Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

AYURVED PATRIKA

1954

G. K. U.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri 079436

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

COMPILED

079436

079436

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोषक्षयजन्य व्याधींचें निदान व चिकित्सा कोठें दिली आहे?

078436 071436

(लेखकः — वैद्य नृसिंहाचार्य बागेवाडीकर, सोलापूर)

आयुर्वेद हा सुमारें सात– आठव्या वर्षापासून उपेक्षिलेला, राजाश्रयाविना पोरका झालेला, भारतांतील राजकीय आंदोलनांनीं छिन्नविछिन्न झालेला, असा आज आमच्या हातांत राहिला आहे. त्याच्या अवयवांची जुळणी करण्यासाठीं हल्लीं सरकार व विद्वान् वैद्यवर्ग प्रयत्न करीत आहे. सरकारनें आयुर्वेदाच्या संशोधनाकरितां केंद्रहि निर्माण केलें आहे. कांहीं संस्था आयुर्वेदाचें संशोधन करीत असल्याचें ऐकिवांत आहे. सभासंमेलनांतूनहि आयुर्वेदाच्या संशोधनाची भाषा ऐकण्यांत येऊं लागली आहे. आयुर्वेदाच्या शिक्षणाचें कार्य कांहीं संस्थांनीं आपल्या शिरावर घेऊन या संस्था आयुर्वेदाच्या अंगोपांगाची वाढ होण्यासाठीं पाश्चात्य वैद्यकांची जोड त्यांस देत आहेत, तर कांहीं संस्था आयुर्वेदाचें शिक्षण घेतलेल्यांची परीक्षा घेऊन प्रमाणपत्रें देत आहेत.

त्रिदोषांच्या ६३ प्रकारांचें शिक्षण

या सर्व संस्था व अखिल भारतांतील विद्वान् वैद्यवर्ग यांना माझी एक नम्र विनंति आहे कीं, आयुर्वेदांतील मूलग्राही जो त्रिदोषसिद्धांत त्याची मांडणी प्रथम करावी; आणि या त्रिदोषांचे जे ६३ प्रकार पाडलेले आहेत त्यांचें शिक्षण आयुर्वेद विद्यालयांतील विद्यार्थ्यांना प्रथम द्यावें. हल्लीं विद्यालयांतून हें शिक्षण दिलें जात नाहीं असा माझा अनुभव आहे.

क्षयजन्य व्याधींचें निदानाचा विचार

याचें कारण चरक, सुश्रुत, वाग्भट इ. ग्रंथांतील निदान किंवा माधवनिदानांतील निदान हे केवल दोषवृद्धिजन्य व्याधींचें आहे. क्षयजन्य व्याधींच्या निदानाचा विचार या ग्रंथकारांनीं केलेला नाहीं. आयुर्वेदाचार्यांनीं रोग म्हणजे दोषवैषम्य (रोगस्तु दोषवैषम्यम्) असें म्हटलें आहे. वैषम्य म्हणजे केवल दोषवृद्धि नव्हे. हल्लीं उपलब्ध असलेल्या ग्रंथांत केवल वृद्धिजन्य व्याधींचें निदान लिहिलें असल्यामुळें रोग म्हणजे दोषवृद्धि (रोगस्तु दोषवृद्धिः) अशी रोगाची व्याख्या करावी लागेल.

ही व्याख्या योग्य आहे कां? याची चर्चा आयुर्वेद संशोधन मंदिरांतील विद्वानांनीं शिक्षण-क्षेत्रांतील तज्ञांनीं, निखिल भारतीय संमेलनाध्यक्षांनीं, प्रांतीय संमेलनाध्यक्षांनीं, विद्वत् परिषदाध्यक्षांनीं किंवा एकांतवासीय विद्वान् वैद्यांनीं करावी अशी माझी त्यांना नम्र सूचना आहे.

आयुर्वेदीय रोगनिदान

वरील विचारसरणीच्या पुष्ट्यर्थ आणखी थोडासा विचार करणें आवश्यक असल्यामुळें तो करीत आहे. आयुर्वेदाचार्यांनीं 'रोगस्तु दोषवैषम्यम्' असें म्हटलें आहे. ही विषमता दोन प्रकारची आहे. १ दोषवृद्धिजन्य २ दोषक्षयजन्य. या व्याख्येप्रमाणें व्याधींचे वृद्धिजन्य आणि क्षयजन्य असे दोन प्रकार पडतात. हे प्रकार चरक, सुश्रुतादि ग्रंथकारांनीं पाडलेले आहेत. (यथा वृद्धैस्तथा क्षीणैर्दोषैः स्युः पंचविंशतिः) याप्रमाणें दोषवृद्धि आणि दोषक्षयजन्य रोगांचें वर्णन ग्रंथांतून असावें; पण तें आढळत नाहीं. केवल दोषवृध्दिजन्य रोगांचें वर्णन लिहिलें गेलें आहे. त्यांच्या कारणांचीहि मीमांसा केलेली आहे. सुश्रुताचार्यांनीं दोषांच्या चय, प्रकोप, प्रसर, स्थानसंश्रय, व्यक्ति आणि भेद या दोषवृध्द्यात्मक अवस्थांचें ज्ञान ज्यांना होतें तो वैद्य असें म्हटलें आहे. चरक, सुश्रुत वाग्भट आणि माधवनिदान या ग्रंथांतून दोषवृद्ध्यात्मक निदान सांगितलें असल्यामुळें वैद्यवर्ग याच दृष्टिकोनांतून रोगनिदान करून चिकित्सा करीत असतो. या व्यवहारावरून रोग म्हणजे दोषवृद्धि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असें आज प्रस्थापित होत आहे.' इकडे विद्वान् वैद्यांनीं, शुद्ध अभ्यासक्रम तयार करणाऱ्यांनीं अवश्य लक्ष द्यावें.

दोष-क्षीणतेनें होणारे रोग

ज्याप्रमाणें दोषवृद्धीनें रोग उत्पन्न होतात त्याचप्रमाणें दोषक्षीणतेनें होतातः- उदा. पित्त क्षीण झालें असतां अग्नि मंद होणें, शरिरांत शीतत्व येणें, प्रभाहानि हीं लक्षणें उत्पन्न होतात. किंवा कफक्षीणतेनें भ्रम इ. लक्षणें होतात. यांना रोग म्हणावयाचें नाहीं कां? दोषांचे विकारात्मक जे ६३ प्रकार पाडले आहेत त्यांत पंचवीस व्याधि दोषवृद्धिजन्य व पंचवीस दोषक्षयजन्य आणि बारा वृद्धिक्षयजन्य आहेत. ही विचारसरणी निदानांत फारशी उपयोगांत आणलेली नाहीं. ज्वररोगांत सान्निपातिक अवस्थेमध्यें वृद्धिक्षयजन्य अवस्थांचा विचार थोडाफार केलेला दिसून येतो, इतर रोगांत या अवस्थांचा विचार केलेला नाहीं. तसेंच दोषक्षयजन्य अवस्थांचा कोठेंच विचार केलेला नाहीं. म्हणून असें समजावयाचें कीं काय दोषक्षय-अवस्था कोणत्याहि रोगांत येत नाहीं? असें जर असेल तर दोषांच्या क्षयजन्य अवस्था कां पाडल्या? या सर्व गोष्टांचा विचार संशोधकांनीं अवश्य करावा असें मला वाटतें.

हे आयुर्वेदीय ग्रंथ एकांगी आहेत

राजकीय आंदोलनांनीं आयुर्वेदीय वाङ्मय नष्ट झालेलें आहे. त्यांत क्षयजन्य व्याधीसंबंधीं वाङ्मय नाहींसें झालें कां? याचा विचार होणें आवश्यक आहे. चरकाचार्यांनीं चिकित्सा म्हणजे "याभिः क्रियाभिर्जायंते शरीरे धातवः समाः। ' सा चिकित्सा विकाराणाम्" असें म्हटलें आहे. या सूत्रावरून पाहतां रोग म्हणजे दोषवैषम्य ही व्याख्या योग्य आहे. पण निदानपंचकांत क्षयजन्य अवस्थांचा विचार आज उपलब्ध असलेल्या आयुर्वेदीय ग्रंथांत केलेला नसल्यामुळें हे ग्रंथ एकांगी आहेत असें म्हणणें भाग पडतें.

अभ्यासक व संशोधक यांना विनंति

वरील मांडणीवरून खालील शंका उत्पन्न होतात त्याची चर्चा संमेलनांतून अवश्य करावी.

१ दोषांच्या क्षयामुळें विकार उत्पन्न होतात कीं नाहीं?

२ क्षयजन्य पंचवीस प्रकार आज कोणत्या विकारांत दिसून येतात?

३ प्राचीन ग्रंथांत क्षयजन्य विकारांचें वर्णन कोठें सांपडतें कां?

४ केवळ वृद्धिजन्य विकारांची चिकित्सा अपुरी वाटते कां?

क्षयजन्य पंचवीस विकारांचा निदानचिकित्सेंत उपयोग करणारी तज्ञ मंडळी असतील तर त्यांनीं आपला अनुभव प्रसिद्ध करावा. क्षयजन्य अवस्थांचा विचार करण्याची आवश्यकता नाहीं असें ज्यांना वाटतें त्यांनींहि आपले विचार वैद्यकीय मासिकांतून मांडावे व माझ्यासारख्या आयुर्वेदाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावें अशी सविनय प्रार्थना आहे.

प्रमाणपत्र

आपण जें जें औषध बनवितो व जनतेस देतो, तें तें प्रत्येक औषध सचोटीचें व गुण देणारें असलें पाहिजे; तरच त्याचें प्रमाणपत्र जनतेकडून आपणास मिळेल. तर अशा गुण देणाऱ्या खऱ्या, अस्सल व ताज्या औषधी खरेदी करण्यास विश्वासपात्र ठिकाण पाहिजे. त्याकरितां आपण

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स

पायधुनी मुंबई नं. ३

(टेलिफोन नं. ३१८५८) यांना लिहा.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात. अधिक माहितीसाठीं कॅटलाग मागवावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मण्डला जिल्ह्यांतील 'गरम पानी'

मध्यप्रदेशांत मण्डला जिल्हा प्राकृतिक सौंदर्याच्या दृष्टीनें श्रेष्ठ मानला जातो. अमरकंटकापासून उगम पावलेल्या पावनी नर्मदामाईचें बाळपणचें क्रीडांगण म्हणजेच प्राचीन काळचें हें माहिष्मती क्षेत्र. जबलपुराहून पुढें भडोचला खंबायतच्या आखातास मिळेपावेतों जवळजवळ एका सरळ रेषेंत वाहणारी नर्मदा, मण्डला जिल्ह्यांत अनेक मंडलें घेत वाहात जाते. खुद्द मण्डला शहराला तिनें तीन बाजूनें वेढलेलें आहे.

औषधी वनस्पतींनीं समृद्ध जिल्हा

अनेक घनदाट अरण्यें, उंच उंच पहाड, नानाप्रकारचे पशूपक्षी यांनीं संपन्न असें मण्डला जनपद अगणित औषधि वनस्पतींनीं समृद्ध आहे. नाना प्रकारच्या अद्‌भुत जडीबुटी येथें सांपडतात. त्यांतच 'तृण ज्योतीष्मती' चा देखील समावेश होतो.

निसर्गाचा वरद हस्त

निसर्गाचा वरद हस्त असलेल्या या भूप्रदेशाचें रमणीयत्व व उपकारकत्व 'गरम पानी' नामक उष्ण झऱ्यानें अधिकच वाढविलें आहे. जबलपुरापासून मण्डल्यास जाणाऱ्या पक्क्या सडकेवर जबलपुराहून ४८ मैलावर व मण्डल्याहून अवघ्या १२ मैलावर सडकेपासून एक फर्लांगावर असणाऱ्या खोऱ्यांत हा 'गरम झरा' आहे. वीस वर्षांपासून येथें असलेल्या एका साधूनें या ठिकाणीं अलिकडे नाना प्रकारचीं फळझाडें व फुलझाडें लावून एक सुंदर उद्यान निर्माण केलें आहे. गरम झरा, लोककर्म (पी. डब्ल्यू. डी.) विभागानें हौदासारखा बांधून काढला आहे. दरवर्षी खोऱ्यांतल्या ओहोळास पावसाळ्यांत पूर आला म्हणजे हें उष्ण झऱ्याचें टाकें रेतीनें भरून जातें. पावसाळा ओसरला म्हणजे येथें रहात असलेला साधु हें टांकें स्वच्छ करतो. त्यांत जाड रेती टाकून तें पाणी नेहमीं स्वच्छ राहील, अशी दक्षता बाळगतो. पाण्याचा झरा अखण्ड आहे. तीन फूटापेक्षां अधिक वर चढलेलें पाणी टाक्यांतून दुसरीकडे वाहून जाण्याची सोय आहे. बाहेर पडलेल्या पाण्यास बांध घालून कपडे वगैरे धुण्यासाठीं वापरावयास हें पाणी सांठविलें आहे.

हिंवाळ्यांत ऊन पाण्याचा आनंद

आपण दिवाळींत पहाटे मंगल स्नान करावयास जितकें ऊनपाणी घेतो तितकें ऊनपाणी या टाक्यांत सदैव असल्यानें हिंवाळ्यांत येथें स्नान करण्याचा आनंद अवर्णनीय आहे. पाण्यांत उतरल्याबरोबर अंगास चटके लागल्याचा भास होतो पण दोन मिनिटांतच पाण्यांत बुडाविलेल्या शरीरास अत्यंत आल्हाद वाटतो. सर्व रोमांध्रांतून एक प्रकारचें स्वेदन होऊन तीं मोकळीं होतात. व शरीरास आणि मनास प्रसन्नता वाटते. श्रांत प्रवाशाचे श्रम व थकवा नाहींशी होतात. रोग्याचा रोग पळून जातो व निरोगी मनुष्य टवटवीत होऊन उत्साहानें ओथंबू लागतो. पाण्यास थोडासा गंधकाचा उग्र वास येतो. तें पाणी पोटांत गेल्यानें पोटांतले विकार नाहींसे होऊन छान भूक लागते. असलें अप्रतिम निसर्गदत्त ऐश्वर्य मंडल्यास लाभूनहि अजून या 'गरम झऱ्यास' मिळावी तशी प्रसिद्धि प्राप्त झालेली नाहीं.

महत्व प्राप्त झालें पाहिजे

आरोग्यदेवतेच्या उपासकांचें आश्रयस्थान म्हणून या स्थानास महत्व प्राप्त झालें पाहिजे. या ठिकाणीं लांबून येणाऱ्या बाहेरगांवच्या रुग्णासाठीं व यात्रेसाठीं निवासस्थानें बांधलीं गेलीं पाहिजेत.

एक अद्‌भुत चमत्कार

गरम झऱ्यापासून केवळ दहा हातावर एक थंड गोड्या पाण्याचें कुंड आहे. त्यांतलें पाणी कितीहि उपसलें तरी कमी होत नाहीं. हाहि एक अद्‌भुत चमत्कार नव्हे कां?

सध्यां रानावनांत राहणाऱ्या आसपासच्या खेड्यापाड्यांतले गोंड लोक कधींकाळीं या गरमझऱ्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर येऊन स्नान करतात व घरीं जातात. कांहीं खाज-खुजली, त्वग्रोग झाला तर या पाण्यांत स्नान केल्यानें बरें वाटतें असा त्यांचा अनुभव आहे. हाच अनुभव वर्षानुवर्षे पिडलेल्या व इंजेक्शनें आणि नाना औषधांच्यापायीं लक्षावधि रुपये पाण्यासारखे खर्च करणाऱ्या भारतीय रुग्णास येणार नाहीं का ?

नाना बापट
वनवासी सेवा मण्डळ, मंडला

तृणज्योतिष्मति

-ः विकत मिळण्याची व्यवस्था ः-

किं. १ तोळयास १ रुपया, टपालखर्च निराळा.

आयुर्वेद सेवा संघ, नाशिक

होमिओपॅथिक संदेशचा वार्षिक अंक

लवकरच प्रसिद्ध होईल !

जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यांत 'होमिओ-पॅथिकसंदेश'चा वार्षिक अंक प्रकाशित होत आहे. त्याची पृष्ठसंख्या १०० पेक्षां जास्त असेल. सदर अंकांत अनुभवी होमिओपॅथिक डॉक्टरांचे लेख, एकांकी नाटक, ज्ञानवर्धक वाङ्मय, शिवाय भरपूर उपयुक्त बातम्या व वृत्त यांनीं हा अंक सुसज्जित केला जाईल.

या मासिकाची वार्षिक वर्गणी ५ रुपये आहे. आजच आपली वार्षिक वर्गणी ५ रुपये पाठवून आपला अंक निश्चित करा म्हणजे विलंबामुळें निराश होण्याची वेळ आपणांस येणार नाहीं.

व्यवस्थापक
' होमिओपॅथिक संदेश '
गंगानिवास, चांदणी चौक, दिल्ली

सूचनाः-नमुना अंकाकरितां आजच लिहा. जाहिराती व अधिक खुलाशासाठीं पत्रव्यवहार करा.

ताजा कलमः—या गरम झऱ्याच्या ' गंधक-पाण्याचा, उपयोग उपचाराच्या दृष्टीनें करून पहाण्याचा इच्छा असल्यास कळवावें. तें पाणी पाठविण्याची व्यवस्था करूं. नाना बापट

जेल-निरीक्षक म्हणून नेमणूक

पंजाब राज्यांत लुधिआना जिल्हा-जेलमध्यें एका ॲलोपॅथिक डॉक्टरचे जागेवर एका आयुर्वेदिक वैद्याची जेलचे बिनसरकारी निरीक्षक म्हणून नेमणूक करण्यांत आली आहे.

आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज

उत्तर प्रदेश सरकारनें आठ लाख रुपये खर्च करून लखनौ येथें एक आयुर्वेदिक तिब्बी मेडिकल कॉलेज व त्याच शास्त्रपद्धतीनुसार चिकित्सा करणारें एक रुग्णालय उघडण्याचें निश्चित केलें आहे.त्यासाठीं व्हिक्टोरिया गंज येथील ' किंग हॉस्पिटल ' हें अधिक सुसज्ज करून त्यास प्रथम श्रेणीच्या हॉस्पटलचा दर्जा प्राप्त करून देण्यांत येईल. ह्यांत ज्या रुग्णांना देशी पद्धतीनें औषधोपचार करण्याची इच्छा आहे त्यांचेकरितां १५० रुग्ण-शय्यांची सोय राहील.

महिला आयुर्वेद विद्यालय, दिल्ली

भारताची राजधानी दिल्ली येथें एक खास स्त्रियांकरितां आयुर्वेद-चिकित्सा-पद्धतीचें शिक्षण देणारें विद्यालय, सब्जी मंडी, बिरला लाइन्स मध्यें असलेल्या आर्यसमाज संस्थेमध्यें उघडण्यांत आलें आहे. आतांपर्यंत या विद्यालयांत १२ विद्यार्थिनी प्रविष्ट झाल्या आहेत.

विद्यालयाची कार्यकारी समिति, विद्यालयाचे उन्नतीकरितां अत्यंत परिश्रम घेत आहे. श्री. टेकचंद नागिया यांनीं विद्यालयाकरितां एक ट्रस्ट स्थापन केला आहे. ह्या विश्वस्तनिधीच्या संचालकांचा असा विचार आहे कीं, ५० हजार रुपये खर्च करून विद्यालयाकरितां एक स्वतंत्र भवन बांधण्यांत यावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आर्ष ग्रंथांतील सूत्रस्थानें

(लेखकः—आयुर्वेदाचार्य वै. माधवशास्त्री जोशी, पुणें)

'सूत्र' शब्दाचा अर्थ 'सूचनात् सूत्रणाच्चैव स्मरणादर्थसंततेः।' असा सुश्रुतानें केला आहे. अष्टांगसंग्रह व वाग्भट यांनीं 'अत्रार्थाः सूत्रिताः सूक्ष्माः प्रतन्यन्ते हि सर्वशः।' अशी व्याख्या दिली आहे. चरकांत सूत्रस्थान ह्या शब्दाची स्पष्ट व्याख्या दिलेली नसली तरी 'श्लोकार्थः संग्रहार्थश्च श्लोकस्थानमतः स्मृतम्।' असें म्हटल्यानें वरील दोन्ही ग्रंथकारांनीं केलेल्या अर्थाला बाध येत नाहीं. वरील व्याख्येवरून व चारहि ग्रंथकारांनीं केलेल्या ह्या स्थानांतील विवेचनावरून असें दिसून येईल कीं, वरील सर्व ग्रंथकारांनीं केलेली सूत्रस्थानाची योजना पुढें विस्तारानें सांगितल्या जाणाऱ्या निदान, चिकित्सा, शल्य, आदि शालाक्य विषयांची बैठक समजावून देण्याकरितां लागणारी पूर्वतयारी म्हणूनच होती.

कायचिकित्सेची पूर्वतयारी

अष्टांगहृदय व सुश्रुतसंहिता ह्यांनीं सूत्रस्थानांत सांगितलेले अध्याय जर आपण पाहिले तर आपल्याला त्याची पूर्ण कल्पना येईल. वाग्भटानें लिहिलेल्या तीस अध्यायांतील यंत्र, शस्त्र, क्षार, या विषयावरील ३-४ अध्याय सोडले तर बाकी सर्व कायचिकित्सेची पूर्वतयारी म्हणूनच विषयाचें प्रतिपादन आहे. सुश्रुतानें लिहिलेल्या शेहेचाळीस अध्यायांपैकीं २८ ते ३२ हे पांच अध्याय रिष्टलक्षणांचें वर्णनात्मक म्हणून सोडले तर बाकीच्या ४१ अध्यायांपैकीं तेवीस अध्याय शल्यशालाक्याच्या पूर्व तयारीचे विषय म्हणून प्रतिपादिले आहेत. चरकानें सर्व अध्याय कायचिकित्सेचे म्हणूनच लिहिले आहेत व त्यांची विभागणी सात प्रकारानें केली आहे. वाग्भटानें चरकाचाच क्रम स्वीकारला, परंतु त्यांत विस्तारानें सांगितलेल्या गोष्टी संक्षेपांत आणल्या.

तत्वांत फरक नाहीं

ह्या चारहि ग्रंथकारांनीं आपल्या ग्रंथाची रचना स्वतंत्र बुद्धीनें केली असल्यानें प्रतिपाद्य विषयाच्या क्रमांत फरक येईल. पण तत्वांत फरक येणार नाहीं. चरकामध्यें 'धातुसाम्यक्रिया चोक्ता तंत्रस्यास्य प्रयोजनम्' असें म्हटलें असलें तरी त्यांनीं 'दोषसाम्यमरोगता' ह्या वाग्भटवचनाला मुळींच बाध येत नाहीं. कारण चरकानें धातु शब्द 'दोषधातुमल' अशा अर्थानें तेथें वापरला आहे. किंवा वातपित्तकफ हे तीन दोष असतांना सुश्रुतानें चवथा रक्तदोष मानला तर त्यांत फारसें बिघडत नाहीं. रक्ताचा महिमा फक्त देहधारकत्वापुरताच सुश्रुतानें मान्य केला आहे. चक्रपाणीच्या टीकेंत त्याचा उल्लेख आहे. (अ. २१)

चरकसूत्रस्थानाचे ७ विभाग

प्रतिपाद्य विषयाचे निदान चिकित्सोपयोगी विभाग पाडणें अवश्य असतें, म्हणूनच चरकानें आपल्या ग्रंथांत त्याचे विभाग पाडलेले आहेत. तसे सुश्रुत आणि वाग्भट ह्यांत पाडलेले नाहींत. चरकानें पाडलेले विभाग असेः— (१) भेषज (२) स्वस्थवृत्त (३) निर्देशक (४) उपकल्पन (५) रोगाध्याय (६) योजना (७) अन्नविषयक. प्रत्येक विभाग ४ अध्यायांचा आहे. शेवटचे २ अध्याय स्वतंत्र आहेत. त्यामध्यें वैद्यवर्णन व शारीरोपयोगी वर्णन आहे..

सुश्रुतांतील १८ अध्याय

सुश्रुत शल्यप्रधान ग्रंथ असल्यानें त्यांत फक्त १८ अध्याय काय-चिकित्सोपयोगी आहेत. त्यापैकीं स्वस्थवृत्त २ (६), रोगाध्याय ३ (१५, २१, २४) रोगपरीक्षा १ (३५), भेषजकल्प व अन्नविषयक (३७ ते ४२, ४५, ४६) उपकल्पन (४३, ४४,) व सुरवातीचे दोन अशी विभागणी पडते.

वाग्भटांतील क्रम

वाग्भटाचे १ ते ४ व ८ स्वस्थवृत्त, ५ ते ७ अन्नज्ञान, ९, १०, १५ द्रव्य, ११ ते १४ निदान-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चिकित्सा (रोगाध्याय) १६ ते २४, उपकल्पना, त्यापैकीं १६ ते २० शोधनकर्म (पंचकर्म) याकरितां असून पुढील धूमगंडूषकवलाश्चोतन ह्याकरितां लिहिले गेले आहेत. पंचवीस ते तीस हे पांच अध्याय यंत्र-शस्त्रशिरादि वर्णनांत घातलेले आहेत.

अष्टांगसंग्रहांतील क्रम

अष्टांगसंग्रहांतील क्रम वाग्भटाप्रमाणेंच असून त्यांत जास्त फक्त द्रव्यगुणाचे कांहीं व इतर असे एकंदर दहा अध्याय आहेत. ह्यापैकीं विषय प्रतिपादन करण्याचे दृष्टीनें वाग्भटानें जरी नांवें देऊन विभाग पाडले नसले तरी एकंदर विषयाची मांडणी तशीच आणि व्यवस्थित आहे

त्यांत क्रम राहिलेला नाहीं

सुश्रुतानें आपल्या प्रतिपाद्य विषयांची पूर्वतयारी म्हणून विवेचन केलें आहे खरें. पण त्यांत क्रम राहिलेला नाहीं. यंत्रपरिचय झाल्यावर ऋतुचर्याध्याय आहे. दोषधातुमलविज्ञान पंधराव्या अध्यायांत सांगून झाल्यावर लगेच कर्णव्यधविधीचा विचार केला आहे. नंतरचे पांच अध्यायांत शस्त्रकर्माला उपयोगी असे अध्याय लिहून एकविसाव्या अध्यायांत व्रणप्रश्न-निमित्तानें दोषांची विस्तृत माहिती दिली आहे.

सांडु
टोमॅटो कम्पाउन्ड
• व्हिटॅमिनयुक्त टॉनिक
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द. कृ. सांडु ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई
[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स–
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

चिकित्सेचीं मूलतत्त्वें

पुढें प्रतिपाद्य विषयापैकीं चिकित्साविषयक भागाची मुख्य तत्वें वाग्भट व चरकच्या ह्या सूत्रस्थानामध्यें सांगितलीं आहेत. म्हणून ह्या ग्रंथांतील सूत्रस्थानांना आयुर्वेदीय चिकित्सेचीं मूलतत्वें सांगणारें स्थान म्हटलें तर चूक होणार नाहीं. वाग्भटाचें तेरावा व चवदावा अध्याय आणि चरकांतील चिकित्साप्राभृतीय व लंघन-बृंहणीय असे दोन अध्याय उदाहरण म्हणून दाखवितां येतील. इतर अध्यायांतून देखील वचनें कोठें कोठें सांपडतील, पण बहुतेक वचनें ह्यांच चार अध्यायांत सांपडतील. शोधनाचा चिकित्सेंत उपयोग वाग्भटानें चवथ्या अध्यायांत वर्णन केला आहे तर योग्य प्रमाणें अन्न पचविण्याला लागणाऱ्या शरीरांतील अग्नीचें विवेचन चरकानें सव्विसाव्या अध्यायांत केलें आहे.

चिकित्सेंतील मर्में कळतील

ही आयुर्वेदीय चिकित्सेची मूळ बैठक पक्की झाल्याशिवाय पुढील चिकित्सा व उत्तरस्थान समजावयाचें नाहीं. त्या ठिकाणीं चिकित्सेची सांगितलेलीं सूत्रें रोगांत कशीं वापरावयाची ह्याचा ऊहापोह केला आहे. उदाहरणार्थ, ज्वरांमध्यें व आमवातामध्यें आमाची दुष्टि होऊन रोग होतात असें सांगितलें असतां 'आम' ही शास्त्रीय संज्ञा वापरली तिचा अर्थ काय हें सूत्रस्थान शिकलें तरच समजणें शक्य आहे. 'संशाम्यापां धातुरग्निं प्रवृध्दः।' हें अतिसारांतील संप्राप्तिवचन वाचलें म्हणजे 'अग्निं संशम्य' ह्यामध्यें सांगितलेला 'अग्नि' म्हणजे काय हें कळावयाला मात्राशितीय अध्यायच लक्षांत असला पाहिजे. 'विप्रान् गुरून् धर्षयतां पापं कर्म च कुर्वताम्।' हीं कुष्ठांतील कारणें चरकाच्या सूत्रस्थानांतील प्रज्ञापराध हें कारण समजल्याशिवाय कळावयाचें नाहीं. सूत्रस्थानांत सांगितलेलीं हीं तत्वें प्रथम चांगलीं समजून घेतलीं तरच चिकित्सेंतील मर्में कळतील, किंबहुना निम्मी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चिकित्सा आली असें म्हणावयास हरकत नाहीं.

श्लोक देऊन स्पष्टीकरण

हाच मुद्दा कांहीं श्लोक देऊन स्पष्ट केला असतां मी वरील केलेल्या विधानाची सयता पटेल. 'समाप्यते स्थानमिदं हृदयस्य रहस्यवत्' ही वाग्भटोक्ति वरील विधानाला पुष्टी देणारी आहे. कांहीं ग्रंथोक्त श्लोक देऊन स्पष्टीकरण केलें तर समजण्यास सोपें जाईल असें वाटतें.

चिकित्सेंत शोधनाचें महत्त्व

१) दोषाः कदाचित् कुप्यन्ति जिताः लंघनपाचनैः ।
ये तु संशोधनैः शुद्धाः न तेषां पुनरुद्भवः ॥
—वाग्भट सू. अ. ४, २७

दोषाणां च द्रुमाणां च मूलेऽनुपहृते सति ।
रोगाणां प्रसवानां च गतानामागतिर्ध्रुवा ॥
चरक सू. अ.

१) सर्व रोगांच्या चिकित्सेचें मूलभूत असें हें तत्व आहे. शोधन व शमन असे दोन चिकित्सेचे भेद असले व त्यांचीं द्रव्येंहि भिन्न असलीं आणि दोहोंचा परिणाम रोग नाहींसा होण्याकडे होत असला तरी शमनापेक्षां शोधनालाच महत्व जास्त आहे. चरकानें उदाहरण घेऊन ही गोष्ट स्पष्ट केली आहे. चिकित्सेंतील अर्धे अधिक काम शोधनानेंच होतें. प्रत्येक रोगांतील चिकित्सासूत्राकडे नीट बारकाईनें बघितलें तर त्यांत शोधनांतील कोणता तरी एखादा प्रकार सांगितला असल्याचें दिसून येईल. सर्व धातु क्षीण झालेल्या क्षयरोगांतहि 'ऊर्ध्वाधः शोधनं कुर्यात् यक्ष्मिणः पालयन् । बलम्' असें सांगितलें आहे. एकच अपवाद सर्व रोगांत आहे. तो म्हणजे ऊरुस्तंभ. त्यांत कोणतीहि शोधनचिकित्सा करण्याचा निषेध सांगितला आहे. शोधनचिकित्सेनें मलरूप दोष शरीराबाहेर निघून जातात. एकदां बाहेर पडलेले दोष पुन्हा येण्याची शक्यता नसते. म्हणून अशी चिकित्साच यशस्वी होते.

सुधारून वाढविलेली नवीन आवृत्ति, वैद्य, विद्यार्थी व सामान्य लोक यांस अत्यंत उपयोगी. सुलभ रीतीनें रोगांची माहिती व उपचार सांगणारें पुस्तक.
किं. ६ रु. **सिद्धौषधि प्रकाश** पो. ख. नि.
लेखक:- वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी
मिळण्याचीं ठिकाणें:-(१) द. वा. शेंड्ये २८ शुक्रवार, पुणें २ (२) आयुर्वेदीय औषधी भांडार, २५५ गिरगांव, मुंबई ४ (३) वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

अपथ्य क्रमाक्रमानें सोडावें

२) पादेनापथ्यमभ्यस्तं पादपादेन वा त्यजेत् ।
निषेवेत हितं तद्वत् एकद्वित्र्यन्तरीकृतम् ॥
वाग्भट सू. अ. ७

२) चिकित्सा करतांना रोग्यानें कोणत्या तऱ्हेचें कुपथ्य केल्यामुळें रोग वाढला इकडे लक्ष देणें जरूर असतें. असें केलेलें कुपथ्य रोग्याला एकदम सोडावयास सांगितलें तर त्याला त्रास होईल. तेंच क्रमानें सोडावयास लावलें तर त्याला मानसिक आनंद होऊन रोगपरिहारालाहि मदत होईल. समजा, धूम्रपान करून एखाद्याला कफविशिष्ट रोग झाले किंवा पित्तवर्धक पदार्थ खाऊन अम्लपित्त झालें तर ते रोग वाढविणारे पदार्थ एकदम सोडावयास न सांगतां क्रमाक्रमानें सोडावयास सांगावे. त्याचप्रमाणें जे हितकारक पदार्थ खावयाला सांगावयाचे तेहि असेच हलके हलके वाढविण्यास सांगावे. पिंपळी, बिब्बा, लसूण इत्यादि औषधींचे जे वर्धमान योग सांगितले त्याचें इंगित वरील सूत्रांतच आहे. 'असात्म्यजाः हि रोगाःस्युः सहसा त्यागशीलनात्' हें वाग्भटांत इतरत्र सांगितलेलें सूत्र येथेंहि लागू पडेल.

शरीराचे तीन खांब

३) आहारशयनाब्रह्मचर्यैः युक्त्या प्रयोजितैः ।
शरीरं धार्यते नित्यमागारमिव धारणैः ॥
वाग्भट सू. अ. ८

३) निरोगी अवस्थेंत पाळावयाच्या नियमांचें हें सूत्र असलें तरी त्याचा चिकित्सेकडे बराच उपयोग होणार हें लक्षांत ठेवावें. रोगनिदान करतांना रोग्याच्या आहारांत अपथ्यकारक कोणते बदल झाले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व त्यांचा परिणाम शरीरावर काय झाला, त्यामुळें कोणते दोष बिघडले ह्या गोष्टी विचारांत घ्याव्या लागतात. घेतल्या जाणाऱ्या आहारानेंच सर्व धातुपुष्टि व शरीराचे रोजचे व्यवहार होत असल्यानें त्या आहारांत जर कमी अधिक बदल झाला तर दोष व धातुदुष्टीचीं लक्षणें, रोगाचीं पूर्वरूपात्मक किंवा संपूर्ण लक्षणें दिसूं लागतील. प्रत्येक रोगाच्या चिकित्सेमध्यें आहाराच्या विचाराला महत्व आहे. तीच गोष्ट झोंप व स्त्रीपुरुष-संबंध ह्यांचेविषयीं लक्षांत ठेवणें हिताचें आहे.

रोगी अवस्थेंत अग्नीचें महत्व

४) बलमारोग्यमायुश्च प्राणाश्चाग्नौ प्रतिष्ठिताः।

चरक सू. अ. २७

४) अग्नि म्हणजे अन्न पचविणारा. त्याचें महत्व शरीरांत रोगी व निरोगी अवस्थेंत बरेंच आहे. निरोगी अवस्थेंत तो शरीराचें रक्षण करतो, अन्न पाचन करून धातु वाढवितो आणि रोगी अवस्थेंत शरीराच्या नेहमींच्या क्रिया बिघडवून धातूंची शक्ति कमी करतो. सर्व रोगांमध्यें अग्नीची क्रिया बिघडणें व त्याचा परिणाम म्हणून आमावस्था किंवा अन्नाचें आमांत रूपांतर होणें ही क्रिया प्रामुख्यानें असते. रोगाः सर्वेऽपि मंदेऽग्नौ हें विधान खोटें नाहीं. अग्नि योग्य स्थितींत असला म्हणजे अन्नाचें पचन उत्तम तऱ्हेनें होतें. 'औदर्यो भगवानग्निः ईश्वरोऽन्नस्य पाचकः' शरीराच्या क्रिया व खाल्ला जाणारा आहार ह्यांचा समतोलपणा असेल तरच अग्नीची स्थिति चांगली राहील. शरीरांतील अग्नि चांगला असून माणसाच्या दोषानें जास्त अन्नाचा ताण त्याच्यावर पडला तर त्या अग्नीला अन्न पचविण्याचें काम करणें अवघड जातें व त्यामुळें अग्निमांद्य नांवाचा रोग निर्माण होतो. म्हणून 'अग्निमूलं बलं पुंसां' हें वचन लक्षांत ठेवावें. रोगामध्यें चिकित्सेच्या दृष्टीनें विचार करतांना अग्नीचा विचार करावयास सांगितला आहे.

अग्नीची निरनिराळी शक्ति

असा हा अग्नि प्रत्येकाचें शरीरांत असून त्याची शक्ति मात्र निरनिराळी असते. दोन निरनिराळे एकाच धर्माचे व प्रकृतीचे पुरुष घेतले तरी त्यांच्या शारीरिक क्रियांच्या होणाऱ्या फरकांमुळें अग्नि मंद किंवा तीक्ष्ण होतो. ह्या फरकाचा विचार चिकित्से-मध्यें विशेषतः अग्निवैषम्यामुळें होणाऱ्या विकारांत करावा लागतो. त्याचप्रमाणें ऋतुभेदानेंहि अग्नीच्या शक्तीमध्यें फरक होतो. हेमंतऋतूमध्यें 'पक्ता भवति हेमंते मात्राद्रव्यगुरुक्षमः।' केलेलें अग्नीचें वर्णन चिकित्सेतें उपयोगी पडतें. अग्नीचें अधिष्ठान असलेली ग्रहणी बिघडून ज्यावेळीं तो रोग निर्माण होतो त्या-वेळीं अग्नीचें महत्व लक्षांत येतें. प्रत्येक माणसानें अग्नि सांभाळला तर ग्रहणीविकार होणार नाहींत. एवढेंच नव्हे तर विरुद्ध अन्न, गुरुलघु अन्न ह्यांचा विचार करावयालाहि नको. वाग्भट ग्रहणीचिकित्सेचे शेवटीं म्हणतात 'एतत् प्रकृत्यैव विरुद्धमन्नं संयोगसंस्कारवशेन चेदम् एतावविज्ञाय यथेष्टचेष्टाः चरन्ति यत्साऽग्निबलस्य शक्तिः॥ वरील सर्व विवेचनावरून अग्नीचें सांगितलेलें महत्व यथार्थ आहे हें लक्षांत येईल.

आम शब्दाची संपूर्ण कल्पना

५) ऊष्मणोऽल्पबलत्वेन धातुमाद्यमपाचितम्।
दुष्टमामाशयगतं रसमामं प्रचक्षते॥

वाग्भट सू. अ. १३

५) आमाची व्याख्या चिकित्सेमध्यें वारंवार उपयोगी पडते. कारण दोष साम आहेत किंवा निराम आहेत ह्यांवरच पुढील चिकित्सा अवलंबून असते. ज्वरामध्यें सामावस्था असतांना औषध द्यावयाचें नाहीं हें सूत्र लक्षांत ठेवतांना साम शब्दाची व्याख्या व लक्षणें लक्षांत आणावीं लागतात. त्याचप्रमाणें आमवातव्याधीमध्यें 'वायुना प्रेरितो ह्यामः श्लेष्म-स्थानं प्रधावति' ह्या संप्रातीचें विवेचन करतांना आम शब्दाची संपूर्ण कल्पना येणें अवश्य असतें.

विशुद्ध प्रयोग व अशुद्ध प्रयोग

६) प्रयोगः शमयेद्व्याधिं नोऽन्यमन्यदुदीरयेत्।
नाऽसौ विशुद्धः शुद्धस्तु शमयेत् यो न कोपयेत्॥

६) हें सूत्र पुढें चिकित्सा कोणत्या प्रकारें केली असतां यशस्वी होते, याचें सूचक आहे. एक रोग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जाऊन त्याचे जागीं दुसरा रोग त्रास देणारा (उपद्रवात्मक) होतो तो होऊं नये. हल्लीं पुष्कळ वेळां असें आढळून येतें कीं एक रोग बरा झाल्यासारखा होतो, पण तो बीजरूपानें राहून पुन्हां उलटतो. किंवा दुसरा त्याच दोषांचा व्याधि उत्पन्न करतो. अशा प्रकारची चिकित्सा ही खरी चिकित्सा होऊं शकत नाहीं हें दाखविण्याकरितां हें सूत्र आहे.

स्नेहस्वेदाचें महत्व

७) स्नेहस्वेदावनभ्यस्य कुर्यात् संशोधनं तु यः ।
दारुशुष्कमिवानामे शरीरं तस्य दीर्यते ॥
वाग्भट सू. अ. १८

७) पुढील चिकित्सेंत वारंवार प्रत्येक रोगांत संशोधन किंवा पंचकर्मचिकित्सा सांगितली आहे. त्या पंचकर्मांची चिकित्सा यशस्वी व्हावी म्हणून पूर्वी स्नेह व स्वेद करावे. त्यानें इतरत्र विखुरलेले दोषरूप मल कोठ्यांत आणले जातात व बाहेर काढण्यास सोपे जातात. म्हणून स्नेहस्वेदाचें महत्व प्रतिपादन करणारा हा श्लोक लक्षांत ठेवला म्हणजे चिकित्सेचे वेळीं अडचण पडत नाहीं.

शल्यचिकित्सेंतील महत्वाचा श्लोक

८) आमं विपच्यमानं च सम्यक् पक्वं च यो भिषक् ।
जानीयात् स भवेत् वैद्यः शेषास्तस्करवृत्तयः ॥
सुश्रुत सू. अ. १७

८) शल्य-प्रधान असलेल्या सुश्रुत ग्रंथांतील हा महत्वाचा व पायाभूत श्लोक आहे. व्रण किंवा जखमा होण्यापूर्वी शरीरांतील दोष बिघडून सूज मुख्य असलेल्या ग्रंथी, विद्रधि किंवा तत्सम, कातडीवर गांठीचे आकाराचे होतात. ते फोडल्याशिवाय त्यांचे आंत असणारा निचरा होत नाहीं म्हणून ते केव्हां फोडावयाचे ह्याचें निदर्शक म्हणून हा श्लोक आहे. ह्याचीं आम, पच्यमान व पक्व लक्षणें ग्रंथांत सांगितलेलीं आहेत. तीं लक्षांत घेऊन तो विद्रधि केव्हां फोडावयाचा हें शल्यकोविदानें ठरवावयाचें आहे. ग्रंथिप्रधान शस्त्रसाध्य रोगांत ह्या सूत्राचा बराच उपयोग होईल.

युक्तीचें चिकित्सेंतील स्थान

९) मात्राकालाश्रया युक्तिः सिद्धिर्युक्तौ प्रतिष्ठिता ।
तिष्ठत्युपरि युक्तिज्ञः द्रव्यज्ञानवतां सदा ॥
चरक सू. अ. २

९) चिकित्सेमध्यें लागणाऱ्या द्रव्यांची गुणधर्मांचे दृष्टीनें माहिती असणें ह्यापेक्षांहि त्यांची योग्य ठिकाणीं योजण्याची कल्पना असणें हें चिकित्सेच्या यशस्वितेचें गमक आहे. व्याधीचें स्वरूप, त्यांतील दोषांचें आधिक्य, रोग्याचें बल इत्यादि सर्व लक्षांत घेऊन औषधयोजना केली तरच ती यशस्वी होते. स्तंभक औषधांनीं बऱ्या होणाऱ्या ग्रहणीरोगावर हिरडा कार्यकारी होतो हें त्या द्रव्याच्या गुणांत वाचलें तरी त्याचा उपयोग ग्रहणीच्या कोणत्या अवस्थेंत करावयाचा ही युक्ति कळलेली असली म्हणजेच ती चिकित्सा यशस्वी होते.

" सूत्रस्थाने तु वाग्भटः "

सारांश युक्ति म्हणजे योजना हेंच द्रव्य वापरण्याचें महत्वाचें अंग आहे. हें चिकित्सकानें विसरूं नये. चिकित्सेमध्यें प्रत्येक वेळीं आपल्यापुढें हा प्रश्न उभा राहतो व त्यावेळीं गोंधळून गेलें नाहीं तरच ती चिकित्सा यशस्वी होते. अशा रीतीनें सूत्रस्थान म्हणजे पुढें विस्तारानें सांगितलेल्या निदान चिकित्सेचीं मूलतत्वें सांगितलेला विभागच होय हें लक्षांत येईल. हा मूलभूत पाया तयार झाला तरच पुढें चिकित्सा करण्यास सोपें जाईल. त्या दृष्टीनें सूत्रस्थानाचें महत्व प्रत्येकाला पटलें व त्यानें सूत्रस्थानें नीट वाचलीं तर उपयोग होण्यासारखा आहे. सर्व तिन्ही ग्रंथांत वाग्भटानें लिहिलेलें सूत्रस्थान, योग्य, थोडकें, मार्मिक, सर्व विषयांचा संग्रह केलेलें, मांडणी नीट व सोप्या रीतीनें समजेल अशी केलेली व श्लोकबद्ध रचना असलेलें आहे. म्हणूनच ' सूत्रस्थाने तु वाग्भटः ' असें म्हटलेलें आहे. त्या ग्रंथांतलि सूत्रस्थानाचें अध्ययन प्रत्येक वैद्यक जाणूं इच्छिणारानें प्रथम करावें अशी विनंति केल्यास अस्थानीं होणार नाहीं. ॥ वंदेऽश्विनौ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६० वर्षांचे जुने सुप्रसिद्ध व विश्वसनीय औषधी-निर्माते

उंझा फार्मसी लिमिटेड उंझा, (उत्तर गुजरात)

.... कांहीं लोकप्रिय औषधें ....

सर्वांकरितां— 'नवरत्न-रस' — * स्त्रिया, पुरुष, बालक या सर्वांकरितां ही महौषधी आहे. रस-रक्तादि सप्त धातूंची शुद्धि, वृद्धि व पोषण करणें हें 'नवरत्न रसाचें' विशेष कार्य आहे. निरोगी लोकांस रसायन व रुग्णांना उत्तम औषध आहे. किं. २८ गोळ्याचे ५ रु.

स्त्रियांसाठीं— 'सुंदरी-संजीवनी' — * स्त्रियांचे प्रदर, ऋतु दोष, गर्भाशयविकार, वंध्यत्व आदि नष्ट करून शक्ति येतें. स्त्री-रोगावर हें अमृततुल्य औषध आहे. किं. ४ औंस २ रु.

मलेरियांवर— 'एरल्टो पिल्स' — * ह्या गोळया सप्तपर्ण, कालमेघ, कुटकी आदि वनस्पतींच्या घन सत्वापासून बनविल्या आहेत. ह्या गोळया मलेरिया, शीतज्वर ह्या तापांवर अत्यंत गुणकारी असल्याचें सिद्ध झालें आहे. किं. ५०० गोळया (१० तो.) ३॥ रु.

आंव व मुरड्यावर— 'अँटी-डिसेंट्रॉल' — * ही पर्पटी इंद्रजव, कुटजत्वक्घन, बिल्व, कापूर, अफू ह्या औषधी द्रव्यांच्या संयोगापासून बनविली आहे. ही जुनाट आव, मुरडा, संग्रहणी ह्यावर अतिशय गुणकारी आहे. पहिल्याच दिवशीं गुण दिसूं लागतो. १ बा. १ रु.

लहान मुलांकरितां— 'शिशु-संजीवनी' — * लहान मुलांचा ताप, हगवण, दूध न पचणें, खोकला वगैरेंवर उत्तम औषध. मुलांना नियमित दिल्यानें मुलें बाळसेदार व धष्टपुष्ट होतात. १ बा. ·॥· रु.

सायरप— 'शंख-पुष्पी' — * स्मरणशक्तिवर्धक व ज्ञानतंतूना बलदायक असें हें उत्तम ब्रेन-टॉनिक आहे. विद्यार्थी, कारकून, वकील, प्रोफेसर, अधिकारी वगैरे मेंदूचीं कामें करणाऱ्या लोकांना हें अत्युत्तम औषध आहे. १ बा. १। रु.

'अष्टावक्र-रस' — * वलिपलितनाशक, बलवर्धक, पौष्टिक, आरोग्यरक्षक व बुद्धि आणि कांति-वर्धक असें आयुर्वेदीय औषध आहे. किं. १ तो. ४० रु.

'बृहत्कस्तुरीभैरव' [स्वर्णयुक्त] — * सन्निपात, आंत्रिकज्वर, वातज्वर, कफज्वर आणि वातकफज्वर ह्या तापांत उत्तम उपयोगी आहे. तसेंच मंथरज्वर व न्युमोनिया यांतहि हा योग सत्वर गुण देतो. किं १ तो. १८ रु.

'बृहत् वातचिंतामणी' — * आयुर्वेदांतील वातरोगांवर हें एक दिव्य औषध आहे. हृदयाला व मेंदूला बल देणारें आहे. मेंदूच्या ज्ञानतंतूच्या विकृतीमुळें उद्भवणाऱ्या सर्व विकारावर उत्तम गुणदायी आहे. मेंदूची क्षीणता, रक्तदाब, हिस्टेरिया वगैरेवरहि लाभदायक आहे. किं. १ तो. ३५ रु.

उंझा फार्मसी लि. उंझा [उ. गुजरात]

महाराष्ट्र एजंटः— **जयंत अँड कंपनी, लक्ष्मीरोड, पुणें सिटी.**

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मानसिक विकार

शारीरिक रोगाइतकेंच मानसिक रोगांना महत्व आहे

(लेखकः—डॉ. प्र. शं. गुप्ते एम्. बी. बी. एस्. नासिक)

मानासिक विकारांविषयीं कांहींहि लिहिण्यापूर्वी मन म्हणजे काय ह्याची कल्पना आपणास असणें आवश्यक आहे. मन ही अवस्था काय आहे ह्याबद्दल मनोविदामध्यें मतैक्य नाहीं. अनुभवाच्या दृष्टीनें मनाच्या दोन अवस्था आपल्या डोळ्यासमोर उभ्या राहतात. एक स्वास्थ्य-स्थितींतील मन व दुसरें विकृतस्थितींतील मन. इतर पांच ज्ञानेंद्रियें जशीं दृश्य तसें मन हें दृश्य होऊं शकत नाहीं. ज्याअर्थी तें आपण निरनिराळ्या दोन अवस्थेंत अनुभवतो, त्याअर्थी मन हें शरीरांतील विशिष्ट अवस्था आहे ह्यांत शंका नाहीं. हिंदु अध्यात्मशास्त्रांत, मन हें ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियांप्रमाणें एक सूक्ष्म इन्द्रिय समजलें जातें व त्याचें विश्वांतील स्थान असें आहेः—

- प्रकृति
  - बुद्धि
    - अहंकार
      - व्यक्त इन्द्रियें
        - पांच ज्ञानेंद्रियें
        - पांच कर्मेन्द्रियें
      - सूक्ष्म इन्द्रिय
        - मन

आधुनिक शास्त्रज्ञांच्या मतें

आधुनिक मानसिक शास्त्रांत कांहीं शास्त्रज्ञ, मन ही कांहीं निराळी शक्ति किंवा चीज आहे असें समजत नाहींत. त्यांच्या मतें, ज्याला आपण मानसिक क्रिया म्हणतो त्या सर्व मज्जातन्तुसंस्थे (Nervous System) मध्यें उद्भवतात. त्यांत विचारशक्ति, स्मरणशक्ति, ज्ञानेंद्रियांनीं होणारें ज्ञान, अनुभव, मनोविकार वगैरे क्रियांचा समावेश होऊन शिवाय व्यक्त क्रियांचाहि (चालणें, बोलणें, लिहिणें वगैरे यांचा) अन्तर्भाव होतो.

संकलित परिणाम म्हणजे मन

मज्जातंतु-संस्थेंतील कार्यांमुळें उत्पन्न होणारा एक प्रकारचा संकलित परिणाम म्हणजेच मन असें मी समजतों. ज्ञानेंद्रियांचा राजा म्हणून हें एक मुख्य सहावें ज्ञानेंद्रिय समजावें. योगी पुरुष जे अजब व आश्चर्यकारक प्रयोग करून दाखवितात त्यांची मीमांसा विज्ञानशास्त्राच्या आज विदित असलेल्या नियमांनीं होऊं शकत नाहीं. मनुष्याच्या ह्या सहाव्या इंद्रियाचा जसजसा विकास होत जाईल तसतसे त्याचे नियम अवगत होत जातील हें मात्र निश्चित.

अजाणतेनें समतोलपणा

जाणीव (अभिज्ञान Consciousness) होण्यास मन, बुद्धि व अहंकार (ego-Individuality) ह्यांची जरुरी आहे. शरीराच्या कांहीं क्रिया आपण जाणीवतेनें करतो-जसें खेळणें, व्यायाम करणें. जीवन धारण करण्याकरितां लागणाऱ्या अत्यंत अवश्यक क्रिया, ह्या न कळत चालू असतात- जसें पचन, रक्ताभिसरण. अतिशय सरावामुळें जाणीवतेनें केलेल्या क्रिया पुढें आपण अजाणतेनें करीत असतो. सायकल चालवित असतांना आपण आपला समतोलपणा अजाणतेनें ठेवित असतो.

बाह्य चेतनामुळें मनाची नियमबद्ध वागणूक

व्यक्तीच्या सर्व क्रिया अन्तर किंवा बाह्य चेतनांनीं किंवा हेतूंनीं घडून येतात. तहान, भूक, विषयवासना व इतर मनोविकार ह्या अन्तश्चेतना होत. उष्णता, थंडी, वारा, स्तुति, निंदा वगैरे ह्या बाह्य चेतना होत. अतिसूक्ष्म अशी एकदेशी (अमीबा)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्राण्यापासून ते मनुष्य प्राण्यांपर्यंत सर्वांच्या क्रिया ह्या चेतनांमुळें घडून येतात, हें वाचकांच्या लक्षांत येईल. व्यक्तीची जगांतील वागणूक स्वास्थस्थितीतील मनाच्या संकलित व नियमबद्ध क्रियांमुळें सुसंबद्ध असते.

मनाची कसरत

स्वास्थस्थितींत व्यक्तीच्या सर्व क्रिया त्यांच्या कल्याणार्थ किंवा सुखासमाधानासाठीं समाजाला, भोंवतालच्या परिस्थितीला (Environment) व जीवनाला धरून चालल्या असतात. ह्या सर्व गोष्टींना तोंड देणें ही मनाची एक प्रकारची कसरत आहे. एखादा मनुष्य हळवा असतो व त्याच्या आयुष्यक्रमणांत त्याला थोडासाहि विरोध झाला तरी त्याच्या मनाचा तोल जाऊन त्याला मानसिक विकार जडतो. बेरड वृत्तीचा मनुष्य येणाऱ्या परिस्थितीला तोंड देऊन आपला मार्ग काढीत असतो.

मानसिक विकाराचीं अनेक कारणें

ह्यावरून समजून येईल कीं मानसिक विकार उत्पन्न होण्याचीं अनेक कारणें असूं शकतील. प्रत्येक मानसिक विकारांत मज्जातन्तु संस्थेंत संप्राप्तिक (Pathological) फरक घडून येत असला पाहिजे असें शास्त्रज्ञांचें म्हणणें आहे. परंतु प्रत्येक विकारांत सध्यांच्या आपल्या उपलब्ध असलेल्या साधनांनीं मेंदूतील विकृत फरक आपल्याला दिसून येईलच असें नाहीं.

शारीरिक रोगामुळें मेंदूवर परिणाम

शारीरिक रोगांमुळें मेंदूवर परिणाम होऊन मानसिक विकार होतात. ज्वरानें किंवा मूत्रविषरक्तमयानें (Uremia) मनुष्याला वात होऊन तो बरळतो, उगीच ऐकल्यासारखें करतो (Auditory Hallucination), त्याला वेडेंवाकडें भयानक दिसतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे वातामुळें ज्ञानेंद्रियांवर आणि कर्मेन्द्रियांवर त्याचा ताबा रहात नाहीं. मेन्दूंत सूज आल्यामुळें त्याच्या धातूंत (Tissue त) अपक्रांति झाल्यानें मनुष्याच्या वागणुकींत फरक पडतो. ह्याच्या उलट मानसिक विकारांनीं शारीरिक विकार उत्पन्न होतात हेंहि तितकेंच खरें आहे. रक्तदाब, छातींत धडधडणें, आमाशय व्रण हे मानसिक विकारांनीं होऊं शकतात.

मनाचे दोन भाग कल्पितात

कांहीं मनःशास्त्रज्ञ मनाचे दोन भाग कल्पितात. एक सुप्त मन व दुसरें जागृत मन. सुप्त मनाची व जागृत मनाची योग्य युति होऊन मनुष्य शहाणपणानें वागत असतो असें त्यांचें मत आहे. परंतु ज्या वेळीं त्यांच्यामध्यें संघर्ष सुरूं होऊन कशा रीतीनें वागावें ह्याचा त्या व्यक्तीला उलगडा होत नाहीं, त्या वेळीं तो वेड्यासारखा वागतो – त्याला वेड लागतें – असें ते मनःशास्त्रज्ञ समजतात.

निदान करणें सोपें नाहीं

शारीरिक रोगांचें वर्गीकरण करणें व निदान करणें जितकें सोपें आहे तितकें मानसिक रोगाचें नाहीं. कांहीं वेळां रोग्याला वेड लागलें आहे किंवा नाहीं हें एकदम सांगणें कठीण जातें. अलीकडे वैद्यक शास्त्रांत शारीरिक रोगाइतकेंच मानसिक रोगांना महत्व दिलें जातें. असें म्हणतात कीं दररोजच्या वैद्यांकडे येणाऱ्या रुग्णांमध्यें शें. ५०–६० रोगी मानसिकच असतात. हा अमेरिकेंतील आंकडा आहे. आपल्याकडे इतका उच्च अंक असेल असें मला वाटत नाहीं. एवढें मात्र खरें कीं वैद्यानें रोग्याच्या शारीरिक रोगाबरोबर त्याच्या मानसिक अवस्थेकडेहि लक्ष देणें आवश्यक आहे.

ह्या लेखासाठीं खालील ग्रंथांचा आधार घेतला आहे.

1) General Psychology- By Guilford, 7th edition.

2) Text Book of Practice of medicine- Price- 7th edition.

३) गीतारहस्य — लो. टिळक कृत — आवृत्ति ६ वी. १९५०

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मानवजातीचे तीन महान् वैद्य

अडीचशें वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे.

इंग्लंडांत घरोघर या दिवशीं शोकाची छाया पसरली होती. प्रवासी लोक दुसऱ्याला विचारीतः— "अरे, कोणी राजा आजारी नाहीं कीं कोणी प्रधान अस्वस्थ नाहीं, कोणी पुढारी बीमार नाहीं अगर एखादी दुर्घटना अगर अपघात झालेला नाहीं. मग गांवांत एवढें शोकाचें वादळ कसें?"

स्थानिक लोक दीर्घ उसासा टाकून सांगत. "इंग्लंडचा सुप्रसिद्ध वैद्य सिडनहॅम आजारी आहे."

वैद्यासाठीं सामुदायिक शोक

गांवांत तीनशे त्रेपन्न वैद्य असतांना एक वैद्य योग्य कालीं वृद्धावस्थेंत आजारी पडला तर त्यासाठीं सर्वांनीं सामुदायिक शोक करण्याचें काय प्रयोजन?" असा प्रश्न परदेशांहून आलेले प्रवासी विचारीत.

तेव्हां स्थानिक लोक उत्तर देतः– "पुष्कळ वैद्य आज आहेत व पुढेंहि होतील; पण असा वैद्य मिळा-वयाचा नाहीं. वैद्य सिडनहॅम हा साधा वैद्य नाहीं. तो निसर्गाचा मित्र आहे. निसर्ग हा नेहमीं मनुष्याला आरोग्य राखण्यास मदत करीत असतो. पाण्यांत बुडणाऱ्या माणसाला तारण्यासाठीं निसर्ग त्याला तीन तीन वेळां वर आणतो, पण माणुसच निसर्गविरोधी वागणूक करतो आणि बुडतो. हा वैद्य, विरोधी निस-र्गाला सरळ करणारा आहे व म्हणून लोकांना तो अत्यंत पसंत आहे. नाहींतर पुष्कळ वेळां वैद्याच्या घरीं जाण्यापेक्षां लोकांना यमाच्या घरीं जाणेंच अधिक बरें वाटत असतें."

असा वैद्य कोठें मिळेल?

लोक, सगेसंबंधी, शिष्यपरिवार, वैद्य सिडन-हॅमच्या शय्येजवळ उभे राहून आसू गाळीत होते. ते सर्व म्हणत "आम्हांला आतां असा वैद्य कोठें मिळेल?"

लोकांचा हा प्रश्न आजारी वैद्य सिडनहॅमच्या कानीं पडला. त्यानें सर्वांना शांत केलें व सांगितलें "तुम्ही सर्व इतका शोक कां करतां? मला तर जातांना आनंद वाटत आहे. कारण, आपल्या सेवेसाठीं मी पाठीमागें तीन मोठे वैद्य ठेवून जात आहे."

सर्वांना आश्चर्य वाटलें

वैद्य सिडनहॅमचें तें भाषण ऐकून सर्वांना खूप आश्चर्य वाटलें. "एक नव्हे तर ३–३ वैद्य आणि तेहि वैद्य सिडनहॅमपेक्षां श्रेष्ठ! खरोखर आपण आजवर अंधारांतच राहिलो!"

सर्वांनीं सिडनहॅमला विनंति केलीः–"आम्हांला तर तुमच्यासारख्या दुसऱ्या एकाहि वैद्याचें नांव माहित नाहीं. तरी कृपा करून लवकर आपण ह्या तीन वैद्यांचीं नांवें आम्हांला सांगा म्हणजे जरूर पडेल त्यावेळीं आम्हीं त्यांचा लाभ अवश्य घेऊ!"

वैद्य सिडनहॅम कुशी बदलतां बदलतां शांतपणें बोलले "पहिल्या वैद्याचें नांव आहे वैद्य समीर (Air)!"

"काय वैद्य समीर! आम्हीं तर हें नांव प्रथमच ऐकत आहोत. हे कोठें रहातात? व त्यांची चिकित्सा दक्षिणा (फी) काय आहे?

वैद्य समीर = मोकळी हवा

"हे सर्वांना रोज भेटतात. विशेषतः खुल्या जागीं, व हे फी कांहींच घेत नाहींत. ते नेहमीं सर्वांना ताजे-पणा देतात. वैद्य 'समीर' म्हणजेच 'मोकळी हवा! शुद्ध हवा हा एक वैद्यच आहे; माझ्यापेक्षांहि मोठा!"

दुसऱ्या वैद्याचें नांव 'अंबु'

वैद्य सिडनहॅम यांच्या म्हणण्याचा भावार्थ श्रोते लोकांच्या लक्षांत तेव्हांच आला. वैद्य सिडनहॅम पुढें म्हणालेः–"दुसऱ्या वैद्याचें नांव आहे 'वैद्य अंबु (water)' समजलें?"

"'बरोबर समजलें' सर्वांनीं एकदम उत्तर दिलें. पाणी हा वैद्य पण सर्वत्र हजर आहे व याची कांहीं फी नाहीं. आतां आम्हाला तिसऱ्या डॉक्टरचें नांव सांगा."

"तिसऱ्या वैद्याचें नांव आहे, वैद्य 'शरीरश्रम' (bodily work)".

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चौथ्या वैद्याकडे जाणार नाहींत

सर्व लोक लगेच म्हणाले ' शरीरकष्टाचीं कामें ' बरोबर! शुद्ध हवा, शुद्ध पाणी व शरीरकष्टाचीं कामें हे मानवतेचे ३ महान् वैद्य आहेत. या तिघांचा ज्यांना परिचय आहे ते चौथ्या वैद्याकडे जाणारच नाहींत.

शहरी जीवन म्हणजे श्रमहीन जीवन

पण आम्ही शहरीं लोक मोहानें अखाद्य वस्तु खातो, अपेय वस्तु पितो, व जें अनैसर्गिक तें नैसर्गिक मानतो, व्यवहार करतो. शहरी जीवन म्हणजे श्रमहीन जीवन! हातानें कामें करण्याचा व पायानें चालण्याचा आळस, पचनशक्तीची दुर्बलता व शुद्ध हवेची दुर्मिळता! " वैद्य खिडनहॅमची ही शिकवण जमलेल्या लोकांना फार आवडली.

त्रिदोषांची शिकवण ती हीच

भारतवर्षास हजारो वर्षांपासून ऋषीमुनींनीं दिलेली त्रिदोषांची शिकवण व वैद्य खिडनहॅमची ही शिकवण तत्वतः एकच आहे. इंग्लंड व आधुनिक पाश्चात्य वैद्यक ती विसरलें आहे व जन्तुनाश आणि शस्त्रकर्मे यावर जोर देत आहे.

इंग्लंडांत उन्हाचें दर्शन दुर्मिळ, त्यामुळें वैद्य खिडनहॅमनें ' शरीरश्रम ' सांगितलें. भारतांत जेथें सूर्यकिरण उपलब्ध आहेत तेथें ते (सूर्यकिरण) हि लोकांना निरोगी ठेवणारे तिसरे मोठे वैद्य आहेत.

वात, पित्त, कफ हे जसे दोष आहेत, तसेंच ते उपचारहि आहेत. पित्तकफावर वात (समीर) हा उपचार, वातपित्तावर कफ (अंबु) हा उपचार, वातकफावर पित्त (सूर्यकिरण व शरीरश्रम) हा उपचार समजावा. तसेंच उलट वातावर पित्तकफ हा उपचार, पित्तावर वातकफ हा उपचार, व कफावर वातपित्त हा उपचार आहे.

सार्वजनिक आरोग्यासंबंधीं उपाय

मुंबई सरकारच्या सार्वजनिक आरोग्यखात्याच्या व तत्संबंधीं इतर खात्यांच्या अधिकाऱ्यांची तीन दिवसांची एक परिषद पुणें येथें भरली होती. तींत पाणीपुरवठा, गटारव्यवस्था, अन्नपदार्थांतील व औषधांतील भेसळ, स्वच्छता व रोगांच्या साथींचें नियंत्रण इत्यादि प्रश्नावर विचारविनिमय झाला.

मुंबईचे सार्वजनिक आरोग्यखात्याचे मंत्री श्री. शांतिलाल शहा यांनीं परिषदेचें उद्घाटन केलें. त्यावेळीं ते म्हणाले कीं, अखिल भारतीय स्वरूपाच्या अन्नपदार्थ-भेसळ-प्रतिबंधक कायद्याबाबत पार्लमेंट सध्यां विचार करीत असून असा कायदा शक्य तितक्या लौकर मंजूर करण्याची मध्यवर्ति सरकारला विनंति करावी. तसेंच बनावट औषधांचा सुळसुळाट झाला आहे त्याचाहि गंभीरपणें विचार केला पाहिजे आणि त्या दृष्टीनें ड्रग अक्टांत दुरुस्ती केली पाहिजे असेहि ते म्हणाले.

नर्स, सॅनिटरी इन्स्पेक्टर व पब्लिक हेल्थ ओव्हरसिअर यांना शिक्षण देण्यासाठीं राज्यांत एक हायजिन व पब्लिक हेल्थ अिन्स्टिट्यूट स्थापन करावी, अशीहि त्यानीं सूचना केली. या परिषदेंत निरनिराळ्या खात्याच्या अधिकाऱ्यांनीं कांहीं प्रबंधहि वाचले.

ग्रामीण भागासाठीं दुय्यम व्यवसायी

दोन वर्षांचा अभ्यासक्रम ठेवून दुय्यम वैद्यक व्यवसायी तयार करण्यासंबंधींच्या भारत सरकारच्या सूचनेबाबतहि या परिषदेंत विचार करण्यांत आला. अशा रीतीनें शिक्षण घेऊन तयार होणारे हे व्यवसायी ग्रामीण भागांतील वैद्यकीय स्वरूपाच्या गरजा भागविण्याच्या दृष्टीनें उपयुक्त ठरतील, अशी अपेक्षा आहे.

तसेंच कुष्ठरोग व क्षयरोग यांच्या निवारणाच्या उपायांबाबतहि परिषदेंत विचार करण्यांत आला.

बाकेरी भाते

अत्यंत खात्रीचें व ताजे मिळते. १ पौंड २ रु. ट. ख. निराळा.

श्रीपाद फार्मसी, पो. पेण (कुलाबा)

इंजेक्शन चिकित्सा

पाश्चात्य इंजेक्शन चिकित्सेवरील अभिनव मराठी ग्रंथ. किं. ६ रु. ट. ख. निराळा.

वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक शहर

सुबोध वैद्यक ग्रंथमाला, पो. कागल (कोल्हापूर)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जाहीर खबर—

होमिओपॅथिक रजिस्ट्रेशन ट्रिब्युनल

बॉम्बे होमिओपॅथिक ॲक्ट १९५१ अन्वयें प्रस्थापित झालेल्या 'होमिओपॅथिक रजिस्ट्रेशन ट्रिब्युनल' कडे ३००० पेक्षां जास्त अर्ज नोंदणीकरितां आलेले आहेत. त्यापैकीं बहुसंख्य अर्ज 'अपूर्ण भरलेले' अगर 'संदिग्ध पुरावा जोडलेले' असे आहेत. आणि म्हणून 'रजिस्ट्रेशन ट्रिब्युनलला' अशा अर्जांची तपासणी करून ते अखेर निकाली काढण्यास बराच काल लागतो.

समाधानकारक पुरावा दिला पाहिजे

'बॉंबे मेडिकल ॲक्ट १९१२ अगर 'बॉंबे मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्ट १९३८' अन्वयें नोंदलेल्या अर्जदाराखेरीज इतर सर्व अर्जदारांनीं 'बॉंबे होमिओपॅथिक ॲक्ट १९५१' च्या सेक्शन १८ (अ) अगर (क) ह्यांतील सर्व तरतुदी आणि अटी पूर्ण करावयास पाहिजेत व त्याखेरीज त्यांनीं त्यांचे अर्जांत नमूद केलेल्या कालामध्यें त्यांचा मुख्य धंदा होमिओपॅथिक वैद्यक व्यवसाय हाच होता अशाबद्दल समाधानकारक पुरावा सादर करावयास पाहिजे.

रजिस्टर्ड वैद्य-डॉक्टरासाठीं

जे इसम 'बॉंबे मेडिकल ॲक्ट १९१२' अगर 'बॉंबे मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्ट १९३८' अन्वयें रजिस्टर्ड झाले असतील त्यांनीं त्यांच्या रजिस्ट्रेशन सर्टिफिकिटांखेरीज, ते होमिओपॅथिक वैद्यकव्यवसायीहि करीत आहेत अशाबद्दल योग्य पुरावा सादर करावयास पाहिजे. असा पुरावा सादर केल्यानंतर ह्या वैद्यक व्यवसायींना सदर कायद्याचें सेक्शन १८ विभाग (ब) खालीं होमिओपॅथिक रजिस्ट्रेशन देण्यांत येईल. अशा वास्तव स्थितींत रजिस्ट्रेशन नाकारल्याचें एकहि उदाहरण अद्याप घडलेलें नाहीं.

एन्लिस्टेड लोकासाठीं नियम

बॉंबे मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्ट १९३८ अन्वयें जे इसम 'एन्लिस्ट' झालेले आहेत, त्यांनीं सदर कायद्यांतील तरतुदींच्या हेतूंचा विपर्यास केलेला दिसतो. हे एन्लिस्ट झालेले इसम अनेक वेळां ते रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टिशनर्स आहेत असा दावा करतात आणि म्हणून ते सदर कायद्याचें सेक्शन १८ विभाग (ब) खालीं होमिओपॅथिक रजिस्ट्रेशन मिळवूं इच्छितात. परंतु ही त्यांची समज चुकीची आहे.

अर्ज रद्द करणें भाग पडेल

एन्लिस्ट झालेले वैद्यक व्यवसायी हे सन १९३८ च्या कायद्यान्वयें रजिस्टर्ड झालेले वैद्यक व्यवसायी नव्हेत आणि म्हणून त्यांच्या बाबी (cases) सदर कायद्याच्या सेक्शन १८-(अ) अगर (क) ह्यांत नमूद केलेल्या तरतुदींच्या कक्षेंतच फक्त येतात. अशी वस्तुस्थिति असल्या कारणानें एन्लिस्ट झालेल्या वैद्यक व्यवसायींनीं त्यांच्या अर्जांत नमूद केलेल्या कालामध्यें त्यांचा मुख्य धंदा होमिओपॅथिक वैद्यक व्यवसायच होता, अशाबद्दल समाधानकारक पुरावा सादर करावयास पाहिजे. आणि तसें न झाल्यास त्यांचे अर्ज रद्द करणें भाग पडेल.

प्रमाणपत्र देणाऱ्या संस्था

होमिओपॅथिक औषधी पद्धतीचा अभ्यास केल्याबद्दलचें प्रमाणपत्र अगर पदवी देणाऱ्या अनेक संस्था ह्या देशांत आहेत परंतु होमिओपॅथिक कायद्यानुसार व त्या दर्जाचें होमिओपॅथिक शिक्षण देणाऱ्या संस्था फारच थोड्या आहेत; आणि म्हणून कायद्याच्या सेक्शन १८ विभाग– अ (ब) च्या हेतूकरितां रजिस्ट्रेशन ट्रिब्युनल हें फक्त अशाच संस्थांच्या परीक्षांना ग्राह्य मानील. संबंधित कायद्याच्या तरतुदी–प्रमाणें जे अर्जदार मान्यवर संस्थेची होमिओपॅथिक परीक्षा पास नसतील त्यांनीं होमिओपॅथिक रजिस्टेशन-करतां होमिओपॅथिक कायद्याच्या सेक्शन १८ विभाग– (अ) अगर (क) अन्वयें अर्ज करावेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अन्यप्रांतीय होमिओ व्यवसायींसाठीं

भारतांतील मुंबई प्रांताखेरीज अन्य प्रांतांत होमिओपॅथिक वैद्यक व्यवसायी म्हणून रजिस्टर्ड झालेल्या अर्जदारास मुंबई प्रांताचें रजिस्ट्रेशन देण्याची बॉंबे होमिओपॅथिक ॲक्टांत तरतूद नाहीं. ह्या कारणास्तव जे अर्जदार अन्य प्रांतांत होमिओपॅथिक वैद्यक व्यवसायी म्हणून रजिस्टर्ड झाले असतील त्यांना ह्या मुद्यावर मुंबई-प्रांताचें रजिस्ट्रेशन मिळू शकणार नाहीं. करितां त्यांनीं बॉंबे होमिओपॅथिक ॲक्ट १९५१ च्या सेक्शन १८ मधील तरतुदीप्रमाणें जरूर तो समाधानकारक पुरावा रजिस्ट्रेशन ट्रिब्युनलकडे सादर करावयाला पाहिजे.

कायद्याचें पालन व योग्य सवलती

हो. रजिस्ट्रेशन ट्रिब्युनल असें स्पष्टपणें निदर्शनास आणूं इच्छिते कीं, तिचेकडे आलेल्या सर्व अर्जांचा विचार सदर कायदा व त्यासंबंधीं केलेले नियम ह्यांचें योग्य पालन करून करील. प्रत्येक अर्जदारास त्याचा हक्क शाबित करण्याकरितां योग्य त्या सर्व सवलती देण्यांत येतील. जरूर त्या बाबतींत अर्जदार ज्या जिल्ह्यामध्यें राहात असेल त्या जिल्ह्याच्या संबंधित ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरचा अभिप्राय मागविला जाईल व अर्जदारासहि समक्ष मुलाखतीसाठीं बोलवण्यांत येईल.

(सही) डॉ. एस्. आर्. वाडिया,
चेअरमन, होमिओपॅथिक रजिस्ट्रेशन ट्रिब्यूनल

आयुर्वेद महाविद्यालय, सुरत

सुरत येथील ओछवलाल नाझर आयुर्वेद-महाविद्यालयांत चालू सहामाही पासून मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजांतील पॅथॉलाजी विषयाचे सेवा निवृत्त प्राध्यापक डॉ. पी. व्ही. घारपुरे एम्. डी. (पॅथॉलाजी) हे पॅथॉलजी हा विषय शिकवू लागले आहेत.

डॉ. कांतिलाल मेहेता हे या विषयाचे साहाय्यक प्राध्यापक नियुक्त झाले आहेत.

ताज्या वनस्पति

" आमच्याकडे वनस्पतींचा सांठा नसतो. हंगामांत वनस्पति जमवून स्वच्छ, ताज्या, छायाशुष्क अशा पुरवितो. मिळणाऱ्या वनस्पतींची यादी:- धायटी फूल, कुडामूळ साल, अडूळसा पाला, नागरमोथा, भुइकोहळा, टेटूमूळ, शिवणमूळ, सालवण, पिठवण, मोरवेल, बेहेडेदळ, खैरसाल, बेलमूळ, बेलफळमगज, कुडाबी (इंद्रजव, कवंडळ मूळ-पिंगळीमूळ.

— वि. का. पेंडसे
मु. कोळिंबे ता. कर्जत, जि. कुलाबा

पांढरें कोड

हजारोंचें गेले व त्यांनीं अभिप्राय दिलेलें आणि अनेक बक्षिसें मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो. असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य वी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन'
मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

शुद्ध केशर, कस्तुरी, अंबर, मोती, प्रवाळ आणि शिलाजीत वगैरेसाठीं
— पुढील पत्त्यावर संपर्क साधा —
गणेशीलाल जीवराज
२१४ सेम्युअल स्ट्रीट, चौथा मजला मुंबई ३

पवित्र नेपाली कस्तुरी रु. ४४ तोला,
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला,
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला,
लिहाः—नेपाल हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद विद्वत् परिषद्, मुंबई

पूर्वी जाहीर झाल्याप्रमाणें ता. १९ व २० डिसेंबर रोजीं मुंबई येथें आयुर्वेदज्ञ विद्वानांची परिषद भरली होती. शुद्धआयुर्वेदाच्या अभ्यासक्रमास मुंबई सरकारनें मान्यता देऊन महत्वाचें प्रगतीचें पाऊल टाकिलें आहे. तो अभ्यासक्रम उत्तम तऱ्हेनें अमलांत आणून आयुर्वेदाची व परंपरेनें वैद्यवर्गाची उन्नति करून देण्याची जबाबदारी आतां शुद्ध आयुर्वेदवादी वैद्यांच्यावर येऊन पडली आहे. साहजिकच त्या दृष्टीनें हालचालींना सुरवात होऊन हा अभ्यासक्रम शिकविण्यास विद्यालयें कशीं असावीत, गुरुचो व छात्रांची पात्रता काय असावी, पाठ्यक्रमांतील ग्रंथांश–शेयांश कोणते असावेत हें ठरविण्याकरितां व हा अभ्यासक्रम पार पाडतांना येणाऱ्या शंकांचें चर्चा करून निरसन करून घेण्याकरितां ही परिषद बोलविण्यांत आली होती. ही परिषद मुंबईस ठाकुरद्वारीं फणसवाडीच्या नाक्याजवळील निमाणी वाडींत भरली होती.

सौराष्ट्रापासून हुबळीपर्यंत

या सभेस सौराष्ट्रापासून हुबळीधारवाडपर्यंतची व मुंबईपासून भुसावळपर्यंतची वैद्यमंडळी तर जमली होतीच; पण त्याशिवाय लखनौहून वैद्यराज द. अ. कुळकर्णी (डेप्युटी डायरेक्टर आयुर्वेद), इंदोरचे कविराज प्रतापसिंहजी, नागपूरचे वैद्य वेणीमाधवशास्त्री, झांशीचे गोडबोलेशास्त्री, अकोल्याचे वैद्य हरिशास्त्री पराडकर आदि प्रसिद्ध व्यक्ति मुद्दाम उपस्थित होत्या. सरकारनें नियुक्त केलेल्या शुद्ध आयुर्वेद समितीचे बहुसंख्य सदस्य या सभेस उपस्थित होते. फॅकल्टीचे सदस्य वैद्य बागेवाडीकर, बोर्डाचे सदस्य वैद्यराज मुनी, वैद्यराज हलशीकर, वैद्य वि. म. गोगटे, नाशिकचे वैद्यराज केळकरशास्त्री, पुण्याचे पांडुरंगशास्त्री देशपांडे, यादवजीभाई आचार्य, महाराष्ट्र प्रांतीय वैद्यमंडळाचे मंत्री वैद्य ब्रम्हदत्त शर्मा व वैद्य बिंदुमाधव पंडित, चारहि प्रांताचे वैद्याध्यक्ष, याशिवाय अहमदाबादचे माधवप्रसाद व नटवरप्रसादशास्त्री, उमरावतीचे वैद्य वा. कृ. दाणी, सुरतचे वैद्य रणजितराय, वैद्य लक्ष्मीबाई बोरवणकर, चंचलबेन, वैद्य मळेकर, वैद्य ऐनापुरे आदि अनेकानेक विद्वान् वैद्यहि या परिषदेकरितां उपस्थित होते.

सर्वांना आनंद वाटला

१९३८ सालीं आयुर्वेदाला सरकारमान्यता मिळाल्यापासून आजवर १५ वर्षांत बोर्ड अगर फॅकल्टी यांनीं अशी परिषद भरवून विद्वान् वैद्यमंडळींना एकत्रित आणून चर्चा करण्याचा सुयोग आणला नव्हता, तो या परिषदेमुळें आला, याबद्दल जमलेल्या सर्व वैद्यांना आनंद झालेला व्यक्त होत होता.

शनिवार ता. १९।१२।५३ ला दुपारीं ठीक १ वाजतां सुरवात झाली. प्रारंभीं वै. श्रीरामशर्मा यांनीं जगद्गुरु शंकराचार्य यांना परिषदेस आशीर्वाद देण्याची विनंति केली. त्यांच्या आशीर्वादानंतर स्वागताध्यक्ष पंडित शिवशर्माजी यांनीं सर्वांचें स्वागत केलें. संदेशवाचन केल्यानंतर अध्यक्षांचें विस्तृत भाषण झालें व हा कार्यक्रम दुपारीं ३॥ वाजतां संपला.

रात्रीं १० वाजतां नियुक्त विषयांच्या चर्चेस सुरवात झाली. विद्यार्थ्यांच्या प्रवेशपात्रतेकरितां निरनिराळया १६-१७ संस्कृत परीक्षांची यादी वैद्यांच्या सूचनेवरून मान्य करण्यांत आली.

गुरुंच्या पात्रतेबाबत कडाक्याची चर्चा

गुरूंची पात्रता ठरवितांना कडाक्याची चर्चा झाली. नि. भा. विद्यापीठाची आयुर्वेदाचार्य परीक्षोत्तीर्ण गुरु हा गुरु म्हणून पात्र समजण्यात यावा. याशिवाय इतरहि विशारद, तीर्थ, आदि पदवीधर व ज्यांना कांहीं काल शिकविण्याचा अनुभव आहे. अशाहि वैद्यांना मान्यता देण्यांत यावी अशी शिफारस करण्यांत आली. ज्यांच्याबद्दल संदेह आहे अशांची चांचणी शुद्ध आयुर्वेद समितीनें घ्यावी अशीहि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिफारस करण्यांत आली. व रात्रींची चर्चा संपली.

अभ्यासक्रम ठरविण्यासाठीं समित्या

रविवार ता. २०-१२-५३ रोजीं सकाळीं ९॥ वा. परत चर्चेस सुरवात झाली. अभ्यासक्रम सरकारनें ठरविला आहेच. त्याचे ग्रंथांश व ज्ञेयांश ठरवावयाचे राहिले होते. याकरितां निरनिराळ्या चार समित्या नेमण्यांत आल्या. त्या समित्यावर आपण होऊन नांवें सुचवावयाची होतीं. त्यांत वैद्य लक्ष्मीबाई बोरवणकर, वैद्य वाटवे, वैद्य केळकर, वैद्य वेणीमाधव, वैद्य देशपांडे, वैद्य गोगटे, वैद्य धामणकर, वैद्य गोडबोले, वैद्य दाणी, वैद्य रामाशिरोमणी, वैद्य मरुलाराध्य शास्त्री, वैद्य कुळकर्णी ही मंडळी आली होती.

परिषद यशस्वी झाली

तीन तीन वैद्यांच्या समितीकडे २-२, ३-३ विषय प्रत्येकीं वाटून दिले होते. दुपारीं ५ वाजेपर्यंत या समित्यांनीं आपले लेखी अभिप्राय अध्यक्षांकडे आणून दिले. त्यांचें सविस्तर वाचन व त्यावर चर्चा होऊन अभ्यासक्रमाचे ग्रंथांश व ज्ञेयांश सर्वानुमतें ठरविण्यांत ही परिषद यशस्वी झाली. किरकोळ मुद्यावर संघर्ष निर्माण झाले. पण तेहि समझोत्यानें निकालांत निघाले.

मध्यन्तरीं परिचयाचा एक गोडसा कार्यक्रम झाला. गुरुपरंपरेंत येणाऱ्या अडचणींबाबतहि थोडासा विचारविनिमय झाला. येणाऱ्या पाहुण्यांची मोफत राहण्याजेवणाची सोय स्वागतमंडळीनें केली होती. स्वागत मंडळाच्या अपेक्षेपेक्षांहि खूप-अधिक संख्येनें विद्वान् वैद्यमंडळी उपस्थित राहिली होती आभार प्रदर्शनाचा कार्यक्रम होऊन वंदेमातरम् गीत झालें. व हा सोहळा संपला.

अध्यक्षांची विशेष सूचना

सर्वंच महाराष्ट्रांत शुद्ध आयुर्वेद शिक्षणाची पद्धति एकच प्रकारची असावी आणि निदान अष्टांगहृदय ग्रंथ तरी प्रत्यक्ष शारीर दृष्ट्या एकच ठराविक विचारधारेप्रमाणें प्रांतभर शिकविला जावा हें अत्यन्त आवश्यक आहे. त्याकरितां प्रत्येक मोठ्या शहरांतील निदान एक तरी प्रमुख वैद्यानें एका संयुक्त सभेकरितां नाशिकला जमावें व ग्रंथांतील कठिण स्थळें सर्वांच्या संमतीनें एकाच पद्धतीनें कशी शिकवितां येतील याचा विचारविनिमय करून टांचण करावें. याशाठीं नाशिकला सभा बोलवावी. ८ दिवस एकत्र बसून ही पद्धत ठरवावी." अशी सूचना विद्वत् परिषदेचे अध्यक्ष वै. डेग्वेकरशास्त्री, म. प्रां. वै. मंडळाचे मंत्री वैद्य बिंदुमाधवशास्त्री पंडित यांना पत्र पाठवून केली आहे.

वैद्य बन्धुओ

अपनी आय बढाओ ।

बिना पूंजी, बिना परिश्रम, बिना किसी व्यय के आय बढाना चाहें तो हम से पत्र-व्यवहार करें। हमारा कारखाना भारत भर में थोक परिणाम में सस्ती एवं उत्तम प्रकार की आयुर्वेदिक औषधियां सप्लाई करने में प्रसिद्ध है। कई प्रान्तीय गवर्नमेण्टें हमारी ग्राहक हैं।

काश्मीर आयुर्वेदिक वर्क्स

अमृतसर

आयुर्वेद सेवा संघाचें ४ थें पुष्प

अनुभविक औषधें

(सिद्धयोगसंग्रह)

लेखकः- वैद्यवाचस्पति यादवजी त्रिकमजी

किंमत ४ रुपये, टपाल खर्च १२ आणे

वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद विद्वत् परिषद, मुंबई

भिषगाचार्य भि. वि. डेग्वेकरजी का अध्यक्षीय भाषण

॥ ॐ नमो ब्रह्मप्रजापत्यश्विबलभिद्धन्वन्तरिसुश्रुतप्रभृतिभ्यः ॥

श्रीयुत अध्यक्ष, शुद्धायुर्वेद अभ्यासक्रम समिति, समिति सदस्य, शुद्धायुर्वेद के पुरस्कर्ता प्रांतीय सदस्य व बंधुभगिनी गण—

आजका बडा सौभाग्य का दिवस है कि, जिस शुद्ध आयुर्वेदकी परिपाठी हमारे देशमें पुनश्च सरकार द्वारा स्वीकृत की जावे इस संबंध का प्रयत्न गत १५ वर्ष से एकसा चालू रहा, वह, सफल होकर आज उसी बंबई सरकारने--जिसने मिश्र शिक्षण को आग्रहपूर्वक प्रारंभ किया था- उसी प्राचीन शुद्ध परिपाटीका पुनरुत्थान करना स्वीकार किया है. इस विचारपरिवर्तन के लिये प्रधानमंत्री श्री. मुरारजी देसाई तथा आरोग्यमंत्री श्री. शांतिलालजी शाह धन्यवादके पात्र हैं. यह मार्गदर्शन अन्य प्रान्तोंपर भी अपना परिणाम करते हुए इसी प्रकारका शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रम वहां भी स्वीकार किया जायगा ऐसी हमें पूर्ण आशा ही नहीं किंतु निश्चित विश्वास है. कारण, हरएक प्रांत इस बातका अनुभव कर रहा है की मिश्र शिक्षण प्राप्त स्नातकों में से ९९ प्रतिशत आयुर्वेद से इतनी घृणा रखते हैं कि अपनेको वैद्य कहलाना भी उन्हे मानो बिच्छू काटनेके समान तापदायक होता है. तथा आयुर्वेदीय औषधियोंका संपर्क भी उनके औषधालयोंमें नहीं पाया जाता. जिस चिकित्सा का ध्येय चरकमें ' नात्मार्थं नापि कामार्थं अथ भूतदयां प्रति । इस सूत्रमें संगठित किया है उस के स्थानमें केवल व्यापार एवं अर्थलाभैकसाधक बनानेवाली चिकित्सापद्धति उन्हे अधिक प्रिय होती है. यदि यह मिश्र शिक्षण पांच पचास वर्ष इस देशमें चालू रहा तो आयुर्वेदके चिकित्सक अजायब घरमें (म्यूझियम में) रखने योग्य संख्या में भी प्राप्त न हो सकेंगे. इस परिस्थितिका योग्य आकलन बंबई सरकारको होकर शुद्ध पाठ्यक्रम निर्माण करनेकी सुबुद्धि हुई यह हमारे देशका परम सौभाग्य है ।

हमारा कर्तव्य- अब हमारा कर्तव्य है कि सर्व दृष्टिसे विचार करते हुए इस प्रकार का पाठ्यक्रम निर्माण करें कि जिससे हमारे शास्त्रके मूलतत्वोंमें किसीभी प्रकारकी बाधा न आते हुए तथा शुद्धायुर्वेदकी प्राचीन परंपरा एवं चिकित्सा पद्धतिके हर एक अंगको प्राधान्य देते हुए वह प्रणाली प्रत्यक्षोपयोगी हो सके.

शास्त्रज्ञोंके दो विभाग-- इस उद्देश्यके पूर्तिके लिये हमें हमारे शास्त्रज्ञोंके प्रथमतः दो विभिन्न विभाग करना चाहिये, जैसे कि आधुनिक चिकित्सा शास्त्रको भी मान्य है; एक काय-चिकित्सक (फिजीशियन्स) तथा दुसरे शल्य-चिकित्सक (सर्जन्स). जिस प्रकार आधुनिक शास्त्रज्ञों में भी विशेषज्ञ (स्पेशालिस्ट्स्) हुआ करते हैं- उदाहरणार्थ, शालाक्य-चिकित्सक (Those who treat eyes, ears, nose and throat), दंत-चिकित्सक (डेंटिस्ट्स्), मलमूत्रश्लेष्मादि विश्लेषक (पॅथॉलॉजिस्ट्स्) इत्यादि. उसी प्रकार हम भी शुद्धायुर्वेद द्वारा रोगोंकी सर्व प्रकारकी चिकित्सा करनेवाले चिकित्सक प्रथम निर्माण करें.

पंचकर्म- इन चिकित्सकोंको वमन, विरेचन, बस्ति, शिरोविरेचन, तथा रक्तमोक्ष करानेके सब प्रकारके उपाय गुरुगृहमें कराये जानेकी नितांत आवश्यकता पाठ्यक्रममें अन्तर्भूतकी जावे. रक्तमोक्ष के लिये जलौकाप्रयोग, सिराव्यध, घटी, अलाबू, तुंबी आदिप्रयोग प्रत्येक गुरु अपने चिकित्सालयमें स्वतः करे और विद्यार्थियोंसे करावे. स्नेहन और स्वेदन ये दोनो—पंचकर्मोंके पूर्व करानेके—साधन हैं. किस व्याधिमें कौनसे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

द्रव्यद्वारा स्नेहन कराना और किस प्रकारका स्वेदन कराना इसका संपूर्ण आलेख (चार्ट) बनाकर उस आलेखको चिकित्साकर्म करानेके स्थानपर बोर्डपर लटका हुआ रखा जाय. इस प्रकार हर एक पंचकर्मके आलेख तैयार करके, विद्यार्थिओंके सन्मुख रहनेसे सुविधा होती है।

सिराव्यध– सिराव्यध करानेकी कला प्रत्येक वैद्य को अवगत कर लेना नितांत आवश्यक है. वह स्वल्प प्रयत्नसाध्य है. आवश्यकतानुसार हर एक गुरु वैद्यको एक विशिष्ट स्थानमें आठ दिन रहकर यह, और अन्य सरल कलायें अवगत करानेका साधन, इस अभ्यासक्रम समितिने बंबई सरीके प्रधान स्थानमें निर्माण कराना चाहिये।

अन्य उपक्रम– नस्य, धूमपान, गंडूष, कवलग्रह, प्रतिसारण, मुखालेप, मूर्धतैल, अभ्यंग, सेक, पिचु, शिरोबस्ति, कर्णपूरण, आश्चोतन, अंजन, पुटपाक, तर्पण इत्यादि का प्रात्याक्षिक प्रत्येक वैद्यने विद्यार्थीको अपने गुरु-गृहमें कराना नितांत आवश्यक है. यह करा दिया जानेका सर्टिफिकिट गुरुसे मिलना चाहिये. तथा प्रात्यक्षिक परीक्षामें इन सब विषयोंकी परीक्षा ली जानी चाहिये.

अष्टविध परीक्षा– अष्टविध परीक्षामें नाडी और मूत्र संबंधी जितना विवरण योगरत्नाकरके प्रारंभिक भागमें दिया हुआ है उतना विद्यार्थियों को मुखाग्र होना आवश्यक है. प्राचीन पद्धतिके अनुसार ये सब विषय मुखाग्र रहा करते थे. वही पद्धति फिरसे, इस गुरुपरंपरागत शिक्षणक्रममें अंतर्भूत की जाना चाहिये. बाल वयमें ग्रंथके ग्रंथ कंठस्थ करा दिये जाते थे; उसके कारण विषय सदैव उपस्थित रहा करता था. वही प्रथा जब फिरसे चलेगी तब ही प्राचीन पद्धतिके वैद्य निर्माण हो सकेंगे.

मूत्र परीक्षा– तैलबिंदुद्वारा की जानेवाली मूत्रपरीक्षा पूर्णतया शास्त्रीय [सायंटिफिक] है. मूत्रमें विद्रावित (डिझाल्व्ह्ड्) जो द्रव्य रहते हैं उनके कारण मूत्रकी उपरकी सतह (सरफेस) में एक प्रकारका खिचाव उत्पन्न होता है. इसे ‘ सरफेस टेन्शन ’ कहते है. उन द्रव्योंके अभावमें तैलबिंदु मूत्रपर एकदम प्रसारित होता है. वे द्रव्य विद्रावित हो तो वह बिंदु धीरे धीरे प्रसारित होता है. कई द्रव्य ऐसे हैं जिनके कारण प्रसारण बिलकुल नहीं होता. अतएव नागार्जुनने सुझाई हुई यह तैलबिंदु परीक्षा पूर्णतया शास्त्रीय है.

आप्तवाक्य पर श्रद्धा– हमें इस बातका भी ध्यान रखना चाहिये कि आधुनिक शास्त्रोंके अनुसार जिसको हम प्रमाणित कर सकें वही सशास्त्र है, और बाकी सब अशास्त्र है, यह धारणा बिलकुल असत्य है. हमारा शास्त्र जो कुछ कहता है वह आप्तवाक्य है.

रजस्तमोभ्यां निर्मुक्ताः तपोज्ञानबलेन ये। येषां त्रिकालममलं ज्ञानमव्याहतं सदा ॥ आप्ता शिष्टा-विबुद्धास्ते, तेषां वाक्यमसंशयम्। सत्यं, वक्ष्यंति ते कस्मादसत्यं नीरजस्तमाः ॥ च. सू. ११-श्लो. १८, १९

इन वाक्यों में कहे हुए शब्द हमारे दृढविश्वास के विषय होना चाहिये. गत ५० वर्ष के कई, हमारे देश के उभयशास्त्रकोविद विद्वानोंने इस श्रद्धा को डमाडोल कराकर शारीरे सुश्रुतो नष्टः। इत्यादि अनर्गल उक्तियां प्रचलित कराते हुए शास्त्रवाक्यों पर जो आघात किये हैं, उसीके फलस्वरूप प्राचीन आयुर्वेद नष्ट होनेपर आया था, परंतु इसी दृढ श्रद्धाके आधारपर हम उसे फिरसे पुनरुज्जीवित कर सकेंगे. आयुर्वेदीय ग्रंथ-चतुष्टय हमारी सात्विक श्रद्धाका विषय है, उसका हर एक वाक्य सत्य है, ऐसा दृढविश्वास होना चाहिये. कारण वह आप्तोंने निर्माण किया हुआ है. दृढश्रद्धा सिवाय कार्य कभी भी सफल नहीं होता.

नाडी परीक्षा— इसी प्रकार हमारी नाडीपरीक्षा भी पूर्णतया शास्त्रसिद्ध है. त्रिदोष शारीर द्रव्य हैं, वे उदीरित होनेके पश्चात् अन्नरसमें संमिश्रित होकर रसरक्त परिणालिकासे रक्तमें मिश्रीभूत होकर जो रक्त धातुपर परिणाम करते हैं वही परिणाम रक्तवहरोहिणी [नाडी] द्वारा विशिष्ट प्रकारका स्पर्शज्ञान

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हमें कराता है. अतएव नाडी मंद, तीक्ष्ण, कुटिलगति इत्यादि अनेक प्रकार चलती हुई हमें प्रतित होती है. उसकी परीक्षा बहुत दिनोंके अनुभव के पश्चात् हो सकती है. उसके लिये वर्षोंका अनुभव चाहिये. इस दृष्टिसे योगरत्नाकर में जो नाडी संबंधी प्रमुख लक्षण वर्णित हैं उन्हींके अनुसार तद्विषयक ज्ञान प्राप्त किया जा सकता है.

आलेख-मल, मूत्र, शब्द, जिव्हा आदि द्वारा जो दोषोंका ज्ञान हो सकता है, उससे दोषविकृति की पूर्ण निश्चिति होती है. अतः अष्टविध परीक्षा, गुरु-गृह में हरएक कष्टसाध्य व्याधि में अवश्य ही कराई जाय. तथा तत्संबंधी हरएक रोगीका विवरण, विद्यार्थीद्वारा लिखवाने की परिपाठी, स्वीकृत की जाय. तीन वर्षोंके पाठ्यक्रम में निदान ३०० रोगियों का (भिन्न व्याधियों से पीडितों का) आलेख हरएक विद्यार्थीने अपने हातसे लिखा हुआ, और गुरुके हस्ताक्षर व तिथिके समेत, परीक्षकों को उपलब्ध कराया जाना चाहिये.

शुद्धायुर्वेदीय पाठ्यक्रम यशस्वी होने के लिये जिस प्रकार, संक्षेप में, ऊपर लिखी हुई बातों की आवश्यकता है उसी प्रकार अन्य अनेक आवश्यकताएं हैं जिनका अब विचार करें.

(१) शिष्योंकी पात्रता- इस पाठ्यक्रमके लिये, विद्यार्थी जितना अधिक अन्य शास्त्रपठित हो, उतनी ही उसकी विषयग्रहणशक्ति अच्छी होती है. तथा वह बहुश्रुत भी होना चाहिये. आजकल बनारसकी संस्कृत परीक्षाओं में कुछ आधुनिक विषय भी समाविष्ट किये जा रहे हैं. प्राचीन परंपरानुसार धातु-रूपावली शब्द-रूपावली, समासचक्र आदि कंठगत किये हुए विद्यार्थी अधिक उपयुक्त होंगे. परंतु आज वे उपलब्ध न होंगे. अतः निदान संस्कृत विषय ले कर मॅट्रिक वा तत्समान कक्षोत्तीर्ण विद्यार्थी, अथवा काशी, कलकत्ता आदि की निदान संस्कृत प्रथमपरीक्षोत्तीर्ण विद्यार्थी लिये जाय, और गुरु-गृहमें आवश्यकतानुसार संस्कृत का भी शिक्षण समयानुकूल दिया जाय. आयुर्वेदशास्त्रीय भाषा, चरकके अतिरिक्त अन्य तीनों ग्रंथोंकी, सरल है, और वाग्भट पूरा पढ लेने के पश्चात् चरक भी समजा जा सकता है. अतएव ऊपर वर्णन किया हुआ साधारण संस्कृत का ज्ञान भी पर्याप्त हो सकता है. पाठ्यक्रम में अभी जो पात्रता निश्चित की है वही योग्य प्रतीत होती है. तीन मास शिक्षण देने के पश्चात् गुरु विद्यार्थी की लिखित परीक्षा लेवे, और योग्यता प्रतीत हो तो आगे शिक्षण चालू रखे. नही तो उसे अयोग्य ठहराकर अन्य कार्य करने दे. इस संबंध में गुरुका निर्णय ही मान्य किया जाय.

(२) गुरुकी पात्रता- यह बडी जटिल समस्या है. ग्रंथचतुष्टय पढानेवाले वैद्य आज की परिस्थिति में हरएक प्रांतके शहरों में भी उंगलियों पर गिनने लायक मिलना कठिन है. विद्यार्थी के प्रत्येक शंकाका शारीर दृष्टिसे समाधान करना यही आयुर्वेदीय शिक्षणका प्रमुख अंग है. त्रिदोष, अन्य शारीर द्रव्योंके समान ही, शारीर द्रव्य हैं. इसका परिषद द्वारा निश्चय हो जानेपर भी उन्हें अत्यंत शक्तिमान् द्रव्य कह कर शक्ति विशेषण प्रयोजित करने का ढकोसला अभी भी कई वैद्यों का कायम है. कारखाने के यंत्र के एक छोटेसे सूची का भी महत्त्व इतना ही होता है जितना एक बडे भारी चक्र का. शरीर के हरएक अवयव का शरीर संचालन में उतना ही महत्व है जो एक अत्यंत सूक्ष्म अवयव का. फिर दोष ही अत्यंत शक्तिमान् और मल हीन शक्तिमान् कहने में तात्पर्य क्या ? क्षयी मनुष्य का जीवन जिस मलपर अवलंबित रहता है उसे क्या कम शक्तिमान् कहेंगे. दोष शरीरको धारण करते हैं (देहं संधारयंत्येते) तो मलभी धारण करते हैं. (त्रयो दोषा धातवश्च पुरीषं मूत्र एव च । देहं संधारयंत्येते ।)

अतएव अन्य शारीर द्रव्योंके समान ही दोष भी शारीर द्रव्य हैं. किंतु उनका महत्त्व इस लिये कि असात्म्येंद्रियार्थसंयोगादि द्वारा जो शरीरपर दुष्परिणाम होता है उसका प्रथम आघात इन्ही दोष संज्ञक तीन द्रव्योंपर होता हैं. तत्पश्चात् धातु और मलोंपर होता है. अतएव उनको 'दोषधातुमलमूलं हि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शरीरम् ' इस वाक्य में आद्यस्थान दिया है. प्रथम आघात सहन करनेवाले जैसे दलरक्षक सिपाही होते हैं उसी प्रकार ये भी हैं. किंतु उसके कारण वे सर्व शक्तिमान् नहीं होते. धातुमलोंका सहयोग न हो तो दोष अकेले शरीरमें क्या कर सकेंगे? अतएव सहकार्य की दृष्टिसे सबका महत्व एक है. वे सब ही १३ पदार्थ समकक्षीय हैं. दोषोंको प्रथम आघात सहन करना होता है. यही उनका महत्व है. उन्हीकी आद्य विकृति सब रोगोंका कारण होती है. ' दोषा एव हि सर्वेषां रोगाणामेककारणम् ' दोषधातु मलोंके सहकार्य से शरीर चलता है, न केवल दोषोंसे। अतएव सब ही द्रव्य शक्तिमान् है. उनमें तरतमभाव दिखाने से कोई लाभ नही है.

ये दोषधातुमलसंज्ञक सिद्धांत, विद्यार्थियोंके अंतःकरण में कूटकूट कर भरनेवाले गुरु होना चाहिये. अतएव ग्रंथ-चतुष्टय नहीं तो निदान अष्टांगहृदय पूरी तोरसे पढे हुए और सर्वांगसुंदरा, हेमाद्रि टीकाओं के सहयोगसे विवरण करनेवाले गुरु तो अवश्य ही होना चाहिये. जिस गुरु को मान्यता मिलाना हो वह, यदि कमेटी योग्य और आवश्यक समझे तो, सूत्र या शरीरस्थान का कोई विशेष अध्याय विवरण कर के सुनावे. किंतु कमेटीने एकवार गुरु से विचारविनिमय अवश्य ही करना चाहिये. सब ही गुरु के आवेदनपत्र, विना प्रत्यक्ष शिक्षण-पद्धति का परिचय किये, मान्य करना योग्य न होगा.

(३) शल्य–शालाक्य और सौतिक का गुरुगृह में प्रात्यक्षिक कैसा हो सकता है ?

इन तीनों विषयों का प्रात्यक्षिक सर्व साधारण को आवश्यक न रखते हुए, विशेष ज्ञेय (स्पेशलाइज्ड) कोटिमें उनका अंतर्भाव किया जाय. उनमें भी सौतिक केवल स्त्री वैद्यों के लिये ही एक विशेष विषय मान्य किया जाय. आजकल कई बडे शहरों में सूतिकागृह रहा करते हैं. गुरुको अपने स्त्री–विद्यार्थियों को प्रात्यक्षिकके लिये वहां भेज कर अधिकारियों से प्रथम निरीक्षण करने की, तथा तत्पश्चात् स्वयं प्रसूति कराने की अनुज्ञा सरकार द्वारा प्राप्त करा लेनी चाहिये. इस प्रकार क्रमशः इस विषयका ज्ञान अधिकाधिक हो सकेगा. शल्य-शालाक्य में केवल औषधि (अंजन, क्षारकर्म, नस्य, मूर्धतैल, पुटपाक आदि) द्वारा जो चिकित्सा, शास्त्र में वर्णित है, वही गुरु-गृह में हो सकती है. उसका प्रयोग भी तो अभी वैद्य-समाज नहीं करता. उतना ही यदि प्रारंभ किया जाय तो चिकित्सा-सौकर्य कई गुना बढ जायगा. अतः अभी वही प्रारंभ किया जाय.

(४) वातादि दोषोंका प्रात्यक्षिक- दोषोंकी अवस्थायें- दोष शारीर द्रव्य हैं यह तो निश्चित होयी चुका है. समावस्थामें वे शरीर के भीतर भी रहते हैं अतः उस अवस्थामें उनका प्रात्यक्षिक नही हो सकता. विकृतावस्थामें वे प्रमाण से वृद्ध अथवा प्रमाणसे क्षीण होते हैं. क्षीणावस्था में भी प्रात्यक्षिक नही हो सकता. परन्तु जब प्रमाणसे वृद्ध होते हैं तब वे शरीर से बाहर निकलते हैं अथवा वमन विरेचन बस्तिद्वारा बाहर निकाले जा सकते हैं. इसी अवस्थामें उनका प्रात्यक्षिक होता है. दोषोंकी एक और अवस्था होती है, जिसे आमावस्था कहते हैं. इस अवस्था में ये आमसंज्ञक द्रव्यके साथ मिश्रित होकर फिर बाहर निकलते है. वातदोष जब आममिश्रित होगा तब उसमें दुर्गंध रहेगी, किंतु केवळ वृद्ध वातका जब गद या मुखद्वारा निःसरण होगा, तब उसमें दुर्गंध नही रहेगी. इसी प्रकार वृद्धपित्त का वर्ण पीला व हरा (शुक्लारुणवर्ज्यः) रहेगा गंध विस्र अर्थात् आमगंधी तथा रस चिरपिरा और खट्टा (रसौ च कटुकाम्लौ) ऐसे रहेंगे. कारण वृद्धावस्थामें प्रमाण वृद्धि होती है. गुण वही रहते हैं किंतु अधिक प्रमाणमें. आमयुक्त पित्त दुर्गंधि काले वर्णका वजनमें भारी,प्रमाणमें अत्यधिक होता है,तथा अति चिरपिरा होता है.एवं वृद्धकफ शुक्ल वर्णका मधुर रसका पैच्छिल्ययुक्त तथा मृत्स्न (मृद्यमानः अंगुलिग्राहि) होता है. आमयुक्त कफ मटमैला, तारयुक्त, स्त्यान

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(खीचनेपर रबरके समान फैलनेवाला), शरीरको या गिरनेके स्थानपर चिपकनेवाला होता है. ये सब लक्षण अष्टांगसंग्रह सूत्रस्थान २१ अध्याय में दिये हुए हैं.

किस अवस्था में दोषों का प्रात्यक्षिक हो सकता है ?

एवं दोषों की (१) आम-पक्वावस्था (२) वृद्ध-क्षीणावस्था तथा (३) समावस्था, ऐसी केवल तीन प्रकार की अवस्थायें हुआ करती हैं. इनमें से वे हमें प्रथम व द्वितीयावस्थाओं में प्रत्यक्ष होते हैं. तीसरी अवस्था में नहीं हो सकते. क्षीणावस्था में भी प्रात्यक्षिक नहीं हो सकता, कारण वे उस अवस्था में भी बाहर नहीं आते. आम या वृद्धावस्थाओं में ही उनका प्रात्यक्षिक हो सकता है. अतएव इसी वृद्धावस्था में वमन-विरेचनादि पंचकर्मों द्वारा जब ये द्रव्य बाहर निकलते हैं तब ही उनका प्रात्यक्षिक होता है.

वमन में कफद्रव्य बाहर निकलता हुआ प्रत्यक्ष दिखाई देता है. शीत ऋतु में स्वस्थ मनुष्यको भी नासिका द्वारा तथा खकार द्वारा यह द्रव्य निकलता है. इस ऋतु में कफदोषका संचय होते रहने के कारण यह द्रव्य उत्पन्न होता रहता है. प्रमाण में वृद्ध होते ही शरीरसे बाहर फेंका जाता है. दोषकी वृद्धि जब इतनी आधिक नहीं होती कि व्याधिको उत्पन्न कर सके तब कोई व्याधि तो नहीं होता; किंतु वह वृद्ध दोष शरीर से बाहर अवश्य ही आता रहता है. इसी वृद्ध कफदोष संज्ञक द्रव्य में हमें कफ के गुणों का-' स्निग्धः शीतो गुरुर्मंदः श्लक्ष्णो मृत्स्नः स्थिरः कफः।' प्रात्यक्षिक होता है. प्राचीन वैद्य इसी प्रकार प्रात्यक्षिक करते थे, और आधुनिक वैद्य भी, जिन्हे पाश्चिमात्य वैद्यक शास्त्रों का संपर्क तक नहीं है, अभी भी करते हैं. परंतु आधुनिक शास्त्रज्ञों ने, तथा पाश्चिमात्य शास्त्र भी पढे हुए प्रसिद्ध वैद्यों ने, इन पदार्थों की मल संज्ञा का, योग्य शास्त्रीय अर्थ न समझते हुए, अनर्गल प्रलापरूप टीका करना प्रारंभ किया. इन में अग्रगण्य पूना के स्वर्गीय डॉ. गर्दे थे. नासिका या खकार से निकलनेवाले द्रव्य को शारीर कफदोष, वमन में गिरनेवाले पित्त का पित्तदोष, तथा अपान अथवा मुखमार्ग से निकलनेवाले वायू को वातदोष, ऐसी संज्ञा देनेवाले तथा इन्ही वात-पित्त-कफों से शरीर उत्पन्न होता है- वातपित्तश्लेष्माणो एव देहसंभवहेतवः। कहनेवाले ऋषि कितने मूर्ख कहे जाने योग्य हैं, इस प्रकारकी टीका करनेवाले ही बडे विद्वान् समझे गये; तथा आधुनिक पाश्चिमात्य शिक्षा-प्राप्त वैद्य भी उसी का प्रचार करने लगे.

' तत्र वायुः सदा सूक्ष्म इतरौ तु द्वयात्मकौ । ' और ' सूक्ष्मत्वं नाम इह अतींद्रियत्वम् । ' इस प्रकार की स्वकपोलकल्पित व्याख्या कर दी. यह विचार प्रगट करते समय निदान ' सूक्ष्म ' शब्द का अर्थ अरुणदत्त ने क्या किया है उसको तो ध्यानमें लेना था. ' सूक्ष्मः स्रोतः प्रचारित्वात् ' जिसका संचार स्रोतसों में होता है तथा जिसके गुण रूक्ष, लघु, शीतादि हैं वह पदार्थ अतींद्रिय कैसे हो सकता है. रूक्ष लघ्वादि, अतींद्रिय पदार्थ के गुण क्या कभी हो सकते हैं ?

इस प्रकार जो विषय सीधासाधा था, समझने योग्य था उसको अपनी अशुद्ध विचारधारा द्वारा उलटा सुलटा करते. हुए, शास्त्रीय विज्ञान में बडी बाधा उत्पन्न की. चरकके वायु संबंधी ' स हि भगवान्... धाता ... प्रजापतिः विश्वकर्मा ... विष्णु ... वायुरेव भगवानितिः ' इस वाक्य पर चक्रदत्त ने क्या लिखा वह देखिये है, ' वायुरिह देवतारूपो ऽ भिप्रेतः। तेन तस्य भूतरूपचतुर्युगान्तकरानिलकरणलिंगम-विरुद्धं, एवं यदन्यदप्यनुपपद्यमानं वायोः तदपि देवतारूपत्वेनैव समाधेयम्। इस प्राचीन टीका की ओर जरा भी ध्यान न देते हुए तथा किसी भी शारीर द्रव्य को, यदि वह बडे बडे शारीर कार्य कराता हो तो उसे बडेबडे विशेषण अर्थवादात्मक दिये जाते हैं। इसका भी विचार न करते हुए, रूक्ष शीतादि गुणयुक्त वायु-द्रव्य को अतींद्रिय कह देना कितना धार्ष्ट्य है, यह आप ही देखिये. आयुर्वेद के प्रगति में यदि कोई बडी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भारी बाधाये आजतक आई हैं, तो वे यही कि, आधुनिकों ने प्राचीन टीकाकारों के विचार की ओर जरा भी ध्यान नहीं दिया. बुद्धिमत्ता का ठेका प्राचीनोंने ही लिया था, आधुनिकों में उसका अभाव है, ऐसा मेरा मत नहीं है. परन्तु प्राचीन ग्रंथोंको जब हम समझना चाहते हैं तो प्राचीन टीकाकारोंने उस संबंध में क्या कहा है इसकी ओर हमने पूरा ध्यान देना चाहिए यही मेरी धारणा है.

एवं वायु अतींद्रिय नहीं है किंतु बाह्य वायुके (हवाके) समान ही एक वायुरूप पांच भौतिक द्रव्य है, यह सिद्धांत चरक सुश्रुतादि ग्रंथो के वाक्यों से निश्चित होता है. उसी प्रकार पित्त कफ भी पांचभौतिक द्रव्य है. तथा इन द्रव्यों का प्रात्याक्षिक उनको वृद्धावस्था में वमन विरेचनादि द्वारा शरीर से बाहर पडने के पश्चात् किया जा सकता है. यह बात निश्चित रूपसे स्थिर हो जाना चाहिये.

(५) शरीर प्रात्याक्षिक-जितने शरीरावयव, स्थूल है, उनका प्रात्याक्षिक आज उपलब्धे होनवाले आलेखों (charts) परसे हरएक गुरु को, अपने विद्यार्थियों को, करा दिया जा सकता है. चारों प्रकार की सिराएं रोहिणी, नीला, अरुण, तथा गौरी और धमनी, भी आलखों में दिखाई जा सकती हैं. कला, स्रोतस्, द्वादशाग्नि, सप्तत्वचा, मर्म ये सब सूक्ष्म होनेके कारण उनका प्रात्यक्षिक नहीं हो सकता, किंतु अनुमान प्रमाण द्वारा निश्चित कराई जा सकती है.

प्रत्यक्षतश्च यत् दृष्टं शास्त्रदृष्टं च यद्भवेत् । समासतस्तदुभयं भूयो ज्ञानविवर्धनम् ॥

इस उक्तिके अनुसार जो विषय हमें प्रत्यक्ष नहीं दिखाने बनता उसे शास्त्रदृष्ट समझ कर उसका विज्ञान विद्यार्थियों को करना चाहिये.

सुश्रुत का भाषांतरः- इस संबंधमें श्री पटवर्धनजी ने अंग्रजी में लिखा हुआ सुश्रुत शारीर का भाषांतर हिंदी भाषा में कराने का प्रयत्न तात्काल किया जाना चाहिये. उससे हरएक गुरु को शारीर पढाना बडा ही सुलभ हो जायगा. और सुश्रुत की प्रत्यक्ष शारीरके विज्ञान की परंपरा आदर्शके समान प्रत्यक्ष हो सकेगी.

[६] शिक्षण-पद्धति विषयप्रधान हो अथवा ग्रंथप्रधान

ग्रंथप्रधान शिक्षणः- विषयप्रधान शुद्ध आयुर्वेद के ग्रंथ आज उपलब्ध नहीं है. वे तज्ञ विद्वानों द्वारा तैयार कराना होंगे. मेरा निजी मत ऐसा है कि हमारे ग्रंथ-चतुष्टय में एक शब्द भी निरर्थक नहीं है. आजकाल हमें वारंवार सुनाया जाता है कि इन प्राचीन ग्रंथों में जो कुछ उपयुक्त है वह तो ले लिया जाय, किंतु जो विस्तार अनुपयुक्त है वह अलग कर दिया जाय. किंतु मैं दावे के साथ कह सकता हूं कि इनमें अनुपयुक्त ऐसा एक अक्षर भी नहीं है. प्राचीन लेखक वैय्याकरणों के समान ही 'अर्धमात्रालाघवेन पुत्रोत्सवं मन्यंते' इसी विचारधारा के अनुयायी रहे हैं. अतः व्यर्थ का विषय उसमें है ही नहीं. ग्रंथचतुष्टय में एक ग्रंथ में की वही बात-जब कभी उन्ही वाक्यों में-दूसरे में भी कही गई है. अतः केवल यही पौनः-पुन्य (repetition) निकाल देने की आवश्यकता है किंतु यह कार्य अच्छे विद्वान् वैद्यों को कई दिन तक करने योग्य है. जब तक वह हो कर, मान्य ग्रंथ तयार नहीं होते तब तक ग्रंथप्रधान पठनपाठन ही सुविधा का रहेगा.

ग्रंथोक्त श्लोक कंठ करनेकी प्रथा

दूसरे, हमे फिर से प्राचीन श्लोक कंठ करने की प्रथा का भी पुनरुज्जीवन करना है. वह प्रथा विशेषतः निदान और चिकित्सा के लिये बडी ही उपयोगी होती है. अष्टविध परीक्षा, सर्व रोगनिदान, दोषों के समावस्था, क्षीणावस्था, वृद्धावस्था का स्वरूप, माधवनिदान समग्र ये कंठ होने से चिकित्सा बडी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ही सुलभ होती है. इस दृष्टिसे ग्रंथप्रधान शिक्षण-पद्धति ही अभी विशेष सुविधाजनक होगी. इस तत्वको सरकारी पाठ्यक्रमके विधाता भी मान्य किये हुए है, कारण अष्टांगहृदय ग्रंथ ही पाठ्यक्रमके एक परीक्षापत्र में अंतर्भूत किया हुआ है. ग्रंथोंकी भाषा भी प्रासादिक होने के कारण विद्यार्थी उसीसे परिचित होना चाहिये.

शुद्ध आयुर्वेदीय शिक्षणपद्धतिका उद्देश

टीका पढने की आवश्यकता- प्राचीन शिक्षाप्रणाली के अनुसार इन ग्रंथों की निदान एकेक टीका भी पाठ्यक्रम में अंतर्भूत होनी चाहिये. उसके अतिरिक्त, ग्रंथ ठीक समझने की पात्रता विद्यार्थियों में न आ सकेगी. शास्त्रीय ज्ञान, वास्तविक और परिपूर्ण करा देना, यही इस शुद्ध आयुर्वेदीय पद्धति का उद्देश है, ऐसा मैं समझता हूं. ग्रंथों का वास्तविक अर्थ, टीकाकारों का विवेचन पढे बिना विज्ञात नहीं हो सकता. विद्यार्थी तो अनभिज्ञ होते ही हैं, किंतु उनके गुरु भी जब तक टीका नहीं पढते, तब तक वास्तविक अर्थ से अपरिचित रहते हैं, और अन्त में जब उनका अर्थ टीकाकारों के विचारसे भिन्न किया जानेपर विषय समझने मे आपत्ति आने लगती है, तब इन्हीं मान्य टीकाकारों का अर्थ ही निर्णायक लेना पडता है. एवं ये टीकाएं मार्गदर्शक (Mile Stones) होतीं हैं. तथा सूक्ष्मादि शब्दों के वास्तविक अर्थ समझने में सहायक होतीं हैं. यदि ग्रंथचतुष्टय के आधार पर शिक्षणक्रम निश्चित करना हो तो हरएक ग्रंथकी एकेक टीका (१) अरुणदत्त (२) चक्रपाणी (३) डल्हण तथा (४) इंदु भी पाठ्यक्रम में अन्तर्भूत कीं जावें. शुद्ध आयुर्वेदीय शिक्षणक्रम यशस्वी हो कर फिरसें गत पिढी के गुरुवर्य लागवणकर, त्र्यंबकशास्त्री जैसे आयुर्वेद के विद्वान् पैदा कराना हों, तो वही प्राचीन पाठ्यक्रम मान्य करना होगा. केवल उदरंभर वैद्यों की वृद्धि होने के लिये मिश्र शिक्षण है ही.

[७] पाठ्य पुस्तकें

ग्रंथप्रधान शिक्षण इस परिषद को मान्य होता हो तो पाठ्य पुस्तकें अभी बनानेकी आवश्यकता ही नहीं है. किंतु यदि वह अस्त्रीकृत हो तो प्रथम हरएक विभाग संबंधी एकेक वाक्य ग्रंथचतुष्टय में से एकत्रित किया जाना चाहिये. उसमें से एक भी विचारणीय वाक्य, अपनी योजना में अंतर्भूत होना रह न जावे, इस ओर विशेष ध्यान देना चाहिये. इस कार्य के लिये तीन विद्वान् वैद्य वेतन दे कर नियुक्त किये जाना चाहिये. प्रथमतः विषयोंका वर्गीकरण करना होगा, तत्पश्चात् तत्तद्विषय संबंधी वाक्यों का. बाद में समानार्थी वाक्यों में से एक ही वाक्य लेकर अन्य वाक्यों में जो एक या अधिक विचार हों उनका अंतर्भाव इसी में करना होगा. इस सब कार्य में, मूल विचारों में जरा भी बाधा न आवे, इस ओर विशेष ध्यान देना होगा. इस संबंध में एक कमिटी नियुक्त होना चाहिये. अभी तो ग्रंथवार पाठ्यक्रम ही मान्य किया जाय. जब इस प्रकार विषयप्रधान ग्रंथ बन जाय, तब परिवर्तन किया जा सकता है.

(८) विषयवार ग्रंथांश का व्याख्यानों में विभाजन

शुद्ध आयुर्वेद का अभ्यासक्रम, जो बंबई सरकार द्वारा अभी प्रसिद्ध हुआ है, उसमें जितनी व्याख्यानों की संख्या, हरएक विषय के लिये नियुक्त है वह पर्याप्त प्रतीत होती है. उसमें अभी परिवर्तन करने की आवश्यकता नहीं है. प्रत्यक्षानुभव के पश्चात् विद्यालयों से अथवा गुरुजनों से जो सुझाव होंगे उनका विचार एक वर्ष शिक्षण के पश्चात् किया जा सकता है.

यहांतक पाठ्यक्रम के संबंध में जो सूचनाएं करना थीं उनका विचार हुआ. अब इस पाठ्य-क्रम के अनुसार जो विद्यार्थी परीक्षोत्तीर्ण होंगे उनको प्रतीत होनेवाली असुविधाओं का विचार करें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रजिस्ट्रेशन

(१) इस पाठ्यक्रमके अनुसार उत्तीर्ण विद्यार्थी आयुर्वेदीय व्यवसाय कर सकेंगे; यह सुविधा उन्हे सरकार द्वारा दी गयी है. परंतु उनका रजिस्ट्रेशन अथवा एन्लिस्टमेन्ट न हो सकेगा. ऐसा क्यों? जिस आयुर्वेदशास्त्र संबंधी ये ज्ञान संपादन करते हैं उसमें इनका रजिस्ट्रेशन होने में कौनसी बाधा होती है? इन वैद्यों का एक अलग राजिस्टर खोल कर, 'शुद्ध आयुर्वेदिक वैद्य' अथवा अन्य इसी अर्थ को द्योतित करनेवाला हेडिंग दे कर, उस प्रकार का इनका रजिस्ट्रेशन किया जाय. परन्तु इसे सरकार की मान्यता है यह बात तो जनता को अवश्य विज्ञात कराना होगी. नहीं तो यह समग्र प्रयत्न निष्फल होगा. जिस प्रकार सरकार डेंटिस्ट को, आप्थेलिमिस्ट को मान्यता देती है,— अब तो होमियोपेथ ही रजिस्टर होंगे— उसी प्रकार इन्हे भी मान्यता अवश्य होना चाहिये. इस विषय में सरकार की विचारधारा निश्चित कराये विना हम लोग एक कदम भी आगे न बढ सकेंगे. और जिस पाठ्यक्रम के लिये आज सरकार को हम कोटिशः धन्यवाद देते है, उसके संचालन में हमें तनिक भी उत्साह न रहेगा. सर्वसाधारण जनता सरकार की मान्यता को ही अत्यधिक महत्व देती है, और वह योग्य भी है. उसके अभाव में सर्व प्रयत्न व्यर्थ होगा. अतएव प्रधानमंत्री तथा स्वास्थ्यमंत्रीजी को हमारी विनम्र प्रार्थना है कि इस संबंध में अपनी नीति का शीघ्रातिशीघ्र निर्धारण करें, और उसे प्रसिद्ध करें.

औषधी-करण की सुविधा

(२) उपरिनिर्दिष्ट रजिस्ट्रेशन होने लगते ही, इन वैद्यों को आसवारिष्ट बनाने की, तथा अफीम, गांजा, भांग इत्यादि एक्साइज ड्यूटीवाले द्रव्य प्राप्त करने की व उपयोग में लाने की सुविधा हो सकेगी. इन द्रव्यों के अभाव में वैद्यक व्यवसाय चल नहीं सकता. शुद्धायुर्वेदीय वैद्यको अपने औषधालय में हरएक प्रकारकी औषधियां बनाना पडतीं हैं. प्राचीन परंपरा में स्वावलंबन का बडा महत्व है. औषधि बनानेवाला व्यक्ति एक, और काम में लानेवाला दूसरा, यह परावलंबन प्राचीन परंपरा को मान्य नहीं है. 'नात्मार्थं नापि कामार्थमथ भूतदयातपि' यह आयुर्वेद का ध्येय है. यह भूतदया तब ही सफल होता है जब औषधी अपनी बनाई हुई अर्थात् निश्चित द्रव्ययुक्त हो. व्यवसायी लोग स्वार्थ की ओर अधिक ध्यान देंगे यह स्वाभाविक है. उनपर सरकार का नियंत्रण जब तक नहीं है तब तक केवल उनके सुबुद्धि पर ही जनता और वैद्यों को अवलंबित रहना पडता है. यह बुद्धि कब भ्रष्ट होगी इसका कोई नियम नहीं है; जैसा की अभी सरकारको कलकत्तेके कई एलोपेथिक कारखानदारों के संबंध में अनुभव आया है. अतएव यह आसवारिष्ट बनानेकी और अफीम आदि विषोपविष पर्याप्त मात्रा में रखनेकी, सुविधा इन शुद्धायुर्वेदीय वैद्यों को अवश्यमेव प्राप्त होना चाहिये.

वैद्यक विषयक प्रमाणपत्र की मान्यता

(३) शुद्धायुर्वेदीय वैद्यों का केवल चिकित्साविषयक प्रमाणपत्र भी सरकारमान्य होना चाहिये. ऐसा न होगा तो उसने चिकित्सा कराने के लिये कोई भी सरकारी या जनपद, कॉर्पोरेशन आदि संस्थाओं में कर्मचारी तैयार न होंगे. देहातों में भी इन संस्थाओं का संबंध रहता है. अतः इस सुविधा की नितांत आवश्यकता है. प्रदीर्घ काल रहनेवाले (क्रॉनिक) व्याधिओं में आयुर्वेदीय चिकित्सा अत्यंत लाभदायक होता है, इस बात का विश्वास सर्व सुशिक्षित लोगों में अस्तित्व में है. सुशिक्षितों को ही दीर्घ व्याधि अधिक प्रमाण में होते हैं, ऐसा अनुभव है. ऐसे दीर्घ व्याधियों में प्रमाणपत्र की अधिक आवश्यकता

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होती है. यदि यह सुविधा शुद्धायुर्वेदीय वैद्यों को प्राप्त न हो सकी तो जनता एवं वैद्य दोनों को हानिकारक होगी. अतएव इन वैद्यों के इस संबंध के प्रमाणपत्र अवश्य मान्य किये जाना चाहिए.

शुद्ध पाठ्यक्रम का सातत्य कैसा टिकेगा ?

(४) जनतंत्र राज्य में एक शासनसंस्था के हात में सब सत्ता रहती है, तथा एक प्रकार के विचारवाले मंत्रियों के विचारानुसार कार्य चलता है. उन मंत्रियों ने प्रारंभ किये हुए कार्यों को परिवर्तित मंत्री भी, बहुधा चलाते हैं. परंतु इस संबंधका कोई निश्चय नहीं होता. श्री. गिल्डर मंत्री महोदय के कार्य-काल में मिश्र शिक्षण का अधिष्ठान जमाया गया. अनुभव से सिद्ध हुआ कि इस शिक्षण से आयुर्वेद का परिपोष तो दूर ही रहा, सर्वनाश अत्यंत निकट भविष्य में होगा. अतएव अनुभव से सचेत होकर शुद्ध पाठ्यक्रम आज मान्य किया जा रहा है. यह एकबार का अनुभव पुनः परिवर्तन नहीं होने देगा, ऐसा हमें विश्वास है. परंतु केवल उस विश्वास पर अवलंबित न रह कर, यदि कोई ऐसी वैधानिक योजना हो सके, जिससे शुद्ध वैद्यों को मिली हुई यह सुविधा, सदैव के लिये कायम रहे तो वह योजना बडी ही उत्साहवर्धक होगी. दोनों प्रकार के पाठ्यक्रम, पालकों व विद्यार्थियों के सामने रहेंगे. जिसे जो स्वीकार करना हो वह किया जाय. परन्तु गुरुपरंपरा फिरसे जो चालू हो रही है वह अबाधित रहे, उस में सरकार हस्तक्षेप न कर सके यही एक अभिलाषा है. इस संबंध में श्री. मुरारजीभाई की मिनिस्ट्री विधान की किसी धारा की योजना कर सके, तो वैद्य-समाज पर बडे ही उपकार होंगे. इस कार्य के लिये डेप्युटेशन की योजना करने की विनंति, अभ्यासक्रम समिति के अध्यक्ष महोदय से करता हूं.

सरकारसे अनेक सुविधाओं की याचना

(५) इस शुद्ध आयुर्वेदिक पाठ्यक्रम को सफल करने के लिये हमें सरकार से अनेक सुविधाओं की याचना करना होगी. जिसमें सबसे बडी बात है रुग्णालयों की. हरएक सरकारी रुग्णालय में कुछ रुग्ण-शय्याएं केवल शुद्धायुर्वेदीय चिकित्सा के लिये अलग से निर्धारित की जाना चाहिये. इनपर स्थानीय शुद्धा-युर्वेदीय चिकित्सातज्ञों का नियंत्रण रहे. विद्यार्थियोंको, जो स्थानीय गुरु पढावेंगे, उन्हींके नियंत्रण में ये शय्याएं रहे. उन रुग्णोंके पथ्य की व्यवस्था गुरु व्यक्तियों के निर्देशानुसार की जाय. जिस प्रकार पंचकर्म, औषधीयोजना, परिचर्यादिका लिखित निर्देश गुरु-वैद्य करें, उसी प्रकार परिचारक द्वारा वहां का कार्य संचालित हो. रुग्णोंके पत्रक गुरु जिस प्रकार कहें, उसी प्रकार लिखा जाय. आवश्यक आयुर्वेदीय औषधियों का प्रबंध सरकार द्वारा किया जाय. अन्य आवश्यकताएं गुरुके आदेशानुसार पूर्ण की जावे. वहां के एलोपेथिक अधिकारी रुग्ण को देखें. अपने पत्रक अलग लिखें. रुग्ण की परिस्थिति में जो परिवर्तन होता जाय उसे इच्छानुसार अपने शास्त्र की भाषा में लिखे. परन्तु चिकित्साके क्रम में कोई भी गडबडी न करें. इस प्रकार सुविधा मिलने से चिकित्सक गुरु, अपने शिष्योंको प्रात्यक्षिक चिकित्साका अनुभव दिला सकेगा. इसके अभाव में विद्यार्थियों को प्रात्यक्षिक शिक्षणकी अभी अन्य कोई सुविधा दिखती नहीं है.

सर्जन जनरल का हस्तक्षेप वांछित नहीं

ऐसे रुग्णालय के अलग किये हुए विभागपर सर्जन जनरल का किसी भी प्रकारका हस्तक्षेप न हो सके, तथा चिकित्साविषयक आधिपत्य न रहे, इस बात की व्यवस्था मिनिस्टर द्वारा ही होनी चाहिये. चिकित्सा संबंधी सर्व जवाबदारी वैद्योंकी ही होना आवश्यक है.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उत्तीर्ण विद्यार्थिओंका सरकारी संस्था में स्थान

(६) शुद्धायुर्वेद का शिक्षण संपादित किये हुए वैद्यों को सरकारी आयुर्वेदीय रुग्णालयों में, औषधालयों में तथा औषधी बनानेके कारखाने आदि संस्थाओं में अवश्य ही स्थान दिये जाना चाहिये. ऐसे औषधालयों में शुद्ध आयुर्वेदीय पाठों के अनुसार बनाई हुई औषधियां ही चिकित्सा कार्य में उपयोग में लाई जाय. व्रणशोधन, लेप, व्रणपूरण, बंध आदि सब व्रणोपचार सुश्रुतोक्त द्रव्यों द्वारा ही करायें जाय. ये सब द्रव्य स्थानीय जंगलों में सहज उपलब्ध हो सकते हैं. इस निर्बंध के कारण आयुर्वेदशास्त्रीय ज्ञान की भी उन्नति होगी और स्वल्प द्रव्य-व्यय करने से कार्य होने लगेगा. वनस्पतियों में जो अचिंत्य गुण हैं उनसे प्रत्यक्ष प्रयोग द्वारा, हम लाभ उठा सकेंगे. अतएव शहरों तथा ग्रामीण शुद्धायुर्वेदीय संस्थाओं में इसी पाठ्यक्रमसे उत्तीर्ण वैद्योंकी योजना की जाना चाहिये. आजतक परदेश से तैयार आये हुए मलम, आईडोफॉर्म आदि व्रणपूरण करने के द्रव्यों तथा अन्य औषधियों में, देश का करोडो रुपया परतंत्रावस्था में बरबाद हुआ. अब समय आया है कि स्वतंत्रता के काल में उनको बचा कर ऐसे अनुभवसिद्ध द्रव्य हम तयार करें जिनको सस्ते कीमत में परदेश में भेज सकें. परदेश से द्रव्य का ओघ अपने देश के तरफ लौटाने का एक बडा भारी साधन यह भी हो सकता है.

सरकार द्वारा शुद्ध आयुर्वेदीय विद्यालय का प्रारंभ

(७) जिस उदात्त और अर्थपूर्ण विचारधारा का आश्रय ले कर बंबई सरकार ने इस शुद्धायुर्वेदीय पाठ्यक्रम को मान्यता देनेका निश्चय किया है, उसीका फलस्वरूप एक शुद्धायुर्वेदीय विद्यालय भी सरकारद्वारा प्रारंभ किया जाना चाहिये. स्वतंत्र कार्य करनेवाले गुरुजनों के लिये वह एक नमूना होगा, तथा उस विद्यालय कार्यप्रणाली को आदर्शभूत मान कर शिक्षा देनका कार्य, इन्हे भी करते बनेगा. इस विद्यालय से दूसरा लाभ यह होगा कि शुद्धायुर्वेदके संबंध में जनता की भी रुचि दिन प्रतिदिन वृद्धिंगत होगी. जनता सदैव ही राजशासन की ओर अपनी दृष्टि लगायें रहती है. 'राजा बोले दल हाले' वह उक्ति अक्षरशः सत्य है. शासनसंस्था के संबंध में जनता का इतना आदर रहता है कि उसने किया हुआ कार्य मानो ईश्वर का ही कार्य है, ऐसा समझा जाता है. बंबई सरकारने शुद्धायुर्वेद को मान्यता देते ही सारे हिंदुस्थान में मानो झंझावात के समान हलचल मच गई है. कई मिश्र शिक्षण देनेवाली संस्थाओं को यह कुठाराघात सा प्रतीत हो कर, कृष्ण के जन्म से पूर्व ही जिस प्रकार कंस को दुःस्वप्नों ने ग्रस्त कर दिया था, उसी प्रकार इन्हे अपना अस्तित्व ही नष्ट हो जाने का डर प्रतीत होने लगा है. परन्तु इतना व्यथित होने का कोई कारण नहीं है. जनता के सामने एलोपेथी तथा मिश्र शिक्षण की संस्थाएं कई वर्षों से अपना कार्य कर रहीं हैं. सरकारने उन दोनों को शक्त्यनुसार हर प्रकार की मदत दी हुई है. मिश्रशिक्षा का अनुभव निदान गत २५ वर्ष से सरकार ले रही है. उससे उत्तीर्ण विद्यार्थी किस पेथी का अवलंब करते है यह भी सरकार जानती है. ऐसी अवस्था में शुद्धायुर्वेद को भी, अधिक नहीं तो निदान मिश्रशिक्षण प्राप्त संस्थाओं के बराबर मदत करना सरकार का क्या कर्तव्य नहीं होता? सब पहिलवानों को बराबर खुराक खिलाने के पश्चात् उन्हे मैदान में युद्ध के लिये खडा करना चाहिये. यही समान दृष्टि सरकार की होना चाहिये. वही अपना कर्तव्य शासनसंस्था करते हुए, उस संबंध में उसे धन्यवाद देना तो एक तरफ रहा, शुद्ध शिक्षणप्रणाली को शाप देना तथा सरकार पर दोषारोपण करना असभ्यता का अतिरेक करना है. अस्तु.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सरकारसे हमारी विनंति

हमारी सरकार से विनंति यही है कि जिस प्रकार बंबई तथा अन्य स्थानों में अपने खर्चे से अनेक मिश्रशिक्षण के विद्यालय सरकार चला रही है; तथा पूना, नगर, सातारा आदि स्थानों के मिश्रशिक्षण देनेवाले विद्यालयों को पर्याप्त ग्रँट दे रही है, उसी प्रकार नमूने के लिये केवल एक शुद्ध शिक्षण देनेवाला विद्यालय खोलकर उसका स्वयं संचालन करे, जिससे प्रांतभर के गुरु उसे देखकर, उसी प्रकार का शिक्षण-क्रम घरघर देनेका प्रयत्न कर सकें. आवश्यकतानुसार इसी विद्यालय में एक छह महिने का ट्रेनिंग-कोर्स प्रारंभ कर दिया जा सकेगा, जिससे शिक्षा की दिशा प्राप्त करते हुए समग्र प्रांत में एक ही पद्धति की शुद्ध शिक्षा की प्रणाली चालू हो सके.

एक हि नमुने का तथा सर्वमान्य शिक्षण

नमूने के लिये एक उदाहरण पर्याप्त होगा. अष्टांगहृदय का प्रथम अध्याय पढाना प्रारंभ करते ही वातदोष के गुण 'तत्र रूक्षो लघुः शीतः खरः सूक्ष्मश्चलोनिलः।' ऐसे दिये हुये है. यहां सूक्ष्म शब्द का अर्थ सूक्ष्मः स्रोतः संचारि ऐसा टीकाकारोंने स्पष्ट दिया है. परंतु, प्रकांड आधुनिक विद्वान् उसे 'अतींद्रिय' कह कर विद्यार्थीयों के अंतःकरण में संशयोच्छेद न करते हुये उस संशय को द्विगुणित करते है. यह उदाहरण पीछे भी दिया गया है. जब उपरिनिर्दिष्ट एक प्रकार के ट्रेनिंग विद्यालय में इन सब शंकाओं का निरास हो कर, वह गुरु-समाज विद्यार्थियों को शिक्षण देगा तब सब शिक्षण एक ही नमूने का तथा सर्वमान्य हो सकेगा. इस प्रकार के विद्यालय की आवश्यकता सिद्ध करानेवाले और भी अनेक कारण हैं, जिनका समयाभाव के कारण यहां उल्लेख नहीं किया जा रहा है, परंतु विद्यालय की आवश्यकता अत्यंत अधिक है. सरकार जब इस प्रकार का विद्यालय खोलेगी तब जनता को इस शुद्ध पाठ्यक्रम पर अधिक विश्वास होने लगेगा.

अन्य प्रांतों को इस पाठ्यक्रमसे लाभ कैसा हो सके ?

(८) इस पाठ्यक्रमसे अन्य प्रांतस्थ वैद्य भी अभी से लाभ उठा सके, इसकी भी सुविधा सरकार द्वारा करा लेना आवश्यक है. यदि अन्य प्रांतों में इसी प्रकार का शुद्धायुर्वेदीय पाठ्यक्रम मान्य करानेका प्रयत्न किया जाय तो संभवतः उस प्रांतीय सरकार का उत्तर यही मिलेगा कि, बंबई में इसका प्रचार कहां तक होता है, उसे वर्ष दो वर्ष देख कर, तत्पश्चात् तद्विषयक कानून यहां भी स्वीकृत किया जायगा. अत एव जिन अन्यप्रांतीय वैद्योंको इस प्रांत में नियुक्त की हुई वैद्यों की कमेटी योग्य समझे उन्हे भी 'योग्य' गुरुओंके रजिस्टर में अंतर्भूत कर सके ऐसी कानून की धारा बन जाना आवश्यक है. मैं एक परप्रांतस्थ वैद्य हूं. परंतु आपके अनन्य प्रेमके कारण इस प्रांत के वैद्यक विषयक हरएक कार्य से, मेरा घनिष्ट संबंध रहा है. १९४७ में आपके प्रांत के तृतीय संमेलन का कार्यभार मुझे ही सौंपा गया था. उस समय के भाषण को यदि आप पढे, तो देखेंगे कि जिस प्रकार का शिक्षणक्रम आपकी सरकार ने आज स्वीकृत किया है वही मैंने निर्दिष्ट किया था. ३० वर्ष से गुरुपरंपरा के अनुसार कई विद्यार्थियों को अपने घर रख कर यह विद्या पढाई है. और अभी भी पढा रहा हूं. विद्यापीठ की परीक्षाएं दिलाता हूं. प्रतिदिन प्रातःकाल ६ बजे से दो घंटे मेरा यह पढाने का कार्यक्रम चलता है. मैं इस प्रांत का सेवक हूं और अंतःकरण से चाहता हूं कि मेरे विद्यार्थियों को इस शुद्ध पाठ्यक्रम के परीक्षाओं में उत्तीर्ण करा कर अपनी चिर वांछित पिपासा तृप्त करने के सुख का अनुभव लूं. अब मेरे सामने 'कृतांतकटकामलध्वजजरा' दिखने लगी है. अतः यदि इस प्रकार की कानूनी कार्यवाही अभी की जा सके तो बडा ही उपकार अन्य प्रांतों पर होगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परप्रांतस्थ वैद्यों को मान्यता मिलने पर नियमानुसार शिक्षण-संपादन करनेवाले विद्यार्थी परीक्षार्ह समझे जा कर, उनकी परीक्षा इसी प्रांत में ली जावे.

शुद्ध आयुर्वेदरूपी अमृत का पान करने की अभिलाषा

बंधुओं, इस प्रकार शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रम यशस्वी होने के लिये, जो जो आवश्यक विचार मुझे सूझे वे आपके सामने रखे हैं. मैंने एक विस्तृत शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रम अपने प्रांत के बोर्ड के लिये बनाया था. वो भी मैं यहां लाया हूं. उसके अधिकांश को अब मध्यप्रांत बोर्ड ने स्वीकार किया है, ऐसा सुन रहा हूं. कारण अब यह शुद्धायुर्वेदरूपी अमृत का पान कराने की अभिलाषा— गत बीस पंचवीस वर्ष के मिश्र-शिक्षण संबंधी कटु अनुभव के पश्चात्—सब वैद्यों में दिन प्रतिदिन प्रबल होती जा रही है. जिनका चरितार्थ मिश्रशिक्षण पर चल रहा है, उनमें उस अभिलाषा का होना असंभव नहीं तो निदान अनपेक्षित है. मैं यह भी अनुभव कर रहा हूं कि कई मिश्रशिक्षणप्राप्त वैद्य भी (जो अपने को सदैव डॉक्टर कहलाना ही पसंद करते हैं) कह रहे है कि जिस प्रकार डेंटिस्ट, आय्-स्पेशालिस्ट आदि विशेषज्ञ हुआ कहते है, उसी प्रकार शुद्धायुर्वेद के पाठ्यक्रमोत्तीर्ण विद्यार्थी आयुर्वेद विशेषज्ञ माने जा कर, अन्य स्पेशालिस्टों को समान एक स्पेशालिस्ट के नाते रजिष्टर किये जाय. ये सब बातें शासनसंस्था के आधीन है. परंतु सब ही मिश्र शिक्षणप्राप्त चिकित्सक उतने विरोधी नहीं है, जितने कि आपके प्रांत के मिश्रशिक्षण देनेवाले संस्थाध्यक्ष किडमिडा कर चिल्ला रहे हैं. हमें इन सब बातों से जरा भी चिंता का कारण नहीं है.

आयुर्वेद ऋषिमुनियोंकी देन है

आयुर्वेद इस देश के ऋषिमुनियों की तथा आप्तों की देन है. उसके अनुसार चिकित्सा करनेवाले यशस्वी वैद्य निर्माण करना हमारा कर्तव्य है. विचारवान् अन्य देशीय तज्ञों को भी इस ऋषिप्रणीत कला का महत्व अभी भी प्रतीत हो रहा है, और शुद्ध चिकित्साकला की प्राप्ति इसी देशमें हो सकेगी ऐसा सर ई. कॅरेल जसे प्रसिद्ध विद्वान् कह रहे हैं. अतः हमारा कर्तव्य है कि इस कला को जीवित रखने का हम पूरा प्रयत्न करें. उसके विरोध में कोई कितना भी चिल्लावें, हमें उसकी चिंता नहीं. परन्तु उसे जीवित रखने के प्रयत्न में पाश्चिमात्य देशों के तथा उनका अनुकरण करनेवाले एतद्देशीय एलोपेथिक चिकित्सकों के समान इस विद्याको केवल द्रव्योपार्जन का व्यवसाय न समझते हुए, व्यक्तिमात्र, निर्धन से निर्धन, रोगपीडित व्यक्ति, जो हमारे शास्त्र के शरण आवे, उसकी शुद्ध बुद्धि से सशास्त्र चिकित्सा करना, उससे सुयोग्य पथ्य करना, इत्यादि आयुर्वेदशास्त्र के जो प्रधान नियम हैं, उनका उल्लंघन स्वप्न में भी न करने का हमने संकल्प करना चाहिये.

नात्मार्थं नापि कामार्थमथ भूतदयां प्रति ॥ पथ्ये सति गदार्तस्य किमौषधनिषेवणम् ॥

आदि सूत्रों का शब्दशः पालन करना चाहिये.

मैंने आपका अधिक समय लिया इसके लिये क्षमा प्रार्थी हूं. शुद्धायुर्वेद को परमेश्वर अजरामर करे यही अभिलाषा है.

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाशिक जिल्ह्यांतील
कुष्ठरोग्यांच्या औषधोपचाराबाबत अपुरी वैद्यकीय व्यवस्था

(मुंबई विधिमंडळांत विचारलेले कांहीं प्रश्न व आरोग्यमंत्र्यांचीं उत्तरें)

प्रश्न– नाशिक जिल्ह्यांत अलिकडे कुष्ठरोग्यांची संख्या बरीच वाढली आहे ह्याची सरकारला दखल आहे काय ? उत्तर– नाहीं.

प्रश्न– नाशिक शहरांत व नाशिक जिल्ह्यांत अशा कुष्ठरोग्यांची संख्या किती आहे ?

उत्तर - सदरची माहिती उपलब्ध नाहीं.

प्रश्न–ह्या जिल्ह्यांतील अशा रोग्यांच्या औषधोपचारांची सोय असल्यास ती काय आहे ?

उत्तर– अशा बाह्य रोग्यांना डी. डी. एस्. टॅब्लेट्सचा सर्व सरकारी हॉस्पिटलस् व दवाखाने तसेंच म्युनिसिपल व डि. लो. बोर्डाचे दवाखाने ह्यांतून उपचार केला जातो. शिवाय नाशिक येथें असलेल्या मिशनरी कुष्ठरोग हॉस्पिटलमध्यें अशा रोग्यांना दाखल करून घेतलें जातें. सरकार ह्या मिशनरी हॉस्पिटलला कुष्ठरोग्यांचे खर्चाकरितां प्रमाणिक स्वरूपाची वार्षिक देणगी देतें.

प्रश्न– ह्या सुखसोयी सर्व कुष्ठरोग्यांस पुरेशा आहेत काय ?

उत्तर– होय; बाह्य रुग्णास औषधोपचाराबद्दल त्या पुरेशा आहेत. सांसर्गिक स्वरूपाच्या रुग्णांकरितां स्वतंत्र जागेची आवश्यकता आहे.

प्रश्न– जर सुखसोयी कुष्ठरोग्यांना पुरेशा नसतील तर सरकार ह्याबाबत काय करूं इच्छितें ?

उत्तर– ह्या कामीं नाशिक म्युनिसिपॅलिटीस आर्थिक मदत देऊन कुष्ठरोग्यांकरितां एक स्वतंत्र वसतिस्थान काढण्याबाबत विचारविनिमय चालू आहे.

असली केशर

हवें असल्यास ' आयुर्वेद सेवा संघा ' कडे मागणी करावी.

अनुक्रमणिका

आयुर्वेद ही संपूर्ण विद्या आहे !	४२०
दोषक्षयजन्य व्याधींचें निदान	४२१
मण्डला जिल्ह्यांतील ' गरम पानी '	४२३
आर्ष ग्रंथांतील सूत्रस्थानें	४२५
मानसिक विकार	४३१
मानव जातीचे तीन महान् वैद्य	४३३
सार्वजनिक आरोग्यासंबंधीं उपाय	४३४
होमिओपॅथिक रजिस्ट्रेशन ट्रिब्युनल	४३५
आयुर्वेद विद्वत् परिषद, मुंबई	४३७
स्वागताध्यक्ष वै. डेग्वेकरशास्त्री यांचें भाषण	४३९

आदिवासी कार्यकर्ता
शिक्षण केंद्र, मंडला

शिक्षणकाल ९ महिने. शिष्यवृत्ति ३० रु.
केंद्रसंचालक ही उपाधि
व उत्तीर्ण होणाऱ्यास ७५ रु. दरमहा पगार.
२ वर्षे कार्य करण्याचा बॉंड द्यावा लागेल.

वनवासी सेवा मंडळ, मंडला (म. प्र.)

तीन वैद्यकीय ग्रंथ

सिद्धौषधिप्रकाश (मराठी)
—वै. गणेशशास्त्री जोशी किं. ६ रु.

संक्षिप्त दोषधातुमलविज्ञान (संस्कृत-मराठी)
डॉ. द. म. पटवर्धन आ. वि. वि. किं. ३ रु.

शारीर तत्वदर्शनम् (संस्कृत-हिंदी)
– वै. हिर्लेकरशास्त्री किं. ६ रु. –

वैद्यक ग्रंथ-भांडार नाशिक

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाची वार्षिक वर्गणी १ रु. भरून सभासद व्हा व

वैद्य संघटना बलवान् करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काश्मीरी शिलाजीत

आमचे कारखान्यांत दरसाल सुमारें २०० मण शिलाजीत शास्त्रोक्त पद्धतीनें शुद्ध केला जातो. शुद्ध शिलाजिताचा भाव १ शेरास ३६ रुपये. ५ तोळ्यास ३॥ रुपये. अशुद्ध शिलाजीत पत्थर ११० रु. मण. याशिवाय खालील औषधांचे भाव दर शेरास (८० तोळ्यांस) पुढें दिल्याप्रमाणें आहेत:—

लोहभस्म	.... २४ रु. शेर	मंडूरभस्म	.... २० रु. शेर
वंगभस्म	.... ३६ ,, ,,	शंखभस्म	.... ७ ,, ,,
प्रवाळभस्म	.... ३२ ,, ,,	श्रृंगभस्म	.... १४ ,, ,,
अभ्रक (वज्र) भस्म	.... ४६ ,, ,,	कपर्दिकाभस्म	.... ८ ,, ,,
कांतलोहभस्म	.... २८ ,, ,,	मुक्ताशुक्तिभस्म	.... १० ,, ,,
स्वर्णमाक्षिकभस्म	.... २८ ,, ,,	गोदंतीभस्म	.... ३॥। ,, ,,
रससिंदूर	.... ६० ,, ,,	चन्द्रप्रभावटी	.... २८ ,, ,,
स्वर्णराजवंगेश्वर	.... ८८ ,, ,,	स्वर्णसिंदूर	.... ३ रु. तोळा

सूचना: — कोणतेंहि औषध २० तोळ्यापेक्षां कमी ऑर्डर असल्यास वरील भावाप्रमाणें पाठविलें जाणार नाहीं. सूचीपत्र मागवा, मोफत पाठवू.

काश्मीर आयुर्वेदिक वर्क्स, अमृतसर

—: कांहीं संग्राह्य वैद्यकीय ग्रंथ :—

अनुभविक औषधें	(यादवजी)	४ रु.	बृहदासवारिष्टसंग्रह भाग १-२	(द्विवेदी)	७ रु.
अनुभविक चिकित्सा	(वृद्ध वैद्य)	१ रु.	रोगनिदान भाग १-२-३	(कडेगांवकर)	२ रु.
आरोग्यदीप	(गोखले)	।॥। रु.	रोगविज्ञान भाग १-२	(भट)	१२ रु.
आरोग्यमार्गप्रदीप	(चिपळूणकर)	३ रु.	विषूचिका	(सहस्रबुद्धे)	१ रु.
आयुर्वेदीय औषधीसंशोधन	(धामणकर)	१ रु.	वैद्यसन्मित्र [हिंदी]	(जायदे)	२ रु.
इन्फ्लुएंझा	(गुणेशास्त्री)	१ रु.	सार्थ सुश्रुतसंहिता	(बोरकर)	११ रु.
घरगुती औषधोपचार	(संघ प्रकाशन)	।। रु.	स्टेथॉस्कोप व छातीची तपासणी	(जोशी)	६ रु.
दण्डकज्वर	(गुणेशास्त्री)	।। रु.	राष्ट्रीय चिकित्सा सिद्धयोगसंग्रह		१॥ रु.
नारूचा वैद्य	(कार्लेकर)	।= रु.	यकृतरोग विशेषांक	(जळूकर)	१ रु.
निवडक रुग्ण चिकित्सा	(संघ प्रकाशन)	४॥ रु.	आयुर्वेदीय औषधीविज्ञान	(हिर्लेकर)	२ रु.
प्रसूतितंत्र	(भट)	७ रु.	विवेचनात्मक सूचिवेधपद्धति	(मिश्रा)	५॥ रु.
पांच वर्षांचा पाळणा	(मराठे)	१॥ रु.	सिद्धमृत्युंजययोग	(पाठक)	१ रु.

वैद्यक ग्रंथ भांडार, आयुर्वेद सेवा संघ, नाशिक

संपादक व प्रकाशक:— वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, मेनरोड, नाशिक
मुद्रक:— श्री. चि. ओक, सफल प्रेस, आग्रारोड, नाशिक
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ७ वें) नाशिक, ता. १६ जानेवारी १९५४ (अंक १४ वा

म. प्रांतीय वैद्य संघटना बलवान् करा !

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ या संस्थेचें नवीन वर्ष १ जानेवारी १९५४ पासून सुरू झालें आहे. गेल्या १५ वर्षांच्या सतत प्रयत्नामुळेंच मुंबई सरकारनें मुंबई प्रांतांत शुद्ध आयुर्वेद शिक्षणक्रमास मान्यता दिली आहे, ही गोष्ट आतां सर्वश्रुत आहे. प्रांतीय मंडळांच्या संघटनेलाच खरोखर याचें श्रेय आहे. आतां यापुढेंसुद्धां मुंबई राज्यांतील ह्या सर्वहि प्रांतीय मंडळांची संघटना अधिकाधिक मजबूत होण्यावरच शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रमाची यशस्विता आम्ही सिद्ध करूं शकणार आहोंत, ही गोष्ट विसरून चालणार नाहीं.

यासाठीं निश्चिंत वा उदासीन न राहतां स्वतः सदस्य बनून प्रांतीय मंडळाची संघटना मजबूत करण्याचें महत्त्व पटवून देणें हें शुद्ध आयुर्वेदाभिमानी प्रत्येक वैद्याचें कर्तव्य आहे.

तरी ज्यांची गतवर्षाची महाराष्ट्र प्रांतिय मंडळाची सदस्यत्व वर्गणी येणें राहिली असेल त्यांनीं स्वतःचे पूर्वीची व चालू वर्षाची मिळून दोन रुपये वर्गणी पाठवावी. आणि नव्यानेंच सभासद होणारांनीं फक्त १९५४ सालाकरितां एक रुपया वर्गणी पाठवावी, व मंडळाच्या वाढत्या कार्यासाठीं शक्यनुसार देणगीहि द्यावी अशी विनंति आहे.

वर्गणी खालील ३ ठिकाणांपैकीं कोठेंहि पाठविल्यास तिचा स्वीकार केला जाईल:—

१ वैद्य दत्तात्रेयशास्त्री जळूकर, मु. पो. नशिराबाद–पूर्वखानदेश.

२ वैद्य विदुमाधवशास्त्री पंडित, मंत्री, स्थायी कार्यालय, म. प्रां. वै. मंडळ, नाशिक शहर.

३ वैद्य [illegible], मंत्री, म. प्रां. वै. मंडळ कार्यालय, [illegible]

वैद्य [illegible]शर्मा, मन्त्री वैद्य दत्तात्रेयशास्त्री जळूकर, अध्यक्ष

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय जीवनपद्धतिच अधिक हितावह !

डॉ. राधाकृष्णन् यांचा महत्त्वाचा अनुभव

पुणें, ता. १०-"आधुनिक काळांतील जीवनाची धांवपळ नि धांदल पहातां भारतीयांचा जीवनक्रम हाच मानवी शरीरास हितावह असल्याचें दिसून येतें" असे उद्गार भारताचे उपाध्यक्ष डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनीं बी. जे. मेडिकल कॉलेज व रुग्णालय यांच्या नव्या इमारतींचें उद्घाटन करतांना काढले. ते म्हणाले:-मानवी आरोग्यासाठीं औषधांपेक्षां मानसिक स्वास्थ्यांचीच अधिक आवश्यकता आहे. मानवी शरीर म्हणजे केवळ रक्तमांसाचा गोळा नसल्यामुळें रोग्या-वरील औषधोपचारांत सहसंवेदनाला फार महत्त्व आहे.

विधायक दृष्टिकोन

'वैद्यक शास्त्राकडे पाहण्याचा आमचा दृष्टिकोन विधायक स्वरूपाचा आहे. रोग नि मरण यापेक्षां आमचें लक्ष आरोग्य नि जीवन यांकडेच अधिक असतें. हा आपल्या आयुर्वेदशास्त्राचा प्राचीन दृष्टिकोन आहे. याचेंच आधुनिक काळांतहि प्रगतीकरण झालें पाहिजे.'

विलंब कां होत आहे ?

या नव्या इमारतीची कोनशिला १९४८ सालीं बसविण्यांत आली असून सुमारें ६ वर्षांनंतर तिचें बांधकाम पूर्ण होऊन उद्घाटन केलें जात आहे. याचा उल्लेख करून डॉ. राधाकृष्णन् म्हणाले, "एवढा विलंब कां होत आहे ? अशी विचारणा केली तर समजलें कीं सरकारतर्फे आर्थिक टंचाईचें कारण सांग-ण्यांत येत असे. हें कारण खरेंहि असेल. परन्तु राष्ट्रीय जीवनांतील प्रत्येक क्षेत्रांतच आतां द्रुतगतीची आव-श्यकता आहे."

देह = शरीर+मन+आत्मा

'आयुर्वेद, शरीर हें मानवी विकासाचें प्रमुख साधन मानतो' असें सांगून ते पुढें म्हणाले, "रक्त नि मांस यांचा केवळ गोळा म्हणजे देह, अशी आयु-र्वेदाची कल्पना नाहीं. तर शरीर, मन व आत्मा हें तिन्ही मिळून देह होतो, अशीच आयुर्वेदाची कल्पना आहे. त्यामुळें या त्रयींकडे लक्ष देणें हेंच आयुर्वेदाचें साध्य आहे."

वेड्यांची वाढ होईल

"नव्या औद्योगिक विकासामुळें व रेडिओ, टेलिव्हिजन आदि करमणुकीच्या आधुनिक साधनांमुळें सध्यांचें आयुष्य 'गोंगाट व धांदल' यांनीं परिपूर्ण झाल्यानें मनःशांति लाभत नाहीं. हें असेंच चालूं राहील तर वेड्यांच्या इस्पितळांतील रुग्णांची वाढ होईल. हें सर्व टाळण्यासाठीं नव्या साधनांचा अवलंब करून आयुर्वेदाचा उपयोग करून घेतला पाहिजे."

शुद्ध आयुर्वेदाचा अभ्यासक्रम

"या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनीं व्यवसाय करतांना केवळ धंदेवाईक दृष्टि न ठेवतां आपण मानवाची सेवा करतो ही भावना जागृत ठेवावी. आपल्या राज्यांत शुद्ध आयुर्वेदाचा अभ्यासक्रम ठेवला आहे ही चांगली गोष्ट आहे. आयुर्वेद पुरातन आहे पण तो इतिहास नसून आरोग्यरक्षणाचें तें महान् शास्त्र आहे. त्याचें संरक्षण, संशोधन व संव-र्धन केलें पाहिजे."

स्वतःचा अनुभव

डॉ. राधाकृष्णन् यांनीं अमेरिकेंतील स्वतःचा ताजा अनुभव सांगितला. ते म्हणाले कीं, तेथील डॉक्टरांनीं माझी संपूर्ण वैद्यकीय तपासणी करून पाहिली, आणि माझी प्रकृति धडधाकट पाहून आश्चर्य व्यक्त केलें.

'इतकी चांगली प्रकृति कशी' असें त्यांनीं विचा-रतांच 'आमची प्राचीन आयुर्वेदिक जीवनसरणी' असें मी त्यांस उत्तर दिलें.

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

 0 74436

मुंबई प्रांतांतील शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रमास पाठिंबा देणाऱ्या वैद्यांस विनंति

डिसेंबरच्या १९ व २० तारखांस पाठ्यक्रम ठरविण्यांकरितां बोलविलेल्या परिषदेनें पाठ्यक्रम निश्चित केलाच आहे. त्या पाठ्यक्रमाप्रमाणें ग्रंथ शिकविले जात असतांना शास्त्रांत प्रयुक्त केल्या गेलेल्या शास्त्रीय शब्दांचा (Technical terms) एकच निश्चित अर्थ सर्व गुरु वैद्यांनीं विद्यार्थ्यांस सांगितला, आणि शास्त्रांतील क्लिष्ट व संदिग्ध

वाक्यांचें विवरण एकाच पद्धतीनें सर्व वैद्य गुरुंनीं केलें म्हणजेच शास्त्रासंबंधीं विद्यार्थ्यांत आदरबुद्धि वाढेल व एक विशिष्ट परंपरा कायम होऊं शकेल. शास्त्राच्या प्रगतीच्या दृष्टीनें हें घडून येणें अत्यंत आवश्यक आहे.

या कार्याकरितां प्रांतांतील निदान मोठमोठ्या शहरांत रहाणाऱ्या एकेक वैद्यानें एकत्र जमून परस्पर विचारविनिमय करून विवरण ठरविलें पाहिजे व त्याची एक व्यवस्थित नोंद होऊन तिचीपण प्रसिद्धि झाली पाहिजे. हें कार्य शिस्तपूर्वक झाल्यास ती ठरलेली दिशा व विचारपरंपराचा संबंध देशभर मान्य होण्याचा व त्यायोगें शिक्षणांत एकसूत्रीपणा येण्याचा बराच संभव आहे.

या कार्याकरितां प्राचीन ग्रंथचतुष्टयी व त्यावरील सुप्रसिद्ध प्राचीन टीका प्रधानतया आधारभूत मानून त्यांच्याशीं सहमत असलेले आधुनिक टीकाकारांचे विचारहि संमत होऊं शकतील. परंतु तद्विरुद्ध असलेले मग ते कितीहि मोठ्या विद्वान् व्यक्तीनें प्रतिपादन केले असेोना, विचार अंतर्भूत केले जाऊ नयेत असा दंड घातल्याखेरीज आयुर्वेदाचें शुद्ध स्वरूप टिकणार नाहीं.

अधिकांश वचनें एका विचारधारेला समर्थक असून एखादें विरुद्ध भासत असलें तर तशा प्रकारची नोंद करून अधिकांश-वचन-संमत विचारधाराच मान्य केली पाहिजे. याप्रमाणें कांहीं नियमपालन करून ग्रंथचतुष्टयींतील सर्व प्रकरणें नीटपणें आधुनिक सुशिक्षित विद्यार्थ्यांस प्रत्यक्षादि चारहि प्रमाणांनीं पटवून देतां येतील अशीं ठरलीं पाहिजेत.

ग्रंथचतुष्टयीपैकीं प्रथम अष्टांगहृदय ग्रंथासंबंधीं विचार व्हावा. बैठक सारखी ८-१० दिवस चालूं शकेल अशी योजना व्हावी. याकरितां थंडीचे दिवसच सोईचे असतात असा मागील शास्त्रचर्चा परिषदांपासून घेतलेला अनुभव आहे. नियोजितस्थान मध्यवर्ति नासिकसारखें असावें. आवश्यक शारीर कार्याव्यतिरिक्त सर्ववेळ चर्चा व नोंदणींत घालविला जावा.

संघाय संभाषाविधीप्रमाणें हें कार्य झालें तर त्यापासून एक मोठें कार्य साधेल. खर्च प्रत्येक व्यक्तीनें आपापला सोसावा. स्थानीय कार्यकर्ते फक्त बैठकीच्या स्थानाची व्यवस्था करतील. नाशिकसारख्या स्थानीं नदी असल्यामुळें स्नानाची सोय आहेच. इतर जे किरकोळ खर्च होतील ते सर्वांनीं मिळून करावे. कोणत्याहि व्यक्ति किंवा संस्थेवर भार पडूं नये. कारण आम्हांस हें कार्य कित्येक वर्षे चालू ठेवावें लागेल.

यासंबंधीं इतरांच्या सूचना अपेक्षित आहेत. त्या 'आयुर्वेद पत्रिके' कडे पाठविल्यास अवश्य प्रसिद्ध होतील.

भि. वि. डेग्वेकर

अध्यक्ष, शुद्धायुर्वेदीय पाठ्यक्रम संमेलन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बुद्धिजीवी लोकांसाठीं अंजीरपाक

मी आपणांकडून अंजीरपाक तयार करून मागवीत असतो; आजवर बरेचवेळां तो मी मागितला आहे.

या अंजीरपाकाची योजना मी खालील अवस्थेंत करीत असतो:—

(१) कोणत्याहि आजारानन्तर येणाऱ्या अशक्तते-साठीं, तसेंच मुदतीज्वरानन्तर किंवा शीतज्वरानन्तर येणाऱ्या अशक्ततेकरितां.

(२) कांहीं लोक नळांत वात धरल्यामुळें त्रस्त होतात. त्या विकारांतहि मी वरील पाकाची योजना करीत असतों.

(३) बुद्धिजीवी वर्ग— जसे क्लार्क, शिक्षक वगैरे, या लोकांना कामाचा ताण पडतो व त्यापासून त्यांना अशक्तता, निरुत्साह वाटतो. डोक्यास थकवा वाटतो, उष्णताहि वाढल्यासारखी वाटते. अशा परिस्थितींत त्या विकारांकरितां मी अंजीरपाक योजितो.

अशा तऱ्हेनें निरनिराळ्या विकारांवर त्या पाकाची योजना केली असून त्याचा रुग्णांना फायदा झालेला दिसला. जसजसा ह्याचा फायदा दिसला तसतशी त्या पाकाची मागणीहि वाढत आहे. बुद्धिजीवी लोक अनुभवांतीं पुनः तो पाक मागवून घ्या असें सांगतात व त्याप्रमाणें तो अनेकदां मागविण्यांत आला आहे.

रोगाचें मान व रुग्णाची प्रकृति पाहून त्या पाकाबरोबर 'लोहभस्म' 'रौप्यभस्म' 'सुवर्ण-मालिनीवसंत' यांचीहि योजना गुणकारक होते असें अनुभवास आलें आहे. —वैद्य बि. म. मुळमुळे

रोगी-हायस्कूलमधील शिक्षक, रोग-जुनाट शीतपूर्वकज्वर

गतवर्षी येथील हायस्कूलमधील एका शिक्षकांना उलटून उलटून शीतज्वर येत असे. त्यावर क्विनाईन इंजेक्शन्स, पॅल्युड्रिन, कामाक्विनच्या गोळ्या ह्या उपचारांचा तात्पुरता परिणाम व्हावयाचा. शेवटीं त्रासून त्यांनीं सुदर्शनचूर्ण, अमृतारिष्ट हें कांहीं दिवस सतत घेतलें. त्यामुळें ज्वर थांबला; पण अंगांत दाह आणि अशक्तता मात्र राहिली. शिवाय डोकेदुखीचा विकार होताच.

त्यांना मी अंजीरपाक घेण्यास सुचविल्याप्रमाणें त्यांनीं अर्धाशेर अंजीर पाक घेतला. त्यामुळें डोक्याचा त्रास थांबला; भूकहि व्यवस्थित आली; आणि त्यामुळें त्यांना नित्याच्या कामांत पूर्वीपेक्षां जास्त उत्साह वाटूं लागला.

नंतर शरीरांत रक्ताचें प्रमाण वाढण्याकरितां पुनः त्यांना अंजीरपाक व त्याबरोबर कान्तलोह घेण्यास सुचविलें. ह्या योजनेचा चांगला परिणाम होऊन त्यांच्या प्रकृतींत बरीच सुधारणा झाली.

यंदाहि त्यांनीं अंजीरपाक घेण्याची इच्छा दर्शविली असून व त्याप्रमाणें ते घेणार आहेत.

रोगी-धान्याचे व्यापारी, वय ३०-३५

सदर्हु रोगी नेहमीं डोकें दुखतें, छातींत धडधडते अशी तक्रार करीत असे. वरील रोगांची पाश्चात्य(एक्सरे) पद्धतीनें (डोळे, नाक, मेंदू वगैरे) तपासणी झाली. त्यांत कोणत्याहि तऱ्हेची विकृति आढळून आली नाहीं. मग असें कां व्हावें? त्या-करितां Bromocalcium ची इंजेक्शनें ३-४ महिने सतत चालू होतीं. त्यानंतर ते त्रासून आयुर्वेदाकडे आले. ती हकीकत ऐकून हा विकार 'मानसिकच' असावा असें निदान मीं केलें. व त्यावर दिवसांतून २ वेळां अंजीरपाक दुधाबरोबर घ्यावयास सांगितलें. दुपारीं ३-४वाजल्यापासून छातींत धडधड वाढत असे, म्हणून रौप्यसूतशेखर-दाडिमावलेहाबरोबर घेण्यास सांगितलें. ह्याचा योग्य तो परिणाम झालेला दिसून आला व पूर्ण परिणाम होण्याकरितां १ शेर अंजीरपाक व फक्त ।· तोळा सूतशेखर (रौप्यसुवर्णयुक्त) कामीं आला. कारण धडधडी कमी होतांच सूतशेखर कमी केला होता.

अंजीर-पाकाचा पाठ

अंजीर २० तोळे, दूध १ शेर, साखऱ्या १॥ शेर, तूप १० तो., बदामबी १० तो., चारोळी २ तो., बेदाणा २॥ तो., पिंपळी २॥ तो., पिस्ते २॥ तो., दालचिनी २॥ तो., वेलची २॥ तो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मिश्रशिक्षण आयुर्वेदाचा प्राणघात करीत आहे !

सुप्रसिद्ध सि. सर्जन डॉ. कल्ले यांची स्पष्टोक्ति

अहमदनगर येथें ता. २१ नोव्हेंबर रोजीं आयुर्वेद विद्यालय संस्थेतर्फे श्री. भाऊसाहेब फिरोदिया यांच्या अध्यक्षतेखालीं आयुर्वेद महाविद्यालयाच्या रुग्णालयाचे माजी प्रमुख सुप्रसिद्ध डॉ. कल्ले एफ्. आर. सी. एस्. यांचा सत्कार व निरोप समारंभ झाला. उत्तरादाखल त्यांनीं केलेलें भाषण मिश्र आयुर्वेदीय शिक्षण चालू ठेवणाऱ्या संस्थांना मार्गदर्शक असल्यानें तें येथें दिलें आहे:-

हा मार्ग चुकीचा आहे

१९४७ सालीं मी अहमदनगर येथील आयुर्वेदीय रुग्णालयाची व्यवस्था मजकडे घेतली. आयुर्वेदीय शिक्षण-संस्था सध्यां ज्या रीतीनें चालविण्यांत येतात, त्याचा कांहीं कालपर्यंत सूक्ष्म अभ्यास व निरीक्षण करून नाइलाजानें माझें असें मत झालें आहे कीं, आजच्या प्रचलित वस्तुस्थितींत आयुर्वेदीय शिक्षण संस्था आयुर्वेदाच्या प्रगतीकरितां ज्या मार्गाचें अवलंबन करीत आहेत तो मार्ग निखालस चुकीचा आहे. आज ६ वर्षांच्या अनुभवानंतरहि हें माझें मत बदलूं शकत नाहीं. कदाचित् मी चूक असेन, कदाचित् मी बरोबरहि असेन. मी बरोबरच आहे असें निश्चयात्मक म्हणण्याचा मला काय अधिकार आहे ?

ॲलोपॅथीनें आयुर्वेदाचा प्राणघात

ज्या संस्थांत ॲलोपॅथिक व आयुर्वेदिक असें मिश्र शिक्षण दिलें जातें, त्या संस्थांत ॲलोपॅथी ही आयुर्वेदाचा प्राणघातच करीत असल्याचें मला स्पष्ट दिसतें. बोर्डानें आंखलेला चालू संयुक्त शिक्षणक्रम प्रगतिपर ठरूं शकला नाहीं. कालानुभवानेंहि या परिस्थितींत सुधारणा घडलेली नाहीं, आणि आयुर्वेदोन्नतीच्या दृष्टीनें विचार करतां तर ती परिस्थिति अधिकच भ्रष्ट झाली आहे.

पदवी शिक्षणक्रमाची अव्यवहार्यता

आयुर्वेद-फॅकल्टीची स्थापना व तिचा नवीन (पदवी) शिक्षणक्रम ह्या गोष्टींपासून त्या वस्तुस्थितींत कांहीं भरीव सुधारणा होण्याचीं चिन्हें मला मुळींच दिसत नाहींत. प्रचलित पदवी शिक्षणक्रमाची अव्यवहार्यता हळूं हळूं समजूं लागली आहे, असें अनुमान सध्यांच्या मिश्रशिक्षणक्रमाचा फेरविचार करण्याच्या दिशेनें जीं पावलें टाकलीं जात आहेत त्यावरून करण्यास हरकत नाहीं.

शुद्धायुर्वेदाचें शिक्षण व गुरुपरंपरा ह्या गोष्टी कितपत यशस्वी होतील ही बाब अद्याप दैवाधिष्ठित आहे.

मनास दुःखदायक लोकसमजूत

मी आतां बहुतेक कायमचेंच अहमदनगर सोडीत आहे व पुनः भेटीचा योग येईल किंवा नाहीं याबद्दल अनिश्चितता आहे. आणि म्हणून जी एक गोष्ट माझ्या मनास नेहमीं दुःख देते, तिच्याबद्दल मी माझें अंतःकरण आज खुलें करूं इच्छितो. ती गोष्ट ही कीं, मी आयुर्वेदाचा विरोधक आहे असा मिथ्याभास लोकांत प्रसृत झालेला दिसतो; परंतु ही मनोधारणा सर्वथैव असत्य आहे. ज्याला बुद्धिभ्रंश झाला असेल तोच फक्त आयुर्वेदाचा विरोधक असूं शकेल !

आयुर्वेदाबद्दल गाढ आदर आहे

शुद्धायुर्वेद व आयुर्वेदाचें चालू मिश्र शिक्षण यांत जमीन-अस्मानाइतकें अंतर आहे. आपल्या प्राचीन आयुर्वेदाबद्दल मला आत्यंतिक आदर आहे. या शास्त्राचा मी फार अभ्यास केला आहे असें नाहीं, परंतु मी चरक व सुश्रुत ह्या ग्रंथांचे थोडेंफार वाचन केलेलें आहे. जो कोणी – कुतूहलानें कां होईना – हे ग्रंथ वाचील त्यास आपल्या प्राचीन धन्वंतरींचें शरीर-विज्ञानाविषयक व रोग-विज्ञानविषयक ज्ञान किती सखोल होतें ह्याची प्रचीति आल्यावांचून राहणार नाहीं. शरीर आणि त्याचीं विविध कार्यें ह्यांचा अभ्यास त्यांनीं फारच सूक्ष्म रीतीनें केला आहे. विशेषतः आयुर्वेदीय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहारशास्त्र व स्वस्थवृत्त ह्या बाबतींत तर वाचक स्तंभित झाल्यावांचून राहाणार नाहीं.

जे कोणी ह्या शास्त्राविषयीं आस्थेवाईक असतील त्यांनीं श्रीयुत बी. सील यांनीं लिहिलेलें 'The Positive Science of the Hindus' हें पुस्तक जरूर वाचावें.

दोन निदान पद्धतींतील फरक

आपली ही प्राचीन पद्धति व आजची आधुनिक पाश्चात्य पद्धति ह्यांत किती मोठें अंतर आहे तें पहा. तुम्ही रोग्याचें सर्व कांहीं तपासतां, परंतु प्रत्यक्ष संपूर्ण रुग्णदर्शन मात्र कधींच घेत नाहीं. अलिकडे अमेरिकेंत एक खूळ उठलें आहे, व त्यास 'Annual check up' (वार्षिक रोग-प्रतिबंध) असें म्हटलें जातें. तेथें रुग्ण एका अतिशय मोठ्या रुग्णालयांत जातो, ज्यांत निरनिराळ्या शरीरांगांचे तज्ञ डॉक्टर असतात व जे रुग्णाच्या निरनिराळ्या अंगाची तपासणी करतात. (संपूर्ण रुग्णाची परीक्षा नव्हे.) ह्यास तिकडे रुग्णाचें संपूर्ण परीक्षण असें म्हटलें जातें. कानांचा तज्ञ डॉक्टर, कान तपासतो, नाकाचा तज्ञ नाक तपासतो, डोळ्यांचा तज्ञ डोळे तपासतो, घशाचा तज्ञ घसा तपासतो वगैरे. अनेकविध उपकरणें रुग्णाच्या शरीरांत जेथें जेथें प्रवेशद्वार असेल तेथें तेथें घातलीं जातात. त्याची क्ष-किरण परीक्षा-कांहीं कांहीं प्रसंगीं एक डझन वेळांहि--केली जाते. हा सर्व प्रकार होऊन हॉस्पिटलच्या प्रवेशद्वारांतून शिरलेला रुग्ण त्याच्या उत्तर--द्वारांतून बाहेर पडतो. बाहेर आल्यानंतर त्यास ह्या सर्व परीक्षांचा वृत्तांत व शास्त्रीय तपशील मिळतो. परंतु ह्या सर्व प्रकारांत एक मोठें न्यून आहे व तें म्हणजे संपूर्ण रुग्णाची एक समयावच्छेदें करून परीक्षा केली जात नाहीं हें होय.

मानसशास्त्राचा रोगनिवारणाकडे उपयोग

आयुर्वेदाच्या श्रेष्ठत्वाचें व वैभवाचें एक उदाहरण असें देतां येईल कीं, ज्यास आज पाश्चात्य देश मानस-शास्त्र म्हणून संबोधितात तें मानस-शास्त्र व त्याची कार्यकारणपरंपरा आपल्या प्राचीन ऋषिमुनींनीं हजारों वर्षांपूर्वीं सूक्ष्म रीतीनें अभ्यासून आत्मसात् केली आहे. ह्यांतील जिज्ञासूंनीं स्वामी अखिलानंदाचें 'Hindu Psychology, its lessons for the West' हें पुस्तक जरूर वाचावें. सांख्य-सूत्रें व पातंजलीसूत्रें हीं मानसशास्त्रावरील ज्ञानप्रचुर सूत्रें नव्हेत काय ? परंतु ह्या मानसशास्त्राचा, शारीरिक व मानसिक रोग निवारणाकडे व्यवहारिक उपयोग करून घेण्याचें श्रेय प्रामुख्यानें आयुर्वेदालाच आहे. जो कोणी सुश्रुताचे सुरुवातीचे कांहीं अध्याय वाचील त्यास ही गोष्ट जरूर अनुभवास येईल.

पाश्चात्य शास्त्रवेत्त्यांची चुकीची बैठक

सापेक्षतः मानसशास्त्राचा पाश्चात्य देशांतील उगम हा आधुनिक ठरतो. ह्या शास्त्राच्या ज्ञानाकरितां आपणास फ्रॅंड, जंग किंवा अॅडलर ह्या पाश्चात्य शास्त्रवेत्त्यांचा आश्रय घेण्याची जरूरी नाहीं; शिवाय त्या शास्त्रवेत्त्यांची ह्या शास्त्रांतील बैठक चुकीची आहे असाहि मतप्रवाह वाहात आहे. तथापि हें कांहीं खरी असलें तरी ह्या शास्त्रांतील त्यांचें कार्य हें अतिशय महनीय व मननीय असेंच आहे हें खास.

रोग--चिकित्सेंत मानस--शास्त्रास आज विशिष्ट व महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे. पाश्चात्य देशांत मानसिक रोगांस अलिकडे 'Psychosomatic diseases' असें संबोधूं लागले आहेत. शारीरिक अनेक रोगांचा आतां ह्या मानसिक रोगांत अंतर्भाव होऊं लागला आहे.

ह्यावरून आपणांस असें दिसून येईल कीं, काय-चिकित्सा, मानसशास्त्र व त्याचा रोगांशीं संबंध वगैरे अनेक महत्वाच्या गोष्टींचें ज्ञान आपणास आयुर्वेदापासूनच विपुलतेनें शिकण्यासारखें आहे. जय-हिंद

-'भिषग्विलास'

अर्धशिशीवर उपाय

ज्या बाजूची अर्धशिशी दुखत असेल त्या बाजूच्या नाकपुडींत, लसूणाचा रस (पाणी न घालतां काढलेला) १-२ थेंब सोडावा. हें सूर्योदयापूर्वी करावें. जास्त आग झाल्यास १-२ थेंब तूप सोडावें. व पोटांत दूधसाखर घ्यावी. हा उपचार मोफत करावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सांठवणीसाठीं पाऱ्याचा उपयोग

[लेखकः– प्राध्यापक एन्. व्ही. जोशी बी. ए., एम्. एस्सी.]

अन्नधान्य-सांठवणीकरतां पाऱ्याचा उपयोग करण्याची कल्पना भारतांतीलच आहे. परदेशांतील शास्त्रज्ञांना धान्य–सांठवणीकरतां पाऱ्याचा उपयोग करतां येतो हें ३४ वर्षांपूर्वी माहित नव्हतें. भारतांत या कल्पनेचा प्रसार प्रथम कोणी व कसा केला याची माहिती * तूर्त तरी मिळत नाहीं; कारण हें तांत्रिक ज्ञान खेड्यांत राहणाऱ्या शेतकरी-वर्गांसच कित्येक शतकें माहीत होतें; पण त्याबद्दल चिकित्सा किंवा संशोधन भारतीय सुशिक्षितांपैकीं कोणी केलें नव्हतें.

डॉ. कुन्हिकन्नम् यांचे प्रयोग

समाधानाची गोष्ट ही कीं, म्हैसूरचे भारतीय कीटकशास्त्रज्ञ डॉ. कुन्हिकन्नम् यांचें लक्ष या कल्पनेकडे वेधलें, व त्यांनीं प्रयोग करून भारतांतील कीटकशास्त्रज्ञांच्या तिसऱ्या परिषदेंत आपल्या प्रयोगाची हकीकत सांगून धान्यसांठवणीकरतां पाऱ्याचा उपयोग करण्याच्या भारतीय कल्पनेला प्रसिद्धि दिली. धान्य-सांठवणीकरतां पारा वापरण्याच्या पूर्वीपासून भारतांत प्रचलित असलेल्या फार जुन्या कल्पनेवरून डॉ. कुन्हिकन्नम् यांना स्वतःस सुचलेल्या व त्यांनीं स्वतः केलेल्या प्रयोगाचें वर्णन १९१९ सालीं केलें.

रिठ्यांत भोकें पाडून पारा

त्यांनीं रिठयांमध्यें भोकें पाडून त्यांत पारा घालून ते रिठे धान्यांत ठेवले तेव्हां (पारा असलेले रिठे घालून ज्या लहान लहान डब्यांत धान्य सांठविलें होतें त्या डब्यांतील धान्याला) रिठ्यांशिवाय असलेल्या इतर डब्यांतील धान्यांप्रमाणें कीड लागली नाहीं. यानंतर रिठ्यांप्रमाणें शेणाचे पोकळ गोळे करून त्यांत पारा ठेवण्याची कल्पना निघाली. डॉ. कुन्हिकन्नम् यांच्या प्रयोगाची माहिती झाल्यावर विहार प्रांतांतील पुसा येथील शेतकी संशोधन संस्थेंतील कीटकशास्त्रीयशाखेंत लहानमोठ्या प्रमाणावर पाऱ्याचा उपयोग करून धान्य सांठविण्याचे प्रयोग झाले.

दोन प्रमुख रीति

डॉ. कुन्हिकन्नम् यांची माहिती प्रसिद्ध झाल्यावर माझें लक्ष या कल्पनेकडे वेधलें. घरगुती धान्य-सांठवणीकरतां पाऱ्याचा उपयोग जवळजवळ गेलीं ३० वर्षे आम्ही करीत आहोत. आमची रीत थोडी निराळी व सोपी आहे. आमची पहिली रीत अशीः– थोडा पारा घेऊन ओल्या मातींत अगर शेणांत मिसळून त्याच्या लहान चौकोनी विटा, वाटोळ्या वड्या अथवा चकत्या करून त्या वाळवून मग त्या गहूं, तांदूळ, कडधान्यें, डाळी वगैरेचे डबे भरतांना निरनिराळ्या थरांतून घालून ठेवायच्या. आमच्या अनुभवाप्रमाणें अशा धान्यांत कीड, टोके, पोरकिडे वगैरे कांहीं होत नाहींत.

धान्य-सांठवणीची दुसरी पद्धत

तांदूळ सांठविण्याची दुसरी एक पद्धत थोडी निराळी आहे, ती अशीः-एक पल्ला तांदूळ असल्यास दोन किंवा तीन तोळे पारा घेऊन तो जुन्या वाळलेल्या तुपांत मिसळून फेसून हें मिश्रण सर्व तांदळांस चोळून ठेवावयाचें. म्हणजे सर्व तांदळास तुपाचें चोपडण होऊन पाऱ्याचे बारीक कण तांदळांत पसरले जातात. मग ते तांदूळ डब्यांत भरून ठेवावयाचे. डब्यावर डाग लावून झांकण बसविण्याची जरुरी नाहीं. नुसतें झांकण घालून डबे ठेविले कीं झालें.

पाऱ्याचा अवशेष धुऊन जातो

जसा लागेल त्याप्रमाणें डब्यांतून थोडे थोडे

---

* वनस्पतीपासून तयार केलेलीं औषधें-गुटिका चूर्णें इत्यादि किडूं नयेत व गुणकारी रहावीत (इतकेंच नव्हे तर त्यांचें गुणसंवर्धन व्हावें) यासाठीं त्यास पारा, गंधक यांच्या मिश्रणापासून तयार झालेल्या कज्जलीची जोड देण्याची प्रथा आयुर्वेदांत फार प्राचीन कालापासून चालू आहे. संपादक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तांदूळ काढून घेऊन ते निवडतांना व धुतांना पाऱ्याचे कण, त्यांपासून होणाऱ्या लहान लहान गोळया वगैरे निघून जातात व तुपाचा अवशेषहि बराचसा धुऊन निघतो. उरलासुरला भाताच्या कढाबरोबर निघून जातो. चुकून एखादी पाऱ्याची गोळी तांदूळ धुतांना राहिली तर तांदूळ ओयरायच्या भांड्यांत तळाशीं बसते.

पारा-कथील संमिश्रणाचा उपयोग

वरील सर्व पद्धतींत साधा प्रवाही पारा वापरल्यामुळें तो जास्त लागतो व खर्च जरा अधिक येतो. तेव्हां हा खर्च कमी करण्याकरितां पाऱ्याचा ॲमल्गम्, म्हणजे पाऱ्याचें दुसऱ्या धातूशीं विशेषतः कथील या धातूबरोबर संमिश्रण केल्यानें जो घट्ट पदार्थ होतो तो, कीड लागल्याशिवाय धान्याची साठवण करण्यांत यशस्वी ठरला आहे. याचे मोठ्या प्रमाणावर प्रयोग रांची येथें करण्यांत आले. पारा तीन भाग व शुद्ध कथील दोन भाग घेऊन हे दोन्ही धातु एके ठिकाणीं खलावे, म्हणजे थोड्या वेळानें त्यांचा घट्ट पदार्थ (ॲमल्गम्) होऊ लागतो. तेव्हांच त्याच्या लहान वड्या किंवा धान्य पुष्कळ असेल तर मोठ्या आकाराच्या विटा पाडाव्यात; आणि अशा वड्या किंवा विटा पोत्यांतून टाकाव्या, म्हणजे त्या पोत्यांतील धान्याला कीड मुळींच लागणार नाहीं.

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स–
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते–मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

१६ मण धान्यास ७ औंस पारा

सुमारें सोळा मण धान्यास सात औंस पाऱ्याच्या केलेल्या विटा पुरतात. रांची येथील प्रयोगांत असें आढळून आलें आहे कीं एका गुदामांतील खोलींत अशा पाऱ्याच्या ॲमल्गमूच्या विटा ठेवलेलीं धान्याचीं कांहीं पोतीं होतीं; ॲमल्गमूच्या विटा घातलेलीं जीं पोतीं होतीं त्यांत अजिबात कीड आढळली नाहीं. पण ह्याच खोलींत तुलना करून पहाण्याकरितां, ॲमल्गमूच्या विटा घातल्याशिवाय जीं पोतीं होतीं अशा पोत्यांतील धान्याला दरवर्षीपेक्षां कीड बऱ्याच कमी प्रमाणांत लागलेली दिसली.

पारा चढविलेल्या पट्ट्या

लहान प्रमाणावर अशाच प्रकारचा प्रयोग करावयाचा असेल तर तांब्याच्या किंवा जस्ताच्या पत्र्याच्या लहान लहान पट्या अगर चकत्या घेऊन त्यावर पारा चढवावा (स्वच्छ करून अशा पट्या पाऱ्यांत टाकल्या कीं त्यावर पारा सहज चिकटतो) व ह्या पारा चढविलेल्या पट्या किंवा चकत्या धान्य सांठवण्याकरितां डब्यांत किंवा पोत्यांत ठेवाव्यात म्हणजे अशा रीतीनें सांठवलेल्या धान्यालाहि कीड लागत नाहीं.

पाऱ्यानें कीड कां लागत नाहीं ?

पाऱ्याचा उपयोग केल्यानें धान्याला कीड कां लागत नाहीं ? पाऱ्याचे बाष्प (Vapour) होऊन त्या बाष्पाचा परिणाम किड्यांवर व अळयांवर होतो. धान्याच्या दाण्यावरील सर्व अंडीं जशीच्या तशीं दाण्यांना चिटकून राहिलेलीं असतात. त्या अंड्यांतून अळी बाहेर पडलेली दिसत नाहीं. किंवा अळी निघाल्यामुळें अंड्याच्या बाहेरील कवच्याला भोक पडलेलें दिसत नाहीं. मोठे किडे मरत नाहींत, याचें [illegible] त्यांच्यावर कांहींच परिणाम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सांठवणीसाठीं पाऱ्याचा उपयोग

[लेखकः– प्राध्यापक एन्. व्ही. जोशी बी. ए., एम्. एस्सी.]

अन्नधान्य-सांठवणीकरतां पाऱ्याचा उपयोग करण्याची कल्पना भारतांतीलच आहे. परदेशांतील शास्त्रज्ञांना धान्य-सांठवणीकरतां पाऱ्याचा उपयोग करतां येतो हें ३४ वर्षांपूर्वी माहित नव्हतें. भारतांत या कल्पनेचा प्रसार प्रथम कोणी व कसा केला याची माहिती * तूर्त तरी मिळत नाहीं; कारण हें तांत्रिक ज्ञान खेड्यांत राहणाऱ्या शेतकरी-वर्गांसच कित्येक शतकें माहीत होतें; पण त्याबद्दल चिकित्सा किंवा संशोधन भारतीय सुशिक्षितांपैकीं कोणी केलें नव्हतें.

डॉ. कुन्हिकन्नम् यांचे प्रयोग

समाधानाची गोष्ट ही कीं, म्हैसूरचे भारतीय कीटकशास्त्रज्ञ डॉ. कुन्हिकन्नम् यांचें लक्ष या कल्पने-कडे वेधलें, व त्यांनीं प्रयोग करून भारतांतील कीटक-शास्त्रज्ञांच्या तिसऱ्या परिषदेंत आपल्या प्रयोगाची हकीकत सांगून धान्यसांठवणीकरतां पाऱ्याचा उपयोग करण्याच्या भारतीय कल्पनेला प्रसिद्धि दिली. धान्य-सांठवणीकरतां पारा वापरण्याच्या पूर्वीपासून भारतांत प्रचलित असलेल्या फार जुन्या कल्पनेवरून डॉ. कुन्हि-कन्नम् यांना स्वतःस सुचलेल्या व त्यांनीं स्वतः केलेल्या प्रयोगाचें वर्णन १९१९ सालीं केलें.

रिठ्यांत भोकें पाडून पारा

त्यांनीं रिठयांमध्यें भोकें पाडून त्यांत पारा घालून ते रिठे धान्यांत ठेवले तेव्हां (पारा असलेले रिठे घालून ज्या लहान लहान डब्यांत धान्य सांठ-विलें होतें त्या डब्यांतील धान्याला) रिठ्यांशिवाय असलेल्या इतर डब्यांतील धान्यांप्रमाणें कीड लागली नाहीं. यानंतर रिठ्यांप्रमाणें शेणाचे पोकळ गोळे करून त्यांत पारा ठेवण्याची कल्पना निघाली. डॉ. कुन्हिकन्नम् यांच्या प्रयोगाची माहिती झाल्यावर बिहार प्रांतांतील पुसा येथील शेतकी संशोधन संस्थेंतील कीटकशास्त्रीयशाखेंत लहानमोठ्या प्रमाणावर पाऱ्याचा उपयोग करून धान्य सांठविण्याचे प्रयोग झाले.

दोन प्रमुख रीति

डॉ. कुन्हिकन्नम् यांची माहिती प्रसिद्ध झाल्या-वर माझें लक्ष या कल्पनेकडे वेधलें. घरगुती धान्य-सांठवणीकरतां पाऱ्याचा उपयोग जवळजवळ गेलीं ३० वर्षे आम्ही करीत आहोत. आमची रीत थोडी निराळी व सोपी आहे. आमची पहिली रीत अशीः– थोडा पारा घेऊन ओल्या मातींत अगर शेणांत मिसळून त्याच्या लहान चौकोनी विटा, वाटोळ्या वड्या अथवा चकत्या करून त्या वाळवून मग त्या गहूं, तांदूळ, कडधान्यें, डाळी वगैरेचे डबे भरतांना निर-निराळ्या थरांतून घालून ठेवायच्या. आमच्या अनुभवाप्रमाणें अशा धान्यांत कीड, टोके, पोरकिडे वगैरे कांहीं होत नाहींत.

धान्य-सांठवणीची दुसरी पद्धत

तांदूळ सांठविण्याची दुसरी एक पद्धत थोडी निराळी आहे, ती अशीः–एक पल्ला तांदूळ असल्यास दोन किंवा तीन तोळे पारा घेऊन तो जुन्या वाशेळ्या तुपांत मिसळून फेसून हें मिश्रण सर्व तांदळांस चोळून ठेवावयाचें. म्हणजे सर्व तांदळास तुपाचें चोपडण होऊन पाऱ्याचे बारीक कण तांदळांत पसरले जातात. मग ते तांदूळ डब्यांत भरून ठेवावयाचे. डब्यावर डाग लावून झांकण बसविण्याची जरूरी नाहीं. नुसतें झांकण घालून डबे ठेविले कीं झालें.

पाऱ्याचा अवशेष धुऊन जातो

जरूर लागेल त्याप्रमाणें डब्यांतून गोडे थोडे

---

* वनस्पतीपासून तयार केलेलीं औषधें-गुटिका चूर्णें इत्यादि किडूं नयेत व गुणकारी रहावींत (इतकेंच नव्हे तर त्यांचें गुणसंवर्धन व्हावें) यासाठीं त्यास पारा, गंधक यांच्या मिश्रणापासून तयार झालेल्या कज्जलीची जोड देण्याची प्रथा आयुर्वेदांत फार प्राचीन कालापासून चालू आहे. — संपादक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तांदूळ काढून घेऊन ते निवडतांना व धुतांना पाऱ्याचे कण, त्यांपासून होणाऱ्या लहान लहान गोळया वगैरे निघून जातात व तुपाचा अवशेषहि बराचसा धुऊन निघतो. उरलासुरला भाताच्या कढाबरोबर निघून जातो. चुकून एखादी पाऱ्याची गोळी तांदूळ धुतांना राहिली तर तांदूळ ओयरायच्या भांड्यांत तळाशीं बसते.

पारा-कथील संमिश्रणाचा उपयोग

वरील सर्व पद्धतींत साधा प्रवाही पारा वापरल्यामुळें तो जास्त लागतो व खर्च जरा अधिक येतो. तेव्हां हा खर्च कमी करण्याकरितां पाऱ्याचा ॲमल्गम्, म्हणजे पाऱ्याचें दुसऱ्या धातूशीं विशेषतः कथील या धातूबरोबर संमिश्रण केल्यानें जो घट्ट पदार्थ होतो तो, कीड लागल्याशिवाय धान्याची साठवण करण्यांत यशस्वी ठरला आहे. याचे मोठ्या प्रमाणावर प्रयोग रांची येथें करण्यांत आले. पारा तीन भाग व शुद्ध कथील दोन भाग घेऊन हे दोन्ही धातु एके ठिकाणीं खलावे, म्हणजे थोड्या वेळानें त्यांचा घट्ट पदार्थ (ॲमल्गम्) होऊ लागतो. तेव्हांच त्याच्या लहान वड्या किंवा धान्य पुष्कळ असेल तर मोठ्या आकाराच्या विटा पाडाव्यात; आणि अशा वड्या किंवा विटा पोत्यांतून टाकाव्या, म्हणजे त्या पोत्यांतील धान्याला कीड मुळींच लागणार नाहीं.

१६ मण धान्यास ७ औंस पारा

सुमारें सोळा मण धान्यास सात औंस पाऱ्याच्या केलेल्या विटा पुरतात. रांची येथील प्रयोगांत असें आढळून आलें आहे कीं एका गुदामांतील खोलींत अशा पाऱ्याच्या अमल्गमूच्या विटा ठेवलेलीं धान्याचीं कांहीं पोतीं होतीं; ॲमल्गमूच्या विटा घातलेलीं जीं पोतीं होतीं त्यांत अजिबात कीड आढळली नाहीं. पण ह्याच खोलींत तुलना करून पहाण्याकरितां, ॲमल्गमूच्या विटा घातल्याशिवाय जीं पोतीं होतीं अशा पोत्यांतील धान्याला दरवर्षीपेक्षां कीड बऱ्याच कमी प्रमाणांत लागलेली दिसली.

पारा चढविलेल्या पट्ट्या

लहान प्रमाणावर अशाच प्रकारचा प्रयोग करावयाचा असेल तर तांब्याच्या किंवा जस्ताच्या पत्र्याच्या लहान लहान पट्ट्या अगर चकत्या घेऊन त्यावर पारा चढवावा (स्वच्छ करून अशा पट्ट्या पाऱ्यांत टाकल्या कीं त्यावर पारा सहज चिकटतो) व ह्या पारा चढविलेल्या पट्ट्या किंवा चकत्या धान्य सांठवण्याकरितां डब्यांत किंवा पोत्यांत ठेवाव्यात म्हणजे अशा रीतीनें सांठवलेल्या धान्यालाहि कीड लागत नाहीं.

पाऱ्यानें कीड कां लागत नाहीं ?

पाऱ्याचा उपयोग केल्यानें धान्याला कीड कां लागत नाहीं ? पाऱ्याचे बाष्प (Vapour) होऊन त्या बाष्पाचा परिणाम किड्यांवर व अळयांवर होतो. धान्याच्या दाण्यावरील सर्व अंडीं जशीच्या तशीं दाण्यांना चिटकून राहिलेलीं असतात. त्या अंड्यांतून अळी बाहेर पडलेली दिसत नाहीं. किंवा अळी निघाल्यामुळें अंड्याच्या बाहेरील कवच्याला भोक पडलेलें दिसत नाहीं. मोठे किडे मरत नाहींत, याचें कारण पाऱ्याच्या बाष्पाचा त्यांच्यावर कांहींच परिणाम

सांइ
गोल्ड टॅब्लेटस्
क्षयाच्या प्राथमिक अवस्थेवर अप्रतिम.
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द कृ. सांइ ब्रदर्स चेंबूर लि. ...-मुंबई.
[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स-
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होत नाहीं, अंडीं व लहान आळयांच्या जीवन-रसावर (protoplasm) पाऱ्याच्या बाष्पाचा परिणाम होऊन तो गोठत असल्यामुळें अंड्यांतून अळ्या बाहेर पडणें बंद होतें व अगदीं लहान असलेल्या अळयांपैकीं बऱ्याचशा मेलेल्या आढळतात, असें संशोधनान्तीं समजलें आहे.

रांची येथील यशस्वी प्रयोग

रांची येथील प्रयोगांत पाऱ्याच्या ॲमलगमूच्या विटा न घातलेल्या पोत्यांत नेहमींपेक्षां कमी कीड कां लागली ह्याचें स्पष्टीकरण आतां होईल. पाऱ्याच्या ॲमलगमूच्या विटा घातलेल्या पोत्यांतून निघालेलें पाऱ्याचें बाष्प हवेंत पसरत जाऊन त्यांचा परिणाम ॲमलगमूच्या विटा न घातलेल्या पोत्यांतील धान्याच्या दाण्यांवरील अंड्यांवर झाला असला पाहिजे व म्हणून अशा पोत्यांतील धान्याला नेहमींपेक्षां कीड कमी लागलेली आढळली.

बचत करण्याचे नवीन प्रयोग

पाऱ्याचे अत्यंत लहान कण करून खर्चांत बचत करण्याकरितां पारा वापरण्याचे कांहीं नवीन प्रकार निघाले आहेत. त्यापैकीं एका प्रकारांत पारा व कथील यांच्या संयोगामुळें होणारें मिश्रण किंवा ॲमलगम् संगजिऱ्याच्या भुकटीबरोबर घोटून खलवयाचे म्हणजे त्याचा करड्या रंगाचा पूड होते व ही पूड धान्याबरोबर डब्यांत किंवा पोत्यांत घालून ठेवली म्हणजे ह्या पुडीनें धान्याचें किडीपासून रक्षण होतें.

वालचंदनगरांतील धान्य-सांठवणी

अशा प्रकारच्या पुडीनें धान्य सांठवणीचे प्रयोग पुणें जिल्ह्यांतील सरकारी गुदामांत, तसेंच वालचन्दनगर येथील गुदामांत चांगलेच यशस्वी झाले. पूर्वीं रांची येथील प्रयोगांत जसा अनुभव आला होता, तसाच अनुभव या गुदामांतील प्रयोगांतहि आला. म्हणजे पाऱ्याच्या ॲमलगमूची पूड घालून ठेवलेल्या पोत्यांच्या बाहेर बऱ्याच दूर अन्तरावर असलेल्या व ॲमलगमूची पूड न घातलेल्या पोत्यांतील धान्यालाहि पुष्कळच कमी प्रमाणांत कीड लागलेली दिसली व त्यापैकीं कांहीं पोत्यांत तर मुळींच कीड लागली नव्हती.

बुडकल्या वापरतां येतील

दुसरा प्रकार, एका इंग्रज कीटकशास्त्रज्ञानें प्रयोग करून शोधून काढून त्याबद्दल पेटन्ट घेतलें आहे. त्यांतील कल्पनेचें मुख्य तत्व म्हणजे विशिष्ट प्रकारच्या मातीच्या अतिसूक्ष्म रन्ध्रें असलेल्या विटा करून व त्या विटा करतांना त्यांच्या मध्यभागांत पोकळी ठेवून त्यांत पारा ठेवावयाचा व त्या विटा डब्यांत, पोत्यांत किंवा गुदामांत ठेवावयाच्या. यावरून आम्हांला अशी कल्पना सुचली कीं, लहान मुलांना खेळण्याकरितां जशा बुडकुल्या किंवा लहान मडकीं करतात तशी कुंभारांकडून मातीच्याच झांकणासकट घेऊन त्यांत पारा किंवा वर लिहिल्याप्रमाणें केलेली पूड घालून त्यांवर तीं मातीचीं झांकणें फडक्यानें बांधावींत व नन्तर त्या बुडकुल्या डब्यांत पोत्यांत किंवा गुदमांत जरुरीप्रमाणें लागतील तितक्या ठेवून द्याव्यात.

कांहीं शंकांचें निरसन

पाऱ्याचा उपयोग खाण्याच्या धान्यावर करतां येतो. तसाच तो बियाण्याकरतां सांठविलेल्या धान्यावरहि करतां येतो. पाऱ्याचा अनिष्ट परिणाम बियाण्यांतील अंकुरावर मुळींच होत नाहीं. बियाणें पेरण्याकरितां उत्तम स्थितींत राहतें; व अशा रीतीनें सांठवलेलें बियाणें जमिनींत पेरलें तर त्याची रुजूत येण्याची शक्ति, पूर्वीप्रमाणें जशीच्या तशी असते. धान्य सांठविण्याकरतां पारा, पाऱ्याचें ॲमलगम् किंवा ॲमलगमूची केलेली पूड वापरली तर त्या धान्यांत पाऱ्याचें फार मिश्रण होत असेल व त्यामुळें तें धान्य खाण्यांत आल्यास मनुष्यांना अपायकारक होईल असें कांहीं पाश्चात्य वैद्यकशास्त्राभिमानी पंडितांचें मत आहे. पण तें सयुक्तिक नसून निराधार आहे.

भारतीय म्हणजे त्याज्य !

ह्या मतांत 'भारतीय म्हणजे त्याज्य' हा गर्भित हेतु दिसत असून, हें मत पाश्चात्यांनीं तयार केलेल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांच्या कीटकनाशक द्रव्यांचा पाठपुरावा करण्यासाठीं मुद्दाम हेतुपुरःसर बनविलें असावें असें वाटतें.

अपायकारक होत नाहीं

पाऱ्यानें सांठविलेल्या धान्यामध्यें अतिशय अल्प प्रमाणांत पारा अन्नधान्याबरोबर संयोग पावतो. पण तेवढ्यानेंच हें अन्नधान्य अपायकारक होत नाहीं; कारण पाऱ्याचा परिणाम, गॅमेक्सिन्‌सारख्या कीटकनाशक औषधांप्रमाणें तडकाफडकी होत नाहीं. पाऱ्यानें साठविलेल्या अन्नधान्याबरोबर पोटांत गेलेला पारा अत्यंत थोडा असून तो माणसाच्या विशिष्ट भागांत सांठत जातो व मनुष्याच्या अंगांत सांठत गेलेल्या पाऱ्याचें वजन ठराविक मर्यादेपेक्षां जास्त झालें तरच अपाय होण्याचा संभव. ही विवक्षित मर्यादा किती आहे हें पारायुक्त औषधें देण्याच्या पूर्वानुभवावरून वैद्यकशास्त्रांत आधीं ठरलेलें आहे. आम्हीं अनेकवेळां हिशेब करून पाहिला, तेव्हां एक शेर धान्यांत शेराच्या एक दशलक्षांश भागाएवढ्या पाऱ्यापासून फारतर एक पांच लक्षांश भागाइतका पारा असूं शकेल असें आढळून आलें.

बियाणावर अनिष्ट परिणाम नाहीं

रासायनिक परीक्षणाच्या निरनिराळ्या रीति आहेत. त्याप्रमाणें अन्नधान्याचें पृथक्करण भारतांत केलें गेलें आहे, या दोन्ही ठिकाणीं अन्नधान्याच्या दशकोटि भागांत फार तर एक भाग पारा एवढेंच प्रमाण आढळलें. पाऱ्याचें बाष्प सर्व अन्नधान्याशीं संयोग पावत नाहीं. बराच भाग हवेंत तरंगत जाऊन भिंतीवर, जमिनीवर पडतो व कांहीं अंड्यांवर परिणाम करण्यांत खर्च होतो व म्हणूनच बियाण्याच्या अंकुरावर पाऱ्याचा परिणाम झालेला दिसत नाहीं. एरवीं जास्त पारा धान्याशीं संयोग पावला असतां तर कदाचित् दाण्यांतील अंकुर नष्ट झाला असता. एवढ्या अत्यंत कमी प्रमाणांत असल्यामुळें ठराविक मर्यादेपर्यंत माणसाच्या पोटांत पारा सांठायला एकसारखें पाऱ्यानें सांठविलेलें धान्य खाण्यांत येत असलें तरी कितीतरी वर्षें लागतील!

आमचा प्रत्यक्ष अनुभव

आम्ही व आमच्या कुटुंबांतील माणसांनीं रेशनिंग सुरू होण्यापूर्वी कितीतरी वर्षें पारायुक्त सांठवणीचें धान्य खाऊन काढलीं आहेत. पुसाला येथें असतांना तेथील दुसऱ्या एका कुटुंबांतील माणसांनींहि कांहीं वर्षें पाऱ्यानें सांठविलेलें धान्य खाल्लेलें आहे. पुण्यांतील श्री वाय्. आर. घारपुरे यांच्या कुटुंबांतील माणसांनीं कित्येक वर्षें पाऱ्याच्या योगानें साठविलेल्या तांदुळाचा भात करून खाल्लेला आहे. रांची येथील प्रयोगांतील तांदुळ तेथील हॉस्पिटलमधील लोकांनीं खाल्ले, पण या सर्वांपैकीं कोणासहि इजा पोचल्याची बातमी आमच्या कानावर आलेली नाहीं.

याच्या उलट साठवणीकरितां गॅमेक्सिन् औषध वापरलेलें धान्य खाण्यांत आल्यामुळें भारतांतील कांहीं माणसें दगावल्याचें प्रसिद्ध झालें आहे. तेव्हां त्यापासून काय निष्कर्ष काढावयाचा तो स्पष्ट दिसत आहे.

या ज्ञानाचा फायदा करून घ्या

सारांश, धान्य सांठविण्याकरितां पाऱ्याचा उपयोग करतां येतो हें सिद्ध झालें आहे. इंग्लंडमधील संशोधनाचाहि तोच अनुभव आहे. तेव्हां लष्करी साठे, मुलकी सरकारी साठे, व्यापाऱ्यांचे साठे, शेतकरी व नागरिक यांचे वैयक्तिक साठे, कोठारें, अंबारें, कणग्या अथवा पोतीं यांमध्यें ठेवलेले प्रचंड अगर लहान सांठे वरील उपायानें खात्रीनें कीड लागल्याशिवाय उत्तम स्थितींत राहू शकतील. हा फायदा सर्व संबंधित अधिकारी वर्गानें, व्यापाऱ्यांनीं, शेतकऱ्यांनीं व नागरिकांनीं करून घ्यावा. —केसरी

पवित्र
नेपाळी कस्तुरी रु. ४४ तोला,
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला,
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला,
लिहाः—नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होत नाहीं, अंडीं व लहान आळयांच्या जीवन-रसावर (protoplasm) पाऱ्याच्या बाष्पाचा परिणाम होऊन तो गोठत असल्यामुळें अंड्यांतून अळ्या बाहेर पडणें बंद होतें व अगदीं लहान असलेल्या अळयांपैकीं बऱ्याचशा मेलेल्या आढळतात, असें संशोधनान्तीं समजलें आहे.

रांची येथील यशस्वी प्रयोग

रांची येथील प्रयोगांत पाऱ्याच्या ॲमलगमूच्या विटा न घातलेल्या पोत्यांत नेहमींपेक्षां कमी कीड कां लागली ह्याचें स्पष्टीकरण आतां होईल. पाऱ्याच्या ॲमलगमूच्या विटा घातलेल्या पोत्यांतून निघालेलें पाऱ्याचें बाष्प हवेंत पसरत जाऊन त्यांचा परिणाम ॲमलगमूच्या विटा न घातलेल्या पोत्यांतील धान्याच्या दाण्यांवरील अंड्यांवर झाला असला पाहिजे व म्हणून अशा पोत्यांतील धान्याला नेहमींपेक्षां कीड कमी लागलेली आढळली.

बचत करण्याचे नवीन प्रयोग

पाऱ्याचे अत्यंत लहान कण करून खर्चांत बचत करण्याकरितां पारा वापरण्याचे कांहीं नवीन प्रकार निघाले आहेत. त्यापैकीं एका प्रकारांत पारा व कथील यांच्या संयोगामुळें होणारें मिश्रण किंवा ॲमलगम् संगजिऱ्याच्या भुकटीबरोबर घोटून खलावयाचे म्हणजे त्याचा करड्या रंगाचा पूड होते व ही पूड धान्याबरोबर डब्यांत किंवा पोत्यांत घालून ठेवली म्हणजे ह्या पुडीनें धान्याचें किडीपासून रक्षण होतें.

वालचंदनगरांतील धान्य-सांठवणी

अशा प्रकारच्या पुडीनें धान्य सांठवणीचे प्रयोग पुणें जिल्ह्यांतील सरकारी गुदामांत, तसेंच वालचन्दनगर येथील गुदामांत चांगलेच यशस्वी झाले. पूर्वी रांची येथील प्रयोगांत जसा अनुभव आला होता, तसाच अनुभव या गुदामांतील प्रयोगांतहि आला. म्हणजे पाऱ्याच्या ॲमलगमूची पूड घालून ठेवलेल्या पोत्यांच्या बाहेर बऱ्याच दूर अन्तरावर असलेल्या व ॲमलगमूची पूड न घातलेल्या पोत्यांतील धान्यालाहि पुष्कळच कमी प्रमाणांत कीड लागलेली दिसली व त्यापैकीं कांहीं पोत्यांत तर मुळींच कीड लागली नव्हती.

बुडकुल्या वापरतां येतील

दुसरा प्रकार, एका इंग्रज कीटकशास्त्रज्ञानें प्रयोग करून शोधून काढून त्याबद्दल पेटन्ट घेतलें आहे. त्यांतील कल्पनेचें मुख्य तत्व म्हणजे विशिष्ट प्रकारच्या मातीच्या अतिसूक्ष्म रन्ध्रें असलेल्या विटा करून व त्या विटा करतांना त्यांच्या मध्यभागांत पोकळी ठेवून त्यांत पारा ठेवावयाचा व त्या विटा डब्यांत, पोत्यांत किंवा गुदामांत ठेवावयाच्या. यावरून आम्हांला अशी कल्पना सुचली कीं, लहान मुलांना खेळण्याकरितां जशा बुडकुल्या किंवा लहान मडकीं करतात तशी कुंभारांकडून मातीच्याच झांकणासकट घेऊन त्यांत पारा किंवा वर लिहिल्याप्रमाणें केलेली पूड घालून त्यांवर तीं मातीचीं झांकणें फडक्यानें बांधावींत व नन्तर त्या बुडकुल्या डब्यांत पोत्यांत किंवा गुदमांत जरुरीप्रमाणें लागतील तितक्या ठेवून द्याव्यात.

कांहीं शंकांचें निरसन

पाऱ्याचा उपयोग खाण्याच्या धान्यावर करतां येतो तसाच तो बियाण्याकरतां सांठविलेल्या धान्यावरहि करतां येतो. पाऱ्याचा अनिष्ट परिणाम बियाण्यांतील अंकुरावर मुळींच होत नाहीं. बियाणें पेरण्याकरितां उत्तम स्थितींत राहतें; व अशा रीतीनें सांठवलेलें बियाणें जमिनींत पेरलें तर त्याची रुजून येण्याची शक्ति, पूर्वीप्रमाणें जशीच्या तशी असते. धान्य सांठविण्याकरतां पारा, पाऱ्याचें ॲमलगम् किंवा ॲमलगमूची केलेली पूड वापरली तर त्या धान्यांत पाऱ्याचें फार मिश्रण होत असेल व त्यामुळें तें धान्य खाण्यांत आल्यास मनुष्यांना अपायकारक होईल असें कांहीं पाश्चात्य वैद्यकशास्त्राभिमानी पंडितांचें मत आहे. पण तें सयुक्तिक नसून निराधार आहे.

भारतीय म्हणजे त्याज्य !

ह्या मतांत 'भारतीय म्हणजे त्याज्य' हा गर्भित हेतु दिसत असून, हें मत पाश्चात्यांनीं तयार केलेल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांच्या कीटकनाशक द्रव्यांचा पाठपुरावा करण्यासाठीं मुद्दाम हेतुपुरःसर बनविलें असावें असें वाटतें.

अपायकारक होत नाहीं

पाऱ्यानें सांठविलेल्या धान्यामध्यें अतिशय अल्प प्रमाणांत पारा अन्नधान्याबरोबर संयोग पावतो. पण तेवढ्यानेंच हें अन्नधान्य अपायकारक होत नाहीं; कारण पाऱ्याचा परिणाम, गॅमेक्सिन्सारख्या कीटकनाशक औषधांप्रमाणें तडकाफडकी होत नाहीं. पाऱ्यानें साठविलेल्या अन्नधान्याबरोबर पोटांत गेलेला पारा अत्यंत थोडा असून तो माणसाच्या विशिष्ट भागांत सांठत जातो व मनुष्याच्या अंगांत सांठत गेलेल्या पाऱ्याचें वजन ठराविक मर्यादेपेक्षां जास्त झालें तरच अपाय होण्याचा संभव. ही विवक्षित मर्यादा किती आहे हें पारायुक्त औषधें देण्याच्या पूर्वानुभवावरून वैद्यकशास्त्रांत आधीं ठरलेलें आहे. आम्हीं अनेकवेळां हिशेब करून पाहिला, तेव्हां एक शेर धान्यांत शेराच्या एक दशलक्षांश भागाएवढ्या पाऱ्यापासून फारतर एक पांच लक्षांश भागाइतका पारा असूं शकेल असें आढळून आलें.

बियाणावर अनिष्ट परिणाम नाहीं

रासायनिक परीक्षणाच्या निरनिराळ्या रीति आहेत. त्याप्रमाणें अन्नधान्याचें पृथक्करण भारतांत केलें गेलें आहे, या दोन्हीं ठिकाणीं अन्नधान्याच्या दशकोटि भागांत फार तर एक भाग पारा एवढेंच प्रमाण आढळलें. पाऱ्याचें बाष्प सर्व अन्नधान्याशीं संयोग पावत नाहीं. बराच भाग हवेंत तरंगत जाऊन भिंतीवर, जमिनीवर पडतो व कांहीं अंड्यांवर परिणाम करण्यांत खर्च होतो व म्हणूनच बियाण्याच्या अंकुरावर पाऱ्याचा परिणाम झालेला दिसत नाहीं. एरवीं जास्त पारा धान्याशीं संयोग पावला असतां तर कदाचित् दाण्यांतील अंकुर नष्ट झाला असता. एवढ्या अत्यंत कमी प्रमाणांत असल्यामुळें ठराविक मर्यादेपर्यंत माणसाच्या पोटांत पारा सांठायला एकसारखें पाऱ्यानें सांठविलेलें धान्य खाण्यांत येत असलें तरी कितीतरी वर्षें लागतील!

आमचा प्रत्यक्ष अनुभव

आम्ही व आमच्या कुटुंबांतील माणसांनीं रेशनिंग सुरू होण्यापूर्वी कितीतरी वर्षें पारायुक्त सांठवणीचें धान्य खाऊन काढलीं आहेत. पुसाला येथें असतांना तेथील दुसऱ्या एका कुटुंबांतील माणसांनींहि कांहीं वर्षें पाऱ्यानें सांठविलेलें धान्य खाल्लेलें आहे. पुण्यांतील श्री वाय्. आर. घारपुरे यांच्या कुटुंबांतील माणसांनीं कित्येक वर्षें पाऱ्याच्या योगानें साठविलेल्या तांदुळाचा भात करून खाल्ला आहे. रांची येथील प्रयोगांतील तांदुळ तेथील हॉस्पिटलमधील लोकांनीं खाल्लें, पण या सर्वांपैकीं कोणासहि इजा पोचल्याची बातमी आमच्या कानावर आलेली नाहीं.

याच्या उलट साठवणीकरितां गॅमेक्सिन् औषध वापरलेलें धान्य खाण्यांत आल्यामुळें भारतांतील कांहीं माणसें दगावल्याचें प्रसिद्ध झालें आहे. तेव्हां त्यापासून काय निष्कर्ष काढावयाचा तो स्पष्ट दिसत आहे.

या ज्ञानाचा फायदा करून घ्या

सारांश, धान्य सांठविण्याकरितां पाऱ्याचा उपयोग करतां येतो हें सिद्ध झालें आहे. इंग्लंडमधील संशोधनाचाहि तोच अनुभव आहे. तेव्हां लष्करी साठे, मुलकी सरकारी साठे, व्यापाऱ्यांचे साठे, शेतकरी व नागरिक यांचे वैयक्तिक साठे, कोठारें, अंबारें, कणग्या अथवा पोतीं यांमध्यें ठेवलेले प्रचंड अगर लहान सांठे वरील उपायानें खात्रीनें कीड लागल्याशिवाय उत्तम स्थितींत राहू शकतील. हा फायदा सर्व संबंधित अधिकारी वर्गानें, व्यापाऱ्यांनीं, शेतकऱ्यांनीं व नागरिकांनीं करून घ्यावा. —केसरी

पवित्र
नेपाली कस्तुरी रु. ४४ तोला,
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला,
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला,
लिहाः—नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सहकारी पद्धतीनें तयार करावयाचीं औषधें

पर्पटीकल्प

लेखक : वैद्य पु. वि. धामणकर,
धूतपापेश्वर–पनवेल

पर्पट=पापड, पोपडा. पर्पटी=पापडी किंवा फेणी. पातळ, पसरट अशा पदार्थास ही संज्ञा देतात. वैद्यकांतहि ज्या औषधीयोगांना असा आकार असतो अगर देतात त्यांनाहि पर्पटी ह्या नांवानें संबोधतात. ही पर्पटी दोन प्रकारची असते. १ नैसर्गिक, २ कृत्रिम.

तळ्यांतलें पाणी आटतें तेव्हां त्यांतील माती व क्षार तळ्यांतील चिखलाच्या पृष्ठभागांवर बसतात, व तेथेंच सुकतात. हा वरचा थर पातळ व पसरट असा बनतो. तो कोपऱ्याकोपऱ्यांनीं जमिनीपासून सुटलेलाहि असतो. अशा तऱ्हेच्या क्षारमृत्तिकेच्या वड्या खरडून काढून औषधीयोगांत उपयोजतात; उदाहरणार्थ ज्वरभैरवरस (१३१ र.यो.सा., भै.र., बसवराजीय). ह्या संदर्भावरून असें वाटतें कीं, वृंदमाधवाच्या रक्तपित्त चिकित्सेतील नवव्या श्लोकांवरील टीकेंत मातीचा पर्याय 'कृष्णपंचकपर्पटी' असा दिला आहे, तो शब्द 'कृष्णपंकजपर्पटी' असा असावा. कृष्णपंचक ह्या नांवाचा पदार्थ संस्कृत व वैद्यककोषांत सांपडत नाहीं.

कृत्रिमपर्पटी

हिचे चार प्रकार आहेतः– १ पारा+गंधक, २ पारागंधकयुक्त, ३ गंधकयुक्त, ४पारागंधकविरहित. उदा.

१) १ गंधकपर्पटी– १ पारा१ गंधक ४२४ र.यो.सा.
 २ रसपर्पटी– १ पारा १ गंधक ७१ ,,
 ३ ,, ,, ३ पारा १ गंधक ७७ ,,
 ४ स्वरभेदहररस १ पारा १ गंधक ५९८ ,,

२) गगनपर्पटी– १ पारा १ गंधक १ अभ्रक
(३७१ र.यो.सा.).

सुधासार– १ पारा १ गंधक १ अभ्रक
(४२० र.यो.सा.).

अभ्रकपर्पटी– २ पारा ४ गंधक १ अभ्रक
(१४१ र.यो.सा).

३) अभ्रपर्पटी– १ अभ्रक १ ताम्र १ गंधक
(१४० र. यो. सा.).

४) शीतलपर्पटी– ४ तोळे सोरा, १ मासा गंधक
(१३१ र.यो.सा.).

क्षारपर्पटी– ४० सोरा, ५ तुरटी, २॥ नवसागर
(सिद्धयोगसंग्रह)

पर्पटी हाहि एक बंध आहे

कज्जलीप्रमाणेंच पर्पटी हाहि एक बंध आहे. ह्याबाबत एक समजूत अशी आहे कीं कज्जलीपेक्षां पर्पटीबंध अधिक दृढ आहे. आणि कज्जलीचें वियोजन, संशोषण ओठापासूनच्याहि श्लेष्मल त्वचेंत होऊं लागतें, तर पर्पटी आंतड्यांत जाईपर्यंत अविभक्त राहते, व तेथून पुढें ती विरूं लागते. अर्थात् हें अनुमान आहे. प्रत्यक्षानें तें ग्राह्याग्राह्य ठरेल हें उघड आहे.

पर्पटीयोगांचे ६३ पाठ

आयुर्वेदीय औषधीपाठचिंतामणींत पर्पटीयोगांचे एकूण ६३ पाठ संग्रहित केले आहेत. ते ९७ रोगांवर चालतात. पैकीं कांहीं नमुनाकृति म्हणून येथें देत आहे.

अभ्रपर्पटीचे अनेक पाठ

अभ्रपर्पटीचे अनेक पाठ आहेत. पैकीं दोन आयुर्वेदीय औषधीपाठचिंतामणींत संग्रहित केले आहेत. पैकीं ताम्रयुक्त अथवा पारदविरहित अभ्रपर्पटीबाबत "शल्लकीकाथसंयुक्ता पंचकोलेन वाऽथवा। गुंजामात्रया निहन्त्याशु जिव्हारोगान्नसंशयः।" एवढेंच म्हटलें आहे. आणि म्हणून तो पाठ उद्धृत केला. त्याचा विधि दुसऱ्या अभ्रपर्पटीप्रमाणेंच असल्यानें तो समग्र दिला आहे.

गगनपर्पटी व सुधासार

गगनपर्पटी व सुधासार ह्यांतील द्रव्यवर्ग तोच व त्यांचीं मानेंहि तींच, पण सुधासाररसाला अनेक भावना आहेत आणि गगनपर्पटी तद्विरहित आहे. असा दोहोंत फरक आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१ अभ्रपर्पटी

(१४१ र. यो. सा., र. मा. श्लेष्मले गदे)

नांवः- प्रधानऔषधीबोधक.

अभ्रपर्पटीचा पाठ

कृष्णाभ्ररसगन्धानां भागाद्द्विगुणवृद्धिकान्।
एकत्र मर्दयेत्खल्वे तच्चूर्णं कज्जलोपमम् ॥
घृताक्ते लोहपात्रेऽग्नौ द्रुतत्वादेकतां गतम्।
निक्षिपेत्कदलीपत्रे तेनैव च पिधापयेत् ॥
ऊर्ध्वाधो गोमयं चार्द्रमूर्ध्वाधो वर्तिपत्रयोः।
दद्यात्तच्छीतलं चूर्णं गुञ्जैकद्वित्रिमानतः ॥
हीनमध्योत्तमा मात्रा कटुत्रयसमन्विता।
दत्ता श्लेष्मोल्बणे कासे क्षये श्वासे त्वरोचके ॥
पाण्डुरोगे कफाढ्ये च दिनानां सप्तसप्तकैः।
सर्वानेतान् गदान्हन्ति स्वादुमृद्वन्नभोजनात् ॥
क्षाराम्लतीक्ष्णवृन्ताकाद्विदलान्नस्य वर्जनात्।
अभ्रपर्पटिका नाम रसोऽयं श्लेष्मले गदे ॥

द्रव्यसंग्रहः- १ अभ्रक, २ पारा, ४ गंधक.

द्रव्यविशेषः- अभ्रक किमान शतपुटी व निश्चंद्र.

द्रव्यशोधनः- गंधक (घृतदुग्ध), पारा (रसोन).

दंडः- सामान्य (लोह)

पत्रः- कदली (केळीचें).

पात्रः- लोह (लोखंडाची पळी अथवा कढई)

अग्निः- सामान्य (बोरीचा)

प्रक्रियाः- प्रथम पारागंधकाची कज्जली करून घ्यावी. आणि मग त्यांत अभ्रक मिसळावें. बाकी विधि सामान्य.

संपुटः- गोमय. सिद्धिप्रमाणः- ७ तोळे.

परिगणनः- अभ्रक १/७, पारा २/७, गंधक ४/७

कालः- सामान्य. औषध घेण्याची कालमर्यादा ४९ दि.

रोगः- कफप्रधान कास, श्वास, क्षय, अरुचि, पांडु, कफ

मात्राः- हीनमात्रा-१ गुं., मध्यम-२ गुं., उत्तम-३ गुं.

अनुपानः- त्रिकटुचूर्ण+मध

पथ्यः- मधुर रुचकर हलकें अन्न

अपथ्यः- क्षार, आम्ल, तीक्ष्ण, वांगें, द्विदल धान्य.

पंचामृतपर्पटी

पंचामृतपर्पटीचे असंख्य पाठ आयुर्वेदीय औषधी भांडारांत आहेत. ह्यांत 'पंचामृत' ह्या संज्ञेनें निरनिराळा द्रव्यवर्ग घेतलेला आढळतो. कोठें द्रव्यें तींच पण त्यांचे मानांत, तर कोठें भावनावर्गांत फरक असलेला आढळतो. अर्थात् तो पाठहि स्वतंत्र होतो. असे नऊ पाठ आ. औ. पाठचिंतामणींत संग्रहित केले आहेत. प्रक्रियेच्या दृष्टीनें एक पाठ येथें उध्दृत केला आहे.

पारा	गंधक	अभ्रक	ताम्र	लोह	
१	२	२	१	१	४५ र.यो.सा.
१	१	१	१	२	४८ ,,
१	२	१	१	१	४९ ,,

२ पंचामृतपर्पटी (४९ र. यो. सा.)

(नि. र., र. सा., र. सु., वै. द., र. कौ., र. म. मा., र. प्र., र. सं., वै. चि., वै. जी., र. सु., यो. च., र. प., र. पा.)

नांव- द्रव्यसंख्याबोधक

पाठ- सूतायसी च ताम्राभ्रं समं द्विगुणगंधकम्।
लोहपात्रे बादराग्नौ मृदुपाको भवेद्रसः ॥
ढालयेत्कदलीपत्रे कर्तव्या रसपर्पटी।
पंचामृता पर्पटी च रसो वह्निप्रदीपनः ॥

तारेचा पत्ताः-Newbottle
के. के. शहा अँड कंपनी
बाटल्यांचे व्यापारी
(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)
रिकाम्या बाटल्या, बुच, कॅपसुल्स्
[हेअर ऑईल, सरबत, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाचीं सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे
ठोक व किरकोळ
विक्री करणारे व्यापारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज्वरातिसारकासघ्नी कामलापांडुमेहजित् ।
अनुपानं मले बद्धे ज्वरे जीर्णे च मूत्रकम् ॥
पलं पथ्यं तु तैलाम्लवर्ज्यमन्यच्च युक्तितः ॥

द्रव्यसंग्रहः– १ तो. पारा, १ तो. लोह, १ तो. ताम्र, १ तो. अभ्रक, २ तो. गंधक.

पत्रः– कदली पात्रः– लोह अग्निः–बोरीचा

प्रक्रियाः– गंधक ४ तो. भ्रेणें. पाकः– मृदु

सिद्धिप्रमाणः– ६ तोळे

रोगः– अग्निमांद्य, ज्वर, अतिसार, खोकला, कामला, पांडु, मेह. वर्ज्यः– तेल, आंबट.

अनुपानः– मलावरोध, जीर्णज्वर–गोमूत्र ४ तोळे.

३ बोलपर्पटी (३८३ र. यो. सा.)

(यो. र., र. सं., र. चं., र. सि., र. सु., र. को., र., पा. नि. ट., र. क. ल., र. का., र. धं., र. ल., र. प्र., यो. त., रक्तपित्ते । र. सि.)

नांवः– प्रधानद्रव्यसूचक.

पाठः– सूतगन्धकसुकज्जलिकायाः
पर्पटी समयुता समभागम् ।
बोलचूर्णविहितं प्रतिवाप्यं
स्याद्रसोऽयमसृगामयहारी ॥
वल्लयुग्मयुगुलं प्रतिदेयं
शर्करामधुयुतः किल दत्तः ।
रक्तपित्तगुदजस्रुतियोनि–
स्रावमाशु विनिवारयतीशः ॥

पाठनिश्चितिः– बोलबद्धरस, रक्तारिरस, शुद्धोदयरस, बोलबध्द रक्तादि हीं यांचीं पर्याय नांवें होत.

द्रव्यसंग्रहः– १ तो. पारा, १ तो. गंधक १ तो. बोळ.

प्रक्रियाः– पारा, गंधकाची कज्जली पातळ करून तींत बोळाचें चूर्ण घालून घोटावें व पर्पटी तयार करावी.

रोगः– रक्तपित्त, रक्तमूळव्याध, प्रदर, रक्तस्रुति.

मात्राः– ४ गुंजा अनुपानः–मध–साखर

टीपः– १) बोळाचे प्रकार दोन आहेत; एक काळा व दुसरा तांबडा (हिरादखन). काळा विरेचक आहे. तांबडा स्तंभक आहे. रक्तस्राव सुरू करावयाचा असेल म्हणजे अनार्तवांत काळा बोळ, व रक्तस्राव बंद करावयाचा म्हणजे अत्यार्तवांत तांबडा बोळ उपयोगी पडतो. हा विरोध लक्षांत घेऊन बोळाची योजना तयार करावी.

(२) ग्रंथोक्त प्रमाणांतला गंधक अपुरा पडतो म्हणून तो २ तोळे घ्यावा.

---

४ रसपर्पटी – (७१ र. यो. सा.)

भा. प्र., चि. क्र., र. सु., र. क. ल., नि. र. यो. म., र. त., भ. र., र. सु., रससागर, र.प्र.सु.र.मृ.

(आ. औ. पाठचिंतामणींत रसपर्पटीचे एकूण तेरा पाठ संग्रहित केले आहेत. रसपर्पटी ह्या नांवानें पारदाची पर्पटी असा अर्थबोध होतो. पण व्यवहार पाहतां अनेक इतर द्रव्य असलेले पाठहि ह्याच संज्ञेनें दिलेले आढळतात. वरील गंधकपर्पटी, रसपर्पटी व स्वरभेदहररस ह्यांतील द्रव्यवर्ग व त्यांचीं मानें एकच आहेत. पण त्यांचा भावनावर्ग पृथक् आहे.)

नांवः– प्रधानद्रव्यसूचक.

पाठः– जयापत्ररसेनाऽपि वर्धमानरसेन च ।
भृंगराजरसेनाऽपि काकमाच्या रसेन च ॥
रसं संशोध्य यत्नेन तत्समं शोधयेद्बलिम् ।
भृंगराजरसैः पिष्ट्वा शोषयेदर्करश्मिभिः ॥
सप्तधा वा त्रिधा वाऽपि पश्चाच्चूर्णं च कारयेत् ।

पांढरें कोड

हजारोंचें गेले व त्यांनीं अभिप्राय दिलेलें आणि अनेक बक्षिसें मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु.

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो. असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, ' आयुर्वेद भवन '
मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चूर्णयित्वा समं तेन रसेन सह मर्दयेत् ॥
नष्टसूतं यदा चूर्णं भवेत्कज्जलसन्निभम् ।
निर्धूमे बदरांगारे द्रवीकुर्यात्प्रयत्नतः ॥
महिषीमलविन्यस्ते तत्र तत्कदलीदले ।
निक्षिप्य तदुपर्यन्यत्पत्रं दत्त्वा प्रपीडयेत् ॥
शीतलत्वं गते पत्रादुद्धृत्य विचूर्णयेत् ।
एवं सिद्धा भवेद् व्याधिघातिनी रसपर्पटी ॥
ज्वरादिव्याधिभिर्व्याप्तं विश्वं दृष्ट्वा पुरा हरः ।
चकार कृपया युक्तः सुधावद्रसपर्पटीम् ॥
रक्तिकासम्मितां तावद्भृष्टजीरकसंयुताम् ।
गुंजाऽर्द्धभृष्टहिंग्वाढ्यां भक्षयेद्रसपर्पटीम् ॥
रोगानुरूपभैषज्यैरपि तां भक्षयेद्बुधः ।
पिबेत्तदनु पानीयं शीतलं चुलुकत्रयम् ॥
प्रत्यहं वर्धयेत्तस्या एकैकां रक्तिकां भिषक् ।
नाऽधिकां दशगुंजातो भक्षयेत्तां कदाचन ॥
एकादशदिनाऽऽरम्भात्तां तथैवाऽपकर्षयेत् ।
एवमेतां समश्नीयान्नरो विंशति वासरान् ॥
शिवं गुरुं तथा विप्रान् पूजयित्वा प्रणम्य च ।
श्रद्धया भक्षयेदेतां क्षीरमांसरसाशनः ॥
ज्वरं च ग्रहणीं चापि तथाऽतीसारमेव च ।
कामलां पाण्डुरोगं च शूलप्लीहजलोदरम् ॥
एवमादीन्गदान्हत्वा हृष्टः पुष्टश्च वीर्यवान् ।
जीवेद्वर्षशतं साग्रं वलीपलितवर्जितः ॥

द्रव्यसंग्रहः– १ तो. पारा, १ तो गंधक.

शोधक वनस्पती– १ भांग, २ एरंड, ३ पत्र, ४ माका ५ कावळी.

पत्रः– कदली पात्रः–लोह

अग्निः– बोरलाकूड

प्रक्रियाः– वर सांगितलेल्या शोधक वनस्पतींच्या रसांत पारा शुद्ध करून घ्यावा. नंतर पारा-गंधकाची कज्जली करावी. त्या कज्जलीस माक्याच्या रसाची भावना द्यावी. नंतर ती कज्जली उन्हांत सुकवावी. चांगली वाळल्यावर लोहपत्रांत घालून विधिवत् पर्पटी तयार करावी.

संपुटः– म्हशीचें शेण. सिद्धिप्रमाणः– २ तोळे.

रोगः– ज्वर, ग्रहणी, अतिसार, कामला, पांडु, प्लीहा, जलोदर, कार्श्य, दैन्य, वलीपलित.

मात्राः— १ गुंज

अनुपानः– भाजलेलें जिरें, भाजलेला हिंग.

सेवनविधिः– ही पर्पटी १ ते १० गुंजापर्यंत व १० ते १ गुंजेप्रमाणें वर्धक्षीयमाण विधीनें सेवन करावी. हिचे बरोबर रोगानुरूप इतर औषध दिलें तरी चालतें. ही पर्पटी घेतल्यानंतर तीन घोट थंड पाणी प्यावें. पथ्यः– दूध, मांसरस.

---

५ रसपर्पटी (७३ र. यो. सा.)

र. सु., र. दी., चि. र. भ., नि. र., सू. प्र., र. को, र. शि., यो. म., यो. त., यो. स., र. का. र., (मा)

पाठः– शुद्धसूतं द्विधा गन्धं मर्द्यं भृंगीरसैः क्षणम् ।
पाचयेल्लोहपात्रस्थं चाल्यं लघुपुटेन च ॥
लोहभस्माऽथवा ताम्रं पादांशेन विनिक्षिपेत् ।
पाच्यं प्रवालयन्त्रेव यामार्द्धं मृदुवह्निना ॥
तत्क्षिपेत्कदलीपत्रे गोमयस्योपरि स्थिते ।
तत्पत्रं धारयेदूर्ध्वं तदूर्ध्वं गोमयं क्षिपेत् ॥
ततः संचूर्णयेत्खल्वे निर्गुण्ड्या भावयेद्दिनम् ।
जयन्तीत्रिफलाकन्यावासाभार्ङ्गीकटुत्रयैः ॥
भृंग्याग्निमुनिमुंडीभिर्भावयेत्प्रत्यहं पृथक् ।
आर्द्रकस्य द्रवैः पश्चाद्भावयेद्दिनसप्तकम् ॥

अनेक ग्राहकांच्या सूचनेवरून
परतवाडा येथें आयुर्वेद सेवा संघ नासिकचीं
सर्व अनुभविक व गुणकारी औषधें
मिळण्याची सोय आम्हीं केली आहे.
श्री समर्थ स्टोअर्स
परतवाडा (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अंगारैः स्वेदयेत्पश्चात्पर्पटाख्यो महारसः ।
अष्टगुंजं प्रदातव्यं शुष्कान्नं पथ्यमाचरेत् ॥
तरुणस्य त्वचोर्मूलं क्वाथयित्वा पिबेदनु ।
त्रिसप्ताहप्रयोगेण चान्तःस्थां विद्रधिं जयेत् ॥
चतुर्गुंजामितो देयः सम्यक् श्लेष्माऽधिके ज्वरे ।
वासाशुण्ठ्यभयाक्वाथमनुपानं प्रकल्पयेत् ॥
च्व्यकस्य रसैर्वाऽथ पेया श्लेष्मज्वरापहा ॥

द्रव्यसंग्रहः- १ तो. पारा, १ तो. गंधक, ।· तो. लोहभस्म, ।· तो. ताम्रभस्म.

भावनाः- निर्गुंडी, एरण, त्रिफला, कोरफड, अडुळसा, भारंग, त्रिकटु, माका, चित्रक, अगस्ति यांची १।१ भावना. आलें भावना ७.

दंडः— लोह पत्रः— कदली
पात्रः—लोह अग्निः— मंद

प्रक्रियाः—

कज्जली पातळ करून तींत क्रमाक्रमानें ताम्र, लोह हीं भस्में घालून घोटावीं. किंवा कज्जलींत ताम्रभस्म, लोहभस्म एकजीव करून त्या मिश्रणाची पर्पटी करावी. पर्पटी तयार झाल्यावर तीस निर्गुंडी आदि वनस्पतींच्या भावना घ्याव्या. व मग पुनः थोडासा शेक द्यावा.

संपुटः— गोमय. सिद्धिप्रमाणः— २॥ तोळे.
कालः— २१ दिवस मात्राः- ८ गुंजा
रोगः- १) अंतर्विद्रधी-८ गुंजा २) कफज्वर-४ गुंजा
अनुपानः- १) वायवर्णामूळकाढा. पथ्य-शुष्कान्न. (अंतर्विद्रधीकरितां).

२) अडुळसा, सुंठ, हिरडाकाढा. पथ्य-पेया (कफज्वराकरितां.)

सुवर्णपर्पटी

सुवर्ण, पारा, गंधक इतकीच द्रव्यें असलेले चार, व ह्याहूनहि अधिक द्रव्ययुक्त असे दोन, मिळून ६ पाठ आ. औ. पाठचिंतामणींत उद्धृत केले आहेत.

सोन्याचा वर्ख, सोन्याचें चूर्ण अथवा सोन्याचें भस्म, हे सुवर्णपर्पटींत सोनें घालण्याचे तीन प्रकार आहेत. ह्यांच्या मानांत व प्रक्रियेंतहि फरक आहेत.

भिन्नमानदर्शन

		पारा	गंधक	सोनें
८३२८	भा. भै. र.	पारा	गंधक	सोनें
८३२९	,,	१	२	१
४३०	र. यो. सा.	८	८	२

भिन्न प्रक्रिया

१) पारा, सुवर्ण प्रथम एकत्र करून तें मिश्रण गंधक-द्रवांत घालून घोटणें.

२) पारा, सुवर्ण, गंधक एकत्र खलून पातळ करणें.

३) पारा, गंधक सुवर्ण ह्या क्रमानें खल करणें. सर्व पदार्थांचें मिश्रण सम्यक् होण्याच्या दृष्टीनें क्रमांक दोनची प्रक्रिया प्रशस्त वाटते.

सुवर्णपर्पटी (८३२८ भा.भै.र.)

(बृ. यो. त. । त ७६, बृ नि. र., यो. र. । ग्रहण्यधिकार । र. रा. सु., भै. र., रसे. सा. स. । ग्रहण्य. । र. चं. । ग्रहण्य, राजयक्ष्मा । बृ. नि. र. । क्षय. ॥ यो. र. । राजयक्ष्मा)

नांवः— प्रधानद्रव्यसूचक

पाठः- शुद्धसूतं पलमितं तुर्यांशस्वर्णसंयुतम् ।
मर्दयेन्निम्बुनीरेण यावदेकत्वमाप्नुयात् ॥
प्रक्षाल्योष्णाम्बुना पश्चात्पलमात्रे तु गन्धके ।
द्रुते लोहमये पात्रे बादरानलयोगतः ॥
प्रक्षिप्य चालयेल्लोह्यां मन्दं लोहशलाकया ।
ततः पाकं विदित्वा तु रम्भापत्रे शनैः क्षिपेत् ॥
गोमयस्थे तदुपरि रम्भापत्रेण यन्त्रयेत् ।
शीतं तच्चूर्णितं गुंजाक्रमवृद्धं निषेवयेत् ।
माषमात्रं भवेद्यावत्ततो मात्रां न वर्धयेत् ।
सक्षौद्रेणोषणेनैव लेहयेद्भिषगुत्तमः ॥
ग्रहणीं हन्ति शोषं च सुवर्णरसपर्पटी ।
सद्यो बलकारी शुक्रवर्धिनी वह्निदीपनी ॥
क्षयकासश्वासमेहशूलातीसारपाण्डुनुत् ॥

द्रव्यसंग्रहः- ४ पारा ४ गंधक १ सुवर्ण
द्रव्यविशेषः- पारा-हिंगुलोत्थ, सुवर्ण - वर्ख,
द्रव्यशोधनः- पारासुवर्णमिश्रण लिंबूरसानें धुवावें.
दंडः- लोह पत्रः- रंभापत्र
पात्रः- लोह अग्निः- बोर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रक्रियाः- प्रथम पारा, सुवर्ण एकत्र खलावेत. नंतर त्यांत लिंबाचा रस घालून पुनः खल करावा. व ऊन पाण्यानें धुवून तो कोरडा करावा. व मग त्यांत गंधक घालावा.

संपुटः- गोमय पाकः- गोमयाग्नि

सिद्धिप्रमाणः— ९ तोळे

रोगः— शुक्रक्षय, मंदाग्नि, ग्रहणी, कास, श्वास, मेह, शूल, अतिसार, पांडु.

मात्राः— १ गुंजेपासून ८ गुंजेपासून वर्धमानक्रमानें.

अनुपानः— मध-पिंपळी

७ शीतलपर्पटी (पाठ १ ला)

(१३१ र. यो. सा.) (सि. भे. म. मूत्रकृच्छ्र)

नांवः— कार्यबोधक

पाठः— सौरे प्रकुंचे द्रवति प्रणीय
माषं बलिं ढालय खल्वकुक्षौ ।
सिद्धो रसः शीतलपर्पटीति
कृच्छ्रेऽतिकृच्छ्रे कथितः सुजीरः ॥

पाठनिश्चितिः- सामान्य.

द्रव्यसंग्रहः- ४ तोळे सोरा, १ मासा गंधक.

प्रक्रियाः- सोरा पातळ करावा. चुलीवरून खालीं उतरावा. त्यांत गंधक घालून विधिवत् पर्पटी करावी.

सिद्धिप्रमाणः- ४ तोळे

रोगः— मूत्रकृच्छ्र अनुपानः — जिरें

८ क्षारपर्पटी (शीतलपर्पटी पाठ २रा)

[सिद्धयोगसंग्रह पान ९६]

द्रव्यसंग्रहः-४० तोळे सोरा, ५ तोळे तुरटी, २॥ तोळे नवसागर.

पत्रः— कदली

प्रक्रियाः— मातीच्या मडक्यांत पातळ करणें.

सिद्धिप्रमाणः— ४७॥ तोळे

रोगः— अम्लपित्त, मूत्रकृच्छ्र, मूत्राघात.

मात्राः— ५ ते १० गुंजा.

अनुपानः- थंडपाणी, भिजविलेला कापूर, किंवा नारळाचें पाणी.

वाचकांचा पत्रव्यवहार—

जखमेवर रक्तगतकषाय*

(* पटोलपत्र, सारिवामूळ, नागरमोथा, पाठा, कुटकी -वाग्भट ज्वराचिकित्सा)

"मांडीवरील मांसांतील एक जखम अत्यंत लाल व पुनःपुनः फुलून वर यावयाची. कॅरबॉलिक ॲसिड लावून जाळली तरी पुनःपुनः वर यावयाची. म्हणून रक्तगतकषायांत भिजवून गॉझ (विकेशिका) ठेवली. जखम दुसऱ्या ड्रेसिंगला खालीं गेली. कां ?

सांताक्रूझ —डॉ. वसंत अवसरे, एम्. बी.बी. एस्.

मंगल विवाह

कुष्ठनिवास, दत्तपूर पो. वर्धा येथील कार्यकर्ते वैद्य गो. य. जोशी आयुर्विद्याविशारद व चि. सौ. कां. वैद्य शशिकलाबाई आठवले डी. ए. एस्. एफ् (आयुर्वेदाविशारद) यांचा विवाह रविवार ता. ३ जानेवारी रोजीं गोरज मुहुर्तावर कुष्ठधामांतील कार्यकर्तानिवासांत झाला.

वैद्य ना. ब. पंडितराव आयुर्वेदतीर्थ (वैद्य लोकलबोर्ड दवाखाना, नांदेड पू. खा.) व सातारा येथील पां. व्यं. एकबोटे यांची कन्या चि. सुमन यांचा विवाह सातारा येथें ता. २७।१२।५३ रोजीं झाला.

आम्ही वधूवरांना सुखी व कर्तव्यपूर्ण दीर्घायुष्य चिंतितो.

आयुर्वेद सेवा संघ-नासिकचीं सर्व शास्त्रोक्त अनुभविक औषधें, तसेंच आयुर्वेद पत्रिकेचे अंक आमचेकडे मिळूं शकतील.

धातुवर्धक कंदर्प-वृष्य-पाक, टकलावर भ. भृंगराज तेल, शक्तिवर्धक अगस्तिप्राश हीं व अशींच नवीन नवीन औषधें वापरा. विशेष माहितीकरितां एकवेळ भेट द्या.

दि सूर्यकिरण फार्मसी लि.

१७३ गिरगांवरोड, मुंबई ४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभिप्राय

संक्षिप्त दोषधातुमलविज्ञान

(ग्रंथलेखकः–डॉ. द. म. पटवर्धन, L. C. P. S. आयुर्विद्याविशारद, पुणें)

आयुर्वेदाच्या त्रिदोष - सिद्धान्तावर प्रकाश पाडणारे ग्रंथ फारच विरळा ! कारण हा विषय किचकट व थोडासा गुंतागुंतीचाहि आहे. म्हणूनच हा विषय हाताळण्याची प्रवृत्तिहि फार थोड्यांची व सहाजिकच अशा ग्रंथांना वाचकवर्गहि दुर्मिळ ! तथापि वैद्यांना, व फॅकल्टीच्या अभ्यासक्रमानुसार शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना दोषधातुमलांच्याबद्दलची संकलित माहिती देणारीं जीं कांहीं थोडींच पुस्तकें आहेत, त्यांत संक्षिप्त दोषधातुमलविज्ञान या पुस्तकाचा क्रमांक बराच वरचा लागेल यांत शंका नाहीं.

ग्रंथांत तक्ते दिले आहेत

प्रस्तुत पुस्तक दोषधातुमलविज्ञानाच्या दृष्टीनें संक्षिप्त आहे, हें ग्रंथकारानेंच सांगितलें आहे. तथापि त्यांतील विषय–विवरण–पद्धति व आवश्यक त्या सर्व ठिकाणीं दिलेले तक्ते विद्यार्थ्यांच्या अभ्यासाला योग्य व पुरेसे असल्यानें हें पुस्तक त्या विषयाचें पाठ्यपुस्तक म्हणून नेमण्याच्या पात्रतेचें निश्चित झालें आहे.

उभयशास्त्रकोविद लेखक

डॉक्टर-वैद्य पटवर्धन हे उभयशास्त्रकोविद असल्याकारणानें ग्रंथांत एकांगीपणा कोठेंच आढळत नाहीं. जसें असेल तसें, व शास्त्रीय विषय असूनहि सुगम भाषेंत मांडण्याची त्यांची लेखनशैली अभिनंदनीय आहे. हें पुस्तक लिहितांना अनेक तज्ञांचा सल्लाहि लेखकानें घेतला आहे.

प्रकृतिविज्ञान व विकृतिविज्ञान या दोन भागांत वर्ण्य विषय प्राधान्यानें आलेला आहे. शेवटीं कांहीं प्रश्न दिले असल्यानें अभ्यासलेल्या विषयाच्या आत्मपरीक्षणास मदत झाली आहे. असल्या शास्त्रीय ग्रंथांत ७१ ठिकाणीं शुद्धि कराव्या लागणें इष्ट नसलें तरी परिस्थितीनें ही गोष्ट घडली आहे, याची वाचकवर्ग जाणीव ठेवीलच.

दोनशें पानांचा शास्त्रीय ग्रंथ

दोनशें पानांचा शास्त्रीय ग्रंथ प्रादेशिक सोप्या भाषेंत छापून वैद्यांना व विद्यार्थ्यांना सादर करणाऱ्या लेखकाच्या धाडसाचें कौतुक करावेसें वाटतें. पुस्तक प्रत्येक वैद्याला संग्राह्य आहे. क्रिंमत ३ रुपये

अभिप्राय लेखक—वैद्य वि. म. गोगटे
(सभासद, आयुर्वेद युनानी बोर्ड, मुंबई)

जलवेतसाचें बी

“ लक्ष्मीविलासगुटीच्या पाठांत ‘ जलवेतस बी ’ सांगितलेलें आहे. औषधीबाजारांत ‘जलवेतस’ नांवानें एक बी मिळतें, पण तें जलवेतस नव्हे असें जाणतें म्हणतात.

तरी जलवेतसाचीं झाडें कोठें आहेत? त्याला फुलें, फळें, बी केव्हां येतें? याची माहिती कोणास असल्यास ती पत्रिकेकडे कळवावी.

असें कळतें कीं, जलवेतसाचीं झाडें कन्नड तालुक्यांत शिवना नदी किनाऱ्यास आहेत. तरी त्या भागांतील वैद्यांनीं यासंबंधीं अधिक माहिती मिळवून प्रसिद्ध करावी. ” — एक जिज्ञासु वैद्य

राष्ट्रपतींचे
सन्मान्य युनानी चिकित्सक

अखिल भारतीय युनानी तिब्बी काँग्रेसचे अध्यक्ष हकीमसाहेब नसीरुद्दीन अहंमद ह्यांना राष्ट्रपति राजेंद्रप्रसाद यांचे ऑनररी युनानी हकीम म्हणून नेमण्यांत आलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दंतवैद्यक शास्त्राचा कोर्स

१९४८ च्या डेन्टिस्ट्स अॅक्टाखालीं ठेवण्यांत आलेल्या डेन्टिस्ट्स रजिस्टरच्या भाग ब (तात्पुरतें) मध्यें नांवें नोंदविलेल्या दन्तवैद्यांना आपलीं नांवें भाग ब (कायमचें) मध्यें नोंदवून घेण्यासाठीं अेक परीक्षा पास व्हावें लागतें. या परीक्षेच्या ट्रेनिंगचा कोर्स १५ जानेवारी १९५४ पासून सर सी. अी. अेम. डेन्टल कॉलेज अॅण्ड हॉस्पिटल, भायखळा मुंबई ८ येथें सुरू झाला आहे.

कोठल्याहि उमेदवारास प्रवेश

सबंध भारतांत अशा प्रकारचा हा अेकमेव कोर्स असून त्यासाठीं भारतांतील कुठल्याहि ठिकाण--च्या उमेदवारास प्रवेश मिळू शकतो. ज्यांचीं नांवें तात्पुरत्या भागांत नोंदविलीं असतील त्यांनाच फक्त या कोर्सला हजर राहतां येते.

या कोर्सला प्रवेश मिळण्यासाठीं ठराविक फार्मवर अर्ज करावा लागेल. अर्जाचे फॉर्म व या कोर्स-बाबतची अधिक माहिती प्रिन्सिपॉल सर सी. अी. अेम. डेन्टल कॉलेज, भायखळा, मुंबई ८ यांचेकडे मिळेल. त्यासाठीं स्वतःचा पत्ता असलेला मोठा लिफाफा व पुरेसे पोस्टेज पाठवावे.

आयुर्वेद हें जिवंत विज्ञान आहे

झांशी येथील आयुर्वेद विद्यापीठांत भाषण देतांना उत्तर प्रदेशाचे राज्यपाल श्री. कन्हैयालालजी मुनशी म्हणालेः--"आयुर्वेद हें एक जिवंत विज्ञान आहे. व या देशांत त्याचें भविष्य उज्वल आहे. आमच्या देशांतील सुशिक्षित लोक आयुर्वेदांतील उत्तमोत्तम औषधांच्याकडे दुर्लक्ष करून अधिक महाग व बेकार पाश्चिमात्य औषधांचा उपयोग करतात व या रीतीनें आपल्या देशांतील पुरातन विद्येचा अनादर करतात हें पाहून मला खेद होतो."

वैद्य बन्धुओ! अपनी आय बढाओ!

बिना पूंजी, बिना परिश्रम, बिना किसी व्यय के, आय बढाना चाहें तो हमसे पत्रव्यवहार करें। हमारा कारखाना भारत भर में थोक परिणाम में सस्ती एवं उत्तम प्रकार की आयुर्वेदिक औषधियां सप्लाई करने में प्रसिद्ध है। कई प्रान्तीय गवर्नमेण्टें हमारी ग्राहक हैं।

काश्मीरी शिलाजीत

यह हमारे अपने कारखाने में प्रति वर्ष करीब २०० मन शास्त्रविधिअनुसार शुद्ध की जाती है। मात्र शुद्ध ३६) सेर, ३॥) छटाक, अशुद्ध पत्थर ११० प्रति मन, लोहभस्म २४), वंग भस्म ३६), प्रवाल भस्म ३२), अभ्रक वज्र भस्म ४६), कान्तलोहभस्म १८), स्वर्णमक्षिक-भस्म २८), रससिन्दूर ६०), स्वर्णराजवंगेश्वर ८८), मण्डूरभस्म २०), शंख भस्म ७), श्रृंग भस्म १४), कपर्दिका भस्म ८), मुक्ता शुक्ति भस्म १०), गोदन्ती भस्म ३॥), चन्द्रप्रभावटी २८), प्रति सेर स्वर्ण सिन्दूर ३ प्रति तोला।

नोटः— इन भावोंपर २० तोला से कम कोई औषधि न भेजी जावेगी, सूचिपत्र मुफ्त।

काश्मीर आयुर्वेदिक वर्क्स, अमृतसर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार

अग्निहोत्रमंदिरांतील ज्ञानसत्र

ता. १६ डिसेंबर १९५३ च्या आयुर्वेद-पत्रिकेंत पुण्याच्या अग्निहोत्रमंदिरांतील शारदीय ज्ञानसत्रांतील 'वैद्यकशास्त्र' या विषयांवर निरनिराळ्या वैद्यक पंथांच्या विद्वद्वर्यांच्या झालेल्या ३२ व्याख्यानांचा अत्यल्प सारांश आलेला आहे. त्यावरून या सर्व व्याख्यानांचा जर समग्र व शक्यतों सविस्तर आशय त्या त्या व्याख्यात्यांच्या व विषयांच्या नांवाखालीं एकत्र पुस्तकरूपानें छापून काढला तर वाचकांचें, विशेषतः पुण्याहून शेकडों मैल दूर असलेल्या आमच्यासारख्या वाचकांचें समाधान होईल व वैद्यकीय वाङ्मयांत ही एक अमूल्य भर पडेल असें वाटतें. निरनिराळ्या पॅथींची तुलनात्मक माहिती व आयुर्वेदाचें वैशिष्टय एतद् विषयक उत्तम लहान ग्रंथ तयार होईल. —वै. मो. म. भांडारकर, रत्नागिरी

———

पुणें वैद्यक मंडळ

पदाधिकाऱ्यांची त्रैवार्षिक निवडणूक

पुणें वैद्यक मंडळाची सर्वसाधारण सभा दि. २०।१२।५३ रोजीं भरून खालील पदाधिकारी मंडळ (कार्यकारी मंडळ) पुढील ३ वर्षांसाठीं निवडलें गेलें आहे. अध्यक्ष—वै. भा. वि. गोखले. मंत्री-वै. अ. य. जोशी, वै. शं. गं. वर्तक. खजिनदार- वै. वा. क. साठे. सभासद-वै. ग. वि. पुरोहित, वै. पु. वा. पानसे, वै. र. वा. जोशी.

पुणें येथें
'आयुर्वेद सेवा संघ नासिक' चीं
औषधें मिळण्याचें ठिकाण
किरण मेडिकल सर्व्हिस
नगरकर तालीम चौक, लक्ष्मीरोड, पुणें

जगाची सुधारणा केव्हां होईल ?

प्रश्न-जग सुधारण्यासाठीं इतके जण इतके प्रयत्न करीत आहेत तरी जग कां सुधरत नाहीं ? असं मला विचारावयाचें आहे. उदाहरणार्थ, चोऱ्या होऊ नयेत म्हणून तुरुंग निर्माण केले तरी चोऱ्या सुरूच आहेत. माणसं आजारी पडू नयेत म्हणून नवीन नवीन औषधं निघालीं तरी आजार कांहीं हटले नाहींत.

मुलें शहाणी व्हावींत म्हणून शाळा-कॉलेज निघालीं पण वेड्यांचीं इस्पितळें कांहीं ओस पडलीं नाहींत. याचें कारण काय ?

उत्तरः—जगांत तसे वाईट कोणीच नसतात. कांहीं लोक तर सत्यवादी, निष्कपटी, उदात्त, निःस्वार्थी, सर्वांभूतीं सारखे अशी ख्याति असते. पण-

पण, स्वतः आणि दुसरे अशी तुलना आली कीं तो त्याग, तो कडकपणा, तो नियम—सारं सारं दूर जातं!

कायदे करणारे आणि दुसऱ्याच्या बाबतींत ते कसोशीनें अंमलांत आणणारे अनेक आहेत; पण स्वतःवर पाळी आली कीं आपला सारासारविचार नाहींसा होतो. आणि उघडा स्वार्थ नाचूं लागतो.

भावे प्रयोगी लोक

उपदेश इतराकडून पाळवून घेणारे 'भावे' प्रयोगी लोकच जगांत फार आहेत. पण उपदेश स्वतः पाळणारे 'कर्तरि' प्रयोगी लोक नाहींत. म्हणून जगाची सुधारणा होत नाहीं.

ज्यावेळीं प्रत्येकजण आपल्याला जें करणं शक्य आहे तेवढाच उपदेश इतरांना करील, आणि तेवढाच कायदा करील त्यावेळीं जग सुधारेल. पण हें घडणार नाहीं. —उतारा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शाली व व्रीहि

" मुंबई येथें भरलेल्या विद्वत् परिषदेंत खाजगी चर्चेच्या वेळीं वैद्य बिंदुमाधव पंडित यांनीं व्यवहारांत शाली व व्रीहि कशा ओळखाव्यात ? असा प्रश्न विचारला होता. त्याला अनुसरून पुढील माहिती देत आहे.

सुश्रुताचार्यांच्या मतें- हैमंताः शालयः, ग्रैष्माः षष्टिकाः, वार्षिकास्तु व्रीहयः।

चरकाचार्यांच्या मतें- अत्र च शालिः हैमंतिकं धान्यं, षष्टिकादयश्च ग्रैष्मिकाः, व्रीहयः शारदाः इति व्यवस्था।

शूक धान्यामध्यें ३ प्रकार आहेत. त्याचें पीक येण्यास लागणाऱ्या कालावर, व लागणाऱ्या अधिक पाण्याच्या पुरवठ्यावर हे भेद पडले आहेत.

'षष्टिक' या धान्याला कालावधि थोडा लागतो व पाणीदेखिल थोडें पुरतें. हें धान्य पचण्यास हलकें आहे.

षष्टिकापेक्षां अधिक पाणी व अधिक कालावधि लागतो ते व्रीहि होत. (कांहींच्या मतें षष्टिक ही जात व्रीहींचीच आहे.)

शालि या प्रकारास सर्वांत अधिक पाणी व अधिक काल लागतो. हा काल अजमासें ६ महिन्याचा असतो. या तीन्ही जातींत, शाली श्रेष्ठ होत. "

—वैद्य रा. कृ. जिनराळकर, बेळगांव

ही माहिती प्रत्यक्ष व्यवहारास पुरेशी नाहीं. बाजारांत जे तांदुळाचे विविध प्रकार विकत मिळतात त्यापैकीं शाली कोंणत्या व व्रीहि कोणत्या हें यावरून ठरवितां येत नाहीं. व आरोग्यासाठीं हें समजणें अवश्य आहे. — संपादक

विवाह —पुनर्विवाह

यासाठीं सुशिक्षित वधुवरांची नोंदणी चालू आहे. अनाथ विधवा व गरीब कुमारिका यांना विनामूल्य स्थळें सुचविलीं जातात. लिहा-विवाह-संस्था, ४८७ रंगठा हायस्कूल रोड. नासिक शहर

मध्यवर्ती आरोग्यमंडळाची बैठक

नवी दिल्लीः- मध्यवर्ती आरोग्यमंडळाची दुसरी बैठक राजकोट येथें ८ ते ११ फेब्रुवारी १९५४ पर्यंत भरणार आहे. या मंडळाची पहिली बैठक गत-वर्षी हैदराबाद येथें झाली होती.

मंडळाच्या या दुसऱ्या बैठकींत वैद्यकीय व्यवस्था व वैद्यकीय नोकरवर्ग यासंबंधींच्या अनेक प्रश्नांवर विचारविनिमय करण्यांत येईल. राष्ट्रीय पाणीपुरवठा व आरोग्य कार्यक्रम आंखण्याचा प्रश्न, मध्यवर्ती आरोग्य शिक्षण विभागाची स्थापना आणि राज्यांतील आरोग्यविषयक प्रसिद्धि कार्यक्रमांत वाढ इत्यादीवरहि मंडळ या प्रसंगीं विचार करील.

किरण औषधोपचार पद्धतीच्या (अल्ट्रा-व्हायोलेट रेज) अनिर्बंध वापरावर नियंत्रण व प्रतिबंध आणण्यासाठीं कायदा करण्याच्या प्रश्नावर या बैठकींत विचार होणार असून भारतांत वैद्यक संशोधन मंडळाच्या कामकाजाचेंहि पुनर्विलोकन करण्यांत येईल. तसेंच पहिल्या बैठकींत सम्मत झालेल्या ठरावाच्या अंमलबजावणींत किती प्रगति झाली त्याचाहि या बैठकींत विचार होणार आहे.

तिलापिया मासळी

तिलापिया या नांवानें ओळखली जाणारी अगदीं नवीन जातीची आफ्रिकन मासळी भारतांत आयात करण्यांत आली असून तिची संख्या झपाट्यानें वाढविणें शक्य असल्यानें भारताचा अन्नप्रश्न बऱ्याच अंशीं सुटूं शकेल अशी आशा वाटत आहे.

मद्रास राज्यांतील ९सरकारी मत्स्योत्पादक केंद्रांत, मंडपम् येथील मध्यवर्ती सागरी मच्छमारी केंद्रांत (सेन्ट्रल मरीन फिशरीज स्टेशन), व गोड्या पाण्यांतील मासळीबाबत जीवनशास्त्रविषयक संशोधन करणाऱ्या मद्रासच्या प्रयोगशाळेंत (फ्रेश वॉटर फिशरीज बायॉलॉजिकल स्टेशन) तज्ज्ञांनीं त्या मासळीबाबत जें संशोधन चालविलें तें अन्न म्हणून तिचा वापर करण्यास फारच अनुकूल असल्याचें आढळून आलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रंगरहित औषधाला रुग्ण नाखूष

औषध म्हटलें म्हणजे त्याला कसलातरी रंग, कसलीतरी चव, व कसलातरी वास असावयाचाच, अशी सर्वसाधारण भावना दृढमूल झालेली आहे. आणि आयुर्वेदिक व अलोपॅथिक पद्धतींचीं बरींचशीं औषधें या तत्त्वाला उतरतात.

परंतु होमिओ व बायोकेमिक औषधांना कोणताच रंग, वास अगर चव नसते. विशेषतः होमिओ औषधांपैकीं द्रवरूप औषध म्हणजे अगदीं केवळ पाणी अशीच समजूत औषध घेणाराची होते. त्यामुळें खात्रीच्या व योग्य अशा औषधाची निवड केली व तें औषध रोग्याला दिलें तरी त्या औषधाला कोणताच रंग, वास अगर चव नसल्यामुळें रोग्याच्या मनाचें समाधान होत नाहीं.

सर्व गोळ्या पांढऱ्या

औषधांच्या गोळ्याच वापरल्या तरी सर्व गोळ्या एकाच रंगाच्या (पांढऱ्या), एकाच चवीच्या व जवळजवळ एकाच आकाराच्या असल्यामुळें, सर्व रोग्यांना डॉक्टर एकच औषध देतात, अशी समज होते.

स्वतःच्या कल्पनेनें औषधें

होमिओपॅथिक औषध चालू असतांना, आयुर्वेदिक अगर ॲलोपॅथिक औषध मुळींच देतां कामा नये. परन्तु वैद्याचें अगर डॉक्टरचें औषध चालू असतांना मध्यंतरीं स्वतःच्याच कल्पनेनें सूतशेखर, रससिन्दूर, वातविध्वंस इत्यादि रसायनें, कांदा, ओवा, बाळहरडी इत्यादि घरगुती उपाय, ॲस्प्रो, ॲनासिन पेप्स, परगोलॅक्स अशीं औषधें रोग्याचे आप्त, स्नेही, शेजारी अशा मंडळीकडून दिलीं जातात.

खेडेगांवांतील अनुभव

वरील सर्व प्रकारचे अनुभव विशेषतः खेडेगांवांत अशिक्षित वर्गांत दिसून येतात. अशा अडचणीमुळें, होमिओपॅथिक औषधांमधील अत्यंत गुणावह अशीं औषधेंसुद्धां वापरण्याकडे प्रवृत्ति होत नाहीं.

रंग येईल अशी योजना

याकरितां होमिओपॅथिक औषध द्रवरूप द्यावयाचें झाल्यास, त्याला निदान लाल अगर पिवळट किंवा हिरवट रंग तरी येईल परंतु मूळ औषधाचा गुणधर्म मात्र यत्किंचितहि कमी होणार नाहीं, अशाप्रकारची कांहीं योजना आहे काय ? अगर अशी योजना करतां येणें शक्य आहे काय ? याबद्दल तज्ञांनीं अवश्य खुलासा करावा. —के. व्ही. देसाई, सागवे

वरील लेखांत वैद्य के. व्ही. देसाई यांनीं केलेली सूचना आयुर्वेदीयांनाहि विचारार्ह आहे. आयुर्वेदीय कोरड्या औषधांत विविध रंग आढळत असले तरी पातळ औषधांत आसवारिष्टांचा एक ठराविक लालसर काळा रंग आढळतो. सबब वैद्यांनींहि निरनिराळ्या रंगाचीं औषधें देण्याची कांहीं योजना करतां येईल कां यांचा विचार करावा. सध्यां बाजारांत निरनिराळे खाद्य रंग (खाद्यपेय पदार्थांत वापरण्यास योग्य असे) मिळतात. त्यांचा रस, गुण उत्पादक द्रव्य इ. माहिती मिळवून त्यांचा अनुभव घ्यावा व तो प्रसिद्ध करावा. —संपादक

आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा

आयुर्वेद प्रसारक मंडळी नि तदंगभूत संस्थांचा वार्षिक समारंभ संस्थेच्या जागेंत दि. १५-१-५४ शुक्रवारीं सायंकाळीं ५ वाजतां मुंबई राज्याचे नागरी पुरवठा मंत्री नामदार श्री. यशवंतराव चव्हाण, बी. ए., एल्एल्. बी. यांचे अध्यक्षतेखालीं झाला.

नागपूर येथें

' आयुर्वेद सेवा संघाचीं ' सर्व प्रकारचीं गुणकारी औषधें मिळण्याचें

एकमेव ठिकाण—

श्री. माधवराव परांडे

आयुर्वेदीय औषधांचे व्यापारी

महाल रोड, नागपूर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्मार्थ दंतयज्ञ, कुमठा

अखिल भारतीय आयुर्वेदीय डेंटल मिशनच्या वतीनें वैद्य पां. वि. जायदे, दंतवैद्य, हुबळी यांचें नेतृत्वाखालीं कुमठ्यांत दिनांक २५।१२।५३ पासून २९।१२।५३ पर्यंत धर्मार्थ दंतयज्ञ करण्यांत आला. सदर दंतयज्ञास केंद्रीय वाणिज्यमंत्री श्री. डी. पी. करमरकर व मुंबई इलाख्याचे (आरोग्य) उपमंत्रि मान्यवर श्री. जत्ती यांनीं दिनांक २६ रोजीं भेट दिली व समाधान व्यक्त केलें. सदर दंतयज्ञांत ५५० रुग्णांना मोफत उपचार करण्यांत आले व आयुर्वेदीय शूलरहित पद्धतीनें दंतोत्पाटनें करण्यांत आलीं. ३६ व्या कर्नाटक साहित्य संमेलनांतर्गत विज्ञान गोष्ठी परिषदेंत वैद्य जायदे यांचें उद्बोधक भाषण झालें.

दंतयज्ञ आणि ज्ञानकण

कुमठा दंतयज्ञांत एक आश्चर्यकारक प्रकार पाहण्यांत आला. एका मुलाचे दांत तपासत असतां त्यास दोन उपजिव्हा आढळून आल्या. श्वासाबरोबर त्या एकाच वेळीं वर उचलल्या जात असत.

दुष्काळ भागांतील वैद्यासाठीं

गतवर्षी ज्या भागांत दुष्काळ पडला त्या भागांतील कांहीं वैद्य यंदा पत्रिकेची वर्गणी भरू शकले नाहींत.त्यांच्यापैकीं कांहींनीं पत्र पाठवून मार्च एप्रिल पर्यंत मागील व चालू सर्व वर्गणी म. ऑ. नें पाठवून देण्याचें आश्वासन दिलें व अंक चालू ठेवण्याविषयीं कळविलें आहे. ही आर्थिक अडचण दुष्काळ भागांत सर्वत्र भासणारी असल्यामुळें अशी सवलत जरूर त्या वैद्यांना देण्याचें सेवा संघानें ठरविलें आहे.व्यवस्थापक

प्रशसंनीय प्रवृत्ति

आ. प. ची १९५४ सालची वर्गणी रु. ६ म. ऑ. नें पाठविली आहे. पत्रिकेचा नियमितपणा व वैद्यशास्त्रासंबंधीं निरनिराळे विषय हाताळण्यांची प्रवृत्ति प्रशंसनीय वाटते. –वै. विश्वनाथशास्त्री कात्रे

— आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारी —

आयुर्वेदिक व युनानी वनौषधि

तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण!

अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक खाका, माणिक, अकीक, सुवर्ण-वर्ख, रौप्य-वर्ख, शिंपा, कवड्या, शंख, प्रवाळ, आवळसार गंधक, दगडीवेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, वाकेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलटकंबल, नागकेशर (अस्सली), ब्राम्ही, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारची वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य! विशेष माहितीसाठीं आमचें साप्ताहिक दरांचें छापील भावपत्रक मागवावें.

टे. फो. नं. ३१७९६ टेलिग्रॅम–'आयुर्वेद'

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदाविषयीं भारत सरकारचा दृष्टिकोन

बनारसच्या आयुर्वेदिक कॉलेजमध्यें श्रीमती अमृत कौर यांचें भाषण

" आधुनिक वैद्यकांत, आयुर्वेद, उल्लेखनीय भर घालणार असेल तर, तें काम स्वतः शास्त्रीय पद्धतीनें

शिक्षण घेतलेले आणि संशोधन करून उपचार वैद्यकाची अवघड कला वृद्धिंगत करूं शकणारे आयुर्वेदाचे पाठिराखेच करूं शकतील. आयुर्वेद शास्त्राला संपूर्णतया वाहून घेण्यानेंच त्याला पुरातन वैभव प्राप्त होऊं शकेल. " असे विचार भारताच्या आरोग्यमंत्री राजकुमारी अमृत कौर यांनीं बनारस हिंदु विद्यापीठाच्या आयुर्वेदिक कॉलेजच्या वार्षिक समारंभप्रसंगीं केलेल्या भाषणांत व्यक्त केले.

शास्त्रीय पद्धतीचा गाभा

त्या पुढें म्हणाल्या, " आपले पूर्वज मोठे ज्ञानी पुरुष होते व त्यांनीं आपली बुद्धि व मन मानवाची भौतिक परिस्थिति व आत्मिक प्रकृति यांचा अभ्यास करण्याकडे अशा पद्धतीनें खर्च केली कीं ही पद्धति, आजच्या अर्वाचीन शास्त्राच्या कसोटीस पारखली तरी देखील भक्कम होती तें कबूल करावेंच लागतें. आपल्या पूर्वजांनीं वैद्यकाचा किंवा ज्ञानाच्या कोणत्याहि शाखेचा अभ्यास करतांना निःपक्षपातीपणें चोकशी व त्रयस्थ वृत्तीनें निर्णय याच गोष्टी अवलंबिल्या आणि अर्वाचीन पद्धतीचाहि निःसंशयपणें हाच गाभा आहे.

विविध बिनचूक उपकरणें व यंत्रें

अर्थातच अर्वाचीन आधिभौतिक व जीव-विषयक शास्त्रांनीं मानवाच्या सेवेस सादर केलेलीं विविध बिनचूक उपकरणें व यंत्रें त्यांचेपाशीं नस-ल्यानें त्यांची कुचंबणा झाली होती. अशा यंत्रांमुळें रोगांचा अभ्यास व त्यांवरील उपचार पूर्वीपेक्षां अधिक सोपे झाले आहेत. परंतु अशा प्रतिकूल परिस्थितींतहि केवळ निरीक्षणानें व विचार करून उंदीर हा प्लेगचा संसर्ग होण्यास व डांस हा मलेरियाचा उद्भव होण्यास कारणीभूत होतो ही गोष्ट प्राचीनांनीं संशोधून नक्की केली या गोष्टी भारतांतील प्राचीन शास्त्रज्ञांच्या कीर्तींत अधिकच भर घालतात. भारतांतील प्लेग कमिशनचें प्रदीर्घ संशोधन आणि सर रोनाल्ड रॉस यांची पाहणी यांतून याच सिद्ध गोष्टी चालू शतकाच्या प्रारंभीं पुनः सिद्ध करण्यांत आल्या.

ही गोष्ट नक्की आहे

ज्यांनीं आयुर्वेदाचा विकास केला त्या वैद्यक शास्त्रज्ञांची बुद्धि व शास्त्रीय दृष्टि खरोखरच गौरवास्पद आहे, हें दाखविण्यासाठींच मी या माहितीकडे आपलें लक्ष वेधलें. औषधें, पद्धति व तत्त्वें या दृष्टीनें या आयुर्वेद पद्धतींत अर्थात् कांहीं महत्वाचें ज्ञान-भांडार असलें पाहिजे ही गोष्ट नक्की असून त्या जाणून घेतल्या पाहिजेत व त्यांचा विनाश होऊं न देतां जतन केलें पाहिजे. कारण त्यामुळेंच त्यांचा अर्वाचीन वैद्यकांत समावेश करून अखिल मानव-जातीला लाभ करून देतां येईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैद्यकाची वाढ खुंटली

अितर अनेक गोष्टीप्रमाणेंच आमच्या पुरातन वैद्यक पद्धतीची वाढ खुंटली आणि तिच्या पूर्वीच्या पुरस्कर्त्यांचा उत्साह व कल्पकता यांची जागा बाबा-वाक्यं प्रमाणम् या न्यायानें घेतली ही गोष्ट मोठ्या खेदानें का होईना पण कबूल करणें भाग आहे. कारण कमी बुद्धिमत्तेच्या सामान्य व्यक्तींना या व्यवसायां-तील आपलें पुढारपण टिकविण्याची हीच एक आशा होऊन बसली.

आधुनिक वैद्यकानें केलेली प्रगति

आयुर्वेद व वैद्यकांच्या अितर शाखा यांबाबतची माझीं मतें प्रतिपादन करण्यास प्रारंभ करण्यापूर्वी या विषयाच्या आणखी एक अंगाचा मी उल्लेख करूं अिच्छिते. आधुनिक वैद्यकानें अितकी प्रगति केलेली आहे, आणि मानवाच्या सुखसोयी वृद्धिंगत करण्यासाठीं त्याला आज उपलब्ध असलेले मार्ग व साधनें आज इतकीं अमाप आहेत, कीं आयुर्वेद किंवा अितर कोणत्याहि प्रकारच्या वैद्यकानें तें हुसकून लावलें जाण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाहीं. मानवाच्या ज्ञानभांडारांत वेळोवेळीं भर घालण्याचा आणि याहूनहि महत्वाचें म्हणजे दुःख व हालअपेष्टा हलक्या करण्यास साहाय्यभूत होणाऱ्या सर्व शास्त्रीय संशो-धनाचा पुरेपुर लाभ करून न घेणें ही गोष्ट कोणत्याहि देशाच्या बाबतींत असमंजसपणाची होईल हें नक्की.

मध्यवर्ति भारत सरकारचें मत

मी आतांपर्यंत व्यक्त केलेलीं मतें लक्षांत घेऊन या बाबतींतील मध्यवर्ती सरकारच्या मतांकडे मी आतां वळते. मी मध्यवर्ति आरोग्यखात्याचीं सूत्रें हातीं घेतल्यापासून आयुर्वेद व इतर वैद्यक पद्धती-बद्दलच्या माझ्या तथाकथित वैरभावाबद्दल अेवढेंच नव्हें तर त्यांचा नाश करण्याच्या अिच्छेबद्दल माझ्या वर बरीच टीका झाली आहे. दुःखी मानवाची सेवा करूं शकणाऱ्या कोणत्याहि कार्यक्षम साधनाबद्दल माझें मनांत वैरभाव नाहीं. सत्य गोष्ट नष्ट करण्याचें सामर्थ्य माझ्यांतच काय पण परमेश्वर कृपेनें कोणाहि मानवी व्यक्तींत नाहीं आणि शास्त्र म्हणजे सत्या-न्वेषण यापरतें दुसरें काय आहे?

अन्तर्मुख व्हावें

परन्तु जी गोष्ट उत्कृष्ट नाहीं, शास्त्रीय संशो-धनाच्या प्रखर प्रकाशांत टिकाव धरूं शकत नाहीं, आणि स्वीकृतीसाठीं आपली पात्रता सिद्ध करूं शकत नाहीं अशा कोणत्याहि गोष्टीचा पुरस्कार करण्याची अपेक्षा माझ्याकडून करतां येणार नाहीं. म्हणून आयु-र्वेद, युनानी, होमिओपॅथी व निसर्गोपचार या पद्ध-तीचे पाठीराखे वा व्यवसायी यांना मी अशी विनंति करतें कीं, त्यांनीं अंतर्मुख व्हावें आणि अर्वाचीन काळांतील जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत पाहिजे असलेल्या उच्च पातळीप्रत आपल्या कलेचा दर्जा उंचाविण्याची शर्थ करावी.

एकवाक्यता न करतां चाललेलें शिक्षण

गेल्या तीन दशकांत निरनिराळ्या दर्जाचीं आयुर्वेदिक कॉलेजें भारताच्या निरनिराळ्या भागांत

.... गौरव ....

आपण आयुर्वेदिक औषधांचा गौरव वाढविला पाहिजे. ती एक आपल्या हिताची गोष्ट आहे. आपण प्रत्येक औषधी द्रव्य अस्सल पैकीं व ताजें वापरून सिद्ध औषधें बनविलीं पाहिजेत. अशीं उत्कृष्ट औषधीं द्रव्यें मिळवण्या-करितां आपणः—

दि ऑल इंडिया करीयाणा स्टोर्स

पायधुनी मुंबई नं. ३

(टेलिफोन नं. ३१८५८) यांना लिहा.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें

मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात. अधिक माहितीसाठीं कॅटलॉग मागवावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बऱ्याचदां राज्य सरकारांच्या पाठिंब्यानें स्थापन करण्यांत आलीं आहेत. आणि त्यामधून आयुर्वेद व आधुनिक वैद्यकांतील चांगल्या भागाचें अेकत्रितपणें शिक्षण देणारे अभ्यासक्रम शिकविले जातात. प्रत्यक्षांत मात्र हा अभ्यासक्रम म्हणजे अर्वाचीन शरीररचनाशास्त्र, शरीरविज्ञान व अितर अनुषंगिक गोष्टींचे जोडीस आयुर्वेदांतील या बाबतचेंच शिक्षण असें बऱ्याच ठिकाणीं आढळते, आणि या दोन्ही पद्धतींतील कल्पनांत बऱ्याच बाबतींत मताभिन्नता असली तरी त्या विद्यार्थ्यांपुढें मांडण्यापूर्वी त्यांची अेकवाक्यता करण्याचा प्रयत्न करण्यांत येत नाहीं.

परिस्थिति बिघडण्याचीं कारणें

कदाचित् एका विद्वान् अध्यापकांनीं म्हटल्याप्रमाणें बऱ्याचदां या कल्पनांत अेकवाक्यता होण्यासारखीच नसते यामुळें हें घडत असेल. तरुण विद्यार्थ्यांच्या परिपक्व मनापुढें परस्पर भिन्न कल्पना बरोबरच मांडण्यामुळें कोणतेंहि शिक्षण देण्यांतील मूळ उद्देशाचाच पराभव होतो. तसेंच आयुर्वेदिक कॉलेजांत प्रवेश मिळविणारे विद्यार्थी बऱ्याचदां, त्यांना आधुनिक वैद्यकाचें शिक्षण देणाऱ्या कॉलेजांत प्रवेश मिळण्यासाठीं अवश्य तेवढे गुण मिळवूं न शकल्यानें त्यामध्यें प्रवेश मिळूं न शकलेले असतात. आणि त्यामुळें हें असमाधानकारक पद्धतीचें शिक्षण देण्यांत येणाऱ्या विद्यार्थ्यांचा दर्जाहि उत्कृष्ट नसल्यामुळें परिस्थिति अधिकच बिघडते.

आधुनिक मूलभूत शास्त्रांचें शिक्षण

आयुर्वेदिक कॉलेजांतील विद्यार्थ्यांना मूलभूत शास्त्रांचें शिक्षण देण्याचें बाबतींत आधुनिक वैद्यकाचाच मार्ग अनुसरावा आणि प्राचीनकाळीं आयुर्वेदानें कितीहि प्रगति केली असली तरी आज ज्या शाखांत आयुर्वेदाची अजिबात गति नाहीं अशा शस्त्रक्रिया, सार्वजनिक आरोग्य व सूतिकाशास्त्र यासारख्या इतर अनेक शाखांच्या शिक्षणाचे बाबतींत तर या कॉलेजांतील विद्यार्थ्यांचा शिक्षणक्रम आधुनिक वैद्यकाचें शिक्षण देणाऱ्या कॉलेजांतल्याप्रमाणेंच असावा. हाच एक मार्ग मी आतांपर्यंत कथन केलेल्या परिस्थितींत मला दिसतो.

आयुर्वेदाच्या मूलभूत शास्त्रांचा अभ्यास

उपचारविद्याशास्त्र (थेराप्युटिक्स) या दृष्टीनें आयुर्वेदाचें शिक्षण देतां येईल आणि असें करतांना ही पद्धति ज्या मूलभूत सिद्धांतावर अधिष्ठित आहे त्यांचाहि या शिक्षणांत समावेश करण्यांत यावा. कारण त्यांचेविना आयुर्वेदानें पुढें आणलेली उपचार पद्धति विद्यार्थ्यांपुढें मांडणें अवघड जाईल.

भारत सरकार उत्सुक आहे

आपल्या आयुर्वेदाच्या समृद्ध वारशांत औषधें, व्यवहार व तत्वें या दृष्टींनीं जे जें उपयुक्त असेल त्याची अत्यंत शास्त्रीय पद्धतींनीं पारख करण्यांत यावी, व त्याचें जतन करण्यांत यावें याबद्दल मी आधीं म्हटलें त्याप्रमाणें भारत सरकार उत्सुक आहे. आणि म्हणून जामनगर येथें एक आयुर्वेदिक संशोधन संस्थेची स्थापना करण्यांत आली आहे.

आयुर्वेदाचें पुनरुज्जीवन केव्हां होईल ?

या सुचविलेल्या पद्धतीच्या बाबतींत बनारस हिंदु विद्यापीठ पुढाकार घेईल अशी मला आशा आहे. आयुर्वेदाचा व्यवसाय करणारे केवळ एक चरितार्थाचें साधन म्हणून नव्हे, तर अेक पेशा या दृष्टीनें आयुर्वेदाकडे पाहू लागल्यावांचून आयुर्वेद आपलें स्थान कदापि पुनरपि प्राप्त करूं शकेल यावर माझा विश्वास नाहीं. ”

———

(मस्तु) दह्यांतील पाणी

दह्यांतून जें पाणी अलग निघतें त्याला मस्तु म्हणतात. आयुर्वेदांत या मस्तूचें गुणधर्म ठिकठिकाणीं वर्णन केले आहेत. तथापि आयुर्वेदीय वैद्य मस्तूचा उपयोग अनुपान अगर आहार द्रव्य म्हणून विशेष करतांना आढळत नाहींत.

तरी जे कोणी याचा वापर करीत असतील व त्यांचा अनुकूल-प्रतिकूल अभिप्राय झाला असेल तो त्यांनीं पत्र अगर लेख रूपानें पत्रिकेकडे पाठवावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक सत्यकथा—

दुष्ट नाडी-व्रणावर केळीचें पान :

लेखकः-ठा. सत्यदेवसिंह वैद्य
कम्हरियाघाट (फैजाबाद)

आमचे गांवीं एका मनुष्यास त्याचे जांघेंत एक उष्णतेची गांठ झाली. कांहीं दिवसांनीं ती पिकून फुटली व तिचें रूपांतर नाडीव्रणांत (नासूर) झालें. तें नासूर इतकें भयंकर झालें कीं, जांघेंत दोन छिद्रें व गुडघ्याखालीं तळपायापर्यंत आणखी चार छिद्रें पडलीं. सर्व व्रण-छिद्रांतून पूं वाहूं लागला. जांघेंतील व्रण पाण्यानें धुतांना पाणी व्रणाच्या अंतर्भागांत शिरून तें इतर ठिकाणीं झालेल्या व्रणांतून बाहेर पडत असे. व अशावेळीं रोग्यास अतिशय तकलीफ होई.

पाय तोडण्याचा सल्ला

शल्य-चिकित्सकाचाहि उपाय झाला; परंतु कांहीं गुण आला नाहीं. एका डॉक्टरनें सबंध पायच तोडण्याचा सल्ला दिला. दुसऱ्या एका डॉक्टरनें ६०० रुपये द्या म्हणजे औषधोपचार सुरूं करतो असें सांगितलें. रुग्ण गरीब असल्यानें सहाशें रुपये देऊ शकला नाहीं व निराश होत्साता आपल्या नशीबी मरण आहे असें समजून स्वस्थ बसला. मरणचिंतेमुळें त्याचे खाणेंपिणेंहि तुटलें.

तुमचें औषध घरासमोर आहे

दैववशात् एके दिवशीं एक भिकारी भीक मागत त्याचे दारीं आला व त्यानें त्याची ती रोगग्रस्त दुर्दशा पाहिली. अवलोकनानंतर त्या भिकाऱ्यानें रोग्यास सांगितलें कीं, ह्या रोगावरील औषध तुमच्या घरासमोरच आहे. समोरील केळीचें पान आणून तें ह्या नासूरावर बांधा. आदेशानुसार रोग्यानें केळीचें पान बांधलें. रुग्ण तर व्याधीचें दुःखामुळें रात्रंदिवस कण्हत कुंथत असे. परंतु केळीचें पान बांधल्यानंतर १५ मिनिटांनीं त्यास शांत झोप लागली.

रडारड सुरू झाली

रुग्ण तर आरामशीर झोंपी गेला होता, परन्तु घरांतील मंडळींना तो मृत झाला असें वाटून त्यांनीं रडा-ओरडीस सुरुवात केली. घरांतील रडारडीच्या कल्लोळानें रुग्ण जागा झाला, तेव्हां सर्वांस समजलें कीं रुग्ण स्वस्थ झोंपी गेला होता.

१ महिन्यांत गुण आला

सुमारें एक महिन्याच्या आंतच रुग्ण कदली-पत्राच्या उपचारानें पूर्ण बरा झाला. व आज ३-४ वर्षें झालीं रोगाचा पुनरुद्भव न होतां सदरहू मनुष्य आनंदानें आपलें कामकाज व व्यवसाय करीत आहे.

आमच्या वैद्य--बंधूंनीं नाडी--व्रणावरील कदली-पत्राच्या चिकित्सेचा जरूर अनुभव घ्यावा व तसेंच कदलीपत्रांत नाडीव्रण बरा करण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगच्या कोणत्या गुणांमुळें त्यांत आलें आहे ह्याचें संशोधनहि करावें. —'धन्वन्तरि'

विद्यार्थ्यांची शरीरप्रकृति

निकोप प्रकृतीचे व निरोगी मनाचे विद्यार्थी तयार करण्याच्या बाबतींत एकादी शाळा किंवा कॉलेज किती प्रयत्न करते यावरून मी त्या शाळेचें व कॉलेजाचें मूल्यमापन करतो. मुलांची बुद्धि, व्यवसायकौशल्य, कला वाढविण्याच्या कामास माझ्या मतें दुय्यम स्थान आहे. —ना. मुरारजी देसाई

कल्याण येथें

नवीन विक्री केंद्र

कळविण्यास आनंद वाटतो कीं अनेक ग्राहकांच्या आग्रहावरून आयुर्वेद सेवा संघ नाशिक या संस्थेचीं सर्व अनुभवी व गुणकारी औषधें कल्याण येथें मिळण्याची सोय आम्हीं केली आहे, तरी ग्राहकांनीं याचा लाभ अवश्य घ्यावा व एकवेळ या विक्रीकेंद्रास भेट द्यावी.

उषा औषधी एजन्सी

राममारुती चौक, गोखले वाडा,
सिद्धेश्वर आळी, कल्याण (सेंट्रल रेल्वे)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज्योतिष्मती चमत्कार :

ले.:- वै. पं. निहालचंद मिश्र
आयुर्वेदविज्ञानशिरोमणी.

तारीख १६ नोव्हेंबर १९५३ च्या आयुर्वेद-पत्रिकेंतील पान ३५० वर "लताज्योतिष्मती-तेल-प्रभावाचा प्राचीन पुरावा" या मथळयाखालीं भिषग्वर ग. कृ. पाटणकर यांचा लेख प्रसिद्ध झाला आहे. ती माहिती चांगली असून, लेखक धन्यवादास पात्र आहेत.

ज्योतिष्मतीचे गुणधर्म

ज्योतिष्मती हें झाड लता म्हणजे वेलच असतें. परंतु तें बहुवर्षायु असतें आणि अन्य झाडाप्रमाणें या वनस्पतीचें बुड फूट दोन फूटपर्यंतच्या व्यासाचें असतें. या वेलाचें वर्णन ता. १ डिसेंबर १९४९ च्या "आयुर्वेद पत्रिकेंतील" पान ३२९ वर "कामोणी आणि कांगोणी," संदिग्ध वनस्पति-चर्चा, या मथळयाखालीं प्रसिद्ध झालें होतें. त्यांत या झाडाचें वर्णन असून, ओळखण्यास सुलभ अशी माहितीहि पण दिली आहे. त्यांतच 'अत्युष्णादाहका मेध्या प्रज्ञापुष्टिकरी मता।' हा 'गणनिघंटूंतील' श्लोकभाग दिला असून, गुणदोषहि दाखविले आहेत. याचें तेलंगी भाषेंतील श्री. पाटणकरांनीं दिलेलें नांव 'बेकूकुडुनोगे' नसून 'बेकूकुडुतोगे' असें आहे.

तेल स्वतःच तयार करावें

बेकूकुडुतोगे या वनस्पति- तेलाचा उपयोग बऱ्याच ठिकाणीं ग्रंथांत आढळतो आणि तोहि सिद्धयोग प्रकरणांत. असले कांहीं सिद्धयोग अनुभव घेऊन पाहण्यासारखे आहेत; परंतु धैर्य, संयम आणि श्रद्धा या तीन गोष्टींची अनुभवास अत्यंत जरूरी आहे. तसेंच हें तेल पोटांत घेण्याकरितां स्वतःच तयार केलेलें बरें; किंवा बाहेरून मागविणें झाल्यास एखाद्या खात्रीच्या विश्वासू वैद्याकडूनच मागविणें चांगलें. नाहींतर फायद्याऐवजीं नुकसानच जास्त. कारण, आजकाल बाजारी फार्मसींतून हें तेल शेंकडों मण विकायला लागलें आहे. म्हणून ही सूचना मुद्दाम दिली आहे.

ज्योतिष्मतीचे सिद्ध प्रयोग

लेखक वृद्ध-वैद्यांनीं (भिषग्वर पाटणकर) या तेलाचे गुणावगुण पूर्वींच्या ऐतिहासिक पुराव्यांनीं दाखविले आहेत, हें स्तुत्य! परंतु कोणत्याहि ग्रंथांतून एकादा तसा प्रयोग धुंडाळून प्रसिद्ध करावयास पाहिजे होता. कारण, त्यायोगें जिज्ञासु आणि कर्तबगार व्यक्तीस अनुभव घेण्यास बरें झालें असतें. श्री. पाटणकरांना तसा एखादा प्रयोग मिळाला नसेल अथवा वृद्धावस्थेमुळें शोधण्याची दगदग झाली नसेल. परंतु 'आयुर्वेद महर्षींच्या दिव्य शोधांचा व ज्ञानज्योतीचा प्रकाश सर्व जगावर पडून भारतास शांति व सुख यांचा झालेला लाभ पहावयास मिळावा अशी या वृद्ध-वैद्याची इच्छा आहे.' हें वाक्य पाहून आणि या इच्छेस ईश्वर पूर्ण करो अशी त्यांचें चरणीं प्रार्थना करून एखादा तरी जिज्ञासू पुढें येऊन प्रयोगांचा अनुभव घेवो, म्हणूनच हे सिद्धयोग येथें देत आहे.

ज्योतिष्मतीकल्प

मालकांगोणीचें तेल १ शेर, गाईचें तूप १। शेर, मध १ शेर एकत्र करून लोखंडी कढईंत कढवून तिसरा हिस्सा उरला म्हणजे उतरवून कांचेच्या बाटलींत भरून मुखमुद्रा करून साळीच्या कणगींत पुरून चार महिने ठेवावें. नंतर काढून घेऊन घेण्यास सुरुवात करावी. प्रथम दिवशीं एक मासा, दुसरे दिवशीं दोन मासे, याप्रमाणें क्रमवृद्धीनें आठ दिवसांत आठ मासेपर्यंत वाढवावें आणि मग आठ दिवस याच क्रमानें उतरवावें. या प्रमाणें एक महिना सेवन केल्यास अंगांतील कसलाहि रोग जाईल. दुसरा महिना झाल्यावर दिव्य शरीर होईल. तिसरा महिना झाल्यावर पुत्रांसमावेत महारोग जाईल. चौथा महिना झाल्यावर सतेजता येईल. पांचवा महिना झाल्यावर दिव्य नक्षत्रें दिसतील. सहाव्या महिन्यात कानीं पडेल तें विसरणार नाहीं. सातव्या महिन्यांत दिव्य दृष्टि होईल. आठव्या महिन्यांत गुप्त धन दिसेल. नवव्या महि-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

न्यांत चमत्कार करील. दहाव्या महिन्यांत कला प्राप्त होतील. अकराव्या महिन्यांत सर्वसिद्धि मिळेल. बाराव्या महिन्यांत इच्छिलें तें मिळेल. याप्रमाणें गोरखनाथ खात्रीनें सांगतात, असें लिहिलें आहे. मात्र मला येथें असें सुचवावेंसें वाटतें कीं, 'तुका म्हणे व्हाला पाहिजे जातीचे । येर गबाळाचें काम नव्हे ॥ असो. यापेक्षां हा खालीं दिलेला उपाय सोपा असून, करून पाहण्यासारखा आहे. तो असा:—

ज्योतिष्मतीप्रताप

मालकांगोण्यांचें बीं गाईच्या दुधांत वाटून त्यास विरजण लावून दही बनवावें. नंतर तें दही घुसळून ताक करून त्यांचेवरील लोणी काढून घ्यावें. त्या लोण्याचें नन्तर तूप करून तें तूप रोज एक तोळा खिरींत घालून खावें. याप्रमाणें २१।४२ दिवस करावें. तेणेंकरून बुद्धि तीव्र होईल, बल वाढेल, वलिपलित जाईल व मेंदूची शक्ति वाढेल. मुलाकडून साधन करविल्यास मूल प्रतापी होऊन त्याची आयुष्यवृद्धि होईल. (हें दोन्ही प्रयोग चिकित्साप्रभाकर ग्रंथांतील आहेत.) असो. आतां थोडेसे पाश्चात्य विद्वानांचेहि या दिव्य वनस्पतीबद्दल विचार एका डॉक्टरांचेंच शब्दांत पुढें लिहून हा लेख तूर्त पुरा करतो.

मालकांगोणी तेल ज्वरघ्न आहे

डॉ. हरक्लॉट्स् लिहितातः- मालकांगोणीच्या बियांपासून एक तेल निघतें. हें तेल बेरि-बेरि तापावर फार उत्तम असें औषध आहे. ह्या तेलाचे १०।१५ थेंब याप्रमाणें दिवसांतून दोन तीन वेळ घेतल्यास तें अतिशय स्फूर्तिदायक आहे. मालकांगोणीच्यां बियांचें पोटीस करून तें फोड, व्रण यांवर लाविलें असतां त्यांचा विकोप थांबून ते बरे होतात. बेरि बेरि तापांत तर मालकांगोणीचा प्रभाव इतका सुन्दर दिसतो कीं, तसा प्रभाव दुसऱ्या इतर औषधांचा दिसूंच शकत नाहीं. ह्या तेलाचा सर्वांत विशेष गुण हा आहे कीं, ह्यानें शौचास अगदीं साफ होऊन जलोदरासारख्या रोगाचाहि प्रभाव संपूर्णपणें नाहींसा होतो व रोग्यास सुख-शांतीचा लाभ मिळतो. भारतीय चिकित्सक ह्या तेलाचें सेवनकालांत गव्हाच्या चपातीशिवाय पाणीयुक्त इतर कोणतेहि पदार्थ खाण्यास देत नाहींत; परंतु ह्यापासून कांहीं विशेष फायदा होतो असें नाहीं. बेरि-बेरि तापाच्या रुग्णास विशेष पोषक अन्न दिलें पाहिजे. जलोदराच्या व्याधींत मालकांगोणीच्या तेलाचा प्रभाव फारच सुंदर असा अनुभवास आलेला आहे. वैद्यकग्रंथ ह्या तेलास स्नायुपरिवर्तक आणि बलदायक मानतात.

मालकांगोणीनें घाम येतो

मालकांगोणीच्या तेलाचें सेवनानन्तर थोड्याच वेळांत अंगांतून खूप घाम निघतो, परन्तु त्यामुळें जीवाचा घबराट वगैरे कांहीं होत नाहीं व अशा रीतीनें बेरि-बेरि ज्वर जो कांहीं कांहीं वेळां अतिशय चढून रोग्यास अत्यंत बेचैन करतो, त्यास मोठ्या सुगमतेनें आटोक्यांत आणून रोग्यास शान्ति मिळते. —'भारतीय वनस्पतियोंपर अंग्रेज विद्वानोंकी सम्मति' भाग ३ रा या पुस्तकावरून.

वाचकांचा पत्रव्यवहार

तृण—लता—व वृक्ष स्वरूपांत
ज्योतिष्मति

तृणज्योतिष्मती— या दिव्य वनस्पतीच्या गुणधर्मांची माहिती प्रसिद्ध झाल्यानंतर तिच्या उपलब्धतेची ठिकाणें प्रसिद्ध होऊन तिच्या गुणधर्मांची छाननी भारत सरकार संशोधन केन्द्रांत सुरू झाली. भाद्रपद महिन्यांत या वनस्पतीच्या जून मुळया संग्रहित कराव्या लागतात. या वनस्पतीच्या इंजेक्शन-अॅम्प्यूल्स सरकारी केन्द्रांत तयार केल्या गेल्यास त्या सरकारी दवाखान्यांत योग्य पथ्यपाण्यावर ठेविलेल्या (वनस्पतीच्या गुणधर्मनिदर्शक) निरनिराळ्या रुग्णावर आजमावून पाहून गुणधर्मनिश्चिति ठरवितां येईल. शुभवेळीं, शुभदिवशीं, शुचिर्भूतपणानें या वनस्पतीच्या मुळया प्रथमतः आपण उपयोग करणें इष्ट होय.—

—भिषग्रत्न- ग. कृ. पाटणकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तृणज्योतिष्मतीचा प्रकाश

तृणज्योतिष्मतीचा प्रकाश कसा पहावा यासंबंधीं कांहीं सूचना आवश्यक आहेत. वाळलेली तृणज्योतिष्मति चमकत नाहीं. ती भिजवावी लागते. तसेंच अंधाऱ्या खोलींत आपले डोळे कांहीं वेळ बंद ठेवून मग उघडून ती पहावी म्हणजे चमकलेली दिसेल. काचेच्या बाटलींत ठेवून पाहण्याची पद्धति आहे. स्टेनलेसच्या भांड्यांतहि ती अंधारांत चांगली दिसते.

मद्यार्कयुक्त औषधें

क्लबांतून, इतर संस्थांमधून अथवा समारंभ प्रसंगीं जमलेले पाहुणे, सभासद व इतर लोक यांना हॉल्स वाईन व इतर मद्यार्कयुक्त औषधें पेय म्हणून बाटेल तशीं पुरवितां येतात, अशी पुष्कळ लोकांची समजूत झाल्याचें दिसून येतें.

याबाबत सर्व संबंधित लोकांचें १९५२ च्या बाम्बे ड्रग्ज (कन्ट्रोल) ॲक्ट व त्याखालीं काढलेली नोटिफिकेशनें यांकडे लक्ष वेधण्यांत येत आहे. हीं नोटिफिकेशनें कांहीं विशिष्ट मद्यार्कयुक्त औषधांचा सांठा जवळ बाळगणें व त्यांची विक्री करणें यासंबंधींचीं आहेत. तसेंच १९४९ च्या बॉम्बे प्रोहिबिशन ॲक्टान्वयेंहि मद्यार्कयुक्त औषधांची अमली पदार्थ म्हणून विक्री करण्यास बन्दी करण्यांत आली आहे. वरील कायद्यांत 'विक्री' (सेल) या शब्दाची केलेली व्याख्याहि लोकांनीं लक्षांत घ्यावी.

तेव्हां एखादा क्लब, संस्था किंवा व्यक्ति, हॉल्स वाईन व इतर मद्यार्कयुक्त औषधें त्यांचा मादक पेय म्हणून उपयोग होणार असल्याचें माहीत असूनसुद्धां तीं पुरवीत असेल तर उपरोक्त कायद्याच्या ६७-अ कलमाखालीं तो गुन्हा होईल. आयुर्वेदिक व युनानी पद्धतीप्रमाणें मद्यार्कयुक्त औषधें तयार करण्याच्या बाबतीतहि वरील कलम लागू आहे. म्हणून हॉल्स वाईन वा इतर मद्यार्कयुक्त औषधें कोणत्याहि प्रसंगीं पेय म्हणून पुरवू नयेत असा क्लब, संस्था व सर्वसाधारण जनता यांना इशारा देण्यांत येत आहे.

वाचकांचा पत्रव्यवहार

केतकी स्तन

तारीख १-१०-५३ च्या 'आयुर्वेद पत्रिकेंत' वैद्यराज मु. अं. गायकवाड यांनीं चंद्रकलेच्या पाठांत केतकीस्तनाबद्दल जें लिहिलें व निघंटूनें मूळ घेणें वगैरे जें लिहिलें तें कितपत योग्य आहे तें पहा —

'मला श्रीक्षेत्र गणपतिपुळें येथें प्रदक्षिणा घालतांना केवड्यास स्तनाप्रमाणें फळें आलेलीं दिसलीं आहेत. मी दोन तीन फळें तोडून पाहिलीं. आंत पांढरा भाग व लहानशा अननसाएवढें फळ. मागें जाड सुमारें १०"-१२" बेढीचें व टोंकास निमुळतें. लांबीला साधारणतः ४"-५" अशी पुष्कळ स्तनें पाहिलीं. मी स्वतः १९५१ सालीं हीं फळें पाहिलेलीं आहेत हें सत्य.' —द. कृ. गोगटे, मुंबई नं. ४

सर्प-गृह

जगांतील दुसऱ्या नम्बरचें सर्प-गृह बँकॉक येथें आहे व ते सयाम सरकारच्या आरोग्य खात्यानें चालविलेलें आहे. संस्थेचे डायरेक्टर डॉ. पूर्णानंद हे आहेत. या सर्पगृहांत ७०० सर्प आहेत. सर्पांना बेडूक उंदीर खाण्यास घालतात. कोब्रासाप लहान लहान सर्पच खातो.

सर्पगृह म्हणजे ४ फूट खोलीचा रिकामा हौद. त्यामध्यें २-३ झुडुपें असतात. त्याच्या काठाजवळ पाण्याचा १ फूट रुंदीचा खंदक असतो, कांहीं साप झाडावर चढून झोपतात, तर कांहीं पाण्यांत खेळतात.

या सर्पापासून दर ७ दिवसांनीं विष काढतात व त्यापासून ॲंटीव्हेनम् तयार करतात.

आयुर्वेद महाविद्यालय, अहमदनगर

अहमदनगर येथील आयुर्वेद महाविद्यालयाचें स्नेहसंमेलन शनिवार ता. २ जानेवारी १९५४ रोजीं ५-३० वाजतां म्युनिसिपल हॉलमध्यें मुंबई येथील टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेजचे डीन डॉ. एस्. जी. वेंगसरकर एम्. डी. एफ्. सी. पी. एस. यांच्या अध्यक्षतेखालीं झालें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उत्तमांग वसंताचा पाठ

सध्यां तयार केलेल्या उत्तमांग वसंताचा पाठ पुढीलप्रमाणें (मधु-मालिनीवसंताप्रमाणें) आहे.

शुद्ध हिंगुळ ७॥ तोळे, बोकडाचा मेंदू ७॥तोळे, कचोरा ५ तोळे, गव्हला ५तोळे, पांढरी मिरी ५ तोळे, ७ दिवस डाळिंबाच्या रसांत खल नंतर १।१ गुंजेच्या गोळया.

या गोळया लघुमालिनी-वसंता-प्रमाणें तिखट झाल्या आहेत. म्हणून त्या पाठांत बालामयप्रतिषेधा-तील काकडशिंगी, ज्येष्ठमध, आस्कंद, काकोली, क्षीर-काकोली, ऋषभक,जीवक,रानमूग इत्यादि द्रव्यें घाल-ण्याची व्यवस्था केली आहे. बालकांच्या मुडदूस (रिकेटस) या विकारासाठीं हा योग गुणकारी आहे.

रसोन वृष्यवटीचा पाठ

शुद्ध हिंगूळ ३ तोळे
लसूणरस १॥ शेर
लवंग चूर्ण १ तोळा

५ शेर लसूणाचा १॥ शेर लसूणरस निघाला तो ३ तोळे हिंगूळाबरोबर तव्यावर मन्दाग्नीवर आट-वावा. तव्यावर औषधाभोवताली लवंगांच्या चूर्णाचें कडें घालावें.

आटल्यानंतर त्याचें वजन करावें (५८ तोळे) त्यांत १८ तोळे बस्तांड घालून ते खलांत खलावे. व नंतर पुढील चूर्णें मिसळावी.

आस्कंद १॥ तोळा	वंगभस्म १॥ तोळा
शतावरी १॥ तोळा	शुद्धकुचला ३ तोळे
कवचबीज १॥ तोळा	दालचिनी १॥ तोळा
सफेतमुसळी १॥ तोळा	वेलची १॥ तोळा
जुंदवेस्तर १॥ तोळा	

व ३ दिवस खल करून गोळया कराव्या.

वात-प्रकृति शुक्रक्षीण लोकांना या गोळया विशेष चांगल्या मानवतात असा अनुभव आहे. २ गुंजा रसोनवृष्यवटी दुधाबरोबर अगर तूपसाखरेबरोबर रात्रीं झोपण्यापूर्वी खावी.

गुजराथ विद्यापीठांत आयुर्वेद शाखा

या देशांत आयुर्वेदाच्या शाळा व परीक्षा घेण्याच्या व्यवस्था अनेक ठिकाणीं व अनेक राज्यांत आहेत तथापि त्याला सरकारमान्य विद्यापाठाची मान्यता अशी फक्त आजवर बनारस हिंदु विश्वविद्या-लयांतच होती. यानंतर विद्यापीठाची मान्यता आयु-र्वेदास देण्याचा मान अहमदाबाद येथील गुजराथ विद्यापीठ मिळविणार अशी लक्षणें दिसू लागलीं आहेत. गुजराथ विद्यापीठाच्या सिंडिकेटनें आयुर्वेद शाखा सुरू करण्याचें ठरविलें आहे. सेनेटची मंजुरी मिळताच हा ठराव अंमलांत येणार आहे.

गीतेंतील कर्मयोग आचरा

सांगली नगरपालिकेच्या मानपत्राला उत्तर देतांना, डॉ. राधाकृष्णन् म्हणाले कीं, आपलीं उद्दिष्टें साध्य करण्याचें स्वातंत्र्य हें साधन आहे. आतांच आपण हालचाल केली पाहिजे. गीतेंतील 'कर्मयोगा'ची शिकवण सर्वांनीं आचरणांत आणली पाहिजे.

आयुर्वेद सेवा संघातर्फे निमंत्रण

आयुर्वेदीय अध्यापनांत एकसूत्रता आणण्यासाठीं अध्यापक अभ्यासू लोकांची चर्चा बैठक घेण्याची सूचना भिषगाचार्य डेग्वेकर यांनीं केली आहे. ती बैठक नासिक येथें भरण्याचें ठरल्यास येणाऱ्या वैद्यांच्या निवासाची, स्नानाची व झोपण्याची व्यवस्था आयुर्वेद सेवा संघातर्फे आनंदानें विनामूल्य केली जाईल. भोजनाची व्यवस्था भोजनालयातर्फे होईल. त्यासाठीं वेळेचा १ रु. खर्च येईल. या बैठकीसाठीं येऊ इच्छिणाऱ्या मंडळींनीं आपला येण्याचा मानस आगाऊ कळविल्यास व्यवस्थेच्या दृष्टीनें तें सोईचें होईल.

पत्ताः- शनिगल्ली, रविवार पेठ
श्रीकृष्ण टॉकीज जवळ

वा. स. मराठे,
मंत्री, आयुर्वेद सेवा संघ, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देवालयासारखी
प्रशांत औषधीकरणशाळा

मध्यप्रदेश वनवासी सेवा मंडळाचे सहमंत्री श्री. नानासाहेब बापट, एम्. ए., बी. टी. यांनीं २ जानेवारी १९५४ रोजीं आयुर्वेद सेवा संघ पहाण्यासाठीं नाशकास भेट दिली. नाशकांत त्यांचा मुक्काम २८ तास होता. आपल्या अभिप्रायांत ते लिहितात:—

" मी नाशकासारख्या पावनतीर्थी आलो तो चालत्या बोलत्या देवांच्या दर्शनासाठीं. नाशकांतले कांहीं देव, त्यांनीं उभारलेलीं कांहीं राउळें मी पाहिलीं व मन प्रसन्न झालें.

वै. श्री. पंडित व वै. श्री. मराठे यांनीं आपल्या प्रेमळ सहकाऱ्याबरोबर चालविलेली आयुर्वेदाची ही सेवा प्रशंसनीय आहे. आयुर्वेद सेवा संघानें चालविलेल्या औषधी निर्माणशालेची पवित्रता देवालयासारखी प्रशांत आहे. सकाळ सायंकाळ प्रार्थनेच्या वातावरणांत दिवसभर चालविलेलें औषधें तयार करण्याचें काम देखील स्वास्थ्यवर्धन करणारें वाटलें. गोंगाट नाहीं, खडखडाट नाहीं. एकहि यंत्र नसलें तरी यंत्रासारखें काम चाललेलें! आसवांनीं भरलेलें लाकडी रांजण व मोठ्या बरण्या, कल्प, अरिष्टें, चूर्णें, वटिका; मात्रा, रसायनें आणि कच्चीं द्रव्यें सर्व कांहीं व्यवस्थित मांडलेलें. मोठा आनंद वाटला.

वैद्य श्री. मराठे यांनीं आयुर्वेद सेवा संघाच्या निर्मितीचा व विकासाचा इतिहास सांगितला. वैद्य पंडितांनीं साप्ताहिक गांवकरींत प्रकाशित झालेल्या आरोग्यविषयक लेखांची फाइल दाखविली.

आयुर्वेदमय झालेल्या या कार्यकर्त्यांचें समीप-दर्शन त्यांच्या 'अगस्तिप्राश' च्या सेवनापेक्षांहि अधिक आरोग्यदायी सिद्ध होईल असें वाटतें.

—नाना बापट, मंडला

असली केशर

हवें असल्यास 'आयुर्वेद सेवा संघा' कडे मागणी करावी.

अनुक्रमणिका

महाराष्ट्र प्रां. वैद्य संघटना बलवान् करा	४५३
आयुर्वेदीय जीवनपद्धतिच अधिक हितावह	४५४
वैद्यराज डेग्वेकर यांची विनंति	४५५
बुद्धिजीवी लोकांसाठीं अंजीरपाक	४५६
मिश्रशिक्षणानें आयुर्वेदाचा प्राणघात	४५७
सांठवणीसाठीं पान्यांचा उपयोग	४५९
पर्पटीकल्प-सहकारी पद्धतीनें औषधें	४६३
अभिप्राय-दोषधातुमलविज्ञान	४६९
दन्तवैद्यक शास्त्राचा कोर्स	४७०
अग्निहोत्र मंदिरांतील ज्ञानयज्ञ	४७१
शाली व व्रीही	४७२
रंगरहित औषधाला रुग्ण नाखूष	४७३
धर्मार्थ दंतयज्ञ, कुमठा	४७४
आयुर्वेदाविषयीं भारत सरकारचा दृष्टिकोन	४७५
दुष्ट नाडीव्रणावर केळीचें पान	४७८
ज्योतिष्मती चमत्कार	४७९
मद्यार्कयुक्त औषधें	४८१
उत्तमांगवसंताचा पाठ, रसोनवृष्यवटी-पाठ	४८२

नारूवर निर्गुंड्यादिरस

निर्गुंड्यादिरस या नारूवरील औषधाची इस्पितळांतून बारकाईनें व नियंत्रित परिस्थितींत परीक्षा घेण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे.

मुंबई सरकारनें राज्यांतील सरकारी आयुर्वेदिक अस्पितळांतून अशा प्रकारें औषधांची परीक्षा करणाच्या बाबतींत पुढील अटी घातल्या आहेत:-

औषध तयार करणाऱ्या कंपनीस त्या औषधाचा जितक्या रोग्यावर प्रयोग करावयाचा असेल तितक्या रोग्यांच्या बाबतींत प्रत्येक रोग्यामागें दररोज सहा रुपये याप्रमाणें फी भरावी लागेल. एकाद्या व्यक्तीनें औषध तयार केलें असेल तर तिला वरील रकमेच्या पाव हिश्याइतकी (१॥ रु) फी भरावी लागेल. रोग्यांची किमान संख्या १० असेल आणि प्रयोग किती दिवस करावयाचा हें औषधाची परीक्षा करणाऱ्या अधिकाऱ्यावर अवलंबून राहील.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्री बद्रिकाश्रम का प्रसिद्ध 'लौह' शिलाजित

लौह शिलाजीत, कैलाशी मधु, भूटानी कस्तूरी तथा हिमालय की जड़ी, बूटियों का ६० वर्ष प्राचीन, विश्वस्त तथा प्रतिष्ठित फर्म जिसे आयुर्वेद महामहोपाध्याय स्वर्गीय श्रीमान शंकर दाजीशास्त्री पदे आयुर्वेद विद्यापीठ नासिक का संरक्षण प्राप्त था।

प्रधान कार्यालयः—नंदप्रयाग गढ़वाल उत्तरा खंड।

शाखायेंः—श्री बदरीनाथ धाम तथा लखनऊ।

श्रेष्ठ पदार्थ रियायती मूल्य में। थोक खरीदपर विशेष रियायत।

कृपया पत्रव्यवहार केवल हिंदी या अंग्रेजी में निम्नाङ्कित पते से कीजिये :

महेशानंद ॲन्ड सन्स

— भास्कर भवन, अशोकनगर, लखनऊ (यू. पी.) —

आयुर्वेद सेवा संघाचीं २ नवीन प्रायोगिक औषधें

(१) रसोनवृष्यवटी ५ रु. तोळा

कंदर्पवृष्यवटीचे गुणधर्म मिळावेत पण कंदर्पाच्या शीतवीर्याची बाधा होऊ नये व लसूणाच्या उष्णवीर्याचा लाभ घेतां यावा यासाठीं कंदर्पवृष्यवटींतील कांद्याच्या रसाऐवजीं लसुणाचा रस घालून ही वटी बनविण्यांत आली आहे. वातप्रकृति लोकांना हितावह आहे.

लहान मुलांच्या मुडदूस विकारावर

(२) अज + उत्तमांग वसंत ८ रु. तोळा

अजाच्या मेंदूपासून हा वसंत बनविण्यांत आला आहे. वाग्भट उत्तरतंत्रांत बालामयप्रतिषेध अध्यायांत सशाच्या उत्तमांगाच्या काढ्यांत घृत सिद्ध करून तें सुकट (मुडदूस रिकेट्स) मुलाला पुष्टि येण्यासाठीं सांगितले आहे. घृतकल्पना टिकाऊ नसल्यामुळें उत्तमांगापासून मधुमालिनीवसंतप्रमाणें हा उत्तमांगवसंत तयार करण्यात आला आहे. शरीरधातुसामान्यात् नेहमीं मिळण्याच्या दृष्टीनें सशाऐवजीं अजाची योजना केली आहे. शशउत्तमांगापासूनहि वसंत बनविण्याची योजना चालू आहे.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नाशिक

संपादक व प्रकाशक:— वैद्य विद्याधर पंडित आयुर्वेद सेवा संघ, मेनरोड, नाशिक
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
मुद्रक:— श्री. चिं. ओक, चर्केल प्रेस, आग्रारोड, नाशिक

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ७ वें) नाशिक, ता. १ फेब्रुवारी १९५४ (अंक १५ वा

३९ वें अ. भा. आयुर्वेद महासंमेलन

अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलनाचें आगामी ३९ वें अधिवेशन दाक्षिण मलबार प्रांतांत कोट्टकल या गांवीं ता. ७-८-९ मार्च रोजीं भरण्याचें निश्चित झालें आहे.

वैद्य वामनराव दीनानाथ, मंत्री

थोडा पूर्वेतिहास

३८ वें वैद्य संमेलन १९५२ सालीं इंदूर येथें भरलें होतें. त्या संमेलनांत आगामी संमेलन व्यावर (अजमेर) येथें भरविण्याचें निमंत्रण तेथील सुप्रसिद्ध उत्साही वृद्धवैद्य रावसाहेब तनसुखजी व्यास यांनीं दिलें होतें. व त्याप्रमाणें त्या संमेलनाची तयारीहि चालली होती. दरम्यान दुर्दैवानें श्री. व्यासजी यांचा देहांत झाला. त्यामुळें या संमेलनाच्या स्वागताची जबाबदारी घेऊं शकेल अशी व्यक्ति तेथील स्वागतमंडळास न लाभल्यामुळें, तें संमेलन दाक्षिण मलबारमध्यें कोट्टकल येथें जानेवारी ५-६-७-८ तारखेस भरण्याचें ठरवावें लागलें.

नागपूर विमान अपघातांत श्री. वारियर

डिसेंबरच्या पहिल्या पंधरवड्यांत नागपूर येथें झालेल्या विमान अपघातांत कोट्टकल संमेलनाचे स्वागताध्यक्ष वैद्य श्री. माधव वारियर व सौ. वारियर परलोकवासी झाल्यामुळें त्यांचे बन्धु श्री. राघव वारियर यांनीं टेलिफोननें अध्यक्षांना असें कळविलें कीं, आता कोट्टकल येथें आयुर्वेद महासंमेलन ठरल्यावेळीं भरविणें अशक्य आहे. आपण ' सावकाश स्वागतमंडळाची सभा घेऊन निर्णय कळवावा. तो सहानुभूतिपूर्वक स्वीकारला जाईल ' असें त्याचें उत्तर अध्यक्षांनीं दिलें होतें.

एका आठवड्यानंतर पुन: कोट्टकलहून टेलिफोन आला कीं स्वर्गीय वैद्य माधव वारियर यांनीं स्वहस्ताक्षरांत महासंमेलनाला दिलेलें निमंत्रण परत घेणें आम्हांस इष्ट वाटत नाहीं. सबब त्याचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुण्यस्मरण म्हणून हें संमेलन ता. १५-१६-१७ फेब्रुआरी रोजीं घेण्यांत येईल, याला उत्तर म्हणून अध्यक्षांनीं असें कळविलें कीं सध्यां कुंभपर्वणी आहे. सबब त्या तारखा उत्तर भारत, राजस्थान, दिल्ली, पंजाब आदि राज्यांतील वैद्यांना सोईच्या नाहींत; सबब संमेलन फेब्रुवारी अखेर अगर मार्चच्या प्रथम सप्ताहांत घ्यावें.

अध्यक्षांच्या त्या पत्राचा स्वागतमंडळानें पुनः विचार करून मार्चच्या ७-८-९ या तारखा निश्चित केल्या आहेत. वैद्यबंधूंना त्या संमेलनास उपस्थित राहण्याची तयारी करण्यासाठीं भरपूर अवधि आहे. सबब भारतवर्षांतील सर्व भागांतील वैद्यवर्यांनीं अधिक संख्येनें उपस्थित राहून संमेलन यशस्वी करावे असें विनंतिपत्रक अ. भा. आयुर्वेद महासंमेलनाचे प्रधानमंत्री वैद्य वामनराव दीनानाथ (मुंबई) यांनीं काढलें आहे.

झांशी आयुर्वेद विद्यापीठास

राज्यपालांची भेट

(१) श्री. डॉ. बल्देवशर्मा, आयुर्वेदाचार्य शास्त्री B.A., M.N.M.S., [Berlin] M.I.P.A. [Vienna] मनोविज्ञानविशेषज्ञ [Psycho-Analyst], D.Sc.A., आयुर्वेदबृहस्पति, यांची ता १८ ऑगस्ट १९५३ पासुन झांशी आयुर्वेद विश्वविद्यालयाचे व्हाइस चॅन्सेलर म्हणून नियुक्ति झाली आहे.

(२) झांशी आयुर्वेद विश्वविद्यालयातर्फे M.Sc.A. ही पदवी परीक्षा लवकरच घेण्यांत येईल. येत्या गव्हर्निंग कौन्सिलच्या बैठकींत या परीक्षेची तारीख निश्चित केली जाईल.

(३) उत्तर प्रदेशाचे राज्यपाल महामान्य श्री. कन्हैयालाल माणिकलाल मुन्शी यांनीं सपत्नीक तारीख २४ डिसेंबर १९५३ रोजीं झांशी आयुर्वेद विश्वविद्यालयास भेट दिली.

विश्वविद्यालयाचें कार्य

त्यावेळीं, श्री. धुळेकर प्रधानसंस्थापक एम्. पी. यांनीं शहरांतील जमलेल्या विद्वान व प्रतिष्ठित लोकांसमोर प्रास्ताविक भाषण करून् ना. राज्यपालांचे आभार मानले व विश्वविद्यालयाच्या देशव्यापी कार्याची माहिती करून दिली. भारतांतील निरनिराळया प्रांतांतून M. Sc. A. व D. Sc. A. च्या स्नातकोत्तर शिक्षणाकरितां तसेंच संशोधन कार्याकरितां अभ्यासु व संशोधनेच्छु येथें येतात. विश्वविद्यालयानेंहि आयुर्वेदिक इंजेक्शनचें संशोधन केलें व त्यांवर असलेला सरकारी प्रतिबंध आतिशय प्रयास करून उठविला.

प्रगति पाहून आश्चर्य वाटलें

उत्तरादाखल भाषण करतांना ना. राज्यपाल म्हणाले कीं, फार दिवसांपासून मी झांशी आयुर्वेद विश्वविद्यालयाची कीर्ति ऐकून होतो, परंतु आज प्रत्यक्ष मूर्त स्वरूप पाहाण्याची संधि मला प्राप्त झाली आहे. येथील कार्यकर्त्यांनीं इतक्या अल्पावकाशांत इतकी महान् प्रगति केलेली पाहून मला आश्चर्य वाटलें. मी असें आश्वासन देतो कीं, ह्या विश्वविद्यालयाच्या समृध्द्यर्थ मी माझेकडून संपूर्ण साहाय्य देईन. आधुनिक चिकित्सक केवळ अॅलोपॅथीलाच शास्त्र मानतात हें त्यांच्या मानसिक दास्यतेचें लक्षण आहे."

अंजीरपाक कृति

१) अंजिरे गरम दुधांत भिजत ठेवावी.
२) बदामबी गरम पाण्यांत टाकून साल काढावी
३) अंजिरे चांगलीं मऊ झाल्यावर वाटून घ्यावींत.
४) बदामबी, चारोळी, बेदाणा, पिस्ते वाटून घ्यावीत.
५) दुधाचा खवा करून तो खवा, वाटलेले अंजीर, वाटलेले बदाम वगैरे सर्व तुपावर चांगले खमंग परतून घ्यावे.
६) त्यांत इतर चूर्णे मिसळावी व चांगलें भगराळ करावे.
७) साखरेचा पाक करून त्यांत सर्व मिश्रण सोडून चटका देऊन चौकटींत टाकून वड्या पाडाव्यात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

.... मुंबई ऑब्स्टेट्रिक अँड् गायनॉकॉलॉजिकल सोसायटी ....

६ वा उजळणी (रिफ्रेशर) वर्ग

(लेखकः—वैद्य मा. श्री. देसवंडीकर, आयुर्वेदतीर्थ, खर्डा)

वरील संस्थेचे ६ दिवसाचे रिफ्रेशर कोर्सेस दर दोन वर्षानें होतात, त्याप्रमाणें तो यंदाहि १५ मार्च ते २० मार्च अखेर होणार आहे. मागील रिफ्रेशर कोर्सचे वेळीं कांहीं वैद्य मंडळींनीं सूचना केल्या होत्या त्याप्रमाणें वैद्यांचा गट स्वतंत्र तयार करून त्यांना झेपेल अशा प्रकारचीं प्रात्यक्षिकें द्यावींत अशा-बद्दल मी यंदा पत्रानें सूचना केली. त्याप्रमाणें संस्थेचे सेक्रेटरी यांचें सहानुभूतिपूर्वक इंग्रजी उत्तर खालीं दिल्याप्रमाणें आलें आहे.

"आपण सुचविल्याप्रमाणें प्रात्यक्षिकें व उपकरणांचा उपयोग वगैरे करितां वैद्यांच्या स्वतंत्र तुकड्या करण्याचा आम्ही प्रयत्न करूं. व्याख्यानांना सर्वच उमेदवार एकाचवेळीं उपस्थित राहूं शकतील.

याबाबतींत आपली इच्छा असल्यास आपण स्थानिक वृत्तपत्रांतून प्रसिद्धि देऊं शकतां. वरील-प्रमाणें इच्छा असणाऱ्या प्रवेशेच्छु वैद्य मंडळीचे आम्ही रिफ्रेशर कोर्सकरितां आनंदानें स्वागत करूं व त्यांना झेपेल आणि ग्रहण करतां येईल अशा बेतानें शिक्षण देण्याची आम्ही आमचेकडून पराकाष्ठा करूं."

विश्वासू

(सही) एस्. आप्टेकर

जॉ. ऑ. सेक्रेटरी

खेड्यांतून काम करणारे वैद्य

ज्या कोणा वैद्यांना विशेषतः खेड्यांतून काम करणाऱ्या व ज्यांचें इंग्रजी वगैरे चांगलें आहे, ज्यांना अशा प्रकारच्या रुग्णांचे उपचार करावे लागतात किंवा प्रसंग येतो त्यांनीं हजर राहणें अधिक श्रेयस्कर ठरते असा माझा अनुभव आहे. खेड्यांतून काम करणारे एस्.एस् पी. व लो. बो. वैद्य यांना नेहमीं अशा प्रकारच्या केसेसबद्दल विचारणा होते. परंतु दुर्दैवानें त्यांचें शैक्षणिक ज्ञान अपुरें पडतें; तरी ज्याप्रमाणें प्रत्येक डॉक्टरला १२ नॉर्मल डिलिव्हरीज कराव्याच लागतात तेव्हांच तो परीक्षेला बसू शकतो अशा प्रकारच्या १२ नॉर्मल डिलिव्हरीज करून घेण्याचा एखादा छोटासा रिफ्रेशर कोर्स या संस्थेनें करावा अशी विनंति बऱ्याच वैद्यांनीं केल्यास मुंबईची ही संस्था कदाचित् हें कार्य अंगीकृत करील. तरी ज्यांना या विषयांत कांहीं प्राविण्य मिळवावें असें वाटतें त्यांनीं वरील संस्थेला तसें कळवावें.

प्रयत्न फारच चांगला असतो

एकंदरींत व्याख्यानें वगैरेंचा कार्यक्रम फारच चांगला असतो. वैद्यांचें दृष्टीनें यंदा स्वतंत्र व्यवस्था शक्यतो करण्याबद्दल त्यांचा प्रयत्न आहे. तरी शक्य असल्यास वैद्यमंडळींनीं बहुसंख्येनें उपस्थित राहून या ज्ञानाचा लाभ घ्यावा. मी या विषयावर मागील २ वर्षांचे कोर्सचे माझे अनुभव आयुर्वेद पत्रिकेंतून प्रसिद्ध केल्यावर मला बऱ्याच वैद्यवर्यांनीं पुनः केव्हां हा कोर्स भरेल म्हणून विचारणा केली होती, म्हणून हें निवेदन मुद्दाम पत्रिकेंत प्रसिद्ध करीत आहे.

शिक्षणक्रमाची फी १५ रु.

या कोर्सची फी १५रु. खालील पत्त्यावर ताबडतोब पाठवावी. जेवणाचा व राहण्याचा खर्च ज्याचा त्यानें करावयाचा आहे. मुंबईच्या कांहीं वैद्यांनीं पुढाकार घेऊन प्रांतांतील येणाऱ्या वैद्यांची एखाद्या नजीकच्या निवासस्थानांत सोय करून दिल्यास व तेथील निरनिराळ्या हॉस्पिटल्समधील होणाऱ्या कार्यक्रमांना हजर राहण्याचें दृष्टीनें पुढाकार घेऊन सोबत केल्यास बाहेर गांवची मंडळी मुंबईकराकडून उपकृत होतील. कारण निरनिराळीं हॉस्पिटल्स ठराविक वेळा ठराविक ठिकाणीं सांपडणें हें मुद्दां अडचणीचें पडतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सर्व वैद्यांनीं एकत्र रहावें

तसेंच बाहेरगांवच्या सर्व वैद्यांनीं एकाच निवास-स्थानांत प्रवेश मिळविल्यास रोज सायंकाळीं चर्चेची देवाण-घेवाण चांगलीच होईल. तरी त्या दृष्टीनें पत्र-व्यवहार व्हावयास हरकत नाहीं.

१५ रु. फी पाठविण्याचा पत्ताः-

जॉइंट ऑनररी सेक्रेटरीज, बॉम्बे ऑब्स्टेट्रिक
ॲंड गायनेकॉलॉजिकल सोसायटी,
पुरंदरे-गृह, चौपाटी सी फेस, मुंबई ७

अभिप्राय—

दंत-रोग विज्ञन व चिकित्सा

(ग्रंथ लेखकः- वै. पां. त्रि. जायदे)

अखिल भारतीय आयुर्वेदीय डटलॅ-मिशनचें कार्याध्यक्ष वैद्यराज पां. वि. जायदे, आयुर्वेद-तीर्थ या सुप्रसिद्ध, कर्तव्यपरायण, 'वैद्यसन्मित्र' ग्रंथमालेच्या लेखकाचें, हें तिसरें अत्युपयुक्त पुष्प आहे. १५६ पृष्ठांच्या ह्या पुस्तकाचे २ विभाग असून प्रथम विभागांत लेखकानें आपणास शूलरहित विनासंमोहन दंतोपाटनाची कला, ज्या दंतयज्ञांच्या प्रसादानें प्राप्त झाली, त्या हुबळी, गदग, नानलनगर, दिल्ली, इ. ठिकाणीं झालेल्या धर्मार्थ दंतयज्ञांची सचित्र माहिती दिली आहे. व दुसऱ्या विभागांत, दांतांचें शारीर, दंतरोगांचीं सामान्य कारणें, निदान चिकित्सेंत दंत-रोगांचें महत्व, त्या दृष्टीनें दंतोत्पाटन हें केव्हां युक्त व केव्हां अयुक्त, तें शूलरहित विनासंमोहन कसें करावें व दंतरोगांचा इतर रोगांशीं संबंध काय, दांतांचे व हिरड्यांचे रोग, औषधें व दंतमंजनें नि उपयुक्त माहिती इ. दंतरोगचिकित्सा - व्यवहारोपयोगी ९ प्रकरणें आहेत.

या ग्रंथास वैद्य विंदुमाधव पंडित यांनीं छोटीशी प्रस्तावना लिहिला आहे.

लेखक उभयवैद्यकशास्त्रकोविद व 'दृष्टकर्मा नि कृतकर्मा असल्यामुळें, अत्यंत माहितीपूर्वक असा हा ग्रंथ 'संग्राह्य' झाला आहे. पुस्तकाची किंमत फक्त तीन रुपये आहे.

विद्यार्थ्यांच्या दांतांची दुःस्थिति

अखिलभारतीय आयुर्वेदीय डेंटल मिशनच्या धर्मार्थ दंतयज्ञातर्फे मिळविलेली निरनिराळ्या शाळा-कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या दांताची दुःस्थिति आंकडे-वारीनें लेखकानें दिली आहे, ती उद्बोधक अशी आहे.

हा विषय अधिक आयुर्वेदीय दृष्टिकोनांतून व भारतीय दंतविद्येची वैशिष्ट्यपूर्ण छाप पाडण्यास उप-युक्त अशा पद्धतीनें लिहिणें शक्य आहे. तथापि सामान्य वाचकांच्याहि बुद्धीला पेलवेल असा 'नाति-संक्षेपविस्तरम्' किंवा 'मंदबुद्धीनामपि व्यवहाराय' हा ग्रंथ झाला आहे. ऊर्ध्वजत्रुगत विकारांवरील चिकित्सेंतहि वमनासारखी शुद्धि अत्यंतावश्यक असून ती झाल्यावर नस्य-अंजन-तर्पण-पुटपाक-धूम-गंडूष कवल-अभ्यंग इ. आयुर्वेदीय औषधी प्रणिधान-पद्धतीचें महत्व फार आहे. त्या दृष्टीनें ग्रंथकार पुढील आवृत्तींत भर घालतील अशी आशा आहे.

अभिप्राय लेखक-वै. श्री. रा. करमरकर, आयुर्वेदाचार्य

कंदर्पवृष्यपाकानें चांगलाच गुण आला!

व्यवस्थापक, आयुर्वेद सेवा संघ यांसी—

गेल्या जून १९५३ मध्यें मी आपलें कंदर्पवृष्यपाक हें औषध १ शेर मागविलें होतें. तें खाल्ल्यानंतर चांगलाच गुण आला.

पण आणखीन् एक पौंड तें औषध घ्यावें असें वाटतें. म्हणजे बिलकूल तक्रार रहाणार नाहीं.

तरी तावडतोब व्ही. पी. नें १ पौंड कंदर्पवृष्य पाक पाठवावा अशी विनंति आहे.

—एक शिक्षक जि. पो. पुणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माझे अनुभवसिद्ध प्रयोग :

लेखकः-रामप्रसाद दीक्षित वैद्य
सरदारशहर (राजस्थान)

आमच्या औषधालयांत नित्याच्या वापरांत जे अनुभवसिद्ध औषधी प्रयोग आम्ही वापरतो त्यापैकीं कांहीं आपल्या सेवेस सादर करण्यांत मला अतिशय आनंद होत आहे. आमच्या राजस्थानांत प्रांतांत राजे, महाराजे, शेठ, सावकार यांमध्यें अशा प्रकारचे स्वादिष्ट, पाचक व रोचक औषधी प्रयोग वापरण्याची बरीच प्रथा आहे. आणि म्हणून अशा प्रकारचे स्वादिष्ट, पाचक व रुचकर औषधी प्रयोग मी आपणाकडे पाठवित आहे.

सौवर्चलवटी, रोचकवटी

लिंबूरस १। शेर, कृष्णलवण पावशेर; लिंबाच्या रसांत कृष्णलवण शिजवावें व लिंबाचा रस आटून पावशेर शिल्लक राहिल्यावर त्यांत १० तोळे खडीसाखर व २ तोळे तूप घालावें. नंतर त्यांत भाजलेला टाकणखार, भाजलेले सफेत जिरे, सुंठ, मिरे, पिंपळी हीं प्रत्येकीं २ तोळे घालावीं व अक्कलकरा ३ तोळे घालावा. नंतर सर्व एकजीव करून त्याच्या १।१ गुंजेच्या गोळ्या बनवाव्या. याचें सेवनानें मंदाग्नि, गुल्म, शूल अरुचि वगैरे विकार नाहींसे होतात. ह्या गोळ्या अतिशय स्वादिष्ट पाचक व रुचकर आहेत. याचें दुसरें नांव 'रोचकवटी' असेंहि आहे.

(२) शांतिवर्धक चूर्ण

सुंठ, मिरे, पिंपळी, लवंग, मोठ्या वेलचीचे दाणे, लिंबाचें सत्व [Citric acid], गेरु हीं प्रत्येकीं १।१ तोळा. नवसागर ५ तोळे, सौवर्चल लवण ४ तोळे, पेपरमिंट (अस्मानतारा) १॥ मासा. या सर्वांचें एकत्र चूर्ण करावें. ह्या चूर्णापासून अजीर्ण, सर्दी, अग्निमांद्य, विषूचिका, गुल्म, प्लिहोदर आदि विकार नाहींसे होतात. हें सौम्य सारकहि आहे. हें चूर्ण खाण्यास अतिशय स्वादिष्ट असल्यानें सर्वसाधारण लोकांत अतिशय प्रिय आहे.

(३) पाचक मनुका

मनुका १ शेर, सांभर लवण १२ तोळे, खडीसाखर १२ तोळे, भाजलेले सफेद जिरे ३ तोळे, वेलची (बारीक) ३ तोळे, हिंग (भाजलेला) ४ मासे, काळे मिरे ६ तोळे, लिंबाचा रस २ शेर.

प्रथम मनुका स्वच्छ धुवून त्यांतील बिया काढून टाकाव्या. नंतर सर्व औषधी जिनसांचें चूर्ण करून घ्यावें, लिंबाचा २ शेर रस एका चांदीच्या अगर कल्हईच्या भांड्यांत घालून त्यांत वरील औषधांचे चूर्ण व मनुका घालाव्या. नंतर तें सर्व चांगलें मिश्र करून अग्नीवर ठेवावें. त्यांतील मनुका अर्धवट शिजल्यावर त्यांत खडीसाखर टाकावी. नंतर मनुका चांगल्या शिजल्यावर भांडे अग्नीवरून खालीं काढून ठेवून थंड होऊं द्यावें. थंड झाल्यावर तें औषधीमिश्रण एखाद्या तुपानें रावलेल्या मडक्यांत अगर लाखेचें रोगण केलेल्या मृत्तिकापात्रांत भरून ठेवावें. भोजनोत्तर त्यांतील दोन तीन मनुका खाव्यात. त्यानें अजीर्ण नाहींसें होऊन खरमरीत भूक लागते व बद्धकोष्ठ दूर होतें. हें कामोद्दीपकहि आहे. खाण्यास हें औषध अतिशय स्वादिष्ट, पाचक व रुचकर आहे.

(४) राजरेचन

जुलाफा १ शेर, खडीसाखर १ शेर यांचें चूर्ण करावें. मात्रा-॥ माशापासून ६ मासे-- पर्यंत. यानें मलावरोध नाहींसा होऊन पित्तनिःसरण चांगलें होतें. पांडुरोगांत विरेचन म्हणून चांगला उपयोग होतो.

(५) तरुणी कुसुमाकर

गुलाबकळी, सैंधव, संचळ, सफेद जिरे, कृष्ण जिरे, यवक्षार, सुंठ, मिरें, पिंपळी, हरीतकी, बिभीतक, आमलकी, टंकणलाही, वेलची दाणे, हीं प्रत्येक १।१ तोळा. स्वर्णपत्री १४ तोळे. यांचें चूर्ण एकत्र करावें. मात्रा- ३ ते ६ मासे. अनुपान- पाणी. उपयोग मलावरोधनाशक. रात्रीं निजण्याचे वेळीं घेतलें असतां सकाळीं शौचास अगदीं साफ होऊन जाते. आंवहि निघून जाते.

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाचे

१९५४ सालचे सदस्य

वैद्य ब्रह्मदत्त शर्मा भुसावळ, लक्ष्मण दामोदर जोशी, चिनावल पू. खानदेश, श्रीधर रावजी करंजीकर मु. पो. रनाळे प. खा., रामदास कालीदास पाठक-शास्त्री मु. यावल पू. खा., महादेव भास्कर वाटवे, ठळकवाडी बेळगांव, भेरूलालजी व्यास शहापूर बेळगांव, पुरुषोत्तम विनायक घामणकर मु. पो. पनवेल, विष्णु महादेव गोगटे वकीलवाडी नाशिक, सौ. यमुताई विष्णु गोगटे वकीलवाडी नाशिक, आचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी, एल. आय्. टी. नागपूर, भास्कर दत्तात्रेय गोडबोले धूतपापेश्वर पनवेल, द. अ. कुळकर्णी डायरेक्टर ऑफ आयुर्वेद लखनौ, पांडुरंग हरी देशपांडे ६३७ शुक्रवार पुणे २, नारायण लालजी इंदूरकर भुसावळ पू. खा., द्वारकादास शिवलाल भजेगल्ली भुसावळ पू. खा., गो. स. जोग बाजारवाडी भुसावळ, आसरानजी नेत्रवैद्य भुसावळ, विष्णु दुला पाटील स्टेशनरोड भुसावळ, जनार्दन वासुदेव मोकाशी भुसावळ, एन्. डी. दीक्षित मु. शेरूळ पो. झोडगे जि. नाशिक, दत्तात्रेयशास्त्री जळूकर मु. पो. नशिराबाद पू. खा., अनंत वामन नाईक मु. पो. नशिराबाद पू. खा. रामदास श्रीकृष्ण नाईक मु. पो. नशिराबाद, भिकाजी श्रीधर कुळकर्णी मु. पो. नशिराबाद, बन्सी श्रीपत चव्हाण मु. पो. नशिराबाद पू. खा., ज्वालाप्रसाद शर्मा मु. पो. बोधवड पू. खा., वि. रा. इंगळे सोलापूर, चूडामणी खंडेराव चौधरी फैजपूर, अण्णाप्पा तवनाप्पा उपाध्ये जैन सांगली, सखाराम लक्ष्मण लेले इचलकरंजी, शिवाजी भिमराव भोसले उमदि, पांडुरंग राजाराम पुराणिक डांगशिरवाडे, गणेश सोनुपंत जोशी कवठे सुकेणे, टी. एम्. शिंगाडे दहीवडी, विनायक बाळकृष्ण जोशी चिकुर्डे, दत्तात्रेय गणेश चौक खापर, केशव नारायण कार्णिक गोरेगांव, श्रीधर गोपाळ कुलकर्णी लांबकानी, लक्ष्मण विश्वनाथ गायधनी ओझर, नरहर पुरुषोत्तम जोशी रोहें, अ. बा. जोशी बेळगांव, स. गो. देव-जोशी थेरगांव, द म. तांबेकर सोलापूर, केशवराव साहेबराव आनंदे नागठाणे, रघुनाथ साहेबराव आनंदे घोडेगांव, देवराम लक्ष्मणराव आनंदे परळरोड मुंबई, नामदेव बाबुराव शितोळे सांगली, शामराव बाबुराव शितोळे सांगली, बी. एस्. शितोळे नायगांव, गणपत बाबाजी शितोळे सांगली, आर्. एन्. आंबे ताडदेव, व्ही. डी. शिंदे लालबाग, गणपत रामजी मोरे सांगली, अनंताचार्य श्यामाचार्य घळसासी मुंबई २, भार्गव विष्णु बापट मुंबई २, नारायण रामकृष्ण खरे गोरेगांव, गं. वि. पुराणिक पनवेल, म. वि. पुराणिक पनवेल, पुं. ग. पुराणिक पनवेल, अ. वि. फडके शिरढोण, श्री. ना. हर्षे पनवेल, न. पां सामंत पनवेल, दत्तात्रय कृष्णाजी पाडुळकर सोलापूर, शंकर धोंडो नंदनवनकर कुंडलवाडी, व्ही. व्ही. भारंबे फैजपूर, हरी दिगंबर शुक्ल माळशेवगे, प्रतापकुमार वैद्य भुलेश्वर मुंबई, नारायण रामचन्द्र चुरी दानिवरे, गोविंद नारायण जतीवाले लेंगरे, एम्. डी. गायकवाड सोलापूर, मियालाल आब्दुल्ला आलासकर मुळकूड, वि. दा. एकतारे अहमदनगर, बिन्दुमाधव गणेश पंडित नाशिक, श्रीराम कृष्ण करमरकर नाशिक. रा. म. रुद्रभटे फलटण, नारायण रामय्या गुंडु नगर, रामलिंग भगवान पकाळे बार्शी, प्र. ल. समुद्र अकोला, केशव नारायण कार्णिक गोरेगांव, म. वा. धर्माधिकारी परतवाडा, ना. रा. शास्त्री एलिचपूर, (अचलपूर,) वामन यशवन्त देशमूख परतवाडा, द्वारकानाथ तात्याबा कुकर बाऱ्हे (पेठ), बी. डी. शिरोडकर झारप, धोंडो सदाशिव अंतरकर मुंबअी, रघुनाथ गणेश यार्दी लोहोणेर, वि. नि. नार्वेकर मुंबअी ४, कुलकर्णी c/o नार्वेकर मुंबअी ४, कृष्णाजी केशव कानिटकर मुंबई २, सोनबा तानोबा डाकरे दादर मुंबई १४, विष्णु महादेव केळकर ठाकुरद्वार मुंबई २, शान्ताराम नारायण वैद्य मुंबअी ४, चिंतामण धोंडू जोशी मुंबअी ४.

देणगी २५ रु.-वैद्य ज. बा. मोकाशी, भुसावळ

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय ग्रंथपाठन पद्धति

लेखक - वैद्य भि. वि. डेग्वेकर
जबलपूर

समग्र हिंदुस्थान देशमें आयुर्वेदीय प्राचीनग्रंथ एकही निश्चित अर्थ से पढाये जाना नितांत आवश्यक है, इस संबंधमें कोई वाद नहीं है, ऐसा मैं समझता हूं। प्रत्येक नियोजित शब्द से एकही विशिष्ट पदार्थ का बोध जबतक हरएक विद्यार्थी को न कराया जायगा, तबतक उत्तर से दाक्षिण तक तथा पूर्व से पश्चिम तक मिलनेवाले आयुर्वेदीय विद्यार्थियोंको परस्पर विचार-विनिमय करना असंभव होगा। अतएव, शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रमका देशमें प्रसार होनेके लिये, ग्रंथोंमें नियोजित संज्ञाओंका एक विशिष्ट अर्थ तथा उससे संबोधित एकही शारीर पदार्थ, हमें प्रथम निश्चित करने की आवश्यकता है।

सारे देशमें एकसा ही अर्थ

आयुर्वेदीय ग्रंथोंके हरएक वाक्यसे अभिप्रेत अर्थ सारे देशमें एकसाही होना चाहिये। तथा वह अर्थ भी प्रत्यक्ष शारीरसे संबंधनिदर्शक ऐसा होना चाहिये।

इन उद्देशोंको साध्य करनेको प्रथम अष्टांगहृदय ग्रंथमें जो अनेक ऐसे स्थल हैं उनका सर्वसंमत अर्थ निर्णय करनेके लिये एक विद्वत्परिषद की आयोजना की जाना नितांत आवश्यक है। उसमें उन स्थलोंके संबंधमें जो निर्णय होगा उसे देशके अन्य विद्वान् भी अपना निर्णय दे सकेंगे अथवा कोई विशेष वक्तव्य देना चाहें तो प्रसिद्ध कर सकेंगे। यह कार्य यद्यपि आयुर्वेदमहामंडलके समान देशव्यापि संस्थाके द्वारा होना अधिक स्वीकारार्ह होता, तथापि प्रारंभिक कार्य, जहां शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रम स्वीकृत हुआ हैं, ऐसे बंबई प्रांतमेंही किया जाना योग्य है।

इस संबंधके शंकित स्थल अनेक है। उनमेंसे उदाहरणके लिये कईका निर्देश किया जाता है:—

१) अ. हृ. सू. १-७ ते व्यापिनोऽपि हृन्नाभ्योरधोमध्योर्ध्वसंश्रयाः। इस वाक्यमें हृदय, नाभि, व्यापि शब्दों के प्रत्यक्ष शारीरदृष्ट्या अर्थ, तथा दोषोंके आश्रयस्थान, उनका स्वरूप आदि विद्यार्थियोंको मनुष्यशरीरमें जबतक दिखाये न जायेंगे तब तक केवल भाषांतर करनेसे गुरूशिष्योंमेंसे किसी एकका भी समाधान नहीं हो सकता।

२) अ. हृ. सू. १-९ शुक्रार्तवस्थैर्जन्मादौ विषेणेव विषक्रिमेः। यहां दोष शुक्रार्तवोंमें कैसे रहते हैं, इसका शारीरदृष्ट्या स्पष्टीकरण होना चाहिये।

दोषोंका प्रात्यक्षिक ज्ञान आवश्यक

३) अ. हृ. सू. १-१०, ११

तत्र रूक्षो लघुः शीतः खरः सूक्ष्मश्चलोऽनिलः।
पित्तं सस्नेहतीक्ष्णोष्णं लघु विस्रं सर द्रवम्॥
स्निग्धः शीतो गुरुर्मंदः श्लक्ष्णो मृत्स्नः स्थिरःकफः॥

यह विवरण आतेही इन गुणवाले ये द्रव्य वात, पित्त, कफ कोनसे हैं, उनका प्रत्यक्ष ज्ञान शारीरदृष्ट्या विद्यार्थींकों कराया जाना चाहिये। ये सब गुण पांचभौतिक होनेके कारण वह शरीरगत पांचभौतिक पदार्थ कौनसे हैं, इसका प्रात्यक्षिक जबतक विद्यार्थींकों न कराया जायगा, तबतक उसका समाधान कैसा हो सकता है। रस, रक्त मांसादि सप्तधातुओंका तथा मूत्रशकृतादि मलोंका हम प्रात्यक्षिक करा देते हैं, उसी प्रकार दोषोंकाभी प्रात्यक्षिक जबतक न कराया जायगा तबतक वे शास्त्रके आगेके भाग किस प्रकार समझ सकेंगे। अतएव इसकाभी विचार करना होगा।

४) अ. हृ. सू. १-२५ शरीरजानां दोषाणां क्रमेण परमौषधम्। यहांपर दोष शरीरज अर्थात् शरीरसे कैसे उत्पन्न होते हैं, यह प्रत्यक्ष शारीरदृष्ट्या विवरण करना होगा।

५) अ. हृ. सू. २-१९ न वेगान्नीरयेद्बलात्। न वेगितोऽन्यकार्यः स्यात्॥ इस सूत्रमें वेगोंके रोकनेसे तथा जबरदस्ती प्रेरित करनेसे शरीरके कौनसे अवयवों पर क्या परिणाम, और वे क्यों होते हैं, इसका शारीरदृष्ट्या विवरण करना होगा।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६) अ. हृ. सू. २-२९

न पीडयेदिंद्रियाणि न चैतान्यतिलालयेत् ॥

यहां पर इंद्रियोंके लालन-पीडनसे शरीरपर क्या परिणाम शारीरदृष्ट्या होते हैं, तथा शरीरके किन अवयवोंमें विकृति होती है, वह दिखाना होगा। हरएक सद्वृत्तका शारीरावयवोंपर क्या परिणाम होता है इसका स्पष्टीकरण अवश्य होना चाहिये.

भौगोलिक ज्ञानकी आवश्यकता

७) अ. हृ. सू. ३-२,५

आदानं च, तदादत्ते नृणां प्रतिदिनं बलम्।

ऋतवो दक्षिणायनम्। यद्बलं विसृजत्ययम्॥

इसके विवरणमें सूर्य और पृथ्वीका परस्पर भौगोलिक संबंध, सूर्यसंक्रमणमार्ग, उसके कारण होनेवाली शीतोष्णादि की वृद्धि, तथा बलका आदान और विसर्ग किस प्रकार होता है, यह सब विवरण विस्तारपूर्वक प्रत्यक्षकी दृष्टिसे करना होगा। उसके लिये भौगोलिक ज्ञानकी आवश्यकता है।

८) अ. हृ. सू. ३-७,८ शीतसंरोधात् हेमंते प्रबलोऽनलः। भवत्यल्पेंधनो धातून्स पचेद्वायुनेरितः॥

इसमें अनल प्रबल क्यों और कैसा होता है, वह वायुसे प्रेरित कैसा होता है, इत्यादि विषय शारीरदृष्टया स्पष्ट करना होगा।

९) अ. हृ. सू. ३-४२

आदानग्लानवपुषामाग्निः सन्नोपि सीदति।

यहांपर अग्नि क्या वस्तु है, वह पहिलेसेही सन्न कैसा रहता है तथा औरभी सन्न क्यों होता है इत्यादि शरीरसंबंधसे विवरण किया जाना होगा।

इस प्रकार प्रत्येक ऋतुमें जो शरीर की विशिष्ट परिस्थिति होती है वह कोनसे शारीर कारणसे होती है इसका विवरण होना।

१०) अ. हृ. सू. ४-१ वेगान्न धारयेत्...

वेगविधारणसे शरीरके कोनसे अवयवपर क्या परिणाम होता है इसका विवरण चाहिये।

११) अ. हृ. सू. ८-४ पीड्यमाना हि वाताद्या युगपत्तेन कोपिताः।

यहां पर वातादि दोष कहांपर रहते हुए अन्नसे कैसे पीडित होते है उसका विवरण चाहिये.

१२) अ. हृ. सू. ९-१,२

पंचभूतात्मकं तत्तु क्ष्मामाधिष्ठाय जायते। अंबुयोन्यग्निपवननभसां समवायतः॥ तन्निर्वृत्तिः।

पंचमहाभूत क्या पदार्थ हैं?

इसके विवरणमें पंचमहाभूत क्या पदार्थ हैं, वे पांचही क्यों हैं, उनका शरीरसे और बाह्य जगत् से संबंध, उनकी स्वतंत्रतया उपलब्धि होती है या नहीं, उनका इंद्रियोंसे संबंध, उनकी पृथ्वी, आपादि संज्ञा कैसी और क्यों इत्यादि सब विषयोंका विवरण बुद्धिगम्य विचारधाराद्वारा होना चाहिये।

१३) अ. हृ. सू. ९-११ से २८ तक

रस, गुण, वीर्य, विपाक और प्रभाव का द्रव्यसे और शरीरसे संबंध तथा उनकी व्याख्याएँ स्पष्टतया विवृत की जाना चाहिये।

१४) अ. हृ. सू. ११-१,२,३ उत्साहोच्छ्वासनिःश्वासचेष्टावेगप्रवर्तनैः इत्यादि जो अविकृत वातके

सांड
प्रेग-युटेरो
गर्भिणी-गर्भ-रक्षक
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द.कृ.सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई.
[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स- बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को. मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कार्य हैं वे प्रत्यक्ष शारीर की दृष्टिसे कोनसे शरीरावयवके हैं तथा उनका और वातद्रव्यका संबंध क्या, इस संबंधकी विद्यार्थियोंकी जिज्ञासा पूर्ण की जाना चाहिये। शरीराशरीरचर वातके भेद, वातका एकत्व, उसके शरीरावयवांतरमें होनेवाले भिन्न द्रव्यत्व, उसके शरीरावयवांतरमें होनेवाले भिन्न परिणाम, कुपित शरीरचर वातके कार्योंका शरीर से संबंध, इत्यादि विषय जब तक स्पष्ट न हो सकेंगे तबतक तद्विषयक ज्ञान कैसे पूर्ण होगा. अष्टांगहृदयके ११ वे व १२ वे अध्याय संपूर्णतया स्पष्ट किये जानेकी आवश्यकता है।

१५) अध्याय १५ में जितने गण दिये हैं उनमें की प्रत्येक औषधि का परिचय विद्यार्थीको आवश्यक है। इसके साफल्यके लिये क्या उपाय हो सकता है, वह परिषद्ने निश्चित करना चाहिये।

१६) सूत्र. अध्याय १६ से ३० तक स्नेहन-स्वेदनादि कर्मोंके विधि ग्रंथमें स्पष्टतया वर्णित है। उनका प्रात्यक्षिक करानेके लिये आलेख (charts) किस प्रकार तैयार करना, उसका सर्वसंमत निर्णय करना, और सब गुरुजनोंने एकही प्रकारके आलेख काममें लाना, यह भी इस शिक्षा पद्धातिका एक प्रधान अंग होना चाहिये.

अत्यंत महत्वका विषय

१७) शारीरस्थानमें अत्यंत महत्वका भाग है संज्ञा निश्चय करना। कला, सिरा, धमनी, स्रोतस् आदि अनेक शब्द किस विशिष्ट शरीरावयवके द्योतक होते हैं इसका निश्चय करनेके पश्चात् सब विद्यार्थी उन्ही शब्दोंका उपयोग उसी अर्थमें करें, यह नितांत आवश्यक है। आधुनिक ग्रंथोंमें भिन्न अर्थोंमें एकही संज्ञा नियोजित होनेके कारण विद्यार्थी बडे संकटमें पडते हैं, अतः यह निर्णय एक बार होही जाना आवश्यक है। वह होनेके पश्चात् अन्य आनुषंगिक बातें सोचनेमें सुविधा होगी।

१८) शारीर अध्याय ३ में श्लोक ४९ से ७२ तक दिया हुआ 'अन्नभौतिकधात्वग्निकर्म' का विस्तृत स्पष्टीकरण आवश्यक है। यही आयुर्वेदका प्रधान शारीरक्रियाविज्ञान है। इसी क्रियामें जो वात, पित्त, कफ, द्रव्य उत्पन्न होते हैं वेही समग्र शारीरक्रियाओंका संचालन करते हैं। इसी कारण आयुर्वेदमें हरएक व्याधि इन तीनों के विकृतिके कारण होता है, ऐसा सिद्धांत है। अतः इतना भाग विद्यार्थियोंको अत्यधिक स्पष्टतया समझाया जाना चाहिये।

१९) विकृतिविज्ञानीय शारीर के मूलतत्व क्या है तथा रिष्ट विज्ञान कैसा विचारगम्य (rational) हैं इसकाभी विचार होना चाहिये।

२०) निदानस्थान में उपशय क्या वस्तु है तथा उसमें होमियोपेथीका क्या संबंध है इसका भी विचार होना चाहिये। विद्यार्थियोंके अंतःकरणमें अशुद्ध विचारधारायें प्रारंभसे ही प्रतिबिंबित न होवें इसकी फिक्र लेना नितांत आवश्यक है।

२१) हरएक व्याधि के संप्राप्तिका विस्तृत विवरण विद्यार्थियोंको करानेकी दृष्टिसे विचार निश्चित होना चाहिये।

२२) चिकित्सामें संशोधन चिकित्साका महत्व तथा हरएक व्याधिमें किस प्रकारकी संशोधनचिकित्सा क्यों करना इसके कारण स्पष्टतया तथा विस्तारपूर्वक विद्यार्थीको समझाना चाहिये।

२३) भूतविद्यामें राक्षसादि भूत क्या वस्तु है इसका विचार निश्चित किया जाना चाहिये।

इस प्रकार उदाहरणके लिये विचारणीय प्रश्नोंकी नामावलि दे रहा हूं। हमारे हरएक वैद्यबन्धु इसी प्रकार अनेक शंकितस्थल प्रसिद्ध करें जिससे एक सूची तैय्यार करके उसका विचार सर्वमतसे किया जा सके।

पूर्वऋषियोंका अनुकरण

अंतमें इतनी अवश्य प्रार्थना है कि शुद्धायुर्वेद-पाठ्यक्रमको सफल करना हो तो वह कार्य एक विचारधारा की निश्चितिसेही साध्य हो सकता है।

पूर्वऋषियोंनें हिमालयके पार्श्वमें सम्मिलित होकर वह कार्य किया। उनके वंशज हम लोग नाशिक अथवा अन्य किसी क्षेत्रस्थानमें एकत्रित होकर अपनी विचारधारा निश्चित करें।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६० वर्षांचे जुने सुप्रसिद्ध व विश्वसनीय औषधी-निर्माते

उंझा फार्मसी लिमिटेड उंझा, (उत्तर गुजरात)

.... कांहीं लोकप्रिय औषधें ....

सर्वांकरितां—
' नवरत्न-रस '
* स्त्रिया, पुरुष, बालक या सर्वांकरितां ही महौषधी आहे. रस रक्तादि सप्त धातूंची शुद्धि, वृद्धि व पोषण करणें हें 'नवरत्नरसाचें' विशेष कार्य आहे. निरोगी लोकांस रसायन व रुग्णांना उत्तम औषध आहे. किं. २८ गोळ्याचे ५ रु.

स्त्रियांसाठीं—
' सुंदरी-संजीवनी '
* स्त्रियांचे प्रदर, ऋतुदोष, गर्भाशयविकार, वंध्यत्व आदि नष्ट करून शक्ति येतें. स्त्री-रोगावर हें अमृततुल्य औषध आहे. किं. ४ औंस ५ रु.

मलेरियांवर—
' एलस्टो पिल्स '
* ह्या गोळ्या सप्तपर्ण, कालमेघ, कुटकी आदि वनस्पतींच्या घन सत्वापासून बनविल्या आहेत. ह्या गोळ्या मलेरिया, शीतज्वर ह्या तापांवर अत्यंत गुणकारी असल्याचें सिद्ध झालें आहे. किं. ५०० गोळ्या (१० तो.) ३॥ रु.

आंव व मुरडव्यावर-
' अँटी-डिसेंट्रॉल '
* ही पर्पटी इंद्रजव, कुटजत्वकघन, बिल्व, कापूर, अफू ह्या औषधी द्रव्यांच्या संयोगापासून बनविली आहे. ही जुनाट आव, मुरडा, संग्रहणी ह्यावर अतिशय गुणकारी आहे. पहिल्याच दिवशीं गुण दिसूं लागतो. १ बा. १ रु.

लहान मुलांकरितां-
' शिशु-संजीवनी '
* लहान मुलांचा ताप, हगवण, दूध न पचणें, खोकला वगैरेंवर उत्तम औषध. मुलांना नियमित दिल्यानें मुलें बाळसेदार व धष्टपुष्ट होतात. १ बा. ॥॰ रु.

सायरप-
' शंख-पुष्पी '
* स्मरणशक्तिवर्धक व ज्ञानतंतूना बलदायक असें हें उत्तम ब्रेन-टॉनिक आहे. विद्यार्थी, कारकून, वकील, प्रोफेसर, अधिकारी वगैरे मेंदूचीं कामें करणाऱ्या लोकांना हें अत्युत्तम औषध आहे. १ बा. १। रु.

' अष्टावक्र-रस '
* वलिपालितनाशक, बलवर्धक, पौष्टिक, आरोग्यरक्षक व बुद्धि आणि कांतिवर्धक असें आयुर्वेदीय औषध आहे. किं. १ तो. ४० रु.

' बृहत्कस्तुरीभैरव '
[स्वर्णयुक्त]
* सन्निपात, आंत्रिकज्वर, वातज्वर, कफज्वर आणि वातकफज्वर ह्या तापांत उत्तम उपयोगी आहे. तसेंच मंथरज्वर व न्युमोनिया यांतहि हा योग सत्वर गुण देतो. किं १ तो. १८ रु.

' बृहत् वातचिंतामणी '
* आयुर्वेदांतील वातरोगांवर हें एक दिव्य औषध आहे. हृदयाला व मेंदूला बल देणारें आहे. मेंदूच्या ज्ञानतंतूच्या विकृतीमुळें उद्भवणाऱ्या सर्व विकारावर उत्तम गुणदायी आहे. मेंदूची क्षीणता, रक्तदाब, हिस्टेरिया वगैरेंवरहि लाभदायक आहे. किं. १ तो. ३५ रु.

उंझा फार्मसी लि. उंझा [उ. गुजरात]

महाराष्ट्र एजंटः—जयंत अँड कंपनी, लक्ष्मीरोड, पुणें सिटी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

.... सहकारी पद्धतीनें तयार करावयाचीं औषधें ...

पोट्टली कल्प

लेखक-वैद्य पु. वि. धामणकर
धूतपापेश्वर, पनवेल

पोट्टली म्हणजे पोतडी, पुरचुंडी किंवा पोटली. वनस्पतींचीं चूर्णें लवकरच हीनवीर्य होतात; त्यांचें वीर्य दीर्घकाल टिकावें म्हणून तीं पाकवून ठेवण्याची कल्पना उदयास आली. तिला पाक अथवा गुड म्हणतात. चरकाशीं स्पर्धा करणाऱ्या नागार्जुनानें प्रथम अशी एक पर्पटीची कल्पना काढली. पण तेव्हढ्यावर त्याचें समाधान झालें नाहीं, म्हणून पोट्टलीची कल्पना निघाली. चरक सांप्रदायीन पाक व गुड यांचेशीं अनुक्रमें पर्पटी व पोट्टली ह्यांचें साम्य दिसतें. पाकापेक्षां गुड, तसा पर्पटीपेक्षां पोट्टली हे अधिक दृढतर बंध आहेत. चरकानें बंधन व टिकवण म्हणून गूळसाखरेचा उपयोग केला. तर नागार्जुनानें त्याऐवजीं खनिज पदार्थ गंधक सम्मत केला.

जुन्या-नव्याबाबत पंडित हरिप्रपन्नजी म्हणतातः- "पर्वतीया जाङ्गलाश्चाऽधुनाऽप्यौषधानां पिण्डं निर्माय रक्षयन्ति।" "आधुनिकास्त्वौषधस्य वर्ण-विपर्ययभीत्या निर्यासादिद्रवमन्तरैव केवलदिव्यजलेन पिष्टिकामापाद्य पोट्टलीं निर्वर्तयन्ति।"

कोंबडीच्या अंड्यांतील बलकाचा उपयोग

चरक, नागार्जुन आणि आधुनिक ह्या तीन संप्रदायांत साखर, गूळ, गंधक, डिंक ह्यांचा उपयोग बंधनार्थ केला आहे. तर सिद्ध सांप्रदायिक कोंबडीचे अंड्यांतला पांढरा मगज, गोळी वळण्याकरितां द्रव म्हणून घेतात. ही गोळी सर्वांत कठीण होते, ह्यांत संशयच नाहीं.

कल्प अधिक टिकाऊ होतात

काठिण्यामुळें आंतील घटक, वातावरणाचे परि-णामांपासून सुरक्षित राहतात. त्यामुळें चूर्ण, गुटी, गुड, पोट्टली हीं उत्तरोत्तर अधिकाधिक टिकाऊ होतात. तसेंच ह्या विधीनें औषधाचा आकार व रंग ह्यांत सौकर्य आणि सौष्ठव साधतां येतें. गंधक आणि अग्निसंयोग ह्यामुळें हे कल्प पचन-शोषण-सुलभ व अधिक कार्यक्षम होतात.

"अल्पप्रमाणगंधकयोगोऽपि पोट्टलीगतपरमाणूनां संयोजकस्तदीयगुणोत्कर्षविधायकश्चेति बोध्यम्।"

(पण्डित हरिप्रपन्न)

आयुर्वेदीय औषधीपाठचिंतामणींत पोट्टली-कल्पाचे एकूण ३८ पाठ संग्रहित केले आहेत. हे ४४ रोगांवर चालतात. ह्यांपैकीं ८ प्रक्रिया-प्रतिमा येथें नमूद करीत आहे.

---

१) रसपोट्टली

(भा.भै.र.६०६९) (र.प्र.सु.-अ. ३)

पाठः—स शुकपिच्छसमोऽपि हि पारदो
भवति खल्वतलेन च कुट्टितः।
दृढतरामुपकल्पय पर्पटीं
वसनबद्धकृतामपि पोटलीम्॥
उपरि नागरसेन विलेपितां
रविकरेण सदा परिशोषिताम्।
कनकपत्ररसेन च सप्तधाऽ-
प्यवनिगर्ततले विनिवेशय॥
अवनिगर्तमरत्निकमायतं
द्विदशमङ्गुलमेव सुनिम्नकम्।
सिकतया परिपूर्य तदर्धकं
तदनु तत्र निवेशय पोटलीम्॥
उपरि वालुकया परिपूर्यत
च्छगणकैश्च पुटं परिदीयताम्।
द्विदशयाममथाग्निमहो कुरु
भवति तेन महारसपोटली॥
इति मया कथिता रसपोटली
बलकरा सुकरा सुखसिद्धिदा॥

नांव —— प्रधानद्रव्यसूचक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

द्रव्यसंग्रहः- पारा, गंधक

प्रक्रियाः- पारा व गंधकाची विधिवत् पर्पटी करावी. पर्पटीचें चूर्ण करून कपड्यांत बांधून पोट्टली तयार करावी व नागवेलीच्या पानाच्या रसांत बुडवून उन्हांत ठेवावी. रस सुकून गेला म्हणजे पोट्टली बुडे-पर्यंत पुन्हा रस घालावा. अशा ७ भावना द्याव्या. याप्रमाणेंच धोत्र्याच्या पाल्याच्या ७ भावना द्याव्या. पोट्टली सुकल्यावर सदर पोटली वाळत ठेवावी.

२० अंगुळें खोल व १२ अंगुळ लांब रुंद असा चौरस खळगा खणावा. खळगा अर्धा वाळूनें भरावा. त्यावर पोट्टली ठेवावी. व पोटलीवर वाळू भरून खळगा जमिनीसपाट करावा. त्यावर रान-शेणीचा अग्नि २० प्रहर द्यावा म्हणजे महारसपोट्टली तयार होते.

सिद्धिप्रमाणः— ३ तोळे

रोगः— अशक्तता

टीपः- १ रत्नी- अदमासे ६ इंच.

---

२) हेमगर्भपोट्टली

(भा. भ. र. ८६६४) (शा. धं. । खं.३- अ १२, र. प्र. सु. । अ. ८, वृ. नि. र., र. का. धे.)

पाठः- रसं च गन्धकं चैव समं खल्वे विमर्दयेत् ।
कज्जल्यां च तथा स्वर्णं संशुद्धं च विनिक्षिपेत् ॥
सुसूक्ष्मे सुदृढे वस्त्रे बध्द्वा पोटलिकां दृढाम् ।
गन्धकेनाऽऽयसे पात्रे पक्त्वा पोटालिकां चिरम् ॥
मन्दाग्निना पचेद्यावद् व्योमवर्णं भवेत्तु तत् ।
हेमगर्भ इति ख्यातो रसोऽयं श्वासकासनुत् ॥
अनुपानविभेदेन सर्वरोगाञ्जयत्यसौ ॥

पवित्र
नेपाली कस्तुरी रु. ४४ तोला,
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला,
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला,
लिहाः-नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाल

नांवः- प्रधानद्रव्यसूचक.

द्रव्यसंग्रहः- १पारा, १गंधक, १सुवर्ण. समभाग

प्रक्रियाः— (पुढें क्रमांक सहाप्रमाणें)

सिद्धिप्रमाणः- ३ तोळे

---

३) हिरण्यगर्भपोट्टली

[र.यो.सा.६३२] [यो.र.,र.चं.]

पाठः- शुद्धं सूतं चतुर्भागं द्विभागं गन्धकस्य च ।
भागमेकं सुवर्णं च त्रिभागं शुल्बभस्म च ॥
कुमारीरससंयुक्तं सप्ताहं मर्दयेत् दृढम् ।
गुटिकां कारयेत्तान्तु बध्नीयात्खरकर्पटे ॥
वस्त्रे किंचिद्बलिं दत्त्वा तत्र गोलं निधाय च ।
बध्नीयात्पोट्टलीं गाढां पश्चाद्वस्त्रेण वेष्टयेत् ॥
सर्वभागसमं गन्धं दत्त्वा मृण्मयभाजने ।
तन्मध्ये पोट्टलीं न्यस्य मुखे मुद्राञ्च कारयेत् ॥
विधाय छिद्रं मुद्रास्थं द्रावं दृष्ट्वा शलाकया ।
पाचयेत्सिकतायंत्रे रसोऽयं मृदुवह्निना ॥
यामार्द्धेन सुसञ्जातं स्वाङ्गशीतं समुद्धरेत् ।
कासे श्वासे क्षये वाते कफे ग्रहणिकागदे ॥
सर्वरोगेषु दातव्या हेमगर्भाख्यपोट्टली ॥

नांवः— प्रधानद्रव्यसूचक

द्रव्यसंग्रहः- ४ पारा, २ गंधक, १ सुवर्ण ३ ताम्रभस्म

भावनाः- कोरफडरस ७ दिवस

वस्त्रः— खरकर्पट

पात्रः— मातीचें

अग्निः-- मंदाग्नि, वालुकायंत्र.

प्रक्रियाः- कापडावर थोडासा गंधक पसरावा. त्यावर वरची गोळी ठेवावी. व पोट्टली घट्ट बांधावी. १० भाग गंधक घेऊन तो मातीचें परळांत गाळून परळ तापलेल्या वाळूवर ठेवावें. परळावर मध्यभागीं छिद्र असलेलें एक झांकण ठेवावें आणि मंदाग्नि द्यावा. अर्धा प्रहरानंतर वरच्या भोंकामधून सळई घालून पोट्टली तळलीं गेली आहे कीं नाहीं तें पहावें, व पोट्टली तयार झाली असल्यास परळ जमिनीवर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काढावें व स्वांगशीत होऊ द्यावें. नंतर त्यामधून मात्रा काढून घ्यावी.

सिद्धिप्रमाणः— १० तोळे

रोगः— कास, श्वास, क्षय, ग्रहणी, वातकफरोग.

---

४) हिरण्यगर्भपोट्टली

(र. यो. सा. ६३३) (यो. र., र. सा. सं., नि. र., वै. चि.)

पाठः— शुद्धं सूतं त्रिभागञ्च तत्समं शुल्बभस्म च ।
भागैकं गंधकं दद्यात्तदर्धं स्वर्णमेव च ॥
कज्जलीं कारयेत्तान्तु खल्वके सप्तवासरम् ।
अथ निर्गुण्डिकाद्रावैर्मर्दयेद्दिनसप्तकम् ॥
अथवा कनकद्रावैर्गुटिकां कारयेत्ततः ।
किञ्चिद्दलितमायुक्ते वस्त्रे गोलं निधाय च ॥
बध्नीयात्पोट्टलीं गाढामेवञ्च त्रिःपुटांश्चरेत् ।
दृढमृन्मयपात्रे तु गन्धं दत्त्वाऽधरोत्तरम् ॥
तन्मध्ये पोट्टलीं न्यस्य निर्वातभवनान्तरे ।
वितस्तिप्रमितं गर्तं तस्मिन्संस्थाप्य मुद्रयेत् ॥
वस्त्रैश्च मृत्तिकाभिश्च ज्वालयेदिन्धनानि च ।
यामेन सिद्धतां याति हेमगर्भाख्यपोट्टली ॥
अनुपानानुसारेण सर्वरोगेषु योजयेत् ॥

नांवः— प्रधानद्रव्यसूचक

द्रव्यसंग्रहः-३ पारा, ३ ताम्र, १ गंधक, -॥ सोनें.

खलः— ७ दिवस

भावनाः—निर्गुंडी किंवा धोतरा ७ दिवस.

प्रक्रियाः-एक फडकें घ्यावें. फडक्यावर थोडासा गंधक शिंपडावा. त्यामध्यें वरील कज्जली घालून घट्ट पोट्टली बांधावी. असें तीन वेळ करावें. बळकट मातीच्या परळांत खालीवर गंधक घालून ती पोट्टली ठेवावी. नंतर त्यावर दुसरें परळ घालून संधिलेप करावा. व संपुटास ७ मातकापडें करावीत. तीं सुकल्यावर निर्वात प्रदेशीं एक वीत लांब रुंद व खोल खळगा खणून त्यांत हें संपुट ठेवावें. खळगा बंद करावा. परळावर एक अंगुळ जाड मातीचा थर द्यावा व त्यावर एक प्रहर अग्नि द्यावा.

---

५) हेमगर्भपोट्टली

(भा. भै. र. ८६५६) (र. चं., रसें. सा. सं. धन्व., र. रा. सु.)

पाठः— रसभस्म त्रयो भागा भागैकं हेमभस्मकम् ।
मृतताम्रस्य भागैकं तोलैकं गन्धकस्य च ॥
मर्द्दयेच्चित्रकद्रावैर्द्दियामान्ते समुद्धरेत् ।
पूर्यां वराटिका तेन टङ्कणेन विलेपयेत् ॥
वराटीं पूरयेद्भाण्डे रुद्ध्वा गजपुटे पचेत् ।
विचूर्णयेत्स्वाङ्गशीते पोट्टलीं हेमगर्भिकाम् ॥
मृगाङ्कवच्चतुर्गुंजा भक्षणाद्राजयक्ष्मनुत् ॥

नांवः—प्रधानद्रव्यसूचक

द्रव्यसंग्रहः— ३ रससिंदूर, १ सुवर्ण, १ ताम्रभस्म, गंधक.

भावनाः— चित्रक १ प्रहर.

प्रक्रियाः- कवड्यांत भरणें, टंकणानें मुद्रा देणें. संपुटांत कवड्या घालून गजपुट देणें.

रोगः— क्षय मात्राः-- ४ गुंजा

अनुपानः— मृगांकाप्रमाणें.

---

६) हिरण्यगर्भपोट्टली

(र. यो. सा. ६३९) (रसायन सं.)

पाठः— चंद्रोदयं रसं श्वेतं रसकर्पूरसंज्ञकम् ।
नागवङ्गौ मृतौ प्रत्यकर्षं कर्षं प्रदापयेत् ॥
सूक्ष्मं खल्वे विमर्द्याथ दशांशं हेम दापयेत् ।
स्वर्णाद्दशांशकं शुद्धं मल्लभस्म प्रदापयेत् ॥
अर्कदुग्धैस्ततखल्वे मर्दनीयमहर्द्वयम् ।
सूर्यातपे खरे शोष्यं पिष्टिं कुर्यान्मृदुं बुधः ॥
पट्टखल्वे दृढां बध्वा गुटिका पट्टतन्तुना ।
गुटिकाषड्गुणं गन्धं चूर्णयेल्लोहपात्रके ॥
तत्पात्रं वेशयेच्चुल्ल्यां निर्धूमाग्निं प्रदापयेत् ।
गन्धके गुटिकां पक्त्वा लोहदर्व्या च चालयेत् ॥
यामैकं पाचयेन्मन्दं गुटिकां तत उद्धरेत् ॥
स्वांगशीतां छुरिकया गुटिस्थं वस्त्रमुद्धरेत् ॥
चन्द्रकांतर्भवेत्स्वच्छो हेमगर्भो रसोत्तमः ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्वासे कासे महावाते ज्वरे सर्वगदेषु च ॥
मधुना शृंगवेराद्भिर्वीक्ष्य रोगबलाबलम् ।
दन्तबन्धे तथा शूले गुल्मेऽमुं हेमगर्भकम् ॥

द्रव्यसंग्रहः- १ तो. रससिंदूर, १ तो. रसकापूर, १तो. नागभस्म, १तो. वंगभस्म, १/१० सुवर्णभस्म, १/१०० सोमलभस्म

भावनाः- रुईंचा चीक. भावना तप्तखलांत २ दिवस वाळविणें. मात्रा फडक्यांत दोऱ्यानें बांधावी. ६ पट गंधक घ्यावा.

प्रक्रियाः- लोखंडाच्या कढईत ६ पट गंधक घ्यावा. मंद व निर्धूम अग्नीवर पातळ करावा. नंतर त्यांत पोट्टल्या सोडाव्यात. लोखंडाच्या काडीनें त्या हलवाव्यात. १ प्रहर मंद विस्तवावर पचन चालू ठेवावें. नंतर त्या बाहेर काढाव्यात. थंड झाल्यावर सुरीनें त्या मात्रावरील वस्त्र खरडून काढावें. आंतील मात्रा चंद्राप्रमाणें पांढरी स्वच्छ तयार होते.

सिद्धिप्रमाणः— ४॥० तोळे

रोगः- श्वास, कास, महावात, ज्वर, दंतबंध (दांतखिळी बसणें), शूल, गुल्म.

मात्राः— १ गुंज अनुपानः— मध व आलें.

———

७) हिरण्यगर्भपोट्टली

[र. यो. सा. ६३४] [रसायनसार]

पाठः- स्वर्णस्य भस्मनो भागाश्चत्वारः पारदस्य च ।
अष्टौ गन्धस्य ताम्रस्य वङ्गस्यैकैकभागकः ॥
कपर्दी शङ्खयोर्भस्म भागौ द्वौ द्वौ च टङ्कणात् ।
शुद्धाच्चैकश्च मुक्तानां भागास्वर्णसमा मताः ॥
पञ्चकोलश्रुतेनैव सर्वे तद्भावयेत्त्रिधा ।
शिखरारम्भिका कार्या पोट्टली घर्मशोषिता ॥
वस्त्रबद्धा बलिस्था सा पाचनीयाऽल्पवह्निना ।
वटिकाद्वितयं शीतां पोट्टलीं मंजूदर्शनाम् ॥
ग्रहण्यां क्षयरोगे चाऽतिसारे ज्वरकासयोः ।
बाले वृद्धेऽतिमन्दाग्नौ द्वित्रिगुंजां प्रयोजयेत् ॥

नांवः- प्रधानद्रव्यसूचक

द्रव्यसंग्रहः- ४ सुवर्ण, ४ रससिंदूर, ८ गंधक, १ ताम्र, १ वंग, २ कपर्दिक, २ शंख, १ टंकण, ४ मोती.

भावनाः- पंचकोलकषाय ३ भावना

प्रक्रियाः- खल झाल्यानंतर शिखराकार मात्रा तयार करावी व उन्हांत सुकवावी. नंतर ती फडक्यांत बांधून गंधकांत मंद विस्तवावर २ घटका शिजवावी.

सिद्धिप्रमाणः- २७ तोळे.

रोगः- ग्रहणी, क्षय, अतिसार, ज्वर, कास, अग्निमांद्य.

मात्राः- ३ गुंजा.

———

८) रेतोरोधन पोट्टली

(र. यो. सा. १९४) (सि. भे. म.)

पाठः- आकल्लजातीफलजातिकैला
कस्तूरिका कुङ्कुमहिङ्गुलानाम् ।
पटे पट्टः पोट्टलिकां प्रणीय
निक्षिप्य दुग्धे विपचेद्बुधस्त्या ॥
ज्ञात्वाऽर्धशेषं ससितं पयस्त-
न्निष्कास्य तां पोट्टलिकां पिबेद्यः ।
भवन्ति भोगाय न तस्य शक्ताः
प्रचण्डकामाः शतशोऽपि रामाः ॥

नांवः- कार्यबोधक

द्रव्यसंग्रहः- १ अकलकारा, १ जायफळ, १ जायपत्री, १ वेलची, १ कस्तुरी, १ केशर, १ हिंगूळ.

प्रक्रियाः- एकत्र खल करून पातळ मलमलीसारख्या कापडामध्यें पुरचुंडी बांधावी. ती पुरचुंडी दुधांत शिजवावी. व अर्धे दूध शिल्लक राहिल्यावर पोट्टला काढून घ्यावी व दूध प्यावें.

रागः— शुक्रक्षीणता

मात्राः— चूर्ण घेण्याचें प्रमाण प्रत्येकीं ४ गुंजा ते १ मासा.

———

आजकालचे तरुण

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपली तरुण मंडळी आळशी आणि सुस्त बनलेली दिसतात. — डॉ. राधाकृष्णन्

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रमाच्या पाठीशीं आम्हीं आहोंत

(लेखकः—वैद्य दत्तात्रेयशास्त्री जळूकर, अध्यक्ष, म. प्रां. वैद्य मंडळ, नशिराबाद)

गेल्या १९|२० डिसेंबरला मुंबईस आयुर्वेद-विद्वत् परिषद् झाली. शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम प्रत्यक्षांत आणण्याच्या दृष्टीनें त्या परिषदेंत पुष्कळच ऊहापोह झाला. पाठ्यक्रमासाठीं ग्रंथ, ग्रंथांश व ज्ञेयांश सुचविण्यांत आले. अध्यापनाच्या व अध्ययनाच्या अधिकारी गुरु-शिष्यांच्या राजमान्यतेसाठीं पात्रता निश्चित करण्याच्या दृष्टीनेंहि विचार-प्रदर्शन झालें. आतां ह्या सर्वहि गोष्टींविषयीं सरकारनियुक्त शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीची शिफारस व तिच्यावर सरकारी शिक्कामोर्तब होऊन ह्या पाठ्यक्रमाचा स्वीकार करणारी व अध्यापन करणारीं विद्यालयें कोठें व कधीं सुरू होतात आणि कोणकोणत्या राजमान्य गुरुंकडे अध्यापनाची सोय होऊं शकते, यासंबंधीं प्रसिद्ध होणाऱ्या माहितीकडे पुष्कळांचे डोळे लागले आहेत; उत्सुकता वाढत आहे.

बुद्धिभेद व शाब्दिक युद्ध

नेमकें याचवेळीं "ह्या अभ्यासक्रम यशस्वी होणें शक्य नाहीं" "ही आयुर्वेदाची प्रगति नसून परागति (पीछेहाट) आहे" इ. प्रकारचा बुद्धिभेद निर्माण करण्याचेंहि कार्य शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रमाची भूमिका मान्य नसणाऱ्या पक्षाकडून केलें जात आहे. त्यांच्या ह्या बुद्धिभेदवृत्तीवर चिडून शुद्ध आयुर्वेद पक्षीयांचेंहि कांहीं लिखाण प्रसिध्द होत आहे. परंतु अशा ह्या शाब्दिक युध्दांतून कांहीं श्रेयनिष्पत्ति होण्याची आशा दोन्हीहि पक्षांस धरतां येणार नाहीं. उलटपक्षीं अंतःकरणाची कटुता मात्र उभयपक्षीं वाढण्याचीच शक्यता अधिक आहे.

भारतीय स्वातंत्र्य व शुद्ध आयुर्वेद

पाश्चात्य वैद्यक व आयुर्वेद हीं दोन्ही शास्त्रें एकाच वेळीं विद्यार्थ्यांस शिकवलीं जात असल्यानें होणारे दुष्परिणाम आयुर्वेदाच्या दृष्टीनें उपेक्षणीय नाहींत, हा अनुभव अनेक वर्षें घेतल्यानंतरच शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रमाविषयक चळवळ सुरू झाली, व तिला नुकतेंच सरकारमान्यता मिळून यश आलें आहे. तथापि ज्याप्रमाणें स्वराज्य मिळवण्यासाठीं राष्ट्रीय चळवळ झाली, इंग्रज भारत सोडून गेले, व आमच्या स्वाधीन भारताचा कारभार आला म्हणून लागलीच आम्हांस संपूर्ण स्वराज्याचीं सर्व सुखें अनुभवास आलीं असें होत नाहीं, तशीच स्थिति आज मिळालेल्या शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रमास मिळालेल्या राजमान्यतेचीहि आहे. स्वराज्य मिळण्यापूर्वी इंग्रज "अजून हिंदुस्थानची प्रजा हिंदुस्थानचें राज्य सांभाळण्यास पात्र नाहीं, ती पात्र झाली कीं आम्ही राज्य भारतीयांचें स्वाधीन करून आमच्या देशांत परत जाऊं" असें म्हणत असत. तेंच त्यांचें म्हणणें जवळजवळ वैद्यकशास्त्रापुरतें अजून आमच्या देशांत अवशिष्ट आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

मोठ्या लोकांतील साशंकता

"भारताच्या आरोग्यरक्षणाच्या सर्वहि गरजा संपूर्णतया भागविण्यास आजचा वैद्यवर्ग समर्थ आहे काय ?" असा प्रश्न मुंबई सरकारचे भूतपूर्व प्रधानमंत्री श्री. बाळासाहेब खेर यांनीं चेंबूर संमेलनांत विचारला होता, हें आठवल्यास शुद्ध आयुर्वेदाच्या समर्थतेबद्दल मोठमोठ्या लोकांतहि किती साशंकता आहे हें दिसून येतें. सुदैवानें या प्रश्नास सक्रिय उत्तर देण्याची वेळ आतां आली आहे. शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रमाचें अध्ययन-अध्यापन, व प्राचीन गुरुपरंपरा पद्धतीचे साह्यानें आम्ही किती लौकर अथवा उशिरा ह्या प्रश्नास सक्रिय उत्तर देऊं शकतों, त्यावरच शुद्ध-आयुर्वेदीय पाठ्यक्रमविरोधी लोकांच्या विरोधाचें आयुष्य अवलंबून आहे.

शुद्ध आयुर्वेदास आमचा पाठिंबा आहे

यासाठीं आजवर आम्ही धारण केलेली उदासीनता, आळस व संकोचवृत्ति सोडून पुढें आलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाहिजे. 'मला काय त्याचें' या वृत्तीचीं कटुफळें आजवर खूप भोगलीं व अजूनहि निष्क्रिय राहूं तर ही आलेली संधीहि हातची गमावून पश्चात्तापाची पाळी येईल व विरोधी पक्षाचें हसें आवरणार नाहीं. ही आपत्ति टाळण्याकरितां:—

१ शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रमास आपला पाठिंबा आहे हें कृतीनें दाखवून दिलें पाहिजे; म्हणजेच या पाठ्यक्रमाचा पुरस्कार करणाऱ्या, त्यासाठीं झटणाऱ्या, प्रांतीय वैद्यमंडळ संस्थांची संघटना त्या संस्थेची सदस्यसंख्या वाढवून केली पाहिजे.

२ स्वतः सदस्य व्हावे व जे अजून झाले नसतील त्या वैद्यबंधूंस सदस्य करावे.

३ आपल्या गांवीं अथवा आसपास असलेल्या शुद्ध आयुर्वेदीय प्रथितयश व विद्वान् वैद्यांचीं नांवें व पत्ते प्रांतीय मंडळाकडे कळवावेत.

४ धनिक वर्गानें व्यक्तिशः वा संघशः आपल्या गांवीं वा मध्यवर्ती ठिकाणीं शुद्ध आयुर्वेदीय विद्यालय, औषधालय, रुग्णालय, औषधिनिर्माणशाला स्थापन करण्याच्या शक्यतेबद्दल विचार व प्रयत्न करावेत.

५ अशा संस्था सुरू करणें शक्य असेल त्यांनीं त्या संस्थांची रूपरेषा, कार्यपद्धति व कार्यसाफल्य या दृष्टीनें सर्व प्रकारची माहिती प्रां. मंडळाकडून घ्यावी.

बंद पडलेलीं आयुर्वेद विद्यालयें

६ पूर्वीचीं जीं शुद्ध आयुर्वेद विद्यालयें मध्यंतरीच्या कायद्यामुळें बंद झालीं तीं पुन्हां सुरू करण्याबद्दल त्या त्या संस्थांच्या त्या वेळच्या संचालक मंडळींनीं आतां प्रयत्न करावा.

७ सध्यां जीं मिश्र शिक्षणाचीं विद्यालयें चालू आहेत, त्यापैकीं ज्यांना नवीन ४॥ वर्षांचा (इंटर सायन्सनंतर) दीर्घकालीन शिक्षणक्रम आर्थिकदृष्ट्या झेपत नसेल, अशा विद्यालयांनीं सुद्धां हा शिक्षणक्रम आपल्या विद्यालयांतून सुरू करणें शक्य होईल काय तें पहावें.

सारांश ज्या ज्या मार्गानें शक्य होईल त्या त्या मार्गाचा अवलंब करून "शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम आम्हांस संमत आहे, तो सर्व दृष्टीनें हितावह होईल अशी आमची श्रद्धा आहे, व म्हणून आम्ही त्या पाठ्यक्रमाचे पाठीशीं आहोत, तो यशस्वी करण्यासाठीं तनमनधनानें आम्ही झटणार आहोत" ही गोष्ट आम्हीं कृतीनें सिद्ध केली पाहिजे. त्यासाठीं आपण प्रांतीय मंडळांत बहुसंख्येनें समाविष्ट व्हावें आणि आपली ही संस्था बलिष्ठ करावी हीच विनंति आहे.

धर्मार्थ दंतयज्ञ, बेळगांव

दिनांक ३-१-५४ पासून बेळगांव येथील श्रीमारुती मंदिरांत वैद्य पां. वि. जायदे यांच्या नेतृत्वाखालीं धर्मार्थ दंतयज्ञ झाला. सदर दंतयज्ञाचें उद्‌घाटन श्री. कात्रे डि. जज् यांच्या हस्तें झालें. १५०० वर रोग्यांना मोफत उपचार करण्यांत आले.

ग्रंथप्रकाशनसमारंभ

सदर दंतयज्ञांत दि. ३।१।५४ रोजीं डॉ. बाक्रे-सदस्य 'बोर्ड ऑफ इंडियन् सि. ऑफ् मेडिसिन' यांच्या अध्यक्षतेखालीं वैद्य जायदे यांनीं लिहिलेल्या 'दंतरोग विज्ञान आणि चिकित्सा' या ग्रंथांचा प्रकाशन समारंभ झाला.

मेडिकल् असोसिएशनची दंतयज्ञास भेट

दिनांक ८।१।५४ रोजीं स्थानिक मेडिकल् असोसिएशनच्या डॉक्टर मंडळींनीं दंतयज्ञास भेट देऊन प्रात्यक्षिकें पाहून समाधान व्यक्त केलें. या कार्यक्रमास मोठमोठे सर्जन व डेंटिस्टस् उपस्थित होते.

सत्कार समारंभ

दिनांक १०।१।५४ रोजीं डॉ. खानोलकर [सिव्हिल सर्जन] यांच्या अध्यक्षतेखालीं वैद्यमंडळ, विद्यापीठ व सेवादल या संस्थातर्फे वैद्य जायदे यांचा सत्कार झाला. त्यावेळीं डॉ. खानोलकरांनीं वैद्य जायदे यांच्या 'दंतरोगविज्ञान आणि चिकित्सा' या ग्रंथाची मुक्तकंठानें प्रशंसा केली व तो अत्यंत शास्त्रीय व अनुभवपूर्ण असल्याचें सांगितलें.

दिनांक १०।१।५४ रोजीं रात्रीं डि. कॉं. कमिटीतर्फे वैद्य जायदे यांचा सत्कार करण्यांत आला व त्यांना अल्पोपहार देण्यांत आला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घशाच्या कॅन्सरवर गोदुग्धाहार व भजनपूजन

(गोदुग्ध-गोमूत्राच्या असामान्य उपयुक्ततेमुळें मानवी आरोग्याच्या दृष्टीनें गाईची महति अनेकवार सिद्ध झालेली आहे. केवळ गोदुग्धाहाराच्या योगानें बडोदें येथील मिस्त्री शिवलाल यादवजी या गृहस्थाचा कॅन्सर कसा बरा झाला, यासंबंधीं दि. १।११।५३ च्या 'सकाळ' मध्यें प्रसिद्ध झालेल्या राजरत्न वा. वि. जोशी यांच्या लेखांतील उतारा आणि त्यांत उल्लेख केलेले कॅन्सर-रुग्णाईत श्री. शिवलाल जादवजी मिस्त्री यांचें स्वदस्तुरचें पत्र येथें दिलें आहे.

—संपादक)

राजरत्न वा. वि. जोशी यांचा लेख

गाईच्या दुधानें कॅन्सर बरा होणें शक्य आहे कीं नाहीं याबाबत एक अनुभव देत आहे. मी बडोद्यास वकिली करीत असतां १९४९ सालीं कॅन्सरबद्दल आमचें कांहीं बोलणें चाललें होतें. तें आमच्या एका पक्षकारानें ऐकलें. त्याचें नांव मिस्त्री शिवलाल जादवजी. यानें सांगितली स्वतःची हकीकत अशीः— त्याचा गळा एकाएकीं दुखू लागला व इतका सुजला कीं पाण्याचा थेंबहि जाईना. त्याचे मुलगे त्याला मुंबईला घेऊन गेले, टाटा कॅन्सर हॉस्पिटलमध्यें त्याची परीक्षा करण्यांत आली व कॅन्सर असल्याबद्दलचें निदान करण्यांत आलें. कॅन्सरचा रोगी पूर्ण बरा होत नाहीं, असें तेथें त्याला वाटलें, व तो परत बडोद्यास आला. आपण कांहीं औषधोपचार करणार नाहीं असें त्यानें सर्वांना निक्षून सांगितलें.

स्थानिक वैद्याचा सल्ला, गोदुग्धाहार

त्याच्यासमोर एक वैद्य रहात होते. त्यांचे सल्ल्यावरून त्यानें गोदुग्धाहारावर रहाण्याचें ठरविलें. तिसऱ्या मजल्यावर एकटें पडून राहणें, नुसतें गाईचें दूध घेणें आणि सबंध दिवस भजनपूजनांत घालविणें असे त्यानें सहा महिने घालविले. त्याच्या गळ्यांतील सूज आणि दुखावा नाहींसा झाला. आणि त्याची तब्येतहि पुष्कळ सुधारली. हाच कार्यक्रम त्यानें पुन्हां सहा महिने आचरणांत आणला. डॉक्टरांकडून परीक्षा करून घेतली आणि कॅन्सरचा मागमूसहि शिल्लक राहिलेला नाहीं असें वैद्यकीय तपासणींत निश्चित झालें. त्यानंतर त्यानें आपला आहार साधा ठेवला. तो इसम पूर्वीप्रमाणें कामधंदा करूं लागला. बडोद्यांतील नामांकित होमिओपाथिक डॉ. भट्टाचार्य यांना या बाबतींत विचारलें, तेव्हां त्यांचें म्हणणें पडलें कीं होमिओ औषधांच्या चिकित्सेनुसार गाईच्या दुधानें कॅन्सर बरा होणें शक्य आहे."

श्री. शिवलाल जादवजी मिस्त्री यांचें पत्र

"पांच वर्षांपूर्वी मला ताप येऊन घसा सुजला. पाणीसुद्धां घशांतून उतरेना. डॉक्टरांनीं पेनिसिलिनचीं इन्जेक्शनें दिलीं. त्यानें थोडा आराम वाटला; पण घशांतील दुःख कायमच राहिलें. त्यानन्तर मी दुधावर राहण्याचा निश्चय केला. खाणें एकदम बन्द करून दुग्धाहार सुरू केला. साखर न घालतां गरम केलेलें दूध दिवसांमध्यें जितकें पचेल तितकें घेऊं लागलों. प्रारंभीं मलावरोधाची थोडीशी तक्रार वाटली. ती त्रिफळा-चूर्णानें दूर झाली. ५ शेरपर्यंत दूध रोज घेई. या प्रमाणें ६ महिने राहिलों. यायोगें घशाचें दुःख नाहींसें झालें.

सर्वांकडून विचारणा होत आहे

यासंबंधीं मला पुष्कळांकडून विचारणा होते. त्या सर्वांना मी दुग्धाहाराचा उपाय सांगतो. विलायती औषधांनीं कॅन्सर रोग मिटत नाहीं. थोडा आराम वाटतो; पण पुन्हां रोग जोर करतो. दुग्धाहार आणि ईश्वरस्मरणाच्या योगानें असाध्य रोगहि नाहींसे होतात अशी माझी श्रद्धा आहे."

मागील संदर्भ

(आयुर्वेद पत्रिकेच्या १ डिसेंबरच्या अंकांत याच रुग्णासंबंधींचा वैद्य मानेकर, धुळे यांचा पत्रव्यवहार पूर्वी प्रसिद्ध झाला आहे —संपादक)

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार—

प्रकाशमान तृणाचे ५ प्रकार

ता. १३-११-५३ रोजीं मध्यप्रांतांत (मंडला जिल्हा) दोन प्रकारचें स्वयंप्रकाशित तृण प्राप्त झालें. ता. २०-१२-५३ रोजीं महाराष्ट्रांत (रत्नागिरी जिल्हा) तीन प्रकारचें प्रकाशमान तृण मिळालें. आतांपर्यंत एकूण पांच प्रकारचें प्रकाशित तृण उपलब्ध झालें आहे. ह्या पांच प्रकारांमध्यें कांहीं जमिनीवर सरपटणारे तर कांहीं उंच उंच वाढणारें आहे. कांहींच्या मुळ्यांचे शेंडे प्रकाशतात, तर कांहींचे मूळ न चमकतां जमिनीवरील काष्ठ प्रकाशित दिसतें. हा जरी फरक असला तरी त्यांच्या प्रकाशाचे वर्णांत पुष्कळच साम्य आहे.

अस्सल तृणज्योतिष्मति

खास कसोटीला उतरलेल्या तृणज्योतिष्मतीचें मूळ दुधांत वाटलें असतां दुधाचा वर्ण लाल होतो. व जमिनीचे वरील भाग प्रकाशित दिसतात. तृणज्योतिष्मतीच्या प्रकाशाचा वर्ण व वरील इतर प्रकाशमान तृणांच्या प्रकाशाचा वर्ण ह्यांत बरेंच साम्य आहे.

—वै. बा. वि. नलावडे, सांगवी

आरोग्यावर ६ टक्के खर्च

मुंबई सरकार आपल्या एकूण उत्पन्नापैकीं ६ टक्के उत्पन्न सार्वजनिक आरोग्यविषयक उपाययोजनासाठीं खर्च करीत आहे, असें आरोग्यमंत्री श्री. शान्तिलाल शहा यांनीं राजपिपला येथें अेका प्रसूतिगृहाचें उद्घाटन करतांना सांगितलें.

मुंबअी सरकारनें हातीं घेतलेल्या विविध प्रकारच्या आरोग्यविषयक उपाययोजनांचा थोडक्यांत आढावा घेऊन त्यांनीं मलेरियाप्रतिबंधक योजना, क्षयरोगप्रतिबंधक योजना आणि कॉलराप्रतिबंधक उपाययोजना यांचा उल्लेख केला. डी.डी.टी. फवारण्याची योजना हितावह ठरली आहे असेंहि ते म्हणाले.

मुंबअी राज्यांत अेकूण २३,००० रजिस्टर्ड वैद्यक व्यवसायी [वैद्य, डॉक्टर, हकीम मिळून] आहेत अशी माहिती त्यांनीं दिली.

उंदिरांचा उपद्रव

उंदिरांचा उपद्रव टाळण्यासाठीं सुमारें छटाक मोरचूद (विषारी औषधें विकणारे दुकानदाराकडे २ ते ३ आण्यास छटाक ह्या भावानें मिळतो) ५ ते ६ शेर पाण्यांत घालून विरघळूं द्यावा, अगर काळजीपूर्वक बारीक करावा व पाण्यांत टाकावा. त्या पाण्यांत माती कालवून तिनें घरांतील सर्व बिळें लिंपून पुन्हां वर साध्या मातीचा थर द्यावा. बिळें लिंपण्यापूर्वी तेंच पाणी बिळांतहि शिंपडावें. असें केल्यानें त्या ठिकाणीं पुन्हा उंदीर येत नाहींत असा अनुभव आहे.

याच प्रयोगाचा शेतांतील उंदिरावर उपयोग करतां आला तर पहावा. घुशींवर मात्र याचा परिणाम झालेला नाहीं. हें मोरचुदाचें काम करीत असतां लहान मुलांना दूर ठेवावें. कारण हा पदार्थ विषारी आहे. या प्रयोगानें तीन वर्षांत उंदरांचा त्रास (प्रयोग केलेल्या बिऱ्हाडांत) झालेला नाहीं.

१४३ बुधवार, पुणें २ कृ. शा. कुलकर्णी

पांढरें कोड

हजारोंचें गेले व त्यांनीं अभिप्राय दिलेलें आणि अनेक बक्षिसें मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु.

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो. असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन' मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

वाकेरी भाते

अत्यंत खात्रीचें व ताजे मिळते. १ पौंड २ रु. ट. ख. निराळा.

श्रीपाद फार्मसी, पो. पेण (कुलाबा)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय सूक्ष्मौषधींचा उपयोग

(लेखकः— श्री. वि. वि. काळे, पुणें)

सूक्ष्मौषधींच्या उपयोगासंबंधीं आयुर्वेदरत्न सुंदरराव वैद्य यांनीं जी माहिती दिली आहे ती उद्बोधक तर आहेच, पण त्यांची पद्धति यशस्वी ठरल्यास आयुर्वेदीय चिकित्सेंत मोठी क्रांति झाल्याखेरीज राहणार नाहीं; कारण हल्लीं रोगांपेक्षां तो बरा करण्यास लागणाऱ्या खर्चानेंच लोक अधिक बेजार झाले आहेत. व साध्या रोगांपेक्षां मिश्र दोषांनीं उद्भवलेले रोगच अधिक असल्यामुळें वनौषधींच्या मिश्र गोळ्या तयार करण्याची श्री. वैद्य यांची कल्पना योग्य आहे.

३५ वर्षांपूर्वींचा प्रयोग

असाच परन्तु थोडा निराळ्या प्रकारचा सूक्ष्मौषधींचा प्रयोग ३५ वर्षांपूर्वी पंढरपुरास कै. डॉ. गोगटे यांनीं करून पाहिला होता. व तो चांगलाच यशस्वी ठरला. डॉ. गोगटे हे साताऱ्याचे कै. दादासाहेब करंदीकर यांचे मेहुणे. त्यांच्याबरोबर ते विलायतेलाहि गेले होते. तेथें आयुर्वेदीय औषधें फुकट देऊन शेंकडों रोग्यांस त्यांनीं रोगमुक्त केलें होतें. तिकडे परवान्याशिवाय वैद्यकी करितां येत नसल्यामुळें औषधें विनामूल्य द्यावीं लागत.

कै. डॉ. गोगटे यांचा अनुभव

त्यांनीं 'बायोकेमिक' च्या म्हणजे बारा क्षारांच्या धर्तीवर आयुर्वेदांतील गोळ्या, मात्रा, रसायनें वगैरे १६ औषधें तयार केलीं होतीं. पैकीं तापावरील त्रिभुवनकीर्ति हें औषध पंढरपुरांत ते सर्वांस विनामूल्य देत. त्याचा चांगला उपयोग होतो असें पाहूनच मग त्यांनीं आणखी १९ औषधें तयार केलीं. प्रवाही औषध मात्र त्यांनीं बनविलें नव्हतें.

एकास नऊ भाग अनौषधिक द्रव्य

होमिओपाथीच्याच तत्त्वानुसार पण डेसिमल पद्धतीनें म्हणजे एकास नऊ भाग अनौषधिक द्रव्य वापरून डॉ. शूस्लर यांनीं बायोकेमिक औषधें बनविलीं. पण त्यांचे बारा क्षार घनरूपांत असल्यामुळें अनौषधिक द्रव्यहि त्याच स्वरूपाचें योजावें लागलें. ते दुग्धशर्करा या कामीं वापरीत. दळलेला शुभ्र साखऱ्याहि वापरला तरी चालतो. या औषधांची शक्ति × या चिन्हानें दर्शवितात.

आयुर्वेदीय औषधें कशीं बनविलीं ?

हीच कल्पना घेऊन डॉ. गोगटे यांनीं आपली आयुर्वेदीय औषधें बनविलीं होतीं. 'तापावरील औषध आपण विनामूल्य कसें देऊं शकतां ?' असा प्रश्न विचारला असतां त्यांनीं पुढीलप्रमाणें हिशेब सांगितला-
" १ गुंज त्रिभुवनकीर्ति किंमत १ पै, यांत १० तो. मोरस साखर ६ पै (जुना भाव) किंमतीचा मिसळून चांगला एकजीव होईतो म्हणजे २-३ तास दगडी खलांत घोटल्यानंतर ३× शक्तीचें ९६१ गुंजा औषध तयार होतें. घोटण्याचें काम मीच करितो. यांतून १ गुंज औषध घेऊन १० तोळे साखरेबरोबर खल केला म्हणजे ६× चें तितकेंच औषध तयार होतें. शेकडा ९९ रोग्यांस या शक्तीचीं औषधें उपयोगी पडतात. माझकडे रोज तापाचे असे रोगी दहापेक्षां अधिक येत नाहींत. त्या सर्वांना १३ पैच्या खर्चांत मी २ महिनेपर्यंत सहज औषध देऊं शकतो. फुकट औषध देऊन वर्षाचा खर्च फक्त ६॥ आणे येतो ! "

अनुभव घेऊन पहावा

या पद्धतीनें निरनिराळ्या शक्तींची नित्योपयोगी आयुर्वेदीय औषधें तयार करून त्यांचा अनुभव घेऊन पाहावा. औषधाचें प्रमाण सूक्ष्म केल्यामुळें त्याच्या गुणांत फरक पडत नाहीं. किंबहुना त्यांचे कण विरळ झाल्यामुळें तें रक्तांत त्वरित शोषलें जातें. या सिद्धांतावर बारा क्षार औषधांची पद्धति बसविली आहे. तिचा अवलंब वैद्यवर्गानें करून पाहण्यासारखा खचित आहे.

—केसरी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूक्ष्म औषधें मिळण्याची व्यवस्था

(वरील लेखांतील सूचनेप्रमाणें सूक्ष्म औषधें कोणास हवी असतील तर आयुर्वेद सेवा संघ तीं आनंदानें तयार करून पुरवील. प्रत्येक वैद्याला खाजगी व्यवसायांत सुद्धां कांहीं रोग्यांना मोफत औषधें द्यावीं लागतातच. व त्यामुळें त्याचा व्यवसाय वाढण्यास मदतच होते. अशा वेळीं कमी खर्चाचीं हीं औषधें वापरून अनुभव मिळवितां येईल व तो पैसे देऊ शकणाऱ्या रोग्यांचें बाबतींत पुढें उपयोगांत आणतां येईल. स्वतः खल केला तर उत्तमच आहे. तथापि लहान खलापेक्षां मोठ्या खलांत खल चांगला होण्याची शक्यता आहे म्हणून ही सूचना केली आहे.
— व्यवस्थापक)

औषध देऊन न देऊन सारखेंच !

१९५० सालीं ब्रिटिश मेडिकल रिसर्च कौंसिलनें सर्दीवरच्या एका रामबाण औषधाबाबत एक प्रयोग केला. या औषधाचें नांव 'नेथोत्रामिन'. सर्दी झालेल्या १५५० पेशंटावर हा प्रयोग करण्यांत आला. यांतील निम्म्या लोकांना या औषधाच्या गोळ्या दिल्या आणि निम्म्या रोग्यांना त्यांत कसलेंच औषध नसलेल्या साध्या तशाच दिसणाऱ्या गोळ्या दिल्या. अर्थात् रोग्यांची मात्र एकाच प्रकारचें औषध सर्वांना दिलें असल्याची समजूत करून देण्यांत आली होती. दुसऱ्या दिवशीं या सर्व रोग्यांची तपासणी केली तेव्हां असें आढळलें कीं, खरोखरचें औषध घेतलेल्या लोकांपैकीं १३·४ टक्के लोक पूर्ण बरे झाले, व ६८·१ टक्के लोकांची सर्दी बरीच कमी झालेली होती.

आणि औषध नसलेल्या साध्या गोळ्या ज्या रोग्यांना दिल्या होत्या त्यांचें काय झालें? त्यांच्यापैकीं १३·९ टक्के रोगी पूर्ण बरे झाले होते, आणि ६४·७ रोग्यांची सर्दी पुष्कळ कमी झाली होती !

[हा कांहीं नवीन प्रयोग नाहीं. चरकसंहितेंत यासंबंधीं चर्चा आली आहे. औषधें घेतलेले व न घेतलेले असे दोनहि प्रकारचे रोगी वाचतात व मरतात मग औषधाचा उपयोग काय ? (भेषजं अभेषजेन अविशिष्टम् । असा प्रश्न तेथें विचारला आहे. व त्याचें उत्तरहि दिलें आहे. —संपादक]

नेत्रोपचार पथकाचा कार्यक्रम

मुंबई सरकारचे दक्षिण विभागांतील फिरतें नेत्रोपचार पथक फेब्रुवारी महिन्यांत रत्नागिरी जिल्ह्याच्या मध्य भागांत दौरा करणार आहे. राजापूर ता. ९; रायपाटण ता. १०; जैतापूर ता. ११; खारे पाटण ता. १२; देवगड ता. १३; कणकवली ता. १५.

राजापूर येथील सरकारी दवाखान्यांत ता. १६ ते २५ फेब्रुवारीपर्यंत नेत्रोपचार शिबिर चालविण्यांत येइल व त्यावेळीं तेथें पहिल्या दिवशीं शस्त्रक्रियेसाठीं रोग्यांना प्रवेश देण्यांत येईल. मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया ता. १८ रोजीं आणि इतर नेत्ररोगांच्या शस्त्रक्रिया ता. १९ रोजीं करण्यांत येतील.

नेत्ररोग्यांना चष्मे घ्यावयास सांगणें, औषधोपचाराबद्दल सल्ला देणें आणि गरीब रोग्यांना मोफत औषधें देणें अित्यादि गोष्टींचा नेत्रतपासणींत समावेश होतो. सरकारी वैद्यकीय संस्थांकडून ज्यांना मोफत सल्ला मिळतो अशांनाहि मोफत औषधें पुरविलीं जातात व अितरांना ठराविक फी आकारली जाते.

सुधारून वाढविलेली नवीन आवृत्ति,
वैद्य, विद्यार्थी व सामान्य लोक यांस अत्यंत उपयोगी. सुलभ रीतीनें रोगांची माहिती व उपचार सांगणारें पुस्तक.
किं. ६ रु. **सिद्धौषधि प्रकाश** पो. ख. नि.
(लेखक:-वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी)
पुस्तक मिळण्याचीं ठिकाणें:- (१) श्री. द. वा. शेंड्ये २८ शुक्रवार, पुणें २ (२) आयुर्वेदीय औषधी भांडार, २५५ गिरगांव, मुंबई ४ (३) वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्री. वैद्यराज डेग्वेकर यांचें अभिनंदन

(लेखकः— आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे, पुणें)

पां. ह. देशपांडे

मुंबईस नुकत्याच भरलेल्या आयुर्वेद विद्वत्परिषदेचे अध्यक्ष श्री. वैद्यराज पं. भि. वि. डेग्वेकर यांचें अध्यक्षीय भाषण विद्वत्ताप्रचुर, नवविचारपरिप्लुत व आयुर्वेदाभिमानानें भरलेलें झालें. म्हणून मी त्यांचें प्रकट अभिनंदन करीत आहे.

मलाच अभिनंदनाचें कारण

मलाच अभिनंदनाचें काय कारण हें पूर्वेतिहास माहित नसलेल्यांसाठीं सांगणें अवश्य आहे. १९२७ सालचे डिसेंबरांत दारव्हा येथें भरलेल्या वऱ्हाडप्रांतीय वैद्यसंमेलनाचे अध्यक्षीय भाषणावर प्रथम मींच 'आयुर्वेद' मासिकांत टीका केली होती. त्याला त्यांचें उत्तर व त्यावरचें माझें प्रत्युत्तर ओघानेंच झाल्यानें एकमेकांचा एकमेकांना चांगलाच परिचय झाला, तरी तो विरोधाचाच. पण आजच्या या भाषणानें विरोधी भावना कमी होण्याचा संभव दिसूं लागला, म्हणून मींच श्री. डेग्वेकरजींचें अभिनंदन करणें कर्तव्य ठरतें.

अभिनंदनीय प्रकटीकरण

वायुपित्तकफ या दोषत्रयींला प्रत्यक्ष द्रव्यें म्हणावीं कीं न म्हणावीं हा एक दोषांबद्दलचा वादाचा मुद्दा होता. श्री. डेग्वेकरजींचें मत, वातादि दोष हीं कोणत्याहि अवस्थेंत, समावस्थेंतहि, प्रत्यक्ष द्रव्यें आहेत असेंच होतें; निदान मी तरी तसें धरून चाललो होतो. कदाचित् ती माझी गैरसमजूतहि असेल. ती आज नाहींशी झाली हेंहि बरें झालें, आणि श्री. डेग्वेकरजींच्या मतांत परिवर्तन झालें असेल तर तें खास खास अभिनंदनीय आहे.

पनवेलपासून पाटण्यापर्यंत

पनवेलीस १९३३ सालीं झालेल्या त्रिदोषचर्चा-परिषदेंत "त्रिदोषाः नाम प्रत्यक्षादिप्रमाणसिद्धानि प्रत्यक्षद्रव्याणि" प. त्रि प. इतिवृत्त पृ. १९७) असा जो प्रस्ताव संमत झाला त्याचा प्रस्तावक म्हणून श्री. पं. डेग्वेकरजींनींच पुरस्कार केला होता. बनारसच्या पंचमहाभूत-त्रिदोषपरिषेंदत हाच प्रस्ताव निराळ्या भाषेंत मांडला गेला. [(वातपित्तयोरवस्था-भेदेन स्थूलत्वं (चतुरिन्द्रियग्राह्यत्वं), वायोस्तु पित्त-कफापेक्षया सूक्ष्मत्वं (चतुरिन्द्रियाग्राह्यत्वं) (तस्मिन्नेव "त्रिदोषचर्चा-परिषदे संजातो विचार" इत्यस्मि-न्विषये पृ. २७)] त्यालाहि श्री. वै. डेग्वेकर यांनीं पाठिंबा दिला होता. पाटण्यास २४-१२-५० पासून चाललेल्या चर्चापरिषदेंतहि त्यांनीं जवळ-जवळ तेंच मत मांडलें. वायु तर Co2 असेंच त्यांचें पूर्वीपासून मत * आहे.

पाटण्यापासून पुढें परिवर्तन

तथापि तेथून त्यांच्या मनांत परिवर्तन घडून येऊं लागलेलें दिसतें. त्या परिषदेंतील चर्चेंत त्यांनीं द्विविध मत प्रदर्शित केलें आहे. प्रत्यक्ष बोलतांना, व शेवटीं निघालेल्या डॉ. बानर्जी वगैरेंच्या सहीच्या जोडीनें आपलीहि सही करतांना, चर्चेंतील भाषणांत थोडी संदिग्धता वाटली. त्यांत ते म्हणतात, "ये दोष स्थूलरूपेण शरीरके अंदर स्राव (secretion)के रूपमें आते हैं। परंतु इनमें भी कफ और पित्त ही स्राव के रूपमें आते है। वात सदा सूक्ष्म होनेसे अव्यक्त कहा गया है। वातके स्थूल रूपको भी हम आंखोंसे नहीं देख सकते। इसीलिये वातको 'अव्यक्तो व्यक्तकर्मा च' कहा गया है। अतः

* पहा— श्री. वै. भा. वि. गोखलेकृत "आयुर्वेदीय शारीरक्रियाविज्ञान" (प्रस्तावना)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वायूका ज्ञान वायूके अदृश्य होनेसे उसके कर्मद्वाराही होता है। यावर वैद्य यादवजींनीं अपरिणामी (वैकृत) वायूचें हें स्वरूप आहे असें म्हटलें, त्यावर पुन्हां ते स्पष्ट म्हणतात, "उक्त सूत्रमें 'अपरिणामी' शब्द आया हुवा है, जिसका अर्थ 'सहजसिद्ध' होता है।

इससें यह प्रतीत होता है कि यद्यपि यहाँ वायूका आत्मरूप विकृत वायूके लिए वर्णित है, तथापि प्रकृत अवस्थामें ये ही गुण प्रकृत रूपमें रहते हैं जो बढकर विकृत रूप धारण कर लेते है।" (सचित्र आयुर्वेद पृ. ६७१) "इन सब वर्णनोंसे यह स्पष्ट होता कि आमाशय और पक्वाशयके बीचमें निकलनेवाला पाचकस्रावही पित्त है।" (सदर पृ. ६७६)

अपानवायु व प्राणवायु

"... डॉ. बानर्जीने श्री. डेग्वेकरजीके इस वचनका की अपानवायु Carbon dioxide है, यह कहते हुअे खण्डन किया...।" (सदर पृ. ७३९) "श्री. डॉ. बलीराम येरकुण्ठवारजीने भी डेग्वेकरजीके इस कथनका की अपानवायु Carbon dioxide है खण्डन किया।" (सदर सदर) "...प्राणवायुमें ऑक्सिजनकी मात्रा अधिक होती है और नाकद्वारा निकाले हुअे वायुमें (अपान वायुमें) कार्बन डायऑक्साइड की मात्रा अधिक होती है।" "इसपर डॉ. बानर्जीने कहा कि प्राणवायुका जो गुणधर्म शास्त्रोंमें वर्णित है उसको देखकर ऑक्सिजनको ही प्राणवायु मान लेना युक्तिसंगत नहीं होता।" (सदर सदर).

विचार घोटाळ्याचे वाटतात

यांत श्री. डेग्वेकरजींचे विचार घोटाळ्याचे वाटतात. केव्हां दोष (व त्यांचे प्रकार*) दृश्य तर केव्हां अदृश्य, असें ते म्हणतात. विशेषें कफ व पित्तांना स्राव (Secretions) तर वाताला कधीं C_{o2} तर कधीं Oxygen असें ते म्हणतात.

पण पाटणा परिषदेनें नेमलेल्या उपसमितींत डॉ. डी. एन्. बानर्जी व पं. रामरक्ष पाठक यांचेबरोबर श्री. पं. भि. वि. डेग्वेकर असून त्यांनीं तयार केलेल्या पत्रकांत (ड्राफ्ट रिपोर्ट) पुढील ठराव आहेत.

"वायु शरीरका वह द्रव्य है जिससे शरीरके अन्दर गति, प्राप्ति, संज्ञा तथा उत्साहका कर्म संपन्न होता है। (वा—गतिगन्धनयोः।) क्योंकि शरीरकी सभी प्रकारकी चेष्टाएं (गतियाँ) तथा उत्साह आदि नाडीस्पन्दन (Nerve Impulse) के द्वारा संपन्न होती हैं। नाडीस्पन्दन (Nerve Impulse) स्वयं वायु नहीं है। अतः वायूको 'अव्यक्तो व्यक्तकर्मा च' ऐसा विशेषण दिया गया है। (सदर पृ. ७४२) "शरीरका प्रत्येक पदार्थ जो शरीरके अन्दर अग्निकर्म (पाक या रासायनिक परिवर्तन) को संपन्न करता है वह पित्त है। रसे अग्नि (कायाग्नि) भी कहा गया है। शरीरके अन्दर विविध स्रावोंमें निकलनेवाला एन्झाइम तथा हारमोन (अन्तः स्राव) एवं रञ्जक पदार्थ पित्तके रूप है। (सदर पृ. ७४३) यांत Enzyme म्हणजे पाचक स्राव हें पित्त, व श्लेष्मधर आवरण (Mucous Membrane), उदकधर आवरण (Serous Membrane), व स्रावी ग्रन्थी (Secretion glands) यांतील स्राव म्हणजे कफ असें म्हटलें आहे. (पृ. ७४४) तरी यांत वायूला Co_2 म्हटलें नाहीं व पित्ताला एन्झाईम म्हटलें आहे.

पित्त हें शक्तिशाली तत्त्वयुक्त द्रव्य

पित्ताच्या सर्व प्रकारानंतर "सामान्यपित्त" या सदराखालीं '६' वें कलम म्हणून पत्रकांत एन्झाईमचें वर्णन देतांना "ये एञ्जाईम अतिसूक्ष्म मात्रामेंही अतिशक्तिशाली (Immense Potentiality) होते हैं। अतः इसे तीक्ष्ण कहा गया है। (सदर पृ. ७४४) असें म्हटलें आहे. यावरून पित्त हें केवळ स्थूल व दृश्य स्राव नसून शक्तिशाली तत्त्वयुक्त द्रव्य असें पत्रककारांना म्हणावयाचें आहे. शक्तिवादी म्हणून डागाळलेल्या पक्षानें फक्त याचें पुढें जाऊन कफादि तीनहि दोष अदृश्य व शक्तिशाली आहेत असें

---

* विस्तार-भीतीमुळें या प्रकारावरचें श्री. पं. डेग्वेकरजींचें निवेदन मी उद्धृत केलें नाहीं. जिज्ञासूंनीं सचित्र आयुर्वेद पृ. ६७७ ते ७१० पहावींत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हटलें आहे. श्री. पं. डेग्वेकर यांनीं वाताला सबंध व पित्ताला अर्धेमुर्धे तसेंच म्हटल्यानें निम्मे तरी ते शक्तिवादी पक्षाकडे झुकल्याचें स्पष्ट दिसतें.

प्रकृतीची वृद्धि म्हणजे विकृति

समावस्थेंत दोषांचें तर मुळीं प्रात्यक्षिकच होत नाहीं असें ते स्पष्टच म्हणतात. प्रकृतीची वृद्धि म्हणजेच विकृति व मग विकृतींत जसें स्थूल स्वरूप असतें तसेंच तें प्राकृतावस्थेंत असणार असें त्यांनीं म्हटलें आहे. म्हणजे शक्तिवादी पक्षाच्या मताप्रमाणें दोष हे अनुमानगम्य आहेत असेंच नाहीं कां ते म्हणत? हीहि अभिनंदनीय गोष्टआहे. शक्तिवादी म्हणून संबोधलेल्या पक्षाचें मताशीं हें मत किती जवळ येतें हें पुढील उताऱ्यावरून पाहण्यासारखें आहे. (१) सूक्ष्मद्रव्याश्रिता शक्तिः शक्तिनाम्ना ऽभिधीयते ।(शारीरं तत्वदर्शनम् २।५) (२)शक्तिः शक्तिस्वरूपं वा द्रव्यं सूक्ष्मं समाश्रितम्। स्थूलद्रव्ये व्यक्तरूपेऽविभक्तं न विभज्यते। (सदर ७). (३) दोषाः सूक्ष्माः शक्तिरूपाः शक्तियुक्ताश्च धातवः। मलाः शक्तिविहीनाश्च भूतार्थो ऽयं विनिश्चितः। (सदर १०।११) (४) न केवलं शक्तिरूपा सूक्ष्मद्रव्याश्रया मताः। न केवलं द्रव्यरूपाः शक्तिमन्तो भवन्त्यतः॥ न दोषाः पंचभूतानि अपि भूतविकारजाः। शक्त्युत्कर्षयुतं सुसूक्ष्मं दोषसंज्ञकम्॥ (शारीरं तत्वदर्शनम् १०।१८-१९)

दोष शक्तिशालीच नव्हेत का?

माझ्या समजुतीनें या विद्वत्परिषदेचें भाषणांत त्रिदोष विषयाला अवसर नसावा. निदान गुरूची पात्रता दाखविण्याचें निमित्तानें उदाहरणादाखल घेतलेल्या या विषयांतील, सबंध त्रिदोषवाद उकरून काढून केलेलें विवेचन, अस्थानीं व अप्रासंगिक वाटतें. त्यांतहि [गुरूकी पात्रता पृ. ३ (२)], "विद्यार्थ्यांचें शंकेला शारीरदृष्टीनें समाधानकारक उत्तर देणारा गुरू पात्र" असें म्हणतांना 'त्रिदोष अन्य शारीरद्रव्योंके समानही शारीर द्रव्य है इसका परिषद्द्वारा निश्चय हो जानेपर भी उन्हे अत्यंत शक्तिमान् द्रव्य कह कर शक्तिविशेषण प्रयोजित करनेका ढकोसला अभीभी है वैद्योंका कायम है' असें म्हणणें तर अप्रासंगिकतेचें नमुनेदार उदाहरण आहे.

दोषांचें निर्विवाद प्राधान्य

पण तें असो. शक्तिवादाचेंच दृष्टीनें पहावयाचें तर, आयुर्वेदांत सर्वत्र दोषांचें प्राधान्य निर्विवाद आहे. "वातपित्तश्लेष्माण एव देहसंभवहेतवः तैरेवाव्यापन्नैः शरीरमिदं धार्यते।" व "विसर्गादानविक्षेपैः सोमसूर्यानिला यथा। धारयन्ति जगद्देहं कफपित्तानिलास्तथा॥" या सूत्रांतून सुश्रुतानें तरी ही गोष्ट स्पष्टपणें सांगितली आहे. शरीराचें उत्पादन व जीवन (जीवमान) टिकविणें हीच शरीराचे दृष्टीनें अत्यंत महत्वाची गोष्ट, व ती जर वायुपित्तकफ हेच करीत असले तर तेच प्रधान व मग ओघानेंच ते अत्यंत शक्तिशाली, असें येतें. यांत अनायुर्वेदीय काय आहे? शक्तिवादी हेच या दृष्टीनें खरे आयुर्वेदीय. उलट सुश्रुताबाहेर जाऊन श्री. पं. डेग्वेकरजी मात्र धातू व मळ यांचेशीं दोष हे "समकक्षीय" आहेत असें आवर्जून म्हणतात. पण हें आयुर्वेदाला अप्रमाण आहे. ते स्वतः आजवर दोषांचेंच विवेचन करीत आले आहेत. धातु आणि मलांचें त्यांचें विवेचन त्या मानानें सागरांत बिंदुवतच आहे. यावरून त्यांनाहि दोषच प्रधान, अर्थात् शक्तिशाली वाटतात हें सिद्ध होत नाहीं काय?

आमावस्थेंत व वृद्धीच्या अवस्थेंत प्रत्यक्ष!

तथापि आमावस्थेंत व वृद्धि पावल्यावरच दोष दिसतात, हें त्यांचें मत मात्र मला अभिनंदनीय वाटतें. 'सत्कार्यवादाप्रमाणें जें वृद्धींत तेंच समानतेंत' हा प्रश्न विवाद्य असला तरी साम्यावस्थेंत दोष दृश्य नाहींत ही त्यांची आजची स्पष्टता मला फार महत्वाची वाटते, व त्यासाठींच मी त्यांचें मनापासून अभिनंदन करतो. कारण साम्यावस्थेंत तरी दोष अदृश्य आहेत ही आमची प्रथमपासूनची प्रतिज्ञाच आहे.

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धन्वतरी उत्सव, नाशिक—

प्रतिकूल परिस्थितींत आयुर्वेद कसा टिकला

नासिकशहर वैद्यमंडळातर्फे श्रीधन्वंतरी उत्सव साजरा करण्यांत आला त्यावेळीं पहिलें व्याख्यान वै. वा. स. मराठे आयुर्वेदतीर्थ यांचें झालें. त्या व्याख्यानाचा सारांश असा:—

"कोणत्याहि शास्त्राची विचारसरणी त्रिकालाबाधित सिद्धांताच्या पायावर उभारलेली असावी लागते. ज्यांचा जीवनव्यापाराशीं सतत संबंध येतो अशा तऱ्हेच्या सूत्रांनीं बद्ध असा आयुर्वेद, इसवी सनापूर्वी (२००० वर्षांपूर्वी) रचला गेला. प्राण्यांचें स्वास्थ्य व रुग्णावस्था यांचा विचार करून स्वस्थांचें स्वास्थ्यरक्षण व रोगी लोकांची रोगापासून मुक्तता कशी करावी यासाठीं जें शास्त्र निर्माण झालें त्यालाच 'आयुर्वेद' असें म्हणतां येईल.

धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांची सिद्धि प्राप्त करून घ्यावयाची असेल तर त्यासाठीं व्यक्तीचें आरोग्य चांगलें असलें पाहिजे. राष्ट्राच्या घटकाचें आरोग्य चांगलें असलें तर व्यक्तीपासून होणारा समाज व अनेक समाज मिळून बनणारें राष्ट्र हें स्वसंरक्षणक्षम होऊं शकतें. म्हणून राष्ट्राची मानवी संपत्ति ही सदाचारी, राष्ट्राभिमानी असेल तर त्या राष्ट्राकडे आक्रमक राष्ट्रेंहि वाकड्या नजरेनीं पाहूं शकणार नाहींत.

सांगण्याचा अट्टाहास एवढाच कीं, अशा तऱ्हेच्या सर्व गोष्टींचा नुसता विचार आयुर्वेद शास्त्रांत सांगितला नसून त्याची अंमलबजावणी समाजावर कळत न कळत कधीं श्रद्धेनें तर कधीं अश्रद्धेनेंहि होत आहे म्हणून आपणांस आरोग्य लाभत आहे. आयुर्वेदाच्या विचारसरणीचा संस्कार अगदीं जीवनाच्या साध्या व्यवहारापासून तो उच्च व्यवहारांशीं निगडित असल्यामुळें त्याची व्याप्ति सर्वत्र आढळते. म्हणूनच आयुर्वेद शास्त्राची उत्पत्ति, स्थिति व त्यानंतर क्रमानें येणारी लयाची अवस्था ही जरी आजवर आली तरी तो नाहींसा होऊं शकला नाहीं. मात्र त्याची अलीकडील काळांत वाढ होऊं शकली नाहीं हें कबूल करावें लागेल. पण प्रतिकूल परिस्थितींतहि तो तग धरून राहिला आहे हें मात्र निश्चित !

कोणत्याहि शास्त्राच्या संवर्धनाला राजमान्यता लागते. संशोधन हें शास्त्राचें जीवन आहे. ज्या शास्त्राला संशोधन लाभत नाहीं तें शास्त्र मागें पडूं लागतें, परंतु त्या शास्त्राची विचारसरणी हीच जर जीवनाच्या तत्वाशीं निगडित असेल तर तें शास्त्र सर्वस्वी नाहींसें होत नाहीं; योग्य संधि येतांच त्याची वाढ होऊं शकते. तशीच स्थिति आयुर्वेद शास्त्राची झाल्यामुळें व पाश्चात्य वैद्यकाच्या राजमान्यतेमुळें जनतेची जी मनोभूमिका बनली गेली, त्यामुळें आयुर्वेदाची गेलीं १००।१५० वर्षे उपेक्षा झाली.

तथापि आपण या गोष्टीनें नाउमेद होतां कामा नये. आयुर्वेदशास्त्र हें स्वतःच्या तत्वप्रणालीनेंच जगूं शकणारें आहे. आपण त्याचे उपासक म्हणून त्याची योग्य जोपासना करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत व योग्य संधीचा उपयोग करून त्याचें संशोधन करीत राहिलें पाहिजे. एका काळीं भारताचें राष्ट्रीय वैद्यक म्हणून परिपूर्ण असलेल्या शास्त्रास तें अपूर्ण आहे असें म्हणणें हास्यापद होईल. त्यावेळच्या परिस्थितींत धरून तो व्यवहार तें वैद्यक करीत असें हें त्या काळच्या वेगवेगळ्या उदाहरणावरून आढळून येईल.

हल्लीचेंहि जें प्रत्यक्षवादावर उभारलेलें पाश्चात्य वैद्यक हें तरी पूर्णतेला पोंचलें आहे काय ? त्यांत नित्य नवीन शोध होत आहेत. व नवीन संशोधक मागील संशोधकांना कांहीं कळलें नाहीं असें म्हणत आहेत. एकूण शास्त्राचीं जीं महान् तत्त्वें मानवाच्या बुद्धीप्रमाणें त्यास जितपत आकलन होत आहेत त्या मानानें त्या शास्त्राची प्रगति होत आहे. अनुकूल परिस्थितींत आयुर्वेदाचीहि अशीच वाढ संशोधनानें होऊ शकेल."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हें ह्या तात्त्विक मार्गदर्शन !

लेखकः—आयुर्वेदरत्न
सुंदरराव भास्करराव वैद्य, मुंबई २

आयुर्वेदपत्रिकेच्या दि. १६ डिसेंबर १९५३ च्या अंकांत 'तात्त्विक मार्गदर्शन हवें' या नांवाचा वै. न. पु. जोशी, आयुर्वेदतीर्थ यांचा अेक लेख आला आहे. त्यांत त्यांनीं 'जीमुळें गुण आला त्या पॅथीचा पुढें अनुभव कां घेतला नाहीं ?' असा प्रश्न केला आहे. मीं होमिओपथी न लिहितां अिलेक्ट्रो-होमिओपथी असें लिहिलें आहे. त्यांतील विद्युत्‌चा मला चांगला अनुभव आला नाहीं. अिलेक्ट्रो-होमिओपथीचें तत्व औषध सूक्ष्म करून देणें हें आहे. अिन्जेक्शनमध्यें औषध टोंचून सूक्ष्म रूपांत रक्तवाहिनींत घालतात व तें रक्तांत मिसळून सर्व शरिरांत जातें. तसेंच आयुर्वेदीय सूक्ष्मौषध पाण्याशीं मिश्र करून सूक्ष्म रूपानें दिलें असतां तें रक्तवाहिन्या शोषून घेतात व तें ताबडतोब शरीरभर पसरतें व लागू पडतें. माझा लेख नीट वाचला असतां तर तें तत्व त्यांस सांपडलें असतें.

जात पहावी लागत नाहीं

इलेक्ट्रो-होमिओपॅथींत ताप कोणत्या जातीचा हें पहात नाहींत. डेंग्यूताप, सततज्वर, जखमेचा ताप, आगंतुक ताप, अंतरित ज्वर, देवी आल्याचा ज्वर, गोंवराचा ताप, सन्निपात ह्या सर्वांवर एकच औषध 'फेब्रिफ्यूगो' हें. 'ज्वरो रोगपतिः पाप्मा' अथवा 'यं दोषमधिकं पश्येत्तस्यादौ प्रतिकारयेत्।' या न्यायानें पहिल्यानें औषध दिलें जातें. आयुर्वेदांत किंवा अॅलो-पॅथींत ज्वराचीं लक्षणें पहातात, व नंतर चिकित्सा करतात; तसें त्यांत करावें लागत नाहीं. अॅलोपॅथीचीं व आयुर्वेदीय औषधें पोटांत जातात व तेथें त्यांचे रस व रक्त बनून नंतर तें रक्तवाहिन्यांत जातें.

मेथीचे दाणे कां ?

वरील विवेचन वाचून वाचकांच्या ध्यानांत येअील कीं, तापाची जात पहावी लागत नाहीं. तापावर मजजवळ अितकीं औषधें लिहिलेलीं आहेतः- तुळस, डिकेमाली, तांदुळजा, नागरमोथा, भारंगमूळ, मेंदी, मेथी, मोहरी, इंद्रजव, कुड्याचें पान, ऊद, ओंवा, कडूनिंब, काकडी बिया, कापूर, कांडेकिरा-अित, गुळवेल, दारुहळद, नवसागर, माका, बिब्बा, रिंगणी, काळें मिरी, कोरफड, धमासा, धने, पपयी-चीक, शेवगा. ह्यांतील पाहिजे तें कोणत्याहि तापावर औषध द्यावें. खेड्यांत मेथीचे दाणे हाताशीं मिळाले म्हणून ते दिले. सूक्ष्म पद्धतीनें दिलें म्हणजे त्याचा गुण आलाच पाहिजे.

थोडें म्हणजे सूक्ष्म नव्हे

अेका डॉक्टरानें विचारलें कीं, क्विनिन सूक्ष्म करून दिलें असतां गुण येईल कीं नाहीं ? माझें म्हणणें ह्या पद्धतीनें येईल. श्री. जोशी म्हणतात, क्विनिन सूक्ष्म देऊन भागत नाहीं. ते थोड्या क्विनि-नला सूक्ष्म म्हणतात, परंतु सूक्ष्म म्हणजे 'ज्याचे कण विरळ झाल्यामुळें जें रक्तांत त्वरित शोषलें जातें तें.' एक वैद्य लिहितात, 'आम्ही आयुर्वेदांत सूक्ष्म औषधें देतो तीं मात्रा, रसायनें, भस्में वगैरे.' पण तें म्हणणें बरोबर नाहीं. तीं सूक्ष्म करून न देतां थोडीं देतात.

काळे मिरी कां ?

वै. अप्पाशास्त्री साठे लिहितातः— 'कसलाहि हट्टी हिंवताप बरा होतो. कसल्याहि हिंवतापावर वस्ताद मिऱ्याचा काढा.' म्हणून मी काळी मिरी देतो, व दुसऱ्यास देण्यास सांगतो. अेकानें लिहिलें आहे कीं, माझा हिंवताप मिऱ्याच्या सूक्ष्म औषधानें चार दिव-सांत गेला. जे उपयोग करतात त्यांस गुणाचा अनु-भव येत आहे. न वापरतां थोतांड म्हणणें हें सज्जनाचें काम नव्हे. कांहीं वाचक असे असतात कीं, ते लेख वाचून आपलें मत बनवितात व नन्तर त्याप्रमाणें लिहितात. मी स्पष्ट अनुभव दिले असतां त्यांत त्यांना तत्त्व कां सांपडलें नाहीं ? पण डोक्याला इतका शीण कोण देतो ? श्री. वि. वि. काळे लिहितातः— 'सूक्ष्मौषधींच्या उपयोगासंबंधीं केसरींत आयुर्वेदरत्न

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुंदरराव वैद्य यांनीं जी माहिती दिली आहे ती उद्बोधक तर आहेच, पण त्यांची पद्धति यशस्वी ठरल्यास आयुर्वेदीय चिकित्सेंत मोठी क्रांति झाल्या-खेरीज रहाणार नाहीं." त्यांना मात्र त्यांत तत्व सांपडलें.

सौ. कोल्हटकरांचा अनुभव

" सौ. सुशिलाबाई रामचन्द्र कोल्हटकर, विमा एजंट वे. अ‍ि. ला. इं. कंपनी मु. कर्जत ह्या लिहितातः- "आपला २०।१२।५३ च्या केसरींतील लेख वाचला. मी त्याप्रमाणें प्रत्यक्ष अनुभव घेऊन पाहिला. ऐका बाईस थंडीताप आज तीन आठवड्यापासून येत असल्याचें समजलें. त्यावर मी एका बाटलींत स्वच्छ गार पाणी भरून त्यांत मेथीचे सहा दाणे बारीक वाटून घालून खूप हलवून तिला रात्रभर चमचा चमचा घेण्यास सांगितलें. दुसरें दिवशीं ताप अजिबात नाहींसा झाला. पण हातापायांस मुंग्या येऊं लागल्या व हात-पाय गार गार लागूं लागले. तेव्हां मी चहांत सुंठ घेण्यास सांगितलें. त्यामुळें तिची प्रकृति आतां उत्तम झाली आहे.

सूक्ष्म औषधें उत्तम गुणकारी आहेत

दुसऱ्या अिसमास काळ्या मिऱ्याचे चार दाणे बारीक वाटून, गार पाण्यानें भरलेल्या बाटलींत घालून हलवून पिण्यास दिलें. त्यामुळें त्याचाहि ताप गेला. यावरून सूक्ष्म औषधें उत्तम गुणकारी आहेत याचा अनुभव आला."

द्विदल वनस्पतींपासून जंतुनाशकें

भारतांत निरनिराळ्या ठिकाणीं आढळून येणाऱ्या द्विदल जातीय वनस्पतींपासून मोठ्या प्रमाणांत जंतुनाशकें तयार करतां येतील असें हैदराबाद येथील उस्मानिया विद्यापीठांत कांहीं दिवसांपूर्वी करण्यांत आलेल्या रासायनिक संशोधनावरून दिसून येतें. जर्नल ऑफ सायंटिफिक ॲण्ड अिंडस्ट्रियल रीसर्चच्या जानेवारीच्या अंकांत या संशोधनाची माहिती दिलेली आहे.

चामड्यापासून सरस

रासायनिक पद्धतींनीं चामड्यापासून अधिक प्रमाणांत सरस काढतां येईल असें पुणें येथील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेंत केलेल्या संशोधनांत आढळून आलें आहे. सरस तयार करण्याच्या कामांत चामड्यांना चुना लावून ठेवणें (लॉइमिंग) ही महत्वाची गोष्ट आहे. या सरसाचे गुणधर्महि छायालेखनांत उपयोगी पडणाऱ्या सरसाच्या व्यापारी नमुन्यांच्या तोडीचे असतात.

भिषग्विलास (योगशास्त्र-विशेषांक)

अहमदनगर येथील भिषग्विलास मासिकाचा "योग विशेषांक" १ फेब्रुवारी रोजीं प्रसिद्ध न होतां १ मार्च रोजीं प्रसिद्ध होईल असें संपादक कळवितात.

नवीन मराठी वैद्यक मराठी मासिक

: महाराष्ट्र वैद्यक परिचय :

औषधें, इंजेक्शनें, रोगनिदान, रुग्ण-परीक्षा, नवीन शोध वगैरे पाश्चात्य वैद्यकांतील ज्ञान सोप्या मराठी भाषेंतून देणारें एकमेव मासिक " महाराष्ट्र वैद्यक परिचय " 'वैद्यकीय पेशांतील बहुमोल सहाय्यक' आजच वर्गणीदार व्हा! वार्षिक वर्गणी ५ रु. (किरकोळ अंकासाठीं आठ आण्याची तिकीटें पाठवावीत.

पत्ताः- संपादक, वैद्य ज. बा. मोकाशी-ठाणें

सेवा संघाचीं सर्व औषधें तसेंच खालीचीं सर्व देशी काष्ठौषधी व ताजी वनस्पती आणि शिलाजीत, कस्तुरी, केशर, भीमसेनी कापूर, गोरोचन, बाकेरी भाते, वंशलोचन, नागकेशर, अनंतमूळ, जितसाया, उत्तम महाबळेश्वरी मध वगैरे औषधें मिळण्याचें ठिकाणः—

देशी सर्वौषधी संग्रहालय

पोलिस चौकीसमोर, दादर मुंबई २८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हा रसायनखंड कोणता ?

लेखकः-वैद्य पं. निहालचंद मिश्र
ब्रह्मपुरी (चांदा)

ता. १६ डिसेंबरच्या आयुर्वेद पत्रिकेंत पान ४१४ वर " हस्तलिखितांतील एक उतारा " या मथळ्याखालीं भिषगरत्न ग. कृ. पाटणकर यांनीं ' नित्यनाथांचे रसायन- खंड यांचे पांच भाग आहेत, पैकीं रसरत्नाकर यांत रसखंड व रसेंद्रखंड हे दोन भाग छापले आहेत...वादी-खंड, रसायनखंड, मंत्र-खंड हे छापले नाहींत ' असें लिहिलें आहे.

मला वाटतें, श्री. पाटणकरांनीं " रसशाला औषधाश्रम गोंडल (काठीयावाड) येथें १९४० सालांतच " ऋद्धिखंडः वादिखंडः " या नांवांनीं राजवैद्य जीवराम कालीदासजी यांनीं गोंडल रसशाळेंत छापुन प्रसिद्ध केलेला ग्रंथ पाहिला नसावा!

पंचखंडात्मक ग्रंथ

श्रीपार्वतीपुत्र नित्यनाथसिद्धानें रसरत्नाकर नांवाचा पंचखंडात्मक एक ग्रंथ १२ व्या शताब्दींत लिहिला होता. (१ रसखंड, २ रसेंद्रखंड, ३ रसायन-खंड, ४ वादिखंड, ५ मंत्रखंड) या पांच खंडांपैकीं रसखंड आणि रसेंद्रखंड हे कलकत्यास व रसायनखंड मुंबईस (श्री. जादवजी त्रिकमजी आचार्य यांनीं संवत १९६९ मध्यें) प्रसिद्ध झाले आहेत. बाकी वादिखंड आणि मंत्रखंड अप्रकाशित होते, ते राजवैद्य जीवनराम कालिदासजीनीं 'ऋद्धिखंडः वादि-खंडः' या नांवांनीं एक ग्रंथांत प्रसिद्ध केले आहेत.

या ग्रंथांत रसोपरसांचें संशोधन, सत्ववेधः, द्रुती इ. क्रियेवर चांगला प्रकाश टाकला असून कृत्रिम क्रियेनें प्रवाळ, मौक्तिक, नीलम्, पुष्पराग, गोमेद, मरकत, पन्न, रत्नोपरत्नें इ. तयार करण्याची क्रिया सांगितली आहे. परंतु ८ व्या खंडाच्या अध्यायांत " मल्लिकार्जुनदेवस्य पुरतो गजसंनिभा ...... इ. हा श्लोक श्री. पाटणकरांनीं प्रसिद्ध केलेला कोठें तो दिसत नाहीं! हां! असले चमत्कार जर कोणाला वाचून अथवा अनुभव घेऊन पहावयाचे असतील तर " भारतीय रसायनशास्त्र " या नांवाचें छोटेसें हिंदी पुस्तक पं. विश्वेश्वर दयालुजी वैद्यराज बराळोकपूर, इटावा, यांनीं प्रसिद्ध केलें आहे. तें अवश्य पहावें. यांत बरेंच चमत्कारिक आणि मानवी जीवनास न उकल-णारें ' गूढ ' खेचरी-गुटिकादि प्रकार, तसेंच शैलो-दकांचे अनेकानेक चमत्कार प्रसिद्ध केले आहेत! जसें:-

रामेश्वरमें एक प्रसिद्ध कुंड है, उसका जल गर्म है , उसकी मिट्टी (माती) मधु, घृत के साथ खानेसे १६ वर्षके पुरुषके समान हो जाता है ! रामेश्वरमें एक पर्वत है, उसके दक्षिण तरफ तालके समान वृक्ष (ताडाचें झाडासारखा वृक्ष) है उसका रस पीनेसे अमर होता है। उस ताल वृक्षकी राख सहस्र वेधी है । उसी पर्वत के पास तादेवल तीर्थ है, उसके उत्तर दिशामें कुछ ऐसे वृक्ष है, जिनके फूल भ्रमर-सदृश होते (भुंग्यासारखें फूल) है. उन्हें पारस जाणों । उन फूलोंकी खीर ७ दीन खाई जाय तो हजार वर्षकी आयु हो । वहि फूल यदि गन्धोदकमें डालकर खाये जाय तो, खानेवालेके लारसे सोना बनता है। उन फुलोंको जस्ताके साथ गलानेसे सोना बनता है। उन्हीं फूलोंको पानीमें पीस बटका दूध (वडाचें दूध) मिला यदि जस्तापर लेप दिया जाय तो सोना बनता है। यह फूल अष्टधातूके वेधक है। परन्तु, ध्यान रहे कि फूल तोडते समय फूल-भ्रमर बनकर उड न जाय। ये भ्रमरवाले फूलोंका वृक्ष जहां है, वहांसे २० डोरीपर एक कुंड है, उस कुंडका जल दो पहर वेधी है। असे बरेच प्रयोग आहेत.

(२) आरोग्य-लवण

हेंहि श्री. पाटणकरांनीं याच पत्रिकेंत पा. ४१५ वर दिलें आहे. हा पाठ ' गदनिग्रहांत ' असून, चिकित्साप्रभाकर ग्रंथांतहि " उदररोग " प्रकरणांत आहे. परंतु हा पाठ असा आहे:—

कडुवृंदावनाचीं फळें ४० तो. भिषारीनिवडुं-गाची कांडी ८० तो. रिंगणी फळें १०० तो. कोर-फड ८० तो. रुईची पानें १०० तो. करंजाची पानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१०० तो. गुग्गुळ ६४ तो. लसूण २० तो. सैंधव २० तो. करंजाची साल २० तो. पादेलोण १२ तो. त्रिकटु प्रत्येकीं २० तो. कांचलवण (बांगडखार) ८ तो. मीठ ४० तो. बीडलवण ४ तो. बचनाग १६ तो. ओवा २० तो. अजमोदा २० तो हिंग ४ तो. जिरें, शहाजिरें ४।४ तो. मोहऱ्या १६ तो. चित्रक ३२ तो. हे सर्व चूर्णे करून त्यांत रुईचा चीक (दूध) ३२ तो. घालून चांगलें कालवून घ्यावें. (मिसळून घ्यावें.) तसेंच ३२ तो. सरसोचें तेल घालून त्यांत हें सर्व मिश्रचूर्ण कालवून एका मडक्यांत भरून मडक्यास मुखमुद्रा करून खळग्यांत रानगोंवऱ्या घालून त्यांत मडके ठेवून भट्टी लावून क्षार करावा. (बाकी सर्व ठीक आहे) परंतु मूळ पाठांत अजमोदा, ओवा २०।२० तोळे असतांना श्री. पाटणकरांनीं २।२ तोळेच कां घेतला ! याचप्रमाणें कोरफड ८० तोळे असून ८ तो, करंजसाल २० तोळे असतांना ८ तो. करंजपानें १०० तोळे असतांना ४०० पानें, त्रिकटु प्रत्येकीं २०।२० तोळे असतांना एकत्र २० तोळे, असा फरक कां केला आहे ! हें श्री. पाटणकरांनीं स्पष्ट केलें असतें तर बरें झालें असतें.

सर राधाकृष्णन् यांच्याशीं चर्चा

मुंबई येथें ता. १२ जानेवारी १९५४ रोजीं उपराष्ट्रपति सर सर्वपल्ली राधाकृष्णन् यांची श्री. कन्हैयालाल भेडा, श्री. वामनराव दीनानाथ व श्री. शिवशर्मा यांनीं भेट घेतली.

आपण पुनः मुंबईस याल त्यावेळीं वैद्यसमाजाला आपलें स्वागत करण्याची संधि द्यावी अशी विनंति श्री. शिवशर्माजी यांनीं श्री. राधाकृष्णन् यांना केली. ' आपण तशा अर्थाचें पत्र पाठवावें म्हणजे सवड काढण्याचा विचार करतां येईल ' असें श्री. राधाकृष्णन् म्हणाले.

संभाषणाच्या ओघांत राधाकृष्णन् म्हणाले:— ' मी प्रथमपासूनच आयुर्वेदाचा समर्थक आहे व आतां आपणाकडून मला आयुर्वेद महासंमेलनासंबंधीचें वाङ्मय मिळालें आहे. तें मी विशेष ध्यान देऊन वाचीन व त्यांतून ज्या सूचना मिळतील त्यांचा सहानुभूतिपूर्वक विचार करीन "

एक शिष्यवृत्ति

लंडन येथील भारतीय महिला शिक्षण संघानें १९५४-५५ सालासाठीं एक शिष्यवृत्ती देऊं केली असून, शारीरिक शिक्षणासुद्धां शिक्षण विषयाचा इंग्लंडमध्यें अभ्यास करण्यासाठीं हुशार भारतीय पदवीधर महिलेला (वय २९चे आंत) ती मिळूं शकेल. राहाण्याजेवणाच्या खर्चादाखल एक वर्षपर्यंत दरमहा २५ पौंड आणि जाण्यायेण्याच्या खर्चासाठीं १५० पौंडापर्यंत खर्च इतकी शिष्यवृत्ति ही आहे.

बोन डायजेस्टचें उत्पादन

खत म्हणून ज्यांच्या भुकटीचा उपयोग करतां येईल अशीं प्राण्यांचीं सुमारें ५ लक्ष हाडें प्रतिवर्षी भारतांत मिळूं शकतात. सध्यां मिळणाऱ्या हाडांचा खतासाठीं जास्तींत जास्त प्रमाणांत उपयोग करतां यावा म्हणून हाडांची भुकटी करण्यासाठीं, तसेंच त्याचे उपपदार्थ मिळविण्यासाठीं विकेंद्रित स्वरूपांत छोटे छोटे ग्रामोद्योग स्थापन करण्याचा भारत सरकारचा विचार आहे.

सिगारेट्सचा खप

भारतांत १९५२।५३ मध्यें खपलेल्या सिगरेट्सची किंमत जकातीसुद्धां अंदाज ३५.५ कोटी रु. होते.

' आयुर्वेदाच्या सेवेसाठीं तयार '

शास्त्रोक्त पद्धतीनें तयार झालेलीं सर्वप्रकारचीं सिद्धौषधें [गुटिका, मात्रा, रसायनें, आसवें वगैरे] व हिंवतापांवर अत्युत्तम ठरलेलें हिंवतापांतक, मिळण्याचें एकच ठिकाण.

सविस्तर माहितीकरितां लिहा:—

आयुर्वेदीय औषधी भांडार

२८ शुक्रवार, तुळशीबागेची पिछाडी, पुणें २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टक्कल – त्याचें कारण व उपचार

(ले.— कविराज प्रेमचंद शास्त्री)

सर्वसाधारण लोकांची अशी समजूत असते कीं, विशेष बौद्धिक काम केल्यानें माणसास टक्कल पडतें व टक्कल हें एक श्रीमंतीचें लक्षण आहे. (खल्वाटो निर्धनः क्वचित्). शास्त्रीय दृष्ट्या ही समजूत चुकीची आहे. स्त्रियाहि मोठमोठ्या क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीनें बौद्धिक कार्य करीत आहेत व त्या श्रीमंतींतहि वावरतात, परंतु आजतागाइत शंभरांत एक या प्रमाणांतहि स्त्रियांना टक्कल पडलेलें दिसत नाहीं.

शरीर-रचनाशास्त्राधारें पहातां स्त्रिया व पुरुष या दोघांच्याहि डोक्यास एकाच प्रकारें केस येतात, त्यांचें पोषणहि एकाच प्रकारें होतें; तर मग असें कोणतें कारण आहे कीं ज्यायोगें पुरुषांच्या डोक्याचे केस मात्र झडतात व स्त्रियांचे झडत नाहींत? -

खारट पदार्थांनें पित्तप्रकोप

चरकाचार्यांनीं याचें कारण लिहितांना असें प्रतिपादिलें आहे कीं, जे लोक डोक्याचे केसास नियमित तेल लावित नाहींत, अतितीक्ष्ण व अतिखारे पदार्थ नेहमीं खातात, (ज्यायोगें रोमरंध्रांत असणारें पित्त प्रकुपित होतें) तेव्हां त्यांचें शरीरांत उष्णता व रूक्षता हीं दोन्हीहि वाढत जातात, व ह्या उष्णतेमुळें व रूक्षतेमुळें रोमरंध्रांत असणारा स्निग्ध पदार्थ सुकत जातो. व त्यामुळें डोक्यावरील केस झडण्यास सुरवात होते. तदनंतर रक्तरहित कफहि दूषित होत जातो. असा हा प्रकुपित कफ रोमरंध्रांना रोखून टाकतो व त्यामुळें नवीन केस उगवूं शकत नाहींत.

स्त्रियांना टक्कल कां पडत नाहीं?

पुरुष व स्त्रिया यांना टक्कल पडण्याचे बाबतींत कारणमीमांसा करतांना आचार्य विदेह सांगतात कीं, स्त्रिया ह्या जात्याच सुकुमार असतात. त्यांच्या शरीरांत उत्पन्न होणारे दोष महिनाभर एकत्र जमतात. व ते मासिक धर्माच्या वेळीं(विटाळशीपणांत)स्वाभाविक रजःस्रावाबरोबर निघून जातात. अशा रीतीनें स्त्रियांचे बाबतींत नैसर्गिक रीत्या दोषपरिमार्जन होत असल्यानें त्यांच्या शरीरांतील स्रोतसांचा अवरोध होत नाहीं व स्रोतसांचा अवरोध न झाल्यानें रोमरंध्रांचाहि अवरोध होत नाहीं. आणि त्या कारणामुळें स्त्रियांचे केस झडत नाहींत.

पुरुषांचें चुकतें कोठें?

पुरुष स्नानाचे वेळीं डोक्यास साबण लावतात व त्यामुळें रोमरंध्रांतील नैसर्गिक स्निग्धपणा (जो केसांचे वाढीस पोषक असतो तो) – नष्ट होतो. त्याशिवाय केस ओले असतांनाच त्यांना तेल लावण्यांत येतें व त्यामुळें तेल रोमरंध्रांत भिनूं शकत नाहीं. स्त्रिया असें करीत नाहींत; त्या आधूनमधूनच डोक्यावरून न्हातात व न्हाल्यानंतर केस चांगले सुकल्यावर त्यांना तेल लावून विंचरतात. न्हातांना त्या केसास मुलतानी माती, रिठे अगर शिकेकाई लावतात; व ह्या कारणास्तव डोक्याचे केस झडण्यापासून (टक्लापासून) त्या अलिप्त असतात.

मोकळी हवा व सूर्यप्रकाश

प्रसिद्ध चिकित्सातज्ञ डॉ. ज्वार्ड टी. जॅक्सन यांचें असें म्हणणें आहे कीं, केसांचें खाद्य एक स्नेहमय पदार्थ आहे व जो पदार्थ केसांच्या मुळांना दृढ करतो, त्यांना मृदु व चकचकित राखतो व त्यांचें झडण्यापासून संरक्षण करतो. ह्या स्नेहमय पदार्थाचें रक्षण व जोपासना करण्याकरितां केस चांगले सुकवून त्यांना तेल लावीत जावें. तेल डोक्यास चांगलें चोळून तें केसांच्या मुळांपर्यंत भिनविलें पाहिजे. त्याचप्रमाणें केसांचें रक्षणार्थ मोकळी हवा व सूर्यप्रकाश ही अत्यंत आवश्यक आहेत. जे लोक डोक्यास पगडी, टोपी, हॅट वगैरे घालून डोकें नेहमीं झांकून ठेवितात, त्यांचें हें करणें केसवर्धनाचे दृष्टीनें हानिकारक आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजर्षि टंडनजींचा अनुभव

राजर्षि टंडन म्हणतात 'मी गेल्या ३५ वर्षांत डोक्यास साबण अगर सोडा लाविला नाहीं. मी अजूनहि माझें डोकें मुलतानी माती, दही, बोरीच्या पानांचा रस ह्यांनींच धुतो. आजहि माझे केस इतके मऊ व मजबूत आहेत कीं जसे मी विद्यार्थीदशेंत असतांना होते.'

टकलरोगास प्रतिबंध करण्याचा उपाय

केस हें सौंदर्याचें एक साधन आहे. केस झडण्याचें थांबविण्याकरितां आपण ज्यावेळीं स्नान करतो व केसांस तेल लावतो त्यावेळीं आपल्या अंतः-शक्तीचा उगम जें ब्रह्मचर्य त्याकडेहि लक्ष द्यावें. ब्रम्हचर्यामुळें आपली जीवनशक्ति बलशाली बनेल व बाह्य अनेक प्रतिकूल परिस्थितींशींहि ती झगडूं शकेल. ह्या जीवनशक्तीचा प्रभाव स्त्री-पुरुषावर सारखाच होतो.

केस कसे धुवावे ?

साबण व सोड्याचा उपयोग केस धुण्याकरितां शक्यतों करूं नये. त्रिफळा, दही, रिठा व डाळिंबाच्या अगर बोरीच्या पानांचा रस अगर काढा ह्यांचा उपयोग डोक्याचे केस धुण्याकरितां मधूनमधून करीत असावे.

केसांना काय लावावें ?

बाजारी सुगंधी तेलांचा उपयोग करूं नये. सरसूचें, एरंडीचें अगर तिळाचें तेल डोक्यास लावण्यास उत्तम आहे. आणि जर सुवासिक तेलच वापरावयाचें असेल तर आयुर्वेदाच्या शास्त्रीय पद्धतीनें मुद्दाम डोक्यास लावण्याकरितांच तयार केलेलें असेल तें वापरावें.

— स्वास्थ्यसंदेश, पाटना

टकलावर अनुभविक तेल

भल्लातक—भृंगराज तेल

१० तो. २ रु. – ट. ख. निराळा

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक

आयुर्वेद ग्रंथपाठन परिषद

वैद्यराज डेग्वेकरजी यांनीं जी चर्चा परिषद भरविण्याचा विचार मांडला आहे त्याला उपस्थित राहू इच्छिणाऱ्या लोकांनीं पत्र पाठवून आपली तशी मनीषा कळवावी. तसेच ही परिषद केव्हां घेणें योग्य होईल यासंबंधीं आपापला विचार कळवावा.

साधारणतः आज अध्यापन कार्यांत काम करित असलेल्या व्यक्तींच्या सोईनें ही वेळ ठरवावयाची तर ती एप्रिलच्या पहिल्या आठवड्यांत ठेवावी लागेल. नाशिकांस परिषद घेतल्यास ती मे मध्यें घेतली तरी हरकत नाहीं असें कांहींचें मत आहे.

शुध्द आयुर्वेदाचें अध्यापन कार्य करू इच्छिणाऱ्या वैद्य मंडळींनीं या चर्चेत अवश्य भाग घ्यावा. व या चर्चा परिषदेला प्रांत वगैरे देशिक बंधन नसावें. गुजरात, कर्नाटक आदि सर्व ठिकाणच्या लोकांना येथें प्रवेश असावा अशी वैद्यराज डेग्वेकर यांची मनीषा आहे. —मंत्री, आयुर्वेद सेवा संघ, नाशिक

उज्वल कीर्ति

आयुर्वेदीय औषधांची उज्वल कीर्ति बनविलेल्या सिद्ध औषधांच्या गुणावर आहे. औषधें गुण देणारीं असतील तर कीर्ति नेहमीं उज्वल राहील. तरी अशीं गुण देणारीं औषधें, अस्सल ताजी व स्वच्छ घटक औषधी द्रव्यें खरेदी करण्यावर अवलंबून आहे औषधी द्रव्यासाठीं आपण

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स

पायधुनी, मुंबई नं. ३

फोन नं. (३१८५८) यांचेकडे मागणी करा.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें

मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात.

अधिक माहितीसाठीं कॅटलाग मागवा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मिश्र वैद्यक बोर्डांची सभा व सुचविलेले ठराव

मिश्र वैद्यक बोर्डाची आगामी सभा २६-२-५४ रोजीं भरणार आहे असें कळतें. या सभेंत मांडण्यासाठीं बोर्डाच्या निवडून आलेल्या (वैद्य वेणीमाधव, हळशीकर, मुनी, प्रतापकुमार, वि. म. गोगटे व हकीम देवासिंग) या ६ सभासदांनीं पुढील ३ ठराव पाठविले आहेत.

(१) तीन वर्षांपेक्षां अधिक कालपर्यंत बोर्डाचे वर्तमान अध्यक्ष डॉ. योध यांच्या बरोबर काम केल्यानन्तर हें बोर्ड या खेदप्रद निर्णयाला आलें आहे कीं अध्यक्ष डॉ. योध यांच्यावर बोर्डाचा कोणत्याहि प्रकारचा विश्वास राहिलेला नाहीं.

(२) रजिस्टर्ड व एन्लिस्टेड वैद्यहकीमाकडून १९५४-५५ सालीं रिन्यूअल फी वसूल करू नये.

(३) हें बोर्ड मुंबई सरकारला अशी विनंति करते कीं सरकारनें डॉ. योध यांना आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याची विनंति करावी व त्या जागीं अध्यक्ष म्हणून १९३८ च्या कायद्यान्वयें रजिस्टर्ड असलेली व्यक्ति नेमावी.

मुंबई सरकार नियोजित शुद्धायुर्वेद समितीची दुसरी सभा ता. २९-१-५४ रोजीं मुंबई येथें वैद्य वामनरावजी यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती.

धान्य-सांठवणीसाठीं एरंडेल

गिरणीमध्यें एका घरच्या दळणानंतर दुसरें दळण ओतलें जातें. एका कुटुंबानें गहूं टिकाविण्यासाठीं त्यांत मिश्र केलेला पारा एकत्र जमून दळणांत प्रथम खालीं गेला व पूर्वीच्या दळणाच्या पिठांत मिसळला.

पारदयुक्त पिठाच्या पोळया खाल्यामुळें प्रथम घरच्या लोकांना पारदाचे विषारी परिणाम (मंदज्वर, अंगमर्द व दांत ढिले पडणें) बाधले. ते औषधोपचारानंतर दूर झाले. सबब तांदूळ गहूं हीं धान्यें टिकाविण्यासाठीं पारा न लावतां एरंडेल लावण्याचा प्रयोग अंमलांत आणावा, अशी सूचना श्रीमती लीलाबेन कामदार यांनीं केली आहे.

अनुक्रमणिका

३९ वें अ. भा. आयुर्वेद महासंमेलन	४८५
झांसी आयुर्वेद विद्यापीठ	४८६
अंजीरपाकाची कृति	४८६
आब्स्टेट्रिक ॲंड गायनॅकॉलॉजिकल सोसायटीचा ६ वा उजळणीवर्ग	४८७
दन्तरोगविज्ञान व चिकित्सा, अभिप्राय	४८८
माझे अनुभवसिद्ध प्रयोग	४८९
म. प्रां. वैद्यमंडळ १९५४ चे सभासद	४९०
आयुर्वेदीय ग्रंथ-पाठन पद्धति	४९१
पोट्टली कल्प- सहकारी औषधें	४९५
शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रमास पाठिंबा	४९९
घशाचा कॅन्सर व गोदुग्धाहार	५०१
प्रकाशमान तृणाचे ५ प्रकार	५०२
उन्दरांचा उपद्रव	,,
आयुर्वेदीय सूक्ष्मौषधींचा उपयोग	५०३
वैद्यराज डेग्वेकर यांचें अभिनन्दन	५०५
प्रतिकूल परिस्थितींत आयुर्वेद कसा टिकला	५०८
हें घ्या तात्विक मार्गदर्शन!	५०९
हा रसायनखंड कोणता ?	५११
टक्कल- त्याचें कारण व उपचार	५१३
आयुर्वेद ग्रंथ पाठन परिषद	५१४

बुद्धिजीवी लोकांसाठीं पौष्टिक आहार

अंजीर पाक

किंमत ६ रु. रत्तल

टपाल-खर्च निराळा

मिळण्याचे ठिकाणः—

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नस्य-धूमाचे प्रयोग सुरू आहेत

१९२३-२४ सालीं श्री. गोपाळराव बाईवारु आदि आयुर्वेद विद्यार्थी-नगर येथील आयुर्वेद विद्यालय संस्थेंत शिकत असतां वाग्भट सूत्रस्थानांतील नस्य-धूम आदि प्रयोग व्यवहारांत आणावयाचे, त्यासाठीं आयुर्वेदीय वनस्पति चूर्णाच्या विड्या, सिगारेट्स् करून त्या विक्रीस ठेवावयाच्या असें विचार बोलून दाखवीत असत.

नासिक हें गांव विड्या बनविण्याबाबत प्रख्यात आहे. आयुर्वेदांतील मृदु, मध्यम व तीक्ष्ण धूम द्रव्यापासून विड्या तयार करून त्यांचे वातज, वातकफज व कफज ऊर्ध्वजत्रुरोगावर प्रयोग करण्याचे आयुर्वेद सेवा संघानें ठरविलें आहे व त्याप्रमाणें विड्या तयार केल्या आहेत. प्रयोग करू इच्छिणाऱ्या वैद्यांनीं माहिती घ्यावी व मागणी करावी.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक

उपयुक्त वैद्यकीय ग्रंथ

अनुभविक औषधें	वै. यादवजी त्रिकमजी	४	रु.
अनुभविक चिकित्सा	एक वृद्धवैद्य (म. प्र.)	१	,,
निवडक रुग्णचिकित्सा	प्र. विंदुमाधव पंडित	४॥	,,
क्षयरोग चिकित्सा	,, ,, ,,	२॥	,,
उपयुक्त ॲलोपॉथिक औषधें	डॉ. प्र. शं. गुत्ते	१॥	,,
घरगुती औषधोपचार	वै. नारायणप्रसाद	-।-	,,
औषधी गुणधर्मशास्त्र भाग १ हिंदी	गुणेशास्त्री	१॥	,,
आयुर्वेदीय औषधी संशोधन हिंदी, मराठी		१	,,
रोगविज्ञान (जोड भाग)	डॉ. वि. म. भट	१२	,,
आयुर्वेदीय औषधी विज्ञान	वै. हिर्लेकरशास्त्री	२	,,
सिद्धौषधीप्रकाश	वै. गणेशशास्त्री जोशी	६	,,
संक्षिप्त दोषधातुमलविज्ञान	डॉ. पटवर्धन	३	,,
शारीरं तत्त्वदर्शनम्	वै. हिर्लेकरशास्त्री	६	,,
बृहदासवारिष्टसंग्रह पूर्वार्ध हिंदी	पं. द्विवेदी	३॥	,,
प्रसूतितंत्र	डॉ. वि. म. भट	७	,,
सार्थ सुश्रुत संहिता	वै. द. च. बोरकर	११	,,
स्टेथॉस्कोपने छातीची तपासणी	डॉ. वा. कृ. जोशी	६	,,
पांच वर्षांचा पाळणा	डॉ. शं. ह. मराठे	१॥	,,
फलाहार चिकित्सा	श्री. स. ना. जोशी	२	,,
वैद्यसन्मित्र (हिन्दी)	वै. पां. वि. जायदे	२	,,
वनस्पती प्रभाव	धन्वंतरी	२॥	,,
आरोग्यदीप	श्री. रा. ज. गोखले	-॥।	,,
आरोग्यमार्गप्रदीप	श्री. गो. म. चिपळूणकर	३	,,
आरोग्याचीं प्रश्नोत्तरें	वै. ना. ह. जोशी	।=	,,
बाळकडू बालसंगोपन	वै. लक्ष्मीबाई बोरवणकर	-।-	,,
खेड्यांतील दवाखाना	वै. रामभाऊ भोगे	-।=	,,
इन्फ्लूएन्झा	वै. पं. गुणेशास्त्री	१	,,
दण्डकज्वर	वै. पं. गुणेशास्त्री	-।	,,
नारुचा वैद्य	प्र. गो. मो. कालेंकर	-।=	,,
विषूचिका	वै. अ. वा. सहस्रबुद्धे	१	,,
वांती व अतिसार	वै. कडेगांवकर	-॥-	,,
यकृतरोग विशेषांक	सं. वै. जळूकरशास्त्री	१	,,
रोगनिदान भाग १,२,३	वै कडेगांवकर	२	,,
सिद्धमृत्युंजययोग हिंदी)	वै. केदारनाथ पाठक	१	,,

वैद्यक ग्रंथ भांडार, आयुर्वेद सेवा संघ, नाशिक

संपादक व प्रकाशक:— वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, मेनरोड, नाशिक
मुद्रक:— श्री. चि. ओक, वकील प्रेस, आग्रारोड, नाशिक
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ७ वें) नाशिक, ता. १६ फेब्रुवारी १९५४ (अंक १६ वा

महाबळेश्वर येथील मधु-विज्ञान केंद्र

आयुर्वेदीय विचारसरणीनुसार आहार-द्रव्यांत मधास विशेष महत्व आहे, तसेंच औषधीकरण व चिकित्सा-द्रव्य म्हणूनहि त्याचा विचार आलेला आहे. आयुर्वेदानें मध हें कफदोषाचें श्रेष्ठ औषध ठरविलें आहे. (तया तैलं घृतं मधु — वाग्भट सू. १)

सबब मुंबई सरकार व ग्रामोद्योग समिति यांच्या सहकार्यानें महाबळेश्वर येथें चाललेल्या मधु-संशोधन व प्रचार कार्यास वैद्यमंडळींनीं डोळसपणें मदत केली पाहिजे, मध आणि मधमाशासंबंधीं अधिकाधिक माहिती मिळविली पाहिजे व तिचा चिकित्सेंत उपयोग केला पाहिजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मध्यवर्ति आरोग्य मंडळाचे निर्णय

भारतांतील सर्व राज्यांचे आरोग्यमंत्री व भारताच्या आरोग्यमंत्री राजकुमारी अमृत कौर यांची बैठक राजकोट येथें ता. ८ ते १० फेब्रु अखेर भरली होती. त्यांत झालेले कांहीं निर्णय पुढीलप्रमाणें आहेत.

(१) सर्व भारतांतील परिचारिकांच्या पगारादि नोकरीविषयक अटींची पहाणी करण्यासाठीं एक समिति नेमण्यांत आली.

(२) महारोग नियंत्रण व एका राज्यांतून दुसऱ्या राज्यांत महारोग्यांची होणारी आवक-जावक या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं एक समिति नेमण्यांत आली.

शिक्षण, नोकरीच्या अटी, पगार इ. दृष्टीनीं परिचारिकेच्या व्यवसायाबाबत व महारोगनियंत्रणाबाबत बरीच चर्चा झाली. उपलब्ध असलेला मर्यादित पैसा लक्षांत घेतां डॉक्टर व परिचारिका यांचे पगार वाढविणें कितपत शक्य होईल याबद्दल मुंबईराज्याचे आरोग्यमंत्री श्री. शांतिलाल शहा यांनीं शंका प्रदर्शित केली.

परिचारिकांचा तुटवडा कमी व्हावा म्हणून शैक्षणिक पात्रता विशेषतः इंग्रजी भाषेचे बाबतींत कमी करावी व शिक्षण प्रादेशिक भाषेंत द्यावें, असें त्यांनीं सुचविलें.

आयुर्वेदाचा ५ वर्षांचा अभ्यासक्रम

आयुर्वेद वा युनानी या चिकित्सा पद्धतींचा प्रत्येकीं ५ वर्षांचा पदवी-शिक्षणक्रम देशभर सर्व राज्यांत चालू करावा. इंटर सायन्स झाल्यावरच हा शिक्षणक्रम घेता यावा. आयुर्वेदाकडे जाणाऱ्यास संस्कृत व युनानीकडे जाणाऱ्यास पर्शियनचें कामचलाऊ ज्ञान आवश्यक असावें असें ठरविण्यांत आलें आहे.

आयुर्वेद व युनानी वैद्यकाचे पदवीउत्तर (पोस्ट ग्रॅज्युएट) अभ्यासक्रम असावेत व आयुर्वेदीय संशोधनाचीहि व्यवस्था सरकारनें करावी अशी शिफारस केली आहे.

दंतवैद्य जायदे अमेरिकेस जाणार

हुबळीचे वैद्यराज पां. वि. जायदे यांनीं जें अवेदन दंतोत्पाटन कौशल्य हस्तगत केलें आहे तें पाहून ठिकाठिकाणचे डॉक्टर मुग्ध होत आहेत. नुकतांच बेळगांव येथें जो दंतयज्ञ झाला त्याला अनेक डॉक्टरमंडळींनीं भेटी दिल्या. तेथील काम पाहून त्यांनीं प्रशंसोद्गार काढले. इतकेंच नव्हे तर 'तुमच्या या कौशल्याचें चीज अमेरिकेंत होईल सबब तुम्ही अमेरिकेस जा' असा सल्ला त्या डॉक्टरमंडळींनीं त्यांना दिला आहे.

आजवर मुंबई राज्यांत अनेक ठिकाणीं व नवी दिल्ली येथेंहि दंतयज्ञ करून मुंबई व भारत सरकारच्या नजरेस हें दंतरोगविज्ञान आणण्याचे प्रयत्न श्री. किशोरदास गुप्ता व जायदे इत्यादींनीं केले. परंतु त्याचा कांहींहि परिणाम येथील सरकारच्या गतानुगतिक धोरणावर झालेला नाहीं. हें पाहून कोणासहि बरें वाटणार नाहीं. भारतीयांचें कौतुक परदेशांत झालें म्हणजे मग आपल्या लोकांचे व सरकारचे डोळे उघडतात हा अनुभव नवीन नाहीं.

सबब हें दंतरोगविज्ञान जगाच्या तज्ज्ञापुढें ठेवण्यासाठीं वैद्यराज पां. वि. जायदे यांनीं अमेरिकेस अवश्य जावें असें आम्हांस वाटतें. ज्यांना ज्यांना वैद्य जायदे यांचे चालू प्रयत्न यशस्वी व्हावेत असें वाटतें त्यांनीं त्यांनीं वैद्य जायदे यांना जरूर तें आर्थिक सहाय्य अवश्य करावें अशी आमची सूज्ञ वाचकांस विनंति आहे.

अमेरिकेंतील लाइफ नांवाच्या सुप्रसिद्ध मासिकांत दिल्ली येथें झालेल्या दंतयज्ञाचे फोटो पूर्वीच प्रसिद्ध झाले आहेत.

होमिओपॅथीचा अभ्यासक्रम

होमिओपॅथीचा अभ्यासक्रमहि इंटरनंतर ४॥ वर्षांचा असावा व पुढें ६ महिने अनुभवासाठीं द्यावेत असें सुचविलें आहे.

मदतनीस डॉक्टरी अभ्यासक्रम

मदतनीस डॉक्टर तयार करण्याच्या योजनेस मान्यता देण्यांत आली. हा अभ्यासक्रम केवळ २ वर्षांचा राहील.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

युनिव्हर्सल हेल्थ इन्स्टिटयूटची वैद्यवर्गास विनंति

प्रेसिडेंटः— श्री. मुरारजी देसाई
चेअरमनः—श्री. गुलझारीलाल नंदा

बुद्धभवन ऑर्ट्रम रोड, मुंबई १
ता. १९-२-५४

माननीय वैद्यराज

आपणास माहितच असेल कीं, युनिव्हर्सल हेल्थ इन्स्टिटयूट, मुंबई, या संस्थेतील आयुर्वेद-विभाग, वैद्यांच्या एका समितीचे नेतृत्वाखालीं कार्य करीत असून, तो आयुर्वेदाचें पुनरुत्थान करण्याकरितां प्रयत्नशील आहे. याचें दृश्य फल असें आहे कीं, या विभागाच्या एका संपन्न अशा स्वतंत्र रुग्णालयाचें उद्घाटन मुंबई राज्याचे मुख्य मंत्री श्री. मुरारजी देसाई यांच्या हस्तें नुकतेंच झालें आहे.

संस्थेचें यश व किर्ति

आयुर्वेदाचा नांवलौकिक वाढावा व आयुर्वेदिक चिकित्सा देणाऱ्या ह्या पहिल्या संस्थेचें यश आणि कीर्ति ह्यांत निरंतर भर पडावी व आर्थिक साहाय्याचे अभावीं ह्या संस्थेची प्रगति कुंठित होऊं नये म्हणून सुशिक्षित वैद्यसमाजानें ह्या संस्थेस सहकार्य व पाठिंबा ह्याचा दुजोरा द्यावा, अशी विनंति आहे.

निदान-चिकित्सेसाठीं रुग्ण पाठवावेत

वैद्य समाज ह्या संस्थेस व हिच्या ह्या आंदोलनास कोणत्या प्रकारें साहाय्य करूं शकेल ह्याचा विचार करण्याकरितां आयुर्वेदिक समितीच्या खालील सदस्यांची एक बैठक ता. ३०।१२।५३ रोजीं बोलाविण्यांत आली होती. गंभीर विचारविनिमयानंतर असें ठरविण्यांत आलें कीं, आपणाकडून दर महिन्यांत कमींतकमी पांच रुग्ण युनिव्हर्सल हेल्थ इन्स्टिटयूटच्या आयुर्वेदीय विभागांत तपासणीसाठीं पाठविण्यांत यावे, अशी विनंति मुंबई नगरींतील (व राज्यांतील) प्रसिद्ध वैद्यांना करण्यांत यावी व अशा रुग्णांची नांवें व त्यांची केलेली रोगपरीक्षा ह्यांचें रेकॉर्ड [दप्तर] संस्थेंत ठेवण्यांत यावें. त्याचप्रमाणें सदरहू रोगी पूर्ण बरे झाल्यानंतर फेरतपासणीसाठीं या संस्थेकडे पाठविण्यांत यावेत. ह्यायोगें शुद्धायुर्वेदीय चिकित्सेनें संपूर्ण बरे झालेल्या रोग्यांची संख्या संशोधन-विभागाच्या आंकडेवारीसाठीं उपलब्ध होऊं शकेल.

संस्था आपलीच आहे

यांखेरीज वैद्यसमाजानें ही संस्था आपलीच आहे असें समजून रोग्यांचें रक्त, मल, मूत्र, ह्यांची परीक्षा तसेंच क्ष-किरण निवेदन (एक्सरे रिपोर्ट) यांचेसाठींहि रुग्णांस संस्थेमध्यें अवश्य पाठवावे. या सर्व परिक्षांची व्यवस्था संस्थेंत असून त्याची फीहि अल्प अशीच ठेवलेली आहे.

ही संस्था आयुर्वेदाच्या भविष्यकाळास आधारभूत आहे म्हणून आम्हांस अशी आशा आहे कीं वैद्यसमाज ह्या संस्थेस भक्कम करण्याकरितां संपूर्ण सहकार्य व पाठिंबा देईल.

निवेदकः- वैद्य जादवजी त्रिकमजी आचार्य
,, वामनराव दीनानाथ
,, प्रतापकुमार वैद्य
,, शिवशर्मा
,, कन्हैयालालजी भेडा
राजवैद्य दामुभाई

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समिति

(४५ कॅथेड्रल स्ट्रीट) मुंबई २

शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीची दुसरी सभा दिनांक २९।१।१९५४ रोजीं बुद्ध भवन, औट रॅम रोड, फोर्ट मुंबई येथें दुपारीं २ वाजतां वैद्य वामनरावजी दिनानाथ यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. सभेस समितीचे सातहि सभासद उपस्थित होते. प्रथम मागील सभेच्या अहवालास मंजुरी देण्यांत आली.

त्यानंतर पाठ्यक्रम समितीच्या पहिल्या सभेंत नियुक्त केलेल्या पाठ्यक्रम उपसमितीचा अहवाल चर्चेसाठीं निघाला व त्यावर खालील विषयांवरील प्रस्ताव मंजूर करण्यांत आले.

[अ] समितीच्या संचालनार्थ नियम व पोट-नियम.

[आ] सरकारमान्य गुरुच्या पात्रतेबाबत निश्चिति व त्यांनीं करावयाच्या अर्जाचा नमुना.

[इ] राजमान्य गुरुजवळ अध्यापनावश्यक साधनसामुग्री काय काय असावयास पाहिजे त्याची निश्चिति.

[ई] शुद्धायुर्वेदीय शिक्षण देणाऱ्या विद्यालयाची पात्रता, त्याच्याजवळ शिक्षणार्थ लागणारी साधन सामुग्री व त्यानें मंजुरीसाठीं करावयाच्या अर्जाचा नमुना यांची निश्चिति.

[उ] विद्यार्थ्यांच्या प्रवेशपात्रतेबाबत आवश्यक असणारी शैक्षणिक लायकी:– गव्हर्नमेंट संस्कृत कॉलेज, बनारसच्या प्रथमा परीक्षेच्या समकक्ष असणाऱ्या दुसऱ्या संस्कृत परीक्षा. त्याचप्रमाणें मुंबई प्रांताच्या एस्. एस्. सी. परीक्षेच्या समकक्ष दुसऱ्या बोर्डाच्या किंवा विश्वविद्यालयाच्या परीक्षा.

वरील विषयांवरील सर्व प्रस्ताव सरकारच्या अंतिम निर्णयासाठीं पाठविण्यांत आले आहेत. व त्यांस सरकारी मंजुरी मिळाल्यानंतर ते अधिकृत म्हणून प्रसिद्ध करण्यांत येतील.

वैद्य-हकीम आणि विषारी औषध योजनेचा प्रश्न

अेखाद्या रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टिशनरनें औषधें लिहून दिल्याखेरीज परिशिष्ट अेच् मधील औषधें किरकोळीनें विकतां येणार नाहींत असें १९४० च्या औषधविषयक कायद्यांतील तरतुदी आणि त्या कायद्यान्वयें केलेल्या नियमांमध्यें नमूद केलेलें आहे. हीं औषधें विषारी असून परिशिष्ट अेच् यादी अिंग्लंडमधील अशाच विषारी औषधांच्या यादीशीं जुळती आहे. त्यामुळें या विषारी औषधांची योजना वैद्य आणि हकीम यांसुद्धां रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टिशनरांखेरीज अितरांनीं करूं नये असा प्रतिबंध या तरतुदींनीं घातलेला आहे.

या औषधांच्या अेका गटाचा म्हणजे सल्फा औषधांचा उपयोग डॉक्टर वर्ग आणि अितर नोंदणी न केलेले वैद्यकीय व्यवसायी या दोघांकडूनहि सर्रास केला जातो आणि औषधीविषयक कायद्यान्वयें केलेल्या नियमांनुसार बसविलेले निर्बंध उठावेत अशी विनंति नोंदणी न केलेल्या वैद्यकीय व्यवसायिकांच्या संस्थांनीं केलेली आहे. या प्रश्नाचा विचार करतांना औषधी तांत्रिक सल्लागार मंडळ आणि औषधी सल्लागार समिती यांनीं औषधी विषयक नियमांत कांहीं विशिष्ट बदल सुचविले आहेत; त्यामुळें पशुवैद्य आणि दंतवैद्य या व्यतिरिक्त अितरांस अितर गोष्टींबरोबरच आधुनिक शास्त्रीय वैद्यकशास्त्रांतील सरकारमान्य शैक्षणिक पात्रता असल्याखेरीज, औषधी नियमासाठीं वैद्यकीय व्यवसायी मानण्यांत येणार नाहीं.

'मेडिकल प्रॅक्टिशनर'च्या संकल्पित व्याख्येंत न बसणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकांस परिशिष्ट अेच मधील औषधांची योजना करण्यास परवानगी न देण्याच्या प्रश्नावर आणि अशा सवलती यापूर्वीच दिल्या असल्यास त्या रद्द करण्यासंबंधीं आपलीं मतें कळविण्याबद्दल राज्य सरकारांस कळविलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मधमाशा-पालन व्यवसाय

मुंबई-राज्यांत अलिकडल्या कालांत मधमाशा पाळण्याच्या व्यवसायाची फार झपाट्यानें प्रगति झालेली आहे. मधमाशा पाळणें हा एक महत्वाचा आणि किफायतशीर असा घरगुती व्यवसाय असून तो करून शेतकऱ्याला आपल्या मिळकतींत भर घालतां येते. शिवाय रोपांच्या फुलांतील स्त्रीकेसर व पुंकेसर यांचा संयोग करून फळझाडें वगैरे पिकांचें उत्पन्न वाढविण्यासहि मधमाशा मदत करीत असतात. या क्रियेमुळें जंगलाचा व शेतीचा फायदा होतो असें सिद्ध झालें आहे. अशा रीतीनें मधमाशा केवळ मधच देतात असें नव्हे तर शेतीचें उत्पादन वाढविण्यासहि मदत करतात.

महाबळेश्वर येथें मधु-केंद्र

राज्यामध्यें निरनिराळे ग्रामोद्योग सुरूं करण्यासाठीं व त्यांचा विकास करण्यासाठीं राज्य सरकार, ग्रामोद्योग समितीला ग्रँट देतें. या समितीनें १९४७ सालीं उत्तर सातारा जिल्ह्यांत महाबळेश्वर येथें अेक मधमाशापालनाचें केंद्र सुरूं केलें, त्यावेळीं आजुबाजूच्या भागांतील गांवकऱ्यांना मध मिळविण्यासाठीं मधमाशा पाळावयाच्या या कल्पनेची गंमत वाटली व कांहींना तर ती हास्यास्पदहि वाटली. त्याचबरोबर अघोरी मार्गानें मधमाशा मारून त्यांची पोळी काढून मध जमविण्याचा व्यवसाय जे लोक करीत होते त्यांनाहि केंद्राची कल्पना पसंत पडली नाहीं आणि केंद्रामुळें आपल्याला अेक प्रतिस्पर्धी निर्माण होत आहे असें त्यांना सहाजिकपणेंच वाटलें.

नियमित उत्पन्न मिळत राहतें

तथापि अशाहि परिस्थितींत केन्द्राच्या कार्यकर्त्यांनीं आपलीं कामें चालूं ठेवलीं आणि थोड्या श्रमांत मध पैदा करून त्यापासून नियमित उत्पन्न

अशा रीतीनें जमा केलेला मध शुद्ध करून बाटल्या भरण्यांत येत आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कसें मिळवितां येतें हें खेडुतांना प्रात्य-क्षिकांच्या द्वारां पटवून दिलें. तसेंच केन्द्राच्या कार्यकर्त्यांनीं खेडूतां-साठीं मधमाशांची पोळीं जमविलीं आणि त्या पाळण्या-साठीं त्यांना पेट्या पुरविल्या. खेडूतांनीं या मध-माशापासून मिळविलेला मध केन्द्रास विकून या पेट्यांची किंमत दिली. ज्यांचीं नांवें नोंदलीं आहेत अशा मधमाशा पाळणाऱ्या लोकांकडून केन्द्र मध विकत घेतें आणि तो शुद्ध करून आणि डब्यांत भरून त्याची विक्री करतें.

एका पोवळ्यांत किती मध होतो ?

पहिल्या वर्षी केंद्राकडून पेट्या घेऊन मधमाशा पाळणारा असा अेकच अिसम होता आणि त्यानें १० पोळीं ठेवलीं होतीं. नंतर मात्र मधमाशा पाळ-णाऱ्या लोकांची संख्या भराभर वाढूं लागली. ३१ मार्च १९५३ रोजीं नांवें नोंदलेल्या अशा मधमाशा पाळणाऱ्या लोकांची संख्या ४११ आणि पोळ्यांची संख्या २०६३ इतकी होती. सदरहू केंद्रातर्फे आज ५१ गांवांना मध पुरविण्यांत येतो. त्याचबरोबर एका पोळ्यांतून मिळणाऱ्या मधाचें सरासरी प्रमाणहि वाढलें आहे. १९४७ सालीं मधाचें सरासरी प्रमाण २ शेर इतकें होतें तें १९५१-५२ सालीं ४॥ शेर इतकें झालें. तसेंच १९४७ सालीं एका पोळ्यांतून जास्तींत जास्त ४ शेर इतका मध निघाला; १९५१-५२ सालीं हाच आंकडा ५० शेर होता. १९५२-५३ सालीं एका पोळ्यांतून सरासरी १७ रत्तल मध मिळाला. एवढ्या मधाची किंमत २३ रु. ६ आणे होते.

महाराष्ट्रांत ८९० मधमाशापालक

या काळांत महाराष्ट्रांतहि मधमाशा-पालनाच्या व्यवसायाची पुष्कळच प्रगति झाली. या प्रदेशांत हा व्यवसाय करणाऱ्या उपकेंद्रांची संख्या १९४७ सालीं ३ होती ती १९५२-५३ सालीं १२ झाली. तसेंच मधमाशा पाळणाऱ्या लोकांची संख्या १६ वरून ८९० पर्यंत आणि त्यांच्या जवळील पोळ्यांची संख्या ८८ वरून ३०७७ पर्यंत वाढली. मधाचें उत्पादनहि वाढून १३ रत्तलाचें ३७.७२७ रत्तल इतकें झालें; आणि त्यामुळें पोळ्याच्या मालकांची प्राप्ति १८५ रुपयावरून ५१८७५ रुपयापर्यंत वाढली आहे. याबाबतींत ग्रामोद्योग समितीची तर अशी उमेद आहे कीं, मधाच्या वार्षिक उत्पादनांत आणखी ३९,००० रत्तलांची भर घालतां येईल, आणि त्यामुळें ४८,००० रुपये जादा उत्पन्न मिळून ८९० कुटुंबांना फुरसतीच्या वेळांत करण्यासाठीं एक व्यव-साय मिळेल. महाबळेश्वर येथें एक इसम असा आहे कीं, तो एका पायानें अधू असून सुद्धां मधमाशा पालना पासून दरवर्षी ७४० रुपये मिळवितो.

शिक्षण-वर्ग

महाबळेश्वर येथील केन्द्रातर्फे या व्यवसायाचे शिक्षण घेण्यासाठीं दीर्घ मुदतीचे, अल्प मुदतीचे आणि नवाशिक्यासाठीं असे शिक्षण-वर्ग चालविण्यांत येतात. या वर्गांची फी माफक असून कांहीं, ठराविक संख्येपर्यंत विद्यार्थ्यांसाठीं मोफत रहाण्याचीहि सोय करण्यांत येते. या वर्गांत विद्यार्थ्यांना मधमाशा पाळण्याच्यां पद्धति, मधमाशांच्या संबयी व व त्यांना होणारे रोग वगैरे विषयांचें पुस्तकीं तसेंच प्रात्यक्षिक शिक्षण देण्यांत येतें.

संस्था स्थापन करण्याचा विचार

महाबळेश्वर येथील केन्द्राचा विकास करून तेथें मधमाशा पालनाची संस्था स्थापन करण्याचा विचार आहे. तेथें संशोधनकार्यासाठीं प्रयोगशाळा, यंत्रसामुग्री, पोलन सर्व्हिस, मधमाशा पालनाच्या व्यवसायासाठीं लागणारी साधनसामुग्री, तयार करण्याचे अेक वर्कशॉप वगैरेची सोय करण्यांत यावयाची आहे.

सरकारकडून मिळणारी ग्रँट

ग्रामोद्योगसमितीस मधमाशा-पालनाच्या व्यव-सायाची राज्यांत सर्वत्र वाढ करतां यावी म्हणून सरकार सढळ हातानें ग्रॅन्ट देत असते. १९५२-५३ सालीं सरकारनें केवळ मधमाशा-पालनाच्या कार्या-साठीं ग्रामोद्योगसमितीस ७४,५०० रुपयांची ग्रॅन्ट दिली. १९५३-५४ सालच्या अंदाजपत्रकांत ८०,००० रुपयांपेक्षां जास्त तरतूद करण्यांत आली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. त्याशिवाय सदरहू समितीस खेळत्या भांडवला-साठीं ३०,००० रुपयांचें बिनव्याजी कर्जहि देण्यांत आलें आहे. हें कर्ज चालू सालीच वापरावयाचें आहे.

मधाची वर्गवारी करण्यांत येते

महाबळेश्वर हा डोंगराळ प्रदेश असून तेथें पैदा होणाऱ्या मधास जास्त किंमत येते. ग्रामोद्योग समितीच्या महाबळेश्वर येथील केंद्रांत मधाची प्रतवारी लावण्याच्या बाबतींत संशोधनकार्य करण्यांत आलें असून मध देणाऱ्या रोपांच्या परागांचाहि अभ्यास करण्यांत आला आहे. सूक्ष्म निरीक्षण करण्यासाठीं आंतरराष्ट्रीय मोजमापानुसार पोलन स्लाईडसहि (काचा) तयार करण्यांत आल्या आहेत.

जांभळाचा मध, हिरड्याचा मध

पैदा झालेला मध, परागावरून ओळखण्यांत येतो आणि त्यानुसार त्याची वर्गवारी करण्यांत येते. या भागांत मिळणाऱ्या मधापैकीं ३० ते ४० टक्के मध जांभळाच्या झाडापासून व २० ते २५ टक्के हिरड्याच्या झाडापासून मिळतो. याशिवाय निरगुंडी, छोटी मुरम्बी, मोठी मुरम्बी, पानगळ, गेळा, पिसा वगैरे झाडापासूनहि मध मिळतो.

सात वर्षांतून एकदां फुलें

'वाहिती' (कारवी?) झाडास सात वर्षांतून अेकदां फुलें येतात आणि त्या झाडापासूनच मिळणारा मध रंगहीन व पारदर्शक असून त्याचे थंडाव्यानें खडे बनतात. निरनिराळ्या वर्गांतील मधाचा रंग, गुणधर्म व स्वाद निरनिराळा असतो.

मध परागांवरून ओळखतात

मधमाश्यांनीं गोळा केलेल्या मधांत रोपांच्या फुलांतील पराग-कण तरंगत असतात. या मधाची प्रयोगशाळेंत तपासणी केल्यावर तो कोणत्या रोपा-पासून मिळाला आहे हें कळू शकतें. तसेंच मधांत कोणत्या द्रव्याचें आणि किती प्रमाणांत मिश्रण झालें आहे हेंहि प्रयोगशाळेंतील तपासणीवरून कळून येतें. येथें हेंहि नमूद करावयास हरकत नाहीं कीं, मध-माशा-पालनाबाबतची अेक अन्तरराष्ट्रीय संघटना असून तिचें मुख्य ठाणें स्वित्सर्लंन्डमध्यें आहे. या संघटनेचा मध-वनस्पतीशास्त्र हा एक खास विभाग असून तेथें पोलन स्लाअीड्स् (काचा) गोळा करण्यांत येतात.

मधाचे औषधी गुण

महाबळेश्वर येथील कांहीं रोपांपासून मिळणाऱ्या मधांत औषधी गुण असतात आणि अशा मधास जास्त मागणी असते. म्हणून प्रयोगशाळेंत मधाच्या नमुन्याची तपासणी केल्यावर मधाचें वर्गीकरण करून त्याप्रमाणें त्यावर लेबलें लावण्यांत येतात.

या व्यवसायाचें भवितव्य

मध पैदा करण्याच्या धंद्याचा एक सुसंघटित घरगुती उद्योगधंदा म्हणून विकास होण्यास भरपूर वाव आहे. यासाठीं या व्यवसायाच्या शास्त्रांबाबत व तंत्रांबाबत आपल्याला बरेंच संशोधनकार्य केलें पाहिजे. आपल्या देशांत मधमाशाच्या पोळ्यांतून जेवढा मध पैदा होतो, त्यापेक्षां अधिक प्रमाणांत मध देणारी पोळी अनेक परकीय देशांत आढळून येतात. तथापि मधमाशांची चांगल्या प्रकारें निगा ठेवल्यास मधाचें उत्पादन बरेंच वाढवितां येईल, ही गोष्ट महाबळेश्वर येथें मिळालेल्या अनुभवावरून दिसून आली आहे.

मधमाशाचे ३ प्रकार

इतर बहुतेक परकीय देशांचे मधमाशांचा एकच प्रकार सांपडतो, तर आपल्या देशांत मध-

' आयुर्वेदाच्या सेवेसाठीं तयार '

शास्त्रोक्त पद्धतीनें तयार झालेलीं सर्व-प्रकारचीं सिद्धौषधें [गुटिका, मात्रा, रसायनें, आसवें वगैरे] व हिंवतापांवर अत्युत्तम ठरलेलें हिंवतापांतक, मिळण्याचें एकच ठिकाण.

सविस्तर माहितीकरितां लिहाः—

आयुर्वेदीय औषधी भांडार

२८ शुक्रवार, तुळशीबागेची पिछाडी, पुणें २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माश्यांचे कमीतकमी तीन *प्रकार सांपडतात.ही आपल्या फायद्याची गोष्ट आहे. हे तीन प्रकार पुढीलप्रमाणें आहेतः—

(१) 'एपिस इंडिका' ह्या जातीची मधमाशी आपल्याला नेहमीं पहावयास मिळते. युरोपांत सांपडणाऱ्या मधमाश्यांचे या मधमाश्यांशीं बरेंच साम्य आहे.

(२) 'एपिस फ्लोरिआ' या जातीची मधमाशी आकारानें किंचित् लहान असते; आणि

(३) 'एपिस डोरसाटा' किंवा 'रॉक बी' या जातीची मधमाशी जशी अतिशय चावरी असते तशीच मध जमा करण्याची तिची ताकदहि जबरदस्त असते.

धंद्याचा पद्धतशीर विकास

आपल्या राज्यामध्यें जर स्थानिक परिस्थिती--नुसार दोन जातीच्या मधमाशामध्यें संकर करून किंवा एकाच जातीच्या मधमाश्यांची निवड करून जास्त मध देण्याऱ्या मधमाश्यांची पैदास वाढवितां आली तर मधाच्या धंद्याचा फार फायदा होणार आहे. 'रॉक बी' जातीच्या मधमाशा पाळण्याचे अनेक देशांत प्रयत्न करण्यांत आले आहेत. परंतु ते अद्याप यशस्वी झालेले नाहींत. महाबळेश्वर येथें स्थापन होणाऱ्या संस्थेमध्यें त्यासंबंधीं संशोधन व प्रयोग करतां येईल. एकंदरीनें या किफायतशीर अशा घरगुती उद्योगधंद्याचा यापुढें पद्धतशीरपणें विकास घडवून आणला जाईल अशीं चिन्हें दिसत आहेत यांत शंका नाहीं.

मधमाशांचे आयुर्वेदांतील प्रकार

* आयुर्वेदीय ग्रंथांतून मधाच्या जातींचा व मधमाशांच्या जातींचा विचार बराच सापडतो. चरकांत माक्षिकं भ्रामरं क्षौद्रं पौत्तिकं मधुजातयः। (च. सू. अ. २७) अशा मधाच्या ४ जाति दिल्या आहेत. त्यापैकीं माक्षिक हा तेल वर्णाचा, पौत्तिक हा तुपासारखा, क्षौद्र काळसर लाल, व भ्रामर हा पांढरा असतो, असें सांगितलें आहे. सुश्रुताचार्यांनीं मधाच्या पुढील ८ जाति दिल्या आहेत, यावरून भारतवर्षांत या क्षेत्रांत संशोधन करण्यास पुष्कळच वाव आहे असें दिसून येतें. सुश्रुतांत दिलेल्या मधाच्या जाति अशाः—

पौत्तिकं भ्रामरं क्षौद्रं माक्षिकं छात्रमेव च ।
आर्घ्यं औद्दालकं दालं इत्यष्टौ मधुजातयः ॥

— संपादक)

शास्त्रं सुचिंतितमथो परिचिंतनीयम्

—सुभाषित रत्नावली

शनिवार, दि ६-२-५४ रोजीं नासिक-शहर-वैद्यमंडळाच्या अभ्यासमंडळानें पुढील उपक्रम केला. अष्टांगहृदय (वाग्भट) सूत्रस्थानांतील प्रथमपासून १५ अध्यायांना आवृत्ति देण्यांत आली. एक एक अध्याय एकेक वैद्यानें क्रमानें वाचला.

गांवापासून दूर २ मैलावर असलेल्या श्री. लवाटे. शास्त्री यांच्या रम्य उद्यानांत बहरलेल्या आम्रवृक्षांच्या राईत हा कार्यक्रम झाला. दोन तासाच्या या बैठकी-नंतर षड्रसात्मक आहाराचा आवश्यक कार्यक्रम झाला.

वैद्यांनीं आपली संघटना वाढण्याच्या दृष्टीनें, महिन्यांतून एकदां तरी असे कार्यक्रम ठेवण्यासारखे आहेत. नित्य व्यवसायापासून अलिप्त व रम्य निसर्गा-च्या सान्निध्यांत घालविलेला हा काल शरीर व मन या दोघांनाहि सुप्रसन्नकर असा होतो.

ब्रह्मदेशांतील देशी वैद्यकाची स्थिति

गेल्या ऑगस्ट महिन्यांत ब्रह्मदेशाच्या लोक-सभेनें देशी वैद्यकास राजमान्यता दिली असून रंगून मंडाले, मोलमीन, अक्याब, व बँककॉक येथें स-रकारमान्य विद्यालयें व रुग्णालयें निघणार आहेत

शास्त्रोक्त पद्धतीनें व अत्यंत परिश्रमानें तयार
केलेलीं महाराष्ट्र प्रांतीय वैद्यसंमेलनानें
व ऑल इंडिया आयुर्वेद कॉंग्रेस
व प्रदर्शनाकडून प्रशंसित
सहस्रपुटी अभ्रक इ. भस्में व इतर औषधें
प्राइस लिस्ट मागवा.
श्री अमरेश्वर आरोग्यमंदिर
मिराशी बोळ, पो. इचलकरंजी S.M.C.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

.... सहकारी पद्धतीनें तयार करावयाचीं औषधें ....

लेखक–वैद्य पु. वि. धामणकर
धूतपापेश्वर–पनवेल

सिंदूर कल्प : :

चरक सांप्रदायी सूक्ष्म स्रोतोगामी व स्थिर–कल्पांत तूप व तैलाचा उपयोग करीत. स्नेहसाधन-विधींत स्नेह हें आधारद्रव्य म्हणून असे. हे वैद्य म्हणतः– 'तूप सहस्रवीर्य आहे. संस्कारक्षम आहे.' "विषस्य तैलस्य न किंचिदंतरम् ।" म्हणजे विषा-प्रमाणें तैलहि व्यवायि आहे. ह्या विधीस तोड म्हणून सिंदूरकल्प निर्माण झाला असावा. कारण ह्याप्रमाणेंच येथें संस्कारक्षम, व्यवायि म्हणून पारद घेतला असून पाचनविधींत व पाकप्रकारांत अगदीं फार साम्य आहे.

स्थानपरत्वें वर्गीकरण

गलस्थ, तलस्थ, उभयस्थ. कूपीचे कंठाशीं जो पदार्थ लागतो तो गलस्थ. ह्यांत सर्व सिंदूरांचा समावेश होतो. ह्यांत विधीचे शेवटीं कुपीचे बुडाशीं कांहींहि रहात नाहीं. दुसरा प्रकार केवळ तलस्थांचा. ह्यांत समीरपन्नग, सुवर्णपति इ. येतात. ह्यांचे विधींत कंठाशीं कांहींहि लागलेलें नसतें. उभयस्थ प्रकार तिसरा. ह्यांत कंठाशीं सिंदूर लागतो व तळाशींहि कांहीं पदार्थ राहतो. त्यांतहि दोन प्रकारः– एक उपयुक्त; २ रा अनुपयुक्त. मकरध्वजांत सुवर्णाचें भस्म बाटलीचें बुडीं सांपडतें. तें उपयुक्त असतें. पण माणिक्यरसांत शिसें खालीं सांपडतें तें अगदीं जळ-लेलें, निर्जीव झालेलें असतें.

वंगेश्वर तळाशीं तयार होतो

सु. रा. वंगेश्वराची उपयुक्तता सर्वश्रुत आहेच. एकाच प्रयोगांत दोन पदार्थ हातीं लागतात, असे कल्प ह्या वर्गांत येतात. पहिल्या तीन कल्पांत मुख्य औषध कूपीचे गळ्याशीं लागतें, नि वंगेश्वर तळाशीं तयार होतो. त्रिपुर-भैरव, सुवर्ण-सिंदूर, माणिक्यरस नि वंगेश्वर ह्यांतले दुसरे पदार्थ युक्तायुक्ततेच्या दृष्टीनें भिन्न असतात. त्रिपुरभैरवांत तळाशीं तुरटी राहते. ती फुललेली असते. तिचा उपयोग होऊं शकतो. सुवर्णसिंदूरांत सोनें खालीं राहतें. अग्नि बेताचा दिला गेला असला तर तें सोनें भस्मरूप सांपडतें. पण तोच अग्नि अधिक झाला असला तर सोनेंच पुनः तयार होतें. माणिक्यरसांत शिसें असतें, तें जळलेलें सांपडतें. उघडच आहे. कारण शिशाच्या वितळण व जळण बिंदूपेक्षां अधिक तापमानाची उष्णता माणिक्यरसास दिली जाते. हें शिसें सुरम्यासारखें वजनदार, कठीण पण भंगूर असतें. ह्याचा उपयोग काय करावा हें अद्याप सुचलेलें नाहीं. वंगेश्वरांत कूपीकंठलग्न रससिंदूर सांपडतो, तो असतो पातळ थराचा व थोडा. पण तो लक्ष्मीविलास इत्यादींत घालण्यास योग्य असतो. तुरटी, सुवर्ण, शिसें, सिंदूर ह्या उपपदार्थांना प्रोत्फुल्ल सजीव, निर्जीव नि भस्म अशींहि छोटींछोटीं नांवें देतात.

आयुर्वेदीय औषधीरत्नभांडारांत सिंदूरकल्पाचे पाठ अपरिमित आहेत. त्यापैकीं १४८ पाठ आयुर्वेदीय औषधी पाठचिंतामणींत उद्धृत केले आहेत. हे योग १४१ रोगांवर चालतात. पैकीं कांहीं पाठप्रक्रिया प्रतिमा येथें नमूद करीत आहे.

रससिंदूर

(नि. र.) (र. यो. सा. ११३)

पाठः–पलद्वयं शुद्धसूतं गंधकं च तदर्धमकम् ।
स्नुह्यर्कजरसेनैवं भावना दिनसप्तकम् ॥
सर्पस्य गरलेनैव काचकूप्यां विनिःक्षिपेत् ।
कूप्यां दृढं मुखं रोध्यं धृत्वा सैकतयन्त्रके ॥
यामषोडशकं वन्हिं ज्वालयेत् क्रमसंस्थितम् ।
कूपिकागलसंबद्धं स्वांगशीतं समुद्धरेत् ॥
अयं सूतवरः ख्यातो देवैर्विजयदायकः ।
गुंजार्धं रोगहृत्सर्वं क्षुधार्तो जायते शिवः ॥

द्रव्यसंग्रहः-४०तो. पारा, २०तो. गंधक, यांची कज्जली करावी. ती निवडुंग व रुईचा चीक आणि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बचनागाचा काढा ह्यांत सात सात दिवस खलावी. तदनंतर ती सुकवावी. पुनः खलून सूक्ष्म करावी. व मातकापड केलेल्या कांचेच्या बाटलींत भरावी व बाटलीचे तोंड पक्कें बंद करावें. ही बाटली वालुकायंत्रांत ठेवावी. व १६ प्रहर क्रमाग्नि द्यावा. तदनंतर कुपीचे गळयाशीं लागलेला रससिंदूर युक्तीनें काढून घ्यावा.

हा अर्धे गुंज मात्रेनें सेवन केला असतां अग्निप्रदीपन उत्तम होतें.

रससिंदूर

(र. यो. सा. ११५) यो. म.

पाठः-शुद्धं सूतं समं गन्धं तयोः कज्जलिकां कृताम् ।
महेंद्रीरसंपिष्टां शार्द्रां काचघटे न्यसेत् ॥
पलाण्डुस्वरसं तत्र क्षिपेद्वै चूलिकापद्रुम् ।
रसात्पूर्वे च विधिना तद्घटं वालुकाख्यके ॥
यंत्रे संपाचयेद्यावत्प्रहरद्वादशं यथा ।
क्रमाग्निना ततः सम्यग्रसः स्यात्तल संस्थितः ॥
एवं वारत्रयं कुर्यादुत्तमो ऽसौ भवेद्रसः ।
निर्गुंडीस्वरसैरेवं सिद्धो भवति नाऽन्यथा ॥

पारा, गंधक समभाग घेऊन त्याची कज्जली करावी. कज्जलीस कडूवृंदावनाच्या रसाची भावना द्यावी. व तो गोळा ओला असतांनाच कांचेच्या भांड्यांत ठेवावा. नंतर पाऱ्याच्या वजनाइतका नवसागर त्यांत घालावा. व नंतर कांद्याचा रस त्यांत घालावा. आणि मग तो घट वालुकायंत्रांत ठेवावा. वालुकायंत्रास १२ प्रहर अग्नि द्यावा म्हणजे पारदाचें भस्म (तलस्थ रससिंदूर) तयार होतें. या रससिंदूरास पुनः कडुवृंदावनाची व कांद्याच्या रसाची भावना व अग्नि, असें तीन वेळ करावें. म्हणजे पारदाचें उत्तम भस्म तयार होतें. कांद्याच्या रसाऐवजीं निर्गुंडीचा रस घातला असतांना सुद्धां असेंच पारदाचें भस्म तयार होतें. इतर वनस्पतींचा उपयोग होत नाहीं.

समगंधक रससिंदूर

[नि. र. पा. ४४७] आ. प्र.

पाठः— कूपीं सप्तमृदं सुकर्पटयुतां शुष्कां च गन्धश्रसौ ।
तुल्यौ तौ नवसारपादकलितः संमर्द्य तस्यां न्यसेत् ॥
सा यंत्रे सिकताख्यके तलबिले पक्त्वाऽर्कयामं हिमं ।
कृत्वा कुंकुमपिंजरं रसवरं भस्माऽऽददेद्वैद्यराट् ॥
पाके रुद्धमुखं कूप्यां नवसारेण जायते ।
ततः शलाकया कुर्यात्कूपिकानां च शान्तये ॥
अनेन विधिना पाको यावानस्य भविष्यति ।
तावानपि गुणोत्कर्षो जायते रसभस्मना ॥

१८ पारा, १८ गंधक, ४॥ नवसागर ह्यांची कज्जली सात सात मातकापडें केलेल्या कूपींत भरावी. ती कूपी बुडास छिद्र असलेल्या वालुकायंत्रांत ठेवावी, व त्यास १२ प्रहर क्रमाग्नि द्यावा. नवसागरानें तोंड बंद होऊं लागल्यास ते तापलेल्या सळईनें मोकळें करावें म्हणजे कूपीच्या कंठाशीं केशर अथवा पिंजर यासारखा लाल रससिंदूर लागेल तो युक्तीनें काढून घ्यावा.

ह्याप्रमाणें जितक्या अधिक वेळ गंधक जारण करावें तितका तो रस अधिक गुणदायक ठरतो.

टिप्पणीः- रससिंदूर म्हणजे पारा-गंधकाचें मिश्रण. त्यांत कोणी क्षार घालतात किंवा घालीत नाहींत. सामान्यतः मूतखड्याकरितां जवखार व खोकल्याकरितां नवसागर घालण्याची प्रथा आहे.

षड्गुण बलिजारित रससिंदूर

नि. र. पा. ४७८

पाठः-हिङ्गुलोत्थरसैर्भागं षड्भागं शुद्धगन्धकम् ।
खल्वमध्ये विनिक्षिप्य कुमारीरसमर्दितम् ॥
काचकूप्यां विनिक्षिप्य वालुकायन्त्रगे क्षिपेत् ।
पाचयेत्सप्तरात्राणि सिन्दूरं भवति ध्रुवम् ॥
वल्लमात्रं प्रयुंजीत मधुना लेहयेत्परम् ।
स्तम्भनं दण्डवृद्धिं च वीर्यवृद्धिबलान्वितम् ॥
तेजस्त्वं पुष्टिकारित्वं महामत्तगजेन्द्रवत् ।
षण्ढत्वं वन्ध्यरोगत्वं संन्यासादिं च रोगजित् ।
दिनमेकं शतस्त्रीणां रमते तृप्तिवीर्यवान् ।
निरन्तरमनोल्हासं रतिं प्रेम्णा सनातनः ॥
शतानि पंचषट्केन रोगाणां नाशको भवेत् ।
षड्गुणो गन्धको नाम विश्वामित्रेण निर्मितः

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रथम पांच तोळे पारा तीस तोळे गंधक एकत्र खलून त्यांची कज्जली तयार करावी. मग तीस कोरफडीचे रसाची भावना द्यावी व पुनः खल करावा. भावना जिरल्यावर तो कल्क उन्हांत विरवून सुकवावा. सुकल्यावर पुनः खल करावा. आणि मग तें चूर्ण सप्त मृद्वस्त्रपरिधारित कांचकूपींत भरावें. ती कूपिका वालुकायंत्रांत ठेवून वालुकायंत्रास सात दिवस क्रमाग्नि द्यावा. मग ती भट्टी-कुपी स्वांगशीत झाल्या-वर तीमध्यें तयार झालेला षड्गुण बलिजारित रस-सिन्दूर युक्तीनें काढून घ्यावा.

मात्रा-२ गुंजा. अनुपान-मध. गुण-ग्रंथोक्त.

रससिंदूर षड्गुण बलिजारित करण्यानें त्याचे गुणांचा उत्कर्ष होतो, हें निश्चित. आयुर्वेदप्रकाश-मध्यें प्रत्येक गंधक जारणेनें गुणांत काय फरक होतो, तें दिलें आहे. ही गंधकजारणा करण्याचे दोन प्रकार आहेत. कोणी एकाच वेळीं सहापट गंधक घालून एकदांच अग्निसंस्कार करतात. तर कोणी प्रत्येक वेळीं समभाग गंधक घालून अग्नि देतात. व असा क्रम सहा वेळ करतात. त्याहिपेक्षां आणखी अशी एक परंपरा आहे कीं, रससिंदूरांतून पारा काढून समभाग बलिजारण असा क्रम सहा वेळ आचरतात. औषधी-करणांत जितकी अधिक मेहनत घ्यावी तितकें अधिक फल मिळतें. घेतलेली मेहनत केव्हांहि वाया जात नाहीं.

---

२ समीरपन्नग

[र.यो.सा. ३०२] [र.चं., रसायनसं.]

पाठः- पारदं गन्धकं मल्लं हरितालं तथैव च ।
एतच्चतुष्टयं सर्वं तुलसीरसमर्दितम् ॥
वटीं कृत्वाऽभ्रकेणैव वेष्टयेद्गोलकन्तु तत् ।
शरावयुगले क्षिप्त्वा वालुकायंत्रगं पचेत् ॥
दीपिकाप्रमितं वह्निं दत्त्वा यामचतुष्टयम् ।
स्वांगशीतं समुध्दृत्य नाम्नाऽसौ वातपन्नगः ॥
सन्निपाते तथोन्मादे सन्धिबन्धे कफामये ।
नागवल्ल्यां दलेनैव भक्षयेद्गुञ्जिकाद्वयम् ॥

१० पारा, १० गंधक, १० सोमल, १० हरताल ह्यांचे कज्जलीस तुलशीरसाची भावना द्यावी. ती खल करून जिरवावी. तदनंतर तो गोळा, खालीं वर बाजूस अभ्रकाचे पत्रे घालून, परळांत ठेवावा. त्यावर दुसरें परळ झांकण घालून संपुट तयार करावें. संपुटास संधिलेप द्यावा. तो सुकल्यावर तें संपुट वालुकायंत्रांत ठेवून त्यास चार प्रहर मंदाग्नि द्यावा. म्हणजे रसायन तयार होतें. तें युक्तीनें काढून घ्यावें.

मात्रा- २ गुंजा. अनुपान- नागवेल पान
गुण- ग्रंथोक्त.

समीरपन्नग [प्रकार २ रा]

(औ. गु. ध. शा. भाग ४, पान ८८)

पाठः-पारदं गंधकं मल्लं हरितालं मनःशिला ।
एतच्चूर्णीकृतं सर्वं मर्दयेच्च दिनत्रयम् ॥
काचकूप्यां विनिक्षिप्य वालुकायंत्रके न्यसेत् ।
क्रमाग्निना पचेत्सम्यग्यामाष्टेन च मुद्रयेत् ॥
स्वांगशीतं समुध्दृत्य नाम्नाऽसौ वातपन्नगः ।
सन्निपाते कफोन्मादे संधिबन्धे कफामये ॥
नागवल्या दलेनैव भक्षयेद् गुञ्जिकामितम् ॥

१) दुसऱ्या प्रकारचे समीरपन्नगास ८ प्रहर क्रमाग्नि दिला तर तो कंठस्थ होतो. पण त्यांत सोमल अथवा त्याचे कल्प नाममात्र राहतात. तेव्हां सोमल-प्रधान असा समीरपन्नग पाहिजे असेल तर इतका वेळ व क्रमाग्नि ह्या दोन्ही गोष्टी वर्ज कराव्यात.

२) दुसऱ्या पाठाप्रमाणें समीरपन्नग तयार घेतल्यास त्यांत तापलेली लाल लोखंडी सळई घात-ल्यास आंतील मिश्रण पेट घेतें. व भराभर उतूंहि जातें. म्हणून थंड अशी लोखंडी सळई वापरावी.

तलस्थ समीरपन्नग ६ ते ८ तासांत तयार होतो. अर्धा अर्धा तासानें आंतलें मिश्रण सळईनें वर काढून सहाणेवर उगाळून पहात जावें. उगाळ हळदी वर्णाचा, तांबूस छटायुक्त पिवळा-धमक दिसला कीं, यंत्र स्वतः शीत होऊं द्यावें. म्हणजे शाळिग्रामासारखा काळा कुळकुळीत, कांचेप्रमाणें चमकणारा अत्यंत कठीण व जड असा समीरपन्नग तयार होतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुवर्णराजवंगेश्वर

र. यो. सागरांत ह्या औषधाचे पाठ अनेक आहेत. त्यांचें वर्गीकरण आयुर्मीमांसा अंक जुलै ५० व आयुर्वेद-पत्रिका अंक ऑगस्ट ५३ ह्यांत दिलेले आहे. प्रक्रिया-प्रतिमा म्हणून पांच पाठ येथें उध्दृत करीत आहे.:-

ग्रंथाधार	नांव	द्रव्यसंग्रह	अग्नि	प्रहर
र. यो. सा.				
३३४	वंगेश्वर	वंग, पारद	—	—
३४४	,,	,, ,, बलि ४ ४ १६	क्रम	२४
३४१	,,	,, ,, ,, ताल	मंद	१२
६१०	मृगांक	,, – ,, सैंधव, नवक्षार	—	१६
४५१	सु. रा. वं.	वंग, पारा, मिरें, नाग, कांत, सुवर्ण, मुक्ता, वज्री २ १ १ १ १ १/२ १/२ ४	तीक्ष्ण	४

वंगेश्वर (र.यो.सा. ३४४)

(रसायनसं. वै. चि. यो. र. र. पा.)

पाठः- रसं वङ्गं समं कृत्वा चतुर्भागं तु गन्धकम् ।
कुमारीरससंयुक्तं दिनमेकं विमर्दयेत् ॥
फलत्रयकषायेण त्रिदिनं मर्दयेत् दृढम् ।
सुदीपमध्यतीव्राग्नौ वालुकायन्त्रगं पचेत् ॥
स्वाङ्गशीतं समादाय चूर्णयेद्भिषगुत्तमः ।
अश्वगन्धाऽमृतासारमोचारसशतावरी ॥
गोक्षूरधात्री कूष्माण्डी वाराही पत्रमागधी ।
त्रिफलामर्कटीमुस्तायष्टीमधुसमन्वितम् ॥
सर्वसाम्यसितायुक्तं चूर्णं पलार्द्धसंयुतम् ।
गुंजाचतुष्टयं मात्रा गोक्षीरस्याऽनुपानतः ॥
प्रातरुत्थाय सेवेत लवणाम्लौ विवर्जयेत् ।
बहुमूत्रं मूत्रकृच्छ्रं रक्तशुक्रं प्रमेहकम् ॥
मधुमेहं नष्टशुक्रं नष्टलिङ्गञ्च नाशयेत् ।
सर्वप्रमेहशमनो वङ्गेश्वर इति स्मृतः ॥

द्रव्यसंग्रहः-४ तो. पारा, ४ तो. वंग, १६ तो. गंधक.

भावनाद्रव्यः- कुमारीरस एक दिवस, त्रिफलाकाथ ३ दिवस

यंत्रः- वालुकायंत्र

अग्निः- १२ प्रहर, प्रकार-क्रमाग्नि.

द्रव्यसिद्धिः- ४ तो.

अधिकारः- प्रमेह

रोगः- बहुमूत्र, मूत्रकृच्छ्र, रक्तशुक्र, प्रमेह, मधुमेह नष्टशुक्र नष्टलिंग, सर्वप्रमेह.

मात्राः- ।- गुंज

अनुपानः- गाईचें दूध

सहयोगीद्रव्यः- अश्वगंधादिचूर्ण मात्रा ४ गुंजा

पथ्यः- लवणाम्ल वर्ज्य

[अश्वगंधादिचूर्णः- अस्कंद, गुळवेलसत्व, मोचरस, शतावरी, गोखरूं, भुईआवळी, भुईकोहळा, डुकरकंद, तमालपत्र, पिंपळी, हिरडा, बेहेडा, आंवळा, कवच-बीज, नागरमोथा, जेष्ठमध, प्रत्येकीं १२ गुंजा.]

वंगेश्वर

(र. यो. सा. ३४१) (र. सु.)

पाठः- शुद्धं तालं शुद्धसूतं वंगं शुद्धं च गंधकम् ।
ग्राहयेत्समभागेन सूर्यक्षीरैर्विमर्दयेत् ॥
दिनसप्तकपर्यन्तं मर्दयेच्च निरन्तरम् ।
काचकूप्यां क्षिपेन्मुद्रां दत्त्वा चैव भिषग्वरः ॥
द्वादशप्रहरं दद्यान्मन्दाग्निञ्च न संशयः ।
पुनरेव प्रकर्तव्यो विधिरेष न संशयः ॥
रसो ग्राह्यः प्रयत्नेन रक्तिकाऽर्द्धं प्रदीयते ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ताम्बूलपत्रसंयुक्तं वातव्याधिं विनाशयेत् ॥
उन्मादे नष्टशुक्रे च वह्निहीने च दीयते ।
कुष्ठं व्रणं ज्वरञ्चैव नाशयेच्च किमद्भुतम् ॥

द्रव्यसंग्रहः- १० ताल, १० पारा, १० वंग, १० गंधक.

भावनाद्रव्यः— रुईचा चीक, ७ दिवस

पाचनपात्रः- मृत्कर्पटयुक्त कांचकूपी (मुखमुद्रा)

यंत्रः— वालुकायंत्र

अग्निः— १२ प्रहर प्रकारः— मंदाग्नि

द्रव्यसिद्धिः— १० तोळे.

अधिकारः— वातव्याधि

रोगः- वातव्याधि, उन्माद, नष्टशुक्र, अग्निनाश, कुष्ठ, व्रण, ज्वर.

मात्राः— ।॥· गुंज

अनुपानः— विड्याचें पान.

मृगांकरस

(र.यो.सा. ६१०) (र.कौ.,सि. भै. म.)

पाठः- नवसारं सैन्धवञ्च पञ्चबिल्वमितं पृथक् ।
निधाय डमरूयन्त्रे वह्निं यामचतुष्टयम् ॥
प्रज्वालयेदूर्ध्वभाण्डलग्नं सत्वं समाहरेत् ।
तत्सत्वं चूर्णितं रङ्गं समगन्धं तयोः समम् ॥
विचूर्ण्यैकत्र काचोत्थकुपिकायां विनिःक्षिपेत् ।
मृल्लिप्तवालुकायन्त्रस्थितायां दिवसद्वयम् ॥
चुल्ल्यामग्निमधो दत्त्वा यामान् द्वादश वा पचेत् ।
कूपीतलस्थं तद्रसम स्वर्णाभं स्वाङ्गशीतलम् ॥
गृह्णीयान्मारितात्स्वर्णाद्भवेद्गुणशताऽधिकम् ।
वृष्यमायुःप्रदं सर्वमेहानाञ्च विनाशनम् ॥
काम्यं परममेतद्धि मृगाङ्को गुरुगोपितः ।
प्रमेहोपशमे धातुवर्धने निश्चितं हि तत् ॥

द्रव्यसंग्रहः- १० तो. नवसागर, १० तो. सैंधव यांचें सत्त्व, १० तो. वंग, १० तो. गंधक.

पाचनपात्रः- मृत्कर्पटयुक्त कांचकूपी

यंत्रः- वालुकायंत्र

अग्निः- २ दिवस

सिद्धिः— १० तो. अधिकारः— क्षय

रोगः- प्रमेह, क्षय, वृष्य, धातुवर्धक वाजीकर.

टीपः- नवसागर २०, सैंधव २० एकत्र खलावेत. व डमरुयंत्रांत घालून ४ प्रहर अग्नि द्यावा. नंतर वरच्या मडक्यास आंतल्या बाजूनें लागलेलें सत्व काढून घ्यावें. त्याचें वजन करावें. त्याच्या वजनाइतकें कथलाचें चूर्ण घ्यावें. व दोघांच्या वजनाइतका गंधक घ्यावा. सर्वांचा खल करावा. या मिश्रणास सिंदूरविधीप्रमाणें २ दिवस किंवा १२ प्रहर अग्नि द्यावा. नंतर बाटली आपोआप थंड झाल्यावर युक्तीनें ती फोडून बाटलीच्या खालच्या भागांत सुवर्णाच्या रंगासारखें पिवळें भस्म तयार होतें, तें काढून घ्यावें.

सुवर्णराजवंगेश्वर

(र. यो. सा. ४५१) (रसायनसं.)

पाठः- रसाद्द्विगुणितं वङ्गं वङ्गाद्द्विगुणगन्धकम् ।
रसार्द्धं हेमभागञ्च तत्समं मौक्तिकन्तथा ॥
रसभागन्तु मरिचं तत्समं कान्तनागयोः ।
कुमारीरससम्पिष्टं खल्वे चूर्णन्तु कारयेत् ॥
सप्तमृद्वस्त्रं कृत्वा काचकूप्यां विनिक्षिपेत् ।
वालुकायन्त्रगं कृत्वा दिनमेकं हठाग्निना ॥
स्वाङ्गशीतं समुध्दृत्य पुनः खल्वे विमर्दयेत् ।
एवं सप्तदिनं कृत्वा वटिकाः कारयेद्बुधः ॥
चतुर्गुञ्जाप्रमाणेन योजयेदनुपानतः ।
सर्वरोगेषु दातव्या प्रमेहान्हन्ति विंशतिम् ॥
मूत्राघातं मूत्रकृच्छ्रं प्रदरार्शो वमींस्तथा ।
रसायनमिदं श्रेष्ठं स्वर्णवंगेश्वरो रसः ॥

द्रव्यसंग्रहः- १ मोती, १ सुवर्ण, २ पारा, २ मिरे, २ नाग, २ कांतलोह ४ वंग ८ गंधक.

भावनाद्रव्यः- कुमारीरस, १।२ दिवस

पाचनपात्रः- मृत्कर्पटयुक्त कांचकूपी

यंत्रः — वालुकायंत्र अग्निः— एक दिवस

प्रकारः— तीक्ष्णाग्नि द्रव्यसिद्धिः— ४ तोळे

अधिकारः— रसायन

रोगः- सर्वरोग, प्रमेह, मूत्राघात, मूत्रकृच्छ्र, प्रदर, अर्श, छर्दि.

मात्राः— ४ गुंजा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४ त्रिपुरभैरव

(नवसंहिता) (आ. औ. गु. शा.)

पाठः- रसं दरदगन्धं च गृहित्वा दशभागतः ।
एकभागं नवक्षारं स्फटिका पंचभागिका ॥
शुद्धं च रसकर्पूरं दशकर्षप्रमाणतः ।
गृहीत्वा प्रोक्तमानेन खल्वमध्ये विमर्दयेत् ॥
सुरलक्ष्णां कज्जलीं कृत्वा काचकूप्यां निधापयेत् ।
यामषोडशपर्यन्तं वालुकायन्त्रगं पचेत् ॥
स्वांगशीतं समुद्धृत्य पादगुंजाप्रमाणतः ।
पक्षाघातं वातरोगं उपदंशं च नाशयेत् ॥
उपदंशोत्थितान् रोगान् अन्यांश्चापि विनाशयेत् ॥

पारा १० भाग, गंधक १० भाग, हिंगूळ १० भाग, नवसागर १ भाग, तुरटी ५ भाग, रसकापूर १० भाग. ह्याप्रमाणें औषधें घेऊन खलांत घालून खलावींत. उत्तम कज्जली झाली म्हणजे बाटलींत घालून वालुकायंत्रविधीनें पचन करावें. अग्नि सोळा प्रहर द्यावा. स्वांगशीत झाल्यावर काढून घ्यावें. ह्याचें नांव त्रिपुरभैरव. हें औषध पक्षाघात, वातरोग, उपदंश आणि तज्जन्य विकार ह्यांचा नाश करतें.

त्रिपुरभैरवाची अवस्था

हें औषध दरदसिंदूराच्या वर्गांतील आहे. व्याधिहरण, अष्टमूर्ति व त्रिपुरभैरव ही त्रयी उपदंशघ्न वर्गांतील प्रसिद्ध होय. व्याधिहरण तीव्र म्हणजे नवीन विकारांत उपयोगी पडते. अष्टधातुरसायन अत्यंत जुनाट विकारांत उपयोगी पडते. त्रिपुरभैरव हें औषध उपदंश, विष, वातवाहिन्या, स्वयंप्रेरित स्नायु व इतर प्रकारचे स्नायु यांत बिघाड उत्पन्न झाला असतां द्यावें. नाडीव्रण, दुष्टव्रण, कर्कट ग्रंथि या विकारांत त्रिपुरभैरव उत्तम उपयोगी पडतें. अर्दितासारख्या विकाराच्या तीव्रावस्थेंत शक्यतो पारदकल्पना न दिलेली चांगली. अपरिहार्यच तर त्रिपुरभैरव एखाद्या सौम्य अनुपानाबरोबर देणें युक्त होय. याचप्रमाणें हें औषध देतांना विकार उपदंशजन्य असल्याबद्दल खात्री करून घ्यावी.

हें औषध उपदंशघ्न व तज्जन्यवातघ्न आहे.

५ सुवर्णसिंदूर

आयुर्वेदीय औषधीकरणांत कांहीं कांहीं गोष्टी अति निगूढ आहेत. पदार्थविज्ञान अगर रसायनशास्त्र त्यांचा उलगडा करूं शकत नाहींत. पण दृक्प्रत्यय मात्र हमखास येतो. त्यामुळें त्या गोष्टी मानल्याशिवाय गत्यंतर उरत नाहीं. ह्यापैकींच हें एक कोडें आहे.

आपला नित्याचा अनुभव

सुवर्णसिंदूर, चंद्रोदय, मकरध्वज ह्या औषधांत सुवर्ण घालण्यास सांगितलें आहे. पण तें सिद्धकल्पांत नाममात्र अथवा साक्षित्वरूपांतहि सांपडत नाहीं. पण सोन्याचे कांहीं गुण, प्रक्रियेंतील सुवर्णसाक्षित्वानें-हि प्रत्ययास येतात. आसन्नमरण रुग्णास सोन्याची अंगठी अग्नीवर लाल करून ती थंड पाण्यांत बुझवून तें पाणी पिण्यास दिलें तरी लागलीच थोडासा थकवा येतो. हा आपला नित्याचा अनुभव आहे.

संस्कृतत्वाचें गमक

परन्तु समान अथवा अधिक गुण गंधक जारित पारदांत, सिंदूरांत किंवा पृथक्शः समानगुण गंधक जारित पारदांत-सिंदूरांत किंवा अनेकवार सिंदूरोत्थित पारदांत विशिष्ट असं कांहीं लक्षण सांगतां येत नाहीं. रुग्ण-प्रात्यक्षिक एवढेंच त्याच्या संस्कृतत्वाचें गमक आहे. तेव्हां ह्याबाबत संशोधनपूर्वक प्रयोग होऊन कांहीं तरी उलगडा होणें अत्यावश्यक आहे.

पण तसें होत नाहीं.

हे कल्प तयार करण्यांत गंधक-जारण ह्या एक हेतु आहे. आणि तो साधतोहि. पण पारा व सुवर्ण यांचा दृढ संयोग मात्र साधत नाहीं. रसायनसार नामक पुस्तकांत पूर्व व उत्तरपक्षीय आघात-प्रत्याघाती वाङ्मय वाचायला मिळते. पण त्यावरूनहि ही गोष्ट कोणास सिद्ध झाली होती असें दिसत नाहीं. मकरध्वजांत घातलेलें सुवर्ण, पारदाबरोबर वर चढलें पाहिजे आणि तें त्या सिंदूरांत सांपडलेंहि पाहिजे, पण तसें होत नाहीं हें खरें.

[पुढें पान ५३५ पहा]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महासुदर्शन चूर्ण (शार्ङ्गधर)

लेखकः-श्री. मा. या. व्यवहारे बी एस्सी. (फार्म-केम) नासिक

शार्ङ्गधरांतील सुदर्शनचूर्णांतच महासुदर्शन चूर्ण संशोधितात. या चूर्णाच्या पाठांत एकंदर त्रेपन्न औषधी द्रव्यें असून त्यांपैकीं बावन्न वनस्पति-चूर्णें समभाग असून या सर्वांच्या निम्मानें काडेचिराईत चूर्ण आहे.

ह्या चूर्णाचा विशेषतः, जीर्णज्वर, हिंवताप व त्यांतील एक दिवसानंतर, दोन दिवसानंतर, तीन दिवसानंतर किंवा चार दिवसानंतर येणारे थंडीताप, हाडीताप, कडकी, यकृत्-प्लिहावृद्धि इत्यादि रोगांवर उत्कृष्ट उपयोग होतो. हें चूर्ण विशेष गुणकारी कां हें त्यांतील वनस्पतींच्या गुणधर्मांचा विचार करतां लक्षांत येईल.

या चूर्णाचा पाठ खालीं देऊन कोणकोणती वनस्पति शरिराच्या कोणकोणत्या अवयवांवर कार्य करते तें पाहूं. असें केल्यानें चूर्णाचा एकसमया-वच्छेदेंकरून कसा उपयोग होतो व रोगाचा परिहार कसा होतो याचा उलगडा होईल.

महासुदर्शनाचा पाठ

हिरडा, बेहेडा, आमलकी, हळद, दारूहळद, रिंगणी, मोतरिंगणी, कचोरा, सुंठ, मिरे, पिंपळी, पिंपळमूळ, मोरवेल, गुळवेल, धमासा, कुटकी, पित्त-पापडा, नागरमोथा, त्रायमाण, वाळा, कडूनिंब, पोखरमूळ, जेष्ठमध, कुडा, अजमोदा, इंद्रजव, भारंग-मूळ, शेवगा बी, तुरटी लाही, वेखंड, दालचिनी, पद्मकाष्ठ, नेत्रवाळा, श्वेतचंदन, अतिविष, चिकणामूळ, सालवण, पिठवण, विडंग, तगर, चित्रक, देवदार, चवक, पटोल, भुईकोहळा, लवंग, वंशलोचन, श्वेत-कमळ, आस्कंद, तमालपत्र, जायपत्री, तालीसपत्र, ही बावन्न औषधी व सर्वांच्या निम्मे काडेचिराईत.

या चूर्णामध्यें जीं निरनिराळीं कडू, तिखट, तुरट, आंबट, गोड वनस्पति चूर्णें आहेत त्यांची गटवारी करून शरीरांतील कोणकोणत्या अवयवांवर कार्य होतें तें पाहूं :—

१ पित्तदोषनाशक औषधें
२ मल व कफदोषनाशक ,,
३ स्वेदल व तापहारक ,,
४ उत्तेजक व शक्तिदायक ,,
५ दीपक, पाचक, वातनाशक औषधें
६ कृमिघ्न व अतिसार न होऊं देणारी औषधें
७ बुद्धिवर्धक औषधें

वरीलप्रमाणें कार्यकारी वनस्पतीची वर्गवारी-करतां येते. या वर्गवारीमध्यें कोणकोणती वनस्पति येते याचा विचार करूं.

(१) पित्तदोषनाशक वनस्पति

या गटांत दारुहळद, हळद, त्रायमाण, कडू-निंबसाल, कडू पडवळ, शेवगा बी, तालिसपत्र व काडे-चिराईत यांचा समावेश होतो. या वनस्पतींमध्यें कडू द्रव्यें हीं कार्यकारी घटक असल्यामुळें ते आपलें कार्य यकृत्, प्लिहा व पित्तस्राव यावर करतात. कार्यकारी घटकामध्यें बर्बेरीन, मार्गोसिन, स्वायरोचिन इत्यादि हीं व इतर कडू द्रव्यें आहेत. हीं द्रव्यें प्लिहेमध्यें संचित झालेले थंडीतापाचे जंतु मारून प्लिहा व यकृत् यांची झालेली वाढ कमी करतात, व पित्तस्राव कमीजास्त होऊन जे दोष निर्माण होतात ते नाहींसे करून स्राव सुस्थितीत आणतात; त्यामुळें थंडीताप व इतर ज्वर नाहींसे होतात. ज्वरांवरील प्रधान वनस्पतीकार्य अशा रीतीनें होतें.

(२) मल व कफदोषनाशक

या गटांत मलांचा दोष, मलावाटें मूत्रावाटें, व कफावाटें दूर करणाऱ्या औषधींचा समावेश होतो.

जीर्णज्वर, थंडीताप इत्यादि ज्वरांत बद्धकोष्ठता नेहमीं निर्माण होते व या रोगांत शौचास साफ होणें आवश्यक असते, म्हणून शौचास साफ होण्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कारितां त्रिफळा, चित्रक, सुंठ, अजमोदा ह्या वनस्पती वापरल्या आहेत. त्यामुळें शौचास साफ होऊन थंडी-तापाचे मरण पावलेले जीवजंतू मलावाटें बाहेर फेंकले जातात व रोगपरिहार लवकर होतो.

मूत्रल व कफनाशक वनस्पति

शरीरांतलि संचित झालेलीं निरुपयोगी द्रव्यें नेहमीं मलमूत्रावाटें बाहेर फेंकलीं जातात व त्या बरोबर जीवजंतुहि बाहेर फेंकले जातात व शरीर आंतून स्वच्छ होत जातें. अशावेळेस मूत्रेंद्रियें जास्त कार्यकारी व्हावींत म्हणून मूत्रल वनस्पतीचा या चूर्णांत उपयोग केला आहे. त्या वनस्पती म्हणजे धमासा, श्वेतचंदन, देवदार ह्या होत. ह्या वनस्पतीमुळें लघवीस जास्त व साफ होऊन शरीर स्वच्छ व निरोगी ठेवलें जातें. तसेंच गळा, श्वासनलिका व फुप्फुसांत संचित झालेला कफ पातळ होऊन बाहेर फेंकला जातो व श्वासोच्छ्वासेंद्रियें आपलें दैनंदिन कार्य नीट करूं लागतात. या चूर्णांतील अशा वनस्पती रिंगणी, मोतरिंगणी, जेष्टमध, भारंगमूळ, सालवण, पिठवण ह्या होत.

(३) स्वेदल व तापहारक औषधी

तापामध्यें घाम आला असतां ताप लवकर कमी होतो व तें कार्य सुंठ, मिरे, पिंपळी, पिंपळमूळ करतात. या वनस्पतींनीं शरीरांत उष्णता वाढून शरीराच्या रंध्रांतून घाम येतो व त्यामुळें उष्णता बाहेर निघून जाते व ताप उतरतो. त्याचप्रमाणें नागरमोथा, अतिविष, पित्तपापडा तापहारक आहेत त्यामुळें ताप कमी होतो.

(४) उत्तेजक व शक्तिदायक द्रव्यें

या गटांत रक्तशुद्धि व रक्तकणजनक हृदय-उत्तेजक व स्नायुशक्तिदायक असे भाग पडतात. थंडीतापांत प्लिहा व यकृत्वृद्धीमुळें रक्तकणजनन कमी होऊन पित्तकण वाढून शरीर फिकट व पिवळसर होऊं लागतें व शेवटीं कामला व पांडु रोग होण्यास सुरवात होते. अशा वेळेस रक्तकणजनन होणें जरूर असतें व ती भरपायी आवळकंठीतील फोलिक ॲसिड भरुन काढते व शरीर फिकट होऊं न देण्याचें कार्य करून शरीरांत जोम व उत्साह वाढवितें. त्याचप्रमाणें रक्तशुध्दि करण्याचें कार्य हळद, कमळ, पद्मकाष्ठ ह्या वनस्पति करतात.

हृदय-उत्तेजक वनस्पति

थंडीताप व इतर ज्वरांत हृदय आपलें कार्य शिथिलपणानें करित असतें व त्यामुळें त्याचा जोम कमी होतो. तो कमी न व्हावा नेहमींप्रमाणें रहावा म्हणून हृदय उत्तेजक वनस्पति कुटकी ही वापरली आहे. त्यामुळें हृदयाचें कार्य नियमित चालू राहून रक्ताभिसरण नियमित होतें व शरीर ताजेतवाने रहातें.

थंडीतापांत शरीराचे स्नायु विशेष शिथिल होऊन शरीर अशक्त होतें. हात-पाय-मांड्या काम करूं शकत नाहींत व त्यामुळें शरीरास एक प्रकारचा थकवा व निरुत्साह येतो. पण ही परिस्थिति येऊं नये व स्नायूस शिथिलता येऊं नये म्हणून या चूर्णांत भुई-कोहळा, चिकणामूळ ह्या पौष्टिक वनस्पती वापरल्या आहेत. त्यामुळें स्नायु आपलें कार्य कमजोर होऊं देत नाहींत व थकवा येऊं देत नाहींत.

सांड
डायाबेटॉल
मधुमेहावर अप्रतिम.
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द. कृ. सांड ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई.

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स-
बी. पी. बर्वे ॲंड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर ॲंड को.
मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(५) दीपक, पाचक, व वातनाशक

दीपक पाचक द्रव्यामुळें जठराग्नि वाढून भूक, पचन व शक्ति वाढते व त्यामुळें शरीरांत निर्माण झालेली उष्णता व कडकी कमी होते. हें कार्य वाळा, चंदन, कमल, दीपक पाचक म्हणून सुंठ,मिरे,पिपळी गुळवेल,दालचिनी,कचोरा,लवंग, पुष्करमूळ, तमालपत्र हे करितात. व शरीरांतील वात अजमोदा, सुंठ वगैरे नाहींसा करतात व सर्व नलाची व पोटाची पचन-क्रिया कार्यक्षम ठेवतात.

(६) कृमिघ्न व अतिसार न होऊं देणारीं

बद्धकोष्ठतेमुळें कृमि होऊं नये किंवा अतिसार निर्माण होऊं नये म्हणून वावडिंग, कुडा, व इन्द्रजव ह्या वनस्पतींचा संयोग ह्या चूर्णांत केला आहे.

(७) बुद्धिवर्धक वनस्पति

शेवटीं राहता राहिला मेंदू. रोगामध्यें मेंदू अतिशय अशक्त होतो व कुविचार सुरूं होऊन शांत झोंप येत नाहीं. त्यामुळें रोग कमी होण्याऐवजीं वाढत जातो. शांत झोंप येणें म्हणजे निम्यानें रोग कमी होणें, पण शांत झोंप येणार कशी ? अशा वेळेस मेंदूची अशक्तता घालविणें जरूर असते. ती घालविण्याकरितां आस्कन्द, वेखंड, जायपत्री ह्या वनस्पती महासुदर्शनचूर्णांत वापरल्या आहेत. वरील वनस्पतीमुळें मेंदूची अशक्तता कमी होऊन मेंदू शांत होतो व झोंपहि गाढ येते व रोगी रोगापासून लवकर मुक्त होतो. त्याचा उत्साह वाढतो व तो दैनंदिन कार्य करूं लागतो.

वरील सर्व वनस्पतींचें शरीरांतील प्लिहा, यकृत, पित्त, हृदय, श्वासोच्छ्वासेंद्रियें, मलमूत्रेंद्रियें, पोट, आंतडीं, स्नायू व मेंदू या सर्व अवयवांवर एक समयावच्छेदें कार्य होऊन, हें महासुदर्शनचूर्ण थंडीताप व त्याचे इतर संततज्वर नाहींसें करतें. वरील गुणांमुळेंच तें एक प्रभावी चूर्ण गणलें आहे.

इतर औषधांशीं तुलना

इतर औषधानें थंडीताप जरी कमी होत असला तरी इतर निमार्ण झालेले दोष नाहींसे होत नाहींत, त्यामुळें शरीर संपूर्णपणें रोगमुक्त होत नाहीं. वरील चूर्णांमुळें मुख्य रोगाबरोबरच इतर निर्माण झालेले दोष परिपूर्ण नाहींसे होतात व शरीरांतील रोगांचा परिहार पूर्णपणें करतात. म्हणूनच या महासुदर्शनचूर्णांत इतर सर्व प्रकारच्या वनस्पतींचा उपयोग केला आहे व तें एक प्रभावी औषध बनलें आहे.

लेखकाचा स्वानुभव

[वरील लेखक हे वैद्य अगर डॉक्टर नाहींत, औषधीनिर्माणकर्ते आहेत, व विशेष म्हणजे स्वतःच्या आजारीपणांत त्यांनीं महासुदर्शनचूर्णांचा अनुभव स्वतःवर घेतलेला आहे.

आंबट अनुपानाची जोड आवश्यक आहे

या लेखांत सुचविल्याप्रमाणें वाचकांनीं महासुदर्शनचूर्ण वापरून अनुभव घ्यावाच पण तेवढ्यानें परिणाम दिसत नाहीं असें अनुभवास येईल तर त्याला ताक, लिंबाचा रस, डायल्युट हायड्रोक्लोरिक ॲसिड यासारख्या एखाद्या अम्ल अनुपान ची जोड द्यावी म्हणजे तें अधिक उपयुक्त होतें व कमी मात्रा पुरते असें अनुभवास येईल. या चूर्णालाच ३ अगर ७ अम्ल भावना देऊन गोळया करून ठेवणें अधिक सोईचें आहे. —संपादक]

तारेचा पत्ताः–Newbottle

के. के. शहा अँड कंपनी

बाटल्यांचे व्यापारी

(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)

रिकाम्या बाटल्या, बुच, कॅपसुल्स् [हेअर ऑईल, सरबत, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाचीं सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे

ठोक व किरकोळ

विक्री करणारे व्यापारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मलेरियावर खात्रीचें औषध

लेखकः-वैद्य दातार, अंबरनाथ

"आतां आपण औषधीकल्पांची तुलना करूं या! मलेरियावरचें म्हणजे हिंवतापावरचें खात्रीचें औषध क्विनिन घेऊं. त्या क्विनिननें मलेरिया बरा झाला तरी त्याचे उष्णतेमुळें आणि रोगाचे प्रादुर्भावास कारणीभूत झालेली व रोगानें वाढलेली यकृत् दुर्बलता जात नाहीं. त्यामुळें पुढें होणारा ॲनिमिया व बहिरेपणा ह्या व्याधींचा विचार करावयास नको कां?

रुईच्या पानाचा तुकडा द्यावा

आयुर्वेदांत हिंवतापाचें निदान नुसतें मलेरिया किंवा हिंवताप एवढ्या शब्दांनें होत नाहीं, तर संततज्वर, एकांत्रक, द्वितीयक, तृतीयक ज्वर असें त्याच्या प्रकारासहित निदान केलें जातें. असें निदान करून मोठ्या माणसाव तापाचे पाळीचे दिवशीं एक रुपयाच्या आकाराएवढा रुईचे पानाचा तुकडा खाण्याचे विड्यांतून देऊन पहावा. आणि फक्त दोनच पाळ्यांचे वेळेला म्हणजे फक्त दोनच विडे द्यावेत. क्विनिननें १० ते ९ रोगी बरे होतील तर ह्या विड्यांत १० पैकीं १० बरे झाले पाहिजेत. पुनः क्विनिनसारखा मागाहून कोणताहि दुष्परिणाम होणार नाहीं, हें वेगळेंच. आणि किंमत ह्या दृष्टीनें विड्याला काय पडेल तेंहि पहावें."

—लोकमान्य ता. १३-११-५३

मलेरियावर रुईचें दूध

मलेरियावरील आयुर्वेदीय औषधाबाबत चर्चा चालली असतां वैद्यराज जळूकरशास्त्री यांचे चि. श्री. द. जळूकर तेथें होते. ते म्हणालेः- आमचे वडील मलेरियावर रुईचें दूध वापरतात. एका कांचेच्या ग्लासांत २० तोळे साखर घेऊन आम्हीं रुईचीं पानें तोडून त्याचें दूध त्या साखरेंत पाडतो. साधारणतः २ तोळे रुईचें दूध २ तोळे साखरेंत घेतलें जातें या साखरेचे ४ गुंजा प्रमाण देण्यानें मलेरिया जातो. याच्या गोळ्याहि करतां येतात."

वैद्यराज जळूकरशास्त्री यांचे अर्कप्रयोग मागें पत्रिकेंत प्रसिद्ध झाले आहेत.

रुईचें दूध कसें द्यावें ?

हवी तेवढी साखर भांड्यांत घ्यावी व ती चांगली भिजून पेढा बनेल इतकें रुईचें दूध घालावें व सावलींतच वाळू द्यावें. वाळल्यावर भरून ठेवून २ ते ८ गुं. प्रमाणांत, ती साखर, मध किंवा कोमट पाणी याबरोबर अगर नुसती जिभेवर सोडावी. वय, प्रकृति व दोषबलानुसार रोज ती ३।४ वेळां हें देतां येते.

मलेरिया की अचूक सिध्दौषधी

आझाद मेडिकल फार्मसी (जवाजा-अजमेर) या औषधी कारखान्यांत तयार झालेलें *A5* नांवाचें मलेरियाताप थांबविणारें औषध आयुर्वेद पत्रिकेकडे आलें आहे. या गोळ्यांची रसायनशाळेकडून परीक्षा केली असतां त्यांत क्विनाइन अथवा सल्फानिलमाईड वर्गापैकीं रसायन मिश्र नाहीं असें कळून आलें आहे. औषधी-निर्मात्याकडून घटकांची माहिती मिळवून मगच त्या औषधासंबंधीं दोन शब्द येथें लिहिण्यांत येत आहेत.

घटक आयुर्वेदीय आहेत

या औषधाचे घटक शुद्ध आयुर्वेदीय आहेत व आपल्या देशांत सर्वत्र उपलब्ध होणारे आहेत. आझाद मेडिकल फार्मसी अनुभवासाठीं कांहीं गोळ्या मागणी करणाऱ्या वैद्यांना पाठवूं शकेल. त्यांचा वापर मलेरिया भागांतील वैद्यांनीं करून अनुभव कळवावा अशी विनन्ति आहे.

पुणें येथें
'आयुर्वेद सेवा संघ नासिक' चीं
औषधें मिळण्याचें ठिकाण
किरण मेडिकल सर्व्हिस
नगरकर तालीम चौक, लक्ष्मीरोड, पुणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

[पान ५३० वरून पुढें]

ह्या बाबतींत प्राचीन अर्वाचीन अशा दोन प्रक्रिया संभवूं शकतीलसें वाटतें.

	वितळण बिंदु	बाष्पीभवन बिंदु
पारा	———	२५६·९८
सोनें	१०६३·०९	

१) सोन्याची वाफ होण्यास लागणारी उष्णता सहन करील असा पारा तयार केला पाहिजे म्हणजे तो सोन्याबरोबर वर रससिंदुरांत चढेल व मग तो संयोग दृढ स्वरूप पावेल असें वाटतें.

२) किंवा सोनें, पारा, गंधक यांच्या वाफांचे प्रवाह एकत्र आणण्यानेंहि अशा प्रकारचा संयोग होऊं शकेलसें वाटतें; पण ह्या दोन्ही केवळ कल्पनाच आहेत. प्रत्यक्ष संशोधनानंतरच खरा निर्णय कळेल.

सुवर्णसिंदूर

(र. यो. सा. ४५२) (र. क. यो.)

पाठ– पारदं गन्धकं स्वर्णं जंबीररसमर्दितम् ।
काचकूप्यां विनिक्षिप्य वालुकायन्त्रमध्यगम् ॥
दिनार्धं पाचयेदेतत्स्वांगशीतलतां गतम् ।
हेमसिन्दूरकं नाम नागताम्राभ्रसंयुतम् ॥
प्रयोगे सर्वदोषादि हन्ति सत्यं न संशयः ॥

द्रव्यसंग्रहः– १३ पारा, १३ गंधक, १३ सुवर्णचूर्ण.
भावना द्रव्यः– जंबीररस ३।४ दिवस
पाचनपात्रः– मृत्कर्पटयुक्त काचकूपी
यंत्रः– वालुकायंत्र अग्निः– ४ प्रहर
प्रकारः तीक्ष्णाग्नि द्रव्यसिद्धिः– १३ तोळे
अधिकार व रोगः— सर्वरोग
अनुपानः— रोगोचित
टीपः— नंतर नागभस्म अभ्रकभस्म, ताम्रभस्म समभाग मिश्र करून मर्दन करणें.

पूर्णचंद्रोदय र. चं. मै. र.

पलं मृदुस्वर्णदलं रसेंद्रात्पलाष्टकं षोडश गन्धकस्य ।
शोणैः सुकार्पासभवप्रसूनैः सर्वं विमर्द्याथ कुमारिकाद्भिः ॥
स्यात्काचकुंभे निहितं प्रगाढं मृत्कर्पटैः स्याद्दिवसत्रयं च ।
पचेत्क्रमाग्नौ सिकताख्ययन्त्रे ततो रजः पल्लवरागरम्यम् ।
संगृह्य चैतस्य पलं च सम्यक् पलं च कर्पूररजस्तथैव ॥
जातीफलं सोषणमिन्द्रपुष्पं कस्तूरिकाया इहशाण एकः ।
चंद्रोदयो ऽयं कथितो ऽस्य वल्लो भुक्तो हि वल्लीदलमध्यवर्ती ॥

द्रव्यसंग्रहः– १॥ तो. सुवर्णवर्ख, १२ तोळे पारा (सुवर्णग्रासित), २४ तो. गंधक.

भावनाद्रव्यः– तांबड्या कपाशीचीं फुलें व कोरफडीचा रस ३।३ भावना.

पाचनपात्रः– सप्तमृत्कर्पटयुक्त काचकूपी.
यंत्रः– वालुकायंत्र.
अग्निः– २४ तास (८ प्रहर)
द्रव्यसिद्धिः– १२ तोळे. मात्राः– ।॥ ते १गुंज
अनुपानः– नागवेलपान किंवा षोडशगुणीविडा.

टीपः– स्वांगशीत झाल्यावर सिंदूरवर्णाचा अगर कोवळया पानाच्या वर्णाचा तांबडा रस तयार होतो. हा तयार झाल्यावर हा रस ४ तोळे व ४ तो. कापूर मिसळून प्रथम खल करणें. नन्तर जायफळ, समुद्रशोफाचें फळ व लवंग, कस्तूरी ही प्रत्येकीं २४ गुंजा मिसळून एकत्र खल करावा.

माणिक्य रस (र. यो. सा. ५६६)

(र. चं. र. सु. यो. म. र. म. मा.)

पाठः– शुद्धं सूतं पलान्यष्टौ कुनटी तालकं समम् ।
नागपत्रं चाष्टपलमष्टौ भागाश्च गन्धतः ॥
एकत्र कज्जलीं कृत्वा काचकूप्यां विनिःक्षिपेत् ।
वालुकायन्त्रमध्ये तु वह्निं षोडशयामकम् ॥
भवेन्माणिक्यवर्णोऽयं शुक्रस्तम्भं करोति च ।
जराव्याधिविनाशाय राजरोगकुलान्तकृत् ॥
दशरात्रप्रयोगेण महाव्याधिविनाशनम् ।
रक्तिकार्द्धं सदा पथ्यं वृद्धः संयाति यौवनम् ॥

द्रव्यसंग्रहः– ७ पारा, ७ गंधक, ७ मनशीळ, ७ हरताळ, ७ नागपत्र.

पाचनपात्रः– मृत्कर्पटयुक्त काचकूपी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यंत्रः— वालुकायंत्र अग्निः—१६ प्रहर
द्रव्यसिद्धिः- ७ तोळे अधिकारः—राजयक्ष्मा
रोगः- यक्ष्मा, कुष्ठादि महाव्याधि, शुक्रस्तंभक, वार्धक्य नाशक.

मात्राः— ।।- गुंज सेवनकालः—१० दिवस

वाचकांचा पत्रव्यवहार—

पण अनुभव मात्र उलट आहे !

आयुर्वेद पत्रिका १।२।५४ चे अंकांत कविराज प्रेमचंदशास्त्री लिहितात कीं ' विशेष बौद्धिक श्रम करणाऱ्यांत तसेंच श्रीमंत वर्गात टक्कल जास्त असते ही समजूत शास्त्रीय दृष्ट्या चुकीची आहे. ' पण अनुभव मात्र या बाजूचाच आहे.

गरीब माणसांत तसेंच श्रमजीवी लोकांत टक्कल सहस्रांत एकाला सुद्धां सांपडत नाहीं; पण श्रीमंत-वर्ग तसेंच बुद्धिजीवी वर्ग कारकून, डॉक्टर, वकील, इंजिनीयर व राजकारणी या लोकांत टक्कल चढत्या श्रेणीनें दिसून येते, व उलट हमाल, पाटीवाले, गिरणी कामगार, कल्हईवाले तसेंच इतर अंगमेहनतीचीं कामें करणारा मजूर वर्ग यांत हजारी एकहि टक्कल पडलेला दिसून येत नाहीं ही गोष्ट आजूबाजूस नजर टाकली असतां दिसून येईल.

तसेंच टोपी, हॅट अगर पगडी वा अन्य शिर-स्त्राण यांचा पण टक्कलाशीं कांहीं एक संबंध नाहीं. उलट ह्या देशांत तरी असें म्हणतां येईल की शिरो--भूषणामुळेंच केसांचें संरक्षण होतें.

ऑफिसांत पट्टेवाले, कल्हईवाले, पाटीवाले, कामगार वर्ग तसेंच डोक्यावरून खडी वाहणारे तेलंगी मजूर यांचे डोक्यावर सतत कांहींतरी १०।१२ तास शिरोभूषण असतें व त्यांचे केसांचें आरोग्यहि दृष्ट लागण्यासारखें असतें. ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे.

तसेंच तीक्ष्ण व खारट पदार्थ पण या वर्गांतच जास्त खाण्यांत येतात. एवढेंच नव्हे तर ते खात असलेले तिखट पदार्थ आजचा बुद्धिजीवी वर्ग तोंडांत घालूं शकणार नाही इतके झणझणीत असतात. पण त्यामुळें त्यांचेमध्यें टक्कल पडलें आहे, असेंहि म्हणतां येणार नाहीं. —वैद्य र. गो. कुलकर्णी

सूक्ष्मौषधीबाबत शंका

"१ गुंज औषधाला १० तोळे साखर या प्रमाणांत कांहीं तरी चूक दिसते. १ गुंज औषधाला १० गुंजा साखर असें असावें. तरी लेखकानें पूर्ण खुलासा करावा ही विनंति, अगर जाणत्यांनीं."

— वैद्य प्रतापकुमार

(दशांश कल्पनेप्रमाणें १ गुंजा औषध व ९ गुंजा साखर एकत्र घोटली असतां १० गुंजा औषध (१ X) पद्धतीचें होतें. तें १० गुंजा १ X औषध + ९० गुंजा साखर एकत्र खलल्यास १०० गुंजा औषध (२ X) पद्धतीचें होतें. तें १० गुंजा २ X औषध + ९०० गुंजा साखर मिळून १००० गुंजा औषध ३ X पद्धतीचें होईल. १ गुंज औषधांत १० तोळे (= ९६० गुंजा) साखर घालणें काय किंवा ९९९ गुंजा साखर घालणें काय जवळ जवळ सारखेंच असें वाटतें. तज्ज्ञांनीं अधिक खुलासा स्पष्ट केल्यास बरें — संपादक)

पांढरें कोड

हजारोंचें गेले व त्यांनीं अभिप्राय दिलेलें आणि अनेक बक्षिसें मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु.

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो. असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन' मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदांतील एक अत्यंत प्रभावी तैल कल्प

....बृहज्जात्यादितैल....

लेखकः-वैद्य इंदुभूषण भिगारे,
महाल, नागपूर

आयुर्वेदांतील तैलपाकसिद्धि हा एक स्वतंत्र विषय आहे. तैलपाकसिद्धीकरितां शास्त्र, गुरुपरंपरा व प्रत्यक्ष अनुभव ह्यांची जोड असल्याशिवाय तैल-पाकसिद्धि पूर्ण होऊं शकत नाहीं. बंगाल प्रांतांत तैलपाक करणारे निष्णात वैद्य आहेत. त्यांचा वंश-परंपरेनें आयुर्वेदीय पद्धतीनें तैलपाक करणें हाच मुख्य व्यवसाय आहे, व ह्यामुळें आयुर्वेदीय चिकित्सा-क्षेत्रांत बंगालप्रांतांत तेलाचा वापर फार मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. माझ्या ६ वर्षांच्या बंगाल-प्रांताच्या वास्तव्यांत मी तेथील आयुर्वेदीय तैलपाक-सिद्धीचा अभ्यास केला आहे. व त्यानंतर आपल्या ह्या मराठी प्रांतांत देखील वीस वर्षांपासून तैलपाक सिद्धीचा प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे. यामुळें तैलपाक करतांना कोणकोणत्या मुख्य बाबींकडे लक्ष द्यावयास पाहिजे ह्याची एक विस्तृत लेखमालाच लिहावी लागेल. तूर्त प्रस्तुत विषयाकडे वळूं या.

बृहत्जात्यादि तैलाची पाकसिद्धि

बृहत्जात्यादि तैल करतांना तिळाच्या तेलावर खालील संस्कार करावे लागतात. १) मूर्च्छापाक २) कषायपाक ३) कल्कपाक. हे तीन संस्कार बृहत्जात्यादि तैलांत आवश्यक आहेत. तेलाचे एकंदर संस्कार पांच आहेत. १) मूर्च्छापाक २) कषायपाक ३) कल्कपाक ४) क्षीरपाक व ५) सुगंधपाक. तैलाचा मूर्च्छापाक हा संस्कार आपल्या प्रांतांत प्रचलित नाहीं. ह्या मूर्च्छा-पाकाचें वर्णन बृहत्-त्रयींत किंवा लघु-त्रयींत मला आढळलें नाहीं. श्री. गोविंदसेनकृत वैद्यक-परिभाषा-प्रदीप, नांवाच्या ग्रंथांत शेवटल्या परिच्छेदांत 'घृत-तैल-मूर्च्छाविधि' नांवाचें स्वतंत्र प्रकरण आहे. हा विधि ग्रंथकारानें कोणत्या आर्ष ग्रंथांतून उद्धृत केला आहे, हें मात्र स्पष्ट केलेलें नाहीं. तस्मादामोपदोषं हरति च सकलं वीर्यवत् सौख्यदायी ॥
दुर्गन्धं विनिहन्ति तैलमरुणं सौरभ्यमाकुर्वते ॥१९४॥
घृत व तिलतैलमूर्च्छाविधिः ॥

अर्थात् मूर्च्छापाकामुळें घृत तैलाचा आमदोष जाऊन तेल अत्यंत वीर्यवान् दुर्गंधिविरहित होऊन लाल रंगाचें व सुगंधित होतें, असें लिहिलें आहे. मूर्च्छा-पाकाशिवाय केलेली कोणतीहि तैलपाकसिद्धि बंगाली वैद्य शास्त्र-संमत मानीत नाहींत. म्हणून प्रत्येक तैलपाक विधींत मूर्च्छापाकविधि आवश्यक आहे. त्या मूर्च्छापाकाचें विस्तृत वर्णन वरील ग्रंथांत पहा-वयास मिळेल.

कठिण द्रव्यांचा काढा

बृहज्जात्यादि तेलांत कषाय व कल्कपाक करावा लागतो. तैलाच्या पाकांत सांगितलेल्या कठीण द्रव्यांचा काढा करून तो स्वच्छ गाळावा व ह्या काढ्याबरोबर मूर्च्छित तेलाचा पाक करावा. तीन भाग काढा आट-ल्यावर निम्ब, करंज, चमेली व पडवळ ह्यांच्या ताज्या व हिरव्या पानांचा कल्क टाकून तेलाचें वजनाइतकें स्वच्छ पाणी घालून पाक करावा. पाणी सर्व आटल्या-वर मध्यम पाकाचें तेल तयार करावें. खरपाक किंवा मृदुपाक होऊं देऊं नये.

भैषज्यरत्नावलीचा पाठ

बृहज्जात्यादि तैलाचा पाठ भैषज्यरत्नावली ग्रंथांत दिला आहे. लघु जात्यादि तैल किंवा घृत ह्यांचे पाठ सर्व संग्रहग्रंथांतून आढळतात. परन्तु बृहत्-जात्यादितैलाचा पाठ मात्र फक्त भैषज्यरत्नावलींतच आढळतो. भैषज्यरत्नावलीकारांनीं हा पाठ एखाद्या आर्ष ग्रंथांतून उद्धृत केला आहे, असें म्हटलेलें नाहीं. भैषज्यरत्नावलींतील बृहज्जात्यादितैलाचा पाठ खालील प्रमाणें आहे.

जातीनिम्बपटोलानां नक्तमालस्य पल्लवाः ।
सिक्थकं मधुकं कुष्ठं द्वे निशे कटुरोहिणी ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मंजिष्ठा पद्मकं लोध्रमभया पद्मकेशरम् ।
तुत्थकं शारिवा बीजं नक्तमालस्य दापयेत् ॥
एतानि समभागानि पिष्ट्वा तैलं विपाचयेत् ।
विषव्रणे समुत्पन्ने स्फोटके कुष्ठरोगिषु ॥
दद्रुवीसर्परोगेषु कीटरोगेषु सर्वशः ।
सद्यःशस्त्रप्रहारेषु दंष्ट्राविद्धेषु चैव हि ॥
नखदंतक्षते देहे दुष्टमांसापकर्षणम् ।
म्रक्षणार्थमिदं तैलं हितं शोधनरोपणम् ॥

कल्कद्रव्यः– चमेली, कडुनिम्ब, पडवळ, करंज ह्यांची ताजी व हिरवीगार पानें.

काथ्यद्रव्यः– जेष्टमध, कोष्ठ, हळद, दारुहळद, कुटकी मंजिष्ठा, पद्मकाष्ठ, लोध्र, हिरडा, कमलकेशर, अनंतमूळ, करंजबीज ह्या द्रव्यांचा काढा.

बृहत्जात्यादि तैलाचे गुणधर्म

ह्या तैलाचा उपयोग विषव्रण, कुष्ठ व सद्योव्रण ह्या विकारावर सांगितलेला आहे, व ह्या तैलामुळें शोधन व रोपण हीं दोन्हीही कार्यें होतात, असें दिसून आलें आहे. गेल्या वीस वर्षांपासून आम्ही व्रणाच्या शोधनरोपणाकरतां ह्याच तैलाचा उपयोग केला आहे. कोणत्याहि व्रणावर ह्या तैलाची पट्टी दिल्यास व्रणांतील पू साफ होऊन व्रण तावडतोब भरून येतो. शस्त्रक्रिया केल्यानंतर ह्या तैलाचा उपयोग आम्ही आतांपावेतो हजारो रोग्यांवर केला आहे. आयुर्वेदांतील व्रण शोधन व रोपणाकरतां अनेक कल्प वापरल्यानंतर ह्या कल्पाचा उपयोग आम्हीं केला आहे. आम्हांला एकाहि ठिकाणीं अपयश आलें नाहीं. व दुसरा एखादा कल्प वापरण्याचें कामहि पडलें नाहीं. आयुर्वेदीय रुग्णालयांतून ह्या तैलाचा प्रयोग होणें अत्यंत आवश्यक आहे. व वैद्यबंधूंनींहि ह्या तैलाविषयींचा आपला अनुभव जाहीर केल्यास त्यांत अनेक सुधारणा घडून येतील. ह्या तेलांत निंब, करंज, जाति व पटोल ह्यांची ताजी पानें असल्यामुळें ह्या पानांतील क्लोरोफिल नांवाचा हिरवा पदार्थ तेलांत मिसळतो व ह्या क्लोरोफिल नांवाच्या पदार्थानें व्रणशोधनाचें व रोपणाचें कार्य तावडतोब होतें, असें आधुनिक शास्त्रज्ञांचें निश्चित मत आहे. केवळ ह्या दृष्टिकोनांतूनहि, ह्या तेलाचा विचार केल्यास, हें तेल अद्वितीय ठरल्याशिवाय राहणार नाहीं.

पाठांत किंचित् परिवर्तन

हें तैल तयार करतांना आम्ही मोरचूद व मेण हे पाठांत सांगितलेले पदार्थ तैलांत वर्ज्य केले आहेत. कारण नाक, कान, वगैरे इंद्रियांतून ह्या तेलाचा वापर होत असल्यानें तेलांत मोरचूद न घातलेलें बरें, असें आम्हांस वाटलें. मेण हा पदार्थ बाजारांत शुद्ध न मिळत असल्यामुळें तेहि टाकण्याचें टाळलें आहे. ह्या तेलाचा अनुभव आपल्या चिकित्सा व्यवसायांत घेऊन आपला अनुभव वैद्य कळवितील अशी उमेद आहे.

घृत-तैल-मूर्च्छाविधिः ।

आयुर्वेदीय औषधनिर्माणाविधींत तैलपाक व घृतपाक विधीला अत्यंत महत्व आहे. पारदशुद्धि, पारदमारण, व पारदबंधन ह्या विधींना जेवढें रसशास्त्रांत महत्व आहे, तेवढेंच महत्व काष्ठ--औषधी व त्यांचे कल्प तयार करणाऱ्या चिकित्साशास्त्रांत तैलपाकविधीला आहे.

तेल कुजणार नाहीं

तैलपाक विधींतील प्रथम संस्कार मूर्च्छापाक हा आहे. मूर्च्छापाक हा प्रथम संस्कार झाल्याशिवाय तैल किंवा घृत हे योगवाही होऊं शकत नाहीं. अर्थात् निरनिराळ्या औषधी द्रव्यांचे रस, वीर्य, विपाक, व प्रभाव हे तैलांत विलयन होऊं शकत नाहींत, असा ठाम सिद्धांत तैलपाकविधींतील आहे. रसशास्त्रांत अष्ट संस्कारांतील मूर्च्छन संस्काराला जेवढें महत्व आहे, तेवढेंच महत्व तैलमूर्च्छाविधीला आहे. कोणत्याहि वैद्यांनीं मूर्च्छापाकसहित व मूर्च्छापाकरहित तैलसिद्धि करून पहावी; त्यांत त्यांना फरक आढळून आल्याशिवाय राहणार नाहीं. मूर्च्छापाक विधीनें तयार केलेलें तैल कधींहि कुजणार नाहीं, अर्थात् द्रव्य, गंध, व रस ह्यांत कधींच फरक पडत नाहीं. म्हणून बंगाल प्रांतांत मूर्च्छाविधीला अत्यंत महत्व दिलें जातें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्र प्रांतांत तैलमूर्च्छा-विधीची वैद्यांना माहिती नसल्यामुळें आम्ही सविस्तर हा विधि पुढें दिला आहे. ह्याचा उपयोग आमच्या प्रांतांतील वैद्य-बंधु करून एक नवीन परंपरा निर्माण करतील, अशी आशा आहे. मूर्च्छापाकविधींतील एकंदर परंपरा कशी आहे, ह्यांचें वर्णन थोडक्यांत देण्याचें ठरविलें असलें, तरी देखील प्रत्यक्ष प्रयोग पाहिल्याशिवाय ह्या प्रयोगांतील अडचणी कळणें जरा कठीणच जाते. परंतु ह्यांतील वर्णनावरून बऱ्याचशा अडचणी दूर करतां येतील असें वाटतें.

तैलपाक मूर्च्छाविधि

प्रथम तेल स्वच्छ व मजबूत अशा भांड्यांत मंदाग्नीवर गरम करावें. तेल निष्फेन झाल्यावर भांडें भट्टीवरून खालीं उतरावें, व तैल किंचित् थंड झाल्यावर त्यांत कल्क द्रव्य हळूहळू टाकावें. कल्कद्रव्य स्वच्छ कुटून तें बारा तास पाण्यांत भिजत ठेवावें. कल्कद्रव्य तैलांत टाकल्यास तेलांतील फेन बाहेर जाण्याचा संभव असतो म्हणून किंचित् तेल थंड झाल्यावर कल्क सोडावा. ह्या विधींत आज अर्थात् अग्नि मंदच असला पाहिजे. असा शास्त्र-कारांनीं आदेश दिला आहे. हा मूर्च्छाविधि श्री. गोविन्दसेनांच्या परिभाषाप्रदीप नांवाच्या ग्रंथांत दिला आहे तो जसाचा तसाच आम्हीं खालीं देत आहोत.

घृतमूर्च्छाविधि

पथ्याधात्री विभीतैर्जलधररजनीमातुलुंगद्रवैश्च ।
द्रव्यैरेतैः समस्तैः पलकपरिमितैर्मन्दमन्दानलेन
आज्यप्रस्थं विफेनं परिचपलगतं मूर्च्छयेद्वैद्यराज-
स्तस्मादामोपदोषं हरति च सकलं वीर्यवत्सौख्यदायी १८८

कटुतैलमूर्च्छाविधिः ।

वयस्थारजनीमुस्ताबिल्वदाडिमकेशरैः ।
कृष्णाजीरकह्रीबेरनलिकैः सबिभीतकैः ॥१८९॥
एतैः समांशैः प्रस्थे च कर्षमात्रं प्रयोजयेत् ।
कटुतैलं पचेत्तेन आमदोषहरं परम् ॥१९०॥

एरण्डतैलमूर्च्छाविधिः

विकसामुस्तकं धान्यं त्रिफला वैजयन्तिका ।
ह्रीबेरघनखर्जूरवटशृङ्गनिशायुगम् ॥१९१॥
नलिका भेषजं देयं केतकी च समं समम् ।
प्रस्थे देयं शाणभितं मूर्च्छने दधिकांजिकम् ॥१९२॥

तिलतैलमूर्च्छाविधिः ।

कृत्वा तैलं कटाहे दृढतर विमले मन्दमन्दानले तत् तैलं
निष्फेन भावंगतमिह च यदा शैत्ययुक्तं तदैव
मंजिष्ठारात्रिलोध्रै जलधरनलिकैः साक्षपथ्यैः कुमार्या ।
सूचीपुष्पांघ्रिनीरैरुपहितमथितैर्गन्धयोगं जहाति ॥
तैलस्येन्दुकलांशिकैकविकसाभागोऽपि मूर्च्छाविधौ ।
ये चान्ये त्रिफलापयोदरजनी ह्रीबेरलोध्रान्विताः ॥
सूची पुष्पवटावरोहनलिकास्तस्याश्चपादांशिका-
दुर्गंधं विनिहन्ति तैलमरुणं सौरभ्यमाकुर्वते

———

गुरुवर्य वेणीमाधवशास्त्री जोशी पारितोषक वितरण समारंभ

वै. त्र्यं. म. गोगटे आयुर्वेतीर्थ अमरावती, यांच्या योजनेनुसार टिळक संक्रांतीला गु. वेणीमाधव-शास्त्री जोशी पारितोषक संबंधीचा पाठान्तराचा कार्यक्रम झाला. त्यांतील निकालानुसार श्री. मधुकर ज्ञानेश्वर कुलकर्णी तृतीय वर्ष विदर्भ आयुर्वेद महा-विद्यालय अमरावती यांनीं तें पारितोषक मिळविलें. त्याबद्दल सदरहू विद्यार्थी अभिनंदनास पात्र आहे.

पारितोषक-वितरणाचा समारंभ तेथील श्री. शिवाजी महाविद्यालयाचे प्रो. नानासाहेब (बी. टी.) देशपांडे एम्. ए. यांच्या हस्तें रविवार तारीख ३१-१-५४ रोजीं विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय अमरावती येथें झाला.

उपयुक्त अभ्यासनीय ग्रंथ
गोविंदसेन कृत
वैद्यक परिभाषाप्रदीप
किंमत १॥ रु. ट. ख. निराळा
वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकाचा पत्रव्यवहार

केतकीमूळ कीं स्तन ?

ता. १६।१।५४ चे आयुर्वेद पत्रिका पान ७८१ वरील पत्रव्यवहार विभागांतील श्री. द. कृ. गोगटे यांनीं लिहिलेल्या पत्राचा सारांश वाचला.

सादृश्यामुळें संज्ञा

केतकीमूळांना 'स्तन' ही संज्ञा निघण्टुकारांनीं दिली. ती तत्सादृश्यामुळेंच होय. गाईचे वा शेळीचे सडाप्रमाणें केवडामुळें व त्यांचीं टोकें हुबेहुब दिसतात; गुणवर्णन करितांनाहि निघण्टुकारांनीं फळांचें व स्तन संज्ञक मुळांचे वेगळें वेगळें वर्णन दिलें आहे.

स्तनांचे व फळाचे गुणधर्म

पहाः– 'स्तनश्चास्यातिशिशिरो देहदार्ढ्यकरः पटुः।
बल्यो रसायनः पित्तकफस्य च विनाशकः ॥
किंचिदुष्णं फलं स्वादु वातमेहकफामहम् ।'
बृ नि. रत्नाकर

चंद्रकलेंत शीतवीर्यात्मक द्रव्यें

चंद्रकलेमध्यें प्राधान्यानें शीतवीर्यात्मक द्रव्यें मिश्र केलीं आहेत. केतकीफल हें उष्णवीर्यात्मक आहे. म्हणून तें शीतवीर्यात्मक द्रव्याबरोबर मिश्र न करणें योग्य. केतकीमूळ हें शीतवीर्यात्मक असल्यामुळें चन्द्रकलेच्या गुणधर्मांची वाढ करण्यास मदत करणॊर असल्यामुळें या ठिकाणीं केतकीमूळ वापरणें जास्त बरें होईल.

नारळासारखें मोठें फळ

केतकीफळ हें नारळासारखें मोठें असतें असें भावप्रकाशनिघण्टुवरील ललितार्थकरी टीकाकार श्री. विश्वनाथ द्विवेदी म्हणतात. आयुर्वेद महा-महोपाध्याय कै. शंकर दाजीशास्त्री पदे यांचें वनौषधी गुणादर्शांत याच निर्दिष्ट श्लोकांचें भाषांतर आलेलें आहे. तेथें देखील स्तनसंज्ञक मूळांना 'पारंग्या' नांव देऊन गुणवर्णन केलें आहे. केतकीफळास स्तनसंज्ञा दिल्याचें कुठेंच वाचण्यांत आलें नाहीं. श्री. गोगटे सदरील फळें दाखवित असतील तर पहाण्याची इच्छा आहे.

फलदर्शन झालें नाहीं

केवडावनांत सर्व ऋतूंत फिरूनहि फलदर्शन कधींच झालें नाहीं. क्वचित् देशकालभेदानें फल लागत असेल; नाहीं असें नाहीं. त्याशिवाय कां निघण्टुकार फल गुणधर्म सांगतात! पण क्वचितच दिसून येणाऱ्या द्रव्याची पूर्वाचार्यांनीं उपेक्षाच केली आहे. आणि "अप्रसिद्धकथनं हि निष्फलम्" या उक्तीप्रमाणें दुर्मिळ अशा केतकीफळाबद्दल विनाकारण वादविवाद घालण्यांत काय अर्थ! मुळें केव्हांहि कोठेंहि उपलब्ध असतातच व गुणधर्मानेंहि श्रेष्ठ आहेत. म्हणून वैद्यपरंपरेनें तींच उपयोगांत आणली जात आहेत.

असो, केतकीफळें पाहून जिज्ञासू बुद्धीनें तीं वैद्यांच्या निदर्शनास आणलीं त्याबद्दल श्री. द. कृ. गोगटे यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

—मु. अं. गायकवाड, वैद्य

.... सेवा ....

जनतेची सेवा करणें हा मनुष्यमात्राचा धर्म आहे. त्यांतहि आजारी माणसाची सेवा करणें हा अति उत्तम धर्म होय. उत्तम गुणकारी औषध देऊन रोगाचें निवारण केल्यानें रोगी माणसाची सेवा उत्तम घडते.

अशी सेवा करण्यासाठीं उत्तम व अस्सल औषधेंच वापरलीं पाहिजेत. अशा खात्रीच्या औषधी खरेदी करण्याचें स्थान -

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स
पायधुनी मुंबई नं. ३
(टेलिफोन नं. ३१८५८.) हेंच आहे.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोषक्षीणतेनें रोगोद्भवच होत नाहीं!

(लेखकः— आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे, पुणें)

मित्रवर्य श्री. वैद्यराज नृसिंहाचार्य बागेवाडीकर यांनीं, प्रस्तुतच्या आयुर्वेदांत दोषक्षयजन्य व्याधींची निदान व चिकित्सा कोठें दिली आहे व दिली नसल्यास ती कां नाहीं ? असा 'आयुर्वेद पत्रिकेच्या' ता. १।१।५४ च्या अंकांत प्रश्न विचारला असून जशी सन्निपातज्वरांत वृद्धीप्रमाणें दोषक्षयाचीं लक्षणें आढळतात, तशी इतर रोगांत तीं कां आढळत नाहींत, अशी शंका काढली आहे. आपल्या मतानें त्यांनीं जातां जातां स्वतःच उत्तरहि दिलें आहे कीं, यावरचें "वाङ्मय" राजकीय आंदोलनांनीं नष्ट झालें आहे! पण असें म्हणण्यापूर्वी त्यांनीं त्याचें कारण, "चरक, सुश्रुत, वाग्भट इ. ग्रंथांतील निदान किंवा माधवनिदानांतील निदान हें केवळ दोषवृद्धिजन्य व्याधींचें आहे. क्षयजन्य व्याधींच्या निदानाचा विचार या ग्रंथकारांनीं केलेला नाहीं," असें दिलें आहे. अर्थात् मग नष्ट झालेल्या वाङ्मयांतहि या ग्रन्थकारांनीं त्याचा "विचार केला" असणारच नाहीं असेंच श्री. वैद्य बागेवाडीकरांचें म्हणण्यावरून सिद्ध होतें, नाहीं कां ? का ही विधानांतील विसंगति म्हणावी ?

एक गमतीची विसंगति

वरील वाक्यांच्याच पुढें ते लगेच म्हणतात कीं "आयुर्वेदाचार्यांनीं रोग म्हणजे दोषवैषम्य (रोगस्तु दोषवैषम्यम्) असें म्हटलें आहे." मग हे "आयुर्वेदाचार्य" चरक-सुश्रुत-वाग्भटांहून आणखी कोणी निराळे होते काय? टीकाकार तर या तिघांनाहि आचार्यच म्हणतात. शिवाय त्यांनीं वाग्भटाचें त्यांत (न विचार करणारांत) नांव घातलें आहे. श्री. वै. बागेवाडीकर यांनीं 'रोगस्तु दोषवैषम्यम्' हें दिलेलें सूत्र वाग्भटाचेंच आहे (अ. हृ. सू. १।२०, अ.सं.सू. १।४०) ही पण एक गमतीची विसंगति आहे.

दोषक्षयाचाहि विचार केला आहे

वस्तुतः कांहीं मर्यादेपर्यंत आयुर्वेदानें म्हणजेच त्याच्यावरील तीनहि आचार्यांनीं (खरोखर संग्रहकारांसह चारांनींहि) दोषांच्या वृद्धीप्रमाणें क्षयाचाहि विचार केला आहे. हृदयांतील पित्त व कफ यांच्या क्षीणतेचा उल्लेख करून श्री. वै. बागेवाडीकर यांनीं स्वतःच तो विचार दिलाहि आहे. (अ. हृ. सू. ११।१६) अर्थात् याच्यावरच्याच सूत्रांतील वातक्षीणतेचींहि लक्षणें त्यांनीं पाहिलीं असावयास हवींत. संग्रहांतहि "प्रसेकारुचिहृल्लास...... आदिभिः क्षीणो वायुः पीडयति । स्तम्भशैत्य...... शौक्ल्यादिभिः पित्तम् । भ्रमोद्वेष्टन...... श्लेष्माशयशून्यतादिभिः श्लेष्मा ।" (अ. सं. सू. १९) अशी सविस्तर लक्षणें दिलीं आहेत. दोघे वाग्भट, चरकसुश्रुताचेच अनुवादक. हीं वा या नमुन्याचीं लक्षणें त्या दोन्हीं "आचार्यांनीं" दिलींहि आहेत.

चरक-सुश्रुतांतील लक्षणें

सुश्रुतानें स्पष्टपणें (सू. १५।९ यांत) हीं लक्षणें पुढीलप्रमाणें दिलीं आहेत. "अत ऊर्ध्वमेषां क्षीणलक्षणं वक्ष्यामः । तत्र वातक्षये मन्दचेष्टताऽल्पवाक्त्वमप्रहर्षो मूढसंज्ञता च । पित्तक्षये मन्दोष्माग्निता निष्प्रभत्वं च । श्लेष्मक्षये रूक्षताऽन्तर्दाह आमाशयेतरश्लेष्माशयशून्यता सन्धिशैथिल्यं तृष्णादौर्बल्यं प्रजागरणं च ।" एवढेंच नव्हें तर "तत्र स्वयोनिवर्धनान्येव प्रतिकारः ।" अशी चिकित्सेची दिशाहि त्यानें सांगितली आहे; आणि डह्लणानें ही दिशा सविस्तरपणें टीकेंत सांगितली आहे (सु. सू. १५-१० ड. टी.). चरकानें तर अत्यन्त विस्तृत अशी वृद्धि-साम्य-क्षयाचीं एकेकटीं आणि दोहोंदोहोंचींहि (द्वंद्वज) लक्षणें दिलीं आहेत. (पहा चरक सू. स्था. १०।४५ ते ६५)

कांहीं मर्यादेंत, सुश्रुतापेक्षां थोडी अधिक, चिकित्साहि चरकानें दिली आहे. "वातक्षये कटुतिक्तकषायरूक्षलघुशीतानाम् । पित्तक्षयेऽम्ललवणकटु-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कक्षारोष्णतक्ष्णानाम् । श्लेष्मक्षये स्निग्धगुरुमधुरसान्द्रपिच्छिलानां द्रव्याणाम् ।" (च. शा. स्था. ६।११) अर्थात् दोषांच्या क्षीणतेचे विकार व त्यावरची चिकित्सा आयुर्वेदाचार्यांनीं सांगितली नाहीं हें वै. बागेवाडीकर यांचें म्हणणें निर्मूल ठरतें. बहुदा त्यांना सर्व वर्णन सविस्तर हवें असावेसें दिसतें.

सन्निपातज्वराप्रमाणें दोषक्षयाचीं लक्षणें इतर रोगांत कां आढळत नाहींत " या प्रश्नालाहि हें पुरेसें उत्तर त्यांना वाटणार नाहीं कदाचित्. कारण 'इतर' याचा " उरलेले सर्व " असा अभिप्राय असणार. पण दोषक्षयानें जे रोग होणें संभवनीय आहेत तेवढे " आयुर्वेदाचार्यांनीं " दिले आहेत. जे होणारच नसतील ते त्यांना देतां तरी कसे येणार ? सूत्रमय वर्णनाहून सविस्तर वर्णनाची तरी अपेक्षा कशासाठीं ?

दोषक्षय म्हणजे तत्प्रत्यनीक दोषांची वृद्धि

वरील लक्षणांतील रोगवाचक अभिधानांकडे पाहतां, ते ते रोग बरेचसे तत्तत्प्रत्यनीक दोषांच्या वृद्धीनेंहि होणारे आहेत. वाग्भटांतील (१) अरुचि, (२) अग्निवैषम्य, (३) भ्रम; सुश्रुतांतील (४) मंदाग्निता (५) तृष्णा; व चरकांतील (६) शूल, (७) ज्वर, (८) मूर्च्छा, (९) वाक्संग, (१०) संज्ञानाश, एवढेच काय ते ज्याला कदाचित् रोग म्हणतां येतील असे आहेत. 'कदाचित्' म्हणण्याचें कारण यांतीलहि बहुतेक, मुख्य रोगांचीं लक्षणें होत.

रोग व रोगलक्षणें यांतील विशेष

रोग आणि लक्षणें यांत पुष्कळदां घोटाळा होतो. " रुजन्तीति रोगाः " या सामान्य धात्वर्थाप्रमाणें रोगलक्षणहि रोग म्हणून व्यवहारतः मानलें तरी सुश्रुताच्या व्याख्येप्रमाणें विवक्षित स्थानीं आश्रय घेणारा विकृत दोष असाच रोग शब्दाचा तात्विक अर्थ आहे. (कुपितानां हि दोषाणां शरीरे परिधावताम्। यत्र संगः स्ववैगुण्यात् व्याधिस्तत्रोपजायते ॥) (सु.सू. २४।१०) कृत्स्नेऽर्धेवयवे वाऽपि यत्राङ्गे कुपितो भृशम्। दोषो विकारं नभसि मेघवत्तत्र वर्षति ॥ (सु. सू. २१।२९) एखाद्या विवक्षित स्थानीं आश्रय घेण्यापूर्वीं प्रसरावस्थेंत व आश्रय घेतल्यावरहि फार वाढलेला दोष शरीरांत इतस्त्र पसरल्यानें, अनेक स्थानीं होणाऱ्या रुजांनीं अनेक लक्षणें एकेका रोगापूर्वीं व प्रत्यक्ष रोग झाल्यावर होतात. पण ते तत्वतः रोग नव्हेत.

दोषक्षयानें रोगोद्भव नाहीं

वरील सुश्रुताच्या व्याख्येंत 'कुपितानां हि दोषाणां' या पदाकडे लक्ष दिलें असतां हा जो दोषक्षीणतेचा नवीन वाटणारा मुद्दा श्री. वै. बागेवाडीकर यांनीं काढला आहे त्यावर प्रकाश पडेल. सुश्रुताला दोषांच्या प्रकोपावस्थेनंतरच रोगोत्पत्ति (व तीहि स्थानसंश्रयांतीं) सांगावयाची आहे. दोषांची प्रकोपावस्था दोष वृद्ध झाल्यानंतरच होणार. वृद्ध दोष जेव्हां उन्मार्गगामी होतात तेव्हां त्यांना प्रकोपावस्था येते. (कोपस्तून्मार्गगामिता । (अ. हृ. सू. १२।२३)) प्रकुपित दोष उन्मार्गी होतात. आणि मगच त्यांनीं प्रसरावस्था व त्यानंतर स्थानसंश्रय असा (संचयं च प्रकोपं च प्रसरं स्थानसंश्रयं ।) सुश्रुतानें क्रम दिला आहे. (सु. सू. २१।३६)) या दृष्टीनें पाहतां, दोषक्षयानें रोगोत्पत्तीच होत नाहीं असें म्हणावें लागेल, व थोडा आणखी विचार करतां हेंच बरोबर वाटेल.

दोषक्षय म्हणजे काय ?

दोषक्षय याचा खरोखर अर्थ वायुपित्तकफांची शक्ति कमी होणें असाच आहे. अर्थात् त्यांचीं कार्यें चेष्टादि, पक्त्यादि व स्निग्धत्वादि (कीं ज्यांचें स्वरूप वियोजन अथवा विसर्जन, विभाजन अथवा पचन, व श्लेषण अथवा संयोजन हें होय.) तीं कमी होतात. हीं कार्यें कमी पडलीं कीं सर्व पचनक्रियाच बिघडते व मग पथ्याचा व सात्म्य आहारहि अपचन करतो. पण यामुळेंहि एक प्रकारची विकृत (मलरूपी) दोषवृद्धीच होते. कोणत्याहि रोगापूर्वीं पचनेंद्रियांत आम पैदा होतो, व तो जेथें जाऊन बसेल तेथें रोगोत्पत्ति होते. (यत्रस्थमामं विरुजेत्तमेव देशं विशेषण विकारजातैः । दोषेण येनावततं शरीरं तल्लक्षणैरामसमुद्भवैश्च [मा. नि.])

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आमाचें स्वरूप कोणतें ?

आमाचें एक स्वरूप 'आद्य अपाचित दुष्ट रस-धातु' असें वाग्भटानें दिलें आहे. (अ. हृ. सू. १३।२५) चरकानें (सुश्रुतप्रमाणेंच स्थानसंश्रयाला रोग म्हणतांना) दिलेल्या 'क्षिप्यमाणः खवैगुण्याद्रसः सज्जति यत्र सः। तस्मिन्विकारं कुरुते खे वर्षमिव तोयदः ॥' [च. चि. १५।३७] या सूत्रांत सांगितलेला 'रस' व माधवाचा आम एकच म्हणावे लागतील. रोगाला आमय नांव पडण्याचें कारण तो आमानें उद्भवतो, हेंच होय. वस्तुतः मलस्वरूपांत त्या त्या स्थानीं संचित होणारे जे वायु, पित्त, कफ [आमाशयांतील क्लेदक, पक्वामाशयमध्यांतील पित्त, व पक्वाशयांतील वायु] हे तदन्तर्गत मूळचे क्रिया चालविणारे शक्तिमान् वायुपित्तकफ यांना विकृत करतात व मग विकृत श्लेषण, विकृत पचन व विकृत चेष्टा उद्भवतात. याच विकृत वायुपित्तकफांच्या अन्योन्यमूर्छनानें या संचित [मलस्वरूपी] वायुपित्तकफांतून आम नांवाचें विषारी द्रव्य पैदा होतें. प्रकुपित दोषांकडून तेंच सर्व शरीरभर पसरविलें जातें. आणि त्या त्या स्थानीं त्यानें रोगोत्पत्ती होते. अर्थात् कोणताहि रोग दोषांच्या वृद्धीनें व तज्जन्य विकृतीनें होतो, हेंच सिद्ध होतें.

हीच तत्त्वतः विकृति

दोषांच्या क्षीणतेनें उद्भवणारे साक्षात् रोग नसून श्लेषणादि क्रियाची उणीव एवढेंच त्याचें स्वरूप असतें. हीच तत्त्वतः विकृती. जो आम पैदा होतो तो त्या विक्रियेमुळेंच. तत्प्रत्यनीक दोषांच्या वाढीप्रमाणेंच ही स्थिति असते. जसें, कफ क्षीण झाल्यानें श्लेषण कमी पडतें व मग श्लेषक कफाचें जेथें कार्य व्हावयाचें तेथें त्याची जाणीव होते. 'श्लेष्माशयानां शून्यत्व ... श्लथसंधिता' हें त्याचेंच लक्षण. वायूच्या वृद्धीनेंहि हींच लक्षणें होतात. 'वृद्धस्तु कुरुतेऽनिलः। कार्श्य...... दीनताः ॥ अ. हृ. सू. ११।५६) हीच प्रकुपित वायूंत अधिक प्रत्ययाला येतात.

कफक्षयाचीं निदर्शक लक्षणें

'स्रंस—तोद—अंगभंग—शौषिर्य शोष-वेष्टनम्।' (अ. हृ. सू. १२।४९-५१) हीं कुपित वायूचीं लक्षणें, सार्वदेहिक कफ कमी झाल्याचीच निदर्शक आहेत. 'लिंगं क्षीणेऽनिले—श्लेष्मवृद्ध्युक्तामयसंभवः।' यांत वायुक्षीणतेनें कफवृद्धीचीं लक्षणें उत्पन्न होतात. या नमुन्याचें कफवृद्धीचें वर्णन जरी वृद्ध वा कुपित वायूचे लक्षणांत नाहीं, तरी त्यांत दिलेलीं लक्षणें सार्वदेहिक कफ कमी होण्यानें होणारींच होतात. फरक एवढाच कीं, क्षीणतेंत त्या त्या दोषांच्या स्थानीं क्षीणता व वृद्धावस्थेंत त्यांच्या त्यांच्या स्थानीं वृद्धि एवढाच; म्हणजे कफाची क्षीणता आमाशयांत, तर वाताची वृद्धि पक्वाशयांत पण आमाशयांत क्षीण झालेला कफ, पक्वाशयांत वायु वाढण्यास (अगर वाढल्यासारखा वाटण्यास) सहजिकच कारण होतो.

सुश्रुतानें "आमाशयेतरश्लेष्माशयशून्यता" या लक्षणानें, कफक्षीणतेंत आमाशयांत क्षीणता जाणवत नाहीं, पण इतरत्र म्हणजे शरीरभर संचार करतांना ती त्या त्या स्थानीं जाणवते, असेंच दर्शविलें आहे. अर्थात् संधिगत होण्यासाठीं आवश्यक असलेलें आमाशयांतील कफाचें प्रमाण कमी पडल्यानें पक्वाशयांतहि तें कमीच होणार व मग तत्प्रत्यनीक दोष जो वायु तो साक्षात् न वाढतांहि वाढल्यासारखा वाटणार. एक दोष कमी झाला म्हणजे तत्प्रत्यनीक दोष न वाढतां वाढल्यासारखाच वाटतो, अर्थात् येथेंच "तत्र स्वयोनिवर्धनान्येव प्रतिकारः" या सुश्रुतादेशाप्रमाणें कफवर्धक उपाय करावयाचे. स्निग्ध असल्यानें ते सहजिक वायूनाशाला कारण होतातहि (वातस्योपक्रमः स्नेहः); पण प्राधान्य कफवृद्धीला द्यावयाचे म्हणजे स्निग्ध द्रव्यहि शीत असावें लागतें व वातनाशासाठीं उष्णोपचार लागतात एवढेंच!

दोषक्षयानें रोगोत्पत्ति नाहीं

पण म्हणून क्षीणतेनें रोगोद्भव होतो असें नाहीं. त्या त्या दोषांच्या क्रिया कमी पडल्यानें होणारी ती ती पचन-पोषण पृथक्करणाचीं निदर्शक लक्षणें तेवढी 'आयुर्वेदाचार्यांनीं' सांगितलीं आहेत. अर्थात् त्यांची सर्व रोगांच्या निदानांत आवश्यकता असण्याचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कारण नाहीं. प्रत्येक रोगांत दोषक्षीणतेनें रोगोद्भव होणारच नाहीं, कारण दोषांच्या वृद्धीनेंच खरोखर रोग होतो. ज्या रोगांत क्षयाचीं लक्षणें आढळतील त्यांत मात्र दोषक्षीणतेचीं लक्षणें अवश्य आढळतील. अनुलोम राजयक्ष्म्यांत वातक्षीणतेचीं लक्षणें आढळतील पण त्यांतहि लक्षांत ठेवण्यासारखें हें कीं, 'कफप्रधानैर्दोषैस्तु' असेंच वर्णन आहे. कफसंचय, शोथ, ग्रन्थि इत्यादि रूपानें तींच लक्षणें प्रत्ययाला आल्यानें वर्णन कफाच्या नांवावर येतें हें साहजिकहि आहे.

सान्निपातिक अवस्थेंत प्रत्यय

पण खरोखर वायु अगर प्राणशक्ति कमी होणें हेंच क्षयाचें महत्वाचें लक्षण आहे. इतर रोगांतील दोषक्षयासाठीं त्यांचा सन्निपातजन्य म्हणून जो प्रकार दिला असतो त्याकडे जावें लागेल. सान्निपातिक विकृति ही वायुपित्तकफांच्या तीनहि क्रिया एकसमयावच्छेदानें बिघडून होणारी असते. यांत कित्येकदां एक वा दोन दोष क्षीणहि असूं शकतील व याचवेळीं तो रोग क्षयजन्य आहे असें प्रत्ययाला येईल. दुसऱ्या भाषेंत बोलावयाचें तर तो तो रोग क्षयजन्य असल्याचा सान्निपातिक अवस्थेंत प्रत्यय येईल.

नेहमींच संभवनीय नाहीं

" ज्वररोगांत सान्निपातिक अवस्थेमध्यें वृद्धिक्षयजन्य अवस्थांचा विचार थोडाफार केलेला दिसून येतो '' असें श्री. वैद्य बागेवाडीकर म्हणतात, त्याचा सरळ अर्थ, सान्निपातिक अवस्थेंतच क्षीणदोषजन्य म्हणजे क्षयजन्य विकृति होणें संभवनीय असते असाच आहे. या नमुन्याच्या ज्वरांपासून क्षयोत्पत्ति होईल अथवा क्षयजन्य सन्निपात म्हणूनच त्याला ओळखावें लागेल. यावरून इतरत्र ज्या ज्या रोगांत सान्निपातिक विकृति सांगितली आहे तेथें तेथें क्षयजन्य असाहि एक प्रकार संभवनीय आहे एवढें समजून येईल. पण म्हणून नेहमींच ती होईल हें संभवनीय नाहीं.

ज्वरांत उल्लेख कां आला ?

ज्वर हा सर्व रोगाग्रज व बली असल्यानें व क्षयरोगांतहि ज्वरच प्राधान्यानें असल्यानें सन्निपातज्वरांत दोषक्षीणतेचा " आयुर्वेदाचार्यांनीं " उल्लेख केला. " इतर ' रोगांतील सान्निपातिक अवस्था सूक्ष्मतेनें न्याहाळून तींत क्षयजन्यता आहे कां, हें ध्यानीं घेतल्यास त्याचा उलगडा जरूर होईल. बहुधा कोणत्याहि रोगाला बळी पडणारा रोगी सान्निपातिक अवस्थेंत जातो आणि तेव्हां दोषक्षीणता (विशेषें वातक्षीणता अर्थात् प्राणवायूची क्षीणता) असते, असें मानल्यास हें कोडें उलगडेल. पण प्रत्येक रोगांत क्षीण दोषांचीं लक्षणें होणारीं नाहींत. प्रत्येक रोग प्रत्येकाला मारक होत नाहीं. रोग हा दोषांच्या वृद्धीनेंच व्हावयाचा.

चिकित्साहि दोषवृद्धीवरच

चिकित्सेबाबत शेवटीं एवढेंच म्हणावयाचें कीं तीहि निदानाप्रमाणें दोषवृद्धीवरच म्हणजे लंघनात्मकच आहे. पंचकर्मांनीं शोधन व दीपन पाचन हे सर्व लंघनचिकित्सेचे प्रकार आहेत. बृंहण ही रोगनाशक चिकित्साच नाहीं, व तशी ती कोणत्याच रोगांत निर्भेळ सांगितलीच नाहीं. वातरोगांत सांगितलेलें बृंहण हें वातदोषाच्या लंघनासाठीं असतें. (बृंहणं शमनं त्वेव वायोः पित्तानिलस्य च । (अ. हृ. सू. १६) म्हणजे येथेंहि लंघनासाठींच बृंहण आहे, बृंहणासाठीं बृंहण नाहीं. " बृंहयेद्व्याधिभैषज्य..... " इत्यादि सूत्रांतून व्याधीपेक्षां तज्जन्य, तदवशिष्ट, वा स्वतंत्र अशक्तता यावरच बृंहण आहे, रोगावर नाहीं, कारण दोषक्षीणतेनें रोग नाहीं, दोषवृद्धीनेंच रोग होतात, हा सर्वत्र आयुर्वेदाचार्यांचा संकेत आहे.

विद्वान् वैद्यांना विनंति

(ता. १-१-५४ च्या आयुर्वेद पत्रिकेंत वैद्यराज नृ. ना. बागेवाडीकर यांनीं दोषक्षयजन्य व्याधींची निदानचिकित्सा कोठें दिली आहे? असा पूर्व पक्ष केला, त्याला ' दोषक्षयानें रोगोद्भव होत नाहीं ' असा उत्तरपक्ष वरील लेखांत वै. पां. ह. देशपांडे यांनीं मांडला आहे. विद्वान् वैद्यांनीं या विषयावरील आपापले विचार मांडावेत अशी विनंति आहे. —संपादक)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनू-रजिस्टर्ड वैद्यांसाठीं

महत्वाची सूचना

मध्यप्रदेश (नागपूर) सरकारनें वैद्य व हकीम यांना रजिस्ट्रेशन मिळण्याकरितां अर्ज करण्याची मुदत वाढविली असून अर्ज पोंहोचण्याची शेवटची तारीख ३१ मार्च १९५४ ही आहे. मुंबई प्रांतांतील व इतरहि प्रांतांतील रजिस्टर न झालेल्या वैद्यांनीं वरील मुदतीचे आंत नागपूरहून (रजिस्ट्रार, आयुर्वेद युनानी वैद्यक बोर्ड मध्यप्रदेश, नागपूर) या पत्यावरून आवेदन-पत्र (ठराविक फार्म) मागवून घ्यावें. रजिस्ट्रेशन फी १० रु. मनिऑर्डरनें वरील पत्त्यावर नागपूरला पाठवावी. त्याची पोस्टाची पावती व आवेदनपत्र सर्व माहिती भरून रजिस्ट्रारकडे पाठवावें.

आयुर्वेद महाविद्यालयांतून (सरकारमान्य असलेल्या) ४ वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या पदवीधरांनीं व नि. भा. आयुर्वेद विद्यापीठाच्या पदवीधरांनींहि, आपलें पदवी सर्टिफिकेट, आवेदनपत्राबरोबर रजिस्टर पोस्टानें पाठवावें. इतर वैद्यांनीं आवेदन-पत्रासोबत वैद्यकीय धंदा १९३७ पासून नियमितपणें करीत असल्याचें सेकंड क्लास मॅजिस्ट्रेटचें सर्टिफिकेट आवेदनपत्राबरोबर पाठवावें.

आवेदनपत्र ८- तिकिट पाठवून रजिस्ट्रार आयुर्वेद युनानी वैद्यक बोर्ड मध्यप्रदेश, नागपूर यांचेकडून मागवावें.

या विषयासंबंधीं अधिक माहिती लागल्यास खालील पत्त्यावरून मागवावी.

पत्ताः- भिषगाचार्य हरिशास्त्री पराडकर वैद्य
सदस्य, आयुर्वेद युनानी वैद्यक बोर्ड, मध्यप्रदेश
अकोला-वऱ्हाड

ग्रामोद्योगासाठीं सरकारी मदत

सुशिक्षित बेकारांनीं घरगुती उद्योगधंदे सुरू करण्यासाठीं किंवा त्यांचा विकास करण्यासाठीं १,५०० रुपयांपर्यंत मदत मिळण्याकरितां करावयाचे अर्ज संबंधित डिव्हिजनल डेप्युटी रजिस्ट्रारांकडे व त्यापेक्षां अधिक रकमेसाठीं करावयाचे अर्ज जॉईंट रजिस्ट्रार फॉर इंडस्ट्रियल कोऑपरेटिव्हज् अ‍ॅण्ड व्हिलेज इंडस्ट्रीज, पुणें यांच्याकडे करावे.

तसेंच खरखुरे हस्तव्यवसायी, वैयक्तिक कारागीर, आणि मागासलेल्या वर्गांचे कारागीर यांनीं २००० रुपयापर्यंतच्या मदतीसाठीं करावयाचे अर्ज ठराविक फॉर्ममध्यें संबंधित डिव्हिजनच्या डेप्युटी रजिस्ट्रारांकडे मंजुरीसाठीं पाठवावे; त्यापेक्षां अधिक रकमेबाबतचे अर्ज मंजुरीसाठीं जॉईंट रजिस्ट्रार फॉर इंडस्ट्रियल को ऑपरेटिव्हज् अ‍ॅण्ड व्हिलेज इंडस्ट्रीज, पुणें यांचेकडे पाठवावे.

---

१९ वें बिहार प्रां. वैद्य संमेलन

सदर अधिवेशन भागलपूर येथें ता. २७ व २८ फेब्रुवारी १९५४ रोजीं होणार आहे. 'स्वास्थ्य-संदेश' चे माननीय संपादक पं. कपिलदेव त्रिपाठी यांची अध्यक्षपदीं निवड झाली आहे. संमेलन प्रसंगीं एक वैद्यकीय प्रदर्शन भरविण्याचें ठरलें असून त्याचें उद्घाटन बिहार सरकारचे स्वास्थ्य-मंत्री यांचे हस्तें होईल. शिवाय आलेल्या रुग्णांची विनाशुल्क तपासणीचीहि व्यवस्था होणार आहे.

नवीन मराठी वैद्यक मराठी मासिक

: महाराष्ट्र वैद्यक परिचय :

औषधें, इंजेक्शनें, रोगनिदान, रुग्ण-परीक्षा, नवीन शोध वगैरे पाश्चात्य वैद्यकांतील ज्ञान सोप्या मराठी भाषेंतून देणारें एकमेव मासिक " महाराष्ट्र वैद्यक परिचय " 'वैद्यकीय पेशांतील बहुमोल सहाय्यक' आजच वर्गणीदार व्हा ! वार्षिक वर्गणी ५ रु. (किरकोळ अंकासाठीं आठ आण्याचीं तिकिटें पाठवावीत.

पत्ताः- संपादक, वैद्य जे. बी. मोकाशी-ठाणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आरोग्य-मंत्र्यांची धुळयास भेट

दिनांक २।२।५४ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां अगाऊ ठरविल्याप्रमाणें धुळें येथें इन्स्पेक्शन बंगल्यांत आरोग्यमंत्री ना. शांतिलाल शाह यांचा सत्कार धुळें स्थानिक वैद्यमंडळानें करून आपल्या निवेदनाची प्रत नामदारांना सादर केली. त्यावर नामदारांनीं अंमळनेर येथील श्री. प्रतापशेठजींनीं सुरूं केलेल्या आयुर्वेदीय संस्थेचें नेतृत्व स्वीकारण्याबद्दलचा विचार चालू आहे असें सांगितलें. धुळयाच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्यें स्वतंत्र वॉर्ड करून आयुर्वेदीय उपचार सुरूं करतां येणार नाहींत असें सांगितलें.

वनस्पति-उद्यानासाठीं जागा

वनस्पति-उद्यानासाठीं धुळयास आयुर्वेदीय शिक्षणाकारितां जागा देतां येणार नाहीं कारण इतर ठिकाणींहि तशी द्यावी लागेल असें नामदार म्हणाले. त्यावर श्री. ग. द. माळी आमदार यांनीं वृक्षारोपणासाठीं जागा दिली जाते, तशी वनस्पति–उद्यानासाठीं दिली जावी असें वैद्यांना समर्थक भाषण केलें.

वैद्यमंडळामार्फत शिक्षण

ठिकठिकाणीं वैद्यमंडळांच्या द्वारां शुद्ध आयुर्वेदीय शिक्षण देण्याची जी व्यवस्था धुळयाच्या वैद्यमंडळानें सुचविली ती मान्य करूं असें नामदार म्हणाले. शुद्ध आयुर्वेदाच्या विद्यार्थ्यांची वैद्य म्हणून नोंद करणें व पदवी देणें या गोष्टीस अजून कालावधि आहे, योग्यवेळीं तें होईल असें नामदार म्हणाले.

वैद्यांनीं अडचण सोसावी

आसवारिष्टें व अन्य औषधें यांवरील निर्बंध सरकारी उत्पन्नाच्या दृष्टीनें व प्रामाणिकतेच्या दृष्टीनें जरूर आहेत त्यामुळें वैद्यांनीं अडचण सोसूनहि तें स्वीकृत करावें, असें आमदारानीं सांगितलें. नंतर येथील रुग्णसेवा मंडळाचें वृत्त सादर करण्यांत आलें.

———

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाची १९५४ सालची वर्गणी १ रु. पाठवून संघटना बळवान करा.

नजरेंत भरण्यासारखी टापटीप व व्यवस्था

आजरोजीं आयुर्वेद सेवा संघ, नाशिक यांचा कारखाना पाहण्याचा सुयोग मिळाला. संघाचे एक सदस्य श्री. मराठे यांनीं कारखान्याचे निरनिराळे भाग आपुलकीनें दाखविले.

कारखान्याचें धोरण व्यापारी नाहीं

कारखान्याची व्यवस्था व टापटीप एकदम नजरेंत भरण्यासारखी आहे. नुसतें व्यापारी धोरण सांभाळलें जाऊन संघाची भरभराट करणें हें कारखान्याचें ध्येय नसून अल्प मोलांत शुद्ध व शास्त्रोक्त आयुर्वेदीय औषधें पुरविण्याचा संघाचा इरादा आहे. त्यास अनुसरूनच सर्व व्यवस्था आहे.

दुर्मिळ आयुर्वेदीय ग्रंथसंग्रह

विशेष म्हणजे संघानें सर्व आयुर्वेदीय ग्रंथांचा केलेला दुर्मिळ संग्रह होय.

या कारखान्याची उत्तरोत्तर भरभराट होवो. व आयुर्वेदाचें महत्त्व स्वतंत्र भारतांत वाढविण्याची कामगिरी पूर्ण करण्यास या संस्थेस सुयश लाभो.

ता. २९-१-५४ शं. ग. पिळे, कोल्हापूर

(शाहू आयौषधी कारखान्याचे व्यवस्थापक यांचा अभिप्राय)

———

शृंगार
नेत्रांजन
डोळयांचे विकारावर उत्कृष्ट
कृष्णशास्त्री बिवलकर
पो. आंजर्ले. (रत्नागिरी)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लिंबाच्या सालींचें लोणचें

या लोणच्याविषयीं आयुर्वेद पत्रिकेच्या वाचकांना पुरेशी माहिती आहेच. कांहीं वाचकांच्या घरीं तें तयारहि होत आहे. तथापि ज्यांना तें तयार करणें शक्य होत नाहीं त्यांच्यासाठीं आयुर्वेद सेवा संघातर्फे तें विक्रीस ठेवण्यांत आलें आहे. खारावलेल्या सालींचा भाव १ रु. शेर व संपूर्ण लोणच्याचा भाव २ रु. शेर आहे. बाटलीची किंमत अलग पडते ती येणेप्रमाणेः- १ शेरी बाटली ८ आणे, ॥ शेरी ४ आणे, पावशेरी २ आणे.

ज्या गांवीं आयुर्वेद सेवा संघाचीं विक्रीकेंद्रें आहेत. तेथील वाचकांनीं त्या दुकानाकडे मागणी केल्यास त्यांच्याकडून हें लोणचें त्यांना मिळू शकेल. विशेषतः आंबट रस आवडत नाहीं, व कडूरस अल्प प्रमाणांत नित्य पोटांत जाणें अवश्य आहे, अशा लोकांनीं या सोईचा लाभ अवश्य घ्यावा.

———

अनुक्रमणिका

महाबळेश्वर येथील मधुविज्ञान केंद्र	५१७
मध्यवर्ति आरोग्य मंडळाचे निर्णय	५१८
युनिव्हर्सल हेल्थ इन्स्टिट्यूची विनंति	५१९
शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीची सभा	५२०
मधमाशा-पालन-व्यवसाय	५२१
सहकारी औषधें-सिंदूरकल्प	५२५
महासुदर्शन चूर्ण	५३१
मलेरियावर खात्रीचें औषध	५३४
बृहज्जात्यादि तेल, घृततैलमूर्च्छाविधि	५३७
केतकी मूळ कीं स्तन?	५४०
दोषक्षीणतेनें रोगोद्भवच होत नाहीं	५४१
अनरजिस्टर्ड वैद्यासाठी महत्वाची सूचना	५४५
आरोग्य मंत्र्याची धुळयास भेट	५४६

पवित्र नेपाली कस्तुरी रु. ४४ तोला,
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला,
तब्बत कस्तुरी रु. ३६ तोला,
लिहाः-नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाल

— आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारी —

आयुर्वेदिक व युनानी वनौषधि

तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण!

अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक खाका, माणिक, अकीक, सुवर्ण-वर्ख, रौप्य-वर्ख, शिंपा, कवड्या, शंख, प्रवाळ, आवळसार गंधक, दगडीबेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, वाकेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलटकंबल, नागकेशर (अस्सली), ब्राम्ही, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारची वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य! विशेष माहितीसाठीं आमचें साप्ताहिक दरांचें छापील भावपत्रक मागवावें.

टे. फो. नं. ३१७९६ टेलिग्रॅम-'आयुर्वेद'

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रत्येक क्षेत्रांत भरीव कार्य

" आज रोजीं आयुर्वेद सेवा संघाला भेट देण्याचा योग आला. संस्था आयुर्वेदाच्या प्रत्येक क्षेत्रामध्यें भरीव कार्य करीत आहे हें पाहून फार समाधान वाटलें. ध्येयवादी संचालकांचें योग्य मार्गदर्शनाखालीं औषध-निर्माण-विभाग, प्रकाशन-विभाग, चिकित्सा-विभाग व आयुर्वेदप्रचार-विभाग उत्तरोत्तर सराहनीय प्रगतिपथावर आहे ही आनंदाची गोष्ट होय.

आयुर्वेदीय स्वाध्याय मंडळ

सेवा-संघाचें नेतृत्वाखालीं रोज प्रातःकालीं आयुर्वेद स्वाध्याय-मंडळहि सुरू झालें आहे. मुंबई सरकारमान्य शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रमाप्रमाणें विद्यालय काढण्याची तळमळ संचालकामध्यें उत्कटतेनें दिसून आली. परमेश्वरानें यांचे सत्प्रयत्नांना यश द्यावें व लोकसेवेच्या या महान् कार्याला जनताजनार्दनानें तन, मन, धनानें सहकार्य द्यावें, अशी प्रार्थना आहे.

नासिक
ता. ५-२-५४

वैद्य ब्रह्मदत्त शर्मा
आयुर्वेदाचार्य, भुसावळ

— चिकित्सकांना सुसंधि —

आजवर चिकित्सेसाठीं व आहारद्रव्य म्हणून वापरण्यासाठीं खात्रीचा मध मिळविणें कठिण पडत होतें. पण ती गैरसोय आतां सरकारी मदतीमुळें दूर झाली आहे.

जांभळीचा मध, हिरड्याचा मध

असे मधाचे प्रकार नित्य वापरून आपणास कफविकार, प्रमेह, रक्तदाब, इत्यादि विकार आटोक्यात आणतां येतील.

किंमतः- ५ तोळे ८ आणे, १५ तोळे १॥ रु., ३० तोळे ३ रु.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक

GURUKULA KANGRI DELY. 13 FEB 1954 SAHARANPUR

संपादक व प्रकाशकः— वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, मेनरोड, नासिक
मुद्रकः— श्री. वि. ओक, वर्धन प्रेस, आग्रारोड, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ७ वें) नाशिक, ता. १ मार्च १९५४ (अंक १७ वा

दांतांच्या रोगासाठीं फिरतीं इस्पितळें

आरोग्यमंत्री श्री. शांतिलाल शहा यांची सूचना

ग्रामीण भागांत दांतांच्या रोगावर औषधोपचार करण्यासाठीं नेत्रोपचार पथकांच्या धर्तीवर दन्तवैद्यक पथकें सुरू करतां येतील, अशी सूचना, मुंबईचे कामगार व सार्वजनिक आरोग्य खात्याचे मंत्री श्री. शांतिलाल शहा यांनीं मुंबईत नायर हॉस्पिटल डेन्टल कॉलेजमध्यें दंतवैद्यकाच्या रिफ्रेशर कोर्सचें उद्‌घाटन करतांना केली. दांतांच्या आरोग्याचें महत्व फार असलें तरी ग्रामीण भागांत त्याकडे लक्ष दिलें जात नाहीं, असेंहि ते म्हणाले.

कॉलेजें कोठें स्थापन करावींत ?

खेडेगांवांतील लोकांसाठीं दांतांच्या रोगावर औषधोपचार करण्याची सोय करण्याकडे अधिक लक्ष देण्याची त्यांनीं दंतवैद्यांना विनंति केली. तसेच दंतवैद्यक शास्त्राचीं कॉलेजें मुंबई शहराबाहेर स्थापन करावींत, अशीहि त्यांनीं सूचना केली. दंतवैद्यकशास्त्राचे विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याच्या बाबतींत व इस्पितळ चालविण्याच्या बाबतींत म्युनिसिपल कार्पोरेशनें व सरकार यांच्यामध्यें खर्चाची विभागणी झाली पाहिजे आणि मोठ्या शहरांत इस्पितळें चालविण्याची जबाबदारी म्युनिसिपल कार्पोरेशनांनीं घ्यावी, असेंहि ते म्हणाले. सदरहू रिफ्रेशर कोर्स, इंडियन डेन्टल कॉन्फरन्सच्या विद्यमानें सुरू करण्यांत आला होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुद्ध आयुर्वेदाचा कोर्स

येत्या जूनपासून नक्की सुरूं होणार !

शुद्ध आयुर्वेदिक कोर्स हा मध्यवर्ति सरकारला पसंत नाहीं, असें मत मध्यवर्ति सरकारच्या आरोग्यमंत्र्यांनीं व्यक्त केल्यामुळें शुद्ध आयुर्वेदिक कोर्सचें पुढें काय होणार अशी मुंबई सरकार-कडे अनेक लोक विचारणा करीत आहेत. तेव्हां, या बाबतींत हें स्पष्ट करण्यांत येत आहे कीं, मुंबई सरकारचा निर्णय कायम असून तदनुसार या कोर्सचे शिक्षण देण्यांत येणार आहे. १९५४च्या जून पासून हा कोर्स सुरू होईल व त्या दृष्टीनें आवश्यक ती पूर्वतयारी करण्यांत येत आहे.

(मुंबई सरकारचें पत्रक)

मुंबई सरकारची नवी घोषणा

डायरेक्टर ऑफ् आयुर्वेद : नवीन जागा निर्माण करण्यांत आली

आयुर्वेदाला उत्तेजन देण्याच्या आपल्या धोरणानुसार मुंबई सरकारनें सुरुवातीस तीन वर्षासाठीं डायरेक्टर ऑफ् आयुर्वेद ही जागा निर्माण केली आहे. तसेंच आयुर्वेदाबाबतचे कामकाज पाहण्यासाठीं सर्जन जनरलांच्या कचेरींत एक वेगळा विभाग स्थापन करण्यांत येईल.

डायरेक्टर ऑफ् आयुर्वेद हे स्वतंत्ररीत्या कार्य करतील. तथापि त्यांच्यावर सर्जन जनरलांचें एक वर्षपर्यंत कारभारविषयक नियंत्रण राहील.

दंतवैद्य परिषदेस मुरारजींचा सल्ला

वैद्य-डॉक्टरांचें कर्तव्य

"रोग्यास औषध देणें एवढेंच कांहीं डॉक्टरचें कर्तव्य नाहीं, उलट औषध देण्याची वेळच येऊं नये, याकडे त्यानें लक्ष ठेवलें पाहिजे. रोगनिवारणा-पेक्षां रोगास प्रतिबंध करणें हें अधिक महत्वाचें आहे" असें मुख्य मंत्री श्री. मुरारजीभाई देसाई यांनीं अ. भा. दंतवैद्य परिषदेचें उद्घाटन करतांना सांगितलें.

कुचकामी टूथपेस्ट !

ते पुढें म्हणाले:-बाजारांत टूथपेस्टचा भयंकर सुळसुळाट झाला आहे; पण गुणाच्या मानानें, त्यापैकीं बहुतेक निरुपयोगीच ठरतील. तीं खरीदणें म्हणजे पैशाची केवळ उधळपट्टी आहे !

आणखी कॉलेजें कशाला ?

परिषदेचे अध्यक्ष डॉ. पटेल यांनीं दन्तविषयक पहाणी सरकारनें हातीं घ्यावी, अशी सूचना करून अधिक कालेजांची आवश्यकता आहे, असें म्हटलें.

परन्तु श्री. मुरारजींना हें म्हणणें पटलें नाहीं. ते म्हणाले कीं, केवळ कॉलेजांची संख्या वाढवून आणि अधिक दन्तवैद्य निर्माण करून लोकांच्या आरोग्याचा प्रश्न सुटणार नाहीं. त्यासाठीं, एक नियोजन समिति नेमली बरें होईल.

पांढरें कोड

हजारोंचें गेले व त्यांनीं अभिप्राय दिलेलें आणि अनेक बक्षिसें मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु.

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो. असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन' मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्र प्रां. वैद्यसंमेलनाचे २ ठराव

सरकारी खुलासा व प्रतिखुलासा

सरकारी खुलासा

नं. S.M.P. १०५३/१३७४३७-C.

रेव्हिन्यु डिपार्टमेंट,
सेक्रेटरिएट, मुंबई नं. १
२०।१।१९५४

असिस्टंट सेक्रेटरी, महसूल खातें, मुंबई राज्य, यांजकडून—

वैद्य श्री. दत्तात्रेयशास्त्री जळूकर,
अध्यक्ष, महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ,
भुसावळ, (जि. पू. खा.) यांसी—

विषयः– महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाच्या ९ व्या संमेलनांत पास झालेले ठराव नं. ८ व १५ बाबत.

महोदय,

स्थानिक-स्वराज्य आणि सार्वजनिक आरोग्य खातें, मुंबई, यांचें पत्र नं. A.D.R. १०५३/६४९-H, ता. ८।८।५३ यांस अनुसरून खालीलप्रमाणें खुलासा देण्याबद्दल मला आदेश मिळाला आहे.

ठराव नं. ८ चें उत्तर

ज्या अर्थी रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टिशनर्सना निर्बंधित अगर अनिर्बंधित आसवें, व अरिष्टें यांची निर्मिति, क्रय व विक्रय याबाबत कांहींहि निर्बंध नाहींत, त्याअर्थी ह्याबाबत आणखी कोणती विशेष सवलत पाहिजे तें स्पष्ट व निश्चित शब्दांत मांडण्यांत यावें.

ठराव नं. १५ चा खुलासा

अफू, भांग व मोहाचीं फुलें यांचा सांठा, उपयोग व वहातूक यांवर असलेले निर्बंध हे वैद्यक व्यवसायींची विशेष गैरसोय करतील असें सरकारांस वाटत नाहीं. शिवाय बॉंबे प्रोहिबिशन ॲक्ट, १९४९ (मादक पदार्थ प्रतिबंधक कायदा १९४९ मुंबई राज्य) अगर डेंजरस ड्रग्ज (घातक औषधांबाबत कायदा) या कायद्यान्वयें कोणत्याहि (रजिस्टर्ड) मान्यता असलेल्या वैद्यक व्यवसायीकडून परमिट अगर पास मिळण्याबद्दल आलेल्या अर्जांची विल्हेवाट शक्य तितक्या लवकर लावण्याबद्दल सर्व संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या गेल्या आहेत.

आपला विश्वासू
असिस्टंट सेक्रेटरी, टू दि गव्हर्मेंट ऑफ बॉंबे
रेव्हिन्यु डिपार्टमेंट

म. प्रां. वैद्य मंडळाचा प्रतिखुलासा

माननीय असिस्टंट सेक्रेटरी
टू धी गव्हर्मेंट ऑफ बॉम्बे,
रेव्हेन्यु डिपार्टमेंट, मुंबई यांसीः—

विनंति कीं

आपणाकडून नं. ऎस्. ऎम्. पी. १०५३/१३७४३७-सी चें ता. २०-१-५४ चें पत्र मिळालें. आभारी आहोत. आपण लिहिलेल्या गोष्टींबद्दलचा खुलासा खालीं देत आहोंत.:—

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनाचा ठराव नं. ८ बद्दल

वास्तविक औषधीकरण ही गोष्ट फारशी अवघड नाहीं. पण त्याबाबत आज दोन प्रकारें अडचण उपस्थित झाली आहे. गुरुपरंपरेनें शिकलेला किंवा १९३८ पूर्वीचा विद्यालयीन विद्यार्थी, आयुर्वेदीय औषधें घरीं करूं शकतो हें खरें. पण आज जागा आणि पैसा यांच्या टंचाईमुळें, व १९३८ नंतरच्या विद्यार्थ्यांस ही विद्या अवगत नसल्यामुळें हे दोन्ही वर्ग तयार औषधें विकतच घेतात. हे स्वतःच औषधें विकत घेणार! मग ते विक्री कशी करणार! म्हणुन त्यांच्या रुग्णांनाहि आयुर्वेदीय औषधें कारखानदाराकडूनच घ्यावी लागतात. आसवारिष्टें तयार करून औषधीयोजनेंत वापरण्यास चिकित्सकास कांहीं प्रत्यवाय नाहीं हें खरें, पण ही सोय स्वतः औषधें तयार करणाऱ्याकरितां आहे. इतरांना हीं औषधें महाग व मोठ्या कष्टानेंच मिळवावीं लागतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आसवारिष्टांचा खप घटला

मुंबई राज्यांत मद्यपानबंदी जारी झाल्यापासून आसवारिष्टांचा खप बिलकूल वाढलेला नाहीं. निर्बंधित आसवारिष्टांचा खप तर घटलाच आहे असें आपणासहि चौकशी अंतीं कळून येईल, असा मला विश्वास वाटतो.

दुसरी गोष्ट म्हणजे दारूदेवजीं टिंक्चर्स, दारूची तलफ भागवितात असें अनेक ठिकाणीं आढळतें. किंबहुना टिंक्चरचा खप अमाप वाढलेलाहि आपणांस दिसून येइल. तसा प्रकार आसवारिष्टासंबंधानें झालेला दिसून आला नाहीं. इतकेंच नव्हे तर तशी बोलवाहि नाहीं.

सबब आसवारिष्टावरील बंधनें उठवावीत

तेव्हां आसवारिष्टें ही दारू आणि टिंक्चर्स या वर्गांतून काढून त्यावरील सर्व बंधनें उठवावीत म्हणजे चिकित्सक व रुग्ण यांना तीं सुलभतेनें व स्वस्तहि मिळूं शकतील.

महाराष्ट्र प्रान्तीय वैद्य संमेलन ठराव नं. १५ बद्दलः—

अफू, भांग, गांजा बाबत आमचें असें म्हणणें आहे कीं हीं औषधें जीवितास अपायकारक आहेत पण ती नीट न वापरलीं तर! आयुर्वेदानें याबाबतींत फार सावधगिरी घेतली आहे. आधीं तीं एकाकीं केव्हांच वापरलीं जात नाहींत. औषधीयोगांत तीं घालतांना त्यांच्या दोषांचे पारिपत्य करणारे पदार्थ त्या योगांत घालण्याची दक्षता घेतली गेलेली आहे. त्यामुळें अपाय होण्याइतकी मात्रा त्याची सहजासहजी दिली घेतली जात नाहीं. तलफ भागविण्याकरतां तर हीं द्रव्येंयुक्त औषधांचा उपयोग होत नसल्यानें तो तसा केव्हांहि केला जात नाहीं, याबद्दल आमची खात्री आहे. आणि आपलीहि आम्ही ती करून देऊं शकतो. मात्र या द्रव्यांची आयुर्वेदानें अंगिकार केलेली पद्धत अवगत करून घेण्यास आपण तयार होणें अत्यावश्यक आहे.

शंकेला जागा उरत नाहीं

भांगेबाबत तर अशी स्थिति आहे कीं भांगेच्या पानावर असलेला चिकट पदार्थ (चरस) हाच खरा धुंदी आणणारा पदार्थ आहे. तो प्रथम निःशेष काढून घेऊन मगच भांगपत्ती विक्रीस ठेवली जाते. हा सर्व व्यवहार सरकारच करीत असल्यानें त्याबाबत शंकेला जागाच उरत नाहीं.

अकारण कडक बंधनें

अशी भांग आम्ही विकत घेतो. ती पुन्हां उकळतो. म्हणजे उरलासुरला चरसहि निघून जातो. आयुर्वेदीय औषधांत भांग हा पदार्थ मादक म्हणून वापरला जात नसल्यानें किंबहुना तो धर्म आम्हांस नकोच असल्यानें चरस घालविण्याची कोशीस केली जाते. व तो निघून गेल्यानें वैद्य स्वतःला कृतार्थ मानतात. मग त्या भांगेचें चूर्ण आम्ही कांहीं औषधांत वापरतो, तर कोठें त्या पानांचा काढा उपयोजितो. चूर्णयुक्त औषधांतहि भांग सांपडूं शकत नाहीं तर काढ्याचा काय पत्ता लागणार? अशी आहे आज रसायनशास्त्राची स्थिति. पण पाश्चात्यांना भांगेचे गुण दिसले नाहींत. तो निकष आयुर्वेदीय क्षेत्रांत अनुसरला जात आहे. ही गोष्ट बरी नव्हे. आपल्या अकारण कडक बंधनामुळें अफू, भांग, गांजायुक्त औषधें आज बाजारांतून उठलीं आहेत. त्यामुळें चिकित्सक आणि रुग्ण यांची फारच कुचंबणा होत आहे. तेव्हां सरकारनें या प्रश्नाची शहानिशा करून घेण्याकरितां एक तज्ञ समिति नेमावी. व समितीचा निर्णय ठरेपर्यंत अफू, भांग, गांजायुक्त औषधावरील विक्री नियंत्रणें दूर करावीत.

आम्ही सरकारी धोरणाविरुद्ध नाहीं

आसवारिष्टें व अफू भांग गांजायुक्त औषधांबाबत आमचें म्हणणें असें आहे. कारण शास्त्र आणि व्यवहार यापैकीं कोणत्याहि दृष्टिकोनांतून याकडे पाहिलें तरी सरकारी धोरणाविरुद्ध असें त्यांत आजवर कांहींहि आढळलें नाहीं. व पुढेंहि आढळणार नाहीं, याबद्दल आमची खात्री आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं या वर्गांत सरकारी नियंत्रण बिलकूल नसावें. सरकारनें या औषधींच्या प्रमाण्यांबाबत आवश्यक ते

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदाची प्रातिनिधिक संस्था
स्थापन करण्याचा प्रयत्न

मुंबई २३।२।५४

श्रीमान् महोदय,

मुंबई राज्याचे मुख्य मंत्री श्री. मुरारजी देसाई यांनीं वेळोवेळीं अशी इच्छा प्रदर्शित केली आहे कीं, निरनिराळीं आयुर्वेदीय मंडळें या सर्वांनीं एकत्र होऊन आयुर्वेदाचें उत्थान करण्याचें कामीं संघटित प्रयत्न करावा.

वरील उद्देशास अनुसरून जर मुंबई राज्यांतील समस्त वैद्यवर्गाची एक प्रातिनिधिक संस्था अस्तित्वांत आली व ह्या संस्थेच्या प्रतिनिधींमार्फत सरकारास जरूर तें मार्गदर्शन केलें गेलें तर सरकारलाहि वरीलप्रमाणें स्थापन झालेल्या संस्थेस आयुर्वेदाची एकमेव प्रातिनिधिक संस्था म्हणून मान्यता देणें क्रमप्राप्त होईल व तिनें वेळोवेळीं केलेल्या मार्गदर्शनाचा आस्थापूर्वक विचार करावा लागेल.

खालीं सह्या करणारी वैद्यमंडळी अशा प्रातिनिधिक संस्थेची आवश्यकता मान्य करीत आहेत व आपणहि अशा संस्थेस मान्यता द्याल अशी त्यांना आशा वाटत आहे.

प्राथमिक सभा

ह्या विचारास व आवश्यकतेस मूर्त स्वरूप देण्याबावत मुंबईतील अनेक वैद्यांची एक प्राथमिक सभा शनिवार ता. २७।२।५४ रोजीं दुपारीं २॥ वाजतां युनिव्हर्सल हेल्थ इन्स्टिट्यूटचें हॉस्पिटल, नीलम हाऊस, लॅमिंग्टन रोड, मुंबई, येथें होईल. सदर प्रसंगीं उपस्थित राहण्यास आपणास निमंत्रण देत आहों. आशा आहे कीं, आपण अवश्यमेव उपस्थित राहाल.

–भवदीय–

शिव शर्मा	जाधवजी त्रिकमजी आचार्य
गं. वि. पुराणिक	दामुभाई रामप्रसाद
कन्हैयालाल भेडा	वामनराव दीनानाथ
वै. रामगोपाळ शर्मा	अन्नासाहेब सांडू
गणेश महादेव अभ्यंकर	गजानन शर्मा
रविशंकर मट्टुभाई याज्ञिक	हिंमतलाल त्र्यंबकलाल मुनी
नारायण हरि जोशी	प्रतापकुमार पोपटभाई वैद्य
श्रीराम शर्मा	सोमेश्वर मयाशंकर भट्ट
शांतिलाल नंदलाल भट्ट	जयंतिलाल मोहनलाल ठक्कर

जरूर करावें. परंतु तीं दुर्मिळ व महाग होतील असें कांहींहि करूं नये. कारण त्यांचेबाबत झालेला गवगवा शास्त्र आणि व्यवहार यांना संमत नाहीं. तेव्हां विद्यमान जाचक बंधनें चालू ठेवल्यानें एकपरीनें या औषधांना व तीं वापरणारांना अन्याय केल्यासारखें होत आहे, असें आम्हांस वाटतें.

आपण याचा शांत चित्तानें, व निर्विकार मनानें विचार केल्यास आमच्या म्हणण्याची सत्यता आपणांस पटेल. व आपणहि मोकळ्या मनानें हीं बंधनें उठवाल असा विश्वास बाळगूनच आम्ही आपणांस ही आग्रहाची विनंति करीत आहोंत.

वैद्य दत्तात्रेयशास्त्री जळूकर
अध्यक्ष महाराष्ट्र प्रां. वैद्य मंडळ
कार्यालय, भुसावळ

श्री. मरुलाराध्यशास्त्री यांची भेट

अखिल कर्नाटक प्रां. आयुर्वेद मंडळाचे अध्यक्ष पं. मरुलाराध्यशास्त्री हे ता. १४-२-५४ रोजीं हुबळीहून सोलापूर येथें आले असतां त्यांनीं तेथील चरक क्षयरोग चिकित्सालयास भेट दिली. तेथें त्यांचा सत्कार करण्यांत आला.

नाशिक येथें मेनरोडवर आयुर्वेद सेवा संघाचीं सर्व शास्त्रोक्त पाठाप्रमाणें बनविलेलीं औषधें मिळण्याचें ठिकाणः—

श्री. कृ. वा. फाल्गुने
३६ मेनरोड, नासिक

अनेकांनीं औषधांची मुक्तकंठानें स्तुति केली.
आपणहि एकवेळ वापरून अनुभव घ्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अहमदाबाद वैद्यसभा

या वैद्यसभेचा १९५३ सालचा वृत्तांत व जमाखर्च छापून प्रसिद्ध करण्यांत आला आहे. ५ आश्रयदाते, मागील २४ व नवीन ६ मिळून ३० संरक्षक सभासद, स्थानिक १८९ व बाहेरगांवचे २२ सामान्य सभासद मिळून एकूण २४६ सभासद होते. स्थायी निधि ४४८४-६-० त्यापैकीं ४००० रुपयांचे ४० शेअर इलेक्ट्रिक कंपनीचे घेतले आहेत. चालू वर्षांत सामान्य सभा ७७ व जनरल सभा ४, व्यवस्थापक मंडळ सभा ६, सन्मानसमारंभ ३, व धन्वंतरी उत्सव १ मिळून ९१ सभा झाल्या. नडियाद येथें प्रगट झालेल्या शोथरोगाच्या संशोधनासाठीं एक समिति नेमली होती. तिचा अहवाल वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाला आहे.

गेल्या वर्षाच्या जमाखर्चांत व्याजखातें २६-८-०, वर्गणी खातें ९३०, वाचनालय ८ रु., धन्वन्तरी पूजन भेट १६१-१४-०, डिव्हिडंड ११-५-११, नियमावली विक्री १ रु. या रकमा जमेच्या बाजूस असून पोस्टखर्च १८-११-० किरकोळ २३-१० छपाई ८९ संबद्ध संस्था शुल्क १५-५ ऑफिस भाडे १२० धन्वतर पूजन ५३-११ याप्रमाणें एकूण ३२०-५-० खर्च आहे.

अध्यक्ष—वैद्यरत्न लक्ष्मीशंकर रामकृष्ण शास्त्री उपाध्यक्ष- वैद्यरत्न माधवप्रसादशास्त्री, वैद्य शंभुप्रसादशास्त्री, मंत्री– वैद्य अमरप्रसाद बुलाखीदास, व वैद्य डाय्याभाई केशवलाल.

क्षयरोगासंबंधीं उजळणी वर्ग

नवी दिल्ली क्षयरोग निवारण केंद्रानें आपल्या वार्षिक कार्यक्रमांतील एक नित्याचा भाग म्हणून वैद्यकीय व्यवसायासाठीं क्षयरोगाचे दोन पदव्युत्तर उजळणीवर्ग लवकरच सुरू करण्याचें ठरविलें आहे. १५ दिवस मुदतीचा एक वर्ग मार्च एप्रिल १९५४ मध्यें चालविण्यांत येईल. दिल्ली आणि इतर राज्यांतील डॉक्टरांनीं या सोयीचा फायदा यावा. केवळ दिल्लींतील डॉक्टर वर्गासाठीं सहा आठवड्यांचा आणखी एक वर्ग नोव्हेंबर १९५४ मध्यें केव्हांतरी चालविला जाईल.

नवी दिल्ली क्षयरोग निवारणकेंद्रांतील या संधीचा फायदा घेऊं इच्छिणाऱ्या डॉक्टरांनीं डायरेक्टर, नवी दिल्ली क्षयरोग निवारण केंद्र, सर्क्युलर रोड, नवी दिल्ली यांचेशीं पत्रव्यवहार करावा.

अशाच प्रकारचे वर्ग पाटणा आणि त्रिवेंद्रम येथील क्षयरोग निवारण केंद्रांत तसेंच आंध्रमधील आरोग्यवरम् येथील युनियन मिशन सॅनेटोरियम् मध्येंहि लवकरच सुरू करण्यांत येतील अशी अपेक्षा आहे.

अकोला जि. वैद्य संमेलन

अकोला (मध्यप्रदेश) जिल्हा वैद्य संमेलनाचे पहिलें अधिवेशन मु. पो. मानोरा ता. मंगरुळ येथें दि. ६ व ७ मार्च रोजीं भिषगाचार्य वा. कृ. दाणी यांच्या अध्यक्षतेखालीं भरणार आहे.

गौरव

आपण आयुर्वेदिक औषधांचा गौरव वाढविला पाहिजे. ती एक आपल्या हिताची गोष्ट आहे. आपण प्रत्येक औषधी द्रव्य अस्सल पैकीं व ताजें वापरून सिद्ध औषधें बनविलीं पाहिजेत. अशीं उत्कृष्ट औषधीं द्रव्यें मिळवण्याकरितां आपण:—

दि ऑल इंडिया करीयाणा स्टोर्स
पायधुनी मुंबई नं. ३
(टेलिफोन नं. ३१८५८) यांना लिहा.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात.
अधिक माहितीसाठीं कॅटलॉग मागवावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सफल ग्रंथप्रधान शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रम

(लेखख—वैद्य बा. ना. वैद्य, प्रमुख जिल्हा वैद्य सभा, भडोच)

सुज्ञेषु,

आप सभीके भगीरथ प्रयत्नके फलस्वरूप बम्बई सरकारने शुद्धायुर्वेदका पाठ्यक्रम स्वीकृत किया है। इसे अमली बनानेकी कोशिश की जा रही है। ऐसे अवसर पर हमें शुद्धायुर्वेद पाठ्यक्रम समिति को सफल बनानेके लिए अभीसे उसपर सोच विचार कर लेना चाहिए।

पाठ्यक्रम निश्चित करनेके पूर्व हमें अपना ध्येय, समय, और सामग्री किस प्रकारकी है, उस पर ध्यान देना चाहिए।

हमारा ध्येय

१ इस समय हमारा ध्येय व्यवहार-कुशल वैद्य उत्पन्न करना है जो सफलतापूर्वक चिकित्सा व्यवसाय कर सके, आयुर्वेदके यशदीप को और प्रज्वलित कर सके। इस ध्येयके अनुरूप पाठ्यक्रम होना चाहिए।

निश्चित की गई अवधि

२ समयः– सरकारसे निश्चित की गई अवधि-में (साढ़ेतीन वर्षके समयमें) आयुर्वेदके आकर ग्रंथोंकी शिक्षा देना असंभव है। किंतु इन ग्रंथोंका ज्ञान विद्यार्थी सरलतासे, संक्षेपमें फिरभी सफलता-पूर्वक प्राप्त कर सके ऐसा पाठ्यक्रम होना चाहिए।

३ विद्यार्थीका बौद्धिक स्तर

पिछले कई वर्षोंकी पश्चिमी हवानें भारतके प्राचीन विद्याओंके प्रति जो उदासीनता-अवहेलना उत्पन्न की है उसीके कारण, एवं देशभरमेंसे संस्कृत भाषा, जो कि आयुर्वेद विद्याके लिए आवश्यक है, उससे भी बुरी तरह उपेक्षित रहनेके कारण जो विद्यार्थी इस पाठ्यक्रमके अनुसार शिक्षा प्राप्त करेंगे, उनके बौद्धिक स्तर के अनुरूप पाठ्यक्रम तैयार किया जाना चाहिए।

इस प्रकारके निर्दिष्ट ध्येयकी रक्षाको ध्यानमें रखकर ही हम पाठ्यक्रम पर सोच विचार करें।

निश्चित क्रम चाहिये

एक बालकको बी. ए. तक पढानेके लिए जिस प्रकारका एक निश्चित क्रम आज हमारी समक्ष है, उसी तरह आयुर्वेदकी आरंभिक शिक्षासे लेकर कोई क्रम निश्चित होना आवश्यक है। यह क्रम ऐसा होना चाहिए जिससे विद्यार्थी बड़े सुगमतासे ज्ञान प्राप्त कर सके, उत्साह उत्तरोत्तर बढता रहे, श्रद्धा भी बढती रहे।

मंद, मध्य, तीक्ष्ण बुद्धि के विद्यार्थी

मंद, मध्य और तीक्ष्ण तीनों प्रकारके बुद्धि-वालोंको सरलतापूर्वक ज्ञान प्राप्त हो सके इस बातको ध्यानमें रखकर हमारे ऋषिओंने ग्रंथोंका संकलन किया है। इन ग्रंथोंमें प्रथम सूत्रस्थानकी शिक्षा के बाद निदानस्थान और शारीरस्थान वगैरह। उसी प्रकारका एक क्रम उन्होंने निश्चित किया है। सूत्र-स्थान में भी प्रथम अध्यायकी पढाईके बाद द्वितीय और इसके बाद तृतीय, इस प्रकारका क्रम रखा गया है। प्रथम अध्यायमें भी सर्वप्रथम विषयका बिल-कुल नये सिरेसे आरंभ करके क्रमशः विस्तार किया गया है। आयुर्वेदके परमज्ञाता ऐसे ऋषिओंने विद्या-र्थिओंको पढानेमें अत्यंत सुगमता हो इसी प्रकार ग्रंथोंकी रचना की है। सैकडो, हजारो वर्षपर्यंत इस क्रमानुसार शिक्षा पाकर तैयार किए गये वैद्योंने आयुर्वेदके परंपराकी रक्षा आजतक की है।

टीका, और प्रकरण ग्रंथोंकी रचना

कालान्तरमें मनुष्योंका बौद्धिक स्तर ज्यों ज्यों घटता गया, राजकीय उथलपुथल के कारण ज्यों ज्यों आयुर्वेदके पठन-पाठनमें कठिनाइयां उत्पन्न होती गई, मूल ग्रंथ ज्यों ज्यों लुप्तप्राय होते गये, त्यों त्यों

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उस कालके विद्वानोंने उक्त क्रमकी रक्षाके लिये, लुप्तप्राय ग्रंथोंके उपयोगी तत्त्वोंका संग्रह करके, और उनपर मनन करके, शेष मूल ग्रंथोंसे टीका ग्रंथोंकी रचना की। टीका ग्रंथोंके अध्ययनमें भी कठिनाइयाँ बढती गई त्यों त्यों उन्हें अधिक सुबोध्य बनानेके हेतु प्रकरण ग्रंथोंकी रचना हुई। यहाँ तक कि सिद्धांतको सफल व्यवहारमें गूंथकर अत्यंत प्रमाणित फिरभी अत्यंत सरल ग्रंथ जैसे कि 'योगशतक', 'वैद्यजीवन', 'माधवनिदान', 'भावप्रकाश', 'शार्ङ्गधर' आदि प्रकरण थोंकी परंपरा प्रस्तुत की।

लघुत्रयी और वृद्धत्रयी

ये सभी प्रयत्न मूल ग्रंथोंको समझनेकी एक क्रमबद्ध योजन के फलस्वरूप हुए। मन्द बुद्धिके विद्यार्थीको भी अल्प समयमें व्यवहारिक, फिरभी शास्त्रीय ज्ञान सुगमतासे हो सके वैसा वह उत्कृष्ट क्रम है, जो संपूर्ण आयुर्वेदिक है, और आज तक अत्यंत अनुकूल एवं अनिवार्य प्रमाणित हो चुका है। यह क्रम है लघुत्रयी और वृद्धत्रयी। सरकारसे निश्चित अवधिमें (साढ़े तीन वर्षमें) लघुत्रयीका अध्ययन हो जानेके बाद वृद्धत्रयीकी पढाईके लिए कुछ और व्यवस्थाका प्रबंध किया जाय, ताकि एम्.डी. की तरह आयुर्वेदके पंडित वैद्य तैयार करनेकी व्यवस्था भी उत्तम प्रकारसे हो सके।

इस क्रमका अध्ययन करके सैंकडों वैद्यरत्न भारतमें आज भी विद्यमान हैं, जिनकी आयुर्वेद पर अटूट श्रद्धा है, जो आयुर्वेदके प्रकाण्ड-पंडित भी हैं; और उन्हीं ग्रंथोंके अध्ययन के जोरसे आज वे (अपवाद छोडकर) शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीमें भी विद्यमान हैं। यदि उक्त क्रममें कमी होती तो उन्हीं विद्वानोंमें भी वही त्रुटि रहती, उनकी श्रद्धा भी आयुर्वेदमें उतनी दृढ न होती, उनकी सफलताभी उतनी दैदिप्यमान न होती।

अन्य क्रम असफल साबित हुआ

इस सफल क्रमको छोडकर हमने आयुर्वेदकी शिक्षाके लिए जो अन्य क्रमोंका निर्माण किया, वह असफल साबित हुआ है। उसी असफलताके कारण ही पुनः उहापोह उठाकर, मिश्र पाठ्यक्रमको विरोध करके शुद्धायुर्वेदकी बात सरकारसे मान्य करवाने के लिए इतना कष्ट उठाना पडा है। जबकी आयुर्वेदकी अस्मिताकी रक्षा करनेके लिए प्राप्त इस शुभ अवसर भी पाठ्यक्रमके विषयमें पुनः वही भूल बडी भयंकर परिणाममूलक होगी इसका हमें खयाल रखना होगा। इस विषम परिस्थिति पर हमें पूरा सोच विचार कर लेना चाहिए।

पाश्चात्य ढांचेमें आयुर्वेदका गला

पाश्चात्य वैद्यकका क्रम जो कुछ हो, किंतु पाश्चात्य वैद्यकका केवल अधिक प्रचार होनेके कारण ही पाश्चात्य ढांचेमें आयुर्वेदका गला घोटकर फिर उसीके साथ आयुर्वेदकी तुलना करनेका जो प्रयत्न किया जाता है, यह अत्यंत दीन हीन एवं लज्जाप्रद है।

साधन शुद्ध और पवित्र चाहिये

शुद्धायुर्वेदका पाठ्यक्रम निश्चित करनेके पूर्व हम सभीका आशय अत्यंत शुद्ध और पवित्र है, इसमें कोई संदेह नही है, फिरभी उसकी सफलताके लिए साधन भी उतना ही शुद्ध और पवित्र होना आवश्यक है। आयुर्वेदका पाठ्यक्रम, विषयानुसार निश्चित करना, यह आयुर्वेदकी दृष्टिसे अशुद्ध है, ऋषिओंसे संमत क्रमसे विरुद्ध होनेसे अग्राह्य है। उसे अमली बनाकर उसकी असफलताका भी अनुभव हम कर चुके हैं। इस प्रत्यक्ष प्रमाणका अस्वीकार किसीसे भी होना अशक्य है।

सरकारने शुद्धायुर्वेद पाठ्यक्रम समितिको विषयक्रमानुसार पाठ्यक्रमको जो ढांचा दिय है यह कानूनकी दृष्टिसे चाहे बदला न जा सके वैसा हो, तो भी, उक्त ढांचा हमारे क्रममें बाधारूप नही है। विषयकी सूचि देनेमें सरकारका हेतु इतना ही हो सकता है कि प्रस्तुत पाठ्यक्रममें कमसे कम उन्हीं विषयोंका ज्ञान सीमित हो जाना चाहिए। सरकारके उसी सुझावको हम अपने आयुर्वेदिक क्रमसे निम्नानुसार कार्यान्वित कर सकते हैः—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठ्यक्रम

पहली परीक्षा:—

१ शारीर २ दोष-धातु-मल-विज्ञान	भावप्रकाशके सृष्टिप्रकरण, गर्भ-प्रकरण, बाल प्रकरण, और शार्ङ्गधरसे
३ वनस्पतिपरिचय और द्रव्यगुण—	मदनपाल निघंटु और भाव-प्रकाशके वर्ग प्रकरणसे
४ रस शास्त्र	भावप्रकाश और शार्ङ्गधरसे या रसप्रकाशसुधाकरसे
५ स्वस्थवृत्त, रोगानुत्पादन और जनपदोद्ध्वंस प्रतिकार	भावप्रकाशके दिनचर्यादि प्रकरणसे और शार्ङ्गधरके पूर्वखण्डसे, अष्टांगहृदयसे
६ अष्टांगहृदय—	अष्टांगहृदयका सूत्रस्थान
७ संस्कृत	लघुकौमुदीकी पंचसंधि, शब्दरूपावली, धातुरूपावली और हितोपदेशसे

(ता. क.—रसशास्त्रका विषय, रसप्रकाश-सुधाकरसे पढाया जाय तो भावप्रकाश और शार्ङ्गधरका रसप्रकरण छोड दिया जाय.)

दूसरी परीक्षा:—

१ निदान पंचक और सर्वरोगसंप्राप्तिविज्ञान	माधवनिदानसे
२ रोगविज्ञान और कार्यचिकित्सा	भावप्रकाश और शार्ङ्गधरसे
३ शल्यशालाक्य ४ प्रसूति तंत्र	भावप्रकाश और शार्ङ्गधरसे और अष्टांगहृदयसे
५ विषतंत्र औषधिनिर्माणशास्त्र	शार्ङ्गधरसे
६ अष्टांगहृदय	अष्टांगहृदय

इन विषयोंको उपर लिखे ग्रंथ क्रमानुसार विभाजित करके आजके युगमें विद्यार्थीको कठिन प्रतीत न हो सके वैसे सरल, रोचक और प्रत्यक्षसिद्ध ऐसे ग्रंथोंसे विषयका परिचय प्राप्त करानेके लिए:--

प्रथम सत्रमें:- योगशतक, वैद्यजीवन और मदनपालनिघंटुका अध्ययन हो जानेके बाद—

दूसरे व तीसरे सत्रमें:- भावप्रकाश और शार्ङ्ग-धरका आरंभ किया जाय और अष्टांगहृदयका भी आरंभ किया जाय।

चौथे सत्रमें:-भावप्रकाश, शार्ङ्गधर और अष्टांग-हृदयका अध्ययन जारी रखा जाय और माधवनिदानका आरंभ किया जाय।

पांचवे, छठें व सातवें सत्रमें-भावप्रकाश शार्ङ्ग-धर और माधवनिदान संपूर्ण करें और अष्टांगहृदयभी संपूर्ण करें. (हो सके तो).

(यदि उक्त समयमें अष्टांगहृदय पूरा न हो सके तो दुसरी परीक्षामें रसायन-वाजीकरणका प्रकरण लेकर शेष छोड दिया जाय। शल्य-शालाक्य, प्रसूतितंत्र और विषतंत्रका जो अंश भावप्रकाश और शार्ङ्गधरसे शेष रहेगा वह अष्टांगहृदयसे पूरा हो जायगा। अष्टांग आयुर्वेदके भूतविद्याका निर्देश सरकारसे दिये गये विषयमें नहीं है। वहभी अष्टांग-हृदयसे पूरा हो जायगा।)

पहले, दूसरे व तीसरे सत्रमें संस्कृतका विषय लघुकौमुदीके पंचसंधि, शब्दरूपावली और धातु-रूपावली और हितोपदेशसे पढाया जाय।

पहले सत्रमें 'योगशतक' और 'वैद्यजीवन' जैसी पुस्तकें अत्यंत उपयोगी हैं। इनसे विद्या-र्थिओंको अध्ययनमें आनन्द रहेगा, व आयु-र्वेदकी शिक्षा बडी सुगमतासे प्राप्त कर सकेंगे ऐसा उनमें विश्वास पैदा होगा और इन पुस्तकोंके छोटे छोटे नुस्के कि जो समग्र आयुर्वेदके निचोड हैं, सिद्ध मुष्टियोग हैं, संपूर्ण शास्त्रीय हैं, इनके प्रयोगसे आयुर्वेदशास्त्र प्रति उनकी श्रद्धा अधिक बलवत्तर होगी। आयुर्वेदकी शिक्षा के लिये योग्य विद्यार्थी प्राप्त करना आज टेढी खीरसा है। ऐसी परिस्थितिमें यदि हम आरंभमें क्लिष्ट पुस्तकें पाठ्यक्रम में नियत करेंगे तो फल यह होगा कि विद्यार्थी पढनेसे हिच-किचायेंगे। इसके बजाय ये पुस्तकें अति सुलभ, रसिक एवं प्रत्यक्ष रूपसे ठोस होनेसे विद्यार्थीको आकर्षित करनेमें बडी सहायक होंगी।

शिक्षित विद्यार्थीकी दयनीय स्थिति

इस क्रमसे विपरीत भिन्नभिन्न ग्रंथोंसे एक ही विषयकी अन्टसन्ट सामग्री जुटाकर लिखी गई पुस्तकोंके अध्ययन से शिक्षित (!) विद्यार्थीकी दयनीय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्थितिका अनुभव किसे नही है ? अनुवृत्तिरहित वैसी 'भानमति के कुनवे' की तरह जुटाई गई सामग्रीके अध्ययनसे विद्यार्थी विषयके मर्मको नही समझ पाते। फलस्वरूप उन्हें विषयके प्रति रुचि और श्रद्धा नही रहती, उठ जाती है। ज्यों त्यों करके विद्यार्थी परीक्षा उत्तीर्ण कर लेता है, किन्तु आयुर्वेदसे तो वह विमुखही रहता है। भिन्नभिन्न ग्रंथोंसे एक विषयकी सामुग्री ले कर पढाते समय आयुर्वेदके मूल ग्रंथोंकी सूत्रात्मक अनुवृत्तिसहित और पुनरुक्तिरहित शैलीकी घोर उपेक्षा की जाती है। इससे विद्यार्थीको यथार्थ ज्ञान प्राप्त नही हो सकता। विना यथेष्ट ज्ञान प्राप्त किये सफलता प्राप्त नही हो सकती। फलस्वरूप विद्यार्थी पाश्चात्यानुगामी बन जाता है। अतः सुशिक्षित समाजमें भी आयुर्वेदके प्रति भयंकर अश्रद्धाकी जडें जम जाती हैं।

विद्यार्थी व्यवहारकुशल बनेगा

इसके विपरीत उपरनिर्दिष्ट क्रमानुसार शिक्षित विद्यार्थी अच्छा व्यवहारकुशल बनेगा, चिकित्सामें सफल रहेगा, आयुर्वेदमें उसे अटूट श्रद्धा होगी और जिसकी सफलताका समाज पर बडा प्रभाव होगा। और साथसाथ सरकार परभी अच्छा असर होगा। आयुर्वेदको वेगशील बनानेका अधिक दृढ वातावरण पैदा होगा। शुद्धायुर्वेदके अधिक अध्ययनके लिए भी वातावरण उत्पन्न होगा। यही एकसही कदमसे आयुर्वेदके प्रकाण्डपंडित उत्पन्न करनेका सौभाग्य और यश आपको प्राप्त होगा। अतः संपूर्ण आयुर्वेदीय एवं संपूर्ण सफल इस ग्रंथप्रधान पाठ्यक्रम का आप पुरे बलसे समर्थन कीजिए और शुद्धायुर्वेद पाठ्यक्रम समितिको प्रस्तुत पाठ्यक्रम कार्यान्वित करनेका आग्रह करके आप अपने अत्यंत उत्तरदायित्वपूर्ण कर्तव्यकी पालन कीजिये।

निम्न लिखित फार्मके अनुसार प्रस्ताव करके शीघ्रही आप अपनी जिला वैद्य सभा द्वारा शुद्धायुर्वेद पाठ्यक्रम समितिको भेजनेकी कृपा करें।

श्रीमान् अध्यक्षजी,

शुद्धायुर्वेद पाठ्यक्रम समिति बम्बई,

गाँव/जिला

की यह सभा सर्वानुमतीसे प्रस्ताव करती है कि आयुर्वेदके अध्ययनके लिए ग्रंथप्रधान पाठ्यक्रम ही केवल उपयोगी है। सरकारसे प्रस्तावित अभ्यासक्रमके ढांचे में ग्रंथप्रधान पाठ्यक्रम ठीक तरह ढल सकता है। अतः आपसे अनुरोध है कि ग्रंथप्रधान पाठ्यक्रमसे ही आयुर्वेदका अध्ययन करानेका प्रबंध करें।

वैद्यसभा

अध्यक्ष गांव / जिला

———

सांड
डायाबेटॉल
मधुमेहावर अप्रतिम.
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द. कृ. सांड ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई.
[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स–
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते–मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

पवित्र
नेपाली कस्तुरी रु. ४४ तोला,
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला,
तब्बत कस्तुरी रु. ३६ तोला,
लिहाः–नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लेखक: श्री. विश्वनाथ केरू कांडेकर
वणी (जि. नाशिक)

इंद्रवारुणी ....

अस्सल इंद्रवारुणी

नांवें:- संस्कृत- इंद्रवारुणी, विशाला, श्वेतपुष्पा, गवाक्षी. हिंदी — इंद्रायन. मराठी— कडू इंद्रावण. पंजाबी- कोडतुंब. तेलंगी- एतिपुछा. गुजराथी- इंद्रावणा. इंग्रजी- कोलोसिंथ.

वर्णन— इंद्रावणीची वेल बहुवर्षायु असते. पानें कलिंगडच्या पानांसारखी परंतु लहान असतात. फुलें लहान पांढरट व आंतील भागांत पिवळसर झांक मारते. फळ कच्चें असतांना हिरव्या रंगाचें असतें व पिकल्यावर पिवळें होतें. बी लहान, चापट, काळसर तांबूस रंगाची असते. मूळ सरळ, एक दीड फूट लांब व पांढरें असतें. मूळ मोडण्यास ठिसूळ असतें.

इंद्रवारुणीचे ३ प्रकार

इंद्रवारुणीचे तीन प्रकार आहेत, ते खालील प्रमाणें:— १) घोडे इंद्रावण:- हें साधारण मोठ्या कवठाएवढें असून गोल असतें. हें नदीकिनारीं व रेताड जमिनींत होतें.

२) लहान इंद्रावण:- हें फळ लिंबाएवढें असतें. पानें घोडेइंद्रावणीपेक्षां लहान असतात.

३) कांटे इंद्रावण (घुले इंद्रावण):- याचा आकार करटोल्यासारखाच असतो, व करटोल्याप्रमाणेंच याच्या अंगावर कांटे असतात; म्हणून यास कांटे इंद्रावण म्हणतात. पानें नं. १ प्रमाणें असतात. या तिन्ही वेलींचीं फुलें दिसण्यांत सारखीं असतात व तीन्हींचीं फळें पिकल्यावर पिवळीं होतात.

उपयुक्त अंगें:— फळ व मूळ.

गुणधर्म:— या इंद्रावणी अत्यंत कडू असून रेचक व उष्ण आहेत.

२ अनुभूत उपयोग

१) इंद्रवारुणाचें मूळ अगर पक्कें फळ याचा लेप स्तनांतील ठणका, दाह यांवर करावा म्हणजे वेदना नाहींशा होतात व थंड वाटतें.

(२) लहान मुलाच्या पोटांत विकार होतो त्यावर कांटेइंद्रावणीचें बी किंवा गीर आईच्या दुधांत उगाळून द्यावें. यानें मुलास शौचास साफ होऊन पोटांत येणें थांबतें.

(३) कामलेवर:- इंद्रावणीच्या फळाचें चूर्ण व कडू दोडक्याचें चूर्ण समभाग घेऊन थोडा वेळ पाण्यांत भिजत ठेवून रवीनें अथवा हातानें चांगलें कुसकरून पाणी गाळून त्यांत थोडी सुंठेची पूड टाकून रोग्याचें बल पाहून देणें. (अनुभवित)

इंद्रवारुणीचें चूर्ण:— इंद्रावणीचीं पक्कीं फळें आणून त्यांत तीन प्रकारचें मीठ (सैंधव, संचळ, मीठ) भरून वरून मातीनें लिंपावें. माती वाळल्यावर त्या फळांना तीव्र अग्नींत जाळून थंड झाल्यावर माती काढून टाकून त्यांत त्रिफळा, सुंठ, मिरे, पिंपळी, चित्रकमूळ, पिंपळमूळ (गांठ पिंपळी) सर्व समभाग घालून खलून एकजीव करावा. मात्रा तीन मासेपर्यंत एका वेळेस. यानें अत्यंत भूक लागते व अन्नपचन होतें. हें पुष्टिकर असून उत्तम प्रकारचें पाचक आहे.

टीप:— हे सर्व गुण वर वर्णन केलेल्या इंद्रवारुणीचे आहेत. कडु चिभडाचे नाहींत.

कडू चिभड (नकली इंद्रवारुणी)

नांव:-देशावरी- कडू चिभड. कोंकणी- चीरांट.
वर्णन:-कडू चिभडाची वेल एक वर्षायु असते. पानें, फुलें काकडीसारखीं असतात. फळ लांबट दोन ते तीन इंच असतें. कच्चें फळ हिरव्या रंगाचें असतें व पिकल्यावर पिवळें होतें. हें रुचीनें अत्यंत कडू. बिया काकडीच्या बियांप्रमाणें असतात.

गुणधर्म:- कडुत्वामुळें पित्तकारक असून थंड आहे. हें रेचक नाहीं.

उपयोग:- फळाची भाजी करून गरीब लोक खातात. फोड अगर गांठीचा दाह होत असल्यास पक्या फळाचा लेप करतात.

चरकांत अस्सल इंद्रवारुणीचे गुणधर्म खालील-प्रमाणें दिले आहेत.- षोडशमूलिनीषु गवाक्षी नाम्ना विरचनद्रव्येषु च इंद्रवारुणी पठ्यते। (च. सु. अ. १)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार—

पंच वायूंचे काल ?

प्राण, अपान, समान, उदान व व्यान ह्या वायूंचा दिवस, रात्र, ऋतु आदि परत्वें शरीरांतील कुपित-काल, त्याचप्रमाणें त्यांचें कोप-शमन मला कोठेंच आढळलें नाहीं. प्राण, अपान आदि वायूंचा प्रकोप झाला असतां दिवसां अगर रात्रीं औषध द्यावें याचाहि आढळ झाला नाहीं. समय स्पष्ट दिला असतांना चिकित्सा करण्याचें काम सोपें होतें. चरकसंहितेंत ह्या वायूंचा कुपित-काल व औषध देण्याची रीति कोठें कोणत्या अध्यायांत सांगितली आहे ? मी पुष्कळ धुंडाळून पाहिलें परन्तु मला त्याचा कोठेंहि आढळ झाला नाहीं.

मालकांगणी तेलाचा उपयोग

मी स्वतः व माझे पूर्वज अनेक वर्षांपासून मालकांगोणीच्या तेलाचा उपचार अर्धांगवात, उन्माद स्वरभंग ह्या रोगांत करीत आलो आहों. वंगसेन-कृत 'रसायनाधिकार' ह्यांतील ग्रंथोक्त पाठाप्रमाणें प्रयोग करतो. ह्यानें उपरोक्त असाध्य कोटींतील रोगांच्या बाबतींतहि सर्व अवस्थांमध्यें पूर्ण गुण येतो. पहिल्या दिवशीं ५ थेंब, दुसऱ्या दिवशीं ५ थेंब, तिसऱ्या दिवशीं १० थेंब, चवथ्या दिवशीं १५ थेंब, पांचव्या दिवशीं २० थेंब व सहाव्या दिवशीं २५ थेंब येथपर्यंत वाढवून नंतर हें प्रमाण कमीकमी करीत जावयाचें. बाजरीची भाकरी, दूध व भात हें पथ्य. मीठ वर्ज. औषध दिवसांतून एक वेळ द्यावें.

पठाणकोट (पंजाब) —देवदत्त वैद्य

मस्तुसंबंधीं थोडी माहिती

"मस्तु (दह्यांतील पाणी) बद्दल तूर्त मला एवढीच माहिती आहे. मस्तुमध्यें दुधांतील लॅक्टोज (दुग्धशर्करा) या साखरेचें लॅक्टिक ॲसिड नामक आम्लद्रव्यांत रूपांतर झालेलें असतें. हें रूपांतर मुख्यतः लॅक्टिक ॲसिड बॅक्टिरियामुळें झालेलें असतें.

मस्तु क्लमहर बल्य लघु

मधुर दह्याच्या पाण्यांत (मधुर मस्तु) लॅक्टिक ॲसिड कमी प्रमाणांत असून कांहीं प्रमाणांत लॅक्टोज ही साखरहि असूं शकते.

मस्तुच्या आम्लत्वामुळें त्यांत असणारीं जीवन-सत्वें टिकविलीं जातात. दुधाचें दही होतांना दुधांतलि केसीन (प्रोटीन्स), व चरबी (तूप) हीं द्रव्यें वेगळीं होतात. त्यामुळें दह्याचा अभिष्यंदी हा गुण मस्तूमध्यें दिसत नाहीं.

'क्लमहरं बल्यं लघु ....हे मस्तूचे गुण बहुधा लॅक्टोज, लॅक्टिक ॲसिड व इतर द्रव्यें (जीवनसत्वें व खनिजें) यामुळें असावेत."

—चं. ग. जोशी M. Sc.

सुधारून वाढविलेली नवीन आवृत्ति,
वैद्य, विद्यार्थी व सामान्य लोक यांस अत्यंत उपयोगी. सुलभ रीतीनें रोगांची माहिती व उपचार सांगणारें पुस्तक.

किं. ६ रु. **सिद्धौषधि प्रकाश** पो. ख. नि.

(लेखक:-वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी)

पुस्तक मिळण्याचीं ठिकाणें:- (१) श्री. द. वा. शेंड्ये २८ शुक्रवार, पुणें २ (२) आयुर्वेदीय औषधी भांडार, २५५ गिरगांव, मुंबई ४ (३) वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

आमच्याकडे 'आयुर्वेद सेवा संघा'चीं भल्लातकासव, कंदर्पवृष्यशाक, कुमारीआसव ग्राईप मिक्श्चर, एरंडेल, बालशूलार्क, इ. सर्व प्रकारचीं औषधें, गुलकंद, मोरावळा, सरबतें मिळतील. मागणीप्रमाणें पुरवूं.

सोनार ब्रदर्स

पो नरडाणे (प. खान्देश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केवल गोदुग्धाहाराचा प्रभाव

लेखकः—
श्री. शंकर मुकुंद जोशी, वाई

तारीख १।१२।५३ व ता. १।२।५४ च्या आयुर्वेद पत्रिकेंतील ' कॅन्सरवर गोदुग्धाहार ' हे लेख वाचले. गोदुग्धाहाराचा उपयोग क्षयावर, कफक्षयावरहि उत्तम होतो, याबद्दलचा आमचा घरचा अनुभव पुढें देत आहे.

कडक थंडीचा परिणाम

सन १९३५ सालची गोष्ट. तेव्हां आम्ही बेळगांवीं राहात होतो. माझे वडील (त्यावेळीं वय ४४ वर्षें,) कांहीं विशेष कामाकरितां पुण्यास एकटेच दोन महिने रहावयास गेले होते. तेथें फेब्रुवारींत पडलेल्या कडक थंडीचा परिणाम त्यांचेवर होऊन ते गारठले. ४ दिवसांत खाणें पिणें, मलमूत्र—विसर्जन इत्यादि सर्व शारीरिक क्रिया बंद होऊन अंथरुणावर निजूनच होते. घर-मालकांनीं जवळच्या डॉक्टरांचें औषध देवविलें. त्यानें त्यांचे अंगांत आंतून बाहेरून आगच आग झाली व प्राणांतिक पॅल्पिटेशनहि सुरूं झालें. म्हणून तेथीलच एका नामांकित वैद्यवर्यांचें औषध ७।८ दिवस घेतलें. त्यानें थोडेसें बरें वाटूं लागल्यामुळें त्याच वैद्याचें आणखी आठ दिवसांचें औषध बरोबर घेऊन वडील बेळगांवीं परत आले.

प्रकृति बिघडत चालली

औषध त्याच वैद्याचें सुरूंच होतें, पण प्रकृति सुधारण्याऐवजीं दिवसेंदिवस अधिकच बिघडत चालली व जुलै महिन्यांत अगदीं प्राणांतिक अवस्था झाली. म्हणून पुण्याच्या त्याच वैद्यराजांचें औषध घेण्याकरितां आम्हीं पुण्यास बिऱ्हाड करून राहिलो. वैद्यराजांचें औषध सुरूं केलें. एक महिना झाला पण प्रकृति सुधारण्याऐवजीं जास्त जास्तच खंगत चालली. म्हणून सदर वैद्यराजाचे अनुमतीनें आणखी ३।४ नामवंत वैद्यांना प्रकृति दाखवून सर्व वैद्यराजांचे एकमतानें औषध पूर्वीचेच वैद्यराज देत होते, पण गुणाचा लेश नाहीं. उत्तरोत्तर प्रकृति क्षीणच होत होती.

महिना २ महिन्याचे सोबती

वैद्यराजांना वडिलांनीं प्रकृतीबद्दल विचारलें तरी ते स्पष्ट कांहींच सांगत नसत. पण वाड्यांतील इतर कोणीहि वडिलांचे प्रकृतीबद्दल वैद्यराजांना प्रश्न विचारला, तर ते सांगत कीं, ' अहो, या रोग्याचें काय सांगावयाचें, महिना दोन महिन्यांचा सोबती ! '

वैद्यांनीं आशा सोडली

ही भाषा वाड्यांतील लोकांकडून कर्णोपकर्णीं वडिलांना समजली; म्हणून एक दिवस वडिलांनीं वैद्यराजांना " स्पष्ट काय तें सांगा " म्हणून निक्षून विचारतां " आम्ही आमचे बुद्धीप्रमाणें प्रयत्न करीतच आहोत, यापेक्षां आम्ही तरी या रोगांत अधिक काय करावें ! "

प्राणांतिक स्थितींत स्थलांतर

असें वैद्यराजांचें उत्तर ऐकून वडिलांची फारच निराशा झाली. पण प्रयत्न सोडावयाचे नाहींत, म्हणून वडिलांनीं नगरचे एक ख्यातनाम वैद्य यांचेकडे पत्रव्यवहार करून त्यांचे अनुमतीनें अश्विन शु॥ १० शके १८५७ या दिवशीं तशा प्राणांतिक स्थितींतच पुण्याहून सर्व बिऱ्हाड नगरास नेलें व शास्त्रीबुवांचें औषध सुरूं केलें.

पुनः गाडें उलटलें

दोन महिने औषध घेतलें, प्रकृति थोडीशी सुधारलीहि; पण ४।८ दिवसांनीं पुनः गाडें उलटलेंच. शास्त्रीजी म्हणत आतां औषध नकोच; म्हणून औषध बंद केलें. तों ८ दिवसांनीं पुनः प्रकृति मूळपदावर आली.

केवळ गाईच्या दुधाचें पथ्य

वैद्यराज त्यावेळीं कोठें वैद्य-संमेलनाला गेले होते, ते ८।१० दिवस आले नाहींत. इकडे वडिलांची प्राणांतिक अवस्था होत होती. शेवटीं नाइलाज म्हणून तेथीलच दुसऱ्या एका वैद्यराजांना बोलावून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकृती दाखविली. त्यांनीं वडिलांना सांगितलें कीं, "केवळ गाईच्या दुधाच्या पथ्यावर राहात असाल तर मी तुम्हाला बरें करतों."

दुसऱ्याच सप्तकांत हुषारी

वडिलांनीं ती गोष्ट त्याच दिवसांपासून चालूं केली. वैद्यांनीं औषधहि दिलें. दुसऱ्याच सप्तकापासून वडिलांना हुषारी वाटून तें थोडेसें हिंडूं फिरूंहि लागले. पंधरा दिवसांनीं वैद्यराजानीं सांगितलें कीं, "औषध तुमच्या समजुतीकरितां नाममात्र देत होतो; त्याची जरूर नाहीं. गाईचें दूधच तुमचें जीवन आहे. तेंच तुमचें औषध;" म्हणून इतर औषध बंद केलें. दूधमात्र नियमित २।२ तासांनीं १५।१५ तोळे घेणें चालूं ठेवले. असे दुधावर तेथें तीन महिने राहिले. प्रकृति चांगली सुधारली. मन प्रसन्न व शांत झालें. रोज सकाळ संध्याकाळ नियमानें गांवांतून स्टेशनावर फिरावयास जाण्याचा क्रम वैद्यराजांच्या कडक हुकुमाप्रमाणें दोन्हीहि वेळां चालूं होता.

मार्च महिन्यांत तेथें थंडी कमी झाली. वैद्यराजानीं उन्हाळ्यामध्यें तेथें न राहतां थंड हवेच्या ठिकाणीं जाण्यास सांगितल्यानें, वडिलांनीं तेथून रत्नागिरी जिल्ह्यांत प्रयाण केलें. दुधाचा आहार वैद्यराजाच्या कडक ताकदीप्रमाणें चालूंच होता. कोंकणच्या समुद्रकांठच्या हवेंत ३ महिने राहून व दुधाचें पथ्य सांभाळून वडिलांची प्रकृति फारच उत्तम झाली.

कडक पथ्यपालन केलें

तरी देखील पुढें ऑगस्टपर्यंत २।३ महिने केवळ दुग्धाहारच वडिलांनीं चालूं ठेविला. तिखट, मीठ, भात, भाकरी किंवा पोळी यापैकीं कांहींहि खात नव्हते. नाहीं म्हणायला पुढें भूक फारच वाढून खाय खाय उत्पन्न होऊं लागली म्हणून नगरच्या वैद्यराजांच्या अनुमतीनें दुधाच्या जोडीला साळीच्या लाह्या कोरड्या चावून खाऊन वर दूध घेण्याच्या क्रम शेवटीं २।३ महिने चालूं केला होता. पण याशिवाय दुसरें कोणतेंहि खाद्य किंवा पेय ७।८ महिन्यांच्या मुदतींत वडिलांनीं घेतलें नाहीं.

त्यानंतर १८ वर्षांत आजार नाहीं

७।८ महिने दुग्धाहारावरच राहिल्यानें वडिलांची प्रकृति फारच उत्तम झाली; व तेव्हांपासून आतांपर्यंत १८ वर्षांत त्यांना विशेष असा कोणताहि आजार झाला नाहीं. आज मितीला वडिलांना ६२ वें वर्ष चालूं आहे. तरी देखील दर महिन्याला ते भागवतसप्ताहाचें पारायण रोज सकाळ संध्याकाळ ४।४ तास करतात. त्यांना चाळिशीहि (चष्मा) अद्याप लागत नाहीं.

थंड हवेचा परिणाम

नाहीं म्हणायला अलिकडे या वर्षांत वाईच्या व बेळगांवच्या थंड हवेच्या परिणामामुळें गेल्या आषाढापासून खोकला व दमा ८।१५ द्या दिवशीं होऊं लागला आहे. दुसऱ्या कोरड्या हवेच्या ठिकाणीं गेले म्हणजे तोहि तात्वडतोब कमी होतो. व त्या त्रासामुळें ते बेळगांव व वाईचें वास्तव्य सोडण्याच्या विचारांत आहेत.

गोदुग्धाहार = अमृताहार

तात्पर्य असें कीं केवळ दुग्धाहारानेंच, त्यांच्या वैद्यांचे मतानें झालेला क्षय साफ बरा झाला आहे. व त्यानंतर आज १९ वर्षांपर्यंत ते चांगल्या आरोग्यसंपन्न स्थितींत आहेत. म्हणून 'गोदुग्धाहार' म्हणजे मृत्युलोकींचा 'अमृताहार' आहे असें ते आम्हाला नेहमीं सांगत असतात. तो ज्याला सेवन करावयास मिळेल तो फारच भाग्यवान् प्राणी होय.

गोदुग्धाचा दोष दृष्ट्या विचार

[गोदुग्धाची महति वरील अनुभवांत निवेदन केली आहे. तथापि सर्वच प्रकारच्या प्रकृतींना गोदुग्धाहार मानवेल असें समजूं नये. पित्तप्रकृतीच्या लोकांना दुग्धाहार युक्त आहे. पण कफप्रकृति व वातप्रकृति लोकांना दूध घेणें झाल्यास तेथें कफनाशक वा वातहारक द्रव्यांनीं संस्कृत करूनच वापरावें लागेल. हें विसरूं नये. संस्कृतं शीतमुष्णं वा तस्मात् धारोष्णमेव वा। विभज्य काले युंजीत प्राणदः स्यात् यथा नृणाम्। असा दुधासंबंधींचा नियम आहे.
—संपादक]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाणी स्पष्ट, व स्मरणशक्ति तीव्र करण्याचे उपाय

(लेखकः— वैद्य हरिशास्त्री ताटके, वाई)

पेशवाईच्या अखेरीस पुणें शहरांत दीक्षित गोपिनाथ भट्ट या नांवाचे विद्वान् मीमांसादिशास्त्रज्ञ होऊन गेले. गृह्य (स्मार्त) कर्मे सांगणारा 'संस्कार-रत्नमाला' या नांवाचा धर्मनिबंध त्यांनीं लिहिला आहे. या ग्रंथांत 'अक्षरग्रहण' नांवाचा संस्कारविधि सांगि-तला आहे. अक्षरग्रहण म्हणजे प्राथमिक विद्यारंभ. बालकाची वाणी स्पष्टोच्चारी नसेल तर शब्दोच्चार विकृत होतो. विकृतोच्चार जिव्हेच्या दोषामुळें होत असतो. स्पष्टोच्चारी जिव्हा होण्यास ग्रंथकारानें तीन पाठ दिले आहेत.

पाठ पहिला

वचा ब्राम्ही च मंडूका धनं कुष्ठं सनागरम् ।
घृतेन परिदेयं च चूर्णं वाक्शुद्धि (वाक्पटु)कारणम् ॥

पाठ दुसरा

गुडूचिकाऽपामार्गश्च विडंगं शंखपुष्पिका ।
विष्णुक्रांता.वचा पथ्या नागरं च शतावरी ॥
चूर्णं घृतेन संमिश्रं लिह्यात्प्रज्ञां विवर्धयेत् ।
त्रिभिर्दिनैः सहस्रैकं श्लोकानां अवधार्यते ॥

पाठ तिसरा

त्रिकटु त्रिफला धन्या यवानी शतमूलिका ।
वचा भार्ङ्गी तथा ब्राह्मी चूर्णं समधु लेहितम् ।
वाक्पटुत्वं च बालानां वीणावाद्यसमस्वरम् ॥

पहिल्या पाठाचा अर्थ

वेखंड, ब्राह्मीपत्र, मंडूकपर्णी(ब्राह्मेः ईषदूनम् । ब्राह्मीचा प्रकार,बेडकीचा, पाला उभयतांचे गुण-साधर्म आहे.) धणे, कुष्ठ, सुंठ या सर्वांचें चूर्ण करून तुपांत देणें. यानें वाचा शुद्ध हो .

प्रधान द्रव्य ब्राह्मीचे गुणधर्म

या पाठांत ब्राह्मी खेरीज सर्व द्रव्य शुष्क आहेत. या शुष्क द्रव्यांना ब्राम्हीच्या रसाच्या सात भावना द्याव्यात व वटिका चणप्रमाणांत बांधाव्यात. यांत ब्राह्मी द्रव्य प्रधान आहे. प्रधान द्रव्याच्या भावनांनीं मूळ योग प्रभावी होईल. सर्व निघंटकारांनीं ब्राह्मीचे मेध्या, बुद्धिप्रदा, कंठशुद्धिकरी, स्मृतिदा, वाक्स्वर-स्मृतिदा असें वर्णन दिलें आहे.

यत्र तु द्रव्याणां भागप्रमाणं नोपलभ्यते । तत्र तु सर्वेषां द्रव्याणां समानभागं प्रमाणम् ॥ या नियमाप्रमाणें वरील योगांत सर्व द्रव्यांचें समप्रमाण घ्यावें.

चूर्णापेक्षां घनसत्व प्रशस्त

ब्राह्मीचें चूर्णापेक्षां घन सत्व प्रशस्त. ब्राह्मीच्या एक तोळा स्वरसांत एक माष (मासा) घन सत्व सांग-डतें. वरील चार द्रव्याला ब्राह्मी व मंडूकपर्णी यांच्या ४।४ भावना दिल्या असतां मूळ द्रव्याचें प्रमाण येईल. व तें तयार औषधाच्या वजनानें समजेल. हीच प्रक्रिया इतरत्र समजावी.

दुसऱ्या पाठाचा अर्थ

गुळवेल, आघाडा, वावडिंग, शंखपुष्पी, विष्णु-क्रांता, वेखंड, हिरडा, सुंठ, शतावरी, यांचें चूर्ण तुपाचें अनुपानांत देणें.

गुळवेल चूर्ण कीं सत्व !

क्रमांक २ च्या पाठांत गुळवेल चूर्ण किंवा सत्व बापरावयाचें हें नेहमींच्या परंपरेवर अगर अनुभवावर ठरवावें. कांहीं वर्षांपूर्वी एका वैद्यक मासिकांत 'गुळ-वेलचूर्ण कीं गुळवेलसत्व, असें शीर्षक देऊन एका वैद्यराजांनीं लेख लिहून सत्वापेक्षां चूर्ण प्रभावी असतें असें प्रतिपादन केलें आहे. याबाबतचा निर्णय ज्याचा त्यांनीं ठरवावा, या मताचे आम्हीं आहोत. यामुळें वादांग निर्माण होत नाहीं.

तिसऱ्या पाठाचा अर्थ

त्रिकटु (सुंठ, मिरे, पिंपळी) त्रिफळा (हिरडा, बेहडा, आवळकाठी) धने,अजमोदा (ओवा), शतावरी, वेखंड, भारंगमूळ, ब्राम्ही. अनुपान मध.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बौद्धिक वर्गासाठीं बौद्धिक चाटण

सदरचे पाठ वैद्यकीय मुद्रित ग्रंथांत सांपडत नाहींत. कोणाच्या लिखित संग्रहांत असल्यास कोण जाणे! सांप्रतच्या काळांत बौद्धिक वर्गाचें (स्टडी सर्कल) स्तोम वाढत आहे. हे बौद्धिक वर्ग चालविणाऱ्यांनीं प्रथम या वर्गाला वर दिलेले बौद्धिक टॉनिक द्यावें म्हणजे स्वप्रत्ययी बुद्धि होईल व चालकांच्या श्रमाचें चीज होईल. वर्तमानपत्रीं प्रसृत होण्याऱ्या ब्रेनटॉनिक-कडे लोकांना धांव घ्यावी लागणार नाहीं.

स्वराज्यांत स्वविद्येला उत्कर्षाकडे नेणें हें सुशिक्षित समाजाचें कर्तव्यच आहे.

स्त्री-पुरुष शरीर भेद

आचार्य वेणीमाधवशास्त्री यांचें भाषण

नागपूर येथें सोमवार ता. ८ फे. रोजीं सायंकाळीं सीताबर्डी सूतिकागृहांत आयुर्वेदाचार्य श्री. वेणीमाधव-शास्त्री जोशी यांचें परिचारिका व विद्यार्थिनी यांच्या-साठीं व्याख्यान झालें. त्यावेळीं ते म्हणाले कीं, परकीय सत्ता असतांना आपण त्यांच्या आधुनिक शास्त्रांचा अवलंब केला होता, व देशाला स्वातंत्र्य मिळून आज पांच सहा वर्षें होऊन गेलीं तरी आपण त्याच शास्त्रांचा अभ्यास करीत आहोत. त्या शास्त्रांचा अभ्यास करूं नये असें माझें म्हणणें नाहीं; परंतु स्वतंत्र देशांत आपल्या कला, शास्त्रें वगैरे काय आहेत हें जाणून घेण्याची जिज्ञासा लोकांत जागृत व्हायला हवी व ती जागृति आपल्या देशांत अजूनहि होत नाहीं हें पाहून फार खेद वाटतो.

अस्थिप्रधान पुरुष, मज्जप्रधान स्त्री

पुढें त्यांनीं अस्थिप्रधान पुरुष-शरीर व मज्जा-प्रधान स्त्री-शरीर कसें असतें व ह्या मुख्य धातूंच्या फरकामुळें मन, भावना, आवडी वगैरे सर्वच बाबतींत दोन्हींत कसा फरक असतो तें स्पष्ट करून सांगितलें.

आयुर्वेदीयांची दोष-धातु-मल दृष्टि

पुढें ते म्हणाले, आयुर्वेदाप्रमाणें आम्ही शरीरा-कडे तीन दृष्टीनें पाहतो. धातुदृष्टि, दोषदृष्टि व मल-दृष्टि. रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा वगैरे सात धातु शरीराचे मुख्य घटक असतात. शरीरांत जरूरीपेक्षां अधिक म्हणून अनुपयुक्त, शल्यरूप द्रव्यें झालीं कीं दोष उत्पन्न होतो. मल म्हणजे शरीरांतील टाकाऊ पदार्थ. ते नीटपणें शरीराबाहेर टाकले गेले पाहिजेत.

रस, रक्त, स्वतंत्र धातु

डॉक्टरी शास्त्राप्रमाणें रक्तांत पोषकद्रव्यें असतात व आयुर्वेदाच्या मतें पोषक रसांत रक्ताचे घटक असतात. आम्ही रस व रक्त हे दोन स्वतंत्र धातु मानितो.

शास्त्रीय पण मनोरंजक वर्णन

नन्तर त्यांनीं श्रोतृवर्गाच्या दृष्टीनें योग्य असा विषय म्हणजे स्त्रीचें शरीर, त्याची रचना, त्याचे घटक, सौंदर्य, भावना, नैसर्गिक जबाबदारीच्या दृष्टीनें बरीवाईट लक्षणें ह्या सर्वांचें आयुर्वेदशास्त्राच्या आधारानें फार मनोरंजक रीतीनें विवरण केलें. वैद्य-कीय अभ्यासाच्या दृष्टीनें निरीक्षणाचें महत्व त्यांनीं उदाहरणांनीं पटवून दिलें.

निरीक्षणपूर्वक प्रयोग करा

अखेर त्यांनीं सांगितलें कीं, तुमच्या संस्थेंत जर तुमची इच्छा असेल तर मी सांगतो त्या पद्धतीनें निरीक्षण करून कांहीं प्रयोग करून पहा. मी लागेल ती मदत करायला खुषीनें तयार आहे.

ह्यानन्तर असेच पुन्हा येऊन माहितीपूर्ण व्याख्यानें देण्याची विनंति करून झालेल्या मनोरंजक व्याख्यानाबद्दल डॉ. सौ. कुसुमताई वांकर यांनीं त्यांचे आभार मानले.

पुणें येथें
' आयुर्वेद सेवा संघ नासिक ' चीं
औषधें मिळण्याचें ठिकाण
किरण मेडिकल सर्व्हिस
नगरकर तालीम चौक, लक्ष्मीरोड, पुणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कुचल्याच्या बियांची शुध्दि

आयुर्वेदिक पद्धतीचा अभ्यास

लेखकः- श्री. जी. पी. श्रीवास्तव, श्री. एस्. एन्. गानू, श्री. एस्. एस्. अय्यर.
(औषधीकरण-विभाग, हिन्दु विश्वविद्यालय, काशी)

आयुर्वेदीय औषधीकरण पद्धतींत वनस्पतिज वा खनिज द्रव्यांची, ती वापरणीय करण्याकरितां विशिष्ट प्रकारची शुद्धि (किंवा शोधन - संस्कार) करावी लागते. त्यामुळें तें द्रव्य शुद्ध स्वरूपांत मिळतें. या 'शुद्धि' म्हणून म्हटल्या जाणाऱ्या क्रियेंत विशेषतः गोदुग्ध, घृत, मूत्र, कांजी [Vinegar] इ. द्रव्यांचा संस्कार शोधनीय द्रव्यांवर करण्यांत येतो. या संस्कारामुळें त्या द्रव्याचे घातक परिणाम कमी होतात असें म्हटलें जातें. वनस्पतिज द्रव्यांतील कुचला, अफू, बचनाग याबारख्या तीव्र कार्यकारी द्रव्यांवर ही क्रिया केली जाते. ह्या द्रव्यांना आधुनिक औषधिगुण-कर्मशास्त्रांतहि महत्त्व आहे.

अशा प्रकारच्या शुद्धिक्रिया पुरातन कालापासून आयुर्वेदीय वैद्यांत प्रचलित आहेत, तरी या शुद्धि-क्रियेमुळें त्या द्रव्यांतील कार्यकारी घटकांच्या प्रमाणांत अगर त्या द्रव्यांच्या विषवत्वांत काय बदल घडतात याविषयीं प्रयत्न करण्यांत आलेले नाहींत. आणि म्हणून आयुर्वेदीय ग्रंथांत (रसतरंगिणी वैद्य हरिदत्त-शास्त्री कृत ४थी आवृत्ति) वर्णिलेल्या कुचल्याच्या बियांच्या शुद्धीचा अभ्यास करण्याचें आम्ही ठरविलें.

या पद्धतींत प्रमुखत्वानें कुचला-बी, विशिष्ट प्रमाणांत असलेल्या दुधांत विशिष्ट कालपर्यंत शिज-विली जातें. बियावरील टरफल काढलें जातें, बियांतील मगज वाळविला जातो., व बारीक चूर्ण केलें जातें.

या प्रयोगार्थ कुचल्याच्या बिया मिळविण्यांत आल्या. आणि रासायनिक दृष्ट्या व विषारीदृष्ट्या त्यांचे परिणाम शुद्धिपूर्वी व शुद्धीनंतरहिं अभ्यासण्यांत आले.

केलेले प्रयोग असे

कुचला बियांचे ४ नमुने मिळवून बी. पी. पद्धतीनें त्यांतील स्ट्रिक्निनचें प्रमाण निश्चित केलें. नंतर २० ग्रॅमचे दोन व ७० ग्रॅमचा एक अशा ३ गटाचे स्वतंत्र प्रयोग करून परीक्षण (असे) केलें.

सर्व नमुने खालीं दिलेल्या आयुर्वेदीय पद्धतीनें शुद्ध केले. २० ग्रॅम-कुचला बी एका कापडांत बांधले व तें कापड दोऱ्यानें बांधून ती पिशवी १८० ग्रॅम दूध असलेल्या बीकरमध्यें (कांचपात्रांत) टांगली. शिजवीत असतांना पिशवी दुधांत सारखी बुडती राहील याची खबरदारी घेतली. कांचपात्रावर एक नरसाळे पालथे झांकून तें सारखें थंड ठेवलें. त्यामुळें दुधांतील पाणी जास्त आटूं शकलें नाहीं.

आयुर्वेदांत वर्णन केलेल्या दोलायंत्राप्रमाणेंच हें यंत्र होतें. दुधास हळूहळू उकळी फुटेपर्यंत उष्णता देण्यांत आली व तितकी उष्णता ३ तासपर्यंत कायम ठेवली. जसजसें दूध आटत होतें तसतशी कुचल्याची पिशवी खालीं सोडण्यांत येत असे. व त्यामुळें ती नेहमीं दुधांत बुडती राही. ३ तासानंतर पिशवी काढून घेतली. १/५ दूध शिल्लक राहिलें. बियांचें टरफल काढून टाकलें आणि मज्जेचे ओलेंरणींच तुकडे करून चाळणींत वाळविले व त्यांचें चूर्ण केलें. एकंदर बियांच्या वजनाचा मानानें चूर्णाचें वजन शें. ८०% भरलें. वापरलेलें दूध पृथःकरण करण्याकरितां रिफ्रिजिरेटरमध्यें ठेवण्यांत आलें. बियांचें टरफलहि वाळवून पृथक्करणाकरितां ठेवलें. त्यांचें वजन जवळ-जवळ मूळ वजनाच्या शे. २० भरलें.

शुद्ध कुचल्यांतील स्ट्रिक्निनच्या प्रमाणाकरितां बी. पी. पद्धतीनें पृथक्करण करण्यांत आलें.

दुधाचें व तिन्ही नमुन्यांच्या टरफलाचें विभाजक पृथक्करण [differential analysis] त्याच्यां-तील कुचल्याच्या प्रमाणाकरितां करण्यांत आलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुधांतील कुचल्याचें अल्कलाइडचें प्रमाण काढण्या-करितां खालीलप्रमाणें प्रयोग करण्यांत आला:—

N/१ गंधकाम्लाचे ४० सी. सी. दुधांत टाकले व मिश्रण ढवळलें व घट्ट झालेलें दूध गाळण्यांत आलें. व N/१० गंधकाम्लाच्या २० सी. सी. ने अल्कलाइड न मिळे पर्यंत धुण्यांत आलें. अम्ल मिसळलेला द्राव एका सेपरेटर मध्यें घेऊन पेट्रोलियम इथरच्या २०/१०/१० सी. सी. नीं त्यांतील स्नेहद्रव्य अलग करण्याकरितां पेट्रोलियम ईथर मिसळलेलें मिश्रण N/१० च्या १० सी. सी. नीं दोनदां घुसळून नंतर फेकून देण्यांत आलें. अम्लानें धुवून मिळालेला भाग पहिल्या धुवणांत मिळवून नंतर अमोनियाचा सौम्य द्रव त्यांत घालून पूर्ण अल्कली केला. नंतर बी. पी. पद्धतीनें द्रव्यगणना (ॲसे) पूर्ण केली.

स्थानिक बाजारांतून शुद्ध कुचला विकत घेऊन त्यांचेंहि पृथक्करण केलें.

आलेख १

शुद्ध व अशुद्ध कुचल्यांतील स्ट्रिक्नीन.

नमुना	असंस्कारित कुचल्यांतील स्ट्रिक्नीनचें शे. प्रमाण	शुद्धकुचल्यांतील (बियांच्या मज्जेतील) (स्ट्रिक्नीनचे) शे. प्रमाण	कमी झालेल्या स्ट्रिक्नीनचें शे. प्रमाण
१ (अ)	·७८२३	·२९५५	६२·२२
(ब)	·७९९६	·३९१२	५१·१०
सरासरी	·७९११	·३४३४	५६·६६
२ (अ)	·६९९७	·५४१६	२२·६०
(ब)	·७१६४	·५२४८	२६·७४
सरासरी	·७०८१	·५३३२	२४·६७
३ (अ)	·५२४८	·४२४८	१९·०५
(ब)	·५१६५	·४७४७	८·१०
सरासरी	·५२०७	·४४९८	१३·०८
४ (अ)	·९७७४	·६५६७	३३·१४
(ब)	१·०४८०	·६८०३	३७·३५
(क)	१·०३२०	·६४८९	३७·१३
सरासरी	१·०१९१	·६६२०	३५·८७

आलेख नं. २

शुद्ध कुचला-मज्जा, शुद्ध कुचला-त्वचा, व शोधनांत वापरलेलें दूध यांतील स्ट्रिक्नीनचें प्रमाण:—

नमुना	मज्जा (Endorsppurm) ग्रॅम	कवच ग्रॅम	दूध ग्रॅम	एकुण ग्रॅम	२० ग्रॅम्स असंस्कारित कुचल्यांत ग्रॅम
१ अ	·०४४९०	·०३६६०	·००३४८	·०८४९८	·१५६५
ब	·०६१०२	·००८६९	·००२६१	·०७२३२	·१६००
सरासरी	·०५२९६	·०२२६५	·००३०४	·०७८६५	·१५८३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नमुना	मज्जा [Endor/urm] ग्रॅम	कवच ग्रॅम	दुध ग्रॅम	एकूण ग्रॅम	२० ग्रॅम्स असंस्कारित कुचल्यांत ग्रॅम
२ अ	·०८२८७	·०३३३२	·०२८३२	·१४४५	·१४००
ब	·०९०२६	·०२८३२	·०२५००	·१४३७	·१४३३
सरासरी	·०८६५७	·०३१०८	·०२६६६	·१४४१	·१४१७
३ अ	·०६७३७	·०१९९९	·०१६६६	·१०४६	·१०५०
ब	·०७६९०	·०१९९९	·०१०८२	·१०७६	·१०३३
सरासरी	·०७२४४	·०१९९९	·०१३७४	·१०६१	·१०४२

शुद्ध कुचलाबी व अशुद्ध कुचला बी या दोघां-मधील स्ट्रिक्निन व स्ट्रिक्नीनचें प्रतिशत किती प्रमाण नष्ट होतें हें १ ल्या आलेखांत दिलें आहे. दुसऱ्या आलेखांत, शुद्ध कुचल्याची मज्जा, शुद्ध कुचल्याचें टरफल व २० ग्रॅम कुचला उकळल्यावर जें दुधांत उतरलें तें या सर्व स्ट्रिक्निनचें प्रमाण दिलें आहे.

१ ल्या तक्त्यावरून असें समजतें कीं असं-स्कारित कुचल्यातील स्ट्रिक्निनचें प्रमाणापेक्षां संस्कारित कुचल्यांतील स्ट्रिक्नीनचें प्रमाण कमी झालेलें आहे. (२) हे कमी होण्याचें शें. प्रमाण बदलणारें आहे.

दुसऱ्या तक्त्यावरून दिसून येणाऱ्या गोष्टी:—(१) शुद्ध कुचल्यांतील मज्जेंत व कवचांत सांपडलेले स्ट्रिक्निन व दुधांत मिळालेलें स्ट्रिक्निन ह्याची बेरीज असंस्कारित कुचल्यांतील स्ट्रिक्नीनचे प्रमाणाबरोबर आहे. दुसऱ्या व ३ऱ्या नमुन्यांत हें सिद्ध होतें. पहिल्या नमुन्यांत तें प्रयोगांतील चुकीमुळें बदललेलें आहे.

यावरून शोधनसंस्कारांत दुधांत कुचल्यांतील स्ट्रिक्नीन उतरतें, हें शुद्ध द्रव्यांतील प्रमाण कमी होण्याचें कारण आहे. स्ट्रिक्नीन कोणत्याहि प्रकारें विघटना पावत नाहीं. [does not decompose]

विषत्वाविषयीं अभ्यास

कुचल्याचे विषारी परिणाम ॲल्बिनो जातीच्या उंदरावर विशिष्ट तऱ्हेचे होतात. म्हणून या जातीचे प्रयोगशाळेंत पाळलेले उंदीर घेऊन त्यांच्यावर शुद्ध व अशुद्ध कुचल्याचे प्रयोग केले.

उंदरावर केलेले प्रयोग

ठराविक वजनाची कुचलाबियांच्या मज्जेची भुकटी ३/४सी.सी. परिस्रुत जलांत टाकून हालविली व पिच-कारींत भरली. उंदराचे पुढचे व मागचे पाय दोऱ्यानें बांधून त्याचें तोंड उघडलें. व हळूच काळजीपूर्वक एक बारिकशी कांचेची नळी त्याच्या घशांत सोडली व पिचकारीचें तोंडाशी ती नळी जोडली आणि तें सबंध मिश्रण उंदराच्या घशांत ओतलें. त्यानंतर तो उंदीर सारखा निरीक्षणाखालीं ठेवला व परिणामाची नोंद केली. उंदराच्या वजनाप्रमाणें भुकटीचें प्रमाण निर-निराळें ठरविलें. दोन वेळां प्रयोग केले. प्रथम प्रयोगांत शुद्ध कुचल्याच्या सर्व प्रकारांत शुद्ध कुच-ल्याच्या तीनहि नमुन्यांचे मिश्रणाचा[·५०१% प्रमाण स्ट्रिक्नीनचे] व असंस्कारित कुचल्याचा [·७६४% स्ट्रिक्नीन] परिणाम पाहिला. दुसऱ्या प्रयोगांत असंस्कारित कुचल्याचा [१·०९१%] व प्रयोग-शाळेत शुद्ध केलेल्या कुचल्याचा [·६६२%] व बाजारांतून घेतलेल्या शुद्ध कुचल्याचा [·७३५%] परिणाम पाहिला.

शुद्ध कुचल्याची मारक मात्रा

विषारी प्रमाण ठरविण्याकरितां मोजके वाढतें प्रमाणांत नमुने वापरले [$\frac{1}{100}$gr.] व सहा उंदरांत सर्वांत कमी प्रमाण उंदीर मरण्याकरितां किती लागतें तें पाहिलें. अशा रीतीनें ठरविलेलें विषारी प्रमाण आलेख नं. ३ मध्यें दिलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आलेख ३

निरनिराळ्या नमुन्याच्या विषारी मात्रा [डोस]

मात्रा व परिणाम

	असंस्कारित,	प्रयोग शाळेंत शुद्ध १	असंस्कारित २	प्रयोगशाळेंत शुद्ध २	बाजारांतील शुद्ध
४·०	मृत	—	—	—	—
३·०	,,	—	—	—	—
२·५	,,	—	—	—	—
१·५	जिवंत	मृत	जिवंत	—	—
१·०	,,	जिवंत	,,	जिवंत	—
०·५	,,	,,	,,	,,	जिवंत
विषारी मात्राः-ग्रेन		१·५	२ग्रेन	१·५ग्रेन	१ ग्रेन

तिसऱ्या आलेखाचे निष्कर्ष

१) शुद्ध (संस्कारित) कुचल्याची विषारी मात्रा असंस्कारित कुचल्याच्या विषारी मात्रेपेक्षां अल्प आहे.

२) असंस्कारित कुचल्यापेक्षां शुद्ध कुचल्यानें मृत्यु त्वरित होतो. व शुद्ध कुचल्यांत स्ट्रिक्नीनचें प्रमाण असंस्कारित कुचल्यापेक्षां कमी असूनहि हें होतें. याचें कारण असें कीं, शुद्धिसंस्कारानें कुचल्याच्या पेशी मऊ होतात, व टरफल काढून टाकल्यावर तर कठीण भाग आणखी कमी होतो. अशा प्रकारचा वाढतां मऊपणा हा स्ट्रिक्नीन ह्या विषारी द्रव्याचा भाग जास्त लवकर सुटा होऊन लगेच शरीरांत शोषला जाण्यास कारणीभूत होत असावा म्हणून तौलनिक दृष्ट्या शुद्धाच्या मात्रेपेक्षां अशुद्धाच्या कमी मात्रेनें अधिक लवकर मृत्यु होतो.

उलट असंस्कारित कुचल्याचे कठिण पेशींतून स्ट्रिक्नीन लवकर विलग होत नाहीं, म्हणून तितकाच परिणाम घडायला कुचल्याचें प्रमाण मोठें लागतें.

विषारी प्रमाण कसें ठरविलें ?

स्ट्रिक्नेनीचें विषारी प्रमाण पुढीलप्रमाणें ठरविलें स्ट्रिक्नीन हायड्रोक्लोराइडचें (·०००७ ग्रॅ. स्ट्रिक्नीन प्रत्येक सी. सी. नें) ठराविक वाढत्या प्रमाणाचें द्रावणांचा उंदरांच्या २ गटावर प्रयोग केला. व तें प्रमाण (·००२) ग्रेन आहे असें आढळलें. व निरनिराळ्या नमुन्यांतील कुचल्याच्या विषारी मात्रेंत स्ट्रिक्नीनचें इतकें प्रमाण होतें व तें शरीरांत शोषलें जाऊन मृत्युला कारणीभूत झालें असावें. या कल्पनेवरून शुद्ध व असंस्कारित कुचल्यांतून शोषणा करितां निर्माण झालेलें स्ट्रिक्नीनचें प्रमाण ४ थ्या आलेखांत काढलें आहे.

४ थें पत्रक

शें. प्रमाण (शोषित स्ट्रिक्नीनचें)

नमुना	स्ट्रिक्नीनचें शें. प्रमाण	विषारी मात्रा (कुचल्याची) (ग्रेनमध्यें)	विषारी मात्रेंतील स्ट्रिक्नीनचें प्रमाण	शोषित स्ट्रिक्नीनचें शें. प्रमाण
अशुद्ध १	·७६४	२·०	·०१५३ ग्रेन	१३
,, २	१·०९१	२·०	·०२२०	१०
प्रयोगशुद्ध	१·५०१	१·५	·००७५	२७
,,	२·६६२	१·५	·००९९	२०
बाजारी शुद्ध	१·७३५	१·०	·००७४	२७

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४ थ्या आलेखावरून दिसणाऱ्या गोष्टी

१] शुद्ध कुचल्यापासून २० ते २७ प्रतिशत स्ट्रिक्नीन शोषलें जातें व त्याचे परिणाम शरीरघटकांवर होतात.

२] अशुद्ध कुचल्यापासून १० ते १३ प्रतिशत स्ट्रिक्नीन शोषलें जातें व तितक्याचा परिणाम प्राणिशरीरावर होतो.

वरील परीक्षणांवरून असा निष्कर्ष काढतां येईल कीं, शुद्धि संस्कारांत स्ट्रिक्नीनचें प्रमाण कमी होतें. व त्यांचे विषत्व सर्वतः वाढतें. कारण तें सहज सुटें होतें व त्याच्या शोषणाचें प्रमाण वाढतें.

या संशोधनाचा सारांश

१) दुधानें शुद्धिसंस्कार केलेल्या कुचल्यांतील स्ट्रिक्नीनचें प्रमाण कमी होतें.

२) शुद्धीकरतां वापरलेलें दुध कुचल्यांतून कांहीं स्ट्रिक्नीन काढून घेतें व म्हणून तें बियांतून कमी होतें.

३) शुद्धिसंस्कारानंतर बियांतील मज्जा जास्त विषारी होते.

कारण, त्याच्या पेशी अधिक मऊ होतात. व त्यांतून स्ट्रिक्नीनचें विषारी प्रमाण लवकर सुटें होऊन लवकर शोषलें जातें.

प्रो. एन्. के. बसू एम्. एस्सी , एफ्. आर. आय्. सी. प्रमुख औषधीकरण विभाग बनारस हिंदु युनिव्हर्सिटी, यांनीं आमच्या कामांत पूर्ण लक्ष घातलें याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोत. तसेंच आयुर्वेदाचार्य श्री. भैरवप्रसाद शुक्ल, प्रोफेसर आयुर्वेदिक कॉलेज ब. हिं. यु. यांनीं आमच्या या कामांत केलेल्या मदतीबद्दल त्यांचे ऋणी आहेत.

संदर्भ

१) ब्रिटिश फार्माकोपिया १९४८

२) फार्माकॉग्नोसीवरील टेक्स्टबुक (वॅलिसकृत) १९५१

३) रसतरंगिणी (४ थी आवृत्ति) श्री. हरिदत्तशास्त्री.

४) मॉडर्न फार्माकॉलॉजी व थेरॅप्युटिक्स- मुजुमदार (९ वी आवृत्ति)

[दि इंडियन फार्मासिस्ट डिसेंबर ५३ मध्यें प्रसिद्ध झालेल्या लेखाचा अनुवाद]

एक दिवसांत ।· तोळा कुचला

'कुचला हें विष असल्यामुळें दररोज ३ वेळ ३।३ गुंजा अर्थात् ९ गुंजा पोटांत गेल्यामुळें त्याचे इतर कोणते दुष्परिणाम तर होणार नाहींत ना' अशी शंका अनेक वृद्ध व तरुण वैद्यांना येते. याबाबतीत माझा अनुभव असा कीं, तीव्र असा संधिवात झालेल्या एका बाईस दररोज ६ गुंजाच्या ४ पुड्या म्हणजे एका दिवसांत पाव तोळा कुचला देत असे. या बाईच्या शरीरांतील प्रत्येक अस्थिसंधि सुजला होता. यावर दोन महिने सतत पाव तोळा म्हणजे जवळ जवळ १५ तोळे हें विष तिच्या पोटांत गेल्यावर ती चालू फिरू लागली. दररोज ५ ते १० तोळे तूप मात्र तिच्या पोटांत जात होतें.

अशा रीतीनें एकच प्रयोगांत कां होईना परंतु १०-२० तोळे शुद्ध कुचला पोटांत गेला तरी त्याचे कोणतेच दुष्परिणाम होत नाहींत. तूप हें कुचल्याला मारक आहे. सबब तें घेतलें असतां कधींहि अपाय होत नाहीं.

'अनुभविक चिकित्सा' ज्वरप्रकरण लेखकः- एक वृद्धवैद्य (मध्यप्रदेश)

आयुर्वेदमार्तंड यादवजी त्रिकमजी आचार्य यांनींहि अनुभविक औषधें पुस्तकांत शुद्ध कुचल्याचीं पुष्कळ औषधें वापरलीं आहेत, तीहि मारक नाहींत. — संपादक]

वै. पं. गुणेशास्त्री यांची पुण्यतिथि

नगर- गु. वै. पं. गंगाधरशास्त्री गुणे यांची तृतीय पुण्यतिथि शनिवार ता. २० फे रोजीं सायंकाळीं नगराध्यक्ष श्री. किसनसिंग परदेशी यांच्या अध्यक्षतेखालीं आयुर्वेद महाविद्यालयांत साजरी झाली. डॉ. केतकर, श्री. भाऊसाहेब फिरोदिया, श्री. रिंगळे व वैद्य करंदीकर यांचीं भाषणें झालीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार—

अधिक स्पष्टता हवी

औषधीतेलांचा मूर्च्छापाकविधि साग्र पद्धतीनें दिल्यास अधिक स्पष्टता त्यांत येईल, व महाराष्ट्रांत तो प्रकार सुरूं होईल. पत्रिकेंत दिलेली तैलपाक-मूर्च्छाविधि ही माहिती सर्व वैद्यांना कळण्याजोगी स्पष्ट नाहीं.

महाराष्ट्रांत ही कृति नसल्यामुळें औषधी-तेलांत दोष उत्पन्न झाल्याचें मला माहित आहे.

घृत वा तेल तयार करण्याचें भांडें कोणत्या धातूचे असावें तेलांत कल्क घातल्यावर व काढा घातल्यावर त्याला किती डिग्रीपर्यंत उष्णता द्यावी वा ही क्रिया वॉटर बॉथवर व्हावी याचा खुलासा होणें जरूर आहे. घृत, कटुतेल, एरंड तेल यांच्यावर संस्कार करतांना कोणत्या धातूचीं भांडीं वापरावीं याचा खुलासा हवा.

× × ×

सुदर्शन काढा आधीं एक्स्ट्रॅक्टच्या रूपानें तयार करून मग त्यास लिंबाच्या रसाच्या भावना देऊन गोळ्या करणें अत्यंत हिताचे होईल. ग. कृ. पाटणकर

गूळ करण्याची योग्य पद्धति

प्रत्येक १६०० रत्तल अथवा ४० घासलेटचे डबे इतक्या उंसाच्या रसाला ६ औंस या प्रमाणांत डबल सुपर फॉस्फेट वापरावें. डबल सुपर फॉस्फेट न मिळाल्यास सिंगल सुपर फॉस्फेट १० औंस याप्रमाणांत वापरावें. सुपर फॉस्फेट त्याच्या वजनाच्या सुमारें पांचपट इतक्या पाण्यांत मिसळावे. हें मिश्रण सुमारें अर्धा तास उकळावें आणि नंतर साध्या लिननच्या कापडांतून गाळावें. अशा रीतीनें तयार होणारें हें मिश्रण ढोरमळी काढून टाकल्यानंतर काहिलींत घालावें.

भेंडीच्या रसाचा उपयोग

ही पहिली मळी काढून टाकण्यासाठीं भेंडीच्या रसाचा चांगला उपयोग होतो. सुपर फॉस्फे-टचे मिश्रण काहिलींत टाकल्यानंतर मळीचे थर धरतात व ते काळजीपूर्वक काढून टाकावे लागतात. नाहींतर गुळाच्या दर्जावर अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता असते. वर सांगितल्यापेक्षां अधिक प्रमाणांत सुपर फॉस्फेट घातलें तर गूळ मऊ होतो. तेव्हां वर सांगितलेल्या प्रमाणापेक्षां अधिक प्रमाणांत तें घालू नये.

कागदी लिंबाचा रस

खाऱ्या जमिनींतील उंसापासून तयार होणाऱ्या गुळास खारटपणा येतो म्हणून अशा उंसाच्या बाब-तींत दुसरी किंवा सोनमळी काढून घतल्यानंतर १६०० रत्तल रसांत कागदी लिंबाचा ८ ते १० तोळे रस घालावा.

वरील पद्धतीनें तयार केलेला गूळ रंग, दर्जा, चव वगैरे दृष्टीनें उत्कृष्ट असतो व त्याला भावहि चांगला येतो.

आयुर्वेद सेवा संघाची दिनदर्शिका

आयुर्वेद सेवा संघानें १९५४ सालची दिन-दर्शिका प्रसिद्ध केली असून त्यांत आयुर्वेदीय दृष्टि-कोनांतून प्रकृति-विकृतीचा विचार नमुन्यादाखल देण्यांत आला आहे. वातप्रकृतीचीं लक्षणें, वात-प्रकृति माणसाची प्रकृति, वातदोषानें बिघडण्याची कारणें, होणारे रोग, ते रोग न होण्यासाठीं, व झालेतर बरे करण्यासाठीं, करावयाचे उपचार यांचीं माहिती बोधक रीत्या त्यांत निवेदन केली आहे. आयुर्वेद म्हणजे नुसती कांहीं ठराविक औषधें नसून ती एक जीवन-विषयक संपूर्ण विचारसरणी आहे हें या दिनदर्शिके-वरून वाचकांच्या लक्षांत येते.

वैद्य मा. बा. जोशी, जळगांव, लिहितात.–

चालू सालच्या दिनदर्शिकेंत स्वास्थ्यरक्षणाचे दृष्टीनें दिलेली माहिती सामान्य जनतेस फारच उप-युक्त आहे. आपल्या या उपक्रमाबद्दल धन्यवाद.

आयुर्वेद पत्रिकेच्या चालू वर्गणीदारांना दिन-दर्शिका पाठविली जात आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शेवगा — एक प्रभावी जंतुनाशक औषध

लेखकः– श्री. मा. या. व्यवहारे बी. एस्सी. (फार्म) नासिक

पारिभाषिक नांवें:- सं. शोभांजन, हिंदी, सौंजिना, मराठी-शेवगा, बंगाली-सजिना, मल्याळी-मुरीन्ना, पंजाबी-सौंजिना, इं.- Horse Radish

शेवग्याचे वृक्ष असून त्याचे अस्तित्व सर्व देश-भर आढळून येतें. या वृक्षाची बगीच्यांतून व घरा-भोंवतीं सर्वत्र लागवडहि करितात.

मूळसालीचा विशेष उपयोग

आयुर्वेदांत या झाडाचा बराचसा उपयोग केलेला आढळून येतो. या झाडाच्या मूळसालीचा, मूळाचा, पानांचा, फुलांचा व बियांचा उपयोग केलेला आहे. व त्यांतल्या त्यांत मूळसाल व मूळाचा विशेष उपयोग केलेला आहे. पुरातन कालापासून याचा औषधी उपयोग होत आहे. तसेंच चक्रदत्तानें या वनस्पतीचा पोटांत देण्यांसाठीं उपयोग केला आहे. व भावप्रकाशांतहि याचा पुष्कळ औषधींतून उपयोग आलेला आहे.

या वृक्षाचे भागाच्या उपयोगाबद्दल पाहूं. याची फुलें दूधाबरोबर उकळून धातुपौष्टिक म्हणून घेतात. फुलें पौष्टिक, मूत्रल असून पित्तस्राव वाढ-विणारीं आहेत. फळांची म्हणजे शेंगाची सर्व लोक भाजी करून खातात. याची भाजी फार रुचकर पाचक असून कृमिनाशक आहे.

बियांचा उपयोग

फळांतील बियांस श्वेतमिरी म्हणून कांहीं लोक संबोधितात. बिया, उग्र कडवट व किंचित् तिखट चुरचुरणाऱ्या आहेत. त्या उत्तेजक असून प्लिहा व-यकृत वृद्धीवर गुणकारी आहेत व म्हणूनच या बिया महासुदर्शनचूर्णांत वापरल्या आहेत. बियांचें तेल बाहेरून संधिवातावर चोळतात.

झाडांचीं पानें भाजी म्हणून वापरतात. पानां-बरोबर इतर औषधी वापरून तीं कुत्रे चावलें असतां देतात व त्यापासून कुत्र्याची विषबाधा उतरते व व मनुष्य दगावत नाहीं.

मूळ विशेष प्रभावी आहे

या झाडाचें मूळ विशेष प्रभावी आहे. मूळ बाहेरून फिकट पिवळसर असून आंतील भाग पांढरा असतो. ते खरखरीत असून त्यास उभ्या रेषा असतात. सालीचें बाह्यांग जाड असून ओलेपणीं बुळबुळीत असतें. लाकूडहि जाड असून नरम असते. वास उग्र व तिखट असतो. चव किंचित् कडवट असून मुळांत कॅल्शियम् ऑक्झोलेट (Calcium Oxolate), सुक्षाक्षाराचे स्फटिक, तेल-बिंदु (oil Globules), व राळयुक्त पदार्थ (Oleoresins) आहेत. मुळांत क्रियात्मक कार्य-कारी घटक म्हणजे स्पायरोचिन (Spirochin) व जन्तुनाशक टेरिगॉस्पर्मिन (Pterygospermin) हीं द्रव्यें आहेत व या कार्यकारी द्रव्यांचा शोध इंडिजीनस ड्रग्ज (भाग पहिला) म्हणजे इंडियन फॉर्मास्युटिकल कोड्याक्स १९५३ या पुस्तकांत नमूद केला आहे.

स्पायरोचिनचें वैशिष्टय

स्पायरोचिन हें मूळ क्रियात्मक द्रव्य स्टॅफिलो कॉकल [Staphylo coccal] व स्ट्रिप्टोकॉकल [Strepto coccal] बॅक्टिरिया मारण्यांत बहु-गुणी आहे. वरील रोगजंतुपासून डांग्या खोकला, नारू, गळू, संधिवात, विषमज्वर, खोकला, पडसें इत्यादि अनेक रोग निर्माण होतात. तसेंच स्पायरो-चिन हें त्वचेवरील पापुद्र्याची लवकर वाढ करतें व मज्जातंतूवर बधिरता निर्माण करतें.

शेवग्यांतील २ कार्यकारी द्रव्यें

टेरिगॉस्पर्मिन पुष्कळ प्रकारच्या फंगी (Fungi) जंतूंची वाढ खुंटविते. जर अत्यल्प प्रमाणांत न्युक्लि--

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यिक ॲसिड [Nucleic Acid] ह्याबरोबर वापरलें तर टेरिगॉस्पर्मिनची क्रियात्मक शक्ति फार वाढते. न्युक्लियिक ॲसिड हें पेशींतील नत्रयुक्त पदार्थांबरोबर संयोगित असतें. ह्याचें अस्तित्व यीस्ट-जीवाणू, गव्हाचे कोंब व इतर धान्याचे कोंबांत असते व त्यापासूनच तें तयार करितात. ह्याची आकार-विरहित पांढरी भुकटी असून पाण्यांत अत्यल्प प्रमाणांत विरघळणारी आहे. क्षारद्रवांत लवकर विरघळते, पण कोहलांत अविद्राव्य आहे. हें पोटांत घेतल्यानें ८ ते १० तासांत श्वेत रक्तकणाची फार लवकर व पुष्कळ वाढ करतें व त्यामुळें शरीराची प्रतिकारक शक्ति वाढते. टेरिगॉस्पर्मिन हें कार्यकारी द्रव्य, घन बॅक्टिरिया व ऋणबॅक्टिरिया जंतूवर १:७५००० व १:४०००० या प्रमाणांत विशेष प्रतिकारात्मक कार्य करतें. याचें अस्तित्व, रक्त व पोटांतील आमरसाबरोबर टिकाऊ आहे. याप्रमाणें या शेवग्यांतील दोन नवीन कार्यकारी द्रव्यांची शरीरांतील रोगांवर प्रतिकारक क्रिया होऊन रोग हरण होतो.

शेवग्यानें बरे होणारे रोग

तसेंच झाडाचें नवीन मूळ, कमी प्रमाणांत पाळीनें येणारे ताप, फेंपरे, संधिवात, जलोदर, प्लिहा यकृत वृद्धि व अग्निमांद्यांत देतात. मुळाचा काढा हिंग सैंधवाबरोबर सूज व गळूं यांत देतात.

प्रभावी औषधाचा उपयोग

शेवगा मूळसाल किती प्रभावी औषध आहे हें त्यांतील क्रियात्मक घटकावरून स्पष्ट होतें. या मुळाचा व इतर भागांचा आयुर्वेदांत कांहीं औषधी पाठांत उपयोग केला आहे. त्यांचीं नांवें खालीं दिलीं आहेत.

(१) वातारिरस [अफुयुक्त] यांस शेवगा मूळसाल रस भावना व आलेंरस भावना देतात.

(२) महासुदर्शन चूर्णांत बियांचें चूर्ण वापरलें आहे.

(३) गर्भकषाय (भरड) नं.६ यामध्यें मूळसाल वापरली आहे.

(४) क्षार तेल (५) महाविषगर्भतेल (६) तगरादि तेल (७) दोषघ्न लेप इ.

ह्यावरून शेवगा ही अत्यंत उपयुक्त व गुणकारी वनस्पति आहे हें वाचकांच्या ध्यानांत येईल.

वाचकांचा पत्रव्यवहार—

"सूक्ष्मौषधि" चें अचूक प्रमाण

एक गुंज औषधांत १० तोळे साखर (९६० गुंजा) म्हणजे औषध व साखर यांचे प्रमाण १:१००० जवळ जवळ असें म्हणण्यास हरकत नाहीं. हें प्रमाण औषधि मात्रेस योग्य आहे अगर नाहीं हें मला सांगतां येणार नाहीं; पण योग्य प्रकारें या तऱ्हेचें मिश्रणाचें औषध होण्यास खालीलप्रमाणें औषध मिसळावें. हें मिश्रण प्रत्येक पायरीस चांगलें केलें तर त्यांत अपेक्षित औषधाचें प्रमाण अचूक येतें.

मिश्रणपद्धतीच्या ४ पायऱ्या

१ प्रथम मिश्रण

१० गुंजा औषध + १० गुंजा साखर
औषध प्रमाण १:१

[२] द्वितीय मिश्रण

वरील तयार मिश्रणातील १ गुंज+९गुंजा साखर
औषध प्रमाण १:२० सुमारें.

[३] तृतीय मिश्रण

नं. २ मधील १ गुं. द्रव्य+९ गुं. साखर
औषध प्रमाण १:२०० सुमारें.

[४] चतुर्थ मिश्रण

मिश्रण नं.३ मधील १ गुं. द्रव्य +४ गुं. साखर
औषध प्रमाण १:१०००

शेवटचें (चतुर्थ) मिश्रण ५ गुंजा तयार होईल. जेवढें शेवटचें मिश्रण हवें असेल तेवढें शेवटच्या नं. [२] व [३] मिश्रणांतून काढून तेवढी साखर मिसळून औषध द्यावें.

नाहींतरी हीं औषधें सूक्ष्म प्रमाणांतच द्यावयाचीं असतात.

—सौ. उमा जोशी सी. बी. एस्सी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रुद्रवंती ....

भिषग्रत्न- ग. कृ. पाटणकर
पो. किनई, जि. उत्तर-सातारा

स्वतेजानें दीप्तिमान् होणाऱ्या तृणज्योतिष्मती-प्रमाणेंच संशोधकांना आपल्या प्रभावशाली गुणधर्मांनें एक एक पाऊल पुढें टाकण्यास भाग पाडणारी ही दुसरी तितक्याच योग्यतेची, भारतभूषण ठरणारी महत्वाची वनस्पति आहे. तृणज्योतिष्मतीच्या पूर्ण गुणधर्मांचे शोधानंतर याहि वनस्पतीच्या संशोधना-कडे सरकारी संशोधन केंद्राकडून, खाजगी संशोधन संस्थाकडून तसेंच आधुनिक आयुर्वेद-तपोनिधींकडून लक्ष पुरविलें जावें याच उद्देशानें खालील माहिती नमूद केली आहे.

संस्कृत व इतर पारिभाषिक नांवें

रुदंती, स्रवतोया, संजीवनी, अमृतस्रवा, रोमांचिका, महामांसी, चणपत्री, सुधास्रवा. गुजराथी पालियोलाणो. लॅटिन Cressa-cratica

सूत्ररूपांत गुणधर्म

कटुतिक्तोष्णा, क्षयघ्नी, रक्तपित्तघ्नि, मेहघ्नी, जराव्याधिहरत्वात् रसायनी, व्रणकुष्ठ कामला-शोथघ्नी इ.

पद्यरूपांत गुणधर्म

रुदंती नाम विख्याता जराव्याधिविनाशिनी ।
चणपत्रोपमैः पत्रैर्युक्तांभोबिंदुवर्षिणी ॥
चतुर्विधा च सा ज्ञेया पीतरक्तासितासिता ।
तामौषधीं समासाद्य शुक्लपक्षे शुभे दिने ॥
चणपत्रसमं पत्रं क्षुपं चैव तथाम्लकम् ।
शिशिरे जलबिंदूनां स्रवन्तीति रुंदतिका ॥
चणकपत्रसादृश्या हेममारी तपस्विनी ।
यस्यां तु विंदते तोयं हेमबिंदुनिभाकृति ॥
छायाशुष्कां च तां कृत्वा भक्षयेन्नियतेंद्रियः ।
रेचनं वमनं कृत्वा बिडालपदमात्रया ।।
भक्षयेन्मधुसर्पिर्भ्यां मासमेकं महौषधम् ।
जीर्णांते भोजनं कुर्याद् दुग्धभक्त नरो यदि ॥
दृढकायातितेजस्वी सर्वरोगैः प्रमुच्यते ।
वलीपलितानिर्मुक्तो परमायुस्ततो भवेत् ॥
सूक्ष्मचूर्णं ततः कृत्वा स्थापयेत् कटुतुंबके ।
कर्षमात्रप्रमाणेन पथ्यभोजी शुभे दिने ॥
मधुसर्पिः समालोड्य कृष्णगोक्षीरभोजनम् ।
षण्मासस्य प्रयोगेण वज्रकायो भवेन्नरः ॥
पंचांगं भक्षयेद्यस्तु सर्वरोगं विनाशयेत् ।
अर्धकर्षकमात्रं तु मधुसर्पिसमन्वितम् ॥
जीवेद्वर्षशतं पंच वलीपालितवर्जितम् ।
पाने लेपे तथा नस्ये विषं हंति च भक्षणात् ॥
शिवाय-लवणाम्लं वर्जितं स्यात् भक्ष्यः शाल्योदनं तथा।
नखदंतत्वचालोम जायते च पुनर्नवा॥

—या प्रमाणें सूचना आहे.

या वनस्पतीचा विशेष उपयोग

ही वनस्पती श्यामादिगणापैकीं असून हिच्या-मध्यें सारकधर्म आहे. (१) रक्तपेशी, वायुपेशी संकुचित झाल्यामुळें ज्यावेळीं क्षयाविकारांत रक्तांत जरूर इतका ऑक्सिजन मिश्र होत नाहीं, अशावेळीं विकारी मनुष्याच्या अंगाचा दाह सुरूं होतो. अशी स्थिति असतांना- रुद्रवंतीचूर्ण ४ गुंजा, पित्तपापडा २ गुंजा प्रवाळ (चन्द्रपुटी) २ गुंजा, गुळवेलसत्व २ गुंजा या प्रमाणांत तीन पुड्या बांधून त्या दुधाबरोबर द्याव्या. (२) नुकत्याच महाकुष्ठ झालेल्या इसमास प्रथम वमन, विरेचन द्यावें.

स्त्रीदुग्धाचा आहार

स्त्रीदुग्ध दिवसांतून प्रतिवेळीं २ कपप्रमाणें ३-ते ४ नियमित वेळीं देण्याचें ठरवून त्याचवेळीं अक्रोड खाण्यास द्यावें. पाणी नियमित पिण्यास द्यावें. याशिवाय १ वर्षपर्यंत दुसरा आहार देऊं नये.

औषधाचा उपयोग कसा करावा ?

रक्तदोष शुद्ध करणाऱ्या वनस्पतींच्या काढ्यांत प्रामुख्यानें अधिक प्रमाणांत या औषधीचा दिवसांतून ३ वेळ उपयोग करावा. या वनस्पतीच्या स्वरसाच्या स्पेशल इंजेक्शन अँम्प्यूल्स तयार करून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किंवा या स्वरसानें बावचीचें तेल षड्गुणित करून त्याचे आधुनिक पद्धतीनें इंजेक्शन अँप्यूल्स तयार करून त्याचा उपयोग सुरू करावा. सतत परमेश्वरी नामाचा जप करीत औषध सेवन करणारास या वनस्पतीचा प्रभाव पहिल्या ६ महिन्यांत कळून येईल.

सरकारआश्रित कुष्ठधामें व शुद्ध रक्त असलेल्या गरीब स्त्रिया, सरकार नियंत्रणाखालीं ठेवून त्यांचें रुग्णाइताकरितां कपिंग केलेलें दूध मिळवून कांहीं रुग्णावर प्रयोग करणें अशक्य नाहीं. परदेशांत वेटनर्सिंग या नात्यानें सरकारतर्फे अशा स्त्रियांची योजना केली जाते, त्याच पद्धतीनें इकडेहि व्यवस्था होणें जरूर आहे.

वास्तव्य — स्थान

शिवालये भवेद्देवी औषधी देवपूजिता ।
गिरीकंदरदुर्गेषु निर्झरेषु तथैव च ॥
पुण्यक्षेत्रेषु सर्वेषु देवतायतनेषु च ।
कैलासे मंदिरे विंध्ये नदीसागरसंगमे ॥
श्रीशैले हेमकूटे च पारियात्रे महेश्वरी ।
गिरीणां संगमे चैव शिलायाः पुण्यपर्वते ॥

गद्य रूपांत माहिती

या वनस्पतीस रानहरबरा म्हणतात. कारण या वनस्पतीचीं पानें हरबऱ्याच्या पानासारखीं असतात. वनस्पति अर्धवट खाऱ्या शेत जमिनींत उगवते. पानाचा रंग हिरवा असून त्यावर कुसें असतात. ही धुरकट हिरवी दिसते. ही पिवळी, तांबडी, व काळ्या रंगाची असते. ही पुरुष व स्त्री जातीची आहे. पुरुष जातीला रुद्रवंता म्हणतात. याचा कोणत्याहि कामीं उपयोगी होत नाहीं. स्त्री जातीची कृष्णवर्ण असणारी, औषधी व रसायनी कर्मांत उपयोगी आहे. सदर झाडाखालीं रात्रीं पांढऱ्या कवड्या ठेवाव्या. पानावरील स्रवणारे दवबिंदु पडून सकाळपर्यंत जेथें कवड्या पिवळ्या होतील ती स्त्री जातीची समजावी व ती कृष्णवर्ण आहे किंवा नाहीं हें पाहून उपयोगांत घ्यावी. शिशिर ऋतूंत ही दवाच्या योगानें अधिक स्रवत असते. हीं स्रवणाची क्रिया सकाळीं १० ते ११ वाजेपर्यंत चालू असते. हिचे सहाय्यानें सुवर्णभस्म व ताम्रभस्म होत असून ही पारद बंधन करणारी दिव्यौषधि आहे. प्रयत्नवादी संशोधकास तृणज्योतिष्मतीप्रमाणेंच हिच्यापासून सुवर्णक्रिया, आरोग्य व विकारांचा आणि विषांचा उपशम हे मार्ग साध्य होतील.

रुदंतिरसमादाय रसेन सह मर्दयेत् ।
लेपयेत् शुल्बपत्राणि पुटपाकेन कांचनम् ॥

या माहितीचे खालीं दुसरी माहिती आहे तीः—

रसं नागं समं चैव माक्षिकं च मनःशिला ।
गंधकं तालकं चैव विष्ठा मूत्रे विनिक्षिपेत् ॥
रुदंत्याश्च रसेनैव मर्दयेत् घटिकात्रयं ।
तेनैव तारपत्राणि लेपयेत्तु विचक्षणः ॥
मूषमध्ये क्षिपेत् पश्चात् ध्मातः खादिरवन्हिना ।
निर्बीजं जायते हेम सर्वदोषविवर्जितः ॥

संशोधकांना एकामागून एक प्रक्रिया करण्यास मार्ग सांपडावा याकरितांच मिळाला तेवढा त्रुटित भाग दिला आहे.

ही वनस्पति कोठें सांपडते ?

आयुर्वेदांतील रसक्रियेंत मुरलेला व आधुनिक रसायनज्ञ ही महर्षींचीं कोडीं सतत प्रयोग, चुका व त्यांची दुरस्ती यांचे सतत-प्रयोगानें सोडवूं शकेल. विंध्याद्रीच्या पहाडांत व खानदेशच्या कांहीं भागांत

नवीन मराठी वैद्यक सराठी मासिक
: महाराष्ट्र वैद्यक परिचय :
औषधें, इंजेक्शनें, रोगनिदान, रुग्णपरीक्षा, नवीन शोध वगैरे पाश्चात्य वैद्यकांतील ज्ञान सोप्या मराठी भाषेंतून देणारें एकमेव मासिक " महाराष्ट्र वैद्यक परिचय " 'वैद्यकीय पेशातील बहुमोल सहाय्यक' आजच वर्गणीदार व्हा ! वार्षिक वर्गणी ५ रु. (किरकोळ अंकासाठीं आठ आण्याचीं तिकीटें पाठवावीत.
पत्ताः— संपादक, वैद्य जे. बी. मोकाशी-ठाणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ही वनस्पति मिळते. जी. आय्. पी. रेल्वेच्या मजगवा स्टेशनजवळ, 'मजगवा' या नांवाचें पाण्याचें डबकें आहे. फाल्गुन, चैत्र मासांत त्या डबक्यांतील पाणी आटतें व त्या सुमारास ही वनस्पति तेथें मिळते. तिकडील भागांत हिला रुदंती, रुद्रवंती किंवा चना--बुटी म्हणतात. मारवाडांत धार संस्थानांत व रतलाम संस्थानच्या डोंगरांत ही वनस्पति सांपडूं शकते असें म्हणतात.

वनस्पति-स्थानदर्शक नकाशे

ज्या ज्या भारतीय वैद्यांना ही वनस्पति त्यांच्या त्यांच्या विवक्षित गांवीं अगर ठिकाणीं आढळेल ती ती माहिती त्यांनीं आयुर्वेद पत्रिकेकडे कळवावी. अशा दिव्य वनस्पतींच्या निरनिराळ्या विवक्षित ठिकाणांचा शोध एकत्रित झाल्यास हिंदवी नकाशांत तेवढींच त्या वनस्पतींचीं उपलब्ध स्थळें देऊन तेवढ्या वनस्पतीपुरतां तो नकाशा उपयुक्त होऊं शकेल. अशा दिव्य वनस्पतींचीं निरनिराळीं ठिकाणें व त्यांचें उत्पत्तीचे ऋतुकाल उपलब्ध झाले तरच संशोधकांना विवक्षित पद्धतीचें संशोधन करण्यास सुलभता येणार आहे.

सुवर्णकेश्वर तंत्र

या तंत्रांत म्हणजे हस्तलिखित ग्रंथांत या व अशा दिव्य वनस्पतींची, पारदबंधनाची, सुवर्णक्रियेची योग्य माहिती सूत्रस्वरूपांत दिलेली आहे. ज्या जुने वैद्यांचे घराण्यांत हा अपूर्व हस्तलिखित ग्रंथ आहे तो त्यांनीं संस्थेकडे पाठविल्यास आमचे सारख्या सतत आयुर्वेदाची सेवा करण्यास व इतर संशोधकास संशोधन करण्यास सुलभता येणार आहे. अशा प्रभावशाली ग्रंथांचें शुद्धिकरण होऊन तो टाईप करून घेणें अगर त्यांतील महत्वाचा भाग छपाई करून घेणें हें आतांच्या कालीं सुसाध्य झालेलें आहे. अनेक संस्थांनीं राजकीय लायब्ररींतून असे हस्तलिखित ग्रंथ आहेत. त्यांतील मुख्य अधिकाऱ्यांनीं एकवेळ असे आयुर्वेदीय कोणते ग्रंथ त्यांचे संग्रहीं आहेत हें कळविल्यास श्री भगवान् धन्वन्तरीचा त्यांना खास आशीर्वाद मिळेल.

आयुर्वेदासाठीं १५ लाख रु.

मुंबई सरकारनें १९५४-५५ च्या अंदाजपत्रकांत (बजेटमध्यें) आयुर्वेदावर खर्च करण्यासाठीं १५ लक्ष ४१ हजार रुपयाची तरतूद केली आहे.

नायटोफ्थुरन्स

मक्याच्या कणसांचा निरुपयोगी भाग, ओट धान्याचा कोंडा अशासारख्या शेतावरील कचऱ्यांतून नायटोफ्युरॅन्स नांवाचीं नवीन रसायनें तयार होत आहेत.

पेनिसिलीननन्तर हा अेक मोठ्यांत मोठा वैद्यकीय शोध आहे असें वैज्ञानिकांचें मत आहे. ही रसायेंनें बऱ्याच विकारावर अतिशय उपयोगी असल्याचें दिसून आलें आहे. कॅन्सर, निद्रारोग वगैरे आणखी अनेक रोगावर त्यांचा उपयोग कितपत होईल हें तपासून पहाण्यांत येत आहे.

चुकीची दुरुस्ती

आयुर्वेद पत्रिका पान ५६२ स्तंभ २ ओळ खालून ३ रीः-विभाज्य काले युंजीत ज्वरिणं हन्त्यतोऽन्यथा। अशी वाचावी. दुधावर कोणते संस्कार करावेत याची माहिती अष्टांगहृदय जीर्णज्वर चिकित्सेंत आली आहे ती पहावी. [श्लोक १०६ ते ११५.] तसेंच भेषजापचितांगानां क्षीरमेवामृतायते। हें उदर चिकित्सेंतील वचन दुधाची योग्य महति दर्शविणारें आहे.

अनेकांनीं प्रशंसलेलीं "आयुर्वेद सेवा संघ" नासिकचीं सर्व गुणकारी औषधे आतां

क ऱ्हा डां त

मिळूं लागलीं.

औषधी भांडार

गुरुवार पेठ, पो. कऱ्हाड (सातारा)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६० वर्षांचे जुने सुप्रसिद्ध व विश्वसनीय औषधी-निर्माते

उंझा फार्मसी लिमिटेड उंझा, (उत्तर गुजरात)

.... कांहीं लोकप्रिय औषधें ....

सर्वांकरितां— 'नवरत्न-रस'
* स्त्रिया, पुरुष, बालक या सर्वांकरितां ही महौषधी आहे. रस-रक्तादि सप्त धातूंची शुद्धि, वृद्धि व पोषण करणें हें 'नवरत्नरसाचें' विशेष कार्य आहे. निरोगी लोकांस रसायन व रुग्णांना उत्तम औषध आहे. किं. २८ गोळ्याचे ५ रु.

स्त्रियांसाठीं— 'सुंदरी-संजीवनी'
* स्त्रियांचे प्रदर, ऋतुदोष, गर्भाशयविकार, वंध्यत्व आदि नष्ट करून शक्ति येते. स्त्री-रोगावर हें अमृततुल्य औषध आहे. किं. ४ औंस २ रु.

मलेरियांवर— 'एल्स्टो पिल्स'
* ह्या गोळ्या सप्तपर्ण, कालमेघ, कुटकी आदि वनस्पतींच्या घन सत्त्वापासून बनविल्या आहेत. ह्या गोळ्या मलेरिया, शीतज्वर ह्या तापांवर अत्यंत गुणकारी असल्याचें सिद्ध झालें आहे. किं. ५०० गोळ्या (१० तो.) ३॥ रु.

आंव व मुरड्यावर— 'अँटी-डिसेंट्रॉल'
* ही पर्पटी इंद्रजव, कुटजत्वक्घन, बिल्व, कापूर, अफू ह्या औषधी द्रव्यांच्या संयोगापासून बनविली आहे. ही जुनाट आव, मुरडा, संग्रहणी ह्यावर अतिशय गुणकारी आहे. पहिल्याच दिवशीं गुण दिसूं लागतो. १ बा. १ रु.

लहान मुलांकरितां— 'शिशु-संजीवनी'
* लहान मुलांचा ताप, हगवण, दूध न पचणें, खोकला वगैरेंवर उत्तम औषध. मुलांना नियमित दिल्यानें मुलें बाळसेदार व धष्टपुष्ट होतात. १ बा. ॥ रु.

सायरप— 'शंख-पुष्पी'
* स्मरणशक्तिवर्धक व ज्ञानतंतूंना बलदायक असें हें उत्तम ब्रेन टॉनिक आहे. विद्यार्थी, कारकून, वकील, प्रोफेसर, अधिकारी वगैरे मेंदूचीं कामें करणाऱ्या लोकांना हें अत्युत्तम औषध आहे. १ बा. १। रु.

'अष्टावक्र-रस'
* वलिपलितनाशक, बलवर्धक, पौष्टिक, आरोग्यरक्षक व बुद्धि आणि कांति-वर्धक असें आयुर्वेदीय औषध आहे. किं. १ तो. ४० रु.

'बृहत्कस्तुरीभैरव' [स्वर्णयुक्त]
* सन्निपात, आंत्रिकज्वर, वातज्वर, कफज्वर आणि वातकफज्वर ह्या तापांत उत्तम उपयोगी आहे. तसेंच मंथरज्वर व न्युमोनिया यांतहि हा योग सत्वर गुण देतो. किं १ तो. १८ रु.

'बृहत्-वातचिंतामणी'
* आयुर्वेदांतील वातरोगांवर हें एक दिव्य औषध आहे. हृदयाला व मेंदूला बल देणारें आहे. मेंदूच्या ज्ञानतंतूच्या विकृतीमुळें उद्भवणाऱ्या सर्व विकारांवर उत्तम गुणदायी आहे. मेंदूची क्षीणता, रक्तदाब, हिस्टेरिया वगैरेंवरहि लाभदायक आहे. किं. १ तो. ३५ रु.

उंझा फार्मसी लि. उंझा [उ. गुजरात]

महाराष्ट्र एजंट:—जयंत अँड कंपनी, लक्ष्मीरोड, पुणें सिटी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हळद एक महत्वाचें औषध

लेखकः- वैद्यरत्न अ. रा. माषोदकर
आयुर्वेद विशारद,

आयुर्वेदांत हळद या घरगुती औषधाच्या बहुमूल्य उपयोगांचें वर्णन केलें आहे. अल्पमोली व बहुगुणी असें हें अत्यंत प्रभावशाली औषध आहे. ४० वर्षांच्या वैद्यक व्यवसायांत हळदीच्या प्रयोगानें आम्ही अनेक कष्टसाध्य रोगी बरे केले आहेत.

हळदीनें कूज थांबते

हळदीच्या बाबतींत जुनी म्हण आहे कीं, "पी हळद व हो गोरी" यावरून हळदीचा रक्तशुद्धिकारक गुण लक्षांत येतो. आम्ही हळदीचे प्रयोग, कफजरोग, कफजकास, कफजक्षय, पांडु, मूत्रविकार यांवर अनुभवून पाहिले आहेत. सामान्यतः फुप्फुसांत घाणकट सांचणारा कफ व त्यामुळें पूतीअवस्था प्राप्त होते; त्यांत हळदीनें फार लवकर व खात्रीलायक बरें वाटतें. जसजसे हळदीचा प्रयोग वाढत जाईल तसतसा फुफ्फुसावर चांगला परिणाम होऊन आंतील वायुकोश शुद्ध होत जातात व खोकल्याच्या उबळीवर इष्ट परिणाम होऊन तापमान कमी होतें. मुख्यतः घाणकट कफ तयार होण्याच्या क्रियेंत फरक पडल्यानें राजयक्ष्मामधील झालेले व्रण बरे होण्यास मदत होते.

हळदीचे गुणधर्म--व्रणशोधक, रोपक, रक्तप्रसारण करून शुद्ध रक्ताचा पुरवठा करणारी, पांडुरोगनाशक विषनाशक,बालरोग,कफरोग बरी करणारी आहे.

(१) बालरोगांवरः- न्यूमोनियामध्यें-

हळकुंड घासून व तेलिया सुहागा (टंकणलाही) कोरफडीचा गीर एकत्र करून मधांत चाटण करावें. छातींतील कफ खोकला बरा होतो.

(२) आघात झाला असल्यास हळद, मैदालकडी उगाळून गरम करून लावणें. खरचटणें, मार लागणें, रक्त साकळणें बरें होणें.

(३) शरीराच्या अंतर्गत वेदना व व्रण यांवर हळद व अर्जुन वृक्षाचे सालीचें चूर्ण गरम दुधांत उकळून पिणें; हृदयांत, छातींत होणारी पीडा थांबून रोग्यास फार आराम मिळतो.

(४) हळदीचें तेल तयार करून वापरलें तर कफाचें-सर्दीचें डोकें दुखणें व पडसें बरें होतें.

(५) श्वासावर-हळद व गूळ यांच्या गोळया तोंडांत धरून रस गिळावा. कफ पातळ होऊन श्वास, दमा याला आराम होतो.

(६) मलेरिया-तापावर—हळद, आंबेहळद, डिकेमाली, सागरगोटी, अतिविष, काकडसिंगी, पिंपळी, मिरे यांचे चूर्ण तुळशीचे रसांत २।६ गुंजा प्रमाण गोळया करून रोज ३ वेळ ताप भरण्यापूर्वी द्यावा, पाळी थांबेल.

कफक्षयावर अनुभवी प्रयोग

(७) कफक्षयावर-- वैद्य लोकांचे फार उपयोगी पडणारा फार मौल्यवान् अनुभवी प्रयोग—

ओली हळद घेऊन दगडी खलबत्यांत कुट्टून चूर्ण करून सावलींत वाळवावें नंतर ओले हळदीच्या रसांत भावना देऊन छायाशुष्क करून ठेवावें. हें चूर्ण कफक्षयांत -॥- मासा रोग्याची शक्ति पाहून बकरीचें किंवा गाईचें दुधांत दि. २ वेळ देत जावें.

या औषधानें क्षयी मनुष्यास फार लवकर बरें वाटून शक्ति येते. वैद्य लोकांना आपले बुद्धिमत्तेप्रमाणें क्षयाच्या निरनिराळ्या औषधांबरोबर हें वापरून पाहिल्यास क्षयाचे जंतू नाहींसे होऊन आर्यवैद्यकाचा यशोदुंदुभी या वैज्ञानिक जगांत निनादून, देशांत व समाजांत पसरणारा दुष्ट संसर्गजन्य रोग थांबविण्यास मदत होईल.

अमळनेर

येथें आयुर्वेद सेवा संघाचीं नवीन सर्व प्रकारचीं औषधें मिळण्याचें ठिकाण—

श्रीकृष्ण वैद्य अँड ब्रदर्स

कुंभार टेक, अमळनेर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्मार्थ दंतयज्ञ —हुबळी

"दि. १-३-५४ पासून हुबळी येथें सुरूं होणाऱ्या अखिल भारतीय खादी, ग्रामोद्योग व शेतकी प्रदर्शनांत धर्मार्थ दंतयज्ञ होणार आहे. सदर प्रदर्शनाचें उद्घाटन मान्य मुरारजीभाई देसाई करणार आहेत. त्यांना व मान्य हुक्केरीकरांना दंतयज्ञास भेट देण्याचें निमंत्रण देण्यांत आलें आहे.

आरोग्यमंत्री मान्यवर शहा यांनीं प्रांतांत एक फिरतें दंतवैद्यक पथक [Mobile Dental Unit] सुरूं करण्याची घोषणा केली आहे. आजच्या आर्थिक हलाखीच्या काळांत ॲलोपॅथीच्या युनिटचा गरीब लोकांना फारसा उपयोग होणार नाहीं. परंतु आयुर्वेदीय दंतचिकित्सा अत्यंत स्वस्त सुलभ व उपकारक ठरणार यांत संदेह नाहीं. त्या दृष्टीनें मुंबई सरकारला या कार्याची माहिती हुबळीच्या दंतयज्ञांत करून देण्यांत येणार आहे.

वैद्य जायदे यांना थैली

बेळगांव दंतयज्ञ समाप्तीच्या वेळीं नगराध्यक्षांच्या अध्यक्षतेखालीं झालेल्या सत्कृत्य-सत्कार समारंभांत वैद्यराज पां. वि. जायदे यांना जनतेनें ३०१ रु. थैली अर्पण केली. त्यांतील प्रमुख दात्यांचीं नांवें (१) श्री. कात्रे डि. जज्ज २५ रु. (२) डॉ. जठार २१ रु. (३) वै. जयदेव कुलकर्णी २१ रु. (४) मेसर्स शेवडे २५ रु. (५) डॉ. याळगी २१ रु. (६) श्री. बोंद्रे २१ रु. (७) श्री. मोघे २१ रु. (८) श्री. जाधव १५ रु. (९) श्री. हिरेमठ १५ रु. (१०) श्री. शहा २१ रु. इत्यादि.

गेलीं ३ वर्षे आर्थिक नुकसान सोसून वैद्यराज जायदे यांनीं भारतीय दंतवैद्यक कलेचा अभ्यास व प्रचार चालविला आहे. आयुर्वेद पत्रिकेच्या वाचकांपैकीं जे आर्थिक मदत करूं शकतील त्यांनीं धन पाठवून वैद्य जायदे यांना त्यांच्या सत्कार्यार्थ उत्तेजन द्यावें अशी विनंति आहे.

बेळगांव मेडिकल ॲसोसियेशन तर्फे मिळालेलें शिफारसपत्र

The Belgaum Medical Association

[Branch:— The Indian medical Association, Belgaum]

President
Dr. K. V. Sathe, M. B. B. S.

Secretaries
Dr. V. D. Ram Rao M. B. B. S.
Dr. V. R. Koppikar M. B. B. S. [LOND]

Date :
6th Feb. 1954.

CERTIFICATE.

Vaidya Jayde P. V. conducted his 'Dental Camp' in Belgaum successfully, thus serving many patients with dental complaints. He also gave demonstration of his Yogic method of painless dental extraction to the members of Belgaum Medical Association, which was highly appreciated by one and all. Needless to say that he has perfected his art of extraction to such an extent, that hardly any one suffered from post extraction pain or complications.

He richly deserves all encouragement both from the Government as well as from the public. We wish him all success.

Sd/—[K. V. Sathe]
President, Belgaum Medical Association, Belgaum.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कुष्ठरोगावर आयुर्वेदीय औषध

मुंबई सरकारच्या मदतीनें संशोधन होणार—

श्री. पी. आर. परांजपे नांवाचे गृहस्थ महारोगानें पीडित होते. माटुंग्याच्या ॲक्वर्थ लेप्रसी होममध्यें ते उपचारासाठीं रहात होते. त्यांना गुण आला नाहीं. नंतर त्यांना एका साधूनें आयुर्वेदीय औषध दिलें त्यानें त्यांची प्रकृति सुधारली.

श्री. परांजपे मुंबई सरकारकडे गेले व त्यांनीं तो उपाय सरकारला मोफत देण्याची तयारी दर्शविली.

मुंबई सरकार 'या औषधांचा उपयोग कितपत होतो' याचा तपास अक्वर्थ लेपरहोममध्यें करणार आहे. त्यासाठीं १० रोगी घेण्यांत येणार असून त्यावर ४७४० रुपये खर्च करण्यांत येणार आहे.

———

गाईच्या दुधाचे गुणधर्म

गाईच्या दुधाचे गुणधर्म चरकांत पुढील मोजक्या शब्दांत दिले आहेत

स्वादु शीतं मृदु स्निग्धं बहलं श्लक्ष्णपिच्छिलम् ।
गुरु मंदं प्रसन्नं च गव्यं दशगुणं पयः ॥
तदैवगुणमेवौजः सामान्यात् अभिवर्धयेत् ॥

म्हशीच्या दुधाचे गुण

माहिषीणां गुरुतरं गव्यात् शीततरं पयः ।
स्नेहान्यूनं आनिद्राय हितं अत्यग्नये च तत् ॥

———

...अनुक्रमणिका....

फिरती दंतवैद्यक इस्पितळें	५४९
शुद्ध आयुर्वेदीय अभ्यासक्रम सुरू होणार	५५०
वैद्य सं.चे ठराव सरकारी खुलासा	५५१
आयुर्वेदाची प्रातिनिधिक संस्था	५५३
सफल ग्रंथप्रधान पाठ्यक्रम	५५५
इंद्रवारुणी	५५९
पंचवायूंचे काल, मस्तुसंबंधीं माहिती	५६०
केवळ गोदुग्धाहाराचा प्रयोग	५६१
वाणी स्पष्ट करण्याचे उपाय	५६३
स्त्री-पुरुष शरीर भेद	५६४
कुचल्याच्या बियांची शुद्धि	५६५
एक दिवसांत ।· तोळा कुचला	५६९
शेवगा-प्रभावी जंतुनाशक औषध	५७१
सूक्ष्मौषधींचें अचूक प्रमाण	५७२
रुद्रवंती	५७३
हळद एक महत्वाचें औषध	५७७
धर्मार्थ दंतयज्ञ हुबळी	५७८

वाकेरी भाते

अत्यंत खात्रीचें व ताजे मिळते. १ पौंड २ रु. ट. ख. निराळा.

श्रीपाद फार्मसी, पो पेण (कुलाबा)

मुंबई ऑब्स्टेस्ट्रिक व गायनेकॉलॉजिकल सोसायटी

[पत्ता:-- पुरंदर गृह, चौपाटी, समुद्रसन्मुख मुंबई ७]

वरील सोसायटीतर्फे ६ वा अभ्यास-उजळणीवर्ग मार्चच्या तिसऱ्या आठवड्यांत (१५ मार्च ते २० मार्च) भरणार आहे. फी १५ रु. (आगाऊ) आहे. राहाण्या-भोजनाचा खर्च ज्याचा त्यानें करण्याचा आहे. चर्चेसाठीं कोणत्या विषयांचा अंतर्भाव आम्ही करावा तेहि आगाऊ पत्रानें कळवावें. अशी सूचना आहे.

—अभ्यासाचा कार्यक्रम—

ता. १५ मार्च त २० मार्च सकाळीं ९ ते दुपारी १२॥ पर्यंत } रुग्णालयांत उपस्थिति व बाह्य तपासणी; रुग्णालयांतील रुग्ण पहाणें व शस्त्रकर्में

दुपारी २ ते ३, ३ ते ४ व ४॥ ते ५॥ व्याख्यानें

दुपारी २ ते ३ चर्चा (२ दिवस) वैद्यकीय चित्रपट सायंकाळीं (२ वेळ)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" कल्पनातीत समाधान "

डॉ. के. लद्दू, पी. एच्. डी., निवृत्त प्रिंसिपॉल, आर्टस् कॉलेज, जयपूर यांनीं आयुर्वेद सेवा संघ, ह्या संस्थेस भेट दिली व खालील अभिप्राय व्यक्त केला:— "माझे समवेत असलेले श्री. बाळशास्त्री फडके, व श्री. सखारामपंत ... ' आयुर्वेद सेवा संघ, ' ह्या संस्थेचे जीव - सदस्य वैद्य श्री. वासुदेव सखाराम मराठे यांनीं मोठ्या आस्थेनें सर्व संस्था दाखविली व ती ज्या विशिष्ट हेतूनें प्रस्थापित केली गेली त्या हेतूचें निवेदन केलें. तेथें चालू असलेलें औषधीकरणाचें प्रत्यक्ष कार्यहि आम्हांस दाखविण्यांत आलें व तें पाहून आम्हांस कल्पनातीत समाधान वाटलें.

जनताजनार्दनास प्रेमाची विनंति

आणि म्हणून समाजाचे सामान्य व नम्र घटक या नात्यानें आम्हीं या संस्थेस सुयश चिंतितो, व समस्त जनता-जनार्दनास अशी प्रेमाची विनंति करतो कीं, त्यांनीं स्वयंप्रेरणेनें पुढें येऊन संस्थेस उदार अंतःकरणानें सर्वतोपरी सहकार्य द्यावें व आपल्या कार्यक्षेत्रांतील दर्जा उन्नत करण्यास तिला हातभार लावावा. "

रडवें मूल

निरोगी बालक क्वचितच रडतांना आढळून येईल. दांत निघतांना होणारा त्रास देखील आपण "आफालि" ग्राईप मिक्श्चरच्या मदतीनें सह्य करूं शकतां.

आफालि

ग्राईप मिक्श्चर

आयुर्वेदाश्रम फार्मसी लिमिटेड (आफालि) अहमदनगर.

EVEREST GM 53 2

संपादक व प्रकाशक:— वैद्य विंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, मेनरोड, नासिक
मुद्रक:— श्री. चिं. आक, सकल-प्रेस, आग्रारोड, नासिक
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ७ वें) नाशिक, ता. १६ मार्च १९५४ (अंक १८ वा

लोकशाही सरकारच्या रुग्णालयांतून भारतीय दंतचिकित्सा पद्धतीस संधि मिळाली पाहिजे



निखिल भारतीय आयुर्वेदीय डेंटल मिशनतर्फे दिल्ली येथें वैद्य-डॉक्टरांना शूलरहित दंतोत्पाटनाचें प्रात्यक्षिक दाखविण्यांत आलें, त्याचें छायाचित्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नियम माणसाकरिता आहेत, माणसें नियमाकरितां नाहींत!

दिनांक १-३-५४ रोजीं मान्यवर मोरारजीभाई देसाई, मुख्य मंत्री, मुंबई राज्य यांनीं मान्यवर हुक्केरीकरजी यांच्या समवेत हुबळी येथें त्यावेळीं चालू असलेल्या दंतयज्ञास भेट दिली व समाधान व्यक्त केलें. त्यावेळीं उभयतांमध्यें खालील महत्त्वपूर्ण संभाषण झालें.

श्री. मोरारजी:— हें कर्म स्वस्त आणि उत्कृष्ट आहे. यांना एकाद्या हॉस्पिटलमध्यें संधि दिली पाहिजे. (This is cheapest & best. He should be given a chance in some hospital.)

श्री. हुक्केरीकरजी:—(सरकारी) नियमानुसार हें अशक्य आहे. (As per present rules, it is not possible.)

श्री. मोरारजी:— नियम माणसांकरितां आहेत. माणसें नियमाकरितां नाहींत. (अर्थात्) नियम बदलले पाहिजेत. (Rules are meant for men. Men are not meant for rules. Rules must be changed.)

अनुभविक काळी मात्रा

दादर (मुंबई) येथील सुप्रसिद्ध वैद्य आत्माराम-शास्त्री दातार, आयुर्वेदाचार्य यांनीं आपल्या नासिक येथील मुक्कामांत आयुर्वेद सेवा संघास भेट दिली व कांहीं शास्त्रीय चर्चाहि केली. त्यावेळीं स्वतःचा एक अनुभविक योग त्यांनीं सांगितला तो असा:-

विडंगं चित्रकं शुण्ठीं सघृतां सैंधवं वचाम्।
दग्ध्वा कपाले पयसा गुल्मप्लीहापहं पिबेत् ॥ चरक

वावडिंग, चित्रक, तूप लावलेली सुंठ, सैंधव, वेखंड यांचीं चूर्णें जाळून त्याची काळी मात्रा (पूड) करावी व ती जीर्ण (विषम) ज्वरांतील अग्निमांद्य, प्लीहावृद्धि आदि विकारावर मधांत अगर दुधांत १ गुंज प्रमाणांत द्यावी.

मोठें उपयुक्त विवेचन

आयुर्वेद सेवा संघाच्या यंदाच्या दिनदर्शिकेंत 'वात' विषयक विवेचन मोठें उपयुक्त असें दिलें आहे. उपक्रम स्तुत्य आहे. त्याप्रमाणें पित्त व कफ विषयक माहितीसाठीं संघाच्या भावी आरोग्यशालेचें माहिती-पत्रक तयार असल्यास पाठवावें. —डॉ. र. कृ. गर्दे



कै. हरिशास्त्री पराडकर वैद्य

आंध्र आयुर्वेद कॉलेज

आयुर्वेदाचें स्वतंत्र कॉलेज काढण्याचा आंध्र सरकार लौकरच विचार करणार आहे. दरम्यानच्या काळांत आंध्राच्या विद्यार्थ्यांची सोय, मद्रासच्या आयुर्वेद कॉलेजांत करण्याची मद्रास सरकारला विनंति करण्यांत येणार आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

.... कै. भिषगाचार्य हरिशास्त्री पराडकर वैद्य ....

[ता. २५ फेब्रुआरी रोजीं अकोल्याहून नागपूर एक्सप्रेसनें निघून ता. २६ रोजीं सायंकाळीं ४ वाजतां मुंबईस आलेले वैद्य हरिशास्त्री पराडकर हे त्याच सायंकाळीं ७-८ वाजतां परलोकवासी झाले ही दैवी अघटित घटना आहे. दुसऱ्या दिवशीं पहाटेच्या बोटीनें ते कोकणांत उत्सवासाठीं जाणार होते. ६९ व्या वर्षीं सर्व प्रवास एकट्यानें करण्याइतकी त्यांची प्रकृति खडखडीत होती. आजाराचा त्रास १० मिनिटें सुद्धां न भोगावा लागतां त्यांना आलेला मृत्यु हा हेवा करण्यासारखा तर खराच! भिषगाचार्य पराडकर यांचें जीवनचरित्र थोडक्यांत पुढें दिलें आहे. —संपादक]

अकोला (वऱ्हाड) येथील सुप्रसिद्ध भिषगाचार्य श्री. हरिशास्त्री पराडकर वैद्य यांचा जन्म (अश्विन शु. १३ शके १८०७) दि. २१-१०-१८८५ रोजीं मु देवळें, जि. रत्नागिरी येथें झाला. त्यांचे वयाचे १९ वर्षांपर्यंत संस्कृत, काव्य, ज्योतिषशास्त्र, यांचें अध्ययन कऱ्हाड येथें झालें. २० व्या वर्षापासून आयुर्वेदाचें अध्ययन १॥ वर्षपर्यंत इंदूर येथील संस्कृत महाविद्यालयांत कै. वेदशास्त्रसंपन्न चिंतामणशास्त्री खरे यांचे जवळ झालें. याच वेळीं त्यांचे सहाध्यायी श्री. रामभाऊ शेवडे व प्रो. प. ल. वैद्य हेहि इंदूरास आले. तेथें नाशिकचे गुरु. कृष्णशास्त्री देवघर वैद्य यांची कीर्ति ऐकली. तिघेहि गुरु. देवघरशास्त्री यांची अनुमति घेऊन त्यांचेजवळ शिकावयास आले. तेथें आल्यावर हरिशास्त्री यांनीं अध्ययन करून शके १८२९ मध्यें पुण्याचे वेदशास्त्रोत्तेजक सभेची पहिली परीक्षा पास होऊन २० रु. बक्षिस (दक्षिणा) मिळविलें. नंतर शके १८३१ मध्यें वेदशास्त्रोत्तेजक सभेची दुसरी परीक्षा पास होऊन ३० रु. बक्षिस (दक्षिणा) मिळविलें; तसेंच १८३१ चे श्रावण महिन्यांत बडोदा येथील श्रावणमास दक्षिणाकमेटीच्या परीक्षा उत्तीर्ण होऊन ७५ रु. बक्षिस (दक्षिणा) मिळविलें.

वैद्यकी धंदा व गुरुभक्ति

गुरुवर्य देवघर शास्त्री यांच्या अनुज्ञेनें व गुरुकृपेनें शके १८३२ व्या आषाढ महिन्यांत (वयाच्या २५ व्या वर्षीं) अकोला येथें ' श्रीकृष्ण चिकित्सालय ' या नांवानें आयुर्वेदिक दवाखाना सुरूं केला. गुरुकृपेनें दुःसाध्य रोगचिकित्सेंतहि (उदा. उदर, क्षय, कामला आदि) यश मिळविलें व 'श्री'हि मिळाली. अकोल्यास सन १९२१ मध्यें वऱ्हाडप्रांतीय वैद्यसंमेलन भरविलें तेव्हां गुरु. कृष्णशास्त्री देवघर यांना अध्यक्षस्थान देण्याचें ठरवून बोलाविलें व त्यांचा गौरव वऱ्हाड प्रांतिक वैद्यमंडळातर्फे केला. संमेलनाचें स्थायीकार्य म्हणून व्यापारी मंडळीतर्फे खटपट करून ' आयुर्वेदिक धर्मार्थ औषधालय ' सुरूं केलें तें अजून सुरूं आहे.

गुरुवर्य देवघरशास्त्री यांना ग्रंथ अर्पण

त्यांचे गुरुवर्य देवघरशास्त्री यांचे वयाचीं ७५ वर्षें पूर्ण झाल्यावर त्यांचा सत्कार समारंभ देवघरांचे शिष्यांनीं करण्याचें योजलें. व त्याप्रमाणें यांनींहि त्यांत भाग घेतला. त्यावेळीं कृतज्ञतांजली अर्पण केली, व पराडकरशास्त्री यांनीं अष्टांगहृदय (सटीक) संशोधन केलें तो ग्रंथहि गुरुवर्य देवघरशास्त्री यांना याच वेळीं सादर अर्पण केला. गुरुवर्यांनीं त्यांचें कौतुक केलें.

आयुर्वेदीय ग्रंथ संशोधन

वाग्भटकृत अष्टांगहृदय (सटीक) संशोधन करून त्याकरितां १०-११ वर्षें मेहनत करून सर्वांगसुंदरा टीका व हेमाद्रीची आयुर्वेदरसायनी टीका अधिक घालून, निर्णयसागर प्रेस मुंबई, येथें प्रसिद्ध केली. त्या आवृत्तीचा विशेष म्हणजे हस्तलिखित पोथ्यांच्या संग्रहालयांतून ३०-३५ हस्तलिखित पोथ्यांचें साहाय्यानें शुद्ध करून प्रत तयार केली. हेमाद्रीची टीका आतांपर्यंत मुद्रित नव्हती, ती प्रकाशित केली. यंत्रशास्त्रांचीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चित्रें नवीं छापलीं. वाग्भटाचें चरित्रविषयक माहिती, ग्रंथासंबंधीं काल, व धर्म वगैरे बद्दल सविस्तर माहितीचा—"वाग्भट विमर्श" या नांवाचा प्रबंध लिहून त्यांत प्रसिद्ध केला.

अष्टांगहृदयाची 'आदर्श आवृत्ति'

अशा रीतीनें अष्टांगहृदयाची ही आवृत्ति "आदर्श आवृत्ति" म्हणून अखिल हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहे. हें संशोधन कार्य पाहून निर्णयसागर प्रेसचे मॅनेजर यांनीं त्यांना सुश्रुतसंहिता व माधव-निदानाचें संशोधनाचें काम करावयास सांगितलें. तें काम आतापर्यंत सुरू आहे. याकरितांहि पुष्कळ हस्तलिखित पोथ्या व माहिती जमा केली आहे. हरि-शास्त्री यांचे स्नेही डॉ. तपस्वी बाबासाहेब परांजपे यांनींहि अष्टांगहृदयाचें कामाबद्दल प्रशंसा केली. व सुश्रुतसंहितेचें काम जरूर करावें असें सांगितलें.

सार्वजनिक काम, मान-सन्मान

श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्यस्वामीमहाराज मठ संकेश्वर व करवीर, यांनीं शके १८५६ मध्यें हरि-शास्त्री यांना आशिर्वादपूर्वक "भिषगाचार्य" ही पदवी दिली. अकोला येथें गेल्या १५ वर्षांपासून अकोला वैद्यमंडळ ही वैद्यांची संघटना आहे. त्या अकोला वैद्यमंडळाचे हरिशास्त्री हे आतापर्यंत अध्यक्ष होते. आकोला वैद्यमंडळातर्फे ते मध्यप्रदेशचे आयुर्वेद युनानी वैद्यक बोर्डाचे उमेदवार म्हणून उभे राहून निवडूनहि आले होते. बोर्डामध्यें निवडून आल्या-नंतर अभ्यासक्रमाचे पोटकमेटीवर त्यांची नेमणूक झाली होती. त्या कमेटीतर्फे शुद्धायुर्वेद अभ्यासक्रम ठरला आहे. याबाबतचा ठरावहि मध्यप्रदेश आयुर्वेद युनानी बोर्डानें पास केला आहे. अकोला येथें डॉक्टर व वैद्य यांनीं "रुग्ण सेवा मंडळ" नांवाची संस्था स्थापन केली त्याचे हे सभासद होते.

आयुर्वेदाबद्दल फार आस्था

आयुर्वेदाबद्दल, आयुर्वेदाचें शिक्षणाबद्दल त्यांना फार आस्था वाटे, व म्हणून त्यांनीं आपले मुलास (गंगाधर हरि पराडकर) त्यांचे स्नेही वै. पं. गंगाधर शास्त्री गुणे यांचेकडे अहमदनगरला शिकावयास ठेवलें होतें व तेथील पदवीधर (आयुर्वेदतीर्थ) केलें.

मुंबईची आयुर्वेद विद्वान परिषद

मुंबई येथें गेल्या डिसेंबरमध्यें भरलेल्या आयु-र्वेद विद्वत् परिषदेस ते उपस्थित होते. त्यावेळीं त्यांचा महाराष्ट्रांतील बऱ्याच वैद्यमंडळीशीं विशेष परिचय झाला. वयानें वृद्ध असले तरी वागणुकींत ते अगदीं तरुणाप्रमाणें उत्साहानें कार्य करीत. नाशिक येथें भरावयाच्या आयुर्वेदीय अभ्यासवर्गास उपस्थित राह-ण्याचा आपला मनोदय त्यांनीं कळविला होता.

श्री. पराडकरशास्त्री हे कोंकणांतील त्यांचे गांवीं देवळें येथें श्रीखड्गेश्वराचे शिवरात्री उत्सवाकरितां जाण्यासाठीं मुंबईस गेले तेव्हां ता. २६-२-५४ रोजीं हृदयक्रिया बंद पडून ते कैलासवासी झाले, त्यावेळीं त्यांना ६९ वें वर्ष सुरू होतें.

अंत्य यात्रा

त्यांच्या अन्त्य यात्रेचे वेळीं महाराष्ट्र वैद्य मंडळांतील प्रमुख वैद्य श्रीमंत नानासाहेब पुराणिक, पनवेल, वैद्य विंदुमाधवशास्त्री पंडित, वैद्यराज जळूकरशास्त्री अध्यक्ष महाराष्ट्रप्रांत वैद्यमंडळ, वैद्य वेणीमाधवशास्त्री जोशी आयुर्वेदाचार्य, वैद्य वामनराव दीनानाथ, आदि बरीच वैद्य मंडळी हजर होती. त्या समयीं शोकसभा होऊन वैद्य वेणीमाधवशास्त्री, वैद्य धामणकरशास्त्री, वैद्य विंदु-माधवशास्त्री पंडित, वैद्य वामनराव दीनानाथ आदि वैद्यांनीं गुणगौरवपर भाषणें करून त्यांना श्रद्धांजली वाहिली. अशा रीतीनें आयुर्वेदाचे एक अभ्यासू व सेवक सर्वांना सोडून गेले. सरकार हल्लीं आयुर्वेदास प्रोत्साहन देण्याचे तयारींत असतांना यांचा वियोग सर्वांनाच अत्यंत जाणवत आहे.

पांढरे कोड नष्ट झालेल्या हजारों गांवच्या लोकांची बक्षिसे व प्रशस्तिपत्रें.छाप-लेले पत्रक मोफत मागवा.
वैद्य के. आर. बोरकर मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला [मध्य-प्रदेश]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्वचारोगावरील पंजाबी प्रयोग :

लेखक:-
वि. म. गोगटे

मजकडे येणाऱ्या एका पंजाबी गृहस्थानें निरनिराळ्या त्वग्रोगावर उपयोगी पडणारे दोन प्रयोग मला सुचविले. निरनिराळ्या औषधीद्रव्यांचे अन्नावर संस्कार करून त्या अन्नाचा औषधी म्हणून उपयोग करावयाचा ही आयुर्वेदीय कल्पना या प्रयोगांत मला आढळली; म्हणून पत्रिकेच्या वाचकांना त्यांची माहिती देत आहे.

(१) संस्कृत गहूं

अमरवेल व कडुनिंब यांचीं पानें यांचा प्रथम काढा करावयाचा; त्या काढ्यांत गहू एक रात्र हळू-हळूं शिजवयाचे, नंतर ते गहू वाळवून त्याचा रवा काढावयाचा व त्याचा शिरा करून खावयाचा.

या प्रयोगानें वांति अगर शौचास साफ होते व त्वग्रोग मुळासह नाहींसे होतात.

(२) त्रिफळ्याची भाजी

याच गृहस्थानें दुसरा एक प्रयोग सांगितला. तो जरा विचित्र वाटला तो असा:- त्वचेच्या रोगा-करितां त्रिफळ्याचा काढा सतत बारा दिवस घ्याव-याचा. काढा गाळल्यानन्तर फडक्यावर जो चोथा राहील, त्याची मीठ मसाला वगैरे सर्व कांहीं घालून भाजी करावयाची व ती खावयाची. या पद्धतीनें शरीरशुद्धि करून त्वग्रोग बरा करावयाचा.

फार चांगली चव येते

या प्रयोगांतील त्रिफळ्याच्या चोथ्याची भाजी करून खावयाची कल्पना विचित्र वाटते. चवीबद्दल त्याला विचारले तर तो म्हणतो 'फार चांगली चव येते तिला.' हाहि प्रयोग पाहण्यासारखा आहे.

[कार्ली, मेथी, आंबाडी, यांचा कडूपणा आंबट-पणा काढून टाकण्यासाठीं त्या भाज्या उकडून आपण पाणी काढून टाकतो त्याप्रमाणेंच त्रिफळ्याचा अति-तुरटपणा घालविण्यासाठीं काढा करून चोथा घेणें ही कल्पना नित्याच्या व्यवहाराशीं जुळती अशीच आहे.

अष्टांगहृदयांत दिलेल्या शाकभाज्या

वाग्भटांत ज्या शाकभाज्या रोजच्या जेवणांत वापरावयास सांगितल्या आहेत, त्यापैकीं बहुतेक कडू, तुरट अशाच रसांच्या आहेत. कडुपडवळ, शिकेकाई, कडूनिंब, सागरगोटी, बावंची, गुळवेल, वेळू, वेत, रिंगणी, डोरली, अडूळसा, मंडूकपर्णी, कारली, पित्त-पापडा, गोजिव्हा, काडेचिराईत, ब्राह्मी, मेढशिंगी, कुटकी, पुनर्नवा, कपिला, इत्यादि भाज्या या कोवळ्या (कमी कडु तुरट) असतांना तशाच व जास्त कडुतुरट असतां उकडून पाणी काढून टाकूनच केल्या पाहिजेत.

भाज्या कोणत्या रसाच्या असाव्यात ?

आज आपल्या जेवणांत गोड, आंबट, खारट तिखट ह्या चार रसाचे पदार्थच असतात. पूर्वी भाज्यांच्या रूपानें कडु, तुरट रस जात असे. हल्लीं आपण बटाटे (गोड) आदिकंद व इतर क्षारप्रधान वांगी, गोवारी सारख्या भाज्या विशेष वापरतो. त्यामुळें कफप्रधान विकार जनतेंत बाहुल्यानें आढळतात. या दृष्टीनें विचार केल्यास त्रिफळ्याची भाजी करण्याची कल्पना स्वागतार्ह आहे. —संपादक]

अल्सरसाठीं कोबीचा रस

जठरव्रणांमुळें होणारा अल्सर बरा करण्याकरितां अमेरिकन डॉक्टर कोबीच्या रसाचा अर्क वापरीत असतात.

दररोज अेक क्वार्ट साधा कोबीचा रस प्यायल्यानें अल्सरच्या रोग्यांना आराम वाटतो, असा आजवरचा अनुभव आहे. डॉ. चेनी यांनीं सांगितलेल्या नवीन उपचारांत दररोज ३ चमचे कोबीच्या वाळलेला रस घ्यावयाचा असतो.

१०० रोग्यांवर त्या अर्काचा प्रयोग केला असतां असें दिसून आलें कीं त्यांची पोटदुखी पांच दिवसांत थांबली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शस्त्रक्रियेंतहि आयुर्वेदाची प्रगति

" भारतीय वैद्यकशास्त्रांचे अध्ययन माझें अत्यंत आवडतें असून आयुर्वेदाचे मूलभूत सिद्धांत सांगणारी अथर्ववेद सूक्तें मी ज्यावेळीं वाचलीं तेव्हांपासून माझी आयुर्वेदावर भक्ति जडली आहे." असे उद्गार अमेरिकन प्राध्यापक वॉल्टर हार्डिंग मौरेर यांनीं पुणें आयुर्वेद महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसमोर संस्कृतमध्यें भाषण करतांना काढले. प्रा. मौरेर हे अमेरिकेंतील एक ग्रंथालयांत कामास आहेत.

भारतासंबंधीं ४ लक्ष पुस्तकें

ते पुढें म्हणाले, " मी अमेरिकेंत ज्या ग्रंथालयांत काम करतो तें अमेरिकेतील सर्वांत मोठें ग्रंथालय असून त्यामध्यें भारतीय संस्कृतीसंबंधीं सुमारें ४ लक्ष पुस्तकें आहेत, व त्यांचा उपयोग कोणीहि नागरिक करूं शकतो.

आयुर्वेदाची महति व प्राचीनत्वाचें वर्णन करून, " सर्व शस्त्रांमध्यें 'हात' हेंच शस्त्रकर्मातील प्रमुख शस्त्र आहे " असा सुश्रुताचा आधार देऊन ते पुढें म्हणाले, " प्राचीन शस्त्रांचीं संस्कृत नांवें व आधुनिक शस्त्रांचीं इंग्रजी नांवें ह्यांत अत्यंत साम्य आहे. "

सुश्रुतकालीं धनुष्याकार सुया

आतांप्रमाणेंच सुश्रुताच्या कालींहि धनुष्याकार वक्र सुया होत्या. जखमा शिवण्याकरितां निरनिराळ्या प्रकारची सूत्रें होतीं. डोळ्यांमधील लोखंडी कण बाहेर काढण्याकरितां आतांप्रमाणें त्यावेळींहि लोहचुंबकाचा उपयोग केला जात असे. शस्त्रक्रियेचे वेळीं मूर्च्छा आणण्याला उपयोगी अशीं विविध औषधीहि त्यावेळीं प्रचारांत होतीं. भोजराजाच्या डोक्यावर शस्त्रक्रिया करतांना वैद्यांनीं मूर्च्छादायक औषधांचा उपयोग केला होता. ही सर्व माहिती त्यांनीं भारतीय व पाश्चात्य वैद्यशास्त्रांच्या तुलनात्मक परीक्षणांत दिली.

संस्कृत भाषेच्या अध्ययनाचें महत्व

प्रा. मौरेर यांच्यानंतर डेक्कन कॉलेजमध्यें संस्कृतचा उच्च अभ्यास करीत असलेले फ्रेंच प्राध्यापक रोशे यांनीं संस्कृतमध्यें भाषण केले. समारोपाच्या भाषणांत पं. मार्तंडशास्त्री दीक्षित यांनी विद्यार्थ्यांना आयुर्वेदांत पारंगत व्हावयाचें असेल तर संस्कृतची हेळसांड न करतां चिकित्सक बुद्धीनें आयुर्वेदाचें संवर्धन करा असा कळकळीचा उपदेश केला.

डॉक्टरांना अधिक पगार कां ?

सरकारकडून सध्यां कामगार विमा योजना व ग्रामीण वैद्यकीय मदत योजना याच्या बाबतींत डॉक्टरमंडळींना मिळणारा मेहनताना असमाधानकारक आहे. सरकारनें डॉक्टरांना चांगले पगार द्यावेत, असे भारतीय मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सेन यांनीं सुरत येथील डॉक्टर मंडळींच्या सभेंत सांगितले.

ते म्हणाले—" डॉक्टरी शिक्षण हें अत्यंत खर्चाचें व अधिक वेळेचें असल्यानें डॉक्टरांना इतर कोठल्याहि व्यवसायापेक्षां अधिक वेतन मिळावें या सूचनेला कारभारस्थ लोक हंसतात. पण सर्व प्रगत देशांत तशी पद्धत चालू आहे. जर योग्य वेतन व सवलती मिळत असतील तर ग्रामीण भागांत जाण्याचा सल्ला ही संघटना नव्या डॉक्टरांना देईल. आयुर्वेद व पाश्चात्य वैद्यक यांचें एकीकरण अशक्य आहे. पाश्चात्य वैद्यकानें इतर वैद्यक पद्धतींतील गोष्टी कसोटीस उतरल्या तरच अंगिकाराव्या."

डॉ. गर्देकृत २ संग्राह्य पुस्तकें

१ आरोग्यासनें-दीर्घायुष्य व निरोगीपणाची गुरुकिल्ली किंमत १-८-०

२ गृहवैद्य-एक खराखुरा गृहवैद्य भावना-कोशासह किंमत ३-०-०

दोन्ही पुस्तकांवर उत्कृष्ट अभिप्राय

ट. ख. निराळा

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें:—

१ वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक.

२ डॉ. गर्दे २६ मोगललेन, मुंबई १६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जल-झेंडू ....

लेखकः- वैद्य मुकुंदराव अं. गायकवाड
सोलापूर

[लेखक वै. गायकवाड यांनीं ह्या लेखास जलवेतस हें शीर्षक देऊन लेख पाठविला आहे. पण आंतील सर्व वर्णन जलझेंडू या वनस्पतीचे आढळल्यावरून त्यावर जलझेंडू हें नांव छापण्यांत आलें आहे. जलवेतस कशास म्हणावें व त्याचें बी कसें असतें याविषयीं निर्णायक माहिती अद्याप कोठेंच मिळूं शकत नाहीं. वाचकांपैकीं कोणास अशी माहिती असल्यास त्यांनीं ती प्रसिद्धीसाठीं पाठवावी. वै. गायकवाड यांनीं जल-झेंडू बियांचा नमुना आमच्याकडे पाठविला आहे.—संपादक]

जलझेंडूचें वर्णन- पाण्याच्या कडेस थवेच्या थवे उगवणारें, ३-४ फूट उंचीचें, नाजूक, नम्र, बारमाही फुललेलें दिसणारें, फिकट जांभळी छटा फांद्यावर असलेलें, झेंडू (मखमाल) प्रमाणें सुगंध असलेलें झुडुप असें हें असतें. पानें एकांतरानें, फांदीच्या दोन किंवा तीन इंचाचे कांडीवर तीन तीन लागतात. पैकीं मधलें पान मोठें व पूर्ण वाढीचें २ ते ४ इंच लांब व पाव ते अर्धा इंच रुंद, कडा कातरलेलें (झेंडूप्रमाणेंच दंतुर किनारीचें) असतें. बाजूचीं दोन पानें लहान, १-१॥ इंच लांबीचीं व अपूर्ण वाढीचीं असतात. पानांचा देंठ चमचाप्रमाणें (किंवा स्तबकासारखा) रुंदावलेला व जांभळ्या रंगाचा असून त्यावरच फुलांचे गुच्छाची बैठक असते. पानांच्या प्रत्येक त्रिकुटावर पानांचे व फांदीचे कोनांत एकेक गुच्छ असतो. हे गुच्छ, तारकाकृति पांढऱ्या रंगाच्या पांच पाकळ्यांचे व जांभळे केसर असलेल्या असंख्य फुलांचे असतात. या गुच्छांत फुलें सुकल्यावर बीजें तयार होतात. हीं बीजें गोलट, चपट, बाळंतशेपेहून लहान, बाजूवर पातळ व मध्यें टणक, फुगीर, जांभळा रंग असलेलीं, दिसावयास खपाटी पोट गेलेल्या व उपासमारीनें चपट्या झालेल्या ढेकणासारखीं हुबेहूब दिसतात. फांद्या स्वतंत्र, उपफाटे नसलेल्या, गोल, गुळगुळीत व सुकल्यावर पोंकळ, पोचट होणाऱ्या असतात. पाण्यालगतचीं झुडुपमुळें दोरमुळें असतात व पाण्यापासून दूरचे झुडूपाचें मधलें मूळ मोठें होतें.

जिभेस सूक्ष्म रिवरिव होतें

पानें किंवा बिया चघळल्यास जिभेस सूक्ष्म रिवरिव होते, जीभ गरम झाल्याप्रमाणें वाटतें, आणि तिखट रसाचा अनुभव येतो.

शेवंती वर्गांतील वनस्पति

या झुडूपाचे रंगरूपावरून हें शेवती (शतपत्री) वर्गांत मोडणारें झुडूप आहे असें ठरतें. या शेवती वर्गाचें लॅटिन नांव कम्पोझिटीई (Compositae) आहे. याचे वर्गांत झेंडू (मखमाल), माका (भृंगराज) मोडतात.

उपयुक्त अंगें- बिया, पानें, मुळे.

जलझेंडूचे गुणधर्म

रसतः कटु, तिक्त, कषाय; शीतवीर्य, कटु विपाकी; गुरु; रूक्ष; सुगंधि; ग्राही; स्वेदापनयन; मूत्रल; विषघ्न; कफ पित्त-वात-नाशक, हृदय, श्वासनलिका, फुप्फुसें, व फुप्फुसांचा परिवार यांना उत्तेजक; ज्वर, श्वसनक (न्युमोनिया), डांग्याखोकला, गोवर, देवी, कांजिण्या, रक्तपित्त, अतिसार, त्वग्रोग, पिसाट कुत्र्याचें विष, कृमि, अपतंत्रक (हिस्टेरिया) यांचा नाश करणारें व व्रणशोधन करणारें असें हें औषध आहे.

जलद गुण दाखवित नाहीं

अशा तऱ्हेचे याचे गुणधर्म जरी असले तरी हें औषध प्रधानवर्गांत गणतां येत नाहीं. समान गुणधर्मांच्या इतर औषधांशीं युक्त केल्यास त्या त्या गुणधर्मांचा परिपोष चांगला करतें. एकटें वापरल्यास चटकन् डोळ्यांत भरण्यासारखा जलद गुण दाखवीत नाहीं. आस्ते आस्ते पण निश्चित कार्य दिसून येतें. याचा ऊर्ध्वपातित सुगंधि अर्क मात्र थोडासा जलद गुण दाखवतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जलझेंडूची औषधी मात्रा

अर्क १ ते २ तोळे; पानांचा फांट १ ते २ तोळे; बियांचें चूर्ण व पानांचें चूर्ण ४ ते १६ गुंजा; पानांचा रस १/८ ते १ तोळा. विषघ्न व मूत्रल मात्रा– अर्क, फांट, रसरूपानें ५ तोळे.

जलझेंडु बाष्पार्क

जलझेंडू बिया व पानें वजनी २ शेर एका कापडी पुरचुंडींत बांधून ती अर्कयंत्रांत ठेवलेल्या मापी ६ शेर पाण्यांत लोंबती राहील अशी लटकवावी. मंदाग्नीनें ४ शेर मापी अर्क काढून झाला कीं बन्द करावें. यास वंजुल (जलझेंडू) बाष्पार्क, वंजुल बाष्पादक नांव देण्यास हरकत नाहीं.

वंजुल फांट– जलझेंडू पानें २ तोळे (सुकी पानें), उकळतें पाणी ४० तोळे एकत्र बन्द करून अर्धा तास ठेवून मग गाळून वापरावयास घ्यावें.

रसशास्त्र– जलझेंडूंत एक सुगंधि हिरवट पिवळें तेल आहे. हें अल्कोहोल व पाण्यांत मिसळतें. तेलांतच संयुक्त स्थितींत एक कडवट राळ व एक क्षारस्वभावी (अल्कलॉइड) द्रव्य आहे. क्षारस्वभावी द्रव्य तिखट, उष्ण व जिभेस बधिर करणारें आहे. सुगंधी तेल तीन टक्के प्रमाणांत आहे.

जलझेंडूचे उपयोग

कफज आणि वातज विकारांत प्रयोजक औषधांशीं जलझेंडू उपयोगांत आणावा. जसें डांग्या खोकला; हा उत्कट वातकासच आहे. त्यांत बकुळफुलें, लाजाळू वेलीचें मूळ, उटकटारी यांचे क्वाथांत खडीसाखर मिळवून केलेल्या अवलेहामध्यें जलझेंडू-बाष्पोदक मिळवून द्यावें. फारसा त्रास न देतां व जास्त मुदत न घेतां हा कपिकास (डांग्याखोकला) निघून जातो व त्यांत घातक उपद्रवहि निर्माण होत नाहींत.

हृदयसंरक्षक अर्क उपयोगी

ज्वरांत सान्निपातिक चिन्हें दिसूं लागतांच रोग्यास हृदय संरक्षक म्हणून जलझेंडू-अर्क किंवा त्याचा फांट द्यावा. यानें रोग्यास चेतना–उत्तेजन येतें. याचें शीतवीर्यामुळें रक्तांतील पित्ताची वाढलेली तीव्रता कमी होऊन ज्वर उतरत जातो. श्वसनक-ज्वरांत (न्युमोनिया) किंवा मलेरियाचे तीव्र प्रकारांत खूप घाम सुटून रोगी घाबरल्याप्रमाणें करतो, घामहि गारगार असतो, नाडी मंद मंद चालूं लागते किंवा मध्येंच एखादा ठोका गाळते, रोगी डोळे फिरवतो, अशा वेळीं दर दहापांच मिनिटांनीं वंजुलबाष्पोदक देत राहावें. एकदीड तासांत वरील लक्षणें कमी होऊन नाडीगति सुधारते. लक्ष्मीविलासगुटींत जलवेतस-बीज याच कार्याकरितां घातलें आहे.

देवी, गोवर, कांजण्या

गोवर, देवी, कांजिण्या यांतहि जलझेंडूबाष्पोदक उपयुक्त आहे. उंबराचीं कच्चीं फळें वंजुलबाष्पार्कांत भिजत टाकून तीन तासांनीं गाळून घेऊन तें दिल्यानें गोवर, देवीमुळें होणारा अन्तर्दाह कमी होतो व अन्तस्त्वचाक्षोभहि लवकर नाहींसा होतो. यांत ग्लूको साखर मिळवून दिल्यास चालतें.

खोकला, श्वास

खोकला, श्वास लागणें यांत जलझेंडूबीज देतात. यानें रोग्याची घुमसट–श्वास कोंडल्यागत होणें बंद होऊन त्यास उत्तेजन येतें. याचे बरोबर चुंचलीबीज योजल्यास जास्त चांगलें कार्य दिसतें.

ज्वरोष्मा लौकर कमी होण्यास उंटकटारीच्या मूळाचें सालीचें चूर्णासह जलझेंडूबीजचूर्ण द्यावें.

पांढरें कोड

हजारोंचें गेले व त्यांनीं अभिप्राय दिलेले आणि अनेक बक्षिसें मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु.

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो. असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन'
मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हातापायांना खूप घाम

कांहीं लोकांना हातापायास खूप घाम येतो. त्यामुळें त्यांना फार त्रास होतो. पचनविकृतीमुळें होणारा हा एक त्वग्रोगच आहे. यांत जलझेंडूबीजचूर्ण कांहीं दिवस दिल्यानें हें अति घाम येणें बंद होतें.

पिसाट कुत्रे चावल्यास जलझेंडूबीज एक दोन सप्ताह देतात. जखमेवर पानांची लुगदी बांधतात.

रक्तपित्त, अतिसार

रक्तपित्त व अतिसारांत जलझेंडू पानाचें चूर्ण किंवा बियांचें चूर्ण दिल्यानें ग्राही कार्य होऊन हे रोग कमी होतात. व थकवा नाहींसा होतो.

कृमिविकार

कृमिपातनार्थहि याच्या बिया देतात. कृमिजन्य आंकडी (झटके) जलझेंडूच्या बिया देत राहिल्यानें कमी होतें. वेखंड, वावडिंग, अक्कलकारा, माक्षिक-भस्म व जलझेंडू बिया १।१ भाग घेऊन जलझेंडू पानरसांत गोळया चण्याएवढ्या बांधाव्या. या गोळ्यांनीं अपतंत्रकाच्या फिट्स येणें, मज्जातंतु व मेंदूचा क्षोभ होऊन हातपायास पेटके, झटके येणें, मस्तकदुखी इत्यादि विकार बंद होऊन झोप चांगली येते.

व्रणशोधन कार्य

जलझेंडूचे पानांचा रस घाण व पूंवळणारे व्रणा-वर लावल्यानें व्रणशोधन होऊन तो लवकर रुजतो.

धोत्रबिया जलझेंडूच्या पानांच्या रसांत भिजत टाकाव्या. १२ ते २४ तासांनंतर धुवून वाळवाव्यात. कुटून तुषरहित करून (पाखडून) औषधांत वापरण्यास घ्याव्यात. ह्या कृतीनें त्यांची शुद्धि होते.

कमलाविलास वटिका

जलझेंडूबीज २ तोळे, कापूर ।· तोळा, गांजा-बीज १ तोळा, कवडीऊद १ तोळा, धोत्राबीज ।· तोळा, कुचलाबीज शुद्ध ।· तोळा, एकत्र खलून नागवेलीचे पानाचें रसांत खलून ते १ गुंज प्रमाण गोळी बांधावी. ही गोळी आसन्नमरणास उत्तेजन देऊन चैतन्य आणते. लक्ष्मीविलासगुटीचें कार्य करिते. नाडीमंदता घालवते. हृद्य, वृष्य आहे.

[जलझेंडूचें बीज लेखकाकडे मिळेल. पत्ता– गायकवाड बंधु १११ उत्तर कसबा सोलापूर १ तोळा ६ आणे, १० तोळे ३ रु. ट.ख. निराळा]

बृहज्जात्यादि तेलाचा पाठ

योगरत्नाकर – भावप्रकाशांत आहे.

वै. भिंगारेशास्त्री यांनीं दि. १६-२-५४ चे आयुर्वेद-पत्रिकेंत बृहत्जात्यादि तेलाचा पाठ दिला आहे व हा पाठ फक्त भैषज्यरत्नावलींतच आहे असें तेथें म्हटलें आहे; पण हें म्हणणें बरोबर नाहीं.

कारण हाच पाठ भावप्रकाश पान ६३९ व योगरत्नाकर भाग २ रा पान २८४ ह्या दोन्ही ग्रंथांत व्रणचिकित्सेंत जात्यादि तेल या नांवानें आहे. नांव फक्त बृहत्जात्यादि तेल (भैषज्यरत्नावलींत) दिले आहे. बाकी औषधें व गुणधर्म सारखेच सांगितले आहे .

मुंबई २ वै. र. गो. कुळकर्णी

पवित्र नेपाली कस्तुरी रु. ४४ तोला,
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला,
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला,
लिहाः–नेपाल हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज्योतिष्मती-सेवनाचें पथ्यापथ्य

आयुर्वेद विद्यापीठ झांशी येथील सुप्रसिद्ध संशोधक वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध श्री. गोडबोलेशास्त्री यांनीं तृणज्योतिष्मतीसंबंधीं दोन पाठ काढून दिले होते, ते पत्रिकेच्या वाचकांचे माहितीसाठीं शेवटीं देत आहे. यापैकीं काकचण्डीश्वर तंत्रकल्प यामधील पाठ कांहींसा वैद्य रुद्रभटे यांनीं मागें प्रसिद्ध केलेल्या पाठाशी जुळता असला तरी त्यांतहि नाविन्य आहे हें शोधक वाचकांस कळून येईल. रसाचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी यांचे करवीं तृणज्योतीचें शास्त्रीय संशोधन होत आहेच, पण त्याबरोबरच या व इतर अप्रसिद्ध हस्तलिखितांतून मिळणाऱ्या पाठांच्या आधारावर जिज्ञासू वैद्यांनीं या अमूल्य वनस्पतीचे संशोधनात्मक प्रयोग केले व आपले अनुभव प्रसिद्ध केले तर आयुर्वेदसेवेचें महत्वाचें काम होईल.

तृणज्योतिष्मती सेवनाचे नियम

भवानी तृणज्योतिष्मतीचे प्राप्तीसाठीं व तिचे संशोधनासाठीं नाना प्रकारची माहिती संकलित करण्यांत ज्या महाभाग भिषग्रत्न श्री. ग. कृ. पाटणकर मु. किनई, यांनीं जवळजवळ तीन तपें खर्च केलीं, त्यांनीं दिलेल्या नियमांकडे तृणज्योतिष्मतीचें सेवन करूं इच्छिणारांनीं अवश्य ध्यान द्यावें.

१ शुक्ल पक्षांत शुभ दिवशीं व शुभ वेळीं शुचिर्भूत होऊन वनस्पतीची पूजा करून वनस्पति काढून आणावी.

२ तिला स्वच्छ करून सावलींत वाळवून तिचें चूर्ण करावें.

३ वमन, विरेचन करून अंगाला तेल लावून (स्नेहन करून) नंतर स्वेदन करावें लागतें. या चार क्रियांनीं देहांतील दोष नाहींसे होतात.

४ हे झाल्यावर पुनः शुभ दिवशीं शुभ वेळीं शुचिर्भूत होऊन परमेश्वराचें नामस्मरण करून सुरवात करावी. पथ्य म्हणजे फक्त दूध व भात आणि लोणी घेण्याचें प्रमाण बिडालपदमात्रकम्, मधांत चाटण केले तरी चालते. घेण्याची वेळ-सकाळ, संध्याकाळ व दुपार.

५) ब्रह्मचर्य व्रत अवश्य पाळलें पाहिजे.

६) प्रकृतीचे मानानें २-३ अथवा ६ महिने सेवन करावी.

७) भात आंबेमोहोर तांदूळ अथवा उत्तम सरस असलेले तांदूळ व पिण्यास गाईचें भरपूर दूध. मधल्या वेळीं २ ते ४ तोळे लोणी घ्यावें.

८ वनस्पति घेत असतांना मेंदू व शरीर यांना पूर्ण विश्रांति पाहिजे.

[त्यांनीं पाठविलेल्या ६।११।५३ चें पत्रांतून उद्धृत]

तृणज्योतिष्मतीसंबंधीं दोन पाठ

वर उल्लेखिलेले पाठ पुढें दिले आहेतः—

१) रसोपनिषद् अध्याय १७

ज्योतिस्तृणस्य मूलेन वङ्गं निर्वापितं त्रिधा ।
नवदोषविनिर्मुक्तं रजतं कुमुदप्रभम् ॥
वङ्गस्य मलमेदं च कापोतं चाम्लपेषितम् ।
तन्मूलैस्तीक्ष्णमालिप्य येत् तद् द्रुतं भवेत् ॥
एतद् ताम्रं भवेत् सद्यो मूलजेन विलेपितम् ।
तत् ताम्रं तारमायाति कालयुक्तं समूलतः ॥
अजाघृतं सुपिष्टं तु तच्चारं हेमतां नयेत् ।
तन्मूलमुदरे क्षिप्तं षण्डतामपनीयते ॥

२) काकचण्डीश्वर-तन्त्रकल्पम् (पान ५०)

तृणतेजसमेकं तु विद्यते विबुधेश्वरि ।
रात्रौ प्रज्वलते तत्तं हिरण्यसदृशं भवेत् ॥
तस्य मूलं समादाय क्षीरेण सह पेषयेत् ।
क्षणात्तद् रक्तवर्णं स्यात्तत्क्षीरं च पिबेत् नरः ॥
सप्तरात्रप्रयोगेण बलं विन्दन्त्यनुत्तमम् ॥
क्षीरेण नियताहारो लवणाम्लौ च वर्जयेत् ।
वृषभांसो महाकायो जीवेत् वर्षशतं नरः ॥
तस्य मूलं समानीय रसगन्धौ च तत्समौ ।
निक्षिप्य मातुलुङ्गोत्थैः रसैः सर्वं विमर्दयेत् ।
बिल्वपत्रैश्च संवेष्ट्य दापयेत् तु पुटत्रयम् ।
हेमच्छायं महावीर्यं रसायनमथोद्भवेत् ॥

या श्लोकांचा अर्थ स्पष्टच आहे.

—नाना बापट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मनाचा समतोलपणा कसा राखावा ?

(लेखकः- डॉ. प्र. शं. गुप्ते, नासिक)

मानसिक क्रिया ह्या अन्तस्थ (Instincts) प्रेरणा व बाह्य (Environments) प्रेरणा ह्यामुळें घडत असतात. क्षणोक्षणीं मनावर आणि शरीरावर ह्या प्रेरणांचे आघात होत असल्यामुळें मनुष्य, स्वतःच्या रक्षणासाठीं व सुखासाठीं, आपली वागणूक (म्हणजेच आचार आणि विचार) बदलीत असतो. ही क्रिया करीत असतां आपण न कळत प्रत्येक गोष्टीची मनांत शहानिशा करून त्याप्रमाणें सुखावह गोष्ट कोणती हें ठरवून मगच त्याप्रमाणें वागतो.

शरीराचें रक्षण व मनाची शांति

सर्वसाधारण व्यक्तीची वागणूक कशी असावी हें ती व्यक्ति ज्या समाजांत वावरत असते त्याच्या-त्या ज्या सामाजिक, नैतिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक परिस्थितीनें ठरवलेलें असतें. ती तशी योग्य वागणूक ठेवली म्हणजे शरीराचें रक्षण व मनाची शान्ति त्याला मिळत असते.

मानसिक युक्त्या

प्रत्येक प्रसंगीं आणि प्रत्येक परिस्थितींत अशा रीतीनें समतोलपणा माणसाला राखतां येत नसल्यास त्याचें मन द्विधा होतें. समतोलपणा गेल्यामुळें 'व्यक्ति तितक्या प्रकृति ' ह्या न्यायानें समतोलपणा किंवा मनाची शान्ति संभाळण्यासाठीं ती व्यक्ति मानसिक युक्त्या योजित असते. ह्या युक्त्यांना कांहीं मनःशास्त्रज्ञ " मानसिक प्रतिक्रिया "(Mental Reactions) असें म्हणतात.

मानसिक विकार

ह्या युक्त्यांचा अतिरेक झाला किंवा त्या युक्त्या सफल न झाल्या म्हणजे मानसिक लक्षणें बाहेर दिसूं लागतात; व त्यालाच आपण 'मानसिक विकार' अशी संज्ञा देतो.

मानस युक्त्यांचें विवेचन

मानसशास्त्रांत ह्या युक्त्यांचें विवेचन केलेलें असतें. मानसिक विकारांचें निदान व चिकित्सा करण्यास ह्या मानसिक क्रियांचें ज्ञान, वैद्यांना अत्यन्त आवश्यक आहे. त्यांची माहिती थोडक्यांत पुढ दिली आहे.

परावर्तन (Regression)

पूर्ववयांतील विशेषतः बाळपणाच्या काळांतील वागणुकीची पुनरावृत्ति करणें. उदाहरणार्थः- एखादें मूल गरीब व वेड्या आईबापांच्या वेगळें दुसऱ्या एखाद्या गृहस्थानें संभाळलेलें असतें. संभाळणाऱ्या गृहस्थानें त्याला आईबापांच्या परिस्थितीची ओळख मुळींच दिलेली नसते. वयांत आल्यावर त्याला आपल्या आईबापांची परिस्थिति एकाएकींच कळल्यामुळें त्याच्या मनावर आघात होऊन तो लहान मुलासारखे चाळे करूं लागतो.

विस्मृति (Suppression)

एखाद्या घटनेनें मनाची विस्खलित वृत्ति होते. तिनें मानसिक दुःख, त्रास किंवा चिंता उत्पन्न झाल्यामुळें ती वृत्ति व तिचें कारण ह्या दोन्हींची आठवण बुजवून टाकून " दुसऱ्या गोष्टीकडे लक्ष वेधणें " ह्याला 'विस्मृति' म्हणतात. अशा रीतीनें आपल्या मनांतील द्वन्द्व आपण विसरून जाऊं असें त्या व्यक्तीला वाटून ती दुसरी क्रिया ती व्यक्ति वारंवार करीत असते.

संयम (Repression)

जागृत अवस्थेंतून (जाणीवतूनं) सुप्त अवस्थेंत (नेणीवेंत) द्वंद्व व त्याचीं कारणें घालविणें. वरच्या नंबर दोनच्या व ह्या साधनेंत एवढाच फरक असतो कीं, तो मनुष्य दुसऱ्या गोष्टीकडे आपलें लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत नाहीं. त्यामुळें तें द्वन्द्व पुनः

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुनः डोकें वर करीत असतें. तें दाबून टाकण्याकडे व्यक्तीची प्रवृत्ति असते. त्या व्यक्तीला आपल्या वर्तणुकीवर सतत पहारा ठेवावा लागत असल्यामुळें मानसिक शक्तीचा भयंकर अपव्यय होत असतो. त्याची एकाग्रता जाते, विस्मृति वाढते, इत्यादि अनेक लक्षणें उद्भवतात. स्त्रीपुरुषांचा एकमेकांविषयींचा मिथ्याविनय, दांभिकपणा, शिष्टपणा इ. क्रिया ह्याचीं उदाहरणें देतां येतील.

उन्नतिकरण [Sublimation]

एका भावनेचा भंग झाल्यामुळें दुसऱ्या कोणत्या तरी भावनेचा अतिरेक झालेला असतो. आपण जगाचा उद्धार करणार आहों, आपण धर्मसंस्थापक आहों इत्यादि कल्पनेनें ती व्यक्ति वागणुकीचा अतिरेक करते. प्रेमभंग झाल्यामुळें संन्यासवृत्ति उद्भवणें हें पुष्कळ वेळां पाहण्यांत येतें. परंतु ह्या वृत्तींत व खरोखरची संन्यासवृत्ति ह्यांत पुष्कळ अन्तर आहे.

खरी धार्मिकवृत्ति नसते

खऱ्या संन्यास वृत्तींत जी मनाला शांन्ति वाटत असते ती ह्या वृत्तींत वाटत नाहीं. देवाला वारंवार नमस्कार करणें किंवा मोठ्या आवेशानें धर्माच्या गोष्टी सांगणें, ह्याच्या बुडाशीं दुसऱ्याच एखाद्या कल्पनेचा खेळ चाललेला असतो.

बुद्धिवाद [Rationalisation]

" नाचतां येईना अंगण वाकडें " ही म्हण ह्या युक्तीचें उदाहरण देतां येईल. हें असें कां करतो असें विचारलें असतां कांहींतरी सबब म्हणून बुद्धीला पटेल असा युक्तिवाद आवेशानें सांगणें. असें वाकडें तिकडें कां लिहितो असें विचारलें तर हाताला कांहींतरी झालें आहे म्हणून तो सांगेल. (खरोखर हाताला कांहींच झालेलें नसतें.)

भरपाई [Compensation]

मानसिक किंवा शारीरिक दोष झांकण्यासाठीं त्याच्या अगदीं उलट दिशेनें क्रिया करणें. कुरूपपणा झाकण्यासाठीं फाजील नखरा करणें. हाताला घाण लागली आहे असें समजून एकसारखा हात धूत बसणें.

प्रतीकी करण [Symbolisation]

मनांतील भाव व्यक्त करण्यासाठीं कृति करणें, गाणें गात बसणें, कविता करणें, भातुकली किंवा आगगाडीचा खेळ खेळणें इत्यादि.

उपक्रिया किंवा उपविधान [Substitution]

अपतंत्रकांत (Hystera) ह्या युक्तीचा अवलम्ब पुष्कळ वेळां करण्यांत येतो. नूतन परिणीत वधूच्या मनाच्या परिस्थितींत अबोलपणा (Aphasia) अंगवध किंवा कोणतेंहि असेंच लक्षण उद्भवतें. शाळेतील अभ्यासाची तयारी झेपत नसली तर विद्यार्थ्याला फळ्यावरचें दिसत नाहीं किंवा पुस्तकांतील अक्षरें दिसत नाहींत म्हणून सांगतात [Amblyopia]

ढोंग करणाऱ्या माणसांच्या क्रियेंत व ह्या क्रियेंत फार फरक आहे हें लक्षांत ठेवावें. उपक्रियेंत व्यक्तीला आपल्या कृत्याची जाणीव मुळींच नसते. तिला हीं लक्षणें खरोखरच होत असतात.

उज्वल कीर्ति

आयुर्वेदीय औषधांची उज्वल कीर्ति बनविलेल्या सिद्ध औषधांच्या गुणावर आहे. औषधें गुण देणारीं असतील तर कीर्ति नेहमीं उज्वल राहील. तरी अशीं गुण देणारीं औषधें, अस्सल, ताजी व स्वच्छ घटक औषधी द्रव्यें खरेदी करण्यावर अवलंबून आहे औषधी द्रव्यासाठीं आपण

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स

पायधुनी, मुंबई नं. ३

फोन नं. (३१८५८) यांचेकडे मागणी करा.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें

मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात.

अधिक माहितीसाठीं कॅटलाग मागवा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आरोपण [Projection]

'वड्याचें तेल वांग्यावर' दोष स्वतःचा पण आरोप दुसऱ्यावर. उदाहरणार्थः- तूं दुर्मुखलेला कां तर दुसरी माणसें माझ्याबरोबर नीट वागत नाहींत म्हणून. तूं अबोल कां राहतो तर दुसरी माणसें माझ्याशीं बोलत नाहींत म्हणून. उन्माद स्थितींत काल्पनिक व्यक्तीमुळें किंवा कारणांमुळें आरोपण घडत असतें.

विभक्तिकरण [Dissociation]

द्वंद्व विसरून जाण्यासाठीं रोगी स्वतःची अस्मिता [Personality] विसरून दुसऱ्याच काल्पनिक किंवा खऱ्या व्यक्तीचें रूप धारण करून तसें वागत असतो. 'अंगांत येणें' ह्यांत आरण कोणीतरी देवता आहे असें समजून त्याप्रमाणें तो मनुष्य वागत असतो. स्वतःच्या कुटुंबाला व घराला कंटाळून दुसऱ्या गांवाला जाऊन तेथें निराळ्या व्यक्तीचें स्वरूप धारण करून व्यवसाय करणारे वेडे असतात. न्यायवैद्यकां- [Medical jurisprudence] मध्यें ह्याची उदाहरणें पुष्कळ आढळून येतात.

कल्पनातरंग [Phantasy]

"शेखमहंमदी वृत्ति" ह्याचें उदाहरणः— एखादा मनुष्य स्वतःचें जग निर्माण करून त्यांतच गढलेला असतो. प्रत्येक मनुष्य मनांत कल्पना करीत असतो. परंतु तें मित प्रमाणांत आहे तोपर्यंत ठीक असतें.

वैद्याचें कर्तव्यकर्म कोणतें ?

वर दिलेल्या मानसिक युक्त्यांचें ज्ञान व्यावसायिक वैद्याला मानसिक रोगांचें विश्लेषण [Analysis] करण्यास उपयोगी पडेल. ह्याच्या अनुरोधानें मन निरामय कसें राखावें ह्याचीहि कल्पना वैद्याला असणें जरूर आहे. मानसिक रोगांची वाढ जनतेंत होऊं नये व विश्वास ठेवून आलेल्या व्यक्तींना योग्य मार्गदर्शन करणें हें वैद्यांचें कर्तव्यकर्म आहे.

आवडीचा व्यवसाय करावा

लहानपणींच मुलांच्या वागणुकीकडे लक्ष देऊन त्यांची वर्तणूक समजुतीनें सुधारणें फार महत्त्वाचें आहे. विशेषतः ज्या घराण्यांतून मानसिक विकार उत्पन्न होण्याची शक्यता आहे त्यांनीं विशेष खबरदारी घ्यावी. मनाची वृत्ति द्विधा होऊं नये व मनाला कमकुवतपणा येऊं नये, म्हणून प्रत्येकानें आपल्या आवडीच्या व्यवसायांत नेहमीं गढून जाणें फार महत्वाचें आहे.

दडपादडपी करूं नये

आपल्या मनाला कोणत्याहि गोष्टीची त्रास किंवा चिंता वाटत असल्यास त्या गोष्टीची योग्य शहानिशा मनांतल्या मनांत करून त्याची विल्हेवाट लावण्याची संवय करावी. नुसती आडदांडपणानें दडपादडपी किंवा खोटी समजूत करून मनाची शांति ठेवता येणार नाहीं. अशा स्थितींत आपण प्रेमाच्या माणसाजवळ, किंवा आपल्या विश्वासांतील वैद्याजवळ सर्व गोष्टी स्पष्ट सांगून त्याचाहि विचार व सल्लामसलत घ्यावी.

सत्-संगति व सद्-विचार

'प्रत्येक मनुष्य चुकीस पात्र आहे' हें लक्षांत ठेवावें. अन्तर्मुख मन करून स्वतःचे दोष हुडकून ते काढून टाकण्याचा सतत प्रयत्न करीत रहावें. मनांत सुविचार येण्यासाठीं चांगल्या माणसांची संगत धरणें, व उत्तम उत्तम पुस्तकें वाचणें अगत्याचें आहे. दररोज थोडावेळ एकचित्त करून स्वस्थ बसण्याची सवय केल्यानें मनाला हुशारी वाटेल. हा प्रयोग प्रत्येकानें जरूर करावा.

आधार ग्रंथः—

(१) रोग विज्ञान-भाग २ रा- डॉ. भट.

(२) Text Book of medicinx —Russel Cecil.

(३) System of clinical medicine —Saville.

(४) General Psychology —Guilford

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उपयुक्त वैद्यक ग्रंथ

ॲलोपॅथिक औषधीसंग्रह	पं. जगन्नाथशास्त्री	६ रु.
कफक्षय व त्यावरील उपचाराची दिशा	डॉ. वा. कृ. जोशी	७ रु.
चिकित्सा-प्रभाकर	श्री. प्र. बा. ओगले	२० रु.
चारुचिकित्सा (हिंदी)	वै. गोपीनाथजी गुप्त	१॥ रु.
न्यायवैद्यक	डॉ. मा. पु. जोशी	८ रु.
कायापालट	डॉ. कृ. श्री. म्हसकर	६ रु.
प्रथमोपचार	डॉ. वा. वि. आठल्ये	१॥ रु.
नित्योपयोगी औषधें	वै. अ. वा. ऐनापुरे	२॥ रु.
नित्योपयोगी निवडक औषधें	श्री. म. गो. मोडक	१॥ रु.
बृहदासवारिष्टसंग्रह (पूर्वार्ध उत्तरार्ध) (हिंदी)	पं. कृष्णशास्त्री द्विवेदी	७ रु.
संमोहनशास्त्र	डॉ. मा. पु. जोशी	२॥ रु.
वनस्पतिप्रभाव	धन्वतरी	२॥ रु.
वैद्य-सन्मित्र (हिंदी)	वै. पां. वि. जायदे	२ रु.
वैद्यक स्वयंशिक्षक	वै. कशाळीकर	३ रु.
गृहवैद्य अथवा क्षार-चिकित्सा	डॉ. र. कृ. गर्दे	३ रु.
दंतरोगविज्ञान आणि चिकित्सा	वै. पां. वि. जायदे	३ रु.
विवेचनात्मक सूचिवेधपद्धति	वै. प्रभाकर मिश्र	५॥ रु.
राष्ट्रीय चिकित्सा सिद्धयोग-संग्रह	पं. रघुवीरप्रसाद द्विवेदी	१॥ रु.
सचित्र श्रवणपरीक्षायंत्र	डॉ. डी. ए. घाटगे	२। रु.
सचित्र उपनेत्र विज्ञान	वै. आ. द. घाटगे	१॥ रु.
स्टेथॉस्कोप व छातीची तपासणी	डॉ. वा. कृ. जोशी	६ रु.
सार्थ सुश्रुत	वै. द. ब. बोरकर	११ रु.
सिद्धौषधी प्रकाश	वै. गणेशशास्त्री जोशी	६ रु.
आयुर्वेदीय औषधी विज्ञान	वै. हिर्लेकरशास्त्री	२ रु.

वैद्यक ग्रंथ भांडार, आयुर्वेद सेवा संघ नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बिछाना भिजविण्याची संवय : लेखकः-बन्सीधर

बहुतेक मुलें अंथरुणांत मुततात.

लहानपणीं पुष्कळ मुलें अंथरुणांत मुततात. साधारण दोन वर्षांचें मूल मुतायला किंवा परसाकडेस जाण्यासंबंधीं सांगूं लागतें. परंतु कांहीं अशीं मुलें आढळतात कीं, तीं वयाच्या पंधरा-वीस वर्षांपर्यंत-सुद्धां बिछाना भिजवतात. त्यांना एक प्रकारचा आजार झालेला असतो.

परिणाम भोगावे लागतात

कांहीं मुलें फक्त रात्रीं बिछाना भिजवतात; कांहीं फक्त दिवसां बिछाना भिजवतात, तर कांहीं दिवसा व रात्रीं दोन्ही वेळां बिछाना भिजवतात. यांमध्यें कांहीं मुलें हें सुस्तीमुळें करतात, तर कांहीं अचेतन अवस्थेमुळें करतात.

कांहींहि असो, पण आईवडिलांनीं सावधानतेनें जर लक्ष दिलें तर मुलांची ही संवय लवकर सुटते. लक्ष जर दिलें नाहीं तर मात्र मुलांना कित्येक वर्षें-पर्यंत त्याचे परिणाम भोगावे लागतात.

मुलांवर होणारा परिणाम

(१) पुष्कळ वर्षेंपर्यंत अंथरुणांत मुतणारें मूल चिडचिडें व रागीट होतें.

(२) दांतांनीं नखें कुरतडूं लागतें.

(३) फार चटकन् रागावतें.

(४) आपल्यावर नियंत्रण ठेवूं शकत नाहीं.

(५) फार अस्ताव्यस्त व अव्यवस्थित राहतें.

(६) फार अस्थिर असतें, कोणत्याहि कामावर स्थिर होऊं शकत नाहीं, इकडेतिकडे भटकणें पसंत करतें.

संकोची वृत्ति वाढते

(७) अतिशय संकोची वृत्तीचें बनतें; इतकें कीं, कोणाहि समोर बोलणें किंवा येणें टाळतें.

याशिवाय आणखी सुद्धां कित्येक प्रकार या मुलांत असतात, तेव्हां आईवडिलांनीं कंटाळा न करतां सुरवातीलाच ही संवय सोडण्यासाठीं प्रयत्न करावा.

अंथरुणांत मुतण्याचीं कारणें

(१) कित्येक मुलांना पौष्टिक अन्न न मिळा-ल्यानें अथवा शारीरिक निर्बलतेमुळें ही संवय जडते. त्यांचा मूत्राशय इतका कमजोर असतो कीं, मुतण्याची क्रिया केव्हां झाली हें त्यांना कळतच नाहीं. स्नायूंच्या दुर्बलतेमुळें सुद्धां ही संवय जडते.

(२) जास्ती जेवण, जास्त खमंग पदार्थांचें सेवन, किंवा गोड पदार्थ जास्त खाणें, अपचन किंवा पोटांत कृमि झाले असले, झोंपण्यापूर्वीं जास्त पाणी किंवा जास्त दूध पिणें, तसेंच उताणें झोपलें तर मुलें बिछाना भिजवतात.

धमकी देऊं नये

(३) ज्या मुलाला वेळेवर मुतण्याची संवय लावली नसल किंवा सारखी सारखी आठवण केली जात असेल किंवा बिछाना न भिजण्याबद्दल धमकी दिली असेल, किंवा जें मूल मुतणें आळसानें दाबून धरीत असेल तें मूल बिछान्यांत मुतूं लागतें.

(४) मुलाला झोंपण्यासाठीं स्वतंत्र खोली दिलेली असेल व कांहीं कारणानें ती काढून घेण्यांत आली तरी ही संवय जडते.

(५) ज्या मुलावर वरचेवर जागा बदलण्याचा प्रसंग येतो, त्याच्या मूत्राशयावर ताण पडून त्याचा परिणाम बिछान्यांत मुतण्यांत होतो. युद्धकाळीं मुलांना निरनिराळ्या जागीं हलविण्यांत आलें होतें. तेव्हां बरींच मुलें बिछान्यांत मुतत असत. परंतु ज्या वेळीं त्यांना एके जागीं आणण्यांत आलें तेव्हां त्यांची ही संवय गेली.

फार सुस्त मुलें

(६) जीं मुलें काम करतां करतां, खेळतां खेळतां थकून जातात, किंवा ज्यांना पुरेशी विश्रांति मिळत नाहीं किंवा स्वस्थ झोंप लागत नाहीं किंवा फार सुस्त असतात त्यांना बिछान्यांत मुतण्याची संवय लागते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(७) शाळेची नवी सुरुवात करणें, घरांत सारखे पाहुणे येणें अथवा नवीन भाऊ बहीण घरांत होणें, किंवा लांबवर पर्यटनास जाणें, यांनीं मुलांचें मनावर फार ताण पडतो व त्यामुळें तीं बिछान्यांत मुतूं लागतात.

मनोविकाराचा परिणाम

(८) जें मूल एकदम रागावतें, किंवा जें खूप ईर्षा करणारे आहे, किंवा जें फार भित्रें आहे किंवा संकोची वृत्तीचें आहे किंवा एकदम व खूप हंसणारें आहे तें मूल बिछान्यांत मुतूं लागतें.

(९) जें मूल अधिक वेळ कल्पनातरंगांत घालवतें किंवा भीतिप्रद गोष्टी ऐकतें किंवा उत्तेजित करणाऱ्या गोष्टींचा अनुभव घेतें किंवा खूप सरकशी पाहातें, तें मूल बिछान्यांत मुतूं लागतें.

(१०) ज्या मुलाचा परीक्षेमध्यें नंबर वर येत नाहीं किंवा जो नापास होतो किंवा मंदबुद्धि आहे किंवा सर्वजण ज्याचेवर टीका करतात तें मूल बिछान्यांत मुतूं लागतें.

(११) ज्या मुलाला विनाकारण अपराधी समजलें जातें किंवा सर्वांच्या समोर ज्याचा अपमान होतो किंवा ज्याला सारखा धाकदपटशा दाखविला जातो किंवा सारखी शिक्षा केली जाते किंवा कठोर नियंत्रणांत ठेवलें जातें तें मूल बिछान्यांत मुतूं लागतें.

खूप लाड करणें

(१२) ज्या मुलामध्यें कांहीं कारणानें हीनगंड उत्पन्न झालेला असेल किंवा ज्याचा आत्मविश्वास नष्ट झालेला असेल असें मूल बिछान्यांत मुतूं लागतें.

(१३) ज्या मुलांचे एकदां खूप लाड केले गेले असतील व ज्यांना मन मानेल तें करण्यास मिळालें असेल, ज्यांची अनुचित मागणीसुद्धां पुरी केली गेली असेल अशांना कांहीं कारणानें हें मिळालें नाहीं तर तें मूल बिछान्यांत मुतूं लागतें.

(१४) ज्यांना मातापित्याचें प्रेम मिळत नाहीं किंवा ज्या घरांत आईबापांचें नेहमीं भांडण चालतें अशा घरांतील बालक भटकत राहतें, घाबरल्यासारखें असतें व याचा परिणाम मूत्राशयावर ताण बसणें हा होऊन, तें बिछान्यांत मुतूं लागतें.

आणखी बरींच कारणें

(१५) ज्या मुलाचा शारीरिक व मानसिक विकास झालेला नसतो अथवा ज्याचे सुरुवातीपासूनच संघर्षांत दिवस गेलेले असतील अथवा ज्या मुलाच्या ऊर्मि व इच्छा वाईट तऱ्हेनें कुसकरल्या गेल्या असतील अथवा ज्या मुलाला स्वतःचे विचार मोकळेपणानें प्रगट करतां येत नसतील अथवा ज्या मुलाला आपल्या सवंगड्यावरोबर खेळायला, त्यांना भेटायला मिळत नसेल किंवा ज्याला रात्रंदिवस ४ भिंतींच्या आंत राहावें लागत असेल तें मूल बिछान्यांत मुतूं लागतें.

बिछान्यात मुतण्याचीं कारणें आणखीं बरींच असूं शकतील, पण येथें जे प्रकार दिले आहेत ते मातापित्यांच्याकडून दूर होण्यासारखे आहेत.

ही संवय घालविण्याचे उपाय

ही संवय घालविण्यासाठीं प्रथम एकाद्या मानसशास्त्रज्ञास बालकाची पूर्ण तपासणी करण्यास सांगणें आणि नंतर त्यांच्या सांगण्याप्रमाणें वागणें. निरीक्षण करतांना एक ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, मुलाला कोणत्याहि प्रकारचा मानसिक त्रास होतां कामा नयेव पुष्कळ दिवस दवाखान्यांत राहण्याची वेळ येऊं नये.

आहार कसा असावा ?

(२) खाण्यासाठीं पचनाला हलकें, साधें फार मसाला नसलेलें, फार गोड नसलेलें असें समतोल जेवण द्यावें. मुलांना रात्रींचें जेवण सूर्यास्तापूर्वीं द्यावें.

(३) निजण्यापूर्वीं दूध अथवा पाणी अथवा कोणतेंहि द्रव पदार्थ पिण्यास देऊं नयेत. मात्र या बाबतींत मुलांची समजूत बरोबर करून दिली पाहिजे व त्यांना कारण पटविलें पाहिजे.

(४) मुलाला अपचन होणार नाहीं याकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे.

(५) रात्रीं झोंपण्यापूर्वीं त्याला मुतण्यास नेऊन आणून लगेंच झोंपवावें. त्याचप्रमाणें ३।४ तासानंतर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुन्हां त्याला चांगलें जागें करून मुतण्यास न्यावें. मुलाला कळलें पाहिजे कीं, याच कामाकरितां आपल्याला जागें केलें आहे. मुलाला उताणें झोपूं न देतां कोणत्याहि कुशीवर झोंपण्यास सांगावें.

गजराचें घड्याळ ठेवावें

[६] मुलाला स्वतंत्र व एके बाजूला झोंपवावें म्हणजे त्याला कोणी चिडवणार नाहीं. मूल मोठें असेल तर स्वतंत्र खोलींत झोंपवून त्याच्या अनुमतीनें एक गजराचें घड्याळ त्याच्या उशागतीं ठेवावें. म्हणजे गजर झाला कीं, तें मूल आपणहून उठून जाईल.

(७) मुलाला पाण्यांत व ओल्या मातींत भरपूर खेळूं द्यावें.

[८] मुलाला दिवसां भरपूर काम अथवा खेळूं द्यावें व रात्रीं शांत झोंपूं द्यावें. अतिश्रम पण करूं देऊं नयेत. त्याचप्रमाणें अति आळसानें पण बसूं देऊं नये.

[९] घरामध्यें मुलांच्या आवडीनुसार कांहीं आकर्षक खेळणी व चित्रें असावींत. मात्र त्यांपासून त्यांना भीति वाटतां कामा नये. कोणत्याहि दुर्घटनेची अगर दुःखी चित्रें असूं नयेत.

मनावर आघात करू नये

(१०) मुलाला एकाग्र व मोकळेपणानें खेळतां येईल अशी स्वतंत्र खेळण्याची सोय असावी. त्याच्या कामांत अथवा खेळांत आपण सारखे बदल करूं नयेत.

[११] मुलाला मोकळेपणानें आपले विचार मांडतां येतील असें वातावरण असावें. कोणत्याहि प्रकारचा हीनगंड उत्पन्न होऊं देऊं नये. त्याच्या कोमल मनावर आघात होईल असे प्रसंग येऊं देऊं नयेत. त्याच्या भावना उत्तेजित होतील किंवा तो एकदम चिडेल असेंहि कांहीं करूं नये.

[१२] मुलाला असें कधींहि भासवूं नये कीं बिछान्यांत मुतणें म्हणजे मोठा अपराध आहे आईबापांनीं या बाबतींत लक्ष द्यावें; पण फार चिंतेंत असूं नये. कारण त्यामुळें मुलाला काळजी वाटून त्यांचेवर ताण पडतो व त्याचा परिणाम म्हणजे तें बिछान्यांत मुतूं लागतें.

[१३] घरांतील वातावरण प्रसन्न आणि प्रफुल्लित असलें पाहिजे. घरांत भांडण-तंटे असूं नयेत. व एकमेक खेळीमेळीनें वागणारे पाहिजेत.

[१४] बालकाचा सर्वांगीण विकास होईल अशा [बालमंदिरासारख्या] वातावरणांत त्याला ठेवावें.

बक्षीस अगर शिक्षा नसावी

[१५] ही संवय जावी म्हणून चुकून सुद्धां बक्षिस, शिक्षा यांचा प्रयोग होतां कामा नये.

(१६) आठवड्यामध्यें किती वेळां बिछाना भिजवला त्याचा आलेख ठेवून प्रमाण कमी होत असेल तर त्याला ही संवय घालविण्याच्या दृष्टीनें प्रोत्साहन दिलें पाहिजे.

(१७) सर्वांत उत्तम उपाय म्हणजे ही संवय घालवितां येते याबद्दल मुलामध्यें आत्मविश्वास उत्पन्न करणें. त्यांच्यामध्यें अशी प्रेरणा केली पाहिजे कीं तो सहज यांतून मुक्त होऊं शकेल. ही संवय जाण्यास त्याला प्रयत्न केले पाहिजेत, हें त्याला नक्की माहीत असावें. आत्मविश्वास वाढला कीं ही संवय सुटण्यास नक्की मदत होईल. —शिक्षण पत्रिका

तारेचा पत्ताः-Newbottle
के. के. शहा अँड कंपनी
बाटल्यांचे व्यापारी
(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)
रिकाम्या बाटल्या, बुच, कॅपसुल्स्
[हेअर ऑईल, सरबत, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाचीं सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे
ठोक व किरकोळ
विक्री करणारे व्यापारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भिषग्विलास-योगविशेषांक

गुरुवर्य वै. पं. गंगाधरशास्त्री गुणे यांच्या तृतीय पुण्यतिथीनिमित्त प्रकाशित केलेला भिषग्विलासचा योगशास्त्र विशेषांक आमच्याकडे अभिप्रायार्थ आला आहे. योगशास्त्र विशेषांकाचा प्रथम भाग 'आरोग्यासनें' हा जानेवारींत प्रसिद्ध झाला आहे. गेलीं ४० वर्षे भिषग्विलास झीज सोसूनहि आपलें ज्ञानदानाचें कार्य अखंडपणें करीत आला आहे. आयुर्वेद सेवा संघाचें मुखपत्र म्हणूनहि १९३५ ते १९४६ पर्यंत तो प्रसिद्ध होत होता, हें सेवा संघाच्या परिचितांना माहीत आहेच.

या अंकांतील योगाचीं आठ अंगें, योगाभ्यास केव्हां, कोणी, व कां करावा हा श्री. कोल्हटकरांचा लेख योगाभ्यासू वाचकांना मार्गदर्शन करील असा विश्वास वाटतो. वैद्यक व वैद्यकीय व्यवसायांत प्रत्यही अनुभवास येणाऱ्या अनेक मानसिक समस्यांचा उलगडा योग व वैद्यक ह्या डॉ. संजीव विणेकर यांच्या लेखांत वाचकांना आढळून येईल. त्याचप्रमाणें ज्ञानप्राप्ति कशी होते ह्या संबंधींचा आयुर्वेद व पाश्चात्य वैद्यक शास्त्रानुसार केलेला तौलनिक विवेचनात्मक विचार 'योग व आयुर्वेद' ह्या वै. वि. दा. एकतारे ह्या लेखांत वाचावयास मिळतो.

याशिवाय कैवल्यधाम व स्वामी कुवलयानंद ह्यांच्या विषयींच्या माहितीनें योगशास्त्राविषयीं आस्था वाढून मनांत योगाच्या शास्त्रीय सिद्धीची नवीन आशा निर्माण होते. योगी अरविंदांचें चरित्र व शिकवण अनेक वाचकांस उद्बोधक व योगाभ्यासाची प्रेरणा देणारी आहे.

अशा रीतीनें हा योगशास्त्रविशेषांक योगविषयक साहित्यानें भरलेला व संग्राह्य असा झाला आहे. वाचक आपल्या योग व स्वास्थ्यविषयक ज्ञानांत भर घालण्यासाठीं त्याचा उपयोग करतील अशी आशा आहे. या योगविशेषांकाची किंमत २ रु. आहे

पत्ता:—भिषग्विलास कार्यालय, अहमदनगर वार्षिक वर्गणी ३ रु.

— आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारी —

आयुर्वेदिक व युनानी वनौषधि

तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण!

अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक खाका, माणिक, अकीक, सुवर्ण-वर्ख, रौप्य-वर्ख, शिंपा, कवड्या, शंख, प्रवाळ, आवळसार गंधक, दगडीबेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, वाकेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलटकंबल, नागकेशर (अस्सली), ब्राम्ही, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारची वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य! विशेष माहितीसाठीं आमचें साप्ताहिक दरांचें छापील भावपत्रक मागवावें.

टे. फो. नं. ३१७९६ टेलिग्रॅम-'आयुर्वेद'

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

.... आयुर्वेदीय ग्रंथांची अर्थनिश्चिति ....

(लेखकः—भिषग्वर्य गणपतराव पांडुरंग काळोखे, मुंबई)

आयुर्वेद पत्रिकेच्या ता. १ फेब्रुवारी १९५४ च्या अंकांत जबलपूरच्या विद्वद्वर्य वैद्य श्री. भिकाजी विनायक डेग्वेकरशास्त्री ह्यांचा 'आयुर्वेदीय ग्रंथ-पाठन पद्धति' ह्या शीर्षकाचा एक हिंदी लेख आला आहे. 'आयुर्वेदीय प्राचीन ग्रंथांत वापरल्या गेलेल्या प्रत्येक शब्दाचा एकच आणि विशिष्ट अर्थ भारतांत सर्वत्र निश्चित होणें आवश्यक आहे.' ह्या त्यांच्या मताशीं तर मी सहमत आहेच पण प्रथम 'अष्टांग-हृदय' ग्रंथांतील कित्येक ठिकाणांच्या सर्वसंमत अर्थाचा निर्णय करण्याकरितां एका विद्वत्परिषदेची योजना आखण्यांत यावी अशा बद्दलच्या त्यांच्या सूचनेचाहि मला मोठ्या उत्साहानें पुरस्कार करावासा वाटतो.

वैद्य डेग्वेकरांचा मनमोकळेपणा

गेल्या डिसेंबरांतील आयुर्वेद विद्वत्-परिषदे-समोर अध्यक्ष या नात्यानें केलेल्या भाषणांत त्यांनीं म्हटलें आहे कीं, 'आमचें शास्त्र जें कांहीं सांगतें तें आप्तवाक्य आहे. त्या वाक्यांतून सांगितले गेलेले शब्द आपल्या दृढ विश्वासाचें स्थान झालें पाहिजे. आयुर्वेदीय ग्रंथचतुष्टय हें आपल्या सात्विक श्रद्धेचा विषय आहे. त्यांतील प्रत्येक वाक्य सत्य आहे, असा आपला दृढविश्वास असला पाहिजे.' आणि त्यांनींच जेव्हां आज दोन महिन्यांच्या आंत हीं शंका-स्थानें अशीं जाहीर लोकांसमोर मांडलीं आहेत तेव्हां त्यांचा मनमोकळेपणा पाहून मला आनंद वाटला. मात्र ह्याच्याबरोबरच एक भीति वाटते ती एवढीच कीं, 'आम्हांला आमच्या गुरुंकडून जो आणि जसा समजला आहे तोच केवळ शुद्ध आयुर्वेद; आम्ही म्हणतो तोच त्याचा खरा अर्थ; आम्ही जी आणि जशी करितो तीच केवळ आयुर्वेदीय चिकित्सा; आणि आम्हांजवळ आहे त्या बाहेरचें ज्ञान म्हणजे आपल्या गुरुपरंपरागत शुद्धायुर्वेदाच्या ज्ञानांत भयंकर आणि अक्षम्य संकर' अशा सारख्या विचारांनीं झपाटलेल्या आमच्या कित्येक वैद्यांना वैद्य डेग्वेकरांचें हें मोकळे-पणाचें लिहिणें कसें रुचणार !

आयुर्वेद जिवंत ठेवण्याचा उपाय

जो जो मनुष्य कोणताहि आयुर्वेदीय ग्रंथ उघड्या डोळ्यांनीं वाचील त्याला वैद्य डेग्वेकरांना दिसल्या आहेत तशा शंका दिसणारच; शंकाच काय पण कित्येक ठिकाणीं उणीवाहि दिसतील; आणि त्या सर्वांचा तर्कशुद्ध पद्धतीनें आणि इतर प्रचलित शास्त्रांचा समन्वय लक्षांत घेऊन विचार करून एक-वाक्यता निर्णित करणें, ह्याच आयुर्वेद जिवंत ठेव-ण्याचा खरा उपाय आहे.

विचारणीय प्रश्नावली

भौगोलिक ज्ञान, पंचमहाभूतें, निदानस्थानां-तील उपशयाशीं होमिओपॅथीचा संबंध, भूतविद्येमध्यें राक्षसादि भूतें म्हणजे काय, ह्याचा विचार—इत्यादि बाबतींचा उल्लेख वैद्य डेग्वेकरांच्या विचारणीय प्रश्नावलींत पाहून आणि असल्या प्रकारच्या अनेक शंकास्थलांची यादी प्रसिद्ध करण्याबद्दलच्या वैद्य-बंधूंना केलेल्या सूचनेला मान देऊन मी श्री. डेग्वे-करांच्या अखिल भारतीय विद्वत्परिषदेचा मनापासून पुरस्कार करण्याकरितां प्रस्तुत लेख लिहीत आहे.

हें कार्य दोघाचौघांचें नाहीं

खरोखरीच ह्या असल्या शंका प्रत्येक वैद्याला असतील, आणि त्या दूर व्हाव्यात ही प्रत्येकाची इच्छाहि असेल; पण हें असलें कार्य दोनचार वैद्यांचें किंवा सरकारनें अमूक एका उद्देशानें नेमलेल्या एकाद्या समितीचें नाहीं. ही गोष्ट त्यांच्या अधिकाराच्या आणि शक्तीच्या बाहेरची आहे. दोन चार वैद्यांना किंवा एखाद्या समितीच्या सभासदांना ज्या विषयाचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आकलन नाहीं अशा विषयाचा एखाद्या वैद्यानें केलेला उल्लेख मुळींच समजणार नाहीं आणि ही आपली कांहीं तरी थट्टा केली आहे असें त्यांना वाटण्याचें आणि त्यामुळें असल्या सूचनांचा त्यांच्याकडून घड विचारच न होण्याचें भय असतें.

भारतीय विद्वत् परिषदेनें करावें

म्हणून अशा गोष्टी शक्य असल्यास अखिल भारतीय वैद्य विद्वत्परिषदेनें कराव्यात हें उत्तम; आणि हें जर शक्य नसलें तर ज्यांच्या स्वास्थ्याकरितां ह्या गोष्टी करावयाच्या त्या लोकांच्या मताचें प्रतीक असें जें सरकार त्यानें त्या बाबतींत कायदा करूनहि हें करतां येण्यासारखें आहे. हा मार्गहि मी एके ठिकाणीं सुचविला होता. पण जो मार्ग शक्य किंवा सुलभ असेल तो पत्करतां येईल. मुख्य गोष्ट म्हणजे वैद्य डेग्वेकर म्हणतात त्याप्रमाणें अर्थनिश्चिति. ही गोष्ट झालीच पाहिजे; आणि ह्याकरितां सत्य वस्तूवर लक्ष ठेवून वैद्यबंधूंनीं 'आपण आपल्या शंका प्रसिद्ध केल्या तर आपलें अज्ञान प्रकट होईल कीं!' असली भ्रामक समजूत दूर सारून ही आपली जबाबदारी पार पाडावी, अशी माझीहि सर्व वैद्यबंधूंस आग्रहाची विनंति आहे.

माझ्या कांहीं शंका

जेव्हां परिषदेच्या ह्या विचाराला मूर्त स्वरूप येण्यास प्रारंभ होईल तेव्हां माझ्या शंका मी विस्तारानें सांगेन. परवां कांहीं विद्यार्थ्यांना कांहीं भाग समजावून सांगतांना एक दोन गोष्टी पुन्हा लक्षांत आल्या, त्या येथें देत आहे.

(१) समस्थूलकृशा भक्तमध्यांतप्रथमांबुपाः। (वा. सू. अ. ५) यांतील समस्थूलकृशता कशी होऊं शकते हें स्पष्ट झालें पाहिजे.

(२) स्थूलानां कर्शनाय च ॥ (वा. सू. अ. ५) ह्यांत तेऊ स्थूलांना कृश कसें करतें ह्याचें स्पष्टीकरण व्हावयास पाहिजे.

(३) पक्वाशयगतास्तत्र नाड्यो मूत्रवहास्तु याः।
तर्पयंति सदा मूत्रं सरितः सागरे यथा॥
सूक्ष्मत्वान्नोपलभ्यन्ते मुखान्यासां सहस्रशः।
नाडिभिरुपनीतस्य मूत्रस्यामाशयान्तरात्।
जाग्रतः स्वपतश्चैव स निःस्यन्देन पूर्यते॥
[सु. नि. ३]

ह्यांत सांगितलेल्या लघ्वीच्या उत्पत्तीचें खुलासेवार वर्णन मिळालें पाहिजे.

दैवी चिकित्सेचा विचार

(४) हर्षणाश्वासनैर्नित्य... प्रयोजयेत् ॥ (च. चि. अ. ८) ह्यांत जी दैवी चिकित्सा सांगितली आहे, तसेंच ठिकठिकाणीं अमूक रोग अमूक ग्रहाच्या अनिष्टतेमुळें होतात किंवा 'पूर्वजन्मकृतं पापं व्याधिरूपेण बाधते। इह जन्मनि' इत्यादि कर्मविपाकाचे सिद्धांत आणि 'मंत्रेणानेन पूतस्य (वाग्भट)' इत्यादि वचनांत सांगितल्याप्रमाणें ज्या मंत्रचिकित्सेचा उल्लेख वाग्भटादि ग्रंथांतून आहे त्या सर्वांचा सप्रयोग विचार होऊन निर्णय घेतला गेला पाहिजे.

शेवटीं ह्या आयुर्वेदीय शब्दांच्या एकवाक्यतेबद्दल हा स्पष्ट लेख लिहून या महत्त्वाच्या विषयाला योग्य चालना दिल्याबद्दल वै. डेग्वेकरांचें पुन्हां एकदां अभिनंदन करून हा लेख संपवितो.

आयुर्वेदीय तयार औषधें

वैद्यांनीं रोजच्या व्यवहारांत ताजी तयार आयुर्वेदीय मिश्रणें [टेबल मिक्श्चर्स] कोणतीं वापरावीत? (सरकारी दवाखान्यांतून अशी ॲलोपॅथिक मिश्रणें नेहमीं वापरलेलीं पहाण्यांत येतात.) वाचकांपैकीं कोणीं अशा औषधांचीं नांवें व कृति सुचवाव्यात.

माजलगांव —वै. वा. शं. देशपांडे

पुणें येथें
'आयुर्वेद सेवा संघ, नासिक' चीं
औषधें मिळण्याचें ठिकाण
किरण मेडिकल सर्व्हिस
नगरकर तालीम चौक, लक्ष्मीरोड, पुणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हळदीचे उपयुक्त औषधी प्रयोग

लेखक:— वैद्यरत्न अ. रा. मासोदकर आयुर्वेदविशारद, जरूड

हरिद्रा कटुकातिक्ता देहवर्णविधायका ॥
उष्णा रूक्षा शोधनी च स्त्रियाणां भूषणं मता ॥
कफं वातं रक्तदोषं कुष्ठं कंडुं प्रमेहकम् ॥
त्वग्दोषं च व्रणं शोफं पांडुरोगं कृमीन् विषम् ॥
पीनसं चारुचिं पित्तमपचीं चैव नाशयेत् ॥

अर्थ- हळद, तिखट, कडू, देहाचा वर्ण सुधारणारी (कांतिप्रद) उष्ण, रूक्ष, शोधन, स्त्रियांचें भूषण असून, कफ, वायु, रक्तदोष, कुष्ठ, कंडू, प्रमेह, त्वग्दोष, व्रण, सूज, पांडुरोग, कृमि, विष, पीनस, पित्त आणि अपचि यांचा नाश करते.

हळदीचे भेद

हळद, दारुहळद, आंबेहळद, असे ३ भेद आहेत. परंतु नित्य व्यवहारांत आपण खाण्याचे पदार्थांत उपयोग करतो, त्या हळदीचेच औषधी उपयोग आपणांस जाणून घ्यावयाचे आहेत. एवढें नित्य व्यवहारांत वापरलें जाणारें अत्यंत उपयोगी औषधी द्रव्य आपले जवळ असतांना आपण त्याविषयीं उदासीन राहणें चिकित्सक दृष्टीनें योग्य नाहीं.

आमचे धंद्यांत आम्ही खेडेगांवांतील रोग्यावर जो अनुभव घेतला तोच पत्रिकेच्या वाचकवर्गासमोर ठेवित आहोत.

कफज्वर, पडसें, श्वास यांवर

हळद व गूळ एकत्र करून गोळ्या कराव्या. हळदीचें चूर्ण तव्यावर किंचित् उष्ण होईपर्यंत परतावें व गूळ (एक वर्षाचा असल्यास उत्तम) गोळी होईइतपत घेऊन २ गुंजेच्या गोळ्या कराव्या. २ गुंजा ते ४ गुंजापर्यंत, गरम दुधाबरोबर देत जाव्या.

रासायनिक परीक्षण

हळद सर्व ठिकाणीं प्राप्त होणारी वनस्पती असून तिचें आधुनिक रीत्या विश्लेषण केलें असतांना अस्थिर तेल व स्थिर तेल सांपडतें. विशेष पिवळें तत्त्व सांपडते. त्यास Cureumin म्हणतात. आणि एकप्रकारची राळहि असते. (अनुभूतयोगमाला)

हरिद्राखंड

हळद ३२ तो. गाईचें तूप २४ तो. दूध ५१२ तो. साखर २०० तो. त्रिकटु, त्रिजात, वावडिंग, निशोत्तर, त्रिफळा, नागकेशर, नागरमोथा, हीं प्रत्येकीं ४ तो. पाक तयार करून सेवन करावा. २ आठवडे बरणींत भरून ठेवल्यानंतर उपयोग करावा. उत्तम प्रकारें रक्तशुद्ध होऊन विस्फोट, दाह, वगैरे बरें होऊन शरीराची कांति सुधारते. (पाकसंग्रह)

निशालोह

हळद, दारुहळद, त्रिफळा, कुटकी, लोहभस्म सर्व समभाग घेऊन चूर्ण तयार करून ठेवावें. मात्रा ५ ते २० गुंजपर्यंत गाईचें दुधाबरोबर. दिवसांतून २ वेळ. रोग:-पांडु, कामला, रक्ताल्पता, यकृताभिवृद्धि, उदर या विकारावर गोमूत्राबरोबर देणें.

बालरोगावर कोरफडीचे रसांत गोळ्या १ ते २ गुंजेच्या करून दिल्यास मुलांना हें औषध शरीरवृद्धि करितां अमृताप्रमाणें उपयोगी पडते. मुडदूस, जीर्णज्वर वगैरेवर हें अमृत आहे.

हरिद्रादि तैल (वृंदमाधव)

हळद, दारुहळद, जेष्ठमध, पिवळाचंदन, रक्तचंदन, पुंडरीक वृक्षांचीं पानें, मंजिष्ठ, कमलपुष्प पद्मकाष्ठ, केशर, कवठ, टेंभुरणीचीं फळें, पिंपरणी, वडाचीं पानें यांचा दुधांत कल्क करून याच कल्कानें तैल सिद्ध करावें. तें नित्य लावलें म्हणजे लांसे, वांग, तीळ, मुखदूषिका यांचा नाश होतो. व तोंड मनोहर होतें. स्नो वापरण्यापेक्षां हें शास्त्रीय तेल वापरल्यास कितीतरी फायदे होतील.

वरील तेलांत ४ भाग तेल व १६ भाग दूध घालून तेल सिद्ध करावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निशादितैल

हरिद्रा, गन्धक, प्रत्येकीं १ भाग, तेल ८ भाग घोतऱ्याचा रस ३२ भाग मिळवून तैलपाक करावा.

गुणः- कर्णरोग, कर्णशोथ, कर्णनाडीव्रण यावर उपयोग करावा.

हळद त्वचेवरील सूज नाहीशी करणारी आहे.

हरिद्रातैल (खवड्यावर)

हळद, दारुहळद, काडेचिराईत, हिरडा, बेहडा आवळकंठी, बाळंतनिंबाचा पाला, चंदन, यांचा कल्क तेलाच्या चतुर्थांश, तेलाचे चौपट पाणी घालून तैल सिद्ध करावें. खवडे बरे होऊन डोक्यांतील इतर प्रकारचे घाणेरडे फोड वगैरे बरे होतात.

हरिद्राचूर्ण

हळदीचें चूर्ण व गूळ समभाग घेऊन गोमूत्राबरोबर दिले असतां श्लीपद (१ वर्षाचे आंतील) बरा होतो. नायटेहि बरे होतात.

मूत्रमार्गांतील विकार

मूत्रमार्गांत होणारे व्रण, पूतिप्रमेह, यांवर आम्ही गुडूचीचा, संस्कारयुक्त हरिद्राचूर्ण घालून काढा देतो. जुनाट प्रमेह बरा होतो असा अनुभव आहे.

मूत्रांतील घाण पू, तंतुप्रमेह, मूत्रदाह, ठणका, जळजळ वगैरे करितां-त्रिफळा, गैरिक, हळद यांच्या काढ्यांत चंदनी तेल घालून मूत्रमार्गांत पिचकारी दिल्यानें लघवींतून होणारी जळजळ, थेंबथेंब होणारी लघवी, लघवींतून जाणारा पू बाहेर पडून प्रमेह बरा होण्यास मदत होते. परमा रोग्यास या प्रयोगानें परिणामकारक गुण होतो.

यकृत्-विकारांत

यकृताभिवृद्धि व प्लीहाभिवृद्धीत-यकृताचें कार्य चालू करण्यास ताम्राबरोबर संस्कारित हरिद्राचूर्णानें अत्यंत कष्टसाध्य रोगी बरे होतात.

पांडुरोगांत

मंडूरभस्म २गुं. कपर्दिकभस्म २ गुं., शंखभस्म २गुं. संस्कारयुक्त निशाचूर्ण घालून पुनर्नवासवाबरोबर दिल्यानें हस्तपादशोथयुक्त पांडु बरा होतो.

मात्रा २ते४ गुंजा.

अनियमित आर्तव, कष्टार्तव, अत्यार्तव

केळीचे क्षाराबरोबर हळदचूर्ण मिश्रण करून दिल्यास आर्तवशुद्धि होते. मात्रा कदलीक्षार ४ गुंजा, तेवढेंच शुद्ध संस्कारित हळदीचें चूर्ण घालून तुपा-बरोबर द्यावें. वर अशोकारिष्ट द्यावें. हें औषध पाळीचे वेळीं दिल्यास, होणारा त्रास कमी होतो.

आर्तवशुद्धिकारक न्यग्रोधादि काढ्याचाहि उपयोग अशावेळीं होतो.

लहान मुलांना-कफविकारांत- कोरडा खोकला, न्यूमोनियाचे वेळीं दोन्ही फुप्फुसांत सांचलेला कफ पातळ करून छाती मोकळी होऊन श्वासोच्छ्वास घेण्यास, हळकुंड कोरफडीचे रसांत उगाळून टंकणलाही घालून वारंवार चाटण द्यावें. अगदीं अनुभवी आहे. मात्र कोरफडीचें पान गरम राखेंत भाजून नंतर रस काढून त्यांत हळकुंड टंकणलाही मिश्रण करून द्यावें. (भिषक्-भुवन पहा.) मुलांचे कफविकार बरे होतात.

सुधारून वाढविलेली नवीन आवृत्ति,
वैद्य, विद्यार्थी व सामान्य लोक यांस अत्यंत उपयोगी. सुलभ रीतीनें रोगांची माहिती व उपचार सांगणारें पुस्तक.
किं.६ रु. सिद्धौषधि प्रकाश पो. ख. नि.
(लेखकः-वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी)
पुस्तक मिळण्याचीं ठिकाणें:- (१) श्री. द. वा. शेंड्ये २८ शुक्रवार, पुणें २ (२) आयुर्वेदीय औषधी भांडार, २५५ गिरगांव, मुंबई ४ (३) वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

पाचोरें येथील विक्रीकेंद्र
श्री गजानन स्टोअर्स, पाचोरें (पू. खा.) यांचेकडे आयुर्वेद सेवा संघ, औषधीभवनांत तयार झालेलीं सर्व औषधें मिळतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हळदीचे विविध उपयोग

१ हळद वरून त्वचेला कांति देणारी, जीवाणुहर, व शोथनाशक आहे.

२ अंतःप्रयोग - दीपक, आध्मानहर, यकृच्छोधक, रक्तशोधक आहे. हळद त्वचेवरील सूज नाहींशी करते. आघातजन्यशोथ, एखादा अवयव दुखावून मुचकले किंवा लचक भरली तर हळदचूर्णांत थोडा चूना मिळवून पाणी टाकून गरम करून कपड्यावर मलमाप्रमाणें लावून कोमट कोमट असतांना बांधावा. आयोडीनप्रमाणेंच उपयोग होतो.

३ क्षत किंवा सद्योव्रणजन्य सुजेवर हरिद्राव तूप गरम करून स्वच्छ कपड्यावर बांधावे.

४ एखाद ठिकाणची वेदना शमन करण्यास लसुणाच्या स्वरसांत हळद मिळवून लावावी.

५ २० पट पाण्यांत हळद उकळून तें पाणी कोमट असतांना कपडा भिजवून त्यानें डोळे शेकावे.

६ हरिद्रा तेल कोमट करून त्याचें किंवा निशातेलाचे कोमट कोमट बिंदू टाकल्यास कर्णशूल थांबतो.

७ जळते निखारे घेऊन त्यावर हळद चूर्ण टाकून नाकानें धूर ओढावा. पडसें दूर होते.

८ नाकांतून द्रव वाहून नाकाची सूज बरी होते. यावर मोठें पथ्य म्हणजे कांहीं तासपर्यंत कोणचाच द्रव पदार्थ पिऊ नये.

८ गुदशोथ, अर्श- हळदचूर्ण, कणीक, लसूण स्वरस आणि अळशी तेल एकत्र करून पोटीस बांधावें. अर्शाचे मोडांना हळदचूर्णाचा धूर द्यावा. सूज नाहींशी होते.

९ त्वचा व डोके यावर होणारे फोड, कंडयुक्त त्वग्रोगावर हरिद्रा वाटून लावावी किंवा द्विहरिद्रा तेल लावावे.

१० तोंडावर होणारे मुरुम (तारुण्यपिटिका), तीळ, व्यंग या विकारावर हरिद्रातेल मर्दन करावें.

११ दम्याचा व कफाचा जोर कमी होण्यास हळद व ओव्याची धुरी घ्यावी.

१२ जळत्या जखमेवर चिकटल्यास तिचे तोंडावर हळदचूर्ण टाकावें. लवकर जळू सुटते.

१३ त्वचारोगावर- यावर पोटांत हरिद्राखंड वापरावा.

१४ मसूरिका हलक्या येण्यास हळद व चिंचोका थंड पाण्यांत उगाळून घुटी द्यावी.

१५ मसूरिकाचे साथींत हळदीचा उपयोग केल्यानें या रोगाचें साथीचें भय कमी होते.

१६ पांडु, कामला यांत निशालोहाचा उत्तम उपयोग होतो.

१७ मधुमेहावरहि हरिद्राचूर्ण प्रभावशाली आहे. त्रिफला क्वाथांत हरिद्रा घालून दिल्यास फार फायदा होतो. इतकेंच नव्हे तर नित्य हरिद्रासेवन करणाऱ्यांत मधुमेह कमी आढळतो.

विद्यार्थीदशेंत चारित्र्याचा पाया

"विद्यार्थ्यांनीं विद्यार्थीदशेंत चारित्र्याचा पाया घालावा आणि शिस्त अंगीं बाणवावी त्यामुळें त्यांना जीवनाच्या लढ्यास यशस्वीपणें तोंड देतां येईल" अशा आशयाचे उद्गार मुंबई सरकारचे अर्थ, दारूबंदी आणि उद्योगधंदे खात्यांचे मंत्री डॉ. जीवराज मेहता यांनीं मुंबईंत स्टूडन्टस प्रोग्रेसिव्ह ग्रूपच्या वार्षिक दिनाच्या समारंभाचेवेळीं अध्यक्षस्थानावरून भाषण करतांना काढले.

नागपूर येथें

' आयुर्वेद सेवा संघाचीं ' सर्व प्रकारचीं गुणकारी औषधें मिळण्याचें

एकमेव ठिकाण-

श्री. माधवराव परांडे

आयुर्वेदीय औषधांचे व्यापारी

महाल रोड, नागपूर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोन महत्वाचे लेख

या अंकांत 'बिछाना भिजविण्याची संवय' व हळदीचे उपयुक्त औषधी उपयोग' हे दोन लेख विशेष उद्देशानें जवळजवळ छापले आहेत. बाल वय हें कफप्रधान असतें (स्निग्धा एव सदा बालाः घृत-क्षीरनिषेवणात्). त्यापैकीं जीं कफप्रकृतीचीं मुलें असतात त्यांना सर्दी, पडसें, छातींत कफ (दमा खोकला),अंगांत चरबी वाढणें (वाळवे) अगर लघवी पुष्कळ होणें इत्यादि पैकीं कांहीं ना कांहीं होणें शक्य असतें.'अंथरुणांत लघवी होणें' हा कफदोषाचा कफप्रकृति बालकांना (अगर मोठ्यांनासुद्धां) होणारा रोग आहे. हें जाणून त्या व्यक्तीच्या आहार-पेय-विहार-निद्रा इत्यादि गोष्टी ठरविल्या पाहिजेत. त्यांना वात अगर पित्त प्रकृतीच्या व्यक्तीप्रमाणें आहार-विहार ठेवून चालत नाहीं असा अनुभव आहे.

आईचें दूध कफकारक व मूत्रकारक

आईचें दूध कफदोषकारक असेल तर मुलाला कितीहि औषधें दिलीं तरी गुण तात्पुरताच दिसेल. त्याच्या पिण्यांतील दूध, साखर, चहा,कॉफी हीं द्रव्यें सुद्धां मूत्रवृद्धिकारकच आहेत. सबब अशा मुलांना द्यावयाच्या वस्तु (आहार व पेयें) या कफदोषनाशक द्रव्यांनीं संस्कृत करूनच दिल्या पाहिजेत. अन्नापासून मूत्र जास्त बनणें हें एक प्रकारचें अपचनच आहे. हें पचन सुधारण्यासाठीं उपयोगी पडणाऱ्या वस्तूंत 'हळद' हें प्रधान द्रव्य आहे.

हळदीचे ग्रंथोक्त गुणधर्म

अष्टांगहृदयांत सूत्रस्थान १५ व्या अध्यायांत हरिद्रादि गण स्वतंत्र दिला आहे. व त्याचे गुणधर्म आमपाचन, मेदोदोषहरण, कफदोषनाशन, आढ्यवात (ऊरुस्तंभ) नाशक व दुधाचे दोष घालविणें हें आहेत. अंथरुणांत मुतणाऱ्या लहान अगर मोठ्या मुलांना रोजच्या सर्व कफकारक आहार व पेय द्रव्या-बरोबर अल्प प्रमाणांत हळद सुरू केली तर ती संवय जाते असा अनुभव आहे.

एका ७ वर्षे वयाच्या मुलीला अंथरुणांत मुतण्याची संवय होती. ती जाण्यासाठीं तिच्या पाल-कांना पुढील उपाय सांगितला व तो त्यांनीं केला. सर्वांसाठीं बनणाऱ्या प्रत्येक आहार व पेय पदार्थांत हळद वापरावयाची. तेल कमी घालून फोडणीचा भात करावयाचा अगर साध्या भातांत शिजतांना हळद टाकावयाची. भाकरी पोळींतहि हळद घालावयाची, ताकांत हळद घालावयाची अगर कढी बनवावयाची. हें पातळ ताक हेंच पेय म्हणून वापरावयाचें. असें करण्यानें १ महिन्याच्या आंत त्या मुलींची ती संवय (खोड) गेली. व पुनः उद्भवली नाहीं.

" कफमेदःप्रसादात् वृक्कौ " मूत्रपिंड हा अवयव कफदोष व मेदोधातु यांच्या प्राधान्यानें बनलेला आहे. शरीरांतील कफदोष व मेदोधातूचा स्वभाव बदलण्याचें कार्य हळद करते. हळदीसारखी आणखीहि पुष्कळ द्रव्यें आहेत;पण हळद सर्वत्र सहज उपलब्ध आहे. वैद्य मासोदकर यांनीं लेखांत म्हटल्या-प्रमाणें ती हळदीच्याच स्वरसाच्या भावना देऊन संस्कारयुक्त (संस्कृत) केली तर गुण अधिकच येईल. हळद संस्कृत कशी करावी हे पत्रिकेच्या मागील अंकांत आलें आहे.

हा मानसिक विकार नव्हे

प्रमेह चिकित्सेंतील हळद हें प्रमुख द्रव्य आहे (धात्रीरसप्लुतां प्राह्णे हरिद्रां माक्षिकान्विताम्। वाग्भट चिकित्सा अ. १५ श्लोक ५). प्रमेह कां होतो याची कारणें जाणून तीं जीवनांतून वर्ज केलीं पाहिजेत. निदान-परिवर्जन हें रोगहरणाचें प्रमुख सूत्र आहे. फार वेळ बसून राहणें,फार वेळ झोपणें, दूध, मांसरस, नवीन धान्यें- फळें खाणें, गूळसाखरेचे पदार्थ खाणें, हीं लघवी जास्त होण्याचीं कारणें आहेत. तीं टाळलीं पाहिजेत. व आहारांतील प्रत्येक गोड पदार्थांबरोबर (भातसुद्धां) हळद, मोहरी वापरली पाहिजे. म्हणजे बिछाना भिजविण्याची संवय हटकून मोडेल. त्या विकाराचा आज वाटतो तसा बाऊ वाटणार नाहीं.

—बिंदुमाधव पंडित

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पं. सातवळेकरजींचें आदर्श जीवन

पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर यांचें "स्वाध्याय मंडळ" हें त्यांच्या कार्याचें मूर्त प्रतिक आहे. आज ८६ वर्षांच्या वयांतहि त्यांच्या अंगीं असलेला उत्साह पाहून आश्चर्य वाटतें. म. गांधीजींनीं एकदां पंडितजींचा "आपके प्रचार कार्यपर मैं तो हमेशा मुग्ध रहा हूं!" या शब्दांत गौरव केला होता. वैदिक वाङ्मयाचें संशोधन व प्रकाशन हें त्यांचें जीवनकार्य आहे. त्यांच्याकडे पाहिलें म्हणजे हा वेद-कालांतील कोणी ऋषि पुन्हां अवतरला असें वाटतें.

संस्कृत व राष्ट्रभाषा प्रचार

वयाच्या २२ व्या वर्षी त्यांनीं सावंतवाडी गांव सोडलें आणि तेव्हांपासून मुंबई, हैद्राबाद, लाहोर, औंध या भागांत ते फिरले आहेत. त्यांचा अनुभव समृद्ध आहे. त्यांची विद्वत्ता निर्विवाद आहे. संस्कृत सोप्या रीतीनें शिकविणारीं त्यांचीं "संस्कृत स्वयं-शिक्षक" हीं पुस्तकें अत्यंत लोकप्रिय झालीं आहेत. राष्ट्रभाषेचा त्यांनीं केलेला प्रचार इतका मोठा आहे कीं त्यासाठीं अ. भा. राष्ट्रभाषा संमेलनानें त्यांना १५०१ रु. चा "महात्मा गांधी पुरस्कार" दिला.

योगव्यायाम व वेदाध्ययन

लोकांच्या दृष्टीनें असें रूक्ष आयुष्य जगणारे पंडितजी उत्कृष्ट चित्रकार आहेत. पारडी (जि. सुरत) येथें त्यांनीं शारीरिक कार्यक्षमतेसाठीं योगव्यायाम आणि मानसिक उन्नतीसाठीं वेदाध्ययन हे जातपात, वर्ण आणि धर्म यांचा भेदाभेद न मानतां सर्वसाधारण जनतेला शिकविण्यासाठीं "वेदमंदिर" बांधलें आहे. हें मंदिर पंडितजींच्या जीवन-ध्येयाचें सुफल आहे.

पंडितजींचें अलौकिक कार्य

पांच वर्षांपूर्वीं पंडितजींचें पारडी (गुजरात) या गांवांत आगमन झालें. एका पाश्चिमात्य महान् व्यक्तीनें म्हटलें आहे कीं, "I came, I saw, I conquered." पारडींत यांच्यासाठीं हेच शब्द योग्य आहेत. तेथें आल्याबरोबरच त्यांनीं आपल्या अनोख्या व्यक्तिमत्वानें सर्वांवर छाप पाडली. त्यांची शांत मूर्ति सर्वांना आपलेसें करते आणि त्यांच्या पहिल्याच भेटीच्या वेळीं त्यांच्या विषयीं पूज्यभाव उत्पन्न करते. त्यांचें जीवन एक बोधपाठ आहे. सात्विक आणि आशावादी जीवनाचा मन, बुद्धि आणि शरीर यांवर कसा परिणाम होऊं शकतो याचा पंडितजी हे प्रत्यक्ष दृष्टांत आहेत. तरुण वृद्ध (युवान् बुड्ढा) असे हे ८० व्या वर्षी स्वतःची संस्था औंध-संस्थानांतून पूर्णत्वानें पारडीच्या त्या आम्रवाटिकेंत आणतात आणि आपल्या जीवनाचें एक नवें आणि अनोखें प्रकरण सुरूं करतात. आज ८६ व्या वर्षींहि हें आपणास वृद्ध झालों आहोंत हें समजण्यास अथवा म्हणवण्यास हरकत घेत आहेत. ताठ देहयष्टी, दैदिप्य-मान् मुख, बुद्धीची तेजस्विता, बुलंद आणि निनाद-युक्त वाणीप्रवाह, अगाध कर्मशक्ति, अपार उमेद आणि अनन्त आशा यांनीं भरलेली जीवनदृष्टि ही सर्व त्यांच्या अखंड यौवनाचे पुरावे आहेत. त्यांच्या वयाला ८६ वर्षें झालींत, पण हे १२५ वर्षें जगावे अशी इच्छा करतात.

दैवगति न्यारी आहे. पंडितजींनीं आपलें पूर्व-आयुष्य एक यशस्वी चित्रकार म्हणून सुरूं केलें. एक वेळच्या भौतिक कलाकाराचें एका आध्यात्मिक कलाकारांत आज परिवर्तन झालें आहे.

संसारांत पडण्यापूर्वींच वेदाध्ययन

गीता आणि उपनिषदें यांचें अध्ययन केवळ वृद्ध आणि विरक्त माणसांनींच न करतां संसारांत पडण्यापूर्वींच सर्वांनीं या ग्रंथांचा मननपूर्वक अभ्यास केला तर अधिक फायदा मिळेल. संसाराची जबाबदारी स्वीकारण्यापूर्वीं मनुष्याला ब्रह्मज्ञान होणें अत्यंत आव-श्यक आहे; कारण यामुळेंच आपणांस आदर्श जीवन जगतां येईल, असा पंडितजींचा सिद्धांत आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'हा संसार दुःखमय आहे,' हा विचार आजपर्यंत आपल्यांत दृढ झालेला आहे. 'हें जग स्वर्ग आहे आणि मनुष्य मनांत आणील तर तो येथेंच स्वर्ग निर्माण करूं शकेल' असें पंडितजी मानतात.

संस्कृत स्वयं-शिक्षक

संस्कृत म्हणजे संस्कृतीची भाषा-हिलाच पुष्कळ जण मातृभाषा म्हणतात. एके काळची बहुजन समाजाची भाषा, कालांतरानें आज प्रगाढ अशा विद्वानांचीच भाषा झाली आहे. आणि यामुळेंच संस्कृतांतील विशाल आणि अमूल्य ज्ञानभांडाराला आम जनता मुकली आहे. पंडितजींनीं संस्कृत भाषेचा उद्धार करण्यासाठीं कमर कसली आहे; आणि ही भाषा सुलभतेनें समजूं शकेल आणि शिकतांहि येईल म्हणून "संस्कृत स्वयं शिक्षक" ची योजना आंखली आणि संस्कृतच्या परीक्षांसाठीं प्रबंध केला आहे. संस्कृत प्रचारासाठीं जी योजना आंखली आहे तिचा अखिल भारतवर्षांत ४०० केन्द्रें लाभ घेत आहेत. चालू वर्षी जवळ जवळ ११००० विद्यार्थ्यांनीं आनंदाश्रमाच्या संस्कृत परीक्षांचा लाभ घेतला आहे.

कार्यक्षम देहाची आवश्यकता

आदर्श मनुष्यजीवन होण्यास उच्च संस्कारयुक्त व्यवहारशुद्ध जीवन तर आवश्यक आहेच, पण त्याहिपेक्षां कार्यक्षम देहमंदिराचीहि अत्यन्त जरूरी आहे. सध्यां आपलें शरीरसौष्ठव नाहींसें झालेलें आहे. पंडितजींच्यासारख्या प्रखर संस्कृति-प्रचारकाला ही गोष्ट फार दिवसांपासून बोंचत होती आणि त्यांनीं कित्येक वर्षांपासून यौगिक व्यायाम आणि सूर्यनमस्कार यांच्या प्रचाराचे आपल्या या राष्ट्रीय आपत्तीच्या निवारणासाठीं प्रयत्न चालविले आहेत.

"धर्मसेवा कर"

सत्कार समारंभांत उत्तरादाखल भाषण करतांना पं सातवळेकरजी म्हणाले:—

मी चित्रकलेवर बडा श्रीमन्त झालो असतो, परन्तु मला अंतःसंदेश मिळाला कीं, " हे ब्राह्मण पुत्रा, धर्मसेवा कर. " आणि आज मी ती सेवा करीत आहे. अजूनहि पूर्वायुष्यांतील चित्रकारांचा धंदा आज परत मी सुरूं करीन, तर हवी तेवढी कमाई करूं शकेन; परन्तु जेव्हां भारतांत सर्वदूर प्राचीन धर्म व संस्कृतीबद्दल निराशा व दैन्यपूर्ण वातावरण पसरलें आहे, अशा वेळीं दुसऱ्याची नाकतोंडें काढून उपजीविका करण्याच्या त्या धंद्याला धिक्कार असो! दारिद्र्य पत्करीन, परन्तु या वेदवाङ्मयाचा प्रसार करीन, असा निश्चय करून मी स्वाध्याय मंडळाच्या कार्यास सुरवात केली.

सर्व इंद्रियांची वृद्धापकाळीं शक्ति क्षीण झाल्यावर वेद, उपनिषदें आदींचें पठण व मनन करावें हा समज अत्यंत घातक आहे. ब्रह्मचर्यकाळींच वेदवाङ्मयाच्या पठणानें, मननानें दीर्घ जीवन, सुप्रजा व निरोगी जीवन निर्माण होऊं शकतें. जीवन असार आहे, सर्व नष्ट होणार आहे वगैरे निराशेचे विचार सोडून " अहं इन्द्रो न पराजिग्ये " मी अजेय आहे, मी पाहिजे तें सत्कृत्य करूं शकतो. अशा मंत्राच्या सतत उद्घोषानें १००-१२५ वर्षेपर्यंत दीर्घजीवन

साँड
डायाबेटॉल
मधुमेहावर अप्रतिम.
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई.

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स-
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जगून माणूस फार मोठें कार्य करूं शकेल. भारतांत आज भावात्मक(Positive) विचार निर्माण होण्याची आवश्यकता आहे. ”

आश्चर्यकारक पाठांतर प्रयोग

मॅक्समुल्लरनें संपादित केलेल्या वेद-वाङ्म-यांतील एक पाठ चुकीचा आहे, असें प्रतिज्ञेवर सांग-णाऱ्या श्री. सखारामशास्त्री येडुरकर यांच्या वेद-मंत्राच्या पाठांतराचे व स्मरणशक्तीचे पारडी येथील प्रयोग पाहून सर्वजण आश्चर्यानें थक्क झाले. अकरा हजार श्लोकांतील केवळ क्रमांक सांगितल्यावर बरोबर तो श्लोक म्हणणें, निरानिराळ्या सूक्तांतील श्लोक उलटे सुलटे म्हणणें अशा तऱ्हेचे प्रयोग पाहून व वेदविद्येची महत्ता जाणून कोणीहि नम्र न झाल्यास तरच नवल !

जगांतील प्रमुख रोगांचें औषध

पारडी येथील एक सज्जन श्री. गुलाभाई देसाई यांनीं [जगतांतील प्रमुख रोगाचें औषध स्वाध्याय मंडळाचे द्वारां पंडित सातवळेकर यांनीं शोधून काढलें आहे अशा गौरवपूर्ण उल्लेख करून] पंडिजींचें अभिनंदन केलें त्यांच्या भावी कार्यांत सुयश चिंतलें.

आपल्या अध्यक्षीय भाषणांत ना. मंत्री श्री. दिनकरराव देसाई म्हणाले, “ आज वेदमंदिराचें उद्घाटन करतांना मला अत्यानंद होत आहे. येथें पवित्र मानवधर्माचा प्रचार करण्यांत येईल, तसेंच येथें सकाळीं येणाऱ्यांना शारीरिक व्यायाम शिकविण्यांत येतील आणि सायंकाळीं मानसिक विकासासाठीं प्रव-चनें होतील.

समाजांत निर्माण झालेल्या विकृति

आपल्या दुर्दैवानें आपला हा कमनशिबी भारत-देश पुष्कळ काळ परकीयांचा ताबेदार राहिल्यामुळें आपल्या समाजांत कित्येक विकृति निर्माण झाल्या आहेत. यांतील मुख्य विकृति म्हणजे स्वतःवरील अविश्वास. जो देश फार काळ गुलामींत राहिला तेथील जनतेंतील आत्मविश्वास नष्ट झाला हें स्वाभा-विक आहे. यामुळेंच आपली संस्कृति, आपला धर्म आणि आपल्या प्राचीन विद्या याबाबतींत मोठा अनादर निर्माण झाला आहे.

दारिद्र्यांत राहून विद्यांचें जतन

कांहीं विद्वानांनीं व थोर पुरुषांनीं कोणत्याहि पारितोषकाची इच्छा न करतां केवळ विद्येचें संरक्षण करणें हेंच आमचें जन्मध्येय आहे असें मानून स्वतः अत्यंत दारिद्र्यांत राहूनहि आपल्या वेदादि विद्यांचें हें जतन करून ठेवलें म्हणूनच त्या आतांपर्यंत राहूं शकल्या आहेत. या भारतीय विद्वानांनीं ज्या प्रमाणें आपल्या भारतीय विद्यांचें हें जतन केलें तसें, दुसऱ्या कोणत्याहि देशांतील विद्वानांनीं केलें असेल, असे वाटत नाहीं. म्हणून आम्हीं या भारतीय विद्वानांचें अत्यंत ऋणी असलें पाहिजे. मुंबई सरकार अशा विद्वानांना साहाय्य करण्यास सिद्ध आहे.

आत्मविश्वास निर्माण केला पाहिजे

परदेशी इंग्रजी भाषा हें शिक्षणाचें माध्यम असूं नये. या सरकारच्या धोरणावर झालेली जबाबदार माणसांची प्रतिक्रिया पाहिली व इंग्रजीवर अवलंबून राहण्याची प्रवृत्ति पाहिली म्हणजे आपल्यांत निर्माण झालेली आत्मविश्वासशून्यता व विकृत मनोदशा यांची कल्पना येते. हा आत्मविश्वास जनतेंत हळूं हळूं परत निर्माण करावा लागेल. याबाबतींत ज्याप्रमाणें सर-कारनें प्रयत्न केला पाहिजे, त्याचप्रमाणें लोकांच्या प्रतिनिधींनींहि करणें आवश्यक आहे. कारण आत्म-विश्वास निर्माण झाला नाहीं तर राष्ट्राची उन्नति होणें अशक्य आहे. ”

अनेक ग्राहकांच्या सूचनेवरून
परतवाडा येथें आयुर्वेद सेवा संघ नासिकचीं
सर्व अनुभविक व गुणकारी औषधें
मिळण्याची सोय आम्हीं केली आहे.
श्री समर्थ स्टोअर्स
परतवाडा (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्री. डॉ. जीवराजांच्या शब्दांत 'शुद्ध आयुर्वेद'

अंदाजपत्रकावरील अर्थमंत्र्यांचें भाषण

"आयुर्वेदाला उत्तेजन देण्यासाठीं सरकार अलिकडे कांहीं वर्षांत योग्य ती उपाययोजना करीत असून या कामासाठीं एका खास अधिकाऱ्याच्या नेमणुकीला मंजुरी देण्यांत आली आहे. प्रथम एक वर्षपर्यंत या अधिकाऱ्यांना सर्जन जनरलच्या नियंत्रणाखालीं काम करावें लागणार असलें तरी त्यानंतर संपूर्णपणें स्वतंत्ररीत्या त्यांना काम करतां येईल.

संशोधन कार्यासाठीं स्वतंत्र बिछाने

अहमदाबाद, पुणें आणि बडोदें येथील टीचिंग हॉस्पिटलांतून आयुर्वेदाच्या संशोधन कार्यासाठीं बिछान्याची तरतुद करतां यावी म्हणून अंदाजपत्रकांत खर्चाची तरतूद करण्यांत आली आहे. मुंबईमध्यें अशा तऱ्हेच्या संशोधनाची सोय यापूर्वींच करण्यांत आली आहे. याशिवाय सरकारनें चालविलेल्या आयुर्वेदिक हॉस्पिटलांतून व सरकारी मदतीनें चालणाऱ्या खाजगी हॉस्पिटलांतूनहि आयुर्वेदाबाबतचें संशोधन कार्य चालूच आहे.

कुष्ठरोगावर आयुर्वेदीय उपचार

आयुर्वेदाचें शिक्षण देणाऱ्या पांच शाळांना आणि कॉलेजांना आवर्तक व अनावर्तक स्वरूपाच्या ग्रँट देण्यांत येतात. ॲलोपॅथिक हॉस्पिटलांतून खास आयुर्वेदिक औषधांचा उपयोग करण्याची सोय आम्ही केली असून कुष्ठरोगांवर खास औषधोपचार करण्याबाबतहि प्रयोग करण्यांत येत आहेत. सरकारी मदतीनें चालविण्यांत येणाऱ्या आयुर्वेदिक वैद्यक व्यवसायींच्या दवाखान्यांची संख्याहि वाढली आहे.

आयुर्वेदाला वाढती मदत

आयुर्वेदाला उत्तेजन देण्यासंबंधींच्या योजनांना पाठिंबा देण्यासाठीं १९५१-५२ सालीं ९·५८ लाख रुपयांची, १८५२-५३ सालीं १३·९३ लाख रुपयांची, आणि १९५३-५४ सालच्या दुरुस्त अंदाजाप्रमाणें १२·१३ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली असून १९५४-५५ सालासाठीं १५.४१ लाख रुपयांची तरतूद करण्यात येत आहे.

डॉक्टर खेड्यांत जाण्यास नाखूष

डॉक्टर खेड्यांत जाऊन व्यवसाय करण्यास नाखुष असतात; त्यामुळें ग्रामीण भागांतील जनतेस वैद्यकीय मदत देणें कठीण होतें. याचें कारण म्हणजे खेडेगांवांत दारिद्र्य असतें व तीं मागासलेलीं असतात, हें होय. शिवाय एकंदर गरजेच्या मानानें डॉक्टरांची संख्याहि अपुरी आहे. व वैद्यकीय अभ्यासक्रमहि लांब मुदतीचा आहे. तेव्हां अधिक डॉक्टर तयार व्हावेत म्हणून सरकारनें अहमदाबाद आणि पुणें येथील मेडिकल कॉलेजांत आणखी ६० विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा असें ठरविलें आहे.

३॥ वर्षांच्या अभ्यासक्रमाचा उद्देश

तसेंच वैद्यक-व्यवसायींच्या संख्येंत वाढ व्हावी म्हणून शुद्ध आयुर्वेदाचा ३॥ वर्षांचा एक अल्पमुदतीचा अभ्यासक्रमहि आंखण्यांत आला असून त्याबाबत मार्गदर्शन करण्यासाठीं एक समितीहि नेमण्यांत आली आहे. अशा रीतीनें आयुर्वेदाच्या शिक्षणाची सोय उपलब्ध झाल्यामुळें आणि आयुर्वेदिक वैद्य व्यवसायींना कामधंदा मिळण्याची सोय झाल्यामुळें आतां अधिक प्रमाणांत ते खेड्यापाड्यांत जाऊन रहावयास तयार होतील अशी आशा आहे. अशा प्रकारच्या कार्यांचे काय परिणाम होतात हें अनेक वर्षांच्या प्रयोगानंतर ठरवितां येईल."

"न झोंपणारा" ऊंस

ऊंसाचें उत्पन्न वाढविण्यासाठीं रात्रभर दिवे जळत ठेवून ऊंसाला "जागा" ठेवतात. उजेडामुळें ऊंसाचें चैतन्य वाढतें आणि त्याची जास्तींत जास्त वाढ होते असें प्रयोगान्तीं सिद्ध झालें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फाजील औषधामुळें अनारोग्य

आंतरराष्ट्रीय समाज सुरक्षा संघानें औषधां-बाबत केलेल्या संशोधनांत असें आढळून आलें आहे कीं निष्कारण फाजिल औषधें घेतल्यामुळेंच देशो-देशींच्या लोकांचें आरोग्य खालावत आहे. औषधांच्या जाहिरातींवर प्रतिबंध घालावा आणि औषधांची निर्मिति, विक्री व किंमत यांवर कायद्याचें नियंत्रण असावें अशी या संघाची सूचना आहे.

ॲस्पिरिनचा भयंकर खप

लोकांच्या आरोग्यावर अनिष्ट परिणाम घड-विणाऱ्या औषधांमध्यें 'ॲस्पिरिन' हें प्रमुख आहे. एकट्या ब्रिटनमध्यें दररोज ॲस्पिरिनच्या एक कोटी वड्या खपतात.

बद्धकोष्ठ विकारानें बेजार

जगांतले बहुसंख्य लोक सध्यां 'बद्धकोष्ठ' या विकारानें बेजार झालेले असतात. प्रो. वॉकर यांच्या अंदाजाप्रमाणें ब्रिटन दरवर्षी रेचक औषधांवर साडेसहा लक्ष पौंड म्हणजे सरासरी एक कोटि रुपये खर्च करते! पण अमेरिकेंत तर हा खर्च साडेतीन कोटि पौंड म्हणजे पन्नास कोटि रुपयांहून अधिक होतो!

व्हिटॅमिन्सचे दुष्परिणाम

पेनिसिलिन व व्हिटॅमिन्स यांचा अविवेकी वापर होत असून पेनिसिलिनच्या वड्या-गोळ्या घशा-साठीं वाटेल तशा वापरल्या जातात. पण इंजेक्शन-पेक्षांहि या वड्यांनीं 'ॲलर्जी' अधिक निर्माण होते, असें आंतरराष्ट्रीय समाजसुरक्षा संघाचें म्हणणें आहे. ॲस्पिरिनप्रमाणेंच व्हिटॅमिनच्या गोळ्यांचाहि दुष्परिणाम होतो.

दमा खोकल्यावर आरोग्य जल

पिण्याचें पाणी उकळून १।४ करावें, व तें प्यावें. याला आरोग्य जल म्हणतात. हे खोकला, दमा दूर करते व वायु (गॅसेस) काढून टाकतें, यानें ताप (कफवातज्वर) जातो. शौचास साफ होतें. कफ दूर होतो, पडसें पिकते, पोटदुखी, (कफवातज) गुल्म, मूळव्याध (कफवातज) जाते. भूक वाढते. पांडु रोग, सूज व उदर विकार नाहींसा होतो.

रात्रीं झोपतांना ऊन पाणी प्याल्यानें अजीर्ण मोडते.

त्वचेंतून पोषण व रोगहरण

फळझाडांच्या बुंध्यांतून व सालींतून पोषक द्रव्यें आंत सोडलीं असतां त्या झाडांचें चांगलें पोषण होते व त्यांचे रोग बरे होतात.

पोषक द्रव्यांच्या द्रावणांत रेडियोॲक्टिव्ह आय-सोटोप मिसळून त्या द्रावणांत भिजवलेल्या कापसाच्या पट्ट्या वैज्ञानिकांनीं फळझाडांच्या फांद्यांना गुंडाळल्या कांहीं थोड्या तासांतच तें द्रावण फांद्यांच्या अन्त-र्भागांत पोंचलेलें आढळून आलें. फांदी खरवडून त्या जागीं पोषक द्रावणाचा लेप लावला असतां तें लवकर फांदीच्या अन्तर्भागांत शिरतें असें दिसून आलें.

मुळाप्रमाणेंच साली-त्वचा

झाडांचीं मुळें हेच पोषक द्रव्य शोषून घेणारे मुख्य अवयव आहेत; पण मुळांप्रमाणें सालींतूनहि पोषण द्रव्यांचा प्रवेश होऊं शकत असल्यामुळें जस्त व मॅग्नेशियम अशा द्रव्यांची कमतरता आणि असेच अितर पोषकविषयक दोष दूर करतां येणें शक्य झालें आहे.

आयुर्वेदांत याच ज्ञानाचा उपयोग अभ्यंग-द्वारा विकार बरे करण्याकडे केला आहे.

एक पृच्छा

क्षारद्रव्य असलेल्या गुटिका अगर टॅब्लेट्स् यांना आर्द्र हवेच्या प्रदेशांत किंवा पावसाळ्यांत ओलावा उत्पन्न होतो. त्या एकमेकास चिकटतात अगर कित्येक वेळीं बाटलींत त्याचा लगदा बनतो.

त्यासाठीं निरुपद्रवी (इनर्टकेमिकल्सचे) कोटिंग मिश्रणाची अत्यन्त जरूर भासते. असें मिश्रण प्रयोगासह प्रसिद्ध केल्यास आयुर्वेदीय औषधी-करणावर इष्ट परिणाम होईल.

—भिषग्रत्न ग. कृ. पाटणकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदिक वैद्यक व्यवसायींसाठीं
रिफ्रेशर कोर्स

मुंबई येथील फॅकल्टी ऑफ आयुर्वेदिक अँण्ड युनानी तिब्बी सिस्टिम्स ऑफ मेडिसिन या संस्थेतर्फे पुढील ठिकाणीं, व त्यांच्या नांवापुढें कंसांत नमूद केलेल्या भाषेंत, ३ ते २९ मे पर्यंत चार आठवड्यांचा एक रिफ्रेशर कोर्स शिकवण्यांत येईल.

(१) आर्. ए. पोदार मेडिकल कॉलेज (आयुर्वेदिक), वरळी, मुंबई १८ (हिंदी); (२) आयुर्वेद महाविद्यालय, पुणें, (मराठी); (३) आयुर्वेद विद्यालय, जामनगर (सौराष्ट्र) (गुजराती); आणि (४) जे. अस्. अेम्. जी. आयुर्वेदिक कॉलेज, नडियाद, (गुजराती).

सरकारी, म्युनिसिपल आणि जिल्हा लोकल बोर्डाच्या नोकरींतील वैद्यांना आणि १९३८ च्या मुंबई वैद्यक व्यवसायींसंबंधींच्या कायद्याखालीं नोंदविलेल्या अथवा यादींत ज्यांचीं नांवे समाविष्ट करण्यांत आली आहेत अशा, सरकारी मदत मिळणाऱ्या वैद्यक व्यवसायींनाच या कोर्सला प्रवेश मिळेल. सबंध कोर्स ८० व्याख्यानांचा असून त्यासाठीं ३० रुपये फी भरावी लागेल.

प्रवेश मिळण्यासाठीं उपरोक्त संस्थांकडे परभारें अर्ज करावेत. अधिक तपशिलवार माहिती हवी असल्यास तीहि उपरोक्त संस्थांकडे मिळू शकेल.

मुंबईतील सरकारी रुग्णालयावर
सरकारी खर्च २० लाख रुपये

आरोग्य-खात्यावरील टीकेचा समाचार घेतांना आरोग्यमंत्री श्री. शांतिलाल शहा म्हणाले:- गलिच्छ वस्त्या नष्ट करण्यासाठीं सरकार आर्थिक मदत देत नाहीं हा दावा चुकीचा आहे. नगरपालिकेनें हें काम प्रत्यक्ष हातीं घेतलें कीं सरकार मदत देते.

२४ लाखापैकीं २० लाख

सरकारी रुग्णालयें मुंबई नगरपालिकेच्या स्वाधीन करावींत या श्री. नाथालाल पारीख (काँ.) यांच्या सूचनेबाबत श्री. शहा म्हणाले, मुंबईच्या सरकारी रुग्णालयांस मेडिकल कॉलेजें जोडलीं आहेत. तीं रुग्णालयें व कॉलेजें, मुंबई नगरपालिका स्वतःकडे घेणार असेल तर आमची हरकत नाहीं. सरकारी रुग्णालयांच्या व्यवस्थेसाठीं नगरपालिका दरसाल फक्त ४ लाख रु. देते, तर प्रत्यक्ष खर्च २४ लाख रु. येतो. म्हणजे सरकारला २० लाख रुपये खर्चावे लागतात.

पाणीपुरवठ्यासाठीं १ कोटी

आरोग्यमंत्री पुढें म्हणाले, खेड्यांना पाणीपुरवठा करण्याच्या कामाकरतां भारत सरकार लवकरच एक कोटी रुपये कर्ज देईल अशी दाट शक्यता आहे.

आयुर्वेदीय पदव्युत्तर शिक्षणक्रम

मुंबईच्या महादेवी आनंदीलाल पोदार हॉस्पिटल-मध्यें पुढील पदव्युत्तर शिक्षणक्रमांचें शिक्षण देण्याची सोय करण्यांत आली आहे.

(अ) आयुर्वेदिक औषधें (ब) शस्त्रवैद्यक (क) मिडवाइफरी व शरीरशास्त्र (ड) आयुर्वेदिक फार्मसी आणि (इ) अॅनस्थेशिया.

शिक्षणक्रम सहा महिन्याचा असून त्यासाठीं ६५ रु. फी आकारण्यांत येते.

१९३८ च्या मुंबई वैद्यक व्यवसायीसंबंधींच्या कायद्याच्या परिशिष्टांत केल्याप्रमाणें नोंद करण्यास पात्र ठरण्याच्या दृष्टीनें वैद्यक व्यवसायीस जी लायकी मिळवावी लागते ती लायकी मिळविलेल्या लोकांनाच फक्त या शिक्षणक्रमासाठीं प्रवेश मिळूं शकेल.

आयुर्वेद सेवा संघ-नासिकचीं सर्व शास्त्रोक्त अनुभविक औषधें, तसेंच आयुर्वेद पत्रिकेचे अंक आमचेकडे मिळू शकतील.

धातुवर्धक कंदर्प-वृष्य-पाक, टकलावर भ. भृंगराज तेल, शक्तिवर्धक अगस्तिप्राश हीं व अशींच नवीन नवीन औषधें वापरा. विशेष माहितीकरितां एकवेळ भेट द्या.

दि सूर्यकिरण फार्मसी लि.

१७३ गिरगांवरोड, मुंबई ४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभिप्राय-

होमिओपॅथिक चिकित्सापद्धति

इलेक्ट्रो-होमिओपॅथिस्ट कै. डॉ. के. मो. काणे यांनीं हें पुस्तक आपल्या ३७ वर्षांच्या अनुभविक ज्ञानानें लिहिलें आहे. लेखकानें आयुर्वेद अगर ॲलोपॅथी इत्यादि पद्धतींना दोष न देतां, हीं औषधें घेण्यास रोगी कंटाळत नाहीं, औषधें चवीला गोड, गुण कायमचा व त्वरित असे फायदे या पद्धतींत आहेत असें म्हटलें आहे.

या पुस्तकाचा विशेष असा कीं ग्रंथांत कित्येक ठिकाणीं रोग्याचीं लक्षणें थोडक्यांत सांगण्याच्या उद्देशानें आयुर्वेदीय परिभाषा वापरली आहे. उदाहरणार्थ, पान ५० वर वातकास, पित्तकास, कफकास असे खोकल्याचे प्रकार पाडून त्यावरील होमिओ औषधें दिली आहेत. डोकेदुखी वगैरे विकारांतहि असेंच वर्णन आलें आहे. या पद्धतीमुळें वैद्यांना समजण्यासाठीं हें पुस्तक सुगम झालें आहे.

अस्वच्छता हा सामाजिक गुन्हा

"चोरी करणें हा आपण गुन्हा समजतो त्याप्रमाणें वाटेल तेथें केरकचरा टाकणें हाहि गुन्हा मानला पाहिजे" असे उद्गार मुंबई नगरपालिकेच्या आरोग्य सप्ताहाचें उद्घाटन करतांना आरोग्यमंत्री श्री. शांतिलाल शहा यांनीं काढले. वैयक्तिक स्वच्छतेप्रमाणेंच सामुदायिक स्वच्छता राखणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे, असे ते म्हणाले.

अभ्यासवर्गाची तारीख

वैद्यराज डेग्वेकर यांनीं सुचविलेल्या अध्यापकांच्या अभ्यासवर्गाची तारीख मे महिन्याच्या चौथ्या आठवड्यांत निश्चित करण्यांत येत आहे. या वर्गासाठीं आचार्य वेणीमाधवशास्त्री, वै. जळूकरशास्त्री, वैद्यराज वा. कृ. दाणी, वै. मु. कृ. जोशी आदि वरील मंडळी उपस्थित राहणार आहेत, अशी पत्रें आलीं आहेत.

अनुक्रमणिका

भारतीय दंतचिकित्सेस संधि दिली पाहिजे	५८१
नियम माणसाकरितां आहेत	५८२
कै. भिषगाचार्य हरिशास्त्री पराडकर	५८३
त्वचारोगावर पंजाबी प्रयोग	५८५
शस्त्रक्रियेंतहि आयुर्वेदाची प्रगति	५८६
जलझेंडू	५८७
बृहज्जात्यादितेलाचा पाठ	५८९
ज्योतिष्मती सेवनाचें पथ्यापथ्य	५९०
मनाचा समतोलपणा कसा राखावा?	५९१
बिछाना भिजविण्याची संवय	५९५
आयुर्वेदीय ग्रंथांची अर्थ निश्चिति	५९९
हळदीचे उपयुक्त औषधी प्रयोग	६०१
दोन महत्त्वाचे लेख	६०४
पं. सातवळेकरजींचें आदर्श जीवन	६९५
डॉ. जीवराजांच्या शब्दांत शुद्ध आयुर्वेद	६०८
फाजील औषधामुळें अनारोग्य	६०९
रिफ्रेशर कोर्स	६१०

आदिम जाति सेवक विद्यालय

भारतीय आदिम जाति सेवक संघ, दिल्ली, या संस्थेतर्फे छिंदवाडा (मध्यप्रदेश) येथें आदिम जाति सेवकांचें प्रशिक्षण शिबिर सुरू झालें आहे. भारतांतील सर्व प्रांतांतून आदिवासी सेवक तेथें आले आहेत. ८ महिने येथील शिक्षण चालणार आहे. अभ्यासक्रमांत आरोग्यशास्त्र हा विषय आहे. त्यासाठीं वैद्य बिंदुमाधव पंडित यांना मार्गदर्शनासाठीं बोलाविण्यांत आलें आहे.

आजच्या तरुणांतील दोष

"आज मला भारतीय तरुणांत एक दोष दिसतो त्यांना कोणत्याच प्रश्नाबद्दल उत्कट आस वाटत नाहीं आणि आस नसेल तर कोणत्याहि कार्यांत सफलता प्राप्त होत नसते. ज्या कार्याबद्दल आपणाला जिव्हाळा वाटेल तें कार्य तरुणांनीं अंगीकृत ध्येय म्हणून मानावयास हवें." – राधाकृष्णन्

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

— ठिकठिकाणच्या चिकित्सक वैद्यांचा अभिप्राय —

आयुर्वेद सेवा संघाचीं

अगस्तिप्राश व अश्विनीप्राश

हीं दोन औषधें ग्राहकांना अत्यंत पसंत पडलीं आहेत हें कळविण्यास आम्हांस आनंद वाटतो.

दीर्घ मुदतीच्या रोगांवर त्यांचा अप्रतिम फायदा होतो असें ज्यांना आम्हीं यांची योजना केली त्यांच्या अनुभवावरून दिसून आलें आहे. अशा औषधांची समाजाला आज फार जरूरी आहे, असें आमचें मत झालें आहे.

सेवा संघाच्या औषधांचा श्रेष्ठ दर्जा

"माझ्या मनांत आयुर्वेद सेवा संघाची एजन्सी घ्यावयाचें आहे. म्हणून मी आपल्या मालाच्या स्टँडर्डबद्दल .... गांवीं .... फार्मसी या औषधि दुकानीं जाऊन विक्रेत्याकडे चौकशी करून आलो.

सेवा संघाचीं औषधें किंमतींत स्वस्त

असें समजलें कीं, कांहीं थोड्या औषधांचे बाबतींत सेवा संघाचीं औषधें इतर कंपन्यापेक्षां किंमतींत थोडीशी अधिक असलीं तरी एकूण विचार करतां इतरांपेक्षां तीं स्वस्त आहेत.

व अधिक गुणकारी आहेत

गुणकारीपणाच्या दृष्टीनें विचार करतां तीं इतर प्रसिद्ध कंपन्यांच्या तोडीचीं, इतकेंच नव्हे तर, कांकणभर अधिक गुणकारी आहेत.

फक्त दर्शनी (पॅकिंगमध्यें) सुधारणा हवी आहे

नासिकच्या मालांत फक्त सुधारणा व्हावयाची आहे ती फक्त दर्शनी (पॅकिंगमध्यें). ती सुधारणा झाली कीं अखिल हिंदुस्थानांत सेवा संघाचीं औषधें अग्रगण्य रहाणार !"

बेळगाव

— ए. एस्. टी.

संपादक व प्रकाशकः— वैद्यबिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, मेनरोड, नाशिक
मुद्रक— श्री. वि. [illegible] नाशिक
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ७ वें) नाशिक, ता. १ एप्रिल १९५४ (अंक १९ वा

भारत सरकारच्या स्वास्थ्य विभागातर्फे
'अधम' रीत्या आयुर्वेदाची गळचेपी

कोट्टाकल (दक्षिण मलबार) येथें मार्चमध्यें भरलेल्या अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलनाच्या ३९ व्या अधिवेशनाच्या अध्यक्षीय स्थानावरून भाषण करते समयीं मुंबईचे वैद्यरत्न **पं. शिवशर्मा** यांनीं भारत सरकारच्या स्वास्थ्य-नीतीचा गौप्यस्फोट करून असें सांगितलें कीं, सरकारनें आपल्या या भ्रष्ट धोरणाचा तत्काळ परित्याग करावा. स्वास्थ्यमंत्रिणी राजकुमारी अमृतकौर यांनीं आपला दुराग्रह सोडून देणें जरूर आहे. मोंगल राजवटींत आयुर्वेदाचा नाश क्रूरतेनें केला गेला, ब्रिटिश राजवटींत तो मुत्सद्दीगिरीनें केला गेला, तर हल्लींच्या ह्या स्वतंत्र भारतीय राजवटींत त्याचा नाश अधर्म्य मार्गानें केला जात आहे.

आयुर्वेदाचें अत्यंत व्यापक क्षेत्र

आपले जे भारतवर्षीय बांधव आयुर्वेदाकडे साशंक दृष्टीनें पाहात असतील त्यांना ह्या शास्त्राची उपयुक्तता, वैज्ञानिकता, त्याचप्रमाणें त्याचें स्थान व विशालता ह्या गोष्टी योग्य रीतीनें समजावून देण्याचा आपला मनोदय अध्यक्षांनीं व्यक्त केला. ज्ञान आणि क्रिया (कला) या दोन्ही अंगांचें आयुर्वेदाचें क्षेत्र इतकें व्यापक आहे कीं, दुसरी कोणतीहि वैद्यक-पद्धति कोणत्याहि प्रकारें आयुर्वेदाला आपल्या शास्त्रामध्यें समाविष्ट करूं शकणार नाहीं, असें ते म्हणाले,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अध्यक्ष पं. शिवशर्मा पुढें म्हणाले कीं —

" आयुर्वेदाच्या प्राथमिक व उच्च शिक्षणाचे बाबतींत कांहीं सांगण्याचा अगर करण्याचा अधिकार सरकारनें अद्यापपर्यंत आयुर्वेदतज्ञ जनतेच्या हातीं दिलेला नाहीं. आयुर्वेदाच्या योजनांची निर्मिति ॲलोपॅथिक डॉक्टरांच्याच मार्फत करण्यांत आली आहे. व तेच डॉक्टर्स आयुर्वेदीय वैद्यांची मुक्त कंठानें निंदा करीत आहेत. खेदाची गोष्ट आहे कीं, राजकुमारी अमृतकौरनीं शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रमास विरोध केला. मुंबई-सरकार मात्र येत्या जून महिन्यापासून शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रमास सुरवात करणार आहे.

स्वास्थ्यमंत्र्यांची मानसिक दुर्बलता

राजकुमारी आज भारताच्या सार्वजनिक आरोग्य-मंत्रीपदावर आरूढ आहेत. त्यांच्या निवेदनाची उपयुक्तता तसेंच त्याचें शास्त्रीय अगर वैज्ञानिक मूल्य ह्या गोष्टींचा विचार न करतां वृत्तपत्रें त्यांच्या दृष्टिकोनाचें प्रकाशन करीत असतात. ह्यामुळें अज्ञ जनतेची दिशाभूल होण्याचा संभव अतिशय आहे. राजकुमारी अमृतकौर यांचें अंतःकरण शुद्ध आहे. परंतु ॲलोपॅथि-तज्ञ त्यांच्या मानासिक दुर्बलतेचा अयोग्य फायदा घेतल्यावांचून राहात नाहींत.

मी कॉंग्रेसविरोधी नाहीं

भारत सरकारचे गुणदोष काढण्यांत मला आनंद प्राप्त होत नाहीं. मी कॉंग्रेसविरोधी अशा कोणत्याहि पक्षाचा सभासद नाहीं. सरकारला अशा प्रकारें विरोध करण्याचा मला मनापासून तिटकारा आहे. मी आज अगर भविष्यकालांतहि श्रीमती राजकुमारी अगर त्यांच्या पदावर भावी कालांत अधिष्ठित होणाऱ्या दुसऱ्या अधिकाऱ्यांच्या निंदेची अगर स्तुतीची अपेक्षा करीत नाहीं. माझी अशीच इच्छा आहे कीं, विद्यमान सरकारच सत्यनिष्ठ व्हावें व तें अधिक दृढमूल व्हावें. जरी कॉंग्रेस सरकारच्या कारकीर्दींत आयुर्वेदाची आत्यंतिक हानि झाली आहे, तरी देखील माझी अशी प्रामाणिक समजूत आहे कीं, कॉंग्रेसशिवाय इतर कोणताहि पक्ष अद्याप सुसंघटित व बलशाली झालेला नाहीं कीं जो भारताची राज्यधुरा व्यवस्थितपणें सांभाळू शकेल !

आयुर्वेद महासंमेलनाचा सल्ला घ्यावा

सरकार, डॉक्टरी शिक्षणाचे [Allopath] बाबतींत अगर तत्संबंधांत कांहींहि फेरफार करण्याचा निर्णय ' ऑल इंडिया मेडिकल कौन्सिल ' च्या संमतिशिवाय करीत नाहीं. त्याचप्रमाणें आयुर्वेदाच्या बाबतींत सरकारला कांहींहि करावयाचें असल्यास त्यानीं आयुर्वेद महासंमेलनाच्या संमतिवांचून करूं नये असें आम्हांस वाटतें. मी असें आश्वासन देतों कीं, शुद्ध आयुर्वेद म्हणजे निश्चल निष्क्रिय स्वरूपी आयुर्वेद नसून तो एक प्रगतिशील व कार्यक्षम अशा स्वरूपाचा आहे. ज्या शाखेंतील पाश्चात्य चिकित्सा-पद्धति उत्कृष्ट स्वरूपाची सिद्ध झाली आहे ती चिकित्सा-पद्धति अंगिकृत करण्यांत आयुर्वेदीय वैद्यसमाज डॉक्टरांचें सहाय्य घेण्यास यत्किंचितहि विलंब लावणार नाहीं. "

नेत्रोपचार पथकाचा कार्यक्रम

मुंबई सरकारचे फिरते नेत्रोपचार पथक एप्रिल महिन्यांत रत्नागिरी जिल्ह्याच्या उत्तर भागांत दौरा काढणार असून पुढील ठिकाणीं व त्या त्या तारखेस नेत्ररोग्यांची तपासणी करण्यांत येईल. दापोली ता. १०, मंडणगड ता. १२, खेड ता. १४, शिवतर ता. १५, आणि चिपळूण ता. १७ एप्रिल.

दापोली येथील कॉटेज हॉस्पिटलमध्यें ता. १९ ते २८ एप्रिल पर्यंत नेत्रशिबिर भरविण्यास येईल.

वैद्यासाठीं अफू-भांग परवाना फी

१ एप्रिल पासून सरकारी नवें वर्ष सुरू होत आहे. औषधासाठीं वैद्यांना लागणाऱ्या अफू भांग आदि द्रव्याचा परवाना दरसाल फी भरून नवा करून घ्यावा लागतो. अफू परवान्याची व भांग परवान्याची फी १-१ रुपया आहे. तीच चालू आहे.

चालू वर्षापासून औषधी कारखान्यांना अफू भांग परवान्याची फी वाढवून ती ५ रुपये करण्यांत आली आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आधुनिक (?) वैद्यक व शुद्ध आयुर्वेद

(लेखकः—वैद्य शंकर बळवंत दिवेकर आयुर्वेदतीर्थ, हैद्राबाद)

अफीमी मनुष्यास अफू अमृताप्रमाणें वाटते. पराणीचें टॉक वा चाबकाचा तडाखा वेळामध्यें क्षणिक गति निर्माण करतो.

पण मग आपण हळहळतो

अफू व पराणी यांचें कार्य ज्या पद्धतीनें होतें व इष्ट फलप्राप्ति शीघ्र मिळते, त्यामुळें त्यांचा उपयोग करणाऱ्यास विजयानन्द होतो. हा शीघ्र इष्ट फलप्राप्तीचा विजयानन्द परिणामीं त्या प्राण्यांचा जीव घेतो (नेहमींचा रोगी बनवितो); व जीव गेल्यावर मग आपण हळहळतो. पुन्हा प्रसंग पडल्यावर तेंच करतों, व तेंच शास्त्रीय आहे, प्रयोगसिद्ध आहे, जागतिक नामवन्त तज्ञांचें तसें म्हणणें आहे असा सडेतोड युक्तिवाद करतो.

आधुनिक प्रयोगशाळांचा उपयोग

अफूचें व पराणीचें [Nervous system] वातसंस्थेवर सातत्यानें शामक वा उत्तेजक कार्य झाल्यानें मेंदूची विचारशक्ति, हृदयाचें रुधिराभिसरण यकृताचें व इतर पाचक रसांचें पचनकार्य, आंत्र व मूत्रपिंडांचें उत्सर्जक कार्य हीं हळुहळू मन्द होतात व शेवटीं तीं निष्क्रिय बनतात, व शरीर म्हणजे अेक संडास होतो. यांतूनच नानाप्रकारच्या नवीन रोगांची निर्मिति होते व त्यासाठीं नवीन नवीन औषधें निर्माण करण्यासाठीं सुसज्ज अशा प्रयोगशाळा लागतात. आधुनिक वैद्यकाचें स्वरूप हें असें आहे.

आधुनिक वैद्यकाचा प्रत्यक्ष व्यवहार

लक्षणें म्हणजे रोग बरा (Cure) करण्याचा, शोधन स्वरूपाचा, शरिराचा प्रयत्न. पण लक्षणांची शमन चिकित्सा (Suppressive Symptomatic Treatment) हाच आधुनिक वैद्यकाचा सिद्धांत, निदान प्रत्यक्ष व्यवहार तरी आहे. परिणामें ही पद्धति सर्व मानव समाजास चिररोगी बनविणारी व अखेर प्राण घेणारी चिकित्सा आहे. प्रत्यक्ष हें आपण अनुभवितहि आहोंत. ॲन्टीबायोटिक्स, व्हिटॅमिन्स, लिव्हर एक्स्ट्रॅक्ट, हारमोन्स हीं औषधें म्हणजे कोणताहि रोग दाबून (Suppression) ठेवण्याची शक्ति आहे हे मान्य. पण शरीर हें जिवंत आहे व यामुळें रोगाची क्षेत्रमर्यादा स्थूलांतून सूक्ष्मांत जाते याचा विचार कोणीच करीत नाहीं.

यामुळें रोग अभ्यंतरमार्गी होतो

रोग अभ्यंतर-मार्गी झाला म्हणजे असाध्य होतो हा चिकित्सासिद्धांत आयुर्वेदानें अत्यंत महत्त्वाचा मानला आहे. लक्षणरूपी साधनानें रोग शरीराच्या बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत असतो. यासच रोग बाह्यमार्गी म्हणतात व बाह्यमार्गी सुखसाध्य असतो. शमन चिकित्सा (Suppressive Treatment) बाह्यमार्गी रोग अंतर्मार्गी करते व त्यामुळें रोगलक्षणें दबली जातात. रोग्यास क्षणिक बरें झाल्यासारखें वाटतें पण रोग स्थूल शरिरांतून सूक्ष्म शरीरांत ठाण मांडून बसतो व रोगी हळुहळू झिजत असतो, शमन चिकित्सा मात्र चालूच असते. या चिकित्सा-पद्धतीस मी आधुनिक वैद्यक म्हणतो.

स्ट्रेप्टोमायसिन रोग्याचा प्राण घेतें

उदा. स्ट्रेप्टोमायसिन हें प्रभावी औषध घ्या ! तें रोगाचा प्राण घेण्यापेक्षां रोग्याचा प्राण घेतें. हें विधान वाचून कांहीं शास्त्रज्ञ व कांहीं सामान्य लोकसुद्धां मला वेड्यांत काढतील; पण प्रत्यक्ष मी जें अनुभवित आहे तेंच लिहित आहे. टेस्टट्यूबमध्यें क्षयजंतु स्ट्रेप्टोमायसिन द्रावणांत मरतात पण क्षयरोग्यास (Possitve T. B.) तें कितीहि टोंचलें तरी तात्पुरतें बरें झाल्यासारखें वाटतें व जितक्या जास्त सुया घेतल्या असतील तितक्या लवकर तो सुया

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बंद करतांच मरतो. हें विधान चूक असल्याचें कोणीहि सिद्ध करावें. मग माझा असा प्रश्न आहे कीं, टेस्टट्यूबमध्यें क्षय जंतूस मारणारें हें औषध क्षयरोग्यांस कां बरें करूं शकत नाहीं?

शमन-चिकित्सेचे भयंकर परिणाम

कारण क्षयजंतु स्थूल शरीरांतून सूक्ष्म शरीरांत जाऊन लपून बसतात व तेथपर्यंत जाण्याची स्ट्रेप्टोमायसिन या औषधाची शक्ति नाहीं. म्हणजे रोग अभ्यंतर मार्गी झाला व क्षय-जंतूस विश्रांति मिळाली. कांहीं दिवसांनीं रोगी निर्बल व रोग सबळ अशी परिस्थिति निर्माण होते व रोगी इहलोकींची यात्रा संपवितो. यावरून शमन चिकित्सेच्या भयंकर परिणामाची कल्पना येईल.

शुद्ध आयुर्वेद म्हणजे शोधन चिकित्सा

वरील आधुनिक वैद्यकशास्त्राच्या तात्विक संक्षिप्त विवेचनानंतर शुद्ध आयुर्वेद म्हणजे काय याचें विवेचन करणें क्रमप्राप्त आहे. तेव्हां शुद्ध आयुर्वेद म्हणजे शोधन-चिकित्सा पद्धति (Curetive Treatment) असें मी मानतों. याच चिकित्सा पद्धतीचा पुरस्कार चरक, सुश्रुत या संहिता रचणाऱ्या ऋषींनीं केला आहे. आरोग्याच्या दृष्टीनें कोणतेंहि चिकित्सातत्व जोंपर्यंत तें सत्य आहे तोपर्यंत तें पुरातन आहे असें म्हणतां येणार नाहीं. तेव्हां तें पुरातन म्हणजे नित्य नवीनच आहे असें मानलें पाहिजे. म्हणून वैद्यकाचें आधुनिक वैद्यक (Allopathy) व पुरातन वैद्यक (Ayurved) असें वर्गीकरण करणें अशास्त्रीय आहे. शोधन-चिकित्सा (Curetive Treatment) व शमन-चिकित्सा (Suppressive Treatment) असें वैद्यकशास्त्राचें तात्विक भूमिकेवरून वर्गीकरण केले पाहिजे.

वैद्यकशास्त्रावरील उत्तम ग्रंथ

चरक व सुश्रुत या संहितेंतच फक्त ग्रथित केलेले चिकित्सा सिद्धांत म्हणजे आयुर्वेद असें मी मानीत नाहीं. वैद्यकशास्त्रावरील जे अनेक उत्तम ग्रंथ आहेत त्यापैकीं ते अत्युत्तम ग्रंथ आहेत इतकेंच. स्वतंत्र प्रश्नेनें त्यामध्यें सांगितलेले आरोग्यसिद्धांत आधुनिक (Modern) सुधारलेल्या (Civilised) व विकसित (Developed) जगांत प्रयोगाच्या किंवा प्रत्यक्ष अनुभवाच्या कसोटीवर सत्य ठरले तर त्याचें समर्थन करणें आपलें कर्तव्य ठरतें म्हणूनच त्यांचा विचार करावयाचा.

पहिला व मूलभूत प्रश्न

मनुष्य रोगी झाल्यावर रोग्याची चिकित्सा करावयाची कां रोगाची चिकित्सा करावयाची हा वैद्यकशास्त्रापुढील पहिला व मूलभूत प्रश्न आहे. ज्यावेळीं जगांतील शास्त्रज्ञ एकाद्या पवित्र स्थळीं बसून ऋषिमुनींच्या वृत्तीनें या प्रश्नांचा विचार करतील त्यावेळीं ते रोगी मनुष्याची चिकित्सा केली पाहिजे असें एकमतें उत्तर देतील. पण तेंच शास्त्रज्ञ कारखानदारांचे पगारी सेवक होऊन एकाद्या प्रयोगशाळेंत बसून उत्तर देतील त्यावेळीं रोगाची चिकित्सा झाली पाहिजे असा निर्णय देतील. रोगी मनुष्याची चिकित्सा हा वैद्यकशास्त्राचा मूलभूत सिद्धांत मानला तर चरक, सुश्रुतोक्त वैद्यकशास्त्राचें समर्थन करणें भाग पडेल.

शमन हें गौण चिकित्सातत्व

आयुर्वेदांत-शमन चिकित्सा [Suprissive Treatment] म्हणजे रोगाची चिकित्सा या तत्वास मान्यता दिलेली आहे; पण हें चिकित्सातत्व

'आयुर्वेदाच्या सेवेसाठीं तयार'

शास्त्रोक्त पद्धतीनें तयार झालेलीं सर्वप्रकारचीं सिद्धौषधें [गुटिका, मात्रा, रसायनें, आसवें वगैरे] व हिंवतापांवर अत्युत्तम ठरलेलें हिंवतापांतक, मिळण्याचें एकच ठिकाण.

सविस्तर माहितीकरितां लिहा:—

आयुर्वेदीय औषधी भांडार

२८ शुक्रवार, तुळशीबागेची पिछाडी, पुणें २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गौण मानलें आहे. शमन-चिकित्सा फक्त शोधन-चिकित्सेस अनुकूल परिस्थिति निर्माण करण्यापुरतीच करावी, असें पुनःपुनः निक्षून सांगितलें आहे.

समतोल वैद्यकशास्त्र कोणतें?

आयुर्वेद हें समतोल वैद्यकशास्त्र आहे. हल्लीं अनेक चिकित्सापद्धति [Pathy] आहेत. त्यामध्यें एका एका चिकित्सातत्वावरच जोर दिलेला आहे. व कोणत्याहि रोगामध्यें त्याचा पुरस्कार केला आहे पण जीवधर्म त्रिगुणात्मक [Complex] असतांना चिकित्सा सिद्धांत एकांतिक असणें केव्हांहि अशास्त्रीय आहे. रोगकारण-चिकित्सा (शोधन), रोग चिकित्सा [Allopathy] तदर्थकारी चिकित्सा [Like Cures Like, Homœopathy] हीं तिन्हीं चिकित्सातत्वें आयुर्वेदानें मान्य केलेलीं आहेत. पण कारणचिकित्सा (शोधन) ही चिकित्सा शास्त्राचें पायाभूत तत्व आहे.

शुद्ध आयुर्वेदाचे सिद्धांत

शुद्ध आयुर्वेदाचे सिद्धांत खालीलप्रमाणें आहेत.

१] शरीरेंद्रियसत्वात्मसंयोगो जीवितम् ।

शरीर, इंद्रियें, सत्व व आत्मा यांचा संयोग [सम्यक् योग] म्हणजे जीवन. जीवन हें चार प्रकारच्या शरीरांनीं [कोशांनीं] वेष्टित आहे. क्रमानें शरिरें स्थूल, सूक्ष्म, सूक्ष्मतर व सूक्ष्मतम आहेत.

२] जीवनाचा हा सम्यक्‌योग त्रिधातु-साम्यावर अवलंबून आहे. त्रिधातु-वैषम्य म्हणजेच त्रिदोष-निर्मिति म्हणजेच रोगावस्था.

३] रोग होतांच त्याचा मूळ स्वभाव शरीराच्या बाहेर पडण्याचा असतो. हा शरीराचा धर्म लक्षांत घेऊनच चिकित्सासिद्धांत निश्चित करावयास पाहिजेत.

४] स्वकर्में [पूर्वजन्मीचीं व या जन्मीचीं] माता, पिता यांचे प्रकृतिधर्म व परिस्थिति यानें व्यक्तीचे प्रकृतिधर्म [Temperaments] बनतात. म्हणून चिकित्सातपशील हे सर्व विचारांत घेऊन करावा.

५] शरीरधर्म लक्षांत घेतां शोधन म्हणजेच निदानपरिवर्जन हाच चिकित्साशास्त्राचा नैसर्गिक सिध्दांत आहे, असें आयुर्वेद म्हणतो.

शोधन चिकित्सेचे २ प्रकार

६ शोधन चिकित्सा २ प्रकारचीः-१. पंचमहाभूतात्मक (पंचकर्मे) २. मनोनिग्रहात्मक (यम, नियम, परिमितता आदि)

पंचमहाभूतात्मक चिकित्सा शरीरशुद्धि (सूक्ष्म शरीरेंसुद्धां) करते व मनोनिग्रहात्मक चिकित्सा मनःशुद्धि करते.

७ रोगवेग अतितीव्र प्राणहरण करणारा असेल तर शमन चिकित्सेनें तात्पुरतें कां असेना प्राणरक्षण करतां येत असल्यास या अवस्थेपुरतेंच शमनचिकित्सातत्व मान्य आहे.

शास्त्रज्ञ अर्थाचे दास

शोधन चिकित्सा-पद्धति व शमन चिकित्सा-पद्धति या स्वभावतःच विरोधी आहेत, तें शास्त्रज्ञांना कळत नाहीं असें नाहीं; पण ते या आर्थिक जगांत अर्थाचे दास झाले असल्याकारणानें मुद्दामच त्यांना वेड घेऊन पेडगांवाला जावे लागते. शिवाय मानवी स्वभावांतील दोष [Weakness] सतत दृष्टीपुढें ठेवून वैद्यकशास्त्राची उभारणी करावयाची असे ठरविलें तर शमन-चिकित्साच विकसित करावी लागेल.

आयुर्वेदाचा गौण भाग

पण खऱ्या आरोग्याचा आदर्श ठेवून वैद्यकशास्त्र वाढलें पाहिजें असें मान्य केलें तर शोधन-चिकित्सेचा पुरस्कार केला पाहिजे. जादूप्रमाणें त्वरित गुणकारी औषधें हा भ्रम असतो. शामक औषधें सूक्ष्मतम शरीरापर्यंत सुद्धां रोगांस अंतर्गामी करतात, व रोग असाध्य होतो. आयुर्वेदाचा, वाग्भटाच्या कालानंतरचा जो विकास झाला तो शमन चिकित्सेलाच अनुकूल असा आहे. तेव्हां शोधन-चिकित्सेच्या दृष्टीनें विचार करतां आयुर्वेदाचा तो भाग गौणच मानला पाहिजे.

संस्थांनीं चालविलेलें दुर्लक्ष

महाराष्ट्रांत नगर, पुणें, सातारा येथें आयुर्वेद

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैद्यक शास्त्राच्या संस्था तीस चाळीस वर्षांपासून आहेत. परन्तु आयुर्वेद म्हणजे त्रिधातु (जीव स्वभाव), त्रिदोष (रोग संप्राप्ति) व शोधन चिकित्सा हें चिकित्सा शास्त्राचें मूलभूत तत्व, या तीन आयुर्वेदाच्या मूलभूत तत्वाकडेच त्यांनीं दुर्लक्ष केलें. आधुनिक वैद्यकाप्रमाणें त्वरित गुणदायी औषधें आयुर्वेदांत कोणती आहेत याच एका दृष्टीनें रुग्णालयें चालविलीं. त्यामुळें आयुर्वेद हें अशास्त्रीय असें वैद्यक आहे असें आम्हींच सिद्ध करूं लागलो, व आधुनिक वैद्यक तज्ञांना आयुर्वेदाविरुद्ध जोरानें ओरड करण्याची संधि आणून दिली.

रुग्णालयें कशी चालवावीत ?

आतां तरी पुढें ही दृष्टि बदलून, मूलगामी दृष्टीनें आयुर्वेदीय रुग्णालयें चालविलीं तर १० वर्षांत काय चमत्कार घडून येतील तें पहावें, अशी माझी नम्रपणें सूचना आहे. ज्या गुरुवर्यांनीं त्याग व कष्ट सहन करून संस्था चालविल्या व वाढविल्या त्याबद्दल त्यांना शतशः कृतज्ञतापूर्वक धन्यवाद देऊनहि मूळ संस्थेची उभारणीच कशी चुकीची झाली हें व्यक्त करणें कर्तव्य वाटतें, म्हणूनच हें लिहिलें आहे.

'आप्त' जनांच्या हातीं सत्ता द्यावी

वैद्यक शास्त्राची उभारणी व्यावसायिक भूमिकेवरून व मानव स्वभावाचे जन्मजात दोष (Weaknesses) व परिस्थितीची अडचण ही सतत विचारांत घेऊनच करावयाची असेल तर शमन-चिकित्सेशिवाय तरणोपाय नाहीं. पण त्याचा परिणाम म्हणून दिवसेंदिवस सर्व मानवसमाज सतत रोगी होत जाणारच व निरोगी कधींच होणार नाहीं. पण मानवसमाजाचे जीवन विकासी व सुखी व्हावें असें वाटत असेल तर कोणत्याहि शास्त्राची व विशेषतः आरोग्यशास्त्राची उभारणी आध्यात्मिक, निदान नैतिक, भूमिकेवरून तरी झाली पाहिजे व त्यासाठीं आरोग्य-शास्त्राचा विकास व धोरण ठरविण्याची सत्ता आप्त (ज्याचें जीवन समाजाच्या हितासाठींच असते) अशा लोकांच्या हातीं असली पाहिजे.

रोग्यांना चिकित्सकांची सहानुभूति हवी.

"हॉस्पिटलमध्यें डॉक्टरांनीं रोग्याशीं अशा रीतीनें वागलें पाहिजे कीं, डॉक्टर हा आपल्या कुटुंबांतलाच एक इसम आहे, असें रोग्याला वाटावें" असे उद्गार आरोग्य-खात्याचे मंत्री श्री. शांतिलाल शहा यांनीं मुंबईत जे. जे. हॉस्पिटलमध्यें ग्रँट मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं रोग्यांच्या कल्याणाकडे लक्ष देण्यासाठीं स्थापन केलेल्या समितीच्या कार्याचें उद्घाटन करतांना काढले.

रोग्याचीं शारीरिक व मानसिक दुःखें

रोग्याला शारीरिक दुःख तर असतेच, पण त्याशिवाय त्याच्यामागें अनेक काळज्याहि असतात, अशा वेळीं डॉक्टर त्याच्याशीं मित्रत्वानें वागल्यास त्याचें मन उल्हसित राहण्यास मदत होते, असेंहि ते म्हणाले.

स्वस्त व परिणामकारक उपचार

तुम्ही डॉक्टर होऊन बाहेर पडाल तेव्हां रोग्यांना महाग औषधें घेण्याचा सल्ला न देतां स्वस्त व परिणामकारक अशीं औषधें घेण्याची शिफारस करा, असा त्यांनीं विद्यार्थ्यांना उपदेश केला आणि रोग्यांच्या कल्याणाचें कार्य सुरू केल्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले.

पेशन्ट-वार्डांतील एका छोट्या ग्रंथालयाचेंहि मंत्र्यांनीं उद्घाटन केलें.

या कॉलेजांतील ६० विद्यार्थ्यांनीं आठवड्यांतून तीन तास या समितीच्या कार्यासाठीं देण्याचें ठरविलें आहे.

पवित्र नेपाल कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहाः—नेपाल हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३१२०००।२००१ नेपाल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संतत (टायफॉइड) ज्वराचे ४ अनुभव

लेखक:— वैद्य वि. रा. वैद्य शिंदखेडा

शिंदखेडा हें दहा हजार वस्तीचें गांव आहे. येथें वैद्य व डॉक्टर मिळून ७-८ जण वैद्यक व्यवसाय करतात. मुदतीच्या तापाच्या निरनिराळ्या ४ रुग्णासंबंधीं माझे अनुभव यथामति येथें देत आहे.

माझी मुलगी वय ९ वर्षे, मुदतीचे तापानें (टायफॉइडनें) आजारी होती. त्यावेळीं गांवांतील दोघा डॉक्टरांना मीं बोलाविलें. त्यांनीं टायफॉइड असल्याचें निदान केलें व क्लोरोमायसेटीन देण्यास सांगितलें. त्याप्रमाणें दोन बाटल्या मागविल्या व गोळ्या देण्यास सुरवात केली. २४ गोळ्या दिल्या-नंतर तिचा ज्वरवेग कमी झाला. पुन्हां डॉक्टरांना बोलावलें व पुढें काय करायचें तें विचारलें. त्यावेळीं त्यांनीं सांगितलें कीं, पुन्हां एक बाटली क्लोरोमाय-सेटीन द्या, कारण ताप उलटण्याची भीति असते; म्हणून पुन्हां क्लोरोमायसेटीन सुरू केलें. त्याचें प्रमाण पहिल्या वेळेस दर ५ तासांनीं एक गोळी याप्रमाणें २ दिवस, पुढें ६ तासांनीं एक गोळी याप्रमाणें २ दिवस, नंतर ८ तासांनीं १ गोळी याप्रमाणें २ दिवस, नंतर १२ तासांनीं १ गोळी याप्रमाणें २ दिवस, नंतर २४ तासांनीं १ गोळी याप्रमाणें ५ दिवस असें डॉक्टरांनीं मला समजावून सांगितलें. त्याप्रमाणें मी गोळ्या दिल्या व माझी मुलगी बरी झाली. पण मी स्वतः घरचा चिकित्सक असूनहि मला केवळ औषधें वगैरेसाठीं १५० रुपये खर्च आला.

दुसरा अनुभव

त्यानन्तर कांहीं महिन्यांनीं माझा भाऊ वय वर्षे १२ हा मुदतीच्या तापानेंच आजारी झाला. या वेळीं मी कोणाचाहि सल्ला न घेतां त्यास माझें घरचेंच औषध सुरू केलें व त्यानें त्यास बरें वाटलें.

तिसरा अनुभव

नन्तर कांहीं दिवसांनीं माझ्याकडे एका वैद्या-कडून बोलावणें आलें. मी तेथें गेलों व मुदतीच्या तापानें आजारी असलेल्या एका रुग्णाची प्रकृति पाहिली. मीं वैद्याला विचारलें आपण या रोग्यास काय औषध दिलें ! त्यांनीं सांगितलें कीं, अभयादि काढा व त्रिभुवन-कीर्ति दिली. मध्यें अमृतारिष्ट ज्वराकरितां दिलें. त्यावेळीं त्या रोग्यास तीव्र ज्वर होता. बडबड, उठून पळणें, नाकांत बोटें घालणें वगैरे चालू असून नजरहि गैरशुद्धीसारखी होती.

लिहून दिलेलीं औषधें

सदर रुग्णास मी खालील औषधें लिहून दिलीं. सुंठ (चिंचोकी प्रमाण), गांठी पिंपळी, मनुका, बाळहिरडा, खडीसाखर, कोष्टकोलिंजन, तुळसमंजरी, जेष्ठमध. ह्या जिनसा दूध व तितकेंच पाणी घेऊन त्यांत घातल्या. त्याचा १/४ काढा केला व नंतर त्यांत मध व वात-विध्वंसनरस नं. २ घातला. हा काढा सकाळीं व रात्रीं असा ४ दिवस दिला. दुपारीं गुळवेलसत्व, प्रवाळ मिश्रण पाण्यांतून दिलें. ताप कमी कमी होत गेला. बडबड कमी झाली. रुग्ण पूर्ण बरा झाला.

चौथा अनुभव

एका बडगुजर गरीब शिंप्याची मुलगी, वय वर्षे १०. मुलीस ताप आला. प्रथम कांहीं घरगुती उपचार केले. त्यानें ताप उतरेना. नंतर मीं पाहिलें व त्यास सांगितलें कीं, ताप मुदतीचा आहे; लक्षणें त्या प्रमाणें दिसत आहेत. कोणा डॉक्टरास दाखवून खात्री करून घ्या.

नन्तर डॉक्टरला बोलावलें व त्यांनीं रुग्णास तपासलें. प्रथम पोट पाहिलें तें ताठरल्यासारखें व निबरट होतें. जिभेवर पिवळट थर, थोडासा खोकला व बडबड होतीच. ज्वराचा वेग १०४° पर्यंत होता. डॉक्टरनें निदान टायफॉइडचें केलें व क्लोरोमायसेटीन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देण्यास सांगितलें. त्याप्रमाणें मी त्यांना क्लोरोमायसेटीनच्या दोन बाटल्या आणण्यास सांगितलें. त्यांची इतके पैसे खर्च करण्याची ताकद नव्हती. घरांतील माणसांच्या भिडेस्तव त्यांनीं कर्ज काढून दोन बाटल्या मागवल्या व माझे हातून गोळ्या देण्यास सुरुवात केली.

७ दिवसांत गोळ्या संपल्या

रोज टॅंपरेचर (तापमान) घेणें, प्रकृति पाहाणें, ग्लिसरीनची पिचकारी देऊन शौचास करविणें, असें ७ दिवस झालें. क्लोरोमायसेटीनच्या गोळ्या संपल्या. मी पुन्हां क्लोरोमायसेटीनची एक बाटली आणण्यास सांगितलें.

पुनः ताप वाढला

त्या वेळेस ज्वर ९९·५° होता. रोग्यास थोडी शुद्धि होती. ताप आतां निघून जाईल असें घरांतील माणसांना वाटलें. पण असा विचार करतां करतां २ दिवस औषधावांचून गेले. ताप पुन्हां १०४° वर गेला. पुन्हां पूर्ववत् स्थिति झाली.

बापानें स्पष्ट सांगितलें

मी सांगितलें कीं, पुन्हा क्लोरोमायसेटीनच्या गोळ्या आणाव्या लागतील, त्या वेळीं रुग्णाच्या बापानें मला स्पष्ट सांगितलें कीं, पुन्हां माझी इतके पैसे खर्च करण्याची ताकद नाहीं. माझी मुलगी मेली तरी चालेल. मीहि हताश झालो व आतां काय करावें ह्या चिंतेंत पडलो. मी जर माझें औषध दिलें तर त्याची प्रतिक्रिया भलतीच न होवो ! कारण क्लोरोमायसेटीनवर माझें औषध दिलें तर चालेल कां, असा विचार माझ्या मनांत घोळूं लागला.

बापाचें खंबीर मन

परन्तु रुग्णाच्या बापानें मला स्पष्ट सांगितलें कीं, तुमचेवर आम्ही कोणीहि कोणतेंहि निमित्त देणार नाहीं. आमचें दैव. तुम्हावर आमचा पूर्ण विश्वास आहे. त्यांचें मन जेव्हां खंबीर वृत्तीचें मी पाहिलें तेव्हां मीहि धाडस करून वरीलप्रमाणें सुंठ, मनुका वगैरेचा दूध काढा ५ दिवस दिला. ताप हळूं हळूं उतरूं लागला. सहाव्या दिवशीं मुलगी शुद्धीवर येऊन थोडी बोलूं लागली. नंतर पुन्हां तोच काढा आणखी २ दिवस दिला. असे ७ दिवस पूर्ण झाले. मुलीस पुष्कळच बरें वाटलें. पुन्हां ५ दिवस महासुदर्शनाचा फांट दिला. त्यामुळें रोग्याची भूक वाढूं लागली. पोट अगदीं मऊ झालें. खोकला, ताप अजिबात नाहीं, अशी खात्री झाली.

तीस दिवसानंतर दूध, पेज

तीस दिवसानंतर दुधापासून सुरुवात केली. दूध पचतें, ताप वाढत नाहीं असें दिसलें. मग तांदुळाची पेज देण्यास सुरुवात केली. त्याबरोबर अमृतारिष्ट सकाळ, दुपार, रात्रौ १५ दिवस दिलें. मुलगी पूर्ण बरी होऊन शाळेंत जावयास लागली आहे.

या अनुभवापासून वाचकांनीं योग्य तो बोध घ्यावा व आपले अनुभवहि इतरांच्या विचारासाठीं प्रसिद्ध करावेत अशी विनंति आहे.

———

आयुर्वेदके क्षेत्रमें एक आगे कदम

– आरोग्य दर्पण –

(मासिक पत्र)

उँझा फार्मसी द्वारा इस मासिक पत्रका ता. १ मार्च १९५४ से पुनः प्रकाशन हो रहा है।

आयुर्वेदके सर्व प्रश्नोंकी शास्त्रीय एवं वैज्ञानिक ढंगसे चर्चा इत्यादि इसके प्रमुख अंग होंगे।

वार्षिक मूल्य केवळ दो रुपिया म. ऑ. से भेजकर आजही ग्राहक बनिये। वी. पी. नही।

मूल्य भेजनेका पता--

जयंत एन्ड कंपनी

सिटी पोस्टक सामने, पुना नं. २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय औषधी पाठचिंतामणि

[सहकारी पद्धतीनें करावयाचीं औषधें या लेखमालेंत ठिकठिकाणीं आयुर्वेदीय औषधी पाठचिंतामणीचा उल्लेख आला आहे, तो वाचून अनेकांनीं त्या ग्रंथाविषयीं जिज्ञासा व्यक्त केली; म्हणून आयुर्वेदीय औषधी पाठचिंतामणीविषयींची सविस्तर माहिती पुढें दिली आहे. ज्यांना आपले अनुभविक पाठ त्या ग्रंथांत समाविष्ट व्हावेत असें वाटत असेल त्यांनीं आपले पाठ तात्बडतोब पत्रानें पनवेल येथें कळवून ग्रंथनिर्मितीचा उद्देश सफल करावा. —संपादक]

मुंबई राज्यांत लहानमोठे, नवेजुने मिळून जवळ जवळ १०० आयुर्वेदीय औषधि कारखाने आहेत. ह्यांमध्यें हिंदी, मराठी, गुजराथी व कानडी इतक्या भाषिकांचा समावेश आहे. रोग आणि हवामान यांच्या अनुरोधानें या कारखान्यांनीं तयार केलेले कल्प अथवा औषधें विविध आहेत. कांहीं औषधांचीं नांवें सारखीं आहेत, परन्तु त्यांतील औषधें भिन्न आहेत. उ. शंखोदर, अमृतवटी इ. कांहीं औषधांचे पोटभेद अनेक आहेत. उ. कुमारीआसव, कामदुघा, गंधकरसायन, बाळंतकाढा इ. इ. अनेक कारखान्यांनीं हे पोटभेद पुरविण्याचा प्रयत्न केला आहे; परन्तु त्यांतहि पाठभिन्नता आहे. औषधांचे रंग अथवा रस यांतहि केव्हां केव्हां विभिन्नता आढळते.

औषधियोजनेवर परिणाम होतो

अशा ह्या परिस्थितीमुळें कोणत्या कारखान्यानें कोणतीं द्रव्यें त्या योगांत घातलीं आहेत हें रुग्ण अथवा वैद्य यांना अवगत होत नाहीं. त्याचा परिणाम औषधियोजनेवर होतो.

औषधिपाठ माहीत नसल्यानें कांहीं वैद्य कारखानदारांचीं औषधें वापरीत नाहींत. एकतर ते स्वतः घरीं तयार करतात, नाहींतर माहितगार माणसाकडून विकत घेतात. असें जरी आहे तरीपण एकंदरींत रुग्ण आणि वैद्य यांच्या मनांत कारखान्यांचीं औषधें याबाबत अज्ञान आणि म्हणून कांहीं अंशीं साशंकता वावरत असते.

औषधांची प्रतिष्ठा वाढावी

ही परिस्थिति दूर व्हावी, औषधिपाठ व प्रक्रिया याबाबतची माहिती सर्व जनतेसमोर स्पष्टपणें रहावी, शक्यतर एकाच नमुन्याचीं औषधें सर्वत्र उपलब्ध व्हावींत आणि त्यामुळें कारखानदार व त्यांचीं औषधें याबद्दल सव लोकांत प्रेम व आदर सारखा असावा, त्यांची प्रतिष्ठा वाढावी व एकजूट व्हावी एतदर्थ औषधि पाठचिंतामणीची आवश्यकता निकडीनें भासत आहे.

ड्रग ॲक्टचा उद्देश

औषधीनिर्मितीमध्यें लबाडी होऊं नये यासाठीं सन १९४० सालीं ड्रग ॲक्ट पास करण्यांत आला. त्यावेळीं शुद्ध आयुर्वेदीय औषधें त्यांतून वगळण्यांत आलीं होतीं. तथापि सन १९४९ सालीं त्या कायद्यांचीं कांहीं कलमें मुंबई राज्यांत अमलांत आणलीं, तेव्हां तीं आयुर्वेदीय औषधांनाहि लागू व्हावींत अशी मुंबई सरकारची इच्छा होती. याचें कारण असें सांगण्यांत आलें कीं, तसें न केल्यास आयुर्वेदीय नांवाखालीं निकृष्ट प्रतीचें औषध विकण्यास वाव राहील.

इंडियन फार्मासिस्ट ॲसो. ची कामगिरी

त्यावेळीं इं. फा. असोसिएशनचे कार्यकर्त्यांनीं सरकारचे निदर्शनास आणलें कीं, ड्रग ॲक्ट लागू करण्यापूर्वीं जी पूर्वतयारी लागते ती आयुर्वेदीय औषधांचे बाबतींत झालेली नसल्यानें आजच त्या औषधांस ड्रग ॲक्ट लागू करणें आयुर्वेदास घातक होईल.

मुंबई सरकारचें म्हणणें

शुद्ध आयुर्वेदीय औषध कशास म्हणावें असाहि वाद त्यावेळीं निर्माण झाला होता व ब्रिटिश फार्मा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोपियांत ज्याचा उल्लेख आहे असें मूळ द्रव्य ज्या औषधांत असेल तें शुद्ध आयुर्वेदीय नव्हे असें मुंबई सरकारचें म्हणणें होतें. ही विचारसरणी कशी चुकीची आहे हें इं. फा. अ. चे कार्यकर्त्यांनीं सरकारला पटवून दिलें.

सरकारची सूचना

याप्रमाणें इं. फा. अ. चे प्रयत्नास यश येऊन त्यावेळीं सरकारनें आपले मताचा आग्रह धरला नाहीं; मात्र औषधी-पाठचिंतामणीचे निर्मितीस आयुर्वेदीय औषधी कारखानदारांनीं मान्यता द्यावी असें सरकारनें सुचविलें व कारखानदारांचे वतीनें ती सूचना मान्य करण्यांत आली.

पाठचिंतामणि तयार झाला

जनता आणि सरकार यांची मनःस्थिति अथवा यांच्या अपेक्षा लक्षांत घेऊन आम्ही (धूतपापेश्वर इंडस्ट्रीज लि. ह्या आयुर्वेदीय औषधी कारखान्यानें) हें काम अंगावर घेतलें. या कामीं एक औषधितज्ज्ञ* वैद्य, एक निखिल भारतीय आयुर्वेद मंडळाचा आयुर्वेदाचार्य व इतर सहाय्यक यांची नेमणूक केली. या मंडळींनीं रसयोगसागर, भारत-भैषज्य-रत्नाकर आदि रससंग्रह व चरक सुश्रुतादि संहिता यांचें आलोडन करून व प्रचलित औषधी कल्प लक्षांत घेऊन तीन वर्षांच्या परिश्रमानंन्तर सर्वसंग्राहक आणि नित्योपयोगी असा एक आयुर्वेदीय औषधी पाठ-चिंतामणि तयार केला.

पाठचिंतामणीचा उपयोग

या संकलनाचा सरकार, स्थानिक स्वराज्यसंस्था, रुग्ण व वैद्य यांना विशेषत्वानें उपयोग होण्यासारखा आहे. हवामान व रोगराई अनुसार कांहीं विशिष्ट योग असूं शकतील, परंतु सर्वसामान्य औषधींचा वर्ग एकच ठेवावयाचा म्हटला तर त्यास ह्या पाठ-चिंतामणीची फार मदत होण्याची शक्यता आहे. ह्या सोयीमुळें औषधालयास औषधींबाबतचा लागणारा खर्च, रुग्णागणिक लागणारीं औषधें याबाबत एक-वाक्यता, एकसूत्रता निर्माण होण्याची शक्यता संभवेल. असें झालें म्हणजे रोग, औषधें आणि खर्च याबाबत संशोधन व काल आणि पैसा यांची बचत करणें सहज शक्य होईल.

[* आयुर्वेद सेवासंघाचे सेवानिवृत्त जीवसदस्य वैद्य पु. वि. धामणकर यांनीं हें महत्वाचें काम पार पाडलें याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत. -संपादक]

सर्वोपयोगी ग्रंथ

एका राज्यांत हा पाठचिंतामणि संमत व रूढ झाला म्हणजे त्याचें अनुकरण इतर राज्यांस करता येणें शक्य होईल. हे परिश्रम इतर राज्यांच्या कामीं येतील व त्यांचें काम उत्तरोत्तर सोपें जाईल. म्हणून धूतपापेश्वर संस्थेनें हा नमुना तयार केला व त्याचा परिचय आज आपणांस करून देत आहों.

ग्रंथाचीं ११ सदरें

या ग्रंथांत (१) पाठनिश्चिति (२) द्रव्यसंग्रह (३) द्रव्यनिर्णय (४) द्रव्यशोधन (५) प्रक्रिया (६)

सेवा

जनतेची सेवा करणें हा मनुष्यमात्राचा धर्म आहे. त्यांतहि आजारी माणसाची सेवा करणें हा अति उत्तम धर्म होय. उत्तम गुण-कारी औषध देऊन रोगाचें निवारण केल्यानें रोगी माणसाची सेवा उत्तम घडते.

अशी सेवा करण्यासाठीं उत्तम व अस्सल औषधेंच वापरलीं पाहिजेत. अशा खात्रीच्या औषधी खरेदी करण्याचें स्थान-

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स

पायधुनी मुंबई नं. ३

(टेलिफोन नं. ३१८५८) हेंच आहे.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें

मुख्य केंद्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काल (७) सिद्धिप्रमाण (८) परिगणन (९) रोग (१०) मात्रा (११) अनुपान, या अकरा सदराखालीं पाठांचें विवेचन केलें आहे.

१२९१ पाठांचें संकलन

(२) हें काम आम्ही बरेच दिवसांपासून हातीं घेतलें आहे. आतापर्यंत [भाग १] कल्क (६०), चूर्ण (३९), गुटिका-वटिका (७२), वर्ति (२९), गुग्गुल (८८) [भाग २] खल्वीरसायनें (१५०) [भाग ३] कूपीपक्वरसायनें (१४८), पर्पटी (६३), पोट्टली (३८), [भाग ४] आसवारिष्टें (१३५) [भाग ५] अवलेह-पाक (८४), घृत-तैल (३१३), [भाग ६] भस्में (४२), सत्व १९, द्रुति ११. एकूण १२९१ पाठांचें संकलन झालें आहे. ह्या कामीं, भारतभैषज्यरत्नाकर, रसयोगसागर, ह्या दोन संकलित ग्रंथांचें प्राधु यानें साहाय्य घेतलें आहे. ह्या पाठचिंतामणींत मुंबई राज्यांतील विद्यमान आयुर्वेदीय औषधी निर्मात्यांचे बहुतेक पाठ समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. तरीपण ह्याहून कांहीं अन्य पाठ प्रचलित असल्यास त्यांचाहि समावेश ह्यांत करून घेतां यावा म्हणून हें निवेदन करीत आहों.

या ग्रंथाची परिशिष्टें

(३) ह्याशिवाय प्रत्येक भागांत द्रव्यविवेक, द्रव्यपरिचय, द्रव्यांशकल्पना, कोणतें द्रव्य किती पाठांत, कोणत्या अंशानें आलें आहे, तें दाखविणारें पत्रक व रोगवार औषधी योग हीं परिशिष्टेंहि ह्यांस जोडलीं आहेत.

नि. भा. आ. महामंडळाची समिति

(४) हा पाठचिंतामणि विचारांत घेण्याकरितां निखिल भारतीय आयुर्वेद महामंडळानें एक समिति नेमली आहे. समितिचे सदस्य वैद्यवाचस्पति यादवजी त्रिकमजी आचार्य; कविराज प्रतापसिंहजी रसायनाचार्य; पं. वै. हरिदत्तशास्त्री; वै. भि. वि. हेग्वेकर, M. A. M. SC., LL. B., व वै. गं. वि. ऊर्फ नानासाहेब पुराणिक हे आहेत. ह्या समितीची सभा लौकरच बोलवावयाची आहे. तत्पूर्वी निराळ्या कारखान्यांचीं अविकृत व नवीं सूचीपत्रें (व त्यांतील औषधियोगांचे आधारासह समितीपुढें ठेवण्याकरितां आमचे संग्रहीं असण्याची आवश्यकता तीव्रतेनें भासत आहे. म्हणून आयुर्वेदीय औषधि कारखानदार व आयुर्वेदीय औषधि चिकित्सक यांनीं आपापले प्रचलित औषधीयोग(त्यांचे ग्रंथाधारासह) खालील पत्त्यावर कळविणेंचें करावें.

सर्वांस विनंति

इंडियन फार्मासिस्ट असोसिएशन मुंबई या संस्थेच्या सभासदांना हें पत्रक जात आहेच. तरीपण या व्यतिरिक्त इतर कोणी औषधी-व्यवसाय करीत असतील त्या सर्वांनीं ही विज्ञप्ति स्वीकारावी, आमच्या विनंतीस मान द्यावा, आपले समव्यवसायी औषधि-निर्मात्यांसहि हें साहाय्य देण्यास प्रवृत्त करावें व आपलें साहित्य अवश्य पुरवावें ही विनन्ति.

संशोधन विभाग,
धूतपापेश्वर इंडस्ट्रीज लि.,
पनवेल, जि. कुलाबा

सांडू
गोल्ड टॅब्लेटस्
क्षयाच्या प्राथमिक अवस्थेवर अप्रतिम.
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई.

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स—
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते—मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६० वर्षांचे जुने सुप्रसिद्ध व विश्वसनीय औषधी-निर्माते

उंझा फार्मसी लिमिटेड उंझा, (उत्तर गुजरात)

.... कांहीं लोकप्रिय औषधें ....

सर्वांकरितां— ' नवरत्न-रस '
* स्त्रिया, पुरुष, बालक या सर्वांकरितां ही महौषधी आहे. रस-रक्तादि सप्त धातूंची शुद्धि, वृद्धि व पोषण करणें हें 'नवरत्नरसाचें' विशेष कार्य आहे. निरोगी लोकांस रसायन व रुग्णांना उत्तम औषध आहे. किं. २८ गोळ्याचे ५ रु.

स्त्रियांसाठीं— ' सुंदरी-संजीवनी '
* स्त्रियांचे प्रदर, ऋतुदोष, गर्भाशयविकार, वंध्यत्व आदि नष्ट करून शक्ति येते. स्त्री-रोगावर हें अमृततुल्य औषध आहे. किं. ४ औंस २ रु.

मलेरियांवर— ' एल्स्टो पिल्स '
* ह्या गोळया सप्तपर्ण, कालमेघ, कुटकी आदि वनस्पतींच्या घन सत्त्वापासून बनविल्या आहेत. ह्या गोळ्या मलेरिया, शीतज्वर ह्या तापांवर अत्यंत गुणकारी असल्याचें सिद्ध झालें आहे. किं. ५०० गोळया (१० तो.) ३॥ रु.

आंव व मुरड्यावर- ' अँटी-डिसेंट्रॉल '
* ही पर्पटी इंद्रजव, कुटजत्वक्घन, बिल्व, कापूर, अफू ह्या औषधी द्रव्यांच्या संयोगापासून बनविली आहे. ही जुनाट आव, मुरडा, संग्रहणी ह्यावर अतिशय गुणकारी आहे. पहिल्याच दिवशीं गुण दिसूं लागतो. १ बा. १ रु.

लहान मुलांकरितां- ' शिशु-संजीवनी '
* लहान मुलांचा तार, हगवण, दूध न पचणें, खोकला वगैरेंवर उत्तम औषध. मुलांना नियमित दिल्यानें मुलें बाळसेदार व धष्टपुष्ट होतात. १ बा. ।।। रु.

सायरप- ' शंख-पुष्पी '
* स्मरणशक्तिवर्धक व ज्ञानतंतूंना बलदायक असें हें उत्तम ब्रेन टॉनिक आहे. विद्यार्थी, कारकून, वकील, प्रोफेसर, अधिकारी वगैरे मेंदूचीं कामें करणाऱ्या लोकांना हें अत्युत्तम औषध आहे. १ बा. १। रु.

' अष्टावक्र-रस '
* वलिपलितनाशक, बलवर्धक, पौष्टिक, आरोग्यरक्षक व बुद्धि आणि कांति-वर्धक असें आयुर्वेदीय औषध आहे. किं. १ तो. ४० रु.

' बृहत्कस्तुरीभैरव ' [स्वर्णयुक्त]
* सन्निपात, आंत्रिकज्वर, वातज्वर, कफज्वर आणि वातकफज्वर ह्या तापांत उत्तम उपयोगी आहे. तसेंच मंथरज्वर व न्युमोनिया यांतहि हा योग सत्वर गुण देतो. किं १ तो. १८ रु.

' बृहत्-वातचिंतामणी '
* आयुर्वेदांतील वातरोगांवर हें एक दिव्य औषध आहे. हृदयाला व मेंदूला बल देणारें आहे. मेंदूच्या ज्ञानतंतूच्या विकृतीमुळें उद्भवणाऱ्या सर्व विकारावर उत्तम गुणदायी आहे. मेंदूची क्षीणता, रक्तदाब, हिस्टेरिया वगैरेवरहि लाभदायक आहे. किं. १ तो. ३५ रु.

उंझा फार्मसी लि. उंझा [उ. गुजरात]

महाराष्ट्र एजंटः—जयंत अँड कंपनी, लक्ष्मीरोड, पुणें सिटी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सोनामुखी

लेखकः-श्री. प्र. ग. कुलकर्णी, बी. फार्म,
हैद्राबाद

नांवें:— संस्कृत— मार्कंडी
गुजराथी—मिंढी आवळ
तामिळ—निलाविरै
बंगाली—सोनपत
इंग्लिश— Senna
लॅटिन—Cassia acutifolia,
Cassia augustifolia.

सोनामुखीचा उपयोग

सोनामुखीचीं पानें सौम्य विरेचक म्हणून आयुर्वेदांतील अनेक औषधांमध्यें वापरलीं जातात. नुसती पानांची भुकटीसुद्धां गरम पाण्याबरोबर रात्रीं निजतेवेळीं घेण्यास, बद्धकोष्ठाचा विकार असणाऱ्या रोग्यास वैद्यलोक सांगतात. सोनामुखीची लहान आंतड्याच्या स्नायूवर उत्तेजक क्रिया होत असल्यानें सामान्य मनुष्यास याचें सेवनानें जुलाब होतात, तर बद्धकोष्ठाचा विकार असलेल्यांना शौचास साफ होते. सोनामुखीच्या या गुणधर्मामुळें बद्धकोष्ठाचा विकार असणाऱ्यांना पुष्कळ दिवस सातत्यानें सोनामुखी घेत राहिल्यास बद्धकोष्ठाचा विकार (लहान आंतडें अधिक कार्यक्षम झाल्यानें) नाहींसा होऊं शकतो. *

सोनामुखीच्या शेंगमधील गुणधर्म

सोनामुखीच्या शेंगामध्येंहि वरील गुणधर्म आहेतच. शिवाय सोनामुखीच्या पानांची भुकटी सेवन केली असतां पोटांत मुरडा होऊन थोड्याफार वेदना होतात, त्या शेंगाच्या सेवनानें कमी प्रमाणांत होतात. सोनामुखीच्या शेंगाबाबत आणखी एक विशेष गोष्ट दिसून येते ती ही कीं, बियासह शेंगाचा काढा करून घेतल्यास पोटांत अधिक कळा येतात; परंतु बिया काढून शेंगांचा काढा करून तो घेतला तर पोटांत कळा फारच कमी-जवळ जवळ येतच नाहींत. असें आढळून आलें आहे. याचें कारण काय असावें याचा मात्र उलगडा अद्याप झालेला नाहीं.

* हें विधान सर्वमान्य होण्यासारखें नाहीं. -संपादक

शेंगामधील विरेचक द्रव्याचें प्रमाण

शेंगामधील विरेचक द्रव्याचें प्रमाणहि पानापेक्षां अधिक, सुमारें तिप्पट असतें. या सर्व गोष्टींचा विचार करतां सोनामुखीच्या शेंगाचाच औषधामध्यें अधिक वापर व्हावयास पाहिजे; परंतु आपल्याकडे औषधांमध्यें फक्त सोनामुखीच्या पानांचाच वापर सामान्यतः आढळतो, ही आश्चर्याचीच गोष्ट समजली पाहिजे.

सोनामुखीच्या २ जाति

सोनामुखीच्या दोन जाति आहेत. एक अलेक्झांड्रियन अथवा अरबी, आणि दुसरी तिनेवेल्ली अथवा हिंदी. यांनाच लॅटिनमध्यें अनुक्रमें Cassia acutifolia आणि Cassia augustifolia अशीं नांवें आहेत. अरबी सोनामुखीचीं पानें हिंदी सोनामुखीच्या पानापेक्षां आकारानें विशेषतः लांबीमध्यें लहान असतात. या दोहोंतील आणखी एक महत्वाचा फरक म्हणजे अरबी सोनामुखीच्या पानाची देठाजवळील दोन्ही बाजूची पाती एकमेकांस मिळत नाहींत म्हणजेच पानाची एका बाजूची पात दुसऱ्या बाजूच्या पातीपेक्षां उंचीनें लहान असते. परंतु हिंदी सोनामुखीच्या पानांची देठाजवळील दोन्ही पाती एकमेकांस मिळतात. हिंदी सोनामुखीच्या शेंगाहि अरबी सोनामुखीच्या शेंगापेक्षां अधिक लांब परंतु रुंदीनें कमी असतात. त्याचप्रमाणें त्या बहुधा सरळ असतात, तर अरबी सोनामुखीच्या शेंगा किंचित् वक्र असतात.

हिंदी सोनामुखीची लागवड

अरबी सोनामुखी हिंदुस्थानांत आढळत नाहीं. ती सुदानमध्यें जंगलांत मिळते. तेथें अलिकडे तिची लागवडहि करण्यांत येत आहे. पश्चिम हिमालयांत बारामुल्लासारख्या ठिकाणीं हिची लागवड होऊं शकेल असें वनस्पतिशास्त्रज्ञांचें मत आहे. हिंदी सोनामुखीची लागवड मुख्यतः मद्रासमध्यें तिनेवेल्ली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जिल्ह्यांत होते. मुंबई प्रांतांतहि कांहीं ठिकाणीं हिची लागवड यशस्वी रीत्या करण्यांत आली आहे. उदा. पुण्याजवळील गणेशखिंडींत हिची लागवड केली आहे.

अधिक कार्यक्षम सोनामुखी

हिंदी सोनामुखीपेक्षां अरबी सोनामुखी विरेचक या दृष्टीनें अधिक कार्यक्षम आहे. तिची लागवड भारतांत होणें भारताच्या हिताचें आहे.

सोनामुखींतील भेसळ कशी ओळखावी ?

सोनामुखीमध्यें विशेषतः मुईतरवडीचाच (cassia obovata) भेसळ करण्यासाठीं उपयोग केला जातो. मुईतरवडीचीं पानें टोंकास निमुळती होऊन टोंकदार न होतां गोल (obovate) असतात. तर सोनामुखीचीं पानें टोंकास निमुळती होऊन टोंकदार होतात व त्यांचें टोंक बोटास टोंचेल इतपत तीक्ष्ण असतें. मुईतरवडच्या शेंगाहि अर्धचंद्राकृति असतात तर सोनामुखीच्या जवळ जवळ सरळ असतात.

———

जागतिक आरोग्य-दिन

येत्या ७ एप्रिल रोजीं भारतांत सर्वत्र सहावा जागतिक आरोग्य-दिन साजरा करण्यांत येणार आहे. इतर ठिकाणाप्रमाणें मुंबई राज्यांतहि तो साजरा करण्यांत येईल.

शुश्रूषा व स्वच्छतेकडे विशेष लक्ष

फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांनीं नर्सिंग व स्वच्छतेच्या बाबतींत जें कार्य सुरूं केलें त्यास १९५४ सालीं १०० वर्षें पुरी होत असल्यामुळें या सालच्या आरोग्य-दिनाच्या कार्यक्रमांत नर्सिंग या विषयाकडे विशेष लक्ष देण्यांत येईल.

संघटनेकडून भारताला मदत मिळते

जागतिक आरोग्य संघटना स्थापन झाल्यापासून त्या संघटनेतर्फे करण्यांत येणाऱ्या विविध प्रकारच्या कार्यांत भारत भाग घेत आहे. या संघटनेकडून भारताला भरीव स्वरूपाची मदतहि मिळत आहे.

———

स्वच्छता पाळण्यास कांहींहि खर्च येत नाहीं

“ आरोग्यसंपन्नता ही सुखाची व जीवनानंदाची गुरुकिल्ली आहे, ” असे उद्गार सार्वजनिक आरोग्य खात्याचे उपमंत्री श्री. ब. द. जत्ती यांनीं वडाळी येथें ॲन्टप हिल कामगार वस्तींत कामगारांपुढे बोलतांना काढले. स्वच्छता हा आरोग्याचा पाया असून त्यासाठीं कांहींहि खर्च येत नाहीं, असेंहि ते म्हणाले. आरोग्य व स्वच्छता सप्ताहानिमित्त ही सभा भरविण्यांत आली होती.

———

वाचकांचा पत्रव्यवहारः—

प्रसूतिवेणा येण्यासाठीं

महायोगराजगुग्गुळ उपयुक्त आहे

प्रसूतीचे वेळीं कळा येण्याचें कार्य बरोबर होत नसले म्हणजे कळा आणविण्यासाठीं इंजेक्शन देण्याची हल्लींची पद्धति आहे.

महायोगराजगुग्गुळाचा प्रसूतिवेणा येण्याकरितां सुंदर उपयोग होत असल्याचा माझा अनुभव आहे. मी महायोगराजगुग्गुळ २ गोळ्या (२ गुंजा) ३ पुड्या करून दर तासानें १ पुडी मधांत देण्यास सांगतो. या औषधानें साधारणतः ३ पुड्यांत काम होते. वैद्यबंधूंनीं अनुभव घेऊन प्रसिद्ध करावा.

खर्डा [जि. नगर] —वैद्य भा. श्री. देसवंडीकर, आयुर्वेदतीर्थ

पांढरें कोड

हजारोंचें गेले व त्यांनीं अभिप्राय दिलेले आणि अनेक बक्षिसें मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु.
नकली वैद्यापासून सावध रहा !

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, ‘ आयुर्वेद भवन ’
मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवडक रुग्णाचिकित्सा—

मलक्षीणता, अत्यार्तव व अग्निमांद्य, मलावरोध व शूल.

(लेखकः- श्रीमती लक्ष्मीबाई बोरवणकर आयुर्वेदविशारद, मुंबई २.)

एक ५० वर्षांची वृद्ध स्त्री, पोटांत गुबारा धरतो म्हणून औषधोपचारासाठीं आली. रोगाचा इतिहास विचारतां प्रचारक असल्यामुळें हिंडण्या-फिरण्याचें काम, व वात धरतो म्हणून एकंदरींत खाणें फार कमी हीं विकाराचीं कारणें आढळून आलीं.

छातींत दुखणें, अशक्तता, चक्कर पोटांत गुड-गुड आवाज व मलावरोध व अतिशय अस्वस्थता हीं लक्षणें होतीं.

पुरीषे वायुरंत्राणि सशब्दो वेष्टयन् इव ।
कुक्षौ भ्रमति यात्यूर्ध्वं हृत्पार्श्वे पीडयन् भृशम् ॥

रोगाचें मलक्षीणता असें निदान करून आहारां-तील अन्नाचें प्रमाण वाढवावयास सांगितलें. तसेंच चवळी व मूग यांची उसळ, कोंड्यासकट पोळी, पालेभाज्या यांचा उपयोग करण्यास सांगितलें. कारण मलक्षीणता आहे तेथें मलनिर्मिति झाली पाहिजे. आणि हे अन्नपदार्थ त्यांत चोथा अधिक असल्यानें मलवर्धक आहेत, त्याबरोबर वातशमनासाठीं आंबट गोड असें लिंबाचें सरबत व मधुर ताकहि घेण्यास सांगितलें.

रेचक दिलें नाहीं

या रोग्यांत मलक्षीणता असल्यामुळें त्याचा रेचक द्या असा आग्रह होता तरी रेचक दिलें नाहीं. फक्त आहारांतील वरील बदल केला. लक्ष्मीविलासगुटी १ गुं. प्रवाळ ४ गुं. कुचला १ गुं. अशी १-१ पुडी सकाळ सायंकाळ वातशमन व शक्तिवर्धनासाठीं गरम दुध-साखरेंतून घेण्यास दिली. १ल्या आठवड्यांत बराच आराम वाटला. एकेक लक्षणें कमी होऊन १ महिन्यांत रोगी चांगलाच सुधारला. इतकेंच नव्हे तर पुढील संबंध वर्षांत त्यास औषधाची गरज पडली नाहीं.

अत्यार्तव व अग्निमांद्य

पोटांत गॅस धरतो व अन्न पचत नाहीं म्हणून २५ वर्षें वयाच्या बाई उपचाराला आल्या. ॲनि-मिया आहे असें डॉक्टर म्हणतात, त्यावर बरीच इंजेक्शनें घेतलीं. तात्पुरतें बरें वाटतें. पण कायम गुण येत नाहीं असें त्यांनीं सांगितलें.

पाळीची चौकशी करतां अत्यार्तव आहे असें आढळून आलें व तें बरेच वर्षें आहे असें समजलें. डोकें दुखणें, थकवा, जरा चालतांच दम लागणें, अनुत्साह, अपचन, पोटांत गुबारा, आणि पांडुता हीं लक्षणें होतीं.

अति रक्तस्रुतीमुळें अग्निमांद्य

अतिशय रक्तस्रुति झाल्यास अग्नि मंद होतो व वायूचा अत्यंत कोप होतो. (धातुक्षयात् स्रुते रक्ते मंदः संजायतेऽनलः। पवनश्च परं कोपं याति) बरेच दिवस अत्यार्तव असल्यामुळें अग्निमांद्य व वातप्रकोप आहे, हें निदान ठरलें.

रसधातुगत पित्तदोषपचनाची योजना

रज हा रसाचा उपधातु असल्यामुळें अधिक आर्तव हें रसदुष्टीमुळें आहे व रसदुष्टीमुळें रक्तक्षीणता आहे. तेव्हां प्रत्यक्ष रक्तवर्धक चिकित्सेपेक्षां रसधातूचें सम्यक् पचन करणारी चिकित्साच उपयोगी पडेल असा विचार करून प्रथम अग्निवर्धक व रसाचें सम्यक् पचन व्हावें म्हणून, आरोग्यवर्धिनी २ गुं. शंखभस्म २ गुं. व प्रवाळभस्म ४ गुं. अशी १-१ पुडी सकाळीं व सायंकाळीं दूधसाखरेंतून दिली.

शिवाय जेवणानंतर अशोकारिष्ट

अत्यार्तवांत रक्तपित्ताचा संबंध असतो म्हणून आरोग्यवर्धिनीबरोबर शंखभस्म व प्रवाळभस्म दिलें. त्याचा रसावरहि योग्य परिणाम झाला. शिवाय दोन्ही वेळां जेवणानंतर अर्धा अर्धा औंस अशोका-रिष्ट तितकेंच पाणी मिसळून पिण्यास सांगितलें. या योजनेनें १५ दिवसांत भूक वाढली, अन्न पचूं लागलें, गॅस धरिनासा झाला, हुषारी वाटली आणि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाळीचे वेळीं स्रावाचें प्रमाण बरेच कमी झालें. १ महिनाभर औषध घेतल्यानें तिची प्रकृति सुधारली, वजन वाढलें व चेहेऱ्यावर लाली दिसूं लागली. गेल्या सहा महिन्यांत तिला औषधाची गरज लागली नाहीं.

मलावरोध व शूल

चाळीशीचे सुमाराची एक बाई पोटांत दुखतें म्हणून उपचारास आली. पोटांत व मांड्यांत चावे मारतात असें ती सांगत होती.

१ वर्ष उपचार झाले होते

अत्यंत बेचैनी, तीव्र डोकें दुखणें, श्वास लागलेला, सर्व अंग व मांड्या दुखणें, कंबर दुखणें, खोकला व अत्यंत मलावरोध यांनीं ती बेजार झाली होती. १ वर्ष पर्यंत डॉक्टरांनीं औषधोपचार केले होते पण मलावरोध अगर अन्य कोणतेंहि लक्षण कमी झालें नव्हतें, बाईला ताठ बसतांहि येत नव्हतें.

श्वसनेंद्रियें, पचनेंद्रियें, मलमार्ग, मूत्रमार्ग वगैरे सर्व स्रोतसांचा अत्यंत संकोच झाला असल्यानें बेचैनी (अरति) फार होती.

रुद्ध वायूवर उपचार

स्रोतसांच्या संकोचामुळें 'रुद्धगति वात' हेंच सर्व विकारांचें मूळ होय, म्हणून प्रथम ४ तोळे शुद्ध तिळेल तेल गरम करून दररोज सायंकाळीं पिचकारी सुरू केली. तसेंच रव्याची बरेंच तूप व सैंधव घातलेली पेज दोन वेळ घेण्यास सांगितली, आणि पोटांत हिंगाष्टक १ मासा, सैंधव ४, गुं. संचळ ४ गुं. व कुचला १गुं. अशी पूड सकाळीं १ पुडी व सायंकाळीं गरम पाण्यांतून १ पुडी घेण्यास दिली.

उपचारांचा इष्ट परिणाम

चार दिवसांनीं मलाचे खडे पडूं लागले व श्वास किंचित् कमी झाला. नंतर हाच उपचार १५ दिवस चालू ठेवला. त्यामुळें दमा, खोकला बरा झाला. भूक लागूं लागली. डोकेदुखी थांबली, अस्वस्थता जाऊन बाई ताठ बसूं लागली. पोटांत व मांड्यांत चावणें पहिल्याच दोन दिवसांत कमी झालें होतें.

नंतर दोन्ही जेवणानंतर दशमूलारिष्ट अर्धा औंस तितकेंच पाणी घालून घ्यावयास दिलें. १ महिन्यांत बराच फरक पडून रोगी स्त्री काम धंदा करूं लागली.

जामनगर संशोधन संस्था

केंद्रीय सरकारच्या जामनगर येथील आयुर्वेदीय संशोधन संस्थेंत निरनिराळ्या जागा भरणें आहेत व त्यांसाठीं योग्य उमेदवारांची नांवें सुचवावीत अशी सूचना त्या संस्थेच्या डायरेक्टरांनीं केली आहे.

१] हाऊस फिजीशियन्स [पगार १६०-१०-३३०] डी. ए. एस्. एफ्. [रुग्णालयीन अनुभवासह] या शिवाय सिस्टर्स, स्टाफ नर्सिस, लॅबोरेटरी असिस्टंट्स्, ड्राफ्ट्समन् स्टेनोग्राफर या भूमिकेंतून काम करणारे लोक हवे आहेत.

पाश्चात्य इंजेक्शन शास्त्रावरील

दोन दुर्मिळ ग्रंथ !

(१) सचित्र इंजेक्शन विज्ञान:-या इंजेक्शन क्रिया व द्रव्य विज्ञानाची अद्यावत् माहिती देणाऱ्या दुर्मिळ ग्रंथाची संपूर्ण सुधारलेली विस्तृत नवीन आवृत्ति नुकतीच प्रसिद्ध झाली. या आवृत्तींत ३० चित्रें, ४० प्रकरणें, ४०० पृष्ठें आणि १ हजारावर अद्यावत् इंजेक्शन द्रव्यें यांची विस्तृत माहिती आली आहे. किंमत फक्त ६ रु. टपाल खर्च निराळा.

(२) इंजेक्शन चिकित्सा:- वरील ग्रंथांतील इंजेक्शन द्रव्याचा, कोणत्या रोगांतील कोणत्या अवस्थेंत निश्चितपणें कसा उपयोग करावयाचा? याची विस्तृत माहिती देणारा, लौकरच दुर्मिळ होणारा ग्रंथ. २६ प्रकरणें, २७५ पृष्ठें. किंमत ६ रु. टपाल खर्च निराळा.

मिळण्याचीं ठिकाणें:—

(१) वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

(२) सुबोध वैद्यक ग्रंथमाला, कागल

(जि. कोल्हापूर)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ओला व कोरडा इसब

(भिषग्भारती मासिकांतील प्रश्नोत्तरी)

प्रश्नः- मला १५ वर्षांपासून इसब आहे. पुष्कळ औषधें केलीं पण तो जात नाहीं. रामबाण औषध सुचवाल तर ऋणी होईन.

उत्तरः- इसबासाठीं कोणतेंच रामबाण औषध नाहीं व असेल तर तें मला माहित नाहीं. जितके इसबाचे रोगी तितकीं त्याचीं औषधें अशी स्थिति आहे. एकच औषध प्रत्येक रोग्यास लागू पडत नाहीं. कोणाचा इसब एक पैशाच्या औषधानें बरा होतो, तर कोणाचा डीप एक्सरे वगैरे वगैरे उपचार व लाखो रुपये खर्च करूनहि जात नाहीं.

प्रत्येक रोग्यांत कोणती ना कोणती औषधी गुणकारी म्हणून ठरूं पहाते. मी जर इसबासंबंधीं सर्व गोष्टींचा संग्रह करूं म्हणेन तर अकबर व बिरबलाच्या गोष्टीप्रमाणें हजार एक चुटके जरूर जमा होतील.

आपल्या शरीराच्या चामडींत परमात्म्यानें अनेक करामती केलेल्या आहेत. हृदयाखालोखाल दुसऱ्या नंबरचा शरीरांतील कोणता अवयव असेल तर तो चामडी होय असें माझें मत आहे. चामडी हें देहाचें कवच आहे. देहाच्या रूप व लावण्य हा यांचा तराजू आहे. सर्वांची कातडी एकसारखी नसते. कातडीच्या भिन्नभिन्न भागांची प्रतिक्रिया पण भिन्नभिन्न अनुभवास येते. चेहेऱ्यावर निरनिराळे भाव दिसून येतात तसेच शरीरावर अनेक मानसिक आवेगांचे परिणाम दिसून येतात. व अशा प्रकारच्या मानसिक आवेगांचा परिणाम हाच इसबासारखे त्वचेचे रोग निर्माण करतो. अशा प्रकारें इसब हा या त्वचेचाच रोग आहे.

माझ्या वैद्यक व्यवसायाच्या प्रारंभींच्या काळांत मी इसबाला रक्तविकार समजत असे व इसबाच्या रोग्याला मोठ्या प्रमाणांत दूध या आहारावरच ठेवत असें. एका रोग्याला मी ६ महिने फक्त दुधावर ठेवलें होतें. या सर्व प्रयोगांनीं मला असें शिकविलें आहे कीं आहाराच्या पथ्याचा इसब या रोगाशीं कांहीं संबंध नाहीं. सबब आतां मी इसबाच्या रोग्याकडून कोणतेंच पथ्य पाळून घेत नाहीं. मीठ मिरची बंद करण्यांत पण कांहीं तथ्य आहे असें मला वाटत नाहीं. थोडक्यांत म्हणजे याला रक्तविकार मानून कडक पथ्य पाळण्याची जरूरी मला वाटत नाहीं.

असा कोणताच आहार नाहीं कीं जो इसबाला चांगला आहे असें सांगतां येईल. खाण्यापिण्याशीं इसबांचा संबंधच नाहीं. याचा अर्थ कोणी असा करूं नये कीं मिरची मसाला खूप खाल्ला तरी हरकत नाहीं. युक्ताहारांत मसाल्यास पण स्थान आहेच. परन्तु कोणत्याहि वस्तूचा अतिरेक झाला कीं नुकसान ठरलेलेंच आहे.

बाजारांत इसबावर अनेक जातीचीं औषधें (नाना प्रकारचीं लोशन्स) विकलीं जात आहेत. हीं औषधें वापरावीत असें माझें म्हणणें नाहीं. सध्यांच माझ्याजवळ एक रोगी आहे; त्यानें बाजारांतील कांहीं मलम (लोशन) वापरलें व त्याचा पाय फदफदून आला आहे. आंत आग पेटत आहे, फोड निघत आहेत असें रोगी सांगत आहे. सबब बाजारी मलमें न वापरण्यांत शहाणपणा आहे. बाजारांत विकत मिळणारीं कांहीं औषधें चांगलीं पण असतील; पण मला सर्वच औषधांचे अनुभव असणें कसें शक्य आहे ?

इसबाच्या २ जाति

इसबाच्या दोन जाति आहेत. एक कोरडा व दुसरा ओला (स्रावी). कोरडा इसब बरा पण ओला इसब फारच वाईट, सुक्या इसबाला खाज येते त्यावेळीं रॉकेल लावलें तर खाज थांबते; पण मी कोरड्या इसबवाल्यास पुढील प्रयोग सांगतो. तो मला खूपच गुणकारी आढळून आला आहे.

एक ओला (पाणी असलेला) नारळ घ्यावा. त्याचें खोबरें बारीक किसणीवर किसावें. मग जाड कपड्यावर तें खवलेलें खोबरें ठेवून दोन्ही हातानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जोरानें दाबावें. म्हणजे त्यांतून दुधाप्रमाणें पांढरा रस निघेल. जो चोथा निघेल तो उकळत्या पाण्यांत टाकावा म्हणजे त्यांतील तेल त्या पाण्यांत उतरेल. नंतर हा दुधासारखा रस मंदाग्नीवर ठेवून लोणी तापवून तूप करतो त्याप्रमाणें आटवावा. रसाची खरवड खालीं बसेल व वर पातळ तुपाप्रमाणें तेल येईल. वरील पाणी उकळल्यानंतरहि असें तेल (थोडेसें) हातीं येईल.

या तेलाला मी खोबऱ्याचें स्वच्छ तेल * म्हणतो. आज बाजारांत जें खोबरेल मिळतें त्यांत रासायनिक भेसळ असते. सबब रिफाइन्ड तेल वापरू नका अशी मी सर्वांना शिफारस करीत असतो. अशा प्रकारचें काढलेलें स्वच्छ खोबरेल तेल कोरड्या इसबावर लावल्यानें तो इसब जातो. वाळलेले व बिघडलेले खोबरे दाबून काढलेलें तेल माझ्यामते यासाठीं निरुपयोगी आहे. सबब घरींच १०-१२ नारळ फोडून एकदम तेल तयार करणें व तें वापरणें हितावह आहे. या तेलाची मालिश कातड्यास मृदु करते. खाज घालवते, व कातडीच्या कोशांत नवीन प्राण (जीवन) भरतें.

वाहत्या इसबावर

ओल्या इसबाचे पाणी जेथें जेथें लागते तेथें तेथें त्याचा संसर्ग बांधतो व इसब वाढत जातो. कांहीं भागांत आंतून आग होते व तो फदफदून येतो. यासाठीं मला पुढील मलम चांगलें वाटतें व तें मी मुक्त हस्तानें वापरतो.

खर्पर (कॅलमिना प्रिपरेटा)	$2\frac{1}{3}$ मासे
लोकरीतील चरबी (लॅनोलिन)	२ मासे
ऑलिव्ह तेल (स्वच्छ तिळाचे तेल चालेल)	१५ मासे
चुन्याची निवळी (२॥ तोळे)	३० मासे

प्रथम खर्पर व लॅनोलिन खलावें; मग त्यांत चुन्याचें पाणी व तेल हळुहळु मिळविलें जावें. गुलाबी मलम जें फार घट्टहि नाहीं व पातळहि नाहीं असें तयार होईल. खाज फार येत असेल तर या मलमांत कॉर्बोलिक ॲसिडचे २।४ थेंब टाकावेत. (खाज येत नसेल तर टाकू नयेत.)

ह्या मलमांत स्वच्छ बारीक मलमलीचा तुकडा कालवून तो इसबावर पसरावा. सुकून जाईल तेव्हां दुसरा ठेवावा. ओला सुका हा मलम ठेवण्यानें आग, खाज व पाणी वहाणें पहातां पहातां बंद होते. व रोग्याला खूपच फायदा होतो. वहात्या इसबासाठीं हें औषध फारच उत्तम आहे.

एखाद्या वेळीं फार दाह होत असेल व पाणी वहात असेल तर मेंदीच्या पानाची लुगदी लावावी. त्यांत मुलतानी माती (गोपीचंदन) मिळवावी. एरंडेल घालावें. एरंडेलानें लुगदी चिकटणार नाहीं. व फार ओढहि बसणार नाहीं. ही लुगदी बांधण्यानें पुष्कळ वेळ रोग्यास पुष्कळ मदत मिळते.

वर कोरड्या इसबासाठीं सांगितलेलें खर्परमलम पण या लुगदीमध्यें मिळवून त्याचा उपयोग करतां येईल. रोग्यास ज्या भागांत इसब असेल त्या भागावर साबण व पाणी कधीं लावूं नये. धुण्यासाठीं कडुनिंबाचीं पानें उकळून तें पाणी अगर बाभळीच्या सालीचें पाणी वापरावें. कधी साबू वापरू नये. पाणी धूळ, वारा हे तीन इसबाचे शत्रू आहेत.

विद्वान् वैद्य डॉक्टर यांच्याजवळ स्वतःचे अनुभव असतीलच. त्यांनीं ते लिहून पाठवल्यास त्यास प्रसिद्धि मिळेलच. त्यांनीं जरूर लिहावें अशी माझी विनंति आहे.

× × ×

भिषग्भारती नांवाचें एक नवीन गुजराती मासिक निघालें आहे. त्याचे पहिले दोन अंक आले आहेत. संपादक वैद्य बापालाल गडबडदास वैद्य हे आहेत. पत्ता आयुर्वेद महाविद्यालय सुरत असा आहे.

या मासिकांतील एका लेखाचा अनुवाद वर दिला आहे. लेखाच्या प्रारंभीं अगर शेवटीं लेखकाचें नांव नाहीं. तथापि तो लेख प्रसिद्ध केला आहे व त्यावर कांहींच टीका-टिप्पणी जोडलेली नाहीं, त्या अर्थी तो एकतर संपादकांचा असेल अथवा संपादकांना

* ताज्या नारळापासून अशा प्रकारें काढलेलें तेल मिळण्याची व्यवस्था आयुर्वेद सेवा संघानें केली आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांतील विचारसरणी नापसंत नाहीं असें मानण्यास जागा आहे.

भिषग्भारतीचे संपादक हे आयुर्वेद महाविद्यालयाचे प्रमुख आहेत व हें मासिक आयुर्वेदाचे सिद्धांत स्पष्ट करून सांगण्याकरितां आहे, अशी आमची समजूत आहे. आयुर्वेद महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या विचारांवर या लेखनाची छाप पडणार आहे, म्हणून या लेखांतील कांहीं विधानांचा परामर्ष घेणें अवश्य आहे.

दूध अपथ्य आहे

रक्तविकारावर दुधाचें पथ्य ही कल्पना आयुर्वेदीय विचारसरणीशीं सुसंगत नाहीं. खाज व स्राव असतांना दूध हें अपथ्यच आहे (दधि-दुग्ध-गुडानूप-तिल-माषांस्त्यजेत्तराम्। वाग्भट चि.अ.१९।२७)

सप्त त्वचा या निरनिराळ्या धातूपासून झालेल्या आहेत असें आयुर्वेद सांगतो. याचा अर्थच त्वचेचा विकार हा निरनिराळ्या धातूचा असतो. सबब हा त्वचाविकारच आहे हें म्हणण्यानें कांहीं शास्त्रीय बोध होत नाहीं.

कारण मानसिक, उपचार भौतिक

इसब या रोगाचीं कारणें भौतिक नाहींत, तीं मानसिक आहेत, असें या रोगाचें निदान सांगतांना सांगितलें व उपाय सुचवितांना मानसिक उपाय न सुचवितां केवळ तैलाभ्यंग अगर मलम सांगितलें हें कसें? या उपायानें विकार समूळ कसा जाणार? या विकाराचा विचार आयुर्वेदीय दोषधातुमलदृष्ट्या कसा करावयाचा असतो तें कोठेंच दिलें नाहीं. या एकंदर निदान-चिकित्सेंत आयुर्वेदाचा अंश कोणता? जे उपाय यशस्वी म्हणून दिले त्यांचा उपयुक्त परिणाम होण्यामागील तात्विक विचारसरणी कोणती? इ. गोष्टींचा कोठेंच मागमूस सांपडत नाहीं. त्यामुळें हा सर्व लेख वाचून बुद्धींत कांहींच प्रकाश पडत नाहीं.

जीं औषधें प्रचीतीस आलीं त्यावरूनहि कांहीं सिद्धांत बांधतां येण्यासारखे आहेत. नारळाच्या शुद्ध तेलाचा स्वभाव (रस, वीर्य, विपाक, प्रभाव) लक्षांत घेतला तर तें तेल उपयुक्त ठरेल अशा विकाराचें स्वरूप सांगतां आलें पाहिजे; तीच गोष्ट मेंदीचा कल्क व खर्परादि मलम यांची आहे.

आयुर्वेद महाविद्यालयें व त्यांचीं मासिकें हीं शास्त्रीय विचारसरणी व तदनुसार उपचार सांगण्यासाठीं आहेत. त्यांतच जर केवळ अनुभविक योग (उपपत्ति विरहित) प्रसिद्ध होऊं लागले तर मग विद्यार्थ्यांच्या समोर अन्धःकाराचेंच वातावरण पसरणार यांत शंका नाहीं.—संपादक]

विंचवावर पांगेरा

पांगेरा नांवाचा काटेरी वृक्ष असतो. त्याला तांबडी फुलें येतात. या झाडाची साल उगाळून विंचूदंश झाल्याठिकाणीं लेप द्यावा. १५-२० मिनिटांत वेदना थांबतात. तीच साल पाण्यांत उगाळून प्याल्यास त्वरित गुण येतो.

बोरिवली —स्नेहप्रभा प्रधान

रोग विज्ञान भाग १ व २

[जोड बांधणी]

पाश्चात्य रोगनिदान लेखक डॉ. वि. म. भट येवले यांनीं दुसऱ्या आवृत्तीच्या वेळीं रोगविज्ञान [निदान व चिकित्सा] यावर विस्तृत ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला आहे. मराठी वाचकांना आधुनिक वैद्यकांची अधिकृत माहिती मिळण्याची उत्तम सोय त्यामुळें झाली आहे.

जाड बांधणीच्या पुस्तकाची किंमत १२ रु. आहे सुटे भागांची किंमत प्रथम भाग ६ रु. द्वितीय भाग ७ रुपये. टपाल खर्च निराळा.

आयुर्वेद सेवा संघाचीं प्रकाशनें

- मुंबईस मिळण्याचीं ठिकाणें -

तुकाराम बुकडेपो, माधवबाग, मुंबई
निंबकर आणि मंडळी, ,, ,,
बलवंत बुकडेपो, गिरगांव, मुंबई ४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'राजयक्ष्मा' वर आयुर्वेदीय उपचार

इंदूर येथें भरलेल्या अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलनांत प्रादेशिक सरकारांना अशी विनंति करण्यांत आली होती कीं, त्यांनीं आपआपल्या राज्यांत आयुर्वेदीय पद्धतीनुसार राजयक्ष्मा वरील उपचारांसाठीं एकेक उपचारगृह स्थापन करावें.

या प्रस्तावाचा विचार मुंबई सरकारनें केला असून आर्थिक अडचणीमुळें सॅनिटोरियम सुरू करणें तूर्त शक्य नाहीं. तथापि आयुर्वेद महाविद्यालयांशीं संबद्ध असलेल्या आतुरालयामध्यें एक स्वतंत्र वार्ड राजयक्ष्मा रोग्यासाठीं ठेवणें शक्य होईल.

या विचारानुसार पुणें, मुंबई व सुरत या ठिकाणच्या आयुर्वेद महाविद्यालयांकडे असा वार्ड उघडण्यासाठीं किती स्थायी व अस्थायी खर्च येईल अशी विचारणा मुंबई सरकारनें केली आहे, असें कळतें.

वैद्यराज ह. भा. भिडे

मुंबई विधान सभेच्या मध्यविभाग पदवीधर मतदार संघांतून पुणें येथील वैद्य ह. . भिडे आयुर्विद्या विशारद उभे राहिले आहेत. वैद्याचे वैद्य-प्रतिनिधि विधान सभेंत जाणें अत्यंत आवश्यक आहे असें आजवर चाललेल्या आयुर्वेदाच्या प्रश्नाच्या ससेहोलपटीवरून उघड दिसून येत आहे. वैद्य मग तो कोणत्याहि पक्षाचा असो ज्याची आयुर्वेदावर भारताचे राष्ट्रीय वैद्यक म्हणून श्रद्धा असेल त्याला मत द्यावयाचे असें वैद्यमंडळींचें धोरण आहे. त्या धोरणास अनुसरून मतदारांनीं आपलें पहिलें मत वै. ह. भा. भिडे यांना देऊन निवडून आणणें अवश्य आहे.

पांढरे कोड नष्ट झालेल्या हजारों गांवच्या लोकांची बक्षिसे व प्रशस्तिपत्रें छापलेले पत्रक मोफत मागवा.
वैद्य के. आर. बोरकर मु. पो. मंगरुळपीर,
जि. अकोला [मध्य-प्रदेश]

सेवासंघाची दिनदर्शिका

आयुर्वेद सेवा संघाची दिनदर्शिका न मिळाल्याच्या तक्रारी येत आहेत. परंतु कार्यालयांतील प्रति संपल्या आहेत. सबब इतःपर कोणास दिनदर्शिका पाठविणें शक्य होणार नाहीं.

आयुर्वेद सेवा संघातर्फे जें आरोग्य-शाळेचें माहिती पत्रक प्रसिद्ध होणार आहे त्यांत दिनदर्शिकेंत दिलेली वातादि दोषासंबंधींची माहिती प्रसिद्ध होणार आहे.

माशापासून खाद्यपदार्थ

माशापासून एक प्रोटीन-युक्त खाद्य पदार्थ तयार करण्यांत आला आहे. तो पदार्थ म्हणजे माशाचें वाळवलेलें सत्व आहे. रहात्या घरांतील नेहमींच्या उष्णतामानांत तो पदार्थ ५ वर्षे टिकूं शकतो. भाज्यांत किंवा कडधान्याच्या पदार्थांत तें सत्व घालून अन्नांतील पोषक गुण वाढवितां येतात.

क्षयरोग चिकित्सा

क्षयरोगावर आधुनिक कालांत किती तरी औषधी व शस्त्रकर्मांचे उपाय निघाले आहेत. तरीहि आयुर्वेदीय उपचार घेण्याची आवश्यकता क्षयरोग्यांना भासतेच.

महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध २१ वैद्य-डॉक्टरानें लिहिलेले क्षयरोगावरील अनुभविक लेख या पुस्तकांत एकत्र दिले आहेत.

किंमत २-८-० ट. ख. निराळा
आयुर्वेद सेवा संघाची प्रकाशनें
बनारस येथें विक्रत मिळण्याचें ठिकाणः—
चौखंबा संस्कृत पुस्तकालय
पोस्ट बॉक्स नं. ८, बनारस नं. १

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाङ्मेधास्मृतिबुद्धिदौर्बल्य (सहज) व त्याची चिकित्सा

(चिकित्सक — आयुर्वेदाचार्य ल. मा. काळे)

रुग्णः— मुलगी, वय १० महिने.

देशः— आनूप (भूमि), कफ (शिरोगत)

मुख्य तक्रारः— १ शरीरावयवांची कुठलीहि हालचाल स्वयंप्रेरणेने नाहीं.

२ रडणें, हसणें इ. नाहीं.

३ कोणत्याहि संवेदना नाहींत. (अविकास)

रुग्णाचा पूर्व इतिहास

आजोबांना वेडाची झांक होती. वडील भावाला हस्तकंप, लाळ गळणें, बुद्धिमांद्य, इ. विकार होते.

आईच्या वंशांत कोणीहि आजारी नाहीं. आईहि गर्भारपणीं अगर पूर्वी वा नंतर कशानेंहि आजारी नव्हती. पण तिची मूळची प्रकृति अशक्त.

रोग्याची जन्मापासून शारीरिक वाढ होत होती. पण ज्ञानेंद्रियाची कोणतीहि क्रिया होत नव्हती. कर्मेंद्रियांची क्रिया नव्हती.

आईच्या आजारपणांत मुलीला सकाळपासून सायंकाळीं ४वाजेपर्यंत दूध पाजलें गेलें नाहीं, तरी सुद्धां मुलगी रडली नाहीं. यावरून संशय येऊन रोग्याची प्रकृति चिकित्सकास दाखविण्यांत आली.

रुग्ण-परीक्षण

एकंदर परीक्षण करतां रोग्याच्या तोंडावर संपूर्ण बावळटपणाची छटा होती. व डोक्यावर जावळ नव्हतें याखेरीज अन्य कोणतीहि विकृति बाह्यतः अंगोपांगांत नव्हती. मलमूत्राची प्रवृत्ति नियामितपणें होत असे.

नुसता मांसाचा गोळा

परन्तु रोग्यास चिमटा घेतला तरी रडत नसे (स्पर्श), वाजवलें तरी तिकडे पहात नसे (ऐकूं न येणें), भुकेनें ती रडली नाहीं (वाचा नसणें). डोळ्यासमोरून वस्तु इकडे तिकडे हलवली तरी वस्तुकडे पहात नसे (दर्शन नाहीं), आई बाप ओळखतां येत नसे, पण डोळे मात्र इकडे तिकडे फिरत. (बुद्धि, स्मृति, मेधा कमी). स्वतः होऊन रोगी कांहींच हालचाल करीत नसे. नुसता जणूं मांसादिकाचा गोळा ठेवलेला वाटत असे. रोग्याची शारीर स्थितिहि दुसऱ्यानें बदलून द्यावी लागत होती.

रोग-निदान

वरील सर्व लक्षणावरून जन्मतःच असलेल्या इंद्रियदौर्बल्यामुळें मुलीस वाङ्मेधास्मृतिबुद्धिदौर्बल्य आहे असें निदान केलें. भाऊ किंवा आजोबा यांच्या उदाहरणावरूनहि इंद्रियांचें व तज्जन्य वाङ्मेधास्मृति यांचें दौर्बल्य असलें पाहिजे हें स्पष्ट होत होतें.

केस (जाऊळ) नव्हतें. यावरून अस्थिवातु-पासून पुढील धातुनिर्मितीचें कार्यहि होत नव्हते असें दिसलें.

संज्ञाबोधी चिकित्सा

वरील निदानावरून वाङ्मेधास्मृतिकर संज्ञाबोधी व वातशामक (अस्थिस्थ) धातुवर्धक द्रव्यांची आवश्यकता होती हें ठरवून पुढील चिकित्सा सुरू केली.

१) * महानारायणतैल $\frac{1}{2}$ थेंब दुधांत खूप घोळून दिलें सकाळ, संध्याकाळ.

२) अभ्रकभस्म सहस्त्रपुटी $\frac{1}{8}$ गुंज
+ स्मृतिसागर १ गुंज
+ प्रवाळभस्म ४ गुंजा
१ पुडी— पुढील अनुपानांतून रात्रीं

३) ब्राह्मीअर्क $\frac{1}{2}$ तोळा
सारस्वतारिष्ट $\frac{1}{2}$ तोळा
दूध २ तोळे

४) महानारायणतैल १ तोळा +
चंदनबलालाक्षादितैल १ तोळा +
निर्गुंड्यादितैल १ तोळा
} अभ्यंग मिश्रण

* आयुर्वेद सेवा संघ, नाशिक यांनीं तयार केलेलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वरील चिकित्सा १५ दिवस केली. त्यानंतर १५ दिवस नंबर २४३ चे तेंच औषध दिलें. व नंबर १चें औषध २ थेंब दिलें. पुढील १५ दिवस नंबर १ चें औषध ३ थेंब याप्रमाणें दिलें.

१॥ महिन्याच्या चिकित्सेचा परिणाम—

तीव्र आवाज व प्रकाश यांची जाणीव होऊं लागल्याचें लक्षांत आलें व भुकेसाठीं मुलगी किंचित् आवाज काढूं लागली.

पुढील १॥ महिन्यांत अनुपान मिश्रणाचें (नं. ३) प्रत्येकीं प्रमाण ·।।।· तोळा केलें व ३ थेंब महानारायण तेल सुरूं ठेवलें.

तीन महिन्यानंतरची योजना

अनुपान मिश्रण व प्रमाण तेंच पण अभ्रकभस्म $\frac{1}{4}$ गुंज केलें:—

याचा सर्वांचा परिणाम म्हणून १५ दिवसानंतर जाऊळ दिसूं लागलें व ती हालचाल करूं लागली. पुढें दंतोद्भेदार्थः–

१) मधुमालिनीवसंत १ गुं.
प्रवाळभस्म १ गुं.
मौक्तिकभस्म १ गुं.
(या मिश्रणाच्या ३ वेळां ३ पुड्या)
२) अभ्रकादि मिश्रण १ पुडी
३) महानारायण तैल पोटांतून ६ थेंब

या चिकित्सेनंतर वरचे २ दांत आले पण मलग्रह होऊं लागला. मल गुदापर्यंत येत असे, पण बाहेर निघत नसे, म्हणून [१] महानारायणतेल १/२ औंस मात्राबस्ति दिला. व [२] बहावामगज स्रंसनार्थ सुरूं केला. [३] अग्नितुण्डी १/२ गुंज सर्वशरीरगत क्रियांची शक्ति वाढण्यास व अग्निवर्धनार्थ दिली.

त्यानें मलग्रह नाहींसा झाला व अवयवांची स्वाभाविक हालचाल व इंद्रियांच्या क्रिया सुरूं झाल्या. याप्रमाणें एकूण १ वर्ष ३ महिने चिकित्सा केली. रोगी खेळूं, बागडूं व बोलूं लागला. पुढें २ वर्षांनीं डोळा फिरवूं लागला. हल्लीं त्याचें वय ४ वर्षे आहे. बावळटपणाची छटा थोडी आहे.

चिकित्सेनंतर १५-१५ दिवसांनीं पडलेला बदल व चिकित्सा थांबल्यानंतर निर्माण झालेली लक्षणें पाहतां, वरील सर्व परिणाम केवळ (वय) 'कालज' नसून चिकित्सेचाच आहे हें दिसेल.

मागील आयुर्वेद पत्रिकेच्या अंकांत वाङ्मेधा-स्मृतिकर योग दिले आहेत. प्रस्तुत चिकित्सेवरून अशा योगांची उपयुक्तता व व्यवहार्यता लक्षांत येईल.

नेत्रदान करतां येतें

मेजर जनरल विल्यम डीन यांनीं आपल्या मरणानंतर आपले दोन्ही डोळे विज्ञानाच्या सेवेसाठीं द्यावेत असें मृत्युपत्रांत लिहून ठेवलें आहे. मृत्यूनंतर नेत्रदान करण्याची कल्पना मान्यता पावत आहे.

सेवा संघाचा नवा कल्प
लिंबाच्या सालींचें लोणचें

आपण लिंबाचा आंबट रस भात-भाजीवर घेतो व सुगंधी साल पानाबाहेर फेकून देतो. शास्त्रीयदृष्ट्या लिंबाची सुंदर पिवळी सुगंधि कडु साल अत्यंत आरोग्यदायक आहे. हें पत्रिकेनें लेखनद्वारें वाचकांना पटवून दिलें आहे, व औषधीभवनानें लिंबाच्या सालींचें लोणचें तयार करून तें विक्रीस ठेवलें आहे.

अंगांतील ताप, कडकी, जाण्यासाठीं कोयनेल खाण्यापेक्षां हें लोणचें खाणें कितीतरी पटीनें हितकारक आहे. ४० तोळे बाटली १ रु., २० तोळे बाटली ८ आणे.

आयुर्वेद सेवा संघाच्या विक्री केंद्रांतून मिळते.

न्यू बुक स्टॉल
कालाणी भुवन, नाशिकरोड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांहीं अनुभूत योग ....

लेखक:—
ह. रा. ताटके, वाई

दिवंगत वृद्ध-वैद्यांच्या संग्रहांतून पूर्ण अनुभूत असलेले, व नन्तर आम्ही अनुभवून ठेवलेले असे महाराष्ट्र भाषेंत असलेले कांहीं औषधीपाठ अल्प प्रयासानें साध्य होणारे अतएव सोपे आहेत.

चतुर्विध प्रमाणांपैकीं अनुभवप्रमाणावर आयुर्वेदाची उभारणी आहे. मुक्तावलींत 'व्याप्तिज्ञान-करणकं ज्ञानं अनुभवः । किंवा 'परामर्शजन्यं ज्ञानं अनुभवः' असें अनुभवाचें लक्षण तर्कसंग्रहांत केलें

आहे. इतर शास्त्रें शब्द प्रमाणानें बद्ध आहेत. आयुर्वेदाच्या शब्दांचा अभ्यास मार्गदर्शक ठरतो. शब्दांतून निष्पन्न होणारा अनुभव हा प्रधान असल्यामुळें इतर शास्त्राहून आयुर्वेदशास्त्र आदरणीय झालें आहे.

७५ टक्के संस्कृत न जाणणारे वैद्य

सदर पाठांचें छंदोबद्ध संस्कृतीकरण करण्याचें योजिलें होतें. पण वैद्यसमाजाचें दृष्टीनें पाहतां वैद्यबंधू ७५ टक्के संस्कृत न जाणणारे आहेत अशांचा निर्वाह ग्रंथांच्या भाषांतरावरच होतो. म्हणून आम्हीं ज्या भाषेंतले पाठ जसेच्या तसेच त्या भाषेंत देत आहोत.

प्रकरण-ग्रंथ कशास म्हणतात ?

आतां अभ्यासकांच्या दृष्टीनें पहातां अभ्यासकांच्या अभ्यासांत दर्शनत्रयीनंतर फारसे प्रकरण ग्रंथ वाचले जात नाहींत. पण 'शास्त्रैकदेशसंबद्धं शास्त्रकार्यांतरे स्थितं ॥ आहुः प्रकरणम् ॥ शास्त्राशीं एकदेशसंबंध ठेवून मूलतः शास्त्राला सर्वांगीण उपयुक्त ठरतात असें प्रकरण ग्रंथाचें लक्षण, व उपयोग सांगितला आहे.

वैद्य मनोरमा प्रकरण ग्रंथ

५०-६० वर्षांपूर्वी ग्रंथमालेंत प्रसिद्ध झालेला श्री मित्रवंशीधरप्रणीत वैद्यमनोत्सव नामक वैद्यकाचा छोटासा व प्रकरण ग्रंथ पाहण्यांत आला. त्या ग्रंथांत पुष्कळच उपयुक्त असे पाठ आहेत. त्यांच्यांतील अनुभवानें जाणलेला व वापरीत असलेला सिद्ध-ज्वरांकुश, या नांवाचा पाठ फार चांगला आहे. सर्व वैद्यांना त्याचा उपयोग व्हावा, व त्यांनीं अनुभव घ्यावा. आणि मागें पडलेले उपयुक्त पाठ पुढें करून रोगार्तांना रोगमुक्त करून त्या पाठांचा प्रभावीपणा सिद्ध करून दाखवावा.

सांप्रतकाळीं जन्माला येऊ घातलेल्या पाठचिंतामणीच्या बाहेर उपयुक्त व ग्रथिताभावात्मक असें पाठांचें वाङ्मय आहे तें वैद्यांनीं जिवंत ठेवण्याचें श्रेय घ्यावें. पाठचिंतामणी सरकारमान्य झाल्यास्तर हें वाङ्मय जागच्या जागींच नष्ट होऊन जाईल व मग पूर्वजांचें अनुभूत ज्ञान गेल्याबद्दल हळहळत बसण्याचा प्रसंग येईल.

सिध्दज्वरांकुश

शंखभस्माष्टशाणं च हरितालं च तत्समम् ॥
तुत्थकं कोलमात्रं च कुमार्याश्च पुटत्रयम् ॥१॥
शरावसंपुटे धृत्वा चतुर्यामाग्निना पचेत् ॥
एवं गजपुटे स्वांगशीते चैवोद्धरेत् पुमान् ॥२॥
गुंजैकं परिमाणं तु खंडयासह दापयेत् ॥
पथ्यं दुग्धोदनं देयं सर्वज्वरविनाशनः ॥३॥
चरकेण समाख्यातः सर्वज्वरहरः परः ॥
सिद्धिप्रदत्वाद्वैद्यानां नाम्ना सिद्धज्वरांकुशः ॥४॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अर्थ-शंखभस्म तो. ४, हरताळ तो. ४, ताम्रभस्म तो. ।।-, या सर्वांचा खल करून त्याला कोरफडीच्या रसाचीं ३ पुटें द्यावींत. शराव-संपुटांत ठेवून मातकापड करून चार प्रहरपर्यंत गजपुट अग्नि देणें. स्वांगशीत झाल्यावर काढावें. गुंजमात्रा प्रमाण खडीसाखरेबरोबर द्यावें. दूधभाताचें पथ्य द्यावें. सर्वज्वराचा नाश होतो. हा सर्वज्वरहर योग चरकांनीं सांगितला आहे. वैद्यांना सिद्धि देणारा असलेमुळें याला सिद्धिज्वरांकुश नांव पावलें आहे.

ज्वरघ्न हरताळ कल्प

ग्रंथलेखकानें चरकाचार्योंशीं नातें जोडलें आहे. पण चरकाच्या ज्वरचिकित्सेंत या नात्याच्या संबंध दिसत नाहीं. थोरांच्या नांवाचा उपयोग शिष्टाचार म्हणून केला जातो, त्यामुळें लेखाला पुरस्कार मिळतो. हा पाठ तालककल्पाचा दिसतो; आवश्यक दिसल्यास याचें विश्लेषण तज्ञांनीं करावें.

वज्रदंती चूर्णम् (दंतमंजन)

पतंगलोध्रौ कणासैंधवं च तुत्थं हिराकासी वर्णमाक्षिकम् ।। हरीतकी खादिरलोहचूर्णं मंजिष्ठयुक्तं च समानभागैः (गः) ।। एतानि सूक्ष्मचूर्णानि दशने घर्षयेत्सुधीः। वज्रतुल्यं भवेद्दंतो यावज्जीवं न संशयः ।।२।।

अर्थः- पतंग, लोध्र, पिंपळी, सैंधव, मोरचूद-लाही, हिराकस, सुवर्णमाक्षिकभस्म, हिरडाचूर्ण, खादिरचूर्ण (कात), लोहभस्म, मंजिष्ठ या सर्वांचें समभागचूर्ण एकत्र खलून बाटलींत भरून ठेवावें. घडी पडेपर्यंत खलावें व रोज दांतांस लावून दांत घासावे.

रद्दींत सांपडलेला पाठ

वरील औषधीयोग द्रव्यगुणधर्माच्या दृष्टीनें पहातां दंत दृढ करण्यांकडे उपयोग होईल असें वाटतें. सुरक्षित भारतीयांनीं पेस्टच्या नादीं न लागतां या दंतमंजनाचा वापर करून आपल्या ज्ञानाला उत्तेजन द्यावें. हा दंतमंजनाचा पाठ वाण्याच्या दुकानांतल्या रद्दीकागदावर लिहिलेला सांपडला. असे किती तरी वाङ्मय वाया जात असेल.

उपदंशावरील अनुभविक योग

वंशलोचन -।।- भाग, मोरचूत १ भाग, बाळहिरडे १ यांची कज्जली करावी. ती कज्जली कढईंत एक पावशेर (तो.२०) तूप घालून त्या तुपांत टाकावी चुलीवर ठेवावे. मोठ्या परातींत पाणी घेऊन कढलेलें तुपाची कढई त्या पाण्यांत ठेवावी. कढई गार झालेवर पुनश्च चुलीवर ठेऊन तुपास कढ आणून परातींतील पाण्यांत पूर्ववत् कढई ठेवावी. याप्रमाणें सात वेळ हा जलसंस्कार करावा. नंतर तें तूप बाटलींत भरून ठेवावें. रोज सकाळीं तें तूप विड्याचें पानावर चण्याडाळीचे प्रमाणांत घेऊन एकवेळ खावें. हेंच तूप उपदंशाचे चट्ट्यावर लावावे. पथ्य साधें रोगोक्त फक्त हिंगवर्ज. हें तूप एक वर्षपर्यंत टिकते.

प्रथम रेचकानें कोष्टशुद्धि करून नंतर हें औषध सुरू करावे. या औषधापूर्वी घ्यावयाचा—

रेचक औषधी योग

सोनामुखी ९, बाळहिरडे ४, पादेलोण १, सुंठ १।।, यांचें चूर्ण करून रात्रीं झोपण्याच्या वेळेस प्रमाण मासे ४ पर्यंत उष्णोदकाबरोबर घ्यावें. दुसरे दिवशी १-२ जुलाब झाले तर तूपभात खाणें, किंवा नुसतें तूप खाण्यास देणें. याप्रमाणें कोष्ठशुद्धि झाल्यावर वरील योग सुरू करणें. दिनसंख्या ७।१४।२१।२८ पर्यंत देणें. हा विकार शरिरावर जरी उमगला तरीसुद्धां बरा होतो.

एक नम्र विनंति

वैद्यबंधूंनीं आपले गुलदस्तांतील योग्य अनुभूत असे पाठ प्रसिद्ध करून ज्ञानसंवर्धन करून या पाठांचा अंतर्भाव पाठचिंतामणींत परिशिष्ट प्रकरणांत घेण्याचा आग्रह धरावा. सरकारमान्य नसलेल्या चांगल्या वाङ्मयाचासुद्धां सुशिक्षितांत अनादर होतो, म्हणून आतांपासून याची दक्षता बाळगिली पाहिजे. म्हणजे आपण आयुर्वेदाच्या ऋणांतून अंशतः तरी मुक्त होऊ.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

— चर्चा—पत्र —

शुद्धायुर्वेद का विषय-विभाग कैसा होना चाहिये?

मेरे समान बहुतोंने आशा की होगी कि, शुद्ध आयुर्वेद को पुनः प्रतिष्ठित करते हुए उसका विभाग एलोपॅथी के अनुसार न कर प्राचीनानुसारी ही किया जाएगा। प्राचीनोंने आयुर्वेद का विभाग आठ अंगों में किया है। वही विभाग सामने रखते हुए हमें आयुर्वेद का अध्ययन—अध्यापन करना चाहिए।

इसमें घोर आत्मदैन्य

एलोपॅथी में फिजिऑलॉजी है तो हम भी शरीरक्रिया या दोषधातुमल-विज्ञान विषय रखें, एनेटॉमी [Anatomy] के मुकाबले शरीररचना रखें। पेथॉलॉजिको [Pathology] दृष्टि में रख निदानपंचक तथा सर्वरोगसंप्राप्ति—विज्ञान रखें। इसमें मुझे तो घोर आत्मदैन्य ही प्रतीत होता है।

विषयों की संख्या बढेगी

प्राचीन विभाग ही रखा जाय तो आयुर्वेद के विषयों की संख्या भी बढ जाएगी, और कई अंग अन्य बडे अंगोंके उपांगभूत हो जाने से उनका महत्व और प्रचार क्षीण हो गया है, वह स्थिति भी न रहेगी।

कौमारभृत्य अलग रखना चाहिये

यथा वाजीकरण और रसायन संप्रति निदान चिकित्सा के अंगभूत रखे गये हैं, इन्हें पृथक् करना चाहिए। इस प्रकार एक ही विषय के तीन विभाग हो जाएँगे। फॅकल्टी के पाठ्यक्रम में एलोपॅथी के अनुसार बालोपचरण तथा बालरोगनिदान चिकित्साके साथ रखे गए हैं। वहां से उन्हें हटा कर सौतिक, स्त्रीरोग, बालरोग तथा बालशिक्षण इन चार को मिलाकर प्राचीन नामधारी कौमारभृत्य विषय बनाना चाहिए।

अगदतंत्र के बगल में स्वस्थवृत्त

स्वस्थवृत्त न जाने क्यों सर्वत्र अगदतंत्र की बगल में रखा जाता है। यह कायचिकित्साका ही अंग है। शरीररचना और शरीरक्रिया भी कायचिकित्सा के ही अंगभूत है। पदार्थविज्ञान आयुर्वेद का ही अध्यापनीय है और वह शरीररचना और शरीरक्रिया के साथ कायचिकित्सा के आरंभिक व्याख्यानोंमें ही सिखाया जाना चाहिए। द्रव्यगुण- रसशास्त्र कायचिकित्साके ही अंग हैं। इनका पेपर पृथक रखा जा सकता है।

शल्य और शालाक्य पृथक् हैं।

शल्य और शालाक्य ये दो पृथक् तंत्र हैं। अतः प्रत्येक को एक एक विषय मान कर अध्ययन —अध्यापन करना चाहिए।

शुद्धायुर्वेद का पाठ्यक्रम अभी बना नहीं है। समिति के किन्ही सभ्य को इस दिशा में पाठ्यक्रम—पर विचार करना उचित लगे इस दृष्टिसे समय रहते यह नम्र प्रस्ताव रखा है।

एक और बात. सुनते हैं संस्कृत विषय का जो प्रस्तावित पाठ्यक्रम हैं उसमें इतना व्याकरण, काव्य, दर्शन (तर्क—सांख्य) तथा आयुर्वेद का कुछ अंश भी भरेला है कि एकमात्र संस्कृत ही उस प्रस्तावके अनुसार पढाया जाए तो ३॥ वर्ष के लिये पर्याप्त है। समिति को विचार करना चाहिए कि एस्. एस्. सी. में अनुत्तीर्ण भी विद्यार्थी प्रवेशयोग्य माना गया है इस हिसाबसे कैसे कोमलमति विद्यार्थी इस पाठ्य-- क्रम में आएँगे। उनको लक्ष्य में रखकर पाठ्यक्रम बनाया जाय तो बहुतसी भावी कठिनाइयों से हम अभी से बच सकते हैं।

प्रचार—प्रधान परीक्षा

संक्षेप में मेरा प्रस्ताव इस विषय में यह है कि, इन परीक्षाओं को हमें प्रचार—प्रधान ही रखना चाहिए। इन परीक्षाओंका विस्तार प्रभूत हो जाय उसके अनन्तर गंभीर अध्ययन को दृष्टि में रख कर उच्च कक्षा का पाठ्यक्रम बनाना चाहिए।

वैद्य रणजितराय देसाई, सुरत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दि बॉम्बे मेडिकल असोसिएशन [आयुर्वेदिक]

१९४५ सालपासून मुंबई राज्यांत जे डी. ए. एस्. एफ्. प्रमाणपत्र घेतलेले चिकित्सक निर्माण झाले आहेत, त्यांची संघटना करण्यासाठीं वरील नांवाची संस्था स्थापण्याचा प्रयत्न चालू आहे असें कळतें.

३१-१-५४ रोजीं मुंबई येथें हिराबागेमध्यें या मंडळाचें पहिलें स्नेहसंमेलन आरोग्य-उपमंत्री श्री. ब. द. जत्ती यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें होतें.

स्वागताध्यक्ष वैद्य अश्विन म्हणाले:- "डी. ए. एस. एफ. चिकित्सकांना व्यवसायासाठीं पुरती व्यवस्था नाहीं. सरकार त्यांना खेड्यांत पाठवू इच्छितें पण आवश्यक त्या सोई करून देत नाहीं. आम्हाला अधिक अभ्यास करण्यासाठीं पण मार्ग नाहीं. त्यासाठीं पोस्ट ग्रॅज्युएट अभ्यासक्रम हवा आहे.

आयुर्वेद जिवंत कसा राहील ?

सरकारी नोकरींत वैद्य व डॉक्टर असा भेद केला जात आहे. असा भेद होता कामा नये. आमचें असें मत आहे कीं आयुर्वेद जिवंत रहाणार असेल तर तो मिश्र अभ्यासक्रमानेंच राहील; कारण आजच्या कालाबरोबर राहाण्यासाठीं आयुर्वेद व ॲलोपॅथी * या दोहोंचा अभ्यास आवश्यक आहे."

अध्यक्ष श्री. जत्ती म्हणाले 'स्नातकांच्या अशा संमेलनाची आवश्यकता मी जाणतो. आयुर्वेद हें नवें विज्ञान नाहीं. परदेशी राज्यवटीनें या शास्त्राला महत्व दिलें नाहीं. व त्यामुळें जनतेची मदत पण हळू हळू कमी होत गेली.

पदवीधर मंडळीचें कर्तव्य

आतां आपलें सरकार आहे. आम्ही आतां असा निश्चय केला आहे कीं प्रत्येक शास्त्राला आपापल्या पद्धतीनें विकास पावू द्यावें. लोक आयुर्वेदाकडे अधिक वळतील असें कार्य पदवीधर मंडळींनीं केलें पाहिजे.

तुम्ही अमूकच जातीचीं औषधें वापरा असें लोक सांगत नसतात, त्यांना त्याचा रोग गेला पाहिजे असतो. तसा प्रयत्न तुम्ही केला कीं त्यांचा विश्वास तुमच्यावर बसेल. मुंबई मेडिकल सर्व्हिस थर्डक्लास यांत जसजशा जागा खालीं होतील तसतसे आम्ही डी. ए. एस्. एफ्. भरती करूं. या कार्यास आतांच प्रारंभ झाला आहे. सबब तूर्त ॲलोपॅथी पदवीधर व आयुर्वेदिक पदवीधर यांत भेद हा राहाणारच.

आयुर्वेदिक दवाखाना मागतील असें करा

अर्थखात्यांत ज्यावेळीं नवीन खर्चाचा प्रश्न येतो त्यावेळीं तें काम लौकर होत नाहीं. त्याला वेळ लागतो. खेड्यांत अधिक वैद्यकीय मदत मिळावी असा आमचा उद्देश आहे. खेड्यांतील लोकांना आयुर्वेदीय उपचारासाठीं तुम्ही स्वस्थ कराल तर ते आयुर्वेदाचा दवाखाना मागतील व मग सरकार पण तुम्हाला अधिक सवलती देईल. सबब आयुर्वेदीय प्रमाणपत्र धारण करणाऱ्यांनीं डॉक्टरांच्या बरोबरीच्या दर्जा मिळविण्यासाठीं थोडा धीर धरला पाहिजे. तथापि आम्ही शक्य तो प्रयत्न यासाठीं करूंच."

---

* मग होमिओपॅथीचा अभ्यास कां नको
—संपादक

तेलिया असाणा भरड

मुंबईत कोठें मिळेल ?

मधुमेह या विकारावर असाणा भरडीच्या जलपानानें इष्ट परिणाम येऊ लागतो हें माहिती झाल्यापासून असणाभरडीसाठीं सर्वत्र मागणी वाढली आहे. म्हणून आम्हीं आयुर्वेद सेवा संघाकडून २० तोळे प्रमाणाचे पुडे आणवून ते विक्रीस ठेवले आहेत. असाणा-भरड व सेवा संघाचीं इतर नवनवीन विशेष औषधें यासाठीं आमच्या दुकानास अवश्य भेट द्या.

सूर्यकिरण फार्मसी विक्री केंद्र
१७६ गिरगांवरोड मुंबई ४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शेवगा-शोभांजन :

लेखक:-भिषग्रत्न ग. कृ. पाटणकर
पो. किनई, जि. उ. सातारा

१ मार्च ५४ च्या आयुर्वेद पत्रिकेच्या अंकांत शेवगा या वनस्पतीचे गुणधर्म (लेखक- श्री. व्यवहारे) प्रसिद्ध झालेले आहेत. त्या गुणधर्मांत थोडी भर घालावी या उद्देशानें खालील माहिती देत आहे- अनुभव घेणारास याचे गुणधर्म खास पटतील.

अपस्मार, आचके, मूर्च्छा यांवर

या झाडाची अंतर्साल, १ भाग व त्याचे दुप्पट मुळांची साल अगर चांगलीं मुळें घेऊन ते सर्व ३ ते ४ तास भिजत ठेवून त्याचा ट्रिपल डिस्टिल्ड अर्क काढावा.

मूर्च्छा, स्नायूंची शिथिलता, आचके येणें, अपस्मार, पोटांत वात धरणें अगर रोग्यास गळाल्या-सारखे वाटणें, या सर्वांवर हा अर्क वापरावा. प्रमाण वयमानाप्रमाणें प्रतिवेळीं १ ड्राम (६० थेंब) पासून १ औंसापर्यंत. अनुपान दुप्पट पाणी अगर साखरेच्या पाकाचें मिश्रण.

हातापायाला मुंग्या, पक्षघात

अंतर्साल ठेंचून त्याचा रस काढावा व तो फडक्यानें गाळावा. मोहरीचें तेल १ पावशेर + रोशा तेल अर्धा पावशेर, या १॥ पावशेरांत वरील रस १॥ पावशेर घालून काळजीपूर्वक बेताचे अग्नीवर रस आटेपर्यंत आटवावा व पुन: एक वेळ रस वरील-प्रमाणें घालून तो रस आटवून स्वच्छ दुहेरी फडक्या-वर गाळून तें तेल वातविकारावर म्हणजे संधिवात, पक्षघात, हातापायाला मुंग्या येणें, सांधे दुखणें, यांवर १५ ते २० दिवस सतत दिवसांतून दोन वेळ त्या भागावर जिरवून अनुभव घ्यावा.

बियांच्या तेलाचा घड्याळांत उपयोग

या झाडाच्या शेंगांतील बियांचें तेलाचा घड्या-ळांतील यंत्रांना तेल देण्याकरितां व फुलांचीं अत्तरें तयार करण्याकरितां परदेशांत फारच मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो व याकरितां हिंदु-स्थानांतून परदेशांत हें मोठ्या प्रमाणावर पाठविलें जातें. हें तेल थिजत नाहीं, कुजत नाहीं. व या तेलामध्यें, घेतलेला सुवास न सोडण्याचा विलक्षण गुण आहे. या तेलाला इंग्रजीमध्यें Oil of Ben म्हणतात.

The seeds yield a fine fixed oil which does not turn rancid and hence is much valued by perfumers for extracting the odours of flowers and by Watch-makers as a Lubricant

विकार व फुलांचीं अत्तरें या संबंधीं स्वतः अनुभव घेऊन वरील माहिती कळविलेली आहे.

संस्कृत हिरड्याचा प्रयोग

मिळेल तेवढा मोठा सुरवर हिरडा मिळवून अगर खात्रीलायक औषधी कारखानदाराकडून आण-वून नंतर शेवग्याचे झाडाचें खोडांत ४ इंच खोल भोक (गिरमिटाचे मोठ्या फळानें) घ्यावें. त्या भोंकांतील लाकडाचा निघालेला चोथा बर्णीत ठेवावा. नंतर तो हिरडा त्या भोकांत उभा घालून बर्णीतील चोथा त्यावर दडपून नंतर स्वच्छ मातीनें तें भोंक लिंपून काढावें. तारीख टिपून ठेवावी. एक-विसावे दिवशीं तो हिरडा त्या पाडलेल्या भोंकाला त्याचे खालच्या भागाला बेतानें छेद पाडून तो हिरडा काढून घ्यावा. अगस्त्याचे फुलाचा अगर कमळाचा कादिंबरी मध यांत उगाळून पुनः तो स्वच्छ फडक्यावर गाळून बाटलींत भरून ठेवावा.

संस्कृत हिरड्याचे गुणधर्म

सारा, फूल, वडस व इतर नेत्र-विकार यांवर हें औषध अपूर्व गुणकारी आहे. नेत्रविकारी लोकांनीं असा उपयोग करीत असतां त्रिफलाघृत, त्रिफळा-गुग्गुळ अगर सिंहनाद-गुग्गुळ याचा मलशुद्धी-करितां उपयोग करावा. नेत्रदोष दूर होईपर्यंत लवण वर्जित अन्न खाल्ल्यास उत्तम.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नियमः- शुभ दिवशीं व शुभ वेळीं, स्नानादि-क्रियाकर्में करून सुरवारी हिरडा झाडाच्या भोकांत ठेवावा व शुभ वेळ पाहून डोळ्यांत प्रथमतः काजळा-प्रमाणें उपयोग करावा.

सोयः— विश्वस्त औषधी कारखानदाराकडून अशा तऱ्हेचा संस्कारित सुरवर हिरडा व वर नमूद केलेला मध याच्या छोट्या बाटल्या नेत्रविकारी लोकांस मिळाल्यास नेत्रविकारी लोकांस अत्यंत उपयोग होणार आहे.

सरकार आयुर्वेदीय औषधें बनविणार

मध्यप्रांत सरकारनें खेड्यांतून प्रत्येक रेव्हेन्यु सर्कल मध्यें एक आयुर्वेदिक दवाखाना काढावा अशी मागणी अनेक आमदारांनीं मध्यप्रदेश विधि-मंडळाच्या सभेंत केली. त्याला उत्तर देतांना स्वास्थ-मंत्री श्री. कन्नमावर म्हणाले " आयुर्वेदीय दवाखाने काढावे. व त्यांत औषधें नाहींत अशी परिस्थिति होऊ नये म्हणून सरकारनें रायपूर येथें आयुर्वेदीय रसशाळा काढली असून एका वर्षांत तेथें औषधें तयार होतील व मग आयुर्वेदीय दवाखानें काढण्याचें कार्य सरकार सुकरतेनें करू शकेल.

सुशिक्षित दायांची उणीव

खेड्यांतूनसुद्धां अशिक्षित दाया असू नयेत असें आम्हीं ठरविलें आहे. तथापि हें नर्सिंग व मिडवाइ-फचें शिक्षण घेण्यासाठीं पुरेशा महिला मिळत नाहींत.

पत्रिकेस होळीचा आहेर

नागपूर येथील ' आयुर्वेद ' यां साप्ताहिकानें होळीनिमित्त भारतांतील अनेक व्यक्तींना व वृत्तपत्रे यांना शाब्दिक आहेर दिले आहेत. आयुर्वेद पत्रि-केच्या वाट्णीला पुढील पंक्ती आल्या आहेत.

यदपि मसाला खूप है, किंतु न चोखी नीति।
कभी नही इनने लिखी, शासन की करतूति।
लेखनी रहती है भयभीत॥

" फक्त वैद्यासाठीं " इंजेक्शन-
ट्रेनिंग क्लास मे महिन्याचें सेशनसाठीं प्रवेश देणें सुरू आहे. विशेष माहितीसाठीं २ आणे पोस्टेज पाठवा.
डॉ. जिल्लेवार C. T. S.
यवतमाळ (मध्यप्रदेश)

अनुभविक औषधोपचार
किंमत ४ आणे.
वैद्यकावरील कितीहि मोठमोठे ग्रंथ वाचले तरी प्रथमोपचार म्हणून वापरतां येतील असे उपाय प्रत्येकजण शोधत असतो. वनस्थली विद्यापीठाचे वैद्यराज नारायणप्रसाद यांच्या अनुभवाची अनेक रोगावरील औषधें त्यांच्या कृतीसह या पुस्तकांत दिलीं आहेत. पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें आहे.
लालबाग येथें सेवा संघाचीं प्रकाशनें विकत मिळण्याचें ठिकाण—
ॐ बुक स्टॉल
लालबाग ट्रॅम स्टॅंडसमोर, मुंबई १२

आरोग्यासनें
लेखकः- डॉ. र. कृ. गर्दे एम्. बी. बी. एस्.
रिटायर्ड आय्. एम्. एस.
लेखक प्रारंभिक निवेदनांत सांगतातः—
या आरोग्यासनांचा फायदा असा झाला कीं दुसऱ्या महायुद्धांत निरनिराळ्या हवा-पाण्याच्या परकीय देशांत लढाईच्या धाम-धुमीच्या काळांत रहावें लागूनहि मी चुकूनसुद्धां आजारी पडलो नाहीं.
या पुस्तक बरोबर १५ आसनांचा चित्र-पट जोडला आहे.
पृष्ठें ८० किं. १॥ रु. ट. ख. निराळा.
वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभिप्राय

आयुर्मीमांसा--राजयक्ष्मा विशेषांक

सातारा येथील आयुर्मीमांसा मासिकाचा हा विशेषांक आहे. आयुर्वेदीय निदान-चिकित्सेतील विषयाला धरून अशा तऱ्हेचे विशेषांक काढण्याचे सुयोग्य कार्य 'मीमांसा' नित्य करीत असते. या अंकावें लिखाण अथपासून इतिपर्यंत वैद्यरत्न गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य यांनींच केलेलें आहे. त्यामुळें विवेचनांत सर्वत्र सुसूत्रता आढळते.

आयुर्वेदीय ग्रंथांत जीं सूत्रें आहेत; तेवढी वाचून किंवा त्यांचा केवळ अर्थ सांगून आजच्या विद्यार्थीवर्गाची तृप्ति होण्यासारखी नाहीं. त्यासाठीं त्या सूत्रांचा विस्तार (तो विषय पिंजून पिंजून) प्रत्यक्षपूर्वक सांगितला पाहिजे, म्हणजे विद्यार्थ्यांच्या मनांत शंका रहात नाहीं. तो विषय त्याला चांगला पटतो. असा स्वतःचा गेल्या २ तपाचा अनुभव लक्षांत घेऊन आचार्यांनीं राजयक्ष्मा व त्याची संप्राप्ति, पूर्वरूपें, रूपें व चिकित्सा यांचा विस्तार करण्याकरितां हें सर्व लिखाण केलेलें आहे.

सूत्रांचा प्रत्यक्ष उपक्रम पद्धतीनें पडताळा ही आयुर्वेदीय संशोधनांतील अतिशय वरची पायरी आहे; परंतु तिच्यापूर्वी सूत्रांचा प्रत्यक्ष चिकित्सेंत जमेल अशा तऱ्हेनें विस्तार ही प्रथम पायरी होय; व याकरितांच हा प्रयत्न केलेला आहे, असें दिसतें.

आयुर्वेदाच्या अभ्यासू विद्यार्थ्यांना व वैद्यांना ह्या विशेषांकाचा बराच उपयोग होण्यासारखा आहे.

(१) राजयक्ष्म्याचीं नांवें व स्वरूप (२) राजयक्ष्म्याचीं कारणें, (३) क्षयरोगाची संप्राप्ति (४) क्षयरोगाचीं पूर्वरूपें (५) क्षयरोगाचीं लक्षणें (६) राजयक्ष्म्याचें साध्यासाध्यत्व (७) चिकित्सा अशा ७ विषयांतील प्रत्येक शब्दाची फोड करून हा विषय मांडला आहे. विशेषकरून 'संप्राप्ति' हा भाग वाचनीय व अभ्यासनीय आहे.

या पुस्तकांत दिलेली चिकित्सा चिकित्सांगाच्या सर्व विषयांना केवळ स्पर्श करून गेल्यासारखी वाटली तरी प्रत्यक्षांत अत्यंत उपयुक्त व कारणभेदानुसार विविध प्रकारांनीं ती कशी करावयाची तें दर्शविणारी आहे. सुवर्णकल्प, मौक्तिक, प्रवाळ, मृगशृंगभस्म या ४ औषधांनीं मूलगामी चिकित्सा व इतर लाक्षणिक चिकित्सा असा भेद आचार्यांनीं केला; तो व्यवहारी असाच आहे. प्रत्यक्ष व्यवहार करतांना सामान्य नवीन वैद्यांस त्याचा फार फार उपयोग होईल. परंतु,

निराळ्या दृष्टिकोनाची छाप दिसते

निदानाचा, संप्राप्तीचा, एवढा विस्तार ज्या चिकित्सेकरितां आचार्यांनीं केला, त्या चिकित्सेचें मात्र आयुर्वेदीय चिकित्सांगाप्रमाणें विभजन व विवेचन अंकांत सांपडत नाहीं. प्रतिबंधक चिकित्सा, आहार-चिकित्सा, मूलगामी औषधीकल्प, लाक्षणिक चिकित्सा व बाह्यचिकित्सा अशा तऱ्हेचें वर्गीकरण मागच्या संबंध विस्तारापुढें पहातां आयुर्वेदीय दृष्टिकोन असलेल्या वैद्यांना निराळ्या दृष्टिकोनाचा छाप पडल्यासारखें वाटतें.

हें सांपडत नाहीं

कारणभेदानुसार, प्रकृतिभेदानुसार, शोधन व शमन चिकित्सेतील निरनिराळे भेद व त्यांचे अत्यंत व्यवहारी प्रयोग आचार्यांकडून या ठिकाणीं अपेक्षित होते. तसे आढळत नाहींत.

सूत्रांचा अर्थ विशद करतांना संप्राप्तीची जशी सुंदर उकलण आचार्यांनीं या अंकांत केली, तशी पूर्वरूपें, रूपें, व चिकित्साद्रव्यें यांची केली नाहीं. दोषधातुमलविज्ञानानुसार प्रत्येक सूत्रार्थाचें तसेंच पुनर्विवेचन आचार्यांना करतां येणें शक्य आहेसें दिसतें. परन्तु अत्यंत शास्त्रीय अशा या विवेचनाचा मोह टाळून लिखाणाला सोपेपणा आणण्यांत वैद्यरत्नांनीं एखाद्या अभिजात रत्नपारख्याचें काम केलें आहे यांत संशय नाहीं.

एवंच १ रुपयाच्या मोबदल्यांत इतकें उत्कृष्ट दर्जाचें लिखाण वाचकांचें हातीं देणारी 'मीमांसा' अभिनंदनास पात्र आहे हें निश्चित.

अभिप्राय लेखक—आयुर्वेदाचार्य श्री. कृ. करमरकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शीतपित्त

लेखकः-वैद्य डी. एस्. अंतरकर
डी. ए. एस्. एफ्. मुंबई १८

हा त्रिदोषजन्य व्याधि आहे. कातडीवर मधमाशी चावल्याप्रमाणें सूज येते. या विकारांतील मुख्य दोष पित्त आहे. वायु अनुबंधी असतो. पाश्चात्य वैद्यकानुसार या विकाराला अर्टिकेरिया म्हणतात. या रोगानें मृत्यु आल्याचें पाहण्यांत नाहीं. पण दाह व खाजयुक्त सुजेचा त्रास फार होतो. सूज येते जाते असें कित्येक वर्षें चालतें.

(१) थंड वायूचा स्पर्श (२) असात्म्य अन्नपान व औषध. (३) पित्तवर्धक आहारविहार उदाहरणार्थः आंबट, उष्ण, विदाही अन्नाचें सेवन; उपवास, उन्हांत फिरणें, रात्रीचें जागरण करणें. हीं रोगाचीं कारणें आहेत. या कारणामुळें पित्त, वायु व कफ हे तीनहि दोष प्रकुपित होतात. पण यांतील प्रमुख दोष पित्त व अनुबंधी दोष वायु असतो.

लक्षणें:- त्वचेवर मधमाशी चावून येते त्याप्रमाणें लाल रंगाची सूज, खाज, ताप, दाह, उलटी, टोंचणी. प्रथम खाज येऊन अगर खाजेशिवायहि पित्त उठतें, तीव्र विकारांतच ताप व वान्ति हीं लक्षणें होतात. कित्येक वेळीं सर्व शरीर सुजतें. कान, नाक, डोळे यांत अत्यंत दाह होतो. कांहींहि उपचार न करतां हा रोग कित्येक वेळां जातो व पुनः केव्हांतरी उत्पन्न होतो.

चिकित्साः- शोधन. पित्तदोषाचें रक्त हें दूष्य असल्यामुळें तीव्र विरेचन दिलें पाहिजे. रोग्याचें बलाबल पाहून दररोज अगर ४।४ दिवसांनीं इच्छाभेदीरस द्यावा. नंतर

शमन-चिकित्साः- (१) प्रवाळपिष्टी ४ रत्ती दिवसांतून ३ अगर ४ वेळां तुपाबरोबर.

सुदर्शन चूर्ण १ मासा सकाळ सायंकाळ थंड पाण्याबरोबर देणें.

पथ्यः- गव्हाची पोळी, दूध.

अपथ्यः- उष्ण, अम्ल, विदाही, दही, केळीं, तुरीची डाळ, मासे.

याप्रमाणें चिकित्सा केली असतां ८।१० रोग्यांना फायदा झाला आहे. त्यापैकीं दोन रोग्यांची हकीकत अशीः—

नांवः- व्ही. एस्. पाध्ये वय वर्षें ४० रहाणार दादर, धंदा कापड दुकानांत नोकरी. १॥ महिन्यापूर्वीं हा रोगी आला होता, तेव्हां त्याच्या अंगावर दाह व खाजयुक्त लाल चकंदळें होतीं. २ महिनेपर्यंत त्यानें कल्शियमचीं इंजेक्शनें, फिनेर्जेन वगैरे ॲन्टि हिस्टॅमिन औषधें अशी चिकित्सा घेतली होती. इंजेक्शन घेतल्या दिवसांपुरती चकंदळें बंद होत होतीं.

रोग्याचें नांव विजयागौरी. वय ३० वर्षें. सांताक्रुझ, व्यवसाय—घरकाम.

हा रोगी जानेवारी ५३ मध्यें आला. त्यावेळीं तोंड सुजलें होतें व त्यांत दाह, कंडू हीं लक्षणें होतीं. या रोग्यास तुपांतून ४ गुंजा प्रवाळपिष्टी (प्रवाळ भस्म चंद्रपुटी) देण्यानें ४ दिवसांत सर्व विकार हटला. या रोगाचें कारण शीतवायूचा स्पर्श हें आहे.

× × ×

* [या रोगाचा मुख्य दोष पित्त आहे असें लेखकानें म्हटलें आहे. पण लक्षणें व उपचार पाहतां ते दोष कफपित्तात्मक मानले पाहिजेत. खाज हें लक्षण कफाचें आहे. तीव्र विकारांतील उलटी हें लक्षण कफदोषाचेंच आहे. (पित्तदोषाचें लक्षण अतिसार हें असतें.) अम्लरसाच्या आहारामुळें कफपित्तात्मक दोषांची वृद्धि होते. सबब या विकारांच्या रोग्यानें अम्ल पदार्थ वर्ज करावयास हवेत.

चिकित्सेंत वापरलेलें इच्छाभेदी हें विरेचक केवळ पित्तदोषाचें नाहीं. तें कफ-पित्तदोषाचें आहे. इच्छाभेदींत पुढील द्रव्यें आहेत. पारा, गंधक, टांकणखार, सुंठ, मिरे, जेपाळबीज ३ भाग. हीं सर्व तीक्ष्ण द्रव्यें आहेत. कफ व पित्त दोषांचीं विरेचक आहेत. केवळ पित्तदोषाचीं नाहींत. केवळ पित्तदोषावर स्वादिष्ट विरेचन, बहावा मगज अशीं मधुर द्रव्यें वापरावीं लागलीं असतीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रवाळ कफपित्त शामक आहे

शामक उपचार म्हणून वापरलेलें प्रवाळभस्म हेंहि कफपित्त दोषाचें शमन औषध आहे. प्रवाळ कषाय रसाचें द्रव्य आहे. व कषायरस कफपित्तशामक आहे (कषायःपित्तकफहा). कषाय वर्गांत प्रवाळद्रव्य वाग्भटानें दिलें आहे.

लेखकानेंहि प्रारंभीं व मध्यंतरींहि त्रिदोष व कफदोषाचा उल्लेख केला आहेच. शीतपित्ताची सुटसुटीत निदान चिकित्सा प्रसिद्ध केल्याबद्दल लेखकांस धन्यवाद. —संपादक]

टिंक्चरें व स्पिरिट यावर कडक नियंत्रण

१९५२ च्या मुंबई ड्रग्ज (कंट्रोल) ॲक्टांत दुरुस्ती करण्या संबंधींचें बिल मुंबई सरकारच्या ता. १९ मार्चच्या गॅझेटांत प्रसिद्ध झालें आहे.

टिंक्चरें आणि स्पिरिट युक्त पदार्थांची मोठ्या प्रमाणावर आयात केली जात असून त्यांचा मानवी जीवितास हानिकारक होईल अशा रीतीनें मद्य म्हणून वापर केला जात आहे. तेव्हां अशा पदार्थांची विक्री करणें, तें जवळ बाळगणें आणि त्याचा वापर करणें याबाबत नियमन करण्याचा हेतु आहे.

या दृष्टीनें फक्त दोन प्रकारच्या व्यापाऱ्यांनाच असे पदार्थ विकण्याची परवानगी देण्याचा विचार आहे. हे व्यापारी म्हणजे (१) घाउक विक्रेते व (२) किरकोळ विक्रेते. वैद्यक व्यवसायींना हे पदार्थ घाउक किंवा किरकोळ व्यापाऱ्यांकडून घ्यावे लागतील. तसेंच किरकोळ विक्रेत्यांना ते फक्त घाउक विक्रेत्याकडून खरेदी करावे लागतील. अशी तरतूद या बिलांत करण्यांत आली आहे.

तसेच हे पदार्थ विकण्यासाठीं लायसेन्स घ्यावे आणि घाऊक व किरकोळ विक्रेत्यांनीं हे पदार्थ किती विकावयाचे हें ठरवून देण्याचाहि विचार आहे.

अनुक्रमणिका

अधम रीत्या आयुर्वेदाचा नाश	६१३
आधुनिक वैद्यक व शुद्ध आयुर्वेद	६१५
रोग्यांना चिकित्सकाची सहानुभूति हवी	६१८
संतत ज्वराचे ४ अनुभव	६१९
आयुर्वेदीय औषधी पाठचिंतामणी	६२१
सोनामुखी	६२५
प्रसूतिवेणा येण्यासाठीं योगराजगुग्गुळ	६२६
निवडक रुग्ण चिकित्सा	६२७
ओला व कोरडा इसब	६२९
राजयक्ष्मावर आयुर्वेदीय उपचार	६३२
वाङ्मेधास्मृतिबुद्धिमांद्य व त्याची चिकित्सा	६३३
कांहीं अनुभूत योग	६३५
शुद्धायुर्वेदका विषय विभाग कैसा होना चाहिये	६३७
दि बॉम्बे मेडिकल असोसिएशन(आयुर्वेदिक)	६३८
शेवगा-शोभांजन	६३९
सरकार आयुर्वेदीय औषधें बनविणार	६४०
आयुर्मीमांसा, राजयक्ष्मा-विशेषांक	६४१
शीतपित्त चिकित्सा	६४२

अकोला जिल्हा वैद्य संमेलन

मु. पो. मानोरा ता. मंगरूळपीर येथें ता. ७-३-५३ रोजीं रात्रीं ८ वाजतां वैद्यराज वा. कृ. दाणी यांच्या अध्यक्षतेखालीं वरील संमेलन भरलें होतें. संमेलनाचें उद्घाटन कोंडोली येथील वैद्य न. ल. जोशी यांनीं केलें. वनस्पतिप्रदर्शन, महत्वाचे रोगी तपासणें, प्रमुख वैद्यांचीं भाषणें इ. कार्यक्रम झाला.

मंजूर झालेले ठराव

दर १०००० वस्तीला १ सरकारी आयुर्वेदीय दवाखाना असावा. मुंबई सरकारनें जाहीर केलेल्या शुद्ध आयुर्वेदीय अभ्यासक्रमास पाठिंबा. शाळांतून आयुर्वेदीय पद्धतीनें दिनचर्या शिकविण्याबाबद शिक्षणखात्यास विनंति. वैद्यांना हेल्थव्हिजिटर्स नेमण्यांत यावें. गोदुग्धाचा प्रचार वाढवावा. गोवधबंदीबद्दल मध्यप्रदेश सरकारचें अभिनंदन इत्यादि.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

" संस्थेचें नांव सार्थ आहे "

" आज रोजीं भारत सेवक समाजाच्या कामानिमित्त नाशिक येथें आलें असतां ' आयुर्वेद सेवा संघ ' ही संस्था पाहिली. सेवासंघातर्फे इतक्या मोठ्या प्रमाणावर आयुर्वेदीय औषधें तयार होत आहेत हें पाहून फार आनंद वाटला.

आजकाल आपल्या भारतीय जनतेचा ओढा आयुर्वेदीय औषधांपेक्षां ॲलोपॅथीचीं औषधें वापरण्याकडेच अधिक आहे. व सरकारकडूनहि आयुर्वेदाला व आयुर्वेदीय चिकित्सेला फारसें उत्तेजन मिळत नाहीं. अशा विपरीत व निरुत्साही वातावरणांतहि सेवासंघ निरनिराळीं व नवनवीं औषधें तयार करीत आहे हें अभिनंदनीय आहे.

सेवासंघाची रोगचिकित्सा करण्याची पद्धति फार चांगली आहे. आयुर्वेदपत्रिका चालवून व साप्ताहिक गांवकरींत आरोग्यविषयक लेख लिहून जनतेस आयुर्वेदाचें जें आरोग्यविषयक ज्ञान दिलें जात आहे तें कार्य अनमोल असें आहे.

सेवासंघ आयुर्वेदाची जी सेवा करीत आहे ती देशास भूषणावह अशी आहे. हीं सर्व कार्यें पाहून ' आयुर्वेद सेवा संघ ' हें संस्थेचें नांव सार्थ आहे असें मला वाटतें.

आयुर्वेद सेवा संघास व त्याच्या कार्यास भरभराट व सुयश इच्छितें. "

रावळगांव — सौ. कुमुदिनी दोशी

अखेर शोध लागला !

ग्रामीण जनतेला जर्जर करणाऱ्या

नारूच्या सांथीवर

खात्रीलायक उपाय सांपडला !!

नारूच्या कोणत्याहि अवस्थेंत त्वरित व हमखास प्रभावी ठरलेलें

" बी. बी. सी. " चें

" ड्रॅक्युलॅन "

त्वरित मागवा.

सोल डिस्ट्रिब्यूटर्सः—

धूतपापेश्वर सेल्स कार्पोरेशन लि.

धूतपापेश्वर प्रासाद, मुंबई नं. ४

संपादक व प्रकाशकः— वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, मेनरोड, नाशिक
मुद्रकः— श्री. चि. ओक, सफल प्रेस, आग्रारोड, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

गुरुकुल कांगड़ी

वर्ष ७ वें) नाशिक, ता. १६ एप्रिल १९५४ (अंक २० वा

आयुर्वेद सेवा संघ, नासिक

स्थापना [अहमदनगर]	रजिस्ट्रेशन	स्थलांतर [नासिक]	पब्लिक ट्रस्ट
ता. ९।१०।२४	ता. २०।९।३३	ता. २२।५।४६	ता. ५।१।५३



या संस्थेच्या सदस्यांची सर्वसाधारण सभा ता २४।२।५४ रोजीं नासिक येथें भरली होती. त्यावेळीं घेण्यांत आलेलें छायाचित्र.

बसलेले — (१) वै. वि. दा. एकतारे, अहमदनगर; (२) वै. पु. वि. घामणकर, पनवेल, (३) श्री. अ. वि. केतकर, अहमदनगर; (४) वै. त्र्यं. वि. गाडगीळ, नागपूर (५) वै. गो. गं. परांडे, नागपूर.

उभे — (१) वै. श्री. कृ. करमरकर आयुर्वेदाचार्य, नासिक (२) वै. बिंदुमाधव पंडित, नासिक; (३) वै. वा. स. मराठे, नासिक; (४) वै. वि. म. गोगटे, नासिक (५) वै. [illegible]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म. प्रां. वैद्य मंडळाचें अध्यक्षांस जाहिर अनावृत पत्र

गेल्या जून महिन्यांत लातूर येथें म. प्रां. वैद्य मंडळाचे ९ वें संमेलन यशस्वीरीत्या पार पडलें. गेल्या १५ वर्षांची प्रां. मंडळाची तपश्चर्या फळास आली व मुंबई सरकारनें शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रमाचा स्वीकार करून तद्विषयक पुढील तजविजीकरतां शुद्ध आयुर्वेदीय तज्ञांची एक समितीहि नेमली. व त्याप्रमाणें तिच्या कार्याची चक्रेंहि फिरू लागलीं आहेत. हे सर्व सध्यांचे प्रांतीय अध्यक्षांचे कारकीर्दीत पदरीं पडलें यास्तव अध्यक्षमहाराज अभिनंदनास पात्र आहेत.

पुणें वैद्यक मंडळाचे निमंत्रण

हें सर्व ठीक झालें; पण लातूर संमेलन होऊन १७ महिने झाले तरी संमेलनाच्या पुढील अधिवेशनाबावत कांहींच हालचाल दिसत नाहीं. गेल्या संमेलनांत पुणें वैद्य मंडळाचे निमंत्रण स्विकारले गेले. या वैद्यक मंडळाच्या अध्यक्षस्थानीं पुण्याचे वै. मामा गोखले निवडले गेले आहेत असें वाचनांत आलें. पण पुण्यास भरावयाच्या संमेलनाबाबत अद्याप एकहि वार्ता प्रसिद्ध झाली नाहीं.

अद्याप प्रचार नाहीं

नेहेमींच्या शिरस्त्याप्रमाणें जानेवारी फेब्रुआरींतच भावी संमेलन कार्याचा प्रचार सुरू होत असतो, पण यावर्षी पहावें तर सर्वत्र थंडावाच दिसत आहे. जणूं कांहीं सरकारनें शुद्ध आयुर्वेदास मान्यता दिल्यामुळें प्रांतीय वैद्य मंडळाचें अवतारकार्यच संपलें !

स्वराज्य-प्राप्तीकरितां जितके बहुविध कष्ट पडले नसतील तितके सुराज्य निर्माण करण्याकरितां कष्ट पडत आहेत. पडणार आहेत. त्यागहि करावे लागणार आहेत; आयुष्येंहि खर्ची घालावीं लागतील. तेव्हांच कोठें सुराज्य दिसू शकणार आहे. हें जसें तसेंच केवळ शुद्ध आयुर्वेदाच्या पाठ्यक्रमास सरकारी मान्यता मिळून तो आपला प्रभाव किंवा अस्तित्व कसा दाखवू शकेल ? प्रगति कशी करू शकेल ? त्याकरितां करावे लागणारे दीर्घोद्योग, चिकाटीचे प्रयत्न, आर्थिक त्याग, सतत संशोधन इ० बाबतींत शुद्ध आयुर्वेदीयांनीं जमून विचार करणें आवश्यक नाहीं काय ?

संमेलन अवश्य आहे

हा पाठ्यक्रम प्रत्यक्षांत आणून जनता सरकार व आयुर्वेदाचे हितशत्रू यास खरा आयुर्वेद असा आहे. वैद्यांना संधि मिळाली तर तेहि कांहीं कार्य करूं शकतात हे पटवून देण्याची खरी वेळ आंताच आहे व तें कार्य संघटनापूर्वक करण्यासाठीं प्रांतीय संमेलन भरणें अत्यंत अवश्य आहे.

तांतडीचें अधिवेशन भरवावें

सबब अध्यक्षमहाशय यांस अशी जाहीर विनंति आहे कीं त्यांनीं क्षणाचाहि उसंत न घेतां आगामी संमेलन लवकर घडून आणावें. पुण्यपुरींतील वैद्यक मंडळ संमेलनाचें आमंत्रण देऊनहि संमेलन भरविण्यास असमर्थ असेल किंवा जाणून बुजून दिरंगाई करीत असेल तर आपण आपल्या कार्यकारिणीच्या सल्ल्यानें तांतडीचें एक विशेष अधिवेशन मुंबई अगर नाशिक सारख्या मध्यवर्ति ठिकाणीं १ १॥ दिवसाचें घ्यावें. त्यांत सरकारनें शुद्ध आयुर्वेदाला दिलेल्या मान्यतेबद्दल अभिप्राय व्यक्त करावा. तो पाठ्यक्रम यशस्वी करण्याकरितां यंत्रणा तयार करावी, व पुढील उद्योगास प्रवृत्त व्हावें.

विद्यालय स्थापावें

पनवेल, पुणें, मुंबई, नाशिक सारख्या ठिकाणीं शुद्ध आयुर्वेदाचें सरकारमान्य शिक्षण देणारें एकतरी आयुर्वेद विद्यालय म. प्रां. वैद्य मंडळानें अधिकृतपणें स्थापन करावें.

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाचे कार्याधिकारी वरील विनंतीकडे लक्ष पुरवून शुद्धायुर्वेदाचे कार्यात जोराची चालना देतील अशी आशा आहे.

१०-४-५४ —कविराज का. सी. मावे

फैजपूर भिषगाचार्य-धन्वन्तरी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३९ वें अ. भा. आयुर्वेद महासंमेलन, कोट्टाकल

अधिवेशनांत सम्मत झालेल्या प्रस्तावांचा सारांश

श्रद्धांजली

प्रस्ताव १- स्वर्गीय वैद्य श्रीयुत व श्रीमती पी. एम्. वारियार कोट्टाकल, श्री. पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकर अमरावती, श्री. हरिशास्त्री पराडकर अकोला, श्री. हेमराज शर्मा राजगुरु नेपाल, श्री. भगवंतराय जैन कनखल, रायसाहब श्री. तनसुखजी व्यास ब्यावर-अजमेर, श्री. डी. के. भारद्वाज बंगलोर, श्री. ठाकुरदत्त मुलतानी दिल्ली, व श्री. आचार्य सुरेंद्र मोहन दिल्ली, या सर्वांचें निधना-निमित्त आत्यंतिक दुःख आहे.

आयुर्वेदास हानिकारक हालचालीवर प्रकाश

प्रस्ताव २—हें अधिवेशन ह्या अधिवेशनाचे अध्यक्ष पं. शिवशर्मा यांना अशी विनंति करीत आहे कीं, त्यांनी केंद्रीय स्वास्थ्य मंत्रणालय व त्याचें मार्फत प्रेरित असलेली इतर प्रांतीय स्वास्थ्य मंत्रणा-लयें यांचीं राष्ट्रीय स्वास्थ्यास हानिकर व आयु-र्वेदाच्या प्रगतीस बाधक अशीं जीं कृत्यें असतील त्यांच्यावर प्रकाश पाडणारें एक स्मृतिपत्र (Memo-randum) तयार करावें, व तें भारताच्या प्रधान-मंत्र्यांच्या नजरेस आणून केंद्रीय स्वास्थ्य मंत्रणालया-कडून अवलंबित असलेल्या हानिकारक स्वास्थ्य–नीतीचे बाबतींत त्यांनीं स्वतः लक्ष घालून त्याचें शुद्धिकरणार्थ प्रयत्न करावा.

मुंबई मंत्रिमंडळाचें अभिनंदन

प्रस्ताव ३— हें महासंमेलनाधिवेशन मुंबई सरकारनें शुद्ध आयुर्वेदीय शिक्षणास प्रारंभ केल्या-बद्दल त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानीत आहे. ह्या पाठ्यक्रमानें योग्य वैद्यवर्ग तयार होऊन तो आयुर्वेदाचें ज्ञानभांडार प्रकाशांत आणील.

शुद्ध अभ्यासक्रमास मान्यता

प्रस्ताव ४- हें अधिवेशन मुंबई राज्याच्या शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रमास मान्यता देत आहे.

इतर राज्यसरकारांना विनंति

प्रस्ताव ५- हें अधिवेशन सर्व राज्य-सरकारांना अशी आग्रहाची विनंति करीत आहे कीं, त्यांनीं मुंबई-राज्य सरकारच्या शुद्धायुर्वेदीय शिक्षणक्रमाचा स्वीकार करून गुरु-शिष्य परंपरा द्वारां अधिकाधिक सुयोग्य वैद्य तयार करण्याचें कार्य हातीं घ्यावें.

प्रमाणपत्रांना सार्वजनिक मान्यता

प्रस्ताव ६ - हें अधिवेशन सर्व राज्य-सरकारांना अशी विनंति करीत आहे कीं, भारतांतील कोणत्याहि राज्यसरकारनें मान्य केलेलें प्रमाणपत्र अगर उपाधि ही इतरहि राज्यांत मान्य करण्यांत यावी व ह्याबाबत प्रचलित असलेली विषमता नाहींशी करावी.

केंद्रीय देशी चिकित्साबोर्ड स्थापावें

(ब) हें अधिवेशन केंद्रीय सरकारलाहि अशी विनंति करीत आहे कीं त्यांनीं एक केंद्रीय देशी चिकित्सा बोर्ड स्थापन करण्याकरितां कार्योचित विधेयक पास करून घ्यावें.

आयुर्वेदाला हानिकारक पाठ्यक्रम

प्रस्ताव ७-हें अधिवेशन राजकोट येथें भरलेल्या ज्यांत आयुर्वेदाचें प्रतिनिधित्व नव्हते-केन्द्रीय स्वास्थ्य-परिषदेच्या द्वारा केलेला आयुर्वेदिक पाठ्यक्रम व तदर्थ लागणारी प्रवेश-पात्रता ह्यासंबंधीं झालेला ठराव आयुर्वेद तज्ज्ञांच्या दृष्टीनें अत्यंत त्याज्य स्वरूपाचा व भारतीय जनतेच्या दृष्टीनें अत्यंत हानिकारक आहे असें समजतें; सबब सुशिक्षित बन-लेला व विशेषतः वैद्यवर्गाला या ठरावास प्रखर विरोध करण्याबद्दल विनंति करते.

स्वास्थ्य परिषदेंत प्रतिनिधित्व

प्रस्ताव ८-हें अधिवेशन केन्द्रीय तसेंच प्रान्तीय सरकारांना अशी आग्रहपूर्वक विनंति करीत आहे कीं स्वास्थ्य परिषदेमध्यें आयुर्वेदीय वैद्यांना भरपूर प्रति-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निश्चित व्हावें; कारण कीं भारतांतील शेंकडा ८० टक्केंरक्षां अधिक जनता आयुर्वेदीय चिकित्सेचा लाभ घेत आहे.

बिहार संस्कृत समिति

प्रस्ताव ९-हें अधिवेशन बिहार राज्यांत ३० वर्षांपूर्वीपासून 'बिहार संस्कृत समिति 'द्वारा गुरुशिष्य-परंपरा आधारें शुद्धायुर्वेदीय पाठ्यक्रम चालू आहे तो तसाच चालू ठेवून त्यांत आणि वृद्धि करण्याबद्दल शिक्षण-मंत्र्यास व प्रमुख शिक्षणाधिकाऱ्यास विनंति करीत आहे. प्रमुख वैद्यांच्या महत् प्रयासानें मुंबई राज्यांत आज जी शुद्धायुर्वेदाची योजना अस्तित्वांत आली ती योजना ३० वर्षांपूर्वीच बिहार सरकारनें चालू केली याबद्दल तें सरकार अभिनंदनास पात्र आहे.

मद्रासचें देशी वैद्यक कॉलेज

प्रस्ताव १०-'मद्रास स्टेट गव्हमेंन्ट कॉलेज ऑफ इंडिजिनस मेडिसिन ' ह्या कॉलेजच्या पाठ्यक्रमांत देशी वैद्यकीय शिक्षणापेक्षां अलोपॅथिक वैद्यकास अधिक समय निश्चित केला आहे, ही निराशाजनक गोष्ट असून ह्या नीतिपरिवर्तनामुळें परिणाम असा झाला आहे कीं, ह्या कॉलेजच्या संबंधांत असलेल्या रुग्णालयांतून पंचकर्मचिकित्सेचें उच्चाटन झालें असून वनस्पति-संग्रहालयेंहि समाप्त करण्यांत आलीं आहेत. ही गोष्ट असंतोष निर्माण केल्यावांचून राहात नाहीं.

तज्ञांचा विचार घ्यावा

हें संमेलन ह्या परिवर्तनाचे बाबतींत जबाबदार अधिकाऱ्यांस असें स्मरण करून देऊं इच्छितें कीं, ह्या परिवर्तनामुळें देशी वैद्यकाच्या प्रगतीमध्यें अतिशय हानि होत आहे आणि म्हणून मद्रास सरकारला अशी विनंति करण्यांत येत आहे कीं, सदर कॉलेजच्या शिक्षणांत व प्रशिक्षणांत, सदर कॉलेजचा आयुर्वेदीय सरकारी विभाग व कॉलेजशीं संबंध नसलेले योग्य आयुर्वेदीय तज्ञ ह्यांची संमति घेतल्यावांचून फेरफार करूं नयेत.

आयुर्वेदीय दवाखाने उघडावेत

प्रस्ताव ११-हें संमेलन सर्व राज्य-सरकारांना अशी आग्रहाची विनंति करीत आहे कीं, त्यांनीं आपापल्या राज्यांत आयुर्वेदीय चिकित्सा जनतेस सहज सुलभ व्हावी ह्या हेतूनें ठिकठिकाणीं अधिकांत अधिक आयुर्वेदिक दवाखाने उघडावेत व प्रत्येक जिल्ह्याच्या गांवीं जिल्हा रुग्णालय उघडावें.

आंध्र राज्य सरकारचें कॉलेज

प्रस्ताव १२- आंध्र राज्य सरकारनें आपल्या राज्यांत आयुर्वेदिक कॉलेज काढल्याबद्दल हें अधिवेशन त्यांना धन्यवाद देत आहे व अशीहि प्रार्थना करीत आहे कीं, सदरचें कॉलेज अष्टांग आयुर्वेदिक कॉलेजच्या स्वरूपांत चालविण्यांत यावें.

सेंट्रल ड्रग अॅक्ट

प्रस्ताव १३-हें अधिवेशन वैद्य श्री. हरदयाळजी यांच्या अध्यक्षतेखालीं एक समिति नियुक्त करीत आहे. सेंट्रल ड्रग्ज कंट्रोल अॅक्ट लागू करण्यामुळें ज्या अडीअडचणी उत्पन्न होतील त्यांचा विचार करून

रससिंदूर मागवून

संशोधन कार्यास मदत करा.

रससिंदूर

किंमत-तो. ५, ५॥ रु., १० तो. ९॥ रु.
तो. २०, १७॥ रु., १ पौंड ३२ रु.
आगाऊ म. ऑ. आल्यासच पॅ. पो. माफ.

धंद्याचे दृष्टीनें वैद्यांचा फायदा असून म्हातारपणीं पुढील संशोधनकार्यास मला मदत केल्यासारखें होणार आहे. भावनापरत्वें किंवा अनुपानपरत्वें विकारावर वापरा. हिंगुळाऐवजीं किंवा कज्जलीऐवजीं खल्वी अगर कुपिस्थ-रसायनांत वापरा. गुणप्रभावाचा अनुभव पटेल.

भिषग्रत्न —ग. कृ. पाटणकर
पो. किनई, जि. उत्तर सातारा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचें निराकरण करण्याचें उपायांसंबंधीं आपल्या सूचना प्रस्तावित करील.

महामारक व्याधि विरुद्ध समिति

प्रस्ताव १४–हें अधिवेशन विषूचिका, क्षयरोग वगैरे महामारक व्याधींपासून संरक्षण करण्याविषयीं उपाय योजनांचा विचार करण्याकरितां श्री. पं. हरि-नारायणजी चतुर्वेदी यांच्या अध्यक्षतेखालीं एक समिति स्थापन करील व तिच्या मार्फत वरील संबंधांत एक रिपोर्ट तयार करण्यांत येईल. या समितींत ४ सदस्य असतील व त्यांची नियुक्ति महासंमेलनाध्यक्षा-द्वारा समितीच्या अध्यक्षानुमतीनें करण्यांत येईल.

वैद्यवर्गास जनतासंपर्काबाबत सूचना

प्रस्ताव १५–हें अधिवेशन केंद्रीय व प्रांतीय सरकारांचे आयुर्वेदासंबंधीं धोरण लक्षांत घेऊन वैद्य-वर्गास व अ. भा. आ. महासंमेलनाचे सदस्यांस अशी विनंति करीत आहे कीं, त्यांनीं आठवड्यांतून कांहीं तास जनतासंपर्क कार्यांत तसेंच आयुर्वेदाचें ज्ञान-प्रसार कार्यांत खर्ची घालून जनतेस आरोग्याविषयीं आयुर्वेदीय नियम समजावून सांगावेत. ह्या योगें देशांतील वाढत्या रोगराईस पायबंद बसेल.

वैद्यसभा स्थापाव्यात

प्रस्ताव १६ – अ. भा. आ. महासंमेलनाचें हें अधिवेशन इतर सर्व संबंधित प्रांतीय आयुर्वेद संमे-लनांना आदेश देत आहे कीं, त्यांनीं आपापल्या प्रांतांतील जिल्ह्याच्या गांवीं व मोठमोठ्या शहरीं स्थानिक वैद्य-सभा दर आठवड्यास, निदान दर महिन्यांस, भरवित जावी. व अशा सभेंतून स्वानुभव-सिद्ध औषधें आणि रोगनिदान-चिकित्सा ह्यावर पर-स्परांशीं विचारविनिमय करावा व सर्वसंमत विचार महासंमेलन कार्यालयाकडे प्रकाशनार्थ पाठवावेत. या व्यतिरिक्त सर्व सरकारी व खाजगी संशोधन संस्था-नाहि अशी विनंति आहे कीं, त्यांनीं संशोधित केलेली चिकित्सा आणि रोगांचे बाबतींत विशेष विचारप्रवाह हेहि बहुजन हिताचे दृष्टीनें प्रकाशनार्थ महासंमेलन पत्रिकेकडे जरूर पाठवित जावेत.

शुद्ध आयुर्वेद = अष्टांग आयुर्वेद

प्रस्ताव १७– महासंमेनाचें हें अधिवेशन 'शुद्धायुर्वेद' या शब्दाचा अर्थ 'अष्टांगायुर्वेद' असा समजते.

प्रस्ताव १८–हें अधिवेशन ज्या ज्या सरकारी आणि खाजगी संस्थांनीं आपले प्रतिनिधि ह्या अधि-वेशनास पाठविले त्या सर्वांचे आभार मानवें.

प्रस्ताव १९–दिल्ली नगरपालिकेनें स्वखर्चानें आपले प्रतिनिधि कविराज केशवप्रसाद आत्रेय यांना या अधिवेशनास पाठविलें त्याबद्दल हें अधिवेशन दिल्ली नगरपालिकेचे आभार मानीत आहे.

संमेलन पत्रिकेंत संस्कृत विभाग

प्रस्ताव २०– हें अधिवेशन महासंमेलनाचें मुखपत्र 'आयुर्वेद महासंमेलन पत्रिका' यांत ८ पानांचा एक संस्कृत विभाग कायम चालविण्यासाठीं त्याचे संपादक म्हणून वैद्य श्री. व्ही. वी. नटराज-शास्त्री, त्रिचनापल्ली, व त्यांचे सहाय्यक संपादक म्हणून वैद्यविशारद् श्री. एस्. व्ही. राधाकृष्णशास्त्री टेपाकुलम् यांना नियुक्त करीत आहे.

त्रावणकोर कोचीन आमंत्रण

प्रस्ताव २१– महासंमेलनाच्या ४० व्या अधिवेशनासाठीं त्रावणकोर–कोचीनच्या निमंत्रणाचा स्वीकार केला जात आहे.

परिवर्तित नियमावलीचा स्वीकार

प्रस्ताव २२–(१) आयुर्वेद महासंमेलनानें नेम-लेल्या समितीतर्फे तयार केलेली परिवर्तित, संशोधित व प्रस्तावित नियमावलीचा स्वीकार करण्यांत येत आहे. (२) सदर नियमावली लवकरच प्रकाशित करून

पवित्र नेपाळ कस्तुरी रु. ४४ तोळा.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोळा.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोळा.
लिहाः–नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आवश्यकतेनुसार त्याचें इंग्रजी भाषांतरहि प्रसिद्ध करण्यांत यावें

महासंमेलनाची पुनर्नोंदणी

प्रस्ताव २३- स्वीकृत केलेल्या नियमावलीच्या आधारावर अ भा. आयुर्वेद महासंमेलनाचे पुनर्-रजिस्ट्रेशन करण्याची व्यवस्था केली जावी.

प्रस्ताव २४-(१) महासंमेलनाच्या नियमावलींत संघटनेंबाबत जें विधान दिलें आहे त्याची सूचना सर्व प्रादेशिक आयुर्वेद संमेलनांना दिली जावी व जी प्रादेशिक आ. संमेलनें त्यास अनुसरून कार्याला सुरुवात करतील त्या प्रादेशिक संमेलनांना अ. भा. आयुर्वेद महासंमेलनाचे अंगभूत मानण्यांत येईल व जीं प्रादेशिक संमेलनें नियमावलीनुसार कार्यांत प्रारंभ करणार नाहींत त्यांचेकडून वार्षिक २५ रुपये सदस्य वर्गणी घेऊन त्यांना महासंमेलनाच्या संबद्ध संस्था म्हणून मानण्यांत येईल.

(२) ज्या साधारण वैद्य सभा आतांपर्यंत १० रुपये वार्षिक वर्गणी देऊन महासंमेलनाशीं प्रत्यक्ष संबद्ध आहेत त्यांची ती सवलत पूर्ववत् चालू राहील.

(३) सदरचा प्रस्ताव संशोधित नियमावलीच्या शेवटीं स्वतंत्र परिशिष्ट म्हणून जोडण्याचें ठरलें.

अ. भा. आयुर्वेद महासंमेलनाचे निवडलेले पदाधिकारी

अध्यक्षः- वैद्यरत्न श्री. पं. शिवशर्मा, मुंबई.

उपाध्यक्षः- डॉ. वायु. पार्थनारायण पंडित, बंगलोर
वैद्य श्री. पं. ओंकार प्रसादशर्मा, दिल्ली.

प्रधानमंत्रीः- वैद्य श्री. वामनराव दीनानाथ, मुंबई.

संयुक्तमंत्रीः- क. श्री. स्वामी चेतनानंद, दिल्ली.

सहायकमंत्रीः- वैद्य नित्यानंद सारस्वत, पिलानी.
वैद्य बाबूराम मिश्र, हापूड. वैद्य श्रीरामशर्मा, मुंबई. वैद्य वैद्यनाथ मिश्र, मुझफरपूर.

कोषाध्यक्षः- वैद्य श्री. शिवनाथ शर्मा, दिल्ली.

प्रधान संपादकः- कविराज श्री. कैलासचंद्र अग्रवाल, दिल्ली.

वाचकांचा पत्रव्यवहार —

आयुर्वेदाचा पाया

'आयुर्वेदाचा पाया' (भिषग्विलास मासिक पुस्तक ३६ वें) या १९३७ सालीं प्रसिद्ध झालेल्या (वैद्य बिंदुमाधव पंडित यांच्या) लेखमालेचें पुनर्मुद्रण होणें जरूर आहे. पुणें विद्यापीठ आयुर्वेदाचा अभ्यासक्रम ठरविण्याच्या विचारांत आहे. आपण या बाबतींत प्राध्यापक × × यांच्याशीं पत्रव्यवहार करून इंटर सायन्स प्रवेश-पात्रता ही यासाठीं कशी मिथ्या आहे हें त्यांना पटवून देण्याचा कसोशीचा प्रयत्न करावा. वरील लेखमाला त्यांचे नजरेस आल्यानें खरा परिणाम होईल.

किंवा इंटर सायन्स ही पूर्वपात्रता आयुर्वेदाला कां नको यावर पुनः लेखमाला लौकरच लिहा. 'आयुर्वेद पत्रिकेंत' अशा लेखांची आज फार आवश्यकता आहे. —एक वाचक

आसवें अरिष्टें व दारुबंदी

सरकारी दारुबन्दी कायद्यामुळें आमची आसवें व अरिष्टें ही महाग होत चाललीं आहेत. अगदीं खालच्या वर्गांतील लोकास तीं देणेंसुद्धां जड होऊं लागलें आहे.

त्यांतच विक्रीकर, देवा स्वराज्यांतून व त्याच्या करांतून वाचीव अशी प्रार्थना करण्याची पाळी आली आहे. —सी. एल. जठार

शास्त्रोक्त पद्धतीनें व अत्यंत परिश्रमानें तयार केलेलीं महाराष्ट्र प्रांतीय वैद्यसंमेलनानें व ऑल इंडिया आयुर्वेद कॉंग्रेस व प्रदर्शनाकडून प्रशंसित
सहस्त्रपुटी अभ्रक इ. भस्में व इतर औषधें
प्राइसलिस्ट मागवा.
श्री अमरेश्वर आरोग्यमंदिर
मिरासी बोळ, पो. इचलकरंजी S. M. C.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

—सहकारी पद्धतीनें तयार करावयाचीं औषधें—

कोहलकल्प [आसवारिष्टविधि]

(लेखकः— वैद्य पु. वि. धामणकर धूतपापेश्वर-पनवेल)

आसवारिष्ट विधि हा चरक सांप्रदायांतला अत्यंत गुंतागुन्तीचा, नाजूक, दक्षतेनें करण्याचा आणि सर्वश्रेष्ठ असा विधी आहे. ह्यांत रसायन-शास्त्राचें साहाय्य विपुल घेतलें आहे. त्यामुळें, ह्या-बाबतचें शास्त्र समजावयास पाहिजे असेल तर तें 'आयुर्वेदीय औषधीकरण' नामक पुस्तकांतलें संधान-विधि हें प्रकरणच वाचलें पाहिजे. पण ह्यांतला फक्त कलात्मकच भाग पाहिजे असलेल्यांचे सोयीकरितां कांहीं आसवारिष्टांच्या नमुनाकृति येथें देत आहे. पुढें दिलेल्या सामान्य सूचना लक्षांत घेऊन आसव तयार केलें तर तें बिघडण्याचा संभव उरत नाहीं.

आसवकल्पविधीबाबत सामान्य सूचना

१) आसव अगर अरिष्ट पावसाळीं हवेंत करूं नये. त्यावेळची हवा व पाणी हीं अभिषवनाकरितां युक्त नसतात.

२) आसवारिष्टें कोंदट, कुंचट, गार हवेंत करूं नयेत व ठेवूंहि नयेत.

३) पाणी स्वच्छ व अच्छ असावें. पाण्यास विशिष्ट गंध असल्यास तें पाणी उकळून घ्यावें. १२ तास संथ ठेवावें. मेसळ बुडाशीं जाते अगर वर येते ती दोन्ही दूर करून मधलें निव्वळ पाणी आसवा-करितां घ्यावें.

वनस्पतींचा रस कसा काढावा ?

फळें, फुलें व पानें प्रथम धुवून व पुसून कोरडीं करावीं व मग शक्यतों लोहसंसर्ग न होऊं देतां (दगडी खलबत्त्यानें) रस काढावा. अडुळशाचें पानांस किंचित् वाफ दिल्यानें त्यांचा रस निघतो. कुमारीरस शरदांत, आवळ्यांचा रस हेमंतांत निघतो, तो उत्तम. लोहस्पर्शानें आंवळारस काळा पडतो, तो फरक इष्ट नव्हे. रस काढण्याकरितां पाण्याचें साहाय्य कधींहि घेऊं नये.

४) काढा करणें नसेल तेथेंसुद्धां पाणी शृतशीत घ्यावें. हें पाणी लघु होतें. त्यांत अर्क छान उतरतात.

जल, काल, उष्णतामान

५) क्वाथ्य द्रव्यांची भरड करावी, ती १२ तास भिजूं द्यावी, नंतर त्यांत अपेक्षित जल घालावें. काष्ठौषधींमधील सार, ती उमलल्यानें पाण्यांत उतरतें. ह्याकरितां काल व अग्नि ह्यांची अपेक्षा असते. सार-निष्कृतीकरितां आवश्यक तेवढें जल, काल, व उष्णता-मान सातत्यानें कायम राखावें.

काढा कसा करावा ?

६) क्वाथ्य द्रव्यें निःसार होईपर्यंत पाण्यांत बुडलेल्या स्थितींत उकळूं द्यावींत. निःसार झाल्यावर काढा गरम असतांनाच तो गाळावा व चोथा लाग-लींच दाबून त्यामधील द्रव काढून तो पहिल्या द्रवांत मिळवावा. हा काढा पुन्हां उकळून अपेक्षित शेषमान साधावें. नंतर मात्र तो थंड होऊं द्यावा. व वरील निवळ, हळूंच हलक्या हातानें वा नळीनें अलग करावी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७) क्वथित रस, बल, हिम, फांट अगर क्वाथ, ३५-९०उष्ण असतां त्यांत मधुर द्रव्यांचें मेलन करावें. (मधुर पदार्थांपैकीं गूळ जुना, रवाळ, मधुर, पिवळसर असा असावा. तो आंबट, कडवट अगर चिकीचा नसावा. साखर, पिठीसाखर आसवांत घालूं नये. स्वच्छ, शुभ्र, पेलुदार, कोरडा, नवा साखऱ्या घ्यावा. मध जुना, गोड, पिवळसर घ्यावा. तो निर्मळ, स्वच्छ असावा. जरूर तर शुद्धच करून घ्यावा.) हें मिश्रण १२ तास ठेवावें.

८) मधुर द्रव्य पूर्णतया विरघळलेलें पाहून तो द्रव गाळून घेऊन त्यामधील माती केरकचरा दूर करावा.

कापडास खळ नसावी

९) मग त्यांत जुन्या धायटी फुलांच्या चूर्णाची पोटली सोडावी. धायटीफूल भिजवून १२ तास ठेवून फुगल्यावर पिशवींत भरावें. पिशवीचें कापड नवें पांढरें स्वच्छ व पातळ असावें. कापडास खळ नसावी. खळीमुळें आसव आंबट होण्याचा संभव निर्माण होतो. किंवा धातकीजल तयार करून घालावें.

धातकीफुलांच्या हिमाचें वैशिष्ट्य

धायटी फुलाचें प्रस्तुत जल (Macerated water) अथवा फुलाचा हिम फुलांपेक्षां अधिक कार्यक्षम ठरतो. जांगल देशांत हिम छान उपयोगी पडतो. हिम योजल्यास ६४ तो. फुलांचें काम अवघे चार तोळे फूल देतें. रंग तांबडालाल गहिरा येतो. औषधाचें वीर्य वाढतें.

धातकी जलविधिः– धातकी–पुष्प भरड १ तो. + (क्वाथ) पाणी १० तो. २४ तास भिजत ठेवून कुसकरून फडक्यांत घालून दाबून गाळून घेणें. व १ शेर (मधुर पदार्थ + पाणी अगर फांट) मिश्रणास २॥ तो. धातकीपुष्पद्रव घालावें.

धातकीपुष्पजलाची उपयुक्तता

हा द्रव घालण्यानें (१) फूल कमी लागतें. (२) कार्य सुकर, लौकर नि इष्ट प्रमाणांत होतें. (३) आसव गाळण्याचे वेळीं त्रास कमी होतो. किंबहुना आवाप द्रव्यांची पोथकी घातली तर आसव गाळण्याचें कारणच उरत नाहीं. (४) आसव वाया जात नाहीं.

१०) पाणी, मधुर पदार्थ व धायटीफूल ह्यांचें मिश्रण ४८ तास बंद करून ठेवावें. ठेवतांना पाण्याचें उष्णतामान ३५°९० (सेंटिग्रेड) राखावें.

मिश्रणांत आवाज व बुडबुडे येऊं लागल्यानंतर आवाप्य द्रव्यांच्या सूक्ष्म चूर्णाची पोट्टली त्यांत सोडावी. पोट्टलीमधील चूर्णें १२ तास पाण्यांत भिजून फुगलेलीं असावींत. त्यांनीं पोट्टलीचा $\frac{3}{4}$ भाग व्यापून $\frac{1}{4}$ भाग मोकळा रहावा.

१२) सर्व मिश्रण पोट्टल्यासह काष्ठ दंडानें खूप ढवळावें.

आसवारिष्ट-पात्रशुद्धि कशी करावी ?

१३ पात्र चुन्याच्या निवळीनें धुवून निरस करून घ्यावें. व मिऱ्यांच्या तीक्ष्ण धुरीनें तें निर्जंतुक करावें व जटामांसी, अगरु, चंदन इ.च्या सुगंधी धुरानें सुगंधित करावें. अशा तऱ्हेनें भांडें सुयोग्य करून घ्यावें.

१४) पात्र धुरानें भरलेलें असतांनाच त्यांत वरील द्रवमिश्रण घालावें. त्याचें उष्णतामान ३५°९° राखावें. पुनः सुगंध धूप देऊन पात्र मुद्राबंद करावें.

१५) संधीस गोपीचंदन लावलेली कापडपट्टी गुंडाळून तो हवाबंद करावा म्हणजे हवेंतील जंतु आंत जाऊं शकत नाहींत.

१६) संधिलेप सुकल्यावर तें पात्र १ महिनाभर धान्यराशींत, भूगर्भांत वा कोष्ठघरें (ढोलींत) झांकून ठेवावें म्हणजे हवेंतील उष्णतामानाचे फरकांचा परिणाम त्यावर होत नाहीं. पात्रांतील उष्णतामान अपेक्षित तेंच व स्थिर राहतें. त्यामुळें परिवर्तन अखंड व सुंदर होत रहातें.

१७) मुदतीनंतर संधिलेप ओलावून, उघडून काढावा. तो भाग धुवून पुसून स्वच्छ करावा. झांकण काढून पहावें. आवाप द्रव्यें तळाशीं जाऊन बसलीं असतील. वरच्या पोकळ जागेंत आगकाडी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जर्ळू शकेल व तयार आसवास मनोज्ञ गंध येऊं लागला कीं, तें आसव झालें असें समजावें.

१८) धातकीपुष्प, सुगंधी व इतर द्रव्यें ह्यांच्या पोट्टल्या काढून घेऊन त्यामधील अवशिष्ट सारभाग दाबून, पिळून अलग करावा, व तो तयार आसवांत घालावा.

१९) साधारण मानतः १३ शेर पाण्यांत गूळ साखर व मध हीं मधुर द्रव्यें १०, १०, १५ ह्या क्रमानें घातलीं जातात. हें प्रमाण अनुसरलें असल्यास १३ शेर पाण्याचें तयार आसव अनुक्रमें २० शेर १३ शेर आणि २०॥- शेर तयार होतें.

पाणी	मधुर पदार्थ		तयार मिश्रण (मापी)
१३ शेर	गूळ	१०शेर	२० शेर
१३ शेर	साखर	१०शेर	२३ शेर
१३ शेर	मध	१५शेर	२०॥ शेर

२०) आसवांत अम्ल हवा अगर पदार्थ, पीठ अम्लजंतु त्यांचा संसर्ग न होण्याची दक्षता घ्यावी. कोंदट, कुबट, गार हवाहि वर्ज्य मानावी.

यापुढें रस, हिम, फांट, कषायद्रव असलेल्या व पिंड, द्रव सारासव स्वरूप असलेल्या आसवांच्या नमुनाकृति दिल्या आहेत.

पिंडस्वरूप कृति

१] अष्टशतारिष्ट [भा.भै.र.१९९] च.,ग.नि.

पाठः- काश्मर्यधात्रीमरिच्याभयाक्ष—
द्राक्षाफलानां च सपिप्पलीनाम् ।
शतं शतं जीर्णगुडात्तुलां च
संक्षुद्य कुम्भे मधुना प्रलिप्ते ॥
सप्ताहमुष्णे द्विगुणं तु शीते
स्थितं जलद्रोणयुतं पिबेन्ना ।
शोफान्विबन्धान्कफवातजाँश्च
स हन्त्यरिष्टोऽष्टशतोऽग्निकृच्च ॥

१ नांवः— द्रव्यसंख्याबोधक

२ रोगाधिकारः— शोथ

३ कार्य- दीपन, पाचन, मलबंधनाशक, कफवातहर

४ रोगः— सर्वांगशोफ. ५ स्थानः—सर्व शरीर

६ द्रव्यसंग्रहः— शिवण, आंवळा, पिंपळी, गूळ, हिरडा, बेहेडा, मनुका, मिरें (प्रत्येकीं ४।४ शें तोळे).

८ द्रव्यानिर्णयः- शिवणीचें फळ व त्रिफळयाचें फोल घ्यावें.

९ प्रक्रियाः- द्रव्यें कुटून पाण्यांत भिजवून गोळा करून संधित स्थितींत ठेवावें.

१२ कालः- संधान-शरद-हेमंत.

स्थापनः- उष्ण ऋतूंत ७ दिवस. थंडऋतूंत १४ दि. उष्ण देशांत ७ दि. थंड देशांत १४ दि.

टीपः- जरूर पडेल तेव्हां अपेक्षित मात्रा पाण्यांत कोलून तें पाणी प्यावें.

द्रवासव श्रृतशीतजल [हिम]

२) अरविंदासव (भा. भै. र. १९६) भै. र.

पाठ

अरविन्दमुशीरं च काश्मरीं नीलमुत्पलम् ।
मंजिष्ठैला बला मांसीरम्बुदं सारिवां शिवाम् ॥
बिभीतकवचाधात्रीः शठी श्यामां सनीलिनीम् ।
पटोलं पर्पटं पार्थं मधूकं मधुकं मुराम् ॥
पलमानेन संगृह्य द्राक्षायाः पलविंशतिम् ।
धातकीं षोडशपलां जलद्रोणद्वये क्षिपेत् ॥
शर्करायास्तुलां तत्र तुलार्धं माक्षिकस्य च ।
मासं संस्थापयेद् भाण्डे मृत्तिकापरि निर्मिते ॥
बालानां सर्व रोगघ्नो बलपुष्ट्यग्निवर्धनः ।
अरविन्दासवः प्रोक्तः आयुष्यो ग्रहदोषहृत् ॥

१) नांवः- आरंभींचे पदार्थांवरून.

२) रोगाधिकारः- बालरोग.

३) कार्यः- बल्य, बृंहण, दीपन, पाचन, आयुष्यकर, ग्रहघ्न.

४) रोगः- लहान मुलांच्या सर्व तक्रारीवर.

५) द्रव्यसंग्रहः- ४ तो. नीलकमळ, ४ वाळा, ४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मंजिष्ठा, ४ जटामांसी, ४ शिवणफळ, ४ मोथा, ४ बेहेडा, ४ मोहपुष्प, ४ श्वेतकमळ, ४ मुरा, ४ वेखंड, ४ जेष्ठमध, ४ उपळसरी, ४ वेलची, ४ आंवळा, ४ नीळ, ४ पित्तपापडा, ४ चिकणा, ४ कचोरा, ४ कडूपडवळ, ४ अर्जुनसाल, ४ हिरडा, ४ त्रिवृत, ८० द्राक्षे, १५ शेर साखर, ५ शेर मध, २६ शेर पाणी, ६४ तो. धायटीफूल.

७) स्थानः— सर्व तनु

८) द्रव्यनिर्णयः —

मुराः— कापुरीमधुरी, किंवा जटामांसी.

शिवण फळाचे प्रतिनिधि- वडाचें फळ अगर मनुका.

प्रक्रिया

१) पाणी $\frac{1}{4}$ आटवून $\frac{3}{4}$ उरवून गाळून घ्यावें.

२) प्रथम मध, साखर, पाणी एकत्र करून १२ तास ठेवावें.

३) त्याचबरोबर आवाप्य द्रव्यांचीं सूक्ष्म चूर्णें १२ तास भिजत ठेवावीत.

४) मनुका कुटून अगर वाटून घ्याव्या.

५) धायटीफूल कल्क द्रव मिश्रणांत घालून तें ४८ तास झांकून ठेवावें.

६) नंतर आवाप्य द्रव्य पोथकी आंत सोडावी.

७) मुद्रा-संधिलेप द्यावा.

८) धान्य राशींत पुरून ठेवावें अगर निवात प्रदेशीं ठेवावें.

९) मुदतीनंतर काढून वरची निवळ अलग करावी. मग चोथा दाबून निघेल तो अर्क व वरील निवळी एकत्र करावीत.

१०) सिद्धिप्रमाणः— ४३॥· तोळे

११) परिगणनः- कोहल शतमान विशिष्ट गुरुत्व

अम्लशतमान	रस
वट्टसार शतमान	रंग
मधुजन शतमान	खनिज शतमान

१२) कालः-स्थापनकाल-१ महिना, सेवनकाल-भोजनोत्तर, साधनकाल-शरद्.

—— ——

द्रवासव —काढा

(३) कुटजारिष्ट [भा.भै.र.८९२] भै.र.,शा.

पाठः- तुलां कुटजमूलस्य मृद्वीकार्धतुलां तथा ।
मधूकपुष्पकाश्मर्योर्भागान् दशपलोन्मिताम् ॥
चतुर्द्रोणेऽम्भसः पक्त्वा द्रोणं चैवावशेषितम् ।
धातक्या विंशतिपलं गुडस्य च तुलां क्षिपेत् ॥
मासमात्रं स्थितो भाण्डे कुटजारिष्टसंज्ञितः ।
ज्वरान् प्रशमयेत्सर्वान्कुर्यात्तीक्ष्णं धनंजयम् ॥
दुर्वारां ग्रहणीं हन्ति रक्तातीसारमुल्बणम् ॥

१) नांवः— प्रारंभद्रव्यावरून.

२) रोगाधिकारः— अतिसार.

३) कार्यः— आमपाचक, संग्राहक.

४) स्थानः— आंत्र.

५) मात्राः— १ ते ४ तोळे ३।३ तासांनीं.

६) रोगः— रक्तातिसार, संग्रहणी, सर्वज्वर.

७) द्रव्यसंग्रहः- कुडासाल ५ शेर, मोहपुष्प -॥· शेर, मनुका २॥- शेर, शिवणफळ -॥· शेर, गूळ १० शेर, धायटीफूल ४० तोळे.

८) द्रव्यनिर्णयः- कुडासाल ओली घेणें श्रेष्ठ. तें न जमल्यास सुकी डासाल भरड करून १२ तास पाण्यांत भिजत घालावी. फुगलेल्या सालीचें वजन ५ शेर घ्यावें.

कुड्याची साल वाळतांना तीमधील कार्यकारी द्रव्य (Conessine) उडून गेल्यानें कमी होतें. म्हणून कुड्याची साल ओली घेणें श्रेष्ठ मानलें आहे.

कुटजारिष्ट प्रक्रिया

९) ग्रंथांत सांगितलेलें पाण्याचें मान कमी पडतें. एक तर सालीमध्यें साराचें निष्कासन पूर्णपणें होण्याकरितां चतुर्थांश काढा उरवायचा म्हटलें तर १० शेर शेष फारच कमी पडतो. म्हणजे साल पाण्याच्यावर राहून पाणी तळाशीं राहतें. हा प्रकार होऊं नये म्हणून प्रथम ह्या द्रव्यसंग्रहाचे एक कठीण व दुसरा मृदु असे दोन भाग केले. कुडासाल कठीण द्रव्य म्हणून त्यास १६ पट पाणी घातलें व चतुर्थांश पाणी उरविलें. सारनिष्कासन पूर्ण झाल्यानें साल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काढून घेतली व राहिलेला २० शेर काढा पुनः निम्मे करून अष्टमांश शेष साधला. दुसरा गट मृदु द्रव्याचा (मनुका २॥ शेर, मोहपुष्प -॥- शेर, शिवणफळ -॥- शेर) त्याचें वजन ३॥ शेर त्याचें चौपट पाणी १४ शेर. शेष (चतुर्थांश) ३॥ शेर. दोन्ही शेष १०+३॥ मिळून १३॥ शेर म्हणजे ग्रंथांत सांगितल्या-प्रमाणें १ द्रोण शेष द्रव निराळ्या पद्धतीनें साधला. पुढची प्रक्रिया सामान्यच आहे.

———

द्रवासव फांट

जीरकाद्यरिष्ट भा. भै. र. २०६४ भै. र.

पाठ

जीरकस्य तुलाद्वंद्वं चतुर्द्रोणे जले पचेत् ।
द्रोणशेषे क्षिपेत्तत्र तुलात्रयमितं गुडम् ॥
धातकी षोडशपलां शुण्ठी च द्विपलोन्मिताम् ।
जातीफलं मुस्तकं च चातुर्जातं यमानिकाम् ॥
कंकोलं देवपुष्पं च पलमानेन निक्षिपेत् ।
मासं संस्थापयेद् भाण्डे मृत्तिकापरिनिर्मिते ॥
ततः कल्कान् विनिर्हृत्य पाययेत् कर्षमात्रया ।
अरिष्टो जीरकाद्योऽयं निहन्यात् सूतिकामयान् ॥
ग्रहणीमतिसारं च तथा वह्नेश्च वैकृतिम् ।

१) नांवः– आद्यद्रव्यावरून

२) रोगाधिकारः– स्त्रीरोग

३) कार्यः– बल्य, दीपन, पाचन, मलवातानुलोमक, स्तन्यवर्धन, स्तन्यशोधन.

४) स्थानः— उर, गर्भाशय व पक्वाशय.

५) मात्राः— १ ते २ तोळे.

६) रोगः– अग्निविकृति, अतिसार, संग्रहणी, सूतिकारोग, स्तन्यरोग.

७) द्रव्यसंग्रहः– १० शेर जिरें, १५ शे. गूळ, ५२ शे. पाणी, ६४ तो. धायटीफूल, १३ शे. शेष, ८ तो. सुंठ, ४ तो. दालचिनी, ४ तो. नागकेशर, ४ तो. कंकोळ, ४ तो. वेलची, ४ तो. तमालपत्र, ३ तो. नागरमोथा, ४ तो. लवंग, ४ तो. ओवा.

८) द्रव्यनिर्णयः– सामान्य. जिरें, पांढरें, गोडें.

९) प्रक्रिया

मूळ पाठांत जिऱ्याचा काढा करावयास सांगितला आहे. त्यानें अपेक्षित कार्य होतें. पण त्याचें प्रमाण अल्प असतें. व स्तन्यपानानंतर मातेला थकवा येतो. म्हणजे हें जीरकाद्यरिष्ट उत्तेजक होतें. त्यापेक्षां जिऱ्याचा फांट तयार करून तो द्रव म्हणून योजला तर ह्यापेक्षां अधिक मानाचें व मोलाचें कार्य होतें. माता-बालकांचें मल व वात ह्यांचें अनुलोमन व निःसरण चांगलें होतें. मुलांचें पोट उत्तम भरतें. आईस थकवा येत नाहीं, उलट हुषारीच वाटते; तेव्हां जिऱ्याचा फांट तर योजावाच, पण त्याचे जोडीला शतावरी हिमाचीहि जोड द्यावी. हें फार उत्तम ठरतें.

१) जीरक भरडपूड १० शे., १० शेर थंड पाण्यांत १२ तास भिजत ठेवावी. नंतर तो कल्क १० शेर उकळत्या पाण्यांत सोडावा. १२ तासानंतर तें जिरें त्याच पाण्यांत वांटून त्याचा चव काढावा.

२) शतावरी भरड ३ शेर, ३ शेर पाण्यांत १२ तास भिजत ठेवावी. नंतर ३ शेर उकळत्या पाण्यांत टाकून थंड झाल्यावर वाटून तिचें दूध काढावें. (३ शेर)

वर १३ शेर काढा सांगितला आहे. तेथें हा द्रव घ्यावा.

१०) सिद्धिप्रमाणः– १३ शेर द्रव असल्यास २३ शेर आसव तयार होतें.

११) परिगणनः— सामान्य.

१२) कालः– साधन-शरद्. इतर सामान्य.

———

द्रवासव, रस

५ द्राक्षासव (भा. भै. र. ३११८)

यो. र., भै. र., शा., यो. चि.

पाठः– मृद्वीकायास्तुलार्धं तु द्विद्रोणेऽपां विपाचयेत् ।
पादशेषे कषाये च पूते शीते प्रदापयेत् ॥
गुडस्य द्वितुलां मानीं धातक्या घृतभाजने ।
विडंगं फलिनी कृष्णा त्वगेलापत्रकेशरम् ॥
मरिचं च भिषक् चूर्णं सम्यग्दत्वा विचक्षणः ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्षिपेच्च पालिकैर्भागैः स्थापयेच्चैव तद्दिने ॥
ततो यथाबलं पीत्वा कासश्वासगलामयान् ।
हन्ति यक्ष्माणमत्युग्रमुरःसंधानकारकम् ॥
चतुर्थभागं द्राक्षाया धातकीमत्र केचन ।
प्रयच्छन्ति ततो वीर्यमेतस्योच्चैः प्रजायते ॥

१) नांवः– प्रधान द्रव्य बोधक.

२ रोगाधिकारः– क्षय.

३) कार्यः– बल्य, कफघ्न, रक्तप्रसादन, संधानकर.

४) स्थानः– कफस्थान.

५) मात्राः– १ ते २ तोळे.

६) रोगः– कास, श्वास, गलरोग, क्षय, उरःक्षत.

७) द्रव्यसंग्रहः– द्राक्षारस १३ शेर, वावडिंग ४ तोळे, पिंपळी ४ तोळे, नागकेशर ४ तो., गूळ १० शेर, गहूला ४ तोळे, मिरें ४ तोळे, सुंठ ४ तोळे, दालचिनी ४ तोळे, वेलची ४ तो. तमालपत्र ४ तो. धायटीफूल ६४ तोळे.

८) द्रव्यनिर्णयः– सामान्य

९) सिद्धिप्रमाणः— २० शेर

१०) कालः— साधन काल–वसंत.

———

तारेचा पत्ताः–Newbottle
के. के. शहा अँड कंपनी
बाटल्यांचे व्यापारी
(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)
रिकाम्या बाटल्या, बुच, कॅपसुल्स्
[हेअर ऑईल, सरबत, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाचीं सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे
ठोक व किरकोळ
विक्री करणारे व्यापारी

आरोग्यविषयक नोकरवर्ग
जादा शिक्षणाच्या सोयी

समाज विकास गटांसाठीं लागणारे डॉक्टर, कम्पाउंडर, सॅनिटरी इन्स्पेक्टर्स इत्यादि निरनिराळा आरोग्यविषयक नोकरवर्ग बाहेरून मिळण्यास पंचाईत पडणार नाहीं असें समाज विकास कारभार मंडळास वाटतें. लेडी हेल्थ व्हिजिटर्स आणि सुईणी यांच्या शिक्षणाबाबत असलेल्या सोयी, शिक्षणाच्या मानाने अगदींच तुटपुंज्या आहेत. डॉक्टर, कम्पाउंडर, सॅनिटरी इन्स्पेक्टर आणि लेडी हेल्थ व्हिजिटर यांची प्रत्येकीं ६२० जणांची गरज आहे. तसेंच, २४८० सुईणींची गरज आहे. समाज विकास योजना कारभार मंडळानें भारत सरकारच्या आरोग्य-खात्याशीं विचारविनिमय करून लेडी हेल्थ व्हिजिटर आणि सुईणी यांना जादा शैक्षणिक सवलती देण्या-साठीं एक योजना आंखली आहे. याशिवाय नर्स मिडवाइफ नांवानें ओळखल्या जाणाऱ्या सहाय्यक नोकरवर्गाच्या शिक्षणाचीहि तरतूद केली आहे. आणखी २ ते ३ वर्षेंपर्यंत पुरेशा लेडी हेल्थ व्हिजिटर मिळण्याची शक्यता नसल्यानें पडणारी उणीव यामुळें थोड्याशा स्वरूपांत तरी भरून निघेल. समाज-विकास योजनांच्या निरनिराळ्या विभागांतील सूतिकागृहांत आणि कल्याण केंद्रांत त्या काम करतील. पंचवार्षिक योजनेच्या शिक्षण योजनांसाठीं असलेल्या पांच कोटी रुपयांतून ही रक्कम खर्च केली जाईल.

थंडगार
नेत्रांजन
डोळ्यांचे विकारावर उत्कृष्ट
कृष्णशास्त्री बिवलकर
पो. आंजर्ले. (रत्नागिरी)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रोगोत्पत्ति दोषवृद्धिजन्यच असूं शकते.

(लेखकः— वैद्य अ. वा. आष्टीकर, आयुर्वेदाचार्य, नागपूर)

"आयुर्वेदपत्रिके" च्या १ जानेवारीच्या अंकांत श्री. वैद्य नृसिंहाचार्य बागेवाडीकर यांचा "दोषक्षयजन्य व्याधींचें निदान व चिकित्सा कुठें दिली आहे!" या शीर्षकाखालीं लेख प्रसिद्ध झाला आहे. तसेंच उमरावतीहून प्रकाशित होणाऱ्या "आरोग्य" मासिकांतहि याच विषयावर त्यांचा लेख संस्कृतमध्यें आला आहे. त्यांत ते म्हणतातः-

"रोगा दोषक्षयजन्या अपि सन्ति" । यथा "रोगा दोषवृद्ध्या रोगाः समुद्भवान्ति तथैव ते दोषक्षयेणापि यथा पित्तक्षयात् अग्निमांद्यं प्रभाहानिः । कफक्षयेणापि भ्रमादीनि भवन्ति, एते रोगा इति न व्यपदिष्टाः, परं निदानपंचके क्षयजन्यावस्थानां विचारः उपलब्धेषु ग्रंथेषु नोपलभ्यते । तेन अनुमन्यामहे यद् इमे आयुर्वेदग्रंथाः अपूर्णांगाः।"

वरील दोन लेख वाचून जे विचार सुचले ते आयुर्वेदाचा अभ्यासक या नात्यानें तज्ज्ञाच्या परीक्षणार्थ यथामति मांडण्याचा प्रयत्न करतो.

सजीव शरीराच्या दोन अवस्था

प्रत्येक प्राण्यास सुखात्मक आणि दुःखात्मकं संवेदना नित्य अनुभूत आहेत; म्हणून या दृष्टीनें सुखसंज्ञकं आरोग्यं, विकारो दुःखमेव च।

"तद्दुःखसंयोगा व्याधयः"

"रुजाकरणात् रोगः ।"

अशी रोगाची 'सामान्य' व्याख्या केली. सुश्रुतोक्त शारीरिक, मानसिक व स्वाभाविक अशा तिन्ही प्रकारच्या रोगांना ती लागूं पडत असल्यामुळें तिला 'सामान्य' असें नांव देऊं या. शारीरशास्त्राच्या दृष्टीनें रोगाची दुसरी व्याख्या चरकादि महर्षींनीं अशी केली कीं,

"रोगस्तु दोषवैषम्यम्"

स्वास्थ्यावस्था व रोगावस्था अशा दोन प्रकारच्या शारीरिक अवस्था. स्वास्थ्यावस्थेच्या विरुद्ध किंवा तिला बाधक अशी जी स्थिति, तिला रोग, व्याधि, विकार, आमय असें नांव आहे. "सुखसंज्ञकं आरोग्यम्" व "दोषसाम्यं अरोगता" ही आरोग्याची निश्चित कल्पना असल्यामुळें तद्विरुद्ध "दोषवैषम्य" हें रोगच म्हणावें लागतें, मग तें वैषम्य क्षयात्मक असो किंवा वृद्ध्यात्मक असो.

शारीरिक रोगांचे दोन प्रकार

वाग्भट, सुश्रुत व चरक या ग्रंथांचें थोडें सूक्ष्म निरीक्षण केलें असतां 'हेतुभूत' रोग व 'कार्यभूत' रोग, किंवा कारणस्वरूप रोग व कार्यस्वरूप रोग, अथवा सामान्य रोग व विशेष रोग असे दोन प्रकार दिसतात. वरील नांवांनीं ओळखले जाणारे दोन प्रकारचे रोग त्याच शब्दांत आयुर्वेद ग्रंथांत कुठें सांगितले नाहींत, ही गोष्ट खरी; परंतु तसे विभाग पाडलेले स्पष्ट दिसतात. "रोगस्तु दोषवैषम्यं" ही व्याख्या हेतुभूत रोगांची आहे. रोग म्हणजे वैषम्य आणि वैषम्य म्हणजे रोग, दोघांत भेद नाहीं, असा याचा अभिप्राय आहे. या दृष्टीनें वृद्ध दोषांचीं व क्षीण दोषांचीं लक्षणें रोगस्वरूपच ठरतात. ह्या दोषवैषम्य लक्षणांनाच हेतुभूत किंवा कारणस्वरूप अथवा 'सामान्य' रोग असें नांव देणें इष्ट होईल.

कार्यस्वरूप रोग

'दोषा एव हि सर्वेषां रोगाणामेककारणम् ।'

'सर्वेषामेव रोगाणां निदानं कुपिता मलाः ।'

'स एव कुपितो दोषो समुत्थानविशेषतः ।
स्थानांतराणि च प्राप्य, विकारान्कुरुते बहून् ।'

वरील सूत्रांचा अभिप्राय असा कीं. सर्व रोगांचें समवायिकारण विषम दोष असून रोग हें त्यांचें कार्य आहे. रोग आणि दोषवैषम्य यांचा कार्यकारणभाव आहे. या दृष्टीनें पाहातां वृद्ध-क्षीण दोषांचीं लक्षणें रोगांमध्यें अन्तर्भूत होत नाहींत; परन्तु "रोगस्तु दोषवैषम्यं" या सामान्य व्याख्येप्रमाणें त्याची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गणना रोगांतच केली आहे.

'रोग' शब्दार्थाविषयीं समन्वय

आयुर्वेदग्रंथांत वर सांगितल्याप्रमाणें रोगांविषयीं मतभेद दिसतो. कांहीं ठिकाणीं रोग हें दोषवैषम्याचें कार्य सांगितलें आहे तर कांहीं ठिकाणीं दोषवैषम्य लक्षणासच रोग ही संज्ञा दिली आहे. "तपोज्ञानस्य निधयः" इत्यादि विशेषणांनीं ज्यांचें आप्तत्व सिद्ध आहे अशा चरकादि महर्षींच्या एकाच ग्रंथांत परस्पर विरोधी वाक्यार्थांचा व्यवहार असणें शक्य नाहीं, म्हणून त्यांचा समन्वय करणें, हेंच आपलें कर्तव्य. या समन्वय दृष्टीनेंच रोगांचे दोन प्रकार मी इथें उद्धृत करीत आहे.

दोन्ही प्रकारच्या रोगांची भिन्न चिकित्सा

हेतुविपरीत (म्हणजे दोषप्रत्यनीक) व व्याधिविपरीत असे चिकित्सेचे मुख्य दोन प्रकार आयुर्वेदीय ग्रंथांत सर्वत्र पाडलेले दिसतात. अर्थात् हेतुभूत आणि कार्यभूत असे रोगांचे दोन प्रकार असल्याशिवाय त्यांची चिकित्सा दोन प्रकारची शास्त्रकारांनीं सांगणें कसें शक्य आहे ?

दोषलक्षणें व रोगलक्षणें

कार्यस्वरूप ज्वरादि रोगांचें वर्णन करीत असतांना त्यांत "तत्र वातात्" "तत्र कफात्" "तत्र पित्तात्" अशीं दोषलक्षणें दिलीं आहेत. दोषवैषम्य हें ज्वरादि रोगांचें कारण असल्यामुळें वैषम्यस्वरूप लक्षणें त्या ज्वरादिकार्यांत अनुस्यूत असणारच. त्याचा उद्देश असा कीं, व्याधिविपरीत चिकित्सा करतांना हेतुभूत लक्षणांचीहि चिकित्सा व्हावी. त्याकरितां हेतुविपरीत चिकित्सा सांगितली आहे. दोषलक्षणांचा व रोगलक्षणांचा स्वतंत्र विभाग आयुर्वेदांत आहे. वृद्धिक्षयाचीं लक्षणें व त्यांचे पंचवीस प्रकार "स्रंसव्यासव्यधस्वाप" इत्यादि वृद्ध दोषांचीं कर्में या सर्वांना दोष-लक्षणें अशी संज्ञा आहे. इत्येषाऽऽमयव्यापि यदुक्तं दोषलक्षणम्"। त्यानंतर रोगलक्षणें सांगतात. तत्रादौ वातविकारान् अनुव्याख्यास्यामः। तद्यथा नखभेदश्च ······ इत्यशीतिर्वातविकारा वातविकाराणां अपरिसंख्येयानां आविष्कृततया व्याख्याताः। (चर सू.२०-११). एवंच, चरकादि ग्रंथांत हेतुभूत व कार्य असे (रोगांचे) दोन प्रकार पाडलेले स्पष्ट दिसतात.

चरकादिकांना अभिप्रेत असलेले रोग कोणते ?

वाग्भट, सुश्रुत, चरकादि ग्रंथावरून असें निश्चित होतें कीं, रोग किंवा व्याधि हा शब्द दोन कार्यस्वरूप ज्वर-गुल्मोदरादि रोगांनाच लावले आहे. प्रत्येक रोगाचें विशिष्ट निदान, त्याचें पूर्वरूप, संप्राप्ति, उपद्रव, साध्यासाध्यावस्था इत्यादिकां विवेचन वर सांगितलेल्या कार्यभूत रोगांविषयीं दिलेलें आहे. वातादि दोषभेदानें प्रत्येक दोषांचें लक्षणें त्यात सांगितलीं आहेत. यावरून रोग शब्दाचा शास्त्रकारांना अभिप्रेत असलेला अर्थ कोणता, हें सांगण्याची निराळी गरज नाहीं.

हें त्यांचें म्हणणें बरोबर आहे

श्री. बागेवाडीकर आपल्या संस्कृत लेखां म्हणतातः-"यथा पित्तक्षयात् अग्निमान्द्यं, प्रभाहानि भवन्ति, एते रोगाः इति न व्यपदिष्टाः" हें त्यांचें म्हणणें बरोबर आहे. याचें कारणच हें कीं, वैषम्य-लक्षणांस रोग किंवा व्याधि ही संज्ञा शास्त्रकारांना अभिप्रेत नाहीं.

क्षीण व वृद्ध दोषांचें भिन्न कार्य

"रोगस्तु दोषवैषम्यम्" या सूत्रावरून आपाततः असें वाटतें कीं, दोन्ही प्रकारचें दोषवैषम्य रोगांचें कारण असून, त्यापासून उत्पन्न होणाऱ्या रोगांचें स्वरूपहि अगदीं समानच असावें, परन्तु ही विचारसरणी सदोष आहे. शास्त्रांत या कल्पनेला कुठें आधार नाहीं. क्षयावस्था व वृद्धावस्था या परस्पर भिन्न असतांना त्यांचें कार्य एकस्वरूपच कसें राहील ! पहिली अवस्था अभावस्वरूप; तर दुसरी भावस्वरूप, म्हणून चरकादि महर्षींनीं क्षीण दोषांचें कार्य अगदीं स्वतंत्रच सांगितलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्षीण दोषांचें कार्य असें

"क्षीणा जहति लिंगं स्वम्। च. सू. अ. १७ "वाते पित्ते कफे चैव क्षीणे लक्षणमुच्यते। "वाते पित्ते कफे चैव क्षीणे लक्षणमुच्यते। कर्मणः प्राकृतात् हानिः" "यथाबलं यथास्वं च दोषा वृद्धा वितन्वते। रूपाणि, जहति क्षीणाः" वरील सूत्रांचा अर्थ असा कीं, आयुर्वेद ग्रंथांत प्राकृतिक दोषांचीं जीं स्वाभाविक कार्यें उत्साहोच्छ्वास निश्वास-चेष्टा-वेगप्रवर्तनैः। इत्यादि सांगितलेलीं आहेत, त्यांचा नाश एवढेंच फक्त क्षीण दोषांचें कार्य. रोगोत्पादकत्व त्यांच्या ठिकाणीं नाहीं.

कोणी असें म्हणेल कीं

कोणी म्हणेल कीं, असें आहे तर मग "लिंग क्षीणेऽनिले अंगस्य सादः अल्पंभाषित्वेहितं, संज्ञा-मोहः इत्यादि क्षीण दोषांचीं रोगस्वरूप लक्षणें स्वतंत्र कशीं सांगितलीं ?"

हीं लक्षणें रोगाचीं दर्शक नाहींत

याचें उत्तर असें कीं, वर सांगितलेलीं क्षीण दोषांचीं लक्षणें प्राकृत कर्मांच्या हानीचीं द्योतक आहेत, रोगांची दर्शक नाहींत. प्राकृतावस्थेंत उत्साह वाटणें हें वाताचें कार्य, परंतु क्षीणावस्थेंत त्याचा नाश होतो हा अर्थ "अंगस्य सादः" यानें सांगितला. स्वास्थ्यावस्थेंत भूक चांगली लागते, परंतु त्याच्या क्षीणावस्थेंत 'पित्ते मंदोऽनिलः' म्हणजे भूक मंद होते. एवंच क्षीण दोषांचीं लक्षणें स्वतंत्र रोग-स्वरूप नाहींत.

क्षीण दोषांपासून रोगोत्पत्ति कां नाहीं ?

वरील विवेचनावरून स्वाभाविकच प्रश्न उत्पन्न होतो कीं, क्षीण दोषांपासून रोगोत्पत्ति कां होत नाहीं ? त्याचें उत्तर असें कीं, रोग हें एक दोषदूष्यादिसंमूर्च्छनाजन्य कार्य आहे. दोषांचा रसरक्तादि दूष्यांशीं विशिष्ट प्रकारचा संयोग झाल्यानंतर त्या दोषांपासून अशीं कांहीं विशिष्ट लक्षणें उत्पन्न होतात कीं, ज्यांचा अंतर्भाव क्षीणात्मक किंवा वृद्ध्यात्मक वैषम्य लक्षणांत होत नाहीं, अशा विकारांना रोग ही विशेष संज्ञा आहे. संप्राप्तिजन्य लक्षणें म्हणजेच रोग किंवा व्याधि. क्षीण दोषांचा रसरक्तादि दूष्यांशीं संयोग होणें शक्य नाहीं. कारण तो होण्याकरितां "संचयं च प्रकोपं च प्रसरं स्थानसंश्रयम्" ॥ एवढ्या क्रिया घडव्याच लागतात, आणि त्या वृद्ध दोषांच्या ठिकाणींच संभवतात. क्षीण दोषांच्या ठिकाणीं शक्य नाहीं, म्हणून क्षीण-दोषापासून रोगोत्पत्ति नाहीं.

टीकाकार स्पष्टच लिहितात

"क्षीणा जहति लिंगं स्वम्" च. सू. १७/६२ या सूत्रावर टीकाकार चक्रपाणि स्पष्टच लिहितात कीं, "लिंगं स्वं जहति" इत्यनेन क्षीणानां प्रकृतिलिंग-क्षयव्यतिरिक्तं विकारकर्तृत्वं नास्ति, यतो वृद्धा उन्मार्गगामिनो दोषाः दूष्यं दूषयन्तो ज्वरादीन् कुर्वन्ति, न क्षीणाः स्वयमेव दुःस्थितत्वात्।"

रोगोत्पत्तीविषयीं हीच प्रक्रिया सर्वत्र सांगितली आहे. स एव कुपितो दोषः समुत्थानविशेषतः। स्थानांतराणि च प्राप्य विकारान् कुरुते बहून्। वाग्भट

यथा दुष्टेन दोषेण यथा चानुविसर्पता।
निर्वृत्तिरामयस्यासौ सम्प्राप्तिः।
कुपितानां हि दोषाणां शरीरे परिधावताम्।
यत्र संगः खवैगुण्यात् व्याधिस्तत्रोपजायते ॥ ६
संचयं च प्रकोपं च प्रसरं स्थानसंश्रयम्।
व्यक्तिं भेदं च यो वेत्ति दोषाणां स भवेत् भिषक् ॥

वैद्यराज बागेवाडीकरांना विनंति

वैद्यराज श्री. नृसिंहाचार्य बागेवाडीकर अगदीं ठासून सांगतात कीं, 'रोगाः दोषक्षयजन्याऽपि संति' तेव्हां माझी त्यांना विनंति आहे कीं, क्षीणावस्थेंत दोषांची रोगोत्पादक संप्राप्ति कशी घडते हें त्यांनीं सप्रमाण सिद्ध करून दाखवावें म्हणजे माझ्यासारख्या अभ्यासूंच्या ज्ञानांत कांहीं विशेष भर पडेल. क्षय-जन्य व्याधि उत्पन्न होतात असें मानलें तर, या रोगोत्पत्तीला संप्राप्तीची गरज मुळींच नाहीं कां ? रोग दोषक्षयजन्य मानल्यास त्यांचा समूळ नाश होण्याकरितां वमनविरेचनादि शोधनचिकित्सा कशी काय लागू पडते ? तसेंच "दीपनं पाचनं क्षुत्तृट्व्यायाम-आतपमारुताः" अशी सात प्रकारची शमनचिकित्सा क्षयजन्य व्याधींच्या कोणकोणत्या अवस्थेंत करावी ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्षीणावस्थेंत चय प्रकोप प्रशम कसे ?

त्या अवस्थांची निर्मिति क्षीणावस्थेंत कशी ? चयप्रकोपप्रशमा वार्योग्रीष्मादिषु त्रिषु असें सांगून ऋतुजन्य व्याधींच्या निवारणार्थ "श्रावणे कार्तिके चैत्रे मासि साधारणे क्रमात्। ग्रीष्मवर्षाहिमचितान् वाय्वादीनाशु निर्हरेत्" असें सांगितलें आहे. तेव्हां क्षयजन्य व्याधींच्या दृष्टीनें चय, प्रकोप प्रशम, त्या त्या ऋतूमध्यें कसे होतात ? इत्यादि अनेक प्रश्न उद्भवतात. त्यांची संगति व्यवस्थित लागली तरच क्षीणदोषजन्य रोग मानण्यांत अर्थ आहे, असो !

क्षीण लक्षणें दोषक्षयजन्य कीं तद्विपरीत वृद्धदोषजन्य ?

वाग्भट-चरकादि ग्रथांत क्षीणदोषांचीं जीं लक्षणें सांगितलीं तीं सर्व दोषांच्या केवळ क्षीणतेपासून होतात कीं तद्विरुद्ध दोषांच्या वृद्धीपासून ? हाही एक प्रश्न विचार करण्यासारखा आहे. वात क्षीण झाला असें जेव्हां आपण म्हणतो तेव्हां त्याचा तात्विक अर्थ कोंणता होतो? रूक्ष शीतादि गुण व तदनुसार घडणाऱ्या क्रिया क्षीण झाल्या, असाच त्याचा अर्थ आहे. परंतु वाताचा रूक्ष गुण कमी होतो त्यावेळीं त्याविरुद्ध गुणाची म्हणजे स्निग्धगुणाची तेवढ्याच प्रमाणांत वाढ झालेली असते म्हणून रूक्षता कमी होते कीं ती न होतां निष्कारणच रूक्षता कमी होते ? याचें उत्तर चरकादि महर्षि देतात कीं,

" श्लेष्मवृद्ध्युक्तामयसंभवः । "

" वृद्धिर्वाऽपि विरोधिनाम् "

विरुद्ध गुणांच्या वृद्धीनेंच क्षीणता येते.

पित्त क्षीण झालें तर अग्नि मद होतो, थंडी भासते व निस्तेजपणा येतो; परन्तु हींच लक्षणें कफ-वृद्धीनेंहि होतात.

"श्लेष्मा - अग्निसदन - स्तैर्यं शैत्यश्लथांगत्वम् ॥

याचप्रमाणें कफ क्षीण झाला असतां होणारीं लक्षणें वातजन्य असतात असें सांगितलें आहे. तेव्हां दोषक्षीणतेचीं लक्षण तद्विरुद्ध दोषजन्य कां मानू नयत ?

शास्त्रकारांचें मत

दोषाची क्षीणता, तद्विरुद्ध दोषवृद्धिमूलक असल्यामुळें क्षीण दोषांचीं लक्षणें विरुद्ध दोषवृद्धीमुळेंच होतात असें शास्त्रकाराचें मत आहे.

" वाते पित्ते कफे चैव क्षीणे लक्षणमुच्यते।
कर्मणः प्राकृताद्धानिर्वृद्धिर्वापि विरोधिनाम्॥
क्षयेण, विपरीतानां गुणानां वर्धनेन च ॥

याचें उत्तर असें कीं

यावर अशी शंका येईल कीं, दोषवृद्धींचीं लक्षणेंसुद्धां तद्विरुद्ध क्षणिदोषजन्यच कां मानू नये! याचें उत्तर असें कीं, दोषांची क्षीणता ही अभावस्वरूप असून वृद्धावस्था भावस्वरूप आहे. अभावापासून भावोपत्ति मानणें सदोष आहे. आयुर्वेदास तें संमत नाहीं. अभाववादाचें खंडन चरकाचार्यांनी केलें आहे. न्यायमताचा अंगिकार करून अभावालाहि कारणता द्यावयाची असेलच तर त्या मतानें क्षीण दोष रोगांचें निमित्तकारण ठरतात, समवायिकारण वृद्ध दोषच !

दुसरी विचार करण्यासारखी गोष्ट

दुसरी विचार करण्यासारखी गोष्ट अशी कीं, क्षीण दोषांचीं लक्षणें सांगत असतांना ज्याप्रमाणें "श्लेष्मवृद्ध्युक्तामयसंभवः" "वृद्धिर्वापि विरोधिनाम्" अशा रीतीनें विरुद्ध दोषांची वृद्धि सांगितली आहे, परन्तु दोषवृद्धींचीं लक्षणें सांगतांना क्षीणोक्तामयसंभवः। किंवा 'क्षयो वापि विरोधिनाम्' ।असें कुठें म्हटलें नाहीं, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

हेंच त्याचें स्वरूप

बरें, चिकित्सेच्या दृष्टीनें पाहिलें तर दोषवृद्धीचें चिकित्सा जशी मूलगामी, शास्त्रीय आणि व्यापक आहे तशी क्षीणतेची चिकित्सा नाहीं. विरुद्ध गुणकर्मात्मक दोषांचें वर्धन, हेंच त्याचें स्वरूप।

तात्पर्य हें कीं, वैद्यराज श्री. बागेवाडीकर म्हणतात कीं " रोगाः दोषक्षयजन्या अपि सन्ति परं निदानपंचके क्षयजन्यानां विचारः उपलब्धेषु ग्रंथेषु नोपलभ्यते, तेन अनुमन्यामहे यद् इमे आयुर्वेदग्रंथ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अपूर्णाः।" हें त्यांचें म्हणणें शास्त्रतः व युक्तितः पटण्यासारखें नाहीं. चरकादि महर्षींनीं आपल्या ग्रंथांत वैषम्याच्या द्विविध अंगांपैकीं फक्त वृद्ध्यात्मक एकाच अंगाचा विचार केला असतां तर त्यांनीं तसें स्पष्ट सांगून टाकलें असतें, त्यांना कोणाची भीति बाळगण्याचें कारण काय? वस्तुस्थिति अशी आहे कीं, शास्त्रकारांच्या म्हणण्याचा अर्थ आपणांस नीट समजत नाहीं, त्यामुळेंच त्यांच्या ग्रंथांत न्यूनता, अपूर्णता भासते असें माझें मत आहे. असो.

बागेवाडीकरांचा प्रश्न व पुनः उत्तर

मग क्षीण दोषांचीं लक्षणें व त्यांचें पंचवीस प्रकार कशाकरितां सांगितले? असा श्री. बागेवाडीकरांचा प्रश्न. त्याचें उत्तर आतांपर्यंत केलेल्या विवेचनांत आलें आहे; तथापि तें थोडक्यांत पुन्हां खालीं देत आहे.

दोषवैषम्य स्वास्थ्याला विघातक व दुःखोत्पादक असल्यामुळें वृद्धि-क्षयात्मक वैषम्यलक्षणांसहि रोग ही संज्ञा सामान्यतः दिली. परंतु दोषवैषम्य हें रोगांचें कारण असल्यामुळें त्यांच्या लक्षणांचा अंतर्भाव हेतुभूत रोगांत होतो व तज्जन्य विकारांचा कार्यभूत रोगांत समावेश होतो.

रोगाचे दोन प्रकार

अशा रीतीनें रोगांचे दोन प्रकार पडतात. रोगांचे प्रकार दोन म्हणून चिकित्साहि दोन प्रकारची. हेतुभूत रोगांकरितां हेतुविपरीत व कार्यभूत रोगांकरितां व्याधिविपरीत. कार्यामध्यें त्याचें उपादान किंवा समवायि कारण अनुस्यूत असतेंच, म्हणून रोगलक्षणामध्यें दोषलक्षणें सुद्धां असतातच. कार्यभूत रोगाच्या नाशाकरितां व्याधिविपरीत चिकित्सा करावी लागते. ही गोष्ट जरी खरी आहे, तरी पण त्यांत हेतुविपरीतता साधावीच लागते. कारण व्याधिविपरीत चिकित्सा याचा अर्थ संप्राप्तिनाशक उपाय. परन्तु ही संप्राप्ति ज्या दोषांपासून निर्माण होते ते जर तसेंच शरीरांत कायम राहिले तर "दोषाः कदाचित् कुप्यन्ति" या सूत्रांत सांगितल्याप्रमाणें ती चिकित्सा "अपुनर्भवकारि" होत नाहीं. म्हणून ज्वरादि रोग-चिकित्सेमध्यें दोषानुसार शोधनक्रिया प्रथम सांगून नंतर शेष दोष-निवृत्तीकरितां शमनचिकित्सा सांगितलेली आहे. तात्पर्य हें कीं, स्वतंत्रपणें हेतुविपरीत चिकित्सा करतांना किंवा व्याधिविपरीत चिकित्सान्तर्गत हेतुविपरीतता साधण्याकरितां दोष-दुष्टीची जितकी सूक्ष्मातिसूक्ष्म कल्पना येईल त्यावरच रोगनाश अवलंबून आहे. "संख्या-विकल्प-प्राधान्य--बल--काल-विशेषतः" अशा तऱ्हेनें दोष-वैषम्याचा विचार अत्यन्त काटेकोरपणानें होण्याकरितांच संप्राप्तीचे भेद पाडले आहेत.

वाग्भटांनीं स्वंसव्यासव्यघस्वाप इ. वात-पित्त-कफ याचीं कर्में सांगितलीं आणि ते शेवटीं म्हणतात कीं, इत्यशेषामयव्यापि यदुक्तं दोषलक्षणम्। दर्शनाद्यैरवहितस्तत्सम्यगुपलक्षयेत्। व्याध्यवस्थाविभागज्ञः पश्यन्नार्तान् प्रतिक्षणम्॥ वा. सू. १२/५४

चरकादिकांचें सूत्रांत उत्तर

श्री. बागेवाडीकरांनीं विचारलेल्या प्रश्नास वाग्भट चरकादिकांनीं वरील सूत्रांत उत्तर दिलें आहे.

दोष वृद्धीचे पंचवीस प्रकार तर तेवढेच क्षीण-दोषांचे. हें सांगण्याचें तात्पर्य हें कीं, दोषांची वृद्धावस्था क्षीणवस्थापूर्वक असते. एक दोष जेव्हां क्षीण होतो तेव्हां तद्विरुद्ध दोष वाढतो. दोषांचें वैषम्य निश्चित तोलून पहावयाचें तर वृद्ध त्याचबरोबर क्षीण अशा दोन्ही प्रकारांनीं वैषम्याचें कमी अधिक प्रमाण ठरवावें लागतें.

पहिलें प्रयोजन

कुष्ठरोगांत दोषनिश्चय कसा करावा हें सांगतांना चरक म्हणतात कीं, "कुष्ठविशेषैर्दोषा दोषविशेषैः पुनश्च कुष्ठानि। ज्ञायन्ते तैर्हेतुः, हेतुस्तांश्च प्रकाशयति" च. चि. ७।३३ रोगांमध्यें विकल्पसंप्राप्ति, प्राधान्य-संप्राप्ति, बलाबल इत्यादि पाहाण्याकरितां वर सांगितलेल्या चिकित्सासूत्राप्रमाणेंच क्षीण आणि वृद्ध यांच्या परस्परांच्या लक्षणांची तुलना करावी लागते; व याचकरितां क्षीणदोषांचीं लक्षणें व त्यांचे पंचवीस प्रकार शास्त्रकारांनीं सांगितले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्षीणदोषांचें दुसरें प्रयोजन

कित्येक वेळीं ज्वरादि रोगांत दोषांचीं वृद्ध लक्षणें स्पष्ट झालेलीं नसतात, अव्यक्त असतात. " लिंगमव्यक्तमल्पत्वात् व्याधीनां तद्यथायथम् । " अशा वेळीं क्षीण दोषांचीं लक्षणें पाहून चिकित्सेला सुरुवात करण्याकरितां क्षीणदोषांचीं लक्षणें सांगितलीं आहेत. गूढलिंगं व्याधिं उपशयानुपशयाभ्यां परीक्षेत । "

तिसरें प्रयोजन

संचयावस्था ही दोषवृद्धीचीं अगदीं प्रारंभावस्था. यावेळीं दोषवृद्धीचीं लक्षणें मुळींच व्यक्त नसतात. वाग्भट सांगतात :- "चये वृध्दिः स्वधाम्न्येव प्रद्वेषो वृध्दिहेतुषु । विपरीतगुणेच्छा च । " एवढींच मुख्य चिन्हें व्यक्त होतात. परन्तु ह्या संचयावस्थेंतच रोगाचा प्रतिकार करण्याकरितां दोषांचें निर्हरण सांगितलें आहे. अव्यक्तावस्थेंत असणाऱ्या भावी दोषवृद्धीची कल्पना क्षीणदोषांच्या लक्षणांवरून घेतां येते. याकरितां क्षीणदोषांचीं लक्षणें व त्यांचे २५ प्रकार यांचें निरूपण केलें आहे.

चवथें प्रयोजन

"स्वस्थस्य स्वास्थ्यरक्षणं, आतुरस्य रोगप्रशमनं च" हें आयुर्वेदाचें ध्येय. या दोन ध्येयांपैकीं, स्वास्थ्यरक्षण हें पहिलें कर्तव्य. स्वास्थ्यावस्थेचें परिपालन क्षीण दोषांपासूनच मुख्यतः करावें लागतें. कारण अखंड चालणाऱ्या जीवन-व्यापारांत दोष-धातु-मलांची झीज एकसारखी होतच असते. ती अपरिहार्य आहे. दैनंदिन व्यापारांत झालेली झीज भरून काढणें हेंच स्वास्थ्यरक्षणाचें मूलतत्त्व. 'क्षीणा वर्धयितव्याः' या न्यायाचा क्षयात्मक दोषवैषम्यांत अवलंब करावा लागतो.

" यद्यदाहारजातं तु क्षीणः प्रार्थयते नरः ।
तस्य तस्य स लाभे तु तं तं क्षयमपोहति ॥

क्षीणता भरून काढावी लागते

" वृद्धिः समानैः सर्वेषाम् । " इत्यादि सूत्रोक्त सिद्धांताप्रमाणें दोषांची क्षीणता भरून काढावी लागते. अशा रीतीनें स्वास्थ्यरक्षणाकरितां क्षीण दोषांची सूक्ष्म कल्पना देण्याकरितां क्षीण दोषांचीं लक्षणें व त्यांचे २५ प्रकार (उपलक्षणार्थ) सांगितले आहेत.

रोगाच्या सान्निपातिक अवस्थेंतसुद्धां त्यांचा उपयोग आहेच. रोगोत्पादक वृद्ध दोष किती प्रमाणांत व कोणत्या क्रमानें कमी करीत आणावयाचे, याचें कांहीं विशिष्ट तत्व आहे. दगड जसा उंचावरून खालीं पडतो, तशाप्रमाणें दोषांची वृद्धि नाहींशी करावयाची नसते. तसें करण्यांत शारीरिक घटक द्रव्यांची मोडतोड होते. " निवर्तते तु कुपितो मलोऽल्पाल्पं जलौघवत् " असें आयुर्वेदाचें सांगणें आहे. म्हणून विमान खालीं उतरतांना एकदम न उतरतां वेग कमी कमी होऊन उतरतें. तद्वत् सान्निपातिक अवस्थेंत " वर्धनेनैकदोषस्य, क्षपणेनोच्छ्रितस्य च । " या क्रमानेंच चिकित्सा करावी लागते; व त्याकरितां वृद्ध दोषांप्रमाणें क्षीण दोषांच्या लक्षणांकडेहि सूक्ष्म लक्ष ठेवणें आवश्यक आहे. याकरितां क्षीण दोषांचें महत्व आहेच. असो.

विद्वानांनीं खुलासा करावा

या लेखांत मी आपले विचार मांडले आहेत. त्यांत शास्त्र व युक्ति यांस बाधक असें कांहीं आढळल्यास त्याचा खुलासा विद्वानांनीं अवश्य करावा. कारण गुरुपरंपरागत अध्ययनपद्धति नष्ट झाल्यामुळें वाद, चर्चा इत्यादिकांच्या द्वारेंच आयुर्वेदाचा अभ्यास करण्याचा आज प्रसंग आहे.

पांढरें कोड

हजारोंचें गेले व त्यांनीं अभिप्राय दिलेले आणि अनेक बक्षिसें मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु.
नकली वैद्यापासून सावध रहा !

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु.
माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन'
मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कामाची व जेवणाची वेळ कोणती असावी ?

(सूचकः–श्री. डॉ. अमुल देसाई, बलसाड)

(डॉ. अमुल देसाई यांनीं केलेली सूचना व त्यांचें समर्थन पुढें दिलें आहे. त्यांत आयुर्वेदीयांनीं विचार करण्यासारखीं कांहीं विधानें आहेत. सकाळीं निजून उठण्याचा काळ (ब्राह्मे मुहुर्ते उत्तिष्ठेत्) सकाळीं लौकर न जेवणें, कामाची उत्तम वेळ, तिसऱ्या प्रहरीं भोजन, सांस्कृतिक कार्यासाठीं फुरसत व निद्राकाल (६।७ तास) या बाबी महत्वाच्या आहेत. आज समाजांत जे अग्निमांद्य, स्थौल्य, पाण्डु• रोग इ. रोग वाढत आहेत त्यांना आळा बसण्यास यानें मदत होईल. —संपादक)

कचेरींची वेळ बहुधा १०॥ ते ५॥ मध्यां अशी असते. मध्यें अर्ध्या तासाची सुटी घरली तर एकंदर ६॥ तास काम असतें असें म्हणतां येईल. या कामाच्या वेळेचे महत्वाचे दोष खालीं दिले आहेत.

(१) व्यक्तीचा मोकळा वेळ सकाळ व संध्याकाळमध्यें विभागला जातो. सकाळचा वेळ ऑफिसमध्यें जाण्याची तयारी करण्यांत व गाडींत जातो. तासन्तास काम केल्यानन्तर घरीं गेलें कीं, कुठल्याहि तऱ्हेचें दुसरें काम करण्यास अगर एखाद्या कार्यक्रमांत भाग घेण्यास उत्साह रहात नाहीं.

जेवणास गैरसोईची वेळ

(२) ऑफिसांत जाण्यापूर्वी ९॥ लाच जेवा-वयास बसावें लागतें. ही वेळ जेवणास मुळींच सोईची नसते. आणि अर्धवट जेवलेल्या स्थितींत त्याला संध्याकाळपर्यंत काम करावें लागतें. या गोष्टींचा परि-णाम माणसाच्या आरोग्यावर व जीवितावर होतो.

(३) वैयक्तिक अगर कौटुंबिक जीवन, सामाजिक अगर सांस्कृतिक कार्य व खेळ यासाठीं फारच थोडा वेळ शिल्लक राहतो. या सर्व गोष्टींचा परिणाम शहरांतील व्यक्तींचें जीवन यांत्रिक बनण्यांत होतो.

वेळेंत बदल कां हवा ?

या सर्व गोष्टींचा विचार करतां कचेऱ्यांच्या वेळांत बदल केला तर कचेरींत जाणाऱ्यांच्या दिन-चर्येत फरक होईल. त्यांना बाहेरच्या कार्यांत भाग घेतां येईल व त्यांचें जिवन जास्त आनंदी व चैतन्य-मय होईल असें मला वाटतें व या दृष्टीनें मी कचे-रीची नवी वेळ सुचविली आहे.

नव्या वेळेपासून फायदे

मी सुचविलेली वेळ सकाळीं ७ ते १॥ दुपारीं अशी आहे. मध्यंतरीं ९॥ वाजतां अर्ध्या तासाची सुटी. या पध्दतीप्रमाणें कामाचे तास ६ राहतील. या पद्धतीचे फायदे पुढीलप्रमाणें:—

(१) सकाळचा वेळ हा हवेच्या व शारीरिक दृष्ट्याहि कामास चांगला असतो. त्यामुळें त्यावेळीं काम केल्यामुळें ६॥ ते ७ तासांत होणारें काम ५ ते ६ तासांतच होईल.

आरोग्यावर चांगला परिणाम

(२) दुपारीं १॥ वाजेपासून ते रात्रीं ९॥ वाजे-पर्यंत कौटुंबिक जीवनासाठीं, सामाजिक अगर सांस्कृ-तिक कार्यासाठीं वा खेळासाठीं सलग वेळ त्यास मिळेल. या कार्यक्रमाचा आरोग्यावर निश्चित चांगला परिणाम होईल. जेवणासाठींहि योग्य वेळ मिळूं शकेल.

जेवणाच्या नवीन वेळा

(३) नवीन वेळेप्रमाणें सकाळीं ६ वाजतां चहा अगर दूध घेऊन कचेरींत जातां येईल. ९॥ वाजतां कचेरींत चहा पाव खातां येईल; आणि २ ते ३ चे दरम्यान दुपारचें जेवण व ८॥ ते ९॥ चे दरम्यान रात्रीचें जेवण करतां येईल.

सकाळचा उत्साहवर्धक काळ

(४) सकाळीं ४॥ ते ७ हा अत्यन्त उत्साह-दायक काळ आपण झोंपेंत घालवतो, तो वेळ कामास मिळेल. सुरुवातीला लवकर उठणें जड जाईल. परन्तु सवयीनें तें अंगवळणीं पडेल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नवी दिनचर्या कशी असेल?

(५) दिवसाचे ढोबळमानानें (?) स्थूलरूपतः काम, करमणूक आणि विश्रांति असे तीन भाग पडतील. सकाळीं ४॥ ते ५ वाजतां उठलें कीं, ५॥ ते ६ प्रातर्विधि उरकणें, ६ ते ७ ऑफिसचा प्रवास, ७ ते १॥ कचेरी, १॥ ते २॥ घरीं येणें, २॥ ते ३॥ जेवण, ३॥ ते ४॥ विश्रांति, ४॥ ते ८॥ बाहेरचा कार्यक्रम, ८॥ ते ९॥ जेवण व नन्तर झोप. या कार्यक्रमाप्रमाणें काम, झोंप आणि करमणूक यांना योग्य तो वेळ मिळेलच, पण शिवाय जेवणाची वेळहि आरोग्यदायक राहील.

शनिवारीं सकाळीं ७ ते १०॥

(६) शनिवारीं वेळ सकाळीं ७ ते १०॥ अशी असावी म्हणजे जवळ जवळ २ दिवस सलग सुटी मिळेल. व तिचा उपभोग जास्त चांगल्या रीतीनें घेतां येईल.

रात्रीं जागरणाची वाईट सवय

(७) रात्रीं जागरणाची वाईट सवय नाहींशी होईल. या सर्व फायद्यामुळें आरोग्यावर तर इष्ट परिणाम होईलच, पण शिवाय सामाजिक वातावरणहि सुधारेल.

ही वेळ सध्यां मुंबईंत सैनिकांना लागू आहे व त्याबाबत अनुभवहि समाधानकारक आहे. ही वेळ ऋतूप्रमाणें बदलतां येईल, अगर त्यांत इष्ट ते बदल करण्यासहि माझी ना नाहीं.

सूचनेवरील कांहीं आक्षेप

आतां या सूचनेबाबत जे आक्षेप घेण्यांत आले आहेत त्यांचा विचार करूं. सर्वसाधारण खालील आक्षेप घेण्यांत आले आहेत.

(१) गाडींतील गर्दी (२) बायकांना लवकर उठावें लागेल. (३) जे शिक्षण व नोकरी दोन्ही करीत आहेत त्यांना अडचण होईल. (४) टपालच्या वेळा (५) विरार ते कल्याणपर्यंत दूरचे रहाणारे लोक यांना फारच लवकर उठावें लागेल. (६) जेवण बाहेर घ्यावें लागेल. (७) बँका, इन्शुअरन्स कंपन्या, खाजगी कंपन्या यांच्या अन्य वेळामुळें होणारा त्रास.

वरील आक्षेपांचें निरसन

प्रथमदर्शनीं या अडचणी जरी खऱ्या वाटल्या असल्या तरी ही योजना अंमलांत आली तर सर्व अडचणी दूर होतील.

सर्व कचेऱ्यांच्या वेळा बदलाव्या

मी ज्या वेळीं कचेरीच्या वेळां बदलाव्या असें सुचविलें, त्यावेळीं त्याचा अर्थ सर्व कचेऱ्या, कॉलेजें, पोस्ट ऑफिसें, रेल्वे या सर्वांच्याच वेळांत बदल करावा असा होता. आज जर १०॥ वाजतां कचेरींत जाणाऱ्या सर्वांना गाड्या नेऊं शकतात तर रेल्वेच्या वेळापत्रकांत जरूर तो तो बदल करून तें सकाळीं ७ लाहि करणें शक्य आहे. त्याप्रमाणें टपालांच्या वेळांतहि बदल करणें शक्य आहे. सकाळीं फक्त चहाच करावयाचा असल्यानें स्त्रियांना पुरुषांपेक्षां फक्त १५ मिनिटें ते अर्धा तास आधीं उठावें लागेल.

शिकणाऱ्यांना सोयीची वेळ

कॉलेजें व शाळा या सकाळींच असल्यानें स्त्रियांना फक्त एकदांच स्वयंपाक करावा लागेल. मी जें वेळापत्रक दिलें आहे, त्यांत गाडीच्या प्रवासाला एक तास दिला आहे त्यामुळें कल्याण व विरारला राहणाऱ्यांना फार तर १५ ते ३० मिनिटें आधीं उठावें लागेल. जे लोक शिकतात आणि नोकरी करतात त्यांना तर ही वेळ फारच सोयीची होईल. फक्त कॉलेजें संध्याकाळीं करावीं लागतील.

सरकारनें जर कचेरीची वेळ बदलली तर बँकांना ती बदलावीच लागेल व त्यांनीं ती बदलली कीं, खाजगी कचेऱ्यांनाहि आपल्या वेळां बदलणें भाग पडेल आणि म्हणूनच मी सरकारी कचेऱ्यांनीं प्रथम वेळां बदलाव्या असें सुचवि

माझें स्वप्न साकार होईल

एक दिवस या कल्पनेला जोराची चालना मिळेल व माझें हें स्वप्न साकार होईल आणि त्यावेरोबर भारतांतील मुंबई या पहिल्या प्रतीच्या शहराच्या सामाजिक जीवनांत क्रांतिकारक बदल होईल असा मला विश्वास वाटतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तज्ज्ञांना विचारासाठीं खाद्य--

श्वेत ताम्रभस्माचें विद्युत्कार्य

(लेखकः- श्री. वि. वि. पाटणकर पुणें २)

कांहीं महिन्यांपूर्वी मला हृदयविकाराचा त्रास दोनदां झाला होता. त्यावर मी वैद्य XXXX शास्त्री, आयुर्वेदविशारद यांचे आयुर्वेदिक उपचार घेतले होते. त्यांच्या सल्ल्याप्रमाणें जरी मी ८-१० महिने औषध सेवन केलेलें नसलें, तरी मला त्यांच्या २॥ महिन्यांच्या उपचारानें बरें वाटलें होतें.

पडल्यानें पांनथरीला धक्का

मुंबईमध्यें फूटपाथवरून चालत असतां पाय घसरून मी खालीं पडलों. त्यावेळीं माझ्या एका पायाला चांगलाच मार बसला. घरगुती उपचारानें माझें तें दुखणें बरें झालें. पण लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट कीं जेव्हां जेव्हां मीं डाव्या पायावर भर देऊन चालावें, त्यावेळीं पोटांत पांथरीच्या जागीं चांगलीच कळ येत असे. मी त्याकडे लक्ष दिलें नाहीं.

असह्य पोटदुखी

नेहमींप्रमाणें उपवासाचे दिवशीं दोन दिवस माझें खाण्यांत शेंगदाणे आले. पोटदुखीनें आजारी पडण्याचे आदलें दिवशीं डाळीचे बरेंचसें पिठलें मी खालें होतें, आणि दुसरेच दिवशीं पोटदुखीच्या वेदनेनें मी आजारी पडलों. चालतां-बसतां येईना व झोपतांदेखील येईना. अशा असह्य वेदना मला होऊं लागल्या.

श्वेत ताम्रभस्माचा उपयोग

त्यामुळें सदर वैद्यांना मी बोलाविलें. त्यांनीं अनेक तऱ्हेचे रेचक उपचार करून पाहिले. पण कांहीं केलें तरी अनुलोमन क्रिया होईना. पोट तर इकडे फुगत चाललें. आतां प्राण गेला तर बरें होईल असें वाटूं लागलें. श्वेत ताम्रभस्म, अनुपानासह "कॅप्सुल" मधून हा आपला शेवटचा उपचार असें सांगून त्या वैद्यांनीं दिलें. सदर औषध पोटांत जातांच एक रेच झाला. जादूची कांडी जशी फिरवावी तसें माझें असह्य दुखणें एकदम जें थांबलें, तें नंतरच्या पांच दिवसांत उद्भवलें नाहीं.

माझ्या लक्षांत आलेली गोष्ट

पहाटे चारच्या सुमारास मी जागा झालों. धोतराच्या निऱ्या करतो तों हात व धोतर यांच्या स्पर्शामुळें चांगले मोठाले विजेचे 'स्पार्क' दिसूं लागले; व नन्तर निरनिराळ्या वस्त्रांवर हात फिरवून पाहिला. रेशमी कपड्यावर विजेची ज्योत जास्त प्रमाणांत दिसते असें अनुभवास आलें. हें कशामुळें होतें असें मीं वैद्यांना विचारलें. "मोठ्या प्रमाणांत वनस्पतिमारित अभ्रक, सुवर्ण व श्वेतताम्रभस्म इ. सेवन केलीं असतां वयोवृद्ध माणसांत देखील तरुणांप्रमाणें तरतरी वाटते" व मधुर आहार (जगण्याला आवश्यक) जास्त जातो. यावरून अंगांत रेडिओ-ॲक्टिव्हिटीसारखा पदार्थ वाढत असावा असें वाटतें. याचा उपयोग शरीर निरोगी ठेवून माणसांना फार दिवस जगवतां येईल. यासंबंधीं आपले प्रयोग चालू आहेत." असें ते वैद्य म्हणाले.

याबाबत डॉक्टरांचें म्हणणें

डॉक्टरलोकांना बोलावून त्यांच्यासमोर मी वस्तुस्थिति मांडली. त्यांनीं आपला हात लाल होईपर्यंत वस्त्रावर घासून किंचित् स्पार्क उडवून दाखविला. तेव्हां मी म्हणालोः- "अहो डॉक्टरसाहेब, तुम्हांला एकदां स्पार्क दाखवावयास हात लाल होईपर्यंत घासावें लागलें, पण मला तसें घासावें लागत नाहीं; हें कशामुळें? त्यावर त्यांना समर्पक उत्तर देतां आलें नाहीं. जमलेल्या कांहीं लोकांनीं 'माझे अंगांत रखरखीतपणा आहे म्हणून तसें होत असावें' म्हणून सांगितलें. माझे अंगांत रखरखितपणा जास्त

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असतां तर मला हल्लीं जी शांतपणें ७।८ तास झोप लागत आहे ती मुळींच आली नसती, " असें मी त्यांना उत्तर दिलें.

वैद्यांचे पथ्य पाळीत असतां माझा आहारः—

वैद्यांनीं कांहीं दिवसपर्यंत माझेवर आहाराचें बंधन घातलें आहे. हल्लींचा माझा आहार दूध १। शेर, एक सबंध ऊस, १० तोळे रव्याची लापशी, ५ तोळे तूप.

माझें वय ५९ वर्षे आहे. स्पार्क दिसण्याची क्रिया चालू आहे.

तज्ज्ञांना विनंति

योग्य औषधाभावीं लोक दिवसेंदिवस नाना तऱ्हेच्या रोगांनीं पीडित होत चालले आहेत. सदर माझ्या सांगण्याचा उपयोग होऊन रोग्यांना रोगमुक्त करण्यांत येऊन, त्यांचे आरोग्य जर वाढवितां आलें तर जगांतल्या संशोधनांत भारतानें अद्वितीय स्थान संपादन केलें असें म्हणतां येईल. तरी तज्ज्ञांनीं माझे वरील निवेदनाचा साधक-बाधक विचार करावा अशी माझी विनंति आहे.

———

श्वेत ताम्रभस्म

वरील लेखांत श्वेत ताम्रभस्माचा उल्लेख आला आहे. त्या वैद्यांनीं तें कसें तयार केलें याची आम्हांस माहिती नाहीं. तथापि श्वेत ताम्रभस्म कसें तयार करतात याची रसचंडांशूंत पान १०३ वर दिलेली माहिती वाचकांच्या सोयीसाठीं येथें देत आहोत.

ताम्रभस्म, पांचवा प्रकार

तैले तक्रे गवां मूत्रे शोधयेत् वापयेत् पुनः ।
भूर्जपत्रप्रमाणानि पत्राणि कारयेत् सुधीः ॥
औदुंबरस्य दुग्धं तु नित्य दस्योपरि क्षिपेत् ।
छायायां शोषयेत् नित्यं सार्धमासं दिनाष्टकम् ॥
निर्मळं जायते ताम्रं भस्म कार्यं तदंतर ।
एकान्ते तु खनित्वा च गर्तं हस्तद्वयं नरः ॥
खादिरैर्बदरीकाष्ठैः गर्तं चैव प्रपूरयेत् ।
स्वांगशीतलकं जातं तदा ग्राह्यं विचक्षणः ।
पूर्वभार प्रमाणं वै जायते मौक्तिकोपमम् ॥
सिद्धयोगो मया ख्यातः न देयो यस्य कस्यचित् ।
गोपनीयः गोपनीयः गोपनीयः प्रयत्नतः ॥

श्वेत ताम्रभस्माची कृति

भूर्जपत्राप्रमाणें पातळ केलेले तांब्याचे पत्रे तापवून तेल, ताक व गोमूत्र ह्या प्रत्येकामध्यें क्रमाने ७।७ वेळा बुडवावे.

नंतर उंबराच्या चिकांत ते बुडवून ठेवावे. रोज रोज नवा चीक त्याजवर घालून ते सावलींत वाळवावेत. याप्रमाणें ५३ दिवस करावें. म्हणजे तांबें निर्मल होतें.

नंतर त्याचें भस्म करावें तें असें– एकांत स्थळीं औरस चौरस २ हात खोलीचा एक खळगा खणून त्या खळग्यांत खैराचीं व बोरीचीं लाकडें भरून त्यामध्यें, तांब्यांचे पत्रे घालून तोंड बंद केलेले शराव संपुष्ट ठेवून आंच द्यावी. मग स्वांगशीत झाल्यावर जेवढ्या वजनाचे तांबें घातले होते तेवढ्या वजनाचें मोत्याप्रमाणें शुभ्र वर्ण असें तांब्याचें भस्म निघेल तें काढून घ्यावें.

मी सांगितलेला हा सिद्धयोग कोणाला सांगू नये. मोठ्या प्रयत्नानें फार गुप्त ठेवावा.

— गोरक्षसंहिता

श्वेत ताम्रभस्माच्या कृतीविषयीं अगर वरील गुणकर्माविषयीं कोणाला अधिक कांहीं माहिती असल्यास त्यांनीं ती अवश्य पत्रिकेकडे प्रसिद्धीसाठीं व विचार विनिमयासाठीं पाठवावी. — संपादक

पांढरें कोड नष्ट झालेल्या हजारों गांवच्या लोकांची बक्षिसे व प्रशस्तिपत्रें छापलेलें पत्रक मोफत मागवा.
वैद्य के. आर. बोरकर मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला [मध्य-प्रदेश]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवडक रुग्णचिकित्सा —

— [१] मूत्रस्राव, [२] शुक्रक्षीणतेमुळें पांडुरोग —

(चिकित्सकः—श्रीमती लक्ष्मीबाई बोरवणकर, आयुर्वेदविशारद, मुंबई २)

— १ —

चाळीस वर्षे वयाची एक बाई सारखा मूत्र-स्राव होतो म्हणून उपचाराला आली. शिंक अगर खोकला आला कीं, लघवी होऊन कपडे खराब होतात ही तिची तक्रार! बाकी सर्वप्रकारें प्रकृति ठणठणीत!

प्रसूतिजन्य शैथिल्य

इतिहास विचारतां ५।६ बाळंतपणें [नैसर्गिक] झालीं व २।३ गर्भपात झाले असें समजलें.

मूत्राशयाचे [ब्लॅडर] स्नायु शिथिल होऊन त्या अवयवाची धारणाशक्ति कमी झाली आहे असा तर्क करून चिकित्सा केली. बाई अत्यंत गरीब असल्यानें उपचाराचा खर्च करण्याची ऐपत नव्हती, म्हणून मूत्रविकारावर व मूत्राशयावर काम करणारा कांटेगोखरूं वापरण्याचें ठरविलें. गोखरूं बल्य असल्यानें अवयवाला ताकद आणील हा तर्क! आणि त्याच्या जोडीला साधा योगराजगुग्गुळ.

अपानकालीं वातनाशक बल्य योजना

दोन्ही वेळां जेवणापूर्वी अपानकालीं दूधसाखरेंतून योगराजगुग्गुळ १ मासा व गोखरूं चूर्ण १ मासा यांची एक पुडी याप्रमाणें दोन पुड्या घेण्यास दिल्या.

एक महिन्यांत कांहीं फरक पडला नाहीं; परंतु दुसऱ्या महिन्याला किंचित् गुण वाटूं लागला, आणि सहा महिने औषध घेतल्यानें तक्रार दूर झाली.

दुधाऐवजीं तूपमधाचें अनुपान

(हेंच औषध तूपमधांतून दिलें गेलें असतें, तर लौकर परिणाम दिसला असता. कारण मूत्रपिंड हा मेदोघटित अवयव आहे. दूध या अनुपानापेक्षां तूप हें अनुपान जवळचें व वातनाशक बल्य असें आहे. -संपादक)

— २ —

ब्राह्मणबाई, वय वर्षें ३५

होणारीं लक्षणें:— कटिशूल, श्वेतस्राव, डोळे ओढणें, शिरःशूल, मनाची अस्वस्थता, चिडकेपणा, भय वाटणें, मुखपाक (तीव्र), विदाह, अपचन, मलावरोध, डावा पाय दुखणें इत्यादि अनेक लक्षणें असून रक्तक्षीणता (ॲनिमिया) आहे म्हणून नेहमीं औषधोपचार केला जाई. लिव्हर एक्स्ट्रॅक्ट, व्हिटॅमिन् बी-कॉम्प्लेक्स घेतलें कीं, तात्पुरतें बरें वाटे. पण निखालस बरें कधींच वाटलें नाहीं. असें अनेक वर्षे चालूं होतें.

अस्थिमज्जाशुक्रवर्धक चिकित्सा

या बाईची 'रक्तक्षीणता' ही शुक्रक्षीणतेमुळें निर्माण झाली आहे असें निदान करून वृष्यवटी २ गुंजा, प्रवाळ (चंद्रपुटी)४ गुंजा, अशा ३ पुड्या सकाळ दुपार सायंकाळ कपकप दूधसाखरेंतून घेण्यास दिल्या. १५ दिवसांनीं एकेक लक्षण कमी झालें.

प्रथम कटिशूल व श्वेतस्राव एकदम कमी झाल्यानें बाईचें मनावर अत्यंत चांगला परिणाम झालेला दिसून आला व ओजःक्षीणतेचीं लक्षणें कमी होऊं लागलीं. मन निश्चित झालें. नंतर मुखपाक, अपचन, मलावरोध हीं लक्षणें कमी झालीं व अंगांत रक्त भरूं लागलें. ३ महिन्यांत बाई निरोगी झाली.

या रुग्णांत रक्तक्षीणतेचें कारण शुक्रक्षीणता व मज्जाक्षीणता असल्यानें रक्तधातुवर्धक अशीं लिव्हर एक्स्ट्रॅक्टचीं इंजक्शनें घेऊनहि रक्तधातूची वृद्धि होत नव्हती, तीच निदानपरिवर्जन म्हणून शुक्रमज्जाधातूची वृद्धि होतांच रक्तधातु सम झाला व रोगाचें मूळ कारण नष्ट होतांच सर्व लक्षणें हळूंहळूं मावळत गेलीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निखिल भारतीय आयुर्वेद विद्यापीठ

आजवर निखिल भारतीय आयुर्वेद विद्यापीठ व नि. भा. आयुर्वेद महासंमेलन यांचीं कार्यालयें एकच ठिकाणीं असत. कोट्टकल येथें भरलेल्या ३९ व्या अ. भा. आयुर्वेद महासंमेलनाच्या स्थायी समितीनें व विद्यापीठाच्या कार्यकारिणी समितीनें ठरविल्याप्रमाणें इतःपर नि. भा. आयुर्वेद विद्यापीठाचें स्थलांतर दिल्लीहून ऋषिकेश येथें झालें आहे.

नवा पत्ताः—

मंत्री, नि. भा. आयुर्वेद विद्यापीठ
आत्मविज्ञान-भवन, मु. पो. ऋषिकेश
जि. देहराडून (उत्तर प्रदेश)

अ. भा. आयुर्वेद महासंमेलनाचा पत्ता पूर्वीचाच कायम आहे तो असाः—

मंत्री अ. भा. आयुर्वेद महासंमेलन कार्यालय
महालक्ष्मी मार्केट, चांदणी चौक, दिल्ली नं ६

———

नर्स व मिड्वाइफ व्यवसायांवर योग्य नियंत्रण

१९५४ मुंबई नर्सेस्, मिडवाइफस् आणि हेल्थ व्हिजिटर्स ॲक्ट, मुंबई सरकारच्या ता. २३ मार्चच्या गॅझेटांत प्रसिद्ध झाला आहे. राज्यांतील नर्सेस, मिडवाअिव्हज् आणि हेल्थ व्हिजिटरसंबंधींच्या कायद्यांचें सदरहू कायद्यान्वयें अेकत्रीकरण करण्यांत आलें असून त्यानुसार साविकांची (मिडवाअिफांची) सक्तीची नोंद करून ह्या व्यवसायावर योग्य प्रकारें नियंत्रण व देखरेख ठेवण्यांत आली आहे.

अिंग्लंडमधील १९०२ च्या मिडवाअिव्हज् ॲक्टाच्या धर्तीवर ही तरतूद करण्यांत आली आहे. तसेंच नर्सेस पुरविणाऱ्या संस्थाहि सदरहू कायद्याच्या नियंत्रणाखालीं येतात. याबाबतची तरतूद ब्रिटिश नर्सिंग ॲक्टाच्या धर्तीवर करण्यांत आली असून त्या अन्वयें अशा संस्थांची नोंद करणें हें सक्तीचें करण्यांत आलें आहे.

———

ग्रामीण भागास वैद्यकीय मदत

जेथें कोणत्याहि प्रकारची वैद्यकीय मदत मिळण्याची सोय नसेल अशा आडबाजूच्या खेडेगांवांना वैद्यकीय मदतीबाबतची योजना लागू करण्यासंबंधें मुंबअी राज्य आरोग्य मंडळाच्या, सेक्रेटरियेटमध्ये झालेल्या बैठकींत विचारविनिमय करण्यांत आला.

औषधी पेट्या पुरविणार

ही योजना सुरवातीस प्रत्येक जिल्ह्यांतील पांच पंचायतींच्या व पांच बिगर पंचायतींच्या गांवांना लागूं करण्यांत येअील, आणि या योजनेनुसार ग्रामीण वैद्यकीय केंद्रांना आयुर्वेदिक व ॲलोपॅथिक या दोन्ही पद्धतींच्या औषधांच्या पेट्या व प्रथमोपचाराचें साहित्य पुरविण्यांत येईल. गांवकऱ्यांच्या किरकोळ आजारावर औषधोपचार करण्यासाठीं ग्रामपंचायतींचे सेक्रेटरी व गांवांतील समाजसेवक यांना सिव्हिल सर्जनांच्या मार्गदर्शनाखालीं योग्य तें शिक्षण देण्यांत येईल. व तालुक्याच्या व लोकलबोर्डांच्या दवाखान्यांत जादा औषधें ठेवण्यांत येतील.

———

साइ
प्रेग-युटेरो
गर्भिणी-गर्भ-रक्षक
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स-
बी. पी. बर्वे ॲंड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर ॲंड को.
मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्नोत्तरी...

मोठमोठाले जंत, माती खाणें

प्रश्नः-चि. ××× वय वर्षें २ पूर्ण. या मुलास सध्यां मोठमोठाले जंत पडत आहेत.

त्याला गेल्या वर्षापासूनच कांहीं ना कांहीं तक्रारी व आजारीपण चालूं आहे. १ वर्षाचा होईपर्यंत प्रकृति चांगली होती. नंतर टायफाइड, हगवण, डांग्या खोकला व ताप यामुळें तो फारच क्षीण झाला.

तापांत त्याचे पायावरून वारें गेल्यानें तो नुसता सरकत असे, चालतां येत नव्हतें. त्याला भीति वाटावयाची. उभे राहाण्यासहि भीत असे. परंतु ××× च्या औषधी तेलाचे मालिशीमुळें त्याला फायदा वाटला व तो घरांतल्या घरांत चालूं लागला.

माती खाण्याची संवय

त्याला माती खाण्याची संवय होती. व मधून मधून बारीक कृमि पडत असत. त्याकरितां विडंगारिष्ट, कृमिकुठार, कृमिअर्क अशीं औषधें आम्ही देत असूं. परंतु औषध हें सतत व बराच काळ दिलें गेलें नाहीं ही सत्य गोष्ट आहे.

माती खाण्याच्या संवयीकरितां आपण कळविलेलें औषध गेरू, खडीसाखर, तुरटी, मृगशृंगभस्म इ. चें मिश्रण करून तें औषध तयार केलें. सदर मिश्रण तो मागून घेतो. मध्यंतरीं माती खाण्याचे अजिबात १-१॥ महिना बंद झालें होतें. परंतु पुन्हां तो माती खातो, म्हणजे भिंतींना जीभ लावून चाटतो.

३०--४० जंत पडले

या १ महिन्यांत त्याला आम्ही सँटोमिक्सची पुडी २ वेळां दिली. त्यायोगें जंत पडण्यास सुरवात झाली. आतांपर्यंत सुमारें ३०।४० जंत पडले असतील. १५ दिवसांपासून सारखा किरकिर करतो व हट्टी बनला आहे. आतांपर्यंत त्याला सकाळीं कोको व दुपारीं दूध देत असूं, पण आतां दोन्ही वेळां कोकोच सुरूं केला आहे. दुधानें जंत होतात या कल्पनेनें साखरहि कमी घालतो. मात्र साखर व गूळ तो मागतो व केव्हां केव्हां फारच हट्ट केल्यावर आम्ही देत असूं. दूध गाईचें आहे.

शौचास वेळ लागतो

जेवण सर्व जेवतो. खातखाव करतो. जंतामुळें त्याचें पोट चावत असेल, व म्हणून तो रडतो असें वाटतें. शौचाची त्याची तक्रार लहानपणापासून आहे. फार वेळ लागतो व साफ होत नाहीं.

या जंतांमुळें आम्हाला काळजी वाटूं लागली आहे. डॉक्टरांनीं त्याला दर आठ दिवसांनीं सँटोमिक्स देण्यास सांगितलें आहे. परंतु सँटोमिक्सचा लिव्हरवर परिणाम होतो म्हणून सारखें द्यावें कीं नाहीं याची शंका वाटते.

तरी कृपा करून त्याचें शरीरांतील सर्व जंत जाऊन प्रकृति सुधारण्यास उपयोगी पडेल अशी औषध-योजना कळवावी. खानपानांत काय बदल करावयाचा ? दूध वगैरे नुसतें द्यावयाचें कीं नाहीं वगैरे सर्व सल्ला कळविण्याची विनंति आहे.

———

दूध उपयोगाचें नाहीं

उत्तरः- वरील सर्व हकीकतीवरून या मुलाची प्रकृति कफदोषाची आहे, सबब याला दूध हें आहारद्रव्य उपयोगाचें नाहीं हें स्पष्ट आहे. क्रिमिचिकित्सेंत वाग्भटाचार्यांनीं क्रिमिकारक ज्या वस्तु वर्ज सांगितल्या आहेत, त्यांत दूध हें प्रधान (पहिलें) आहे.

क्षीराणि मांसानि घृतं गुडं च
दधीनि शाकानि च पर्णवन्ति।
समासतोऽम्लान् मधुरान् रसांश्च
क्रिमीन् जिहासुः परिवर्जयेत् च॥

दूध, मांसरस, तूप, गूळ, दही, व आंबट, गोड रसाचे पदार्थ वर्ज सांगितले आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय विचारसरणीप्रमाणें मनुष्याचा द्रवाहार मुख्यतः त्रिविध आहे. (१)यूष (२) क्षीर (३) मांसरस हीं त्याचीं ३ स्वरूपें आहेत. वातप्रकृतीला मांसरस, अंडी वगैरे. पित्तप्रकृतीला दूध, तूप, व कफप्रकृतीला धान्ययूष हेच प्राधान्यानें दिले पाहिजेत. आपण बालकांना आहार देतांना त्यांच्या प्रकृतिदोषाकडे लक्ष देत नाहीं. सर्वांना एकच म्हशीचें दूध हा आहार देत राहतो व मग केवळ होणाऱ्या दुखण्यांचा विचार करतो.

क्रिमिकोष्ठी मुलासाठीं पुढील आहार युक्त मानला आहे. तांदळाची ताकांत शिजविलेली कण्हेरी व त्याबरोबर मेतकूट. वावडिंगाचें बारीक चूर्ण, माक्याचें चूर्ण, निर्गुंडीपाल्याचें चूर्ण, तुळशीचा पाला, धणे, जिरे, हळद, मेथी यांपैकीं एखादें द्रव्य पिठांत मिसळून त्याची चुलींत भाजून केलेली पोळी, पातळ ताकांत कुसकरून देणें. पातळ ताक थोडें आलें मीठ लावून देणें. कफप्रकृति मुलांना दूध व साखरेच्या गोळया देणें म्हणजे शरीरांत रोगाला कायमचें घर करून देणें आहे. माती खाणाऱ्या मुलाच्या बाबतींत तोच नियम लागू आहे.

दूध देणेंच आवश्यक झाल्यास तें वावडिंग, तुळस, पिंपळी, दालचिनी इत्यादि द्रव्यांच्या सौम्य संस्काराचें द्यावें. सीतोपलादिचूर्ण व वावडिंग घालून उकळून तें द्यावें. शक्यतोंवर पातळ ताक द्यावें हें चांगलें.

क्रिमिमान् व्यक्तीचा आहार कसा असावा तें एका ओळींत सांगितलें आहे. उद्रिक्ततिक्तकटुकं अल्पस्नेहं च भोजयेत् । स्पष्ट कडु, तिखट व अल्पस्नेह असा आहार प्रशस्त औषधी मानला आहे.

द्विदल धान्याचे कट द्यावेत

यूष म्हणजे मूग, मसूर, इत्यादि द्विदल धान्याचे कट. व्यवहारांत वरणाचे पाणी आजाऱ्यास देण्याची प्रथा आहेच. नुसत्या डाळीपेक्षां सालीसकट डाळीचें पाणी देणें अधिक चांगलें. सबंध मुगाचें पाणी, मीठ मिरी घालून देण्यानें क्रमिकोष्ठी मुलाची प्रकृति सुधारते.

मुख्य अडचण या कामीं असेल तर ती आईबापांच्या मनाची. दुधाशिवाय मुलाच्या अंगांत शक्ति येणार नाहीं, शक्ति टिकणार नाहीं अशी पालकांची समजूत असते. वरील उदाहरणांत सुशिक्षित आईबापांच्या मुलाला २ वर्षांच्या वयांत टायफाइड हगवण, डांग्याखोकला, पायावरून वारें जाणें (पोलियो) जंत व माती खाणें इतकी दुखणीं झालीं यावरून मुलाचा आहार युक्त नाहीं हें सिद्ध होत नाहीं काय?

मुलांच्या खाण्यांत कवठें, उंबरें, मध, पानाचा विडा, प्रवाळ, मृगशृंग, गेरु, हिरड्यापासून तयार झालेले अगस्तिप्राशासारखे कल्प, बाळकडु, कुमारीआसव, अश्वनादि जळ इ. वस्तु ठेवल्यास माती खाण्याची प्रवृत्ति जाईल. जंत पडत राहण्यानें जंत होण्याचें थांबत नाहीं. त्यासाठीं आहारच सुधारला पाहिजे.

विडा व भाजकें अन्न द्यावें

सध्यां समाजांत गोड वस्तु खाण्याची प्रवृत्ति वाढलेली आहे. गोड-आंबट, गोड-तिखट (पेपरमिंट) गोड खारट (सोडामिंट) असे कल्प खाण्यांत येतात. त्याचप्रमाणें गोड-तुरट, गोड-कडू असे कल्प तयार करून ते खाण्याची प्रथा पाडल्यास हा प्रश्न सुटेल. शर्करावगुंठित कोयनेल प्रमाणेंच शर्करावगुंठित त्रिफळावटी सेवन केली पाहिजे. पानसुपारीचीं द्रव्यें कडू, तिखट, तुरट अशीं आहेत, पण तीं महाग पडणारीं आहेत. तथापि कफप्रकृतीमुळें रोगी राहिल्यापेक्षां त्यांनीं नियमानें जेवणानंतर विडा खाणें जास्त हिताचें आहे. भडभुंजाच्या दुकानांत मिळणारे भाजके पदार्थ ज्वारीच्या साळीच्या लाह्या, फुटाणे, डाळे, हे पदार्थ क्रिमी-कोष्ठी मुलांस अवश्य द्यावेत. त्यावरहि हळद, जिरे, यांचा सौम्य संस्कार करणें चांगलें.

जंतासाठीं तोंडासाटें औषधें देण्यापेक्षां बस्तिद्वारें देणें युक्त सांगितलें आहे. तुळस, वावडिंग यांच्या काढ्याचा एनिमा द्यावा. वावडिंगापासून सिद्ध केलेल्या विडंगतेलाची पिचकारी द्यावी. पोटावर वरूनहि काळाबोळ, करंज, कडूनिंबाचें पाणी यांचें सिंचन करावें, लेप द्यावा. (अपूर्ण)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभिनंदनीय प्रगति–

वैद्य त्र्यं. म. गोगटे, अमरावती

अमरावती येथील आयर्विन रुग्णालयांत सन्मान्य उप-संमोहक (अनेस्थेटिस्ट) ची जागा (पोस्ट) २८ फेब्रुआरी १९५५ पर्यंत निर्माण करण्यांत आली आहे व त्या जागेवर वैद्य टी. एम्. गोगटे, (आयुर्वेदतीर्थ) यांची नेमणूक खास विशेष परवानगीनें (as a very special case) करण्यांत येत आहे, असा हुकुम मध्यप्रदेश सरकारनें काढला आहे, असें कळतें.

प्रयत्नपूर्वक अध्ययन

गेलीं सुमारें १६ वर्षे वैद्य त्र्यं. म. गोगटे अमरावती(मध्यप्रदेश)मध्यें आहेत व ते तेथें खाजगी वैद्यकीय व्यवसाय करीत आहेत. उपजत गुण चित्रकाराचे, जीवनाचा व्यवसाय म्हणून आयुर्वेदाचें व दंतवैद्यकाचें शिक्षण त्यांनीं घेतलें. व्यवसायाच्या कालांतहि संधि मिळेल त्याप्रमाणें अध्ययन– अध्यापन चालू ठेवलें. गांवांतील विद्यालयांतून शारीरक्रियाविज्ञान व स्वस्थवृत्त इ. शिकवीत राहून रुग्णालयांत जाऊन निदानचिकित्सा शल्यतंत्र संमोहन इत्यादींचें आधुनिक तंत्रहि त्यांनीं आत्मसात् केलें आहे. तें इतकें कीं जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्यांनीं खास शिफारस करून त्यांची नेमणूक वरील जागीं केली आहे. त्यांच्या विद्या व कलाव्यासंगाबद्दल त्यांना धन्यवाद.

आयुर्वेदीय विचारसरणीनुसार औषधी योजना

येथें सांगण्यासारखी विशेष गोष्ट अशी कीं इतक्या सर्व आधुनिक वातावरणांत वावरत असतांहि जुने नवे आयुर्वेदीय औषधी व आहार कल्प आयुर्वेदीय विचारसरणीनें वापरण्याचा त्यांचा प्रयत्न चालू असतो. या औषधासंबंधीं स्वतःच विस्तृत अनुभव त्यांनीं पत्रिकेच्या वाचकांना सादर करावेत अशी सूचना या प्रसंगीं आम्ही देत आहोत. म्हणजे त्यांच्या वरील तंत्र—कौशल्याप्रमाणेंच त्यांचें हें चिकित्सा–कौशल्य इतर वैद्यांना मार्गदर्शन होईल. व आयुर्वेदीय निदानचिकित्सेवरील त्यांचा विश्वास वृद्धिंगत करील.

आयुर्वेदीय ग्रंथाच्या पाठांतराबद्दल त्यांनीं मागें जाहीर केलेल्या बक्षिसाचें स्मरण वाचकांना या निमित्तानें होईल.

सरकारी मधुकेंद्रं

बाळंतलिंब–आंबा, निर्गुंडी, अगस्ता, कमळ, अडुळसा अशा उपयुक्त वनस्पति तसेंच गुलाब, धायटी इ. पुष्पें याचे हंगामांतील मोहोळापासून निघालेला मध तपासून नांवनिशीवार बाटल्यांत भरून विकत मिळाल्यास 'अनुपान' या सदरांत त्यांचा फार उपयोग वैद्यांना करतां येईल.

भारतीय मधुकेंद्राकडून अशी माहिती वेळोवेळीं प्रसिद्ध होत गेल्यास वैद्य व रुग्णजन त्याचा लाभ घेतल्याशिवाय राहणार नाहींत.

— वै. ग. कृ. पाटणकर

प्रमाणपत्र

आपण जें जें औषध बनवितो व जनतेस देतो, तें तें प्रत्येक औषध सचोटीचें व गुण देणारें असलें पाहिजे; तरच त्याचें प्रमाणपत्र जनतेकडून आपणास मिळेल. तर अशा गुण देणाऱ्या खऱ्या, अस्सल व ताज्या औषधी खरेदी करण्यास विश्वासपात्र ठिकाण पाहिजे. त्याकरितां आपण

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स

पायधुनी मुंबई नं. ३

(टेलिफोन नं. ३१८५८) यांना लिहा.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें

मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात. अधिक माहितीसाठीं कॅटलाग मागवावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अत्यंत सशास्त्र, योग्य व बोधप्रद

' ओला व कोरडा इसब ' या लेखावरील आपली टीका अत्यन्त सशास्त्र, योग्य व बाधप्रद वाटली.

अशाच इतर अनायुर्वेदीय लेखांचा परामर्ष आयुर्वेदपत्रिकेनें वेळोवेळीं घ्यावा, व आयुर्वेदीय तत्वांचा प्रसार करण्याचें खंबीर धोरण ठेवावें.

मुंबई २८ वैद्य देव्हारे, आयुर्विद्याविशारद

पाठ्यक्रमाबाबत विचारविनिमय

ता. ६-४-५४ रोजीं म. प्रां. वैद्य संमेलनाचे अध्यक्ष वैद्यराज दत्तात्रेयशास्त्री जळूकर यांनीं जळगांव येथें जाऊन तेथील स्थानिक वैद्यांच्या गांठीभेटी घेतल्या व शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रम सुरू करण्या-बाबत विचारविनिमय केला.

शुद्ध आयुर्वेद समितीकडून नियम वगैरे प्रसिद्ध झाल्यानन्तर पुनः याबाबत सभा घेण्याचें ठरलें.

औषधी-पाठचिंतामणी

(१) ता. १ एप्रिल १९५४ आयुर्वेद पत्रिका पान ६२१ यावर पाठचिंतामणि वासंबंधीं लेख प्रसिद्ध झाला आहे.

(२) या पाठचिंतामणींत एकंदर १२११ पाठांचें संकलन निरनिराळ्या ११ भागांत केल्याचें नमद केलें आहे.

औषधांची यादी प्रसिद्ध करा

(३) ११ भागांत आलेल्या पाठांचीं फक्त नांवें पत्रिकेंत प्रसिद्ध केलीं गेल्यास आणखी कोणते उप-युक्त पाठ समावेश करणें जरूर आहे हें आयुर्वेदीय औषधिचिकित्सक वैद्यांना मनमोकळेपणानें कळविणें सोईचे होणार आहे. या योगें पाठ कळविणाऱ्या आयुर्वेद महाभागांचे हातून द्विरुक्ति होणार नाहीं.

आयुर्वेद-सेवक
भिषग्रत्न ग. कृ. पाटणकर

आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारी
आयुर्वेदिक व युनानी वनौषधि
तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण!

अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक खाका, माणिक, अकीक, सुवर्ण-वर्ख, रौप्य-वर्ख, शिंपा, कवड्या, शंख, प्रवाळ, आवळसार गंधक, गदगीबेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, वाकेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलटकंबल, नागकेशर (अस्सली), ब्राम्ही, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारची वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य! विशेष माहितीसाठीं आमचें साप्ताहिक दरांचें छापील भावपत्रक मागवावें.

टे. फो. नं. ३१७९६ टेलिग्रॅम-'आयुर्वेद'

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद महाविद्यालयांना सरकारी मदत

प्रांतीय वैद्य मंडळामार्फत जी आयुर्वेदासाठीं शास्त्री चळवळ चालूं आहे तिचा परिणाम प्रांतांतील आयुर्वेदीय संस्था दरसाल वाढती आर्थिक मदत मिळण्यांत होत आहे हे पुढील आंकड्यावरून दिसून येईल. मात्र या मिळणाऱ्या देणग्यांचा व्यय आयुर्वेदीय अध्यापनाची साधनें, शिक्षक, चिकित्सा इत्यादींवर कितपत होतो हें पाहाणें बोधप्रद ठरेल.

१९५३-५४ सालच्या खर्चांत मुंबई सरकारनें राज्यांतील आयुर्वेदीय शिक्षण संस्थांना पुढील प्रमाणें त्रिविध देणग्या दिल्या आहेत.

चालू खर्चासाठीं	रुपये
आयुर्वेद महाविद्यालय, पुणें.	७००००
आर्याग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा.	१००००
आयुर्वेद महाविद्यालय, अहमदनगर.	३५०००
आयुर्वेद महाविद्यालय सुरत	१००००

नवीन पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठीं पुढील प्रमाणें देणग्या दिल्या आहेत.

आयुर्वेद महाविद्यालय, पुणें.	८०६३ रु.
,, ,, सातारा	१७५०० ,,
,, ,, अहमदनगर	२००० ,,
,, ,, नडियाद	९३०० ,,
,, ,, सुरत	१८००० ,,

कायम व्यवस्थेसाठीं देणग्या

पुणें-रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग वाढविण्यासाठीं	१५००० रु.
सातारा--आवश्यक इमारती बांधण्यासाठीं	१२००० ,,
अहमदनगर--संस्थेच्या किरकोळ बांधकामासाठीं	८१३६ ,,
नडियाद--कॉलेज इमारतीसाठीं	१५००० ,,
सुरत--बांधलेल्या इमारतीपोटी	२०००० ,,

अनुक्रमणिका

आयुर्वेद सेवा संघ, नाशिक ६४५
म. प्रां. वैद्य मंडळाचे अध्यक्षास जाहीर अनावृत्त पत्र ६४६
३९ व्या अ. भा. महासंमेलन प्रस्ताव ६४७
कोहल कल्प (आसवारिष्ट विधि) ६५१
रोगोत्पत्ति दोष वृद्धिजन्यच असूं शकते ६५७
कामाची व जेवणाची वेळ कोणती असावी ६६३
श्वेत ताम्रभस्माचें विद्युत्कार्य ५६५
१) मूत्रस्राव २) शुक्रक्षीणतेमुळें पांडूरोग ६६७
नर्स व मिडवाइफ व्यवसायावर नियंत्रण ६६८
ग्रामीण भागास वैद्यकीय मदत ६६८
मोठमोठाले जन्त, माती खाणें ६६९
वै. त्र्यं. म. गोगटे, अमरावती ६७१

'शेवगा' लेखाबाबत

माझ्या शेवग्याचे लेखांतील राहिलेली गोष्ट अशीः—

२१ व्या दिवशीं शेवग्याचे झाडांतून काढलेला सुरवर हिरडा ओला होतो. तो स्वच्छ वस्त्रांत सावलींत ठेवून वाळवावा व मग त्याचा उपयोग करावा.

—वै. ग. कृ. पाटणकर

नर्सिंग कॉलेज निघणार

मुंबई राज्यांत एक नर्सिंगचें, कॉलेज (शुश्रूषा महाविद्यालय) काढण्याची तरतूद पंचवार्षिक योजनेंत आहे व ते कॉलेज सुरूं करण्याचा मुंबई सरकार विचार करीत आहे.

"फक्त वैद्यासाठीं" इंजेक्शन

ट्रेनिंग क्लास मे महिन्याचे सेशनसाठीं प्रवेश देणें सुरूं आहे. विशेष माहितीसाठीं २ आणे पोस्टेज पाठवा.

डॉ. जिल्लेवार C. T. S.

यवतमाळ [मध्यप्रदेश]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

संशोधनपूर्वक औषधीकरणाचा ३० वर्षांचा अनुभव असलेलें

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक

— कांहीं पौष्टिक आहारकल्प —

अगस्तिप्राश- सुरवारी हिरड्यापासून तयार केलेला कषायमधुर अवलेह. कफवात-(थंड) प्रकृति लोकांनीं याचें नित्य सेवन ठेवावें. यानें शौचास साफ होते, त्वचाविकार नष्ट होतात. कफदोष, मेदोधातुविकार व मूत्रविकार यावर गुणकारी. किंमत ४० तो. ४ रु.

अश्विनीप्राश- वल्लीकूष्मांड व भूकूष्मांड इ. पासून तयार केलेला हा पौष्टिक रुचिकर अवलेह, घशांतून रक्त पडणें, खोकला, मेंदूची अशक्तता इत्यादि विकार न होण्यासाठीं पित्त-प्रकृति आबालवृद्धांनीं रोज एकवेळ अवश्य घ्यावा. ४० तोळे ४ रु., ट. ख. नि.

कंदर्पवृष्यपाक-- आज सर्वत्र शुक्रधातुक्षीणतेची तक्रार ऐकू येते. शुक्रक्षयामुळें शरीरांत विविध प्रकारचीं दौर्बल्याचीं लक्षणें आढळून येतात. मेंदूची अशक्तता, थकवा, रक्त-क्षीणता, आवाज सहन न होणें इत्यादि धातुक्षीणतेचीं लक्षण कंदर्पवृष्यपाकाच्या सेवनानें लवकर कमी होतात व मनुष्यास जीवनांत रस वाटावयास लागतो. आत्महत्येचे विचार येत नाहींत. सेवा संघाचा कंदर्पवृष्यपाक सर्वत्र पसंत पडला आहे. किं. ४० तोळे -- ६ रु.

अंजीरपाक-- बौद्धिक कामें करणारी कारकून मंडळी व आर्थिक उलाढाली करणारे व्यापारी यांना मेंदूस बल्य व आंतड्यांतील पित्तादि दोषांची स्थिति स्वस्थ राखणारा हा पाक चिकित्सक ग्राहकांच्या सूचनेवरून सेवा संघानें तयार केला आहे. किं. ४० तोळे. ४ रु.

असनादिसार-- व्यवहारांत जीं पौष्टिक आहार द्रव्यें समजलीं जातात, तीं दूध, तूप, साखर, दही, बदाम, पिस्ते, इत्यादि खाऊनहि कांहीं लोक अशक्त, रोगी, प्रमेही, मधुमेही, मेदस्वी, कुष्ठी, बनतात. त्यांना नित्याचीं तूपसाखरेचीं पौष्टिक औषधें उपयोगी पडत नाहींत. अशा लोकांनीं सकाळ सायंकाळ २ तोळे असनादिसार चूर्ण २० तोळे पाण्यांत भिजत घालून तें गाळून, जेवण्यापूर्वी अगर जेवतांना घ्यावयास कफदोष, मेदधातु, मूत्रमळ यांचे विकार निर्माण होत नाहींत. औषध घेण्यास अत्यंत सोपें व कोणतीच वाईट चव नसलेलें असें आहे. ४० तोळे २॥ रु. ट. ख. निराळा

जीवनसर्पि-- कांहीं विकार असे आहेत कीं त्यासाठीं मांसाहार आयुर्वेदानें आवश्यक मानला आहे. 'मांसमेव अश्नतो युक्त्या' असें राजयक्ष्माचिकित्सेंत सांगितलें आहे. व्यवहारांत पुष्कळांना योग्य मांसाहार घेणें जमत नाहीं. त्यांच्यासाठीं मांस व जीवनीय गणांतील द्रव्यें यांच्या संस्कारानें हें तूप बनविण्यांत आलें आहे व तें क्षयी माणसास उत्तम गुण देतें असा अनुभव आहे. किं. २० तोळे १० रु.

याशिवाय महानारायण तेल, महामाष तेल इत्यादि विविध कल्प केले जात आहेत त्यांची माहिती घेण्यासाठीं वरील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

संपादक व प्रकाशक— वैद्य [illegible] आयुर्वेद सेवा संघ, मेनरोड, नाशिक
मुद्रक— श्री. चिं. खोत, धर्मज प्रेस, आग्रारोड, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजी प्रसिद्ध होतें)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक)

वर्ष ७ वें) नाशिक, ता. १ मे १९५४ (अंक २१ वा

अतिव्यायामासाठीं मांसाहार आवश्यक

प्रख्यात मल्ल श्री. दारासिंग यांची मुलाखत

मनुष्याचा आहार कसा असावा ? तो केवळ वनस्पति आहारी असावा काय ? प्राणिज द्रव्यापैकीं दूध, तूप, अंडीं यांचा आहारांत समावेश केल्यानें कार्यभाग होऊं शकेल काय ? प्रत्येकास मांसाहार आवश्यक आहे काय ? इत्यादि अनेक प्रश्न आपल्यापुढें विचारार्थ येतात व त्यांचें नीट उत्तर देणें जड जतें.

आयुर्वेदांत मांसाहाराचा विचार सविस्तर आलेला आहे. मांसाहाराचे विविध प्रकार कोणते, मांस कोणाला वर्ज्य ? द्विदल धान्यें, दूध, तूप या आहारानें ज्यांचें काम भागतें अशा प्रकृति कोणत्या ? व कोणत्या प्रकृतीला व किती व्यायामाला मांसाहार आवश्यक असतो इ. गोष्टी त्यांत सांगितलेल्या आहेत.



उद्यम मासिकाच्या एप्रिलच्या अंकांत श्री. दारासिंग या पंजाबी सुप्रसिद्ध मल्ल व्यक्तीची परिचयात्मक मुलाखत प्रसिद्ध झाली आहे. त्यांत व्यायाम व आहार या गोष्टींवर प्रकाश पाडणारी कांहीं माहिती आली आहे, ती अशी:—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बालपणाविषयीं माहितीः— पंजाबांत श्री. दारासिंगांचे वडील व बंधु शेती करतात. तेथें वयाच्या १५ व्या वर्षापर्यंत श्री. दारासिंग राहिले. त्यांना लहानपणापासून कुस्तीची आवड आहे. त्यांनी पाश्चात्य पद्धतीचा व्यायाम कधीं केला नाहीं. रोजचे १००० दंड १५०० बैठक हा त्यांचा व्यायाम आहे.

फ्रीस्टाईल कुस्ती म्हणजे भीम-जरासंध मल्लयुद्ध

वजन व उंचीः— आज दारासिंगांचें वय २६ वर्षांचें आहे. उंची ६ फूट २॥ इंच व वजन २४० पौंड आहे.

प्रश्नः— उंची व वजन कसें वाढत गेलें.

उत्तरः— मी १५।१६ वर्षांचा होईपर्यंत साधारण प्रकृतीचाच होतो. माझें वजन त्यावेळीं ११० पौंड व उंची ५॥ फूट असेल. वयाच्या २२ व्या वर्षापर्यंत माझी उंची वाढत राहिली व वजन २४० पौंडा-पर्यंत वाढलें. मी माझे वजन गेलीं ३ वर्षें स्थिर ठेवलें आहे. लहानपणीं खूप प्यायला मिळालेल्या दुधालाच माझ्या दणकट शरीरयष्टीचें श्रेय द्यावयास पाहिजे.

माझा बदलेला आहार

मी १७।१८ वर्षांचा होईपर्यंत सकाळीं उषःपान (अर्धा पेला पाणी पिणें) करीत असे. प्रातर्विधी-नंतर पिसलेले बदाम दुधांत घोळून पिणें व वरण, भाजी, पोळीचें जेवण हा माझा नित्याचा आहार. आतां मात्र मी मांसाहारी आहे. वयाच्या १८ व्या वर्षापासून मांसाहाराची मला गरज भासू लागली. मांसाहारांत कोंबडीचा रस्सा (चिकन सूप) उत्तम. ह्या आहारानें खूप ताकद येते. ”

प्रश्नः— मोतीभस्म, हिराभस्म वगैरे खाऊन शक्ति वाढते म्हणतात हें खरें ना! मग चिकनसूपापेक्षा हीं भस्में खाणें अधिक चांगलें नव्हे काय !

उत्तर— हीं भस्में खाणारे पहेलवान लोक नाहींत असें नाहीं, पण चिकनसूपमधील गुण कांहीं और आहेत. चिकनसूपरोटीचा आहार अल्पमोली व बहुगुणी. शाकाहारी पहेलवानहि आहेत. त्यांत त्यांत मलायाचा पथरू हा नामांकित आहे. तथापि वाढत्या वयांत कुस्तीचा पेशा चालू ठेवण्यासाठीं मांसाहाराची जोड देणेंच फायदेशीर असतें.

माणसानें आपला आहार वयाच्या ३०-३२ पर्यंत थोडाथोडा वाढवावा. त्यामुळें शक्ति वाढते पोट तडीस लागेपर्यंत खाऊं नये. मी खाण्याची शर्यत कधीं लावीत नाहीं.

विश्रांति आणि मालिश

आहार व व्यायामाइतकींच मल्लाला भरपूर विश्रांतीची गरज असते. हें विसरतां कामा नये. त्यासाठीं रोजचे मालिशहि फार फायदेशीर ठरतें. दोन मल्ल एकमेकाला मालिश करण्यास मदत करूं शकतात व त्यामुळें मालिशहि अधिक चांगलें होतें.

—‘ उद्यम ’ च्या कृपेनें.

कुस्तीपासून श्री. दारासिंग यांना आमदानी सालिना ३० हजार रुपये.

किंग कांग चें वय व आहार

वय ४३ वर्षें, उंची ६ फूट, वजन ३९६ पौंड, छाती ५९ इंच. पोट ४८ इंच

आहारः— सकाळी २ डझन अंडी, १ पौंड मांस (डुकराचें) २ शेर दूध दुपारी ६ कोंबड्या कच्च्यां भाज्या व फळें. रात्रीं ४ बदके व मिठाई, झोपण्यापूर्वी २ शेर थंड केलेलें दूध

(या अन्नांत धान्याचा समावेश जवळ जवळ नाहीं.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ

कार्यकारी मंडळ व स्थायी समिति सभावृत्त व प्रस्ताव

दि. २५-४-५४ रविवारीं सकाळीं ९ वा. व दुपारीं ३ वाजतां म. प्रां. वै. मंडळाची अनुक्रमें द्वितीय कार्यकारी आणि स्थायी समितीची सभा पुणें येथें वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी यांचे दिवाणखान्यांत प्रांतीय मंडळाध्यक्ष वैद्यप्रवर दत्तात्रय शास्त्री जळूकर यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती.

उपस्थित वैद्य मंडळी

या सभेला वै. जळूकरशास्त्री अध्यक्ष, वै. बिंदुमाधवशास्त्री स्थायी कार्यमंत्री, वै. ब्रह्मदत्तशर्मा कार्यमंत्री, आणि रामभाऊ भोगे मुंबई, वै. म. भा. वाटवे बेळगांव, कविराज का. सी. भावे, फैजपूर हे कार्यकारी सदस्य, वै. फुलचंद दोशी सोलापूर वैद्य द. ब. वैद्य ठाणे व वै. पां. ह. देशपांडे पुणें, वै. ना. ह. जोशी मुंबई, वै. दे. ल. आनंदे मुंबई, वै. भा. द. गोडबोले पनवेल, वै. लक्ष्मीबाई बोरवणकर मुंबई, वै. द. का. थत्ते चिपळूण हे स्थायी सदस्य उपस्थित होते. शिवाय पुण्याचे स्थानिक वैद्य त्र्यंबकशास्त्री आपटे, वै. र. वा. जोशी, वै. भा. वि. गोखले, वै. अ. य. जोशी, वै. पं. कृष्णशास्त्री कवडे आणि नाशिकचे वै. वि. म. गोगटे ही सर्व मंडळी निमंत्रित म्हणून सभेस उपस्थित होती. सभेंत परस्पर विचारविनिमय होऊन खालील प्रस्ताव सर्वसंमत करण्यांत आले.

दिवंगताबद्दल दुःखप्रदर्शन

प्र. १ ला— अकोला येथील सुप्रसिद्ध वृद्ध-वैद्य भिषगाचार्य हरिशास्त्री पराडकर यांस मुंबई येथें अकस्मात् हृदयावसादाचें निमित्त होऊन त्यांचें देहावसान झाल्यामुळें म. प्रां. वै. मं. च्या ह्या सभेस अत्यंत दुःख होत आहे. वै. पराडकरशास्त्रीबुवांच्या मृत्यूमुळें आयुर्वेदशास्त्राची अपरिमित हानि झाली आहे. त्याचप्रमाणें नाशिकचे आयुर्वेदप्रेमी डॉ. फत्तेचंद हंसराज राका हेहि अकालीं दिवंगत झाल्यामुळें आजची ही सभा अत्यंत दुःख व्यक्त करीत असून त्यांना श्रद्धांजली अर्पण करीत आहे."

हा प्रस्ताव सर्वांनीं १ मिनिट उभे राहून मूक भावानें श्रद्धांजली समर्पित करून संमत केला.

इतिवृत्तवाचन व मंजुरी

प्र. २रा- यानंतर भुसावळ येथें झालेल्या २०-१०-५३ च्या म. प्रां. वै. मं. च्या का. का. व स्थायी समितीचें सभावृत्त मंडळाचे मंत्री वै. ब्रह्मदत्त शर्मा यांनीं वाचून दाखविलें. तें सभेपुढें मांडण्यांत आल्यावर सर्व संमत करण्यांत आलें.

म. प्रां. वै. मंडळ रजिस्टर्ड झालें

तसेंच मंडळाचे कार्याचा अहवाल वाचून दाखविण्यांत आला. त्यांत मुख्यतः बरेंच दिवसाच्या परिश्रमानंतर म. प्रां. वै. मंडळ ही संस्था सरकारी नियमानुसार राजिस्टर करणेंत आली व तिचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेटहि प्राप्त झाल्याचें निवेदन करण्यांत येऊन ते स्थायी कार्यालयांत ठेवण्यासाठीं स्थायी मंत्री वै. बिंदुमाधवशास्त्री यांचे हवालीं करणेंत आलें.

सरकारकडून खुलासा मागवावा

तसेंच अफू, भांग, गांजा, दारू, विषयक गेल्या सभेंतील प्रस्तावानुसार सरकारशीं पत्रव्यवहार करण्यांत आला तो व त्यास आलेलीं उत्तरें वाचून दाखविण्यांत आल्यावर संदिग्ध विधानाचा अधिक स्पष्ट खुलासा सरकारकडून मागवावा, असें ठरविण्यांत आल्यावर तो अहवाल संमत करण्यांत आला.

प्रचारार्थ दौरा काढावा

प्र. ३ अ)-शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रम संपूर्ण प्रांतांतून यशस्वी करण्यासाठीं अध्यक्ष व मंत्री यांनीं प्रचार दौरा काढावा व ठिकठिकाणच्या वैद्यमंडळांनीं त्यांना सक्रिय साहाय्य द्यावें अशी विनंति आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या कामीं लागणारा प्रवासखर्च म. प्रां. वै. मंडळानें करावा असें आजची सभा सुचवित आहे.

सू.— वै. लक्ष्मीबाई बोरवणकर

अ.— वै. द. का. थत्ते सर्वसंमत

सरकारनें शुद्ध आयुर्वेदाचें विद्यालय काढावें

ब) शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम यशस्वी करण्यासाठीं मुंबई सरकारनें प्रांतांत शुद्ध आयुर्वेदाचें एक विद्यालय व रुग्णालय सुरू करावें अशी या सभेची मुंबई सरकारला विनंति आहे.

अध्यक्षद्वारा प्रस्तावित. सर्वसंमत

निखिल मुंबई राज्य वैद्य मंडळ

प्र. ४– मुंबई राज्यात आयुर्वेद क्षेत्रांतील वेळोवेळीं उत्पन्न होणारे प्रश्न व अडीअडचणींचा विचार करून प्रसंगानुसार सरकारकडे एकमुखी मागणी करणें अथवा अडचणी कळविणारी अशी प्रांतांतील सर्व आयुर्वेदीय संस्थांची मिळून एक मुंबई राज्य वैद्य मंडळ नांवाची संस्था असावी, असें आजच्या सभेस वाटत आहे व त्या दृष्टीनें म. प्रां. वै. मं. चे भूतपूर्व अध्यक्ष व यासाठींच मुंबईस भरलेल्या सभेचे अध्यक्ष श्री. वै. नानासाहेब पुराणिक यांनीं आजच्या सभेकडे पत्र पाठवून सूचना केली आहे. त्या सूचनेप्रमाणें महाराष्ट्र प्रांतीय वै. मं. तर्फे
१) वै. श्री. गं. वि.(नानासाहेब) पुराणिक, मुंबई,
२) ,, दत्तात्रयशास्त्री जळूकर (म.प्रां.वै.मं. अध्यक्ष
३) ,, ब्रह्मदत्त शर्मा (म. प्रां. वै. मं. कार्यमंत्री)
४) ,, बिंदुमाधवशास्त्री पंडित (,, स्थायीमंत्री)
असे ४ प्रतिनिधी आजची सभा निवडून देत आहे.

सू.- वै. रामभाऊ भोगे अ.–वै. का. सी. भावे.

वैद्य विवलकर कारंजा, नासिक

प्र. ५– वैद्य वि म. गोगटे यांनीं नासिक येथें स्वतः म्युनिसिपालिटींत सभासद निवडून आल्यावर 'रविवार कारंजा' म्हणून आजपर्यंत प्रसिद्ध असलेली वास्तु प्राणाचार्य विवलकर यांचीं देणगी असलेमुळे त्यांचें नाव लोकांना समजेल अशा रीतीनें तेथें जाहिर फलक लावून त्यावर 'वैद्य विवलकर कारंजा" असें नांव घालण्यास म्युनिसिपालिटीला भाग पाडले व वैद्यांचा यथायोग्य मान राखला या त्यांच्या वैद्यहितदक्षतेबद्दल ही सभा वै. वि. म. गोगटे यांचे अभिनंदन करते व अशाच तऱ्हेची दक्षता इतरही वैद्यांनीं व्यवहारांत व सर्वत्र दाखवावी अशी या सभेची सर्व वैद्यबंधूंना शिफारस आहे. सर्वसंमत

सू.- वै. बिंदुमाधवशास्त्री अ.–वै. रामभाऊ भोगे.

पुणें विद्यापीठांत आयुर्वेदशास्त्र

प्र. ६–पुणे विद्यापीठाचे अभ्यासक्रमांत आयुर्वेदशाखा (The faculty of Ayurvedic medicine) सुरू करण्यांत येणार असें समजतें. याबद्दल म. प्रां. वै. मंडळ, पुणे विद्यापीठाचें हार्दिक अभिनंदन करीत आहे.

या फॅकल्टीचा अभ्यासक्रम निश्चित करण्यापूर्वी म. प्रां. वै. मंडळ ही महाराष्ट्रांतील वैद्यांची अधिकृत संस्था आहे म्हणून ह्या संस्थेचे विचार पुणें विद्यापीठानें समजून घ्यावेत. त्यासाठीं म. प्रां. वै. मं.ची आजची ही सभा खालील वैद्यांचे शिष्टमंडळाची निवड करीत आहे. या मंडळानें पुणें विद्यापीठाचे सन्माननीय व्हाईसचान्सेलरमहोदय व रजिस्ट्रारमहोदय यांची भेट घेऊन भेटींत होणारा निर्णय, म. प्रां. वै. मंडळाकडे लवकर कळवावा असें ही सभा सुचवित आहे.

शिष्टमंडळ सदस्य

(१) श्रीमंत वै. नानासाहेब पुराणिक, २) वै. पं. कृष्णशास्त्री कवडे ३) वै. भू. गणेशशास्त्री जोशी ४) वै. पांडुरंगशास्त्री देशपांडे ५) वै. म. भा. वाटवे ६) वै. ह. बा. परांजपे ७) वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर (अध्यक्ष म. प्रां. वै. मंडळ) ८) व आवश्यकतेनुसार आणखी एकादा सभासद घ्यावा.

सू.–वै. बिंदुमाधव पंडित अ.–वै. द. ब. वैद्य सर्वसंमत

१० वें म. प्रां. वैद्य संमेलन

प्र. ७ वा.–दिलेल्या निमंत्रणानुसार पुणें वैद्य मंडळाचे अध्यक्ष व मंत्री यांनीं आजच्या म. प्रां. वै.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म. वै स्थायी समेंत उपस्थित होऊन म. प्रां. वै. संमेलन भरण्यासाठीं अधिक अवसर पाहिजे अशी विनंति केली, त्या विनंतीचा ही सभा स्वीकार करीत आहे व येत्या आक्टोबर ते डिसेंबरच्या आंत हें म. प्रां. वै. संमेलन भरवावें असें पुणें वैद्य मंडळास सुचवीत आहे.

सू. वै. पां. ह. देशपांडे अ. वै. लक्ष्मीबाई बोरवणकर

सर्व संमत

विशेष अधिवेशन घ्यावें

प्र. ८ वा-शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रम प्रत्यक्षांत आणण्यासाठीं प्रचारदृष्टीनें म. प्रां. वै. मंडळाचें एक विशेष अधिवेशन येत्या जूनचे आंत भरवावें असें ही सभा ठरवीत आहे.

सू.-वै ना. ह. जोशी, अ.-वै. ब्रह्मदत्त शर्मा.

सर्वसंमत

वै. भू. गणेशशास्त्री यांचें अभिनंदन

शेवटीं आजच्या म. प्रां. वै. मंडळाच्या कार्यकारी व स्थायी समितीस निमंत्रण दिलें, सभा कार्यांसाठीं आपली जागा दिली आणि उपस्थित सदस्यांचे उत्कृष्ट आतिथ्य केलें व अशा प्रकारें आजचें सभाकार्य पार पाडण्यास वै. भू. गणेशशास्त्री जोशी यांनीं साह्य केलें याबद्दल वै. भू. गणेशशास्त्री जोशी यांचे आणि मंडळाचे विनंतीस मान देऊन सभाकार्यास आपल्या सुविचाराचे मार्गदर्शन केल्याबद्दल स्थानिक व परस्थ निमंत्रित वैद्यश्रेष्ठांचे म. प्रां. वै. मं. चे मंत्री वै. ब्रह्मदत्त शर्मा यांनीं आभार मानल्यावर व अध्यक्षांचें समारोपात्मक भाषण झाल्यावर सभाकार्य संपलें.

डॉ. मूळगांवकर शिष्यवृत्ती

पुणें येथील बी. जे. मेडिकल कॉलेजमध्यें अॅनॉटमी विषयासाठीं ठेवण्यांत आलेली पहिली डॉ. एस्. आर्. मूळगांवकर शिष्यवृत्ती श्री. एन्. वी. कुरकुरे यांना देण्यांत आली आहे.

म. प्रां. वैद्य सम्मेलन, मुंबई

विशेष अधिवेशन शुक्रवार ता. २८ मे १९५४

मंगळवार ता. २७-४-५४ रोजीं दुपारीं ३ वाजतां मुगभाटमधील आयुर्वेद रुग्णालयांत महाराष्ट्र वैद्य मंडळाचे मुंबई येथील प्रांतिक सभासदांची एक सभा भरली होती. त्यांत खालीलप्रमाणें कार्यक्रम निश्चितपणें ठरविण्यांत आला आहे.

प्रथम प्रांताध्यक्ष वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर यांनीं विशेष संमेलन घेणेबद्दलचा हेतु निवेदन केला. नंतर वैद्य ना. ह. जोशी यांनींहि कार्याचें महत्त्व सांगितलें. नंतर सर्वांचें मतें जादा संमेलन मुंबई येथें घेणेचें निश्चित ठरलें व तदनुसार जादा संमेलनाचें कार्यकारी मंडळ निवडणेंत आलें.

विशेष अधिवेशनाचे अध्यक्ष-

वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर

स्वागताध्यक्ष— वै. आबासाहेब सांडू

स्वागतोपाध्यक्ष- १) वै. ग. म. अभ्यंकर,

२) वै. वामनराव दीनानाथ

खजिनदार— वै. भाऊसाहेब सांडू

मंत्री- १ वै. प्रतापकुमार प्रधानमंत्री, २ वै. रा. ना. आंबे, ३ वै. कानिटकर ४ वै. घळसासी.

स्वागत मंडळाचे अन्य सदस्य

१) वै. दे. ल. आनंदे २) वै. गो. कृ. पेठे ३) वै. वि. म. पारकर ४) वै ना. ह. जोशी ५) वै. रामभाऊ भोगे ६) वै. श्री. कृ. चराटकर ७) वै. भा. द. गोडबोले ८) वै. पु. रा. बेल्हे ९) वै. के. जी. पवार १०) वै. व्ही. डी. शिंदे ११) वै. श्री. ग. बहुतुले १२) वै. श्री. वा. सांडू.

शिवाय जरूरीप्रमाणें जादा सभासद मदतीस घेणेस घेणेस परवानगी दिली आहे.

संमेलनाची तिथि व शुल्क

संमेलनाचा दिवस २८ मे १९५४ हा निश्चित ठरविला आहे. स्वागत सदस्य शुल्क २ रुपये ठरविणेत आलें आहे.

कार्यालयाचा पत्ताः- आयुर्वेदीय रुग्णालय, मुगभाट, मुंबई४ } प्रतापकुमार वैद्य, प्रधानमंत्री स्वागत मंडळ म. प्रां. वैद्य संमेलन मुंबई

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार

अवास्तव कल्पना

१६ एप्रिलच्या अंकांत श्वेत ताम्रभस्मासाठीं माहिती आली आहे. त्या बाबत माझे कांहीं विचार येथें मांडीत आहे. श्वेत ताम्रभस्म ही प्रक्रिया आरंभीं किमयावाल्यांनीं शोधली. त्याचा किमयेकडे उपयोग होत नाहीं हें त्यांचे नजरी नक्की आलें. नंतर इतर औषधी उपयोग आहे कीं काय असें पाहतां उत्तम औषधी गुण विशेष असल्याचें निदर्शनाला आलें. आणि त्यावेळेपासून त्याचा वापर माहीतगार कांहीं ठराविक वैद्य करीत आहेत. या श्वेतभस्माचा प्रचार गोरखनाथाचे काळीं फार होता. त्याचें कारण ते सर्व किमयावाले होते. त्यानन्तर श्वेतताम्रभस्मविधि रस-संग्रहांतून दिसू लागला. भस्माविषयीं इतकी माहिती पुरे. श्वेतभस्म मी वापरून पाहिलेलें आहे. याचा विशेष गुण असा की सत्वर परिणामकारी विशेषेकरून कफ विकारावर आढळले. त्यांत अद्वितीय असें कांहीं वाटले नाहीं, याची कृति मात्र आजवर मला भस्म दिलें त्या गृहस्थानें सांगितलें नाहीं.

भस्म सेवन केल्यानन्तरचा आपला अनुभव जिज्ञासूंना विचारार्थ श्री. पाटणकरांनीं प्रसिद्ध केला आहे, त्याचें स्पष्टीकरण मी माझ्या मतें पुढें देत आहे.

काकतालीय न्यायानें त्यांच्या प्रकृतीत तो फरक भस्म सेवन केलेल्या दिवशींच दिसूं लागला. ताम्रभस्म गुणाशीं व त्या इलेक्ट्रिक स्पार्कशी कांहीं संबंध नाहीं. त्या रोग्याच्या शरीरांत कोठेतरी वातवाही शिरामध्यें फ्रिक्शन (घर्षण) होत आहे त्या घर्षणाचा परिणाम म्हणून तशा प्रकारचे इलेक्ट्रिक स्पार्क दिसतात. ते घर्षण नाहींसे झाले म्हणजे ते तसें दिसणें बंद होते.

अशा घर्षणक्रियेला कोठेंतरी अवरोध असावयास पाहिजे. अवरोध म्हणजे मार्गावरोध असतां संवेदना अडचणीनें वाहून जातात.

या सदर लेखक रोग्यामध्यें त्याचे बेंबीच्या किंचित् उजवीकडे एक इंच खालीं एक दोरखंडा प्रमाणें शीर निदान अंगठ्याइतकी जाड शीर आ[हे] ती दाबानें दुखतें, तेथेंच अडथळा आहे. त्या[चा] त्याचा परिणाम म्हणून हृदय, पाठीची बाजू, इतक्या ठिकाणी व्यापलेला आहे पाठीच्या कण्या[त] घर्षण क्रिया जास्त होत आहे. त्याच कारणानें ठिण[गी] कण दिसतात, हा मजकूर खरा खोटा हें लेखका[स] विचारून समजून घेणें, एकंदर श्वेत ताम्रभस्माचा क्रियेशी कांहीं संबंध नाहीं. उगाच अवास्तव कल्पने[स] वाव देऊं नये. वैद्य ग. नी. पटवर्ध[न]

शुभमंगल

डॉ. चि. बालगोविंद कन्हैयाभाई मालपूरवाला (डॉ. बी. के. शहा) डी. ए. एस् एफ्. यांचा विवाह नंदुरबार येथें चि. सौ. कां. गंगाबहन गोकुळदास देसाई यांच्याबरोबर मंगळवार ता. ४-५-५[?] रोजीं गोरज मुहूर्तावर होणार आहे.

मुद्रणदोष

१६ एप्रिलच्या आयुर्वेद पत्रिकेंत पान ६४६ वर दोन महत्त्वाचे मुद्रणदोष राहिले आहेत ते दुरुस्त करावेत. शीर्षकामध्यें जाहीर हा शब्द कंसांत घालावा व संमेलन होऊन ८।९ महिने झाले असें वाचावें. —व्यवस्थापक

पांढरें कोड

हजारोंचें गेले व त्यांनीं अभिप्राय दिलेले आणि अनेक बक्षिसें मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु. नकली वैद्यापासून सावध रहा!

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन' मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

—सहकारी पद्धतीनें तयार करावयाचीं औषधें—

कोहलकल्प [आसवारिष्टविधि]

लेखकः- वैद्य पु. वि. धामणकर
धूतपापेश्वर–पनवेल

(मागील अंकावरून समाप्त)

सारासव (कोहल) नमुना १

८ असृग्हरारिष्ट (भै र.)

पाठः- असृग्घ्नीस्वरसं चैव मृतसंजीवनी तथा ।
पलमेकं समादाय प्रत्येकं मानतो भिषक् ॥
मृदा लिप्तमुखे भाण्डे स्थापयेत्सप्त वासरान् ।
ततः स्थूलपटापूतः शीतलेन जलेन च ॥
सेव्यो माषमितो नित्यं यामे यामे प्रयत्नतः ।
उरःक्षतं रक्तपित्तं कासरक्तातिसारकम् ॥
नाशयेद् राजयक्ष्माणं रक्तप्रदरमेव च ॥

१) नांवः- आद्यद्रव्य.
२) रोगाधिकारः- राजयक्ष्मा.
३) कार्यः- व्रणसंधान, रक्तस्कंदन—स्तंभन.
४) स्थानः- कफस्थान, विशेषतः उर, आंत्र, रक्त.
५) रोगः- रक्तनिष्ठीवन, रक्ती आंव, रक्तातिसार, रक्तप्रदर, क्षय.
६) मात्राः- १ ते ५ बिंदु.
७) द्रव्यसंग्रहः- अडुळसा १ भाग, कोहल १ भाग.
८) द्रव्यनिर्णयः- सामान्य
९) प्रक्रियाः- अडुळशाचे पानास वाफ दिली म्हणजे त्यांचा रस छान निघतो. तो घेऊन कोहलाशीं (मृतसंजीवनीसुरेशीं) मिश्र करून मुद्रित व संधित स्थितींत धान्यराशींत ७ दिवस ठेवावा. नंतर गाळून उपयोजावा.

सारासव, नमुना २

७ अहिफेनासव (भा. भै. र. २००) भै. र.

पाठः- तुलां मधूकमद्यस्य शुभे भाण्डे प्रक्षिपेत् ।
फणिफेनस्य कुडवं मुस्तकं पलसम्मितम् ॥
जातीफलं चेन्द्रयवं तथैलां तत्र दापयेत् ।
रुद्ध्वा भाण्डं मासमात्रं यत्नतः परिरक्षयेत् ॥
हन्त्यतीसारमत्युग्रं विषूचीमपि दारुणाम् ॥

१) नांवः- प्रधान द्रव्य
२) रोगाधिकारः- अतिसार
३) कार्यः- आमपाचन, स्तंभन, शूलघ्न, संमोहन.
४) स्थानः- महास्रोत, वातवाहिनी.
५) रोगः- शूल, संग्रहणी, अतिसार, विषूची.
६) मात्राः- १ ते ५ थेंब.
७) द्रव्यसंग्रहः- ५ शेर मधुकमद्य, ४ तो. मुस्ता, १६ तो. शुद्ध अफू, ४ तो. इंद्रजव, ४ तो. वेलची, ४ तो. जायफळ.
८) द्रव्य-निर्णयः- मुस्ता-क्षेत्र (कंद) मुस्ता, जायफळ नवें, अफू शुद्ध. इंद्रजव नवें.
९) प्रक्रियाः- सामान्य.
१०) सिद्धिप्रमाणः-- ५। शेर
११) परिगणनः-- अफू
१२) कालः-- संधान--१ महिना.

८ कुमार्यासव

(सिद्धभेषजमणिमाला)

पाठः- कन्यारसाढके प्रस्थं गुडतः कुडवद्वयं ।
मण्डूरं टंकणं क्षारौ पंचैव लवणानि च ॥
नवसादर इत्यस्माद्वर्गाद्देयं पलं पलम् ।
काचकोषे समाधाय मुखमस्य विमुद्रयेत् ॥
अष्टाहमातपन्यस्तमेकीभूतं रसं पिबेत् ।
यकृत्प्लीहोदरेष्वेनं कुमार्यासवमाख्यया ॥

१] नांव–आद्यद्रव्य.

२] पाठनिश्चितिः— यकृत् व प्लीहा ह्यांचे व्यापार नीटनेटके व सुरळीत करण्याचें काम कुमारी आसव करतें. पण ह्या अवयवांचा शोथ रोहितारिष्ट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दूर करतें. सिद्धभेषजमणिमाला ग्रंथकारानें ही दोन्ही कार्ये एकसमयावच्छेदें करणारा असा कुमारी-आसवाचा एक पाठ संयोजिला, तो मुद्दाम येथें उद्धृत केला आहे.

३ रोगाधिकार-- गुल्म

४ कार्य-- वातानुलोमन, अभिष्यंदी, मूत्रल, मलभेदन, लेखन.

५ स्थान-- यकृत्, प्लीहा, उदर.

६ रोग-- यकृत्वृद्धि, प्लीहावृद्धि, उदर.

७ मात्रा-- १ पल.

८ द्रव्यसंग्रह-- २५६ तो. कुमारीरस, ३२ तो. गूळ, ४ तो. टंकण, ४ तो. सैंधव, ४ तो. मीठ, ४ तो. सज्जीखार, ४ तो. सौवर्चल, ४ तो. नवसागर, ४ तो. औद्भिद, ४ तो. यवक्षार.

९ द्रव्यनिर्णय-- कुमारीरसास अग्निसंस्कार वर्ज्य.

१० प्रक्रिया-- सर्व पदार्थ एकत्र करून ८ दिवस उन्हांत ठेवणें.

११ सिद्धिप्रमाण-- वट वजन ३॥ शेर.

१२ काल-संधान- ८ दिवस. साधन-शरद, सेवन भोजनात्तर.

९ कुमार्यासव (भा.भै.र. ८९६) यो.र.

पाठः- कुमार्याश्च रसद्रोणे गुडं पलशतं तथा ।
तुलाँग्निसंख्यां विजयां क्वाथयेत्तज्जलार्मणे ॥
चतुर्थांशावशेषे तु पूते तस्मिन्निपापयेत् ।
मधुतश्चाढकं दत्वा धातक्या द्विपलाष्टकम् ॥
स्निग्धभाण्डे विनिक्षिप्य कल्कं चैव प्रदापयेत् ।
जाती फलं लवंगं च कंकोलं च कबाबकम् ॥
जटिलां चव्यचित्रं च जातिपत्री सकर्कटम् ।
अक्षं पुष्करमूलं च प्रत्येकं च पलं पलम् ॥
मृतं शुल्वं तथा लोहं शुक्तिमात्रं प्रदापयेत् ।
भूम्यां वा धान्यराशौ वा स्थापयेद्दिनविंशतिम् ॥
तदुद्धृत्य पिबेन्मात्रां यथा चाग्निबलावलम् ।
पंचकासं तथा श्वासं क्षयरोगं च दारुणम् ॥
उदराणि तथाष्टौ च षडर्शांसि च नाशयेत् ।
वातव्याधिमपस्मारमन्यान् रोगान् सुदारुणान् ।
जाठरं कुरुते दीप्तं कोष्ठशूलं च नाशयेत् ।
गुल्माष्टकं नष्टपुष्पं नाशयेदेकपक्षतः ॥
कुमारिकासवो ह्येष बृहस्पातिविनिर्मितः ॥

१) नांवः- आद्य पदार्थ

३) रोगाधिकारः— गुल्म.

४) कार्यः- दीपन, पाचन, स्रोतःशोधन, मल-निःसरण, वातानुलोमन, पित्तोदीरण, कफहर.

५) स्थानः- प्लीहा, यकृत्, आंत्र, गर्भाशय, यांमधील अस्तर, मलधराकला, पित्तधराकला.

६) रोगः- श्वास, कास, क्षय, उदर, गुल्म, अर्श, अपस्मार, नष्टपुष्प, कोष्ठशूल, वातव्याधि.

७) मात्राः- रोगी व त्याचा अग्नि ह्यांचें बल पाहून १ ते ४ तोळे.

८) द्रव्यसंग्रहः-- १ द्रोण कुमारीरस, ५ शेर गूळ, ३। शेर काढा, २५६ तो. मध. ६४ तो. धातकी-पुष्प, अथवा धातकीजल. १। शेर हिरडे, १३ शेर पाणी, ३। शेर शेष, ४ तो. जायफळ, ४ तो. कंकोळ, ४ तो. जटामांसी, ४ तो. चित्रक, ४ तो. काकड-शिंगी, ४ तो. पोखरमूळ, २ तो. ताम्रभस्म, ४ तो. लवंग, ४ तो. कबाब, ४ तो. चवक, ४ तो. जाय-पत्री, ४ तो. बेहेडा, २ तो. लोहभस्म.

९) द्रव्यनिर्णय सामान्य

१० प्रक्रिया- योगरत्नाकरांतील कुमारीआसवाचा पाठ चांगला आहे. पण त्याच्या पहिल्या तीन ओळींच्या अर्थांत संदिग्धता आढळते. त्यामुळें वैद्य जरासा गोंधळतो. माझी सुद्धां प्रथम तीच स्थिति झाली. म्हणून मी कोरफडीच्या घटकांचा अभ्यास केला, तेव्हां मला असें आढळून आलें कीं, कोरफडीचे रसांत (i) अल्ब्युमिनस मॅटर (ii) काळाबोळ (aloes) आणि (iii) कॅल्शियम् ऑक्झलेट्स असतात. आणि ते तिन्ही घटक प्राणी-शरीरास उपकारक असतात. परन्तु तो रस उकळला तर अल्ब्युमिनस मॅटर गोठून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पृष्ठभागी येते. कॅल्शियम् ऑक्झलेटस् सुटे पडून तळाशी जाऊन बसतात, व ाेळ मधल्या द्रवांत अंतराळी राहतो. अशी त्यांची फाटाफूट होते. ती होणें इष्ट नसल्यानें कुमारीरसास अग्निसंस्कार हितावह ठरत नाहीं.

पहिल्या ३ ओळींचा अर्थ

म्हणून पहिल्या ३ ओळींचा अर्थ मी असा करतो. प्रथम १०२४ तो. कोरफड रस व ४०० तो. गूळ ह्यांचें मिश्रण करावें व त्यांत (तस्मिन्) १०० तो. हिरडाफोल (तत्) व १०२४ तो. पाणी ह्यांचा चतुर्थांश काढा २५६ तो. घालून एक मिश्रण करावें. नंतर त्यांत मध, धातकीपुष्प अथवा त्याचा हिम व आवाप द्रव्यें घालावीत. ताम्र व लोह ह्यांच्या पुरचुंड्या पृथक् पृथक् सोडाव्यात.

(११) सिद्धिप्रमाणः– १०२४ तो. कुमारीरसाचे २०४८ तो. आसव होतें.

(१२) परिगणनः– वि. गु., १ कोहल, २) बोळ, ३) मधुशर्करा, ४) अम्ल, ५) लोह, ६) ताम्र.

(१३) काल सेवनः– साधन–शरद् ऋतु, संधान–१ महिना. –१५ दिवस.

१० दशमूलासव

(भा.भै.र.३१९२) बृ.नि.रं.

पाठः– दशमूलं तुलार्धं च पौष्करं च तदर्धकम् ।
हरीतकीनां प्रस्थार्द्धं धात्रीप्रस्थद्वयं तथा ॥
चित्रकं पुष्करमितं चित्रकार्धं दुरालभा ।
गुडुच्या वै शतपलं विशाला पलपंचकम् ॥
खादिरस्य पलान्यष्टौ तदर्धं बीजकं तथा ।
मंजिष्ठा मधुकं कुष्ठं कपित्थं देवदारु च ॥
विडंगं चविका लोध्रं भार्ङ्गी चाष्टकवर्गकम् ।
कृष्णाजाजी पिप्पली च क्रमुकं पद्मकं सठी ॥
प्रियंगु सारिवा मांसी रेणुका नागकेशरम् ।
त्रिवृता रजनी रास्ना मेषशृंगी पुनर्नवा ॥
शतावरी चेन्द्रयवा मुस्ता द्विपलिकां जले ।
चतुर्गुणे पादशेषे द्राक्षा षष्टिपलं क्षिपेत् ॥
त्रिंशत्पलानि धातक्या गुडं पलचतुःशतम् ।
मधुद्वात्रिंशत्पलं चैव सर्वमेकत्रं कारयेत् ॥
भाण्डे पुराणे स्निग्धे च मांसीमरिचधूपिते ।
पृथक् द्विपलिकानेतान् पिप्पली चन्दनं जलम् ॥
जातीफलं लवंगं च त्वगेलापत्रकेशरान् ।
कर्षमात्रां च कस्तूरी दत्त्वा पक्षं निधापयेत् ॥
कतकद्विपलं चूर्णं क्षिपेन्निर्मलता भवेत् ।
पश्चादूर्ध्वं पिबेद्यस्तु मात्रया च यथाबलम् ॥
धातुक्षयं जयत्येव कासं पंचविधं तथा ।
अर्शांसि षट्प्रकाराणि तथाष्टावुदराणि च ॥
प्रमेहं च महाव्याधिमरुचिं पाण्डुरुक् तथा ।
सर्ववातांस्तथा शूलं श्वासं छर्दिमसृग्दरम् ॥
अष्टादशैव कुष्ठानि शोफं शूलं भगन्दरम् ।
शर्कराद्यं मूत्रकृच्छ्रमश्मरीं च विनाशयेत् ॥
कृशस्य पुष्टिं कुरुते पुष्टस्य च महाबलम् ।
महावेगो महातेजो महावीर्यो विलोक्यते ॥
कामपुष्टिकरो ह्येष वंध्यानां पुत्रदो भवेत् ॥

१) नांवः– आद्यपदार्थ

२) रोगाधिकारः– क्षय

२) कार्यः– बृंहण, बलवर्धन, पुत्रद, वातनाशक, रक्तवर्धक, कफनाशक, धातुवर्धक.

४) स्थानः– सर्व शरीर.

५) रोगः– धातुक्षय, खोकला, मूळव्याध, उदर, प्रमेह, महारोग, सूज, अरुचि, पांडु, शू दमा, वांती, रक्तप्रदर, कुष्ठ, भगंदर, शर्करा, मूत्रकृच्छ्र, मूत्राश्मरी.

६) मात्राः– यथाबल

द्रव्यसंग्रह

२॥ शेर दशमुळें, १। शेर पुष्करमूळ, ३२ तो. हिरडा, १२८ तो. आंवळा, १०० तो. चित्रक ५० तो. धमासा, ४०० तो. गुळवेल, २० तो. इंद्रायणी, ३२ तो. खैर, १६ तो. बिबळा, ८ तो. मंजिष्ठा, ८ तो. जेष्ठमध, ८ तो. कुष्ठ, ८ तो. कवठ ८ तो. देवदार, ८ तो. वावडिंग, ८ तो. चवक, ८ तो लोध्र, ८ तो. भारंग, ६४ तो. अष्टवर्ग, ८ तो. पिंपळी, ८ तो. जिरे (काळें), ८ तो. सुपारी,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८ तो. पद्मकाष्ट, ८ तो. कचोरा, ८ तो. गहुला, ८ तो. सारिवा, ८ तो. जटामांसी, ८ तो. रेणुकबीज ८ तो. नागकेशर, ८ तो. निशोत्तर, ८ तो. हळद, ८ तो. रास्ना, ८ तो. मेढशिंगी, ८ तो. पुनर्नवा, ८ तो. शतावरी, ८ तो. इंद्रजव, ८ तो. नागरमोथा, चार पट पाणी (१२ द्रो.)

आवाप द्रव्यें

२४० तो. मनुका, १२० तो. घायटी, २० शेर गूळ, १२८ तो. मध, ८ तो. पिंपळी, ८ तो. चंदन. ८ तो. वाळा, ८ तो. जायफळ, ८ तो. लवंग, ८ तो. दालचिनी, ८ तो. वेलची, ८ तो. तमालपत्र, ८ तो. नागकेशर, (१ तो. कस्तूरी पटे बद्धम्)

द्रव्यनिर्णयः- सामान्य

प्रक्रिया

प्रथम सर्व औषधें पाण्यांत बुडवून ठेवावींत. दुसरें दिवशीं तीं फुगलीं अथवा त्यांनीं तें सर्व पाणी शोषलें म्हणजे तीं सर्व औषधें बारा द्रोण पाण्यांत सोडावींत व खालीं मध्यम अग्नि द्यावा. नऊ द्रोण पाणी आटलें कीं, तो काढा गाळून घ्यावा व तो दोन द्रोणापर्यंत पुनः आटवावा. मग त्यांत गूळ मिसळावा. नंतर त्यामध्यें कस्तूरीशिवाय मनुका इ. आवाप्य द्रव्यें टाकावींत व सर्व मिश्रण सारखें करून झांकून ठेवावें.

सुगंधी व नयनमनोहर आसव

जुन्या स्निग्ध भांड्यास जटामांसी व मिरे ह्यांची जोराची धुरी देऊन तें भांडें बाह्याभ्यंतरतः निर्जंतुक व जरासें गरमहि करावें व त्यांत हें सर्व मिश्रण करावें. आणि भांडें त्वरित बंद करून त्यास मुखमुद्रा द्यावी व एक महिनाभर कोरड्या व गरम जागीं अथवा धान्यराशींत ठेवावें. मिश्रण गाळून घ्यावें. आणि मग त्यांत निवळीचें बीं आठ तोळे, साधारण ओबडधोबड कुटून टाकावें म्हणजे अंतराळीं तरंगणारे सर्व कण तळाशीं बसतात आणि अत्यंत स्वच्छ, निर्मळ असें दशमूलासव हातीं लागतें. ह्यांत कस्तूरीची पुरचुंडी टाकावी म्हणजे ती सर्व त्यांत विरेल व आसव अत्यन्त सुगंधी व नयनमनोहर होईल.

१०) सिद्धिप्रमाणः— ३५ शेर.

११) परिगणनः- सामान्य

१२) कालः- संधान-१५ दिवस, साधन-हेमंत.

११) जंबीरद्राव

(योग चिंतामणी)

पाठ- शतं जम्बीररसकं रामठं च पलद्वयम्।
सैन्धवं च विडंगं च पृथग् दत्वा पलं पलम्।
त्र्यूषणं पलमेकैकं सौवर्चलचतुष्टयम्।
यवानिका पलं चैकं कर्षमानचतुष्टयम्॥
स्निग्धभाण्डे विनिक्षिप्य अश्वशालां निधापयेत्
एकविंशद्दिनं यावत् ततः सर्वं समुद्धरेत्॥
सुचन्द्रे सुदिने लोके पूजयित्वा भिषग्गुरून्।
यकृत्प्लीहामगुल्मं च विद्रध्यष्ठीलिकादयः॥
वातगुल्ममतिसारं शूलं पार्श्वहृदामयान्।
नाभिशूलं विबन्धं च आध्मानं च गुदोदरम्।
नश्यन्ति तस्य शीघ्रेण वातश्लेष्मामयाश्च ये।
जीर्यन्ते तस्य कोष्ठे तु जम्बीरीद्रावसेवनात्॥

१ नांवः- आद्य पदार्थ

२ रोगाधिकारः- उदर

३ कार्यः- दीपक, पाचक (तीव्र)

४ स्थानः- पक्वाशय, पचनेंद्रिय, वाताशय, कफाशय, यकृत्, प्लीहा.

५ रोगः- यकृतवृद्धि, प्लीहावृद्धि, गुल्मविद्रधि, अष्ठीलिका, अतिसार, पार्श्वशूल, आध्मान, बद्धगुदोदर.

६ मात्राः- १।४ पल.

७ द्रव्यसंग्रहः- ४० तोळे लिंबूरस, ८ तो. हिंग (कच्चा), ४ तो. सैंधव, ४ तो. विडंग, ४ तो. सुंठ, ४ तो. मिरे, ४ तो. पिंपळी, १६ तो. सौवर्चल, ४ तो. यवानी.

८) द्रव्यनिर्णयः— सामान्य.

९) प्रक्रियाः— अश्वशाळेंत ठेवणें, मुदत २१ दिवस.

१०) सिद्धिप्रमाणः— वट वजन ५ शेर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

११) परिगणनः— सामान्य.
१२) कालः- संधान-- २१ दिवस, साधन-- शरद,
सेवन—समानकालीं.

१२) यवान्यासव (पारसिक यवानी)
[वृद्धवैद्याधार]

१) नांवः- आद्यद्रव्यसूचक.
२) रोगाधिकारः- शूल.
३) कार्यः- वेदनाशामक, स्वापजनक.
४) स्थानः- (कोष्ठ) सर्वशरीर.
५) रोगः- शूल.
६) मात्राः- सामान्य.
७) द्रव्यसंग्रहः- ८० तो. खोरासनी ओवा, ४ तो. लवंग, ४ तो. सुंठ, १ द्रोण पाणी, ४ तो. एरंडमूल, ४ तो. जायफळ, ४ तो. अफूचा बोंडे. १५ शेर मध, ४ तो. जिरे, ४ तो. बिडलवण.
८) द्रव्यनिर्णयः- सामान्य.
९) प्रक्रियाः- ,,
१०) सिद्धिप्रमाणः- वट वजन १८ शेर.
११) परिगणनः- सामान्य.
१२) कालः- संधान--१ महिना, साधन- शरद.

पांढरें कोड नष्ट झालेल्या हजारों गांवच्या लोकांची बक्षिसे व प्रशस्तिपत्रें छापलेलें पत्रक मोफत मागवा.
वैद्य के. आर. बोरकर मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला [मध्य-प्रदेश]

"फक्त वैद्यासाठीं" इंजेक्शन
ट्रेनिंग क्लास मे महिन्याचे सेशनसाठीं प्रवेश देणें सुरूं आहे. विशेष माहितीसाठीं २ आणे पोस्टेज पाठवा.
डॉ. जिल्लेवार . T. C.
यवतमाळ [मध्यप्रदेश]

आसव बिघडण्याचे प्रकार
व त्यांचीं कारणें

कारणें	बिघाडाचें स्वरूप
अम्लविपाकी ऋतु	१) आसव आंबट होतें
थंडऋतु.	२ आसवावर पांडुरका बारिक बुरा येतो.
थंड हवा.	२ ,, ,, ,, ,, ,,
कोंदट हवा.	३ ,, तांबूस जाड मोठी साय येते.
सर्द हवा.	४ वरचे प्रमाणें साय येतें. रूप रस रंग विटतो.
काळा गूळ.	५ आसव कडवट काळें होतें.
अम्ल गूळ.	५ ,, आंबूस होतें.
चिकीचा गूळ.	६ आसवास तार येते.
खराब मध.	७ आसव आंबते, फेसाळतें.
खळीचें वस्त्र	,, ,, ,, ,,
जंतुजुष्ट पात्र	,, ,, ,, ,,
आसव उडत रहाणें	८ आसवांतील कोहल उडतो- खुमारी घटते.
आसव ऊन करणें	,, आसवांतील कोहल उडतो, रूप, रस, रंग विटतात.
आसव प्रस्रुत करणें.	आसवांतील कोहल उडतो, आसव प्रसन्न होतें हा गुण आहे मात्र.
मधुर द्रव्य हीनमान	१ आसव तीव्र अम्ल होतें.
अम्लकिण्व	१ ,, — ,, ,,

वरील दोष दूर करण्याचे उपाय

२ बुरा येणें:-पातळ मलमलीचें चाळणीनें बुरा दूर करावा. आसव ६०० अंशापर्यंत गरम करावें. जंतु मरावेत व त्यांत सिद्ध आसव घालून तें उबदार असतांनाच संधित करावें.

३ व ४ साय येणें:-ही अवस्था सुधारणें कठीण असतें. तरी पण वरील विधि करून पहावा.

५ कडवट काळें होणें:- क्षम्य आहे.

६ तार येणें:- मध पाणी घालून पातळ करून नं. २ प्रमाणें करून त्याचें चुक्र बनवावें.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७ आंवर्णे फेसाळणें:- सहसा दुरुस्त होणें दुरापास्त. तें पुनः बंद करून त्याचें चुक्र बनवावें.

८ कोहल उडणें:-धातकीजलसहाय्यानें पुन्हां परिवर्तन सुरू करतां येते.

९ रंग विटणें:-साखर भाजून ती तांबडी लाल करून ती मिसळावी.

१० रस विटणें:-साखर, मध अथवा सॅकरिनचा उपयोग झाल्यास पहावा.

टिकाऊ काढे

हा प्रकार अलिकडेच आणि तोहि नव्यानेंच रूढ झाला आहे. पण ताजा काढा आणि हा कल्प ह्यांत महदंतर आहे. काढ्यांत वनस्पतींचे कांहीं कण अन्तराळीं तरंगत असतात. ते काढ्याबरोबर पोटांत जातात. व कार्यकारीहि ठरतात. टिकाऊ काढ्यांत हा भाग उरत नाहीं. काढ्यांत कोहल अगर अम्ल त्यापैकीं कांहींहि असत नाहीं. त्यामुळें तो सौम्य व मृदु रहातो. टिकाऊ काढ्यांत कोहल अम्ल असल्यानें तो तीव्र व तीक्ष्ण होतो. अशा प्रकारचा फरक काढा व टिकाऊ काढा ह्यांत असल्यानें ते एकमेकांचे प्रतिनिधि होत नाहींत. अशोकसालकाढा व अशोकारिष्ट, किंवा बाळंतकाढा ताजा व टिकाऊ, ह्यांचे गुणधर्मांत फार फरक आढळतो. वनस्पतींचे शास्त्रोक्त गुणधर्म हुकमी लाभण्यास त्यांचा ताजा काढाच घ्यावा लागतो. टिकाऊ काढा-विधींत रासायनिक परिवर्तन होत असल्यानें द्रव्य व गुण हीं दोन्हींहि कांहीं प्रमाणांत बदलतात. टिकाऊ काढा आणि आसव ह्यांच्या प्रक्रिया गुण सारख्याच असल्यानें टिकाऊ काढा म्हणजे एक प्रकारचीं आसवारिष्टेंच होत.

पवित्र नेपाल कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तो.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहा:-नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाल

स्वस्थवृत्तम् । (प्रथम खंड)

आयुर्वेदोक्तमारोग्यं दीर्घायुष्यं च ।

मुंबापुरीप्रदेशीय आयुर्वेद संशोधन समितीनें प्रसिद्ध केलेला हा दुसरा ग्रंथ आयुर्वेदपत्रिकेकडे नुकताच आला आहे. ग्रंथ प्रथम संस्कृत व नंतर इंग्रजी भाषेंत एकत्र छापला आहे. ग्रंथकार म्हणून डॉ. कृ. श्री. म्हसकर स्वतः व एन्. एस्. वाटवे नांवाचे कोणी अप्रसिद्ध रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टिशनर आहेत. त्यांच्या पदव्या दुर्बोध आहेत व त्यांसच आर्. एम्. पी. हीं अक्षरें पदवीवजा जोडलीं आहेत. (असें करणें वैद्यकीय नीतिनियमाविरुद्ध वर्तन आहे.)

ग्रंथाच्या प्रारंभीं पोप व प्लेटो यांचीं वचनें संस्कृत भाषेंत छापलीं आहेत.

पुस्तकाचीं आयुर्वेद पत्रिका आकाराचीं पृष्ठें सुमारें ४०० आहेत. किंमत १२ रु. ट. ख. निराळा आहे. पुस्तकाचें सविस्तर परीक्षण पुढें देण्यांत येईल.

यानंतर पुढील तीन पुस्तकें छापत आहेत:—

१ स्वस्थवृत्तः (भाग २)— लेखकः- डॉ. म्हसकर व श्री. वाटवे.

२ शालाक्यतंत्र—लेखक डॉ. म्हसकर

३ शरीर रचना—वैद्य जी. व्ही. पुरोहित.

नेत्रोपचार पथकाचा दौरा

मुंबई सरकारचें दक्षिण विभागांतील फिरतें नेत्रोपचार पथक येत्या मे महिन्यांत कोल्हापूर जिल्ह्याच्या पश्चिम भागांत दौरा काढणार असून त्यावेळीं पुढील ठिकाणीं त्या त्या तारखांना नेत्ररोग्यांचा तपासणी करण्यांत येईल.

कोल्हापूर ता. १०, मलकापूर ता. ११, कागल ता. १२, गारगोटी ता. १३, राधानगरी ता. १४, आजरे ता. १५ आणि गडहिंग्लज ता. १७.

बावडा येथें सर्व्हिसेस हॉस्पिटलमध्यें ता. १८ ते २७ मे पर्यंत नेत्रोपचार शिबिर भरविण्यांत येईल, व ता. २० रोजीं मोतीबिंदूच्या आणि ता. २१ रोजीं इतर नेत्ररोगांवावत शस्त्रक्रिया करण्यांत येतील व त्यानंतर शस्त्रक्रियेनंतरचे औषधोपचार करण्यांत येतील.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवडक रुग्ण चिकित्सा—

थंड पेयापासून पोटांत गुरगुर व जुलाब

(लेखकः- वैद्य र. गो. कुळकर्णी, आयुर्वेदविशारद मुंबई २)

रोगी- वय वर्षें ५०. पुरुष, ब्राह्मण, व्यवसाय बैठा, तक्रार फक्त पोटांत गुरगुर होऊन दिवसांतून ५।७ वेळ पातळ शौचास होणें, शौचास होतांना पोट दुखणें वा फुगणें, जळजळ वगैरे; दुसरा कांहींच त्रास नव्हता. वयाचे २८।२९ चे सुमारास तक्रारीस सुरवात झाली. सुरवातीस २।३ वेळच पातळ शौचास होत असे, तारुण्याचे जोरामुळें तिकडे दुर्लक्ष केलें गेलें, पण ३६।३७ व्या वर्षी चांगलाच त्रास जाणवूं लागला. आतांपर्यंत निरनिराळ्या पॅथीचीं ५०।६० डॉक्टर, वैद्य, होमिओ वगैरेचीं औषधें घेतलीं, पण विकार थमलेला नाहीं. एक दिवस हे गृहस्थ आमचे-कडे सहज आले असतां त्यांस खाण्यास दिलें होतें, सोंबत थंडगार पाणी (उन्हाळा होता) पिण्यास दिलें, तेव्हां त्यांनीं आपणास हें सोसत नाहीं, थंड पदार्थां-पासून पोटांत गुरगुर जास्त होते व जुलाबहि होतात तेव्हां साध्याच पाण्याची त्यांनीं मागणी केली, व त्यांनीं असेंहि सांगितलें कीं गरम कॉफी अगर गरम सोडा घेतला म्हणजे तात्पुरतें बरें वाटतें.

लशुनादिवटीची योजना

हा उपशम जाणून त्यांस आठ दिवसांचें औषध घेण्यास सुचविलें. शीतगुणानें विशेषतः वाताची वृद्धि होऊन त्या वृद्ध वायूनें गुरगुर व अतिसार होत असावा अशी कल्पना आली व त्यावर दीपक पाचक अतिसारनाशक म्हणून प्रसिद्ध असलेली लशुनादि वटि (पित्तरक्तविनिर्मुक्तसमस्तावरणावृते । शुद्धे वा विद्यते वायौ न द्रव्यं लशुनात्परम्)१।१ गुंजेच्या २।२ गोळ्या जेवणापूर्वीं, जेवणाच्या मध्यंतरीं व जेवण झाल्यावर ताज्या ताकांतून घेण्यास सांगितलें (आम्ल-रसानें लशुनाचे गुणाची वृद्धि होते). ८ दिवसांत गुरगुर व शौचाचे प्रमाणांत सुधारणा वाटल्यावरून हेंच औषध आणखी दोन महिने चालू होतें. रोजीं १॥ मासा लशुनादिवटी पोटांत जात असे.

चित्रक-संस्कृत ताक

औषधांपासून सुधारणा दिसूं लागतांच ताक घुसळतांना त्यांत थोडें (१ मासा) चित्रकचूर्ण पण टाकून नीट घुसळून तें ताक वापरण्यास घेण्यास सांगि-तलें. एकंदर ३ महिन्यांत गुरगुर व शौचास पातळ होणें या तक्रारी थांबून ताकद व हुशारी वाढली व शौच्यास पूर्ववत् घट्ट होऊं लागलें. तेव्हां लशुनादि-वटीचें प्रमाण दर आठवड्यास १।१ गुंज कमी करीत आणलें. एकंदर सहा महिने लशुनादिवटि चालू होती. या चिकित्सेनें रुग्णास पूर्ण आराम वाटला व पुढें दोन वर्षेपर्यंत विकार उलटलेला नाहीं. पुढें नोकरी सुटल्यावर बाहेरगांवीं गेल्यामुळें पुढील हकिकत कळलेली नाहीं.

[आयुर्वेदीय सिद्धांताप्रमाणें अशा लोकांनीं पुनः रोग होण्याची वाट न पाहतां, रोग न होण्या-साठीं म्हणून शीतऋतूंत लशुनाचें विशेष सेवन ठेवलें पाहिजे अगर लशुनादिवटी घेतली पाहिजे —संपादक]

———

हृदयशूळावर त्रैलोक्यचिंतामणी

रुग्ण–स्त्री, वृद्ध, वय ७० वर्षें, ब्राह्मण, विकार हृदयशूल हा विकार अलिकडे १।२वेळ जाणवूं लागला होता पण होईल बरें म्हणून दुर्लक्ष करण्यांत आलें. एक दिवस विकार फारच वाढला व जीविताशा नष्ट झाली. दुपारचे वेळीं मला बोलावण्यांत आलें होतें पण मी बाहेर गेलो होतो व सायंकाळपर्यंत परत येणार नसल्यामुळें दुसऱ्या चिकित्सकास बोलाविलें. त्यांनीं वेदनाशामक सूचिकाभरण दिलें व स्पष्ट सांगितलें कीं, रोगी जगण्या-सारखा नाहीं. आणखी औषध वगैरे कांहीं नको.

रोग्याचीं त्रासदायक लक्षणें

मला येऊन जाण्यास सांगितलें होतेंच, त्याप्रमाणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मी सायंकाळीं बाहेरून येतांच रोगी पाहण्यास गेलों, त्यावेळीं पुढील लक्षणें स्पष्ट दिसत होतीं:-श्वासोच्छ्वास कष्टानें, सर्वांगास शीतता. कुठलीहि हालचाल करण्यास असमर्थ, मोह, नाडी हातास लागतच नव्हती, नाकाचा शेंडा पडलेला (रिष्ट लक्षण). एकंदर रोगी पहातांच, बरा होईल असें वाटत नसल्यामुळें २ दिवस जाऊं द्या मग बघू म्हणून मीं सांगितलें.

त्रैलोक्यचिंतामणीचे २ वळसे

घरोबा असल्यामुळें रोज पाहून जाण्यास त्यांनीं सुचविलें. त्याप्रमाणें रुग्ण रोज नजरेखालीं होताच. दोन दिवसांत तब्येत जास्त बिघडलेली किंवा सुधारलेली दिसत नव्हती. तेव्हां सहज त्यास म्हटलें कीं, रुग्णास त्रैलोक्यचिंतामणि मात्रा, सकाळ सायंकाळ दुधांत उगाळून २।२ वळसे द्या. त्यांनीं लगेच मात्रा मजकडून मागून घेतली व त्याच रात्रीपासून त्या रुग्णास देण्यास सुरवात केली.

९ व्या दिवसापासून फरक

८ दिवस त्याच परिस्थितींत गेले, पण ९ व्या दिवसांपासून रोग्यांत हळूंहळूं सुधारणा होऊं लागून नाडीहि स्पष्ट लागूं लागली, व श्वासोच्छ्वास होतांना होणारा अडथळा दूर होऊन दुःख कमी झालें, हुषारी वाढली. झोंप चांगली येऊं लागली. तेव्हां हेंच औषध पुढें चालूं ठेवण्यास सांगितलें.

२॥ महिन्यांत १॥ मासा मात्रा

आतां रुग्ण आपली घरांतली सर्व कामेंहि करूं लागला असून हुषारी व ताकद यामध्यें चांगलीच वाढ झाली आहे. एकंदर त्रैलोक्यचिंतामणि १॥ मासा मात्रा २॥ महिन्यांत देण्यांत आली. त्रैलोक्यचिंतामणीचे गुण रसचंडांशु पान २८६वर दिले आहेत. ते असेः-

अभ्यासेन निहंति मृत्यु पलितं पुष्टिं प्रदत्ते नृणाम् । साध्यासाध्यरुजो निहन्ति च रसः त्रैलोक्य-चिंतामणिः ॥

या गुणधर्मांचा पडताळा आला.

सदाचाराचें सातत्य

"ज्याला आपण शील * म्हणतो, त्याची आ[वश्यकता] फार जरुरी आहे. व्यक्ति काय अगर राष्ट्र काय, त्यां[चें] मूल्यमापन शीलावरच केलें जातें. ज्या व्यक्ती[ला] अगर राष्ट्राला शील नाहीं, तें राष्ट्र कधींहि उन्नत[ा]वस्थेस पोचणार नाहीं.

शीलाचा सर्वत्र अभाव

आपल्यांत कोणाचा कोणावर विश्वास नाहीं. कोणतीहि व्यक्ति अगर संस्था याकडे पाहिलें त[र] सर्वांची धडपड आपल्या हातीं सत्तास्थानें ठेवण्याक[डे] आहे. खालपासून वरपर्यंत शीलाचा सर्वत्र अभा[व] दिसून येतो, म्हणून दुःख होतें. भारताची उन्नती शीलाची वृद्धि झाल्यानेंच होईल."

असे उद्गार वाईचे स्वामी केवलानंदसरस्वती यांनीं कऱ्हाड नागरिकातर्फे झालेल्या त्यांच्या सत्कार-प्रसंगीं काढले.

* शीलनं सततक्रिया, सदाचाराचें सातत्य

---

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स-
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव

[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूक्ष्म औषधांचा अनुभव

लेखक-वै. गोविंद रामचंद्र जोशी
आयुर्विद्याविशारद, गडहिंग्लज

आयुर्वेद पत्रिकेंत सूक्ष्मौषधाबद्दल हल्लीं बरीच माहिती प्रसिद्ध होत आहे. त्या विषयींचे माझे कांहीं अनुभव मी पत्रिकेच्या वाचकांस सादर करीत आहे.

अनुपानांची अडचण

मी गेलीं चार पांच वर्षे कांहीं आयुर्वेदीय औषधांचे सूक्ष्म कल्प करून माझ्या खाजगी व्यवसायांत वापरीत आहे. मला रोजच्या व्यवसायांत स्त्रिया आणि विशेषतः लहान मुलें यांना आयुर्वेदीय औषधें देतांना अनुपानाची अडचण भासूं लागली. आल्याचा रस, मध, किंवा तुळशीचा रस आणि मध अशा कडक अनुपानांतून औषधें देतांना उष्ण पडूं लागलीं व वेळेला तीं केव्हां केव्हां मिळतहि नाहींत असें अनुभवास आलें. औषध मधुर व रुच्य असलें म्हणजे तें घेण्याचाहि कंटाळा रोगी करीत नाहीं, म्हणून १० गुंजा औषध व १० तोळे साखर यांचा ६ तास खल करून याप्रमाणें तयार झालेलीं औषधें वापरण्यास मीं सुरवात केली.

याचा उपयोग होत नाहीं

१ गुंज औषध व १० तोळे साखर या सूक्ष्म कल्पांचा उपयोग होत नाहीं, असा माझा अनुभव आहे. या प्रमाणाबद्दल वैद्य प्रतापकुमार यांनींहि आपल्या पत्रिकेच्या गेल्या अंकांत शंका व्यक्त केली आहेच.

सूक्ष्म औषधाची गुणकारी मात्रा

मी सुचविल्याप्रमाणें केलेलें औषध प्रत्ये वेळीं २ गुंजा मात्रेनें दर ३ तासानें ५-६ वेळ द्यावें लागतें. व्याधि लक्षणें कमी झाल्यावर दिवसांतून ३।४ वेळ द्यावें लागतें. म्हणजे यावरून मला असें म्हणावयाचें आहे कीं, आयुर्वेदीय औषधी कल्प प्रमाणानें थोडे (सूक्ष्म नव्हे) व वरचेवर दिलें असतांनाच अपेक्षित गुण येतो. निरनिराळ्या व्याधीमध्यें 'दूष्यं देशं बलं कालं अनलं प्रकृतिं वयः' हें पाहून योग्य मात्रेनें औषध दिलें तरच गुण येतो, असा आजपर्यंतचा अनेक वैद्यांचा अनेक वर्षांचा अनुभव आहे.

होमिओपॅथीप्रमाणें मात्रा नसावी

आयुर्वेदीय कल्प होमिओपॅथीप्रमाणें सूक्ष्म करून देण्याच्या कल्पनेवर आधारलेले नसावेत असें मला वाटतें. कारण १ गुंज औषध व १० तोळे साखर या कल्पाचा गुणाच्या दृष्टीनें फायदा दिसून येत नाहीं. नक्स वामिका या होमिओ औषधाचा जसा तात्काळ गुण दिसतो तसा अग्नितुंडी या आयुर्वेदीय कुचलप्रधान कल्पाचा दिसत नाहीं, उलट १० गुंजा औषध व १० तोळे साखर या मिश्रणाचा उपयोग होतो, असा अनुभव आहे. विद्वान् वैद्यांनीं उपयोग करून पहावा.

ज्वरेतर व्याधींचे अनुभव सांगा

आतांपर्यंत अनेकांच्या लिहिण्यामध्यें लंघनसाध्य चिकित्सेच्या ज्वर अतिसार रोगांचाच, सूक्ष्म औषधें देऊन उपयोग झाला असे उल्लेख दिसून आले. साध्या ज्वरामध्यें औषध दिलें नाहीं तरी आपोआप फक्त लंघनानें ज्वरमुक्ति होते. उत्तर हिंदुस्थानांत तर मुदतीचे ज्वरांत तिकडील वैद्य नाममात्र औषध देतात व लंघनावरच जोर असतो.

लंघनानें दोषांना मार्दव येतें असें शास्त्रच सांगतें. मग सूक्ष्म औषधें देऊन ज्वर गेला या म्हणण्यांत तथ्य नाहीं.

सूक्ष्म औषधासंबधीं

सूक्ष्म औषधें देण्याबद्दल व तीं तयार करण्याच्या पद्धतीबद्दल वैद्यक ग्रंथांत कोठें उल्लेख असलेला मला माहित नाहीं. औषध किती द्यावें याबद्दल भावप्रकाशांत 'अल्पमात्रं बहुगुणं गन्धवर्णरसान्वितम्' याप्रमाणें उल्लेख आलेला आहे. 'मात्रा द्रव्याश्रया युक्तिः' हें वचनहि सर्वप्रसिद्ध आहे.

योग्य मात्रेत औषध द्यावें

आयुर्वेदशास्त्र हें प्रत्यक्ष शास्त्र आहे. दोष द्रव्यादिकांचा विचार करून योग्य मात्रेंत औषध

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिलें तर रुग्णामध्यें तत् तत् व्याधि लक्षणें कमी होतात हा अनुभव सर्वत्र आहे. कोणाचा अधिक्षेप करण्याचा हेतू नाहीं, परन्तु माझ्या व्यवसायांत मला जो अनुभव आला तो मीं थोडक्यांत नमूद केला आहे.

मधमाशा पाळणाऱ्यांची परिषद

महाबळेश्वर येथें मे महिन्यांत ता. ८ ते १० पर्यंत अखिल भारतांतील मधमाशा पाळणाऱ्यांची परिषद भरणार आहे.

स्वागताध्यक्ष— माजी सांगली अधिपति श्री. चिंतामणराव पटवर्धन.

अध्यक्ष— श्री. वैकुंठलाल मेहता.

उद्घाटक— श्री. मुरारजीभाई देसाई.

परिषदेला जाऊं इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनीं व प्रेक्षकांनीं वाहतुकीच्या व महाबळेश्वर येथें राहण्या-जेवणाच्या व्यवस्थेसाठीं रीजनल ऑर्गनायझर, ग्रामोद्योग समिति, पुणें, यांना आगाऊ लिहावें.

विकास योजनेसाठीं महिला संघटक

पंचवार्षिक योजनेंतील समाजविकासाचा कार्य-क्रम, पार पाडण्यासाठीं महिला-समाज शिक्षण-संघटकांची अत्यंत उणीव भासत आहे. या संघटकांना तालुक्याचें गांवीं रहावयाचें असतें, व पगार पदवीधर व बी. टी. शिक्षकांच्या प्रमाणें मिळतो. या क्षेत्रांत काम करूं इच्छिणाऱ्या सुशिक्षित महिलांनीं ' समाज विकास कारभारी मंडळ, नियोजन मंडळ, नवी दिल्ली, या पत्त्यावर अर्ज करावेत. निवड झालेल्या महिलांना नेमणुकीपूर्वीं ५ महिन्याचें शिक्षण देण्याची व्यवस्था आहे. अशीं शिक्षण-केंद्रें ५ आहेत.

वाकेरी भाते

अत्यंत खात्रीचें व ताजे मिळते. १ पौंड २ रु. ट ख. निराळा.

श्रीपाद फार्मसी, पो. पेण (कुलाबा)

होमिओपॅथिक एक्झामिनर कोर्ट

डॉ. गिल्डर यांची नेमणूक

मुंबई सरकारनें मुंबई होमिओपॅथिक कायद्या-नुसार, कोर्ट ऑफ अेक्झामिनर्स, स्थापन केलें आहे. मुंबई सरकारचे सर्जन जनरल हे या कोर्टाचे अध्यक्ष असून इतर सहा सभासद पुढीलप्रमाणें आहेत:—

श्री. एम्. एन्. परांजपे बी. एस्सी., श्री. बी. दासगुप्ता, एच्. एम्. बी., श्री. एस्. आर. पाठक, एम्. बी. बी. एस्., श्री. एम्. डी. डी. गिल्डर एम्. एम्. अेस्., एफ्. आर. सी. अेस्., अेम्. डी., मुंबईच्या होमिओपॅथिक हॉस्पिटलाचे ऑनररी चीफ मेडिकल ऑफिसर, मुंबइ जे. जे. ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सचे सुपरिंटेंडेंट. यापैकीं पहिले तीन सभासद सरकारनें नियुक्त केले आहेत.

परीक्षक नेमणें, परीक्षा घेणें आणि अभ्यास-क्रमाबाबत बोर्डामार्फत राज्य सरकारला शिफारसी करणें हें कोर्ट ऑफ एक्झामिनरचें काम आहे.

.... गौरव ....

आपण आयुर्वेदिक औषधांचा गौरव वाढविला पाहिजे. ती एक आपल्या हिताची गोष्ट आहे आपण प्रत्येक औषधी द्रव्य अस्सल पैकीं व ताजें वापरून सिद्ध औषधें बनविलीं पाहिजेत. अशीं उत्कृष्ट औषधी द्रव्यें मिळवण्या-करितां आपणः—

दि ऑल इंडिया करीयाणा स्टोर्स

पायधुनी मुंबई नं. ३

(टेलिफोन नं. ३१८५८) यांना लिहा.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचं

मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात.

अधिक माहितीसाठीं कॅटलॉग मागवावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चीनची किमया [CHINA JOSS*] :

लेखकः- वै. ज. के. सबनीस
मुंबई (तत्पूर्वी नागपूर)

नुकतेच इंग्लंडचे सुप्रसिद्ध डॉक्टर सर फिलिप मॅन्सन-बार (Sir Philip Manson Bahr C.M.G. D.S.O. M.D. F.R.C.S. (Eng) D.T.M. H. (Lond) यांचे ता. ३१-१-५४ रोजी मुंबईस सेंट झेवियर कॉलेजमध्ये एक सुश्राव्य व माहितीपूर्ण व्याख्यान झालें. अध्यक्षस्थानीं मुंबईचे सुप्रसिद्ध डॉ. ए. जे. कोहियार M.D. (Lond) MRCP (Lond.) हे होते. विषय " ग्रहणीचे विकार व त्यांची चिकित्सा " (The Sprue Syndrome and its Treatment) असा होता. विषयाच्या ओघांत सरसाहेबानीं आयुर्वेदीयांस विशेष महत्त्वाची अशी खालील माहिती सांगितली.

" कलकत्ता स्टूल "

सरसाहेबांचे सासरे थोरले डॉ. मन्सन, Tropical Medicine या विषयावरील पुस्तकाचे मूळ लेखक (त्यांच्या निधनानंतर अलीकडील आवृत्त्या सर फिलिप यांनीं म्हणजे जावयांनीं संपादित केल्या आहेत) हे सुमारें ६०-६५ वर्षांपूर्वी चीनमध्यें शांघाय कीं हाँगकाँगला डायरेक्टर जनरल (ऑफ् दि मेडिकल सर्व्हिसेस्) होते. त्या काळांत पूर्वेकडे येणाऱ्या युरोपियन मंडळींत या रोगाचें प्रमाण बरेंच असे. या रोगांत सामान्यतः अपक्व पण केव्हां पक्वहि मलाचें अतिसारण (वाग्भट, निदान ८ १६।१८) होत राहातें. कमोड वा बेडपॅन (Commod or Bed Pan) भरून मळ बाहेर ओसंडू पाहतो अशा मळास त्या काळांत लंडनच्या इस्पितळामध्यें 'Calcutta Stools' असें नांव प्राप्त झालें होतें. (Sprue) हें नामाभिधान तेव्हां नव्हतें. हा शब्द मूळचा डच भाषेतला (हॉलंडचा) असून डच मेडिकल सर्व्हिसच्या डॉक्टरांनीं इंडोनेशियांत त्याचा प्रथम वापर सुरू केला. असो.

बाई ओळखू येईना

या रोगानें पिडलेली एक युरोपियन बाई फार दिवस (मोठ्या) मॅन्सन साहेबांचें औषध घेत होती. पण कांहींच गुण न दिसतां खंगत चालली होती. पुढें एका शस्त्रकर्मासाठीं साहेबांना १॥-२ महिने चीनमधील दूरच्या गांवीं जावें लागलें. परतल्यावर बाई पाहिली तर ओळखूं येईना. तिचा कायापालट झाला होता. पूर्णतः रोगमुक्त इतकेंच नव्हे तर १०-१२ वर्षांनीं तरुणहि ती दिसूं लागली होती. (Ten years younger). साहेबांनीं विचारलें ही कोणाची किमया तुम्हीं केली ? कोणती देवता प्रसन्न झाली ? यांवर तिनें हांसत उत्तर दिलें कीं, तुम्ही बाहेरगांवीं गेल्याची संधि साधून मी शहराच्या नेटिव्ह भागांत जाऊन एका चिनी वैद्याचें (Joss doctor *) औषध सुरू केलें आहे. व आश्चर्याची गोष्ट अशी कीं, अगदीं पहिल्या दिवसापासून माझी प्रकृति क्रमशः सुधारतच चालली आहे.

वैद्यास पालखी पाठविली

साहेब थक्क झाले व त्यांनीं त्या वैद्यास पालखी पाठवून बहुमानानें भेटीस बोलावलें पण तो भिषग्वर स्वस्थानावरून हालेना. भेटीस आला नाहीं. कोणी रुग्ण अत्यवस्थ असेल तरच जाऊन पाहातो. एरवीं मी बाहेर जात नाहीं असें त्यानें उत्तर पाठविलें. शेवटीं साहेबासच स्वतः उठून त्याचे भेटीस जावें लागलें. व त्यांनीं पुन्हांपुन्हां भेटून व सौजन्यानें वागून त्याचा विश्वास संपादन केला. पार्ट्या, मेजवान्या व व्हिस्कीब्रँडीचीहि रेलचेल उडविली.

* joss म्हणजे अफू. चिन्यांचें अफूचें व्यसन प्रसिद्धच आहे. त्यास उद्देशून चीनच्या प्रत्येक गोष्टीस हिणवण्याच्या बुद्धीनें joss असें उपपद गोरे लोक लावीत असत. आतां चिन्यांनीं अफू टाकून तरवार हातीं धरली आहे व त्या तरवारीचें तिखट पाणी कोरियांत व इतरत्र गोऱ्यांना पाजिलें पण आहे. म्हणून हिणवण्याचे प्रकार चटसारे थांबले आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कावळ्याचें यकृत सुकवून गोळ्या

शेवटीं २-३ महिने गेल्यावर एक दिवस त्यानें सहजच सांगितलें कीं, हें तर अगदींच सामान्य औषध आमचेकडे सर्रास वापरांत आहे. कावळयाचें यकृत् सुकवून त्याच्या गोळया आम्ही करून ठेवतो व जुनाट ग्रहणीक्षयादि रोगांत वापरतो.

५००० वर्षापूर्वीचा प्रयोग

चरकाचार्योनीं ५००० वर्षांपूर्वीच लिहिलें कीं,

प्रसहानां विशेषेण मासं मांसाशिनां भिषक् ।
जीर्णार्शो ग्रहणीदोषशोषार्तानां प्रयोजयेत् ॥

– चरक सूत्र २७-५७

प्रसद प्राण्यांपैकीं जे मांसाहारी आहेत त्यांच्या अंगावयवांचा उपयोग जुनाट अर्श, ग्रहणीचे विकार, क्षयादिमध्यें करावा. यामध्यें कावळा, लांडगा, वाघ, सिंह, चित्ता, मुंगूस, मांजर, ससाणा, गिधाड इ. येतात. लोपाको जम्बुकः श्येनो वान्तादश्चाषवायसौ।

– चरक सूत्र २७.३५

सुश्रुताचार्यांच्या काळीं पण यकृताचा औषधांत उपयोग चालू होता असें दिसतें. 'यकृद्वा भक्षयेत्' ......इ. इ. सुश्रुत उत्तर. ४५।२८

त्यानंतर लिव्हर एक्स्ट्रॅक्ट निघालें

अशा रीतीनें यकृताचा औषधी उपयोग पाश्चिमात्यास ज्ञात झाला. नंतर त्यांनीं विविध प्राण्यांच्या यकृतापासून Liver Extract व त्यापासून निघणारी B. Complex मध्यें गणना असलेलीं व्हिटामिनें तयार केलीं. पैकी B 12 हें अगदीं अलिकडील आहे. पुढेंहि अन्वेषण त्यांचें चालूंच आहे, असो.

युरोपांत आयुर्वेदाचा अभ्यास चालू

तात्पर्य असें कीं, अशा रीतीनें उपयुक्त ज्ञानाची देवघेव वेगवेगळ्या भूप्रदेशांतल्या शास्त्रज्ञात पुरातन कालापासून होत आली आहे व पुढेंहि होत राहील हें निस्संशय. आजहि युरोप अमेरिकेंत आयुर्वेदाचा व इतर पौर्वात्य शास्त्रांचा अभ्यास चालू आहेच. केवळ औषधींचा नव्हे तर निदानतंत्रें व दिनचर्या ऋतुचर्यादिकांचा पण. (Hygiene) साथसाथ ॲलोपाथीहि प्रगत होत आहेच. पण त्यांच्या या प्रगत व प्रगतिशील जमान्यांतहि ज्या शास्त्रज्ञांच्या व अभ्यासूंच्या वैयक्तिक वा सामुदायिक दीर्घोद्योगाचें फलस्वरूप ही प्रगति आहे, अद्यापैकीं कोणीहि पाश्चिमात्य तज्ज्ञ शास्त्रज्ञ वा उभयशास्त्रकोविद असें म्हणत नाहीं कीं, आतां आमची ॲलोपाथी फार पुढें गेली, तुम्ही पौर्वात्यांनीं यापुढें तुमच्या देशी वैद्यक--पद्धतीवर त्यांचे वेळ व पैसा दवडणें निरर्थक ठरणारें आहे. त्यापेक्षा पूर्णतया ॲलोपाथीचा स्वीकार करावा हेंच श्रेयस्कर.

जगास मार्गदर्शक गोष्टी

उलट डॉ. सर केनेथ वॉकर F. R. C. S. इंग्लंडच्या राजघराण्याचे सर्जन (Sir Kenneth Walker F. R. C. S.) यांच्यासारखी मंडळी भारतीय वैद्यांस असें आवाहन करतांना दिसतात कीं, " आतां तुम्ही स्वतंत्र झाला आहांत, तुमच्या पुरातन शास्त्रांत अखिल जगतास मार्गदर्शक ठरण्यासारख्या ज्या अनेक गोष्टी आहेत, त्या दुनियेस उपलब्ध करून देण्याची जबाबदारी यापुढें तुमचेवर आहे, "

" Now that India has obtained

कोर्सपेक्षांहि उपयोगी !

" मला कोर्स करूनहि जें यश प्राप्त होऊं शकलें नाहीं, तें यश आपल्या इंजेक्शनविषयक ग्रंथांनीं मला प्राप्त करून दिलें आहे. या उपकाराबद्दल मी आभारी आहे. "

डॉ. डी. एम्. मूर्तिजापूरकर
भांबेरी (अकोला)

सचित्र इंजेक्शन विज्ञान किं. ६ रु. | ट. खर्च
इंजेक्शन-चिकित्सा किं. ६ रु. | निराळा

प्राप्तिस्थानें-१ वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक
२ सुबोध वैद्यक ग्रंथमाला
कागल (कोल्हापूर)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Independence...She has much to give us out of her store of ancient Learning."

चालू एप्रिलच्या अखेर न्यूयार्क येथें सर्पगंधा या आयुर्वेदीय वनस्पतीचे गुणधर्म वगैरे निश्चित करण्यासाठीं (अॅलो. पारिभाषेमध्यें व प्रणालीनुसार) अखिल विश्वांतील या विषयांवरील अभ्यासूंची चर्चा परिषद (World Seminar) भरली होती.

अनाहूत व विनामूल्य भाटगिरी

ही झाली पाश्चात्य अभ्यासाची गोष्ट. आतां ऐका, पूर्वपश्चिमेंत कोठेंच प्रगतीस स्वतः हातभार न लावतां केवळ पश्चिमी प्रगतीची अनाहूत व विनामूल्य भाटगिरी करणाऱ्या एतद्देशीयांचे (unsolicited and unpaid Propagandists)

श्रीमती अमृतकुंवरचें भाषण

"आधुनिक चिकित्सा प्राणाली (Allopathy) इस हदतक प्रगति कर चुकी है और मानव कल्याणके साधन और तरीके उसके पास इतने अधिक है कि उसके स्थानपर आयुर्वेद या अन्य किसी चिकित्सा प्रणालीको प्रतिष्ठित करनेका प्रश्नही नहीं उठता। .... जब मिस्र (Egypt) और चीन (China) जैसे प्राचीन देशोंने आधुनिक चिकित्सा प्रणाली (Allopathy) अपनी राष्ट्रीय चिकित्सा सेवाका आधार बनाया है तब भारतमें अन्य किसी चिकित्सा प्रणालीका आश्रय लेना अक्षम्य अपराध होगा।"

[राजकुमारी अमृतकुंवरजीका बनारस हिंदु विद्यापीठ के आयुर्वेद कालेजमें भाषण]

हिंद आरोग्यखात्याचा अक्षम्य अपराध

आधुनिक वैद्यकांतले "मानव कल्याणके साधन और तरीके" जे उपयुक्त व उपद्रव रहित ठरतील ते स्वीकारावयास शास्त्रसेवक सदैव तयार आहेतच. पण देशी व पौर्वात्य वैद्यकांतहि असे कांहीं 'मानव कल्याणके साधन और तरीके' असूं शकतात; किंबहुना ते आहेत कीं नाहींत याचा विचार वा चौकशी स्वतः तर करावयाची नाहीं. दुसरे कोणी आयुर्वेदीयांच्या संस्था वगैरे करीत असतील तर त्यांचाहि हिरमोड करावयाचा. प्रांतिक सरकारें या बाबत थोडेंफार कार्य करीत करवीत असतील तर त्यांच्यावर गुरगुरावयाचें, असली जी नीति भारतसरकारच्या आरोग्य (!) खात्याची दिसून येते, तो अपराध मात्र अक्षम्य वाटतो खरा.

ही गोष्ट खरी आहे काय !

शिवाय नव चीननें तरी आपल्या पुरातन वैद्यकाचा त्याग करून सर्वस्वी अॅलोपाथी स्वीकारली आहे ही गोष्ट खरी काय ! राजकुमारीजींची कांहीं गैरसमजूत तर नाहींना ! क्षणभर असेंहि धरून चाललें कीं, राजकुमारी म्हणतात त्याप्रमाणें वस्तुस्थिति चीनांत आहे. असल्यास चिन्यांच्या हातून ही चूक होत आहे असें पुढें न ठरेल कशावरून ! म्हणून आम्हीहि अशा चुकांचा किता गिरवावा काय ! आजवर आम्ही वैद्यकीय क्षेत्रांत इंग्रजांच्या चुकांची बरीच नक्कल केली. त्याचीं फळें भोगत आहोतच. यापुढें या सत्वहीन समाजांत रशिया, चीनच्या चुकांच्या पुनरावृत्त्या निघणार काय ! आम्हीं शेवटपर्यंत असें परप्रत्ययनेयच राहाणार काय ! स्वजनांचें बरेंवाईट नीटपणें हेरून तदनुसार धोरण आंखून अमलांत आणण्याची पात्रता आमच्यांत कधींच येणार नाहीं कां !

भारताचें स्वतंत्र धोरण हवें

परराष्ट्रीय संबंधांत पं. नेहरूंनीं भारताचें स्वतंत्र धोरण आंखून बरेंच यशस्वी केलें आहे. (foreign policy) त्यांच्याच सरकारांतला आरोग्यविभाग असा हीन, दीन, दुबळा, स्वत्वपराङ्मुख व परोपजीवी काय म्हणून ! १०० वर्षांहून अधिक काळ अॅलोपॅथीचें शिक्षण या देशांत चालू आहे. तरीहि आमच्या देशांतल्या वैद्यकीय (Allpathic) शिक्षणाचा दर्जा अगदींच कुचकामी आहे, तो उंचावण्यास आम्हांस मदत करा म्हणून W.H.O. कडे तोंड वेंगाडण्याची पाळी राजकुमारीजींच्यावर येतें याचें मर्म काय !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार—

जलवेतस बीज

आपण गतवर्षी शिर्डीला आलांत त्यावेळीं जलवेतससंबंधीं चर्चा झाली. ती शेवटीं जलवेतस म्हणजे अमूक असें ठरलें नाहीं, तरी आपण वेताचें बी पाहण्याची इच्छा व्यक्त केल्यावरून मुद्दामच बरेंच लांब प्रदेशांतून तें मागवून आपणाकडे पाठवीत आहे. आपण पाहून आपणास शक्य असलेल्या आधारें निर्णय करून पहावा व परिणाम यथावकाश मला कळविणेची कृपा करावी. अनुभविक रीत्या माहिती न मिळाल्यास प्रत्यक्ष त्यांचा वापर करून जो कांहीं अनुभव कालांतरानें ठरेल तोहि कळवावा. रोग्यावर वापरून पाहणें हा अत्यंत श्रेयस्कर व खात्रीचा मार्ग होय.

अन्वर्थक उद्देश

लक्ष्मीविलासगुटी ही अन्वर्थक उद्देशासाठीं निर्माण झाली. त्यांत सांगितलेलीं बीजें ही शुक्रवर्धक प्रेरक या हेत्वर्थ उपयोजिलीं असावीत, करितां या वेताच्या बिया कोणी नपुंसकांस अगर अतिकाम्यास उत्तेजक अशा हेतूसाठीं उपयोजून फळ मिळाल्यास वेताच्या बियांचें स्थान ठरवितां येईल. आपण सुज्ञ आहातच. आपणास योग्य वाटेल तो मार्ग अवलंबून निश्चय करणें ही विनंति

एक साधारण अभिप्राय

वेताच्या बाबतींत माझा एक साधारण अभिप्राय कळवीत आहे. त्याचाहि विचार करून कळविणें. हिज्जलो जलवेतसः। असें म्हटलें आहे. हिज्जल म्हणजे समुद्रफळ असें नक्की ठरलेलें आहे. करितां जलवेतसाचे ठिकाणीं समुद्रफळ वापरणें योग्य. मी त्या योगांत समुद्रफळ वापरतो. —वैद्य ग. नि. पटवर्धन

....सुपारी....

हिंदुस्थानांत २१०००० मण सुपारी होते व ९१०००० मण सुपारी बाहेरून आयात केली जाते. आजवर ३९ तोळे वजनाच्या सुपारीवर ३८ पैसे कर होता. तो आतां ४० तोळे सुपारीवर ६४ पैसे कर झाला आहे. ४० तोळे सुपारीची आजची मूळ किंमत ६ आणे आहे. ही सुपारी सध्यां ५ रु. शेर विकली जात आहे. इतका भयंकर कर दुसऱ्या कोणत्याहि पदार्थावर नाहीं.

षड्‌रसापैकीं तुरट या आवश्यक रसाचा नित्योपयोगी पदार्थ या दृष्टीनें सुपारीवर एवढा कर असणें अत्यंत अयोग्य आहे.

तर्कशुद्ध लेख

आयुर्वेद-पत्रिकेचा १५ एप्रिल ५४ चा अंक साभार पावला. दिवसेंदिवस पत्रिकेंत शास्त्रीय, उपयुक्त तसेच तर्कशुद्ध लेख वाढूं लागले आहेत, त्याबद्दल अभिनंदन. "रोगोत्पत्ति दोषवृद्धिजन्यच असूं शकते" हा शुद्धाआयुर्वेदीय दृष्टीचा लेख उत्कृष्ट वाटला. इतकें तर्कशुद्ध विवेचनाबद्दल वैद्य अष्टीकर अभिनंदनास पात्र आहेत. आयुर्वेदाच्या शास्त्रीय भक्कम पायाचें किंचित्‌दर्शन होतें. शिक्षित समाजाचे या आपल्या उपेक्षित पण उपयुक्त पुराण्या शास्त्राबद्दलचे गैरसमज दूर होण्यास असे लेख येतील तेवढे थोडेच. असो.

डॉ. अमूल देसाई यांचा लेखहि उपयुक्त असून योग्य वेळीं प्रसिद्ध होत आहे. श्वेत-ताम्रभस्माबद्दलचा नवा शोधहि विचारणीय वाटतो. आधुनिक शास्त्रीय ज्ञानसंपन्न व्यक्तींशीं रेडिओ ॲक्टीव्हिटीबद्दल जरूर विचारविनिमय व्हावा.

वैद्य श्रीमती बोरवणकर यांची निवडक रुग्णचिकित्सा उपयुक्त ठरेल. त्यामुळें लिव्हर एक्स्टॅक्ट्चा दुरुपयोग उघडा पडेल. प्रश्नोत्तरींत जंतविकार निमित्तानें केलेली त्रिदोष प्रकृतीनुसार खाण्यांतील पथ्यापथ्य उपयुक्त आहे. त्यावरून तरी आपल्या नैसर्गिक आवडीनुसार बालपणापासून आहारविहारादि विषयक इच्छेनुसार जरूर खाऊं देणें इष्ट वाटेल. हेंच खा-ते नको हा पालकांचा हट्ट कमी झाल्यास प्रकृति निरामय राहील. असो. असेंच उपयुक्त लेख येऊन पुढेंहि पत्रिका आयुर्वेदोद्धारास महत्त्वाचा हातभार लावील.यांत शंका नाहीं. डॉ. र.कृ.गर्दे.एम्.बी.बी.एस्.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मस्तु

(संग्राहकः — आयुर्वेदाचार्य श्री. कृ. करमरकर, आयुर्विद्याविशारद
आयुर्वेद-सेवा-संघ, नासिक)

स्वस्थ वा रोगी व्यक्तीनें स्वास्थ्यानुवृत्तिकर असें एखादें पेय घेणें आवश्यक असतें. आयुर्वेदानें पेय द्रव्यांचीं गुणकर्में सांगून चिकित्सेंत त्यांचा सर्वत्र उपयोग केला आहे. 'मस्तु' हें अशा द्रव (पेय) द्रव्यांपैकीं एक द्रव्य आहे. मस्तु = दह्यांतील पाणी.

मस्तु हा एक क्षीरकल्प आहे

पूर्ण दूध
|
पूर्ण दही
|

दधिसर (दह्याची साय) (दधिमेद) (दध्नः उपरि भागः सरः ।)	दह्याचा निःस्नेह चक्का (दधिमांस)	दधिमस्तु दह्याचें पाणी (दह्यांतील रस, रक्त) सुजातस्य दध्नः द्रवभागो मस्तु ।

विविध आयुर्वेदिक सिद्धान्तानुसार मस्तूचा विचार

१) पंचमहाभूत सिद्धांत

मस्तु हें पांचभौतिक द्रव्य आहे. तथापि त्यांतील 'आप्' ह्या महाभूताच्या आधिक्यामुळें तें जलस्वरूपी आप्य गुणवान् असें आहे.

द्रवशीतगुरुस्निग्धमंदसांद्ररसोल्बणम् ।
आप्यं स्नेहनविष्यंदक्लेदप्रल्हादबंधकृत् ॥

या आप्यद्रव्यांच्या गुणांपैकीं अनेक गुण त्यांत आहेत. अम्लरस निर्माण झालेलें हें द्रव्य-'अग्नि' व पृथ्वी ह्या पंचमहाभूतात्मक आहे; त्यामुळें दीपक, पाचक, गुरु (बलवर्धक) असें आहे.

२) रसविपाक-वीर्य-प्रभावादि सिद्धांत

रस	विपाक	वीर्य	प्रभाव	समानप्रत्ययारब्ध or विचित्रप्रत्ययारब्ध
अम्ल कषायानुरस (इषत्) मधुरानुरस	मधुरविपाक किंवा अम्लविपाक	शीतस्पर्श उष्णवीर्य लघु	स्रोतःशुद्धिकर विष्टंभजित्	?

असम्ल मस्तूचा विपाक अम्ल; गोड मस्तु मधुरविपाकी आहे. स्पर्शानें शीतवीर्य, कार्यानें उष्णवीर्य, स्वतः पचनाला अतिशय लघु, व शरीरांत लाघव निर्माण करणारें म्हणून लघुवीर्य आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३ दोषधातुमलसिद्धांत

दोषांवर कार्य	धातूंवर कार्य	मलांवर काय
कफनाशक वातनाशक	रसवर्धक रक्तवर्धक मेदपाचक अवृष्य	विष्टभंजित् शकृद्ग्रहनाशक मूत्रल मलभेदक

(४) स्रोतस्सिद्धान्त (स्थानविचार). मस्तु स्रोतसशुद्धिकर आहे.

मस्तूचीं ग्रंथोक्त गुण-कर्में

तद्वन्मस्तु सरं स्रोतःशोधि विष्टंभजिल्लघु —अष्टांगहृदय सूत्रस्थान अ. ५ ॥३४॥ मस्तुचीं गुणकर्में ताकाप्रमाणेंच असून 'सर' स्रोतःशोधि, विष्टंभ नाहींसें करणारे, व 'लघु' हीं गुणकर्मे विशेष आहेत.

तृष्णाक्लमहरं मस्तु लघु स्रोतोविशोधनम् ।
अम्लं कषायानुरसं अवृष्यं कफवातजित् ॥८०॥
आल्हादनं प्रीणनं च भिनत्याशु मलं च तत् ।
बलमावहति क्षिप्रं तथा भक्तस्य रोचकम् ॥८१॥ सुश्रुत सं. सूत्रस्थान अ. ४५

तृष्णानाशक, क्लम म्हणजे मानसिक थकवा नाहींसें करतें. मनाला तृप्ति देते व आल्हाद देते. पण फारसें शुक्रवर्धक नाहीं. अ (किंचिदर्थे ?) वृष्य आहे. म्हणजे किंचित्वृष्यकर आहे. पुरीषाचें भेदन करणारें, तावडतोब बल देणारें व खाल्लेल्याची रुचि वाढविणारें आहे.

अष्टांगहृदयोक्त मस्तूचा उपयोग (अनुक्रमणिका)

(१) कायचिकित्सा (२) बालचिकित्सा (३) शालाक्यचिकित्सा (४) रसायनचिकित्सा.

(१) कायचिकित्सा:- [अ] स्वस्थवृत्त-वर्षाऋतुचर्येंत.

[ब] विरेचनकल्पानुपानः- १, दन्तीद्रवन्तीकल्प; २, तिल्वककल्प; ३, सुधाकल्प.

[क] बस्तिकल्पांत उपयोग.

[ड] चिकित्सास्थानः- १, वातजकास (१६ श्लोक). २, आमज तृष्णा (७५). ३, अर्श अपतां पे (८५); ४, निरामग्रहणीचिकित्सा (२७।२८) ५, गुल्मचिकित्सा (३८।११२) ६, उदरचिकित्सा (७१ ७, कुष्ठचिकित्सा (८७). ८, वातरक्तचिकित्सा (२६). ९, वातव्याधि (२४).

(२) बालचिकित्सा:- १, दंतामयप्रतिषेधी घृत उ. अ. २(४२). २, लाक्षादितैल.

(३) उर्ध्वांगचिकित्सा (शालाक्यचिकित्सा):- १, वर्त्मांचें अतिलेखन झालें तर. २, अंजन (आश्चोतनार्थ) ३, मंथचिकित्सा (वर्ति उगाळून लावणेस).

(४) रसायनचिकित्सा:- १, भल्लातक-रसायनानुपान (८०). २, लशुनरसायनानुपान (११८).

वर्षाऋतुचर्येंत उपयोग

मस्तु सौवर्चलाढ्यं वा पंचकोलावचूर्णितं पिबेत् । अ. हृ. सू. अ. ३

१) दह्याची निवळ + संचळक्षार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१) दह्याची निवळ + पंचकोल (पिंपळी + पिंपळामूळ + चवक + चित्रक + सुंठ) यांचा उपयोग वर्षाऋतूंत स्वास्थ्य कायम ठेवतें.

वातज कासचिकित्सेंत पानपंचक

पिबेच्च कृष्णां कोष्णेन सलिलेन ससैंधवम् ।
मस्तुना वसितां शुण्ठीं दध्ना वा कणरेणुकाम् ॥१६॥
पिबेद्बदरमज्जां वा मदिरां दधिमस्तुभिः । ॥ १७ ॥

१] मस्तु + सुंठ + साखर,
२] मस्तु + बोराची मज्जा
३] मस्तु + दाडिमरस + मदिरा
} वातज कास नाहींसा करते.

दधिमत्वारनालाम्लफलाम्बुमदिराः पिबेत् । २५।३

आमज तृष्णेंत उपयोग [वमनार्थ]

सर्वैरामाच्च तद्वन्त्रीं क्रियेष्टा वमनं तथा ।
त्र्यूषणारुष्करवचाफलाम्लोष्णाम्बुमस्तुभिः ॥ ७५ ॥

[त्रिकटु + बिब्बा + वेखंड + फलाम्ल + ऊनपाणी + मस्तु] ही पिऊन आमज व सान्निपातिक तृष्णेंत वांति करवावी.

अर्शचिकित्सेंत वात-पुरीषानुलोमक पान

अरिष्टं मस्तु पानीयं, पानीयं वाऽल्पकं श्रृतम् ॥ ८९ ॥
धान्येन धान्यशुंठिभ्यां कंटकारिकया ऽ थवा ।
अन्ते भक्तस्य मध्ये वा वातवर्चो ऽ नुलोमनम् ॥

निरामग्रहणी चिकित्सेंत पंचमूलादिघृत तयार करण्यास

पंचमूलाभयाव्योषपिप्पलीमूलसैंधवैः ॥२७॥ तक्रमस्तु सुरामण्डसौवीरकतुषोदकैः ।
कांजिकेन च तत्पक्वमग्निदीप्तिकरं परम् ॥२९॥ शूलगुल्मोदरश्वासकासानिलकफापहम् ।

२) पूतीकपत्रादि चूर्णाचें अनुपान...

पूतीकपत्रगजचिर्भटचव्यवन्हिव्योषं च संस्तरचितं लवणोपधानम् ।
दग्ध्वा विचूर्ण्य दधिमस्तुयुतं प्रयोज्यं गुल्मोदरश्वयथुपांडुगुदोद्भवेषु ॥३८॥

आहाराबरोबर पान म्हणून उपयोग

धान्याम्लं मस्तु तक्रं च यवानीविडचूर्णितम् ॥११॥

उदरचिकित्सेंत

(१) नारायणचूर्णाचें अनुपान—

दधिमण्डेन विट्संगे, दाडिमाम्भोभिरर्शसैः । नारायणचूर्णं देयम् ॥

२) हिंग्वादिक्षाराचें अनुपान—

बिडालपदकं अंतर्धूमं ततः क्षारात् पिबेत् । मदिरादधिमण्डेन जलारिष्टसुरासवैः ॥७३॥

कुष्ठचिकित्सेंत लेपार्थ द्रव

लाक्षारसांजनेलाः पुनर्नवा चैति कुष्ठिनां लेपाः । दधिमण्डयुताः पादैः षट् प्रोक्ता मारुतकफघ्नाः ॥८७॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

—वातरोग चिकित्सेंत—

१) वातरोगचिकित्सोक्त बलातैल तयार करण्याकरितां—

दधिमस्त्विक्षुनिर्यासशुक्तैस्तैलाढकं समैः ॥७४॥

२) वातरक्तचिकित्सेंत परिषेकार्थ उपयोग—

द्राक्षेक्षुरसमद्यानि दधिमस्त्वम्लकांजिकम् । सेकार्थं तण्डुलक्षौद्रशर्कराम्भश्च शस्यते ॥२६॥

—विरेचन कल्पांचें अनुपान—

१) बहावा कल्पाचें अनुपान—

चतुरङ्गुलकषायो वा कषायं पाययेद्धिमम् । दधिमण्डसुरामण्डधात्रीफलरसैः पृथक् ॥३५॥

२) तिल्वक कल्पाचें अनुपान—

शुष्कं चूर्णं पुनः कृत्वा ततः पाणितलं पिबेत् । मस्तुमूत्रसुरामण्डकोलधात्रीफलाम्बुभिः ॥४०॥

३) सुधाकल्पानुपानम्—

मिश्रयित्वा सुधाक्षीरं ततोऽङ्गारेषु शोषयेत् । पिबेत्कृत्वा तु गुटिकां मस्तुमूत्रसुरादिभिः ॥४६॥ क.अ.२

४) दन्तीद्रवन्त्यनुपानम्—

तत्पिबेन्मस्तुमदिरातक्रपीलुरसासवैः ॥५४॥

— बस्तिकल्पार्थ मस्तु—

निकुम्भकुम्भाग्न्युरुबुकधावनीपुनर्नवादारु महच्च पंचकम् ।

फलं च मूत्रे क्वथितं समस्तुघृतं सतैलं लवणानि पंच ॥

निरूहितं धन्वरसेन भोजयेत् । निकुंभतैलेन ततोऽनुवासयेत् ॥ अ. संग्रह

—बाल-रोगचिकित्सेंत उपयोग—

१) दन्तामयप्रतिषेधीं घृत तयार करतांना—

क्षीरमस्तुयुतं हन्ति शीघ्रं दन्तोद्भवोद्भवान् । विविधानामयानेतद्वृद्धकाश्यपनिर्मितम उ.अ.२ ॥१२॥

२) लाक्षादितैल तयार करतांना—

लाक्षारससमं तैलप्रस्थं मस्तु चतुर्गुणम् ॥ ५४।२

शालाक्य- चिकित्सेंत उपयोग

१ पापण्यांचें अतिशय लेखन केलें गेलें तर-

कुर्यान्नेत्रेऽतिलिखिते मृदितं दधिमस्तुना । केवलेनापि वा सेकं मस्तुना जाङ्गलाशिनः ॥१४॥

अर्जुन (अहिरा) धुण्याकारितां

अर्जुने शर्करामस्तुक्षौद्रैराश्चोतनं हितम् ॥ उ. स्था. अ. ११।११

जरा-चिकित्सेंत (रसायनचिकित्सेंत) उपयोग

२) भल्लातकरसायनाचें अनुपान –(दधिसर)

सहामलकशुक्तिभिर्दधिसरेण तैलेन वा । वपुष्करमरुष्करं परममेध्यमायुष्करम् ॥८०॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२) लशुनरसायन प्रयोगांत—

मद्यस्यान्यस्य तक्रस्य मस्तुना कांजिकस्य वा। तत्काल एव वा युक्तं युक्तमालोच्य मात्रया। अ ३०।११८

याप्रमाणें कायवालऊर्ध्वांग रसायन इतक्या अंगांत 'मस्तु' या द्रव्याचा वापर अष्टांगहृदयकारांनीं सांगितला आहे.

आयुर्वेद सेवा-संघातर्फे केलेल्या प्रयोगांचें फल

१) प्रथमच सांगावयास हरकत नाहीं कीं, हे प्रयोग अकालीं केलेले आहेत. वर्षाऋतुऐवजीं 'हेमंत' ऋतूंत केले गेले. कल्पना सुचतांच केले. यामुळें मस्तुप्रयोगाचे कांहीं दुष्परिणाम (पुढें दर्शविलेले) शीतासहिष्णु लोकांत दिसले.

२ त्याचप्रमाणें मस्तूचा वापर करतांना सौवर्चल किंवा पंचकोल टाकावयास पाहिजे होतें. पण एक पेय या दृष्टीनें त्यांत (शर्करा + आलें + कोथिंबीर + मीठ) हीं द्रव्यें टाकल्यानें मस्तूंत अभिष्यदि गुण आलेला दिसला.

प्रमाण	काल	वातकफ प्रकृति	पित्तप्रकृति
१० तोळे	दुपारीं १२ वाजतां जेवणापूर्वी	१ भूक प्रथम मंदावते २ अन्नाची रुचि वाढली ३ शौचास साफ ४ वायु सरतो ५ लघवीला भरपूर होते	१ भूक साधारण मंदावते २ शौचास साफ ४ वायु सरतो ५ लघवीला भरपूर होते
"	सकाळीं ९ वाजतां	१ मानवत नाहीं २ डोकें जड होऊन सर्दी झाली. पडसें आलें ३ भूक मंद झाली	१ विशेष त्रास झाला नाहीं २ दुपारीं भूक चांगली ३ मल बांधून होऊं लागला
"	दुपारीं २ वाजतां	१ त्रास नाहीं २ अधिक झोप येऊं लागली	त्रास नाहीं

वरील प्रयोगावरून अन्नाची रुचि वाढवणें, मलमूत्रप्रवृत्ति साफ करणें. (स्रोतसशुद्धिकर, विष्टंभजित्) वायु सरणें, इ. ग्रंथोक्त गुणकर्में अनुभवसिद्ध झालीं.

व शीतस्पर्शामुळें डोकें जड होणें, पडसें येणें इ. प्रकार वातकफप्रकृतींत (थंड प्रकृतींत) झाले— त्याचप्रमाणें त्यांच्यांत जेवणानंतर (कफकालीं) घेतल्यामुळें गुरुता वाढून मस्तुशर्करापेय निद्राकर झालें, शर्करेचा ता परिणाम असावा. मात्र पचन तावडतोब होऊन भूक संध्याकाळीं चांगली लागली.

'कृश' वा 'स्थूल' दोघांचेंहि वजनांत घट झाली, यावरून स्त्रोतसशुद्धिकरत्व सिद्ध झालें.

प्रयोग व गुणसंग्रहणकार्याचा उद्देश

'मस्तु' सारखें स्रोतसशुद्धिकर उपयुक्त द्रव्य चिकित्सेंतून कमी झालें व व्यवहारांत तें फेकून दिलें जातें त्याचें, महत्व समजून पुनः त्याचा वापर सुरू व्हावा हा उद्देश या लिखाणाचा आहे.

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अध्यापक चर्चा परिषद

म. प्रां. वैद्य संमेलनाचें जादा अधिवेशन ता. २८ मे १९५४ मुंबई येथें भरत आहे. त्याला जोडून आधी सात दिवस अगर नंतर सात दिवस वरील परिषदेची बैठक नाशिक येथें घ्यावी असें ठरविलें आहे. जूनमध्यें आयुर्वेद विद्यालयें सुरू होतील त्यावेळीं अध्यापक मंडळींना परगांवीं ७ दिवस राहणें जमणार नाहीं, व पुनः पुनः प्रवास-खर्च नको म्हणून बैठकीची वेळ वरीलप्रमाणें निश्चित केली आहे.

तरी ज्यांना ज्यांना त्यांत वक्ते अगर श्रोते म्हणून भाग घेणें असेल त्यांनीं आगाऊ पत्रानें तसें कळवून ठेवावें. व व्यवस्था खर्चासाठीं किमान ५ रु. पाठवावेत म्हणजे त्यांची सोय करण्याचा प्रयत्न केला जाईल व त्यांना पत्रानें नक्की तारीख व कार्यक्रम कळविला जाईल.

आयुर्वेद सत्र संघ, नाशिक —बिंदुमाधव पंडित

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलन, अधिवेशन ९ वें. लातूर १९५३

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलन अधिवेशन ९ वें च्या स्वागत सभासदांची सभा पूर्व सूचनेनुसार ठरल्याप्रमाणें रविवार दिनांक १८ एप्रिल १९५४ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां लातूर येथें भरून सभेचा इतिवृत्तांत व आय-व्यय पत्रक सभेपुढें ठेवण्यांत आले. थोडीफार चर्चा व विचारविनिमय होऊन सभेची त्यांस मंजूरी मिळाली.

आय—व्यय पत्रक

स्वागत सभासद फी	रु. १०६१- ६-९	स्टेशनरी	रु. ७०- ९-६
प्रतिनिधी फी	,, २७९-१३-९	छपाई	,, ६७९- ०-३
सन्मान्य देणग्या	,, २१५४-११-६	टपाल व तार खाते	,, २४९-१४-६
स्टॉल भाडे (प्रदर्शनउत्पन्न)	,, १५०- ०-०	प्रवासखर्च	,, ८४४- ५ ३
		प्रचार-प्रसिद्धी	,, ४० ०-०
		भोजन	,, १०३७-१३-०
		समारंभ व सत्कार खातें	,, ३९७-१२-९
		पगार व मजूरी	,, २५७- २-६
		दिवाबत्ती	,, ४८- ०-०
		किरकोळ खर्च	,, १- २-९
		एकूण खर्च	,, ३६२५-१२-३
		शिल्लक	,, २०- ३-९
	रु. ३६४६-०-०		रु. ३६४६- ०-०

हिशोब तपासले, बरोबर आहेत.

वि. वि. झंवर
कोषाध्यक्ष

एम्. बि. खाबानी
एल्. टी. शेटे
हिशोब तपासनीस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शीतपित्तांतील दोषांची अंशांश कल्पना

(लेखकः—वैद्य डी. एस्. अंतरकर, डी. ए. एस्. एफ्. मुंबई १८)

एक एप्रिलच्या आयुर्वेद पत्रिकेमधें प्रसिद्ध झालेल्या शीतपित्तावरील लेखाच्या टिप्पणीमध्यें संपादक महोदयांनीं म्हटलें आहे कीं, लक्षण व उपचार पहातां शीतपित्तांतील दोष कफपित्तात्मक मानले पाहिजेत.

शीतपित्त वातप्रधान, उदर्द कफप्रधान

परंतु शीतपित्त ही व्याधी त्रिदोषात्मक आहे कारण माधवनिदानाच्या मधुकोशटीकेमध्यें "त्वग्दुष्टिदोषत्रयजन्यत्वसामान्यात् कुष्ठानन्तरम् शीतपित्तोदर्दादि निदानम् " असें स्पष्ट म्हटलें आहे. त्रिदोषजन्य असूनहि शीतपित्त वातप्रधान व उदर्द कफप्रधान असा स्पष्ट उल्लेख लक्षणांच्या पृथक्करणावरून केला आहे तो असा.

"वरटीदंशसंस्थानः शोथः संजायते बहिः ।
सकण्डूस्तोदबहुलश्छर्दिज्वराविदाहवान् ॥
वाताधिकं शीतपित्तं उदर्दस्तु कफाधिकः ।" मा.नि.

अत्र कण्डू कफात् तोदो वातात् छर्दिज्वरविदाहाः पित्तात् इति दोषत्रयलिंगम् । अनयोः शीतपित्तोदर्दयोः समानसंस्थानत्वेऽपि वाताधिकं शीतपित्तं कफाधिक उदर्दः । (मधुकोश).

उलटी हें लक्षण पित्ताचें आहे

अर्थात् संपादकांनीं प्रतिपादन केल्याप्रमाणें छर्दि (उलटी) हें लक्षण कफाचें नसून पित्ताचें आहे (खाज) हें लक्षण कफाचे आहे. परंतु व्याधि त्रिदोषात्मक असल्यामुळें कांहीं कफाचीं लक्षणें मिळणें सहाजिकच आहे. तसेंच अम्ल रसामुळें कफपित्तात्मक दोषांची वृद्धी होते, म्हणून या विकारांत अम्ल रस वर्ज्य करावा लागतो असें म्हटलें आहे, परंतु या रोगामध्यें अम्ल रसाचे अत्याधिक सेवन हें एकमेव रोगाचें निदान (कारण) अथवा अनुपशय नसून त्याच्याबरोबर रात्रिजागरण, उपवास वगैरे वातप्रकोपक निदानाचें मुद्दां मूळ लेखांत वर्णन केलें गेलें आहे तसेंच व्रतवैकल्याकरतां केलेल्या उपवासानेंहि रोगाची वृद्धी झाल्याचे लेखांत उद्धृत केलेल्या रुग्णांत पहाण्यांत आलें आहे. शिवाय या रोगांत वायूचा रूक्ष गुण वाढल्यामुळें रूक्ष आहारहि वर्ज्य करावा लागतो. व्याधीमध्यें कफाचें प्राधान्य असतें तर रूक्ष चिकित्सा उपशय झाली असती.

प्रवाळ मधुर असतें

चिकित्सेच्या दृष्टीनेंहि पहातां प्रवालपिष्टी वापरली गेली होती. प्रवाल शुद्ध करून एकवीस दिवसपर्यंत गुलाब पाण्यांत अगदीं सूक्ष्म होईपर्यंत घोटल्यानंतर प्रवालपिष्टी तयार होते. व अशा तऱ्हेनें तयार केलेल्या प्रवालपिष्टीमध्यें पित्तशमनाचाच प्रमुख गुण दिसून येतो. दीपनपाचन वगैरे कफनाशक व थोडे तीव्र स्वरूपाचे गुणधर्म अग्निसंस्कारानें [पुटें देऊन] बनविलेल्या प्रवालामध्यें दिसून येतात. वाग्भटामध्यें प्रवाल, कषायवर्गांत घातलें असलें तरी वरील प्रकारानें बनविलेल्या प्रवालामध्यें पित्तशमनाचाच गुण प्रमुख असतो व तें मधुर असतें. प्रवालपिष्टीचे गुणधर्मांचें विवेचन सिद्धयोगसंग्रह, औषधी गुणधर्मशास्त्र सिद्धौषधिप्रकाश, वगैरे अनुभवाच्या आधारावर लिहिलेल्या पुस्तकांमध्यें अशाच प्रकारें केलें आहे.

तीव्र विरेचन केव्हां द्यावें ?

रक्त दूष्य असतांना तीव्र विरेचन द्यावें लागतें, याच उद्देशानें फक्त इच्छाभेदीचा उपयोग या रोगांत केला गेला होता. एक किंवा दोन गुंजा इच्छाभेदी येणाऱ्या सुंठ मिरीं वगैरे औषधांचा स्वतंत्रपणानें कितीसा प्रभाव होत असेल ही विचार करण्यासारखीच गोष्ट आहे. शिवाय अशा योगांच्या गुणधर्मांचा विचार त्यांच्यापर्वें येणाऱ्या औषधांचा स्वतंत्र, स्वतंत्र विचार करून न केलेलाच बरा. कारण अशा संयुक्त कल्पामध्यें संयोगानें विशिष्ट गुणधर्म येत असतात. व म्हणूनच इच्छाभेदीमध्यें येणाऱ्या जयपालानें तेवढ्याच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रमाणांत स्वतंत्रपणानें दिल्यानें जेवढें कार्य होणार नाहीं, तेवढें इच्छाभेदीनें होतें.

वायु व पित्ताचें प्राधान्य

अर्थात् एकंदर सर्व गोष्टींचा विचार करतां व ग्रंथाधार पाहतां शीतपित्तामध्यें वायु व पित्ताचेंच प्राधान्य असतें. व ज्या कफपित्तप्रधान रोगाबद्दल संपादकांनीं लिहिलें आहे तो शीतपित्त नसून उदर्द आहे. उदर्दाचे रोगी फार प्रमाणांत पहावयास मिळत नाहींत. परंतु अशा रोगामध्यें मात्र सफेत मिरीं वगैरे सारखी कफनाशक चिकित्सा केल्यानें फायदा होतो.

आयुर्वेदासाठीं ५ लाख रुपये

भारत सरकारच्या १९५४—५५ सालच्या अंदाजपत्रकांत वैद्यक खात्यावर ८ कोटी रुपये खर्च धरण्यांत आला आहे. त्यांत आयुर्वेदासाठीं ५ लाख रुपये व अर्वाचीन वैद्यकेवर हिंदी वैद्यकाच्या संशोधनासाठीं १ लाख रुपये रक्कम धरण्यांत आली आहे.

या रकमेपैकीं ४ लाख रुपये जामनगर येथील केंद्रीय संशोधन संस्थेच्या चालू खर्चासाठीं देण्यांत येणार आहेत असें कळतें. याच संस्थेतर्फे एक पोस्ट ग्रॅज्युएट कोर्स सुरू व्हावयाचा आहे. त्यासाठीं १ लाख रुपयाची तरतूद आहे.

ड्रग्ज ॲक्टखालील लायसेन्सें

मुंबई सरकारनें १९४० चा ड्रग्ज ॲक्ट व १९४६ चे बॉम्बे ड्रग्ज रूल्स याखालीं लायसेन्ससाठीं अर्ज करण्याबाबतची मुदत ३१ मे १९४४ पर्यंत वाढविली आहे, तेव्हा या तारखेपूर्वी सर्व औषधांच्या कारखानदारांनीं व विक्रेत्यांनीं आपल्या जिल्ह्यांच्या सिव्हिल सर्जनकडे लायसेन्ससाठीं अर्ज करावा असा त्यांना सल्ला देण्यांत येत आहे.

३१ मे पर्यंत मुदतवाढ

गेल्या १ डिसेंबरपासून ड्रग्ज रूल्स मुंबई राज्याच्या सर्व भागास लागू करण्यांत आले आहेत. त्यावेळीं ज्या भागास वरील कायदा व नियम नव्यानें लागू झाले त्या भागांतील सर्व औषधांच्या कारखानदारांनीं व विक्रेत्यांनीं ३१ जानेवारीपर्यंत लायसेन्स घ्यावीत, असा त्यांना सल्ला देण्यांत आला होता. तथापि अजून सुद्धां जिल्हा भागांतील अनेक विक्रेत्यांनीं लायसेन्ससाठीं अर्ज केले नसावेत. म्हणून वरीलप्रमाणें मुदत वाढ देण्यांत आली आहे.

भंग करणाऱ्यास शिक्षा

ड्रग्ज ॲक्ट आणि बॉम्बे ड्रग्ज रूल्स खालील तरतुदींचा भंग करणाऱ्यांस कायद्यांत सांगितल्याप्रमाणे कैद वा दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा होऊं शकते.

विमानतळावर सत्कार

ता. ४-४-५४ रोजीं मुंबई राज्याचे आरोग्यमंत्री ना. शांतिलालजी शहा बेळगांवीं विमानानें आले होते. त्यावेळीं अखिल भारतीय आयुर्वेदीय डेंटल मिशन तर्फे त्यांचा विमान तळावर सत्कार करण्यांत आला.

आरोग्य मंत्र्याचें उत्तर

उत्तरादाखल भाषण करतांना आरोग्यमंत्री म्हणाले " तुमच्या दंतविज्ञानविषयक चालू कार्याबद्दल पंतप्रधान ना. मुरारजीभाई यांनीं मला सर्व सांगितलें आहे "

नवीन मराठी वैद्यक मासिक

: महाराष्ट्र वैद्यक परिचय :

औषधें, इंजेक्शनें, रोगनिदान, रुग्णपरीक्षा, नवीन शोध वगैरे पाश्चात्य वैद्यकांतील ज्ञान सोप्या मराठी भाषेंतून देणारें एकमेव मासिक " महाराष्ट्र वैद्यक परिचय " ' वैद्यकीय पेशांतील बहुमोल सहाय्यक ' आजच वर्गणीदार व्हा ! वार्षिक वर्गणी ५ रु. (किरकोळ अंकासाठीं आठ आण्यांचीं तिकिटें पाठवावीत.

पत्ता:— संपादक, वैद्य जे. बी. मोकाशी-ठाणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोषक्षीणता व रोग :

लेखक– वैद्य नृसिंहाचार्य बागेवाडीकर
आयुर्वेदचिकित्सक, सोलापूर

रोग म्हणजे काय ? याची व्याख्या आयुर्वेदाचार्यांनीं स्पष्ट केलेली आहे. तसेंच आरोग्य शब्दाचीहि व्याख्या त्यांनीं केली आहे. या व्याख्येप्रमाणें आपण आयुर्वेदीय विचारसरणी मांडणें आवश्यक आहे. असें कोणाहि शास्त्रज्ञांस वाटणें साहजिक आहे. चरकांनीं " विकारो धातुवैषम्यम् " असें म्हटलें आहे. या ठिकाणीं धातुवैषम्य याचा अर्थ वात, पित्त आणि कफ यांचें वैषम्य असें न म्हणतां वातादि दोष, रसादि सप्त धातु आणि त्रिमल यांचें वैषम्य म्हणजे विकार असा अर्थ टीकाकारांनीं केलेला आढळतो. वाग्भटाचार्य म्हणतात विकार म्हणजे दोषवैषम्य. या दोन व्याख्येंत वात, पित्त आणि कफ यांना प्राधान्य दिलें गेलें आहे. धातु शब्दाचा अर्थ 'धारणात् धातवः' असा आहे. वातादि तीन दोष हे अविकृत स्थितींत शरीराचें धारण करतात म्हणून त्यांस धातु अशी संज्ञा दिली. शरीर हें, तीन दोष, रसरक्तादि धातु आणि त्रिमल यांच्या–पासून बनलेलें आहे. पण या त्रयींत दोषांनाच प्राधान्य आहे, कारण दोषांकडूनच धातु आणि मल यांची उत्पत्ति होते. (वातपित्तश्लेष्मणः एव देहसंभवहेतवः) शरीराचे कर्तृत्व दोषांकडेच असल्यामुळें त्यांना प्राधान्य दिलें आहे. एकाद्या धातूची किंवा मलाची उत्पत्ति, स्थिति आणि क्षीणता दोषाकडून होऊं शकते. एकाद्या दोषाची उत्पत्ति, स्थिति आणि क्षीणता धातूकडून किंवा मलाकडून होऊं शकत नाहीं. म्हणून विकारी धातुवैषम्यम् याचा अर्थ दोषवैषम्य असा करणें जास्त बरोबर योग्य व सयुक्तिक वाटते. वाग्भटांनीं रोग म्हणजे दोषवैषम्य असें जें म्हटलें आहे तेंच योग्य आहे असें म्हणणें भाग पडतें.

वरील विवेचनावरून रोग म्हणजे काय याची कल्पना येण्यासारखी आहे. कांहीं विद्वान् वैद्य, धातुवैषम्य म्हणजे केवल रसादि धातूंचें वैषम्य म्हणजे रोग असें म्हणतात. वैद्य पांडुरंगशास्त्री देशपांडे हे धातुवैषम्म म्हणजे रसादि धातूंचें वैषम्य असें म्हणणाऱ्यापैकीं एक आहेत, असें त्यांच्या बोलण्यावरून दिसतें. माझे मित्र वैद्य पांडुरंगशास्त्री देशपांडे यांनीं " दोषक्षीणतेनें रोगोद्भवच होत नाहीं " असें आयुर्वेदपत्रिकेंत प्रसिद्ध केलें आहे. त्यांच्या लिखाणांतून जो उत्तर–पक्ष केला आहे त्यामुळें माझ्या शंकांचें निरसन तर होत नाहींच, उलट त्यांच्या लिखाणामुळें नवीन शंका मात्र उत्पन्न होतात. श्री. वैद्य पां. देशपांडे यांनीं दोषक्षीणतेनें रोगाद्भव होत नाहीं असें जें आपल्या लेखांतून म्हटलें आहे, तें थोडक्यांत पुढीलप्रमाणें मांडतां येईल:—

१ माझ्या लेखांतील विसंगति. २ दोषक्षयजन्य विकाराचा विचार. ३ दोषक्षय म्हणजे तत्प्रत्यनिक दोषांची वृद्धि. ४ दोषक्षयाची व्याख्या. ५ दोषक्षयानीं रोगोद्भव नाहीं.

वै. देशपांडे यांच्या वरील सर्व मुद्यांचा विचार आपणांस या लेखांतून करणें आवश्यक आहे. क्रमाक्रमानीं आपण वरील सर्व मुद्यांचा परामर्श घेऊं.

माझ्या लेखांत विसंगति नाहीं.

क्षयजन्य व्याधींचें निदान व चिकित्सा आयुर्वेदीय निदान—चिकित्सा प्रकरणांत कोठें आहे कां ? असा माझा प्रश्न आहे. याचें उत्तर मींच माझ्या लेखांत दिलें आहे असें श्री. वै. देशपांडे यांना वाटतें. त्यांनीं माझ्या लिखाणांतून कांहीं अर्धवट वाक्यें घेऊन माझ्या लेखांत विसंगति आहे असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. उदा. राजकीय आंदोलनांनीं आयुर्वेदीय वाङ्मय नष्ट झालेलें आहे, त्यांत क्षयजन्य व्याधीसंबंधीं वाङ्मय नाहींसें झालें कां ? याचा विचार होणें आवश्यक आहे. " (आ. प. पान २४२) या माझ्या वाक्यांतील " आयुर्वेदीय वाङ्मय नष्ट झालें आहे " अवढेंच अर्धवट वाक्य घेऊन वैद्य देशपांडे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यांनीं माझ्या लिखाणांत विसंगति आहे हें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. राजकीय आंदोलनांत क्षीणजन्य व्याधींचें वाङ्मय नष्ट झालें कां ? असा मी प्रश्न विचारला आहे. इकडे शास्त्रीबुवांनीं लक्ष द्यावें. माझ्या या प्रश्नाकडे शास्त्रीबुवांनीं दुर्लक्ष कां केलें तें कळत नाहीं. प्रतिपक्षाला चीत करण्यासाठीं कांहीं वादविवादपटु अशा रीतीनें प्रथम घाव घालीत असतात. त्यांतलीच ही एक तऱ्हा आचार्यांनीं अवलंबिलेली दिसते, इतकेंच मला वाचकांना सांगावयाचें आहे. अशा या किरकोळ गोष्टींत मी जास्त वेळ घालवू इच्छित नाहीं, म्हणून हा मुद्दा येथेंच सोडून देतो.

दोषक्षयाचा अन्यत्र असलेला विचार

दोषक्षयाचा विचार प्राचीन आचार्यांनीं निदान-चिकित्सेतर प्रकरणीं केला आहे हें सिद्ध करण्यासाठीं वैद्य देशपांडे यांनीं चरक, सुश्रुत आणि वाग्भट या ग्रंथांतील कांहीं वचनें उद्धृत केलीं आहेत. इतके श्रम त्यांना करण्याचें कारण नव्हतें. क्षयजन्य विकारांचा विचार इतरत्र केला असल्याचें आम्हांस माहीत आहे. याची कल्पना त्यांना माझ्या लिखाणावरून यावयास पाहिजे होती. मी माझ्या लेखांतून दोषक्षयजन्य वि ारांचा उल्लेख उदाहरणादाखल केला आहे. दोषक्षयाचा हाच विचार रोगनिदानचिकित्सेंत कां नाहीं! याचें उत्तर आम्हांस पाहिजे. ज्या ठिकाणीं दोषक्षयाचा विचार केला आहे त्या ठिकाणीं दोषवृद्धीचाहि विचार केला आहे; असें असूनहि निदानांत केवल वृद्धिजन्य विकारांचा विस्तार कां केला ? माझ्या या प्रश्नास वैद्य देशपांडे यांनीं बगल देऊन क्षीणजन्य विकारांचा विचार प्राचीनांनीं केला आहे असें दाखविण्याचा व्यर्थ खटाटोप केला आहे.

वृद्धिजन्य पंचवीस विकल्प व क्षीणजन्य पंचवीस विकल्प आणि मिश्रजन्य बारा विकल्प यांचा विचार निदान-चिकित्सेंत कसा करावा ? याची मांडणी अजूनहि वैद्य देशपांडे यांनीं करावी अशी मी त्यांना विनंति करतो. हा विषय मी केवल वादविवादासाठीं मांडला नाहीं हें त्यांनीं लक्षांत ठेवावें.

दोषक्षीणता व तत्प्रत्यनीक दोष

एकाद्या दोषाची क्षीणता उत्पन्न झाली असतां त्या दोषाच्या विरुद्ध असलेला दोष वाढतो असें वैद्य पां. देशपांडे यांना वाटतें. म्हणून त्यांनीं " दोषक्षय म्हणजे तत्प्रत्यनीक दोषांची वृद्धि " असा मथळा देऊन हा विषय थोडा स्पष्ट केला आहे. त्यांत शास्त्रीबोवांनीं फारसा खोल विचार केला नाहीं असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. एखादा दोष क्षीण झाला असतां इतर दोषांची काय स्थिति असते किंवा शरिरांत कोणतीं लक्षणें उत्पन्न होतात याचें विवेचन चरकांनीं केलें आहे तिकडे आचार्यांनीं लक्ष द्यावें.

वाते पित्ते कफे चैव क्षीणे लक्षणमुच्यते। "कर्मणः प्राकृताद्धानिर्वृद्धिर्वापि विरोधिनाम्" च. सू. अ. १८-५४

या सूत्रांत वात, पित्त आणि कफ क्षीण झाले असतां त्यांच्या प्राकृत कर्मांची हानि होते किंवा विरोधी कर्मांची वाढ होते असें म्हटलें आहे. उदा. वातक्षीणतेंत उत्साहहानि होते किंवा त्याच्या विरोधी कर्म विषाद याची वाढ होते. विरोधि दोषांची वाढ होत नाहीं हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. एखाद्या दोषक्षीणतेंत जर विरोधी दोषांची वृद्धि होते असें मानलें तर एखाद्या दोषाची वृद्धि झाली असतां तत्प्रत्यनीक असलेल्या दोषांची क्षीणता होते असें मानण्याची आपत्ति येईल, ही विचारपरंपरा अशास्त्रीय आहे. एक दोष वृद्ध, दोन सम किंवा दोन दोष वृद्ध, एक सम राहून विकार उत्पन्न करतात, याचप्रमाणें एक दोष क्षीण, दोन दोष सम, किंवा दोन दोष क्षीण, एक दोष सम यामुळेंहि विकार उत्पन्न होतात. ज्याप्रमाणें तिन्ही दोष वृद्ध होऊन सान्निपातिक रोग होतात त्याचप्रमाणें तीन्ही दोष क्षीण होऊन सान्निपातिक रोग होतात असें शास्त्रकारांनीं म्हटलें आहे याची वाट काय ? (यथा वृद्धैस्तथाक्षीणैर्दोषैःस्युः पंचविंशतिः" च. सू. अ. १७)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शास्त्रीबुवांसारख्या कट्टर आयुर्वेदाभिमान्यांनीं तरी इकडे दुर्लक्ष करूं नये असें वाटतें.

माझे मित्र पांडुरंगशास्त्री देशपांडे यांनीं तत्प्रत्यनीक दोषांची वाढ होते असें जें लिहिलें आहे तें कसें अयोग्य आहे, कसें अशास्त्रीय आहे याची कल्पना वाचकांना यावी यासाठीं वरील विवेचन करणें भाग पडलें.

दोषक्षयाची शास्त्रीबुवांनीं केलेली व्याख्या

वैद्य पां. देशपांडे यांनीं दोषक्षयाची व्याख्या पुढीलप्रमाणें केली आहे. "दोषक्षय याचा खरोखर अर्थ वायु, पित्त, कफाची शक्ति कमी होणें असाच आहे" (आ. प. पा. ५४२) ही व्याख्या कशी सदोष आहे याचा विचार करूं. कोणत्याहि द्रव्यांत शक्ति असतेच. द्रव्यांत असणाऱ्या शक्तीचा ऱ्हास किंवा वृद्धि केव्हांहि होत नसते, हा पदार्थविज्ञानशास्त्राचा सामान्य नियम वैद्य देशपांडे यांना माहीत नसावा याबद्दल वाईट वाटतें. कोणत्याहि पदार्थांत (द्रव्यांत) बदल होत असतां त्यांत असणारी शक्ति मुक्त होऊन ती द्रव्याच्या रचनेंत बदल करीत असते. म्हणून या शक्तीस द्रव्याचा धर्म असें म्हटलें आहे. (योग्यता-वच्छिन्ना धर्मिणः शक्तिरेव धर्मः). ही शक्ति स्थावर आणि जंगम द्रव्यांत एकाच प्रकारची असते. वैद्य देशपांडे यांना वात, पित्त आणि कफ या द्रव्यांतील शक्ति कमी झाली म्हणजे ह्या द्रव्यांत क्षीणता आली असें जें वाटतें तें चुकीचें आहे. ह्या द्रव्यांचें शरिरांत विशिष्ट प्रमाण आहे त्यांत ज्यावेळीं कमीपणा येता तेव्हां दोष क्षीण झाले असें म्हणणें योग्य. एखाद्या द्रव्याच्या रचनेंत जेव्हां बदल होतो तेव्हां त्यांच्या गुण-धर्मांत बदल होतो. वैद्य देशपांडे यांच्या व्याख्येप्रमाणें क्षीणतेंत दोषांची शक्ति कमी होते असें मानलें तर दोषांच्या वृद्धींत त्यांची शक्ति वाढते असेंहि मानावें लागेल.

हल्लींच्या शास्त्रीय जगांत जर आपण ही भाषा बोलूं लागलो तर आयुर्वेदाची व प्राचीन पदार्थ-विज्ञानशास्त्राची किंमत शास्त्रीय जगास किती आहे तें कळून येईल. या विचारसरणीमुळें आयुर्वेदाची हानि आपण आपल्या हातानीं करूं इकडे शास्त्रीबुवांनीं सावधानपणें लक्ष द्यावें. आयुर्वेदाची शास्त्रीय भाषा बोल-तांना वैद्यांनीं सावधानपणें ती हाताळावी. दोष क्षीण झाले असतां त्यांच्या प्राकृत कर्मांची हानि होते किंवा विरुद्ध कर्मांची वाढ होते ही चरकाचार्यांनीं केलेली व्याख्या अत्यंत योग्य आहे. शास्त्रीबुवांची व्याख्या चुकीची आणि अशास्त्रीय असल्यामुळें त्याज्य आहे.

दोष क्षयानें रोगोद्भव नाहीं

आचार्य पां. देशपांडे दोषक्षीणतेनीं रोग उत्पन्न होत नाहींत असें निश्चितपणें जाड टाईपांत सांगतात. तरी पण कांहीं रोगांत दोष क्षीण होतात असेंहि त्यांना लिहावें लागलें. उदा. "यांत कित्येकदां एक वा दोन दोष क्षीणहि असूं शकतील व याच वेळीं तो रोग क्षयजन्य आहे असें प्रत्ययास येईल." (आ. प. पा. ५४४) या त्यांच्या विसंगत विचाराचें सूक्ष्म अवलोकन वाचकांनींच करावें.

माझ्या प्रश्नाचें उत्तर नाहीं

दोषक्षयजन्य पंचवीस प्रकार चरकादि आचार्यांनीं सांगितले आहेत. त्यांचा व्यवहार आज कसा करावयाचा असा माझा प्रश्न आहे. याचें उत्तर शास्त्रीबुवांनीं दिलें नाहीं. उलट त्याचें म्हणणें दोषक्षीणतेनीं रोगच उद्भवत नाहींत. दोषक्षीणतेनीं रोग उत्पन्न होत नाहीं हें सुद्धां त्यांना निर्भेळपणें मांडतां आलें नाहीं हें त्यांच्याच वरील उताऱ्यावरून सिद्ध होतें. क्षयजन्य विकार सर्व रोगांत आढळावयास पाहिजेत. असें शास्त्रकारांस म्हणावयाचें नाहीं किंवा मीहि तसें म्हणत नाहीं. ज्याप्रमाणें वृद्धिजन्य पंचवीस प्रकार पाडले आहेत त्याच प्रमाणें क्षयजन्य पंचवीस प्रकार पाडले आहेत, यांचा विचार निदानचिकित्सेंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोठे केला आहे कां ? अशी शंका मी वैद्यवर्गापुढें ठेवली आहे. याचें उत्तर क्षयजन्य रोगच उद्भवत नाहींत असें म्हणणें योग्य नाहीं. कारण चरकासारख्या ग्रंथकारांनीं क्षयजन्य विकार उत्पन्न होतात ह्मणूनच त्यांच्या प्रकाराची मांडणी केली आहे, हें विसरून चालणार नाहीं. चरकांनीं दोषविकल्पज्ञ आणि रसविकल्पज्ञ असा वैद्य चिकित्सेमध्यें कधीं मोह पावत नाहीं असें म्हटलें आहे. म्हणजे वैद्यांनीं रसविकल्पांचा आणि दोषविकल्पांचा अभ्यास करावयास पाहिजे. दोषक्षीणतेनीं जर रोगच उत्पन्न होत नाहींत तर चरकाचार्यांनीं हें सूत्र सांगण्यांत चूक तर केली नाहींना ? आज वैद्य पांडुरंगशास्त्री किंवा त्यांच्या तोडीचे इतर वैद्य रसविकल्पांचा व दोषविकल्पांचा विचार करीत नाहींत हें आम्हांस दिसत आहे. म्हणूनच आम्ही हा विचार वैद्यांचे पुढें ठेवण्याचें धाडस केलें आहे. आज जरी रसविकल्पज्ञ वैद्य आपणांस दिसत नाहींत, तरी यापुढें ते निर्माण होऊं नयेत असें कोणासहि वाटणार नाहीं. क्षीणजन्य विकारच उद्भवत नाहींत म्हणून त्यांचा विचार आजचा अधीत वैद्य करीत नाहीं हें ठीक, पण वृद्धिजन्य पंचवीस प्रकारांचा व्यवहार करणारेहि वैद्य आज सांपडत नाहींत, तसेंच वृद्धिजन्य पंचवीस प्रकारांचें विवेचन निदान-चिकित्सेंत कोणत्याहि ग्रंथांत केलेलें आढळत नाहीं ही दुर्दैवी घटना आहे. या दुर्दैवी घटनेस चिकटून त्याचें समर्थन करणारा वैद्यवर्ग वैद्यसमाजांत आहे हें पाहून मन उद्विग्न होते. असो, हा वर्ग कांहींही म्हणो ! कसेंही वागो ! नवीन व संशोधक वैद्यांनीं तरी रसविकल्पज्ञ आणि दोषविकल्पज्ञ व्हावें आणि आयुर्वेदाचा उद्धार करावा अशी इच्छा व्यक्त करतो.

चिकित्सा करीत असतां दोषवृद्धींचा विचार जसा करावयास पाहिजे तसाच क्षीण दोषांचाहि विचार करावयास पाहिजे असें चरकाचार्यांनीं सांगितलें आहे. दोषप्रकृतिवैशेष्यं नियतं वृद्धिलक्षणम् । दोषाणां प्रकृतिर्हानिर्वृद्धिश्चैवं परिक्ष्यते च. सू. अ. १८-५५

हा श्लोक दोषांच्या वृद्धीचा विचार करीत असतां चरकांनीं सांगितला आहे. यांत दोषांची प्रकृति, हानि, आणि वृद्धि यांचा विचार चिकित्सकांनीं करावा असें म्हटलें आहे. यावर गंगाधर टीकेंत पुढीलप्रमाणें स्पष्टीकरण करतो.:- एतैः क्षीणलक्षणैः दोषाणां हानिः परीक्ष्यते । एतैश्च वृद्धिलक्षणैर्दोषाणां वृद्धिः परीक्ष्यते अनुमानादिभिः॥ (च. सू. अ. १८-४६ पान ७४९)

दोषांच्या वृद्धीमुळेंच रोग उत्पन्न होतात असें जर मानलें तर क्षयजन्यामुळें उत्पन्न होणाऱ्या व्याधींनें रोगी मृत्युमुखीं पडतील त्याची वाट काय ? रोगीअवस्थेंत किंवा निरोगी अवस्थेंत दोषांची वृद्धि आणि क्षीणता येऊं देऊं नये असें वाग्भटहि म्हणतो. य एव देहस्य समाविवृध्यै त एव दोषा विषमा वधाय। यस्मादतस्ते हितचर्ययैव क्षयाद्विवृद्धेरिव रक्षणीयाः॥वा. सू. अ. ११-४५

जे दोष समस्थितींत देहाची वाढ करतात तेच विषमावस्थेंत देहाचा नाश करतात, म्हणून हितकर आहारविहारांनीं वृद्धीपासून जसें शरीराचें रक्षण करावें लागतें तसेंच क्षयापासूनहि करावें. वरील विचार वाग्भटांनीं दोषविज्ञान अध्यायांत मांडले आहेत, केवळ दोषवृद्धीनेंच विकार उत्पन्न होत असते तर क्षयाचा विचार करावयास वाग्भटानें कां सांगितलें ? याचें उत्तर वैद्य देशपांडे यांनीं दिल्यास बरें होईल.

दोषवैषम्य म्हणजे काय याचें स्पष्टीकरण अरुणदत्तानें केलें आहे इकडे वाचकांनीं लक्ष द्यावें. त एव दोषा विषमाः स्वप्रमाणादधिका हीना वा सन्तः वधाय देहविघाताय स्युः ॥

वात, पित्त आणि कफ हीं शरीरस्थ द्रव्यें आहेत, यांचें शरीरांत विशिष्ट प्रमाण आहे. या प्रमाणांत ज्यावेळीं वाढ होते त्यावेळीं वृद्धिजन्य विकार उत्पन्न होतात. यांस चय अशी संज्ञा शास्त्रकारांनीं दिली आहे यानंतर प्रकोपादि अवस्था उत्पन्न होतात. क्षयजन्य अवस्थांत दोषांच्या आशयांतच त्यांचें प्रमाण कमी होतें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यामुळें क्षयजन्य दोषांकडून त्यांच्या प्राकृत कर्मांची हानि होते. ही हानि म्हणजेच विकार होत. या विकारां-नीहि देहाचा नाश होतो. उदा. पित्त क्षीण झालें असतां अग्निमांद्य निर्माण होते. यांस रोग म्हणावयाचें नाहीं कां ? पित्तक्षीणतेनीं उत्पन्न झालेलें अग्निमांद्य रोग नाहीं असें वैद्य देशपांडे म्हणणार. हें लक्षण आहे असें त्यांचें उत्तर कदाचित् येईल. वृद्धीजन्य म्हणून जे विकार सांगितले आहेत तेहि या विचाराप्रमाणें लक्ष-णच होऊं शकतील. उदा. वाताचे ८० विकार, ग्रंथांतरीं लिहिले आहेत, त्यांतील पादसुप्तता हा एक विकार आहे असें आज तरी आपण मानतो. यांस जर लक्षण म्हणून संबोधिलें तर तें शास्त्रसंमत होईल कां ? याचा विचार शास्त्रीबुवांनीं करावा.

क्षीणजन्य दोषांकडून उद्‌भवणारे रोग

हल्लीं पित्तक्षीणतेनीं क्षीण होत चाललेले रोगी पहावयास मिळतात. त्यांच्या ठिकाणीं पुढील लक्षणें दिसतात. भूक न लागणें, चेहरा फिकट, शरीर थंड वाटणें, अन्नाचें पचन न होणें, रक्तक्षीणता इ. या रोग्यांत पित्त क्षीण झाल्यामुळें हीं लक्षणें उत्पन्न झालेलीं असतात. या रोग्यास पित्तवर्धनात्मक चिकित्सा केली असतां रोगी बरा होतो. पित्त क्षीण असतां अग्निसमानगुणात्मक द्रव्यें देण्यास सांगितलें आहे. (क्षीणे ह्यग्निगुणे तत्समानद्रव्यो पयोगादतिवृद्धे, सु. सू. अ. २१-८) या अवस्थेंत अग्निसमान द्रव्यांचा उपयोग केला गेला नाहीं तर पित्ताच्या पांच प्रकारापैकीं रंजक, साधक आणि भ्राजक पित्ताची क्षीणता येते. कारण पाचक पित्ताच्या अनुग्रहावरच या पित्तांचें कार्य अवलंबून असतें. पाचक पित्तच क्षीण असल्यामुळें रंजकादि पित्तें क्षीण होतात. त्यामुळें रसाचें रंजन होत नाहीं म्हणून रक्त क्षीण होऊन पंडुरोग उत्पन्न होतो. रक्तधातु क्षीण झाल्यामुळें आम्ल द्रव्याची इच्छा रोग्यास होते. या अवस्थेंत अम्ल, लवण, कटु रसांचा, व क्षार, तीक्ष्ण, उष्ण द्रव्यांचा उपयोग करावा लागतो. (पित्तक्षयेऽम्लवणकटुक्षारोष्णतीक्ष्णानां उपयोगः) या चिकित्सेनीं रोगी बरा होतो असा अनुभवहि येतो.

दोषक्षीणजन्य पांडु व दोषवृद्धिजन्य पांडु

हल्लींच्या उपलब्ध ग्रंथांत पांडुरोगाचें जें वर्णन आहे तें केवल पित्तवृद्धिजन्यात्मक व्याधीचें आहे. पांडुरोगाच्या कारणांत पित्तप्रकोपात्मक कारणांचाच विचार केला आहे. व संप्राप्ति वृद्धिजन्यच आहे. या ठिकाणीं चिकित्सा ही मधुर-तिक्त-रसात्मक करावी लागते. आम्ल, लवण, कटु रसात्मक जर केली तर पांडुरोग बरा होणार नाहीं. कारण हे रस पित्तप्रकोपात्मक आहेत. पित्तक्षीणजन्य पांडुरोगी आज आपणांस पाहावयास सांपडत असल्यामुळें त्यांच्या कारणांचा, संप्राप्तीचा व चिकित्सेचा विचार करणें योग्य आहे. पित्तक्षीण होण्याचीं कारणें पुढीलप्रमाणें आढळतात. आहारांत आम्ल, लवण, कटु रसांचा अभाव हें महत्वाचें कारण आहे. या कारणांनीं पाचकपित्त प्रथम क्षीण होतें व नंतर रंजक पित्त क्षीण होऊन पांडुता येते.

पित्तक्षीणजन्य पांडुरोगाची चिकित्सा

वृद्धिजन्य पांडुरोगांत आम्ल रसाचें अतिसेवन, तीक्ष्ण-उष्ण द्रव्यांचा अति उपयोग, या कारणांनीं पित्त प्रकुपित (वृद्ध) होऊन पांडुता येते. पांडुता हें एकच लक्षण दोन परस्पर विरोधी कारणांनीं उत्पन्न होतें इकडे वैद्यांनीं लक्ष देणें आवश्यक आहे. रोगाच्या सम्यक् ज्ञानासाठीं पांच ज्ञानोपाय सांगितले आहेत. त्यांत निदान (कारणें) हा एक महत्वाचा ज्ञानोपाय आहे. आपण जर कारणांचा विचार केला नाहीं तर रोगाचें खरें स्वरूप आपणांस कळणार नाहीं, व आपण रोग्यांस रोगमुक्त करूंहि शकणार नाहीं. रोगकारणांचा विचार चिकित्सेंत करावा लागत असल्यामुळें, या दोन पांडुरोगांत कारणभिन्नत्वानें चिकित्सा निरनिराळी

CC-0. In Public Domain: Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करावी लागेल. पित्तक्षीणजन्य पांडुरोगांत आम्ल, लवण, कटु रसात्मक व तीक्ष्ण, उष्ण गुणात्मक द्रव्यें यावीं लागतात, तर पित्तवृद्धिजन्य पांडूंत मधुर, तिक्त रसात्मक व शीत गुणात्मक द्रव्यें यावीं लागतील. (कषाय-तिक्तमधुराः पित्तं घ्नन्ति) पित्तक्षीणजन्य पांडूचा विचारच आपल्या डोळ्यापुढें आज नसल्यामुळें व्यापक पांडुरोग म्हटला कीं, पित्तविरुद्ध चिकित्सा ही आरंभ करणार; मग तो पांडु क्षीणजन्य कां असेना ! या दोन चिकित्सेंत असा भेद असल्यामुळें पांडुरोगाच्या निदानांत आपणांस भर टाकावयास पाहिजे असें मला वाटतें. तरी विद्वान् वैद्यबंधूंना माझ्या या विचारांत कांहीं तथ्य आहे असें वाटत असल्यास ते हंसक्षीरन्यायानें ग्रहण करतील.

माझ्या वरील विवेचनावरून वैद्य पां. देशपांडे यांच्या व इतर विद्वान् वैद्यमंडळींच्या हें लक्षांत येईल कीं, दोषक्षयानींहि रोग उत्पन्न होतात व त्याची चिकित्साहि करतां येते. या विषयावर आणखी बरेंच लिहितां येण्यासारखें आहे. ते सवडीनुसार प्रसिद्ध करण्याचें आश्वासन वाचकांना देत आहे.

कंदर्पवृष्यपाक व वंध्यत्व

आयुर्वेद सेवा संघानें विशेष रूढ केलेल्या कंदर्पवृष्यपाकाविषयीं विशेष माहिती वेळोवेळीं प्रसिद्ध झाली आहे. खानदेशांतील एका दूरच्या खेड्यांत राहणाऱ्या शेतकऱ्यानें पूर्व सूचना न देतां संघास भेट दिली. १९५२ सालच्या प्रारंभीं तिकडील एका वैद्याच्या सल्ल्यानुसार सेवा संघाकडून त्यानें कंदर्पवृष्यपाक १ शेर व कंदर्पवृष्यवटी १ तोळा व्ही. पी. नें मागविली होती. त्या व्ही. पी. सोबत गेलेलें कार्ड त्यानें दाखविलें. रोज सकाळीं १ वडी दुधाबरोबर व रात्रीं २ गोळ्या दुधाबरोबर याप्रमाणें ४०–४५ दिवसपर्यंत पतिपत्नी उभयतांनीं त्या वड्या व गोळ्या खाल्ल्या.

उत्साह व हुषारी वाढली

पौष्टिक कल्प घेत असतांना त्यांना जीवनांत आनन्द वाटूं लागला. उभयतांचा उत्साह व हुषारी वाढली आणि पुढील ३।४ महिन्यांत पत्नी गर्भिणी राहिली. पतिपत्नींचें वय अनुक्रमें ४०–३८ असें होतें. एवढ्या वयापर्यंत यापूर्वी कधींच गर्भधारणा झालेली नव्हती.

सेवा संघाच्या संग्रहीं असलेल्या अनेक उदाहरणांपैकीं हें एक उदाहरण दिलें आहे. विवाहित लोकांनी आपली प्रकृति सबळ राखण्यासाठीं अशा प्रकारचे पाक घेणें हिताचें आहे.

मासानुमासिक कषायांची उपयुक्तता

त्या गर्भाची वाढ आठ महिने व्यवस्थित झाली, पण गरोदरपणीं मासानुमासिक कषाय वा पित्तशामक योग्य उपचार न झाल्यामुळें त्या गर्भाचा स्त्राव झाला. (गर्भपात झाला नाही). त्याबद्दल सेवा संघातर्फे उपचार करून घेण्यासाठीं तें दांपत्य आलें होतें.

स्त्री-पुरुषांचें वीर्य जोमदार असेल तरच प्रतिकूल परिस्थितींतहि सुद्धां न जुमानतां गर्भ टिकतो. सबब केवळ गर्भधारणा झाली म्हणून उपाय थांबविणें इष्ट नसतें. पुढेंहि समाधानकारक उपचार चालू ठेवावे लागतात असें आयुर्वेदशास्त्राचें मत आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुद्ध आयुर्वेदीय अभ्यासक्रम
किमान शैक्षणिक लायकी

मुंबई सरकारनें, शुद्ध आयुर्वेदीय अभ्यासक्रमा· साठीं किमान शैक्षणिक लायकी म्हणून एस्. एस्. सी. परीक्षा (पास अगर नापास) पण (संस्कृत विषयांत किमान ५० टक्के मार्क मिळाले पाहिजेत) आणि बनारस येथील सरकारी संस्कृत कॉलेजची प्रथमा परीक्षा पास, त्यांच्याबरोबर पुढील परीक्षांनाहि मान्यता दिली आहे.

एस. एस. सी. परीक्षेबरोबरची कोणच्याहि भारतीय विद्यापीठाची वा मंडळाची (बोर्डाची) परीक्षा.

बडोदा आर्यकन्या महाविद्यालय विशारद परीक्षा.

बडोद्याच्या महाराजा सयाजीराव विद्यापीठाची व्याकरण साहित्य शाखा (तृतीय परीक्षा).

बडोद्याच्या श्रावणमास दक्षिणा परीक्षेची मध्यमा.

पुणें येथील टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची संस्कृतची चतुर्थ परीक्षा.

पुण्याच्या वेदशास्त्रोक्त सभेची प्रवेश परीक्षा

अहमदाबादच्या गुजराथ विद्यासभेची प्रथमा.

धारवाडच्या श्रीजगद्गुरू शंकराचार्य संस्कृत पाठशाळेची प्रथमा.

मुंबईच्या भारतीय विद्याभवनाची प्रवेशिका;

पार्डीच्या संस्कृत स्वाध्याय मंडळाची चतुर्थ परीक्षा

अहमदाबादच्या बृहत् गुजराथ संस्कृत परिषदेची मध्यमा;

भावनगर येथील सौराष्ट्र विद्वत् परिषदेची संस्कृत साहित्यभूषण;

कलकत्ता येथील वंगीय संस्कृत विद्यापरिषदेची संस्कृत परीक्षा व्याकरण;

सागर युनिव्हर्सिटीची प्राज्ञ;

बिहारच्या बिहार संस्कृत असोसिएशनची प्रथमा;

अनुक्रमणिका

अतिव्यायामासाठीं मांसाहार आवश्यक	६७५
म. प्रांतीय वैद्यमंडळ कार्यकारी सभा वृत्त	६७७
म. प्रान्तीय वैद्यसंमेलन विशेष अधिवेशन	६७९
सहकारी पद्धतीनें तयार करावयाचीं औषधें	६८१
आसव बिघडण्याचे प्रकार	६८५
थंड पेयापासून पोटांत गुरगुर व जुलाब	६८६
सूक्ष्म औषधांचा अनुभव	६८९
चीनची किमया	६९१
जलवेतसबीज, सुपारी	६९४
मस्तु-दह्यांतील पाणी	६९५
म. प्रां. वैद्यसंमेलन लातूर आयव्यय पत्रक	७००
शीतपित्तांतील दोषांची अंशांश कल्पना	७०१
दोषक्षीणता व रोग	७०३

म. प्रां. वैद्य मंडळ [रजिस्टर्ड]

कळविण्यास आनंद वाटतो कीं, प्रांतीय वैद्य संमेलनाचे ठरावास अनुसरून म. प्रां. वैद्य मंडळ ही संस्था मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० (Bom. XXIX of 1950 अन्वयें नोंदली गेली असून त्याबद्दलचे संबंधित खात्याचे वरिष्ठ अधिकाऱ्याकडून A 386 क्रमांकाचें प्रमाणपत्र म. प्रां. वैद्यमंडळाच्या अध्यक्षाचे कडे आले आहे.

पाटणा येथील बिहार संस्कृत समितीची प्रथमा;

जयपूर येथील सरकारी संस्कृत कॉलेजची प्रथमा;

बनारसच्या हिंदु युनिव्हर्सिटीची संस्कृत प्रथमा;

बनारस येथील काशी विद्यापीठाची संस्कृत प्रथमा;

मद्रास येथील मद्रास सरकारची संस्कृत प्रवेश·· परीक्षा आणि

मुंबईच्या संस्कृत विद्यापीठाची मध्यमा परीक्षा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संस्थेचें काम चांगल्या रीतीनें चालूं आहे

भिषग्रत्न ग. कृ. पाटणकर मु. किन्हई यांच्या मार्फत आयुर्वेद सेवासंघ या संस्थेची व आयुर्वेदपत्रिका या पाक्षिकाची माहिती झाली होती. या संस्थेचें काम चांगल्या रीतीनें चाललेलें आज समक्ष पाहून समाधान वाटलें.

औषधें घेण्याला सोईचीं व सोपी असावींत अशी आतां मनःप्रवृत्ति झालेली आहे. एक गोळी तोंडांत टाकून वर पाणी प्यालें कीं भागावें अशा तऱ्हेचीं औषधें तयार होणें अगत्याचें आहे.

टिकाऊ गुणकारी औषधें काढावींत

कांहीं रोगांवर पाश्चिमात्य औषधीशास्त्रामध्यें गुणावह औषधें मिळत नाहींत (त्या औषधानें टिकाऊ गुण येत नाहीं.) अशा रोगांवर औषधें काढून त्याचा प्रचार पत्रिकेमार्फत करावा अशी शिफारस आहे. मी या संस्थेची भरभराट इच्छितो.

पं. आ. इनामदार
माजी विद्याधिकारी व डायरेक्टर ऑफ इन्स्ट्रक्शन
औंध व इदार संस्थान.

औंध, जि. सातारा
१९।४।५४

उपयुक्त वैद्यक ग्रंथ

इंजेक्शन विज्ञान (आवृत्ती दुसरी)	ले. डॉ. घाटगे	किं. ६ रु.
इंजेक्शन चिकित्सा	"	किं. ६ रु.
सार्थ माधवनिदान	ले. वै. बोरकर	किं. ५ रु.
वनौषधीगुणादर्श	ले. वै. पदेशास्त्री	किं ७॥ रु.
दंतरोगविज्ञान व चिकित्सा	ले. वै. जायदे	किं. ३ रु.
वैद्यसन्मित्र	"	किं. २ रु.
ज्वरनिदान	ले. वै. गो. आ. फडके	किं. ३ रु.
औषधीशास्त्र भाग १, २	"	किं. ५ रु.॥
आरोग्यविज्ञान	ले. डॉ. गर्दे	किं. २॥ रु.
सिद्धौषधीप्रकाश	ले. गणेशशास्त्री जोशी	किं. ६ रु.
चिकित्साप्रभाकर	ले. श्री. ओगले	किं. २० रु.
स्त्रीरोगविज्ञान	ले. डॉ. भट	किं. ५ रु.

वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

संपादक व प्रकाशक:— वैद्य विंदमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, मेनरोड, नाशिक
मुद्रक— श्री. वि. बोक, ..., ..., नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक)

वर्ष ७ वें) नाशिक, ता. १६ मे १९५४ (अंक २२ वा

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलन, मुंबई

शुक्रवार ता. २८ मे रोजीं विशेष अधिवेशन

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनाचें १९५४ सालचें अधिवेशन पुणें येथें भरावयाचें असें गतवर्षीं लातूर येथें ठरलें होतें. तथापि पुणें वैद्यक मंडळास १९५४ च्या मे महिन्यांत संमेलन भरविणें शक्य न झाल्यामुळें ता. २८ मे १९५४ रोजीं मुंबई येथें म. प्रां. वैद्य मंडळाचें विशेष अधिवेशन घेण्याचें स्थायी समितीनें निश्चित केलें आहे.

अध्यक्ष वैद्य दत्तात्रेयशास्त्री जळूकर

या विशेष संमेलनाचे अध्यक्ष प्रांताध्यक्ष वैद्य दत्तात्रेयशास्त्री जळूकर हेच आहेत. संमेलन भरण्याचें स्थान सरदारगृह (क्राफर्ड मार्केटजवळ) हें निश्चित केलें आहे.

म. प्रांतीय वैद्यांना आग्रहाची विनंति

मुंबई मंत्रिमंडळानें शुद्ध आयुर्वेदीय अभ्यासक्रमास दिलेली स्वतंत्र मान्यता, पुणें विद्यापीठानें विद्यापीठांत स्वतंत्र आयुर्वेद शाखा सुरू करण्याचें आंखलेलें धोरण, मुंबई राज्यांतील सर्व वैद्यांच्या वतीनें बोलणारी अशी एक प्रातिनिधिक संस्था असण्याची निर्माण झालेली निकड, कामगार विमा योजनेंत वैद्यांना घेण्याबाबतचा विचार इत्यादि अनेक महत्वाच्या तांतडीच्या प्रश्नावर निर्णय या विशेष अधिवेशनांत घेतले जाणार आहेत व त्या दृष्टीनें हें संमेलन महत्वाचें आहे.

या एक दिवसाच्या संमेलनासाठीं महाराष्ट्रांतील सर्व जिल्ह्यांतून आणि तालुका तालुक्यांतून वैद्यांनीं यावें व हें संमेलन यशस्वी करावें अशी विनंति आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्री धन्वन्तरी प्रसन्न

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ

विशेषाधिवेशन कार्यक्रम

शुक्रवार दिनांक २८ मे १९५४

सकाळीं ८॥ वा. स्वागत गीत.

,, ९ ,, स्वागताध्यक्ष भाषण

,, ९॥ ,, उद्घाटकांना विनंति करणारें भाषण

,, १० ,, उद्घाटकांचें भाषण; आभार व पुष्पहार

,, १० ,, संदेश वाचन व नंतर अध्यक्षीय भाषण.

———

दुपारीं ३ ते ५ खुलें अधिवेशन

,, ५ ते ६ शीतपेयपान, परिचय, शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीचें अभिनंदन व अध्यक्षांना पुष्पहार.

,, ६ ते ८ अध्यक्षीय समारोप, आभारप्रदर्शन, छायाचित्र, वन्देमातरम्.

विशेषाधिवेशन स्थळ सरदारगृह मुंबई	आपला आबासाहेब सांडू स्वागताध्यक्ष

सूचनाः- आवश्यक झाल्यास कार्यक्रमांत फेरफार केला जाईल.

पत्रव्यवहाराचा पत्ताः- कार्यवाह, म. प्रां. वै. मंडळ, विशेषाधिवेशन, मुंबई. ८७, सावित्री भुवन गुगभाट, मुंबई ४.

मार्गः- बोरीबंदर स्थानकाकडून एच्. डी. एन्. ओ २ च्या बसेस सरदारगृहाकडे येतात. आपण केव्हां व कसे येणार ते कळवावें म्हणजे स्वयंसेवक उपस्थित रहातील.

टीपः- स्वागत सभासद शुल्क २ रुपये व प्रतिनिधी शुल्क १ रुपया असून भोजनखर्च ज्याचा त्यानें करावयाचा आहे. सरदारगृहांतील चालू जेवण १ रुपया व खास जेवण २ रुपये आहे. बाहेरगांवच्या प्रतिनिधींची विनामूल्य उतरण्याची सोय स्वागत मंडळानें सरदारगृहांत केली आहे.

———

विष गोड आहे, अमृत कडू आहे

नाशिक येथील वसंत व्याख्यानमालेंत [illegible] ता. ५ रोजीं सायंकाळीं ७॥ वाजतां वरील विषयावर वैद्य बिंदुमाधव पंडित यांचें वैद्य वि. म. [illegible] यांच्या अध्यक्षतेखालीं व्याख्यान झालें. दूध, [illegible] इत्यादि मधुर पदार्थांच्या अतिसेवनामुळें होणाऱ्या लहानथोर विकारांची कल्पना देऊन ते टाळण्याला कडू पदार्थांची जोड अमृतमय कशी [illegible] याची माहिती त्यांनीं श्रोत्यांना दिली.

———

स्ट्रेप्टोमायसिन विक्रीवर निर्बंध

रजिस्टर्ड डॉक्टरांचें प्रिस्क्रिप्शन असलें [illegible] स्ट्रेप्टोमायसिन व विशिष्ट अँटीबायोटिकें मिळ[illegible] अशा प्रकारें त्याच्या विक्रीचें नियमन करण्या[illegible] भारत सरकार विचार करीत आहे, असें लोकसभेंत आरोग्य खात्याचे उपमंत्री श्रीमती एम्. चंद्रशेखर ह्यांनीं सांगितलें.

अँटी-बायोटिकांचा अविवेकी उपयोग न [illegible]ण्याच्या सूचना डॉक्टरांना द्याव्यात असें आरोग्य खात्याच्या डायरेक्टर-जनरलनीं राज्यांच्या आरोग्य खात्यांना सुचविलें आहे.

———

केंद्रीय सरकारी आरोग्य शिक्षण संस्था

दिल्लींत मध्यवर्ति आरोग्य शिक्षणसंस्था [illegible] उघडण्याचा केंद्र सरकारचा विचार असल्याचें आरोग्य खात्याच्या उपमंत्री श्रीमती एम्. चन्द्रशेखर यांनी लोकसभेंत सांगितलें.

सदर संस्था काढण्यासाठीं यंदाच्या वर्षी [illegible] ७,४४,००० आणि पुढील वर्षी रु. ४,५०,००० खर्च येणार आहे.

आरोग्यविषयक वाङ्मय व नियतकालिकें प्रसिद्ध करणें हें या संस्थेचें कार्य राहील.

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्र प्रान्तीय वैद्य संमेलन, मुंबई

.... स्वागत मंडळाचें नम्र निवेदन ....

अखिल वैद्य बंधु-भगिनींनों,

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाचें विशेषाधिवेशन मुंबईला सरदारगृहामध्यें २८ मे १९५४ ला भरणेचें निश्चित झालें आहे, हें आपणां सर्वांना निरनिराळया नियतकालिकांवरून माहित झालेलें आहेच. आपणा सर्वांच्या संघटनेमुळें व अविरत श्रमामुळें प्राप्त झालें-ल्या स्वातंत्र्यकालांत भरणारें हें पहिलेंच मुंबईतील अधिवेशन आहे.

आयुर्वेदीयांचें पारतंत्र्य गेलें

आयुर्वेदाचें व आयुर्वेदीयांचें पारतंत्र्य गेलें! स्वातंत्र्याचा उदय झाला! मुंबई सरकारनें वैद्यांचें मागणीचा योग्य विचार करून हें स्वातंत्र्यदान केलें! आपण या संमेलनाला उपस्थित राहून मुंबई सरकारचें अभिनंदन केलें पाहिजे. तसेंच आपली कृतज्ञता, आपल्याला झालेला आनंद, आपल्या संघटनेचें बल, आपल्या भावी योजनांचें स्वरूप, आपणांवर पडलेली जबाबदारी स्वीकारण्याची उत्सुकता व उत्साह व्यक्त करणें अत्यंत आवश्यक आहे. तरी या आयुर्वेदाच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांत लिहिल्या जाणाऱ्या अपूर्व विशेषाधिवेशनाला आपण बहुसंख्येनें उपस्थित राहून व स्वागत मंडळाला हें अधिवेशन जास्तींत जास्त यशस्वी करण्याचें दृष्टीनें मदत करून कृतार्थता प्राप्त करून द्यावी अशी स्वागत मंडळाची आंतरिक इच्छा आहे.

हा अतिशय शुभ योग आहे

हें अधिवेशन मुंबईला भरत आहे हा अतिशय शुभ योग आहे. मुंबई राज्यांत अनेक प्रांतीय घटना आहेत. त्या सर्व घटनांचा एकमुखी आवाज निर्माण व्हावा अशी बलवत्तर संघटना निर्माण होण्याची अत्यंत जरूरी आहे. मुंबईला सर्व प्रांतीय संघटनांचें घटक आहेत. आतापर्यंत गुर्जरबंधूंनी प्रांतीय अधि-वेशन मुंबईस भरविलें होतें. मुंबईला प्रांतीय संमेलनें भविष्यामध्यें इतर प्रांतीय संघटनांच्या घटकांची सहानुभूति व त्यांच्या विचारांचें प्रतिबिंब व्यक्त होत असतें. संमेलन जरी प्रांतीय असलें तरी तें मुंबई राज्य संमेलनाचें पडछाया रूपच असतें. त्यानें केलेल्या कार्याला, त्यानें व्यक्त केलेल्या विचारांना अधिक महत्व असतें. हिंदुस्थानांत अग्रगण्य अशा वैद्य समाजांतील महान् व्यक्ति आचार्य यादवजी त्रिकमजी, पंडित शिवशर्माजी वगैरे मुंबईमध्येंच असल्यामुळें त्यांचाहि संमेलनाला आशीर्वाद मिळतो तसेंच त्यांच्या अमूल्य विचारांचा फायदाहि आप-णाला घेतां येतो.

मंत्रिमंडळावर योग्य परिणाम

मुंबई हें राज्याच्या राजधानीचें शहर असल्यामुळें प्रधान मंडळ व मुख्य अधिकारी वर्ग यांना अगदीं जवळून आपल्या प्रयत्नाचें व विचारांचें स्वरूप पहा-वयास मिळतें. व त्याचा खोल परिणाम त्यांचे अंतः-करणावर होतो. इतरत्र बहुसंख्येनें जमण्यापेक्षां मुंबापुरींत बहुसंख्येनें जमण्यानें होणारा परिणाम हा बलवत्तर असल्यामुळें आपलें कार्य संमेलनांच्या दृष्टीनें अधिक जवळ जातें. म्हणून वैद्य बंधुभगिनींनो! अशा या महत्वाच्या व ऐतिहासिक विशेषाधिवेश-नाला उपस्थित राहून संघटनेच्या कार्याला आपल्या बहुमोल विचारांची मदत कराल अशी स्वागत-मंडळाला आशा वाटते.

सरकारनें दिलेलें वरदान

" शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रम " हें सरकारनें दिलेलें वरदान आहे. त्याचा शास्त्राला आणि शास्त्रावर उपजीविका करणाऱ्या आपण वैद्यबंधूंच्या उन्नतीला पुरेपूर उपयोग करून घेण्याकरितां योजनाबद्ध कार्य-क्रमाचा विचार करणें अत्यंत महत्वाचें असें आजचें पहिलें कर्तव्य आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संमेलनांत होणारा उहापोह

शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रमांतून उत्तीर्ण होणारे विद्यार्थी आयुर्वेदनिष्ठ, आयुर्वेदाच्या उन्नतीला आपलें जीवन व जीवितकार्य मानणारे व त्याकरितां आपलें जीवन अर्पण करणाऱ्या प्रवृत्तीचे वैद्य (निर्माण) झाले पाहिजेत! या दृष्टीनें हा पाठ्यक्रम, तो शिकणारे ध्येयभूत उत्कृष्ट बुद्धीचे विद्यार्थी, तो शिकविण्याची पद्धति, प्रात्यक्षिकें, योग्य अध्यापक, योग्य संस्था (गुरुगृहें व विद्यालयें) या संबंधींचा उहापोह या अधिवेशनांत होणें अत्यावश्यक आहे.

पुणें विद्यापीठांत आयुर्वेद

कालाची अनुकूलता म्हणूनच दुसरीहि एक महत्वाची घटना नुकतीच घडून आली आहे ती म्हणजे पुणें विद्यापीठाचा आयुर्वेदीय शिक्षाविभाग सुरू होण्याचा झालेला संकल्प ! त्या बाबतींतहि आपली कृतज्ञता व्यक्त करणें आणि त्याबद्दल आपले विचार प्रकट करणें हेंहि आपलें एक प्रमुख कर्तव्य आहे.

मुंबईराज्य वैद्यमंडळाची स्थापना

मुंबई सरकारनें नेमलेल्या शुद्धायुर्वेद पाठ्यक्रम समितीचेंहि या अधिवेशनांत अभिनंदन करणें अत्यंत महत्वाचें असें कर्तव्य आहे. मुंबई राज्यांतील सर्व वैद्य बंधूंची एकमुखी मागणी, एकमुखी विचार यांचे परिणाम वैद्यसमाजाच्या फायद्याचे आणि शासनकर्त्यांच्या निर्णयाला सोईचे असतात. याकरितां प्रातिनिधिक अशा संयुक्त मंडळाला (फेडरेशन) मूर्त स्वरूप देण्याचें अत्यंत नाजूक कामहि प्रांतीय मंडळाला करावयाचें आहे व त्याचा विचार संमेलनानें अवश्य केला पाहिजे.

वैद्यांच्या अडचणींचे प्रश्न

मुंबईसरकारप्रणीत कामगार आरोग्य विमा योजना हाहि एक महत्वाचा मुद्दा संमेलनांत विचारांत घ्यावयाचा आहे. आपलें दैनंदिन व्यावहारिक अडीअडचणींचे अनेक प्रश्नः-उदाहरणार्थ १) आसवारिष्टें २) अफू, भांग, गांजा वगैरे मादक पदार्थ ३) भेसळविरहित व खात्रीचीं औषधें वैद्यांना उपलब्ध होणें, वगैरेचा उहापोह करून सरकारपुढें आपल्या मागण्या ठेवणें जरूर आहे. म्हणून पुन्हां एकदां विनंति कीं, अशा या महत्त्वपूर्ण विशेषाधिवेशनाला सर्व वैद्यसमाज बहुसंख्येनें उपस्थित राहील व भावी कार्याचा दृढ पाया रचील अशी महान् आशा स्वागत मंडळाला वाटत आहे.

संमेलनांत मांडावयाचे ठराव २५ मे पूर्वी कार्यालयांत पोंचतील असे पाठवावेत. त्यानंतर येणारे ठराव स्वीकारले जाणार नाहींत.

आपण केव्हां व कोणत्या वेळीं येणार ते आगाऊ कळवावें म्हणजे स्वयंसेवक त्यावेळीं स्थानकावर (स्टेशनवर) उपस्थित रहातील व मग सरदारगृहांत जाणें सोईस्कर होईल.

टीप- बोरीबंदर स्थानकाकडून येणाऱ्या एच्. डी, व एन्, मार्गाच्या बसेस् सरदारगृहासमोर थांबतात. सरदारगृह पोलीस कमिशनरच्या ऑफीससमोर व क्राफर्ड मार्केटचें जवळ आहे.

प्रतिनिधींच्या उतरण्याची सोय

स्वागत सभासद शुल्क २ रुपये, व प्रतिनिधी शुल्क १ रुपया असून भोजनखर्च ज्याचा त्यानें करावयाचा आहे. सरदारगृहांतील चालू जेवणाचा एकवेळचा दर १ रु. व खास भोजनाचा दर २ रु. आहे. बाहेर गांवाहून येणाऱ्या मंडळींची उतरण्याची

'आयुर्वेदाच्या सेवेसाठीं तयार'

शास्त्रोक्त पद्धतीनें तयार झालेलीं सर्वप्रकारचीं सिद्धौषधें [गुटिका, मात्रा, रसायनें, आसवें वगैरे] व हिंवतापांवर अत्युत्तम ठरलेलें हिंवतापांतक, मिळण्याचें एकच ठिकाण.

सविस्तर माहितीकरितां लिहाः—

आयुर्वेदीय औषधी भांडार

२८ शुक्रवार, तुळशीबागेची पिछाडी, पुणें २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सोय स्वागत मंडळानें सरदारगृहांत केली आहे. त्यासाठीं प्रतिनिधींना भाडें द्यावें लागणार नाहीं.

संमेलनाध्यक्ष- वैद्य दत्तात्रेयशास्त्री जळूकर

स्वागताध्यक्ष-

श्रीमंत आबासाहेब सांडू

स्वागतोपाध्यक्ष

१ वैद्यराज वेणीमाधवशास्त्री जोशी

२ वैद्य ग. म. अभ्यंकर

३ वैद्य वामनराव दीनानाथ

मंत्री-

१ वैद्य प्रतापकुमार पोपटभाई, प्रधानमंत्री

,, रा. ना. आंबे
,, कृ. के. कानिटकर } सहमंत्री
,, अनन्ताचार्य घळसासी

सभासद

१ वैद्य ना. ह. जोशी	९ वैद्य ब. ल. वष्ट
२ ,, लक्ष्मीबाई चोरवणकर	१० ,, श्री. प. बहुतुले
३ ,, भा. द. गोडबोले	११ ,, पु. रा. बेल्हे
४ ,, श्री. वा. सांडू	१२ ,, रामभाऊ भोगे
५ ,, दे. ल. आनंदे जे.पी.	१३ ,, व्ही. डी. शिंदे
६ ,, गो. कृ. पेठे	१४ ,, के. जी. पवार
७ ,, वि. म. पारकर	१५ ,, एल.एस.शितोळे
८ ,, श्री. कृ. चराटकर	

———

बनावट औषध प्रतिबंधक समिति

मुंबई सरकारनें गेल्या फेब्रुवारीमध्यें स्थापन केलेल्या बनावट औषध प्रतिबंधक समितीचे सेक्रेटरी म्हणून मुंबई राज्याच्या ड्रग्ज कंट्रोलरांची नेमणूक करण्यांत आली आहे. बनावट औषधें तयार करण्यास व त्यांची विक्री करण्यास पायबंद घालण्यासाठीं उपाय सुचविणें आणि या प्रकारांना आळा घालण्याच्या बाबतींत व्यापारी, वैद्यक व्यवसायी आणि जनता यांचें सहकार्य मिळविणें हें या समितीचें काम आहे.

चर्चा परिषद पुढें ढकलावी

" ता. ६ व ८ जून ला माझ्याकडे दोन लग्नें ठरलीं आहेत. त्यामुळें २९ मे पासून ६ दिवस नाशिक येथें चर्चा परिषद ठरविली तर मला उपस्थित होता येणार नाहीं. आपण माझी सोय पहावी अशी विनंति आहे.

प्रांतीय वैद्य संमेलन जर आक्टोबर-डिसेंबर मध्यें ठरलें तर त्याच्याच पूर्वी सप्टेंबरमध्यें चर्चा परिषद भरवितां येईल.

इतकें मात्र खरें कीं, माझ्या अनुपस्थितींत चर्चा परिषद भरल्यास मला अत्यंत दुःख होईल आणि मी ठरविलेले विचार जागच्या जागीं रहातील.

गेल्या ३० वर्षांत मी १२ वेळ विद्यार्थ्यांस वाग्भट शिकविला आहे. —मि. वि. डेग्वेकर

———

आलेल्या अनेक सूचनांचा विचार करून चर्चा परिषदेची तारीख पुढें ढकलण्यांत आली आहे.
आयुर्वेद सेवा संघ, नाशिक —विंदुमाधव पंडित

———

खेडेगांवांतून फिरणारे वैदू

दिवसेंदिवस वैदूंची संख्या वाढत असून ते ग्रामीण भागांतील जनतेस फसवतात व त्यामुळें वैद्यक व्यवसायावरहि अनिष्ट परिणाम होतो अशा आशयाची तक्रार एका वैद्यक व्यवसायीनें टोपण नांवानें वर्तमानपत्रांत केली आहे. तरी याबाबत सरकारला अशा वैदूंची तपशीलवार माहिती दिल्यास सरकार त्यांच्या विरुद्ध उपाययोजना करते असें लोकांना आश्वासन देण्यांत येत आहे. अशा प्रकारांची जरूर तर पोलीसांच्या सहाय्यानें चौकशी करण्यांत येते व कोर्टांत खटले भरण्यांत येतात.

तेव्हां लोकांनीं टोपण नांवानें वर्तमानपत्रांतून वैदूंचा निषेध करण्याऐवजीं अशा वैदूंची तपशिलवार माहिती मुंबई सरकारचे सर्जन जनरल, मुंबई, यांना कळवावी असा त्यांस सल्ला देण्यांत येत आहे.

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ही आमची संपत्ति आहे

पुणें विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. जयकर दादर येथील वसन्त व्याख्यानमालेचें उद्घाटन करतांना म्हणाले —

पुणें विद्यापीठासाठीं मी भिक्षांदेहि पत्करली आहे. वाईसारख्या ठिकाणीं तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या नेतृत्वाखालीं चाललेल्या संशोधन-कार्याकडे नजर टाका. थोड्या वेतनावर हे लोक किती महत्वपूर्ण कार्य करीत आहेत! ही आमची संपत्ति आहे! हें महाराष्ट्राचें वैशिष्ट्य आहे.

मानवी संपत्तीचें महत्व

विद्यापीठें केवळ पैशावर चालणार नाहींत. अशा मानवी संपत्तीची त्याला फार जरूरी असते. आमच्या विद्यापीठाला जें द्रव्यसाहाय्य होतें, तें गरीब व मध्यम वर्गीयाकडूनच.

धनिकांच्या पाठीमागें मी धावलों, पण त्यांत यश आलें नाहीं; कारण पुणें विद्यापीठास द्रव्यदान केलें तर त्यामुळें सरकारला काय वाटेल असें त्यांना वाटतें. म्हणून ते पैसा द्यावयास भितात. संयुक्त महाराष्ट्र झाल्यास या भीतीचें कारणच उरणार नाहीं.

शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रम

विश्वसनीय रीत्या असें समजतें कीं, शुद्धायुर्वेद पाठ्यक्रम समितीनें पाठ्यक्रमाबाबतचे केलेले नियम सरकारने मंजूर केले आहेत. तरी ज्यांना १५ जून-पासून या अभ्यासक्रमाप्रमाणें विद्यालयें अगर गुरुपरंपरा शिक्षणपद्धति सुरू करावयाची असेल त्यांनीं याबाबत अधिक माहितीसाठीं "शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समिति" मुंबई, ऑटरॅमरोड, बुद्धभवन फोर्ट–मुंबई या पत्यावर पत्रव्यवहार करावा.

धर्मार्थ दंतयज्ञ, पुणें

अखिल भारतीय आयुर्वेदीय डेंटल मिशन या संस्थेच्या वतीनें वैद्य पां. वि. जायदे यांच्या नेतृत्वा-खालीं पुणें येथील अनाथ विद्यार्थी गृहाच्या आवारांत रविवार ता. १६-५-५४ पासून धर्मार्थ दंतयज्ञ सुरू करण्याचें ठरलें आहे.

[विना इंजेक्शन दन्तोत्पाटनाचें शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या त्या भागांतील वैद्यांनीं या संधीचा लाभ मिळाल्यास अवश्य घ्यावा. –संपादक]

१ अर्धशिशी–सूर्यावर्त

अगोदर एरंडेल, अगर अश्वकंचुकी अगर सोनामुखी चूर्ण देऊन शौचास साफ करवावें.

नंतर रोज सकाळीं सूर्योदयापूर्वी १ तास मा पुढील औषध द्यावें.

प्रवाळ भस्म (चंद्रपुटी) १ गुंज. तूप २॥ तोळे गूळ २॥ तोळे – १ मात्रा

असें ३ दिवस पहाटे करावे. अर्धशिशी खात्रीनें थांबते. —वैद्य रा. ग. कोल्हे

पांढरें कोड

हजारोंचें गेले व त्यांनीं अभिप्राय दिलेले आणि अनेक बक्षिसें मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु. नकली वैद्यापासून सावध रहा!

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन' मु. पो. मंगरूळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीयांचा हेतुपुरःसर अपमान

नुकतेंच मुंबईला एक नागरिक प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. मुंबईच्या नगरपालिकेनें लाखों रुपये खर्च करून त्याची उभारणी केली होती. त्यांत आयुर्वेदाची जी विटंबना व विपर्यास केला होता तो पाहून कुणाहि वैद्याला चीड येईल. आपण परतंत्र होतो तेव्हां पाश्चात्य शास्त्राचा प्रचार धूमधडाक्यानें वाटेल त्या सूक्त-असूक्त मार्गानें होत असे. हें क्षम्य होऊं शकेल, परंतु राष्ट्र स्वतंत्र झाल्यावरहि हीच परंपरा चालूं रहावी काय ? हा विचारवंतांनीं आणि शासनकर्त्यांनीं विचार करण्यासारखा विषय आहे.

आरोग्य विभागांतील दुकानें

प्रदर्शनांतील आरोग्य-विभागांत शस्त्रक्रिया आणि प्रसूतितंत्र यांमध्यें पाश्चात्य पद्धतीनें किती प्रगति केली आहे हें दर्शविणारीं कांहीं दुकानें होतीं. जशीं कापडाचीं, किराणा मालाचीं दुकानें, भेळ-पुरीचीं दुकानें, तशींच हींहि दुकानेंच होतीं. कारण जर तीं दुकानें नसतीं तर तेथील वातावरण गंभीर आणि निराळया प्रकारचें असलें असतें. तें तसें नव्हतें, भेळ-पुरीवाल्याप्रमाणें तेथील लोक प्रेक्षकांना ओरडून बोलावित होते व आमची प्रगति पहा, असा आग्रह करीत होते. ही प्रचाराची खालची पातळी आहे. इतक्या हीन दर्जावरून ॲलोपाथीचा प्रचार भारतांत व्हावा, ही गोष्ट त्या शास्त्राला शोभा देणारी नाहीं.

प्राचीन शस्त्रवैद्यकाचा उपहास

तसेंच त्या ठिकाणीं सध्यांच्या शस्त्रक्रियेचें प्रात्यक्षिक दाखवितांना प्राचीन शस्त्रवैद्य म्हणून एक दाढीवाला बैरागी दाखवून त्याच्या खालीं सुश्रुत असें लिहिलें होतें. हा आयुर्वेदाचा अपमान आहे. आपल्याच बांधवांनीं आपल्या पूर्वजांचा अपमान करावा ही गोष्ट आपणालाहि लाजिरवाणी आहे. हे वैद्यवर्गानें सहन करूं नये. त्याचा जाब प्रदर्शन भरवणाऱ्या जबाबदार लोकांना वैद्यवर्गानें विचारला पाहिजे.

स्वरूप अभ्यासलें असतें

हेंच प्रदर्शन जर परदेशांत भरलें असतें तर पाश्चात्य पंडितांनीं सुश्रुताचें चित्र काढतांना सुश्रुतांचे ग्रंथ प्रथम अभ्यासले असते, व त्यांत प्राचीन शस्त्रक्रियेचें स्वरूप कसें होतें हें प्रथम समजावून घेतलें असतें. नंतर त्याचें चित्र रेखाटून आजचें शस्त्रक्रियेचें स्वरूप मांडलें असतें. असें करतांना कुणाचाहि अन्याय किंवा वस्तुस्थितीचा विपर्यास होणार नाहीं याची त्यांनीं दक्षता बाळगली असती.

शस्त्रवैद्याचा पेहेराव

सुश्रुतांत शस्त्रवैद्यानें शुचिर्भूत व्हावें, नखें, केस काढून स्वच्छ व्हावें, पांढरें शुभ्र वस्त्र परिधान करावें, असा स्वच्छ आदेश दिलेला आहे. आजच्या सर्जनमध्यें आणि त्या वेळच्या या शस्त्रवैद्यामध्यें कुठे फरक आहे? सुश्रुताचें असें चित्र तेथें कां काढलें नाहीं! रानटी गलिच्छ ओंगळ असा शस्त्रवैद्य कां दाखवला?

आयुर्वेदीय परीक्षापद्धति कोणती ?

केवळ नाडीवर हात ठेवला कीं रोग्याची परीक्षा करतां येतें असें कोणत्याहि आयुर्वेदीय ग्रंथकारानीं म्हटलेलें नाहीं. दर्शन-स्पर्शन-प्रश्न, मल-मूत्र-परीक्षण इत्यादि रोगीपरीक्षेचे सर्व प्रकार पूर्वाचार्यांनीं सांगितले असतांना, नाडीवर हात ठेवून तपासणारा दाढीवाला सुश्रुत दाखविण्यांत या पाश्चात्य पंडितांच्या गुलामांना काय साधावयाचें आहे ! आजच्या ॲलोपॅथीप्रमाणें विविध तऱ्हेची रोगपरीक्षा पूर्वी प्रचलित नव्हती असें म्हणणें म्हणजे धादांत खोटा प्रचार करणें होय. हा सत्याचा खून आहे. तपशीलांत फरक असूं शकेल, पण शास्त्रीय दृष्टिकोनांत फारसा फरक कोठेंहि आढळत नाहीं. उलट आयुर्वेदाचें श्रेष्ठत्वच सर्वत्र आढळतें. वस्तुस्थितीचें यथार्थ चित्र समाजापुढें ठेवा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तरच तुलना योग्य होईल. अन्यथा हा पक्षपात आहे व तो हेतुपुरःसर, अतएव गर्ह्य आहे.

तसेंच सुश्रुताचार्यांनीं १२५ शस्त्रें ऑपरेशन-साठीं निर्माण केली होतीं, त्यांचीं चित्रें तुलना करतांना तेथें कां दाखविलीं नाहींत?

प्राचीन शस्त्रांचे नमुने

मी लाहोरला असतांना सर्व प्राचीन शस्त्रांचे ग्रंथाप्रमाणें नमुने तयार करून प्रदर्शन तयार केलें होतें व तें सर्वांना फारच आवडलेंहि होतें. परंतु दुर्दैवानें पाकिस्तान झाल्यामुळें माझें लाहोर सुटलें व अनेक मालमत्तेप्रमाणें हा सांठाहि नाहींसा झाला. आज ज्या स्टेनलेस स्टीलच्या शोधाबद्दल बोलबाला होत आहे तें स्टेनलेस स्टील पंचवीस हजार वर्षांपूर्वी प्राचीन पूर्वजांनीं भारतांत केलें होतें, याचा पुरावा अशोकस्तंभावरून आपणांस पहावयास मिळतो.

वस्तुस्थितीचा विपर्यास

सारांश, वस्तुस्थितीचा विपर्यास करून पूर्वजांना कमी लेखण्याची व पाश्चात्यांचें सर्वच चांगलें म्हणून त्यांना डोक्यावर घेऊन नाचण्याची ही जी हीन मनोवृत्ति आज सुशिक्षितांत दिसून येत आहे याला काय म्हणावें तेंच समजत नाहीं.

[वैद्यरत्न पं. शिवशर्मा यांच्या मुंबई येथील भाषणांतून उद्धृत]

कोंबडीच्या अंड्याच्या टरफलापासून केलेलें

कुक्कुटांडत्वक् भस्म

जगांत औषधी द्रव्यें सर्वत्र पसरलीं आहेत. त्यांचा ज्ञानपूर्वक व युक्तीनें उपयोग करण्यांत शहाणपणा आहे.

शरीरास जी अस्थिधातूच्या पोषणाची गरज वेळोवेळीं भासते ती पूर्ण करण्यासाठीं बाल, तरुण, स्त्री, वृद्ध या सर्वांना हें प्राणिज भस्म उपयुक्त आहे.

....औषधी भवन, नाशिक....

पोंचे व अभिप्राय —

त्रिफोलिन नेत्रबिंदु

पुणें येथील औषधी व्यापारी ' जयंत आणि कंपनी ' यांनीं त्रिफोलिन नेत्रबिंदु (आय् ड्रॉप्स) नांवाचें डोळ्याचें औषध तयार केलें असून तें पाहाण्यासाठीं आयुर्वेद पत्रिकेकडे पाठविलें आहे. सकाळीं सायंकाळीं २।२ थेंब डोळयांत टाकावे अशी सूचना त्यावर छापलेली आहे. औषधाचा रंग गवताचा (पिवळसर) व वास गुलाबपाण्याचा आहे. डोळे येणें, डोळे लाल होणें, डोळ्यांतून पाणी गळणें इत्यादि विकारावर वापरण्यासाठीं हें तयार करण्यांत आलें आहे.

सध्यांच्या ड्रग अॅक्टनें कान, नाक, डोळे यांची ॲलोपॅथिक औषधें, बी. फार्म केमिस्ट व सुसज्ज लेबोरेटरी शिवाय बनविण्याला बंदी केली आहे, त्यामुळें औषधी-विक्रेत्यांचें विशेष लक्ष आयुर्वेदीय औषधें बनविण्याकडे वळलें आहे. त्रिफोलिन नेत्रबिंदु हें त्या प्रवृत्तीचें एक उदाहरण म्हणून सांगतां येईल. त्रिफळा चूर्ण हें नेत्रविकार अंतर्बाह्य उपयुक्त आहे हें सर्वांना माहित आहे तथापि व्यवहार करतांना मात्र नेमका आर्जिरॉल, प्रोटर्गालचा उपयोग प्रत्यक्षांत सर्वत्र दिसतो.

स्वप्नकाळीं पोटांत औषध द्यावें

डोळ्याचे बरेचसे औषधसाध्य विकार पोटांतील दोषविकृतीमुळेंच उत्पन्न झालेले असतात, व त्यासाठीं स्वप्नकाळीं औषधीयोजना करणें मूलगामी उपाय या दृष्टीनें इष्ट असतें. त्याच वेळीं स्थानिक सौम्य उपचार या दृष्टीनें त्रिफळेचा गुलाबपाण्यांतील हा सौम्य अर्क उपयुक्त ठरेल यांत शंका नाहीं.

त्रिफळ्यापासून नेत्रबिंदु तयार करून ते रूढ करण्याचा पुढाकार घेतल्याबद्दल आम्ही जयंत आणि कंपनीचें अभिनंदन करतो, व इतरांनींहि त्यांच्यापासून स्फूर्ति घ्यावी व निर्बुद्धपणें पाश्चिमात्यांचें अनुकरण करण्याची प्रवृत्ति टाकावी अशी नम्र विनंति करतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवडक रुग्ण चिकित्सा —

[१] मलावरोधजन्य आर्तवावरोध [२] छातींतील कळा

(चिकित्सक - वै. लक्ष्मीबाई बोरवणकर, आयुर्वेदविशारद मुंबई २)

-१-

१८ वर्षे वयाची एक मुलगी, अजून ऋतुप्राप्ति झाली नाहीं म्हणून औषधोपचाराला आली. तपासणी करतां तिचे गर्भाशय, योनि व स्तन हे अवयव प्रकृत (स्वाभाविक स्वरूपांत) असल्याचें व त्यांत कोणतेंहि वैगुण्य नसल्याचें आढळून आलें. तिचा शरीरबांधा व ठेवण चांगलीच होती. लग्न झालेलें होतें.

कपड्यांना मलाची घाण येत होती

लक्षणें- अंगमर्द, आळस, सुस्ती व अनुत्साह प्रकर्षानें असून मलावरोध होता. भूक चांगली होती. तपासणीचे वेळीं घामाला व कपड्यांना मलाची घाण येत होती म्हणून अधिक चौकशी करतां मलावरोध अत्यन्त तीव्र होता व २-३ दिवसांनीं एकदां शौचास होई व तेंहि मळाचे घट्ट खडे होऊनच.

मलावरोधजन्य अपानदुष्टि

तेव्हां आर्तवाचा अवरोध आहे व त्याला मलावरोधामुळें झालेली अपानदुष्टि हें कारण आहे असें निदान केलें.

मलावरोधामुळें अपानाची दुष्टि झाली व त्याचें वेगप्रवर्तन हें कार्य विकृत होऊन परिणामीं आर्तवावरोध निर्माण झाला. तसेंच अपानदुष्टीमुळें इतर वायु विशेषतः व्यानवायु विकृत झाला व इंद्रियपाटव व सर्व शरीरचेष्टा या दोन्हीं कार्यांत बिघाड निर्माण झाला.

एरंडेल, आरोग्यवर्धिनी+शंखभस्म

हें निदान ठरल्यानन्तर प्रथम तिला एरंडेल तेल घेण्यास सांगितलें व नन्तर आरोग्यवर्धिनी ४ गुं. + शंखभस्म २ गुं. अशी एकेक पुडी तुपांतून अशनकालीं (जेवावयास बसतांना) दोन्ही वेळां घेण्यास दिली. जेवणानंतर दशमूलारिष्ट १। तोळा तितकेंच पाणी घालून दोन्ही वेळां घेण्यास दिलें.

एक महिना उपचार घेतल्यानंतर दररोज शौचास होऊं लागलें. आळस व सुस्ती कमी झाली व चार दोन धंदे कामाचे करावे असें वाटूं लागलें. ३ महिने उपचार चालू होते. नंतर आर्तवप्रवृत्ति सुरू झाली आणि आतां दर महिन्याला नियमित पाळी येत आहे.

-२-

छातींतील कळा [आमदोषजन्य]

रोगी स्त्री वय ३९. विकारः- छातींतून सारख्या कळा. बाई अंगानें स्थूल असून जरा अधिक हालचाल केली कीं दम लागे. जेवल्यानंतर पोटाला तडस लागे व छातींतून कळा येत.

तपासणींत हृदयांत कांहीं विकृति आढळली नाहीं. मात्र 'स्रोतोरोधबलभ्रंशगौरवाऽनिलमूढता। आलस्यापक्ति'... हीं आमाचीं लक्षणें दिसून आलीं. म्हणून प्रथम लंघन करण्यास सांगितलें. फक्त पातळ ताक व सैंधव घालून गरम पाण्यांत लिंबू पिळून तें पाणी घेण्यास सांगितलें. आणि हिंगाष्टक १ मासा÷शंखभस्म २ गुं.+शुद्धकुचलाचूर्ण १ गुं. अशी १ पुडी सकाळीं व १ पुडी सायंकाळीं गरम पाण्यांतून घेण्यास दिली.

तिसऱ्या दिवशीं आमाचीं लक्षणें कमी होऊन छातींतील कळा कमी झाल्यानंतर पचनाला हलका म्हणून मऊसर तूपभात खाण्यास सांगितला. व वरील औषध २ वेळां चालू ठेवलें.

बाई स्थूल असल्यामुळें डॉक्टरांचे सल्ल्यावरून त्यांनीं भात सोडला होता व फक्त पोळीच खात असत. छातींतील कळांवर इंजेक्शनें व औषधें चालू होतीं. परंतु त्यांनीं गुण आला नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आमपाचनपूर्वक वातानुलोमन

बाईच्या छातींतील कळा या आमाशयांतील आमसंचितीमुळें रुद्ध झालेल्या वातामुळें येत असल्यानें आमपाचन होतांच वातानुलोमन होऊन कळा बंद झाल्या. तांदुळापेक्षां गहूं पचनाला जड असल्यानें तो पचला नाहीं आणि बाईना तांदुळाचें सात्म्य होतें. गव्हाचें नव्हतें यामुळें हीं आमोत्पत्ति अधिक झाली.

--xx--

वाचकांचा पत्रव्यवहार—

कामाची आरोग्यदायी कालमर्यादा

"डॉ. अमुल देसाई यांना आमच्या चिरंजीवांनीं पाठविलेल्या इंग्रजी पत्राची नक्कल या पत्रासोबत आपल्याकडे पाठविली आहे.

डॉ. अमुल यांची ही सूचना आयुर्वेदीय विचारसरणीला धरूनच असल्यानें आयुर्वेदीयांनीं तिला पाठिंबा द्यावा, एवढेंच नव्हे तर ते वैध मार्गानें हे विचार विधानसभेंत मांडित असले तर आयुर्वेदीयांनीं बाहेर आंदोलन करूनहि त्यांना सामुदायिक पाठिंबा द्यावा." —पां. ह. देशपांडे वैद्य

श्री. डॉ. अमुल देसाई,

मुंबई विधानसभेचे सदस्य, यांसी—

आयुर्वेद पत्रिकेंत प्रसिध्द झालेला लेख मी आस्थापूर्वक वाचला. त्यांत आपण कचेरीच्या वेळांत फेरफार सुचविले आहेत. नोकरवर्गाच्या स्वास्थ्यसंवर्धनाच्या दृष्टीनें, व फुरसतीचा वेळ सामाजिक व अन्य कार्यार्थ मिळविण्याच्या दृष्टीनें ते महत्वाचे आहेत. आपल्या या दृष्टिकोनाशीं मी १०० टक्के सहमत आहे.

माझा २ वर्षांचा अनुभव

१९४९ ते १९५१ या २ वर्षांच्या कालांत मी खडकी येथील स्कूल ऑफ् मिलिटरी इंजीनियरिंग-मध्यें लॅबोरेटरी असिस्टंट होतो. तेथील बारमहा कामाची वेळ सकाळीं ७ ते दुपारीं १ अशी होती. उन्हाळ्यांत फक्त अर्धा तास ती उशीरा ठेवण्यांत येत असे.

प्रकृति अत्युत्तम राहिली

या कालांतील माझे अनुभव उत्साहवर्धक आहेत. या दोन वर्षांत माझी प्रकृति अत्युत्तम राहिली. सांगावयाची विशेष गोष्ट अशी कीं, या कालांत सकाळीं नोकरी करून दुपारीं रात्रीं भरपूर व उत्साहपूर्वक मी बी. एसूसी. परीक्षेचा अभ्यास करूं शकलो. व वरच्या वर्गांत पास झालो.

सकाळीं काम दुप्पट वेगानें होतें

शिवाय महत्वाचा मुद्दा असा कीं, मी माझा सर्व दैनिक नित्यक्रम वेळच्यावेळीं पार पाडूं शकत असे. भारतीय विचारसरणीप्रमाणें सकाळचें वातावरण अत्यन्त उत्साहवर्धक असतें; त्यामुळें सर्व नोकरवर्ग दुप्पट वेगानें काम करूं शकतो.

थंड देशांतील पद्धति

ब्रिटिशांनीं आपल्या आमदानींत कामाची वेळ दुपारची केली ती त्यांच्या थंड देशांतील पद्धतीप्रमाणें होती. पण आपला देश बारमहा कमी जास्त प्रमाणांत उष्ण रहात असल्यामुळें ती पद्धति आपणास अनुकूल आली नाहीं. आपण आतां स्वतंत्र आहोत, सबब आपण आपल्या कामाच्या वेळां आपल्या जीवनपद्धतीनुसार बदलल्या पाहिजेत.

६ संपूर्ण दिवस काम करावें

मला आपणास आणखी एक प्रश्न विचारावयाचा आहे. आठवड्यांतून ६ दिवस एकच वेळापत्रक ठेवावयास काय हरकत आहे ? शनिवारीं अर्धा दिवस काम ठेवण्याची काय जरूरी आहे ? असें केल्यानें कामांत कमतरता पडणार नाहीं. प्रत्येक दिवशींच सायंकाळीं सुटी राहणार असल्यामुळें शनिवारच्या सुटीची आवश्यकता राहणार नाहीं.

मी आपल्या पूर्वीच्या सूचनेला दुजोरा देतो व निर्भयपणें ती लोकांसमोर मांडल्याबद्दल आपले अभिनंदन करतो. आपण हा प्रश्न विधान-सभेसमोर मांडावा अशी आपणास आग्रहाची विनंति आहे.

आपला

एस्. पी. देशपांडे, सिनि. एम्. एसूसी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संमेलन ज्ञानदायी कसें होईल ?

प्रश्न- "वार्षिक संमेलनास मी २-४ वेळ जाऊन पाहिलें, माझी मुख्य तक्रार अशी कीं, कांहीं अनुभव-ठेवें ज्ञान मिळेल या दृष्टीनें आम्ही जातो व अनुभव नेमका उलटा येतो. कांहीं विद्वान् वैद्यांचीं त्रिदोषावर अगर आणखी कशावर तरी व्याख्यानें होतात. पण अमूक वनस्पति अगर औषधि मी इतक्या प्रमाणांत वापरली व त्याचा अनुभव असा आला असें कांहीं कोणी सांगत नाहीं. असें कोणी सांगितलें तरच व्यवसायांत त्या दृष्टीनें फायदा व कांहीं समाधान मिळेल."

—एक चिकित्सक

उत्तर- वरील पत्र वाचल्यानंतर मला बालपणीं ऐकलेल्या एका गोष्टीची आठवण झाली. एका राजानें दुधानें हौद भरण्याचें ठरविलें. व प्रजेला आज्ञा केली कीं, प्रत्येकानें हौदांत आपणास शक्य तेवढें अधिक दूध आणून टाकावें. "इतर दूध आणणार आहेत मग मी पाणी टाकलें तर काय हरकत आहे" असा प्रत्येकजण विचार करू लागला, त्याचा परिणाम असा कीं, दुसरे दिवशीं तो हौद दुधाऐवजीं पाण्यानेंच भरला आहे असें आढळून आलें.

अनुभव देण्यासाठीं जावयाचें

आपल्या संमेलनांची गोष्ट अशीच आहे. आपणास संमेलनास जावयाचे म्हणजे आपले अनुभव द्यावयास जावयाचें असें ठरवून जर प्रत्येकजण जाईल तर जमणारी १००-२०० माणसें सम्मेलनाचा हौद अनुभवाच्या दुधानें भरतील.

हजारांत एखादाच वक्ता

पण मी दुसऱ्याचे अनुभव घेणार, माझे अनुभव देण्याची काय आवश्यकता आहे ? अशा विचारानें तेथें मंडळी जमतात. त्याचा परिणाम असा विपरीत होतो. प्रत्येक चिकित्सकाजवळ कांहींना कांहीं बरावाईट अनुभव असतोच, पण त्याला तो सांगतां येत नाहीं. वक्ता दशसहस्रेषु । हजारांत नव्हे १० हजारांत एखादाच वक्ता असतो त्यामुळें सर्वांचें अडतें. तरी येणाऱ्या मंडळींनीं संमेलनांत ज्ञान अगर अनुभव मिळत नाहीं अशी तक्रार न करतां गेल्या कित्येक वर्षांत आपण जे पाहिले-अनुभवले तें कागदावर लिहून आणावें.

मंत्र्यांना अनुभव लिहून कळवा

ज्यानें त्यानें स्वतः वाचून दाखविलें तर ठीकच, पण न वाचतां नुसतें संमेलनमंत्र्यांच्या स्वाधीन केलें (आधीं पोस्टानें पाठविलें) तर मंत्री त्या लिखाणाचा लाभ सर्वांना मिळेल अशी व्यवस्था करू शकतील व मग आपण संमेलनाला व्यर्थ गेलो अशी तक्रार करण्यास अवसर सांपडणार नाहीं.

-बिंदुमाधव पंडित

साभार पोंच

१] यूनानी चिकित्सा-सार

[यूनानी मतेन आशिरःपादसर्वनिदान-चिकित्सादि संबन्धित]

२] संक्रामकरोगविज्ञान

[संक्रामक रोगोंका तुलनात्मक निदान व चिकित्साका अपूर्व ग्रंथ]

लेखकः- कविराज बालकराम शुक्ल आयुर्वेद-शास्त्राचार्य. वैद्यनाथ प्रकाशन. मूल्य ६ रुपये.

३] कॅन्सर चिकित्सा [बंगाली]

[श्री प्रभाकर बन्दोपाध्याय, आयुर्वेदबृहस्पति-प्रणीत]

४] संस्कृत साहित्यमां वनस्पति

लेखकः- बाप्पालाल ग. वैद्य

गुजरात विद्या सभा अहमदाबाद संशोधन ग्रंथमाला ४२ वें पुष्प.

5] Introduction to SHIVKOSA of Shiwadatta Misra.

Critically edited by R. G. Harshe B. A. [Tilak] D. Lit. (Paris) Deccan College Post graduate, Research Institute, Poona.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दंतमंजनाचा
एक शास्त्रीय व उपयुक्त पाठ

बाजारांत मिळणारी कोळशाची बारीक पूड घेऊन त्यांत साखर, मीठ, अस्मानतारा, कापूर मिसळून दंतमंजन बनविण्याची पद्धति सर्वत्र दिसून येते. पण ती अशास्त्रीय आहे. दंतमंजनांत साखर वा मीठ वापरणें युक्त नाहीं. दंतमंजन हें तुरट तिखट कडू रसाचें असावें असें आयुर्वेदीय ग्रंथांत स्पष्ट सांगितलें आहे. साखर मीठ हे आहार पदार्थ आहेत; दोषशोधन पदार्थ नाहींत.

दंतमंजनासाठीं कोळसा वापरणें तो रुई, वड, खैर, बाभूळ, करंज या लांकडांचा असावा. त्यांत सुगंधासाठीं कंकोळ वापरावा. मधुर द्रव्य हवेंच असेल तर जेष्ठमध घालावा. काथ, मायफळ या तुरट वस्तु तोंड स्वच्छ करण्यासाठीं व मुखगत रक्त व कफ दोष स्वस्थ करण्यासाठीं उपयुक्त आहेत.

मुखांतील वातावरण अधिक निर्जंतुक करण्याच्या दृष्टीनें अत्यंत अल्प प्रमाणांत मोरचूद वापरण्याची कल्पनाहि विचार करण्यासारखी आहे

आयुर्वेद सेवा संघाकडून एका ग्राहकांनीं पुढील पाठाचें दंतमंजन २ वेळ करून नेलें. सर्वांना त्याचा अनुभव घेतां यावा म्हणून तो पाठ पुढें देत आहे.

रुईच्या सालीची काळी राख ५ तोळे, जेष्ठमध २ तोळे, काथ २ तोळे, मायफळ २ तोळे, कंकोळ १ तोळा, मोरचूद ·।· तोळा. मोरचूदाची लाही फडक्यांत बांधून पाण्यांत ४।५ वेळ विरवावी व तें पाणी वरील चूर्णाचें मिश्रण खलण्यासाठीं वापरावें. खलून कोरडें झालेलें मंजन बाटलींत भरून ठेवून उपयोगांत आणावें.

ज्यांना वरील दंतमंजन तयार पाहिजे असेल त्यांना तें आयुर्वेद सेवा संघाच्या औषधी भवनांतून तयार करून मिळूं शकेल.

वातदोषासाठीं रुई, पित्तदोषासाठीं वड, व कफदोषासाठीं करंज या लाकडाचा कोळसा वापरावा.

अमेरिकनांच्या आहारांत बदल

अमेरिकन सरकारच्या शेती खात्याच्या अहवालावरून असें दिसतें कीं १९२९ ते १९५२ या काळांत अमेरिकन लोकांच्या आहाराच्या संबंधांत फार बदल झाला आहे. आतां ते लोक अंडीं, दूध, मांस व लिंबाच्या जातींचीं फळें अधिक प्रमाणांत खात आहेत. पीठ, बटाटे व गहूं-तांदळासारखीं धान्यें आतां त्यांच्या आहारांत कमी प्रमाणांत येत आहेत.

अपामार्गासव

वाग्भटानें सूत्रस्थानांत दहाव्या अध्यायांत रसभेदानें जी औषधी द्रव्यें वर्णिलीं आहेत त्यांत तिक्तरसाच्या वर्गांत आघाडा (अपामार्ग) हें द्रव्य सांगितलें आहे (पाठापामार्ग कांस्यायो गुडूची धन्वयासक्रम्). त्यापैकीं पाहाडमूळ, लोहभस्म, गुळवेल, धमासा हीं द्रव्यें आजच्या औषधीकरणांत भरपूर वापरलेलीं आढळतात. पण आघाडा व कांस्यभस्म हीं द्रव्यें मात्र वापरलेलीं आढळत नाहींत. आघाडा हें भरपूर प्रमाणांत मिळणारें असंदिग्ध द्रव्य असल्यामुळें आयुर्वेद सेवा संघानें त्याचें आसव बनवून विक्रीस ठेवलें आहे.

अरुचि, कृमि, कुष्ठ, ज्वर, हल्लेरा, दाह व पित्तकफ दोष, यावर अपामार्गासव वापरावें. लाळ जास्त येणें, कफवृद्धि मेदोवृद्धि, मूत्रवृद्धि, रक्तदोष इत्यादि विकारावर अपामार्गासवाचा अनुभव घ्यावा.

आयुर्वेद सेवा संघ,
औषधि भवन, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवडक रुग्ण-चिकित्सा—

—: पायांतील तीव्र वेदना व सूज :—

(चिकित्सकः—वैद्य र. गो. कुळकर्णी, आयुर्वेदविशारद, मुंबई २)

असे शरीरीं प्राण जोंवरि, औषध देणें सोडूं नये ।
ईशकृपेनें जीव वांचती प्रचिती त्याची येत असे ॥

रोगीः— पुरुष, वय ४०, व्यवसाय बैठा, मुंबईच्या बाहेर राहाणारा. पूर्वीपासून पोटांत वारा धरणें, मलावरोध वगैरे तक्रारी होत्याच. त्यांचाच परिणाम म्हणून शौचास होतांना थोडेबहुत कुंथावें लागे व कांही काळानें त्यामुळें डाव्या पायांत वेग येण्यास सुरवात झाली. सुरवातीस वेग मधून मधून येत व थांबत. ४।६ दिवस शेकणें, तेल चोळणें या घरगुती उपचारामुळें बरें न वाटल्यामुळें तेथील एका एम्. डी. डॉक्टर चा सल्ला घेऊन औषधोपचार सुरू केले. एक महिना औषधोपचार चालूं असूनहि परिणाम न वाटल्यामुळें ती चिकित्सा बंद करून आयुर्वेद चिकित्सेकडे वळले.

मुंबईस दाखविण्याचा सल्ला

त्या गांवांतील ख्यातनाम आयुर्वेदाचार्यांचें औषध एक महिना घेऊन गुण दिसेना म्हणून पुन्हां परत पहिल्या चिकित्सकांकडे गेले. त्यांनींहि दोन महिने शिकस्तीचे प्रयत्न केले; पण गुण न दिसल्यामुळें त्यांनीं मुंबईस जाण्याचा सल्ला दिला. मुंबईस येतांच येथील एका प्रसिद्ध M.B.B.S. डॉक्टरांचे सल्ल्यानें येथील प्रसिद्ध असलेल्या M.D. डॉक्टरला बोलावून त्यांचे सल्ल्याप्रमाणें औषधोपचारास सुरवात झाली. १॥ महिना औषध सुरू होतें, पण वेदनांचें प्रमाण कमी न होतां तें वाढत जाऊन डाव्या पायाबरोबर उजव्या पायांतूनहि कळा येऊं लागल्या.

सर्व बाजूंनीं तपासणी

शेवटीं सर्वानुमतें एका प्रसिद्ध F.R.C.S. चे हॉस्पिटलमध्यें दाखल करून २ M.D. १ F.R.C.S. त्याशिवाय मलमूत्र रक्त थुंकीचे खास तज्ञ यांनीं एका वेळींच सर्व बाजूंनीं तपासणी केली, क्ष-किरण चित्र घेतलें, पण दोष कोठेंच आढळेना. औषध चालूं होतेंच, पण गुण न येतां हळूंहळूं पायास पावलावर थोडी सूज दिसूं लागली. थोडा तापहि येऊं लागला. भूक मंदावत गेली व वेदनांमुळें झोप उडाली. शेवटीं हाहि औषधी प्रयोग बंद करून तिसऱ्याच F.R.C.S. ना बोलाविलें. त्यांनीं स्पष्ट सांगितलें कीं, ही केस शस्त्रक्रिया साध्य नाहीं. ह्यावर झालाच तर औषधोपचारच उपयोगी पडेल. म्हणून दुसऱ्या M.D. चे सहाय्यानें औषधोपचार सुरू केले.

विकार वाढत चालला

दोन महिने झाले पण गुणाचें नांव नाहीं. विकार वाढत चालला, उठणें, वळणें थांबलें. तेव्हां मुंबईबाहेरील एका प्रसिद्ध वैद्यांचें औषध सुरू केलें. औषधाचा परिणाम लघवीला जळजळीत होऊं लागलें. रोगी मुंबईत व वैद्य १०० मैलांवर आतां काय करावें, रात्रीं लघवी होण्यास फारच त्रास पडूं लागला. तेव्हां M.B.B.S. डॉ. ना बोलावून लघवी काढण्यांत आली व तो मार्ग धुवून काढल्यावर जरा बरें वाटूं लागलें.

एक दिवस रुग्णाचे स्नेह्यांनीं मला सहज विचारलें कीं, ह्यावर कांहीं औषधोपचार नाहीं काय ? मी म्हटलें आतांच काय सांगूं! गेलें एक वर्ष ख्यातनाम डॉक्टर-वैद्यांच्या औषधांनीं गुण नाहीं. तेव्हां लगेच कसें सांगूं! एक महिना औषध घेत असल्यास विचार करतां येईल. फरक वाटला तर चालूं ठेवूं नाहींतर बंद करूं. रोगीहि कंटाळला असल्यामुळें त्यास कबूल होऊन दुसरे दिवशीं रोगी पाहिला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यावेळचीं स्पष्ट लक्षणें

त्यावेळीं पुढील लक्षणें स्पष्ट दिसत होतीं:- रोग्याचे दोन्ही पायास नखापासून तों गुढघ्यापर्यंत उतरती सूज. चलन-वलनाची शक्ति कमी झालेली. पायांत वरपासून खालपर्यंत मनस्वी कळा. खोकला मनस्वी. अलिकडे गेले तीन महिने रोज सायंकाळीं १०० ते १०१॥ पर्यंत ताप. अग्निमांद्य, मलावरोध होताच. रात्रंदिवस वेदना व झोंप नसल्यामुळें दीन झालेला. खोकला केव्हां केव्हां इतका वाढे कीं, आतांच प्राण जातो कीं काय असें वाटे. एकंदर परिस्थिति पाहातां रोगी निश्चित बरा होईल असें सांगतां येण्यासारखें नव्हतेंच. औषध पाहिजे असल्यास प्रयत्न करूं असें सांगितलें व औषध सुरू केलें गेलें.

वातकफप्रधान त्रिदोषदुष्टि

रोगाचा एकंदर विचार करतां तिन्हीं दोष प्रकुपित झालेले दिसून येत असून विशेषतः वात-कफाची दुष्टि जास्त होती व मे महिना असल्यामुळें व त्यांतच अलिकडे रोज ताप येऊं लागल्यामुळें लघ्वीला पण कष्टानें व थोडें होऊं लागलें होतें. औषध मागण्यास आल्यावर प्रथम उपद्रव बलवान् जो ताप खोकला व दिवसेंदिवस येणारी अशक्तता त्यावेळीं (निदान अनुलोमक्षय) ह्यांचाच प्रथम विचार करण्याचें ठरविलें. सुरवातीस वेदना होत्याच, मग त्यांचा परिणाम झोंप न येणें सुरू झालें व ह्या दोन गोष्टींनीं अग्निमांद्य वाढूं लागलें व इतकीं औषधें घेतो पण गुण नाहीं ह्यामुळें मनास उदासीनता आलेली व सर्वांचा परिणाम म्हणून आद्य धातु जो रस तो व्यवस्थित न बनल्यामुळें पुढील सर्व धातूंत दुष्टि झाली (वाट थांबली. मार्गरोध व विघटना सुरू झाली) व विकार सर्व बाजूंनीं वाढूं लागला.

काढा व शक्तिवर्धक औषधें

ताकद वाढल्यास उपचार करण्यास संधि मिळेल असें धरून महालक्ष्मीविलास ·॥· गुंज + सहस्रपुटी अभ्रक ·।· गुं. + प्रवाळ २ गुं. + शृंगभस्म २ गुं. + सितोपलादि ४ गुंजा यांच्या दोन पुड्या सकाळीं ७ वा. व रात्रीं झोंपतेवेळीं मधांतून. दुपारीं २ वा. महावातविध्वंस १/१६ गुं. + शु. कुचला १/४ गुं. व सु. सूतशेखर २ गुं. १ पुडी दुधांतून. सकाळीं १० वा. व सायंकाळीं ६ वा. गुळवेल, कडुनिंब, कडूपडवळ, पुनर्नवा, देवदार, गोखरू, काडेचिराईत, कुटकी, रास्ना बाहवामगज, बाळहरीतकी, जेष्टमध, अडुळसा ह्यांचा काढा प्रत्येक वेळेस २॥-२॥ तोळे देण्यास सुरवात केली. वातावर सूतशेखर, महावातविध्वंस, कुचला; पित्तावर सूतशेखर, प्रवाळ; व कफावर शृंग, महालक्ष्मीविलास, सितोपलादि हीं औषधें असून बहुतेक सर्व शक्तिवर्धक असल्यामुळें ताकदहि वाढेल. तापासाठीं काढ्यांत असलेलीं पंचतिक्त औषधें, वातासाठीं देवदार, गुळवेल, रास्ना; सुजेसाठीं पुनर्नवा, व खोकल्यासाठीं ज्येष्ठमध, पुनर्नवा, अडुळसा वगैरे औषधांचा हा काढा ज्वरघ्न, त्रिदोषघ्न, कासघ्न, दीपक व अनुलोमक आहे.

बाह्य उपचारासाठीं माषादि तेल

बाहेरून पायास माषादितैल लावून निर्गुंडीचे पाल्यानें शेकणें, २ वेळ आहार सकाळीं दूध ·॥· शेर थोडा भात, अर्धी पोळी व मुगाचे वरण, सकाळीं व संध्याकाळीं अर्धा अर्धा कप चहा एवढाच. पाणी तापवून थंड करून मग तें वापरावें.

८ दिवसांत परिणाम

ह्या औषधांचा परिणाम ८ दिवसांतच दिसूं लागला. ताप खोकला ५० टक्के कमी होऊन रोज शौचास लघ्वीस साफ होऊं लागलें. १५ दिवसांत कुशीवर वळतांना जो त्रास होत असे तो बंद झाला, व पायांची सूज थोडी कमी होऊन पायांचें चलन-वलन वाढलें. १॥ महिन्यानें पायाची सूज, ताप, खोकला संपूर्ण जाऊन होणाऱ्या वेदनाहि थांबल्या व एकएक विकार कमी पडूं लागतांच व मन शांत होऊं लागल्यामुळें व्यवस्थित झोंप येऊं लागली, आहार वाढला व जोर येऊं लागतांच दुपारींहि वाढूं लागली. रोगी बसून आपले व्यवहार करूं लागला व २ महिन्यांत काठीचें साह्यानें उभा राहूं लागला. तेव्हां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सायंकाळचा काढा बंद करून त्याऐवजीं महावात-विध्वंसमिश्रण सायंकाळीं सुरू केलें.

३॥ महिन्यांत चालू लागला

३॥ महिन्यांत सर्व तक्रारी मिटून काठीचें ३॥ महिन्यांत गॅलरींत रोगी रोजी ४०।५० वाऱ्यानें ६० फूट लांबीचे गॅलरींत रोगी रोजी ४०।५० फेऱ्या घालूं लागला. रोगी सर्व बाजूंनीं सुधारला तरी डावा पाय किंचित् अधु राहिला. अजूनहि त्यास काठीची जरुरी भासते. ४ महिने औषध घेतल्या-नंतर पुन्हां आपलें गांवीं जाऊन कामावर हजर झाला. मुंबईतील वास्तव्यांत पहिल्या ११ महि-न्यांत एकंदर ९ हजार रुपये खर्च झाल्यावर रुग्ण आयुर्वेदिक चिकित्सेनें १५० रुपयांत बरा झाला. ह्या रुग्णचिकित्सेंत मला गु. वै. ग. म. अभ्यंकर यांचे सल्ल्याचा फारच उपयोग झाला.

(वरील रुग्णास कोरड्या बल्य औषधाबरोबरच त्रिदोषनाशक काष्ठौषधींच्या ताज्या काढ्याची जी योजना करण्यांत आली त्यामुळें दोषांचें पचन-शोधन स्वाभाविकरीत्या झालें व रोग्यास लाभ झाला असावा. वैद्यांनीं जुनाट विकारांचे बाबतींत तरी बल्य औषधा-बरोबर अशा प्रकारचे ताजे काढे अवश्य वापरावेत. —संपादक)

त्रैलोक्यचिंतामणी व श्वासरोग

श्वासरोग्यामध्यें शेवटचे अवस्थेंत त्रैलोक्य-चिंतामणि मात्रा मधांतून अगर कंटकार्यावलेहांतून दिल्यास फारच फायदा होतो असें ५ रुग्णांत दिसून आलें आहे. —वै. र. गो. कुलकर्णी

पवित्र नेपाल कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तो.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.

लिहा:–नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाल

आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारीं
आयुर्वेदिक व युनानी वनौषधि
तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण!

अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक खाका, माणिक, अकीक, सुवर्ण-वर्ख, रौप्य-वर्ख, शिंपा, कवड्या, शंख, प्रवाळ, आवळसार गंधक, दगडीबेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, चाकेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलटकंबल, नागकेशर (अस्सली), ब्राम्ही, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारची वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य! विशेष माहितीसाठीं आमचें साप्ताहिक दरांचें छापील भावपत्रक मागवावें.

टे. फो. नं. ३१७९६ टेलिग्रॅम–'आयुर्वेद'

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी
२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किर्लोस्कर

"शिक्षण व व्यवसाय मार्गदर्शक पुरवणी"

विद्यार्थ्यांना आपल्या शिक्षणक्रमाची व व्यवसायाची निवड करण्याचे दृष्टीनें उपयुक्त ठरेल असे साहित्य, किर्लोस्कर मासिकाच्या मे १९५४ च्या अंकांत ४८ पानांच्या खास पुरवणीच्या स्वरूपांत देण्यांत आलेलें आहे.

अस्. अस्. सी. परीक्षा झालेल्या तरुणांपुढें उच्च शिक्षण घ्यावें काय, व घेणें शक्य असल्यास कोणत्या विषयाचें घ्यावें, हा प्रश्न उभा रहातो. ह्या विषयांवर कुमार उत्कर्ष मंडळाचे श्री. य. गो. नित्सुरे व सुप्रसिद्ध शिक्षणतज्ञ डॉ. ग. श्री. खैर, यांचे लेख देण्यांत आलेले आहेत. कॉलेजजीवनांतील विविध संधींचा फायदा व्यक्तिविकासासाठीं कसा करवून घेतां येईल याबद्दल श्री. गोपीनाथ तळवलकर यांचा लेख मननीय आहे. नोकरी व स्वतंत्र धंद्यात यशस्वी होण्याचे दृष्टीनें पूर्वतयारी कशी करावी यांचें सोदाहरण व सुबोध मार्गदर्शन श्री. ब. ल. वष्ट, श्री. सदाशिवराव पाध्ये (जनरल मॅनेजर, ओगले ग्लास वर्क्स लि.) व श्री. शंकरराव किर्लोस्कर (जनरल मॅनेजर, किर्लोस्कर बंधु लि.) यांनीं आपल्या लेखांतून केलें आहे.

हुशार व कर्तबगार विद्यार्थ्यांचा कल बड्या-ओढींच्या परीक्षांना बसण्याचा व उच्च शिक्षणासाठीं परदेशी जाण्याचा असतो. हें जाणून पब्लिक सर्व्हिस कमिशनवर काम केलेल्या महाराष्ट्रीय सदस्यांचे व व्ही. जे. टी. आय्‌न्स्टि. चे प्रिन्सिपाल पी. अेन्. जोशी यांचे मौलिक विचारहि पुरवणींत दिलेले आहेत. प्रि. ब. वें. बापट यांनीं तयार दिलेले सूचक प्रश्न आपल्या मुलाचा कल शोधून काढण्यास पालकांना उपयुक्त ठरतील तरुणांच्या कर्तृत्वाला वाव देतील अशा सुमारें १५ व्यवसायाची माहितीहि देण्यांत आली आहे.

या माहितीचा लाभ आपला व्यवसाय निवडण्यासाठीं तरुणांनीं अवश्य घ्यावा.

वाचकांचा पत्रव्यवहार—

अध्यापक चर्चा परिषद

ता. १ मे च्या आयुर्वेद-पत्रिकेतील 'अध्यापक परिषद ता. २० मे पूर्वी घ्यावी. अशा अर्थाची आपली सूचना वाचली. म. प्रां. वैद्य संमेलनाच्या स्वागत मंडळाच्या ता. ४-५-५४ रोजीं मुंबईत भरलेल्या सभेंतहि या प्रश्नावर चर्चा झाली. त्याचा निष्कर्ष असा:- अध्यापक चर्चा परिषद ही ता. २८ मे पूर्वी भरवू नये. ती नंतर घ्यावी. कारण असें कीं, मुंबई येथें भरावयाचें हें संमेलन यशस्वी करण्यास ज्यांची विशेष आवश्यकता आहे तीच मंडळी अध्यापक परिषदेंत भाग घेण्यास आतुर आहेत.

दुसरें असें कीं, शुद्ध आयुर्वेद समितीचे कार्यालयाकडे चौकशी करतां सरकारमान्य अध्यापक कोण हें ठरण्यासहि अद्याप अवधि आहे. तें ठरल्यानंतरच अध्यापक परिषद झालेली बरी. सबब ही चर्चा परिषद ता २८ मे नंतर घ्यावी अशी आग्रहाची विनंति आहे.

—प्रतापकुमार वैद्य, प्रधानमंत्री

फलसर्पीच्या औषधापासून तयार केलेलें

फलासव

वाग्भटांत उत्तरस्थानांत गुह्यरोग प्रतिषेधाध्यायांत शेवटीं योनिशुक्रप्रदोषावर फलसर्पि नांवाचा घृतकल्प सांगितला आहे. हल्लीं तूप घेण्याची प्रथा कमी झाली आहे व कफमेदप्रकृति लोकांना असले घृतकल्प मानवत नाहींत. स्थौल्य वाढवितात. म्हणून फलघृताच्या औषधापासून हें आसव बनविलें आहे. शुक्रार्तवदोषामुळें संतति न होणाऱ्या स्त्रीपुरुषांना हें फलासव दोषानुरूप विचारानें वापरून परिणाम नोंदवावयाचे आहेत. वापरू इच्छिणाऱ्यांनीं पत्रव्यवहार करावा.

आयुर्वेद सेवा संघ, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

.... कांहीं सूक्ष्म औषधांचे अनुभव ....

(लेखक:—वैद्य गो. रा. जोशी, आयुर्विद्याविशारद, गडहिंग्लज)

गेल्या अंकांत सूक्ष्म औषधांबद्दलचा विचार मी थोडक्यांत नमूद केला आहे. यावेळीं मी कांहीं सूक्ष्म औषधांचे अनुभव निवेदन करीत आहे.

उपयुक्त सूक्ष्म औषधें

मी माझे दवाखान्यांत नेहमीं १० गुं. औषध व १० तोळे साखर या प्रमाणांत खालील औषधें वापरीत असतो. (१) त्रिभुवन-कीर्ति (२) ज्वरांकुश (३) क्विनिन (४) शुद्ध गंधक (५) पिंपळी (६) सुवर्ण-सूतशेखर (७) महालक्ष्मीविलास (८) वसंत--कुसुमाकर (९) सुवर्ण-मालिनी-वसंत (१०) सुवर्णराजवंगेश्वर (११) समीरपन्नग (१२) रससिंदूर (१३) श्वास कुठार (१४) प्रतापलंकेश्वर (१५) शतपुटी अभ्रक (१६) अग्नितुंडी (१७) प्रवाळपंचामृत (१८) पंचामृत-पर्पटी (१९) महायोगराजगुग्गुळ (२०) चंद्रकला इ.

चूर्णें नेहमींप्रमाणें वापरतो

चूर्णें वगैरे पारा, गंधक, सुवर्ण रहित औषधें, यांचा या सूक्ष्म प्रमाणांत व्हावा तसा उपयोग होत नाहीं, असें दिसून आलें, म्हणून तीं औषधें नेहमींच्या प्रमाणांत वापरतो.

सूक्ष्म त्रिभुवनकीर्तीची अवस्था

वरील प्रमाणानें तयार केलेलें त्रिभुवनकीर्ति हें औषध साध्या ज्वरप्रतिश्यायापासून तो वातकफज्वरा-सारख्या द्वंद्वज ज्वरांतहि अनेक वेळां अगदीं लहान-मुलापासून तो वृद्धापर्यंत वापरून अनुभव घेतला आहे. अतिशय उत्कृष्ट उपयोग होतो. दिवसांतून ८।१० वेळ गरम पाण्यांतून किंवा तसेंच २ गुंजेची १ पुडी याप्रमाणें औषध दिलें तर अंगमर्द, डोळ्यां-तून पाणी येणें, जडत्व इ. लक्षणें फार लवकर कमी होतात. लहान मुलांमध्यें तर ज्वर, कास, श्वास, प्रति-श्याय हीं लक्षणें असतां सहसा दुसरें औषध द्यावें लागत नाहीं.

सूक्ष्म सूतशेखराचा विशेष उपयोग

त्याचप्रमाणें या सूक्ष्म मात्रेनें दिलेल्या सूत-शेखराचाहि पित्तजन्य किंवा वातपित्तजन्य विकृतींत चांगला उपयोग होतो. विशेषतः गरोदरपणीं होणाऱ्या वांत्या आणि जळजळ ही स्त्रियांना फारच त्रासदायक

लेखक—वैद्य गो. रा. जोशी

होतात. पाणीसुद्धां पोटांत रहात नाहीं व ओकून ओकून जीव हैराण होतो. अशा वेळीं या मिश्रणाचा फारच चांगला उपयोग होतो, व वांत्या आणि जळजळ हीं लक्षणें इतर कोणत्याहि औषधापेक्षां या मिश्रणानें फार लवकर कमी होतात. लक्षणें तीव्र असतील तेव्हां मात्र औषध वरचेवर द्यावें लागतें. आणि दुसरा फायदा म्हणजे खल्वी किंवा कुपिस्थ रसायनें तशींच दिलीं तर नाजूक प्रकृतीच्या रुग्णांना घसा येणें, हातापायाची जळजळ, मूत्रप्रवृत्ति सदाह होणें हीं जीं लक्षणें होतात तीं या सूक्ष्म मात्रेनें औषध दिलें तर होत नाहींत आणि व्याधिलक्षणें तर कमी होतातच.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रिकेट्स्वर सूक्ष्म सुवर्णमालिनीवसंत

रिकेट्स् (फक्क) अथवा (बाळशोष) या विकारांत यामिश्रणाप्रमाणें तयार केलेल्या सुवर्णमालिनीवसंताचा उत्तम उपयोग होतो. अगदीं बलमांसविहीन रुग्णांतहि वापरून व इतर दुसरें कोणतेंहि औषध पोटांत न देतां अनुभवून पाहिलें आहे. रोज २ गुंजा प्रमाणाच्या ६ पुड्या द्याव्या लागतात. आणि वर चोळण्यास कडुनिंबाचा पाला + पांढरे तीळ दुधांत वाटून तो, रस अंगास चोळणेस सांगत असतो. अनुभव घेऊन पहावा.

तमकश्वासांत सूक्ष्म श्वासकुठार

तसेंच तमक-श्वासांत श्वासकुठार आलेरस मध इ. अनुपानांतून तसाच दिला तर कांहीं रोगांत धवराट, श्वास वगैरे लक्षणें अधिकच होतात व जीव कासाविस होतो. अशा रुग्णांना १० गुं. १० तोळे चे सूक्ष्म मिश्रण दिलें तर औषध चांगलें लागू पडते व वरील लक्षणें कमी होऊन आश्चर्यकारक फरक दिसून येतो.

डांग्याखोकल्यांत अग्नितुंडी

डांग्या खोकल्यांत पचनाची विकृति, यकृत-दुष्टि वा वृद्धि, आध्मान, ही विकृति ज्या वेळीं असते तेव्हां अग्नितुंडीच्या मिश्रणाचा फार फायदा होतो. पचन सुधारून खोकल्याची उबळ कमी कमी होते. वरील विकारानें आणि खोकल्यानें त्रासलेल्या हट्टी चिडखोर मुलांना औषध देण्यांच्या दृष्टीनें किती सुकरता वाटते तें हें मिश्रण वापरून अनुभव घेतल्या शिवाय समजणार नाहीं.

लहान मुलें सूक्ष्म औषधावर खूष

याप्रमाणें अवस्थाभेदानुसार वरील सर्वच औषधांचा निरनिराळ्या व्याधीमध्यें चांगला उपयोग होतो. रुग्णांना औषध घेण्याचा कंटाळा येत नाहीं. लहान मुलें तर या औषधावर फारच खूष असतात. वैद्यबंधूंनीं आपल्या व्यवसायांत या मिश्रणानें तयार झालेल्या औषधांचा जरूर उपयोग करून आपआपले अनुभव प्रसिद्ध करावेत अशी विनंति आहे.

———

वाचकांचा पत्रव्यवहार—

जुनाट व्रणावर केळीचें पान

आपल्या आयुर्वेद पत्रिकेंत उपचार या सदराखालीं आलेला अनुभव कळवीत आहे.

एका रुग्णास (स्त्री वय६०वर्षें) उजव्या पायाच्या पाऊलास करांगुळीपासून घोट्याकडे ४ बोटे जागेत जवळजवळ ८ वर्षे व्रण होता. त्यावर फक्त केळीचे पान रोज बांधण्यास सांगितलें. आश्चर्यकारक गुण आला. २ महिन्यांत पूर्ववत् त्वचा झाली.

—वै. गो. रा. बोरी

अमोल लेख

आयुर्वेदपत्रिकेच्या सहकारी पद्धतीनें तयार करावयाचीं औषधें ही लेखमाला प्रसिद्ध होत आहे. आम्हाला या विषयाचा स्वतंत्र ग्रंथ हिजे आहे. आपणाकडे आहे काय ! असेल तर त्याची किंमत काय ! असे अमोल लेख प्रसिद्ध करून वैद्यवर्गाचे आपण समाधान करीत आहात याबद्दल धन्यवाद !

—हकीम मीरासाहेब हसनसाहेब

सांडू
टोमॅटो कम्पाऊन्ड
•व्हिटॅमिनयुक्त टॉनिक
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई
[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स-
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मधुमेहावर रानतोंडलें (कडू तोंडलें)

लेखक:— वैद्य ज. के. सबनीस मुंबई

*Coccinia Indica wright & Arn. (formerly called Cephanlandra Indica NAUD.) in Diabetes.

रानतोंडल्याचीं इतर नांवें:- संस्कृत-बिंबा, गुजराथी-गलेडू, हिंदी व उर्दू-कुंदरू, तामिळ-कोवाई स्कूल ऑफ ट्रॉपिकल मेडिसिन, कलकत्ता, या सरकारी वैद्यकीय संशोधन शाळेंत व रुग्णालयांत प्रयोग सफल केल्यानन्तर डॉक्टर डे व डॉ. मुकर्जी (लेखकौ) लिहितात:- रानतोंडलें या वनस्पतीच्या अंगोपांगाचा मधुमेहावर उपयोग वैद्य हकीम यांजकडून पूर्वापार होत आला आहे व त्याची ख्याति विशेषतः बंगालमध्यें फार आहे. हकीम लोकांत विशेषतः फळेंच वापरण्याची प्रथा दिसते. कविराज लोक मात्र(बंगाल्यांत वैद्यास कविराज म्हणतात.) पानें, मुळें, फळें इत्यादींचा म्हणजे पंचांगांचा वापर करतात. इन्सुलिनचीं इंजेक्शनें निरुपयोगी वा धोक्याचीं ठरणाऱ्या रुग्णावरसुद्धां याचा गुण येतो असा देशी वैद्यांचा दावा आहे. असो.

३२ वर्षांपूर्वी प्रथम प्रयोग

कलकत्ता मेडिकल कॉलेजमध्यें सुमारें ३२ वर्षांपूर्वी याच्या पंचांगाच्या रसाचा प्रथम उपयोग करण्यांत आला. त्यावेळींहि याचा उत्तम उपयोग (Promising results) दिसून आला. पण त्या वेळच्या संशोधनाचा शास्त्रीय वृत्तांत योग्य तऱ्हेनें संकलित करून सादर केला गेला नव्हता. नंतर १९२५ सालीं चोप्रा व बोस यांनीं पानें, मुळें व फांद्या (Extract of leaves,roots & stems) यांचें सत्व काढून मानवी रुग्णावर पुन्हां प्रयोग केले. पण सत्व काढण्याची रीत चुकल्यामुळें किंवा फळें न वापरल्यामुळें असेल कदाचित्, त्यांना मात्र रक्त वा मूत्रांतील शर्करा कमी करण्याचा गुण या वनस्पतींत आढळून आला नाहीं. नंतर पुढें साहाजिकच याकडे

---

*(1) Coccinia Indica in Diabetes :- De & Mukherjee in the 'Indian Journal of Medical Sciences, Bombay'. (December 1953 issue)

(2) Dr. W. R. Aykroyd M. D. Directer of Nutrition Research Laboretories,. Kunnoor. यांनीं सामान्य भारतीयांच्या आहारद्रव्यांचें पोषकत्व (पोषणमूल्य) व समाधानकारक आहार-योजना (The Nutilive value of Indian and the planning of satisfactory diets) या नं. २३ च्या बुलेटिनमध्यें 'Coccinia India' याला देशी प्रतिशब्द म्हणून KOVAI fruit (कोवाई, कुन्दरी, तोंडलें, भाजीचें गोडें) असें एके ठिकाणीं व परवल, परवर असें दुसरें ठिकाणीं संबोधलें आहे. यापैकीं पहिला अर्थ भाजीचें तोंडलें वा रानतोंडलें जें कडू असतें हा बरोबर व दुसरा परवल वा परवर हा चूक दिसतो. या परवलाचें लॅटिन नांव Tricosanthes Dioica हें असावें. (नाडकर्णी पान ८६३). याचीहि जंगली जात कडू व औषधोपयोगी व बागायती जात cultivated varity भाजीच्या कामाची आहे. दोन्ही फळांची अंतर्गत रचना वेगवेगळी आहे. तसेंच तोंडल्याचें बीं चपटें व लांब (flat, oblong) तर परवलाचें बीं पूर्णपणें गोल (spherical) असतें. बंगाल,बिहार, मध्यप्रदेशांतील वैद्य ही भाजी ज्वरी कुष्ठरोग्यांस आणि सामान्य माणसासहि पथ्याची म्हणून आग्रहानें खाण्यास सांगतात. उत्तम जात बनारस, जबलपूर वगैरे ठिकाणीं होते. मुंबईबाजारांत ठाणें, कुलाबा जिल्ह्यांतील चालू माल विपुल प्रमाणांत व थोडाफार जबलपुरी, बनारसी उंची मालहि मे ते डिसेंबर अखेर मिळतो. पण महाराष्ट्रीयांत या बल्य व पथ्यकर भाजीचा वापर फारसा दिसत नाहीं. —ज. के. स

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विशेष लक्ष कोणी दिलें नाहीं.

डॉ. मुकर्जींच्या माहितींचे २ रुग्ण

नंतर गेल्या १-२ वर्षांत मुकर्जी यांच्या माहितीच्या २ रुग्णांची यशस्वी चिकित्सा एका वैद्याकडे चालू होती, त्याकडे त्यांचें लक्ष वेधलें गेलें. या दोघांहि रुग्णांना वैद्याकडे जाण्याच्या आधीं कलकत्त्याच्या उच्चतम व ख्यातनाम ॲलोपाथी डॉक्टरांकडे दीर्घकाल उपचार केले होते व स्कूल आफ् ट्रॉपिकल मेडिसिन ' च्या रुग्णालयांतहि त्यांच्या प्रकृतीची कसून तपासणी करण्यांत येऊन (Diabetes melitus चें) निदान पक्कें केलें गेलें होतें. * I आधुनिक चिकित्सा असमाधानकारक ठरल्यानंतर या दोघांनींहि एका वैद्याकडे उपचार सुरूं केले. कांहीं आयुर्वेदीय * खनिज रसायनें (हीं कोणतीं तें आम्हांस समजलें नाहीं.) व जोडीला रानतोंडल्याच्या मुळाचे ताजे कल्प अशी चिकित्सा सुरूं असल्याचें कळलें.

रुग्णांचा कायापालट

ही चिकित्सा सुमारें १ वर्षभर झाल्यानंतर त्या दोघांहि रुग्णांचा प्रायः कायापालट झालेला दिसला. त्यांची सर्वांगीण प्रकृति तर बरीच सुधारलेली दिसली, पण रक्ताचें परीक्षण केलें त्यांतहि रक्तांतल्या साखरेचें प्रमाण बरेंच खालीं आलेलें (Reduced the blood-suger content significantly) दिसलें व (Diabetes Melitus) चीं इतर लक्षणें उदा. मूत्रांतील साखर, बहुमूत्रता, मांसक्षय इत्यादि तर प्रायः नाहींशी झालेली दिसलीं.

वरील दोन्ही रुग्णांवर झालेलें या औषधांचें प्रात्यक्षिक इतकें खात्री वाटण्यासारखें दिसलें कीं, आधुनिक लॅबोरेटरी पद्धतीनें या वनस्पतीची पुन्हां तपासणी करण्याचें आम्हीं (डॉ. डे आणि मुकर्जी यांनीं) ठरविलें.

तपासणीचा अनुक्रमें तपशील

असल्या तपासणीचा अनुक्रम खालीलप्रमाणें:-

(१) प्रयोगशाळेंतले ८ ससे (Rabbits) चांगल्या प्रकृतीचे निवडून घेतले. व ८ दिवसपर्यंत त्या सर्वांस पूर्ण निरीक्षणाखालीं सारखें खाणेंपिणें, आहारविहार, प्राकृतिक निवास वगैरे ठेवून त्यांना मूळचा कांहींएक रोग नाहीं अशी खात्री करून घेतली

वंगेश्वर वा सोमनाथ रस

* रानतोंडल्याच्या मूळ, फळ वा पंचांगाच्या ताज्या कल्पांच्या अनुपानाबरोबर सामान्यतः वंगेश्वर वा सोमनाथ रस देतात. यानें बराच फायदा होतो. या रोगांत गोड्या तोंडल्याची भाजी पण हितावह आहे. लघवींतून जाणारा चिकट पदार्थ [Albuminuria] जो मधुमेहांमध्यें कधीं कधीं दिसतो, त्यावरहि हें औषध उपयुक्त आहे, असें डॉ. देसाई औषधी-संग्रहांत लिहितात (पान२४९).

मधुमेही रोग्यासाठीं उपयुक्त औषध

शिलाजत्वादिवटी

सध्यां मधुमेही लोक असाणाभरडचें पाणी नित्य सेवन करूं लागले आहेत व त्यामुळें त्यांना फायदाहि होत आहे. आयुर्वेदानें जुनाट मधुमेही रोग्यांनीं क्रमानें ४०० तोळे शिलाजतु सेवन करावा असें सांगितलें आहे.

मधुमेही रोग्यांचे मेदादि धातु बलवान् करण्यासाठीं शिलाजतु-आदिवटी हा उपयुक्त कल्प आहे. त्रिवंग-भस्म, कडूनिंबाच्या वाळविलेल्या पानांचें चूर्ण, गुडमार चूर्ण, शिलाजतु, व सुवर्णभस्म हीं औषधें या वटीमध्यें असतात.

लघवीला अधिक प्रमाणांत होणें व लघवींतून साखर जाणें या विकारावर या गोळ्या उपयुक्त व अनुभविक आहेत.

आयुर्वेद सेवा संघ, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मधुमेह निर्माण केला

(२) नंतर त्यापैकीं ७ सशांना ॲलोक्सानची (Alloxan-Ureide of mesoxalic Acid) इंजेक्शनें देऊन त्यांचेमध्यें Dia melitus नामक मधुमेह निर्माण केला. या ॲलोक्सानच्या इंजेक्शनांनीं अग्न्याशयांतल्या (Pancreas) Necrosis of the Beta cells of the Islets of Langerhans स्वादुपिंडातल्या इन्सुलिन नामक स्राव (धात्वग्निः धात्वंतराग्नि) निर्माण करणाऱ्या स्वादुपिंडाचा विनाश वा कार्यनाश होतो हें अनेक प्रयोगांनीं सिद्ध झालेलें आहे. [* II]

हें इंजेक्शनहि नेहमीं अशा प्रयोगांत देतात त्याच्या दीडपट मात्रेनें (150 Mg/Kg) आम्ही दिलें, सतत ८ दिवसपर्यंत दिलें. त्यामुळें सर्व सशांना चांगल्या प्रकारें मधुमेह रोग झाला.

कडु तोंडले मुळाच्या सालीचें सत्व

नंतर यापैकीं ५ सशांना कडू तोंडल्याच्या मुळाच्या सालीचें शास्त्रीय पद्धतीनें काढलेलें सत्व दिलें (Petroleum Ether B. P., 40-60c). या सत्वाच्या 2 c. c. मध्यें 11 g. इतकें मूळ-द्रव्य आलें असावें. व हें 2 c. c. प्रमाणांत प्रथम कांहीं दिवस रोज २ वेळ, नंतर कांहीं दिवस रोज १ वेळ, व पुढें आठवड्यांतून २ वेळां असें या ५ सशांना ५८ ते ७१ दिवसपर्यंत दिलें.

४ ससे बरे झाले

नंतर पाहातां यापैकीं ४ ससे चांगल्यापैकीं बरे झालेले दिसले. औषध थांबल्यावरहि (निरीक्षणाच्या मुदतीपर्यंत तरी) दीर्घ कालपर्यंत त्यांची प्रकृति बरीच राहिली. क्वचित् पुनरुद्भव जेथें झाला तेथेंहि थोड्याशाच औषधानें पुन्हां बरें वाटलें. पांचव्या सशावर मात्र टिकाऊ स्वरूपाचा गुण दिसला नाहीं. (प्रकृतिभेदानें !) औषध आहे तोवर प्रकृति बरी, थांबल्यावर पुन्हां लवकरच मूळ पदावर; अशा स्वरूपाचा म्हणजे इन्सुलिन सारखाच गुण त्या एका सशावर अनुभवास आला [Suppressive effect].

"हें आमचें संशोधन प्राथमिक स्वरूपाचें आहे. इतर संशोधकांनींहि हें काम हातीं घ्यावें व जास्त सखोल व विस्तृत प्रमाणांत संशोधन करावें अशा बुद्धीनें आज सादर करीत आहोत." असें म्हणून डॉ. डे व मुकर्जी यांनीं आपलें निवेदन संपविलें आहे. सदर निवेदनासोबत Dosage, blood- Urine-examination इत्यादि बाबत विस्तृत कोष्टकें छापलीं आहेत. ती जिज्ञासूंनीं मूळ लेखांतच पहावी.

लेखकः—वैद्य ज. के. सबनीस

पाश्चात्य पद्धतीनुसार पुढील कार्य कोणी हातीं घेणार असतील तर त्यांच्याकरतां खालील सूचना प्रस्तुत लेखक करूं इच्छितो. यापुढील प्रयोगांत जे ससे बरे होतील त्यांची चिरफाड करून त्यांच्या Pancreas मधील Beta cells of the Islets of Langerhans ची तपासणी करावी. कांहीं ससे Alloxan Diabetes निर्माण केलेले पण रानतोंडल्याचें वा इतर कोणतेंच औषध न देतां control म्हणून ठेवावे लागतीलच. या प्रयोगांतहि ७ पैकीं २ ससे असे ठेवून पांचासच औषध दिलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतें. त्यांच्या B. cells ची औषधानें बऱ्या झालेल्या सशांच्या B. cells शीं तुलना करतां येईल.

संप्राप्तीची अपुरी कल्पना !

Alloxan इंजेक्शनांनीं आधीं या Cells चा विनाश (Necrosis) झाला होता हें उघडच आहे. रानतोंडल्याच्या चिकित्सेनें Clinical cure मिळतो, रोगी बरा झालेला दिसतो. तें कसें झालें असावें (its mechanism) त्याचें निरीक्षण करावें. म्हणजे Alloxan नें विनाश वा कार्यनाश झालेले B. Cells पुन्हां Regenerate वा Re-activate (पुनर्निर्मित वा पुनः कार्यप्रवण) होतात कां हें पहावें. Regeneration किंवा Re-activation होतें असें दिसलें तर तो या औषधाचा गुण समजतां येईल. ॲलोपाथीस आज परिचित असलेल्या Insulin वा इतर कोणत्याच औषधांत हा गुण नाहीं. असें ॲलोपाथच म्हणतात. उलटपक्षीं B. Cells तसेच नष्ट (Necrosed) वा कार्यहत (inactive) स्थितींत रहातात पण रोगी मात्र सुधारतो (क्लिनिकली), रक्तांतली शर्कराहि कमी होते व वेतांत रहाते असें दिसलें तर B. Cells नाश झाल्यामुळें Insulin ची निर्मिति होत नाहीं म्हणून D. melitus होतो, ही जी संप्राप्तीची चालू ॲलोपाथिक कल्पना आहे ती चूक (निदान अपुरी तरी असावी) असें ठरेल, असो. [* III]

मुंबईच्या बाजारांत ताजें पंचांग

कडू तोंडल्याचा प्रमेहामध्यें वापर महाराष्ट्रांत फारसा प्रचलित असावासें दिसत नाहीं. पण तसें म्हणावें तर मुंबईच्या बाजारांत सुकलेलीं फळें व इत-- केंच नव्हे तर ताजें पंचांगहि आधीं वर्दी न देतांहि मुलेश्वर नळबाजारांत प्रस्तुत लेखकास मिळूं शकलें. यावरून मुंबईत तरी रोज याचा वापर होत आहे हें निश्चित दिसतें. पण ते कोण कशाकरितां वापरतो याचा मात्र तपास अद्याप लागूं शकला नाहीं. अर्थात् मेह-- प्रमेहाशिवायहि या कडू पण स्निग्ध औषधाचा उप-योग पित्तज्वर, शोथ, त्वचेचे रोग, जननेंद्रियें व मूत्रसंस्थेचे इतर रोग, रक्तपित्त इ. वर संभवतो.

पत्रिकेच्या वाचकांपैकीं याची माहिती वा अनु-भव ज्यांना असेल त्यांनीं तो प्रसिद्ध करावा अशी विनंति आहे.

I-II-III Etiology Pathology of the Diabetic Syndrome. स्वादुपिंडाच्या विनाशा-मुळें वा कमी अधिक कार्यनाश झाल्यामुळें इन्सुलिनची निर्मिति अपुरी व बंदच होऊन मधुमेह निर्माण होतो अशी संप्राप्ति चालू समजली जाते. पण या-बाबत हल्लीं पाश्चात्यांतहि वादतीं मतमतांतरें आहेत. उदाहरणार्थः—

अ) " मधुमेह्यांपैकीं ८०% टक्के रुग्ण (रोगाच्या सुरवातीस) स्थूल व मध्यम वा उतार वयाच्या व्यक्ति असतात व इन्सुलिनची कमतरता नव्हे तर स्थौल्य हेंच त्यांच्या रोगाचें कारण असावें. (कफप्रमेही)

— Beaumont " Medicine 1948 " page 647 & 652

ब) तसें पाहतां रक्तांत साखरेचें अधिक प्रमाण असणें हेंच (D. Melitus) चें निर्णायक गमक समजण्यांत येतें. इतर प्रमेहांत Glycosuria वगैरे मध्यें मूत्रांत साखर अधिक असली तरी रक्तांत अधिक नसते. पण Clinical Methods मध्यें page 187 Edition 1949 Hunter Hutchinson यांना लिहिण्याचा प्रसंग येतो कीं, The Significance of moderately raised blood sugar curves without symptoms of Diabetes is not known म्हणजे असें कीं, रक्तांतहि साखर अधिक असली पण मधुमेहाची इतर लक्षणें नसलीं तर तो Diabetes नव्हे. म्हणजे लक्षणें हेंच निर्णायक.

क) Diabetes चे रोगी मेल्यानंतर त्यांचे Pancreas ची तपासणी केली तर पुष्कळ रोग्यांच्या अग्न्याशयांत Pancreas मध्यें निरोगी लोकांत असतें तितकेंच इन्सुलिन दिसून येतें.

— Downie Medical Journal of

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Australia 1: 105; 1951 Vide J. A. M. A. July 7- 1951. page 971.	
(ड) "९०% रोग्यांत यकृताची विकृति दिसून येते"	Kaito Tohoku J. Exp. Med. 51: 247
(इ) "व्हिटामिन A व B Complex दिल्यानें रक्तांतलें व मूत्रांतलें शर्करा-धिक्य Acetonuria व इतर सर्व लक्षणें सुधारलीं"	R. Lecop et al Therapy 6: 15: 1951
(फ) "D. Melitus हा लक्षण समुच्चय आहे (Syndrome Complex) व त्याला अनेक कारणें असूं शकतात." (इन्सुलीन वेगळी)	Downie in same as (c) या डाऊनी साहेबांनीं इन्शुलिन च्या विरुद्ध मोठी आघाडी चालू आहे.

आयुर्वेदांतील कल्पना दृढ व सुस्पष्ट

आयुर्वेदांत मेह-प्रमेह व अंतिमरूप मधुमेह यांचीं मूळ कारणें, संप्राप्ति, चिकित्सा व साध्यत्व यावद्दलच्या दृढ व सुस्पष्ट कल्पना आहेस व त्या नित्य प्रत्ययासहि येतात. तेव्हां वास्तविक पहातां वैद्यास या सर्व मतमतांतरांत स्वतःस गुरफटून घेण्याचें कांहीं कारण नाहीं. पण सध्यां काळच असा विचित्र आला आहे कीं, आम्ही पाश्चिमात्यांच्या नित्य बदलत्या समजुतींची (गैरसमजुतींचींहि) अभ्यासपूर्वक नोंद घेतली नाहीं तर स्वकीयांच्याच दृष्टीनें आम्ही प्रगतिशील दिसूं शकत नाहीं. म्हणून हा सर्व प्रपंच करावा लागत आहे, जाणते वाचक क्षमा करतीलच.

पांढरें कोड नष्ट झालेल्या हजारों गांवच्या लोकांचीं बक्षिसें व प्रशस्तिपत्रें छापलेलें पत्रक मोफत मागवा.

वैद्य के. आर. बोरकर मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला [मध्य-प्रदेश]

पशुवैद्यांचा तुटवडा

पंचवार्षिक योजनेतील पशुधनाच्या सुधारणाविषयक संकल्पित योजना हातीं घेतांना पशुवैद्यांची भासणारी तूट भरून काढण्यासाठीं राज्य सरकारांच्या विचारानें भारत सरकारनें हैद्राबाद व हिस्सार (पंजाब) येथील पशुवैद्यक महाविद्यालयांत एक प्रयोग म्हणून दोन पाळ्यामध्यें शिक्षणाची व्यवस्था करण्याचा आणि मथुरा येथील उत्तर प्रदेश पशुवैद्यक महाविद्यालयांत जुलै १९५४ पासून अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळें १८० अधिक विद्यार्थ्यांस प्रवेश मिळेल.

या महाविद्यालयांत प्रवेश मिळण्यासाठीं किमान शैक्षणिक पात्रता इंटर सायन्स (वैद्यकीय गट) असून वयोमर्यादा १७ ते २१ या दरम्यान ही आहे.

अफूचा कारखाना

भारत सरकारचा अफू कारखाना गाझीपूर (उत्तरप्रदेश) येथें आहे.

उज्वल कीर्ति

आयुर्वेदीय औषधांची उज्वल कीर्ति बनविलेल्या सिद्ध औषधांच्या गुणावर आहे. औषधें गुण देणारीं असतील तर कीर्ति नेहमीं उज्वल राहील. तरी अशीं गुण देणारीं औषधें, अस्सल ताजी व स्वच्छ घटक औषधी द्रव्यें खरेदी करण्यावर अवलंबून आहे. औषधी द्रव्यासाठीं आपण

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स

पायधुनी, मुंबई नं. ३

फोन नं. (३१८५८) यांचेकडे मागणी करा.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें

मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात.

अधिक माहितीसाठीं कॅटलाग मागवा.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दंतवैद्य चंद्राकुमारी शुभविवाह

मुंबई येथील दंतवैद्य किशोरदास गुप्ता यांची कन्या चि. सौ. कां. चंद्राकुमारी व डॉ. रमणलालजी शाह एम्. बी. बी. एस. (पारडी) यांचा शुभविवाह ता. २९ मे १९५४ रोजीं सायंकाळीं ७ वाजतां (गुलालवाडी-स्वामीनारायण मंदिरासमोर ३ रा भोई-पाडा भुलेश्वर) मुंबई २ येथें होणार आहे.

वैद्य किशोरदासजींच्या दंतवैद्य कार्यालयाचा पत्ता अ. भा. आयुर्वेदिक डेंटल मिशन, ३२८ विठ्ठल-भाई पटेलरोड मुंबई ४ असा आहे.

नासिक शहर वैद्य मंडळ

दिनांक ५-५-५४ रोजी नासिक शहर वैद्य मंडळाची पदाधिकाऱ्याची निवडणूक होऊन खालील प्रमाणें कार्यकारी मंडळ तयार झालें आहे.

अध्यक्ष- वैद्य विष्णुशास्त्री दाते.
उपाध्यक्ष- वैद्य पी. पी. टापर
मंत्री- वैद्य ग. म. लोखंडे, वैद्य श्री. कृ. करमरकर
कोषाधिकारी- वैद्य व. ना. रानडे
कार्यकारी मंडळांतील सदस्यः- १) वैद्यरत्न वि. ग. केळकर २) वै. विंदुमाधवशास्त्री पंडित ३) वै. स. कृ. लेले ४) वै. वा. ना. आंवर्डेकर ५) वै. पां. प्र. दाणी ६) वै. त्र्यं. व. दाते ७) वै. ज. ल. रामैय्या ८) वै. म. क. आग्रवाल ९) वै. रं. गो. मानोसे १०) वै. वा. स. मराठे.
हिशेब तपासनीस- वै. दि. कृ. देवधर.

आयुर्वेदप्रचाराची एक अनुकरणीय दिशा

नमस्कार. आपण पाठविलेल्या कॅलेंडरकडे आज ध्यान गेलें. माझ्या नांवावर कॅलेंडरच्या आणखी १-२ प्रति पाठविण्यांत येतील तर मी स्वतःला अनुग्रहीत समजेन.

शिवाय खालीं दिलेल्या पत्यावर दोन प्रति पाठवाव्यात. आयुर्वेदप्रचाराची हीसुद्धां एक अनु-करणीय दिशा आहे. —वैद्य रणजितराय

दवाखाना विकणें आहे

कै. डॉ. राका M. B. B. S. यांचा मध्यवस्तींत असलेला चालू दवाखाना फर्निचर-सह विकणें आहे.

तीच जागा पण भाड्यानें मिळूं शकेल.

मोहनलाल हंसराज राका
सरकारवाड्यासमोर, नासिक

विषतंत्रांत मस्तूचा उपयोग

मागील अंकांत मस्तूचा अष्टांग आयुर्वेदाच्या विविध चिकित्सेंत उपयोग दाखविला होता. त्यांत 'विषचिकित्सेतील उपयोग' राहिला. तो पुढीलप्रमाणें-

करंजार्जुनशेलूनां कटभ्याः कुटजस्य च।
शिरीषस्य च पुष्पाणि मस्तुना दंशलेपनम्॥
उत्तरस्थान अ. श्लो. ३६।३७

करंजादि झाडांची फुलें मस्तूंत वाटून त्याचा विंचवाचे दंशावर लेप करावा. विंचवाचें विष उतरते. —वैद्य श्री. कृ. करमरकर

शीव रुग्णालयांत दंतविभाग

आयुर्विद्याप्रसारक मंडळ, शीव या संस्थेच्या व. मा. धर्मार्थ दवाखान्यांत एक नवीन दंतरोग विभाग उघडण्यांत आला आहे. वेळ दर बुधवारीं व शुक्रवारीं सकाळीं ९ ते १०॥. दन्तवैद्य किशोरदास गुप्ता हे या विभागाची व्यवस्था पहाणार आहेत. येथें विना-इंजेक्शन दांत काढले जातील, एवढेंच नव्हे तर दांताच्या स्वास्थ्यासाठीं पथ्यापथ्य सुचविलें जाईल व जरूर पडेल तर रोग्यांस तेथील रुग्णालयांतील ठेवून उपचार केले जातील.

गुदापाकावर मलम

तुरटीची लाही व संगजीऱ्याची पूड समभाग घेऊन तुपांत खलावी व मलम डबींत भरून ठेवावें. जरूर पडेल त्यावेळीं वापरावें. फार उत्तम मलम आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभिनव महारोगी परिषद, अमरावती

परिषदेंत मंजूर झालेले ११ ठराव

भारतांतील पहिली प्रादेशिक महारोगी परिषद अमरावती (मध्यप्रदेश) येथील श्रीजगदंब कुष्ठ-निवासांत ता. २७।२८ एप्रिल रोजीं उत्कल (ओरिसा) चे ख्यातनाम महारोगी सेवक कार्यकर्ते डॉ. ॲझाक संत्रा यांच्या अध्यक्षतेखालीं यशस्वी रीतीनें पार पडली. त्या परिषदेंत मंजूर झालेले ११ ठराव पुढें दिले आहेत. त्यावरून परिषदेच्या विचारसरणीची कल्पना येईल.

१ कुष्ठधामांतील सेवक हे रोगी किंवा रोगमुक्त बांधव यांतूनच असावेत कारण रोग्यांच्या अडीअडचणी, भावना व सुखदुःखें यांची जाणीव ज्या प्रमाणांत किंवा जशी रोग्यांना असते तशी इतरांना क्वचितच असते व त्या अभावीं अशांच्या वागणुकीचा विपरीत परिणाम घडून पुष्कळ वेळा रोग्यांच्या मनांत स्वतःबद्दल न्यूनगंड किंवा उणेपणा निर्माण होऊन त्यांचें अपरिमित नुकसान होतें व आश्रम हें आपलें स्वतःचें घाम आहे हें ते विसरतात व त्यांच्या ठायीं आपुलकीची भावना राहात नाहीं.

२ भारत देशांत महारोग्यांची संख्या फारच भयंकर आहे. त्या मानानें या देशातील कुष्ठाश्रमांची व त्यातील कुष्ठपीडितांची अत्यंत मर्यादित संख्या ही फारच अपुरी पडतात. म्हणून या परिषदेची सरकारला अशी विनंति आहे कीं, ज्या विभागांत कुष्ठ-रोगाचा प्रसार सांथीच्या स्वरूपाचा आहे त्या राज्य सरकारांनीं विद्यमान कुष्ठधामांत दरवर्षी ५०० नवीन रुग्णांची सोय करावी. म्हणजे थोड्याच वर्षांत सांसर्गिक अवस्थेतील कुष्ठपीडित बांधवांना वेगळे ठेवण्याची व्यवस्था निर्माण होऊं शकेल.

३ कुष्ठधामांत आलेल्या कुष्ठपीडित बालकांना निर्मळ औषधोपचार करून त्यांचा प्रश्न सुटणार नाहीं. अशा बालकांसाठीं निरनिराळ्या उद्योगधंद्यांचें व कलांचें शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यांत यावी. अशी व्यवस्था केल्यास रोगमुक्त झाल्यानंतर त्यांचें भावी जीवन स्वाभिमानानें जगण्यास ते समर्थ होऊं शकतील.

४ कुष्ठपीडितांना रोगमुक्त झाल्यानंतर प्रत्यक्ष समाजांत मिसळतां येत नाहीं व त्यामुळें स्वतःच्या परिश्रमावर जीवन चालविण्याची इच्छा असतांहि त्यांना तसें जीवन जगणें अशक्य होतें. म्हणून या परिषदेची सरकारला अशी विनंति आहे कीं, रोग-मुक्त झालेल्या बंधुभगिनींसाठीं सरकारनें पुनर्जीवन वसाहती स्थापन कराव्यात. अशा वसाहतींत परिश्रम करून रोगमुक्त बांधव स्वतःचें जीवन चालवूं शकेल.

५ कुष्ठरोगामुळें ज्यांना शारीरिक व्यंग अगर अपंगता निर्माण झाली आहे अशा रोगमुक्त अपंग बंधुभगिनींसाठीं सरकारनें अनाथालयें काढून अशा अनाथ व अपंग बांधवांची स्वतंत्र सोय करावी अशी या परिषदेची विनंति आहे.

६ कुष्ठरोग हा वंशपरंपरागत रोग नाहीं व त्यांची संसर्गक्षमताहि तीव्र नाहीं ही गोष्ट शास्त्रज्ञांनीं आतां सिद्ध केली आहे. त्याचप्रमाणें प्रत्येक रोगी हा संसर्गक्षम असतोच असेंहि नाहीं. समाजानें या शास्त्रमान्य गोष्टींचा विचार करून कुष्ठ-पीडिताकडे पाहण्याचा आपला दूषित दृष्टिकोन बदलवावा व इतर रोगाप्रमाणेंच हाहि एक शारीरिक रोग आहे हें समजून घेऊन औषधोपचारांची व्यवस्था करतांनाच कुष्ठपीडिताबद्दलचा सामाजिक तिरस्कार व बहिष्कार नाहींसा होईल असा प्रयत्न करावा, अशी या परिषदेची समाजसेवकांना विनंति आहे.

७ " कुष्ठपीडित स्त्रीची तिच्या कायदेशीर पालकाकडून हेळसांड झाल्यामुळें तिला आपलें जीवन जगणें असह्य होतें. अशा स्त्रियांची आर्थिक जबाब-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दारी स्वीकारण्याची कायदेशीर सक्ति तिच्या पालकावर व्हावी व तशा प्रकारचा सरकारनें आदेश द्यावा. अगर कायदा करावा अशी या परिषदेची विनंति आहे.

८ " हल्लीं अस्तित्वांत असलेल्या Leprosy Act of 1809 व Railway Act of 1898 मधील कलम ४७ व ७१ मध्यें, त्याचप्रमाणें राज्य-सरकारचे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कायद्यामध्यें महारोग्यासंबंधींच्या निर्बंधांत पुष्कळ दोष आहेत. हे कायदे व्यवहारतःच नव्हे पण तात्विक दृष्ट्यासुद्धां निरुपयोगी आहेत. ते बदलून घेण्याकरितां व त्यांत सुधारणा सुचविण्याकरितां एक समिति नेमण्यांत यावी. त्या समितीनें नव्या कायद्याचा मसुदा पास करून घेण्याबद्दल प्रयत्न करावेत. "

९ " विद्यार्थी दशेमध्येंच महारोगाचीं लक्षणें प्रथम दिसूं लागतात व तो पूर्ण बराहि होऊ शकतो. म्हणून अशा विद्यार्थ्याला खाजगी अभ्यास करून करून परीक्षेला बसण्याची परवानगी द्यावी अशी शिक्षणखात्याला विनंति आहे. "

१० " पूज्य विनोबाजींनीं श्रम करू इच्छिणाऱ्या गरीब मनुष्याला स्वाभिमानानें राहतां यावें म्हणून शेती देण्याचा उपक्रम सुरू केला आहे. महारोगी लोकांना सर्व प्रथम अशा जमिनी देण्याची व्यवस्था करावी अशी या परिषदेची विनंति आहे."

११ " महारोगी हा योग्य औषधोपचार केल्यावर पूर्णपणें बरा होऊ शकतो ही गोष्ट आतां सिद्ध झाली आहे. तरी जे बरे झाले असतील त्यांना सरकारनें पुनः नोकरीवर घ्यावें किंवा नोकरी देतांना अशा लोकांना प्रथम स्थान देण्याची सरकारनें व्यवस्था करावी. "

वाकेरी भाते

अत्यंत खात्रीचें व ताजे मिळते. १ पौंड २ रु. ट ख. निराळा.

श्रीपाद फार्मसी, पो. पेण (कुलाबा)

आरोग्यविषयक कार्यांत खाजगी प्रयत्नांची आवश्यकता

ग्रामीण भागांत सार्वजनिक आरोग्याच्या बाबतींत सरकारी उपाय योजनांस, खाजगी प्रयत्नांची जोड मिळण्याची आवश्यकता कामगार व सार्वजनिक आरोग्य खात्यांचे मंत्री श्री. शांतिलाल शहा यांनी मेहसाणा जिल्ह्यांत पाटण येथें आरोग्य केन्द्र आणि मोफत नेत्रोपचार व दंतोपचार शिबिर यांचें उद्घाटन करतांना प्रतिपादली. सदरहू केन्द्र व शिबीर भारतीय आरोग्य निधीमार्फत चालविण्यांत येत आहे.

ग्रामीण भागांतील लोकांना मोफत वैद्यकीय मदत देण्यासाठीं हा निधि स्थापन करण्यांत आला आहे.

ग्रामीण भागावर अधिक खर्च

आरोग्यविषयक उपाययोजनांच्या बाबतींत सरकार शहर भागापेक्षां ग्रामीण भागांत अधिक पैसा खर्च करीत आहे असें सांगून सरकारी कार्यांत खाजगी प्रयत्नांची जोड मिळाली पाहिजे, असें ते म्हणाले.

वैद्यक व्यवसायींनीं व वैद्यकीय संस्थांनीं, सार्वजनिक आरोग्याबाबत लोकांच्या मनांत आस्था निर्माण केली पाहिजे, असेंहि ते म्हणाले.

नवीन मराठी वैद्यक मासिक

: महाराष्ट्र वैद्यक परिचय :

औषधें, इंजेक्शनें, रोगनिदान, रुग्ण-परीक्षा, नवीन शोध वगैरे पाश्चात्य वैद्यकांतील ज्ञान सोप्या मराठी भाषेंतून देणारें एकमेव मासिक " महाराष्ट्र वैद्यक परिचय " ' वैद्यकीय पेशांतील बहुमोल सहाय्यक ' आजच वर्गणीदार व्हा ! वार्षिक वर्गणी ५ रु.

(किरकोळ अंकासाठीं आठ आण्याचीं तिकीटें पाठवावीत.)

पत्ताः- संपादक, वैद्य जे. बी. मोकाशी-ठाणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वच्छ नासिक

गतवर्षीप्रमाणेंच यंदाहि नगरपालिका नाशिक या संस्थेच्या विद्यमानें साजरा होणाऱ्या आरोग्य- सप्ताहांत नाशिक मेडिकल ॲसोसियेशन, नाशिक रोटरी क्लब व नाशिक शहर वैद्य मंडळ या संस्थांनीं भाग घेतला. प्रत्येक संस्थेचे सभासद असलेल्या गटांनीं रोज सकाळीं निरनिराळ्या वार्डांत फिरून तेथील स्वच्छतेची तपासणी केली.

या सप्ताहाच्या निमित्तानें म्युनिसिपल सभा- गृहांत प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. त्यांत नाशिक शहर वैद्यमंडळानें इतरांबरोबर प्रामुख्यानें भाग घेतला होता. नेहमी आपल्या खाण्यांत येणारी धान्यें, भाजी पाले व आरोग्यासाठीं उपयुक्त अशा वनस्पती तेथें मांडल्या होत्या व त्यांचे गुणधर्म दर्शविणारे तक्ते जोडले होते. ही योजना प्रदर्शन पाहणाऱ्या लोकांना फारच पसंत पडलेली दिसत होती.

अशा प्रकारें उपयुक्त प्रदर्शनें तालुका निहाय भरवून ती कमींत कमी ८ दिवस उघडी ठेवावीत. त्यामुळें जनतेचें आरोग्याविषयक ज्ञान वाढून पर- देशी औषधाकडे होणारी जनतेची धाव निश्चित थांबेल असा मंडळाच्या कार्यकर्त्यांचा विश्वास आहे.

याबाबत योजना आखून अंमलबजावणी त्वरित व्हावी अशी महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलन मुंबई या संस्थेस नाशिक शहर वैद्य मंडळाची अगत्याची विनंति आहे.

बेळगांव येथें

आयुर्वेद सेवा संघाचीं औषधें

— मिळण्याचें ठिकाण —

श्री. अप्पासाहेब एस्. तुरबटमठ

नवभारत औषधालय

A ५३२-३३ मारुती गल्ली, बेळगांव

वाचकांचा पत्रव्यवहार—

अनुभव विश्वसनीय नाहीं

वनस्पतीमारित श्वेतताम्रभस्म प्रसिद्ध झालेल्या गुणधर्माचें राहूच शकत नाहीं; कारण असें भस्म मध्यम प्रतीचें असतें, असें शास्त्रकारांचें म्हणणें आहे. म्हणून आपल्या आयुर्वेदपत्रिकेंत प्रसिद्ध झालेला श्वेतताम्रभस्मासंबंधींचा अनुभव विश्वसनीय वाटत नाहीं.

सोमनाथी ताम्रभस्म हाच मोरपंखी ताम्र- भस्माचा प्रकार सर्वांत श्रेष्ठ असून गुणधर्मांच्या दृष्टीनेंहि तो इतर प्रकारापेक्षां श्रेष्ठ आहे.

नागपूर वैद्य इंदुभूषण भिंगारे

महारोगाविरुद्ध मोहीम

मुंबई सरकारनें बडोदा, भडोच व पुणें या तीन जिल्ह्यासाठीं ३ सन्माननीय महारोगी सेवक नेमण्याचें ठरविलें आहे.

हे कार्यकर्ते शक्यतो बरे झालेले महारोगी अस- तील. त्यांना कांहीं भाग वाटून दिला जाईल त्या भागांतील प्रत्येक खेड्यास भेट देऊन तेथील महा- रोग्यांची खानेसुमारी करणें व जनतेला महारोगाचा प्रसार कसा होतो व त्यावरील उपाय हें समजून सांगणें हीं त्यांची कामें राहतील.

तारेचा पत्ताः–Newbottle

के. के. शहा ॲंड कंपनी

बाटल्यांचे व्यापारी

(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)

रिकाम्या बाटल्या, बुच, कॅपसुल्स् [हेअर ऑईल, सरबत, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाचीं सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे

ठोक व किरकोळ

विक्री करणारे व्यापारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्र व्यवहार

अफू भांग परवाना

प्रश्न- "माझा दवाखाना असून मला लागणारीं खल्वी रसायनें मी घरींच करतो, व त्यासाठीं भांग, अफूचे व आसवादिकें तयार करण्याचे परवाने (लायसेन्सें) मी १९५०-५१ सालीं योग्य फी भरून काढले आहेत.

अफू, भांगेचीं तयार औषधें आहेत

भांग-अफूचीं औषधें कनकसुंदर, केशरादिवटी वैगेरे मी सन १९५१-५२ या दोन वर्षांत तयार केलीं आहेत. तीं तयार औषधें शिल्लक असून हल्लीं मी तीं वापरीत आहे. अजूनहि पुष्कळ वर्षे तीं पुरतील.

मजजवळ मूळ अफू भांग नाहीं

मजजवळ मूळ-अफू अगर भांग शिल्लक नाहीं, व पुनः तूर्त तीं आणावयाची नाहींत, म्हणून मी १९५३-५४ सालीं ते परवाने नूतनीकरण (रिन्यू) करून घेतले नाहींत व त्या खात्याकडूनहि मजकडे तशी सूचना आली नाहीं.

मनांत उत्पन्न झालेला संदेह

आयुर्वेद पत्रिकेच्या १ एप्रिल १९५४ मधील मजकूर वाचून माझ्या मनांत अशा संशय उत्पन्न झाला आहे कीं मला पुनः अफू भांग परवाने रिन्यू करून घेतले पाहिजेत काय ? कारण मजजवळ अफू भांगयुक्त औषधें आहेत व ती मी वापरीत आहे. तरी मला लायसेन्स रिन्यू करावयास हवें काय ? तें समजावें

औषधें मादक नाहींत

उत्तरः- पुनः अफू भांग पाहिजे असणाऱ्यांना जसें लायसेन्स हवें तसें अशा औषधांत घातलेल्या अफू भांगेसाठीं लायसेन्स काढण्याची आवश्यकता नाहीं. या औषधांतील अफू भांगेचें प्रमाण मादक स्वरूपाचें नाहीं. मादक स्वरूपांत अफू भांग बाळगणाऱ्यांना लायसेन्सची जरूरी आहे. असें आम्हांस असलेल्या माहितीवरून वाटतें.

प्रश्न कायद्याचा आहे

तथापि हा प्रश्न कायद्याचा आहे. कायद्याच्या मर्यादा वेळोवेळीं बदलत आहेत व त्याचा अर्थ लावण्यावरहि तें अवलंबून आहे. सबब या विषयींची अधिक माहिती मिळवून ती प्रसिद्ध करण्यांत येईल.

योग्य वैद्य व कल्पद पाहिजे

असें कळतें कीं डहाणु येथें गांवांत मध्यभागीं सध्यां जो सरकारी दवाखाना आहे तो गांवाबाहेर दूर बांधलेल्या सरकारी कॉटेज हास्पिटल मध्यें जाणार आहे. गांवांतील दवाखान्याच्या जागीं आयुर्वेदीय दवाखाना चालवावा असें स्थानिक ग्रामपंचायतीचा विचार चालू आहे.

सदर दवाखाना आयुर्वेद सेवा संघाच्या मार्गदर्शनाखालीं चालवून आयुर्वेदीय निदान चिकित्सा-पद्धतीचा जास्तीत जास्त प्रचार प्रसार करावा असें तेथील ग्रामपंचायतीचें मनांत आहे तरी हें काम अंगावर घेऊन ॲलोपॉथिक अगर होमिओपॅथिक औषधें न वापरतां आयुर्वेदीय औषधें अभ्यासपूर्वक वापरण्याचीं प्रवृत्ति असलेल्या लोकांनीं सेवा संघाकडे पत्रव्यवहार करावा.

वैद्य व कल्पद यांना रहाण्याची सोय दवाखान्यांतच आहे. केवळ रुग्णांना औषधें देणें एवढेंच यांचें काम नसून नागरिकांचें आरोग्य सुधारण्यासाठीं स्वस्थांना मार्गदर्शन करणें हेंहि आवश्यक कर्तव्य समजण्यांत येईल. खाजगी धंदा करतां येणार नाहीं.

आयुर्वेद सेवा संघ-नासिकचीं सर्व औषधें मुंबईंत मिळण्याचें आणखी एक नवें केंद्र

रामकृष्ण एजन्सी

३६८ बी ३।७० सुपारीबाग रोड

लालबाग, मुंबई १२

* मागणी रोज वाढत आहे. *

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाच्या बाळगोळीचा पाठ

	१२॥ तोळे
हिरडा	१२॥ ,,
बेहेडा	१२॥ ,,
आतिविष	१२॥ ,,
नागरमोथे	१२॥ ,,
इंद्रजव	१२॥ ,,
डिकेमाली	१२॥ ,,
अक्कलक'रा	२५ ,,
बाळंतशेपा	१२॥ ,,
वावडिंग	१२॥ ,,
किरमाणी ओवा	१२॥ ,,
गुगुळ	६। ,,
सैंधव	१२॥ ,,
सौवर्चल	१२॥ ,,
जेष्ठमध	१२॥ ,,
बडिशेप	२५ ,,
बहावा मगज	१२॥ ,,

या सर्वांच्या चूर्णाला त्रिफळ्याच्या काढ्याच्या २१ भावना. औषध तयार होण्यास एक महिन्याहून अधिक काल लागतो.

होमिओपॅथिक पद्धत मद्रास सरकारला अमान्य

मद्रासचे आरोग्यमंत्री श्री. ए. बी. शेट्टी यांनीं आज प्रश्नोत्तराचे वेळीं सांगितले कीं, औषधोपचाराच्या होमिओपॅथिक पद्धतीला मान्यता न देण्याचें सरकारनें ठरविलें आहे. ही पद्धत कमी खर्चाची, अत्यंत निरुपद्रवी व सर्वांत पारिणामकारक आहे असें सांगण्यांत आले. तेव्हां मंत्री म्हणाले कीं सभासदाचे तसें मत असेल, परंतु मान्यता पावलेल्या आधुनिक शास्त्रज्ञांना ते मान्य नाहीं

मुंगी दंशांतील रसायनापासून संधिपीडेवर औषध

मुंगी चावली असतां किंवा अंगाला खाजकुयरीचा स्पर्श झाला असतां ज्या रासायनिक द्रव्यामुळें अंगाची आग होते, त्याचा उपयोग संधिपीडेच्या (आर्थ्रा-इटिस) चिकित्सेंत केला जात आहे.

अनुक्रमाणिका

महाराष्ट्र प्रां. वै. संमेलन मुंबई	७११
संमेलनाचा कार्यक्रम	७१२
स्वागतमंडळाचें नम्र निवेदन	७१३
ही आमची संपत्ति आहे	७१६
आयुर्वेदीयांचा हेतुपुरःसर अपमान	७१७
त्रिकोलिन नेत्रबिंदु	७१८
मलावरोधजन्य आर्तवावरोध छातीतील कळा	७१९
कामाची आरोग्यदायी कालमर्यादा	७२०
संमेलन ज्ञानदायी कसे होईल ?	७२१
दंतमंजनाचा एक उपयुक्त पाठ	७२२
पायांतील तीव्र वेदना व सूज	७२३
कांहीं सूक्ष्म औषधांचे अनुभव	७२७
मधुमेहावर रानतोंडले	७२९
पशुवैद्यांचा तुटवडा	७३३
अभिनव महारोगी परिषद-ठराव	७३५

अभ्यास मंडळाचा वाढदिवस

नासिक शहर वैद्य मंडळाच्या अभ्यास मंडळाचा वाढदिवस दिनांक ५।५।५४ ला लोकसत्ता हॉल मध्यें साजरा करण्यांत आला. तन्निमित्त वैद्यराज बिंदुमाधव पंडित यांचे " प्रमिताशनजन्य अस्थिक्षय, अस्थिभंग चिकित्सा " या विषयावर व्याख्यान झाले. नंतर पन्हेपान व पानसुपारी वाटल्यावर समारंभ संपला.

पुणें युनिव्हर्सिटींत आयुर्वेद

पुणें विद्यापीठांत आयुर्वेदाच्या अभ्यासाची शाखा सुरू करण्याचा निर्णय पुणें विद्यापीठाच्या कोर्टानें ता. ६ मे रोजीं प्रचंड बहुमतानें घेतला.

या आयुर्वेदाच्या विभागाचा पुणें विद्यापीठांतील फॅकल्टी ऑफ् (अलोपॅथिक) मेडिसिनशी कांहींहि संबंध रहावयाचा नाहीं असेंहि याच वेळीं ठरविण्यांत आलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" निःस्वार्थ कार्यकर्त्यांचें स्वप्न साकार होवो ! "

वैद्यश्री ... मराठे यांचे आग्रहावरून आज आयुर्वेद सेवा संघाचें औषधी तयार करण्याचें स्थान (औषधी भवन) व तेथील कार्य पाहिलें–समाधान वाटलें.

संघाचा हा उद्योग प्रशसनीय आहे

आयुर्वेदांतील कांहीं विशेष माहिती मला नाहीं; पण आसमंतात् मिळत असलेल्या औषधींचा उपयोग करून लोकांना स्वस्त व गुणकारी औषधांचा पुरवठा करण्याचा संघाचा हा उद्योग प्रशंसनीय आहे.

आयुर्वेद सेवा संघाचे कार्य असेंच वृद्धिंगत होऊन संघाच्या निःस्वार्थ कार्यकर्त्यांचें " रोग झाल्यावर चिकित्सा करण्यापेक्षां, सर्व लोकांना रोगमुक्त ठेवण्याकरितां प्रयत्नशील राहण्याचें" स्वप्न साकार होवो, हीच परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

—मा. स. गोळवलकर

आयुर्वेद सेवा संघाची बाळगोळी व प्रवाळ चन्द्रपुटी

नेपानगर (मध्यप्रदेश) येथून श्री. वा. ना. हातगडकर लिहितातः—

" मी आतापर्यंत आपणांकडून ५ वेळा बाळगोळी (१ तोळ्याची १ गोळी) मागविली. या मोठ्या एक तोळ्याच्या बाळगोळ्या येथील लोकांना फार पसंत पडल्या आहेत. लहान लहान १ गुंज अर्ध्यागुंजेची गोळी घेऊन ती मुलांना बारीक करून देणें सोईचें पडत नाहीं. १।१ तोळ्याची एक गोळी असली म्हणजे मातांना मुलांसाठीं गुटी म्हणून उगाळून देण्यास सोपी पडते असा येथील अनुभव आहे.

राष्ट्र बलवान् होण्यास मदतच होईल

सेवासंघाचें बाळगोळी हें औषध अत्यंत गुणकारी, परिणामकारी व लहान मुलांना पोषक आहे असा अनुभव आल्यामुळें लोकांकडून त्याची पुनः पुनः मागणी होत आहे. सेवासंघाचें प्रवाळभस्म (चन्द्रपुटी) हि मुलांना उन्हाळ्यांत फारच गुणकारी असल्याचा अनुभव आला आहे. अशी प्रभावी औषधें सेवासंघाकडून लोकांना मिळत गेल्यास लोकांचा आयुर्वेदावरील विश्वास सबळ करण्यास व राष्ट्र बलवान् होण्यास मदतच होईल "

संपादक व प्रकाशकः— वैद्य विद्याधर पंडित, आयुर्वेद सेवा संघ, मेनरोड, नाशिक
मुद्रक— श्री. चिं. थोरात, ... प्रेस, ...रोड, नाशिक
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक)

वर्ष ७ वें) नाशिक, ता. १ जून १९५४ (अंक २३ वा

शुद्ध आयुर्वेदाचीं रुग्णालयें कां नाहींत ?

ना. पक्वासा यांचा सरकारला सवाल

म. प्रां. वैद्य संमेलनाच्या मुंबई येथें भरलेल्या विशेष अधिवेशनाचें उद्घाटन करतांना मध्यप्रदेश राज्य सरकारचे माजी राज्यपाल नामदार **मंगळदास पक्वासा** म्हणाले– “ गेलीं २४ वर्षें माझ्या कुवतीनुसार मी आयुर्वेदासाठीं परिश्रम करीत आहे. जेलमध्यें **वैद्य बापालाल**सारख्या वैद्यांनीं आयुर्वेदांत असलेल्या किती किती गोष्टी मला समजाऊन सांगितल्या आहेत. आयुर्वेदाच्या बाजूनें मी बोलतो याबद्दल डॉ. गिल्डर, डॉ. जीवराज मेहेता यांच्यासारख्या बड्या डॉक्टरांकडून इतक्या शिव्या खाल्ल्या आहेत कीं त्या जर सर्व एकत्र केल्या तर एक लहानसा कोश बनेल. त्या डॉक्टरांचें म्हणणें असें, आयुर्वेद हा मॉडर्न (अद्ययावत्) नाहीं. आरोग्य या विषयाचे बाबतींत आयुर्वेदांतील ज्ञान हें या ५–६ वर्षांच्या बालकाइतकेंच अप्रबुद्ध आहे. या आयुर्वेद ज्ञानाच्य प्रसारानें हिंदुस्थानला नुकसानच भोगावें लगेल.

नामदार मंगळदास पक्वासा

२८ कोटी ग्रामीण जनतेचा प्रश्न आयुर्वेदच सोडवील

आज आपल्या व आपल्या सरकारच्या सर्व हालचाली शहरांतील वरच्या थरांतील लोकांसाठीं चालल्या आहेत. २८ कोटी जनता खेड्यांत राहते, तिच्यासाठीं कोणतीच आरोग्य योजना नाहीं. खेड्यांतील लोकांना अन्नपाण्यासाठींसुद्धां लांब ४–५ मैल जावें लागतें. वैद्यक शिकणारे लोक फोर्ट-मुलेश्वरमध्यें दवाखाना ठेवून केवळ पैसे कमविण्यांत दंग असतात. ते खेड्यांतील गरजाकडे लक्ष देत नाहींत, खेड्यांत जात नाहींत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नामदार पक्वासा पुढें म्हणाले—

खेड्यांत नेतां येईल अशी वस्तु-आयुर्वेद

आयुर्वेद हीच एक अशी वस्तु आहे कीं मी ती खेड्यांत घेऊन जाऊ शकतो व खेड्यांतील स्त्रिया व मुलें यांना त्याच्या साहाय्यानें मदत करू शकतो. आयुर्वेदीय औषधें निर्माण करण्यासाठीं कारखान्यांची जरूरी नाहीं व लेबलें लावण्याचीहि आवश्यकता नाहीं. आयुर्वेदीय औषधें सर्वत्र पसरलीं आहेत. त्रिवेंद्रममधील माणसासाठीं हिमालयांतील औषधें आणण्याचें कांहीं कारण नाहीं. आपणांस थोडी जरी अक्कल असेल तर आपल्याला आयुर्वेदीय औषधें आपल्या जवळपास सांपडतील. आयुर्वेदाची ही उपयुक्तता कांहीं कमी महत्त्वाची नाहीं.

प्रमुख दोष, वैद्यांत सहकार्य नाहीं

वैद्य लोक सांगतात, आयुर्वेदांत त्रिदोष आहेत म्हणून; पण मला वैद्यांत त्याहूनहि अधिक दोष दिसतात. मुख्य म्हणजे वैद्यांत सहकाराची भावना नाहीं. वैद्य-वैद्यांत सहकार्य नाहीं. वैद्य व सरकार यांच्यांत सहकार्य नाहीं, इतकेंच नव्हे तर वैद्य व रोगी यामध्येंहि सहकार्याची भावना दिसत नाहीं.

सरकारचें कर्तव्य

राज्यांत इतक्या लोकसंख्येसठीं १ डॉक्टर आहे अशी गणना सरकार करते, पण तशी वैद्यांची गणना करीत नाहीं. वास्तविक हें सरकारचें कर्तव्य आहे. ही सरकारची जबाबदारी आहे, पण वैद्यमंडळी संघटित न होतां आपसांत भांडत राहतात. एकाच क्षेत्रांत २।३ संस्था उभ्या करतात व वैद्यवर्ग संघटित नसल्यामुळें सरकार त्यांना विचारीत नाहीं.

लोकसेवेची दृष्टि ठेवा

ज्याची प्रॅक्टिस मोठी व फी जास्त तो डॉक्टर मोठा असें लोक समजतात. त्याची अक्कल काय दर्जाची आहे ते कोणी पहात नाहीं. डॉक्टराप्रमाणेंच वैद्य रोग्यांना भारी किंमतीचीं २००-२०० रुपयांचीं औषधें सांगू लागले तर जनतेला त्याचा कांहींच उपयोग होणार नाहीं. । वैद्यांनीं लोकसेवेची दृष्टि ठेवली पाहिजे तरच त्यांच्या सर्व अडचणी दूर होतील.

स्त्री-वैद्य कमी कां ?

जुन्या काळीं स्त्रिया वैद्यकाचें काम करीत होत्या कीं नाहीं मला माहित नाहीं. पण मला नेहमीं प्रश्न पडतो तो हा कीं भगिनींना यांत कां घेत नाहीं ! पुष्कळशा स्त्रिया डॉक्टर बनतात मग त्या वैद्य कां होत नाहींत ? स्त्रिया वैद्य होण्यानें स्त्रिया व मुलें यांचा फायदाच होईल. सबब अधिक स्त्रिया आयुर्वेदाकडे वळतील यासाठीं स्कॉलरशिप्स द्या. इतर कांहीं प्रलोभनें ठेवा. पण स्त्री, वैद्य तयार करा.

आयुर्वेदाचीं रुग्णालयें नाहींत

आज काल कोणी जादा आजारी झाला की त्याला ॲलोपॅथीच्या रुग्णालयांत पाठवितात. कारण आयुर्वेदाचीं रुग्णालयेंच नाहींत. नागपूर येथें आम्ही समन्वय रुग्णालय काढलें. तेथें रुग्ण आला कीं त्याला विचारतात तुम्हा कोणते उपचार हवेत ? आयुर्वेदिक, होमिओपॅथिक कीं ॲलोपॅथिक ? व त्याच्या इच्छे-प्रमाणें इलाज केले जातात. आयुर्वेदीय उपचार जुन्या पद्धतीनेंच केले पाहिजेत. मुंबईत व मुंबई राज्यांतहि अशी शुद्ध आयुर्वेदीय रुग्णालयें निर्माण करणें अवश्य आहे.

रोग होऊ नये हें आयुर्वेदाचें वैशिष्ट्य

डॉक्टर म्हणतात, रोग होऊं द्या, मग आम्ही तुम्हाला बरे करून दाखवितो. आयुर्वेद म्हणतो, या या पद्धतीनें वागाल तर तुम्हाला रोगच होणार नाहीं. रोगी न होण्याचा मार्ग आयुर्वेद दाखवितो म्हणून आयुर्वेद श्रेष्ठ आहे. जन्मापासून मरेपर्यंत उपयोगी पडणारें असें केवळ आयुर्वेद हेंच एक आरोग्यशास्त्र आहे. बाकीचे पंथ तसे नाहींत व म्हणूनच मी आयुर्वेदाचा पुरस्कर्ता आहे. वैद्यबंधु जर नेटानें व विश्वासानें आयुर्वेदाच्या द्वारें जनसेवा करतील तर त्यांना यश प्राप्त झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बोटे रुग्णालय व 'तृष्णा' रोगी

(निवेदक—आयुर्वेदाचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी)

बोटे रुग्णालयाचा सरकारी अहवाल प्रसिद्ध झाला आहे. बोटे येथें अॅलोपॅथिक आणि आयुर्वेदिक असे दोन्ही उपचार केले गेले आहेत. अॅलोपॅथिक उपचार ८ महिने चालले व आयुर्वेदिक उपचार २॥ महिने झाले. उपचारांचें यशापयश मोजतांना सर्व बाजूंचा आणि मुद्यांचा विचार करावा लागतो. अॅलोपॅथिक शास्त्र-संशोधन आज जगांत कांहीं शतकें वाढत्या प्रयत्नानें, सातत्यानें, चालू आहे. त्याच्या पाठीशीं जगांतली उत्कृष्ट बुद्धि, अमाप पैसा, हीं सर्व सत्तांच्या छायेखालीं राबत आहेत. त्यामुळें संशोधनाच्या पद्धति निश्चित झाल्या आहेत. त्या पद्धति अंगवळणीं पडलेले तज्ज्ञ तयार केलेले आहेत. पण आयुर्वेदाचा आतांपर्यंतचा १०००वर्षांचा अवनतीचा उतरता काल असल्यामुळें, जगांतली सत्ता, संपत्ति आणि बुद्धि त्यास पाठमोरी झालेली आहे. अशा स्थितींत त्या शास्त्रानें संशोधन करतांना चुकीचे मार्ग, अपुऱ्या कल्पना, अस्पष्ट रीति यामुळें अनेक प्रमाद नकळत घडत असतात. त्याचा परिणाम आयुर्वेदीय पद्धतीनें आलेल्या निर्णयाच्या यशाचें शेंकडा प्रमाण कमी होण्यालाच कारणीभूत होतो. या दृष्टीनें वास्तविक हें कमी होणारें यशाचें प्रमाण त्या शास्त्राचें दोषदर्शक ठरूं शकत नाहीं. अशा स्थितींत, या परिस्थितीचा विचार करतांना, दृश्य यशापेक्षां, वास्तव यश अधिकच आहे, याची कल्पना तज्ज्ञांना होऊं शकते.

प्रयोगकालीन परिस्थिति

बोटे रुग्णालयांतील सांथीचा विकार जगांत नवीन व आयुर्वेदीय उपचारकांना अगदींच नवीन. त्यावरील चिकित्सेचा प्रयोगहि अलोपॅथीच्या कार्यक्षेत्रांत काम चालू असतांना, अॅलोपॅथीच्या तज्ज्ञ व माहितगार लोकांच्या साहचर्यांत करावा लागला. तेथेंहि गुणकारी औषधांचा एकच योग सर्व रोग्यांना दिला नाहीं. निरनिराळे औषधी योग देऊन कशानें जास्त चांगलें होतें, हें पहाण्याचा प्रयत्न केला गेला. आपली विचारसरणी बरोबर आहे कीं चूक आहे याचा पडताळा पहाण्याकरितां, निरनिराळे योग दिले गेले. गुण येणाऱ्या औषधांच्या गुणांच्या विपरीत गुणांचीं म्हणजे रोग वाढवणारीं औषधें मुद्दाम देऊन रोग वाढतो कीं नाहीं हेंहि पहाण्यांत आलें. आधुनिक शास्त्राप्रमाणें रोगी पूर्ण बरा झाला हें त्या रुग्णाची, बरा झाल्यानंतरच्या आठ दिवसांची स्थिति पाहून ठरविलें पाहिजे, हा जो नियम त्याचा फायदा आयुर्वेदीयांना कांहीं रुग्णांत मिळाला नाहीं. असें पहावें लागतें हें आयुर्वेदीयांना आरंभीं माहीत नव्हतें.

वरील चार कारणांनीं आयुर्वेदीय चिकित्सेच्या यशाचें प्रमाण, असलेल्या प्रमाणापेक्षां उगीचच कमी झालें आहे. आयुर्वेदीय उपचारांनीं बरे झालेल्याचें शेंकडा प्रमाण ५७ आहे असें डायरेक्टर ऑफ् पब्लिक हेल्थ यांनीं आपल्या रिपोर्टच्या १०व्या पानांवर पुढील वाक्यांत सांगितलें आहे. As regards the Ayurvedic treatment the total cure rate in 44 cases is about 57% " यापेक्षां बरे होणाराचें वास्तविक प्रमाण हें कितीतरी जास्त होतें हें वाचकांच्या सहज लक्षांत येईल. शिवाय आयुर्वेदीय उपचारकांना संशोधनाला काल व रुग्णहि त्या मानानें कमी मिळाले.

या रोगाचें निदान

या रोगाचीं दोन मुख्य चिन्हें होतीं. (१) तृष्णा व (२) बहुमूत्रता. पण हीं चिन्हें आरंभापासून नसत. बहुतेक रोग्यांमध्यें आरंभ ज्वरापासून झाला होता अशी हकीगत मिळाली आहे. ज्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

थोड्या रोग्यांमध्यें ज्वराची हकीकत मिळाली नाहीं, त्यांनाहि ज्वर येऊनच हीं चिन्हें निर्माण झालीं असावींत असें वाटतें; कारण कित्येक रोग्यांमध्यें अंगांत ज्वर असूनहि आतां ज्वर वाटतो कां ? असा प्रश्न विचारतां, ज्वर येत नाहीं, वाटत नाहीं, व आतां नाहीं, असें उत्तर मिळालें; पण थर्मामिटर लावल्यानंतर १००° पर्यंत ज्वर अंगांत आहे असें स्पष्ट होत असे. ज्वर १००° पर्यंत असूनहि त्याचें अस्तित्व ज्वराच्या स्वरूपांत रोग्यांना भासत नव्हतें म्हणून जे रोगी ज्वराची हकीकत देत नसत त्यांनाहि १००° पर्यंत सौम्य स्वरूपांत ज्वर आला असावा, असें म्हणावें लागतें. आणि ज्वर हा मुख्य विकार निश्चित होतो. 'तृष्णा' व बहुमूत्रता हीं चिन्हें त्या ज्वराचें उपद्रवस्वरूप ठरतात. हीं चिन्हें ज्वराबरोबरच निर्माण झालीं असतीं आणि ज्वर कमी होत असतांनाच त्याच्याबरोबर कमी झाली असतीं, तर त्यांना ज्वराचीं चिन्हें म्हटलीं असतीं; पण ज्वरानन्तर उत्पन्न होऊन ज्वर गेल्यानन्तरहि राहाणारीं हीं चिन्हें ज्वररोगाचीं चिन्हें नसून ज्वराचे उपद्रव होत. व्याधिरुपरि यो व्याधिः भवत्युत्तरकालजः । उपक्रमविघाती च स उपद्रव उच्यते ॥– माधवनिदान.

रक्तगत वा रक्तमांसगत विषमज्वर

हा ज्वर दोषांच्या दृष्टीनें 'पित्तज ज्वर' ठरतो. पण त्यांत तीक्ष्ण वेग इ. (वेगस्तीक्ष्णोऽतिसारश्च) लक्षणें आढळलीं नाहींत. म्हणून याला दोषज ज्वरांपैकीं पित्तजज्वर म्हणतां येत नाहीं. पण तृष्णा हा उपद्रव व दाह, अन्तर्दाह हीं बहुतेक ठिकाणीं आढळणारीं चिन्हें 'पित्तज' असल्यामुळें हा ज्वर दोषाच्या दृष्टीनें पित्ताच्या जातीचा ठरतो, पित्तजातीय ठरतो. ज्वर सौम्य स्वरूपाचा आणि उपद्रव तीव्र स्वरूपाचा, तोहि फारसें कांहीं अपथ्य न होतांना निर्माण होणें हें शरीराच्या धातूंचें अबलत्व असतांना होऊं शकतें. ही स्थिति विषमज्वरांत असते. दाह हें रक्तगत विषमज्वराचें चिन्ह आहे व अन्तर्दाह हें मांसगत विषमज्वराचें चिन्ह आहे. या दोन्ही विषमज्वरांत तृष्णा हें चिन्ह असूं शकतें. पण दाह, अन्तर्दाह हीं चिन्हें जशी ज्वराबरोबर आढळलीं तशी तृष्णा हें चिन्ह ज्वराबरोबर आढळलें नाहीं. म्हणून 'तृष्णा' हा उपद्रवच निश्चित होतो; आणि दाह-व अन्तर्दाह हीं चिन्हें रक्तगत विषमज्वर व मांसगत विषमज्वर निश्चित करतात. म्हणून बोटे येथें उत्पन्न झालेला विकार रक्तगत ज्वर होय व कांहीं रोग्यांत तो रक्तगत ज्वर, मांसगतहि आढळून आला. म्हणजे एकाच वेळीं द्विधातुस्थ (द्विधातुस्थः करोत्ययम्) होता, म्हणून ह्या ज्वराची जाति रक्तगत विषमज्वर (रक्तगत वा रक्तमांसगत) होती हें निश्चित. पित्तजातीय रक्तगतज्वरामध्यें तृष्णा हा उपद्रव होणें, स्वाभाविक आहे. आणि तो उपद्रव हाच आपलें उग्र व जाहीर स्वरूप धारण करून बोट्यास उत्पन्न झालेला विकार म्हणून गाजला गेला.

उपद्रव तृष्णा किं बहुमूत्रता (प्रमेह ?)

तृष्णा आणि बहुमूत्रता हीं दोन्हीं जवळजवळ तुल्यबल लक्षणें होतीं. पण तृष्णा हें चिन्ह उत्पन्न होऊन त्याचा परिणाम म्हणून बहुमूत्रता हें लक्षण निर्माण झालें. तृष्णा अधिक म्हणून पाणी पिण्याचें प्रमाण अधिक, आणि शरीरांत घेतलेलें पाणी बाहेर टाकून देण्याचें (अर्थात् मूत्रमार्गानें टाकून देणारें) चिन्ह बहुमूत्रता हेंच होय. तृष्णा→जलपान→बहुमूत्रता. म्हणून तृष्णेचें परतंत्र चिन्ह बहुमूत्रता हें आहे.

उन्हांतान्हांत भटकणाऱ्या शरीरकष्ट करणाऱ्या शेतकरी लोकांत बहुमूत्रता हें चिन्ह बहुधा होत नाहीं. बहुमूत्रता हें चिन्ह नेहमीं बसणाऱ्या, नेहमीं झोंपणाऱ्या (स्वप्नसुख), अशा लोकांना होत असतें. आणि तें ह्या कारणांनीं वाढत असतें. पण ह्या रोग्यांना रुग्णालयांत पूर्ण विश्रांति मिळाल्यानें (आस्यासुख व स्वप्नसुख मिळाल्यानें) वाढलें नाहीं. उलट कमीच झालें. हें डायरेक्टरसाहेबांच्या रिपोर्टावरूनहि स्पष्ट झालें आहे. शिवाय हा विकार साखर (क्षीरीशर्करा) देऊनहि कमी झाला आहे म्हणूनहि हा प्रमेह विकार नाहीं, हें स्पष्ट होतें. म्हणून या उपद्रवरूप जाहीर विकाराचें नांव 'तृष्णा' हेंच ठेवायचें हें सिद्ध होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रोगाचें औपसर्गिकत्व

हा विकार एकाच वेळीं, एका घरांत, एका गांवांत व एका प्रदेशांत अनेक व्यक्तींना उत्पन्न झाला, हा जो याचा स्वभाव आहे, हा स्वभाव जन्तुजन्य विकारासारखा आहे. जनपदोद्ध्वंसनीय (साथीचे) विकार सांगतांना ते जन्तूनींहि उत्पन्न होतात असें चरकाचार्यांनीं सांगितलें आहे. जन्तूकरितां आयुर्वेदांत रक्षस, भूत, हे शब्द वापरलेले आहेत. रक्षोगणादिभिर्वा विविधभूतसंघैस्तमधर्ममन्यद्वाऽप्यपचारान्तरमुपलभ्याभिहन्यन्ते । २६ (चरक विमानस्थान. अध्याय ३रा.)

उष्ण-तीक्ष्णगुणाचे आधिक्याचा विचार

कांहीं आचार्यांना विषमज्वर जन्तुजन्य आढळले आहेत असें सुश्रुताचार्यांनींहि सांगितलें आहे. केचित् भूताभिषंगोत्थं ब्रुवते विषमज्वरम् ॥ ६८ सुश्रुत उ. अ. ३९. औपसर्गिक रोगाश्च संक्रामन्ति नरान्नरम् म्हणून हा विकार संसर्गजन्य आहे. ह्या लोकांच्या शरीरांत हे जन्तु कशाच्या बरोबर गेले हें शोधून पहाण्याला आयुर्वेदीयांना संधि मिळाली नाहीं. तरीपण जी हकीकत सामान्यतः कळून आली त्यावरून असें दिसून येतें कीं, त्या भागांतली बाजरी ही विकृत होती. बाजरी हें धान्य रूक्ष व उष्ण आहे. तें जन्तुदूषित झाल्यानन्तर शरीरांत अधिकच उष्ण, तीक्ष्ण गुणाच्या विकारांची निर्मिति करण्याला कारणीभूत होतें. आणि झालेला ज्वर-तृष्णा विकार उष्ण तीक्ष्ण गुणांच्या आधिक्याचाच होता.

— चिकित्सा —

तृष्णा हा उपद्रव, मूळ विकार जो ज्वर त्याच्यासह कांहीं रोग्यांमध्यें होता, तर कांहीं रोग्यांमध्यें तद्रहित होता. त्यांच्यावर दोषदूष्यविवेक करून चिकित्सा केली गेली. या विकारांत रक्तधातुदुष्टीचीं प्रथम, आणि कांहीं काळानें रक्तनाशाचीं चिन्हेंहि निर्माण होत होतीं. म्हणून रक्ताकडे लक्ष देऊन ह्या तृष्णा विकाराची चिकित्सा करणें जरूर वाटलें. रक्तनाशाची प्रवृत्ति जेथें अधिक वाटली तेथें 'धात्रीलोह' व तृष्णाभ्रंशरस हे दोन्ही लोहघटित कल्प दिले गेले. व त्यांचा उपयोगहि चांगला झाला. क्षीरीवल्कक्षाय हा तृष्णानाशक व बहुमूत्रप्रवृत्तीवर नियंत्रण करणारा असा दोन्ही दृष्टीनें कार्य करणारा योग होता. त्याचेंहि कार्य चांगलें झालें. पित्ताधिक्य ज्या ठिकाणीं उत्कट दिसून आलें त्या ठिकाणीं प्रवाळ व मौक्तिक या भस्मांची जोड देण्यांत आली. शेफालीकल्प (पारिजातकाच्या पाल्याच्या रसांत साखर भिजवून तयार केलेला कल्प) हा नुसता किंवा 'प्रवाळासह' फारच उपयुक्त ठरला. विनामोलाचें, सहज उपलब्ध होणारें, कोणताहि अनिष्ट परिणाम न करणारें, खेडूतांच्या परसांत असणारें हें औषध फारच चांगलें उपयुक्त झालें, या पाल्याचा ज्वरनाशक म्हणून उपयोग प्रसिद्ध आहे. तृष्णा या उपद्रवासह ज्वरनाश करण्याचा ह्याचा गुण येथें सिद्ध झाला.

त्रिभुवनकीर्ति व शिलाजतु यांनीं विकार वाढला

हा विकार पित्तस्वभावी, रक्तधातुगामी असल्यामुळें उष्ण द्रव्यें देऊन हा विकार वाढतो कीं नाहीं हा अनुपशय पहाण्याकरितां ज्वरनाशक असें 'त्रिभुवनकीर्ति' हें औषध दिलें. पण विकार कमी न होतां विकार वाढल्याचेंच दिसून आलें. शिलाजतु, हें बहुमूत्रता(प्रमेह)नाशक पण उष्णतीक्ष्णस्वभावी औषध देऊन पाहिलें. पण त्याच्यानेंहि विकार कमी न होतां वाढला. यावरून हा विकार प्रमेह नाहीं असेंहि दिसलें. या विकारास पूर्ण विसावा हा ॲलोपॅथीच्या दृष्टीनें जरी रोगनाशाला अकरणात्मक अनुकूल असला, तरी आयुर्वेदाच्या दृष्टीनें तो ज्वर, तृष्णा यांचें पित्त कमी करणारा आहे, करणात्मक आहे. श्रम उष्णतावर्धक, पित्तवर्धक आहे; तर विसावा हा उष्णता(पित्त)शामक आहे. अशा रीतीनें ती चिकित्साच आहे. आणखीहि औषधांचे प्रयोग केले पण त्यांचा उल्लेख विस्तारभयास्तव टाळीत आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

' उपशय व अनुपशय या दोहोंनीं निदान-निश्चिति '

आपण आतांपर्यंत केलेल्या विचारावरून आयुर्वेदीय पद्धतीनें या रोगाचें ' रक्तगतज्वराचा तृष्णा हा उपद्रव' असें निदान निश्चित केलें गेलें व त्या निदानाला अनुसरून, रोगनाशाच्या दृष्टीनें केलेली चिकित्सा रोगनाशक झाली व रोगवर्धनाच्या दृष्टीनें केलेली चिकित्सा रोगवर्धक ठरली. अशा दोन्ही दृष्टीनें आयुर्वेदीय चिकित्सा सफल झाली, आणि या सफल चिकित्सेनें केलेल्या निदानाला पुष्टी मिळाली. केलेलें निदान अधिक निश्चित झालें.

आधुनिक शास्त्राच निदान अयोग्य

आधुनिक शास्त्राप्रमाणें केलेलें ' डायबेटिस इन्सिपिडस ' [उदकमेह] हें निदान आयुर्वेदीय दृष्टिकोनांतून पाहिलें असतां अत्यंत चूक आहे. कारण (१) तें तृष्णेवर अवलंबून असलेलें चिन्ह आहे. तृष्णा ही त्यावर अवलंबून नव्हती. (२) मेहावरचें उत्कृष्ट असें शिलाजतु हें औषध त्याच्यावर उपयुक्त न होता उलट विकार वाढविण्यास कारणीभूत झालें. (३) तसेंच सतत पडून रहाणें व दिवसां झोप घेणें ही कारणें प्रमेह वाढविणारीं आहेत, या कारणांनीं बरें वाटावयास नको असतांना रोग्यांना बरें वाटलें आहे. म्हणून उदकमेह (Diabetes incipidus) हें निदान अयोग्य ठरतें.

साहाय्यकांचे आभार

मुंबई सरकारनें [नामदार शान्तिलालजी शहा यांनीं) आयुर्वेदीयांना ही जी संधि दिली, त्याबद्दल सरकारचें, माननीय शान्तिलालजींचें, सर्व वैद्यवर्गाचे तर्फे मी हार्दिक आभार मानतो. आणि वैद्यांना अशीच संधि देऊन संशोधनाच्या कार्यात त्यांना रुळवावें व त्यांचेकडून आयुर्वेदाचें संशोधन करून घ्यावें, अशी विनंति करतो. हें कार्य करीत असतांना श्रीमान् सर्जनजनरल डॉ. दीक्षित, डायरेक्टर ऑफ पब्लिक हेल्थ श्रीमान् डॉ. विश्वनाथन्, पुण्याचे सिव्हिलसर्जनसाहेब, तसेंच बोटे येथील डॉ. हिरेमठ डॉ. मुतालिक वगैरे सर्व अधिकारी व नोकरवर्ग यांनीं आमच्या कार्याला केलेल्या मदतीबद्दल आभारी आहे. विशेषतः डायरेक्टर ऑफ पब्लिक हेल्थ यांचा ऋणी आहे. वैद्य एस. आर. देशपांडे, व वैद्य पी. जे. पोरे यांनीं माझ्या सूचनांना अनुसरून उपचार करून जी मदत केली त्याबद्दल त्यांचें आभार मानणें माझें कर्तव्य आहे. हें कार्य मी करावें म्हणून माझें नांव श्रीमान् शान्तिलालजींना ज्या वैद्यबंधूंनीं सुचविलें त्यांचें ऋण माझ्याकडून कधींहि फिटणार नाहीं. अहमदनगर येथील आयुर्वेद महाविद्यालयानें या कामीं सहकार्य केलें नसतें तर मला फारच अवघड गेलें असतें. त्या संस्थेनें केलेल्या सहकार्याबद्दल त्या संस्थेचे प्रिंसिपॉल डॉ. गो. वि. केतकर व सेक्रेटरी श्री. व्ही. बी. गुणे यांचा अत्यंत आभारी आहे.

आयुर्वेदीय चिकित्सा श्रेष्ठ कां ?

या कार्यात एक अत्यन्त महत्वाची गोष्ट स्पष्ट झाली कीं, आयुर्वेद हा आपल्या पद्धतीनें निदान करून त्याची चिकित्सा तावडतोब करूं शकतो. बाह्य कारणें कोणत्याहि तऱ्हेचीं घडलीं, आणि तीं न कळलीं तरी त्याच्यावर खोळंबून बसत नाहीं. याचें कारण बाह्य ज्ञात व अज्ञात कारणांचा, कारणें शरीरांत गेल्यानंतर त्यांचें जे दोषस्वरूप रोगाचें कारण म्हणून तयार होतें, तें वैद्याला समजूं शकतें. वैद्य रोगाचें शरीरस्थ कारण (बाह्य कारण रूपान्तरित) हुडकून काढून रोगाचें स्वरूप ठरवून चिकित्सा करूं शकतो. या दृष्टीनें आयुर्वेद स्वतंत्र, व स्वयंपूर्ण आणि यशस्वी शास्त्र आहे, ही गोष्ट, ह्या थोड्या दिवसांच्या कार्यावरूनही प्रत्यन्तराला आली. यापूर्वी आयुर्वेदपत्रिकेंत वेळोवेळीं प्रसिद्ध झालेल्या लेखांवरून यासंबंधीं इतर पुष्कळशी माहिती वाचकांना समजली आहेच.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सहकारी पद्धतीनें तयार करावयाचीं औषधें

गुग्गुळ-गुटिका-वटिका :

लेखक–वैद्य पु. वि. धामणकर
धूतपापेश्वर–पनवेल

चूर्ण टिकविण्याचा हा एक प्रकार आहे. किमान पक्षीं सर्व चूर्णांच्या समान गुग्गुळ ज्यांत असतो त्या कल्पाचे शेवटीं गुग्गुळ असें लिहिण्याची प्राचीन प्रथा आहे. उ. योगराजगुग्गुळ इ. असे गुग्गुळ-कल्पाचे पाठ जवळजवळ दोनशें आहेत. पैकीं फक्त अठ्याऐंशींच पाठ आयुर्वेदीय औषधीपाठचिंतामणी-ग्रंथांत उद्धृत केले आहेत.

गुग्गुळाचें स्थान व उत्पत्ति

गुग्गुळ म्हणजे झाडाचा तेलिया डिंक. हीं झाडें निरनिराळ्या प्रकारचीं व निरनिराळ्या प्रांतांत असतात. गुग्गुळ हा पदार्थ झाडाच्या नारासभोंवार लपेटलेला असतो. त्यावरून सालीचें जाड आवरण असते. तरीपण थंडींत अतिशैत्यामुळें ती साल इतकी आक्रसते कीं तिच्या संकोचदाबानें आंतील गुग्गुळ, साल फाडून बाहेर येतो. उलटपक्षीं असेंहि होतें कीं, उन्हाळ्यांत साल स्थिर राहते. नि अतिऊष्ण्यामुळें सालीआडचा गुग्गुळ तापतो, द्रव होतो, फुगतो आणि सालीचा भेद करून तो बाहेर येतो. हवेच्या अत्यधिकत्वामुळें गुग्गुळाची प्राप्ति वर्षांतून दोनदां होते. नि ती म्हणजे उन्हाळयांत व थंडींत.

गुग्गुळाचा स्वभाव व घटना

गुग्गुळ आतिशय घट्ट, चिकट नि सुगंधी असतो. तो विरल होणें, तो शोषला जाणें, तो पचणें ह्या सर्वच गोष्टी जात्याच अवघड. पण पचनानन्तर हा त्रिदोषघ्न, आग्निदीपक नि रसायन असल्यामुळें त्यावर विशेष मेहनत घेऊन त्याचे स्वाभाविक धर्म मानवांना लाभण्यास्तव आटोकाट प्रयत्न केलेला आहे. त्याचे ठिकाणचा तिखटपणा, तीक्ष्णपणा, सौगन्ध्य आणि स्रोत:शोधक धर्म ह्यांचा पुरेपूर उपयोग करून घेतां आल्यास त्याच्या वृक्षांप्रमाणें मानवी शरीरहि नीरज, प्रतिकारक्षम, भक्कम नि दीर्घजीवी होईल, ह्या कल्पनेनें गुग्गुळाचा उपयोग औषध म्हणून करूं लागले असावेत असें दिसतें.

नवीन गुग्गुळ पौष्टिक असतो

ह्यांत राळ, डिंक आणि उडणारें सुगंधी तैल असतें. हा नवा असतो तेव्हां शुक्रवर्धक नि पौष्टिक असतो. पण तो जसजसा जुना होत जातो तसतसा तो मेदाचें शोषण करणारा होतो. म्हणजे नव्या गुग्गुळानें मनुष्य पुष्ट होतो. औषधांत अपेक्षापरत्वें दोन्ही वापरतात.

गुग्गुळाची प्रक्रिया

गुग्गुळ तयार करण्याचे विधि तीन आहेत. विधि अनेक असले तरी ते आचरण्याचा काल एकच. शिलाजित, गुग्गुळ हे पदार्थ हवेंतील आर्द्र पदार्थ शोषतात. त्याकरितां हवेंत आर्द्रता असणाऱ्या ऋतूंत गुग्गुळ तयार करावयास घेत नाहींत. असा ऋतु म्हणजे वर्षा होय. वर्षाऋतूंत गुग्गुळ करावयास घातल्यास तो सुकण्याऐवजीं कुजतो. त्यांत आळ्या होतात. म्हणून सूर्यकिरण उत्तम मिळण्याची सोय उपलब्ध असल्याशिवाय हे कल्प तयार करावयास न घेणें बरें.

विधि पहिला (सोमपाक)

गुग्गुळ व इतर औषधें एकत्र करून त्यांत स्नेह घालून पाटावरवंट्यावर डांगराप्रमाणें पिटतात. ह्याचे शतपिट्टित, सहस्रपिट्टित असे प्रकार असतात. जितकें पिट्टण अधिक तितका तो गुग्गुळ अधिक कार्यक्षम समजला जातो. पिट्टण पुरेसें झाल्यावर त्याच्या गोळ्या करून ठेवतात.

सोमपाकाचा आणखी एक प्रकार

सोमपाकाचा आणखी एक प्रकार आहे, तो असा:– अपेक्षित गुणद्रवांत गुग्गुळाचा पाक करा-वयाचा आणि तो पाक पळीस चिकटू लागला कीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तो खलांत घालून त्यांत चूर्ण मिश्रण मिसळावयाचें व ८।१५ दिवस खल करावयाचा. खल चिकणाईवर आला कीं गोळ्या करून उन्हांत सुकवावयाच्या.

दोन विधींतील फरक

पहिल्या विधींत स्नेह आहे तर दुसऱ्यांत कषाय-द्रव आहे. पहिल्यांत पिट्टण (आघात) आहे तर दुसऱ्यांत खल (मर्दन) आहे. स्नेहास व द्रवास अनुक्रमें पिट्टण व मर्दनच योग्य होत. अशी ही परंपरा मानते.

विधि दुसरा (सूर्यपाक)

ह्या विधींत पिट्टण, मर्दन कांहीं नाहीं, पण भावन आहे. आणि भावनाद्रव जिरण्या (सुकण्या)-करितां आतपाची योजना आहे, ती अशीः-गुग्गुळ द्रवांत विरवून त्यांत चूर्णे मिसळून त्यांचा चांगला चिखल तयार करावा आणि मग पुनः त्यांत अधिक द्रव घालून तें मिश्रण सपाट भांड्यांत घालून सारखें पसरून प्रखर उन्हांत ठेवावें. सुरीनें हा पंक पुनः पुनः हालवून सारखा करीत रहावें. एक भावना सुकून मिश्रण घट्ट झालें कि पुनः द्रव घालून दुसरी भावना द्यावी. अशा ७ ते २१ भावना द्याव्यात. तदनंतर त्यांच्या गोळ्या करून त्या सुकवून ठेवाव्यात ही परंपरा सूर्यकिरणांची विशेष आवश्यकता मानते.

विधि तिसरा (अनलपाक)

ह्या विधींत चन्द्र, सूर्य अगर पिट्टण, मर्दन, भावना यापैकीं कांहींहि घेतलेलें नाहीं. आणि ह्या पद्धतीनें गुग्गुळहि तेव्हांच तयार होतो. उदा. मंद विस्तवावर गुग्गुळाचा उत्तम पाक तयार करावा. पाकाची गोळी वळूं लागली कीं त्यांत चूर्णांचें मिश्रण घालून भराभर व जाराजोरानें तो पाक ढवळून गोळ्या वळाव्यात, किं झाला गुग्गुळ तयार ! या विधिसंबंधांत "पाको न स्याच्च चूर्णानाम्।" असा इषारा वृंदमाधवानें दिला आहे. त्यांचें म्हणणें असें कीं पाकांतील चूर्णे निजास्थितींतच राहिलीं पाहिजेत. म्हणजे येथें गुग्गुळाचा उपयोग बंधक पदार्थ म्हणूनहि होतो, हें लक्षांत येणें जरूर आहे. आणि या कृती-मुळेंच गुग्गुळकल्प बंधन वर्गांत घातले गेले आहेत.

सिंहनादगुग्गुळ भा. भै. र. ७९२४

(भै. र., धन्व-र. र., बृ. नि. र., यो. त., तरंग ४२, भा. प्र.)

पाठः– पिट्टितां गुग्गुलोर्मानीं कटुतैलपलाष्टकम्।
प्रत्येकं त्रिफलाप्रस्थौ सार्द्धं द्रोणे जले पचेत् ॥
पादशेषं च पूतं च पुनरेताद्विमिश्रयेत्।
त्रिकटु त्रिफला मुस्तं विडंगामरदारुकम् ॥
गुडूच्यग्नित्रिवृद्दन्ती चवीशूरणमाणकम्।
पारदं गंधकं चैव प्रत्येकं शुक्तिसंमितम् ॥
सहस्रं कानकफलं सिद्धे संचूर्ण्य निक्षिपेत्।
ततो रक्तिद्वयं जग्धा पिबेत्तप्तजलादिकम् ॥
अग्निं च कुरुते दीप्तं वडवानलसन्निभम्।
धातुवृद्धिं वयोवृद्धिं बलं सुविपुलं तथा ॥
आमवातं शिरोवातं संधिवातं सुदारुणम्।
जानुजंघाश्रितं वातं सकटीग्रहमेव च ॥
अश्मरीं मूत्रकृच्छ्रं च भग्नं च तिमिरोदरे।
अम्लपित्तं तथा कुष्ठ प्रमेहं गुदनिर्गमम् ॥
कासं पंचविधं श्वासं क्षयं च विषमज्वरम् ॥
प्लीहानं श्लीपदं गुल्मं पांडुरोगं सकामलम् ॥
शोथान्त्रवृद्धिशूलानि गुदजानि विनाशयेत्।
मेदः कफामसंघातं व्याधिवारणदर्पहा ॥
सिंहनाद इति ख्यातो योगोऽयममृतोपमः ॥

नांवः– ?

द्रव्यः–क्वाथ–हिरडा, बेहडा, आंवळा, सर्षपतेल
१ प्र. १ प्र. १ प्र. १ प्र.

पाणी– दीड द्रोण शेष-एकचतुर्थांश

गुग्गुळ– एक प्रस्थ (पोटलींत)

प्रक्षेप– त्रिकटु, त्रिफला, मुस्ता, विडंग, देव-दार, गुडूची, चित्रक, दंती, चवक, सूरण, मानकंद, पारा, गंधक २।२ तोळे, १००० कनकफल (जेपाळ) कस्तूरी २ तोळे.

पाक— अनल पाचनपात्र–

मर्दनस्नेह–

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सिद्धिप्रमाण- ४ प्रस्थ ३८ तोळे.

परिगणन—

सिंहनाद गुग्गुळाचे गुणधर्म

रोग- अग्निदीपन, धातु. वय-बलवर्धक-आमवात, शिरोवात, संधिवात, जानुजंघावात, कटीग्रह, अश्मरी, मूत्रकृच्छ्र, भग्न, तिमिर, उदर, अम्लपित्त, कुष्ठ, प्रमेह, गुदभ्रंश, पांच कास, श्वास, क्षय, विषमज्वर, प्लीहा, श्लीपद, गुल्म, पांडुरोग, कामला, शोथ, आंत्रवृद्धि, शूल, अर्श, मेद-कफ-आमज रोग.

मात्रा- २ गुंजा अनुपानः—उष्णोदक

पथ्यापथ्य—

———

महायोगराजगुग्गुळ (भा. भै. र. ५७८०)

शा. सं. । म. खं. अ. २) बृ. नि. र.

पाठः- नागरं पिप्पलीमूलं पिप्पली चव्यचित्रकौ ।
भृष्टं हिंग्वजमोदा च सर्षपा जीरकद्वयम् ॥
रेणुकेन्द्रयवाः पाठा विडंगं गजपिप्पली ॥
कटुकातिविषा भार्ङ्गी वचा मूर्वेति भागतः ॥
प्रत्येकं शाणिकानि स्युर्द्रव्याणीमानि विंशतिः ।
द्रव्येभ्यः सकलेभ्यश्च त्रिफला द्विगुणा भवेत् ॥
एभिश्चूर्णीकृतैः सर्वैः समो देयश्च गुग्गुलुः ।
वंगं रौप्यं च नागं च लोहसारस्तथाभ्रकम् ॥
मण्डूरं रससिन्दूरं प्रत्येकं पलसंमितम् ।
गुडपाकसमं कृत्वा इमं दद्याद्यथोचितम् ॥
एकपिण्डं ततः कृत्वा धारयेद् घृतभाजने ।
गुटिकाः शाणमात्रास्तु कृत्वा ग्राह्या यथोचिताः ॥
गुग्गुलुर्योगराजोऽयं त्रिदोषघ्नो रसायनः ।
मैथुनाहारपानानां त्यागो नैवात्र विद्यते ॥
सर्वान्वातामयान्कुष्ठानर्शांसि ग्रहणीगदम् ।
प्रमेहं वातरक्तं च नाभिशूलं भगन्दरम् ॥
उदावर्तं क्षयं गुल्ममपस्मारमुरोग्रहम् ।
मन्दाग्निश्वासकासांश्च नाशयेदरुचिं तथा ॥
रेतोदोषहरः पुंसां रजोदोषहरः स्त्रियाम् ।
पुंसामपत्यजनको वन्ध्यानां गर्भदस्तथा ॥
रास्नादिक्वाथसंयुक्तो विविधं हन्ति मारुतम् ।
काकोल्यादि शृतात्पित्तं कफमारग्वधादिना ॥
दार्वीशृतेन मेहांश्च गोमूत्रेण च पांडुताम् ।
मेदोवृद्धिं च मधुना कुष्ठं निम्बशृतेन वा ॥
छिन्नाक्वाथेन वातास्रं शोथं शूलं कणाशृतात् ।
पाटलाक्वाथसहितो विषं मूषकजं जयेत् ॥
त्रिफलाक्वाथसहितो नेत्रार्तिं हन्ति दारुणाम् ॥

नांव- श्रेष्ठत्वनिदर्शक

द्रव्यः- क्वाथः- सुंठ, पिंपळमूळ, पिंपळी, चवक, चित्रक, भृष्टहिंगु, अजमोदा, सर्षप, दोन्ही जिरें, रेणुकबीज, इंद्रजव, पाठा, विडंग, गजपिंपळी, कुटकी, अतिविष, भारंगी, वचा, मोरवेल हीं १।१ भाग, त्रिफळा २ भाग.

गुग्गुळः— सर्वांचे बरोबर

पाणीः— शेषः—

प्रक्षेपः- वंग, रौप्य, नाग, लोहसार, मंडूर अभ्रक, रससिंदूर प्रत्येकीं १।१ पल

पाक— गुडपाकसम

पाचनपात्रः— मर्दनस्नेहः—घृत

सिद्धिप्रमाणः— ७ पल २१ तोळे

परिगणनः—

महायोगराजगुगुळाचे गुणधर्म

रोगः- त्रिदोष, वातव्याधी, कुष्ठ,अर्श, ग्रहणी, प्रमेह, वातरक्त, नाभिशूल, भगंदर, उदावर्त, क्षय, गुल्म, अपस्मार, उरोरुजा, मंदाग्नि, श्वास, कास, अरुचि, रेतोदोष-रजोदोष-नाशक, गर्भप्रद, अपत्य-जनक, रसायन.

मात्राः- १ माष (३ मासे)

अनुपानः- रास्नादिकाढाः- वात,
काकोल्यादिकाढाः- पित्त
आरग्वधादिकाढाः- कफ
दारुहळदकाढाः- प्रमेह
गोमूत्रः- पांडू
मधः-- मेदोरोग
निंबक्वाथः- कुष्ठ
गुडूचीक्वाथः- वातरक्त.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पिंपळीक्वाथः— शोथ, शूल
पाडळक्वाथः- उंदिरविष
त्रिफलाक्वाथः- नेत्ररोग
पथ्यापथ्यः—काहीं नाहीं.

———

गुटिका-वटिका

चूर्णांना भावना देऊन त्यांचे गुणधर्म वाढवून, ते टिकवून धरण्याचा गुटिका, वटिका हा अल्पसा प्रयत्न आहे. गुटिका गुटिका यांचें सेवनमान चूर्णाचे मानानें कमी असल्यानें व त्या घेण्यास सोयीच्या पडत असल्यानें हा एक कल्पप्रकार प्रचारांत आला. त्याच्या नमुनाकृति पुढें दिल्या आहेत.

संजीवनीगुटिका (आ. भै. र. ८१८५) (यो. त. । त. २४, बृ. यो. त. । त. ७१, वै. र. शा. सं. । खं. २ अ. ७, यो. र. यो. चि. म. । अ. ३)

पाठः- विडंगं नागरं कृष्णा पथ्यामलविभीतकम् ।
वचा गुडूची भल्लातं सविषं चात्र योजयेत् ॥
एतानि समभागानि गोमूत्रेणैव पेषयेत् ।
गुंजाभा गुटिका कार्या दद्यादार्द्रकजैः रसैः ॥
एकामजीर्णगुल्मेषु द्वे विषूच्यां प्रदापयेत् ।
तिस्रश्च सर्पदष्टे तु चतस्रः सान्निपातिके ॥
वटी संजीवनी नाम्ना संजीवयति मानवम् ॥

नांवः- विशिष्ट कार्यसूचक.
द्रव्यसंग्रहः- वावडिंग, सुंठ, पिंपळी, हिरडा, बेहेडा, आंवळा, वचा, गुळवेल, भल्लातक, बचनाग, सर्व समभाग.

भावनाः-- गोमूत्र.

रोगः--	अजीर्ण,	गुल्म,	विषूचिका,	सर्पदंश,	सन्निपात
मात्राः-	१	१	२	३	४ गुंजा

अनुपानः-- आलें रस.
सिद्धिप्रमाणः-- १० तोळे पथ्यापथ्यः—

गंधकवटी (भा. भै. र. १३०१) र. सा.

पाठः—शुद्धगंधकभागैकं सत्वं शुण्ठ्याश्चतुर्गुणम् ।
निम्बुनीरेण संमर्द्य सप्तवारं विशेषतः ॥
पुनश्च सैन्धवं क्षेप्यं यथारुचि भिषग्वरैः ।
चणकप्रमितां कुर्याद्वटिकां रुचिदायिनीम् ॥
भोजनान्ते सदा देया गन्धकाख्या वटी शुभा ॥

नांवः— प्रारंभद्रव्यसूचक
द्रव्यसंग्रहः— गंधक, सुंठीसत्व
भावनाः— लिंबुरस ७ भावना. नंतर जरुरीप्रमाणे सैंधव मिश्र करणें.
रोगः— अरुचि मात्राः— हरबऱ्याएवढी
सिद्धिः— ५ तोळे अनुपानः—
कालः— भोजनांते (जेवणाचे शेवटीं)
पथ्यापथ्यः—

रजःप्रवर्तिनीवटी भा.भै.र.५९२४भै.र.

पाठः-कन्यासारं च कासीसं रामठं टंकणं तथा ।
समादाय समं सर्वं पेषयेत्कन्यकाद्रवैः ॥
निर्मापयेद्भिषग्वर्यो रक्तिद्वयमिता वटीः ।
शीलितेयं तु वटिका विनिहन्ति सुदारुणाम् ॥
रजोरोधव्यथां कष्टरजःस्रावव्यथां तथा ।
रजःप्रवर्तिनी ह्येषा नीलकण्ठेन भाषिता ॥

नांवः— रोगसूचक
द्रव्यसंग्रहः— काळा बोळ, कासीस, हिंग, टंकण समभाग
भावनाः— कुमारीरस
रोगः— नष्टार्तव, कष्टार्तव, पीडितार्तव.
मात्राः— २ गुंजा. अनुपानः--
सिद्धिप्रमाणः— ४ पथ्यापथ्यः--

———

पांढरें कोड नष्ट झालेल्या हजारों गांवच्या लोकांचीं बक्षिसें व प्रशस्तिपत्रें छापलेलें पत्रक मोफत मागवा.
वैद्य के. आर. बोरकर मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला [मध्य-प्रदेश]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ
प्रांताध्यक्षांचा कोकणांतील दौरा

पुण्यास प्रांतीय मंडळाच्या (ता. २५।४।५४ ला) सभेंत ठरल्याप्रमाणें म. प्रां. वैद्य मंडळाचे अध्यक्ष वैद्य दत्तात्रयशास्त्री जळूकर यांनीं प्रांतीय मंडळाच्या प्रचारकार्यासाठीं कोकणपट्टीपासून प्रारंभ केला, त्याचा त्रोटक वृत्तांत पुढें दिला आहे.

वैद्यबंधूंच्या भेटी

ठाणेः- पुण्याच्या सभेंतच ठाणें व रत्नागिरी जिल्ह्यातर्फे अनुक्रमें वैद्यवर दत्तात्रेय ब. वैद्य आणि वैद्य द. का. यत्तेशास्त्री यांनीं आमंत्रणें दिलीं होतीं. तसेंच वै. नानासाहेब जोशी (मुंबई) यांनींहि त्यांचे जन्मभूमीचे गांवीं येण्यासाठीं निमंत्रण दिलें होतें. त्याप्रमाणें पावसाळ्याचे पूर्वींच ह्या भागांत फिरून येणें इष्ट असल्यामुळें १३ ते १७ मे १९५४ पर्यंत ह्या सर्व प्रदेशांतून फिरून येण्याचें ठरवून नशिराबादहून अध्यक्ष १२।५।५४ बुधवारीं रात्रीं निघून १३।५ ला ठाणें येथें प्रातःकाळीं पोचले. तेथील स्थानिक वृद्ध-वैद्य, मुंबईच्या महाराष्ट्र आयुर्वेद विद्यालयाचे व रुग्णालयाचे एक काळचे प्रमुख कार्यकर्ते, सुप्रसिद्ध रसशास्त्रज्ञ श्री. दत्तात्रेय बळवन्त वैद्य यांचेकडे अध्यक्षांचें संपूर्ण दिवसभर वास्तव्य होतें. सकाळीं वैद्यराज दत्तोपंतासह अध्यक्षांनीं गांवांत हिंडून वैद्य-बंधूंच्या भेटी घेतल्या. ठाण्याचे वै. ना. ह. जोशी आयुर्वेदचिकित्सक, पतिपत्नी वैद्य भागवत, वैद्य परांजपे, वैद्य मोकाशी यांचेकडे जाऊन अध्यक्षांनीं व्यवसाय-विषयक माहिती मिळविली व परिचय करून घेतला.

व्यक्तीचे दोष संस्थेला घातक

नन्तर दुपारीं ३॥ वाजतां, वै. दत्तोपंत यांचे दिवाणखान्यांतील उपस्थित स्थानिक वैद्यांनीं शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समिति, प्रांतीय संमेलनाचें चालू असलेलें कार्य, जनतेच्या आणि वैद्यांच्या अपेक्षा, गुरुपरंपरापद्धतीचें पुनरुज्जीवन यशस्वी होणें शक्य आहे काय ? इ. प्रश्नांविषयीं मोकळ्या मनानें ऊहापोह केला. त्यांच्या शंकांचें समाधान करण्यांत आलें. व्यक्तिगत दोषांचे परिणाम संस्थेला घातक होण्याचा संभव असतो, तथापि कार्यकर्त्यांनीं व्यक्तिदोष टाकून गुण तेवढेंच ग्रहण करावेत व त्यायोगें लोकसंग्रह करून संघटन वाढवीत असावें, यांतच संस्थेचा व शास्त्राचा उत्कर्ष सांठवलेला आहे असें सांगून अध्यक्षांनीं येत्या २८।५ ला मुंबईस होणाऱ्या प्रांतीय मंडळाच्या विशेषाधिवेशनाचें निमंत्रण देऊन व आलेल्या वैद्यबंधूंना मंडळाचे सदस्य बनवून येथील प्रचारकार्य संपवलें.

ताम्रयुक्त ज्वरपंचानन रस

वैद्य श्री. दत्तोपंत हे जुन्या पिढीचे वैद्य असले तरी 'जें जें आपणां ठावें तें तें इतरां सांगावें' या वृत्तीचे आहेत. तसेंच नवीन गोष्टी समजून घेण्यांतहि त्यांना कमीपणा न वाटतां तें एक कर्तव्य आहे असें मानणाऱ्या-पैकीं ते आहेत असें दिसून आलें. 'नव गोप्यानि कारयेत्' या सूत्रांत औषधीविद्येस प्रविष्ट करूनच आयुर्वेदाचा अपकर्ष झाला ही त्यांची ठाम श्रद्धा आहे, हें पाहून फार बरें वाटलें. आयुर्वेदपत्रिकेंत नुकताच चर्चिला गेलेला ज्वरपंचानन रस स्वतः तयार करून तो उत्कृष्ट अनुभवास आल्यानें त्यांनीं सांगितलें. सध्यां त्यांतील ताम्र त्यांनीं निम्मे प्रमाणानें घालून हा योग तयार केला आहे.

'जिरणी' वनस्पतीची पाचक मुळी

ठाणें जिल्ह्यांत 'जिरणी' नांवाच्या वन-स्पतीची मुळी ही अत्यंत पाचक असल्याचा अनुभव त्यांनीं सांगितला. कितीहि जडान्न सेवन केल्यावर ही मुळी घासून पोटांतून दिल्यास १ तासाचे आंत पुन्हां सडकून भूक लागते असें ते म्हणाले. तसेंच 'न्युमोनियाची मुळी' म्हणून एक मुळी कोकणांत वापरण्यांत येत असल्याचें त्यांनीं सांगून अगदीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असाध्य वाटणारे न्युमोनियाचे रोगीहि या मुळींचे उपयोगानें खडखडित बरे झाल्याचाहि स्वानुभव वैद्य दत्तोपंतांनीं सांगितला. स्वतःचे व्यवसायासाठीं स्वतः केलेलींच सर्वहि औषधें ते वापरतात हें दिसून आलें.

चिपळूण येथील संघटित वैद्यवर्ग

दिनांक १४ शुक्रवार रोजीं सकाळीं ६ वा. ठाण्याहून मुंबईचे वैद्य ना. ह. जोशी यांचेसह अध्यक्ष वैद्य जळूकरशास्त्री चिपळूणकडे जाण्यास निघाले. दुपारीं ४ वाजतां चिपळूणास वै. दत्तात्रेय-शास्त्री थत्ते यांचेकडे पोंचल्यावर यांनीं गांवांतील सर्व वैद्यांस रात्रौ एकत्र जमणेसाठीं निमंत्रण दिलें. चिपळुणास १०-१२ वैद्य व्यवसाय करीत असून स्थानिक वैद्यांची संघटित संस्था असल्याचें दिसून आलें. वैद्यराज थत्ते यांनीं सर्वांना रात्रौ भोजनाचेंच निमंत्रण दिल्यामुळें सभेसाठीं पुन्हां निराळें बोलावणें करणेची गरज उरली नाहीं. गांवांतील ३।४ महत्वाचें रोगी वैद्यराज थत्ते यांनीं अध्यक्षांना दाखवून त्यांचे चिकित्सेचे बाबतींत इतर वैद्यांसह अध्यक्षांशीं विचारविनिमय केला.

प्रचारकार्यास आर्थिक साहाय्य

त्याच दिवशीं रात्रीं ९॥ ते १२ वाजेतों सभा-कार्य, विचारविनिमय, शंकासमाधान, व्यावसायिक अडचणींचा विचार इ. स्वरूपाचें झालें. शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रमाची भूमिका व त्यानिमित्त वैद्यवर्गावरील जबाबदारी अध्यक्षांनीं आपल्या भाषणांतून सांगितली. व मुंबईस २८।५ ला होणाऱ्या प्रांतीय विशेष अधि-वेशनाचें निमंत्रण देऊन सभासद व देणगी रूपानें मंडळास साह्य करण्याची विनंति केली. सभेंत उपस्थित असलेले सर्वहि बंधु सभासद झाले. आसपासचे २।३ मैलावरील खेड्यावरूनहि वैद्यबंधु आले होते. वै. थत्ते वै. कृष्णाजी सखाराम, वै. ना. वि. गोखले, वै. द. श्री. रायकर, वै. श्री. द. रायकर, ह्या स्थानिक वैद्यबंधुशिवाय शेजारचे पेठ मापचे वै. ना. श्री. रायकर, रामपूरचे वै. ना. कृ. मालशे, खेर्डीचे वै. गो. ग. केतकर, मार्ग ताम्हणे येथील वै. श्री. द. नातु असे वैद्यबंधु उपस्थित होते. परीक्षा-खालीं घेतलेल्या रोग्यांकडून मिळालेलें परीक्षण-शुल्क व शिवाय अध्यक्षांना रत्नागिरीपर्यंतचा प्रवास-खर्च देऊन दुसरे दिवशीं वै. थत्ते यांनीं अध्यक्षांना रत्नागिरीकडे रवाना केलें. हे सर्वहि पैसे म. प्रां. वै. मंडळाकडे जमा करण्यांत आले आहेत.

रत्नागिरींत वैद्यांची संख्या कमी कां?

त्यानंतर दिनांक १५ मे शनिवारीं सकाळीं ६॥ चे मोटारीनें निघून अध्यक्ष वै. जळूकरशास्त्री रत्नागिरीस ११ वाजतां पोंचले. तेथील वैद्यराज पांडुरंगशास्त्री भिडे यांचेकडे दिवसभर वास्तव्य होतें. रत्नागिरी गांव जिल्ह्याचा असूनहि त्या मानानें येथें डॉक्टर-वैद्यांच्या दवाखान्यांची संख्या कमी वाटली. स्थानिक वृद्धवैद्य श्री पुरुषोत्तम भिकाजी जोशी, वै. गजानन महादेव जोगळेकर, वै. केशव गणेश जोशी व तरुण वैद्य रा. ग. जोगळेकर यांच्या घरीं जाऊन अध्यक्षांनीं भेटी घेतल्या. प्रचाराचा उद्देश, संघटन, शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रम व म. प्रांतीय विशेषाधिवेशन विषयक माहिती निवेदन करून सदस्य शुल्क व देणगी मिळवली. वै. पु. भि. जोशी व वै. ग. म. जोगळेकर यांनीं सदस्य शुल्क देऊन ४ व ९ रुपये मंडळास देणगी दिली.

तरुण वैद्यांची संमेलनाकडून अपेक्षा

तरुण वैद्य रा. ग. जोगळेकर यांनीं, आम्ही तरुण वैद्य संमेलनाचे अहवालांतून देणग्या-वर्गणीदारां-च्या नांवांची अपेक्षा करीत नसून संमेलनांत निरनिराळे रोगी तपासले जावेत व त्यांचें शास्त्रीय निदान चिकित्सादिग्दर्शनासह अहवाल आमचे हातीं पडावा, हवा तर त्यासाठीं होणारा खर्च प्रतिमास आमचे-कडून घ्यावा, अशी असल्याचें सांगितलें. व आम्ही मिश्र पद्धतीनें शिकलेले लोक आयुर्वेदीय निदान-चिकित्सा करण्यास अपूर्ण पडतों, ही जाणीव आम्हांला पदोपदीं होते असें स्वच्छ सांगून शुद्ध-आयुर्वेदीय पाठ्यक्रमानें ही उणीव भरून काढावी असें सुचविलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चेंबूर-पनवेल संमेलनांतून शास्त्रीय चर्चा

पनवेल व चेंबूर संमेलनांत रुग्ण प्रात्यक्षिक व शास्त्रीय संभाय संभाषा चर्चेचा उपक्रम केल्याचें वै. पनमाऊ नोगळेकरांना सांगण्यांत आलें. तरी पण त्यासंबंधीं सविस्तर अहवाल प्रसिद्ध होऊं शकला नाहीं; तो होणें इष्ट आहे, ही गोष्ट अध्यक्षांनीं मान्य केली व हा उपक्रम यापुढील संमेलनापुढें मी अवश्य मांडीन असें सुचविलें.

नृसिंहसरस्वती जयंति - उत्सव

माखजन, कासें, बुरंबाड–दुसरे दिवशीं सकाळचे मोटारीस जागा न मिळाल्यानें वै. पांडुरंगशास्त्री भिडे यांचेसह मंडळाचे अध्यक्ष दि. १६।५ रविवारीं माखजनकडे जाण्यास निघाले. माखजनजवळच कासें हा छोटासा गांव मुंबईचे वै. ना. ह. जोशी यांची जन्मभूमी आहे. तेथें या दिवशीं म्हणजे वैशाख शु॥ १५ ला श्रीनृसिंहसरस्वतीचे जयंतीचा उत्सव असतो. त्यासाठीं वै. ना. ह. जोशींनीं अध्यक्षांना मुद्दाम आमंत्रण देऊन थांबवून घेतलें. या उत्सवांत सर्व कुटुंबीय व जवळपासचे आप्तेष्टहि येत असतात. लघुरुद्राभिषेक, पूजन, आरती होऊन नंतर भोजन-समारंभ सुमारें शेंदीडशें मंडळींचा झाला. नंतर रात्रीं श्री. वेदमूर्ति कान्हेरेबुवांचें सुश्राव्य प्रवचन व त्यास जोडूनच भजनाचा कार्यक्रम झाला.

वैद्य साठे पतिपत्नींचें सुसज्ज रुग्णालय

शेजारीं बुरंबाडचे वरचे वाठारांत साताराचे विद्यापीठाचे जुने स्नातक श्री. वै. दत्तात्रेय हरी साठे हे रहातात. ते उत्सवासाठीं येऊन परत जातांना अध्यक्षांना आपलेकडे घेऊन गेले. १९२८ सालीं विद्यालयांतून शिकून आल्यावर वै. साठे यांनीं आसपासचे लोकांची गैरसोय लक्षांत घेऊन स्वखर्चानें मोठें रुग्णालय, सूतिकागृह व चिकित्सागृह सुरूं केलें. अर्धांगीला सूतिकाशल्यनिर्मोचनाचे पाठ देऊन तयार केलें व त्यासाठीं सर्व प्रकारचीं शस्त्रास्त्रें, सुसज्ज शस्त्रकर्मालय, रोग्यास व त्यांचे बरोबरच्या लोकांस रहाण्यासाठीं खोल्या व त्यांची सर्व प्रकारें अन्न-धान्य, लाकूड, फाट्यासुद्धां सर्व व्यवस्था श्री. साठे यांनीं केलेली पाहून फारच आश्चर्य व समाधान वाटलें. आसपासच्या २० मैलांतील सर्व प्रकारचे रुग्ण व अडलेल्या अथवा साध्या बाळंतिणींना आतां वैद्य साठे यांच्या उपचारांचें साह्य होत आहे. धनिक व मध्यमवर्गास योग्य खर्चांत याचा फायदा घेतां येतो इतकेंच नव्हे तर गरिबांना विनामूल्यहि फायदा देण्याची श्री. साठे यांची तयारी असते. दाई, गडी माणसें इ. परिवारहि योग्य असा ठेवला आहे तरी पण सर्व बारीकसारीक गोष्टी स्वतः करण्याची श्री. साठे पतिपत्नींची तयारी असते, ही गोष्ट विशेष आढळली. या भागांतील हें कार्य खरोखरच विशेष वाटलें.

मालशे यांचा भल्लातक कल्प

माखजनचे वैद्यराज स. प. मालशे हेहि उत्सवानिमित्त कासे या गावीं आले होते. त्यांनाहि पूर्वसूचना होतीच. त्याप्रमाणें त्यांनींहि अध्यक्षांस आपलें गावीं नेऊन आपलें चिकित्सागृह दाखविलें. स्वतः केलेलीं औषधें चिकित्सेंत वापरणें व वडिलार्जित (वै. परशराम महादेव मालशे यांचा) भल्लातककल्प हें वै. सखारामशास्त्री मालशे यांचें वैशिष्ट्य होय. येथील ग्रामपंचायतीचेहि हे सरपंच असून सर्वत्र लोकप्रिय आहेत. या सर्वहि ठिकाणीं उपरोक्त प्रचार-कार्य करून अध्यक्षांनीं कोंकणचा हा संचार पूर्ण केला. यापुढें लौकरच बेळगांव, सातारा येथें प्रचार होईलसें वाटतें. या प्रचारांत झालेल्या सदस्यांचीं नांवें व मिळालेली मदत येणेप्रमाणें:—

म. प्रां. वैद्य मंडळाचे सदस्य

(१) वै. दत्तात्रेय काशिनाथ थत्ते चिपळूण, (२) वै. कृष्णाजी सखाराम वैद्य चिपळूण, (३) वै. नारायण विष्णु गोखले सातारकर, चिपळूण, (४) वै. नारायण श्रीधर रायकर, पेठमाप, पो. चिपळूण, (५) वै. नारायण कृष्ण मालशे पो. रामपूर ता. चिपळूण, (६) वै. गोपाळ गंगाधर केतकर, आयुर्वेद-विशारद. खेर्डी पो. चिपळूण, (७) वै. श्रीधर दत्तात्रेय नातू मु. पो. मार्गताम्हणे ता. चिपळूण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(८) वैद्य दामोदर श्रीधर रायकर, चिपळूण (९) वै. श्रीराम दत्तात्रेय रायकर मु. मार्कंडी, चिपळूण (१०) वै. पुरुषोत्तम भिकाजी जोशी. रत्नागिरी (११) वै. रामचंद्र गजानन जोगळेकर आयुर्विद्या-विशारद रत्नागिरी (१२) वै. केशव गणेश जोशी आयुर्वेदप्रवर, आरोग्यालय, रत्नागिरी (१३) वै. दत्तात्रेय हरी साठे मु. पो. बुरंबाड व्हाया माखजन, (१४) वै. सदाशिव परशराम मालशे आयुर्वेदविशारद मु. पो. माखजन, जि. रत्नागिरी.

वर्गणी देणगीचा हिशोब

या सर्व सदस्यांची १९५४ ची वार्षिक प्रत्येकी एक रुपया वर्गणी कार्यालयांत जमा असून १३ रु. वैद्य थत्ते चिपळूण यांचेकडून रोगपरीक्षण व प्रवास-खर्चासाठीं मिळून देणगी मिळाली. तसेंच रत्नागिरी येथें वै. पु. भि. जोशी ४ रु. व वैद्य गजानन महादेव जोगळेकर ९ रु. असे एकूण १३ रु. मिळाले तेहि कार्यालयांत जमा आहेत. याशिवाय ठाणें येथील सदस्याची नांवें वगैरे प्रसिद्धीसाठीं पाठविण्या बद्दल तिकडे कळविलें आहे. तेथील सर्व कार्य वै. दत्तोपंत हें पूर्ण करून नंतर हिशेब पाठवतील.

आपण चोरी करीत आहोत !

"मी म्हणतो कीं एका दृष्टीनें आपण चोर आहोत. ज्या वस्तूंची मला गरज नाहीं अशी वस्तू मी घेणें आणि ती जवळ ठेवणें म्हणजे मी ती वस्तू दुसऱ्यापासून चोरण्यासारखें आहे.

निसर्गाची उदारता

मी असें म्हणूं शकतो कीं आपल्याला दररोज लागणाऱ्या वस्तु निसर्ग भरपूर प्रमाणांत पुरवितो आणि जर प्रत्येकानें निसर्गापासून जास्त कांहीं न घेतां स्वतःला लागेल तेवढेंच घेतलें तर जगांत दारिद्र्य उरणार नाहीं, कोणीहि अन्नावाचून मरणार नाहीं.

परंतु जोपर्यंत विषमता चालू आहे तोपर्यंत आपण चोरी करीत आहोत असेंच म्हणावें लागेल."

—म. गांधी

नेत्रोपचार पथकाचा दौरा

मुंबई सरकारचे दक्षिण विभागांतील फिरते नेत्रोपचार पथक जून महिन्यांत कोल्हापूर जिल्ह्याच्या पूर्व भागांत दौरा करणार आहे त्यावेळीं पुढील ठिकाणी व त्या त्या तारखेला नेत्ररोग्यांची तपासणी करण्यांत येईल.

कुरुंदवाड ता. १२ जून, शिरोळे ता. १४, जयसिंगपूर ता. १५, वडगांव ता. १६, इचलकरंजी ता. १७ आणि हातकणंगले ता. १८ जून.

कुरुंदवाड येथें सरकारी दवाखान्यांत ता. १९ ते २८ जूनपर्यंत नेत्रोपचार शिबिर भरविण्यांत येईल.

वाकेरी भाते

अस्सल खात्रीचें व ताजे मिळते. १ पौंड २ रु. ट ख. निराळा.

श्रीपाद फार्मसी, पो. पेण (कुलाबा)

.... उत्तम धर्म ....

जनतेची सेवा करणें हा मनुष्यमात्राचा धर्म आहे. त्यांतहि आजारी माणसाची सेवा करणें हा अति उत्तम धर्म होय. उत्तम गुणकारी औषध देऊन रोगाचें निवारण केल्यानें रोगी माणसाची सेवा उत्तम घडते.

अशी सेवा करण्यासाठीं उत्तम व अस्सल औषधेंच वापरलीं पाहिजेत. अशा खात्रीच्या औषधी खरेदी करण्याचें स्थान-

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स

पायधुनी मुंबई नं. ३

(टेलिफोन नं. ३१८५८) हेंच आहे.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें

मुख्य केंद्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलन, विशेष अधिवेशन, मुंबई

वैद्यवर दत्तात्रेयशास्त्री जळूकर यांचें

अध्यक्षीय भाषण

॥ नमो ऽ स्तु अश्विभ्याम् ॥

प्रेमास्पदः परमपावनपुण्यपुंजः । सर्वामयघ्नविविधौषधिजो निकुंजः ॥
शारीरतत्त्वपरिशीलनशुद्धबुद्धिः । धन्वंतरिर्विजयते भिषजां समृद्धिः ॥१॥
गुणत्रयविभेदेन मूर्तित्रयमुपेयुषे । त्रयीभुवे त्रिनेत्राय त्रिलोकीपतये नमः ॥२॥
ब्रह्मदक्षाश्विदेवेश भरद्वाजपुनर्वसु- । हुताशवेशचरकप्रभृतिभ्यो नमो नमः ॥३॥

समादरणीय स्वागताध्यक्ष, प्रातःस्मरणीय गुरुजन,
आणि उपस्थित प्रतिनिधि बंधु-भगिनींनो—

सुमारें वर्षापूर्वी लातूर येथील महाराष्ट्र प्रांतीय नवम वैद्य संमेलनाचे प्रसंगीं निश्चित झाल्याप्रमाणें वस्तुतः आपण आज प्रान्तीय संमेलनाच्या दशम अधिवेशनानिमित्त पुणें येथें एकत्र यावयाचें; परन्तु दशम संमेलन निमंत्रक पुणें वैद्य-मंडळाच्या विनंतीवरून तें अधिवेशन येत्या आक्टोबर—डिसेंबरपर्यंत लांबणीवर टाकणें भाग झालें. तथापि चालू वर्षांत लातूर संमेलनानन्तर फारच थोड्या अवधींत मुंबई राज्यांत आयुर्वेदक्षेत्रांत आयुर्वेदाच्या भाग्य-चक्रास अशी कांहीं अनुकूल गति मिळाली कीं, त्या गतीमुळें केवळ महाराष्ट्र प्रांतांतच नव्हे तर आसेतुहिमाचल संपूर्ण भारतवर्षभर आनंद व आशा यांच्या सुखद ऊर्मि वैद्यसमाजाच्या हृदय-सागरांत उसळूं लागल्या. सांदीकोपऱ्यांत पडून अगतिक झालेला आयुर्वेद, शुद्ध व सोज्वल स्वरूपांत पुनश्च तळपूं लागणार असें वैद्यसमाजास वाटून निराशेच्या फटकाऱ्यानें पंगू बनलेला वैद्यसमाज जणूं नवचैतन्याचा संचार होऊन अडचणींचे प्रचंड गिरि उल्लंघण्यास सरसावूं लागला; महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाची गेल्या एक दीड तपाची तपश्चर्या फळास येण्याचीं सुचिन्हें दिसूं लागलीं. आयुर्वेदाच्या उद्धाराचें दानोदक, शुद्ध आयुर्वेदीय पक्षाच्या हातावर मुंबई सरकाररूपी बलिराजाचे हातून पडूं नये म्हणून दानोदकाच्या झारीचे तोंडाशीं गुप्त रूपानें जाऊन बसलेल्या कावळयांची विरोधी नेत्रगोलकें सुविचाराच्या दर्भाग्रानें भेदून बलिराज मुंबई सरकारनें संकल्पित उदक, शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रम संमत करून, सोडलें. अशा वेळीं ' आयुर्वेद मस्तकीं धरावा। अवघा हलकल्लोळ करावा । लोक एकूणएक वेधावा । आयुर्वेद कारणें ॥ ' अशी तांतडीची गरज म. प्रां. वै. मंडळास वाटणें व त्याच हेतूनें हें विशेष अधिवेशन घेणें अवश्य झालें.

स्वागत मंडळाचें अभिनंदन

ह्या विशेष अधिवेशनाची कल्पना गेल्या महिन्यांत पुणें येथें, जेव्हां वार्षिक अधिवेशन मे-जून मध्यें घेण्याविषयींची आपली असमर्थता स्थानिक वैद्य मंडळाधिकाऱ्यांनीं प्रांतीय मंडळाच्या स्थायी समितीच्या सभेपुढें निवेदन केली, तेव्हांच निश्चित झाली. तथापि हें अधिवेशन व्हावें कोठें हा प्रश्नहि तांतडीनें सोडविणें इष्ट होतें आणि आनंदाची व अभिमानाची गोष्ट ही कीं कळकळीच्या कार्यकर्त्यांचा कधींहि दुष्काळ नसणाऱ्या मुंबापुरीनेंच हा प्रश्न सोडविण्याचा पत्कर घेतला. त्याचें प्रत्यक्ष फळ म्हणजेच हें आजचें अधिवेशन होय. या कर्तव्यतत्परतेबद्दल मी सर्व प्रथम वयोज्ञानतपोवृद्ध भिषक्श्रेष्ठ श्री. आबासाहेब कांडू यांच्या अध्यक्षतेखालीं स्थापन झालेल्या स्वागत मंडळाचे आभार मानतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुंबई राज्य सरकारास धन्यवाद

२) मुंबई राज्य सरकारनें, पूर्वीच्या सरकारचें धोरण सयुक्तिक नाहीं, सामान्य जनतेच्या आरोग्याचा प्रश्न आयुर्वेदच सोडवूं शकेल, मिश्रवैद्यक शिक्षण पद्धतीचे परिणाम आयुर्वेदशास्त्र व विद्यार्थीवर्गास हानिकारकच होत आहेत, हें ध्यानीं घेऊन कोठल्याहि विरोधास, बुद्धिभेद करणाऱ्या कल्पनास व इतर लहानमोठ्या अडचणीस न जुमानतां शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रमास, मान्यता दिली, इतकेंच नव्हें तर हा पाठ्यक्रम प्रत्यक्षांत आणण्यासाठीं शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीहि नियुक्त करून या पवित्र कार्याच्या सिद्धीचें निग्रहपूर्वक पाऊल उचललेलें आहे, यावद्दल म प्रां. वै. मंडळाचे वतीनें मी सध्यांच्या मुंबईराज्य सरकारास धन्यवाद देतों आणि त्याबरोबरच बहुताकाळाच्या इच्छा-आकांक्षांचें साफल्य ' याच देहीं याच डोळां ' पाहण्याचें व त्यासाठीं यथासमय प्रत्यक्ष कार्य करण्याचें भाग्य ज्या सरकारानियुक्त आयुर्वेद समितीस लाभलें आहे तिचेंहि मनःपूर्वक अभिनंदन करून तिच्या स्वीकृत कार्यांत यशःचिंतन करतों.

पूतनामावशी व कंसमामांची विषारी दृष्टि

शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रमाचें हें बालक जन्मास येतांच कित्येक पूतनामावशांना कां धडकी भरावी हें कळणें दुरापास्त आहे. जन्मास येणाऱ्या आठव्या अपत्यापासूनच आपणास अपाय आहे, या कल्पनेनें गर्भपात घडवून आणण्यापासूनच सर्व प्रयत्न देवकीनंदन श्रीकृष्णाचे बाबतींत करणाऱ्या पूतनामावशी व दुष्टबुद्धि कंसमामाकडून, नाहींतर आणखीन् काय होणें शक्य होतें ? परंतु हें कळल्यावरसुद्धां आपल्या सत्क्रिया व सद्धर्माचरणापासून रतिभरहि विचलित न होणाऱ्या गोपजनांच्या भक्तिभावसंपन्न हृदयांतच भक्तवत्सल भगवान् श्रीकृष्ण अवतीर्ण झाले व ' इच्छी परां तें येई घरा ' चा साक्षात्कार त्या सर्वमंगल प्रभूनें पटवून दिला, हें आम्हांस विसरून चालणार नाहीं; व म्हणूनच कुणाच्याहि बुद्धिभेदाच्या भरकटण्यानें चलत्चित्त न होतां शुद्ध आयुर्वेदाच्या ह्या पाठ्यक्रमास चिटकून राहून तो यशस्वी करण्यासाठीं व्यक्तिशः व संघशः तनमनधनानें प्रयत्न करण्याची फार मोठी जबाबदारी शुद्ध आयुर्वेदाचे पक्षपाती म्हणविणाऱ्या आम्हां वैद्यवर्गांवर येऊन पडली आहे. ती आम्हीं दक्षतापूर्वक पार न पाडली तर आयुर्वेदाच्या शुद्ध सोज्वल परंतु सुकुमार देहावर तद्विरोधी विषारी दृष्टि पडेल व ती त्यास बाधल्याविना राहाणार नाहीं.

विरोधी जनांचे कांहीं बुद्धिभेदक आक्षेप

शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रम अयशस्वी व्हावा ह्या हेतूनें तद्विरोधी वर्गाकडून सर्वसाधारण जनता व अपक्वविचारी वैद्यांचा बुद्धिभेद करण्यासाठीं कांहीं आक्षेप प्रसृत करण्यांत येत असतात, व ते पटवण्यासाठीं कांहीं वाङ्मयहि प्रसृत करण्यांत येत असतें. वर वर विचार करणारा त्यामुळें सहज फसणें शक्य आहे. तसें होऊं नये एवढ्याच हेतूनें ते आक्षेप कसे फोल आहेत, एवढें नमूद करणें इष्ट वाटतें.

आयुर्वेदाचा कांकणभर सरस अभ्यासक्रम

१ " ३॥ वर्षें मुदतीचा हा शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रम अगदींच सामान्य स्वरूपाचा आहे. " हा पहिला आक्षेप किती फोल आहे हें ह्या पाठ्यक्रमांत अंतर्भूत केलेले आयुर्वेदीय शास्त्र शिकण्याचे विषय, त्यासाठीं ठेवलेले आयुर्वेदीय ग्रंथ, त्या त्या विषयांस पोषक आणखीहि निरनिराळ्या ग्रंथांतील ग्रंथांश व ज्ञेयांश प्रथम दृष्टीपुढें घ्यावेत आणि नंतर सध्यां प्रचलित असलेल्या मिश्र शिक्षणपद्धतींतून मिळणारे त्याच विषयासंबंधींचे केवळ आयुर्वेददृष्टीनें अभ्यासार्थ ठेवलेले ग्रंथांश व ज्ञेयांशहि दृष्टीपुढें ठेवून तुलनात्मक दृष्टीनें आयुर्वेदाचा भाग, शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रमांतच मिश्र शिक्षणपद्धतीपेक्षां अधिक आहे कीं नाहीं ही खात्री

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...नसून घ्यावी म्हणजे झालें. पूर्वग्रहदुष्ट नसलेली त्रयस्थ व्यक्तीच हा पाठ्यक्रम सामान्य स्वरूपाचा नसून ...र्थ्यांना विद्यालयांतून मिळणाऱ्या आयुर्वेदज्ञानापेक्षां कांकणभर सरस आहे असें म्हणेल.

विरोधकांचा दुसरा आक्षेप

२) "हा अभ्यासक्रम संपवून तयार होणारा वैद्य आरोग्यविषयक सर्व गरजा भागवूं शकणार नाहीं." असा दुसरा आक्षेप पुढें करण्यांत येतो. व तो स्पष्ट करतांना, काय व शल्य चिकित्साविषयक ...आजच्या प्रगत समजल्या जाणाऱ्या पाश्चात्य वैद्यकांतील कांहीं प्रभावी औषधें व शस्त्रविभागांतील प्रगति ...करण्यासाठीं पुढें मांडण्यांत येते. परंतु अष्टांग आयुर्वेदाचा यथासांग अभ्यास झालेला वैद्यच या प्रश्नास कृतीनें उत्तर देणार आहे. आज असे अष्टांग आयुर्वेदपारंगत वैद्य अत्यल्प आहेत ही गोष्ट मात्र खरी, व म्हणूनच ...स्थूलदर्शनीं हा आक्षेप बरोबर वाटतो.

पारंगत अभ्यासक्रमाची आवश्यकता

परंतु ह्या ३॥ वर्षांचा अभ्यासक्रम बारकाईनें वाचणारास हें सहज दिसून येईल कीं, ह्या अभ्यास-क्रमांत, व्यवहारांत लागणारी काय व शल्य चिकित्सेची गरज भागविण्यापुरत्या विषयांचा समावेश निश्चित ...झाला असून जसा प्रत्येक पाश्चात्य वैद्यक चिकित्सक, संकीर्ण व जटिल स्वरूपाचे रोगांत औषधोपचार किंवा अत्यंत जोखमीचें शस्त्रकर्म स्वतःचे जबाबदारीवर करूं शकत नाहीं, आपल्यापेक्षां अधिक ज्ञानी व अनुभवी ...तज्ज्ञाचें साहाय्य घेतो, तशीच स्थिति ३॥ वर्षांचा शिक्षणक्रम संपविणाऱ्या वैद्याचीहि राहाणार आहे. ...माझ्या ह्या म्हणण्यावरून आपल्या हेंहि ध्यानांत येईल कीं, हा ३॥ वर्षांचा अभ्यासक्रम आयुर्वेदाच्या सर्व विभागांत पूर्ण पारंगतता देणार नाहीं. तशी पारंगतता येण्यासाठीं यानंतर आणखी १॥/२ वर्षांचा तरी अभ्यासक्रम अधिक ठेवण्याची आवश्यकता आहे, असें माझें मत आहे. येथें हेंहि सांगून ठेवणें इष्ट वाटतें कीं, मुंबई सरकारच्याहि ही गोष्ट ध्यानीं आली आहे व त्या दृष्टीनें पुढील अभ्यासक्रम आंखून अष्टांग आयुर्वेद पूर्णतया शिकून पारंगत होऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची सोय सरकार शुद्ध आयुर्वेद समितीचे ...द्वारानें करण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मिश्रचिकित्सकापेक्षां सरस चिकित्सक

३) 'या पाठ्यक्रमामुळें आयुर्वेदाचा शास्त्रीय उत्कर्ष न होतां अपकर्ष म्हणजे पिछेहाट होणार आहे' असाहि आणखी एक आक्षेप पुढें करण्यांत येतो. या प्रश्नाचें उत्तर पहिल्या आक्षेपाचें समर्थनांत आलेंच आहे. हल्लींच्या मिश्र शिक्षण विद्यालयापेक्षां जर ह्या पाठ्यक्रमाचें द्वारें आयुर्वेदाचे विषय अधिक शिकविले जाणार आहेत तर आयुर्वेदाचा अपकर्ष होणार असें कसें म्हणतां येईल? दोष दूष्यादींचा यथायोग्य विचार करून चिकित्साकार्य करणारा वैद्य तुलनात्मक दृष्टीनेंहि मिश्रचिकित्सकापेक्षां सरसच ठरेल.

गुरुपरंपरा-शिक्षणपद्धतींचें वैशिष्ट्य

४) सर्वांत विशेष महत्वाचा व पुष्कळांना चटकन् खरा वाटणारा आक्षेप, सरकारनें हा पाठ्यक्रम शिकवण्यांत पुरातन काळीं प्रचलित असलेल्या गुरुपरंपरापद्धतीनें ज्ञानदान करण्यास दिलेल्या संमतीवर आहे. वस्तुतः जीविताशीं अतिनिकट संबंध असलेल्या शास्त्राचें यथार्थ ज्ञान, गुरुपरंपरा अध्यापन-पद्धतीनेंच होणार आहे. या पद्धतींत गुरु व शिष्य विद्यालयापेक्षां अधिक काळ एकत्र राहाणार आहेत. पुस्तकी ज्ञानाहून अनुभवजन्य ज्ञान अधिक महत्वाचें असतें; व तें गुरूचें साहचर्य जितकें अधिक प्रमाणांत प्राप्त होईल तितकें अधिक मिळणें शक्य असतें. आलेल्या रोग्यांशीं कसें बोलावें, विश्वास कसा निर्माण करावा, औषधें कशीं तयार करावीं, मात्रा, भस्में, रसायनें कशीं तयार करावींत, त्यासाठीं भट्ट्या इ. लावायच्या त्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

औषधी द्रव्यें मिश्रणाचें प्रमाण व क्रम, भट्ट्यांची रचना, अग्नि मंद, मध्यम, तीक्ष्ण इ. केव्हां द्यावयाचा, औषध तयार झाल्याची परीक्षा इ. इ. गोष्टींचें प्रात्यक्षिक, वनस्पति व खनिज कच्च्या मू द्रव्यांची परीक्षा, औषधांत वापरण्यापूर्वी त्यांचें शुद्धीकरण, प्रक्रियेंतील संभाव्य धोके वगैरे सर्व गोष्टीं बारीक सारीक माहिती विद्यालयीन शिक्षणापेक्षां गुरुपरंपरा पद्धतीमध्येंच अधिक मार्मिक मिळणें शक्य आहे थोडा दूरवर विचार केल्यावर सहज ध्यानीं येणार आहे.

श्रीमद्भगवद्गीतेंचें मार्मिक वचन

" तत् विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया। उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥" श्रीमद्भगवत्गीतेंतील मार्मिक वचन गुरुपरंपरा पद्धतींत गुरूंचे पाय चेपणारा व लंगोटी धुणारा शिष्य गुरू प्रिय होणार आहे अशा अर्थाची टीका करणारांनीं अवश्य ध्यानांत घ्यावें. ' गुरोः शुश्रूषया विद्या पुष्क धनेन वा। अथवा विद्यया विद्या—' हें अनादि कालापासूनचे विद्यासंपादनाचे ठरलेले राजमान्य मा आहेत. गुरु सांदीपनीकडे लाकडाची मोळी वाहून विद्या संपादन करण्याचा काळ आज नाहीं हेंहि तितकें खरें आहे. आजच्या काळीं तशी सेवा करून घेणारे गुरु आणि करणारे शिष्य दुर्लभ आहेत. तथा गुरुकृपा संपादन करणारा ' गुरुगतां विद्यां शुश्रूषुः अधिगच्छति ' हें वचन सार्थ करणारा शिष्यच कचा सारखा संजीवनी विद्येचा म्हणजेच आयुर्वेदाचा खरा अधिकारी होईल, ही गोष्ट उपहासकांचा उपहा पत्करूनहि सांगावीशी वाटते. अर्थातच शास्त्राचे खरे अधिकारी गुरु व शुश्रूषु वृत्तीनें विद्याग्रहण करूं इच्छि णारे शिष्यच त्या गुरुपरंपरेचा प्राचीनकाळचा लौकिक पुन्हां प्रस्थापित करूं शकतील हें उमजूनच मुंबई सरकारनें ह्या पद्धतीसहि संमति दिली आहे हें मान्य करावें लागेल. असे गुरु व शिष्य संख्येनें कितीहि कमी उपलब्ध होण्याची शक्यता असली तरी लक्ष्यसिद्धीच्या दृष्टीनें त्या परंपरेंतून निर्माण होणारी भावी वैद्य पिढी आयुर्वेद क्षेत्रांत लाख मोलाची ठरेल खास !

या शिक्षणक्रमाचें यश

एकंदरींत सुविद्य व अनुभववृद्ध अध्यापक, प्रात्यक्षिकावर विशेष भर असलेली व सोपपत्तिक अध्यापनाची एकसूत्री पद्धति असलेलीं विद्यालयें व गुरुगृहेंच हा शिक्षणक्रम यशस्वी करूं शकतील. आरं आरंभीं याबाबतींत बऱ्याच अडचणी व कांहीं अपूर्णताहि वाटण्याचा संभव आहे; तथापि त्यांना भिऊ आम्ही आमचें काम थांबूं देतां नये. " प्रारब्धस्यांतगमनम् " हा आमचा निर्धार हवा. याहिपेक्षां अधि मुळाशीं खोलवर हात घालावयाचें धोरण सरकारनें आरंभणें जरूर आहे असें वाटतें; तें म्हणजे आयुर्वेदाचं शास्त्रीय परिभाषा आणि आरोग्यविषयक सोपे धडे प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या पाठ्यपुस्तकांतून शाद आयुर्वेदशास्त्राची तोंड ओळख आरोग्यशास्त्र हा विषय शिकवण्याचे निमित्तानें करून द्यावी. म्हणजे पुढें ज्यांना त्याची गोडी लागेल व जे मग आयुर्वेदाच्या विद्यालयांत प्रविष्ट होतील त्यांना ते विषय समज ण्यास सोपे जातील.

तीन प्रकारचे विशेषज्ञ

आयुर्वेद विद्यालयाचे शिक्षणांतहि सध्यांचा ३॥ वर्षांचा पदवी पाठ्यक्रम संपल्यानंतर विशेषज्ञ होण्याचीं इच्छा व पात्रता असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीं पदव्युत्तर अभ्यासक्रम हा आयुर्वेद विचारसरणीचा विकास आधुनिक साधनांच्या साह्यानें करण्यासाठीं केला जाणें इष्ट आहे. सुदैवानें ही गोष्ट सरकारच्याहि ध्यानीं आली असून त्याबाबतींत शुद्ध आयुर्वेद समितीवरच जबाबदारी सोपवली जाण्याची शक्यता आहे ह्या अशा विशिष्ट अभ्यासक्रमाचे द्वारें तीन प्रकारचे वैद्य निर्माण होतील. १) विशेषज्ञ, २) उत्कृष्ट अध्याप

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि, ३ संशोधनकार्यकुशल वैद्य. असे ते तीन प्रकारचे वैद्य निर्माण झाले कीं मग मात्र आयुर्वेदाचा हा गाडा खरा खरा सुरळीत चालू लागून ध्येयसिद्धीच्या मुक्कामीं आम्हांस नेऊन पोचवील.

पुणें विद्यापीठाचें अभिनंदन

पुणें विद्यापीठानें आपल्या अभ्यासक्रमांत आयुर्वेद शिक्षण-विभाग सुरूं करण्याचा नुकताच निर्णय घेतला आहे. ही गोष्टसुद्धां आयुर्वेदाचे बाबतींत सरकारें व लोकमत अनुकूल होत असल्याचीच निदर्शक आहे. तेथेंहि या निर्णयाचे वेळीं विरोध झालाच, पण शेवटीं तो विरोध लंगडा ठरला, व विद्यापीठानें आयुर्वेदाच्या बाजूनेंच न्यायाचा कौल दिला, याबद्दल विद्यापीठ व त्यांचे प्रमुख याचें अभिनंदन केलें पाहिजे. आतां ही गोष्ट प्रत्यक्षांत आणण्यासाठीं विद्यापीठानें केवळ आयुर्वेदाचें शिक्षण देणारी फॅकल्टी निर्माण करावी अशी आग्रहाची विनंति आहे.

मुंबई राज्य संशोधन मंडळ

मुंबई राज्यांत आयुर्वेदाच्या संशोधनासाठीं सरकारनें संशोधन मंडळ नियुक्त केलें आहे. परंतु त्या मंडळांत पाश्चात्य दृष्टिकोनांतून आयुर्वेद संशोधन होत असल्यानें तें निरुपयोगी संशोधन ठरणार आहे. त्यासाठीं त्या ठिकाणीं सुद्धां तज्ज्ञ वैद्यांचीच नियुक्त होणें इष्ट आहे. ती झाल्यावांचून संशोधनाचा हेतु सफल होणार नाहीं. प्रत्येक शास्त्र विशिष्ट परिभाषेच्या व विशिष्ट तत्त्वांच्या आधारावर आधारलेलें असल्यानें तो दृष्टिकोन अवगत असणाराच खरें संशोधन करूं शकेल. यासाठीं ह्या संशोधन मंडळांत त्याच प्रमाणें बोर्ड व फॅकल्टींतहि संपूर्णतया वैद्यांचीच निवड सरकारनें करावी असें लातूर संमेलनानंतर पुन्हां एकदां मुंबई सरकारास आग्रहानें सुचवावेंसें वाटतें.

संशोधकांना पारितोषकें द्यावीत

राष्ट्रोन्नतीसाठीं सरकार ज्या पंच व दशवार्षिक योजनांची आंखणी करीत असतें त्यांत आयुर्वेदोन्नतीच्या योजनांसहि स्थान मिळणें इष्ट आहे. अ) सर्वांगीण संशोधन योजनेविषयींच्या माझ्या कल्पना यापूर्वी लातूर संमेलन प्रसंगीं मीं माझ्या भाषणांतून सविस्तर निवेदन केल्या आहेत, म्हणून येथें त्याची द्विरुक्ति करणें इष्ट वाटत नाहीं.(आ)आयुर्वेदीय संशोधन कार्यांची यथार्थ दृष्टि असणारे विद्वान् संपूर्ण देशभर विखुरलेले आहेत. त्यांच्या प्रयत्नांत परस्पर साहचर्य निर्माण करणें, त्याचप्रमाणें वैयक्तिक संशोधन कार्यास वाव देऊन त्या संशोधनाचे परीक्षण होऊन योग्यतेनुसार त्या प्रयत्नांना पारितोषिकें देऊन प्रोत्साहन मिळणें या गोष्टींचीहि फार आवश्यकता आहे, हें कार्य मुख्यत्वें सरकारच करूं शकणार असल्यानें सरकारचें मी या बाजूकडे लक्ष वेधूं इच्छितो.

कार्यसाधक संघटित संस्था (फेडरेशन)

मुंबई राज्यांतील इतर सर्व कार्यक्षेत्राप्रमाणें आयुर्वेद क्षेत्रांतहि पुष्कळांचे पुष्कळ हित साठवलेले असे निरनिराळ्या प्रांताचे सर्वसाधारण कितीतरी प्रश्न आजहि आहेत व पुढेंहि उत्पन्न होत राहातील. अशा प्रश्नासंबंधीं एकमुखी आवाज सरकार व जनतेच्या कानीं प्रभावीपणें नेऊन पोचविण्याची वेळा आज निश्चित आली आहे. आपल्या राज्याचे महामंत्री माननीय मुरारजीभाईनीं सुद्धां हीच गोष्ट एका सत्कार-समारंभाचे सभेंत आम्हां वैद्यांचेपुढें मांडली आहे. महाराष्ट्र, महागुजराथ, मुंबई आणि अखिल कर्नाटक अशा चारहि वैद्यमंडळाचे. सर्वसाधारण प्रश्न व अडीअडचणींना तोंड फोडण्यासाठीं ह्या चारहि संस्थांनीं आपापली मागणी स्वतंत्र मांडण्यापेक्षां चारहि प्रांतांनीं संघटित स्वरूपांत मांडणें अधिक प्रभावी ठरूं शकेल. अर्थातच ह्या चारहि प्रांतांचें मिळून फेडरेशन स्वरूपी संघटन होणें त्यासाठीं अत्यावश्यक आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रत्यक्ष मुंबईस त्या दृष्टीनें श्रीमंत वैद्य नानासाहेब पुराणिक यांचे अध्यक्षतेखालीं प्रयत्न सुरू झाले असून म. प्रां. वै. मंडळानें गेल्या महिन्यांत स्थायीसभेच्या प्रस्तावद्वारां यास आपली संमति दिली आहे. ह्या चारीहि मंडळांनीं लौकरच एकत्र येऊन ही फेडरेशन स्वरूप संघटित संस्था स्थापन करावी अशी माझी आग्रहाची प्रार्थना आहे.

सरकारकडून होत असलेला अज्ञानमूलक अन्याय

मुंबई राज्यांतील वैद्यवर्ग, औषधी कारखानदार आणि जनता ह्या सर्वांच्या दृष्टीनें सरकारकडून होत असणारा अन्याय हा सरकारच्या आयुर्वेदविषयक उदार धोरणास साजेसा नाहीं हें अत्यंत खेदानें म्हणण्याची पाळी सरकारनें दारूबंदीच्या नांवाखालीं आयुर्वेदीय आसवारिष्टांबद्दल अवलंबिलेल्या धोरणामुळें आली आहे. लातूर संमेलनानें या बाबतींत केलेल्या ठरावाचीहि सरकारनें अजून दखल घेतली नाहीं ही गोष्टहि सरकारची उपेक्षावृत्ति सिद्ध करीत आहे.

१९३९ सालीं भारतीय प्रतिनिधित्वाखालीं ब्रिटिशांचें राज्य चालूं लागलें तेव्हां आयुर्वेदाला मदत करण्याच्या नांवाखालीं सरकारनें खूपच निरनिराळे उपक्रम केले. त्यांत आयुर्वेदीय आसवारिष्टांवर निर्बंध हा एक फार मोठा आघात आयुर्वेदावर केला. हे निर्बंध घालण्यापूर्वी चौकशीसाठीं एखादी समितीहि सरकारनें नेमल्याचें ऐकिवांत नाहीं, परंतु चौकशीवाचूनच बंधनें मात्र त्वरित जारी केलीं. यावरून असें म्हणावेंसें वाटतें कीं सरकारी सत्ता केव्हां हातीं येते व आपण आयुर्वेदावर केव्हां सूड उगवून घेतो असें त्या स्थानीं असलेल्या अधिकारी व्यक्तीचे मनांत असलें पाहिजे. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी कीं पूर्वग्रहदूषित मनानें त्यावेळच्या सरकारनें केलेली गोष्ट आमचे सरकारहि कांहीं स्वरूपांत चालू ठेवीत आहे, ही गोष्ट आज सरकारचे नजरेस आणावी लागत आहे.

मुंबई सरकारला वैद्यसमाजाचें आव्हान

आयुर्वेदीय आसवारिष्टें, भांग, गांजा, अफू याबाबत विचार करणेकरितां डॉ. योध यांचे नेतृत्वाखालीं एक समिति नेमली होती; या समितीनें बरीचशीं आसवें बंधमुक्त केलीं पण सरकारी दुराग्रहास्तव कांहीं आसवें बंदिस्त राहिलीं. आज तीं आसवें मादक (Intoxicant) सदराखालीं जाऊन त्यावर जबर कर सरकार वसूल करीत आहे. टिंक्चर्स बाबत झालेले हिडिस दुष्परिणाम आसवारिष्टांना भोगावे लागत आहेत. वस्तुतः आसवांत कोहल फारतर अवघा १५ टक्के असूनहि त्यांत त्यांचे संशोषणप्रतिबंधक मधुर द्रव्य याचेशीं संलग्न ठेवलेलें असतें. गेल्या १५ वर्षांत आयुर्वेदीय आसवारिष्टें पिऊन झिंगलेला किंवा तीं पिणेसाठीं लायसेन्स घेतलेला अथवा दारूची तलफ भागविण्याचें हेतूनें त्याची संवय लावून घेतलेला एकहि मनुष्य सरकारला किंवा जनतेला आढळलेला नाहीं. आजहि सरकारला प्रत्यक्ष खात्री पटवून घेणें असेल तर कुणाहि सरकारी प्रतिनिधीला १ पौंड पर्यंत आसवारिष्ट पिऊनहि दारुप्रमाणें गुंगी, बेहोशी इ. दुष्परिणाम होत नाहींत, तें तें आसवारिष्ट ज्या ज्या रोगप्रतिकारक द्रव्यांनीं घटित असेल त्या द्रव्याच्या कमिअधिक प्रमाणांत प्राशनाचेच कायदे थोडे फार दुष्परिणाम घडतात असेंच आढळून येईल. आव्हानपूर्वक हा प्रयोग कुणीहि तज्ञ वैद्य सरकारची खात्री पटवण्यासाठीं करून दाखवील, मात्र मग सरकारनेंहि तात्काल हीं आसवारिष्टें बंधमुक्त करून त्याचेवरील जाचक कर रद्द करावेत आणि आसवारिष्टांचे कपाळीं मादक म्हणून जो अवास्तव शिक्का मारला आहे तो पुसून काढावा.

आजचे मेडिकल स्टोअर्स म्हणजे दारूचे गुत्तेच

टिंक्चर्समध्यें ४५ ते ५० टक्के कोहल असतें, त्याचें संशोषण प्रतिबंधक त्यांत नसतें व त्यामुळें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अमुक टिंक्चर प्यालो व माझी दारूची तलफ भागली " असें उघड सांगणारे लोक आढळतात. किंच-ना टिंक्चर निर्मिति बंद करतां येत नाहीं व दारूबंदीहि तितकीशी परिणामकारक होत नाहीं व त्यामुळें उद्देश लोअर्थ म्हणजे एक प्रकारचे दारूचे गुत्तेच बनत चालले आहेत, असें असतां केवळ 'अल्कोहोल' आहे म्हणून द्राक्षासवादिकांवर बंधणें असणें ही गोष्ट अन्यायमूलक व चीड आणणारी आहे. आसवारिष्टें मादक (इंटॉक्सिकंट) आहेत हें सिध्द न करतांच त्यांचेवर बंधनें लादणें म्हणजे 'चोर सोडून संन्याशाला सुळी' होय. तरी आयुर्वेदाच्या शिक्षणाबाबत आयुर्वेदावरील भक्ति प्रकट करण्याकरितां जसें सरकारनें मनोधैर्य दाखविलें तसेंच आयुर्वेदीय औषधाबाबतींतहि न्याय्य धोरण स्वीकारावें.शास्त्रीय दृष्टया कांहीं शंका असल्यास महाराष्ट्र प्रां. वै. मंडळाचे भूतपूर्ण अध्यक्ष व सुप्रसिद्ध औषधीकरणतज्ज्ञ आयुर्वेदभूषण धामणकर-गोवा शास्त्र्याकडून त्या दूर करून घ्याव्यात अशी विनंति आहे.

सरकारी रुग्णालयांत आयुर्वेद

मुंबई राज्यांतील कांहीं मोठ्या सरकारी रुग्णालयांतून आयुर्वेदीय उपचारासाठीं रुग्णशय्या राखून ठेवण्याचा एक उपक्रम सरकार करणार असेंहि कळतें. ही गोष्ट इष्ट व अभिनंदनीय अशीच आहे. तथापि या गोष्टीचें श्रेय पुष्कळ अंशीं या उपचारासाठीं नेमल्या जाणाऱ्या वैद्यांच्या पात्रतेवर अवलंबून राहाणार असल्यानें केवळ आयुर्वेदीय उपचार करणाऱ्या तज्ज्ञ वैद्यांचीच अशा ठिकाणीं नियुक्ति होणें इष्ट आहे हें विसरून चालणार नाहीं. प्रचलित मिश्रशिक्षण विद्यालयांतून बाहेर पडणारे पदवीधर थर्ड असिस्टंट डॉक्टर म्हणून या सरकारी रुग्णालयांतून नेमण्याचाहि एक उपक्रम सरकार करणार असें कळतें. परंतु केवळ आयुर्वेदीय उपचारासाठीं राखून ठेवलेल्या रुग्णशय्या ह्या D. A. S. F. किंवा G. F. A M. लोकांकडे सोपवण्यांत आल्यावर सरकारचा हेतु कितपत सफल होईल ही शंकाच आहे. हेंहि सुचवून ठेवणें इष्ट वाटतें.

खरीं औषधें व औषधी द्रव्यें मिळत नाहींत

वैद्याच्या उपचारांत यश मिळणें हें त्यानें केलेल्या रोगनिदानानंतर योग्य औषधीयोजनेवर अवलंबून आहे. आज आम्ही वैद्यवर्ग बहुतेक बाजारांत मिळणारीं निरनिराळ्या कारखान्यांचीं तयार औषधेंच वापरतो. जे वैद्य औषधें स्वतः तयार करतात त्यांनासुद्धां तीं करण्यास लागणारीं मूलद्रव्यें खात्रीचीं मिळेनाशी झालीं आहेत. दूध डब्याचें, तूप डालडा, तेलांत व्हाइट ऑईल, कपडा इमिटेशन, अलंकार नकली सोन्याचे, अन्नांत भेसळ असा सध्यां आमचा जीवनाचा थाट बनला आहे. सिव्हिलाइझ्ड म्हणायचे आणि मर्सराइझ्ड व्हायचा प्रयत्न करायचा असें त्रांगडें चालू आहे. त्याच्या पुरवठ्याला आजारीपणांत मिळायचीं तीं औषधेंहि नकली, भेसळीचीं मिळू लागल्यावर मग ' राम बोलो ' व्हायला काय उशीर ! सांगण्याचें तात्पर्य हें कीं भेसळीचें भूत औषधीक्षेत्रांतहि शिरल्यामुळें हुकमी काम देणारीं औषधें बनवू म्हटल्यानेंहि वैद्य किंवा कारखानदार बनवू शकत नाहींत. यासाठीं सरकारनें या बाबतींतहि लक्ष घालून योग्य किंमतींत खात्रीचीं औषधी मूलद्रव्यें उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी अशी मुंबई सरकारला विनंति आहे.

प्रार्थना " संघे शक्तिः कलौ युगे "

बंधु-भगिनींनो ! प्रांतीय मंडळाच्या आतांपर्यंतच्या आयुष्यांत विशेष अधिवेशन घेण्याचा हा पहिलाच प्रसंग ! विशेषाधिवेशन विशेष कार्यासाठींच घ्यावें लागतें. एरव्हीं तें न घेतलें तरी चालतें. अहमदनगरच्या अधिवेशनानंतर ४।५ वर्षें वार्षिक अधिवेशन होऊं शकलें नाहीं. पण त्यावेळच्या परिस्थितीप्रमाणें तें कुणासहि गौण वाटलें नाहीं. परंतु आतां तशी स्थिति नाहीं. लौकरच पुढील महिन्यांत शुद्ध आयु-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केंद्रीय पाठ्यक्रमाचे अभ्यासक्रमास प्रारंभ व्हायचा आहे. अशा वेळीं आणि ह्या वर्षांत सरकारहि आयुर्वेदा-कडे प्रत्येक क्षेत्रांत त्यास वाव देण्यासाठीं उत्सुक असतां आम्हीं निष्क्रिय राहाणें योग्य नव्हे. म्हणून "मोठ्या प्रमाणांत" व "शास्त्रीय स्वरूपाचें" वार्षिक अधिवेशन भरवितां यावें या हेतूनें पुणें वैद्यमंडळानें मागि-तलेला भरपूर अवधि त्यास देऊन हें विशेष अधिवेशन घेतलें जात आहे. लातूर संमेलन प्रसंगीं मी माझे सर्व विचार शक्य तेवढे विस्तृत स्वरूपांत मांडले आहेतच. आजच्या परिस्थितींत या विशेष अधिवेशनापुढें थोड्या अवधींत चर्चिले जाण्यास योग्य तेवढेच विषय मी माझ्या ह्या भाषणांत आपल्यापुढें थोडक्यांत मांडले आहेत.

तालुका व जिल्हा वैद्यमंडळें स्थापावींत

आपण सर्व मिळून या अधिवेशनांत वैद्यवर्ग, जनता व सरकार यांना उद्देशून प्रस्तुत परिस्थितींत अगदीं निकडीच्या प्रश्नावरच उहापोह करून निर्णयात्मक थोडे प्रस्ताव थोड्या अवधींत संमत करणें इष्ट आहे. संमत होतील त्या प्रस्तावनांना कृतीचें स्वरूप येण्यासाठीं स्थानिक, तालुका व जिल्हे निहाय वैद्य-मंडळें स्थापन व्हावींत. प्रांतीय मंडळें आहेतच व या सर्व प्रांतांचें मिळून मुंबई राज्य वैद्य मंडळ प्रस्थापित करून त्यांचे द्वारा आपले विशेषतः राजकीय संबंध येणारे प्रश्न धसास लावले जावेत असें पुन्हां एकदां निवेदन करतों. काळ संघटनेचा आहे. 'संघे शक्तिः कलौ युगे' हें आपणास माहित आहेच.

भाषणाचा अधिक विस्तार न करतां स्वागतमंडळाचें व आपणा सर्वांचें पुन्हां एकदां आभार मानतो व जगन्मंगल प्रभूजवळ श्रीज्ञानेश्वरायांच्या वाणींत मागणें मागतोः—

" दुरितांचें तिमिर जावो, विश्व स्वधर्मसूर्यें पाहो । जो जें वांछील तो तें लाहो, प्राणिजात ॥

॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

भिजि बाजरी + तीळ

खेडोपाडीं जे खाद्य पदार्थ तयार करतात ते कित्येकवेळीं बरेच महत्वाचे असतात. शहरी लोकांना त्याची माहितीहि नसते. खेड्यांतील आया आपल्या मुलांसाठीं पुढील साधा, स्वस्त पण पौष्टिक खुराक तयार करतात.

चांगली बाजरी आतां बाजारांत मिळते. ती आणून त्यांतील जाड बाजरी घोळून बाजूस काढावी. व ती नीट निवडून दुपारीं पाण्यांत भिजत घालावी. रात्रीच्यावेळीं पाण्यांतून उपसून जाड फड-क्यांत बांधून दडपून ठेवावी. त्या बाजरीला मटक्या-प्रमाणें मोड येतात.

मोड आलेली बाजरी एका भांड्यांत काढून घ्यावी व ती पुनः निवडून तींत समभाग स्वच्छ धुतलेले तीळ मिसळावे. (शेंगदाण्याचें कूटहि चालेल.)

हें तीळ+बाजरी खाद्य चावून चावून खावें. एक दोन मुठीपेक्षां जास्त एकावेळीं खाऊ नये. आठवड्यांतून एक दोन वेळा असा प्रयोग करावा.

नवीन मराठी वैद्यक मासिक

: महाराष्ट्र वैद्यक परिचय :

औषधें, इंजेक्शनें, रोगनिदान, रुग्ण-परीक्षा, नवीन शोध वगैरे पाश्चात्य वैद्यकांतील ज्ञान सोप्या मराठी भाषेंतून देणारें एकमेव मासिक " महाराष्ट्र वैद्यक परिचय " 'वैद्यकीय पेशांतील बहुमोल सहाय्यक' आजच वर्गणीदार व्हा! वार्षिक वर्गणी ५ रु. (किरकोळ अंकासाठीं आठ आण्यांचीं तिकीटें पाठवावीत.)

पत्ताः— संपादक, वैद्य जे. बी. मोकाशी-ठाणें

पवित्र नेपाल कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तो.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहाः—नेपाल हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जुनाट खरूज, ज्वर व अतिसार

(चिकि त्सकः– वैद्य र. गो. कुलकर्णी, आयुर्वेदविशारद, मुंबई)

यावत् कण्ठगताः प्राण स्तावत्कार्या प्रतिक्रिया ।
कदाचिद्दैवयोगेन दृष्ट रिष्टोऽपि जीवति ॥

रोगी-मुलगी, वय १॥। वर्षे—पहिल्या वर्षाचे शेवटीं अंगावर खरूज होऊन तो विकार हळू हळू वाढूं लागला. त्यावर निरनिराळ्या दोन डॉक्टरांचें २ व ३ महिने औषध चालूं होतें पण गुण न दिसतां हळू हळू मुलगी वाळूं लागली, तेव्हां येथील खास स्त्री बाल-चिकित्सालयांत नामांकित डॉक्टरांचे नजरेखालीं रोगी ठेवण्यांत आला; पण तेथेंहि औषधापासून सुधारणा न होतां विकार वाढत चालला व सोबत ताप, खोकला आणि जुलाब पण सुरूं झाले.

दोन वैद्यांचें औषध

दोन महिन्यांत कांहींच प्रगति न दिसल्यामुळें तेथील औषध बंद करून सहकारी तत्वावर एकच दवाखाना चालविणाऱ्या दोन वैद्यांचें औषध सुरूं केलें. एक महिना औषध चालूं होतेंच तों कांहीं अड-चणीमुळें त्यांस कामासाठीं बाहेरगांवीं निदान आठ दिवस तरी जाऊन येणें जरुर असल्यामुळें त्यांनीं (माझे स्नेही असल्यामुळें) ही केस आपणाकडे देतो व औषधयोजना समजावून सांगतो व त्याप्रमाणें औषध द्या व आल्यावर पुढें काय करावयाचें तें पाहूं असें सांगितलें.

रुग्ण जगण्याची शंका

ज्यावेळीं रोगी पहाण्यांत आला त्यावळीं १०३ पर्यंत ताप अलिकडे रोज येतच असे. रोज ५।६ वेळ पांढरट जुलाब, खोकला, खरुज इतकी कीं अंगास कोठेंही हात लावण्याची सोय नाहीं. हातापायांच्या काड्या झालेल्या व रोगी त्रासल्यामुळें रात्रंदिवस रडे. एकंदर रुग्ण मान पहातां आणखी १५ दिवस तरी रोगी जगेल किंवा नाहीं अशी शंका वाटत असल्यामुळें तुमची योजना सांगा, योग्य वाटल्यास देऊं अगर जरुरीप्रमाणें फरक करण्याचा अधिकार असावा व रोगी दगावल्यास जबाबदार नाहीं असें स्पष्ट सांगून ती केस घेतली. हा रुग्ण औषधासाठीं घेण्यास माझ्या घरांतील सर्वांचाच विरोध होता, कारण रोगी जगेल असें कोणासच वाटलें नव्हतें. प्रयत्न करून पहावा म्हणून औषध देतो म्हणून सांगितलें.

जुलाबासाठीं कुटजवारिष्ट व पुड्या

आतांपर्यंत सर्वांचा रक्तशुद्धि करण्यावरच भर होता, पण आतां मात्र वेळ तशी नव्हती. जुलाब बंद होणें व ताकद वाढणें हें प्रथम व्हावयास पाहिजे होतें. या प्रधान उपद्रवासाठीं तसेंच ज्वरासाठीं कुट-जारिष्ट, चहाचा -॥- चमचा १ चमचा पाण्यांतून २ वेळ सकाळ संध्याकाळ, तसेंच सुवर्णपर्पटी १/४ गुं. + शृंग १ गुं. + प्रवाळ १ गुं.+कपर्दिक १ गुंज यांच्या ३ पुड्या ४ तासांनीं १।१ प्रमाणें ३ वेळ देण्यास सुरवात केली. ह्या चिकित्सेनें रुग्णाचा ज्वर व जुलाब कमी होऊन ८ दिवसांतच चेहऱ्यावर तजेला दिसूं लागला. वैद्यराज परत येण्याची मुदत संपली तरी न आल्यामुळें हीच चिकित्सा आणखी ८ दिवस चालू ठेवण्याचें ठरविलें.

खरजेवर लावण्यासाठीं कासीसादि घृत

फक्त आतां जुलाब कमी झाले तेव्हां रक्तशुद्धी-साठीं गंधकरसायन (शतपुटी)१/४ गुंज कपर्दिऐवजीं घालून चालू ठेवलें व बाहेरून कासीसादि घृत २ वेळ अंगास लावण्यास सांगितलें. ह्या चिकित्सेनें एक महि-न्यांत आश्चर्यकारक फरक घडवून आणला. रोगी ८ दिवसांपेक्षां जास्त दिवस जगणार नाहीं असें जे म्हणत होते तेच हा आतां नक्की बरा होणार म्हणून म्हणूं लागले. एक महिन्यानें वैद्यराज परत आले तेव्हां त्यांची केस त्यांस दाखवून त्यांस औषधोपचार कर-ण्यास सांगितलें, पण उभयतां वैद्यराजांनीं उदार मनानें आपणच ही केस पुढें चालू ठेवावी, आपल्या यशांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भागीदार होणें बरें नव्हे म्हणून त्यांनीं परत ती माझेकडेच सोंपविली.

दोन महिने वरील मिश्रण व कुटजारिष्ट चालूं होते एवढ्या अवधींत जुलाब थांबले, ताप पूर्णपणें हटला, अंगावरील खरूज बरी झाली व रोगी हसूं खेळूं लागला. तेव्हां वरील सर्व बंद करून मंडूर १/४ गुं.+१/४ गुं. गंधक रसायन+१ गुं. शृंग+प्रवाळ १ गुं. सितोपलादि ४ गुं. ३ पुड्या ३ वेळ दुधांतून देण्यास सुरवात केली. रोगी ४ महिन्यांत पूर्ण बरा झाला व चालू बोलूं लागला. ह्या रुग्णास खरूज पुन्हां होऊं नये म्हणून सतत ३ महिने रक्तशुद्धिकर काढा घेण्यास सांगितलें व दरवर्षी उन्हाळ्यांत हा काढा चालूं ठेवावयाचा असें सांगितलें. आज ८ वर्षें झालीं तरी खरूज झालेली नाहीं.

टिंक्चरांच्या विक्रीवर नियंत्रण

१९५४ च्या बॉम्बे ड्रग्ज (कंट्रोल) (अमेंडमेंट) ॲक्ट, मुंबई सरकारच्या ता. १२ मे च्या गॅझेटांत प्रसिद्ध झाला आहे.

सरकार जाहीर करील त्या तारखेपासून हा कायदा अमलांत यावयाचा असून त्यांत टिंक्चर, स्पिरिट, व इतर स्पिरिटयुक्त पदार्थ यांची विक्री करणें व ते जवळ बाळगणें व त्याचा आरोग्याला हानिकारक होईल अशा रीतीनें मद्य म्हणून वापर करणें याबाबतींत नियंत्रण करण्याचा सरकारला अधिकार मिळाला आहे.

दुरुस्त कायद्यानुसार फक्त (१) घाऊक विक्रेते व (२) किरकोळ विक्रेते या दोन प्रकारच्या व्यापाऱ्यांनाच औषधें विकतां येतील. वैद्यक व्यवसायांना वरीलपैकीं कोणाकडूनहि औषधें खरेदी करतां येतील. तसेच किरकोळ विक्रेत्यांना फक्त घाऊक विक्रेत्यांकडून औषधें खरेदी करतां येतील.

जुनाट इसबावर बाह्योपचार

जुनाट इसबावर करवंदीचा चीक लावावा. इसब बरा होतो. असें आढळून आलें आहे.

वाचकांचा पत्रव्यवहार

सूक्ष्म औषधें व त्यांचे गुण

गुण हे द्रव्याश्रित असतात. द्रव्याचें प्रमाणावर गुणाचें प्रमाण अवलंबून असणें स्वाभाविक आहे. शास्त्रकारांनीं योग्य परिणामकारी मात्रा अगोदरपासून ठरविल्या आहेत. त्यांचें अनुकरण करून हल्लींचे औषधी कॅटलागांतल्या त्या त्या औषधाची मात्रा लिहिलेली असते, व तें प्रमाण शीघ्र परिणामकारी होऊं शकते असा अनुभव कित्येक वर्षांचा आहे.

औषध गुणानें हीनवीर्य होणार

त्याचे विरुद्ध सूक्ष्म औषधें अल्प प्रमाणामुळें गुणानें हीनवीर्य होणार. कारण एक वेळेस जें औषध एक गुंज द्यावयाचें त्याचे ऐवजीं औषध १/९६, गुंज किंवा १/४८ गुंज एका मात्रेंत जाणार. शिवाय त्या औषधांत शर्करेच्या गुणाचें प्राधान्य होणार व प्रमुख औषध अत्यन्त अल्प होणार.

कमी विकारावर कमी मात्रा द्यावी

जर एखादें औषध एखाद्या विकारावर इतक्या अल्प मात्रेंत प्रभावी झालें तर तितक्याच त्या विकाराचें प्रमाणांत अल्पत्व असलें पाहिजे असें सिद्ध होतें. म्हणजे दोष अल्पत्व असल्यानें त्या औषधाचा गुण आला असावा.

एरवी शास्त्रमर्यादेचें उल्लंघन करून अत्यन्त कमी प्रमाणांत औषधी देणें सुरू केल्यास आपल्या औषधांनीं अगोदरच उशीरा गुण येतो असा जो जनतेचा समज आहे. त्यांत आणखी भर पडेल व औषधाचा गुण येण्यास फारच विलंब लागेल असें वाटतें.

— वैद्य क. ना. जोशी आयुर्वेदाचार्य धन्वतरी

४१ गांवांना वैद्यकीय मदत

प्रवरानगर (जि. अहमदनगर) वसाहतींत एक ॲलोपथी व एक आयुर्वेदिक असे दोन वैद्यक व्यवसायी असून ते जिप मोटारगाडींतून ४१ गांवांतील लोकांना वैद्यकीय मदत पुरवितात. — शेतकरी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवडक सफल रुग्णचिकित्सा.....

मर्कट-नख-दन्तज व्रण चिकित्सा

(आयुर्वेद सेवासंघ चिकित्साविभाग धर्मार्थ, औषधालय)

रोगी:-१० वर्षांचा मुलगा, प्रमुख तक्रार सकाळीं (११।५।५४) माकड चावल्यामुळें डाव्या गुडघ्याचे ठिकाणीं नखदन्तज व्रण.

इतिहास:- रस्त्यानें शुकाट्यानें जाणाऱ्या माकडाला कोणीतरी दगड मारल्यामुळें त्यानें चवताळून रुग्णाच्या गुडघ्याचा चावा घेतला. जवळच्या लोकांनीं व्रणांत चुना भरून कापूस चिकटविला होता. रुग्णास संध्याकाळीं दवाखान्यांत आणलें.

यष्टिमधुजलानें व्रणधावन

प्राथमिक उपचार:-कोष्ण यष्टिमधुजलानें व्रणधावन करून शुद्ध मन:शिलाचूर्ण टाकून विकेशिका (गॉझ) ठेवली व सैल व्रणपट्ट बांधला.

त्यावेळचें रुग्णपरीक्षण

व्रण-(१) व्रण दाताचा १ इंच लांब व किंचित् खोल (२) व्रण त्वग्गत, नखाचे.

रुग्ण:- कफप्रकृतीचा रसरक्तमज्जासार, मांसमेद मध्यम, अस्थिशुक्र असार, मलांची सम्यक्प्रवृत्ति असणारा होता.

११।५।५४ व्रणाभोवतीं सूज व्रण पिंगट, पूं पांढरटसर, पातळ. रात्रीं ताप आला होता.

वातनाशक कषायानें व्रणक्षालन करून मध लावून विकेशिका ठेवली व व्रणपट्ट सैल असा बांधला.

१२।५।५४ व्रणांतील वेदना वाढल्या. सांधा आवळून धरला. पुंवाचें प्रमाण वाढलेलें, रात्रीं ज्वर व व्रण खोल गेलेले (कर्णिका तयार होऊं लागली)

१) वातनाशक कषायानें क्षालन (हळद + दारुहळद + गैरिक + मंजिष्ठा) चूर्ण टाकून विकेशिका ठेवली व सैल व्रणपट्टा बांधला.

२) अग्नितुण्डी १ गुंज. } ६ पुड्या दोन दिवसा-
गुळवेलसत्व १० गुंजा. } करितां मधतुपांतून

सकाळीं कफकालीं— १
दुपारीं २ वाजतां } पित्तकालीं-१।१
व रात्रीं १० वाजतां }

३ तूप व पोळीचा आहार.

१३।५।५४ ताप कमी झाला. पू व वेदना कमी. सूज कमी. व्रण अर्धा भरून आला-मलग्रह होता -म्हणून वरीलप्रमाणेंच चिकित्सा केली. फक्त इच्छाभेदी १ गुंज-विरेचनार्थ दिली.

१३।५।५४ } व्रण भरून आला. शौचशुद्धि झाली. ताप नाहीं.
१४।५।५४ } चालता येऊं लागलें-व्रणावर त्वचा
१५।५।५४ } फक्त नव्हती—

१६।५।५४ } -तीच चिकित्सा-त्वचा येऊन व्रण
१७।५।५४ } बरा झाला. यानंतर रसायन-चिकित्सा म्हणून विषमुष्ट्यादि गोळ्या चालू ठेवल्या.

याप्रमाणें माकड चावून १० दिवस झाले. उपद्रव झाला नाहीं, व विकारोपशम झाला.

चिकित्सेची मीमांसा

ज्या प्राण्यांचा दंश झाला त्याच्या स्वभावाचा विचार आयुर्वेदीय विष-चिकित्सक करतो. व त्या प्राण्याच्या प्रकृतानुसार सामान्यपणें दंष्ट्रा-विषाची जाति अवलंबून असते. व त्या जातिनुसार त्या व्रणातील दोषांची कल्पना येते. सर्वत्र नखदंश व्रणांत पित्तानुबंध असतोच. 'माकड' हे 'प्राणि वातप्रकृति स्वभावाचे' त्यामुळें त्याच्या दातानें झालेला व्रण 'वातपित्तात्मक'. शिवाय 'चल' अशा स्थानीं व्रण झाला. म्हणून वातवृद्धीला अनुकूलता. उंदराच्या नखदन्तव्रणाच चिकित्सा ग्रंथांत आहे. माकडहि उंदराप्रमाणेंच चंचल असल्यानें उंदराच्या चिकित्सेप्रमाणचें याहि व्रणाची चिकित्सा करावयास पाहिजे उंदराच्या व्रणांत कर्णिका (व्रण खोलखोल जाणें व कडा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जाड होणें) असते. तशी येथेहि होऊं लागली होती. म्हणून रजन्यादि चूर्णांच्या उपयोगानें कर्णिक नाश व नखदन्तज उपद्रव टळले.

रजन्यौ गैरिकं लेपो नखदन्तविषापहः ।

वाग्भट उ स्थान अ ३८ श्लो. ४०

आगारधूम--मंजिष्ठा--रजनी--लवणोत्तमैः ॥१८॥

लेपो जयत्याखुविषं कर्णिकायाश्च पातनः ।

। अ. ३८ ।

व्रण कोणाचा भरून येतो

२) आयुर्वेदीय व्रणचिकित्सेचें एक महत्वाचें सूत्र- म्हणजे शरीर शुद्ध ठेवणें. कारण शुद्ध व्यक्तीचा व्रण लवकर भरून येतो. शुद्धस्य;आशु संरोहति व्रणः। म्हणून या रोग्यास इच्छाभेदी देऊन पित्तदोषाची वृद्धि होऊं दिली नाहीं, व शरीर शुद्ध ठेवलें.

३) नखदन्तज व्रण नेहमीं सुजतात, पिकतात व ज्वर येतो. म्हणून चिकित्सकानें केव्हांहि गडबडतां कामा नये.

चतुष्पाद्भिर्द्विपाद्भिर्वा नखदन्तपरिक्षतम् ।

शूयते पच्यते रागज्वरस्रावरुजान्वितम् ॥३९॥

उत्तरस्थान अ ३८

पहिल्या दिवशीं यष्टिमधुजलानें धावन वात-पित्तदोष शमनार्थ वेदनाशांतीकरतां केलें, मनःशिला 'कफवातहन्त्री व विषनाशिनी' म्हणून कफ प्रकृतींत झालेल्या वातप्रकृति पाण्याच्या दंष्ट्राज व्रणांत वापरली.

अग्नितु डी + गुळवेलसत्वप्रयोग

प्राणिज विषाचा प्रतिकार वनस्पति विषानें; या कल्पनेनें, कुचला वापरला. शिवाय बचनागासारखें कटु वनस्पतिविष न वापरतां तिक्तरसाचें व्रणक्लेद-शोषक, पित्तशामक असें विष कुचला व तेंहि त्रिदोष-नाशक अशा गुळवेलीबरोबर दिलें. ज्वरप्रत्यनिकहि हा याग होईल ही अपेक्षा होतीच.

ग्रीष्मऋतु असल्यामुळें कालाचा विचार करून व्रणपट्ट सैल बांधला.

मधाचा अनुपशय

या ठिकाणीं अनुपशय म्हणून मध मुद्दाम वापरून अवस्था पाहिली. मध रूक्ष वातक आहे. म्हणून तो ह्या वातपित्तप्रधान व्रणांत उप पडणार नाहीं ही कल्पना असतांहि व्रणशोधन म्हणून वापरला. कल्पनेप्रमाणें व्रणरोपण न उलट कर्णिक वाढली.

सदरहूं रुग्णास ज्वर येऊं लागला आखडूं लागला, व्रणांत पूं झाला, व प्राण जाऊं लागला, हें पाहून पालक घाबरले. व रेबिज ट्रीटमेंट किंवा पेनिसिलीन इ. चिकित्सा क वयाची काय? म्हणून विचारलें! चिकित्स विचार करून, १ दिवस मागून घेतला दुसऱ्या दिवसापासून उपशय आला. हॉस्पिटलमधील डॉक्टरांना विचारतां ॲन्टी ट्रीटमेंट करणें चांगलें, पेनिसिलीन द्यावें सांगितलें होतें.—

कोणत्याहि विषचिकित्सेनंतर रसायन चिकि करावी लागते. त्यामुळें शेषविष पुनःपुनः होत नाहीं. म्हणून 'कुचला + त्रिकटु' याचा म्हणजे 'विषमुष्ट्यादिवटी' रसायन व दीपन म्ह चालू ठेवला.

चिकित्सकानें धैर्यानें चिकित्सा चालूं ठेव तिचें प्रत्यंतर आलें म्हणून,

आयुर्वेदोपदेशेषु विधेयः परमादरः । वाग्भट

—आयुर्वेदाचार्य श्रीराम करमर

पांढरें कोड

हजारोंचें गेले व त्यांनीं अभिप्राय दिलेले आणि अनेक बक्षिसें मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु. नकली वैद्यापासून सावध रहा!

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन' मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनाचें मुंबई येथील यशस्वी विशेष अधिवेशन

पूर्वी जाहीर झाल्याप्रमाणें महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनाच्या विशेषाधिवेशनाच्या प्रास्ताविक कार्यास गुरुवार ता. २७ रोजीं रात्रीं ८॥ वाजतां मुंबई येथें सरदारगृहांत सुरुवात झाली. प्रथम स्थायी समितीच्या सभेचें निमंत्रण-पत्रक वैद्य ब्रह्मदत्त शर्मा यांनीं वाचून दाखविलें. नंतर मागील सभेचें वृत्त, वार्षिक कार्यांचा अहवाल व वार्षिक जमाखर्च (नशिराबाद, भुसावळ व नाशिक कार्यालयाचे) सादर करण्यांत आले. ते सर्वानुमतें सम्मत झाले.

त्यानंतर संमेलनापुढें मांडण्याकरतां आलेल्या ठरावांचे मसुदे तयार करण्यांत आले. या सभेचें काम रात्रीं १२॥ वाजतां संपलें.

शुक्रवार ता. २८।५।५४ रोजीं सकाळीं ९ वाजतां विशेषाधिवेशनास प्रारंभ झाला. प्रथम वैद्य-कुमार रायकर चिपळूण यांनीं तयार केलेलें स्वागतगीत-गायन झाल्यावर स्वागताध्यक्ष श्रीमंत आबासाहेब सांडू यांचें स्वागतपर भाषण आयुर्वेदाचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी यांनीं वाचून दाखविलें. त्यानंतर श्रीमंत नाना-साहेब पुराणिक यांनीं उद्घाटकांचा परिचय करून दिला. ना. मंगलदास पक्वासा हे मध्यप्रांताचे गव्हर्नर असतांना त्यांनीं तेथें सुरू केलेले समन्वय रुग्णालय, फिरत्या गाडींतून त्रिफळा चूर्ण व त्याचे एक हिरडा, बेहडा, आवळकंठी, यांची जनतेला माहिती देण्याची सुरु केलेली पद्धति, कस्तुरबा व गांधी स्मारक निधि या निधींचे विश्वस्त इ. त्यांच्या विविध कार्यांबद्दल माहिती दिली.

नामदार पक्वासा यांचें भाषण इतरत्र दिलें आहे. त्यानंतर उपस्थित स्त्री--वैद्यांचा परिचय नाम-दारांना करून देण्यांत आला. व त्यापैकीं श्रीमती लक्ष्मीबाई बोरवणकर यांनीं छोटेसें भाषणहि केलें.

ना. पक्वासांचे आभार मानतांना अध्यक्ष श्री. जळूकरशास्त्री म्हणाले— वैद्यांचे दोष आतां आम, पच्यमान या अवस्थेंतून पुढें पक्व होऊन पक्वाशया-पर्यंत पोहोचले आहेत, तेव्हां त्यांचे वेळींच निर्हरण वैद्यसमाजानें करणें वैद्यांचें कर्तव्य आहे.

यानंतर अध्यक्षांचें भाषण झाल्यानंतर १०॥ ते ११॥ या एक तासभर शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समि-तीच्या कार्यपद्धतीबद्दल माहिती प्रश्नोत्तर रूपानें देण्यांत आली. गुरु, शिक्षणक्रम, संस्था इ. बाबतींत सर्व खुलासे त्यावेळीं उपस्थितांना मिळाले.

दुपारीं २॥ ते ३ अर्धातास वैद्य श्री. लक्ष्मीबाई बोरवणकर यांचे 'स्त्रीरोग' या विषयावर व्याख्यान झालें. त्यानंतर खुल्या अधिवेशनाच्या कार्यास प्रारंभ होऊन पुढील अर्थाचे प्रस्ताव मंजूर झाले.

एकमेव प्रातिनिधिक समिति

मुंबई राज्यांमध्यें प्रांतीय वैद्यांच्या मताचें प्रतिबिंब ज्यामध्यें पडतें अशा चार व्यापक प्रादेशिक संघटना आहेत त्या संघटनांचे अधिकृत प्रतिनिधी एकत्रित येतील अशी संयुक्त मुंबई राज्य वैद्य-परि-षद निर्माण व्हावी अशी या अधिवेशनाची मागणी आहे. अध्यक्षांना हें अधिवेशन या बाबतींत इतर संघटनांशीं विचारविनिमय करून ही योजना मूर्त स्वरूपांत आणण्याकरितां अधिकार देत आहे.

कामगार आरोग्यविमा योजना

२) मुंबई सरकारनें कामगारांकरितां आखलेल्या कामगार आरोग्य विमा योजनेबद्दल हें अधिवेशन सरकारचें अभिनंदन करीत आहे. या योजनेत वैद्यांना सरकारनें योग्य प्रमाणांत स्थान द्यावें अशी या अधिवेशनाची सरकारला आग्रहाची विनंति आहे.

या योजनेबाबत म. प्रा. वैद्यमंडळाच्या वतीनें सरकारशीं विचारविनिमय करण्याकरितां पं. शिव-शर्माजी, वै. दे. ल. आनंदे, वै. लक्ष्मीबाई बोरवणकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वै. नि. वि. भुरे, वै. ना. ह. जोशी या सदस्यांची समिति नेमण्यांत येत आहे. ही समिति या योजनेंत भाग घेणाऱ्या वैद्यांसहि सल्लामसलत देईल.

मुंबई सरकारचें अभिनन्दन

३) मुंबई राज्य सरकारनें शुद्धायुर्वेदाचा पाठक्रम मान्य करून त्यांचे संचालनासाठीं सुयोग्य वैद्यांची समिति नेमल्याबरोबर अभिनंदन करणारा ठराव तसेंच अफू, भांग, गांजा यांचा आयु. औषधांत उपयोग करण्यासाठीं सरकारी अबकारी जे नियम आहेत ते नसावेत अशा आशयाचा ठराव करण्यांत आला.

आसवारिष्टांवरील निर्बंध उठवावे

(४) मुंबई सरकारनें लोक आसवारिष्टें दारू-ऐवजीं पिऊन मद्याची तहान भागवतील असा समज करून आसवारिष्टांवर घालण्यांत आलेले निर्बंध उठविण्यासंबंधीं विनंति करणारा ठराव.

पुणें विद्यापीठाचे अभिनंदन

(५) पुणें विद्यापीठानें आयुर्वेदाच्या शिक्षणाची केलेल्या व्यवस्थेबद्दल अभिनंदन करणारा ठराव.

आर्थिक साहाय्य

(६) तसेंच ज्या संस्था व गुरु, शुद्ध आयु-र्वेदीय विद्यालय चालवू इच्छित असतील त्यांना आर्थिक व इतर सहाय्य मुंबई सरकारनें देण्यासंबंधीं विनंति करणारा ठराव.

डायरेक्टर ऑफ आयुर्वेद

(७) मुंबई राज्य सरकारनें डायरेक्टर ऑफ आयुर्वेद ही जागा निर्माण करून आयुर्वेदाकडे विशेष लक्ष दिल्याबद्दल आजचें हें अधिवेशन मुंबई सर-कारचें अभिनंदन करीत असल्याचा ठराव करण्यांत आला.

वैद्यांची प्रातिनिधिक उपस्थिति

हें संमेलन तांतडीनें घेतलेलें व ता. २८ हा शुभमुहूर्त (लग्नाचा) असें असतांहि प्रांताच्या सर्व भागांतून प्रमुख वैद्यमंडळी उपस्थित होती. वै. म. भा. वाटवे बेळगांव, अ. वा. जोशी बेळगांव, वि. दा. एकतारे अहमदनगर, पां. वि. जायदे हुबळी, हिरा-लाल शहा रावळगांव, भा. द. गोडबोले, सि. डि. चितळे, गणेशशास्त्री जोशी पुणें, वामनराव दिनानाथ पु. वि. धामणकर, अ. वि. फडके शिरढोण, दा. य. हळशीकर हुबळी, वि. मो. दाते नासिक, अनंतशास्त्री जोशी येवलें, वि. गं. केळकर नासिक, सी. रं. जोशी बेलठाण, ह. बा. परांजपे, नि. वि. भुरे, का. सी. पुराणिक, रा. स. वेदपाठक, ग. द. जोशी, नी. द. देशपांडे, नाटेलीकर कागल, वा. र. गांगल कर्जत, व्यं. ह. जोशी, महेन्द्रकुमार शास्त्री, ह. भा. भिडे पुणें, डॉ. आशानंद पंचरत्न, पां. ह. देशपांडे, गो. वि. भुजले हुबळी, श्री. लक्ष्मीबाई ठुबे, श्री.कृष्णाबाई मिठसागर, सौ.लक्ष्मीबाई परांजपे इ.इ.

पांढरे कोड असलेली वधू पाहिजे

स्वत:ला पांढरें कोड असलेल्या एका पदवीधराला (वय ३५ वर्षे) समजुतदार व वयस्क वधूशीं विवाह कर्तव्य आहे.

पत्रव्यवहाराचा पत्ता:-प्रति आयुर्वेद पत्रिका, नासिक.

साइ
गोल्ड टॅब्लेटस्
क्षयाच्या प्राथमिक अवस्थेवर अप्रतिम.
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द कृ. साइ ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई.

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स-
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वातज उन्माद

(आयुर्वेद-सेवा, संघ., चिकित्सा विभाग--प्रकाश औषधालय)

रोगी- स्त्रीरुग्ण, वय वर्षे ३०.

प्रमुख तक्रार-१ मोठमोठ्यानें असंबद्धपणें ओरडणें, २) विवस्त्र लोळणें, ३) गाणें म्हणणें. ४) घरांतल्या मंडळींना शिव्या देणें, ५) मधून मधून शुद्धीवर नसणें, ६) ज्वर थोडासा (९९°)

इतिहास- या स्त्रीस १ ल्या बाळंतपणांत (१ वर्षापूर्वींच्या) जुळी मुलें झालीं. व हें तिला कळतांच एकदम ती रडू, ओरडू, हांसूं लागली— दोन मुलं! अगबाई! आतां माझें कसें होईल! इ. त्या उन्मादावस्थेंतून ती बरी झाली. उशीरा लग्न व जुळें बाळंतपण यामुळें बरेच मोठें. गर्भाशयमुख-विदारण (Cervical Tear) झालें होते. त्यामुळें बाळंतपणाची भीति मनांत बसली.

पुनः उन्माद होण्याचीं कारणें

घरांत सासूचें बोलणें आजारपणाबद्दल नित्य असे! व सासरा नित्य आजारी, दिरांचें नणंदांचें काम पडे! स्वतः बाई अगदीं मेदमांसशुक्र असार व क्षीण, वातप्रकृति लक्षणाची, कृश त्यामुळें तिच्यानें काम होत नसे. अशा परिस्थितींत तिला १--१॥ महिने गेलेसे वाटले, गर्भारपणाची शंका आली व म्हणून आतां पुनः उन्माद सुरू झाला.

परीक्षण- रोगी विवस्त्र स्थितींत अंथरुणावर पडून होता. गादीवर पांघरुणांत दिसेनासा होण्या-इतका कृश मेदमांसशुक्र क्षीण. ३ दिवसापासून मलावरोध; उदरस्पर्शानें मळाच्या गाठी हातास लागल्या. दर्शन-परीक्षेंत योनी अतिशय विवृत्त झालेली व फाटलेल्या भागांतून गर्भाशय दृष्टीस पडत होता. जिव्हा साम-श्वेतोपलिप्त अशी होती. नाडी तीव्र वातकफात्मक होती.

दोषधातूंचा विचार करून चिकित्सा

चिकित्सा- वातप्रधान दोषकल्पना करून मांस व शुक्र धातूंचा विचार करतां मलावरोध दूर करण्यास्तव नारायणतेल २॥ तोळे + ग्लिसरिन २॥ तोळे यांचा (१) मात्राबस्ति दिला. त्यामुळें मलाचे खूप खडे पडले. मलाला वास नव्हता.

(२) ब्राह्मयादिचूर्ण १ मासा + वल्लीकूष्मा--ण्डशर्करा १ मासा यांच्या ३ पुड्या करून दिल्या. दुधांतून घेण्यास सांगितल्या. या चिकित्सेनेंहि रात्रभर झोप आली नाही. प्रलाप चालूच होता. म्हणून, वातकफनाशक मज्जाधातुदुष्टी दूर करण्याच्या उद्देशानें गुळवेलसत्व ४ गुं. शुद्ध मनःशिला १ गुं. + रौप्यभस्म १ गुं. + अभ्रकभस्म शतपुटी १ गुं. २ पुड्या करून मोरावळ्यांतून दिवसभर चाटण करावयास सांगितलें. २ दिवस हीच चिकित्सा ठेवली. फक्त ताप्यादिलोह २गुं. व सितोपलाचूर्ण ६गुं. त्यांत घातलें. सारस्वतारिष्टाचें अनुपान सांगितलें.

४ थ्या दिवशींहि उपशय न पाहून—

(१) प्रतापलंकेश्वर ४ गुं. + गर्भपालरस ४ गुं. यांच्या पुड्या करून अपानकालीं घेण्यास दिल्या.

(२) व निर्गुंड्यादितैलाचें नस्य व कर्णपूरक चालूं ठेवलें.

(३) निर्गुंड्यादितैलाचा मात्राबस्तिहि चालूं ठेवला.

(४) मानसिक उपचार–घरांतील वातावरण शांत ठेवण्याचें व तिच्या आईस बोलावण्याचें केलें. व माहेरीं पाठविण्यास सांगितलें. ४ दिवस सतत हे उपचार केल्यावर क्रमाक्रमानें ती शांत झाली. नंतर तिला माहेरी पाठविली. व तेथें तिची शक्तिक्षीणता भरून आली.

वरील चिकित्सेची मीमांसा

१) वातांचें अनुलोमन व शोधन चिकित्सा— म्हणून वातनाशक तैलाचे मात्राबस्ति.

२) मूर्धास्थानांवर, इंद्रियस्थानावर, जत्रूर्ध्वं दोषांवर जवळच्या मार्गानें औषधींचा प्रयोग म्हणजे नस्य व कर्णपूरण.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३) व मानसविकारांत चिकित्सेला घेतलेले मानसोपचारांचें साहाय्य.

(४) औषधीद्रव्यांचे दृष्टीनें वातदोषाचें शमन करीत असतांना केवळ ब्राह्मी, शतावरी, रौप्यभस्म सारस्वतारिष्ट यांच्यासारखीं,शीतवीर्यात्मक शामक द्रव्यें उपयोगी पडत नाहींत, उलट निर्गुंडीसारख्या उष्णवीर्याच्या द्रव्यांनीं सिद्धतैलाचें नस्य कर्णपूरण केलें असतां उपयोग होतो. तसेंच अपानप्रकोपाची जाति गर्भाशयगामी अपान- ही लक्षांत घेऊन प्रतापलंकेश्वर, गर्भपालरस यांच्यासारखीं दीपक, अनुलोमक, गर्भाशयदोषहारक अशीं औषधें वापरल्यानें, व पक्वाशयस्थ मूल वाताचेंहि शोधन करीत राहिल्यानें चिकित्सा यशस्वी झाली.

नैसर्गिक मार्गातून उपचार

आयुर्वेदांतील शोधन चिकित्सेचें, हें वैशिष्ट्य व बस्ति, नस्य,कर्णपूरण इ. नैसर्गिक मार्गावर उपचार करण्याचें हें तंत्र सूचीवेधांच्या मार्गानें कृत्रिम मार्ग तयार करण्यापेक्षां खात्रीनें श्रेष्ठ होय, हें या चिकित्सेवरून दिसून येईल.

आयुर्वेदतीर्थ वा. स. मराठे.

अपस्मारावर घरगुती प्रयोग

(निवेदकः- वैद्य आ.बा. देव्हारे, आयुर्विशारद, मुंबई)

अपस्मारावरील एक तोडगा या सदरांत बसू शकेल अशी एक चिकित्सा पुढीलप्रमाणें आहे.

ज्या अपस्मारी माणसास हा रोग असेल त्यानें पहाटे ४ वाजतां उठून स्वतःचें मूत्र एका भांड्यांत धरून तें कपड्यानें गाळून एका बाटलींत भरावें व त्याचे ४ भाग करून ३।३ तासानीं घ्यावें.

हा उपाय सतत ३ ते ६ महिने केल्यानें अपस्मार [फिटस] येण्याचें बंद होतें असा अनुभव आहे.

जनावराचे दूध वाढविण्यासाठीं

उडदाचा प्रयोग

उकडलेले उडीद अर्धा पावशेर, तांदुळाची पेज पावशेर, चांगला गूळ अर्धापावशेर,मीठ भुकटी दोन ते चार तोळे, बारीक वाटलेली पिंपळी एक तोळा.

हे सर्व जिन्नस एकत्रित वाटून पेजेमध्यें मिळवावें व मिश्रण एकजीव करावें. सायंकाळीं दूध काढून झाल्यावर गाईस किंवा म्हशीस खाऊं घालावें. क आठवड्यानन्तर पिंपळी बन्द करावी.

(स्त्रियांचें दूध वाढण्यासाठीं अल्प प्रमाणांत हाच प्रयोग करावा. शरीर धष्टपुष्ट होण्यासाठींहि हा प्रयोग करावा. —संपादक

आयुर्विद्या प्रसारक मंडळ, मुंबई

वरील संस्थेच्या शीव व मुगभाट येथील आयुर्वेदीय हॉस्पिटलांत व दवाखान्यांत जानेवारी ते एप्रिल १९५४ या चार महिन्यामध्यें खालीलप्रमाणें रुग्णांना औषधोपचार करण्यांत आला.

शीव हॉस्पितलः- कायाविभाग, प्रसूतीविभाग, शस्त्रकर्माविभाग, नेत्ररोगविभाग, दंतरोगविभाग इत्यादीमध्यें उपचार घेतलेल्यांची एकूण हजेरी १७७९ होती.

शीव दवाखानाः- एकूण निरनिराळ्या रोगांच्या ११२९९ रुग्णावर औषधोपचार करण्यांत आला.

मुगभाट हॉस्पिटलः-कायाविभाग, प्रसूतीविभाग, शस्त्रकर्माविभाग, नेत्रविभाग इत्यादीमध्यें उपचार घेतलेल्यांची एकूण हजेरी १२१७ होती.

मुगभाट दवाखानाः- एकूण निरनिराळ्या रोगांवर१२०८०रुग्णांना औषधोपचार करण्यांत आले

चांगला व्यावहारिक उपयोग

आयुर्वेद सेवासंघाच्या आयुर्वेद पत्रिकेचा व्यवहारिक उपयोग चांगला होतो. सेवा संघाच्या कार्याबद्दल धन्यवाद. —वै. श्री. ना. फाटक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महत्त्वाची सूचना

आयुर्वेद पत्रिकेचा

१ जुलै १९५४ चा अंक

आयुर्वेदाभ्यासी डॉ. सावनूर विशेषांक

स्वरूपांत प्रसिद्ध होणार आहे. किरकोळ अंकाची किंमत १ रु. त्या अंकापासून आयुर्वेद पत्रिका ८ व्या वर्षांत पदार्पण करीत आहे. वर्गणीदारांनीं आपली वर्गणी तावडतोब पाठवून तो अंक मिळविण्याची व्यवस्था करावी. ज्यांची वर्गणी येणें असेल त्यांना अंक पाठविणें शक्य होणार नाहीं.

— व्यवस्थापक

आरोग्य शाला, नासिक

मुंबई सरकारनें मुंबई राज्यांत १० जून पासून शुद्ध आयुर्वेदाचा ३॥ वर्षांचा शिक्षणक्रम सुरू करण्याचें ठरविलें आहे. तो अभ्यासक्रम शिकविण्याची व्यवस्था आयुर्वेद सेवा संघाचे विद्यमानें नासिक येथें करण्यांत येणार आहे. शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनीं आरोग्य-शाला, आयुर्वेद सेवा संघ, नासिक या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

अनुक्रमणिका

शुद्ध आयुर्वेदाचीं रुग्णालयें कां नाहींत?	७४१
खोटे रुग्णालय व तृष्णारोगी	७४३
गुग्गुळ–गुटिका–वटिका	७४७
प्रांताध्यक्षांचा कोकणांतील दौरा	७५१
वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर, अध्यक्षीय भाषण	७५५
भीजबाजरी + तीळ	७६२
जुनाट खरूज, ज्वर व अतिसार	७६३
टिंक्चरांच्या विक्रीवर नियंत्रण	७६४
सूक्ष्म औषधें व त्यांचे गुण	७६४
मर्कट-नख-दन्तज व्रण–चिकित्सा	७६५
म. प्रां. वैद्य सम्मे. यशस्वी विशेष अधिवेशन	७६७
वातज उन्माद चिकित्सा	७६९
अपस्मारीवर घरगुती प्रयोग	७७०
दूध वाढविण्यासाठीं उडिदाचा प्रयोग	,,
आयुर्विद्या प्रसारक मंडळ, मुंबई	,,

३०० वैद्यकीय मदत केंद्रें

मुंबई राज्यांत ग्रामीण भागांत लौकरच ३०० वैद्यकीय मदत केंद्रें स्थापन करण्यांत येणार असून तेथें सर्व सामान्य आजारावर औषधोपचार करण्यांत येतील. अशी माहिती आरोग्य खात्याचे उपमंत्री बी. डी. जत्ती यांनीं डहाणू येथील आदिया कॉटेज हॉस्पिटल व सूतिकागृह यांचें उद्घाटन करतांना दिली. या रुग्णालयाच्या बांधकामावर एकूण खर्च ४॥ लाख रु. होणार आहे.

शुद्धायुर्वेद शिकणारे विद्यार्थी पाहिजेत

पुण्याचे वैद्य गणेशशास्त्री जोशी हे सरकारमान्य शुद्धायुर्वेदाचा शिक्षणक्रम (साडेतीन वर्षांचा) पांच विद्यार्थ्यांना शिकविणार आहेत. त्याकरितां या शिक्षणाची प्रवेशयोग्यता असलेल्या विद्यार्थ्यांनीं खालील पत्त्यावर अर्ज करावेत. मान्य विद्यार्थ्यांची राहण्याची जेवणाची व्यवस्था मोफत होईल. विद्यार्थ्यांनीं पुस्तकें व कपडे यांचा खर्च स्वतः करावा. हुषार विद्यार्थ्यांनीं अर्ज तारीख १० जून पर्यंत २८ शुक्रवार पुणें नं. २ या पत्त्यावर वैद्य गणेशशास्त्री जोशी यांचे नांवें करावे.

यो विद्यार्थ्यांना आपल्या खर्चानें मुलाखतीकरितां यावें लागेल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एम्. बी. बी. एस्. डॉक्टरांना पसंत पडलेलें आयुर्वेदीय औषध

भल्लातकासव

आयुर्वेद सेवा संघानें उत्तम मोठ्या बिब्ब्यापासून भल्लातकासव बनवून तें चिकित्सेंत रूढ केलें आहे. दिवसेंदिवस या भल्लातकासवास सर्वत्र वाढती मागणी आहे.

आतां तर पावसाळा नजीक आला असल्यामुळें भल्लातकासवाची गरज सर्वांनाच भासणार आहे. पावसाळी थंड हवा न मानवणाऱ्या लोकांना भल्लातकासव हें अमृताप्रमाणें आहे. आयुर्वेद सेवा संघाच्या विशेष औषधांचे एक ग्राहक व चाहते डॉक्टर लिहितातः—

"मला २० पौंड भल्लातकासव ताबडतोब पाहिजे. कृपा करून रेल्वे पार्सलनें तें पाठवून, रेल्वे रिसीट.....................बँकेमार्फत पाठवा."

आपणहि आयुर्वेद सेवा संघाचे भल्लातक कल्प मागवून त्यांचा अनुभव घ्या.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक

ठिकठिकाणचे औषधी विक्रेते व वैद्य यांनीं भल्लातकासवाची माहिती मागवावी.

चेहऱ्यावरील पुळ्या!

रक्तशुद्धीकरितां नांणावलेलें "रक्तदोषांतक" घेऊन आपणांस हा त्रास वांचवतां येईल.

"आफालि"

आपल्या विश्वासाचें प्रतीक

रक्त-दोषांतक

आयुर्वेदाश्रम फार्मसी लिमिटेड (आफालि) अहमदनगर.

EVEREST R. 53.4

संपादक व प्रकाशक:— वैद्य [illegible] आयुर्वेद सेवा संघ, वैद्य चित्रलकर कारंजा, नासिक
मुद्रक:— श्री. त्रि. [illegible] सर्कल प्रेस, आग्रारोड नासिक.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ७ वें) नाशिक, ता. १६ जून १९५४ (अंक २४ वा

देशाचें वैभव वाढविण्यासाठीं

त्यागपूर्वक कर्म (श्रम) शक्तीची आराधना करा ! —आरोग्यमंत्री

" पतीच्या मिळकतीनुसार संसार चालविणाऱ्या पत्नीची भूमिका आज आम्हीं राज्यकर्ते पार पाडीत आहोत. जनता कररूपानें वा अन्य प्रकारें जें आर्थिक सहकार्य देईल, त्यावर आमच्या राज्याचा संसार आम्ही चालविणार. जनतेनें कांहींच सहकार्य न दिल्यास आमच्याकडून संसारसुखाची अपेक्षा करतां येणार नाहीं. मात्र दिलेल्या सहकार्यामुळें आम्ही संसार कसा चालविला याचा हिशेब करड्या पतिराजाप्रमाणें आमच्यापासून जनतेला मागतां येईल. " असे उद्गार चेंबूर येथील नवीन हायस्कूलचें उद्घाटन करतांना मुंबई राज्य सरकारचें आरोग्यमंत्री श्री. शांतिलाल शहा यांनीं काढले.



आरोग्यमंत्री श्री. शांतिलाल शहा

घाम गाळून श्रम करण्याची आवश्यकता

ते पुढें म्हणाले " अधिक नोटा छापून किंवा मंत्र्यांची संख्या वाढवून देशाचें वैभव वाढत नसतें. जीवनावश्यक वस्तूंचें वाढतें उत्पादन व सुबत्ता यांतूनच देशाला ऊर्जितावस्था येते. आज प्रत्येक व्यक्तीनें त्यागबुद्धीनें व उत्साहानें पुढें येऊन घाम गाळून श्रम करण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीनें विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा विचार केल्यास पुस्तकी ज्ञानाबरोबरच श्रमाची आवड निर्माण होईल असें शिक्षण दिलें पाहिजे. श्रमशक्तीची आराधना करणारे विद्यार्थीच भारतीय स्वातंत्र्याचा वारसा जतन करूं शकतील. "

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य संमेलनाचे २ ठराव

(म. प्रां. वैद्य संमेलनाच्या विशेष अधिवेशनांतील संमत ठराव पुढें पान नं. ७७९-७८१ या छापले आहेत. त्यापैकीं राहिलेले २ ठराव येथें दिले आहेत.)

सरकारनें आदर्श शुद्ध आयुर्वेद विद्यालय सुरूं करावें

मुंबई राज्य सरकारनें शुद्ध आयुर्वेदाचा पाठ्यक्रम मान्य केला याबद्दल ही सभा सरकारचें मनःपूर्वक अभिनंदन करते. हा अभ्यासक्रम यशस्वी व्हावा या दृष्टीनें पहिलें आवश्यक पाऊल म्हणून सरकारनें स्वतःच्या पुरस्कारानें एक आदर्श असें शुद्ध आयुर्वेद विद्यालय सुसज्ज रुग्णालयासह सुरूं करावें अशी सरकारला या अधिवेशनाची विनंति आहे.

ज्या संस्था व गुरु, शुद्ध आयुर्वेद विद्यालय चालवूं इच्छित असतील, त्यांना पाठ्यक्रम समितीच्या नियमांच्या पूर्ततेसाठीं आर्थिक व इतर साह्य सरकारनें द्यावें अशीहि अधिवेशनाची सरकारास विनंति आहे.

सू.— कविराज का. सी. भावे अ.— वै. वि. मो. दाते सर्वसंमत

कामगार विमा योजना व वैद्य

मुंबई सरकारनें कामगारांकरितां आंखलेल्या कामगार आरोग्य विमायोजनेबद्दल हें अधिवेशन सरकारचें अभिनंदन करीत आहे. या योजनेंत वैद्यांना सरकारनें योग्य प्रमाणांत स्थान द्यावें अशी ह्या अधिवेशनाची सरकारला आग्रहाची विनंति आहे. या योजनेबाबत म. प्रां. वै. मंडळाच्या वतीनें सरकारशीं विचारविनिमय करणेकरितां १) पं. शिवशर्मा, २) वै. दे. ल. आनंदे, ३) वै. लक्ष्मीबाई बोरवणकर, ४) वै. नी. वि. धुरे, ५) वै. ना. ह. जोशी या सदस्यांची समिति नेमण्यांत येत आहे. ही समिति या योजनेंत भाग घेणाऱ्या वैद्यांसहि सल्लामसलत देईल.

सू.— वै. ना. ह. जोशी अ.— वै. बिंदुमाधव पंडित सर्वसंमत

शुद्ध आयुर्वेदाला रजिस्ट्रेशन

मुंबई सरकारच्या आरोग्यखात्याचे उपमंत्री माननीय श्री. बी. डी. जत्ती यांच्या अध्यक्षतेखालीं शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीच्या सभासदांचा सत्कार समारंभ ता. २८ मे रोजीं सायंकाळीं सरदारगृहांत पार पडला.

त्याप्रसंगीं भाषण करतांना श्री. जत्ती म्हणाले:- " शुद्ध आयुर्वेदीय अभ्यासक्रमास मुंबई सरकारनें मान्यता दिली पण त्या अभ्यासक्रमाप्रमाणें उत्तीर्ण झालेल्या वैद्य लोकांच्या रजिस्ट्रेशनची व्यवस्था काय ?" असा प्रश्न अनेक वेळा केला जातो. सरकारनें १९३८ चा कायदा त्या दृष्टीनें दुरुस्त करण्याची व्यवस्था केली असून लौकरच ती दुरुस्ती कायदेमंडळांत आलेली आपणांस दिसेल.

जें सरकार एखाद्या अभ्यासक्रमास मान्यता देतें, ते जर पुढें त्याच्या व्यवसायास मान्यता देणार नसेल तर तें सरकार म्हणून टिकूं शकणार नाहीं, सबब शंकेखोर लोकांनीं आपली लेखणी व जीभ जरा आवरती ठेवावी हें चांगलें "

मलेरिया विरोधी योजना

मुंबई सरकारनें १९५३ सालीं मलेरिया विरोधी योजनेवर ३० लक्ष रुपये खर्च केले असून उरलेल्या २ वर्षांत दरसाल तितकीच रक्कम खर्च करण्याचा सरकारचा विचार आहे. याकामीं भारत सरकार व अमेरिका यांजकडून ३६ लक्ष रु. ची मदत मिळाली आहे.

या योजनेमुळें प्लेगचें उच्चाटन झालें, अतिसार व आमांश यांना आळा बसला, जनावरांच्या प्रकृतींत सुधारणा झाली व शेकडो एकर जमीन लागवडीखालीं आली आहे. —आरोग्यमंत्री ग्रह

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्र प्रांतिक वैद्य मंडळ, विशेषाधिवेशन, मुंबई

सभाकार्य-वृत्त व प्रस्ताव

दिनांक २७ मे १९५४ गुरुवारीं मुंबई येथें सरदारगृहांत टिळक हॉलमध्यें म. प्रां. वै. मं. च्या कार्यकारी व स्थायी समितीची सभा झाली. त्यांत दुसरे दिवशींचश (२८ मे १९५४, शुक्रवार) प्रकट अधिवेशनासाठीं प्रस्ताव निश्चित करण्यांत आले. दोनहि दिवशीं अध्यक्षस्थानीं प्रांताध्यक्ष आयुर्वेदप्रवर दत्तात्रेयशास्त्री जळूकर हे होते.

दिवंगतांना श्रद्धांजली

प्र. १— वैद्यभूषण पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकर, वै. यशवंतराव दामूभाई, वै. दत्तात्रेय जे. राणे, वै. विनायकराव गजेंद्रगडकर, वै. धमण बसळ पाटील, प्रो. माणिकराव वडोदे, वै. का. श्री. पाठक यांचेवर काळानें झडप घालून आयुर्वेदाची फार मोठी हानि केली आहे. म. प्रां. वै. मं. चें हें विशेषाधिवेशन त्यांचेबद्दल शोक व्यक्त करीत असून त्यांच्या आत्म्यास श्रद्धांजलि अर्पण करीत आहे.

--अध्यक्षद्वारा प्रस्तावित, सर्वसंमत

पुणें विद्यापीठाचें अभिनंदन

प्र. २— पुणें विद्यापीठानें आपल्या अभ्यासक्रमांत आयुर्वेद शिक्षणविभाग (फॅकल्टी) निर्माण करून आयुर्वेदाला मान्यता दिली व त्याच्या शिक्षणाची व संशोधनाची व्यवस्था करण्याची घोषणा केली, याबद्दल हें अधिवेशन पुणें विद्यापीठाचें अभिनंदन करीत आहे.

विद्यापीठांतील ॲलोपॅथिक फॅकल्टी ज्याप्रमाणें केवळ ॲलोपॅथीच्या शिक्षणविषयाशीं बांधली गेली आहे, त्याप्रमाणें आयुर्वेदीय फॅकल्टी शुद्धायुर्वेदाचेंच शिक्षण देण्यास बांधली गेली आहे, असें वैद्यसमाज समजतो. आयुर्वेदाचें बाबतींत हें बंधन पुणें विद्यापीठ, कटाक्षानें पाळील असा ह्या अधिवेशनास विश्वास वाटतो.

शुद्ध आयुर्वेदाचा प्रश्न विद्यापीठापुढें नेटानें मांडण्यासाठीं म. प्रां. वै. मं. चें हें विशेषाधिवेशन पुढील सदस्यांचें एक शिष्टमंडळ नियुक्त करीत आहे. १ वै. भू. गणेशशास्त्री जोशी, २ समाजशास्त्रज्ञ गो. म. जोशी पुणें, श्री. रा. बि. रहाळकर वकील नाशिक, ३ श्री. ज. स. ऊर्फ तात्यासाहेब करंदीकर पुणें, ४ श्री. द. श्री. येरवडेकर ५ वै. ह. बा. परांजपे, ६ वै. पां. ह. देशपांडे (निमंत्रक)

सूचक- वै. बिंदुमाधव पंडित अनुमोदक- वै. प्रतापकुमार पोपटभाई सर्वसंमत

परदेशी दारू व आसवारिष्टें

प्र. ३— दी बॉम्बे स्टेट प्रोहिबिशन ॲक्ट १९४९ क्लॉज १७ से. २, मध्यें भू-जल किंवा वायू-मार्गानें परदेशांतून भारतांत आलेली दारू ती परदेशी दारू असें म्हटलें आहे. तदनंतर २०।३।५० रोजीं मुंबई प्रदेश सरकारनें नं. १०४८४ नें ४५ एक नोटिफिकेशन काढून प्रवाही औषधें जीं भारतांत व भारतीय आयुर्वेदीय पद्धतीनें तयार केली जात आहेत, व ज्यांत स्वयंजनित कोहल आहे, ती सुद्धां परदेशी दारू (फॉरिन् लिकर) ह्या सदरांत घातलें असल्याचें विशद केलें आहे.

फॉरिन लिकर व आयुर्वेदीय आसवारिष्टें द्रव्यतः व गुणत हि विभिन्न असल्यानें आसवारिष्टांचा समावेश परदेशी दारूंत करूं नये. तसेंच कांहीं आसवारिष्टनिर्मितीस बॉण्ड आवश्यक ठेवला आहे, तो दूर करावा. निर्बंधित आसवारिष्टांवरील एक्साइज ड्यूटी रद्द करावी. तसेंच आसवारिष्टांवरील (स्पेशल व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निर्बंधित आसवारिष्टावरील) मादक (इन्टॉक्सिकंट) कर माफ करावा, असें हें अधिवेशन मुंबई सरकारास आग्रहानें सुचवीत आहे.

सूः— वै. पु. वि. धामणकर अ.— वै. रामभाऊ भोगे सर्वसंमत.

या कार्यासाठीं समितीची योजना

टीपः — ही गोष्ट सरकारचें नजरेस आणण्यासाठीं आजचें हें अधिवेशन १ वै. चिंदुमाधव पंडित, २ वै. ना. ह. जोशी, ३ वै. लक्ष्मीबाई दुधे, ४ वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी यांची एक समिति नियुक्त करीत आहे. या समितीनें कायद्याचा सल्ला अवश्य घ्यावा, आणि सरकारपुढें ही गोष्ट मांडतांना एक कायदा-सल्लागार व्यक्ति बरोबर घ्यावी. (समितीचे निमंत्रक वै. ना. ह. जोशी).

नियंत्रणें दूर करण्याची मागणी

प्र. ४— मुंबई-राज्यांत दारुबंदीचें धोरण आमलांत आणतांना आयुर्वेदीय पद्धतीनें तयार केलेलीं आसवारिष्टें, दारूऐवजीं पिऊन, मद्याची आलेली तलफ भागवून घेतो अशी समजूत करून घेऊन मुंबई सरकारनें आसवारिष्टांत निर्बंधित व मुक्त असे २ भाग पाडून कांहीं आसवारिष्टांवर अयोग्य व अशास्त्रीय नियंत्रण घालून त्याच्या निर्मितीस, विक्रीस व प्रसारास आळा घातला, यामुळें वैद्य व रुग्ण यांची अत्यंत गैरसोय झाली. तसेंच गेल्या १५ वर्षांच्या काळांत आसवारिष्टांचा उपयोग दारूची तलफ भागविण्याकरतां केलेला आढळत नाहीं. सरकारी कडक नियंत्रणामुळें निर्बंधित आसवारिष्टांचा खप अत्यंत कमी प्रमाणावर येऊन ठेपला आहे, ही गोष्ट आम्हीं सरकारच्या निदर्शनास आणूं इच्छितो. आणि म्हणून हें विशेषाधिवेशन आसवारिष्टांवरील नियंत्रणें दूर करण्याबावत सरकारास अत्यंत आग्रहाची विनंति करीत आहे.

सूचक—वै. पु. वि. धामणकर अ.— वै. यां. ह. देशपांडे सर्वसंमत

अफू भांग गांजा परवाने

प्र. ५— अफू, भांग, गांजा हे पदार्थ आयुर्वेदीय औषधी कल्पांत आयुर्वेदीय पद्धतीनें शुद्ध करूनच घातले जातात. तसेंच त्यांत त्या पदार्थांबरोबर तद्दोषक प्रतिकारार्थ अन्य द्रव्यें असल्यानें आणि त्यांनीं युक्त आयुर्वेदीय औषधी कल्प रुग्णांना उपयोगी व व्यसनी लोकांना निरुपयोगी होत असल्यानें त्या द्रव्ययुक्त औषधीकल्पावर व हीं द्रव्यें एकाकी स्थितींत असतांना असलेले सरकारी अबकारी निर्बंध नसावेत.

अफू, भांग, गांजा, मोहाचीं फुलें इ. पदार्थांची ने जा आण करण्याची लायसेन्स अगर परवाने मिळविण्यांत फार विलंब होतो व एकाच विलंबानें दुसरा परवाना विफल होतो. सबब ह्या द्रव्यांवरील वाहतुक नियंत्रण अधिक सोईचें करावें अशी या अधिवेशनाची सरकारला विनंति आहे.

सूचक— वै. वि. मो. दाते अ.– वै. अनंतशास्त्री जोशी सर्वसंमत

डायरेक्टर तज्ज्ञ वैद्य असावा

प्र. ६— मुंबई-राज्य सरकारनें 'डायरेक्टर ऑफ आयुर्वेद' हें स्थान निर्माण करून आयुर्वेदाकडे विशेष लक्ष दिल्याबद्दल आजचें हें विशेषाधिवेशन मुंबई सरकारचें अभिनंदन करीत असून या डायरेक्टरचे जागीं तज्ञ वैद्याचीच नियुक्ति करावी अशी सरकारास विनंति करीत आहे.

सू.—वै. विष्णुशास्त्री केळकर, नाशिक अ.— वैद्य हरिदत्तशास्त्री सर्वसंमत

मुंबई राज्य परिषद

प्र. ७— मुंबई राज्यांत प्रांतीय वैद्यांच्या मताचें प्रतिबिंब ज्यांत व्यक्त होऊं शकते अशा ४ व्यापक प्रादेशिक संघटना आहेत. त्या संघटनांचे अधिकृत प्रतिनिधि एकत्र येतील अशी संयुक्त मुंबईराज्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिषद (फेडरेशन) निर्माण व्हावी अशी ह्या अधिवेशनाची तीव्र इच्छा आहे. यासाठीं इतर संघटनांशीं विचारविनिमय करून ही योजना मूर्तस्वरूपांत आणण्यासाठीं हें विशेषाधिवेशन अधिकार देत आहे.

सू.—वै. वेणीमाधवशास्त्री अ.—वै. ना. ह. जोशी सर्वसंमत

स्वागत मंडळास धन्यवाद

प्र. ८— म. प्रां. वै. मं. च्या आजच्या ह्या अधिवेशनास निमंत्रण देऊन व उपस्थित प्रतिनिधींचें सर्व प्रकारें उचित आतिथ्य करून विशेषाधिवेशनाच्या सभा-कार्य व्यवस्थेचाहि सर्व भार शिरीं घेतला व हें विशेषाधिवेशन अत्यंत यशस्वी केलें याबद्दल म. प्रां. वै. चें हें विशेषाधिवेशन श्रीमंत वै. आबासाहेब यांच्या नेतृत्वाखालीं प्रस्थापित झालेल्या अधिवेशनास हार्दिक धन्यवाद देत आहे.

सू.— वै. ब्रह्मदत्तशर्मा अ.— वै. का. सी. भावे, सर्वसंमत

महारोग निवारण कार्यासाठीं समितीची स्थापना

राजकोट येथें फेब्रुवारी ५४ मध्यें मध्यवर्ती आरोग्य मंडळाच्या दुसऱ्या परिषदेंत सम्मत झालेल्या एका ठरावानुसार मध्यवर्ती आरोग्य खात्यानें महारोगावर नियंत्रण आणण्याच्या उपाययोजनावर विचार करण्यासाठीं एका समितीची स्थापना केली आहे. पं. बंगाल राज्याच्या वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य खात्याचे उपमंत्री या समितीचे अध्यक्ष असून मुंबई, मद्रास, ओरिसा व दिल्ली या राज्यांचे आरोग्यमंत्री वा त्यांचे प्रतिनिधी तिचे सदस्य आहेत.

ही समिति भारतांतील महारोगयाच्या प्रश्नांचे मूल्यमापन करून महारोग निवारण कार्याच्या सर्व अंगांत झालेल्या प्रगतीचें पुनर्विलोकन करील; तसेंच महारोगासंबंधीं असलेल्या सध्यांच्या कायद्याचा ही समिति अभ्यास करून त्यांत कांहीं दोष आढल्यास मध्यवर्ती व राज्य सरकारांसाठीं नवा योग्य असा कायदा सुचवील.

मध्यवर्ती व राज्य सरकारें आणि गांधी स्मारक निधी, कुष्ठ-निवारण संघ यासारख्या या क्षेत्रांत काम करणाऱ्या निरनिराळया स्वयंस्फूर्त संघटना यांच्या कार्यांत एकसूत्रता आणण्याचे दृष्टीनेंही समिति कांहीं सूचना करील.

समितीला आपला अहवाल सहा महिन्यांत सादर करावयाचा आहे.

पवित्र नेपाल कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तो.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहा:—नेपाल हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाल

मध्यप्रदेश सरकारमान्य (Recognized)
विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती
आयुर्वेदाचें सर्वांगपूर्ण शिक्षण देणारी संस्था. (१) शवच्छेदन, रुग्ण परीक्षा, नेत्ररोग, स्त्रीरोग, ऑपरेशन्स, रक्त, थुंकी, मूत्रपरीक्षण, आदींचें प्रत्यक्षासहित ज्ञान. (२) सरकारी आर्विन हॉस्पिटलमध्यें ऑपरेशन्स पाहाण्याची सोय. (३) सरकारी आयुर्वेद बोर्डामार्फत परीक्षा. (४) चार वर्षांचा डिग्री कोर्स, मॅट्रिक व इंटर पास विद्यार्थ्यांना प्रवेश. (५) बोर्डिंगची व्यवस्था, विद्यार्थिनींचे राहण्याची स्वतंत्र व्यवस्था. (६) महाविद्यालय २१ जून पासून सुरूं होतें.
माहितीपत्रक मागवा. —पं. दा. मुळे, प्रिन्सिपॉल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एका वैदूची कैफियत : (लि. आ. म.)

खेडेगांवांतून दिवसेंदिवस वैदूंची संख्या वाढत आहे व ते जनतेची फसवणूक करतात म्हणून त्यांचे विरुद्ध सरकार उपाय योजना करणार, असें कळल्यावरून आम्हां वैदूंचे म्हणणेंहि सरकारनें लक्षांत घ्यावें म्हणून ही कैफियत सादर करीत आहे.

सरकार काय करीत आहे ?

गरीबांना वैदूशिवाय गतीच नाहीं; कारण सरकार आज करोडो रुपये खर्च करून पुणें, मुंबई, अहमदाबाद अशा मोठ्या शहरीं दोनदोन कोट रुपये निव्वळ इमारतींत खर्च करून जीं ॲलोपॉथिक वैद्यकाचीं कॉलेजें चालवीत आहे, त्यांतून तयार होणाऱ्या डॉक्टरांचा तर ग्रामीण जनतेला कांहींदेखील उपयोग होण्यासारखा नाहीं. हे डॉक्टरलोक खेड्यांतील मनुष्य शहरांत औषधाकरितां आला म्हणजे आम्हां वैदूंपेक्षां पंचवीस पटीनें गरीबांना नाडतात.

डॉक्टरांचीं भरमसाट बिलें

क्विनाईन, पेनिसिलीन, पल्मोट्रोन अशा दहा आण्यांपासून एक रुपयापर्यंत मिळणाऱ्या इंजेक्शनला कमींत कमी चार ते सहा रुपयेपर्यंत बिल आकारतात व खेड्यावर गेले म्हणजे जरुरी नसतांना पैसे उकळण्याकरितां वरीलपैकीं एखादें सूचिकाभरण व शिवाय ग्लूकोज वगैरे ३-४ इंजेक्शनें एकदम देऊन ३०।४० रुपयांची मागणी करतात.

सरकारी मोफत हॉस्पिटलमध्यें ओळख, वशिला व पैसा याशिवाय गरीबांची मुळीं दादच लागत नाहीं. दाद एकदांची लागली तरी त्यांनीं लिहून दिलेलीं भारी किंमतीचीं औषधें व इंजेक्शनें विकत आणण्याचें आर्थिक दृष्ट्या सामर्थ्य नसल्यानें आपोआपच गरीब लोक आम्हां वैदूंची कास धरतात. 'आग रामेश्वरी आणि बंब सोमेश्वरी ' अशी गत सरकारी हॉस्पिटलमध्यें पुष्कळ वेळां होते, हें नुकत्याच धुळें येथें घडलेल्या पुढील हकीकतीवरून लक्षांत येईल:-

अस्थिभंग तंगडीचा, प्लॅस्टर मांडीला

१) एक गरीब मनुष्य बँकेचें टपाल घेऊन जात असतांना म्हशीचा कळप त्याचे अंगावरून गेला व तो सडकेवर मूर्च्छा येऊन पडला. नंतर त्याला सरकारी हॉस्पिटलमध्यें नेण्यांत आलें. पण तंगडीला अस्थिभंग असतांना मांडीला पलीस्तर करण्यांत आलें, व दोन महिन्यांत त्याचे गरीबीमुळें कोणी लक्ष न दिल्याकारणानें त्याला घरीं आणलें तेव्हां इतर डॉक्टरांचे लक्षांत ही चूक आली व शेवटीं त्याला मुंबई येथें टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्यें जाऊन पाय कापून काढावा लागला. अद्याप तो मनुष्य मुंबई येथें टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्येंच आहे. कोणीहि खात्री करून घ्यावी.

चष्म्याच्या नंबरासाठीं पैसे

२) एका गरीब विद्यार्थ्याच्या चष्म्याचे कांच फुटले होते म्हणून कांचांचा नंबर काढण्याकरितां तो सरकारी इस्पितळांत गेला; पण त्याला ' झिंक बोरीक ड्रॉप्स ' देण्यांत आले व आठ दिवसांनीं येण्यास सांगितलें. परगांवचा जाण्यायेण्याचा खर्च गरीबांना परवडत नाहीं असें पुनःपुनः सांगितलें तरी त्याला तेथें नंबर दिला नाहीं. अखेर तीन रुपये नेत्रतपासणीफी भीक मागून घरीं द्यावी लागली तेव्हां कांचांचे नंबर काढून मिळाले. अशीं शेंकडो नव्हे हजारों उदाहरणें नित्य घडत आहेत.

सरकारचें झोंपीं गेलेलें खातें

मुंबई येथें गेलीं तीन चार वर्षें कराचीवाला डॉ. आझाद नांवाचे कोणी हकीम सर्व वर्तमानपत्रांत नित्य जाहिरात करून व गोवा रेडिओवरून रोज जाहिरात करून कायद्याचा भंग करीत होते, तेव्हां मुंबई सरकारचें सर्जन-जनरलचें खातें काय करीत होतें ? त्याचप्रमाणें डॉ. पंजवाणी नांवाचे अनरजिस्टर्ड वैदू मुंबईप्रांतभर फिरून हजारों भित्तिपत्रकें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

…गून व वाढून शेकडो लोकांपासून हजारों रुपये उकळीत होते. अखेर लोकांनीं जेव्हां त्यांची फारच फसवणूक होत आहे असें सरकारला कळविलें तेव्हां त्या गृहस्थाचा पुणें येथें खटला चालू केला. पण अगोदर सरकारचें हें काम नव्हेत काय कीं शेकडो लोकांची फसवणूक होत आहे, तेव्हां ताबडताब याचा बंदोबस्त करावा.

गरीबांना वैदूशिवाय गतीच नाहीं

तेव्हां जोपर्यंत खाजगी व सरकारी दवाखान्यां तील व हॉस्पिटलमधील डॉक्टरलोकांत गरीबांबद्दल जिव्हाळा, निःस्वार्थबुद्धि, आत्मौपम्य दृष्टि व सेवा-वृत्ति दिसून येणार नाहीं तोपर्यंत खेडेगांवांतच काय पण जिल्ह्याचें ठिकाणींदेखील गरीबांना वैदूशिवाय गतीच नाहीं, हें निश्चित समजावें. अपवाद म्हणून कांहीं सज्जन डॉक्टर गरीबांबद्दल कळवळा असणारे आहेत, पण ते अपवाद म्हणूनच गणावे लागतील.

आयुर्वेद पत्रिकेच्या ग्राहकांस नम्र निवेदन

आयुर्वेद-पत्रिकेच्या पहिल्या वर्षाच्या पहिल्या अंकापासून अंक राखून ठेवलेले आहेत. तथापि त्यांत खालीलप्रमाणें कांहीं अंक आमचे संग्रहीं नाहींत. तरी ज्या ग्राहकांजवळ ते असतील, त्यांनीं पत्रानें तशी माहिती कार्यालयास कळवावी. —व्यवस्थापक

आयुर्वेद-पत्रिका, (वर्ष १ लें)

१ जुलै ४७ ते १ डिसें. ४७ अखेरचे अंक १ ते ११ अखेर ११ अंक.

१ जाने. ४८ ते १ मे ४८ अखेर, अंक १३ ते २० अखेर ८ अंक.

वर्ष २ रें

१ जुलै ४८ चा अंक १ ला

१ एप्रिल ४९ चा अंक १९ वा

१६ मे ४९ चा अंक २२ वा

१ जून ४९ चा अंक २३ वा

वर्ष ४ थें

दि. १६ सप्टेंबर ५० चा ६ वा अंक

दि. १ मे ५१ चा २१ वा अंक

दि. १६ मे ५१ चा २२ वा ,,

दि. १६ जून ५१ चा २४ वा ,,

वर्ष ५ वें

दि. १ नोव्हें. ५१चा ९वा अंक (वै.साठे विशेषांक)

दि. १ एप्रिल ५२ चा १९ वा अंक

दि. १ जून ५२ चा २३ वा अंक

वर्ष ६ वें

दि. १ एप्रिल ५३ चा १९ वा अंक

सांई

प्रेग-युटेरो

गर्भिणी-गर्भ-रक्षक

सविस्तर माहितीसाठीं लिहा

द.कृ.सांइ ब्रदर्स चेंबर लि. चेंबूर-मुंबई

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स-
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव

[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

पुणें येथें

' आयुर्वेद सेवा संघ, नासिक ' चीं
औषधें मिळण्याचें ठिकाण

किरण मेडिकल सर्व्हिस

नगरकर तालीम चौक, लक्ष्मीरोड, पुणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भारत-सरकार वैद्य-नोंदणी करणार

भारताच्या आरोग्य मंत्री राजकुमारी अमृतकौर यांनी कौन्सिल ऑफ् स्टेटसमध्यें नुकतेंच असें निवेदन केलें कीं, भारताच्या सार्वजनिक आरोग्यरक्षणाची योजना ही आधुनिक वैद्यशास्त्राच्या पायावरच आधारली जाईल, परन्तु त्याचबरोबर आयुर्वेदिक व युनानी वैद्यकाचें शास्त्रीय पद्धतीनुसार संशोधन करण्यासहि मदत व उत्तेजन दिले जाईल.

भारत व्यापी कायदा

त्यांनीं पुढें असेंहि सांगितलें कीं, जे लोक आयुर्वेदिक, युनानी व इतर पद्धतीनुसार विशिष्ट कालापासून वैद्यकीय व्यवसाय करीत आले आहेत त्यांच्याकरितां भारतव्यापी स्वरूपाचा वैद्यकीय-नोंदणी कायदा संमत करण्याचें भारत-सरकारनें ठरविलें आहे. सदर कायदा अस्तित्वांत आल्यानन्तर त्यापुढें विगर नोंदलेल्या लोकांना वैद्यकीय व्यवसाय करतां येणार नाहीं. सरकारच्या मध्यवर्ति आरोग्य मंडळाच्या कार्यकारी समितीपुढें येत्या बैठकींत सदरहू कायद्याचा मसुदा छाननीकरितां ठेवण्यांत येईल.

पैसा पडून आहे

पंचवार्षिक योजनेंत भारतांतील ग्रामीण भागांत समाज कल्याण योजना सुरू झाल्या आहेत. या योजनासाठीं पुरेशा पैशाचीहि व्यवस्था करण्यांत आली आहे. तथापि या योजनांची यशस्विता तज्ज्ञ समाजसेवकावर अवलंबून आहे. अशा समाजसेवकांचा अभाव आहे त्यामुळें आजच्या पंचवार्षिक योजनेंत शिक्षण व आरोग्य विषयक योजनासाठीं मंजूर केलेला पैसा पडून आहे. —सौ. दुर्गाबाई देशमुख

आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारीं आयुर्वेदिक व युनानी वनौषधि तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण!

अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक खाका, माणिक, अकीक, सुवर्ण-वर्ख, रौप्य-वर्ख, शिंपा, कवड्या, शंख, प्रवाळ, आंवळसार गंधक, दगडीबेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, वाकेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलटकंबल, नागकेशर (अस्सली), ब्राम्ही, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारची वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य! विशेष माहितीसाठीं आमचें साप्ताहिक दरांचें छापील भावपत्रक मागवावें.

टे. फो. नं. ३१७९६ टेलिग्रॅम-'आयुर्वेद'

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोषक्षीणता व रोग :

लेखक:-वैद्य नृसिंहाचार्य बागेवाडीकर
आयुर्वेदचिकित्सक, सोलापूर

दोषक्षीणतेनें रोग उत्पन्न होतात कीं नाहीं ? या माझ्या प्रश्नास विद्वान् वैद्यांकडून नकारात्मक उत्तरें येऊं लागलीं ही फार चांगली गोष्ट आहे. हा आयुर्वेदाचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. त्रिदोषाशिवाय आयुर्वेदाचें अस्तित्व म्हणजे प्राणाशिवाय असलेल्या शरिरासारखें आहे, म्हणून आपण त्रिदोषाविषयीं असलेलें वाङ्मय संकलित करावें आणि शक्य तों त्याचा व्यवहार करावा असें मला वाटूं लागलें, व त्या दृष्टीनें मी चरक, सुश्रुत वाग्भट या ग्रंथांतील (त्रिदोषात्मक) वाङ्मय पाहूं लागलों. या तीनहि ग्रंथांत रोग आणि आरोग्याची व्याख्या त्रिदोषांना धरून केलेली आढळली. रोग म्हणजे "धातुवैषम्य". या 'धातु' शब्दानें दोष, रसादि सप्त धातु आणि मल यांचें वैषम्य म्हणजे रोग अशी चरकाची व्याख्या आहे, तर वाग्भट म्हणतो कीं, दोषवैषम्य म्हणजे रोग (रोगस्तु दोषवैषम्यम्). या दोनहि व्याख्येंत दोषांना प्राधान्य दिलें गेलें आहे. या ठिकाणीं दोष हें रोगाला कारण असतां त्यांच्या वैषम्यास रोग कां म्हटलें ? अशी एक शंका उत्पन्न होते. रोग म्हणजे दोषांचें कार्य आहे. या कार्यास रोग म्हणणें जास्त योग्य. कारणांस कार्य असें कोणी म्हणत नाहीं. उदा. घटाच्या उत्पत्तीस कारण असलेलीं मृत्, जल, इ. जीं कारणें आहेत त्यांना कोणी घट म्हणत नाहीं. असें असतांना या ठिकाणीं दोषवैषम्यरुपी कारणास रोग असें कां संबोधिलें ? याचें उत्तर अरुणदत्तानें पुढीलप्रमाणें दिलें आहे. " ततःकार्यकारणयोरभेदेन पठितो रोग इति ।. " कार्य आणि कारण यांच्यामध्यें भेद नाहीं असें सांगितलें असल्यामुळें आम्ही दोषवैषम्यास रोग असें म्हणतो. घटास जशी मृत्तिका ही उपादान कारण आहे तसेंच दोषवैषम्य हें रोगाचें समवायी कारण आहे. दोषांत वैषम्य निर्माण झाल्याबरोबर त्यांना सम करावें लागतें. चिकित्सेस खरी सुरुवात येथूनच होते. दोषसाम्य म्हणजे आरोग्य, या आरोग्याचें रक्षण करण्यासाठीं आयुर्वेदाचा जन्म आहे. रोग किंवा आरोग्य शरीरस्थ असल्यामुळें या शरिरासंबंधीं प्राचीन आचार्य काय म्हणतात तें पाहूं.

वैद्य नृसिंहाचार्य बागेवाडीकर

'शरीर' शब्दाची व्युत्पत्ति व त्याचें अस्थायित्व

"शीर्यते इति शरीरम्" अशी शरीर शब्दाची व्युत्पत्ति आहे. प्राण्यांचीं शरीरें प्रतिक्षणीं क्षीण होत असतात म्हणून त्यांस शरीर असें संबोधिलें आहे. हें शरीर क्षीयमाण कां ? असा प्रश्न उत्पन्न होतो. शरीर हें पंचमहाभूतात्मक आहे. या महाभूतांची उत्पत्ति प्रकृतीपासून झालेली आहे. प्रकृति ही परिणमनशील आहे. हें प्रकृतींतील परिणमन सत्व, रज, तम या गुणांमुळें परिणाम पद्धतीनें होत असतें. या प्रकृतीच्या परिणमनांतून पंचमहाभूतें उत्पन्न झालीं आहेत. चराचर सृष्टींतील सर्व द्रव्यें परिणामक्रम-नियमानें बदलत असतात. हा बदल दोन प्रकारचा आहे. १ साम्यावस्थेंतून वैषम्यावस्था, २ वैषम्यावस्थेंतून साम्यावस्था. ही साम्यावस्था आणि वैषम्यावस्था त्रिगुणांची आहे, त्रिदोषांची नव्हे. सृष्टींतील सर्व द्रव्यें त्रिगुणांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैषम्यांतून निर्माण होऊन ती परत त्रिगुणांच्या साम्यावस्थेंत विलीन होतात. या दोन्ही क्रिया एकाच वेळी चालू असतात. शरीर हें गर्भावस्थेपासून तारुण्यावस्थेपर्यंत वृद्धि पावत असतें, नंतर कांहीं काल स्थिर आहे असें वाटतें, आणि वृद्धावस्थेंत क्षीण होतें. या ज्या शरीराच्या तीन अवस्था आपणांस दिसतात, त्या त्रिगुणांच्या वैषम्यामुळेंच. या वैषम्यावस्थेंत आपणांस एकंदर वृद्धीच दिसते. या अवस्थवरोवरच त्रिगुण हे पण साम्यावस्थेकडे जात असतात म्हणून शरीर हें क्षीण होत असतें. उदा. माणूस हा जसजसा मोठा होत असतो, तसतसें त्याचें आयुर्मान कमी होतें. आपण आपला स्वतःचा किंवा मुलाबाळांचा वाढदिवस साजरा करतो, खरोखर तो दिवस म्हणजे आपल्या आयुष्यांतील क्षीण दिवस होय. याची कल्पना सामान्य माणसास येत नाहीं. याचप्रमाणें शरीरांत सजीव परमाणूंचा संयोग आणि विभाग चालू असतो. संयोगात्मक कार्य अधिक असतें, तेव्हां शरीराची वाढ होते आणि विभागात्मक कार्य प्रभावी असतें, त्यावेळीं शरीर क्षीण होत राहतें. या कार्याचें ज्ञानहि सामान्य माणसांना नसतें. अशा रीतीनें शरीर हें क्षीण होण्याकडे झुकलेलें असल्यामुळें तें नाशवंत आहे, असें आपण म्हणतो. याचें कारण असें आहे कीं, शरीर हें प्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या पंचमहाभूतांची विकृति आहे. विकृतीचा नाश म्हणजे मरण होय. (मरणं प्रकृतिः शरीरिणां विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः ।) विद्वान् लोक मरण म्हणजे प्रकृति आणि जीवन म्हणजे विकृति असें म्हणतात. सांख्यांच्या दृष्टिकोनांतून बोलावयाचें झाल्यास मरण म्हणजे त्रिगुणांचा साम्यावस्थेंत होणारा लय होय. अशा या नाशवंत शरीराविषयीं आयुर्वेदाचार्य काय म्हणतात तें पाहूं:—

आयुर्वेदांतील चिकित्सा पुरुष (शरीर)

आयुर्वेदाचार्यांनीं शरीराची व्याख्या पुढीलप्रमाणें केली आहे. " चेतनेचें (आत्म्याचें) अधिष्ठान असलेला, समयोगानीं चालणारा, पंचमहाभूतांचा विकार-समुदाय म्हणजे शरीर. (शरीरं नाम चेतनाधिष्ठानभूतं पंचमहाभूतविकारसमुदायात्मकं समयोगवाहि । च. शा. अ. ६-४०)

चेतना धातु आणि पंच-महा-भूतांपासून उत्पन्न झालेलें, रसादि धातु यांच्या योग्य प्रमाणांनीं बनलेलें व सम्यक् रीत्या चाललेलें असें हें शरीर आहे असें चक्रदत्त म्हणतो. या ठिकाणीं पंचमहाभूतांचे विकार म्हणजे केवळ रसादि धातु न म्हणतां त्रिधातु, रसादि सप्त धातु आणि मल यांचा उल्लेख करावयास पाहिजे; त्याशिवाय पुढील सूत्रांचा संगति लावतां येणार नाहीं. " दोषधातुमलामूलं हि शरीरम् " शरीर हें दोषधातु- लात्मक आहे, यांच्या योग्य प्रमाणबद्ध समवायानें शरीर निरोगी राहते, म्हणून या ठिकाणीं शरीर हें चेतनाधिष्ठित दोषधातुमलात्मक आहे असें म्हणणें जास्त योग्य होईल. दोष, धातु, मलांचें साम्य म्हणजे आरोग्य आणि वैषम्य म्हणजे रोग. या व्याख्येशींहि ही मांडणी जुळते. हें जें आयुर्वेदांतील रीर तेंहि त्रिगुणांच्या वैषम्यांतून निर्माण झालेलें आहे. तें परत त्रिगुणांच्या साम्यावस्थेंत विलीन होणारच. या शरीराचे जे मूल घटक दोष, धातु आणि मल हेहि त्रिगुणांचे विकार आहेत. यापैकीं त्रिदोष हे त्रिगुणात्मक असल्याचा उल्लेख आयुर्वेदांत सांपडतो. " भिन्नादोषास्त्रयो गुणाः ॥ गुणा गुणमयाः सत्वरजस्तमोमयाः, तद्यथा रजोभूयिष्ठो मारुतः रजो हि प्रवर्तकं सर्वभावानां, पित्तं सत्त्वोत्कटं लघुप्रकाशकत्वात्, कफः तमोबहुलः गुरुप्रावरणात्मकत्वात् इत्याहुर्भिषजः ॥ (सु. उ. तं. अ. ६६)

या विचारसरणीवरून असें दिसून येतें कीं, वैद्यांनीं पंचमहाभूतांच्या पंचीकरणाच्या सिद्धांतांतून त्रिवृत्करणाच्या सांख्य सिद्धांतांत आयुर्वेदाच्या मूळ सिद्धांताचें परिवर्तन केलें आहे. हें वरील विवेचनावरून कळून येईल. त्रिदोष हें त्रिगुणाप्रमाणेंच विकार उत्पन्न करणारे आहेत. ते सम असतांना विकार उत्पन्न करीत नाहींत. पण ते त्रिगुणात्मक असल्यामुळें त्यांची मूळ प्रकृतींत लय पावण्याची प्रवृत्ति मात्र कायम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असते, म्हणून शरीर हें क्षीण होत जातें व प्राणी मरतो. आतां आपण त्रिगुण आणि त्रिदोष यांच्या कार्यातील साधर्म्य आणि वैधर्म्य यांचा विचार करूं. त्याशिवाय आपणांस विकारांचें ज्ञान नीट होणार नाहीं.

त्रिगुण आणि त्रिदोष

सांख्यांचें म्हणणें असें आहे कीं, सर्व चराचर सृष्टि प्रकृतीपासून उत्पन्न झाली आहे. या प्रकृतींत असणाऱ्या त्रिगुणांच्या वैषम्यामुळें सृष्टींत अनेक प्रकारचीं द्रव्यें उत्पन्न होतात म्हणजे अविशेष अशा प्रकृतीपासून विशेष द्रव्यें निर्माण होतात. प्रकृतींत असणारे हे जे त्रिगुण यांत वैषम्य निर्माण होतें म्हणजे तरी काय ? या त्रिगुणांपैकीं कोणत्या तरी एका गुणाची वृद्धि होते आणि तो गुण दुसऱ्या गुणावर आपला प्रभाव पाडून त्याची वृद्धि करतो, यामुळें या वैषम्ययुक्त गुणाकडून अनेक प्रकारचीं द्रव्यें उत्पन्न केलीं जातात. यावरून त्रिगुणांचें वैषम्य हें केवळ वृद्धिजन्यच आहे हें दिसून येईल. या सृष्टींत उत्पन्न झालेलीं द्रव्यें नाश कशी पावतात ? त्रिगुण हे जसे वैषम्यावस्थेंत जातात तसेच ते परत साम्यावस्थेंत जात असतात. ते साम्यावस्थेकडे गेले म्हणजे त्या द्रव्यांचा नाश होतो, या क्रियेस ' अनुलोम सर्ग ' असें म्हणतात. आणि वृद्धिजन्य अवस्थेंत ' विलोम सर्ग ' असें म्हणतात. त्रिगुणांची वृध्दिजन्य अवस्था म्हणजे द्रव्यांची उत्पत्ति, स्थिति या अवस्था होत, आणि क्षीण अवस्था म्हणजे त्यांचा लय होण्याची अवस्था होय. अशाप्रकारच्या दोन अवस्था (द्रव्यांच्या) सांख्यांनीं ठरविल्या आहेत. आतां आपण आयुर्वेदाचार्यांनीं त्रिदोषांची कोणती व्यवस्था केली आहे तें पाहूं.

ज्याप्रमाणें सृष्टींतील विकारास त्रिगुण हे कारण आहेत त्याचप्रमाणें शरिरांतील एकंदर भावाच्या उत्पत्तीला कारण त्रिदोष हे आहेत. (वातपित्तश्लेष्माणः देहसंभवहेतवः). यांची साम्यावस्था म्हणजे आरोग्य आणि वैषम्यावस्था म्हणजे रोग (विकार). या ठिकाणीं अशी एक शंका उत्पन्न होते कीं, त्रिगुणांच्या साम्यावस्थेंत विकार उत्पन्न होत नाहींत आणि त्रिदोषांच्या साम्यावस्थेंत भाव उत्पन्न होतात तें कसें ? याच्या स्पष्टीकरणार्थ त्यांच्या साधर्म्यांचा आणि वैधर्म्यांचा विचार करूं.

साधर्म्य	वैधर्म्य
१ तीन संख्येचें	१ गुणसाम्य म्हणजे प्रकृति (विकाररहित)
२ गुण आणि दोष हीं द्रव्यें	२ दोषवैषम्यज प्रकृति (आयुर्वेद)
३ द्रव्यारंभकत्व	३ दोषवैषम्य प्रकृतींतील वैषम्य म्हणजे विकार प्रकार, वृद्धि आणि क्षय. (आयुर्वेद)
४ विकारोत्पादकत्व	४ गुणवैषम्य म्हणजे विकार. केवळ वृद्धिजय

सांख्याची प्रकृति म्हणजे त्रिगुणांचें साम्य. (सत्वरजस्तमसां साम्यावस्था प्रकृतिः) या अवस्थेंत त्रिगुण कर्तृत्वहीन असल्यामुळें विकार उत्पन्न होत नाहींत. आयुर्वेदीय प्रकृतींत दोषांचें कार्य सुरू असते व तींत त्रिदोषांचें वैषम्य असते. हा प्रकृतीतील दोन शास्त्रांत असणारा महत्वाचा फरक आहे.

विकार– सांख्यांचें म्हणणें असें आहे कीं, गुणवृद्धीमुळें विकार उत्पन्न होतात. आयुर्वेदाचार्यांचें असें मत आहे कीं, दोषांच्या वृद्धीनें व क्षयानें विकार उत्पन्न होतात.

वरील विचारसरणीवरून आपणांस असें दिसून येईल कीं, सांख्यांच्या विकारांची उत्पत्ति केवळ गुणवृद्धीमुळें होते. या विकारांचा नाश ते परत सम झाले असतां होतो. या उत्पत्तींत गुणांचा क्षय नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदांतील प्रकृति ही वैषम्यमूलक आहे. म्हणून पुरुषाची प्रकृति सांगितली आहे. उदा. वातज, पित्तज, कफज इ. या प्रकृतींत वैषम्य निर्माण झालें कीं विकार उत्पन्न होतात. याप्रमाणें या दोन शास्त्रांत भेद असले तरी आयुर्वेदाचार्यांनीं परिणामवादाचा अवलंब केला असून त्यास अनुसरून अनेक ठिकाणीं त्यांनीं आपले सिद्धांत मांडले आहेत. म्हणून परिणामवाद म्हणजे काय याचा विचार करूं.

परिणामवादः- त्रिगुणांच्या साम्यावस्थेंतून वैषम्य निर्माण होणें, किंवा अविशेषांतून विशेष निर्माण होणें, किंवा अयुतसिद्ध द्रव्यांतून युतसिद्ध द्रव्यें उत्पन्न होणें. या कार्यास उत्क्रांति असेंहि म्हणतात. हें कार्य विशिष्ट नियमबद्ध चालूं असतें.

परिणामक्रम नियमः- अल्प वैषम्यांतून अधिक वैषम्य निर्माण होणें किंवा अल्प विशेषांतून अधिक वैषम्य उत्पन्न होणें.

या नियमास अनुसरून आयुर्वेदांतील चिकित्सा पुरुषांत असणाऱ्या अल्प वैषम्यांतून (वातज प्रकृति) अधिक वैषम्य निर्माण झाल्यास त्यांस विकार असें म्हणतात. ही त्यांची मांडणी परिणामक्रम नियमास धरून आहे.

दुसरें उदाहरण म्हणून असें देतां येईल कीं, आकाशांतून पडणाऱ्या उदकापासून षड्रसात्मक द्रव्यांची उत्पत्ति. ही कशी होते याचें स्पष्टीकरण वाचस्पतीनें पुढीलप्रमाणें केलें आहे.

" कथं अेकरूपाणां गुणानां अनेकरूपा प्रवृत्तिः इत्यत आह परिणामतः सलिलवत्। यथा वारिद-विमुक्तं उदकं अेकरसं अपि तत्तद्भूतविकारान् आसाद्य नारिकेलतालीबिल्वचिरबिल्वतिन्दुकामलककपित्थ-फलरसतया परिणामात् मधुराम्ललवणातिक्तकटुकषायतया विकल्पते ।" (कौमुदी १६)

या नियमाप्रमाणें आयुर्वेदाचार्यांनीं त्रिदोषापासून जे विकार उत्पन्न होतात ते वृद्धिजन्य मानले आहेत. विशेषतः चरकाचार्य हे परिणामवादाचे पुरस्कर्ते असल्यामुळें त्यांनीं विकारामध्यें (रोगांत) वृद्धिजन्य विकारांना प्राधान्य देऊन रोग निदान आणि चिकित्सा लिहिली आहे. याची जाणीव वाग्भटास झालेली दिसते, म्हणून त्यांनीं क्षीण दोषांना महत्व दिलें आहे. तरीपण वाग्भटांनीं क्षीण दोषांचा विचार निदान-चिकित्सेंत केला नाहीं. असो. वाग्भटांनीं क्षीण दोषासंबंधीं कोणते विचार मांडले आहेत तें पाहूं.

वाग्भटांनीं दोष-क्षीणतेस दिलेलें महत्व

" शीर्यते इति शरीरम् " या व्याख्येप्रमाणें षड्धात्वात्मक पुरुषहि क्षीयमाण आहे. हा क्षीयमाण होण्यास दोषवृद्धि आणि दोषक्षीणता हींच प्रमुख कारणें आहेत. या कारणांकडे वैद्यांनीं लक्ष देणें आवश्यक आहे. या दोन्ही कारणांकडे जे लक्ष देत नाहींत ते रोग्याचा नाश करतात म्हणून वाग्भटानें त्यांना 'अबुध' असें म्हटलें आहे. इकडे वैद्यांनीं सावधानपणें पाहावें अशी मी त्यांना सूचना करतो.

" कुर्वते हि रुचिं दोषा विपरीतसमानयोः ।
" वृध्दाः क्षीणाश्च भूयिष्ठं लक्षयंत्यबुधास्तु न ॥ वा सू. अ. ११

वाग्भटाच्या कालींहि दोषांच्या क्षीणावस्थेकडे वैद्य लोक फारसें लक्ष देत नसावेत, म्हणून त्यास वैद्यांना सूचना द्यावी लागली आहे. हें पुढील सूत्रावरून दिसतें. हें सूत्र सांगण्यापूर्वीं अरुणदत्तानें जी थोडी प्रस्तावना केली आहे, ती वैद्यांचे लक्ष जावें म्हणून मुद्दाम उद्धृत करीत आहे.

" क्षीणा दोषाः क्षीणत्वादेवाकिंचित्करत्वात् कदाचित् पीडां नोत्पादयन्त्येव इति विचिन्त्याल्पमतयो वैद्याः क्षीणदोषवर्धनार्थं कदाचिदनादरं कुर्युः इत्याह "

दोष क्षीण झाल्यानंतर त्यांच्या ठिकाणीं कर्तृत्व नसल्यामुळें ते कदाचित् पीडा करणार नाहींत असें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मानूत अल्पबुद्धीचे वैद्य दोषक्षीणतेकडे दुर्लक्ष करतील म्हणून वाग्भट म्हणतोः-

य एव देहस्य समा विवृद्धयै त एव दोषा विषमा वधाय।
यस्मादतस्ते हितचर्ययैव क्षयात् विवृद्धेरिव रक्षणीयाः ॥ वा. सू. अ. ११

ज्याप्रमाणें आपण आज वृद्ध दोषापासून शरिराचें रक्षण करतो, त्याप्रमाणें दोषक्षीणतेपासून शरिराचें रक्षण करीत नाहीं. वाग्भटाच्या काळीं हीच स्थिति असली पाहिजे हें वरील सूत्रावरून दिसतें. वाग्भट ग्रंथाचीं पारायणें करणारे वैद्य आज समाजांत आहेत, पण त्यांतील सूत्रांचा व्यवहार करणारे मात्र नाहींत. वाग्भटानें क्षीण दोषांचा विचार करावयास पाहिजे असें निक्षून सांगूनहि आजचा वैद्यवर्ग तिकडे दुर्लक्ष करीत आहे हें वैद्य डेग्वेकर, वैद्य पांडुरंगशास्त्री देशपांडे, वैद्य आठींकर यांच्या लेखावरून दिसतें. वैद्य प्रि. वि. डेग्वेकर हे तर क्षीणजन्य पंचवीस प्रकारांचा निदान-चिकित्सेंत विचार करण्याची आवश्यकता नाहीं असें म्हणतात. "अतः प्राचीन ग्रंथचतुष्टयमें इन दोषक्षयजन्य पंचविंशति विकारोंका विस्तार नहीं किया है और न उसकी आवश्यकता ही प्रतीत होती है"। (सचित्र आयुर्वेद, एप्रिल १९५४ पान ९४२)

श्री. वैद्य डेग्वेकर हे माझ्यापेक्षां विद्वान् आहेत, वयोवृद्ध आहेत. त्यांचा अनादर व्हावा किंवा करावा अशी माझी इच्छा नाहीं. त्यांना दोषक्षयाचा विचार करण्याचें कारण नाहीं. असें जें वाटतें याचे कारण असें आहे कीं, चरककालापासून आजतागायत जी शिक्षणप्रणाली आहे तींत दोषक्षीणता ही रोगोत्पादक आहे याचें शिक्षणच दिलें गेलें नाहीं. मी त्यांना वाग्भटाच्या "लक्षयन्त्यबुधास्तु न" या सूत्राकडे लक्ष देण्याची विनंति करतो. प्राचीन ग्रंथांत दोषक्षीणतेचा विस्तार कोठें कसा केला आहे, याचा विचार आपुढें करूं.

दोषक्षीणतेचा विस्तार

वाग्भटानें रोग म्हणजे दोषवैषम्य (रोगस्तु दोषवैषम्यम्) अशी व्याख्या केली आहे. वैषम्य हें दोन प्रकारचें आहे. १ दोषवृद्धि २ दोषक्षीणता. या वैषम्याचें स्पष्टीकरण अरुणदत्तानें पुढीलप्रमाणें केलें आहे. "दोषादीनां वातादीनां वैषम्यं स्वप्रमाणात् एकस्य द्वयोस्त्रयाणां वा वृद्धिः क्षयो वा" वातादिदोषांची स्वप्रमाणापेक्षां एकाची दोहोंची किंवा तीहींची वृद्धि किंवा क्षय म्हणजे वैषम्य होय. या वैषम्यावस्थेंत दोषांची स्वरूपापासून च्युति होते म्हणून शरीरांत पीडा उत्पन्न होते. म्हणून वृद्धिक्षयजन्य अवस्थेस रोग असें म्हटलें आहे. (रुजाकरत्वात् रोगः एव वैषम्यम् स्वरूपात् च्यावः। -अरुणदत्त)

दोषवृद्धीमुळेंच शरीरांत रुजाकरत्व येतें व दोषक्षीणतेमुळें रुजाकरत्व येत नाहीं असें कांहीं वैद्यांना वाटतें तें कसें चुकीचें आहे हें अरुणदत्ताच्या वरील उताऱ्यावरून कळून येईल.

हल्लीं समाजांत दोषक्षीणतेनें रोग उत्पन्न होत असल्याचा अनुभवहि येतो. एखाद्या माणसास आघातामुळें रक्तस्राव अति होतो किंवा रक्तपित्त विकारांत अति रक्तस्राव होतो यामुळें रक्त-धातु क्षीण होतो. या अवस्थेंत रक्ताश्रयि पित्तहि क्षीण होतें. या ठिकाणीं रक्तवृद्धीसाठीं रक्त पिण्यास सांगितलें आहे, हें "वृद्धिः समानैः सर्वेषाम्" या न्यायानें ठीक आहे. पण आम पित्तयुक्त यकृत् कां खाण्यास सांगितलें? (अतिनिसृत-रक्तश्चैद्रेण रुधिरं पिबेत्। जांगलं भक्षयेद्वाजमामपित्तयुतं यकृत् ॥ वा. चि. अ. २ श्लो. ३०) याची उपपत्ति रक्तक्षीणता आणि पित्तक्षीणता मानल्याशिवाय लागत नाहीं, म्हणून इकडे अल्पमतिमान् वैद्यांनीं लक्ष द्यावें. रक्तपित्त विकारांत प्रथम हीं दोन्ही प्रकुपित होतात, नंतर रक्तधातूचा अतिविसर्ग झाल्यामुळें रक्तक्षीणता व पित्तक्षीणता उत्पन्न होते. असे अनेक रोग आहेत कीं, प्रथम दोषप्रकोप होऊन नंतर दोष क्षीण होतात. याप्रमाणें दोष क्षीण झाले असतां रुजा होते म्हणून आपणांस याचें ज्ञान आवश्यक आहे,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इतकेंच मला वैद्यवर्गाच्या निदर्शनास आणावयाचें आहे. अशा रीतीनें क्षीण दोषामुळें विकार उत्पन्न होत असल्यामुळेंच यांचे तर तम भावानें संसर्गज सन्निपातज प्रकार ग्रंथांतरीं पाडलेले आहेत.

वृद्धिप्रमाणेंच क्षयज प्रकार

" संसर्गः सन्निपातश्च तद्द्वित्रिक्षयकोपतः ॥ वा. सू. अ. १--१२

द्वयोः स्वप्रमाणाधिकयोः क्षीणयोर्वा संयोगः संसर्गः। त्रयाणां दोषाणां वृद्धानां क्षीणानां वा संयोगः सन्निपातः

वृद्ध किंवा क्षीण दोन दोषांच्या संयोगास संसर्गज विकार असें म्हणतात. तीन दोषांच्या वृद्ध वा क्षीण संयोगास सन्निपात असें म्हणतात. हल्लीं वैद्यवर्ग केवल वृद्धिजन्य संसर्ग आणि सन्निपात जाणतो. क्षीणजन्य संसर्ग आणि सन्निपातज विकार असतात ही कल्पनासुद्धां त्यांना सह्य होत नाहीं. रोगांच्या विशिष्ट अवस्थाचें ज्ञान व्हावें या हेतूनें हे प्रकार पाडले आहेत.ज्याप्रमाणें वृद्धिजन्य संसर्गज किंवा सन्निपातज विकारांचे ज्ञान चिकित्सेंत उपयोगी आहे, त्याचप्रमाणें क्षयज संसर्गाच्या किंवा सन्निपातज विकारांच्या ज्ञानाचा उपयोग चिकित्सेंत आहे. क्षयज प्रकारांचा उल्लेख निदान-चिकित्सेंत ग्रंथकारांनीं सांगितला नाहीं म्हणून ही अवस्था विकारांत उत्पन्न होत नाहीं असें मानून चालणार नाहीं. हें वरील रक्तपित्ताच्या उदाहरणावरून लक्षांत येईल. याशिवाय आणखी कांहीं रोग असे आहेत कीं, ग्रंथांत त्यांचीं लक्षणें स्पष्ट लिहिलींच नाहींत, प्रत्यक्ष लक्षणें पाहून आपणांस या अवस्था लिहाव्या लागतील. उदा. विषूचिका या रोगाचें घेतां येईल. विषूचिका म्हणजे कॉलरा असें वैद्य लोक समजतात, असें मला वाटतें. विषूचिकेच्या लक्षणांत हात पाय अंग गार पडणें, नाडी क्षीण होणें, मुत्रोत्पत्ति न होणें, चेहरा काळवंडणें, इ. लक्षणें लिहिलेलीं नाहींत. कॉलऱ्यांतील ही लक्षणें, दोषवृद्धीचीं आहेत कीं दोषक्षयाचीं आहेत याचें ज्ञान किती वैद्यांस आहे ? हीं लक्षणें दोषक्षयाचीं आहेत असें मला वाटतें. या अवस्थेंत पित्त आणि कफ हे दोन दोष क्षीण होतात. या रोगांत प्रथम वातादि दोष प्रकुपित होऊन वांति आणि अतिसार उत्पन्न करतात, नंतर वांतीच्या द्वारें कफाचा विसर्ग, आणि अतिसारद्वारें पित्ताचा विसर्ग होऊं लागतो. हा विसर्ग अतिप्रमाणांत होऊन कफ आणि पित्त क्षीण होतात. (क्षयं चातिविसर्गतः) पाश्चात्य वैद्यक या रोगांत केवल आप धातु क्षीण होतो असें म्हणतें, तर आयुर्वेद या अवस्थेंत कफ आणि पित्त क्षीण होतात असें म्हणतो. पाश्चात्य वैद्यकांत पित्ताची उत्पत्ति नसते असेंहि म्हटलें आहे.

पित्तक्षयाचीं लक्षणें:- अग्निमांद्य, प्रभाहानि, अंग गार पडणें.

कफक्षयाचीं लक्षणें:- सांधे गळणें, श्लेष्माशयशून्यत्व, भ्रम, हृद्द्रव इ. समान गुणात्मक द्रव्यांची लक्षणें, तृषा वाढणें.

या विकारांत शरीरांतील आप धातु अतिशय बाहेर गेल्यामुळें कफाच्या क्षीणतेचीं लक्षणें उत्पन्न होतात, म्हणून रोगी पाणी मागतो. कफाचें महत्वाचें कार्य जें अंबुकर्मानीं इतर श्लेष्मस्थानांना बल देण्याचें तें या अवस्थेंत घडत नाहीं; तसेंच रस धातु क्षीण झाला असल्यामुळें हृद्द्रव हें लक्षण उत्पन्न होतें.

पित्त क्षीण झाल्यामुळें शरिराचें स्वाभाविक उष्णतामान कमी होऊन ९५ अंशाच्याहि खालीं येतें. रोग्याचें अंग गार पडतें, हातपाय गार पडतात. पित्ताच्या स्वाभाविक कर्माची हानि होत असल्यामुळें हीं लक्षणें दिसतात.

हे दोन दोष जरी क्षीण झाले असले तरी वात मात्र कुपित असतो. कांहा कांहीं रोग्यांत वात झाल्यामुळें श्वासोच्छ्वास क्षीण होऊन रोगी मृत्युमुखीं पडतो. तसेंच मलमूत्रप्रवृत्ति नसते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या अवस्थेंत दोषक्षीणतेचें ज्ञान वैद्यास आवश्यक आहे. कफक्षीण आहे म्हणून नारिकेलोदक देणें, पाणी देणें, ही चिकित्सा किती आवश्यक आहे याचा विचार आपण अवश्य करावा. पित्त क्षीण असल्यामुळें अम्ल, कटु रसात्मक द्रव्यांचा रस देणें, उदा. लिंबाचा रस, आल्याचा रस इ. द्रव्यें दिलीं असतां रोगी बरा होतो हा अनुभव काय दर्शवितो ? अशा रीतीनें जर दोष क्षीण आहेत याचें ज्ञान वैद्यांस झालें तर रोगी वांचेल व त्याचे पदरीं यश पडेल. अशा रीतीनें दोषक्षीणता ही रोग्याच्या देहाचा नाश करूं शकते म्हणून वाग्भटानें दोषक्षयापासून देहाचें रक्षण करावें असें म्हटलें आहे तें सार्थ आहे, याचा विचार आपण करावा ही विनंति. दोषवृद्धिजन्य रोगांत दोषक्षीण होतात याची कल्पना वरील विवेचनावरून आपणांस आली असेलच. आतां आपण स्वतंत्रपणें दोष क्षीण होतात कीं नाहीं व त्यांचीं कारणें कोणतीं याचा विचार करूं.

दोषक्षयाचीं कारणें

व्यायामोऽनशनं चिन्ता रूक्षाल्पप्रमिताशनम् । वातातपो भयं शोको रूक्षपानं प्रजागरः ॥ ७६ ॥
कफशोणितशुक्राणामतिवर्तनमोक्षणम् । कालो भूतोपघातश्च विज्ञेयाः क्षयहेतवः ॥७७॥ च. सू. अ. १७

व्यायाम, अनशन, चिंता, रूक्ष आहार, प्रमिताशन (एकरसात्मक आहार), वातसेवन, आतपसेवन, भय, शोक, रूक्षपान, जागरण, कफ-शोणित-शुक्र यांची अतिप्रवृत्ति, काल (वार्धक्य, आदानकाल, व्याधिकाल), भूतोपघात (जन्तुज,) यांनीं दोष क्षीण होतात.

व्यायामानें वाताचा प्रकोप होतो. क्षय कसा संभवतो ? अशी शंका गंगाधरानें घेऊन तिचें निरसन केलें आहे. तें असें " ननु व्यायामादिकं वातपित्तप्रकोपकं कथं क्षयहेतुरिति चेत् ? न साधारणतया क्षयहेतुत्वेनोक्त्या यथार्हं हेतुतया व्याख्येयम् यद् यस्य विशेषवत् तस्य क्षयहेतुस्तादिति व्यायामेनातियुक्तेन कफक्षयः स्यात्, वातपित्तक्षयस्तु अतिस्निग्धाद्यशनादिना स्यादित्येवं यथार्हता अत्र बोध्या ॥ च. सू. अ. १७ सं. टीका.

ज्याप्रमाणें दोषांच्या वृद्धीचीं कारणें ग्रंथांत सांगितलीं आहेत त्याचप्रमाणें दोषक्षीणतेचीं कारणें सांगितलीं आहेत. या कारणांनीं दोष क्षीण झाल्यानंतर देहनाश कसा होतो हें पाहणें आपलें कर्तव्य आहे. आयुर्वेदाचा जन्म देहनाश होऊं नये यासाठीं आहे; म्हणून आपण दोषक्षीणतेनें कोणकोणते विकार होतात ते पाहूं.

(अपूर्ण)

शृंगार
नेत्रांजन
डोळ्याचे विकारावर अक्सीर
कृष्णशास्त्री विवलकर
पो. आंजर्ले. (रत्नागिरी)

शास्त्रोक्त पद्धतीनें व अत्यंत परिश्रमानें तयार
केलेलीं महाराष्ट्र प्रांतीय वैद्यसंमेलनानें
व ऑल इंडिया आयुर्वेद कॉंग्रेस
व प्रदर्शनाकडून प्रशंसित
सहस्रपुटी अभ्रक इ. भस्में व इतर औषधें
प्राइसलिस्ट मागवा.
श्री अमरेश्वर आरोग्यमंदिर
मिराची बोळ, पो. इचलकरंजी S. M. C.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अ. भा. आ. डेंटल मिशन

(महाराष्ट्र शाखा २६४ रास्तापेठ, पुणें २)

संचालकः- वैद्य माधव गणेश शेंड्ये

अखिल भारतीय आयुर्वेद डेंटल मिशनतर्फे पुणें येथील अनाथ विद्यार्थी गृहांत वैद्यराज पां. वि. जायदे यांचे नेतृत्वाखालीं दि. १६-५-५४ ते २६-५-५४ पर्यंत एकूण दहा दिवस दंतयज्ञ झाला. दंतयज्ञाचा उद्‌घाटन समारंभ पुण्याचे माननीय नगराध्यक्ष श्री. उरसळ यांचे अध्यक्षतेखालीं झाला.

४००० दांतांचें उत्पाटन

दन्तयज्ञामध्यें सुमारें २००० चे वर लोकांनीं आपले दांत दाखवून आयुर्वेदीय उपचार करून घेतले सुमारें ४००० वर विनासंमोहन दंतोत्पादन केलें गेलें. त्याचप्रमाणें शेकडों मूलोत्पाटनें (Root extractions) सुद्धां विनासंमोहन अशीः झालीं.

वरील दन्तयज्ञांत डेंटल मिशन संस्थेतर्फे खालील तीन लोकांनीं दांत तपासण्यापासून ते दंतोत्पाटना-पर्यंतचीं कामें केलीं. १)वैद्य पां. वि. जायदे २) वैद्य मा. ग. शेंड्ये ३) डॉ. गणेश विनायक फडके.

सदरहु दन्तयज्ञास खालील सन्माननीय लोकांनीं भेटी देऊन समाधान व्यक्त केलें.

१) नामदार श्री. दादासाहेब मावळणकर दिल्ली २) डॉ. बा. चिं. लागू ३) वैद्यराज मामासाहेब गोखले ४) आयुर्वेदाचार्य पांडुरंगशास्त्री देशपांडे ५) भिषगाचार्य त्र्यंबकशास्त्री आपटे ६) वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी ७)श्री.ग.श्री. खैर ८)रँग्लर र. पु. परांजपे ९)डॉ. वि. म. भट १०) श्री. वागळे अध्यक्ष महाराष्ट्र मुद्रण परिषद ११) श्री. दा. न. शिखरे.

वरील दहा दिवसाचे कार्यक्रमांत वैद्य पां. वि. जायदे यांचीं खालील ठिकाणीं आयुर्वेदीय दन्त-चिकित्सेसंबंधीं व्याख्यानें झालीं. १) पुणे वैद्यक मंडळ २) पुणें महिला मंडळ ३) नारद मंदिर, पुणें.

समारोप समारंभ

दि. २६।५।५४ रोजीं डॉ. बा. चिं. लागू यांचे अध्यक्षतेखालीं वरील दन्तयज्ञाचा समारोप समारंभ मोठ्या थाटानें साजरा झाला.समारंभास सुमारें २५० चे वर नागरिक लोक उपस्थित होते. समारोपाचे वेळीं निरनिराळ्या रुग्णांचीं व वैद्यवरांचीं, वैद्य पां. वि. जायदे यांच्या गुणगौरवपर अशी व्याख्यानें झालीं. वैद्यराज जायदे यांनीं आपल्या व्याख्यानांत दन्तोत्पाटनाच्या कलेविषयीं असलेल्या शास्त्रीय अधिष्ठानाचें विवेचन केलें.

आयुर्वेद हें उत्तम शास्त्र आहे

श्री. डॉ. लागू आपल्या अध्यक्षीय भाषणांत म्हणाले- " सर्व वैद्यांनीं वै. जायदे यांचेसारखे कांहींतरी प्रत्यक्ष करून दाखविलें पाहिजे. यांच्या जवळ जशी दांतासंबंधीं कला आहे तशी इतरीह वैद्यांजवळ निरनिराळ्या गोष्टी आहेत, तेव्हां त्या त्या वैद्यांनीं आपल्या जवळ असलेल्या गुणांचा जनतेला व इतरहि वैद्यांना प्रत्यक्षपणें कांहीं तरी करून दाखवून फायदा करून द्यावा म्हणजे त्यायोगें आयुर्वेद या उत्तम असणाऱ्या शास्त्रासंबंधीं जनतेचा विश्वास अधिकाधिक वृद्धिंगत होईल, व सरकार हें,लोकशाही असल्यामुळें परंपरेनें सरकारी वैद्यकीय खात्यांतहि त्यामुळें आयुर्वेदाची प्रतिष्ठा वाढल्याशिवाय राहणार नाहीं. "

संपत्तिदान यज्ञ

संपत्तिदान यज्ञ ही एक नैतिक आणि आध्यात्मिक चळवळ आहे. तो एक सामाजिक ऋण फेडण्याचा मार्ग आहे. संपत्तिदानामागें असलेला विश्वस्त वृत्तीचा सिद्धांत शाश्वत स्वरूपाचा आहे.

दरिद्रनारायण हा आपल्या कुटुंबांतील एक घटक आहे असें मानून त्याच्यासाठीं आपल्या मिळकतीचा विनियोग करणें हें आपल्यापैकीं प्रत्येकाचें कर्तव्य आहे.

संपत्तिदानाचा प्रयोग अयशस्वी झाला तर अहिंसेच्या कक्षेंतील सत्याग्रहाचा (असहकाराचा) मार्ग पत्करावा लागेल. —जयप्रकाश नारायण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

— सहकारी पद्धतीनें तयार करावयाचीं औषधें —

लेखकः- वैद्य पु. वि. धामणकर
धूतपापेश्वर–पनवेळ

घृतें-तैलें :

स्नेहसाधन कल्पनेचा उदय

'स्नेहमेव परं विद्यात् दुर्बलानलदीपनम् ।'
—वा. चि. १०।६८

रुग्णांच्या निरनिराळ्या स्थितींत त्यांना निरनिराळे कल्प द्यावे लागतात. विशिष्ट अवस्थेला योग्य असा कल्प लाभला तर चिकित्सनाचें कार्य फार सुकर होतें व रुग्णासहि लवकर आराम वाटूं लागतो. त्या अनुभवामुळेंच विविध कल्प जन्मास आले. स्नेहसिद्ध करण्याबाबतहि हाच हेतु आहे. रुग्णांना सिद्धस्नेह देण्याची योग्य अवस्था सांगतांना ज्या रुग्णांचा अग्नि दुर्बल झाला आहे अशा लोकांना स्नेह हाच एक कल्प हात देणारा आहे असें वाग्भटाचार्य म्हणतात.

आयुर्वेदांत स्नेहाचे १ घृत, २ तैल, ३ वसा, ४ मज्जा, असे चार प्रकार सांगितले आहेत. ते उत्तरोत्तर पचायला अधिकाधिक जड आहेत. सामान्यतः लवकर पातळ होणारा स्नेह लौकर पचतो.

स्नेहसंस्करण

तूप, तैल, वसा आणि मज्जा हे चार प्रकार आहेत स्नेहाचे. त्यांचा क्रमच असें दर्शवितो कीं, ते उत्तरोत्तर वापरांत कमी आहेत, ते एकापेक्षां एक जड आहेत. तूप हें सर्वांत सात्म्य. परन्तु तें थिजतें. ह्या गुणामुळें तें सूक्ष्म स्रोतोगामित्वांत तैलापेक्षां कमी दर्जाचें ठरतें. तेल हें थिजत नाहीं. तैल त्यांतलेंत्यांत तिळतैल सर्व तेलांत श्रेष्ठ, कारण त्यांतील घटक ओलेईन, पामिटीन व स्टिरीन ह्याच क्रमांत असतात. त्यामुळें वनस्पति-तूप अगर साबणाकरितां तिळतैल तितकेंसें रास्त ठरत नाहीं. पण सूक्ष्म स्रोतोगामित्व व ओशटपणा ह्या गुणांत तिळतैल सर्वश्रेष्ठ आहे. ह्याचा रंग, ह्याची रुचि अत्यंत दृढ असतात. थंडी अगर उष्णता दोन्हीहि त्याला पूरकच ठरतात. तसेंच तें कृशांना पुष्ट करतें, स्थूलांना कृश करते. ह्यावर संस्करण लवकर होतें टिकतेंहि बराच काळ. ह्या कारणानें स्नेहांत स्नेह तैल नि त्यांतहि तिळाचें तैल अधिक संस्कारक्षम ठरलें आहे.

स्नेहपाक अवस्था, २ लक्षणें

प्रथम स्नेह सिद्ध व्हावा लागतो. त्याचीं दोन लक्षणें दिलीं आहेत. (१) स्नेहांतील कल्क बोटांनीं वळविला असतां जेव्हां त्याची वात होते व तो कल्क अग्नीवर टाकला असतां फुरफुर शब्द होत नाहीं तेव्हां स्नेह सिद्ध झाला म्हणून समजावें.

२) तैलाचे पाकावर फेंस आला व तुपाचे पाकावर फेंस येऊन गेला आणि त्या पाकांत चांगला गंध, उत्तम वर्ण, उत्तम रस हे उत्पन्न झाले म्हणजे तो स्नेह चांगला सिद्ध झाला म्हणून समजावें.

पहिली कसोटी तेल जलांशरहित झाल्याची व दुसरी अच्छत्वाची आहे.

स्नेह उपयोगी होण्यास ह्या दोन कसोट्या आवश्यक होत. ह्याला मध्यपाक म्हणतात. (सर्वेषामेव पाकानां मध्यपाकः प्रशस्यते) सर्व प्रकारच्या पाकावस्थेंत ही अवस्था उत्तम गणली गेली आहे.

स्नेहपाकलक्षण, घृततैलपाक लक्षणम् ।

वर्तिवत्स्नेहकल्कः स्याद्यदांगुल्या विमर्दितः ।
शब्दहीनोऽग्निनिक्षिप्तः स्नेहः सिद्धो भवेत्तदा ॥
यदा फेनोद्भवस्तैले फेनशांतिश्च सर्पिषि ।
गंधवर्णरसोत्पत्तिः स्नेहसिद्धिस्तदा भवेत् ॥
स्नेहपाकस्त्रिधा प्रोक्तो मृदुर्मध्यः खरस्तथा ।
ईषत्सरसकल्कस्तु स्नेहपाको मृदुर्भवेत् ॥
मध्यपाकश्च सिद्धिश्च कल्के नीरसकोमले ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ईषत्कठिनकल्कश्च स्नेहपाकः खरो मतः ॥
तदूर्ध्वं दग्धपाकः स्याद्दाहकृन्निष्प्रयोजकः ।
आमपाकश्च निर्वीर्यो वन्हिमांद्यकरो गुरुः ॥
नस्यार्थे स्यान्मृदुःपाको मध्यमः सर्वकर्मसु ।

घृतसिद्धिलक्षण

शब्दस्योपशमे प्राप्ते फेनस्योपरमे तथा ।
गंधवर्णरसादीनां संपत्तौ सिद्धिमादिशेत् ॥

तैलसिद्धिलक्षण

फेनोऽतिमात्रं तैलस्य शेषं घृतवदादिशेत् ।
दूर्वायां पतिते बिंदौ शुष्कतां याति तत्क्षणात् ॥

८५१ कनकतैल भै. र. शि. रो.

सुकुमार घृत

[भा.भै.र.७९५९] [शा.चि.अ.१३]

पाठः-पचेत्पुनर्नवतुलां तथा दशपलाः पृथक् ।
दशमूलपयस्याश्वगन्धैरण्डशतावरीः ॥
द्विदर्भशरकाशेक्षुमूलपोटगलान्विताः ।
वहेऽपामष्टभागस्थे तत्र त्रिंशत्पलं गुडात् ॥
प्रस्थमेरण्डतैलस्य द्वौ घृतात्पयसस्तथा ।
आवपेद्द्विपलांशं च कृष्णा तन्मूलसैन्धवम् ॥
यष्टीमधुकमृद्वीकायवानीनागराणि च ।
तत्सिद्धं सुकुमाराख्यं सुकुमारं रसायनम् ॥
वातातपाध्वयानादिपरिहार्येष्वयन्त्रणम् ।
प्रयोज्यं सुकुमाराणामीश्वराणां सुखात्मनाम् ।
नृणां स्त्रीवृन्दभर्तॄणामलक्ष्मीकलिनाशनम् ।
सर्वकालोपयोगेन कान्तिलावण्यपुष्टिदम् ॥
वर्ध्मविद्रधिगुल्मार्शोयोनिमेढ्रानिलार्तिषु ।
शोफोदरखुडप्लीहविड्विबंधेषु चोत्तमम् ।

नांवः- सेवनयोग्यतासूचक.

द्रव्यसंग्रहः- पुनर्नवा १ तुला, दशमुळें ४० तो., क्षीरकाकोली, अगरु, एरंडमूळ, शतावरी, दर्भमूळें २ प्रकारचीं, कसाड, ऊंस, नलमूळ, प्रत्येकीं ४०।४० तो., पाणी ८ भाग अवशेष १/४.

कल्कः- पिंपळी, पिंपळमूळ, सैंधव, जेष्टमध, मनुका, अजमोदा, सुंठ ८।८ तो. गूळ १२० तोळे.

कल्ककाथः- गूळ २ प्रस्थ, तूप, एरंडेल १ प्रस्थ, दूध २ प्रस्थ.

पचनः- मंदाग्नि शेष—तूप

प्रक्षेपः—

रोगः- वर्ध्म, विद्रधि, अर्श, योनिरोग, मेदोरोग, वातरोग, शोथ, उदर, वातरक्त, प्लीहा, गलरोग.

कार्यः— कांति, लावण्य, पुष्टिकारक.

पथ्यः- कांहीं नाहीं. सुकुमार लोकांनाहि प्रशस्त.

नारायण तेल (भा.भै.र,३५०३,भै.र.)

पाठः- बिल्वाश्वगन्धावृहतीश्वदंष्ट्रा
श्योनाकवाट्यालकपारिभद्रम् ।
क्षुद्रा कठिल्लातिबलाग्निमन्थं
मूलानि चैषां सरणीयुतानाम् ॥
मूलं विदध्यादथ पाटलीनां
प्रस्थं सपादं विधिनोद्धृतानाम् ।
द्रोणैरपामष्टभिरेव पक्त्वा
पादावशेषेण रसेन तेन ॥
तैलाढकाभ्यां सममेव दुग्ध-
माजं निदध्यादथ वापि गव्यम् ।
एकत्र सम्यग्विपचेत्सुबुद्धि-
र्दद्याद्रसं चैव शतावरीनाम् ॥
तैलेन तुल्यं पुनरेव तत्र
रास्नाश्वगन्धामिशिदारुकुष्ठम् ।
पर्णीचतुष्कागरुकेशराणि
सिन्धूत्थमांसीरजनीद्वयं च ॥
शैलेयकं चन्दन-पुष्कराणि
एलासयष्टीतगराब्दपत्रम् ।
भृंगाष्टवर्गाम्बुवचापलाशं
स्थौणेयवृश्चीरकचोरकाख्यम् ॥
एतैः समस्तैर्द्विपलप्रमाणै-
रालोड्य सर्वं विधिना विपक्वम् ।
कर्पूरकाश्मीरमृगाण्डजानां
चूर्णीकृतानां त्रिपलप्रमाणम् ॥
प्रस्वेददौर्गन्ध्यनिवारणाय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दद्यात् सुगन्धाय वदन्ति केचित् ।
नारायणं नाम महच्च तैलम्
सर्वप्रकारैर्विधिवत्प्रयोज्यम् ॥
आश्वेव पुंसां पवनार्दितानां— ।
मेकांगहीनार्दितवेश्मनानाम् ।
ये पंगवः पठितिसर्पिणश्च
बाधिर्यशुक्रक्षयपीडिताश्च ॥
मन्याहनुस्तम्भशिरोरुजार्ता
मुक्तामयास्ते बलवर्णयुक्ता ।
संसेव्य तैलं सहसा भवन्ति
वन्ध्या च नारी लभते च पुत्रम् ॥
वीरोपमं सर्वगुणोपपन्नं
सुमेधसं श्रीविनयान्वितं च ।
शाखाश्रिते कोष्ठगते च वाते
वृद्धौ विधेयं पवनार्दितानाम् ॥
जिव्हानिले दन्तगते च शूले
उन्मादकौब्ज्यज्वरकार्दितानाम् ।
प्राप्नोति लक्ष्मीं प्रमदाप्रियत्वं
वपुःप्रकर्षं विजयं च नित्यम् ॥
तैलोपसेवी जरयाभिमुक्तो
जीवेच्चिरं चापि भवेद् युवेव ।
देवासुरे युद्धपरे समीक्ष्य
स्नाय्वास्थिभंगानसुरैः सुरांश्च ॥
नारायणेनापि सुबृंहणार्थं
स्वनामतैलं विहितं च तेषाम् ॥

नांवः— देवतासूचक

द्रव्यसंग्रहः- बेल, आस्कंद, रिंगणी, सराटे, टेंटू, तोरी, निंब, डोरली, पुनर्नवा, अतिबला, ऐरण, प्रसारणी, पाडळमुळें १।१ प्रस्थ. ८ भाग पाणी, मंदाग्निपाचन, १/४ अवशेष. तिळाचें तेल १६ शेर, अजादुग्ध १६ शेर, शतावरीरस १६ शेर.

कल्कद्रव्यें:- रास्ना, आस्कंद, बडिशेप, देवदार, कोष्ठ, सालवण, पिठवण, मुद्गपर्णी, माषपर्णी, अगरु, केशर, सैंधव, जटामांसी, हळद, दारुहळद, चांदफूल, चंदन, पोखरमूळ, लहान वेलची, मंजिष्ठ, जेष्ठमध, तगर, नागरमोथा, तेजपत्र, माका, अष्टवर्ग (जीवक, ऋषभक, मेदा, महामेदा, ऋद्धि, वृद्धि, काकोली, क्षीरकाकोली), वाळा, वेखंड, पळस, स्थौणेय, पुनर्नवा, चोरओंवा २।२ पलें कल्क, मंदाग्निपाचन, तैलावशेष. नंतर कापूर, केशर, कस्तूरी ३।३ पलें मिळविणें.

रोगः- वातव्याधि, अर्दित, एकांगवध, कंप, पंगुत्व, विसर्प, बाधिर्य, शुक्रक्षय, मन्यास्तंभ, हनुस्तंभ, शिरोरोग, वंध्यत्व, शाखागतवात, कोष्ठगतवात, जिव्हागतवात, दंतशूल, उन्माद, कुब्जत्व, ज्वर,

कार्यः— आयुः-शरीर-पुष्टिकर.

समाजसेवक दांपत्यें

"शिक्षण व आरोग्य विषयक योजनांत महिलांना नोकर नेमावें म्हणून मी मांडून तत्त्व मान्य करून घेतलें, पण मला तसा सेवकवर्ग मिळाला नाहीं. महिलांच्या अडचणी मला माहित आहेत. म्हणून मी पतिपत्नींना नेमून घेण्याचा मार्ग काढला आहे.

पं. मालवीयजींचा यशस्वी प्रयोग

बनारस विद्यापीठांत पं. मालवीयजींनीं असा प्रयोग यशस्वी करून प्राध्यापकांचीं दांपत्यें विद्यापीठांत ठेवलीं होतीं."

—सौ. दुर्गाबाई देशमुख

तारेचा पत्ताः-Newbottle

के. के. शहा अँड कंपनी

बाटल्यांचे व्यापारी

(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)

रिकाम्या बाटल्या, बुच, कॅपसुल्स् [हेअर ऑईल, सरबत, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाचीं सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे

ठोक व किरकोळ

विक्री करणारे व्यापारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदिक व युनानी चिकित्सापद्धति बोर्ड, नागपूर

१९५४ च्या वार्षिक परिक्षेचा निकाल

विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती, या संस्थेतील खालील विद्यार्थी आयुर्वेद व युनानी चिकित्सा पद्धतीच्या बोर्डाच्या परीक्षा समिति द्वारा झालेल्या १९५४ च्या परीक्षेंत उत्तीर्ण झाले आहेत.

प्रथम वर्ष द्वितीय श्रेणी

कु. लीला जोशी, कु. सुमन रायटे, शांतिलाल मुथा, म. म. काटे, शि. द. महाजन, सु. वे. पाटील, श्री. शं. ढवळे, म. म भावसार, श्री. वि. चिरडे, ह. ल. भुसारे, वा. ना. भावसार, दा. ध. गुंजाळ, के. ज. बोंढे, अ. जि. व्होरा.

पास श्रेणी

म. न. टिळक, चं. ग. बैसास, मु. त्रिं. भोलाणे, अ. का. आपटे, व. दि. भागवत, व. गं. गर्गे, ह. शं. तांदळे, ना. शं. सोहनी, सु. सो. लोहार, आ. तो. पवार, बा. स. शित्रे, ना. व. भिसे, कृ. ग. बेलोरकर, श्री. पां. जोशी, द. रा. बोरशे.

द्वितीय वर्ष प्रथम श्रेणी

कु. उषा पोतदार

द्वितीय श्रेणी

मो. स. झेंटे, चं. गुजराथी, सु. सो. पटेल, भा. गुं. जोशी, वा. मो. बेलसरे, कृ. स. मालशे, ना. ग. देशमुख.

पास श्रेणी

अ. ह. तायडे, पां. ना. मिरजकर, रा. ना. चौधरी,

तृतीय वर्ष प्रथम श्रेणी

श्री. म. शा. कुळकर्णी.

द्वितीय श्रेणी

श्री. के. पोंक्षे, आर. व्ही. परब, व. के. कुळकर्णी, शिवराम बी. चौधरी, माधव एम्. ठोंबरे, वा. त. तनवानी, ए. ल. नेमाडे, प्रभाकर कुळकर्णी, राजाराम एन्. फडके, बंसीलाल आर. विश्वनाथ व्यास, महारू पी. चौधरी, गिरिधर ए. चौधरी, ज्ञानेश्वर जी. निचळे.

पास श्रेणी

मनोहर एन्. आठवले, हरी शिवराम चौध मधुकर आर. पाठक.

चतुर्थ वर्ष द्वितीय श्रेणी

र. रा. पाटील, श. न. जावळे, गो. ङ. वा मो. मु. राजकुमार, द. गो. भाटे, कि. गो. वाळ पं. ना. चोपडे, म. जा. महाजन, नी. क. नारखे सौ. शांता पाटील.

पुढील विद्यार्थ्यांना कंपार्टमेंट देण्यांत आहे.

प्रथम वर्ष संस्कृत-तर्क-सांख्य

भा. गो. खोंड, व. वा. देशपांडे, च. पाकणीकर, वा. द. भंडारी,

प्रे. मा. राजपुत, शे. ल. वाघमारे ॲनाटॉ

द्वितीय वर्ष

प्रे. मा. राजपुत, ह. खं. सातव, फिजिऑला

तृतीय वर्ष

वा. हि. मेहत्रे न्यायवैद्यक

चतुर्थ वर्ष

रा. रा. उपाध्ये सर्जरी
श्री. ग. गाजरे ऊर्ध्व जत्रुगत
व. के. मानेकर सर्जरी

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाची १९५४ सालची १ रु. सभासद वर्गणी पाठवून संघटना बळकट करा. —मंत्री, म. प्रां. वैद्य मंडळ, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दररोज स्नान व दररोज साबण

एक अमेरिकन त्वग्रोगनिष्णात म्हणतो कीं, दररोज स्नान करणें, त्यांतल्यात्यांत अंगास साबण लावून नित्य स्नान करणें, हें मनुष्याच्या त्वचेस अतिशय घातक आहे. तिबेट व तुर्कस्तान या देशांतील लोक क्वचितच स्नान करतात व त्यामुळें त्यांना त्वचारोग सहसा होत नाहीं. सुधारलेला मानव-समाज हा, कल्पक व हुषार शास्त्रवेत्त्यांचा उपकृत आहे. हे व्यवहारचतुर शास्त्रवेत्ते आपल्या संशोधन-कृतीचा प्रसार होण्याकरितां (मग ती संशोधन कृति शास्त्रशुद्ध असो वा अशास्त्रीय असो) मोठमोठाल्या देशभक्तांच्या व नांवाजलेल्या मुत्सद्दी व राजकारणी पुरुषांच्या आकर्षक अभिप्रायांच्या साधन-भांडवलावर आपल्या संशोधन-कृतीचा वापर करण्यास जनतेस व्यामोह उत्पन्न करित असतात.

परंतु डॉ. अर्ल ऑसबोर्न यांचा 'हावलर' हा ग्रंथ केवळ अशा प्रकारचा व्यामोह उत्पन्न करणारा खास नाहीं. या ग्रंथांत व्यावहारिक ज्ञानाची सखोल अशी भूमिका आहे.

रोजच्या स्नानाचा दुष्परिणाम

दररोज अंग घासण्यानें वा धुण्यानें त्वचेचा नाजुकपणा वाढतो व फाजील संवेदनाक्षमत्व मात्र निर्माण होतें. त्वचेवर मळाचा थर असण्यानें त्वचेस फाजील नाजुकपणा येत नाहीं, व त्याचप्रमाणें ती नैसर्गिक रीत्या रोगजंतु-प्रतिबंधक होते. हत्ती व म्हैस हे दोन प्राणी वगळतां बाकीचीं जनावरें स्नान करीत नाहींत. मांजर तर पाण्याचा तिटकाराच करतें व पाण्याशीं संबंध येऊं देत नाहीं, तरीहि त्याच्या अंगावरील लव मात्र अगदींच स्वच्छ असते.

त्वचा मजबूत व प्रतिकारक्षम

प्राचीन तार्तर, चंगीझ व हुलगू लोकांत मूल जन्मल्यानंतर फक्त प्रथम सहा महिने दररोज त्यास अगदीं थंडगार पाण्यानें स्नान घालण्याची प्रथा होती, परंतु पुढें मात्र ते त्यास कधींच स्नान घालीत नसत. ह्या संस्कार-दीक्षेमुळें मूल सुदृढ तर होईच परंतु त्याची त्वचा रानगेंड्याप्रमाणें मजबूत व शैत्य व शीतज्वर या रोगांचे बाबतींत प्रतिकारक्षम होई.

सुवासिक साबणानें स्नान, एक चैन

सुवासिक साबणानें दररोज स्नान करणें ही आधुनिक काळांतील एक चैनीची बाब होऊन बसली आहे. राजे ग्रँड मॉनर्क व १५ वा लुई यांचा सौंदर्योत्फुल्ल झनाना व त्यांतल्यात्यांत ड्यु-बेरी व पोमॅडर यासारख्या अत्यंत लावण्यवती स्त्रिया यांना स्नान व साबण यांची माहिती नव्हती असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. टाइम्स १५।५।५४

× × ×

[प्रत्येक व्यक्तीनें बाराहि महिने रोज स्नान करावें काय ? हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. पाण्यानें स्नान, हें शरीरांत आप तत्वाची वृद्धि करणारें आहे. सबब उन्हाळ्यांत ज्यावेळीं शरीरांतून मोठ्या प्रमाणांत जलतत्व बाहेर जातें त्यावेळीं, एकदां सोडून दोन वेळां केलेला जलसंस्कार कांहीं व्यक्तींना हितावहच होईल. बाकीच्यांना उन्हाळ्यांत एकवेळ केलेलें थंड अगर जरा कोमट पाण्याचें स्नान पुरेसें होतें.

पावसाळ्यांत सर्वांना स्नान नको

पावसाळ्यांत घरीं दारीं हवेंत सर्वत्र आर्द्रता पसरली असतां स्नानाची आवश्यकता भासूं नये. पाऊस नसेल व ऊन पडलें असेल तरच स्नान करावेंसें वाटेल. पावसाळ्यांत ऊन पाण्यानें स्नान करण्यापेक्षां भस्म लावणें चांगलें. कोरडा शेकहि फायदा करील.

पावसाळ्यांतील आहार-विहार

वाग्भटकार म्हणतात- सतुषारेण मरुता सहसा शीतलेन च । भूबाष्पेणाम्लपाकेन मलिनेन च वारिणा । वन्हिनैव च मंदेन, तेष्वित्यन्योन्यदूषिषु । भजेत् साधारणं सर्वं ऊष्मणस्तेजनं च यत् ॥

पोटांत घेण्यासाठीं सुद्धां साधें पाणी न वापरतां मध्वारिष्ट, मस्तु, यूष, उकळलेलें पाणी व संशुष्क आहार, धूपित वस्त्रें, यांचा वापर करावयाचा आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मग सर्वांनीं रोज स्नानानें शरीर ओलें करणें आयुर्वेद-शास्त्राला कसें वरें मान्य होईल ?

हिंवाळ्यांत तेल लावून स्नान

हिंवाळ्यांत थंडी जोरदार असते अशा वेळीं नुसतें थंड वा ऊन पाण्याचें स्नान सुद्धां बाधकच ठरेल. या दिवसांत स्नान बाधूं नये यासाठीं प्रथम शरीरास तेल चोळावें लागेल व स्नानानंतर केशराची अगरुची उटी लावली तरच पाण्याची बाधा टळेल. या दिवसांत वापरावयाचें सर्व पाणी ऊनच असावें. (शौच-कार्ये सुखोदकं) उष्णस्वभावैर्लघुभिः प्रावृतः शयनं भजेत्। असें सांगितलेलें आहे. पाणी शीतस्वभावी आहे. पावसाच्या या थंडीच्या दिवसांत स्नान करणें झाल्यास दुपारीं बारा वाजतां करावें व नंतर उन्हांत बसावें (युक्त्यार्ककिरणान् स्वेदं भजेत्). —संपादक]

———

शिक्षणार्थ जर्मनीचा प्रवास करूं इच्छिणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकासाठीं

'शैक्षणिक सफर संघ जर्मनी' या संस्थेच्या वतीनें, पश्चिम जर्मनींतील वैद्यकीय उपचार केंद्रांना भेट देणें, नवीन जर्मन औषधें व यंत्रें निर्माण करणाऱ्या कारखान्यांना भेट देणें या हेतूनें १९५४ च्या उन्हाळ्यांत व पावसाळ्यांत या सफरींचा कार्यक्रम ठरविला आहे. यासाठीं परदेशस्थ वैद्यक-व्यवसायिकांना निमंत्रण आहे. निरनिराळ्या व्याख्यानांचा कार्यक्रम व त्यानंतर चर्चा यांतून परस्परांच्या अनुभवांची देवाण घेवाण व्हावी हा हेतु त्यांत आहे.

४ आंतरराष्ट्रीय परिषदा

या सफरीचा काल २ महिने आहे. त्यानंतर युरोपांत भरणाऱ्या पुढील अन्तर्राष्ट्रीय वैद्यकीय परिषदांना हजर रहातां येईल.

१) जिनेव्हा (स्वित्सरलंड) येथील २६ जुलै रोजीं भरणारी स्त्रीरोगविषयक आन्तर राष्ट्रीय परिषद.

२) बेर्न (Berne) येथें ३० ऑगस्ट रोजीं भरणारी हाडांवरील शस्त्रकर्म परिषद.

३) माद्रिद येथें २६ सप्टेंबरला सुरू होणारी क्षय विषयक परिषद

४) रोम येथें ३० ऑगस्ट रोजीं पोलियोमायलाइटिस विषयक परिषद.

पत्रव्यवहाराचा पत्ता

ज्यांना या सफरींत भाग घ्यावयाची इच्छा असेल, त्यांनीं जर्मन एज्युकेशनल ट्रॅव्हल असोशिएशन, नूर्नबर्ग (Nuernburg) जर्मनी या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

फेडरल रिपब्लिक जर्मन वकीलातीकडून प्रकाशित

———

आरोग्यखात्याचें धोरण

(१) खेड्यांतील जनतेला पिण्याच्या पाण्याची सोय व (२) साथीच्या रोगांचा प्रतिबन्ध हे दोन आरोग्य-विषयक धोरणाचे प्रधान हेतु आम्ही आमच्या समोर ठेवले आहेत.

येत्या ४।५ वर्षांत मुंबई राज्यांतील प्रत्येक विद्यार्थ्याला क्षयरोग प्रतिबन्धक लस टोचण्याची योजना यासाठींच आम्ही आंखली आहे.

आरोग्यविषयक अग्रहक्कांचा क्रम

प्रसुति-गृहें बालसंगोपन केंद्रे यांच्या सारख्या योजना अत्यावश्यक असूनसुद्धां आरोग्य विषयक अग्रहक्काचा जो क्रम मी सांगितला त्यांत या योजनांचा समावेश करणें कठीण जातें." — आरोग्यमंत्री शहा

———

पांढरें कोड

हजारोंचें गेले व त्यांनीं अभिप्राय दिलेले आणि अनेक बक्षिसें मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु. नकली वैद्यापासून सावध रहा !

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन' मु. पो. मंगरूळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवडक रुग्ण चिकित्सा

लेखकः- वैद्य र. गो. कुलकर्णी,
आयुर्वेदविशारद, मुंबई २

(१) शोथ व त्यावरील शस्त्रक्रियेचा व्रण

रोगी मुलगा, वय १५, वयाचे १२ व्या वर्षी एकाएकी ताप येऊन डाव्या पायाचे गुढघ्यांत सूज आली. त्यावेळेस तापाचें मान सतत १०३ ते १०४ होतें असे. औषध, फॅमिली डॉक्टरचें चालूच होतें पण ८ दिवसांत सुधारणा न दिसल्यामुळें त्यांचे सल्ल्यासाठीं त्यांनीं सुचविलेल्या एम्. डी. ना बोलाविलें. त्यांनीं गुढघ्यांत पूं होत असावा व तावडतोब शस्त्रक्रिया न केल्यास रोगी दगावयाचा संभव, असा इषारा दिल्यामुळें मुंबईतील विख्यात नर्सिंगहोममध्यें नेण्यांत येऊन तेथें शस्त्रक्रिया करण्यांत आली. येथपर्यंत सर्व ठीक झालें. पण ऑपरेशनची जखम चिघळूं लागली म्हणून पुन्हा १० दिवसांनीं बाजूस शस्त्रक्रिया करण्यांत आली, पण रुग्णस्थिति न सुधारतां पूं वहाणें चालूंच होतें. हॉस्पिटलमध्यें रोगी केवळ ठेवण्याबद्दल रोजचे २० रु. देऊन ४ महिने ठेवण्यांत आला, (औषधें व शस्त्रक्रिया यांचा खर्च निराळाच) पण न सुधारल्यामुळें फॅमिली डॉक्टरांनीं रोगी घरीं आणण्याचा सल्ला दिला. पूं वाहात असल्यामुळें दिवसेंदिवस रोगी क्षीण होऊ लागला.

सूज, व्रण कायम, रुग्ण अस्थिचर्म

घरीं आणल्यावर सतत दोन वर्षे चिकित्सा चालू होती. या काळांत २०० हून अधिक निरनिराळीं सूचिकाभरणें देण्यांत आलीं. रोग्याचा पाय (डावा) आखडला जाऊन सूज कायम होती व शस्त्रक्रियेच्या जखमेंतून सारखा पूं वहात असल्यामुळें पाय अगदीं अस्थिचर्म उरला होता व हळूंहळूं ताप पण सायंकाळचे सुमारास ९८॥ ते ९९ दरम्यान येऊं लागला. अशा परिस्थितींत रोगी सुधारण्याचा (कदाचित्) एकच उपाय म्हणजे डावा पाय अजिबात काढून टाकण्याचा सल्ला देण्यांत आला, पण रोगी सुधारण्याचें चिन्ह दिसत नसल्यामुळें तशांत एकुलता मुलगा असल्यामुळें पालकांनीं ह्या गोष्टीस संमति दिली नाहीं व ते आयुर्वेदिक चिकित्सेकडे वळले.

अस्थिधातुपूरक चिकित्सा

रोगी पाहिला तेव्हां एक गडी त्यास इकडे तिकडे हातावर लहान मुलासारखा घेऊन फिरवीत होता. (इतकें वजन कमी झालें होतें). पायास गुडघ्या-भोंवतीं सूज, पूं वाहणें, धक्का लागल्यास वेदना, क्वचित् खोकला व भूक अजिबात नाहीं. शक्तिवर्धक विशेषतः अस्थिधातूचें पूरण करणारी चिकित्सा पाहिजे होती. कमीतकमी एक वर्ष औषध घ्यावें लागेल, पायाचे कांहीं सांगता येत नाहीं, असें सांगून औषधयोजना सुरू केली. शक्तिवर्धक म्हणून सुवर्ण-भस्म १/६० गुं+सहस्रपुटी अभ्रकभस्म १/४ गुं+ प्रवाळपिष्टी २गुं + शृंगभस्म २गुं + वंगभस्म १/२गुं. (पूतिघ्न म्हणून) यांच्या दोन पुड्या सकाळीं व सायंकाळीं मधांतून देण्यास सांगितलें व पायावर कापूरभेंडीचें पाळ गरम पाण्यांत उगाळून दिवसांतून ३ वेळ लावण्यास दिलें.

पूं वाहण्यासाठीं उपाय

ह्या चिकित्सेनें ताप कमी होऊन ताकद वाढूं लागली व रोगी सुधारेल अशी आशा वाटली. ४ महिन्यांत ताकद वाढली, पण पायाचे दृष्टीनें सुधारणा फारशी दिसली नाहीं, म्हणून वंगभस्म १ गुं + शतपुटी गंधक रसायन २ गुं. + प्रवाळ २ गुं + शृंग २ गुं. यांच्या तीन पुड्या दशमूलारिष्टांतून देण्यास सुरवात केली व बाहेरून गंधाबिरोजाचा लेप लावण्यास दिला. लेप लावतांच ८ दिवसांत पूं जोरानें वहाण्यास सुरवात झाली व जसजशी घाण बाहेर पडत गेली तसतशी पायाची सूज कमी होत जाऊन एक वर्षाचे अवधींत साफ गेली व रुग्ण कुबडीचें साह्यानें घरांत फिरूं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लागला व कमी अधिक ह्याच चिकित्सेनें दोन वर्षांत रुग्ण मुलगा चौपाटीवरून काठीचें साह्यानें गिरगावांत शाळेंत जाऊं येऊं लागला.

पुनः ॲलोपॅथी, पुनः आयुर्वेद

अंगलट भरदार झाली पण पूं येण्याचें प्रमाण पूर्णतः थांबलें नाहीं, म्हणून पालक पुन्हां दुसऱ्या चिकित्सेकडे वळले. रुग्णास पूर्वीचेच डॉक्टरचे सल्ल्यानें पेनिसिलीन, स्ट्रेप्टोमायसिन, व अशाच औषधांचीं शेंकडों सूचिकाभरणें देण्यांत आलीं, तसेंच दोन वर्षेपर्यंत निरनिराळ्या गोळ्या, औषधेंहि चालूं होतीं, पण ३ वर्षांत पूं वहाण्याचे दृष्टीनें कांहींच सुधारणा न झाल्यामुळें पुन्हां रुग्ण माझेकडे आला. ह्या वेळीं मह्य योगराजगुग्गुळ १/२ गुं+ वंग १ गुं + अजास्थिभस्म २ गुं+ कासवाचे पाठीचे भस्म २ गुं. व शृंगभस्म २ गुंजा यांच्या २ पुड्या सकाळीं व रात्रीं मधांतून देण्यास सुरवात केली व जखमेंत ज्योतिष्मती तेल टाकण्यास सांगितलें, तसेंच रोज शेळीच्या तंगड्या बारीक करून एका लहान डब्यांत १ शेर पाणी घालून त्यांत टाकणें व तो डबा मोठ्या डब्यामध्यें लहान वाटीवर ठेवून वरपर्यंत पाणी घालून मंदाग्नीवर ठेवून चांगली उकळी येईपर्यंत ठेवावयाचा व थंड झाल्यावर आंतील डब्यांतील तें सूप जरूरीप्रमाणें सैंधव, जिरें हळद घालून जेवतांना वापरायचें (गर्भतंत्र पद्धतीनें).

११ वर्षांचा हाड्या व्रण

ह्या चिकित्सेनें ३ वर्षांत आस्ते आस्ते सुधारणा होत पूं अजिबात थांबला व आज ६ महिने झाले तरी जखम पूर्ण भरून आलेली दिसत आहे. एकंदर हा रुग्ण माझेकडे ४॥ वर्षे चिकित्सेस होता. मुलाचें वाढतें वय, सांपत्तिक अनुकूल स्थिति व धीरानें चिकित्सा चालूं ठेवण्याचें धोरण ह्या त्रयीमुळेंच ११ वर्षांचा हा हाड्या व्रण बरा झाला. सूज आल्यापासून तो व्रण बरा होईपर्यंतचा काल ११ वर्षांचा गेला. पाय मात्र वाळलेला व गुडघ्यांत आखडलेला आहेच. मुलगा आज बी. ए. ला बसला आहे. पाय सरळ होणें मात्र दुरापास्त आहे असें दिसतें. त्यासाठीं पुन्हां शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला अनेकवेळां देण्यांत आला, पण गेल्या ११ वर्षांची परिस्थिति पहातां शस्त्रक्रिया न करण्याचेंच पालकांनी ठरविलें आहे.

---

२ अभिघातजन्य शोथ

रुग्णः- पुरुष, वय ३०, जिन्यावरून घसरल्याचे निमित्त होऊन उजव्या पायाचे घोट्याजवळ थोडी सूज आली. २।३ दिवस घरगुती उपचार म्हणून पेंड बांधणें, खता घालणें वगैरे उपचारांचा उपयोग करून पाहिला, पण सुधारणा न होतां सूज वाढूं लागली, तेव्हां डॉक्टरी उपचार सुरूं झाले. १५ दिवसांत सुजेचे दृष्टीनें परिणाम कांहींच न दिसतां उलट वाढत जाऊं लागली व पायाचीं बोटें पण सुजलीं तेव्हां एफ्. आर्. सी. एस्. कडे जाऊन पाय दाखविण्यांत आला. एक्सरे घेण्यांत आला पण हाड मोडलेलें कोठेंच दिसत नव्हतें. घरांत काठीचें साह्यानें कष्टानें फिरत असे. प्लॅस्टरमध्यें पाय घालून ठेवण्यांत आला व दर १५ दिवसांनीं प्लॅस्टर काढून पुन्हां प्लॅस्टरमध्यें ठेवण्यांत येत असे.

सूज कमी होईना

असें ४ वेळ केलें पण सूज कमी होईना तेव्हां दुसऱ्या हाडवैद्यांकडे जाऊन तेथें दोन महिने उपचार केले पण सूज कमी वा जास्त झालेली नाहीं, तेव्हां मसाजतज्ञांकडे जाऊन त्यांचे उपचार सुरूं केले. १॥ महिन्यांत परिणाम न वाटल्यामुळें पुन्हां घरगुती उपचार सुरूं केले, पण गुण न दिसल्यामुळें सुरवात झाल्यानंतर ७ महिन्यानंतर उपचारासाठीं माझेकडे आला. पायाची तक्रार म्हणजे घोट्यापासून खालीं बोटावरहि सूज, दाबल्यानंतर किंचित् खळगा पडणें व पाऊल टाकतांना वेदना एवढीच, बाकी शारीरिक तक्रार अशी कोणतीच नव्हती, आतांपर्यंत पोटांत औषध कोणीच दिलें नव्हतें. सर्वांचे चिकित्सेचा भर बाहेरून. पण आतां विकार जुना झाल्यामुळें पोटांतहि शोथघ्न उपचार करण्याची जरूरी होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुग्गुळ व रक्तशोधक काढा

द्या रुग्णास शुद्ध गुग्गुळ २ गुं., मृगशृंगभस्म २ गुंजा, गंधकरसायन २ गुंजा सकाळीं व सायंकाळीं दुधांतून शिवाय मंजिष्ठा, पुनर्नवा, गुळवेल, कडुनिंब, झाडेचिराईत, देवदार, रास्ना, उपळसरी, गोखरू, बाळहरितकी यांचा काढा शोथघ्न, मूत्रल, रक्तशुद्धिकर म्हणून दुपारीं व रात्रीं २॥-२॥ तोळे देण्यांत आला व बाहेरून निगडीचा पाला (कात्री निर्गुंडी) मोदक पात्रांत शिजवून त्यानें पाय शेकणें व बाहेरून त्यावर शेकून झाल्याबरोबर गुग्गुळ पुनर्नवेचा गरम पाण्यांत उगाळून लेप देणें, दिवसांतून २ वेळ याप्रमाणें चिकित्सा सुरूं होताच चार दिवसांतच बोटांवरील सूज कमी होऊं लागली. एक महिन्यांत पायावरील सूज सर्व गेली. घोट्याजवळ किंचित् दिसत असे तीहि आणखी १५ दिवसांतच गेली. औषध दोन महिने अन्तर्बाह्य चालू होतें. एवढ्या अवधींत पाय पूर्ण बरा होऊन रोगी पूर्ववत् आपले व्यवहार करूं लागला व पायाची कांहींहि तक्रार पुन्हां उत्पन्न झाली नाहीं.

(३) अम्लपित्त व मनोव्याघात

रुग्णः— स्त्री, वय ४०, ८।१० वर्षांपूर्वींपासून अम्लपित्ताच्या विकारानें आजारी पण अंथरूण मात्र धरलें नव्हतें. एक वर्षापूर्वीं मनास धक्का बसल्यामुळें जेवणावरील इच्छा गेली व त्यामुळें शक्तिपात होऊं लागला. निरनिराळ्या वैद्यराजांचे सल्ल्याप्रमाणें औषधयोजनाहि चालू होती पण विकार बराचसा मानसिक असल्यामुळें औषधांचा उपयोग होत नव्हता. असेच ५।६ महिने गेल्यावर जोरानें थंडी वाजून ताप येऊं लागला. घरांत करणारें कोणी नसल्यामुळें बाहेर नातलगांकडे पाठविण्यांत आलें. तेथें डॉक्टरी उपाय योजण्यांत आले. १।२ दिवसांनीं जोरानें थंडी भरून ताप येत असे. क्विनाइन, यकृतादींची वरीच सूचिकाभरणें देण्यांत आलीं परंतु उपयोग न होतां दिवसेंदिवस कृशता वाढूं लागल्यामुळें पुन्हा घरीं आणण्यांत येऊन आयुर्वेदिक उपचारांस सुरवात झाली. अमृतारिष्ट, पंचामृतवटी, सुवर्णमालिनीवसंत इत्यादि औषधांना दाद न देतां शौचास पातळ २।३ वेळ, रोज १०० ते १०३ पर्यंत ताप, अशक्तता मनस्वी कीं हात उचलून ठेवणें पण जड जाऊं लागलें. आणखी थोडे दिवस जातांच हातपाय तोंडावर सूज दिसूं लागली, आतां अंतकाळ समीप आला असें समजून तशी नातलगास सूचना पण देण्यांत आली. एका वैद्यानींहि हा रोगी १।२ दिवसांचाच सोबती आहे तेव्हां आतां कांहीं त्रास देऊं नका म्हणून सांगितलें. व त्याचें तें म्हणणें इतर वैद्यांसहि पटलें. औषध केवळ चालू ठेवावयाचें म्हणून बाकीचीं सर्व औषधें बंद करून त्रैलोक्यचिंतामणि १/४ गुं.+सहस्त्रपुटी अभ्रक १/२ गुं+प्रवाळ २ गुंजा यांच्या ४ पुड्या मोरावळ्यांतून ४।४ तासानीं नुसतेंच चाट-

.... उत्तम धर्म ....

जनतेची सेवा करणें हा मनुष्यमात्राचा धर्म आहे. त्यांतहि आजारी माणसाची सेवा करणें हा अति उत्तम धर्म होय. उत्तम गुणकारी औषध देऊन रोगाचें निवारण केल्यानें रोगी माणसाची सेवा उत्तम घडते.

अशी सेवा करण्यासाठीं उत्तम व अस्सल औषधेंच वापरलीं पाहिजेत. अशा खात्रीच्या औषधी खरेदी करण्याचें स्थान—

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स

पायधुनी मुंबई नं. ३

(टेलिफोन नं. ३१८५८) हेंच आहे.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें

मुख्य केंद्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ण्यास दिल्या. ४ दिवस तसेच गेले परंतु पांचवे दिवसापासून चेहऱ्यावर टवटवी दिसूं लागली, १५ दिवसांत हातापायावरील सूज गेली व पुन्हां जीवनाकडे प्रवृत्ति दिसूं लागली. एक महिन्यांत घरांत चार पावलें पण रुग्ण टाकूं लागला तेव्हां ४ पुड्या ऐवजीं २ पुड्या करून दोन वेळेस सुवर्णसूतशेखर १ गुंजा मोरावळयांतून देण्यास सुरवात केली.

४ महिन्यांत रुग्ण बराच सुधारला, पण २।४ दिवसांनीं तापाची पाळी येण्याचें पूर्ण थांबेना. जोर कमी पडला पण ताप येत होतांच, तेव्हां शुद्ध कुचला -।- गुं. + लोहभस्म -।।-गुंज+सुवर्णसूतशेखर २ गुंजा दशमूलारिष्टांतून देण्यास सुरवात केली. ह्या योजनेनें २।४ दिवसांनीं येणारा ताप १०।१२ दिवसांनीं, एक महिन्यानें असा लांबत जाऊन ४ थे महिन्यांत पूर्णपणें थांबला, तेव्हां पुन्हां वरील औषधांचे जोडीस सुवर्णमालिनी -।। गुंज मिसळून देण्यास सुरवात केली. वरील सर्व औषधांचा परिणाम इतका उत्तम झाला कीं गेल्या २० वर्षांत इतकी सुंदर तब्येत कधींच नव्हती व अम्लपित्ताचा विकारहि पूर्ण मोडून नंतर १० वर्षेंपर्यंत त्याचा त्रास झाला नाहीं. ह्या सर्वांचें श्रेय त्रैलोक्यचिंतामणिलाच. वह्निं दीपयते बलं च कुरुते तेजो महद्वर्धते । वीर्यं वर्धयते विषं च हरते दार्ढ्यं विधत्ते तनोः । या गुणांचा पडताळा आला.

(४) उष्मघाताचे २ रुग्ण

रोगी, मूल, २।। वर्षे, मे महिन्याचे दिवस होते. उकाडा फारच जाणवत होता अशा परिस्थितींत बाहेर गरम पाण्यानें मुलीस आंघोळ घालण्यांत येत होती. एकाएकीं उष्माघात झाल्याप्रमाणें मूल निश्चेष्ट पडलें, कांदा फोडून नाकासमोर तसेंच डोक्यावर धरण्यांत आला. पण कांहींच परिणाम दिसेना म्हणून घाईघाईनें बोलाविण्यांत आलें. उष्णतामान दिसेना. हातपाय अगदीं गार. नाडी त्रुटित लागते न लागते अशी, तेव्हां हेमगर्भ मात्रा लगेच चाटविली. साधारण ३।४ मिनिटांतच उष्णता येऊन नाडी वगैरे स्पष्ट लागूं लागली. सुमारें १५ मिनिटांनीं रुग्ण हालचाल करूं लागला, पण हेमगर्भानें उष्णता मात्र खूप वाढली. जेथें टेंपरेचर अजिबात लागत नव्हतें तेथें ४।। पर्यंत वाढलें आतां ताप आला तरी रुग्णास धास्ती नसल्यामुळें हेमगर्भाचा परिणाम कमी व्हावा म्हणून चंद्रपुटी प्रवाळ १ गुंज + शु. माक्षिक भस्म १ गुं.+गुळवेल सत्त्व २ गुंजा यांच्या ३ पुड्या मोरावळयांतून दिल्या. हळूंहळूं वाढलेली उष्णता कमी होऊन दोन दिवसांत रुग्ण पूर्ण बरा झाला. मग किरकोळ तक्रारींसाठीं अरविंदासव देण्यांत आलें.

अशीच ४वर्षांचे मुलाची पण एक केस हेमगर्भाचे मात्रेनें शेवटचे अवस्थेंत सुधारली. ह्या रुग्णास ४दिवस ताप होता व त्यासाठीं चंद्रकला २।२ गुंजा ३ वेळ मोरावळयांतून देत असे. ४ दिवसांत हाहि रुग्ण सुधारला.

————

पोस्ट ग्रॅज्युएट कोर्स

शुद्ध आयुर्वेदाचा ३।। वर्षांचा कोर्स अपुरा आहे अशी अनेकांची धारणा आहे' यासंबंधी खुलासा करतांना उपआरोग्यमंत्री श्री. बी. डी. जत्ती म्हणाले- "हा अभ्यासक्रम पुरा केलेल्या हुषार विद्यार्थ्यांसाठीं पुढें पोस्ट ग्रॅज्युएट अभ्यासक्रम सुरूं करण्याची व्यवस्था करण्यांत येणार आहे."

आरोग्यशाला, नासिक

आयुर्वेद सेवा संघ (रजिस्टर्ड) नासिक या संस्थेच्या विद्यमानें नासिक येथें शुद्ध आयुर्वेदशास्त्राची सरकारमान्य शिक्षणसंस्था दि. २१ जून १९५४ पासून सुरूं होणार आहे. एस्. एस्. सी. मध्यें संस्कृत परीक्षा पास असणाऱ्यांनीं ता. २१ पूर्वी आयुर्वेद सेवा संघ, रविवार पेठ, शनिगल्ली, नासिक येथें दुपारीं २ ते ५ च्या दरम्यान भेटावें.

— विंदुमाधव पण्डित

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फॅकल्टी ऑफ आयुर्वेदिक अँड यूनानी तिब्बी सिस्टिम्स ऑफ् मेडिसिन, (मुंबई राज्य)

एप्रिल १९५४ च्या डी. ए. एफ्. एस्. (चतुर्थ) परीक्षेचा निकाल

बसलेले उमेदवार २१६ उत्तीर्ण उमेदवारांची नांवें उत्तीर्ण उमेदवार १२०

मुंबई केंद्र

आगाशे मंदाकिनी स., आफळे दि. वि., भातखंडे शरयु पु., भावे प्र. ग., चावला नै. के., देव भा. अ., दवे मंजू अ., देसाई आशा भि., देसाई भावना अ., देशपांडे ना. ह., गांधी सुधा ल., अय्यंगार गो. रा., जळूकर श्री. द., जोहारपूरकर अ. शा., जोशी उषा कृ., लेव्ही डा. सा., माजगांवकर प्रभावती वि., मनकोडी धैर्यबाला भो., मटकर का. आ., मेहता म. म., मुकति कि. मू., पनिया सु. जे., राजपुरोहित कृ. रा., राऊत अ. मो., संत कुसुम म., सराफ व. र., शाह बा. रा., शाह ले. कु., शानभाग सरोज भि., श्राफ कृष्णा धी., टाकळकर सुमन दे., ठाकरे नलिनी द., थत्ते ज. द. वरेरकर मीरा न., व्यास प्र. नं., व्यवहारे प्र. ना.

जामनगर केंद्र

अग्रवात म. वि., भगत र. म., दलाल वी. गि., दवे प्र. मो., देसाई कां. त्रि., जदेज स. ग., जानी म. म., जानी प्र. ग., जानी विद्यागौरी ना., जोशी चं. फु., जोशी म. छ., कापडिया म. धी., लाखाणी अ. सि., मेहता म. र., नानावटी त्रि. आ., पारीख व. वृ., पटेल अ. प्र., पटेल ई. अं., पटेल कु. ना., पटेल सुशीला जि., राणा घ. चं., रावळ न. प्रा., सरैया ह. न., शाह जे. ना., शेठ सुशीला के., सोमाणी कु. दु., त्रिवेदी अ. वृ., त्रिवेदी जनकबाला म., व्होरा उ. शि.,

पुणें केंद्र

आठल्ये कुसुम वा., भट कुसुम य., भिरंगी कुसुम रा., चौधरी सु. ना., चौधरी श्री. मो., चितळे सुधा श्री., दातार प्रमा मो., दाते कुसुम स., दीक्षित रा. द., देशपांडे श्री. द., दोशी मालती मो., दोशी सुलभा कां., जोगळेकर रुक्मिणी गो., कावली श्र. म., कायंदे शा. रा., खांडेकर गं. स., खोत वा. दे., कोल्हे रा. श्रां., कोटस्थाने व. स., कुलकर्णी ना. ज., कुलकर्णी सिंधु ल., कुलकर्णी व. बं., लिमये कुसुम के., म्हाळशी व. का., नानल ग. श्यं., पराडकर स. द., पाटील चु. रू., पेंडसे मालती गो., राईलकर इंदु मो., साक्रीकर य. ना., शिंदे वि. ग., तेंडुलकर ध. शा., ठकार सुशीला भा., वैद्य कुसुम ना., वज्री अ. पी.

सुरत केंद्र

देसाई मधुकांता व., दीक्षित दक्षकुमारी श्री., झवेरी बिंदुबेन चि., लाड ना. दु., मेहता नलिनी म., नाईक म. अं., पंड्या नवनीतकला शां., पारीख ह. ज., पटेल क. न., पटेल कां. गो., पटेल म. बा. पटेल शांता भा., संजाणवाला प्र. ह., शाह भद्रा फु., शाह प्र. चि., शाह र. ना., शाह शकुन्तला ह., श्राफ र. हि., वाणीयावाला वि. आ., व्यास चि. क.

मेडिकल कॉलेजांत हिंदी माध्यम

भारतांतील सर्व कॉलेजामध्यें हिंदी हेंच या शिक्षणचें माध्यम ठेवण्यांत आलें तर सर्व मेडिकल कॉलेजामध्येंहि तेंच माध्यम ठेवण्यास मी आनंदानें तयार होईन. हिंदी माध्यम होणें ही राष्ट्रीय अभिमानाची गोष्ट आहे. असे उद्गार भारतीय मेडिकल कौन्सिलचे अध्यक्ष डॉ. सी. एस्. पटेल यांनीं मुंबई शाखेच्या क्लिनिकल सेक्शनचें उद्घाटन करतांना काढले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुस्तक परीक्षण—

श्री शिवदत्तमिश्र यांचा सटीक

—शिवकोष—

हा ग्रंथ 'डेकन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट ॲंड रिसर्च इन्स्टिट्यूट पुणें नं. ६' या संस्थेनें प्रकाशित केलेला आहे. श्री. डॉ. आर. जी. हर्षे. बी. ए. (टिळक), डि. लिट्. (पॅरिस) हे त्याचे संपादक आहेत. ऐतिहासिक आधारावर नवीन 'संस्कृत-कोष' तयार करण्याचें कार्य या संस्थेनें अंगावर घेतलेलें असून त्या कार्याचा एक भाग म्हणजे हा एक ग्रंथ होय. ग्रंथ २१० पृष्ठांचा असून मूल्य १२ रुपये आहे.

या कोषाचा विषय 'आयुर्वेदीय द्रव्यगुण-शास्त्रांतील वनस्पतींचीं नांवें' हा आहे. जवळजवळ २८६० प्रमुख अशीं नांवें यांत आलीं त्यांचे पर्याय मिळून ४८६० शब्दांचा हा 'कोष' ५४० श्लोकात रचला आहे. केवळ ४९ पानीं मूळ कोषावर स्वतः कोषकारांनीं ११५ पानांची विस्तृत अशी 'शिवप्रकाश' नांवाची टीका केलेली आहे.

आयुर्वेदीय वाङ्मयांत प्रसिद्ध असलेल्या 'धन्वन्तरीय' अथवा 'राजनिघण्टू' यांसारख्या कोषाहूनहि अधिक विस्तृत असा हा कोष आहे. इतर अनेक कोषांत न सांपडणारे विशिष्ट 'शब्द' व विशिष्ट अर्थ यांचा संग्रह यांत आहे. यांतील शब्द अतिशय अर्थबोधक व वनस्पतींचें यथार्थ चित्र आपल्यापुढें उभें करणारें असे आहेत. त्याचबरोबर 'नामलिंगानुशासनम्' या प्रमाणें लिंगभेदतः स्पष्टीकरण व्हावें अशी रचना केली आहे. स्वतः ग्रंथकार उपोद्घातांत म्हणतातः—

प्रीत्यै विविच्य भिषजो त्रिविधौषधानामसंदिहानस्य।
नानार्थौषधकोषो विरच्येत लिङ्गभेदेन ॥३॥

या रचनेमुळें वनस्पतींची ओळख सहज ठसते.

दीर्घपत्रा, जंतुमत्फला, शकुनाश इ. सारखीं नांवें वनस्पतीची बाह्य रचना दाखवतात. तर त्रायमाण, कासमर्दक, अक्षिभेषज, इ. वनस्पतींचे वैद्यकीय गुण दर्शवितात. नादेयी, हेमवती, गिरिजा, मागधी इ. वरून वनस्पतीचा मूलप्रदेश समजतो. अग्निमंथा, पुत्रजननी, वसंतोत्सवमंडिनी हीं नांवें वनस्पति उपयोजण्याची अवस्था सांगतात. वरुणा, शिवा, शारदा, यांना देवतांची, विष्णुकांता, कालकुंभयोनी यांना अवतारांची, यजनागा, ब्रह्मदारु, सोमलता यांना यज्ञयागविषयक नांवें ठेवून, त्यांचे विषयीं महती माहिती सूचित केली आहे.

या कोषांतील वनस्पतींचीं नांवें किती प्रकारचीं व किती यथार्थ आहेत, हें डॉ. हर्षे यांनी कोषावर जी ५३ पानांची विस्तृत व अभ्यासपूर्ण अशी विद्वत्तापरिपूर्ण टीका केली आहे, ती वाचून होते. पशुपक्षी, कीटक, जलचरप्राणी, सरपटणारे प्राणी, ऋतुपरिणाम, संसारांतील प्रसंग, जाती, समाजजीवन, धार्मिक रूढी, इ. कितीतरी जीवनांतील अंगांत वापरणारे शब्द वनस्पतींना आहेत. स्त्रीजातीशीं वनस्पतींचें असणारें साहचर्य, सौन्दर्यदर्शक, कोमलभागदर्शक, स्वभावदर्शक, हास्यादिभावदर्शक शब्दांचे साह्यानें प्रगट झालेलें आहे. डॉ. हर्षे यांनीं लिहिलेली सगळींच प्रस्तावना अतिशय वाचनीय व अभ्यासार्ह अशी आहे. आदर्श प्रस्तावना, आदर्श अभ्यास दृष्टि, संशोधक दृष्टि, ती प्रस्तावना वाचून समजते. बुद्धिमान व्यक्ति आयुर्वेदांतील वाङ्मयाचा अभ्यास करूं लागल्यावर त्या किती विविध दृष्टिकोन त्या वाङ्मयाच्या अभ्यासाचा देऊं शकतात हें ती प्रस्तावना वाचून प्रगटते.

'शिवप्रकाश टीका ही देखील आदर्श टीका आहे. संस्कृत साहित्यांतील साहित्यिकांच्या ग्रंथांतील उताऱ्यापासून अनेक आयुर्वेदीय ग्रंथ ग्रंथकार यांच्या उताऱ्यापर्यंत सर्व या टीकेंत आहे. ४४ इतर कोशकार, त्यांचीं नांवें व १०७ इतर वैद्यकेतर ग्रंथकार यांचा उल्लेख टीकेंत आला आहे. ह्या भागाचा संकलित आढावा घेऊन श्री, हर्षे यांनी टीकेच्या साहाय्यानें नवीन संशोधन-कार्यास प्रवृत्त होणाऱ्यांना मार्गदर्शन केलें आहे.

आयुर्वेदाचार्य—श्री.कृ. करमरकर

वरील ग्रंथ वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक येथें विक्रीस मिळण्याची व्यवस्था केली आहे. —व्यवस्थापक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुणें येथें शिष्योपनयन विधि

" पूर्वी पत्रिकेंत प्रसिद्ध झाल्याप्रमाणें वैद्य-भूषण गणेशशास्त्री जोशी हे ता. २१।६।५४ सोमवार-पासून नवीन शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रमाप्रमाणें पांच विद्यार्थी आपले घरीं ठेवून शिक्षण देण्यास आरंभ करणार आहेत. त्यापूर्वीं ता. २०।६।५४ रविवारीं सुश्रुतोक्त "शिष्योपनयनविधि" होमहवनपूर्वक करणार आहेत.

विद्यार्थ्यांचे ९० अर्ज आले होते. आयुर्वेद-प्रेमी लोकांनीं ता. २० रविवारीं सकाळीं ९ वाजतां "१८ शुक्रवार तुळशीबागेजवळ वै. भू. गणेशशास्त्री यांचे घरीं " गुरुशिष्यांचें अभिष्ट चिंतन करण्या-करितां उपस्थित रहावें किंवा पत्रद्वारा अभिष्ट-चिंतन करावें. "

मुंबई राज्याचे मुख्य प्रधान ना. मुरारजीभाई यांची

आयुर्वेद सेवासंघास भेट

रविवार ता. १३ जून १९५४ रोजीं रात्रीं ८॥ वाजतां मुंबई राज्याचे पंतप्रधान नामदार मुरारजी-भाई देसाई यांनीं आयुर्वेद सेवा संघ या संस्थेची पहाणी केली.

रविवार हा सुटीचा दिवस व रात्रीची वेळ असें असतांहि औषधीभवनादि सेवा संघाचे विभाग चालू ठेवण्यांत आले होते. (सविस्तर हकिकत पुढील अंकीं)

अनुक्रमणिका

बुद्धिपूर्वक श्रमशक्तीची आराधना करा	७७७
म. प्रां. वैद्य सम्मेलनाचे २ ठराव	७७८
म.प्रां. वैद्य संमेलन, विशेषाधिवेशनाचे ठराव	७७९
भारत सरकार वैद्य नोंदणी-करणार	७८२
एका वैदूची कैफियत	७८३
दोषक्षीणता व रोग	७८५
अ. भा. आयुर्वेद डेंटल मिशन	७९२
सहकारी पद्धतीनें तयार करावयाचीं औषधें	७९३
आयु. युनानी चिकित्सा बोर्ड परीक्षाफल	७९६
दररोज स्नान व दररोज साबण	७९७
शिक्षणार्थ जर्मनीचा प्रवास	७९८
निवडक रुग्ण चिकित्सा	७९९
डी. ए. एस्. एफ्. (चतुर्थ) परीक्षेचा निकाल	८०३
शिवदत्त मिश्र यांचा सटीक शिवकोष	८०४

डॉक्टरांनीं निधि जमवावा

भारतांतील डॉक्टरांची कमतरता नष्ट करण्यासाठीं खुद्द डॉक्टरमंडळीनीं निधि जम-वावा व स्वतःचें मेडिकल कॉलेज सुरू करावें. सध्या भारतांत ५० हजार डॉक्टर आहेत पण गरज मात्र २ लक्ष डॉक्टरांची आहे. मुंबईतील फक्त डॉक्टरांच्या मुलामुलींसाठीं एक मेडिकल कॉलेज काढावें अशीहि एक विलक्षण सूचना भारतीय मेडिकल कौन्सिलचे अध्यक्ष डॉ. सी. एस्. पटेल यांनीं केली आहे.

आयुर्विद्या प्रसारक मंडळाचें

शुद्ध आयुर्वेद विद्यालय, शींव, मुंबई

वरील संस्थेचें सरकारमान्य शुद्ध आयुर्वेद विद्यालय दि. २१ जून १९५४ पासून सुरू होणार आहे. एस्. एस्. सी.मध्यें संस्कृतमध्यें ५० टक्के गुण मिळविणाऱ्यांनीं किंवा सरकारमान्य संस्कृत परीक्षा पास असणाऱ्यांनीं प्रवेशासाठीं ता. १८ जून १९५४ च्या आंत वरील पत्त्यावर समक्ष भेटावें.

ग. म. अभ्यंकर

अधिपति

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

—: कांहीं उपयुक्त वैद्यक ग्रंथ :—

रोगविज्ञान जोडभाग डॉ. वि. म. भट १२ रु.
प्रसूतितंत्र ... ... ,, ,, ७ ,,
स्त्रीरोग विज्ञान ,, ,, ५ ,,
प्रश्नोत्तर कामशास्त्र श्री. पं. ज. कुलकर्णी ३ ,,
उपयुक्त ॲलोपॅथिक औषधें डॉ. गुप्ते १॥ ,,
बृहदासवारिष्टसंग्रह पं. कृष्णशास्त्री त्रिवेदी ७ ,,
सार्थ सुश्रुतसंहिता वै. द. ब. बोरकर ११ ,,
चारुचिकित्सा हिंदी गोपीनाथजी गुप्ता २॥ ,,
पांच वर्षांचा पाळणा डॉ. शं. ह. मराठे १॥ ,,
आयुर्वेदीय औषधी संशोधन वै. धामणकर १ ,,
नित्योपयोगी औषधें वै. अ. वा. ऐनापुरे २॥ ,,
ॲलोपॅथिक औषधीसंग्रह पं. जगन्नाथशास्त्री ६ ,,
ॲलोपॅथिक चिकित्सासंग्रह ,, ४॥ ,,
आरोग्यमार्गप्रदीप श्री. गो. म. चिपळूणकर ३ ,,
चिकित्साप्रभाकर श्री. प्र. बा. ओगले २० ,,

कामसूत्र ... ... ५ रु.
दंतरोगविज्ञान व चिकित्सा वै. जायदे ३ ,,
वैद्यसन्मित्र (हिंदी) ,, ३ ,,
औषधीशास्त्र भाग २ वै. गो. आ. फडके ३ ,,
सिद्धौषधीप्रकाश वै. गणेशशास्त्री जोशी ६ ,,
आरोग्यासनें डॉ. र. कृ. गर्दे १॥ ,,
वनौषधी गुणादर्श वै. पदेशास्त्री ७॥ ,,
ज्वरनिदान वै. गो. आ. फडके ३ ,,
रसकामधेनुः (संस्कृत) वै. यादवजी ५ ,,
विवेचनात्मक सूचिवेध पद्धति हिंदी ५॥ ,,
यकृतरोग विशेषांक १ ,,
शारीर तत्वदर्शनम् (संस्कृत) वै. हिर्लेकर ६ ,,
वात्स्यायन कामसूत्र भाग १ अनु. खुपेरकर ६॥ ,,
इंजेक्शनविज्ञान डॉ. डी. ए. घाटगे ६ ,,
इंजेक्शनचिकित्सा ... ... ,, ,, ६ ,,

वैद्यक ग्रंथ भांडार, आयुर्वेद सेवा संघ, नाशिक

४० वर्षांवरील **अनुभव** आणि सर्व देशभर पसरलेल्या नऊ वैद्यकीय प्रयोग शाळांतील वैद्यक शास्त्रीय पंडितांचें कार्य हा जम्मींच्या कीर्तीचा पाया होय.

* जम्मीचा आंकडेवारी-दर्शक रिपोर्ट मागवा



जम्मींचें लिव्हरक्युअर दरवर्षी हजारों मुलांचें यकृताच्या विकृतिपासून संरक्षण करून त्यांना पुनः आरोग्य प्राप्ति करून देतें.

आतां सोयीस्कर आकाराच्या वड्या मिळतात

जम्मी वेंकटरमणय्या अॅन्ड सन्स

"जम्मी बिल्डिंग", मयलापूर, मद्रास ४ मुंबई शाखा: 'पारेख मॅन्शन', सॅन्डहर्स्ट रोड (पश्चिम)

संपादक व प्रकाशक:— वैद्य पिंडुमाधव पांडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य विठ्ठलकर कारंजा, नाशिक
मुद्रक:— श्री. चि. ओक. सर्कल प्रेस, आग्रारोड नासिक.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होते)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु.   सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ८ वें)   नाशिक, ता. १ जुलै १९५४   (अंक १ ला

वैद्यभूषण गणेशशास्त्री यांची गुरुपरंपरेला सुरुवात

विद्याप्रेमी लोकांना अनुकरणीय कार्यक्रम

अखिल भारतांत आयुर्वेदीय शिक्षणक्रमाला सरकारमान्य गुरुपरंपरा पद्धतीनें रविवार ता. २०-६-५४ रोजीं प्रथम महाराष्ट्रांतील प्रख्यात वैद्य व थोर देशभक्त वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी यांचेकडे शिष्योपनयन विधीनें आरंभ झाला.

आयुर्वेदीयांनीं कसून प्रयत्न करावा



वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी

त्यासमयीं 'केसरी' चे वयोवृद्ध संपादक श्री. तात्यासाहेब करंदीकर यांनीं गुरुशिष्यांना मार्गदर्शन करतांना आयुर्वेदाचें महत्व सांगितलें. व शासनसंस्थेनें शासित अशी ही गुरुपरंपरा आहे हें या परंपरेचें वैशिष्ट्य आहे. वैद्यभूषण गणेशशास्त्री यांनीं स्वार्थत्यागपूर्वक सुरू केलेला हा कार्यक्रम महाराष्ट्रांतीलच नव्हे तर भारतांतील विद्याप्रेमी लोकांना अनुकरणीय आहे व शास्त्रीबोवांना भूषणावह आहे. भारत-सरकारच्या आरोग्यमंत्री श्रीमति अमृतकुंवरबाई यांनीं आयुर्वेद हें एक बाडी वैद्यक आहे असा त्यावर घेतलेला आक्षेप आजच्या समारंभाच्या वेळीं उपस्थितांच्या व गुरुशिष्यांच्या नजरेसमोर आणून असे अयोग्य आक्षेप खोडून काढण्याचा आयुर्वेदीयांनीं कसून प्रयत्न करावा असें त्यांनीं सांगितलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

गुरुकुल-पत्रिका

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पार्लमेंटांतील बहुसंख्याचा आयुर्वेदाला पाठिंबा

त्यानंतर श्री. त्र्यंबकराव देवगिरीकर यांनीं शास्त्रीबोवांनीं ज्या ध्येयानें आयुर्वेदाचें सखोल ज्ञान मिळविलें त्या ध्येयाप्रमाणें शिष्य तयार करून जनसेवा व शास्त्रसेवा त्यांचेकडून अव्याहतपणें चालूं रहावी, हें स्वप्न साकार झाल्याचें पाहण्याचें भाग्य माझ्यासारख्या परमस्नेह्याला आनंददायक तर खास आहे. शिवाय ज्या पुणें शहरांत वैद्य अण्णासाहेब पटवर्धन, बापूसाहेब मेहेंदळे, लागवणकर इत्यादि प्रख्यात वैद्यांनीं शहराचे आयुर्वेदीय दृष्टया वैभव वाढविलें त्याच शहराची ही कीर्ति अखिल भारतांत दिगंत गाजत राहील अशी कृति शास्त्रीबुवांनीं करून पुणें शहराच्या वैभवांत भर टाकली आहे. हें कार्य यशस्वी व फलद्रूप होण्याला माझ्याप्रमाणेंच देशांतील प्रत्येकाचा मनःपूर्वक पाठिंबा राहील. आयुर्वेदाचे बाबतींत पार्लमेंटमध्ये बहुसंख्याची सहानुभूति आहे व मीहि यासाठीं पाहिजे ते प्रयत्न करीन.

पुण्यांत एकच वैद्य गुरु

आयुर्वेदाचार्य पांडुरंगशास्त्री देशपांडे यांनीं आनंद व्यक्त करतांना आजच्या समारंभांत चरक-सुश्रुत कालाप्रमाणें अग्नीला साक्षी ठेवून घ्यावयाच्या प्रतिज्ञा गुरुशिष्यांनीं घेतल्या हें पाहण्याचें भाग्य आम्हांस लाभले याबद्दल आम्ही आपणांस धन्य मानतो. आयुर्वेदाचें शास्त्रीयत्व पटवून देण्याची शास्त्रीबुवांची हातोटी फारच थोड्या लोकांत आहे, आणि म्हणूनच आज पुण्यांत आम्ही कितीहि वैद्य असलो तरी एक शास्त्री-बोवाच गुरु म्हणून होऊं शकतात. हीच एक गोष्ट त्यांच्याबद्दल सरकारनें व वैद्यांनीं टाकलेल्या विश्वासाला पुरेशी आहे. त्याप्रमाणेंच प्रा. म. माटे यांनींहि यापुढें आयुर्वेद उंचावला जाऊन प्रतिष्ठा लाभेल अशी आशा व्यक्त केली.

देशाला स्वातंत्र्य व शुद्ध आयुर्वेदाला मान्यता

आभार मानतांना श्री. पोपटलाल शहा म्हणाले, शास्त्रीबोवांचा सार्वजनिक कार्यातील एक पाईक म्हणून ही कामगिरी वैद्यभूषणांनीं माझ्याकडे सोपविली आहे. वैद्यभूषणांची मनीषा असल्याप्रमाणें देशाला स्वातंत्र्य व शुद्ध आयुर्वेदाला मान्यता या दोन्ही गोष्टी सफल झाल्या आहेत. त्यानंतर प्रसाद, पानसुपारी व वंदेमातरम् होऊन कार्यक्रम समाप्त झाला.

आयुर्वेद पत्रिकेचा डॉ. सावनूर विशेषांक

आयुर्वेद पत्रिकेच्या आठव्या वर्षाचा विशेषांक १ आगस्ट ऐवजीं प्रसिद्ध होणार आहे.

सर्कल मुद्रणालयाकडे सरकारी मतदारांच्या याद्या छपाईचें जोखमीचें काम अनपेक्षितपणें आल्यामुळें हा बदल करणें भाग पडलें, याबद्दल ग्राहकांनीं क्षमा करावी. --व्यवस्थापक

‘आयुर्वेदाच्या सेवेसाठीं तयार’

शास्त्रोक्त पद्धतीनें तयार झालेलीं सर्व-प्रकारचीं सिद्धौषधें [गुटिका, मात्रा, रसायनें, आसवें वगैरे] व हिंवतापांवर अत्युत्तम ठरलेलें हिंवतापांतक, मिळण्याचें एकच ठिकाण.

सविस्तर माहितीकरितां लिहा:—

आयुर्वेदीय औषधी भांडार

२८ शुक्रवार, तुळशीबागेची पिछाडी, पुणें २

शास्त्रोक्त पद्धतीनें व अत्यंत परिश्रमानें तयार केलेलीं महाराष्ट्र प्रांतीय वैद्यसंमेलनानें व ऑल इंडिया आयुर्वेद कॉंग्रेस व प्रदर्शनाकडून प्रशंसित

सहस्रपुटी अभ्रक इ. भस्में व इतर औषधें

प्राइसलिस्ट मागवा.

श्री अमरेश्वर आरोग्यमंदिर

मिरासी बोळ, पो. इचलकरंजी S. M. C.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघास मोरारजीभाईंची भेट

रविवार तारीख १३।६ रोजीं रात्रीं ८॥ वाजतां मुंबई राज्याचे पंतप्रधान ना. मुरारजीभाई यांनीं नाशिक येथील आयुर्वेद सेवा संघ या संस्थेस भेट दिली. त्यावेळीं बरोबर पी. ए. श्री. टोणपे, कलेक्टर श्री. यार्दी, आमदार वसंतराव नाईक, आमदार काळे, श्री. वामनराव यार्दी, श्री. पोतनीस, श्री. बाळासाहेब पांडे, श्री. आव्हड वकील, रावबहादूर गोखले, वैद्य विष्णुशास्त्री दाते आदि मंडळी उपस्थित होती.

संघ सदस्यांचा परिचय

रविवार पेठेंत शनिगल्लींत आयुर्वेद सेवा संघाच्या द्वारीं वैद्य बिंदुमाधव पंडित यांनीं पंतप्रधानांचें नमस्कारपूर्वक स्वागत केलें व सेवासंघाचे मंत्री वै. मराठे; सदस्य वै. वि. म. गोगटे व भावी सदस्य वै. कुलकर्णी व वै. करमरकर यांचा परिचय करुन दिला. त्यानंतर क्रमानें भस्मांच्या चौकटी, चालू असलेले दगडी हात-खल, दळण्याचीं जातीं, कुटण्याचे लोखंडी खलबत्ते, वनस्पति तोडण्याच्या लहान कुऱ्हाडी इ. साधनें चालू स्थितींत दाखविलीं. पर्यंत वसंतराव नाईक यांनीं कामगारांना मिळणाऱ्या मजुरीची माहिती घेतली. त्यानंतर कोरडीं औषधें, भस्में, गोळ्या हा विभाग पाहिला. गोळ्या करतांना यंत्र वापरण्यांत औषधी द्रव्यांत कांहीं बदल करावा लागतो काय याबाबत चर्चा झाली.

संघाचीं विशेष औषधें

नंतर सेवा संघानें गुरवारी हिरड्यापासून अगस्तिप्राश, बिब्यापासून भल्लातकासव, लिंबाच्या सालीपासून लोणचें, आंब्याच्या बाठीपासून पंचामृतचटणी, पूर्णप्रमाण सुवर्ण असलेला वसंत इत्यादि केलेलीं विशेष औषधें व त्यांचे उपयोग समजून सांगण्यांत आले.

महाबळेश्वरी मध

मोहाचीं फुलें औषधीकरणासाठीं मिळण्यांत अबकारी-खात्याकडून येणाऱ्या अडथळ्याचें गाऱ्हाणें नामदारांच्या पुढें मांडण्यांत आलें. त्याचें निराकरण करण्याचें त्यांनीं मान्य केलें. महाबळेश्वरी हिरड्याचा, जांभळाचा मध येथें पाहून त्यांना समाधान वाटलें. पारिजातकाच्या पानांपासून मलेरियानाशक शेफाली-कल्प होतो व उंबराच्या पानांपासून स्तनाच्या खांडकांना लावण्याचें उदुंबरसार हें गुणकारी औषध तयार होतें हें पाहून नामदाराना बरें वाटलें.

पोटदुखीवर उदाचा धूर

वातावरण शुद्धीसाठीं सेवा-संघांत धूप (लोबाण) जाळतात. त्या धुराचा पोटदुखीवरील प्रयोग नामदारानीं कलेक्टर साहेबांस समजावून सांगितला. लोबाण जाळून त्याचा धूर एका तांब्यांत पकडावयाचा व मग त्या तांब्यांत पाणी भरून तें पाणी पोटदुखीच्या माणसास प्यावयास द्यावयाचें. प्रयोग साधाच पण उत्तम गुणकारी आहे.

अर्क-यंत्राचा उपयोग, भट्ट्या

किन्हईच्या पाटणकर वैद्यांच्या अर्कयंत्रांतून गुलाबपाणी काढण्याचें काम चालू होतें. तें नामदारांनीं पाहिलें. नंतर कुपिस्थ रसायनें व त्यांच्या भट्ट्या, काव्यांच्या भट्ट्या व गजपुटाच्या भस्या पाहिल्या. काढा करून राहिलेल्या चोथ्याचें कंपोस्ट-खत करण्यांत येतें तें पाहून तुम्ही कांहींहि वाया जाऊं देत नाहीं, असे उद्गार त्यांनीं काढले.

ओल्या वनस्पतींच्या कुंड्या

आसवारिष्टसंग्रह-विभागांत त्यांनीं विडंगारिष्ट, चंदनासव, भल्लातकासव, कुमारीआसव इत्यादि भरलेलीं लाकडी पिपें पाहिलीं तेव्हां त्यांनीं तेथें, असलेल्या लोकांना 'मी सध्यां कुमारीआसव घेत आहे' असें सांगितलें. आंगणांतील उदुंबर व पारिजातक वृक्ष व वेखंड, अक्कलकरा, ब्राह्मी आदि जिवंत वनस्पती पाहून ना. मोरारजींना बरें वाटलें. जवळच असलेली

(पुढील मजकूर पान नंबर ६ वर पहा)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आरोग्यमंत्री ना. शांतिलालजी शहा यांचे हस्तें आ. से. संघाच्या शुद्ध आयुर्वेद विद्यालयाचें उद्घाटन

बुधवार दि. २३ जून १९५४ रोजीं दुपारीं २ वाजतां आयुर्वेद सेवा संघाच्या चिकित्सा विभागांत (मेनरोडवरील प्रकाश औषधालय व धर्मार्थ दवाखाना यांत) आरोग्यमंत्री नामदार शांतिलाल शाह यांचें स्वागत करण्यांत आलें. संस्थेच्या कार्याध्यक्षांनीं नामदारांना सर्व विभाग दाखविले. निवातागार, लघुशस्त्रकर्मविभाग, शोधनचिकित्सागृह, स्वास्थ्योपचारगृह, मलपरीक्षण-व्यवस्था इ. विभाग दाखवून, लवकरच सुरूं करावयाच्या शुद्ध आयुर्वेद विद्यालयांतील चिकित्सेच्या प्रत्यक्ष शिक्षणाच्या ह्या सोयी असल्याचें नामदारांना सांगण्यांत आलें.

प्रत्यक्ष शिक्षणाच्या सोयी

त्यानन्तर सेवा संघाच्या औषधी भवनांत जाऊन तेथील विविध विभाग, रसशास्त्र व वनस्पतिशास्त्र या विषयांच्या प्रत्यक्ष शिक्षणाच्या सोई म्हणून दाखविण्यांत आल्या. त्याचवेळीं चालू असलेल्या संशोधन कार्याची माहितीहि देण्यांत आली.

विद्यालयाच्या अध्यापकांचा परिचय

केतकर भवनाच्या प्रवेशद्वारीं सर्व अध्यापकांनीं मंत्र्याचे स्वागत केल्यावर,अध्यापकांचा क्रमानें परिचय करून देण्यांत आला.

श्री धन्वन्तरी स्तवन

आरोग्यमंत्री स्थानापन्न झाल्यावर, वैद्य श्री. हडपे यांनीं गांभीर्यपूर्ण व भक्तियुक्त सुस्वरांत श्रीधन्वन्तरीस्तवन म्हटलें, व समारंभास सुरवात झाली.

शहर वैद्य मंडळाचा पाठिंबा

शुद्ध आयुर्वेद विद्यालयाचे व्यवस्थापक वैद्य लोखंडे यांनीं महाराष्ट्रांतील सर्व प्रांतांतून व जिल्ह्यांतून आलेले शुभसंदेश वांचून दाखविले. त्यानन्तर कार्यवाह वै. विष्णुशास्त्री दाते यांनीं आयुर्वेद विद्यालयाच्या स्थापनेचा इतिहास थोडक्यांत निवेदन करून नासिक शहर वैद्य मंडळाचा विद्यालयास पूर्णपणे पाठिंबा असल्याचें सांगितलें व १९३८ सालीं पडलेलें बंधन मंत्र्यांनीं नाहींसें करून हा मार्ग मोकळा करून दिला याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें.

वै. वेणीमाधवशास्त्री यांचें भाषण

आयुर्वेद सेवा संघाचे चालू वर्षाचे अध्यक्ष वेणीमाधवशास्त्री जोशी यांनीं आयुर्वेद सेवा संघ गेलीं २० वर्षे आयुर्वेदाच्या अध्यापनाचें कार्य करीत आल्याची परंपरा सांगून नाशिक हीच भूमि आयुर्वेदाचें अध्ययन-अध्यापनाचें कार्य करण्यास कशी सुयोग्य आहे हें सांगितलें.

सेवा संघाचे मंत्री वैद्य वा. स. मराठे यांनीं चिकित्सा विभागातर्फे गेल्या ११ वर्षे चालविलेल्या 'रोग निवारण' व 'स्वास्थ्यानुवृत्तिकर' कार्याचें वृत्त निवेदन केलें.

सुयोग्य प्रकारें चाललेलें कार्य

शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीचे मंत्री व शुद्ध आयुर्वेदाचा पुरस्कार सर्व प्रथम ज्या नासिक जिल्हा वैद्य संमेलनानें केला, त्याचे भूतपूर्व अध्यक्ष वैद्य ना. ह. जोशी हे या प्रसंगीं मुद्दाम हजर होते. त्यांनीं आयुर्वेद सेवा संघाचें कार्य अत्यन्त सुयोग्य प्रकारानें चाललेलें असल्यामुळें नाशकास सेवा संघातर्फे विद्यालय निघणार म्हणून मंत्र्यांना आपण पूर्वी सांगितलेलें आपलें निवेदन आज साकार होत असतांना पाहून समाधान व्यक्त केलें.

शुद्ध आयुर्वेद विद्यालय = आरोग्यशाला

विद्यालयाचे प्रधानाध्यापक वै. विंदुमाधव यांनीं हें विद्यालय म्हणजे केवळ रोगनिवारणाचें कार्य शिकवणारें विद्यालय होणार नसून रोग होऊं न देण्याचें शास्त्र शिकविणारें होणार असल्यामुळें याला आरोग्यशाला नांव द्यावयाचें मनांत असतांना सरकारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

योजनेप्रमाणें सरकारमान्य पाठ्यक्रमाचें विद्यालय अॅ निदर्शनास यावें म्हणून 'शुद्ध आयुर्वेद विद्यालय' असें नांव दिलें आहे असें सांगितलें व विद्यालयाचें उद्‌घाटन करण्याविषयीं नामदारांना विनंति केली.

सरकारचा दृष्टिकोन

आयुर्वेद म्हणजे केवळ एक जुनें पुराणें, रोग नाहींसे करण्याचें शास्त्र, असें नसून तें एक सबंध जीवन, कोणत्या तऱ्हेनें घालवावें याचें संपूर्ण शास्त्र आहे, अशी सुरुवात करून नामदार आरोग्यमंत्री शहा यांनीं आपली व आपल्याबरोबरच्या राज्यकर्त्यांची आयुर्वेदाकडे पहाण्याची दृष्टि पुढीलप्रमाणें मांडली. ते म्हणाले—

शरीर केवळ लॅबोरेटरी नव्हे

आयुर्वेद व इतर पाश्चात्य वैद्यक शास्त्र यांच्यातील मूलभूत भेद म्हणजे पाश्चात्य वैद्यक, शरीर म्हणजे एक फिजिकल व केमिकल लॅबोरेटरी मानतें. व आयुर्वेद यांच्यापलिकडे असलेल्या आत्म्याचा विचार करतो. साहजिकच याचा परिणाम असा होतो की रोग्याच्या रोगापलिकडे खाणें, पिणें, आचार-विचार, नीतिनियम, संयम, इ. गोष्टींचा विचार करण्याची गरज अॅलोपॅथला नसते व वैद्याकडे गेले म्हणजे तो या सगळया गोष्टींचा विचार करतो. परन्तु आजचा समाज दिवसेंदिवस स्वच्छंदी बनत चालला आहे. त्याला हीं सर्व बंधनें नको असतात. मनःपूत वागून रोगनाश झाला तर त्याला पाहिजे आहे. यामुळें वैद्याकडे जाण्याची त्याची प्रवृत्ति कमी होत आली आहे. शिवाय इंग्रजी राज्यकर्त्यांनीं अॅलोपॅथीलाच प्राधान्य दिलें व तिचाच प्रचार करविला. आजचेहि राज्यकर्ते लाखो रुपये अॅलोपॅथीवर खर्च करीत आहेत. यामुळेंहि आयुर्वेद मागें पडला. आज रोगी स्वतः होऊन पेनिसिलीनं मागतो. इंजेक्शन मागतो, आयुर्वेदाकडे जात नाहीं. स्वास्थ्याविषयीं त्याची बेपर्वाई वृत्ति असते.

मी आणि माझे राज्यकर्ते स्नेही यांची विचारधारा अशी आहे. समाजांत आत्मिक विचार, संयम, सदाचार हें आले तरच समाजाची पातळी उंचावेल. सामाजिक जीवनांत बदल झाला पाहिजे असें आम्हांस प्रांजलपणें वाटतें. केवळ शरीरस्वास्थ्यच नाहीं तर मनस्वास्थ्य समाजांत निर्माण होणें परमावश्यक आहे. हें कार्य करायला आयुर्वेदीय विचारसरणी योग्य आहे. आयुर्वेदाचीं विद्यालयें चालावींत, या विद्येचा, ज्ञानाचा प्रचार व्हावा, समाजांत त्याविषयींची श्रद्धा वाढावी असें आम्हाला वाटतें. पण ज्ञानावरची श्रद्धा सरकार वाढवूं शकत नाहीं. तें कार्य तुमच्यासारखे ब्राह्मवृत्तीनें रहाणारे त्यागी व ज्ञानी लोक करीत असतात. फक्त राज्यसत्तेचा पाठिंबा मात्र त्यांना अवश्य असतो. राज्यसत्ता वणिक् व क्वचित् क्षात्रवृत्तीची असते खरें कार्य आपणांसच करावयाचें आहे. आपली, ज्ञानवंतांची, प्रतिष्ठा वाढावी म्हणून आम्ही आयुर्वेदाला पाठिंबा दिला आहे. केवळ सामान्य जनतेच्या हिताच्या दृष्टीनें त्याकडे आम्हीं पाहातो. पक्षपाताची दृष्टि आमच्यांत नाहीं.

कठीणतम काम

आपल्याला आयुर्वेदाची प्रगति द्रुतगतीनें करावयाची आहे. लाखो रुपये दरसाल मिळून ज्यांचें कार्य सुरुं आहे त्यांचे मानानें आपणांस प्रगति करावयाची आहे. याकरितां आपण सुसंघटित झालें पाहिजे. विद्वान् असला, मतभेद असले, तरी सरकारपुढें एकविचारानें जातां आलें पाहिजे. नियमितपणें वेळेवर कार्य करायला आपणास शिकावें लागेल. सरकारी नियंत्रणाप्रमाणें आपल्याला वेळेवर कार्य करून पुढें यावें लागेल. आयुर्वेद लोकप्रिय करावयास हवा. आयुर्वेदाप्रमाणें इतरहि वैद्यकें आमच्यापुढें असतात. आपण उत्तम रीतीनें वारंवार आपली बाजू आमच्यापुढें मांडून आम्हीं दुर्लक्ष केलें तरी आमचें लक्ष वेधून घेतलें पाहिजे.

आमचें लक्ष वारंवार वेधवा

आपल्याला हॉस्पिटलची जरूरी आहे. सरकार पुणें व अहमदाबाद येथें २० बेड्‌सची सोय करून देणार आहे. पण तें सर्व आपल्या कार्यावर अवलंबून आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपण संशोधनशील, प्रगतिशील राहिलें पाहिजे. आयुर्वेदांतील अनेक त्रुटी आहेत त्या नाहींशा करण्याकरितां योजना आहेत, त्या सर्वांवर तुम्ही एकमत प्रगट करावयास हवें. आम्ही अज्ञ लोक आहोंत. तुम्ही ज्या प्रमाणांत आमचें लक्ष वेधाल त्या प्रमाणांत तुम्हाला मदत मिळेल. संकुचित वृत्ति सोडून कार्य करावयास पाहिजे. आयुर्वेदीय वैद्यांच्या प्रगतीला आड येणाऱ्या या गोष्टीचा विचार करा. "विद्या" मग ती कुठलीहि असो तिचा स्वीकार करून शास्त्राला प्रगत करा.

गुरुशिष्य-परंपरेला परवानगी

हा कोर्स सुरूं करण्याकरितां आम्ही गुरुशिष्य परंपरेसहि परवानगी दिली आहे. गुरु व शिष्यांचे संबंध अधिक दृढ व्हावेत व शिष्यानें सर्व प्रकारानें गुरूस उत्साहित करून ग्रंथांत नसलेलें, गुरूच्या बुध्दींत असलेलें ज्ञान आत्मसात करून घ्यावें.

मधुकर वृत्तीनें आयुर्वेद वाढवा

शेवटीं सांगावयाचें इतकेंच कीं आपण सर्व मधुकरी वृत्तीनें, त्यागानें, वागून ऋषितुल्य जीवनानें आयुर्वेद प्रगत करावयास हवा. राजा व ऋषि यांपैकीं ऋषींनाच जास्त किंमत आहे, आपण आपल्या पायावरच उभें रहावयास हवें!

आज हें विद्यालय सुरूं झालें असें मी प्रगट करतो. व येथून बाहेर पडणारे शिष्य समाजाचे उत्तम प्रकारचे सेवक होऊन आयुर्वेदाची कीर्ति वाढवतील अशी आशा करतो.

यानंतर मंत्र्यांचे आभार मानून विद्यालयातर्फे व नाशिक शहर वैद्यमंडळातर्फे त्यांना सुताचे व पुष्पांचे हार अर्पण करण्यांत आल्यावर 'वंदेमातरम्' गीत म्हटलें गेलें, व प्रसादवितरणानंतर समारंभ समाप्त झाला.

या नंतर प्राचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी यांचे अध्यापकवर्गासाठीं 'आयुर्वेदीय अध्यापनाची दिशा' यांवर विद्यालयाचें पहिलें व्याख्यान म्हणून एक उद्बोधक असें प्रवचन झालें.

या समारंभास नासिक जिल्ह्याचे कलेक्टर श्री. मधुकरराव यार्दी, सिव्हिलसर्जन श्री. पारेख आमदार वामनराव यार्दी, श्री. द. शं. पोतनीस, श्री. रावसाहेब थोरात, आदि बरीच प्रमुख नागरिक व अधिकारी मंडळी उपस्थित होती.

ना. मोरारजीभाईंची भेट

(पान नंबर ३ वरून चालू)

केतकर टाऊन हॉल ही जागा लवकरच सुरूं व्हावयाच्या शुद्ध आयुर्वेदाच्या शिक्षणासाठीं मिळविण्याचा चालकांचा प्रयत्न चालू असल्याचें त्यांच्या कानावर घालण्यांत आलें.

जंगलांतून आणलेल्या वनस्पति

चरखा-संघाच्या जंगलांतील उत्पत्तिप्रांतून (सिरपूर-कागजनगर-हैद्राबाद स्टेट) वनस्पति आणण्याची व त्याच्या मोबदल्यांत सिद्धौषधें पुरविण्याची संघाची व्यवस्था त्यांना पसंत पडली. सेवा-संघाचे वैद्यक ग्रंथालय व वैद्यकीय प्रकाशनें पाहून संस्थेचें वैशिष्ट्य त्यांच्या लक्षांत आलेसें दिसलें. आयुर्वेद-पत्रिकेच्या बांधीव पुस्तकें, सेवा-संघ सदस्यांचे रुप फोटो, संस्था ट्रस्ट-ॲक्टखालीं नोंदल्याचा दाखला हें सर्व त्यांना दाखविण्यांत आलें.

लेखी निवेदन

आयुर्वेद सेवा संघानें एक लेखी निवेदन नामदारांना सादर केलें आहे. 'संस्थेला येणाऱ्या अडचणींबावत व भावी कार्याबावत मुंबईस भेटा, असा सूचक सल्ला नामदारांनीं चालकांना दिला आहे.

मस्तु, वर्षाऋतूचें पेय

गाईचें दुध विरजून त्यांतील घनभाग अलग करून केवळ द्रवभाग जो मस्तु तो नामदारांना पेय म्हणून अर्पण करण्यांत आला व त्याची माहिती देण्यांत आली. ती कल्पना नामदारांना पसंत पडलेली दिसली. सेवा संघातर्फे व नाशिक शहर वैद्य मंडळातर्फे सुताचे हार अर्पण करून आभार मानल्यावर समारंभ रात्रीं ९। वाजतां समाप्त झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

— सहकारी पद्धतीनें तयार करावयाचीं औषधें —

अवलेह–पाक :

लेखकः– वैद्य पु. वि. धामणकर
धूतपापेश्वर-पनवेल

कल्पहेतुः– औषधी पदार्थ मोठ्या प्रमाणांत सेवन करतां यावा; तो आहार द्रव्याबरोबर देऊन त्याचे बरोबरच ह्याचेंहि पचन, संशोषण सुलभ व्हावें, शरीराची गरज त्वरेनें व भरपूर भागवितां यावी, वनस्पतींचें ताजेपणाचे गुण इतर ऋतूंतहि पूर्णपणें लाभावेत व स्वास्थ्य-रक्षण व रोगहरणाचें कार्य सुफल व्हावें, म्हणून हा कल्प रचण्यांत आला आहे.

संज्ञाः– १ मधु, २ शर्करा, ३ लेह, ४ अवलेह ५ प्राश, ६ गुड, ७ मोदक, ८ खंड, ९ पर्पटी.

द्रव्यवर्ग

ह्यांत वनस्पतींचे रस अथवा त्यांचीं चूर्णें, खनिजांचीं भस्में, मध, तूप, साखर, गूळ हे पदार्थ कमी अधिक अंशानें व कांहींच्या फरकानें असतात. उदा...

फळः– आंवळा, कोहळा, हिरडा, बेल, आंबा इ.

बीः– बदाम, कवच, एरंडी, वावडिंग, इ.

फूलः– गुलाब, अडुळसा, इ.

सालः– कुडा, इ.

पानः– अडुळसा, कोरफड.

कंदः– आलें, चोपचिनी, कांदा, लसूण, कोहळा इ.

हे पदार्थ ओले, सुके, अखंड, खंडशः वा रस-कल्पांतहि असतात.

मधुर द्रव्य

प्रयोजनः– सहा रसांत मधुर रस आबालवृद्धांस आजन्म-सात्म्य असतो. त्याचे अनुषंगानें शरीर औषधी पदार्थ मोठ्या प्रमाणांत स्वीकारतें. ह्या द्रव्यांत मध, गूळ व साखर यांचा अंतर्भाव होतो. हे पदार्थ स्वतः टिकाऊ व दुसऱ्यासहि सुस्थितींत राखणारे आहेत. ह्यांची योजना येथें बंधक, संरक्षक व रोचक म्हणून आहे.

मधुर द्रव्य चौपट लागतें

प्रमाणः– प्राचीन काळीं हे कल्प [illegible] ह्यांना अनुलक्षून केले जात. तेव्हां टिकाऊपणा, रुचि-वैचित्र्य, वाहतुक इ. चा विशेषसा संबंध येत नसे. आज तीं प्रमाणें इष्ट मानून भागत नाहीं. आज तयार मिश्रणापेक्षां चौपट मधुर द्रव्य घ्यावें लागतें, तर तो कल्प सर्वांना रुचतो.

दक्षताः— मधुर पदार्थ जात्याच संरक्षणक्षम असला तरी तें त्याचें सामर्थ्य बेताचेंच असतें. हवा, उजेड, आर्द्रता ह्यांचे संपर्कानें कल्पांत विकृति उत्पन्न होते. पण सुरवातीस हे पदार्थ निर्जंतुक करून घेतले व बाह्य वातावरणांतील फरकांचे आघात त्यांवर होऊं दिले नाहींत तर ते चांगले संरक्षणक्षम राहतात.

विधिप्रकार

हे कल्प दोन प्रकारें करतात. १ अनग्निसिद्ध २ अग्निसिद्ध.

१ अनग्निसिध्दः– ह्यांत आतप, धान्यराशी, भूगर्भ ह्या उष्णतेचें साहाय्य घेतात.

२ अग्निसिध्दः-- अग्नि मंद व अखंड असावा.

पात्रः-- क्वथन, भर्जन, पाचन, ढालन, स्थापन ह्या कामाकरितां भांड्यांची जरुरी भासते. प्राचीन काळीं मृत्तिका(माहेय) पात्र सरसहा वापरलें जात असें. तरीपण कोठें कोठें तांबे, लोखंड, चांदी इ. धातुपात्रांचा उल्लेख आढळतो.

उदा. भर्जन-- मृण्मय– कटाह-- २७२ अश्वगंधावलेह र. यो. सा.

लोह--कटाह– २७६ कुमारीपाक

ताम्रपात्र– ३५८ खंडखाद्यावलेह र. यो. सा.

उदुंबरकटाह– कूष्मांडपाक वृंदमाधव

पाचन-- साध्यं औदुंबरे पात्रे।४०२ ब्राम्हरसायन र. यो. सा.

पचेत्ताम्रमये पात्रे-- २५२ लोहरसायन, ५७ शतावरीमोदक, ३०० समशर्करालोह र. यो. सा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ढालन-- ढालयेत्तैप्यभाजने । ४९८ गोधूम--पाक र. यो. सा.

स्थापन-- स्थापनीयो विशेषेण मृण्मये नवे । ८४४ कूष्मांडावलेह वृ. नि. र.

सौवर्णेऽप्यथ राजते मणिभवे मार्तेऽपि वा स्थापयेत् । ४०१ भल्लातकपाक र. यो. सा.

वर माती, सुवर्ण, रजत, ताम्र, लोह ह्या धातु-पात्रांचा उपयोग करण्यास सांगितला आहे. पण आज व्यवहार मात्र कथिलाची कल्हई केलेल्या पितळेच्या भांड्यांतून आहे खरा.

अमृतप्राशावलेह

(भा. भै. र. १४४) (वृ. नि. र.)

पाठः– क्षीरधात्रीविदारीक्षुक्षीरीणां च तथा रसे ।
पचेत्समे घृतप्रस्थे मधुकैः कर्षसम्मितैः ॥
द्राक्षाद्विचन्दनोशीरशर्करोत्पलपद्मकैः ।
मधूककुसुमानन्ताकाश्मरीतृणपञ्चकैः ॥
प्रस्थार्द्धे मधुनः शीते शर्करायास्तुलां तथा ।
पलार्द्धकांश्च संचूर्ण्य त्वगेलापद्मकेशरान् ॥
विनीय तस्य संलिह्यान्मात्रां नित्यं सुयन्त्रिता ।
अमृतप्राश्यमित्येतीन्निर्मितं त्रिपुरारिणा ॥
क्षीरमांसाशिनो हन्तिरक्तपित्तक्षतक्षयान् ।
तृष्णारुचिश्वासकासच्छर्दिहिक्काप्रमर्दनम् ॥
मूत्रकृच्छ्रं ज्वरघ्नं च बल्यं स्त्रीरतिवर्द्धनम् ॥

नांवः—

द्रव्यसंग्रहः– दूध, आंवळारस, विदारीकंदरस ऊंसाचा रस,पांचक्षीरीवृक्षरस व तूप १।१प्रस्थ पाचन.

प्रक्षेपः– मधुरादिगणोक्त द्रव्यें, मनुका, रक्त--श्वेतचंदन, वाळा, साखर, निळें कमळ, पद्माक्ष, मोहाचीं फुलें, अनंतमूळ, शिवणमूळ, तृणपंचमूळ, याचा कल्क १।१ तोळा. लेह झाल्यावर१/२ प्रस्थ मध, साखर १ तुला, दालचिनी, वेलची, पद्मकेसर २।२ तोळे.

रोगः— रक्तपित्त, क्षतक्षय, तृष्णा, अरुचि, श्वास, खोकला, वांती, उचकी, मूत्रकृच्छ्र, ज्वर-नाशक, बलवर्धक.

मात्राः— यथोचित.

च्यवनप्राश

एका काळचें खाद्य

प्राचीन काळीं पंचकर्मांनीं देह शुद्ध करून हा प्राश मोठ्या मात्रेनें अन्न म्हणून घेत असत. पण काळचें हें खाद्य आज औषध होऊन बसलें आहे. इतका मोठा फरक मनुष्यांत झाला आहे. पंचकर्म-चिकित्सा तर लुप्तच झालेली; अशा स्थितींत ह्याचें यथायोग्य सेवन व्हायचें कसें? तेव्हां सध्यां हे औषध म्हणून थोड्या मात्रेनें घेतात. गुणहि त्या मानानेंच लाभतात. तरीपण हा प्राश थंडीचे दिवसांत अवश्य सेवनीय होय; म्हणूनच त्याचा पाठ, त्याची प्रक्रिया आणि त्याचे गुण ह्यांची माहिती येथें देत आहे.

च्यवनप्राश (च.सं.; भै.र.; भा.भै.र.)

बिल्वाग्निमंथः श्योनाकः काश्मर्यः पाटलिर्बला ।
पर्ण्यश्चतस्रः पिप्पल्यः श्वदंष्ट्रा बृहतीद्वयम् ॥
शृंगी तामलकी द्राक्षा जीवन्ती पुष्करागरुः ।
अभया चामृता ऋद्धिर्जीवकर्षभकौ शठी ॥
मुस्तं पुनर्नवा मेदा एलाचंदनमुत्पलम् ।
विदारी वृषमूलानि काकोली काकनासिका ॥
एषां पलोन्मितान्भागान् शतान्यामलकस्य च ।
पंच दद्यात्तदैकत्र जलद्रोणे विपाचयेत् ॥
ज्ञात्वा गतरसान्येतान्यौषधान्यथ तं रसम् ।
तच्चामलकमुध्दृत्य निष्कुलं तैलसर्पिषोः ॥
पलाद्वादशके भृष्ट्वा दत्वा चार्धतुलां भिषक् ।
मत्स्यंडिकायाः पूताया लेहवत्साधु साधयेत् ॥
षट्पलं मधुनश्चात्र सिद्धे शीते प्रदापयेत् ।
चतुःपलं तुगाक्षीर्याः पिप्पली द्विपलं तथा ॥
पलमेकं निदध्याच्च त्वगेलापत्रकेसरात् ।
इत्ययं च्यवनप्राशः परमुक्तो रसायनः ॥

पाठचिकित्सा

च्यवनप्राशाचा सर्वांत जुना असा पाठ चरक-संहितेंत मिळतो. तोच पाठ भै.र. व भा.भै.र. यांनीं उद्धृत केला. वाग्भटांनींहि तोच घेतला. पण भा...

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बरा फरक केला आहे. त्यांचे काष्ठौषधी वर्गामध्येंहि थोडासा निराळा भाव दिसतो. पण तो बदल लेखक व जुळवे ह्यांचेमुळें झाला असावासें वाटतें. ह्यानन्तर चिकित्साकलिकाकारानीं हा पाठ घेतला--पण त्यांनीं काष्ठौषधींत बरीच अदलाबदल केलेली दिसते. हाच पाठ बृ.यो.तरंगिणींत घेतला तसाच योगरत्नाकरानेंहि घेतला पण त्यांत एक किंचितसा मुद्रणदोष झाला आहे, तो असा "अब्द्रोणेन" शब्दाचे जागीं 'अब्देनेन' असा शब्द पडला. त्यामुळें आंवळयाची संख्या ८ नीं कमी झाली. ५०० ऐवजीं ४९२ आंवळे घेण्यानें विशेष असा फरक काय झाला? त्याचा शोध करतांना हें अशुद्ध आढळलें.

चरकसंहिता	चि. क., यो. र., बृ. यो. त.		वाग्भट		शार्ङ्गधर	
	कमी	जास्त	कमी	जास्त	कमी	जास्त
	मुद्गपर्णी	वृद्धि	ऋद्धि	क्षीरकाकोली		महामेदा
	माषपर्णी	बिभीतक	अभया			क्षीरकाकोली
	पुनर्नवा	आमलक				
	काकनासा	महामेदा				
	पिंपळी	क्षीरकाकोली				
	अगरू					
औषधें ३६	औषधें ३५		औषधें ३५		औषधें ३८	

असो. ह्यांचे नंतर शार्ङ्गधरानें च्यवनप्राशाचा पाठ घेतला. त्यांत त्यानें तैल व तुप यापैकीं तैल अजिबात गाळलें व तुपाचें प्रमाण जवळजवळ निम्मे केलें. हा दृश्य फरक शार्ङ्गधरानें केला. तसाच आणखी एक उपक्रम त्यानेंच केला. तो म्हणजे चातुर्जाताचे प्रमाणासंबंधांतली संदिग्धता काढून टाकली, हा होय. शार्ङ्गधराच्या ह्या दोन्ही गोष्टी संस्करण, संशोधन, अन्वेषण ह्या सदरांत मोडतात.

असल्या प्रकारचे फरक, चरक-सुश्रुतादिकांना अभिप्रेत होते असें दिसतें. म्हणूनच ते म्हणतातः-

विस्तारयति लेशोक्तं संक्षिपत्यतिविस्तरम् ।
संस्कर्ता कुरुते तंत्रं पुराणं च पुनर्नवम् ॥

च. सि. अ. १२।७६

गणोक्तमपि यद्द्रव्यं भवेद्व्याधावयौगिकम् ।
तमुद्धरेत्यौगिकं तु प्रक्षिपेदप्यकीर्तितम् ॥

सु. चि. अ. १।१३७

वरील पाठांतलि कांहीं औषधें दुर्मिळ आहेत. महाप्रयासानें कदाचित् तीं मिळतीलहि! पण तसा प्रयत्न सध्यां होत नाहीं खरा. त्यामुळें त्यांचे प्रतिनिधि घेण्याची प्रथा रूढ झाली, त्यांतहि मतभिन्नता. तीच येथें देतो, म्हणजे वस्तुस्थितिदर्शन योग्यतया होईल.

मूलद्रव्य	प्रतिनिधि			
	यो. र.	भा.भै.र. (टीका)	भै. र.	वै.हि.मो. जंगले
ऋद्धि	डुकरकंद	चिकणा	बला	चिडियाकंद
वृद्धि	डुकरकंद	चिकणा	महाबला	पंजाबसालम
मेदा	शतावरी	भुईकोहळा	आस्कंद	सालममिश्री
महामेदा	,,	,,	सारिवा	सकाकलमिश्री
जीवक	भुईकोहळा	गुळवेल	गुडूची	लंबे दानेकी सालव
ऋषभक	,,	वंशलोचन	वांशी	बहमनश्वेतत
काकोली	आस्कंद	शतावरी	शतावरी	काळी मुसळी
क्षीरकाकोली	,,	,,	,,	सफेत मुसळी
काकनासा		काकजंघा	काकजंघा	नकटी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पहिल्या आठ औषधांस अष्टवर्ग म्हणतात. आर्य वैद्यकाचे बाजारांत अष्टवर्ग ह्या नांवानें हे पदार्थ मागितले तर जे पदार्थ मिळतात तेच पदार्थ युनानी औषधी बाजारांत वरच्या ऊर्दु नांवानेंहि मिळतात. पण भावांत फक्त वीस पटीचा फरक असतो इतकेंच. ऊर्दु नांवानें जिन्नस घेणें फार स्वस्त पडतें.

स्नेहविषयक

चरकसंहिता	तूप व तैल मिळून वजन ४८ तो.
चिकित्साकलिका	,, ,, प्रत्येकी ,, २४ तो.
शार्ङ्गधर	तूपच फक्त २८ तो. (ह्यानें तैल गाळलें)

यमक स्नेहाचा च्यवनप्राश होतो छान. कार्यहि उत्तम होतें त्याचें ! पण तेल थिजत नाहीं. तें लेहांत मिसळत नाहीं. तें प्राशावर तरंगतें. तो हिरवा तरंग पाहून रुग्णाचें मन विटतें. पुन्हां उन्हाळयांत, उष्ण प्रदेशांत तें पाघळतें व बूच अगर लाखेंतून बाहेरहि येतें. ह्या सर्व गोष्टी आजचें युगास अप्रिय व गैरसोयीच्या वाटतात. ह्या दृष्टीनें शार्ङ्गधरानें केलेला फरक स्वागतार्ह ठरतो.

चातुर्जात विषयक

च. चि. क.	भा. भै. र.	अष्टांगहृदयमूल	डॉ. गर्दे	शार्ङ्गधर
पलमेकं त्वगेलापत्र–	(भाषाटीका)	चातुर्जातं–	वाग्भट	प्रत्येकं त्रिशाणाःस्युः
केशरात्	प्रत्येकीं १|१ पल	कणाद्वितम्	प्रत्येकीं १|१ तो.	प्र. १|१ तो.

ह्याबाबत मात्र शार्ङ्गधरानें केलेला फरक श्रीमंत व नाजूक माणसांकरितां इष्ट वाटतो. पण त्वग्, एला, पत्र, केशर हीं औषधें ४\|४ तोळे घालण्यानेंच च्यवनप्राश ठसठसीत होतो एवढें खरें.

द्रव्यवर्ग

क्वाथ्य औषधें:—

कचोराकंद	पोखरमूळ	पुनर्नवामूळ	भुईआंवळी पंचांग
काकोलीकंद	चिकणामूळ	अडुळसामूळ	रानउडीद पंचांग
जीवककंद	पिंपळीफळ	सालवणमूळ	नागरमोथा कंद
शिवणमूळ	हिरडाफळ	पिठवणमूळ	हरणखुरी पंचांग
ऐरणमूळ	वेलचीफळ	गुळवेलकांड	रानमूग पंचांग
पाडळमूळ	मनुकाफळ	मेदाकंद	भुईकोहळाकंद
गोखरूमूळ	चंदन नार	ऋषभककंद	क्षीरकाकोलीकंद
रिंगणीमूळ	अगुरु नार	ऋद्धिकंद	काकडशिंगीफळ
डोरलीमूळ	कमलफूल	बेलमूळ	टेंटूमूळ

प्रत्येक औषध ४\|४ तो. आंवळे फळ ५०० पाणी १०२४ तोळे.

आवाप्य किंवा इतर औषधें

२०० तोळे साखर, ८ तोळे पिंपळी, ४ तोळे दालचिनी, ४ तो. तमालपत्र, १६ तो. वंशलोचन, ४ तो. वेलची, ४ तो. नागकेशर, २४\|२४ तोळे तूप व तैल.

द्रव्यनिर्णय

आंवळयाचीं संस्कृत नांवें– अमल, आमलक, तिष्य, तिष्यपुष्पी, तिष्यफला, शुक्तिः, वयस्था, कायस्था, इ. अमलः नमलः अमलः। निर्मळ.

आमलकः। आमलते ऽ सौ। (रुचि अथवा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रूप धारण करतो जो. रुचकर, रूपवान्.

तिष्यः- त्वेषते इति । दीप्तिमान असतो जो तो तेजस्वी, चकाकित.

तिष्यपुष्पी- तिष्ये पुष्यनक्षत्रे पुष्पवती भवति सा । आषाढांत पर्जन्य नक्षत्र पुष्पकालीं जी फुलते.

तिष्यफल- तिष्यं मंगलं फलं यस्याः सा । मंगल-कारक फल आहे जिचें, तिष्ये पौषमासे पुष्यति फलं यस्याः सा । पौष महिन्यांत परिपुष्ट होतें फल जिचें.

शुक्ति— कर्षाभ्यामर्धपलं शुक्तिः । दोन तोळे वजन आहे ज्याचें तें आंवळा (फळ)

कायस्था— काये तिष्ठति यया । देह (सुदृढ) राहतो जिचे योगानें.

वयस्था— वये यौवने तिष्ठति अनया सा । जिचे भक्षणानें तारुण्य कायम राहतें ती.

प्रक्रिया

काष्ठौषधी ४।४ तोळे प्रमाणांत घ्यावीत, त्याची भरड करावी. ती दुप्पट पाण्यांत २४ तास भिजत घालावी. नंतर त्यांत १०२४ तो. पाणी घालावें. व ५०० आंवळे एका जाळीदार फडक्यांत बांधून ती मोट ह्या पाण्यांत ठेवावी.

आंवळे मोकळे सोडले तर त्यांत कांटे शिरतात. मग ते कांटे आंवळे फेंसणाराचे हातांत शिरतात. दुसरें असें कीं, प्रत्येक आंवळा हुडकीत बसावें लागतें, इत्यादि सर्व श्रम आंवळशांची मोट बांधल्यानें वांचतात. त्रासहि कांहीं होत नाहीं.

आंवळयांतला उत्कट अम्लरस पाण्यांत उतरे-पर्यंत अग्नि देण्यास सांगितला आहे.(ज्ञात्वा गतरसान्) आंवळयांची मोट बुडेपर्यंत पातेल्यांत पाणी सारखें कायम ठेवावें. साधारण मानतः तीन तासांनीं इष्ट कार्य साधतें. मग मोटली गरम गरम असतांनाच बाहेर काढावी व सर्व आंवळे एकदम मोकळे करावेत. म्हणजे वाफरूपानें त्यांतील पुष्कळसें पाणी निघून जातें व आंवळे आपोआप उकलतातहि.

मर्दनम्

आंवळे थंड झाल्यावर त्यांमधील बी काढून पाटावरवंट्यावर वांटावेत. वाटलेला कल्क जाड फडक्यावर दह्याचे चक्याप्रमाणें फेंसावा. फडक्यावर आंवळयाचें कवच व ह्या आंवळयांतील रेषा राहतात. खालीं चक्का पडतो तो घ्यावा.

नंतर हा मावा जाड फडक्यांत बांधून ती मोट दोन पाट्यांत दाबून ठेवावी. म्हणजे माव्यांतील बहुतेक पाणी व राहिलेला अम्लरस निघून जातो व खवा परतणें सोपें जातें.

भर्जनम्

हा खवा परतण्याकरितां २८ तो. तूप घेण्यास सांगितलें आहे. हें सर्व तूप एकदम घातलें आणि भर्जन सुरू केलें तर तो कल्क भराभर अंगावर उडूं लागतो. तेव्हां प्रथम थोडें तूप घालून खवा परतूं लागावें. पहिलें घातलेलें तूप प्रथम कल्कांत मिसळतें. जसजसें पाणी कमी होईल तसतसें तूप अलग होऊं लागतें. खवा काळा पडतो. तूप हिरवें होतें. मधून मधून तूप थोडें थोडें घालीत जावें. खवा दवळीत रहावें. खव्याच्या बारीक बारीक गोळ्या होऊं लागल्या व तो छान मोकळा भगराळ झाला म्हणजे भर्जन कार्य पुरेसें झालें असें समजावें.

भर्जनाचे हेतु

आंवळयाचें कल्कांतलें पाणी उडवणें, आंव-ळ्याचें चूर्ण बिघडूं नये व त्यामुळें प्राशहि बिघडूं नये, एवढ्याकरितां आमलकीचे प्रत्येक कणास घृताचे आवरण देणें. कल्कांत पाणी असल्यानें चूर्ण व तूप ह्यांचा संयोग होत नाहीं. अग्नीचे मध्यस्थीनें तें कार्य छान साधतें. च्यवनप्राश टिकाऊं करण्यांतला घृतभर्जन हा एक भाग आहे.

पुनर्मर्दनम्

परतणें पुरें झाल्यावर सर्व खवा परातींत एका बाजूस थापून परात तिरपी ठेवावी. म्हणजे सर्व सुटें तूप अलग होऊन सखल भागांत जाऊन सांठतें. २४ तासांनीं हा मावा पुन्हां पाटावरवंट्यावर वांटून सर्व गोळ्या अजिबात मोडाव्यात. नाहींतर त्यागोळ्या शेवटपर्यंत अभंग रहातात व प्राशाची रुचि बिघडवितात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाकप्रकरणम्

नंतर साखरेचा पक्का पाक तयार करावा. फक्त शारंगधरानें काढ्यांतलें पाणी पाकांत घालावयास सांगितलें आहे. (ततस्तत्र क्षिपेत्क्वाथम्) पण त्यानें पाक फार आंबट होतो, फसफसतो, बिघडतोहि. तेव्हां पाकाकरितां स्वच्छ व निवळ पाणी घ्यावें हें उत्तम. पाक गोळीबंद करावा. कढत असतांनाच तो जमिनीवर उतरून त्यांत वाटलेला खवा घालून खूप ढवळावें, व थंड झाल्यावर पुन: हातानें सर्व पाक ढवळून कांहीं गोळ्या अगर गांठुळगुठुळ कांहीं भाग असल्यास तो हातानें चोळून साफ करावा, व पुन: त्यास एक चटका द्यावा.

पाक करतांना घ्यावयाची दक्षता

ह्या वेळेस अतिशय जपावयाचें असतें. पाक तळाशीं करपूं (लागूं) नये, अगर तो चिक्कीवर जाऊं नये, ह्याबाबत अत्यंत दक्षता घ्यावी, आणि लेह चांगला घट्ट करावा. व त्यांत उरलेलें सर्व तूप मिळवून तो थंड होऊं द्यावा.

आवापद्रव्यमेलन

मध शुद्ध करून घ्यावा म्हणजे प्राशास पाणी सुटत नाहीं. मधांतला अशुद्ध भाग प्राशास हटकून बिघडवितो. मध हा पदार्थ ह्यांत योगवाही व टिकवण म्हणून योजला आहे. चूर्णाचें मिश्रण प्रथम तयार करावें. तें वरील मधांत खलावें. हा छोटा लेह मोठ्या लेहांत घालून खूप घोटावें व सर्व मिश्रण एकजीव करावें कीं झाला च्यवनप्राश तयार.

स्वानुभवानें बसविलेला च्यवनप्राशाचा पाठ

५०० आंवळ्यांचा (तुपावर परतलेला) खवा ७५ तो., साखर ३०० तो., पिंपळी १२ तो., दालचिनी ६ तो., तमालपत्र ६ तो., वंशलोचन २४तो., वेलची ६ तो., नागकेशर ६ तो. मध ३६ तो.

प्रमाणें दीडपट केलीं

साखर इ. आठ पदार्थ चरकोक्त मानानेंच घेतले आहेत. फक्त खव्याचे मानानें तीं प्रमाणें कमी पडूं लागलीं, म्हणून तीं मानें दीडपट केलीं, इतकेंच.

गुणधर्म

हा लेह अग्निबल पाहून पचेल तसा घ्यावा म्हणजे भूक मोडत नाहीं, उलट ती वाढते. पचन सुधारतें. वायूची गति अनुलोम होते. मलमूत्रविसर्जन योग्य तऱ्हेनें होऊं लागतें. रक्त शुद्ध होतें. रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा, शुक्र हे सातहि धातु चांगले वाढीस लागतात. शरीर सुंदर होतें. पुष्ट होतें, कांति सुधारते. वर्ण व मन प्रसन्न होतात. उत्साह वाढतो, बुद्धि,स्मरण व धारणाशक्ति तरतरीत होतात. बलहि चांगलें लाभतें. त्यामुळें रोगप्रतिकारकशक्ति ओघानेंच बलवान होते. शरीर व मन सुदृढ होतात.

च्यवनप्राशाचें कार्य

श्वसनेंद्रियें, पचनेंद्रियें, उत्सर्जक इंद्रियें, जननेंद्रियें, रक्तवह व वातवह स्रोतसें यांवर शोधन व बलदान स्वरूपाचें यांचें कार्य होतें. त्यामुळें शरीराचे सर्व व्यापार सुरळीत सुरूं होतात. आल्हाद होतो. साधारण मानतः मन्दज्वर, धातुगतज्वर, अशक्तता, पांडुता, खोकला, दमा, क्षय, उरःक्षत, स्वरभेद, धातुक्षय अशा विकारांत ह्याचा उपयोग शक्तिवर्धक म्हणून बरा होतो.

पथ्य- हा लेह घेत असतां केव्हांहि अजीर्ण होऊं देऊं नये.

बदामपाक

(भा.भै.र.४६४६) (नपु.मृता । त४)

पाठः-मज्जां वातादजं पिष्ट्वा प्रस्थार्धं मानतो बुधः।
प्रस्थैकं च सितां पक्त्वा विधिना मेलयेत्ततः॥
पलद्वयं घृतं दत्वा चूर्णानेतांश्च संक्षिपेत्।
एलाद्वयं जातिफलं लवंगं केशरं त्वचम्॥
कर्षकर्षप्रमाणेन चूर्णयित्वा विमेलयेत्।
मज्जाद्वयं पलैकैकं दलाश्चाथ सुवर्णजान्॥
राजताञ्छतमानेन सम्मेल्य विधिना ततः।
पंचकर्षप्रमाणेन मोदकान्कारयेद्बुधः॥
धनिनां पुरवासानां भक्षणार्थं हि शोभनं।
बलवृद्धिकरं शश्वद् वाजीकरणमुत्तमम्॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नांव:- प्रधानद्रव्यसूचक

द्रव्यसंग्रह-बदामगीर ।।- प्रस्थ, साखर १ प्रस्थ, दुग्धाग्निपाचन, तूप २ पल.

प्रक्षेप- ल. व मो. वेलची, जायफळ, लवंग, केशर, दालचिनी १।१ तो., सुवर्णवर्ख, पिस्ते, चारोळी १।१ तो., चांदीचा वर्ख १ तो. मिसळून ५ तोळे गोळी तयार करावी.

रोग- कार्य-- बल, वृद्धि, वाजीकरण.

शुद्ध आयुर्वेद विद्यालय

शीव-मुंबई २२

सोमवार ता. २१-६-५४ रोजीं सायंकाळीं ५॥ वाजतां मुंबई येथील आयुर्विद्या प्रसारक मंडळाचे शीव येथील जागेंत शुद्ध आयुर्वेद विद्यालयाचें उद्घाटन आरोग्यमंत्री ना. शांतिलालजी शहा यांच्या हस्ते झालें.

वैद्य-डॉक्टरांना समान भत्ता मिळणार

आपल्या भाषणांत आरोग्यमंत्री म्हणाले कीं, २ आक्टोबर १९५४ पासून मुंबई येथें सुरू होणाऱ्या कामगार आरोग्य-विमा योजनेंत प्रत्येक कामगार रोग्यामागें वैद्य व डॉक्टर यांना समान भत्ता देण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे.

वाचकांचा पत्रव्यवहार

दन्तमंजनासाठीं

लघुगंगाधरचूर्णाचा उपयोग

ता. १६ मे ५४ च्या आयुर्वेद-पत्रिकेंत दंत-मंजनासंबंधीं आपले विचार वाचले. आज कित्येक महिने आम्हीं दंतमंजन म्हणून अतिसारावरील लघु-गंगाधरचूर्ण (तिक्त,कषाय,कटु रसाचीं द्रव्यें असलेलें) वापरीत आहोंत व त्याचा परिणाम चांगला आहे हें कळविण्यास आनन्द वाटतो.

दन्तमंजनांत साखर, मीठ हीं आहार द्रव्यें नसावीत या आपल्या म्हणण्याशीं आम्ही पूर्णपणें सहमत आहोत.

—ज. गो. कुलकर्णी

ओवा, बडीशेप, पाती चहा, गोळ्या

होमीओपॅथी औषधासाठीं मिळणाऱ्या मोठ्या साखरी गोळ्यावर ओवा, बडिशेप, पातीचहा यांच्या तेलाचा संस्कार करून त्या गोळ्या जनरल सप्लायर्स [हिन्द] मुंबई २ यांनीं तयार केल्या आहेत. गोळ्या घेण्यास सोईच्या आहेत. सरदी, अपचन, जुलाब, पोटदुखी वगैरे विकारावर घरगुती उपाय या दृष्टीनें उपयुक्त आहेत.

जरूरीप्रमाणें १ ते २ गो. दिवसांतून ४ वेळा पाण्याबरोबर घ्याव्यात. लहानास अर्धेप्रमाण. गोळ्या नुसत्या न घेतां त्या पाण्यांत विरवून घेणेंच युक्त. नुसत्या गोळ्यानें तोंडांत झणका बसतो.

सांड
डायाबेटॉल
मधुमेहावर अप्रतिम.
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द. कृ. सांडु ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स-
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते-मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

पवित्र नेपाल कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तो.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहा:-नेपाल हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पदव्युत्तर शिक्षण

आतां मुंबईच्या अेम्. अे. पोतदार हॉस्पिटलमध्यें पॅथीलॉजीच्या पदव्युत्तर शिक्षणाची सोय करण्यांत आली असून पुढील विषयांचेंहि पदव्युत्तर शिक्षण तेथें देण्यांत येतें.

(अ) आयुर्वेदिक वैद्यक शास्त्र, (ब) शस्त्रक्रिया, (क) मिडवाअिफ्री आणि फिजियालॉजी (इ) आयुर्वेदिक फार्मसी आणि (फ) अॅनेस्थेशिआ.

१९३८ च्या मुंबई वैद्यक व्यवसायींसंबंधींच्या कायद्याच्या परिशिष्टांत नमूद केलेली शैक्षणिक पात्रता असणाऱ्यांनाच उपरोल्लिखित कोर्ससाठीं प्रवेश देण्यांत येतो.

शुद्ध आयुर्वेदिक कोर्स

सरकारमान्य गुरु आणि शिक्षण-संस्था

मुंबई सरकारनें शुद्ध आयुर्वेदाचें शिक्षण देण्यासाठीं पुढील गुरूंना आणि शिक्षणसंस्थांना मान्यता दिली आहे.

शिक्षण संस्था

[१] अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय ४७९। ११, सदाशिव पेठ, टिळक रोड पुणें; [२] आयुर्वेद प्रसारक मंडळ, शीव, मुंबई [३] निखिल कर्नाटक आयुर्वेद प्रसारक मंडळ, गणेशपेठ, हुबळी.

गुरु

[१] वैद्य गणेशशास्त्री जोशी, शुक्रवार पुणें २ [२] वैद्य एन्. एन्. बागेवाडीकर, गोल्ड फिंच पेठ, सोलापूर, [३] वैद्य एन्. एन्. भंडारे श्रीकृष्ण फार्मसी, धुळें, [४] वैद्य एम्. वी. वाटवे ९५ ठळकवाडी बेळगांव, [५] वैद्य व्ही. एस्. पाठक, म्युनिसिपल दवाखाना, धुळें, पश्चिम खानदेश, [६] वैद्य ए. वी. पाध्ये गुर्जर, राजापूर, जिल्हा रत्नागिरी, [७] वैद्य अनंताचार्य आद्य, विजापूर, [८] वैद्य डी. वी. मनोहर, दाभोळ, रत्नागिरी, [९] वैद्य मंगळेश्वर एस्. वैद्य, २० मोतीनगर, अेलिस ब्रिज, अमदावाद, [१०] वैद्य वायु. टी. नाटोलीकर. पुनर्वसु. चिकित्सा मंदिर, कागल, कोल्हापूर; आणि [११] वैद्य जयदेव करसनदास देसाई, C/o आर्य कन्या महाविद्यालय, वडोदे.

शुद्ध आयुर्वेदाच्या अध्यापनासाठीं

सरकारी मान्यता मिळालेले गुरु

दुसरी यादी

[१] वै. प्रभाशंकर एन्. वैद्य, रसशाळा नडियाद [२] वै. बिंदुमाधव गणेश पंडित, आयुर्वेद सेवा संघ, नाशिक सिटी. [३] वै. दत्तात्रेय वासुदेव शेंड्ये, ९४५ सदाशिव पेठ पुणें २ [४] वै. माधव गणेश जोशी, २८ शुक्रवार पुणें २ [५] वै. मदनलाल गिरिजाशंकर, स्टेशनरोड, डभोई जि. वडोदा [६] वै. एन्. डी. देशपांडे, विश्राम चेंबूर मुंबई, [७] वै. मरुलाराध्य शास्त्री, कुमार आयुर्वेद औषधालय, विजापूर, [८] वै. बिंदुमाधव भीमाचार्य वडेयार, हायस्कूलरोड, विजापूर.

प्रमाणपत्र

आपण जें जें औषध बनवितो व जनतेस देतें, तें तें प्रत्येक औषध सचोटीचें व गुण देणारें असलें पाहिजे; तरच त्याचें प्रमाणपत्र जनतेकडून आपणास मिळेल. तर अशा गुण देणाऱ्या खऱ्या, अस्सल व ताज्या औषधी खरेदी करण्याचें विश्वासपात्र ठिकाण पाहिजे. त्याकरितां आपण

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स

पायधुनी मुंबई नं. ३

(टेलिफोन नं. ३१८५८). यांना लिहा.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधींचें

मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात. अधिक माहितीसाठीं कॅटलाग मागवावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवडक रुग्ण चिकित्सा

लेखकः—वैद्य र. गो. कुलकर्णी
आयुर्वेदविशारद, मुंबई २

(१) मेदोवृद्धि

रुग्णः- स्त्री, वय ४०, २० वर्षांपूर्वी पहिल्या बाळंतपणांत उभें राहाण्याची शक्ति गेली. पाय मात्र वाळले नाहींत. शरीर फारच मेदस्वी. घरांत हाताचे आधारानें सरकत सरकत काम करीत असे. भूक साधारण, घाम जास्त, सर्वांगास वेदना, श्वास लागणें. २० वर्षांत नाना पॅथीचे अनेक तज्ञांचे उपचार केले परंतु गुण नाहीं. सहज औषध देण्यासंबंधीं विचारलें तेव्हां देऊन पाहूं म्हटलें. खरोखरींच दुसरे दिवशीं त्यांनीं घरीं बोलाविलें. रोगी पाहातां अतिशय स्थूल, मेदोवृद्धीमुळें आर्तव बंद झालेलें व बाकीच्या वर लिहिलेल्या सर्व तक्रारी होत्याच. रोगी सुखासीन. आहार मधुर व नेहमींच बसून असल्यामुळें मेद वाढतच होता. एक वर्षाची मुदत मागून घेतली. मेद कमी करण्यासाठीं आरोग्यवर्धिनी २ गुं. + शु. गुग्गुळ २ गुं. मध-गरम पाणी यांतून ३ वेळ देत होतो. याप्रमाणें ६ महिने झाले तरी भूक लागणें वा श्वास कमी होणें, यापेक्षां कांहींच सुधारणा दिसून येत नव्हती.

हाडांस जोर आणणारी चिकित्सा

वरील कारणामुळेंच बहुधा औषध लागूं पडत नसावें असें वाटलें व आतां काय करावें हा विचार पडला. इतक्यांत कल्पना सुचली कीं, जर मेद कमी होत नसेल तर ज्या योगें हाडांस जोर येऊन शरीराचा बोजा तीं सहन करूं शकतील अशी चिकित्सा पाहिजे. बहुधा स्थूल माणसांत (मेदोवृद्धि असलेल्या) अस्थिधातूंची दुर्बलता असतेच. म्हणून दुसरे दिवसापासून सु. मा. वसंत $\frac{१}{२}$ गुं. + सूर्यपुटी प्रवाळ २ गुं. + मृगशृंग ४ गुं. सकाळीं व सायंकाळीं मधांतून, भोजनोत्तर भृंगराजासव दोन्ही वेळां २/२ तोळे दर वेळेस दुप्पट पाण्यांतून व रात्रीं पूर्वीप्रमाणें आरोग्यवर्धिनी + गुग्गुळ यांची १ पुडी गरम पाण्यांतून, अशी दुहेरी मेदोवृद्धिविनाशक व अस्थिवर्धक योजना सुरू केली.

त्रिफळाचूर्णाचें उटणें

सकाळीं आंघोळीचे वेळीं त्रिफळाचूर्ण पाण्यांत कालवून तें उटण्याप्रमाणें सर्वांगास रगडून लावणें. या चिकित्सेनें एक महिन्यांतच सुधारणा दिसूं लागली. भूक वाढली, अंगांतील ठणका कमी झाला व श्वासहि व्यवस्थित होऊं लागला. ३ महिन्यांत काठीचे साह्यानें उभें राहतां येऊं लागलें व ५ महिन्यांत काठीशिवाय घरांत चार पावलेंहि टाकतां येऊं लागलीं. ६ व्या महिन्यांत काठीचे साह्यानें समोरचे चाळींतील आजारी मैत्रिणीसह पहिल्या मजल्यावर जाऊन भेटून आली. पुढें मात्र जास्त परिणाम दिसेना. बरोबर एक वर्ष दोन महिने औषध नियमित घेतलें. पुढें औषध घेण्यास, जास्त सुधारणा न दिसल्यामुळें रोगी कंटाळला. इतके दिवस सतत तेंच औषध घेतलें हेंच मोठें समजावयाचें. ही झालेली सुधारणा साधारण एक वर्ष पर्यंत टिकली व पुढें पुन्हां मेद वाढूं लागून प्रकृति पूर्व स्थितीवर आली.

(२) मुलाची वाढ थांबली

रोगीः—मुलगा वय १॥ वर्ष, ५ व्या महिन्यापासून मुलाची वाढ थांबली. वडिल वैद्यकी व्यवसायांतील असल्यामुळें त्यांचे व त्यांचे दोन्ही स्नेही डॉक्टर यांचें सतत १। वर्ष औषध चालू होतें. लाईट देण्यांत आला. हॉस्पिटलमध्यें दाखल करून तेथेंहि उपचार करण्यांत आले. १॥ वर्षांत ५० हून अधिक सूचिकाभरणें देण्यांत आलीं, परंतु मूल जगण्यापलिकडे कोणत्याच औषधांचा विशेष असा परिणाम झालेला नव्हता, म्हणून हवापालट करण्यांत आली, बाहेरगांवीं औषधाची व्यवस्था होऊं न शकल्यामुळें पुनश्च मुंबईत रुग्ण आणण्यांत आला. १॥। वर्षांचा मुलगा झाला तरी त्यांस पुढें सरकतां येत नसे. मनुष्य ओळखी, मनाची वाढ ठीक, परंतु शरीराची वाढ बिलकूल नाहीं. ताप, खोकला, शौचास पातळ व पांढरें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होणें, शरीर काळें दिसणें, मूळचाच काळा असल्यामुळें कृष्णवर्ण जास्तच दिसत असे. अशा परिस्थितींत ना-इलाजानें आयुर्वेदिक चिकित्सेकडे वळले.

पचन सुधारण्यासाठीं कुटजारिष्ट

सप्तधातुवर्धक चिकित्सा पाहिजे होतीच, विशेषतः पचन सुधारावयास पाहिजे होतें म्हणून सूर्यपुटी प्रवाळ -॥-गुं. + मृगशृंग -॥- गुं. + शौक्तिक -।- गुं. + मंडूरभस्म १/८गुं. यांच्या ३ पुड्या मधांतून देण्यास सुरुवात केली. तसेंच दिवसांतून २ वेळ कुटजारिष्ट २०।२० थेंब गरम पाण्यांतून दिलें. एक महिन्यांत ताप, खोकला, शौचास पांढरें होणें या तक्रारी कमी होऊन हातापायांची चळवळ सुरूं झाली. दोन महिन्यांत मुलगा मागें पुढें सरकूं लागला.

चूर्णसिद्ध दुधानें लाभ झाला

एक महिन्याचे चिकित्सेनंतर आस्कंद + उपळसरी + वावडिंग यांनीं सिद्ध केलेलें दूध पिण्यासाठीं द्यावयास सांगितलें.ह्या चिकित्सेनें चांगलेंच बल प्राप्त झालें. वरील पुड्या व कुटजारिष्ट चालू होतेंच. चार महिन्यांत रांगू व नीट बसूं लागला. ६ महिन्यांनीं धरून उभा राहूं लागला व ८ महिन्यांनीं नीट चालूं पण लागला. रुग्णाचीं १॥ वर्षें आजारांत गेल्यामुळें वयाचे मानानें तो लहान दिसतो म्हणून सतत चार महिने अश्वगंधारिष्ट व कुटजारिष्ट दिवसांतून ३ वेळ चालू ठेवण्यास सांगितलें. आतां सर्व क्रारी मिटून हसत खेळत आहे.

मोठाले जंत व दूध आहार

१६ एप्रिल १९५४ च्या आयुर्वेद पत्रिकेंत पान ६६९वर मोठमोठाले जंत, माती खाणें यासंबंधीं प्रश्नोत्तरी दिली आहे. त्यांत कफप्रकृति मुलांना दूध हें आहारद्रव्य उपयोगाचें नाहीं, कारण तें क्रिमी निर्माण करतें, त्यामुळें माती खाण्याची प्रवृत्ति सुरूं होते असें म्हटलें आहे.

त्या लेखांत दिलेल्या सूचनानुसार त्या २ वर्षें वयाच्या मुलास पालकांनीं दूध देणें आजिबात बंद केलें. मुगाच्या डाळींचें कढण, नागलीचा पापड देणें सुरूं केलें व त्याचा त्यांना फायदा दिसून आला, असें २०--५--५४ व पुनः १०--६--५४ रोजीं त्यांनीं पाठविलेल्या पत्रांत म्हटलें आहे.

त्या मुलास पूर्वीं तापांत पायावरून वारे गेल्यामुळें चालतां येत नव्हतें. तो नुसतां सरकत असे, उभें राहण्यासहि भीत असे.

पालक लिहितातः–" चि. + + + चे प्रकृतिबाबत आपणाकडून जो वैद्यकीय सल्ला मिळाला त्याप्रमाणें आम्ही त्याचें खानपानांत व औषधयोजनेंत यथाशक्ति बदल केला व त्यानें निःसंशय फायदा वाटला, याबद्दल कृतज्ञ आहोत.

मुलगा पायीं धावतो

चि.× × × आतां रस्त्यानें देवदर्शनास जातो, बाजारांत जातांना पायीं चालतो, धांवतो. अतिशय खोड्या करतो. ...... रात्रीचे वेळीं वेखंड मधामधून उगाळून देतो. आतां त्याची शौचाची तक्रार नसते. दूध आजिबात बंद केलें आहे. आंबे तो मागतो व आम्ही देतो. त्याची चालण्याची तक्रार नाहीं. प्रकृति सुधारत आहे. आपल्या सल्ल्याबद्दल आभारी आहों."

वरील उदाहरणावरून केवल दूध हें एकांत हितकारी द्रव्य नाहीं हें वाचकांच्या ध्यानांत येईल.

— विंदुमाधव पंडित

पांढरें कोड

हजारोंचें गेले व त्यांनीं अभिप्राय दिलेले आणि अनेक बक्षिसें मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु. नकली वैद्यापासून सावध रहा!

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन' मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२ पुस्तक परीक्षण

वर्णजल-चिकित्सा-शिक्षक

अर्थात् क्रोमोपॅथी इन्स्ट्रक्टर (आवृत्ति ५)

'ज्ञानमित्र' पुस्तकमाला पुणें यांचें हें १०० वें प्रकाशन आहे. १३८ पानांच्या या पुस्तकाची किंमत १॥ रु. आहे. ग्रंथ व्यवहारोपयोगी व ग्रामीण भागांत आरोग्य-प्रचारक ग्रामसेवकांना उपयुक्त आहे.

या पुस्तकाचा विशेष

निरनिराळ्या रोगांवर निरनिराळ्या रंगाचें पाणी, साखर, तेल इ. कसें उपयोगी पडतें, तें या ग्रंथांत सांगितलें आहे. वैद्यांच्या दृष्टीनें या पुस्तकाचा विशेष असा कीं, दोषांच्या दृष्टीनें या पाण्याचा निरनिराळ्या दोषांवर परिणाम वर्णन केला आहे. व रोगाच्या दोषजप्रकारानुरूप विशिष्ट रंग वापरण्यास सांगितला आहे. यामुळें वैद्यवर्गास उपयोगी असा हा ग्रंथ आहे. आयुर्वेदाच्या पंचमहाभूत-सिद्धांतावर जोर देऊन चिकित्सा करणाऱ्या वैद्यांना त्यांपासून मदत होईल. सर्वांकरितां रोग्याला कोणत्या रंगाच्या बाटल्या असाव्यात व निरोगी राहाण्यासाठीं आपल्या प्रकृत्य-नुसार कोणत्या प्रकाशांत राहावें तेंहि समजेल.

वाताकरितां तांबडा रंग

मात्र या पुस्तकांत सांगितल्याप्रमाणेंच फक्त रंगाचा उपयोग न करितां, वाताकरितां काळा वा तांबडा, पित्ताकरितां श्वेत, व कफाकरिता तांबडा अशा प्रकारचे व या मिश्रणाचे रंगांचा उपयोग होतो कीं काय हेंहि अवश्य पहावें.

—श्रीराम कृष्ण करमरकर

—————

वाचकांचा पत्रव्यवहार

मूतखडा रोगावर
देवदार कीं सागवान ?

"मला तीस वर्षांपूर्वी एक भिल्ल भेटला होता. त्यानें मूतखड्याचे बरेचसे रोगी दुरुस्त केल्याची खात्री-लायक माहिती आहे. बऱ्याच वर्षांचे परिचयानंतर त्या भिल्लानें मला मूतखडारोगांवर देवदार अगर सागवान या झाडाची मुळी पाण्यांत उगाळून सकाळ संध्याकाळ वयोमानाप्रमाणें तीन दिवस देणें म्हणून सांगितलें होतें.

तज्ज्ञांस विनंति

बरींच वर्षें झाल्यामुळें देवदार अगर सागवान यापैकीं कोणतें झाड नक्की तें ध्यानांत राहिलें नाहीं. तरी कोणा तज्ज्ञांस या दोहोंपैकीं कोणतें झाड घ्यावें व वरील विधि बरोबर व योग्य आहे काय ? याची माहिती असेल तर त्यांनीं आपले पत्रिकेंतून सविस्तर व सत्वर प्रसिध्द करण्याची कृपा करावी.

सोलापूर

—ए. व्ही. नकल

—————

स्वाध्याय मंडळांतील कांहीं शंका

१) एकांत हितकर-स्वस्थहितकर-अशीं द्रव्यें आहेत कां ? जें द्रव्य एका प्रकृतीला स्वास्थ्यकारक तें दुसऱ्या प्रकृतीला तसें ठरेलच असें नसेंत; म्हणून ही शंका.

कुष्ठी लोकांचे आगंतु व्रण

२) कुष्ठी रोग्यांचे आगन्तु व्रण लवकर भरून येतात कीं नाहीं ? कुष्ठिनां·········व्रणाः कृच्छ्रेण सिध्यन्ति। असें सूत्र आहे. व्यवहारांत काय अनुभव येतो ?

तुपाचें शीत वीर्यत्व ?

३) तुपावर पिंपळी, मिरी आदि उष्ण द्रव्यांचे संस्कार केले तर तुपाचे शीतवीर्य नष्ट होतें कीं नाहीं ? ग्रंथांत 'संस्कारमनुरुध्यते'। असें आहे. प्रत्यक्षांत काय अनुभव येतो ? व तो कां ?

स्थिर धातु पुरुष

४) स्थिरधातोर्ऋतौ हिमे। मांसलस्याल्पदोषस्य सुसाध्यो ॥ अष्टांगहृदय उत्तर स्थान. स्थिर--धातु पुरुषाचे भग्न साध्य असते या सूत्रांतील स्थिरधातु पुरुष म्हणजे कोणता पुरुष ? पुरुषांचे धातु कधीं स्थिर असतात काय ? स्थिरत्वाचा अर्थ काय ?

—निवेदक श्री. . करमरकर

—————

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्री. धुळेकरांची जळगांवास भेट

झांसीचे सुप्रसिद्ध वकील व दिल्ली पार्लमेंटचे सदस्य श्री. धुळेकर हे ७।६।५४ रविवारीं मुलाचे लग्नानिमित्त जळगांव (पूर्व-खान्देश) येथें आले असतां जळगांव शहर वैद्यमंडळ, सं. खा. वै. मंडळ आणि म. प्रां. वै. मंडळ यातर्फे जळगांवचे वैद्य श्री. भा. शं. जहागीरदार यांचे दिवाणखान्यांत म. प्रां. वै. मंडळाध्यक्ष वै. दत्तात्रियशास्त्री जळूकर यांचे अध्यक्षतेखालीं त्यांचा सत्कार करण्यांत आला. समारंभास स्थानिक वैद्य व निमंत्रित आयुर्वेदाभिमानी सभ्यगृहस्थ उपस्थित होते.

भुसावळहून वै. ब्रह्मदत्त शर्मा हे मुद्दाम या समारंभास आले होते. त्यांनीं प्रथम श्री. धुळेकर यांची सर्व उपस्थितांना ओळख करून दिली व आयुर्वेदविषयक त्यांचे पार्लमेंटांतील कळकळीचे प्रयत्न व झांशी येथें त्यांच्याच असीम प्रयत्नानें प्रस्थापित झालेल्या आयुर्वेद विश्वविद्यालयाची माहिती निवेदन केल्यावर वै. मा. बा. जोशी, वै. जहागीरदार, वै. लाठी, इ. नीं विचारलेल्या शंका व प्रश्नास श्री. धुळेकर यांनीं उत्तरें दिलीं व आपल्या भाषणांत सध्यांचे परिस्थितींत आयुर्वेदासंबंधीं आपल्या प्रयत्नांची सर्व बाजूनें कशा प्रकारचे प्रयत्नांची जरूरी आहे हें उत्तम तऱ्हेनें समजावून सांगितलें.

मुंबई राज्यांत प्रस्थापित शुद्ध आयुर्वेद समितीबद्दलहि समाधान व्यक्त करून सध्यांचे पाठ्यक्रम जोडून उच्च शिक्षणक्रम आणखी १॥-२ वर्षांचा ठेवला जाण्याबद्दल प्रयत्नांची आवश्यकता प्रतिपादन केली. शेवटीं अध्यक्ष वै. जळूकरशास्त्री यांनीं असा शिक्षणक्रम ठेवला जाणार आहे व त्यासंबंधी हे तयारी चालू आहे असें आपल्या समारोपाचे भाषणांत निवेदन करून श्री. धुळेकर यांचे आभार मानले.

शहरें व लिस्टेट वैद्य

"येथील एका डॉक्टरांचे म्हणणें असें आहे कीं लिस्टेट वैद्यांना फक्त खेड्यांत प्रॅक्टिस करण्याचें सर्टिफिकेट मिळालें आहे. त्यांनीं शहरांत प्रॅक्टिस करणें गुन्हा आहे. तरी याबाबत जाहिर खुलासा करावा ही विनंति."

—वै. जे. एस. कांबळे

लिस्टेड वैद्य रजिस्टर्ड वैद्याप्रमाणेंच कोठेंहि चिकित्सा व्यवसाय करूं शकतो. फक्त त्यानें दिलेलें सर्टिफिकेट कोर्टांत मान्य होईल असें नाहीं, व त्याला बोर्डाच्या निवडणुकींत भाग घेतां येत नाहीं. बाकी सर्व अधिकार सारखे आहेत. --संपादक]

पुणें येथें

'आयुर्वेद सेवा संघ, नासिक' चीं औषधें मिळण्याचें ठिकाण

किरण मेडिकल सर्व्हिस

नगरकर तालीम चौक, लक्ष्मीरोड, पुणें

शास्त्रोक्त पद्धति से औषधियों का निर्माण

मैंने आज आयुर्वेद सेवा संघ को देखा। देखकर अत्यंत हर्ष प्राप्त हुवा। इस संस्था में औषधियोंका निर्माण शास्त्रोक्त पद्धति से होता है। रसायनशाला का भवन भी विशेष विशाल है।

आसवारिष्ट निर्माणशाला में अधिक स्वच्छता

संस्था बहुतसी देखनेमें आई किन्तु इसमें विशेषत यह पाई गई कि आसवारिष्ट निर्माणशालाम स्वच्छता बहुत अधिक है। आरोग्यतामें स्वच्छताको विशेष स्थान दिया है। अतः इसके निरीक्षक वैद्य की प्रशंसा विशेष सराहनीय है। इस संस्था की उत्तरोत्तर वृद्धि चाहता हूं।

—प्रभवेंद्र शर्मा, आयुर्वेदाचार्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोषक्षीणता व रोग :

लेखकः– वैद्य नृसिंहाचार्य बागेवाडीकर
आयुर्वेदचिकित्सक, सोलापूर

(मागील अंकावरून समाप्त)

दोषक्षयजन्य विकार

आयुर्वेदाचार्यांनीं रोग म्हणजे दोषवैषम्य असें म्हटलें आहे. किंवा "रुजाकरत्वात् रोगः" असें म्हटलें आहे. आतां आपण दोष क्षीण झाले असतां रोग्यास कोणती पीडा होते ? कां पीडा होत नाहीं ? याचा विचार करूं. दोषक्षीणतेनीं जर पीडा होत नसेल तर आपणांस याचा विचार करण्याचें कारण नाहीं.

ज्याप्रमाणें दोषवृद्धीनें देहाचा नाश होतो त्याचप्रमाणें दोष क्षीण झाले असतां देहनाश होतो याची जाणीव आचार्यांना आहे हें मागें दिलेल्या सूत्रावरून दिसून येतें. वर दिलेल्या कारणांनीं दोष क्षीण होतात हें तर चरकाचार्यांनीं मान्य केलेलें आहे. म्हणून आपणांस दोषक्षय म्हणजे काय ? तो कोठें उत्पन्न होतो, हें पाहणें क्रमप्राप्त आहे. दोषक्षीणता म्हणजे त्याच्या मूळ स्वरूपांत बदल होणें हें होय. विकार म्हटला कीं, दोषांच्या मूळ स्वरूपांत बदल हा निश्चित ठरलेलाच आहे. या विकाराचे मुख्य दोन प्रकार आहेत. १ दोष-वृद्धि २ दोष–क्षीणता. दोषवृद्धींत त्यांच्या मूळ स्वरूपांत वाढ होते, तर दोषक्षीणतेंत त्याच्या मूळ स्वरूपांत क्षीणता निर्माण होते. या स्वरूपांत वृद्धि आणि क्षीणता म्हणजे गुणात्मक आणि मानात्मक अशी पाहावी लागते. या गुणात्मक आणि मानात्मक प्राकृत स्वरूपांत बदल झाला कीं, हें शरीर समयोगयुक्त राहात नाहीं, व शरीरांत पीडा उत्पन्न होते याचें स्पष्टीकरणार्थ आपण एक उदाहरण घेऊं.

एंजिन चालण्यासाठीं पाण्याचें व अग्नीचें विशिष्ट प्रमाण

सध्यां यांत्रिक युग आहे. या युगांत सामान्य विद्यार्थ्यांनासुद्धां हीं यंत्रें कशीं चालतात याचें ज्ञान दिलें जातें. शरीर हेंहि एक यंत्राप्रमाणें चालणारें एंजिन आहे. शरीरांत हृदय, यकृत्, वृक्क इ. यंत्रें आहेत. या यंत्रांचें धारण वायूकडून होतें (वायुस्तंत्रयंत्रधरः) असें चरक म्हणतो. शरीर आणि एंजिन यांच्या क्रियेंत पुष्कळ साम्य आहे. हें जडरूपी एंजिन चालण्यास अग्नि आणि पाणी यांची आवश्यकता आहे. अग्नि आणि पाणी यांच्या संयोगानें उष्णता उत्पन्न होऊन हें एंजिन चालतें. या गतीला कारण असलेल्या द्रव्यांच्या (पाणी व अग्नि) मानांत जर बदल झाला तर एंजिनच्या गतींत बदल होतो. अग्नि वृद्ध झाला तर पाण्याची वाफ वाढेल व एंजिन फुटेल, पाण्याची वाढ झाली तर एंजिनला विशिष्ट गति येणार नाहीं. याचप्रमाणें अग्नि क्षीण झाला तर पाण्याची वाफ योग्य प्रमाणांत न झाल्यामुळें इंजिनला गति येणार नाहीं. पाणी क्षीण झालें तर योग्य वाफ तयार न झाल्यामुळें एंजिनमधील यंत्रांत गति निर्माण होणार नाहीं. या यंत्राच्या बॉयलरमध्यें वाफेचें प्रमाण वाढलें कीं, त्यांत असणारे पडदे उघडतात व पाणी कमी झालें कीं दुसरे पडदे उघडतात, व वाफेचें प्रमाण कमी असल्याचें ज्ञान एंजिन चालविणाऱ्यांना होतें. अशा रीतीनें पाण्याचें प्रमाण व अग्नीचें प्रमाण विशिष्ट ठेवल्याशिवाय एंजिन चालत नाहीं.

शरीराला एंजिनची उपमा

याच पद्धतीनें आपलें शरीरहि चालत असतें. या शरीरांत पित्त म्हणजे अग्नि, आणि कफ म्हणजे पाणी, हीं दोन द्रव्यें योग्य प्रमाणांत असावीं लागतात. त्यांच्यामध्यें वाढ झाली तर विकार उत्पन्न होतात किंवा ते क्षीण झाले तरीहि विकार उत्पन्न होतात. पित्त क्षीण झालें असतां शरीराचें स्वाभाविक उष्णतामान कमी होतें, व पित्त वृद्ध झालें तर शरीराचें उष्णतामान वाढतें. या दोन्ही अवस्थांचें ज्ञान आपणांस त्यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वृद्धिक्षयात्मक लक्षणांवरून होतें. ज्याप्रमाणें दोषवृद्धीनें देहनाश होतो त्याचप्रमाणें दोष क्षीण झाले असतां देहनाश होतो म्हणून त्यांस विकार असें म्हटलें तर तें वावगें होत नाहीं.

अभाव अमूर्त नाहीं

दोष वृद्ध असो किंवा क्षीण असो यांचें कार्य देहनाश हा ठरलेलाच आहे. म्हणून क्षीण दोषांनीं विकार उत्पन्न होतात असें म्हटलें आहे. " विकारो दुःखमेव च ". ज्या विकारांनीं दुःख होतें तो रोग. (दुःखं विकारस्तज्जनकधातुवैषम्यं च विकारः) दोषवृद्धिजन्य ज्वरादि जसे विकार आहेत तसेंच क्षीणजन्य अग्निमांद्यादि विकार होत. विकाराचे वृद्धिजन्य आणि क्षीणजन्य हे प्रकार आहेत. वृद्धिजन्य प्रकारांत दोष वृद्ध होऊन दूष्याशीं संमूर्च्छित होऊन विकार उत्पन्न करतात तर दोष क्षीण झाले असतां दोषांच्या स्वरूपाची हानि होऊन रसरक्तादि धातूंना क्षीण करतात. आहारांत कटु, अम्ल, लवण रसांचा अभाव असेल तर पाचक पित्ताचें उदीकरण योग्य प्रमाणांत व तैजस गुणात्मक होत नाहीं. यामुळें अग्निमांद्य उत्पन्न होईल, यांसच विकार असें म्हटलें तर तें वावगें होणार नाहीं. पाचक पित्त योग्य मानात्मक व योग्य गुणात्मक नसल्यामुळें त्याच्या कर्मांची हानि होते, किंवा विरोधि कर्मांची वाढ होते. चरकाचार्यांनीं दोष क्षीण झाला असतां स्वतःचीं चिन्हें सोडतो असें म्हटलें आहे. " क्षीणाः जहति स्वं लिंगम् " याचा अर्थ माझे एक मित्र वैद्य अ. वा. आठीकर असा करतात कीं, " दोषांची क्षीणता ही अभावस्वरूप असून वृद्धावस्था ही भावस्वरूप आहे. अभावापासून भावोत्पत्ति मानणें सदोष आहे. " (आयुर्वेद-पत्रिका. १६ अेप्रिल १९५४.) आयुर्वेदाचार्यांनीं भाव आणि अभाव यांची केवळ शाब्दिक कसरत केलेली नाहीं. भाव हा मूर्तिमत् मानला आहे. या मूर्तीचा क्षय होऊं लागला कीं, तीस अेकदम अभावत्व येत नाहीं ही गोष्ट विचारांत घेणें आवश्यक आहे. भाव म्हणजे असणें आणि अभाव म्हणजे नसणें असे या शब्दांचे अर्थ आहेत वैद्य आठीकरानीं भाव म्हणजे वृद्धावस्था असा अर्थ केला आहे. या त्यांच्या अर्थाप्रमाणें दोषांची साम्यावस्था ही अभावरूप मानावी लागेल. दोष हे भावरूप आहेत. त्यांचे वृद्ध आणि क्षीण रूप हीहि भावरूपच आहे. म्हणूनच क्षीणावस्था निर्माण झाली कीं, त्यांचीं लक्षणें दिसूं लागतात. तीं ग्रंथकारांनीं पण सांगितलीं आहेत. वा अवस्थेंत त्यांची चिकित्सा समान गुणात्मक अशी सांगितली आहे. दोषांचा क्षय झाला असतां वृद्धीच्या कारणांचा द्वेष निर्माण होतो, याचप्रमाणें दोष क्षीण झाला असतां समान गुणात्मक द्रव्यांची इच्छा रोग्यांत उत्पन्न होते. हें जें त्याचें लिंग तें भावस्वरूपच आहे. " लिंग्यते ज्ञायते इति लिंगम् । " ज्यामुळें एखाद्या वस्तूचें ज्ञान होतें तें त्या वस्तूचें लिंग होय. या व्याख्येप्रमाणें दोषक्षीणावस्था अभावरूप नाहीं, भावरूपच आहे. अशा या भावरूप क्षीणदोषाकडून शरीरांत रोग उत्पन्न होतो.

यानन्तर आणखी एका शंकेचें निरसन येथेंच केलेलें बरें. ती शंका अशी आहे कीं, दोष क्षीण झाला म्हणजे तो कर्तृत्वशून्य होतो. यामुळें शरीरांत तो पीडा उत्पन्न करण्यास असमर्थ असतो, अशी सामान्य वैद्यवर्गांची कल्पना आहे, ती कशी चुकीची आहे तें पाहूं. " क्षयवृध्द्योः पीडाकरत्वे तारतम्यमाह मलोचित्तत्वादिति, दोषादीनां वृद्धिः देहपीडनी, क्षयस्तु ततोऽपि देहपीडनः, कुतः ? मलोचितत्वात्, देहो हि मलसात्म्यः सात्म्यं च बह्वपि नाति बाधते, वक्षति, सात्म्यं ह्याशुचलं धत्ते नातिदोषं च बह्वपि इति, मलशब्देन दोषधातुमलानां ग्रहणम्, वक्षति-विट्श्लेष्मपित्तादिमलोच्चयानां विक्षेपसंहारकरः यस्मात्, " इति

(वा. सू. अ. ११ हेमाद्रि)

दोषक्षीणता जास्त पीडाकर आहे-हेमाद्री

दोषवृद्धीपेक्षां दोषक्षीणता ही जास्त पीडाकर आहे असें हेमाद्रि म्हणतो तें योग्य आहे. दोष

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्षीणतेमुळें हजारों रोगी मृत्युमुखीं पडतात. उदा. ज्वराच्या सान्निपातिक अवस्थेंत (वृद्धिजन्य) कांहीं कांहीं रोग्याचा ज्वर अति घाम येऊन उतरतो, सर्व अंग गार पडतें, नाडी क्षीण होते. या अवस्थेंत स्वेदातिप्रवर्तनामुळें पित्त क्षीण होतें, म्हणून शरीराचा उष्मा ९५ अंशाच्याहि खालीं जातो व रोगी दगावतो. स्वेदाच्या अतिप्रवर्तनानीं त्यांत असणाऱ्या पित्ताचा अतिविसर्ग झाल्यामुळें पित्त क्षीण होतें. (क्षयं चातिविसर्गतः) आणि पित्त क्षीण झाल्यामुळें शरीरोष्मा खालीं येतो. या अवस्थेंत जी चिकित्सा केली जाते ती पित्तवृद्धीची असते, उदा. हात पाय अंग शेकणें, अंगास सुंठ चोळणें, हेमगर्भ, समीरपन्नग, त्रैलोक्यचिंतामणि इ. मात्रा देणें. ही सर्व चिकित्सा पित्तवर्धनाची आहे याची कल्पना किती वैद्यांस आहे? याप्रमाणें दोषक्षीणतेची ही जी अवस्था आहे ती दोषवृद्धीपेक्षां अत्यंत कठीण असते, याचा अनुभव प्रत्येकास येतो, म्हणून दोषक्षीणतेचा विचार निदान चिकित्सेंत जरूर करावा, एवढीच माझी वैद्यबंधूंना विनंति आहे. या एकंदर विवेचनावरून दोषक्षीणतेचें महत्व किती आणि कसें आहे तें कळून येण्यासारखें आहे. व दोषक्षीणता ही देहनाशास कशी कारणीभूत होते याची कल्पनाहि आपणांस आली असेलच. आतां आपण देहनाशाच्या सामान्य कारणांचा विचार यापुढें करूं.

देहनाशाची मीमांसा

शरीराचा वध दोषवैषम्यामुळें होतो. हें वैषम्य एकंदर चार प्रकारचें आहे.

दोष वैषम्य

दोषवृद्धि | दोषक्षीणता | दोषवृद्धिक्षय | दोषवृद्धिक्षयसम

अमूक एक रोग झाला आहे असें म्हटल्याबरोबर आपणांस मृत्यूची भीति वाटूं लागते, इतका धाक प्राणिमात्रावर बसलेला आहे. अशा रोगाचें मूळ कारण तरी कोणतें? त्याचें स्वरूप तरी कसें असतें? याचा विचार करूं.

रोग उत्पन्न होण्यास प्रज्ञापराध, परिणाम (काल), आणि असात्म्येंद्रियार्थसंयोग हीं आदि कारणें आहेत. यांनाच निमित्त कारणें असें म्हणतात. या कारणांनीं शरीरस्थ दोष विषम होऊन रोग उत्पन्न करतात आणि देहाचा नाश करतात. दोष हे शरीरारंभक आहेत. हें आरंभकच विकृत होऊन देहाचा नाश करतें.

> दोषा अेव हि सर्वेषां रोगाणामेककारणम् । यथा पक्षी परिपतन् सर्वतः सर्वमप्यहः ॥
> छायामत्येति नात्मीयां यथा वा कृत्स्नमप्यदः । विकारजातं विविधं त्रीन् गुणान्नातिवर्तते ॥
> तथा स्वधातुवैषम्यनिमित्तमपि सर्वदा । विकारजातं त्रीन्दोषान् ॥ वा. सु. अ. १२-३२-३३-३४

दोष हें एकच कारण सर्व रोगांना आहे. जसा पक्षी आकाशांत फिरत असतां त्याची छाया त्यास सोडून असत नाहीं, त्याचप्रमाणें दोष हे रोगांना सोडून असत नाहींत. सृष्टींत उत्पन्न झालेलीं अनेक द्रव्यें तीन गुणांना सोडून असत नाहींत, त्याचप्रमाणें शरीरांत उत्पन्न होणाऱ्या विकारांना दोष सोडून असत नाहींत. याप्रमाणें रोगाला कारण असलेले दोषवैषम्य कोणत्या स्वरूपांत असतें त्याचा विचार करूं.

१ दोषवृद्धिजन्य वैषम्यः— प्रज्ञापराध, असात्म्येंद्रियार्थसंयोग आणि परिणाम या कारणांनीं दोषांच्या चयादि अवस्था निर्माण होऊन हे विकार उत्पन्न करतात. याचे दोन प्रकार आहेत. १ स्वस्थानांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होणारी वृद्धि २ प्रकोपादि दुसऱ्या स्थानांत विकार उत्पन्न करणारी. या वृद्धीमुळें रसादि धातु विकृत होतात व त्यांचें एकमेकांशीं संमूर्च्छन होतें व विशिष्ट रोगाला उत्पन्न करतात. या एकंदर कार्यांत दोषांच्या अवयवांची वृद्धि होते. (वृद्धिरवयवोपचयः) यांचे पंचवीस प्रकार पाडले आहेत.

क्षयज वैषम्यः- ही दोषांची अपचयावस्था आहे. यांत दोष क्षीण होऊन शरीराच्या प्राकृत कर्मांची हानि होते व शरीराचा समयोग गेल्यामुळें शरीराचा नाश होतो. दोष हे रसादि धातूंच्या उत्पत्तीस कारण असल्यामुळें या अवस्थेंत ते रसादि योग्य प्रमाणांत उत्पन्न करूं शकत नाहींत. यामुळें हे रसादि धातु क्षीण होतात. या अवस्थेचेहि पंचवीस प्रकार आहेत.

या अवस्थेंत कांहीं दोष वृद्ध, कांहीं क्षीण असतात. ही अवस्था वृद्धिजन्य रोगांत आढळते. रक्तपित्त, अतिसार, ज्वर, इ. रोगांत ही अवस्था पाहावयास मिळते. या संबंधीं मागें विवेचन केलें आहे. या अवस्थेचे बारा प्रकार आहेत.

वृद्धि-क्षय-समः- या अवस्थेंत एक दोष वृद्ध, एक क्षीण, आणि एक सम असतो. चरकाचार्यांनीं या अवस्थेचें वर्णन फारच सुंदर केलें आहे. क्षयजन्य रोगांचा विचार करण्याची आवश्यकता नाहीं असें म्हणणाऱ्यांना हें कितपत मानवतें कोणास ठाऊक ? दोषक्षयाचा विचार करण्याचें कारण नाहीं, ते विकार करूं शकत नाहींत असें आचार्य पदवीधरांना वाटतें. या ठिकाणीं तर एक दोष सम असतांना विकार उत्पन्न करतो असें चरकाचार्य म्हणतात तें त्यांना कसें पटणार ? प्राचीन आचार्यांनीं दोषांचा अत्यंत सूक्ष्म अभ्यास करून या अवस्था ठरविल्या आहेत. त्या त्यांच्याच शब्दांत मी आपणापुढें ठेवणें बरें.

प्रकृतिस्थं यदा पित्तं मारुतः श्लेष्मणक्षये । स्थानादादाय गात्रेषु यत्र यत्र विसर्पति ॥
तदा भेदश्च दाहश्च तत्र तत्रानवस्थितः । गात्रदेशे भवत्यस्य श्रमो दौर्बल्यमेव च ॥ च.सू.अ.१७

प्रकुपित वात, प्रकृत पित्त आणि कफ क्षीण या दोषांच्या संयोगानीं रोग उत्पन्न होतात. या दोषांच्या अवस्थेंत प्रकुपित वात हा पित्तस्थानांत जाऊन प्रकृत पित्तास बाहेर काढतो आणि त्यांस घेऊन ज्या ज्या स्थानांत जातो तेथें दाह आणि भेद उत्पन्न करतो. या दोषांच्या स्थितीचें ज्ञान ज्या वैद्यांस होत नाहीं तो पित्त प्रकुपित झालें आहे असें समजून विरेचन देतो. यामुळें पित्त क्षीण होऊन ते निराळा विकार उत्पन्न करील.

भट्टार हरिश्चंद्रांचा आधार

वरील चरकाचार्यांच्या विचारावरून आपणांस असें दिसून येतें कीं, समान दोषहि विकार उत्पन्न करतो, मग क्षीण दोष विकार करणार नाहीं हें म्हणणें कितपत योग्य ठरेल ? भट्टार हरिचंद्र असें म्हणतो कीं, अविकृत पित्ताची चिकित्सा करावयाची झाल्यास वातास स्वस्थानांत आणावें, म्हणजे दाह कमी होईल. जर अज्ञानानें पित्त वृद्ध आहे असें समजून विरेचन दिलें गेलें तर पित्त क्षीण होऊन दुसरा रोग उत्पन्न होईल. (ये त्वेनां पित्तस्य स्थानाकृष्टं न विन्दति ते दाहोपलंभेन पित्तवृद्धिं मन्यमानाः पित्तं न्हासयन्तः पित्तक्षयलक्षणं रोगांतरमेवोत्पादयन्त आतुरमतिपातयन्ति " इति " भट्टार हरिचंद्रः, मा. नि. टीका पा. १) क्षीण दोषामुळें रोग उत्पन्न होतात या माझ्या म्हणण्यास भट्टार हरिचंद्राचाहि एक आधार आहे.

वरील चार अवस्थांचा विचार संप्राप्तिमध्यें करावयास पाहिजे, त्याशिवाय आयुर्वेदीय चिकित्सा यशस्वी होणार नाहीं. उपलब्ध निदान चिकित्सा ही केवल वृद्धिजन्य असल्यामुळें ती एकांगी व अपूर्ण आहे. तींत जर दोषक्षय कारणांची व अवस्थांची भर टाकली तर आयुर्वेद पुष्ट होईल. सध्यां आयुर्वेदरूपी पुरुष दोषक्षयानें पीडित आहे, तरी त्याची चिकित्सा संतर्पणात्मक करावी अशी मी विद्वान् वैद्यांना विनंति करतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आतांपर्यंत आपण दोषक्षयाच्या कारणांचा व त्याच्या अवस्थेचा विचार केला. दोषक्षयांनें शरीरांत रोग कशी उत्पन्न होते हें पाहिलें. यानंतर आपण त्याच्या चिकित्सेचा विचार करूं.

दोषक्षयाची चिकित्सा

वर दिलेल्या दोषांच्या चार अवस्था, दोषांच्या तीन गतींतून पाडल्या आहेत. वृद्धि, क्षय आणि स्थान या तीन दोषांच्या गति चरकांनीं पाडल्या आहेत. (क्षयः स्थानं च वृद्धिश्च विज्ञेया त्रिविधा गतिः। च. सू. अ. १७). दोष हे वृद्धीच्या अवस्थेंतच गमन करतात असें नाहीं तर ते क्षयावस्थेंतहि गमन करतात, असें चरकांचें म्हणणें आहे. आपण दोषांची वृद्ध अवस्थाच गमनात्मक आहे असें समजतों. क्षयावस्था गमनात्मक कशी होऊं शकते ? याचा खुलासा विद्वान् वैद्यांनीं अवश्य करावा.

ग्रंथकारांनीं दोषांच्या चार अवस्था आणि तीन गति सांगितल्या असल्या तरी खऱ्या दोषांच्या दोनच अवस्था पडतात. १ दोषवृद्धि २ दोषक्षय. या दोन अवस्थांना सोडून तिसरी अवस्था रोगांत नाहीं. बाकीच्या अवस्था या दोन अवस्थांचे पोटभेद आहेत. म्हणून चिकित्सा ही संतर्पणात्मक आणि अपतर्पणात्मक अशी द्विविध आहे. दोषांची वृद्धि ही संतर्पणानीं होते आणि दोषांचा क्षय हा अपतर्पणानीं होतो. याचें विवेचन थोडेसें अधिक स्पष्ट करूं.

एखाद्या दोषाची वृद्धि कोणत्या कारणांनीं होते ? त्या दोषाच्या समान गुणांच्या आहार विहारांनीं होते. वाताचीहि वृद्धि तत्समान गुणानींच होत असते. या वृद्धीच्या अवस्थेंत श्लेष्मा हा त्या दोषाबरोबर असतो. म्हणून वृद्धि ही संतर्पणात्मक असल्यामुळें तिची चिकित्सा ही अपतर्पणात्मक करावी लागते. क्षयावस्था ही वायुयुक्त असते. वृद्धिजन्य अवस्था जशी कफयुक्त असते तशीच क्षयज अवस्था ही वायुयुक्त असते म्हणून क्षयज अवस्थेची चिकित्सा ही संतर्पणात्मक करावी लागते.

वृद्धिजन्य अवस्था ही उपचयात्मक आहे. हींत 'वृद्धिः समानैः सर्वेषां' या न्यायानें दोषांचा उपचय होत असतो. आणि दोषक्षयांत दोषांचा अपचय होतो. दोषांच्या वृद्धीस खरें कारण संतर्पण हें आहे. या कारणाच्या विरुद्ध अशा चिकित्सा म्हणजे अपतर्पण हें होय. या अपतर्पणानीं दोषांची वृद्धि कमी होते म्हणून ही हेतुविपरित चिकित्सा होते. दोषवृद्धिजन्य अवस्थेंत कफ हा अनुगत असतो आणि तो वृद्ध दोषांना कोठेंतरी स्थिर करून स्थानसंश्रयात्मक रोग उत्पन्न करतो. या अवस्थेंत रोगाच्या विरुद्ध म्हणून अपतर्पणात्मक चिकित्सा केली जाते, यांस व्याधिविपरीत चिकित्सा म्हटली आहे. अशा रीतीनें दोषवृद्धीं अपतर्पणात्मक चिकित्सा ही हेतुविपरीत आणि व्याधिविपरीत कार्य करते.

क्षयज अवस्था ही अपतर्पणानीं उत्पन्न होत असल्यामुळें या अवस्थेंत संतर्पणात्मक चिकित्सा ही उपयुक्त आहे. क्षयज अवस्थेंत वायु हा दुसऱ्या दोषाबरोबर अनुगत असतो. या अवस्थेंत हेतुविपरीत म्हणून संतर्पण उपयोगी पडतें, तर ही अवस्था वायुयुक्त असल्यामुळें संतर्पण हें व्याधिविपरीत म्हणून उपयोगी पडते. (चिकित्सा च द्विविधा, बृंहणलंघनभेदात्, तत्र बृंहणलंघने विभजति प्रायो वृद्धिरिति, वृद्धिजान् विकारान् लंघनेन साधयेत्, क्षयजान् बृंहणेन, कुतोऽयं विभागः ? हि यस्मात् वृद्धिस्तर्पणात् बृंहणात् भवति, सा च श्लेष्माणानुगता यत्र यत्र वृद्धिः तत्र तत्र श्लेष्मा, पित्तादि वृद्धावपि श्लेष्मानुगमोस्तीत्यर्थः। तस्मात्सर्वेषु वृद्धिविकारेषु लंघनमौषधम्, हेतुविपरीतत्वात् श्लेष्मानुगमेन व्याधिविपरीतत्वाच्च, तथा संक्षयस्तद्विपर्ययात्-तद्विपर्ययात् लंघनाद्भवति, स च वायुनानुगतः यत्र यत्र क्षयः तत्र तत्र वायुः कफादिक्षयेऽपि वायोरनुगमोस्तीत्यर्थः, तस्मात् सर्वेषु क्षयविकारेषु बृंहणमौषधम्, हेतुविपरीतत्वाद्वातानुगमेन व्याधिविपरीतत्वाच्च। च. सू. अ. १२ हे.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ही सामान्य चिकित्सा सांगितली आहे. यांस अपवाद म्हणून खालील सूत्र वाग्भटानें सांगितलें आहे. " वायोरन्यत्रतज्जांस्तु तैरेवोत्क्रमयोजितैः । "

वरील सामान्य नियमाला वायु हा अपवादात्मक आहे. वायूची वृद्धि संतर्पणानीं होत नाहीं आणि वायु वृद्ध झाला असतां त्याची चिकित्साहि अपतर्पण होऊं शकत नाहीं. तर वायु वृद्ध झाला असतां बृंहणात्मक चिकित्सा करावी लागते आणि वायु क्षीण झाला असतां लंघनात्मक चिकित्सा करणें भाग पडतें. दोषांचा क्षय होऊं लागला म्हणजे आपणांस त्याचें ज्ञान होतें. जसा दोष वृद्ध होत असतां (चयावस्थेत) त्याच्या वृद्धीस कारण असलेल्या गुणांचा द्वेष उत्पन्न होतो किंवा विपरीत गुणांची इच्छा होते तद्वत् दोष क्षीण होऊं लागला कीं, रोगी तत् समान गुणांची इच्छा व्यक्त करतो. यावरून आपणांस कोणत्या दोषाचा क्षय होणार किंवा होत आहे हें कळतें. उदा. वात क्षीण झाला असतां रोगी लघु, रुक्ष, कषाय अन्नाची इच्छा करतो. कफ क्षीण झाला असतां स्निग्ध, मधुर, आम्ल, लवण रसात्मक अन्नाची इच्छा व्यक्त करतो. पित्त क्षीण होत असतां आम्ल, लवण, कटु रसात्मक आहाराची इच्छा करतो. याप्रमाणें क्षीण दोषांची चिकित्सा बृंहणरूपात्मक करावी अशी शास्त्रकारांची आज्ञा आहे.

(वातः क्षीणो रूक्षकषायाद्यन्नमभिलषति, पित्तं क्षीणं अम्ललवणकटुकमन्नमभिलषति, श्लेष्मा क्षीणः स्निग्धमधुराम्ललवणमन्नमाभिलषति । वा. सू. अ. ११)

औषधाचे प्रकार व दोषक्षीणता

" शोधनं शमनं चेति समासादौषधं द्विधा । " वा. सू. अ. १

शोधन आणि शमन अशीं दोनच प्रकारचीं औषधें आहेत. शोधन औषधें हीं वृद्ध झालेल्या दोषांना बाहेर काढतात आणि शमन औषधें हीं क्षीण दोषांना सम करतात. क्षीणावस्थेंत दोष हे अपचयात्मक असतात, त्यांचा उपचय व्हावा म्हणून बृंहण चिकित्सा करावी लागते. या ठिकाणीं बृंहण शब्दानीं केवल दोषांचेंच बृंहण घेणें. (शमनं त्वधिकक्षरणक्षीणवर्धनाभ्याम्, अत एवात्याधिके दोषे शोधनम् अधिकक्षीणयोः शमनम् इति विभागः सिध्दः, वा. सू. अ. १ हेमाद्रि) या हेमाद्रीच्या विचारसरणीवरून पाहतां क्षीण दोषांना सम करणारी जी चिकित्सा ती शमन होय. ज्यांच्या डोळ्यापुढें केवल वृद्धिजन्य रोगांचाच विचार आहे, तेथें त्यांनीं वृद्ध दोषांना बाहेर न काढतां सम करणारी जी चिकित्सा केली जाते तीसहि शमन चिकित्साच म्हटलें आहे.

या माझ्या विवेचनावरून विद्वान् वैद्यांच्या लक्षांत येईल कीं, " रोगस्तु दोषवैषम्यम् " हें सूत्र किंवा चरकाचार्यांचें "विकारो धातुवैषम्यम्" हें सूत्र घेऊन रोग म्हणजे दोषवृध्दि आणि दोषक्षीणता हीच व्याख्या कशी योग्य आहे तें सिद्ध केलें आहे. यानंतर या व्याख्येस धरून दोषसाम्य कसें प्रस्थापित करावें लागतें तेंहि शास्त्रीय आधारासह दाखविलें आहे. रोग म्हणजे दोषांची केवळ वृद्धि मानली तर " याभिः क्रियाभिर्जायते शरीरे धातवः समाः " ही व्याख्या जुळत नाहीं. आयुर्वेदाचार्यांना जर केवळ वृद्धिजन्यच विकार उत्पन्न होतात असें वाटत असतें तर त्यांनीं 'रोगस्तु दोषवृद्धिः' असें म्हटलें असतें. मी माझ्या अल्प बुद्धीला जें वाटतें तें विद्वान् वैद्यांच्या पुढें मांडलें आहे. त्याचा स्वीकार करणें न करणें हें त्यांच्या मर्जीवर अवलंबून आहे.

यानंतर माझ्या विनंति-पत्रकाप्रमाणें कांहीं वैद्यांनीं दोषक्षीणजन्य रोगच उद्भवूं शकत नाहींत असें प्रतिपादन केलें आहे. त्यांनीं ज्या शंका किंवा त्या प्रतिपादनांत जे आधार दिले आहेत ते कसे चुकीचे आहेत याचा विचार करणें भाग पडते म्हणून मी त्यांची मांडणी कशी सदोष आहे तें वाचकांच्या निदर्शनास आणूं इच्छितो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांहीं आक्षेपांचें निरसन

दोषक्षीणतेनें रोग उत्पन्न होतात कीं नाहीं ? किंवा दोषक्षीणता ही रोगाच्या अवस्थेंत असते कीं नाहीं ? या माझ्या प्रश्नास एकंदर चार विद्वान् वैद्यांनीं उत्तरें दिलीं आहेत. त्यांत वैद्य आचार्य मणिराम शर्मा भूतपूर्व अध्यक्ष निखिल भारतीय आयुर्वेद विद्यापीठ हे एक आहेत. यांनीं दोषक्षीणतेनें रोग उत्पन्न होत नाहींत असें म्हटलें. नंतर प्राचीन आचार्यांनीं क्षीणजन्य रोगांचा विचार केला आहे असें सांगून दुरुह क्षीणदोषांच्या विचाराची अपेक्षा दर्शविली; आणि दोषक्षीणजन्य विकारांचे बाबतींत नवीन वाङ्मय प्रसिद्ध करून आयुर्वेदसंसारांत वैद्यांनीं भर टाकावी अशी त्यांनीं इच्छा प्रगट केली आहे.

(तथापि दुरूहाणां क्षीणानां चापेक्ष्यते, आशासे विद्वद्वैद्या अस्मिन् दुरूह क्षीणदोषकल्पनाविषये व्याख्यानद्वारा नवीनपुस्तकलेखनद्वारा वा आयुर्वेदसंसारमुरकरिष्यन्ति । सचित्र आयुर्वेद एप्रिल १९५४)

हे त्यांचे प्रगतिपर विचार पाहून मला आनंद होतो. त्यांनीं हे विचार मांडण्याचे जें धाडस केलें याबद्दल मी त्यांचें अभिनंदन करतो.

आचार्य मणिराम शर्मा यांनीं क्षीणदोषामुळें विकार उत्पन्न होत नाहींत असें म्हटलें आहे. तें त्यांच्याच शब्दांत देणें बरें.

"दोषक्षयेणापि ये रोगाः भवन्ति यथा पित्तक्षयादग्निमांद्यादि तत्रापि कफवृद्धिरिति संभाव्यते ",......

(सचित्र आ., ए. १९५४, पान ९४०)

आचार्य शर्माजींचे हे विचार अत्यंत चुकीचे, अशास्त्रीय आहेत. याचप्रमाणें वैद्य अ. वा. आष्टीकर यांनींहि असेंच विचार मांडले आहेत. ते म्हणतात

" दोषाची क्षीणता तद्विरुद्ध दोषवृद्धिमूलक असल्यामुळें क्षीणदोषांचीं लक्षणें विरुद्ध दोषवृद्धिमुळेंच होतात असें शास्त्रकारांचे मत आहे. "

" वाते पित्ते कफे चैव क्षीणे लक्षणमुच्यते " " कर्मणः प्राकृताद्धानिर्वृद्धिर्वापि विरोधिनाम् "

हा शास्त्रकारांचा आधार म्हणून वैद्य अ. वा. आष्टीकर यांनीं दिला आहे. वैद्य आष्टीकरांनीं हा आधार देतांना या श्लोकाचें नीट अवलोकन करावयास पाहिजे होतें. हा आधार त्यांना तर उपयोगी पडत नाहीं, उलट प्रतिपक्षाला उपयोगी पडणारा आहे. त्यांचें लिखाण प्रतिपक्षाला चीत करण्याऐवजीं पुष्ट करणारें आहे.

वरील श्लोकाच्या आधारेंच मी असें म्हणतो कीं, एक दोष क्षीण झाला असतां तत्‌विरुद्ध दोष वृद्धिंगत होत नाहीं, तर क्षीणदोषाच्या प्रकृत कर्माची हानि होते किंवा तत्‌विरुद्ध कर्मांची वाढ होते. याचें स्पष्टीकरण चक्रदत्तानें खालीलप्रमाणें केलें आहे:—

" वृद्धिर्वाऽपि विरोधिनामिति उक्तप्राकृतलक्षणविरोधिनां कर्मणां वृद्धिः यथा वातक्षये उत्साहविरोधिनो विषादस्य वृद्धिः, पित्तक्षये दर्शनापक्त्यादीनां, श्लेष्मक्षये रौक्ष्यादीनां वृद्धिः ॥

वृद्धिर्वापि विरोधिनां इत्युक्तम्, यदुच्यते–वृद्धिर्वापि विरोधिनामिति विरोधिदोषाणां, यथा पित्तवृद्धौ श्लेष्मक्षयो जायते, इत्येवमादि, तन्न ।

आचार्य पां. देशपांडे, आचार्य मणिराम शर्मा, आचार्य आष्टीकर या आचार्यत्रयांची कल्पना एकाच तऱ्हेची पाहून असें वाटतें कीं, हल्लीं चालू असलेली शिक्षणपरंपराच सदोष आहे कीं काय ! इकडे शिक्षण-तज्ञांनी अवश्य लक्ष द्यावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या विवेचनावरून वाचकांना असें दिसून येईल कीं, एक दोष क्षीण झाला असतां तत्विरुद्ध दोष वृध्द होत नाहीं, हें माझें म्हणणें बरोबर आहे. असो, यानंतर आपण वैद्य अ.वा. आष्टीकरांनीं आणखी कांहीं मुद्दे असेंच विचित्र चित्रित केले आहेत त्यांचा विचार करूं.

वैद्य आष्टीकरांचें अयोग्य विवेचन

दोषांचे वृद्धिजन्य व क्षीणजन्य पंचवीस प्रकार कां पाडले? याचें उत्तर वैद्य आष्टीकरांनीं पुढील प्रमाणें दिलें आहे. " दोषवृद्धीचे पंचवीस प्रकार तर तेवढेच क्षीण दोषांचे हें सांगण्याचें तात्पर्य हें कीं, दोषाची वृद्धावस्था क्षीणावस्थापूर्वक असते. एक दोष जेव्हां क्षीण होतो तेव्हां तद्विरुद्ध दोष वाढतो. दोषांचें वैषम्य निश्चित तोलून पाहावयाचें तर वृद्ध त्याचबरोबर क्षीण अशा दोन्ही प्रकारांनीं वैषम्याचें कमी अधिक प्रमाण ठरवावें लागतें. "[आ. पत्रिका, १६अे.,पा. ६६१] या बाबतींत त्यांना माझा एक प्रश्न असा आहे कीं, दोषवृद्धीचे किंवा दोषक्षीणतेचे प्रकार ग्रंथकारांनीं कसे पाडले आहेत, हें आपण वाचलें तरी आहे कां? वृध्द दोषांचे प्रकार वृध्द, वृध्दतर, वृध्दतम असें प्रकार पाडलेले आहेत. तसेंच क्षीण, क्षीणतर, क्षीणतम असे दोषक्षयाचे प्रकार पाडलेले आहेत. आपण ग्रंथाचें अवलोकन न करतां वरील मीमांसा मांडली आहे, ती अशास्त्रीय आहे. दोष क्षीण झाला असतां तत् विरुद्ध दोष वृद्ध होत नाहीं हें वर सिद्ध केलें आहेच. यावरून वैद्य आष्टीकरांचें वरील चित्रण किती विचित्र आहे याची कल्पना वाचकांना येईल.

वैद्य आष्टीकरांनीं आयुर्वेदीय वाङ्मयांतील कोठलेंहि एखादें सूत्र घेऊन तें क्षीण दोषांशीं जुळविण्याचा प्रयत्न अनेक ठिकाणीं केला आहे. यांचें कारण असें असावें कीं, त्यांनीं जेव्हां हा विषय लेखनासाठीं निवडला तेव्हां त्यांच्या डोकींत अनेक विचारांचें काहूर माजलेलें असावें. त्याशिवाय त्यांनीं गाईचें वासरूं म्हशीस, व म्हशीचें वासरूं गाईस लावलें नसतें. आपण उदाहरणादाखल कांहीं स्थळांचा विचार करूं.

कांहीं स्थळांचा विचार

कुष्ठ रोगांत दोषविनिश्चय कसा करावा हें सांगतांना चरक म्हणतात कीं, " कुष्ठविशेषैर्दोषं दोषविशेषैः पुनश्च कुष्ठानि, ज्ञायन्ते तैर्हेतुः हेतुस्तांश्च प्रकाशयति। " वर सांगितलेल्या चिकित्सासूत्राप्रमाणेंच क्षीण आणि वृद्ध यांच्या परस्परांच्या लक्षणांची तुलना करावी लागते, व याचकरतां क्षीण दोषांचीं लक्षणें व त्यांचे पंचवीस प्रकार शास्त्रकारांनीं सांगितले. (आ. पत्रिका, १६अे. पा.६६१) " कुष्ठविशेषैः " हें सूत्र चरकाचार्यांनीं कार्यविशेषांनीं कारणाचें अनुमान कसें करतां येतें व कारणविशेषांनीं कार्यांचें अनुमान कसें करतां येतें हें समजावून सांगण्या करतां दिलें आहे. यांत दोषक्षीणतेचा संबंध कसा येतो आम्हांस तरी कळत नाहीं. उलट हा विचार दोषवृद्धिजन्य विकारांत सांगितला आहे, येथें दोषक्षीणतेचा संबंधच नाहीं.

यानंतर दुसरें प्रयोजनहि असेंच विचार न करतां मांडलेलें आहे. त्याचा विचार करूं. उदाहरणार्थ कित्येक वेळीं ज्वरादि रोगांत दोषांचीं वृद्ध लक्षणें स्पष्ट झालेलीं नसतात, अव्यक्त असतात. " लिंगमव्यक्तमल्पत्वात् व्याधीनां तद्यथायथम् " अशा वेळीं क्षीण दोषांचीं लक्षणें पाहून चिकित्सा करावी लागते. " (आ. प. पा. ६६२) वैद्य आष्टीकरांना जर अशा अवस्थेंत क्षीण दोषांचीं लक्षणें दिसत असतील तर तीं त्यांनीं प्रसिद्ध करावी. कोणत्या ग्रंथांत येथें क्षीण दोषांचीं लक्षणें दिसत असतात असें म्हटलें आहे! तें तरी त्यांनीं प्रसिद्ध करावें. उगाच कल्पनेंत रंगून जाऊं नये. वरील सूत्र किंवा विचार वृद्धिजन्य प्रकरणांत आले आहेत. वृद्धिजन्य अवस्थेंत जर लिंग अव्यक्त असेल तर उपशयानुपशयानीं तें जाणावें असें शास्त्रकारांचें म्हणणें वैद्य आष्टीकर महाशयानीं क्षीण दोषांशीं आणून जोडलें आहे. अशा रीतीनें त्यांनीं अनेक सूत्रें क्षीण दोषांशीं जोडून लेख पूर्ण केला आहे. बाकीच्या सूत्रांचा विचार करून मी वाचकांचा अमूल्य वेळ घेऊं इच्छित नाहीं.

" इति शम् "

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

– आयुर्वेद सेवा संघ, नासिक –

मागील ३० वर्षांतील कार्याचें त्रोटक निवेदन

१९२० ते २१ सालीं काँग्रेसनें पुकारलेल्या असहकारितेच्या आंदोलनांत सरकारी शाळा-कॉलेजें सोडून राष्ट्रीय शिक्षणाकडे वळलेल्या कांहीं तरुणांनीं आपलें शिक्षण पूर्ण करून १९२४ सालच्या आक्टोबर महिन्यांत दसऱ्याच्या मुहूर्तावर अहमदनगर येथें या संघाची स्थापना केली.

आयुर्वेद सेवा संघाची कायदेशीर घटना

आयुर्वेद सेवा संघाच्या कांहीं सभासदांनीं १९३०--३२ व १९४१-४२ या सालीं झालेल्या राष्ट्रीय आंदोलनांत भाग घेऊन स्वातंत्र्यप्राप्तीच्या कार्यांत आपली सेवा अर्पण केली आहे. १९३२ सालीं येरवडा तुरुंगांत (आजचे आरोग्यमंत्री) श्री. शांतिलालजी शहा यांनींच आयुर्वेद सेवा संघाची कायदेशीर घटना लिहून दिली. व तदनुसार १९३३ सालीं आयुर्वेद सेवा संघ, १८६० च्या कायद्यान्वयें सरकारांत नोंदला गेला आहे. (संस्थेची घटना सोबत दिली आहे.)

१९२४ ते १९४५ दरम्यानचीं २१ वर्षें

१९२४ ते १९४५ (मार्च १९४६) अखेर आयुर्वेद सेवा संघाचें मुख्य कार्यालय अहमदनगर येथें होतें. त्या कालांत तेथील आयुर्वेद महाविद्यालयांत अध्यापन, तेथील आयुर्वेदीय दवाखाने व रुग्णालय यांत रोगचिकित्सा, व आयुर्वेदाश्रम फार्मसी या औषधी कारखान्याचें संचालन हीं मुख्य कामें सेवासंघानें वैशिष्ट्यपूर्णरीत्या केलीं. त्यांत यंत्रांचा वापर नव्हता. व अल्कोहलमिश्रित औषधेंहि केलीं जात नसत.

१९४१ ते १९४६ अत्यंत विपरीत काल

१९४१ ते १९४५--४६ हा काल सेवा संघाला अत्यंत कठीण गेला. आयुर्वेदीय कार्याला कांहीं अंशानें मदतरूप होणारें औषधीकरण (आयुर्वेदाश्रम फार्मसी) हें सेवा संघाकडून काढून घ्यावें असें कांहीं लोकांना वाटू लागलें, व त्यासाठीं आयुर्वेद सेवा संघ ही संघटना नाहींशी करावी असे प्रयत्न झाले. मतभेदामुळें चालू कार्याचा नाश होऊं नये असा सुविचार करून, सेवा संघाचे बहुतेक सदस्य अहमदनगर येथील सर्व आयुर्वेदीय संस्था तेथील लोकाकडे सोंपवून नाशिक येथें आले.

१९४६ ते ५४ आणिबाणीची परिस्थिति

१९४६ ते १९५४ हीं ८ वर्षें सेवा संघाच्या आयुष्यांतील आणिबाणीचीं म्हणतां येतील. भूमि, इमारती, औषधीकरणाचीं पात्रें, साधनें सर्वच गोष्टी मिळवितांना अत्यंत कष्ट पडले. महागाई, नियंत्रणें, आसवारिष्टावरील बंदी, यामुळें सेवा संघ पुनः नव्या भूमींत मूळ धरतो कीं नाहीं अशी चिंता वाटत होती; तथापि कार्यकर्त्यांनीं आपली चिकाटी सोडली नाहीं.

आयुर्वेद सेवा संघाचीं नाशिक येथील चालू विविध कार्यें

आज नासिक येथें (१) प्रकाश औषधालय (दवाखाना), (२) औषधीभवन (औषधी कारखाना) (३) वैद्यक ग्रंथ भांडार (वैद्यकीय ग्रंथ विक्रीची व्यवस्था), (४) सेवा संघ पुस्तक माला (वैद्यकीय ग्रंथ प्रकाशनाची व्यवस्था), (५) आयुर्वेद–पत्रिका (पाक्षिक वृत्तपत्र व लोकशिक्षणाचें साधन), (६) वैद्यकीय ग्रंथालय (लायब्ररी व वाचनालय), (७) पहाटेचा स्वाध्याय वर्ग (आयुर्वेदीय ग्रंथवाचन व मनन वर्ग), याप्रमाणें कामें सुरू आहेत. (८) नुकतेंच संस्थेनें धर्मार्थ चिकित्सालयहि सुरू केलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुंबई राज्यांतील मिश्र शिक्षणाचा प्रयोग

महाराष्ट्रांत आयुर्वेद व अॅलोपॅथी एकत्र शिकविण्याचा जो प्रयोग गेलीं ४० वर्षें झाला, त्यापैकीं २० वर्षेंपर्यंत त्या प्रयोगांत सेवा संघानें भाग घेतला आहे. तथापि त्यामुळें आयुर्वेदशास्त्राची प्रगति होत नसल्याचें दिसून आल्यामुळें सेवा संघाच्या सभासदांनीं महाराष्ट्र प्रान्तीय वैद्य मंडळाच्या चळवळींत प्रामुख्यानें भाग घेऊन शुद्ध आयुर्वेदाच्या शिक्षणाची व संशोधनाची मागणी सरकारकडे केली. महाराष्ट्र प्रांतीय (९) वैद्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानीं विराजमान झालेल्या व्यक्तींपैकीं ४ अध्यक्ष १ कार्याध्यक्ष हे आयुर्वेद सेवा संघाचे सदस्य होते. व आतांहि महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाचें स्थायी कार्यालय नासिक येथेंच आहे.

संस्थेवर येऊन पडलेली जबाबदारी

खानदेश, नासिक व मुंबई या ठिकाणच्या कार्यकर्त्यांनीं प्रामुख्यानें महाराष्ट्र प्रांतीय आयुर्वेदीय चळवळी नेटानें पुढें चालविली. व त्याचा परिणाम म्हणून शुद्ध आयुर्वेदाच्या शिक्षणाच्या संस्था काढण्याची जबाबदारी या मंडळीवर येऊन पडली आहे. शिक्षणसंस्था व त्यांतून वैद्यकीय शिक्षणसंस्था चालविणें कठीण काम आहे. सरकारच्या मदतीशिवाय चालविलेलें असें एकहि वैद्यकीय विद्यालय प्रांतांत सांपडणार नाहीं.

सेवासंघाच्या आयुष्यांतील अत्यंत सुयोगाचा दिवस

आयुर्वेद सेवा संघाच्या आयुष्यांतील आजचा हा एक अत्यंत सुयोगाचा दिवस आहे. आज कांहीं जनता आयुर्वेदीय औषधें वापरणारी असली तरी नेते लोकांकडून या शास्त्राकडे अत्यंत दुर्लक्ष होत आहे. त्यामुळें नाशिक येथें आयुर्वेदाच्या शिक्षणाची संस्था सुरू करावी कीं नाहीं अशा किंकर्तव्यमूढ अवस्थेंत संस्थेचे चालक असतांना मुंबई राज्याचे प्रधानमंत्री यांचें आगमन येथें झालें आहे. येथील परिस्थिति पाहून त्यांनीं आम्हांस मार्गदर्शन करावें अशी विनंति आहे.

नासिक येथें नव्या दृष्टिकोनांतून चाललेलें कार्य

नासिक येथें आयुर्वेद सेवा संघाचें कार्य एका नव्या दृष्टिकोनांतून चाललेलें आहे. आजारी झालेल्या लोकांना औषधें देऊन बरें करणें एवढीच इतिकर्तव्यता समजण्यांत येत नाहीं. जन्मापासून (गर्भधारणेपासून) गर्भिणीनें व बालकानें आपल्या आपल्या दोषप्रकृत्यनुसार आहार-विहार व विचार कसे ठेवावेत याबाबत येथें प्रयोग केले जात असून प्रकृति बिघडण्यापूर्वींच करावयाच्या उपचारांना येथें प्राधान्य देण्यांत येत आहे. बालक, कुमार, तरुण, प्रौढ व वृद्ध या सर्व अवस्थांत तपासणी करून प्रकृतिदोषानुसार आहारांत कायकाय फेरबदल करावेत? व कोणते पौष्टिक वा कर्षक कल्प वापरावेत? याचें मार्गदर्शन ही संस्था करीत आहे. व्याख्यानें, लेख, यांच्या द्वारा याबाबत सतत प्रचार चालू आहे.

लोकांच्या विविध प्रकृति व त्यांचे विविध उपचार

जग हें त्रिविध आहे. व तें षड्रसात्मक आहे. एका व्यक्तीला उपयोगी पडेल तें तसेच दुसऱ्या व्यक्तीला तितकेंच हितावह होईल असें नाहीं. सबब व्यक्तीचे वर्ग व जगांतील उपभोग-साधनें व आहार-औषधीद्रव्यें यांचे वर्ग पाडून त्यांचा स्वतः अभ्यास व निरीक्षण करणें व त्याप्रमाणें त्यांचें जनतेला शिक्षण देणें हें काम संस्था करीत आहे व पुढेंहि करणार आहे.

सेवा संघाच्या औषधी भवनाचें भिन्न स्वरूप

आयुर्वेद सेवा संघाच्या कार्यांत औषधीभवनाचा व्याप मोठा दिसत असला तरी त्याचें स्वरूप इतर लिमिटेड व खाजगी औषधी कारखान्याहून बहुतांशीं निराळ्या प्रकारचें आहे. जें खपतें तें करून विकावयाचें हें संस्थेचें धोरण नाहीं. जें लोकांच्या आरोग्याला हितकारक असेल तें बनवून वा उपलब्ध करून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचा प्रचार अभ्यासपूर्वक वैद्य-डॉक्टर वर्गात व जनतेंत करावयाचा असें याचें धोरण आहे. आज जरी स्वावलंबनासाठीं कांहीं रूढ औषधें सेवा संघ करीत असला तरी तीं उच्च दर्जाचीं केलीं जात आहेत. व क्रमानें ५-१० वर्षांत संपूर्ण नवीन उपयुक्त औषधें तयार करून त्यांचा प्रसार करावयाचा असा सेवा संघाचा निर्धार आहे.

सेवासंघाचीं नवीननवीन औषधें

सेवा संघानें आजवर अगस्तिप्राश, भल्लातकासव, अश्विनीप्राश, कंदर्पवृष्यपाक, उत्तमांगवसंत, कुक्कुटांडत्वक्भस्म, रसोनवृष्यवटी, उदुंबरसार, अयस्कृति इत्यादि कल्प तयार करून व त्यांचा जनतेंत प्रचार करून आपल्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली आहे. शेअर भांडवल जमा न करतां व वर्तमानपत्रांतील जाहिरातीच्या जोरावर औषधें खपविण्याचे प्रयत्न न करतां आयुर्वेदपत्रिकाद्वारें वैद्यवर्गाला आपल्या चालू मालाची माहिती देऊन ही संस्था पुनः चालकांनीं प्रयत्नपूर्वक उभी केली आहे.

नैतिक पाठिंब्याची आवश्यकता

सेवा संघानें गेल्या ३० वर्षांत केलेली ही कामगिरी सरकारनें त्याला आपला नैतिक पाठिंबा द्यावा इतकी भक्कम खास आहे, असें आम्हांस वाटतें. सरकारला सध्यां आयुर्वेदीय औषधें अनेक दवाखान्यासाठीं लागतात. सरकारनें ती सेवा संघाकडून घेण्याचें ठरविल्यास इतर लोकल बोर्डें व म्युनिसिपालिट्याहि सरकारचें अनुकरण करतील. आज प्रांतांतील फार काय जिल्ह्यांतील दवाखान्यांना सुद्धां आमचीं औषधें घ्या असें आर्जव करूनहि फारच थोडा उपयोग होतो.

या राज्यांत जवळपासच्या जंगलांतून होणाऱ्या वनस्पतीवर भर देण्याचें संस्थेचें धोरण आहे. सरकारच्या जंगल खात्यानें सहकार्य दिल्यास जंगल खात्याचे उत्पन्न वाढेल. लोकांनाहि विश्वसनीय वनस्पति मिळण्याचा मार्ग मोकळा होईल.

ही संस्था वैयक्तिक भांडवलावर उभारलेली नाहीं व या संस्थेचें कार्य वाढल्यास जनतेची अधिकाधिक सेवाच घडणार आहे. सबब या संस्थेच्या कार्यांचा व कार्यकर्त्यांच्या अनुभवाचा उपयोग सरकारनें शक्य तितका करून घ्यावा. व एक शिक्षण-संशोधन संस्था म्हणून कार्य करणाऱ्या या संस्थेच्या कार्यकर्त्यांना आपल्या पाठिंब्यानें उत्साहित करावें अशी नम्र विनंति आहे.

आपले नम्र

वैद्य वा. स. मराठे

वैद्य बिंदुमाधव पंडित

वैद्य वि. म. गोगटे

[मुंबई राज्याचे मुख्य प्रधान ना. मोरारजीभाई देसाई यांना भेटीच्या प्रसंगीं संस्थेतर्फे सादर केलेलें निवेदन.]

शुद्ध आयुर्वेद विद्यालय, नासिक
विद्यालयांतील अध्यापक मंडळी

या विद्यालयांत पुढील वैद्यमंडळींनीं अध्यापन कार्य करण्याचें ठरविलें आहे. वैद्य बिंदुमाधवशास्त्री पंडित, प्रधानाध्यापक, वैद्य श्री. कृ. करमरकर उपप्रमुख, वैद्य विष्णु महादेव गोगटे आयुर्वेदप्रवीण, वैद्यरत्न विष्णुशास्त्री केळकर, वैद्य त्र्यंबकशास्त्री दाते आयुर्वेदमध्यमा (बडोदे), वैद्यरत्न पुरुषोत्तमशास्त्री पाटणकर, वैद्य सखारामशास्त्री दातार आ. म. (बडोदे), वैद्य पांडुरंगशास्त्री दाणी आ. म. (बडोदे), वैद्य ल. भा. काळे आयुर्वेदाचार्य, वैद्य प्रभाकर वामनशास्त्री दातार, डी. ए. एस्. एफ्., वैद्य वा. स. मराठे आयुर्वेदतीर्थ, वैद्य शामराव धों. कुलकर्णी आयुर्विद्याविशारद, वैद्य कृ. ब. महाबळ, व्यायामपारंगत, वैद्य स. का. लवाटेशास्त्री आ. म. (बडोदे), वृध्दवैद्य भाऊशास्त्री जाईल, त्र्यंबकेश्वर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्रांतील स्थानिक, तालुका व जिल्हा वैद्यमंडळें यांतील सर्व वैद्यबंधूंस विनंति

म. प्रां. वैद्यमंडळाच्या स्थायी सभेनें शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रमाचा व प्रांतीय वैद्यमंडळाचे कार्याचा प्रचार करण्यासाठीं अध्यक्षांनीं प्रांतभर हिंडावें असा प्रस्ताव संमत केला आहे. त्याप्रमाणें गेल्या मे महिन्यांत मी कोकणांत कांहीं ठिकाणीं हिंडून आलो व इतरहि जिल्ह्यांतून हिंडून यावें असा विचार आहे. तथापि खर्च होणारा वेळ आणि पैसा यांचा विचार करतां हा प्रचार प्रवास फार महागे पडतो असें वाटतें. साधारणपणें पांचाहून अधिक वैद्य ज्या गांवीं आहेत आणि ५हजारांवर लोकवस्ती ज्या गांवची आहे अशा गांवीं प्रचारास जाणें सोयीचें होतें.

प्रचारांतील नानाविध कार्यें

प्रचार कार्यांत संघटनेच्या दृष्टीनें अजूनहि जेथें स्थानिक, तालुका व जिल्हा वैद्यमंडळें प्रस्थापित झाली नसतील तेथें तीं प्रस्थापित करणें, वैद्यमंडळींच्या गांठीभेटी घेणें, वृद्ध वद्यांचें दर्शन, गांवच्या आयुर्वेद-प्रेमी सज्जनांच्या ओळखी, आयुर्वेदीय कार्यांच्या दृष्टीनें गांवाचें निरीक्षण, संघटनात्मक कार्यें सुरूं होण्याचें दृष्टीनें कार्यकर्त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांचा परिहार करण्यासाठीं विचारविनिमय-पूर्वक प्रयत्नांची रूपरेषा आंखणें, शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रमाची माहिती देणें, निरनिराळ्या ठिकाणीं हा पाठ्यक्रम प्रत्यक्षांत आणण्याचे दृष्टीनें योग्य अशा गुरूंचा शोध करून त्यांना ह्या कामीं लक्ष घालण्यास प्रवृत्त करणें, त्यांच्या ह्या कामीं कांहीं अडचणी असतील त्या स्थानिक सज्जनांच्या व वैद्यबंधूंच्या साह्यानें दूर करण्याचा प्रयत्न करणें, त्या त्या ठिकाणीं उपलब्ध वनस्पति व औषधीद्रव्यांची माहितीं गोळा करणें, प्रांतीय मंडळाचे संघटनेसाठीं सदस्य मिळविणें प्रांतीय वैद्यमंडळासाठीं वर्गणी, देणगी, ग्रंथ इ. मिळवणें अशा नानाविध कार्यांचा अंतर्भाव होतो.

कार्यांचे विविध प्रकार

पण वर्षभराच्या अवधींत एकट्या अध्यक्ष व्यक्तीस हें सर्वच सर्वत्र हिंडून जमणें अशक्य आहे. या कार्यांपैकीं कोणतें कार्य कोठें होणें कितपत शक्य आहे व त्यासाठीं अध्यक्षाचे येण्याचीच कितपत आवश्यकता आहे, ह्याची कल्पना अध्यक्षास असणे शक्य नसते. अशीं कार्यें हीं तळमळीच्या सहकार्यानेंच सर्वांनीं मिळून पार पाडावयाचीं असतात. केवळ धूळभेटीसारखे त्या त्या गांवीं जाऊन कांहीं तासांच्या वास्तव्यानें यांतील कांहीं कामें होण्यासारखीं आहेत तर एकाच गांवीं अथवा अगदी नजीकच्या ४।५ गांवीं हिंडून कांहीं कामें साध्य करण्यासाठीं अध्यक्षास ४।५ दिवसहि मोडावे लागण्याचा संभव आहे.

पाहुणा नव्हे सेवक

अर्थातच ही माहिती कार्यांच्या स्पष्ट कल्पनेसह स्थानिक कार्यकर्त्यांनींच प्रांतीय कार्यालयाकडे कळवावयास हवी. म्हणजे कार्यांचें स्वरूप व महत्व ध्यानीं घेऊन अध्यक्ष, कार्यमंत्री, स्थायीमंत्री शक्यतेनुसार कार्यकारी वा स्थायी समितींतील सदस्यांसह त्या-ठिकाणीं प्रचारास जातील व मग तें कार्य खर्च आणि वेळ सार्थकीं लागण्याचे दृष्टीनें चांगलें होईल. प्रचारास येणारी व्यक्ति ही पाहुणा म्हणून येत नसून सेवक म्हणून येत असल्यानें त्याच्या आतिथ्यांतच वेळ आणि कष्ट वायां न घालवितां त्या त्या कार्यांची भूमिका तयार ठेवून त्या व्यक्तीचें तें कार्य कसें पार पाडतां येईल ह्यासाठींच मुख्यतः स्थानिक कार्यकर्त्यांनीं वेळ व परिश्रम कारणी लावणें अधिक चांगलें.

पत्रद्वारें स्पष्ट कल्पना द्यावी

यासाठीं विनंति कीं वरील पैकीं कोणतें कार्य आपल्या भागांत, गांवीं वा तालुक्यांत, जिल्ह्यांत होण्याजोगें आहे याची स्पष्ट कल्पना स्थानिक कार्य-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कर्त्यांनी प्रांतीय मंडळाच्या कार्यालयाकडे पत्रद्वारा देऊन ठेवण्याची कृपा करावी. तसेंच कार्याच्या महत्वाच्या दृष्टीनें आपल्या भागांत कधीं येणें इष्ट आहे, किती दिवस खर्ची घालण्याची आवश्यकता आहे, साधारणपणें प्रत्येक महिन्याचा शेवटचा आठवडा प्रचारासाठीं घालवावा असा विचार आहे. अर्थातच प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यांत तशा अर्थाच्या कार्यक्रमाची आंखणी करून कार्यकर्त्यांना कळवितां यावें अशी अपेक्षा आहे. आशा आहे कीं स्थानिक, तालुका व जिल्हा वैद्य-मंडळें आणि ठिकठिकाणचे तळमळीचे कार्यकर्ते वैद्यबंधु हा सर्वांहि आशय ध्यानीं आणून प्रचारकार्य यशस्वी होण्याचे कामीं सहकार्यपूर्वक मार्गदर्शन करतील.

सर्वांचा नम्र सेवक

नशिराबाद पू.खा. १०-६-१९५४ } वैद्य दत्तात्रेयशास्त्री जळूकर
अध्यक्ष
म. प्रां. वै. मंडळ

शुद्ध आयुर्वेद विद्यालय, नासिक

आजवर मिळालेल्या देणग्या

वै. विष्णु महादेव गोगटे	२५१ रु.
वै. विष्णुशास्त्री केळकर	१२५ ,,
वै. वेणीमाधवशास्त्री जोशी	१२५ ,,
वै. विंदुमाधवशास्त्री पंडित	१२५ ,,
वै. वासुदेव सखाराम मराठे	१२५ ,,
वै. श्रीराम कृष्ण करमरकर	१२५ ,,
वै. सौ. यमुताई गोगटे	१२५ ,,
श्री. सौ. शान्ताबाई पंडित, नासिक	१२५ रु.
वै. त्र्यं. म. गोगटे, अमरावती	२५ रु.

[यांनीं अधिक देणगी वा शिष्यवृत्ति देऊ केली आहे.]

श्री. ग. सी. जोशी, बडोदा	५ रु.
डॉ. शं. वि. देवधर नाशिक	१ रु.

संस्थेस द्रव्यसाहाय्याची अत्यंत आवश्यकता आहे. पत्रिकेच्या वाचकांनीं देणग्या पाठवाव्यात व आयुर्वेदाच्या शिक्षण-संशोधन कार्यास हस्तें परहस्तें मदत करावी अशी नम्र विनंति आहे.

—बिंदुमाधव पंडित
प्रधानाध्यापक

अनुक्रमणिका

वै. भू. गणेशशास्त्री यांची गुरुपरंपरेस सुरवात १
मुख्य मंत्री ना. मोरारजी यांची भेट ३
शुद्ध आयुर्वेद विद्यालयाचें उद्घाटन ५
सहकारी औषधें (अवलेह-पाक) ७
दंतमंजनासाठीं लघुगंगाधरचूर्ण १३
सरकारमान्य गुरु आणि शिक्षणसंस्था १४
नि. रु. चिकित्सा-मेदोवृद्धि, मुलाची वाढ १५
मोठाले जंत व दूध आहार १६
स्वाध्याय मंडळांतील कांहीं शंका १७
दोषक्षीणता व रोग १९
आयुर्वेद सेवा संघाचें मुख्यमंत्र्यांना निवेदन २७
शुद्ध आयुर्वेद विद्यालय अध्यापक मंडळी २९
वैद्यबंधूंस अध्यक्षांची विनंति ३०

मध्यप्रदेश सरकार मान्य (Recognized)
विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती
आयुर्वेदाचें सर्वांगपूर्ण शिक्षण देणारी संस्था. (१) शवच्छेदन, रुग्णपरीक्षा, नेत्ररोग, स्त्रीरोग, ऑपरेशन्स, रक्त, थुंकी, मूत्रपरीक्षण, आदींचें प्रत्यक्षासहित ज्ञान. (२) सरकारी अर्विन हॉस्पिटलमध्यें ऑपरेशन्स पाहाण्याची सोय. (३) सरकारी आयुर्वेद बोर्डामार्फत परीक्षा. (४) चार वर्षांचा डिग्री कोर्स मॅट्रिक व इंटर पास विद्यार्थ्यांना प्रवेश. (५) बोर्डिंगची व्यवस्था, विद्यार्थिनींचे राहण्याची स्वतंत्र व्यवस्था. (६) महाविद्यालय २१ जून पासून सुरूं झालें आहे.
माहितीपत्रक मागवा.
—पं. दा. मुळे, प्रिन्सिपॉल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदाच्या पुनरुज्जीवनाचें चाललेलें कार्य पाहून समाधान वाटलें !

मुख्य मंत्री
मुंबई राज्य

सेक्रेटरीएट, मुंबई १
ता. २३-६-१९५४

आयुर्वेद सेवा संघ, नासिक, या संस्थेस ता. १३-६-१९५४ रोजीं भेट दिली. या संस्थेंत आयुर्वेदाच्या पुनरुज्जीवनाचें जें कार्य श्रीयुत बिंदुमाधवशास्त्री यांचे देखरेखीखालीं चाललें आहे तें पाहून समाधान वाटलें.

आशा आहे कीं, शुद्ध आयुर्वेदाच्या आदर्शास कोणत्याहि परिस्थितींत कमीपणा न येऊं देतां त्याचा प्रसार करण्याकडे संस्था लक्ष पुरवीत राहील. संस्थेची उत्तरोत्तर भरभराट होवो हीच माझी प्रार्थना.

(सही) —मोरारजी देसाई

माता-बाल-संगोपनासाठीं

अभ्रलोह

रक्त--शक्तिवर्धक

बालजीवन

बालकांचे वाढीसाठीं

धूतपापेश्वर इंडस्ट्रीज् लि.
पनवेल मुंबई

संपादक व प्रकाशकः— वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य विवलकर कारंजा, नाशिक.
मुद्रकः-- श्री. चिं. ओक, सर्कल प्रेस, आग्रारोड नाशिक.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक मुखपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होते)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. सहामाही वर्गणी (१२ अंक) ३ रु.

वर्ष ८ वें) नाशिक, ता. १६ जुलै १९५४ (अंक २ रा

-: आरोग्यमंत्र्यांची सेवा संघास भेट :-

औषधिभवनांतील आसवारिष्टसंग्रहाच्या निरीक्षणाचें दृश्य



बुधवार ता. २३ जून ५४ रोजीं दुपारीं २॥ वाजतां मुंबई राज्याचे आरोग्यमंत्री नामदार शांतिलाल शहा यांनीं आयुर्वेद सेवा संघाच्या औषधी भवनास भेट दिली. त्यावेळीं त्यांच्या समवेत सेवा संघाचे अध्यक्ष आयुर्वेदाचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी हे होते. वरील चित्रांत वैद्य बिंदुमाधव पंडित हे आरोग्यमंत्र्यांना भल्लातकासव, अपामार्गारिष्ट आदि, सेवा संघानें सुलभ द्रव्यापासून तयार केलेल्या व मोठ्या प्रमाणावर खप असलेल्या नवीन औषधांची माहिती देत आहेत.

गुरुकुल-पत्रिका

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैद्यकीय संशोधनासाठीं पारितोषिकें

भारतीय संशोधकांनीं १९५३ च्या शैक्षणिक वर्षांत प्रसिद्ध केलेल्या वैद्यक शास्त्रांतील सर्वोत्कृष्ट संशोधन प्रबंधांस प्रत्येकीं सुमारें ३०० रुपये किंमतीचीं दोन पारितोषिकें देण्याचें भारतीय वैद्यक संशोधन मंडळानें ठरविलें आहे. पुढील वर्षापासून पारितोषिकांची संख्या सहा करण्यांत येईल.

हीं पारितोषिकें देण्यासाठीं नवी दिल्ली येथील लेडी हार्डिंज मेडिकल कॉलेजचे माजी प्राचार्य लेप्ट. कर्नल अमीरचंद यांनीं ५० हजार रुपये सदर मंडळाच्या हवालीं केले आहेत. या निधीचा कारभार व व्यवस्था पाहण्याकरितां मंडळाच्या नियामक मंडळानें कर्नल अमीरचंद ट्रस्ट नांवाचा एक विश्वस्त निधी बनविला आहे.

क्लिनिक रीसर्चसहित वैद्यकशास्त्राच्या कोणत्याहि क्षेत्रांतील विषयावरील सर्वोत्कृष्ट संशोधन प्रबंधांना प्रतिवर्षी सहा पारितोषिकें देण्यांत येतील. क्लिनिकल रीसर्चमध्यें रोगांचीं कारणें, स्वरूप व त्यांचा प्रतिबंध व उपचार यांचा अंतर्भाव होतो. या विषयाच्या कक्षेंत केवल इस्पितळांत रोग्यावर करण्यांत येणाऱ्या उपचारांचाच समावेश नसून, रोगांच्या सांथीचें शास्त्र, सोशल मेडिसिन इत्यादिचा अंतर्भाव होतो.

संशोधकांनीं आपापल्या प्रबंधांच्या १५ प्रती १५ ऑक्टोबर १९५४ पूर्वी भारतीय वैद्यक संशोधन मंडळाकडे पाठवाव्यात. सदर मंडळाच्या बडोदे येथे नोव्हेंबर वा डिसेंबर १९५४ मध्यें भरणाऱ्या शास्त्रीय सल्लागार मंडळ व सल्लागार समित्यांच्या वार्षिक बैठकीचे वेळीं पारितोषिकें कोणास मिळालीं तें जाहीर करण्यांत येईल.

शुद्ध आयुर्वेद शिक्षण क्रमाचे

सरकारमान्य गुरु वै. ब्रह्मदत्त शर्माजी भुसावळ

—: वर्गणीदारांस नम्र विनंति :—

दि. १ ऑगस्ट ५४ चा आयुर्वेद-पत्रिकेचा अंक हा कै. डॉ. सावनूर विशेषांक प्रसिद्ध होत आहे हें आपणास विदित आहेच. ज्या वर्गणीदारांची वर्गणी जून ५४ अखेर संपली आहे अशा सर्व वर्गणीदारांस स्मरणपत्रें रवाना झालीं आहेत. परंतु कांहीं वर्गणीदाराकडून पुढील वर्षांची वर्गणी अद्याप आलेली नाहीं. विशेषांकाच्या प्रति मर्यादितच छापल्या जाणार असल्यानें ज्यांनीं आपली वर्गणी अद्याप पाठविली नसेल त्यांनीं ताबडतोब म. ऑ. नें ती पाठविण्याची कृपा करावी.

ज्या वर्गणीदाराकडून चालू वर्षाची वर्गणी येईल, त्यांनाच हा कै. डॉ. सावनूर विशेषांक पाठविला जाणार आहे. इतरांना पाठविला जाणार नाहीं. तरी आतांच वर्गणी पाठविण्याची त्वरा करावी, म्हणजे मागाहून निराश होण्याची पाळी येणार नाहीं.

— व्यवस्थापक

आयुर्वेद पत्रिका, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निसर्ग आणि मानव

(वैद्य त्र्यं. म. गोगटे, अमरावती, यांच्या व्याख्यानाचा सारांश)

मोझरी येथील श्रीगुरुदेव आयुर्वेद मंदिराचे विद्यमानें भरणाऱ्या आयुर्वेदाच्या वर्गामध्यें अमरावती येथील वैद्य त्र्यं. म. गोगटे (ऑनररी ॲनेस्थेटिस्ट इर्विन आणि डफरिन हॉस्पिटल, अमरावती) यांचे वरील विषयावर आयुर्वेदाच्या दृष्टिकोनांतून मूलग्राही विचारसरणी स्पष्ट करणारें व फारच विचारप्रवर्तक असें व्याख्यान झालें.

आयुर्वेदीय सिद्धांत निसर्गाच्या स्वभावाशीं किती तादात्म्य पावले आहेत हें वक्त्यानीं निरनिराळीं उदाहरणें देऊन विशद करून सांगितलें.

आज दिसणारें आयुर्वेदाचें स्वरूप

आज दिसणारें आयुर्वेदाचें स्वरूप हें अगदींच हीन दर्जाचें झालेलें आहे. शास्त्रशुद्ध आयुर्वेदाचें स्वरूप फारच उज्वल आहे. अनेक दुर्दैवी घटनांनीं आयुर्वेदाचें खरें स्वरूप, जनता सरकार, आणि वैद्यकीय जगतासमोर नीटपणें येऊं शकत नाहीं. त्यामुळें आयुर्वेदाबद्दल विनाकारण पुष्कळसे गैरसमज पसरलेले आहेत. म्हणून वक्त्यांनीं आयुर्वेदाच्या अभ्यासकांना आयुर्वेदाच्या थेट गाभ्यापर्यंत जाऊन पोहोचण्याची कळकळीची विनंति केली. कालाच्या प्रवाहानुसार आयुर्वेदावर आवश्यक असे संस्कार पुन्हा पुन्हा घडत गेले असते, तर तोच आयुर्वेद आजहि ताजा आणि अद्यावत् वाटला असता. आयुर्वेदील तत्त्वें आणि सिद्धांत आजहि अबाधित आहेत. कारण तीं निसर्गाच्या स्वभावाशीं तादात्म्य पावलेलीं आहेत.

व्याख्यानाचा एकंदर गोषवारा खालील मुद्यांत मांडतां येईल.

आहार-विहारांचें महत्त्व

१ स्वास्थ्य-रक्षणासाठीं रोजची वागणूक कशी ठेवावी आणि निसर्गातील फेरबदलाप्रमाणें निरनिराळ्या ऋतूंमध्यें वागणूक कशी ठेवायची याची निश्चित आखणी आयुर्वेदांत करून ठेवली आहे. रोग मुळांतच होऊं नये या दृष्टीनें या पद्धतीच्या वागणुकीचें -आहारविहारांचें- फार महत्व असतें.

आहार-विहारांची बारकाईनें छाननी

२ निरोगी माणसानें आपल्या शरीराची वाढ आणि पोषण नीट व्हावें म्हणून आहारविहार कसा ठेवावा आणि विशिष्ट रोगामध्यें त्या त्या रोगाच्या वाढीला आळा घालण्यासाठीं कोणचा आहार घ्यावा आणि कोणता वर्ज्य करावा हें आयुर्वेदांत फार कटाक्षानें सांगितलें आहे. आहारविहारांतूनच रोग उत्पन्न होतात. आणि आहारविहारावरच आरोग्य अवलंबून आहे. म्हणून आहाराची छाननी आयुर्वेदानें फार बारकाईनें केली आहे.

शरीरशुद्धीसाठीं पंचकर्मे

निरनिराळ्या ऋतूंमध्यें शरीरशुद्धीसाठीं सांगितलेल्या प्रक्रिया म्हणजेच पंचकर्में. हीं त्या त्या ऋतूंतील हवामानाच्या फेरफाराला अनुकूल अशीच सांगितलीं आहेत. निरनिराळ्या रोगांमध्येंहि या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुद्धिचिकित्सा आयुर्वेदानें सांगितल्या आहेत. आयुर्वेदीय चिकित्सेचा, शुद्धिचिकित्सा हा जणू गाभाच आहे. शरीरघटकांची शक्ति यत्किंचितहि कमी होऊ न देतां शरीराची शुद्धि करण्याचें पंचकर्म हें एक महान् तंत्र आहे. अशा प्रकारच्या शुद्धिचिकित्सेच्या तंत्राचा उल्लेख जगाच्या पाठीवरील आजपर्यंत माहित असलेल्या एकहि वैद्यकीय पॅथीमध्यें नाहीं.

कुष्ठरोगाचा प्रतिकार

वरील मुद्याच्या स्पष्टिकरणांमध्यें कुष्ठरोगाला अनुलक्षून बरीच उदाहरणें व्याख्यात्यांनीं दिलीं. कारण कुष्ठरोगाचा प्रतिकार आयुर्वेदांतील विरुद्ध आहार-विहार टाळल्यास पद्धतशीर रीतीनें होऊं शकतो. उपायाच्या बाबतींतहि शुद्धि-चिकित्सा हीच सर्व श्रेष्ठ ठरणार आहे.

वाचकांचा पत्रव्यवहार—

कामगार विमा योजना व वैद्य

नुकतीच कामगार आरोग्य विमा योजनेसंबंधीं मुंबई सरकारची सर्व व्यवस्था पूर्ण झाली आहे. व त्याप्रमाणें सरकारतर्फे त्या योजनेचे पूर्ततेची तयारी पण चालू आहे.

आयुर्वेदाचें महत्व कमी होईल

सरकारतर्फे वैद्य व डॉक्टर यामध्यें भेद ठेवला नाहीं; परन्तु कामगारानें औषध कोणाचें घ्यावें ही पसंती मात्र कामगारांचे इच्छेवर अवलंबून ठेवली आहे. सर्वसाधारण कोणताहि कामगार, डॉक्टरचे औषध पाहिजे असें म्हणणार; कारण डॉक्टरांचे त्या-दृष्टीनें प्रयत्न चालू आहेत. पण वैद्यवर्ग मात्र स्वस्थ बसून आहे. जर कामगारवर्गानें देशी औषध नको असें लिहून दिलें तर सरकार कांहीं कामगारांना वैद्याचेंच औषध घे अशी सक्ति करणार नाहीं व कामगारांनींच कबुली दिली नाहीं तर मग वैद्याला त्या योजनेंत भाग घेतां येणार नाहीं. आयुर्वेदाचें त्यामुळें महत्व कमी होण्याचा संभव आहे. म्हणून याचेवेळीं महाराष्ट्र प्रान्तिक वैद्य मंडळ व मुंबईकर वैद्यांनीं जागृत राहून कामगारांत चळवळ करणें प्राप्त आहे.

प्रचार केला पाहिजे

तेव्हां माझी वैद्यांना नम्र विनंति अशी आहे कीं या वेळीं ठिकठिकाणच्या सर्व वैद्यबंधूंनी एकत्र येऊन कामगारवर्गांत आयुर्वेदीय औषधें घेण्याबद्दल त्यांचीं मतें तयार करणें, त्यांना व्याख्यानें देऊन त्याना पटविणें, अशा तऱ्हेचा कार्यक्रम हातीं घेऊन त्या दृष्टीनें प्रयत्न केले पाहिजेत. आणि असे केले तरच आयुर्वेदिक औषधांचा प्रचार होईल. व सरकारनें जी मान्यता दिली आहे व जनतेचा सुद्धां त्याला पाठिंबा आहे हें सिद्ध होईल. असें केलें नाहीं-तर कामगारांनीं आयुर्वेदीय औषधें घेण्याचें नाकारल्यास आयुर्वेदाचें स्थान कमी होईल असें मला वाटतें.

—वैद्य वि. म. पारकर, मुंबई

पटतें, पटत नाहीं

'त्याचें माझें पटत नाहीं' अशी भाषा नेहमीं ऐकू येतें. 'पटत नाहीं' यांत जो पटणें धातु आहे त्याचा अर्थ लक्षांत घेण्यासारखा आहे. पट म्हणजे वस्त्र, कपडा. धागे हे उभे व आडवे घालून पट-वस्त्र तयार केलें जातें. सर्वच धागे उभे असतील अगर आडवे राहतील तर पट होणार नाहीं. धागे नुसते एकावर एक ठेवूनहि वस्त्र बनत नाहीं.

उभे धागे व आडवे धागे हे अशा रीतीनें गुंफले जातात कीं ज्याचा गुंता होत नाहीं व त्याची कार्यक्षम वस्तु बनते, तेव्हां त्यास 'पट' म्हणतात. ज्या दोन व्यक्तींच्या व्यवहारांतून असा पट निर्माण होतो त्यांचे स्वभाव एकमेकांशीं पटतात असें समजलें पाहिजे.

पांढरें कोड नष्ट झालेल्या हजारों गांवच्या लोकांचीं प्रशस्तिपत्रें व बक्षिसें पूर्ण पथ्या-सहित छापलेलीं पत्रकें मोफत मागवा.
औषधीची किंमत ५ रु., पो. ख. १ रु.
वैद्य के. आर. बोरकर
मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला [म. प्र.]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दंतमंजनासाठीं त्रिफळाचूर्णाचा उपयोग

(लेखक:—आयुर्वेदाचार्य म. बा. दीक्षित, सातारा)

आयुर्वेद पत्रिकेच्या १ जुलै १९५४ च्या अंकांत पृष्ठ १३ वर वाचकांचा पत्रव्यवहार या सदराखालीं 'दंतमंजनासाठीं लघुगंगाधर चूर्णाचा उपयोग' याबद्दल मजकूर आला आहे.

मुख हें कफाचें स्थान आहे. रात्रीच्या विश्रांतीनंतर साहजिकच सकाळीं कफदोष वाढल्यामुळें तोंड अस्वच्छ, चिकट वाटते. तें स्वच्छ करण्यासाठीं कफघ्न अशा कटु, तिक्त, कषाय रसांच्या दंतधावनाचा उपयोग करणें जरूर आहे.

लेखक

लघुगंगाधर चूर्णांतील लोध्र, धायटीचीं फुलें इत्यादि औषधें तुरट असल्यामुळें त्याचे उपयोगानें दांत व तोंड स्वच्छ होतील, परंतु त्याहिपेक्षां त्रिफळाचूर्णानें दांत घासून तोंड धुतल्यानें अधिक फायदा होता, असा माझा अनुभव आहे. त्रिफळाचूर्णांतील हिरडा, बेहडा, आवळकंठी हीं तीनहि द्रव्यें तुरट असल्यामुळें यानें दांत अगदीं स्वच्छ होतात. तोंडांतील चिकटपणा, घाण, जिभेवरील बुळबुळीतपणा साफ निघून जाऊन तोंड स्वच्छ होतें. तोंडाला रुचि येते.

तोंडाला आल्हाददायक माधुर्य

इतर तुरट रसाच्या दंतमंजनापेक्षां यामध्यें विशेष असा आहे कीं, त्यानें तोंड स्वच्छ तर होतेंच; शिवाय दांत घासल्यानंतर चुळा भरून टाकल्यावर तोंडाला एक प्रकारचें आल्हाददायक माधुर्य येतें. आवळा खाल्यावर पाणी प्यालें असतां तोंड गोड होतें हें पुष्कळांना माहीत असेलच. त्रिफळ्यांतील आमलकीमुळें तोंडाला ही चव येते.

ही कल्पना कशी सुचली ?

त्रिफळाचूर्णानें दांत घासण्याची कल्पना सुचण्याचें कारण असें झालें कीं, हिरड्या सुजल्यानें दांत सळसळत असलेल्या व तोंडास चिकटपणा व किंचित् घाण येत असलेल्या एका रुग्णाला गुळण्या करण्यासाठीं औषध पहावें या हेतूनें ग्रंथावलोकन करीत होतो. औषध सहज मिळणारें व उत्तम गुण देणारें असावें अशी अपेक्षा होती. 'त्रिफलामधुगंडूषः कफासृक्पित्तनाशनः' हें शारंगधरांतील सूत्र या दृष्टीनें योग्य वाटलें

हिरड्यांची सूज गेली

त्या वचनाप्रमाणें त्रिफळाचूर्ण देऊन पाण्यांत उकळून थंड झाल्यावर २ चमचे मध टाकून गुळण्या करण्यास सांगितलें. २-३ दिवस गुळण्या केल्यावर चांगलाच गुण दिसला. हिरड्यांची सूज गेली, दांत सळसळणें थांबलें, इतकेंच नव्हेतर दांत पूर्वीपेक्षां थोडे आवळल्यासारखे वाटतात असें तो सांगू लागला.

नुसत्या फांटाच्या गुळण्या

तेव्हांपासून अशा विकारावर विशेषतः हिरड्यांत पूं व चिकटपणा असेल तर त्रिफळ्याच्या काढ्यामध्यें किंवा फांटामध्यें मध टाकून गुळण्या करण्यास देतो. पू, चिकटपणा नसेल तर मध न टाकतां नुसत्या गुळण्या करण्यास सांगतो. याचा गुण चांगला येतो असें पुष्कळांच्या अनुभवावरून दिसून आलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माझा ४५ वर्षांचा अनुभव

तेव्हां ज्याअर्थी त्रिफळाकषायाच्या गुळण्या करण्यानें हा गुण दिसतो, त्याअर्थी या चूर्णानें दररोज तोंड धुण्यासाठीं दांत घासल्यास निश्चित उपयोग होईल असें वाटल्यावरून या चूर्णानें दांत घासण्यास मी सुरवात केली. चार-पांच वर्षांपासून याचाच उपयोग करतो व इतरांनाहि दंतमंजन म्हणून हेंच लावण्यास देतो. यापासून चांगला उपयोग होतो असें दिसून येतें.

वाचकांचा पत्रव्यवहार--

मुतखडा रोगावर सागाची मुळी

आयुर्वेद पत्रिकेच्या ८ व्या वर्षाच्या १ ल्या अंकांत पान १७ वर वरील विषयासंबंधीं विचारणा झाली आहे. मी पिंपरी-अचल या डोंगरी गांवीं असतां ५० वर्षें वयाच्या एका रोग्यास मुतखड्यावर प्रथम सागाची बी रात्रीं थंड पाण्यांत गंधाप्रमाणें उगाळून १ चमचभर दिली होती. त्यानें रात्रीं थोडा आराम पडला होता.

सकाळीं कळवण तालुक्यांतील वणीचे गडाजवळील एक भगतानें मला सागाची मुळी उगाळून दररोज ३ वेळ याप्रमाणें ३ दिवस देण्यास सांगितले होती. त्याप्रमाणें मी दिली. व तो रोगी अगदीं उत्तम रीतीनें बरा झाला.

सागाची बी उगाळून दिली असतां मूत्रावरोध मूत्राघात, आगंतुक गर्मी, धातुस्थानाची कडकी यावर उपयोग होतो. सागाची मुळी सर्पविषावर उपयोगी आहे.

पवित्र नेपाल कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तो.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहाः-नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाल

आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारीं
आयुर्वेदिक व युनानी वनौषधि
तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण!

अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक खाका, माणिक, अकीक, सुवर्ण-वर्ख, रौप्य-वर्ख, शिंपा, कवड्या, शंख, प्रवाळ, आवळसार गंधक, दगडीबेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, वाकेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलटकंबल, नागकेशर (अस्सली), ब्राम्ही, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारची वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्टय! विशेष माहितीसाठीं आमचें साप्ताहिक दरांचें छापील भावपत्रक मागवावें.

टे. फो. नं. ३१७९६ — टेलिग्रॅम-'आयुर्वेद'

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी
२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

— पुनश्च आयुर्वेदीय सूक्ष्मौषधें —

(लेखकः—वैद्य सुंदरराव भास्करराव वैद्य, आयुर्वेदरत्न मुंबई २)

आपल्या ता. १ जूनच्या अंकांत वैद्य क. ना. जोशी यांनीं "शास्त्रकारांनीं योग्य परिणामकारी मात्रा अनुभवापासून ठरविल्या आहेत. तेंच अतिसूक्ष्म करून दिलें तर प्रमुख औषध अत्यंत अल्प म्हणून परिणाम-कारक होणार नाहीं. गुण येतो म्हणतात तेव्हां विकार अत्यंत थोडा असला पाहिजे" अशा भावार्थाचें पत्र लिहिलें आहे.

इलेक्ट्रो-होमिओपॅथींची माहिती

होमिओपॅथी व इलेक्ट्रो-होमिओपॅथी यांची त्यांना कांहींच माहिती दिसत नाहीं. त्यांत औषध सूक्ष्म म्हणजे विरळ करून देतात व गुण येतो. इलेक्ट्रो-होमिओपॅथीचा माझा अनुभव मी दिला आहे. मोठ्या डॉक्टरानें तीन महिने औषध देऊन जो रोग बरा होणार नाहीं म्हणून सांगितलें, तो माझा रोग विरळ औषधानें म्हणजे मोहरीएवढी एक गोळी एका मोठ्या पाण्यानें भरलेल्या शिश्यांत घालून तें पाणी घेऊन बरा झाला.

अनेकांचे अनुभव

त्याच अनुभवानें मी हिंवतापाचे रोगी एका शाळ्या मिऱ्याच्या दाण्यानें बरे केले आहेत. तसाच अनुभव सौ. कोल्हटकर मु. कर्जत यांनीं घेऊन दोन रोगी बरे केले म्हणून मला कळविलें. तसाच अनुभव श्री. भागवत मु. कर्जत, श्री. पेठे मु. अिचलकरंजी, श्री. सुभेदार मु. चिचखेडा जि. भंडारा, श्री. भोसले मु. भिलवडी यांनीं घेऊन रोगी बरे केले असें कळ-विलें आहे.

अनुभव घेऊन तर पहा

आतां माझी विनंति कीं, श्री. जोशी यांनीं अनुभव घेऊन पहावा व "जरी नोहे तरी कोपें" असें श्रीकृष्णासारखें म्हणावें. हातच्या कांकणाला आरसा कशास पाहिजे? हें पत्र लिहिण्यापूर्वी त्यांनीं अनुभव कां घेऊन पाहिला नाहीं? रोगी बरा झाला नसता तर पत्र लिहावयाचें होतें. साधारणतः लोकांची पद्धतच अशी दिसते कीं, दुसरा काय लिहितो ह्याचा विचार न करतां व त्याप्रमाणें अनुभव न घेतां आपणास लिहितां येतें म्हणून लिहावयाचें. मी सर्व वैद्यांना जाहीर विनंति केली आहे कीं, कांहीं रोगांचा तरी अनुभव घेऊन पहा व मग लिहा.

लेखक

शहरांतील दवाखाने कोणासाठीं ?

श्री. अेस. वी. पाटील, हेडमास्तर मराठी शाळा पिंपळखुरा, हे लिहितात "शहरांतील श्रीमंत, मध्यम लोकांकरितां सरकारी दवाखाने, आयुर्वेदीय दवाखाने आहेत. त्यांच्या कितीतरी सोयी आहेत. फार काय सांगावें ? शहरांतील घोडा, गाढव, कुत्रा, बैल, गाय वगैरे जनावरांना सुद्धां सरकारी दवाखाने असून त्यांना फुकट औषधोपचार होतो. त्याहून दीन खेड्यां-तील जनता. त्यांना पोटभर अन्न व अंगाला कपडा मिळत नाहीं.

माझें पुस्तक कधीं होणार ?

तो जर कां आजारी पडला तर त्याचे हाल काय विचारतां ! त्याला औषधोपचार कोठून मिळ-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

णार ? खेड्यांत काय सोय ? जर औषधी विकत आणावी तर शहर फार लांब, १० ते १२ मैल. तेथून कोण आणील ? त्याची फारच हवालदिल स्थिति होते. जो खेड्यांत रहातो त्यासच त्याची कल्पना. शहरांतील लोकांना त्याची काय पर्वा. तो मेला तरी त्याचें काय दुःख. " इतकें लिहून ते माझें पुस्तक कधीं तयार होणार म्हणून विचारणा कारितात. मी काळपुळीनें ता.५ फेब्रुवारीपासून आजारी होतो. आतां बरा होत आलो आहे. ह्यावरून असें सिद्ध होतें कीं, खेड्यांतील गरिबांना सूक्ष्म औषधींच्या पुस्तकाची फार जरूर आहे. मी होईल तितकें लौकर तयार करीन.

मुंबईच्या पंतप्रधानांचें लक्ष

मुंबईचे पंतप्रधान ना. मोरारजीभाई यांनीं आयुर्वेद शिक्षणाकडे लक्ष दिलेलें पाहून मला फार आनंद झाला. त्यांनीं आतां एक पाऊल पुढें टाकून आयुर्वेदीय सूक्ष्म औषधें म्हणजे काय ह्याकडे लक्ष द्यावें. त्यांच्यामतें हें आयुर्वेदांत कांहीं नवीन आहे व त्यांत मोठ्या खर्चाची बाब नाहीं असें त्यांस दिसलें तर त्यांनीं त्यांत मन घालावें. श्री. काळे लिहितातः- " आयुर्वेदरत्न सुंदरराव वैद्य यांनीं जी माहिती दिली आहे, ती उद्बोधक तर आहेच, पण त्यांची पद्धति यशस्वी ठरल्यास आयुर्वेद चिकित्सेंत मोठी क्रांति झाल्याशिवाय रहाणार नाहीं. " म्हणून मी पुनः विनंति करितों कीं, त्यांनीं ह्यांत लक्ष घालावें. त्यांनीं ह्यांत लक्ष घातलें तर गरिबांची फार सोय होऊन ही जनता त्यांस आशिर्वाद देईल.

७॥ कोटी लोकांना मलेरियाचा ताप

भारतांत ७॥ कोटी माणसांना मलेरियाचा येतो व त्यातील ७ लाख माणसे दरवर्षी मृत्युमुखीं पडतात. जर सरकारनें मेहनत घेऊन माझें मलेरियाचें औषध सर्व खेड्यापाड्यांत नेऊन पोहोचविलें व त्यामुळें कांहीं लाख माणसें मृत्युमुखीं पडण्याचीं थांबलीं तर माझ्या जन्माचें सार्थक्य झालें असें मी समजेन. इतकें मोठें काम माझ्या हातून होणें शक्य नाहीं. पण मी मरेपर्यंत प्रयत्न करीत राहीन.

माझें मलेरियाचें औषध

माझ्या पहिल्या लेखांत मी हिंवतापावर दोन औषधें प्रसिद्ध केलीं. एक काळे मिरी व दुसरे मेथीचे दाणे. आयुर्वेद पत्रिकेच्या १६ तारखेच्या अंकांत वैद्य जोशी यांनीं हिंवतापावर काळे मिरी कां ? अशी शंका विचारली आहे त्याला १ फेब्रुवारीच्या अंकांत उत्तर आलें आहे. त्याच लेखांत शेवटीं सौ. कोल्हटकर यांचा अनुभव दिला आहे व त्यांत थंडीताप मेथीचे दाणे व काळे मिरी यांनीं एका दिवसांत बरा झाला म्हणून दिले आहे. ह्या रीतीनें मी माझ्या प्रत्येक लेखांत हिंवतापावरील औषध स्पष्ट शब्दांत दिलें आहे.

मलेरिया—हिंवताप—यावर

काळे मिरी, मेथीचे दाणे, कुटकी, कडूनिंब, दारुहळद, सागरगोटा, काडेचिराईत, गुळवेल ह्यापैकीं वाटेल ते सूक्ष्म वाटून मोठ्या बाटलीभर पाण्यांत टाकावें. हें पाणी ५।५ मिनिटांनीं घ्यावे म्हणजे ताप एका दिवसांत जातो, असा अनुभव आहे. ४।४ तासांनीं दिले तर ताप जाण्यास वेळ लागतो. हा अनुभव औषधाचें प्रमाण अगदीं थोडें घेऊन पाण्यांत विरळ करून दिल्याचा आहे. सर्वांनीं अनुभव पहावा.

———

तारेचा पत्ताः–Newbottle

के. के. शहा अँड कंपनी

बाटल्यांचे व्यापारी

(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)

रिकाम्या बाटल्या, बुच, कॅपसुल्स्

[हेअर ऑईल, सरबत, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाचीं सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे

ठोक व किरकोळ

विक्री करणारे व्यापारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सहकारी पद्धतीवर वैद्यकीय मदत

[लेखकः— श्री. विलासराव कोकळेकर ' भाषारत्न ']

' शास्त्र ' याची व्याख्या करणं अत्यंत कठीण आहे. जीवनांत कुठल्याहि अंगाकडे वळलं कीं शास्त्र दिसेल. शास्त्राशिवाय जीवन नाहीं. जीवन कसं जगावं, हे सुद्धां एक शास्त्रच आहे. शास्त्र या शब्दाची व्युत्पत्ति पाहूं गेलो तर 'पुण्य' हा शब्द शास्त्राच्या मागें उभा आहे असं दिसून येईल. या पवित्रतेच्या मागें त्याग आणि साहस या देवता दिसतील. यांच्याहि मागें भक्ति असेल, भक्तीच्या मागें निर्मला-देवी, निर्मलादेवीच्या मागें आसक्ति दिसून येईल, असो; शास्त्राचा अर्थ लावणं किंवा व्याख्या करणं कठीण आहे. तथापि येवढें मात्र सांगतां येईल कीं तंत्रबद्धतेनं केलेलं काम किंवा अभ्यास यालाच शास्त्र म्हणतां येईल.

शास्त्राचे प्रकार

शास्त्राच्या विविध जाती आहेत. तथापि वैद्यकीय शास्त्राचा जीवनाशीं निकट आणि अधिक सांद्र संबंध आहे, असं जर मला वाटलं तर कांहीं वावगं होणार नाहीं. मित्राप्रमाणें शास्त्राचे मुख्यतः दोन प्रकार मानता येतील. १ उपकारकर्ते आणि २ अनुपकारकर्ते— कृतज्ञ आणि कृतघ्न. तथापि या अशा शास्त्रामुळेंच आजपावेतों मानवतेचें पोषण तसेंच रक्तशोषणहि झालं आहे. उदाहरणार्थ— नवीन युद्धाचीं अस्त्रें, कधीं कधीं असं वाटतं कीं असे शोध लागतां लागतां एके दिवशीं जगच पेटावयाचें. अरे हो! पण साम्राज्यवादी होणं हें सुद्धां एक शास्त्रच आहे. त्याचा सुद्धां अभ्यास करावा लागतो. शास्त्राचा प्रतिक्षणीं, प्रतिदिनीं आणि प्रत्येक कारणीं प्रत्यय येत असतो. म्हणूनच मी प्रथम शास्त्राशिवाय जीवन नाहीं, असं विधान केलं.

प्राचीन वैद्यकीय शास्त्र

अति प्राचीन कालापासून वैद्यकीय शास्त्र प्रकट होत, असा इतिहास पुरावा देतोच आहे. वीर हनुमानानें द्रोणागिरि उचलून आणून संजीवनी आणली. सम्राट् अशोकानें स्तूप उभारण्याबरोबर औषधी वनस्पती लाविल्या. आताच्या तज्ञ डॉक्टराप्रमाणें ऑपरेशनची पद्धति अस्तित्वांत होती. ऋषीलोक मंत्र-तंत्राच्या जोरावर साप-विंचवाच्या दंशावरहि तावडतोब इलाज करीत असत. अश्विनीकुमार हे देवाचे प्रसिद्ध वैद्य आहेत. विक्रमादित्याच्या काळीं तर राजानें धन्वन्तरीला मुख्य नेमून एका संस्थेमार्फत तिचा फायदा सर्वांना मिळेल अशी व्यवस्था केली होती. त्याचा उत्तरोत्तर उत्कर्ष होऊन ती संस्था भरभराटीस आली होती. पण शक, हूण यवनादींच्या अत्याचारी हल्ल्यामुळें तिचा विध्वंस झाला.

मानवजात

अखिल मानवजात मूळची निरोगी, निकोप, सदृढ आहे. परंतु परिस्थिति, पैसा, खाद्य, पेय, हवा आणि मन याच गोष्टी त्याला रोगी बनवितात. प्रत्येक वस्तूला क्षय हा ठरलेला आहेच. परंतु क्षयाच्या पूर्वी तरी असा विचार करावयास पाहिजे कीं, ईश्वरानें जगांत आपणाला कां पाठविलें आहे! प्रत्येकाचें जीवन कार्यमय आहे. पण तें करण्यासाठीं त्याला निरोगी व्हायला पाहिजे. एका थोर साहित्यिकानें म्हटलं आहे कीं, ' Health is Wealth. ' प्रकृति निकोप असल्याखेरीज कुठल्याहि कार्याची धुरा वाहतांच येणार नाहीं. त्यासाठीं शरिराला सात्विक आहाराची औषधींची- जरूरी आहे. व्यायामाची, औषधींची, पौष्टिक पेयांची आवश्यकता आहे.

सहकारी पद्धतीवर वैद्यकीय मदत

माझे स्नेही श्री. वि. वा. जोशी खानापूरकर यांनीं सहकारी पद्धतीवर पुरविण्याची वैद्यकीय मदत याविषयीं सांगली वैद्यसंमेलनांत सांगितलें आहेच.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भारताची थोर संस्कृति

भारताची संस्कृति थोर आहे. तिला मी अनन्य भावानें प्रथम वंदन करतो. रामायण, महाभारत, वेद, उपनिषदें यांनीं केवळ भारतीयांनाच नव्हे तर अखिल मानवजातीला संस्कृतीचे पाठ देऊन ऋणी करून ठेविलें आहे. तें ऋण कालत्रयीं फेडणें शक्य नाहीं.

आपली औषधें आणि परकीय औषधें

परंतु आज सर्वत्रच असें दिसून येतें कीं, स्वदेशी मालाची चळवळ चालू आहे. परदेशी माल खरेदी करण्याच्या आधीं एतद्देशीय माल खरेदी करून परदेशांत जाणारी संपत्ति थोपवून धरण्याची पराकाष्ठा चालू आहे. आजकाल मजुरांची संघटना, ही काय शेतकऱ्यांची आणि ती कोणाची तर काम-कऱ्यांची, मग त्यांत एतद्देशीय वैद्यांची कां ही गळती? त्याबाबत एवढें गौण स्थान कां हो? अशीं पुष्कळ उदाहरणें आजहि दाखवितां येतील कीं, जे असाध्य रोगी जाड्या विद्वान् आणि तज्ञ डॉक्टर्संना बरे करतां आले नाहींत, तेच भारतीय वैद्याकडून त्वरित कमी खर्चांत, वेळेची बचत होऊन आणि खडखडीत बरे केले जातात. अशा वेळीं स्वतःच्या औषधांना वाईट आणि परकीय औषधींना चांगलें म्हटलेलें पाहून त्यांची कींव करावीशी वाटते.

आपली प्रगति कशामुळें होईल ?

परदेशांत तयार झालेलीं औषधें किंमतीनें महाग असतात. आणि तीं वेळेवर खेडुतांना मिळूं शकत नाहींत. 'ऑपरेशन्स्', 'एक्स-रे' निरनिराळीं इंजेक्शन्स, यानें खेडुत दिपून जाऊं लागले आहेत. जरासें कुठें खटकलें कीं, ते तज्ञ डॉक्टराकडे धांव घेतात. त्यांत पैशाचा चक्काचूर, पोरांची आबाळ आणि वेळ फुकट जातो. याचा अर्थ असा नव्हें कीं, वैद्यकीय शास्त्राची ही एक अंधश्रद्धा आहे! परंतु हा आपण विचार करावयास नको कां? कीं आपला फायदा कशांत आहे, आपली प्रगति कशामुळें होईल? त्याबरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजें, कीं जें कांहीं परकीयांचें ग्राह्य आहे ते ग्रहण करण्यास हरकत नाहीं, कारण जें त्यांचें आहे तें आमचेंहि आहे.

आजचें कार्य आणि सहकार्य

योजनेला स्वप्नाइतकेंच महत्व देऊन चालणार नाहीं. भरीव कार्याची तयारीहि ठेवली पाहिजे. सध्याचे युग सहकार्याचें आहे एवढें मात्र म्हटल्या-खेरीज राहवत नाहीं.

सहकारी वैद्य मंडळांची स्थापना

भारत सरकारनें आपल्या या राज्यास कोऑपरेटिव्ह कॉमनवेल्थ म्हणजेच 'सहकारी संघ राज्य' असें संबोधिलें आहे. आणि अशा या सहकारी संघ राज्याचा पाया म्हणजे सहकारी क्षेत्रांत शहरी आणि ग्रामीण जनतेला ओढणें होय! सहकार्यामुळें अनेक अवघड व अवजड गोष्टीदेखील थोड्या वेळांत व कमी श्रमांत आणि थोडक्या अर्थांत होऊं शकतात. त्यास अनुसरूनच प्रत्येक जिल्ह्यांत, जिल्हा सहकारी वैद्य मंडळ स्थापून खेड्यापाड्यांत सहकारी योजनेखालीं वैद्यकीय मदत मिळण्याची आवश्यकता आहे. खेडीं सुधारलीं पाहिजेत, खेडूतांची सर्वांगीण उन्नति झाली पाहिजे, या गोष्टीकडे सहकारी दृष्टिकोनांतून प्रयत्न झाल्यास स्वराज्यास बळकटी येण्यास अवधि लागणार नाहीं.

———

पांढरें कोड

हजारोंचें गेले व त्यांनीं अभिप्राय दिलेलें आणि अनेक बक्षिसें मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु. नकली वैद्यापासून सावध रहा!

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन' मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

वाचकांचा पत्रव्यवहार—

स्नानासंबंधीं चर्चा

" आयुर्वेद पत्रिकेच्या जून १६ च्या अंकांतील स्नानाबद्दलचा लघुनिबंध व त्यावरील संपादकीय वाचून मात्र नवल वाटलें. अर्थात् साबणाच्या उपयोगामुळें होणाऱ्या हानीबद्दल सुज्ञांत दुमत होणार नाहीं. पाश्चिमात्यांचे गुण सोडून फक्त ' वाण ' घेतले गेले त्यापैकींच हा एक. पण उष्णकटिबंधांत स्नान न करण्याचा उपदेश म्हणजे त्वग्रोगास आमंत्रणच.

वाग्भटांत स्नानम् ऊर्जाबलप्रदम् । इत्यादि वर्णन आहे. फक्त नेत्रकर्ण इत्यादींच्या रोगांत ते वर्ज सांगितलें आहे. खाज, श्रम, तंद्रा, तृषा इ. च्या परिहारास स्नानाइतका सोपा व स्वस्त उपाय शोधूनहि सांपडणार नाहीं. पाश्चिमात्य थंड प्रदेश व आपले उष्ण कटिबंधीय देश हे एकाच मापानें मोजून कसे चालेल ?

स्वातंत्र्योत्तर कालांतहि पाश्चिमात्यांच्या ऑजळीनें पाणी पिण्याची हौस आयुर्वेदीयांतहि दिसावी याबद्दल सखेद आश्चर्य वाटतें.

मुंबई-कलकत्ता इ. समुद्रकांठचे प्रदेशांत दिवसांतून एकदां नव्हे तर सकाळ सायंकाळ असे दोनदां स्नान करून आपलें आरोग्य संभाळणारा वर्ग लहान नाहीं. त्यांना तरी तें विवेचन खास पटणार नाहीं. "

—डॉ र. कृ. गर्दे, माहिम

[स्नानाचे गुण डॉ. गर्दे यांना माहित आहेत तितकेच ते आम्हांलाहि आहेत. तथापि ज्यांना कधींच घाम येत नाहीं, अंग दुखत राहते, व वारंवार शेकावे लागते, उष्ण औषधें घ्यावीं, प्यावीं लागतात असाहि कांहीं वर्ग-मग तो लहान कां असेना-समाजांत आहे, तिकडे चिकित्सक वर्गानें दुर्लक्ष करून कसें चालेल ?

थंड वा उष्ण पाण्याच्या स्नानापासून कफ व वातप्रकृति लोकांना होणाऱ्या हानीची कल्पना जेव्हांपासून आमच्या लक्षांत आली तेव्हांपासून आम्ही त्या प्रकृतीच्या रोग्यांना नित्य स्नान न करण्याची, शीतकालीं स्नान न करण्याची, सूचना देत असतो; व त्याचा त्यांना लाभहि झालेला आमच्या पाहण्यांत आहे. सबब जी गोष्ट प्रत्यक्षानें अनुभवास येणारी आहे, याबद्दल केवळ शाब्दिक काथ्याकूट करण्यांत काय अर्थ आहे !

ज्यांना जलस्नानानें बाधा होते त्यांच्यासाठीं धर्मशास्त्रानें भस्मस्नान, आतपस्नान, वगैरे पर्याय सांगितले आहेत, व ते त्वचारोग न होऊ देण्यास समर्थ असे आहेत. अशा लोकांना स्नान न केल्यापासून झालेल्या लाभाची माहिती योग्यवेळीं पत्रिकेंत प्रसिद्ध करण्यांत येईल. —संपादक]

वैद्यराज नृ. ना. बागेवाडीकर, सोलापूर

शुद्ध आयुर्वेदाचा अभ्यासक्रम शिकविण्यास योग्य 'गुरु' म्हणून यांना मुंबई सरकारतर्फे मान्यता मिळाली आहे.

पुणें येथें
' आयुर्वेद सेवा संघ, नासिक ' चीं
औषधें मिळण्याचें ठिकाण
किरण मेडिकल सर्व्हिस
नगरकर तालीम चौक, लक्ष्मीरोड, पुणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार—

सातारा-नगरच्या पदव्या

मी आपले पत्रिकेमध्यें मागें माझे नोकरीबद्दलचें पत्र छापणेस लिहिलें होतें. त्यावेळीं आपण D.A.S.F. व आमची "आयुर्वेद विशारद" (सातारा) ही पदवी सारखीच आहे असें मला कळविलें होतें. परंतु आतां मे. सर्जन जनरल मुंबई यांनीं आमची "आयुर्वेद विशारद" ही पदवी किंवा नगरची "आयुर्वेद तीर्थ" ही पदवी D.A.S.F. या पदवीबरोबर नाहीं असें ठरविलेचें दिसतें, कारण संस्थानामध्यें काम करणारे आयुर्वेदीय दवाखान्यावरील अधिकारी वैद्यांना पगाराचें स्केल हें ते जर D.A.S.F. अगर तत्सम पदवीधारण करणारे असतील तर त्यांना ८०-५-१०० E.B. ६-१६० E.B. ८-२४० द्यावें व ते जर अशी पदवी धारण करणारे नसतील तर त्यांना ५५-३-८५ E.B. ४-१२५ E.B. ५-१३० प्रमाणें द्यावें असा मुंबई सरकारचा ५९५१।३३ ता. ३०।५।५३ चा रेग्यूलेशन पास झाला आहे. त्यानुसार मे. सर्जन जनरल यांनीं ता. १९।१०।५३ ता. १९४।F चे सर्क्युलर काढून माझा पगार ५५-३-८५-४-१२५-५-१३० हा फिक्स केला आहे. वास्तवीक पहातां मी पदवीधर वैद्य असतांना माझेवर हा अन्याय झाला आहे.

मी सातारा येथील आर्योग्ल महावैद्यक विद्यालयांत सन १९३६ मध्यें "आयुर्वेद विशारद" ही पदवी घेऊन पास झालो असून औंध संस्थानांत १९३६ चे १ ऑगस्ट रोजीं नोकरीस लागलो आहे. संस्थान विलीन होऊन आज पांच वर्षे झालीं, आम्हाला संस्थानचे स्केलवरच काम करावें लागत आहे. आतां सरकारनें पदवीधर वैद्यांचे स्केल ठरविलें असतांना आम्हाला बिन पदवीधर वैद्याचे स्केल मंजूर झाले आहे. त्यामुळें आमचेवर अन्याय झाला आहे. तरी आपण आमची दाद लावून द्यावी अशी विनंति आहे.

आयुर्वेदतीर्थ (नगर) व आयुर्वेद विशारद (सातारा) या पदव्या आयुर्वेद विशारद D.A.S.F. बरोबरीच्या आहेत अगर नाहींत याबाबत जरूर तर मुंबई सरकार यांना विचारणा करून कळवावें.

—गो. वा. जरंडीकर

कामगार विमा योजना
वैद्यक व्यवसायींच्या नोकरीच्या अटी

कामगार विमा योजनेच्या ५८ (१)कलमाखालीं मुंबई सरकार इन्शुरन्स वैद्यक व्यवसायीसाठीं नोकरी व स्वताःच्या ज्या अटी ठरविणार आहे, त्यांचा मसुदा मुंबई सरकारच्या ता.७ जुलैच्या जादा गॅझेटांत भाग ४ मध्यें प्रसिद्ध झाला आहे. या बाबतच्या हरकती किंवा सूचना सरकार २५ जुलै पर्यन्त स्वीकारील.

हरकती किंवा सूचना मुंबई सरकारचे स्थानिक स्वराज्य व सार्वजनिक आरोग्य खात्याचे सेक्रेटरी, सेक्रेटरीएट, मुंबई- १ यांच्याकडे पाठवाव्या.

या मसुद्याच्या प्रती ॲडमिनिस्ट्रेटिव्ह मेडिकल ऑफिसर एम्प्लायीज स्टेट इन्शुरन्स स्कीम, मुंबई सरकारचे सर्जन जनरल, कॉंट्रॅक्टर बिल्डिंग, निकोल रोड बलार्ड इस्टेट यांच्याकडे मिळू शकतील.

कामगार विमा योजना सुरू होणार

येत्या ऑक्टोबरमध्यें मुंबई राज्य कामगार आरोग्य विमा योजना सुरू होणार आहे. त्यावेळीं मुंबई शहर व उपनगर यांतील सुमारें ६०० डॉक्टर-वैद्य, ४ लाखांहून अधिक औद्योगिक कामगारांच्या आरोग्याकडे दक्षतेनें लक्ष पुरवू लागतील.

या योजनेबाबत अंतिम अधिकार कोणाचा रहावा याबद्दल मुंबई कॉर्पोरेशन व इंडियन मेडिकल कौन्सिलची मुंबई प्रांतीय शाखा यांत वाद चालू आहे. या योजनप्रमाणें डॉक्टरांना दर कामगारामागें ६॥ रु. देण्यांत येणार आहेत असें कळतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सेवा संघाच्या शुद्ध आयुर्वेद विद्यालयाकडे आलेले
— कांहीं शुभसंदेश —

नासिक येथें आरोग्यमंत्र्याच्या हस्तें शुद्ध आयुर्वेद विद्यालयाचें उद्घाटन झालें. त्यानिमित्त आलेले कांहीं शुभ संदेश पुढें दिले आहेतः–

अंगीकृत कार्यांत सुयश चिंतितो.

—श्रीमंत नानासाहेब पुराणिक, पनवेल

विद्यालयाला भरभराट इच्छितो.

—श्रीमंत आबासाहेब सांडू, चेंबूर

आपला समारंभ यशस्वी रीत्या पार पडो.

—वैद्य भगवंतराव वैद्य, धुळें

शुद्ध आयुर्वेदिक शिक्षणास योग्य संधि मिळाली. आपल्या साहसपूर्ण कार्यास यश इच्छितो.

—वैद्य परांडे, नागपूर

तुमच्या शुद्ध आयुर्वेद विद्यालयास सुयश चिंतितो.

श्री. वामनराव दिनानाथ वैद्य, मुंबई
अध्यक्ष, शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समिति.

परमेश्वर तुमच्या विद्यालयास शुभाशीर्वाद देवो.

—वै. अनंताचार्य, विजापूर

तुमचे कार्यास संपूर्ण यश इच्छितो.

—वै. बी. डी. गोडबोले, पनवेल

तुमचे कार्यास सर्वप्रकारें यश चिंतितो.

—सोनार ब्रदर्स, नरडाणा

विद्यालयास आयुर्वेदाची व जीवांची सेवा करण्यास उज्वल भविष्यकाळ इच्छितो.

—वैद्य वेदपाठक, मुंबई

आयुर्वेद विद्यालयाच्या उद्घाटनास शुभाशीर्वाद.

—के. के. शहा आणि कं. मुंबई

विद्यालयाचें उद्घाटन यशस्वी होवो.

— कविराज भावे, फैजपूर

विद्यालयाची भरभराट व आयुर्वेदाची उन्नति होवो.

—वै. बागेवाडीकर, सोलापूर

नवीन पाठ्यक्रमानुसारेणांगीकृताध्यापनकार्ये सफली-कर्तुं कार्यकर्तॄणां सामर्थ्यं निधेहि, साधनसंपन्नताऽपि पर्याप्ता भवतु इति श्रीधन्वंतरिचरणकमलयोः प्रार्थ्यते ।

—त्र्यंबकशास्त्री, पुणें

आपल्या विद्यालयाची भरभराट होऊन विद्यार्थी तज्ञ आयुर्वेदीय व आयुर्वेदाची धुरा बाळगणारे निघोत अशी धन्वतरिचरणीं प्रार्थना आहे.

— वै. पां. ह. देशपांडे, पुणें

'शुद्ध आयुर्वेद विद्यलय' नाशिकला सुरूं होत आहे याबद्दल आनंदच वाटतो. भारताच्या नवनिर्मितीसाठीं आपला प्रयत्न अभिनंदनिय आहे.

–गर्गे-पळणीटकर, प्रतिमा ॲड्व्हर्टायझिंग, नाशिक

आपल्या विद्यालयाचें कार्य प्रारंभापासून शेवटपर्यंत यशस्वी होवे; अशी सदिच्छा व्यक्त करतो.

—वै. वि. श्री. पाठक, धुळें

या विद्यालयाचा स्नातक-वर्ग जनतेच्या आरोग्यरक्षण क्षेत्रांत साहाय्यभूत होईल अशी आशा बाळगतो.

—वैद्य एल्. टी. शहा, अकोला

धन्वंतरि परमेश्वर आपणास आपल्या अंगिकृत कार्यांत पूर्ण सुयश व दीर्घायुरारोग्य देवो ही परमेश्वरचरणीं नम्र प्रार्थना करतो.

—डॉ. रा. त्र्यं. मोने, सिव्हिल सर्जन (रिटायर्ड)

शुद्ध आयुर्वेदकी प्रगति के लिये ऐसे विद्यालयकी आवश्यकता है.

—वै. नवनीतलाल पंड्या, झंडु फार्मा. वर्क्स लि. मुंबई

विद्यालयाला पूर्णपणें उत्कर्ष लाभून ह्या निमित्तानें आयुर्वेदीय संशोधनालाहि चालना मिळो ही इच्छा.

—डॉ. अ. वि. केतकर, अहमदनगर

आजचा दिवस आयुर्वेदीयांच्या इतिहासांत सुवर्ण अक्षरांनीं लिहिण्यासारखा आहे. आपल्या नेतृत्वाखालीं सुरूं होणारें विद्यालय प्रांतांत पहिल्या प्रतीचें ठरेल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशी माझी मनोदेवता मला साक्ष देत आहे.

—वै. रामभाऊ भोगे, मुंबई

सेवा संघानें सेवा तत्वाखालीं काढलेलें विद्यालय निश्चितपणें आयुर्वेदाला साहाय्यक होईल.

—वै. ब्रह्मदत्त शर्माजी, भुसावळ.

आपलें विद्यालय शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रमाचें मार्गदर्शक व इतरांस आदर्श होऊन चिरकाल टिको.

—वै. भाऊशास्त्री जाईल, त्रिंबक

समारंभाला व संस्थेला साफल्य प्रार्थितो.

—वै. प्रतापकुमार पोपटभाई, मुंबई

सेवा संघाला आपलें विद्यालय उत्कृष्ट तऱ्हेनें चालवितां येऊन आयुर्वेदाच्या ज्ञानसंपन्न स्नातकांची परंपरा अविरत चालवितां येवो अशी कामना प्रगट करतो. —वै. वि. दा. एकतारे, अहमदनगर.

माझ्या सदिच्छा आपल्या पाठीशीं आहेत ह्यांचें द्योतक म्हणून काल्च यंत्र व मूषा यांचे दोन तक्ते आपल्या विद्यालयाकरितां पाठविले आहेत.

—वै. पु. वि. धामणकर, पनवेल

शुद्धायुर्वेदाचा, आपलें विद्यालयाचा व गुरुपरंपरेचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत जावो हीच धन्वतरिचरणीं प्रार्थना.

—वै. ल. रा. मळेकर संपादक 'आयुर्वेद' मुंबई.

आपण अंगिकारलेल्या कार्यांत आपणास यश येवो ही शुभेच्छा. —'आयुर्मीमांसा' सातारा

गेल्या १५ वर्षांच्या सतत खटपटीला यश मिळालें. आपला उपक्रम यशस्वी होऊन दरिद्री जनता-जनार्दनाला आदर्श सेवा वृत्तीचे वैद्य लाभोत हीच परमेश्वराजवळ प्रार्थना.

—के. कृ. मानेकर, 'प्राणिरक्षक संस्था,' धुळें

आज सेवा संघ आपल्या मूळ उद्दिष्टानुसार आयुर्वेदाच्या अध्ययन-अध्यापनाचें विद्यालय सुरूं करीत आहे. श्रीधन्वन्तरी आपल्या ह्या कार्यांत निश्चित सुयश देईलच. —का. शं. करंदीकर, अहमदनगर

आपल्या प्रधान अध्यापकत्वाखालीं विद्यालयाची भरभराट होईल असा विश्वास आहे.

—द्वारकानाथजी लेले,
अ. भा. खादी ग्रामोद्योग-बोर्ड, मुंबई

गौतमी तटाकीं शनी गल्लींत केतकर भवनांत हा समारंभ म्हणून शनेश्वराचे कृपेनें आयुर्वेदाची साडेसाती नष्ट होवो अशी जगच्चालकाजवळ धन्वंतरि परमेश्वराजवळ प्रार्थना करतो. —द. कृ. गोगटे, मुंबई

शुद्ध आयुर्वेद विद्यालय ,सुरूं करीत आहा हें पाहून फारच समाधान झालें. अशीच आपलेकडून आयुर्वेदाची सेवा नेहमीं घडो. वै. बाबुराव कुलकर्णी, दादर.

तळमळीचेंच हें फल आहे. औषधी भवनानें प्रकाशमान होणाऱ्या सेवा संघाच्या विभागांत शुद्ध आयुर्वेद विद्यालय भर घालील याबद्दल पूर्ण खात्री आहे. —वै. दि. के. कुळकर्णी उत्तम

संस्थेतर्फे शुद्ध आयुर्वेदाचा अभ्यासक्रम शिकविणारें 'आयुर्वेद विद्यालय' नासिकसारख्या शहरांत सुरूं होणार आहे हें वांचून आनंद झालां.

—वै. बी. एन्. दाधीच, वाईकरे

आयुर्वेद सेवा संघाच्या अंगीकृत कार्यांत सुयश लाभो.

—वै. श्री. ना. हर्षे, पनवेल

आयुर्वेद विद्यालयाची प्रगति सेवा संघाप्रमाणें वृद्धिंगत होवो अशी श्रीलक्ष्मीनारायणापाशीं प्रार्थना करतो.

—ज. गो. कुलकर्णी जनरल सप्लायर्स [हिंद] मुंबई

शुद्ध आयुर्वेद विद्यालयाचे चालकांस त्यांचे कार्यांत पूर्ण यश येईल हा आशीर्वाद.

श्रीजगद्गुरु शंकराचार्य श्रीयोगेश्वरानंद-
गोवर्धन पीठ, जगन्नाथपुरी

आपल्या संस्थेचें शुध्द आयुर्वेद विद्यालय सुरूं होत आहे ही आनंदाची, अभिमानाची व जबाबदारीची गोष्ट आहे. शिष्यवृत्ति देऊं इच्छितो.

-वै. त्र्यं. म. गोगटे व डॉ. सौ. ईशदया गोगटे, अमरावती

आयुर्वेदास राजमान्यतेपेक्षां लोकमान्यतेची विशेष जरूर आहे. आपल्या विद्यालयास अभीष्ट चिंतितो.

—आयुर्वेदाचार्य पं. व्यासनारायण शुक्ल, नागपूर

आपल्या शुद्ध आयुर्वेद विद्यालयाची उत्तरोत्तर भरभराट होवो. —गणेश सिताराम जोशी, बडोदें

शुद्ध आयुर्वेद विद्यालयाचा हा प्रयोग नवीनच होत आहे. त्याचें यश कळण्यास कांहीं काळ जावा लागेल. समारंभ चांगल्या रीतीनें पार पाडलाच असेल.

—वा. वि. आठल्ये, सातारा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपल्या विद्यालयामार्फत आयुर्वेदाची लौकिक वृद्धि-गत होवो. विद्यालयास सयश चिंतितो.

—वै. य. घों. नाटोळीकर, कागल.

आपली शुद्ध आयुर्वेदाबद्दलची तळमळ पाहून आपलें मनःपूर्वक अभिनंदन करतो. श्रीधन्वन्तरीकृपेनें आपण हातीं घेतलेल्या कार्याची लवकरच भरभराट होवो.

—वै. हि. मो. जंगलें, वाघळी.

आपला उपक्रम अभिनंदनीय आहे. सुयश चिंतितो.

—आयुर्वेदाश्रम फार्मसी, अहमदनगर.

शुद्ध आयुर्वेद विद्यालयके उद्घाटनके शुभ अवसरपर मेरी ओरसे आपके लिये तथा आपके विद्यालयके लिये शुभ कामनाएँ स्वीकार हों। इस कार्यमें मेरी सहायता एवं सहयोग आपको सदा प्राप्त होता रहेगा।

—वै.द.अ. कुलकर्णी, डायरेक्टर (आयुर्वेद) लखनौ.

आपण सेवा संघाचें शुद्ध आयुर्वेद विद्यालय काढीत आहात यावरून नाशिक येथें आयुर्वेदाची उज्वल अशी परंपरा व परम पवित्र पताका तेजानें फडकेल अशी सदिच्छा प्रगट करतो. — वै. चंद्रात्रे, सटाणा

आपलें नेतृत्वाखालीं विद्यालय लवकरच एक उत्तम व नांवाजलेलें विद्यालय म्हणून पुढें येईल.

—प्रभाकर गुप्ते, तालुका कॉंग्रेस कमेटी, येवले.

या शुद्ध आयुर्वेद विद्यालयाचा फायदा हजारों विद्यार्थ्यांनीं घ्यावा व कोर्स पुरा झाल्यानन्तर आयुर्वेदाचा प्रसार सर्व खेड्यापाड्यांतून करावा हीच आमची सदिच्छा आहे.

—शे. मोतीलाल माणकचन्द उर्फ प्रतापशेठ, अंमळनेर

पत्र-रूपानें मी समारंभास उपस्थित आहे असें समजावें. आयुर्वेदास मानाचें स्थान प्राप्त होवो ही प्रभू धन्वंतरि चरणीं प्रार्थना आहे.

—श्रीकृष्ण शांताराम वैद्य, अमळनेर

शुद्ध आयुर्वेद विद्यालय काढण्याचा संकल्प मूर्त स्वरूपांत आला हें पाहून धन्यता वाटते.

—डॉ. ए. बी. देव्हारे, दादर.

'शुद्ध आयुर्वेद विद्यालय' आपल्या कुशलतेनें व सर्व शक्तिमान् धन्वंतरींच्या कृपेनें यशस्वी होवो.

—वैद्य व्ही. एच्. कानिटकर, भद्रावती म्हैसूर

आयुर्वेद विद्यालयाची स्थापना ही ऐतिहासिक घटना आहे. आमचा सर्व कार्यकारी-वर्ग आपल्या कार्यास सुयश चिंतितो.

वैद्य चिनुभाई—संपादक 'वैद्यबंधू' नागपूर

आपला समारंभ निर्विघ्नपणें पार पडावा अशी प्रभू-चरणीं प्रार्थना आहे.—वैद्य जयराम श्रीनिवास ढुमे, वणी (यवतमाळ)

माझी आंतरिक इच्छा फलद्रूप झाली. नासिक येथें 'शुद्ध आयुर्वेद विद्यालय' मूर्त स्वरूपांत आलें. आनंद वाटला. सर्व अध्यापक-वर्गाचें अभिनंदन

—प्रांताध्यक्ष वैद्य दत्तात्रेयशास्त्री जळूकर, नशिराबाद

शुद्धायुर्वेदीय छात्रगण उत्तम प्रकारचा होऊन आयुर्वेदाची सेवा निष्ठापूर्वक करो अशी भगवान् पुनर्वसु चरणीं प्रार्थना आहे.

—वैद्य पांडुरंग रामचंद्र कासेगांवकर, कऱ्हाड

आपण हा मंगल प्रारंभ करीत आहात याबद्दल अत्यंत आनंद होत आहे. आपल्या संस्थेला सुयश चिंतितो.

—गो. आ. फडके, आयुर्वेदाचार्य,
आयांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा

आयुर्वेद सेवा संघास परमेश्वरानें सर्वतोपरी सहाय्य करून अधिकाधिक कार्य करण्यास सामर्थ्य द्यावें हीच प्रभुचरणीं नम्र प्रार्थना.

—वैद्य प्रभाकरशास्त्री पूरकर, आयुर्वेदतीर्थ,
शिरूड, (प.खा.)

आपल्या कार्यांत धन्वतरी कृपेकरून सुयश लाभो व विद्यालयाची भरभराट होऊन उत्तमोत्तम विद्यार्थीगण बाहेर पडून जनसेवा चांगल्या प्रकारें करो.

—वैद्य करंजीकर, रनाळे, (प. खा.)

आपल्या विद्यालयाची भरभराट होवो.

—वैद्य वा. न. ग्रामोपाध्ये, बेळगांव.

शुद्ध त्रिदोष पद्धतीच्या मर्यादा ओळखून त्यांचा योग्य प्रकारें उपयोग व्हावा. आपल्या कार्यांत ईश्वर-प्रसादानें यश मिळो.

—डॉ. व. व्यं. घाटगे, वडूज (उ. सातारा)

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुद्ध आयुर्वेदिक कोर्स

आणखी "गुरुंना" मान्यता

१९५४-५५ च्या शैक्षणिक वर्षी शुद्ध आयुर्वेदाचें शिक्षण देण्यासाठीं मुंबई सरकारनें आणखी २३ वैद्यांना "गुरु" म्हणून मान्यता दिली आहे. त्यांचीं नांवें पुढील प्रमाणें आहेत.—

वै. रामगोपाल शर्मा ४१ कोलभाट स्ट्रीट, मुंबई २; वै. पांडुरंग रामचंद्र कुलकर्णी, कासेगांव जिल्हा दक्षिण सातारा, वै. परमानंद गोविंद हळदणकर शिवाजी रोड, कोल्हापूर; वै. केशवाचार्य नरहराचार्य अवधानी, विजापूर; वै. नानालाल महादेव पाठक, अमीन धर्मार्थ औषधालय, भडोच; वै. हरिदत्त शास्त्री, युनिव्हर्सल हेल्थ हॉस्पिटल लॅमिंग्टन रोड, मुंबई ४; वै. करुणाशंकर रामेश्वर त्रिवेदी रचनात्मक औषधालय, अहमदाबाद; वै. गुंडुदीक्षित रामदीक्षित फडके, बनवासी शिरसी तालुका, कारवार जिल्हा, वै. त्र्यंबक बळवंत दाते, नगरकर गल्ली नाशिक, वै. पुरुषोत्तम विनायक धामणकर, परदेशी लेन पनवेल, वै. काशिनाथ सिताराम भावे, विश्वास औषधालय फैजपूर, पूर्व खानदेश, वै. अमृत वासुदेव-शास्त्री ऐनापुरे, डॉ. देशमुख लेन मुंबई ४, वै. त्र्यंबक हरी जाईल, त्र्यंबक, नाशिक जिल्हा, वै. गौरीशंकर सुंदरजी जानी, अिसाई स्ट्रीट मुंबई, ३ वै. ब्रम्हदत्त प्रभुदयाळ शर्मा, भुसावळ, वै. राजाराम नीळकंठ कवीश्वर २७ शुक्रवार, पुणें २, वै. नारायण बाळाजी कुळकर्णी, ९२९, सदाशिव पेठ, पुणें २; वै. एस. आर. हिरेमठ, आझाद रोड, विजापूर, वै. मगनलाल भक्तवरलालजी भटनागर, वमराळ बझार, नडियाद; वै. रामचंद्र कृष्ण कुळकर्णी २२१५ कचेरी गल्ली शहापूर बेळगांव, वै. पुरुषोत्तम गणपत पंड्या, डाकोर जिल्हा खेडा, वै. गिरिजाशंकर प्राणशंकर याज्ञिक कुकरवाडा, मेहसाणा जिल्हा, आणि वै. मगनलाल दीपचंद व्होरा लक्ष्मीनारायण मंदिर कॅंप नं. ३ कल्याण.

अशा रीतीनें १९५४-५५ च्या शैक्षणिक सालांत शुद्ध आयुर्वेदाचें शिक्षण देण्यासाठीं आतां-पर्यंत ४२ वैद्यांना मान्यता देण्यात आली आहे.

———

संयुक्त खानदेश वैद्य मंडळ

(१) संयुक्त खान्देश वैद्य मंडळाची चालू वर्षाची शेवटची सभा सावदे (पू. खान्देश) येथें वैद्यराज ज. रा. नाईक आयुर्वेदतीर्थ यांचे अध्यक्षते-खालीं झाली. त्यांत १९५४/५५ सालाकरितां अध्यक्ष वैद्य वि. श्री. पाठक आ. तीर्थ धुळे, उपाध्यक्ष वैद्य भगवन्त त्र्यंबक वैद्य आ. भि. म्यु. स्कूलबोर्ड चेअरमन धुळें. मंत्री वै. चुडामणी खंडेराव चौधरी आ. भि. फैजपूर [पू. खा.] याप्रमाणें पदाधिकारी निवडून आले.

(२) वैद्य वि. श्री. पाठक आ. तीर्थ धुळे [पू. खा.] यांना मुंबई सरकारकडून शुद्ध आयुर्वेद समितीच्या शिफारशीवरून गुरू म्हणुन मान्यता मिळाली याबद्दल या सभेंत त्यांचा सत्कार समारंभ होऊन नारिकेल फळ व वस्त्र अर्पण करण्यांत आलें.

(३) पुणें युनिव्हर्सिटीनें आयुर्वेदाला, मान्यता देऊन जी चालना देण्याचे ठरविलें आहे ती शुद्ध आयुर्वेदाच्या दृष्टीनेंच असावी अशी ही सभा पुणें युनिव्हर्सिटीस सूचना करीत आहे.

———

शुद्ध आयुर्वेदीय अभ्यासक्रम

आणखी "शिक्षणसंस्थाना" मान्यता

शुद्ध आयुर्वेदीय अभ्यासक्रमाप्रमाणें शिक्षण देण्यासाठीं मुंबई सरकारनें पूर्वी ३ शिक्षणसंस्थांना मान्यता दिली होती. नव्या हुकुमानुसार आणखी ४ संस्था सरकारमान्य करण्यांत आल्या आहेत.

१ आयुर्वेद सेवा संघ, नाशिक

२ सत्वेश्वर आयुर्वेद पाठशाळा, विजापूर

३ श्री आयुर्वेद प्रचार संस्था, अग्रवालनगर, व्हिन्सेंटरोड, मुंबई १९

४ कर्नाटक आयुर्वेदीय विद्यापीठ, बेळगांव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुद्ध आयुर्वेद गुरुपरंपरा शिक्षणसंस्था

.... त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक ....

त्र्यंबकेश्वर (जि. नाशिक) येथें आयुर्वेदाच्या अध्ययन-अध्यापनाची परंपरा २०० वर्षांची जुनी आहे. कोल्हापूरचे सुप्रसिद्ध वैद्य हणमंतशास्त्री पाध्ये, ठाणापूरची पाध्येमंडळी हीं याच परंपरेतील वैद्यमंडळी होत. शीव येथें निघालेल्या शुद्ध आयुर्वेद विद्यालयाचे प्रमुख वै.ग.म. अभ्यंकरशास्त्री हे कोल्हापूरच्या हणमंतशास्त्री पाध्ये यांचेच शिष्य. अशा या त्र्यंबकेश्वर क्षेत्रींची अध्ययन-अध्यापन-परंपरा १९३८च्या डॉ. गिल्डर-कायद्यान्वयें गेलीं १६ वर्षे खंडित झाली होती.

सल्लागार समितीची स्थापना

मुंबई सरकारनें राज्यांत शुद्ध आयुर्वेदाच्या गुरुपरंपरा शिक्षणपद्धतीस सरकारी मान्यता दिल्यामुळें ती खंडित परंपरा पुनः सुरूं होण्याचा योग आला. त्र्यंबकेश्वर येथील सुप्रसिद्ध वनस्पतितज्ञ वृद्धवैद्य त्र्यंबकशास्त्री जाईल (वय वर्षे ६१) यांनीं शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीकडे अर्ज करून शुद्ध आयुर्वेदाचें अध्यापन करण्यासाठीं सरकारी मान्यता मिळविली व ती मान्यता येतांच गांवांतील जाणत्या लोकांची एक सल्लागार समिति स्थापन करून कार्यास प्रारंभ केला. या समितींत म्यु. चे अध्यक्ष आदि ७ सभासद आहेत व त्या समितीचे अध्यक्ष स्वतः वैद्य भाऊशास्त्री जाईल हेच आहेत.

१२ जुलै रोजीं उद्‌घाटन समारंभ

या समितीनें जुलै ता. १२ रोज सोमवार हा शिक्षणाचा प्रारंभ दिन ठरविला व त्या दिवशीं जाहीर समारंभ केला. वैद्य जाईल यांच्या माडीवरील दिवाणखान्यांत या समारंभाची उत्कृष्ट व्यवस्था केली होती. त्या दिवशीं सकाळीं श्री धन्वन्तरी पूजन, दिवंगत वृद्धवैद्य श्री. भाऊशास्त्री जोशी यांच्या प्रतिमेचें पूजन, इत्यादि धार्मिक कार्यक्रम उरकण्यांत आला व दुपारीं ३॥ वाजतां त्याच ठिकाणीं सभा-समारंभ झाला. नाशिक येथील सेवा संघाच्या शुद्ध आयुर्वेद विद्यालयाचे प्रधानाध्यापक व सरकारमान्य गुरु वैद्य बिंदुमाधवशास्त्री पंडित यांच्या अध्यक्षतेखालीं श्री. आ. पु. चांदवडकर, श्री. रामशास्त्री दिक्षित, म्यु. अध्यक्ष दा. पां. लोणारी, श्री. देवरे, श्री. विश्वेश्वरशास्त्री शुक्ल, श्री. खरे मास्तर आदिमंडळींची भाषणें झालीं. नव्या संस्थेचा परिचय श्री. बाळासाहेब लाखलगांवकर यांनीं करून दिला. नाशिकहून या समारंभासाठीं मुद्दाम आलेली वैद्यमंडळी वैद्यरत्न विष्णुशास्त्री केळकर (वय वर्षे ७०) वैद्य विष्णुशास्त्री दाते (अध्यक्ष, शहर वैद्य मंडळ नाशिक) व वैद्य वि. म. गोगटे (देशी वैद्यक बोर्डाचे व नासिक म्यु. चे सदस्य) यांनींहि भाषणें करून संस्थेचे शुभचिंतन केलें.

भावी वैद्यांचें कर्तव्य

संस्थेचे उद्‌घाटन पूज्य महाराज पूर्णानंदजी यांनीं केलें. अध्यक्षांनीं आपल्या समारोपाच्या भाषणांत सरकारला शुद्ध आयुर्वेदाच्या शिक्षणाची आवश्यकता कां पटली त्याचा इतिहास सांगितला व इतःपर रोग्यांना औषधें देण्यांत समाधान न मानतां लोक आजारी न पडतील व अधिकाधिक कार्यक्षम बनतील अशा प्रकारें आयुर्वेदीय ज्ञानाचा जनतेला लाभ देण्याकडे वैद्यांनीं आपलें बुद्धिवैभव खर्च केलें पाहिजे म्हणजे जनता मदत केल्याशिवाय राहाणार नाहीं असें सांगितलें.

निश्चयी स्वभाव

आभार मानतांना वृद्धवैद्य भाऊशास्त्री जाईल म्हणाले ' माझा स्वभाव देहं वा पातयेत् कार्यं वा साधयेत् अशा प्रकारचा निश्चयी आहे. मी कीर्तन-संस्था वगैरे मधून सेवानिवृत्त होण्याच्या तयारींत आहे. तथापि एक अत्यंत आवश्यक प्राप्त कर्तव्य म्हणून वैद्यांची एक तुकडी तयार करण्याचा व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्र्यंबकेश्वर येथील आयुर्वेदाध्यापन-परंपरा पुनः सुरू करण्याचा निश्चय केला आहे. व प्रभुत्र्यंबकेश्वर तो आपल्या सर्वांच्या सहकार्यानें माझ्या हातून पार पाडील असा मला विश्वास आहे.

या समारंभानिमित्त संस्थेच्या कार्यासाठीं पुढील देणग्या मिळाल्या.

श्री. सदाशिव गणेश लाखलगांवकर, त्र्यंबक	रु. २५
श्री. राधाकिसन रामचंद्र भुतेडा ,,	रु. २५
श्री. आबाजी पुरुषोत्तम चांदवडकर	रु. ११
श्री. रामचंद्र चिंतामण दीक्षित, त्र्यंबक	रु. ११
श्री. बाबु अहंमद आतार ,,	रु. ५
श्री. देविदास दामोदर देवरे ,,	रु. ५
श्री. बिंदुमाधवशास्त्री पंडित, नाशिक	रु. ११
श्री. दामोदर पांडुरंग लोणारी प्रेसिडेंट, त्र्यंबक नगरपालिका	रु. ११
श्री. विष्णु महादेव गोगटे, नाशिक	रु. ५
पूज्य पूर्णानंदमहाराज, त्र्यंबक	रु. २५

सांडू ब्रदर्सचीं

शास्त्रोक्त तयार औषधें, काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायनें इ. वैद्यवर्गास चिकित्सेंत फार उपयोगी पडतात.

वैद्यांना तीं घाऊक दरानें विशेष सवलतीनें दिलीं जातात.

पत्रव्यवहाराचा पत्ताः—

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स

चेंबूर लि.

फॅक्टरी व हेड ऑफिस—चेंबूर (मुंबई)

एक नैसर्गिक औषध—

औदुंबरजल

औदुंबर (उंबर) वृक्षाच्या मुळांपैकीं एक मुळें तोडून त्याखालीं बाटली ठेवून औदुंबरजल जमा करण्यांत येतें. हें विकत मिळण्याची व्यवस्था मुंबई येथें कांहीं ठिकाणीं आहे. एकेक दुकानदार वर्षाला सुमारें ३०।४० शेर औदुंबरजल विकतात. भाव रे ते ४ आणे औंस असा असतो.

असली औदुंबरजल टिकविण्यासाठीं त्यांत कांहींहि संरक्षक द्रव्य घालावें लागत नाहीं. मात्र तें निर्मळ असावें लागतें. त्याकरितां काढतांना स्वच्छता फार ठेवावी लागते. जरासुद्धां घाण अगर मिश्रण (पाण्याचीसुध्दां) होऊं देतां कामा नये.

कांहीं वेळा चिकानें युक्त असें पाणी मिळतें. असें पाणी भांड्यास वस्त्र बांधून उन्हांत ठेवून तापवून घ्यावें. असे ७।८ वेळां करावें लागतें, म्हणजे त्यांतील चिकाची घाण खालीं बसते. दरवेळीं तें गाळून घेत जावें. इतका विधि केला म्हणजे टिकण्यासाठीं त्यांत आणखी कांहीं टाकावें लागत नाहीं. २-२ वर्षं सुद्धां टिकते. औदुंबरजल काढण्यास साधारतः नोंव्हेंबर डिसेंबर हे महिने चांगले असतात.

देवी, गोवर, कांजण्या या विकारांची बाधा लहान मुलांना होऊ नये म्हणून व झाल्यास त्यांची धातुगत उष्णता नाहींशी व्हावी म्हणून या जलाचा उपयोग करतात. —वै. आ. बा. देव्हारे

आयुर्वेद सेवा संघ-नासिकचीं सर्व औषधें मुंबईंत मिळण्याचें आणखी एक नवें केंद्र

रामकृष्ण एजन्सी

३६८ बी ३।७० सुपारीबाग रोड

लालबाग, मुंबई १२

* मागणी रोज वाढत आहे. *

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य-मंडळाचे सन १९५४ चे सभासद

(मागील यादीवरून पुढें चालू)

नासिक जिल्हा

वै. वा. स. मराठे, वै. त्र्यंबकशास्त्री दाते, वै. गो. मानोरे, वै. वसंत नारायण रानडे, वै. ...राम रंगनाथ जोशी मु. बोलठाण, वै. स. वा. ...तार, वै. स. कृ. लेले, वै. प्र. वा. दातार, वै. ...चन्द बदलाणी, वै. केशव विष्णु मुळे, वै. विष्णु-...स्त्री केळकर, वै. मोरेश्वर दामोदर पाटणकर (...सिकरोड), वै. शरद् शंकर परचुरे, वै. शंकर ...राम परचुरे, वै. दिनकर कृष्णशास्त्री देवधर, वै. ...मा. काळे, वै. पी. पी. टापर, वै. ना. शि. खेड-...र, वै. पंडित मोहनलाल प्रल्हादजी, हकीम सुफी, वै. ...मा. शुक्ल, वै. अनंत वंडो जोशी (येवले) वै. ...त्रिं. मुळे (निफाड), वै. पां. प्र. दाणी, वै. ...लाल प्रेमराज मारवाडी (देवघट), वै. मोहनीराज ...(नामपूर), वै. व्यंकटेश हरी जोशी विंचूर, वै. ...सोत्तम नथुशास्त्री पाटणकर (नासिकरोड), वै. ...मदस्तगीर बालमभाई, वै. लुला परशराम पोकर-...र, वै. जे. ल. रामय्या, वै. वा. गो. पानसे, वै. ...म. ढोलंडे, वै. विष्णु मोरेश्वर दाते, वै. नारायण ...राळ गुणे, वै. ब्रम्हदत्त शर्माजी पंचवटी, वै. व्यं. ...मंगरूळकर.

बृहन् मुंबई

वै. सी. डी. जोशी, वै. पां. कृ. भवे, वै. दत्तात्रेय त्र्यंबक मेढेकर, वै. वासुदेव महादेव नाटेकर, वै. ना. घों. राजापूरकर, वै. एस्. के. नलावडे, वै. एन्. डी. देशपांडे चेंबूर, वै. वामनराव दिनानाथ ...राजापूरकर, वै. सौ. कमलाबाई करंदीकर, वै. बी. आर. पवार, वै. एस्. डी. प्रभू, वै. डी. एच्. ...डे, वै. एन्. एच्. पवार, वै. नानासाहेब अप्पाजी ...दे, वै. जी. एम्. भोसले, वै. सौ. शकुंतलाबाई ...जी. भोसले, वै. मानसेन पुष्पसेन गोरागांधी, वै. बी. एस्. शिंदे, वै. जी. एल्. गुप्ता, वै. पी. वाय. भोगा, ...शिवाराव देऊ सावंत, वै. बी. व्ही. कदम, वै. एस्. बी. देवगडकर, वै. एम्. एस. प्रभु, वै. डी. डी. पाठक, वै. कृष्णा गोविंद शिंदे, वै. सटवाजी यल्लाजी शितोळे, वै. शामराव बी. शिंदे, वै. दत्तात्रेय कृष्ण गोगटे, वै. विष्णु कृष्ण काळे, वै. जे. के. सबनीस, वै. ज. रा. जोशी, वै. गोविंद वामन कामत, वै. गोविंद कृष्ण पेठे, वै. नारायण धोंडो राजापूरकर, वै. गो. कृ. सांडु, वै. शं. वा. सांडु, वै. रा. ह. सांडू, वै. श्री. वा. सांडु, वै. विष्णु महादेव केळकर, वै. द. धों. गाडगीळ, वै. रामचंद्र सदाशिव वेद-पाठक, वै. श्रीयुत सामंत, वै. श्रीपाद अनंत मावळणकर, वै. केशव गणेश अंबर्डेकर, वै. कृष्णराव एस्. कुळकर्णी, वै. टी. के. क्षेमसे, वै. रामजी रतनसी, वै. श्री. गं. बहुतुले, वै. पु. रा. बेल्हे, वै. धनजीभाई कानजी-भाई, वै. शिवराम मदनराव देसाई, वै. रतिलाल हरकिसनदास, वै. शांताबाई ल. सावंत, वै. दामोदर-दास हरकिसनदास, वै. गुलाबराय रतिलाल, वै. एल्. एस्. शितोळे, वै. के. जी. पवार, वै. गणेश विष्णु आठलेकर, वै. आत्माराम वासुदेव साबळे, वै. गो. य. उर्फ भाऊसाहेब शिंदे, शिंदे ब्रदर्स, वै. बी. जी. उपाध्याय, वै. आर. एस्. देसाई, वै. रंगुताई माटे, वै. एच्. वाय शितोळे मिरजकर, वै. एस. डॉ. दाभोळकर, वै. विद्याचंद गुलाबचंद शहा, वै. श्रीराम शर्मा, वै. रामभरोसे उपाध्याय, वै. सोमेश्वर मया-शंकर भट, वै. हरिदत्तजी, वै. हिंमतलाल मुनी, वै. माधव रामचंद्र दातार, वै. आत्माराम वामन दातार, वै. नामदेव बापुजी फडतरे, वै. रघुनाथशास्त्री तांबवेकर.

पुणें जिल्हा

वै. सच्चिदानंद श्रीधर बिवलकर, वै. श्रीमती लक्ष्मीबाई ठुसे, वै. श्रीमती कृष्णाबाई मीठसागर, वै. रामचंद्र शंकर जोशी, वै. हरी लक्ष्मण जोशी, वै. गणेशशास्त्री जोशी, वै. दत्तात्रय वासुदेव शेंड्ये, वै. माधव गणेशशास्त्री जोशी, वै. कृष्णराव यज्ञेश्वर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कुळकर्णी, वै. विश्वनाथ आत्माराम बेडेकर, वै. द. गो. एकबोटे, वै. शंकर दामोदर घायगुडे, वै. नरहर पांडुरंग कुळकर्णी, वै. ह. भा. भिडे, वै. गंगाधर काशिनाथ साठे.

ठाणे जिल्हा

वै. नारायण हरी जोशी, वै. रामचंद्र दिनकर भागवत, वै. सौ. वैदेही रामचंद्र भागवत, वै. दत्तात्रय बळवंत वैद्य, वै. गणेश दत्तात्रय वैद्य, वै. गणेश कृष्ण परांजपे, वै. गोविंद कृष्ण परांजपे, वै. कृष्णराव महादेव गुप्ते [चरई], वै. एस. आर. मेटवानी.

पश्चिम खानदेश

वै. अनिल मराठे (पिंपळनेर), वै. सौ. आशाबाई मराठे (पिंपळनेर)

पूर्व खानदेश

वै. होरमसजी बेजोनजी बलसारा, जळगांव, वै. राघो शिवराम वारी, वै. कृष्णा धनजी मोरे.

अकोला (वऱ्हाड)

वै. गंगाधर हरि पराडकर.

दक्षिण सातारा जिल्हा

वै. बळवन्त दगडू चव्हाण, वै. एम्. एम्. माजगांवकर(नागोठाणे), वै. एल. टी. ठोंबरे (ढालगांव)

उत्तर सातारा जिल्हा

वै. सिताराम रामचंद्र शिंदे

उस्मानाबाद जिल्हा

वै. श्री. गो. जोहारी (लातूर), वै. वैद्यनाथ बालमुकुंद झंवर (लातूर), वै. सिद्धेश्वर लिंगप्पा शेटे, वै. बाबुराव गुरुसिद्ध झुरळे,

कुलाबा जिल्हा

वै. नीलकंठ कृष्ण भावे [वरसई], वै. वासुदेव रघुनाथ गांगल, [कर्जत], वै. जगजीवन तुलसीदास वैद्य [शिरोली], वै. कृष्णाजी अनंत खाडीलकर, वै. अप्पासाहेब पुंडरीकाक्ष पुराणिक.

रत्नागिरी जिल्हा

वै. मो. म. भांडारकर.

बेळगांव जिल्हा

वै. र. द. नाईक, वै. पां. सि. काजोळ, वै. आर. एम्. पराडकर, वै. प्र. म. दाते.

सोलापूर जिल्हा

वै. वि. पा. करंडे, [वैराग], वै. विठ्ठल इंगळे, वै. रामचंद्र गणेश कुदाळ.

नगर जिल्हा—वै. पी. जान्सन.

गुदकंडूचा त्रास गेला

रागा, वय वर्षे ५०, गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यांत मी भल्लातकासव घेणें सुरूं केलें. माझे कंबर, गुडघे, कोपर, खांदे हे दुखत असत. धान्यांकुर (धान्याला येणाऱ्या मोडाप्रमाणें असलेले) मला शौचावाटे पडत.

भल्लातकासव घेण्याचें प्रमाण १ तोळा दुप्पट पाण्यांत दोन्हीवेळ जेवणानंतर असें होतें, एक वेळ मुख्य व दुसरें अल्प असें ठेवलें होतें. भल्लातकासव घेणें सुरूं केल्यापासून कंबर दुखणें पहिल्याच महिन्यांत थांबलें. भूक वाढली, काम करण्याचा कंटाळा गेला व उत्साह वाढला.

वजन वाढलें

अपचन, आमांश, ताप याची तक्रार असलेला व इंग्रजी औषधें घेऊन कंटाळलेला एक तरुण गेल्या हिवाळ्यांत त्यानें भल्लातकासव वरीलप्रमाणेंच घेतलें. त्याचा ताप गेला, पुनः ताप आलाच नाहीं व वजन १० पौंड वाढलें.

महाराष्ट्र प्रांतीय वैद्यमंडळाची १९५४ ची १ रु. वर्गणी पाठवून सभासद व्हा व प्रांतीय वैद्यसंघटना बलवान् करा.

वर्गणी पाठविण्याचा पत्ता—

वैद्य बिंदुमाधव पंडित

स्थायी मंडळ, म. प्रां. वैद्य मंडळ,

कार्यालय नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निःस्पृहनगर वैद्यसंमेलन, विशेष अधिवेशन

आयुर्वेदाभ्यासी त्र्यं. म. गोगटे यांचें अध्यक्षीय भाषण

दीर्घजीवितमारोग्यं धर्ममर्थं सुखं यशः। पाठावबोधानुष्ठानैरधिगच्छत्यतो ध्रुवम्॥

वाग्भट उत्तरस्थान अध्याय ४० श्लोक ८१

पूर्वाचार्यांना नमन

भूतलावरील आपल्या किंकर्तव्यमूढ आयुर्वेदीय वारसांच्या नामुष्कीच्या जिण्याकडे पाहून स्वर्गातून दुःखाश्रु ढाळणाऱ्या परमपूज्य श्रीमान् चरकाचार्य, सुश्रुताचार्य, वाग्भटाचार्य, आणि इतर आचार्यांच्या चरणीं मीं अत्यन्त विनम्र भावानें नतमस्तक होतो.

मागच्या पिढींतील वैद्यांना वंदन

पृथ्वीतलावरील आयुर्वेदाची ज्योत परकीय आक्रमणाच्या झंजावातांतून परलोकेषणा, धनेषणा आणि प्राणेषणा यांची तमा न बाळगतां, आणि स्वकीय विरोधकांना दाद न देतां, ज्यांनीं सारखी तेवत ठेवली अशा गुरुस्थानीं असणाऱ्या महाभागांना मी अत्यंत सद्गदित अन्तकरणानें वन्दन करतो.

पूर्वींच्या अध्यक्षांचें स्मरण

माझ्या पूर्वीं निरनिराळ्या वैद्य संमेलनाच्या अध्यक्षपदीं विराजमान झालेल्या वैद्यराजांनों, तुमचेंहि स्मरण मला या ठिकाणीं झाल्याशिवाय रहात नाहीं. पण तें स्मरण मला फारच निराळ्या अर्थानें होत आहे. तुमच्यापैकीं कांहींच्या मनांतील आयुर्वेदाबद्दलची भक्ती आणि तळमळ याची मला जाणीव आहे. मध्यंतरीच्या काळांत आयुर्वेदाची पालखी मिरवत नेण्याची जबाबदारी तुम्हा लोकांवर पडली. तुमचेपैकीं बरेच जणांनीं ही जबाबदारी कोणत्या रीतीनें पार पडली हें सांगत असतांना मनस्वी दुःख होत आहे. त्यांनीं त्या पालखींतल्या आयुर्वेदाची इतकी हेळसांड केली कीं, जेव्हां नवी पिढी त्या पालखीची धुरा आपल्या खांद्यावर घेण्याच्या तयारीनें पुढें सरसावली तेव्हां त्यांना पालखीच्या जागीं काय दिसलें? आयुर्वेदाच्या पालखीला सामोऱ्या गेलेल्या नव्या पिढीला जेथें चवऱ्या, अब्दागिरे आणि मंगल वाद्यें यांच्याऐवजीं तेथें निराशेचा देखावा आणि भयानक शांतता आढळली. कधींच गतप्राण झालेल्या आयुर्वेदाच्या शवाची ती मिरवणूक होती. गतप्राण झालेल्या आयुर्वेदाच्या नाड्या तुम्ही गाफीलपणें पाहात बसलात. काय ज्ञान झालें तुम्हांला त्या नाडीपरीक्षेंतून? शेवटचे श्वास घेतांना तरी आयुर्वेदाचें दर्शन नवीन पिढीला घेऊ द्यायचें होतें. आयुर्वेदाची प्रकृति बिघडवून रिष्ट लक्षणें दिसू लागण्यापूर्वीं तरी जागे व्हावयाचें होतें. (शेम शेम अशा समारंभातून आरोळ्या)

नव्या पिढीशीं हितगुज

विभ्रमांत पडलेल्या समवयस्क वैद्यबंधूनो, मी तुमच्याशीं मात्र थोड्या निराळ्या रीतीनें हितगुज करणार आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदाचा जो मान आज तुम्हीं मला दिला तो आयुष्यांत पुनः कधींहि मला मिळेल अशी थोडीसुद्धां आशा मनांत न बाळगतां मी आपले विचार आपणापुढें मांडतो.

पूर्वाचार्यांनीं लिहून ठेवलेलीं मतें

माझें भाषण संपूर्ण ऐकल्यावर कदाचित् तुम्हालाहि मला अध्यक्षपद दिल्याबद्दल पश्चाताप होण्याचा संभव आहे. याची जाणीव असूनहि मी आज अगदीं स्पष्ट आणि निर्भिडपणें माझीं मतें आपणापुढें मांडणार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. तीं मतें कुणाला पटोत वा न पटोत मला त्याची पर्वा नाहीं. हीं मतें माझ्या पदरचीं नाहींत, तर ज्यांच्या ज्ञानाबद्दल कोणी शंका घेऊ शकणार नाहीं अशा आचार्यांनीं लिहून ठेवलेलीं मतें आहेत. मी हेंहि पक्कें जाणतो की श्रोत्यांमध्यें कांहीं प्रामाणिक सुहृद् आहेत कीं ज्यांना माझीं मतें पटतील. पण त्यांचीं तीं मतें त्यांच्या तोंडून बाहेर काढण्यासाठीं त्यांना निर्वात प्रदेशांत न्यावें लागेल. तेथें एका कुटीमध्यें नेऊन त्यांचा आवाज फक्त मलाच ऐकू येईल असा बंदोबस्त करावा लागेल. मग आश्वासन देऊन पाठीवर हात फिरवून अंगावर दहा रजया घालून हळूच विचारल्यास ते संमतिदर्शक नुसती मान डोलावतील.

अर्धवट वैद्यांची भूमिका

तुमच्याशीं हितगूज करतांना आपल्या पिढीमध्यें जे तुमच्या आमच्यासारखे अर्धवट वैद्य झालेले आहेत त्यांची भूमिका थोडी स्पष्ट मांडाविशी वाटते. आपल्या पिढीच्या वैद्यांनीं ज्या संस्थांतून शिक्षण घेतलें तेथें पंचकर्मादिकांनीं युक्त आयुर्वेदीय चिकित्सा करणारा एकहि दृष्टकर्मा वैद्य नव्हता. आयुर्वेदाचें शास्त्रीय आणि व्यावहारिक स्वरूप पहावयास मुळींच मिळत नव्हतें. अध्ययन थोडें फार ठीक होत होतें. पण त्या सर्व क्रिया आणि शास्त्रसिद्धांत पुस्तकांतच राहत होते. त्यांचें प्रात्यक्षिक कधींहि पाहावयास मिळत नव्हतें. पोटभरू विद्यार्थी सोडून दिले तर कांहीं विद्यार्थी मोठ्या हिरिरीनें आयुर्वेद हस्तगत करावा म्हणून ग्रंथांचें पठण आणि मनन करीत. परंतु शेवटीं त्यांच्याजवळ फक्त आयुर्वेदांतील पंचकर्मादिकांच्या चर्पटपंजरीची शिदोरी राहिली. प्रत्यक्ष रुग्णचिकित्सेकरतां नाड्यापुड्यांचाच आयुर्वेद हातीं राहिला. यावेळेपर्यंत चतुर्विधगुणसंपन्न वैद्य होऊन आत्मविश्वासानें तेजस्वी आयुर्वेदीय चिकित्सेचा व्यवहार समाजांत करण्याची जर आपल्याला पात्रता आलेली असती तर!—

समाजाची श्रद्धा कां कमी झाली?

आयुर्वेदाच्या नांवावर तुटपुंजा व्यवसाय करणारा हा वैद्यवर्ग आणि त्याच्याच जोडीला ज्याला शुद्ध आणि शाश्वत आयुर्वेदीय उपचार कधींहि अनुभवावयास मिळालेलाच नाहीं असा समाज होता, आणि आहेहि. केवळ अंधश्रद्धेनें आणि दारिद्र्यानें नाड्यापुड्यांचे उपचार करून घेणारा समाज हा वैद्यांचा आधार झाला होता. या कारणांमुळें आयुर्वेदीय उपचारावरील समाजाची श्रद्धा कमी होत चालली. नव्या बदललेल्या जमान्यामध्यें तूप-तेल पिणारे, आहारविहाराचें नियंत्रण मनोभावें पाळणारे लोक, समाजांत सांपडेनासे होऊ लागले. जर कांहींजण तनमनधनानें उपचारासाठीं संपूर्णपणें वैद्यांच्या अंकित झाले तरी त्यांना शुद्ध आयुर्वेदीय उपचार करावयास अनुभवाच्या अभावामुळें वैद्य असमर्थ ठरत असे. याचवेळीं बहुजन समाजाला दिपवून टाकणारें, व्यापारी वेष्टनांतून पुढें आलेलें पाश्चात्य वैद्यक दिवसेंदिवस समाजांत आपलें स्थान स्थिर करूं लागलें. आणि अखेर समाजाचा आरोग्याचा प्रश्न पेलण्यास समर्थ असणारें असें एखादें आयुर्वेद नांवाचें तेजस्वी शास्त्र जगांत आहे यांचा पत्ता वैद्यांच्या आणि समाजाच्या ध्यानींमनींहि राहिला नाहीं. ज्यांना आयुर्वेदाचा मख्खी कळली आहे, आणि ज्यांची त्यावरील श्रद्धेची ज्योत तेजस्वीपणानें तेवत आहे त्यांचे मात्र हातपाय बांधले गेल्यामुळें आणि भोवतालीं प्रतिकूल वातावरण असल्यानें ते एकांडे शिलेदाराप्रमाणें आपलें अस्तित्व आणि निष्ठाहि पराकाष्ठेचे प्रयत्न करून टिकवून धरीत आहेत. बाकीचे उसनें अवसान आणून डॉक्टर बनण्याचे खटपटीस लागले आहेत. सुरवातीस वैद्यासाठीं उघडपणें इंजेक्शनचे झटपट रंगारी क्लासेस सुरूं झाले नसल्यामुळें चोरून मारून मिळविलेल्या इंजेक्शनच्या माहितीवर लाचारीनें "वैद्यभांडौषधैः केचित्" स्वरूपानें व्यवसाय करते झाले. औषधांच्या कारखानदारांनीं सध्यांचे व्यापारी नीतीला अनुसरून प्रथम बाटल्यावरील वेष्टनें आणि कांहीं काळानंतर वेष्टनाच्या आंतला मालहि पार बदलला यांत कांहीं नवल नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(यावेळीं संमेलनाच्या स्वागत समितीपैकीं कांहीं मंडळी एकमेकांना खुणा करून मंडपाच्या बाहेर कांहीं खलबत करण्याच्या उद्देशानें गेलेली दिसली. कांहीं चिठया अध्यक्षांच्या समोरच्या टेबलावरहि येऊन पडल्या. परंतु ह्या सर्व प्रकाराची अध्यक्षांनीं यत्किंचितहि दखल घेतली नाहीं.)

आयुर्वेदाच्या कार्याचीं निश्चित कार्यक्षेत्रें

इतकें परिस्थितीचें शोधन झाल्यानंतर आतां आपण आयुर्वेदाला कायाकल्प देऊन रसायनविधी करून तेजस्वी आणि बलवान् करण्यासाठीं कोणत्या योजना फलदायी ठरतील तें पाहू.

आपल्या समोरील तीन कार्यक्षेत्रें

आयुर्वेदाच्या खऱ्या स्वरूपाचा आविष्कार जनतेसमोर झाला पाहिजे. जनतेला स्वास्थ्यानुवृत्तीसाठीं आणि रोगोच्छेदनासाठीं आयुर्वेदाचा उपयोग व्हावा आणि तो उपयोग श्रद्धायुक्त आणि विश्वासपूर्ण झाला पाहिजे. यासंबंधींचें भरीव कार्य करण्याचीं आपल्यासमोर तीन क्षेत्रें उभीं राहतात. पहिलें क्षेत्र समष्टीचें, दुसरें व्यवसायामधलें, तिसरें वैद्याचें व्यक्तिगत आणि कुटुंबापुरतें. आतां आपण या प्रत्येक क्षेत्राचा एकेकशः विचार करू. आयुर्वेदीयांपैकीं कांहींची अलोट बुद्धिमत्ता आणि अमर्याद कर्तृत्व हीं विनाकारण वाया चाललीं आहेत. नसते वाद आणि वितंड चालू आहेत, भरीव कार्याचे दृष्टीनें मात्र एकहि पाऊल पुढें पडत नाहीं. कोणी म्हणतो "धमानात् धमन्यः" असें म्हणून धमनीचा वाद घालतो. कुणी उठतो आणि म्हणतो कीं 'त्रिदोष हे शक्तिस्वरूप' आहेत. कोणी नाडीवरील शास्त्राचें अवडंबर माजवितात. मला मोठी रसायनशाळा हाताखालीं दिल्यास मी त्रिदोष सिद्ध करून दाखवीन अशी कोणी गर्जना करतो. कोणी दोषवृद्धि कां दोषक्षय रोगाला कारण आहेत याबद्दल वाव माजवितात. अशा केवळ शब्दावडंबराच्या वितंडवादामध्यें आपल्या आयुष्याचीं मौल्यवान् वर्षें वाया घालवितात. आयुर्वेदाच्या सिद्धीसाठीं असल्या उपक्रमाची आवश्यकता आज असेल किंवा नसेल. खरोखर जर कशाची जरुर असेल तर समष्टीनें प्रत्यक्ष कांहीं विधायक कार्य करण्याची(टाळ्या)आहे. एकेका विषयांचा जसें पंचकर्मांपैकीं एकेक कर्मांचा अभ्यास करून एकेका वैद्यसमूहानें त्याचे प्रत्यक्ष प्रयोग केले पाहिजेत. पंचकर्मचिकित्सा हा आयुर्वेदाचा गाभा आहे. त्याला वगळून इतर कितीहि पांडित्यपूर्ण चर्चा केली तर त्याचा आयुर्वेदाच्या सप्तधातूंना आरोग्यसंपन्न आणि बलवान् करण्याकडे कांहीं उपयोग होणार नाहीं. अशा प्रकारच्या भरीव कार्याकडे कानाडोळा करून 'आपला मान आणि प्रतिष्ठा' यांच्या भ्रामक समजुतीनें लिखाणाची भाराभर रद्दी वाढविण्यांत काय अर्थ आहे?

खाजगी व्यवसायाचें कार्यक्षेत्रें

आतां आपण दुसरें कार्यक्षेत्र पाहू. व्यवसायांमध्यें आयुर्वेदीय तत्त्वांशीं प्रामाणिक राहून आयुर्वेदाचें थोडे फार तरी ऋण कसें फेडतां येईल तें पाहू. जेथें वैद्यांचें संघटन नाहीं, वैद्यांच्या मदतीनें मोठ्या क्रिया हातीं घेतां येत नाहींत, अशा वेळीं आयुर्वेदीय सूत्रांचा अभ्यास जागृत ठेवून त्यानुसार जेथें जमेल तेथें योजना करून निदान तात्त्विक दृष्ट्यातरी तो जिवंत राखण्याचा प्रयत्न करतां येईल. चिकित्सेतील साध्यासाध्य सूत्रांचा समजून उमजून उपयोग करणें हेंसुद्धां एक महान् कार्य आहे. हिरडा ही एक महान् आयुर्वेदीय औषधी आहे. ती केवळ प्रचारांतील व्यवहाराप्रमाणें वापरण्यापेक्षां तो शास्त्रशुद्ध वापरणें, त्याचे गुणधर्म आणि अवस्था हें समजून वापरणें आयुर्वेदाच्या सेवेंत भर टाकणारें कलम आहे. ती अतिसारांत वापरित असतांना "अपिऽचाध्मानगुरुताशूलस्तैमित्यकारिणी। प्राणदा प्राणदा दोषे विबद्धे संप्रवर्तिनी॥" हें सूत्र अभ्यासून वापरला पाहिजे. लहान लहान सूत्रें पठन करून त्यांचें मनन केलें पाहिजे. विशिष्ट कालीवर आयुर्वेदानें "भृशाम्लतीक्ष्णकटुकलवणोष्णं च शस्यते।" हें सांगितलेलें पथ्य जाणून चिकित्सा करणें तसेंच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साध्या विद्रधीच्या चिकित्सेंत त्याच्या आम।विदह्यमान आणि पक्व अवस्था नीट ओळखून चिरा देतांना "आयतं च विशालं च यथा दोषो न तिष्ठति।" या सूत्रांचें प्रामाणिक पालन करणें हींसुद्धां आयुर्वेदाची महान् सेवा आहे.

व्यक्तिगत कार्यक्षेत्र

आतां समष्टीनें किंवा व्यवसायामध्यें प्रतिकूल परिस्थिति असल्यामुळें आयुर्वेदाच्या मंत्रानें पवित्र केलेलें एकहि पाऊल पुढें टाकणें कठीण होत असेल तर प्रत्येक व्यक्तीला आचरणांत आणण्यासारखा आयुर्वेदाच्या सेवेचा मार्ग कोणता तें पाहूं. तो मार्ग तर कोणीहि बंद करू शकत नाहीं. शत्रूच्या अफाट सामर्थ्यापुढें आपल्या सैन्याची दाणादाण उडाली असतांना आणि सैनिकांना सैरावैरा पळून जाण्याशिवाय मार्ग उरलेला नसतांनाहि एकेक मावळा झाडाझुडपांत दडून राहून हिंदुपदपादशाहीचें बीज कणखर स्वामिनिष्ठेनें आणि महाराष्ट्राच्या ज्वलन्त अभिमानानें आमरणांत जतन करण्याचा प्रयत्न करीत असे. (टाळ्या) जुलमी राज्यसत्तेच्या विरुद्ध कडवेपणानें लढा देणाऱ्या शिखांचा सबंध एक शतकाचा इतिहास आपणाला काय सांगतो? जेव्हां त्यांना संघटित प्रयत्न करण्यास यत्किंचित् वाव मिळेना, तेव्हां प्रत्येक शिख हाच सरदार आणि सैनिकहि तोच होऊन त्यानें व्यक्तीव्यक्तीनें लढण्याची ज्योत अखंड तेवत ठेवली. त्याला कोण्या पुढाऱ्याची किंवा कोण्या संस्थेची जरूरी राहिली नाहीं, इतकेच नव्हे तर कोणाकडून मार्गदर्शन होईल म्हणून कोणाहिकडे लाचारीनें पाहाण्याची आवश्यकता भासली नाहीं. एकच ग्रंथसाहिब आणि त्याच्यावर दृढ निष्ठा आणि अढळ विश्वास ठेवून प्रत्येक शिख शेवटपर्यंत लढला (आणखी टाळ्या). भारताच्या स्वातंत्र्ययुद्धाचा इतिहासहि आपणाला काय सांगतो? परकीय सत्तेच्या दमन नीतीपुढें राष्ट्रीय संघटनेच्या पार चिंधड्या उडू लागल्या असतांना, पूज्य महात्माजींच्या आदेशाप्रमाणें प्रत्येक स्वयंसेवक हा वैयक्तिक सत्याग्रहाच्या तंत्रानें दुर्दम्य साम्राज्यशाहीच्या अफाट शक्तीविरुद्ध लढा देण्यास सिद्ध झाला (टाळ्यांचा कडकडाट). तद्वतच आयुर्वेदाच्या उन्नतीच्या सर्व मार्गांवर नाकेबंदी झाली असतांना व्यक्तिगत जीवन आयुर्वेदीय सूत्रांनीं मंतरून टाकण्याचा खास मार्ग तर कधींच बंद होऊ शकत नाहीं. आयुर्वेदप्रणीत दिनचर्या आणि ऋतुचर्या आपल्या हाडींमांसीं खिळवून टाकायला तर आपले कोणी हातपाय बांधले नाहींत ना? आयुर्वेदीय ग्रंथांतील दिनचर्येच्या आणि ऋतुचर्येच्या अध्यायांचीं पानें एकवेळ उघडून त्यांतील वागणुकीशीं आपल्या दैनिक कार्यक्रमाची तुलना करून किती तफावत दिसून येतें हें पाहण्यासारखें आहे. यावरून कितीतरी वैद्यांनीं स्वतःच्याच घरांत आयुर्वेदाच्या स्वस्थवृत्ताला कशी मूठमाती दिली आहे याची कल्पना येईल. साधी दंतधावनाची गोष्ट घ्या. (हें असें म्हणतां क्षणींच श्रोतृवर्गापैकीं बऱ्याच जनांनीं आपल्या दंतपंक्ती झाकून घेण्यास सुरवात केली.)

आशेचा किरण, सरकारनें दिलेली संधि

आयुर्वेद अशा आसन्नमरण स्थितींत असतांनासुद्धां मला मात्र दूरवर एक आशेचा किरण दिसत आहे. तो किरण म्हणजे आयुर्वेदाला कायाकल्प देण्याची संधि सरकारनें आपल्याला दिली आहे. शुद्ध आयुर्वेदाच्या शिक्षणास मान्यता दिली आहे. कदाचित् शुद्ध आयुर्वेद म्हणजे काय, याची नीटशी कल्पनाहि सरकारला नसेल, पण आयुर्वेदीयांना मात्र शुद्ध आयुर्वेदाची शाब्दिक कल्पनाच आहे. सरकारला शुद्ध आयुर्वेद केवळ कल्पनेंत किंवा चर्चेंत नको आहे. शुद्ध आयुर्वेदीय पद्धतीनें समाजाच्या आरोग्यरक्षणाचा प्रश्न सोडविण्याचं सामर्थ्य या पुरस्कारांतून लाभेल, किंवा आयुर्वेदीय म्हणवून घेणारांची भगभग तरी एकदांची थांबवितां येईल अशी सरकारची अपेक्षा आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उग्र आणि भयानक परिस्थिति

या आशेच्या किरणाबरोबरच मला अत्यन्त उग्र आणि भयानक परिस्थितीची घनदाट छाया सर्वत्र पसरलेली दिसत आहे. परिस्थिति मोठी बिकट आहे. आयुर्वेदाचा भव्य चवदा चौकडी वाडा पण त्याची वर्षानुवर्षे डागडुगी न झाल्यानें त्याची सर्व शोभा नष्ट व्हावी; त्याच्या मोडक्यातोडक्या भिंतीवर घारी-गिधाडांनीं मलीनता आणावी, इतस्ततः रानटी झुडपें उगवावीं, अशी त्या वाड्याची स्थिति झालेली आहे. शुद्ध आयुर्वेदीयांना अभिमानानें जिच्या छपराखालीं आसरा घेतां येईल अशी एकही जागा त्या वाड्यांत नसावी, असा तो आयुर्वेद, समाजाला आणि सरकारला रोगराईच्या उष्ण वाऱ्या-पावसापासून बचाव करण्याची हमीत ती काय देणार ? चौकांतील मोडक्यातोडक्या खांबावरील उत्कृष्ट नकशीकामाचे अवशेष आयुर्वेदाच्या भव्यतेची साक्ष देतील इतकेंच. पण हा सर्व प्रकार अत्यन्त खेदजनक आहे.

सर्व तंत्र अवगत केलें पाहिजे

शुद्ध आयुर्वेदाच्या अहमहमिकेनें पुढें सरसावणाऱ्या योद्धांच्या तरवारी पाजळलेल्या नाहींत. ढालींना चिरा गेलेल्या आहेत, त्यांनीं युद्धाचा खोटा आव आणून भागणार नाहीं. त्यांनीं अगोदर युद्धाचें सर्व तंत्र अवगत केले पाहिजे. पंचकर्मादिकांचें प्रात्यक्षिक स्वतः घेतलें पाहिजे. आयुर्वेदांतील लहान लहान सूत्रांपासून तो थेट मोठमोठ्या क्रियापर्यंत त्यांनीं त्यांत ज्ञान आणि योग यांची व्यवस्थिति अंगांत बाणविली पाहिजे, स्वतःच्या हिंमतीनें पंचकर्मादि क्रिया करतां आल्या पाहिजेत, तरच ते आत्मविश्वासानें विद्यार्थ्यांना शुद्ध आयुर्वेद शिकवू शकतील. नाहीं तर अखेर हें सर्व ढोंगच ठरेल.

प्रत्यक्ष व्यवहारांतील ग्रंथांतील तत्त्वांशीं आणि तपशिलांशीं आमूलाग्र फारकत ठेवून वर्षानुवर्ष विद्यार्थ्यांना अनेक ग्रंथ शिकविणारे प्राचार्य, याबरोबरच ग्रंथाच्या पठणाबरोबर सूत्रांचें प्रत्यक्षांत अनुष्ठान न करणारे पण आयुर्वेदांतील सूक्ष्म सूक्ष्मतर कानामात्रेवर वादवितंड घालणारे महापंडित, आणि आयुर्वेदाच्या नांवाखालीं चालविलेल्या नाड्यापुडीच्या व्यवसायांवर आपाततः गडगंज संपत्ति मिळविणारे वैद्यबुवांचे झालेले राजवैद्य, व हे सर्व शुद्ध आयुर्वेदाच्या लढाईत आपापल्या ढाली तरवारी तेथेंच टाकून देऊन मागच्या मार्गे पळ काढतील यात मला बिलकुल संदेह नाहीं [यावेळीं सभेंत खळबळ उडाली. “ खालीं बसा ” “ खालीं बसा. ” अशा आरोळ्या ऐकू येऊ लागल्या. “ भाषण थांबवा. ” भाषण थांबवा ” अशाहि किंकाळ्या कोण्या कोपऱ्यांतून आल्या. या गडबडीनें बरेचजण उठून उभे राहिले. बरेसचे निघून जाऊ लागले, तेव्हां अध्यक्षांनीं म्हटलें, “उगाच गैरसमज करून घेऊ नका. माझ्या भाषणांतील महत्वाचे मुद्दे अजून स्पष्ट करावयाचे राहिले आहेत. भाषण पुरतें ऐकल्यानंतर काय बोलावयाचें असेल ते व्यासपीठावर येऊन बोला. माझ्या अधिकारांत मी तशी संधि तुम्हांला देईन, पण सभेमध्यें असा गोंधळ मी मुळींच चालूं देणार नाहीं. त्यावर तात्पुरती शांतता प्रस्थापित झाली.]

[अध्यक्षांचें भाषण इतक्या अवस्थेस येत आहे तोच श्रोतृवर्गात खळबळीची एक फारच मोठी लाट उसळली. कांहीं वृत्तपत्र--प्रतिनिधी उठून बाहेर जाऊ लागले. पित्तप्रकृतीच्या श्रोत्यांना अध्यक्षांच्या व्याख्यानाचा कडकपणा न सोसल्यामुळें ते चिडून जाऊन मुठी आवळून जागच्या जागीं दात खात पण पुढें येण्याची त्यांना हिंमत होईना. कांहीं कफ प्रकृतीचे लोक भाषणांतील तिखटपणा चेंगटपणानें सहन करीत तेथेंच राहिले. इकडे वातप्रकृतीचे तिरसट मत्सरी लोक अध्यक्षाच्या रोखानें लपून छपून गोंधळ माजवित व्यासपीठावर चढण्याचा प्रयत्न करू लागले. कोणी तितक्यात विजेच्या तारा तोडून गोंधळांत भर पाडण्याची करामत केली. सभागृहामध्यें सर्वत्र हलकल्लोळ माजला. अध्यक्ष आवाज चढवून बोलू लागले आणि लोकांना गप्प करण्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साठीं, उधळलेली सभा शांत करण्यासाठीं, निदान अध्यक्ष या नात्यानें सभा बरखास्त झाली हें लोकांना जाहीर करण्यासाठीं टेबलावर जोरानें मुठ दणकन् आदळली. दण-दण-दण. तो आवाज त्यांच्या अपेक्षेपेक्षांहि मोठा झाला. त्या आवाजासरशीं अध्यक्षांनीं डोळे उघडले. समोर कुणीच नव्हते. सभा नव्हती, व्यासपीठहि नव्हें.

(तो ब्राह्ममुहूर्त होता. पहाटेची प्रशांत आणि उत्साही वेळ होती. क्षणापूर्वीचा त्यांच्यावर गुदरलेला प्रसंग विलक्षणच होता. पण त्या प्रसंगाचे सोयरसुतक त्यांना शिवण्याचा सुतराम् संभव नसल्यानें त्यांनी एक मोठा समाधानाचा निश्वास सोडला व ते आयुर्वेदप्रणीत दिनचर्येला लागले.)

आयुर्वेदीय व्याधिविज्ञान

(पूर्वार्ध)

मुंबईचे सुप्रसिद्ध वृद्धवैद्य आचार्य यादवजी त्रिकमजी यांच्या लेखणींतून उतरलेला हा नवीन ग्रंथ होय. या ग्रंथांत पांच अध्याय असून व्याधिविज्ञानाच्या साधनांचें वर्णन त्यांत आहे. व्याधिविज्ञानाचीं साधनें म्हणजे थर्मामिटर, सूक्ष्मदर्शक नळी क्षकिरणयंत्र इ. चीं वर्णनें यांत नसून निदानपंचकाचा विषय यांत आला आहे. ह्या विषयावरील हा पूर्वार्ध असून प्रतिरोगविषयक संप्राप्ति लक्षणें इ. विषय उत्तरार्धांत प्रसिद्ध व्हावयाचा आहे.

१) व्याधिविज्ञान २) व्याधिविज्ञानविषय-'साधनविज्ञान' ३) दोषधातुमलविज्ञान, ४) विविध परीक्ष्यविज्ञानीय, ५) रिष्टविज्ञान असे ५ अध्याय प्रस्तुत ग्रंथांत आहेत.

विषयप्रधान अध्यापन- अध्ययनाच्या या युगांतील नित्याच्या गरजा लक्षांत घेऊन आचार्यांनीं अशा वृद्धावस्थेंतसुद्धां उपयुक्त ग्रंथ लेखनाचें काम चालू ठेवलें आहे. आचार्यांचा हा उत्साह आदर्श असाच आहे. व्याधिविज्ञानाच्या अध्ययन-अध्यापनासाठीं विद्यार्थी व अध्यापक यांना युपयुक्त असा हा ग्रंथ झाला आहे.

उत्तम कागदावर उत्कृष्ट छपाईयुक्त अशा ह्या ग्रंथाचें मूल्य केवळ २॥ रु. असून, संचालक श्री-वैद्यनाथ आयुर्वेदभवन लि. यांनीं तो प्रकाशित केला आहे. पृष्ठ संख्या १२०

—वैद्य श्री. कृ. करमरकर आयुर्वेदाचार्य

आयुर्वेद सेवा संघाच्या वैद्यक ग्रंथ भांडारा-तर्फे तो वाचकांना विकत मिळेल. —व्यवस्थापक

पं. नंदकिशोरजी यांचा स्वर्गवास

जयपूर येथील सुप्रसिद्ध राजवैद्य पं. नंदकिशोरजी महाराज भिषगाचार्य हे अकालीं स्वर्गवासी झाले याबद्दल भारतांत सर्वत्र शोक प्रदर्शन केले जात आहे. ते कोट्टाकल येथें भरलेल्या आयुर्वेद विद्यापीठ संमेलनाचे अध्यक्ष होते. व राजस्थान सरकारच्या आयुर्वेद विभागाचे डायरेक्टर होते. जयपूरच्या स्वामी लक्ष्मीरामजींचे पट्टशिष्य होते.

त्यांच्या स्मरणार्थ सीकर येथील श्री परशुराम पुरीया राजस्थान आयुर्वेदिक कॉलेज व औषधालय ३ दिवस बंद होतें.

.... गौरव ....

आपण आयुर्वेदिक औषधांचा गौरव वाढविला पाहिजे. ती एक आपल्या हिताची गोष्ट आहे. आपण प्रत्येक औषधी द्रव्य अस्सल पैकीं व ताजें वापरून सिद्ध औषधें बनविलीं पाहिजेत. अशीं उत्कृष्ट औषधीं द्रव्यें मिळवण्या-करितां आपणः—

दि ऑल इंडिया करीयाणा स्टोर्स

पायधुनी मुंबई नं. ३

(टेलिफोन नं. ३१८५८) यांना लिहा.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचे

मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात. अधिक माहितीसाठीं कॅटलॉग मागवावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार—

आयुर्वेदांतील बस्ति चिकित्सा

आयुर्वेद शास्त्रांत बस्तिकर्मांबद्दल जी प्रयोग नुसती दिली आहे त्यांत हल्लींच्या देशकाल परिस्थितीनुरूप फेरफार होणें जरूर आहे. सध्या त्यांत दिलेले बस्तीचे प्रकार हल्लींच्या वेळीं कितपत सहन होऊं शकतील ? व सहन झाले तरी ते पद्धतशीरपणें कसा देतां येईल ? त्याची हल्लींच्या पद्धतीनें साधनें कोणती वापरावी ? कोणकोणत्या रोगावर ही चिकित्सा करावी ? अशा शंका उत्पन्न होतात, त्या शंकांचें निरसन होणें जरूर आहे. सर्व साधारण वैद्यासुद्धां ही चिकित्सा आज करतां येणें जरूरीचें आहे.

त्याप्रमाणें ॲलोपॅथीमध्यें स्पेशालिस्ट परंपरा आहे त्याचप्रमाणें आयुर्वेदांतहि "बस्ति स्पेशॅलिस्ट" असणें असाध्य रोगाचे दृष्टीनें अत्यन्त जरूरीचें आहे.

तरी माझी अशी नम्र विनंति आहे कीं, तज्ञ वैद्यांनीं याबाबतीत जरूर ती माहिती पत्रिकेंतून प्रसिद्ध करावी.

—श्री. शां. वैद्य, अमळनेर

अनुक्रमणिका

आरोग्य-मंत्र्याची सेवा संघास भेट	३३
वैद्यकीय संशोधनासाठीं पारितोषिकें	३४
निसर्ग व मानव	३५
दंतमंजनासाठीं तिफळाचूर्णाचा उपयोग	३७
मुतखडा रोगावर सागाची मुळी	३८
पुनश्च आयुर्वेदीय सूक्ष्मौषधें	३९
सहकारी पद्धतीवर वैद्यकीय मदत	४१
स्नानासंबंधीं चर्चा	४३
सातारा-नगरच्या पदव्या	४४
कांहीं शुभ संदेश	४५
आणखी गुरूंना व शिक्षण-संस्थांना मान्यता	४८
गुरुपरंपरा शिक्षणसंस्था, त्र्यंबकेश्वर	४९
औदुंबर जल	५०
म. प्रां. वैद्यमंडळाचे १९५४ सालचे सभासद	५१
निःस्पृहनगर वैद्यसंमेलन विशेष अधिवेशन	५३

संघे शक्तिः कलौ युगे ।

महाराष्ट्र प्रांतिय वैद्य मंडळाचे सभासद होऊन संघटना बलवान् करा.

जाहिरातदारांस विनंति

दि. १ ऑगस्ट ५४ चा आयुर्वेद पत्रिकेचा अंक हा कै. डॉ. सावनूर विशषांक म्हणून प्रसिद्ध होणार आहे. त्या अंकांत जाहिरात पाठविण्याविषयीं सूचनापत्रें जुन्या व नवीन जाहिरातदारास पाठविलीं गेलीं आहेतच. तरी जाहिरातदारांनीं आपल्या जाहिराती तावडतोब पाठविण्याची व्यवस्था करावी.

आयुर्वेद-पत्रिकेचा वाचक वर्ग बराच मोठा असून सर्व प्रांतांतून त्याचे वाचक पसरलेले आहेत. या विशेषांकांत डॉ. सावनूर यांचें चरित्र, त्यांनीं निरनिराळ्या रोगावर दिलेले आयुर्वेदीय व ॲलोपॅथिक उपचार इ. बहुमोल अशी माहिती येणार असल्यामुळें हा अंक संग्राह्य होणार आहे. तरी या संधीचा जाहिरातदारांनीं अवश्य लाभ घ्यावा.

व्यवस्थापक, आयुर्वेद पत्रिका, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कविराज प्रतापसिंह यांची अनपेक्षित भेट

…दूर येथील राजकुमारसिंह आयुर्वेदीय कॉलेजचे प्रिन्सिपॉल व निखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलनाचे भूतपूर्व अध्यक्ष वैद्यरत्न कविराज प्रतापसिंह यांनीं ता. २८ रोजीं दुपारीं १२॥ वाजतां आयुर्वेद सेवा संघास कांहींहि पूर्वसूचना न देतां भेट दिली, व सर्व दूर हिंडून संस्थेचें निरीक्षण केलें.

त्यांचा अभिप्राय असाः—

आयुर्वेद की परंपरा में महत्वपूर्ण परिवर्तन

" आज मैंने प्रसंगोपात्त इस संस्थाका निरीक्षण किया। संस्था की स्वच्छता और प्राचीन पद्धति की निर्माणशैली देखकर परम प्रसन्नता हुई। संचालक मंडल संशोधन कार्यमें संलग्न है। आशा है इनके अनुसंधानसे आयुर्वेदकी परंपरामें महत्वपूर्ण परिवर्तन होंगे। मैं इस संस्थाकी क्रमोन्नति की शुभकामना करता हूं। "

शुद्ध आयुर्वेद शिक्षणक्रमासाठीं लागणारे

वैद्यक व इतर ग्रंथ मिळण्याची व्यवस्था

गेल्या महिन्यांत मुंबई राज्यांत शुद्ध आयुर्वेद शिक्षणक्रमास प्रारंभ झाला. ठिकठिकाणीं गुरुपरंपरा शिक्षण–पद्धतीनें आयुर्वेदाध्ययन सुरू झालें. या अभ्यासक्रमासाठीं पुढील ग्रंथ आवश्यक आहेत. ते मिळण्याची व्यवस्था करण्याचा प्रयत्न आयुर्वेद सेवा संघाच्या वैद्यक ग्रंथ भांडारानें सर्वांच्या सोईसाठीं केला आहे.

अष्टांगहृदय (अरुणदत्त व हेमाद्रि टीकेसहित)	अष्टांगहृदय मूल	
चरकसंहिता सटीक	चरकसंहिता मूल	
सुश्रुतसंहिता सटीक	सुश्रुतसंहिता मूल	
रसरत्नसमुच्चय	रघुवंश	रसेंद्रचिंतामणि
मदनपालनिघंटु	योगरत्नाकर	
भावप्रकाश	शार्ङ्गधर	
किरातार्जुनीय	समासचक्र	
दशकुमारचरितम्	धातुरूपावली, शब्दरूपावली	

वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

संपादक व प्रकाशकः— वैद्य विद्युमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य पिंपळकर कारंजा, नाशिक
मुद्रकः— श्री. चिं. ओक, सर्कल प्रेस, आग्रारोड नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदशास्त्रव्यासंगी डॉ. ह. व्यं. सावनूर, बेळगांव

आयुर्वेद-पत्रिका



विशेषांक

पत्रिका क्रमांक - १७१

वर्ष ८ वें   अंक ३ रा

१ ऑगस्ट १९५४

किंमत १ रु.

आयुर्वेदीय पद्धतीनें देशाची सेवा

" आपल्या देशास शोभेल, रुचेल व पचेल असा आयुर्वेदाचा दर्जा आपण स्वतः परिश्रम करून वाढविला पाहिजे. हीच गोष्ट स्पष्ट भाषेंत सांगावयाची तर " लायख विद्यार्थ्यांस नियमितपणें आयुर्वेदाचें शास्त्रीय शिक्षण देऊन त्यांना आयुर्वेदीय पद्धतीनें देशाची सेवा करतां येईल, असे तयार करणें हें आपलें पहिलें कर्तव्य आहे. "…. " वस्तुस्थिति अशी आहे कीं, ॲलोपॅथी व आयुर्वेद यांची वाढ ज्या मूलतत्वांवर झाली आहे तीं तत्वें परस्पर भिन्न अशीं आहेत. आयुर्वेदाच्या आजच्या अवस्थेंत या दोन्ही शास्त्रांचें एकीकरण होणें जवळजवळ अशक्य आहे. " —डॉ. सावनूर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संपादकीय--

बेळगांव येथील सुप्रसिद्ध वयोवृद्ध आयुर्वेद-शास्त्राभ्यासंगी डॉक्टर ह. व्यं. सावनूर यांच्या पुण्य-स्मरणार्थ आयुर्वेद पत्रिकेचा हा अंक प्रसिद्ध करतांना आम्हांस एक प्रकारचें समाधान वाटत आहे. १९२४ सालीं बेळगांव येथें अखिल कर्नाटक आयुर्वेद संमेलन झालें. त्याला आम्हीं उपस्थित होतो. बेळगांव कॉंग्रेसला जोडूनच हें संमेलन घेण्यांत आलें होतें. त्या संमेलनांत मांडलेल्या ओल्या वनस्पतींच्या कुंड्या, प्रदर्शन, सभामंडप, माडीवरील विषय-नियामक मंडळाची बैठक, हें सर्व आमच्या स्मरणांत इतक्या वर्षांनंतरहि ताजें आहे. त्यावेळीं आम्ही अहमदनगरच्या विद्यालयांत विद्यार्थी होतो व कॉंग्रेसच्या अधिवेशनासाठीं बेळगांवला गेलो होतो.

त्यानंतर १९५१ सालीं बेळगांव येथें महाराष्ट्र प्रांतिय वैद्य मंडळाचें ७ वें संमेलन भरलें त्यावेळीं डॉ. सावनूर, डॉ. जठार आदि मंडळी संमेलनास वेळेवर उपस्थित राहून सर्व कामांत किती दक्षतेनें भाग घेत होती हें आपल्या सर्वांच्या पाहाण्यांत आलेलें आहे. डॉ. सावनूर यांनीं हें आयुर्वेदाच्या प्रचाराचें कार्य १९१५-१६ पासूनच अखंड चालविलें आहे. हें त्यावेळीं बेळगांव येथें भरलेल्या राजकीय परिषदेंत त्यांनीं आयुर्वेदाला प्रोत्साहन देण्याचा ठराव पास करून घेतला यावरून स्पष्ट होतें. १९१५ पासून १९५३ पर्यंत आमरणांत जवळजवळ ३८ वर्षें ज्यांनीं आयुर्वेदाचा हिरिरीनें प्रचार केला, त्यांचे विचार वैद्यसमाज व जनता यांचे समोर साकल्यानें ठेवणें पत्रिका आपलें कर्तव्य समजते. आजचा अंक त्यांचेंच फल आहे.

डॉ. सावनूर यांची ही आयुर्वेद-सेवा पाहातां राहूनराहून विचार मनांत येतो तो हा कीं, मुंबई सरकारनें या कर्तबगार व आयुर्वेदनिष्ठ डॉक्टरची सेवा आयुर्वेदाचा पुरस्कार करण्यासाठीं कां घेतली नाहीं? देशी वैद्यक बोर्डाचा सभासद म्हणून डॉक्टरांना घ्यावयाचें तर मग डॉ. सावनूरांना कां घेतलें नाहीं? कर्नाटकचें योग्य प्रतिनिधित्व त्यांनीं केलें नसतें कां?

पण पाहिल्या बोर्डाची घटनाच अशी विचित्र होती कीं त्यांत डॉ. लागू यांच्या म्हणण्यास होकार देतील अशाच लोकांचा समावेश झाला होता. डॉ. लागू म्हणतील ती पूर्व असा तो जमाना होता. त्यामुळें आयुर्वेदाच्या पहिल्या बोर्डांत ४ डॉक्टर ४ हकीम ४ वैद्य व १ वकील अशी तेरा मंडळींची भरती होती, पण त्या डॉक्टरांत डॉ. आगाशे (सातारा) डॉ. सावनूर (बेळगांव) यासारख्या आयुर्वेदशास्त्र-निष्ठ डॉक्टरांचा समावेश होऊं शकला नाहीं. आयुर्वेदाच्या बोर्डात डॉ. सावनूरांसारखी मंडळी असती तर प्रांतांतील आयुर्वेदाच्या प्रश्नाला जें अनिष्ट वळण लागलें आहे तें टळलें असतें.

मुंबई राज्यांत आज शुद्ध आयुर्वेदाला मान्यता मिळाली त्यावेळीं डॉ. सावनूर हयात नाहींत ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आज ते असते तर त्यांना खात्रीनें आनंद झाला असता व त्यांनीं अशा प्रकारच्या शिक्षणाला मनःपूर्वक पाठिंबा दिला असता!

या अंकांत डॉ. सावनूर यांचे जे लेख व निबंध प्रसिद्ध झाले आहेत त्यावरून डॉ. सावनूर यांची आयुर्वेदशास्त्रांतील सिद्धांतावर किती जाज्वल्य निष्ठा होती तें स्पष्ट होतें. प्रान्तांतील आयुर्वेदप्रेमी मंडळी, ती निष्ठा आपल्या ठिकाणीं बाळगून शुद्ध आयुर्वेदाच्या कार्याला लागतील तर ती आयुर्वेदाचा ध्वज उंच उभारण्यांत यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाहींत. शुद्ध आयुर्वेदाचें हें कार्य ज्यावेळीं यशस्वी होईल त्यावेळीं त्यासाठीं झटणाऱ्या व्यक्तींत इतिहासाला डॉ. सावनूर यांना अवश्य स्थान द्यावें लागेल.

शुद्ध आयुर्वेद पद्धतीनें शिक्षण देण्यासाठीं मान्य संस्था म्हणून बेळगांवच्या कर्नाटक आयुर्वेद विद्यापीठास मान्यता मिळाली आहे असें कळतें. जर बेळगांवकर मंडळी ही एकच संस्था नांवलौकिकाला आणण्यासाठीं मनःपूर्वक प्रयत्न करतील तरी डॉ. सावनूर यांच्या आत्म्याला शांति मिळेल.

आमचे परममित्र डॉ. जठार यांनीं डॉ. सावनूर यांच्या विषयीं माहिती पुरवून हा अंक तयार करण्यास सर्वतोपरी मदत केली, त्याबद्दल सेवा संघ त्यांचा आभारी आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१९३८ च्या आयुर्वेद बिलाबाबत माझे विचार

(लेखकः—डॉ. एच्. व्ही. सावनूर, बेळगांव)

आयुर्वेदाच्या बिलाविषयीं विचार करण्यास मुंबई सरकारनें नेमिलेल्या सिलेक्ट कमिटीचे चेअरमन, पुणे यांसीः—

वैद्य-हकिमांची पूर्ण निराशा

कायदेमंडळापुढें आपल्या सिलेक्ट कमिटी-कडून, ज्या बिलाचा विचार करण्याकरितां आपली कमिटी नेमली आहे, आपलें जें मत व्यक्त होणार आहे त्यानें मुंबई-राज्यांतील वैद्य व हकीम यांच्या नशी-बाचा निर्णय लागणार असल्यामुळें, आपल्या मताची ते चातकाप्रमाणें वाट पहात आहेत. आरोग्य-मंत्र्यांनीं बिलाचा जो मसुदा तयार करून प्रसिद्धिला होता त्यानें मुंबई-राज्यांतील वैद्य-हकीम यांची पूर्ण निराशा झाली आहे. ज्यांना या कायद्याची झळ लागणार आहे ते सचिंत आहेत. देशी वैद्यकीय व्यवसायाच्या सांप्रतच्या अवस्थेंत, त्याची प्रगति होण्याच्या दृष्टीनें कोणत्या तऱ्हेचा बदल व्हावा, या विषयासंबंधानें निरनिराळ्या विद्यालयांतील व्यक्तींच्या विचारांत प्रथमपासूनच बराच गोंधळ माजून राहिलेला आहे.

यानें वैद्यसमाज दुभंगला जाईल

आपल्या सरकारकडे देशी वैद्यकास मान्यता मिळविण्याच्या भाऊगर्दीनें व कांहीं वैद्यांच्या चुकीच्या धोरणानें हा गोंधळ माजला आहे. त्यांतच सरकारच्या मान्यता देण्याकरितां (स्वागतार्ह अगर अस्वागतार्ह) फाजील उत्सुकतेमुळें त्या गोंधळांत भर पडली आहे. माजलेल्या गोंधळांतून जर सरकारनें शहाणपणानें व विचारपूर्वक आयुर्वेदशास्त्राचा विचार, आपली समाजरचना व आपली संस्कृति याचा साकल्यानें विचार करून केला तर मार्ग काढण्यास अडचण पडणार नाहीं. तसें न केल्यास प्राथमिक अवस्थेंतच सर्व वैद्य-समाज मूलभूत तत्वावरच दुभंगला जाईल.

सरकारच्या मध्यस्थीस मर्यादा

समाज, मार्गदर्शनाकरितां व मदतीकरितां आपल्या सरकारपुढें नेहमींच मान तुकवील, हें शक्य दिसत नाहीं. समाजव्यवस्थेस व सरकारच्या मध्य-स्थीस कांहीं मर्यादा असतातच. देवघेव ही एकांगी असूं शकत नाहीं. खाजगी व्यवसाय व नागरिक हक्क यावर कांहीं मर्यादेपर्यंतच सरकारचें आक्रमण समाज सहन करूं शकतो. ही मर्यादा सुटल्यास त्याचे काय परिणाम होतात हें इतिहासांत नमूद आहेतच. समा-जाची सुधारणा करण्याचे झाल्यास त्या सुधारणा समाजास रुचतील व पचतील कां हें पाहूनच सरकारनें आपलें पाऊल टाकलें पाहिजे. सहकार्याच्या मर्यादेचें उल्लंघन झाल्यास सरकारचा हेतु विफल होऊन जनता एक तऱ्हेचें बंड करील. यांतील सुवर्ण मध्य कॉंग्रेस कमि-टीनें सुचविला आहे.

जनतेची बिलाबाबत अपेक्षा

कॉं. वर्किंग कमिटीनें व्यक्तीच्या परंपरेचा व उत्कर्षाचा विचार करून जो निर्णय घेतला त्याला त्याबद्दल तिचे आभार मानून कॉं. क.चे निर्णयास सरकार मान्यता देईल कां? देशाच्या आर्थिक विषम-तेच्या काळांत कॉं. पार्टीनें अधिकार स्वीकार करून राज्यांत सुधारणा घडवून आणण्याचें ठरविलें आहे याकडेहि जनतेस दुर्लक्ष करतां यावयाचें नाहीं. कायदे-मंडळांत आयुर्वेदासंबंधानें जें बिल मांडलें जाणार आहे तें शहरी व खेडूत समाज कोणत्या परिस्थितींत वाढत आहे हें पाहून त्यांना त्या कायद्याचा उपयोग होईल अशाच तऱ्हेचे असावें अशी जनतेची अपेक्षा आहे.

गोडीचे संबंध निर्माण व्हावेत

वकील व अशिल, डॉक्टर व पेशन्ट, व्यापारी व गिऱ्हाईक यांत एक तऱ्हेचे गोडीचे संबंध असावेत, असेंच कोणीहि इच्छील. आपले सरकार जे वैद्य शाळांतून तयार करणार आहे ते खेड्यांतील समाजास योग्य होतील कां? आपल्या समाजाची सध्यांची प-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्थिति पाहतां, नवीन वैद्य कंगाल खेड्यांत जाऊन तेथील समाजांत समरस होऊन राहूं शकणार नाहींत. तसेंच त्यानें ज्या तऱ्हेचें शिक्षण घेतलें आहे त्या दर्जास योग्य ती फी खेडुतांस परवडणार नाहीं.

याचें फल चांगलें होईल कां?

एल्. सी. पी. एस्. कोर्स बंद करून सरकार आयुर्वेदीय शाळांतील विद्यार्थ्यांवर पाश्चिमात्य वैद्यकीय विषय लादून त्यांना डॉक्टरची जबाबदारी घेण्यास भाग पाडणार आहे. कागदावर या सर्व गोष्टी ठीक दिसतात. अशा कृत्यांचें दृश्य फल चांगलें होईल कां? तेव्हां खालील प्रश्न सरकारास विचारावेसे वाटतात.

सरकारला ११ सवाल

(१) आयुर्वेदीय व पाश्चिमात्य असे दोन्ही शास्त्रीय विषय (सर्व साधारण विद्यार्थ्यांस) शिकविण्याचें कार्य चार वर्षांत पुरें होऊं शकेल कां?

(२) चाराच्या ऐवजीं पांच वर्षांचा, वरील तऱ्हेचा अभ्यासक्रम पुरा केल्यावर हे उत्तीर्ण झालेले विद्यार्थी खेडोपाडीं व्यवसाय करण्यास जातील कां?

(३) पाश्चिमात्य सुधारणा व शिक्षण चालूं असलेल्या वातावरणांतील विद्यार्थी एम्. बी. बी. एस्. चा कोर्सहि जवळजवळ तितक्या मुदतीचा असतांना, आपण आखलेल्या मिश्र शिक्षणाकरितां पुरेसे विद्यार्थी उपलब्ध होतील कां? हे वैद्य खेड्यांत जाऊन व्यवसाय करण्यास कितीसे उत्सुक होतील? व खेड्यांत व्यवसायार्थ जातील ते खेड्याची वैद्यकीय मदतीची गरज भागवूं शकतील कां?

(४) अशा वैद्यांचीं बिलें खेडूतांना भागवितां येतील कां?

जबरदस्त शंका वाटते

(५) पाश्चिमात्य तऱ्हेनें शिक्षणक्रम पुरा केलेल्या डॉक्टरानांहि साधीं शस्त्रकर्मे व सूतिकाकर्मे जेथें चांगलींशीं करतां येत नाहींत तेथें आपण सुचविलेल्या मिश्रशिक्षणक्रमांतून बाहेर पडलेल्या वैद्यवर्गास तीं कितीशी जुळतील याची जबरदस्त शंका वाटते.

(६) आपण आखलेला संमिश्र अभ्यासक्रम विद्यार्थ्यांवर लादल्यानंतर दंतोत्पाटन, शस्त्रकर्म व कष्टप्रसूतीच्या रुग्णांना त्या त्या विषयांतील तज्ञच ते पाठवितील अशी अपेक्षा करावी कां?

हें शक्य होणार नाहीं काय?

(७) सुश्रुतांतील शस्त्रकर्मांचीं व्याख्यानें देतांना विद्यार्थ्यांस प्रत्यक्ष शस्त्रकर्मांचें थोडेसें शिक्षण दिलें गेल्यास, आयुर्वेदीय शिक्षण [आपण म्हणतां त्याप्रमाणें] घेतलेल्या विद्यार्थ्यांस दंतोत्पाटन, शस्त्रकर्म व कष्टप्रसूतीचे रुग

हृद्रोगावरील आयुर्वेदीय औषध

चिंतामणीरस [गोळ्या]

चिंतामणीरसाचा पाठ भैषज्यरत्नावलींत आहे. तो असा:- शुद्ध पारा, शुद्ध गंधक, अभ्रकभस्म (शतपुटी), लोहभस्म, वंगभस्म, शिलाजतु हीं औषधें १०-१० तोळे, सुवर्णभस्म २॥ तोळे, रौप्यभस्म ५ तोळे, अंबर १० तोळे, व मौक्तिकभस्म ५ तोळे; या औषधांस चित्रकमूलकाढा, माक्यास, अर्जुनसालीचा काढा यांच्या ७-७ भावना.

हृत्शूल, हृदयद्रव (छातींत धडधडणें) या विकारांत हें औषध उपयुक्त आहे.

डॉ. सी. एल्. जठार यांनीं आपल्या मातुःश्रीच्या हृदयविकारावर चिंतामणीरसाचा घेतलेला अनुभव आयुर्वेद पत्रिका वर्ष ५ अंक १ मध्यें प्रसिद्ध झाला आहे.

(१ तोळा ३२ रु.) १५ गोळ्यांची किंमत ५ रु. टपाल खर्च निराळा.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ओळखून त्या त्या तज्ञाकडे पाठविणें शक्य होणार नाहीं काय

(८) आयुर्वेदीय शिक्षण संस्थेंत प्रवेश मिळविण्या-करितां मॅट्रिक पास होणें अवश्य आहे असें वाटल्यास त्यांना अगदीं ठोकळपणें अनॅटोमि व फिजिऑलॉजी शिकवावी, तसेंच त्यांना वनस्पती-शास्त्राची चांगली ओळख करून द्यावी. असें केल्यास तें शिक्षण त्यांना खेड्यांत व्यवसाय करण्यास पुरेसें होईल. आयुर्वेदीय विषय मात्र चांगल्या तऱ्हेनें शिकवावे. ज्या स्नातकांची तैलबुद्धि असेल व ज्यांची जिज्ञासा असेल ते दोन्ही — पौर्वात्य व पाश्चिमात्य — तऱ्हेच्या विषयांत प्राविण्य मिळविण्याची खटपट करणार नाहींत कां? तसेंच खेड्याची सर्व तऱ्हेची गरज भागविणार नाहींत कां?

मोकळीक कां देऊं नये ?

(९) वर विवेचिल्याप्रमाणें व्यवसायास उपयुक्त प्राथमिक शिक्षण देऊन, शास्त्रशुद्ध असलेलें आयुर्वेदीय ज्ञान त्या पद्धतीप्रमाणें वाढविण्यास त्यांना मोकळीक कां देऊं नये ?

(१०) आयुर्वेदीय विद्यालयांतील विद्यार्थ्यांस पाश्चिमात्य औषधी, शस्त्रकर्म व प्रसूतिशास्त्र शिकविण्याचें बंधन घातल्यास, त्यांचा कल आयुर्वेदाकडे दुर्लक्षून पाश्चिमात्य शास्त्राकडे वळणार नाहीं कां?

कला नामशेष करण्याचे प्रयत्न

(११) आयुर्वेदाचें अधिष्ठान, निसर्गनियम, तर्कशास्त्र व प्रत्यक्षानुभव यांवर आधारिलें असल्याकारणानें पाश्चिमात्य शास्त्रज्ञहि त्याचें शास्त्रीयत्व मान्य करूं लागले आहेत अशा, संक्रमणावस्थेंत सुधारणेच्या नांवाखालीं व्याधिपरित्राण व शारीरिक व मानसिक स्वास्थ्य देणारी ही कला नामशेष करण्याचे मनसुभे आपल्याच देशबांधवांनीं करावे ना?

(१) आयुर्वेद व युनानी शिक्षणक्रमांत सरकारनें ढवळाढवळ न करितां त्याची स्वैर प्रगति होण्यास वाव द्यावा. पाश्चिमात्य विषय त्यांचेवर लादूं नयेत. केवळ आयुर्वेदीय सरकारी विद्यालयांत पाश्चिमात्य शरीरशास्त्र, इंद्रियविज्ञानशास्त्र व वनस्पतिशास्त्र यांची दुय्यम विषय म्हणून जोड देण्यांत यावी.

दोन निरनिराळे अभ्यासक्रम असावेत

(२) मिश्र शिक्षणक्रमांत महत्वाकांक्षी व होतकरु विद्यार्थ्यांकरितां शिक्षणाची मुदत वाढवून विषयांचें ज्ञानदान करण्यांस हरकत नाहीं. दोन्ही कोर्सेस निराळे असावेत.

(३) वरील दोन्ही तऱ्हेच्या परीक्षा पास झालेल्या पदवीधरांना मान्यता देऊन व्यवसाय करण्यांस हरकत नसावी.

रजिस्ट्रेशन आवश्यक नसावें

(४) नांव रजिस्टर करणें न करणें हें त्या त्या व्यक्तीवर सोपवावें. बंधनकारक असूं नये.

(५) वैद्यांची रजिस्ट्रेशन फी कमी करून वैद्यांच्या आवाक्यांत येईल अशी ठेवावी.

(६) मध्यवर्ति बोर्डाच्या हुकमतीमुळें आयुर्वेद युनानी पद्धतीच्या विकासास अडथळा येणार नाहीं असे त्याचे नियम करावेत. दोन्ही शास्त्रांच्या वाढीस व संशोधनास, जेथें व जेव्हां वाव मिळेल तेथें व तेव्हां त्यांस आपली प्रगति करून घेण्यास मुक्तद्वार असावें.

घाई करण्यांत स्वारस्य नाहीं

कोणत्याहि शास्त्राची वाढ सावकाशपणेंच होत असते. घाई करण्यांत स्वारस्य नाहीं, हें पाश्चिमात्य शास्त्राच्या वाढीच्या इतिहासावरून स्पष्ट कळण्यासारखें आहे. तसेंच पाश्चिमात्य व आपल्या देशांतील परिस्थितीकडेहि दुर्लक्ष होऊन चालणार नाहीं हें लक्षांत घेतलें पाहिजे.

वैद्यांच्या निवेदनास पाठिंबा

वैद्यांनीं कमिटीस सादर केलेल्या निवेदनास माझा पाठिंबा आहे. १४ ऑगस्ट १९३८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार

वैद्य हकीमांची दुर्दशा

मध्यप्रदेश रजिस्टर्ड वैद्य हकीम संघाचे मन्त्री पं. व्यासनारायण शुक्ल आयुर्वेदाचार्य कळवितात कीं,

मध्यप्रदेशांतील स्थानिक स्वराज्य विभागा-(जनपदा)च्या माताहत नोकरी करणाऱ्या वैद्य-हकीमांची वर्तमान दुर्दशा सुधारण्याकरतां राज्य सरकारकडे एक स्मृतिपत्र सादर करण्याचा संघाचा विचार आहे.

राज्यसरकारकडे स्मृतिचित्र

या स्मृतिपत्रांत वैद्यांचे पगार, महागाई, नेमणुका, औषधें वगैरे बाबींचा समावेश केला गेला आहे.

याशिवाय इतर कांहीं बाबी ज्या वैद्य-हकीमांना सुचवावयाच्या असतील त्यांनीं लवकर संघाच्या ऑफिसांत पाठवाव्या.

स्मृतिपत्रांतील मागण्यांची प्रत संघकार्यालयांत मिळेल.

संघाचा पत्ताः-मंत्री, म. प्र. रजिस्टर्ड वैद्य-हकीम संघ
दुर्गा आरोग्य मंदिर, मेनरोड
सिताबर्डी, नागपूर १

शुद्ध आयुर्वेद विद्यालय, हुबळी

हुबळी येथील निखिल कर्नाटक आयुर्वेद प्रसारक मंडळाला शुद्ध आयुर्वेदाचें अध्यापन करण्याची सरकारमान्यता मिळाली आहे. या संस्थेच्या शुद्ध आयुर्वेद विद्यालयाचें उद्घाटन अखिल भारतीय आयुर्वेद काँग्रेसचे अध्यक्ष पंडित शिवशर्मा यांच्या हस्तें गेल्या महिन्याच्या प्रारंभीं झालें.

उद्घाटन प्रसंगींच्या आपल्या भाषणांत ते म्हणाले "चिकित्सकास चांगल्या पद्धतीनें व पूर्ण शिक्षण दिलें गेलें पाहिजे. जनतेला वैद्यकीय मदत करण्याची कला त्याला हस्तगत झाली पाहिजे, महात्माजींची प्रबळ इच्छा अशी होती कीं, देशांतील सरकारी चिकित्सापद्धति आयुर्वेदाचीच असली पाहिजे."

पवित्र नेपाल कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहाः-नेपाल हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाल

येत्या हिंवाळ्यांत शक्तीसाठीं सेवन करा

- पूर्णप्रमाण सुवर्ण मालिनी वसंत -

आयुर्वेद पत्रिका १६ एप्रिल १९५२ पा. नं. ६३८-३९ वर वृद्धवैद्यांनीं सुचविल्याप्रमाणें (सुवर्णभस्म न वापरतां) शुद्ध सुवर्ण पूर्णप्रमाणांत घातलेला सुवर्णमालिनीवसंत सेवा संघानें तयार केला असून तो विक्रीस ठेवला आहे. या वसंतांत १ तोळा सुवर्ण, २ तोळे मोतीचुरा, ३ तोळे हिंगूळ, ४ तोळे पांढरी मिरी, ८ तोळे कलखापरी या प्रमाणांत हीं ५ द्रव्यें वापरलीं आहेत.

देण्याचें प्रमाणः—१ ते २ गुंजा अनुपानः-मध, पिंपळी
वेळः-सकाळ, सायंकाळ पथ्यः-दूधभात
किंमत पाव तोळा ८ रु., ट. ख. निराळा

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कै. गुरुवर्य डॉ. सावनूर यांचें शिष्यत्व मला कसें लाभलें ?

(लेखक:—डॉ. सी. एल्. जठार, एल्. सी. पी. एस्., बेळगांव)

माझ्या घराण्याचा व डॉ. सावनूर यांचा जिव्हाळ्याचा ऋणानुबंध होता. आमचीं घरें एकाच आळींत आहेत. ते मजला माझ्या बालपणापासून जाणत असत. डॉक्टरांचे जनक वडील रामचंद्रराव हे डेप्युटी होते. माझ्या पितामहांचा व त्यांचा स्नेह होता. माझ्या पितामहांना त्यांच्या अखेरच्या दुखण्यांत डॉ. सावनूर यांनींच उपचार केले होते. मी मेडिकल स्कूलमध्यें शिकत आहे हें त्यांना माहीत होतें.

शिष्यत्व देण्याची विनंति

मी १९२३ मध्यें एल्. सी. पी. एस्. पास झाल्यावर गुरुवर्यांना भेटून सांगण्याकरितां त्यांचेकडे गेलो. त्यांनीं हास्यवदनानें माझें अभिनंदन करून

लेखक

आशीर्वाद दिला. कांहीं कालानंतर मला शिष्यत्व देण्याची मी त्यांना विनंति केली. त्यांना शिष्याची गरज नाहीं असें दिसलें. असें असलें तरी त्यांच्या दवाखान्यांत प्रात्यक्षिक दाखविण्याचें त्यांनीं कबूल करून मला दवाखान्यांत येण्याची व काम करण्याची परवानगी दिली. कांहीं घरगुती कारणानें मजला दवाखाना उघडण्यास १९२४ साल उजाडलें.

दोन दवाखाने सुरूं केले

डॉ. सावनूर यांना मजला वेळोवेळीं सल्ला देण्याची विनंति करून मी यमकनमर्डी व हुक्केरी येथें असे दोन दवाखाने सुरूं केले. यमकनमर्डी येथें कै. रा. लक्ष्मण किल्लेदार नांवाचा कंपौंडर मिळाला. तो सर्व काम आपल्या वडील भावाचा दवाखाना आहे या भावनेनें करून अखेर पावेतों वागला. वरील ठिकाणीं दवाखाने उघडण्यापूर्वी माझे एक स्नेही डॉ. जे. व्ही. जोशी उर्फ बापू यांचाहि सल्ला घेतला-व अडीअडचणींत मजला मार्गदर्शन करण्याची, विनंति केली. डॉ. बापू यांचें बंधुप्रेम अनुपमेय आज पावेतों आहे. पुढें कॉंग्रेसच्या सत्याग्रहांत सरकारी पाहुणचार दोन वर्षें [१९३२-३३] घ्यावा लागला. या माझ्या अनुपस्थितीच्या काळांत डॉ. बापू व किल्लेदार यांनीं दोन्ही दवाखाने चालवून माझें कुटुंब-पोषणाचें कार्य करून जन्माचे ऋणी करून ठेविलें. त्या दिवसांची आठवण झाल्यास कृतज्ञतेनें अंतःकरण भरून येतें.

कारावासांतील पत्रव्यवहार

गुरुवर्य डॉ. सावनूर यांनीं आयुर्वेदावर कांहीं ग्रंथ लिहिण्याचा उपक्रम केला आहे हें मजला माहित होतें. माझ्या कारावासाच्या काळांत त्यांचें सर्व लिखाण उत्तम तऱ्हेनें लिहून काढावें या भावनेनें त्यांना पत्र धाडून पृच्छा केली. तें लिखाण तसें लिहिण्यासारखें नसून डॉ. सावनूर यांनींच तें निवेदन करावें व लिहिणाऱ्यानें लिहावें अशा स्थितींत तें आहे असें त्यांनीं कळविलें. कांहीं काल व्यतीत झाल्यावर गुरु-वर्यांना तंदुरुस्तीकरितां हुक्केरीस त्यांच्या बंधूकडे येणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्राप्त झालें. त्याच सुमारास सरकारी पाहुणचार संपवून मी परत आलो होतो. कांहीं काढें, चूर्णें व गुटिका करण्याचें माझें कार्य त्याच वेळीं सुरूं झालें असल्याकारणानें गुरुवर्यांची उपस्थिति मजला बरीच उपकारक ठरली. त्या काळापासूनच आयुर्वेदीय चिकित्सा समजून घेण्याची जिज्ञासा बळावली. गुरुवर्य बेळगांवीं जाण्यास उत्सुक होऊं लागले. परतण्याची गडबड करूं नका, अशी विनंति केल्यावर त्यांनीं आपल्या अडचणी सांगून आपला दवाखाना वाऱ्यावर आहे असें सांगितलें. गुरुवर्यांना माझ्या सेवेची केव्हांहि जरूर भासल्यास मी सदैव सिद्ध असल्याचें मी त्यांना त्यावेळीं सुचविलें.

१९३४ पासून निद्रानाशाचा विकार

पुढें योगायोग - दैवी - असा कीं, आक्टोबर १९३४ पासून गुरुवर्यांना निद्रानाशाचा विकार जडला. त्यांनीं ५।६ महिने विविध उपचार करून पाहिले. परंतु विकार कमी न होतां बळावत गेला. विकारावर आसनोपचार घेण्याचें ठरवून कैवल्यधाम लोणावळें येथें जाण्याचें निश्चित केलें. मार्च १९३५ च्या अखेरच्या आठवड्यांत गुरुवर्यांनीं मजला बेळगांवीं भेटण्यास बोलाविलें. मी निघणार होतो इतक्यांत त्यांनीं लवकर येण्याविषयीं तार दिली. मी तावडतोब बेळगांवीं जाऊन त्यांची गांठ घेतली. मी ' हुक्केरीस जाऊन तेथील माझ्या कामाची व्यवस्था करून तीन-चार दिवसांत परत यावें ' असें गुरुवर्यांनीं मजला आज्ञापिलें. मी परत आल्यावर त्यांच्या दवाखान्यांतील रुग्णांचा व त्यांच्या उपचारांचा परिचय गुरुवर्यांनीं मजला करून दिला. ते लोणावळयास एप्रिल च्या पहिल्या आठवड्यांत दाखल झाले.

१९३५ पासून बेळगांव येथें

एप्रिल १९३५ च्या पहिल्या आठवड्यांत गुरुवर्यांच्या दवाखान्याचें काम मी पाहूं लागलो. गुरुवर्यांनीं त्यांच्या दवाखान्याच्या माडीवर मला राहण्यास जागा देऊन त्यांच्या ग्रंथांचा उपयोग करण्यास मुभा दिली. मी त्यांच्या ग्रंथांचा उपयोग करून त्यांतील शंकास्थानांचें निरसन त्यांचे कडून पत्रद्वारें करून घेऊं लागलो. आयुर्वेदांतील अनभिज्ञ डॉक्टरांस विषय सोपा करून सांगण्याची गुरुवर्यांची शैली अप्रतिम होती. आजहि त्यांच्या पत्रांवरून नजर टाकल्यास मौज वाटते. आम्हां दोघांच्या वरील प्रकारच्या पत्रव्यवहारांत व दवाखान्यांतील कामामुळें दोन महिन्याचा काल केव्हां व्यतीत झाला हें समजलें नाहीं.

डॉ. सावनूरांनीं सुचविलेला पर्याय

जून महिन्यांत ते लोणावळयाहून परत आले. त्यांचेकडे दवाखान्याचे सर्व हिशेब सुपूर्त केल्यावर मी हुक्केरीस परत जाण्याची मनीषा प्रदर्शित केली. त्याला पर्याय म्हणून त्यांनीं ' मी प्रॅक्टिसकरितां येथें येऊन दिवसापैकीं एकवेळ त्यांचेकडे व एकवेळ माझा दवाखाना असें काम करावें ' असें सुचविलें. वरील पर्याय अशक्य असल्याकारणानें मी नकार दिला. गुरुवर्यांचा शिष्य म्हणून त्यांच्या दवाखान्यांत काम करण्याची तयारी दर्शविली. या सूचनेस त्यांनीं तावडतोब रुकार दिला.

रामदास-कल्याण जोडी

हुक्केरीचे चंबूगबाळें आटोपून मी बेळगांवीं दाखल होऊन त्यांचे हाताखालीं कामास सुरवात केली. दोन अडीच वर्षे काल गेल्यावर गुरुवर्यांनीं सेवानिवृत्त होण्याचें ठरवून आपला दवाखाना मजला पूर्णपणें सुपूर्त करून ते सल्लागार म्हणून काम करूं लागले. याच कालापासून आम्हांस 'रामदास-कल्याण जोडी ' असें लोक बोलूं लागले.

आयुर्वेदीय मटेरिया मेडिका लिहिली

गुरुवर्यांनीं कांहीं सहकाऱ्यासह १९२० ते २३ या कालांत आयुर्वेदीय शाळा काढून दवाखाना चालविण्याचा प्रयत्न केला होता. प्रथम कर्नाटक आयुर्वेदीय संमेलन कै. श्रीनिवासमूर्ती यांचे अध्यक्षतेखालीं त्यांनीं १९२४ सालीं भरविलें. या संमेलनाचे वेळींच विद्यार्थ्यांकरितां पाठ्यपुस्तक म्हणून आयुर्वेदीय मटेरिया मेडिका लिहिली पाहिजे या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...त्तेस चालना मिळाली. येथूनच गुरुवर्यांनीं आयुर्वेदाचा सोपपत्तिक अभ्यास करून वरील मटेरिया मेडिका करितां टिप्पणें करून तो ग्रंथ लिहिण्याचे परिश्रम सुरूं केले, व त्यांचेंच दृश्य फल म्हणजे दोन भागांत लिहिलेला हा ग्रंथराज होय.

छपाईसाठीं व्यवस्थित प्रत

त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांचे मागें त्यांच्या ग्रंथाची हस्तलिखित प्रत लवकर करण्याचा तगादा लाविला. सर्व जुळवाजुळव करून प्रत्यक्ष हस्तलिखित प्रत लिहिण्याचें कामास सुरवात होण्यास १९४२ साल उगवलें. डॉ. सावनूर यांचे आयुर्वेदाविषयींचे विचार ग्रंथरूपानें जगापुढें यावयाचे तर ते सुव्यवस्थित लिहून काढले पाहिजेत. तसे लिहून काढिल्यावर ते केव्हांहि छापिले जातील असें वाटे. त्यांचे विचार व त्यांचा अनुभव ग्रंथरूपानें प्रसिद्ध झाल्यास जनतेस त्याचा उपयोग होईल व या कार्यांत आपण निमित्त-कारण व्हावें अशी मी मनीषा बाळगली. लिखाणाचें काम करीत असतां आपणासहि आयुर्वेदाचें कांहीं ज्ञान प्राप्त होणार हीहि एक सुप्त इच्छा होती.

गुरुवर्यांची काम करण्याची वेळ

गुरुवर्यांची काम करण्याची वेळ पहाटेची असे. पहाटे ५ वाजतां त्यांचे बंगल्यावर हजर व्हावें लागे. सर्व ऋतूंत पहाटेचा लिखाणाचा क्रम चालू असे. क्वचित् गुरुजींच्या प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें कांहीं काल खंड पडे. पहिल्या भागाची हस्त व टंकलिखित प्रत त्याचप्रमाणें प्रेस कॉपी तयार होण्यास १९४६ साल व्यतीत झालें. दुसऱ्या भागाचें काम हस्त, टंक व प्रेस कॉपी तयार होण्यास १९५१ साल संपलें. पुढें अकार विल्हेवारी वगैरे करण्यास एक वर्ष लागलें. इतका काल लागण्याचें कारण दवाखान्याचें काम हा उदरंभरणाचा उद्योग सांभाळून वरील कामें करावीं लागत.

पहिला भाग छापण्याचें धाडस

गुरुवर्यांच्या सम्मतीनें पहिला भाग छापून काढण्याचें धाडसाचें काम मीं अंगावर घेतलें. ग्रंथ छापून झाल्यावर पुस्तकाचा उद्घाटन समारंभ डॉ. म्हसकर यांचे हस्तें पार पडला. डॉ. म्हसकर यांनीं या ग्रंथाविषयीं धन्योद्गार काढून पाठ्यपुस्तक होण्यास योग्य ग्रंथ आहे असें प्रतिपादिलें. पण पुढें तो ग्रंथ आयुर्वेदीय शाळा-कॉलेजांत पाठ्यग्रंथ म्हणून शिफारस करण्यास त्यांनीं नकार दिला. संदर्भग्रंथ म्हणून शिफारस करण्याचें वचन दिलें आहे.

तज्ञ डॉक्टरांचा अभिप्राय

डॉ. मेथा, डॉ. बानर्जी, कॅ. श्रीनिवासमूर्ती व इतर बऱ्याच वैद्य व डॉक्टर वर्गानें हा ग्रंथ पाठ्य-पुस्तक म्हणून नेमण्यास योग्य आहे असा अभिप्राय प्रगट केला आहे.

वरील दोन्ही ग्रंथ लिहित असतांना गुरुवर्यांनीं त्यांतील बऱ्याच क्लिष्ट असलेल्या भागाची लेखकास माहिती करून दिली.

दुसऱ्या भागाच्या छपाईची व्यवस्था

आयुर्वेद फॅकल्टी, आ. संस्था अगर कोणत्याहि आ. युनिव्हर्सिटीनें ग्रंथाचा दुसरा भाग छापून प्रसिद्ध करण्याचें काम अंगिकारल्यास हस्तलिखित त्यांचे स्वाधीन करून प्रूफ करेक्शन वगैरे कामांत मीं त्यांना मदत करावी अशी त्यांची इच्छा त्यांनीं लेखकास सांगून ठेविली आहे. पहावें, श्रीप्रभूरामचंद्र कोणा संस्थेस प्रेरणा करितात तें ! लेखकाचे हयातींत दुसरा भाग छापून प्रसिद्ध व्हावा अशी लेखकाची तीव्र इच्छा आहे.

पिता-पुत्रवत् लोभ

वरील सर्वकालांत गुरुवर्यांचा व लेखकांचा पितापुत्रवत् लोभ जडला. गांवीं असतांना रोज एक-मेकांची गांठ न पडली तर चुकल्यासारखें होत असे.

अन्ननलिकेचें अर्बुद

त्यांना अन्ननलिकेच्या खालील टोकाजवळ कॅन्सर झाला आहे असें निदान मुंबई येथें केलें गेलें. मुंबईस ऑगस्ट, सप्टेंबर १९५२ दोन महिने राहून एक्सरेचा उपचार केल्यावर ते ऑक्टोबरांत येथें आले व पुढें फेब्रुआरींत लेखकासह ते पुढील तपासणीसाठीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गेले. डॉ. बॉर्जेस वगैरेंनीं तपासल्यावर इंजेक्शन न घेतां औषध घेण्याचा सल्ला दिला गेला. गुरुवर्य कांहीं देशी औषधेंहि घेत असत. लेखकानें डॉ. बोर्जेस यांना गुरुवर्यांविषयीं विचारतां 'देव करो व गुरुवर्यांस बरें वाटो, मानवा हातीं कांहीं नाहीं' असे उद्गार त्यांनीं काढले. लेखकास निराशा वाटूं लागली. अन्ननलिकेंतून आहार घेतां आला नाहीं तर ऑपरेशन करून पोटांत घालण्याकरितां रबराची नळी घालावी लागेल असेंहि वरील तज्ञांनीं सांगितलें.

मृत्यूकालाचे अगोदर २ दिवसपर्यंत

ऑगस्ट १९५२ ते जून १९५३ म्हणजे मरण कालाचे अगोदर दोन दिवसपर्यंत ते, त्यांनीं वरील कालांत लिहिलेल्या 'शारीरशास्त्र' या कानडी ग्रंथाचीं प्रुफे तपासत असत. या कामीं त्यांचे दुसरे एक शिष्य वैद्य मध्वाचार्य बुर्लि बागलकोटकर यांचें बरेंच साहाय्य झालें.

गुरुवर्यांचें देहावसान

गुरुवर्यांचें देहावसान ३।६।५३ रोजीं सकाळीं ११ चे सुमारास झालें. गुरुवर्यांनीं जन्मभर जनतेची व आयुर्वेदाची निरपेक्ष सेवा केली. त्यांच्या असंख्य चाहत्यांस दुःखसागरांत लोटून आयुर्वेदाचार्य डॉ. सावनूर परलोकवासी झाले.

कोंबडीच्या अंड्यांच्या टरफलापासून केलेलें

कुक्कुटांडत्वक्भस्म

जगांत औषधी द्रव्यें सर्वत्र पसरलीं आहेत. त्यांचा ज्ञानपूर्वक व युक्तीनें उपयोग करण्यांत शहाणपणा आहे.

शरीरास अस्थिधातूच्या पोषणाची गरज वेळोवेळीं भासते. ती पूर्ण करण्यासाठीं बाल, तरुण, स्त्री, वृद्ध या सर्वांना हें प्राणिज अस्थिधातुपोषक भस्म उपयुक्त आहे.

आयुर्वेद सेवा संघ
औषधी भवन, नाशिक.

आयुर्वेद सेवा संघानें निर्माण केलेली वैद्यकीय ग्रंथ वाचक व प्रकाशक यांची उत्कृष्ट सोय

वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

आधींच वैद्यकीय ग्रन्थ लेखक फार थोडे. जे लिहित त्यांचे ग्रन्थ छापून प्रसिद्ध होणें कठीण. व असे प्रसिद्ध झालेले ग्रन्थ दहादहा, वीसवीस वर्षे योग्य विक्रेत्यांच्या अभावामुळें पडून राहात. त्यामुळें नवीन ग्रन्थ प्रसिद्ध होणें बन्द पडे.

जिज्ञासू वैद्यक ग्रन्थ वाचकांनाहि विश्वसनीय वैद्यक ग्रंथ कोठें मिळतील हें समजणें कठीण पडे. ग्रंथ-प्रकाशकाकडे फक्त त्यांचेच तेवढे ग्रन्थ मिळत. त्याच विषयावरील इतर ग्रन्थ कोणते आहेत व तें कसे मिळवावेत हा प्रश्न शिल्लक राही. प्रत्येक ग्रन्थ अलग ठिकाणाहून मागवितांना टपालखर्च, पत्रव्यवहारखर्च फार होत असे.

नाशिक येथें वैद्यक ग्रंथ भांडार सुरूं झाल्यापासून या सर्व अडचणी दूर झाल्या आहेत. वैद्यकीय ग्रंथाचे मुद्रक व प्रकाशक आपले ग्रंथ विक्रीसाठीं, मोठ्या प्रमाणावर या भांडाराकडे ठेवू लागले आहेत व वाचकांनाहि वैद्यक ग्रंथ भांडारांतून पुस्तकें मागविणें सर्व दृष्टीनें सोईचें झालें आहे.

आपणहि या उपयुक्त व्यवस्थेचा लाभ घ्या. आपले ग्रंथ विक्रीसाठीं वैद्यक ग्रंथ भांडाराकडे पाठवा, व खरेदी करतांना वैद्यक ग्रंथ भांडाराची आठवण ठेवा, अशी नम्र विनंति आहे.

—व्यवस्थापक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डॉ. एच्. व्ही. सावनूर, एल्. एम्. एस्., बेळगांव

यांचें अल्पसें चरित्र

डॉ. सावनूर यांचा जन्म ता. १३ जुलै १८८० रोजीं कलादगीस झाला. त्यांचें घराणें गेल्या तीन चार पिढ्यापासून बेळगांवींच आहे. डॉक्टरांचे वडील शिक्षणखात्यांत असल्याकारणानें डॉक्टरांचें प्राथमिक (कानडी) शिक्षण त्यांच्या वडिलांची वारंवार बदली होत असल्यानें निरानिराळ्या गांवीं झालें. दुय्यम

डॉ. सावनूर पतिपत्नी

शिक्षण विजापुरास होऊन तेथेंच ते मॅट्रिक पास झाले. मॅट्रिक पास झाल्यावर उच्च शिक्षणाकरितां ते पुण्यास फर्ग्युसन कॉलेजांत दाखल होऊन पहिल्या वर्षाची परीक्षा बऱ्याच उच्च श्रेणींत पास झाले. त्यांचा कल भाषा विषयांकडे होता. पण त्यांना तिकडे जाण्या-विषयीं प्रोत्साहन मिळालें नाहीं. त्यामुळें ते डॉक्टरी-कडे वळले व ग्रँट मेडिकल कॉलेजांत १९०४ सालीं प्रवेश मिळविला. तेथील शिक्षणक्रम पुरा करून १९०७ या वर्षी त्यांनीं एल.एम्.एस्.ही डिग्री संपादन केली.

राष्ट्रीय शाळेंत नियमितपणें अध्यापन

प्रथमतः कानडी प्रदेशांत प्रॅक्टिस सुरूं करावी या हेतूनें पास होतां क्षणींच, त्यांनीं बागलकोट येथें व्यवसायास सुरवात केली. त्यांच्या कोमल स्वभा-वाचा व कोमल अंतःकरणाचा त्यांच्या व्यवसायांत अनुकूल परिणाम होऊन त्यांचा जम चांगला बसला. त्यावेळीं बागलकोट येथें एक राष्ट्रीय शाळा चालविली जात होती. डॉ. सावनूर वृत्तीनें राष्ट्रीय असल्या-कारणानें, तसेंच त्यांचें इंग्लिश व संस्कृत भाषेवर प्रभुत्व असल्यामुळें, त्यांनीं वरील राष्ट्रीय शाळेंत फावल्या वेळांत, पण नियमितपणें, शिक्षकाचा पेशा पत्करला.

वैद्य गुंडाचार्यांचा दाट परिचय

यांच शाळेंतील शिक्षकांपैकीं, एक वैय्याकरणी वैद्य गुंडाचार्य हे होते. कांहीं काळ लोटल्यावर वैद्य गुंडाचार्य व डॉ. सावनूर यांचा दाट परिचय होऊन त्यांचें रूपांतर स्नेहांत झालें. वैद्य गुंडा-चार्य आयुर्वेदांत तज्ञ होते. त्यांच्या सहवासानें डॉ. सावनूर हे आयुर्वेदाकडे आकर्षिले गेले. वैद्य गुंडाचार्य यांनीं डॉ. सावनूर यांस प्रोत्साहन देऊन त्यांच्यांत आयुर्वेदशास्त्राची आवड उत्पन्न केली. डॉ. सावनूर यांचें संस्कृत भाषेवर प्रभुत्व असल्यामुळें व्यवसायांतून सवड मिळेल तेव्हां आयुर्वेदांतील मूळ संस्कृत ग्रंथ अभ्यासण्याचा उपक्रम त्यांनीं चालू केला. कांहीं शंका निर्माण झाल्यास त्याचें निरसन वैद्य गुंडाचार्य यांचेकडून करून घेत असत.

बागलकोटची उष्ण हवा

आयुर्वेदाच्या अभ्यासांत त्यांचें मन रमूं लागलें. त्या शास्त्रांत त्यांची जसजशी प्रगति होत गेली तस-तसें ते आपल्या व्यवसायांत आयुर्वेदीय औषधांचा वापर करूं लागले. त्यांची प्रकृति मुळांतच धडधाकट नव्हती. बागलकोट येथील हवामान उष्ण आहे. ती

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हवा त्यांना न सोसण्याचीं चिन्हें दीडदोन वर्षांत दिसूं लागलीं. त्यांना वरचेवर ज्वर येऊं लागला. तथांतहि आणखी एक वर्ष त्यांनीं काढलें. बरें वाटण्याचें चिन्ह दिसेना, म्हणून तें गांव सोडून बेळगांवीं जाऊन व्यवसाय सुरूं करण्याचें निश्चित करून १९१० इसवींत वर्ष-अखेर बेळगांवीं येऊन राहत्या घरीं दवाखाना थाटून त्यांनीं व्यवसायास सुरुवात केली. त्यांचा जम उत्तमच बसत गेला व तो अखेरपर्यंत म्हणजे व्यवसायनिवृत्त होईतों एकसारखा चालूं होता.

द्रव्यार्जनाकडे लक्ष नसे

त्यांचें द्रव्यार्जनाकडे फारसें लक्ष नसे. ते वृत्तीनें राष्ट्राभिमानी असल्यामुळें शक्यतों देशी वस्तू व औषधें कटाक्षानें वापरीत असत. काँग्रेस या संस्थेस यथाशक्ति द्रव्यसहाय्यहि करीत. लखनौ व कलकत्ता येथें भरलेल्या कॉन्ग्रेसला ते हजर होते. बागलकोटचे वैद्य बुर्लि हे बनारस येथें वैद्यकीय शिक्षण घेत असलेले गृहस्थ त्यांना कलकत्त्यास भेटले. त्यांचें पुढें गुरु-शिष्यांचें नातें जमलें. बुर्लि बागलकोट येथें व्यवसाय करीत. जेव्हां कांहीं कारणानें डॉ. सावनूर यांचें निमंत्रण जाई, तेव्हां वैद्य बुर्लि गुरु-सेवेस बेळगांवीं हजर असत. हें गुरु-शिष्याचें नातें डॉ. सावनूर यांच्या अखेरच्या क्षणापर्यंत वै. बुर्ली यांनीं पाळून त्यांची सेवा केली.

कानडी वाङ्मयाची सेवा

१९२० पासून कानडी वाङ्मयाची सेवा करण्याचे उद्देशानें डॉ. सावनूर यांनीं छापखाना घेऊन 'कर्नाटक मित्र' या नांवाचें साप्ताहिक चालविलें. पुढें तें बंद करावें लागून डॉ. सावनूर यांना मानसिक त्रास व आर्थिक झीज सोसावी लागली.

षड्-दर्शनांचा अभ्यास

वर निर्देशिल्याप्रमाणें वैद्य बुर्ली, डॉ. सावनूरांचे भेटीकरितां बेळगांवीं वरचेवर येत असत. अशाच एका समयीं अदमासें १९२३ या वर्षी दोघांची चर्चा चालूं असतांना आयुर्वेदीय मटिरिया मेडिका लिहिण्याची कल्पना सुचली. कल्पना चांगली खरी पण ती कशी सफल करावी याचा उकल दोन्ही व्यक्तीस होईना. या कल्पनांकुराच्या विचारामुळें त्याची मांडणी कशी काय असावी, त्याला जरूर ते संदर्भ ग्रंथ कोणते व कसे मिळवावे वगैरे विचार-चक्र डॉ. सावनूर यांचें मनांत चालूं लागलें. अशा प्रकारचे त्यावेळपावेतों लिहिलेले ग्रंथ आणविणें, त्यांचा अभ्यास करणें वगैरे कामास त्यांनीं सुरवात केली. षड्दर्शनाच्या अभ्यासाकारितां ते ग्रंथ आणवून त्यांचा अभ्यास आयुर्वेदास उपयोगी पडेल तेवढा करण्यास सुरवात केली. टिप्पणेंहि करूं लागले.

पहाटे ४ ते ७ अध्ययन, लेखन

सवड मिळेल तेव्हां-बैलगाडींत (घमणी) वून व्हिजिटला लांब पल्ल्याच्या गांवीं जातांनाहि-टिप्पणें करण्याचें कार्य चालूं असे. नेहमींची त्यांची वाचन-लेखनाची वेळ म्हणजे पहाटे चार पासून प्रातःकाळीं ७ वाजेतों अशी असे. अखेर क्षणापर्यंत ते पहाटेचें काम करीत असत.

निखिल कर्नाटक आयुर्वेद संमेलन

इ. स. १९२४ या वर्षी डॉ. सावनूर यांनीं विद्वान् के. शेषशास्त्री यांचे साहाय्यानें 'निखिल कर्नाटक आयुर्वेद संमेलन' ही संस्था स्थापन करून त्यांचें प्रथम अधिवेशन बेळगांवीं भरवून कॅप्टन जी. श्रीनिवासमूर्ती यांना अध्यक्षस्थान दिलें होतें. द्वितीय संमेलन बेंगळूर येथें १९२५ या वर्षी डॉ. सावनूर यांचे अध्यक्षतेखालीं पार पडलें. शक्यतों सर्व संमेलनास ते हजर रहात असत.

ग्रंथ लेखनासाठीं ग्रंथसामुग्री

डॉ. सावनूर यांचा आयुर्वेदशास्त्राचा अभ्यास सखोल होऊं लागला, तसतशी आयुर्वेदशास्त्रावरील सिद्धांताविषयीं खात्री पटूं लागली. व्हिजिटेबल मटेरिया मेडिका लिहिण्याचे विचार सारखे घोळत असल्यामुळें त्याकरितां लागणारी बोटॅनिकल संहिता, षड्दर्शनें, सांख्यकारिका, फार्माकोलाजीवरील अद्यावत दुर्मिळ ग्रंथसंपत्ति, व्यावहारिक संपत्तीकडे दुर्लक्षून,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मिळविली. १९२५ ते १९३३ या कालखंडांत त्याची कच्चीं टिपणें तयार झाला होतीं.

पहिल्या भागाचें प्रकाशन

व्यवसाय निवृत्तीनंतर त्यांना फुरसत मिळूं लागली. ते आपल्या कच्च्या टिप्पणांची संगतवार जुळवाजुळव करूं लागले. त्याच वेळीं डॉ. सावनूर यांच्या मागें पुस्तकांची हस्तलिखित प्रत तयार करण्याविषयीं डॉ. जठार यांनीं निकड लावली. तें काम करण्यास अदमासें १९४१ इसवींत सुरवात झाली. कामाची वेळ पहाटें ५ ते सकाळीं ७ अगर ८ अशी होती. १९४१ ते १९४५ पहिल्या भागाचें लिखाण व दुसऱ्या भागाचा कांहीं मजकूर (वनस्पती) लिहून तयार झाला. पहिल्या भागाची हस्तलिखिताची प्रेस-कॉपी तयार करण्याचे कामीं रा. डी. एस्. नाईक, संकेश्वर यांचीं अमोलिक मदत झाली, त्याबद्दल डॉ. सावनूर यांनी त्यांचे हार्दिक आभार मानले आहेत. वरील लिखाण झाल्यावर अनुक्रमाणिकादि तयार होण्यास कांहीं अवधि लोटला. रा. नाईक व जठार यांचे खटपटीनें पहिला भाग १९५० मध्यें तयार होऊन डॉ. महुकर यांचे हस्तें त्या पुस्तकाचा वितरण-समारंभ पार पडला.

दुसरा भाग तयार आहे

वरील पहिल्या भागाचें काम संपूर्ण झाल्यावर दुसऱ्या भागाचें काम पूर्णतेस नेण्याचा निश्चय करून तेंहि काम डॉ. सावनूर व डॉ. जठार यांनीं १९४६ १९४७ सालीं पुरें केलें. त्याच्यांत दुरुस्त्या करून एक प्रेस-कॉपी व इतर दोन टंकालिखित प्रती हातावेगळ्या होण्यास १९५१ वर्ष उगवलें. हा दुसरा भाग तयार होऊन आज तीन साडेतीन वर्षें झालीं. छपाईचें कार्य डॉ. सावनूर यांना द्रव्याभावीं होऊं शकलें नाहीं. डॉ. जठार आणि सन्स यांचेकडे दुसरा भाग छापून झाला कां, याच्या चवकशीचीं पत्रें येत आहेत. त्या ग्रंथाची प्रेसकॉपी, इंडेक्स वगैरे सर्व तयार आहे. आयुर्वेद कारखानदार संघानें वरील दुसरा भाग छापून प्रसिद्ध करून, डॉ. सावनूर यांचा आयुर्वेदासंबंधींचा अनुभव व तौलनिक अभ्यास जनताजनार्दनास पोंचविण्याचें श्रेय घ्यावें. झांसी युनिव्हर्सिटीचे प्रमुख रा. आमदार धुळेकर यांचे बरोबर पत्रव्यवहार करून त्यांचें मत अजमाविण्यास डॉ. सावनूर यांनीं डॉ. जठार यांना आज्ञापिलें होतें. वरील दोन संस्थांपैकीं, भाग दुसरा छापण्यास व प्रसिद्ध करण्यास जे तयार होतील त्यांचेकडे प्रेसकॉपी सुपूर्त करण्यास डॉ. सावनूर यांनीं डॉ. जठार यांस सांगितलें आहे.

कानडींत शरीरविज्ञान

आगष्ट १९५२ महिन्यांत डॉ. सावनूर यांना त्यांच्या अन्ननलिकेच्या खालच्या भागास कॅन्सर झालें आहे, असें निदान मुंबईस निश्चित झालें. लगेच डॉ. सावनूर यांनीं आपला कानडींतील 'शरीर-विज्ञान' हा ग्रंथ लिहून फेब्रुवारी १९५३ मध्यें पुरा करून मार्च अखेर तो छापण्याचें काम सुरूं केलें. हा ग्रंथ अदमासें ३००।३२५ पानांचा असून त्याचीं २५० पानें छापून तयार झालीं आहेत. अशा वेळीं डॉक्टर हे निवर्तल्यामुळें पुढें राहिलेलें काम त्यांचे सत्-शिष्य वैद्य बुर्ली हे पुरे करतील. हा ग्रंथ तयार करण्याचें कामीं वैद्य बुर्ली यांनीं डॉ. सावनूर यांना प्रथमपासूनच मदत केली आहे. डॉ. सावनूर यांनीं २।६।५३ सायंकाळीं ६ वाजेतों प्रुफ तपासण्याचें काम केलें त्याच रात्रीं त्यांचा विकार बळावून ता. ३।६।५३ [बुधवार] रोजीं सकाळीं ११ वाजतां त्यांची प्राणज्योत मावळली. अंतकालापूर्वी २ तास ते चांगले शुद्धींत होते.

तत्वज्ञानी धन्वन्तरी

गरीब रुग्णांचा धन्वंतरी, अडचणींत असणाऱ्यांचा सल्लागार, निराशेंत तत्वज्ञानाचा बोध करून आशेचा अंकुर निर्माण करणारा तत्वज्ञानी, यथाशक्ति आर्थिक मदत करणारा दाता, धार्मिक वृत्तीचा, समुद्रासारखा गंभीर असा हा सत्पुरुष आम्हांस अंतरला आहे. त्यांच्या निधनानें अखिल कर्नाटक व दाक्षिण महाराष्ट्र दुःखसागरांत लोटला गेला.

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डॉ. सावनूर यांनीं लिहिलेला
व
डॉ. जठार अँड सन्स, बेळगांव यांनीं
प्रसिद्ध केलेला

द्रव्यगुण व चिकित्साशास्त्रविषयक इंग्रजी ग्रंथ

A Hand Book of Ayurvedic Materia Medica

भाग १ ला

पृष्ठसंख्या ४००, किं. ट. खर्चासह ९ रु.

सुप्रसिद्ध डॉ. भडकमकर आपल्या प्रस्तावनेंत लिहितातः-" डॅाक्टर, वैद्य व वैद्यकाचे विद्यार्थी यांना द्रव्यगुणशास्त्राचा अभ्यास करण्यासाठीं क्रमिक पुस्तकाप्रमाणें उपयोगी पडणारा असा हा ग्रंथ आहे. "

मिळण्याचें ठिकाणः-वैद्यक ग्रंथ भांडार
नासिक

आयुर्वेद पत्रिकेनें प्रकाशित केलेले
पांच बहुमोल विशेषांक

१) प्राणाचार्य देवधरशास्त्री विशेषांक १ रु.
२) " ऐनापुरेशास्त्री " १ रु.
३) वै. अप्पाशास्त्री साठे " १ रु.
(शिल्लक नाहीं)
४) वै. त्र्यंबकशास्त्री (काशी) " १ रु.
५) वै. नीळकंठराव पटवर्धन (शिरसी) १ रु.

हे विशेषांक प्रत्येक चिकित्सक वैद्यानें आपल्या संग्रहीं अवश्य ठेवावेत व व्यवसायांत हरघडी त्यांचा सल्ला घ्यावा. आपल्या संग्रहीं नसल्यास आजच ॲडव्हान्स रक्कम पाठवून मागणी करा. (ट. खर्च वेगळा.) शिल्लक असलेल्या विशेषांकाच्या फारच थोड्या प्रति शिल्लक आहेत. मागाहून मिळणार नाहींत.

वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

" वैद्यक कोर्स करतांहि उपयुक्त ग्रंथ "

" नुकतीच आपलीं " इंजेक्शन-चिकित्सा " व " इंजेक्शन-विज्ञान " हीं पुस्तकें माझ्या वाचण्यांत आलीं आहेत. तेव्हांपासून आपणास एक अभिनंदनपर पत्र लिहिण्याची उत्सुकता मनांत आहे. खरोखर मी आतांपर्यंत याच शोधांत होतो. ती उणीव आपल्या पुस्तकानें निश्चित भरून निघेल असें वाटतें. मी येथें " मध्य-प्रदेश होमिओपॅथिक आणि बायोकेमिक डॉक्टर्स ट्रेनिंग इन्स्टिट्यूट " ही संस्था चालवित आहे. विद्यार्थ्यांकरतां आतांपर्यंत इतर ग्रंथांच्या ५०० कॉपीज बोलाविल्या. परन्तु आपलीं पुस्तकें आमच्या कोर्सकरतां ठेवावीं असें वाटावयास लागलें आहे. व म्हणून आपणांस हें पत्र लिहिलें आहे. तरी पत्र पहातांच आपण लिहिलेलीं इंजेक्शन-विज्ञान व इंजेक्शन-चिकित्सा, व बाकीचीं उपनेत्र-विज्ञान व श्रवणपरीक्षायंत्र हीं पस्तकेंहि त्वरित व्ही. पी. नें पाठविण्याची कृपा करावी. "

डॉ. आर. जी. नालमवार
फिजिशियन, सर्जन
आयू स्पेशालिस्ट, नागपूर

वरील ग्रंथ खालील ठिकाणीं मिळतील.
(१) सुबोध वैद्यक ग्रंथमाला- कागल (कोल्हापूर)
(२) वैद्यक ग्रंथ भांडार— नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गु. डॉ. सावनूर यांच्या
रोगवार आयुर्वेदीय औषधि योजना

१ पंडुरोग (Anaemia)

[१] मंडूरभस्म ·।· तोळा
प्रवाळभस्म ·।· ,,
गुळवेलसत्व ·।· ,,
१४ पुड्या रोज २ वेळां
सकाळीं ७ वा. व सायंकाळीं ५ वाजतां.
अनुपान— १ चमचा माका रस
+ २ चमचे मध.

(2) R/

Acid Glycrine pepsin	१ ड्रॉम
Tr. Nux Vomica	१० थेंब
Tr. Calumba	½ ड्राम
Tr. Gentine	½ ड्राम
Ex. Taraxaci Liq	१॥ ड्राम
Spt. Chloroform	१५ थेंब
Aqua	२ औंस

½ part after food

२ रक्तक्षीणता

[१] सुवर्णमाक्षिकभस्म ·।· तोळा
प्रवाळभस्म ·।· तोळा
मृगशृंग [सांधे] ·।· तोळा
३२ पुड्या.
वेळ- सकाळीं ८ सायंकाळीं ६ वाजतां.
अनुपान— मध.
[२] युनि-बी-कॉम्प्लेक्स १॥ चमचा.
भोजनोत्तर लगेच, पाण्यांतून, २ वेळां.
[३] अभयारिष्ट १॥ चमचा
द्राक्षारिष्ट १॥ चमचा
भोजनोत्तर १ तासानें [दुप्पट] पाण्यांतून
२ वेळां घेणें

३ अग्निमांद्य व रक्तक्षीणता

[Achlor— Hydria, Anaemia]
[१] Acid Gly. Pep. mixture
जेवणानंतर २ वेळां.
[२] लिव्हर एक्स्ट्रॅक्ट इंजेक्शन
दोन दिवसाआड १ प्रमाणें, ६ घेणें.
[३] सुवर्णराजवंगेश्वर ·।· तोळा
प्रवाळभस्म ·।· तोळा
१६ पुड्या. वेळ- सकाळीं ७ वा.
अनुपान— तूप + मध.

४ रक्तक्षीणता

[१] टेनोफर लिव्हर १॥ चमचा
भोजनोत्तर, पाण्यांतून, २ वेळां.
[२] ताप्यादि लोह ·।· तोळा
प्रवाळ ·।· तोळा
अभ्रक ८= ,,
सत्व ·।।· ,,
२८ पुड्या. रोज २ वेळां
वेळ- सकाळीं ७ व सायंकाळीं ६
अनुपान— मध

५ रक्तक्षीणता

[१] हेपॅटोग्लोबिन १॥ चमचा
जेवणानंतर, पाण्यांतून, २ वेळां.
[२] मधुमालिनीवसंत १॥ मासा
प्रवाळ ·।· तोळा
सत्व ·।· तोळा
सितोपलादिचूर्ण १ तोळा
धात्रीरसक्रिया ·।।· तोळा
२४ पुड्या
वेळ- सकाळीं ८ व सायंकाळीं ६ वाजतां
अनुपान— मध + पिंपळी १ गुंज यांतून घेणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६ रक्तक्षीणता

[१] लिव्हो बी कॉम्प्लेक्स १॥ चमचा
जेवणानन्तर, पाण्यांतून, २ वेळां.

[२] लोहभस्म ·।· तोळा
अभ्रकभस्म १॥ मासा
प्रवाळभस्म ·।· तोळा
बंगभस्म १॥ मासा
शिलाजित ·।· तोळा
३२ पुड्या
वेळः– सकाळीं ८ व सायंकाळीं ६
अनुपानः– मध + माकारस

७ अनार्तव [Amenorrhoea]

[१] सुवर्णराजवंगेश्वर ·॥· तोळा
अभ्रकभस्म ·।· तोळा
प्रवाळभस्म ·॥· तोळा
२४ पुड्या
वेळः– सकाळीं ७ व सायंकाळीं ५ वाजतां
अनुपानः– तूप + मध

(2) R/
Pulv. Aloin — gr. $\frac{1}{4}$
Pil. Alos Et. Ferri – gr. $\frac{1}{2}$
Pil. Alos Et. myrrh – gr. $\frac{1}{2}$
Pil. Alos Et. Asafoetida – gr. $\frac{1}{2}$
Ext. Caskara sagrada – gr. $\frac{1}{2}$
Ext. Ergot – gr. $\frac{1}{2}$
Ext. Nux Vomica – gr. $\frac{1}{4}$
Ext. Belladona – gr. $\frac{1}{6}$
Ext. Gentine – Q.S.
M.Ft. pill No. 1, one after each meal
भोजनोत्तर १ गोळी दिवसांतून २ वेळां

१ दमा (Asthma)

[१] महाकालेश्वर ·।· तोळा
मृगशृंग [कास] ·।· „
२४ पुड्या
वेळः– सकाळीं ८ व सायंकाळीं ५ वाजतां
अनुपानः– च्यवनप्राश

२ दमा

[१] युफोरबिया ग्रिंडेलिया मिश्रण
[२] श्वासकुठार ᳵ= तोळा
महाकालेश्वर ᳵ= तोळा
लक्ष्मीविलासगुटी ᳵ= तोळा
मृगशृंग [कास] ·।· तोळा
२४ पुड्या
वेळः– सकाळीं ७ व सायंकाळीं ५ वाजतां
अनुपानः– मध

३ दम्यानंतरची क्षीणता

[weakness after an attack of Asthma]

(१) एलिक्झियर एफेलिन–
जेवणापूर्वी पाण्यांतून १ चमचा २ वेळा.
(२) अभ्रकभस्म ᳵ= तोळा.
कांतलोहभस्म ᳵ– „
चौसष्टी पिंपळी ·।· „
मृगशृंग (कास) ·।· „
प्रवाळ भस्म ·।· „
२४ पुड्या
वेळ— सकाळीं ७ व सायंकाळीं ५ वाजतां
अनुपान– मध

दम्याच्या दोन उबळींमधील योजना

(treatment between attacks)

(१) व्हिटमॉल– भोजनानंतर पाण्यांतून
१ चमचा २ वेळा
(२) रससिंदूर ᳵ= तोळा
अभ्रकभस्म ᳵ= „
प्रवाळभस्म ·।· „
२४ पुड्या
वेळ– सकाळीं ८ व सायंकाळीं ६ वाजतां
अनुपान— मध.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दम्यानन्तरचें अग्निमांद्य
Anorexia after Asthmatic attack

(१) चतुर्मुखरस ८= तोळा
सत्व -॥- ,,
प्रवाळभस्म -।- ,,
२८ पुड्या
वेळ- सकाळीं ८ व सायंकाळीं ७ वाजतां
(२) व्हिटमॉल
दशमूलारिष्ट
प्रत्येकीं १ चमचा, पाण्यांतून २ वेळा, भोजनोत्तर.

---

१ अस्राभिनोदन (Blood pressure)

(१) रौप्य-सूतशेखर ८= तोळा
चंद्रकला -।- ,,
प्रवालभस्म -।- ,,
२४ पुड्या
वेळ:—सकाळीं ७ वा. व सायंकाळीं ५ वाजतां
अनुपान:— मोरावळा
(२) सोडियम् आयोडाइड-
६ इंजेक्शन्स (सप्ताहांत दोन)
(३) क्रुशेन सॉल्ट— सकाळीं
(४) बी-कॉम्प्लेक्स—
जेवणानंतर पाण्यांतून १॥ चमचा २ वेळा.
(५) सर्पिना २ गोळ्या झोंपण्यापूर्वीं.

अस्राभिनोदन व फुफ्फुसदौर्बल्य
Blood Pressure with weak lungs

(१) कॅल्सि-ऑस्टेलिन—
६ इंजेक्शन्स [सप्ताहांत दोन]
(२) कॉडलिव्हर ऑईल—
भोजनानन्तर
१ चमचा २ वेळा.

(३) एकांगवीर १॥ मासा
वातगजांकुश १॥ ,,
प्रवाळभस्म ३ माषे
गु. सत्व १॥ मासा
२४ पुड्या
वेळ- सकाळीं ७ व सायंकाळीं ५ वाजतां
अनुपान- मोरावळा.

---

३ अस्राभिनोदन व वृक्कदोष
Blood Presure + Derangement of Kidney

(१) चंद्रकला -।- तोळा
उन्हाळ्याचें औषध ·।· ,,
२४ पुड्या
वेळ— सकाळीं ७ सायंकाळीं ५ वाजतां
अनुपान— दूध साखर
(२) ॲस्कॉर्बिक ॲसिड— ५ सी. सी.
[5 c. c.]चीं चार इंजेक्शन्स
(३) माहेश्वरी चूर्ण -।- तोळा
ताप्यादिलोह ·।· ,,
धात्रीरसक्रिया -॥- ,,
प्रवाळ [चं. पु.] -।- ,,
२४ पुड्या झोंपण्यापूर्वीं १ पुडी
अनुपान — तूपसाखर

---

४ अस्राभिनोदन व पक्षघात

(१) एकांगवीर १ गुंज
वेळ:- सकाळीं ८ वा.
अनुपान:- मोरावळा
(२) चंद्रकला १॥ मासा
प्रवाळभस्म १॥ ,,
सूतशेखर (रौप्ययुक्त) ६ गुंजा
८ पुड्या सकाळीं ९
अनुपान:- दूध + साखर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१ मलेरियानंतरची क्षीणता
(Malarial chachexia)

(१) सिद्धलक्ष्मीविलास ·|· तोळा
गुळवेलसत्व ·|· तोळा
४८ पुड्या
रोज २ वेळा
सकाळीं ७ व सायंकाळीं ५ वाजतां
अनुपानः- मध

किंवा

(१) अभ्रकभस्म ८= तोळा
लोहभस्म ·|· तोळा
प्रवाळ भस्म ·|· तोळा
गुळवेल सत्व ·||· तोळा
२४ पुड्या
वेळ- सकाळीं ७ सायंकाळीं ५ वाजतां
अनुपानः- मध + पिंपळी २ गुंजा
(२) लोहमिश्रण
१ चमचा पाण्यांतून, भोजनोत्तर दोन वेळा.

---

१ ज्वरानंतरचा निद्रानाश
Insomnia-Weakness after Pyrexia

[१] अभ्रकभस्म ८= तोळा
ताप्यादिलोह ,, ,,
मृगशृंग [सार्धे] ·|· ,,
प्रवाळभस्म ८= ,,
२४ पुड्या
वेळा— सकाळीं ७ व सायंकाळीं ५ वाजतां
अनुपान— मोरावळा·पाक
[२] व्हॅलेरियनब्रोम—
१ चमचा, पाण्यांतून, झोंपण्यापूर्वी.

---

२ ज्वरानंतर यकृताचें अकार्यक्षमत्व
[sluggish liver after Pyrexia]

[३] कुमारी आसव नं. १
पुनर्नवासव
प्रत्येकीं १ चमचा,पाण्यांतून,भोजनोत्तर २ वेळां

[२] सुवर्णसूतशेखर ६ गुंजा
माक्षिकभस्म १२ ,,
प्रवाळभस्म ४॥ माशे
२४ पुडया.
२ वेळां. सकाळीं ७ व सायं. ५ वा.
अनुपान— मध

---

३ विषमज्वरानंतरची क्षीणता
Anorexia after malarial fever

(१) लघुमालिनीवसंत ·|- तो.
प्रवाळभस्म -|- तो.
पिंपळीचूर्ण -|- तो.
गुळवेल सत्व -|- तो.
१६ पुड्या
वेळां- सकाळीं ७ व सायंकाळीं ५वा.
अनुपान- मध.
(२) थायोसरमीनचीं ०·१५ चीं दोन इंजेक्शनें सप्ताहांत एक.

---

४ जीर्ण मलेरियांत देण्याचें मिश्रण
1 R/

Quinine Sulph—	९ ग्रेन
Mag. Sulph—	½ ड्राम
Ferri Sulph—	९ ग्रेन
Acid Sulphuric Dil—	२० थेंब
Liq. arsenicalis—	८ थेंब
Tr. Nux Vomica—	९ थेंब
Syp. Tolu—	१ ड्राम
Spt. chloroform—	½ ड्राम
Aqua—	३ औंस

1/3 Part T. D. S.

(२) ज्वरांकुश २ गुंजा
गुळवेलसत्व ६ गुंजा
२ पुड्या
वेळां- सकाळीं ७ सायंकाळीं ५ वा.
अनुपान- आल्याचा रस + मध

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५ अम्लपित्त

(१) अभ्रकभस्म १॥ मासा
प्रवाळभस्म ३ मासे
ताप्यादिलोह १॥ मासा
२४ पुड्या रोज एक पुडी सकाळीं ७ वाजतां.
अनुपान— दूध खडीसाखर.

(२) चंद्रकला ३ मासे
मौक्तिकभस्म १॥ मासा
रौप्यभस्म १॥ ,,
सूतशेखर [रौप्य] ३ गुंजा
२४ पुड्या वेळ सकाळीं १० व रात्रीं ९ वा.
अनुपान— मोरावळा-पाक

(३) लॅक्टोपेप्टीन गोळी-जेवणानन्तर

(४) डायजेस्टिनो- २ चमचे, पाणी ६ चमचे जेवणानन्तर वरील गोळीबरोबर घेणें.

---

६ अम्लपित्त

(१) अल्युड्रॉक्स- १ चमचा पाण्यांतून भोजनोत्तर दिवसांत २ वेळा

(२) अभ्रकभस्म १॥ मासा
वंगभस्म १॥ ,,
प्रवाळभस्म ३ मासे
शिलाजीत ३ ,,
गुळवेलसत्व ६ ,,
२४ पुड्या
वेळ- सकाळीं ७ व दुपारीं ४ वाजतां
अनुपान- तूप + मध

(३) प्रवाहीकल्प अश्वगंधा, सारिवा व पुनर्नवा प्रत्येकीं १ चमचा दुप्पट पाण्यांतून.
वेळ- सकाळीं १० व सायंकाळीं ६ वाजतां

---

७ अम्लपित्त व कुपचन

[Hyper acidity & Indigestion]

(१) सूतशेखर (सुवर्ण) ६ गुंजा
चंद्रकला ३ मासे
प्रवाळभस्म ३ ,,
मौक्तिक ६ गुंजा
२४ पुड्या
वेळ- सकाळीं ७ व सायंकाळीं ५ वा.
अनुपान- मोरावळा.

(२) लोहासव
विडंगारिष्ट
पुनर्नवासव
द्राक्षासव
प्रत्येकीं १ चमचा दुप्पट पाण्यांतून भोजनोत्तर दिवसांत दोन वेळा.

(३) शिलाजीत ॥ तोळा
२४ पुड्या. रात्रीं झोपण्यापूर्वी १ पुडी दुधाबरोबर.

---

८ अपचन व क्षीणता

[Indigestion & weakness]

(१) मिस्ट सोडी को.- दिवसांत तीन वेळां

(२) सुवर्णमालिनीवसंत -। तो.
प्रवाळभस्म -।- तो.
गुळवेलसत्व -॥- ,,
१६ पुड्या
१ पुडी सकाळीं अनशापोटी मधांतून घेणें.

प्रवाळ भस्म [लिंबूरस-भावित]
उत्तम पाचक व पौष्टिक कल्प
किंमत १ तोळा, ४ रुपये.
आयुर्वेद सेवा संघ, औषधीभवन, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजयक्ष्मा [T. B. Lungs]

(१) कोंबडीचें एक अंडें गार दुधांत, त्यांत पिंपळी ४ गुंजा व साखर मिसळून सकाळीं घेणें.

(२) इंजेक्शन— कॅल्सी ऑस्टेलिन 2 c. c.
व्हिटॅमिन 'सी' 2 c. c,
एक दिवसाआड १२ घेणें.

(३) कॉडलिव्हर ऑईल
१ चमचा, जेवणानन्तर दिवसांतून २ वेळा

(४) प्रथमचीं दोन सप्तकें—

अभ्रकभस्म	१॥ मासा
प्रवाळभस्म	-।- तो.
सुवर्णमालिनीवसंत	-।- ,,
गुळवेल सत्व	-॥- ,,
सितोपलादिचूर्ण	२ तो.

२८ पुड्या
वेळ— सकाळीं ७ व सायं. ५ वा.
अनुपान— मध

(५) अन्नपचनार्थ जरूरीप्रमाणें
मिस्ट सोडी को. घेणें.

(६) द्वितीय पक्ष (दुसरा पंधरवडा)

अभ्रकभस्म	ॅ= तो.
प्रवाळभस्म	·।- ,,
पूर्णचंद्रोदय	ॅ= ,,
गुळवेलसत्व	-॥- ,,
सितोपलादिचूर्ण	२ ,,

२४ पुड्या.
वेळ सकाळीं ७ व सायं. ५ वा.
अनुपान– मध

---

२ राजयक्ष्मा (फुफ्फुसक्षय)

(१) अभ्रकभस्म	ॅ= तोळा
प्रवाळभस्म	·।· ,,
पूर्णचन्द्रोदय	ॅ= ,,
सितोपलादिचूर्ण	२ ,,

२४ पुड्या.
वेळ— सकाळीं ७ सायं. ५ वाजतां
अनुपान— मध

---

३ यक्ष्मापूर्व Premonitory T. B.

(१) त्रिभुवनकीर्ति	-।- तो.
लघुमालिनीवसंत	·।- ,,
प्रवाळभस्म	-।- ,,
गुळवेलसत्व	-॥- ,,

२४ पुड्या
वेळः- सकाळीं ७ व सायंकाळीं ५ वाजतां
अनुपानः- मध

---

४ राजयक्ष्मापूर्वरूप
[Promonitory signs of T.B.]

(१) अभ्रकभस्म	ॅ= तो.
मृगशृंग [काथ]	·।· ,,
कपर्दिकभस्म	·।· ,,
चौसष्टीपिंपळी	ॅ= ,,

२४ पुड्या
वेळ— सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां.
अनुपान— मध

(२) कॅल्सी ऑस्टेलिन २ c. c.
व्हिटॅमिन 'सी' २ c. c.
एक दिवसा आड
१२ इंजेक्शन्स घेणें

---

५ राजयक्ष्मा पूर्वरूप

मृगशृंगभस्म	ॅ= तो.
प्रवाळभस्म	·।· ,,
पिंपळी	-।· ,,
पूर्णचन्द्रोदय	ॅ= ,,
अभ्रकभस्म	ॅ= ,,

२८ पुड्या
वेळ— सकाळीं ८ व सायं. ६ वाजतां
अनुपान— मध

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६ राजयक्ष्मा पूर्वरूप

अभ्रकभस्म	१॥ माषा
लोहभस्म	१॥ ,,
पिंपळीचूर्ण	-।- तोळा
मृगशृंगभस्म	-।· ,,
सत्व [गुळवेल]	-।- ,,
प्रवाळभस्म	-।- ,,

२४ पुड्या

वेळ-सकाळीं ८ व सायं. ६ वाजतां

अनुपान- मध.

(२) एन्जर्स एमल्शन- १॥ चमचा, पाण्यांतून जेवणानंतर. दिवसांत २ वेळा.

---

७ राजयक्ष्मा पूर्वरूप

(१) अभ्रकभस्म	१॥ माषा
सुवर्णभस्म	१ गुंजा
मृगशृंगभस्म	-।- तोळा
प्रवाळभस्म	-।- ,,
गुळवेल सत्व	-॥- ,,
पिंपळीचूर्ण	-॥- ,,

३२ पुड्या

वेळ- सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां

अनुपान - मध.

(२) एन्जर्स एमल्शन - १॥ चमचा, पाण्यांतून भोजनोत्तर. दिवसांत २ वेळा.

---

८ राजयक्ष्मा

(१) अभ्रक भस्म	६ गुंजा
पूर्णचंद्रोदय	१२ ,,
लक्ष्मीविलासरस	१२ ,,
प्रवाळ भस्म	६ मासे
चौसष्ट पिंपळी	६ ,,

२४ पुड्या

वेळ- सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां

अनुपान- मध.

(२) मंडूरभस्म	१॥ मासा
गुळवेल सत्व	३ मासे

१२ पुड्या

वेळ- दुपारीं ४ ला १ पुडी.

अनुपान- मध.

---

९ आंत्रस्थ-यक्ष्मा (Intestinal T. B.)

(१) R/

Acid Glycerine Pepsin	१ ड्राम
Tr. calumba	-॥· ड्राम
Tr. Nux Vomica	६ थेंब
Spt. chloroform	२० थेंब
Syp. Vasaka Et Tolu	२ ड्राम
Aqua	३ औंस

M. Ft. mist ½ part after food.

(२) नेओगॅडिन सल्फोग्वायकॉलसह- १॥चमचा,पाण्यांतून भोजनोत्तर १ तासानें

(३) सुवर्णपर्पटी	३ गुंजा
मौक्तिकभस्म	६ ,,
प्रवाळपंचामृत	१२ ,,
अग्निसूत	१२ ,,
लवंगादिचूर्ण	-॥· तोळा

२४ पुड्या

वेळ- सकाळीं ८ व सायं. ७ वाजतां

अनुपान- मध.

---

१० आंत्रस्थ राजयक्ष्मा

(१) रायसिल इंजेक्शन- एक दिवसाआड ६ घेणें.

(२) नेओगॅडिन- १॥ चमचा, पाण्यांतून जेवणानंतर. दिवसांत २ वेळा.

(३) कॅल्सिऑस्टेलिन गोळ्या- रोज ४ सकाळ संध्याकाळ दुधाबरोबर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(४) अभ्रक भस्म १॥ मासा
मौक्तिक भस्म १॥ ,,
प्रवाळ भस्म ३ मासे
पूर्णचंद्रोदय १॥ मासा
गुळवेल सत्व ३ मासे
सितोपलादि चूर्ण २ तोळे
२४ पुड्या
वेळ– सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां
अनुपान-- मध.

११ राजयक्ष्म्यांतील कुपचन
(Bad digestion in T. B.)

(१) सुवर्णभस्म १ गुंज
अभ्रकभस्म ५ ,,
शिलाजीत १० ,,
मृगशृंग [कास] १० ,,
मौक्तिकभस्म ५ ,,
गुळवेल सत्व ४० ,,
चौसष्ठीपिंपळी ४८ ,,
प्रवाळ २० ,,
३० पुड्या
वेळ– सकाळीं ७ व सायं. ६ वाजतां

(२) भृंगराजासव
अर्जुनारिष्ट
प्रत्येकीं १॥ चमचा, दुप्पट पाण्यांतून भोजनोत्तर

१ खोकला (Bronchitis)

(१) सुवर्णमालिनीवसंत -।- तोळा
प्रवाळ भस्म -।- ,,
गुळवेल सत्व -।- ,,
चौसष्ठीपिंपळी -॥- ,,
२८ पुड्या
वेळ– सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां
अनुपान— मध

२ जीर्ण खोकला (Chronic Bronchitis)

(१) अभ्रकभस्म १॥ मासा
वंगभस्म १॥ ,,
रससिंदूर १॥ ,,
प्रवाळ भस्म ३ ,,
सितोपलादि चूर्ण २ तोळे
२४ पुड्या
वेळ– सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां
अनुपान— मध

३ कास (Pharingitis)

(१) लोकनाथ १॥ मासा
तालिसादि ३ मासे
कट्‌फलादिचूर्ण ३ मासे
१२ पुड्या
वेळ– सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां

[2] R/
Pot chlor १५ ग्रेन
Tr. cinchona co ·॥- ड्राम
Mag. Sulph. १॥ ड्राम
Syp. Vasaka १॥ ड्राम
Spt. chloroform -॥- ड्राम
Aqua ३ औंस
M. Ft. mist 1/3 T. D. S.

४ श्वसनक-सान्निपातानंतरची अशक्तता
[Weakness after Pneumonia]

(१) अभ्रकभस्म १॥ मासा
ताप्यादि लोह १॥ मासा
सुवर्णमाक्षिक १॥ मासा
प्रवाळ भस्म ३ मासे
अश्वगंधादिचूर्ण १ तोळा
२४ पुड्या
वेळ– सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां

(२) फॉस्फोटोन
२ चमचे, पाण्यांतून जेवणापूर्वी दिवसांतून २ वेळा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५ फुफ्फुसावरणदाह [Pleurisy]

[1] R/

Ammon chlor	-॥- ड्राम
Vin Ipecac	-॥- ड्राम
Calcidin	४ ग्रेन
Ext. Gly. liq.	१॥ ड्राम
Syp. Vasaka	२ ,,
Spt. chloroform	·॥· ,,
Aqua	३ औंस

M. Ft. mist 1/3 T. D. S.

[२] अभ्रक भस्म	१॥ मासा
प्रवाळभस्म	३ मासे
पंचसूत	६ गुंजा
मृगशृंग [कास]	३ मासे
पिंपळी	६ मासे

२८ पुड्या

वेळ- सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां

अनुपान— मध

---

६ खोकला व भूक न लागणें
[Bronchitis & anorexia]

[१] सायरप ग्लिसरोफॉस्फेट	२ औंस
सायरप वसाका	४ ,,
दशमूलारिष्ट	४ ,,

मिश्रणापैकीं २ चमचे, पाण्यांतून.

वेळ— सकाळीं १० व रात्रीं १० वा.

[२] सुवर्णमालिनीवसंत	·।- तो.
प्रवाळभस्म	-।· ,,
पिंपळीचूर्ण	·॥· ,,
गुळवेल सत्व	-॥· ,,

२८ पुड्या

वेळ— सकाळीं ७ व सायं. ५ वा.

---

७ खोकला

[१] रससिंदूर	८१ तो.
आनंदभैरव (कास)	८२ ,,
पिंपळीचूर्ण	८२ ,,
तालिसादिचूर्ण	१ ,,
प्रवाळ [सू. पु.]	८२ ,,

१६ पुड्या

वेळ— सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां

---

८ कास १ (Pharyngitis)

(१) लोकनाथ (कास)	८२ तो.
तालिसादिचूर्ण	१ तो.

१२ पुड्या

वेळ — सकाळीं ७ व सायं. ५ वा.

---

९ कास (खोकला)

(१) सूतशेखर	२ गुंजा
लोकनाथ	१२ ,,
प्रवाळ	२४ ,,

१६ पुड्या

वेळ— दुपारीं ४ व रात्रीं ९ वाजतां.

(२) लिव्होजेन् १॥ चमचा, पाण्यांतून
जेवणानंतर दिवसांत २ वेळां

(३) माहेश्वरीचूर्ण	३ मासे
स्मृतिसागर	।॥- मासा
गुळवेल सत्व	६ मासे

१८ पुड्या

वेळ— दुपारीं ४ व रात्रीं ९ वा.

अनुपान— मध

श्वासरोगावरील नवीन उपयुक्त औषध
महाकालेश्वर रस
किंमत ८ रु. तोळा
आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१ स्मृतिभ्रंश (Insanity ?)

(१) स्मृतिसागर ३ माशे
अभ्रकभस्म ३ माशे
प्रवाळभस्म ६ माशे
२४ पुड्या
वेळ— सकाळीं ७ व सायं. ५ वा.
अनुपान— कोहळापाक

(२) माहेश्वरीचूर्ण ३ माशे
अनन्तमूळचूर्ण ३ माशे
प्रवाळभस्म ६ माशे
२४ पुड्या
वेळ— सकाळीं १० व सायं. ७ वा.
अनुपान— तूपसाखर

---

२ अपस्मार (Epilepsy)

[१] माहेश्वरी चूर्ण ३ माशे
शिलाजित ३ माशे
अनंतचूर्ण ३ माशे
३६ पुड्या
वेळ- सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां
अनुपान— तूपसाखर

(२) स्मृतिसागर १॥ माशा
ताप्यादिलोह १॥ माशा
प्रवाळभस्म ३ माशे
१६ पुड्या
वेळ- सकाळीं १० व रात्रीं ९ वाजतां
अनुपान- तूप + मध.

---

३ चित्तभ्रम (Nervousness)

(१) स्मृतिसागर १॥ माशा
महावातविध्वंस १॥ माशा
सूतशेखर [सु. युक्त] १॥ माशा
१६ पुड्या
वेळ- सकाळीं १० व रात्रीं ९ वाजतां
अनुपान- तूपसाखर

---

१ गृध्रसी (Sciatica)

(१) महारास्नादि काढा- १॥ चमचा
सोडियम आयोडाइड २ गुंजा
६ चमचे पाणी
याप्रमाणें दिवसांत २ वेळा भोजनोत्तर.

(२) महायोगराजगुग्गुळ १॥ माशा
हेमगर्भ ३ गुंजा
गुळवेल सत्व ३ माशे
२४ पुड्या
वेळ- सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां
अनुपान- मोरावळा.

---

२ गृध्रसी

[1] R/
Soda Saly ½ ड्राम
Soda bicarb १ ड्राम
Sodi Iodide ४ ग्रेन
Tripal Bromide ½ ड्राम
Syrup १॥ ड्राम
Aqua chloroform ३ औंस
m. ft. mist ⅓ T. D. S.

(२) महावातविध्वंस ६ गुंजा
हेमगर्भ ३ ,,
गुळवेल सत्व १२ ,,
१२ पुड्या
वेळ- सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां
अनुपान- मध.

शारीरिक व मानसिक दौर्बल्य
Neurasthenia & General Weakness

[1] R/
Tr. Valarian Ammon १॥ ड्राम
Tripal Bromide -॥- ड्राम
Spt. chloroform -॥- ड्राम
Syp Vasaka १॥ ड्राम
अश्वगंधारिष्ट २ ड्राम
Aqua ३ औंस
m. Ft mist. ⅓ T. D. S.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(२) स्मृतिसागर २ गुंजा
अश्वगंधाचूर्ण ८ ,,
१ पुड्या
वेळ- सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां
अनुपान- तूपसाखर.

---

२ शारीरिक व मानसिक दौर्बल्य
(Neurasthenia & General Weakness)

(१) ताप्यादिलोह १॥ मासा
अभ्रकभस्म १॥ मासा
प्रवाळभस्म ३ मासे
समशर्करचूर्ण २ तोळे
२४ पुड्या.
वेळ- सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां
अनुपान- मध.
(२) हेपॅटोग्लोबिन- १ चमचा, पाण्यांतून जेवणानंतर दिवसांत २ वेळा.
(३) मलशुद्धीकरितां जरुरीप्रमाणें झोपण्यापूर्वी घेणें.

---

३ पित्तज दौर्बल्य

[१] कॅलशियम् हायपो. फॉ. मिश्रण.
[२] सुवर्णमाक्षिक १॥ मासा
आरोग्यवर्धिनी १॥ मासा
प्रवाळभस्म ३ मासे
गुळवेल सत्व ३ मासे
१६ पुड्या रोज २ पुड्या तूपमधांत

---

४ सर्वांगदाह [Neuritis]

[१] सुवर्णमाक्षिकभस्म ३ मासे
प्रवाळभस्म ३ मासे
चंद्रकला ३ मासे
मौक्तिकभस्म १॥ मासा
२४ पुड्या.
वेळ- सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां.
अनुपान- लोणी + खडीसाखर.

---

५ सर्वांगवात
[Pain all over the the body]

[१] हेमगर्भ ॥। मासा
महावातविध्वंस ३ मासे
सुवर्णमाक्षिक ३ मासे
सूतशेखर १॥ मासा
प्रवाळभस्म ३ मासे
गुळवेलसत्व ६ मासे
१२ पुड्या
वेळ-- सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां
अनुपान— आल्याचा रस + मध.

---

६ मानसिक दौर्बल्य
(6 Nervous Debility)

[१] व्हेलरियन १ c. c.
+ कॅल्सिऑस्टेलिन २ c, c.
यांचीं ६ इंजेक्शन्स् घेणें. सप्ताहांत २ प्रमाणें.
[२] कॅलशियम् हायपो. फॉ. मिश्रण.
[३] ताप्यादिलोह १ मासा
प्रवाळभस्म ३ मासे
मृगशृंग [सार्ध] ३ मासे
८ पुड्या
वेळ- सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां
अनुपान- तूपसाखर

---

७ दौर्बल्य

[१] कॅलशियम् हायपो. फॉ. मिश्रण
[२] कॅल्सिऑस्टेलिन २ c. c.
+ सेलीन २c.c.
यांचीं ६ इंजेक्शनस् घेणें.
सप्ताहांत २ प्रमाणें
[३] लघुमालिनीवसंत १ मासा
प्रवाळभस्म ३ मासे
१२ पुड्या
वेळ- सकाळीं ७ ला १ पुडी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८ दौर्बल्य

(१) सोडा मिश्रण

(२) सुवर्णराज वंगेश्वर	३ माशे
शिलाजीत	३ माशे
प्रवाळ भस्म	३ माशे

१२ पुड्या

वेळ– सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां

अनुपान— तूप + साखर

९ मानसिक दौर्बल्य

[Nervous Debility]

(१) ताप्यादिलोह	३ माशे
पिंपळीचूर्ण	३ माशे
प्रवाळभस्म	३ माशे

१६ पुड्या

वेळ-- सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां

अनुपान-. तूप + मध.

(२) Dinner Pill-- (पुढें दिलेली)

जेवल्यावरोबर एक, रोज २

R/

Pulv Aloin	·।· ग्रेन
Calomel	·।· ग्रेन
Oil menthi	$\frac{1}{10}$ थेंब
Ext. Caskara Sagrada	·॥· ग्रेन
Ext Nux Vomica	·।· ग्रेन
Ext. Belladona	८= ग्रेन
Poda Phyli Resin	·॥· ग्रेन
Pulv. Ipecac.	·॥· ग्रेन
Ext. Gentine	Q.S.

m. ft. pill No 1

one after each meal

Twice a day

(३) वसंतकुसुमाकर	१॥ माशा
प्रवाळभस्म	३ माशे
गुळवेलसत्व	३ माशे

१६ पुड्या

वेळ– सकाळीं ९ ला १ पुडी

अनुपान– महाळुंग पाक.

१० कामदौर्बल्य

[Sexual Debility]

(१) सारिवासव

अश्वगंधारिष्ट

महारास्नादि काढा

प्रत्येकीं १ चमचा, दुप्पट पाण्यांतून. भोजनोत्तर २ वेळा.

[२] पुष्पधन्वा	१॥ माशा
त्रिवंगभस्म	१॥ माशा
गुळवेलसत्व	३ माशे

पुड्या १२

वेळ– सकाळीं ७ व सायंकाळीं ५ वा.

अनुपान– दूधसाखर अगर मध.

११ शुक्रधातु–दौर्बल्य

[Sexual Debility]

[१] मकरध्वज गुटी

१ गोळी सकाळीं ७ वाजतां मधांतून

[२] पॅरॅन्ड्रिन इंजेक्शन्स्

३ सप्ताहांत दोन

[३] अश्वगंधारिष्ट

२ चमचे पाण्यांतून भोजनोत्तर, २ वेळा

[४] च्यवनप्राश (अष्टवर्ग)

१ चमचा, झोंपण्यापूर्वी घेऊन दूध घेणें

१२ मानसदौर्बल्य

[Nervous Debility]

[१] मिनॅव्हिटॉल भोजनोत्तर २ वेळां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

[२] सूतशेखर १॥ माशा
प्रवाळ (सू. पु.) ३ माशे
चंद्रकला ३ माशे
गुळवेल सत्व ३ माशे
३२ पुड्या
वेळ- सकाळीं व ७ सायं. ५ वाजतां
अनुपान- मोरावळा
१५ दिवसानंतर खालील पुड्या घेणें.

[३] अभ्रकभस्म १॥ माशा
चंद्रकला ३ माशे
प्रवाळभस्म ३ माशे
ताप्यादिलोह ३ माशे
सुवर्णमाक्षिक भस्म ३ माशे
१२ पुड्या
वेळ- सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां
अनुपान- मोरावळा

(४) आस्वन
बी कॉम्प्लेक्स
प्रत्येकीं १॥ चमचा, दुप्पट पाण्यांतून

---

१३ धातुदौर्बल्य

(१) बेरिन १ c. c. +
कॅल्सिऑस्टेलिन १ c. c.
यांचीं ६ इंजेक्शन्स घेणें. सप्ताहांत तीन.

(२) आस्वन
बी कॉम्प्लेक्स
प्रत्येकीं १॥ चमचा, दुप्पट पाण्यांतून
भोजनोत्तर २ वेळां

(३) वसंतकुसुमाकर १॥ माशा
ताप्यादिलोह ६ ,,
प्रवाळभस्म ६ ,,
४८ पुड्या
वेळ- सकाळीं ७ व सायं. ५ वा.
अनुपान— मध

---

१४ मानसिक दौर्बल्य (वातजन्य)

(१) सोडामिश्रण तीन वेळा.

(२) वसन्तकुसुमाकर १ माशे
चन्द्रकला ३ ,,
प्रवाळभस्म ३ ,,
२४ पुड्या
वेळ— सकाळीं ७ व सायं. ७ वा.
अनुपान-- मोरावळा.

---

१५ उपदंशजन्य अशक्तता

(१) सार्सापरिला (डॉ. वामन गोपाळ)-
१॥ चमचा, पाण्यांतून भोजनोत्तर;
दिवसांत २ वेळा.

(२) अभ्रकभस्म १॥ माशा
वंगभस्म १॥ माशा
लोहभस्म १॥ माशा
शिलाजित ३ माशे
२४ पुड्या
वेळ- सकाळीं ७ व रात्रीं ९ वाजतां
अनुपान- च्यवनप्राश व दूध याजबरोबर.

स्त्रियांतील अल्पकामता

(1) R/ (Sexual Debility in Females)

Ferum Reductum	१ ग्रेन
Aloin	-।- ग्रेन
Ext. Damiana	-॥- ग्रेन
Ext. Coni	-।- ग्रेन
Ext. Cocii	-।- ग्रेन
वंगभस्म	१ ग्रेन
मकरध्वज	१ ग्रेन
Ext. Gentine	Q. S.

M. Ft. pill No 1
वेळ- सकाळीं ७ व सायंकाळीं ५ वाजतां
दुधाबरोबर २ वेळां

[२] एलिक्झियर एलेट्रिज--
२ चमचे, पाण्यांतून भोजनोत्तर; २ वेळा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गरोदरपणांतील अशक्तता

(१) लिव्हर + फॉलिक -
जेवणानंतर १ गोळी रोज २ वेळा.

(२) पाचक मिश्रण (पनवेल)- १॥ चमचा,
पाण्यांतून. दिवसांत २ वेळा.

(२) गर्भपालरस ३ मासे
कामदुधा ३ मासे
धात्रीरसक्रिया ६ मासे
३६ पुड्या
वेळ सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां
अनुपान- मोरावळा.

गरोदरपणांतील अशक्तता

(१) हिपोस्टॅन फोर्ट इंजेक्शन-
१ दिवसाआड ६ घेणें.

(२) लिव्हिप्लान ॥- चमचा
विन्हीप्लेक्स १ चमचा
६ चमचे पाण्यांतून जेवणानंतर.
दिवसांत २ वेळा.

(३) मंडूरभस्म ३ मासे
गर्भपालरस १॥ मासा
मधुमालिनीवसंत १॥ मासा
प्रवाळभस्म ४॥ मासा
मौक्तिकभस्म ३ मासे
२८ पुड्या
वेळ- सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां
अनुपान- मोरावळा.

वंध्यत्व (Stirilty)

(१) वंगभस्म ३ मासे
प्रवाळभस्म ३ मासे
शिलाजीत ३ मासे
मकरध्वज १॥ मासा
पूर्णचंद्रोदय १॥ मासा
३६ पुड्या.
वेळ- सकाळीं ७ व सायं. ५ वाज.
अनुपान- तूपसाखर.

श्वेत प्रदर (Leucorrhoea)

(१) पुष्पधन्वारस ३ मासे
प्रदरारिलोह ३ मासे
प्रवाळभस्म ६ मासे
२४ पुड्या
वेळ- सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां
अनुपान- दूध साखर.

गरोदरपणीं श्वेतप्रदर
[Leucorrhoea in Pregnancy]

[१] मधुमालिनीवसंत १॥ मासा
प्रदरादि ३ मासे
प्रवाळभस्म ६ मासे
१६ पुड्या
वेळ- सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां
अनुपान- मोरावळा.

(२) जेनेटोन- १ चमचा, पाण्यांतून.
भोजनोत्तर. दिवसांत २ वेळा.

बालकाचें यकृद्दौर्बल्य
[Sluggish liver in children]

(१) अमोनियम क्लोराइड मिश्रण ३ वेळा.
Ammoni chlori ५ ग्रेन
Sodii Sulph ४० ग्रेन
कुमारी आसव नं. ३ १ ड्राम
पुनर्नवासव ॥ ड्राम
Ext. Kalmegh liq. ॥ ड्राम
Spt. chlorform ८ थेंब
Aqua १ ड्राम
M. Ft. $\frac{1}{3}$ T. D. S.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

(२) मंडूरवटक १॥ मासा
गुळवेल सत्व ३ मासे
२४ पुड्या
वेळ– सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां
अनुपान– मध.

बालकांचा मृदूवस्थि विकार

(रिकेट्स्)

(१) ग्रिमाल्ट सायरप-- १ चमचा.
वेळ-- सकाळीं ७ व सायं. ५ वाजतां
(२) कुमारकल्याण ३ गुंजा
प्रवाळभस्म ३ मासे
३६ पुड्या.
रोज १ पुडी सकाळीं दुधांतून.

सुनबाहिरी

[१] सोडियम हिडनोकार्पेट इंजेक्शन– सप्ताहांत २ प्रमाणें १२ घेणें
[२] महामंजिष्ठादि काढा
खादिरादि काढा
प्रत्येकीं १॥ चमचा, दुप्पट पाण्यांतून भोजनोत्तर
[३] कैशोरगुग्गुळ— सकाळीं २ गुंजा मधांतून घेणें
[४] महामरिच्यादि तैल अंगास चोळणें.

डॉ. काणे यांचें
होमिओपॅथिक चिकित्सापद्धति
पुस्तक किं. २॥, रु. ट. ख. १ रु. निराळा
"प्रसिद्ध होमिओपाथ्सकडेहि मिळतें."
वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

खुलासा

या औषधी-योजनांत औषधींचीं वजनें दर्शविण्यासाठीं पुढील खुणा वापरल्या आहेत.

१ तोळा	=	९६	गुंजा	=	१२	मासे
-॥-	,,	= ४८	,,	=	६	,,
-।-	,,	= २४	,,	=	३	,,
ऽ=	,,	= १२	,,	=	१॥	मासा
ऽ२	,,	= ,,	,,	=	,,	,,
ऽ-	,,	= ६	,,	=	-॥।-	मासा
ऽ१	,,	= ,,	,,	=	,,	,,

मधुमेही रोग्यासाठीं उपयुक्त औषध
शिलाजत्वादिवटी
सध्यां मधुमेही लोक असाणाभरडीचें पाणी नित्य सेवन करूं लागले आहेत व त्यामुळें त्यांना फायदाहि होत आहे. आयुर्वेदानें जुनाट मधुमेही रोग्यांनीं क्रमानें ४०० तोळे शिलाजतु सेवन करावा असें सांगितलें आहे.

मधुमेही रोग्याचे मेदादि धातु बलवान् करण्यासाठीं शिलाजतु-आदिवटी हा उपयुक्त कल्प आहे. त्रिवंगभस्म, कडूनिंबाच्या वाळविलेल्या पानांचें चूर्ण, गुडमार-चूर्ण, शिलाजतु, व सुवर्णभस्म हीं औषधें या वटीमध्यें असतात.

लघवीला अधिक प्रमाणांत होणें, व लघवींतून साखर जाणें या विकारावर या गोळ्या उपयुक्त व अनुभविक आहेत.

आयुर्वेद सेवा संघ, नाशिक

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डॉक्टरांचें मेडिकल रजिस्टर

अद्यावत् राखण्यासाठीं १९१२ च्या ॲक्टांत दुरुस्ती

डॉक्टरांचें मेडिकल रजिस्टर अद्यावत् राखण्या-साठीं त्यांत सुधारणा करण्याच्या उद्देशानें १९२२च्या मुंबई मेडिकल ॲक्टांत दुरुस्ती करण्यांत येणार आहे.

मेलेले चिकित्सक रजिस्टरमध्यें

सध्या डॉक्टरांच्या मेडिकल रजिस्टरची सुधा-रणा करण्याचें काम मेडिकल कौन्सिलच्या रजिस्टरकडे सोंपविण्यांत आलें असून रजिस्टर्ड वैद्यक व्यवसायींवर त्यासंबंधीं कोणतीहि जबाबदारी नसल्यामुळें मृत झालेल्या रजिस्टर्ड वैद्यक व्यवसायींचींहि नांवें या रजिस्टर मध्यें आढळतात.

दर ५ वर्षांनीं नवा अर्ज करावा

सदरहू दुरुस्तीचा मसुदा मुंबई सरकारच्या ता. १६ जुलैच्या गॅझेटमध्यें प्रसिद्ध झाला असून त्या अन्वयें रजिस्टर्ड वैद्यक व्यवसायींना दर पांच वर्षांनीं आपलें नांव सदरहू रजिस्टरवर चालू ठेवण्यासाठीं नवा अर्ज करावा लागेल. कौन्सिलनें नेमून दिलेल्या तारखेच्या आंत एखाद्या वैद्यक व्यवसायीनें असा अर्ज न पाठविल्यास त्याचें नांव रजिस्टरमधून काढून टाकण्यांत येईल. तथापि खास फी भरून सहा महि-न्यांत पुन्हां नांव नोंदविण्याची तरतूदहि करण्यांत येईल.

डॉक्टरांची रजिस्ट्रेशन फी ५० रु.

त्याचप्रमाणें कौन्सिलचा खर्च भागविण्यासाठीं या नव्या दुरुस्ती अन्वयें रजिस्ट्रेशन फीहि वाढवि-ण्यांत यावयाची असून ती १५ रुपयाऐवजीं ५० रुपये करण्यांत येणार आहे. कौन्सिलचा खर्च स्वतः कौन्सिल भागवू शकत नाहीं, व सुमारें ७५ टक्के खर्चाइतकी रक्कम दरसाल सरकार ग्रँटच्या रूपानें देते.

त्याचप्रमाणें भारताचे नागरिक नसलेल्या लोकांचीहि विशिष्ट अटीवर नोंद करण्याची तरतूद या बिलान्वयें करण्यांत येणार आहे.

दिवाणी कोर्टाचे अधिकार

सदरहू कायद्याखालीं चौकशी करण्यासाठीं मेडिकल कौन्सिलला दिवाणी कोर्टाचे अधिकार देण्यांत येणार असून अशी चौकशी ही ज्युडिशियल प्रोसि-डिंग्ज म्हणून समजली जाईल अशीहि तरतूद करण्यांत येणार आहे. तसेंच न्यायालयांत मेडिकल रजिस्टर हें पुरावा म्हणून समजलें जावें अशीहि तरतूद करण्यांत येणार आहे. —सरकारी पत्रक

[आयुर्वेदाच्या बोर्डाला एक दिडकीहि मुंबई सरकारनें आतांपर्यंत दिली नाहीं व दरतीन वर्षांनीं ५ रु. फी मात्र लादली आहे. डॉक्टर व वैद्य यांच्या-कडे पाहण्याचा सरकारचा दृष्टिकोन असा आहे. —संपादक]

फलसर्पींच्या औषधापासून तयार केलेलें

फलासव

वाग्भटांत उत्तरस्थानांत गुह्यरोग प्रति-षेधाध्यांत शेवटीं योनिशुक्रप्रदोषावर 'फलसर्पि' नांवाचा घृतकल्प सांगितला आहे.

हल्लीं तूप घेण्याची प्रथा कमी झाली आहे व कफमेदप्रकृति लोकांना असले घृत-कल्प मानवत नाहींत. त्यांचें स्थौल्य वाढवितात. म्हणून फलघृताच्या औषधांपासून हें आसव बनविलें आहे.

शुक्रार्तवदोषामुळें संतति न होणाऱ्या स्त्री-पुरुषांना हें फलासव दोषानुरूप विचारानें वापरून परिणाम नोंदवावयाचे आहेत. वापरू इच्छिणाऱ्यांनीं पत्रव्यवहार करावा.

आयुर्वेद सेवा संघ, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्लड प्रेशर [अस्राभिनोदन] चें आयुर्वेदांतील स्थान

[डॉ. एच्. व्ही. सावनूर, एल्. एम्. एस्. यांनीं 'अस्राभिनोदन' (Blood Pressure) या विषयावर इंग्रजींत निबंध लिहिला होता त्याचा अनुवाद.]

'अस्राभिनोदन' या रोगलक्षणानें अलीकडील सुशिक्षितांचें बरेंच लक्ष वेधलें आहे. करितां डॉक्टर व आर्यवैद्यकानें यांजकडे लक्ष देऊन त्यास इतकें महत्त्व कां दिलें जातें त्याचा विचार करणें जरूर आहे. अस्राभिनोदन हा व्याधि नसून लक्षण आहे. प्राकृत व व्याधिग्रस्तावस्थेंत त्याचा नेहमीं चढ उतार असतो. हृदया[Heart]ची सुप्तशक्ति मोठी असते.

मॅनोमीटर वापरण्याचा मोह

रक्तवहस्रोतसांतील [Arteries] रक्ताचा दाब प्राकृत असण्यास बहुविध करणें असतात, म्हणूनच' शरिरांत चालू असलेल्या सूक्ष्म विकृत कार्यांचा (pathological Processes) बोध मॅनोमीटर (रक्तदाब मोजण्याचें यंत्र) च्या सहाय्यानें प्रतीत होणार नाहीं. कांहीं वेळा मॅनॉमिटरच्या साहाय्यानें मिळविलेली एकांगी माहिती अत्यंत उपयुक्त असल्याकारणानें तें यंत्र नेहमीं वापरण्यास मोह होतो. हें यंत्र योग्य रुग्णांतच वापरिलें जाईल याची दक्षता घ्यावी लागते. अस्राभिनोदनाच्या परीक्षेचें महत्व जाणून ते स्थिर, अस्थिर अगर गतिमान Progressive आहे, यांजकडे दुर्लक्षून मॅनोमीटरचा उपयोग केल्यास त्यापासून प्राप्त होणाऱ्या माहितीनें विचाराचा गोंधळ होण्याची शक्यता आहे.

पूर्वाचार्यांचें सूक्ष्म निरीक्षण

शारीरिक व्यापारांतील समता राखून शरीरोष्मा ज्या शक्तीनीं राखिला जातो त्याचें ज्ञान, पूर्वाचार्यांना त्यांचेकडे मॅनॉमीटरसारखीं यंत्रें नसतांहि, असल्याकारणानें अस्राभिनोदन अजमावतां येत होतें. निरनिराळ्या परिस्थितींत रुधिराभिसरणाचा वेग व दाब कां बदलत असतो ह्याचें ज्ञान पूर्वाचार्यांना सूक्ष्म निरीक्षणाच्या अभ्यासानें होत असे. हृदय [Heart] रक्तवाहिन्यांचें मुख्य केन्द्र असून तेथूनच रक्तवाहिन्या [Arteries] निघून सर्व शरीरांस रक्ताचा पुरवठा करितात, यांची माहिती त्यांना चांगली होती. श्वसनेंद्रियाच्या व रुधिराभिसरणाच्या अन्योन्य आश्रयाचें ज्ञान त्यांना होतें. भोजन, निद्रा, व्यायाम धक्का [Shock], व ज्वर या अवस्थांत नाडीच्या गतींत जे बदल दिसून येतात त्याचा अभ्यास त्यांनीं उत्तम तऱ्हेनें केला होता. हृदयाच्या व रक्तवाहिन्यांच्या स्नायूंचा व चेतनांच्या ज्ञानाचा उपयोग रुग्णांच्या रोगपरीक्षणांत केला जात असे.

बिनचूक प्रमेयें

त्यांचा न्यायशास्त्राचा [Logic] अभ्यास झाला असल्यामुळें मानव शरीराचें निरीक्षण करीत असतां त्यांनीं काढिलेलीं प्रमेयें बिनचूक असत. पाश्चिमात्य शास्त्रज्ञांचें जुनें लिखाण पाहिल्यास, पूर्वाचार्यांची निरीक्षण पद्धति हल्लींच्या (modern) पद्धतीहून वेगळी होती असें स्पष्ट दिसून येते. पाश्चिमात्य शास्त्रज्ञांच्या विचारांत क्रांति होऊन त्यांनीं आपल्या शास्त्रांत सुधारणा घडवून आणिल्या आहेत. तर पौर्वात्यांच्या विचारांत बदल झालेला नाहीं ही गोष्ट दिसून येते. दोन्ही शास्त्रज्ञांनीं आपापलीं प्रमेयें ज्या मूलभूत तत्वावर आधारिलीं तींच विभिन्न आहेत. पूर्वाचार्यांनीं निसर्गाचा अभ्यास व्यापक दृष्टीनें केला आहे. न्याय, वेदांत, व वैशषिक यांचे सर्वच सिद्धांत न घेतां आध्यात्मिक दृष्टीनें निसर्गाकडे पाहिल्यामुळें सेंद्रिय व निरिंद्रिय सृष्टीची उपपत्ति त्यांना लावितां आली. या तऱ्हेच्या निरीक्षणामुळें सेंद्रिय व निरिंद्रिय सृष्टीस सामान्य बैठक निश्चित करून पुढील सर्व उपपत्तीचें स्पष्टीकरण केलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोन दृष्टिकोनांतील भेद

ही बैठक म्हणजे जगांतील सर्व वस्तुजात कांहीं सामान्य एकत्वानें भरलेलें आहे, ही होय. हें एकत्व म्हणजेच पांचभौतिक सिद्धांत होय. या सिद्धांतानेंच निसर्गांतील सजीवाणूंचें रूपांतर, सजातीयता व विजातीयता तसेंच मानवशरीरांतील क्रिया यांचा उलगडा होऊं शकतो. या बाबतींत चरकांचा उतारा पाहण्यासारिखा आहे. "पुरुषोऽयं लोकसंमितः षड्धातवः समुदिताः पुरुषशब्दं लभंते". जगतांतील वस्तुजाताकडे रचनात्मक (Synthetic) दृष्टीनें पाहण्याचा आयुर्वेदकारांचा कल आहे, तर पाश्चात्यांचा विभजनात्मक (Analytic) दृष्टीनें. जीवनाकडे पाहण्याच्या या विसदृश प्रथेमुळेंच जीवनव्यापारांतील निरनिराळ्या नियंत्रणशक्तींचा शोध घेत असतां निरनिराळे शब्दप्रयोग (Nominclature) उपयोगांत आणिले गेले. जसें–आत्मशक्ति(Soul-force), मन व शरीर.

त्रिदोषांचें कार्यकारित्व

आयुर्वेदकाराप्रमाणें गर्भाची घडण, आत्मा, व पांचभौतिक (मूलद्रव्यें) द्रव्यांनींच होत असते. पुंबीजांतच आत्म्याच्या शक्तीचा प्रादुर्भाव असल्यामुळें तें स्त्रीबीजाकडे जातें. व स्त्रीबीजाशीं एकजीव होतें. आत्म्याची शक्ति महावातांत दृग्गोचर होते. या पुंबीजाच्या गतीला पाश्चिमात्य शास्त्रज्ञ त्याच्या शेपटीची गति मानितात. गर्भाची उत्क्रांति चालू असतां जें विभजन होतें ती क्रियाहि वाताचे प्रभावानें होत असते. हें आयुर्वेदाचें मत आहे. गर्भधारणेपासून तों तो पूर्णदशेस—मानव—देह येईतों त्रिदोषांचें कार्यकारित्व चालू असतें.

प्राथमिक सामान्य प्रेरणा

शरीराच्या अस्वास्थ्यावस्थेंतील विकृति व्यापारवर्णनांतहि दोष हाच शब्दप्रयोग वापरला आहे. "कुपितानां दोषाणां शरीरे परिधावताम्। यत्र संगः स्ववैगुण्यात् व्याधिस्तत्रोपजायते ॥" ही सुश्रुताचार्यांची व्याख्या आहे. वरील अवतरणांतील दोष हा शब्द 'वात, पित्त, कफ' या प्राथमिक एकत्र प्रेरणेचाच निदर्शक आहे. हृद्विकार, अस्थिभिनोदन व रक्तवाहिन्या [artery] यांच्या विकृतींचें वर्णन दोषाच्या सहाय्यानें करितां येते. इंद्रियाच्या घडणींतील विकृति (Structural change) वर्णनाकडे विशेष भर न देतां त्या विकृतीस कारणीभूत असे रासायनिक (Chemical) व वातसंस्थेंतील (Nervous mechanism) फरकाकडे लक्ष वेधणें हेंच आयुर्वेदाचें वैशिष्ट्य होय. स्थानविकृती-(Morbid Anatomy) पेक्षां दोषविकृती-[morbid processes] सच जास्त महत्व दिलें जातें. शल्यतंत्रांतील व्रणसंसर्गाचे वर्णनांत चरकाचार्यांनीं एरिसिपेलस व टेटॅनस यांचें केलेलें वर्णन, एक उदाहरण म्हणून पहातां येईल. संसर्ग म्हणून वर निर्देशिलेल्या दोन्ही व्याधींचीं लक्षणें, जरी त्यांचे जंतु त्यांनीं पाहिले नसले तरी, त्यांना ज्ञात होतीं.

शरीरशास्त्राचें ज्ञान

रोगपरीक्षा व त्यावरील अचूक उपचार-

सांडू
टोमॅटो कम्पाउन्ड
•व्हिटॅमिनयुक्त टॉनिक
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्सः– बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते–मे. पेंढारकर अँड को. मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...ज्ञाति समजण्या इतपत पूर्वाचार्यांना शरीरशास्त्राचें ...ज्ञान होतें. होलें यानें शरीरविच्छेदन (Dissection) ...तावर ग्रंथ लिहून, खिस्तपूर्व ६०० वर्षें होऊन ...गेले चरक व सुश्रुत यांना शरीर-विच्छेदनाची माहिती होती, असें सिद्ध केलें आहे. त्यांना हाडें, ...धि, लिगॅमेंट, व्हेन्स, नर्व्ह, ऑर्टरी, लिंफॅटिक शिरा, ...ल इंद्रियें, अंतस्त्वचा, त्वचा याचें ज्ञान चांगलें ...वगत होतें. गर्भप्रकरण अध्याय वाचनीय आहे. चरक व सुश्रुत यांच्या ग्रंथांचें अवलोकन केल्यास ...म इंद्रियाविकृति (Finer Pathology) व निश्चित उपचारपद्धति या विषयांचें त्यांचें ज्ञान, मति गुंग ...णारें आहे. चरकाच्या विमानस्थानांतील खालील अवतरणावरून त्याची प्राचिति येईल. 'अमुना एव ...र्थेन एके महर्षयः श्रोतसामेव समुदयं पुरुषमिच्छंति ...गतत्वात् सर्वसरत्वात् च दोषप्रकोपप्रशमनानाम्।' मानवशरीर निरनिराळ्या अणूंच्या अवयवांचा व स्रोतसांचा समुदाय आहे हें जाणत होते. तसेंच अणु (cell) समुदायापासून स्रोतसांची रचना झाली ...सून त्यांच्या शोषण, पोषण, उत्सर्जन व सृजन ...र्यांची त्यांना उत्तम जाणीव होती.

शरीरक्रियांचें सूक्ष्म ज्ञान

ज्या शरीरावयवांत (घटक) विकृति उत्पन्न होईल अशांचा नामनिर्देश खालील अवतरणांत पहावयास सापडतो. 'स्रोतांसि शिरा धमन्यः रसवाहिन्यः नाड्यः पंथानः मार्गाः शरीरच्छिद्राणि संवृतानि स्थानानि आशयाः निकेताश्चेति शरीरधात्ववकाशानां लक्ष्याऽलक्ष्याणां नामानि भवंति।" ब्रेन, हार्ट, लंग अशीं नांवें न देतां आपल्या ओघवती वाणीनें संप्राप्तिनिर्देश वर्णिला आहे. आचार्यांचीं अवतरणें देऊन त्यांच्या ज्ञानाचें वर्णन मला करावयाचें नसून त्यांना शरीरक्रियांचें [Physiology] सूक्ष्म ज्ञान होतें व त्यांत झालेला बिघाड उत्तम रीतीनें जाणत असत, एवढेंच दाखवावयाचें आहे. हार्ट, लंग, ब्रेन इत्यादि इंद्रियांची शरीरघटक [Anatomical Structure] दृष्ट्या फारशी माहिती (आधुनिक दृष्टीनें पाहता) नसली तरी त्यांच्या क्रियांचें शरीरधारणेच्या दृष्टीनें असलेलें त्यांचें ज्ञान विलक्षण आहे.

अस्राभिनोदनांतील विकृतदोष

अस्राभिनोदनाच्या विषयाचा विचार करितांना हार्ट, रक्तवाहिन्या [Arteries] व स्वयंचालित वातसंस्था (Autonomous Nervous System) याचा विचार अत्यंत जरूर आहे. आयुर्वेदाचार्यांना, वरील सर्व इंद्रियांच्या घडणीची व कार्याची, चांगली माहिती होती एवढेंच नव्हे तर त्या माहितीचा उपयोग व्याधिविनिश्चितीकडे करीत असत. अष्टविध परीक्षेत नाडीपरीक्षेचा समावेश होतो. पूर्वाचार्यांनीं नाडीपरीक्षेवर १०-२० ग्रंथ लिहिले आहेत. वेगवेगळ्या रोगांत नाडीची गति, दाब व मंदत्व कसे उद्भवतात याचें वर्णन वरील ग्रंथांत पहावयास मिळतें. अशा ग्रंथाचे आधारें या विषयाचे आधुनिक दृष्ट्या संशोधनाचा उपक्रम होणें अत्यंत जरूरीचें आहे.

(१) हार्ट फोर्स-प्राणवायुनियमन.

(२) रक्तवाहिन्यांच्या संकोचविकासाचा रक्ताच्या गतीवर होणारा परिणाम, शरीरांत सर्वत्र केशवाहिन्यापर्यंत-होणारा प्रतिकार-रक्तवहस्रोतांसि

(३) रक्ताचें प्रमाण व घनत्व-रक्त

(४) केशवाहिन्यांच्या आकुंचनावर रासायनिक द्रव्यांचें उत्तेजन- पित्तकफ

शरीराची व्याख्या एक वाक्यांत

वात, पित्त, कफ या आयुर्वेदाच्या मूलभूत तत्वाविषयीं, विषयग्रहणाचे दृष्टीनें, थोडक्यांत विवरण करतो. मानवशरीराचे अस्तित्वास शरीर, इंद्रिय, मन व आत्म्याची शक्ति (Soul force) याची जरूरी आहे. आत्म्याच्या शक्तीला, आत्मा, कर्ता, कारण, द्रष्टा, धाता, ब्रह्मा, विश्वरूप, नित्य, जीव, इंद्रियात्मा, चेतनावान् (चरक) नांवें आहेत. आपल्या शरीरांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जें आत्मतत्व आहे त्याचा उल्लेख "स्वभाव! ईश्वरः कालः यदृच्छा," वगैरे जगताचे दृष्टीनें केला जातो. सुश्रुत युक्तिवादपटु असल्यानें त्यांनीं शरीराची व्याख्या एका वाक्यांत केली आहे. "शरीरं नाम चेतनाधिष्ठानभूतं पंचमहाभूतविकारसमुदायात्मकम्". मानव शरीर म्हणजे आत्म-तत्व (आत्मा) व पांच भौतिक तत्वांनीं बनविलेला कोश होय. पृथिवी तत्व, अर्थांत उपलब्ध असतें, आकाशाचें तत्वांत-अवकाश वाढ होतें. मानवशरीरांत वात, पित्त, कफ यांची उत्पत्ति वायु, तेजस् व आप् या मूल शक्तिमान् द्रव्यापासून होते. शरीरस्वास्थ्यांतील व विकृतींतील सर्व क्रिया या त्रयींकडूनच होत असतात. शरीरवाढीचे कार्य होत असतां या त्रयीस 'धातु' अशी संज्ञा व विकृतींत 'दोष' अशी संज्ञा दिली जाते.

तीन धातु व सप्त धातु

शरीरांतील सप्तधातु व त्रिधातु हे एक नव्हत. त्रिधातु शरीराच्या प्रकृतावस्थेंत (स्वस्थ) त्यांचें पोषण करितात; करितां त्यास धातु असें म्हणतात. तर विकृतावस्थेंत त्यांना त्रिदोष असें संबोधिलें जातें. सप्त धातूंचें पोषण व संवर्धन त्रिधातूंमुळें होत असतें. असात्म्यसेवनानें अगर कांहीं आकस्मिक कारणानें त्रिधातूंत बिघाड होऊन त्यांचें रूपांतर त्रिदोषांत होते. सप्तधातु व मल यापेक्षां त्रिदोष उच्चस्थ असून ते जन्ममरणास कारणभूत होतात. "वातपित्तकफा एव देहसंभवहेतवः। तदेभिः शोणितचतुर्थैः संभव-स्थिति-प्रलयेषु अपि अविरतं शरीरं धार्यते'॥ सर्जन सुश्रुत यांना प्रत्यक्ष व्यवहारांत रक्ताशीं संबंध येत असल्यामुळें त्याचा नामनिर्देश करून केवळ शरीरपोषणास त्याची उपयुक्तता असल्यामुळें त्रिदोषांचे मानानें शोणितास दुय्यम महत्व दिलें आहे. त्रिदोष रक्तप्रवाहांतून सर्व शरीरांत संचारत असून त्याचे द्वारा पोषण, उत्सर्जन व जनन या शारीरिक क्रिया सुव्यवस्थित चालू असतात. 'वातपित्तकफा देहे सर्वस्रोतोनुसारिणः'। (चरक)

सप्तधातूंचे नित्य व्यवहार

सप्तधातूंचे नित्य व्यवहार त्रिदोषावांचून होणेंच शक्य नाहीं. या वीर्यवान् त्रयीपासूनच सप्त धातूंच्या कार्यास चालना मिळत असते. दोषांचे पृथक्त्व दाखवित करणें केवळ अशक्य. "तत्रास्थिनि स्थितो वायुः पित्तं तु स्वेदरक्तयोः। श्लेष्मा शेषेषु।" आत्म्याबरोबरच त्रिदोष गर्भांत प्रवेश करून गर्भावक्रांति घडवून तो पूर्णत्वास नेतात. या त्रिदोषांचे योगेंच स्नायु, रक्त व नर्व्ह सेल हे पृथक्त्वानें दृग्गोचर होतात. कांहीं शास्त्रज्ञ या सर्व क्रियांस निसर्ग अशी विशाल संज्ञा देतात. त्या निसर्गांतहि सत्व, रजः व तमः या तीन शक्तींचा समावेश होऊन त्यांतूनच पंचमहाभूताची उत्पत्ति आहे. प्राकृत व विकृत शरीरावस्थेंत त्रिदोषांच्या प्रत्यक्ष संबंध येत असल्यामुळें आयुर्वेदांत त्याचे विशेष महत्व गणिलें गेलें आहे. रक्तोत्पत्ति व त्याची प्राकृतावस्था त्रिदोषानेंच राखिली जात असते. यास्तव शोणिताहूनहि त्याचें अधिक महत्व आहे.

उज्वल कीर्ति

आयुर्वेदीय औषधांची उज्वल कीर्ति बनविलेल्या सिद्ध औषधांच्या गुणावर आहे. औषधें गुण देणारीं असतील तर कीर्ति नेहमीं उज्वल राहील. तरी अशीं गुण देणारीं औषधें, असल ताजी व स्वच्छ घटक औषधी द्रव्यें खरेदी करण्यावर अवलंबून आहे. औषधी द्रव्यासाठीं आपण

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स

पायधुनी, मुंबई नं. ३

फोन नं. (३१८५८) यांचेकडे मागणी करा.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधींचें

मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात.

अधिक माहितीसाठीं कॅटलाग मागवा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्रिदोषामुळेंच रक्ताचे प्रकार

रक्तदानाचे वेळीं रक्ताचे जे निरनिराळे प्रकार दिसून येतात त्याचें कारणहि त्रिदोषच होय. दूषित अन्नसेवनानें या त्रिदोषांचे मध्यस्थीनें रक्त दूषित होऊं शकते. 'दोषा दुष्टा रसैर्धातून् दूषयंति उभये मलान्', वरील विवेचनावरून त्रिदोषांचें शरीर-व्यापारांत किती महत्व आहे हें जाणता येतें. निसर्गा-तील पंचमहाभूतापासून त्रिदोषांस शक्ति मिळून शरीरकार्यार्थ त्यांचा उपयोग होतो. शरीरांतील चेत-नेच्या (आत्म्याच्या) सान्निध्यानें त्रिदोषांना गति व विद्युत्शक्ति प्राप्त झाली आहे. याविरुद्ध जगतांतील इतर वस्तुजात पांचभौतिक असल्यातरी चेतना-विहीनत्वामुळें निरिंद्रियत्व प्राप्त झालें आहे. त्रिदोष शब्दप्रयोग सजीव व निर्जीव पदार्थवर्णनांत विशिष्ट अर्थानें उपयोगांत आणिला जातो, तर पांचभौतिक हा शब्दसमुच्चय सर्व साधारण रीतीनें उपयोगितात.

वात ही मुख्य नियंत्रक शक्ति

या त्रिदोषांपैकीं वात ही पित्तकफास नियंत्रण करणारी मुख्य शक्ति असून पित्त व कफ हे दुय्यम दर्जाचे आहेत. "वायुरेव हि सूक्ष्मत्वात् द्वयो स्तत्राप्युदीरणः ॥ (चरक) or "योगवाहः परं वायुः संयोगात् उभयार्थकृत्। दाहकृत् तेजसा युक्तः शीतकृत् सोमसंश्रयात्।" (चरक) या तिन्ही दोषांचे परस्पर साहाय्यकारित्व असून त्यांचें पृथक्त्व अशक्यच आहे. 'अन्योन्याभिभवाश्रयजननमिथुन वृत्तयश्च गुणाः। (सांख्य). आधुनिक शास्त्रांतील पेशी (cell) त्रिदोषांत एकत्व आणित असले तरी त्रिदोष हे पेशी नव्हत, तर त्यांची (पेशींची) सहा-य्यक शक्ति आहे. परमाणु-समुच्चयास-सेल-चरकांनीं शरीरावयव असें संबोधिलें आहे.

शरीरावयवांचें महत्व

पदार्थविज्ञान, प्राणीविज्ञान व रासायनिक विज्ञान शास्त्राचें दृष्टीनें या अवयवांचें महत्व आहे. यांची वृद्धि, ऱ्हास व संयोजीकरण त्रिदोषानेंच घडून येतें. पेशींचें विभजन व त्यांतील निरनिराळे भाग त्रिदोषांचे साहाय्यामुळेंच होत असतात. पोषण व उत्सर्जन हे वायूचे, ऊष्मोत्पत्ति पित्ताचें, व शरीरोष्मा नियंत्रण हें कफाचें कार्य होय. शरीराच्या गतीचे व चलनवलनाचें वायूचें, अन्नपचन व ऊष्मोत्पत्ति पित्ताचें, स्थिरत्व स्निग्धत्व हें कफाचें कार्य त्या त्या दोषाकडून घडून येतें. आधुनिक शरीरविज्ञानशास्त्र दृष्टीनें पित्तानें अन्नाचें पृथक्करण होऊन ज्वलन होतें. तर तेंच शोषण होऊन कफाकडून आत्मसात् केलें जातें. त्रिदोषांच्या या सर्व आंतरिक स्वाभाविक क्रिया असल्याकारणानें त्यांना अतींद्रियक अशी संज्ञा प्राप्त झाली आहे. ऐंद्रियक शब्दानें इंद्रियाचें सान्निध्य समजलें जातें. स्थूल द्रव्यासहि वात,पित्त,कफ अशींच, नांवें देऊन त्यांची व्युत्पत्ति दिली आहे. वा-गति-गंधयोः।- वात, तप्-संतापे-पित्त; श्लिष्-आलिंगने श्लेष्मा. प्राणिशास्त्र, वस्तुशास्त्र व रासायनिकशास्त्र यांचा संबंध स्थूल द्रव्यांशीं येतो तर सूक्ष्म त्रिदोषांचा संबंध अध्यात्म व शरीरशास्त्र यांशीं असतो. सजीव वस्तूंत पोषण व उत्सर्जन सारिखें चालू असल्यामुळें त्यांत रासायनिक स्थिरता कधीं असूं शकत नाहीं. या सर्व सूक्ष्म घडामोडीस मेटॅबॉलिझम् हा शब्द प्रयोग वापरिला जातो. प्रकृत्या च यौगपद्येन तु धातूनां वृद्धि-ह्रासौ भवतः ॥(शारीरस्थान चरक).

मानव शरीरांतील 'त्रिधातु' या तीन संस्था (System) असून ऊष्मोत्पत्ति व त्याचें नियंत्रण तसेंच शरीरांतर्गत सर्व व्यवहार त्यांचेकडून होत असतात. असात्म्यसेवनानें अगर विषबाधेनें त्यांत बिघाड झाल्यास व्याधि संभवतो. वाताचे ८०, पित्ताचे ४०, कफाचे २० अशी व्याधींची संख्या गणली गेली आहे.

औषधी वनस्पतींची घडण

औषधी वनस्पतींची घडण मूळ पांचभौतिक द्रव्यांपासून होत असल्यामुळें त्यांत त्रिदोषास साहाय्य-भूत अशीं कार्यकारी नैसर्गिक द्रव्यें असतात. हीं द्रव्यें आपल्या स्वाभाविक शक्तीनें शरीरांतर्गत व्यापारावर आपापलीं कार्यें व्यवस्थित रीतीनें करतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शास्त्रास कळेचें स्वरूप

मूलभूत तत्वांची संगति लाविण्याचें कार्य आयुर्वेदाचार्यांनीं सुलभ करून शास्त्रास कळेचें स्वरूप दिलें आहे. तें शास्त्र ज्या परिभाषेंत लिहिलें गेलें आहे ती परिभाषा आत्मसात् करण्याचा विशेष प्रयत्न केल्याविना घोटाळा होण्याचा संभव आहे.

स्थानभेदानें ५ विभाग

वात, पित्त, कफ या संस्थांचें स्थानविशेषत्वानें, प्रत्येकाचे पांच विभाग कल्पिले आहेत व ते अर्वाचीन रक्तवहसंस्था, श्वसनसंस्था, पचनसंस्था वगैरेशीं जुळण्यासारखे आहेत. अग्नाभिनोदनाच्या कार्यांत या सर्व संस्थांनें कार्यकारित्व असतें हें खालील कोष्टकावरून दिसून येईल.

(१) वात– सेंट्रल नर्व्हस सिस्टिम, सिंपथेटिक नर्व्हस सिस्टिम, पेरिफेरल नर्व्हस सिस्टिम, लोकोमोटार सिस्टिम	पक्काधान व मूर्धन्
(२) पित्त– रुधिराभिसरणसंस्था, पचनसंस्था मूत्रोत्सर्जनसंस्था	नाभिः
(३) कफ— श्वसनसंस्था, रसवहसंस्था [लिंफॅटिक सिस्टिम]	उरस्

वरील विभागणी त्रिधातूंच्या साधारण स्थानावरूनच केली आहे. त्रिधातूंच्या कार्याचा विचार करितांना कर्म, अवस्था, आकृति, संयोग वगैरेचा विचार आयुर्वेदकार ध्यानीं आणित असतात. पाश्चिमात्य अगर आयुर्वेदांतील, वर नमूद केलेल्या संस्था [Systems] परस्परांच्या सहकार्यावांचून कोणतेंहि कार्य करूं शकत नाहींत. हार्ट, त्याच्या वातवाहिन्या [nerves]; रक्त, समीपस्थ व दूरस्थ रक्तवाहिन्या व त्रिधातु यांच्या कार्यसमूहानें अग्नाभिनोदन व्यक्त होत असतें हें मागें आलेंच आहे.

शरीराच्या प्राकृतावस्थेंत अग्नाभिनोदनांत खालील कारणांनीं बदल होतो.

(१) अन्न - कफ- पचनेंद्रियें कार्यान्वित होऊन कफाची वृद्धि करतात.

(२) विश्रांति, झोंप– कफ– याच्या शामक कार्यामुळें पित्ताची तीव्रता कमी होते.

(३) व्यायाम– यानें रक्तांतगत पित्त प्राणवायूस उत्तेजित करीत असल्यामुळें हृदयाची गति शीघ्र होऊन दूरस्थ रक्तवाहिन्या आकुंचित होतात. या क्रियेनें अग्नाभिनोदन वाढतें, कालांतरानें स्थिरावतें.

(४) भावना [अ] भीति– मुळें हृदयक्रिया वाढते, पण प्राणवायूस कफाचा संपर्क असल्यामुळें शरीरावयव [cell activity] गति मंद होऊन अग्नाभिनोदन कमी होतें. [आ] राग– हृदयावेग वाढून पित्तानें शरीरावयवाची (cell activity) क्रिया वाढून अग्नाभिनोदन वाढतें.

अग्नाभिनोदनाचे प्रकार खालीं दिल्याप्रमाणें होऊं शकतात.

(१) शरीरस्थिति [उभे आडवे]—अग्नाभिनोदन कमी अधिक होते.

(२) दिवसांतील प्रहरावरून [दिवस, रात्र, दुपार, मध्यरात्र]– ही अग्नाभिनोदनाची क्रिया कमी अधिक होत असते.

(३) ऋतु-वर्षाकाल-वायुप्रकोप, शरत्काल-पित्तप्रकोप, वसंत–श्लेष्माप्रकोप.

(४) उंची, तेथील हवामान, दिशा व त्याचप्रमाणें दोषप्रकोपावर अग्नाभिनोदन अवलंबून असतें.

पांढरें कोड

हजारोंचें गेलें व त्यांनीं अभिप्राय दिलेले आणि अनेक बक्षिसें मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु. नकली वैद्यापासून सावध रहा!

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन' मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(५) व्यक्तिगत स्वभाव आणि वातल, पित्तल, व श्लेष्मल प्रकृति असेल त्यामानानें अस्राभिनोदन कमी आधिक होतें.

(६) श्रमिक जीवन, काळजी, दगदग, अव्यवस्थित अन्नोदकसेवन वगैरे कारणांनीं व्याधि संभवून अस्राभिनोदन वाढतें.

दुसरीं बरींच कारणें

अस्राभिनोदन वाढण्यास दुसरीं बरींच कारणें असूं शकतात. प्राणवायूच्या बिघाडानेंच अस्राभिनोदन वाढतें. ‘ पित्तप्रकोपणैरेव चाभीक्ष्णं द्रवस्निग्धगुरुभिराहारैः दिवास्वप्नक्रोधानलातपश्रमाभिघातअजीर्ण- विरुद्धाध्यशन – आदिभिः विशेषैः असृक् प्रकोपमापद्यते ॥ च. सू. ॥ व्यक्तीच्या अतिदगदगीच्या जीवनक्रमामुळें हृदय व प्राणवायु यांचा बिघाड होतो. अव्यवस्थित अन्नोदकानें पित्त कफ दूषित होऊन रक्तांत बिघाड होतो. अन्नाशनाचा, विश्रांतीचा, व व्यायामाचा अति--मिथ्या व अयोग यानेंच शारीरिक विकृति संभवते असें आयुर्वेदाचें निश्चित मत आहे. हीच स्थिति कांहीं काल चालूं राहिल्यास रक्त व वातवाहिन्यांत बिघाड होऊन व्याधीची उत्पत्ति होते. वायूचा परिणाम रक्तवाहिन्यांवर होऊन त्यांत कार्यहीनत्व उद्‌भवतें. त्यामुळेंच त्या जाड अगर पातळ होतात असें चरकाचें मत आहे. ‘ सुप्तास्तन्व्यो महत्यो वा शिरा वाते विरागते। ’ (च. चि.) रक्तवाहिन्यांतील विकृति कांहीं काल तशीच राहूं दिली तर त्यांच्या अंतस्त्वचेंत मांस व मेद धातूंची वृद्धि होत जाऊन त्यांच्या पोकळीचा संकोच होतो. त्या संकोचानें हृदयाकार वाढून अस्राभिनोदन वाढतें.

विषारी द्रव्यामुळें व्यानाचा प्रकोप

रुधिराभिसरणांतून भ्रमणाऱ्या विषारी द्रव्याकडून अतींद्रियक व्यान वायूचा प्रकोप होऊन लहान रक्तवाहिन्यांचा संकोच होतो, यावर आयुर्वेदाचा पूर्ण विश्वास आहे. केशवाहिन्यांतील प्रतिकार वाढल्यामुळें रक्तास पुढें ढकलण्याकरितां हृदयास बरेच परिश्रम करावे लागतात. याच वेळीं हृदयांतील प्राणवायु प्रथमतः पित्तामुळें व तदनंतर कफामुळें प्रक्षोभित केला जातो. याच ठिकाणीं हृदयाच्या रक्तवाहिन्यांची गति पित्तामुळें वाढून कफाचे सहाय्यानें हृदयांत रस व मांस धातूंची वाढ होते. या वाढीमुळें हृदयाकार मोठा होतो. विषारांनीं सुरूं केलेलें दुष्टचक्र येथेंच न थांबतां वृक्क (Kidney) वगैरे सारखे मलमार्ग, त्यांना विषांचें उत्सर्जनकार्यांत पडलेल्या ताणामुळें, हळूहळूं बिघडूं लागतात. “ दोषा दुष्टा रसैर्धातून् दूषयंत्युभये मलान् ” ।

उष्णवीर्य औषधी व अन्न

शरीरांतील विषाराप्रमाणेंच कांहीं उष्णवीर्य औषधी व अन्न यानें रक्ताभिनोदन वाढतें, तर शीतवीर्य अन्नानें अगर द्रव्यानें कमी होतें. कटु, अम्ल, लवण हे रस उष्ण असल्याकारणानें रुधिराभिसरण वाढते व तिक्त, कषाय, मधुर हे रस शीत असल्यानें त्यानें तें कमी होतें.

त्रिदोषदृष्टीनें विचार

रक्ताभिनोदनाचा विचार करणें झाल्यास आयुर्वेदकार त्रिदोषांचें दृष्टीनें त्याजकडे पाहतात. शरीरधारणेस उष्णतेची जशी जरूरी असते, तद्वतच अस्राभिनोदनाचीहि जरूरी असते, व तें कार्य व्यानवायूकडून मुख्यत्वें सांभाळलें जातें. “ कृत्स्नदेहचरो व्यानो रससंवहनोद्यतः । स्वेदासृक् स्रवणाचापि पंचधा चेष्टयत्यपि ” ॥ सुश्रुत शरीरांत रक्ताचें न्यूनाधिक्य झाल्यास लहान रक्तवाहिन्यांचा संकोचविकास घडवून समतोलपणा राखणें हें व्यानानेंच कार्य आहे. ‘ शोणितक्षये शिराशैथिल्यम् ’ । ‘ अतिवृद्धे रक्ते शिरापूर्णत्वम् । ’

आयुर्वेदांत इतर शास्त्रांचा समावेश

शारीर (Anatomy), शारीरक्रिया (Physiology), विकृति (Pathology), व औषधी विज्ञान (Pharmacology) शास्त्राचे दृष्टीनें पाहिल्यास वात, पित्त, कफांचे कार्याचा साहाजिकच उलगडा होईल. आयुर्वेदशास्त्र दोन हजार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्षांपूर्वी वेदासारखे सूत्रमय लिहिलें असल्याकारणानें आधुनिक शास्त्रांतील असंदिग्धता त्यांत दिसून येत नाहीं. तत्वज्ञान, अध्यात्मज्ञान, तर्क, नीति, मानस व योग या शास्त्रांचा आयुर्वेदांत पद्धतशीर समावेश असल्याकारणानें शास्त्रज्ञांचे विचार त्यांस धरून आहेत. शरीरांतील वायूचें सूक्ष्म प्रकारचें अध्ययन करणें असल्यास योगशास्त्रावरील ग्रंथ पाहावे. या ग्रंथांतरीं मेंदूंतील (Brain) व सुषुम्नेतील (Spinal Cord) केंद्रें, नाडिचक्रें (Plexuses), स्वयंचलित वातकेंद्रें (Autonomus Nervous System) यांचें विशदीकरण केलेलें दिसतें. पातंजली योगशास्त्रांत या विषयांवरील सर्व माहिती मिळते. प्राणायामशास्त्रज्ञांना अद्भूत शक्ति कशी प्राप्त होते, हें सर्वांस विदित आहे. वायूची साग्र माहिती मिळविल्यास मध्यवर्ती व दुय्यम (Central & Sympathetic Nervous System) वातकेंद्रांचें ज्ञान मिळतें, तसेंच पित्त व कफ यांचा सशास्त्र अर्थ समजून घेतल्यास रक्ताभिनोदन समजण्यास कठीण पडणार नाहीं.

पित्ताच्या व कफाच्या स्थानांचा व कर्मांचा ग्रंथांतरीं स्पष्ट उल्लेख आहे. हृदयेंद्रिय व रक्तवाहिन्या यांच्या झीज व पोषणाविषयींचा तसेंच रक्ताच्या दूषित्वाचा व विस्ताराचा (Volume) हि विचार सुस्पष्ट मांडिलेला आहे.

वातपित्तानें रक्ताभिनोदन वाढतें

वातपित्तानें रक्ताभिनोदन वाढतें व वातकफानें कमी होतें असें थोडक्यांत सांगतां येईल. रक्ताभिनोदन वाढण्याचीं बहुविध कारणें असल्या कारणानें त्याचें अचुक निदान करणें फार जिकीरीचें असतें. शरीरांतील सूक्ष्म प्रवाहाचें ज्ञान मॅनॉमीटरनें होत नसल्यानें त्याचा वापर करीत असतांच त्रिदोषांचा विचार ध्यानांत आणणें इष्ट व जरूर असतें त्रिदोषाचे साहाय्यानें दोषविकृतीचें ज्ञान जाणून घेतल्यास केवळ मॅनॉमीटरनें अपक्व निर्णय घेण्याचे टळेल. वृक्कदाहांत (Inflammation of kidney) पित्ताचें वर्चस्व असल्यामुळें रक्ताभिनोदन वाढण्याकडे प्रवृत्ति असते. अतिरिक्त... मूत्रेंषु शिखिनो गुणाः ॥ ' सुश्रुत।

वातकफानें अस्राभिनोदन कमी होतें

उरःस्थ सन्निपातांत (Pneumonia) कफस्थानाच्या विकृतीनें अस्राभिनोदन उतरंडीस लागतें, आंत्रिक सन्निपातज्वरांत (Enteric Fever) प्राण व व्यान वायूच्या क्षीणतेनें पाचकपित्त व समानवायु यांनाहि हीनत्व प्राप्त होऊन कफाधिक्य दिसून येतें. कफाच्या गुणकर्मानें रुधिराभिसरणांत मंदत्व येऊन अस्राभिनोदन उतरतें. हें सर्व वर्णन असांसर्गिक सन्निपातज्वराचें आहे. (१) पक्षाघात (२) वातपित्तात्मक शिरोरोग, (३) पित्तोल्बण अर्श, (४) निद्रानाश (५) वातरक्त वगैरे व्याधी अस्राभिनोदनानें संभवतात. रक्ताभिनोदन वातपित्ताच्या वृद्धीनें होत असून त्याकरितां अपतर्पण व वातानुलोमनचिकित्सा आयुर्वेदानें प्रतिपादिली आहे.

उदुंबर-सार

[किंमत १ तोळ्यास ३ रु.]

वरील अनुभविक दाट औषध आयुर्वेद सेवा संघानें तयार केलें आहे व त्याचा अनुभवहि पुष्कळ रोग्यावर घेतला आहे. गरोदर स्त्रिया, बाळंत झालेल्या स्त्रिया यांना स्तनविकाराची बाधा झालेली आढळून येते. त्यांनीं उदुंबररसाचा लेप स्तनावर द्यावा व पोटांत १ मासा औषध पाण्यांत कोळून प्यावें. केवळ वरून लावूनहि गुण येतो. मात्र पोट साफ असावें.

आपल्या बऱ्या न झालेल्या रोगासाठीं आयुर्वेद सेवा संघानें नवी नवी शोधून तयार केलेलीं औषधें वापरा.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सात्विक व्यक्तींत रक्ताभिनोदन !

आयुर्वेदकारांनीं अस्त्राभिनोदन हें लक्षण मानून तें त्याच व्याधींत संभवते, व व्याध्युत्तर प्राकृतावस्थेप्रत येतें असें निवेदिलें आहे. बदलत्या आधुनिक कालांत राहणींत फरक झाल्याकारणानें अस्त्राभिनोदनाकडे विशेष लक्ष पुरविणें चांगलें. सात्विक व्यक्तींत अस्त्राभिनोदन संभवत नाहीं. मुलें व स्त्रियांत जिकीरीचें जीवन नसल्यानें अस्त्राभिनोदन होण्याचें प्रमाण फारच खालच्या पातळीवर असतें. चाळीस वर्षांपुढील वयांत चिंता व दगदग वृद्धिंगत होते. त्यामुळें अस्त्राभिनोदन वाढण्याचा संभव असतो.

मीं तज्ञ नाहीं

पाश्चात्य अगर आयुर्वेदशास्त्रांतील तज्ञ नसूनहि अस्त्राभिनोदनाविषयीं आयुर्वेदाचे विचार मांडण्याचा मीं प्रयत्न केला आहे. आयुर्वेदाची अस्त्राभिनोदनाविषयींची विचारसरणी स्पष्ट व्हावी म्हणून त्रिदोष-सिद्धांत थोडासा विशद रीतीनें मांडला आहे. हृदयाची व्याख्या कठीण असल्यानें ती करण्याचे भरीस मीं पडलो नाहीं. वातसंस्था व रुधिराभिसरणसंस्था यांचा अन्योन्य संबंध विशेषतः प्राण व व्यान वायूकडून कसा जोडला जातो हें थोडक्यांत दर्शविलें आहे. या दोन्ही संस्थांच्या अन्योन्य सहकारानेंच शारीर स्वास्थ्य टिकून राहतें.

सर्वेंद्रियाणि येनास्मिन् प्राणा येन च संश्रिताः ।
तेन तस्योत्तमांगस्य रक्षायामादृतो भवेत् ॥ (वाग्भट)

॥ इतीशम् ॥

पांढरें कोड नष्ट झालेल्या हजारों गांवच्या लोकांचीं प्रशस्तिपत्रें व बक्षिसें पूर्ण पत्त्यासहित छापलेलीं पत्रकें मोफत मागवा.
औषधीची किंमत ५ रु., पो. ख. १ रु.
वैद्य के. आर. बोरकर
मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला [म. प्र.]

मद्यार्कयुक्त औषधांची निर्यात

मद्यार्क औषधें एका राज्यांतून दुसऱ्या राज्यांत पाठवितांना त्यावरील जकात योग्य त्या राज्याला वसूल करतां यावी; असें करतांना औषधें पाठविणाराला व विकत घेणाऱ्या व्यापाऱ्याला या बाबतींत त्रास होऊं नये, म्हणून राज्याराज्यांत करार झालेले आहेत. त्यानुसार मद्रास राज्यांतील निर्यात करणाऱ्या व्यापाऱ्याला त्या राज्याचा निर्यात परवाना मिळविला कीं त्यावर मद्यार्क औषधें मुंबई राज्यांत पाठवितां येतात.

मुंबई राज्यांतील अडचण

परंतु मुंबई राज्यांतील निर्यातदाराला मात्र मद्रास राज्यांत मद्यार्क औषधें पाठवितांना मुंबई राज्याच्या निर्यात परवान्याबरोबरच, मद्रास राज्याचा आयात परवानाहि मिळवावा लागतो. त्यामुळें मुंबईतील निर्यातदाराला मद्रास राज्याशीं व्यापार करणें त्रासाचें व व्यर्थ कालहरण करणारें होऊन बसलें आहे.

महाराष्ट्र चेंबरचे योग्य प्रयत्न

याबाबत महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, मुंबई या संस्थेनें मद्रास व मुंबई सरकारांना लिहिलें असून या अडचणी दूर करण्याची व परस्पर करारांतील एकतर्फी कलमें बदलण्याची विनंति केली आहे.

अनेक ग्राहकांच्या सूचनेवरून
परतवाडा येथें आयुर्वेद सेवासंघ नासिकचीं
सर्व अनुभविक व गुणकारी औषधें
मिळण्याची सोय आम्हीं केली आहे.
श्रीसमर्थ स्टोअर्स
परतवाडा (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार—

देशी औषधींचे प्रचारक

आमच्या ५ हजार वस्तीच्या खेडेगांवीं सुद्धां ॲलोपॅथिक औषधी विकणाऱ्या अनेक कंपन्यांचे कितीतरी फिरते प्रचारक नेहमीं येत असतात. ते निरनिराळ्या औषधांचे नमुने (सॅंपल्स) फुकट देतात. जाहिराती, ब्लॉटिंग पेपर्स व इतर सुबक कागदावर छापलेलें वाङ्मय देतात. त्यांच्या कंपन्या-कडून आमच्या (वैद्यांच्या) पत्यावर नेहमीं कांहीं तरी जाहिरातवजा वाङ्मय येत असतें.

त्यामुळें त्या औषधाकडे ओढा

नेहमीं परदेशी औषधांच्या प्रचाराचें वाङ्मय डोळ्यासमोर येत गेल्यामुळें आपोआप आमचा ओढा त्या औषधाकडे होतो.

आयुर्वेदीय औषधी कारखानदार याबाबत फार उदासिन दिसतात. ते स्वतः होऊन फारशी हालचाल करीत नाहींत. त्यामुळें जे थोडे आयुर्वेदीय औषधें वापरणारे वैद्यलोक आहेत, त्यांची संख्या वाढत तर नाहींच; उलट तिकडील प्रवृत्ति कमीच होत जात आहे असें दिसतें.

दुर्लक्ष करून भागणार नाहीं

या प्रचाराच्या युगांत या महत्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून भागेल असें वाटत नाहीं. आपापल्या कुवतीप्रमाणें प्रत्येक आयुर्वेदीय औषधी कारखान्यानें या गोष्टीकडे लक्ष दिलें पाहिजे.

रोहें —वै. न. पु. जोशी

तुमच्या दवाखान्यांत—मोठ्या प्रमाणांत औषधें हीं संग्रहीं ठेवा!

—१ सवलतीचे दरांत कांहीं संग्राह्य औषधें:—

अकीक भस्म	४९ रु. शेर	मोतीसीप भस्म (शौक्तिक)	१६ रु. शेर
कपर्दिक भस्म	७ रु. ,,	शंख भस्म	७ रु. ,,
कासवपृष्ठ भस्म	३५ रु. ,,	शृंग भस्म	११ रु. ,,
खेकडा (कर्कट भस्म) भस्म	२५ रु. ,,	गोदंती भस्म	५ रु. ,,
जहरमोहरा खताई नं. १	८० रु. ,,	गोक्षुरादि गुग्गुळ	१२ रु. ,,
नागभस्म (जुनें-उत्तम)	३५ रु. ,,	हंस मंडूर	३१ रु. ,,
प्रवाळ भस्म (सूर्यपुटी)	३१ रु. ,,	त्रिफळा मंडूर	२५ रु. ,,
,, (अग्निपुटी)	३१ रु. ,,	शंखवटी (बृहत्)	२५ रु ,,
बेरपथ्थर (हजरतेबर) भस्म	१५ रु. ,,	सितोपलादि चूर्ण	११ रु. ,,
मंडूर भस्म	१६ रु. ,,	(१ शेर = ८० तोळे)	

त्रिफळा चूर्ण वस्त्रगाळ १ शेरास (८० तोळे) १ रु. फक्त

सूचनाः—वरील औषधें २० तोळ्यापेक्षां कमी ऑर्डर असल्यास वरील भावाप्रमाणें पाठविली जाणार नाहींत. लहान ऑर्डर्स सूचिपत्राप्रमाणें पाठविले जातील. नवीन सूचिपत्र मागवा. फुकट पाठवूं. औषधी भस्मांचा स्टॉक मर्यादित आहे. स्टॉक संपतांच या भावांत वरील कोणतींच औषधें पाठवितां येणार नाहींत.

मिश्रा महाराष्ट्र फार्मसी (रजि.) ब्रह्मपुरी (जि. चांदा, म. प्र.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देवमाणूस आणि दयाळू डॉ. सवणूर

" दोन वर्षांपूर्वी कॅन्सरसारखा असाध्य रोग डॉक्टरांना जडला. प्रथम प्रथम गिळतांना त्यांना त्रास होऊं लागला म्हणून त्यांनीं दुसऱ्या डॉक्टरकडून तपासून घेतलें. तपासणाऱ्या डॉक्टरांना कॅन्सरचा संशय आला म्हणून त्यांनीं ताबडतोब मुंबईला टाटा मेमोरिअल हॉस्पिटलमध्यें जाऊन तपासून घेण्याचा सल्ला दिला. तेथें ते ताबडतोब गेले व चार महिने राहून उपचारहि घेऊन आले. परंतु शेवटीं परवां त्यानें डॉक्टरांचा बळी घेतलाच.

उत्साह कमी झाला नाहीं

आपल्याला कॅन्सर झाला आहे, ह्यांतून आपण जगत नाहीं याची खात्री त्यांना पाहिल्याच दिवशीं वाटली तरी त्यांचा उत्साह यत्किंचितहि कमी झाला नव्हता. पोटांत अन्न जाऊं शकत नसल्यामुळें त्यांना जेव्हां फारच अशक्तपणा वाटूं लागला तेव्हां महिन्यापूर्वी त्यांनीं रुग्णाना औषध देण्याचें बंद केलें. त्यांच्या निधनामुळें हळहळला नाहीं असा एकहि इसम या भागांत मिळणार नाहीं. डॉ. सवणूरांचेंच औषध मी घेत आहे, मला आतां कशाचीहि भीति नाहीं हा आत्मविश्वास प्रत्येक रुग्णाला वाटत होता व अजूनहि कित्येक वयस्क लोक बेळगांवांत आहेत कीं जे " दिलें तर डॉ. सवणूरांचेंच औषध आपल्याला द्या, नाहीं-तर मला खुशाल मरूं द्या " असें स्पष्टपणें सांगतात.

गेल्या वर्षाची गोष्ट

गेल्याच वर्षांतील गोष्ट. त्यांच्याच वयाचे व त्यांचेच औषध घेणारे एक सद्गृहस्थ अतिसारानें आजारी पडून शेवटची घटका मोजूं लागले होते. त्यावेळीं नुकतेच मुंबईचा उपचार घेऊन डॉ. आपल्या बंगल्यांत आराम घेत होते. कोणतेंहि श्रम घ्यावयाचे नाहींत अशी सक्त ताकीद त्यांना मुंबईच्या डॉक्टरांची होती. आजारी पडलेल्या गृहस्थाचा डॉ. सवणूरशिवाय दुसऱ्या कोणावरहि विश्वास नाहीं व डॉक्टरांच्या पर्यंत कोणाला जाऊंहि दिलें जात नव्हतें पण त्यांच्या घरच्या मंडळींच्याकडून बोलण्याच्या ओघांत सहज ही गोष्ट डॉक्टरांच्या कानावर पडली, लगेच डॉक्टरांनीं कपडे चढविले, टांगा बोलाविला व त्या गृहस्थांच्या घरीं जाऊन त्याला तपासून औषध देऊन परत आले. ते गृहस्थ पूर्ण बरे झाले हें सांगण्याची जरूरी नाहीं.

डॉक्टरांच्या निधनाची वार्ता ऐकून त्या गृहस्थानें फोडलेला हंबरडा प्रत्यक्ष तेथें हजर असणाऱ्यांना विसरतां येणार नाहीं. येणारा रोगी माझें बिल देऊं शकेल कीं नाहीं, याचा विचार त्यांच्या मनाला कधीं शिवलाच नाहीं. त्याला बरा करणें इतकेंच ध्येय त्यांच्या नजरेसमोर होतें.

आयुर्वेदपद्धति स्वस्त म्हणून स्वीकारली

बेळगांवांत त्यावेळीं डॉ. खर्शेटजी, शिरगांवकर सारखे प्रख्यात डॉक्टर, व शिकून येऊन नव्यानें प्रॅक्टिस करणारे इतर डॉक्टर कितीतरी होते. पण डॉक्टर सवनूरनीं आपला जम बसविला. ॲलोपॅथिक औषधपद्धति या देशांत जेथें जास्तींत जास्त लोक गरीब आहेत, त्यांना ती परवडणारहि नाहीं, असा अनुभव त्याना लगेच आला व याला तोड काय काढावी या विचारांत असतांनाच त्यांनीं आयुर्वेद औषधपद्धति सुरूं केली. ती इतकी यशस्वी झाली कीं, डॉ. सवनूर हे ॲलोपॅथिक असूनहि अनेक ठिकाणीं भरलेल्या आयुर्वेद संमेलनाचे अध्यक्षस्थान डॉ. सवनूर याना भूषवावें लागलें. सांगण्याचें कारण इतकेंच कीं, ॲलोपॅथिक पद्धतीपेक्षां आयुर्वेदपद्धति उत्तम म्हणून डॉक्टरनीं तिचा* प्रथम स्वीकार केला, हें खरें नसून ॲलोपॅथिकपद्धति या देशांतील बहुसंख्य असलेल्या गरीब जनतेला परवडणार नाहीं या कल्पनेंतच

[* लेखकाचें हें मत डॉ. सवणूर यांच्या लेखांत प्रकट झालेल्या विचाराशीं सुसंगत वाटत नाहीं.
—संपादक]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदाचा जन्म झाला. नंतर या आयुर्वेदपद्धतींत त्यांचा चांगलाच जम बसला, ही गोष्ट निराळी.

१९१८ साली इन्फ्लुएंझानें सर्वत्र कहर केला. बेळगांवांत शेंकडों गरीब लोक बळी पडूं लागले. श्रीमंत, डॉक्टरांचें औषध घेऊन बरे होऊं लागले, पण गरीबांचें काय ? त्यावेळीं डॉ. सावनूर यांनीं बेळगांवांतील गोविंदराव याळगी यांच्या घरांत मोठें घमेलें भरून दररोज सकाळीं एक काढा करावयाचा व कै. गोविंदराव याळगी आदि स्वयंसेवकांनीं घरोघरीं जाऊन रुग्णांना तो पाजावयाचा. या काढ्यानें वांचलेले अनेक लोक आपली अखेरची श्रद्धांजली वाहण्यास परवां स्मशानांत हजर होते.

गरीबासाठीं कांहीं तरी केलें पाहिजे ही तळमळ डॉक्टरांना सदैव बेचैन करून सोडीत होती. गरीबांचा त्राता, दीनांचा दयाळू आणि मनाचा कनवाळू डॉक्टर आमच्यामधून आज गेला आहे. "

६ जून १९५३ 'बेळगांव समाचार'

वैद्य पां. वि. जायदे यांची
फेडरेशनवर निवड

निखिल कर्नाटक आयुर्वेद मंडळाच्या कार्यकारी मंडळाची सभा विजापूर येथें दि. ५।७।५४ सोमवार रोजीं भरली होती. त्यांत कर्नाटकच्या वतीनें मुंबई प्रांतीय आयुर्वेदीय फेडरेशनकरितां अेक सदस्य म्हणून वैद्य पां. वि. जायदे, आयुर्वेदतीर्थ यांची निवड करण्यांत आली आहे.

श्रीगुरुपौर्णिमा उत्सव, शीव

गुरुवार दिनांक १५।७।१९५४ रोजीं शीव येथें विद्यालयाच्या जागेत आयुर्विद्या प्रसारक मंडळाच्या शुद्ध आयुर्वेद विद्यालयाचा श्रीगुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या थाटांत साजरा झाला. या समारंभाचें अध्यक्षस्थान श्रीमान् शेठ रतनचंद हिराचंद एम्.ए. यांनीं विभूषित केलें होतें.

प्रथम विद्यालयाचे अधिपति अभ्यंकरशास्त्री यांनीं श्रीधन्वन्तरीचें पूजन करून प्रास्ताविक भाषण केलें. नंतर वैद्य वामनराव, अध्यक्ष शुद्ध आयुर्वेद समिति, यांनीं निमंत्रित गुरुवर्यांचा परिचय करून दिला.

आचार्य यादवजी त्रिकमजी, पंडित शिवशर्मा, वै. नानासाहेब पुराणिक, वै. रामगोपाळ शर्मा, वै. प्यारेलाल शर्मा, वैद्यराज अभ्यंकरशास्त्री, वै. अमृतराव ऐनापुरे, प्रा. नी. दे. देशपांडे आयुर्वेदाचार्य, इत्यादि गुरूंचें गुणसंकीर्तन झाल्यानंतर अध्यक्षांचे हस्तें त्यांस पुष्पहार व गुच्छ समर्पण केले. त्यानंतर त्यांचीं समयोचित भाषणें झालीं.

वैद्य ना. ह. जोशी यांनीं गुरुचें महत्व सांगितलें. आजच्या समारंभाबद्दल झालेला आनंद माजी विद्यार्थी या नात्यानें वै. लक्ष्मीबाई बोरवणकर यांनीं प्रकट केला व पानसुपारी, पेढे व फोटोचा कार्यक्रम होऊन समारंभ समाप्त झाला.

नाशिक शहर वैद्य मंडळ

मंडळाच्या ता. ११।७।५४ च्या सभेंत पुढील २ ठराव मंजूर झाले :—

(१) ना. श. वै. मंडळाचे अध्यक्ष वै. वि. मो. दातेशास्त्री यांनीं मंडळाची मंजुरी गृहीत धरून नाशिक येथें निघणाऱ्या शुद्ध आयुर्वेद विद्यालयाचे कार्यास सहकार्य देण्याचें जाहीर केलें होतें. आजची ही सभा त्या कृत्यास मंजुरी देत आहे.

(२) आयुर्वेद सेवा संघानें नाशिक येथें शुद्ध आयुर्वेद विद्यालय सुरू केलें याबद्दल नाशिक शहर वैद्यमंडळ सेवासंघाचें हार्दिक अभिनंदन करीत आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वै. भा. वि. गोखले यांनीं लिहिलेलें समालोचन

— डॉ. सावनूर, एल्. एम्. एस्. यांच्या मूळ इंग्रजी लेखाचा अनुवाद —

(अनुवादकः—डॉ. सी. एल्. जठार, बेळगांव)

वैद्यक विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तक म्हणून मीं लिहिलेल्या "आयुर्वेदिक मटिरिया मेडिका, युईंथ प्रिन्सिपल्स ऑफ् फार्माकॉलॉजी अँड थिरॅप्युटिक्स" व्हॉल्युम १ ला, पुस्तकावर केसरीच्या ता.२३-१२-५२ च्या अंकांत वैद्य भा. वि. गोखले यांनीं आपलें समालोचन प्रसिद्ध केलें आहे. तें पुस्तक कोणत्या उद्देशानें लिहिलें गेलें आहे हें त्यांत सुस्पष्ट रीतीनें मांडलें असूनहि त्याचेकडे दुर्लक्ष करून, वैद्य गोखले यांनीं आपलें समालोचन असत्य आधारावर, अन्यायीपणानें व शिष्टाचारास फांटा देऊन लिहिलें आहे असें मोठ्या खेदानें नमूद करणें प्राप्त झालें आहे. ग्रंथ लिहिण्याचा उद्देश नीट लक्षांत घेऊन त्या दृष्टीनें तें संपूर्ण वाचून मग ग्रंथ-लेखकावर टीका केली असती तर तें योग्य झालें असतें. 'अशास्त्रीय, शास्त्रीय सिद्धांताचे बाबतींत मूले कुठार' असे शब्दप्रयोग वापरणें हें खोडसाळपणाचें द्योतक असून गैरसमज फैलाविणारें आहे. त्यांच्या समालोचनाच्या वाचनानें विद्वान् वैद्य व डॉक्टर यांचा गैरसमज होणार नाहीं. झालातर सर्वसामान्य वाचकांचाच गैरसमज होण्याचा संभव आहे.

वैद्य गोखले यांचे ४ मुद्दे

वैद्य गोखले यांच्या समालोचनांत त्यांनीं खालील मुद्दे उपस्थित केले आहेत ते येणेंप्रमाणें:—

(१) पंचभूतांचें अकिंचित्करत्व. (२) पंचभूतांचें त्रिवृत्करण.
(३) त्रिदोषमय शरीर. (४) कांहीं शब्दांचें चुकीचें भाषांतर.

यापैकीं प्रत्येकांचा आतां विचार करूं. (१) पंचभूतांचें अकिंचित्करत्व.

(अ) पंचभूतांच्या महत्वाकडे मीं दुर्लक्ष केलेलें नाहीं. सांख्य तत्वज्ञानानें जगदुत्पत्तीविषयीं केलेलें विवेचन मीं विचारांत घेतलें आहे. तसेंच दर्शनकारांच्या उत्क्रांतिवादाचें स्पष्टीकरण केलें आहे. आपण पाहातो व आहेत असें मानतो त्यापेक्षां असंख्य वस्तूंनीं हें जग नटलेलें आहे. त्या वस्तूंचें वर्गीकरण खालीलप्रमाणें करतां येईल.

(१) नैसर्गिक (२) अतींद्रिय (कार्यकारणभावावरून कळणारें) (३) प्रत्यक्ष

या वर्गीकरणांत-नैसर्गिक-पुरुष व प्रकृति यांचा समावेश होतो; दुसऱ्यांत त्रिगुण व पंचमहाभूतें; तिसऱ्यांत स्थावर-जंगम सर्व सृष्ट-दृश्यांचा समावेश होतो. आत्म्याव्यतिरिक्त जगांत कोणात्यहि पदार्थास किंमत नाहीं. 'न चेत् कारणमात्मा स्यात् खादयः स्युरहेतुकाः' । च. शा. १

प्रकृतीपासून सृष्टि निर्माण होण्यास त्रिगुणांचें साहाय्य अवश्य असतें. अहंकार, तन्मात्रा व पंचमहाभूतें यांच्या आविर्भावास त्रिगुणांचें साहाय्य [जरूरी] लागतें.

'तन्मयान्येव भूतानि तद्गुणान्येव चादिशेत् । तैश्च तल्लक्षणः कृत्स्नो भूतग्रामो व्यजन्यत' ॥ सु. शा. अ. १

जगदुत्क्रांतीचे वेळीं हीं भूतग्रामें पंचमहाभूताचे गुण आपल्यांत सामावून घेत असतां 'आत्मा' साक्षीरूपानें त्याचें निरीक्षण करीत असतो. ज्या पंचमहाभूतांनीं ही स्थावर-जंगम सृष्टि बनली आहे त्यांचेपासून सत्व, रज, तम पृथक् होऊं शकत नाहींत. तद्वतच द्रव्यांतील द्रव्यत्व व गुणत्व हीं त्या द्रव्यापासून अविभाज्य आहेत. ज्या भूतग्रामाच्या व्याख्येंत मानवदेहाची गणना केली जाते, तो (मानव) देह, आत्मा, धातु व पंचभूतें यांचें अधिष्ठान आहे, असें उत्क्रांतितत्व मानतें. त्रिगुण, सृष्टिरचनेंत ज्याप्रमाणें कार्यकारी असतात

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तद्वतच त्यांचें कार्यकारित्व, प्रकृति-त्रिगुण- पंचमहाभूतें (सूक्ष्म), पंचमहाभूतें (स्थूल) भूतग्राम-शरीर यांत प्रतीत होतें. उत्क्रांतींत सूक्ष्म पंचमहाभूतांना जसें अढळस्थान आहे त्याचप्रमाणें मानवदेह वा इंद्रियें यांतहि त्यांचें स्थान मूलभूत मानलें जातें. तसेंच सचेतन वा अचेतन सृष्टींत हीं पंचमहाभूतें पायाभूत होत. प्रस्तुत भूतग्रामापैकीं सर्व श्रेष्ठ असा जो मानवदेह तोच आपणास विचारार्ह आहे.

लोको हि द्विविधः स्थावरो जंगमश्च। तस्मिन् पुरुषः प्रधानः। तस्य उपकरणं अन्यत्। पंचमहाभूतारब्धस्य भूतग्रामस्य चिकित्सोपकरणत्वम्॥ (डल्हण. सु. शा. १)

माझ्या पुस्तकांतील ५४ व्या पानांतील 'त्रिदोषांचें उत्पत्तिस्थान पंचभूतें आहेत' या विधानास वैद्य गोखले यांचा आक्षेप असावा असें दिसतें.

चरक व कपिलदेव यांच्या 'आयुस्' या शब्दाची फोड करीत असतांना, वैद्य गोखले यांच्या दृष्टीनें आक्षेपित, ओळी लिहिल्या गेल्या आहेत. त्याच तऱ्हेचीं अवतरणें खालीं दिलीं आहेत तीं पहावींत.

(१) नित्यगश्चानुबंधश्च पर्यायैरायुरुच्यते। च. सू.

(२) गर्भस्य चत्वारि चतुर्विधानि भूतानि मातापितृसंभवानि।
आहारजान्यात्मकृतानि चैव। सर्वस्य सर्वाणि भवंति देहे॥
तेषां विशेषे बलवंति यानि। भवंति मातापितृकर्मजानि॥ च. शा. २

(३) पूर्वोत्पन्नमसक्तं नियतं महदादि सूक्ष्मपर्यंतम्।
संसरति निरुपभोगं भावैरधिवासितं लिंगम्॥ सां. का. ४०

सूचनाः— अधोरेखित शब्द जीवनावर संचित कर्मांचा काय परिणाम होतो ते दाखवितात.

वरील सर्व उताऱ्यांवरून मानवदेहाची उत्क्रांति सिद्ध होते. पंचविंशतितत्त्वांत पंचमहाभूतांचा अंतर्भाव असतो. याच ठिकाणीं वैद्य गोखले यांनीं चहाच्या कपांतील वादळ उठविलें आहे.

पांचभौतिक आहार व पांच भौतिक अग्नि

ग्रंथांतील पान ४७ यांतील वैद्य गोखले यांचे दृष्टीनें आक्षेपार्ह भाग म्हणजे पांचभौतिक आहारासंबंधीं आहे असें दिसतें. त्रिधातु (त्रिदोष) व सप्तधातु यांचें पोषण पांचभौतिक आहारानेंच होत असतें हें स्मरणांत ठेवणें अत्यंत आवश्यक आहे. पचनव्यवस्थेंतील पांचभौतिक अग्नि हा अत्यंत कार्यक्षम असून पांचभौतिक आहाराचें पाचन-कार्यांत त्याचें अग्रस्थान आहे हें दुर्लक्षितां येणार नाहीं. पचनव्यापारांत दोन प्रकारचीं पांचभौतिक द्रव्यें असतात, हें जाणून पुढील संदर्भाकडे पाहिलें पाहिजे. शरीरस्थ धातूंत जीं पांचभौतिक द्रव्यें आहेत त्यांचे ठायीं भौतिकाग्नि स्वयंभू असतो. दुसरीं पांचभौतिक द्रव्यें आहारज असतात शरीरस्थ भौतिकाग्नि असतो—जो पांचभौतिक असतो—आहारांतील पांचभौतिक द्रव्यें पचन करून शारीरद्रव्यांत एकरूप करितो.

त्रिदोष (हि) पांचभौतिक द्रव्याचेच आहेत हें खालील शब्दावरून सहज ध्यानीं येण्यासारिखें आहे. व्यापिनः, सर्वचरः, कर्तव्यतः शरीरपद् द्रव्याणि वगैरे. शरीरस्थ धातूंवर पाचनानंतर उद्भविलेल्या द्रव्यांचा परिणाम होणें सहज क्रिया होय. वायवीय व आकाशीय द्रव्यांचा वातसंस्थेवर, अग्नीचा पित्तसंस्थेवर व आप्याचा कफ संस्थेवर परिणाम दृग्गोचर होतो. वरील विवरणावरून पांचभौतिक आहारानें त्रिधातूंचें कसें पोषण होतें हें सहज उमजण्यासारिखें आहे. वरील विवेचनास चरकाचार्यांचा आधार आहे.

'भौमाप्याग्नेयवायव्याः पंचोष्माणः सनाभसाः।
पंचाहारगुणान् स्वान् स्वान् पार्थिवादीन् पचंति हि॥ ग्र. चि. अ. १५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हा मुद्दा दर्शनकारांचा असून तो चरकाचार्यांनीं ग्रथित केला आहे.

टीकाकार शिवदास यांचे विचार

इंद्रियविज्ञानशास्त्राचे दृष्टीनेंहि पांचभौतिक आहारांचें पचन कसें काय होतें तेंहि विशद करणें जरूर आहे. महास्रोतसांत अन्नाचें संपूर्ण पाचन व शोषण होतें हें सर्वांस विदितच आहे. पांचभौतिक अन्न आमाशयांत पोचतांच क्लेदक कफ व समानवायु यांचे साहाय्यानें त्यास मधुरभाव येऊन त्याचे कफधातूंत रूपांतर होऊन शरीरांतर्गत कफधातूंत तो एकरूप होतो; हें अन्न पुढें पच्यमानाशयांत पोंचल्यावर अग्नि पित्तरस व समानवायू यांच्या प्रक्रियेनें त्यांस अम्लत्व प्राप्त होऊन त्यांचें पित्तांत रूपांतर होतें. हेंच पुढें पक्वाशयांत पोंहचल्यावर तेथील वाताच्या प्रभावानें कटुभाव उत्पन्न होऊन त्यांचें वातद्रव्यांत रूपांतर होतें. टीकाकार 'शिवदास' यांनींहि वरीलप्रमाणेंच विचार प्रकट केले आहेत. 'कफादि स्थानेषु मनुष्याणां स्वभावेन मधुरादयः रसाः तिष्ठंति । ते च अन्नं स्वस्वस्वभावं नीत्वा कफादीन् जनयंति ॥'

ज्यावेळीं समानवायु रसमलविवेक सुरू करतो त्यावेळीं व्यानवायु शोषणाचें कार्य करून मलोत्सर्जनाचें कार्य अपानावर सोपविलें जातें.

'सोऽन्नं पचति तज्जांश्च विशेषान् विविनक्ति हि । सु. नि. १

त्रिधा मलस्तु रसमलविवेकसमानकाले एव अवस्थाभेदैः संभवंति' ॥ चक्रदत्त टीका

वर विशद केल्याप्रमाणें रसधातूस त्रिदोषांची जोड मिळाल्यावर तो 'केदरकुल्यन्यायानें' सप्तधातूंचें पोषण करितो.

"तत्र आहाररसः व्यानविक्षिप्तः यथास्वं सप्तसु धात्वग्निषु क्रमात् पच्यमानः स्वात्मभाव प्रच्युतिसमनंतरमेवप्राप्तरक्तादिधातुसंज्ञकः कालवत् अस्खलितबलप्रमाणः देहमूर्जयित्वा धातून् धातुमलांश्च पुष्णाति ॥" अष्टां. सं. शा. अ. ६॥ चरकाचार्यांनींहि सूत्रस्थानाच्या २८ व्या अध्यायांत वरील विचार प्रतिपादिले आहेत. त्रिधातु व इतर धातू यांची मूलोत्पत्ति आहाररसच होय.

(१) पंचाग्नीनें होणारें पाचन (पंचोष्माणः) = शरीरांतर्गत सूक्ष्माणूंतील घडणारें पाचन.

(२) त्रिधा विपाक होणारें महास्रोतसांतील पाचन = स्थूल पाचन

(३) रसमलविवेक-समान वायूच्या कर्तृत्वामुळें = शोषण व मलविसर्जन

(४) सप्त धातूत्पत्ति = रसादिधातुजनन

वै. गोखले यांनीं पुस्तकांतील पान ५४ वरील खालील विधानास आक्षेप घेतला आहे.

"आत्माधिष्ठित पंचमहाभूतविकार यांसच शरीर ही संज्ञा प्राप्त होते."

वरील वाक्य पंचमहाभूतांचें व त्रिदोषांचें सविस्तर विवेचन केल्यावर लिहिलें गेलें आहे. त्या सर्व विवेचनाचें अनुसंधान सोईस्करपणें विसरून अर्धेंच वाक्य घेऊन त्यांतील गर्भितार्थाकडे बुध्याच दुर्लक्ष करून गैरसमज प्रसृत करण्याचा प्रयत्न वै. गोखले यांनीं केला आहे असा भास होतो. आत्मा, पंचमहाभूतें व त्रिदोष यांची मूलभूत कल्पना, त्याची वाढ व आत्म्यापासून त्यांना प्राप्त झालेली शक्ति वरील कल्पनेंत विवेचिली आहे. चेतनाधातूंस मी आत्मा या संज्ञेनें संबोधिलें आहे. ऐंद्रिय जगतांत पांचभौतिक द्रव्याबरोबर चेतना धातु असतो.

'चेतनाधातुरतींद्रियश्च स नित्ययुक् सानुशयः स एव ॥' चरक शा. अ. १

"न चेत् कारणमात्मा स्यात् खादयः स्युः अहेतुकाः ॥' च. शा. १

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रस्तुत चर्चिल्या जाणाऱ्या विषयांत त्रिदोषासारख्या सेंद्रिय द्रव्यांचा आपणास विचार-कर्तव्य आहे. सजीव सेंद्रिय प्राण्यांत त्रिधातूंची उत्पत्ति व उत्क्रांति याचा विचारहि कर्तव्य आहे. आतां त्रिधातु मानव शरीरांत केव्हां प्रतीत होतात असा प्रश्न उद्भवतो. सूक्ष्म पंचमहाभूतावस्था व तन्मात्रावस्थेंत त्रिधातु असल्याचे दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. गर्भसंज्ञकावस्थेंत त्रिधातु दृग्गोचर होतात. या संदर्भात सुश्रुताचार्यांचे शारीरस्थानांतील तिसऱ्या अध्यायांतील वचन खालीं उद्धृत केलें आहे.

' तत्र स्त्रीपुरुषसंयोगे तेजः शरीरात् वायुः उदीरयति, ततस्तेजोऽनिलसंनिपातात् शुक्रं च्युतं योनि अभिप्रतिपद्यते, संसृज्यते च आर्तवेन, ततो अग्निषोमसंयोगात् संसृज्यमानः गर्भाशयं अनुप्रतिपद्यते, पुरुषः भूतात्मनासह अन्वक्षं सत्वरजतमोभिः वायुना च अभिप्रेर्यमाणः गर्भाशयं अनुप्रविश्य अवतिष्ठते । '

भूतात्मा = भौतिक शरीरेण सूक्ष्मेण लिंगशरीरेण - डल्हण. चरकाचार्यांनींहि शारीराच्या तिसऱ्या अध्यायांत वरीलप्रमाणें वर्णन केलें आहे. 'स गर्भाशयं अनुप्रादिश्य शुक्रशोणिताभ्यां संयोगम् एत्य गर्भत्वेन जनयति आत्मना आत्मानम् । ' वगैरे.

याच ठिकाणीं शुक्र, रजस्, रस वगैरे धातूंतील स्थूल पंचमहाभूतें बनतात. त्याचें स्पष्टीकरण ' शरीरं नाम चेतनाधिष्ठितं पंचभूतविकारसमुदायात्मकं समयोगवाहि ' या अवतरणांत मिळतें. भूतात्मा व पंचमहाभूतें यांस पंचेंद्रियद्रव्य, पंचेंद्रिय, पंचेंद्रियार्थ यांच्या अधिष्ठानाची अत्यंत जरूरी आहे. इंद्रिया-(करण) व्यतिरिक्त आत्मा कांहींच करूं शकत नाहीं.

तो ' आत्मा स्वतंत्र ' आहे.

(अ) " आत्मजः, करणैर्योगात् ज्ञानं तस्य प्रवर्तते ।

(ब) करणानि मनोबुद्धिर्बुद्धिकर्मेंद्रियाणि च ॥ " च. शा. अ. १

नेमकें याच ठिकाणीं पंचमहाभूतांत विकार होऊन वात, पित्त व कफ हे संभवतात.

वाय्वाकाशे वायुः, आग्नेयं पित्तं, अंभः पृथिवीभ्यां कफः ॥

—अष्टांगसंग्रह सू. अ. २०; सुश्रुत सू. अ. ४२

इन्दूच्या टीकेंत वरील विषयांचें उत्तम स्पष्टीकरण आहे. पंचमहाभूतें हीं कारण-द्रव्यें असून त्रिधातु हीं कार्य-द्रव्यें आहेत हें समालोचनकारांनीं विसरू नये. कारण-द्रव्यें व प्रकृतिद्रव्यें हा शब्दप्रयोग न्याय-शास्त्रांत वापरला जातो. त्रिधातूचें सेंद्रियत्व चेतनाधिष्ठित पंचमहाभूतापासून उद्भऊन तेच गुण इंद्रियें व इंद्रियार्थ यांत उतरतात.

भौतिकानि च इंद्रियाणि आयुर्वेदे वर्ण्यते । सुश्रुत चिकित्साधिकृत कर्मपुरुषांबद्दल जेव्हां आपणांस कर्तव्य असतें त्यावेळीं आत्मा, पंचभूतें (पंचेंद्रिय द्रव्य, पचेंद्रियें) त्रिधातू यांच्या अन्योन्य संबंधाचें स्पष्टीकरण होणें जरूर असतें.

मी वर निर्दिष्ट केलेल्या विधानांच्या पृष्टयर्थ शास्त्राधार द्यावेत असें वैद्य गोखले यांचा अभिप्राय दिसतो. ते शास्त्राधार खालीं देत आहे.

(१) कार्यकारण संबंधः- तत्र कारणानुरूपं कार्यामीतिकृत्वा सर्व एव एते विशेषाः सत्वरजतमोमयाः भवंति ॥ डल्हण टीका पहा. सु. शा. अ. १

(२) त्रिधातु (त्रिदोष) चा उगमः-वाय्वाकाश धातुभ्यां वायुः; अग्नेय पित्तं, अंभः पृथिवीभ्यां कफः। अष्टांग स. च. सू. अ. २०

(३) वरील नं. २ च्या कलमांतील शब्दप्रयोग सुश्रुतानीं सूत्रस्थानांत ४२ व्या अध्यायांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्रिधातूत्पत्तीबद्दल केला आहे तो पहावा.

(४) महाभूतापासून शरीरोद्भव–महागुणेभ्यश्च खपवनतेजोजलभूम्याख्येभ्यो महाभूतेभ्यः चेतना–धिष्ठितेभ्यः अभिनिर्वृत्तिः अंगस्य।

टीकाः– सत्वादयः एवं भूत भावेन परिणताः। अ. स. शा. अ. १

(५) वातपित्तश्लेष्माणः एव देहसंभवहेतवः···तदैभिरेव शोणित चतुर्थैः संभवस्थितिप्रलयेषु अविरहितं शरीरं भवति॥ सु. सू. अ. २१

(६) यस्माद्रक्तं विनादोषैर्नकदाचित् प्रकुप्यति। तस्मात् तस्य यथादोषं कालं विद्यात् प्रकोपणे॥
सु. सू. अ. २१

II+III वरील अवतरणापैकीं नं. २ व ३ त्रिधातु खालीं येत असल्याकारणानें 'त्रिवृत्करण' व 'त्रिदोषमय शरीर' या दोन्हींचें स्पष्टीकरण एकाच वेळीं करीत आहे.

ही त्रयी मी बनविली नाहीं

आयुर्वेदीय इंद्रियविज्ञान शास्त्रांतील मूलभूत तत्वांचे 'त्रिवृत्' करणा (त्रिधातु त्रिदोष) विषयीं वैद्य गोखले यांचें, पूर्वग्रहदूषित मत असावें असें दिसतें. ही त्रयी मी बनविली नसून चरक, सुश्रुत व वाग्भट या सारख्या अद्वितीय पूर्वाचार्यांनीं केवळ सद्यत्व म्हणून नव्हे तर त्याला शास्त्र व अनुभव यांच्या आधाराची बैठक आहे म्हणून. त्याची मांडणी एखाद्या दर्पणासारखी असून त्यांत सर्व अंगप्रत्यंगांचें दर्शन होतें. पूर्वाचार्यांनीं वरील सिद्धांत मांडतांना शास्त्र व कौशल्य याचा बेमालूम मिलाफ केला आहे. त्यांत गूढार्थ अगर तत्वज्ञान यांचा संबंध येत नाहीं.

पूर्वाचार्यांनीं त्रिधातूंच्या शब्दव्युत्पत्तीपासून विचार करून क्रमाक्रमानें द्रव्यगुण, शरीरक्रिया, संप्राप्ति व चिकित्सा वगैरे सारख्या शास्त्रीय विषयाची विशाल आयुर्वेदशास्त्रांतील, मांडणी पृथक्पणें न करितां संग्राहक (संयोगात्मक) रीतीनें करून सूत्रमय ग्रंथ लिहिले आहेत. वरील उद्देश साध्य होण्याचें दृष्टीनें त्यांना जरूर असलेलीं मूलभूत तत्त्वें सांख्य, वैशेषिक व न्याय या शास्त्रांतून त्यांनीं घेतलीं. सत्कर्मवादाचें तत्व मान्य करून आपल्या विषयांच्या मांडणीस आत्मा, प्रकृति व त्रिगुण या मूलभूत संस्थेचा उपयोग करून घेतला आहे. वरील तत्वांचा उपसिद्धांत म्हणून द्रव्य-गुण-कर्म यांची कल्पना सुचली. तदनंतर विषयाची मांडणी शास्त्रशुद्ध पायावर अधिष्ठित करण्याकरितां त्यांना उपयोगी पडणारी मूलभूत शास्त्रीय तत्वें क्रमाक्रमानें त्यांनीं आत्मसात् केली. "पिंडीं तें ब्रह्मांडीं व ब्रह्मांडीं तें पिंडीं" हें त्यांना उमगलें.

पुरुषोऽयं लोकसंमितः इत्युवाच भगवान् पुनर्वसुः आत्रेयः। यावंतः मूर्तिमंतः लोके भावविशेषाः तावंतः पुरुषे, यावंतः पुरुषे तावंतः लोके॥ च. शा. अ. ५ पहा.

रोग-कारणें, लक्षणें व उपचार ही समस्या सोडवितांना कारण, कार्य, द्रव्य, गुण व कर्म हा जो तर्कशास्त्रांतील सामान्य शास्त्रीय क्रम-जें तर्कशास्त्र चरकानीं मान्य केलें आहे–तोच शास्त्रकारानीं अंगिकारिला आहे. पांचभौतिकविचार पूर्वाचार्यांना त्यांच्या तर्कशुद्ध विचारांस उपयोगी पडत असल्याकारणानें तो त्यांनीं ग्राह्य मानिला आहे. तद्वतच त्रिधातुसिद्धांतांत पंचमहाभूतांचे सर्व गुणधर्म प्रतीत होत असल्याकारणानें त्याचा पुरस्कार केला आहे. 'वाय्याकाशधातुभ्यां वायुः' हें वृद्ध वाग्भटाचें वचन आहे. या अवतरणांतील धातु हा शब्द ध्यानीं ठेवण्यासारिखा आहे. इंदुकारांची टीका खालीलप्रमाणें आहे. धातुग्रहणं शक्तिस्वरूपप्रदर्शनार्थम्'। स्वास्थ्यरक्षणार्थ व रोगपरिहारार्थ त्रिदोष संस्था अत्यंत उपयोगी आहे, म्हणूनच पूर्वाचार्यांनीं तिचा स्वीकार केला आहे. त्रिदोष-सिद्धांतानें, द्रव्यगुण, शारीर, इंद्रियविज्ञान, संप्राप्ति (Pathology), कारणें (Etiology) व चिकित्सा या शास्त्रांचा उलगडा होतो. याच कारणा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्तव ' त्रिवृत् करणाची ' जरूरी होती व आहे. त्रिदोषसिद्धांत विशद करण्याचें हें स्थळ नव्हे. हें विवेचन जास्त न वाढवितां, ' व्यापिनः ', आश्रयरूपधातु व विशिष्ट-शक्तिमत् द्रव्याणि ' यांतील, सर्वसंमत शास्त्रकारांच्या लिखाणांतील, एकेक उतारा देतो.

(१) व्युत्पत्ति- वा- गति गंधयोः; तप्-संतापे. श्लिष-आलिंगने. (सु. प६ा)

(२) कार्यकारणभाव- पंचभूत = कारण द्रव्य; त्रिधातु = कार्यद्रव्य

(३) वायोरात्मैवात्मा, पित्तमाग्नेयं, श्लेष्मा सौम्यः,-डल्हणटीका सु. सू. अ. ४२

(४) शारीरशास्त्रदृष्ट्या (इंद्रियविज्ञानशास्त्र)

पंच वातस्थानें:- ज्ञानेंद्रियें, उरस्, हृदय, कंठ, नाभि, आमाशय, आमपक्वाशय, सर्वदेह, पक्वाशय, जननेंद्रिय, (व्यान), कटि, स्वेदवह व अंबुवह स्रोतस्.

पंच पित्तस्थानें:- आमाशय, आमपक्वाशय, यकृत्, प्लीहा, हृदय, त्वचा, नेत्रांतः पटल.

पंच कफस्थानें:- उरस्, आमाशय, मुख, कंठ, जिव्हा, शिरस्, संधि.

(५) शारीरक्रियाशास्त्रदृष्ट्या (कर्माणि)

वायु— उत्साहोच्छ्वास-निःश्वास ।

पित्त— पक्त्यूष्मदर्शनैः ।

कफ— स्थिरत्वस्निग्धत्वसंधिबंधक्षमादिभिः । वा. सू. अ. ११

(६) संप्राप्ति [पॅथॉलॉजी] लक्षणें व प्रकार

क्रम— संचयं च प्रकोपं च प्रसरं स्थानसंश्रयम् ।

व्यक्तिं भेदं च यो वेत्ति दोषाणां स भवेद् भिषक् ॥ सु. सू. अ. ११

लक्षणें— कुपित वातस्य-- स्रंसव्यास व्यधस्वाप सादरुक्तोदभेदनम् ।

कुपित पित्तस्य- दाहरागोष्मपाकिताः स्वेदः क्लेदः ।

कुपित कफस्य- स्नेहकाठिण्य कंडूशीतत्व गौरवम् । वाग्भट सू. अ. १२

(७) दोषप्रकोपाचीं कारणें-

वात— तिक्तोषणकषायाल्परूक्षप्रमितभोजनैः ।

पित्त— तिक्तकट्वम्लतीक्ष्णोष्णपटुक्रोधविदाहिभिः ।

कफ— स्वाद्वम्ललवणस्निग्धगुर्वभिष्यंदिशीतलैः ।

(८) चिकित्सोपक्रम-

वातस्य— स्नेह स्वेदः संशोधनम् ।

पित्तस्य— सर्पिषः पानं स्वादुशीतैर्विरेचनम् ।

कफस्य— श्लेष्मणो विधिना युक्तं तीक्ष्णं वमनरेचनम् । वा. सू. अ. १३

(९) इतर धातूंच्या मानानें त्रिधातूंचें वर्चस्व दाखविणारीं कांहीं सर्वसाधारण उदाहरणें.

(अ) वातपित्तकफा देहे सर्वस्रोतोनुसारिणः । च.

(ब) य एव देहस्य समा विवृध्दै त एव दोषा विषमा वधाय । वा.

(क) वातापित्तश्लेष्माणः एव देहसंभवहेतवः । सु.

(ड) तैरेव अव्यापन्नैः शरीरमिदं धार्यते । सु.

(इ) ते एव व्यापन्नाः प्रलयहेतवः । सु.

(फ) नर्ते देहः कफादास्ति न पित्तान्न च मारुतात् । सु.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(ज) दोषा एव हि सर्वेषां रोगाणां एककारणम् । वा.

(ह) तेषां सर्वेषां वातपित्तश्लेष्माणः दुष्टा दोषयितारः भवंति । वा.

(ग) यथा दुष्टेन दोषेण यथा चानुविसर्पता ।
निर्वृतिरामयस्यासौ संप्राप्तिर्जातिरागतिः ॥ मा. नि., वा.

(ख) कुपितानां हि दोषाणां शरीरे परिधावताम् ।
यत्र संगः खवैगुण्याद् व्याधिस्तत्रोपजायते ॥ सु.

(घ) स एव कुपितो दोषः समुत्थानविशेषतः ।
स्थानांतराणि च प्राप्य विकारान् कुरुते बहून् ॥ वा.

(च) रसाः स्वाद्वम्ललवणतिक्तोषणकषायकाः ।
तत्राद्या मारुतं घ्नंति त्रयास्तिक्तादयः कफम् ।
कषायतिक्तमधुराः पित्तमन्ये तु कुर्वते ॥ वा.

निदान व चिकित्सेंत, पंचमहाभूतें व सप्तधातूंच्या ऐवजीं, त्रिदोषांचा आधार घेतला जातो अशी उदाहरणें बरीच दाखवितां येतील. 'त्रिधातुमय शरीर' हा शब्दप्रयोग वैद्य गोखले यांनीं उपरोधिकपणें वापरला असावा असें दिसतें. असो.

शरीर या शब्दाची व्याख्या दुसऱ्या अध्यायांत पहिल्याच कलमांत दिलेली आहे. मी लिहिलेल्या मटेरिया मेडिका या ग्रंथांत औषधींच्या कार्याविषयीं वर्णन असून त्याचे परिणाम त्रिदोषांवर कसे होतात हें दर्शविण्याकरितां वातघ्न, पित्तघ्न व कफघ्न असे शब्द प्रयोग वापरिले आहेत. सूत्रस्थानाच्या अडतिसाव्या अध्यायांत सुश्रुतांनीं क्वचित् कोठें औषधींचे सप्तधातूवरील कार्याचें वर्णन केलें आहे. त्रिधातुव्यतिरिक्त इतर धातु हे आश्रयिणः आहेत हें पक्कें ध्यानांत ठेविलें पाहिजे. सप्तधातूंतील प्रथमचा जो रसधातू त्याची विकृति प्रथम झाल्याविना पुढील धातूंची विकृति होत नसते. आगंतुक दोषस्थिति अपवादात्मक आहे. असें असलें तरी अखेरीस त्रिधातूंची विकृति ही संभवतेच. व्याधीचें निदान ठरवितांना तें निश्चित करणाऱ्यानें रुग्णाच्या सभोंवारच्या परिस्थितीचा विचार करून तें ठरविलें पाहिजे.

(४) शब्दाचीं भाषांतरें चुकीचीं आहेत असें विधान करितांना वैद्य गोखले यांनीं छिद्रान्वेषी दृष्टीनेंच पुस्तकाचें परीक्षण केलें आहे असें वाटतें. पारिभाषिक संज्ञांचे भाषांतर करितांना सर्व संग्राहक असा एकच शब्द उपयोगिला आहे. माझ्या लिखाणांत असे जे शब्दप्रयोग वापरिले आहेत त्या योगें विचाराचा गोंधळ होण्याचें कांहींच कारण नाहीं. उदीरयेत्, स्तंभन वगैरे सारख्या शब्दास बरेच अर्थ आहेत. एका अर्थी एकच शब्द मी वापरला आहे. उदाहरणार्थ 'उदीरयेत्' याचा 'दृढीकरण वा शिथिलीकरण' असे अर्थ होऊं शकतात. या ठिकाणीं 'उदीरण' याचा अर्थ धातूंतील समत्व नाहींसें होणें असा आहे. वरील सारख्या शब्दांची शोध करण्याची कामगिरी प्राध्यापकवर्गावर सोपविली आहे. शब्दार्थ उकलण्यांत ते वाकबगार समजले जातात. निदानचिकित्सेंत हा विषय पुनश्च येत असल्याकारणानें त्याचें सांगोपांग विवेचन तेथेंच येऊं शकेल. वैद्य गोखले यांना, चरकाच्या सूत्रस्थानांतील बाविसाव्या अध्यायांत स्तंभनाचें जें वर्णन दिलें आहे त्यास अनुसरून स्तंभन या शब्दाचें भाषांतर एका शब्दांत देण्याची, विनंति करितो.

शीतं मंदं मृदु श्लक्ष्णं रूक्षं सूक्ष्मं द्रवं स्थिरम् ।
यद् द्रव्यं लघु चोद्दिष्टं प्रायस्तत् स्तंभनं स्मृतम् ॥

'वक्तुं सुकरं कर्तुं दुष्करम्'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्रिदोषसिद्धांताच्या व भाषांतराच्या माझ्या ग्रंथांतील मांडणींत, शास्त्रीय सिद्धांताचे बाबतींत मुळेकुठार असें कांहींच नाहीं. शास्त्राभ्यासाचे वेळीं विनोद अगर चिडखोरपणा याचा उपयोग होत नसतो. कोणत्याहि ग्रंथाचें परीक्षण करितांना निःपक्षपाती अन्तःकरणानें निवाडा देणें जरूर असतें. वैद्य गोखले यांनीं दूषित दृष्टीनें सर्व परीक्षण लिहिलें आहे. ग्रंथांत कांहीं दोष नसतील अगर नाहींत असें माझें म्हणणें नाहीं. ते दोष पुढील आवृत्तींत मला तशी संधि मिळाल्यास सुधारतां येतील.

त्रिदोषसिद्धांत विस्तृत रीतीनें कां मांडला ?

माझ्या ग्रंथांत त्रिदोष–सिद्धांतास बरीच पानें खर्ची पडलीं आहेत, त्याविषयीं चार शब्द लिहिणें अस्थानीं होणार नाहीं. रुग्णास उपचार करण्यापूर्वीं रोगोपत्तीचें मूळ कारण वा वाढत जाणारीं लक्षणें यांचा संपूर्ण विचार केल्याविना उपचार करू नयेत, असें पूर्वाचार्यांनीं निक्षून बजाविलें असतांहि वैद्यवर्ग त्याच-कडे दुर्लक्ष करीत असतात; म्हणूनच 'त्रिदोष सिद्धांत' विस्तृत रीतीनें मांडिला आहे. वैद्यक शास्त्रांवरील कोणत्याहि आधुनिक ग्रंथांतील दोषनिश्चितीविषयींच्या माहितीपेक्षां वाग्भटांतील सूत्रस्थानांतील बारा व तेरा या अध्यायांत दिलेल्या सूचना अमूल्य आहेत. आयुर्वेदांतील दोष (रोग) उपचारद्धपद्धति निर्दोष व सयुक्तिक आहे. दोषचिकित्सेस प्रथम स्थान, लक्षण चिकित्सेस दुय्यम स्थान देऊन, रोगचिकित्सा अनुत्तेजिली आहे. याच अर्थाचें अवतरण खालीं दिलें आहे.

हेतौ लिंगे प्रशमने रोगाणामपुनर्भवे । ज्ञानं चतुर्विधं यस्य स राजार्हो भिषक्तमः ॥
सर्वेषां व्याधीनां वातपित्तश्लेष्माण एव मूलम् तल्लिंगात्, दृष्टफलात्, आगमाच्च ।
दोषधातुमलसंसर्गात् आयतनविशेषात् निमित्ततश्च एषां विकल्पः ।

आयुर्वेदांत रोगावर औषधें नाहींत, दोषावर आहेत

लक्षणांच्या गुंतागुंतीमुळें दोषांची निश्चिति जर लवकर होत नसेल तर सर्व लक्षणांचा सूक्ष्म अभ्यास करून उपचार करणें प्राप्त असतें. आयुर्वेदांत रोगांवर औषध नसून दोषांतील वैषम्य नाहींसे करून दोष साम्यावस्था — शारीरिक क्रियांत — प्रस्थापित होण्यासाठीं औषधें आहेत व तींच वापरलीं जातात. 'रोगस्तु दोषवैषम्यं, धातुसाम्यमरोगता' हीं आयुर्वेदाचीं बोधवचनें आहेत. रुग्णांतील एखाद्या मुख्य लक्षणाची तीव्रता कमी करणें हें आयुर्वेदाचें उद्दिष्ट कार्य नसून रोगाची पुनरावृत्ति होऊं नये हें त्याचें ध्येय आहे. शरीरांतील सूक्ष्म जीवाणू (Cells), धातु, रक्तवाहिन्या, रसवाहिन्या, इंद्रियें, रस (Secretions + Enzymes) व मलायनें या सर्वांतून दोषांचें कार्य घडत असतें. यास्तव द्रव्यांचे गुण व कार्य सूक्ष्म रीतीनें अभ्यासून दोषवैषम्य नाहींसें होण्याकरितां औषधी वापरावीं लागतात. निघंटुकारानीं दोषानुरूप औषधी द्रव्यांचे गुणकार्यासंबंधीं वर्णन दिलें आहे. इंद्रियविज्ञान व संप्राप्ति (Pathology) याची कल्पना दोषांतच सामावलेली असल्याकारणानें वाचकांचें लक्ष वेधावें म्हणून माझ्या ग्रंथांत तत्संबंधीं एका स्वतंत्र भागांतच त्याचें विवेचन केलें आहे. हें विवेचन प्रस्तुत ग्रंथांत जरूरीपुरतेंच दिलें आहे. वैद्य गोखले यांनीं माझ्या प्रस्तुत ग्रंथावरील समालोचनांत अत्यंत गंभीर आरोप केल्याकारणानें त्यांना उत्तर देणें जरूर वाटलें. तें नाईलाजानें जरासें लांबलें आहे. याची त्यांनीं माफी करावी अशी विनंति आहे. याउप्पर ग्रंथाच्या गुणदोषांची छाननी मी वाचकवर्गावर सोपवितो. इतिश्रीशम् ॥

११३ कप बळगांव, तारीख ५–२–५३ डॉ. एच्. व्ही. सावनूर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

.... चरकाचार्य डॉ. हणमंतराव सावनूर ....

(लेखकः-वै. वा. नृ. ग्रामोपाध्ये, आयुर्विद्याविशारद, बेळगांव)

बेळगांव येथील सुप्रसिद्ध डॉ. सावणूर हे ३ जून १९५३ रोजीं वैकुंठवासी झाले. ते डॉक्टर असूनहि त्यांनीं आयुर्वेदाच्या क्षेत्रांत बरीच महत्वाची कामगिरी केली आहे. ते कट्टे आयुर्वेदाभिमानी होते. त्यांच्या कामगिरीबद्दल वैद्यसमाज त्यांचा ऋणी आहे.

बेंगळूर वैद्यसंमेलनाचे अध्यक्ष

इ. स. १९२५ सालीं बेंगळूर येथें द्वितीय कर्नाटक वैद्य-संमेलन भरलें त्यावेळीं डॉ. सावनूर यांना अध्यक्ष नेमलें होतें. वैद्यक शिक्षणाची वाढ व्हावी म्हणून त्यांनीं इ. स. १९२६ सालीं बेळगांव येथें आयुर्वेद विद्यालय चालूं केलें. तें चार वर्षें चालूं होतें. त्यास लोकलबोर्डाकडून व म्युनिसिपॉलिटीकडून मदत मिळत असे. एक धर्मार्थ आयुर्वेदिक दवाखानाहि चालूं केला. त्याकामीं वैद्यरत्न महादेवशास्त्री वाटवे यांना मुद्दाम बोलावून घेतलें होतें. ते सांगलीस होते. विद्यालयामध्यें वैद्यरत्न वाटवेशास्त्री, वै. बापूशास्त्री काजरेकर, डॉ. साठे, डॉ. लागू, डॉ. जोशी हे शिकविण्यास येत असत. त्यावेळीं लोकलबोर्डाचे प्रेसिडेंट पंडिताप्पा चिक्कोडी होते. त्यांनीं दरसाल १५०० रुपये ग्रँट मंजूर केली होती. नंतर त्यांच्या जागीं अंगडी हे अध्यक्ष झाले. त्यांनीं ती ग्रँट बंद केली. त्यामुळें विद्यालय व दवाखाना बंद पडला. नंतर आयुर्वेदिक दवाखाना म्युनिसिपॉलिटीच्या ताब्यांत देण्यांत आला, व त्यांनीं तो दवाखाना चालूं ठेवण्याचें कबूल केलें. याकामीं डॉ. बाके यांची चांगली मदत झाली. वैद्यरत्न वाटवेशास्त्री यांची म्युनिसिपल दवाखान्यावर नेमणूक झाली. आतां बेळगांव येथें तीन आयुर्वेदिक दवाखाने आहेत.

कर्नाटक आयुर्वेद विद्यापीठ

दानशूर कैलासवासी बसाप्पा कंकणवाडी यांनीं बेळगांव येथें १९३३ सालीं कर्नाटक आयुर्वेद विद्यापीठ चालूं केलें. त्यावेळीं लिंगराज आर्टस् कॉलेज नवीनच चालूं झालें होतें. तेथेंच हें विद्यालय होतें. त्याकामीं डॉ. सावनूर यांनीं बरीच मदत केली. ते वेळोवेळीं येऊन सल्लामसलत देत असत. त्यावेळीं माझी तेथें शिक्षक म्हणून नेमणूक झाली होती. त्यामुळें माझा व डॉ. सावनूर यांचा निकट संबंध आला. त्यावेळीं गांवांतील डॉ. टी. जी. जोशी, डॉ. तेरगुंडी, डॉ. पोतदार, डॉ. शिंदे व वै. बापुशास्त्री काजरेकर, वै. वाटवेशास्त्री इत्यादि वैद्य, डॉक्टर विनावेतन रोज शिकविण्यास येत असत.

'कर्नाटक आयुर्वेद विद्यापीठ' ही संस्था १९४५ सालअखेर चांगल्या स्थितींत चालूं होती. सरकारी मान्यताहि मिळाली होती तिला पण सरकारनें ती मान्यता १९४६ मध्यें काढून घेतल्यानें ती संस्था बंद पडली. पण सरकारनें शुद्धायुर्वेदाच्या ३॥ वर्षांच्या कोर्सला मान्यता दिल्यानें पुन्हां ती शिक्षणसंस्था यंदापासून चालूं झाली आहे. आज डॉक्टर हयात असते तर त्यांना फार आनंद झाला असता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डॉ. ह. व्यं. सावनूर यांनीं वापरलेल्या विशेष औषधांची माहिती

तारामंडूरगुड

वावडिंग, चित्रक, चवक, त्रिफळा, त्रिकटु मिळून ९ भाग, मंडूरभस्म ९ भाग, यांत दुप्पट गोमूत्र घालून व ९ भाग गूळ घालून तें मन्दाग्नीवर शिजवावें व चांगलें आटून गोळ्या होण्यासारखें घट्ट झालें म्हणजे त्यावर स्नेहाचा हात फिरवावा व स्निग्ध भांड्यांत ठेवावें.

परिणामशूळ, पोटदुखी असणाऱ्या, माणसानें जेवणापूर्वी, जेवणामध्यें व जेवणानन्तर यांची १।१ बोराएवढी गोळी द्यावी.

हा योग, पोटदुखी, कावीळ, पांडुरोग, सूज, मंदाग्नि, मूळव्याध, ग्रहणीरोग, कृमि, गुल्म, उदर, अम्लपित्त, व स्थूलपणा यांचा नाशक आहे.

वाळलेल्या भाज्या, विदाही, अम्ल, तिखट अन्न, हें वर्ज्य समजावें.

—भैषज्यरत्नावली, शूलाधिकार

कुमारकल्याणरस

रससिंदूर, मौक्तिकभस्म, सुवर्णभस्म, अभ्रकभस्म, लोहभस्म, सुवर्णमाक्षिकभस्म, सर्व समभाग.

यास भावना कोरफडीच्या रसाच्या देऊन मुगाएवढी बारीक गोळी बांधावी.

वय, अवस्था यांचा विचार करून एक अगर अर्धी गोळी दूध आणि साखरेबरोबर द्यावी.

बालकांचा ज्वर, श्वास, ओकारी, पारिगर्भिक, ग्रहदोष, अंगावर दूध न पिणें, कावीळ, हगवण, रोडपणा, अग्निविकृति, हे विकार कुमारकल्याणरसानें बरे होतात.

— भैषज्यरत्नावली, बालरोगाधिकार

प्रवाळ, प्रवाळ (सू.पु.)

जेथें नुसतें प्रवाळभस्म असें म्हटलें आहे तेथें तें [चंद्रपुटी] जाणावें. सूर्यपुटी प्रवाळास प्रवाळभस्म [सू. पु.] नांव दिलें आहे.

प्रवाहीकल्प अश्वगन्धा, सारिवा

अश्वगन्धारिष्ट, सारिवासव, पुनर्नवासव यांना प्रवाही अश्वगंधा, प्रवाही सारिवा अशीं नांवें दिलीं आहेत.

अभ्रकभस्म

'अभ्रकभस्म' असें जेथें म्हटलें आहे तेथें तें शतपुटी अभ्रकभस्म समजावें.

मृगशृंग (साधे), मृगशृंग (कास)

मृगशृंग भस्मास रुईच्या चिकाच्या भावना दिल्या म्हणजे त्यास मृगशृंग (कास) असें संबोधिलें आहे. रुईच्या भावना न दिलेलें मृगशृंगभस्म हें मृगशृंगभस्म [साधें] होय.

धात्रीरसक्रिया

डॉ. सावनूर व डॉ. जठार हे आपल्या औषधी-योजनेंत धात्रीरसक्रिया या औषधाचा वापर विशेष करीत असत व आजहि करतात. आंवळ्याचा रस काढून तो बाटलींत अगर बरणींत भरून ठेवतात व रोग्याला धातुबल प्राप्त व्हावें म्हणून इतर पातळ औषधासह वा नुसताच हा आंवळ्याचा रस पाण्यांत मिश्र करून देतात. एका वेळीं १ ड्राम (१ चमचा) हें त्याचें सामान्य प्रमाण आहे.

हा रस बरणींत तसाच सुकत जातो, व त्याची वडी, पूड बनते. ती पूड कोरड्या औषधांत मिसळून देता येते. उदाहरणार्थ, पान ९२ पहा, गरोदरपणांतील अशक्तता- येथें गर्भपालरसाबरोबर धात्रीरसक्रियाचूर्ण दिलें आहे.

---

१२५ रु. ची देणगी

जुलै महिन्यांत एका वैद्यांनीं नाशिकच्या शुद्ध आयुर्वेद विद्यालयास १२५ रु. ची देणगी दिली आहे. देणगीदाराच्या इच्छेनुसार त्यांचें नांव जाहीर करण्यांत आलेलें नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कर्नाटकाचे धन्वन्तरी —

लेखकः वै. दा. द. जोशी
आयुर्विद्याविशारद, सांगली

"किडकिडीत पण निरोगी शरीर प्रकृति, निगर्वी व स्वाभिमानी वृत्ति, आणि रोग्याशीं अत्यंत ममतेनें वागून त्यांच्यावर छाप पाडणारा डॉक्टर" असें डॉ. वेंकटेश सावनूर यांचें थोडक्यांत वर्णन करतां येईल.

सालस व गरीब स्वभाव

डॉक्टर सावनूर गरीब रोग्यांकडून पैसा न घेतां आपुलकीनें त्यांचें रोगनिवारण करीत. इतकेंच नव्हे तर प्रसंगीं पदरचा पैसा खर्चून त्यांच्या अन्नपाण्याचीहि व्यवस्था करीत. इतके हे डॉक्टर रोग्याशीं अत्यंत उदारतेनें व ममतेनें वागत. डॉक्टर साहेबांच्या या सालस व गरीब स्वभावाचा पुष्कळ श्रीमान् रुग्ण गैरफायदा घेऊन त्याचे फीचे पैसे बुडवीत, पण या लोकांविषयीं ते कधीं चुकूनहि कटु शब्द बोलल्याचे कुणाच्या ऐकिवांत नाहीं. जणुं कलियुगातील कर्णच असा डॉक्टरांचा स्वभाव होता.

सरकारी मान्यतेसाठीं चळवळ

डॉ. सावनूर जरी ॲलोपॅथीचे डॉक्टर होते तरी आयुर्वेदशास्त्राबद्दल त्यांना फार प्रेम होतें. भारतीय जनतेस आयुर्वेदीय औषधेंच जास्त गुणकारी ठरतील व तीं त्यांस उत्तम मानवतील ही अशी त्यांची पक्की समजूत होती; म्हणूनच त्यांनीं आयुर्वेदास सरकारी मान्यता मिळावी म्हणून चळवळ सुरू केली. १९१६ सालीं बेळगांवास कर्नाटक प्रांतिक होमरूलची परिषद कै. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखालीं भरली असतांना डॉ. सावनूरांनीं आयुर्वेदास सरकारी मान्यता मिळावी म्हणून त्या परिषदेंत ठराव आणला व तो परिषदेनें लो. टिळकांच्या पूर्ण शिफारशीनें एकमतानें पास केला. यावरून डॉ. सावनूरांची आयुर्वेदासंबंधीची दृढ श्रद्धा व जाज्वल्य अभिमान दिसून येतो.

अखिल कर्नाटक आयुर्वेद संमेलन, अधिवेशन १ लें, बेळगांव

१९२४ सालीं बेळगांव येथें भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेसच्या अधिवेशनाबरोबरच वरील संमेलन भरलें होतें. तें भरविण्याची सर्व खटपट डॉ. सावनूर (उजवीकडे शेवटीं), डॉ. बाक्रे (डावीकडे शेवटीं) आदि मंडळींनीं केली होती. अध्यक्षस्थानीं मद्रासचे सुप्रसिद्ध कॅप्टन श्रीनिवासमूर्ति हे होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निखिल कर्नाटकांत जागृति

१९२४ साली डॉ. सावनूरांनींच अगदीं प्रथम निखिल कर्नाटकांत आयुर्वेदासंबंधीं जागृति उत्पन्न करून, निखिल कर्नाटक आयुर्वेद सम्मेलनाचें प्रथम अधिवेशन भरविलें. या सम्मेलनानिमित्त ठिकठिकाणीं दौरा काढून कर्नाटकांतील सर्व वैद्यबंधूमध्यें संघटना निर्माण करण्याचें महान् कार्य डॉ. साहेबांनीं केलें. अशा प्रकारें कर्नाटकांतील वैद्यवर्गामध्यें जागृति उत्पन्न करून कर्नाटकांत आयुर्वेदाचा पाया दृढमूल करण्याचा प्रयत्न त्यांचेकडून झाला. स्वतः डॉक्टर असून आयुर्वेदांसंबंधींची ही अपूर्व आपुलकी पाहून कर्नाटकांतील वैद्यवर्ग तर खूष झालाच, पण सर्वसामान्य जनतासुद्धां आयुर्वेदांवरील त्यांच्या या भक्तिभावाचें सहर्षानें स्वागत करूं लागली.

बेळगांव येथें वैद्यक विद्यालय

डॉ. सावनूर यांनीं वैद्यरत्न वाटवे व वैद्यरत्न रामभाऊ जोशी वगैरेंच्या सहकार्यानें एक आर्यांग्ल वैद्यक विद्यालय काढलें. या विद्यालयांत स्वतः डॉ. सावनूर हे विनावेतन अध्यापनाचें कार्य करीत. विद्यालयास आर्थिक साहाय्य डॉक्टरसाहेबच स्वतः पदरची झीज सोसून करीत. यावरून आयुर्वेदाच्या उर्जितावस्थेसंबंधींची डॉ. साहेबांची तळमळ व्यक्त होणार आहे. हें विद्यालयहि ४।५ वर्षें उत्तम चाललें. पण जनतेकडून व सरकारकडूनहि आर्थिक सहाय्य मिळविण्याची शिकस्त करूनहि तें मिळूं शकलें नाहीं म्हणून तें विद्यालय थोड्याच अवधींत नाइलाजानें बंद पडलें.

कर्नाटक आयुर्वेद विद्यापीठ

यानंतर डॉ. साहेबांनीं सुमारें २० वर्षांपूर्वी बेळगांव येथें बसप्पण्णा कंकणवाडी या श्रीमान् पण आयुर्वेदाभिमानी कर्नाटकांतील उदार गृहस्थाकडून ५० हजार रुपयांची देणगी मिळवून कर्नाटक आयुर्वेद विद्यापीठाची ' स्थापना करविली. हें विद्यापीठ प्रारंभीं बेळगांव येथील लिंगराज कॉलेजमध्यें सुरूं झालें. नंतर संस्थेचा व्याप वाढल्यामुळें सुमारें १० वर्षांपूर्वी हें आयुर्वेद विद्यापीठ बेळगांव नजीकच्या खासबाग येथील प्रशस्त जागेंत नेण्यांत आलें. या जागेंत आयुर्वेद विद्यालय, आयुर्वेदीय औषधांचा कारखाना व डोळ्यांचें हॉस्पिटल असें आयुर्वेदाचें विविध कार्य मोठ्या जोमानें चालूं आहे. डॉ. साहेबांच्या आयुर्वेदांवरील निस्सीम प्रेमाचें हें एक जिवंत स्मारकच होय असें म्हणावयास हरकत नाहीं.

नेत्रवैद्य मोदी यांचें यश

या डोळ्यांच्या हॉस्पिटलचे तज्ज्ञ वैद्य मोदी हे अखिल कर्नाटकांत नेत्रयज्ञ ठिकाठिकाणीं सुरूं करून कर्नाटक आयुर्वेद विद्यापीठाचें यश द्विगुणित करीत आहेत. लोक त्यांना डॉ. मोदी या नांवानें संबोधित असून ते या कर्नाटक आयुर्वेद विद्यापीठाचे एक माजी पदवीधर वैद्यच आहेत. डॉ. साहेबांच्या आयुर्वेदोद्धाराचें स्वप्न प्रत्यक्ष कृतींत आणण्याचें कार्य हें ' आयुर्वेद विद्यापीठ ' करीत असल्याचें पाहून डॉ. सावनूरना फार आनंद वाटत असे.

ब्राह्मी, वचा, शंखपुष्पी

१९३२ साली बेळगांवास मी माझा खाजगी ' राष्ट्रीय आयुर्वेदिक दवाखाना ' नावाचा दवाखाना चालविला होता. मी अगदीं नवशिका पदवीधर वैद्य होतों. माझा १ वर्षाचा मुलगा बालग्रहानें आजारी होता. मी माझ्या परीनें उपाय चालूं ठेवले होते. पण म्हणावा तसा जलद गुण वाटेना, म्हणून पत्नीनें डॉ. सावनुराकडे मुलास नेण्याचा आग्रह धरला. मी नाइलाजानें व मोठ्या नाखुषीनें डॉ. साहेबांचेकडे मुलास नेलें. डॉ. साहेबांनीं मुलास अत्यंत काळजीपूर्वक, व प्रेमळपणें तपासून आयुर्वेदिक औषधांचीच योजना केली. ' ब्राम्ही, वचा, शंखपुष्पी या गटांतील औषधेंच डॉ. साहेबांनीं त्यावेळीं वापरलीं होतीं, व त्या योजनेनें ४ च दिवसांत मुलास बरें वाटलें. या औषधोपचारांबद्दल माझेकडून मी पैसे द्यावयास गेल्यावेळीं डॉ. साहेबांनीं १ पैहि घेण्याचें नाकारलें. यावरून डॉ. साहेबांची आयुर्वेदावरील श्रद्धा व उदार स्वभाव याची खात्री पटणार आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डॉ. चे जांवई डॉ. तेरगुंडी

डॉ. सावनुरांना मुलगा नसून एकुलती एक संजीवच काय तें अपत्य आहे. त्यांचे जावई म्हणजे बेळगांवचे सुप्रसिद्ध डॉक्टर तेरगुंडी हे होत. डॉ. तेरगुंडी हे बेळगांव जिल्हा होमगार्ड कमांडंट असून बेळगांव नगरपालिकेचे सन्मान्य सभासदहि आहेत. गेलीं दहा वर्षे डॉ. साहेबांनीं आपला खाजगी दवाखाना बंद करून तो आपल्या जावयांच्या स्वाधीन केला आहे. जावयांनीं दवाखाना उत्तम रीतीनें चालविला आहे.

अशा प्रकारें कर्नाटक व महाराष्ट्रांत मशहूर असलेले हे कर्नाटकाचे धन्वन्तरी काळानें आपल्यांतून नेल्यामुळें आयुर्वेदाची अपरिमित हानि झाली आहे.

सेवासंघास भेट

नाशिक जिल्ह्यांत प्रत्येक तालुक्यांत असलेल्या हेल्थ असिस्टंटस्‌ना ३ महिन्याच्या विशेष शिक्षणासाठीं नाशिक येथें जिल्हा सार्वजनिक आरोग्य खात्यानें बोलाविलें होतें. त्यापैकीं १२ जणांनीं आयुर्वेद सेवा संघाच्या औषधीकरण, अध्यापन आदि कार्यांची पाहणी केली व जिल्ह्यांतील एक अत्यंत उपयुक्त संस्था असे उद्‌गार काढले.

कुष्ठग्रामाची स्थापना

कुष्ठरोगमुक्त बांधवांना स्वावलंबनानें व स्वयंपूर्ण रीतीनें जगतां यावें यासाठीं या गांवाची स्थापना करण्यांत आली आहे. हें गांव मध्य रेल्वेवर मूर्तिजापूर पासून ४ मैलावर अनभोरा गांवाजवळच्या ४३१ एकर जमिनींत वसविण्यांत येणार आहे.

आरोग्यमंत्र्यांच्या हस्ते समारंभ

ता. १०-७-५४ रोजीं सकाळीं भारताच्या आरोग्यमंत्री राजकुमारी अमृतकौर यांच्या हस्तें या श्रीपरमहंस स्वामी कुष्ठग्रामाचा कोनशिला समारंभ झाला. ही जमीन श्रीमंत विठ्ठलराव जमादार यांनीं महारोगी सेवामंडळास दान दिली आहे.

प्रत्येक कुष्ठरोगमुक्त बांधवास राहावयास झोपडी व ४।५ एकर शेती, शेतीचीं आवजारें, बैल वगैरे सामुदाईक उपयोगासाठीं दिलीं जाणार आहेत.

या समारंभास भारत सरकारचे व मध्यप्रदेश सरकारचे आरोग्यप्रमुख अधिकारी व मंत्री हजर होते.

रसोनवृष्यवटी ५ रु. तोळा

कंदर्पवृष्यवटीचे गुणधर्म मिळावेत पण कंदर्पाच्या शीतवीर्याची बाधा होऊं नये व लसुणाच्या उष्णवीर्याचा लाभ घेतां यावा यासाठीं कंदर्पवृष्यवटींतील कांद्याच्या रसाऐवजीं लसुणाचा रस घालून ही वटी बनविण्यांत आली आहे.. वातप्रकृति लोकांना ही वटी हितावह आहे.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक

लहान मुलांच्या मुडदूस विकारावर

अज + उत्तमांग वसंत ८ रु. तोळा

अजाच्या मेंदूपासून हा वसंत बनविण्यांत आला आहे. उत्तरतंत्रांत बालामयप्रतिषेध अध्यायांत सशाच्या उत्तमांग्या काढ्यांत घृत सिद्ध करून तें पुकट (मुडदूस-रिकेट्स्) मुलाला पुष्टि येण्यासाठीं सांगितलें आहे. घृतकल्पना टिकाऊ नसल्यामुळें उत्तमांगापासून मधुमालिनीवसंताप्रमाणें हा उत्तमांगवसंत तयार करण्यांत आला आहे. शरीरधातुसामान्यात् नेहमीं मिळण्याच्या दृष्टीनें सशाऐवजीं अजाची योजना केली आहे.

शशउत्तमांगापासूनहि वसंत बनविण्याची योजना चालू आहे.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डॉ. सावनूर यांची कांहीं कौटुंबिक माहिती

डॉ. सावनूर यांच्या जनक वडिलांचें नांव रामचंद्रराव. डॉक्टरांचे चुलते चार, श्री. वेंकटराव, श्री. राघवेंद्रराव, श्री. भास्करराव श्री. कोन्हेराव. पैकीं चुलते वेंकटराव यास पुत्रसंतान नसल्यामुळें त्यांनीं डॉ. सावनूर यांना दत्तक घेतलें.

× × ×

डॉक्टर सावनूर यांना श्री. वेंकटराव व श्री. नारायणराव असे दोन सावत्र भाऊ पैकीं श्री. नारायणराव हे दत्तक गेले आहेत.

डॉक्टर सावनूर यांना आयुष्यांत २ वेळ आंत्रिक सन्निपात (टायफाइड) झाला होता, त्यामुळें त्यांची प्रकृति क्षीण झाली.

× × ×

डॉ. सावनूर यांना ३।४ मुलें झालीं. त्यापैकीं फक्त २ मुलीच वाचल्या. त्यापैकीं एक बागलकोटास सोलांपट्टी यांजकडे दिली होती, ती पहिल्या बाळंपणांतच परलोकवासी झाली. तिच्या मुलीचा डॉक्टरांनीं सांभाळ केला. ती डॉक्टरांच्या घरींच राहते.

डॉ. सावनूर यांची दुसरी मुलगी डॉ. हणमंत रामचंद्र तेरगुंडी यांना दिली आहे. तिला ६।७ मुलें आहेत. या सर्व नातवंडांत डॉक्टरसाहेब आनंदानें रममाण होत असत. ते कधीं उदास नसत.

× × ×

डॉक्टरांच्या धर्मपत्नी या स्वभावानें साध्या-भोळ्या होत्या. बदरीनारायणाच्या प्रवासांतच त्या परलोकवासी झाल्या.

डॉक्टरांचा स्वभाव भिडस्त होता. ते आप्ते-ष्टाकडून अगर शिष्यांकडून कोणतीच सेवा स्वीका-रीत नसत.

ते कर्मयोगी होते. सर्व हयात त्यांनीं कर्मयोग्या-प्रमाणें व्यतीत केली.

४० वर्षांवरील **अनुभव** आणि सर्व देशभर पसरलेल्या नऊ वैद्यकीय प्रयोग शाळांतील वैद्यक शास्त्रीय पंडितांचें कार्य हा जम्मींच्या कीर्तीचा पाया होय.

* जम्मींचा
रिपोर्ट
मागवा



जम्मीचें लिव्हरक्युअर दरवर्षी हजारों मुलांचें यकृताच्या विकृतिपासून संरक्षण करून त्यांना पुनः आरोग्य प्राप्ति करून देतें.

आतां सोयीस्कर आकाराच्या वड्या मिळतात

जम्मी वेंकटरमणय्या ॲन्ड सन्स

"जम्मी बिल्डिंग", मयलापूर, मद्रास ४ मुंबई शाखा: 'पारेख मॅन्शन', सॅन्डहर्स्ट रोड (पश्चिम)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

The Curriculum of The Ayurvedic State Faculty, Bombay.

This curriculum is proposed by Dr. H. V. Savanur, L. M. S. Consulting Practitioner, Belgaum, for the one proposed by the Faculty of Indian Systems of Medicines, Bombay.

If one is allowed to give a candid opinion, he can say that the resolutions of the Ayurvedic State Faculty regarding the curriculum & the standard for admission have been very disappointing. The voice of the Ayurvedists has after all ended as a cry in the wilderness. Committees have been founded and their opinions taken; long tours over the whole of India have been undertaken, but the knot has remained a knot and it appears to seal the fate of Ayurveda. It has been a tragedy of unfulfilment. Great hopes were entertained when the reports of the Youth Committee and the Chopra Committee were out. The present resolutions do not certainly do any justice to the so-called impressions of the committees voiced in the reports. The aims and objects were clearly mentioned and the measures to meet the situation were still more clearly put forth.

To foster and to raise the standard of the Indian System of medicine and to promote research there-in, we must first remove the draw-backs which prominently stand in our way & which can be easily be rectified. Instead of directing their thoughts in the most natural way, the Faculty has begun at the wrong end and caused confusion worst confounded. New issues have been placed before the Government and *the rope round the neck of Ayurveda has been tightened*. We must first consider that it is a matter of education and so, that it would take a long term to correct the mistakes and approach our aim. Twelve years are nothing in the history of rejuvenation of a science which is meant to afford medical relief to forty crores of individuals. If we only review the history of the educational policy pursued by the Governments during the last hundred years we will see how slowly things are progressing. The question of Ayurvedic Education has just now shot-up; the bud is not yet seen. In fact, it is the time to prepare the ground and enrich the soil by allowing air, water and sunshine. The distance to reap the fruit is long way. Unfortunately the scythe has been at an odd moment used by the Faculty for removing the bud and not the noxious mushrooms.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

In chalking out a policy or a scheme we have first to look at (1) the situation of the area in which we have to work out our problems (2) to provide facility and allow sufficient time for a healthy responce and a natural progressive advancement in the events and (3) to propose higher attainments after the primary and secondary stages in the development scheme are realised. It is certainly creditable that the Govt. made a good beginning. The Board might not have been able to do the needful owing to lack of facilities, but the Faculty which claims to do responsible service should have been more practical.

It is all the result of impatient idealism. There is much to learn from the history of Grant Medical College, Bombay and the B. J. Medical School Poona. What was the standard of education one hundred years ago? and what was the standard for admission? It may be said that the times have changed and the sciences are advancing, but what can be said with regard to modern science cannot be applied to Ayurveda, which has been neglected through one cause or the other, for two thousand years. India is hundred years behind England. We must set-aside all prejudices and external influences, restrain our speculations and look straight at the points under consideration. There are duties for the Government to do, for the Faculty to propose, and the working institutions to follow. The Govt. has to finance, the situation of the country has to guide, and the Faculty to suggest measures, and the institutions to work out those measures. Furthermore, *the public voice has to be heard* and the pros and cons have to be balanced. We must remember that we can be only directed by circumstances, but we cannot govern circumstances which cannot be moulded by any intensity of our impressions.

Opinions seem to be concentrated in some quarters on the question of synthesis of the two systems. But it would take a very long time to achieve the end. Men of very great calibre are necessary and money has to be poured in on the schemes. In fact the underlying principles on which the two systems have grown are different. Though in general the origins of all sciences meet at one point, the Nature which governs the Universe is one, the systems or schools which try to understand this nature are different and their ways of approach are diverse. The history of civilisation says this. Men like Pro. Albert Einstein, Sir James Jeans or our Pro. C. V. Raman may acknowledge that bases of all sciences are one. But at this stage of Ayurvedic development it is almost impossible to knit together the threads of the two systems until their fibre is made more congenial

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

the prolonged efforts and experiments. The time of such synthesis will surely come, but India has to rise in her accomplishments; and literacy must increase.

Let us now turn to our aims and objects and the measures to accomplish them. In the first place it is necessary to state that it should be our sole aim to obtain a better status for the Ayurvedic Practitioners from external agencies. We must raise our own status befitting to our country. To state the truth, we want to give regular scientific education to deserving students so that they should be able to render *medical service by the Ayurvedic method*. The standard of efficiency does not rise by raising the standard for admission and neglecting other practical measures which are within our reach. Govt. recognition does not mean Govt. support. Let the Govt. look straight at the realities and not through the agencies. In democratical Govt. the rights of the rank and file are always at the mercy of an electoral machine. It is the duty of the Govt. to weigh things and then give its own judgement; because purely academic opinions can only apprehend things but cannot guide.

—×— —×— —×—

The metaphysical portion of the **SAMKHYA DARSHANA** has nothing to do with modern chemistry. Ayurved has utilised the basic principles of **NYAYA—VAISHESHIKA** for the elucidation of Dravya, Guna and Karma. Modern physics begins where Ayurveda ends. Modern science is tentamount to analytical description, where as Ayurveda is synthetic interpretation. Modern thought leans towards exactitude and actualities, while Ayurveda aims at ascertaining the relation between facts and experience. Modern science teaches us how to heal but Ayurveda taught how to prevent. There is no doubt modern science has given us immense knowledge about actualities, but Ayurveda teaches us how to dive into the possibilities of the future by developing our powers of intuition.

Modern science depends upon **PRATYAKSHA**; Ayurveda depands upon **PRATYAKSHA, ANUMANA, APTAGAMA** and **YUKTI.** We see therefore that the principles of Ayurveda include logic, philosophy and psychology. By philosophy I mean the Philosophy of sciences and not religious philosophy. It is more exegetcal in character than theological. It thinks more of the subjective and objective phases of life than of the human body in its material aspect. The chief reason why it is not easily understood is because it is linked with cosmology in its earlist presentation. The principles are based on the logic of cause and effect. It is a search after the ultimate principle which is behind the individual and the universe.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Modern science makes experiments, observes, and thus reaches its goal from effect to cause; in other words it is an objective verification. Ayurveda adopts the Sat-KARYA-WADA of the SAMKHYAS. The whole literature of Ayurveda is based on the conception which is otherwise called PARINAMA-WADA. Here Ayurveda is backed up by the VEDAS, UPANISHADAS, PURANAS and history. Even now the Hindu mind is accustomed to this way of thinking. This attitude of Hindu-mind is seen through the foll.wing lines.

यत्र यत्र हि दृश्यंते धातवः पांचभौतिकाः।
यैरावृतमिदं सर्वं जगत्स्थावरजंगमम् ॥
इंद्रियैर्गृह्यते यद्यत् तत्तद् व्यक्तमिति स्मृतम्।
तदव्यक्तमिति ज्ञेयं लिंगग्राह्यमतींद्रियम् ॥ महाभारत वनपर्व

The western mind sees through the laboratory instruments, while the oriental-insight is LINGA—GRAHYA; therefore the ancient RISHIS saw things though they were *AVYAKTA* & *ATEENDRAYA*.

It is therefore unanimous cry of the *A*yurvedists not to depend entirely upon modern basic sciences but to take advantage of them whenever & wherever the subtle descriptions of the ancients cannot be understood.

× × ×

Pre Clinical Subjects.

Physiology: The TRI-DHATU-TRIDOSHA theory forms the ground on which the principles of Ayurvedic medicine and the interpretation there-of, are based. Further more, the basic principles on which the doctrine is established have their origin in the PANCHA-B*H*AUTIC theory which bears relations to the TRI-GUNAS-the ultimate realities-which rule the universal movements So, clarification of this theory entails a study on Ayurvedic lines, of metaphysics, physics, bio-chemistry, anatomy, physiology, pathology, pharmacology and therapeutics. Ayurveda is not a collection of medical formula as some immagine. The subject of TRI-DHATUS in fact covers the whole field of physiology; these TRI-DHATUS take part in (1) nutrition (2) development (3)structure and (4) function, of the living body. It is held by the Ayurvedists that the disturbance in their equilibrium leads to disease.

× × ×

The five Vayus, the five Pittas, and the five Kaphas conduct all the physiological processes in the body. How these principles do it can only be understood by careful study of the fundamental theories of *A*yurved. On the other hand an attempt towards synthesis by subjecting all the *A*yurvedic theories to scrutiny on modern scientific lines is bound to be failure. There is no doubt that science is one and indivisible. But GOD also is one and he is approached by J*N*YANA YOGA, BHAKTI-YOGA, and KA*R*MA-YOG*A*.

(Incomplete) 10th April 1951

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नवा पत्ता

शुद्ध आयुर्वेद पाठक्रम समितीचा नवीन ... पुढील प्रमाणें आहे:-- शुद्ध आयुर्वेद पाठ्य-समिति, ३८-४० बाम्बे म्यूच्युअल अनेक्सी ... मजला, गनूबो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १

कर्नाटकांतील लोकप्रिय
डॉ. एच्. व्ही. सावनूर यांनीं प्रशंसलेलीं
प्रख्यात मे. द. कृ. सांडू ब्रदर्स
चेंबूर लि. चेंबूर-मुंबई
यांचीं गुणकारी औषधें
व डॉ. सावनूर यांनीं इंग्रजींत लिहिलेली आयुर्वेदिक मटीरीया मेडिका भाग १
... यांचें बेळगांवांतील प्रमुख ठिकाण:-
मेसर्स मॉडर्न ड्रग् स्टोअर्स
डिस्पेंसिंग केमिस्ट व ड्रगिस्ट
१५१५, मारुती गल्ली, बेळगांव

अनुक्रमणिका

आयुर्वेदीय पद्धतीनें देशाची सेवा	६१
संपादकीय	६२
१९३६ च्या आयुर्वेद बिलाबाबत माझे विचार	६३
वैद्य हकीमांची दुर्दशा	६६
गुरुवर्य डॉ. सावनूर यांचें शिष्यत्व कसें लाभलें?	६७
डॉ. सावनूर बेळगांव यांचें चरित्र	७१
डॉ. सावनूर यांच्या आयुर्वेदीय औषधि योजना	७५
डॉक्टरांचें मेडिकल रजिस्टर	९४
ब्लड प्रेशरचें आयुर्वेदांतील स्थान	९५
मद्यार्कयुक्त औषधांची निर्यात	१०३
देशी औषधांचे प्रचारक	१०४
देवमाणूस आणि दयाळू डॉ. सवणूर	१०५
श्री. गुरुपौर्णिमा उत्सव, शीव	१०६
वै. भा. वि. गोखले यांनीं लिहिलेलें समालोचन	१०७
चरकाचार्य डॉ. हणमंतराव सावणूर	११५
कर्नाटकचे धन्वन्तरी	११७
डॉ. सावनूर यांची कौटुंबिक माहिती	१२०

डॉ. सावनूर यांचा सत्कार, बेळगांव



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भारतीय प्राचीन शास्त्र आणि कला

* भारतीय शिल्पकलेचा नमुना प्राचीन लेण्यांमध्यें सापडतो.

* भारतीय प्राचीन औषधी विद्येचा उपकारक अनुभव धूतपापेश्वर औषधांमध्यें प्रत्ययास येतो.

.... आमचे बल-पुष्टिवर्धक कल्प ....

शिलाप्रवंग-शक्तिवर्धक, पौष्टिक

अभ्रलोह-रक्त-शक्तिवर्धक, पौष्टिक

सुवर्णमालिनीवसंत-आजारानंतरच्या क्षीणतेवर

धूतपापेश्वर औषधें

सर्वत्र मिळतात.

अपुरें संरक्षण

धूळ, जंतू व श्वसनाच्या इतर विकारांपासून संरक्षण मिळविण्यासाठीं कास्फो औषधि गोळ्या वापरणें इष्ट आहे. खोकला, पडसें, घशाची खवखव, ब्रॉंकायटिस इ. विकारांमध्यें कास्फो उपयुक्त आहे.

आजच एक बाटली खरेदी करा.

सर्वत्र मिळूं शकते.

कास्फो

खोकल्यावरील अचूक उपाय

आयुर्वेदाश्रम फार्मसी लिमिटेड,
अहमदनगर.

योजना यशस्वी करा
राष्ट्र बलशाली करा

EVEREST APK. 51-3 MAR

संपादक व प्रकाशक:— वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य विवलकर कारंजा, नाशिक
मुद्रक:— श्री. चिं. ओक, सर्कल प्रेस, आग्रारोड, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

पुस्तकालय गुरुकुल कांगड़ी

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें)

र्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. १ अंकाची किंमत ४ आणे

र्ष ८ वें) नाशिक, ता. १६ ऑगस्ट १९५४ (अंक ४ था

आपण काय खावें व केव्हां खावें?

" जेव्हां आम्हीं तरुण होतो तेव्हां आम्हांस असें सांगण्यांत येत असें कीं, मुलांनीं व प्रौढांनीं ा व थोडेंथोडें खाण्याची पाश्चिमात्यांची आहारपद्धति हीच आरोग्यदायी आहे. व म्हणून त्यावेळीं ांस (१) अंथरुणांत चहा, (२) उशीरा प्रातराश, (३) ्या प्रहरीं जेवण, (४) सायंकाळीं फराळ, (५) रात्रीं ट जेवण व (६) झोंपतांना पुनः दूध वगैरे हलकें अन्न, माणें संवयी आम्हीं लावून घेतल्या.

गेल्या इतक्या वर्षांच्या अनेकवार खाण्याच्या अनुभवानें ाला असें कळून आलें आहे कीं, भरपूर अंतरानें २ पूर्ण ें व जरूर पडेल तरच मध्यंतरींचा एक उपहार, एवढया ी आपलें आरोग्य व सौंदर्य यासाठीं अगदीं पुरेशा आहेत.

तसेंच, व्हिटॅमिन्स व कॅलरीच्या शोधामुळें आणखी एक ट लक्षांत आली आहे ती अशी कीं, पांढरा तांदूळ, पांढरी ीक, पांढरी साखर, पांढरें मीठ, पांढरी मलमल वा पांढरें ुभ्र कापड या गोष्टी तांबडा तांदूळ, तांबडी कणीक, तांबूस ार, मातकट रंगाचें मीठ, कोरें कापड यापेक्षां सर्व रीत्या कमी दर्जाच्या आहेत.



डॉ. पट्टाभिसीतारामय्या

आम्हाला ही गोष्ट पुनः पटूं लागली आहे कीं, आपला प्राचीन व अनुभवावर आधारलेला ारविहाराबाबतचा पथ्यापथ्यविचार हा पुष्कळच समतोल आहे, व तो टाकून देणें ाणपणाचें होणार नाहीं. "

—डॉ. पट्टाभिसीतारामय्या (गव्हर्नर मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९॥ पौंडाचें बालक

आपलें बालक जन्मतःच वजनदार असावें असें आपणास वाटतें ना ? मग आपण पुढील उपाय करा.

येत्या हिंवाळयांत ४ महिने नियमानें रोज २ ते ५ तोळे च्यवनप्राश सेवन करा. त्याचा परिणाम आपलें वजन वाढण्यांत होईल. आपले अस्थिधातु, मज्जाधातु व शुक्रधातु बलवान् होतील.

पित्याचे बीजांतील अस्थिधातु बलवान् असल्यास गर्भ चांगला पोसतो व वजनदार होतो असा अनुभव आहे. चरकाचार्य म्हणतातः- पितृजश्चायं गर्भः। यानि तु खलु गर्भस्य पितृजानि, यानि च अस्य पितृतः संभवतः संभवंति तानि अनुव्याख्यास्यामः। तद्यथा— केशश्मश्रूनख-लोम-दंतास्थि-सिरास्नायु-धमन्यः शुक्रं च इति।

बालकाचीं हाडें, दांत, शिरा, स्नायू, धमन्या, केश इ. तेजस्वी व बलवान् असावीत अशी इच्छा करणाऱ्या पालकांनीं आपले अस्थि-मज्जादि धातु बलवान् ठेवण्याची काळजी अवश्य घ्यावी.

मागील हिंवाळयांत पित्यानें ५ शेर च्यवनप्राश सेवन केला. गरोदरपणीं मातेनें कांहींच शक्तिवर्धक घेतलें नव्हतें. (तशी आवश्यकताच भासली नाहीं.) तरीहि तिनें उत्तम पोसलेल्या ९॥ पौंड वजनाच्या बालकास जन्म दिला.

पित्याचे धातु सारवान् असले तर माता व बालक यांना शक्तिवर्धक औषध घेण्याची पाळी बहुदा येऊ नये.

अभिनंदनीय उपक्रम

धुळें येथें आयुर्वेद सेवा संघाचीं औषधें व पुस्तकें मिळण्याची व्यवस्था

प्राणिरक्षक संस्था, धुळें

या संस्थेच्या औषधालयानें केली आहे. धुळें येथील ग्राहकांनीं या सोईचा फायदा घ्यावा.

एक नवा विचार

"त्यावेळीं मी व माझा एक स्नेही, आम्ही पुणे आयुर्वेद महाविद्यालयांत शेवटच्या वर्षांत होतो. आपण बोलतां बोलतां म्हणाला होता कीं (१) आजकाल मधुमेहाची खरोखरची आयुर्वेदीय चिकित्सा होत नाहीं. (२) वैद्यलोक सुद्धां सर्व रोग्यांस सकाळ, दुपार, संध्याकाळ अशीं औषधें देतात, तें चूक आहे. (३) कफप्रकृति लोकांनीं सकाळीं ९ वाजेपर्यंत कांहींच खाऊं पिऊं नये.

हें कां व कसें, तेंहि आपण त्यावेळीं सविस्तर समजावून सांगितलें होतें. याचें मला आजहि स्मरण आहे. आपण त्यावेळीं आम्हाला एक नवा विचार दिला, याबद्दल मी आपला आभारी आहे."

— वि. चिं. काळे

आर्य वनिता समाज, ठाकुरद्वार

(गंगाराम क्षत्रीय वाडी) मुंबई २

ही संस्था १९३६ सालीं स्थापन झाली. सुमारें १०० स्त्रिया या संस्थेच्या सभासद आहेत. वार्षिक वर्गणी २ रु. आहे.

या संस्थेतर्फे (१) कांहीं महत्वाचे उत्सव (२) शिशुवर्ग (३) मोफत सल्ला व औषधोपचार हीं कामें चालू आहेत.

गतवर्षी प्रथम ६ महिने मोफत तपासणी करून औषधें लिहून देत असूं. पण गरीब रुग्णांकडून तीं खरेदी करणें बहुधा शक्य होत नसे. म्हणून पालूं वर्षी आयुर्वेद सेवा संघाकडून औषधी मदत घेतली.

हें औषधोपचार केंद्र १८६ ठाकुरद्वार येथें वै. लक्ष्मीबाई बोरवणकर यांच्या दवाखान्यांतच ठेवलें आहे. मोफत तपासणीचा वार सोमवार हा आहे. औषधाबद्दल शक्य असल्यास १ आणा घेतला जातो. गेल्या ६ महिन्यांत १५० रुग्णांना औषधें दिलीं गेलीं.

या केंद्रांत येणाऱ्या चिकित्साविषयक अनुभवाची माहिती, आयुर्वेद सेवा संघास सादर केली जाते व ती आयुर्वेद पत्रिकेंत प्रसिद्ध होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आरोग्य विमा योजनेचें स्वरूप ....

(लेखकः- श्री. राजाभाऊ कुळकर्णी, मुंबई)

ता. २ आक्टोबर १९५४ पासून मुंबई विभा- [सर]कारी आरोग्य-विमा योजना कारखान्यांतील [काम]गारांसाठीं अंमलांत यावयाची आहे. सदरहू [यो]जना १९४८ च्या " एम्प्लॉइज स्टेट इन्शुअरन्स [ॲक्ट]" अनुसार अस्तित्वांत आलेली आहे. कायद्यांतील [योज]नेच्या अंमलबजावणीसाठीं एक " कॉर्पोरेशन " [स्थाप]न करण्यांत आलें. पण १९५२पर्यंत या योजनेची [सुरु]वात कोणत्याच केंद्रांत होऊं शकली नाहीं. त्या- [नंत]र दिल्ली व कानपूर ह्या शहरांतील कारखान्यांतील [काम]गारांसाठीं प्रथम सुरवात झाली. तेथील कार्य [व्य]वस्थित सुरूं असल्याचें समजतें. तथापि योजने- [मागी]ल हेतु सफल होण्याच्या चिन्हांसंबंधीं अद्याप तरी [निश्चि]त असें मत कोणाकडून बोललें जात नाहीं.

४ लक्ष २० हजार कामगारासाठीं

दिल्ली, कानपूर नंतर पंजाबमध्यें कांहीं ठिकाणीं [ही] विमा-योजना सुरूं करण्यांत आली. गेल्या महि- [न्या]त नागपूर येथें ती लागूं करण्यांत आली. व आतां [मुंब]ई विभागांत तिची अंमलबजावणी होत आहे. [मुंब]ई विभागांत मुंबई शहर व बोरिवली आणि अंबर- [नाथ]पर्यंतचा भाग येवढा टापू येतो. त्यांतील सुमारें [३]१०० कारखान्यांत असलेल्या ४ लक्ष २० हजार कामगारांसाठीं ही योजना अस्तित्वांत यावयाची आहे. [का]मगारांच्या कुटुंबांतील मंडळीसाठीं सध्यांतरी तिचा [उप]योग नाहीं. हिंदुस्थान सरकारच्या मजूरमंत्र्यांनीं [त्या] दृष्टीनें सदरहू योजनेचें कार्यक्षेत्र पुढें केव्हां तरी [वा]ढविण्याची सरकारची इच्छा असल्याचें जाहीर [केलें] आहे. तथापि तेवढ्यावरून योजनेचें महत्व [कमी] होत नाहीं.

मुंबई विभागांतील नियोजित अंमलबजावणी [४] लक्ष २० हजार कामगारांसाठीं आहे; म्हणजे देशां- [ती]ल एकूण २५ लाख औद्योगिक कामगारांपैकीं बऱ्याच मोठ्या हिश्श्यासाठीं कार्याची सुरवात होणार आहे. आतांपर्यंतचीं केंद्रें मुंबईच्या दृष्टीनें लहान होतीं. मुंबईतील योजनेचें दुसरें एक वैशिष्ट्य असें कीं मुंबईतील कार्य " पॅनल " पद्धतीचें असणार आहे. दिल्ली, कानपूर व नागपूर येथें " सर्व्हिस " पद्धतीनें कार्य चालतें.

प्रत्येक डॉक्टरकडे २००० कामगार

' सर्व्हिस ' पद्धतींत कॉर्पोरेशन स्वतःची हॉस्पिटल्स कामगारांसाठीं काढतें. तेथील संपूर्ण वेळ काम करणाऱ्या डॉक्टरकडून औषधोपचाराची मदत कामगारांना पुरविली जाते. ' पॅनल ' पद्धतींत जे खाजगी डॉक्टर योजनेंत यावयास तयार आहेत, त्यांच्याकडे ठराविक इतके कामगार पाठविण्यांत येतात. मुंबई सरकारच्या नियमानुसार एका डॉक्टरकडे जास्तीत जास्त २००० कामगार औषधोपचारासाठीं पाठविण्यांत येतील. डॉक्टरला त्यासाठीं वर्षाकाठीं प्रत्येक कामगारामागें ६॥ रुपये फी देण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. डॉक्टरांच्या ह्या फीच्या आंकड्यावर कार्पोरेशन व मेडिकल ॲसोसिएशन यांच्यांत गेल्या वर्षापासून तडजोड होत नव्हती. आतां वरीलप्रमाणें तडजोड झाली असल्याचें कळतें.

आर्थिक मदतीचीहि तरतूद

पॅनल पद्धत ही फक्त औषधोपचाराच्या मदतीसाठीं आहे. विमा योजनेंत औषधोपचाराच्या मदतीबरोबर प्रत्यक्ष आर्थिक मदतीचीहि पद्धत आहे. आर्थिक मदतीचें कार्य कॉर्पोरेशनतर्फे करण्यांत येणार आहे. औषधोपचाराच्या मदतीच्या कार्याची जबाबदारी मुंबई सरकारवर असून त्यासाठीं मुंबई सरकारनें ॲडमिनिस्ट्रेटिव्ह मेडिकल ऑफिसर नेमला आहे. आर्थिक मदतीचें कार्य कार्पोरेशनच्या स्थानिक ऑफिसतर्फे करण्यांत येणार आहे. असें कळतें कीं,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कार्पोरेशनतर्फे त्यासाठीं शहरांत १७ व उपनगरांत ७ अशी एकूण २४ लोकल ऑफिसेस काढण्यांत यावयाचीं आहेत.

औषधोपचाराची व आर्थिक मदत पुढील चार कारणांसाठीं कामगाराला मिळणार आहे.(१)आजारीपण (२)बाळन्तपण (३)अपघात (४) मृत्यूनन्तर वारसाला मदत. औषधोपचाराच्या मदतीसाठीं ज्या डॉक्टरकडे कामगाराचें नांव असेल त्या डॉक्टरकडे स्वतःच्या ओळखीचे कार्ड दाखविलें पाहिजे. अशा प्रकारचें कार्ड २ आक्टोबरपर्यंत कामगाराला देण्यांत येईल व त्यावर कामगारानें आपल्या डॉक्टरची सही घ्यावयाची आहे.

मिळावयाच्या उपचारांचे प्रकार

खालील प्रकारची मदत विनामूल्य डॉक्टरकडून मिळूं शकेल. किरकोळ व सर्वसाधारण आजारासाठीं औषधोपचार डॉक्टरच्या दवाखान्यांतच केले जातील. डॉक्टरनें कोणते उपचार व साधनें कामगाराला द्यावींत याची मुंबई सरकारनें एक यादी तयार केली आहे. तसेंच महाग किंमतीचीं व महत्वाचीं औषधें –आयुर्वेदिक व इंग्लिश– यांचीहि पण एक यादी सरकारनें केली असून कामगारांना मोफत देण्यासाठीं डॉक्टरकडे सरकारी औषधसाठ्यांतून पुरविण्यांत येतील. देवी टोंचण्याचें व सांथीच्या रोगांचीं इंजेक्शनें देण्याचें कार्यहि विनामूल्य डॉक्टरनें करावयाचें आहे. गरोदरपणांत व बाळंतपणानंतर स्त्री-कामगार आजारी पडल्यास लागणाऱ्या औषधोपचाराची मदत दिली जाईल. ज्यावेळीं कामगाराला डॉक्टरच्या दवाखान्यांत जाणें अशक्य झालें असेल त्यावेळीं डॉक्टरनें कामगाराच्या घरीं जाऊन वैद्यकीय तपासणी व औषधोपचार करावयाचे आहेत; तसेंच पैशाची मदत मिळण्यासाठीं कामगाराला लागणारीं सर्टिफिकेट्सहि डॉक्टरनें विनामूल्य द्यावयाचीं आहेत. बाळंतपणासाठीं मुंबई सरकार जी व्यवस्था करील त्याप्रमाणें स्त्री कामगारांना सवलत मिळूं शकेल.

अत्यंत तांतडीच्या व काळजीच्या केसेस डॉक्टरनीं सुचविल्यास सरकारी मोठ्या हॉस्पिटलमध्यें पाठविण्यांत येतील. अशा कांहीं हॉस्पिटलमध्यें योजनेखालीं येणाऱ्या कामगारांसाठीं कांहीं कॉट्स् राखून ठेवण्याची व्यवस्था करण्यांत येईल, असें सरकारतर्फे सांगण्यांत आलें आहे.

त्यानंतर आजारी कामगाराला घरापासून हॉस्पिटलपर्यंत नेण्यासाठीं अँब्युलन्सहि विनामूल्य पुरविण्यांत येईल.

औषधोपचाराच्या मदतीबाबत आपल्या डॉक्टरसंबंधीं तक्रार असल्यास मुंबई सरकारनें नेमलेल्या मेडिकल सर्व्हिस कमिटीकडे तक्रार नोंदवावयाची असते. या कमिटीला तक्रारीसंबंधीं चौकशी करण्याचा अधिकार आहे. ह्या कमिटीवर कामगाराचा एक किंवा दोन प्रतिनिधि सरकारतर्फे नेमले जातील. तक्रार निर्माण झाल्यानंतर सहा आठवड्याच्या आंत कामगारानें ती कमिटीच्या सेक्रेटरीला कळविली पाहिजे. औषधोपचाराच्या मदतीचा एखाद्या डॉक्टरनें भंग केल्यामुळें त्यावरील आरोपाची चौकशी होऊन डॉक्टरविरुद्ध उपाययोजना करावयाची असल्यास मुंबई सरकारची संमति घ्यावयास हवी. कांहीं बाबतींत सर्जनजनरलला डॉक्टरविरुद्ध उपाययोजना करण्याचा अधिकार आहे.

डॉक्टरांच्या सहकार्यावर अवलंबून

औषधोपचाराच्या मदतीचें हें कार्य खाजगी डॉक्टरांच्या सहकार्यावर सर्वस्वी अवलंबून आहे. मेडिकल असोसिएशननें डॉक्टरांना सहकार्य देण्याची विनंति केली आहे. दोन वर्षांचा अनुभव घेऊन फी वाढविण्याचा विचार केला जाईल असें आश्वासन मजूरमंत्र्यांनीं दिलें असल्याचें असोसिएशननें सांगितलें.

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाचें सभासद होऊन संघटना बळवान करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ग्रंथपरीक्षण—

' मानवाचें कामशास्त्र '

आयुर्वेदाचार्य, ना. वा. कुलकर्णी, ९२९ सदाशिव पेठ, पुणें २, हे या पुस्तकाचे लेखक व प्रकाशक आहेत. ८९ पृष्ठांच्या (डेमी साइझच्या) या पुस्तकाचें मूल्य दोन रुपये आहे. (१) तात्विक भूमिका (२) विवाहोत्तर प्रेम कीं प्रेमोत्तर विवाह (३) स्त्री-पुरुष जननेंद्रियें व शुक्रधातुविचार (४) समागम व गर्भोत्पत्तिविचार (५) कामोद्दीपन व कामसंयमनविचार (६) माझें निवेदन अशीं ६ प्रकरणें सदरहू ग्रंथाचीं असून फर्ग्युसन कॉलेजमधील मानसशास्त्राचे प्राध्यापक डॉ. य. श्री. मेहेंदळे एम्. ए. पीएच्. डी. यांनीं लिहिलेला अभिप्रायहि त्यांत आहे. छपाई व कागद उत्तम आहे.

' संतोऽप्याहुः अपत्यार्थं दंपत्योः संगतं रहः '। या दृष्टिकोनांतून सुयोग्य संतति निर्माण होण्यासाठीं एकपत्नीव्रत वा एकपुरुषव्रताची अत्यंतात्यंत आवश्यकता कशी आहे हेंच या पुस्तकाच्या अथपासून इति-पर्यंतच्या विवेचनाचें सार वाटतें. आणि त्या दृष्टीनें व्यभिचाराचे संभव, प्रसंग व ते टाळण्याचे उपाय ग्रंथकर्त्यांनें उत्तमपणें मांडले आहेत. सत्प्रवृत्तीला प्रोत्साहन देण्याचाच प्रयत्न लेखकानें केला असून व्यभिचाराला प्रोत्साहन दिलेली एक ओळहि, ग्रंथकर्ता म्हणतो त्याप्रमाणें, लिहिलेली नाहीं. स्वतःच्या व आलेल्या रुग्णांच्या आयुष्यांतील व्यभिचार टाळण्याचे विविध प्रसंग ग्रंथकर्त्यांनें उधृत केले आहेत, ते उत्कृष्ट मार्गदर्शक आहेत. अध्यात्मवादी, विचारसरणींतून आचार्यांनीं केलेला हा प्रयत्न बरा आहे.

परन्तु ग्रंथकर्ता आपण आयुर्वेदाचार्य आहो हें त्या वेळीं विसरल्यासारखें वाटतें. कामशास्त्रांतील आयु-र्वेदीयांची वैशिष्ट्यपूर्ण दृष्टि व ' वाजीकर ' व रसायनचिकित्सेची महत्ताही प्रतिपादणारें विवेचन अभावानें तळपतें. प्रकृतिविचार, धातुसारासार-विचार, अमावास्या पौर्णिमा या खेरीजच्या कालाचा विचार, पूर्व व पश्चात्तयारी, शुद्धाशुद्ध शुक्रार्तवाची आयुर्वेदीय विचिकित्सा इ. अनेक विचार दुसरी आवृत्ति काढतांना आचार्य मांडतील तर वैद्येतर समाजांत शास्त्राचें लेण पोहोंचवून समाजशासन कर-ण्याचें पुण्यतम कार्य त्यांचे हातून घडेल व आयुर्वेद-शास्त्राच्या ऋणांतून या पुस्तकाचे प्रकाशनाचे वेळींहि ते मुक्त होतील, असा विश्वास वाटतो.

— आयुर्वेदाचार्य श्री. कृ. करमरकर
७।८।५४ आयुर्वेद सेवा संघ, नासिक

पूरक अन्नप्रदर्शन, सांगली

दक्षिण सातारा जिल्हा भाजीपाला, पूरक अन्नें, फळें फुलें प्रदर्शन, सांगली येथें ता. २५-२६ सप्टें-बर रोजीं भरणार आहे. त्या प्रदर्शन समितीनें अन्न-पदार्थ निवड समितीवर वैद्य दा. द. जोशी, आयु-र्विद्याविशारद यांची अधिकारी वैद्य, म्यु. दवाखाना सांगली, या अधिकृत स्थानावरून गतवर्षीप्रमाणेंच नेमणूक केली आहे.

.... उत्तम धर्म ....

जनतेची सेवा करणें हा मनुष्यमात्राचा धर्म आहे. त्यांतहि आजारी माणसाची सेवा करणें हा अति उत्तम धर्म होय. उत्तम गुण-कारी औषध देऊन रोगाचें निवारण केल्यानें रोगी माणसाची सेवा उत्तम घडते.

अशी सेवा करण्यासाठीं उत्तम व अस्सल औषधेंच वापरलीं पाहिजेत. अशा खात्रीच्या औषधी खरेदी करण्याचें स्थान—

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स

पायधुनी मुंबई नं. ३

(टेलिफोन नं. ३१८५८) हेंच आहे.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें

मुख्य केंद्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवडक रुग्ण चिकित्सा—

अतिसारावर वमनोपचार

चिकित्सासूत्रः—

शूलानाहप्रसेकार्तं वामयेदतिसारिणम् ।

(वाग्भट अतिसारचिकित्सा, श्लोक २)

अतिसारांत शूल, पोट फुगणें व तोंडाला पाणी सुटणें हे विकार असतील तर वांती करवावी.

रुग्ण— मुकुंद कृष्णराव ठाकूर

वय २१ वर्षें (अमरावती). सकाळीं ६ वाजतां वरील रुग्ण पहाण्यास त्याच्या घरीं गेलो असतां त्यानें रोगाचीं कारणें सांगण्यास सुरवात केली. त्या हकीगती-वरून रोग्याकडून मिथ्या आहार करण्यांत आला होता असें दिसलें. दिवस वर्षाऋतूचे होते व त्या दिवशीं हवेंत ओलावा फार होता.

रोगाचीं लक्षणें

(१) लालस्राव (प्रसेक, मळमळ)
(२) अतिसार (हगवण)
(३) पोटांत गुडगुड आवाज
(४) वांत्या
(५) पोट फुगणें (आनाह)

वरील लक्षणें त्या रोग्याचे ठिकाणीं आढळलीं. त्याच्या लक्षणांचा विचार, मळमळ हें लक्षण आमाश-यांतील दोषाचें असल्यानें स्थानानुरूप चिकित्सा केली पाहिजे. आमाशयांतील वाढलेले दोष काढून टाकण्याचा योग्य उपाय वमन होय, म्हणून वमन देण्याचें ठरविलें. व पुढील प्रमाणें वमनाची तयारी केली.

एक मोठा ग्लास पाणी व एक मोठा चमचा मीठ या दोन्हींचें मिश्रण करून त्यास तें पाणी पिण्यास दिलें. अर्धा ग्लास पाणी पोटांत गेलें तोंच त्याला एक वांती झाली.

या वान्तीमुळें लालास्रावाचें प्रमाण थोडें कमी झालें. राहिलेला ।।- ग्लास पाणी नंतर त्याला पिण्यास दिलें. त्यानन्तर वांती न झाल्यास पण मळमळ वाटत असल्यास, घशांत बोटें घालून वान्ती करण्यास सांगितलें.

एक तासानें वांती झाली. दोषांची प्रवृत्ति कमी झाली. सायंकाळीं त्याला शमनाच्या प्रकारचा उपाय व आहार– लाह्या घेण्यास सांगितलें उल्लेख कमी झाला.

पथ्य—

लाजास्तृट्छर्द्यतिसारमेहमेद कफच्छिदः।
कासपित्तोपशमनाः दीपना लघवो हिमाः ॥३५॥

(वाग्भट सूत्र अध्याय ६ श्लोक ३५)

साळीच्या लाह्या लघु, दीपन, शीत, कफपित्त-हारक असून तृषा, अतिसार, मेह, मेद, वांती व खोकला यांचा नाश करतात.

दुसरें दिवशीं सकाळीं एकदांच शौचास गेला. त्याहि दिवशीं त्याला लाह्याच खाण्यास दिल्या.

तिसऱ्या दिवशीं दोष नाहींसे झाल्याचीं व क्षुधेचीं लक्षणें दिसलीं. त्या दिवशीं त्याला हलकासा आहार घेण्यास सांगितलें. चौथ्या दिवसापासून वर्षा-ऋतुंतील आहारविहाराची आंखणी (वाग्भट सूत्र, अ. ३ रा श्लो. ४२-४८) करून दिली.

अमरावतीः- --आनंद नारायण तावरे

शास्त्रोक्त पद्धतीनें व अत्यंत परिश्रमानें तयार केलेलीं महाराष्ट्र प्रांतीय वैद्यसंमेलनानें व ऑल इंडिया आयुर्वेद कॉंग्रेस व प्रदर्शनाकडून प्रशंसित
सहस्रपुटी अभ्रक इ. भस्में व इतर औषधें
प्राइस लिस्ट मागवा.
श्री अमरेश्वर आरोग्यमंदिर
मिराशी बोळ, पो. इचलकरंजी S. M. C.

पांढरें कोड नष्ट झालेल्या हजारों गांवच्या लोकांचीं प्रशस्तिपत्रें व बक्षिसें पूर्ण पत्त्या-सहित छापलेलीं पत्रकें मोफत मागवा.
औषधींचीं किंमत ५ रु., पो. ख. १ रु.
वैद्य के. आर. बोरकर
मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला [म. प्र.]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय स्नातकांना अन्याय

सोबत एक छापील पत्रक जोडलें आहे त्यावरून अहमदनगर, सातारा व पाटण येथील आयुर्वेद महाविद्यालयांतून उत्तीर्ण झालेल्या स्नातकांचे बाबतींत कसा अन्याय झाला आहे हें स्पष्ट दिसून येईल.

सरकारनें ए. व्ही. व्ही. (पुणें), ए.एम्.एस्. (बनारस) व एल्. आय्. एम्. (मद्रास) या पदवीधरांना डी. ए. एस्. एफ्. परीक्षेच्या समकक्ष म्हणून मान्यता देऊन अंशतः अन्याय दूर केला आहे अशी माझी समज आहे.

परंतु आयुर्वेदतीर्थ (अहमदनगर), आयुर्वेद-विशारद (सातारा), व गृहित-आयुर्वेदशास्त्र (पाटण) या संस्थांच्या स्नातकांबाबत अद्यापहि अन्याय दूर झालेला नाहीं. व याचें कारण या संस्था आपला प्रभाव मुंबई सरकारवर पाडूं शकल्या नाहींत असें दिसतें.

ज्याअर्थी सरकारनें १९४९ च्या अखेर दुरुस्ती करून सर्व विद्यालयांच्या स्नातकांना एकाच परिशिष्टांत समाविष्ट केलें आहे त्याअर्थी सर्व विद्यालयांच्या स्नातकांना समान हुद्दा आणि दर्जा देणें सरकारास क्रमप्राप्त आहे.

माझ्या मतें सरकारी नियोजित अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळें व त्याशिवाय योग्य प्रतिनिधित्वाच्या अभावीं हा अन्याय झालेला आहे. परंतु आतां या अन्यायाचें परिमार्जन करणें व त्यासाठीं जरूर ती चळवळ करणें हें आपलें कर्तव्य होऊन बसलें आहे.

१९४९ च्या दुरुस्त केलेल्या परिशिष्टामध्यें ज्या विद्यालयांच्या आणि संस्थांच्या स्नातकांना सरकारनें समकक्ष मानलें आहे त्या सर्व स्नातकांना समान दर्जा आणि हुद्दा देण्याबाबत आयुर्वेदिक स्टेट फॅकल्टी व बोर्डानें एक ठराव पास करून घ्यावा असें मला वाटतें.

आपला,

वै. एस्. एल्. बाविशी

सेक्रेटरी, गुजराथ आयुर्वेद स्नातक-मंडळ.

विनंतिपत्रक

आपणा सर्वांस हें माहित आहे कीं, मुंबई राज्यांत देशी वैद्यक बोर्डाची स्थापना होण्यापूर्वी कित्येक वर्षेपर्यंत सातारा, नगर, पुणें व पाटण(गुजरात) येथें मिश्र शिक्षणाच्या वैद्यक शाळा होत्या. त्या सर्वांचा अभ्यासक्रम ४ वर्षांचा होता व त्या त्या संस्था स्वतःच्या पदव्या देत असत.

बोर्डाच्या स्थापनेनंतर वरील संस्थांचे एकीकरण करण्याचा विचार झाला व स्टेट फॅकल्टीची रचना झाली. दरम्यानच्या काळांत सर्व संस्थांच्या परीक्षा टिळक म.विद्यापीठानें घेऊन २वर्षें A.V.V. पदवी दिली.

१९४४ पासून फॅकल्टीचें काम सुरूं झालें व तिच्यातर्फे D.A.S.F. पदवी दिली जाऊं लागली.

वरील हकीकतीवरून हें स्पष्ट होतें कीं, सातारा नगर, पुणें, पाटण येथील संस्था समकक्ष होत्या व नंतर सर्वांचा अभ्यासक्रम व अलग पदवी ऐवजीं सर्वांची एक पदवी करण्यांत आली आहे.

मुंबई सरकारनें १९३८ च्या कायद्यांत १९४८ सालीं संशोधन केलें त्यावेळीं शेवटीं एक पदव्यांचें परिशिष्ट कायद्यास जोडलें आहे. त्यांत पुढील पदव्या आहेत.- १) आयुर्वेदतीर्थ (१९४२ पूर्वीच्या) आयुर्वेद महाविद्यालय, अहमदनगर. २) आयुर्वेदविशारद (१९४२ पूर्वीच्या) आयुर्वेद महाविद्यालय, सातारा. ३) आयुर्विद्याविशारद (१९४४ च्या पूर्वीच्या) टिळक विद्यापीठ, पुणें. ४) गृहीतआयुर्वेदशास्त्र (१९४२ च्या पहिले) उ. पी. आ., पाटण. ५) डी.ए.एस्.एफ्. स्टेट आयुर्वेद फॅकल्टी, मुंबई. ६) ए.एम्.एस्. बनारस हिंदु युनिव्हर्सिटी, बनारस. ७) एल्. आय्. एम्. आयुर्वेद एक्झॅमिनर्स बोर्ड, मद्रास. ८) आयुर्वेदपारंगत टि. म. विद्यापीठ, पुणें.

या पदव्या धारण करणारे पुष्कळ स्नातक लहान

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोठ्या राजेरजवाड्यांकडे निरनिराळ्या पगारपद्धतीवर मेडिकल ऑफिसर स्वरूपांत काम करीत होते.

संस्थानांचें विलिनीकरण झाल्यावर मुंबई सरकारनें प्रथम, पूर्वीप्रमाणेंच पगार चालूं ठेवले. पण त्यानंतर पुढील ठराव पास केला.—

मुंबई सरकारचे स्थानिक स्वराज्य आणि सार्वजनिक आरोग्यखातें, यांचा ठराव नंबर ५९९१/३३ तारीख ३० मे १९५३ पुढीलप्रमाणें आहे.

विलीन संस्थानांतील आयुर्वेदिक दवाखान्यांवरील नोकरांच्या बाबतींत मुंबई सरकारनें खालील प्रमाणें वेतनश्रेणी निश्चित केली आहे.

(१) डी. ए. एस्. एफ् अगर समकक्ष परीक्षा पास झालेले असून बॉम्बे मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्ट १९३८ अन्वयें जे रजिस्टर्ड झाले असतील अगर रजिस्टर्ड होण्यास पात्र असतील अशांना रु. ८०-५-१०० ई. बी. (नैपुण्य बंध) ६-१६० (नै. बं.) ८-२४० याप्रमाणें मासिक वेतन मिळेल.

(२) वरील (१) प्रमाणें जे वैद्य पदवीधर नाहींत परन्तु जे बॉ. मे. प्रॅ. ॲक्ट १९३८ अन्वयें रजिस्टर्ड अगर रजिस्टर्ड होण्यास पात्र असतील अशा वैद्यांना रु. ५५-३-८५ (नै. बं.) ४-१२५-५-१३० याप्रमाणें मासिक वेतन मिळेल.

(३) वर्ग ४ च्या नोकरवर्गाकरितां रु. ३०-½-३५ अशी मासिक वेतनश्रेणी राहील.

सरकारच्या या ठरावाप्रमाणें स्पष्ट होत कीं, डी. ए. एस्. एफ्. व त्याच्या समकक्ष शेड्यूल मधील दिलेल्या पदवींपैकीं कोणतीहि पदवी असणाऱ्यास ८० ते २४० ची पगारश्रेणी मिळाली पाहिजे.

परंतु सरकारनें हा ठराव झाल्यानंतर फक्त डी. ए. एस्. एफ्. यांना ८० ते २४० श्रेणी दिली व बाकीच्यांना ५५ ते १०० श्रेणींत ढकललें.

ज्या शिक्षणसंस्था आज डी. ए. एस्. एफ्. चा अभ्यासक्रम शिकवितात त्याच संस्थाचा, वरील पदवी नव्हती तेव्हां, ४ वर्षें अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना वरिष्ठ श्रेणीला नालायक ठरविलें, ही सरकारी विचारसरणी किती उलटी आहे.

९-११-१३ चा सरकारी ठराव

नोकरीवर असलेल्या स्नातकांनीं आपापल्या खात्यामार्फत तक्रारी केल्या तेव्हां सरकारनें ९/११/५३ चा L.S.G. & P.H.D. ठराव नं. AUD/१०५३ पसार केला व पुण्याची आयुर्विद्याविशारद, बनारसची ए. एम्. एस्., व मद्रासची एल्. आय. एम्. यांना डी. ए. एस्. एफ्. ची ८०-२४० ची श्रेणी देण्याचें जाहीर केलें.

हा ठराव करतांना ते नगर, सातारा, पाटण येथील पदवीधरांना कां विसरले ? कळत नाहीं.

वरील निवेदनावरून आपल्या लक्षांत येईल कीं, सातारा, नगर व पाटण (गुजरात) येथील आयुर्वेदीय पदवीधरावर पगाराबाबत खूप अन्याय झाला आहे.

हा अन्याय दूर करण्यासाठीं आपण ते शक्य सर्व प्रयत्न करावेत अशी विनंति आहे.

प्रभाशंकर न. वैद्य L.A.M.
त्र्यंबकलाल के. जोशी L.A.M.
मथुरादास विरामी D.A.S.F.
मंत्री, बृहत् गुजरात आयुर्वेद स्नातक मंडळ

कार्यालयाचा पत्ता:—
पीपल्स क्लिनिक, १६१९ घना सुथारनी पोळ
अहमदाबाद १

पांढरें कोड

हजारोंचें गेलें व त्यांनीं अभिप्राय दिलेलें आणि अनेक बक्षिसें मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु. नकली वैद्यापासून सावध रहा !

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन' मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वकांचा पत्रव्यवहार

खुलासा पाहिजे

१ केळीचें पान कसें बांधावें ?

ता. १६ जानेवारी १९५४ चे आयुर्वेद ...मध्यें ' दुष्ट नाडी-व्रणावर केळीचें पान ' या ...खालीं, श्री. ठा. सत्यदेवसिंह वैद्य यांचा ... आहे. आणि त्याप्रमाणें एका बाईचा जुनाट ... केळीचें पान बांधून बरा झाला, असा खुलासा ...गो. रा. जोशी, यांनीं ता. १६ मे १९५४ चे ...र्वेद पत्रिकेमध्यें दिला आहे.

यामध्यें खालीलप्रमाणें खुलासा पाहिजे. (१) ...चें पानाची कोणती बाजू व्रणावर ठेवावयाची ? ...वी कीं खालची ? (२) पान उलट सुलट कसेंहि ...डें तरी चालतें किंवा काय ? (३) पान बांधण्या- ...र्वी व्रण, जंतुनाशक लोशननें किंवा व्रणशुद्धिकारक ...ानें धुणें फायदेशीर आहे कीं काय ? कीं व्रण न ...ता, पान मात्र बांधावयाचें ?

२ भल्लातक-भृंगराज-तैल सूचिकाभरण

तसेंच ता. १६ डिसेंबर १९५३ चे आयुर्वेद ...केमध्यें, ' भल्लातक-भृंगराज तेलाच्या सूचिका- ...नें राजूची प्रकृति सुधारली ! या मथळयाखालीं ... के. जी. कुलकर्णी यांचा लेख आहे. भल्लातक- ...राज तेलाची तयार मिळणारी बाटली (आयुर्वेद ...संघ) इंजेक्शनला योग्य अशा ' शुद्धीकरणानें ' ...र भरलेली असण्याची शक्यता नाहीं. मग इंजे- ...न करण्यापूर्वी, या तेलाचें शुद्धीकरण कसें करावें ? ... तुसतेंच बाटलींतून तेल घेऊन तसेंच टोचलें तर ...क होऊन, विद्रधि-व्रण होणार नाहीं काय ? ...तक-भृंगराज तेलाचीं इंजेक्शनें स्त्री-पुरुषांनाहि ...त आलीं आहेत ' असें ते आपल्या लेखांत ...तात, परंतु त्याचें प्रमाण (सी. सी.) दिलेलें ...हीं.

तेल स्नायूमध्यें जसें जिरतें, तसें त्वचागत ... नाहीं, म्हणून सर्वसाधारण कोणतींहि तेलाचीं इंजेक्शनें, स्नायूमध्यें देण्याची वहिवाट आहे. परंतु कॅम्फर इन् ऑईल त्वचागत दिलें, तरी वेदना, सूज, विद्रधि इत्यादि अपाय होत नाहीं. त्याचप्रमाणें, भल्लातक-भृंगराज तेलाचें इंजेक्शन त्वचागत दिलें तर अपाय होऊं शकेल कीं काय ?

भल्लातक-भृंगराज तेलाप्रमाणेंच नारायण तेल, ब्राम्ही तेल, तुवरक तेल इत्यादि तेलांपैकीं, कोण-कोणत्या तेलांचीं इंजेक्शनें करतां येणें शक्य आहे, याचाहि विचार होणें जरूर आहे. कारण त्यामुळें, आयुर्वेदशास्त्रांतील या तेलांच्या इंजेक्शनांपासून चिकित्साशास्त्रांत मोठी क्रांति होईल.

तरी तज्ञांनीं विचार करून अवश्य खुलासा करावा. —वैद्य के. व्ही. देसाई, सागवे.

भारतीय भाषेंत वैद्यक ग्रंथ

' बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल ब्रँच ऑफ् दी इंडियन मेडिकल असोसिएशन ' च्या प्रथम परिषदेचें उद्घाटन करतांना मुंबई राज्याचे शिक्षणमंत्री श्री. दिनकरराव देसाई म्हणाले कीं, आतां वैद्यकीय क्षेत्रांत परकीय भाषेवर अवलंबून राहण्याचे दिवस संपले आहेत; आपण स्वतंत्र झालों असून आपले विचार व आचार हेहि आपण स्वतंत्र रीत्याच केले पाहिजेत.

डॉक्टरवर्गास विनंति

त्यांनीं डॉक्टरवर्गास उद्देशून अशीहि विनंति केली कीं, डॉक्टरांनीं स्वयंस्फूर्तीनें वैद्यकविषयाच्या निरनिराळया विभागांवर भारतांत प्रचलित असलेल्या निरनिराळया भाषेंतून ग्रंथ-निर्मिति करावी. ह्या योगें वैद्यक विषयाचा अभ्यास करणाऱ्या नवीन विद्यार्थ्यांस प्रादेशिक भाषेंतून शिक्षण देणें सुकर होईल.

पवित्र
नेपाल कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहाः-नेपाल हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कर्नाटक आरोग्यधाम घटप्रभा

ता. ३ आगस्ट रोजीं संध्याकाळीं अर्थमंत्री श्री. देशमुख यांनीं घटप्रभा येथील कर्नाटक हेल्थ इंस्टिट्यूटच्या क्षयरोग्याच्या सामान्य वॉर्डचें उद्घाटन केलें. यावेळीं श्री. पंढरीनाथाचार्य गलगली यांनीं संस्कृतमध्यें मानपत्र वाचलें. संस्थेचे मुख्य आरोग्याधिकारी डॉ. माधवराव वैद्य यांनीं आरोग्यधामाच्या कार्यासंबंधीं माहिती सांगितली. मुंबईच्या डॉक्टर्सतर्फे डॉ. एस. जी. जोशी यांनींहि थोडेसें भाषण केलें.

सरकार साह्य करील

वार्डचें उद्घाटन करतांना श्री. देशमुख म्हणाले, 'या संस्थेची आर्थिक स्थिति पाहिल्यास ती उत्तेजक आहे असें दिसत नाहीं. थोड्याशा पैशांत अचाट कामगिरी या संस्थेनें केली आहे. येथील डॉक्टर्स निरलसपणें राबल्यामुळेंच ही संस्था इतक्या उच्च अवस्थेला पोंचू शकली. अशा संस्थांना सरकारनें सहाय्य करणें ज़रूर आहे. माझ्या हातून जितकें साहाय्य होईल तितकें मी देईन. संस्कृतमध्यें दिलेल्या मानपत्राला संस्कृतमध्येंच श्लोक रचून उत्तर देऊन मंत्र्यानीं आपलें संस्कृतवरील प्रभुत्व प्रकट केलें.

आतां देणग्या बंद झाल्या

नव्या इमारतीची कोनशिला बसवितांना सौ. दुर्गाबाई देशमुख म्हणाल्या:—" जें कार्य, पैशाच्या अभावामुळें होऊं शकत नाहीं तें सामयानें होऊं शकते. त्याचें प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे हें आरोग्याधाम. सरकार लोकोपयोगी कार्यासाठीं जोंपर्यंत पुढें येऊं शकत नाहीं तोंपर्यंत अशा खाजगी संस्थांनाच तें कार्य हातीं घेणें भाग आहे. जमिनदारी नाहींशी होत असल्यामुळें त्या वर्गाकडून या कार्याला मिळणारा पैसा आतां बंद झाला आहे. त्यामुळेंच सरकारची जबाबदारी दुप्पटीनें वाढली आहे. केंद्र-समाज-कल्याण मंडळाकडून या संस्थेला मदत मिळूं शकेल असें मला वाटतें. ह्या संस्थेनें नर्सिंग कोर्स चालू केला असल्याचें सांगण्यांत आलें. या कार्याला समाजकल्याण मंडळ साहाय्य देऊं शकेल.'

पोटांत केसांची गांठ

२ महिन्यापूर्वीं नासिक येथील जिल्हा रुग्णालयांत 'पोटांत दुखते' म्हणून एका १० वर्षांच्या मुलीस आणण्यांत आलें. निरीक्षणान्तीं तिच्या पोटांत गांठ आहे असें निदान करून शस्त्रकर्म करण्यांत आलें. तों पोटांत (जठरांत) केसांचा गोळा सांपडला. त्याचा आकार अगदीं जठरासारखा (Stomach) होता. त्याचें वजन १३ तोळे भरलें. ३॥×२॥×१॥ ही लांबी, रुंदी, जाडी भरली. यांत रक्त, मांस वगैरे कांहींहि नव्हतें.

केस खाण्याची संवय

लहानपणापासून मुलीला डोकीचे केस तोडून चघळून खाण्याची संवय होती असें मुलीच्या वडिलांनीं सांगितलें.

'आयुर्वेदाच्या सेवेसाठीं तयार'

शास्त्रोक्त पद्धतीनें तयार झालेलीं सर्वप्रकारचीं सिद्धौषधें [गुटिका, मात्रा, रसायनें, आसवें वगैरे] व हिंवतापांवर अत्युत्तम ठरलेलें हिंवतापांतक, मिळण्याचें एकच ठिकाण.

सविस्तर माहितीकरितां लिहा:—

आयुर्वेदीय औषधी भांडार

२८ शुक्रवार, तुळशीबागेची पिछाडीं, पुणें २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म. प्रां. वैद्य मंडळाचें प्रचारकार्य

— प्रांतीय अध्यक्षांचा नाशिक जिल्ह्यांतील यशस्वी दौरा —

गेल्या मे महिन्यांत ठाणें व रत्नागिरी जिल्ह्यांत म. प्रां. वै. मंडळाचे प्रचारकार्यासाठीं मंडळाध्यक्ष वैद्य दत्तात्रेयशास्त्री जळूकर यांनीं हिंडून केलेल्या प्रचारकार्याचा अहवाल यापूर्वीं पत्रिकेंतून प्रसिद्ध झालाच आहे. त्यानं त्यांनीं प्रचारकार्याचे ठिकाणें, वेळ व खर्च कारणीं लागण्याच्या दृष्टीनें गेल्या महिन्यांत एक पत्रकहि प्रसिद्ध केलें होतें. त्या पत्रकास अनुसरून जुलई महिन्याचा शेवटचा आठवडा नाशिक जिल्ह्यांतून प्रचारकार्य व्हावें असें नाशिक जिल्हा व शहर वैद्य-मंडळाच्या विचारें निश्चित झालें व त्याप्रमाणें मंडळाध्यक्ष वैद्य दत्तात्रेयशास्त्री जळूकर हे दिनांक २७ जुलई रोजीं सकाळीं नाशिक येथें येऊन पोंचले. नाशिक, सिन्नर, पिंपळगांव-बसवंत, त्र्यंबकेश्वर आणि येवलें या गांवीं जाऊन केलेल्या प्रचारकार्याचा अहवाल पुढें दिला आहे.

सेवासंघाच्या धर्मार्थ औषधालयास भेट

नाशिक— येथें असेतों अध्यक्षांचें वास्तव्य आयुर्वेदाचार्य वै. करमरकरशास्त्री यांचेकडे होतें.

सकाळीं मंडळाध्यक्षांनीं 'आयुर्वेद सेवा संघ कार्यालय,' 'प्रकाश औषधालय' व संघाचे धर्मार्थ औषधालय यांस भेट दिली. धर्मार्थ औषधालयाचे चिकित्सक आयुर्वेदाचार्य श्री. कृ. करमरकरशास्त्री यांनीं आपल्या चिकित्साकार्यांत वात-पित्त-कफ आणि रस-रक्तादि धातूंवर कार्य करणाऱ्या औषधांची व्यवस्थित मांडणी करून त्या दृष्टीनेंच रुग्णपरीक्षा व चिकित्सा-पत्रकहि लिहिण्याची अनुकरणीय पद्धति ठेवलेली आहे; ती पाहून अध्यक्षांनीं अत्यंत समाधान व्यक्त केलें.

नाशिक शहर वैद्यमंडळाध्यक्ष वैद्य वि. मो. दातेशास्त्री यांनीं मंडळाध्यक्षांची, सेवा संघांतच भेट घेतली आणि स्थायीमंत्री वै. बिंदुमाधवशास्त्री व शहर वैद्य मंडळाचे मंत्री वै. ग. म. लोखंडे यांचे विचारें पुढील कार्यक्रमाची आंखणी केली व त्याप्रमाणें सर्वहि कार्यक्रम व्यवस्थित आणि उत्कृष्ट असे घडवून आणले.

प्रांताध्यक्ष वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर

शुद्ध आयुर्वेद विद्यालय, नाशिक

१) प्रथम प्रांताध्यक्षांनीं आयुर्वेद सेवा संघानें चालविलेल्या शुद्ध आयुर्वेद विद्यालयास भेट दिली व विद्यालय प्रविष्ट विद्यार्थी विद्यार्थिनींना उद्देशून उपदेशपर व्याख्यान दिलें. त्यावेळीं अध्यापक मंडळी उपस्थित होती. सर्वहि अध्यापक अगदीं नियमानें आपापले विषय प्रथम स्वतः घरीं अभ्यासून विषयाचें टांचण करून अध्यापन-कार्यांत येत असलेले पाहून तसेंच विद्यालयाचे उपप्रमुख वै. करमरकरशास्त्री वर्गांची सर्वहि व्यवस्था अत्यंत दक्षतेनें लावीत असलेले पाहून त्यांनीं समाधान व्यक्त केलें व स्वार्थत्यागबुद्धीनें, नियमानें व कळकळीनें अध्यापनकार्य करणाऱ्या १४ हि शिक्षकांचा उत्साह अवलोकन करून प्रशंसोद्गार काढले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म. प्रां. वैद्यमंडळ कार्यालयाची पहाणी

२) स्थायी कार्यालय (म. प्रां. वै. मं.) मंत्री वै. बिंदुमाधवशास्त्री पंडित यांचेसह दुपारीं २ ते ३ या कालांत कार्यालयांतील आरंभापासूनचे कागदपत्र पाहून प्रांतीय सम्मेलनांनीं वेळोवेळीं मंडळाचे घटना व नियमांत केलेल्या फेरफारांचें वाचण केलें.

३) रुंगठा हायस्कूलचे विद्यार्थ्यांपुढें आरोग्याचें महत्व व S. C. C. नंतर पुढें काय ? हा प्रश्न सोडविण्यासाठीं शुद्ध आयुर्वेदीय शिक्षणक्रम पत्करणें भावी काळांत कसें श्रेयस्कर आहे हें समजावून सांगितलें व त्याकरितां संस्कृत विषय उत्कृष्ट झाला पाहिजे हें पटवून दिलें. हायस्कूलचे प्रमुख अध्यापक श्री. माचवे व त्यांचा सहकारी शिक्षकवर्ग यांचा उत्साह अवर्णनीय दिसून आला.

४) म. प्रां. वै. संमेलनांतून वेळोवेळीं घटनांत व नियमांत जे फेरफार सुचविले गेले आहेत त्यांचे समावेशासह अध्यक्षांनीं वै. ब्रह्मदत्तशर्मा (मंत्री) व कविराज का. सी. भावे यांचेबरोबर विचारविनिमय करून लिहून आणलेली घटनेची प्रत त्या रात्रीं बसून पुनः एकदां तपासून निश्चित करण्यांत आली. यावेळीं म. प्रां. वै. मं. चे भूतपूर्व मंत्री वै. वि. म. गोगटे यांनाहि मुद्दाम पाचारण करण्यांत आलें होतें. त्यांचें वैचारिक साह्य बरेंच झालें. कांहीं नवीन सूचनाहि येत्या प्रांतीय संमेलनांत संमत करून घेतां येण्याजोग्या माहिती व पूर्व विचारासाठीं प्रसिद्ध करण्याचें ठरलें.

सिन्नर येथील प्रचारकार्य

दिनांक २८-७-५४ बुधवारीं मंडळाध्यक्ष हे श्री. वै. विष्णुशास्त्री दाते यांचेसह सकाळीं १०॥ वा. सिन्नर येथें पोंचले. येथील बिडीचे सुप्रसिद्ध कारखानदार श्री. भिकुसा हे दिवंगत झाल्यामुळें येथील वातावरण बरेंचसें उदासीनहि आढळून आलें. परंतु स्थानिक वैद्यराज भिकाजी केशव देशपांडे यांनीं स्थानिक वैद्यांचे घरोघर हिंडून त्यांची, आपले येथें सभा घेतली व हायस्कूलचे विद्यार्थ्यांसाठीं मुख्याध्यापक श्री. भट यांच्या विचारें एक व्याख्यान घडवून आणलें.

पिंपळगांव-बसवंत येथें सभा

दि. २९।७।५४ रोजीं वै. दातेशास्त्री यांचेसह वै. जळूकरशास्त्री पिंपळगांव-बसवंत येथें सकाळीं १०॥ वाजतां पोंचले. वै. प्रभाकर रामचंद्र चोथी यांनीं स्थानिक वैद्य श्री. तांबे व श्री. साने B.A. (Hon.) आयुर्वेदविशारद यांचेसह विचार-विनिमय करून तेथील हायस्कूलचे हेडमास्तर श्री. पाटील यांचे विचारें दुपारीं २ ते ३ वाजतां व्याख्यानाचा कार्यक्रम घडवून आणला.

त्र्यंबकेश्वर येथील गुरुपरंपरा वर्ग

दि. ३०।७।५४ रोजीं नाशिक शहर वैद्य मंडळाचे मंत्री वै. लोखंडे यांचेसह मंडळाध्यक्ष सकाळीं ९ वाजतां त्र्यंबकेश्वर येथें पोचले. तेथील वृद्धवैद्य श्री भाऊशास्त्री जाईल यांनीं नुकतांच ५ विद्यार्थ्यांचा शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रमाचा गुरुपरंपरावर्ग सुरु केला आहे. ह्या वर्गाचे अध्यापन कार्यांचीच जबाबदारी फक्त, स्वतः गुरुवर्य श्री. भाऊशास्त्री जाईल यांनी पत्करली असून या वर्गाच्या साधनसंपत्तीची व इतर व्यवस्था लावून वेळोवेळीं उत्पन्न होणाऱ्या निरनिराळ्या अडचणींचा परिहार करण्यासाठीं गांवांतील सभ्य गृहस्थांची एक समिति नियुक्त करण्यांत आली आहे. स्वतः वै. जाईलशास्त्रीबुवा हे संस्कृत व्युत्पन्न व आयुर्वेदक्षेत्रांतील वनस्पतितज्ज्ञ आणि सिद्धहस्त चिकित्सक आहेत. वृद्धापकाळांतहि त्यांनीं स्वयंस्फूर्तीनें हा वर्ग सुरूं करून आपली आयुर्वेदविषयक निष्ठा व तळमळच व्यक्त केली आहे, यांत शंका नाहीं. त्यांनीं चालवलेल्या शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रमाच्या वर्गास प्रांताध्यक्ष वैद्य जळूकरशास्त्री यांनीं भेट दिली आणि अभ्यासक्रम व विद्यार्थ्यांच्या परीक्षांविषयींच्या कांहीं शंकांचें निराकरण केलें. कांहीं तांत्रिक अडचणी मुंबईच्या पाठ्यक्रम समितीच्या द्वारें सरकारकडेहि कळविण्याचें आश्वासन दिलें.

शिक्षणाची अपूर्व संधि

दिनांक ३०-७-५४ शुक्रवारीं दुपारीं ३ ते ४ उमरावतीचे सुप्रसिद्ध वैद्य आयुर्वेदतीर्थ त्र्यं. म.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

…यांचे प्रांताध्यक्षांचे अध्यक्षतेखालीं शुद्ध आयुर्वेद …यांचे विद्यार्थ्यांपुढें चर्चात्मक व्याख्यान झालें. …गोगटे यांनीं सर्व विद्यार्थ्यांना प्रस्तुत शिक्षण- …बद्दल स्वतःचे साधकबाधक हवे ते प्रश्न विचार- …सांगून त्या सर्वहि प्रश्नांचीं सडेतोड व …त्विक उत्तरें दिलीं; आणि "शुद्ध आयुर्वेद …नाची ही लाभलेली अपूर्व पर्वणी तुम्हीं वायां …नका, ही संधि घालवाल तर पुन्हां कित्येक …आयुर्वेदाला वर डोकें काढतां येणार नाहीं; …च्या पिढीला हा लाभ होऊं शकला नाहीं, त्याचीं …फळें आम्ही भोगतों आहों, तशी पाळी तुमच्या- …येऊं देऊं नका; व तुम्हांस शिकवण्यांत येणारा …र्वेदाचा प्रत्येक सिध्दांत प्रत्यक्षांत पटल्यावांचून …र्थ्यांना पुढें जाऊं देऊं नका; तरच आजच्या …तुम्हां आयुर्वेदीय नव्या वैद्यांचा टिकाव …, असा उपदेश करून आपलें भाषण संपविलें.

वैद्यसंघटनेची अधिक आवश्यकता

हा कार्यक्रम आटोपून नंतर येथून सर्व मंडळी …वैद्य मंडळाने वतीनें होणाऱ्या कार्यक्रमासाठीं …दातारशास्त्री यांचे चिकित्सागृहांत एकत्र जमली. …प्रथम वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर यांनीं आपल्या …प्रचारकार्याची रूपरेषा सांगून चालू वर्षाच्या …चा थोडक्यांत अहवाल निवेदन केला. आणि …आयुर्वेद विद्यालयें व गुरुपरंपरेच्या पाठशाळांचा …यशस्वी होण्यासाठीं आज संपूर्ण वैद्यवर्गाच्या …ची पूर्वीहून अधिक आवश्यकता आहे असें …नाशिक शहर वैद्य मंडळानेंहि अधिक संघटित …व ज्यांना शरीरबळ, द्रव्यबळ, बुध्दिबळ यांतून …करितां येईल तें निरपेक्ष बुध्दीनें करण्यांत …घेऊं नये अशी विनंति केली.

अध्यक्षांचा सत्कार समारंभ

यानंतर शहर वैद्यमंडळाच्या वतीनें म. प्रां. …मंडळाचे अध्यक्ष व शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम …चे एक सदस्य म्हणून वैद्य दत्तात्रेयशास्त्री …यांचा सत्कार करण्यांत आला. या प्रसंगीं वैद्य श्री. वि. म. गोगटे, आयुर्वेदाचार्य करमरकर-शास्त्री, वै. विष्णुशास्त्री केळकर व अध्यक्ष विष्णुशास्त्री दाते यांचीं समयोचित व वै. जळूकरशास्त्री यांच्या गौरवपर भाषणें झालीं.

श्राद्धानिमित्त ११ रु. देणगी

या सभेंत वै. वि. म. गोगटे यांनीं स्वतःच्या वडिलांच्या श्राद्धातिथिनिमित्त म. प्रां. वै. मंडळास अकरा रुपये देणगी दिली. देणगीचा स्वीकार करतांना वै. जळूकरशास्त्री यांनीं निरनिराळ्या प्रसंगीं यथाशक्ति दान देऊन आयुर्वेद कार्यास साहाय्य करण्याच्या वैद्य गोगटे यांच्या वृत्तीचा आदर्श प्रत्येकानें समोर ठेवण्याजोगा आहे असें सांगून त्यांचे आभार मानले व हा गोड समारंभ संपला.

येवलें येथील आयुर्वेदीय ट्रस्ट

दि. ३१।७।५४ शनिवारीं पहांटे ६ वाजतांच प्रांताध्यक्ष वैद्य जळूकरशास्त्री येवल्यास पोंचले. बरोबर वैद्य विष्णुशास्त्री दातेहि होते. शेठ गंगाराम छबिलदास नांवाच्या धनिकांच्या ट्रस्टमधून कित्येक वर्षांपासून चालू असलेला धर्मार्थ आयुर्वेद दवाखाना सध्यां सुविध वृद्धवैद्य अनंतशास्त्री जोशी हे चालवीत असतात, तो पाहून अध्यक्षांनीं समाधान व्यक्त केलें. दवाखान्यास लागणारीं सर्वहि औषधें येथेंच वै. अनंतशास्त्री यांचे नेतृत्वाखालीं तयार केलीं जातात हें याचें वैशिष्ट्य आढळलें. भरपूर जागा, उपयुक्त वैद्यकीय ग्रंथभांडार, औषधें व सामान्य शस्त्रकर्मांचें प्रात्यक्षिक व अंतःप्रविष्ट रुग्णांस वापरतां येतील अशा रुग्णशय्यांची सिद्धता पाहून अशा ठिकाणीं १० विद्यार्थ्यांचें तरी छोटेंसें शुद्ध आयुर्वेद विद्यालय, निदान ५ विद्यार्थ्यांसाठीं गुरुपरंपरा पद्धतीचा वर्ग सुरू होणें इष्ट व शक्य आहे असा अभिप्राय वैद्य जळूकरशास्त्री यांनीं व्यक्त केला. या संस्थेचे संचालक शेठजी हे आपल्या पूर्वजांनीं सुरू केलेल्या ह्या संस्थेची उपयुक्तता अधिक वाढण्याचे दृष्टीनें हा प्रश्न अवश्य लक्षांत घ्यावा अशी इच्छाहि प्रांताध्यक्षांनीं व्यक्त केली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नासिक जिल्हा वैद्य संमेलन

गांवांतील वैद्यांची एक सभा घेण्यासाठीं वै. अनंतशास्त्री व जिल्हा वैद्यमंडळाचे मंत्री वै. कुलकर्णी यांनीं एक परिपत्रक (सर्क्यूलर) काढून सर्वांस निमंत्रण दिलें. निमंत्रणपत्रकावर स्वाक्षरी प्रत्येकानें दिली; परंतु मंत्री, अध्यक्ष आणि स्थानिक उत्साही स्त्रीवैद्य श्रीमती सौ. सुभद्राबाई पटेल यांच्यावांचून कुणीच उपस्थित राहिले नाहींत. वैद्यवर्गाच्या ह्या औदासिन्याबद्दल प्रांताध्यक्षांनीं खेद व्यक्त केला. उपस्थित मित्रवर्गाशीं विचारविनिमय करून स्थानिक व जिल्हा संघटन अधिक मजबूत होण्यासाठीं येवलें येथें जिल्हा संमेलनाचें अधिवेशन येत्या दिवाळीच्या सुमारास घ्यावें असें ठरविण्यांत आलें.

संस्कृत विषय चांगला तयार करा

आज शनिवार असल्यामुळें हायस्कूलांतील व्याख्यान सकाळीं ८ वाजतांच झालें. व्याख्यानांत आजची पिढी आरोग्याची अपेक्षा करते, परंतु त्यासाठीं आहार-विहार-नियंत्रण करूं इच्छित नाहीं हें अनेक उदाहरणांनीं पटवून दिलें. व स्वस्थवृत्ताचे नि[...] सांगून S.S.C. नंतर पुढें काय? हा प्रश्न सोडवि[...] शुद्ध आयुर्वेद अभ्यासक्रमाकडे वळल्यानें कसें सुगम होणार आहे हें विद्यार्थ्यांस समजावून दिलें व त्यासाठीं आरंभापासूनच संस्कृत विषय अधिक चांगला तयार होणें अवश्य आहे ही सूचना अध्यक्षांनीं दिली.

याप्रमाणें नाशिक, सिन्नर, पिंपळगांव-बसवंत, त्र्यंबकेश्वर व येवलें एवढ्या गांवीं प्रचार करून अध्यक्षांनीं नासिक जिल्ह्यांतील आपला दौरा संपविला.

सिव्हिल हॉस्पिटलमध्यें
वैद्यांची अभिनंदनीय नेमणूक

मु. पो. पेठ (जिल्हा नासिक) येथील वैद्य आयुर्वेदविशारद श्री. वेलणकर डी. ए. एस. एफ. यांची बदली नासिक येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्यें जनरल डयूटीवर झाली आहे. अशा प्रकारची ही नेमणूक पाहिलीच असावी. याबद्दल नासिकचे सिव्हिल सर्जन डॉ. पारखे व वैद्यराज वेलणकर या उभयतांचे अभिनंदन.

आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारीं
आयुर्वेदिक व युनानी वनौषधि
तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण!

अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक खाका, माणिक, अकीक, सुवर्ण-वर्ख, रौप्य-वर्ख, शिंपा, कवड्या, शंख, प्रवाळ, आवळसार गंधक, दगडीबेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, वाकेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलटकंबल, नागकेशर (अस्सली), ब्राम्ही, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारची वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्टय! विशेष माहितीसाठीं आमचें साप्ताहिक दरांचें छापील भावपत्रक मागवावें.

टे. फो. नं. २१७९६ टेलिग्रॅम-'आयुर्वेद'

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...क्षयानें रोगोत्पत्ति हा आयुर्वेदीय दृष्टिकोणच नाहीं.

(लेखकः—आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे, पुणें २)

सन्मित्र श्री. वैद्यराज नृसिंहाचार्य बागेवाडीकर यांनीं मी त्यांच्या लेखावर घेतलेल्या आक्षेपांना आयुर्वेद पत्रिकेच्या ' १।५।५४ च्या अंकांत उत्तर दिलें. पण माझे आक्षेप कायमच आहेत. मी त्यांच्या ...ल्या (१।१।५४ च्या अंकांतील) लेखांतलें एक विधान [आ. प. वर्ष ७ पान ५४१ पहा] विसंगत ...विलें तें त्यांना पटलें नाहीं. मी त्यावर पुनः लिहून जागा अडविण्यापेक्षां वाचकांनींच त्याचा परस्पर ...य करावा असें म्हणून श्री. वै. बागेवाडीकर यांच्या मुख्य विधानाकडे व तत्समर्थनार्थ योजलेल्या कांहीं ...न युक्तिवादांचें, मुद्यांचे आणि आधारांचें विचारांचा थोडक्यांत परामर्श घेणार आहे.

त्रिगुण-त्रिदोषांची अप्रस्तुत तुलना

प्रस्तुतच्या लेखद्वयांत आरंभीं त्यांनीं सांख्यांच्या त्रिगुणांचा आयुर्वेदाच्या त्रिदोषांशीं साम्यविरोध ...विला आहे. त्याचा चालू वादाशीं साक्षात् संबंध कसा पोचतो समजणें कठीण आहे. कारण या दोहो- ...साम्यापेक्षां विरोधच ढळढळीत आहे ! त्यांची पुढील वाक्येंच याची साक्ष देतील. " त्रिगुणांच्या ...साम्यावस्थेंत विकार उत्पन्न होत नाहींत आणि त्रिदोषांच्या साम्यावस्थेंत भाव उत्पन्न होतात. " सांख्यांची ...ति म्हणजे त्रिगुणांचें साम्य (सत्वरजस्तमसां साम्यावस्था प्रकृतिः) या अवस्थेंत त्रिगुण कर्तृत्वहीन ...त्यामुळें विकार उत्पन्न होत नाहींत. आयुर्वेदीय प्रकृतींत दोषांचें कार्य सुरू असते. तींत त्रिदोषांचें ...म्य असतें. हा या दोन शास्त्रांतील असणारा महत्वाचा फरक " (आ. प. पृ. ७८७). (जाड ठसे माझे ...त. माझ्या ' अल्प मतीला ' यांचे अर्थ उकलत नाहींत. ' बृहन्मति ' वैद्यराजांनींच उलगडून दाख- ...वास अनुग्रह होईल.) एक बरं झालं कीं आपल्याला सांख्यतत्वज्ञानाचेंहि अधिष्ठान आहे असें मान- ...णारी आयुर्वेदीय परंपरा वै. बागेवाडीकरांनीं अवलंबिली. खरोखर आयुर्वेदानें सांख्यांचा " न प्रकृतिर्न ...कृतिः " असा उदासीन पुरुष उडवून लावून आपला स्वतंत्र कर्तृत्वशाली पुरुष सिद्ध केला व सांख्य- ...तत्वज्ञानाशीं आपला ठणठणीत विरोध दाखविला, त्याकडे थोडें दुर्लक्ष करून वैद्यराज बागेवाडीकर सांख्य- ...तत्वज्ञानाधारें त्रिदोषविज्ञान वर्तवू पहात होते, तें त्यांचें अधिष्ठानच (नकळत !) गळल्यानें त्यांचेकडून ...आयुर्वेदाची परंपरा (अनिच्छेनें !) राखला गेली व " धर्मो रक्षति रक्षितः " हें आयुर्वेदीय धर्माबाबतहि खरें ...हे याचा प्रत्यय आणला. 'आयुर्विद्याकारांनीं' जूनचे अंकांत वै. बागेवाडीकरांचें व्याख्यान छापतांना त्यांचें ...सर्वच सांख्यतत्वज्ञान गाळून टाकलें आहे.

सांख्य तत्वज्ञानाशीं आयुर्वेदाचा विरोध

सांख्यांचीं पंचवीस तत्वें (मूलप्रकृति इ.) प्रसिद्ध आहेत. आयुर्वेदानें आपला पुरुष " पुनश्च ...चतुर्विंशतिकः स्मृतः । मनो दशेन्द्रियाण्यर्थाः प्रकृतिश्चाष्टधातुकी ॥ (च. शा. १-१५) असा मानला. " ...वर चक्रपाणीची टीका अधिक स्पष्ट आहे. " यद्यपि पंचविंशतितत्वमयोऽयं पुरुषः सांख्यैरुच्यते, यदाह ' मूलप्रकृतिरविकृतिर्महदाद्याः प्रकृतिविकृतयः सप्त । षोडषकस्तुविकारो न प्रकृतिर्न विकृतिः पुरुषः ॥ " (सां.का. ३) इति, तथापीह प्रकृतिव्यतिरिक्तं चोदासीनं पुरुषमव्यक्तत्वसाधर्म्यादव्यक्ताख्यायां प्रकृतावेव प्रक्षिप्य ' अव्यक्त ' शब्देनैव गृह्णाति । " " इति क्षेत्रं समुद्दिष्टं सर्वमव्यक्तवर्जितम् । अव्यक्तमस्य क्षेत्रस्य क्षेत्रज्ञ- ...मृषयो विदुः ॥ " (च. शा. १-६३) यांत चरकानें ' अव्यक्त ' हें पुरुषाशीं सधर्मी मानलें आहे. तसाच ...आत्मा पुरुष हा चेतनावान्, कर्ता व षड्धातुमय असल्याचा आयुर्वेदाचा सांख्याहून भिन्न सिद्धांत त्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुढील सूत्रांत सांगितला आहे. " तत्र शरीरं नाम चेतनाधिष्ठानभूतं पञ्चभूतविकारसमुदायात्मकं समयोगवाहि" (च. शा. ६।४) पृथिव्यापस्तेजो वायुराकाशं ब्रह्म चाव्यक्तं षड्धातवः समुदिताः पुरुष इति शब्दं लभन्ते। (च.शा. ५-५) पंचमहाभूतशरीरिसमवायः पुरुषः। स एव कर्मपुरुषश्चिकित्साधिकृतः "। (सु.शा.१।१६)

टीकाकारांचा विपर्यास व तदाधारें वै. बागेवाडीकरांचें धूलिप्रक्षेपण

वैद्यराज बागेवाडीकर यांचा सांख्यांच्या त्रिगुणांचाच 'त्रिदोष' या नांवाखालीं जणू आयुर्वेदानें वापर केला आहे, असें दाखविण्याचा उद्देश होता, तो तर मुळींच सफल होणारा नाहीं. टीकाकारांचें हवे ते आधार इरेला घालून वाटेल तें सिद्ध होत नसतें. वैद्यराजांनीं " भिन्ना दोषास्त्रयो गुणाः। गुणा गुणमयाः सत्वरजस्तमोमयाः, तद्यथा रजोभूयिष्ठो मारुतः, पित्तं सत्त्वोत्कटं, कफस्तमोबहुलः " हा उतारा देऊन त्याचेपुढें (सु. उ. तं. अ. ६६) असा त्यांनीं कंसांत प्रमाणांक दिला आहे. [आ. प. १६।६।५४ पृ. ७८६] भिन्ना दोषास्त्रयो गुणाः " एवढेंच सूत्र खास सुश्रुताचें असून " गुणा गुणमया " इ. हें डल्हनाचें भाष्य आहे. वै. बागेवाडीकर दोन्ही सुश्रुताचे नांवावर देतात. बरें हें तरी आयुर्वेदाला मान्य आहे म्हणावें तर तसेंहि नाहीं. सुश्रुतासह सर्वच आचार्यांनीं वातादि दोष हे शारीर, व रज तम हे मानस दोष मानले असून या मानस दोषांचा देहोत्पत्तीशीं वा देहाच्या रोगोत्पत्तीशीं कसलाच संबंध दाखविला नाहीं. " वातपित्त-श्लेष्माण एव देहसंभवहेतवः। तैरेवाव्यापन्नैः शरीरमिदं धार्यते, त एव च व्यापन्नाः प्रलयहेतवः। " सु. सू. २१।३) असें सांगितलें असून उभय वाग्भटांनीं थोडक्यांत वायुःपित्तं कफश्चेति त्रयो दोषाः समासतः। विकृताविकृता देहं घ्नन्ति ते वर्तयन्ति च ॥ " (अ. हृ. सू. १।६) (अ. सं. सू. १।२०-२१) असा त्याचाच अनुवाद केला आहे. चरकानेंहि वायुः पित्तं कफः चेति शारीरो दोषसंग्रहः। " (च.सू.१।५६) असें वातादींचें शरीरापुरतें मर्यादित क्षेत्र सांगून " मानसः पुनरुद्दिष्टे रजश्च तम एव च। (सदर) असें रजतमाचें मनोनिष्ठच कर्तृत्व सांगितलें आहे. याचाच वाग्भटांनीं " रजस्तमश्च मनसो द्वौ च दोषावुदाहृतौ " असा अनुवाद केला आहे. यावरून आयुर्वेदाला वातादींचें त्रिगुणांशीं साम्य असल्याचें मुळींच मान्य नाहीं, हें स्पष्ट आहे. बरें टीकाकारांनीं जें साम्य दाखविलें त्यांत तरी क्रम राहिला आहे कां? टीकाकार देतात त्या वचनांत " कफस्तमोबहुलः। " असें आहे. उलट प्रकृतिवर्णनांत कफ सत्त्वमय आहे असें श्लेष्मा सोमः श्लेष्मलस्तेन सौम्यः......बुध्या युक्तः सात्विकः सत्यसन्धः। " (अ.हृ. शा. ३।९६) या वाग्भट वचनावरून स्पष्ट दिसतें. टीकाकारांच्या विपर्यस्त वचनाला सुश्रुताच्या नांवावर खपवून धूलिप्रक्षेपण करण्याची ही वै. बागेवाडीकरांची युक्ति वाचकांनीं डोळे उघडून पाहावी !

दोषक्षीणता व तत्प्रत्यनीक दोषांची वृद्धि

आतां वैद्यराज बागेवाडीकर यांच्या मुख्य मुद्यांकडे वळावयाचें. मी माझ्या लेखांत दोषक्षीणता म्हणजे तत्प्रत्यनिक दोषांची वृद्धि असें म्हटलें. त्यावर मी " फारसा विचार केला नाहीं " असें ते म्हणतात. वैद्यराजांनीं ' खोलवर विचार ' केला आहे. पाहूं या तर तो काय काय केला आहे तो !

त्यांचें म्हणणें विरोधी दोषाची वाढ नसून त्याच्या क्रियेची वाढ होते. चक्रपाणीच्या आधारेच तें त्यांनीं सांगितलें आहे. " उक्तप्राकृतलक्षणाविरोधिनां कर्मणां वृद्धिः " (च. सू. १८।५८ च. टी.) असें ते टीकाकार म्हणतात, आणि त्याचें तें कारणहि असें देतात. " यदुच्यते वृद्धिर्वाऽपि विरोधिनामिति विरोधिदोषाणाम्। यथा पित्तवृद्धौ तु श्लेष्मक्षयो जायते, तन्न, यतोऽन्यदोषवृद्धावन्यस्यावश्यं न ह्रासो भवति, तथाहि सति, पित्तवृद्धौ सत्यां सर्वदा श्लेष्मक्षयः स्यात् " (सदर) आणि याचाच अनुवाद करून वै. बागेवाडीकर मला "ही विचारपरंपरा अशास्त्रीय आहे. " असें बजावतात ! असो बिचारी ! मला एवढें "शास्त्र"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...न नसेल. पण इतकें खास समजतें कीं, एखाद्या समुदायांतून जो कोणी कमी होईल त्याची उणीव ...आइतपत तरी विरोधकाची वृद्धी जाणवते खरी; मग ते प्रत्यक्ष वृद्धी असो वा नसो. एखाद्या बैठकींत ...र्तो विचार करणारावरोबर कांहीं रागीट तसेंच कांहीं खोडसाळहि असले व कांहीं कारणानें खोडसाळ ...बैठकींतून उठून गेले तर बैठकींत गंभीरपणा पसरणारच. मग गंभीर माणसाची अधिक आवक होवो ...न होवो.

"श्लेष्मवृध्द्युक्तामयसंभवः" या वाग्भटाच्या वचनाचा मीहि अर्थ ढिलेपणानें केला ... "आमाशयांत क्षीण झालेला कफ, पक्वाशयांत वायू वाढण्यास (अगर वाढल्यासारखा वाटण्यास) साह...य कारण होतो" (आ. प. १६-२-५४ पृ. ५४३) अशी सावधगिरीची वाक्ययोजना मी केली ...व. एक कमी झाल्यावर दुसऱ्यावर कांहींच परिणाम होत नाहीं असें म्हणावयाचें असेल तर पित्तक्षीण-...श्लेष्मवृध्द्युक्तामयसंभवः हें वाग्भटाला एवढेंच नव्हें, कोणत्याहि दोषाच्या क्षीणतेबाबत विरोधकांची ...ी होते हें चरकाला तरी म्हणण्याचें काय कारण ? याचा वै. बागेवाडीकरांनींच 'खोलवर' विचार करावा.

दोषक्षयाची माझी व्याख्या

"दोषक्षय याचा खरोखर अर्थ वायु, पित्त, कफाची शक्ति कमी होणें असाच आहे" ही ...ी व्याख्या "कशी सदोष आहे" हें दाखवितांना वै. बागेवाडीकर यांनीं बरेंच प्राच्य-पाश्चात्य ...र्थविज्ञान "मला शिकविण्याचा प्रयत्न केला आहे. मी शिष्यभावानें शिकण्यास तयारहि आहे. पण ...ुी मला त्यांना एक शंका विचारावयाची आहे. त्यांना चक्रपाणीनें म्हटलेलें "वृद्धिर्वाऽपि विरोधिनाम्" ...सूत्रावरचें "विरोधिनां कर्मणां वृद्धिः" हें भाष्य मान्य आहेच; तर कर्म हें गुणाशिवाय होऊं शकतें ...? "कर्तव्यस्य क्रिया कर्म" ही कर्माची व्याख्या सांगणाऱ्या चरकानें "कारणं गुणः। असें गुणांकडे ...चें कारणत्व-प्रवर्तकत्व-दिलें आहे. म्हणजे गुणांचें कार्य तें कर्म असा अर्थ होतो. प्राचीन पदार्थविज्ञान-...नीं (नैय्यायिकांनीं) तर कार्यापूर्वी कारण अवश्य असावें लागतें, असा "कार्यस्य अनन्यथासिद्ध-...नियतपूर्ववृत्ति कारणम् [त. सं.] या सूत्रानें सिद्धांत सांगितला आहे. वैद्यराजांच्या सांख्यशास्त्रांत तर कार्य ...कारणगुणात्मकच सांगितलें आहे (कारणगुणात्मकत्वात्कार्यस्याव्यक्तमपि लिङ्गम्। सां. का.) वाग्भटानेंहि ...चा "कारणानुविधायित्वात्कार्याणां तत्स्वभावता अ हृ.शा." (१-४) असा अनुवाद केला आहे. चरकानें ...त "तत्र कारणं नाम तद्यत्करोति। स एव हेतुः स कर्ता।" (च. वि. ८-७०) असें याहून स्पष्ट म्हटलें ...हे. वर म्हटल्याप्रमाणें कार्याचे गुण हेंच तें कारण. आतां गुणांतील आठ जे महत्वाचे त्यांनाच वीर्यसंज्ञा ...दे असें वीर्यसंज्ञा गुणा येऽष्टौ" (सु. सू. ४०-१७) यांत सुश्रुत म्हणतो व त्यावरच टीका करतांना ...र्यं शक्तिरुत्पत्तिविशेषः सामर्थ्यं प्रभाव इत्यनर्थांतरम्" असें डल्हण म्हणतो. चक्रपाणीनेंहि "वीर्यं शक्तिः ...च द्रव्याणां गुणस्य वा" (च.सू.२६-१३) असें म्हटलें आहे. अर्थात् गुण-शक्ति-वीर्य हे शब्द परस्पर पर्याय ...आत. मग दोषक्षय म्हणजे त्यांची शक्ति कमी होणें असें म्हणण्यांत काय चूक ?

शक्ति कमी-अधिक होत नाहीं काय ?

वैद्यराज बागेवाडीकर पदार्थविज्ञानांतला आणखी एक "सामान्य नियम" मला मोठ्या कन-...ळवळ्यानें सांगतात. "द्रव्यांत असणाऱ्या शक्तीचा ऱ्हास किंवा वृद्धि केव्हांहि होत नसते" हाच तो नियम ! ...ते मला माहीत नसावा याबद्दल त्यांना मनापासून "वाईट वाटतें" ! पण त्यांना वाईट वाटलें तरी ...द्रव्यांतील शक्ति कमी आधिक होते त्याला मीं काय करावें ? वरील नियमाची सिद्धता करण्यासाठीं वै. बागे-...वाडीकर म्हणतातः-"कोणत्याहि पदार्थांत (द्रव्यांत) बदल होत असतां त्यांत असणारी शक्ति मुक्त होऊन ...द्रव्याच्या रचनेंत बदल करते" व "म्हणून या शक्तीस द्रव्याचा धर्म म्हटलें आहे." पण हें तत्वज्ञान वै.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बागेवाडीकर यांनींच नीट तपासून पहावें. कारण एखाद्या द्रव्याचा धर्म कमी–अधिक होत नाहीं असा व्यवहारांत दाखला नाहीं. व मग ज्या मानानें हा धर्म कमी अधिक होतो त्या मानानें त्या द्रव्याची शक्ति कमी अधिक होते हें ओघानेंच आलें. सुंठीचा तिखटपणा हा धर्म कमी होतो हा अनुभव जुन्या सुंठींत येतो व मग अशा सुंठीची--पाचक दीपक शक्तीहि कमी होते. बनारसच्या १९३६ च्या पंचमहाभूत-त्रिदोषचर्चा परिषदेचे वेळीं शक्तीबद्दलं बोलतांना मी हेंच प्रतिपादन केलें असतां माझा मुद्दा तेथील कोणाहि दार्शनिकांनीं खोडून काढला नाहीं. (पहा " इतिवृत्तम् " पृ. २५-२६) वै. बागेवाडीकरांनाहि मला हेंच सांगावयाचें आहे कीं, द्रव्यांची शक्ति कमी अगर अधिक अवश्य होते. " शक्ति मुक्त होऊन द्रव्यांत बदल करीत असते " यानें माझ्या म्हणण्यांत कांहींच बदल होत नाहीं. ज्या स्थानांतून शक्ति मुक्त होते तेथें ती खास कमी होते व जेथें ती अधिष्ठित होते तेथें ती वाढते एवढें प्रत्यक्ष आहे व यालाच मी शक्ती कमी वा अधिक होते असें म्हणतो.

द्रव्य व शक्ति यांचा संबंध

शक्ति ही गुणस्वरूपी असते हें वर दाखविलेंच आहे. आतां द्रव्य म्हणजे काय याचा विचार करावयास हवा. नैय्यायिकांचे मतें द्व्यणुकादि क्रमानें पृथिव्यादींचें स्वरूप व्यक्त होतें असें आहे. आयुर्वेद "सर्वं द्रव्यं पाञ्चभौतिकं " असें म्हणतो. (च. सू. २६·१०) या दोहोंचा संबंध लावावयाचा तर असें म्हणतां येईल कीं पंचमहाभूतें हीं द्व्यणुकादि क्रमानेंच द्रव्यांत संसक्त होतात. द्रव्याचा नाश व्हावयाचा तर हेंच द्व्यणुक सुटें होऊन अणुगत जावयास हवें " एवमुत्पन्नस्य कार्यद्रव्यस्य सञ्जिहीर्षावशात्परमाणुषु क्रिया। क्रियया परमाणुद्वयविभागे सति द्व्यणुकस्य नाशः ततस्त्र्यणुकस्य, ततश्चतुरणुकस्य, इत्येवं पृथिव्यादि नाशः। " (त.सं. दीपिका) आयुर्वेदानें द्रव्यनिर्मितीला थोडक्यांत संयोग हें कारण सांगितलें आहे. " तत्र संयोगापेक्षी लोकशब्दः " (च. शा. ५।७) " लोकस्तिष्ठति संयोगात्तत्र सर्वं प्रतिष्ठितम् " (च.सू. १।४५) " लोक " या शब्दांत सर्व " स्थावर जंगम द्रव्यांचा " अंतर्भाव होतो. आतां संयोग होण्याची क्रिया स्नेहानें होते तर नैय्यायिकांच्या पध्दतीनें आप् महाभूतानें होते असें दिसून येते. (चूर्णादिपिण्डीभावहेतुर्गुणः स्नेहो जलमात्रवृत्तिः । त. सं.). अर्थात् द्रव्याची वृद्धि व्हावयासाठीं अनेक सजातीय परमाणु एकत्र होऊन स्नेहानें संयुक्त व्हावे लागतात. ते कमी व्हावयाचे तर तसाच त्यांचेंतील संयोगी स्नेह कमी व्हावा लागतो. स्नेह कमी झाला कीं अणु विभक्त होऊन सुटे पडतात आणि द्व्यणुकादि नाशक्रमानें द्रव्यनाश होतो. तात्पर्य अणूंचा संयोग संधायक द्रव्याच्या स्नेहानें होतो तर वियोग हें संधायक द्रव्य कमी होऊन होतो व अणु सुटे पडून नित्य परमाणूंत समाविष्ट होतात. या परमाणूवरची शक्ति नित्य असून ती केव्हांच कमी जास्त होत नाहीं कारण हें परमाणुच नित्य आहेत हें मला माहिती आहे. (पृथिव्यादि चतुष्टयस्य परमाणवः आकाशादिपञ्चकं च नित्यद्रव्याणि । त. सं.) पण अणूंहून द्व्यणुकांत आलेली अधिक शक्ति तशीच द्व्यणुकाहून अणूंत झालेली कमी शक्ति विचारांत घ्यावयास हवी. आयुर्वेदानें गुणोत्कर्षापकर्ष अवश्य मानला असून तो वीर्याचे रूपानें दर्शविला आहे [समग्रगुणसारेषु " शक्त्युत्कर्षविवर्तिषु "] अ. हृ. सू. ९–१५]

आधुनिक विज्ञानहि माझे म्हणण्याला विरुद्ध जात नाहीं. जातें असें वै. बागेवाडीकर दाखवितील तेव्हां मीहि त्याचा विचार करीन. मात्र " वैद्यांनीं विज्ञानाची भाषा वापरतांना सावधपणें ती हाताळावी " हा केलेला उपदेश वै. बागेवाडीकरांनीं स्वतःसकट अंमलांत आणावा म्हणजे झालें. तेहि " वैद्यच " आहेत. मी वेळ येईल तेव्हां पाहीनच. (अपूर्ण)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जलस्नानासंबंधीं आयुर्वेदाचें मत

(लेखकः—वैद्य भि. श्री. कुलकर्णी, आयुर्वेदतीर्थ, नशिराबाद)

आयुर्वेद पत्रिकेच्या १६-६-५४ च्या अंकांतील रोज स्नान व दररोज साबण ' हा लेख व तील संपादकीय अभिप्राय वाचून मनाला कसें- वाटलें. पुनः त्याच लेखांवरील वाचकांचा पत्र- र या सदरांत ता. १६-७-५४च्या अंकांत श्री. र. कृ. गर्दे यांचे विचार व त्यावरील संपादकीय यांत आल्यामुळें आयुर्वेदांत साबणाबद्दल री तरी स्नानाबद्दल काय काय माहिति उपलब्ध , याबद्दल विचारार्ह मुद्दे लक्षांत घेऊन ' दररोज ' याबद्दल आयुर्वेदाचें मत काय आहे हें स्पष्ट याचे दृष्टीनेंच सदरील लेख लिहिण्याचें धारिष्ट त आहे.

द्वौ कालौ उपस्पृशेत् ।

दैनिक स्वस्थवृत्त सांगतांना श्रीचरकसंहितेंत द्वौ कालावुपस्पृशेत् ।' (च. सू. अ. ८-१८ पहा.) वरील टीकेंत ' द्वौ कालौ सायं प्रातः उपस्पृशेत् स्नायात् ' असें स्पष्टीकरण केलें आहे. (दररोज) सकाळीं व संध्याकाळीं दोन वेळां स्नान करावें असा या सूत्राचा अर्थ आहे. तसेंच सूत्र विसावें, अध्याय आठवा, पाहिल्यास त्यांत स्नान केल्याशिवाय जेवण करू नये असें सांगितलें आहे. 'नारत्नपाणिर्नास्नातो श्नमाददीत।' तसेंच वाग्भटांतील दिनचर्येंत ' नीच-केशनखश्मश्रुनिर्मलांघ्रिमलायनः । स्नानशीलः सुसुरभिः सुवेषोऽनुल्बणोज्ज्वलः ॥' असें रहावें म्हणून सांगि-तलें आहे. याचा अर्थ असा कीं, केस, नखें, दाढी, मिशा (पंधरवड्यांतून तीन वेळां काढून टाकाव्या.) त्या वाढू देऊं नयेत. पाय निर्मळ ठेवावे. तसेंच ज्या छिद्रांतून मलभाग नि तो तीं छिद्रें म्हणजे नाक, डोळे, त्वचारन्ध्रें, गुदद्वार, उपस्थ इ. अवयव स्वच्छ ठेवावेत. स्नानशील असावें. (शीलनं सतताभ्यासः) स्नानशील या शब्दावर आयुर्वेदरसायनटीकेंत श्री-हेमाद्रि म्हणतातः—"स्नानशीलः कालद्वयेऽपि स्नानानिष्ठः प्रत्यहं स्नानस्य प्राग्विहितत्वात् । उक्तं च चरकेण ' द्वौ कालावुपस्पृशेत् इति ।'' रोज स्नान करण्याबद्दल यापूर्वीच उल्लेख असून या ठिकाणीं स्नानशील असावें असा पुनः उल्लेख करण्याचें कारण हेच कीं दिवसां-तून दोनवेळां स्नान करावें. या म्हणण्यास श्री. चरक-मुनींच्या वचनाचा आधार दिलेला आहे. तसेंच सर्वांगसुन्दरा-टीकेंत श्रीअरुणदत्त लिहितात- ' स्नानं शीलयति इति स्नानशीलः नित्यस्नायी स्यात् ' (स्नानाचें सतत सेवन करणारा तो स्नानशील. नित्य स्नान करावें.)

वरील वचनावरून निरोगी मनुष्यानें दैनिक स्वस्थवृत्ताचें आचरण करण्यास दररोज दिवसांतून दोन वेळां स्नान करावें असाच आयुर्वेदाचा अभि-प्राय असावा असें वाटतें. आतां प्रत्येक ऋतूंत स्नान करावें किंवा करूं नये. याबद्दल 'ऋतुचर्या' प्रकरणांत आयुर्वेदाचें काय मत आहे, त्याबद्दल विचार करूं.

ऋतुचर्येंतील स्नानविधि

१ हेमंतऋतुः– ' कषायाऽपहृतस्नेहस्ततः स्नातो यथाविधि । ' (वाग्भट)–अंगाला लावलेलें तेल तुरट रसाचें उटणें लावून काढून टाकावें व यथाविधि स्नान करावें. (खांद्याखालीं गरम पाण्यानें स्नान करावें. व डोक्यावरून कोमट पाणी घ्यावें. डोक्या-वरून गरम पाण्यानें स्नान केलें तर केस व डोळे यांची शक्ति कमी होते. असा हा स्नानविधि दैनिक स्वस्थ वृत्तांत वर्णन केला आहे.) यावरून हेमंतऋतूंत स्नान करावें असा निष्कर्ष निघतो.

२ शिशिरऋतुः- ' अयमेव विधिः कार्यः शिशिरेऽपि विशेषतः । ' म्हणजे हाच विधि विशेषें-करून शिशिर ऋतूंत आचरावा, असें सांगितल्यामुळें शिशिरऋतूंतहि स्नान करण्यास हरकत नाहीं.

३ वसंतऋतुः–' स्नातोऽनुलिप्तः कर्पूरचंदना-गुरुकुंकुमैः । ' म्हणजे स्नान करून कापूर चंदन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अगुरु व केशर यांची उटी लावण्यास सांगितलें (यावर कोणी अशी शंका काढतील कीं, उटी न लावतां आली तर स्नानानें बाधा होईल. त्यापेक्षां स्नानच न केलेलें बरें. कारण आमची आर्थिक परिस्थिति उटी लावण्यास अनुकूल नाहीं. पण ही सबब खरी नव्हे. स्नान केल्यानंतर अथवा नुसतें तोंड हात पाय धुवून बाहेर फिरावयास किंवा कामावर जाण्यापूर्वी सौंदर्यप्रसाधनांचा वापर करणारे पुष्कळ-जण आढळतात. उटीचें रूपांतर सौंदर्यप्रसाधनांत केल्यास अशा लोकांना तें सोईचें होईल. ज्यांना असा सौंदर्यप्रसाधनांचा खर्च झेपत नाहीं, त्यांनीं स्नान केल्यावर चंदनाचें खोड सहाणेवर थोडें केशर, अगुरु व कापूर घालून अथवा नुसतेंच पाणी घालून घासूनघासून उटी म्हणजे गंध तयार करून तें अंगास लावावें. आपल्या धर्मांत स्नान केल्यास गंध लावण्याची प्रथा होती, ती इंग्रजांशी मोडली व त्यानंतर आतां आपली वृत्ति स्नानाबद्दल उदासीन होऊं देणें ही आपल्या धर्माची प्रगति खास नव्हे, असो.)

४ ग्रीष्मऋतुः-' सुशीततोयसिक्तांगः । ' म्हणजे ग्रीष्मऋतूंत थंड पाण्यानें स्नान करण्यास सांगितलें आहे.

वर्षाऋतूंत स्नानाचा उल्लेख !

५ वर्षाऋतुः- वर्षाऋतूंत स्नान करावें किंवा करूं नये याबद्दल वाग्भटांत स्पष्ट उल्लेख आढळत नाहीं. त्यांत फक्त ' भजेत् साधारणं सर्वमूष्मणस्तेजनं च यत् । ' एवढाच उल्लेख असल्यामुळें आपण श्रीचरकसंहिता उघडून वर्षाऋतुचर्या वाचली तर त्यांत ' प्रघर्षोद्वर्तनस्नानगंधमाल्यपरो भवेत् । ' म्हणजे उटणें वगैरे लावून अंग घासून घासून स्नान करून गंध व फुलांच्या माळा धारण कराव्यात असा उल्लेख आढळतो. (चरकसूत्रस्थान अ. ६ श्लोक ४० वा पहा)

६ शरदऋतुः- श्रीवाग्भटांनीं शरदृऋतूंतील हंसोदकाचें वर्णन करून तें पाणी पिणें वगैरेसाठीं अमृताप्रमाणें मलनाशक असतें असें म्हटलें आहे. ' शुचि हंसोदकं नाम निर्मलं मलजिज्जलम् । नाभिष्यंदि न वा रूक्षं पानादिष्वमृतोपमम् । ' यांतील आदि शब्दांत स्नानाचा अंतर्भाव होऊं शकतो. पण स्नानाबद्दलचा स्पष्ट उल्लेख श्रीचरकसंहितेंत आढळतो. ' हंसोदकमिति ख्यातम् शारदं विमलं शुचि । स्नानपानावगाहेषु हितमंबु यथामृतम् । (च. सू. अ. ६ श्लोक ४७).

याप्रमाणें सहाहि ऋतूंत स्नान करण्याबद्दलचा उल्लेख आयुर्वेदांत असून दिनचर्येंत रोज तर दोनदां स्नान करण्यास सांगितलें आहे. यावरून ' सर्व ऋतूंत सर्वांनीं दररोज स्नान करावें ' असेंच आयुर्वेदाचें मत असावें असें वाटतें. हें मत निरोगी (स्वस्थ) अवस्थेंतच ग्राह्य आहे.

स्नानाबद्दलचें स्वस्थवृत्तांतील आयुर्वेदीय मत व आयुर्वेदपत्रिकेच्या ता. १६।६।५४ च्या अंकांतील ' दररोज स्नान व दररोज साबण ' या लेखांतील कांहीं विधानें यांची थोडक्यांत चर्चा करूं.

उष्ण कटिबंध व शीत कटिबंध

अमेरिकन त्वग्रोगनिष्णाताचें म्हणणें असें कीं, 'दररोज अंग घासण्यानें वा धुण्यानें त्वचेचा नाजूक-पणा वाढतो व फाजील संवेदनाक्षमत्व मात्र निर्माण होतें. त्वचेवर मळाचा थर असण्यानें त्वचेचा फाजील नाजुकपणा येत नाहीं, व त्याचप्रमाणें ती नैसर्गिक-रीत्या रोगजन्तुप्रतिबन्धक होते. ' असा अनुभव शीत कटिबंधांत घाम कमी येत असल्यामुळें तेथील लोकाना येत असेल; पण भारतासारख्या उष्ण कटिबंधांत स्नान न केलें तर अंगास घामाची घाण येऊं लागते व कांहीं दिवसांनीं अंगावर उवाहि होतात. स्नान न करतां कपडे स्वच्छ धुवून घातले तर अंगाच्या मळामुळें ते आंतून तावडतोब मळतात इकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. पायांनासुद्धां मळ लागूं देऊं नये (निर्मलांघ्रि) असें सांगणाऱ्या आयुर्वेदास त्वचेवरील मळाचा थर मानवेल काय ! अमेरिकन त्वग्रोगनिष्णातानें कांहींहि विधान केलें तरी तें त्यास शोभेल पण या लेखावरील संपादकीय उल्लेखांतील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पावसाळ्यांत सर्वांना स्नान नको. ’ तसेंच ‘ पावसाळ्यांतील आहार-विहार ’ या मथळ्याखालीं ‘ मग लोकांनीं रोज स्नानानें शरीर ओलें करणें आयुर्वेदाला कसें बरें मान्य होईल ? या विधानांना आयुर्वेदांतील कोणत्या वचनांचा आधार आहे ? याबद्दल खुलासा झाल्यास शंकानिरसन होईल.

नग्नस्नानाची प्रथा

पूर्वी पाश्चात्य देशांत उघड्या जागेंत स्नानगृहांत स्त्रीपुरुषांनीं एकत्र नग्न स्नान करण्याची प्रथा होती असें म्हणतात. या प्रथेमुळें पाप फार वाढूं लागलें म्हणून पाश्चात्य धर्मगुरूंनीं आज्ञा केली कीं, ‘कोणीहि स्नान करूं नये. स्नान केल्यास शिक्षा होईल. ’ स्नान करणें व पाप करणें हें समानार्थी शब्द आहेत असें तेव्हां समजत असत. पौर्वात्य देशांतहि ही प्रथा असावी असें मानण्यास जागा आहे. पौर्वात्य देशांतील धर्मगुरुंनीं या गोष्टीचा सारासार विचार करून निष्कर्ष काढला कीं उष्णकटिबंधांत स्नान करणें रोज आवश्यकच आहे. स्त्रीपुरुषांनीं सामुदायिक स्नान केलें तरी हरकत नाहीं. मात्र या कार्यक्रमांत पाप होतें तें नग्न स्नान केल्यामुळें. तेव्हढी खबरदारी घेतली म्हणजे झालें. म्हणून आपल्या ऋषिमुनींनीं नियम केला कीं, ‘ न नग्न उपस्पृशेत् (च.सू. ११, अ. ८). नग्नावस्थेंत स्नान करूं नये.

उदासीनताहारक स्नान

मनुष्याला आलेला आळस, थकवा व मनाची उदासीनता घालविण्यास स्नानासारखें दुसरें साधन नाहीं हें तत्व गृहीत धरूनच आकस्मिक रीतीनें नातलगाची निधनवार्ता समजली तर लगेच स्नान करावें असें धर्मशास्त्र सांगतें. शुक्रस्खलनानें येणारी शुष्कता व मनाची उदासीनता घालविण्यासाठीं स्त्री-समागमानंतर स्नान करावें असें आयुर्वेद सांगतो. ‘स्नानानुलेपनहिमानिलखंडखाद्यशीतांबुदुग्धरसयूषसुराप्रसन्नाः । सेवेत चानुशयनं विरतौ रतस्य तस्यैव चाशु वपुषः पुनरेति धाम ॥ (वा.सू. ७९, अ. ७) या श्लोकांत स्नानाचा पहिला नंबर आहे.

अधिक योग्य विधान

‘ पावसाळ्यांत सर्वांना स्नान नको ’ असें म्हणण्याऐवजीं ‘ ज्यांना पावसाळ्यांत स्नान मानवत नाहीं, त्यांनीं पावसाळ्यांत स्नान करूं नये ’ हें म्हणणें जास्त योग्य झालें असतें. असो.

धर्मशास्त्राचा आधार

‘ हिवाळ्यांत तेल लावून स्नान ’ या मथळ्याखालीं ‘ पाणी शीत स्वभावी आहे. पावसाच्या वा थंडीच्या दिवसांत स्नान करणें झाल्यास दुपारीं बारा वाजतां करावें. व नंतर उन्हांत बसावें. हें विधानहि रूढीला विसंगत व बुद्धीला न पटणारें वाटतें. धर्मशास्त्रानें वैशाखस्नान, कार्तिकस्नान व माघस्नान करण्यास सांगितलें असून वैशाखांतील स्नान सोडून कार्तिकस्नान व माघस्नान थंडीच्या दिवसांत थंड पाण्यानें नदीवर अथवा तलावावर सूर्योदयापूर्वी केल्यानें जास्त पुण्य लाभतें असें सांगितलें आहे. थंडीच्या दिवसांत सूर्योदयापूर्वी नदीचें किंवा तळ्याचें पाणी साधारण कोमट असतें व सूर्योदयानंतर तें थंड होतें असा सर्वसाधारण अनुभव येतो. आयुर्वेदशास्त्राला धर्मशास्त्र मान्य आहे, कारण सुखार्थाः सर्वभूतानां मताः सर्वाः प्रवृत्तयः । सुखं च न विना धर्मात्तस्माद्धर्मपरो भवेत् ।’ (वाग्भट सू. अ. २ श्लो. २०). अर्थात् आयुर्वेदाचें मतहि धर्मशास्त्राप्रमाणें थंडीच्या दिवसांत सूर्योदयापूर्वी स्नान करण्यास अनुकूल आहे असें अनुमान काढलें तर तें अयोग्य ठरेल काय ?

आयुर्वेद-पत्रिकेच्या ता. १६-७-५४ च्या अंकांतील वाचकांचा पत्रव्यवहार या सदरांतील श्री. गर्दे यांच्या पत्रास उत्तर देतांना ‘ थंड वा उष्ण पाण्याच्या स्नानापासून कफ व वात प्रकृति लोकांना होणाऱ्या हानीची कल्पना लक्षांत आली असल्याबद्दलचा उल्लेख आहे. ही हानि जर कफ व वातप्रकृति लोकांना समजली असती तर फारच थोड्या लोकांनीं स्नान केलें असतें. स्नानानें होणारी हानि जर सर्वांना समजली तर कोणीच स्नान करण्यास तयार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होणार नाहीं. धर्मशास्त्रानें, आतपस्नान, भस्मस्नान हे पर्याय केवळ अशक्त, वृद्ध, बाल व आजारी माणसांकरितांच सुचविले असावेत असें वाटतें. ज्यांना पाण्यानें रोज स्नान करण्यामुळें त्रास होतो त्यांनी देखील होत असलेला त्रास किंवा हानि सहन करून रोज स्नान केलेंच पाहिजे असें कोणीहि म्हणणार नाहीं. पाण्याचें स्नान न मानविणारे लोक प्रकृतीनें अशक्त किंवा बहुदा रोगट असतात. म्हणून “ बहुजन-समाज अशक्त, रोगट वा अस्वस्थ असल्यामुळें ‘सर्वांना दररोज स्नान नको’ असा नियम केल्यास चालेल व स्वस्थ किंवा निरोगी लोकांची गणना अपवादात्मक असल्यास त्यांचें दररोज स्नान करणें मूळ नियमास अपवादात्मक ठरेल !

अतिस्नानाचा निषेध

स्नान कोणी करूं नये याबद्दल श्री वाग्भटा-चार्यांनीं पुढें दिल्याप्रमाणें आपलें मत व्यक्त केलें आहे तें असें:—

स्नानमर्दितनेत्रास्यकर्णरोगातिसारिषु ।
आध्मानपीनसाजीर्णभुक्तवत्सु च गर्हितम् ॥

(वा. सू. अ. २ श्लो. १८)

अर्दित (Facial Paralysis) म्हणजे तोंड वांकडे होणें; डोळ्याचे तोंडाचे व कानाचे रोग असल्यास, अतिसार म्हणजे हगवण लागल्यास; पोट फुगल्यास, पडसें झाल्यास, अजीर्ण झाल्यास आणि जेवण केल्यानंतर तावडतोब स्नान करूं नये. श्रीचरक-चार्यांनीं सूत्रस्थान अध्याय ८ मधील एकोणिसाव्या सूत्रांत अतिस्नानाचा निषेध केला आहे. ‘ अति तेथें माती ’ ही म्हण प्रसिद्धच आहे. स्नानाचा प्रामु-ख्यानें उल्लेख कार्श्यचिकित्सा व निद्रानाशचिकित्सा करतांना श्रीचरकसंहितेंत सूत्रस्थानांत २१ व्या अध्यायांत सांगितला आहे. यावरून शरीर पुष्ट होण्यास व झोप येण्यास स्नानाची आवश्यकता आहे, असा निष्कर्ष काढल्यास तो चुकीचा ठरेल काय ?

स्नानाचे गुणधर्म

स्नानाचे आयुर्वेदीय गुणधर्म पुढीलप्रमाणें आहेतः—

दौर्गंध्यं गौरवं तंद्रां कण्डूं मलमरोचकम् ।
स्वेदबीभत्सतां हन्ति शरीरपरिमार्जनम् ॥९३॥
पवित्रं वृष्यमायुष्यं श्रमस्वेदमलापहम् ।
शरीरबलसंधानं स्नानमोजस्करं परम् ॥९४॥

(चरक संहिता अ. ५ वा.)

जें स्नान दुर्गंधि, जडपणा, गुंगी, खाज, मळ, अरुचि, घामटपणा, थकवा व घामावाटे बाहेर पडणारा शरीरांतील मळ यांचा नाश करतें आणि शरीराचें बल, आयुष्य, ओज व शुक्र यांचें वर्धन करतें अशा स्नानाबद्दल अमेरिकन त्वग्रोगनिष्णातानें इतका तिटकारा दाखवावा व ही गोष्ट आम्हांस आयुर्वेदीय दृष्ट्या मान्य आहे म्हणून त्या गोष्टीस आम्ही संमति द्यावी हें आश्चर्य नव्हे काय ?

अमेरिकन शास्त्रज्ञानें हत्ती व म्हैस याशिवाय इतर जनावरें स्नान करीत नाहींत; मांजर तर पाण्याचा तिटकाराच करतें, म्हणून ‘ स्नान न करणें ’ हा निसर्गांतील प्राण्यांचा नियम माणसांना देखील लागू करणें सयुक्तिक नाहीं. सर्वच निसर्गसिद्ध जनावरांचे नियम मनुष्य प्राण्यांस लागूं केल्यास, गुदप्रक्षालन, वस्त्रप्रावरण, श्मश्रुविधि, समाजव्यवस्था, दंतधावन, धर्मबंधन इ. गोष्टींची स्नानाप्रमाणेंच अनवश्यकता निर्माण होईल. इत्यलम्

तारेचा पत्ताः—Newbottle
के. के. शहा अँड कंपनी
बाटल्यांचे व्यापारी
(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)
रिकाम्या बाटल्या, बुच, कॅपसुल्स्
[हेअर ऑईल, सरबत, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाचीं सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे
ठोक व किरकोळ
विक्री करणारे व्यापारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मण्डळ, स्थायी कार्यालय, नासिक

संशोधित घटना व नियम

(१९५३ अखेर)

संस्थेचें नांव

या संस्थेचें नांव " महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ " असें असावें.

उद्देश

पुढील उद्देश साध्य करण्यासाठीं हें मंडळ निर्माण करण्यांत येत आहे.

१ महाराष्ट्र-प्रांतांतील वैद्यांची संघटना करणें.
२ आयुर्वेदाची शास्त्रीय व व्यवहारिक दृष्ट्या प्रतिष्ठा वाढविणें.
३ जनतेचें स्वास्थ्य-संरक्षण करण्याचा प्रयत्न करणें.
४ वैद्यवर्गांत परस्पर स्नेहभाव निर्माण करणें.
५ वैद्यवर्गाचें आयुर्वेदीय ज्ञानवर्धन करणें.
६ वैद्यवर्गाच्या हितसंबंधाचें रक्षण करणें.
७ वैद्यवर्गाची सर्वांगीण प्रतिष्ठा वाढविणें व टिकविणें.

साधनें

वरील उद्देश साधण्यासाठीं पुढें दिलेल्या साधनांपैकीं शक्य त्या साधनांचा अवलंब हें मंडळ अवश्य करील.

(१) सभा, संमेलनें, प्रदर्शनें, व्याख्यानें करणें व करविणें.

(२) आयुर्वेदीय विद्यालयें, महाविद्यालयें, रुग्णालयें, प्रसूतिगृहें वगैरे चालविणें.

(३) आयुर्वेदीय प्राच्य व अर्वाचीन ग्रंथ, टीका-टिप्पणीसह प्रसिद्ध करणें. आयुर्वेदीय मासिकें व वृत्तपत्रें चालविणें अगर चालविण्यास साहाय्य अथवा प्रोत्साहन देणें. आयुर्वेदीय लेखांचें व ग्रंथांचें परीक्षण करणें; तसेंच नवीन ग्रंथ व निबंध लिहिण्यास प्रोत्साहन देणें.

(४) वैद्यकीय व्यवसायांत येणाऱ्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करणें.

(५) वैद्यकीय ग्रंथालयें, वनस्पति उद्यानें, वैद्यकीय चिकित्सा व उपकरणें आदि वस्तूंचा संग्रह करणें व चालविणें.

(६) आयुर्वेदीय शास्त्रज्ञांचा सन्मान करणें.

(७) प्रान्तांतील स्थानिक स्वराज्यसंस्था, सरकार व जनता यांजकडून आयुर्वेदीय रुग्णालयें, औषधालयें, आरोग्यालयें वगैरे स्थापन करण्याचें व टिकविण्याचे प्रयत्न करणें.

(८) प्रांतांतील आयुर्वेदीय संस्थांना सरकारमान्यता व आर्थिक साहाय्य मिळवून देण्याची खटपट करणें. व या उद्देशांच्या पूर्तीकरितां स्थावर-जंगमात्मक (शेअर्स, ट्रस्ट इ. रूपानें) देणग्या व सदस्य-वर्गणी मिळविणें.

(९) प्रांतांत जिल्हानिहाय वैद्यसमित्या स्थापन करणें व असलेल्या संस्थांना संबद्ध करणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(१०) प्रासंगिक महत्वाच्या आयुर्वेदविषयक प्रश्नांचा विचार करून त्या विषयीं प्रांताचें अधिकृत मत तयार करणें व तें प्रगट करणें.

(११) प्रचाराच्या सर्व साधनांचा उपयोग करणें.

(१२) जरुरीप्रमाणें इतर प्रांतीय वैद्यमंडळांशीं सहकार्य करून कार्य करणें.

संस्था-संबद्धता

हें प्रांतीय वैद्यमंडळ निखिलभारतवर्षीय आयुर्वेद महामण्डळाशीं संबद्ध असावें.

प्रांताच्या भौगोलिक मर्यादा

नासिक, पूर्वखानदेश, पश्चिमखानदेश, अहमदनगर, सोलापूर, सातारा, रत्नागिरी, पुणें, कुलाबा, ठाणें, बृहन् मुंबई [२ जिल्हे], कोल्हापूर, द. सातारा, मराठवाडा व बेळगांव हे जिल्हे ही महाराष्ट्राची भौगोलिक मर्यादा आहे.

मंडळाचें वर्ष

'१ जानेवारी ते ३१ डिसेंबर' हें मंडळाचें वर्ष समजलें जाईल.

कार्यालय-स्थान

प्रधानमंत्री ज्या ठिकाणीं वास्तव्य करीत असतील तेथें कार्यालय राहील.

कार्यालय विभागणी

म. प्रां. वै. मं. च्या कार्यालयाचे स्थिर व चल असे २ भाग असावेत; व या कार्यालयाचे कामांची विभागणी परिस्थिति व कार्याचे दृष्टीनें अध्यक्षांनीं करावी.

सभासद-योग्यता

१९३८ च्या वैद्यक कायद्यान्वयें रजिस्टर्ड झालेले अगर यादींत नांव दाखल केलेले वैद्य या मंडळाचे सभासद होण्यास पात्र आहेत. तसेंच रजिस्टर्ड वैद्य होण्यास पात्र असून वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या गृहस्थांस, मंडळाच्या दोन सभासदांनीं लेखी शिफारस केल्यास त्यांना या मंडळाचे सभासद होतां येईल.

वयोमर्यादा

म. प्रां. वैद्य मंडळाचे सभासद होण्यापूर्वी वैद्याचें वय २० वर्षें पूर्ण असलें पाहिजे.

सभासदत्व

१ महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळास वार्षिक एक रुपया वर्गणी देणारा वैद्य हा या मंडळाचा सभासद समजला जाईल.

२ स्वागत मंडळानें स्वागत सभासद व प्रतिनिधि करतांनाच जे त्या वर्षी सभासद झाले नसतील त्यांजकडून मंडळाची एक रुपया वर्गणी घेऊनच स्वागत सभासद व प्रतिनिधि करावेत. व ती महाराष्ट्र प्रांतीय वैद्य-मंडळाची वर्गणी महाराष्ट्र प्रांतीय वैद्य-मंडळाच्या स्थायी कार्यालयाकडे पोंचती करावी.

३ म. प्रां. वैद्य-मंडळाचे भूतपूर्व अध्यक्ष हे महाराष्ट्र प्रांतीय वैद्य-मंडळाचे कायम सदस्य गणले जावेत.

समित्या

कार्याच्या सोयीसाठीं तीन समित्या निर्माण कराव्यात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(१) महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ (प्राथमिक सभासदांची सर्वसाधारण सभा), (२) स्थायी [समि]ति, (३) कार्यकारी मंडळ.

पदाधिकारी

महाराष्ट्र प्रांतीय वैद्यमंडळ, स्थायी समिति व कार्यकारी मंडळ, यांचे अध्यक्ष, मंत्री व खजिनदार [ए]क राहतील.

मंडळाची सर्वसाधारण सभा

संमेलनाचें वार्षिक अधिवेशन न झाल्यास म. प्रां. वै. मण्डळाची सर्वसाधारण सभा वर्षांतून एक [वेळ] अवश्य व्हावी व त्याची गणसंख्या ३० असावी.

स्थायी समिति

(१) अध्यक्ष (२) मंत्री आणि प्रत्येक जिल्ह्यांतून निवडलेले ३ व वृहन् मुंबईचे (= मानलेल्या २ [जिल्ह्य]ाचे) ६ सभासद आणि खाजिनदार असे एकूण ५२ सभासद राहातील.

स्थायी समितीची निवडणूक

स्थायी समितीची निवडणूक म. प्रां. वै. मंडळाचे सर्वसाधारण सभासद आपापल्या जिल्ह्यांतून [प्रत्ये]कीं तीन प्रमाणें सभासद निवडतील. वरील निवडणूक संमेलनाचे वेळीं करण्यांत येईल.

स्थायी समितीची गणसंख्या

स्थायी समितीची गणसंख्या १० असावी.

स्थायी समितीची सभा

स्थायी समितीच्या वर्षांतून कमींतकमी २ सभा होतील. समितीच्या दहा सभासदांनीं सभा घेण्या- [वि]षयीं लेखी विनंति केल्यास जादा सभा बोलावण्यांत यावी.

स्थायी समितीचीं कार्यें

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाच्या उद्देशानुसार आपल्या विभागांत कार्यें करणें, आयुर्वेदाचा व [वैद्य]ांचा उत्कर्ष होईल असा प्रयत्न करणें, जिल्ह्यांत चालू असलेल्या वैद्यकविषयक गोष्टींची माहिती कार्यकारी [मंड]ळास देणें, कार्यकारी मंडळाच्या साहाय्यानें जिल्ह्यांतील कार्यांची प्रगति करणें व मंडळाच्या उद्देशास [अ]नुसरून आणि व संमेलनांतील ठरावानुरोधें प्रांतांत सतत कार्य करणें, हीं स्थायी समितीच्या सभासदांची [का]र्यें आहेत.

कार्यकारी मंडळ

(१) म. प्रांतीय वैद्यमंडळाचे अध्यक्ष, स्थायी समितींतून सात सभासद निवडतील व त्याशिवाय म. प्रां. वै. मंडळाच्या सर्वसाधारण सभासदांतून दोन मंत्री व एक खाजिनदार नियुक्त करतील; असे सर्व मिळून कार्यकारी मंडळाचे ११ सभासद असतील.

(२) वर्षांतून कमींतकमी तीन वेळ कार्यकारी मंडळाच्या सभा व्हाव्या.

(३) सभेची सूचना सभासदांस सभेपूर्वी कमींतकमी ५ दिवस मिळावी.

(४) सभेची गणसंख्या ५ ही असावी.

संमेलनाच्या अध्यक्षांची निवडणूक

अध्यक्षीय निवडणुकीकरितां मंडळाच्या सभासदांकडून ३ नांवें मागवावींत. आलेल्या सर्वप्रथम- [क्र]मांकाच्या तीन नांवांपैकीं कोणी आपलें नांव मागें घेतल्यास, अथवा अध्यक्षपदासाठीं असंमति दर्शविल्यास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राहिलेल्या २ नांवांतून निवडणूक करावी. कोणत्याहि दोघांनीं नांवें मागें घतल्यास राहिलेली व्यक्ति अध्यक्ष म्हणून निवडून आली असें समजावें. तीनहि लोकांनीं आपलीं नांवें मागें घेतल्यास अनुक्रमानें पुढील तीन नांवें अध्यक्षीय निवडणुकीकरितां घ्यावींत.

हीं नांवें कार्यकारी मंडळानें पुन्हां सर्वसाधारण सभासदांकडे व सर्वसाधारण सभासद नसलेल्या वैद्य-स्वागत-सभासदांकडे पाठवावीं व त्यांतून एक नांव मागवावें व त्या सर्वांत बहुमत मिळालेलें नांव कार्यकारी मंडळानें अध्यक्ष म्हणून जाहीर करावें.

(२) मतपत्रिका मोजण्याचें काम तीन त्रयस्थ माणसांस पंच म्हणून नेमून त्यांचे समक्ष करावें.

(३) हें कार्य संमेलन भरण्यापूर्वी निदान एक महिना अवश्य व्हावें.

(४) संमेलनापूर्वी कमींतकमी दोन महिने स्वागतमंडळाचे सभासद झाले असतील त्या वैद्य स्वागत-सभासदांना अध्यक्षपदाकरितां मत देण्याचा अधिकार राहील.

(५) ठराव व निबंध मागविणें, बक्षिसें देणें, हीं कामें कार्यकारी मंडळानें करावीं.

संमेलनानंतर स्वागतमंडळाची जबाबदारी

(१) संमेलनाच्या स्वागतमंडळानें संमेलन समाप्तीच्या तारखेपासून तीन महिन्यांचे आंत संमेलनाचा अहवाल व जमाखर्च मंडळाच्या कार्यालयाकडे मंजुरीकरितां पाठवावा. स्थायी समितीकडून त्याला मंजुरी मिळाल्यावर कार्यालयानें तो स्वागतमंडळाकडे परत पाठवावा. स्वागतमण्डळानें तो त्यानंतर एक महिन्यांचे आंत छापवून सर्व सभासदांकडे व प्रतिनिधींकडे पाठवावा.

(२) संमेलनाचा जमाखर्च चार्टर्ड ऑडिटर्सकडून तपासून घेतलेला असावा.

विषयनियामक समिति

संमेलनाची विषयनियामक समिति व खुलें अधिवेशन एकच राहील.

अध्यक्ष निवडणूक

ज्या सालीं संमेलन होण्याची शक्यता नसेल, त्या सालीं म. प्रां. वैद्य मंडळाच्या सर्वसाधारण सभासदांनीं सभा भरवून अध्यक्ष निवडावा.

पदाधिकाऱ्यांचीं कर्तव्यें:— मंत्री

मंडळाच्या सर्व कार्यांची जबाबदारीनें पूर्ति करणें, येणाऱ्या व खर्च होणाऱ्या सर्व पैशांचा हिशेब पावतीसह ठेवणें, मंडळाचा पत्रव्यवहार करणें, वर्षअखेर अहवाल तयार करून तो सादर करणें, अंदाजपत्रक तयार करणें, अध्यक्षांच्या सूचनेनुसार सर्व सभा बोलावणें हीं मंत्र्यांचीं कामें आहेत.

संयुक्तमंत्री

प्रधानमंत्र्यांना मदत करणें व त्याच्या गैरहजेरींत काम करणें हें संयुक्त मंत्र्यांचें काम आहे.

कोषाध्यक्ष

निधी संरक्षण करणें व हिशेब ठेवणें हें कोषाध्यक्षांचें काम आहे.

सभासद

मंडळाच्या उत्कर्षासाठीं खटपट करणें व पदाधिकाऱ्यांच्या कार्यांत साह्य करणें.

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सांडू ब्रदर्सचीं
शास्त्रोक्त तयार औषधें, काढे, [चूर्णें], आरिष्टें, भस्में, मात्रा, रसायनें [वै]द्यवर्गास चिकित्सेंत फार उपयोगी [पडतात].
वैद्यांना तीं घाऊक दरानें विशेष [स]वलतीनें दिलीं जातात.
[पत्रव्य]वहाराचा पत्ता:—
दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स
चेंबूर लि.
[फॅक्ट]री व हेड ऑफिस—चेंबूर (मुंबई)

अनुक्रमणिका

आपण काय खावें व केव्हां खावें ?	१२७
९॥ पौंडाचें बालक	१२८
आरोग्य विमा योजनेचें स्वरूप	१२९
मानवांचें कामशास्त्र –अभिप्राय	१३१
अतिसारावर वमनोपचार	१३२
आयुर्वेदीय स्नातकांवर अन्याय	१३३
खुलासा पाहिजे	१३५
कर्नाटक आरोग्यधाम घटप्रभा	१३६
पोटांत केसांची गांळ	१३६
म. प्रां. वैद्य मंडळाचें प्रचारकार्य	१३७
दोषक्षयानें रोगोत्पत्ति हा आयुर्वेदीय दृष्टिकोनच नाहीं	१४१
जलस्नानासंबंधीं आयुर्वेदाचें मत	१४५
म. प्रां. वैद्य मंडळ संशोधित घटना व नियम	१४९

महाराष्ट्र प्रांतीय वैद्यमंडळ

.... घटनादुरुस्तीबाबतच्या कांहीं सूचना ....

आजीवन सदस्य—ज्या सभासदांना म. प्रां. वैद्य मंडळाचे आजीवन सदस्य व्हावयाचे असेल [त्यां]नीं मंडळास एकरकमी रु. ३० द्यावेत. ४० वर्षांवरील वैद्यांस याप्रमाणें आजीवन सदस्य होता येईल. [त्याहून] कमी वयाच्या लोकांना एकरकमी ५० रु. वर्गणी द्यावी लागेल.

मान्य सदस्य—जे सदस्य मंडळास एकरकमी रु. १५ देतील, त्यांना मंडळाचें १० वर्षेंपर्यंत पुनः [वर्गणी] न देतां सदस्य राहतां येईल. या रीतीनें जमा होणारी रकम ही मंडळाच्या स्थिर निधीत जमा व्हावी.

स्थिर कार्यालय व मंत्री—स्थिर कार्यालय जेथें असेल तेथें स्थायी मंत्री राहील. चल मंत्री [अध्यक्षां]च्या गांवीं अगर जवळ पास राहाणारा असावा.

अध्यक्षीय निवडणूक

३१ ऑगस्टपर्यंत जे म. प्रां. वैद्य मंडळाचे सभासद झाले असतील त्यांना दरसाल १ डिसेंबर [१]४ रोजीं जोडकार्डे पाठवून अध्यक्षपदाकरितां ३ नांवें मागवावीत व घटनेंत नमूद केल्याप्रमाणें [अध्यक्ष]ीय निवडणूक करावी. याप्रमाणें निवडलेल्या अध्यक्षांची कारकीर्द पुढील वर्षाच्या १ जानेवारीपासून [सुरू] व्हावी व ३१ डिसेंबरपर्यंत ती एक वर्ष चालू रहावी.

त्याच निवणूक कार्डावर त्या त्या जिल्ह्यातर्फे स्थायी समितीवर पाठवावयाचीं ३ नांवें लिहून [सभा]सदांनीं सुचवावीत. त्या नांवांपैकीं येणारीं पहिल्या तीन क्रमांकाचीं नांवें स्थायी समितीचे सदस्य म्हणून [जाही]र करावीं. या स्थायी समितींतून अध्यक्षांनीं आपलें कार्यकारी मंडळ जाहीर करावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

गुरुकुल-पत्रिका

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

– आयुर्वेदाचें प्रचंड कार्य –

"आज आयुर्वेद सेवासंघास भेट दिली. माझे बंदिवासांतील सहवासी श्री. + + + यांच्या नेतृत्वाखालीं चाललेलें आयुर्वेदाचें प्रचंड कार्य बघून हर्ष वाटला.

प्राचीन विद्येचें पुनरुज्जीवन

या संस्थेचा उत्कर्ष होवो व आपल्या प्राचीन विद्येचें पुनरुज्जीवन होऊन पीडितांचा दुःखभार हलका होवो असें इच्छितो."

दि. ११-८-५४
नासिक

वि. घ. देशपांडे *
सदस्य, भारतीय लोकसभा, दिल्ली

* अखिल भारतीय हिंदु महासभेचे मंत्री

आयुर्वेद सेवा संघाचीं औषधें व पुस्तकें

दादर — मुंबई — येथें

वैद्यांना व्यवसायासाठीं, व औषधी व्यापाऱ्यांना विक्रीसाठीं

सवलतीनें मिळण्याची व्यवस्था

देव्हारे सर्वौषधि भांडार, दादर

(पोलीस चौकी मारुतीसमोर, मुंबई २८)

यांनीं एक ऑगस्टपासून केली आहे. या सोईचा लाभ मुंबईतील व मुंबईस जाणाऱ्या सर्व वैद्य व औषधी व्यापारी मंडळी यांनीं अवश्य घ्यावा, अशी विनंति आहे. –व्यवस्थापक

संपादक व प्रकाशकः—वैद्य विदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य विवलकर कारंजा, नासिक
मुद्रकः—श्री. चिं. ओक, ... प्रेस, ..., नासिक
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें)

र्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु.   १ अंकाची किंमत ४ आणे

र्ष ८ वें)   नाशिक, ता. १ सप्टेंबर १९५४   (अंक ५ वा

केंद्रीय सरकार की आयुर्वेदोन्नति के विषयमें दुर्नीति



पूज्य श्री. छांगाणीजी

नागपूर येथील 'युगधर्म' या हिंदी दैनिक वृत्तपत्रानें गेल्या महिन्यांत **आयुर्वेद अतिरिक्तांक** (विशेषांक) काढला आहे. त्यांत पं. श्री. दा. सातवळेकर (वैदिक कालमें आयुर्वेद चिकित्सा), पं. शिवशर्मा (सरकार की उपेक्षा नीति), वैद्यवाचस्पति गुलराज शर्मा (आयुर्वेद), पं. ठाकुरदत्त शर्मा (आयुर्वेद चिकित्सामें शास्त्रोक्त सर्वोपरि सिद्धांत), पं. हर्षुल मिश्र (आधुनिक शल्यतंत्र और आयुर्वेद), पं. कन्हैयाप्रसाद शुक्ल (आयुर्वेद), वै. पां. वि. शेंड्ये(चिकित्सा नास्ति निष्फला), वै.शिवकरणशर्मा छांगाणी (कीटाणुवाद, टीके और आयुर्वेद), वै. केदारनाथ शर्मा (कुछ घरेलु सिद्धयोग), श्री. शुकदेव शर्मा (आयुर्वेद शुद्ध आयुर्वेदके रूपमें कैसे जीवित रहेगा), आयुर्वेदाचार्य वेणीमाधवशास्त्री (आयुर्वेद संशोधन), वैद्य [illegible]श वेदी (मलेरियामें तुलसीका प्रयोग), श्री. चिं. स. मराठे (मद्यनिषेध कानूनका औषधी व्यव-हारपर परिणाम), श्री. धीरेंद्रनाथ मोहन भट्ट (आयुर्वेदिक अभ्यासक्रम) यांचे हे लेख प्रसिद्ध झाले आहेत.

या विशेषांकाला आशीर्वाद देतांना नागपूरच्या आयुर्वेद बोर्डाचे अध्यक्ष वयोवृद्ध आयुर्वेद-बृहस्पति पूज्य छांगाणीजी लिहितात:— " कुछ राज्यसरकारें आयुर्वेदोन्नति के विषय में कुछ कर रही हैं। परंतु केंद्रीय सरकार की इस विषय में दुर्नीति कुछ भी होने नहीं देती। गोरक्षा एवं आयुर्वेद के विषय में केंद्रीय सरकार की दुर्नीति अब उत्तरोत्तर स्पष्ट हो रही है। एलोपैथी का पानी की तरह पैसा बहाकर पोषण करना, तथा हर किसी बहाने को लेकर आयुर्वेद को नेस्तोनाबूद

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कर देना यह उसका सौतेला व्यवहार अब बिलकुल चौडे आगया है । प्रतिशत ८५-९० की सेवा करनेवाले आयुर्वेद को उचित सहायता न देना यह कितनी भयंकर नीति है ? यह भारत जान चुका है । इस बारे में भारतीयों के संगठन एवं वैद्यों के सत्याग्रह का समय आगया है । ऐसे समय में हमारे संवादपत्र बडी भारी सहायता कर सकते हैं । मैं धन्यवाद देता हूं कि युगधर्म संपादक अपना आयुर्वेद विशेषांक निकाल रहे हैं । परमात्मा इसमें हमें सफलता प्रदान करेगा यह हमारा दृढ विश्वास है ॥ "

—गोवर्धनशर्मा छांगाणी

—०—०—०—

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद, नासिक

वैद्यराज डेग्वेकरजी (जबलपूर) यांनीं मागें आयुर्वेद पत्रिकेंतून जाहीर विनंति केल्याप्रमाणें आयुर्वेदाचें अध्यापन करणाऱ्या अध्यापकांची परिषद नाशिक येथें सोमवार ता. ११-१०-५४ पासून घेण्याचें ठरविलें आहे. परिषदेचें काम ८ दिवस चालेल असा अंदाज आहे. या तारखा शुद्ध आयुर्वेदाच्या अध्यापकांना सुटीच्या आहेत. वैद्यराज डेग्वेकर व आयुर्वेदाचार्य वेणीमाधवशास्त्री यांनीं या तारखा आपणास सोईच्या आहेत असें कळविलें आहे.

सबब या चर्चेंत वक्ते वा श्रोते यापैकीं कोणत्याहि भूमिकेंत भाग घेऊ इच्छिणाऱ्या अध्यापकांनीं आगाऊ पत्र पाठवून तसें कळवावें. तसेंच चर्चेसाठीं कांहीं प्रश्न शंका इ० आगाऊ लेखी पाठवावें.

परिषदेच्या खर्चासाठीं वर्गणी करणें आवश्यक आहे. आपणहि त्या कामीं हातभार लावावा अशी विनंति आहे.

या चर्चेच्या कार्यपद्धतीसंबंधीं सर्वांच्याकडून मार्गदर्शनाची अपेक्षा आहे. या चर्चेमध्यें आयुर्वेदीय संज्ञानिश्चिति, कांहीं समस्यांची पूर्ती, कांहीं द्रव्यनिश्चय, शुद्ध आयुर्वेदाच्या अभ्यासक्रमाला धरून व्हावा अशी अपेक्षा आहे.

चर्चेंत वक्ते म्हणून मोजक्या लोकांनाच भाग घेता येईल. इतरांना श्रोते म्हणून प्रवेश दिला जाईल.

वैद्य वि. म. गोगटे, निमंत्रक

पत्रव्यवहाराचा पत्ता : C/o. शुद्ध आयुर्वेद विद्यालय
आयुर्वेद सेवा संघ, नाशिक

—०—०—०—

मान्य गुरुजनांना परिपत्र

शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समितीनें सर्व मान्य गुरुंना एक परिपत्र पाठवून विद्यार्थ्यांच्या ग्रांथिक व प्रात्यक्षिक अभ्यासाच्या व्यवस्थेबद्दलची माहिती विचारली आहे, असें कळतें.

कांहीं वैद्यांनीं गुरुपदाच्या आवेदनपत्रांत स्वतःविषयीं जी माहिती दिली आहे ती पूर्णपणें सत्य नसल्याच्या तक्रारी आल्या आहेत. सबब तपाससमिती आपणाकडे येण्यापूर्वी जर आपणास आपल्यासंबंधींच्या माहितींत कांहीं दुरुस्ती करावयाची असेल तर ती लिहून पाठवावी. जर तपाससमितीस आपण दिलेली माहिती आहे असत्य आहे असें आढळून येईल तर आपली गुरुजनाची मान्यता रद्द केली जाईल व त्यामुळें विद्यार्थ्यांचें सुद्धा नुकसान होईल, असें त्यांत म्हटलें आहे.

कै. श्री. विनायक काका वैद्य

वसईतील जुन्या पिढींतील एक प्रसिद्ध वैद्य श्री. विनायक काका वैद्य हे ता. ८-८-५४ रोजी निधन पावले. त्यांचा जन्म १८९१ सालीं वसई येथें झाला. ते वैद्यकीय व्यवसाय करीत असून त्यांतच त्यांनीं आपला देह शेवटपर्यंत झिजविला. कै. प्राणाचार्य सदानंद काका वसईकर यांचे ते धाकटे बंधू होत. मृत्युसमयीं त्यांचें वय ६३ वर्षांचें होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...ग्निदग्ध-चिकित्सेंतील विरेचनाचें महत्व

(लेखिका:—वैद्य **लक्ष्मीबाई बोरवणकर**, आयुर्वेदविशारद)

...के दिवशीं दोन तरुण माझ्या दवाखान्यांत ...व "एका भाजलेल्या मुलाच्या जखमांचें ड्रेसिंग ...देतां कां " असा त्यांनीं प्रश्न केला. " मुलाला ...पाशिवाय कशी सांगू ? " असें मी त्यांना उत्तर ... "आपण एखाद्या डॉक्टरकडे अगर रुग्णा-...जाण्याऐवजीं मजकडे कसे काय आलात ? "

वैद्य श्री. लक्ष्मीबाई बोरवणकर

...हि मीं त्यांना प्रश्न केला. त्यावर ते म्हणाले "मुलगा ...ल्यानन्तर आम्ही त्याला ××× हॉस्पिटलमध्यें ... होतें. तेथें त्यांनीं जखमावर औषध लावून पट्टे ...ले होते, पण ते आतां चिकटून बसले आहेत. ...ढूं गेल्यास रक्त वाहूं लागतें. रोग्याचे दोन्ही ... भाजले आहेत. त्याला वेदना सहन होत नाहींत. हॉस्पिटलमध्यें मुलाला खाण्याजेवण्यास सर्व ...न वगैरे देत होते व नाना प्रकारचीं इंजेक्शनें ...दं होतीं. तरी मुलगा सारखा टाहो फोडून रडत होता. एकंदरींत मुलाची प्रकृति कठीण वाटल्यामुळें आम्ही डॉक्टरांना विचारूं लागलो, पण त्यांनीं उत्तर देण्याचेंच नाकारलें. त्यामुळें आम्ही घाबरलो व 'मुलगा हातचा जाणार' असें वाटून 'काय व्हावयाचें असेल तें घरीं होऊं दे' असा निश्चय करून मुलास घरीं आणलें आहे.

'रुग्णालयांतून परत आलेली कठीण अवस्थें-तील केस आहे म्हणून कोणी डॉक्टर त्यांत लक्ष घालीत नाहींत म्हणून आम्ही आपणाकडे आलों आहोत' असें त्यांनीं एकंदर परिस्थितीबाबत लांब-लचक निवेदन केलें.'

संपूर्ण आयुर्वेदीय उपचार

" जर तुम्हांला माझ्या मताप्रमाणें संपूर्ण आयुर्वेदीय उपचार करून घ्यावयाचे असतील तर मी रोगी पहावयास येतें व पाहून काय शक्य आहे तें सांगतें. " असें मी त्यांच्या प्रश्नाला उत्तर दिलें. त्यांनीं माझें म्हणणें मान्य केलें, म्हणून मी त्यांच्या घरीं जाऊन रोगी पाहिला. त्यावेळीं रोग्याची स्थिति पुढीलप्रमाणें होती:-

रुग्ण— मुलगा, वय ५ वर्षें, तळणींतील सांडलेल्या तुपानें भाजलेला. पाहिला त्यावेळीं अंगांत १०४॥ अंश ताप होता. कमरेखालील भाग भाज-लेला असून त्यावर घट्ट पट्ट बांधलेले होते. मुलगा सारखा ओरडत होता. [कांहीं हट्टानें व कांहीं वेदना-मुळें असावा]. त्याचे वृषण बरेंच सुजलेले होते व त्याच्या जिवाची सारखी तळमळ सुरू होती.

मला तो रोगी साध्य वाटला म्हणून मी त्यावर उपचार करण्याचें मान्य केलें. जखमा खोल नव्हत्या, फक्त त्वचाच जळलेली होती, मांस दग्ध झालें नव्हतें. बांधलेल्या बँडेजचा जेवढा लोंबता भाग होता तेवढा मी कातरीनें कातरून टाकला व बाकीचा तसाच राहूं दिला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अग्निदग्ध व्रण तेल

नन्तर त्या जखमावरील पट्ट्यावरच मी स्वतः अग्निदग्धव्रण तेल [सांडू ब्रदर्स यांचें] पट्टे भिजतील इतकें घातलें व असेंच पुनः पुनः घाला असें घरच्या लोकांना सांगितलें.

नाराचरसानें पित्तविरेचन

उपचाराला सुरवात झाली त्या दिवशीं पुढील औषध दिलें:— मौक्तिकभस्म १ गुंज + गोदन्तीभस्म १ गुंजा व लक्ष्मीविलास गुटी ¼ गुंज या मिश्रणाची एक पुडी याप्रमाणें ३ पुड्या सकाळ दुपार सायंकाळ तूपसाखरेंतून व रात्रौ झोपतांना नाराचरस १ गोळी गरम पाण्यांतून. आहार म्हणून फक्त लाह्यांचें पाणी देण्यास सांगितलें. सर्व जेवण, दूध वगैरे सर्व बंद केलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं २ जुलाब झाले. रात्रींतून वारंवार भरपूर लघवीहि झाली व वृषणावरील सूज उतरली. तापहि एक अंशानें कमी झाला (१०३॥). नंतरहि वरील औषध चालूं ठेवून जखमावर तें तेल घालणें सुरूंच ठेवलें.

या तेल घालण्यामुळें जखमेचा जेवढा पट्टा आपोआप अलग होई तेवढा रोज कातरून त्या जागीं त्या तेलांत भिजविलेल्या कापसाची घडी ठेवीत असे.

मुलाचें रडणें ५–६ दिवस चालूंच होतें. पुढें त्याला रात्रींची झोंप लागूं लागली. सर्व पट्टे सुटले तेंव्हां जखमावर फक्त कापसाच्या घड्या चालूं केल्या. त्या बांधल्या नाहींत. सांध्यावरील (घोट्यावरील) व अडसंधींतील जखमा जरा चिघळल्या. त्यावर शंखजिऱ्याची (संगजीरा) वस्त्रगाळ पूड टाकण्यास दिली.

आठव्या दिवशीं संपूर्ण ताप निघाला व मुलाला स्वस्थ झोंप लागूं लागली. नंतर गव्हाची पोळी व तूपसाखर खाण्यास परवानगी दिली.

पंधरा दिवसांत मुलगा चालूं लागला व तो संपूर्ण बरा होण्यास २५ दिवस लागले.

पित्तज व्रण--रोपक औषधें

या अग्निदग्धव्रणतेलाचा पाठ निघंटरत्नाकरांतील असून त्यांत पांढरें चंदन, दूर्वा, मंजिष्ठा, गाईचें दूध, जेष्टमध, कमल, वडाच्या पारंब्या इत्यादि पित्तज व्रणरोपक द्रव्यें आहेत.

चंदनं वटशुंगाश्च मंजिष्ठा मधुकं तथा। प्रपौंडरीकं दूर्वा च पतंगं धातकी तथा । एतैस्तैलं विपक्तव्यं गोक्षीरेण समायुतम्। अग्निदग्धे व्रणे श्रेष्ठं तत्क्षणात् रोपणं परम् ॥

निघंट-रत्नाकर, आगन्तुव्रणप्रकरण पान ६६२

[या रुग्णाची हकीकत येथें सविस्तर देण्याचें प्रयोजन त्यावर केलेल्या विरेचन-चिकित्सेकडे वाचकांचें लक्ष वेधावें हा आहे. कोठेंहि दग्धव्रण झाला कीं, त्यावर दाहनाशक व व्रणरोपक औषधें लावावयाचीं व पोटांतूनहि तशाच गुणाचीं औषधें द्यावयाचीं हा नित्याचा परिपाठ आहे. हा दग्धव्रण आगंतु असला तरी भाजण्यामुळें शरीरांतील धातूंत पित्तदोषाची वृद्धि होते व तें धातुगत पित्त शोधनानें काढून व्रण भरून आणण्याचें कार्य पित्त विरेचक औषध करीत असतें.

पित्तविद्रधिवत् क्रिया

वाग्भट ग्रंथांत सूत्रस्थानांत शेवटच्या (३० व्या अध्यायांत अगदीं शेवटीं या चिकित्सेसंबंधीं सूत्ररूपानें हें तत्व सांगितलें आहे तें असें:- पित्तविद्रधिवत् क्रिया (५१). पित्तज विद्रधि धातुगत (शाखागत) पित्तदुष्टीमुळें होत असतो. व तो बरा होण्यासाठीं हें शाखागत पित्त कोष्ठांत येऊन त्याचें (वारंवार) विरेचन होणें आवश्यक असते, म्हणून विद्रधिचिकित्सेंत आमावस्थेंतील सर्व विद्रधींवर रक्तस्रुति (प्रततं च हरेत् रक्तं) व पक्व पित्तज विद्रधींवर वैरेचानिक युक्तेन त्रैवृतेन विशोध्य च । विदारीवर्गसिद्धेन त्रैवृतेनैव रोपयेत् । क्षालितं क्षीरीतोयेन लिंपेत् य-यमृतातिलैः। इत्यादि उपचार सांगितले आहेत व ते विरेचनपूर्वक आहेत.

विरेचन चिकित्सेचें महत्त्व

कोठल्याहि अग्निदग्ध व्रणाची चिकित्सा करतांना आपण या विरेचन चिकित्सेचें महत्व स्मरणांत आणलें पाहिजे. आगंतु कारणानें व्रण झाला आहे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुख्यतः बाह्योपचारच महत्वाचे; पोटांत फक्त शामक औषधें दिली कीं काम भागेल अशी समजूत होणें स्वाभाविक आहे, पण ती तशी होऊं देणें आहें. पित्तशामक औषधें [दग्ध स्थानीं लेली व पोटांत दिलेली] बहुधा तुरट कडू रसाचीं दोषांचे संग्रहण करणारीं असतात. त्यानें शुद्धिसुद्धां चांगली होण्यास आडकाठी येण्याचा असतो. सबब अशावेळीं विरेचनाची योजना अधिकच आवश्यक ठरते.

वरील रुग्णास शौचास झालें नव्हतें म्हणून औषध दिलें असण्याचीहि शक्यता आहे. नेहेमीचें शौचास झालें असलें तरी वृद्ध पित्त विरेचनानें क्षीण करण्यासाठीं पुनः पुनः विरेचन अग्निदग्धाची शास्त्रशुद्ध चिकित्सा आहे.

बृंहण शोधक औषधें

विरेचनानें दुर्बलता येईल असें वाटण्याचा आहे पण आयुर्वेदांत लंघनशोधन औषधें आहेत. प्रमाणें बृंहण शोधन औषधेंहि आहेत. (बृंहणं लेव। अष्टांगहृदय सूत्रस्थान अ. १४ टीका) त्यांचा उपयोग करावा—संपादक]

———

आरोग्यदायी दुधाचा पुरवठा

दूध पाश्चर करण्याची आणि तें सीलबंद यांतून विकण्याची तरतूद करण्यासंबंधींचें बिल सरकारच्या ता. ५ ऑगस्टच्या गॅझेटांत प्रसिद्ध आहे.

या बिलाचीं उद्दिष्टें व कारणें सांगतांना असें आहे कीं, विशेषकरून शहर भागांत दूध अस्वच्छ रीतीनें हाताळण्यांत येतें आणि तें दूषित होण्याचा संभव असतो.

लोकांना शुद्ध व आरोग्यदायी दुधाचा पुरवठा जाण्याच्या दृष्टीनें दूधविक्रेत्यांनीं तें पाश्चर व सीलबंद बाटल्यांत भरून विकण्याची आवश्यकता आहे.

———

गणेश औषधालय, मुंबई १४

वैद्य र. वि. पारकर डी. ए. एस्. एफ्. यांनीं दादर मुं. १८ (अबदुल कादर बिल्डिंग दुकान नं. १३ हिंदमाता सिनेमासमोर,) येथें १५ ऑगस्ट १९५४ पासून आपलें गणेश औषधालय सुरूं केलें आहे. त्या निमित्त सत्यनारायणाची पूजा व पानसुपारी करण्यांत आली.

———

जरूरीने माहिती पाहिजे

सध्यां आयुर्वेदीय वैद्यांस, दारू पिणाऱ्या इसमाची, सरकारी रीत्या तपासणी यादी पोलीसाकडून आल्यावर, तपासणी करणें भागच असतें.

पीतमद्यासंबंधीं निश्चित मतहि त्यांना लेखी द्यावें लागतें. तरी तें कायद्याच्या परिभाषेंत बसेल अशा तऱ्हेचें निदान व लक्षण समुच्चयसहित कसें असावें तें पाहिजे. प्रथम आसवें, अरिष्टें, यांत किती पर्सेंट अल्कोहल असतें, त्याचा मादक परिणाम किती वेळ टिकतो व प्याला तीं आसवें नसून तें केवळ अल्कोहल आहे असें निश्चितपणें कसें सांगतां येईल याबाबत जर "दारूबंदी कायदा व वैद्यांचीं कर्तव्यें" यावर विस्तृत माहितीपूर्ण लेख वैद्यांचे सोयीसाठीं आपले पत्रिकेंतून आला तर नोकरी करणाऱ्या वैद्यवर्गास तें हितावह होईल.

यासंबंधीं माहिती "न्यायवैद्यक" पुस्तकांत पूर्णतया मिळत नाहीं. कारण दारुबंदी कायदा हा मागाहून झालेला आहे.

बेळगांव येथें
आयुर्वेद सेवा संघाचीं औषधें
— मिळण्याचें ठिकाण —
श्री. अप्पासाहेब एस्. तुरबटमठ
नवभारत औषधालय
A ५३२-३३ मारुती गल्ली, बेळगांव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सेवा-शुश्रुषा करूनच माणिकराव 'राजरत्न' झाले

शारीरिक शिक्षणांत कार्य करणाऱ्या एखाद्या प्रसिद्ध व्यायामपटूला समाजोन्नतीच्या इतर क्षेत्रांत कार्य करण्यास सांगितलें कीं तें आपलें क्षेत्र नव्हे असें तो स्वाभिमानानें (!) सांगतो. परन्तु नुकतेच दिवंगत झालेले प्रो. माणिकराव यांच्या जीवनांतील खालील आठवण वाचल्यानन्तर प्रत्येक व्यायामपटूला शारीरिक शिक्षणाबरोबरच समाजोन्नतीच्या कार्याचीहि आवश्यकता वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

बडोद्याचे सुप्रसिद्ध व्यायामशास्त्रज्ञ प्रो. माणिकराव यांचें संपूर्ण नांव गजानन यशवन्त ताम्हणे. १९१७ सालपर्यंत ते प्रो. माणिकरावच होते. परंतु १९१८ सालीं भारतांत इन्फ्लुएंझाच्या साथीनें कहर केला. या साथींत अवघ्या तीन महिन्याच्या कालावधींत सव्वा कोटी मृत्यु पावले. अशा प्रसंगीं बडोद्यांत प्रो. माणिकराव यांनीं आपल्या व्यायामपटूंच्या सहकार्यानें शुश्रुषा-पथक स्थापन केलें, व या पथकातर्फे निरनिराळ्या रोग्यांना औषधें पोहचविणें, रोग्यांची नियमित विचारपूस करणें, गरीब रोग्यांना विनामूल्य औषध देणें वगैरे कामें प्रामुख्यानें केली. प्रो. माणिकराव यांनीं बडोद्यांत प्रेतवाहक गाडी तयार करून तिच्यांतून शेंकडों मृतांना स्मशानांत नेलें आहे.

हृदयाला पाझर फोडणारा प्रसंग

एका मिठाईवाल्याच्या जीवनांतील प्रसंग तर हृदयाला पाझर फुटण्यासारखाच आहे. त्याच्या कुटुंबांतील एकन्दर वीस माणसांपैकीं या साथींत लागोपाठ १९ माणसें मरण पावलीं आणि या सर्व मृत माणसांची उत्तरक्रिया करण्यास असमर्थ झालेल्या त्या मिठाईवाल्याच्या ऐवजीं त्याच्या कुटुंबांतील सर्व लोकांच्या उत्तरक्रिया स्वतः माणिकरावांनीं केल्या.

प्रो. माणिकरावांचें हें स्पृहणीय कार्य पाहून त्यावेळच्या बडोद्याच्या महाराजांनीं प्रो. माणिकराव यांच्या या कार्याच्या गौरवासाठीं खास सभा घेऊन या सभेंत त्यांना सुवर्णपदक बहाल करून हजारो श्रोतृवर्गासमोर त्यांना 'राजरत्न' ही पदवी बहाल केली. व त्यावेळेपासून प्रो. माणिकराव क्रीडाक्षेत्रांत 'राजरत्न' म्हणून ओळखले जाऊं लागले.

आहारांत बदल झाला नाहीं

"हल्लीं आहाराबाबत कितीहि चर्चा होत असली व त्यांतील घटक अंशांचें मूल्य-मापन केलें जात असले तरी आपल्या आहारांत एकाहि नवीन पदार्थाची भर आजवर घातली गेली नाहीं, ही वस्तुस्थिति आहे. आपले वाडवडील ज्या पद्धतीनें आहारद्रव्यें घेत होते तीच पद्धति आजहि आपण अनुसरत आहोत; त्यांत शिक्षणानें कांहींहि बदल झालेला नाहीं."

—डॉ. पट्टाभिसीतारामय्या

सेवासंघाच्या कार्यासाठीं

आयुर्वेद सेवा संघाचें कार्यक्षेत्र दिवसेंदिवस झपाट्यानें वाढत आहे. त्यांत अध्यापक, चिकित्सक, संशोधक, लेखक, व्यवस्थापक, सेवक, प्रचारक इत्यादि विविध विभागांत आत्मीयतेनें व सेवावृत्तीनें काम करूं शकणारे कर्तबगार कार्यकर्ते हवे आहेत. ज्यांना या सेवा क्षेत्रांत काम करण्याची इच्छा व शक्तिहि असेल त्यांनीं पत्रव्यवहार करावा अगर समक्ष भेटावें.

अक्षर सुन्दर असणें व व्याकरणशुद्ध लिहितां येणें या गोष्टी आवश्यक आहेत. हिंदी, इंग्रजी, कानडी, गुजराथी यापैकीं भाषांची माहिती असणें, त्या लिहितां वाचतां बोलतां येणें या गोष्टी महत्वाच्या आहेत.

--बिंदुमाधव पंडित

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

— आंकडीवर बालमूत्राचा उपयोग —

(माहिती पाठविणार--श्री. वि. बा. चंद्रात्रे, सटाणें)

माझ्या तान्ह्या मुलाला, तो अवघे तीन आठवड्यांचा झाल्यावर आंचके-आंकडी Convulsions यांना सुरुवात झाली. त्यावर स्थानिक डॉक्टर व वैद्य यांचे उपाय केले, थोडाफार फायदा तात्पुरता झाला, परंतु आंचके पूर्णपणें थांबले नाहींत. अखेरीस वैद्य पत्राचे सल्लयानुसार (प्रत्यक्ष मुलास न पहातांना) बालमूत्राचा उपयोग केल्यावर मुलाचे आंचके ताबड-तोब दुसरे दिवशीं पूर्ण बंद झाले. त्यावर पुन्हां आले नाहींत. याबाबतींतला माझा स्वतःचा अनुभव इतरांना उपयोगी व्हावा यासाठीं सविस्तर येथें देत आहे.

या रोगाचें कारण कळलें नाहीं

मुलाची प्रकृति जन्मतः ठीक होती. बाळंत-पणांत पत्नीस कांहीं त्रास झाला नाहीं. मूल अंगावर पूर्णपणें पीत असे. शौच व लघ्वीचीहि तक्रार बहुधा नसे. या तीन आठवड्यांत फक्त १।२ वेळां पोटांत गुबारा धरून शौचास साफ न झाल्याची तक्रार उद्भवली. त्यावेळीं घरगुती व डॉक्टरांचें औषध दिलें व त्यायोगें बरें वाटलें. परंतु मुलगा तीन आठवड्यांचा झाल्यावर त्याला आंचके-आंकडी येण्यास एकदम सुरुवात झाली. नक्की काय कारण घडलें तें कळलें नाहीं. व ह्या आजारास नक्की काय नांव आहे हें सुद्धां प्रथम मला माहित नव्हतें. आजाराचीं लक्षणें खालीलप्रमाणें होतीं. हातपाय ताठ करून मुठी वळवून मूल डोळे फिरवत असे. फिटचाच प्रकार होता. प्रथम प्रथम तर मी घाबरलो. पूर्वी कधींहि पाहिलेलें नव्हतें व मागील दोन अपत्यांच्या वेळीं असा आजार कधीं आला नव्हता.

रोगाचें नांव व उपाय

मंगळवार ता. २२ जून:-आंचके सुरूं झाल्यावर स्थानिक डॉक्टरांची ॲलेपॅथिक औषधयोजना सुरूं केली. त्यांनीं सदर आजाराचें convulsions असें नांव सांगितलें. तेव्हां मला ह्या आजाराचें इंग्रजी नांव समजलें. डॉक्टरांनीं जयकर्स कन्व्हल्शन रेमिडी [Jaykar's Convulsion Remedy] नांवाची पेटन्ट बाटली सदर आजारावर रामबाण औषध म्हणून देण्यास सांगितल्यानें मी एक बाटली दिली. शिवाय डॉक्टरांचें इतरहि औषध चालू होतेच. सुरवातीच १०-१५ मिनिटांनीं आंचके येत. परन्तु अेक आठवड्यानन्तर हें औषध चालू असूनहि आजार वाढला म्हणून १० दिवसानन्तर बंद केलें. आंचके सारखे येऊं लागले. मिनिटामिनिटाला. बन्द नाहींच. रात्रींहि चालू असत. कोठें १०-१५ मिनिटें गुंगी आली तर शिकस्त. मुलाला त्याची आई सारखें अंगावर घेऊन बसे व रात्रींहि याचप्रमाणें कार्यक्रम चाले. आम्ही सर्वंजण कंटाळलों, व शेवटीं डॉक्टरांचें औषध कांहींहि गुण न आल्यानें बंद केलें.

लघवीची तक्रार वाढूं लागली

या काळांत त्याची शौचाची व लघवीची तक्रार वाढूं लागली. लघवीस २४ तासांतून थेंडेसें एखादे वेळीं व शौचासहि एखादेवेळीं होऊ लागलें. पोटांत गुबारा जास्त प्रमाणांत धरूं लागला. आंचके इतके वाढले कीं त्याला आईचे अंगावर पिण्यासहि त्रास होई. पिण्याचें जमेना. अंगावर पिणेंहि बंद झालें. रडणेंहि बंद झालें. यामुळें डॉक्टरांचें औषध बंद केलें व वैद्यांचें सुरूं केलें. या काळांत घरगुती औषधें गुटींतील एखादेवेळीं देत असूं. शौचासाठीं एरंडेल तेल व कफनाशक गोळी दिली. वातासाठीं काळाबोळ लेप लावीत असूं. शेकणें चालूच असे.

वैद्यांनीं दिलेलीं औषधें

नंतर वैद्यांचें आयुर्वेदिक औषध सुरूं केलें (ता. २९ जून). प्रथम एका वैद्यांनीं समीरगज-केसरी नांवाचें औषध दिलें. २ दिवस दिलें. गुण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

न आल्यानें गांवांतील दुसऱ्या वैद्यांचें औषध दिलें. तक्रारी वाढतच चालल्या. त्यामुळें काळजी वाढली व सर्वांचीं मनें अस्वस्थ झालीं.

मात्रा दिली कीं ताप वाढे

दुसऱ्या वैद्यांनीं उन्मादगजकेशरी व नंतर प्रतापलंकेश्वर या औषधांच्या मात्रा दिल्यात. या औषधानें मुलाला थोडी शांत झोंप येऊं लागली व आंचके उशीरां १०।१५ मिनिटांनीं येऊं लागले, जे पूर्वी सारखे मिनिटामिनिटाला येत असत. मात्र मात्रा दिली कीं दुसरे दिवशीं ताप भरे. वैद्य पुन्हां ताप उतरण्याची पुडी देत. ताप असतांना ते मात्रा देत नसत. ताप उतरल्यावरच वरील औषधांच्या (उन्मादगजकेसरी, प्रतापलंकेश्वर) मात्रा देत. या वैद्यांचे औषधानें मुलगा अंगावर पिऊं लागला, जो रडत नव्हता तें रडणें सुरू झालें.

पिचकारी वा एरंडेल

शौचासाठीं पिचकारी १-२ वेळां दिली. एरंडेलहि मधूनमधून देत असूं. वैद्यांचे सल्ल्यानें इतरहि वातहारक औषधें-हिंगणबेट, सागरगोटा, हिंग, बाळहिरडा, वेखंड, वावडिंग, सोनामुखी इ. औषधें दिलीं. या काळांत शौचास जें होई त्याचा रंग अतिशय काळा डांबरासारखा व अतिशय वास येई.

लघवीचे तक्रारीवर उपाय

गोखरूचा काढा, विड्याचीं पानें बांधणें, पळसाचीं फुलें यांनीं शेकणें, चहाच्या चोथ्यानें शेकणें इ. इ. झालें.

पोटाचा गुबारा झाला असतांना एकदांच नाराचरस गोळी $\frac{1}{2}$ दिली. एरंडेल तेल चोळीत असूं. उंदराच्या लेंड्यांचा लेप व शेकणें इ. परंतु हे उपाय नेहमीं गुणदायी ठरले नाहींत. तात्पुरता फायदा वाटे. एकादें औषध गुणकारी न वाटल्यास दुसरें औषध देत असूं व मागील वेळीं गुण देणारें औषध दुसरें वेळीं पुन्हां हमखास फायदा देईलच अशी खात्री नसे.

कांद्याच्या वासानें शुद्धि

प्रत्यक्ष आंचके जोरांत आले कीं, कांदा फोडून त्याचे नाकाजवळ धरीत असूं. तेव्हां तो कोठें जरा शुद्धीवर येई. अमोनिया हुंगण्यास दिल्यानें त्रास होई. १-२ वेळां मध डोळ्यांत घालून पाहिला. अधिक प्रमाणांत आंचके आले कीं, त्याचे छातीवर हलूच हात ठेवून अगदीं जवळ घेत असूं. वेग ओसरे, पण आंचके पुन्हां येत.

पादेलोणाचा कण व ऊन पाणी

याच वेळेस श्री. बिंदुमाधवशास्त्री पंडित यांना पत्रानें हकीकत कळविली. त्यांनीं प्रकृति न पाहतां केवळ आजाराचें वर्णन वाचून पादेलोण (काळे मीठ) व पाणी (एकअष्टमांश उरविलेलें) देण्यास सांगितलें. सदर पाणी दिवसांतून ३।४ वेळां पाजल्यानें मुलाची शौचाची व लघवीची तक्रार नाहींशी झाली. दिवसांतून ३।४ वेळां शौचास व लघवीस साफ होऊं लागलें. पोटाचा गुबारा मात्र राहतच असे व आंचकेहि कायम होते.

ताप वाढला

वैद्याचें प्रतापलंकेश्वर औषध ब्राह्मीचे रसांतून दिल्यावर (१ दिवस) मुलाला ताप वाढला. ताप उतरलाच नाहीं. १०० ते १०२ डिग्री पर्यंत कायम राही. नंतर सदर वैद्यानें ताप कमी न झाल्यानें दुसऱ्या कोणाचें (वाटल्यास डॉक्टराचें) औषध देण्यास सांगितलें. केवळ तापासाठीं पुन्हां आम्हांला वैद्याचें औषध बंद करून परत डॉक्टरांचें औषध सुरू करावें लागलें. ३।४ दिवस डॉक्टरांचें औषध दिल्यावर ताप मात्र उतरला. ताप उतरल्यावर डॉक्टरांचें औषध बंद केलें.

आंचके कमी होण्याचें कांहीं चिन्ह दिसेना म्हणून नाशिकचे श्री. त्रिंबकशास्त्री दाते वैद्य यांना १५।२० दिवस अगोदर पत्र पाठविलें होतें. त्यांना सविस्तर हकीकत कळविली होती. त्यांचेकडून अचानक शुक्रवार ता. १६ जुलै रोजीं औषध * आलें.

---

* ·।· गुंज अभ्रकभस्म + १ गुंज पारसिक यवानी (किरमाणी ओवा) + १ गुंज मौक्तिक या मिश्रणाच्या २ पुड्या १।१ पुडी सकाळ-सायंकाळ मधांत अगर दुधांत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बालमूत्र देण्याची आज्ञा

श्री. दातेशास्त्री यांचें औषध आल्याचें त्याच शी औषध देण्यास सुरवात केली. व ४ दिव- नी सोमवारी वैद्य बिंदुमाधव यांचें पुन्हां १९।७ला आलें. व त्यांत मूत्राचा (अंगावर पिणाऱ्या चें अगर वासराचें) उपयोग करण्याबद्दल आग्रह होता, नव्हे आज्ञाच होती.

थोरल्या मुलाचें मूत्र दिलें

त्यांच्या पहिल्या पत्रांत इतकें आग्रहपूर्वक मूत्रा- नसल्यानें आम्ही प्रथम दुर्लक्ष केलें होतें. व वर पिणाऱ्या दुसऱ्या मुलाचें मूत्र मिळूं शकलें . स्त्रिया ह्याबद्दल शंका घेतात म्हणून हा प्रयोग चा विचार त्यावेळीं तसाच राहिला.

श्री. बिंदुमाधव यांचे दुसऱ्या पत्रानें मात्र पत्नीस प्रयोग करण्याची जास्त इच्छा झाली. दुसरें मूत्र मिळाल्यानें तिनें आमच्या थोरल्या (२॥ वर्षांच्या) मूत्र १ बोंडलें पाजलें. नक्की ३वेळांच १।१ नें मूत दिलें. सोमवारी संध्याकाळीं सदर प्रयोगास त केली. व मंगळवारीं ता. २० रोजीं आंचके बंद , नक्की दुसऱ्याच दिवशीं. या प्रयोगाचे वेळीं फक्त त्र्यंबकशास्त्री दाते यांचेंच औषध सुरूं होतें. व नक्की ३।४ दिवसच आधीं सुरूं केलें होतें. कोणाहि वैद्य अगर डॉक्टरांचें औषध नव्हतें.

चा उपयोग केल्यावर दुसऱ्याच दिवशीं आंचके झाले. व त्यानन्तर पुन्हां आले नाहींत.

मधून मधून वासराचें मूत्र देतो

आंचके बन्द झाल्यावरहि अद्यापपर्यंत वासराचें आम्ही मधून मधून देत आहोतच. अद्याप ची दुसरी तक्रार पोटांत गुबारा होण्याची (वारा चाची) नष्ट झाली नाहीं. शौचास व लघवीस होते. त्याची तक्रार नाहीं. फारच किरकिर करतो. . व पूर्वी पेक्षांहि खूपच अशक्त झाला आहे.

आयुर्वेदीय उपचाराबद्दल आस्था

या प्रयोगानें आम्हांला आयुर्वेदीय औषधीबद्दल उपचारांबद्दल अधिक आस्था व प्रेम वाटूं लागलें. इतका कमी खर्चाचा, सोपा व सहज उपचार आधीं कळतां तर फारच बरें झालें असतें. असो, मुलाला बरें वाटेल कीं नाहीं, याबद्दल आम्हाला खात्री नव्हती. परंतु ईश्वरी कृपाच म्हणून बरें वाटलें.

या उपचाराबरोबर परमेश्वराची आराधना आम्ही चालूंच ठेवली होती. प्रभुकृपा म्हणूनच मुलगा या आजारांतून बरा झाला व आम्हांला आनंद वाटला.

दुसऱ्या एका मुलाला फायदा

ताजा कलमः— गेल्या आठवड्यांतच आमचे मुलाचे वयाचे एवढ्या (२ महिने) मुलाला याच- प्रमाणें आंचके येण्यास सुरवात झाली. त्यालाहि पत्नीनें सदर प्रयोग (मूत्राचा) सांगितला. त्या मुला- लाहि दुसऱ्या दिवशीं गुण आला. त्या मुलाला वांस- राचें मूत दिलें होतें. आमचेप्रमाणें या दुसऱ्या मुला- लाहि गुण आलेला आहे.

वैराग येथें महारोग निवारण केंद्र

सोलापूर जिल्ह्यांत बार्शी तालुक्यांतील वैराग येथें महारोग्यांचें अेक पूरक केन्द्र स्थापन करण्यांत येणार असून त्यासाठीं योग्य अशी जागा निवडण्यांत येत आहे. सदरहू केन्द्रांत दोन औषधोपचार पथकें व अेक कारभारविषयक पथक असेल.

या संकल्पित केन्द्राचा वार्षिक आवर्तक खर्च सुमारें ४२,००० रुपये अितका होअील. चालू आर्थिक सालीं ३१ डिसेंबरपर्यंत येणारा सर्व आवर्तक खर्च भारत सरकार सोसणार असून त्यानन्तर सदरहू केंद्राचा खर्च भारत व राज्य सरकार यांनीं २:१ प्रमाणांत विभागून घ्यावयाचा आहे.

पुणें येथें

' आयुर्वेद सेवा संघ, नासिक ' चीं औषधें मिळण्याचें ठिकाण

किरण मेडिकल सर्व्हिस

नगरकर तालीम चौक, लक्ष्मीरोड, पुणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय
अमरावती (म. प्र.)

विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयामधील विद्यार्थी विविध कार्यनिधी (अमल्गमेटेड फन्ड) संबंधी निवडणूक झाली, तीमध्यें स्नेहसंमेलन व विविध कार्य-निधी असे दोन भाग होते. निवडणूक खेळीमेळीच्या वातावरणांत पण चुरशीनें झाली. मतदानाचा हक्क बजावण्याची जाणीव चांगलीच दिसून आली. पहिल्या वर्षीची विद्यार्थ्यांची संख्या शंभराच्यावर झाल्या-मुळें दोन वर्ग करण्यांत आले आहेत. म्हणून संमेलनासाठीं एकूण पांच वर्ग प्रतिनिधी व एक सरचिटणीस व विद्यार्थी विविध कार्यनिधीकरतां ५ प्रतिनिधी असे एकूण ११ प्रतिनिधी निवडून आले.

श्री. सहारकर (वर्ष १ ले) प्रभात वर्ग, (२) श्री. हणमन्त तांदळे (वर्ष दुसरे), (३) श्री. मालखे (वर्ष तिसरें), (४) श्री. वसन्त कुलकर्णी (वर्ष ४ थें). हे विविधकार्य निधीचे प्रतिनिधी तसेंच गोलर (वर्ष १ लें प्रभात वर्ग) हे स्नेहसंमेलन प्रतिनिधी असे उमेदवार अविरोध निवडून आले.

ता. १३।८।५४ शुक्रवार रोजीं मतदान होऊन पुढील उमेदवार निवडून आले. संमेलन प्रतिनिधीः- [१] श्री विश्वनाथ व्यास [चतुर्थ वर्ष; सरचिटणीस] [२] मधुकर कुळकर्णी चतुर्थ वर्ष [३] तायडे [वर्ष ३ रे], [४] श्री. पाटील वर्ष [१ लें मध्यान्ह वर्ग] तसेच श्री. कडू हे वि. का. निधीकरतां प्रथम वर्षाच्या मध्यान्ह वर्गातर्फे निवडून आले.

आणखी २ गुरूंना मान्यता

१९५४ च्या शैक्षणिक वर्षी शुद्ध-आयुर्वेदाचें शिक्षण देण्यासाठीं मुंबई सरकारनें पुढील दोन वैद्यांना "गुरु" म्हणून मान्यता दिली आहे. वैद्य भास्कर दत्तात्रय गोडबोले, धूतपापेश्वर रुग्णालय, पनवेल (कुलाबा), आणि वैद्य रामाशिरोमणी त्रिवेदी गव्हमेंट कॉलनी, मुंबई १८.

आयुर्वेद सेवा संघाचें धर्मार्थ चिकित्सालय, नासिक

अक्षय्य तृतीयेच्या सुमुहूर्तावर हें चिकित्सालय नाशिक येथें वैद्य बिवलकर कारंजाजवळ श्री. दाजी. साहेब गायधनी वाड्यांत सुरू झालें. त्याचें कार्य दिवसानुदिवस प्रगति करीत आहे.

पहिल्या महिन्यांत एकूण २३०, दुसऱ्या महि-न्यांत ३९८, व तिसऱ्या महिन्यांत ६०८ याप्रमाणें एकूण १२३६ रुग्णांना उपचार करण्यांत आले.

उपचारलेले रोगः— ज्वर, व्रण, अतिसार, संग्रहणी, गर्भिणी विकार, कर्णरोग, नेत्ररोग, श्वास, कास, यकृतोदर, अपस्मार, वातव्याधि, कृमि, कुष्ठ, हृद्रोग, दंतविकार.

रुग्णाकडून रोजीं १ आणा घेतला जातो. याप्रमाणें

मे	महिन्याची	जमा	१६-५-०
जून	,,	,,	२७-७-०
जुलै	,,	,,	४०-२-०

या धर्मार्थ दवाखान्याचें काम आयुर्वेदाचार्य श्री. कृ. करमरकर हे पहात आहेत.

पवित्र नेपाल कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहाः–नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाल

अनेक ग्राहकांच्या सूचनेवरून परतवाडा येथें आयुर्वेद सेवासंघ नासिकचीं सर्व अनुभविक व गुणकारी औषधें मिळण्याची सोय आम्हीं केली आहे.
श्रीसमर्थ स्टोअर्स
परतवाडा (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोषक्षय नें रोगोत्पत्ति—
—हा आयुर्वेदीय दृष्टिकोन नाहीं.

(लेखकः—आयुर्वेदाचार्य पां. ह. देशपांडे, पुणें २)

(मागील अंकावरून पुढें चालू)

वैद्यराज बागेवाडीकर आपल्या दुसऱ्या लेखांत (आ. प. १।५।५४) चरकांतील " विकारो धातु- ..." यांतील "धातु" या संज्ञेचा मी " रसादि धातु " असा अर्थ करतो, यावर आक्षेप घेतात. त्यांचें ...न आधीं करणें जरूर आहे. मगच प्रस्तुत वादाकडे जाणें योग्य होईल.

धातुवैषम्य व दोषवैषम्य या दोन भिन्न अवस्था

खरोखर " धातुवैषम्य " हें चरकोक्त पद व " दोषवैषम्य " हें वाग्भटोक्त पद एकरूप आहे कां ! ...मतें नाहीं. अर्थात् चक्रपाणींचे आधारें तीं एकरूप वाटतीलहि. त्यानें "धातुशब्देन वातादिदोषा रसादयो ...तयश्च ग्राह्या " असें म्हटलें आहे. यामुळें धातु शब्दाचा अर्थ अतिव्याप्त होतोच पण मग ...म्य " यांतील 'दोष' शब्दानेंहि " रसादिधातु व रजःप्रभृति " घेण्याची आपत्ति निस्तरावी लागेल. ...गेवाडीकर यांना हें मान्य आहे कां ? नसेल तर " धातुवैषम्य " याचा अर्थ रसादि धातूंचें वैषम्य ...व माझे प्रमाणें त्यांना करावा लागेल.

दोषवैषम्य हें कारण, धातुवैषम्य हें कार्य

शिवाय, महत्वाची गोष्ट दोषवैषम्य अणि धातुवैषम्य या दोन अवस्थाच निराळ्या आहेत. ...कारणस्वरूपी व दुसरी कार्यस्वरूपी. आधीं दोषदुष्टि होते व मगच त्या कारणानें धातुदुष्टि व मळ- ...होऊन रोग उत्पन्न होतात, असें वाग्भट " दोषा दुष्टा रसैर्धातून्दूषयन्त्युभये मलान् । ...... यथास्वं ...गदाः ।" (अ.हृ सू. ११-३५।३६) या सूत्रांत स्पष्टच म्हणतो. (धातूंचेच अवष्टंभरूप अवयव मळ ...नें कांहीं काळापुरते ते धातुरूपच असतात, म्हणून मळांचा स्वतंत्र उल्लेख न केला तरी चालणारा.) ...वैषम्य ही कार्यात्मक रोगावस्था चरकानें सांगितली व कारणात्मक अवस्था वाग्भटानें सांगितली, हाच ...नी आचार्यांच्या या वचनाचा खरा समन्वय होऊं शकेल.

वैद्यराज बागेवाडीकर यांनीं माझी एक विसंगति म्हणून दाखविली आहे. त्यांची मी दाखविल्या- ...त्यांना माझी दाखवून फिटाफीट करणें भागच होतें ! पण माझी ती विसंगति तरी काय बरें ?

दोषक्षयानें खरोखर काय होतें ?

दोषक्षीणतेनें रोग होत नाहींत असें मी आपल्या लेखांत म्हटलें असतां पुनः मी " कांहीं रोगांत" ...होतात असें म्हणतोच कीं नाहीं ? " ज्या रोगांत क्षयाचीं लक्षणें आढळतील त्यांत मात्र दोषक्षीणतेचीं ...आढळतील " असें मीं म्हटलें खरें ! त्यावर मला " कांहीं रोगांत दोष क्षीण होतात असेंहि...... ...वें लागलें " असें वै. बागेवाडीकर यांना दिसून आलें व हीच माझी त्यांचे मतें विसंगती ! ...एकट्या क्षयाचा उल्लेख करीत असतांना वै. बागेवाडीकर माझेवर " कांही " असा शब्द योजून ...वर विसंगतीचा आरोप करतात. " एक = कांहीं " हें समीकरण मलाहि समजत नाहीं. आतां एक क्षय ...अपवाद मी मानतोहि. तेवढा म्हणजे अर्थात् त्या त्या रोगांतील क्षयी अवस्था हें मीं स्पष्ट केलेंच आहे ...वगळून सर्वच रोग दोषवृद्धीनें होतात असें मीं स्पष्ट म्हटलें आहे. यांत विसंगति काय आहे ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मीं हें विधान न कळत केलेलें नसून, त्याच्या स्पष्टीकरणासह करतांना " इतर रोगांतील क्षयांसाठीं त्यांचा सन्निपातजन्य म्हणून जो प्रकार दिला असतो त्याकडे जावें लागेल. सान्निपातिक विकृति ही वायुपित्त-कफांच्या तीनहि क्रिया एकसमवयावच्छेदानें बिघडून होणारी असते. यांत कित्येकदां एक वा दोन दोष क्षीणहि असूं शकतील व त्याच वेळीं तो तो रोग क्षयजन्य आहे असें प्रत्ययाला येईल. दुसऱ्या भाषेंत बोलावयाचें तर तो तो रोग क्षयजन्य असल्याचा सान्निपातिक अवस्थेंत प्रत्यय येईल, " असें मीं सविस्तर लिहिलें आहे. (आ. प. १६-२-५४ पृ. ५४४). " ज्वरांत उल्लेख कां ? " अशा मथळा देऊन मी " ज्वर हा सर्व रोगाग्रज व बळी असल्यानें व क्षयरोगांतहि ज्वरच प्राधान्यानें असल्यानें सन्निपातज्वरांत दोषक्षीणतेचा आयुर्वेदा-चार्यांनीं उल्लेख केला " एवढेंच नव्हें तर " बहुधा कोणत्याहि रोगाला बळी पडणारा रोगी सान्निपातिक अवस्थेंत जातो आणि तेव्हां दोषक्षीणता (विशेषें वातक्षीणता अर्थात् प्राणवायूची क्षीणता) असते " (सदर) असें मी आणखी म्हणून माझ्या या अपवादाला स्पष्टता आणली असतां वै. बागेवाडीकर मी मुळीं दोषक्षीणता जमेसच धरीत नाहीं अशा ग्रह करून घेतात व माझेवर विसंगतीचा आरोप करतात.

चिकित्साहि दोषवृद्धीवरच म्हणून दोषवृद्धीनेंच रोगोत्पत्ति

माझ्या लेखांत मी " चिकित्साहि दोषवृद्धीवर " या मथळ्याखालीं कोणत्याहि रोगावर केवळ " बृंहण ही रोगनाशक चिकित्साच नाहीं, व तशी ती कोणत्याच रोगांत सांगितली नाहीं. वातरोगांत सांगितलेलें बृंहण हें वातदोषाच्या लंघनासाठींच असतें " (आ. प. १६-२-५४) असें यासाठींच म्हटलें आहे. आतां क्षयरोगाचा अपवाद म्हणून मी वर सांगितला. पण त्याचीहि चिकित्सा केवळ बृंहणात्मक नाहीं. क्षयांत दोषक्षीणता-वातक्षीणता कारण असतें, पण तेथेंच " श्लेष्मवृध्द्युक्तामयसंभव " प्रतीत होतो हें " कफप्रधानैर्दोषैस्तु रुद्धेषु रसवर्त्मसु " या वर्णनानें व शोथ, ग्रंथी इ. रूपानें तें प्रत्ययाला येतें, हें मी त्याच लेखांत दाखविलें होतें. आणि त्यावरच शमनात्मक-लंघनात्मक उपचार करावे लागतात. राजयक्ष्म्याची चिकित्साच मुळीं शोधनापासून आहे हें " बलिनो बहुदोषस्य स्निग्धस्विन्नस्य शोधनं । ऊर्ध्वाधो यक्ष्मिणः कुर्यात्सस्नेहं यन्न कर्शनम् ॥ " (अ. हृ. चि. ५।१) या सूत्रांत वाग्भटानें स्पष्ट सांगितलें आहे. पुढेंहि दशमूलादींचा काढा, घृत, क्षीर, इ. साठींचा उपयोग कफवातनाशक अर्थात् लंघनात्मकच आहेत. कदाचित् " शुद्धवातक्षयागन्तुजीर्णज्वरिषु लंघनं । नेष्यते··" (अ. हृ. चि. १।२२) या वचनावरून क्षयावर लंघनाचा निषेध वाटेल. पण त्याचेच पुढें " तेषु हितं शमनं यन्न कर्शनम् " असेंहि म्हटलेलें आहे. म्हणजे निव्वळ लंघन नसलें तरी शमनरूपी लंघन याहि रोगांत आहेच. शमन हा शब्दच वस्तुतः लंघनवाचक आहे. पण त्यांतील सप्त प्रकारांतील ' क्षुद् ' स्वरूपी शमन एवढेंच ज्वरप्रकरणीं इष्ट असल्यानें तद्व्यतिरिक्त लंघन असाच ' शमन ' या संज्ञेचा या ठिकाणीं वाग्भटाभिप्रेत अर्थ सहजानुमेय आहे. केवळ विसंगतीच पाहणारांना वाग्भटाचीहि ही विसंगति वाटेल. लेखकाचा अभिप्राय जाणून घेणारांना व समन्वयानें ग्रंथार्थ लावण्याची सवय असणारांना मात्र ती वाटणार नाहीं !

एकटे रसविकल्पज्ञ आणि दोषविकल्पज्ञ वैद्यराज

" आज रसविकल्पज्ञ वैद्य आपणांस दिसत नाहींत " असें म्हणतांना वै. बागेवाडीकर स्वतः एकटे एक 'रसविकल्पज्ञ' वैद्य असल्याचे ते मानतात. हें विधान अभोगत राहूं नये म्हणून "वै. पांडुरंगशास्त्री किंवा त्यांच्या तोडीचे इतर वैद्य रसविकल्पांचा व दोषविकल्पांचा विचार करीत नाहींत, " असें त्यांनीं त्याचें विशदीकरण दिलें आहे. मग आतां ही रसविकल्पज्ञांची परंपरा तरी कशी चालावयाची ! पण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

[...]हे त्यांनीं उपाय सुचविला आहे. " नवीन व संशोधक वैद्यांनीं तरी रसविकल्पज्ञ आणि दोषविकल्पज्ञ [...] आणि आयुर्वेदाचा उद्धार करावा " असें त्यावर त्यांनीं उपायचिंतन केलें आहे. उदात्त आहे हा [...]र, माझी शंका यावर अशी आहे कीं, " संशोधक वैद्यांनीं " " रसविकल्पज्ञ आणि दोषविकल्पज्ञ " [...]वरच संशोधन करून आयुर्वेदाचा उद्धार करावयाचा कां त्यांच्या संशोधनाच्या लायकींत या दोन्ही [...]ताची " पूर्वप्राप्ति असावी लागत नाहीं ? कसेंहि असो ! आतां ते " नवीनावर " भरंवसा ठेवून हें [...] " त्यांना प्राप्त करून देणारच आहेत. कारण " योग्य गुरु " म्हणून त्यांना नुकतीच राजमान्यता [...]ळी असून " आयुर्वेदपत्रिकेच्या " कृपेनें त्यांची सचित्र माहिती आम्हां " अल्पज्ञांना " मिळाली [...] मी त्याबद्दल त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतो. अर्थात् तें करतांना त्यांनीं आपल्या " नवीन " [...] होणाऱ्या वैद्यांना शिकवितांना स्वतःच पूर्वापर संदर्भ जाणून घेऊन ग्रंथाचा सुसंगत अर्थ लावावा [...]व सविनय विनवावयाचें आहे.

पित्तक्षीणतेचा अभिनव पांडुरोग !

ही विनंति करण्याचें कारण त्यांनीं पांडुरोगाचा एक अभिनव प्रकार आपल्या लेखांत (आ. प.- [...]१४ पृ. ७०७) उदाहरण म्हणून सांगितला आहे. हा प्रकार पित्तक्षीणतेनें होतो असें त्यांचें म्हणणें. [...]ळींच्या उपलब्ध ग्रंथांत पांडुरोगाचें जें वर्णन आहे तें केवळ पित्तवृद्धिजन्यात्मक व्याधीचें आहे." अशी [...]री हें उदाहरण देण्यांत तक्रार आहे, व " पित्तक्षीणजन्य पांडुरोगी आज आपणांस पाहावयास सांपडतात [...] त्यांचें म्हणणें असल्यानें त्यांच्या कारणांचा, संप्राप्तीचा व चिकित्सेचा विचार करणें जरूर आहे, " [...] त्यांना साहाजिक वाटतें. त्यांनीं स्वतःच संप्राप्तीचा विचारहि करून टाकला असून ती पुढीलप्रमाणें [...]णें मांडलीहि आहे. या रोगांत " पाचक पित्तच क्षीण असल्यामुळें रंजकादि पित्तें क्षीण होतात. त्यामुळें [...]चें रंजन होत नाहीं. म्हणून रक्त क्षीण होऊन पांडुरोग उत्पन्न होतो " (सदर)

आयुर्वेदाचा पाण्डुरोग

वैद्यराज बागेवाडीकरांना आयुर्वेदांतला पित्तजन्य पांडुरोग माहिती आहेच. पण नवथर वाचकांना [...] कल्पना येण्यासाठीं मी ती येथें थोडक्यांत देतो. चरकानें पित्तप्रधान दोष प्रकुपित होऊन सर्वच [...]तूंत शैथिल्य येतें व ओजाचे गुण कमी होऊन रक्तच काय पण त्यावरोबर मेद व इतर धातूंचें सार [...]मी होऊन त्वचेला वैवर्ण्य येतें असें म्हटलें असून या वैवर्ण्यांचे हिरवे, पिवळे व पांढरे असे स्पष्ट वर्णच [...] आहेत. (वर्णान्हरितहारिद्रान्पाण्डून्बहुविधांस्त्वचि) आणि यालाच तो पाण्डुरोग ही संज्ञा देतो. (स [पा]ण्डुरोग इत्युक्तः) क्षाराम्ललवणात्युष्ण हीं त्यांचीं कारणें देऊन त्यांनीं वाढलेलें पित्त, वाढलेलाच (बलिना) [...]विध वायु हृदयांतून धमन्यांत फेंकतो व मग हे वर्ण उत्पन्न होतात अशी त्यानें त्याची सम्प्राप्ति पण दिली [आ]हे. (च. चि. १६-२-१०) सुश्रुतानें व वाग्भटानें पाण्डुत्व म्हणजे फिक्कटपणाच त्यांत जास्त असतो [अ]सें म्हटलें आहे. (सु.) पाण्डुत्वं तेषु चाधिकम् । अ. हृ. नि. १३।३-४)

वै. बागेवाडीकरांचा पित्तक्षीण पाण्डुरोग

आतां वैद्यराज बागेवाडीकर यांना यांत भर घालून पित्तक्षीण पाण्डुरोग प्रतिपादावयाचा आहे. [पा]ण्डुरोगांत पाण्डुता हें आवश्यक लक्षण असून तें भ्राजक पित्ताशीं सम्बद्ध आहे. त्वचेचा योग्य वर्ण [रा]खण्याचें भ्राजकाचेंच कार्य आहे. (भ्राजकं भ्राजनात्त्वचः) हें पित्त रंजक पित्तावर व तें पाचक पित्तावर अवलंबून आहे असें मानूं या. कारण शेष पित्तांचें बलदानानें अनुग्रह करणारें हेंच पित्त आहे असें वाग्भटानें सांगितलें (अ. हृ. सू. १२-१३) एवढेंच नव्हे तर त्याच्या क्षयवृद्धीवर इतर पित्तांची क्षयवृद्धि अवलंबून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असते असेंहि त्यानें म्हटलें आहे. (अ. हृ. शा. ३-७१) पण त्याचबरोबर त्याच्या वृद्धिक्षीणतेवर धातूंचा क्षय वा वृद्धि अवलंबून आहे, असेंहि त्यानें म्हटलें आहे. (स्वस्थानस्य कायाग्नेरंशा धातुषु संश्रिताः। तेषां सादातिदीप्तिभ्यां धातुवृद्धिक्षयोद्भवः ॥ अ. हृ. सू. ११-३४) म्हणजे रसरक्तादि धातूंच्या क्षयाला तदन्तर्गत अग्नीची म्हणजे परंपरेनें पाचकपित्ताची वृद्धीच कारण आहे असा सरळ अर्थ आहे. पाण्डुरोगांत सर्वच धातू क्षीण होतात त्यांनाहि मग अग्नी पित्ताची वृद्धीच कारण आहे हें ओघानेंच आलें. आणि तेंच सरळ आहे. पित्ताच्या गुणवर्णनांत तें तीक्ष्णोष्ण असून दाह करणारें आहे असें वर्णन आहे. वाग्भटानें दाहाला कारण पित्तच असें स्पष्टच म्हटलें आहे. (शूलं नर्तेऽनिलाद्दाहः पित्ताच्छोथः कफोदयात् (अ. हृ. सू. २९-७) पित्ताच्या तक्ष्णितेमुळें धात्ववयव विदग्ध होऊन विभक्त होऊं लागतात. प्राकृत अवस्थेंत याला परिपाक म्हणतां येईल, पण विवृद्धावस्थेंत तो अतिपाक होतो म्हणजेच धात्ववयव विदग्ध होतात-जळतात व परिणामतः क्षीण होतात. प्रस्तुत पाण्डुप्रकरणांत प्राधान्यानें रसरक्तांचे व तदनुषंगानें इतरहि धातूंचे अवयव क्षीण होऊं लागतात, एवढेंच नव्हे तर ओजहि क्षीण होऊं लागतें व मगच रोगी निस्तेज, पाण्डु-वर्णी, निरोजस्क, क्षीणमांस असा होतो. यावरून पित्त किती वाढतें हें लक्ष्यांत येईल. यालाच आयुर्वेदीयांनीं खरोखर पाण्डुरोग म्हटलें आहे.

हीं लक्षणें कफजन्य पांडुरोगांचीं

या दृष्टीनें वै. बागेवाडीकरांच्या पांडुरोगाचा कसा उलगडा होणार? पित्तक्षीण झाल्यानें रसरक्तादि धातु विदग्ध होतात असें त्यांना म्हणावयाचें आहे काय? कां विदग्धतेशिवाय त्यांना क्षीणता येते म्हणा-वयाचें? आतां वातवृद्धीनें धात्ववयव शुष्क होऊन क्षीणता येईलहि. (वृद्धस्तु कुरुतेऽनिलः। कार्श्य-कार्ष्ण्योष्णकामित्वकम्पानाहशकृद्ग्रहान् । अ. हृ. सू. ११।५-६) व यांत पित्तक्षीणतेचीं लक्षणें असतीलहि. पण हें वातरोगाचें वा क्षयाचेंहि कारण होऊं शकेल व त्यावर वातनाशक उपचार करावे लागतील. या अवस्थेंत त्वचेवर पांडुता न येतां कार्ष्ण्य-काळेपणा येईल. म्हणजे ही पाण्डुरोगावस्था खास नाहीं. मग वैद्य बागेवाडीकर पित्तक्षीणतेनें पाण्डुरोग होतो म्हणतात तरी कोणता? त्यांनीं दिलेलीं त्याचीं लक्षणें- " भूक न लागणें, चेहरा फिकट, शरीर थंड वाटणें, अन्नाचें पचन न होणें, रक्तक्षीणता इ." (आ.प. १-५ ५४ पृ.७०७) पाण्डुरोग दर्शवितीलहि कांहींशीं. पण हींच आयुर्वेदीय सम्प्राप्त्यनुसार कफजन्य पाण्डुरोगांतील आहेत. कफज पाण्डुरोगांतील अरुचि, श्वेतावभासता, लोमहर्ष, प्रसेक (च. चि. १६।२१-२३) यांच्याशीं तीं क्रमानें जमणारींहि आहेत. रक्तक्षीणता हें 'चेहरा फिकट' याचेंच स्पष्टीकरण. " या रोगांत अम्ल, लवण, कटु रसांचा न क्षार, तीक्ष्ण, उष्ण द्रव्यांचा उपयोग करावा लागतो, " अशा चिकित्सेवरून ते पित्तक्षयाचें अनुमान करतात. चरकानें कफज पांडूंत " कटुरूक्षोष्णकामता " हें लक्षणच दिलें असल्यानें या चिकित्सेचा त्यावर उपयोग करावा लागतो हें ओघानेंच आलें. कांहीं मर्यादेपर्यंत हे उपचार त्यावर चालतीलहि. सुर-वातीला तर सर्वच-पैत्तिकहि-पाण्डुरोगावर वमन व विरेचन देणें वा विशालादि काढ्यासारखें तीक्ष्णोष्ण औषध द्यावेंहि लागतें. (अ. हृ. चि. १६।१०-१२) हें खरोखरच कफज पाण्डुवरच मुख्यतः आहे. थोड्या काळानंतर पित्तजावर वासागुडूच्यादि सारखाच काढा द्यावा लागतो. कफजन्यावरहि विशालादिसारखें तीक्ष्णोष्ण सतत देऊन भागणार नाहीं. नाहींतर पैत्तिक पाण्डूंत वा कामलेंत त्याचें पर्यवसान व्हावयाचें. (पाण्डुरोगी तु योत्यर्थं पित्तलानि निषेवते।···कामला बहुपित्तैषा कोष्ठशाखाश्रया मता ॥ (च. चि. १६।३२ ३४.) कारण आयुर्वेद सर्वच पाण्डुरोग पित्तप्रधान सांगतो. साहाजिक कफजन्यांतहि पित्त वृद्धच असतें. मुख्य रोगकारक दोषांचें अवधान, लक्षणें व चिकित्सा ठरवितांना सोडून भागत नाहीं. नाहींतर कफजन्य ज्वरांत पित्त अजि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

…र्वे अशा मानानें लागेल. पण मग तापहि त्यांत असणार नाहीं असें म्हणावें लागेल. कारण " ऊष्मा …वाहते नास्ति ज्वरो नास्यूष्मणा विना " (वाग्भट चिकित्सा अ. १…) असा सिद्धांत आहे. कफजन्य …डुरोगांतहि मूळ पांडुरोगच पित्तजन्य हें गृहीत धरून उपचार करावे लागतील. वै. बागेवाडीकर केवळ …तक्ष्णोष्ण द्रव्यांनीं आपला पांडुरोग (म्हणजे खरोखर कफजन्य पाण्डुरोग) अविकृतपणें म्हणजे अन्य …ाराचें उदीरण न करतां करणार असले तर हा शोध त्यांनीं आयुर्वेदांत अवश्य भर म्हणून घालावा. …वटेला ग्रंथ समजून घेऊन त्यांतलें विज्ञान नीट वापरण्याऐवजीं नवीन भर घालण्याची घाई झालेले आयुर्वेदोद्धारक हल्लीं फार झालेत. त्यांचा पक्ष त्यांनीं अवश्य मांडावा.

माझें सोवळें नाजूक नाहीं !

पुण्याच्या वै. बागेवाडीकरांच्या व्याख्यानांत मी त्यांना " या जातीचे नवनवीन शोध आपण …युर्वेदांत घालूं शकता ; मात्र ते आयुर्वेदाच्या नांवावर खपवितांना नीट विचार करा, " म्हणून बजावेले …तें, आयुर्वेदांत कसलीहि भर नको असा मी पुरस्कार केला नाहीं व करीतहि नाहीं. तरीहि या व्याख्यानाचा …त्तांत देऊन स्फुटांत वै. बागेवाडीकरांचे पाठीराखे " आयुर्विद्याकार " यांनीं माझें " सोवळें बिघडलें " …ले तर्कट केलें आहे ! माझें सोवळें खंबीर असतें; तें नव्या विज्ञानाच्या " शिवाशिवीनें " बिघडण्याइतक …नाजूक नाहीं. मला एवढेंच म्हणावयाचें आहे कीं, जी भर घालावयाची ती उघडाउघड घालतो म्हणा, …गल्या दारानें घालूं नका.

(अपूर्ण)

प्रमाणपत्र

आपण जें जें औषध बनवितो व जनतेस देतो, तें तें प्रत्येक औषध सचोटीचें व गुण देणारें असलें पाहिजे; तरच त्याचें प्रमाणपत्र जनतेकडून आपणास मिळेल. तर अशा गुण देणाऱ्या खऱ्या, अस्सल व ताज्या औषधी खरेदी करण्यास विश्वासपात्र ठीकाण पाहिजे. त्याकरितां आपण

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स

पायधुनी मुंबई नं. ३

(टेलिफोन नं. ३१८५८) यांना लिहा.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें

मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात. अधिक माहितीसाठीं कॅटलॉग मागवावा.

सांडू

गोल्ड टॅब्लेटस्

क्षयाच्या प्राथमिक अवस्थेवर अप्रतिम.

सविस्तर माहितीसाठीं लिहा

द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई.

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स:—

बी. पी. बर्वे अँड को., जळगांव

[२] स्थानिक विक्रेते—मे. पेंढारकर अँड को.

मेनरोड, नाशिक शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रांताध्यक्षांचें सामुदायिक निवेदन

नुकतेंच असें ऐकिवांत आलें आहे कीं, २०--२५ वर्षांपूर्वी बंद पडलेली एक वैद्यकीय संस्था फिरून नव्यानें स्थापन करण्याचा प्रयत्न मुंबईच्या कांहीं वैद्य-हकीमांनीं चालविला आहे. व त्यासाठीं त्यांनीं पैसाहि जमविण्याचें कार्य सुरू केलें आहे. सुप्रसिद्ध वैद्यराज श्री. यादवजी त्रिकमजी आचार्य यांनींहि ह्या संस्थेस द्रव्यसाहाय्य केलें आहे असें सांगून त्यांच्या नांवाची खोटीच पावती दाखविण्यांत येते. परन्तु श्री. यादवजी त्रिकमजी यांची व्यक्तिगत मुलाखत झाली असतां त्यांनीं सदर संस्थेस देणगी दिल्याच्या बातमीचा साफ इन्कार केला आहे.

वस्तुतः आम्हांस बृहन् मुंबई, महाराष्ट्र, महागुजराथ, कर्नाटक आदि प्रांतांतील सर्व संस्थांची एकमेव अशी विशाल प्रभावशाली व प्रातिनिधिक संघटित संस्था असणें हेंच उचित आहे. या ध्येयास वरील संस्थेच्या विद्वेषपूर्ण कार्यांनें हानीच पोहोंचेल.

५० वर्षांपूर्वी प्रस्थापित झालेली व आयुर्वेदाच्या हिताकरितां झटणारी अशी एकमेव अखिल भारतीय वैद्यसमाजाची प्रातिनिधिक संस्था 'अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन, दिल्ली' हीच एक आज अखंड विद्यमान आहे. ह्याच संस्थेचे हात दृढमूल करण्याऐवजीं जे आमचे बांधव ह्या संस्थेविरुद्ध दुसरी नवी संस्था स्थापन करण्याचा प्रयत्न करीत आहेत ते 'अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन' ह्या संस्थेचें त्याचप्रमाणें सर्व वैद्यसमाजाचें अहित करीत आहेत.

या बाबतींत अ. भा. आ. महासंमेलनाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनीं वेळींच योग्य ती उपाय-योजना योजून या घृणास्पद व अनुचित प्रचारास आळा घालावा अशी प्रार्थना आहे.

संघटनेच्या नांवावर विघटन करणारे आयुर्वेदाचें यत्किंचितहि हित करूं शकणार नाहींत; म्हणून सर्व बन्धुभगिनी अशा हानिप्रद प्रवृत्तीपासून अलिप्त राहातील अशी आम्हांस दृढ आशा आहे.

निवेदक

वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर,
अध्यक्ष, महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ

वै. मरुलाराध्य,
अध्यक्ष, निखिल कर्नाटक वैद्य मंडळ

वै. वामनराव दीनानाथ,
अध्यक्ष, महागुजरात प्रांतीय वैद्य मंडळ

वै. वेणीमाधवशास्त्री जोशी,
अध्यक्ष, मुंबई व उपनगर वैद्य संमेलन

नवीन वैद्यक मराठी मासिक

: महाराष्ट्र वैद्यक परिचय :

औषधें, इंजेक्शनें, रोगानिदान, रुग्ण-परीक्षा, नवीन शोध वगैरे पाश्चात्य वैद्यकांतील ज्ञान सोप्या मराठी भाषेंतून देणारे एकमेव मासिक "महाराष्ट्र वैद्यक परिचय" 'वैद्यक पेशांतील बहुमोल सहाय्यक' आजच वर्गणीदार व्हा! वार्षिक वर्गणी ५ रु.

(किरकोळ अंकासाठीं आठ आण्याचीं तिकिटें पाठवावीत.)

पत्ताः-संपादक वैद्य जे. बी. मोकाशी, ठाणें

कावीळ व सूज यांवर

[१] गोमूत्र अर्धा कप व गोदुग्ध अर्धा कप एकत्र मिळवून देणें. यांत औषध म्हणून भावनेसाठीं २।३ गुंजा गुळवेलसत्व घेण्यासाठीं द्यावें.

फक्त सकाळीं द्यावें. मुदत ३ ते ७ दिवस. पथ्य— आळणी. दूधभात अगर दूधभाकरी.

[२] गाईचें दूध १ कप व गुळवेलीचा रस वयोमानाप्रमाणें एकत्र मिळवून, सकाळ, संध्याकाळ देणें. मुदत ३ ते ७ दिवस. पथ्य— वरीलप्रमाणें.

सूचकः--रामचंद्र गणपत कोल्हे मु. सावरखेडें शीम.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कामगारांसाठीं आरोग्य विमा योजना

[लेखकः— श्री. राजाभाऊ कुलकर्णी, मुंबई] [मागील अंकावरून समाप्त]

औषधोपचाराच्या मदतीची माहिती मिळविल्या आर्थिक मदतीची योजना समजावून घेतली पाहिजे. पण तत्पूर्वी कामगारांना व मालकांना योजने-खालीं जी वर्गणी भरावी लागणार आहे, तसेंच वर्गणी भरण्याचा काल व मदतीचा काल या संबंधींची माहिती समजून घेणें सोयीचें पडेल.

वर्गणीच्या काळाचे ३ गट

कायद्याप्रमाणें ६ महिन्यांचा काळ (२६ आठवडे) वर्गणी भरण्याचा व ६ महिन्यांचा काळ पैशाच्या मदतीचा. आर्थिक मदतीचा काळ वर्गणी भरण्याचा काळ संपल्याबरोबर सुरूं होत नाहीं. वर्गणी भरण्याचा काळ संपल्यावर ३ महिन्यानन्तर (१३ आठवडे) पैशाच्या मदतीचा काळ सुरूं होतो. २ आक्टोबरला जे सर्व कामगार नोकरीवर आहेत त्यांचा पैसे भरण्याचा काळ त्याच वेळेपासून सुरूं होईल. त्यानन्तर जे कामगार नोकरीला लागतील त्यांच्या-साठीं वर्गणीच्या काळांचे तीन गट पाडले आहेत. ज्या महिन्यांत कामगाराला नोकरी लागली तो महिना ज्या गटांत येईल त्या गटाचा काळ कामगाराच्या वर्गणीचा समजण्यांत येईल. ह्या गटांच्या तारखा कॉर्पोरेशनतर्फे नंतर जाहीर करण्यांत येतील.

वर्गणीचा काळ

कामगारानें आपला वर्गणीचा काळ समजावून घेणें आवश्यक अशासाठीं आहे कीं, त्याशिवाय त्याला मदतीच्या काळांतील मिळणारी पैशाची मदत बरोबर दिली जाते किंवा नाहीं हें समजणार नाहीं. मदतीच्या काळाच्या अगोदरचा जो वर्गणीचा काळ असेल त्यांत भरल्या गेलेल्या वर्गणीवर व त्यांतील पगारावर मदतीचें प्रमाण अवलंबून आहे. मदतीच्या काळांत आजारीपणाचा, बाळन्तपणाचा, अपघाताचा किंवा मृत्यूचा प्रसंग न ओढवल्यास मदतीचा हक्क व रक्कम पुढील काळांसाठीं सांठवितां येत नाहीं किंवा अगोदरच्या वर्गणीच्या काळांतील भरलेली वर्गणी पुढील दुसऱ्या वर्गणीच्या काळांत धरण्यांत यावी असेंहि कोणा कामगाराला म्हणतां यावयाचें नाहीं.

वर्गणी पगारांतून घेतली जाईल

वर्गणीच्या काळांत (२६ आठवड्यांत) कामगाराच्या व कामगारासाठीं मालकांनीं भरावयाच्या वर्गणीचें प्रमाण खालीलप्रमाणें आहे. ही वर्गणी दर आठवड्याची समजण्यांत येईल. तिचें प्रमाण रोजच्या पगाराशीं संबंधित केलें आहे. सर्व कामगारांची व मालकांची वर्गणी सारख्याच रकमेची नाहीं. कामगारांच्या रोजीं पगारांचे एकूण आठ गट पाडले असून वाढत्या पगाराला वाढत्या वर्गणीचें प्रमाण ठेवलें आहे. कारखान्यांतील ज्या नोकरांचा मासिक पगार ४०० रुपयांपेक्षां जास्त आहे त्यांच्यासाठीं मदतीची योजना नसल्यामुळें त्यांना वर्गणी भरावी लागणार नाहीं. ज्यांचा रोजीं पगार १ रुपयापेक्षां कमी आहे त्यांची कसलीहि वर्गणी कापली न जातां त्यांना योजनेखालील सर्व प्रकारची मदत मिळूं शकेल. वर्गणी भराव्या लागणाऱ्या सर्व कामगारांची वर्गणी त्यांच्या पगारांतून कापण्यांत येईल.

कामगाराचें "वर्गणी कार्ड"

पुढील तक्त्याप्रमाणें कामगारांची वर्गणी कापली जाईल. कापल्या गेलेल्या वर्गणीची नोंद "वर्गणी-च्या कार्डावर" केली जाईल. प्रत्येक कामगाराच्या नांवाचें हें कार्ड त्याच्या कारखान्यांत असेल. कापलेली वर्गणी बरोबर लिहिली गेली किंवा नाहीं हें कार्डावर बघण्याचा अधिकार महिन्यांतून एक वेळ कामगाराला आहे. कामगारांची कापलेली वर्गणी व मालकांची वर्गणी पगार झाल्यापासून ७ दिवसांच्या आंत कॉर्पोरेशनच्या विभाग ऑफिसमध्यें मालकांनीं भरावयाची आहे. वर्गणीच्या किंमतीचीं तिकिटें विकत घेऊन मालकांनीं कामगारांच्या "वर्गणीच्या कार्डावर" तीं लावावयाचीं असतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्गणीच्या प्रमाणाचा तक्ता

रोजी पगार	कामगाराची वर्गणी (साप्ताहिक)	मालकाची वर्गणी (साप्ताहिक)
	रु. आ. पै	रु. आ. पै
१ रुपयांपेक्षां कमी	०– ०–०	०– ७–०
१ रु.पासून १॥रु.पेक्षां कमी	०– २–०	०– ७–०
१॥ रु.पासून २रु.पेक्षां कमी	०– ४–०	०– ८–०
२ रु.पासून ३ रु. पेक्षां कमी	०– ६–०	०–१२–०
३ रु.पासून ४ रु. पेक्षां कमी	०– ८–०	१– ०–०
४ रु.पासून ६ रु. पेक्षां कमी	०–११–०	१– ६–०
६ रु.पासून ८ रु. पेक्षां कमी	०–१५–०	१–१४–०
८ रु.पासून वर	१– ४–०	२– ८–०

आर्थिक मदत केव्हां व कशी मिळणार

आजारपण, बाळंतपण, अपघात व मृत्यु यासाठीं मिळणाऱ्या औषधोपचाराच्या मदतीबरोबर पैशाचीहि मदत सरकारी विमा योजनेंत असल्याचें आपण अगोदर समजावून घेतलें आहे. पैशाच्या मदतीसाठीं कामगाराची वर्गणी भरली गेली असली पाहिजे. २ ऑक्टोबरला योजना सुरू झाल्याबरोबर अपघात व मृत्यूमुळें वारसाला मिळणारी पैशाची मदत सुरू होईल. पण आजारपण व बाळंतपण यासाठीं मिळणारी पैशाची मदत ही तावडतोब मिळूं शकणार नाहीं. मदतीच्या काळांत ह्या दोन कारणांसाठीं पैशाची मदत मिळावयाची असल्यास कामगारांना कांहीं अटी पुऱ्या कराव्या लागतात.

आजारीपणाची आर्थिक मदत

वर्गणीच्या काळांत कामगाराच्यां नोकरीचे जे आठवडे असतील त्यापैकीं कमींत कमी दोन तृतीयांश इतक्या आठवड्यांची वर्गणी भरली गेली पाहिजे. अशी भरलेली वर्गणी १२ आठवड्यांपेक्षां कमी असतां उपयोगी नाहीं. ही अट पुरी करणारा कामगार आजारीपणाच्या आर्थिक मदतीस पात्र होतो.

" नोकरीचे दिवस "

वरील अटींतील नोकरीचे दिवस (आठवडे) म्हणजे कामगारानें प्रत्यक्ष काम केलेले दिवस नाहींत ही गोष्ट लक्षांत ठेवावयास हवी. कारखान्यांतील एकूण कामाचे दिवस जेवढे असतील त्यांतून डॉक्टरचे सर्टिफिकेट असलेल्या आजारीपणाचे कामगाराचे दिवस तसेंच बाळन्तपणामुळें व अपघातामुळें बुडालेले दिवस कमी करून राहिलेले सर्व दिवस कामगाराच्या नोकरीचे दिवस समजण्यांत येतात. म्हणजे खाड्याचे दिवस, मंजूर रजेचे किंवा पाळयांचे दिवस नोकरीच्या दिवसांत धरले जातील.

५६ दिवस आर्थिक मदत मिळेल

अशा रीतीनें वरीलप्रमाणें वर्गणी भरण्याची अट पुरी करणाऱ्या कामगाराला मदतीच्या काळांत आजारीपणांत वर्षांतून जास्तींतजास्त ५६ दिवसांसाठीं आर्थिक मदत मिळूं शकेल. ५६ दिवसांपेक्षां जास्त दिवसांच्या आजारीपणाला आर्थिक मदत त्या वर्षी मिळावयाची नाहीं. ही मदत आजारी पडल्याबरोबर पहिल्याच दिवसापासून धरण्यांत येणार नाहीं. पहिले २ दिवस " वेटिंग पिरियड " (थांबावयाचा काळ) म्हणून समजण्यांत येईल. आर्थिक मदत त्यानंतरच्या दिवसांत मिळूं शकेल.

आजारीपणाच्या आर्थिक मदतीचें प्रमाण पुढीलप्रमाणें असूं शकेल. ह्या मदतीसाठीं देखील कामगारां या रोजीं पगाराचे आठ गट पाडले असून प्रत्येक गटासाठीं, मदतीसाठीं धरलेला रोजीं पगार दाखविण्यांत आला अहे. मदतीची रक्कम धरलेल्या पगाराच्या ५० टक्क्याएवढी असूं शकेल.

एक उदाहरण

पुढें दिलेल्या चौकटीवरून एखाद्या कामगाराची आजारीपणाची आर्थिक मदत किती होते ते उदाहरण घेऊन पाहूं. कामगाराचा धरण्यांत यावयाचा रोजीं पगार १ रु. १२ आ. आहे असें समजू. वर्गणीच्या काळांतील त्याच्या नोकरीचे आठवडे २२ आहेत. त्यापैकीं दोन आठवडे कामगार रजेवर असल्याने त्यामुळें त्याची वर्गणी तेवढ्यापुरती भरली गेली नाहीं,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...१० आठवडे कामगारानें १॥ रु. ते २ रु. ...रोजी पगारावर काम केलें आहे.

$$\frac{\text{१० आठवडे} \times \text{२८ आणे}}{\text{२२ आठवडे}} = \text{२५॥ आणे}$$

...याच्या ५० टक्के म्हणजे १२॥। आणे, अपुरा ...पुरा धरून १३ आणे रोज याप्रमाणें सदरहू ...राला आर्थिक मदत मिळणार.

अपघातासाठीं आर्थिक मदत

अपघातामुळें ज्याला तात्पुरती दुखापत झाली ...त दुखापतीच्या काळापर्यंत आर्थिक मदत मिळूं ...ल, मदतीचें प्रमाण आजारीपणांतील प्रमाणाएवढेंच ...ल.

...दुखापतींत ज्याच्या एखाद्या अवयवाची ...ची हानि झाली असेल त्याला आयुष्यभर ...र्थिक मदत मिळत राहील. आर्थिक मदतीचें प्रमाण ...त्या टक्क्यांनीं हानि झाली तितके. आजारी- ...च्या मदतीचे टक्के सध्यां अस्तित्वांत असलेल्या ...नाव नुकसानभरपाईच्या कायद्याखालीं अवय- ...च्या हानीसंबंधीं जें टक्क्यांचें प्रमाण दिलें आहे ...तें, आजारीपणाच्या आर्थिक मदतीच्या प्रमाणाचे ...के आर्थिक मदत समजण्यांत येईल. दुखापतींत जो ...कामगार संपूर्णतया निकामी झाला त्याला आजार- ...पणाच्या मदतीच्या प्रमाणांत आयुष्यभर आर्थिक ...मदत मिळत जाईल. ज्यांची दुखापत वरील कोणत्यां- ...हि प्रकारांत बसूं शकत नाहीं, त्याबाबतींत स्वतंत्र ...नियम केले जातील.

मृत्यु आल्यास वारसाला मिळणारी मदत

कामगाराला मृत्यु आल्यास याच्या बायकोला ...व मुलांना खालीलप्रमाणें आर्थिक मदत ...मिळूं शकेल.

(अ) आजारीपणाच्या मदतीच्या प्रमाणाच्या ...दोनपंचमांश इतकी रक्कम मयत कामगाराच्या ...बायकोला तिच्या आयुष्यभर मदतीच्या रूपानें मिळत ...राहील. बायकोनें पुनर्विवाह केल्यास ही मदत बंद ...होईल. दोन किंवा अधिक बायका असल्यास त्यांच्यांत ...ठरलेल्या प्रमाणांत वरील मदतीची रक्कम वाटली जाईल.

(ब) स्वतः किंवा दत्तक घेतलेल्या मुलाला आजारीपणाच्या आर्थिक मदतीच्या दोनपंचमांश-एवढी रक्कम मदतीच्या रूपानें मिळूं शकेल; पण ती मदत त्या मुलाला वयाच्या १५ वर्षांपर्यंतच मिळूं शकेल.

(क) मुलाप्रमाणें अविवाहित मुलीलाहि मदत मिळेल. पण तिलाहि वयाच्या १५ वर्षांपर्यंतच अशी मदत मिळत राहील.

कॉर्पोरेशनला वाटल्यास मुलाला किंवा मुलीला मिळणारी मदत त्यांच्या शिक्षणासाठीं खास सवलत म्हणून अधिक लांबवितां येईल. मयत कामगाराला बायको, मुलगा अगर मुलगी यापैकीं कोणीहि वारस नसल्यास कॉर्पोरेशन ठरवील त्याप्रमाणांत मयतांच्या आईबापांना अगर आजा-आजींना त्यांच्या हयाती-पर्यंत मदत मिळूं शकेल, किंवा दुसरा कोणी पुरुष वारस असल्यास त्याच्या वयाच्या १५ वर्षांपर्यंत मदत मिळूं शकेल, किंवा कोणी स्त्री वारस असल्यास तिच्या वयाच्या १५ वर्षांपर्यंत किंवा लग्नापर्यंत मदत मिळावयाची आहे.

वर्गणीच्या काळांत स्त्री-कामगारांच्या नोकरीचे जे आठवडे असतील त्यांपैकीं कमींतकमी दोनतृतीयांश इतक्या आठवड्यांची वर्गणी भरली गेली असल्यास (निदान अशी भरलेली वर्गणी १२ आठवड्यांपेक्षां कमी असतां कामा नये) स्त्री-कामगाराला बाळंतपणासाठीं आर्थिक मदत मिळण्याचा हक्क प्राप्त होतो. पण आणखी एक अट ह्या हक्कासाठीं पाळावयास पाहिजे. बाळंतपण ज्या आठवड्यांत अपेक्षित आहे, त्याच्या किंवा गरोदरपणांत बाळंत-पणाच्या रजेसाठीं जी नोटीस दिली असेल त्याच्या अगोदरच्या ३५ साव्या ते ४०साव्या आठवड्याच्या दरम्यान एकादी साप्ताहिक वर्गणी भरली गेली असली पाहिजे.

मदत एकूण १२ आठवड्यासाठीं मिळूं शकेल. बाळंतपणाच्या अगोदर ६ आठवडे व नंतर ६ आठवडे. या १२ आठवड्यांत कारखान्यांत स्त्री-कामगारानें जर काम केलें असेल तर काम केलेल्या दिवसांसाठीं आर्थिक मदत मिळावयाची नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कमींत कमी मदत १२ आणे

आजारीपणाच्या काळांत कामगाराला ज्या प्रमाणांत आर्थिक मदत मिळते त्याच प्रमाणांत वरील कारणासाठीं स्त्री-कामगाराला आर्थिक मदत मिळूं शकेल; तथापि अशा आर्थिक मदतीचा दर जर रोजीं १२ आण्यापेक्षां कमी असला तर १२ आणेप्रमाणें आर्थिक मदत मिळूं शकेल.

लक्षांत ठेवण्यासारख्या गोष्टी

आर्थिक मदतीच्या एकाच काळांत दोन किंवा अधिक कारणांसाठीं निरनिराळी मदत मिळूं शकणार नाहीं. उदाहरणार्थ, स्त्री-कामगाराला बाळंतपणाची व आजारीपणाची दोन्ही आर्थिक मदत एकाच वेळीं मिळावयाची नाहीं. तसेंच कामगारांना अपघातांत तात्पुरती दुखापत झाली असल्यास त्यासाठीं आर्थिक मदत मिळत असतां त्याचवेळीं आजारीपणाची मदत मिळावयाची नाहीं. किंवा स्त्री-कामगाराला त्याच वेळीं बाळन्तपणाची मदत मिळावयाची नाहीं. दोनपैकीं कोणतीहि एक मदत मिळूं शकेल. यापैकीं कोणती मदत पाहिजे हें कामगारानें ठरविलें पाहिजे.

औषधोपचाराच्या सवलती

बऱ्याच कारखान्यांतून आजारीपणाची पगारी रजा, औषधोपचारासाठीं दवाखाने व इतर कांहीं सोयी अगोदरच अस्तित्वांत आहेत. सदरहू योजना अस्तित्वांत आल्यावर त्यांचें काय होणार? ज्या कारखान्यांत कामगारांना आजारीपणाच्या रजेसाठीं अर्धा पगार मिळतो तेथील ती सवलत बंद होईल व त्याऐवजीं योजनेखालील आजारीपणाची आर्थिक मदत चालू होईल. जेथें आजारी रजेचा पगार पूर्ण मिळतो तेथें कामगाराला मिळणारी रक्कम पूर्वीप्रमाणेंच पूर्ण पगाराची राहील. पण योजनेखालील आर्थिक मदत घेतल्यानन्तर बाकी राहिलेला पगार मालकांकडून देण्यांत येईल.

किमान सोई ठेवल्या पाहिजेत

दवाखान्याच्या व औषधोपचाराच्या सोईबाबत फॅक्टरी कायद्यानुसार जेवढ्या किमान सोयी ठेवणें आवश्यक आहे तेवढ्या मालकांना ठेवाव्या लागतील. त्यापेक्षां जास्त सोयी अस्तित्वांत असल्यास त्या ठेवणें न ठेवणें मालकांवर अवलंबून राहील.

कामावरून कमी करतां येते का?

योजनेंतील मदत उपभोगित असतांना कामगाराला कामावरून बंद करतां येत नाहीं. पण आजारीपणासाठीं व तात्पुरत्या अपघातासाठीं कामगाराची गैरहजेरी सहा महिन्यापेक्षां जास्त असल्यास मालकाला कामगारांस नोटीस देण्याचा अधिकार राहील.

इन्शुअरन्स कोर्टाकडे तक्रार करावी

आर्थिक मदतीचा हक्क असतांना ती न मिळणें, किंवा मिळालेली रक्कम कायद्यापेक्षां कमी आहे असें कामगारास वाटल्यास कामगारानें आपली तक्रार १२ महिन्यांच्या आंत "इन्शुअरन्स कोर्टात" दाखल करावयाची असते. राज्य सरकारतर्फे असें कोर्ट स्थापन केलें जाईल. कोर्टाच्या निकालावर कायद्याचा मुद्दा असल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याहि कारणासाठीं अपील होऊं शकणार नाहीं. वरील कोर्टाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि कोर्टात आर्थिक मदतीच्या तक्रारी चालूं शकणार नाहींत.

नियमांचा भंग करणारास शासन

कामगारांनीं वर्गणी न भरणें, मालकानें पैसे विभाग ऑफिसमध्यें आणून न भरणें, किंवा योजनेंतील इतर नियमांचा भंग करणाऱ्या इसमांस तीन महिने तुरुंगवास व ५०० रुपये दंडापर्यंतची शिक्षा होऊं शकेल. (समाप्त)

पांढरें कोड नष्ट झालेल्या हजारों गांवच्या लोकांचीं प्रशस्तिपत्रें व बक्षिसें पूर्ण पत्त्यासहित छापलेलीं पत्रकें मोफत मागवा.

औषधीची किंमत ५ रु., पो. ख. १ रु.

वैद्य के. आर. बोरकर

मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला [म. प्र.]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बनावट औषधांविरुद्ध मोहीम

बनावट औषधें प्रतिबंधक समितीची सभा ता. १६।८ रोजीं मुंबईत सेक्रेटरीअटमध्यें झाली. १९४० च्या बॉम्बे ड्रग्ज ॲक्टांत दुरुस्ती करून कायद्याखालील गुन्ह्यांच्या बाबतींत जास्त शिक्षा देण्याची तरतूद करण्याऱ्या बिलाचें समितीनें स्वागत केलें. सार्वजनिक आरोग्यखात्याचे मंत्री श्री. शांतिलाल शहा हे अध्यक्षस्थानीं होते. आरोग्यखात्याचे उपमंत्री श्री. व. द. जत्ती हेहि या सभेस हजर होते.

सदरहू कायद्याच्या २७ व्या कलमाचा भंग केल्यास एक वर्ष कैद व ५०० रुपये दंड अशी शिक्षा देण्याची सध्यां तरतूद आहे. त्याऐवजीं तीन वर्षे कैद व ५०० रुपये दंड अशी शिक्षा देण्याची तरतूद दुरुस्तीबाबतच्या बिलान्वयें करण्यात येणार आहे. नंतर गुन्ह्याबाबतची शिक्षाहि वाढविण्यांत येणार आहे.

बनावट औषधांचा व्यापार करणाऱ्या असामींचीं प्रकरणें हाताळण्यासाठीं वेगळा कायदा असावा असें मत कांहीं सभासदांनीं व्यक्त केलें. त्यावर मंत्री म्हणाले कीं, तशी गरज भासली तर नवा कायदा करण्यांत येईल. तोंपर्यंत आहे त्याच कायद्यांत जरूर त्या दुरुस्त्या करतां येतील.

बनावट औषधांच्या प्रचारास पायबंद घालण्याच्या दृष्टीनें उपाय सुचविण्यासाठीं आणि "बनावट औषधें" या शब्दप्रयोगाची व्याख्या तयार करण्यासाठीं चार सभासदांची अेक उपसमिति नेमण्यांत आली. ज्या औषधांची आयात करण्यास परवानगी नाहीं अशीं औषधें घेण्याचा सल्ला देऊं नये अशी डॉक्टरांना विनंति करणें, इस्पितळांना व सर्वसाधारण जनतेस औषधांच्या रिकाम्या बाटल्या नष्ट करण्याची विनंति करणें, वगैरे उपायाबाबतहि विचारविनिमय करण्यांत आला.

लोकमत तयार करण्यासाठीं भित्ति-पत्रकें, चित्रपट व स्लाइड्स् तयार करण्यांत येत आहेत असें ड्रग कंट्रोलर यांनीं सांगितलें.

शुद्ध आयुर्वेदीय शिक्षणाचे
आणखी सरकारमान्य गुरु

खालील आणखी १६ वैद्यांना शुद्ध आयुर्वेद अभ्यासक्रम शिकविण्यासाठीं मुंबई सरकारनें १९५४-५५ या शैक्षणिक वर्षाकरितां 'गुरु' म्हणून मान्यता दिली आहे.

(१) वै. म. बा. गुळस्कर, नासिक. (२) वै. द. नी. जोशी, निफाड, जि. नाशिक. (३) वै. वि. दा. वैद्य डाकोर, जि. खेडा. (४) वै. र. गि. अग्निहोत्री, अहमदाबाद. (५) वै. क. शं. वैद्य, सुरत. (६) वै. शिवभाई जगन्नाथजी, नडियाद. (७) वै. पु. अ. जानी अहमदाबाद. (८) वै. पु. वा. पानसे, पुणें. (९) वै. कृ. वा. कर्वे पनवेल. (१०) वै. ह. वि. व्यास, पारडी. (११) वै. शं. पि. पंड्या, नडियाद. (१२) वै. मा. अ. शारंगपाणि, नाशिक (१३) वै. प्यारेलाल ला. शर्मा, मुंबई २ (१४) वै. राममूर्ति मिश्र, वरळी मुंबई १८ (१५) वै. खं. छ. बारोट, बडोदें. (१६) वै. शां. पि. जोशी, सांताक्रूझ मुंबई.

सरकारमान्य शिक्षण-संस्था

त्याचप्रमाणें श्री मुंबई आयुर्वेदिक सोसायटीचें श्री. पं. हरिप्रपन्नजी आयुर्वेद विद्यालय, मुंबई या संस्थेसहि हा शुद्ध आयुर्वेदीय अभ्यासक्रम शिकविण्यास मान्यता दिली आहे.

पांढरें कोड

हजारोंचें गेलें व त्यांनीं अभिप्राय दिलेलें आणि अनेक बक्षिसें मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु.

नकली वैद्यापासून सावध रहा!

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन'
मु. पो. संगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२००० वर्षांपूर्वीची
चिकित्सकाची फी किती ?

'हम्मुरबी' याच्या कायद्याप्रमाणें जनावरांच्या चिकित्सकाची फी ठरविली होती, ती अशीः- बैल किंवा गाढव याच्या जखमेवर उपचार करून जर ती बरी केली असेल तर मालकानें चिकित्सकाला एक-षष्ठांश 'शेकेल' * द्यावा.

मात्र जनावर मेलें तर त्या जनावराच्या किमतीच्या पावपट रक्कम डॉक्टरनेंच मालकाला दिली पाहिजे.

आतां माणसाच्या चिकित्सकाची वेतन-श्रेणी पहा :- मतदानाचा अधिकार असलेल्या नागरिकाला झालेली तीव्र जखम, धातूच्या चाकूच्या साहाय्यानें बरी केली असेल तर डॉक्टरला चांदीचे दहा शेकेल द्यावे. तसेंच चाकूनें गांठ कापून डोळा दुरुस्त केला असेल तरी तितकेच शेकेल द्यावे.

साध्या रहिवाशाला असेंच बरें केलें असेल तर ५ शेकेल पुरेत. आणि रोगी जर गुलामवर्गीतील असला तर गुलामाच्या मालकानें २ शेकेलवर भागवावें.

मात्र चिकित्सा करतांना रोगी मेला किंवा त्याचा डोळा गेला तर डॉक्टरचे हात कापून टाकण्यांत येतील. आणि जखमेवर उपचार करतांना गुलाम मेला तर डॉक्टरनें त्या मालकाचा गुलाम होऊन राहिले पाहिजे.

पुणें ४ —संग्राहक, कॅ. गो. गं. लिमये

* शेकेल हें ज्यू लोकांचें नाणें असून त्याची किंमत २ शिलिंग ६ पेन्स इतकी आहे.

क्षयरोगाबाबत मोफत औषधोपचार

जिल्हा स्कूलबोर्डें आणि ऑथराइज्ड म्युनिसि-पालिट्या यांच्या नोकरींतील प्राथमिक शिक्षकांना सरकारी आस्पितळांतून आणि सरकारमान्य खाजगी सॅनिटेरियममधून क्षयरोगाबाबत मोफत औषधोपचार करण्यांत येतो. सरकारनें आतां ही सवलत खाजगी प्राथमिक शाळांतील शिक्षकांनाहि लागू केली आहे.

वाचकांचा पत्रव्यवहारः-

थंडपाण्याचें स्नान

मी लहानपणापासून सर्व ऋतूंत थंड पाण्यानें स्नान करतो. डिसेंबरांत काशीस गेलो तरी तेथें थंड पाण्यानें स्नान करितो. सन १९५१ सालीं मी काशीस गेलो होतो त्यावेळीं माझें वय ७९ वर्षांचें होतें. तरी सर्व ऋतूंत थंड पाण्यानें स्नान करणें चांगलें कीं वाईट कीं ऋतूप्रमाणें गरम पाणी घ्यावें.

३ महिन्यापूर्वीं मला काळपुळी झाली होती. तींतून मी आतां बरा झालो आहे. परन्तु पायास लांब चालत जाण्याची शक्ति नाहीं. हळूंहळूं चालतां येते बाकी सर्व प्रकृति उत्तम आहे. भूक लागते, झोप येते, सकाळीं ५ वाजतां थंड पाण्यानें स्नान करतो व दिवसभर वाचण्यांत वेळ जातो.

थंडीतापावर काळी मिरी सूक्ष्म करून घेतल्यानें चांगला गुण येतो असें मला पुष्कळ कळवीत आहेत.

मुंबई —सुंदरराव भास्करराव वैद्य

केतकीचीं फळें (स्तन)

या पत्रावरोबर केतकी फळें पाठविलीं आहेत. एक फळ आख्खें सुकलेलें व बाकी अर्धवट व सुखतांना सुटे सुटे त्रिकोनी लहान स्तन वजा झालेले तुकडे सर्व पाठविले आहेत. मी फेब्रुआरी महिन्यांत फळें पाहिलीं तेव्हां ती लहान होतीं. परन्तु आतां फार मोठी झाली. अननस वजा फळें आहेत. ग्रंथकारानें यांना स्तन कां म्हटलें समजत नाहीं.

इराणांत माणसांचें दूध मणावारी बाजारांत विक्रीस येतें. व तेथील स्त्रीस्तन फार मोठे व तेथील स्त्रिया सुमारें पक्के ५ शेरपर्यंत दूध देणाऱ्या असतात. असें मी पाहिल्या लढाईतून इराणांतून परत आलेल्या इसमांच्या गप्पांतून ऐकलेलें स्मरतें. आपल्याकडेहि ब्रह्मदेशांत असें दूध विक्रीस येतें असें ऐकलें आहे. असो, हें विषयांतर झालें.

मुंबई ता. १०-५-५४ द. कृ. गोगटे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संग्रहणीवर दहीवडे :

निवेदक:-
श्री. सौ. विद्या जैसवाल, नासिक

पौर्णिमेची चांदणी रात. आम्ही घरची मंडळी आमच्याकडे आलेले निमचचे पाहुणे मिळून सर्व-जण गच्चीवर गप्पा मारीत बसलो होतो. संभा-षणाच्या ओघांत पाहुणे म्हणाले 'मला पूर्वी संग्रह-णीचा रोग झाला होता. त्यावेळीं पोटांत एकसारखी कळ येऊन दिवसांतून १०-१२ वेळां शौचास होत असे. संग्रहणीच्या रोगानें मी अगदीं बेजार झालो होतो. निमच मधील एकूण एक डॉक्टर व वैद्य येऊन गेले. पण कुणाच्याच औषधानें मला गुण आला नाहीं.'

रंगी-बेरंगी कडू गोळ्या

'मग तुम्ही बरे कसे झालात?' आम्हीं आतुर-तेनें विचारलें, ते म्हणाले "माझे सासरे अत्यंत श्रीमंत होते त्यांचा जावई असा मी एकटाच. त्यामुळें ते दिल्लीहून आले व मला दिल्लीस घेऊन गेले. तेथें त्यांनीं मला एका हवेशीर बंगल्यांत ठेवलें. शुश्रुषेसाठीं दोन नर्स होत्या. डॉक्टरहि जवळ बसून राहावयाचे. वेगनिराळे डॉक्टर येत. कोणी एनिमा देत. कोणी रंगीबेरंगी कडू गोळ्या, औषधें पाजत. कोणी देवीचे भक्त येत व मंत्रतंत्र करीत, पण संग्रहणी-पासून कांहीं बरा होईना.

शौचास दगडासारखें घट्ट

डॉक्टरांनीं मला अन्न खाण्यास मना केलें. फळांचा रस, कॉफी व पाणी या आहारावर १ वर्ष ठेवलें, तरीपण पोटांतील कळ कांहीं थांबेना. व शौचास जातांना खूप त्रास होई. दगडासारखी घट्ट शौचास होत असे.

रोग केव्हां बरा होईल ?

डॉक्टरांनीं सांगितलें होतें कीं, जेव्हां तुम्हांस साधी खुलून मोकळी शौचास होईल तेव्हां तुमचा रोग बरा होईल. पण असें न होतां १ वर्ष गेलें. सासऱ्यानें २० हजार रुपये डॉक्टरांना व भगतांना भरूनसुद्धां माझा रोग बरा झाला नाहीं. तेव्हां मात्र सर्वांची निराशा झाली.

मग मला व माझ्या बायकोला घेऊन माझे वडील निमचला आले. सर्वांची खात्री झाली कीं, माझा मृत्यु जवळ आला आहे व मलाहि तें कळलें होतें.

असाच एके दिवशीं बाहेर व्हरांड्यांत मी कॉटवर पहुडलो होतो. व घरांतील इतर सर्व मंडळी बहिणीच्या लग्नाच्या कामांत गुंग झाली होती. माझ्या जवळ कोणीच नव्हतें.

दहीवडे घ्या दहीवडे ऽऽ

इतक्यांत एक दहीवडे व भजीवाला भय्या "दहीवडे ऽऽ घ्या दहिवडे ऽऽ" असें ओरडत दारीं आला. त्याचा तो आवाज ऐकून माझ्या तोंडाला पाणी सुटलें.

इतके दिवस खाण्यापिण्याचे सर्व निर्बंध पाळून सुद्धां आपणास बरें वाटत नाहीं, आपण खंगत चाललो आहोत, या दुखण्यांत आपण निश्चित मरणार असें माझ्या मनानें घेतलें होतें. तेव्हां मरण्यापूर्वी आपली दहीवडे खाण्याची इच्छा कां पूर्ण करूं नये? असा विचार माझ्या मनांत आला व मग मला राहवेना. मी 'दहीवडे' विकणाऱ्या इसमास हांक मारली.

तुम्ही आजारी आहांत

तो आला व मजकडे पाहून म्हणाला 'साहेब, तुम्ही तर आजारी आहांत, तुम्हाला मी दहीवडे कसे देऊं'?

"अरे, तुला काय करावयाचें त्याचें? मी एर्वीतेवीं मरणार तर आहेच, मग उपाशी मरण्यापेक्षां खाऊन-पिऊन समाधानानें मेलेलें काय वाईट?"

"या डॉक्टरांनीं मला जवळजवळ उपाशीच मारणें चालविलें आहे. मी तुझें नांव कुणासहि सांगणार नाहीं" मीं म्हटलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१२ आण्याचे १२ द्रोण

माझें हें म्हणणें ऐकून त्यानें मला १२ आण्याचे १२ द्रोण दहिवडे दिले व तेवढे सर्व मी खाल्ले. पैसे घेतल्याबरोबर तो निघून गेला.

मोकळी शौचास झाली

हे दहीवडे खाण्याचा परिणाम माझ्या शरीरा-वर असा झाला कीं कांहीं वेळानें मला जोरांत शौचास लागली. प्रथम थोडा त्रासहि झाला, नंतर शौचास मोकळी झाली व मला एकदम बरें वाटूं लागलें. जणूं माझ्या शरीरांत एकदम शक्ति आली असें झालें. नंतर मी नळाखालीं जाऊन आंघोळ केली. नवा शर्ट घातला. माझ्या या वागणुकीमुळें घरांतील सर्व माणसें चकितच झालीं.

ताटलीभर भजी खाल्ली

मी बायकोला ' भजी ' करावयास सांगितलें. ती तयार होईना. तेव्हां मी तिच्या जोरानें थोबाडींत मारली. जवळजवळ मी एक ताटलीभर भजी खाल्ली. पुन्हां एकदां अर्ध्या तासानंतर मला शौचास झाली.

माझ्या या वर्तणुकीवरून माझें मरण जवळ आलें आहे म्हणून मी असे वेडे चाळे करीत आहे असेंच सर्वांना वाटलें.

मला शौचास नीट चांगली होत आहे असें मी त्यांना समजावून सांगितलें पण कोणाला तें पटेच ना !

विकार कोठें गेला ?

नंतर मी क्रमानें सर्व अन्न भरपूर खाऊं लागलो. माझा तो पोटाचा विकार केव्हां, कसा, कुणीकडे गेला तें समजलें सुध्दां नाहीं. "

आमच्या पाहुण्यांचा विचित्र अनुभव ऐकून आम्हां सर्वांना तर नवलच वाटलें. कारण हजारों रुपये खर्च करून जो रोग बरा झाला नाहीं तो १२ आण्याच्या दहीवड्यानें कसा गेला ? या प्रश्नाचें उत्तर आम्हांस मिळालें नाहीं.

अनुभविलें, सांगितलें

[वरील लेख 'साप्ताहिक गांवकरी' कडे 'पाहिलें, अनुभविलें, सांगितलें' या सदरांत छापण्यासाठीं आला. 'गांवकरी'च्या सुजाण संपादकांनीं तो आयुर्वेदपत्रिके-कडे पाठविला व या लेखाला, तो योग्य वाटल्यास शास्त्रीय विवेचनाची जोड देऊन छापावा अशी सूचना केली आहे.

जीर्ण वातज संग्रहणी

प्रस्तुत रुग्णास वातज संग्रहणीचा विकार असावा व त्यावर पित्तज संग्रहणीवर करावयाचे ' फळांचे रस, कडू औषधें ' इत्यादि उपाय केले गेले असावेत. वातज पोटदुखीवर केव्हांहि लंघन देऊं नये, व केवळ पित्तशामक फलरस व पाणी या उपायांनीं वात-शमन होण्याऐवजीं त्यांच्या शीतवीर्यत्वामुळें वातवृद्धि होऊन शौचास खडा व पोटदुखी वाढणें या स्वाभाविक गोष्टी आहेत.

कमी खाण्यानें अगर पचावयास हलके हलके पदार्थ खाण्यानें सर्व प्रकारची पोटदुखी जाते असा सर्व लोकांचा [व बऱ्याच डॉक्टर-वैद्यांचाहि] समज असतो; पण तो बरोबर नाहीं. लंघन हा अन्नाच्या पचनावरील अनेक उपचारांपैकीं एक उपाय असला तरी तो पोटदुखी, हगवण यावरील सर्वावस्थेंतील संपूर्ण उपाय नव्हे.

लंघन करूं नये

इतकेंच नव्हे तर पोटदुखी, हगवण, या विका-रांच्या जीर्णावस्थेंत रोज ठराविक वेळीं दिवसांतून दोनदां अगर तीनदा प्रमाणशीर जेवण करणें हाच ते विकार आरोग्यांत आणण्याचा प्रमुख उपाय आहे.

"मळ कमी निर्माण होणें" विकार

प्रस्तुत लेखांतील रुग्णाचा अतिसार-संग्रहणी हा विकार नव्हता, अथवा तो जाऊन त्या जागीं वर्चःक्षय (मळ कमी निर्माण होणें) हा दुसराच विकार उत्पन्न झाला होता व त्यावर अष्टांगहृदय अ. ९ अतिसारचिकित्सा श्लोक २९ ते ३५ यांत सांगितल्याप्रमाणें मूग,उडीद,तीळ,तेल, तूप,दही यांचे बनविले पदार्थ आवश्यक होते. ते मिळाल्यामुळें त्या इसमाचा रोग बरा झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...जारांतील खाद्यें आरोग्यदायी आहेत

...आज बाजारांतील निरनिराळ्या दुकानांतून ...रे व दारावर विकावयास येणारे विविध खाद्य- ...हे केवळ स्वस्थांचेंच अन्न असतात अशी ...समजूत आहे. ते निर निराळ्या अवस्थेंतील ...रांहि उपयोगी आहेत ही गोष्ट वैद्य-डॉक्टरांच्या व ...पालकांच्या लक्षांत येईल त्यावेळीं औषधाकडे ...न घेतां विविध आहारांनीं आरोग्य मिळण्याच्या ...स महत्व प्राप्त होईल.

आहारावर भर देणारें शास्त्र

आयुर्वेद हें आरोग्यासाठीं विविध आहारांवर ...णारें एकमेव शास्त्र आहे. त्याच्या त्या अंगाचा ...बारकाईनें अभ्यास या स्वातंत्र्याच्या काळांत ...अशी अपेक्षा आहे. -संपादक]

...कांचा पत्रव्यवहार

मुडदुसावर मंत्र-तंत्र

"आयु. पत्रिकेच्या १ मे ५१ च्या प्राणाचार्य ...वि विशेषांकांत पृष्ठ ६५९ वर मुडदुसावर मंत्र- ...विषयीं उपयुक्त माहिती आली आहे. त्या प्रयोगांत ...ची पूजा करावयास सांगितली आहे तो कलश ...र ठेवावयाचा ? पाटावर तांदूळ वगैरे घालून ...स? तसेंच कलशस्य मुखे विष्णुः इ. मंत्रानींच ...करावयाची काय ? तसेंच जपसंख्या किती करा- ...ची ? याचा उल्लेख नाहीं. हा प्रयोग घरींच ...याचा असल्यास १। रु. दक्षिणा व नारळ कोणास ...याचा ? माझ्यासारखा मनुष्य हें सर्व करून ...घेणार नसेल, त्यावळीं त्याचा विनियोग ...करावा ?

एक वाचक

...द्ध आयुर्वेदिक कोर्ससाठीं प्रवेशयोग्यता

...शुद्ध-आयुर्वेदिक कोर्ससाठीं प्रवेश देण्याच्या ...तीत मुंबई सरकारनें पंजाब युनिव्हर्सिटीच्या प्राज्ञ ...ला मान्यता दिली आहे.

लेप्रसी मिशनचा अहवाल

अमेरिकन लेप्रसी मिशनच्या बोर्ड ऑफ् डायरेक्टर्सचे अध्यक्ष डॉ. इ. रॉस यांनीं आपल्या गतवर्षाच्या कार्याचा अहवाल सादर केला त्यांत खालीलप्रमाणें माहिती प्रसिद्ध केली आहे. 'आमच्या मिशनतर्फे २७ भिन्न देशांत १६६ कुष्ठसंस्था स्थापित झाल्या आहेत. त्या सर्वां मिळून ६० हजार रुग्णांना औषधोपचार केले गेले. त्यांपैकीं २८६२ रोग्यांना 'रोग-लक्षण-मुक्त' म्हणून जाहीर केले गेले. म्हणजे शेंकडा ४·७ रुग्ण रोग-लक्षण-मुक्त झाले.

रोग-लक्षण-मुक्त शब्दाची व्याख्या अहवालांत दिलेली नाहीं तथापि ही प्रगति अभिनंदनीय आहे हें खास. ६० हजार भिन्नदेशीय, वंशीय व जातीय अशा रुग्णांचा हा अहवाल असल्यामुळें तो अधिक प्रातिनिधिक व विश्वासार्ह असाच समजला पाहिजे.

सल्फोन-चिकित्सा अद्याप अपूर्ण

आपणा सर्वांस माहित आहे कीं, कुष्ठरोगावर सल्फोन चिकित्सा सुरू होऊन केवळ १४ वर्षे झालीं आहेत. ह्या चिकित्सेसंबंधीं म्यूर सारखे अनुभवी व तौलनिक विचारसरणीचे विशेषज्ञ यांनीं ६ व्या आंतरराष्ट्रीय कुष्ठकॉंग्रेसच्या आसनावरून आपला संतोष व्यक्त केला, परंतु अंतिम समाधान मात्र व्यक्त केलें नाहीं. सल्फोन चिकित्सेने कुष्ठरोगी दुरुस्त होऊं शकतात. परंतु अशा दुरुस्त झालेल्या रोग्यांना रोगाचा पुनरुद्भव होण्याचाहि संभव शक्य असतो ही गोष्ट सर्वमान्य आहे. अशा रीतीनें दुरुस्त झालेल्या रोग्यांच्या मज्जातंतुमध्यें अम्लस्थिर बिंदुकण (acid fast dust) निर्माण होतात ही गोष्ट श्री. खानोलकर यांनीं केलेल्या प्रयोगावरून सिद्ध झाली आहे. अमेरिकेचे मेडिकल डायरेक्टर वोल्कॉट यांनीं डॉ. कार्व्हिल यांच्या गेल्या ५ वर्षांतील कुष्ठ-रोग्यांचा रुग्णेतिहास पाहून अशी सूचना दिली आहे कीं, सल्फोन चिकित्सेनें बाह्य सुधारणा व जंतुंचा अभाव दिसून आला तरी पुढेंमागें गंभीर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वरूपाचा उपद्रव (Serious Complications) निर्माण होण्याचा संभव असतो; म्हणून रोगाचा पुनरुद्भव होण्याचा संभव दिसतो किंवा कसें याचा सूक्ष्म विचार करून दुरुस्ती प्रमाणपत्र देण्यांत यावें.

वरील गोष्टीचा सारांश असा आहे कीं, पूर्वोपचार म्हणून सल्फोन--चिकित्सा ठीक आहे. परन्तु संपूर्ण गुण येण्यास ती चिकित्सा अपूर्ण स्वरूप आहे. म्हणून रोगमान अवश्य लक्षांत घ्यावयास पाहिजे. स्पर्शशून्यता, अवयवांची विद्रूपता, कुष्ठप्रतिक्रिया, डोळ्यांना उपद्रव इत्यादि विकारांकरितां अधिक प्रभावी उपाययोजनेचें संशोधन व्हावयास पाहिजे.

चिकित्सा यशस्वी करणें सर्वांचें कर्तव्य

सल्फोन-चिकित्सा आम्हांस संपूर्ण परितुष्ट वाटत नसली तरी ती आशान्वित वाटत आहे. या चिकित्सेपासून पूर्ण फायदा कुष्ठरोग्यांना मिळेल, यासंबंधीं हरएक प्रयत्न करणें हें सरकार, समाज व कुष्ठसेवक यांचे कर्तव्य आहे. ह्याबाबतींत अधिक सखोल अभ्यास करणें व उपचार--पद्धतींत अधिक संशोधन करणें ह्या गोष्टी आवश्यक आहेत. कुष्ठरोगाविषयीं असत्य भीति अगर असत्य आशावाद या दोन्ही गोष्टी हानिकारक आहेत. या बाबतींत वास्तविकता हाच आपला आधार असावयास पाहिजे.'

—कुष्ठपत्रिका

अनेकांनीं प्रशंसलेलीं " आयुर्वेद सेवा संघ " नासिकचीं सर्व गुणकारी औषधे आतां

कऱ्हाडांत

मिळूं लागलीं.

औषधी भांडार

गुरुवार पेठ, पो. कऱ्हाड (सातारा)

दम्यावर महाकालेश्वर रस

बेळगांव येथील सुप्रसिद्ध डॉ. अेच्. व्ही. सावनूर यांनीं आपल्या अनुभवाचे म्हणून वरील औषध आम्हास कळविले आहे. हा पाठ भैषजरत्नावलींत आहे. पांचही प्रकारचे खोकले व दम्याचे कांहीं प्रकारे यावर गुणकारी आहे. मी तो पुष्कळ रोग्यांवर वापरला आहे, असें त्यांनीं लिहिलें आहे.

त्यांचें पत्र आल्यावर आयुर्वेद सेवा संघानें तें औषध तयार केलें आहे. या औषधांत लोहभस्म, वंगभस्म, ताम्रभस्म, अभ्रकभस्म व माक्षिकभस्म ही भस्में आहेत. त्यामुळें धातुगत दोषामुळें उत्पन्न झालेल्या जीर्ण कासश्वासांत तो उपयुक्त आहे. दालचिनी, वेलची, नागकेशर, लवंग, जायफळ हीं सुगंधी द्रव्यें-- त्यातील सुगंधी तैलें ही-- श्वासमार्ग निर्दोष करणारीं आहेत. धोत्र्याचें बीज हें दम्याची उबळ थांबविणारें आहे. जेपाळ कफशोधक आहे. औषधाला भांगेच्या काढ्याच्या २१ भावना आहेत. अनुपानाला आल्याचा रस सांगितला आहे.

सर्व प्रकारचे खोकले, क्षयाचा खोकला, श्वास, राजयक्ष्मा, सान्निपातिक ज्वर, कंठरोग, संन्यास या विकारांत द्यावा असें ग्रंथकारानें सुचविलें आहे. किंमत ८ रु. १ तोळा

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जनतेच्या आरोग्यासाठीं व चोरापासून रक्षणासाठीं
पहाटे दिवे लावा

स्थानिक स्वराज्य मंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांना जाहीर विनंति

न. वि. वि.

मुंबई राज्यांत अन्नधान्याचें संपूर्ण निर्नियंत्रण करून जनतेची काळयाबाजारांतून मुक्तता करण्यांत आपण यशस्वी झालांत याबद्दल मी आपलें मनःपूर्वक अभिनंदन करतो. आपण आतां स्थानिक स्वराज्याचें खातें आपल्याकडे घेतलें आहे. याहि क्षेत्रांत आपणाला यशस्वीपणानें हाताळता येतील, व जनतेला अंधारांतून उजेडांत आणतां येईल असे अनेक महत्वाचे व जनहिताचे प्रश्न आहेत. त्यांत लक्ष घालून जनतेची शारीरिक व मानासिक दुःखें आपण दूर करावींत अशी विनंति आहे.

स्था. स्वराज्यसंस्थेचें पहिलें कर्तव्य

गांवें, शहरें, निर्मळ ठेवणें हें जसें स्थानिक स्वराज्य संस्थांचें प्रथम कर्तव्य समजलें जातें, तसेंच रात्री रहदारीच्या रस्त्यांच्या बाजूस दिवे लावणें हेंहि त्यांच्या कर्तव्यांतच मोडतें. लहान मोठ्या ग्रामपंचायती- सुद्धां रस्त्यावर प्रकाशासाठीं दिवे लावतात व ते योग्यहि आहे.

रस्त्यावर दिवे लावण्याचे उद्देश

रस्त्यावर दिवे लावण्याचे अनेक उद्देश आहेत. यामुळें नागरिकांचे व्यवहार सुगम होतात. नागरिकांचे व्यवहार सायंकाळपासून रात्रौ ९।१० वाजेपर्यंत जसे चालतात, तसेंच पहाटेहि ४।५ वाजल्यापासून सुरू होत असतात. सायंकाळीं घरोघर व दुकानांतून दिवे लागत असल्यामुळें व रहदारी बरीच असल्यामुळें नगरपालिकेचे अगर ग्रामपंचायतीचे दिवे सायंकाळीं नसले तरी फारसें अडण्यासारखें नाहीं.

पहाटेची वेगळी परिस्थिति

पहाटेची परिस्थिति याहून अगदीं वेगळया प्रकारची असते. त्यावेळीं रहदारी कमी असते, पण परगांवाहून भाजीपाला इत्यादि माल डोक्यावरून वाहून आणणारे लोक गांवांत येत असतात. सर्व सफाई कामगार व भंगी, रस्ता-सफाई व संडास-सफाईचें काम पहाटें सुरू करतात. व नेमके याचवेळीं (पहाटे ५॥ वाजतां) म्युनिसिपॅलिटीचे विजेचे दिवे विझतात.

म्यु. सभासदांचें दुर्लक्ष

या प्रश्नाकडे म्यु. सभासद लक्ष देतांना दिसत नाहींत. कमीतकमी दिवसा उजेड असतांना तरी रस्त्यावर दिवे लावून जनतेच्या श्रमाच्या पैशाची दिवसाढवळया उधळपट्टी व इलेक्ट्रिक कंपनीची भर आपण करूं नये एवढा साधा सरळ विचारसुद्धां त्यांच्या डोक्यांत येत नाहीं. व येत असेल तर तो प्रश्न धसास लावण्याइतकें विचारसामर्थ्य त्यांच्यांत नाहीं, असें दिसून आलें आहे. वृत्तपत्रांतून व समक्ष अनेकवार म्यु. सभासदांना याबाबतींत विनंति करूनहि कांहींहि उपयोग झालेला नाहीं.

रविउदय अस्ताच्या बदलत्या वेळा

नाशिक म्यु. चे वैद्य सभासद श्री. वि. म. गोगटे हे म्यु.तील अल्पसंख्य गटांतील सदस्य आहेत. त्यामुळें त्यांचा आवाज परिणामकारक होऊं शकत नाहीं. पंचांग जाणणाऱ्या लोकांकडून रविउदय व रविअस्ताच्या बदलणाऱ्या वेळां आपण लेखी म्यु.स पुरविण्यास तयार आहोत, त्याचप्रमाणें इलेक्ट्रिक कंपनीस कळवून दिवे चालू ठेवण्याची व्यवस्था करावी अशी त्यांनीं विनन्ति केली आहे.

अविचारपूर्वक ठरवलेली वेळ

मला आपल्या निदर्शनास पुढील गोष्ट आणावयाची आहे. शहरांतून हे जे दिवे लावले जातात त्यांची वेळ विचारपूर्वक ठरविलेली नाहीं. बारा महिने

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एका ठराविक वेळींच दिवे लावले जातात व मालविले जातात. त्यावेळीं रस्त्यावर उजेड आहे कीं अंधार आहे याचा विचारच लक्षांत घेतला जात नाहीं.

सरकारी कचेऱ्यांत सायंकाळीं दिवे

सरकारी कचेऱ्या ठराविक वेळीं बाराहि महिने सुरूं होतात व बंद होतात. उन्हाळा, हिंवाळा, पावसाळयांत त्यांच्या वेळांत बदल होत नाहीं. तथापि कचेऱ्यांतून जेव्हां अंधार पडतो त्यावेळीं दिवे लावले जातात. उजेड असेल त्यावेळीं दिवे लावीत नाहींत. रविउदय व रविअस्त यांच्या वेळा बदलत असल्यामुळें अंधाऱ्या संध्याकाळीं दिवे लावण्याची वेळ सर्वत्र येते. त्याचप्रमाणें नगरपालिकांनीं रस्त्यावर लावावयाचे दिवे हे सूर्यास्त व सूर्योदयाच्या वेळा पाहूनच लावावेत हें जनहिताच्या दृष्टीनें योग्य होईल.

देवींचे दर्शनाचे वेळीं रस्त्यांत अंधार

आश्विन महिन्यांत अनेक स्त्री-पुरुष पहांटे गांवाबाहेर देवीच्या दर्शनास जातात. त्यावेळीं नेमकें म्युनिसिपाटीचे दिवे जातात. असा आमचा नगर व नाशिक येथील गेल्या कित्येक वर्षांचा अनुभव आहे. हिंवाळयांत अनेक मंडळी पहांटे फिरावयास, पळावयास जातात. म्यु. सभासदांना हा प्रश्न कसा महत्वाचा वाटत नाहीं याचेंच आश्चर्य वाटतें.

अंधारांत संडास-सफाई

इतर सर्व प्रश्न जरी बाजूस सारले तरी ज्या मुख्य कामासाठीं नगरपालिका-संस्था ही अस्तित्वांत आली व दृढमूल झाली, तें संडास-सफाई, गटार व रस्ते-सफाईचें काम अत्यंत अंधारांत चालतें. त्यामुळें स्वच्छतेचें कार्य नीट होत नाहीं व तें जनतेच्या अनारोग्याला सतत १२ महिने कारणीभूत होत असतें. रोगराईपासून जनतेला वाचवावयाचें असेल तर हें स्वच्छतेचें काम उजेडांत झालें पाहिजे व त्यासाठीं सूर्योदयापर्यंत दिवे लावणें हें नगरपालिकांचें अत्यंत जबाबदारीचें कर्तव्य आहे.

पहाटे उठण्याची संवय जाते

सकाळीं सर्वत्र अंधार पडत असल्यामुळें जनतेंत प्रातःकाळीं उठून व्यायाम, अभ्यास करण्याची प्रवृत्ति होत नाहीं. लोक आळसानें झोंपून राहतात. जर सकाळीं ५॥ च्या पुढें दिवे चालूं राहतील तर जनतेंत पहांटे उठून लौकर कामास लागण्याची प्रवृत्ति खात्रीनें वाढेल.

पहाटेंच चोऱ्या होतात

गांवांत ज्या चोऱ्या होतात त्या सकाळीं ५॥ ला दिवे विझल्यानंतरच होतात, असा अनेकांचा अनुभव आहे. उजेडामुळें दुरून पहारा ठेवणें पोलिसांना व गुरखा लोकांना शक्य असते. अंधार पडल्यानंतर हा पहारा लंगडा पडतो. झालेल्या अनेक चोऱ्यांचा काल पहाटेचा होता हें पुराव्यानिशीं दाखविणें शक्य आहे.

सबब स्थानिक स्वराज्य मंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांना पुनश्च विनंति कीं, त्यांनीं या प्रश्नांत लक्ष घालावें व जनतेचें या प्रश्नाचे बाबत समाधान होईल अशी व्यवस्था करावी. आपला नम्र

वैद्य बिंदुमाधव पंडित, नाशिक.

कल्याण येथें

नवीन विक्री केंद्र

कळविण्यास आनंद वाटतो कीं अनेक ग्राहकांच्या आग्रहावरून आयुर्वेद सेवा संघ नाशिक या संस्थेचीं सर्व अनुभवी व गुणकारी औषधें कल्याण येथें मिळण्याची सोय आम्हीं केली आहे, तरी ग्राहकांनीं याचा लाभ अवश्य घ्यावा व एकवेळ या विक्रीकेंद्रास भेट द्यावी.

उषा औषधी एजन्सी

राममारुती चौक, गोखले वाडा,
सिद्धेश्वर आळी, कल्याण (सेंट्रल रेल्वे)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैद्य सभा नागपूर तर्फे स्वास्थ्यमंत्री यांचा सन्मान

श्री. कन्नमवारजींचें उद्बोधक भाषण

नागपूर येथें २ ऑगस्ट रोजीं सायंकाळीं ४ वाजतां, नगर वैद्यसभा नागपूर तर्फे स्वास्थ्यमंत्री श्री. कन्नमवार यांचा सन्मान करण्यांत आला. निरनिराळया संस्थांतर्फे श्री. कन्नमवारजी यांना पुष्पमाला अर्पण करण्यांत आल्या. नंतर नगर वैद्य सभेचे मंत्री श्री. ... यांनीं नगर वैद्य सभेच्या स्थापनेची भूमिका व आयुर्वेदाच्या सर्व उपस्थित सदस्यांचा परिचय करून दिला. आयुर्वेदाकडे सरकारची उपेक्षा व सरकारचें कर्तव्य याकडे लक्ष वेधलें. विशेषतः सरकारनें आयुर्वेदिक खातें ॲलोपॅथीपासून स्वतंत्र करून त्याचा आयुर्वेदतज्ञ अशा स्वतंत्र अधिकाऱ्यांकडे हें दिलें जावें अशी मागणी केली. त्यानंतर श्री. शिवलाल छांगाणी यांनीं श्री. कन्नमवारजी स्वास्थ्यमन्त्री झाल्यापासून आयुर्वेदासंबंधीं त्यांनीं केलेल्या कार्याची माहिती सांगितली. प्रान्तांत ५०० आयुर्वेदीय दवाखाने काढले. वैद्याचा पगार ४० वा ८० व ... महागाई भत्ता केला. रायपूर स्कूलचें कॉलेजमध्यें रुपांतर करण्यांत आलें. व त्याकरितां २३ लाख ... हजार रुपये मंजूर करण्यांत आले.

मिश्रशिक्षणपद्धति सदोष आहे

श्री. गुलराज शर्मा, अध्यक्ष नगर वैद्य सभा, आपल्या भाषणांत म्हणाले, सध्यांची मिश्र शिक्षणपद्धति सदोष असून त्यांत आमूलाग्र सुधारणा व्हावयास पाहिजे. ते पुढे म्हणाले:-इंग्रजांनीं जबरदस्तीनें आपल्या देशावर ॲलोपॅथीची चिकित्सा-पद्धति लादली. पण आतां देश स्वतंत्र झाला असल्यामुळें आयुर्वेदाला राष्ट्रीय चिकित्सा-पद्धति म्हणून स्थान दिलें पाहिजे. श्री. परांडे वैद्य यांनीं स्वास्थ्यरक्षण मुख्यतः ... पाहिजें हें सांगितलें.

सरकारांत विरोध उरला नाहीं

यानंतर श्री. कन्नमवारजी आपल्या भाषणांत म्हणाले कीं, सरकारनें प्रांतांत आयुर्वेदिक दवाखान्याची संख्या पुष्कळ वाढविली असून आणखीहि नविन दवाखाने काढणार आहेत. आज ॲलोपॅथिक दवाखान्याची संख्या ४०० आहे तर आयुर्वेदिक ५०० दवाखाने आहेत. पुढें ते म्हणाले कीं, आयुर्वेदाच्या मान्यतेसंबंधीं आतां सरकारांत विरोध उरला नाहीं. नवीन गोष्टी सुरूं होण्यांत विलंब लागण्याचा संभव आहे. आयुर्वेदाच्या शिक्षणाचें स्टॅंडर्ड वाढविण्याचे प्रयत्न सुरूं आहेत. रायपूरला कॉलेज करण्यांत येत असून त्याकरितां २३ लाख रुपये मंजूर झाले आहेत. उमरावतीच्या आयुर्वेद विद्यालयाला सरकारी मान्यता दिली असून आर्थिक साहाय्यहि सरकार देण्याचा विचार करीत आहे.

संघटना मजबूत व प्रांतव्यापी करावी

प्रत्येक जिल्ह्यांत जरी आयुर्वेद विद्यालय निघालें तरी सरकार त्यांना साहाय्य करण्यास तयार आहे. दोषरहित आयुर्वेदाचा एक अभ्यासक्रम तयार करण्याचें काम आयुर्वेदिक बोर्डाकडे सोपविलें आहे. नगर वैद्य सभा स्थापन झाल्याबद्दल आनंद व्यक्त करतांना ते म्हणाले, सभेच्या कार्यकर्त्यांनीं आपली संघटना वाढवून ती प्रांतव्यापी करावी. वैद्यांची मजबूत संघटना करून सरकारला आपल्या सूचना वेळोवेळीं पाठविण्यास सरकारहि आपल्या पुढल्या पंचवार्षिक योजनेंत आयुर्वेदाकरितां चांगली भरीव रकम मंजूर करील.

वैद्यांना समान अधिकार

त्यानंतर श्री. ज्योतिर्मयजी यांनीं मजूर विमा योजनेमध्यें वैद्यांना डॉक्टरांइतकाच अधिकार देण्यांत यावा असें सुचविलें. स्वास्थ्यमंत्री श्री. कन्नमवार यांनीं याबद्दल विचार करण्याचें आश्वासन दिलें.

त्यानंतर सभेचे अध्यक्ष श्री. गोवर्धन शर्मा छांगाणी यांनीं, केंद्रीय स्वास्थ्यमंत्री 'राजकुमारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अमृतकुंवरच्या आयुर्वेद विरोधी नीतीबद्दल दुःख व्यक्त करून वैद्यांच्या संगटनेची आवश्यकता प्रकट केली. वैद्यांनीं आपसांतील वैमनस्य विसरून मजबूत संघटना केल्यास सरकारलाहि त्यांच्या मागण्यांचा विचार करावाच लागेल. त्यानंतर नगर सभेचे मंत्री वझे यांनीं स्वास्थ्य मंत्री श्री. कन्नमवारजी यांनीं येथें येऊन उद्बोधक भाषण करून आयुर्वेदासंबंधींच्या मागण्याबद्दल आश्वासन दिलें त्याबद्दल व नगर वैद्य-सभेची संघटना प्रांतव्यापी करण्याबद्दल जी सूचना केली त्याबद्दल नगर वैद्य सभेतर्फे त्यांचे आभार मानले.

नोबेल बक्षिस आणि कुष्ठकार्य

कुष्ठकार्याकरितां आजपर्यंत नोबेल प्राइझ देण्यांत आलें किंवा नाहीं याची नक्की माहिती नाहीं. परन्तु ज्याला नोबेल बक्षिस मिळालें आहे त्यापैकीं एकानें त्याचा विनियोग कुष्ठकार्याकरितां केला आहे हें वृत्त जो जो वाचक वाचील त्याचें अंतःकरण उचंबळून आल्याशिवाय राहणार नाहीं. डॉ. अल्बर्ट स्विट्झर यांना गतवर्षी नोबेल प्राइझ मिळालें आहे. त्याचा उपयोग ते लँबरीन परगण्यांत एक कुष्ठग्राम वसविण्याचे कामीं करीत आहेत.

येथें कुष्ठग्राम वसविणें हें अतिशय कठीण काम आहे. प्रथम एक टेंकडी खणून ती जमिनीसपाट करणें जरूर आहे. कारण कीं, ह्याच जागेवर रुग्णालयाची इमारत बांधावयाची आहे. मला नोबेल प्राइझ मिळाल्यानें मी ह्या योजनेकरितां पत्रे, लोखंडी सामान, सिमेन्ट व इमारती लाकूड विकत घेऊं शकलो हें मी माझें महत् भाग्यच समजतो.

आपल्या भारतदेशांतहि लक्ष्मीपति व तज्ञ संयोजक यांची कांहीं उणीव नाहीं. तरी असे धनवन्त व तज्ञ आपल्या धनाचा व विद्वत्तेचा उपयोग अशा उपेक्षित व निराधार कुष्ठरोग्यांचे दुःख कमी करण्यांत व त्यांना शक्य तें साहाय्य देण्यांत करतील कां ?

कुष्ठनिवारण विचार समिति

भारत सरकारनें डॉ. बी. सी. रॉय यांच्या अध्यक्षतेखालीं कुष्ठरोग निवारणाच्या प्रश्नावर विचार करण्याकरितां व त्याबाबतींत सरकारला सल्लामसलत देऊन मार्गदर्शन करण्याकरितां पांच सदस्यांची एक सल्लागार समिति नेमली आहे. जरी ही गोष्ट उशी-रानें होत असली तरी देखील सरकार त्याबाबत धन्य-वादास पात्र आहे. वरील समितीच्या रिपोर्टाची आम्ही आतुरतेनें वाट पाहात आहोत, कारण कीं, त्यायोगे सरकारला तसेंच कुष्ठकार्यकर्त्यांना भरीव कार्य कर-ण्यास प्रोत्साहन मिळेल.

कुष्ठकार्य व मंत्रिपद

कुष्ठकार्य सोडून मंत्री झाल्याचींहि कांहीं उदाहरणें आमच्या दप्तरीं आहेत, व त्यांचा गौरवहि त्यावेळीं केला गेला. परन्तु याच्या उलट एखाद्या मंत्र्यानें मंत्रिपद सोडून कुष्ठसेवा करण्याचा जर निश्चय केला तर तें त्यागकार्य किती उठावदार दिसेल! कुष्ठकार्याला त्यागाचीं उदाहरणें आणि प्रत्यक्ष जीवन-दान ह्या गोष्टींनीं जी प्रेरणा मिळेल ती दुसऱ्या कोण-त्याहि गोष्टींनीं मिळणार नाहीं. अशी आशा व अपेक्षा आम्ही केल्यास ती अवाजवी होईल कां?

संस्थांनीं उत्तेजन देऊ नये

कांहीं दुरुस्त झालेले कुष्ठरोगी रोगसंभव अस-लेल्या माणसाबरोबर विवाह करतात, किंवा कांहीं संक्रामक रोगी प्राथमिक शाळेतील लहान मुलांबरोबर एकत्र खेळतात व प्रसंगविशेषीं खानपानहि करतात, अशा गोष्टी घडूं देणें हा व्यक्तिगत जबाबदारीचा प्रश्न आहे. परन्तु शास्त्रीय पद्धतीनुसार कार्य करणाऱ्या संस्थांनीं अशा गोष्टींना संमति अगर उत्तेजन केव्हांहि देऊं नये. हें मुद्दाम स्वतंत्र रीत्या सांगण्याची आव-श्यकता वाटत नाहीं. कारण कीं, शास्त्रशुद्ध व्यवहार करण्याचा आग्रह जर कुष्ठसंस्था न करतील तर त्यांचें मार्गदर्शन समाजांत दुसरें कोण करील? -कुष्ठपत्रिका

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रमणिका

...दोन्नति के विषयमें दुर्नीति	१५५
...अध्यापक चर्चा परिषद, नासिक	१५६
...ध-चिकित्सेतील विरेचनाचें महत्व	१५७
...माहिती पाहिजे	१५९
...गुरुषा करूनच 'राजरत्न' झाले	१६०
...वर बालमूत्राचा उपयोग	१६१
...येथें महारोगनिवारण केन्द्र	१६३
...सेवा संघाचें धर्मार्थ चिकित्सालय	१६४
...र्ते रोगोत्पत्ति हा आयुर्वेदीय दृष्टिकोन नाहीं.	१६५
...यांचें सामुदायिक निवेदन	१७०
...रांसाठीं आरोग्य विमा योजना	१७१
...ऊ औषधाविरुद्ध मोहिम	१७५
दोन हजार वर्षांपूर्वींची चिकित्सकाची फी	१७६
संग्रहणीवर दहिवडे	१७७
मुडदुसावर मंत्र-तंत्र	१७९
लेप्रसी मिशनचा अहवाल	१७९
पहाटे दिवे लावा	१८१
श्री. कन्नमवारजींचें उद्बोधक भाषण	१८३
नोबेल बक्षिस आणि कुष्ठकार्य	१८४

चांगला अनुभव आला

आयुर्वेद सेवा संघाच्या कंदर्पवृष्य--वटींचा व कंदर्पवृष्यपाकाचा अनुभव चांगला आला हें कळविण्यास आनंद वाटतो. किंमत ही त्या मानानें स्वस्थ आहे. —वैद्य

जनपद दवाखाना, पथ्रोट, अमरावती

आयुर्वेद सेवा संघानें तयार केलेलें नवें गुणकारी औषध

भल्लातकासव

भल्लातकासव हें बिब्याचें आसव आहे. बिब्बा हा वातप्रकृति व वात-कफ-प्रकृतीच्या माणसांना विशेष मानवतो. ज्यांना ज्यांना जुनाट वाताचे अगर वातकफदोषाचे रोग त्रास देत असतील, त्यांनीं भल्लातकासव अवश्य घ्यावें.

पावसाळा जड जातो त्यांनीं भल्लातकासव घ्यावें

अनेक लोकांना पावसाळा जड जातो. भूक लागत नाहीं. पोट डब्ब राहाते. वात सरत नाहीं. संध्याकाळीं जेवावेसें वाटत नाहीं. तोंडास पाणी सुटतें. या प्रकारच्या लोकांना भल्लातकासव मानवण्याची जास्त शक्यता आहे.

चांगले मुरलेलें भल्लातकासव

आयुर्वेद सेवा संघाने गेल्या वर्षीच्या उन्हाळ्यांत हें भल्लातकासव तयार केलें असून आतां तें पूर्ण तयार झालेलें आहे. आसवें अरिष्टें ताज्या पेक्षांहि मुरलेली चांगला गुण देतात असा अनुभव आहे. वातकफात्मक अतिसार, आमांश, ग्रहणी या विकारांवर भल्लातकासव रामबाण औषध आहे.

किंमत १ शेर, ५ रु.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या संस्थेची योग्यता

" वैद्य * * * व त्यांची सहकारी मंडळी यांनीं चालविलेली 'आयुर्वेद सेवा संघ' ही संस्था पाहून फार आनंद वाटला.

शिक्षण-संस्था म्हणून चालविलेल्या ह्या कार्याचा, समाजाला विशेष उपयोग होईल, यांत शंका नाहींच.

सुशिक्षित वर्गानें, या संस्थेची विशेष आस्थेनें माहिती मिळविली पाहिजे, इतकी योग्यता येथें दिसून आली. "

१४-८-५४ नासिक } (आचार्य) स. ज. भागवत (पुणें)

भल्लातकासवासंबंधीं अनुभव

मीं भल्लातकासव एका ४॥ वर्षाचे मुलांस ज्याच्या पोटांत कळ मारून दिवसांतून अनेकवेळा शौचास होते व ज्यावेळीं तें शौचास जाईल त्यावेळीं त्याचें ढुंगण (आंतला भाग) बाहेर येत असे, त्याला दिलें.

१ चमचा भल्लातकासव व अर्धा ते पाऊण कप पाणी याप्रमाणें तें ७ दिवस दिलें. रोज दोन वेळ (सकाळीं व सायंकाळीं) तें दिलें.

या औषधाच्या प्रयोगानें १४ मात्रेंत त्या मुलाची हगवण व ढुंगण बाहेर पडण्याचें थांबलें. "

कान्हूर (अहमदनगर) १९-८-५४ } वैद्य सय्यद अजमोद्दिन इस्माइलभाई

संपादक व प्रकाशकः—वैद्य विंदुमाधव पंडित आयुर्वेद सेवा संघ, वैद्य चिवलकर कारंजा, नाशिक
मुद्रकः—श्री. चिं. ओक, एकल प्रेस, आग्राराड, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

गुरुकुल पत्रिका
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. १ अंकाची किंमत ४ आणे

वर्ष ८ वें) नासिक, ता. १६ सप्टेंबर १९५४ (अंक ६ वा

स्वामी कुवलयानंदजींच्या कार्यांचा सत्कार

जनतेनें ५२ हजार रुपयांचा निधि अर्पण केला

स्वामी कुवलयानंद

लोणावळें व मुंबई येथें योगशास्त्रानुसार आसनें, शोधनक्रिया इत्यादींचा अभ्यासपूर्वक प्रचार करणारे गुरुवर्य स्वामी कुवलयानंदजी (पूर्वाश्रमीचे श्री. ज. ग. गुणे, बी. ए.) यांच्या वयाला ७ सप्टेंबर रोजीं ७१ वर्षें पूर्ण झालीं. १९१० सालीं ते पदवीधर झाले. तेव्हांपासून आजपर्यंत सतत ४४ वर्षें त्यांनीं निःस्वार्थ बुद्धीनें शास्त्रसेवेंत घालविलीं. आजहि ते सेवानिवृत्त झालेले नाहींत. पूर्वींच्याच जोमानें त्यांचें कार्य अखंड चालू आहे. आयुर्वेदशास्त्राविषयींहि त्यांना आत्मीयता आहे.

योगमहाविद्यालयासाठीं सत्कार-निधि

स्वामीजींनीं आजवर अपरिग्रहवृत्तीनें केलेल्या कार्यांचा गौरव ...न त्यांच्या चालू कार्यासाठीं धन अर्पण करावें या बुद्धीनें एक सत्कार समिति गतवर्षीं मुंबईस ...न करण्यांत आली होती. तिला देशांत सर्वत्र पाठिंबा मिळाला व निधीहि गोळा झाला. गेल्या ...र ता. १२ रोजीं सायंकाळीं ५॥ वाजतां मुंबईस सुंदराबाई हॉलमध्यें हा सत्कार समारंभ सर ...पी. रामस्वामी अय्यर (उपगुरु, बनारस हिंदु विद्यापीठ) यांच्या अध्यक्षतेखालीं अत्यंत उत्सा... ...पार पडला. त्यावेळीं ५२ हजार रुपयांचा निधि त्यांना अर्पण करण्यांत आला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वतंत्र सेवा कार्याचा एक उत्कृष्ट नमुना

एक बुद्धिमान् पण निर्धन व्यक्ति, तत्वनिष्ठेनें व निःस्वार्थ वृत्तीनें प्रेरित होऊन सतत कार्य-प्रवण राहिली तर ती किती श्रेष्ठ दर्जाचें कार्य समाजांत निर्माण करूं शकते, याचा स्वामीजी हा एक उत्कृष्ट नमुना आहे. त्यांच्या समग्र कार्याची माहिती पत्रिकेच्या वाचकांना पुढें स्वतंत्रपणें देण्यांत येईल. आज या सत्कार समारंभाच्या निमित्तानें आम्ही आयुर्वेद सेवा संघाचे सदस्य स्वामिजींच्या कार्याचें अभीष्ट चिंतन करीत आहोंत. योग व आयुर्वेद ही भारतीय संस्कृतीचीं प्रतीक शास्त्रे स्वातंत्र्याच्या या काळांत उत्कर्ष पावतील व अखिल विश्वाचें लक्ष भारतीय तत्वज्ञानाकडे आकर्षित करतील अशी आमची दृढ श्रद्धा आहे.

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद, नासिक

कांहीं अधिक माहिती

दि. ११ ऑक्टोबर १९५४ रोजीं या परिषदेस सुरवात होईल. परिषद एकूण आठ दिवस चालेल. चर्चेकरितां पुढीलप्रमाणें विषय व त्यांचे दिवस ठरविण्यांत आले आहेत.

दि. ११ व १२

या दोन दिवशीं 'आयुर्वेदीय-शारीर,' त्यांतील संज्ञा, अवयव-निश्चिति, कूटस्थलांचें विवेचन.

दि. १३ व १४

दोषधातुमलविज्ञान यांतील संज्ञानिश्चिति इ.

दि. १५ व १६

द्रव्यगुणविज्ञान यांतील द्रव्यनिश्चिति, पदांच्या व्याख्या, साक्षात् द्रव्यपरिचय. ओल्या वनस्पतींचा परिचय.

दि. १७ व १८

आयुर्वेदीय अध्यापनाची दिशा व अध्यापकांच्या अडचणी, तसेंच आयुर्वेदानुषंगिक इतर विषयांची चर्चा.

त्या त्या विषयांच्या अध्यापकांना फार दिवस न मोडतां, स्वतःच्या विषयांच्या चर्चेकरितां उपस्थित राहून भाग घेतां यावा म्हणून वरील सुटसुटीत योजना आखण्यांत आली आहे.

तो तो विषय कसा शिकविण्यांत यावा, या विषयांच्या (अध्यापनविषयक) मार्गदर्शनाची व्यवस्था करण्याचे ठरवित आहोत.

वर्गणी

श्रोता अगर चर्चेंत भाग घेणारा याकरितां प्रत्येकीं कमीत कमी दहा रुपये वर्गणी ठेवण्यांत आली आहे. परिषदेतील चर्चेची अविकृत टाचणें करून छापून ती प्रसिद्ध करण्यांत येणार आहेत. त्याच्या खर्चासाठीं आगाऊ तरतूद म्हणून वर्गणी ठेवण्यांत आली आहे. परिषदेसाठींहि खर्च लागणार आहेच. (रहाण्याची, स्नानाची, जेवणाची व इतर सोय ज्याची त्यानें करून घ्यावयाची आहे. येथील खाणावळींत या सोयी उपलब्ध होऊं शकतील, अशी व्यवस्था करण्यांत येईल.) वर्गणींत सूट मिळेल.

वेळ

चर्चेची वेळः- पहांटे ६ ते ९ पर्यंत
दुपारीं ३ ते ६ पर्यंत
ठेवण्यांत आली आहे.

या परिषदेस कोणी यावें ?

१) शुद्ध आयुर्वेद-विद्यालयातील अध्यापक

(पान नंबर २१५ वर पहा)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदिक व युनानी बोर्डांची सभा

'वैद्याकडून पुनर्नोंदणी फी घेऊं नये' ठराव अध्यक्ष डॉ. योध यांनीं फेटाळला.

शुक्रवार दि. १० सप्टेंबर १९५४ रोजीं दुपारीं १२॥ वाजतां बोर्डांची सर्वसाधारण सभा, ...बोर्डाच्या कार्यालयांत, डॉ. योध यांच्या अध्यक्षतेखालीं झाली. मागील सभेच्या वृत्तान्तास मान्यता देण्यांत आल्यावर सन १९५३-५४ ...च्या जमाखर्चास सभेनें मान्यता दिली.

३४ हजारांचा वार्षिक खर्च

एकूण वार्षिक खर्च जवळजवळ ३४ हजारांचा असून, पैकीं १७॥ हजार रुपये रजिस्ट्रार व इतर नोकरवर्ग यांचेकरितां खर्च झाला आहे. रजिस्ट्रेशन ...नलकरितां या खर्चांत जवळजवळ दहा हजार ...चे खर्च पडले आहेत. जमेकडील बाजूंत रजिस्ट्रेशन, तसेंच रिन्युअल फी मिळून साडेबासष्टशें रु. ...बोर्डांच्या ठेवींवरील व्याजाचे दोन हजार रुपये आहेत. बोर्डाची शिल्लक १।४।१९५३ ला ...लक्ष पांचहजारांची होती. ३१-३-१९५४ ला ...शिल्लक साडेएक्यांशी हजारांवर आलेली आहे.

पुढील वर्षी २५ हजार रु. खर्चाचा अन्दाज

सन १९५५-५६ सालाकरितां नवीन अंदाजपत्रक बहुमतानें मंजूर करण्यांत आलें असून, रु. ...वीस हजार नउशें वीसचा खर्च व चार हजार सातशें ...सची जमा धरण्यांत आली आहे. या अंदाजपत्रकाप्रमाणें खर्च झाल्यास बोर्डाच्या शिल्लकेंत आणखी वीस हजाराची घट पडणार.

हिंदीच्या परीक्षा आवश्यक

या अंदाजपत्रकाच्या चर्चेच्या वेळीं बोर्डांत काम करणारे कारकून व रजिस्ट्रार यांनीं पुढील तीन वर्षांत हिन्दीच्या परीक्षा पास होणें, बोर्डाचें कामकाज क्रमानें हिन्दींतून होण्याचे दृष्टीनें आवश्यक असल्याचे वैद्य वि. म. गोगटे यांनीं मांडलें. ही सूचना सर्वानुमतें मंजूर करण्यांत आली.

कार्यालयाचें असमाधानकारक काम

या अंदाजपत्रकांत बोर्डाचें कामकाज समाधानकारक नसल्याकारणानें रुपये पंचवीसची कपात सुचवणारा वैद्य प्रतापकुमार यांचा ठराव मतास टाकण्यांत आला. निवडून दिलेल्या ६ प्रतिनिधी-खेरीज बाकीच्या सर्वांनीं यावर विरुद्ध मतें दिलीं.

अध्यक्षांचा पक्षपात

पुढील वर्षाकरितां नवीन कार्यकारी मंडळाची निवडणूक करण्यांत आली. त्यांत (१) वै. बारोट ९मतें (२)वैद्य आपटे ८मतें (३)वै. नेरवी ८मतें (४)वै. एन. व्ही. जोशी ८मतें(५)वै. बाक्रे ८मतें (६)हकीम मिर्झा हैदर बेग ७मतें व हिंमतलाल मुनि ७मतें अशीं मतें पडलीं. हकीम व वै. मुनि यांना सारखींच मतें पडल्यामुळें अध्यक्षांनीं आपलें जादा मत अर्थातच हकीम मिर्झा हैदर बेग यांना दिलें.

डॉ. अटलॅराय चें नांव काढलें

जाहिरातप्रसिद्ध डॉ. अटलराय यांनीं वैद्यकीय नीतिनियमांचा भंग केल्याबाबत त्यांच्यावरील आरोपाची चौकशी झाली. डॉ. अटलराय यांनीं समक्ष उपस्थित राहून आपलें म्हणणें बोर्डापुढें मांडलें. एक तटस्थ, बाकी सर्वांच्या मतानें डॉ. अटलराय यांनीं वैद्यकीय नीतिनियमांचा भंग केला आहे असें ठरून त्यांचें नांव लिस्टमधून कमी करण्यास रजिस्ट्रार यांना ठरावान्वयें आदेश देण्यांत आला आहे.

वैद्यांच्या जाहीर सत्कारावर बंधनें

वै. प्रताकुमार यांनीं पाठविलेल्या ठरावांपैकीं वैद्यांनीं स्वतःचा जाहीर सत्कार करून घेण्याबाबत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोणतीं बंधनें पाळावींत याबाबतचा ठराव योग्य्या फरकानें मान्य करण्यांत आला.

वैद्यांनीं वैद्यांना औषधें विकावींत

वैद्यांनीं करावयाच्या औषधविक्रीबाबतचा ठराव मागें घेण्यांत आला. तथापि वैद्यानें वैद्याला औषधी विकत देण्यास हरकत नसावी असें चर्चेंत निष्पन्न झालें.

नीतिनियमांवर ६ व्याख्यानें

वैद्य व हकीम यांना वैद्यकीय नीतिनियमांचें पुरेसें ज्ञान होण्याच्या दृष्टीनें त्यांच्या अभ्यासक्रमांतच या विषयाचीं सहा व्याख्यानें ठेवावींत. व त्यांचे-करितां चालविल्या जाणाऱ्या रिफ्रेशर कोर्समध्यें तीन व्याख्यानें समाविष्ट करण्याची फॅकल्टी व शुद्ध आयुर्वेद समिति यांना विनंति करण्याचा ठराव मंजूर करण्यांत आला.

नियमांतील सुधारणांसाठीं शिष्टमंडळ

बी. एम्. पी. रूल्समध्यें आवश्यक त्या सुधारणा सुचविण्यासाठीं नेमलेल्या समितीनें शिफारसलेल्या कांहीं सूचना अद्याप सरकार-संमत झाल्या नाहींत; त्यावर फेरविचार करण्याकरितां सरकारला विनंति करण्यांत आली व आवश्यक वाटल्यास त्याच समितीचें शिष्टमंडळ सरकारकडे पाठविण्याचें ठरलें.

यंदा रिन्युअल फी नको

१९५४ व १९५५ सालीं रजिस्टर्ड व एन्‌लिस्टेड वैद्याकडून रिन्युअल फी घेण्यांत येऊं नये हा वैद्यांनीं निवडून दिलेल्या प्रतिनिधींचा ठराव अध्यक्षांनीं नियमबाह्य ठरवून फेटाळून लावला !

बोर्डाला विस्तृत जागा हवी

बोर्डाच्या कार्यालयाची सध्यांची जागा अपुरी असल्याकारणानें सरकारनें दुसरी योग्य जागा बोर्डा-करितां मिळवून द्यावी, अशी सरकारला विनंति करणारा ठराव सर्वानुमतें मंजूर झाला.

अध्यक्षावरील अविश्वासाचा ठराव

शेवटचा महत्वाचा ठराव म्हणजे डॉ. योध यांचेवरील अविश्वासाचा ! सदर ठरावाचे वेळीं डॉ. योध यांनीं मागीलप्रमाणेंच वैद्य बाक्रे यांना अध्यक्ष-पदीं बसण्यास सुचविलें. परन्तु अशा घटनेच्या वेळीं डॉ. योध यांनीं स्वतःचा प्रतिनिधि तेथें अध्यक्ष म्हणून नियोजणें म्हणजे स्वतः डॉ. योधच त्या ठिकाणीं अध्यक्ष म्हणून हजर राहाण्यासारखें होत असल्यानें व लोकशाहींत सर्व उपस्थित सभासदांना निःपक्षपाती अध्यक्ष अशा वेळीं निवडून घेणें योग्य वाटत असल्या-कारणानें लोकनियुक्त प्रतिनिधींनीं सभात्याग केला. अर्थातच गणसंख्येच्या अभावीं ती सभा पुढें तहकूब करावी लागली.

वैद्य वेणीमाधवशास्त्री, वैद्य प्रतापकुमार, वैद्य वि. म. गोगटे, वैद्य हळदीकर यांनीं सर्व चर्चेंत भरपूर भाग घेतला.

लिंगराज कॉलेजमध्यें व्याख्यान

शनिवार दिनांक ४।९।५४ रोजीं सायंकाळीं ४ वाजतां बेळगांव येथील लिंगराज कॉलेजच्या सभा-गृहांत वैद्य जायदे यांचें ' मुखरोग आणि शूलरहित दंतोत्पाटन' या विषयावर व्याख्यान झालें. अध्यक्ष-स्थानीं प्रो. बम्मणवर (Head of the science department) हे होते. प्रथम अध्यक्षांनीं वैद्य जायदे यांचा परिचय करून दिला. त्यानंतर वैद्य जायदे यांनीं दंतरोगाचीं कारणें आणि त्यांचा प्रतिबंध या विषयाची सांगोपांग माहिती सांगितली. तसेंच शूलरहित दंतोत्पाटनासंबंधींहि उद्बोधक विवेचन केलें. श्री. महांबरे (Secretary science, Association) यांनीं सर्वांचे आभार मानले.

आहार व विकार

शुक्रवार ता. १७ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां आंबेडकर कॉलनींतील रेडक्रॉस सोसायटीच्या सभा-गृहांत नासिक रोटरी क्लबतर्फे वैद्य बिंदुमाधव पंडित यांचें आहार व विकार [Diet & Disease] या विषयावर व्याख्यान होणार आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिंदीच्या मुळ्या पौष्टिक आहेत

(लेखकः— आर्यवैद्य श्री. वि. चिटणीस, पो. हलकर्णी, जि. कोल्हापूर,)

दाक्षिण हिंदुस्थानांतील शेंकडो खेड्यांत प्रत्येकीं ...तों शिंदीचीं झाडें असून, अशीं शिंदीचीं वनें ...लेल्या ठिकाणीं हल्लीं सरकारी नीरा केंद्रें चालूं ...त, दारुबंदीपूर्वी या झाडांच्या रसापासून परदेशी ...तेशां शेंकडो पटीनें उत्तम म्हणून विद्वान् वैद्य-...ांनीं ठरविलेली शिंदी नांवाची दारु सर्वत्र ...त, जेथें नीरा केंद्रे नाहींत तेथील शिंदीचीं ...आतां फुकट वायां जात आहेत. सरकारी पर-...नें मक्तेदार शिंदी काढीत, तेव्हां या झाडांच्या ...हि हात लावला जात नसे. हे मक्तेदार गेले व ...साठीं शिंदीचीं पानें तोडण्याचा सर्वत्र सपाटा ...ं आहे.

जनावरांचें दूध आटलें तर

शिंदीच्या पानांच्या चटया,केरसुण्या व बुट्या-...ा करतात. शिंदीचीं फळें खातात, व जनावरांचें ...आटलें तर शिंदीच्या झाडाच्या शेंड्यांतील ...ा भाग देतात. परन्तु, मनुष्यांच्या किंवा ...ांच्या रोगावर या वनस्पतीचा उपयोग होत ...ाचें आमच्या वाचण्यांत किंवा ऐकण्यांतहि ...ं. मात्र, शतावरीच्या मुळांप्रमाणें शिंदीच्याहि ...ांचा पौष्टिक म्हणून उपयोग होईल अशी आमची ...वर्षांची केवळ एक कल्पना होती. शेवटीं डॉ. ...र्णीकृत 'Indian Materia Medica' व डॉ. देसाईकृत औषधीसंग्रह काढून उघडून ...ं या दोघांहि भारतीय वनौषधी-संशोधकांनीं ...ा ग्रंथांत या वनौषधीची माहिती दिल्याचें ...ळें. " The root is good in nervous ...ility and used in toothache " असें ...नाडकर्णी पान ६६२ वर शिंदीचें वर्णन करतात. ...तें देण्याची कृति व प्रमाण त्यांनीं आपल्या ग्रंथांत ...ले नाहीं.

तरी शिंदीचा मुळांचा पौष्टिक व इतर उपयोग कसा करावा याबद्दल वैद्यांनीं आपापले अनुभव आयुर्वेद पत्रिकेंत प्रसिद्ध करावेत.

शिंदीस लॅटिनभाषेंत Phoenix Sylvestris (फोनिक्स सिल्वेस्ट्रिस) संस्कृत-विट्खर्जूर, हिंदी-सेंधी, इंग्रजी- Wild Date Palm, The Date Sugar Palm, अशीं नांवें आहेत.

डॉ. डिमककृत 'The Vegetable Materia Medica of Western India ' (1885) मध्येंहि पान ८०१ वर शिंदीचें वर्णन आहे. त्यावरून बदाम, शिंदीचीं फळें, साखर, Quince Seeds, Pistachio-nuts व Spices यांचें चूर्ण पौष्टिक म्हणून फारच प्रचारांत आहे.

डॉ. वेरिंगकृत ' Pharmacopoeia of India ' (1868 Edition) मध्येंहि शिंदी झाडाबद्दल उल्लेख आहे असें कळतें.

'Indigenous Drugs of India' by Colonel R. N. Chopra; 'Vegetable Drugs of India' by Dr. D. P. Sanyal ' Pharmacopoeia India' by Dr. K. C. Bose वगैरे ग्रंथांत शिंदीचें वर्णन असल्यास तेंहि माहितगार वैद्यांनीं पत्रिकेंत प्रगट करावें, अशी विनंति आहे.

नासिक येथें मेनरोडवर आयुर्वेद सेवा संघाचीं सर्व शास्त्रोक्त पाठाप्रमाणें बनविलेलीं औषधें मिळण्याचें ठिकाणः—

श्री. कृ. वा. फाल्गुने

३६ मेनरोड, नासिक

अनेकांनीं औषधांची मुक्तकंठानें स्तुति केली. आपणहि एकवेळ वापरून अनुभव घ्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दाढसुजेवर उदुंबरसाराचा उपयोग

गेल्या मे महिन्यांत माझ्या खालच्या दोन्ही दाढा ५ दिवस सुजून ठणकत होत्या. यापूर्वी १९४७ सालीं, किडलेली एक दाढ मी दंत-डॉक्टराकडून भरून घेतली होती पण ती पुढें काढूनच टाकावी लागली. किडलेली दाढ सूज असल्यामुळें लवकर भरणें शक्य नव्हतें व पुष्कळ दिवस वेदनाहर औषधें लावूनहि ती दाढ दुखणें थांबलेलें नव्हतें. त्यासाठीं ४ महिने मी दंतडॉक्टरकडे जात होतो.

उदुंबरसाराची माहिती

यावेळीं दाढा सुजल्या, त्यावर मीठ, मध, पुष्यानुगचूर्ण इत्यादि अनेक किरकोळ उपाय प्रथम केले, पण वेदना आटोक्यांत आल्या नाहींत. त्याच वेळीं पत्रिकेंत उदुंबरसाराविषयीं वाचलें होतें, व स्तन, विद्रधीवरील त्याच्या गुणधर्मांची महती ऐकली होती.

विद्रधी समजून उपाय

दाढांच्या खालील हिरड्या सुजणें हाहि एक विद्रधीचाच प्रकार समजून मी त्यावर उदुंबरसाराचा बोळा बसविला. बोळा बसविल्यानंतर एक तासाच्या आंत वेदना थांबल्या. ५ दिवसाचें दुःख इतक्या अल्पावधींत गेलेलें पाहून आश्चर्य वाटलें. त्यानंतर पुनः माझी दाढ दुखली नाहीं.

नाशिक —वैद्य श्या. बॉं. कुलकर्णी

उदुंबरसाराची किंमत

उदुंबरसाराचा वापर वाढावा यासाठी उदुंबरसाराची किंमत कमी करण्यांत आली आहे.

१ तो. १ रु. —आयुर्वेद सेवा संघ, नाशिक

आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारीं

आयुर्वेदिक व युनानी वनौषधि

तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण!

अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक खाका, माणिक, अकीक, सुवर्ण-वर्ख, रौप्य-वर्ख, शिंपा, कवड्या, शंख, प्रवाळ, आवळसार गंधक, दगडीबेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, वाकेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलटकंबल, नागकेशर (अस्सली), ब्राम्ही, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारची वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य! विशेष माहितीसाठीं आमचें साप्ताहिक दरांचें छापील भावपत्रक मागवावें.

टे. फो. नं. ३१७९६ टेलिग्रॅम–'आयुर्वेद'

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रमाचें सर्वत्र स्वागत

म. प्रां. वैद्यमण्डळ मंत्र्यांचें प्रचारकार्य

म. प्रां. वैद्य मंडळाच्या स्थायी कार्यालयाचे ...वै. बिंदुमाधवशास्त्री पंडित हे गणेशोत्सवांतील ...नानिमित्त चाळिसगांव, पाचोरा व औरंगाबाद ...गेले असतां त्यांनीं त्या त्या ठिकाणच्या वैद्य-...ांच्या भेटी घेऊन त्यांच्या समवेत शुद्ध आयुर्वेद ...क्रमाबाबत चर्चा केली व शुद्ध आयुर्वेद विद्या-...ा आर्थिक साहाय्य मिळविलें. तसेंच त्यांना म. ...वैद्य मंडळाचे सभासद करून संघटनेचें महत्व ...दिलें.

चाळिसगांव वैद्य मंडळ

ता. ६ रोजीं दुपारीं ३ वाजतां चाळिसगांव ...बालगजानन मंदिराच्या माडीवर स्थानिक वैद्य ...ंची सभा झाली. या सभेसाठीं वै. शंकरराव ...नानासाहेब गुणे, वैद्य दवे, (रामबाण फार्मसी), ...शि. ज. पंडित आयुर्वेदतीर्थ (अधिकारी वैद्य ...दवाखाना चाळिसगांव) आदि मंडळी उपस्थित ...े, महालक्ष्मीनिमित्तचे पूजा-भोजनादि विशेष ...म असल्यामुळें व त्या दृष्टीनें सभेसाठीं ती वेळ ...ची होती त्यामुळें अधिक मंडळी जमूं शकली ...ंत. जमलेल्या वैद्यांनीं शुद्ध आयुर्वेदीय पाठ्य-...मान्यता देण्यांतील सरकारी उद्देश समजावून ...व शुद्ध आयुर्वेदाचें विद्यालय नाशिक येथे ...झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. जमलेल्या मंडळी-...एकांनीं २५ रु. व दुसऱ्यांनीं १० रु. रोख ...पावत्या घेतल्या. त्यानंतर मंत्र्यांनीं शिवानंद ...चे वैद्य गडकरी, वैद्य चंद्रात्रे व वैद्य देशपांडे ...या घरीं जाऊन विचारविनिमय केला व देणगीची ...सनें मिळविलीं.

म्यु. अध्यक्षांच्या घरीं

चाळिसगांव येथील म्युनिसिपॅलिटीचे अध्यक्ष ...घाटे हे पनवेलच्या वैद्य यशवंतराव पुराणिक आयुर्वेदाविशारद यांचे मेहुणे. वैद्य पुराणिक यांची प्रकृति मधुमेह विकारानें बरी नसल्यामुळें व पनवेलकडे पाऊस विशेष असल्यामुळें ते चाळिसगांवीं येऊन सासुरवाडीस राहिल्याचे समजलें म्हणून मंत्र्यांनीं त्यांची भेट घेऊन त्यांच्या विकाराबाबत चर्चा केली.

स्वस्थस्य स्वास्थ्यरक्षणम्

सायंकाळीं ७ वाजतां लक्ष्मीनारायण मंदिरांत 'स्वस्थस्यस्वास्थ्य रक्षणम्' या विषयावर १॥ तास-पर्यंत व्याख्यान झालें. स्थानिक पुढारी व गणेशो-त्सवाचे अध्यक्ष श्री. जोगळेकर वकील यांनीं श्रीफल देऊन वक्त्यांचे आभार मानले. श्री. जोगळेकर यांनीं नाशिक येथें येऊन संस्थेच्या शुद्ध आयुर्वेद विद्या-लयास भेट देण्याचें आश्वासन दिलें आहे.

रात्रीं मुक्काम वैद्यराज नानासाहेब गुणे यांच्या निवासस्थानीं होता. वैद्य गुणे हे हल्लीं बरेच थकलेले दिसतात; तथापि प्राप्त परिस्थितींत सर्व गोष्टी मनः-पूर्वक झटून करण्याची त्यांची तत्परता वाखाणण्या-जोगी आहे. त्यांनाहि शुद्ध आयुर्वेद अभ्यासक्रमाची उपयुक्तता मान्य असल्याचें संभाषणांत दिसून आलें.

पाचोरा वैद्य मंडळ

ता. ७ रोजीं दुपारीं २॥ वाजतां वै. बिंदुमाधव हे पाचोरें येथें पोंहोचले. तेथें श्रीगजानन मेडिकल अँड जनरल स्टोअर्सचे संचालक तात्यासाहेब पाठक यांच्या घरीं वैद्यमंडळी विचारविनिमयासाठीं जमली. पाचोरा येथील वैद्य एकमतानें वागणारे व चांगले संघटित वृत्तीचे आहेत असें दिसून आलें. याचें श्रेय वृद्ध पण उत्साही वैद्य श्री. बापूसाहेब धर्माधिकारी यांना आहे.

वैद्य मंडळींचीं प्रश्नोत्तरें

शुद्ध आयुर्वेदाचें शिक्षण कशा स्वरूपाचें राहील? उष्णतामापक नळी, उरःपरीक्षण यंत्र, इत्यादि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आधुनिक साधनांचा उपयोग घेण्यास आडकाठी करण्यांत येणार आहे काय ? इत्यादि अनेक प्रश्न विचारले गेले. प्रत्यक्ष शिक्षणाची जोड नसल्यामुळें निखिल भारतीय आयुर्वेद विद्यापीठाचे पदवीधर ज्या-प्रमाणें कांहीं अंशानें आधुनिक कालांत अयशस्वी ठरतात तद्वत्‌च या शुद्ध आयुर्वेदाभ्यासी विद्यार्थ्यांची गत होणार नाहींना? अशी मनांत डोकावणारी शंका स्पष्ट शब्दांत वैद्य धर्माधिकारी यांनीं मांडली. शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रमांत प्रत्यक्ष शिक्षणास प्राधान्य दिलें आहे, आयुर्वेदीय औषधी द्रव्यांचीं इंजेक्शनें देण्यास प्रत्यवाय राहणार नाहीं, आधुनिक साधनें वापरलीं तरी त्यांच्या साहाय्यानें दोषधातुमल-दुष्टीचें अनुमान करण्याचें शिक्षण देण्याचा प्रयत्न या शिक्षणक्रमांत चालू आहे, हें सध्यां चालू असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती देऊन पटवून दिलें. जमलेल्या वैद्यमंडळींत एक आयुर्विद्या-विशारद व कांहीं जुन्या परंपरेनें शिकलेली मंडळी होती. सर्वजण म. प्रां. वैद्य मंडळाचे सभासद ताबड-तोब वर्गणी भरून झाले व सर्वांनीं मिळून पाचोरा तालुका वैद्य मंडळातर्फे शुद्ध आयुर्वेद विद्यालयास आर्थिक साहाय्य देण्याचें आश्वासन दिलें आहे.

एक अलभ्य लाभ

या प्रचारकार्यांतील एक अलभ्य लाभ म्हणजे सुप्रसिद्ध कीर्तनकार वे. शा. सं. मुरलीधरबुवा निजाम-पूरकरांशीं झालेली मनमोकळेपणाची चर्चा. वे.शा.सं. निजामपूरकरबुवा आतां अकोला (वऱ्हाड) येथें घर घेऊन तेथील कायमचे रहिवासी झाले आहेत. तेथील राममंदिराचे ते विश्वस्त आहेत. त्यांचीं कीर्तनें अत्यंत लोकप्रिय होतात. ते लोकांची प्रवृत्ति, आर्यधर्म व आर्यसंस्कृति यांच्याकडे वळेल असा उपदेश कीर्तनांत करीत असतात.

प्राचीन विद्यांचा अभ्यास

" सरकारनें आतां संस्कृत जाणणाऱ्या विद्यार्थ्यां-साठीं शुद्ध आयुर्वेदाचा पाठ्यक्रम सरकारमान्य केला आहे. तेव्हां आपण कीर्तनांतून याविषयीं व आयुर्वेद-शास्त्राच्या श्रेष्ठत्वाविषयीं माहिती सांगत गेल्यास सहजीं प्राचीन विद्येच्या अभ्यासाकडे जनतेचें मन वळेल " ही कल्पना वैद्य बिंदुमाधव पंडित यांनीं बुवांच्या समोर मांडली. बुवांनीं रात्रीं व्याख्यानास उपस्थित राहण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें ते वेळेवर आले. उत्सव-चालकांनीं त्यांना त्या व्याख्यानप्रसंगीं अध्यक्ष केलें.

सनातन धर्मांतील आयुर्वेदीय आचार

' सनातन धर्मांत असलेल्या देवपूजेच्या, सणा-वाराच्या व व्रतवैकल्यांच्या कल्पना यांना आयुर्वेदाचा शास्त्रीय आधार कसा आहे हें वक्त्यांनीं विशद करून सांगितलें. गणेशोत्सव ही शरदृतूची चिकित्सा आहे. बेल, दूर्वा, तुळस या वनस्पति अनुक्रमें वात, पित्त, कफावरील प्रमुख उपचार आहेत. प्रकृतिदोषभेदानुसार सर्व धार्मिक आहारविहाराचा उपयोग समाजांतील व्यक्तींना वेळोवेळीं सुचवीत गेल्यास समाज स्वस्थ, कार्यक्षम व अधिक धार्मिक वृत्तीचा बनण्यास मदतच होईल इ. विवेचन वै. बिंदुमाधव यांनीं अनेक रोग्यांचीं उदाहरणें घेऊन केलें व अध्यक्षांनीं या धर्मशास्त्राचा प्रचार करावा अशी विनंति केली.

अध्यक्ष निजामपुरकरबुवा यांनीं व्याख्या-नाचे शेवटीं भाषण करून तसें आश्वासन दिलें आहे.

व्याख्यानापूर्वी वैद्य बिंदुमाधव पंडित यांनीं कांहीं जुनाट विकाराचे रुग्ण तपासले व त्यावर उप-चार लिहून दिले. या संबंधांत मिळालेलें द्रव्य आयुर्वेद विद्यालयाकडे देणगी म्हणून जमा केलें आहे.

औरंगाबाद येथील प्रचार

पाचोऱ्याहून पठाणकोट एक्सप्रेसनें निघून मनमाड मार्गें वैद्य पंडित सकाळीं औरंगाबाद येथें पोहोंचले. तेथें त्यांनीं गांवांत हिंडून वैद्यमंडळींच्या भेटी घेतल्या. तेथील एक प्रमुख पिढीजात वैद्य नटवरलाल यांच्याशीं सुमारें १ तासभर चर्चा करून ' हैद्राबाद संस्थानांतील आयुर्वेदविषयक नीति ' या संबंधीं माहिती घेतली. ती माहिती धक्का देणारी अशी होती. हैद्राबाद राज्यांत कॉंग्रेस राजवट आल्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

न आयुर्वेदाचे प्रगति ऐवजीं परागतीच मोठ्या णावर चालूं आहे. निजामच्या राजवटींत शहरांतील खेड्यांतील वैद्यांना सरकारी मासिक नक्त नेमणूक ३. कोणाला १०० तर कोणाला ५०-२५ असे मिळत. र्ळे औषधी तयार करणें, गरीबांना मोफत थोपचार करणें इ. गोष्टी सहज शक्य होत त. यांशिवाय ठिकठिकाणीं सरकारी मोफत ताने असत, त्यांचा संपूर्ण खर्च सरकार चालवी. तां खेड्यांत जास्त वैद्यकीय मदत द्यावयाची आहे वहाण्याखालीं शहरांतील व मोठ्या गांवांतील ांच्या आर्थिक मदती बंद केल्या आहेत (व हें आरोग्यमंत्री फुलचंद गांधी यांच्या कारकीर्दींत असें ते म्हणाले) व डॉक्टरी पद्धतीचे दवाखाने त वाढत चालले आहेत. खेड्यांत आयुर्वेदा-वीं ॲलोपॅथीचा प्रसार करणें चालूं आहे. डॉक्टर त नसेल तेथें वैद्य नेमणें हें आयुर्वेदाला प्रोत्साहन हें. हैद्राबाद राज्यांत आयुर्वेदाची संपूर्ण गळचेपी रूं आहे, असें त्यांचें म्हणणें दिसलें.

वैद्य नटवरलालजी यांना नाशिक येथें चालूं केल्या आयुर्वेदीय कार्यांची पूर्ण कल्पना असल्याचें दिसून आलें. त्यांनीं नाशिकच्या शुद्ध आयुर्वेद ालयास २१ रु. ची देणगी व म. प्रां. वैद्य ळाची २ वर्षांची वर्गणी ताबडतोब दिली.

गांवांत एकंदर वैद्यसंख्या कमीच दिसली. श्री. ची परवत टांक यांचे चिरंजीव आयुर्वेदालंकार हेत. श्री. टांक यांना आयुर्वेदाचा संस्कृतनिष्ठ ्याठक्रम सुरूं झाल्याचें ऐकून आनन्द वाटला. ांना एक मुलगा गुरुकुल कांगरीमध्यें ११ वर्षें न मॅट्रिकसमकक्ष तयार झाला आहे. त्याला या ्यासक्रमांत घालण्याचा मनोदय त्यांनीं व्यक्त केला १ रु. देणगी दाखल दिले.

सायंकाळीं ५ वा. आयुर्वेदरत्न वैद्य तोडेवाले ्या अध्यक्षतेखालीं सरस्वतीभवन हायस्कूलच्या ोत्सवांत वैद्य पंडित यांचें १ तास विद्यार्थी व ्यापक यांच्यासमोर भाषण झालें. 'आयुर्वेद हें मागासलेलें शास्त्र आहे. त्याचा टिकाव या काळांत लागणार नाहीं अशी अध्यापकांची समजूत असलेली व्याख्यानापूर्वीच्या संभाषणांत दिसून आली होती. म्हणून आयुर्वेद हें पाश्चात्याच्या जंतु, ग्रंथीअर्क, जीवन-सत्वें, व शस्त्रकर्म यापेक्षांहि अधिक मूळगामी विचार करणारें शास्त्र कसें आहे व त्याचें अध्ययन आजवर कसें झालें व पुढें कसें होईल या संबंधींची कल्पना सविस्तर मांडली.

गौरवपर उद्‌गार

या दौऱ्यांत बऱ्याच जणांच्या तोंडून आयुर्वेद सेवा संघाच्या व महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाच्या चालूं कार्याविषयीं गौरवपर उद्‌गार ऐकूं आले. भल्लातकासव वगैरे नवीन उपयुक्त औषधामुळेंहि आयुर्वेदांत असलेल्या गोष्टी डोळसपणें पाहण्याची आवश्यकता त्यांना पटली असल्याचें दिसून आलें.

. जनतेला वर्तमानपत्रांतील बातम्यावरून योग्य माहिती मिळत नाहीं. गैरसमज पसरलेले राहातात. त्यासाठीं प्रचाराची आवश्यकता फार भासते. मुंबई सरकारनें सरकारमान्य पदवीधर वैद्यांच्या पगाराची अधिकृत श्रेणी ठरविली नसल्यामुळें म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डें व खाजगी संस्था यांतून वैद्य नेमतांना कांहींच निर्बंध रहात नाहीं. त्यांना योग्य पगार दिला जात नाहीं, त्यांत कधींहि वाढ होत नाहीं. त्यामुळें वैद्यांना रजिस्ट्रेशन देऊन आम्ही त्यांचा दर्जा डॉक्टरांच्या बरोबरीचा केला आहे. या सरकारी फुशारकींत कांहीं अर्थ नाहीं अशी भावना मंत्र्यांना सर्वत्र दिसून आली.

'आयुर्वेद सेवा' संघ नाशिकची सर्व
अनुभविक गुणकारी औषधें :—
अमरावती येथें मिळण्याचें ठिकाण
मे. पाटणे बंधु, बडनेरारोड
अमरावती (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार

पोत विधि

पोतविधीचा ग्रामीण व आशिक्षित लोकांमध्यें जितका प्रसार आहे, तितका शहरवासी व सुशिक्षितवर्गामध्यें दिसून येत नाहीं. पोत घेतलेल्या इसमांना विचारलें असतां, " आपण पोतानेंच सुधारलो, वैद्य डॉक्टरांचीं पुष्कळ औषधें झालीं, इंजेक्शनें झालीं, परंतु कांहींएक गुण नाहीं ". असे उद्गार त्यांचेपैकीं बऱ्याच इसमांकडून ऐकूं येतात.

अनेक प्रकार व अनेक अनुभव

पोतीबाबत अनेक इसम, अनेक प्रकार व अनुभव सांगतात. कोणी म्हणतात हळकुंडानें भाजून पोत घेतली तर ती सोंवळी होते. बिब्बा लावून फोड उठवून त्याची पोत केली किंवा विडीनें भाजून पोत घेतली तर ती ओवळी होते. सोवळया पोतीला रजस्वला स्त्रीची सांवली पडली तरी पोतीमधून रक्त वाहूं लागतें त्याला धूप दाखविला म्हणजे रक्त बंद होतें. बिब्बा किंवा विडी यांचे पोतीलासुध्दां रजस्वला स्त्रीच्या सांवलीचा परिणाम होतो, असें कांहीं इसम म्हणतात. तर कांहीं इसम म्हणतात कीं, बिब्बा अगर विडी यानें घेतलेल्या पोतीला रजस्वला स्त्रीपासून कांहीं अपाय होत नाहीं.

शास्त्रोक्त व अनुभविक माहिती हवी

पोतीमध्यें हळकुंड किंवा रुईचे पाळाची गोळी ठेवावी याबाबतहि दुमत ऐकूं येतें. पोतीवर बांधावयाचें पान जांभीचें (काजूच्या झाडाचें) असावें असा विशेष कटाक्ष दिसतो. तर आंबा, काजरा, कापशी अगर कोणतेंहि कोवळें पान चालतें, असेंहि कित्येक लोक म्हणतात. कोणते पदार्थ भक्षण केले असतां पोत चांगली वहाते, त्याबाबतहि मतभिन्नत्व आहे.

पोत जांघेला घ्यावी कीं ढोंपराचे खालीं, बाहेरच्या बाजूनें घ्यावी. कीं आंतल्या बाजूनें घ्यावी या बाबतहि मतैक्य नाहीं.

तरी पोतविधि बाबत शास्त्रोक्त व अनुभविक माहिती पत्रिकेच्या वाचकांकारितां तज्ञांनीं जाहिर करावी. गरजूंना त्यापासून योग्य तो लाभ घेतां येईल.

— वैद्य के. व्ही. देसाई, सांगवे

(आयुर्वेद पत्रिकेच्या मागील एका अंकांत वैद्य म. द. करमरकर (मिरज) यांचा दंभचिकित्सा हा लेख प्रसिद्ध आहे. हें वाचकांना माहित आहेत. संपादक)

लोकमताची प्रतिक्रिया

सरकारतर्फे शुद्ध आयुर्वेदाचे मान्य गुरु म्हणून ज्या याद्या प्रसिद्ध होत आहेत त्या पाहून परिचित लोक, स्थानिक पुढारी व स्थानिक सरकारीअधिकारी आश्चर्यचकित झाले आहेत. " शुद्ध आयुर्वेदाला नमस्कार " असे उद्गार सर्वत्र ऐकूं येत आहेत. शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समिति व सरकार वेळींच आपल्या कार्यपद्धतीत सुधारणा घडवून आणील अशी आशा आहे.

सांडू ब्रदर्सचीं

शास्त्रोक्त तयार औषधें, काढे, आसवें, आरिष्टें, भस्में, मात्रा, रसायनें इ. वैद्यवर्गास चिकित्सेंत फार उपयोगी पडतात.

वैद्यांना तीं घाऊक दरानें विशेष सवलतीनें दिलीं जातात.

पत्रव्यवहाराचा पत्ता:—

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स

चेंबूर लि.

फॅक्टरी व हेड ऑफिस—चेंबूर (मुंबई)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैद्यराज बागेवाडीकर यांच्या
२ लेखांकांचा विचार :

लेखकः—आयुर्वेदाचार्य
पां. ह. देशपांडे, पुणें

आतां, वैद्यराज बागेवाडीकर यांच्या अंतिम दोन लेखांकांचा विचार करावयाचा आहे. दोषवैषम्य, हा प्रत्यक्ष रोग नसून, रोगकारण आहे हें मागें दाखविलेंच आहे. पण वैद्यराज अरुणदत्ताच्या " ततः कार्यकारणयोरभेदेन पठितो रोग इति " या टीकेला प्रमाण धरून " दोषवैषम्य " म्हणजेच रोग असें म्हणतात. आयुर्वेदीय संप्राप्ति-विज्ञानाला हें विरुद्ध आहे, इतकेंच म्हणून मी पुढें जातो.

लेखक

पुनः थोडें सांख्य तत्त्वज्ञान !

याबाबत मागें विवेचन करून वैद्यराज बागेवाडीकर सांख्य व आयुर्वेद यांच्या असमानतेंतहि साम्य दाखविण्याचा कसा प्रयत्न करतात तें दाखविलेंच आहे. या ठिकाणीं त्यांत राहिलेले आणखी कांहीं मुद्दे विचारांत घेणें अवश्य आहे.

वाढदिवस नव्हे क्षीणदिवस !

सदर लेखद्वयांतील पहिल्याचे दुसऱ्या परिच्छेदांत ' शीर्यते इति शरीरं ' ही शरीराची व्याख्या वर्णवितांना, आपलें शरीर सतत क्षीण होत असल्यानें आपण ' वाढदिवस ' म्हणून जो साजरा करतो तो वस्तुतः ' क्षीण दिवस ' आहे असें त्यांनीं म्हटलें आहे ! आणि हें कशासाठीं तर सांख्यांच्या त्रिगुणांच्या साम्यावस्थेंत होणाऱ्या सृष्टीच्या नाशापर्यंतचा टप्पा गांठतां यावा म्हणून ! आम्हां सामान्य मानवांची इतकी दीर्घ दृष्टि असत नाहीं, आणि आमचें वैद्यकहि फार तात्त्विकतेंत न जातां आम्हाला लागूं पडणारा व्यवहारच बोलतें. बाल्य-तारुण्यांत तरी शरीर झिजत नाहीं असें तें म्हणतें. वैद्य बागेवाडीकरांनींहि " शरीर हें गर्भावस्थेपासून तारुण्यावस्थेपर्यंत वृद्धि पावत असतें, नंतर कांहीं काळ स्थिर आहे असें वाटतें " असें स्वतःच म्हटलें आहे. (आ. प. १६।६।५४ पृ. ७८६). आतां " वृद्धावस्थेंत तें क्षीण होतें " हें त्यांचें म्हणणें कांहीं मर्यादेपर्यंत खरें आहे. वाग्भटाच्या " वयस्त्वाषोडशाद्बालं तत्र धात्विन्द्रियौजसाम् । वृद्धि-रासप्ततेर्मध्यं तत्रावृद्धिः परं क्षयः ॥ (अ. हृ. शा. ३।१०५) या श्लोकांतलें हें त्यांचें निवेदन. पण बाल्यांत शरीराची स्पष्ट वाढ आणि तारुण्यांत स्थैर्य असतांना तेव्हांहि शरीर क्षीण होतें असा त्यांचा अर्थ होतो काय ? कां शब्दांचें अर्थ फिरवावयाचे ? तसें पाहिलें तर रोजच मलावोंट शरीर घटतें. पण ती घट धातू-त्पत्तीनें भरून येते. बाल्यांत या घट-वटींत कांहीं शिल्लकहि राहते व म्हणून शरीराची वाढच होते. आतां वार्धक्यांत दोषांची पोषणादींची शक्तीच कमी झाल्यानें धातूत्पादनच गरजेपेक्षां कमी होतें. त्यामुळें खर्चापेक्षां जमा कमी म्हणून परिणाम शरीर-क्षीणता दिसली तरी या (खर्चापेक्षां जमा कमी या) स्वाभाविक अवस्थेंतील क्षीणता, जमेपेक्षां खर्चच जास्त या अवस्थेहून ती भिन्न आहे. पहिलींत आवश्यक खर्चाला जमा कमी पडते तर दुसरींत असलेलीच मर्यादित जमा फाजील खर्चाला अपुरी पडते. या अवस्थेला ' जरा-शोष ' असें आयुर्वेदानें म्हटलें आहे. तीच नजरेपुढें ठेवून रोज शरीर झिजतें असें म्हणावयाचें असेल तर म्हणावें हवें तर. घरचा पोराबाळांच्या वाढदिवसांचा व्याप आणि शिष्टांच्या षष्टिपूर्तीचीं प्रदर्शनें तरी वांचतील ! वैद्यराजांनीं या तत्वाचा जाहीर पुरस्कार अवश्य करावा. पुष्कळ व्यवहारज्ञ त्यांना पाठिंबा देतील !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चरकोक्त चिकित्सापुरुषाचे वर्णनांतील चक्रदत्तटीकेचा अपुरेपणा !

पुढें, चरकाच्या शरीरवर्णनांतील " तत्र शरीरं नाम चेतनाधिष्ठानभूतं पंचमहाभूतविकारसमुदायात्मकं समयोगवाहि " या सूत्रावर चक्रपाणीनें टीका करतांना रसादिधातूंबरोबर त्रिधातु आणि मळ यांसह तें बनलेलें आहे असें म्हणावयास हवें होतें, असें वैद्यराज म्हणतात. कां तर मूळची शरीराची व्याख्या ' दोषधातुमला मूलं ' अशी आहे म्हणून. रसादिधातूंतच त्यांची पूर्वावस्था जे दोष (धातु) ते सहजीं येऊनच जातात आणि धातूंचेच क्षीण भाग जे मल तेहि त्यांत अन्तर्भूत होतात, मग निराळा उल्लेख कशाला ! शरीराचें हें स्थूल दृष्टीचेंच वर्णन आहे. त्रिदोषांना ' त्रिधातु ' या संज्ञेनें ते संबोधतात म्हणून हें असें म्हटलें असलें तरी धात्वंतर्गत सूक्ष्म घटक ते दोष मानणारांनाहि स्थूल स्वरूपाच्या या वर्णनांत अधिक स्पष्टीकरणाची आवश्यकता वाटत नाहीं. पण वैद्यराजांना नेहमीं तपशीलवार बाळबोध वर्णनाची भारी गरज वाटते.

सांख्य-वैद्यकांतल्या भेदाची स्वतःची कबुली

एकूण खरोखर उभय शास्त्रांत स्पष्ट भेद असून स्वतःच वैद्यराज बागेवाडीकर " याप्रमाणें या दोन शास्त्रांत भेद " असल्याचें स्पष्टच म्हणत असतां (सदर पृ. ७८८) त्यांनीं एवढा प्रपंच कशासाठीं केला? तर " चरकाचार्य हे परिणामवादाचे पुरस्कर्ते " आहेत म्हणून !

परिणामवादाच्या पुरस्कारामुळें चरकांचें वृद्धिजन्य विकाराला प्राधान्य

पण या परिणामवादाच्या पुरस्कारामुळें नसतीच आपत्ति ओढवली. अहो "त्यामुळेंच त्यांनीं (चरकांनीं) विकारांमध्यें (रोगांत) वृद्धिजन्य विकारांना प्राधान्य देऊन निदान आणि चिकित्सा लिहिली आहे" (सदर). तथापि दुःखांत सुख एवढेंच कीं, याची " जाणीव वाग्भटाला झालेली " त्यांना दिसली (सदर). पण त्यानें ही आपदा पुरी मिटली नाहींच, कारण वाग्भटानें " क्षीण दोषांचा विचार निदान-चिकित्सेंत केला नाहीं " (सदर). अर्थात् या आपन्निवारणार्थ वैद्यराजांना स्वतःलाच कंबर कसावी लागली व ते त्याचा " विचार " करण्यास प्रवृत्त झाले ! पाहिला पाहिजे आतां तो विचार !

वाग्भटानें दोषक्षीणतेस दिलेलें महत्व आणि अबुध वैद्य !

वाग्भटाला दोषक्षीणतेची नुसती जाणीवच झाली नाहीं तर त्यानें " दोषक्षीणतेस महत्व दिलें आहे" असें वै. बागेवाडीकर लगेच पुढें म्हणतात, आणि हें कोठें तर "कुर्वते हि रुचिं दोषा विपरीतसमानयोः। वृद्धाः क्षीणाश्च भूयिष्ठं, लक्षयन्त्यबुधास्तु न ॥ " या श्लोकांत. अल्पमति आम्हासारखे तें लक्ष्यांत घेत नाहींत म्हणून अबुध खरेच ! या श्लोकांत आम्हांला रोगवर्णन दिसत नसून दोषांच्या वृद्धिक्षीणतेनें तत्तत्पोषक आहाररसाची अप्रीति अगर मागणी एवढेंच सूचित होतें असें वाटतें. त्याला काय करणार? दुसरी गोष्ट, या श्लोकांवर अरुणदत्तानें टीका करतांना " क्षीणा दोषाः क्षीणत्वादेवाकिंचित्करत्वात्कदाचित्पीडां नोत्पादयन्त्येव" असें म्हटलें आहे. त्यावरूनहि क्षीण दोष रोगोत्पत्तीचे दृष्टीनें अकिंचित्कर आहेत असेंच सिद्ध होतें असें आम्हाला वाटतें. याच सन्दर्भात दिलेला " क्षयाद्विवृद्धेरिव रक्षणीयाः " हा वैद्यराजांचा आधारहि तसाच. दोष " विषमा वधाय " होतात असें म्हणणाऱ्या वाग्भटालाहि त्या विषमांतील क्षीणता क्षयरोगोत्पादक होऊन मारक होते असेंच अभिप्रेत आहे. आम्हाला तरी हें कोठें नाकबूल आहे ? संप्राप्तिशास्त्रदृष्ट्या वृध्ददोषांचा चयादि अवस्थेपासून रोगस्थानापर्यंतचा विकासाचा जसा मार्ग दाखवितां येतो व म्हणून दोष वृद्धीनेंच रोग होतात असें मानावें लागतें, तसा क्षीणदोषांचा मार्ग दाखवितां आला तर आम्हींहि ते रोगोत्पादक आहेत असें मानूं. " वाग्भट-ग्रंथाचीं पारायणें करणारे वैद्य असाच याचा अर्थ समजतात. वैद्यराज त्यामुळेंच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

...बुद्धीचे' म्हणून त्यांना म्हणतात तें खरेंहि असेल, पण मग त्यांनीं वाग्भटाचीं पारायणें नकोत करायला ! ...दीचा म्हणजे ' अक्कलेचा कोट ' फोडून बाहेर पडणारांना एकेकदां वाचूनच सर्व संहितांचा किती चांगला ...ळ झाला, दिसतोंच आहे.

दोषक्षीणतेनें रुजाकरत्व

निव्वळ दोषक्षीणतेनें रुजाकरत्व अर्थात् रोगकारकत्व येत नाहीं हें आतां पुनः सांगण्याचें कारण ...हीं. वैषम्य म्हणजे ' स्वरूपाच्च्यावः ' या अरुणदत्ताच्या व्याख्यानानें त्यांत बदल होण्याचें कारण नाहीं. ...न दोषांचा ' स्वरूपाच्च्याव ' म्हणजे ' कर्मणां प्राकृताद्धानि ' याहून निराळा नाहीं, व त्याचें स्पष्टीकरण मागें ...च आहे.

रक्तपित्तावर यकृत् केव्हां द्यावें ?

वैद्यराजांनीं क्षीणदोषजन्य व्याधी व त्यावरची चिकित्सा म्हणून रक्तपित्तांचें व त्यांतील अति-...स्रुत रक्तावर वाग्भटानें द्यावयास सांगितलेल्या आम-पित्तयुक्त यकृताचें उदाहरण दिलें आहे. रक्त-...त पित्त क्षीण होतें असें त्यांचें त्यांनीं कारण दिलें आहे. वस्तुतः हें रक्तपित्ताचें तीव्र स्वरूपाचें लक्षणच ...हे, तीव्र दोषानें तीव्र लक्षणें उद्भवतात. प्रस्तुत रक्तपित्तांत पित्त हा दोष असून तें वृद्ध झालेलें असतें व ...पित्त ' भृशोष्णतीक्ष्णरूक्षाम्ललवणादि विदाहिभिः। ' (अ. हृ. नि. अ. ३-१) वाढतें हें वाग्भट स्पष्टच ...गतो. यांत पित्त कमी होण्याचा संबंधच नाहीं. रक्तस्राव होतो तरी रक्तपित्त म्हणण्याचें कारणांत व ...व्याप्तीत, हें स्पष्ट दिलें आहे. पित्त हा रक्ताचा मळ, व रक्तानुगामी, व त्याचे व रक्ताचे गन्धवर्णादि एकच, ...जिक तें वाढलें, प्रकुपित झालें कीं उन्मार्गगामी होऊन रक्तवाहिनीतलें एखादें विगुण स्थान पाहून ...चे आश्रय घेतें व त्या ठिकाणीं त्याची तीक्ष्णोष्णविदाहिता सहन न झाल्यानें तें बाहेर येतें व येतांना ...आश्रयस्थान रक्तहि घेऊन येतें अशी रक्तपित्ताची संप्राप्ति आहे म्हणजे यांत स्पष्ट पित्तवृद्धीच आहे. ...मुळेंच हें रक्तहि पित्तयुक्त असतें. चिकित्सेंतहि हेतुप्रत्यनीक अशा ' मनोऽनुकूलाः शिशिराश्च सर्वाः कथा ' ...करावयास वाग्भटानें सांगितल्या आहेत. चन्दनादि, शतावर्यादि, इ. काढे, कमलोत्पलादींच्या पेया यासाठींच ...तें सांगितल्या असून सारांशानें ' यत्किंचिद्रक्तपित्तघ्नं निदानं तच्च वर्जयेत् । ' (अ. हृ. चि. २।२४) ...असें म्हटलें आहे. आतां वै. बागेवाडीकर अतिरक्तस्रावावर आमपित्तयुक्त यकृत् द्यावें असें म्हणतात तें ...वाग्भटोक्त असलें तरी तें अन्न म्हणूनच आहे. शिवाय तेंहि हेतुप्रत्यनीक नसून व्याधिप्रत्यनीक आहे. यकृत् ...रक्ताचें व पित्ताचेंहि स्थान असल्यानें त्याच्या परिपोषणासाठीं हें त्वरित पोषण देणारें अन्न सांगितलें ...हे, औषध नव्हे. तसें असतें तर तीक्ष्णोष्णवीर्यच औषधें रक्तपित्तावर सांगितलीं असतीं. आमपित्तयुक्त यकृत् ...गुणाचें तीक्ष्णोष्णच. हा आहारहि अतिरक्तस्राव झाल्यावर त्वरित शक्ति येण्यासाठीं म्हणजे रोगोत्तरच ...हे, खास रोगांत नाहीं. तसा दिल्यास रक्त थांबणेंच संभवनीय नाहीं. एतावता कारण आणि कार्य, ...व आणि रोगोत्तर अवस्था, औषध आणि आहार यांची गल्लत करून गैरसमजानें, अगर समजून असेल ...बुद्धिभेद करण्यासाठीं दिलेलें वैद्यराज बागेवाडीकरांचें हें उदाहरण त्यांच्या साध्याला मुळींच समर्पक नाहीं.

विषूचिका-विमर्श

वैद्यराजांनीं विषूचिकेचे उदाहरणांतहि असाच कार्यकारणांचा घोंटाळा केला आहे. विषूचिका आणि ...रा हे ते म्हणतात त्याप्रमाणें एकरूप आहेत असें मानलें तरी त्यांनीं केलेली त्यांची मीमांसा किती ...धार व सयुक्तिक आहे याचा विचार केला पाहिजे. ते म्हणतातः- " विषूचिकेच्या लक्षणांत हातपाय ...गार पडणें, नाडी क्षीण होणें, मूत्रोत्पत्ति न होणें, चेहरा काळवंडणें इ. लिहिलीं नाहींत. " रोगाचीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लक्षणें दोन प्रकारचीं असतातः- अवश्यंभावी व गौण. पहिलीं निश्चित व्याधिनिदर्शक असून दुसरीं हेतुनिष्ठ वा दोषजन्य असतात. पित्तज्वरांतील तीक्ष्ण वेग हें अवश्यंभावी लक्षण असून अतिसारादि गौण लक्षणें असतात. ज्वरमान न सांगतां अतिसारादि कितीहि लक्षणें सांगितलीं तरी तीं पित्ताचीं लक्षणें होतील पित्तज्वराचीं होणार नाहींत. विषूचिकेंतहि वरील लक्षणें सांगून जुलाब-वांत्या हें लक्षण न सांगितल्यास तीं दुसऱ्या कोणत्याहि तद्दोषजन्य व्याधींचीं होतील. वाग्भटानें 'व्यावयन्तो विषूचिकां, अधरोत्तरमार्गाभ्यां।' (अ. हृ. सू. ८।५-६) व 'सूचीभिरिव गात्राणि विध्यतीति विषूचिका' (सदर ८।८) अशीं विषूचिकेचीं अवश्यंभावी लक्षणें दिलीं आहेत. इतर लक्षणें दोषजन्यच. तीं साध्यासाध्यविवेकाला व त्यामुळें चिकित्सेला सहायक होतील. वैद्यराजांनीं दिलेलीं लक्षणें अवश्यंभावी नाहींत. अर्थात् असाध्यता दर्शवितात म्हणून तीं विचारणीय अवश्य आहेत व तशी तीं माधवानें दिलींहि आहेत. " यः श्यावदन्तौष्ठनखोऽल्पसंज्ञो वम्यर्दितोऽभ्यन्तरयातनेत्रः। क्षामस्वरः सर्वविमुक्तसन्धिर्यायान्नरः सोऽनपुरागमाय ॥ " या माधवोक्त असाध्य लक्षणांत वैद्यराजांचीं लक्षणें अन्तर्भूत होतात. "मूत्रोत्पत्ति न होणें" हेंहि लक्षण 'दारुण' म्हणजे असाध्य या सदरांत पुढें "निद्रानाशोऽरतिः कम्पो मूत्राघातो विसंज्ञता" (मा. नि. अ. नि. २३ व २५) माधवानें संगृहीत केलेंच आहे. श्यावदन्तादि हीं असाध्य लक्षणें असल्याचें "विसूच्यलसकयोरसाध्यलक्षणमाह" असें मधुकोश व आतंकदर्पण या दोन्ही टीकांत म्हटलें आहे. हींच लक्षणें विषूचिकेप्रमाणें अलसकांतहि होऊं शकतात. यावरूनच केवळ विषूचिकेचीं हीं अवश्यंभावी लक्षणें नव्हत हें स्पष्ट होतें.

हीं लक्षणें कफपित्ताच्या क्षीणतेचीं कशीं ?

हा अवांतर मुद्दा झाला. वैद्यराजांना मुख्यतः सांगावयाचें आहे तें हें कीं हीं लक्षणें कफ व पित्त यांच्या क्षयाचीं होत. आमचे मतें हीं वातवृद्धीचीं आहेत. वृद्धवायूच्या लक्षणांतील कार्ष्ण्य व उष्णकामित्व याशीं चेहरा काळवंडणें, हात-पाय-अंग गार पडणें हीं लक्षणें जमणारीं आहेत. नाडी क्षीण होणें हें कोणत्याहि रोगाच्या असाध्यावस्थेंत येणाऱ्या मांसादि धातूंच्या क्षयामुळें व तज्जन्य प्रधान मांसमर्म जें हृदय त्याच्या क्षीणतेनें होणारें लक्षण आहे. पित्त आणि कफ यांच्या क्षीणतेंतलीं वाग्भटोक्त लक्षणें प्रसिद्ध आहेत. त्यांतलें 'शीतं' एवढेंच लक्षण वैद्यराजांनीं दिलेल्या लक्षणांपैकीं 'अंग गार पडणें' याशीं जमणारें आहे. वस्तुतः हीं सर्व लक्षणें सान्निपातावस्थेचीं म्हणजे तीनहि दोषांच्या प्रकोपाचीं अर्थात् दोषवृद्धीचीच निदर्शक आहेत. सर्वांत वातप्रकोप अधिक 'वात झाला' ही भाषा अशाच स्थितींत लोकरूढ आहे. बरें कफ आणि पित्त जे क्षीण होतात म्हणून वैद्यराज म्हणतात तें तरी रोगोत्पत्तीचे वेळीं कीं रोगोत्तर? पण लांब कशाला! स्वतः वै. बागेवाडीकरच म्हणतातः-या रोगांत प्रथम वातादि दोष प्रकुपित होऊन वांती आणि अतिसार उत्पन्न करतात, नंतर वांतीच्या द्वारें कफाचा विसर्ग आणि अतिसारद्वारें पित्ताचा विसर्ग होतो. हा विसर्ग अतिप्रमाणांत होऊन कफ आणि पित्त क्षीण होतात (क्षयं चातिविसर्गतः) (आ. प. १६-७-५४ पृ. ७९०) यांतील "प्रकुपित होऊन" सुरवात आणि "नंतर" होणारी कफपित्ताची क्षीणता याची कबुली वाचकांनीं ध्यानांत ठेवावी. वृद्धीझाल्याशिवाय प्रकोप नसल्यानें दोषांच्या वृद्धीनेंच विषूचिका होते अशीच यांत वै. बागेवाडीकरांची कबुली आहे, नव्हे कां ?

विषूचिकेला कारण दोषवृद्धीच

विषूचिकेंतील प्रधान लक्षणें जुलाब व वांत्या. जुलाब नुसते होणारा जो रोग तो अतिसार. अप् धातूची वृद्धि होऊन तो कोष्ठगत होत्साता पाचकाग्नीचें शमन (निर्वापण) करतो व मळाशीं मिश्र होऊन (तो पातळ होतो व) खालीं सरतो अशी सुश्रुतानें अतिसाराची सम्प्राप्ति दिली आहे. (सु. उ. ४०।६)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

[ध]ातु कफवृद्धीनेंच प्रवृद्ध व्हावयाचा; अर्थात् कफवृद्धीनेंच अतिसार होतो असें म्हटलें पाहिजे. प्रकुपित [झाले]ला वायु महास्रोतसांतील दोषांना (अर्थात् कफपित्तांना) वर फेंकतो अशी वांतीची संप्राप्ति चरकानें [दिल]ी आहे. (च. चि. २०।५) मग विषूचिका या अतिसार-वान्ती या जोड विकाराचें, दोषक्षय हें कारण असूं शकणार, समजत नाहीं.

मग स्वेदप्रवृत्तीमुळें ज्वर हि पित्तक्षयज होईल

वांती-जुलाबावाटें कफपित्ताचा होणारा क्षय हें जर विषूचिकेचें कारण म्हटलें तर ज्वरांत येणारा [घ]ाम पाहून पित्तक्षयानें ज्वर येतो असें म्हणावयाचें काय? अर्थात् ही रोगोत्तरच अवस्था ठरते. रोगोत्तर [अवस्थ]ेंत सदाच दोषक्षीणता येते. त्याबद्दल कोणाचा विरोध आहे? व या अवस्थेंत बृंहण उपचारहि क्रम-[प्राप्त] ठरतात तेंहि अमान्य कोण करतो?

विषूचिकेंत पाणी कोणतें द्यावें!

वैद्यराजांनीं वरील अवस्थेंत "कफ क्षीण आहे म्हणून नारिकेलोदक देणें, पाणी देणें ही चिकित्सा [अ]ावश्यक आहे" असें जें विचारलें आहे तें कोणत्या प्रमाणानें? जें पाश्चात्य वैद्यक "या रोगांत [शरीरांती]ल अप् धातू क्षीण होतो असें म्हणतें" तें तरी या अवस्थेंत नारळाचें वा नुसतें पाणी प्यावयास सांगतें [क]ाय? कदाचित् "न क्वचिद्वारि वारयेत्" असें सांगणाऱ्या आयुर्वेदाचे दृष्टीनेंच तें इष्ट ठरेल. पण [अप्] धातूच्या वृध्दीमुळें उत्पन्न झाल्याची जाणीव असल्यानें या रोगांत निव्वळ पाणी, वा नारळाच्या [पाण्यासा]रखें शीतवीर्य, गुरु पाणी मात्र तें द्यावयास सांगणार नाहीं. वाग्भटानें तर "तदहश्चोपवास्यैनं [विरिक्त]वदुपाचरेत्" असें सांगितल्यानें विषूचिकोत्तर, पेयादिक्रमच अवलंबावयास हवा, आणि त्यांत निव्वळ [पाणी] येत नाहीं हा प्राथमिक पाठ सांगावयास हवा काय? वाग्भटाहून तपशीलवार चिकित्सा सांगणाऱ्या [ग्रं]थांतून थोडेसें पाणी द्यावयास सांगितलें असलें तरी त्यानें आप्यांशांत भर न पडावी यासाठीं तेथें [धण्या], जायफळ वा नागरमोथे घालून उकळलेलें पाणी द्यावयास सांगितलें आहे. "पिपासाया तथोत्क्लेशे [...]त्साम्बु शस्यते। जातीफलस्य वा शीतं शृतं भद्रघनस्य वा॥" (योगरत्नाकर अ. चि. पृ. १४४) पण [विषू]चिकेंत निव्वळ पाणी द्यावयास कोठेंच सांगितलें नाहीं.

[अपूर्ण]

डॉ. सावनूर विशेषांक

[आ]युर्वेद पत्रिकेच्या डॉ. सावनूर विशषांकांत दोन [छा]या-चित्रें देण्यांत आलीं आहेत. त्यांतील व्यक्तींचीं [नांवें] त्यावेळीं छापण्याचें राहून चुकीनें गेलें. या [चित्र]ांना ऐतिहासिक महत्व असल्यामुळें चित्रांतील [व्यक्त]ींचीं नांवें पुढें दिलीं आहेतः—

[प्रथ]म कर्नाटक आयुर्वेदीय संमेलन १९२४

[खुर्च्या]ंवर बसलेले डावीकडून उजवीकडेः–

(१) डॉ. बाक्रे (२) वैद्यरत्न जोशी (३) वैद्य [...]गडकर (४) कॅ. जी. श्रीनिवासमूर्ती (अध्यक्ष) [(५)] अध्यक्षांचे वडील (६) वैद्य शेषशास्त्री [(७)] डॉ. सावनूर.

खालीं बसलेले, डावीकडून उजवीकडे.:—

(१) वैद्य चन्दो हणमंत कुलकर्णी (२) कुमार बाक्रे (३) संमेलन कारकून कुलकर्णी.

फोटो नंबर २

खुर्चीवरील डावीकडून उजवीकडेः—

(१) डॉ. बाक्रे (२) डॉ. साठे (३) वैद्य नांदणीकर (४) डॉ. छत्रे (५) डॉ. सावनूर [अध्यक्ष] (६) मिसेस काळे (७) वैद्य बापूशास्त्री काजरेकर (८) वैद्यरत्न वाटवे (९) वैद्यरत्न जोशी.

उभी रांग डावीकडून उजवीकडे विद्यार्थीः–

(१) रा. नेजकर (२) रा. मंगळवेढेकर (३) रा. कुलकर्णी (४) रा. कुंभोजकर (५) रा. देशपांडे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आधीं प्राकृत, मग संस्कृत भाषा

संस्कृत भाषेविषयीं विद्वान् लोकांत एक अगदीं विपरीत ग्रह निर्माण झालेला आहे. ते म्हणतात आधीं संस्कृत भाषा होती व त्यापासून अनेक प्राकृत भाषा जन्म पावल्या. संस्कृत भाषा ही भारतीय भाषांची जननी आहे असें त्यांचें मत आहे व तें तसें सर्वत्र बोलून, लिहून दाखविलें जात आहे.

शब्दार्थाकडे दुर्लक्ष

हे लोक 'संस्कृत' व 'प्राकृत' या संज्ञांचे अर्थाकडे लक्षच देत नाहींत. संस्कृत म्हणजे संस्कार केलेली, मूळची तशी नसलेली भाषा. व प्राकृत प्रकृतीला धरून असलेली, बदल न पावलेली, मूळची जशीच्या तशी. उदाहरणार्थ: खुर्ची व सागाचें लांकूड यापैकीं खुर्ची ही सागाच्या लाकडावर संस्कार करून निर्माण झालेली वस्तु आहे. व सागाचें लाकूड ही मूळ निसर्गात निर्माण झालेली, जशीच्या तशी वस्तु आहे.

आधीं खुर्ची मग लांकूड !

जर कोणी असें म्हटलें कीं, आधीं खुर्ची होती व मग त्यापासून सागाचें लाकूड, लोखंड, पॉलिश या वस्तु निर्माण झाल्या तर तें कितपत शहाणपणाचें ठरेल.

संस्कृत भाषेचें शुद्ध स्वरूप

आजच्या प्रमाणेंच मूळच्या असलेल्या विविध नैसर्गिक भाषांतील शब्द आत्मसात् करून सर्व प्राकृत भाषांपासून संपन्न बनलेली भाषा ती 'संस्कृत' भाषा. हें संस्कृत भाषेचें शुद्ध स्वरूप आहे. सर्व भाषांतून तिनें शब्दसंपत्ति आत्मसात् केली असल्यामुळें लोकांत गैरसमज पसरले आहेत ते असे कीं, संस्कृत भाषेतून ते शब्द त्या त्या भाषेत गेले. पण वस्तुस्थिति अशी नाहीं, अगदीं उलट आहे.

संस्कृत भाषा मृत्यपंथाला कां लागली ?

अनार्य लोकांना संस्कृत करून आर्य बनविण्याची पद्धति बंद पडली तशीच अन्य भाषांतून शब्द-संपत्ति घेण्याची संस्कृत भाषेची प्रथा बंद पडल्यामुळें संस्कृत भाषा ही मृत्युपंथाला लागली आहे. जर कोणी भाषाशास्त्रज्ञ पुन: भारतांतील सर्व प्राकृत भाषापासून संस्कृत भाषा पुष्ट करण्याचें अंगिकारतील तर संस्कृत भाषा ही पुन: तेजस्वी बनल्याशिवाय राहणार नाहीं.

मीमांसाशास्त्रांतील संस्कार कर्म

मला हा विचार मीमांसाशास्त्रांतील पुढील कल्पनेवरून सुचला. मीमांसा हें वेदांचा अर्थ लावणारें इतकेंच नव्हे तर जीवमात्रांच्या एकंदर हालचालींचा अर्थ उकलण्याचा प्रयत्न करणारें शास्त्र आहे. त्या शास्त्रांत अर्थकर्मांचे ४ प्रकार दिले आहेत, ते असे:-उत्पत्तिकर्म, आप्तिकर्म, विकृतिकर्म व संस्कृतिकर्म मनुष्य कांहीं उत्पन्न करतो [उत्पात्ति], कांहीं मिळवतो (आप्ति), लाकडापासून खुर्ची टेबल बनवतो (विकृति), व तयार केलेल्या मालावर सँडपेपरनें घासून गुळगुळीत करतो, पॉलीश करतो (संस्कार, संस्कृति). प्राकृतभाषांहि अशाच संस्कृत करतां येतात. व त्या तशा पूर्वी केल्या जात असत हें अनेक भाषांतून संस्कृत भाषेत आलेल्या शब्दावरून सहज कळण्यासारखें आहे.

.... गौरव ....

आपण आयुर्वेदिक औषधांचा गौरव वाढविला पाहिजे. ती एक आपल्या हिताची गोष्ट आहे. आपण प्रत्येक औषधी द्रव्य अस्सलपैकीं व ताजें वापरून सिद्ध औषधें बनविलीं पाहिजेत. अशीं उत्कृष्ट औषधीं द्रव्यें मिळवण्याकरितां आपण: —

दि ऑल इंडिया करीयाणा स्टोर्स
पायधुनी मुंबई नं. ३
(टेलिफोन नं. ३१८५८) यांना लिहा.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात.
* अधिक माहितीसाठीं कॅटलॉग मागवावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परीक्षण '—

' राजयक्ष्मा-विशेषांक '

श्री. वैद्यनाथ आयुर्वेद-भवन लि. कलकत्ता इ. यांच्यातर्फे प्रकाशित होणाऱ्या सचित्र-आयुर्वेद पत्रिकेचा जुलै व ऑगस्टचा जोड अंक, व सातव्या वर्षाचा हा प्रथम विशेषांक आहे. २४० पृष्ठसंख्या आहे. मूल्य २ रुपये. कागद व छपाई उत्कृष्ट आहे.

भारतांतील ५३ विद्वान् व आयुर्वेदाभ्यासी यांचे ५५ लेख या अंकांत आहेत. लेखकवर्गांत ७/८ राष्ट्रीय ख्यातनाम लेखक आहेत. कांहीं ४/५ आयुर्वेदाभ्यासी डॉक्टरांचेहि लेख यांत आहेत.

रंगीत मुखपृष्ठावर क्षयित प्राणवहस्रोतसांचें(हृदय व फुफ्फुस) चित्र असून फुफ्फुसाच्या क्षयित भागावर प्रकाशाचा झोत आहे. कल्पना चांगली आहे. आजूबाजूला फुफ्फुसापेक्षां इतर क्षयित उपांगें दाखविलीं असतीं तर तें अधिकच उत्कृष्ट झालें असतें. राजयक्ष्मा केवळ फुफ्फुसांचाच विकार नाहीं. वरील चित्राप्रमाणेंच, सूर्यकिरणांचें राजयक्ष्म्यांतील महत्त्व दर्शविणारें चित्र, राजयक्ष्मा-प्रसाराचीं ५ प्रमुख कारणें, घरांत रोगी असतां घ्यावयाची खबरदारी, फुफ्फुसांच्या 'क्ष'किरण प्रतिमा, क्षयविषयज अस्थिभंगाची 'क्ष' किरण प्रतिमा, विविध 'क्षयित'उपांगांचीं रेखाचित्रें,क्षयरोग सॅनिटेरियममधील व्यवस्थेचीं रेखाचित्रें, इत्यादि चित्रांवरोबर उत्पादकांच्या औषधांच्या रंगीत जाहिराती यांनीं हा अंक नित्याप्रमाणें सचित्र झाला आहे.

अंकांतील लेखांचें वर्गीकरण

लेखांचें वर्गीकरण पाहिल्यास पुढीलप्रमाणें दिसतें.

१) राजयक्ष्मा-इतिहासविषयक लेख (५।६)

२) प्राकृतिकचिकित्सा (निसर्गोपचार), यूनानी वैद्यक, व पाश्चात्यवैद्यक (ॲलोपॅथी फक्त) यांच्या दृष्टिकोनांतून क्षयरोगविचार (४ लेख)

३) राजयक्ष्मानिदान विषयक तीन लेख (परीक्षा, Xray, विनिश्चय)

४) रोगोत्पादक कारणांचा (जीवाणु, प्रमिताशनादि वातवर्धक कारणें व हल्लीचें वातावरण) विचार करणारे ३ लेख.

५) अनौषधिचिकित्सा:-मालिश, उपासना, विश्रांति, स्नान, सूर्यकिरण, पथ्यापथ्य, इ. दिनचर्याविषक लेख.

६) औषधिचिकित्साविषयक:- १५।१६लेख व्यवहारोपयोगी आहेत. सुवर्ण, लसूण, नागबला, सितोपलादिचूर्ण, कल्याणसुंदररस इ. विशिष्ट द्रव्यांच्या उपयोगाचे लेख त्यांत आहेत. सफलचिकित्सा, बालशोषचिकित्सा, अनुभूतचिकित्सा, अनुभविक सल्ला, प्रमिताशनजन्य अस्थिक्षयाची चिकित्सा इ. लेखांतूनहि राजयक्ष्म्यावरील विविध औषधीद्रव्यांचा विचार झाला आहे.

७) क्षयरोगप्रतिबंधनोपाय सुचविणारे:- B.C.G. विषयक, क्षय और उसका प्रतिबंधन, प्रमिताशनजन्य अस्थिक्षयज भंग इ. लेख महत्वपूर्ण आहेत.

८) राजयक्ष्माविरोधी कार्य, जें ठिकठिकाणीं स्वदेशीं व परदेशीं चाललेलें आहे त्याची माहिती, या विषयींचा १ लेख.

९) व राजयक्ष्मोत्तर सावधगिरी या विषयींचा शेवटचा लेख.

दोषधातुमलदृष्टीचा अल्पभाव

अशा रीतीनें विविधप्रकारें अंक सर्वंकष करण्याचा प्रयत्न संपादकमंडळानें केला आहे. भारतांतील नामांकित आयुर्वेद पंडितांचे लेख या अंकांत आहेत. तथापि आयुर्वेदशास्त्राच्या दृष्टिकोनांतून पहावयाचें, झाल्यास—

दोषदृष्टि ठेवून क्षयाचा प्रतिबंध, निदान व चिकित्सा
धातुदृष्टि ठेवून " " " "
मलदृष्टि ठेवून " " " "

याप्रमाणें 'दोषधातुमलमूलं हि शरीरम्' या महत्वाच्या सिद्धातांकडे लक्ष देऊन लिहिलेले लेख अगदीं बोटांवर मोजण्याइतकेच आहेत. 'बलं तस्य हि विड्बलं' अशीं वचनें निरनिराळ्या लेखांत आढळत असतां, त्या सिद्धांतांवर जोर देणारा 'मलमहत्व विषयक' लेख अंकांत नाहीं. दोष व धातु विचार प्रगट करणारा वै. बिंदुमाधव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पंडित यांचा लेख, धातुविचार प्रगट करणारा वै. हरदयाल वैद्यवाचस्पति यांचा लेख व रोगप्रतिबंधक उपचारांचे दृष्टीनें दोष व धातु या दोघांनाहि महत्त्व देणारा वैद्य जळूकरशास्त्री यांचा लेख असे कांहीं थोडे लेख मात्र मार्गदर्शक आहेत. प्रत्येक वैद्यानें व विद्यालयानें संग्राह्य असा हा अंक आहे. लेख सोडून भलत्याच ठिकाणीं चित्रें घालण्याचा उपक्रम संपादकांनीं केला आहे. चित्रें लेखाजवळच असावींत. अस्तु !

—आयुर्वेदाचार्य, श्री. कृ. करमरकर
आयुर्वेद सेवा संघ, नासिक.

डॉक्टरांची रजिस्ट्रेशन फी ५० रु.

१९१२ च्या डॉक्टरी कायद्याप्रमाणें जे डॉक्टर नोंदले जातात, त्यांचें रजिस्टर अद्यावत् ठेवण्यासाठीं दर पांच वर्षांनीं डॉक्टरांनीं आपलें नांव पुनः नोंदवावें अशी दुरुस्ती त्या कायद्यांत करण्यांत आली आहे. (पुनः नोंदणी न केली तर कोण डॉक्टर मेले व कोण जिवन्त आहेत हें कळण्यास मार्ग रहात नाहीं.)

पुनर्नोंदणी करतांना वैद्याप्रमाणेंच फी बसविण्याचा सरकारचा विचार होता पण तो डॉक्टर-मंडळींना पसंत पडला नाहीं. म्हणून पाहिल्या रजिस्ट्रेशनचे वेळीं १५ रु. फी घेतली जात होती ती वाढवून आतां ५० रु. करण्यांत ाली आहे.

दर ५ वर्षांनीं दुरुस्त रजिस्टर-बुक छापण्यासाठीं रक्कम हवी म्हणून ही फी वाढ आहे असें सांगण्यांत येत आहे.

पांढरें कोड नष्ट झालेल्या हजारों गांवच्या लोकांचीं प्रशस्तिपत्रें व बक्षिसें पूर्ण पत्त्यासहित छापलेलीं पत्रकें मोफत मागवा.
औषधीची किंमत ५ रु., पो. ख. १ रु.
वैद्य के. आर. बोरकर
मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला [म. प्र.]

पंचवार्षिक योजना व आयुर्वेद

आष्टे, ता. नंदुरबार, जि. प. खानदेश ह्या गांवांत सरकारनें-बोर्डानें ३/४ व जनतेनें १/४ मिळून ९ हजार रुपये खर्च करून डि. लोकल बोर्ड आयुर्वेदीय दवाखान्याकरितां एक इमारत बांधून दिली आहे. इमारतीचा उद्घाटन समारंभ मे. ज. दौ. राऊळ एम्. एल्. ए. राहाणार दोंडाइचे ह्यांचे हस्ते ता. १८।८।५४ रोजीं आष्टे येथें पार पडला. श्री. राऊळ व मे. मामलेदार नंदुरबार, मे. प्रांतसो, मे. कलेक्टर साहेब, मे. प्रेसिडेंट साहेब डि. लोकल बोर्ड प. खा. धुळें, ह्यांनीं पंचवार्षिक विकासयोजनेंत दवाखाना बांधण्याचें काम घेऊन व तेथील जनतेस उत्साहित करून हें काम जनता व सरकार ह्यांचे मदतीनें पार पाडलें. त्यामुळें येथील जनतेची दवाखान्याचे इमारतीची कायम स्वरूपाची सोय झाली आहे.

येथील दवाखान्यांत वैद्य क. ना. जोशी (आयुर्वेदाचार्य धन्वन्तरि) हे काम करित आहेत.

कुंभयात्रेची पौराणिक कथा

क्षीरसागराचें मंथन केल्यावर त्यांतून १४ रत्नें निघालीं. त्यांपैकीं 'अमृत' कुंभ हा एक होय. तो घेण्यासाठीं देवदानवांत भांडण सुरू झालें. इंद्राचा पुत्र जयंत हा अमृत-कुंभ घेऊन धावूं लागला. देवदानवांच्या या हिसकाहिसकींत त्या अमृताचे १२ बिंदु बारा ठिकाणीं पडले. भूलोकांवर त्यांपैकीं हरिद्वार, प्रयाग, उज्जयिनी व नाशिक; या ४ ठिकाणीं बिंदु पडले. म्हणून या ठिकाणीं १२ वर्षांनीं कुंभयात्रा भरत असते. गुरु कर्क राशींत जाऊन रवि कर्कैंत शिरतांच नाशिकला यात्रा भरते. पुढीलवर्षीं अशी यात्रा नाशिक येथें भरणार आहे.

पवित्र नेपाल कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहाः—नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ-वृत्त

अध्यक्षांचें पश्चिम खानदेशांतील प्रचारकार्य

वैद्य वि. श्री. पाठकशास्त्री, अध्यक्ष संयुक्त खा. वैद्य मंडळ धुळें, यांचे विचारें धुळें शहर पश्चिम खानदेश जिल्ह्यांतील कार्यक्रम ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत निश्चित करून प्रांताध्यक्ष वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर हे दिनांक २८-८-५४ रोजीं शनिवारीं सकाळीं धुळें येथें पोंचले व कार्यक्रमाला प्रारंभ लागलींच झाला.

धुळें स्टेशनवर सं. खा. वै. मं. चे अध्यक्ष वै. श्री. पाठकशास्त्री यांनीं त्यांचा सत्कार, पुष्पहारसमर्पणपूर्वक केला, व मोटारीनें त्यांस व्याख्यानाचे ठिकाणीं नेलें. शनिवारीं सकाळीं जे. आर. सिटी हायस्कूल व न्यू सिटी हायस्कूल ह्या दोन्ही शिक्षण-संस्थांत अनुक्रमें ७॥ ते ८॥ व ९ ते १० वा. विद्यार्थ्यांसाठीं "विद्यार्थ्यांचें आरोग्य व त्यांचे पुढील कर्तव्य" या विषयावर व्याख्यानें झालीं. जे आर्. सिटी स्कूल मधील व्याख्यानास सुमारें ७ शें विद्यार्थी व शिक्षकवर्ग हजर होता.

माणसानें आजारी पडूच नये

आजारी पडून औषधें घेण्यापेक्षां आजारी पडूंच नये या तत्वावर आयुर्वेदाचा भर कसा आहे यासाठीं दिनचर्या व ऋतुचर्या या विषयांचें सांगोपांग विवेचन केलें. व शेवटीं शिक्षणसमाप्तीनंतर विद्यार्थ्यांपुढील पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्याचे दृष्टीनें व मुंबई-राज्यांत नव्यानें सुरूं झालेल्या शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम शिक्षणाच्या सोयीचा लाभ विद्यार्थ्यांनीं अवश्य करून घ्यावा व त्यासाठीं संस्कृत विषयांत उत्कृष्ट प्रगति करावी असें सांगितलें. त्या पाठ्यक्रमाची सर्व माहितीहि दिली.

पाठांतरावर भर देण्याची सूचना

दुपारीं भोजनोत्तर प्रांताध्यक्षांनीं वै. पाठकशास्त्री यांनीं चालविलेल्या शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रम-वर्गास भेट दिली. वै. पाठकशास्त्रीबुवांचें अध्यापन-कार्य पाहिलें. विद्यार्थ्यांची चांचणी घेतली. त्यांना प्रारंभीं तरी पाठांतरावर विशेष भर देण्यास सुचविलें. वर्गाच्या अडचणी समजून घेतल्या व त्या समिती-पुढें निवेदन करण्याचें आश्वासन दिलें.

श्रीसरस्वती पाठशाळा, धुळें

दुपारीं ४॥ वाजतां प्रांताध्यक्षांना मोटारीनें वै. पाठकशास्त्री यांनीं, त्यांच्या वडिलांनीं प्रस्थापित केलेल्या श्रीसरस्वती पाठशाळेकडे नेलें. या पाठशाळेंत विद्यार्थ्यांकडून ३।४ रु. दरमहा नाममात्र घेतले जातात व भोजन, राहाणें व शिक्षण यांची विनामूल्य सोय केली जाते हें पाहून अध्यक्षांनीं समाधान व्यक्त केलें. वेदाध्ययन, संस्कृत, न्याय, सांख्य, तर्कसंग्रह या विषयांचें शिक्षण संस्थेंत दिलें जातें. संस्थेस निःस्वार्थी कळकळीचे वे. शा. सं. वझेशास्त्री हे अत्यंत विद्वान् वैदिक व व्युत्पन्न अध्यापक लाभले असून त्यांची अध्यापनपद्धति व व्यवस्था पाहून प्रांताध्यक्षांना समाधान वाटलें. त्यांनीं विद्यार्थ्यांना थोडक्यांत उपदेश करून शुद्ध आयुर्वेदाध्यनाचाहि फायदा शक्य त्यांनीं घ्यावा असें सुचविलें.

संयुक्त खानदेश वैद्य मंडळ सभा

धुळें येथें रविवार दि. २९ या दिवशीं संयुक्त खानदेश वैद्य मंडळाची कार्यकारी सभा होती. त्या सभेस प्रांताध्यक्ष वै. जळूकरशास्त्री निमंत्रित म्हणून उपस्थित होते. कार्यारंभीं त्यांचा संयुक्त खानदेश वैद्य-मंडळानें श्रीफल व पुष्पहार समर्पण करून सत्कार केला. त्याचप्रमाणें गुरुपरंपरापद्धतीचे अध्यापनासाठीं मान्यता मिळालेले गुरु वैद्य ना. नृ. भगरेशास्त्री आयुर्वेदाचार्य, यांचाहि श्रीफळ व पुष्पहार-समर्पणपूर्वक गौरव करण्यांत आला. सत्कारास प्रत्युत्तर देतांना प्रांताध्यक्ष वै. जळूकरशास्त्री यांनीं संयुक्त खानदेशाची संघटना अधिक प्रभावी होण्यासाठीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अध्यक्ष व मंत्री यांनीं प्रचारार्थ हिंडण्याचें महत्व प्रतिपादन केलें. त्याचप्रमाणें शुद्ध आयुर्वेदीय पाठ्यक्रम यशस्वी होण्यासाठीं गुरु-विद्यार्थी मिळून जेथें हा उपक्रम झाला असेल तेथील कार्यास सक्रिय साह्य करण्याची विनंति केली. धुळें व जळगांवसारख्या ठिकाणीं शुद्ध आयुर्वेद विद्यालयहि निघणें अशक्य नाहीं, तरी स्थानिक पुढारी व धनिकवर्ग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे साह्यानें ही गोष्टहि साध्य करावी असें सुचविलें.

ट्रेनिंग कॉलेजमध्यें व्याख्यान

सोमवार ३०।८।५४ प्रातःकाळीं ८ वा. धुळें येथील ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन या संस्थेतील २५० शिक्षकवर्गांपुढें 'खेडयांतील आरोग्य व शिक्षकवर्ग' या विषयावर व्याख्यान झालें. कॉलेजचे प्रिन्सिपॉल महोदयांनीं असलीं व्याख्यानें आम्हांस वेळोवेळीं ऐकावयास मिळालीं पाहिजेत, पुन्हां असा योग आल्यास स्वतंत्र २।३ तास आम्हीं ठेवून याचा संपूर्ण लाभ घेऊं असें सांगितलें. हा समारंभ आटोपून नंतर प्रांताध्यक्ष ९ चे मोटारीनें तळोद्यास जाण्यासाठीं निघाले.

नरडाणें-नंदुरबार-तळोदें

तळोदें येथें जाण्यासाठीं वाटेंत नरडाणेहून नंदुरबार येथें रेल्वेनें प्रवास करावा लागतो. नंदुरबार येथें वैद्यराज मांडे व वैद्यराज त्रिवेदी यांनीं प्रांताध्यक्ष वैद्य जळूकरशास्त्री यांचा पुष्पहार समर्पणपूर्वक सत्कार केला. व नंतर माध्यान्ह कार्यक्रम आटोपून अध्यक्ष दुपारीं ४ चे मोटारीनें तळोद्याकडे रवाना झाले. या प्रचारकार्यात रनाळें येथील सं. खा. चे भूतपूर्व मंत्री व म. प्रां. वै. मं. चे कार्यकारी सदस्य वै. श्री. रा. करंजीकर हे प्रांताध्यक्षांचे बरोबर होते. त्यांचेसह सायंकाळीं ६ वाजतां अध्यक्ष तळोदें येथें पोहोंचले. तेथें वैद्य काकडे गुरुजी व स्थानिक वैद्य मंडळ यांनीं त्यांचा सत्कार केला. रात्रीं ९ वाजतां वैद्यमंडळापुढें 'संघटनेची आज विशेष आवश्यकता व शुद्ध आयुर्वेद' या विषयावर अध्यक्षांचें १ तास भाषण झालें. नंतर वैद्यबंधूंशीं उपस्थित प्रश्नांवर चर्चा झाली.

विद्यार्थ्यांचें आरोग्य

दि. ३१रोजीं सकाळीं ९॥ ते १०॥ पर्यंत तळोदें येथील मुलांचे मराठी शाळेंत वैद्य जळूकरशास्त्री यांचे 'विद्यार्थ्यांचें आरोग्य' या विषयावर डे. ए. इन्स्पेक्टर यांचे उपस्थितींत सुंदर व्याख्यान झालें.

तळोदें हायस्कूलांत व्याख्यान

दुपारीं १२॥ ते १॥ पर्यंत तळोदें हायस्कूलमध्यें तेथील उत्साही व तरुण प्राध्यापक श्री. देसाई यांचे प्रयत्नानें "विद्यार्थी जीवन व त्यांचे पुढील समस्या" या विषयावर प्रांताध्यक्ष वै. जळूकरशास्त्री यांचे स्फूर्तिप्रद व्याख्यान झालें. व्यायामाचा अतियोग, बेकारीचा प्रश्न, संस्कृत विद्येचें महत्व इ. मुद्दे व्याख्यात्यांनीं उत्कृष्टपणें प्रतिपादन केले. व्याख्यान संपवून लागलींच प्रांताध्यक्ष वै. जळूकरशास्त्री हे नंदुरबारकडे रवाना झाले.

वैयक्तिक व सामुहिक आरोग्य

पूर्व संकेतानुसार नंदुरबारचे म्यु. हायस्कूलमध्यें विद्यार्थ्यांसमोर 'वैयक्तिक व सामुहिक आरोग्य' या विषयावर वै. जळूकरशास्त्री यांचें सायं. ५ ते ६ वाजेपर्यंत सुश्राव्य भाषण झालें.

म्यु. आयुर्वेदीय दवाखान्यास भेट

नन्तर स्थानिक म्यु. आयुर्वेदीय धर्मार्थ चिकित्सालयास अध्यक्षांनीं भेट दिली. तेथील चिकित्सक वै. विठ्ठलशास्त्री त्रिवेदी, भिषगाचार्य धन्वंतरि, हे अत्यंत कळकळीनें आपलें कार्य करीत असतात. रुग्ण-संख्या प्रत्यहीं १५०-१७५ असते. तथापि इतक्या रुग्णांचीं नांवें, चिकित्सापत्रकें लिहिणें, रोगी तपासणें व त्यांचीं औषधें देणें हीं सर्व कामें स्वतः वै. त्रिवेदी यांसच करावीं लागतात. त्यांच्या साहाय्याला कल्पद सुद्धां नाहीं. शिवाय वेतन-श्रेणीसुद्धां फारच कमी आहे हें पाहून अध्यक्षांनीं खेद व्यक्त केला.

यामप्रमाणें नंदुरबारचा कार्यक्रम आटोपून ते पिंपळनेरकडे धुळें मार्गानें जाण्यासाठीं निघाले. परंतु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

…नवर आल्यावर पिंपळनेरच्ये मार्गातील नद्या नाले …ला २ दिवसांतील पावसानें तुडुंब भरून वाहात …ल्यानें गाडया अनियमित जातात असें कळल्या- …तो विचार रहित करावा लागला. व तूर्त हा … येथेंच समाप्त झाला.

शुद्ध आयुर्वेद समितीचा दौरा

मुंबईहून शुद्ध आयुर्वेद समितीचें पत्र आल्या- …विजापूर, बेळगांव, हुबळी, सोलापूर भागाकडे …आयुर्वेद पाठ्यक्रम विद्यालयें व गुरुगृहें पाहणे- …प्रांताध्यक्ष मुंबईकडे रवाना झाले.

सहा प्रकारचा मध

(चिकित्सक वैद्यांना नम्र विनंति)

मुंबई राज्य ग्रामोद्योग समितीनें इतर ग्रामोद्योगाबरोबर मधमाशापालन हा धंदाहि महाराष्ट्रांतील अनुकूल परिस्थितीचे भागामध्यें विशेषतः सह्याद्रीचे …राळ विभागामध्यें सुरू केला आहे. गेल्या ५–६ वर्षांमध्यें या धंद्याच्या तंत्रामध्यें व अवजारामध्यें …सुधारणा झाल्यानें शुद्ध मधाचें उत्पादनहि वाढूं लागलें आहे व त्याचा फायदा मागासलेले भागांतील …तुंना मिळूं लागला आहे.

माशांच्या स्वभावानुसार पेट्याची रचना

आधुनिक पद्धतीप्रमाणें मधमाशा त्यांच्या विशिष्ट …ामध्यें पाळतां येतात व त्यांच्या स्वभावानुसार …ांतील रचना असलेमुळें त्या उत्तम तऱ्हेनें काम … हंगामामध्यें मधाची साठवणूक करतात. पेट्यांच्या …च्या मजल्यांतील चौकटीमध्यें कृत्रिम मेणपत्र्यावर …माशा स्वतःचीं घरें बांधून त्यांत मध साठवून …बंद करितात व अशा तऱ्हेनें पक्क झालेला मध …च्या सहाय्यानें मधाचीं पोवळीं नाश न होता …ला जातो.

मधुमक्षिका संशोधन केंद्र

वरील आधुनिक पद्धतीमुळें निरनिराळ्या प्रका…च्या वनस्पतींचा मध त्या त्या हंगामामध्यें काढतां येतो. महाबळेश्वर येथें २ वर्षांपूर्वी मधुमक्षिका-संशोधन केंद्र (Apiculture Laboratory) स्थापन झाल्यानें निरनिराळया वनस्पतींच्या फुलांतील परागांच्या भिन्नतेमुळें मधाचे पुढील प्रकार निश्चित केले आहेत.

मधाचे मुख्य प्रकार खालील प्रमाणें आहेतः—

(१) जांभूळ (२) हिरडा (३) गेळा (४) व्हायटी (५) तवसा (६) संकीर्ण – कांहीं वनस्पतींच्या फुलोऱ्याचे हंगामाचे वेळीं बदलत्या हवामानामुळें दुसऱ्या कांहीं वनस्पती फुलोऱ्यामध्यें येतात आणि त्यामुळें कांहीं भागामध्यें वरील ६ व्या प्रकारचा मध मिळतो.

अशा तऱ्हेच्या शुद्ध मधाचा आपल्या औषधी द्रव्यामध्यें व अनुपान म्हणून वापर करून वैद्यांनीं या नवोदित धंद्यास उत्तेजन द्यावें.

पांढरें कोड
हजारोंचें गेलें व त्यांनीं अभिप्राय दिलेलें आणि अनेक बक्षिसें मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु.
नकली वैद्यापासून सावध रहा!
मलेरिया शत्रू
पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु.
माहिती मागवा. मोफत पाठवूं.
वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन'
मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

मुंबई राज्य ग्रामोद्योग समितीचा
वर्गीकृत (अहिंसक) मध
मागवून तो आयुर्वेद सेवा संघ औषधी भवनातर्फे विक्रीस ठेवलेला आहे,
हें ग्राहकांना कळविण्यास आनंद वाटतो.
—व्यवस्थापक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुं. प्रांतांतील सर्पदंश व त्यावरील उपाय

श्री. लल्लूभाई मकनजी पटेल, (नवसारी) यांनीं मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या १९५४ च्या द्वितीय अधिवेशनांत सर्पदंशासंबंधीं विचारलेल्या प्रश्नांची माहिती आरोग्यमंत्री श्री. शांतिलालजी शहा यांनीं खालील प्रमाणें दिली आहे.

सर्पदंशानें आपल्या मुंबई प्रांतांत दरसाल हजारों माणसें मृत्युमुखीं पडतात याची सरकारला दखल आहे. इ. सन १९४६ ते १९५३ या सालांत अनुक्रमें ७०५, ७३५, ७९८, ८७७, ९५५, १३२७, ९८४, १०४८ याप्रमाणें सर्पदंशानें मृत्यु घडले. मृत्युचें प्रमाण रत्नागिरी जिल्ह्यांतील ग्रामीण भागांत सर्वांत जास्त व त्या खालोखाल उत्तर सातारा, ठाणे, पुणें, बेळगांव व सोलापूर या जिल्ह्यांत आहे. 'पोलिव्हेलंट अन्टि-स्नेक व्हेनोम सीरम याचा प्रयोग (उपचार) 'कोब्रा' (नाग), 'रसेल्स व्हायपर,' 'क्रेट' आणि फुरसें या चार सामान्य सर्पदंशांच्या बाबतींत रामबाण औषध म्हणून सिद्ध झाला आहे. या सीरमचा (लसीचा) प्रयोग प्रयोगशाळेतील जनावरांवर करून पाहिला असून तो प्रभावशाली होत असल्याचें सिद्ध झालें आहे. ज्या ३९ रुग्णांचे अहवाल हाफकिन इन्स्टिट्यूटमध्यें नोंदलेले आहेत त्यापैकीं ३६ केसेस पूर्णतया बऱ्या झाल्या, उरलेल्या तीन पैकीं २ रुग्ण फार उशीरा आल्यानें दगावले व एक वेळीच योग्य चिकित्सा न मिळाल्यानें दगावली.

लशीचा पुरवठा

ज्या वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून ह्या सीरमकरितां मागणी येते त्यांना ती हाफकिन इन्स्टिट्यूटमार्फत पुरविली जाते. अशी मागणी करणाऱ्यांत ग्रामीण भागांत डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डानें चालविलेल्या दवाखान्यांतील वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर्स यांपैकीं पुष्कळांची मागणी असते.

ह्या संस्थेनें सन १९४६ ते १९५३ अखेरपर्यंत दरसाल अनुक्रमें (प्रत्येकीं १० सी. सी.) ४४३७, ५५१४, ५४५०, ५८२७, ४६११, ५००६, ७१०९, १०५५८ इतकी सर्पदंशावरील सीरमची ॲम्प्यूल्स तयार केलीं.

सन १९५१ ते १९५३ अखेर मुंबई प्रांतास व इतर प्रांतास खालीं दर्शविल्याप्रमाणें ॲम्प्यूल्स पुरविण्यांत आलीं.

१९५१	मुंबई प्रांत	— २४०२
	इतर ,,	— २४०४
१९५२	मुंबई ,,	— ३२२१
	इतर ,,	— ३८८८
१९५३	मुंबई ,,	— ३४३७
	इतर ,,	— ७१२१

हाफकिन इन्स्टिट्यूट सध्यां हें सीरम (लस) लिओफिलाइज्ड स्वरूपांत (सुकविलेल्या स्वरूपांत) पुरविते. त्यामुळें हें सीरम सामान्य हवामानांत १० वर्षेपर्यंत गुणकारी राहूं शकतें. द्रव स्वरूपांतील सीरम मात्र ०° ते २ डिग्री सेंटिग्रेड उष्णतामानांत फक्त २ वर्षेच उपयुक्त स्थितींत राहूं शकतें.

सर्पांची शेती

निरनिराळ्या जातीच्या सर्पांची नैसर्गिक जीवनराहाणी व त्यांच्या प्रजोत्पादनाच्या पद्धती या बाबतींत संशोधनकार्य चालूं आहे. हेतु हा कीं, लशीचा पुरवठा अधिक व्यापक प्रमाणांत करतां यावा. हें संशोधनकार्य करण्याकरितां सरकारनें मुद्दाम एक 'स्नेक फार्म' (सर्प-निवास-क्षेत्र) तयार करविलें आहे.

निरनिराळ्या जातीच्या सापाच्या विषांचें पृथक्करण केले जात असून त्या संबंधांत अधिक अभ्यास चालूं आहे. हेतु हा कीं, सर्पदंशावर वापरावयाच्या सीरममध्यें अधिक सुधारणा व व्यापकता निर्माण करतां यावी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदाचा संक्षिप्त इतिहास

(लेखकः—डॉ. र. कृ. गर्दे सेवानिवृत्त आय्. एम्. एस्. मुंबई)

भारतीय भिषग्विचारांचें मूलस्थान थेट अ-पौरुषेय (मानलेल्या) वेदांत सांपडतें. अथर्ववेदांत तर ज्या औषधींचें गुणधर्मवर्णन व ऋग्वेदांत तर राज-यक्ष्मादि रोग व यकृत्-प्लिहादि अंतरिंद्रियांचें त्रोटक वर्णन आढळतें. म्हणजे आपला "आयुर्वेद" वेदा-इतकाच अतिपुरातन आहे असें मानण्यास हरकत नाहीं. त्यास "पंचमो वेदः" मानतात.

वैद्यक शास्त्राचे २ प्रमुख विभाग

वैद्यकशास्त्राचे दोन प्रमुख विभाग असून त्यांस अनुक्रमें 'कायचिकित्सा' व 'शल्य तंत्र' असें म्हणतात. त्यांचे आद्यप्रवर्तक आत्रेयऋषि व धन्वंतरी-अवतार दिवोदास हे होत. अत्रिपुत्र पुनर्वसूनें सहा शिष्यांना "पुण्यमायुर्वेदम्" पढविला. त्यापैकीं शिष्यवर अग्नि-वेश यानें वैद्यकावर जो ग्रंथ लिहिला तो आयुर्वेदा-वरील आद्यग्रंथ होय. भेड-जातुकर्णादि इतर पांच शिष्यांनीं आपापल्या योग्यतेनुसार वैद्यक ग्रंथ लिहिले. या "षड् भिषक्संहिता" पैकीं अग्निवेशसंहिता हा वैद्यकशास्त्रावरील कायचिकित्सेचा पहिला आकर ग्रंथ होण्याच्या योग्यतेचा ठरला हें वर सांगितलेंच आहे. (प्रथम भरद्वाजानें इंद्रापासून आयुर्वेद आणला असला तरी चरक-कालांत एक अग्निवेशतंत्रच आपल्या गुणानें श्रेष्ठ ठरल्यानें टिकून राहिलें.) उपरिनिर्दिष्ट "षड् भिषक्संहिता" या फक्त कायचिकित्सेवरील विवरणात्मक असून सुश्रुतादींनीं लिहिलेल्या चार संहिता शल्यतंत्रावरील विवेचनात्मक आहेत.

तात्पर्यार्थानें असें म्हणतां येईल कीं ऐतिहासिक कालांत अनेक ऋषी-मुनींनीं अनेक वैद्यकीय प्रबंध जरी लिहिले असले तरी शेवटीं त्या सर्वांचे संग्रहा-त्मक असे दोनच ग्रंथ टिकून राहिले व ते म्हणजे चरकसंहिता व सुश्रुतसंहिता. त्यांत अनुक्रमें काय-चिकित्सा व शस्य-तंत्र यासंबंधीं विवेचन आहे, हें वाचकवर्ग जाणतोच. वैद्यशास्त्रविषयक सव माहिती एकाच ग्रथांत यावी अशा अभिनिवेशानें वाग्भटानें या दोन ग्रंथांतील माहिती एकत्र करून जो ग्रंथ लिहिला त्याचें नांव 'अष्टांगहृदय'. (वाग्भटानें प्रथम 'अष्टांगसंग्रह' या नांवें एक ग्रंथ लिहिला, व त्यांतील "न्यून्य तें सरतें, अधिक तें परतें" करून शेवटीं "अष्टांगहृदय" लिहिलें. अर्थात् इतक्या परिश्रमानंतर लिहिलेला हा ग्रंथ आर्ष‡वैद्यका-वरील आकर ग्रंथ न ठरला तरच नवल.)

मिश्र वैद्यक युग सुरूं झालें

कालांतरानें या आर्षवैद्यकाच्या चिकित्सास्थानांत रसशास्त्राची भर पडून 'मिश्र-वैद्यक-युग' सुरूं झालें. रसविद्या प्राचीन कालापासून भारतीयांना अव-गत होती. तरी चंद्रगुप्ताच्या काळीं शिकंदराच्या स्वाऱ्यामुळें व बौद्धकाळीं बुद्धधर्मप्रसारार्थ भारतीयांचें दळण-वळण परकीयांशीं होऊं लागून, पुढें वाढूंहि लागलें, त्यामुळें रसवैद्यकाची अभिवृद्धि होत गेली. पण शल्यतंत्र मात्र मागें पडूं लागलें. व शेवटीं अति-रेकी अहिंसेमुळें निर्माल्यवत् झालें.

कांहींकाल आर्षवैद्यक व रसविद्या ८ यांचा संघर्ष

---

‡ आर्ष म्हणजे ऋषिप्रणित

८ पारा व हिंगूळ हे रसविद्येचे आधार-स्तंभ होत. रसवैद्यकांतील औषधें व्याधीशीं समान-गुण असून 'व्याधिविपरीत' नाहींत. समलक्षण चिकित्सेचें बीज रसविद्या व चरक या उभयतांत तत्त्वरूपानें आढळतें. 'मात्रया भक्षितं देवी विषमप्य-मृतायते', व शीतैः शीतं तथा जयेत्, अर्थात् या बीजापासून होमियोपॅथीच्या वृक्षाला खतपाणी घालून तो बहरलेला व विस्तारलेला झाला तो पाश्चिमात्य देशांत, विशेषतः जर्मनीमधील डॉ. हानेमान यांच्या परिश्रमानें.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चालूं राहून पुढें त्याची स्वाभाविक परिणति मिश्र-वैद्यकांत झाली. अर्वाचीन भावप्रकाशादि ग्रंथांतील विवेचन हें मिश्रवैद्यकीय स्वरूपाचें आहे. वाग्भटोत्तर कालांतील वैद्यकीय ग्रंथ वरीलप्रमाणेंच समजण्यास हरकत नाहीं. ते म्हणजे वृंदमाधव, वैद्यरहस्य, शार्ङ्गधर इत्यादि होत. त्यांतच माधव-निदान व धन्वतरीचे निघंट (म्हणजे औषधि गुणधर्म कोश) इत्यादींचा समावेश होतो. असे १२ निघंट उपलब्ध आहेत. थोडक्यांत म्हणजे आर्य वैद्यकाचे दोन भाग आर्षभाग व रसभाग-असून त्यांचें सम्यग्दर्शन अनुक्रमें (वाग्भट-अष्टांगहृदय) व रसरत्नसमुच्चय या ग्रंथद्वयींत होऊं शकेल.

आर्ष वैद्यकांत नाडीपरीक्षा नाहीं

वैदू (वैद्य नव्हे) व भोंदू धंदेवाईकामुळें अवनत झालेली "नाडी-परीच्छा वैदपरीच्छाऽऽ," यांतील नाडीपरीक्षेचें बीज आर्षवैद्यकांत पाहूं गेल्यास निराशाच पदरीं येते. ती मागाहून यवनधर्मीयांकडून आली असावी, किंबहुना हठ-योगशास्त्रापासूनहि तिची उसनवारी संभवते. त्या शास्त्रानें "७२००० नाड्या" सांगितल्या असून त्यांच्या शुद्धीवर भर दिला आहे. आयुर्वेदांतील पंच-शोधन-कर्में व हठयोगांत धौति, नेति, बस्ति इ. मधील साम्य व साधर्म्य सुज्ञांना अपरिचित नाहीं. (योगदर्शनकार पतंजलीनें चरकावर भाष्य लिहिलें पण तें उपलब्ध नाहीं.)

सिंधु देशांतील 'वाग्भट' घराणें

आतां, प्रत्यक्ष वाग्भटासंबंधीं चार शब्द लिहून आर्यवैद्यकाचा हा धावता इतिहास आटोपतां घेऊं. 'वाग्भट' हें वैद्यकीय पिढीजात घराणें, ४ थ्या शतकांत, तत्कालीन 'सिंधु' देशांत (म्हणजे हल्लींच्या पंजाबच्या वायव्येस) वास्तव्य करून होतें. त्यांच्या पित्याचें नांव सिंहगुप्त असें होतें. त्यामुळें 'सिंहगुप्त-सूनु' (संघगुप्तसूनु !) कृत 'रसरत्नसमुच्चय' या रसविद्याग्रंथाचें कर्तृत्व वाग्भटावर लादलें जातें. पण त्याचा कर्ता 'गोविंदपूज्यपाद' हे १२।१३ व्या शतकांतील असावेत.

वाग्भटाचे ३ वैद्यकीय ग्रंथ

वाग्भटाचे वैद्यकीय ३ ग्रंथ प्रसिद्ध असून (१) अष्टांगसंग्रह उर्फ वृद्ध वाग्भट, (२) अष्टांगहृदय व (३)सिद्धसार यापैकीं शेवटचा (कदाचित् रसशास्त्रा-वरील) उपलब्ध नाहीं. मधला अष्टांगहृदय हा ग्रंथ सर्वप्रसिद्ध होऊन भारतवर्षांतच नव्हे तर मलायादि द्वीपकल्पांतहि (तद्देशीय भाषेंत) प्रसृत झाला. वाग्भटाचें भाषासौष्ठव किंवा काव्यशक्ति ही त्याच्या प्रसिद्धीचीं मुख्य कारणें नसून सर्व पुरातन वैद्यकीय ज्ञान अनायासानें व पद्धतवार असें एकत्र मिळण्याची सोय हें होय. आतां या ग्रंथाच्या अंग-प्रत्यंगाबद्दल थोडें पाहूं. कायचिकित्सादि वैद्यकीय-शास्त्राचीं आठ अंगें सर्वांच्या परिचयाचीं आहेतच. त्या अष्टांगांचें सूत्रमय वर्णन म्हणजे आयुर्वेदसार-दर्शन वाग्भटानें केलें आहे. पुढें दिल्याप्रमाणें सहा स्थानांत आयुर्वेदाचें सम्यक् दर्शन वाग्भटानें घडविलें आहे असें समजण्यास हरकत नाहीं.

६ स्थानांतील सम्यक् दर्शन

१ लें सूत्रस्थान, एकंदर ३० अध्याय— यांत आरोग्यशास्त्र, औषधिक्रिया, यंत्रशस्त्रा-दींची माहिती आहे.

२ रें शारीरस्थान, एकंदर ८ अध्याय — यांत गर्भ, प्रसूति, मर्में, आयुष्य-रिष्ट लक्षणें आदि विषयक वर्णन आहे.

३ रें निदानस्थान, एकंदर १६ अध्याय— यांत ४० प्रमुख रोगाबद्दल वर्णन आहे.

४ थें चिकित्सास्थान, एकंदर २२ अध्याय— यांत वरील ४० रोगाची चिकित्सा दिली आहे.

५ वें कल्पस्थान, एकंदर ६ अध्याय— यांत वमन-विरेचनादि संबंधीं कल्प, औषधांचीं वजनें-मापें इ. दिलीं आहेत.

६ वें उत्तरस्थान, एकंदर ४० अध्याय — यांत बालरोग,शालाक्य व शल्यतंत्र,विषचिकित्सा,रस-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

…, वाजीकरण इ. विषयक माहिती आहे.

…व्या शतकापर्यंतचा संक्षिप्त इतिहास

…अशा हा आपल्या आयुर्वेदाचा १७ व्या शतका… …चा संक्षिप्त इतिहास आहे. गेल्या ४ शतकांतील …ा उन्नति–अवनतीचा इतिहास कोणी वैद्य-बंधूनीं …ास सध्यांच्या आयुर्वेद–पुनरुज्जीवनास मदतच …, तसा योग लवकरच येवो अशी त्या धन्वं… …ी प्रार्थना करून प्रिय वाचकांची रजा घेतो.

* * *

प्रस्तुत लेख माझे पितामह कै. डॉ. ग. कृ. …एल्. एम्. एस्. यांच्या 'सार्थ वाग्भट' या ग्रंथाच्या …तत्प्रचुर उपोद्घाताधारें लिहिला आहे. त्यांचा …र्वेदाभिमान जाज्वल्य पण डोळस होता. त्यामुळें …कालीन आंग्लविद्याभूषित डॉक्टरवर्ग व आयु… …र्वेदाभिमानी वैद्यवर्ग या उभयतांशीं नेहमीं …विवाद होत. आंग्लशाहीच्या भर अमदानींत …लेल्या आयुर्वेदाबद्दल तत्कालीन सुशिक्षितांत …र्वेदाबद्दल आस्था-उत्कंठा जागृत करण्याचें अप्रिय …त्यांनीं मोठ्या हिरिरीनें केलें, याबद्दल दुमत होई… …वाटत नाहीं. किंबहुना त्यांनीं त्यावेळीं एकट्या… …केलेल्या प्राथमिक आद्य प्रयत्नाला आजचें …ळ आलें असेंहि म्हणतां येईल.

———

…कांचा पत्रव्यवहार

कुष्ठरोगोंपर 'नवनीत'

मेह आदि कुष्ठ रोगोंपर 'नवनीत' नामक दवा …के वैद्य काम में लाते हैं। शायद यह दवा कथिल …बनाया करते हैं। यदि इसका पाठ मालुम होवे …कृपया लोककल्याणकी दृष्टिसे आगामी आयुर्वेद …त्रिका में प्रकाशित करेंगे। या पाठ प्रकाशित करवाने …लिये आयुर्वेद' पत्रिका में सूचना निकालेंगे अशी उमीद …।

—राधाकृष्ण कुलवाल, मोवाड (म. प्र.)

———

वाचकांचा पत्रव्यवहार —

" ज्ञानांत निःसंशय भर "

आयुर्वेद पत्रिकेच्या दिनांक १ सप्टेंबर १९५४ च्या अंकांतील 'अग्निदग्ध-चिकित्सेंतील विरेचनाचें महत्व' हा वैद्य श्री. लक्ष्मीबाई बोरवणकर यांचा लेख वाचला. त्यांनीं सांगितलेल्या अनुभवानें वाचकांच्या ज्ञानांत निःसंशय भर पडली आहे. त्याचप्रमाणें अग्निदग्धव्रणतेलाचा निघंटरत्नाकरांतील पाठ लेखांत दिला त्याबद्दल मी लेखिकेचा आभारी आहे.

कारखान्याची जाहिरात झाली

मात्र, त्या लेखांत अग्निदग्धव्रणतेल 'सांडू ब्रदर्स' यांचें वापरलें असें लिहिलें आहे. त्यामुळें कारखान्याची जाहिरात होत नाहीं काय? तेलाचा मूळ ग्रंथांतील पाठ दिल्यावर लेखिकेचें काम संपतें, असें मला वाटतें.

पुणें २ वैद्य मा. द. राजपाठक

[या पत्रांत एक महत्वाचा प्रश्न वै. श्री. राजपाठक यांनीं उपस्थित केला आहे व त्याचें उत्तर देणें अवश्य आहे. जो विचार वाचकांच्या मनांत उद्भवला, तो आमच्याहि मनांत आला नाहीं असें नाहीं. पण त्यांचें मनाशीं निराकरण करूनच त्या लेखांत " सांडू ब्रदर्स " यांचें नांव छापण्यांत आलें आहे. मागेंहि डॉ. सावनूर अंकांत 'आरोग्य मिश्रण (पनवेल)' असें छापलेलें होतें हें वाचकांच्या लक्षांत आलें असेल.

यांत कांहींहि गैर झाल नाहीं

जो जो जें कांहीं काम करतो, वस्तु तयार करतो अगर ती विकतो, तें तें सर्व कर्म द्रव्यप्राप्तीसाठीं असतें. काम करणें व द्रव्य मिळविणें यांत गैर असें कांहींच नाहीं, उलट ती 'सार्थ लोकसेवाच' आहे. या जीवन-नाटकांतील आपल्या भूमिका प्रत्येकानें चांगल्या वठविल्या तर एकंदर जीवन समृद्धच होणार आहे. आपणास काम मिळावें व आपण केलेल्या कामाचा योग्य मोबदला आपणास मिळावा असें प्रत्ये-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कास वाटत असते. त्याचप्रमाणें 'सांडू ब्रदर्स' सारख्या कारखान्यांनीं लोकोपयोगी असें अग्निदग्धव्रण तेल तयार केलें व त्याची माहिती आयुर्वेदपत्रिकेद्वारा लोकांना होऊन तें ठिकठिकाणीं योग्य प्रसंगीं वापरलें गेलें तर त्यांत कांहीं गैर झालें असें आम्हांस वाटत नाहीं.

परदेशी मलमांचा प्रचार

नुकतेच एका मुलाचा हात गरम कोकोमध्यें भाजला. पालकांनीं त्यावर बर्नॉल नांवाचें इंग्लंडमध्यें तयार झालेलें मलम लावलेलें पाहण्यांत आलें. परदेशी लोकांनीं या देशांत खूप जाहिरात करून डॉक्टर, वैद्य व जनता यांना परदेशी मालाचे ग्राहक बनवावें, आणि त्यामुळें आपण आपल्या देशबांधवांना बेकारीच्या खाईत लोटावें हें केव्हांहि इष्ट नाहीं. ही स्थिति सुधारण्यासाठीं खात्रीच्या मालाची योग्य जाहिरात करून आपली जनता सुजाण करणें हें आपलें कर्तव्यच आहे, असें आम्हांस वाटतें.

सर्वांना औषधें करणें शक्य नसतें

नुसता एखाद्या औषधाचा पाठ कळला म्हणजे पुरे, त्या पाठाप्रमाणें कोणी औषध तयार करून ठेवलें आहे कीं नाहीं हें कळण्याची चिकित्सकाला आवश्यकता नाहीं असें पत्र-लेखकाचें म्हणणें आहे. सर्व चिकित्सकांना औषधीकरण चांगलें जमतेंच असें नाहीं, व जमत असलें तरी प्रत्येक वैद्य सर्व औषधें सर्व काळ तयार करून जवळ बाळगू शकेल असेंहि नाहीं. अग्निदग्ध व्रण हा कांहीं ताप, खोकला, अतिसार याप्रमाणें नित्याचा रोग नव्हे. कोणतेंहि औषध तयार करावयाचें म्हणजे तें थोड्या खर्चांत होत नाहीं व थोडें करून परवडतहि नाहीं.

ही समाजाची आवश्यक गरज आहे

मोठ्या प्रमाणावर उत्तम औषधें तयार करून तीं सर्वत्र उपलब्ध होऊं शकतील अशी व्यवस्था करणाऱ्या संस्था असणें ही समाजाची एक आवश्यकता आहे. व ती पूर्ण केल्याबद्दल अशा संस्थांना आपण धन्यवाद दिले पाहिजेत. व्यक्ती कितीहि कर्तबगार असली तरी तिच्या कार्याला विविध मर्यादा असतात. संस्था या आपल्या सेवेचा लाभ विस्तृत क्षेत्रभर व दीर्घकालपर्यंत देऊ शकतात, देत राहतात. म्हणून अशा संस्था निर्माण व्हाव्यात यासाठीं व्यक्तींनीं व समाजघटकांनीं झटणें हें त्याचें कर्तव्य आहे. असें कांहीं करणें शक्य झालें नाहीं तर निदान अशा संस्थांचें शुभ चिंतन तरी अवश्य करावें.

गबर संस्था व संपन्न व्यापारी

उत्पादक संस्था व व्यापारी, वस्तूंची विक्री करतांना फार नफा मिळवितात, अशीहि तक्रार नेहमीं सर्वत्र ऐकूं येते. कांहीं उत्पादक-संस्था व व्यापारी गबर झालेल्या दिसतात व त्यामुळें हा समज होणें स्वाभाविक आहे. पण हा कांहीं नियम नाहीं. कित्येक उत्पादक--संस्था व व्यापारी नामशेष झालेले आपणाला वारंवार पाहावयास सांपडतात. व्यापार म्हणजे केवळ नफा नव्हे. व्यापार म्हणजे नफा तोटा दोन्हीहि; एखादी देवी नवसाला पावते असा बोलबाला झालेला असतो व देवीच्या समोर नवस पावल्याची खूण म्हणून उंबऱ्याला खूप रुपये ठोकलेले दिसतात, त्यामुळें तो विश्वास अधिकच दुणावतो. पण विचारी मनुष्य म्हणतो 'अरे न पावलेल्या नवसांचा हिशेब कोठें आहे? तो पाहिला म्हणजे नक्की कळेल कीं देवी पावते हें खरें कीं पावत नाहीं हें खरें ' ?

व्यापारी गबर होतात

यावर कांहीं वाचक असें म्हणतील कीं, कांहीं व्यापारी गब्बर होतात हें तरी खरें ना ? मग त्यांना लोकांस लुबाडून असा पैसा मिळविण्याचा काय अधिकार आहे ? जनता गरीब आहे इ. इ. त्यावर आमचें उत्तर असें आहे कीं, व्यापारी हे गाईम्हशीप्रमाणें दुधाळ प्राणी आहेत. त्यांची कास मोठी दिसली व त्यांत पुष्कळ दूध असलें तर त्याबद्दल आपणास आनंदच वाटला पाहिजे. त्याबद्दल दुःख होण्याचें कांहींच कारण नाहीं. तें दूध मिळविण्यासाठीं त्या गाईला मारहाण करण्याची किंवा ठार करण्याची कांहीं आवश्यकता नाहीं. वासरू अगर दोहक (गवळी) बनून त्या कासेंतील दूध बालकांना, रुग्णांना, वृद्धांना कसें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

[...]ड एवढीच व्यवस्था करण्याकडे आपली बुद्धि [...]न खर्च केली पाहिजे. 'सांडू ब्रदर्स' 'धूतपापेश्वर' [...]रख्या संस्थांच्या पुढें, आयुर्वेदशास्त्र प्रगतीच्या [...]रख्या योजना मांडून त्या त्यांना पटतील व [...]त्या आपल्या म्हणण्यावर व कृतीवर विश्वास बसेल [...]ना आचरण आम्ही ठेवलें पाहिजे. शीवचें शुद्धआयुर्वेद [...]लय, नागपूर विद्यापीठांतील आयुर्वेदासन, महा[...]प्रांतीय वैद्यांची चळवळ इत्यादि अनेक उपयुक्त [...]ना वेळोवेळीं व अखंड मदत करून या औषधी [...]दत्यांनीं आपली सत्प्रवृत्ति वारंवार व्यक्त केली [...]ले.

अधिक चांगल्या गोष्टी

[...]पाहून अधिक चांगल्या गोष्टी त्यांच्या हातून [...]न घडल्या तर त्याचा सर्वस्वी दोष त्यांच्यावर [...]हें म्हणणें युक्त होणार नाहीं. त्याचे ५० टक्के [...]दार समाज हाच समजला पाहिजे. केवळ पैसा [...]ला म्हणजे सर्व चांगल्या गोष्टी घडून येतात वा [...]जा येतात असें नाहीं. त्यासाठीं सत्प्रवृत्त व [...]उद्यम कार्यकर्त्यांची आवश्यकता असते. असे कार्य[...]निर्माण करणें हें त्यागी लोकांचें काम आहे. धनी [...]तें करूं शकत नाहींत.

वैद्य व समाज यांची सेवा

[...]आपण केलेली अग्निदग्धव्रणाची चिकित्सा [...]ला वैद्य श्रीमती लक्ष्मीबाई बोरवणकर यांनीं [...]च्या संपादकांना निवेदन केली. त्यावेळीं तेलाच्या [...]चा प्रश्न उत्पन्न झाला नव्हता. पत्रिकेच्या [...]रकांनीं पत्रें पाठवून पाठाची माहिती वै. बोरवण[...]कर सांडू ब्रदर्स यांच्या कडून पत्रानें मिळविली [...]लेखांत अंतर्भूत केली. सांडू ब्रदर्स यांनीं आमचा [...]उद्देश जाणून अग्निदग्धव्रणतेलाची माहिती [...]निश्चितपणें पुरविली याबद्दल आम्ही त्यांचे आभारी [...]होत. सांडू ब्रदर्स हे केवळ लोभी व्यापारी नाहींत. [...]वैद्य व समाज यांची सेवा करूं इच्छितात हेंच [...]नीं आपल्या या कृतीनें सिद्ध केलें आहे.

यशाचे वाटेकरी झाले पाहिजे

सरकार ज्याप्रमाणें जनतेंतून [कायद्यानें] पैसे जमा करून सामुदायिक उपयोगाचीं कामें करते त्याचप्रमाणें खाजगी सेवक संस्थांनीं, गवर उत्पादक संस्था व व्यापारी यांच्याकडून पैसे घेऊन सेवेचीं कामें चालविलीं पाहिजेत; तसेंच त्यांच्या योग्य प्रवृत्तींचा प्रचार करून त्यांना यश प्राप्त करून देण्यांतहि वांटेकरी झालें पाहिजे.

संस्थाबद्दल आदर बाळगला पाहिजे

मागें अनेक माथेफिरूंनीं कारखाने, गिरण्या इ. उत्पादक संस्थांची नासधूस केलेली आपण पाहिली आहे. त्यामुळें कामगार लोकच बेकार झाले व लोकांना नित्योपयोगी वस्तूंचा पुरवठा कमी झाल्यामुळें महागाई वाढली. म्हणून उत्पादक कार्यालयें व वितरणसंस्था यांच्याबद्दल जनतेनें मनांत अनादर न बाळगतां गाई-प्रमाणें आदर बाळगला पाहिजे व त्यांच्या स्तनांतील दूध निर्भेळपणें गरजूंना मिळेल अशी व्यवस्था आपल्या बुद्धिकौशल्यानें केली पाहिजे. -संपादक]

———

नवीन वैद्यक मराठी मासिक

: महाराष्ट्र वैद्यक परिचय :

औषधें, इंजेक्शनें, रोगनिदान, रुग्ण-परीक्षा, नवीन शोध वगैरे पाश्चात्य वैद्यकांतील ज्ञान सोप्या मराठी भाषेंतून देणारें एकमेव मासिक "महाराष्ट्र वैद्यक परिचय" 'वैद्यक मेघांतील बहुमोल सहाय्यक'. आजच वर्गणीदार व्हा! वार्षिक वर्गणी ५ रु.

(किरकोळ अंकासाठीं आठ आण्याचीं तिकिटें पाठवावीत.)

पत्ता:-संपादक वैद्य जे. बी. मोकाशी, ठाणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दाढदुखीवर त्रिफळा

कांहीं दिवसापूर्वीची गोष्ट. एका तरुण वकिलाच्याकडे सहज कांहीं खाजगी कामासाठीं गेलों असतां ते दाढ धरून बसलेले दिसले. त्यांना कारण विचारतां ते म्हणाले:– ३ दिवसापासून माझी दाढ उठली आहे व ती भयंकर दुखत आहे. रात्रीची झोप येत नाहीं. डॉक्टरांनीं दिलेल्या गोळ्या घेत आहे. गोळ्या घ्याव्या तेवढ्यापुरती ती थांबते, व पुनः दुखू लागते.

दुसरी दुखरी दाढ काढली

या गृहस्थांनीं आपली दुसरी एक दुखरी दाढ १। महिन्यापूर्वी काढून घेतली होती, व तो खड्डा अद्याप भरला नव्हता. त्या खड्ड्याजवळची दाढ सध्यां दुखत होती. गरम चहानें त्याला झटका बसत होता व थंड पाण्यानें बरें वाटत होतें. त्यामुळें ते थंड पाण्याच्या चुळा वरचेवर भरत असत.

दाढेच्या खड्ड्यांत त्रिफळाचूर्ण बसविलें

विकाराचें स्वरूप लक्षांत आल्यामुळें मी तावड-तोब धरून त्रिफळाचूर्ण नेलें व ते त्यांना त्या खड्ड्यांत दाबून बसविण्यास सांगितलें व वर कापसाचा बोळा बसविला. मी तेथें १५ मिनिटें मुद्दाम अनुभव पाहण्यासाठीं थांबलो. या ठिकाणीं त्रिफळ्याचा उपयोग करावा ही कल्पना मला आयुर्वेद पत्रिका ता. १६ जुलै मधील आयुर्वेदाचार्य म. बा. दीक्षित याच्या दंतमंजनासाठीं त्रिफळाचूर्णाचा उपयोग या लेखावरून सुचली.

१५ मिनिटांत दाढदुखी थांबली

सांगण्याचें आश्चर्य असें कीं त्या गृहस्थांची ती दाढदुखी १५ मिनिटांत कमी झाली व ते लगेच चहा करून प्याले. हें औषध काय आहे? याची मी त्यांना कल्पना दिली नाहीं. उलट हें दाढ-दुखीवर रामबाण औषध आहे, त्यांत अनेक बहुमूल्य वस्तु घातलेल्या आहेत अशी त्याची भावना करून दिली. शिवाय रोज २-३ वेळ याच प्रमाणें या औषधाचा उपयोग करा अशी सूचना देऊन ३ तोळे त्रिफळाचूर्ण दंतमंजनाप्रमाणें वापरण्यासाठीं दिलें आहे.

यानंतर २-२ दिवसांनीं त्यांची मी भेट घेतली. दांतासंबंधीं त्यांची आतां कांहींहि तक्रार राहिलेली नाहीं.

नाशिक — वैद्य ग. म. लोखंडे

मध्य प्रदेश वैद्य हकीम संघ

मध्यप्रदेश रजिस्टर्ड वैद्य हकिम संघाचे मंत्री कळवितात कीं मध्यप्रदेश सरकारच्या अबकारी खात्याच्या कमिश्नर साहेबांनीं संघ कार्यालयास असें कळविलें आहे कीं वैद्यकीच्या धंद्यांत औषधाच्या उपयोगाकरितां ज्या वैद्यहकिमांना भांग किंवा अफूची जरूरी असेल त्यांना ती मिळविण्याकरितां सरकारकडून लायसन्स देण्यांत येतील.

तरी वैद्यहकिमबंधूंना त्यांच्या धंद्याकरितां लागणाऱ्या भांग-अफूचें लायसन्स मिळविण्याकरितां त्यांनीं जिल्ह्याच्या अबकारी अधिकाऱ्याकडे १ रुपयाचे कोर्ट तिकिट लावून अर्ज करावा. कोणत्या औषधाच्या उपयोगाकारतां किती प्रमाणांत भांग किंवा अफूची गरज आहे याचा स्पष्ट उल्लेख अर्जांत करण्यांत यावा.

या योजनेचा फायदा घेण्याचे दृष्टीने परवाने मिळण्याकरितां वैद्यांना कांहीं अडचणी आल्यास त्या त्यांनी संघ कार्यालयास कळवाव्य.

मंत्री, मध्यप्रदेश रजिस्टर्ड हकिम संघ,
दुर्गा आरोग्य मंदिर, सितावर्डी नागपूर ६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदीय व्यावसायिकांसाठीं उजळणी-अभ्यास वर्ग

ता. २७-९-५४ पासून २३-१०-५४ पर्यंत ४ आठवड्याचा एक उजळणी अभ्यासवर्ग फॅकल्टी आयुर्वेद आणि युनानी सिस्टिम्स ऑफ मेडिसिनच्या विद्यमानें पुढील ठिकाणीं सुरूं होणार आहे.

आयुर्वेद महाविद्यालय, अहमदनगर	(माध्यम-मराठी)
आयुर्वेद विद्यालय, जामनगर	(,, -गुजराती)
आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा सिटी	(,, -मराठी)

केवळ, सरकारी, म्युनिसिपल, लोकलबोर्डाचे अगर एस्. एम्. पी. दवाखान्यांत काम करीत असरजिस्टर्ड अगर एन्लिस्टेड वैद्यांनाच या अभ्यासवर्गांत प्रवेश मिळेल.

संपूर्ण अभ्यासक्रमाची फी ३० रु. आहे एकूण ८० व्याख्यानांचा हा अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रपांत प्रवेश मिळविण्यासंबंधींचे अर्ज वैद्यांनीं ज्या त्या संस्थेच्या चालकांकडे करावेत.

(पान नंबर १८८ वरून)

२) इतर आयुर्वेद-विद्यालयांतील आयुर्वेदीय विषयांचे अध्यापक

३) शुद्ध आयुर्वेद-पाठ्यक्रम समितीने केलेले मान्य गुरु.

४) इतर जिज्ञासु वैद्यवर्ग

विद्यमान विद्यार्थ्यांकरितां ही परिषद नाहीं. त्यांना प्रवेश दिला जाणार नाहीं.

विशेष सूचना

१] ज्यांना चर्चेंत भाग घ्यावयाचा असेल त्यांनीं आपआपल्या विषयांचीं टांचणें, महत्वाचे मुद्दे, शंका, कूटस्थळें इ. दि. ५।१०।१९५४ चे आंत निमंत्रकाकडे पोहोंचतील अशा बेतानें पाठवावीत. तरच चर्चेंत भाग घेतां येईल.

२] श्रोता अगर चर्चेंत भाग घेऊं इच्छिणारानें आपली वर्गणी दि ५ ऑक्टोबर १९५४ पर्यंत निमंत्रकाकडे पोहचेल अशा बेतानें पाठवावी

विनंति

आपल्या मार्गदर्शनाची परिषदेस जरुरी आहे. कृपया [illegible] उपस्थित राहून आयुर्वेदाच्या प्रगतीचा १ [illegible] गाठण्यांत साहाय्य करावें अशी विनंति आहे.

अनुक्रमणिका

स्वामी कुवलयानंदजींच्या कार्याचा सत्कार	१८७
आयुर्वेद अध्यापक परिषद, नासिक	१८८
'वैद्याकडून पुनर्नोंदणी फी घेऊ नये' ठराव	१८९
शिंदीच्या गुळया पौष्टिक आहेत.	१९१
दादमुजेवर उदुंबरक्षाराचा उपयोग	१९२
शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रमाचें स्वागत	१९३
पोतविधि	१९६
वै. बागेवाडीकरांच्या २ लेखांचा विचार	१९७
आधीं प्राकृत, मग संस्कृत भाषा	२०२
पंचवार्षिक योजना व आयुर्वेद	२०४
महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ-वृत्त	२०५
सहा प्रकारचा मध	२०७
मुंबई प्रांतांतील सर्पदंश व त्यावरील उपाय	२०८
आयुर्वेदाचा संक्षिप्त इतिहास	२०९
शानांत निःसंशय भर	२११
दादखुजीवर त्रिफळा	२१४

दि. १ ऑक्टोबर १९५४ पासून रेल्वेच्या वेळापत्रकांत बदल होण्याची शक्यता लक्षांत घ्यावी.

वैद्य वि. म. गोगटे
निमंत्रक
आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद
C/o आयुर्वेद-सेवा-संघ, नासिक.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नेत्रबलासाठीं नित्याचा उपाय

रशियांत जाऊन आलेले एक नामवन्त व्यापारी व पुढारी नाशिक येथें संभाषणाच्या ओघांत म्हणाले:—

भारतांत जितका चष्म्यांचा वापर आहे, तितका रशियांत दिसला नाहीं. डोळे चांगले रहावेत, चष्मा लागू नये यासाठीं कांहीं उपाय आपणास सुचवितां येतील कां ? ”

“ स्वप्नकालीं मधतुपाबरोबर त्रिफलासेवन हा नित्याचा उपाय आयुर्वेदांत सांगितला आहे व त्यासंबंधीं आमचे प्रयोग चालू आहेत. रोज स्वप्नकालीं १ चमचा भर घ्यावा असा एक त्रिफला-कल्प, आयुर्वेद सेवा संघानें तयार केला आहे; त्याचें नांव—

नयनामृतप्राश

रोज रात्रीं झोपण्यापूर्वीं १ चमचा हें औषध सेवन करावें. मग नंतर कांहींहि खाऊ पिऊ नये. त्रिफला मधुसर्पिर्भ्यां निशि नेत्रबलाय । (वाग्भट सूत्रस्थान अध्याय ८ श्लोक ४४) व त्रिफला सर्व रोगघ्नी मेधायुःस्मृतिबुद्धिदा॥(वाग्भट उत्तरस्थान अ. ३९ श्लोक ४२।४३) या वचनांच्या आधारें हा प्राश बनविण्यांत आला आहे व तो गुणकारी आहे असें अनुभवास आलें आहे.

२० तोळे २ रु. १० तोळे १ रु.

नयनामृतांजन

हल्लींच्या पिढींत बारीक अक्षरांचीं पुस्तकें फार वाचण्यामुळें विद्यार्थ्यांना दूरचें दिसत नाहीं असें सर्वत्र पाहाण्यांत येतें. अशा ठिकाणीं डोळ्यांतील बाहुलीची संकोच-विकासशक्तीच कमी झालेली असते. सबब त्यासाठीं डोळ्यांत घालण्याचें दुसरें एक औषध वापरणें अवश्य आहे. तूर्त नयनामृतांजन हें वापरण्याची शिफारस आम्ही करीत आहोत.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नाशिक

संपादक व प्रकाशकः—वैद्य विंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य चिवलकर कारंजा, नाशिक
मुद्रकः—श्री. चिं. ओक, सर्कल प्रेस, आग्रारोड, नाशिक
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
गुरुकुल पत्रिका
पुस्तकालय
गुरुकुल

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

र्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु.   १ अंकाची किंमत ४ आणे

(८ वें)   नासिक, ता. १ ऑक्टोबर १९५४   (अंक ७ वा

मालय प्रदेशांत वनौषधि उद्यान व संशोधन

मुंबई राज्य सरकारचें कर्तव्य

उत्तर प्रदशाचे राज्यपाल श्री. कन्हैयालालजी मुनशी यांना रानीखेत येथील वैद्यांनीं तेंच मानपत्र समर्पण केलें; त्यावेळीं उत्तरादाखल भाषण करतांना राज्यपाल म्हणाले " मी माझ्या लपणापासूनच आयुर्वेदीय औषधांचा प्रत्यक्ष अनुभव घेत ों. या देशांत इंग्रजांचें राज्य सुरू झालें तेव्हांपासून ल्या विद्यांवरील आपला अविश्वास निर्माण झाला व ापीठांतून अध्ययन करणारे विद्यार्थी व विद्यापीठाचे पदवीधर आपल्या विद्यांचा तिरस्कार करूं लागले आहेत.



राज्यसरकारांचें हें कर्तव्य आहे.

१९३८ सालीं मी व श्री. बाळासाहेब खेर यांनीं मुंबईत क आयुर्वेद विद्यालय (पोदार मेडिकल कॉलेज-आयुर्वेदिक) ापन केलें. आचार्य यादवजी त्रिकमजी जे माझे मित्र आहेत- यांनीं या दिशेनें बरेंच कार्य केलेलें आहे. ंतु इकडील भागांत गेल्या ३०।४० वर्षांत आयुर्वेदाची तकी प्रगति व्हावयास हवी होती तितकी झालेली नाहीं. र आपण अशाच पद्धतीनें चालूं तर केवळ परंपरागत वैद्यकीचा निभाव या नव्या कालांत गणार नाहीं. राज्यसरकारांचें हें कर्तव्य आहे कीं त्यांनीं राज्यांत विविध विद्यांना प्रोत्साहन द्यावें, ाचबरोबर सुशिक्षित जनतेचेंहि हें कर्तव्य आहे कीं विद्यांच्या उन्नतीसाठीं त्यांनीं खटपट करावी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदांत संशोधन केलें पाहिजे

वैद्यांच्या रजिस्ट्रेशनबाबत अशा सुधारणा केल्या पाहिजेत कीं ज्यामुळें वैद्यांचा दर्जा वाढेल. बाराव्या शतकापासून आयुर्वेदांतील संशोधन कार्य बंद पडलें आहे व केवळ घोकंपट्टीची पद्धति सुरूं झाली आहे. आपणांस आयुर्वेदांत संशोधन केलें पाहिजे. हिमालय प्रदेशांत असें एक वनौषधिउद्यान असलें पाहिजे कीं जेथें वनौषधींचा संग्रह व संशोधन होऊं शकेल.हिमालय आयुर्वेद संमेलनानें असें कार्य अंगिकारलें पाहिजे व राज्य सरकारकडून त्यास प्रोत्साहन मिळालें पाहिजे.

[मुंबई राज्यांतहि सह्याद्रि सातपुड्यासारखे औषधी वनस्पतींनीं समृद्ध असे पर्वत आहेत, अशा पर्वतांच्या आसमंतात भागीं वनौषधींचें उद्यान व संशोधनकेंद्र निर्माण करणें हें मुंबईराज्यांतील वैद्यवर्गांचें व मुंबईराज्य सरकारचें आद्य कर्तव्य आहे. —संपादक]

आयुर्वेद अध्यापक चर्चा-परिषद, नासिक

सदरची परिषद ता. ११-१०-५४ पासून सुरूं करावयाचें निश्चित ठरलें आहे. परिषदेकरितां जागा म्हणून चांदवडकरगल्ली, नासिक मधील चांदवडकरांचें अंबा मंगलकार्यालय ठरविलें आहे. उतरणें-राहणेंची व परिषदेच्या बैठकीची सोय या वाड्यांतच केली आहे. शक्यतर जेवणाचीहि सोय येथेंच करण्याचा प्रयत्न आहे. जे आगाऊ तसें कळवितील त्यांची व्यवस्था करणें शक्य होईल.

१० रु. वर्गणी काढून टाकण्यांत आली आहे.

(१) परिषदेंत भाग घेऊं इच्छिणाऱ्यांकरितां दहा रुपये वर्गणी ठेवण्यांत आली होती. परंतु ती आतां रहित केली आहे. तथापि खर्च भागण्यास देणगी म्हणून कांहीं द्रव्य (ज्यांना देणें शक्य होईल त्यांच्याकडून) परिषदेस जमा करावे लागेल असें वाटतें. वैद्यराज डिग्वेकर यांनीं प्राथमिक खर्चासाठीं ५१ रुपये पाठविले आहेत.

आमंत्रणें गेलीं आहेत व आणखीं पाठविलीं जातील

(२) सर्वमान्य गुरु, शुद्ध आयुर्वेद विद्यालयें, मिश्र आयुर्वेद विद्यालयांतील आयुर्वेदाचे अध्यापक व कांहीं वैद्य यांना निमंत्रणें गेलीं असून कांहींकडून सूचनाहि आल्या आहेत. [परिषदेस येऊं इच्छिणाऱ्या सर्व व्यक्तींची माहिती नसल्यामुळें सर्वांना निमंत्रणें पाठविणें शक्य झालेलें नाहीं. सबब येऊं इच्छिणाऱ्या वैद्यांनीं पत्र पाठवून आपली मनीषा कळवावी. शक्य त्या सर्वांना आमंत्रणें रवाना केलीं जातील.]

परिषदेचा उद्देश अष्टांगहृदयाचें अध्यापन सुसूत्र करणें हा आहे

(३) मुंबई प्रांतांत शुद्ध आयुर्वेदाचा पाठ्यक्रम, याच गुरुंच्या सन्निध किंवा विद्यालयांच्या इमारतींतून सुरूं झाला आहे, त्यांत दिले जाणाऱ्या शिक्षणांत अष्टांगहृदय हा ग्रंथ संपूर्ण शिकवावयाचा आहे. तेव्हां हा ग्रंथ सर्वमान्य गुरुंकडून व विद्यालयांतील प्राध्यापकांकडून एकाच पद्धतीनें शिकविला जाणें आवश्यक आहे.या हेतूच्या सिद्धीसाठीं ग्रंथवचनांचा अर्थ नीट लावून विद्यार्थ्यांनीं त्यापैकीं कोणता अर्थ त्यावेळीं घ्यावयाचा कीं, ज्यांच्यायोगें ग्रंथवाचनांत एकसूत्रीपणा राहील अशी योजना आंखावयाची, अशी चर्चा करावयाची व निष्कर्षाला यावयाचें असा परिषदेमागील हेतू आहे.

(४) तेव्हां अष्टांगहृदय हा ग्रंथ, अरुणदत्त व हेमाद्री ह्या त्यावरील टीका, त्या आधारभूत घेऊन वाग्भट सूत्रस्थानाचे १, ३, ४, ८, ९, ११, १३, १४, व शारीराचे १ ते ३, एवढा ह्या चर्चेकरितां

[पान नं. २४९ पहा]
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

....वैद्य बागेवाडीकर यांचीं विधानें ....

(लेखकः—वैद्य भि. वि. डेग्वेकर, जबलपूर)

आयुर्वेद पत्रिकेच्या १६ जून १९५४ च्या अंकांत पृष्ठ ७८९ वर वैद्य बागेवाडीकर यांनीं कांहीं विधानें केलीं आहेत त्यांचा परामर्श घेणें जरूर वाटल्यावरून थोडा खुलासा करीत आहे.

लेखक

विस्तार करण्याची आवश्यकता नाहीं

श्री. बागेवाडीकर म्हणतात 'वैद्य भि. वि. डेग्वेकर हे तर क्षीणजन्य पंचवीस प्रकारांचा निदान-चिकित्सेंत विचार करण्याची आवश्यकता नाहीं असें म्हणतात'; परन्तु असें विधान मी कधींच केलेलें नाहीं. ज्या हिन्दी वाक्यावरून ते माझ्यावर हा आरोप करतात तें वाक्य त्यांनींच उद्धृत केलें आहे तें असें:— 'अतः प्राचीन ग्रंथचतुष्टयमें इन दोषक्षयजन्य पंचविंशति विकारोंका विस्तार नहीं किया है और न उसकी आवश्यकताही प्रतीत होती है' या वाक्यांत 'उसकी' शब्दाचा अर्थ 'उस विस्तारकी असा होतो अर्थात् विस्तार करण्याची आवश्यकता नाहीं, विचार करण्याची आवश्यता नाहीं असें नव्हे. दोष-क्षयाचा विचार अवश्य करावयास पाहिजे, करावा लागतो आणि केलाहि पण जातो. त्याखेरीज चिकित्सा साध्य होत नाहीं. परन्तु तो विचार संक्षेपांत साध्य होतो म्हणून ग्रंथकारांनीं त्याचा विस्तार केला नाहीं असें माझें मत आहे.

दुसरें एक तसलेंच विलक्षण विधान

असा विलक्षण आरोप माझ्यावर केल्यानन्तर दुसरें एक तसलेंच विलक्षण विधान श्री. बागेवाडीकर करतात; 'चरककालापासून आजतागायत जी शिक्षण-प्रणाली आहे तींत दोषक्षीणता ही रोगोत्पादक आहे याचें शिक्षणच दिलें गेलें नाहीं.' असलें हें विधान अत्यन्त धाडसाचें, चरकादि ऋषींना 'देवानां प्रियः' च्या कोटींत घालणारें व स्वतःचें शास्त्रविषयक अज्ञान प्रगट करणारे असें असल्यामुळें त्याचा जितका तीव्र निषेध करतां येईल तितका करणें आवश्यक आहे.

धाष्टर्याची सीमा

अ. हृ. सूत्रस्थान अ. ११ त

लिंगं क्षीणेऽनिलेऽङ्गस्य सादोऽल्पं भाषितेहितम् ।
संज्ञामोहस्तथा श्लेष्मवृध्द्युक्तामयसंभवः ॥१५॥

या श्लोकापासुन सुरू करून

मलानामतिसूक्ष्माणां दुर्लक्ष्यं लक्षयेत् क्षयम् ।
स्वमलायनसंशोषतोदशून्यत्वलाघवैः ॥२३॥

या श्लोकापर्यंत दोषक्षीणतेमुळें उत्पन्न होणाऱ्या अनेक विकारांचें विवरण केलेलें नाहीं असें जर श्री. बागेवाडीकरांचें मत असेल तर मग हे आठ श्लोक दुसरें काय वर्णन करितात तें त्यांनीं सांगावें. अंगस्य सादः, संज्ञामोहः, श्लेष्मवृध्द्युक्तामयाः, मंदोनलः, प्रभाहानिः, हृद्द्रवः, शोषः, प्लीह्नो वृद्धिः इत्यादि इत्यादि हे काय रोग नव्हत आणि ते दोषक्षीणतेमुळें उत्पन्न झाले आहेत असें स्पष्ट शब्दांत वाग्भट म्हणत असतां 'दोषक्षीणता ही रोगोत्पादक आहे याचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिक्षणच दिलें गेलें नाहीं असें म्हणणें धाष्टर्याची सीमाच म्हटली पाहिजे.

वडाची साल पिंपळास लावण्याची हातोटी

श्री. बागेवाडीकरांना वडाची साल पिंपळास लावण्याची पण हातोटी साधलेली दिसते! 'लक्षयंत्यबुधास्तु न' हा चरण वाग्भटानें कोणत्या संदर्भांत वापलेला आहे तें समजून घेण्याची विनंति करितो; कारण त्यांनीं मला त्या वाक्याकडे लक्ष्य देण्याची विनंति केली आहे.

कुर्वते हि रुचिं दोषाः विपरीतसमानयोः।
वृद्धाः क्षीणाश्च भूयिष्ठं लक्षयंत्यबुधास्तु न ॥ वा.सू.अ.११

वृद्धदोष दोषगुणांच्या विपरीत गुणवाल्या द्रव्यांची आणि क्षीणदोष दोषगुणांच्या समान गुणवाल्या द्रव्यांची अभिलाषा रुग्णास उत्पन्न करतात ही शरीराची स्वाभाविक प्रतिक्रिया आहे. उदाहरणार्थ, शरीरांत वातदोष वृद्ध झाला तर वाताचे जे रूक्ष, लघु शीतादि गुण, तद्विपरीत गुणवालीं म्हणजे स्निग्ध, गुरु, उष्ण द्रव्यें त्याला घ्यावींशीं वाटतात; आणि वात क्षीण झाला तर वातसमान गुणवालीं म्हणजे रूक्ष, लघु शीत द्रव्यें त्याला हवींशीं वाटतात. या स्वाभाविक प्रवृत्तीकडे 'अबुध' वैद्यांचें लक्ष जात नाहीं म्हणून बुद्धिमान् वैद्यानें तिकडे लक्ष द्यावें, म्हणजे रोग्याची रुचि पाहूनहि, तें एक निदानाचें साधन समजून, निदान करावें, या मुद्यावर जोर देण्याकरितां 'लक्षयंत्यबुधास्तु न' हा चरण श्लोकांत आलेला आहे. त्यावरून 'दोषक्षीणता ही रोगोत्पादक आहे याचें शिक्षणच दिलें गेलें नाहीं हा तर्क करणें म्हणजे प्रमादाची सीमा आणि वडाची साल पिंपळाला लावण्याची संवय हींच सिद्ध होतात. अरुणदत्त आणि हेमाद्रि या दोनहि टीका अवलोकन करून त्यांवरून 'लक्षयंत्यबुधास्तु न' या वाक्याचा अर्थ 'दोषांच्या क्षीणावस्थेकडे वैद्यलोक फारसें लक्ष देत नसावेत म्हणून त्यास वैद्यांना सूचना द्यावी लागली आहे' हें अनुमान कसें निघतें तें त्यांनीं सिद्ध करावें.

अगदींच निरर्थक वाक्य

शास्त्रीय वादामध्यें प्रतिपक्षी आपल्यापेक्षां वयोवृद्ध आहे, विद्वान् आहे, त्याचा अनादर करण्याची इच्छा नाहीं, इत्यादि वाक्यें अगदींच निरर्थक असतात. त्यांचा उपयोग कधींच करूं नये असें मला वाटतें.

इतकेंच वैद्याचें कर्तव्य

'दोषक्षयाचा विचार करण्याचें कारण नाहीं' असें कधींहि कोणताहि वैद्य म्हणणार नाहीं. चिकित्सेकरितां त्याचें ज्ञान आवश्यक असतें. तो दोषक्षय, दूर करण्याकरितां दोषांच्या समान गुणी द्रव्य-गुण-कर्मांचा उपयोग करावा लागतो. परंतु त्याप्रमाणें दोषवृद्धींमुळें ज्वर, अतिसार, ग्रहणी, पांडुरोग, कुष्ठ इत्यादि अनेक व्याधी उत्पन्न होतात तसे दोषक्षयामुळें कोणतेच व्याधी (दोषक्षयाखेरीज) उत्पन्न होत नाहींत. कारण क्षीणदोषाचे संचय, प्रकोप, प्रसर, स्थानसंश्रय इत्यादि क्रियाकाल संभवत नाहींत. त्याचें स्वतःचें अस्तित्वच नष्ट होण्याचा प्रसंग असतो. हे दोष स्वयं पांचभौतिक द्रव्यें असल्यामुळें त्यांचें प्रमाण कमी होऊं लागलें म्हणजे ते स्वयंनष्ट होण्याच्या मार्गास लागलेले म्हणून धातु व मलांस फक्त क्षीण करूं शकतात. या पलीकडे रोग उत्पन्न करण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत नसल्यामुळें दोषक्षयजन्य शरीर परिस्थितींत दोषांच्या समानगुणी द्रव्यगुण-कर्मांचा उपयोग करणें इतकेंच वैद्याचें कर्तव्य ठरतें.

कोणता नवा रोग झाला?

'दोषक्षीणतेमुळें रोग उत्पन्न होत असल्याचा' जो अनुभव श्री. बागेवाडीकरांनीं दिलेला आहे त्याचा विचार करूं. आघातामुळें किंवा रक्तपित्त-विकारांत रक्तस्राव झाला म्हणजे रक्त धातु क्षीण होतो रक्ताश्रयी पित्तहि क्षीण होतें. त्यावर आमपित्तयुक्त यकृत खाण्यास सांगितलें, तें क्षीण पित्ताला वृद्ध करण्याकरितां परंतु या क्षीण पित्तामुळें नवीन कोणता रोग उत्पन्न झाला, तें श्री. बागेवाडीकरांनीं सांगावें म्हणजे "अल्पमतिमान् वैद्य" तिकडे लक्ष देतील.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चिकित्सकाच्या चुकीमुळें असें होतें

श्री. बागेवाडीकर लिहितात ' असे अनेक रोग ...त कीं, प्रथम दोषप्रकोप होऊन नंतर दोष क्षीण ...ात. ' हा सिद्धांत त्यांनीं उदाहरणें देऊन ...द्ध करावा. कारण ' स्वभावोपरम ' सिद्धांताप्रमाणें ...चिकित्सकाच्या चुकीमुळें असें होऊं शकतें. शास्त्र हें ...चिकित्सकाच्या चुकीकडे लक्ष देऊं शकत नाहीं. तें ...र आपलें सिद्धांतच पुढें मांडतें. ' दोष क्षीण झाले ...सतां रुजा होते ' हा कांहीं नवीन सिध्दांत नाहीं. ...म्हणून आपणास याचें ज्ञान आवश्यक आहे ' हेंहि ...ीनी अमान्य करीत नाहीं. मग वैद्यवर्गाच्या निदर्श-...नास श्री. बागेवाडीकर नवीन असें कोणतें तत्व ...आणित आहेत तें कळत नाहीं.

दोषक्षयामुळें विकार होत नाहींत

क्षीण दोषामुळें विकार उत्पन्न होतातच. परन्तु ...े विकार नष्ट करण्याकरितां क्षीण दोषाच्या समान-...ी चिकित्सा करून दोषाची समावस्था प्राप्त केली ...म्हणजे त्या सर्व विकारांचा नाश होतो हा सिध्दांत ...असल्यामुळें ज्याप्रमाणें वृध्ददोषामुळें उत्पन्न होणारे ...ज्वरातिसार, ग्रहणी, कुष्ठादि निरनिराळे विकार धातु-...ंचा आश्रय करून होतात तसें कोणतेहि विकार ...ा दोषक्षयामुळें उत्पन्न होत नाहींत. म्हणून त्याचा ...विस्तार शास्त्रांत केलेला नाहीं. आणि त्यामुळें शास्त्र अपूर्ण ठरत नाहीं, हा मूळ मुद्दा आहे.

नवीन शोध लावल्याचा वृथा अभिमान

श्री. बागेवाडीकर म्हणतात ' हल्लीं वै र्ग केवळ वृद्धिजन्य संसर्ग आणि सन्निपात जाणतो. क्षीणजन्य संसर्गज आणि सन्निपात विकार असतात ही कल्पनासुद्धां त्यांना सह्य होत नाहीं.' श्री. बागेवाडीकरांनीं आपल्या लिखाणाच्या टेबलखुर्चीवर बसले असतांना हवीं तीं स्वप्नें पहावींत आणि जागे झाल्यावर तीं लिहून काढावीं आणि वैद्यवर्गावर हवे ते आरोप करावेत. परंतु वैद्यवर्ग अष्टांगहृदयांतील सूत्रस्थानाच्या १२व्या अध्यायाचें अध्ययन व यापन करीत असतो आणि दोषांच्या वृद्धिक्षयजन्य ६२ प्रकारांचें परिशीलन करीत असतो. त्याला ही ' कल्पना ' श्री. बागेवाडीकरकृत आहे, पूर्वाचार्यांना ही अवगत नव्हती असें कधीं वाटलेंहि नाहीं आणि पुढें वाटणारहि नाहीं. ती त्यांना वाडवडिलापासून प्राप्त आहे. तेव्हां त्या बाबतींत नवीन शोध लावल्याचा वृथा अभिमान श्री. बागेवाडीकरांनीं बाळगूं नये. 'ती कल्पना' पूर्णपणें आत्मसात् करूनच वैद्यवर्ग चिकित्सा करीत असतो.

शुद्धायुर्वेदवाल्यांची भूमिका

' विषूचिका म्हणजे कॉलरा असें वैद्यलोक समजतात असें मला वाटतें ' असें श्री. बागेवाडीकर लिहितात. अर्थातच श्री. बागेवाडीकर स्वतःस वैद्य समजत नाहींत असा तर्क करणें योग्यच होईल. तर मग श्री. बागेवाडीकर ' विषूचिका ' म्हणजे कोणता रोग समजतात तें त्यांनीं स्पष्ट करावयास पाहिजे.

दरमहा १०० रु. अभ्यासवृत्ति

आयुर्वेद सेवा संघानें नुकतेंच शुद्ध आयुर्वेद विद्यालय सुरुं केलें आहे, व सेवा संघाचे इतर विभागहि प्रगतिपथावर आहेत. लौकरच सेवा संघास, आरोग्यशाला व रुग्णालय हे विभाग सुरूं करावयाचे आहेत. या कार्यासाठीं तरुण बुद्धिमान् अभ्यासू पदवीधर वैद्यांची आवश्यकता आहे.

ज्यांना आयुर्वेद सेवा संघानें चालविलेलें कार्य पसंत असेल व त्या सर्व कार्यांत आपण कांहीं काल सहभागी होऊन हातभार लावावा असें वाटत असेल अशा तरुण अभ्यासी पदवीधर वैद्यांना २ वर्षेपर्यंत दरमहा १०० रुपयेप्रमाणें अभ्यासवृत्ति देण्याचा सेवा संघाचा विचार आहे.

ज्या पदवीधरांना या संधीचा लाभ घ्यावयाचा असेल त्यांनीं ' व्यवस्थापक, आयुर्वेद सेवा संघ, नाशिक ' या पत्यावर पत्रव्यवहार करावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वतःस ते वैद्य समजत नसतील तर तें तरी स्पष्ट करावें म्हणजे हा वादविवाद तावडतोब बंद करतां येईल. कारण आम्हा शुद्धायुर्वेदीय वैद्यांस केवळ शुद्धायुर्वेदीयांशींच विचारविनिमय करावयाचा आहे. आणि शुद्धायुर्वेदीयांची भूमिका अशी कीं, ग्रंथचतुष्टयांत जे जे विषय प्रतिपादन केलेले आहेत ते तसेच आहेत असा त्यांचा आत्मविश्वास आहे.

च. वि. २ (त्रिविधकुक्षीय) अध्यायांत

आमाशयगताः वातपित्तश्लेष्माणः अभ्यवहारेणातिमात्रेण अतिप्रपीडयमानाः सर्वे युगपत्प्रकोपमापद्यंते । ते प्रकुपिताः सहसा वाऽव्युत्तराधराभ्यां मार्गाभ्यां प्रच्यावयंतः पृथग्गिमान् विकारानभिनिर्वर्तयंति । "

कॉलऱ्यांत काय होतें ?

कॉलऱ्यांत प्रधानतः अतिसार व वमन हेच विकार होतात ना ? ते सहसा होतात ना ? आणि पुढें वात पित्त कफ वृद्ध झाल्याची शूल, मुखशोष, अंतर्दाह, तृष्णा, भ्रम, अविपाक, गात्रगौरवादि लक्षणें असतात ना ? मग हीं लक्षणें दोषक्षयाचीं नसून दोषवृद्धीचीं आहेत हें सिद्ध होत नाहीं कां ? आणि चिकित्सा करतांना अर्ककपूर, पोदीना, मीठ विरविलेला लिंबाचा रस, लसुणीचा व कांद्याचा रस लशुनादि वटी हीं द्रव्यें कां दिलीं जातात ?

असो, हा वाद संपणारा नाहीं, सबब येथेंच विराम घेतो.

‘ आयुर्वेदाच्या सेवेसाठीं तयार ’

शास्त्रोक्त पद्धतीनें तयार झालेलीं सर्वप्रकारचीं सिद्धौषधें [गुटिका, मात्रा, रसायनें, आसवें वगैरे] व हिंवतापांवर अत्युत्तम ठरलेलें हिंवतापांतक, मिळण्याचें एकच ठिकाण.

सविस्तर माहितीकरितां लिहाः—

आयुर्वेदीय औषधी भांडार

२८ शुक्रवार, तुळशीबागेची पिछाडी, पुणें २

वैद्यराज कुलकर्णी यांचें अभिनंदन

उत्तर प्रदेश सरकारच्या आरोग्यखात्याचे व (आयुर्वेद विभागाचे) उप-संचालक (डेप्युटी डायरेक्टर) वैद्यराज दत्तात्रेय अनंत कुलकर्णी एम्. एस्सी. आयुर्वेदाचार्य, यांची नेमणूक वरील स्थानावर पूर्वी ५ वर्षांसाठीं झाली होती. ती मुदत संपत आली होती व पुढें कोणाची त्या स्थानावर योजना होते याकडे लोकांचें लक्ष वेधलें होतें.

कळविण्यास आनंद वाटतो कीं उत्तर प्रदेश सरकारनें वैद्यराज कुलकर्णी यांची नेमणूक पुढील ५ वर्षांसाठीं कायम केली आहे. या नेमणुकीबद्दल उत्तर-प्रदेश सरकार व आयुर्वेदाचार्य कुलकर्णी या उभयतांचें आम्हीं मनःपूर्वक अभिनंदन करतो.

अध्यापक परिषदेसाठीं येणार

आयुर्वेदाचार्य कुलकर्णी हे नाशिक येथें भरणाऱ्या आयुर्वेद अध्यापक परिषदेंत उपस्थित राहणार आहेत असें त्यांचें पत्र आलें आहे.

पत्रिकेचें यश

" अर्ध्या डझनपेक्षां जास्त वैद्यकीय नियतकालिकांचा मी वर्गणीदार आहे. परंतु त्या सर्वांत मला ‘आयुर्वेदपत्रिका’च श्रेष्ठतम वाटते. या यशाबद्दल मी सेवा संघाचें अभिनंदन करतो, व हेंच वैशिष्ट्य सेवा संघ भावी कालांतहि राखील असें इच्छितो. "

दसनकोप्पा — वैद्य विनायकराव वाय्दे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैद्यराज बागेवाडीकर यांच्या २ लेखांकांचा विचार :

लेखकः— आयुर्वेदाचार्य
पां. इ. देशपांडे, पुणें २

(मागील अंकावरून समाप्त)

दोषक्षयाच्या सिद्धीचें उदाहरण !

प्रस्तुत लेखद्वयांतील दुसऱ्या लेखाच्या सुरवातीला वै. बागेवाडीकर यांनीं इंजिनच्या बॉयलरचें उदाहरण दिलें आहे. वाफ व पाणी कमी झालें तर त्यांतील यंत्राची गति कशी रुद्ध होते हें सांगून शरीरांतील पित्त व कफ हे जणूं वाफ व पाणीच आहेत, अर्थात् दोहोंपैकीं कोणीहि वाढूं नये अगर कमीहि होऊं नये हा त्यांच्या या उदाहरणाचा इत्यर्थ आहे. पण या उदाहरणानें आधुनिकतेशिवाय नवीन असें वैद्यराजांनीं काय सांगितलें ? दोषक्षीणतेनें रोग कसा होतो याची स्पष्टता यानें होते काय ?

दोषक्षयानें रोगोत्पत्तीची मीमांसा

पण आतांपर्यंत न आलेली, दोष क्षीण होऊन रोगोत्पत्ति कशी होते याची मीमांसा, एकदांची वैद्यराजांनीं केली आहे व एका मोठ्या रोगाच्या उदाहरणानें ती सोपपत्तिक लावली आहे. काय बरें ती उपपत्ति ?

दोषक्षीणतेनें धातुक्षीणता व त्यामुळें अग्निमांद्य !

वैद्यराज म्हणतात " वृद्धिजन्य प्रकारांत दोष वृद्ध होऊन दूष्याशीं संमूर्च्छित होऊन विकार उत्पन्न करतात तर दोष क्षीण झाले असतां दोषांच्या स्वरूपाची हानी होऊन रसरक्तादि धातूंना क्षीण करतात. आहारांत कटु, अम्ल, लवण रसांचा अभाव असेल तर पाचक पित्ताचें उदीरण योग्य प्रमाणांत व तैजस गुणात्मक होत नाहीं. यामुळें अग्निमांद्य उत्पन्न होईल. यासच विकार असें म्हटलें तर वावगें होणार नाहीं. " (आ. प. १।७।५४ पृ. २०). यांतील वाक्यांचा परस्पर संबंध लावणें माझ्या सारख्याच्या तरी (अल्पमतित्वामुळें असेल कदाचित्) आटोक्याबाहेरचें आहे. " दोषक्षीण झाले असतां... धातूंना क्षीण करतात " आणि " आहारांत कट्वम्ललवण रसांचा अभाव असेल तर... अग्निमांद्य उत्पन्न होईल " यांतील पृथक् कार्यकारणपरंपरा समजली तरी या दोन वाक्यांत कार्यकारण भाव आहे काय ? धातुक्षीणतेनें कट्वादि रस कमी खाण्याची इच्छा होते असें वैद्यराजांना म्हणावयाचें आहे? वस्तुतः धातु क्षीण झाल्यास त्या त्याच धातूचे व तत्क्षपक दोषाचे परिपोषक रस खाण्याची इच्छा उत्पन्न व्हावी. " कुर्वते हि रुचिं दोषा विपरीतसमानयोः। वृद्धा क्षीणाश्च...। या सूत्रांचा मतितार्थ हाच आहे. मग वैद्यराज कट्वम्ललवण एवढे तीनच रस कमी खाण्याची इच्छा होते असें कां म्हणतात ? त्यांच्या धातूक्षीणतेंत या तीन रसांचा पोष्य असा रक्त धातू व त्याचें संवर्धक पित्त वाढलेलें असावयास हवें. वाढलेल्या पित्तानें तर भूक जास्तच लागेल. पीतविण्मूत्रनेत्रत्वक्क्षुत्तृड्दाहाल्पनिद्रताः। पित्तं [वृद्धं] ...। अ. हृ. सू. ११-७). अग्निमांद्य होण्यासाठीं कफाची वृद्धि व्हावयास हवी [... श्लेष्माग्निसदनप्रसेकालस्यगौरवम्।] पण मग कट्वादींची अधिक इच्छा होईल. वैद्य बागेवाडीकर हे कार्यकारणांचा कसा घोटाळा करतात याचें हें नमुनेदार उदाहरण आहे. आतां बुध कोण तें वाचकांनीं ठरवावें !

अग्निमान्द्य हा रोग कीं रोगकारण ?

वैद्यराज अग्निमान्द्य हा रोग मानतात. अग्निमान्द्य सदराखालीं दिलेल्या लक्षणांत मन्द, तीक्ष्ण व विषम या तीन प्रकारच्या अग्निमान्द्यांत क्रमानें "विषमो वातजान्रोगांस्तीक्ष्णः पित्तनिमित्तजान्। करोत्यग्निस्तथा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मन्दो विकारान्कफसंभवान् । " (मा. नि.) असें क्रमानें विषमादि अग्नि वातादि विकार उत्पन्न करतात असें वर्णन आहे. म्हणजे हे अग्नि अगर अग्निमान्द्य-प्रकार वातादि रोगांचें कारण आहे. ते साक्षात् रोग नव्हेतच मुळीं. " रोगाः सर्वेऽपि मन्देऽग्नौ " या सर्वमान्य सूत्रांत हाच सिद्धान्त वाग्भटानें सांगितलेला आहे. वैद्यराज तो सफाईनें विसरावयास लावीत असले तरी " वाग्भटाचीं पारायणें करणारे " (आम्हीं) " अल्प-बुद्धि " असलो तरी विसरण्याइतके विस्मरणशील नाहीं हें त्यांच्या निदर्शनास आणण्याची परवानगी घेतो.

भाव-अभाव

या चर्चेशीं मला फारसें कर्तव्य नाहीं. ज्यांनीं उपस्थित केली ते ती पाहून घेतील. मला एवढेंच म्हणावयाचें आहे कीं, ज्यांचीं प्राकृत कर्मेंच कमी होतात ते क्षीण दोष, असून नसल्यासारखेच नव्हेत कां ! मग त्यांना अभावरूप म्हटलें म्हणून बिघडलें काय ? अभावाचे जे प्रागभाव, प्रध्वंसाभाव, अत्यंताभाव व अन्योन्याभाव हे चार प्रकार आहेत, त्यांतला अत्यंताभावच (म्हणजे तीन्ही त्रिकाळीं नसणें हा) वैद्यराज, क्षीणदोष अभावरूपी आहेत असें म्हणणारांच्या माथीं मारतात. पण क्षीणदोषांचें खरें कार्य ते दोष सम होण्याइतके तरी वाढल्यावरच व्हावयाचें. अर्थात् " उत्पत्तेः पूर्वं कार्यस्य " या जातीच्या प्रागभावांत त्यांची गणना होऊन त्यांना अभावरूपी म्हणण्यांत कितीशी चूक आहे ?

मलक्षयानें पीडा

" क्षयो वृद्धेस्तु पीडनः " या वाग्भटाचे वचनावरची हेमाद्रीची टीका देऊन वै. बागेवाडी-करांनीं वृद्धीपेक्षां दोषक्षयच पीडाकारक म्हणजेच रोगकारक असतो असें म्हटलें आहे. वर जी रोगोत्तर अवस्था सांगितली त्यांत क्वचित् सर्वच दोष व सर्वच धातू क्षीण होतात व बेसुमार अशक्तता येते हें कबूल आहे. पण याहि अवस्थेंत रोग राहिलेला नसतो. असल्यास त्याचें नांव सांगतां यावयास पाहिजे. आतां यांत कोणताहि रोग उत्पन्न होणें संभवनीय आहे खरें. पण तो साक्षात् झालेला नसल्यानें व पहिला गेलेला असल्यानें याला रोग म्हणतांच येणार नाहीं. यांतील पीडा, बेसुमार अशक्तता, व थकवा त्रासदायक असला तरी यांत रोग कोणता सांगणार ? याच अवस्थेंत बृंहण उपचार करावे लागतात. " बृंहयेद्व्याधिभैषज्य-मद्यस्त्रीशोककर्शितान् । " (अ. हृ. सू. १४·८) इ. वर्णनांत वाग्भटानें हें स्पष्ट सांगितलें आहे. यांत कोण-त्याहि रोगाचें नांव नाहीं हें मी मागेंच लिहिलें होतें. [आ. प. १-२-५४ पृ. ५४४]

पुनः दोषक्षीणतेचें उदाहरण

वैद्यराज बागेवाडीकर तोच तो मुद्दा पुनःपुनः गिरवीत बसल्यानें मलाहि त्याचा परामर्श घेण्या-साठीं निष्कारण लेख लांबवावा लागत आहे त्याला उपाय नाहीं. त्यांनीं आतां सन्निपातोत्तर स्वेदाधिक्याचें उदाहरण दिलें आहे व त्यावरून या ज्वरांत पित्त क्षीण होते व म्हणून यांत हेमगर्भादि उपचार केले जातात, पण ते " पित्तवर्धक असतात याची कल्पना किती वैद्यांना असते " असें ते विचारतात. पण या खरोखर रोगोत्तर अवस्थेंत पित्तक्षीणतेहून धातुक्षीणता हीच महत्वाची. त्यांना विशेषें महामर्म अशा हृदयाला जलद पोषण मिळावें यासाठींच हेमगर्भ, त्रैलोक्यचिंतामणि यासारख्या सुवर्णकल्पांची या ठिकाणीं योजना असते. केवळ पित्तवर्धनासाठीं पंचकोल-लसुन-हिंग्वादींची योजना चालली असती.

प्रकृत कीं प्राकृत ?

सन्निपाताच्या उदाहरणांत वैद्यराजांचें एक वाक्य असें आहे."प्रकुपित वात, प्रकृत पित्त आणि कफ क्षीण या दोषांच्या संयोगांनीं रोग उत्पन्न होतात. " [आ. प. १-७-५४ पृ. २२] " प्रकृत " हा शब्द वैद्यराज बागेवाडीकरांच्या संस्कृताला शोभणारा आहे. कारण ते नव्याशिक्षित बुध आहेत. माझ्यासारख्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ला एवढी मतीच नसल्यानें तो आपला पाणिनीला प्रमाण धरतो व प्रकृति याचें झालेलें ताद्धित जें कृत" तेंच रूप शुद्ध मानतो. [सविस्तर विवेचनासाठीं " आयुर्विद्या " सप्टेंबर १९५३ पहा.]

प्राकृत पित्तहि विकारी !

हा झाला अवांतर विषय. वैद्यराजांचा यांतला महत्वाचा मुद्दा प्राकृत म्हणजे " दोष सम असविकार उत्पन्न होतात असें चरकाचार्य म्हणतात. " हा आहे व याला प्रमाण म्हणून " प्रकृतिस्थं यदा प्रकृतः श्लेष्मणः क्षये ।" हा देऊन दाहादि लक्षणांचे विकार होतात असें ते म्हणतात. आपाततः यांचें हें म्हणणें बिनतोड वाटतें खरें पण हें दाहादि विकार होतात कोठें याचें जें चरकानें उत्तर दिलें तें म्हणजे " यत्र यत्र विसर्पति, तत्र तत्र गात्रप्रदेशे " हें विचारांत घेतलें म्हणजे प्रकृतिस्थ अर्थात् सम पातळींच हें पित्त खरें, पण मी विचारतो, दुसरीकडून येऊन ज्या कोणत्या स्थानीं (तत्र तत्र) तें येऊन त्या ठिकाणीं तें वृद्धच नव्हे कां ! एरवीं दाह कसा होणार ! नाहींतर " त्या" स्थानांत हें पित्त पूर्वींहि दाह झाला असतां; पण हें माझें भाष्य कशाला ! टीकाकार चक्रपाणि, वैद्यराजांनीं संपूर्ण प्रमाण आहेच. तोच यावर म्हणतोः- यत्र यत्रेति वचनात्, यत्र कुपितेन वायुना पित्तं नीतं, तत्र शरीरावयवे समानास्थितमपि पित्तं वृद्धमेव । यतस्तस्मिन्प्रदेशे तावान्पित्तसम्बन्ध उचितो न भवत्येवेत्यधिकः । तत्र दाह उपपन्न एव । " (च. सू. १७।४५-५२ चक्रः). वाचकहो ! पहा, वैद्यराज बागेवाडीकर प्राकृत हे विकार उत्पन्न करतात असलें भलतेंच धोंगडे चरकासारख्या शास्त्रज्ञाच्या गळ्यांत अडकवून त्याला व ठरवितात आणि तुमची दिशाभूल करतात.

भट्टार हरिचन्द्रांची साक्ष

आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ वै. बागेवाडीकरांनीं भट्टार हरिचंद्र या निबंधकाराला इरेला घातलें कारण काय तर " प्रकृतिस्थ पित्त वृद्ध झालेलें मानून त्याला स्वस्थानीं न आणतां कमी करण्याचा करतात ते रोगोत्पत्ती करून रोग्याचा प्राण घेतात " असें तो म्हणतो म्हणून! पण मग या निबंधके शब्दाप्रमाणें या अवस्थेंत पित्तवर्धक उपचार करावयाचे काय? तसे केले तर दाह थांबेल, पण आपण ऐवजीं असें म्हणू कीं या अवस्थेंत वैद्यराजांचा लाडका क्षीण दोष आहे त्याचीच त्यांनीं वृद्धी करून त्तदोष कमी करावयास हवा आहे. नव्हे ! यांतला क्षीण दोष कफ आहे [श्लेष्मणः क्षये]. आतां या यंत कफवर्धक म्हणजे शीतोपचार केले तर काय होईल बरें ! वाढलेला वायु आणखी वाढेल व चा खासा "अतिपात" होईल !

उपलब्ध निदानचिकित्सा अपुरी व एकांगी

इतका जिवाचा आटापिटा करूनहि पुनः वैद्यराज -बागेवाडीकरांना क्षीण दोषांना अनुलक्षून न-चिकित्सा व्यवहार, आयुर्वेदांत न मिळाल्यानें ते कावून जातात. कारण त्यांनीं आतांपर्यंत प्रसंग पडेल माणें आपल्या मनोनीताच्या सिध्यर्थ टीकाकार, संहिताकार, वाग्भटाचार्य, एवढेंच नव्हे तर खास काचार्यहि आधाराला घेऊन पाहिले. पण कोठेंच मनासारखा जमा बसेना. साहजिक या मनोव्यथेचे क असें " उपलब्ध निदान-चिकित्सा ही केवळ वृद्धिजन्य असल्यामुळें ती एकांगी व अपुरी आहे. " ध्या आयुर्वेद दोषक्षयानें पीडित आहे " (आ. प. १-७-५४ पृ. २२) असे त्राग्याचे उद्गार ते रतात. पण या उद्गारांकडे गंभीरपणें पाहाणाराला सहजच वाटेल कीं " सध्यांचे " उलटचा जो कोणता ळ असेल, त्यांत आयुर्वेद सर्वांगीण व पुरा असणार. सध्याचे उलट असणाऱ्या भूत आणि भविष्य ळांपैकीं, भविष्याविषयीं दुसरा कोण सांगू शकणार ! वैद्यराजांनीं स्वतः मनांत आणल्यास तेच आपल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कर्तबगारीनें आयुर्वेदाला असें स्वरूप आणून देतील तर शक्य आहे, व मग आयुर्वेदांत किती "सर्वांग-परिपूर्णता" येते ती तरी दिसेल!

त्रिविध गती

वैद्यराज आपल्या मताच्या समर्थनार्थ शब्दांचे अर्थहि कसे मनमाने करतात याचें त्यांचें त्रिविध गती हें एक नमुनेदार उदाहरण आहे. "क्षयः स्थानं च वृद्धिश्च दोषाणां त्रिविधा गतिः।" या वचनांतील तीन गती म्हणजे तीन गमनावस्था असा अर्थ ते करतात व मग "क्षयावस्था गमनात्मक कशी होऊं शकते याचा खुलासा" करावयास मागतात. वैद्यकाच्या मर्यादित क्षेत्रांतली त्यांची आदळ-आपट संस्कृता-सारख्या विशाल भूगोलांत चालेल हा त्यांचा गैरसमज जितका लवकर जाईल तितका बरा. संस्कृतज्ञांच्या समाजांत आधींच अल्प असलेलें वैद्यांचें स्थान वैद्यराज नाहींसें करण्याचें मात्र श्रेय घेतील. जवळपासच्या एखाद्या संस्कृतज्ञाला त्यांनीं आपलें असलें लेखन दाखविलें असतें तर त्यानें सांगितलें असतें कीं गतीचा अर्थ केवळ गमन नसून स्थिती, अवस्था असाहि आहे. त्यानें त्यांना "का गतिः" "स्थितस्य गतिश्चितनायी" "गहना कर्मणो गतिः" अशी त्या अर्थाचीं उदाहरणेंहि काढून दिलीं असतीं. पण असला कमीपणा पतकरण्याच्या वृत्तीचे अबुध ते नाहींत. दोषक्षयानें रोगोत्पत्ती होते हा नवीन शोध लावण्याच्या मोठेपणाला त्यानें गालबोट लागलें असतें ना! वैद्यराजांचा या शोधाचा अभिनिवेशहि एवढा मोठा कीं ते जवळचाहि आधार पाहण्याचे मनःस्थितींत नाहींत. याच सूत्राचे खालची चक्रपाणीची टीकाहि त्यांनीं वाचली असती तर त्यांत 'गतिः प्रकारोऽवस्था वा' असें चक्रपाणी सरळ "गती" चें स्पष्टीकरण करतो आहे, तें त्यांना दिसलें असतें. पण संस्कृताचा गडबडगुंडा आणि ग्रंथाचें अपुरें वाचन हेंच नव्या शिक्षणाचें भांडवल आहे. त्यांच्या पाठीराख्या "आयुर्विद्येला" असेच वैद्य शास्त्रीय चर्चेला लायक वाटतात. [आयुर्विद्या जून १९५४ संपादकीय पृ. ३]

गतीचा अर्थ गमन धरला आहे?

बरें तर "गतीचा" गमन असा अर्थ केला तर काय होईल? तें आम्हांपेक्षां वैद्यराजांच्या विचारांनाच प्रतिरोधक होईल. गती ही शक्ती आहे हें जर त्यांना मान्य असेल [व वायलरच्या उदाहरणावरून ती त्यांना मान्य आहे असें दिसतें.] तर ही शक्ती क्षीण होते असें म्हणावें लागेल, व शक्ती तर स्थिरच राहते असा त्यांचा सिद्धांत आहे, मग हा अर्थ करून वैद्यराज बागेवाडीकर नसतें घोंगडें कशाला गळ्यांत घेत आहेत?

शमन म्हणजे क्षीणांना सम करणें?

वैद्यराज बागेवाडीकर यांची ग्रंथवचनांचे अर्थ लावण्याची बाकी कमाल आहे. एखाद्याच ठिकाणीं नजरचूक वा गैरसमज म्हणून कोणीहि तिकडे दुर्लक्ष करील. पण येथून तेथून हा ब्रह्मघोटाळा! विरोधक तितिक्षा तरी किती टिकवून धरणार? वैद्यराज पुढें जेव्हां चिकित्सेंत शिरतात तेव्हां त्यांतलें प्रारंभिक सूत्र "शोधनं शमनं चेति समासादौषधं द्विधा।" (अ. हृ. सू. १।२५) हें आधाराला घेऊन "शमन औषधें हीं क्षीणदोषांना सम करतात" असा सिध्दांत ठोकून देतात! ज्या वाग्भटाचें हें सूत्र आहे त्यानेंच शमन चिकित्सेची स्पष्ट व्याख्या केली आहे ती तरी वैद्यराजांनीं वाचावयाची होती. वाग्भट स्पष्टच म्हणतो "न शोधयति यद्दोषान्समान्नोदीरयत्यपि। समीकरोति विषमान्, शमनं।" अ. हृ. सू. आणि याचा (पारंपारिक) अर्थ "जें सम दोषांना बाहेर काढीत नाहीं वा त्यांची उचलहि करीत नाहीं पण केवळ विषमांना समावस्थेत आणतें तें शमन" असा आहे. यांतून नव्य शिक्षितांनाहि "क्षीणदोषांना सम करणें" एवढाच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कसा काढतां येतो तें समजत नाहीं. वैद्यराज हेमाद्रीला प्रमाण मानतात ना ? तो तरी शमनाचा अर्थ करतो त्यांनीं पाहिलें आहे का ? तोहि " शमनं त्वधिकक्षपणं क्षीणवर्धनाभ्यां " असें म्हणतो व या अर्थ अधिकाचें क्षपण व क्षीणाचें वर्धन म्हणजे शमन असाच आहे. पण " वैद्यराज या हेमाद्रीच्या वाक्यरचनेवरून पाहतां क्षीण दोषांना सम करणारी जी चिकित्सा ती शमन होय " असा यांतून बेधडक अर्थ काढतात ! वैद्यराजांचें हें धाष्ट्यं प्रशंसनीय आहे ! असल्या धाष्ट्यांत नव्य शिक्षितांपुढें पारंपरिक वैद्य कमी पडतात खरे !

स्वतःवरच्या आक्षेपांचें निरसन !

आपल्या मूळच्या लेखावरच्या आक्षेपांचें निरसन करण्यांत वैद्यराजांनीं दोन पृष्ठें खर्चीं घालून आपले लेखद्वय संपविले आहेत. त्याचा इत्यर्थ या आक्षेपकांच्या " शंका किंवा प्रतिपादनांत जे आधार दिले आहेत ते कसे चुकीचे आहेत " व त्यांची एकूण " मांडणी कशी सदोष आहे हें वाचकांच्या निदर्शनास आणणें असा आहे. पण यांत " कर्मणां प्राकृताद्धानिः " या सूत्रावरची टीका पुनः उद्धृत करण्याविना कांहींच नावीन्य नाहीं. मग नेहमींचा " शेषं कोपेन पूरयेत् " हा नियम त्यांना तरी कसा चुकतो ? आक्षेपकांत तीन " आचार्य पदवीधर " त्यांना अनायासे सांपडले (आ. मणिराम शर्मा, आ. अष्टीकर व आ. पांडे). त्यांना उद्देशून त्यांनीं आपलें कोपगरल पुढीलप्रमाणें ओकलें आहे. " या तीन आचार्यांची एक प्रकारची कल्पना पाहून हल्लीं चालू असलेली शिक्षणपरंपराच सदोष आहे कीं काय, इकडे शिक्षणतज्ज्ञांनीं अवश्य लक्ष्य द्यावें " (आ. प. १-७-५४ पृ. २५). पण शिक्षणतज्ज्ञ खरे तज्ज्ञ असतील तर त्यांनीं वागे-डीकर यांचें संस्कृत व टीकाकारांचें व्याख्यान नीट ध्यानीं घेऊन ग्रंथार्थांची समन्वयाचे पद्धतीनें संगती लावण्याचें कौशल्य पाहून " परंपरागत " शिक्षण " सदोष ", कीं परंपराशून्य असें नव्य शिक्षण सदोष तें अवश्य ' ठरवावें असें मलाहि त्यांना सुचवावयाचें आहे.

स्नेहाची विनंति

वैद्यराजांच्या अतिविस्तृत लेखावर तितकेंच विस्तृत लिहावे लागल्यानें माझा हा लांबलचक लेख व विषयाचे ओघांत देवाण घेवाण म्हणूनच आलेली त्यांतली खारट तुरट भाषा वाचून वैद्यराजांनीं फार वर्षांच्या स्नेहाला अंतर देऊं नये एवढी मात्र त्यांना विनंती आहे.

आयुर्वेद सेवा संघ-नासिकचीं सर्व औषधें मुंबईंत मिळण्याचें आणखी एक नवें केंद्र

रामकृष्ण एजन्सी

३६८ बी ३।७० सुपारीबाग रोड

लालबाग, मुंबई १२

* मागणी रोज वाढत आहे. *

पांढरें कोड नष्ट झालेल्या हजारों गांवच्या लोकांचीं प्रशस्तिपत्रें व बक्षिसें पूर्ण पत्त्या-सहित छापलेलीं पत्रकें मोफत मागवा.

. औषधीची किंमत ५ रु., पो. ख. १ रु.

वैद्य के. आर. बोरकर

मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला [म. प्र.]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शाळा-कॉलेजांतून योगविद्या शिकवावी !

"सर्व शाळा-कॉलेजांनीं विद्यार्थ्यांना योगविद्या शिकविण्यास प्रारंभ करावा" अशी सूचना अन्नमलाई व बनारस विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सी. पी. रामस्वामी अय्यर यांनीं समारंभप्रसंगीं बोलतांना केली.

स्वामी कुवलयानंदजींचा सत्कार

हा जाहीर समारंभ स्वामी कुवलयानंदजींच्या ७२ व्या जन्मदिनानिमित्त, स्वामी कुवलयानंद सत्कारसमितीतर्फे सुंदराबाई हॉलमध्यें साजरा करण्यांत आला. समारंभाचें अध्यक्षस्थान डॉ. रामस्वामी अय्यर यांनीं स्वीकारलें होतें. स्वामी कुवलयानंदाचे मित्र व हितचिंतक यांनीं जमविलेल्या ५२ हजार रुपयांचा एक चेक सत्कारसमितीतर्फे डॉ. अय्यर यांनीं स्वामींना सादर केला.

योगविद्येची उपासना व दान

योगविद्येच्या विकासासाठीं स्वामींनीं केलेल्या मोलाच्या सेवेबद्दल डॉ. अय्यर यांनीं प्रशंसोद्गार काढले. "योगविद्येची उपासना व योगविद्यादान या गोष्टी शास्त्रीय रीत्या कशा कराव्यात हें सांगण्याचा प्रथम प्रयत्न करणारांपैकीं स्वामी हे एक आहेत" असें सांगून डॉ. अय्यर यांनीं स्वामींना धन्यवाद दिले.

भारतीय मनाचा समतोलपणा

डॉक्टर अय्यर म्हणाले, "मी जेव्हां परदेशांत दौऱ्यावर जातो तेव्हां तेथील लोक मला अनेक वेळां विचारतात कीं, भारतांत दुष्काळ आणि पूर अशा आपत्ती वारंवार येतात आणि तरीहि भारतीयांच्या मनाचा समतोलपणा राहातो हें कसें काय ! त्याला कारणें कोणतीं ! "योगपरंपरा हीच त्याला कारणीभूत आहे," असेंच मीं त्यांना नेहमीं उत्तर देत असतो.

३५ वर्षांत आजारीपण नाहीं

३५ वर्षांमागें आपणाला निद्रानाशाची व्याधि जडली असतां, सर्व वैद्यकीय औषधोपचार संपल्यावर आपणाला योगदीक्षा कशी दिली, त्याविषयींचा आपला अनुभव डॉ. अय्यर यांनीं कथन केला आणि ते म्हणाले, "त्यानन्तर मी एकहि दिवस आजारी पडलों नाहीं कीं एकदांहि औषध घेण्याची पाळी माझ्यावर आली नाहीं."

ही खेदजनक प्रवृत्ति आहे

"परकीयांना एकाद्या गोष्टीचें महत्त्व वाटल्या- शिवाय आपण त्या गोष्टीचा विचार करावयाचा नाहीं अशी एक प्रवृत्ति आपल्या लोकांत निर्माण झालेली आहे" या गोष्टीबद्दल खेद व्यक्त करून ते पुढें म्हणाले, "युरोपांतील अनेक विद्यालयांतून आतां विद्यार्थ्यांना योगविद्या शिकविण्यांत येत आहे. तें पाहून तरी भारतांत योगविद्या आतां अधिक लोकप्रिय होईल अशी मला आशा आहे."

त्रावणकोर व अन्नमलाई विद्यापीठांत आपण योगविद्या शिकविण्यास प्रारंभ केला असून स्वामी कुवलयानंदजींच्या मदतीनें बनारस विद्यापीठांतहि ती सुरूं करण्याचा आपला मानस त्यांनीं व्यक्त केला.

शरीराचें पोषण करणारें शास्त्र

उत्तरादाखल बोलतांना स्वामी कुवलयानंद म्हणाले, "थैलीबद्दल मी सर्वांचा आभारी आहे. १९२४ साली मीं लोणावळें येथें सुरूं केलेला आश्रम व योगसंशोधन केंद्र हीं चालविणाऱ्या कैवल्यधाम समितीकडे ती थैली मी सादर करीन."

'शरीराचें पोषण करणारें असें हें एकच शास्त्र आहे' असें सांगून 'अखेरपर्यंत हें शास्त्र लोकप्रिय करीत राहीन' असें स्वामी कुवलयानंदजींनीं जाहीर केलें.

पवित्र नेपाल कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहाः-नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रक्तस्रावावर पिच्छाबस्ति

आता शरद् ऋतू आला आहे. रक्तप्रकृति लोकांपैकीं कांहीं लोकांना या ना त्या मार्गानें कांहीं रक्तस्राव होण्याची शक्यता आहे. अशा वेळीं प्राध्यापक वैद्यराज वि. दा. एकतारे (अहमदनगर) यांनीं सुचविलेला व यशस्वी ठरलेला पिच्छाबस्तीचा प्रयोग करण्यास सुटसुटीत व परिणामकारक असा आहे. रक्त-

वैद्यराज वि. दा. एकतारे

स्राव नसतां त्या मार्गांत दाह वगैरे पित्ताचीं लक्षणें असतांनाहि तो आचरणांत आणतां येईल. आतां सर्वत्र तांदुळावरील नियंत्रण उठलें असल्यामुळें पिच्छाबस्तीचे द्रव्य मिळण्याचीहि अडचण राहिलेली नाहीं.

पक्कातिसार, पित्तातिसार

आयुर्वेदांत अतिसार व संग्रहणी विकारांच्या चिकित्सेंत एक अवस्था अशी दिली आहे कीं त्यावेळीं दोष साम नसतात, निराम असतात, पक्व असतात. कोष्ठांत मलसंचय नसतो, तथापि शौचाची प्रवृत्ति चालूच रहाते, वेग येत रहातात व त्याचा त्रास वाटतो.

पिच्छाबस्तीची अवस्था

अतिसाराच्या निराम अवस्थेंत इतर नित्याचे उपाय मुखमार्गानें केल्यानंतरहि जर अतिसरण प्रवृत्ति बंद झाली नाहीं तर त्यावर पिच्छावस्ति (पिच्छिल द्रव्यांचा बस्ति) आयुर्वेदांत सांगितला आहे. (अशांतौ इत्यतिसारे पिच्छाबस्तिः परं हितः।)

अतिप्रवृत्तीवर बस्ति

कोष्ठशुद्धीसाठीं तीव्र विरेचनानें सुद्धां उपयोग न झाल्यास अगर इतर वेळीं, निरूह बस्ति देऊन अगर निरूह मात्राबस्ति देऊन, आपण मलप्रवातप्रवृत्ति करतो; त्याचप्रमाणें अतिप्रवृत्तीवर सुद्धां आपणास बस्तिद्वारें उपचार करतां येतात. अशा अवस्थेंत उपयोगी पडणारा बस्ति म्हणजे पिच्छाबस्ति होय.

पिच्छाबस्तीचीं द्रव्यें

पिच्छाबस्तीचे ग्रंथोक्त प्रयोग पाहिले म्हणजे हें कसें जमणार असें वाटतें. 'शाल्मली वृक्षाचे ओले देठ, क्षीरीवृक्षांच्या साली व कोवळे कोंब, तसेंच टेटूचा पुटपाक व कुड्याचे सालीचा दाट काढा' या सर्व गोष्टी जमण्यास कठीण वाटतात.

द्रव्याविषयीं आग्रह नाहीं

अशावेळीं हें आपल्या लक्षांत येत नाहीं कीं शास्त्रकारांचा द्रव्याविषयीं आग्रह नाहीं. द्रव्यगत गुणकर्मांवर त्यांचा विशेष भर आहे. जीर्ण पित्तातिसार व रक्तातिसार यावर वापरावयाचीं द्रव्यें शीतवीर्य, मृदु, मंद, पिच्छिल या गुणांचीं व संग्राही कर्मांचीं पाहिजेत. अशा द्रव्यांचा अन्तर्बाह्य उपयोग हा हितावहच होणार. अशा गुणांचीं पुष्कळच द्रव्यें मिळू शकतात, तथापि नित्य सहज मिळू शकणारें द्रव्य म्हणजे भाताची पेज. तांदूळ शिजवून काढलेली पेज या कामीं उत्तम उपयोगी पडते, असा प्राध्यापक वि. दा. एकतारे यांचा अनुभव आहे.

पिच्छाबस्तीचे प्रयोग

अहमदनगर येथील आयुर्वेद महाविद्यालयाच्या रुग्णालयांत अशा रक्तस्रावाच्या रुग्णांना ठेवून घेऊन भाताच्या पेजेचे पिच्छाबस्ति देण्यांत येतात. असा पिच्छाबस्ति देण्यापूर्वी ते साध्या पाण्याचा बस्ति आंत्र (मलाशय) धावनार्थ वापरतात. त्यामुळें मलाशय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वच्छ होतो. तेथें कांहींहि मल वा कुजण्यासारखा पदार्थ रहात नाहीं व मग दिलेल्या या भाताच्या पेजेच्या बस्तीनें लाभच होतो. पिच्छाबस्तीसाठीं मोठें प्रमाण वापरावें लागतें असें नाहीं. ४ औंस, ८ औंस प्रमाण पुरें होतें, तें मोठ्या सिरिंजनेंहि देतां येतें.

रक्त पडत असतांना आमाचा संबंध असेल तर पोटांतून कुडा चूर्णाचा फांट, बिल्व+मुस्ता या चूर्णानें सिद्ध केलेलें दूध, रोग्यास घेण्यासाठीं द्यावें. लाहीचूर्ण बालसंजीवनीचूर्ण यांच्या पुड्या द्याव्यात. कुटजारिष्टहि पित्तज अतिसार घालविण्याच्या दृष्टीनें उपयुक्त आहेच.

लोकप्रिय व व्यवहार्य प्रयोग

भाताच्या पेजेच्या पिच्छाबस्तीची ही कल्पना नगर येथील वैद्य व कांहीं डॉक्टर मंडळींत बरीच लोकप्रिय व व्यवहार्य झाली आहे असें समजतें.

मोठा माणूस

' मोठा माणूस ' असा शिक्का घेऊन कोणीच जन्मास येत नाहीं. जो आत्मविश्वासानें परिस्थितीशीं तोंड देतो, लढतो, तोच मोठा होतो. विषयांध कबीर, आत्मविश्वासानें झगडला म्हणूनच तो मोठा भक्त झाला. दीर्घ प्रयत्नानें, अविश्रांत चिकाटीनें, कोणत्याहि छोट्या माणसास मोठें होणें कठीण नाहीं.

सामुदायिक प्रार्थनेचें महत्त्व

सांप्रतचा काळ हा सामुदायिक जीवनाचा आहे. या काळांत सामुदायिक जीवनाचें श्रेष्ठ तत्व जे अंगिकारणार नाहींत ते नष्ट झाल्याशिवाय रहाणार नाहींत. सामुदायिक प्रार्थना ही सामुदायिक जीवनाचें तत्वज्ञान शिकविते म्हणून जीवनांत सामुदायिक प्रार्थनेचें महत्व फार मोठें आहे. —संत तुकडोजी



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

— नेत्रबलासाठीं नयनामृतप्राश —

एकदां एक पदवीधर बाई रक्तदाबाची तक्रार न सेवासंघाकडे औषधोपचारासाठीं आल्या. ती र जरा कमी वाटल्यावर त्यांनीं डोळयांना ळीं चिपडें फार येतात अशी तक्रार केली. त्यांना र्गीकरितां चष्मा लागत होताच. आजच्या रूढ तीप्रमाणें आपणास डोळयांत घालावयास कांहीं ो औषध यावर मिळेल अशी त्यांची कल्पना होती. । तसें कांहीं न होतां त्यांना त्रिफळा २ मासे व ष्टीमध १ मासा + सुवर्णमाक्षिक १गुंज प्रत्येकीं अशा श्रणाच्या ७ पुड्या मिळाल्या व रोज रात्रीं झोपतांना मधांतून चाटून खाण्यास सांगण्यांत आलें.

७ दिवसांत बराच फायदा

त्या रुग्णानें सांगितल्याप्रमाणें हा उपचार केला त्याला ७ दिवसांत बराच फायदा दिसून आला. न रात्रीं पुडी वाटींत सोडावयाची, त्यांत तूप मध माणांत घेऊन ती कालवावयाची व पुनः मधाची ली मुंग्यापासून संभाळण्यासाठीं व्यवस्थित पुसून आवयाची, हा त्रास चुकविण्यासाठीं त्यांच्यासाठीं त्रिफलायष्टीमधुसुवर्णमाक्षिकतूपमध मिश्रण तयार रूनच दिलें व तें त्यांनीं नियमितपणें २ महिने तलें.

नेत्रबलासाठीं

या औषधाच्या उपयुक्ततेविषयीं त्यांची श्रद्धा ाढली व त्यांनीं लोकांत या औषधासंबंधीं वरे उद्गार ाढले. त्या शिक्षक आहेत. आपल्या विद्यार्थिनींपैकीं ज्यांचे डोळे दुर्बल आहेत त्यांच्या पालकांना सेवा- संघाकडे जाऊन डोळयाचे पोटांतील उपचार घेण्याचा ल्ला दिला.

सेवा संघानें हें औषध तयार केल्यानंतर आपल्या चिकित्सा--विभागांत तें अनेक रुग्णांवर वापरलें व आतां बाजारांत 'नयनामृतप्राश' या नांवानें तें विक्रीस ठेवलें आहे.

सर्व धातुगत दोषहर त्रिफला

वास्तविक पाहातां त्रिफला हें रसरक्तादि सर्व धातूंतील दोष दूर करणारें द्रव्य आहे.त्याचें कार्य फक्त नेत्रविकारापुरतेंच मर्यादित नाहीं. बुद्धि, स्मृति यांचे दोष दूर करण्याचें सामर्थ्य त्याच्यामध्यें आहे. उत्तर- स्थानांत रसायन अध्यायांत श्लोक ४२।४३ मध्यें त्रिफला सर्वरोगघ्नी मेधायुःस्मृतिबुद्धिदा । या वचनानें तिचें हें कर्म स्पष्ट शब्दांत मांडलेले आहे.

वाग्भट उत्तरस्थान रसायन अध्यायांतील २ श्लोक

मधुकेन तवक्षीर्या पिप्पल्या सिंधुजन्मना ।
पृथक् लोहैः सुवर्णेन वचया मधुसर्पिषा ॥
सितया वा समायुक्ता समा युक्ता रसायनी ।
त्रिफला सर्व रोगघ्नी मेधायुःस्मृतिबुद्धिदा ॥

या श्लोकाचा अर्थ असाः-- जेष्टमध, वंश- लोचन, पिंपळी, सैंधव, रौप्यभस्म, जसदभस्म, ताम्र- भस्म, वंगभस्म, नागभस्म, अभ्रकभस्म, सुवर्णभस्म, वेखंड, खडीसाखर, मध यांच्यापैकीं एकाबरोबर त्रिफला समप्रमाणांत मिश्र करून एक वर्षभर सेवन केला असतां रसरक्तादि धातु शुद्ध करून बुद्धिस्मृति निर्दोष होतात.

त्रिफळेबरोबर जाड द्रव्यें कशासाठीं ?

मनुष्याची दोषप्रकृति, त्याला जडलेला रोग तो राहतो तो देश, त्याचीं आहारद्रव्यें इत्यादींचा विचार करूनच वरील जोड द्रव्यापैकीं कोणतीं घ्यावयाचीं हें ठरवावयाचें असतें. ज्यांना आपल्या प्रकृतिप्रमाणें भिन्न असें मिश्रण वापरावयाचें असेल त्याला तें स्वतः करून वापरतां येईल, अगर सेवा संघ तें त्यांच्यासाठीं तयार करून पाठवूं शकेल. तथापि स्वप्न- कालीं त्रिफलासेवन सुकर व्हावें यासाठीं सर्वसाधारण- पणें सर्वांना मानवेल असें वरील द्रव्यांचें मिश्रण करून हा नयनामृतप्राश बनविण्यांत आला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नयनामृतप्राशांतील द्रव्यें व प्रमाणें

सध्यां तयार केलेल्या नयनामृतप्राशांत पुढील द्रव्यें व त्यांचीं पुढील प्रमाणें आहेत. त्रिफला ४० तो. जेष्टमध १६ तो., वंशलोचन ८ तो., पिंपळी १ तो., साखर ६० तो., सुवर्णमाक्षिक ४ तो., जसद ८ मासे, वेखंड ४ मासे, सैंधव १ तो., मध १२० तो., तूप ६० तोळ, अनुभवानुसार यांत आणखी बदल होण्याची शक्यता आहे. जेव्हां बदल होईल तेव्हां तो आयुर्वेद पत्रिकेद्वारां सर्वांना ज्ञात करून देण्यांत येईल.

स्वस्थ पण नेत्रदुर्बल व्यक्तींसाठीं

पत्रिकेच्या वाचक वैद्यांनीं स्वस्थ पण नेत्र-दुर्बल, बुद्धि-स्मृति दुर्बल लोकांना या औषधाची जरूर शिफारस करावी. या औषधांच्या पुड्या करून त्या तूप मधांतून स्वप्नकालीं घ्यावयास द्याव्यात. शक्य असल्यास लेह बनवून तो घेण्यास द्यावा व हें शक्य नसेल तर सेवा संघानें तयार करून विक्रीस ठेवलेला नयनामृतप्राश घेण्यास सुचवावें.

मुंबईच्या हवेला विशेष उपयोगी

मुंबईच्या हवेला या औषधानें विशेष लाभ होईल अशी आमची समजूत आहे. मुंबईची हवा खारी आहे. विशेष घाम आणणारी आहे. त्रिफळ्यां-तील हिरडा (हरीतकी पंचरसा अलवणा) व सर्व त्रिफला हे मिठाचे दुष्परिणाम घालविणारा आहे. मुंबईत माणसास थकवा फार येतो, त्यामुळें वारंवार चहा (तुरट मधुर द्रव्य) घ्यावा लागतो व त्यामुळें बद्धकोष्ठाची संवय जडते. नयनामृतप्राशांत त्रिफळ्या-बरोबरच ज्येष्टमध वंशलोचन भस्में, तूपसाखर मध इ. बल्य औषधी द्रव्यें असल्यामुळें थकवा येण्याचें प्रमाण कमी होईल व शौचास साफ झाल्यामुळें इतर रोगांचीं बीजें आंतड्यांत, रक्तांत, त्वचेंत वा मेंदूंत संचित होणार नाहींत. पत्रिकेचे वाचक वैद्य स्वप्न-कालीं मधतूपाबरोबर त्रिफला सेवनाचा हा प्रयोग आपल्या व्यवहारांत आणण्यास साहाय्य करतील अशी खात्री वाटते.

[दादर मुंबई येथें देव्हारे सर्वौषधिसंग्रहांत नयनामृतप्राश मिळण्याची व्यवस्था केली आहे.]

आयुर्वेदांतील अभ्यासाचा प्रमुख विषय
दोषधातुमलविज्ञान
व त्याविषयावरील छोटा सुटसुटीत ग्रंथ.
डॉ. द. म. पटवर्धन, आयुर्विद्याविशारद यांचा.
या ग्रंथांत निरनिराळे आलेख दिले आहेत. शुद्ध व मिश्र आयुर्वेदीय शिक्षणांत अभ्यास ग्रंथ म्हणून उपयुक्त आहे. चिकित्सकांनीं या ग्रंथाच्या वाचनानें आयुर्वेदीय दोषदृष्टि प्राप्त करून घ्यावी व ती व्यवहारांत आणावी अशी विनंति आहे.
किंमत ३ रु. टपालखर्च ११ आणे
वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

उज्वल कीर्ति
आयुर्वेदीय औषधांची उज्वल कीर्ति बनविलेल्या सिद्ध औषधांच्या गुणावर आहे. औषधें गुण देणारीं असतील तर कीर्ति नेहमीं उज्वल राहील. तरी अशीं गुण देणारीं औषधें, अस्सल ताजी व स्वच्छ घटक औषधी द्रव्यें खरेदी करण्या-वर अवलंबून आहे. औषधी द्रव्यासाठीं आपण
दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स
पायधुनी, मुंबई नं. ३
फोन नं. (३१८९८) यांचेकडे मागणी करा.
युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें
मुख्य केंद्र
काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात.
अधिक माहितीसाठीं कॅटलाग मागवा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जुनाट मधुमेही रोग्याचा स्वानुभव

(लेखकः—वैद्य श्यामराव धोंडो कुलकर्णी, आयुर्विद्याविशारद)

कांहीं कामानिमित्त पुणें येथें जाण्याचा योग नुकतांच आला. सेवासंघाकडून असाणा भरड [आ]णून त्याचें पाणी (फांट) सेवन केलें आहे अशा [ए]का मधुमेही रुग्णाची तेथें भेट झाली. या भेटींत [मि]ळालेली माहिती अन्य मधुमेही लोकांच्या हितासाठीं [ये]थे देत आहे.

रोग्याचें नांव R. T. K. वय जवळपास ५० [व]र्षे, व्यवसाय–विमा कंपनींत इन्स्पेक्टर, यांना फिरती-[पे]क्षां बैठेंकामच जास्त आहे. जीवन मध्यमवर्गीय [आ]हे. या गृहस्थांना प्रमेह, मधुमेह सुमारें २०-२५ [वर्षां]पासून होता. यांनीं आधुनिक वैद्यकपद्धतीनुसार [सां]गितले जाणारे बहुतेक सर्व औषधोपचार घेतलेले [हो]ते व तोंपर्यंत चालूंहि होते.

मधुमेहावर 'असाणा' नामक वनस्पतीचें चूर्ण [उप]योगी पडतें हें त्यांनीं वृत्तपत्रांतून वाचलें व [आ]युर्वेद सेवा संघाकडे तें मिळतें असें कळल्यावरून [त्या]नीं पत्रानें प्रथम गेल्यावर्षी जुलैमध्यें मागणी केली. [(..]-७-५३). त्यावेळीं त्यांना ४०तोळे असाणा भरड [पा]ठविली होती. पुणें येथील वैद्य शं. द. फणसळकर [यां]च्या सल्ल्यानुसार त्यांनीं रोज १ तोळ्याप्रमाणें ४० [दि]वसपर्यंत असाणा–भरडीचें पाणी तयार करून [घे]तलें. कपांत १ तोळा असाणा चूर्ण ठेवावयाचें, [त्या]ंत गरम पाणी ४।५ औंस ओतावयाचें व तें तसेंच [रा]हूं द्यावयाचें. रात्रीं भिजत घातलेल्या चूर्णाचें पाणी [स]काळीं प्यावयाचें वा सकाळीं भिजत घातलेल्या चूर्णाचें पाणी रात्रीं प्यावयाचें, असें ते करीत असत.

पुनः असाण्याची मागणी

पहिलें चूर्ण संपत येतांच त्यांनीं पुनः ४० तो. [अ]साणा भरडाची मागणी ऑगस्टच्या अखेरीस केली [प]ण त्यावेळीं सेवा संघाकडे तें चूर्ण मिळूं शकलें नाहीं. [म्ह]णून पुनः २ आठवड्यांनीं स्मरणपत्र पाठविलें. त्यावेळीं (२४-९-५३) ४० तोळे भरड त्यांना मिळाली. ती त्यांनीं ऑक्टोबर अखेर वापरली व पुनः २२-१०-५३ रोजीं आणखी ४० तोळे असाणा भरड मागविली.

वारंवार लघवी होणें ही तक्रार

त्यांना लघवींतून साखर फक्त १–१॥ टक्काच जात होती. त्याच्या उपद्रवाचें स्वरूप वारंवार लघ–वीस जावें लागणें हें होतें. त्यांना दिवसांतून १८-२० वेळां लघवीस जावें लागे. असनादि सारजल घेण्यास प्रारंभ केल्यानंतर क्रमानें लघवींतून साखर जाणें कमी झालें व लघवींचें प्रमाण दिवसांतून फक्त ७-८ वेळांवर आलें. बरें वाटल्यानंतरहि एक महिनाभर त्यांनीं असाणा जल घेणें चालूं ठेवलें होतें.

३ वेळां मिळून १२० तोळे असाणा

तीन वेळां मिळून त्यांनीं १२० तोळे असाणा भरड घेतली व ४।५ महिन्याच्या कालांतच त्यांना उत्तम फायदा झाला. त्यानंतर आजवर त्यांना कोणता-हि लघवीसंबंधीं विकार झाला नाहीं.

पुण्यास मिळण्याची व्यवस्था

आपणास विकाराचा त्रास नसला तरी मधून मधून तें पाणी पीत जावें, असा त्यांचा विचार त्यांनीं बोलून दाखविला व पुणें येथें हें चूर्ण मिळ–ण्याची व्यवस्था करा अशी त्यांनीं सूचना केली. कारण सध्यांच्या वाढलेल्या पोष्टाच्या दरामुळें ४० तोळे असाणा येण्यास बराच खर्च पडतो.

पुणें येथें किरण मेडिकल सर्व्हिस, नगरकर तालीम चौक लक्ष्मीरोड येथें असाणा पुडे मिळतात असें मी त्यांना सांगितलें तेव्हां त्यांना बरें वाटलें.

संस्कृत अन्न व संस्कृत पाणी

ते भात साखर वगैरे पदार्थ थोड्या प्रमाणांत नित्य खातात. त्यांनीं पथ्य असें ठेवलेलें नाहीं, तरी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांना साखरेचा अगर बारंवार लघवीचा त्रास झालेला नाहीं. मी त्यांना अन्नावर व पाण्यावर आयुर्वेदीय पद्धतीप्रमाणें तुरट कडु (त्रिफळा, हरिद्रा, असाणा) संस्कार करून खाण्याची कल्पना सुचविली व मग कोणतीच आहारांतील वस्तु वगळण्याची गरज पडणार नाहीं असें सांगितलें.

माझी श्रद्धा वाढली

सदरहु गृहस्थ माझे नातेवाईकहि आहेत व १५-२० वर्षांपूर्वीपासून त्यांना हा त्रास होता, हें मी पुण्यास आयुर्वेद महाविद्यालयांत शिकत असतां मला माहित होतें. अशा जुनाट प्रमेह, मधुमेह, विकारावर असाणाजलानें ५।६ महिन्यांच्या अल्प काळांत झालला लाभ पाहून माझी या औषधाच्या गुणावहतेबद्दलची श्रद्धा दृढ झाली.

१२५ लोकांनीं लाभ घेतला

असाण्याची माहिती होऊन त्याचा वापर सुरूं होण्याला नुकतेंच १ वर्ष लोटलें. या अवधींत सुमारें १२५ लोकांनीं वारंवार या असाणा भरडीची मागणी केली आहे. व त्यापैकीं बहुतेकांना लाभ झाल्याचें आम्हास माहित आहे. त्या रुग्णांकडून अधिकृत मागणी मागविण्यांत येत असून अन्य मधुमेही पीडितांच्या माहितीसाठीं ती प्रसिद्ध करण्यांत येणार आहे.

———

वाचकांचा पत्रव्यवहार—

आयुर्वेदीय दृष्टींतून निदानाचा विचार

" आयुर्वेद पत्रिकेचा १६ सप्टेंबरच्या अंकांत पान २११ वर वैद्य श्री. लक्ष्मीबाई बोरवणकरांच्या लेखांतील विषयासंबंधीं चर्चा आली आहे. मी श्रीमती लक्ष्मीबहनचे सर्व लेख पूर्ण लक्षपूर्वक (बहुतहि दत्तचित्त होकर) वाचतो. शक्य आहे, यांत माझ्या बुद्धीचा कांहीं दोष असेल, परन्तु मला असें नेहेमीं प्रतीत होत आलें आहे कीं, आयुर्वेदाच्या दृष्टींतून निदानाचा विचार व तदनुरूपच चिकित्सेच्या पद्धतीचें जें स्वरूप त्यांच्या लेखांत मिळतें, तें मला अन्यत्र कोठें पहावयास मिळालें नाहीं.

आपण इतरांनाहि प्रेरणा द्यावी

त्यांचे सर्व लेख पुष्कळ ज्ञानवर्धक व आयुर्वेदीय दृष्टीचे प्रदर्शक असतात. आपण त्यांना आणखी प्रोत्साहन देऊन त्यांच्याकडून अधिक लेखन करवावें व इतरांनाहि याच पद्धतीनें विचार करण्याची प्रेरणा द्यावी, ही माझी आपणास विनम्र प्रार्थना आहे.

पुष्कळ दिवसांपासून माझ्या मनांत हा माझा अभिप्राय आपल्याकडे पाठविण्याचा विचार होता पण चुकीनें आजपर्यंत तो पाठविला गेला नाहीं याबद्दल क्षमा मागतो. वैद्य श्री. राजपाठकजी यांचा अनुकूल अभिप्राय वाचून मला पण माझें मत प्रदर्शित करण्याचा लोभ आवरतां आला नाहीं. " —रणजितराय

(उपप्रमुख, आयुर्वेद महाविद्यालय, सुरत)

———

सांड
डायाबेटॉल
मधुमेहावर अप्रतिम.
सविस्तर माहितीसाठीं लिहा
द. कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई
[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स:—
बी. पी. बर्वे अँड को., जळगांव
[२] स्थानिक विक्रेते—मे. पेंढारकर अँड को.
मेनरोड, नाशिक शहर

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाचे सभासद होऊन संघटना बलवान् करा !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुंबई राज्यांतील मेडिकल कॉलेजें

आमदार श्री. होमी जे. एच्. तल्यारखान यांनीं विचारलेल्या प्रश्नाला उत्तर म्हणून विधान-सभेंत आरोग्यमंत्र्यांनीं पुढील माहिती दिली.

मुंबई राज्यांत सरकारी व खाजगी मिळून एकंदर सहा कॉलेजें आहेत.

सरकारी कॉलेजें—[१] ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई. [२] बी. जे. मेडिकल कॉलेज, पुणें. [३] बी. जे. मेडिकल कॉलेज अहमदाबाद. [४] मेडिकल कॉलेज, बडोदा.

खाजगी कॉलेजें—[१] शेठ जी. एस्. मेडिकल कॉलेज, मुंबई. [२] टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेज, मुंबई.

या सहा मेडिकल कॉलेजापैकीं ३ मुंबई येथें व १ पुणें १ अहमदाबाद व १ बडोदे येथें आहे.

सरकारी मदत देण्याचें धोरण

खाजगी कॉलेजापैकीं शेठ जी. एस्. मेडिकल कॉलेजला सरकारी आर्थिक मदत (ग्रँट) दिली जात नाहीं. टी. एन्. मेडिकल कॉलेज, मुंबई या कॉलेजास कायम स्वरूपाच्या देणग्या व फीच्या उत्पन्नापैकीं निम्मी फी इतकी रक्कम कॉलेजच्या सरकारमान्य खर्चांतून वजा जातां राहिलेल्या खर्चाइतकी रक्कम सरकारी आर्थिक मदत (Grant-in-aid) म्हणून देण्यांत येत असे. सन १९५१।५२ साला-पासून ही मदतीची रक्कम दरसाल १/५ हिश्शानें कमी कमी करीत जाऊन ५ वर्षानंतर अशी मदत आपोआप बंद करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. १९५१।५२ सालीं ह्या कॉलेजला २१८३७८ रुपयां-ची सरकारी आर्थिक मदत देण्यांत आली होती.

फक्त शेकडा २५ अर्जदारांना प्रवेश

या सहा मेडिकल कॉलेजांतून प्रवेशासाठीं अर्ज करणाऱ्या एकंदर विद्यार्थ्यांपैकीं शेकडा ७५ विद्या-र्थ्यांना जागेच्या अभावीं प्रवेश मिळूं शकत नाहीं. विद्यार्थ्यांना अधिक प्रमाणांत मेडिकल कॉलेजांतून प्रवेश मिळावा म्हणून सरकारनें कांहीं गोष्टी केल्या आहेत व कांहीं आणखीहि गोष्टी करण्याचा सरकारचा मानस आहे. त्यामध्यें खालील गोष्टींचा समावेश होत आहे.

१९५३ सालापासून बडोदा मेडिकल कॉलेजची प्रवेश-मर्यादा ४० वरून ५० अशी वाढविली आहे. त्याचप्रमाणें पुणें व अमदावाद येथील मेडिकल कॉले-जांची प्रवेशमर्यादा सन १९५४ पासून अनुक्रमें ८० वरून १०० व ६० वरून १०० अशी वाढविली आहे.

हुबळी यथें नवीन मेडिकल कॉलेज

ह्याखेरीज सरकार हुबळी येथें एक नवीन मेडिकल कॉलेज स्थापन करणार आहे. त्यासाठीं योग्य अशी जागा सुमारें ६ लाख रुपये खर्च करून सर-कारनें मिळविली आह. शिवाय उडपी येथील न्यू मेडिकल कॉलेजच्या कर्नाटक विश्वविद्यालयाच्या संबद्धतेस सरकारनें मान्यता दिली आहे. त्यामुळें मुंबई-राज्यांतील कांहीं विद्यार्थ्यांची सोय त्याहि कॉलेजमध्यें होऊं शकेल.

तेलिया असाणा भरड

मुंबईत कोठें मिळेल?

मधुमेह या विकारावर असाणा भरडीच्या जलपानानें इष्ट परिणाम येऊं लागतो हें माहिती झाल्यापासून असणाभरडीसाठीं सर्वत्र मागणी वाढली आहे. म्हणून आम्हीं आयुर्वेद सेवा संघाकडून २० तोळे प्रमाणाचे पुडे आणवून ते विक्रीस ठेवले आहेत. असाणा-भरड व सेवा संघाचीं इतर नवनवीन विशेष औषधें यासाठीं आमच्या दुकानास अवश्य भेट द्या.

सूर्यकिरण फार्मसी विक्री केंद्र

१७३ गिरगांवरोड, मुंबई ४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

-:- उपयुक्त वैद्यकीय ग्रंथ -:-

ग्रंथ	लेखक	किंमत
स्त्रीरोग विज्ञान	डॉ. वि. म. भट	५ रु.
चिकित्साप्रभाकर	श्री. ओगले	२० ,,
सार्थ माधव निदान	वै. बोरकर	५ ,,
वनौषधी गुणादर्श भाग १ त ७	वै. पदेशास्त्री	७॥ ,,
रसकामधेनुः (संस्कृत)	वै. यादवजी	५ ,,
यकृतराग विशेषांक	—	१ ,,
चारुचिकित्सा (हिंदी)	वै. गोपीनाथजी गुप्त	२॥ ,,
नित्योपयोगीं निवडक औषधें	श्री. म. गो. मोडक	१॥ ,,
बृहदासवारिष्ट संग्रह पूर्वार्ध-उत्तरार्थ	पं. कृष्णशास्त्री त्रिवेदी	७ ,,
पांच वर्षाचा पाळणा	डॉ. शं. ह. मराठे	१॥ ,,
आरोग्य मार्ग प्रदीप	श्री. गो. म. चिंपळुणकर	३ ,,
आरोग्यदीप	श्री. रा. ज. गोखले	-।।।- ,,
बाळकड बालसंगोपन	वै. बोरवणकर	-।- ,,
स्त्रियांची सुखदुःखें	सौ. मालती समळे	-।= ,,
सार्थ सुश्रुतसंहिता	वै. बोरकर	११ ,,
विषूचिका	वै. अ. वा. सह बु	१ ,,
नारूचा वध	प्र. गो. मो. कार्लेकर	-।= ,,
राष्ट्रीय चिकित्सा सिद्धयोग संग्रह	पं. रघुवीरप्रसाद द्विवेदी	१॥ ,,
क्षयरोगाची आयुर्वेदीय चिकित्सा व आयुर्वेदीक इंजेक्शनें	वै. ना. बा. कुळकर्णी	४ ,,
स्टेथॉस्कोप व छातीची तपासणी	डॉ. वा. कृ. जोशी	६ ,,
स्वस्थवृत्त	वै. कडेगांवकर	२॥ ,,
सुलभ औषधी प्रभाक	प्र. बा. ओगले	१० ,,

मिळण्याचें ठिकाणः— **वैद्यक ग्रंथ भांडार**

आयुर्वेद सेवा संघ, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खेड्यांतील गरीबांचा घरचा वैद्य

.... आयुर्वेदीय सूक्ष्म औषधें ....

(संशोधक—आयुर्वेदरत्न सुंदरराव भास्करराव वैद्य, एल्. एम्. ई.)
[पत्ताः—२३ भाई जीवनजी गल्ली, ठाकुरद्वार, मुंबई २]

गरीबानें हें वाचून आपल्या मुख्य रोगावर औषध शोधून काढावें. तें स्वतः काढून आणावें. एका वेळेस अकच औषध घ्यावें. तें वाटून पाण्यांत विरळ करावें. तें मोठ्या शिश्यांत (अेक लिटर=२४ औंस=६० तोळे) भरलेल्या स्वच्छ थंड पाण्यांत घालावें. साधारण प्रमाण, १ औषध तर १००० पाणी असें असावें. औषध सूक्ष्म करून वारंवार घेतल्यानें गुण लवकर येतो. हें औषध लहान चमच्यांत मावेल अितकें पांच पांच मिनिटांनीं घ्यावें. असें औषध दिवसभर घ्यावें. झोंप लागल्यास औषध बंद ठेवावें. झाडाचें पान, फूल, फळ, फळाची साल, मूळ, फांदीचा बारीक तुकडा ह्यांपैकीं जें शक्य असेल तें घ्यावें.

एकदम अनेक औषधें घेऊं नयेत

समजा, कोणाला ताप आला आहे. तापावर पुढील औषधें लिहिलीं आहेत, गुळवेल, कडुनिंब, काडेकिराअित, काळें-मिरीं, मेथीचे दाणे. ह्यांतील कोणतें तरी अेक घ्यावें. गुळवेल फुकट मिळते म्हणून वीतभर तुकडा घेऊं नये. नखाअेवढा तुकडा घ्यावा. कडूनिंबाचीं दोन पानें घ्यावीं. सुक्या काडेकिराअिताची तीनबोटांच्या चिमटींत जितकी पूड मावेल तितकी घ्यावी. काळ्या मिऱ्याचे फक्त चार दाणे घ्यावे. मेथीचे सहा दाणे घ्यावे. काळें मिरीं व मेथीचे दाणे यांचा पुष्कळांनीं अनुभव घेतला आहे. पुष्कळ दिवसांचा ताप अेका दिवसांत घालविला आहे. पुढें पुष्कळ रोगांवर औषधें दिलीं आहेत तीं ह्याप्रमाणें घ्यावी. अेकदम अनेक औषधें घेऊं नयेत. अेक घेतल्यावर दुसरें घेण्यास हरकत नाहीं. सूक्ष्म केलेलें औषध शिरांत लवकर भिनतें व गुण लवकर येतो. सर्व औषधांचा आम्ही अनुभव घेतलेला नाहीं. कांहींचा आमच्या स्वतःवर, आमच्या मुलांवर, शेजाऱ्यापाजाऱ्यांवर व आमच्या गांवच्या लोकांवर घेतलेला आहे. कांहीं औषधें आम्हीं आमच्या ज्ञानाप्रमाणें ठरविलीं आहेत. बाकीचीं दुसऱ्याचे ग्रंथ पाहून ठरविलीं आहेत.

लेखक व संशोधक

हा आमचा नवा शोध आहे

आमची खात्री झाली आहे कीं, वनौषधि औषध पाण्यांत सूक्ष्म करून घेतलें असतां लवकर गुण येतो. खर्च मुळींच येत नाहीं असें म्हणतां येईल. आम्हांला सुचलेला हा आमचा नवा शोध आहे. प्रत्येकानें मुख्य औषध फार तर दोन दिवस घ्यावें. गुण दिसला नाहीं तर बदलून दुसरें घ्यावें. एक रोग बरा झाल्यावर दुसऱ्यावर औषध घ्यावें. आपल्या बुद्धीप्रमाणें बदल करण्यास हरकत नाहीं.

सूक्ष्म पद्धतीमुळें लवकर गुण

जुन्या आयुर्वेदीय पद्धतीप्रमाणें वात, पित्त व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कफ यांतील कोणतें कारण आहे तें पाहून त्यावर अनेक औषधें, नवीन उपद्रव होऊं नये म्हणून दुसरीं औषधें व अनुपान म्हणून कांहीं औषधें अशीं एका रोग्यास अनेक औषधें देतात. आम्ही मुख्य रोगावर एकच औषध देतो व तें सूक्ष्म पद्धतीनें दिल्यामुळें लवकर लागू पडतें. अेक रोग बरा झाल्यावर दुसऱ्या रोगावर औषध द्यावें.

बहुधा एक मुख्य रोग बरा झाल्यावर दुसरे रोग आपोआप नाहींसे होतील. समजा एकाला ताप आहे. त्याचें डोकें दुखत असून खोकला व पडसें झालें आहे. त्याचा ताप गेल्यावर हीं सर्व नाहींशीं होतील.

तात्कालिक उपाय म्हणून

हीं औषधें तात्कालिक उपाय म्हणून सर्वांनीं वापरावीं. सर्वांनीं झाडांचीं नांवें शिकून तीं ओळखण्यास शिकावें. आपण स्वतः वैद्य बनून दुसऱ्यांस औषधें द्यावीं. हा गरीबांचा घरचा वैद्य सर्व गरीबांस उपयोगी पडो अशी आमची श्रीभगवंताजवळ प्रार्थना आहे.

औषध थोडें पण गुण पुष्कळ

पडसें झाल्यास एक लवंग तोंडांत धरावी म्हणजे पडसें जातें. खोकल्यावरहि एक लवंग तोंडांत धरावी. ती संपल्यावर दुसरी ठेवावी. नाहींतर खोकल्यावर सहा औंस किंवा १५ तोळे पाणी मावेल अशा बाटलींत थंड पाणी घालून त्यांत थोडें म्हणजे तीन बोटांच्या चिमटींत मावेल अितकें मीठ घालावें. (मीठ जास्त घातल्यास ओकारी येअील.) हें थोडथोडें घ्यावें म्हणजे खोकला जाअील. परसाकडे होण्यासाठीं सकाळीं उठण्यापूर्वीं अेक तास आधीं अेका मोठ्या ग्लासभर पाण्यांत तीन बोटांच्या चिमटीभर मीठ घालून तें अेकदम प्यावें. अेका मूळव्याध झालेल्या माणसानें अेक महिनाभर अळणी खाल्लें व त्याची मूळव्याध गेली. अेकाचा कॅन्सर फक्त गाअीचें दूध पिऊन बरा झाला. पोटांतील नळांत दुखत असतां हिंग सूक्ष्म करून घेतल्यानें बरा झाला.

सूक्ष्म पद्धतीनें वापरण्याचीं ४० औषधें

१ अडुळसा	२ अशोक	३ आपटा
४ आवळकाठी	५ आस्कंद	६ इंद्रजव
७ एरंड	८ ओंवा	९ कडुनिंब
१० काडेचिराईत	११ काळेमिरीं	१२ खारिक
१३ गवती चहा	१४ गोखरूं	१५ गुळवेल
१६ जायफळ	१७ जांभूळ	१८ जिरे
१९ ज्येष्ठमध	२० डाळिंबसाल	२१ तुळस
२२ धने	२३ धमासा	२४ धायटीफूल
२५ नागीशेप	२६ वेल	२७ बेहाडा
२८ बाळहिरडा	२९ मेथी	३० मेंदी
३१ लवंग	३२ लसुण	३३ लिंबू
३४ वावडिंग	३५ वेखंड	३६ शेवगा
३७ सुंठ	३८ हळद	३९ दालचिनी
४० तेलियाअसाणा		

रोगवारीनें औषधें

अजीर्ण–६,८,११, १७, २०,२२. २३, २५, २६.
अर्धशिशी– ११, ३५, ३६, ३७.
आमांश–(आंव) ५,६,१६,१७,१८.२२,२५,२६.
आर्तव– (साफ येण्यास) १२, २४, २७, ३०.
इसब २२, ३५, काळें मिरी १ भाग, शेंदूर ·|· भाग तुपांत खलून लावणें.
उचकी– ४, २८, ३२, ३३,
उवा– वावच्या, शेंदूर, व खोबरेल बाहेरून लावणें.
कफ– १, ११, ३०, ३५,
कान दुखणें– कानांत एक लसूण पाकळी ठेवणें
कावीळ– १, ४, ६, ७, ९, १५, २०, ३०, ३८.
केसतूड– ३ मिरे व एक पाकळी लसूण यांचा लेप वाळल्यावर पुनः दुसऱ्या दिवशीं नाहींसा.
केंस काळे– माक्याचा रस लावणें.
केंसवाढ– १९, कोष्ट व मेंदीचें उटणें लावणें
कोड [पांढरें]वावच्या वांटून रात्रीं लावणें व सकाळीं गोमूत्रानें धुणें.
स्वर– ३, ५, १४, ३०.
खरूज– ९, ३८.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खोकला- १, ४, ९, ११, १४, १५, १८, २०, २२, २३, २९.

गजकर्ण- २१ तोंडल्याचा रस लावणें. आधीं खोबरेल लावून वर बिबा उगाळून लावणें.

गंडमाळा- ३, ४, ७.

जखम- शुद्ध काताची पूड भरणें.

जलोदर- २१, ओटीपोटावर ओली माती.

जुलाब बंद होण्यास- ४, ५, ९, १६, १७, १८, २०, २२, २४, २५, २६, २९.

जंत- ६ ८, ९, ११, १५, १८, २०, २२, ३२, ३३, ३४, ३५, ३६.

टक्कल- कडुनिंबरस खोबरेलांत उकळवून लावणें.

डोळे येणें-हळद उगाळून वर लावणें.

ताप-८, ९, १०, ११, १३, १५, १६, २१, २२, २३, २५, २६, २९, ३०, ३५, ३६, ३९.

तोंड येणें-४, १७, मध लावणें.

त्रिदोष-४, ७, ९, १४, १५, १९, २२, २३.

दमा-१, ४, १०, ११, १४, २१, २२, २६, २७, २८, ३१, ३२, ३४, ३७.

दाढदुखी-रात्रीं निजतेवेळीं तोंडांत ओंवा धरावा.

दांत दुखणें-८, २२, ३१.

धुपणी-४, ५, ९.

नायटा-२१, कागदाचें किंवा करवंटीचें तव्यावर तेल पाडून तें लावणें.

नारू-फटकी पाण्यांत विरळ करून ५।५ मिनिटांनीं दिवसभर घेणें.

परसाकडे होण्यास-४, ७, ८, १०, २७, २८, ३२, ३३, ३७.

प्रदर-१, २, ४, ५, १०, १२, १४, १७, १९, २२, २४.

प्लीहा-७, ११, १५, २२, २८, २९, ३०, ३४.

पांडुरोग-१, ५, ३५, ३८.

प्रमेह-९, ११, १४, १५, २२, २६, २८, ३०, ४०.

भोंवळ-४, १२, २२, २३, २६, ३७.

मूर्च्छा-१२, १७.

मूळव्याध-४, ९, १०, ११, १२, १४, १५, १७, २०.

मधुमेह-४, १७, २०, २३, २४, २७, ४०.

मूतखडा-१४, २३, २६.

भगंदर-करंजपानांचा लेप लावणें.

भाजणें-तिळाचें तेल व चुन्याची निवळी लावण.

यकृत-४, ६, १०, १२, २८.

लघवी साफ होण्यास १३, १४.

वांति बंद होण्यास-१४

विंचूदंश- २१, मीठ खडा ठेवून वर घासलेट थेंब. चिंच चोळणें. थंड पाण्यांत स्नान.

वृष्य- ५, ११, १२, १४, १९, २६, २९, ३२.

सूज- १, ४, ७, ९, १९, २९, ३२, ३५, ३७, ३९.

संधिवात- ५, ७, १०, ११, १४, १५, २०, ३५, ३७.

स्वप्नावस्था- १४, २२.

क्षय- १, १५, १९, २०, २६, २९.

गोळ्या तयार केल्या आहेत

ज्या ठिकाणीं वनौषधि मिळत नसतील तेथें उपयोगी पडाव्या म्हणून कांहीं औषधांच्या गोळ्या तयार केल्या आहेत. गोळीचा आकार साधारण काळ्या मिऱ्यायेवढा आहे. अशा सुमारें १००गोळ्यांच्या बाटलीस किंमत ४ आणे. आम्हांस फक्त ५रु. पाठविणारास २० बाटल्या रजिष्टर पोस्टानें पाठवूं. पोस्टखर्च आम्ही करूं. पैसे आगाऊ पाठवावे. व्ही. पी. नें पाठविणार नाहीं. ६ औंस बाटलींत १ गोळी व २४ औंस बाटलींत ४ गोळ्या घालाव्या.

नियतकालिकांस सूचना

[ज्या वर्तमानपत्रांस किंवा मासिकांस हा मजकूर प्रसिद्ध करावासा वाटेल त्यांनीं तो प्रसिद्ध करावा.]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्त्रियांना अधिक मजुरी दिली पाहिजे !

(लेखकः—श्री. शिवाजीराव न. भावे)

स्त्रियांपेक्षां पुरुषांना मजुरी अधिक दिली जाते. कारण पुरुष जास्त बलवान्. शक्तीच्या कामांत पुरुष स्त्रियांपेक्षां अधिक काम करूं शकेल, हें खरें आहे.

पुरुष कामांत टंगळमंगळ करतो

पण तो शक्तीच्या कामांतहि अधिक काम करीलच हें खरें नाहीं.कारण पुरुष हा स्त्रियांच्या मानानें कोणत्याहि कामांत अधिक टंगळमंगळ करतो. तो गप्पाच मारील, मध्येंच विडी पिईल, मधूनच त्याला बसून राहण्याची हुक्की येईल. तसें स्त्रियांचें नाहीं.

ग्रामोद्योगांत काम, राम, आराम

सामान्यतः शेती व ग्रामोद्योगांच्या कामांत लाकडें फोडण्यासारखे कांहीं अपवाद सोडले तर फार जोर लावावा लागतो अशीं कामें फार थोडीं. कारण ग्रामोद्योगांची रचनाच काम व आराम यांच्या मिश्रणाची आहे. त्यांत भक्ति मिसळली म्हणजे ग्रामोद्योगाची मजुरी, ही रामांत राम, कामांत काम आणि आरामांत आराम अशी सच्चिदानंदरूप होऊन जाते. अशा कमी मेहेनतीच्या कामांत पुरुष स्त्रियांची बरोबरी करूं शकत नाहीं.

स्त्री जिव्हाळ्यानें काम करते

काळजीनें, जिव्हाळ्यानें बारीकसारीक लक्ष ठेवून काम करण्यामध्यें पुरुषाला स्त्रीची बरोबरी करणें दुरापास्त आहे. स्वयंपाक, शुश्रूषा, झाडलोट, पाहुण्यांची व्यवस्था, गाईगुरांची व्यवस्था इत्यादि कामांत पुरुष स्त्रियांपेक्षां हटकून मागें पडतो.

स्त्रिया घरचें स्वयंपाकपाणी करून, धुणें--झाडणें करून, मुलाबाळांना खाऊ घालून, तान्ह्या मुलांना बरोबर वागवून शेतांत जी मजुरी करतात आणि पुनः घरीं गेल्यावर घरच्या पुरुषमंडळीची आणि घराची जी उस्तवारी करतात, तें काम पुरुषांच्यानें झालेलें कोठेंहि अवलोकनांत नाहीं.

हा फार मोठा अन्याय आहे

असें असूनहि सर्वत्र स्त्रियांना पुरुषापेक्षां कमी मजुरी दिली जाते हा फार मोठा अन्याय आहे. त्याच्याविरुद्ध, स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीनें मजुरी द्यावी हा विचार कांहीं ठिकाणीं प्रगट झालेला आहे. स्त्रियांना पुरुषापेक्षां कमी मजुरी दिली जाते त्या दृष्टीनें हा पुढें गेलेला विचार आहे हें खरें. पण तो योग्य विचार दिसत नाहीं. योग्य विचार हाच कीं, स्त्रियांना पुरुषांच्या मानानें थोडी तरी अधिक मजुरी दिली पाहिजे.

— "सेवक" वरून

वैद्यासाठीं उपयुक्त ग्रंथ

ॲलोपॅथिक चिकित्सासंग्रह

सुमारें ७० रोगांवरील चिकित्सासूत्रें व ५४० प्रिस्क्रिप्शनें व इंजेक्शनें यांनीं युक्त. मराठींतील अभिनव ग्रंथ, आपल्या ॲलोपॅथिक ज्ञानांत वाढ होण्यासाठीं आजच मागवा. किं. ४॥ रु. ट. ख. निराळा.

१ वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

२ डॉ. मोकाशी, ठाणें

पांढरें कोड

हजारोंचें गेलें. त्यांनीं अभिप्राय दिलेले आणि अनेक बक्षिसें मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु. नकली वैद्यापासून सावध रहा !

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन' मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परीक्षण— सचित्र जय-आयुर्वेदाचा

पथ्यापथ्य चिकित्सा विशेषांक

जोधपूर (राजस्थान) येथून निघणाऱ्या ... जय-आयुर्वेद ' या मासिकाचा हा ...ांक आहे. विशेषांकाचे संपादक आचार्य रघुवीर- ... त्रिवेदी. ७३८ पृष्ठें. किंमत फक्त ३ रुपये. ...क सरस्वती मुद्रणालय, जोधपूर.

या अंकांतील लेखकवर्ग

हा अंकाच्या लेखकवर्गांत उत्तर भारतांतील ...न्त आयुर्वेद विद्वान् आहेत. काशी हिंदु ...िद्यालय, झांशी आयुर्वेद विश्वविद्यालय, इंदोर ...ैदिक कॉलेज इ. तील नामवन्त प्राध्यापकांचे, ...माणें राजस्थान व उत्तरप्रदेश या दोन प्रदे-...ा उपसंचालक स्वास्थ्य तथा चिकित्साविभाग ... व 'जयआयुर्वेद' राजस्थान, 'सचित्र आयुर्वेद' ...ता, 'आयुर्वेद चिकित्सक' जबलपुर, या मासि-... संपादक आणि आयुर्वेदीय विश्वकोषकारबंधु ... लेख या अंकांत आहेत.

हा अंक एकांगी नाहीं

पथ्ययुक्त-चिकित्सा व पथ्यविहीन-चिकित्सा ... महत्त्व व दोष वर्णन करणाऱ्या लेखा-...च प्रत्यक्ष महास्रोतोविकार, फुफ्फुसविकार, ...ी-अवस्था, मूत्रविकार, रक्तविकार, बालकांचे ..., व सोमलाचें विष इ. वरील पथ्यापथ्याचे ... लेख असून विविध विकार व पथ्य असा एक ...हि लेख यांत आहे. वरील यादींत आयुर्वेदांतील ...ांचा विचार झाला आहे ही आनंदाची गोष्ट ... विविध विकार व पथ्य हा लेख सर्वांगस्पर्शी ... युनानी वैद्यकाचा व ॲलोपथीचा पथ्यापथ्य ...क दृष्टिकोन यांचे दर्शक लेखहि या अंकांत आहेत. ...च हा अंक एकांगी नाहीं. चतुरस्र आहे.

आयुर्वेदीय चिकित्सेचा अमर निधि

अंकाचा विषय एक अभूतपूर्व व मौलिक आहे. हा विषय निवडण्याबद्दल व ह्या विषयावर अधिकारी अशा विद्वानांचे लेख मिळवून ते प्रकाशित करण्याबद्दल संपादकांची दूरदर्शिता व बुद्धि अत्यंता-त्यंत प्रशंसनीय आहे. या अंकाच्या अध्ययनानें चिकित्सकवर्ग व सामान्य जनता दोघेहि अपूर्व लाभ मिळवूं शकतील. या अंकांतील लिखाण आयुर्वेदीय चिकित्सेचा अमर निधि आहे. यामुळें हा अंक प्रत्येक आयुर्वेदीय चिकित्सकास नितान्त संग्राह्य असा झाला आहे.

या अंकांतील मननीय वाक्यें

या अंकातील पुढील वाक्यें मननीय आहेत.

१ " आधुनिक अस्पतालों मे जो भोजन चलता है, वह रोगके भेदसे वा रोगकी अवस्था की दृष्टिसे तो भेद मिलता है। पर रोगीकी प्रकृति का विचार कर एकही रोगसे पिडित व्यक्ति में भिन्नभिन्न पथ्योंका ध्यान भी उन्हें नहीं आता। "

—रघुवीरप्रसाद

२ पथ्यनिरूपण का आधार

दोषान्दूष्यान्देशकालौ सात्म्यं सत्वं बलं वयः।
प्रकृतिं भेषजं वह्निमाहारं च प्रयत्नतः।
निरीक्ष्य मतिमान् वैद्यश्चिकित्सां कर्तुमुद्यतः।
पथ्यानि योजयेन्नित्यं यथास्वं सर्वरोगिषु॥

—योगरत्नाकर

उथळ व अशास्त्रीय विचारसरणी

संपादकानें आपल्या प्रस्तावनेंत या सर्व मुद्यांचे सोदाहरण स्पष्टीकरण देण्याचा उत्तम प्रयत्न केला आहे. परन्तु या वचनांतील अत्यंत महत्वाचा भाग जो ' प्रकृतीचा ' तिथें मात्र संपादकाची विचारसरणी उथळ व अशास्त्रीय वाटते ! ते लिहितातः—

महत्वाच्या मुद्याचें अशास्त्रीय विवेचन

'प्रकृति का विचार किए विना पथ्य की

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्यवस्था करना व्यर्थ है। प्रकृति और परिस्थिति यहां समानवाची हैं। किस परिस्थिति से कौन व्यक्ति गुजर रहा है, उसके मन पर क्या बीत रही है, इसका ध्यान करना परमावश्यक है। प्रकृति के ही साथ शरीर की परिस्थिति का अवलोकन करते समय सगर्भा है या स्तन्यप्रदात्री, रजोस्रावनिवृत्ता है या कर्कटान्वित वृद्धा, इसका भी विचार कर लिया जा सकता है। " पथ्यांतील अत्यन्त महत्वाच्या मुद्याचें हें विवेचन वाचून सखेदाश्चर्य वाटतें.

वास्तविकपणें या ठिकाणीं वातप्रकृति, पित्त-प्रकृति, कफप्रकृति आदि त्रिदोषप्रकृतींचे भेद व त्यानुसार आहारविहार इत्यादींचें विवेचन क्रमप्राप्त होतें.

३) पथ्य-स्वास्थ्यसंरक्षण तथा व्याधिपरिमोक्षण के लिए उपकारक आहारविहार-उचित-प्रकृत्यनुकूल आहारविहार-का नाम पथ्य है। मिथ्या आहारविहारका नाम अपथ्य है।

—लालचन्दजी शास्त्री, अर्जुन आयुर्वेद विद्यालय काशी

संस्कारांचें महत्व

४) संस्कारोंसे सर्वथा अपथ्यकर पदार्थ पथ्यकर बनाया जा सकता है।

वैद्य के लिये कौन वस्तु किस रोग में अपथ्य है इसे जानने का सुलकर उपाय क्या है? इस प्रश्न का साधा उत्तर है, माधवनिदान या किसी संहिता ग्रंथ का निदानस्थान। उसमें जो रोगकारी हेतु दिए हैं वे ही सब अपथ्य हैं। उन्हीं का परिवर्जन यथार्थ चिकित्सा है। —आयुर्वेदाचार्य द. अ. कुलकर्णी

जीवाणु मधुराम्लप्रिय होंगे

५) संसारमें प्रायः सभी जीव स्वभावतया ही मधुर या मधुराम्ल प्रिय होते हैं, इस कारण यह अनुमान भी सम्भवतया यथार्थ ही होगा कि जीवाणु, कीटाणु भी इसी प्रकार मधुर तथा मधुराम्ल प्रिय ही अधिक होंगे? गौर कार्यों में यक्ष्मारोगकी आक्रमण शक्ति इसलिये ही अधिक होती होगी कि वे मधुर मधुराम्ल सेवनप्रिय अधिक होते है! भारत में इस समय न विदेशों से क्षयरोगविशेषज्ञ की ही आवश्यकता है, न औषधियों की, बल्कि उत्तम पुष्टिकर पथ्य कि ही आवश्यकता है।

— श्रीकृष्णपाद भट्टाचार्य

(B. C. G. च्या शीघ्रवेगी प्रचाराचे काळीं वरील विचार काय दर्शवितात ?)

६) यदि व्याधियों में सफलता के कारणों का तुलनात्मक विवेचनकिया जाय-अंशांश विकल्पन किया जाय, तो पथ्यपालन के द्वारा होनेवाला लाभ ५० प्रतिशत, औषधप्रभावजन्य लाभ २५ प्रतिशत, और निदान परिवर्जनजन्य लाभ २५ प्रतिशत मानना पडेगा।

जबतक स्रोत बंद नहीं होगा

शरीरं में संचित हुए व्याधिजनक दोषोंका शोधन-शमन करना औषध का कार्य है, और नवीन रसरक्तादि का निर्माण करना तथा इस प्रकार दोषोत्पत्ति का स्रोत बन्द कर देना पथ्य का कार्य हैं। जब स्रोत नहीं बन्द होगा, व्याधि समूल नष्ट नहीं होगी और आरोग्यमन्दिरकी नीव कची ही रहेगी।

—गंगासहाय पाण्डेय, काशी

७) निदानौषधिपथ्यानि त्रीणि यत्नेन चिंतयेत्।

दोषांशकल्पना का आभाव

८) जैसा हम समजते हैं पथ्यव्यवस्था उतनी स्थूल एवं सरल नहीं है जितनी सरसरी तौर से हम समजते हैं। यह एक गम्भीर चिन्तनीय रहस्यमयी प्रणाली है। और इसका आधार दो बातों के सूक्ष्म अध्ययन पर आश्रित है।

१) रोगी की प्रकृति (२) रोग की दोषांश-कल्पना। आजकल दोषांशकल्पना का सब जगह अभावसा दृष्टिगोचर होता है। प्राप्य आयुर्वेद साहित्य में भी उसका विशेष उल्लेख नहीं है।

(घृत को आयुर्वेदने अग्निवर्धक माना है, परन्तु कफप्रधान प्रकृतिवाले रोगी में पित्त का स्नेहांश और तरलांश बढ कर मंदाग्नि हुई है तो घृत का एक बिंदुभी विषवत् सिद्ध होगा। परन्तु डॉक्टरोंको इनका समाधान केवल इतना मिलेगा कि रोगी में यकृत् निर्बल है और स्नेह का पाचन करने में

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

[स]मर्थ है। परन्तु किसी भी दुर्बल यकृत वाले प्रधान व्यक्ती जिसके पित्त के उष्ण एवं तेजांश [ग]ये हो घृत की एक मात्रा भी चमत्कार दिखाती प्रवाहिका रोग में प्रधानतया कफ दुष्ट होता [प]रन्तु वातस्थान पक्वाशय (वातप्रकृति) का रोग [हो]ने के कारण यदि केवल कफनाशक रूक्ष [चिकि]त्सा की जाय तो सफलता नहीं मिलती है। [अतः] वात और कफ दोनोंका शमन करनेवाली [चिकि]त्सा एवं आहारसेही पूर्ण लाभ प्राप्त हो पाता है।

कविराज नित्यानन्दजी, डे. डा. राजस्थान

वृक्षांना औषधी खत द्यावें

'केवल पथ्य द्वारा रोग–आराम चाहते हो तो [चिकित्सा]-विधि का प्रयोग उन पशु–पक्षी, पेड–पौधों [पर] करना ही होगा।

आज कल मानवसमाज की भांति मानवसमाज [के सं]स्पर्श में रहनेवाले अधिकांश पशु, पेड भी [बीम]ार रहते हैं, न उनकी चिकित्सा होती है, न [पौष्टिक तथा रोगनाशक] [प्रति]जस्कर द्रव्य ही उन्हें खिलाया जाता है, परिणाम [मान]वसमाजके लिये ही घातक सिद्ध हो रहा है। […]ंगी के पेड को नीचे कुनैन सुदर्शनचूर्ण आदि [ज्वर]घ्न औषधियों का खाद दिया तो ज्वरनाश होता [तथा] रक्तपित्त अधिकारोक्त औषधियों द्वारा खजूर के [पेड] को खाद देकर कल्प कराया गया तो लाभ–[दाय]क होता है।' —श्रीकृष्णपद भट्टाचार्य

१०) विनापि भेषजर्व्याधिः पथ्यादेव निवर्तते !
न तु पथ्याविहीनस्य भेषज़ानां शतैरपि ॥
—चरकाचार्य

दुधीभोपळ्याचे पुटपाक कल्प

११) उर्ध्वगरक्तपित्त--ज्वर-रक्तार्श-उर्ध्वगअधोग [अ]म्लपित्त यासाठीं श्री. सत्येश्वरानन्द देहरादून यांनीं [दु]धीभोपळ्याचे पुटपाक कल्प दिले आहेत, ते प्रयोगार्ह आहेत.

१२) शंखविष (शंखिया) पर पथ्य

१) आंवट ताक (१ पाव) + काळी काळी(मिरी $\frac{1}{2}$ तोळा) सर्वांगास ७-८ वेळा चोळणें.

२) आजमांसरस मंदोष्ण पिणें (वातकाळीं) पहाटे व संध्याकाळीं २ ते ४ आठवडे देणें. —श्री. देवदत्त वैद्य, पठाणकोट

अभिप्राय लेखकः- आयुर्वेदाचार्य श्री. कृ. करमरकर
आयुर्वेद सेवा संघ, नाशिक

वैद्यकीय समाज कार्यकर्ते
(मेडिकल सोशल वर्कर्स)

आमदार श्रीमती लिलावती बँकर यांनीं आरोग्य-मंत्री यांना 'वैद्यकीय समाज कार्यकर्ते' या संबंधांत मुंबई विधान सभेच्या १९५४ च्या दुसऱ्या अधि-वेशनांत विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें—

६ रुग्णालयांत ७ कार्यकर्ते

सबंध मुंबई राज्यांत वैद्यकीय समाज कार्यकर्ते किती आहेत याची संपूर्ण माहिती आज हातीं नाहीं; तथापि मुंबई येथील चार सरकारी रुग्णालयें व एक खाजगी रुग्णालय अशा पांच रुग्णालयांतून एकंदर सहा वैद्यकीय समाज कार्यकर्ते काम करीत आहेत. अशा प्रकारच्या आणखी एका कार्यकर्त्याच्या नेम-णूकीस सरकारी मंजुरी मिळाली असून सदर कार्यकर्ते औंध कँप (पुणें) येथें असलेल्या छातीच्या रोगांच्या हॉस्पिटलमध्यें काम करीत आहेत.

वरील सहा रुग्णालयांतून एकंदर सात वैद्यकीय समाज कार्यकर्ते काम करीत असून त्यांतील २ पुरुष कार्यकर्ते व ५ स्त्री कार्यकर्ते आहेत.

'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ स्पेशल सायन्सेस' मुंबई, ह्या संस्थेमार्फत अशा वैद्यकीय समाज कार्यकर्त्यांना शिक्षण दिलें जातें. ह्या कार्यकर्त्यांना प्रात्यक्षिक शिक्षण मिळण्याकरितां सरकारी हॉस्पिटलांमधून वैद्यकीय समाज कार्यकर्त्यांच्या विभागांतून जरूर त्या सर्व सुख-सोयी उपलब्ध करून दिल्या जातात. सरकारनें निवडलेल्या क्षयरोग–निवारण वैद्यकीय समाज कार्य-कर्त्या शिक्षणेच्छु उमेदवारांस दर शैक्षणिक वर्षास १४५० रुपये शिष्यवृत्तीहि दिली जाते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

.... नारूचे प्रताप व उपाय....

खेडगांवांतील विहिरी, तळीं, डबकीं यांसारख्या जलशयांमध्यें नारू झालेल्या व्यक्तींचा संबंध आला असतां नारूचीं अंडीं त्या पाण्यांतील विशिष्ट प्रकारचे कीटक (सायक्लॉप्स) गिळतात. हे कीटक पाण्याबरोबर मनुष्याच्या पोटांत जातात. माणसाच्या पोटांतून नारूचीं हीं बीजें मानवी शरीरांत पसरतात. विशेषतः पायांच्या त्वचेंतून नारू बाहेर पडतात.

नारू निर्माण होण्यास ३४८ दिवस

पाण्याशीं संबंध येणाऱ्या अवयवांतून असे नारू बाहेर पडतात असें दिसून येतें. तसेंच पोट, स्तन आणि जननेंद्रियें या ठिकाणींहि नारूचा उद्भव होत असतो. नारूच्या रोगानें दूषित झालेलें पाणी पोटांत गेल्यापासून नारू निर्माण होण्यास सुमारें ३४८ दिवस लागतात.

नारू रोगाचें स्वरूप आणि लक्षणें

नारू बाहेर पडण्यापूर्वी मानवी शरीरावर जेथें तो मुख पाडतो, तेथें भाजल्यासारखा फोड येतो. तेथें खाज येते व आगहि होते. तो फोड फुटतो आणि त्यांतून पांढरें पांणी आणि नारूचें डोकें वर येतें. त्या ठिकाणीं सूज येते, ताप येतो आणि मनुष्य दुबळा होतो. नारू झाल्यानन्तर तो संपूर्णपणें काढून टाकणें महत्वाचें असतें. १२ ते १६ इंच लांबीचा सुतासारखा हा तंतु न तुटतां बाहेर काढणें पुष्कळ वेळीं कठीण जातें. पाण्याकडे धांव घेण्याची नारूची नैसर्गिक प्रवृत्ति असते. म्हणून नारूनें मुख केलेल्या शरीराच्या भागावर पाण्याची धार धरली असतां बाहेर पडण्यास मदत होते.

नारू काढण्याचे कौशल्य व रीत

नारू बाहेर काढतांनाहि कौशल्यानें काढावा लागतो. चिमट्यानें ओढल्यानें अगर हिसका दिल्यानें हमखास नारू तुटतो व त्या ठिकाणीं गळूं होतें. ऑपरेशन करूनहि नारू काढतां येतात तथापि नारू काढण्याची सोपी रीत अशी कीं, नारूचा तंतु थोडा बहुत बाहेर येतांच आगपेटीच्या काडीला तो गुंडाळून ठेवावा. नाजूक हातानें तो बाहेर येत जाईल तसतसा काडीला गुंडाळीत जावा व त्यावर ओल्या कापसाची घडी ठेवून स्वच्छ कपड्याच्या पट्टीनें बांधून ठेवावा. शरीरांत एकदां नारूचा उद्भव होण्यास प्रारंभ झाल्यानंतर एका व्यक्तीला किती नारू होतील हें सांगणें कठीण असतें. म्हणून दृष्टोत्पत्तीस आलेला नारू काढून टाकण्याबरोबरच शरीरांतील इतर नारूचीं बीजें मारून टाकण्यासाठीं पोटांत औषध घेणें जरूर असतें.

प्रतिबंधक उपाय

नारूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठीं प्रत्यक्ष रोग्याला औषधोपचार करीत असतांना त्याबरोबरच गांवांतील पाणवठे शुद्ध करणें आणि नारू झालेल्या व्यक्तीचा त्या पाणवठ्याशीं संबंध न येईल अशी काळजी घेणें अवश्य असते. शंका असलेल्या ठिकाणचें पाणी, स्वच्छ फडक्यानें गाळून घेणें हा उत्तम उपाय. पाण्यांतील नारूचीं बीजें मारण्यासाठीं चुना, पोटॅशियम परमँगॅनेट ब्लीचिंग पावडर, राख इत्यादि औषधें तज्ज्ञांच्या सल्ल्यानें योग्य प्रमाणांत पाणवठ्यांत टाकल्यास नारूचा उद्भव टाळतां येईल.

वडाच्या चिकाचा उपयोग

नारूवरील गुणकारी आणि निरुपद्रवी औषधाची उणीव मुंबईचे डॉक्टर एम. व्ही. भाजेकर M. A., M. B. B. Ch., F. R. C. S. ऑनररी सर्जन, सेंट जॉर्जेस हॉस्पिटल यांनी दीर्घकालीन संशोधनानें भरून काढली आहे. ड्रॅक्युलॅन हें तें औषध होय. हें औषध आयुर्वेदीय स्वरूपाचें असून त्यामध्यें वडाचा चीक हें प्रमुख द्रव्य आहे. या औषधाच्या गोळ्या केल्या असून प्रत्येक गोळीमध्यें १०० मिलिग्रॅम्स् F. Bengalensis Lynn [Fam.]Meraceae हें द्रव्य असतें. भाजेकर यांनीं गेल्या १२ वर्षांत २०० हून अधिक रुग्णांवर हें औषध वापरून त्याचें रेकॉर्ड तयार केलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुंबई राज्यांतील
आयुर्वेदाचें शिक्षण आणि प्रगति

नवसारीचे श्री. लल्लुभाई मकनजी पटेल यांनीं मुंबई विधानसभेच्या १९५४ च्या दुसऱ्या अधिवेशनांत 'आयुर्वेदाचें शिक्षण व प्रगति' या विषयासंबंधीं कांहीं प्रश्न विचारले. त्यांचीं उत्तरें आरोग्य-मंत्र्यानीं खालीलप्रमाणें दिलीं आहेत.

सरकारनें केलेल्या १२ गोष्टी

आयुर्वेद शास्त्राची प्रगति होण्याकरितां मुंबई सरकारनें खालील गोष्टी केल्या आहेत.

१) १९३८चा बॉंबे मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्ट (कायदा) पास केला.

२) आयुर्वेदिक ॲण्ड युनानी तिब्बि सिस्टिम्स् ऑफ मेडिसन हें बोर्ड व विद्याशाखा (फॅकल्टी) निर्माण केली.

३) आर.ए.पोदार मेडिकल कॉलेज (आयुर्वेदिक) व हॉस्पिटल, वरळी–मुंबई ह्या संस्था निर्माण करून चालू ठेवल्या.

४) मुंबई राज्यांतील आयुर्वेदीय संस्थांना आवतक आर्थिक मदती दिल्या.

५) इंटर–सायन्स परीक्षा पास झाल्यानन्तर ४॥ वर्षांचा आयुर्वेदीय पदवी शिक्षणक्रम सुरू केला.

६) आयुर्वेद संशोधन मंडळाची स्थापना केली.

७) पुणें व अहमदाबाद येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्यें २० रुग्णशय्यांचे स्वतंत्र आयुर्वेदीय चिकित्सा-विभाग काढण्यांत आले.

८) महाराजा सयाजीराव युनिव्हर्सिटी, बडोदा, या विद्यापीठास 'शेठ उजमसी पितांबर आयुर्वेदिक संशोधन विभाग' चालू ठेवण्याकरितां वार्षिक आर्थिक मदत चालू ठेवली आहे.

९) ३॥ वर्षांचा शुद्ध आयुर्वेदिक अभ्यासक्रम चालू करण्याकरितां समितीची नेमणूक केली.

१०) मुंबई सरकारच्या वर्ग ३ च्या श्रेणींत आयुवदीय विभागांत डी. ए. एस. एफ्. अगर तत्सम वैद्यकीय परीक्षा पास झालेल्या इसमांची सरकारी नोकरींत नेमणूक.

११) आर. ए. पोदार आयुर्वेदिक कॉलेज, मुंबई, येथें स्नातकोत्तर आयुर्वेदिक अभ्यासक्रम सुरू केला.

१२) सरकारी आर्थिक मदत मिळणारीं आयुर्वेदीय वैद्यक व्यवसायींची ३३२ केंद्रें चालू आहेत.

मुंबई राज्यांत ६ आयुर्वेद विद्यालयें

मुंबई राज्यांत आयुर्वेदीय महाविद्यालयें एकूण सहा आहेत. त्यांचीं ठिकाणें:—

मुंबई, पुणें, अहमदनगर, सातारा, सुरत आणि नडियाद.

आयुर्वेदीय संस्थांना दिलेल्या सरकारी देणग्या

ह्या आयुर्वेदीय शिक्षण–संस्थांना सन १९५१ ते १९५४ या चार वर्षांत आवर्तित व अनावर्तित स्वरूपाच्या सरकारी आर्थिक देणग्या (grants) खालीलमाणें देण्यांत आल्या :—

	देणगी			
संस्था	१९५०–५१	१९५१–५२	१९५२–५३	१९५३–५४
आयुर्वेद महाविद्यालय, पुणें	रु.	रु.	रु.	रु.
आवर्तक देणगी	५६४००	६३८६६	६८८१२	७००००
अनावर्तक ,,	२८५०८	नाहीं	१,०२३०१	२३०६३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद महाविद्यालय, अहमदनगर				
आवर्तक देणगी	१५०८०	१४५७०	२०७३५	३५०००
अनावर्तक ,,	१७५००	८५०० ७७५०	३१८३०	१०१३७
आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय, सातारा				
आवर्तक देणगी	२००००	११३३१ १००००	३२५८२	१००००
अनावर्तक ,,	२०६७६	१००००	६१२६७	२९५००
ओ. एच. नाझर आयुर्वेद महाविद्यालय, सुरत				
आवर्तक देणगी	१५०००	७६३३ १५६८४	२२२३४	१००००
अनावर्तक ,,	२०००० १३४१५	७५२५ ७५००	१२१५० ७१५२ ४२५६०	१८००० २००००
एम. जी. आयुर्वेदिक कॉलेज, नडियाद				
आवर्तक देणगी	नाहीं	३१३२	नाहीं	नाहीं
अनावर्तक ,,	नाहीं	नाहीं	९०४४२	२४३००

सरकारी देणग्या देण्यांतील धोरण

त्या देणग्या कायम मान्यता मिळालेल्या संस्थांना सरकारमान्य खर्चाच्या शेकडा ५० टक्के व तात्पुरती मान्यता मिळालेल्या संस्थांना शेकडा ३३$\frac{1}{3}$ टक्के या प्रमाणांत दिल्या जातात. परन्तु कोणत्याहि संस्थेस तिच्या मागील सालच्या तुटीच्या रकमेपेक्षां ही देणगीची रक्कम जास्त असणार नाहीं.

आयुर्वेद महाविद्यालयांतील विद्यार्थी

ह्या संस्थांतून शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची चालू संख्या खालीलप्रमाणें आहे.

संस्थेचें नांव	हजेरीपटावर असलेली विद्यार्थ्यांची संख्या
(१) पोदार मेडिकल कॉलेज, मुंबई	२९०
(२) आयुर्वेद महाविद्यालय, पुणें	३६८
(३) आयुर्वेद महाविद्यालय, अहमदनगर	१०५
(४) आर्यांग्ल महाविद्यालय, सातारा	१२४
(५) नाझर आयुर्वेद महाविद्यालय, सुरत	२१९
(६) एम. जी. आयुर्वेदिक कॉलेज, नडियाद	७२

आयुर्वेदीय रुग्णालयांतील शय्या

ह्या प्रत्येक आयुर्वेदीय शिक्षण संस्थेला एकएक रुग्णालय जोडण्यांत आलें आहे, व त्या प्रत्येक रुग्णालयांत खालीं दर्शविल्याप्रमाणें रुग्णशय्यांची तरतूद करण्यांत आली आहे.

(१) आयुर्वेदिक कॉलेज, मुंबई ... ८० रुग्णशय्या
+ ६० सेंट जार्जेस हॉस्पिटल
(२) ,, ,, पुणें ... १५० रुग्णशय्या
(३) ,, ,, अहमदनगर... ५२ ,,
(४) ,, ,, सातारा ... ६० रुग्णशय्या
+ ५० सिव्हिल हॉस्पिटल सातारा
(५) ,, ,, सुरत ६० रुग्णशय्या कॉलेजमध्यें
+ ६० ,, सिव्हिल हॉस्पिटल, सुरत.
+ ३० रुग्णशय्या एस्.एम्.व्ही. हॉस्पिटल, सुरत
(६) ,, ,, नडियाद... १०५ रुग्णशय्या

आयुर्वेदप्रगतीच्या सरकारी योजना

सरकारनें आयुर्वेदाची प्रगति करण्याकरतां पुढील योजना आंखल्या आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद संशोधनाचें कार्य करण्याकरितां सरकारनें एक आयुर्वेदिक संशोधन मंडळ (Research Board) स्थापिलें आहे व त्याचें कार्य ऑगस्ट १९५१ पासून चालू आहे. ह्याशिवाय आयुर्वेदाच्या उन्नतीकरितां सरकार खालील योजनांचाहि विचार करीत आहे.

(१) मुंबई राज्यांत औषधि वनस्पती कोठें कोठें व किती प्रमाणांत उपलब्ध होऊं शकतील याची पाहाणी करणें.

(२) आयुर्वेदीय औषधी निर्माण संस्था [फार्मसी] काढणें.

(३) (अ) वस्तुसंग्रहालय (ब) ग्रंथालय व (क) संशोधन प्रयोगशाळा ह्यांची स्थापना करणें.

बोर्ड ऑफ् आयुर्वेदिक ॲन्ड युनानी सिस्टिम्स ऑफ् मेडिसिन, मुंबई

जाहीर वृत्त

तारीख १०।९।१९५४ रोजी भरलेल्या 'बोर्ड ऑफ् आयुर्वेदिक ॲंड युनानी सिस्टिम्स ऑफ् मेडिसिन' च्या सभेनें श्री. **अटलराय रंगवाणी** मुंबई यांचें नांव यादींतून (लिस्टमधून) कमी केलें आहे.

६८ व्यावसायिकांना नोटिसा दिल्या

सन १९४९ च्या दुरुस्त केलेल्या 'बॉम्बे मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्ट' अन्वयें प्रस्थापित झालेल्या चालू बोर्डानें गेल्या ४ वर्षांत ६८ वैद्यकीय व्यवसायींना वैद्यक-नीतीचा भंग केल्याबद्दल नोटिसा बजावल्या. पैकीं ३७ जणांना ताकिदी देण्यांत आल्या; व ३ जणांच्या कैफियती बोर्डानें ऐकून घेऊन नंतर त्यांचें वर्तन व्यवसायास न साजेसें दिसल्यावरून त्यांचीं नांवें रजिस्टर अगर लिस्टमधून (ज्याप्रमाणें असेल त्याप्रमाणें) कमी करण्यांत आलीं.

रजिस्ट्रेशन ट्रिब्युनलची कामगिरी

ह्याच कालवधींत ७१९ वैद्य व २० हकीम यांना सरकारमान्य परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर रजिस्टर्ड करण्यांत आलें. शिवाय रजिस्ट्रेशन ट्रिब्युनलच्या शिफारसीनुसार १२८ वैद्य व ४७ हकीम यांना रजिस्टर्ड करण्यांत आलें, आणि १८८७ वैद्यक व्यवसायींना एन्‌लिस्ट करण्यांत आलें. त्याशिवाय पूर्वी कमी केलेलीं ७०६ नांवें फिरून दाखल करण्यांत आलीं.

नांवें कमी झालेल्यांची संख्या

ह्याच अवधींत नूतनीकरण फी न भरल्यामुळें (म्हणजे अशा व्यक्ती पुढें वैद्यकीय व्यवसाय करीत नाहींत असें गृहीत धरून) २८१९ नांवें रजिस्टरमधून व ७६९ नांवें लिस्टमधून कमी करण्यांत आलीं आहेत.

सिंहस्थ यात्रा, नासिक

स्वास्थ्य व वैद्यकीय साहाय्य समिति

पुढील वर्षी आक्टोबरपासून नाशिक येथें सुरू होणाऱ्या सिंहस्थ यात्रेनिमित्त निरनिराळ्या समित्या सरकार व जनता यांच्या सहकार्यानें स्थापन करण्यांत आल्या आहेत. सुमारें १० लाख यात्रेकरू नाशिक व त्र्यंबक येथें येऊन जातील असा अंदाज आहे. इतक्या लोकांच्या रहाण्याची, आरोग्याची, वहातुकीची, वगैरे व्यवस्था करण्यासाठीं या समित्या आहेत. स्वास्थ्य व वैद्यकीय सहाय्यक समितींत वैद्य बिंदुमाधव पंडित यांची योजना करण्यांत आली असून त्या समितीच्या अध्यक्षपदीं डॉ. य. स. शुक्ल यांची सर्वानुमतें निवड करण्यांत आली आहे.

नागपूर येथें

'आयुर्वेद सेवा संघाचीं' सर्व प्रकारचीं गुणकारी औषधें मिळण्याचें

एकमेव ठिकाण-

श्री. माधवराव परांडे

आयुर्वेदीय औषधांचे व्यापारी

महाल रोड, नागपूर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मध्यप्रदेश अग्रगामी वैद्य मंडळ, नागपूर

दिनांक १६ सप्टेंबर १९५४ रोजीं वैद्य श्री. गुलराजशर्मा मिश्र यांच्या निवासस्थानीं मध्यप्रदेशीय प्रमुख वैद्यांची सभा भरली होती. सभेचें अध्यक्षस्थान वैद्यराज श्री. छगनलालजी शर्मा आयुर्वेदाचार्य, रायपूर यांनीं मंडित केलें होतें. प्रांतांतील अनेक जिल्ह्यांतून बराचमोठा वैद्यवर्ग सभेस उपस्थित होता, व अनेक वैद्यबंधूकडून सहयोगात्मक शुभ संदेशहि आले होते. प्रांतीय वैद्य संघटनेची नितांत आवश्यकता सर्वांनीं मान्य करून त्या कामीं सर्वतोपरी खटपट करण्याची आपली मनीषा अनेकांनीं व्यक्त केली. वैद्यराज हर्षुलजी मिश्र (बालाघाट) यांनीं नामाभिधानाची मीमांसा करतांना सांगितलें कीं, ह्या संघटनेच्या नांवांतच तिच्या कार्याचा प्रतिध्वनि निनादित झाला आहे. आणि म्हणून आम्ही सर्वांनीं अग्रेसर प्रवृत्तीचा स्वीकार करून आयुर्वेद व वैद्यजगताच्या सर्व समस्या सोडविण्यासाठीं आघाडीवर उभें राहिलें पाहिजे.

संयोजना समितीची स्थापना

त्यानंतर वैद्यराज गं. बा. वझे यांनीं मंडळाचे उद्देश व कार्याचे नियम वाचून दाखविले व ते थोडाफार फरक करून सर्वसंमत झाले. तदनंतर मध्यप्रदेश अग्रगामी वैद्यमंडळाचें अधिवेशन येत्या डिसेंबर अगर जानेवारी महिन्यांत सोयीनुसार नागपूर येथें भरविण्याचें ठरलें. प्रांतांतील वैद्य हकिमांचें संघटन व प्रचारकार्य करण्याकरितां एक " संयोजना समिति " स्थापन करण्यांत आली. तिचे अध्यक्ष म्हणून श्री. गुलराज शर्मा मिश्र व मंत्री म्हणून श्री. हर्षुलजी मिश्र आणि श्री. गं. बा. वझे यांची नियुक्ति झाली. त्याखेरीज सबंध प्रांतांतून ५० सदस्यांची नियुक्ति ह्या संयोजना समितीवर करण्यांत आली. त्याचबरोबर जिल्हानिहाय व तालुकानिहाय संघटन-समित्यांची स्थापना करण्याचेंहि ठरलें. ह्या संघटन समित्यांनीं अग्रगामी वैद्य मंडळाच्या सभासदांची संख्या वाढविणें व मंडळाच्या उद्देशांना मूर्तस्वरूप प्राप्त करून देणें हीं मुख्य कामें करावयाचीं आहेत. व त्यासाठीं ह्या सभेनें सर्वानुमतें आठ ठराव मंजूर केले.

सभेस उपस्थित असलेल्या सर्व वैद्यवर्गाची कार्य करण्याची उत्कट इच्छा, आयुर्वेदावरील अलोट प्रेम, वैद्यसमाजास उन्नत करण्याची उत्कंठा व परस्परांत मिळून मिसळून सहकार्यानें काम करण्याची गाढ श्रद्धा ह्या गोष्टी या सभेंत प्रामुख्यानें दृग्गोचर झाल्या.

सभेस प्रत्यक्ष उपस्थित असलेल्या व पत्रद्वारें स्वसंमति पाठविलेल्या व्यक्तींचीं नांवें पुढें दिलीं आहेत.

वै. गोवर्धनजी शर्मा छांगाणी नागपूर, वै. छगनलालजी शर्मा रायपूर, वै. प्रभाकर समुद्र अकोला, वै. हर्षुलजी मिश्र बालाघाट, वै. नारायणप्रसाद शुक्लाजी वर्धा, वै. किसनलालजी वर्धा, वै. गोवर्धनजी शर्मा तुमसर, वै. द्वारकाप्रसाद पांडे तुमसर, वै. शिवकरण शर्मा छांगाणी, वै. विनायक कुळकर्णी वै. येरकुंटवार, वै. अड्याळकर, वै. गं. बा. वझे, वै. हरिप्रसाद शर्मा, हकीम जहरुद्दीन, हकीम फयाज उमर, वै. भुरे, वै. अष्टीकर, वै. केदरनाथजी शर्मा, वै. एल्. टी. शाह अकोला, वै. डेग्वेकरजी जबलपूर, वै. पुरुषोत्तमलालजी गोस्वामी- अध्यक्ष जबलपूर वैद्यसभा, वै. शोभालालजी शर्मा हिंगणघाट, वै. चोथमलजी शर्मा हिंगणघाट, वै. जनार्दन शर्मा रायगढ, वै. पुरुषोत्तमजी जोशी रायपूर, वै. रोजींदेवी वैद्या रायपूर, वै. हरिराम बाधवानी, वै. बाकरे, वै. गुलराज शर्मा मिश्र, वै. सी. बालप्रसाद चर्खा, वै. शंकरदत्तजी गौड इत्यादि.

उपर्युक्त वैद्य-सभेनें प्रांतांतील सर्व वैद्य-हकीमांना अग्रगामी वैद्य-मंडळाचे सत्वर सभासद होण्याची व संघटना बलवान् करण्याची आग्रहानें विनंति केली. तदनंतर हर्षुलजी मिश्र व गं. बा. वझे यांनीं अध्यक्षाचे व उपस्थित वैद्यवर्गाचे आभार-प्रकटनानंतर चहापान होऊन हा गोड समारंभ समाप्त झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रमणिका

य प्रदेशांत वनौषधि उद्यान व संशोधन	२१७
र्वेद अध्यापक चर्चा परिषद, नासिक	२१८
ागेवाडीकर यांचीं विधानें	२१९
ागेवाडीकर यांच्या २ लेखांकांचा विचार	२२३
-कॉलेजांतून योगविद्या शिकवावी	२२८
ावावर पिच्छाबस्ति	२२९
ासाठीं नयनामृतप्राश	२३१
मधुमेही रोग्याचा स्वानुभव	२३३
राज्यांतील मेडिकल कॉलेजें	२३५
ांतील गरीबांचा घरचा वैद्य	२३७
स्त्रियांना अधिक मजुरी दिली पाहिजे	२४०
जय आयुर्वेदाचा पथ्यापथ्य चिकित्सा विशेषांक	२४१
नारूचे प्रताप व उपाय	२४४
मुंबई राज्यांतील आयुर्वेदाचें शिक्षण आणि प्रगति	२४५
मध्य-प्रदेश अग्रगामी वैद्यमंडळ	२४८

आयुर्वेदाची गळचेपी

"आमच्या सरकारांतून वैद्यांची गळचेपी इतकी चालली आहे की थोडक्याच कालांत आयुर्वेद नामशेष होईल."

मंगलोर — वैद्य बी. आर. हरिदास

(पान नंबर २१८ वरून चालू)

ठेवण्यांत आला आहे. तूर्त या विषयावर चर्चा होईल.

ग्रंथचतुष्टय चरक, सुश्रुत, अष्टांगहृदय व अष्टांगसंग्रह आणि त्यावरील चक्रपाणी, गंगाधर त, अरुणदत्त, हेमाद्री व इंदु या टीका हे सर्व आधार मानावयांचे आहेत अशी एक सूचना ली आहे.

'सर्व परिषदा एकाच वेळीं चालू राहाव्यात' एक सूचना

(५) दोन दोन दिवसांत एकएक विषयाच्या संज्ञांची निश्चिति वगैरे होणें शक्य होणार नाहीं हि सूचना आहे. त्यांच्यामतें सर्व परिषदा एकावेळीं चालाव्यात व त्यांतले निष्कर्ष त्या त्या विषयांच्या ां ६ ते ८ दिवस एकत्र बसून करावेत म्हणजे प्रत्येक विषय पुरा होईल असें आहे. ही सूचनाहि युक्त . परिषदेच्या सुरवातीच्या दिवशीं धोरण आंखण्यांत येऊन त्याप्रमाणें कार्यक्रम ठरविला जाईल. कार्य- त जरुरीप्रमाणें बदलहि केला जाईल.

वक्त्यांनीं आगाऊ प्रश्न व टिपणें पाठवावीत

(६) वर्गणीची अट काढून टाकली आहे. देणगीची सक्ती नाहीं. आपणां सर्वांना ही विनंति आहे आपण अगोदर लेखी टाचणें पाठवून व नंतर समक्ष उपस्थित राहून ही अत्यंत आवश्यक परिषद सफल ी. आपण कधीं येणार तें कृपया ता. ६·१०·५४ चे आंत पत्र पोहचेल अशा बेतानें कळवावें म्हणजे ची सोय करणेंस ठीक पडेल.

आपणां जवळील जें कांहीं साहित्य ग्रंथांचा अर्थ सुबोध होण्याचें दृष्टीनें उपयुक्त असेल तें कृपया बरोबर ावे. ता. १-१०-५५ पासून गाड्यांच्या वेळा बदलत आहेत तरी तेहि लक्षांत घ्यावें.

येऊ इच्छिणाऱ्या लोकांनीं अधिक माहितीसाठीं छापील पत्रक मागवावें.

आपला नम्र

वि. म. गोगटे

निमंत्रक, आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अत्यावश्यक अशा शुद्ध जंगली देशी व विदेशी दुर्मिळ आयुर्वेदिक आणि युनानी वनौषधी, काष्ठौषधी, खनिज व प्राणिज द्रव्यें योग्य भावांत मिळण्याचें एकमेव ठिकाण

इंडिया ड्रग सप्लाय कंपनी

२७९ सॅम्युअल स्ट्रीट (खोजा गल्ली) मुंबई ९

Telegram:—EXCLROOT Call at:—70374

आमचे येथें शुद्ध कस्तुरी, गोरोचन, अंबर, सुवर्ण-वर्ख, चांदी-वर्ख, केशर, शिलाजित, माक्षिक, मोती-बसराई, प्रवाळ, हरताल पत्री व दगडी, गुलकंद, चंदन तेल, निलगिरी तेल, अकलकरा अस्सल, हिरा दख्खन, रसकापूर, गहुला, लोबान, केहरवा, भीमसेनी कापूर, जहरमोरा, शंघेशरमाई, अकिक, कोडी पीली वडी, सीप, सांबरशिंग, हरड, पन्ना, सनी, पोखराज, फिरोजा वगैरे वस्तु अस्सली मिळतील.

एकवेळ आपली मागणी आमचेकडे त्वरित पाठवून खात्रा करा, किंवा आपल्या जरूरीच्या वस्तूंच्या दरांसाठीं वरील पत्त्यावर आजच लिहा.

बृहन्मुंबईंतील वैद्यांना व औषधी व्यापाऱ्यांना

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिकचीं औषधें

सवलतीच्या दरानें पुरविण्याची

आमची योजना यशस्वी झाली !

गेल्या दोन महिन्यांत अनेक वैद्य, डॉक्टर व औषधी व्यापारी यांनीं आमच्या दुकानीं येऊन औषधें समक्ष पाहून घेतलीं व या नव्या व्यवस्थेबद्दल समाधान व्यक्त केलें, हें कळविण्यास आनंद वाटतो.

देव्हारे सर्वौषधि भांडार, दादर मुंबई २८

(पोलिस चौकी मारुतीसमोर)

संपादक व प्रकाशकः—वैद्य [illegible] आयुर्वेद सेवा संघ, वैद्य [illegible] कारंजा, नासिक
मुद्रकः—श्री. चिं. ओक, सर्कल प्रेस, नासिक
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

ार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. १ अंकाची किंमत ४ आणे

र्ष ८ वें) नासिक, ता. १६ ऑक्टोबर १९५४ (अंक ८ वा

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद, नासिक

अध्यक्ष

पूर्वी जाहीर झाल्याप्रमाणें ता. ११--१०--५४ रोजीं ाळीं आयुर्वेद अध्यापक परिषदेच्या कार्यास धन्वतरी नानें प्रारंभ झाला. परिषदेचें अुद्घाटन जबळपूरचे सुप्रसिद्ध गाचार्य मि. वि. डेग्वेकरशास्त्री यांनीं केलें व नागपूर ापीठांतील आयुर्वेद विभागाचे प्रमुख आयुर्वेदाचार्य ीमाक्षत्रशास्त्री यांची सर्वानुमतें अध्यक्षस्थानीं नियुक्ति ी. ही परिषद ७ दिवस चालणार आहे.

या परिषदेसाठीं, वैद्यराज गोपाळशास्त्री गोडबोले ी, आयुर्वेदाचार्य द. अ. कुलकर्णी एम्. एस्सी. ुटी डायरेक्टर (आयुर्वेद) अुत्तर प्रदेश (लखनौ), वैद्य- ा वि. दा. एकतारे, प्राध्यापक आयुर्वेद महाविद्यालय मदनगर, आयुर्वेदतीर्थ वि. श्री. पाठक धुळें, वैद्य श्रीमती ीबाई बोरवणकर, अध्यापक शुद्ध आयुर्वेद विद्यालय शीव, ई, वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर, सदस्य शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समिति मुंबई राज्य, वै. य. घों. टोळीकर पुनर्वसु चिकित्सा मन्दिर कागल (कोल्हापूर), श्री. मरुलाराध्यशास्त्री, अध्यक्ष कर्नाटक . वैद्य संमेलन विजापूर, वैद्य श्री. पांडुरंगशास्त्री शेंड्ये दमोह (म. प्रां.), वै. भा. श्री. देसवंडीकर ी, वै. अंतरकर पोदार मेडिकल कॉलेज मुंबई इत्यादि अध्यापक मंडळी या परिषदेसाठीं उपस्थित ी आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद

आर्थिक साहाय्यासाठीं जाहीर विनंति

नाशिक येथें भरलेल्या आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषदेस आजवर पुढील देणग्या मिळाल्या आहेत.

वै. भि. वि. डेग्वेकर, जबलपूर	५१	रु.
श्रीमंत आबासाहेब सांड्ड, चेंबूर	५१	,,
आयुर्वेदाश्रम फार्मसी, नगर	२५	,,
वै. वेणीमाधवशास्त्री, नागपूर	२५	,,
वै. य. धों. नाटोलीकर, कागल	२१	,,
वै. गोपाळशास्त्री गोडबोले, झांशी	२१	,,
वै. वि. म. गोगटे, नाशिक	२१	,,
वै. बिंदुमाधव पंडित, ,,	११	,,
वैद्यरत्न केळकरशास्त्री, नासिक	११	,,
वै. वामनराव दीनानाथ, मुंबई	११	,,
वै. पां. शि. शेंड्ये, दमोह म. प्र.	११	,,
वै. लक्ष्मीबाई बोरवणकर, मुंबई	११	,,
वै. भा. श्री. देववंडीकर, अश्वी	११	,,
वै. दाते बन्धु नाशिक	११	,,
वै. दातार बन्धु नाशिक	११	,,
वै. विष्णुपन्त नार्वेकर, मुंबई	११	,,
वै. बाजीराव कुलकर्णी, नासिक	११	,,

परिषदेच्या कार्यासाठीं द्रव्यसाहाय्याची अत्यंत आवश्यकता आहे. ज्यांना ज्यांना हें कार्य सफल व्हावें व परिषदेचे निर्णय छापून प्रसिद्ध व्हावेत असें वाटत असेल व यासाठीं मदत करण्याची इच्छा असेल त्यांनीं यथाशक्ति परिषदेस देणग्या पाठवाव्यात अशी विनंति आहे.

सुमारें २००० रु. जमविण्याची कल्पना आहे.

—वै. वि. म. गोगटे, निमंत्रक

पैसे पाठविण्याचा पत्ताः- आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद C/o आयुर्वेद सेवा संघ, नासिक

धर्मार्थ, दंतयज्ञ मुंबई

"अखिल भारतीय आयुर्वेदीय डेंटल् मिशन" या संस्थेच्या वतीनें वै. पां० वि० जायदे आयुर्वेद-तीर्थ (हुबळी) व डॉ. किशोरदास गुप्ता (मुंबई) यांच्या नेतृत्वाखालीं मुंबई येथें माधवबागेमध्यें दि. १०।१०।५४ पासून धर्मार्थ दंतयज्ञ (Free Tooth Camp) सुरू झाला आहे. व तो धनत्रयोदशीपर्यंत चालणार आहे. हा दंतयज्ञ गोरगरिबांकरितां मोफत राहील. परंतु श्रीमंताकडून देणग्या स्वीकारण्यांत येतील. व त्यांचा विनियोग आसाम-बिहार पूरग्रस्तांसाठीं करण्यांत येईल.

सदर दंतयज्ञाचें उद्घाटन मुंबई प्रांताचे मुख्य मंत्री मान्य श्री. मोरारजीभाई देसाई करणार आहेत.

मुंबईस येऊं शकणाऱ्या सर्व वैद्य-डॉक्टर-हकीम बंधूंनीं हा दंतयज्ञ निरीक्षण करावा अशी चालकांची विनन्ति अहे.

.... महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळ ....

स्थायी व कार्यकारी मंडळाच्या सभा

या मंडळाच्या स्थायी व कार्यकारी मंडळाच्या सभा रविवार ता. १७-१०-५४ रोजीं सायंकाळीं ७ वाजतां नासिक येथें आयुर्वेद सेवा संघांत (शनिगल्ली, रविवारपेठ) होणार आहेत. सर्व सभासदांना वेळींच निमंत्रणें गेलीं आहेत. ही बैठक महत्वाची आहे हें जाणून सर्व सभासदांनीं उपस्थित रहावे अशी मंत्र्यांची सभासदांना विनंति आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद

परिषदेच्या उपक्रमाचें सार्वत्रिक स्वागत

या परिषदेसाठीं बरेचसे संदेश आले आहेत त्यापैकीं कांहीं पुढें दिले आहेत.

महत्त्वपूर्ण, प्रसंगोचित उपक्रम

शुद्धआयुर्वेद अभ्यासक्रमाच्या दृष्टीनेंआयुर्वेद सेवा संघानें हातीं घेतलेला हा उपक्रम महत्वपूर्ण प्रसंगोचित व अभिनंदनीय असा आहे. त्यास उत्कृष्ट यश यावें अशी श्रीधन्वन्तरींचे चरणीं प्रार्थना आहे.

—श्रीमंत नानासाहेब पुराणिक, पनवेल

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषदेचें निमंत्रण पावलें. सदर परिषदेला मी हार्दिक सुयश चिंतितो.

—श्रीमंत आबासाहेब सांडू, चेंबूर

मैं ९ ऑक्टोबर को ऋषिकेश जा रहा हूं। वहां नि. भा. आयुर्वेद विश्वविद्यालय के उद्घाटन का प्रबंध करना है। १३ तारीख को राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद उद्घाटन करने आरहे हैं। अतएव मैं १० तारीख को नासिक उपस्थित नहीं हो सकूंगा।

मै प्रयत्न करूंगा कि आपके कार्यक्रमकी समाप्ति के पहिले मै सम्मिलित हो सकूं।

मुझे श्री. डेग्वेकरजीकी योग्यता और नेतृत्वपर पूर्ण विश्वास है। आप उनके पथप्रदर्शन द्वारा अपना कार्य संपूर्ण करेंगे यह मुझे पूर्ण आशा है। आपकी परिषद से मेरी पूर्ण सहानुभूति है और मैं इसकी सफलता के लिए ईश्वरसे प्रार्थना करता हूं।

—पं. शिवशर्मा

अध्यापनांत सुसूत्रता येण्याच्या दृष्टीनें अशा विचारविनिमयाची आवश्यकता आहे. चर्चेतून निष्फळ होणारें मार्गदर्शनरूप 'नवनीत' मजला अवश्य धाडावें —वै. म. भा. वाटवे

आयुर्वेदाच्या उद्धारासाठीं सर्व प्रकारचे प्रयत्न अनवरत आपले चालले आहेत. त्याकरितां अनंत धन्यवाद —वैद्य अनंताचार्य आद्य, विजापूर

I wish Parishad success and trust that decisions arrived at and solutions worked out will be rational and Practical.

—Pratapkumar Vaidya

या खऱ्या अभ्यास-मंडळांत हजर राहून भाग घेण्याचा मानस आहे. —वै. रा. गो. जोग, नगर

ता. १३ ऑक्टो. ह्रषिकेश येथें आयुर्वेद विश्वविद्यालय डॉ. राजेद्रप्रसाद यांच्या हस्तें सुरू होणार आहे. त्यासाठीं तिकडे जात आहे. ता. १७ रोजीं नाशिक येथें येईन. -वै. ब्रम्हदत्त शर्मा, मुसावळ

ता. ११ रोजीं विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचें स्नेहसंमेलन मध्यप्रदेशाचे राज्यपाल डॉ. पट्टाभिसीतारामय्या यांच्या अध्यक्षतेखालीं होणार आहे. तथापि मी कांहीं प्राध्यापकांना आपल्या परिषदेला उपस्थित राहण्याबद्दल सूचना करीन.

-पं. दा. मुळे, अमरावती

आपली परिषद यशस्वी होवो.

-अ. दा. आठवले, आयुर्वेद महाविद्यालय, पुणें

आपल्या पत्रकानें आपल्या कार्याची कल्पना आली. आपण आरंभलेलें सत्कार्य स्वागतार्ह आहे. परिषदेंत झालेली चर्चा व निष्पन्न झालेले निष्कर्ष सुसगतवार प्रसिद्ध व्हावेत. ते उपयुक्त होतील.

-वै. एस्. आर्. हिरेमठ, विजापूर

आयुर्वेदशास्त्रांत लक्ष घालणारे लोक आपल्यांत तयार होत आहेत याबद्दल समाधान वाटतें.

-वै. गो. गं. परांडे, नागपूर

शिक्षणामध्यें एकसूत्रीपणा आणण्याच्या दृष्टीनें अशा परिषदेची अत्यंत जरूरी आहे. त्यांत सहभागी होणें आमचें कर्तव्य आहे. -वा. न. ग्रामोपाध्ये

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Hearty Congratulations, wish all success to Adhyapak conference.

वै. ना. ह. जोशी.

आपण सुरूं केलेले कार्य हें अगदीं योग्य वेळीं झालेलें आहे. सदर कार्याकरितां स्वतंत्र मंडळ नेमून त्याच्या निरनिराळ्या बैठकी होऊन त्यांतून निर्णय बाहेर पडेल तो स्वीकृत व्हावा. कार्यकारी कामिट्या ह्या कायमच्या असाव्या.

वै. ना. के. मेंढी, कापडणें.

सन्माननीय वैद्यांची परिषद व त्यांत होणारी अष्टांग हृदयाची सुसूत्र चर्चा यशस्वी ठरो. त्यायोगें मान्य गुरुवर्गांना मार्गदर्शन होवो.

श्री. नारायणशास्त्री भगरे, धुळें

परिषदेला येण्याची उत्कट इच्छा आहे.

श्री. त्र्यं. म. गोगटे, अमरावती.

आपल्या उत्कृष्ट कार्यांत परमेश्वर आपणांस सुयश देवो व आयुर्वेदाचें कार्य उत्कृष्ट तऱ्हेनें प्रगत होवो. डॉ. रा. त्र्यं. मोने, अमळनेर.

आयुर्वेदाचा संस्कृत-मराठी कोश तयार करण्याची योजना आखता आल्यास बरें होईल. अधिकारयुक्त कोश मराठी भाषेच्या व वैद्यवर्गांच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे. डॉ. प्र. शं. गुप्ते, नाशिक.

स्तुत्य उपक्रमाबद्दल अत्यंत आभारी आहे. गुरुपरंपरा व शुद्ध आयुर्वेद प्रणालीनुसार चर्चा होऊन परिषद यशस्वी होवो.

वै. ल. रा. मळेकर, मुंबई.

आपण जें कार्य चालविलें आहे तें खरोखर अभिमानास्पद आहे.

— वै. ग. मो. वझे, सांगली

यह विषय बडे महत्व का है। आना आवश्यक है। —वै. प्यारेलाल शर्मा, मुंबई

परिषद अत्यंत महत्वाची आहे. पण प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें प्रवास करण्याच्या स्थितींत नाहीं.

—वै. ग. म. अभ्यंकर, मुंबई

कोर्स की सफलता इच्छता हूं।

— डॉ. भा. ब. योध, मुंबई

दीर्घ कालिकेन तमकश्वासेन पीडितोऽहम्
दीर्घप्रवासमंगीकर्तुं न शक्नोमि।

—केशवाचार्य अवधानी, विजापूर

महाराष्ट्रके विद्वान् मिलकर जो सिद्धांत स्थिर करेंगे वे हमारे लिये – सबके लिये – विचारणीयही होंगे। —वै. बापालाल वैद्य, सुरत

आयुर्वेद सेवा संघ की सभी प्रवृत्तियाँ आयुर्वेदोत्तेजक होने से उन्हे संपूर्ण यश मिले ऐसी भगवानसे करबद्ध प्रार्थना करता हूं

—वैद्य रणजितराय, सुरत

लिंगनाशसंज्ञिकया नेत्रपीडया पीडितोऽहम्।
आयुर्वेदाध्यापकशास्त्रचर्चापरिषद उपस्थातुमसमर्थः।

—जोशीत्युपाव्हो गणेशशर्मा पुणें

चर्चारूपी मन्थनांतून संज्ञानिश्चिति, अर्थनिश्चिति व पाठनिश्चिति रत्नें आमच्यासारख्या सर्वसाधारण माणसाला उपलब्ध व्हावीं.

—वै. कृ. के. कानिटकर, मुंबई.

परिषदेचा उद्देश अष्टांगहृदयाचें अध्यापन सुसूत्र करणें एवढाच न ठेवतां पूर्वी जाहीर केल्याप्रमाणें दोषधातुमलविज्ञान इत्यादि विषयावरील शंकास्थलाबद्दल चर्चा करावी. संज्ञा निश्चित कराव्यात.

—आयुर्वेदाचार्य म. बा. दीक्षित, सातारा

याशिवाय वै. रा. वि. वाघ अध्यापक आयुर्वेद विद्यालय रायपूर (म. प्र.), वै. मगनलाल बी. भटनागर--नडियाद, डॉ. कृ. श्री. म्हसकर, मुंबई. वै. मगनलाल दीपचंद बोरा, कल्याण. वै. मगनलाल गिरजाशंकर डभोई. वै. खंडपरशु छत्रसिंह बारोट, बडोदा. वै. श्रीपादशास्त्री मावळणकर, मुंबई. आयुर्वेदाचार्य वै. ना. बा. कुलकर्णी, पुणें. वै. रामभाऊ भोगे, मुंबई. वै. शि. गो. जोशी, पुणें २. वै. मुकुंद कृ. जोशी, हल्याळ. वै. द. भा. मनोहर, दाभोळ. वै. नी. द. देशपांडे, चेंबूर. वै. ग. पां. परांजपे, सांगली. वै. पी. जी. हळदणकर, कोल्हापूर. वै. ना. त्र्यं. जोशी, गव्हर्मेंट आयुर्वेदिक कॉलेज हैद्राबाद. वै. पां.ह. देशपांडे, पुणें. इ.ची संदेशपत्रें आली आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार—

उत्तमांग वसंताचा पाठ

आयुर्वेद पत्रिका १६ जानेवारी ५४ चे अंकांत पान ४८२ वर "उत्तमांगवसंताचा" पाठ व 'रसोन वटी' चा पाठ कृतिसह प्रकाशित केला आहे. यासंबंधीं स्पष्ट खुलासा अपेक्षित आहे.

मधुमालिनीवसंताप्रमाणें हिंगुळाला अंड्याचे बलकाऐवजीं बोकडाचे मेंदूची मंदाग्नीवर (पचवायचा) भावना देणें आहे का ? अंड्याचा बलक तर पातळ—असल्यानें मंदाग्नीवर तत्काळ पचून हिंगुळाशीं एकजीव करतां येतो पण बोकडाचे कसें करतां येईल. बरें! ही क्रिया अग्नीवर न करतां नुसत्या खरलांत केली तर मेंदूच्या चिकट व बुळबुळीतपणामुळें खरलांत घोटणें तितकें चांगलें कसें होईल? कृपाकरून बोकडाचा मेंदू हिंगुळाशीं एकजीव करण्यासंबंधीं खुलासा करावा. हा वसंत कोणत्याच प्रकारची दुर्गंधी न येतां किती दिवस टिकतो ?

रसोनवृष्यवटींत लवंग चूर्णाचे कडे ठेवणें जरूरी आहे काय ? कारण लवंग चूर्ण करपून त्याचा कोळसा होईल. रसोनवृष्यवटीचा विक्रीभाव आपण काय ठेवला आहे !

— वै. का. मु. वाकणकर इंदूर

(शुद्ध हिंगूळ व बोकडाचा मेंदू एकत्र खलून एकजीव झाल्यावर त्यांत कचोरा, गव्हला, पांढरे मिरे, काकडशिंगी, ज्येष्टमध, भारंगमूळ, आस्कंद, काकोली, क्षीरकाकोली, रास्ना, ऋषभक, जीवक, रानमूग, वावडिंग, पिंपळी, देवदार, यांचीं चूर्णे टाकून डाळिंबाच्या रसाच्या ७ भावना दिल्या व नंतर गोळ्या केल्या

हा वसंत आम्ही करून आज आठ महिने झाले आहेत. अद्यापि तरी तो सुगंधीच राहिला आहे.

लवंगाचें चूर्ण करपलें तरी वापरण्यास हरकत नाहीं.

रसोनवृष्यवटीचा भाव ५ रु. तोळा आहे.

—व्यवस्थापक, आयुर्वेद सेवा संघ औषधी भवन

कामगार विमा योजना मुंबई राज्य व होमिओ चिकित्सक

श्री. एस्. जी. वर्टी [वसई] यांनीं मुंबई विधान सभेंत विचारलेल्या प्रश्नांना आरोग्य-मंत्री श्री. शांतिलालजी शाह यांनीं दिलेलीं उत्तरें:—

सरकारनें आजारीपणासाठीं कामगार विमा-योजना सुरू करण्याचें ठरविलें आहे, व त्यासाठीं खालीं निर्देशित केलेली वैद्यकीय लायकी मान्य धरण्यांत आली आहे.

मान्य केलेली वैद्यकीय लायकी

बॉम्बे मेडिकल ॲक्ट १९१२ अन्वयें रजिस्टर्ड असलेले, अथवा बॉम्बे मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्ट १९३८ अन्वयें आयुर्वेदीय वैद्यक व्यवसाय करण्यासाठीं रजिस्टर्ड असलेले, अगर इंडियन मेडिकल ॲक्ट १९१६ च्या सेक्शन ३ मध्यें, अगर इंडियन मेडिकल कौन्सिल ॲक्ट १९३३ च्या परिशिष्टांत निर्देशित केलेल्या अधिकाऱ्यांकडून मान्य केलेली वैद्यकीय शैक्षणिक पात्रता धारण करणारे.

बॉम्बे मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्ट १९३८ अन्वयें रजिस्टर्ड झालेले आयुर्वेदिक वैद्यक व्यवसायी सदर कामगार आजार विमा-योजनेमध्यें काम करण्यासाठीं नोंदले आहेत.

सरकार जरूर विचार करील

सदर विमा योजनेंत होमिओपॅथिक वैद्यक व्यवसायींचा समावेश केलेला नाहीं. कारण बॉम्बे होमिओपॅथिक ॲक्ट १९५१ प्रमाणें होमिओपॅथिक वैद्यक व्यवसायींच्या रजिस्ट्रेशनचें काम 'अद्याप पूर्ण झालेलें नाहीं. तथापि कालांतरानें सदर आजारपणाच्या कामगार विमा-योजनेंतील कामगारांकडून जर होमिओपॅथिक औषधोपचारांची मागणी झाली तर सरकार ह्या औषधोपचार पद्धतीचाहि समावेश सदरहू विमा-योजनेंत करण्याचा जरूर विचार करील.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समालोचना--

सचित्र इंजेक्शन विज्ञान (पूर्वार्ध)

लेखक--वैद्य चुन्नीलालजी पालीवाल.

प्रकाशक—सम्पादक, "अनुभूत योगमाला" बरालोकपूर-इटावा यू. पी. पृष्ठ संख्या १८७, चित्रसंख्या १८. मूल्य ५ रु.

अनुभूत योगमालेचीं पुस्तकें नेहमींच वैद्यांना व्यवहारांत मार्गदर्शन करणारीं झालीं आहेत. इंजेक्शन-विज्ञानविषयक अनेक पुस्तकें असतांहि संपूर्ण विषय मांडणारा ग्रंथ नसल्यामुळें लेखकांनें ३ खंड मिळून हें विज्ञान वैद्यांना पुरवावयाचें ठरविलें आहे. या भागांत प्राकृतिक (नैसर्गिक छिद्रांमधून इंजेक्शन) व अप्राकृत्रिक (मुद्दाम छिद्र पाडून इंजेक्शन) असे इंजेक्शनचे सगळे प्रकार उद्धृत करून त्यांची सुन्दर सोपी व्याख्या केली आहे; व इंजेक्शन देण्याचे प्रकार सोपद्रव वर्णन केले आहेत.

व्यवसायांत नवीन पदार्पण करणाऱ्या वैद्यांना तें पुस्तक निश्चित मार्गदर्शन करील. ग्रंथांतील चित्र छपाई फारच अस्पष्ट आहे. या आकृति चांगल्या असत्या तर पांच रुपये मूल्य सार्थ झालें असतें.

—श्री. कृ. करमरकर

वैद्यांसाठीं दिवाळी भेट

वैद्यराज पं. जनार्दनशास्त्री, काव्यतीर्थकृत

वैद्यक स्वयंशिक्षक } किं. २ रु.

सिद्धौषधि विज्ञान } किं. १॥ रु.

ट. ख. सह ५॥ रु. मनिऑर्डरनें आगाऊ आल्यास वरील दोन्ही ग्रंथ व सोबत निश्चंद्र अभ्रक भस्म १ तोळा व रससिंदूर १ तोळा मोफत पाठवूं.

आर्यन फार्मसी, सावंतवाडी

वाचकांचा पत्रव्यवहार—

काळा धतुरा, जांभळा धतुरा

अस्सल काळा धतुरा, ज्याचीं पानें, मूळ, फुल, फाटे वगैरे सर्व काळे रंगाचे असतात अशी ही वनस्पती कोणत्या भागांत निश्चित मिळते ? असा नक्की पत्ता कोणीं माहितगारानें आयुर्वेद पत्रिकेंत प्रसिद्ध केल्यास त्यांचा फार आभारी होईन.

आमच्या भागांत जांभळ्या रंगाचा धतुरा विपुल; व त्यास इकडील लोक काळा धतुरा म्हणतात, परन्तु माझ्या मतें हें चुकीचें आहे.

ए. व्ही. जक्कल, सोलापूर

नं. १७९ चें पावती पुस्तक

"महाराष्ट्र प्रान्तीय वैद्य मंडळ विशेषाधिवेशन प्रसंगीं सभासद पावती बुक क्र. १७९ पावती क्र. ...... हरवले आहे; किंवा नजर चुकीनें कोणाकडून तरी यावयाचे राहिले आहे. तरी सदरहू क्रमांकाच्या पावत्या ज्या सभासदांकडे असतील त्यांनीं त्या क्रमांक नांव व पत्त्यासह मंत्री, म. प्रां. वैद्य मंडळ, स्थायी कार्यालय, नाशिक यांजकडे कृपा करून कळवाव्या अशी विनम्र विनंति आहे.

कृ. के. कानिटकर

सहमंत्री, विशेषाधिवेशन, मुंबई

श्राद्ध-तिथि-निमित्त

संशोधन शाखेस देणगी

"माझे वडील बन्धु जुन्या परंपरेंतील वैद्य होते. त्यांच्या श्राद्धतिथीनिमित्त चालू वर्षी आयुर्वेद सेवा-संघाच्या संशोधन शाखेस ११ रु. पाठविले आहेत त्याचा स्वीकार करावा.

शुद्ध आयुर्वेद विद्यालयास पुढें मदत करण्याचा प्रयत्न करीन." वै. र. ह. आफळे, मिरी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"दोषक्षीणता व रोग" यां लेखाचें परीक्षण

(लेखकः— आयुर्वेदाचार्य अ. वा. अष्टीकर, नागपूर)

या विषयासंबंधीं इतकी विस्तृत चर्चा झाली आहे कीं, यापुढें त्यावर लिहिणें म्हणजे पिष्टपेषण रणेंच होय. तथापि शास्त्राभ्यासाच्या दृष्टीनें कांहीं महत्वाच्या मुद्यांचा विचार करणें आवश्यक वाटतें.

श्री. वागेवाडीकरांनीं आपल्या लेखांत (आयुर्वेद–पत्रिका ता. १६ जून व १ जुलै १९५४) "रोगस्तु दोषवैषम्यम्" या व्याख्येप्रमाणें क्षीण दोषांचीं लक्षणें रोगस्वरूप आहेत, हें सिद्ध केलें. परन्तु या त्यांच्या म्हणण्यास खरें पाहिलें तर विरोध कोणाचाच नाहीं. ता. १६ एप्रिल १९५४ च्या अंकांतील मी आपल्या लेखांत त्याला पुष्टीच दिली आहे. तेव्हां ज्याबद्दल वाद किंवा मत-भेद नाहीं, त्याचें खंडण तरी कसें होणार ?

रोग व वैषम्य यांचा कार्य-कारणभाव

"कार्ये कारणोपचारः" या न्यायानें "रोगस्तु दोषवैषम्यम्" ही एक औपचारिक म्हणजे गौण व्याख्या आहे. रोगनिदान व चिकित्सा यांस ती उपयोगी नाहीं व पुरेशी नाहीं. कारण दोष-वैषम्याच्या आद्य क्षणीं–संचयावस्थेंत–कोणत्याहि रोगाचीं लक्षणें उत्पन्न होत नाहींत. इच्छा–अनिच्छेचा फक्त विपर्ययच असतो.

"क्षयो वृद्धिः स्वधाम्न्येव प्रद्वेषो वृद्धिहेतुषु । विपरीतगुणेच्छा च"
"कुर्वते हि रुचिं दोषा विपरीतसमानयोः । वृद्धाः क्षीणाश्च" —वाग्भट सूत्र

संचय ही वैषम्याची आद्यावस्था, पण त्यावेळीं रोग मुळींच नसतो. तो वाग्भटाच्या मतानें प्रकोपावस्थेंत, व सुश्रुताच्या मतानें स्थानसंश्रयानन्तर उत्पन्न होतो. एवंच, "कार्यं प्रागभावप्रतियोगि" हें कार्याचें लक्षण ज्वरादि रोगांच्या ठिकाणीं बरोबर जुळतें, म्हणून रोग हें कार्य, व वैषम्य हें त्याचें कारण असें शास्त्रकारांनीं सर्वत्र सांगितलें आहे.

लक्षण-लक्षणवतोरभेदः ।

ज्याचें "स्वरूपलक्षण" करावयाचें, त्या वस्तूहून तें लक्षण भिन्न नसतें. 'सास्नादिमत्त्वं' हें 'गाईचें लक्षण' तिच्याहून भिन्न नाहीं. "सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म" हें ब्रह्माचें स्वरूपलक्षण त्याच्याहून निराळें नाहीं. त्याचप्रमाणें, वृद्धिक्षयात्मक दोषवैषम्य ज्या लक्षणसमुच्चयावरून ओळखलें जातें, तीं संपूर्ण लक्षणें वृद्ध आणि क्षीण दोषाहून भिन्न मुळींच नाहींत. तीं वैषम्यरूपच आहेत. वैषम्यजन्य किंवा वैषम्याचें कार्यस्वरूप नाहींत. त्यामुळें रोग ही संज्ञा शास्त्रकारांनीं त्याला दिली नाहीं. श्री. वागेवाडीकर ज्याला रोग म्हणतात, तीं लक्षणें पारिभाषिक अर्थानें रोग या संज्ञेंत मोडत नाहींत. "रुजाकरणात् रोगः" या सामान्य गौण अर्थानें त्यांचा अन्तर्भाव त्यांत होतो, या विषयीं वादच नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चर्चेचा खरा मुद्दा

" शास्त्रकारांनीं रोगनिदान व चिकित्सा यांचा विचार दोषवृद्धीच्या दृष्टीनेंच केला, क्षीणतेच्या दृष्टीनें केला नाहीं, म्हणून सध्यां उपलब्ध असलेले संपूर्ण आयुर्वेद ग्रंथ अपूर्ण आहेत " असा श्री. वागेवाडीकरांचा आरोप. विरोधकांचा खरा विरोध या त्यांच्या विधानासच आहे.

आयुर्वेदमहर्षींनीं दोषवृद्धीच्याच पायावर संपूर्ण आयुर्वेदाची रचना कां केली ? " कार्यभूत रोग वृद्धिजन्यच त्यांनीं कां सांगितले ? " हाच खरा चर्चेचा विषय.

रोग वृद्धिजन्य मानण्याचें मूलभूत तत्त्व

चरकादिमहर्षींनीं आयुर्वेदाची संपूर्ण उभारणी वृद्ध दोषांच्याच अधिष्ठानावर केली, याच्या मुळाशीं कांहीं तरी तत्त्व असावें, असें चरक शा. अ. ६ वाचीत असतां दिसून येतें.

" तत्र शरीरं नाम चेतनाधिष्ठानभूतं ....समयोगवाहि " अशी शरीराची व्याख्या केली व त्याचें धारण, पोषण, संवर्धन कशानें होतें हें पुढें सांगितलें. जीवन-व्यापारांत शरीरघटक द्रव्यांची झीज भरून काढण्याकरितां तत्तद्भासमान द्रव्यें आहार म्हणून घेणें, पचविणें आणि नको असलेलीं बाहेर फेंकून देणें आणि अशा रीतीनें शरीराचें संवर्धन करणें, ही प्रत्येक जीवाची स्वाभाविक प्रवृत्ति. शरीर-पोषण-संवर्धन करण्याच्या स्वाभाविक प्रवृत्तीला " जीवनयोनिप्रयत्न " असें नांव आहे. शरीरवृद्धी-करितां घेतलेल्या आहाराचें पचन झाल्यानंतर त्याचे दोन विभाग-प्रकार-पडतात, मलभूत आणि प्रसादभूत (सारस्वरूप).

" परिणामतस्त्वाहारगुणाः शरीरगुणभावमापद्यन्ते । "
" शरीरगुणाः पुनर्द्विविधाः संग्रहेण मलभूताः प्रसादभूताश्च ।
तत्र मलभूतास्ते, ये शरीरस्य आबाधकराः स्युः, तद्यथा...
... बहिर्भूताः परिपक्वाश्च धातवः प्रकुपिताश्च वात-पित्त-श्लेष्माणः " च. शा. अ. ६।१७
" तेषां सर्वेषां एव वातपित्त श्लेष्माणो दुष्टाः दूषयितारो भवन्ति, दोषस्वभावात् " ।
च. शा. ६।१८

शरीरवृद्धीकरितां घेतलेल्या आहाराचें पचन अयोग्य झालें तर त्यापासून संपूर्ण शरीराला बाधक असे वातादि दोष वृद्ध-प्रकुपित-दुष्ट होऊन निरनिराळे रोग होतात असें या सूत्रांत म्हटलें आहे. दोषांची रोगोत्पादक मूलभूत अवस्था वृद्धिस्वरूपच मानली, क्षीणस्वरूप सांगितली नाहीं, ही गोष्ट लक्षांत ठेवण्या-सारखी आहे. त्याचें कारण जीवाची जीवनप्रवृत्ति स्वाभाविक वृद्धिमूलकच आहे म्हणून. क्षीणतेकडे प्रवृत्ति असती तर शास्त्रकारांनीं निदान व चिकित्सा क्षीण दोषांच्या दृष्टीनें सांगितली असती. तात्पर्य, वृद्धिमूलक जीवनयोनिप्रयत्न किंवा प्रवृत्ति हेंच तें तत्त्व, कीं ज्याच्यावर आयुर्वेदाची दोषवृद्ध्यात्मक निदान व चिकित्सापद्धति उभारली आहे.

श्री. वागेवाडीकरांनीं लावलेली उपपत्ति

" चरकाचार्य परिणामवादाचे पुरस्कर्ते असल्यामुळें त्यांनीं वृद्धिजन्य विकारांनाच प्राधान्य दिलें, याची जाणीव वाग्भटास झालेली दिसते. म्हणून त्यांनीं क्षीणदोषांना महत्त्व दिलें. " [आयुर्वेद पत्रिका १६ जून १९५४ पृ. ७८८]

लेखकाचें हें म्हणणें ठीक आहे; पण मी विचारतो कीं, परिणामवादाखेरीज दुसरा असा कोणता वाद आहे कां, कीं ज्याच्या आधारावर आयुर्वेदशास्त्राची उभारणी करतां येईल ? वैद्यकशास्त्राच्या सिद्धांतास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रिणामवादच फक्त अधिष्ठानभूत होऊं शकतो, दुसरा असूं शकत नाहीं. क्षीणदोषजन्य रोग व त्यांची चिकित्सा या दोहोंची उपपत्ति लागेल असा एखादा वाद श्री. बागेवाडीकरांजवळ असेल तर त्यांनीं मांडावा. नाहीं म्हटलें तरी हटवाद त्यांच्याजवळ जरूर आहे.)- बरें वाग्भटास जर चरकांची चूक कळली तर मग त्यांनीं निदान--चिकित्सेंत दोषक्षीणतेचा पुरस्कार कां केला नाहीं ? चरकाचार्यांची त्यांना भीति तर नाहीं वाटली ? तें असो, पण वाग्भटानें कोणत्या वादाचा अंगीकार केला ? किंवा असेंहि संभवनीय आहे , " चरककालापासून आजतागायत जी शिक्षणप्रणाली चालत आली, तींत दोषक्षीणता ही रोगोत्पादक आहे याचें शिक्षणच (बिचाऱ्या वाग्भटास) दिलें गेलें नसेल ! " (ता. १६ जून १९५४ पृ. ७८९)

दोषक्षीणतेचीं दोन्हीं उदाहरणें चूक आहेत

" रक्तपित्त विकारांत अतिरक्तस्राव झाल्यामुळें रक्त धातु क्षीण होतो व रक्ताश्रयी पित्तहि क्षीण तें, या ठिकाणीं रक्तपान सांगितलें तें ठीकच आहे, पण आमपित्तयुक्त यकृत् कां खाण्यास सांगितलें याची उपपत्ति रक्त व पित्त यांची क्षीणता मानल्याशिवाय लागत नाहीं, म्हणून इकडे अल्पमति वैद्यांनीं लक्ष्य द्यावें, " (ता. १६ जून १९५४ पृष्ठ ७८९)

" विषूचिकेच्या लक्षणांत हात--पाय अंग गार, नाडी क्षीण, मूत्रोत्पत्ति न होणें, चेहरा काळवंडणें इत्यादि लक्षणें लिहिलीं आहेत. कॉलऱ्यांतील हीं लक्षणें दोषवृद्धीचीं आहेत कीं दोषक्षयाचीं आहेत, याचें ज्ञान किती वैद्यांस आहे ? हीं लक्षणें दोषक्षयाचीं आहेत असें मला वाटतें. या अवस्थेंत कफ-पित्त हे दोन दोष क्षीण होतात" (आ.प.पृष्ठ७९०) असें लेखकाचें म्हणणें. परन्तु क्षीण झालेल्या पित्ताचें संवर्धन होण्याकरितां यकृत्भक्षण सांगितलें, ही समजूत चुकीची आहे. पित्ताचें संवर्धन करणारें औषध किंवा आहारद्रव्य यांत कोणते गुण असले र पित्त वाढवितात ही गोष्ट सामान्यतः सर्व वैद्यांना माहीत आहेच. श्री.बागेवाडीकर यांच्या मतें आमपित्तयुक्त यकृत् अम्ल- लवण--कटु यांपैकीं कोणत्या तरी रसात्मक असावें असें दिसतें. तें उष्णवीर्य आणि आम्लविपाकी किंवा कटुविपाकी आहे अशी त्यांची कल्पना असल्याचें समजतें. परन्तु यांपैकीं आमपित्तयुक्त यकृतामध्यें कांहींच नाहीं. तें स्वादुरसात्मक, शीतवीर्य, मधुरविपाकी आहे. असल्या प्रकारचें हें यकृत्द्रव्य पित्तवर्धक कसें असू शकतें ? हा एक प्रश्नच आहे. "अचिन्त्यप्रभाव" म्हणावा तर तशा तऱ्हेचा अनुभव नाहीं.

बरें, आमपित्तयुक्त यकृताचे गुणधर्म नक्की माहीत नसतील असें गृहीत धरून चालूं या ! पण त्याचा उपयोग ज्या रोगांत व ज्या अवस्थेंत केला त्यावरून तरी निदान त्याच्या गुणांची कल्पना शास्त्रज्ञांस सहज येण्यासारखी आहे. प्रत्येक मनुष्याची प्रकृति जशी भिन्न-भिन्न, त्याचप्रमाणें रोगांची सुद्धां असते. रक्तपित्त हा रोग पित्तप्रकृतीचा. त्यामुळें या रोग्याच्या कोणत्याहि अवस्थेंत पित्तल औषधि द्रव्यांचा उपयोग करतां येत नाहीं. संपूर्ण चिकित्सा शीतवीर्यच करावी लागते; व तशीच चिकित्सा वाग्भट--चरकांनीं आपल्या ग्रंथांत केली आहे. यावरून हें सिद्ध होतें कीं, रक्ताश्रित पित्तक्षीणता भरून काढण्याकरितां आमपित्तयुक्त यकृताचा उपयोग शास्त्रकारांना सांगितला नाहीं. तसें मानल्यास यकृत् हें द्रव्य पित्तवर्धक मानावें लागेल; परंतु तसल्या पित्तवर्धक द्रव्याचा रक्तपित्त या व्याधींत कांहींच उपयोग नाहीं. मागें कॉलऱ्याचीं जीं लक्षणें सांगितलीं, शैत्य, धमनीशैथिल्य, मूत्रक्षय, कार्ष्ण्य इ. तीं सर्व कफ आणि पित्तक्षयाचीं आहेत हें म्हणणेंसुद्धां शास्त्रसंमत नाहीं. शास्त्रकाराचें त्यासंबंधीं काय मत आहे हें मुख्यतः पाहिलें पाहिजे. त्यांनीं निश्चितपणें सांगून ठेवलें आहे कीं

१ " छर्दिप्रसंगेन हि 'मातरिश्वा' धातुक्षयात् कोपमुपैत्यवश्यम् ।
कुर्यादतोऽस्मिन् वमनातियोगप्रोक्तं विधिं स्तंभनबृंहणीयम् ॥ वा. चि. अ. ६।४

२ " श्लेष्मणोऽतिप्रसंगेन वायुः श्लेष्माणमस्यति ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कफप्रसेकं तं विद्वान् स्निग्धोष्णैरेव निर्जयेत् ॥ " वा. चि. ५।६३

३ "क्षीणे कफे गुदे दीर्घकालातीसारदुर्बले । अनिलः प्रबलोऽवश्यं स्वस्थानस्थः प्रजायते ।
स बली सहसा हन्यात् तस्मात् तं त्वरया जयेत् । " वा. चि. ९।१२०

टीका-" वायोर्वैगुण्ये कोपे धातुक्षय एवात्र हेतुः । "

४ " वातोल्बणानि प्रायेण भवन्त्यस्रेऽतिनिस्रुते । अर्शांसि । " वा. चि. ८।१२

५ " धात्वन्तरोपमर्देद्धश्चलो व्यापी स्वधामगः । " वा. ९।४६

टीका— वायुं अपेक्ष्य अन्ये पित्तश्लेष्मादयः — धात्वन्तराः, तेषां उपमर्दः – अन्यथाभावः, तेन इद्धः – उद्धतः ॥ चलः – वाय्वाख्यः । "

वरील सूत्रांचें तात्पर्य असें कीं दोष, धातु आणि मल या शारीरिक द्रव्यांपैकीं कोणत्याहि द्रव्याची अतिशय झीज झाली किंवा निःसरण झालें तर त्या धातूंचा "क्षयं चातिविसर्गतः" या न्यायानें क्षय होतो. आणि नंतर अशा धातुक्षयांतून " वायोर्धातुक्षयात् कोपः " या सिद्धांताप्रमाणें रूक्षादि गुणांनीं युक्त असलेल्या वाताचा प्रकोप होतो. अशा स्थितींमध्यें जेवढे विकार होतात, ते सर्व वातप्रकोपजन्यच असतात. त्यावर स्निग्ध-बृंहण चिकित्सा करावी असें शास्त्रकारांनीं ठिकठिकाणीं उद्घोषित केलें आहे.

रक्तपित्ताच्या विशिष्ट अवस्थेंत आमपित्तयुक्त यकृताचा प्रयोग याच दृष्टीनें आला आहे. कारण तें स्निग्ध-शीत-मधुर-बृंहण आहे ज्या धातूच्या क्षयामुळें वातप्रकोप झाला असेल तज्जातीय किंवा तत्समान द्रव्य रोगप्रकृतीला अनुसरून दिलें पाहिजे.

" रक्तवहानां स्रोतसां यकृन्मूलम् । " " प्रभवत्यसृजःस्थानात् प्लीहतो यकृतश्च तत् । "

या सूत्रांत सांगितल्याप्रमाणें यकृताची योजना शास्त्रकारांनीं जी अत्यंत सूक्ष्मदर्शीपणानें केली ती पित्तवर्धनाकरितां मुळींच नाहीं. धातुक्षयजन्य वातप्रकोप नाहींसा करण्याकरतांच ती आहे. तसेंच कॉलरा या रोगाच्या चिकित्सेमध्यें कफपित्तवर्धक चिकित्सा सांगितली ती धातुक्षयजन्य वातप्रकोप नाहींशी करणारी असल्यामुळें वातघ्न ठरते! कोणत्याहि दोषांचा क्षय एका विशिष्ट मर्यादेच्या बाहेर गेला तर तद्विरुद्ध गुणात्मक दोषांचा प्रकोप होतो. वाताचा क्षय विशिष्ट प्रमाणाच्या बाहेर झाला कीं कफाची किंवा पित्ताची वृद्धि होणारच आणि कफाचा, पित्ताचा क्षय प्रमाणाबाहेर झाला म्हणजे वाताची वृद्धि होते. असो.

क्षयाच्या कारणानेंच विरुद्ध दोषाचें वर्धन

श्री. वागेवाडीकरांनीं दोषक्षयाचीं कारणें अगदीं स्वतंत्र आहेत असें दाखविण्याकरितां " व्यायामोऽनशनं चिंता " चरक सूत्र अ. १७ हा श्लोक उद्धृत केला. परन्तु हींच कारणें तद्विरुद्ध वातदोषाचीं वर्धक आहेत असें वाग्भटचरक यांनींच सांगितलें आहे. " तिक्तोषणकषायाल्परूक्षप्रमितभोजनैः...... ग्रीष्माऽहोरात्रि भुक्तान्ते प्रकुप्यति समीरणः ॥ वा. नि. " तत्राद्या मारुतं घ्नन्ति...... अन्ये तु कुर्वते । " तेव्हां " व्यायामो ऽ नशनं चिंता " हीं कारणें कफ-पित्त क्षयाचीं कीं वातप्रकोपाचीं ! दोघांचा समन्वय कसा लावणार ?

दोषवृद्धीच्या दृष्टीनें क्षीण लक्षणाची चिकित्सा

वाग्भट-चरकादिकांनीं क्षीण दोषांचीं लक्षणें स्वतंत्र सांगितलीं हें जरी खरें, तथापि निदान व चिकित्सा करतांना मात्र वृद्धीच्या दृष्टीनेंच त्यांची मीमांसा केली असें दिसून येतें. उदा. अग्निमांद्य हा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

[पित्त]क्षीणतेच्या विकार. "पित्ते मंदोऽनलः" परन्तु स्वतंत्र कार्यभूत रोगाच्या दृष्टीनें त्याचा विचार [क]रतांना वातज, पित्तज, कफज अग्निमांद्य, असें वृद्धीच्या दृष्टीनें त्याचे भेद पाडले.

"अग्नेर्निर्वापकं पित्तं रेकेण वमनेन वा ।
हृत्वा, तिक्तलघु-ग्राहि-दीपनैरविदाहिभिः ॥" वा. चि. १० । ३३

"कट्वजीर्णविदाह्यम्लक्षाराद्यैः पित्तमुल्बणम् ।
आप्लावयद्धन्त्यनिलं जलं तप्तमिवाऽनलम् ॥" मा० निदान

टीका— "यथा उष्णयुक्तमपि जलं अनलं हन्ति, तथा द्रवांशेन परिवृद्धं पित्तं उष्मरूपं अग्निं हन्ति।"

"रक्तं विसर्पप्लीहविद्रधीन् । कुष्ठवातास्र ····· व्यंगाग्निनाशसंमोह... ।" (वाग्भट)

वरील दोन श्लोकांत पित्त आणि रक्त यांच्या वृद्धीनें सुद्धां अग्निनाश होतो असें सांगितलें आहे.

उदा० २ रें—शैत्य हें पित्तक्षीणतेचें तसेंच कफवृद्धीचेंही लक्षण आहे.

उदा० ३ रें—'प्रभाहानि' हें पित्तक्षीणतेचें लक्षण, परंतु तें वातवृद्धीनें (कार्ष्ण्य) व कफवृद्धीनें (श्वैत्य) सुद्धां होतें.

उदा० ४ थें—कफक्षीणतेनें भ्रमः, परंतु "वातपित्तात् भ्रमः" असेंहि सांगितलें, आणि चिकित्सा-सुद्धां वातपित्तघ्नच.

तात्पर्य, कोणत्याही लक्षणाचें निदान व चिकित्सा दोषवृद्धीच्या दृष्टीनेंच शास्त्रकारांनीं सांगितलीं आहेत.

क्षयावस्था भावरूप कीं अभावरूप ?

प्रतिपक्षाच्या म्हणण्याचा विपर्यास करण्याची अत्यंत वाईट खोड श्री. बागेवाडीकरांना लागलेली दिसते [कि]ंवा विरोधक काय म्हणतो याचें आकलन त्यांना विकारवशतेमुळें होत नसावें असें वाटतें. चालू लेखाच्या [प्र]ारंभींच "रोग" शब्दाच्या अर्थाविषयीं मी ही तक्रार मांडली आहे.

"दोषाची क्षीणता ही अभावस्वरूप असून वृद्धावस्था ही भावस्वरूप आहे" या माझ्या [वा]क्याचा अर्थ त्यांनीं असा घेतला कीं, "वैद्य आष्टीकरांनीं भाव म्हणजे वृद्धावस्था असा केला आहे." (आ. प. १ जुलै १९५४ पृ. २०)

"वृद्धावस्था भावरूप आहे" याचा अर्थ- "भाव म्हणजे वृद्धावस्था" असा कसा होऊं शकतो ? [भ]ाव आणि अभाव यांच्या व्याख्या किंवा लक्षण मला करावयाचें नाहीं. वृद्धवस्थेचें स्वरूप कोणतें ? एवढेंच [म]ला सांगावयाचें आहे. वंध्यापुत्र, खपुष्प हे अत्यन्ताभावस्वरूप आहेत असें जर कोणी म्हटलें तर त्याचा अर्थ असा होतो कां कीं, अत्यंताभाव म्हणजे वंध्यापुत्र, खपुष्प ? शास्त्रीय वादांत वादी-प्रतिवादींनीं एकमेकांच्या बोलण्याचा अभिप्राय नीट समजून घेतला पाहिजे. असो !

"दोषांची क्षीणावस्था अभावरूप नाहीं, भावरूपच आहे" असें लेखकाच म्हणणें; परंतु तें चूक आहे.

दोष हे सावयव द्रव्य. वृद्धि-क्षय, चय-अपचय हे भाव सावयव द्रव्याच्याच ठिकाणीं संभवतात. एखाद्या वस्तूचा क्षय होतो, ती झिजते, याचा अर्थ असाच होतो कीं, त्या द्रव्याच्या अवयवभूत परमाणूंचा ध्वंस होतो. चार प्रकारच्या अभावांपैकीं, "ध्वंस" नांवाचा एक अभाव. तेव्हां दोषांचा क्षय ही प्रध्वंसाभावस्वरूप असल्यामुळें क्षयावस्था ही अभावरूपच ठरते.

मी विचारतों कीं, क्षयावस्था भावस्वरूप, मूर्त, आपण मानली तर त्या अवस्थेंत दोषांचा संचय, प्रकोप, प्रसर व स्थानसंश्रय होण्यास काय हरकत आहे ? परंतु तसें कोणीच मानीत नाहीं व शास्त्रांत कोठें सांगितलेंहि नाहीं. परंतु आमचे पंडित श्री. बागेवाडीकर मात्र धडाकून सांगतात !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोषांचें क्षयावस्थेंतहि गमन !

मनुष्याला एखादी गोष्ट हुडकून काढण्याचें वेड लागलें कीं, त्याला त्यासंबंधीं कांहीं तरी सांपडतेंच ! क्षीण दोषांच्या गमनाविषयीं मला कोठें आधार मिळाला नाहीं. पण श्री. बागेवाडीकर त्याच्या शोधांत भिडले, तर अखेर त्यांनीं चरकसंहितेंतील एक वाक्य हुडकून काढलेंच ! तें कोणतें तर—

"क्षयः स्थानं च वृद्धिश्च दोषाणां त्रिविधा गतिः" । च. सू. अ. १७

लेखक महाशय यावर भाष्य करतातः—

"दोष हे वृद्धीच्याच अवस्थेंत गमन करतात असें नाहीं, तर ते क्षयावस्थेंतहि करतात, असें शास्त्रकारांचें म्हणणें आहे. आपण दोषाची वृद्धावस्थाच गमनात्मक मानतो, परंतु क्षयावस्था गमनात्मक कशी होऊं शकते याचा खुलासा विद्वानांनीं करावा." (आ. प. १ जुलै ५४ पृ. २३)

हें विधान ऐकून मी थोडा चकित झालो. श्री. बागेवाडीकरांचें किती सूक्ष्मवाचन ! असें मला क्षणभर वाटलें. परन्तु टीका पाहूं या, म्हणून ती वाचूं लागलो, तेव्हां टीकाकार लिहितातः-

"गतिः: प्रकारः अवस्था वा"

याचा अर्थ असा कीं, १ क्षयावस्था, २ साम्यावस्था, ३ वृद्धावस्था अशा तीन अवस्था (प्रकार) दोषांच्या आहेत काय ! टीकाकारांनीं केलेलें हें स्पष्टीकरण लेखकमहाशयांच्या कधीं वाचनांतच आलें नसेल ! ही गोष्ट शक्य नाहीं. परंतु स्वमताभिनिवेशानें मोहाला बळी पडून शास्त्रकारांच्या नांवानें आपलें स्वतंत्र विधान ठोकून दिलें झालें !

विहिरींतच नाहीं तर पोहऱ्यांत येईल कोठून !

दोषांच्या वृद्धीला किंवा क्षयाला मूळ सुरवात स्वस्थानांतूनच होत असते. जो नियम वृद्धीकरिता तोच क्षीणवस्थेकरितां लागू आहे. "चयो वृद्धिः स्वधाम्न्येव । "संचये ऽ पहृता दोषा लभंते नोत्तरा गतिः।" उगमस्थानींच जलप्रवाह जर अटला तर तेथून त्या नदीचें पाणी अखंड कसें वाहणार ? शक्यच नाहीं. नाहीं. त्याचप्रमाणें स्वस्थानामध्येंच जर दोषनिर्मिति पुरेशी झाली नाहीं व तेथेंच जर क्षय झाला तर त्याचें बहिर्गमन, संचलन कसें होणार ? याचा विचार विद्वानांनीं करण्याच्या अगोदर श्री. बागेवाडीकरांनीच करावा व आम्हां "अल्पमति, अबुधांना" सांगावा.

क्षीणावस्था भावस्वरूप मानली ही पहिली चूक. तसें मानल्यामुळें क्षीणदोषांचें गमन मानण्याचा प्रसंग ओढवून घेतला ही दुसरी चूक. क्षीण दोष गमनात्मक ठरविण्याकरितां शास्त्रप्रमाण पाहिजे, परन्तु तें मिळत नाहीं, म्हणून मनमानेल तसा शास्त्रकारांच्या नांवावर गति म्हणजे गमन, हा अर्थ दडपून दिला ही तिसरी चूक.

वस्तुतः क्षीणावस्थेंत दोषांचें बहिर्गमन होत नाहीं म्हणूनच तर "रूपाणि जहति क्षीणाः" "क्षीणा जहति लिंगं स्वम्" "कर्मणः प्राकृताद्धानिः" असें म्हटलें आहे.

"क्षीणानां प्रकृति-लिंग-क्षय-व्यतिरिक्तं विकारकर्तृत्वं नास्ति यतो वृद्धाः उन्मार्गगामिनो दोषाः, दूष्यं दूषयन्तो ज्वरादीन् कुर्वन्ति, न क्षीणाः स्वयमेव दुःस्थितत्वात्" (च. सू १७।६२ टीका) क्षीण दोष उन्मार्गगामी नसतात; यापुढें त्यांच्या ठिकाणीं स्वतंत्र विकारकर्तृत्व नाहीं असें श्रीचरकाचें म्हणणें टीकाकारांनीं पुनः स्पष्ट केलें आहे.

केवळ गुणकर्माची वृद्धि होऊं शकते काय ?

"एक दोष क्षीण झाला असतां तद्विरुद्ध-दोष कुपित होत नाहीं तर क्षीण दोषाच्या प्राकृत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

र्मांची हानि होते किंवा तद्विरुद्ध कर्मांची वाढ होते." (आ. प. १ जुलै ५४ पृ. २५)

लेखकांच्या म्हणण्याचा आशय असा कीं, एक दोष क्षीण झाला असतां तद्विरुद्ध दोषस्वरूप द्रव्या-थीं यत्किंचितही वृद्धि न होतां, केवळ त्याच्या कर्मांचीच वाढ होते. यास प्रमाण कोणतें तर "कर्मणः कृतात् हानिः।" या श्लोकांत कर्मांचीच फक्त हानि सांगितली आहे; दोष शब्द उच्चारला नाहीं.

परंतु हें चूक आहे. कारण दोष हे द्रव्य आहेत. द्रव्याची व्याख्या "यत्राश्रिताः कर्मगुणाः कारणं मवायि यत् तत् द्रव्यम्।"

गुण आणि कर्म द्रव्याच्या ठिकाणीं समवाय संबंधानें रहात असल्यामुळें गुण-कर्मांची वृद्धि किंवा ास द्रव्याला सोडून स्वतंत्रपणें केव्हांही होत नसतो, असा सर्वमान्य नियम आहे.

समवायोऽपृथग्भावो भूम्यादीनां गुणैर्मतः। स नित्यः यत्र हि द्रव्यं न तत्राऽनियतो गुणः॥ "च.सू.१।१

"अपृथग्भावः—अयुतसिद्धिः, सहैव अवस्थानं इत्यर्थः।"

तेव्हां गुण-कर्मांच्या वृद्धि-क्षयाबरोबर तदाश्रयीभूत दोषस्वरूप द्रव्याची वृद्धि व ऱ्हास मानलाच हिजे, केवळ कर्मांची वृद्धि होते हें विधान चूक आहे.

वृद्धि-क्षीणतेचा परस्पर संबंध

वृद्धि-क्षयात्मक वैषम्य सर्व रोगांचें कारण असल्यामुळें, "क्षीणा वर्द्धयितव्याः, वृद्धाः ह्रासयितव्याः" चिकित्सेचें सामान्य स्वरूप ठरलें. दोष-वैषम्याला मुख्य कारण मिथ्या आहार-विहार, परंतु इथें विचा-चा प्रश्न असा कीं मिथ्या आहारानें जेव्हां एखाद्या दोषाचा प्रकोप किंवा क्षय होतो, त्यावेळीं दोनपैकीं एकच या घडते कीं युगपद् वृद्धि-क्षयात्मक दोन्ही क्रिया घडतात? उदाहरणार्थ :— एखाद्यानें दररोज अत्यंत खट पदार्थ खाण्याचा सपाटा चालविला, तिखट रसाचा अतियोग केला, तेव्हां त्यापासून "तत्राद्या मारुतं न्ति त्रयस्तिक्तादयः कफम्" या सूत्राप्रमाणें कफाचा क्षय होईल हें निश्चित. परंतु कफक्षय होत असतांना द्विरुद्ध गुणात्मक वात-पित्त दोषांची वृद्धि होईल किंवा नाहीं? या प्रश्नाचें उत्तर शास्त्रकार देतात कीं वश्य होईल. "अन्ये तु कुर्वते।"

कफाचा क्षय आणि वातपित्ताची वृद्धि या दोन्ही क्रिया एकाच कालीं सुरू होतात. ज्या प्रमाणांत फाचा क्षय होतो त्याच प्रमाणांत वातपित्ताचा उपचय होत रहातो. तराजूच्या दांडीचें एक टोंक खालीं मिनीला टेकलें व तद्विरुद्ध दुसरें टोंक तितकेंच वर गेलें. वरचें पारडें क्षयाची बाजू आणि खालचें पारडें द्धीची बाजू. वरच्या पारड्यांत जेवढ्या प्रमाणांत वजन पडेल, तेवढ्यांच प्रमाणांत जमिनीला टेकलेलें पारडें उचलल्या जाते. असें होतां होतां पुढें तराजूच्या दांडीचीं दोन्हीं टोकें समपातळीवर आलीं म्हणजे माप बरोबर झालें. परन्तु दांडी बरोबर आली असतांना पुनः वजन, टाकीत टाकीत राहिलें तर जें पारडें प्रथम लकें होतें तेंच आतां भारी होईल व हळूंहळूं जमिनीला टेकेल. तात्पर्य, एका दोषाचा क्षय आणि विपरीत षांची वृद्धि यांचा संबंध तराजूच्या पारड्यांतील वजनाप्रमाणें परस्परावलंबी आहे. जर क्षीणावस्था व द्धावस्था ह्या दोन परस्परांहून अत्यन्त अलग असतील किंवा निरपेक्ष असतील, तरच एक दोष क्षीण ला तरी दुसरा तद्विपरीत दोष वाढणार नाहीं. परन्तु तसें नाहीं. तिखट रसानें रूक्ष उष्ण गुणांची वृद्धि ते, पण स्निग्ध- शीत गुणात्मक कफाचा नाश होतो.

"विपरीतगुणैर्देशमात्राकालोपपादितैः। भेषजैर्विनिवर्तन्ते विकाराः साध्यसंमताः।"

या सूत्रांत विपरीत गुणांचें महत्त्व याच कारणामुळें सांगितलें आहे. तेव्हां असें कोणतेंही द्रव्य ाहीं, कीं जें फक्त एखाद्या दोषाचा क्षयच करील; परन्तु तद्विरुद्ध दोष (अतियोगे केला तरी) वाढू देव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं. याचें कारण हेंच कीं क्षय व वृद्धि हे भाव परस्परसापेक्ष आहेत आणि या दोषांचेंही आलंबन "साम्यता" हें आहे. एक दोष क्षीण झाला असतां, तद्विरुद्ध दोष (अतियोग झाला तर) वाढतो किंबहुना विरुद्ध दोष वाढतो म्हणूनच दोषाची क्षीणता भरून येते. ह्याविषयीं शास्त्रामध्यें भरपूर प्रमाणें आहेत; तर्कानें हें सिद्ध होतें व वैद्यकीय धंद्यांतील हा नित्याचा अनुभव आहे.

१ "दोषादीनां यथास्वं च विद्याद्वृद्धि-क्षयौ भिषक्।
क्षयेण, विपरीतानां गुणानां वर्धनेन च" ॥ वा. सू. ११/२४

टीकाः- स्निग्धादीनां देहे यदा क्षयो दृश्यते, तदा वायोर्वृद्धिं विद्यात्। यदा तु तेषां स्निग्धादीनां देहे वृद्धिः तदा वायोः क्षयो ज्ञेयः।".

या सूत्रांत "वर्धनेन च" हा "च" शब्द मुद्दाम घातलेला आहे. हें सांगण्याचें कारण असें कीं-

२ "वाते पित्ते कफे चैव क्षीणे लक्षणमुच्यते। कर्मणः प्राकृतात् हानिः, वृद्धिर्वापि विरोधिनाम्" ॥ या चरकसूत्रांत "वा" शब्द विकल्पार्थी आहे, तो विकल्पार्थी नाहीं हें दाखविण्याकरितां "वा" ऐवजीं "च" हा शब्द वाग्भटानें मुद्दाम घालून चरकवाक्याचा अनुवाद केला.

३ "लिंगं क्षीणेऽनिलेऽङ्गस्य सादः...... तथा श्लेष्मवृद्ध्युक्तामयसंभवः।"

४ "यौगपद्येन तु विरोधिनां धातूनां वृद्धि-ह्रासौ भवतः।
यद्धि यस्य धातोर्वृद्धिकरं तत् ततो विपरीतस्य धातोः प्रत्यवायकरं संपद्यते" च. शा. अ. ६

तात्पर्य, कोणतेंही आहार-औषधिद्रव्य पोटांत गेल्यानंतर स्वसमान गुणांचें वर्धन व विपरीत गुणांचें क्षपण अशा दोन्ही प्रकारच्या क्रिया युगपद् करीत असते, म्हणूनच चिकित्सा करतांना ज्या गुणांच्या औषधीनें रोग्यास प्रथम आराम होतो तेच औषध सतत कांहीं दिवस (दोषसाम्य झाल्यावर सुद्धां) सुरू ठेवलें तर त्या विरुद्ध दोषाचा प्रकोप होऊन रोग्यास पुनः दुसरा आजार होतो. दोषसाम्य स्थापन झाल्यानंतर चिकित्सा बंद करण्यास शास्त्रानें सांगितलें आहे याचें कारण हेंच होय.

चिकित्सेंत फरक नाहीं

क्षीण दोषाची चिकित्सा व तद्विरुद्ध वृद्ध दोषाची चिकित्सा यांत जर खरोखरच कांहीं तात्त्विक फरक असता तर मग क्षीणतेची भाषा प्रत्येकवेळीं शास्त्रकारानें वापरली असती, व वैद्यांच्या व्यवहारांतही ती रूढ असती; पण चिकित्सेंत विशेष फरक नाहीं. उदा.... कफे (क्षीणे) भ्रमः। कफ क्षीण होणें याचा अर्थ स्निग्ध-शीत गुणप्रधान द्रव्य कमी होणें। ह्याकरितां तत्समान म्हणजे स्निग्धशीत मधुर रसात्मक द्रव्य श्री. नागेवाडीकर देतील. पण "भ्रम" हें लक्षण वातपित्त-वृद्धीचें म्हणून त्याच्या नाशाकरितां मीसुद्धां स्वादुरसाचाच उपयोग करीन. याचप्रमाणें, बाकीचीं लक्षणें समजावीत. शास्त्रकारांनीं आपल्या ग्रंथांत क्षीण दोषांच्या लक्षणांची संपूर्ण चिकित्सा दोषवृद्धीच्या दृष्टीनेंच सांगितली आहे असें स्पष्ट दिसतें.

रस-रक्त-मांसादि धातु आणि विण्मूत्रादि मल यांच्या वृद्धि-क्षयाच्या दृष्टीनें जेव्हां चिकित्सा करावयाची त्यावेळीं मात्र धातु आणि मल यांच्या वृद्धि-क्षीणतेची मीमांसा करावीच लागते. दोषक्षय आणि वृद्धि यांचें तारतम्य पाहण्याचे प्रसंग कोणते हें मी आयुर्वेदपत्रिकेच्या ता. १६ एप्रिल १९५४ अंकांत दिलें आहे.

चिकित्सेंत जसा फरक नाहीं, तसाच निदानांतहि नाहीं।

"तिक्तोषणकषायाल्परूक्षप्रमितभोजनैः" इत्यादि कारणांनीं कफ-पित्ताचा क्षय होतो असें सांगितलें. परंतु त्याच कारणांनीं वात वाढतो असें सांगितलें. तेव्हां निदान-चिकित्सेंत वृद्धीची भाषा वापरावयाची कीं क्षीणतेची? असा प्रश्न आला असतां, वृद्धीचीच भाषा जास्त व्यापक, मूलगामि, सोप-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ातिक ठरते, म्हणून वैद्यांच्या व्यवहारांत तीच भाषा रूढ आहे व शास्त्रकारांनी सुद्धां तिचाच व्यवहार केला आहे.

सन्निपाताचे किंवा दोषक्षीणतेचे रोगी श्री. बागेवाडीकरांच्या कडेच चिकित्सेकरितां असताल व ते ूर्ण दुरुस्त होतात असें मुळींच नाहीं, इतर वैद्यांकडूनही ते उत्तम रीतीनें दुरुस्त होतातच.

“ दोषवृद्धीचे व क्षीणतेचे प्रकार ग्रंथकारांनीं कसे पाडले आहेत ” हें आष्टीकराबारख्या एखाद्या ैद्यानें पाहिले नसतीलही कदाचित्; म्हणून बाकीच्या विरोधकांनीं ते पाहिले नाहींत अशी कल्पना करूं ये. वृद्ध-क्षीण दोषांच्या तारतम्याचीं लक्षणें एखाद्या वैदिकाप्रमाणें तोंडपाठ म्हणण्याचा अभ्यास श्री. ागेवाडीकरांनीं केला असेल; परंतु त्यांची उपपत्ति कशी लागते यासंबंधीं एखादें उदाहरणपूर्वक विवेचन ात्र आपल्या एवढ्या प्रदीर्घ लेखांत त्यांनीं कोठेंच केलें नाहीं.

श्री. बागेवाडीकरांनीं ता. १ जुलै १९५४ च्या अंकाच्या २६ व्या पृष्ठावर प्रतिवादी म्हणून व्यक्तिशः ाझ्यावर कांहीं आक्षेप घेतले; परंतु ते विपर्यस्त व अगदींच क्षुद्र असल्यामुळें त्याचें उत्तर देण्याचें कारण ाही. खरोखरच आक्षेप घ्यावयाचे होते किंवा खंडण करावयाचे असते तर माझ्या लेखांतील एक एक ुद्दा क्रमानें घेऊन खंडण करावयास पाहिजे होते, आणि माझी तशी अपेक्षाही होती. असो !

विद्याबन्धूंना शेवटचें निवेदन

व्यवसाय-बंधु तसेंच विद्या-बंधु श्री. बागेवाडीकर यांना एवढेंच सांगावयाचें आहे कीं:—

“ मुक्त्वैवं वादसंघट्टं अध्यात्ममनुचिन्त्यताम् । ना ऽ विधूते तमःस्कंधे ज्ञेये ज्ञानं प्रवर्तते ॥ ”

असा चरकाचार्यांचा उपदेश आहे. तेव्हां “ क्षयजन्यावस्थानां विचारः उपलब्धेषु ग्रंथेषु नोपलभ्यते, ेन अनुमन्यामहे यद् इमे आयुर्वेदग्रंथाः अपूर्णांगाः । ” हें आपलें विधान योग्य नाहीं. वाग्भट-चरक-ुश्रुत यांना दोषांची क्षीणावस्था डोळ्यांसमोर प्रत्यक्ष दिसत असतां त्यांनीं त्यासंबंधीं विचार कां केला नाहीं ? ामुळें कांहीं न्यूनता येते कां ? आणि येत असेल तर त्यांनीं कशी भरून काढली ? याचा पूर्ण विचार त्यांनीं ारावा. प्रत्येक शास्त्रकारानें संपूर्ण ग्रंथांत दोषवृद्धीचीच भाषा कां वापरली ? रोगनिदान व चिकित्सा वृद्ध-ोषावरच कां उभारली ? यासंबंधीं मनन करावें.

शास्त्रकारांनीं दिलेल्या ज्ञानावरच पांडित्य गाजविणें, प्रतिष्ठा मिळविणें, उदरनिर्वाह करणें चालूं आहे. तेव्हां त्यांच्यासंबंधीं कृतज्ञता बाळगण्याऐवजीं त्यांनीं रचलेले ग्रंथ अपूर्ण आहेत, असें म्हणणें कृतघ्न-ाणाचें नव्हे कां ? “अल्पमति”, “अबुध” इत्यादि अश्लाघ्य शब्दप्रयोग वादामध्यें प्रतिपक्षाविषयीं वापरणें, ं कदाचित् ठीक होईल. परंतु शास्त्रकारांनाच अपूर्ण ठरविण्याचा प्रयत्न करणें आणि तेंही त्यांच्याच ्का अनुयायी वैद्यानें ! हें कृत्य योग्य नाहीं असें मला वाटतें.

इति शम् ।

पवित्र नेपाल कस्तुरी रु. ४४ तोला,
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहाः—नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाल

सर्वांना मान्य झालेला उपयुक्त ग्रंथ
घरगुती औषधें किं. ५ रु.
हा ग्रंथ आपल्या घरीं अवश्य पाहिजे. त्याच्या वाचनानें घरांतील स्त्रिया सुद्धां छोटे छोटे प्रयोग वापरू शकतात, व आरोग्याचा लाभ होतो.
व्य. वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार—

चित्ते तुष्टे घातवो यान्ति साम्यम्।

" ता. १ सप्टेंबरची पत्रिका साभार पावली. प्रत्येक अंक पानोपानीं उपयुक्त करण्यांत आपलें संपादकीय कौशल्य प्रशंसनीय आहे. पत्रिकेची उपयुक्तता व भरभराट उत्तरोत्तर होवो.

या अंकांत केंद्रीय सरकारचा ' दुर्नीती ' ला तोंड फुटलें ! कोणीतरी मांजराच्या गळ्यांत घंटा बांधणें अवश्य आहे. विधर्मी, कट्टर अशा २ जीर्ण खोडांना सांभाळून गोरक्षण व आयुर्वेद यांची उन्नति करावी लागेल. त्यासाठीं वैद्य-वर्गांनीं संघटित होऊन वेळ पडली तर सत्याग्रहहि करणें प्राप्त होईल.

अग्निदग्ध-चिकित्सा या पेनिसिलिन-वेड-कालांत बोधप्रद आहे. वैद्य बोरवणकर यांचा शुद्धायुर्वेदाभिमान इतरांनीं धडा घेण्यासारखा आहे. बालमूत्राचा बाल-आंकडीवरील उपचार सर्वांना करून पाहण्याइतका सोपा आहे.

वैयक्तिक उल्लेख टाळावेत

दोषक्षयज रोगोद्भव यासंबंधीं चाललेलें वाग्युद्ध ' तत्त्वबोध ' करतें, पण जरा वरच्या पातळीवर म्हणजे वैयक्तिक उल्लेख टाळून झाल्यास उत्तम.

' संग्रहणीवर दहिवड्यांचा औषधीय उपयोग होऊं शकतो ' यावरील आपलें संपादकीय विवेचन शास्त्रीय व व्यवहार दृष्ट्या योग्यच आहे. माझ्या मतें त्यांत थोडा मानसिक भागहि येतो. आत्माराम प्रसन्न झाला-मन संतुष्ट झालें-कीं रोगावर त्याची प्रतिक्रिया होणारच. जसें ' चित्ते नष्टे धातवो यान्ति नाशम् ' तसेंच ' चित्ते तुष्टे धातवो यान्ति साम्यम्' होत असावें, असा तर्क अनाठायीं होईल काय ?

वैद्यकीय शास्त्रांत ' क्षारोपचार व आयुर्वेद ' हे दोन्ही व्यवहारतः निसर्गोपचारांत गणतां यावेत असे आहेत. त्यांचा प्रसार होऊन ' सर्वे सन्तु निरामयाः ' हीच प्रार्थना. "

—डॉ. र. कृ. गर्दे

आयुर्वेद पत्रिकेचे
किरकोळ अंक विक्रीची व्यवस्था

गिरगांव व दादर (मुंबई), पुणें, कोल्हापूर, आणि नागपूर येथें आयुर्वेद पत्रिकेचे अंक विकत मिळण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. अंक मिळण्याचे पत्तेः—

(१) श्री बी. डी. बागवे, न्यूजपेपर एजंट, गोरेगांवकर बिल्डिंग, खटाववाडी, गिरगांव, मुंबई ४

(२) सर्यकिरण फॉर्मसी विक्री केंद्र, १७३ गिरगाव मुंबई नं. ४

(३) देव्हारे सर्वौषधि संग्रहालय, दादर मुं. २८

(४) किरण मेडिकल सर्व्हिस, नगरकर तालिम चौक, लक्ष्मीरोड, पुणें नं.२

(५) अंबा मेडिकल अन्ड जनरल स्टोअर्स, महाद्वाररोड, कोल्हापूर

(६) श्री माधवराव परांडे, औषधाचे व्यापारी, महालरोड, नागपूर.

वाचकांनीं वरील व्यवस्थेचा अवश्य फायदा घ्यावा. व्यवस्थापक

उपयुक्त अभ्यासनीय ग्रंथ
गोविंदसेन कृत
वैद्यक परिभाषाप्रदीप
किंमत १॥ रु. ट. ख. निराळा
वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मलेरियांत वनजाई रामबाण

लेखक
आर्यवैद्य श्री. वि. चिटणीस

सुप्रसिद्ध ॲलोपाथ व भारतीय वनस्पति-संशोधक डॉक्टर वामन गणेश देसाई यांचें, पुणें येथें झालेल्या आठव्या अखिल भारतीय आयुर्वेद संमेलनांत ता. २५-२-१९१७ रोजीं "आयुर्वेदिक वनौषधें" विषयावर व्याख्यान झालें. त्याचा सारांश ता. १-३-१९१७ इ.च्या वैद्यक पत्रिकेंत छापलेला आहे.

एग्यु स्पेसिफिकचे घटक

सदर व्याख्यानांत कै. डॉ. देसाई यांनीं वनजाईचा मलेरिया व पाळीच्या ज्वरांवर फारच उत्तम उपयोग होत असल्याचें सांगून, पेटिट यांचें 'एग्यु स्पेसिफिक' नांवाचें सुप्रसिद्ध औषध फक्त वनजाई-(रानजाई)बरोबर सुंठीचा अर्क मिश्र करून बनविलेलें असतें; तें उत्तम गुणदायी आहे व त्यामुळें त्याचा खपहि उत्तम होतो, असेंहि वर्णिलें आहे.

दुर्मिळ ग्रंथ "औषधीसंग्रह"

त्यानंतर दहा वर्षांनीं, सन १९२७ मध्यें, एक हजार भारतीय वनौषधींवरील ८८० पानांचा "औषधी-संग्रह" हा त्यांचा सुप्रसिद्ध व आतां दुर्मिळ झालेला मराठी ग्रंथ छापून प्रसिद्ध झाला. गेल्या २५ ३० वर्षांत शेकडो वैद्य–डॉक्टरांनीं या ग्रंथांतील प्रयोगांचा प्रभूत अनुभव घेऊन धन व कीर्ति मिळविली आहे. या ग्रंथांत पान ५६८ वर वनजाईचा त्यांनीं एक पाठ दिलेला आहे, तो असा:—

वनजाईचा एक पाठ

सावलींत सुकविलेलीं वनजाईचीं पानें १५ तोळे, सुंठ ३ तोळे, मिरपूड ३ तोळे, गांवठी कडक दारू ६० तोळे, मिश्रण करून १५ दिवस ठेवून गाळून घ्यावें. मात्रा १/४ ते १/२ ते तोळा, लहान मुलांना १ ते ५ थेंब. पानें पुष्कळ दिवस टिकत नाहींत म्हणून त्यांचा असा अर्क काढून ठेवणें चांगलें.

वनजाईचा काढा सांगितला

मात्र, सदर वैद्य संमेलनाचे वेळीं त्यांनीं वनजाईचा जो पाठ सांगितला तो अर्काचा नसून काढ्याचा आहे, तो असा:— २ तोळे रानजाईचीं पानें अथवा साल, -॥- तोळा मिरी, -।- तोळा सुंठ, याप्रमाणें घेऊन त्यांत -॥- शेर पाणी घालून अर्धापाव उरवावें व दिवसांतून दोन वेळां द्यावें.

वनजाई कोठें आहे ?

दारूबंदीच्या या युगांत काढ्याचा उपयोग करता येईल, अगर त्या वनस्पतीचे आसव अरिष्ट करून वापरतां येईल.

वनजाईचा उपयोग मलेरियांत करून वैद्य-बांधवांचे सेवेसाठीं हे अनुभव प्रसिद्ध करण्याचे आम्हीं ठरविलें आहे. आमच्या कोल्हापूर जिल्ह्यांत ही वनस्पति नाहीं. तरी ती असलेल्या भागांतील वैद्यांनीं आम्हांस कळवावें. वरील पाठाचा अनुभवहि घ्यावा व तो आयुर्वेदपत्रिकेकडे पाठवावा.

—आर्यवैद्य श्री. वि. चिटणीस
पो. हलकरणी, जि. कोल्हापूर

तारेचा पत्ता:–Newbottle
कें. के. शहा अँड कंपनी
बाटल्यांचे व्यापारी
(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)
रिकाम्या बाटल्या, बुचें, कॅपसुल्स्
[हेअर ऑईल, सरबतें, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाचीं सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे
ठोक व किरकोळ
विक्री करणारे व्यापारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैद्य पं. प्यारेलालजी शर्मा

यांचा सत्कार-समारंभ

स्व. वैद्य पं. हरिप्रपन्नजी स्मारक धर्मार्थ औषधालयांतील ख्यातनाम चिकित्सक व सदर संस्थेच्या सरकारमान्य शुद्ध आयुर्वेद विद्यालयांतील मुख्याध्यापक वैद्यराज पं. प्यारेलालजी शर्मा आयुर्वेदाचार्य हे वरील संस्थेंत १५ वर्षे सेवा केल्यानंतर निवृत्त होत असल्यामुळें त्यांच्या सन्मानार्थ मुंबई येथें, मालाड नगरपालिकेचे अध्यक्ष श्री. चिमणलाल जे. शाह यांच्या अध्यक्षतेखालीं सत्कारसमारंभ साजरा करण्यांत आला. उपस्थित मंडळीपैकीं कांहीं वैद्यवर्यांचीं पं. प्यारेलालजी शर्मा यांच्या कार्य-गुण गौरपर भाषणें झालीं. त्याप्रसंगीं पं. शिवशर्मा यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें कीं, मुंबई सरकारकडून युनिव्हर्सल हेल्थ इन्स्टिटयूटमध्यें २० रुग्णशय्या आयुर्वेदासाठीं मोफत ठेवण्यांत येणार आहेत.

रोग्याशीं समरस होणारे वैद्य

अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत वैद्य पं. प्यारेलालजी हे अतिशय सरळ-स्वभावी, सुहृदय व उदार अंतःकरणाचें असल्याचें सांगून, रोग्याशीं ते इतके तन्मय होत कीं, जणूं कांहीं ते आपला आत्माच रोग्याच्या आत्माशीं समरस करीत आहेत असें वाटें, असें वर्णन केलें. त्यानंतर हिंदी साहित्य संमेलनाचे मंत्री श्री. उपाध्याय यांनीं अभिनंदन-पत्र वाचून दाखविल्यावर तें अध्यक्षांनीं वै. पं. प्यारेलालजी यांना समर्पण केलें.

जनता जनार्दनाच्या सेवेस सदैव तत्पर

उत्तरादाखल केलेल्या भाषणांत वैद्य पं. प्यारेलालजी यांनीं सांगितलें "कीं, मी ह्या महानगरीच्या जनता-जनार्दनाची सेवा करण्यास सदैव तत्पर आहे."

समारंभास बरेच सन्मान्य नागरिक व विद्वान् वैद्य मंडळी उपस्थित होती.

आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारीं

आयुर्वेदिक व युनानी वनौषधि

तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण !

अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक खाका, माणिक, अकीक, सुवर्ण-वर्ख, रौप्य-वर्ख, शिंपा, कवड्या, शंख, प्रवाळ, आवळसार, गंधक, दगडीबेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, वाकेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलटकंबल, नागकेशर, (अस्सली), ब्राह्मी, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारची वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्ट्य ! विशेष माहितीसाठीं आमचे साप्ताहिक दरांचे छापील भावपत्रक मागवावें.

टे. फो. नं. ३१७९६ टेलिग्रॅम-आयुर्वेद

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी

२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रोगचिकित्सेंत पथ्याचें महत्त्व

लेखकः-डॉ. दा. म. भोसेकर
एल्. एम्. अँड एस्. हैद्राबाद

(आयुर्वेदीय दृष्ट्या : विशेषतः डॉक्टर बंधूंकरतां)

One man's meat is another man's poison अशी एक इंग्रजींत म्हण आहे; म्हणजे व्यक्ति तितक्या प्रकृति असतात, असेंच ठरतें. बरें ! पण ह्या व्यक्तींचें भिन्नत्व कशावरून ठरवावयाचें ? तर प्रकृतीवरून; व ही प्रकृति कशावरून ठरवावयाची तर शरीरस्थ दोषांवरून. असें सोपपत्तिक उत्तर, आयुर्वेद-युनानीशिवाय सध्यां प्रचलित असलेल्या कोणत्याहि पॅथीनें दिलेलें आहे असें मला तरी वाटत नाहीं.

सात प्रकारची प्रकृति

आयुर्वेदानें मुख्यतः तीन दोष, तिन द्वंद्वें व एक सन्निपात मिळून मानवी प्रकृति सात प्रकारची असल्याचें सांगितलें आहे. ह्या प्रकृतींत आईबापां-कडून आलेलाच वारसा जास्त असतो. मनुष्य कोणत्या प्रकृतीचा आहे, हें त्याच्या शरीरठेवणी, बांधणी, रंग, आवडी-निवडी ह्यावरून ठरवतां येतें. दोषांतील बदल पूर्वी नाडीपरीक्षेवरून अगदीं योग्य रीतीनें ठरवण्यांत येत; कारण निसर्गनियमाप्रमाणें दोषांत व रक्तांत झालेला बदल सारखाच असावयाचा. दोषांच्या तरतमभावाचें स्वरूप नाडीवरून ठरवित हें खालील श्लोकावरून कळेल:—

प्रातः स्निग्धा शिरा ज्ञेया मध्यान्हेऽप्युष्णतान्विता ।
सायान्हे धावमाना च सदा रोगविवर्जिता ॥

येथें कफ, पित्त व वाताचें लक्षणात्मक अस्तित्व दाखविलें आहे.

घरोघर अर्धवट संपलेल्या बाटल्या

जगताच्या उत्पत्ति, चलन व विनाशास जसे त्रिगुण कारणीभूत आहेत, तसेंच मानवाला त्रिदोष आहेत, हा आयुर्वेदाचा ठाम सिध्दांत आहे. एकूण काय त्रिगुण, त्रिधातु व त्रिदोष एकच कार्य करतात. म्हणजे जगांतील सर्व स्थावरजंगम पदार्थांच्या उत्पत्ति-विनाशाचें हेंच मूळ कारण समजण्यांत येतें. प्रकृतीचे आणखी सूक्ष्म प्रकार आहेत. म्हणून सर्व रोग्यांना एकच पेटंट औषध लागूं पडत नाहीं. अर्धवट औषध संपलेल्या बाटल्या आज घरोघरीं दिसत आहेत त्या यामुळेंच !

साखर कफाला वाढविते

आयुर्वेदशास्त्रानें सर्व रोगाच्या उत्पत्तीचें कारण, दोषांतील समतोलपणाचा बिघाड, असें सांगितलें आहे. दोषांत बदल, देश, काल (युगधर्मानुसार), ऋतु, प्रकृति, वय व दिनमान ह्याप्रमाणें, सतत पण ठराविकपणें होत असतो. मनुष्याच्या आहार-विहार व मनोविकारानुरूप (पूर्वकर्म व ग्रहमाना-नुरूपहि) त्यांत बदल होतो. त्याचा सिद्धांत असा कीं, समगुणी दोष आपल्या गुणाची वृद्धि करतात, तर विरुद्धगुणी त्यांचा नाश करतात. जसें साखर कफाला वाढवतें तर तिखट त्याचा नाश करतें. वाताला स्निग्ध-उष्ण, पित्ताला थंड-गोड, व कफाला उष्ण व रूक्ष असें खानपान आवडेल. वाताला पित्ताचें व पित्ताला वाताचें आवडणार नाहीं. म्हणून वात, पित्त, कफ, प्रकृतीच्या माणसाला कांहीं गोष्टी आवडतात तर कांहीं नको असतात, हें नैसर्गिक आहे.

हें रोगाला कारण घडतें

पण मनुष्याच्या सारासार शक्तिविरुध्द त्याचा तोल सुटून त्याच्या हातून प्रज्ञापराध घडतो. व हेंच रोगाला कारण ठरतें. म्हणजे प्रकृति, रोग, ऋतु या-विरुध्द आहार, जागरण, पार्ट्यांतील खाद्यपेयांचें आग्र-हानें अतिसेवन किंवा अत्यन्त उपास पडणें हीं याचीं कारणें म्हणतां येतील. रोग होणें ही मनुष्याला एक-प्रकारें शिक्षाच असते. त्यानन्तर त्याला संयम आठवतो व तो रोग बरा होण्याकरितां वैद्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वगैरेची शरणगति पत्करतो. रोग नीट होण्याला औषधापेक्षां पथ्यालाच जास्त महत्व दिलें गेलें आहे. कारण उघड आहे. रोग्याला आपली चूक समजल्याबरोबर त्यानें आपलें आचरण सुधारावें म्हणून रोगोत्पादक दोषांची 'आवक प्रथम कमी करा' म्हणजेच 'पथ्य करा' असें सांगण्यांत येतें.

हेंच तें रोग चिकित्सेचें तत्त्व

जसें, शत्रुसैन्य सरहद्द सोडून एखाद्या देशांत आक्रमण चालूं ठेवील तर 'नरदेह नगरी' काबीज करण्यास त्याला वेळ तो कितीसा लागणार? मग देशांत शांतता व सुव्यवस्था कशी राहील? त्यासाठीं आधीं अपायकारक आयात थांबवणें अगदीं जरूर असते. त्यानंतर देशांत वावरत असलेल्या देशद्रोही व समाजद्रोही अशा शत्रुसैन्यास (हेरास) निवडून काढून वाटे लावणें सोपें जातें. हेंच तें रोगचिकित्सेचें तत्त्व.

....उत्तम धर्म....

जनतेची सेवा करणें हा मनुष्यमात्राचा धर्म आहे. त्यांतहि आजारी माणसाची सेवा करणें हा अति उत्तम धर्म होय. उत्तम गुणकारी औषध देऊन रोगाचें निवारण केल्यानें रोगी माणसाची सेवा उत्तम घडते.

अशी सेवा करण्यासाठीं उत्तम व अस्सल औषधेंच वापरलीं पाहिजेत. अशा खात्रीच्या औषधी खरेदी करण्याचें स्थान—

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स

पायधुनी मुंबई नं. ३

(टेलिफोन नं. ३१८५८) हेंच आहे.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें

मुख्य केंद्र

अध्यात्मशास्त्रांतहि पथ्यावर जोर

अध्यात्मशास्त्रांतहि पथ्यावरच जास्त जोर दिला आहे. "ज्यानें विठ्ठलमात्रा घ्यावी, त्यानें पथ्यें सांभाळावीं" असें आपल्या साधुसंतांनींहि सांगितलें आहे. अशीं पथ्यें नीट सांभाळलीं तर देव काय दूर आहे! असेंहि ते म्हणतात. म्हणजे त्यांच्यांत पण पथ्याला इतकें महत्व आहे. पण आज पथ्याबद्दल किती अनास्था, बेफिकीरपणा दिसत आहे! पाश्चात्यवैद्यशास्त्रविशारद या विषयाची हेटाळणी करतांनाही आढळतात. अशांची कींव करावीशी वाटते. कारण तो त्यांचा दोष नसून त्यांच्या शास्त्रसिद्धांतांतील ती एक उणीव आहे. उदा... आंवेच्या परसाकडेवर ताक, मोसंबीचा रस किंवा साबुदाण्याची लापशी पथ्य म्हणून घेण्यास सर्रास सांगण्यांत येतें. तर टायफॉइडसारख्या रोगांत पथ्याची एक लांबचलांब यादी देण्यांत येते. तींत Milk, Egg, Flip, Tea, Coffee, Soup, Ovaltine अशासारखे पातळ पदार्थ असतात.

डॉक्टरी सिद्धांत अस्थिर आहे

डॉक्टरी सिद्धान्त असा कीं, रोग्याची शक्ति टिकविण्याकरितां त्याला कांहीं ना कांहीं तरी पातळ पदार्थ द्यावेत. पण त्याचा परिणाम काय होतो, हें अशीं पथ्यें करणारे किंवा करविणारे आपल्या अनुभवावरूनच जास्त सांगूं शकतील. मुख्य म्हणजे डॉक्टरी तत्वच, रोगनिदानाचिकित्सेबाबत तरी अद्याप अपुरेंच आहे. त्यांचा सिद्धांत अस्थिर आहे. पण ह्यालाच ते प्रगतीपर सिद्धांत म्हणतात. म्हणूनच रोगाचें मूळ कारण कधीं जन्तु मानण्यांत येतें तर कधीं शारीरिक प्रतिकारकशक्तीची कमतरता, तर कधीं व्हिटॅमिनची कमतरता असें मानण्यांत येतें; व त्याप्रमाणें चिकित्सा, कधीं आयुर्वेदाप्रमाणें क्षेत्राचिकित्सा (ग्राउंड थिअरी) किंवा बायोकेमिकची भरणाचिकित्सा याप्रमाणें, अशी गोळाबेरीज करून (इतर पॅथीजची तत्वमिश्रित) अशी असलेली दिसते. तिला ते 'मॉडर्न थिरॅप्युटिक्स' म्हणतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होमिओपॅथी व बायोकेमिक पद्धति

होमिओपॅथी बायोकेमिक ही जवळजवळ ॲलोपॅथी-खीच आहेत. हींत लाक्षणिक चिकित्सा असल्या-पुष्कळ वेळां चूक होते. तींत चिकित्सेच्या दृष्टीनें च शब्दजंजाळ आहे एवढेंच! परन्तु अन्तिम किंत्सा आयुर्वेदिक तत्वाप्रमाणेंच झालेली दिसून ले. आयुर्वेद चिकित्सेंत या दोन्ही पॅथीजचा समा- असून तिच्यांतील वैशिष्ट्य म्हणजे वाढलेल्या ांचा निचरा करणें व कमी असलेल्या दोषांची करणें हें आहे. दोषात्मक चिकित्सेंत प्रथम लंघन-चन- पथ्य देऊन दोष पक्व करावयाचे. नन्तर धन व औषध देणें असा क्रम असतो. रोगाच्या क्व दशेंत औषध देत नाहींत.

होमिओपॅथीचें तत्व 'समः समं शमयति' णजे 'कांट्यानें कांटा काढणें' अशा प्रकारचें हे असें म्हणतात; पण चिकित्सा मात्र रोगकारक औषधांच्या सूक्ष्म प्रमाणानें केली जाते, म्हणजे /५०० किंवा १०००X या मात्रेनें. पण त्या क्ष्म औषधांत -ज्याला ती पॅथी मोठा डोझ म्हणते-ट क्रिया करण्याचा गुणधर्म असतो. जसें Vin-pecac च्या दहा थेंबानें उलटी होते तर त्याच षधाच्या एका थेंबानें उलटी थांबते हा अनुभव हे. मग असल्या १०००X मात्रेंत 'कांट्याच्या' मगुणाचा अंश तरी राहतो कां!

शरीरस्थ न्यून औषाधिभरण चिकित्सा

बायोकेमिक समजण्यास जरा जास्त सोपी आहे. तिचें तत्व, "शरीरस्थन्यूनऔषधीभरण" असें आहे. जसें जलदोषास (आयुर्वेदाप्रमाणें-पडशास) Nat. Mur. देतात. म्हणजे कफास उष्ण औषध दिलें जातें. पण म्हणायचें मात्र असें कीं; (उष्णता या) दोषाचा अभाव म्हणून मीठ देण्यांत आलें. हीच ती 'पूरक चिकित्सा'. वरील पॅथीचें मूळ तत्व म्हणजे रोग व त्यावरील औषध योग्य प्रमाणांत असणें. ज्याला थोडक्यांत 'मॅचिंग' म्हणतां येईल असें तें आहे.

म्हणजे एका वर्तुळावर दुसरें वर्तुळ अगदीं तंतोतंत, बरोबर बसवणें. पण हें साधत नाहीं. कारण दोषाचें अंशप्रमाण व औषधांचें अंशात्मक प्रमाण बरोबर ठरविण्यास त्यांचेजवळ कांहीं साधन नाहीं. म्हणजे बरोबर माला ठरवितां येत नाहीं. मग मात्रा खालींवर करीत बसावें लागतें. शेवटीं अचूकपणा जमत नाहीं तो नाहींच. कारण उघड आहे. प्राकृतिक दोषसाम्य अपुऱ्या विरुद्ध गुणांनीं साधत नाहीं. एकूण ही चिकित्सा आयुर्वेदीय शमनाचिकित्साच ठरते. ही कमी खर्चाची व औषधेंहि घेण्यास सुलभ अशीं असलीं तरी आयुर्वेदाइतकी—त्याला दोषसाम्य-चिकित्सा (Balancing) म्हणतात—ती पूर्ण नाहीं.

आयुर्वेदीय औषधास पथ्याची जोड

आयुर्वेदिक औषधें म्हणजे काढे, आसवें इ. जास्त टिकाऊ, घेण्यास सुलभ व कमी खर्चाचीं नाहींत कां? आयुर्वेदिक औषधास पथ्याची विशेष जोड असल्यानें समतोलत्व चांगलें साधतां येतें. पथ्य म्हणजे आरोग्याला हितकर असे पदार्थ घेणें व अहितकारक (कुपथ्य) पदार्थांचा त्याग असें सांग-ण्यांत येते. त्याचा सिद्धांत असा कीं, समान गुणी औषधानें किंवा पथ्यानें ते दोष वाढतात व विरुद्ध गुणानें कमी होतात. पथ्याचें महत्त्व इतकें आहे कीं, ह्यावांचून केलेली औषधी चिकित्सा निष्फळच ठरावी.

"विनापि भेषजं व्याधिः पथ्यादेव निवर्तते ।
न तु पथ्यविहीनस्य भेषजानां शतैरपि ॥"

आयुर्वेद चिकित्सेचें हें दुसरें वैशिष्ट्य आहे. पण अशा त्या पथ्याची उपेक्षा केल्यानें रोग नीट होण्या-ऐवजीं वाढत आहेत कसें ते पहाः—

एकदां माझे जवळचे एक नातलग सकाळीं साडेसहाच्या आधींच, मला भेटण्यास आंत आले (कारण सरकारी नोकरीतील सकाळीं ७ ही माझी ड्युटीची वेळ होती.) ते म्हणाले "मला आंवेच्या विकारानें फार हैराण केलें आहे. (Inflamation in intestine due to Amoeba पित्ताधिक्य) एका डॉक्टराचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इलाज चालू आहे. दोन दिवसापासून त्यांच्या सांगण्याप्रमाणें मोसंबीचा रस व साबुदाण्याच्या लापशी-वर आहे. त्यांनीं दिलेले मिक्श्चरही घेत आहे; पण गुण नाहीं. काल संध्याकाळीं जोंधळ्यांची भाकरी व ताक खाण्यास सांगितलें. थंड पथ्य, पण त्यामुळें उलट आजार जास्तच झाला आहे. तुम्हीं तरी पहा काय भानगड आहे ती."

तुपातला शिरा व लिंबाचें लोणचें

पावसाळी दिवस (वातप्रकोपकाल) सुरू झाले होते, पण हवेंत उकाडाहि होता. त्यांची सर्व हकीकत मी लक्षपूर्वक ऐकली. नंतर थोडा विचार करून मी त्यांना सांगितलें कीं, "आज दिवसांतून तीन वेळां चांगल्या तुपांतला शिरा खा. (वातनाशक= उष्ण), जुनें लिंबाचें लोणचें तोंडीं लावण्यास घ्या. (उष्ण व पाचक) आणि खाणें झाल्यावर एक एक गोळी पाण्याबरोबर घ्या" असें म्हणून त्यांच्या हातावर तीन क्विनिनच्या गोळ्या (२ ग्रेनच्या) ठेवून त्यांना वाटेला लावलें. येतांना दवाखान्यांतून औषध आणीन असें सांगायला विसरलो नाहीं. दुपारीं जेव्हां ते औषध न्यायला आले तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, मी अर्ध्याच्यावर नीट झालों आहे. नंतर त्यांना मी दिलेल्या क्विनिन- क्लोरोडीनच्या मिक्श्चरनें पूर्ण बरें वाटलें. मिक्श्चर पाचक, अग्निदीपक, स्तंभक व वातनाशक होतें. इतकें विस्तारानें लिहिण्याचें कारण हें कीं दोषाला धरूनच केलेलेंच पथ्य व उपचार बरोबर ठरतात. लक्षणात्मक चिकित्सेनें फसगत तर होतेच, पण योग्य पथ्याभावीं रोग कसे वाढतात एवढेंच येथें दाखवायचें आहे.

आज हिंदुस्थानांत तरी पथ्याची प्रथा मूळ धरून आहे. त्याचें कारण युनानी पद्धतीचा येथील बऱ्याच दिवसांचा प्रसार हें होय. युनानी पद्धति ही दोषावरच अवलंबून आहे; म्हणूनच एखाद्या मुसलमान रोग्याला औषधसूचि लिहून दिल्याबरोबर तो पहिला प्रश्न विचारतो, "डॉक्टरसाब, अब परेज (पथ्य) बताइए." मामुली दुखण्यावर "सब खा सकते" म्हणून सांगतां येते. पण संततासारख्या दीर्घ मुदतीच्या ज्वरांत जेव्हां असा प्रश्न येतो तेव्हां मनाला थोडें गोंधळल्यासारखें होतें. पण नेहमींच्या सरावाप्रमाणें "दूध, मोसंबीका रस, साबूदाना ऐसी कुछ भी पतली चीज दे दो" असें सांगणें धोक्याचें असतें. कारण वरील प्रकारचें पथ्य सांगण्यांत दोषाचा विचार मुळींच केलेला नसतो. म्हणून अयोग्य पथ्यानेंच रोगी दगावतो.

प्रश्न विचारून भंडावून सोडतो

बरें, रोग्याच्या नातलगाकडे पाहावें तर तो, रोग्याला पथ्यामध्यें कांहीं सूट मिळावी म्हणून, डॉक्टराला अनेक प्रश्न विचारून भंडावून सोडतो. "थोडी खिचडी देना क्या ? और थोडा आचार भी ?" एवढें तरी विचारल्याशिवाय तो रहात नाहीं. ह्यावरून तो रोग्यांकडून पथ्याचें किती पालन करविल हें उघड दिसतेंच. अशा ठिकाणीं, रोग्याकडून योग्य पथ्य नीट न पाळलें गेल्यास त्याचा काय परिणाम होईल हें डॉक्टरनें स्पष्ट व निक्षून सांगावें. एकूण रोग्याची शुश्रुषा करणारास व डॉक्टरलाहि पथ्याची योग्य माहिती असणें किती अगत्याचें असतें हें यावरून कळून येईल. संततासारख्या रोगांत औषधापेक्षां योग्य पथ्यावरच शंभर टक्के यश अवलंबून असतें हें विसरून चालणार नाहीं. पथ्यांत थोडीशी जरी चूक झाली तर बरा होत आलेला रोगी खात्रीनें दगावतो असें पाहण्यांत येतें. म्हणूनच परिचारक व डॉक्टर या उभयतांनीं रोग्याच्या जीवितासाठीं पथ्याची योग्य काळजी घेणें उचित आहे. पण हें पथ्याचें महत्त्व पटेल तर ना ! •

आयुर्वेदीय औषधी संशोधन
लेखकः-वैद्य वि. पु. धामणकर, आयुर्वेदभूषण
मराठी व हिंदी आवृत्ति. किंमत १ रु.
मिळण्याचें ठिकाणः-
वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार—

महाकुष्ठावर नागवधाख्यरस

मी गुरुवर्य हणमंतशास्त्री पाध्ये (कोल्हापूर) यांजकडे आयुर्वेदाचे अध्ययन करीत असता, भावप्रकाशांतील कुष्ठाधिकार सुरू होता तेव्हां गुरुजी म्हणाले " या प्रकरणांत नागवध करून तयार केलेलें औषध आहे, पण तो पाठ चालू (छापील) भावप्रकाशांत दिसत नाहीं. आम्ही अध्ययन केलेल्या पोथींत तो होता. पण माझी पोथी गहाळ झाली आहे.

मग आम्ही विचारलें " तो पाठ असलेली पोथी कोठें मिळेल ? " त्यांनीं सांगितलें " वैद्यवर्य अण्णाशास्त्री आराध्ये यांजकडील पोथींत तो पाठ आहे. तरी तुम्ही मी सांगितलें आहे असें त्यांस सांगून तो पाठ उतरून घ्या. "

त्याप्रमाणें आम्ही (मी, वै. मराठे, व वै. अभ्यंकर वगैरे) त्याजकडे जाऊन तो पाठ उतरून घेतला. त्यानंतर आजपर्यंत तें औषध करणेंचें मला जमलें नाहीं. व पुढें जमेलसें दिसत नाहीं. वैद्य मराठे (मिरज) यांनीं खटपट केली होती पण ती तितकी जमली नाहीं.

तरी आपणाकडे तो पाठ पत्रिकेंत प्रसिद्ध करण्यासाठीं पाठवीत आहे. ज्याला शक्य होईल तो करील, अगर आयुर्वेद सेवा संघाकडून तयार करणें असेल तर करावा. पाठ फार चांगला आहे असें श्री. गुरुजी म्हणाले होते.

हल्लींहि वैद्य आराध्ये (श्री. आण्णाशास्त्री यांचे नातू) यांच्याकडे ती भावप्रकाशाची पोथी आहे. जरूर वाटल्यास त्याजकडे पहावयास मिळेल.

अथ नागवधाख्यस्य रसस्य विधिरुच्यते ॥

यः पुरा मुनिवरैरुद्धृतो यश्चिकित्सकजनैः
समाहृतः ॥
यस्तु कुष्ठिपरमोपकारको नागमारणविधिः स
लिख्यते ॥

सुपक्कां स्थालिकामेकामाढकांबुधृतिक्षमाम् ॥
गुडचूर्णकृतैः पंकैरागलं लेपयेद्बहिः ।
गंधकं भिषगानीय शरावामितमुत्तमम् ॥
चूर्णयित्वा तदर्धं तु तस्यां स्थाल्यां प्रसारयेत् ।
शरावार्धस्य ताम्रस्थ पत्राण्यतितनूनि च ॥
स्थाल्यां यद्गंधकं तस्मिनुर्युपरिधारयेत् ।
शरावार्धस्य सीसस्य पत्राणि च तनूनि च ॥
धारयेत्ताम्रपत्राणामुपर्येव तथैव च ।
गंधकस्य शरावार्धं पत्राणामंतरांतरा ॥
दत्वा तस्यावशिष्टं तु विदध्यात्संधिमुद्रणम् ।
गुडं चूर्णं च खादिरं मिश्रयेत्तेन मुद्रयेत् ॥
मुद्रां संशोष्यतां स्थालीं चुल्यामुपरिधारयेत् ।
तदधो ज्वालयेदग्निं द्वादश प्रहरावधि ॥
स्वांगशीतं समुत्तार्य ततो निष्कास्य चौषधम् ।
शिलायां चूर्णयित्वा तु वस्त्रपूतं च कारयेत् ॥
त्रिद्रोणजलयोग्यं तु विशालास्यं महाघटम् ।
गुडचूर्णकृतैः पंकैरागलं लेपयेद्बहिः ॥
सर्पः षष्ट्यंगुलायामः सांध्रि षष्ट्यंगुलोऽथवा ।
फाणिकः कृष्णवर्णः स्यात् किंवा गोधूमवर्णवान् ॥
वधस्तस्य विधातव्यो यथा देहो न भिद्यते ।
तालकं सदलं यत्नात् चूर्णयेत् कुडवद्वयम् ॥
विषं पलमितं क्षुण्णं दत्वा दत्वांतरांतरा ।
हरितालस्य चूर्णेन पूरयेत् भुजगोदरम् ॥
विषं पलमितं क्षुण्णं बाकुचीं प्रस्थसंमिताम् ।
भल्लातकं सुपक्कं यत् प्रस्थं प्रस्थं यवं तथा ॥
सर्वाणि सम्यगास्तीर्य धारयेत्तन्महाघटे ।
तेषामुपरि सर्पं च धारयेत्कुंडलीकृतम् ॥
सर्पस्योपरि संच्छिद्य धार्याण्येतानि पीडनैः ।
सनालमर्कपत्रं तु शरावयुगलं क्षिपेत् ॥
स्नुहीदलं सनालं च क्षिपेत्प्रस्थमितं तथा ।
वटप्ररोहं प्रस्थं च कुमारीं प्रस्थसंमिताम् ॥
दत्वा पिधानं चूर्णेन गुडेन खदिरेण च ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुद्रयेत्सह वस्त्रेण मृदा कुट्टितयाऽपि च ॥
मुद्रां संशोष्य चूल्यां तु धारयेत्तं महाघटम् ।
तदधो ज्वालयेदग्निं याममेकं यथौदने ॥
ततो हठाग्निर्दातव्यो यावत्स्युः प्रहरा दश ।
पुनः प्रहरमेकं च वन्हिं दद्याद्यथौदने ॥
ततो लोहकटाहे तु शरावत्रितयोन्मिते ।
गोघृते प्रक्षिपेत् सर्वमौषधं यद्घटे स्थितम् ॥
दत्वाग्निं ज्वालयेत्तावद्यावदुत्तिष्ठते नलः ।
भेषजं च भवेत् श्वेतं ततस्तस्मिन् परिक्षिपेत् ॥
भृष्टायाः स्फटिकाख्याया द्वे पले तत्र निक्षिपेत् ॥
भृष्टस्य टंकणस्यापि पलयुग्मं च निक्षिपेत् ॥
ततः प्रहरमेकं तच्चालयेच्चुल्लिकोपरि ।
ततस्ताम्रं च सीसं च मिश्रयित्वावतारयेत् ॥
रसो नागवधाख्योयं विधिनानेन सिध्यति ।
आदौ गुंजामितं खादेत्तावन्मरिचसंयुतम् ॥
क्रमेण वर्धयेत्तावत् यावद्गुंजाचतुष्टयम् ।
वर्धयेन्मरिचं चापि तथैव हि यथा रसम् ॥
यवस्य पर्पटी भोक्तुं दद्याद्वा षष्टिकौदनम् ।
लवणं वर्जयेत्सप्तदिनानि गुणलोलुपः ॥
लवणं यः परित्यक्तुं न शक्नोति कथं च न ।
सैंधवं खादयेत्तेन तच्च सप्तदिनोपरि ॥
रसेनानेन नश्यंति कुष्ठानि सकलान्यपि ।
सन्निपाताश्च नश्यंति राजयक्ष्मादयस्तथा ॥

कोल्हापूर वै. ना. ज. पाध्ये

दसरा म्हणजे दशहरा

"दसरा म्हणजे दशहरा, असाहि अर्थ कांहींजण करतात. कान, नाक, डोळे, जीभ, त्वचा हीं पांच ज्ञानेंद्रियें, व हात, पाय, तोंड हीं तीन व मलमूत्र-विसर्जनाचीं दोन, अशीं पांच कर्मेंद्रियें, या दश (दहा) इंद्रियांना पूर्णपणें कह्यांत ठेवून जर आपण वागलो तर, वा या दश इंद्रियांना हरविलें तर आपल्याला मनोविजय मिळवितां येईल व तीच खरी विजयादशमी!"

—सोलापूर समाचार, दसरा विशेषांक

वैद्यराज पु. वि. धामणकर

वैद्यराज पु. वि. धामणकर (पनवेल) हे पाठीस होत असलेल्या विद्रधींनी गेले ३ महिने प्लॅस्टरमध्यें पडून होते. ता. ८ आक्टोबर १९५४ पासून ते मुंबई येथील लॅमिंग्टन रोडवरील नीलम मॅन्शनमधील युनिव्हर्सल हेल्थ इन्स्टिट्यूटच्या रुग्णालयांत (आयुर्वेद-विभाग) दाखल झाले आहेत. वैद्यरत्न पं. शिवशर्मा हे त्यांच्या विकारावर आयुर्वेदीय उपचार करीत आहेत.

हें रुग्णालय स्वस्तिक सिनेमागृहाजवळ असून येथील भेटण्याची वेळ सायंकाळीं ४ते५॥ अशी आहे.

'आयुर्वेदाच्या सेवेसाठीं तयार'

शास्त्रोक्त पद्धतीनें तयार झालेलीं सर्व-प्रकारचीं सिद्धौषधें [गुटिका, मात्रा, रसायनें, आसवें वगैरे] व हिंवतापांवर अत्युत्तम ठरलेलें हिंवतापांतक, मिळण्याचें एकच ठिकाण.

सविस्तर माहितीकरितां लिहाः—

आयुर्वेदीय औषधी भांडार
२८ शुक्रवार, तुळशीबागेची पिछाडी, पुणें २

बडोदा (गुजरात) येथें
आयुर्वेद सेवा संघ-नाशिक
या संस्थेचीं सर्व प्रकारचीं गुणकारी औषधें
मिळण्याचें ठिकाण
श्री. गणेश सिताराम जोशी
खेडकर फळिय, महंमदवाडी-बडोदा.
आपण एकवेळ अवश्य भेट द्या.

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाचे सभासद व्हा
व
वैद्यांची संघटना मजबूत करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाकेरी भाते व त्याचा औषधि उपयोग

(लेखकः—वै. ग. मा. करंबेळकर, डी. ए. एस्. एफ्. घोपेश्वर)

रत्नागिरी व कुलाबा या जिल्ह्यांत विशेषतः [डों]गराळ भागांत वाकेरीभातें या नांवाचीं झाडें [आ]हेत. याच्या मुळ्या औषधी उपयोगाकरितां [वाप]रतात व या भागांतील लोकांना त्यांचा चांगला [अ]नुभव आहे.

मुळ्या दुधांत शिजवितात

जमिनीमध्यें ५।६ फूट किंवा त्याहिपेक्षां अधिक [खो]ल खणल्यानंतर या मुळ्या उपलब्ध होतात. या [मु]ळ्या आणवून प्रथम त्याचे ४।५ इंच लांबीचे [तु]कडे करून चांगले वाळवावे व त्यानंतर गाईचे [दु]धांत शिजवून पुन्हां चांगले वाळवावे व मग औषधि [उ]पयोगाकरितां वापरावेत.

मुळ्या व कंद (गड्डा)

याप्रमाणें तयार केल्यानंतर साधारणतः एक [व]र्षपर्यंत मुळ्या टिकतात. या कोरड्या जागीं ठेवाव्यात. [या]चे मुळ्या व गड्डा (कंदस्वरूपी मूळ) असे दोन [प्र]कार आहेत. मुळ्या नेहमीं सांपडतात व कांहीं वेळेला [ज]मिनीमध्यें कंदरूप असा भाग (मूळ) सांपडतो. [त्या]लाच गड्डा असें संबोधतात. तो फार दुर्मिळ असतो. [प]रंतु गुणाला अत्यंत उपयुक्त असतो. मुळ्या रताळ्या-[स]ारख्या दिसतात व त्याहि गुणाला उत्तम असतात.

जाड मुळ्या किंवा पाळें असतात तीं गुणाला किंचित् कमी असतात.

या वनस्पतीचे ग्रंथोक्त गुणधर्म उपलब्ध [न]ाहींत. वनौषधि ग्रंथांत याबद्दलची माहिती किंवा गुणधर्म वाचनांत नाहींत, परंतु अनुभाविक गुणधर्म [ख]ालीलप्रमाणें आहेत.

सर्वसाधारण गुणधर्म

जीर्णज्वर (बारीक ताप), मूत्रविकार, हाता-पायांची आग, धातुक्षीणता, धुपणी (तांबडी व पांढरी), खर पडणें, रक्तदोष, वारंवार तोंड येणें, जुनाट व्रण (हाडीव्रण) यामध्यें यांचा चांगला उपयोग होतो. हें सौम्य असल्यामुळें बरेंच दिवस घ्यावें लागतें. कांहीं ठिकाणीं याचा पाक करून त्याचा औषधि उपयोग करतात. स्वप्नावस्था वारंवार होणें, त्यामुळें शरीर तप्त वाटणें, हातापायाची आग, झोंप कमी, बारीक ताप हीं लक्षणें असतां उत्तम उपयोग होतो.

वाकेरी भाते घेण्याचें प्रमाण व रीत

२ ते ३ माशे प्रमाण गाईचें दुधांत उगाळून साखर घालून दिवसांतून एक वेळ घेणें. भूक कमी असेल तर जोडीला अल्प प्रमाणांत सुंठ उगाळून घेणें.

स्त्रियांची धुपणी

धुपणी तांबडी किंवा पांढरी, त्यामुळें अशक्तता, हातापायाची आग, कमर दुखणें, हीं लक्षणें असतां वरील प्रमाणेंच दुधांत उगाळून पोटांत घेणें.

गंडमाळा

या विकारावर वाकेरी भातें पोटांत घ्यावें व बाहेरून लेप लावावा.

रक्तदोष

अंगाला खाज, उपदंशविष, वारंवार तोंड येणें याकरितां दुधांत अगर थंड पाण्यांत उगाळून घ्यावें.

जुनाट व्रण

पोटांत घ्यावें व व्रणावर बाहेरून लेप लावावा किंवा भिजवून पट्टी ठेवावी.

याप्रमाणें अनुभाविक गुण आहेत. तरी वैद्य-बंधूंनीं वाकेरीभातें वापरून त्याचा फायदा जनतेला द्यावा व अनुभव पत्रिकेद्वारा प्रकट करावा अशी विनंति आहे.

वाकेरी झाडाचें वर्णन

रानांत याचीं ५।६ फूट उंचीचीं झाडें (झुडपें) असतात. झुडुपांच्या अंगाला कांटे बरेच असतात, फुलें लालसर रंगाचीं असून फुलांचे घोंस (गुच्छ) येतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाकेरी भात्याचा भाव

आमच्याकडे गेलीं ५०-५५ वर्षें अस्सल वाकेरीभातेच्या मुळया, पाळें, कंद आणवून तीं दुधामध्यें शिजवून चांगली वाळवून नंतर ग्राहकांना पाठविली जातात. खात्रीचा माल म्हणून पुष्कळ लोक आमचेकडून नेतात. १० तोळ्यापासून तो ४-५ शेरापर्यंत मागण्या असतात व त्या आम्हीं सवडीनें पुरवितो. या मालास कांहीं दिवसांनीं कीड लागते; त्यामुळें अधिक सांठा कधींच ठेवीत नाहीं.

कांहीं ठिकाणीं २ रु. पौंड भावानें वाकेरीभाते मिळतें. परंतु तें आमच्याकडे उपलब्ध नाहीं. सर्वसाधारण माल ८ रु. शेर, व उत्तम (निवडक) माल १५ रु. शेर या भावानें पुरवितो.

अपरिचित ग्राहकांना तें महाग वाटतें, परंतु या भागांतील परिचित ग्राहकांची या मालासाठीं नेहेमीं मागणी असते.

वाकेरीभात्याचे ग्रंथोक्त गुणधर्म कोठें असल्यास ते वाचकांनीं प्रसिद्धीसाठीं पाठवावेत अशी नम्र विनंति आहे.

विद्यालयाचा मोठेपणा

"शाळेचा मोठेपणा त्यांतील अध्यापकवर्गाच्या मोठेपणावरच केवळ अवलंबून नसतो. तर त्या शाळेंत शिक्षण घेऊन विशाल जगांत पदार्पण करणारे विद्यार्थीगण जगांत कसें वागतात, आपलीं कर्तव्यें कशीं पार पाडतात ह्यावर अवलंबून असतो."

साधनांची काळजी घ्या

आपली विचारशक्ति व निर्णयशक्ति दुसऱ्याकडे गहाण टाकूं नका. तुम्ही तरुण असल्यामुळें धैर्यानें व निर्धारानें कृति करण्याचा तुमचा हक्क आहे. पुढें ठाकणाऱ्या समस्यांनी विचलित न होता धैर्यानें तोंड देण्याचा प्रयत्न करा. साधनांची काळजी घ्या, म्हणजे साध्यहि आपोआप साधेल."

—श्री. मोरारजी देसाई

गर्भाची सुंदर वाढ झाली !

मुंबईचे एक वैद्य कळवितातः-

आयुर्वेद सेवा संघानें तयार करून विक्रीस ठेवलेलें नवें अनुभविक औषध **भल्लातकासव** हें फार गुणकारी औषध आहे व मुंबईच्या हवेस तें चांगलें लाग पडतें असा येथील वैद्यांचा अनुभव आहे. माझ्याकडे एक रुग्ण-- सौ. + + + पोटांत दुखत आहे, १० महिन्यापासून विटाळ बंद आहे. पोटांत कांहीं तरी फिरत आहे' अशी तक्रार घेऊन आली.

७ महिने भल्लातकासव दिलें

मी त्या रोगाचें सल (न वाढणारा गर्भ) हें निदान करून त्यावर दोन्हीं वेळ जेवणानंतर भल्लातकासव १।१ औंस (४।४ चमचे) याप्रमाणें ७ महिने (बाई बाळंत होईपर्यंत) दिलें. त्याचा उत्तम गुण होऊन बाईला सुंदर मूल झालें आहे. जन्मतःच मुलाचें वजन ६॥ पौंड आहे.

बिब्यापासून तयार केलेलें औषध

भल्लातकासव ह बिब्ब्यापासून तयार केलेलें पातळ औषध असून तें वातविकार, कफविकार, आमांश, आमवात, अग्निमांद्य, संग्रहणी इत्यादींवर अत्यंत गुणकारी आहे.

किंमत ४० तोळे २॥ रु. सर्वत्र मिळते.

आयुर्वेद सेवा संघ

औषधी भवन, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सरकारचें शुद्धायुर्वेदीयांकडे दुर्लक्ष कां ?

(लेखकः—आयुर्वेदाचार्य वै. सीताराम रंगनाथ शिउरकर, काव्यतीर्थ)

आयुर्वेद पत्रिकेच्या १६ ऑगष्ट १९५४ च्या अंकांतून " आयुर्वेदस्नातकांना अन्याय " या शीर्षकाखालीं गुजरात आयुर्वेद स्नातक मंडळानें सरकारी अन्यायाला वाचा फोडली. सरकारनें आणखीहि बऱ्याच संस्थांच्या स्नातकाकडे दुर्लक्ष केलें याबद्दल चार शब्द लिहिण्याची पाळी आली आहे.

सरकारनें मान्य केलेल्या पदव्या

सरकारनें फॅकल्टीचा अभ्यासक्रम सुरू केल्यानंतर १९४८ सालीं संशोधन करून D. A. S. F. तुल्य कोणत्या परीक्षा मानाव्यात व त्यांना D.A.S.F. तुल्य वेतनश्रेणी मिळावी याबद्दल यादी केली. व त्याप्रमाणें वेतनश्रेणी देण्याबद्दल त्या त्या जिल्ह्याच्या सिव्हिल सर्जन्सकडे याद्या पाठवण्यांत आल्या. त्याप्रमाणेंच सरकार संघटित लोकल बोर्डांकडेहि त्या याद्या दिल्या गेल्या व S.M.P. वैद्यांना व लोकल बोर्डांतील अधिकारी वैद्यांना ते या लायकीचे असल्यास D.A.S.F. तुल्य वेतन द्यावें असें जाहीर केलें. त्या संस्था व पदव्या खालीलप्रमाणें:-

१ आयुर्वेदतीर्थ (१९४२ पूर्वीचा) अहमदनगर
२ आयुर्वेदविशारद (१९४२ पूर्वीचा) सातारा
३ आयुर्विद्याविशारद (१९४४ पूर्वीचा) पुणें
४ गृहीतायुर्वेदशास्त्र (१९४२ चे पूर्वीचे) पाटण
५ D.A.S.F. स्टेट फॅकल्टी मुंबई
६ A.M.S. हिंदु युनिव्हर्सिटी, बनारस
७ A.I.M. बोर्ड, मद्रास
८ आयुर्विद्यापारंगत, पुणें

सरकारनें केलेला वदतो व्याघात

वरीलप्रमाणें जाहीर करूनहि परत त्यांतूनहि कांहीं संस्था व त्यांच्या परीक्षा यांची D.A.S.F. तुल्यतेची शंका निदर्शित करून सरकारनें बऱ्याच संस्थांवर " वदतो व्याघात " केला.

सरकारची कर्तुमकर्तुं अन्यथा कर्तुम् शक्ति

यावर मला असें म्हणावयाचें आहे कीं १९४८ चें संशोधनच मुळीं एकांगी व पक्षपाती झालेलें आहे. त्यांत एकांगित्वाचे दोष हे राहाणारच. कारण त्यावेळीं कांहीं प्रथितयश संस्थांच्या परीक्षेकडेहि सरकारनियुक्त लोकांनीं मुद्दाम दुर्लक्ष करून त्या संस्थांविषयीं सरकारांत अनादर निर्माण केला, अर्थातच तत्तत्संस्थेच्या स्नातकांवर सरकारी वेतन-श्रेणीचा अन्याय करून आपली " कर्तुमकर्तुं अन्यथाकर्तुं " शक्ति त्यांनीं दाखविली.

वेतनश्रेणीचा अन्याय दूर करा

त्यावेळीं झालेला अन्याय आतां पुरें झाला, काल बदलतो आहे. आतांचे सरकारनियुक्त आयुर्वेदाधिकारी एकांगी विचारसरणीचे नाहींत व मिश्रायुर्वेदाचेहि पक्षपाती नसावेत. त्यांना अशी नम्र विनन्ति आहे कीं, त्यांनीं पुन्हा एकवार १९४८ प्रमाणेंच पण काटेकोरपणानें संशोधन करून पूर्वीच्या त्यक्त संस्थांना तर मान्यता द्यावीच, पण आणखीहि त्यावेळीं ज्या नाममात्रानेंसुद्धां उपेक्षिल्या गेल्या आहेत व ज्या खरोखरच अहमहमिकेनें बरींच वर्षें आयुर्वेदाची सेवा करतात अशा संस्थांच्या परीक्षांनाहि मान्यता देऊन त्यांवरील वेतनश्रेणीचा अन्याय दूर करावा.

तीन संस्थांना अन्याय

त्यांपैकीं उत्कृष्ट कार्य करून खरोखरच विद्वान् वैद्य निर्माण करणाऱ्या व मिश्रायुर्वेदीयांना कटु वाटणाऱ्या पुढील तीन शुद्धायुर्वेदीय संस्थांविषयीं तर मुद्दामच अन्याय झाला असें म्हणावें लागेल. या संस्था १९३८ च्या कायद्याच्या पूर्वींहि कित्येक वर्षें व अद्यापहि आपापल्यापरी श्रेष्ठ वैद्य निर्माण करीत आहेत. या तीन संस्थांची माहिती विद्वान् वैद्यांना आहेच. तथापि पुन्हां थोडक्यांत देणें अप्रस्तुत होणार नाहीं. त्या तीन संस्था पुढीलप्रमाणें:—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१ वेदशास्त्रोत्तेजक सभा, पुणें.
२ श्रावणमासदक्षिणापरीक्षा, बडोदे,
३ निखिल भारतीय आयुर्वेद विद्यापीठ, दिल्ली.

वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या परीक्षा

वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या सर्व शास्त्रांच्या अशा प्रतिवर्षी परीक्षा होतात. त्यांतच आयुर्वेदशास्त्राचाहि अंतर्भाव केलेला आहे. परीक्षा तीन होतात. प्रथमा, मध्यमा (कोविद), व उत्तमा (चूडामणि). प्रथम परीक्षेस बसतांनाच संस्कृताच्या प्रवेश परीक्षेंतून उत्तीर्ण व्हावें लागतें. व तींतून साधासुधा संस्कृतज्ञ उत्तीर्ण होणें अशक्य असतें. सध्यांचे मॅट्रिक किंवा बी. ए. चें संस्कृत सुद्धां प्रवेश परीक्षेच्या संस्कृतचें मानानें हीन प्रतीचें आहे. परीक्षा विद्वानांचे सान्निध्यांत लेखी व मौखिक, कसोशीनें घेतल्या जाऊन नंतरच उत्तीर्णांना बक्षिसें दिलीं जातात. या सर्व परीक्षेंत, ग्रंथोपस्थिति, अंग-प्रत्यंग-विज्ञान, औषधी विज्ञान, रुग्ण परीक्षण इ. गोष्टींना प्राधान्य असतें. एवढ्या कसोटीतून उतरलेला वैद्य विद्वान् होणार नाहीं कां ?

श्रावणमास दक्षिणा परीक्षा

२) श्रावणमासदक्षिणा परीक्षाहि बडोद्यास उपरीनिर्दिष्ट कार्य करून आयुर्वेदाची सेवा करते. परीक्षा दोन आहेत. मध्यमा व उत्तमा. उत्तमा परीक्षेंत प्रतिशत ८० गुण पडल्यास 'वैद्यरत्न' ही पदवी दिली जाते.

निखिल भारतीय आयुर्वेद विद्यापीठ

३) निखिल भारतीय आयुर्वेद विद्यापीठाचें कार्य तर सर्व भारतांत विदितच आहे. ही संस्था फक्त आयुर्वेद शास्त्राकरितांच आहे. परीक्षा तीन. १ भिषक् २ विशारद व ३ आचार्य आज पुष्कळशा मिश्रायुर्वेद विद्यालयांतील अध्यापक निखिल भारतीयाचे " आचार्यच " आहेत. शुद्धायुर्वेद पाठ्यक्रम समितीनेंहि अध्यापकत्वाकरितां निखिल भारतीयाच्या आचार्यांची प्रथम निवड न निखिल भारतीय आयुर्वेद विद्यापीठाच्या श्रेष्ठतेची ग्वाही दिली आहे.

सरकारानियुक्त लोकांच्या दृष्टीनें वरील संस्थेच्या प्रथम व द्वितीय परीक्षोत्तीर्ण वैद्य D.A.S.F. तुल्य नसले तरी तृतीय परीक्षोत्तीर्ण, (चूडामणि, रत्न, व आयुर्वेदाचार्य) हे D.A.S.F. पेक्षां कमी ज्ञानाचे आहेत असें कोण म्हणूं शकेल

संस्था-प्रमुखांचें कर्तव्य

वास्तविक १९४८ च्या संशोधनाच्या वेळींच सदर संस्थेच्या प्रमुखांनीं आपापल्या संस्थेच्या परीक्षेची योग्यता सरकारला पटवून द्यावयास हवी होती. परंतु जेथें शुद्धायुर्वेदासच विरोध तेथें या संस्था तरी काय करूं शकणार ! त्यांना त्यावेळीं स्तब्ध बसून या लोकांचीं स्वार्थी कृत्यें पाहण्यापलीकडे काय करतां येणार होतें !

स्नातकांनीं संघटनेनें प्रयत्न करावा

सरकारनें पूर्वी D.A.S.F. तुल्य ठरवून पुष्कळशा संस्थांच्या परीक्षांना " वदतो व्याघात " केलाच आहे. तरी त्या संस्थेच्या स्नातकांनीं तद्वत् ज्या संस्थांच्या परीक्षांवर अन्याय झाला असेल अशा परीक्षोत्तीर्ण वैद्यांनीं एकवार पुन्हां संघटनेनें प्रयत्न करून सरकारचें लक्ष इकडे वेधून घ्यावें व झालेल्या नजरचुकीची दुरुस्ती करून घ्यावी.

म. प्रां. वैद्य मंडळाचें कर्तव्य

पूर्वीच्या लोकांनीं जरी शुद्धायुर्वेदाची उपेक्षा केली तथापि ईशकृपेनें शुद्धायुर्वेद सरकारी कसोटीस

पांढरें कोड

हजारोंचें गेलें. त्यांनीं अभिप्राय दिलेले आणि अनेक बक्षिसें मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु.
नकली वैद्यापासून सावध रहा !

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो अस हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु.
माहिती मागवा. मोफत पाठवूं.
वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन'
मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रण्यास सुरवात झाली आहे. "हेम्नः संलक्ष्यते ग्नौ विशुद्धिः श्यामिकाऽपि वा" तद्वत् शुद्धायुर्वेद णखीहि पूर्णपणें कसोटीला उतरेल यांत शंका नाहीं. कारनें शुद्धायुर्वेदास पाठिंबा दिला आहे. याचवेळीं केले प्रयत्न फलद्रूप होतील व असे प्रयत्न महाराष्ट्र ांतीय मंडळासारख्या प्रमुख संस्थेकडून झाल्यास ाला यश आल्यावांचून राहणार नाहीं. महाराष्ट्र प्रांतीय ग्रमंडळाच्या अध्यक्षांनींहि वरील गोष्टींचा सद्-द्विवेकबुद्धीनें विचार करावा अशी विनंति आहे.

इतर प्रांतांना झळ

या अन्यायाची झळ फक्त मुंबई प्रांतालाच ागली असें नसून त्याचा दुर्-गंध इतर संस्थानांतहि सरला गेला. हैद्राबादच्या संस्थानी सरकारनें शुद्धा-युर्वेदाचीं बरींच औषधालयें उघडून आयुर्वेदाबद्दलचें आपलें प्रेम व्यक्त केलें. याबद्दल सर्व आयुर्वेदाभिमानी यांचे ऋणी आहेत. पण इकडची झळ तिकडेहि ागली. संस्थानीं कारभाऱ्यांनीं मुंबईचेंच अनुकरण करून ४।२ संस्थांना मान्यता दिली व तद्व्यतिरिक्त हैद्राबादचे सरकारी विद्यालयांतून उत्तीर्ण झालेल्या विशारदांना मान्य केलें. इकडचेप्रमाणेंच तिकडच्या कारभाऱ्यांना वरील संस्थेची तोंडओळखसुद्धां नाहीं. हैद्राबाद सरकारचा विशारद, निखिल भारतीयाच्या विशारदापेक्षां अगर आचार्यापेक्षां खात्रीनें विद्वान् नाहीं. असें असून ही उपेक्षा काय म्हणून ? संस्थानीं वैद्यांनींहि एकवार संघटित प्रयत्न करून सरकारचें लक्ष सदर गोष्टीकडे वेधण्याचा प्रयत्न करावा.

पुनः विचार करावा

या सर्व विवेचनावरून एवढेंच म्हणावयाचें आहे कीं सरकारनें वैद्यांची वेतन-श्रेणी ठरवण्याबाबत पुन्हां एकवार विचार करावा कीं ज्यायोगें कोणावरहि अन्याय होणार नाहीं.

गजकर्ण-इसबावर बाह्योपचार

आगगाडींत एका सद्गृहस्थांनीं गजकर्णावर (इसबादि त्वग्रोगावर) पुढील औषध सांगितलें.

प्रथम इसब झालेल्या जागीं कागदी लिंबाची फोड घासून चोळावी. थोडी आग होते.

मग रताळें उकडून (किंवा भाजून) तें गरम गरम (सोसवेल असें) शेक म्हणून त्यावर वारंवार लावावें व शेवटीं रात्रभर तें रताळें त्या जागीं बांधून ठेवावें. उपनाह (पोटीस). ५-६ दिवसांत गुण येतो असें त्याचें म्हणणें. —डॉ. र. कृ. गर्दे

(स्थानिक उपाय या दृष्टीनें हें सर्व सोपें व सुटसुटीत आहे. पण हा त्वग्विकार त्या माणसाला कां झाला याचें उत्तर यांत नाहीं व पुनः होणार नाहीं अशी ही उपाययोजना नाहीं.

सबब, हा बाह्योपचार करतांनाच त्वग्गत (रसगत) कफदुष्टि होण्याचीं कारणें घडूं देऊं नयेत व घडणें टळत नसेल तर त्या कारणांचा परिहार करणारा आहारविहार योजावा. केवळ बाह्योपचारानें त्वग्रोग समूळ जात नाहीं. —संपादक)

शास्त्रोक्त पद्धतीनें व अत्यंत परिश्रमानें तयार केलेलीं महाराष्ट्र प्रांतीय वैद्यसंमेलनानें व ऑल इंडिया आयुर्वेद कॉंग्रेस व प्रदर्शनाकडून प्रशंसित
सहस्रपुटी अभ्रक इ. भस्में व इतर औषधें
प्राइस लिस्ट मागवा.
श्री अमरेश्वर आरोग्यमंदिर
मिराशी बोळ, पो. इचलकरंजी S. M. C.

आयुर्वेद सेवा संघ, नाशिक या संस्थेची अत्यंत गुणकारी औषधें दादर (मध्यरेल्वे) येथें मिळण्याचें एक विक्रीकेंद्र
" गणेश औषधालय "
अबदुल कादर बिल्डिंग, दुकान नं. १३
हिंदमाता सिनेमासमोर, मुंबई १४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवडक रुग्ण चिकित्सा

रोज सकाळीं १ पांढरा जुलाब

[लेखकः-वै. श्रीमती लक्ष्मीबाई बोरवणकर, मुंबई]

रुग्णः--मुलगी वय वर्षे ५

रुग्णास रोज सकाळीं एक पांढरा जुलाब होत असें म्हणून उपचारासाठीं आणण्यांत आलें. अशक्तपणा, फिक्कटपणा व किरकिर हीं लक्षणें होतींच.

दर स्टेशनवर पाणी पिणें

" १५ दिवसापूर्वी गांवाहून आली त्यावेळीं जुलाब होत नव्हते. रस्ताभर तिला सारखी तहान लागत होती व दर स्टेशनवर ती पाणी पीत होती. " अशी माहिती सांगण्यांत आली.

मुलीचे जुलाब वाढले

वाईट (बिघडलेल्या) पाण्यापासून निर्माण झालेला व्याधि असा रोगविनिश्चय करून दुर्जलजेता हें औषध द्यावयाचें मी ठरविलें. व दिवसांतून ३ वेळां १।१ गुंज रस गरम पाण्याबरोबर दिला. औषध दोन दिवसांचें दिलें होतें. तिसरे दिवशीं मुलीचे जुलाब वाढले. मळाचें प्रमाणहि वाढलें व तिची आई घाबरून गेली.

हाच औषधाचा इष्ट गुण

परन्तु पुनः तेंच औषध २ दिवसांचेंच दिलें व घाबरण्याचें कारण नसल्याचें सांगितलें. कारण शरीरांतील सर्वधातूंत प्रवेशित झालेलें दूषित जल कोष्ठांत आणलें गेलें. हाच औषधाचा इष्ट गुण होता. जुलाब वाढतील अशी प्रथम कल्पना नव्हती; पण मागाहून त्यांत धोका नाहीं एवढी खात्री झाली. शिवाय मळाचा पांढरा रंग कमी होऊन पिवळेपणा आला होता; म्हणून तेंच औषध दिलें व आठ दिवसांत मुलगी पूर्ण बरी झाली.

दुर्जलजेता कल्पाचा पाठ

शुद्ध बचनाग २ तोळे, कपर्दिकभस्म ५ तोळे, मिरेचूर्ण ५ तोळे व सुंठ ५ तोळे. आल्याच्या रसांत खल करावा.

धातुगत जलदोषाचें पचन व शोधन

[या औषधांतील द्रव्यें रस, मांस, मेद, अस्थि आदि गत जल (आम) दोषाचें पचन करण्यास समर्थ अशी आहेत व त्याच त्यांतील गुणकर्मांमुळें केवळ एकच औषधाचे प्रयोगानें रुग्णास लाभ झाला. सध्यांच्या कालांत प्रवासाचे, व प्रवासांत निरानिराळ्या ठिकाणचे पाणी पिण्याचे प्रसंग वारंवार येतात. अशा वेळीं पारागन्धक नसलेलें हें औषध वापरणें प्राथमिक उपचार म्हणूनहि युक्त होईल आहे. —संपादक]

नासिकची सिंहस्थ पर्वणी

नासिक येथें पुढील वर्षी २० सप्टेंबर १९५५ पासून १६ आक्टोबर १९५६ अखेर सिंहस्थ यात्रा अखेर चालू राहणार आहे. त्यापैकीं पर्वकाळ भाद्रपद शुद्ध ४ शके १८७७ रोजीं सुरू होऊन तो अश्विन शुद्ध १२ शके १८७८ अखेर आहे.

सांडू ब्रदर्सचीं

शास्त्रोक्त तयार औषधें, काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायनें इ. वैद्यवर्गास चिकित्सेंत फार उपयोगी पडतात.

वैद्यांना तीं घाऊक दरानें विशेष सवलतीनें दिलीं जातात.

पत्रव्यवहाराचा पत्ताः—

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर लि.

फॅक्टरी व हेड ऑफिस—चेंबूर (मुंबई)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद

या परिषदेच्या उद्घाटनाचें भाषण करतांना डेग्वेकरजी यांनीं शुद्ध आयुर्वेदाचा अभ्यासक्रम केल्याबद्दल मुंबई मंत्रिमंडळाचें अभिनंदन केलें व भारतांतील सर्व राज्यें या उपक्रमाकडे डोळे उघडून आहेत असें सांगितलें. विद्यार्थ्यांना आयुर्वेदीय ग्रंथ शिकवितांना श्लोकांचे केवळ अर्थ न सांगतां आवश्यक तेथें स्पष्टीकरण अवश्य करावें. पारिभाषिक शब्दांचे सर्व अर्थ लिहून नमूद करावेत व मग प्रकरणानुसार त्या ठिकाणीं अर्थ लावावा. अर्थनिश्चितीच्या वेळीं ग्रंथाधार अवश्य द्यावे. टीकाकारांचे साह्य अवश्य घ्यावे. जो अर्थ टीकाकारांना मान्य पण प्रत्यक्ष विरोधी तो सध्यां घेऊ नये. परिषदेनें आपले निर्णय प्रसिद्ध करावेत व इतरांचीं मतें मागवावीत. पुनः चर्चा करावी. तोपर्यंत या परिषदेतील अर्थ निश्चित धरावा.

अध्यक्ष आपल्या भाषणांत म्हणाले कीं, 'आयुर्वेदीयांनीं आयुर्वेदाच्या सिद्धान्तावर दृढ श्रद्धा ठेवावी. दोषधातुमल ही दृष्टि ठेवून शिकवावें. अशुद्ध रक्त यासारखे अशुद्ध प्रयोग न करतां रक्त व विशुद्ध रक्त असे शब्द वापरावे. [ततू विशुद्धं हि रुधिरं बलवर्णसुखायुषा, युनक्ति प्राणिनां प्राणाः शोणितं हि अनुवर्तते] शिकवितांना महत्वाचे मुद्दे घ्यावेत व त्यांची उत्तरें द्यावीत. अध्यापन ही एक कला आहे. शास्त्रज्ञानाच्या वाढीबरोबर तिचेंहि संपादन अध्यापक मंडळींनीं करणें अवश्य आहे.

ता. ११ रोजीं सकाळीं उद्घाटन व अध्यक्षीय भाषण झाल्यानंतर परिषदेची कार्यपद्धति निश्चित करण्यांत आली. दुपारीं १ पासून वै. डेग्वेकरजी यांनीं अष्टांगहृदयाचा पहिला अध्याय शिकवून दाखविला. त्यांतील महत्वाच्या वाक्यावर विस्तृत चर्चा झाली. आयुर्वेदीय वाङ्मयांत इतःपर दोष हाच शब्द वातपित्तकफ यांना वापरावा असें ठरलें. ता. १२ रोजी सकाळीं डेग्वेकरजींनीं वातपित्तकफाच्या कल्पना प्रात्यक्षिकांची कांहीं उदाहरणें देऊन स्पष्ट केल्या. दुपारीं वै. वि. दा. एकतारे (नगर) यांनीं द्रव्यरसवीर्य विपाक प्रभाव या विषयाचे अध्यापनाच्या दृष्टीनें विवेचन केलें.

रात्रीं ८॥ वाजतां वै. डेग्वेकर व वै. एकतारे यांच्या व्याख्याना वरील उत्पन्न झालेल्या प्रश्नांना त्या दोघांनीं उत्तरें दिलीं. ता. १३ रोजीं सकाळीं पक्वाशय व ग्रहणी या सज्ञांच्या निश्चितीसंबंधीं आचार्य वेणीमाधवशास्त्री यांनीं पूर्वपक्ष मांडला. वै. डेग्वेकर यांनींहि याबाबत दुसरा पक्ष मांडला होताच. वैद्य गोगटे, अंतरकर, एकतारे, बिंदुमाधव व जळूकर यांनीं लहान आतडी हा भाग म्हणजे ग्रहणी असा पक्ष मांडला व तो बहुमताला मान्य झाल्याचें दिसतें.

ता. १३ रोजीं दुपारीं अज-शरीराचे संपूर्ण विच्छेदन करून त्याचे अवयव व प्रात्यक्षिक सर्वांना दिलें. हें कार्य आयुर्वेदाचार्य करमरकर यांनीं अत्यंत मेहनतपूर्वक व दोष- धातु--मलात्मक दृष्टीनें केलें. त्याबद्दल सर्व वैद्यमंडळींनीं त्यांना धन्यवाद दिलें.

रात्रीं वैद्य अंतरकर (मुंबई) यांनीं सुश्रुताच्या आधारें शारीर संज्ञाबाबत चर्चा मांडली.

तीचचर्चा ता. १४ रोजीं सकाळीं चालू होती. दुपारीं वै. शार्ङ्गपाणी व गोगटे यांनीं ऋतुचर्या व श्रीमती बोरवणकर यांनीं मात्राशीतीय अध्याय या स्वस्थवृत्त विषयावर व्याख्यानें दिलीं.

परिषदेचें कार्य उत्साहांत चालू आहे. रोज नवी नवी वैद्य मंडळी येऊन त्यांत भर पडत आहे.

....अनुक्रमणिका....

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद, नाशिक	२५१
परिषदेच्या उपक्रमाचें सार्वत्रिक स्वागत	२५३
उत्तमांग वसंताचा पाठ	२५५
'दोषक्षीणता व रोग' या लेखाचें परीक्षण	२५७
पित्ते तुष्टे घातवो यान्ति साम्यम्	२६६
मलेरियांत वनजाई रामबाण	२६७
रोगचिकित्सेंत पथ्याचें महत्व	२६९
महाकुष्ठावर नागवधाख्यरस	२७३
वाकेरी भाते व त्याचा औषधी उपयोग	२७५
सरकारचें शुद्धायुर्वेदयांकडे दुर्लक्ष कां ?	२७७
रुग्णाचिकित्सा-रोज सकाळीं १ पांढरा जुलाब	२८०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खास दीपावलीनिमित्त

आयुर्वेद सेवा संघाच्या औषधी भवनांत तयार झालेलें

सुगंधी अभ्यंग तेल नं. १



अवश्य वापरा.

गरीब व मध्यमवर्गीय जनताजनार्दनाच्या सोयीसाठीं लहान प्रमाणांतहि अभ्यंग तेल मिळण्याची व्यवस्था केली आहे.

किंमत २॥ तोळे ५ आणे, ५ तोळे १० आणे, १० तोळे १। रु.

—: दीपावलीप्रीत्यर्थ जंगी सवलत :—

अकीकभस्म	४५ रु. शेर	मोतीसीप (शौक्तिक) भस्म	१८ रु. शेर
अग्निकुमाररस	३५ रु. ,,	सांबरशृंगभस्म	११ रु. ,,
कासवपृष्ठभस्म	३२ रु. ,,	गोक्षुरादिगुग्गुळ	१२ रु. ,,
केकडा (कर्कट) भस्म	२४ रु. ,,	त्रिफळामंडूर	२४ रु. ,,
नागभस्म (जुनें उत्तम)	३५ रु. ,,	मरिच्यादिगुटिका	८ रु. ,,
प्रवाळभस्म (सूर्यपुटी)	३१ रु. ,,	शंखवटी (बृहत्)	२४ रु. ,,
प्रवाळभस्म (अग्निपुटी)	३२ रु. ,,	लवणभास्करचूर्ण	४॥ रु. ,,
बेरपत्थर (हजरतबेर) भस्म	१५ रु. ,,	सितोपलादिचूर्ण	११ रु. ,,
मंडूरभस्म (जुनें उत्तम)	१५ रु. ,,	सुधापट्क (सि. यो. सं.)	४४ रु. ,,

त्रिफळाचूर्ण वस्त्रगाळ १ शेरास (८० तो.) १ रुपया फक्त.

—: हीं औषधें २० तोळ्यापेक्षां कमी वरील दरांत देतां येणार नाहींत. :—

स्टॉक मर्यादित आहे. तो कमी होतांच या सवलतीच्या दरांत पाठवितां येणार नाहीं.

मिश्रा महाराष्ट्र फार्मसी (रजि.) ब्रह्मपुरी

[जि. चांदा म. प्र.]

संपादक व प्रकाशकः—वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य विवलकर कारंजा, नाशिक

मुद्रकः—श्री. वि. ओक, सकाळ प्रेस, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होते.)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु.   १ अंकाची किंमत ४ आणे

वर्ष ८ वें)   नासिक, ता. १ नोव्हेंबर १९५४   (अंक ९ वा

" नैतिक भावनांनीं ज्ञानाची वाढ होते "

तर्कतीर्थ पं. लक्ष्मणशास्त्री जोशी यांचें उद्बोधक भाषण

" दुसऱ्यांना बोध देणें केव्हां शक्य होईल ? तर दुसऱ्यावद्दल अनुग्रह किंवा दुसऱ्यांचे दोष सहन करण्याची शक्ति असेल तर ! म्हणूनच 'दया' व 'क्षमा' हे आत्मगुण चरकसंहितेंत 'ज्ञानदेवता' या संज्ञेनें संबोधले आहेत. या नैतिक भावना अंगीं असतील तरच आयुर्वेदाचें संशोधन करणें व आयुर्वेदाचें ज्ञान दुसऱ्यास देणें या गोष्टी शक्य होतील. संकट सोसूनहि दुसऱ्यास उपयोगी पडतां येईल तरच ज्ञान निर्माण होईल.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री

मलांचे दुर्गंध सहन करतां आले पाहिजेत

सहन करण्याची ताकद म्हणजेच क्षमा. क्षमा अंगीं असेल तरच दया करणें शक्य आहे. मूत्रादि मलांचे दुर्गंध सहन करतां आले पाहिजेत; म्हणजेच क्षमा, दया हे गुण असले पाहिजेत. म्हणूनच या ज्ञानदेवता आहेत. नैतिकता ही ज्ञान-देवता आहे. हा फार महत्वाचा विचार आहे. असे उद्गार अथाग्निवेशप्रभृतीन् विविशुर्ज्ञानदेवताः । बुद्धिः सिद्धिः स्मृतिर्मेधा धृतिः कीर्तिः क्षमा दया ॥ या सूत्राचें विवेचन नासिक येथें भरलेल्या आयुर्वेद अध्यापक परिषदेंत करतांना, भारतांतील तज्ज्ञ अध्यापक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनीं काढले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांचें सविस्तर भाषण पत्रिकेंत पुढें प्रसिद्ध होणार आहेच. अध्यापक परिषदेंत निर-निराळया शब्दप्रयोगांचें व वाक्य प्रयोगांचे अर्थ निश्चित करण्यासाठीं त्यांना कांहीं प्रश्न विचारण्यांत आले होते. त्यांचीं त्यांनीं ता. १६ रोजीं दुपारीं १ तासभर व्याख्यान देऊन क्रमानें उत्तरें दिलीं व अध्यापक परिषदेस उपकृत केलें. त्यांच्या उपस्थितीमुळें व भाषणामुळें या अध्यापक परिषदेचें शास्त्रीयत्व किती तरी पटीनें वाढलें आहे यांत शंकाच नाहीं.



....दीपावलीच्या या शुभप्रसंगीं....

आयुर्वेद सेवा संघाच्या

सर्वत्र पसरलेल्या, असंख्य ज्ञात व अज्ञात प्रेमळ

प्रचार कार्यकर्त्यांचे व हितचिंतकांचे

—मनःपूर्वक शुभचिंतन—

सांडू टोमॅटो कम्पाउन्ड

•व्हिटॅमिनयुक्त टॉनिक

सविस्तर माहितीसाठीं लिहा

द कृ. सांडू ब्रदर्स चेंबूर लि. चेंबूर-मुंबई.

[१] नाशिक विभागाचे चीफ डिस्ट्रिब्यूटर्स:— बी. पी. वर्वे अँड को., जळगांव

[२] स्थानिक विक्रेते—मे. पेंढारकर अँड को. मेनरोड, नाशिक शहर

प्रमाणपत्र

आपण जें जें औषध बनवितो व जनतेस देतो, तें तें प्रत्येक औषध सचोटीचें व गुण देणारें असलें पाहिजे; तरच त्याचें प्रमाणपत्र जनतेकडून आपणास मिळेल. तर अशा गुण देणाऱ्या खऱ्या, अस्सल व ताज्या औषधी खरेदी करण्यास विश्वासपात्र ठिकाण पाहिजे. त्याकरितां आपण

दि ऑल इंडिया करियाणा स्टोर्स

पायधुनी मुंबई नं. ३

(टेलिफोन नं. ३१८५८) यांना लिहा.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें

मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात. अधिक माहितीसाठीं कॅटलॉग मागवावा.

CC-0. In Public Domain: Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद

नासिक येथें भरलेल्या पहिल्या अधिवेशनाचा सविस्तर वृत्तांत

पत्रिकेद्वारा जाहीर झाल्याप्रमाणें आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषदेचें पहिलें अधिवेशन नाशिक येथें ११-१०-५४ रोजीं अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणांत भरलें होतें. परिषदेच्या आदले दिवशीं १०-१०-५४ रोजीं सकाळीं कलकत्ता मेलनें परिषदेचे उद्घाटक पंडित डेग्वेकरशास्त्री (जबलपूर) व [आयु]र्वेदाचार्य शेंडयेशास्त्री (दमोह) हे आले. त्यांचा मुक्काम विंदुमाधव पंडितांचे घरीं १दिवस होता. तेथें त्या [उभय]तांची थोडीबहुत प्रास्ताविक चर्चाहि झाली. मुंबई टाइम्सचे व पी.टी.आय.चे वार्ताहर यांनीं पं. डेग्वेकर-[शास्]त्री मुलाखत घेतली.दि. ११-१०-५४ रोजीं पहाटे नागपूर मेलनें परिषदेचे नियोजित अध्यक्ष वै.वेणीमाधव-[शास्]त्री हे आले. परिषदेचे अन्य सभासद हे दि. ११-१०-५४ पहाटेपर्यंत हजर झाले होते.

पत्रिकेंत जाहीर केलेलें परिषदेचें स्थान अनेक दृष्टीनीं गैरसोयीचें वाटल्यामुळें तें पूर्वीच बदलून मोठ्या [पु]लाजवळ गोदावरीचे तीरीं चित्पावन ब्राह्मण संघाच्या जागेंतच परिषद घ्यावी असें नाशिककर वैद्य-[मं]डळींनीं ठरविलें व त्या ठिकाणींच सर्व व्यवस्था उत्तम रीतीनें पार पडली.

ठरल्याप्रमाणें सोमवार दि. ११-१०-५४ रोजीं प्रातःकाळीं बरोबर ७ वाजतां परिषदेस [सुर]वात झाली. प्रथम अध्यक्षांचे हस्तें श्रीधन्वंतरीच्या प्रतिमेचें पूजन झालें व शरद्कालानुकूल असा [सा]खरेचा प्रसाद वाटण्यांत आला. श्रीधन्वन्तरीच्या प्रतिमेला छोटासा पुष्पहार घातला होता. चोहींकडे [अग]रबत्त्यांचा मंद मधुर सुगंध पसरत होता. प्रातःकाळीं गुलाबी थंडी शरीराला व मनालाहि सुखवित होती. [य]ा पवित्र व शुभ कार्याचे प्रारंभकालीं स्वतःची उपस्थिति अपरिहार्य समजून, धुक्याचा पडदा बाजूला [सा]रून दिवसाच्या महालांत पदार्पण करणाऱ्या दिनमणीचे शुभ व कोमल किरण पूर्वेकडील खिडक्यांतून [आ]पला शिरकाव करून घेत होते. या प्रसन्न वेळीं उपस्थित असलेल्या वैद्यवर्गानें स्वतःस धन्य मानलें असल्[य]ास त्यांत नवल तें काय !

आपल्यापुढील समस्या सोडविण्याचा प्रयत्न

परिषदेचे निमंत्रक वै.वि. म. गोगटे यांनीं सर्व पाहुण्यांचें स्वागत करून उद्घाटनांना विनन्ति केली व [प]रिषदेस सुरवात झाली. ते म्हणालेः—उपस्थित वैद्यबन्धूनों।

आज आपण आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषदेसाठीं येथें एकत्र जमलो आहोंत. आजमितीला [आ]पल्यापुढें असलेल्या समस्या सोडविण्यासाठीं हा प्रयत्न आपण करीत आहोंत. इतर राज्यापेक्षां मुंबई-[रा]ज्यानें शिक्षणक्रमांत विशिष्ट पाऊल पुढें टाकलें आहे, आणि आयुर्वेदास मान्यता दिली आहे.आयुर्वेदीय [अ]ध्यापनासाठीं सुविधा प्राप्त व्हावी हा या परिषदेचा उद्देश आहे.

—ही परिषद कोणी बोलाविली, कां बोलाविली इ. विषयाची चर्चा करण्याची जरूरी नाहीं. कित्ये-[क]ांनीं पत्रद्वारा वरील प्रश्न आम्हांस विचारले. त्यांना आम्हीं एकच उत्तर दिलें. “ येथें या व समक्ष पहा ! [ल]ुबते लांबून प्रश्न नकोत। जवळ या आणि कार्य करा।”

सरकारनें शुद्ध आयुर्वेदीय अभ्यासक्रम मान्य केल्यापासून अशा तऱ्हेची चर्चा व्हावी असें अनेकांच्या मनांत होतें. म्हणूनच आम्हीं नाशिककर वैद्यमंडळींनीं हा उपक्रम केला. आपण सर्वजण आम्हांस आशिर्वाद देण्यास येथें आलांत ! हें पाहून आम्हांला खरोखर अत्यानंद होत आहे.मी आपणां सर्वांचें मनःपूर्वक स्वागत करतों.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्या चर्चा परिषदेचें उद्घाटन माननीय डेग्वेकर शास्त्रीजींनीं करावें अशी मी त्यांना विनंति करतो. वैद्यक जगतांतलि प्रत्येकाला ते परिचित आहेतच. परन्तु रीतीप्रमाणें मी त्यांचा थोडक्यांत परिचय करून देत आहे. आपल्या मामांच्या साहाय्यानें त्यांनीं आयुर्वेदाचें अध्ययन पूर्ण केलें. ते केवळ वैद्यच नाहींत तर "कऍ शास्त्रं अधीयानः" ह्या सूत्राप्रमाणें इतरहि शास्त्रांचें त्यांनीं अध्ययन केलेलें आहे. ते एम्. ए., एम्. एस्सी. व एल्एल्. बी आहेत. नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजांत प्राध्यापक म्हणून व जबलपूरच्या हितकारिणी कॉलेजमध्यें प्राचार्य (प्रिन्सिपॉल) म्हणून त्यांनीं काम केलेलें आहे. त्यांचें लेखनहि अत्यंत प्रभावी आहे. आयुर्वेदाखेरीज इतर विषयांचाहि त्यांचा दांडगा व्यासंग आहे. १९४७ सालीं नासिक येथें भरलेल्या तिसऱ्या म. प्रां. वैद्यसंमेलनाचे ते अध्यक्ष होते. शुद्ध आयुर्वेदाची खरी भूमिका त्यांनींच प्रथम मांडली. आणि आजचा शुद्धायुर्वेदाचा अभ्यासक्रम हें त्यांच्या अविरत प्रयत्नाचेंच सुफल आहे. असे ज्ञानवृद्ध व तपोवृद्ध वयोवृद्ध उद्घाटन आपणांस लाभले हें आपलें महद्भाग्यच होय.

अधिकृत चर्चेच्या निश्चित वेळा

आज परिषदेचा प्रथम-आरंभ-दिन आहे. प्रथम आपण परिषदेची पद्धति निश्चित करूं. माझें आग्रहाचें सांगणें आहे कीं, या परिषदेसाठीं बऱ्याच अन्तरावरून अनेक निमंत्रित विद्वान् आले आहेत, येणार आहेत. त्यांच्या विचारांशीं, दृष्टिकोनांशीं परिचित होण्याची फार मोठी संधि चालून आली आहे. तिचा लाभ घेण्यासाठीं इतरांनीं आपलींच भाषणें फार लांबवूं नयेत. ही चर्चा परिषद आहे. तेव्हां चर्चा तर अखंडित चालणारच. परन्तु अधिकृत चर्चेला कालाचें बंधन असणें आवश्यक आहे. म्हणून सर्वांच्या अनुमतीनें उद्यां दि. १२।१०।५४ पासून पुढील वेळां अधिकृत चर्चेच्या समजल्या जातील असें मी जाहीर करतो. प्रातःकालीं ६ ते ९, मध्यान्हकालीं १२॥ ते ५॥ व रात्रौ ८॥ ते १० = एकूण ९॥ तास रोज.

आतां माननीय उद्घाटकांनीं परिषदेस सुरवात करून द्यावी अशी मी आपणा सर्वांतर्फे विनंति करतो.

वैद्यराज गोगटे यांनीं केलेल्या सूचनेस नाशिक शहर वैद्य मंडळातर्फे अध्यक्ष वैद्यराज विष्णुशास्त्री दाते यांनीं अनुमोदन दिलें. त्यानंतर उद्घाटक पं. डेग्वेकरशास्त्री भाषणासाठीं उभे राहिले. ते म्हणाले—

आपण ह्या पवित्र व आवश्यक अशा शुभकार्याचें उद्घाटन करावयास मला सांगितलें याबद्दल मी

आपला आभारी आहे. हें कार्य आवश्यक कसें? अॅलोपॅथीच्या संपर्कानें आयुर्वेद नष्ट होऊं पहात असतां, जणूं धन्वन्तरीच्या प्रेरणेनेंच मुं. सरकारनें शुद्ध आयुर्वेदास मान्यता दिली. आयुर्वेदाच्या अभिमान्यांना ही घटना स्फूर्तिप्रद वाटली यांत नवल नाहीं. आणि म्हणूनच इतर प्रांतांतील सर्व लोक व वैद्यकमंत्री, मुंबई राज्याकडे फार मोठ्या अपेक्षेनें आशेनें पाहात आहेत. या कार्यास कोणीहि अनावश्यक समजत नाहीं. उलट आपला प्रयोग कितपत सफल होता नि निरनिराळ्या प्रांतांत तसेच प्रयोग कसे सुरू करतां येतील, याकडे अगदीं डोळ्यांत तेल घालून सारे परप्रांतीय पहात आहेत. म्हणूनच आपण आपलें कार्य योग्य रीतीनें पार पाडलें तर आयुर्वेदक्षेत्रांत तें इतरांना उत्तम मार्गदर्शक ठरेल.

आणि त्याच कारणामुळें आपली जबाबदारी कितीतरी पटीनें वाढली आहे. आपण सफलतेनें ती पार पाडूं शकलों तरच आपणास लाभ आहे, आणि आयुर्वेदाचा तरणोपाय आहे. एरवीं नाहीं. या कार्यासाठीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ध्यापकांनीं काय करावें हा एक प्रश्न प्रारंभीं उभा राहतो. अध्यापन करतांना विद्यार्थ्यांच्या चौकस बुद्धीला पटेल असेंच शिकविणें हें अध्यापकांच्या दृष्टीनें महत्वाचें आहे. उदा०— " ते व्यापिनोऽ पि हृन्नाभ्यो-ामध्योर्ध्वसंश्रयाः " ह्या किंवा अशाच इतर सूत्रांचें नुसतें प्राकृत भाषेंत भाषांतर सांगून भागणार नाहीं. ांचें योग्य स्पष्टीकरणाहि दिलें पाहिजे. कारण अध्यापकांपुढें निरनिराळ्या शास्त्रांचें अध्ययन केलेले लोकहि ्यार्थी म्हणून बसलेले असतात. माझेंच उदा. घेतलें तर माझ्याकडे -(१)संस्कृत शास्त्री (२) एम्.बी.बी.एस्. क्टर (३) बी.ए. (४)आयुर्वेदविशारद प्रथम श्रेणींत उत्तीर्ण व 'आचार्य' परीक्षेस बसणारा. (५)मॅट्रिक पास ेला असे निरनिराळ्या क्षेत्रांतील विद्वान् विद्यार्थी आहेत. त्यांना केवळ भाषांतर सांगून चालणार नाहीं, णार तर नाहींच नाहीं. कारण हल्लीं प्रत्यक्ष प्रमाणाचें युग सुरू आहे. केवळ ग्रंथांत सांगितलें आहे किंवा नें सांगितलें म्हणून विश्वास ठेवणारे पूर्वींसारखे विद्यार्थी हल्लीं आढळणें शक्यच नाहीं.त्यांना प्रत्यक्ष रच दाखवून अधः, मध्य, ऊर्ध्व हें सांगावें लागणार. तसें न केल्यास ते सरळ सांगतील - आम्हांला ांच समजत नाहीं. आम्हीं उद्यांपासून मुळींच येणार नाहीं.

सर्वत्र परिभाषा एक असावी

हें शिक्षण सर्व प्रांतभर सुरू आहे. एका ठिकाणीं सिरा = व्हेन मानतात तर दुसरें ठिकाणीं ा = ४ प्रणालिका (रोहिणी, नीला, अरुणा, गौरी) मानतात. अशा दोन तऱ्हेच्या शिक्षणपद्धतींतून ार झालेले दान विद्यार्थी एकत्र आले तर ते परस्परांची परिभाषा समजूं शकणार नाहींत. अशी विचित्र स्थिति निर्माण न व्हावी व या शिक्षणप्रणालींतून बाहेर पडलेल्या सर्वच लोकांनीं परस्परांशीं बोलतांना रांना बरोबर समजेल अशीच परिभाषा वापरावी हा या परिषदेचा मूल उद्देश आहे. मग ह्यासाठीं ापकानें काय करावें ! अध्यापकानें प्रत्येक विवरण प्रत्यक्ष शरीराला धरूनच करावयास पाहिजे. कोणता-शरीरविषयक शब्द हा शरीरांत कोठें कोठें काय काय आहे हें स्पष्टपणें दाखविणाराच असला पाहिजे हा ला दंडक !

नाभि शब्दाचे ३ अर्थ

आयुर्वेदांत कांहीं शब्दांचे विशिष्ट असे उपयोग केले आहेत. त्या शब्दांचे सर्व अर्थ नमूद करावेत. ०—नाभि ह्या शब्दाचे तीन अर्थ आहेत. (१) बेंबी (२) महास्रोतसांतील पक्वामाशयमध्य) पृष्ठवंशांतील चतुर्विंशति धमन्यांच्या उगमाचा विशिष्ट भाग.—हे सूत्राच्या मागील संदर्भावरून ता अर्थ कोठें लावावा, हें नीट समजावून सांगावें. हें अध्यापकांस समजू शकेल. परन्तु तें सामान्यतः ार्थ्यांच्या कक्षेच्या बाहेर आहे. म्हणून प्रत्येक वेळीं ' नाभि ' शब्द आला रे आला कीं तीनहि अर्थ गितले पाहिजेत. तरच विद्यार्थ्यांच्या पदरांत योग्य ज्ञान पडेल. तसेंच " रस " हा शब्द अनेक अर्थी . परन्तु आपल्या शास्त्रांत जेथें जेथें रस हा शब्द द्रव्यवाचक येईल तेथें तेथें केवल 'मांसरस' असा च अर्थ निश्चितपणें घेतला जातो. त्याचे इतरहि अर्थ आहेत हें स्पष्ट सांगावें. आपलें शास्त्र सुयोग्य हें निश्चित ! तथापि सर्वांना ज्या कल्पना, ज्या संज्ञा मान्य होतील त्या आपण नमूद करूं. जरी त्या च्या असल्या तरी आज त्या नमूद करूं. वाटल्यास पुढें (उद्यां) त्यांत बदल करतां येईल.

ग्रंथांचा आधार दाखवावाच

केवळ अन्वयार्थ लावून न दाखवितां तो अन्वय तसाच कां लावला यासाठीं निश्चित आधार दाख-ाच पाहिजे. कारण जितक्या प्रकृति तितक्या विचारधारा व बुद्धि यांत भिन्नत्व आढळणार; अध्यापकानें गतींहि मत देतांना " हें माझें मत " असेंच फक्त न सांगतां निर्भिडपणें ग्रंथांचा आधार घ्यावा. आपल्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जवळ वाग्भट, सुश्रुतांसारखे अप्रतिम ग्रंथ आणि अरुणदत्त, हेमाद्रि, डल्हणासारख्या कसलेल्या टीकाकारांच्या सुंदर टीका आहेत. त्यांनीं सूत्रांचा अर्थ पूर्ण होतो. तो अर्थ मान्य नसेल तर त्यावरील विवरण करणें अयोग्य ठरेल. म्हणून टीकाकारांच्या मतांचें बंधन मान्य करावयास पाहिजे. कारण शब्दाची रचना बदलली कीं लगेच अर्थ भिन्न होतो असें आपल्या शास्त्रांत व्हावयास नको. म्हणून टीकाकारांचें मत मान्य करूनच अर्थ लावावा, असें माझें मत आहे. सर्वांनीं आपापलीं मतें सांगावीत. इतःपर परिषद जो निर्णय घेईल तोच सर्वमान्य समजावा.

निर्णित विचार प्रसिद्ध करावेत

. जे विचार आपण निश्चित करूं ते ते प्रसिद्ध करावेत. जरूर वाटेल तर परप्रान्तीय वैद्यांनाहि ते पाठवावेत. त्यांचीं मतें मागवावींत; त्यावर चर्चा पुढें होईलच. पण आज मात्र आपण जें ठरवूं तेच निर्णीत विचार! आणि त्या विचारांच्या अनुरोधानेंच अध्यापकानें आपल्या अध्यापनाची दिशा ठरविली पाहिजे. याप्रमाणें आपण परिषदेच्या कार्यास लक्षपूर्वक आरंभ करावा, अशी मी सर्वांस विनंति करतो. "

सुयोग्य अध्यक्षांची योजना

यानंतर अध्यक्षांची सूचना मांडतांना नाशिक येथील सुप्रसिद्ध वृद्धवैद्य वैद्यरत्न विष्णुशास्त्री केळकर म्हणाले, " मान्यवर उद्घाटक श्रीमान् डेग्वेकरजी यांनीं या परिषदेचे जे हेतु सांगितले व ज्या नियमानुसार या परिषदेचें कामकाज चालावें अशा त्यांनीं सूचना केल्या, त्या सर्वांस मान्य होण्यासारख्याच आहेत. आतां अध्यक्षाच्या नांवाची सूचना करण्यापूर्वी सद्यःकालीन परिस्थिति काय आहे याची कल्पना थोडक्यांत सांगतो. 'काय तस्मै नमः' असें म्हटलें आहे. पूर्वकालांत आयुर्वेद मागें पडला. नंतरच्या कालांत त्याच्या शिक्षणाला मुरड घालण्यांत आली. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळीं जसे पाकिस्थान व हिंदुस्थान असे तुकडे पडले तसेंच आयुर्वेदांत पाश्चात्य वैद्यकाची भेसळ करून आयुर्वेदीय शिक्षण देण्यास प्रारंभ झाला. 'सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः' । या उक्तीप्रमाणें त्यावेळीं तें मान्य केलें गेलें. १९३८ सालीं निर्माण झालेल्या कायद्यानें तें संकट अधिकच वाढलें. तें संकट दूर करण्याचा प्रयत्न केल्यामुळें आज शुद्ध आयुर्वेदाला मान्यता मिळाली आहे. सध्यां जो शुद्ध आयुर्वेदाचा प्रयत्न होत आहे त्यांत आपण यशस्वी होऊंच अशी खात्री नाहीं, कारण मध्यंतरी वैद्यांची एक पिढी नाहींशी झाली आहे. तरीसुद्धां आपण जमून आठवून कृति करण्याकरितां एकत्र जमलो आहोत. अशा वेळीं अध्यक्ष पंडित असावा. तो सर्वांना चांगला परिचित असावा, हा उद्देश समोर ठेवून महाराष्ट्राला सुपरिचित असलेले आणि नगर, सातारा, मुंबई व आतां नागपूर येथें कार्य करीत असलेले आचार्य वेणीमाधवशास्त्री यांना या परिषदेचें अध्यक्षपद देण्यांत यावें अशी मी सूचना करतो. सर्व कार्य निर्विघ्नपणें पार पाडण्यास श्रीधन्वन्तरी समर्थ आहेच.

अध्यक्षनामाच्या सूचनेला अनुमोदन देतांना वैद्य बिंदुमाधव पंडित म्हणाले ' अध्यापक परिषद घ्यावयाची ठरली त्या दिवसापासून अध्यक्ष-नेमणुकीचा प्रश्न आमच्या डोळ्यासमोर होता. वेणीमाधवशास्त्री व डेग्वेकरजी आपल्या पत्रांतून परिषदेसाठीं योग्य अध्यक्ष निवडण्याच्या सूचना करीत असत. वेणीमाधवशास्त्री यांना आपलीं मतें मांडावयाचीं असल्यामुळें अध्यक्षपद नको होतें. अध्यक्षाला हिरिरीनें मतें मांडतां येत नाहींत तथापि अध्यापक परिषदेचा अध्यक्ष हा अभ्यासी व उत्तम अध्यापक असलेलाच पाहिजे म्हणून मी वैद्यराज वेणीमाधवशास्त्री यांनींच या परिषदेचें अध्यक्षपद स्वीकारावें या सूचनेला आपल्या सर्वांच्या वतीनें पाठिंबा देत आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हीं परिषद केव्हां घ्यावी याबद्दल बरीच चर्चा पूर्वी झाली आहे. सर्व गुरुजनांना व आयुर्वेद विद्यालयांना सुटी असेल अशाच वेळीं ती घेणें शक्य आहे व त्या दृष्टीनें ११ ते १७ या तारखा १ महिन्यापूर्वी ठरविल्या व जाहीर केल्या. तथापि त्यावेळीं कोणीहि या तारखा गैरसोईच्या आहेत असें सुचविलें नाहीं. व जेव्हां प्रत्यक्ष लेखी आमंत्रण पाठविलें तेव्हां फॅकल्टीच्या परीक्षा त्यावेळीं चालू होणार असल्यामुळें आपण स्वतः परीक्षक असल्यामुळें येतां येत नाहीं असें अनेकांनीं कळविलें. अर्थात् सर्व योजना झाल्या असल्यामुळें तारखा पुढें ढकलणें युक्त वाटलें नाहीं. जरी यावेळीं अल्पारंभ झाला तरी इतर सर्व सत्प्रयत्नां-प्रमाणेंच हाहि प्रयत्न क्रमानें मोठें स्वरूप धारण करील यांत आम्हांस शंका वाटत नाहीं.

आज ज्यांचें नांव अध्यक्षपदासाठीं सुचविलें आहे त्यांनींच मुंबई-सरकारकडे खेपा घालून हा शुद्ध आयुर्वेद अभ्यासक्रम मंजूर करून घेतला आहे. अशा या अभ्यासक्रमाच्या अध्यापनाचे कर्णधार बनून यांनीं हें कार्य शेवटास न्यावें अशी त्यांना आमची विनंति आहे. त्यांची इच्छा नसतांहि आम्हीं त्यांना अध्यक्षपद ग्रहणाबाबत विनंति केली व त्यांनीं ती मान्य केली याबद्दल मी त्यांना या परिषदेतर्फे धन्यवाद देतो व त्यांच्या नांवाच्या आलेल्या सूचनेला अनुमोदन देतो.

या अनुमोदनानन्तर आचार्य वेणीमाधवशास्त्री यांनीं अध्यक्षपद ग्रहण केलें व भाषणास प्रारंभ केला. ते म्हणाले "पूज्य पं. डेग्वेकरजी, वैद्यरत्न केळकरशास्त्री, श्री. दत्तोपंत कुलकर्णी, वैद्य जळूकरशास्त्री, वैद्य मरुलाराध्यशास्त्री व बंधु-भगिनींनों, आपण मला अध्यक्षपद दिलेत व मी तें घेतलें. अखिल भारतीय कीर्तीचे विद्वान् पं. डेग्वेकरजी यांना या परिषदेचें उद्‌घाटन करणें भाग्याचें वाटलें तर मला अध्यक्ष होतांना किती भाग्याचें वाटत असेल याची कल्पनाच करणें बरें. नासिककरांचें माझ्यावर अलोट प्रेम आहे व तेंच प्रेम येथें व्यक्त झालें आहे त्याबद्दल मी आपला ऋणी आहे.

गुरुपरंपरा शिक्षणांतील स्फुल्लिंग चेतवितां येईल

या अध्यक्षपदासाठीं सुयोग्य व्यक्ती हवी आहे. मला कार्याची तळमळ आहे. पण मी मिश्र-शिक्षणाचा विद्यार्थी आहे. गुरुपरंपरेनें शिक्षण देणाऱ्या गुरूकडे जाऊन ज्ञान घेण्याची दुर्दम्य इच्छा माझ्या ठिकाणीं आहे, पण ती आजवर तृप्त होऊं शकली नाहीं. पण अशा परिषदेच्या निमित्तानें मागच्या गुरुपरंपरेतील एक स्फुल्लिंगहि मिळाला तरी पुनः त्यापासून ज्ञानाग्नि चेतवितां येईल. आज या ठिकाणीं पूज्य डेग्वेकरजी, वैद्यरत्न केळकरशास्त्री यासारख्या तळमळीच्या वृद्ध व्यक्ति उपस्थित आहेत ही आपल्या भाग्याची गोष्ट आहे. त्यांची जिवंत तळमळ पाहून असें वाटतें कीं, अशा व्यक्ति आहेत तोंपर्यंत अशा तऱ्हेच्या कार्याचा आरंभ व्हावयास पाहिजे. आपल्या प्रयत्नांनीं व सदिच्छांनीं मुंबई सरकारच्या मनांत श्रीप्रभुधन्वन्तरींनीं शुद्ध आयुर्वेदाचा कोर्स सुरूं करण्याची प्रेरणा दिली. व त्यामुळेंच आज मला गुरुपरंपरेंतील ज्ञान प्राप्त करून घेण्याची व देण्याची शक्यता वाटूं लागली आहे.

आपल्या प्रांतांतील या शिक्षणक्रमाकडे इतर प्रांतांचें लक्ष आहे. अखिल भारतीय आयुर्वेदिक कॉंग्रेसचे अध्यक्ष पंडित शिवशर्मा यांनीं जोधपुर येथील संमेलनांत स्पष्टपणें सांगितलें आहे कीं, "आयुर्वेदाच्या बाबतींत महाराष्ट्रच मार्गदर्शन करील." म्हणून हें स्पष्ट आहे कीं, आपल्या आयुर्वेदसेवेची सर्व आर्यावर्ताला गरज आहे. आपल्या श्रमांचें चीज होणार आहे. आपल्या श्रमाला आशा आहे. गौरव आहे. याकरितां सर्व शक्ति एकवटून परिश्रम करा अशी माझी सर्वांना नम्र विनंति आहे.

मी मिश्रशिक्षणसंस्थेचा अधिपति होतो. मला माहित आहे कीं, त्या आयुर्वेद-विद्यालयांना शुद्ध आयुर्वेदाचें अध्यापन करणारे शिक्षक मिळत नसत. स्पष्ट बोलणारे विद्यार्थीसुद्धां अशा तऱ्हेचे उद्‌गार काढीत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असत. म्हणून मला अध्यापक तयार करावे लागले. पहाटेला उठवून कसें शिकवावें, विषयांची तयारी कशी करावी, इ. मी शिकवीत असें. अशा प्रकारें तयार केलेला एक विद्यार्थी आज या परिषदेंत एक कार्यकर्ता आहे.

शंका निर्माण करून, त्यांचीं उत्तरें देत देत अध्यापन करावें. बी. टी. कॉलेजप्रमाणें आयुर्वेदाचीं अध्यापक विद्यालयें निघतील तो सुयोग. आपला आजचा प्रयत्न म्हणजे अशा विद्यालयांची मुहूर्तमेढ आहे.

कलाहि आहे आणि शास्त्रहि आहे

आयुर्वेद शास्त्र आहे; त्याचप्रमाणें कलाहि आहे. अध्यापन ही देखील कला आहे व अध्यापनाचेंहि एक शास्त्र असतें. कला ही शास्त्रावर उभी असते. याकरितां शास्त्राचा पाया भक्कम पाहिजे. कलेनें सामान्य जनांना आनंद होतो पण तो कलेच्या केवळ ढोबळ स्वरूपदर्शनानेंसुद्धा होतो. शास्त्रज्ञांना त्या कलेंत वापरलेले नियम पाहून आनंद होतो. गायन सामान्य जनतेला व शास्त्रज्ञानाहि मधुर वाटतें, पण गायक शास्त्रोक्तहि असेल तर दोघांनाहि अनुपम आनंद होतो. परिषदेच्या आरंभापासून आपण 'शास्त्र' व 'कला' यां दोन्ही दृष्टीनें आयुर्वेदाचे अध्यापकांकडे पाहूं या!

येथें जमलेल्या अध्यापकांपैकीं कोणीहि असें समजतां कामा नये कीं आपल्या ठिकाणीं कलाहि नाहीं व शास्त्रहि नाहीं. कोणांत कला आहे. कोणांत शास्त्र आहे. कोणांत दोन्ही आहे. ज्याच्यांत जें असेल तें घ्या! काय नाहीं तें पाहूं नका. यामुळेंच आपलें कार्य वर्धिष्णु होईल. वैद्यकशास्त्र, वैद्यककला, अध्यापनशास्त्र, अध्यापनकला ह्या चारी गोष्टी ज्ञात असलेल्या चतुरस्त्र वैद्याची आज आपल्याला नितान्त जरूरी आहे.

आपल्यापुढील समस्या पाहून निराश होऊं नका. गड मोठा चढावयाचा असला तरी हळु हळू चढूं लागा, निराश होऊं नका. छाती दडपूं देऊं नका. मी पाहातों आहे कीं, इतर कॉलेजामधूनहि योग्य अध्यापक नसतात. अनेक विद्यार्थ्यांतून कांहीं मोजकेच विद्यार्थी तज्ज्ञ निवडतात. त्याच्यावर संस्कार करून त्यांना अध्यापक करावें लागतें. डोळ्यांत तेल घालून असे लोक तयार करावे लागतात. आपणही प्रयत्न करूं तरच यशस्वी होऊं.

आपण आपला आयुर्वेद असें म्हणतो, पण 'आयुर्वेद कांहीं आपलेंच शास्त्र नाहीं. तें जगाचें शास्त्र आहे. त्याचा उपयोग प्रत्येक व्यक्तीस झालाच पाहिजे. मानवतेसाठीं आयुर्वेदोद्धाराचा प्रयत्न आपण करावयालाच पाहिजे.

विद्यार्थ्यांच्या भावी जीवनाची जबाबदारी आपल्यावर आहे. ते लक्ष देणार नाहींत, प्रसंगीं आपली वा आयुर्वेदाची टिंगलहि करतील, तरी आपण त्यांना ज्ञान दिल्याशिवाय राहातां उपयोगी नाहीं. मातेप्रमाणें आपण त्यांच्या गुरुमाऊली आहांत. असंख्य दोष पोटांत घालून त्यांना शिकवलेंच पाहिजे सुश्रुतानें गुरु कसा असावा व शिष्य कसा असावा हें वेगळ्या प्रकारानें सांगितलें! परन्तु सुश्रुताच्या वेळचा काळ निराळा व आजचा काळ निराळा. उत्तम बुद्धीचा विद्यार्थी नसला व आपलें शिकवणें आळवावरचें पाणी झालें तरी त्याला शिकविलेंच पाहिजे. अध्यापकांनीं आपल्या शास्त्राचें अध्ययन सतत केलें पाहिजे म्हणून मी अध्यक्ष असलो तरी या ठिकाणचा १ ला शिष्य आहे. गुरुपरंपरा शिक्षणांतलि १ला धडा मला येथें मिळेल.

ज्यांची दृष्टी, नवीन शास्त्र प्यायला मिळाल्यामुळें, प्रत्यक्षाला धरून सतत असणार, अशा २ व्यक्ति या परिषदेस हजर आहेत. तुलनेवांचून ज्ञानग्रहण सम्यक् होत नाहीं. तुलनेनेंच ज्ञानग्रहण वाढतें. तौलनिक ज्ञान अध्यापकांचें जितकें अधिक तितकें पाहिजेच. जगांतील सर्व वैद्यक पथांचें पाणी प्यायलेला व पचवलेला गुरु असेल तर विद्यार्थ्यांपुढें वर्गांत त्याचें पाणी जाणार नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिषदेचें कार्य असें चालावें

परिषदेचें कार्य कसें चालावें याबद्दलची माझी कल्पना आपल्यापुढें मांडतो. अध्यक्ष म्हणून माझ्या मताचा दबाव नाहीं. आपण विचार करून निर्णय द्याल त्याप्रमाणें चालूं! दुसरीहि बाजू आपणापुढें यावी हाच फक्त हेतु आहे.

वैद्यक ग्रंथांचा अभ्यास केवळ वातापित्तकफांच्या दोषदृष्टीनें होतो. पण शरीर केवळ दोषघटित नाहीं. तें दोषधातुमलमूल असें आहे. म्हणून धातूंचा व मलांचा विचार दोषांबरोबर झालाच पाहिजे. मी स्वतः दोष मानतोच, पण धातूंच्या विचारावर नित्य भर देतो. कारण धातूंचा विचार केला जात नाहीं. स्वस्थ शरीर मला दिसत नाहीं. अध्यापन करतांना, रोगी परीक्षण करतांना दोषधातुमलांच्या चिन्हांचें स्पष्ट वाचन करतां यावयास पाहिजे. धातुसारासारत्वाचीं चिन्हें पाहिलीं पाहिजेत. जे धातु सारवान्, त्यांचे रोग होत नाहींत व झालेच तर कारणें बलवत्तर घडलीं असलीं पाहिजेत, असाच अर्थ होऊं शकतो. म्हणून दोषांबरोबरच धातु व मल यांना सोडून कोणताहि विचार होऊं नये अशी विनंति आहे.

वायूचे गुण शिकविल्याबरोबर वर्गांत स्वतःचें व इतरांच्या शरीरांचें परीक्षण करावयास लावलें पाहिजे. दोषधातुमलांच्या प्रकृति पहावयास शिकविल्याच पाहिजेत. मैत्र्यांवरी लौकर दाट भारी, अशी मैंढी 'मलप्रकृति' आहे. अस्थिधातूचा मल जो 'केश' त्याचें आधिक्य तिच्या शरीरांत. त्यामुळें अस्थिधातूच्या विरुद्ध गुणाची ती असते. मैंढी=भित्रेपणा हें समीकरण आहे. अशी मलप्रकृतीची व्यक्ति रात्रीं लघ्वीला एकटी उठणार नाहीं. ती सहधर्मचारिणीला उठवते हें प्रत्यक्ष दिसतें. अशा रीतीनें प्रत्यक्षपूर्वक शिक्षणास प्रारम्भ केला पाहिजे.

शुद्ध रक्त व विशुद्ध रक्त या संज्ञा उपयोगांत आणा

आधुनिक शास्त्राचा पगडा लहानपणापासून मुलांवर असतो त्यामुळें आयुर्वेदाच्या अध्ययनांत फार अडचणी येतात. 'अशुद्ध' रक्त व 'शुद्ध' रक्त असे शब्द याचमुळें मुलांच्या डोक्यांत असतात; पण ते चूक आहेत! अशुद्ध रक्त व निरोगी शरीरांत! हें असणें कसें शक्य आहे? अशुद्ध रक्त असेल तर रोगाचीं पूर्वरूपें रूपें कांहींतरी दिसलींच पाहिजेत. ॲलोपॅथींतहि व्हीनस ब्लड व आर्टेरिअल ब्लड अशा संज्ञा आहेत. आयुर्वेदांत शुद्ध रक्त व विशुध्द रक्त असे रक्ताचे २ प्रकार आहेत. तद् विशुद्ध हि रुधिरं बलवर्णसुखायुषा। युनक्ति प्राणिनां प्राणाः शोणितं हि अनुवर्तते॥ ह्या वचनाप्रमाणें, व 'पीत्वा अंबरपीयुषं' इ. वचनाप्रमाणें अधिक प्राणयुक्त रक्त विशुध्द व अल्प प्राणयुक्त तें शुध्द रक्त असे अर्थ आयुर्वेदांत आहेत.

मूत्रोत्पत्तीबद्दल Kidney मध्यें मूत्रोत्पत्ति होते असें वैद्य म्हणणार नाहीं. व आज जरी म्हणत असले तरी आधुनिक वैद्यहि आयुर्वेदाप्रमाणेंच ते बोलूं लागतील. त्यांनीं आज म्हटलें नाहीं म्हणून आम्ही आम्हांस चूक समजतां कामा नये. Uric Acids लिव्हरमध्यें तयार होतात हें आतां बोलूं लागले आहेत. पण मलधराकलेची व्याप्ति 'यकृत्. समन्तात्कोष्ठं च तथा आंत्राणि समाश्रिता' अशी आम्ही नित्य सांगतोच आहे. मूत्राचे Mother Substances आंतडींत कशावरून तयार होत नसतील? ॲलोपॅथीचे सिद्धान्त पाहून आपण आपले सिद्धान्त बदलूं नयेत. आपल्या शास्त्राला धरूनच पाहावेत. केवळ मूत्राचीच नव्हे तर इतर धातुमलांचीहि उत्पत्ति आंतांत होते. तिर्यग्वह धमनींचें कार्य पहा— शरीरं तर्पयन्ति... मूत्रपुरीषस्वेदाश्च विवेचयन्त्यः ....। असें विवेचन आहे. स्वेदाच्या उल्लेखावरून मेदोधातूंचें पचन तेथें होतें, मेदाचें सारकिट्ट पृथक्करण तेथें होतें हें समजूं शकतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ग्रहणी = duodenum ! असे वैद्य म्हणतात. पण १९२९ सालींच नाशिक येथील वैद्यसंमेलनांत 'पित्ताशय-ग्रहण्योर्निर्णयः' व 'हृदय' यावर मी निबंध वाचले आहेत. व तेव्हां हें दाखवून दिलें कीं ग्रहणी हा अवयव फार मोठा आहे. Stomach च्या Pyloric end नंतर जो लघ्वंत्राचा भाग सुरूं होतो, तिथपासून तो मोठ्या आंत्राचा (उंडुकाचा) सगळा भाग तिच्यांत येतो पक्वाशयापर्यंत तिची मर्यादा आहे.--

षष्ठी पित्तधरानाम या कला समुदाहृता ।
पक्वामाशयमध्यस्था ग्रहणी सा प्रकीर्तिता ॥

असें सुश्रुतानें स्पष्टतया सांगितलें आहे. व पक्वाशय 'श्रोणिगुदयोरुपरि अधोनाभेः' व वामाश्रयोऽग्निर्ग्रहणी गुदं च' असें वचन बस्तिविधि अध्यायांत आहे. म्हणून ग्रहणीची मर्यादा पक्वाशयापर्यंत आहे, असा माझा अर्थ आहे. आपल्यापुढें मी शंका ठेवतो ! आपण विचार करा.

वाग्भटासारखा उत्कृष्ट ग्रंथकार लाभला

ग्रंथ शिकवतांना पूर्ण लक्षांत असूं द्या कीं वाग्भटासारखा उत्कृष्ट दुसरा कोणताहि ग्रंथकार आयुर्वेदाला लाभला नाहीं. व सूत्रस्थानाचें बाबतींत तर वाग्भटच पूर्णाधिकारी आहे. तो वैय्याकरणी आहे. मीमांसकांची दृष्टि त्याला आहे. कालिदासाप्रमाणें तो कवि आहे. विद्वान् व समतोल विचाराचा वैद्य आहे. तो जैन आहे किं हिंदु आहे याबद्दल वानवा आहे. त्याचेपासून वैद्य कसा असावा याविषयीं फार मोठा बोध आपणांस होतो.

व्याधेस्तत्त्वपरिज्ञानं वेदनायाश्च निग्रहः । एतद्वैद्यस्य वैद्यत्वं............ ।

एवढेंच वैद्याचें कर्तव्य आहे. रोग्याच्या इतर कोणत्याही गोष्टी--त्याचा धर्म, नीति, समाज इ. पहाण्याची वैद्याला गरज नाहीं. म्हणून, जिन-जिनसुत-तारा-भास्कर इ. सर्वांची आराधना करावयास त्यानें सांगितलें आहे. 'सर्वधर्मेषु मध्यमां' या वृत्तीनें त्यानें वागावयास सांगितलें आहे. अध्यायांची मांडणी करतांनाहि एकांतून दुसऱ्यांत फुलोरा आहे. १ ल्या अध्यायांत सगळीं Universal तत्त्वें सांगून टाकलीं आहेत. रोगारोग्यैक कारणापैकीं 'काल' विशद करणारा तिसरा अध्याय, अर्थविस्तार मोठा पण अगोदर कर्म श्रेष्ठ म्हणून अनागताबाधप्रतिषेधाध्यायांत वेग इ. सांगितले, मग द्रवद्रव्य, अन्नस्वरूपीय, बाह्य कारणं सांगून निजकारणें जे दोष त्यांचें विवेचन ११ ते १४ अध्यायापर्यंत, शोधनादि उपचारापर्यंत केलें. असें सुसूत्र विवेचन आहे. मगर ओढते त्याप्रमाणें विद्यार्थ्यांना हळूंहळूं आयुर्वेदाच्या गाभ्याकडे तो ग्रंथकार ओढीत नेतो.

त्या द्रव्यांचा निघंटु कोठें आहे ?

वाग्भट व सुश्रुत यांनीं अन्नाचा जो विचार केला, त्याखेरीज इतर पुष्कळ द्रव्यें चिकित्सेंत आहेत, त्यांचा निघण्टु कोठें आहे ? वाग्भटाच्या स्वतंत्र निघण्टुचा उल्लेख श्री. पराडकरांनीं प्रस्तावनेंत केला आहे. प्रत्येक द्रव्याचीं गुणकर्में दोषधातुमलांप्रमाणेंच सांगितलीं पाहिजेत. वाग्भटाचार्य गुळास - प्रभूतक्रमिमज्जासृक्मेदोमांसकफोऽपरः । असें वर्णितात. दोषधातु, मूर्तभाव व अमूर्तभाव इ. सर्वांवरचीं कार्यें पहावयास पाहिजेत. असावयासच पाहिजे होतीं. ज्या निघण्टूंत तीं पूर्वीं असतील त्याचा उल्लेख कोठें तरी असेलच. निघण्टूचें अध्यापन त्या दृष्टीनें व्हावयास पाहिजे.

'ऋतुचर्चा' शिकवतांना नुसत्या श्लोकांचा अर्थ नको. बोधक शिक्षण पाहिजे. अध्यायांतील प्रमुख सूत्र सांगितलें पाहिजे आगोदर, व नंतर त्याचा विस्तार कसा तें दाखविलें पाहिजे. देशकालात्मगुण-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विपरीतगुणोपासनेन च ', याप्रमाणें चिकित्सा करावयास विपरीत गुण समजावे, हा उद्देश ऋतुचर्या शिकण्यांत आहे. (या ठिकाणीं विपरीत शब्द आहे, विरुद्ध नाहीं. दोषसमान=विरुद्ध. असा शास्त्रकारांचा अर्थ आहे.) कालाचा परिणाम मनुष्यशरीरावर फार मोठा आहे. वाताऽजलं जलाद्देशं देशात्कालं स्वभावतः। विद्यात् गरियस्तरं । म्हणून ऋतुचर्येंत कालाचें महत्व फार आहे. प्रत्येक सूत्रांतील अर्थ तसा कां ? हें अध्यापन करतांना सांगतां आलें पाहिजे.

वाग्भटानें आपल्या रचनाचातुर्यानेंच खूप अर्थ भरून ठेवला आहे. लंघनैःक्षपिते दोषे…… इ. सूत्राची दृष्टि सर्वत्र लावली पाहिजे. या सूत्रांत ३ सतिसप्तमीचीं वाक्यें आहेत. त्यांच्यांत कार्यकारणभाव आहे. लंघने सति दीप्तोऽग्निः । दीप्तेऽग्नौ सति लाघवं व लाघवे सति ? ते पुढें ! ग्रंथ शरीरावर कसा वाचावा ? रुचिः पक्तिः बलं इ. उत्पन्न होतात. लाघवानंतर बल, व ओज निर्माण होतात. व्यायामानंतर कर्मसामर्थ्य निर्माण होतें. लाघवं प्रथम, मग सामर्थ्य होतें ! अग्निदीप्ति झाल्यावर अन्नाची मागणी म्हणून क्षुत् तृट् । मेदाचा क्षय म्हणून विभक्तघनगात्रत्व ! याप्रमाणें अर्थ समजण्यास सुशिक्षितांशीं संबंध ठेवून अध्यापनशक्ति विकसित करावयास पाहिजे.

स्वप्नकालीं औषध कां ?

औषधकालांतील 'ऊर्ध्वजत्रुविकारेषु स्वप्नकाले प्रशस्यते ' हें सूत्र आधुनिक प्रयोग वाचल्यावर अधिकच स्पष्ट होतें. मधमाशा दिवसभर काम करून येतात तेव्हां त्यांच्या डोक्यांतील पोकळी रिकामी असते. व रात्रीच्या विश्रांतीनन्तर जेव्हां त्या कामावर जातात त्यावेळीं त्यांच्या डोक्यांतील पोकळी भरलेली असते ! ह्यावरून रात्रीं निजतांना घेतलेलें औषध जत्रूर्ध्व भागांत जाऊन कार्यकारी होण्याच्या आयुर्वेदीय कल्पनेस पुष्टि मिळते (स्पष्टीकरण आयुर्वेदीय दृष्टीनेंच करावें, पण त्या स्पष्टीकरणास अशी पुष्टि मिळते येवढेंच येथ दर्शविलें)

' पुरोवातातपांस्त्यजेत् ' पूर्वेकडील ऊन आयुर्वेद आरोग्यकारी मानीत नाहीं. युक्त्या सेवित असें संध्याकाळचें ऊन घेणें चांगलें. थंडप्रदेशांतील शास्त्रांचे नियम आपल्याकडे तंतोतंत लागू करतां येणार नाहींत. सूर्योदयानन्तर १ तासाचें ऊन व सूर्योस्ताचें वेळचें ऊन यांच्या तीव्रतेची तुलना केल्यास, संध्याकाळच्या उन्हाचा फायदा मिळून दुरुपयोगहि होत नाहीं. उष्णता हळूं हळूं वाढणारी गोड वाटली तरी जाचक असते तर हळूंहळूं कमी होणारी ही जाचक नसते !

टीकाकाराविषयीं मला सूचना द्यावीशी वाटते ! मला जेथें वाग्भटासारख्या उत्तम ग्रंथकाराचीहि चूक दिसते, तेथें टीकाकारांतहि ती दिसली तर दाखविलीच पाहिजे ! चरकांत शुद्धगुड 'मेदोमांसकर' आहे. व अशुद्ध गुड प्रभूतक्रमि-कफकर आहे ! पण वाग्भटानें एकाच प्रकारचा गूळ-प्रभूतक्रमिमज्जासृक्मेदो-मांसकफोऽपरः । असे समल गुळाचे गुणकर्म सांगितले ! जो दोषगुणांना वाढवतो तो धातुनाहि वाढवतो ? हें वचन बरोबर वाटत नाहीं. वाग्भटाचार्य श्रेष्ठ पण ज्ञानाच्या क्षेत्रांत श्रेष्ठाश्रेष्ठता पहाण्याचें कारण ? बुद्धीला पटेल असेंच विवेचन पाहिजे ! टीकाकारांचें वेळीं वाग्भटापेक्षांहि प्रत्यक्षांची साधनें कमी झालेली होती. म्हणून टीकाकारांना सदैव प्रमाण मानलेंच पाहिजे असें नाहीं ! त्यांचींहि वचनें घासून घेतलीं पाहिजेत.

आयुर्वेदशास्त्राचें पचन, विवेचन, सारग्रहण, उत्सर्जन योग्य रीतीनें व्हावें म्हणून मी माझे विचार मांडले ! मत मांडलीं नाहींत. माझ्या विद्येची मला पूर्ण कल्पना आहे. मी किती मोठा आहे, व वैगुण्य किती ? तें मी जाणतो ! आयुर्वेद क्षेत्रांतील 'अखिल भारतीय ग्रंथालय' असा व्यक्ति आज उपस्थित आहेत. 'वरेण्यं भर्गो ' तेज त्याचें मीं ध्यान करतों. आपल्यासारख्या विद्वानांच्या तेजाचें मी ध्यान करतों व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माझ्या बुद्धीला त्यामुळें चांगलीच प्रेरणा मिळावी अशी इच्छा करतो. येथें गुरुपरंपरेतील ज्ञानवृद्ध व्यक्ति आहेतं, उभयवैद्यकविद्याकोविद आहेत. आयुर्वेद व विज्ञान यांतहि पारंगत असे कुळकर्णीजी, डेग्वेकरजी आहेत. म्हणून भारताला देण्यासारखें या परिषदेतून निर्माण होईल अशी आशा मला वाटते ! नासिककरांनी प्रेमानें ही संधि दिली याबद्दल मी अत्यन्त ऋणी आहे.

याप्रमाणें अध्यक्षीय भाषण झाल्यानंतर वै. ग. म. लोखंडे यांनीं परिषदेस आलेले संदेश व पत्रें वाचून दाखविलीं. त्यानन्तर दुपारचा कार्यक्रम निश्चित करून सकाळचा कार्यक्रम संपला.

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषदेतील अध्यापन कार्यास ता. ११ रोजीं दुपारीं पं. डेग्वेकरजी यांच्या अध्यापनानेच प्रारंभ झाला. अध्यक्षांनीं उद्‌घाटकांना 'अध्यापनपद्धतीचें दर्शन द्यावें' अशी विनंति केल्यावरून वाग्भटाचा सर्वांत महत्वाचा प्रथम अध्याय हा त्यांनीं शिकवावयास घेतला.

पं. डेग्वेकरजी म्हणाले:— "हा अध्याय अत्यंत महत्वाचा आहे. अष्टांगहृदयाचें हृदय सूत्रस्थान व त्या हृदयाचें हृदय म्हणजे हा अध्याय, याचें संपूर्ण पाठान्तर विद्यार्थ्यांनीं करावें असा अध्यापकांनीं आग्रह, नियम केलाच पाहिजे. व तसें पाठान्तर विद्यार्थ्यांकडून करवून घ्यावें. या अध्यायांतील प्रत्येक श्लोक महत्वाचा आहे. शक्य झालें तर, ह्यांतील प्रत्येक श्लोकाचें विवेचन करण्याची माझी इच्छा आहे.

रागादिरोगान् इ. – १ ला श्लोक, हा श्लोक शिकवितांना मी विद्यार्थ्यांपुढें फळ्यावर पुढीलप्रमाणें लिहितों...

(१) सततानुषक्तान्
(२) अशेषकायप्रसृतान् अशेषान्
(३) औत्सुक्यमोहारतिदान्
} रागादिरोगान् यो जघान सः अपूर्ववैद्यः ।

असें लिहिल्यामुळें रागादिरोगांची विशेषणें स्पष्टपणें विद्यार्थ्यांच्या डोळ्यापुढें उभीं राहातात. त्यांच्या मनात तीं ठसतात. व अशा त्रिविध रागादिरोगांना जो नाहींसा करतो, तो अपूर्व वैद्य, अशी स्पष्ट कल्पना, अपूर्व वैद्याविषयींची, विद्यार्थ्यांच्या मनांत बिंबते.

'तस्मै अपूर्ववैद्याय नमः' । असा अन्वय सांगून रागादिरोगांना नाहींसा करणाऱ्या अपूर्व वैद्याला नमस्कार असो असा अर्थ सांगावा.

यानंतर प्रत्येक पद घेऊन त्याचे टीकांच्या आधारें स्पष्ट विवेचन करावें.

रागादिरोगान्:– राग इ. रोगांना, इत्यादींत द्वेष, लोभ हे येतात. म्हणून राग, द्वेष, लोभ या रोगांना असा अर्थ सांगावा. रोग शब्दाची व्याख्या, सामान्य व्याख्या, देहमनसन्ताप करणारे ते रोग, अशी तेथें सांगावी. व दोषवैषम्य म्हणजे रोग ही पुढें येणारी व्याख्याहि याच अर्थीं आहे हेंहि सांगून ठेवावें.

सततानुषक्तान्:—सतत असणारे, सर्वकाल असणारे. म्हणजे जन्मतः असणारे असा अर्थ येथें आहे.

अशेषकायप्रसृतान्—अशेषश्च असौ कायश्च अशेषकायः । शरीरांतील सर्व भाग. काहींहि शिल्लक नाहीं असें शरीर ते अशेषकाय. अशेषाश्च ते कायाश्च अशेषकायाः । म्हणजे जगांतील यच्चावत् प्राणिमात्रांचीं शरीरें असाहि अर्थ घ्यावा. न विद्यते शेषो येषां ते अशेषाः । म्हणजे ज्यांचा शेष किंवा बीज उरत नाहीं असे सर्व 'समूल' किंवा 'सबीज' असा अर्थ !

या ठिकाणीं 'प्रसृता.' म्हणजे अनुगताः । पसरलेले अशेषकायप्रसृता याचा अर्थ सर्व शरीरांत पसरलेले. किंवा जगांतील सर्व प्राणिमात्रांना होणारे किंवा बीजासहित सर्व शरीराला होणारे असा आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

औत्सुक्यमोहारतिदान् —

औत्सुक्य या शब्दाचा टीकाकारांचा अर्थ विषयोत्कंठा व त्यापासून निर्माण होणारा अभिलाष असा आहे. व हाच योग्य आहे.

मोहः— कार्याकार्यानभिज्ञत्वम् । शेक्सपिअरनें आपल्या हॅम्लेट नाटकांत 'मोह' बरोबर दाखविला आहे. काय करावें व काय करूं नये हें न कळणें म्हणजे मोह. सदैव हा एकच अर्थ मोह या शब्दाचा सर्व शास्त्रांत आहे.

अरति– अनवस्थितिः । कार्यांत उत्सुकता नसणें.

रागादि रोग, औत्सुक्य, मोह, अरति यांना निर्माण करतात. अर्थात् हे मानसिक चिकित्सेतील रोग आहेत. कायचिकित्सांतर्गत नाहींत. यांनाहि नष्ट करणारा जो वैद्य तो अपूर्व म्हणजे सर्वश्रेष्ठ किंवा पूर्वी कधींहि झालेला नाहीं, असा होतो. कायचिकित्सेतील रोगहि हीं लक्षणें झालीं असतां दुःसाध्य असतात. असें असतां हा सर्वश्रेष्ठ वैद्य त्यांना उत्पन्न करणाऱ्या रागादींना नाहींसे करतो हें त्याचें श्रेष्ठत्व होय.

हा अपूर्व वैद्य म्हणजे ईश्वर होय. ईश्वराला हा नमस्कार आहे. येवढेंच प्रथमारंभीं विद्यार्थ्यांना सांगावें. तो ईश्व कीं बुद्ध का आणखी कोणी, इ. सांगू नये.

अथातो आयुष्कामीयमध्यायं.........।

आयुष्याची कामना आहे हें या ठिकाणीं सांगितलें याचवेळीं आयुः म्हणजे काय ह्याची थोडक्यांत कल्पना विद्यार्थ्यांना द्यावी. नुसता आयु = आयुष्य असा अर्थ सांगून पुढें जाऊं नये. आयुष्याची व्याख्या या ग्रंथांत दिलेली नसली तर दुसरीकडे आहे ती सांगावयास हरकत नाहीं. टीका-कारांनीं ती घेतली आहे. 'शरीरेंद्रियसत्वात्मसंयोगो आयुः' या व्याख्येतील प्रत्येक शब्दाचें थोडक्यांत विशदीकरण येथेंच करावें. शरीर म्हणजे आपल्यापुढें दिसतें तें इतकेंच येथें सांगावें. फार बारकाईनें खोलांत या प्रश्नारम्भीं जाऊं नये. इंद्रियें म्हणजे ज्ञानेंद्रियें त्यांचीं नांवेंहि आतांच विद्यार्थ्यांच्या कानावर घालावीत. ज्ञान संपादन करणारे शरीरांतील जे अवयव त्यांना इंद्रिय-ज्ञानेंद्रिय असें म्हणतात. कर्ण, त्वचा, डोळा, जीभ, नाक हीं इंद्रियें होत. सत्व–मनआत्मा. म्हणजे हालचाल किंवा क्रिया ज्याच्या संयोगामुळें शरीरांत होतात तें तत्व. या सगळ्यांचा संयोग म्हणजे आयु.ः केवळ शरीर (बॉडी) म्हणजे आयुष्य नाहीं. तर त्यांचा सदैव संयोग. यांनीं सदैव एकमेकास लावून रहाणें म्हणजे आयु.ः या पैकीं एकहि जरी नसेल तर संयोग नाहीं. ५ इंद्रिय नसलीं तर प्राणी मृतवत् होईल.

तें आयुष्य सदैव चालू रहावें म्हणून जो जो विचार तो तो सर्व आयुष्कामीय होय. आयुर्वेदांतील प्रत्येक विचार आयुष्कामीय आहे. म्हणून आयुर्वेदाच्या मूळ तत्त्वाच्या या अध्यायाला आयुष्कामयि म्हटलें.

वाग्भटानें स्वतः निर्माण केलेलें शास्त्र या ग्रंथांत सांगितलें नाहीं. इतर आत्रेयादि महर्षींनीं, जीं शास्त्रें केलीं, त्यांच्या शास्त्रांतील भाग घेऊनच हा ग्रंथ केला. म्हणून "असें आत्रेयादि म्हणाले" असें सांगितलें.

आयुःकामयमानेन.........विधेयः परमादरः ॥२॥

धर्मार्थसुखसाधनम् आयुः । हें मूल वाक्य !

तत्कामयमानेन आयुर्वेदोपदेशषु विधेयः परमादरः । हें दुसरें वाक्य.

धर्मः । धारणाद्धर्ममित्याहुः । शरीरधारणाद्धर्मः ।

इंडियन पिनल कोड हें सुद्धा धर्मच आहे. असा धर्म व तो साधण्याचें साधन आयुर्वेद आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अर्थ – जें मिळविलें मागितलें जातें तें. मनीषा, इ. पूर्तीसाठींहि आयुष्याची आवश्यकता आहे. कारण आयुष्य असेल तरच धर्म व अर्थ प्राप्त होतील. सुख=मोक्ष— किंवा इच्छापूर्ति ! होईल.

असें आयुः मिळविण्यासाठीं आयुर्वेदोपदेशेषु विधेयः परमादरः म्हणजे आयुर्वेदीय तंत्रांत सांगितलेल्या सर्व गोष्टी समजून घेऊन त्यांचें आचरण करावें.

यानंतर आयुर्वेदाची परंपरा सांगितली आहे. आयुर्वेदशास्त्र कोणापासून मिळालें, कोणाला मिळालें इ. माहिती यांत आहे ती वृक्षरूपानें सांगावी. ब्रह्मा प्रजोपतिः असा क्रम फळ्यावर लिहून दाखवावा.

अत्रिपुत्रादिकान् याची फोड करावी. व ते दुसरे ऋषि, धन्वन्तरी, काश्यप, निमि इ. व अग्निवेशादि म्हणजे- भेड, जतूकर्ण, पराशर, हारित इ. नांवें सांगावी. यापैकीं प्रत्येकानें आपआपलें तंत्र रचलें. मग या ग्रंथाचें प्रयोजन काय ?

तेभ्योऽतिविप्रकीर्णेभ्यः
सारतरोच्चयः } अष्टांगहृदयं क्रियते !
नातिसंक्षेपविस्तरः

असें फळ्यावर लिहावें. यामुळें अष्टांगहृदय ग्रंथाचें प्रयोजन स्पष्ट समजेल. इतर ग्रंथ अतिविस्तारपूर्वक आहेत. त्यांचें सार फार विस्तारानें नाहीं व अति थोडक्यांत नाहीं, असें काढून हा ग्रंथ केला.

याला अष्टांगहृदय कां म्हटलें ? आठ अंगें कोणतीं ?

अष्टांगानि

काय | बाल (कौमारभृत्य) | ग्रह (भूतविद्या) | उर्ध्वांग | शल्य | दंष्ट्रा | जरा | वृष

अशा रीतीनें मांडून दाखवावें. व या प्रत्येकाचे पर्याय येथेंच सांगून सामान्य विवेचन करावें.

याप्रमाणें प्रारंभिक भागाचें विवेचन झालें.

वायुः पित्तं कफश्चेति त्रयो दोषाः समासतः।

वायुः पित्तं कफः असे थोडक्यांत तीन दोष आहेत. या ठिकाणीं दोषांची थोडक्यांत स्थूल कल्पना विद्यार्थ्यांना द्यावी. प्रत्यक्ष शरीरावरच त्यांना दोष दाखवावेत.

दोष हीं द्रव्यें आहेत हें त्यांना स्पष्टपणें सांगावें, पटवून द्यावें. तीं पांचभौतिक द्रव्यें आहेत. शक्ति इ. नाहींत. बाकीच्या कोणत्याहि कल्पना विद्यार्थ्यांच्या डोक्यांत नको. व मेहेरबानी कराल तर आपल्याहि कोणाच्या डोक्यांत असतील, त्या काढून टाका.

हीं पांचभौतिक दोषद्रव्यें शरीरांत सदैव सर्व ठिकाणीं असतात, असें नसून त्यांचीं प्रमुख स्थानें तीनच आहेत. व तींहि महास्रोतसांतच आहेत. त्या ठिकाणींच हे तीन दोष उत्पन्न होतात व असतात. इतरत्र ते नेहमीं नसतात तेथें ते जाऊ शकतात हा माझा सिद्धांत (   ) आहे.

महास्रोतसाचे ३ विभाग आहेत.

१) आमाशय. २) पक्वामाशयमध्य ३) पक्वाशय. (१) मुखापासून आमाशयाच्या अन्तापर्यंत १ भाग. (२) आमाशयान्तापासून ९ इंचापर्यंतचा दुसरा भाग, जिथें पित्त येऊन पडते. तितका भाग, (३) बाकीचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पक्वाशय. नाभी म्हणजे शरीरमध्य; वेंबी, पक्वामाशयमध्यं किंवा पृष्ठवंश होय. या ठिकाणीं पक्वामाशयमध्य असाच अर्थ नाभीचा आहे. पक्वामाशयमध्यं पित्तस्य (सुश्रुत). नाभिरत्र विशेषतः। (वाग्भट)

या तीन ठिकाणीं कफ, पित्त व वात हे सदैव असतात, इतरत्र नसतात. कणाकणांत नित्य नसतात. कणाकणांत असतो असें म्हणणाऱ्यांनीं आपल्या वचनाचा आधार दाखवावा. हीं द्रव्यें कोणत्याहि शारीर द्रव्यांना दूषित करतात; म्हणून त्यांना दोष म्हणतात.

वातपित्तकफांना दोषच शब्द वापरावा. निराळा शब्द त्रिधातु इ. वापरूं नये. शास्त्रांत कांहीं ठिकाणीं असला तरी विद्यार्थ्यांपुढें एकच परिभाषा ठेवावी. समावस्थेतील दोष, अशीं हवीं तीं विशेषणें वापरावीं पण दोष हीच संज्ञा कायम ठेवावी, अशी माझी परिषदेला विनंति आहे. असें सांगत असतांना धातु शब्द दोषांच्या करितां निरनिराळया १४ ठिकाणीं आल्याचें मीं माझ्या एका भाषणांत पूर्वी दाखवून दिलेलें आहे. परन्तु या शारीर द्रव्यांचें सामान्य नाम ' दोषच '. विशेष नांवें अनेक असतील. शरीरदूषण करणें हा त्याचा प्रधान धर्म आहे. तो इतर कोणांतहि नाहीं. म्हणून यांना दोष हीच संज्ञा कायम ठेवावी.

विकृता ऽ विकृता देहं घ्नंति............ इ.

विकृता देहं घ्नति । अविकृता देहं वर्तयन्ति ।

विकृतावस्था म्हणजे काय तर वृद्धावस्था व क्षीणावस्था. या दोनाशिवाय तिसरा अर्थ नाहीं. वृद्ध म्हणजे प्रमाणवृद्ध. एकगुणवृद्ध वा द्विगुणवृद्ध असें नाहीं.

उदा. पित्त १॥ तोळा असेल तर तें २ तोळे होणें, म्हणजे वृद्ध होणें. ज्या वयांत दोषांचें जें प्रमाण तेंच असणें म्हणजे अविकृत असणें. त्यापेक्षां कमी वा जास्त असणें म्हणजे क्षीण वा वृद्ध होणें.

हृदय व नाभि या अवयवांच्या (सीमांच्या) अधः वातः, मध्ये पित्तं व ऊर्ध्वं कफः. केवळ हृदयात् ऊर्ध्वं किंवा केवळ नाभेः अधः असें नाहीं.

हृदय व नाभि हीं लक्षणात्मक आहेत. दिग्दर्शनमात्र करण्यासाठीं. वास्तविक दोष हे महास्रोतसांत आहेत. टीकाकार स्पष्ट म्हणतात, :" "हृन्नाभिशब्दाभ्यां तदुभयावधिप्रदेशो लक्ष्यते । "

ते व्यापिनः म्हणजे सर्वशरीरचराः असे असूनहि या ठिकाणीं त्यांचा संश्रय आहे. म्हणजे ते आधिक्यानें असतात.

बाकीचीं ३ सूत्रें सरळ आहेत. वयोहोरात्रिभुक्तानां तेऽ न्त मध्यादिगाः क्रमात् ।—

अहोरात्रीचे ४।४ तासांचे ३ भाग या भागांत दोषांची वृद्धि होते. प्रकोप होतो. व विकारांचें आधिक्य होतें. तैर्भवेद्विषमः इ.—

वातवृद्धि असली तर विषमाग्नि होतो, इ. अर्थ सरळ आहे. कोष्ठः क्रूरो इ.

या ठिकाणीं कोष्ठ संज्ञा फक्त विरेचनाच्या दृष्टीनें आहे. शास्त्रीय अर्थ येथें घ्यावयाचा नाहीं.

[यावेळीं गोपाळशास्त्री गोडबोले (झांशी) म्हणाले कीं संज्ञा २ प्रकारच्या असतात. (१) अंगबोधक सर्वकोष्ठ (२) उपांगबोधक–पुरीषाशय. याठिकाणीं कोष्ठ ही संज्ञा केवळ उपांगबोधक आहे.]

प्रकृति

ज्याचें शरीरांत वाताधिक्य तो वातप्रकृति. वाताधिक्य म्हणजे वातद्रव्य अधिक प्रमाणांत होणें. याचप्रमाणें इतर प्रकृतींचें वर्णन करावें. या प्रकृति कशा निर्माण होतात ? गर्भ हा शुक्रशोणितसंयोगज आहे. शुक्र व आर्तवाबरोबर हीं दोषद्रव्यें येतात. व त्यावेळीं शुक्रआर्तवसंयोगात ज्या दोषांचें आधिक्य असेल त्या दोषाची प्रकृति बनते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज्या शरीरांत योग्य असें दोषप्रमाण असतें त्या शरीराची प्रकृति सम.

दोषांचे गुण

वातः—रूक्षः-बाह्य सृष्टींतील वायु (Air) हाच शरीरांत असणारा वात आहे. याचे गुण पहा. रूक्ष-स्निग्धविपरीत गुण. सृष्टींतील संचारी वायुद्रव्य पूर्णपणें रूक्ष आहे. त्यांत स्निग्धतेचा लवलेश नाहीं. आपलें शरीरांत त्याचे संपर्कानें थोडीसुद्धां स्निग्धता प्रत्यक्षांत येत नाहीं. म्हणून बाह्य वायु हा जसा बाहेर रूक्ष तसाच तो शरीरांतहि रूक्ष.

लघुः । द्रव्यें त्रिविध. घन द्रव्यें गुरु, त्यापेक्षां वायु लघु, घनद्रव्यापेक्षां द्रव लघु, व वायवीय द्रव्य, घन व द्रव या दोहीपेक्षां लघु, अत्यंत लघु आहे. म्हणून लघु हा वायूचा गुण होय.

चल- उष्णतेनें वायुचा आकार वाढतो, व स्फोट होतो. Gun Power नें स्फोट होतो, कारण वायु तयार होऊन चलगुणामुळें त्याचा जोर वाढतो. वायुद्रव्य शक्तिमान् आहे. तें शरीरांतील वाटेल तें कार्य करूं शकतें.

शीतः- शीताविषयीं शंका आहे. काणाद Physicists होते. त्यांनीं वायूला अनुष्णाशीत मानलें मग येथें शीत कां ? कारण वैद्यकांत वायूमुळें निर्माण होणारी पीडा उष्णतेनें शमते. टीकाकार म्हणतात, " योगवाही वायु तो उष्णाशीं संयुक्त झाला म्हणजे उष्ण व शीताशीं संयुक्त झाला म्हणजे शीत. असें असलें तरी तो शीतच. कारण उष्णानें शमन पावतो म्हणून."

खरः— मृदुविपरीत. त्वचेला भेदतो.

सूक्ष्मः- मन, आत्मा इ. प्रमाणें सूक्ष्म असें वाटेल पण टीकाकारांनीं स्पष्टपणें सांगितलेलाच अर्थ घेतला पाहिजे. सूक्ष्मः स्रोतःप्रचारित्वात् । सूक्ष्म याचा दुसरा तिसरा कोणताहि अर्थ येथें नाहीं. चलगुण आणखी स्पष्ट करतो. बाह्य वारा पूर्ण चल आहे. तो सदागति आहे. आपल्या शरीरांतील वायु केव्हांहि स्थिर नाहीं. दुर्गंधयुक्तवायु जातो व दुसरा येतो. अशा प्रकारें हे सहाहि गुण ह्या बाह्य वायूला तसेच शरीरांतल्या वायूला सदैव लागूं पडतात. म्हणून बाह्य वायूप्रमाणेंच शरीरांतर्गत वायु आहे. माझ्या म्हणण्याला ग्रंथाचाहि आधार आहे. " तत्र वायुः आत्मैव आत्मा इति । आत्म इव योनिः वायुतः वातोत्पत्तिः इत्यर्थः "

—— सुश्रुत नि. स्था. १

चरकाचार्यांनीं आपल्या वातकलाकलीय अध्यायांत वायूचे २ प्रकार स्पष्ट दाखविले आहेत.

१] वायु { शरीरचर, अशरीरचर } पण ते दोघेहि कार्यभेदानें फक्त भिन्न

बाह्य वायु शरीराला अत्यंत आवश्यक आहे. येथें अशी शंका निर्माण होईल कीं, बाह्य वायु आधुनिक शास्त्राप्रमाणें अनेक प्रकारच्या वायूंनीं घटित आहे. यापैकीं सर्व हवा उपयोगी का विशिष्ट भाग ? तर याचें उत्तर असें कीं सर्वच्या सर्व उपयोगी. ऑक्सिजन प्राणवायु [O_2] उपयुक्त आहेच. नायट्रोजन हेहि नायट्रोजनयुक्त घटक बनवण्यासाठीं उपयोगी व कार्बनडायआक्साइड [CO_2] नर्व्हससिस्टिमसाठीं आवश्यक आहे. असें आधुनिक प्रयोगांनीं सिद्ध झालें आहे. याप्रमाणें प्रत्येक अंग, विशिष्ट भागाला उपयोगी. येवढ्यासाठीं वायु हा महत्वाचा. त्याच्या विकृतीनें रोग. ' वेलर ' नांवाच्या शास्त्रज्ञानें CO_2 च्या विकृत प्रमाणानें नर्व्हची क्रियाशक्ति विकृत होते असें प्रयोगांनीं सिद्ध केलें आहे. CO_2 चें विशिष्ट प्रमाणांतच नर्व्ह कार्यकारी असते. तें प्रमाण जास्त झालें तर कमी कार्य होतें. म्हणून चरकाचार्यांनीं बाह्यवायूलाच अन्तर्वायू मानलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व वायुरेव भगवान्, धाता, विश्वकर्मा इ. विशेषणें दिलीं. ती शरारांतील वायूला तंतोतंत लागू पडणारीं आहेत. बाह्य वायुद्रव्यच शरीरोपयोगी वायुद्रव्य आहे. माझें हें म्हणणें आपणास बॉंबेचेल सारखें वाटेल; पण आपण विचार करा. चर्चा करा, व तेंच आहे कीं नाहीं हें सिद्ध करा. माझें मत मीं मांडलें.

पित्त

शरीरांतील पित्ताचें प्रत्यक्ष होऊं शकते. बकरीचें, गाईचें पित्त इ. Bile व Pancreatic juice मध्यें संपूर्णपणें दिसतें. पाचकपित्ताविषयींचें वाग्भटाचें वर्णन तंतोतंत प्रत्यक्षाशीं जुळणारें आहे. पित्तं पंचात्मकं तत्र पक्वामाशयमध्यगम्, पंचभूतात्मकत्वेऽपि यत्तैजगुणोदयात् त्यक्तद्रवत्वं, पाकादिकर्मणा... ...इ. ह्या वर्णनावरूनहि पित्त हें पांचभौतिक द्रव्य आहे हें सिद्ध होईल. म्हणून दोष हीं शारीर द्रव्यें आहेत. पांचभौतिक द्रव्यें आहेत. हें पुनः एकदां नीट लक्षांत घ्या. व विद्यार्थ्यांना स्पष्ट सांगा.

पित्त द्रव आहे. तें द्रवत्व गुणांचा त्याग कसा करतें ? तैजसगुणोदय म्हणजे काय ? हें अष्टांगसंग्रहकारांनीं स्पष्ट लिहिलें आहे. त्यक्तद्रवत्वं म्हणजे त्यक्तद्रवस्वभावं, दुसऱ्या वस्तूला ओलें करण्याचा धर्म सोडून तैजसगुणी द्रव्याप्रमाणें पचनाचें कार्य करतें.

हें पित्त पक्वामाशयमध्य स्थानांत प्रत्यक्ष पडत असतांना दिसूं शकते. आग्नेय गुणी पित्त अग्न्याशया (पॅंक्रिआज) मधून येऊन कार्य करतें.

कफ

क्लेदक कफांत शे. ९९.५ टक्के पाणी असतें. तीं सर्व पचनाचीं सहकारी कारणें आहेत. अशा रीतीनें दोष म्हणजे पाचनक्रिया पूर्ण करणारीं द्रव्यें व तीं शरीरांतील (कोष्ठ) याच भागांत निर्माण होऊन शरीरांतील इतर भागांत जातात. वृद्ध वा क्षीण होतात.

रोगस्तु दोषवैषम्यम् । रोग म्हणजे दोषवैषम्य. दोषांचें ठराविक प्रमाणापेक्षां कमी वा अधिक प्रमाण होणें म्हणजे वैषम्य. या मुद्यावर अधिक भर देऊन विवेचन करावें.

[याप्रमाणें १२ ते २ पर्यंत पं. डेग्वेकरजींनीं विवेचनाची दिशा दाखविली. त्यानंतर इतरांनीं या व्याख्यानांतील उपस्थित प्रश्नावर विवेचन व चर्चा केली.]

नागपूर येथें
' आयुर्वेद सेवा संघाचीं ' सर्व प्रकारचीं गुणकारी औषधें मिळण्याचें
एकमेव ठिकाण–
श्री. माधवराव परांडे
आयुर्वेदीय औषधांचे व्यापारी
महाल रोड, नागपूर

आयुर्वेद सेवा संघ, नाशिक या संस्थेची अत्यंत गुणकारी औषधें दादर (मध्यरेल्वे) येथें मिळण्याचें एक विक्रीकेंद्र
" गणेश औषधालय "
अबदुल कादर बिल्डिंग, दुकान नं. १३
हिंदमाता सिनेमासमोर, मुंबई १४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठिकठिकाणचे श्रीधन्वन्तरी उत्सव

नासिक शहर वैद्य मंडळ

नासिक शहर वैद्यमंडळातर्फे नासिक येथें ता. २४ रोजीं सायंकाळीं ५॥ वाजतां वैद्यराज त्र्यंबकशास्त्री दाते यांचे दवाखान्यांत श्रींचें पूजन सर्व सदस्यांनीं केलें. (मंडळाच्या अभ्यास मंडळाचे ते अध्यक्ष आहेत.) वै. विष्णुशास्त्री दाते (अध्यक्ष ना. श. वै. मंडळ) यांनीं अभ्यासमण्डळाचें कार्य यापुढें अध्यापनाचें दृष्टीनें व अध्यापक परिषदेनें दिग्दर्शित केलेल्या मार्गानें व्हावें अशी सूचना केली. वै. विष्णुशास्त्री गोगटे, वै. श्रीरामशास्त्री करमरकर, वै. बिन्दुमाधवशास्त्री पाण्डित यांनीं अभ्यास सुगम होण्यासाठीं मार्गदर्शन केलें.

शुद्ध आयुर्वेद विद्यालयाकरितां पारितोषिकें

श्रीधन्वन्तरी-उत्सवानिमित्त, नासिक शहर वैद्य मण्डळाचें वतीनें, नासिक येथील शुद्ध आयुर्वेद विद्यालयांत पुढीलप्रमाणें पारितोषकें ठेवल्याचें जाहीर करण्यांत आलें.

१) वैद्य श्री. कृ. करमरकर यांचे तर्फे- १ ल्या परीक्षेंत 'शारीर' विषयांत १ ला येणाऱ्यास ३ रु.

२) वै. वि. म. गोगटे यांचेतर्फे- द्रव्यगुणशास्त्र या विषयांत १ ला येणारास ३ रु.

३) वै. त्र्यंबकशास्त्री दाते- अष्टांगहृदय सूत्रस्थान संपूर्ण पाठ करणारास २५ रु.

यानन्तर उपस्थित सदस्यांना श्रींचा प्रसाद म्हणून पित्तप्रशमनीक असें शर्करामिश्रित आटीव दूध देण्यांत आलें. नंतर पानसुपारी अत्तरदान वगैरे झालें.

विश्वास औषधालय, फैजपूर

आयुर्वेद सेवा मंडळ भुसावळ यांचे अध्यक्ष वै. ब्रह्मदत्तशर्मा यांचे अध्यक्षतेखालीं नशिराबाद येथील डि. लो. बोर्ड दवाखान्यांतील चिकित्सक वैद्यराज भि. श्री. कुलकर्णी आयुर्वेदतीर्थ यांचें 'शरद ऋतूंतील उपचार' या विषयावर फैजपूर येथें वरील औषधालयांत सुश्राव्य व बोधक व्याख्यान झालें.

वै. श्री. कृ. करमरकर यांचे घरीं

श्रींचें पूजन. धनेखडीसाखरचा प्रसाद. उपस्थितांना श्री धन्वन्तरी व लक्ष्मी यांचे एकाच दिवशीं पूजा करण्यामागील हेतु व प्रभूप्रिय असलेली जलौका या विषयावर आचार्यांचें प्रवचन झालें. योग्य अशा जलौकांचें वर्णन, जलौकावचारणाची दोषदूष्यानुसार अवस्था, पूर्वकर्म, प्रधानकर्म व पश्चात्कर्म यांची माहिती सांगून मूळव्याध, पित्तप्रधानव्रण, व अरूंषिका यांच्या चिकित्सेंत जलौका लावण्यांत येतात. ही एक पित्ताची शोधनचिकित्सा आहे व आयुर्वेदांतील शोधनचिकित्सा पुनः प्रचारांत येण्यास जलौकावचारणाचें प्रयोग सर्वत्र होणें आवश्यक आहे, असें आचार्यांनीं सांगितलें.

पांढरें कोड

हजारोंचें गेलें. त्यांनीं अभिप्राय दिलेले आणि अनेक बक्षिसें मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु.
नकली वैद्यापासून सावध रहा!

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन'
मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाची कार्यकारी व स्थायीसभा, अधिवेशन ४ थें, नाशिक

दिनांक १७-१०-५४ रविवारीं रात्रीं ७ वाजतां नाशिक येथें आयुर्वेद सेवा संघाचे निमंत्रणास अनुसरून म. प्रां. वै. मं. ची कार्यकारी व स्थायी संमिश्र सभा प्रांताध्यक्ष वैद्य दत्तात्रयशास्त्री जळूकर यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती.

सभेला कार्यकारी व स्थायी समितीच्या सदस्यांपैकीं वै. जळूकरशास्त्री, वै. ब्रह्मदत्त शर्मा, वै. बिंदुमाधवशास्त्री पंडित, वै. विष्णुशास्त्री दाते, वै. द.व. वैद्य ठाणें, वै. ह.मा. भिडे पुणें, वै.न.पु. जोशी रोहे (कुलाबा), वै. य. घों. नाटोलीकर कागल (कोल्हापूर), वै. लक्ष्मीबाई बोरवणकर, मुंबई, वै. भ. त्र्यं. वैद्य धुळे, वै. द. अ. फुलंब्रीकर सारंगखेडा, वै. ज. ल. रामय्या, वै. द. का. थत्ते चिपळूण. वै. वामनराव दीनानाथजी मुंबई, वै. ना. ह. जोशी मुंबई; हे सदस्य उपस्थित होते. व गेल्या ११।१०।५४ पासून नाशिक येथें भरलेल्या व आज समाप्त झालेल्या आयुर्वेद अध्यापक परिषदेसाठीं आलेल्या वैद्य पाहुणे - मंडळीसहि निमंत्रण असल्यामुळें तेंहि सभासद बहुसंख्य उपस्थित होते. त्यांत मुख्यत्वें आयुर्वेदाचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी (चर्चापरिषदेचे अध्यक्ष) नागपूर, वै. श्रीराम शर्मा मुंबई, वै. ल. भा. काळे, वै. श्री. कृं. करमरकरशास्त्री नाशिक, वै. श्री. अ. मावळंकर, मुंबई, वै. ग. म. अभ्यंकर मुंबई, वै. वि. दा. एकतारे अहमदनगर, वै. सी. रं. जोशी बोलढाण, वै. ग. म. लोखंडे नासिक, वै. वा. स. मराठे नाशिक, वै. गोपाळशास्त्री गोडबोले आयुर्वेदबृहस्पती (झांशी), वै. भा. द. गोडबोले पनवेल, यांचा उल्लेख करतां येतो.

पत्रोपस्थिति

वै. द. वा. शेंड्ये पुणें, वै. म. द. करमरकर मिरज, वै. ग. मो. वझे सांगली, वै. शं. वा. शंड्ढू चेंबूर, वै. गो. आ. फडके सातारा, वै. का. सी. भावे फैजपूर, वै. श्री. रा. करंजीकर रनाळें, वै. प्रतापकुमार पोपटभाई मुंबई, वै. पां. ह. देशपांडे पुणें इ. ची पत्रें आलीं होतीं.

सभेच्या प्रारंभींच अध्यक्षांनीं प्राणाचार्य वै. सदानंदकाका यांचे धाकटे बंधु विनायक काका वसईकर हे दि. ८-८-५४ रोजीं दिवंगत झाल्याबद्दल शोकप्रस्ताव सभेपुढें मांडल्यावर सर्वांनीं उभें राहून श्रद्धांजलि समर्पणपूर्वक तो संमत केला.

प्रस्ताव १- मंडळाचे मंत्री वै. ब्रह्मदत्त शर्मा यांनीं मंडळाच्या गतसभेचें वृत्त, तसेंच मुंबईस झालेल्या विशेषाधिवेशनाचें वृत्त वांचून दाखविलें.

त्याचप्रमाणें प्रांतीय मंडळाचें आयव्यय पत्रक आणि मुंबई येथें भरलेल्या विशेष अधिवेशनाचें आयव्यय पत्रक वांचून दाखविलें. त्यावर वै. दातेशास्त्री व वै. रामैया यांनीं विचारलेल्या शंकांचीं मंत्र्यांनीं उत्तरें दिल्यावर त्यास सभासदांनीं संमति दिली.

प्रस्ताव २- मुंबई वैद्य मंडळाचे पत्राचा विचार. मुंबई जिल्हा वैद्य मंडळाची स्थापना करण्याविषयीं वै. कृ. के. कानिटकर मुंबई यांनीं निरनिराळया आवश्यक मुद्यांचें स्पष्टीकरणासह पाठविलेलें पत्र विचारांत घेऊन अशाप्रकारचें वैद्य मंडळ स्थापन करण्याविषयीं म. प्रां. वै. मं. ची ही सभा संमति देत आहे.

सूचक— वै. ना. ह. जोशी, अनुमोदक— वै. वि. मो. दाते — सर्वसंमत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संमेलन भरविण्याचा पुणें वैद्य मंडळाचा अधिकार रद्द

प्रस्ताव ३- पुणें वै.मं. चे अध्यक्षांनीं म.प्रां.वै. मंडळाकडे पाठविलेल्या पत्राचा विचार करून आजच्या ह्या सभेस अत्यंत खेद झाला. पुणें येथील गेले सभेंत पुणें वैद्य मंडळाचे अध्यक्ष व मंत्री यांनीं स्वतः उपस्थित राहून विनंति केल्याप्रमाणें 'म. प्रां. वै. मं. नें १९५४ सालच्या संमेलनासाठीं पुणें वै. मं. नें दिलेलें निमंत्रण अपरिहार्य कारणास्तव प्रत्यक्षांत येऊं शकलें नाहीं, तें येत्या आक्टोबर ते डिसेंबरपर्यंत भरवावें' ह्या मागणीस संमति दिली होती, परन्तु अजूनपर्यंत संमेलनासंबंधीं कांहींहि प्रयत्न न करतां प्रां. वै. मं. कडून स्मरणार्थ पत्र गेल्यावर हें संमेलन १९५५ च्या मे पर्यंत भरविण्याची पुणें वै. मं. ची इच्छा असल्याचें कळविलें आहे. परन्तु त्यांत दर्शविलेलें कारण सयुक्तिक नाहीं. व आतां १९५४ मध्यें हें संमेलन पुणें वैद्य मंडळ भरवूं शकत नाहीं असें त्यांच्या पत्रावरून स्पष्ट होत असल्यानें पुणें वैद्य मंडळास प्रांतीय संमेलन भरविण्याचा दिलेला अधिकार ही सभा रद्द करीत आहे.

सू.- वै. ना. ह. जोशी, अ.- वै. भगवंत त्र्यंबक वैद्य. सर्वसंमत

प्रस्ताव ४- अहमदनगर व धुळें (खानदेश) येथील उपस्थित वैद्यमंडळीकडून म. प्रां. वै. मंडळाचें संमेलन भरविण्याविषयीं दर्शविण्यांत आलेल्या इच्छेला अनुसरून संमेलन कोठें भरविणें तें निश्चित करण्याचा अधिकार आजची ही सभा म. प्रां. वै. मं.चे अध्यक्षांस देत आहे.

सू.- वै. त्रिंदुमाधवशास्त्री, अ.- वै. नाटोलीकर, — सर्वसंमत

प्रस्ताव ५- नि. भा. आ. महासंमेलनाकडून आलेले पत्राप्रमाणें विशिष्ट रचनेच्या दृष्टीनें प्रांतीय मंडळाशीं संबद्ध करण्याचा विचार प्रां. वैद्य मंडळाच्या येत्या अधिवेशनांतच व्हावा ह्या सभेचें मत आहे.

सू.- वै. म. द. का. थत्ते, अ.- वै. फुलंब्रीकर, — सर्वसंमत

प्रस्ताव ६- वै. म. द. करमरकर व इतर सदस्यांनीं म. प्रां. वै. मं. च्या घटनेंत व नियमांत जे फेरफार पत्रानें सुचविले आहेत, त्या सर्वांचा विचार येत्या अधिवेशनांतच व्हावा असें ह्या सभेचें मत आहे.

सू. वै. द. ब. वैद्य, अ.- वै. ज. ल. रामैया — सर्वसंमत

मे पूर्वी व ऑक्टोबर नंतर संमेलन घ्यावें

प्रस्ताव ७- प्रांतीय संमेलनाचें अधिवेशन बहुधा मे किंवा जून महिन्यांतच दरवर्षी होतें, व त्या सुमारास पावसाळी हवेमुळें किंवा पावसाळा सुरूं झाल्यामुळें बोटी बंद होतात व प्रवासास गैरसोय होते; सबब संमेलन मे महिन्याचे पूर्वींच घेण्यांत यावें ही मागणी रास्त आहे असें ह्या सभेचें मत आहे व म्हणून यापुढील संमेलनें शक्यतो मे महिन्यापूर्वी किंवा ऑक्टोबर नंतर भरविणेचा प्रयत्न व्हावा.

सू० वै. द. का. थत्ते, अ०-वै. लक्ष्मीबाई बोरवणकर, सर्व संमत

सरकारनें सर्व प्रकारचें साहाय्य द्यावें

प्रस्ताव ८- मुंबई सरकारनें मान्य केलेला शुद्धायुर्वेदीय पाठ्यक्रम ज्या विद्यालयांतून आणि मान्य गुरूंकडे शिकविला जात असेल त्या विद्यार्थ्यांना व गुरूंना आर्थिक व इतर आवश्यक सर्व प्रकारचें साहाय्य करावें अशी ह्या सभेची मुंबई सरकारास विनंति आहे. (प्रांतीय मंडळानें अशा अर्थाचे ठराव प्रांतांतील सर्व जिल्हा व शहर वैद्यमण्डळाकडून सरकाराकडे पाठविले जातील अशी व्यवस्था करावी.)

सू०- वै. वि. मो. दाते. अनु०- वै. वामनरावजी - सर्वसंमत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रस्ताव९ — मुंबईच्या पण्डित शिवशर्मा सत्कार समितीचें पत्रांतील उद्देशास ह्या सभेची तात्त्विक संमति आहे. सू०— वै. ना. ह जोशी, अ० — वै. बिंदुमाधवशास्त्री – सर्वसम्मत

प्रस्ताव १०— मुम्बई राज्यांतील रजिस्टर्ड वैद्यांकडून यापुढें रजिस्ट्रेशनसाठीं 'रिन्यूअल फी' घेऊं नये, अशी ह्या सभेची देशी वैद्यक बोर्डास आग्रहाची विनन्ति आहे.

सू०— वै. बिंदुमाधव पण्डित, अनुमोदक वै. फुलंब्रीकर —सर्वसम्मत

प्रस्ताव ११– आयुर्वेद-सेवा संघानें आजच्या ह्या सभेस निमंत्रण दिलें, उपस्थित सदस्यांचे उत्कृष्ट आतिथ्य केलें व सभाकार्य यशस्वी होण्यांत सर्वप्रकारें साह्य केलें ह्याबद्दल ही सभा आयुर्वेद सेवा संघ नासिक ह्या संस्थेचे आभार मानीत आहे. (अध्यक्षद्वारा प्रस्तावित-सर्वसंमत.) येणेंप्रमाणें सभाकार्य झालें.

———

भगवान् धन्वन्तरी

जनतेंत आयुर्वेदशास्त्राची वाढ करण्यास सर्वांना स्फूर्ति देवोत !

आयुर्वेदाचा पदवी अभ्यासक्रम

पुणें विद्यापीठा (पूना युनिव्हर्सिटी) नें इंटर-सायन्स बी ग्रुप नंतर ४॥ वर्षांचा आयुर्वेद अधिक ॲलोपॅथीचा अभ्यास असलेला असा पदवी अभ्यास-क्रम मान्य केला आहे व त्यास बी ए. एम्. एस्. ही पदवी देण्याचें ठरविलें आहे. पुणें, नगर व सातारा येथील आयुर्वेद महाविद्यालयें या विद्यापीठाच्या प्रादेशिक मर्यादेंत येतील.

———

राष्ट्रपतींची हरिद्वार भेट

ता. १३-१०-५४ रोजीं भारताचे राष्ट्रपति बाबू राजेंद्रप्रसाद यांनीं हरिद्वार येथील निखिल भार-तीय विद्यापीठास भेट दिली. याप्रसंगीं वद्यरत्न पंडित शिवशर्मा हे हजर होते.

———

कुष्ठचिकित्सा व श्री. परांजपे

श्री. परांजपे आडनावांच्या कुष्ठपीडीत गृहस्थांना ॲलोपॅथिक उपचारानें बरें वाटलें नाहीं व आयुर्वेदीय उपचारांनीं गुण आला असें मुंबई सरकारला कळल्या-वरून मुंबई सरकारनें गतवर्षी ७४० रु. व चालूवर्षी ४१७० रु. त्या औषधाच्या गुणकारित्वाच्या तपासा-साठीं खर्च करण्यास मंजुरी दिली आहे. व यासाठीं ७ लेप्रोमॅटस् (सांसर्गिक), व ३ न्यूरल (असांसर्गिक) रुग्ण घेण्यांत आले आहेत असें कळतें. तें औषध कोणतें व त्याची आयुर्वेदीय पद्धतीनें विचारपूर्वक योजना होत आहे किंवा नाहीं याबाबत कांहींच खुलासा अद्याप प्रसिद्ध झालेला नाहीं.

———

डॉ. डी. ए. घाटगे यांचीं
इंजेक्शनविषयक दोन प्रसिद्ध पुस्तकें
इंजेक्शनविज्ञान, आवृत्ती दुसरी, किं. ६ रु.
इंजेक्शन चिकित्सा, आवृत्ती, पहिली किं. ६ रु.
वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साभार पोहोंच

१) Oriental Thought- प्रथम अंक. श्रीमद्‌जगद्‌गुरु शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांच्या मार्गदर्शनाखालीं, व डॉ. जी. व्ही. देवस्थळी एम्. ए., बी. टी., पीएच्. डी. यांच्या संपादकत्वाखालीं निघणारें त्रैमासिक. वर्गणी वार्षिक रु. ८, भाषा संस्कृत व इंग्लिश पौर्वात्य साहित्यांतील सर्व प्रकारच्या शाखांमधील संशोधनविषयक लेख यांतून प्रसिद्ध होत रहाणार आहेत.

२) विज्ञान में ब्रह्मदर्शन यों आयुर्वेदमें आत्मदर्शन (पहला भाग) ले. आचार्य कविराज श्री. कृष्णपद भट्टाचार्य, मूल्य २॥, पृष्ठसंख्या १११.

३) ' आयुर्वेदसेवकदर्शन ' आयुर्वेदप्रेमी सेवकोंका अनमोल जीवनदर्शन. प्रथमपुष्प.

४) आयुर्वेदीय पंचवर्षीय योजना. २।३।४ प्रकाशक-अ. भा. वैज्ञानिक सत्योदय समाज, झांसी.

५) स्वस्थवृत्तम् (द्वितीयभाग)

ले. डॉ. कृ. श्री. म्हसकर व श्री. एन्. एस. वाटवे प्रकाशक-मुंबई प्रांत आयुर्वेदसंशोधन समिति. मूल्य १६ रु. पृ. सं. ४२९+१२० कापडी बांधणी. पुस्तकाचे ४ भाग. १) स्वस्थवृत्तस्य प्रास्ताविकः। २) सर्वसामान्यं स्वस्थवृत्तम्। ३) आयुर्वेदीयं धर्मशास्त्रम्। ४) सार्वलौकिकं स्वस्थवृत्तम्.

विस्तृत परीक्षण मागाहून देण्यांत येईल. प्रथम खंडाचेवेळीं वाटवे यांच्या नांवापुढें आर. एम. पी. अशी वैद्यकीय नीतिनियमबाह्य अक्षरें होतीं. यावेळीं ती बदलून त्याठिकाणीं आयुर्वेदालंकार (अयोध्या) अशी पदवी आहे. ह्या अलंकारधारी व्यक्तीला वैद्य कां म्हटले नाहीं ? व ही पदवी मुंबई प्रांतानें मान्य केलेली आहे काय ? नसल्यास ती लावण्यास काय अधिकार ? व डॉ. म्हसकरांना हा ग्रंथ लिहिण्यास एकहि सरकारमान्य पदवीधर सांपडला नाहीं हें केवढें आश्चर्य !

—वै. श्री. कृ. करमरकर

अत्यावश्यक अशा शुद्ध जंगली देशी विदेशी दुर्मिळ आयुर्वेदिक आणि युनानी वनौषधी, काष्ठौषधी, खनिज व प्राणिज द्रव्यें योग्य भावांत मिळण्याचें एकमेव ठिकाण

.... इंडिया ड्रग सप्लाय कंपनी

१७९ सॅम्युअल स्ट्रीट (खोजा गल्ली) मुंबई ९

Telegram:—EXCLROOT Call at:— 70374

आमचे येथें शुद्ध कस्तुरी, गोरोचन, अम्बर, सुवर्ण-वर्ख, चांदी वर्ख, केशर, शिलाजित, माक्षिक, मोती वमराई, प्रवाळ, हरताल पत्री व दगडी, गुलकन्द चंदन तेल, निलगिरी तेल, अक्कलकरा अस्सल, हिरा दख्खन, रसकापूर, गहुला, लोबान, केहरवा, भीमसेनी कापूर, जहमोरा, शंघेशरमाई, आकिक, कोडी पीली बडी, सांप, सांबरशिंग, हरड, पन्ना, सनी, पोखराज, फिरोजा, वगैरे वस्तु अस्सली मिळतील.

एकवेळ आपली मागणी आमचेकडे त्वरित पाठवून खात्री करा, किंवा आपल्या जरूरींच्या वस्तूंच्या दर्शासाठीं वरील पत्त्यावर आजच लिहा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयाचें स्नेहसंमेलन

" आयुर्वेदाला मान्यता मिळवावयाची असेल तर आयुर्वेदाच्या क्षेत्रांत संशोधन करून त्या पद्धतीची कार्यक्षमता आधुनिक शास्त्रीय जगांत सिद्ध करण्यास विद्यार्थ्यांनीं झटलें पाहिजे " असे उद्‌गार मध्यप्रदेशाचे राज्यपाल डॉ. पट्टाभि सितारामय्या यांनीं विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलन प्रसंगीं काढले.

विद्यार्थ्यांनीं भरविलेलें प्रदर्शन

विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनाच्या निमित्त महाविद्यालयाच्या नवीन इमारतीसमोर अेक भव्य मंडप उभारण्यांत आलेला होता. बाजूच्या इमारतींत विद्यार्थ्यांनीं तयार केलेलें प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. सोमवार ता. ११ रोजीं सायंकाळीं बरोबर ६-३० वाजतां राज्यपाल श्री. पट्टाभि यांनीं मंडपांत प्रवेश केला. महाविद्यालयाचे प्राचार्य पं.दा. मुळे व इतर प्राध्यापकांनीं त्यांचें स्वागत केलें. सरकारी अधिकारी, प्रतिष्ठित नागरिक व प्रमुख डॉक्टर्स, वैद्य व पत्रप्रतिनिधी ह्या समारंभास प्रामुख्यानें हजर होते.

ग्रामीण भागासाठीं चिकित्सक

प्रथम महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री. पु. र. तारे ह्यांनीं सन्माननीय पाहुण्यांचें स्वागत केलें. त्यांनीं आपल्या भाषणांत महाविद्यालयाचे प्राचार्य व आरोग्य-मंत्री श्री. कन्नमवार यांच्या मुलाखतीचा उल्लेख करून सरकारला ग्रामीण विभागाकरितां वैद्य पुरविणाऱ्या अशा संस्थांना भरपूर सरकारी साहाय्य करण्याच्या, प्राचार्यांनीं केलेल्या विनंतीचा आपल्या भाषणांत पुनरुल्लेख केला.

साधनें उपलब्ध करणें सरकारचें कर्तव्य

त्यानंतर आचार्य त्रिं. गं. जोशी आपल्या भाषणांत म्हणाले " सरकारनें आयुर्वेदाचें शिक्षण देणाऱ्या शाळांना मदत देणें, कांहीं वैद्यांना नोकऱ्या देणें अथवा कांहीं आयुर्वेदिक शाळा-कॉलेजें उघडणें एवढ्यानेंच ह्यापुढें काम भागणार नाहीं. आयुर्वेदिक पद्धतीनें संशोधन करूं इच्छिणाऱ्या संस्थांना आवश्यक तीं साधनें सरकारनें उपलब्ध करून द्यावयास पाहिजेत. त्यांनीं समन्वय रुग्णालयांतील आपला अनुभव थोडक्यांत निवेदन केला व संशोधनावांचून आयुर्वेदाचें पुनरुज्जीवन कठीण असल्याचें सांगितलें. त्यानंतर श्री. पाठक यांनीं भारतीय शास्त्रांचें पुनरुज्जीवन झाल्यावांचून हिंदुस्थान स्वतंत्र झाला असें म्हणतां येणार नाहीं म्हणून सरकारनें आयुर्वेदाला अधिक उत्तेजन देणें जरूर असल्याचें सांगितलें.

२५ वर्षांतील कार्याचा अहवाल

त्यानंतर महाविद्यालयाच्या संमेलनाचे सरचिटणीस श्री. व्यास यांनीं संस्थेच्या प्रगतीचा अहवाल निवेदन केला. एका झोपडीवजा जागेत २५ वर्षांपूर्वी सुरू झालेल्या ह्या संस्थेचें आज महाविद्यालयांत रूपांतर झालें असून संस्थेची आज स्वतःची इमारत झाली आहे. संस्थेतून उत्तीर्ण झालेले ३१० विद्यार्थी सरकारी व निमसरकारी संस्थांतून विशेषतः ग्रामीण विभागांत काम करीत आहेत. संस्थेनें सध्यां मुंबई-सरकारनें मान्य केलेला ४ वर्षांचा शिक्षणक्रम स्वीकारला असून त्याकरितां यंदा मॅट्रिक, इंटर व इंटरसायन्स झालेल्या सुमारें ८० विद्यार्थ्यांना प्रथम वर्गांत प्रवेश देण्यांत आलेला आहे. तज्ञ वैद्य व डॉक्टर्स तसेंच रोटंडाहून शिक्षण घेऊन आलेल्या लेडी डॉ. सौ. दामले ह्यांचा अध्यापकवर्गांत समावेश झालेला आहे. तसेंच संस्थेंत शवच्छेदनाचीहि उत्तम व्यवस्था आहे.

आसाम पीडितांना ३५० रु. साहाय्य

श्री. व्यास ह्यांच्या अहवालानन्तर महाविद्यालयांतील विद्यार्थी-संघाच्या विद्यमानें बूटपॉलीश वगैरे कार्यक्रमद्वारें आसामपूर-पीडितांच्या साहाय्यार्थ जमविलेला २०५ रु.चा निधि व संमेलनातर्फे रु. १०० एकूण रु. ३०५ प्राचार्य आप्पाजी मुळे यांनीं राज्यपालांचे स्वाधीन केला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेदावर मत देण्याचा अधिकार नाहीं

त्यानन्तर माननीय राज्यपाल डॉ. पट्टाभि सीतारामय्या आपल्या भाषणांत म्हणाले "हिंदुस्थानांतील प्राचीन विद्या व आधुनिक शास्त्रीय ज्ञान ह्यांची योग्य सांगड घालण्याची अत्यन्त आवश्यकता आहे; व त्या दृष्टीनें आयुर्वेदाचें संशोधन व्हावयास हवें. ज्यांनीं आयुर्वेदाचा अभ्यास केलेला नाहीं त्यांना ह्या विषयावर मत देण्याचा काय अधिकार आहे?"

डॉक्टर-लोकांचें अनुकरण करूं नका

आयुर्वेदांतील त्रिदोषपद्धतीचा व आधुनिक व्हिटामिन सिद्धांताचा उल्लेख करून राज्यपाल म्हणाले:- "या दोन पद्धतीचा समन्वय घडून आला तर आयुर्वेदाला शास्त्रीय जगांत मान्यता मिळण्यांत भासत असलेली अडचण दूर होईल." भावनगरच्या महाराजांनीं आयुर्वेदिक पद्धतीच्या पुनरुज्जीवनार्थ चालविलेल्या प्रयत्नांचा उल्लेख करून डॉ. पट्टाभि यांनीं विद्यार्थ्यांना डॉक्टर लोकांचें केवळ अनुकरण न करतां संशोधनकार्य करून त्या शास्त्राची कार्यक्षमता सिद्ध करण्याचा उपदेश केला. शेवटीं 'जन मन गण' हें राष्ट्रगीत व आभारप्रदर्शन होऊन हा कार्यक्रम पार पडला.

तारेचा पत्ताः-Newbottle

के. के. शहा अँड कंपनी

बाटल्यांचे व्यापारी

(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)

रिकाम्या बाटल्या, बुचें, कॅपसुल्स् [हेअर ऑईल, सरबतें, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाचीं सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे

ठोक व किरकोळ

विक्री करणारे व्यापारी

वाचकांचा पत्रव्यवहार—

प्रकृतिः संस्कृतम् ।

पत्रिकाके १६ सितंबरके अंकमें प्राकृत और संस्कृत के परस्पर संबंधके विषयमें आपका लेख पढा। वाचकों को विभ्रम न हो इस हेतु यह लिख देना आवश्यक समझता हूँ कि, इस विषय में पूर्वाचार्योंका एक पक्षान्तर भी है। इस पक्षके अनुसार संस्कृत भाषा मूल है, और प्राकृत उसकी पुत्री।

इस मतके अनुयायी भी आपके समान शब्दोंके प्रकृति-प्रत्ययको ही अपना आधार मानते हैं। वे कहते हैं- प्रकृतिका प्रसिद्ध अर्थ है मूलकारण। प्राकृत भाषा का मूल संस्कृत है, उससे उत्पन्न होनेसे इसे प्राकृत कहा जाता है। प्रकृतिः संस्कृतम्, तत्रभवं (तस्माज्जातम्) प्राकृतम्।

अपरं च, आपके पक्षके माननेवाले कहते हैं कि, प्राकृतका अर्थ है सामान्य (असंस्कृत) जन। उनकी भाषा भी प्राकृत। उसमें गुणान्तराधान (संस्कार) करके जो भाषा बनी वह संस्कृत। इसी रीतिसे इस पक्षान्तरके अनुयायी कहते हैं, कि जो जन या गण संस्कृतिसंपन्न हुए उन्हे संस्कृत [कल्चर्ड] कहते है। उनकी भाषा संस्कृत। जैसा कि उपर कहा, उससे व्युत्पन्न भाषा का नाम है प्राकृत।

प्राचीन नाटकोंको देखनेसे प्रतित होता है कि, दोनों ही भाषाएं प्रत्येक कुलीन घरमें प्रचलित थीं। पुरुष संस्कृत बोलते थे और स्त्रिया तथा सेवक प्राकृत। अल्पज्ञ होनेसे ये पिछले लोग जिस अशुद्ध संस्कृतका व्यवहार करते थे उसे प्राकृत कहा जाता था। प्राकृत शब्दका अर्थ भी पामर या साधारण जन है। वाचक चाहेंगे तो इस विषयके प्रमाण प्रस्तुत करनेका प्रयास करूंगा।— वैद्य रणजितराय

महाराष्ट्र प्रांतीय वैद्य मंडळाचे सभासद व्हा व वैद्यांची संघटना मजबूत करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार—

एक गैरसमज

शुध्द आयुर्वेद पाठ्यक्रम समितीनें ज्या पदव्या (परीक्षा) गुरुपरंपरा पध्दतीनें शिक्षण देणाऱ्या गुरुंची योग्यता ठरविण्याबाबत मान्य धरल्या आहेत त्यांत नि. भा. आयुर्वेद विद्यापीठाची आयुर्वेदभिषक् ही पदवी आहे. त्यावरून कांहीं गुरुंची अशी गैरसमजूत झाली आहे कीं, मुंबई राज्यांत ही पदवी रजिस्ट्रेशन-साठीं इतःपर मान्य धरण्यांत आली आहे. कांहीं गुरुंनीं भिषक् परीक्षेसाठीं विद्यार्थीहि शिकविण्यास प्रारंभ केल्याचें आमच्या कानीं आलें आहे.

भिषक् परीक्षेला मान्यता नाहीं

तरी पत्रिकेच्या वाचकांनीं असा गैरसमज करून घेऊ नये. अपेंडिक्स 'बी' ही यादी नवीन ३॥ वर्षांच्या कोर्सच्या मान्य गुरुंच्या योग्यते-(क्वॉलिफिकेशन) बाबत आहे. आयुर्वेद युनानी बोर्ड मुंबई रजिस्ट्रारनें पुढील अर्थाचा खुलासा केला आहे. 'नि.भा. आयुर्वेद विद्यापीठाची भिषक् परीक्षा ही मुंबई राज्यांत रजिस्ट्रेशनसाठीं मान्य परीक्षा नाहीं व राज्यांत या पदवीसाठीं वर्ग चालविण्यास सरकारी मान्यता नाहीं." (पत्र सं २१४७/५४ ता. २३ सप्टेंबर १९५४) —द. आ. घाटगे, कागल

मलेरियाचें जंगली औषध

मीं मध्यप्रदेशांतील बस्तरस्टेट या जंगली विभागांत गेले होते. जंगल म्हटल्यावर तेथें मलेरिअस् हवा असते. हिंवतापानें आजारी पडल्यानंतर तेथें राहणारे आदिवासी लोक कोणतें औषध घेतात, किंवा काय इलाज करतात याची चौकशी केली. आदिवासी लोक चारोळ्या अगर तेंधूच्या झाडावर जे तांबडे मुंगळे असतात, त्या मुंगळयाकडून एकदां दोनदां चाववून घेतात. शरीराची आग होते. परन्तु हा उपाय केल्यावर हिंवताप जातो. उपाय ऐकून आश्चर्य वाटलें.

नाशिक १६।१०।५४ —यमुना हुप्रीकर

विषारी द्रव्यें व र. मे. प्रॅ. वैद्य

"रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टिशनर यांना शिंगरूप (हिंगूळ) रसकापूर, मुरदाडशिंग, मनशीळ, सोमल, बचनाग, जेपाळ या वस्तु जवळ ठेवतां येतात काय? या वस्तूंची औषधीकरणांत व चिकित्सेंत गरज असते. म्हणून त्या विकत घेतां व परगांवीं नेतां येतील का? वैद्य अगर डॉक्टर यांचें कायदे (नियम) बुकांत कोणतें कलम् असें आहे कीं त्याच्या आधारें या गोष्टी जवळ बाळगतां येतील."

वैद्य-आर. डी. क्षीरसागर, कोल्हार भगवती.

(रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टिशनर वैद्यांना अफू, भांग, स्पिरिट आदि वस्तु औषधोपयोगी सरकार-कडूनच मिळतात. त्या इतरांना (व्यसनी लोका-खेरीज) मिळूं शकत नाहींत. वर प्रश्नांत उल्लेखिले-ल्या वस्तु या वैद्यांना विकत मिळूं शकणाऱ्या अशा आहेत. त्यांना परवाना वगैरे कांहीं लागत नाहीं. मग त्या वैद्यांना बाळगण्यास कोणती हरकत असणार? या विषारी वस्तु आहेत सबब त्या जोखमीच्या समजून कुलुपांत ठेवणें अवश्य आहे व त्यांचा हिशेब जवळ असणें अवश्य आहे. म्हणजे कोणी विष खाऊन आत्महत्या केल्यास त्याचा दूरान्वय वैद्यापर्यंत पोहोचणार नाहीं. ही खबरदारी घेतली पाहिजे. ज्याच्या विक्रीवर सरकारच्या जबरदस्त कर वसूल करते अशी द्राक्षासव खर्जूरासवासारखीं आसवारिष्टें स्वतः करून वापरण्यास र. मे. प्रॅ, ला मोकळीक ठेवली आहे. मग या विषद्रव्यांची काय कथा। ती वापरण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं. याला कायद्याच्या कलमाची जरूरी नाहीं. असें वाटतें. —संपादक

पवित्र नेपाळ कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहाः—नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार

नयनामृत प्राश

आक्टोबरच्या आयुर्वेद पत्रिकेंत 'नयनामृत प्राश' बद्दलची माहिती वाचली. चांगली आहे. एक शंका. हिरडा कोणता वापरावा ? बाल कां पक्व (मोठा). माझ्या अनुभवाप्रमाणें मोठ्या हिरड्यांत थोडेंसें ग्राहित्व असतें. तर बाळहिरडा वापरावा काय ? प्रमाण कोणतें ? ग्रंथांतरीं हिरड्याचें वजन अदमासें २ तोळे असतें असें गृहीत धरून १,२,४, असें प्रमाण आढळतें; तर कारखानदार कोणता हिरडा वापरतात तें समजत नाहीं. खुलासा केल्यास आभारी होईन. वरील प्राश दोषभेदानें व्यवहारांत आणूं इच्छितो.

उपचार मात्र आयुर्वेदीयच

तसेंच नेत्रांच्या रुग्णांत नेत्रांची आधुनिक पद्धतीनें परीक्षा करवून तदनंतर वरील प्राश वापरणार आहे. असे कांहीं रुग्ण भेटल्यावर त्या सर्वांची नोंद ठेवून शक्य झाल्यास प्रसिद्धि द्यावी अशी इच्छा आहे. रोगाचें निदान (Diagnosis) दोषदूष्य पद्धतीनें व आधुनिक पद्धतीनें होऊन त्यावर उपचार मात्र आयुर्वेदिक पद्धतीनें झाले म्हणजे माझ्या सारख्या आयुर्वेदाभ्यासकांस आपली उपचार पद्धति, इतर व्यवसायबंधूंच्या गळीं उतरवितां येईल असें वाटतें. सध्यतो मी तसा उपक्रम चालू ठेविलेला आहे.

नवीन पदवीधरांची वृत्ति

दुर्दैवानें वैद्य अगर डॉक्टर वर्ग सहकार्य करूं इच्छित नाहीं. नवीन पदवीधर वैद्य तर सरसहा ऑस्टिओ कॅल्शियम आपल्या कॅल्शियम -कल्पाबद्दल वापरीत आहेत. आपली प्रवाळ, मौक्तिक वगैरे औषधें सेंद्रिय असल्याकारणानें त्याचें शरीराकडून शोषण लवकर होतें व दिलेल्या मात्रेपैकीं जवळजवळ आठदशांश शरीरोपयोगी पडतें. व ऑ. कॅ. खनिज (निरिन्द्रिय) असल्यामुळें दोनदशांश शरीराकडून शोषून आत्मसात् होतें असें वाटतें. शिवाय आपल्या औषधीचा डोस थोडा पुरतो, तर ऑ. कॅ. चा डोस मोठा लागतो. तद्वतच द्रव्यव्ययहि जास्त. याचा अनुभव विशेषें करून गर्भिणी स्त्रियांत पहाण्यासारखा असतो.

लोह व चुना कसा द्यावा ?

अशीच गोष्ट लोहाबाबतहि दृक्प्रत्ययास येते. वरील भस्माबरोबर व्हायटॅमिन 'डी' पाहिजे असल्यास अनुपान म्हणून लोणी-खडीसाखर वापरावी. बाळंतिणीस जो विडा द्यावयाचा तो घट्ट चुन्यांत (२ गुंज) तिप्पट लोणी मिसळून पानास लावून विड्यांतील सर्व द्रव्यें त्यांत घालून दिल्यास मातेस कॅलशियम कमी न पडतां ती तें बालकांसहि पोचवूं शकते. मुलांना रिकेट्स-(मृदस्थि) होत नाहीं. अनुभवून पहावें. पत्रिकेंत वरील शंकेस उत्तर द्यावें.

-- डॉ. सी. एल. जठार.

हिरडा कोणता वापरावा ?

(सध्यां सर्वत्र त्रिफळयांत रंगारी हिरडा (साधा) च वापरतात. बाळहिरडा अगर सुरवारी हिरडा वापरीत नाहींत. आम्ही नयनामृत प्राशांत सुरवारी हिरडा वापरण्याचें ठरविलें आहे. सुरवारी हिरडे अनेक प्रकारचे येतात. शेरांत १०० दाणे (नग) बसतात असा सुरवार हिरडा या कल्पांत वापरला जातो. एका हिरड्याचें वजन २ तोळे असते त्याची किमतहि तशीच भारी १॥ - २॥ रु. असते, तो कल्पास वापरणें परवडू शकत नाहीं. सरवार हिरडा वापरणें शक्य नसेल त्यांनीं बाळहिरडा वापरला तरी चालेल. तोहि नसेल तर रंगारी वापरावा. -- संपादक)

शेगांव (मध्य-प्रदेश) येथें
आयुर्वेद सेवा संघ नाशिक या संस्थेची सर्व प्रकारची अनेक ग्राहकांकडून प्रशंसिलेली औषधें मिळण्याचें ठिकाणः—
खेतान मेडिकल स्टोअर्स
शेगांव (म. प्र.)
आपण एकवेळ अवश्य भेट द्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद, नाशिक

शुद्ध आयुर्वेद समितीला शिफारस

१) पारद संस्कारापैकीं उर्ध्वपातन संस्कारापर्यंतचे संस्कारच शिकवावेत. बाकीच्यांची साधारण माहिती देण्यांत यावी. असा बदल अभ्यासक्रमांत करण्यांत यावा.

२) अभ्यासक्रमांतील त्या त्या विषयाचा अनावश्यक भाग काढून टाकावा व रोजच्या व्यवहारांतील आवश्यक भाग घालण्यांत यावा. याचप्रमाणें तर्कसंग्रह, सांख्यकारिका या ग्रंथांतील अत्यंत आवश्यक भाग निराळा काढून तो शिकविण्याकरितां निश्चित करावा.

३) हीरकभस्मासारख्या किंमती औषधांची प्रक्रिया शिकवावी. तथापि ती परीक्षेकरितां ठेवू नये.

४) विवाद्य मुद्यांविषयीं अेक परिपत्रक तयार करून सर्व परीक्षकांना तें अगोदर द्यावें. ते मुद्दे परीक्षेंत विचारूं नयेत.

———

परिषदेनें मान्य केलेल्या गोष्टी

१) जेव्हां दोन द्रव्यांचा संयोग होईल तेव्हां जर अेका द्रव्यांत अनेक गुण असतील आणि दुसऱ्यांत फक्त एकच गुण असेल तर त्या मिश्रीभूत द्रव्यांत फक्त एकाच गुणाची वृद्धि होईल. सबंध द्रव्याची वृद्धि होणार नाहीं.

२) वातपित्तकफ हीं शरीर द्रव्यें आहेत.

३) वातपित्तकफ या शरीरघटकद्रव्यांना यापुढें "दोष" या संज्ञेनें संबोधिलें जावें.

४) रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा व शुक्र या शरीरघटकद्रव्यांना यापुढें "धातु" या संज्ञेनें संबोधिलें जावें.

५) पुरीष मूत्र स्वेदादि शरीरघटकद्रव्यांना यापुढें "मल" याच संज्ञेनें संबोधिलें जावें.

६) दोष म्हणजे वातपित्तकफ. हे व्यापिनः म्हणजे सर्व शरीरांत असणारे आहेत.

७) बाह्य पांचभौतिक वायु व शरीरांतर्गत वायु हे पदार्थ एकाच प्रकारचे आहेत.

८) कायाग्नि व पाचकपित्त या दोन्ही संज्ञा अेकाच द्रव्याला आहेत.

९) आमाशयाच्या (स्टमकच्या) व लहान आंतड्याच्या संधीपासून, तें लहान आंतडें व मोठें आंतडे यांच्या संधीपर्यंत म्हणजे सर्व लहान आंतडें म्हणजे ग्रहणी होय.

तारीख ११-१०-५४ ते १७-१०-५४ अखेर झालेल्या आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषदेंत वरील गोष्टी मंजूर झाल्या आहेत. आयुर्वेदाचें अध्यापन करतांना वरील संज्ञा उपयोगांत आणल्या जाव्यात.

———

मुंबई राज्य सरकारला विनंति

१) शुद्ध आयुर्वेद विद्यालयें व मान्य गुरूंना यथार्थ शिक्षण देण्याच्या दृष्टीनें जरूर ती आर्थिक व इतर सर्व मदत सरकारकडून देण्यांत यावी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अध्यापकांना सूचना

१) संस्कृत टीका अभ्यासून विषय शिकवावा.

२) सांख्यकारिका, मीमांसापरिभाषा व तर्कसंग्रह यांचा अभ्यास अवश्य करावा.

३) इतर वैद्यकांतील पूरक वा आक्षेपार्ह भाग विवेचन करतांना विद्यार्थ्यांना सांगूं नयेत. (कारण आज त्याची गरज नाहीं व ते पूरक भाग बदलतीलहि.)

४) वैद्यक ग्रंथांचा अभ्यास केवळ वातपित्तकफ या दोषांच्या दृष्टीनें न करतां दोष धातु मल या प्रत्येकाच्या दृष्टीनें विचार करून व्हावा. प्रत्येक वाक्याचा विचार दोष धातुमलांच्या विचार-पूर्वक व्हावा.

५) तंत्रयुक्तिहि अवश्य अभ्यासावी.

श्री धन्वन्तरी सेवा मंडळ, मुंबई

या संस्थेचा धन्वन्तरी उत्सव वैद्य दे. ल. आनंदे जे. पी. म्युनिसिपल कौन्सिलर याच्या अध्यक्षतेखालीं जयहिंद सिनेमाजवळ लक्ष्मी बिल्डिंग लालबाग येथें साजरा झाला. याप्रसंगीं वैद्य प्रतापकुमार, वैद्य रामभाऊ भोगे व मुंबई राज्य सरकारचे आरोग्यखात्याचे उपमंत्री श्री. बसप्पा दासप्पा जत्ती यांचीं भाषणें झालीं श्री. जत्ती म्हणाले “ वैद्यांनीं डॉक्टरांशीं बरोबरी करण्याचा अगर दुसऱ्याच्या शास्त्रास नांवें ठेवण्याचा प्रयत्न करू नये. दोघांनीं आपापल्या चिकित्सापद्धतीप्रमाणें जनतेची सेवा करावी. लोकनियुक्त सरकार दोघानांहि साहाय्य करील. कोणती पद्धति चांगली याचा निर्णय जनता देईल. मी वैद्य अगर डॉक्टर नसल्यामुळें माझी भूमिका निःपक्षपाती अशी आहे.

श्री धन्वन्तरी उत्सव, अहमदनगर

रविवार ता. २४ रोजीं आयुर्वेद महाविद्यालयांत प्रांताध्यक्ष आयुर्वेदप्रवर दत्तात्रेयशास्त्री जळूकर यांचे उत्सवानिमित्त डॉ. गो. वि. केतकर यांच्या अध्यक्षतेखालीं उत्तम व्याख्यान झालें. या विद्यालयास जोडून २४ शय्यांचें एक शुद्ध आयुर्वेद रुग्णालय सुरू होणार आहे. त्यांत गुरुवर्य गुणेशास्त्री यांच्या तैल चित्राचें अनावरण प्रांताध्यक्षांच्या हस्तें झालें.

श्री धन्वन्तरी उत्सव, नाशिराबाद

मंगळवार ता. २६ रोजीं नशिराबाद येथें वै. जळूकरशास्त्री यांच्या चिकित्सागृहांत कविराज भावे यांच्या अध्यक्षतेखालीं वै. भि. श्री. कुलकर्णी यांचे व्याख्यान झालें.

वैद्यासाठीं उपयुक्त ग्रंथ

ॲलोपॅथिक चिकित्सासंग्रह

सुमारें ७० रोगांवरील चिकित्सासूत्रें व २४० प्रिस्क्रिप्शनें व इंजेक्शनें यांनीं युक्त. मराठींतील अभिनव ग्रंथ, आपल्या ॲलोपॅथिक ज्ञानांत वाढ होण्यासाठीं आजच मागवा. किं. ४॥ रु. ट. ख. निराळा.

१ वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

२ डॉ. मोकाशी, ठाणें

सर्व प्रकारचे उपयुक्त

वैद्यक ग्रंथ मिळण्याचें

विश्वसनीय ठिकाण

वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद

उपस्थित अध्यापक वैद्य मंडळी

या परिषदेस पुढील अध्यापक व वैद्य मंडळी उपस्थित राहिली होती. भिषगाचार्य भि. वि. डेग्वेकर जबलपूर, आयुर्वेदाचार्य पांडुरंगशास्त्री शेंड्ये दमोह (म. प्र.), आयुर्वेदाचार्य हरिदत्तशास्त्री मुंबई, वैद्य वामनराव दिनानाथ अध्यक्ष शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समिति, मुंबई; वै. ना. ह. जोशी आयुर्वेदविशारद मंत्री शुद्ध आयुर्वेद पाठ्यक्रम समिति, व अध्यापक शुद्ध आयुर्वेद विद्यालय शीव मुंबई; वै. श्रीमती लक्ष्मीबाई बोरवणकर अध्यापक मुंबई, वैद्यरत्न पं. शिवशर्मा मुंबई, वै. पं. ग. म. अभ्यंकरशास्त्री प्रधानाध्यापक शु. आ. विद्यालय मुंबई, वै. डी. एस. अंतरकर डी. ए. एस. एफ. शारीर अध्यापक पोदार मेडिकल कॉलेज (आयुर्वेदिक) मुंबई, वै. सौ. लक्ष्मीबाई परांजपे मुंबई. वैद्य आयुर्वेदाचार्य दत्तोपंत कुलकर्णी एम. एस्सी. डेप्युटी डायरेक्टर (आयुर्वेद) वैद्यक-खाते, (उत्तर प्रदेश) लखनौ, प्राणाचार्य गोपाळशास्त्री गोडबोले प्राध्यापक आयुर्वेद विश्वविद्यालय झांशी (उत्तर प्रदेश), आयुर्वेदतीर्थ विनायकराव कातारे प्राध्यापक आयुर्वेद महाविद्यालय अहमदनगर, आयुर्वेदविशारद रा. गो. जोग डी. ए. एस. एफ. अध्यापक द्रव्यगुण आयुर्वेद महाविद्यालय अहमदनगर, वै. विश्वनाथशास्त्री पाठक आयुर्वेदतीर्थ मान्य अध्यापक धुळें, वै. य. धों. नाटेलीकर मान्य अध्यापक पुनर्वसु चिकित्सामंदिर कागल (कोल्हापूर), आयुर्विद्याविशारद हरिभाऊ भिडे सहसंपादक धन्वंतरी पुणें, आयुर्वेदाचार्य ब्रह्मदत्तशर्मा भुसावळ, वैद्य कलाराध्यक्षशास्त्री अध्यक्ष निखिल कर्नाटक आयुर्वेद संमेलन विजापूर, वै. दत्तात्रेयशास्त्री जळूकर अध्यक्ष म. प्रां. वैद्य मंडळ नाशिराबाद, आयुर्वेदाचार्य वैद्य वेणीमाधवशास्त्री जोशी, नागपूर विद्यापीठ नागपूर, आयुर्विद्याविशारद वै. हरि बाळकृष्ण परांजपे प्रमुख अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय पुणें, वै. दत्तोपंत वैद्य रसवैद्य ठाणें, आयुर्वेदतीर्थ न. पु. जोशी रोहें. वै. वसंत त्र्यंबक जाईल त्र्यंबकेश्वर, वै. सी. रं. जोशी आयुर्वेदाचार्य बोलठाण, वै द. नी. जोशी निफाड, वै. द. का. थत्ते, चिपळूण, वै. भ. त्र्यं. वैद्य धुळें, वै. द. अ. फुलंब्रीकर सारंगखेडा, वै. बाजीराव कुलकर्णी दादर, वै. अमृतलाल त्रिभुवन पंड्या मुंबई, वै. भा. श्री. देसवंडीकर अश्वी, वै. नारायणराव गुणे नाशिक, वै. गोपाळशास्त्री तर्टे नाशिक, वै. ग. म. लोखंडे, वै. रं. गो. मानोसे नाशिक, वै. रा. उ. देव, वै. पी. पी. टापर नाशिक, वै. कमोद, वै. ना. स. खेडकर, वै. कान्तीस्वरूप शर्मा, वै. स. कृ. लेले, वैद्य मणिराम बाळाजी गुळस्कर मान्य अध्यापक नाशिक, वै. भालचंद्र अनंत शारंगपाणी मान्य अध्यापक नाशिक, वै. त्रिंबकशास्त्री दाते मान्य अध्यापक नाशिक, वैद्यरत्न विष्णुशास्त्री केळकर नासिक, वैद्य वै. वि. म. गोगटे, वै. विष्णुशास्त्री दाते, वै. स. वा. दातार, वै. प्र. वा. दातार डी. ए. एस. एफ. वैद्य पां. प्र. दाणी, वैद्य सदाशिवशास्त्री लवाटे, वैद्य श्यामराव धोंडो कुलकर्णी आयुर्विद्याविशारद, वैद्य भी. कृ. करमरकर आयुर्वेदाचार्य व आयुर्विद्याविशारद, वै. वा. स. मराठे आयुर्वेदतीर्थ, वैद्य आयुर्वेदाचार्य ल. भा. काळे, व्यायामविशारद कृ. व. महाबळ, व वैद्य बिंदुमाधव पंडित इत्यादि शुद्ध आयुर्वेद विद्यालय नाशिक मधील अध्यापक मंडळी.

आयुर्वेदीय औषधी संशोधन
लेखकः–वैद्य वि. पु. धामणकर, आयुर्वेदभूषण
मराठी व हिंदी आवृत्ति. किंमत १ रु.
मिळण्याचें ठिकाणः–
वैद्यक ग्रंथ भांडार, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद, नासिक

आयुर्वेद पत्रिकेच्या १६ आक्टोबरच्या अंकांत आयुर्वेद अध्यापक परिषदेच्या झालेल्या कार्यक्रमाचा कांहीं भाग संक्षेपानें दिला आहे. त्यानंतर झालेला कार्यक्रम थोडक्यांत पुढीलप्रमाणें आहे.

दिनांक १४-१-५४ सकाळीं वैद्यराज श्री. कृ. करमरकरशास्त्री यांनीं 'आयुर्वेदीय शारीर' या विषयाच्या अध्यापनाची त्यांनीं अनुसरलेली पद्धति निवेदन केली व कांहीं शारीर संज्ञांचें स्पष्टीकरण केलें. त्यानंतर दुपारीं वैद्य डी. एस. अंतरकर (मुंबई) व आचार्य वेणीमाधवशास्त्री यांनीं शारीर या विषयासंबंधींच्या अभ्यासक्रमाचें स्पष्टीकरण केलें. सिरा, स्रोतस्, धमनी, पेशी, स्नायू या संज्ञा बाबत उपस्थित वैद्यांत चर्चा होऊन निर्णय घेण्यांत आले. या कामीं वैद्य अंतरकर यांनीं बरेच परिश्रम घेतले.

दिनांक १४ रोजीं सायंकाळीं ५॥ नंतर नासिक शहर वैद्य मंडळातर्फे परगांवाहून आलेल्या वैद्य पाहुणे मंडळींचा सत्कार झाला.

ता. १५ रोजीं सकाळीं वै. सखारामशास्त्री दातार (अध्यापक रसशास्त्र) यांनीं पारदाच्या १८ संस्काराबाबत प्रश्न विचारले व त्यावर वै. द. अ. कुलकर्णी लखनौ व वै. वेणीमाधवशास्त्री जोशी नागपूर यांनीं समाधानकारक विवेचन केलें. यावेळीं झालेल्या चर्चेत वैद्य त्र्यंबकशास्त्री दाते आदि अध्यापक मंडळींनीं भरपूर भाग घेतला. वै. वि. म. गोगटे यांनीं रसौषधीमुळें दोषचिकित्सा मागें पडली हा पूर्व पक्ष मांडला.

मध्यंतरीं आदिवासी क्षेत्रांतील कार्यकर्ते श्री. बगारामजी क्षीरसागर यांनीं आदिवासी लोकांत असलेल्या भुताखेताच्या कल्पनासंबंधीं व त्यावरील उपचारासंबंधी प्रश्न विचारले. अशा विकारावरील औषधोपचाराबद्दल जिज्ञासा व्यक्त केली.

ता. १५ रोजीं रात्रीं वै. वि. म गोगटे यांनीं वाग्भटसूत्रस्थान अध्याय ९ व १० यावरील आपल्या शंका मांडल्या व १५ व्या अध्यायावर व्यवस्थित विवेचन केलें.

ता. १६ रोजीं सकाळीं, वै. पं. डेग्वेकरजी यांनीं विद्यार्थ्यांना पंचमहाभूताची कल्पना कशी आणून द्यावी यासंबंधीं मार्गदर्शन केलें. यानंतर तर्कसंग्रह, सांख्यकारिका यांतील विषय विद्यार्थ्यांना ग्रहण होण्याच्या दृष्टीनें काय करावयास पाहिजे यासंबंधीं चर्चा झाली. ३॥ वर्षांच्या अभ्यासक्रमाच्या शेवटच्या सहामाहींत हा तात्विक विषय शिकवावा हा पहिला पक्ष, पहिल्या १॥ वर्षांच्या शेवटच्या सहामाहींत शिकवावा हा दुसरा पक्ष, व त्या दोन ग्रंथांतील आयुर्वेदोपयोगी भाग अलग काढून तेवढाच पहिल्या वर्षी शिकावण्यांत यावा हा तिसरा पक्ष मांडला गेला. यासंबंधीं विचार करण्यासाठीं एक छोटी समिति नेमली आहे.

ही चर्चा चालू असतां वैद्यराज एकतारे यांनीं न्यायमीमांसादि दर्शनें प्रथम शिकविलीं पाहिजेत असें प्रतिपादिलें. आजच्या अभ्यासक्रमांत मीमांसा दर्शनाचा अंतर्भाव नाहीं तो करावा अशी वै. बिंदुमाधव यांनीं विनंति केली. तर्कसंग्रह व सांख्यकारिका जर मागाहून शिकविली तरी चालेल पण मीमांसापरिभाषा सर्वांच्या आधीं शिकविली पाहिजे असें आपलें स्वतःचें मत अध्यक्ष वैद्य वेणीमाधवशास्त्री यांनीं सांगितलें. मीमांसादर्शनाची ओळख करून देणारें एक व्याख्यान ता. १७ रोजीं दुपारीं वै. बिंदुमाधव पंडित यांनीं दिलें.

सप्त धातूंची श्रेष्ठ कर्में यावर चर्चा झाली. दोषाप्रमाणेंच धातूंचा व मलांचा बारकाईनें अभ्यास करण्याची आवश्यकता अध्यापकांना पटवून देण्यांत आली.

दुपारीं तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचें उपस्थित तात्विक शंकांना उद्देशून सुन्दर भाषण झालें व प्रश्नोत्तरेंहि झालीं. नंतर वैद्यराज गोगटे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रमणिका

नैतिक भावनांनीं ज्ञानाची वाढ होते	१८३
आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद	२८५
ठिकठिकाणचे श्रीधन्वन्तरी उत्सव	३००
म.प्रां.वै.मंडळाची कार्यकारी व स्थायी सभा	३०१
कुष्ठचिकित्सा व श्री. परांजपे	३०३
विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयाचें स्नेहसंमेलन	३०५
प्रकृतिः संस्कृतम्	३०६
एक गैरसमज	३०७
विषारी द्रव्यें व र. मे. प्रॅ. वैद्य	३०७
नयनामृत प्राश	३०८
अध्यापक परिषदेचें ठराव	३०९
अध्यापक परिषद, उपस्थित मंडळी	३११
अध्यापक परिषदेचें इतिवृत्त	३१२

नीं सुमारें ७०/७५ ओल्या वनस्पती दाखविल्या. त्यावर अनेकानीं आपले विचार मांडले.

रात्रीं वै. द. अ. कुळकर्णीजी यांनीं सरकारी र्यपद्धतीची माहिती दिली, व वैद्यांचें कर्तव्य मजावून दिलें.

ता. १७ रोजीं सकाळीं बहुतेक वैद्यमंडळीनीं शिकपासून ८ मैलावर चालू असलेलें गंगापूर रण पाहिलें. दुपारीं डेग्वेकरजींनीं दोषभेदीय अध्या-नाचें अध्यापन केलें. वै. द. अ. कुलकर्णी यांनीं चमहाभूतें व त्रिदोष या विषयाची आपली मांडणी धुनिक विज्ञानाला धरून मांडली व ती प्राचीन चारसरणी शास्त्रीय आहे असें दर्शविलें. त्यानंतर रिषदेनें घेतलेले निर्णय मांडून संमत करण्यांत आले. रिषदेच्या शेवटीं शुद्ध आयुर्वेद समितीचे अध्यक्ष . वामनराव व मंत्री नाना जोशी यांचीं व्याख्यानें ाली वन्देमातरम् गीत व रात्रीं सामुदायिक भोजन ऊन परिषद ता. १७ रोजीं रात्रीं यशस्वी रीत्या ार पडली.

परिषदेनें पुढील कार्यासाठीं एक कार्यकारी डळ नेमलें आहे.

परिषदेचें सर्व कार्यक्रम ठरल्या वेळीं सुरू होत सत. परिषदेचें एकंदर कार्य ७ दिवसांत मिळून ६ तास चाललें.

लिस्टेड वैद्य व ॲलोपॅथिक औषधें

प्रश्नः—मी लिस्टेड वैद्य आहे. काल माझ्या दवाखान्यांत जिल्हा आरोग्याधिकारी तपासणीसाठीं आलें होते. मी थोडी ॲलोपॅथिक औषधें - पिच्युटरी सल्फर्सन—वापरीत असतो. हीं वापरण्यास कायद्यानें बन्दी आहे काय तें कळवावें. वैद्यांनीं बाळंतिणी सोडविणें गुन्हा आहे काय ? अशा प्रकारें चौकशी सुरू आहे. तरी कायद्देशीर खुलासा करावा.

उत्तरः-कायदेशीर सल्ला आपण वकिलाकडून घ्यावा. लिस्टेड व रजिस्टर्ड वैद्यांत फरक एवढाच कीं, रजिस्टर्ड वैद्याला आयुर्वेद बोर्ड निवडणुकींत मतदानाचा हक्क आहे व त्याचें प्रमाणपत्र कोर्टांत मानलें पाहिजे असा सरकारी कायदा आहे. हे दोन अधिकार लिस्टेड वैद्याला नाहींत. या खेरीजचे मान्य वैद्यकीय व्यावसायिकाचे सर्व अधिकार त्याला आहेत. कोणत्याहि एका पद्धतीनुसार रजिस्टर्ड अगर लिस्टेड असेल त्याला कोणत्याहि पॅथीची औषधें वापरण्यास मुभा आहे. लिस्टमध्यें दाखल झालेले बरेच लोक ॲलोपॅथिक परीक्षा नापास झालेले डॉक्टर आहेत असें कळतें. तें बहुत्यानें ॲलोपॅथिक औषधेंच वापरतात.

बडोदा (गुजरात) येथें
आयुर्वेद सेवा संघ-नाशिक
या संस्थेचीं सर्व प्रकारचीं गुणकारी औषधें
मिळण्याचें ठिकाण
श्री. गणेश सिताराम जोशी
खेडकर फळिय, महंमदवाडी-बडोदा.
आपण एकवेळ अवश्य भेट द्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" यह सच्चा सेवा संघ है। "

" आज नासिकके आयुर्वेद सेवा संघ का संदर्शन किया और इस संघने चलाओ हुओ औषधी निर्माणशाला और ग्रंथालय भी देखा। इससे मेरे दिलमें अत्यंत आनंद हुआ, क्योंकि मैंने अभीतक वैद्योंने इतनी पद्धतशीर तथा उत्साह और सेवा बुद्धिसे चलायी हुओ संस्था नही देखी था।

इस संघके सदस्यों में जो आयुर्वेदविषयक अभिमान और संशोधक प्रवृत्ति है वह वर्णनीय और आशाजनक है। यह संघ केवल नाममात्र सेवा संघ न रहकर सच्चा सेवा संघ है।

अतः मैं आशा करता हूँ कि भविष्यमें भी आयुर्वेद का गौरव बढाने वाले बहुतसे कार्य इस संघ की ओरसे होंगे।

मल्लाराध्यशास्त्री, अध्यक्ष

नासिक ता. १५।१०।५४ निखिल कर्नाटक आयुर्वेद मंडळ, विजापूर

हिंवाळा आला ! बलवर्धक 'प्राश' सेवन करा !

थंडीच्या दिवसांत पौष्टिक कल्प सेवन करून आपलें शरीर, मानस व बौद्धिक बल कायम राखण्याची आर्यांची पद्धति आहे. सर्व प्रकारच्या प्रकृतींना एकच प्रकारचा पौष्टिक कल्प लागू पडत नाहीं मानवत नाहीं; हें लक्षांत घेऊन आयुर्वेद सेवा संघानें

वातप्रकृतीसाठीं	पित्तप्रकृतीसाठीं	कफप्रकृतीसाठीं
च्यवनप्राश	अश्विनीप्राश	अगस्तिप्राश

असे पौष्टिक कल्प तयार करून जनतेच्या सोईसाठीं विक्रीस ठेवले आहेत. रुग्णांना व स्वस्थांना पौष्टिक कल्प सुचवितांना वैद्यमंडळींनीं हा दोषविचार अवश्य करावा अशी नम्र विनंति आहे. किंमत ४० तोळे ४ रु.; २० तोळें २ रु.

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक

संपादक व प्रकाशकः—वैद्य विंद्माधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य [illegible]कर कारंजा, नासिक
मुद्रकः—श्री. चिं. ओक, सर्कल प्रेस, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

आयुर्वेद सेवा संघाचें पाक्षिक वृत्तपत्र
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद पत्रिका

(दरमहा ता. १ व १६ रोजीं प्रसिद्ध होतें.)

वार्षिक वर्गणी (२४ अंक) ६ रु. १ अंकाची किंमत ४ आणे

वर्ष ८ वें) नासिक, ता. १६ नोव्हेंबर १९५४ (अंक १० वा

आयुर्वेद सेवा संघांत

कपिला कामधेनूचें शुभ आगमन



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद, नासिक

— प्रेस फोटो. एस्. परशराम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद सेवा संघाचा धर्मार्थ दवाखाना, नासिक

कपाटांतील औषधि द्रव्यांची पद्धतशीर मांडणी

(चिकित्सक व लेखकः– आयुर्वेदाचार्य श्री. छ. करमरकर)

चिकित्सा करतांना निदानाची अशी एक विशिष्ट पद्धति असावी, तशीच औषधें वापरतांनाहि एक पद्धति असावी, या हेतूनें धर्मार्थ दवाखान्यांतील कपाटांत औषधांची मांडणी पुढीलप्रमाणें केली आहे.

औषधी कपाटाची (कौंटरची) रचना पुढीलप्रमाणें आहेः––

डावीकडे ६ खणांचें कपाट, उजवीकडे ३ खणांचें कपाट. दोहोंमध्यें ३ उघडे खण व ह्या सर्वांवर एक मोठा आडवा उघडा खण. वरच्या खणावर एकंदर २१ बाटल्या आहेत. त्यांतील औषधी द्रव्यांची निवड पुढीलप्रमाणें केली आहे.––

सामदोष पाचक औषधी

१) रास्ना–सामवातपाचक (पित्तप्रकृतींत)

२) हिंगाष्टक–सामवातपाचक, पण अनुलोमक (कफप्रकृतींत)

३) अष्टांगलवण– सामवातपाचक व अनुलोमक (वातप्रकृतींत).

४) अश्वगंधाचूर्ण–निरामवातशामक व बृंहण (वातकफप्रकृतींत).

धातुगत पित्तशामक औषधी

१) महासुदर्शनचूर्ण, २) पिवळा वाळाचूर्ण ३) पित्तपापडाचूर्ण– [रसधातुस्थ पित्ताचें पचन करणारीं द्रव्यें]

४) मंजिष्टा ५) मदयंतिका [मेंदी] ६) सारिवा – रक्तधातुस्थ पित्तशामक.

७) जेष्टमध– [मांसस्थ पित्तशामक.]

८) दारुहळद– [मेदोधातुगत पित्तशामक]

९) गुळवेलसत्व –अस्थिमज्जागत पित्तशामक व बृंहण करणारें.

गट तिसरा––

१) पंचकोलचूर्ण–कफघ्न, अग्निवर्धक, पाचक.

२) टंकण–सामकफपाचक व सारक.

३) सितोपलादिचूर्ण– सामकफपाचक व बृंहण.

४) नवायसचूर्ण– सामकफपाचक, अग्निवर्धक, रक्तवर्धक [बृंहण]

५) जसदभस्मयुक्त विजयामृत–सामकफपाचक व सारक.

६) शुद्धमनःशिला } तीव्र कफनाशक विषद्रव्यें.
७) शुद्ध बचनाग }

याप्रमाणें ही वरच्या फळीवरील २१ औषधें दोषांची सामावस्था, निरामावस्था, व धातुगतत्व इ. पाहून चिकित्सा करण्यांस मदत करतात.

कटु रसाचीं चूर्णें

उजवीकडच्या कपाटाच्या वरच्या खणांत कटु रसाचीं चूर्णें आहेत.—१ सुंठ, २ मिरे, ३ पिंपळी, ४ वेखंड, ५ वावडिंग, ६ पारसिक यवानी, ७ रेवाचिनीचा शिरा. यापैकीं रेवाचिनीचा शिरा कफशोधक म्हणुन उपयोगांत आणला जातो. हीं सगळीं कटु [तिखट] द्रव्यें कफप्रकृतींत वापरलीं जातात.

१) मिरे – रसगत कफाकरितां,

२) पिंपळी ३) विडंग–रक्तस्थ कफदोषाकरितां.

४) सुंठ–मांसमेदस्थ कफाकरितां.

५) वेखंड– मज्जास्थित कफाकरितां वापरलें जातें.

त्या खालच्या खणांत तिक्त (कडू) द्रव्यें आहेत. निंबचूर्ण, सागरगोटाचूर्ण, गुळवेलचूर्ण, इन्द्रजव, कडूपडवळ, माका––हीं सगळीं तिक्तरसानें कफप्रत्यनीक आहेत.

माका व इन्द्रयव–रसस्थ कफाकरितां,

कडुपडवळ–रक्तस्थ कफासाठीं,

निंब– मांसस्थ कफासाठीं,

गुळवेल व सागरगोटाचूर्ण मेद, अस्थि व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मज्जागत कफाकरितां वापरलीं जातात.

हीं सगळीं कडु द्रव्यें पित्तप्रकृतीसाठींहि उपयोगांत आणलीं जातात.

तिसऱ्या खणांतील औषधें

तिसऱ्या खणांत जीं द्रव्यें आहेत, तीं कफप्रत्यनीक म्हणून कफपित्तप्रकृतींत वापरलीं जातात. धमासा, असाणा, गैरिक, खैराची साल, बेहेडाचूर्ण, पिंपळाची लाख. हीं तीं द्रव्यें आहेत.

धमासा, गैरिक- रसस्थ कफपित्तशामक,

असाणा, खैर, बेहेडा-मांसमेदस्थ कफपित्तशामक

पिंपळाची लाख-कफस्थानाला वश्य, कफपित्तशामक पण बृंहण म्हणून वापरली जाते.

मलांचा विचार

मधल्या खणामध्यें मलांचा विचार करून पुढील औषधी व्यवस्था केली आहे.

१ ला कप्पा- विरेचकगण- स्वादिष्ट विरेचनचूर्ण, निशोत्तरचूर्ण—पित्तप्रकृतींत पित्तदोषयुक्त मलाचें शोधन.

कुटकी— विरेचक कफपित्तदोषांचें विरेचन. कफप्रकृतींत.

हरीतकी- कफवातदोषयुक्त मलविरेचक कफवातप्रकृतींत.

इच्छाभेदी-कफवातप्रकृतींत सर्वदोषविरेचक.

कपिला-कृमी व कफपित्तदोषयुक्त मलविरेचक.

पुष्पवटी-आर्तवशुद्धिकर.

मूत्रमलावरील औषधें

दुसऱ्या खणांत मूत्रमलावर कार्य करणारीं द्रव्यें आहेतः—

१) गोखरू- मूत्रल वातशामक. वातप्रकृतींत उपयुक्त.

१) आमलकी व चंदन-पित्तप्रकृतींत, मूत्रल व पित्तशामक.

३) चंदन-कफप्रकृतींतहि उपयुक्त.

४) शतावरी— सर्व प्रकृतींत उपयोगी. त्रिदोषघ्न, मूत्रल व बृंहण करणारी.

मलसंग्रहण औषधें

तिसऱ्या खणांत पुरीषसंग्रहणीय द्रव्यें आहेत.-

१) बालसंजीवनी चूर्ण-पित्तप्रकृतींत व कफप्रकृतींत उपयुक्त.

२) कुरटीलाही-कफप्रकृतींत.

३) अतिसारचूर्ण-वातप्रकृतींत.

४) नागरमोथा-साममलपाचन व संग्रहण. चतुर्दोषशमन [रक्तशुद्धां.]

सिद्धौषधें

डावीकडच्या कपाटांत सिद्धौषधी आहेत.—

१ ल्या खणांत वातप्रत्यनीक द्रव्यें—

रसोनवटी, महायोगराजगुग्गुळ, गोक्षुरादिगुग्गुळ, समीरपन्नग- सामवाताचें शमन.

महावातविध्वंस- निराम वातशमन.

सुवणमाक्षिकभस्म-बृंहणशमन.

वायूवरील औषधांत लंघनशमनद्रव्यें व बृंहणशमन द्रव्यें आहेत.

दुसऱ्या व तिसऱ्या खणांत पित्तप्रत्यनीक द्रव्यें

उन्हाळीचें औषध- मूत्रमार्गानें पित्तशमन.

गोरोचनमिश्रण, मुक्ताशुक्तिभस्म, प्रवाळभस्म (चंद्रपुटी,) गोदंतीभस्म, प्रदरारि, कपर्दिकभस्म, अग्निपुटी प्रवाळभस्म, हीं- कफयुक्तपित्तशामक.

लघुसूतशेखर व सूतशेखर हीं देखील कफपित्तशामक.

रौप्यसुवर्णसूतशेखर— पित्तवातशामक व बृंहण कल्प.

बाहुल्यानें अन्तःकोष्ठांतील कफपित्ताचें शमनार्थ सूतशेखर, लघुसूतशेखर, कपर्दिकभस्म हीं वापरलीं जातात. व धातुस्थ विशेषतः रसधातुगत, कफपित्तशमन प्रवाळभस्म, गोदंतीभस्म करतात. मज्जाधातुस्थ पित्तशमन मुक्ताशुक्ति भस्म करतें.

कफप्रत्यनीक द्रव्यें

चवथ्या व पांचव्या खणांत कफप्रत्यनीक द्रव्यें. श्वासकुठार, गर्भपालरस, प्रतापलंकेश्वर, महा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मृत्युंजय, संजीवनीगुटी, हीं सामकफपाचक.

त्रिभुवनकीर्ति, विषमुष्टयादिवटी, जसदभस्म, वंगभस्म, शृंगभस्म, मल्लसिंदूर हीं निरामकफपाचक.

लवंगादिवटी, कनकसुन्दर व चन्द्रप्रभा हींहि द्रव्यें याच खणांत ठेवलीं आहेत.

त्रिभुवनकीर्ति-रसस्थ कफपाचक

जसद- मांसस्थ, कफहारक

विषमुष्टयादि, वंगभस्म, मल्लसिंदूर-मांसमेद-मज्जाशुक्रस्थकफ नाशक.

शृंगभस्म- अस्थिस्थ कफवृद्धि नाहींशी करण्यास वापरलीं जातात.

वरारक्षा- क्लेदशोषक म्हणून याच खणांत आहे.

सहावा खण

रससिंदूर, लघुमालिनीवसन्त, सुवर्णमालिनीवसंत (सूक्ष्म), व लक्ष्मीविलासगुटी- हीं द्रव्यें सर्व सान्निपातिक व जीर्णअवस्थेंत बलप्रस्थापक म्हणून वापरलीं जातात, कारण बलाधिष्ठानमारोग्यं, आरोग्यार्थः क्रियाक्रमः । असें आहे.

तीन दोषांचे प्रत्यनीक कषाय

हें कपाट याच प्रकारचे खण असलेल्या एक टेबलास जोडलें आहे. या टेबलावर तीन दोषांचे प्रत्यनीक असे शमनकषाय ऋतूप्रमाणें कमीजास्त प्रमाणांत रोज तयार करून ताजे ठेवण्यांत येतात. व बहुतेक सर्व रोग्यांसाठीं व स्वस्थ लोकांसाठींहि त्यांचा दोषशामक द्रव्य म्हणून उपयोग केला जातो. अष्टांगहृदयांतील सूत्रस्थान अ. १५ मधील तीन दोषांच्या शामक गणांतील औषधें या काढ्यांत वापरलीं आहेत. सध्यां शरद्‌ऋतु असल्यामुळें पित्तप्रत्यनीक काढा जास्त वापरला जातो.

नाशिक हा कफोल्बण देश

नाशिक हा अनूप (कफोल्बण) प्रदेश आहे. या ठिकाणीं कफाचे व क्लेदजन्य कृमींचे विकार अधिक होतात. यामुळें या कपाटांतील औषधें कफप्रत्यनीकच जास्त आहेत. मधुर, अम्ल व लवण द्रव्यें यांना यांत स्थान दिलेलें नाहीं. ऋतुअनुसार किंवा वात व प्रकृति रोग्यांना मधुरानुपान सांगितलें जातें.

व्रणचिकित्सा

व्रणचिकित्सेच्या दृष्टीनें व स्वस्थोपचार (स्वास्थ्य कायम ठेवण्याकरितां) म्हणून पुढील व्यवस्था आहे:- (१) चंदनबलालाक्षादि तैल (पित्त) (२) क्षारतैल (वात) (३) नारायण तैल (वात) (४) इरिमेदादि तैल (कफ) हीं तैलें नस्यार्थ वापरलीं जातात. कर्णपूरणार्थहि त्यांचा उपयोग केला जातो. अभ्यंग व मुखगण्डूषासाठींही तैलें उपयोजिलीं जातात.

शुद्ध तिलतैल व मध, व्रणशोधन म्हणून, व रोपण तैल व वरील तैलांचा दोषभेदानें उपयोग व्रणरोपक म्हणून केला जातो.

पित्तप्रधान व्रणांसाठीं तिक्त घृताचा उपयोग केला जातो. शतधौतघृतहि वापरलें जातें.

कफप्रधान अथवा उन्नतमांसयुक्त व्रणांसाठीं 'तुत्थ' व क्षारतैल यांचा उपयोग केला जातो. क्लेदशोषक म्हणून शंखजीरकचूर्ण व सारिवाचूर्ण, खैरसालचूर्ण या व्रणांवर वापरलें जातें.

.... गौरव ....

आपण आयुर्वेदिक औषधांचा गौरव वाढविला पाहिजे. ती एक आपल्या हिताची गोष्ट आहे. आपण प्रत्येक औषधी द्रव्य अस्सलपैकीं व ताजें वापरून सिद्ध औषधें बनविलीं पाहिजेत. अशीं उत्कृष्ट औषधीं द्रव्यें मिळवण्याकरितां आपण:—

दि ऑल इंडिया करीयाणा स्टोर्स

पायधुनी मुंबई नं. ३

(टेलिफोन नं. ३१८५८) यांना लिहा.

युनानी व आयुर्वेदीय काष्ठादि औषधांचें

मुख्य केंद्र

काष्ठादि औषधींचीं तयार चूर्णेंहि मिळतात. अधिक माहितीसाठीं कॅटलॉग मागवावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कार्पास, कवलिका (लिंट व गॉज) व व्रणपट्ट (Bandages & Sticking plaster) ठेवलेलीं असतात. तीं वापरलीं जातात.

दशांगलेप व शोथहरलेप व्रणशोथांच्या अवस्थेनुसार वापरले जातात.

नेत्रविकारासाठीं

नेत्रविकारांसाठीं यष्टिमधु जल (वातपित्त) त्रिफळा जल (कफ), दारुहळद जल (कफपित्त) अभिष्यन्दाचे वेळीं धावनार्थ वापरलें जातें. अधिक शूल असतां अफूच्या बोंडाच्या जलानें धावन करावयास व एरंडेल तेलाचे थेंब सोडण्यास सांगितलें जातें. (वरील द्रव्यें उकळून गाळून तें जल घेण्यांत येतें.) नेत्रबिंदु, शतधौतघृत + जसदभस्म, नयनांजन हीं द्रव्यें वापरलीं जातात.

याप्रमाणें विशिष्ट दृष्टीनें औषधांची निवड व रचना केलेली आहे. अशी रचना सतत डोळयांसमोर राहिल्यानें डोक्यांत राहाते. व चिकित्सेच्या वेळीं चिकित्सा लिहितांना तिचा अवलंब केला जातो.

दवाखान्याची रुग्णपत्रिकाहि विशिष्ट पद्धतीची (आयुर्वेदोक्त) अशी तयार केलेली आहे.

या सर्व मांडणीचा उद्देश हाच कीं, निदान व चिकित्सा दोषधातुमलांना धरून (आयुर्वेदीय) व्हावी.

———

पुणें येथें
' आयुर्वेद सेवा संघ, नासिक ' चीं
सर्व औषधें मिळण्याचें ठिकाण
किरण मेडिकल सर्व्हिस
नगरकर तालीम चौक, लक्ष्मीरोड, पुणें २

आयुर्वेदिक कारखानदार व वैद्य यांस लागणारीं
आयुर्वेदिक व युनानी वनौषधि
तसेंच खनिज व प्राणिज द्रव्यें मिळण्याचें मुख्य ठिकाण !

अंबर, कस्तुरी, गोरोचन, केशर, मौक्तिक शाका, माणिक, अकीक, सुवर्ण-वर्ख, रौप्य-वर्ख, शिंपा, कवड्या, शंख, प्रवाळ, आवळसार, गंधक, दगडीबेर, जहरमोहरा, सुवर्णमाक्षिक, कांतलोह, हिंगुळ, पारद, गुग्गुळ, वज्राभ्रक, पन्ना, खर्पर, वाकेरी, अनंतमूळ, अष्टवर्ग, सोम, सर्पगंधा, उलटकंबल, नागकेशर, (अस्सली), ब्राह्मी, वंशलोचन इत्यादि सर्व प्रकारची वनौषधि, खनिज व प्राणिज औषधि द्रव्यें घाऊक भावानें मिळतील.

बाहेरगांवच्या ऑर्डरीवर विशेष लक्ष दिलें जाईल. अस्सल व खात्रीपूर्वक माल हेंच आमचें वैशिष्टय ! विशेष माहितीसाठीं आमचे साप्ताहिक दरांचे छापील भावपत्रक मागवावें.

टे. फो. नं. ३१७९६ टेलिग्रॅम-आयुर्वेद

शा. जादवजी लल्लुभाई आणि कंपनी
२४५ काळबादेवी रोड, मुंबई २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बी. सी. जी. मोहीम

बी.सी. जी. व्हॅक्सिनेशन कमिटीचे सन्मान्य मंत्री डॉ. भास्कर पटेल यांनीं पुढील पत्रक प्रसिद्धी-साठीं पाठविलें आहे.

१ नोव्हेंबर १९५४ हा सर्व भारतांत बी. सी. जी. प्रचार दिवस म्हणून पाळण्यांत आला. क्षय-प्रतिबंधक मोहिमेंतील बी. सी. जी. चें महत्व जनतेला पटवून देणें हा त्याचा उद्देश होता. या दिवशीं सभा, मिरवणुकी, रेडिओ भाषणें, फिल्म्स् दाखविणें इ. कार्यक्रम झाले.

बी. सी. जी. ची पंचवार्षिक योजना

या बाबतींत एक पंचवार्षिक योजना आखण्यांत आली आहे. मुंबई राज्याचे ३ गट पाडून त्यांत १५ तज्ञ मंडळें कार्यासाठीं पाठविलीं आहेत. ५।५ तज्ञ मंडळांचा एक एक संघ केलेला आहे. एकेका तज्ञ मंडळांत १ डॉक्टर ६ तज्ञकार्यकर्ते २ शिपाई व एक मोटार-चालक असतो. प्रचारसामुग्रीसंपन्न अशी १ मोटार यांना दिलेली आहे. प्रत्येक संघास १ व्यवस्थापक वैद्यकीय अधिकारी व त्यांची कचेरी जोडलेली आहे.

१० आक्टोबर ते १० जून पर्यंत खेड्यांतून व १० जून ते १० आक्टोबर (पावसाळा) शहरी भागांत काम चालते. दरमहा ३५००० टयुबरक्युलीन परीक्षा व्हाव्यात अशी योजना आहे. पुढील ५ वर्षांत मुंबई राज्यांतील सर्व तरुणांना बी. सी. जी. लस टोंचली जाईल. हें लक्ष्य ठेवून कार्य चालू आहे. दरसाल ६३ लक्ष वस्तीचें काम होईल. मात्र जनतेचें सहकार्य पाहिजे.

लक्ष लोकांना बी. सी. जी.

सध्यां मुंबई, नाशिक, पुणें खेडा, बडोदा व धारवाड या जिल्ह्यांत काम सुरू आहे. यंदा जादा पाऊस पडत असूनहि आजवर २० लक्षावर टयुबर-क्युलिन परीक्षा झाल्या. त्यापैकीं १२ लक्षावर लोक क्षयानुकूल सांपडले व ४ लक्षावर लोकांना बी.सी.जी. व्हॅक्सीन दिलें गेलें.

गेल्या सप्टेंबर अखेर झालेल्या ३ महिन्यांत १६८ खेडीं, १८५ प्राथमिक शाळा, ६९ विनय-मंदिरे (हायस्कूलें), १२ महाविद्यालयें, ५३ संस्था व ६ नगरें एवढ्या ठिकाणीं काम झालें. १३८ सार्व-जनिक सभा, १० रेडिओ भाषणें, १२३ फिल्म-दर्शनें, २०१ व्याख्यानें, ६ प्रयोगदर्शनें झालीं.

वाचकांचा पत्रव्यवहार--

नवें सदर उघडा

" आयुर्वेद पत्रिकेमध्यें एक नवें सदर उघडाल तर फार बरें होईल. ज्या वैद्य किंवा डॉक्टर मंडळींना कांहीं शास्त्रीय ज्ञानाबद्दलच्या शंका असतील त्यांचें समाधान विद्वान् व वृद्ध वैद्याकडून व्हावें.

मी एक ॲलोपॅथिक डॉक्टर आहे, परंतु आयुर्वेदाचा अभ्यासू आहे. त्या दृष्टीनें माझ्या मनांत कांहीं शंका येतात,

१) ॲलोपॅथीची ' हृद्य ' कल्पना व आयु-र्वेदाची हृद्य कल्पना ह्यांत काय अंतर आहे ?

२) डिजिटॅलिस सारखें हृद्य औषध आयु-र्वेदांत कोणतें ?

३) सान्निपातिक ज्वरांत जेव्हां हृदयाचा वेग वाढत जातो व त्याबरोबर नाडीचा पण वेग वाढत जातो. अशावेळीं डिजिटॅलिस हें औषध नीट काम करीत नाहीं. तरी अशा वेळीं एखादें आयुर्वेदीय औषध वापरतां येईल कां ?

आपण जे औषध सुचवाल त्या औषधाविषयीं दोष दूष्य स्थानसंश्रय इत्यादि अपेक्षेनें वर्णन असावें. या शंकांचें समाधान विद्वान् वैद्याकडून व्हावें.

× × ×

दुसरें असें कीं, आपण एखाद्या वैद्याच्या नांवाचा किंवा परिचयाचा विशेषांक काढतां, त्या-ऐवजीं एखाद्या ' रोगाचा विशेषांक ' काढणें जास्त इष्ट होईल व असा विशेषांक निदान सहा महिन्यां-तून एक तरी असावा.

नागपूर २ डॉ. सी. व्ही. जोगी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाचकांचा पत्रव्यवहार—

आयुर्वेदाच्या प्रगतींतील टप्पे

त्रिदोषाच्या पायावर उभारणी, कोणत्याहि खाद्य पदार्थांचे रस, गुण, वीर्य, विपाक व प्रभावादि ५ गुणांचा (धर्मांचा) शोध, पाऱ्याचा औषधींतील उपयोग, हे आयुर्वेदाच्या प्रगतींतील फार महत्वाचे टप्पे आहेत असें मला वाटतें.

त्या दृष्टीनें मला आपल्याकडून पुढील माहिती हवी आहे.

१ अथर्ववेद-मूळ आयुर्वेद. यांत त्रिदोषांचा विचार आहे काय ?

२ चतुर्दोष पद्धतीचा (युनानीप्रमाणें) आयुर्वेदानें कधीं अंगिकार केला होता काय ?

३ पाऱ्याचा उपयोग औषधींत केव्हांपासून करूं लागले ? कोणत्या व कधींच्या ग्रंथांत त्याचा उल्लेख सर्वांत अगोदर आढळतो ?

४ बुद्धकालापासून शस्त्रक्रिया मागें पडली. अहिंसेचे कांहीं भक्त अद्यापहि प्रवाळभस्म, मध घेण्यास अनमान करतात. प्रवाळाचा उपयोग औषधींत कधींपासून होऊं लागला याची कांहीं कल्पना आहे काय ?

— एक डॉक्टर M. B. B. S.

उधळीचा राजा

आपल्याकडे वारुळांतील – उधळीचा – राजा असल्यास कळविणें. मला एकूण १४ पाहिजेत. त्याची किंमत कळवावी. —कुरकुटे, अहमदाबाद

(पत्रिकेच्या वाचकांपैकीं कोणाला उधळीचा राजा व त्याचे गुणधर्म याची माहिती असल्यास ती प्रसिद्धीसाठीं पत्रिकेकडे पाठवावी. —संपादक)

मान्यता काढून घेतली

विजापूरच्या श्रीसत्येश्वर आयुर्वेद पाठशाळेस, शुद्ध आयुर्वेदिक शिक्षणक्रमाचें शिक्षण देण्याबाबत दिलेली मान्यता, मुंबई सरकारनें काढून घेतली असून हा हुकूम तावडतोब अंमलांत येत आहे.

अकोला वैद्य मंडळ

अकोला वैद्य मंडळातर्फे दिनांक २४-१०-५४ रोजीं पं. शिवगुलामजी पांडे वैद्य यांचे अध्यक्षतेखालीं श्रीधन्वतरीउत्सव साजरा करण्यांत आला. तन्निमित्त वैद्य समुद्र, हकीम जयपुरी, वैद्य शहा व पं. शिवगुलामजी पांडे यांचीं भाषणें झालीं. पुढील वर्षाकरितां पदाधिकाऱ्यांची निवड झाली.

अध्यक्ष— पं. शिवगुलामजी पांडे वैद्य

उपाध्यक्ष— श्री. हरिहर सीताराम राजंदेकर वैद्य

सेक्रेटरी— श्री. गंगाधर हरी पराडकर वैद्य

सहाय्यक सेक्रे.— श्री. ज. तु. सोनटक्के

थंडगार
नेत्रांजन
डोळ्यांचे विकारावर उत्कृष्ट
कृष्णशास्त्री बिवलकर
पो. आंजर्ले. (रत्नागिरी)

पांढरें कोड

हजारोंचें गेलें. त्यांनीं अभिप्राय दिलेले आणि अनेक बक्षिसें मिळालेलें रामबाण औषध किं. ५ रु
नकली वैद्यापासून सावध रहा !

मलेरिया शत्रू

पहिल्याच मात्रेंत मलेरिया नष्ट होतो असें हें प्रभावी औषध आहे. अर्ध्या पौंडास ६ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

वैद्य बी. आर. बोरकर, 'आयुर्वेद भवन'
मु. पो. मंगरुळपीर, जि. अकोला (मध्यप्रदेश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
गुरुकुल पत्रिका

अध्यापकांचा सत्कार

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषदेसाठीं आलेल्या अध्यापकांचा पुढील संस्थांनीं सत्कार केला व आपआपली संस्था अध्यापकांना दाखविली.

(१) अभिनव भारत मंदिर, नासिक.

(२) सार्वजनिक वाचनालय, नासिक.

(३) नाशिक शहर वैद्य मंडळ.

(४) आयुर्वेद सेवा संघ, नाशिक.

नाशिक शहर वैद्य मंडळातर्फे झालेल्या सत्कार-प्रसंगीं निरनिराळ्या अध्यापकांनीं उत्तरादाखल केलेलीं भाषणें:—

पं. डेग्वेकरशास्त्री, [जबलपूर]

"बंधुनो, आत्मस्तुतीचा दोष येऊ न देतां सत्य वस्तुस्थिति आपल्यापुढें मांडायची झाली, तर या परिषदेच्या कल्पनेचा मूळ प्रवर्तक मीच आहे. मनांत कल्पना आल्याबरोबर येथील कार्यकुशल संस्थेचे प्रमुख उत्साही कार्यकर्ते यांना मी ती पत्रानें कळविली व त्यांनींहि ती उचलून धरली व मूर्त स्वरूपांत आणली. असेच प्रयत्न यापुढें सतत होत रहावेत, अशी माझी सदिच्छा आहे. आपल्या प्रयत्नाकडे जनतेचें व इतर प्रांतांचें सर्वांचें लक्ष लागलेलें आहे, येवढ्या-साठीं आपण आपलें कर्तव्य उत्कृष्टपणें पार पाडलें पाहिजे.

उलटा प्रचार केला पाहिजे

आपल्या कार्याला असलेले विरोधहि आपण विसरतां कामा नयेत. आपल्याला फार मोठमोठ्या लोकांचा विरोध आहे. वास्तविकपणें शनाच्या क्षेत्रांत अशा अनिष्ट, आत्मघातकी वृत्ति असावयाचें कांहीं कारण नाहीं. कारण जगाच्या दृष्टीनें, लोकांच्या दृष्टीनें जो उत्तम कार्य करील तोच योग्य ठरेल. प्रत्येकानें आपआपला प्रयत्न करावा.

परन्तु ही गोष्ट विसरून जे विरोधक आमच्यात विरोधी प्रचार करतात, त्यांच्याविरुद्ध उलटा प्रचार-हि आपण चालू ठेवावयास पाहिजे. शुद्ध आयुर्वेदाची भूमिका मांडणाऱ्या 'आयुर्वेद पत्रिका' या वृत्तपत्रां-तून असा विरोधी प्रचार मला मुळींच दिसून येत नाहीं. येथें लोकमान्याच्या प्रतिसहकार तत्त्वाचा अवलंब केलाच पाहिजे. अर्थात् हें सांगतांना आमचें हें केवळ दिग्दर्शन आहे. प्रत्यक्ष कार्यकर्ते आपणच !

पण माझ्या प्रांतांत माझें वागण्याचें धोरण सतत असेंच राहिलेलें आहे. आणि म्हणूनच पर-प्रांतांत जाऊनहि तेथें मी टिकाव धरून आहे. आपण केलेल्या स्वागताबद्दल मी आपला ऋणी आहे. नासिक येथील वैद्यांची संघटना पाहून फार समाधान वाटतें. आपली संघटना कायम राहो, व अधिकाधिक प्रभावी होवो अशी माझी प्रार्थना आहे."

आचार्य दत्तात्रेयशास्त्री कुळकर्णीजी (लखनौ)

"प्रिय बंधूनो, अखिल भारतीय वैद्य समाज नासिककरांचाच अभिमानी आहे. आयुर्वेदाला शास्त्रीय पाया आहे, हें सांगण्यासाठीं हिंदुस्थानभर आपल्या जीवाचें रान करणारे कै. वै. दातारशास्त्री, व कै. वै. देवधरशास्त्री हे येथलेच. त्यांनींच श्रीकाशी-क्षेत्रांत प्रथम असा प्रयत्न केला. नासिककरांच्याच प्रयत्नांनीं, मुंबई प्रांत सरकारनें व इतर प्रांतीय सरकारनें आयुर्वेदाला पाठिंबा दिला आहे.

उत्तर प्रदेशांत पं. जगन्नाथजी शुक्ल म्हणून आयुर्वेदाचे एक वृद्ध कार्यकर्ते आहेत. ते नाशिक-च्या कै. पू. पदेशास्त्रींना तर प्रत्यक्ष 'भगवान्' समजतात. त्या शुक्लजींचे पहिले शिष्यहि (आचार्य शेण्डेशास्त्री) आज येथें आलेले आहेत. पू. पदे-शास्त्रींच्यामुळेंच आयुर्वेदाच्या जिवंत निर्झराचें महान् गंगेंत रूपान्तर झालें आहे. त्यांच्या सुरवातीमुळेंच आज वैद्यपरंपरा कायम राहिली. व वै. दातार-शास्त्री व वै. देवधरशास्त्री यांचेमुळें पुढील शास्त्र परिषदांना सुरवात झाली.

दर अंकांतून मला स्फूर्ति मिळते

"हल्लीं आयुर्वेद पत्रिकेमार्फत चाललेली आयुर्वेद सेवा आदरणीय आहे. पं. डेग्वेकरजींनीं सांगितलेल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मार्गानें जावें कीं नाहीं हें सांगण्यापेक्षा मी येवढेंच सांगू इच्छितो कीं, पत्रिकेचें सध्यांचें धोरण युक्त आहे. माझ्याकडे येणाऱ्या सगळ्या आयुर्वेदीय पत्रिकांपैकीं मजकडून संपूर्ण वाचली जाणारी हीच पत्रिका आहे, तिच्या दर अंकांतून मला स्फूर्ति मिळाली आहे. आणि तिच्यामुळेंच उत्तर प्रांतांतील आयुर्वेदाचा गाडा माझ्याकडून पुढें रेटला जात आहे.

आपलें स्वागत मला भूषणावह वाटतें. मी आपला आभारी आहे. विशेषतः, या वातकाळीं (संध्याकाळीं ६ वाजतां) मधुर व स्निग्ध असा शरद ऋतूला योग्य प्रसाद भूक लागली असतां, आपण दिला याबद्दल मी आपला आभारी आहे. आपण श्रेष्ठ गोमातेप्रमाणें आहांत. कारण जी माता योग्य वेळीं मुलाला पाजते तीच श्रेष्ठ होय ! असो, मी आपणासर्वांचे कल्याण चिंतितों. नासिकला चाललेल्या प्रयत्नांचे परिणाम दूरगामी होतील, व आयुर्वेदाला पूर्णत्व येईल. आयुर्वेदासाठीं योग्य ती मदत उत्तर प्रदेशातर्फे मी देत राहीन."

प्रांताध्यक्ष दत्तात्रेयशास्त्री जळूकर

" भावी इतिहासांत नासिक ही आयुर्वेदाची तपोभूमि गणली जाईल.श्रीप्रभू रामचन्द्रांची तपोभूमि पंचवटी जवळच आहे. सबंध नासिक ही आतां श्री रामाची भूमि झाली आहे. सत्कार्यासाठीं भगवंताचें अधिष्ठान पाहिजे तें आपणांस लाभलें आहे. आपल्या अंतःकरणांत आयुर्वेदनिष्ठा अधिक प्रज्वलितपणें तेवत राहून आपणांस 'याच देहीं याच डोळा' आयुर्वेदरूपी परमेश्वराचें दर्शन घडो.

महाराष्ट्र प्रां. वै. मंडळाचाच नव्हे तर अ. भा. वै. मं. चा सुद्धां प्रारंभ येथेंच झाला. ही भूमि अतिपवित्र अशी आहे. माझी अशी आशा व खात्री आहे कीं या भूमीतले आपण सर्व कार्यकर्ते पूर्वीप्रमाणेंच सर्व कार्ये चालू ठेवाल. "

कर्नाटकाध्यक्ष मल्लाराध्यशास्त्री

"विजापूरमें रहते हुअे मीं नासिकके बडेबडे वैद्योंका दर्शनाभिलाषी मैं हमेशा था। क्यों कि यहांकी गुरुपरंपरासेहि पू. भवानीजी, जिनके बहुतसे सच्छिष्य कर्नाटकमें फैले हुअे है, आये है। इसलिये कर्नाटकप्रांत महाराष्ट्रका विशेषतः नासिकका सदैव ऋणी है। प्रकृति अस्वस्थ होनेके कारण यहां आनेमें मेरे मनमें संदेह थ.। किन्तु वैद्यराज गोगटेजीने लगातार चार खत भेजे जिससे मुझे यहा आनाहि क्रमप्राप्त हुआ। और यह कहनेमें मुझे अत्यानंद होता है कि यहांके कार्यकर्ताओंकी सेवासे मेरा अस्वास्थ्य हल हो गया और नासिकमें आकर हम सब 'ना सिख' [बिना सीखके] नही जा रहे हैं। इस कार्यके लिये आपको धन्यवाद।

वैद्यराज शेंडेशास्त्री, दमोह [म. प्रां.]

"बंधुनों, मला बोलतां येत नाहीं तरी सुद्धां हें सांगितल्यावाचून मला रहावत नाहीं कीं, नासिकच्याच पू. कै. पदेशास्त्रीमुळेंच अ. भा. वै. संघटनेचा वृक्ष निर्माण झाला आहे. व नासिकच्याच आयुर्वेदीय संस्थेचे अध्यक्षामुळें आमच्या प्रांताच्या राजधानींत आज आयुर्वेदाचें संशोधनात्मक कार्य सुरू आहे. आपण श्रेष्ठ आहांत. आपलें पवित्र कार्य वर्धिष्णु होवो. "

वैद्य बिंदुमाधव पंडित

"मी देखील नासिक शहर वैद्य मंडळाचें अभिनंदन करावयास उभा राहिलो आहे हें पाहून आपणा सर्वांना आश्चर्य वाटेल. बाहेरच्या पाहुण्यासमक्ष नासिकच्या वैद्यांचे आभार मानण्याची सर्वोत्तम वेळ आजचीच आहे असें मला वाटतें.आयुर्वेद सेवा संघ आज जी कांहीं अल्पस्वल्प सेवा करीत आहे ती नासिककरांच्या प्रेमळ सहकार्यामुळेंच. अहमदनगर येथील आमची पुण्यतपोभूमि सोडून एकजुटीनें आम्ही बाहेर पडल्यावर नासिकच्या आकर्षणामुळेंच आम्ही येथें आलों. .तेंव्हापासून तो सर्व प्रकारचे अडथळे आम्हाला आले, पण येथील वैद्यमंडळींनीं प्रवृत्ति चांगली ठेवली व सर्वानुकूलता दर्शविली.पू. प्राणाचार्य देवधरशास्त्री यांनीं पत्रिकेच्या पहिल्या वर्षाच्या समारंभाचे अध्यक्ष होऊन साहाय्य केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद पत्रिकेचा पहिला अंक प्रसिद्ध होतांच पहिली वर्गणी नासिककर वैद्यांनींच रोख दिली. आतां नाशिककर व सेवासंघ या गंगायमुना अगदीं एकजीव झालेल्या आहेत.

पू. डेग्वेकरजींनीं सांगितलें त्यांत आत्मश्लाघा मुळींच नाहीं. गु. डेग्वेकरजींच्या भाषणानेंच पत्रिकेचा प्रारंभ झाला. परन्तु पत्रिकेतर्फे आपणा सर्वांना नम्र निवेदन कीं, सेवासंघास विधायक कार्य करावयाचें आहे. प्रतियोगी सहकार्याची कल्पना संपादकास शिवूं शकत नाहीं. आपले सर्वांचे विचार मांडवयास ती समर्थ राहिली पाहिजे. आपण आपले विचार लिहून द्यावेत, आम्हीं छापूं. वैद्यराज द. अ. कुलकर्णीजींनीं आपली लेखणी पत्रिकेकरतां उचलली नाहीं. त्यामुळें माझा त्यांच्यावर राग होता; परन्तु इतक्या लांबून परिषदेकरितां ते आले व ७ दिवस राहिले तेव्हां मी समजलों कीं त्यांचें आमच्यावर खरें प्रेम आहे. ते मानभावी नाहींत.

पत्रिका आदर्श व्हावी, ती पुरेपूर १०० पानी असावी, जबाबदार व शास्त्रीय लेख तिच्यांत असावेत, त्याचप्रमाणें सगळीकडचीं वृत्तें तिच्यांत यावीत अशी आमची इच्छा आहे. त्यासाठीं मी अनेक भाषा शिकत आहे. Modern Review प्रमाणें तिला स्थान प्राप्त व्हावें अशी आकांक्षा आहे. आपण दर पंधरा दिवसांनीं आपल्याकडील आयुर्वेदवृत्त, उपयुक्त कात्रणें, इ. नीं युक्त १ तरी पत्र पाठवीत जावें म्हणजे पत्रिका अधिक कार्यक्षम होईल अशी माझी सर्वांना नम्र विनंति आहे."

आयुर्वेद सेवा संघाच्या कार्यालयास भेट देऊन अध्यापक मंडळी प्रसन्न झाली.

———

आयुर्वेदीय पुष्प चिकित्सा—

एरंडीच्याफुलाचा क्षयरोगावर प्रयोग

" माझे मामा क्षयावर एक औषध देत असत. तें मला माहित आहे. परन्तु जबाबदारीनें त्याचा प्रयोग करून पाहाण्याची आवश्यकता आहे. ते औषध ...

एरंड ...चे ... दास एरंड्या... येण्यापूर्वी जीं फुलें येतात तीं १ औंस घेऊन त्यांचा रस काढावा. त्यांत पाणी अजिबात घालूं नये. तो रस रोग्यास सकाळीं द्यावा. रोग्यास तहानेचा शोष पडूं लागतो. परन्तु पाणी देऊं नये. त्याऐवजीं दूध पाजावें. कोणत्यांहि प्रकारें पोटांत पाणी जाऊं देऊं नये. असें ७ दिवस करावें. बराच गुण येतो. पुनः ७ दिवस करावें. बहुधा बरा होतोच. "

—व्ही. के. कुलकर्णी, इचलकरंजी

[बाळंतरोगावर देण्यांत येणाऱ्या नारळीच्या फुलाप्रमाणेंच (नारळीच्या पोईचें औषध) हा प्रयोग आहे. सबब नारळाच्या पोईचें औषध उपलब्ध नसेल त्या भागांत दोषभेदानुसार विचार करून या औषधाचा अवश्य प्रयोग करावा.

गोखरूचें फूल आलें आहे व फळ धरावयाचे आहे अशावेळीं गोखरू पंचांगाचा उपयोग हाहि एक पुष्प प्रयोगच आहे. वाग्भट रसायनचिकित्सा उ.स्थान.

१९४३-४४ सालीं नाशिकतुरुंगामध्यें असतांना निरनिराळ्या वैद्यक ग्रंथांतून मी वनस्पतीच्या पुष्पांचे औषधी उपयोग आयुर्वेदीय पुष्प चिकित्सा म्हणून अलग लिहून काढले होते. —संपादक)

———

तारेचा पत्ताः—Newbottle
के. के. शहा अँड कंपनी
बाटल्यांचे व्यापारी
(१२३ चकला स्ट्रीट, मुंबई ३)
रिकाम्या बाटल्या, बुचें, कॅपसुल्स्
[हेअर ऑईल, सरबतें, गुलाबपाणी इत्यादींच्या बाटल्यांवर लावावयाचीं सुंदर व आकर्षक] लेबलें इत्यादि मालाचे
ठोक व किरकोळ
विक्री करणारे व्यापारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

औषधी वनस्पती

आरोग्य दिन प्रसंगीं नासिक शहर वैद्य मंडळानें नासिक नगरपालिकेच्या आरोग्य समितीच्या अध्यक्षांना विनंति केली कीं नगरपालिकेच्या शिवाजी उद्यानांतील कांहीं भाग आरोग्योपयोगी वनस्पति लावण्यासाठीं मंडळाकडे सोपवावा.

या विनंतीचा सहानुभूतिपूर्वक विचार करून नगरपालिकेनें शिवाजी उद्यानाचा कांहीं भाग नासिक शहर वैद्य मंडळाकडे दिला आहे. या भागांत वनस्पति लावण्यांत येत असून या औषधी उद्यानाचा उपयोग नासिक येथील शुद्ध आयुर्वेद विद्यालयांतील विद्यार्थ्यांना वनस्पति प्रात्यक्षिकासाठीं होणार आहे. या सुयोग्य व्यवस्थेबद्दल नासिक शहर वैद्य मंडळ व नगरपालिका या उभयतांना धन्यवाद.

शुद्ध आयुर्वेदाचा प्रचार

नासिक शहर वैद्य मंडळाचे मंत्री वैद्य ग. म. लोखंडे यांनीं ता. ३०-१०-५४ ते ५-११-५४ या काळांत नासिक जिल्ह्यातील चांदवड, मालेगांव, सटाणा व कळवण या तालुक्याच्या गांवीं वैद्यमंडळींच्या भेटी घेऊन शुद्ध आयुर्वेदाचा प्रचार केला. त्यांची प्रांतीय वैद्य मंडळाचे सभासद म्हणून नोंदणी केली. नासिक येथें चालू असलेलें शुद्ध आयुर्वेद विद्यालयाचें व आयुर्वेद सेवा संघाचें कार्य यांची माहिती दिली.

कळवण या तालुक्याच्या गांवीं आयुर्वेदीय दवाखान्याची आवश्यकता आहे असें त्यांना दिसून आलें.

भारतांत व्यायामाची वेळ

" भारतामध्यें मुलासाठीं व्यायामाची वेळ सकाळचीच पाहिजे असा सल्ला अमेरिकेचे व्यायामतज्ञ श्री. नाश यांनीं भारत सरकारला दिला आहे.

हल्लीं शाळांतून संध्याकाळीं ४॥ वाजतां व्यायामाचा वर्ग (ड्रिल) भरतो, त्यावेळीं विद्यार्थ्यांची शारीरिक व मानसिक थकावट कळसाला पोहोचलेली असते. अशावेळीं व्यायाम केल्यानें मुलें अधिकच थकून जातात. हिंदुस्थान उष्ण देश असल्यामुळें मुलांच्या शरीराची योग्य वाढ होण्यासाठीं सकाळीं ६ ते ८ पर्यंतच मुलांना (सूर्यनमस्कारासारखे) व्यायाम देणें योग्य आहे. "

× × ×

" दोन वेळच्या [सकाळ संध्याकाळ] शाळा कराव्यात. सकाळीं, सूर्यनमस्कार, आसनें, प्राणायामाचा व्यायाम घ्यावा. दूध अगर भिजलेले चणे सकाळीं खाण्यास द्यावेत. सकाळीं ८ ते ११ शिक्षण घ्यावें. १२ च्या सुमारास जेवावें. सायंकाळीं ३ ते ५ शिक्षण घ्यावें. असें केल्यानें मुलाचें वजन वाढतें. शरीर घट्टपुष्ट होते. "

—आरोग्य मंदिर

पवित्र नेपाल कस्तुरी रु. ४४ तोला.
हिमालय कस्तुरी रु. ४२ तोला.
तिब्बत कस्तुरी रु. ३६ तोला.
लिहाः—नेपाळ हिमालय कस्तुरी भंडार
रजि. नं. ३।२०००।२००१ नेपाल

सांडू ब्रदर्सचीं
शास्त्रोक्त तयार औषधें, काढे, आसवें, अरिष्टें, भस्में, मात्रा, रसायनें इ. वैद्यवर्गास चिकित्सेंत फार उपयोगी पडतात.
वैद्यांना तीं घाऊक दरानें विशेष सवलतीनें दिलीं जातात.
पत्रव्यवहाराचा पत्ता:—
दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर लि.
फॅक्टरी व हेड ऑफिस—चेंबूर (मुंबई)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अग्निकुमार रसाबद्दलचे स्वानुभव

[ले.:— वै. ग. भा. करंबेळकर डी. ए. एस्. एफ्.]

अग्निकुमाररसाचीं घटक द्रव्यें—पारा, गंधक, टंकण, बचनाग, शंख, कपर्दिक व मिरीं यापैकीं पारा, गंधक, टंकण, बचनाग हीं द्रव्यें १।१ भाग शंख व कपर्दिक २।२ भाग व मिरीं ८ भाग या सर्वांना लिंबाचे रसाच्या सात भावना देणें. शिवाय विशेष कार्यकारी होण्याकरितां चित्रक, शेवगा व महाळुंग यांचे रसाच्या भावना देणें. असा सर्व-साधारण पाठ आहे. यांत ज्याच्या त्याच्या परंपरे-नुसार कमीजास्त प्रमाणांत फरक होण्याचा संभव आहे.

कफदोषजन्य विकारांत वापरावा

अग्निकुमार रसाचीं घटक द्रव्यें पाहातां त्याचा उपयोग प्रामुख्यानें कफदोषजन्य विकारामध्यें करा-वयाचा आहे. लहान मुलांची प्रकृति कफप्रधान असल्यामुळें त्यांचे विकारहि कफदोषजन्य असतात; त्यामुळें अग्निकुमाररसाचा उपयोग लहान मुलांचे विकारामध्यें चांगला होणार हें सत्य असलें तरी पुष्कळ वेळेला अशा बहुगुणी औषधाकडे दुर्लक्ष केलें जातें. करितां अग्निकुमाररस स्वतंत्र वापरला असतां कसा फायदा होतो हें येथें थोडक्यांत सांगणार आहे.

लहान मुलांचें अजीर्ण—अपचन व त्यामुळें वांति, अतिसार हीं लक्षणें असतां अग्निकुमार २ गुंजा घेऊन त्याच्या ३ पुड्या करून मधांतून चाटविणें. २।३ दिवसांत गुण येतो.

कृमिविकारावर उपयुक्त

कृमींमुळें (राउंड वर्म) उलटी, जुलाब, पोटांत फारच दुखणें हीं लक्षणें असतां पोटांत कोणतेंहि औषध ठरत नाहीं. अशावेळीं तांदळाचें धुवण काढून त्यांत कुड्याचें पाळ उगाळून त्यांतून अग्निकुमाररस देणें. उत्तम उपयोग होतो. किंवा मोरआवळ्यांत चंदन उगाळून त्यांतून अग्निकुमाररस देणें. यांतील बचनाग हें शूलघ्न द्रव्य आहे. व शंख, कपर्दिक व मिरीं हीं उत्तम दीपन पाचन द्रव्यें आहेत.

लहान मुलांचा कास-श्वास, हांसडा

लहान मुलांचा कास-विशेषतः ज्याला 'हासडा' संबोधितात, यामध्यें ताप व श्वास हीं लक्षणें असतां विड्याचे पानाचा रस + मध यांतून अग्निकुमार रस देणें. म्हणजे लहान मुलांचें अजीर्ण, अतिसार, वांति पोटशूल, पोट फुगणें, ज्वर, कास व दमा अशा वारंवार उद्भवणाऱ्या विकारांमध्यें अग्निकुमाररस निरनिराळ्या अनुपानांतून वापरला असतां उत्तम उपयोग होतो असा स्वतःचा अनुभव आहे.

गर्भिणीची वांति

गर्भिणीची वांति हें लक्षण पुष्कळ औषधांनीं कमी होत नाहीं. अशा वेळीं अग्निकुमाररस वापरला असतां फायदा होतो. विशेषतः दोष आमाशयामध्यें असतांना उपयोग चांगला होतो. हा कफविकार आहे, हेंच पुष्कळांच्या लक्षांत येत नाहीं.

अपचनामुळें किंवा अन्य कारणामुळें अकस्मात् वांति व पोटांत दुखणें (तीव्र वेदना) हीं लक्षणें असतां अग्निकुमाररस २ गुंजा प्रमाणें दिवसांतून २।३ वेळ आले व लिंबू रसांतून देणें किंवा ताकामध्यें कुड्याचे पाळ उगाळून त्यांतून देणें.

विषूचिका (कॉलरा) यामध्येंहि वापरावा. उपयोग होतो.

लघवींतून खर जाते त्यावर

लघवींतून खर (Phosphates) जात अस-ल्यास (अपचनामुळें) अग्निकमार रस वापरावा.

अग्निमांद्य असतां रसायनकाळीं अग्निकुमाररस दिला असतां क्षुधा वाढते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एरंडेलानंतर अग्निकुमार

ॲन्टोनिन दिल्यानंतर एरंडेल दिलें जातें. अशा वेळीं औषध चांगलें लागू पडल्यानंतर आपण रोग्याला तूपभात खावयाला सांगतो. अशा वेळीं आतड्यांचा क्षोभ होऊन वेदना हें लक्षण असतां अग्निकुमार रस देणें.

लहान मुलांची चिकित्सा

चिकित्सकांनीं वरीलप्रमाणें गुण अनुभविले असतील. परंतु गेल्या ८।९ वर्षांतील माझ्या व्यवसायांत विशेषतः लहान मुलांचे विकारामध्यें या औषधानें माझी चिकित्सेची बाजू उत्तम सांभाळली असल्यामुळें या अल्पमोली बहुगुणी औषधाबद्दलचे स्वतःचे अनुभव पत्रिकेद्वारा प्रगट करण्याचा मोह आवरतां आला नाहीं म्हणून लिहिण्याचें धाडस केलें आहे.

श्री धन्वन्तरी उत्सव, विजापूर

निखिल कर्नाटक आयुर्वेद मंडळ व नूतन आयुर्वेद कार्यालय लि. विजापूर या संस्थातर्फे धनत्रयोदशी दिवशीं सकाळीं ९ वाजतां विजापूर येथें धन्वन्तरी उत्सव थाटानें साजरा झाला. या प्रसंगीं उत्तर प्रदेश (लखनौ)चे डेप्युटी डायरेक्टर आयुर्वेदाचार्य बापूराव कुलकर्णी हे आमंत्रणावरून उपस्थित होते

सार्वजनिक व्याख्यान

सायंकाळीं ५ वाजतां विजापूर येथील युनियन क्लबमध्यें डॉ. मंगळवेढेकर यांच्या अध्यक्षतेखालीं सार्वजनिक व्याख्यान झालें. त्यावेळीं भाषण करतांना आयुर्वेदाचार्य कुलकर्णी यांनीं हिंदुस्थानांत निरनिराळया ठिकाणीं होत असलेले आयुर्वेदशास्त्राचे पुनरुत्थान, वाढता उपयोग व विशेषतः आयुर्वेदाच्या उन्नतीकरितां उत्तर प्रदेशानें चालविलेल्या खटपटींचें रसभरीत वर्णन केलें.

तीन मुख्य अडथळे

अध्यक्ष डॉ. मंगळवेढेकर म्हणाले:- 'आयुर्वेदाच्या प्रगतीच्या आड येणारीं ३ मुख्य कारणें आहेत.

१) राज्यधाऱ्यांची अनास्था- सरकारचें धोरण मुळींच आस्थापूर्वक नाहीं.

२) सामान्य जनतेस परदेशी औषधाचें वेड आहे. व आयुर्वेदीय औषधाविषयीं लोकांच्या मनांत एक प्रकारचा दुराग्रह आहे. तो दूर करण्यासाठीं सरकार व डॉक्टर मंडळी यांच्या सहकार्याची जरूरी आहे.

३) डॉक्टरांचा असहकार- सध्यां डॉक्टरलोक आयुर्वेदशास्त्राचा अभ्यास नीट न करतां त्यास हट्टवादीपणानें विरोध करीत आहेत. आयुर्वेदाचा चांगला अभ्यास केल्यास त्याचें शास्त्रीयत्व सहज पटण्यासारखें आहे.

हीं तीन प्रतिबंधक कारणें दूर झालीं तर आयुर्वेदाचा प्रसार झपाट्यानें होईल.

रात्रीं ९ वाजतां आयुर्वेदाचार्य कुलकर्णी यांच्या सत्कार बरोबर वैद्यांची शास्त्रीय विषयावर चर्चा झाली व शंकांचें निरसन करण्यांत आलें.

ता. २५ रोजीं सकाळीं नि. कर्नाटक प्रांतीय आयुर्वेद मंडळातर्फे आयुर्वेदाचार्य कुलकर्णी यांचा सत्कार करण्यांत आला त्यावेळीं त्यांनीं पंचमहाभूतें त्रिदोष व रसवीर्य विपाक हे आयुर्वेदीय पदार्थ आधुनिक विज्ञानाशीं सुसंगत आहेत हें सोदाहरण सिद्ध करून दाखविलें. शेवटीं प्रांताध्यक्ष मल्लाराध्यशास्त्री यांनीं त्यांचे आभार मानले.

'आयुर्वेदाच्या सेवेसाठीं तयार'

शास्त्रोक्त पद्धतीनें तयार झालेलीं सर्वप्रकारचीं सिद्धौषधें [गुटिका, मात्रा, रसायनें, आसवें वगैरे] व हिंवतापांवर अत्युत्तम ठरलेलें हिंवतापांतक, मिळण्याचें एकच ठिकाण.

सविस्तर माहितीकरितां लिहाः—

आयुर्वेदीय औषधी भांडार

२८ शुक्रवार, तुळशीबागेची पिछाडी, पुणें २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद, नासिक

(आयुर्वेद पत्रिका पान २२९ वरून पुढें चालू)

अपूर्व वैद्य म्हणजे ईश्वर

प्रथम पं. वेणीमाधवशास्त्री म्हणाले:- " अपूर्व वैद्य - अपूर्व वैद्य म्हणजे अभूतपूर्व वैद्य, कधींहि न झालेला वैद्य, केवळ कल्पनामूर्ति वैद्य. वैद्यकाच्या सर्व शास्त्रांचें ज्ञान एका व्यक्तीस उत्कृष्टपणें असणें केवळ कल्पना होय. पण ध्येयभूत अशी कल्पनामूर्ति असलेली व्यक्ती अपूर्व होय. अपूर्व म्हणजे श्रेष्ठ, मानवापेक्षाहि श्रेष्ठ. मानव अपूर्ण आहे, देव श्रेष्ठ आहे. अपूर्व वैद्य म्हणजे वैद्यश्रेष्ठ ईश्वर.

चुकीच्या कल्पना काढून टाकाव्यात

इंद्रियें —आयुष्याची कल्पना विद्यार्थ्यांना देत असतांना, त्यांच्या मनांत पूर्वी असलेल्या कल्पना अगोदर काढून टाकावयास पाहिजेत. लहानपणापासून इंद्रियें म्हणजे यकृतादि अवयव असेंच त्यांना शिकविलें गेलेलें असतें. म्हणून आयुर्वेदीय इंद्रिय शब्दाचा अर्थ शिकवितांना, इंद्रियें = पंचज्ञानेंद्रियें किंवा एकादश इंद्रियें असाच अर्थ घ्यावा. यकृतादि अवयव आहेत, इंद्रियें नाहींत, असें स्पष्ट सांगावें.

वायु शीत का ?

वायूचा शीत गुण—वायु उष्णोपशयी आहे म्हणून शीत असें टीकाकार सांगतात. पण तेवढेंच सांगून भागणार नाहीं. शीत आहे म्हणून उष्णोपशयी आहे. व तसा तो शीत कां ? हें सांगावयास पाहिजे. चिकित्सेचें अधिष्ठान मानवी शरीर हें आहे. समप्रकृति शरीर आहे. त्याच्या दृष्टीनें मानवेतर कसे आहेत हें सांगितलें आहे. अनुष्णाशीत वायु वैशेषिकांनीं मानला त्यावेळीं त्यांनीं ' अग्नि ' व ' आप् ' या महाभूतांशीं तुलना केली. मानवी शरीराच्या दृष्टीनें हा अनुष्णाशीत वायु शरीरांत शीतता निर्माण करणारा आहे, म्हणून तो शीत आहे. आयुर्वेदाची सर्व भाषा समप्रकृति मानवाला धरून केलेली आहे. परिषदेनें विचार करावा. मी एक दिशा दाखविली आहे. वायु शीत आहे म्हणून उष्णोपशयी आहे. शीतस्पर्शवत्य:आप:, उष्णस्पर्शवानग्नि:, असें न्यायशास्त्रांत आहे. त्यांच्या तुलनेनें वायु अनुष्णाशीत आहे. पण मानवी शरीर मूलबिन्दु धरून जर विवेचन केलें तर शरीर उष्ण नाहीं. अनुष्णाशीत आहे. त्यांचे दृष्टीनें वायु शीत-तोत्पादक आहे. वायूच्या इतर गुणांचेंहि विवेचन असेंच आहे. (CO_2) कार्बन–डाय-ऑक्साइड नर्व्ह-ज्ना उत्तेजित करतो, असें पं. डेग्वेकरजींनीं सांगितलें. त्याला पोषक एक विचार आहे. व तो म्हणजे कार्बन-डाय-ऑक्साइड श्वसनकेंद्रासहि उत्तेजित करतो. (Stimulator of the Respiratory Centre)

भस्त्रिका केल्यानें अम्लपित्त कमी होते

याचवेळीं डॉ. चिं. न. खाडीलकर एम्. बी. बी. एस्. यांनींहि एक पोषक प्रयोग सांगितला. ज्या लोकांत ॲसिडिटी (अम्लपित्त) असतें, अशा लोकांनीं भस्त्रिका केल्यास ती कमी होते. हाहि परिणाम कार्बन-डाय-ऑक्सॉइडचाच असावा काय ?

' समासतः ' शब्दाचें महत्व

वैद्य वेणीमाधवशास्त्री पुढें म्हणाले—

" वायुः पित्तं कफश्चेति त्रयो दोषाः समासतः । " या वचनाच्या विवेचनांत " समासतः " याला फार महत्व आहे. टीकाकार समासतः सांगण्याचें कारण ' रक्तदोषाची निवृत्ति व्हावी, ' असें सांगतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

... अंगावयाचे तर ३ आहेत. व्यासतः २० गुणांचे वीस दोष. व समासतः तीन दोष. या ... गुणी द्रव्य हा स्वतंत्र दोष आहे. गुरुगुणीद्रव्य शरीरांत अधिक वाढलें तर गुरुदोष निर्माण करील. लोळावेंसें वाटेल. कमी झालें तर लघुता निर्माण होईल. उत्साह वाढेल. लघुदोष वाढेल. शीतगुणी द्रव्य अधिक झालें तर शीत दोष वाढेल. उष्णगुणी दोष शरीरांत असेल तर वारा घ्यावासा वाटेल. गुरुमन्दादि १० गुणांचा-१० दोषांचा-एक गट म्हणजे कफ दोष. व दुसऱ्या विपरीत १० दोषांचे २ गट. उष्णादि सहा गुणाचा १ गट पित्ताचा. व रूक्षादि ६ गुणांचा गट म्हणजे वातदोष. अशा प्रकारचें विवेचन विद्यार्थ्यांना अधिक लवकर समजतें. ते लवकर ग्रहण करतात. ही कल्पना पसंत असेल तर उपयोग करावा. या विवेचनांत मुख्य सूत्र हेंच कीं, जगांतील सगळीं गुणवान् द्रव्यें शरीराच्या तुलनेनें वर्णिलीं आहेत. शरीराची परिभाषा दोषांची ! ती परिभाषा शरीरावर त्यांचा होणारा परिणाम पाहूनच ठरविली.

दोषांचा कोष्ठभागावर परिणाम

कोष्ठः उदरः इ.-चें विवेचन करतांना आणखी स्पष्टता पुढीलप्रमाणें आणतां येते. अग्नि सांगितल्यावर लगेच कोष्ठ आहे. पहिला परिणाम दोषांचा अग्निद्रव्यांवर आहे. व दुसरा परिणाम अग्न्याधार कोष्ठ-भागावरचा आहे. आधेय आधार या दोघांवरचे परिणाम निरनिराळे सांगितले आहेत.

" अंत्राणि " असा बहुवचनी प्रयोग आहे. तो लघ्वंत्र, क्षुद्रांत्र व बृहदंत्र या सर्वांकरितां असावा. क्षुद्रांत्र म्हणजे काय ? लघु=क्षुद्र= अपेंडिक्स् !

पं. गोपाळशास्त्री गोडबोले झांशी म्हणाले: —

अंत्राणि हा शब्द आंत्रव्यूहदर्शक आहे. (व्यूह = संघात) तो अंगबोधक शब्द आहे. क्षुद्रान्त्र, स्थूलान्त्र हे शब्द प्रत्यंगबोधक आहेत. लघ्वन्त्र व बृहदंत्र असे शब्दप्रयोग अलिकडे आयुर्वेदीय वाङ्मयांत (!) केले जातात. परन्तु बृहत्त्रयींत ते नाहींत. क्षुद्रान्त्र व स्थूलान्त्र हे दोनच शब्द आहेत ! म्हणून अंत्राणि असें बहुवचन कां ? ही शंका येणें युक्त आहे. तिचें एक उत्तर वर दिलें. दुसरें उत्तर असें कीं, मुख्यान्त्र, क्षुद्रान्त्र, व स्थूलांत्र अशीं तीन प्रत्यंग अंत्र या अंग आहेत. अंत्र या अंगास अंत्राणि असा शब्दप्रयोग वापरला आहे. ' मुख्यान्त्र ' हा शब्द सायनाचार्यांच्या वेदभाष्यांत आहे. म्हणून ' सार्धत्रीव्याममंत्राणि ' या वचनानें दर्शविलेल्या लांबलचक अंत्रास ' क्षुद्रांत्र ' नांव देणें क्षुद्रपणाचें वाटेल. परन्तु क्षुद्र शब्द अवयव बोधक-एकदेशबोधक-असतो. जसे रोग, क्षुद्ररोग, आंतड्याच्या एकाभागास क्षुद्रान्त्र म्हणावें किंवा मुख्यांत्र = लघ्वंत्र, क्षुद्रांत्र = Apendix, व स्थूलान्त्र = बृहदंत्र, व या "सगळ्यांना मिळून अंत्राणि असा शब्दप्रयोग असावा."

वैद्यराज विनायकरावजी एकतारे म्हणाले:-

वायूचा प्रकोप वा प्रशम कसा होतो हें, चरकसंहितेंत वातकलाकलीय अध्यायांत बडिशधामार्गव मुनींनीं स्पष्टपणें सांगितलें आहे. त्यांच्या वचनावरून वातप्रकोप वा वातशामक द्रव्यें शरीरांत जी परिस्थिति निर्माण करतात, शरीरावर, स्रोतसावर, जो परिणाम घडवितात, त्यामुळें वायूचा प्रकोप वा प्रशम होतो. वायूचे जे रूक्षशीतादि गुण आहेत ते अनुमानानें कळतात. असंघातवान् वायूवर प्रकोपक द्रव्यांचा परिणाम कसा होईल, मूर्तामूर्तांचा (वातप्रकोपी द्रव्य व शरीरवायु) संबन्ध कसा राहील अशी शंका येते. कारण वृद्धिशमनादि परिणाम घडावयास दोन द्रव्यांचा संयोग युक्त आहे. प्रथम शरीरावर परिणाम व मग वायूवर परिणाम असा क्रम पाहिला म्हणजे वरील शंकेचें समाधान होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तत्र वातप्रकोपकाणि खलु रूक्षलघुशीत...... राणां

तथाविधेषु शरीरेषु वायुराश्रयं गत्वा आप्यायमानः प्रकोपमापद्यते।

तत्र प्रशमनानि स्निग्धगुरूष्ण......कराणि शरीराणां।

तथाविधेषु शरीरेषु वायुरसज्यमानश्चरन् प्रशान्तिमाप्नोति।

यावरून वायुशीत कां? तर शरीरावर तो शीत परिणाम करतो म्हणून हें होय! वायुचे इतरहि गुण याचप्रमाणें समजावेत"

वैद्य वि. श्री. पाठक यांचा प्रश्नः- आयुष्याची व्याख्या सांगतांना इंद्रियें व सत्त्व या अलग दोघांचा उल्लेख केला. इंद्रियांत 'सत्त्व' अंतर्भूत नाहीं काय?

उत्तरः- 'सत्त्व' हें पांचभौतिक नाहीं. इंद्रियें पांचभौतिक आहेत. म्हणून दोघांचा उल्लेख करावा लागतो.

प्रश्नः- 'मन' हें पांचभौतिक नाहीं तर मग एकादश इंद्रियांत मनाचा अन्तर्भाव आहे तो कां? शिवाय मन हें 'उभयात्मक' इंद्रिय आहे ह्याचा अर्थ काय? मन हें भौतिक व अभौतिक असे दोहीं असा अर्थ होतो किंवा नाहीं? आहार व औषधें यांचा मनावर परिणाम कसा घडतो?

उत्तरः- अणुत्वमथ चैकत्वं द्वौ गुणौ मनसः स्मृतौ। मनाचें ठिकाणीं शब्दस्पर्शरूपरसगंध हे दाखवितां आले तर तें भौतिक. नाहीं तर नाहीं. तसें दाखवितां येत नाहीं म्हणून मन पांचभौतिक नाहीं. मनाचें पोषण वा क्षय प्रतिबिंबरूपानें होतो, पोषणानें भौतिकत्व वा अभौतिकत्व ठरत नाहीं.

उत्तर—मन उभयात्मक इंद्रियें आहे. याचा अर्थ तें ज्ञानेंद्रियहि आहे व कर्मेंद्रियहि आहे.

सांख्यानीं इंद्रियें अभौतिक मानलीं. त्यांच्याप्रमाणें मन, बुद्धि अहंकार व दश इंद्रियें हीं अभौतिक आहेत. आयुर्वेदानें इंद्रियें भौतिक मानलीं मन हेंसुद्धां आयुर्वेदाप्रमाणें भौतिकच. 'उभयात्मक मन' याचा अर्थ ज्ञानेंद्रिय व कर्मेन्द्रिय दोन्ही असा आहे.

वायूचा 'सूक्ष्म' गुण म्हणजे काय?

उत्तरः- सूक्ष्म म्हणजे सूक्ष्मस्रोतोनुगामी! असंघातवान् वायु कोठल्याहि अतिसूक्ष्म स्रोतसांत जाऊं शकणारा, जाणारा आहे.

वै. वि. म. गोगटे यांचे प्रश्न १) व्यापिनः = 'सर्वशरीरचराः' असा अर्थ कसा होतो?

२) जेवढीं पंचमहाभूतें तेवढे दोष न सांगतां 'समासतः' तीन सांगितले! याचें कारण काय?

३) उत्पत्तिक्रमाच्या दृष्टीनें कफ पित्त व वायु असें असतां, वायुःपित्तं कफः असा क्रम वर्णनांत कां?

४) सर्व दोष इंद्रियप्रत्यक्ष आहेत काय? बाहेरच्या वायूचा अनुभव अनुष्णाशीत आहे. मग शरीरगत वायु शीत कां?

वै. वि. मो. दाते यांचा प्रश्नः- वाग्भटाचार्यांनीं सूत्रस्थानाच्या १२ व्या अध्यायांत दोषांचीं इतर स्थानें असतां, दोष फक्त अन्तःस्रोतसांत असतात, असें कसें?

उत्तरः— (१) टीकाकारांनीं व्यापिनः=सर्वशरीरचराः असा अर्थ केला आहे. टीकाकार हे प्रमाण आहेत. (२) विसर्गादानविक्षेपादि सूत्रांत दोष तीनच कां याचें विवरण सुश्रुतानें केलें आहे. (३) उत्पत्तिक्रमांत कफ प्रथम असला तरी वायु अधिक परिणामकारक! सर्व क्रिया त्याच्या आधीन. (४) सर्व दोषांचें ज्ञान 'प्रत्यक्षानें' होऊं शकतें! ज्यांचीं गुणकर्मे सांगितलीं त्यांचें ज्ञान होतेंच. दोष प्रत्यक्ष आहेत हीच 'कल्पना' वि यांच्या मनावर बिंबवावी. (५) इतर स्थानें वायूचीं १२ व्या अध्यायांत सांगितलीं असलीं व वायूला अनेक नांवें असलीं तरी तीं एकाच वायूचीं आहेत. सुश्रुतांनीं स्पष्ट सांगितलें आहे कीं—'एको

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

... गंजे पंच- ... गुं... प्रविभक्तः किंवा एकच देवदत्ताला अनेक ठिकाणीं काम करतांना निरनिराळ्या संज्ञा दिल्या जातात. तद्वत् एकाच वायूला भिन्न भिन्न संज्ञा आहेत. (६) टीकाकारांच्या अर्थाला प्रमाण मानावयाचें तर दोष अंतःकोष्ठांतच असतात.

वै. वेणीमाधवशास्त्री:—

१) " निर्दिष्ट स्थानांत दोष नित्य असतात. केवळ कार्यापुरतें तेथें जातात असें नाहीं " हीच समजूत सर्व वैद्यांची आहे. एकाच बापाचीं जशीं २ मुलें त्याप्रमाणें एका वायूचे ते प्रकार आहेत. पाचकाचें स्वरूप निराळें, साधकाचें स्वरूप निराळें ! इतकेंच नव्हे तर साधकाचेंहि बुद्धिवैशेषिक पित्त, मेधावैशेषिक पित्त इ. असे प्रकार भेदसंहितेंत सांगितले आहेत.

२) दोष वाढतात, वृद्ध होतात तेव्हां त्याचे सर्वच गुण वाढले पाहिजेत असें कसें ! अंशांशानेंहि दोषांची वृद्धि अभिप्रेत आहे.

३) ' नाभिस्थः प्राणपवनः ' इ. सूत्रानें सांगितलेला प्राणवायु हा भौतिक आहे. पांचभौतिक आहे. परन्तु वायु जर बाहेरचाच आंत आहे तर त्यास उरः स्रोतस् पुरेसें आहे. पक्वाशयाची गरज काय ! 'परिपिंडितपक्वस्य वायुः स्यात् ' याचा अर्थ काय लावावयाचा !

दीर्घकालीन ज्वरानन्तर उत्पन्न होणारा, शीतस्निग्ध गुणांनीं शमन पावणारा (रूक्षं हि तेजो ज्वर, कृत्तेजसा रूक्षितस्य च यः स्यादतिबलो धातुः सहचारी सदागतिः, तस्य संशमनं सर्पिः) असा वायु कोणता व चलगुणानें वाढणारा आणि उष्ण वीर्यानें शमणारा वायु कोणता ? रक्तस्थ वृद्धीनें कार्श्य निर्माण करणारा वायु नाहींसा करण्यास वातस्वभावाला विरुद्ध अशी रक्तस्रुती कां उपयोगी पडते. इ. शंका, बाहेरचाच वायु शारीरवायु आहे असें मानलें तर निर्माण होतात. प्रकृतिस्थ दोष अन्तःकोष्ठांतच नसतो. वातप्रकृतीचा वायु हा त्याच्या मांसांत, रक्तांत असतो, म्हणून कार्श्य व कार्ष्ण्य असतें. म्हणून दोषस्वरूपी वायु, धातुस्वरूपी वायु, इतकेंच नव्हे तर मलस्वरूपीहि वायु असे त्याचे प्रकार आहेत.— विचाराला चालना देण्याकरितां फक्त या शंका मी मांडल्या आहेत.

वैद्य वि.म. गोगटे यांचा प्रश्नः-दोष सतत जर रोग निर्माण करीत नाहींत तर त्यांचे गौण कार्यावरून 'दोष' हें नांव देण्याची गरज काय ! तें नांव मनाला खटकतें. त्यांना धातु कां म्हणूं नये !

पं. डेग्वेकरजी— वातादिकांना 'दोष' हीच संज्ञा सतत द्यावी. धातुमल, इ. म्हणूं नये ! वृद्धदोष, समदोष, अशी पाहिजे तीं विशेषणें लावावीं. पण संज्ञा 'दोष' हीच कायम ठेवावी.

स्यात् – उत्पन्न होतो हाच अर्थ तेथें आहे.

प्रश्नः— तेऽन्तमध्यादिगाः क्रमात् यांतील 'गाः' चा अर्थ काय ! —

उत्तरः— गाः- तत्तत्काले तेषां गमनं कोपकालः ।

प्रश्नः-'व्यापिनः' महत्वाचा शब्द कीं 'संश्रयाः' महत्वाचा !

उत्तरः— दोन्ही महत्त्वाचे !

वै. गोपाळशास्त्री गोडबोले म्हणालेः - ग्रंथांतरीं वायुंचे प्रकार पुढीलप्रमाणें आहेत.

१) प्रेरक वायु, २) पोषक वायु, ३) शोषक वायु, ४) घटक वायु, ५) उत्सर्जक वायु, ६) विसर्जक वायु, ७) शरीरस्थ, वायु ८) शरीरान्तरस्थ वायु. वरील प्रकारांचें विवेचन लेखकांनीं केलेलें नाहीं.

वै. वि. श्री. पाठक यांचा प्रश्न :-शुक्रार्तवस्थैर्जन्मादौ...... चा अर्थ लावतांना शुक्रार्तवस्थ दोष म्हणजे काय? त्यांतील ' स्थ ' चा अर्थ काय ! त्यांच्यांत दोष नित्य असणारे जर असतील तर मग अन्तःकोष्ठांतच दोष असतात, असें म्हणणें संयुक्तिक कसें !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उत्तर- ' स्थाः-तत्र तिष्ठन्ति ' असें टीकाकार ... [illegible] ... हातात असा अर्थ. शुक्र व आर्तव संयोग नित्य नसतो. तो घडवून आणावा लागतो. ती एक विक्रिया आहे. या विशिष्ट कराव्या लागणाऱ्या क्रियेच्या वेळीं दोषांचें उदीरण होऊन अन्तःकोष्ठांतून दोष तेथें जातात.

प्रश्न–असें जर असेल तर कोणतीहि वायूची क्रिया, वायूच्या उदीरणाशिवाय नाहीं. मग उत्साहादि क्रिया कशा होतात ? उत्तर–उत्साहादि वायूचें कर्म वायूच्या उदीरण होऊनच होतें.

वै. वि. मो. दाते यांचा प्रश्नः-पण ग्रंथांत तर हें अविकृत वायूचें कर्म असें स्पष्ट सांगितलें आहे. उत्साहोच्छ्वास.........अनुगृण्हात्यविकृतः । हा विरोध नाहीं काय ?

उत्तर-अविकृत वायूचें योग्य प्रमाणामुळेंच अविकृत धमनीचक्र कार्यान्वित होतें. वृद्ध वा क्षीण अवस्थेंत धमनींचें कार्य होऊं शकत नाहीं.

वै. वि. म. गोगटे यांचा प्रश्नः– दोषांच्या वृद्धिक्षयाचा विचार करतांना अंशांश कल्पना करावयास सांगितली आहे; यावरून वृद्धि वा क्षय सर्वांशानें किंवा अल्पांशानेंहि होऊं शकते. अम्ल, कटु इ. विविध रसांचें पित्त सर्व गुणांनीं वृद्ध झालें तर भिन्न भिन्न गुणांचे आविष्कार कसे करील ? तसें असतें तर कोणत्याहि वात विकारावर बस्ति दिला म्हणजे झाली वातचिकित्सा, व तो देतांनाहि बस्तींचे असंख्य प्रकार करण्याचे किंवा चिकित्सेंत एकाच दोषावर कार्य करणाऱ्या विविध द्रव्यांची निवड करण्याचें कांहींच कारण नाहीं. उपचारांची निर्माण झालेली एवढी संकीर्णता नाहींशी होईल. दोषांची वृद्धि वा क्षय एका अंशानें न होतां सर्वांशानेंच होतो याला आपल्याजवळील प्रमाण काय ? प्रकृतींत असल्याशिवाय अंशांशकल्पना विकृतींत येतात कां ? सत्कार्यवाद मानला तर अंशांशकल्पना पाहिजे. विकल्पोंऽशांशकल्पना' यावर टीकाकार म्हणता अंश अंशश्च ताभ्यां कल्पना कदाचित् लघुना रूक्षेण इ. एकेन गुणेन द्वाभ्यां त्रयाभ्यां इ...... । यावरून अंशांशानेंहि दोषवृद्धि होऊं शकते ! एकाच गुणामुळेंहि जर वात सर्वांशानें वृध्द होईल तर वात वाढला म्हटलें कीं झालें. पण नुसता वात वाढला हें निदान करणें यांत वैद्यकत्व काय ? कोणता वात वाढला हें कळणें चिकित्सोपयोगी आहे.

उत्तरः– " वात हें पांचभौतिक द्रव्य आहे. Matter आहे. केवळ एकागुणानें Matter वाढत नाहीं. सायन्स तसें मानीत नाहीं. द्रव्य व गुण हे आश्रयाश्रयी आहेत. आश्रय वाढला तर आश्रयीहि वाढेल. आश्रयी वाढविणारें द्रव्य आश्रयासहि वाढवेल. रूक्ष गुणांस वाढविणारें, वात द्रव्यासहि वाढवेल. वात द्रव्य वाढणें म्हणजे सर्व गुणांनीं वाढणें. (Matter is increased by all means.) वृद्धिः स्वप्रमाणाधिक्यम् असेंच टीकाकार सांगतात.

एकाच दोषाच्या निराळ्या स्थानांतील तो दोष म्हणजे त्या दोषाचीं तीं भिन्न स्वरूपें होत. त्या स्थानांत तो दोष गेला म्हणून त्याला तें नांव मिळतें. म्हणून तें स्थान अप्रधान होय. दोषांचीं प्रमुख स्थानें अतः कोष्ठांतीलच ! इतर स्थानांतील दोष व अन्तःकोष्ठांतील दोष द्रव्यें एकच आहेत. " येथें पहिल्या दिवशींची चर्चा संपली.

दिवस दुसरा, मंगळवार ता. १२–१०–५४, सकाळीं ६ ते ९

अध्यक्ष वेणीमाधवशास्त्रीः– काल परिषदेचा पहिला दिवस पार पडला. परिषद कशा प्रकारें चालावी याविषयीं आपण आतां योजना करावयास हवी. तत्पूर्वी परिषदेला काल डॉ. चिं. ब. खाडिलकर यांनीं जी माहिती सांगितली तिचा थोडासा विचार आपण करूं. ते पाश्चात्य वैद्यकाचे पदवीधर असूनहि आयुर्वेदाचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पद्धतशीरपणें [illegible] याखेरीज पंच [illegible] गुि [illegible] सुचविल्याप्रमाणें भस्त्रिकेनंतर अम्लपित्त कमी होतें त्याचें कारण असें असावें. भस्त्रिकेनंतर प्राणवायू राखण्यामुळें उच्छ्वास (CO_2) वायूचें प्रमाण रक्तांत वाढतें. सोडियम बायकार्बोनेट (सोडा) ज्यावेळीं आपण घेतो त्यावेळीं 'क्षारो हि याति माधुर्यं तीक्ष्णमम्लेन संयुतः'। या वचनाप्रमाणें क्रिया घडून अम्लपित्त कमी पडतें. हीच क्रिया रक्तांतहि घडत असावी.

वै. वि. म. गोगटे म्हणालेः- भस्त्रिकादि क्रियांच्या परिणामांचें आयुर्वेदीय दृष्टिकोनांतून विवेचन वा परीक्षण जोंपर्यंत आपण केलेलें नाहीं तोंपर्यंत केवळ वरील रीतीनें स्पष्टीकरण करणें मला योग्य वाटत नाहीं. शिवाय अशा प्रक्रियांचे परिणाम, परीक्षण वा विवेचन या परिषदेच्या क्षेत्रांत बसत नसल्यामुळें डॉ. खाडिलकर यांच्या कल्पनेचा विचार झाला एवढा पुरे! परिषदेच्या कार्य पद्धतीविषयीं माझी दुसरी सूचना अशी कीं प्रत्येकानें उभें राहूनच बोलावें; त्यामुळें प्रत्येक वेळीं एकच व्यक्ति बोलूं शकेल.

वैद्य विनायकरावजी एकतारे म्हणालेः— बसून बोलणें हेंच मला युक्त वाटतें. कारण उभे असतांना स्वतःचा, तोल सांभाळण्याकडे वक्त्याचें लक्ष लागतें. शिवाय हातांत ग्रंथ असेल तर अधिक जड वाटतें, तें इष्ट नाहीं. कारण वक्त्याचे मुद्दे हे महत्त्वाचे आहेत. फक्त या निर्बंधाचा हेतु एका वेळीं एकानेंच भाषण करावें हा आहे हें लक्षांत ठेवून प्रत्येकानें वागावें म्हणजे गडबड होणार नाहीं.

परिषदेची कार्यपद्धति पूर्वपरंपरेला धरूनच असावी. अशा तऱ्हेच्या चर्चापरिषदांचें वर्णन चरकाचार्यांच्या ग्रंथांतून आहे. त्यावेळींहि निरनिराळे वाद होते. व चर्चापरिषदेंत वैद्येतर विषयांचे तज्ञहि हजर असत. उदाः— वायोर्विद सांस्कृत्यायन हा विशेषतः 'वायु' ह्या तत्वावरच विचार करणारा असावा. फक्त Physicist असावा. 'मरिचि' पित्ताबद्दलचा व 'काप्य' कफाबद्दलचा विचार करणारे असावेत. पण वायूवरील चर्चापरिषदेंत ते सगळे एकत्र जमलेले आहेत.

त्या चर्चा (१) प्रत्यक्ष (२) अनुमान (३) उपमान व (४) शब्द (आप्तवाक्य) या चार प्रमाणांवर आधारलेल्या असत. आपणहि हींच चार प्रमाणें आधार मानूं. ग्रंथाधार हे आप्तवाक्य समजावें. उदा—'गुणाः गुणाश्रया नोक्ता' असें असलें तरी वर्णनसौकर्यार्थं गुर्वादयो गुणा द्रव्ये पृथिव्यादौ रसाश्रये। रसेषु व्यपदिश्यन्ते साहचर्योपचारतः॥ या वचनांत गुणांवर गुणांचा आश्रय उपचारानें केलेला आहे. अशा तऱ्हेचा आधार आपण घेऊं शकतो. परन्तु वर्णनात्मक शब्दप्रमाण असलें तरी तें बाकीच्या नियमांशीं विरोधी नाहींना हें आपण पहावें. इतरहि प्रमाणांशीं विरोधी नाहींना हें पहावें. उदा.-शरीरचराः व्यापिनः असा अर्थ मांडतां येईल काय? नाहीं! कारण सर्व ठिकाणीं चरत्व आहे कीं नाहीं हें सिद्ध करावें लागेल. तें तसें असेलच असें नाहीं. चरत्व असूनहि एखाद्या ठिकाणीं अव्याप्यत्व असेल. असें जर आहे तर व्यापिनः = सर्व शरीरचराः असा अर्थ शब्द प्रमाणानें आपण मानीत असलो तरी प्रत्यक्ष अनुमान प्रमाणास तो विरोधी जातो.

व्याकरणशास्त्राप्रमाणें जर लेखन असेल तर वचनाप्रमाणेंच अर्थ घेतलाच पाहिजे असें आहे कीं नाहीं? या विषयीं मी माझे विचार मांडतो आपण विचार करावा. प्रकृतिपुरुषांचा विचार मांडणारे सांख्य, १६ पदार्थांचें वर्णन करणारे वैशेषिक व प्रमाणवादी न्यायशास्त्री या प्रत्येकाची स्वतंत्र विचारसरणी आहे. म्हणून सांख्यशास्त्रांतीलच नव्हे तर न्यायशास्त्राच्या वैशेषिक व प्रमाणवादी या दोन्ही प्रकारच्या तत्त्वांवर आधारलेल्या कल्पनांचा विचार एकाच ग्रंथांत निरनिराळ्या ठिकाणीं जर केलेला असेल, तर, त्यांचा अर्थ प्रकरणानुसार निरनिराळा घ्यावा लागेल. त्या ठिकाणीं केवळ व्याकरणनियमानुसार अर्थ करून चालणार नाहीं. वचनाकडे नीट लक्ष द्यावें लागेल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सांख्य-शास्त्र हें सूक्ष्म पदार्थांचें विवेचन करण... मन... त्मा, बुद्धि, अहंकार, तन्मात्रा, यांचा विचार करतांना त्याचा ...हित ... प... गेल. द्रव्याद... ...चार करतांना वैशेषिकांचे विचार विचारांत घ्यावे. श्रीचरकाचार्यांनींहि मन हें खादीन्यात्मा मनः कालो दिशश्च द्रव्यसंग्रहः। या वचनाप्रमाणें पंचमहाभूतांपासून निराळे म्हणजे अभौतिक,- आत्मा इ. प्रमाणे, मानलें आहे. इंद्रियें मात्र आयुर्वेदीयांनीं पांचभौतिक मानलीं, तीं कां ? सांख्यांनीं, तीं अभौतिक मानलीं आहेत. इंद्रियें दिसूं शकतात. रोगी अवस्थेंत तीं नष्ट होतात. (Functionally or organically) शिरसि च इंद्रियाणि......इ. इंद्रियांना शब्दस्पर्शादि गुण आहेत व आखाहरणादि, ज्ञानग्रहणादि कर्में आहेत. म्हणजेच तीं प्रत्यक्ष होतात, म्हणून पांचभौतिक आहेत. अशा रीतीनें नैयायिकांशीं विरोध पत्करूनहि आयुर्वेदीयांनीं आपला विशेष सांगितला आहे.

आयुर्वेदीय आचार्यांनीं आपला मतभेद स्पष्ट सांगितला आहे. व विरोध नसेल त्या ठिकाणीं विरोध केलेला नाहीं. प्रमाणांच्या बाबतींत नैयायिकांना प्रमाण मानावें. व पदार्थांच्या बाबतींत वैशेषिकांना प्रमाण मानावें. यांनीं ज्यावेळीं उपपत्ति लागत नसेल त्यावेळीं इतरांना प्रमाण मानावें.

वैद्य वेणीमाधवशास्त्री म्हणाले:— पदार्थांचें एकत्व वा अनेकत्व कसें ठरविलें ? पाणी, इक्षुरस, व दूध अशीं ३ द्रव्यें घेतलीं. पाणी आप्य. इक्षुरस व दूध हेहि आप्य. मग त्यांच्यांतील फरक कसे पहाणार ? त्यांच्या आश्रयाला असणाऱ्या गुणकर्मांनीं भेद करावे लागतात. जलापेक्षां दूध जास्त सांद्र आहे. (पार्थिव घटक जास्त). इक्षुरस अधिक सांद्र. असा गुणांत भेद आहे. म्हणून भेदासाठीं गुणतः विवेचन सुरू होतें. त्याचा उपयोग चिकित्सेंत होतो.—वैद्यकांत होतो. कफाची जाती एक असली तरी गुणकर्म भेदानें ठिकठिकाणचा कफ परस्परापासून भिन्न आहे. याचप्रमाणें इतरहि दोषांचें बाबतीत आहे. म्हणून अन्तःकोष्ठांतील दोषच इतर स्थानांत असतात असें म्हणणें युक्त होईल काय याची शंका वाटते. सारांश परिषदेंत विचार करतांना आप्तवाक्य हें प्रमाण मानावें. व प्रत्यक्ष, अनुमान यांनीं तें पडताळून पहावें. शिवाय तंत्रयुक्तीनें त्यांतील विरोध नाहींसा करावा. व आपले निर्णय करावेत.

वैद्य पाठक म्हणाले— वैय्याकरणी व नैय्यायिक मिळाला तर आपल्या परिषदेंत जरूर आणावा.

वैद्य वि. म. गोगटे, म्हणाले-पं. डेग्वेकरजी यांनीं अशी सूचना केलेहि होती. परन्तु आर्थिक दृष्टीनें तें परवडणारें नसल्यामुळें तशी व्यवस्था झाली नाहीं. ' प्रत्यक्षं अल्पं अप्रत्यक्षं अनल्पं ' असें असल्यामुळें बरोबर थोडें व चुका अधिक असेंच चालतें. पण आपण आपल्या बुद्धीनें प्रयत्न करणें हें आपलें कर्तव्य ! आपण आतां शास्त्रनिश्चयाकरितां जमलो नसून ग्रंथसुबोध व्हावा म्हणून जमलों आहोंत. आपल्याला ग्रंथ सुसंगत रीतीनें शिकवतां कसा येईल हें पहावयाचें आहे. शिकवणें हें परार्थानुमान आहे. त्यांत निगमनाला महत्व आहे. म्हणून आपलें विवरण आपण प्रतिज्ञादि पंचावयवासहित करावें.

निर्णयाबाबतींत मतें घ्यावीत. अल्पमतवाल्यांनीं आपलें मत व मतसंख्या नोंदून ठेवावी. इतरत्र सभेनें निर्णय घेण्याची जी पद्धत तीच अंमलांत आणावी.

इतर वैद्यकाचे पूरक वा आक्षेपक भाव आम्हाला येथें नको आहेत. शुद्ध आयुर्वेदाच्या अध्ययनांत ते आणूं नयेत. पूरक भाव निश्चित असतील तरच ते एखादे वेळीं सांगितले तर चालतील.

पण्डित डेग्वेकरजीः— आतांपर्यंत सांगितलेल्या पद्धतीनें एका दिवशीं फक्त एक सूत्र होईल. आपला उद्देश सगळया गुरूंनीं शिकविण्याकरितां सर्व साधारणपणें चूक नसलेली एकच पद्धत स्वीकारावी असा आहे. शिवाय शास्त्राचे सर्व सिद्धान्त आज आपण पडताळावयास बसलो नसून वाग्भट शिकवावा कसा हें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समजू. [illegible]रपणें [illegible]त या[illegible] आहेत. [illegible] गु[illegible] [illegible]कामासाठीं दोन टीकांचे निर्णय हेच फक्त बंधनकारक मानावेत अस[illegible] मा [illegible]गितलें. अध्यक्ष[illegible] [illegible]. बंधन घालून द्यावें. कांहीं निर्णय शास्त्राचे दृष्टीनें संपूर्ण बरोबर नसले तरी विद्यार्थ्यांच्या आकलनाचे सोयींकरितां आपण ते वादविवाद न करतां घ्यावे.

वैद्य गोडबोले शास्त्री:– परिभाषा या तीन प्रकारच्या ! [१] सांकेतिक [२] निश्चित [३] आधिकृत त्याच प्रमाणें द्विप्रकारच्या. पूर्वपरिभाषा उदा. अमाशय. व उत्तर परिभाषा, उदा. पक्वाशय.

अध्यक्ष:— [१] ग्रंथाधारासाठीं बृहत्त्रयी व लघुत्रयीहि घ्यावी [२] ग्रंथप्रामाण्य असेल तर टीकाकार अमान्य नसले तरी गौण मानावेत.[३] पं.डेग्वेकरजींनीं विषयांचें विवेचन करावें.व[४]इतर अध्यापकांनीं त्यांतील शंका व आपल्याला अध्ययनाचे वेळीं आलेल्या अडचणी माझ्याकडे लेखी द्याव्या. मध्यें कोणी प्रश्न विचारूं नये ! यथाकाल पं. डेग्वेकरजी आपल्या लेखी शंकांना उत्तरें देतील. यापुढें त्यांनीं आपल्या विवेचनाला सुरुवात करावी असें मी सुचवितों.

पं. डेग्वेकरजी यांनीं यानंतर विवेचनाला प्रारंभ केला.

"पित्तं—पित्त हें द्रव्य कोणतें ? हें द्रव्य त्याचा स्राव जिथें होतो, तिथून आपणास गोळा करतां येते. परन्तु वमनांतूनहि तें बाहेर पडतें. व त्याचें प्रात्यक्षिकावरूनहि शरीरस्थ पित्ताची कल्पना विद्यार्थ्यांना येईल. येथें कोणी अशी शंका घेतील कीं वमनांतून बाहेर पडणाऱ्या व शरीरस्थ पित्ताचे गुण एकच असतील कीं नाहीं ? कारण वमनांतून बाहेर पडणारें पित्त मलरूप आहे. तर त्याचें उत्तर असें कीं या वमनद्रव्यांतील पित्त शरीरस्थ पित्तगुणाचेंच असतें. फक्त तें वृद्ध पित्त असतें. म्हणजे स्वप्रमाणाधिक असतें । वृद्धत्वामुळें गुण बदलूं शकत नाहींत.

सस्नेहं—रूक्षाचा विपरीत असणारा गुण. स्निग्ध गुण ज्यांत असतो असें. किंचित् स्नेह असतो. तो डोळ्यांनीं दिसतो. व स्पर्शानेंहि कळतो.

तीक्ष्ण—मंदविपरीत गुण. ॲसिडचे अंगीं असतो. तीक्ष्णपणामुळें तें असह्य होतें.

उष्ण— शरीर उष्णतेपेक्षां तें अधिक उष्ण वाटतें.

लघु = लाघव. तुलनात्मक आहे. (वात लघुतर, पित्त लघु, व कफ पित्तापेक्षां गुरु)

विस्रं – दुर्गंधी, आमगंधी,

द्रव-- स्पष्ट आहे. हा सांद्रविपरीत गुण आहे. पित्ताचे हे सर्व गुण रुग्णाला प्रतीत होतात. विद्यार्थ्यांना सांगतां येतात.

कफ-- स्निग्ध रूक्षविपरीत असें सांगावें. शीत-- परिणाम शीत. स्पर्शशीत असून वीर्यहि शीत.

गुरु-- लघुविपरीत. वातापेक्षां गुरु. मंद– तीक्ष्णविपरीत– पित्तापेक्षां हळुंहळुं कार्य !

श्लक्ष्ण खरविपरीत. मृत्स्नः– बुळबुळीत भोकराप्रमाणें. स्थिर– वातापेक्षा स्थिर. एका ठिकाणीं रहातो.

अशा रीतीनें दोष हीं द्रव्यें आहेत. वायु हें वायुरुप द्रव्य आहे, पित्त हें द्रव्य आहे. पित्त हें द्रवरूप व कफ हें पित्तापेक्षां घन पण द्रवच द्रव्य आहे. याप्रमाणें दोषांचें विवेचन करावें.

या पं. डेग्वेकरशास्त्री यांच्या विवेचनानन्तर पं. वेणीमाधवशास्त्री म्हणाले:— वमनांतून बाहेर आलेलें पित्त कफमिश्रित पित्त असतें. तें अविकृत पित्त नाहीं. वमनांतील पित्तांत आमाशयस्थ पित्त व अच्छपित्त दोन्ही आहे. अच्छपित्ताची प्रतिज्ञा करून उदाहरण मात्र दुसऱ्या पित्ताचे दिलें, असें होऊं नये. वेध (Aspiration) करून अच्छपित्त बाहेर काढावयास पाहिजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुसरी शंका अशी कीं दोषांचे अविकृत गु[illegible] तलले. [illegible] घि जागदे रस आहेत. ' कटुकाम्लौ रसौ ' असे पित्ताचे विकृत रस आहेत पण [illegible] तिक्तास्यता कां ? तिक्त रस कोणी सांगितला कीं नाहीं ?

उत्तरः— विद्यार्थ्यांना! दोन्ही पित्तें एकत्र आहेत असें सांगावें. हेमाद्रीनें कटुकः = तिक्तः अशी स्पष्ट टीका दिली आहे. तिचा आधार विद्यार्थ्यांना द्यावा. व आपण इतरत्र पित्ताचा तिक्त रस सांगितला आहे कीं नाहीं तें पहावें.

यानंतर पं. डेग्वेकरजी यांनीं पुढील धातुमलविवेचन सुरू केलें—

रसासृङ्मांस.........शुक्राणि धातवः ! सप्त दूष्याः ॥

ह्या सूत्रांत सात धातूंविषयीं सांगितलें आहे. हे सात धातू शरीरांत स्पष्ट दिसतात, दाखवितां येतात. विद्यार्थ्यांना त्यांचें स्थूल स्वरूप समजूं शकतें. दोषांमुळें हे धातू दुष्ट होतात म्हणून त्यांना ' दूष्य ' असेंहि म्हणतात.

मलाः मूत्रशकृत्स्वेदादयोऽपि च ।

यांतील स्वेद ज्यांच्या आदि आहे, असे दूषिका, सिंघाणक, कर्णमल इ. सांगावेत. 'अपि' शब्दाचा अर्थ मलांनाहि ' दूष्य ' संज्ञा आहे, हा होय.

वृद्धिः समानैः सर्वेषां विपरीतैः विपर्ययः ।

सर्वेषां--दोषधातुमलानाम्। दोषधातुमलांशीं जीं द्रव्यें समान असतात त्यांच्यामुळें वृद्धि होते.समानैः द्रव्यगुणकर्मैः । समान द्रव्यांनीं समान द्रव्यांची, समान गुणांनीं समान गुणांची, समान कर्मांनीं समान कर्मांची वृद्धि होते. समान द्रव्यगुणकर्मांनीं दोषधातुमलांच्या गुणकर्मांची वृद्धि होते, येवढाच अर्थ थोडक्यांत स्पष्ट करावा. तसेंच विपरीत द्रव्यगुणकर्मांनीं ऱ्हास होतो हें सांगावें.

द्रव्यांचे तीन प्रकारः— शमनं कोपनं इ. द्रव्य व दोषांचा संबंध येथें स्पष्टपणें सांगितला आहे. शमन-दोषांचे जितके गुण वृद्ध आहेत तितके सर्व, दोषद्रव्य शरीरांत ठेवून कमी करणें म्हणजे शमन. कोपन म्हणजे कोणत्याहि दोषाला वृद्ध करणारें. व स्वस्थाहित म्हणजे दोषाला वाढवीतहि नाहीं व कमीहि करीत नाहीं असें.

वीर्यः— द्रव्यामधली विशिष्ट कार्यकारी शक्ति येवढेंच फक्त येथें सांगावें. शरीरावर ज्यानें जें कार्य होईल तें वीर्य. प्रत्येक द्रव्य उष्णता तरी उत्पन्न करील नाहींतर थंडीतरी उत्पन्न करील. वीर्याची कल्पना आयुर्वेदांत आहे. पाश्चात्य आधुनिक वैद्यक ही कल्पना मानीत नाहीं.

विपाक—विपाक तीन प्रकारचा आहे. स्वादु अम्ल, व कटु. जाठरेणाग्निना इ. पुढच्या अध्यायांत येणारें सूत्र येथेंच विद्यार्थ्यांना स्पष्ट समजून द्यावें. कारण विपाकाची कल्पना त्याशिवाय येणार नाहीं. जाठराग्नि म्हणजे पाचकपित्त. व विपाक म्हणजे या पाचकपित्ताच्या परिणामानंतर शरीरांत उत्पन्न होणारीं द्रव्यें. रसान्तर म्हणजे रसयुक्तद्रव्यान्तरम् ।

बोधककफ, क्लेदक कफ, अवलंबक कफ,पाचकपित्त इ.द्रव्यांत मिसळून दोन द्रव्यांचा संयोग होऊन तिसरें किंवा चवथें द्रव्य बनतें. ताक हें आम्ल द्रव्य+मीठ यांचा संयोग होऊन मधुर द्रव्य तयार होतें. अशा उदाहरणानें परिणाम स्पष्ट करावा.

गुरुमन्दहिमास्निग्ध............सविपर्ययाः ।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

[illegible] या २० गुणापलिकडे गुण आढळणार नाहींत. सूक्ष्म असे इतर असतील त्यांचा विचार येथें नाहीं. वातपित्तकफांचे साधारणतः २० गुण येतात. वातपित्तकफ सगळ्यांचे संचालक, तसेच हे २० गुण संचालक.

कालार्थ.........कारणम् । काल-षड्ऋतु. अर्थ-शब्दस्पर्शादयाः,

कर्म-कायिक वाचिक मानसिक. अर्थांचा शरीराशीं संबंध कसा तें सांगावें. इंद्रिय, इंद्रियाधिष्ठान इ० कल्पना द्यावी. विस्तारपूर्वक त्यांचें विवरण करावें. कर्मांची निरनिराळीं उदाहरणें द्यावींत. ३ योगांचे विस्तृत विवरण करावें.

रोगस्तु दोषवैषम्यं......... ।

दोषवैषम्य म्हणजे दोषवृद्धि वा दोषक्षय. कोणतेंहि द्रव्य वाढलें म्हणजे त्याचे सर्व गुण वाढतात. प्रमाणांनीं वाढ झाली म्हणजे गुणांनीं वाढ होते. क्षय म्हणजे प्रत्येक गुणाचा क्षय झाला पाहिजे. याला प्रमाण काय ? तर एकंदर गुण मिळूनच द्रव्य बनतें ! म्हणून प्रमाणवृद्धि म्हणजे द्रव्यवृद्धि ! तिन्ही दोष सारखे प्रमाणांत असणें म्हणजे दोष साम्य नाहीं. साम्य म्हणजे दोषांचें जें अंजलिप्रमाण सांगितलें तेवढेंच असणें. साम्य राहण्यास आवश्यक इतकें तें प्रमाण आहे. त्या त्या विशिष्ट वयादि अवस्थेंत, शरीर स्वस्थ रहाण्यास आवश्यक असें जें प्रमाण तें सम प्रमाण.

निजागन्तुविभागेन....... । आगन्तु – अलीकडील प्लेग इ. सारखे. प्रथम व्याधि नंतर दोषविकृति. निज – शरीरांत दोषांची प्रथम वृद्धि नंतर व्याधि. दोन प्रकार रोगांत असले तरी एकमेकांचा एकमेकांवर परिणाम होतो.

रजस्तमश्च मनसो............ उदा.- उत्तम सुशोभित वाड्याची स्थिति ही सात्विक, व धुळीला मिसळलेल्या वाड्याची स्थिति ही तामसअवस्था. व पहिल्या अवस्थेपासून शेवटच्या अवस्थेपर्यंत मधली जी अवस्था ती राजस. मनाच्या दोषावस्था फक्त दोनच ! सात्विक ही दोष अवस्था नाहीं.

दर्शनस्पर्शनः— दर्शनपरीक्षा-नेत्रेंद्रियद्वारा व स्पर्शनपरीक्षा त्वचेद्वारा, नाडीद्वारा व प्रश्न या तिघांनीं रोग्याची परीक्षा करावी. इतर सर्व प्रकार या तिघांतच अन्तर्भूत होतात.

रोगं निदानप्राग्रुपः— या सूत्राचें विवरण करीत असतांना निदान, प्राग्रूप इ. चे पर्याय सांगावेत. थोडक्यांत सांगावेत. उपशय निदान शिकतांना विस्तारानें सांगावयाचा असला तरी येथें थोडक्यांत स्पष्ट करावा. 'तदर्थकारी' उपशयात्मक चिकित्सा म्हणजे होमिओपॅथी नव्हे. तसें सांगणें चूक आहे. संप्रातीचें विवरण करतांना एखाद्या रोगाचें उदाहरण घ्यावें. याप्रमाणें या अध्यायांतील ज्या भागांचें विवरण करणें आवश्यक तेवढें सांगून झालें.

हें सर्व विवेचन भिषगाचार्य पं. डेग्वेकरशास्त्री यांनीं केलें.

अप्रतिम व त्वरित गुण

"आमच्या दुकानीं येणाऱ्या औषधी ग्राहकांचा अनुभव असा आहे कीं आयुर्वेद सेवा संघाचीं आयुर्वेदीय औषधें फारच अप्रतिम असतात व त्वरित गुण देतात. त्यापैकीं विशेष म्हणजे अगस्तिप्राश व अश्विनीप्राश यांचा फारच उत्तम गुण येतो."

–श्रीकृष्ण शांताराम

केश व कस्तुरी

या उपयुक्त व निर्भेळ वस्तु मिळण्याची व्यवस्था आयुर्वेद सेवा संघानें केली आहे.

व्यवस्थापक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्मार्थ दंतयज्ञ, मुंबई

श्री. स. का. पाटील यांचें जाहीर आश्वासन

दि. १२-१०-५४ पासून दि. २४-१०-५४ पर्यंत मुंबई येथील माधवबागेंत वैद्य गुप्ता व वैद्य जायदे यांच्या नेतृत्वाखालीं धर्मार्थ दंतयज्ञ करण्यांत आला. सदर दंतयज्ञांत १६५७ रुग्णावर मोफत उपचार करण्यांत आले. २००० हून अधिक दंतोत्पाटनें करण्यांत आलीं व सुमारें ५०० मूलोत्पाटनें करण्यांत आलीं.

आसाम बिहार प्रलय निधि

दंतयज्ञाच्या अवधींत धर्मार्थ पेटींत एकूण १११ रु. ५ आ. ६ पे. निधि जमा झाला. सदर निधीचा विनियोग आसाम, बिहार, रिलीफ फंडाकडे करण्याकरतां तो मुंबई प्रदेश कॉंग्रेस कमेटीच्या कचेरींत भरण्यांत आला.

प्रतिष्ठितांच्या भेटी

मान्य जत्ती, मान्य डॉ. नरवणे, सेठ श्रीमान् मनहरदास (ट्रस्टी वरजीवनदास इस्टेट), सेठ पित्ती (पुणें), डॉ. आर. एन्. दातार (सर्जन ताराचंद रामनाथ हॉस्पिटल पुणें), श्रीमान् योगी रामानंद-स्वामी, श्री. गणपती शंकर देसाई (माजी मेयर मुंबई) डॉ. आर. व्ही. साठे ग्रँट मेडिकल कॉलेज, वै. लेले प्रिन्सिपॉल पोतदार आयु. कॉलज, श्रीमंत नानासाहेब पुराणिक, इ. मंडळींनीं दंतयज्ञांतील काम पाहून समाधान व्यक्त केलें.

जायदे यांनीं अमेरिकेस जावें

रविवार दि. २४।११।५४ धनत्रयोदशी रोजी सकाळीं श्रीमान् एस. के. पाटील एम. पी. (अध्यक्ष मुं. प्र. कॉंग्रेस कमिटी) यांच्या अध्यक्षतेखालीं दंत-यज्ञाचा समारोप झाला. श्री. शहाडे इंजिनीयर, श्री. फाळके (हेड्मास्तर, मिरज) वैद्य ऐनापुरे, श्रीमंत नानासाहेब पुराणिक, इ.चीं समयोचित भाषणें झालीं. श्री. स. का. पाटील यांनीं शूलरहित दंतोत्पाटन-... कले... जायदे यांनीं ... जाऊन या कलेचा प्रचार करावा व त्यांना यावत् शक्य सर्व साहाय्य करूं असें त्यांनीं जाहीरपणें आश्वासन दिलें.

पुस्तकालय 07945

दोन सोपे प्रयोग

१ दांत दबाके टट्टी

शौचास बसलें असतां दांत एकमेकांवर दाबून धरावेत. असें केल्यानें दांत मजबूत होतात व मल-शुद्धिहि उत्तम होते. ही अनुभूत योगिक क्रिया आहे.

[मुंबईच्या दंतयज्ञांत एका हिमालयीन योगि-राजाकडून हा प्रयोग समजला.]

२ कापडानें दांत घासावेत

रोज सकाळीं दंतधावन झाल्यावर स्वच्छ काप-डानें दांत व हिरड्या घासून पुसाव्या. असें करण्यानें दांत स्वच्छ होतात व हिरड्या मजबूत होतात.

(हा प्रयोग कुमठा दंतयज्ञशिबिरांत ६५ वर्षे वयाच्या एका गृहस्थानें सांगितला. त्यांचे दांत अत्यंत स्वच्छ व मजबूत आढळले.)

संपत्तिदान

संपत्तिदान यज्ञ ही एक नैतिक अध्यात्मिक चळवळ आहे. तो एक सामाजिक ऋण फेडण्याचा मार्ग आहे. संपत्तिदानामागें असलेला विश्वस्त वृत्तीचा सिद्धांत शाश्वत स्वरूपाचा आहे.

आपल्या मिळकतीचा विनियोग

दरिद्रनारायण हा आपल्या कुटुंबांतील एक घटक आहे असें मानून त्याच्यासाठीं आपल्या मिळ-कतीचा विनियोग करणें हें आपल्यापैकीं प्रत्येकाचें कर्तव्य आहे.

संपत्तिदानाचा प्रयोग अयशस्वी झाला तर अहिंसेच्या कक्षेतील सत्याग्रहाचा [असहकाराचा] मार्ग पत्करावा लागेल. —जयप्रकाश नारायण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दंतशूलावर [illegible]

वालचंदनगर येथील प्रचारकार्य

निखिल भारतीय आयुर्वेदिक डेंटल मिशनचे महाराष्ट्र शाखेचे संचालक श्री. डॉ. फडके, वालचंदनगर येथें गेले असतां ता. ५।११।५४ रोजीं दुपारीं ४ वाजतां कंपनीचे डायरेक्टरसाहेब यांचे बंगल्यावर कंपनीचे मान्यवर डायरेक्टर शेठ गुलाबचंद हिराचंद व त्यांच्या पत्नी सौ. डॉ. शांताबाई अेफ्. आर्. सी. अेस्. यांच्या समोर शूलरहित दंतोत्पाटनाचें प्रात्यक्षिक करून दाखविलें, यावेळीं कंपनीचे फार्म मॅनेजर श्री. गुमास्ते व मेडिकल ऑफिसर डॉ. शहा अेम्. बी. बी. अेस्. हे हजर होते.

बालकांना दंतरोग कां होतात?

डॉ. फडके स्वतः पाश्चात्य पद्धतीचे दंतवैद्य असूनहि त्यांनीं शूलरहित दंतोत्पाटन व आयुर्वेदीय दंतवैद्यक यांचा मुंबईचे सुप्रसिद्ध आयुर्वेदीय दंतवैद्य श्री. गुप्ता यांचे कडे प्रत्यक्ष अभ्यास केलेला असून या कार्यास त्यांनीं स्वतःस वाहून घेतलें आहे. या प्रात्यक्षिकाचे अनुरोधानें, मंडळी वैद्यकविषयतज्ञ असल्यानें दंत चिकित्सा, आयुर्वेदीय प्रकृतिविज्ञान व आरोग्य, बालकामधलि अलीकडे वाढत असलेल्या दंतरोगांचें प्रमाण वगैरे विविध वैद्यक विषयावर अर्धा पाऊण तास उद्बोधक अशी चर्चा झाली.

ही योगिक प्रक्रिया आहे

त्याच दिवशीं रात्रीं ७॥ वाजतां तेथील विनोदनलयांत सदर विषयाचे प्रात्यक्षिक प्रश्नोत्तरात्मक चर्चा व उद्बोधक व्याख्यान सर्वसामान्य लोकांसाठीं डॉ. श्री फडके यांनीं दिलें. त्यावेळीं निरनिराळ्या प्रकारचे घट्ट दांत त्यांनीं लोकांना लीलेनें काढून दाखविले. त्याचप्रमाणें यांत जादूटोणा वगैरे कांहीं भानगड नसून योगिक प्रक्रियेनें हें करतां येतें. त्याचप्रमाणें हें कोणासहि शिकतां येईल असें त्यांनीं समोर बसलेल्या प्रेक्षकांना सांगितलें. नंतर आहार व दंतरोग यांचा संबंध, वांति करून कफाचें निर्हरण केलें असताना दंतशूल कमी होतें असल्याचा त्यांचा अनुभव वगैरे विषय त्यांनीं विशद केले. अेकंदरींत हा त्यांचा कार्यक्रम अत्यंत उद्बोधक व यशस्वी झाला.

मुंबईस जिल्हा वैद्य मंडळाची स्थापना

म. प्रां. वैद्य मंडळाच्या घटनेंत मुंबईस २ जिल्ह्याएवढे वैद्य प्रतिनिधि स्थायी समितीवर पाठविण्याचा अधिकार पूर्वीपासूनच दिलेला आहे. त्यास अनुसरून मुंबई येथें म. प्रां. वैद्य मंडळाची जिल्हा शाखा सुरु करण्यांत येणार आहे. त्यानिमित्त २८ नोव्हेंबर १९५४ रोजीं मुंबई भागांतील सभासदांची सभा भरणार आहे. सभेचे निमंत्रक वै. कृ. के. कानिटकर (१८८ एफ्. भीमराव वाडी ठाकुरद्वार मुंबई २), वै. रामभाऊ भोगे व वै. रा. ना. आंबे हे आहेत.

तोलिया आसाणा फार उपयुक्त

चिकमंगलूर (म्हैसोर) चे आय. एन्. सीतारामय्या लिहितात– " मी आपणाकडून अनेकवार असनादिसार चूर्ण (भरड) मधुमेहाकरितां मागविलें आहे व मला तें फार उपयुक्त असल्याचें आढळून आलें आहे.

मधुमेहापासून त्रास भोगणाऱ्या अनेक लोकांना मी आपल्याकडून तें असनादिसार चूर्ण मागावून घेण्याचा उपदेश केला आहे.

" मला ६० तोळे असनादिचूर्ण पोस्टानें पाठवा ही विनंति. "

आयुर्वेद सेवा संघ–नासिकचीं सर्व औषधें मुंबईंत मिळण्याचें आणखी एक नवें केंद्र

रामकृष्ण एजन्सी

३६८ बी ३।७० सुपारीबाग रोड

लालबाग, मुंबई १२

* मागणी रोज वाढत आहे. *

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दंतवैद्य जायदे अ[illegible] चालले !

दोन हातांनीं एकाच वेळीं दोन आर्तांचे खालचे व वरचे दांत विना-वेदना काढणारे कुशल दंतवैद्य पां. वि. जायदे आयुर्वेदतीर्थ (अहमदनगर) हे येत्या जानेवारी-फेब्रुआरीचे दरम्यान अमेरिकेस जात असल्याचें उत्साहवर्धक वृत्त आलें आहे.

अमेरिकेंतील दंतारोग्य विमासंघाचे अध्यक्ष डॉ. पामर हे त्यांना पाठविलेल्या पत्रांत लिहितात-'लाइफ' मासिकांत आलेला आपल्या अवेदन दंतोत्पाटनासंबंधींचा मजकूर वाचला. गेलीं २५ वर्षे मुखशल्यतंत्रज्ञ (oral surgeon) म्हणून मला या क्षेत्रांतील अनुभव आहे. व मला आपलें कौशल्य पाहाण्याची उत्कंठा लागली आहे. यू. एस्. ए. चा वैद्यवर्ग आपली ही अलौकिक पद्धति पाहून खूष होईल."

केवळ कर्तव्य म्हणून जाणार

वैद्यराज जायदे लिहितात "अनेक प्रतिष्ठित लोकांचे शुभाशिर्वाद व प्रेरणा लक्षांत घेऊन, केवळ कर्तव्य म्हणून मी अमेरिकेला जाण्याचें निश्चित करीत आहे. या कार्यासाठीं महाराष्ट्रांतील (नव्हे भारतांतील) वैद्यवर्गानीं मला शुभाशीर्वाद द्यावेत. गेलीं कित्येक वर्षे वैयक्तिक वैद्यकीय धंद्याकडे दुर्लक्ष करून मी जनताजनार्दनाची व शास्त्राची सेवा करीत राहिल्या-मुळें माझी आर्थिक स्थिति अमेरिकेला जाण्या-सारखी राहिलेली नाहीं. तथापि आयुर्वेद व भारतीय कला याच्या उद्धाराची तळमळ बाळगणाऱ्या वैद्यवर्याच्या मदतीच्या भरंवशावर मी हें साहस करणार आहे.

अमेरिकेंत दंतवैद्यकासंबंधीं जें जें नवीन शिकता येण्यासारखें असेल तें शिकण्याचीहि माझी इच्छा आहे.

जनतेनें सहाय्य करावें

[वैद्यराज जायदे यांचे वरील स्तुत्य उद्देश लक्षांत घेऊन जनतेनें उदार हस्तानें साहाय्य करावें अशी आमची विनंति आहे.

या कार्यासाठीं एक निधि उभारावा. व तो त्यांना पोहोंचता करावा अशी आमची सूचना आहे. ज्या व्यक्ती अगर संस्था यांना वैद्य जायदे यांनीं अमेरिकेस जाऊन भारतीय दंतचिकित्सेतील हा शोध नव्या जगासमोर मांडावा असें मनापासून वाटत असेल त्यांनीं या कामीं अवश्य मदत पाठवावी. ती मदत सत्कारणीं लागेल एवढी खात्री आम्ही देऊं शकतो. वैद्यराज जायदे यांचें जीवन आम्हीं अगदीं जवळून पाहिलेलें आहे.

वैद्य जायदे अमेरिका प्रवास निधी

या निधीस आयुर्वेद पत्रिकेतर्फे १०१ रु. देण्यांत येत आहेत.

द्रव्यसाहाय्यावरोबर किंवा नुसतेंच वैद्यराज पां. वि. जायदे यांना नारायणचौक हुबळी या पत्यावर पत्र पाठवून शुभचिंतन करावें.

ओळख पत्रें द्यावींत

ज्या कोणाला अमेरिकेंतील भारतीयांचे पत्ते माहित असतील तेहि त्यांना कळवावेत व आपल्या तेथील परिचितांना देण्यासाठीं त्यांच्यावरोबर ओळखपत्रें द्यावींत.

—संपादक]

"धन्वन्तरी उत्सव," अंमळनेर

अमळनेर येथें आयुर्वेद सेवा संघ नाशिक यांचे विक्रीकेंद्रातर्फे "श्रीधन्वन्तरी उत्सव" साजरा करण्यांत आला. त्यावेळीं प्रभुधन्वन्तरीचें यथाविधि पूजन करून वैद्यमंडळीस व गांवांतील प्रतिष्ठित नागरिकांस पानसुपारी देऊन आयुर्वेद सेवा संघाच्या उद्देशाची रूपरेखा सांगण्यांत आली.

श्वेतलक्ष्मणामूळ

लक्ष्मणामूळ [श्वेत रिंगणीमूळ] पाहिजे. भाव कळवावा. लक्ष्मणा वनस्पतीचें बी मिळत असल्यास कळवावें.

—एक वाचक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

[illegible] क

आयुर्वेद सहकारी मंडळ [illegible] तर्फे सालाबादप्रमाणें ' श्री धन्वंतरी महोत्सव, ' सांगली येथील टिळक स्मारक मंदिरांत साजरा करण्यांत आला. सदर प्रसंगीं श्रीपरमहंस परिव्राजकाचार्य श्रीजगद्गुरू शंकराचार्यस्वामी श्रीयोगेश्वरानंदतीर्थजी महाराज, श्रीगोवर्धनमठ पुरी, यांचे ' मंत्रविद्या व आयुर्वेद ' या विषयावर प्रवचन झालें. सदर प्रसंगीं सांगलीचे वैद्यवृंद व आयुर्वेदप्रेमी स्त्रीपुरुष मिळून २५०-३०० मंडळी उपस्थित होती. लाऊड स्पीकरची व्यवस्थाहि केली होती.

मंत्रांचें रोगनिवारक सामर्थ्य

श्रींनीं १॥ ते २ तास अस्खलित असें प्रवचन केलें. मंत्रविद्या फार प्राचीन काळापासून भारतवर्षांत प्रचलित आहे. पण अलीकडे तिकडे दुर्लक्ष केलें गेलें आहे " मंत्रशक्तियोग " या श्रींनीं स्वतः लिहिलेल्या पुस्तकांतील व श्रीभगवद्गीतेंतील अनेक मंत्र व ते सिद्ध करणेचे मार्ग त्यांनीं वाचून दाखविले. मंत्रानें क्षय, अपस्मार कुष्ठादिरोग बरे होतात असें वेदामध्यें तसेच पुराणांतरीं दाखले आहेत. श्रींच्या कांहीं निकट-वर्ती स्नेहीमंडळींनीं मंत्रोपचार करून रोग बरे केलेले कांहीं इसम, स्वतः पाहिलेले सांगितले.

कासवाच्या पाठींत पारद खलावा

" लक्ष्मीः कौस्तुभ " वगैरे नवरत्नांपैकीं "श्री-धन्वन्तरी हें रत्न सुर (बुद्धीजीवी) व असुर (श्रम-जीवी) मंडळी या दोघांनीं एकत्र येऊन सहकार करून विचार करून समुद्रमंथन करून काढलें असेंहि त्यांनीं सांगितलें. पारदसिद्धीसाठीं कासवाचे पाठीचे खोलगटभागीं (पोटांत) पारद खलण्यास सुरवात केली. त्यावेळीं जमलेल्या सुर [बुद्धिवान्] असुर [श्रम-बलवान्] पैकीं श्रीधन्वन्तरी यांनाच पारदसिद्धीची किमया समजली व ते सर्वश्रेष्ठ ठरले. कासवाचे पाठींत पारदमर्दन केल्याखेरीज तो सिद्ध होत नाहीं. पारद सिद्ध केलेला व सेवन केलेला मनुष्य दीर्घायुषी होता व त्यालाच नवरत्नांचा लाभ होतो, म्हणजे धन (लक्ष्मी) आदि करून ऐहिक सुखप्राप्ति होते. गीतेंतील ' राजविद्या राजगुह्यं ' या श्लोकांनीं पारद-विद्येचाच उल्लेख गीतेंत केलेला आहे वगैरे श्रींनीं सांगितलें.

कपिला रंग (चाकलेट)

कपिला ही एक आयुर्वेदीय औषधी वनस्पति आहे. या वनस्पतीच्या फळावर लालसर काळसर रंगाची लव असते. ती वाळल्यावर गळून पडते. ती कृमिविकारावर पोटांत देतात, व त्वचाविकारावर बाहेरून लावतात.

या कपिला औषधी वनस्पतीचा रंग ज्यांनीं ज्यांनीं पाहिला आहे त्यांना कपिला रंग कोणता हें बरोबर समजू शकते. ही वनस्पति पाहण्याचा योग वैद्याशिवाय इतरांना बहुधा नसल्यामुळें ती इतर मंडळी घोटाळयांत पडतात व"काळी कपिला"असा चुकीचा शब्दप्रयोग करितात. पीतांबर म्हणजे पिवळें वस्त्र, असा अर्थ असतां 'लाल पीतांबर' म्हणणें जसें चूक तसेच 'काळी कपिला गाय' असें म्हणणेंहि चूकच.

कपिलेचा रंग लक्षांत यावा म्हणून या अंकांत गाईचा रंग कपिलेशीं साधारण जुळेल अशाप्रकारें छापण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात् अगदीं कपि-लेच्या रंगाची शाई तावडतोब मिळणें शक्य नव्हतें. पण कपिला म्हणजे काळा रंग नव्हे तर चाकोलेट ब्राऊन (अलवणी रंग) एवढें यावरून वाचकांच्या लक्षांत येईल.

सुंदर पिवळ्या लिंबाच्या सालीपासून तयार
केलेल्या रुचकर अग्निदीपक गोळ्या
दीपक वटी
किंमत २ तोळे १० आणे
आयुर्वेद सेवा संघ, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नागपूर येथील

प्राचीन भारतीय चिकित्सा पद्धतींतील प्रत्येक गोष्ट विज्ञानाश्रित आहे !

तारीख २४ ऑक्टोबर रोजीं नागपूर येथें टाऊन-हॉलमध्यें नागपूर विश्वविद्यालयांत उपकुलपति पं. कुंजीलाल दुबे यांच्या अध्यक्षतेखालीं नगर-वैद्य-सभेनें श्रीधन्वंतरिजयंति साजरी केली. प्रथमतः वैद्य-प्रदर्शतर्फे श्रीयुत चीनूभाई शाह यांनीं भगवान् धन्वंतरीच्या चित्रास पुष्पहार घालून श्रीचें पूजन केलें.

आयुर्वेदीय शल्यहरणासाठीं निर्दोष हत्यारें

तदनंतर नागपूर विश्वविद्यालयाचे आयुर्वेदीय विभागाचे प्रमुख, आयुर्वेदाचार्य श्री. वेणीमाधवशास्त्री म्हणाले आज आयुर्वेदीय वैद्यांचा संस्मरण-दिन आहे. आज महर्षि धन्वंतरींचा जन्मदिन आहे. ह्याकरितां शल्यचिकित्सेचा विचार व अवलोकन आपण आज करावयास पाहिजे. प्राचीन शल्यचिकित्सेचा व अर्वाचीन शल्यचिकित्सेचा समन्वय करून आपण आगेकूच (प्रगति) करावयास पाहिजे. गुजरातमध्यें श्री. कृपाशंकर भट्ट मोतीबिंदुवर यशस्वी चिकित्सा करतात; त्याचप्रमाणें अग्निचिकित्साहि आज चालूंच आहे. शिवाय दंतचिकित्सा व शूलरहित दंतोत्पाटनहि आज आयुर्वेदीय पद्धतीनें केलें जात आहे. प्राचीन काळीं आयुर्वेदीय पद्धतीनुसार चिरफाड करण्यास निर्दोष अशीं हत्यारें असत.

मध्यप्रदेश सरकारचे आयुर्वेदिक इन्स्पेक्टर श्री. काशीराम शर्मा यांनीं सांगितलें कीं, आपण केवळ श्रीधन्वन्तरीपूजनच करून स्वस्थ बसतां कामा नये; तर त्यांनीं दिलेल्या ज्ञानाचा अधिकाधिक लाभ करून घेतला पाहिजे. आयुर्वेदाचार्य गुलराजशर्मा म्हणाले कीं, भगवान् धन्वन्तरीच्या शल्यचिकित्सेवर आपण विशेष भर व लक्ष दिलें पाहिजे.

सार्वजनिक रोगराई यज्ञ यागानें घालवीत

यानंतर मध्यप्रदेश विधान-सभेचे अध्यक्ष व नागपूर विश्वविद्यालयाचे उपकुलपति पं. कुंजीलाल दुबे आपल्या अध्यक्षीय भाषणांत म्हणाले कीं, जेव्हांपासून मनुष्य-सृष्टि अस्तित्वांत आली तेव्हांपासूनच मानवाचें स्वास्थ्य-रक्षणाकडे लक्ष गेलेलें आहे. शारीरिक व्याधी दूर करण्याचे प्रयत्न तेव्हांपासूनच सुरू झाले. मनुष्य-सृष्टीबरोबरच चिकित्सा पद्धतीस प्रारंभ झाला. ऋग्वेद हा जगांतील अतिप्राचीन ग्रंथ आहे. छांदोग्योपनिषदांतहि चिकित्सेविषयीं उल्लेख आहे. यज्ञयागादि साधनांच्या द्वारेंहि रोगराई दूर केली जात असे.

विशेषतः सार्वजनिक रोगराई यज्ञ-हवनादि साधनांनीं शिक्षित लोक दूर करीत असत. यजुर्वेदांत मंत्र-साधनांनीं रोग दूर करण्याचे विधि सांगितले आहेत. जल, वायु, काल आणि देश ह्यामध्यें ज्यावेळीं विकृति उत्पन्न होते त्यावेळीं रोगोद्भव होतो असे आचार्य चरक म्हणतात. निंबहवनाचें महत्व आजहि वैज्ञानिक लोक मानतात. ऋग्वेदापासून ते ब्राम्हणकालापर्यंत आमच्या विद्वान् आचार्यांनीं जें चिकित्सेसंबंधीं ज्ञान आम्हांस दिलें आहे तें अनुपम आहे. अंधविश्वासाच्या सबबीवर आमच्या प्राचीन गोष्टींना आधुनिक कालांत मानण्यास जो संकोच दिसून येतो, तें आमचें दुर्भाग्यच होय.

श्रीधन्वतरी हें एक ऐतिहासिक पुरुष होत

आचार्य सुश्रुत म्हणतात कीं, श्रीधन्वंतरि हे ऐतिहासिक पुरुष होऊन गेले. त्यांनीं आयुर्वेदावर महत्वपूर्ण ग्रंथ लिहिले आहेत. परन्तु त्यांनीं लिहिलेले अनेक ग्रंथ आज उपलब्ध नाहींत. त्यांनीं आपल्या देशास एक चिकित्साप्रणाली दिली आहे व आपणांस उपकृत करून ठेवलें आहे. त्याबद्दल आपण त्यांचे सदैव ऋणी आहोत व अशा महान् पुरुषास आपण आज श्रद्धांजलि अर्पण करीत आहोत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

[illegible] शास्त्रदृष्ट्या पुनर्जन्म असल्याचें सिद्ध केलें आहे व म्हणून आपण ह्या जन्मा[illegible], ज्यायोगें आपणांस पुढील जन्मीं सुख मिळूं शकेल. आजच्या वैद्यवर्गांनीं आपणांवरील जबाबदारी लक्षांत पाहिजे व त्यास अनुसरून वागलें पाहिजे. त्यांनीं आयुर्वेदाचें सखोल अध्ययन करून नन्तरच चिकित्साव्यवसायास प्रारंभ करावा.

आहार पदार्थांबाबत संशोधन हवें

अमेरिकेंत खाद्य पदार्थांत भेसळ करीत नाहींत. खाद्य पदार्थांत भेसळ करणें हें महत् पातक आहे. आयुर्वेदावर १५०० हस्तलिखित ग्रंथ असे आहेत कीं, जे अद्याप प्रकाशित झालेले नाहींत असें एका इंग्रज पंडितानें म्हटलें आहे. पहा ! ह्याला अध्ययन म्हणतात.

१६ व्या शतकापर्यंत आयुर्वेद जिवंत होता. तो इंग्रज राजवटींत मात्र मृतप्राय झाला. परन्तु गुलामी राजवटींत झालेले अन्याय आपण आज स्वातंत्र्यकालांत दूर करावयाचे नाहींत तर केव्हां ? आमची संस्कृति इतकी थोर आहे कीं, जीमधून भीष्म, द्रोण, भीम यांच्यासारखे महान् पराक्रमी पुरुष निर्माण होऊन गेले. ह्या उत्सवप्रसंगीं आपण भोजनासंबंधीं अधिक विचार करावयास पाहिजे. आहाराबाबत आपण संशोधन करावयास पाहिजे. हें आपणा सर्वांचें कर्तव्य आहे. ''

शेवटीं वैद्यराज वझे यांनीं सर्व उपस्थित मंडळींचे आभार मानल्यानंतर हा समारंभ समाप्त झाला.

कदलीक्षार

आयुर्वेद सेवा संघांत कदलीक्षार तयार केलेला आहे. त्याचा किरकोळ भाव १२ आणे तोळा आहे. मूत्रल औषध म्हणून हा वानस्पतिक क्षार प्रसिद्ध आहे.

कदलीवृक्ष बहुदा सर्वत्र असतात, पण त्याचा क्षार काढण्याचा खटाटोप करण्याचें सर्वांना जमत नाहीं. त्यामुळें सहजप्राप्त खात्रीच्या अशा या औषधाचा वापर केला जात नाहीं.

कॉलऱ्यासारख्या प्राणघातक विकारांत सुद्धां केळीच्या कांद्याचा रस व तूप एकत्र करून देण्याची प्रथा आहे व तो गुणकारी आहे. तुपांतून कदलीक्षार दिल्यानें अतिसार थांबतो व मूत्रवृद्धि होते.

स्वेद, मूत्र व पुरीष हे मुख्य नित्याचे मल आहेत. हे मल योग्य प्रकारें निघून जाण्यासाठीं कदलीक्षाराचा उपयोग घ्यावा.

अधिक प्रमाणांत कदलीक्षार घेणाऱ्या वैद्यांना विशेष सवलत मिळेल.

औषधी भवन, नासिक

ग्रंथ विकत घेणें आहेत

कांहीं दुर्मिळ पुस्तकें खरेदी करण्याचें वैद्यक ग्रंथ भांडारानें सुरू केलें आहे. तरी ज्यांच्याजवळ जुने वैद्यक ग्रंथ असतील त्यांनीं पत्रानें माहिती द्यावी.

—पुढील पुस्तकें हवी आहेत—

औषधी संग्रह – लेखकः– डॉ. वा. ग. देसाई

वनौषधी प्रकाश – लेखकः– वा. चिं बापट

Vegetable drugs of India
by:– Sanyal & Ghosh

वैद्यक ग्रंथ भांडार, नाशिक

अनेकांनीं प्रशंसलेलीं " आयुर्वेद सेवा संघ " नासिकचीं सर्व गुणकारी औषधें आतां

क ऱ्हा डां त

मिळूं लागलीं.

औषधी भांडार

गुरुवार पेठ, पो. कऱ्हाड (सातारा)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फॅकल्टी ऑफ् आयुर्वे[...] सिस्टिम्स् ऑफ् मेडिसिन, मुंबई

प्रथम जी. एफ्. ए. एम्. [ऑक्टोबर १९५४] च्या परीक्षेस विषयवार किती उमेदवार बसले व किती उत्तीर्ण झाले तें खालीं दिलें आहे—

१ ॲनाटमी व शरीर-रचना

उपस्थित उमेदवार २५८ उत्तीर्ण उमेदवार १२३

२ फिजिऑलॉजी

[बायो-केमिस्ट्री व बायो-फिजिक्स सहीत]

उपस्थित उमेदवार २७२ उत्तीर्ण उमेदवार १५७

३ दोष-धातु-मल-विज्ञान

उपस्थित उमेदवार २५६ उत्तीर्ण उमेदवार १५१

४ रसशास्त्र व औषधी-निर्माण

उपस्थित उमेदवार २४८ उत्तीर्ण उमेदवार १५४

५ पदार्थविज्ञान

उपस्थित उमेदवार २६२ उत्तीर्ण उमेदवार ११९

६ संस्कृत

उपस्थित उमेदवार २७१ उत्तीर्ण उमेदवार १६६

———

डी.ए.एस्.एफ्. परीक्षा [ऑक्टोबर १९५४]

	उपस्थित उमेदवार	उत्तीर्ण उमेदवार
प्रथम परीक्षा...	२	२
द्वितीय परीक्षा...	११	७
तृतीय परीक्षा...	१८२	१५७
चतुर्थ परीक्षा...	२२२	१०९

डी. ए. एस्. एफ्. पदवी परीक्षा आक्टोबर १९५४

मुंबई के

उत्तीर्ण उमेदवारांची नांवें व नंबर

१) अभ्यंकर ३) आहिरराव ६) बारेटो मेरी ७) भागवत ११) चौधरी १२) चौगुले १३) डाके १४) दळवी आशालता १५) दमनीया रसिका १६) दातार प्रमिला १७) देधिया १९ देसाई राधाकृष्ण २१) देसाई सरोज ३०) जोशी कुसुम ३१) जोशी नंद-कुमार ३३) कटाकिया मंजुळा ३४) खोकाळे ३५ खोत ३६) खुटाळे ३८) कोठारी ४२) महाजन गजानन ४३ महाजन नारायण ४७) मेहता कुमुद रतिलाल ४८) मेहता कुमुद उमियाशंकर ४९) मुळे ५०) पंडित ५१) पंड्या ५२) परळकर ५४) पटेल कुमुद ५५) पटेल कुसुमबेन ५७) पाटील अनंत ५८) पाटील शामगोंडा ६० पटवर्धन ६३) सहजे ६५) सत्तिकर ६८) शाह मगनलाल ७०) शर्मा ७१) शेंडे ७४) शिंदे विनायक ७६) ठाकूर ७८) वैद्य नीलकंठ ८१) व्यास ८४) वाणी ८७) झाड.

पुणें केंद्र

१४४) भावसार १४७) चांडक १४८) चौधरी १४९) छत्रे शकुंतला १५१) डबीर १५४) देशपांडे मोहन १५८) गर्गे १६७) कावरे १६८) काळे शाम १६९) काळे उषा १७४) कुळकर्णी कॉ. ल. १७५) कुळकर्णी प्र. बा. १७६) कुळकर्णी रा. ग. १७७) महाजन माधव १८०) मुंगड १८१) नेहते १८२) पंडित यशवंत १८४) पाटील गोरखनाथ १८६) पेठे १८८) पुरंदरे वीणा १९१) रच्या १९३) शाह मधुकांता १९४) शेकदार शांता १९६) शिंगवी १९७) शिराळकर २०१) वैद्य अरिंजयकुमार २०२) वैद्य वामन २०४] वाटवे २०५] झिराळे.

अमळनेर
येथें आयुर्वेद सेवा संघाचीं नवीन सर्व प्रकारचीं औषधें मिळण्याचें ठिकाण—
श्रीकृष्ण वैद्य ॲंड ब्रदर्स
कुंभार टेक, अमळनेर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वाध्याय व...

१९५३ च्या १४ नोव्हेंबरपासून आयुर्वेद सेवा संघांतील वैद्यमंडळींनी रोज पहाटे ५॥ ते ६॥ सेवासंघाच्या जागेत जमून सटीक अष्टांगहृदयाचा व सुश्रुतसंहितेचा अभ्यास करण्याचा क्रम चालू ठेवला आहे.

आयुर्वेद सेवा संघाच्या या स्वाध्याय वर्गाचा प्रथम वार्षिक समारंभ रविवार तारीख २१।११।५४ रोजी सायंकाळीं ५ वाजतां सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहांत साजरा होणार आहे. त्याप्रसंगीं निखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलनाचे अध्यक्ष वैद्यरत्न पं. शिवशर्मा यांचे 'आयुर्वेदाची सद्यःस्थिति' या विषयावर व्याख्यान होणार आहे. त्या प्रसंगीं वैद्य व आयुर्वेदप्रेमी मंडळींनीं उपस्थित राहण्याची कृपा करावी अशी विनंति आहे.

--वैद्य बिंदुमाधव पंडित

वातविकार चिकित्सामंदिर

दादर येथें न. चिं. केळकर पथावरील वातविकार रुग्णालयांत महाराष्ट्र वैद्य संघाचा २७ वा धन्वतरी महोत्सव साजरा झाला. याला जोडून वातरोग्याच्या मेळावा भरविण्यांत आला होता. याप्रसंगीं वैद्यराज रामभाऊ भोगे यांचे 'वातविकारचिकित्सेंतील आयुर्वेदाचें महत्व' या विषयावर माहितीपूर्ण व्याख्यान झालें.

अभ्यंग व आयुर्वेदीय सूचिभरण

या रुग्णालयांत वातविकारावर अभ्यंग व सूचिकाभरण उपचार केले जातात.

कालांतक रस [देवधरशास्त्री]

प्राणाचार्य देवधरशास्त्री विशेषांकांत कालांतक रस या औषधाचा पाठ दिला आहे तो असाः— शुद्ध हिंगुळ २ भाग, मिरे, त्रिकटु, टंकणलाही, शुद्धगंधक १।१ भाग, लिंबाचे रसांत खल.

खोकला, दमा, सान्निपातिक संग्रहणी, अतिसार, अपस्मार, प्रमेह, अजीर्ण, अग्निमांद्य इ. वातकफात्मक विकारावर हा रस उपयुक्त आहे. प्लेगाच्या साथींत यांचा उपयोग करण्यांत आला होता. किंमत — २ रु. तोळा

अनुपान— आल्याचा रस व मध

आयुर्वेद सेवा संघ, नाशिक

आमच्याकडे 'आयुर्वेद सेवा संघा'चीं भल्लातकासव, कंदर्पवृष्यपाक, कुमारी आसव, व ग्राईप मिक्चर, एरंडेल, बालशूलार्क, इ. इतर सर्व प्रकारचीं औषधें, गुलकंद, मोरावळा, सरबतें मिळतील. मागणीप्रमाणें पुरवूं.

लिहाः मे. सोनार ब्रदर्स

पो. नरडाणे (प. खान्देश)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"अंध न निर्माण होतील"
असे प्रयत्न केले पाहिजेत

सोलापूर येथें सोमवार ता. १-११-५४ रोजीं ...त्र व दमा (श्वास) चिकित्सा शिबिराचा उद्घाटन ...रंभ डॉ. पी. डी. खानोलकर सि. सर्जन यांच्या ...हें झाला. ते म्हणाले 'अलीकडे अशीं वैद्यकीय यज्ञ- ...विरें काढण्याची प्रथा वाढत चालली आहे. वैद्य व ...क्टर मंडळींची प्रवृत्ति समाजसेवेकडे वाढत आहे ...पाहून मला आनन्द वाटतो. वैद्य व डॉक्टर मंड- ...ळीं आपआपल्यांतील अज्ञान व गैरसमज काढून ...करण्याचा प्रयत्न केल्यास भारताची वैद्यकीय क्षेत्रां- ...ल कीर्ति वाढीस लागेल. अंधांना उपचार करीत ...ण्यापेक्षांहि अंध न निर्माण होतील असे प्रयत्न ...ण केले पाहिजेत.'

———

...पूर्व आगमन ३१५
औषधी द्रव्यांची आयुर्वेदीय मांडणी ३१७
बी. सी. जी. मोहीम ३२१
नवें सदर उघडा ३२१
आयुर्वेदाच्या प्रगतींतील टप्पे ३२२
अध्यापकांचा सत्कार ३२३
अग्निकुमाररसाबद्दलचे स्वानुभव ३२७
आयुर्वेद अध्यापक चर्चा परिषद, नाशिक ३२९
धमार्थ दंतयज्ञ, मुंबई ३३९
दंतशूलावर कफनिर्हरण उपयुक्त ३४०
दंतवैद्य जायदे अमेरिकेला चालले ३४१
धन्वन्तरी महोत्सव, सांगली ३४२
नागपूर येथील धन्वन्तरी महोत्सव ३४३
डी ए. एस्. एफ्. पदवीपरीक्षा निर्णय ३४५

कामधेनूच्या आगमनानें वातावरण पवित्र झालें !

विजयादशमीच्या सुमुहूर्तावर आयुर्वेद सेवा संघांत एका सवत्स कपिला कामधेनूचें ...गमन झालें, हें शुभ वृत्त निवेदन करण्यास अत्यंत आनंद वाटतो. सेंट्रल पी. डब्ल्यू. डी. ...त्यातील एक अधिकारी श्री. कृ. ज. गोडबोले नाशिकहून दिल्ली येथें बदलून गेले. जाण्यापूर्वी त्यांनीं ...पल्या घरीं बाळगलेली सुंदर भडोच गाय, सेवा संघाचे मान्यवर मंत्री वैद्यराज वासुदेवराव मराठे ...या स्वाधीन केली. तीन वर्षांपूर्वी त्यांनीं ही गाय ३०१ रु. देऊन विकत घेतली होती.

आयुर्वेदीय औषधीकरणात गोमूत्र, गोमय, गोदुग्ध, गोदधि, गोतक्र, गोघृत या वस्तूंचा ...योग सर्वत्र सांगितला आहे. सेवा संघाच्या औषधांत वरील गव्य वस्तु कटाक्षानें वापरण्यांत ...यात अशी सूचना अनेक सेवासंघप्रेमी हितचिंतकांनीं केली आहे. सेवासंघ सेवकांचाहि प्रयत्न ... दृष्टीनें नेहमीं असतोच.

या कामधेनूच्या आगमनानें सेवासंघाचें सर्व वातावरण पवित्र बनून गेलें आहे. सेवा ...घाच्या चिकित्सा विभागांत ताज्या गोमूत्राचा वापर सुरूं झाला असून औषधीकरणासाठीं उत्तम ...घृत नित्य तयार होऊं लागलें आहे. अधिक जागेची सोय होतांच गोसेवा व आयुर्वेदसेवा या दोन्हीहि ...री येथें परस्पर पूरक अशा होत राहातील. या दृष्टीनें सेवा संघास कोणी जागा अगर जागे- ...ला द्रव्य, व मग उत्तम जातीच्या गाई, दान दिल्यास याचा स्वीकार सेवा संघ तत्परतेनें करील.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

HARDWAR DELY NOV.56

तीन श्रेष्ठ औषधें

शरीरजानां दोषाणां क्रमेण परमौषधम् । .... तथा तैलं घृतं मधु ॥

वात-पित्त-कफ ह्या दोषावर क्रमानें तिळतेल, गोघृत, व खात्रीचा (वर्गीकृत मध हीं श्रेष्ठ औषधें होत असें आयुर्वेदांत स्पष्ट शब्दांत सांगितलेलें आहे व आयुर्वेद सेवा संघ, नासिक या संस्थेनें ह्या औषधी निर्मळ व विश्वसनीय मिळण्याची व्यवस्था केली आहे

(१) तिळाचें उत्तम तेल

उत्तम तीळ आणून ते पाखडून निवडून त्याचें तेल आपल्या समक्ष गाळून त्या तेलाचा उपयोग सिद्ध तैलादि औषधीकरणांत केला जातो व शुद्ध तिळाचें तेल बाटल्यांत भरून सेवा संघानें तें विक्रीसहि ठेवलें आहे. किं. २० तो. १ रु.

(२) गाईचें ताजें तूप

सध्यांच्या काळांत खरें तूप मिळणें ही गोष्ट अत्यंत कठीण झालेली आहे. लोण्या तुपांत कांहीं प्रमाणांत 'वनस्पति' मिश्रित असणारच अशी भावना सर्वत्र पसरलेली आ अशा वेळीं गाईचें अगदीं ताजें तूप मिळणें म्हणजे एक सौभाग्याची गोष्ट आहे. आयुर्वे सेवा संघांतील गाईच्या ताज्या लोण्यापासून केलेलें गाईचें ताजें तूप मिळूं लागलें आ बटलीवर तारीख घालण्याची व्यवस्था केली आहे. किं. २॥ तोळे १० आणे.

(३) जांभळीचा मध, हिरड्याचा मध

महाबळेश्वर येथें सरकारी मधुकेंद्रांतून मिळणारा वर्गीकृत मध ग्राहकांना पुरविण्या व्यवस्था चालू आहे. जांभळीचा मध १५ तोळे १॥ रु. हिरड्याचा मध १५ तोळे २।

आयुर्वेद सेवा संघ, औषधी भवन, नासिक

संपादक व प्रकाशकः—वैद्य बिंदुमाधव पंडित, आयुर्वेद सेवा संघ, वैद्य चित्रलकर कारंजा, नाशि
मुद्रकः—श्री. चिं. ओक, सर्कल प्रेस, नासिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Compiled
1999-2000

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar